Ă'ddle-headed, A'ddle-brained, *aa.* (ॲ'डल्-हेडेड्, ॲ'डल्-ब्रेन्ड्)—confused in mind; unsound in brain. मूढ; मंदमति.

Addrĕss', *v. t.* (ॲड्रे'स्)—to direct in speech or writing; write directions for delivery on cover of letter, etc.; apply to. संबोधून बोलणें किंवा लिहिणें, मानपत्र देणें; पत्ता लिहिणें; योजणें, योजना करणें. *n.* speech delivered; manner; subscription of letter; place of residence. व्याख्यान, मानपत्र; ढब; पत्ता; वसतिस्थान. (*pl.*) Addresses=courtship. विवाहाकरितां प्रार्थना. To the address of=च्या पत्त्यावर.

Addrĕss'ee, *n.* (ॲ-ड्रे'सी)—person to whom letter etc. is addressed. ज्याला पत्र वगैरे उद्देशून लिहिलें असतें तो इसम.

Ăddūce', *v. t.* (ॲड्यू'स्)—assign, advance; cite as proof or instance. पुढें करणें, उपन्यास करणें; दुसऱ्या ग्रंथांतील आधार देणें. [L. *ad*, to & *ducere*, to bring]

Ăddū'cent, *a.* (ॲ-ड्यू'-सेन्ट्)—bringing forward or together. पुढें आणलेला.

Ăddū'cible, *a.* (ॲ-ड्यू'-सि-बल)—capable of being adduced. पुढें करतां येण्याजोगा.

Ăddŭct', *v. t.* (ॲ-ड'क्ट्)—(of muscles) draw to a common centre. स्नायु मध्यरेषेनजीक नेणें.

Ăddŭc'tion, *n.* (ॲ-ड'क्-शन्)—the act of adducting. शरीराचे अवयव शरीरांतील काल्पित मध्यरेषेमध्यें नेण्याची क्रिया.

Ăd'enoids, *n. pl.* (ॲ'डि-नॉ-इड्झ्)—small growths in the back part of the throat in children. घशाच्या पाठीमागच्या बाजूला झालेली ग्रंथीची वाढ.

Ădĕpt', *a.* (ॲडे'प्ट्)—thoroughly proficient. प्रवीण, वाकबगार. *n.* skilled person. निष्णात मनुष्य. [L. *ad.* to & *aptus*, fit]

Ăd'équacy̆, *n.* (ॲ'डि-क्व-सि)—state of being adequate, sufficiency. बरोबरी, योग्यता, सामर्थ्य.

Ăd'équāte, *a.* (ॲ'डि-क्वेट्)—sufficient, such as meets the case. पुरेसा, अनुरूप. [L. *ad*, to & *aequus*, equal]

Ăd'equātely̆, *adv.* (ॲ'डि-क्वेट्-लि)—proportionately, properly, in an adequate manner. पुरता, यथायोग्य, कामापुरतें.

Adhēre', *v. i.*(-h-, ॲड्-हि'अर्)—to stick fast to, to be attached; to remain firm. चिकटून राहणें. To *adhere* to one's promise = to keep one's promise. वचन पाळणें. Adher'er, *n.* [L. *ad*, to & *hoerere*, to stick]

Adhēr'ence, *n.* (ॲड्-हि'अ-रन्स्)—steady attachment, fidelity. दृढ आसक्ति, निष्ठा.

Adhēr'ent *n.* (ॲड्-हि'ओरेन्ट्)—a follower, a partisan, a supporter. अनुयायी, पक्षपाती, आश्रित, आश्रय करणारा, पक्षाभिमानी. *a.* sticking; due or incident to. चिकटून राहणारा; प्रासंगिक.

Adhē'sion, *n.* (-hēzhn, ॲड्-ही'झन्)—the act of adhering or sticking, attachment of the mind or feelings, concurrence. चिकटून असणें, अवलंबन, आसक्ति, एकनिष्ठा.

Adhē'sive, *a.* (ॲड्-ही'सिव्ह्)—sticking, sticky, tenacious. चिकट, चिकटणारा, चिकटून राहाणारा. Adhē'sively, *adv.* Adhē'siveness. *n.*

Ădhĭb'ĭt, *v. t.* (ॲड्-हि'-बिट्)—to apply; to affix (one's signature). कामास लावणें, उपयोगांत आणणें; सही करणें. Ădhĭbĭ'tion, *n.*

Ădĭăn'tum, *n.* (ॲ-डि-ॲ'न्-टम्)—kinds of fern, esp. the black maiden-hair. नेचा, सीतेचे केंस.

Adĭăph'orous, *a* (अ-डाय्-ॲ'-फोरस्)—indifferent; neither right nor wrong morally. उदासीन्; ज्याच्या योगानें पाप किंवा पुण्य लागत नाहीं असें.

Adieu', *int. & n.* (adū अ-ड्यू')—good-bye, farewell, an expression of kind wishes at parting. जातेवेळचा नमस्कार, निरोप देतेवेळचा आशीर्वाद. [L. *ad*, to & *deus*, God]

Ăd'ĭpōse, *a.* (ॲडिपोस्)—of fat, fatty. पुष्ट; चरबीनें युक्त, स्निग्ध. Ădĭpos'ĭty̆, *n.* [L. *adeps*, fat]

Ăd'it, *n.* (ॲ'-डिट्)—an approach, a horizontal entrance or passage. खाणींत जाण्याचा रस्ता.

Adjā'cency̆, *n.* (अड्जेसन्सि)—the state of being near. जवळ असणें, समीपता, सांनिध्य.

Ădjā'cent, *a.* (ॲड्-जे'सन्ट्)—lying near to, contiguous. जवळचा, लगतचा. [L. *ad*, to & *jacere*, to lie]

Ăd'jĕctīve, (ॲ'ड्-जेक्-टिव्ह्)—name of an attribute, added to a thing to describe it more fully. विशेषण. *a.* additional, not standing by itself. अधिक, परावलंबी. [L. *ad*, to & *jacere*, to throw]

Ăd'jĕctīval, *a.* (ॲ'ड्जेक्-टाइ-व्हल्)—of or pertaining to an adjective. विशेषणासंबंधीं.

Adjŏin', *v. t.* (ॲड्-जॉ'इन्)—be adjacent to. लगत किंवा शेजारीं असणें, जोडणें. [L. *ad*, to & *jungere*, to join]

Adjoin'ing, *a.* (ॲड्-जॉ'इ-निंग्)—joining to, near, adjacent. जवळचा, लगतचा, पडोशाचा.

Ădjourn', *v. t. & i.* (-jern, ॲड्-ज'र्न्)—put off till another time, defer. तहकूब करणें. [L. *ad*, to & *dies*, a day]

Ădjourn'mĕnt, *n.* (ॲड्-ज'र्न्-मेन्ट्)—the act of adjourning; the interval adjournment causes. दुसऱ्या दिवसाला ठेवणें, तहकुबी; तहकुबीचा काल.

Ădjudge', *v. t.* (ॲड्-ज'ज्)—pronounce judgement on; condemn; award (prize etc.). दंड ठरविणें, शिक्षा सांगणें, निवाडा करून देणें न्याय देणें; दोष ठेवणें; बक्षीस वगैरे देणें.

Adjŭdge'ment, *n.* (ॲड्-ज'ज्-मेन्ट्)—the act of adjudging, sentence. निवाडा, फैसला, शिक्षा.

Adjud'icate, *v. t. & i.* (-jōō- ॲड्-जू'डि-केट्)—to pronounce judicially upon. निवाडा करणें. [L. *ad*, to & *judicare*, to judge]

Adju'dĭcā''tion, *n.* (-jōō-, ॲड्-जू'डि-के''शन्)—adjudgement. निवाडा, फैसला, निर्णय, शिक्षा. Ădju'dĭcātive, *a.*

Adju'dĭcātor, *n.* (ॲड्-जू'डि-केटर्)—one who adjudicates or adjudges. चौकशी करून निवाडा सांगणारा.

Ad'jŭnct, *n.* (ॲ'ड्-जंक्ट्)—subordinate or incidental thing, accompaniment; amplification of subject, predicate, etc. आनुषंगिक विषय; बरोबर असणारा; कर्ता, क्रियापद, इत्यादिकांबरोबर जाणारे शब्द. *a.* united with, immediately consequent. आनुषंगिक, अनुयोगी. [L. *ad*, to & *jungere*, to join]

Adjunc'tive, *a.* (ॲड्-जं'क्-टिव्ह्)—forming an adjunct; added; contributory. जोडणारा; जोडलेला; साहाय्यकारी. Adjunc'tively̆, *adv.*

Ăd'jurătion, *n.* (-jōō-, ॲ'ड्जू-रेशन्)—act of charging solemnly; form of oath. शपथ घालणें; शपथ. [L. *ad*, to & *jurare*, to swear]

Ădjure', *v. t.* (jōō-, ॲड्-जू'र्)—charge or request solemnly or earnestly. शपथ घालणें; शपथ घालून सांगणें. Adju'rer, *n.*

Adjŭst', *v. t.* (ॲड्-जस्ट्)—arrange, fix or set rightly, put in order; harmonize; adapt.

व्यवस्था करणें; ऐक्य करणें; सोईचें करून घेणें.
Ădju'stăble, *a.* [L *ad*, to & *justus*, right]

Adjŭst'ment, *n.* (ॲड्-जस्ट्-मेन्ट्)—a setting in order, arrangement; regulation; settlement. बंदोबस्त; व्यवस्था; तडजोड.

Ădjū'tage, *n.* (ॲड्-ज्यू-टेज्)—mouthpiece of an artificial fountain. कृत्रिम कारंजाचें तोंड.

Ăd'jūtancy, *n.* (ॲड्-ज्यू-टन्सि)—the office of an adjutant. एका लष्करी कामगाराचा हुद्दा.

Ăd'jutant, *n.* (-jōō-, ॲड्-जू-टन्ट्)—an army officer; assisting superior by communicating orders, conducting correspondence, etc.; a gigantic Indian stork. सैन्यांतील एक अधिकारी (याचें काम फक्त सेनानायकास आलेल्या बातम्या पोंचविणें व सेनानायकाकडून झालेल्या आज्ञा ज्याच्या त्यास कळविणें हें आहे); एक जातीचा पक्षी. [L. *ad*, to & *juvare*, to assist]

Ad'jutant-general, *n.* (ॲड्-जू-टन्ट्-जन-रल्)—the executive officer of the commander-in-chief. सेनाधिपतीचा मदतगार.

Ădmea'sure, *v. t.* (-zher, ॲड्-मेझर्)—apportion, assign in due shares. क्षेत्र मोजणें, माप घेणें. [L. *ad*, & *measura*, a measure]

Ădmea'surement, *n.* (ॲड्-मेझर्-मेन्ट्)—comparison, dimensions. तुलना, क्षेत्रफळ, क्षेत्रमापन.

Admĭn'ĭster, *v. t.* & *i.* (ॲड्-मिं-निस्टर्)—manage (affairs, estate, etc.); dispense, supply, furnish, give. वहिवाट करणें; वांटणें, देणें. To administer to one's necessities=to contribute to one's necessities. गरज भागविणें. [L. *ad*, & *ministrare*, to minister]

Admĭnĭstrā'tion, *n.* (ॲड्मिनिस्ट्रेशन्)—act of administering; the ministry, Government. देणें, वहिवाट करणें; प्रधानमंडळ, सरकार. Letters of Administration=authority to administer estate of an intestate. वहिवाट चालविण्याची सनद.

Ădmi'nistrătive, *a.* (ॲड्-मिं निस्-ट्रे-टिव्ह्)—pertaining to management of affairs; executive. कारभाराविषयींचा; विधायक, कार्यात्मक.

Ădmĭnĭstrā'tor, *n.* (ॲड्-मि-निस्ट्रे टर्)—a man that manages an intestate estate. वहिवाटदार, व्यवस्था पाहणारा.

Ădmĭnĭstrăt'orship, *n.* (ॲड्-मि-निस्-ट्रे-टर्-शिप्)—the office of an administrator. वहिवाटदाराचा हुद्दा, वहिवाट.

Admĭnĭstrăt'rix, *n.* (ॲड्-मिनिस्-ट्रे ट्रिक्स्)—a woman that administers. कारभार पाहणारी स्त्री, वहिवाटदारीण. (*pl.*-trīces, ॲड्-मिनिस्-ट्रे-ट्राइसेज्)

Ăd'mĭrāble, *a.* (ॲड्-मि-रेबल्)—surprisingly good, worthy of admiration; excellent. आश्चर्यकारक; उत्कृष्ट. Ad'mirāblenoss, *n.* [L. *ad*, at & *mirari*, to wonder]

Ăd'mĭrābly̆, *adv.* (ॲड्-मि-रेब्-लि)—wonderfully, excellently, exceedingly well. उत्तम रीतीनें, फार चांगलें, उत्कृष्ट.

Ăd'mĭral, *n.* (ॲड्-मि-रल्)—commander-in-chief of the navy, naval officer; ship carrying the admiral. आरमारावरील अधिकारी; ॲड्मिरल असलेलें जहाज.

Ăd'miralship, *n.* (ॲड्-मि-रल्-शिप्)—the office or power of an admiral. ॲड्मिरलचा हुद्दा किंवा अधिकार.

Ăd'mĭralty̆, *n.* (ॲड्-मि-रल्टि)—office of admiral; branch of the executive that superintends the navy. आरमारावरील अधिकाऱ्याचा हुद्दा; आरमारावरील मुख्य अधिकार चालविणाऱ्या मंडळीची शाखा

Admĭrā'tion, *n.* (ॲड्-मि-रे शन्)—astonishment, wonder, amazement, surprise; delight in the contemplation of something beautiful. नवल, आश्चर्य, चमत्कार; मौज, कौतुक. *The admiration of*=admired by. प्रशंसलेले. *Note of admiration*=आश्चर्यदर्शक चिन्ह (!).

Admīre', *v. t.* (ॲड्-माय़र्)—approve warmly of; look with pleasure and wonder at. कौतुक करणें; सानंदाश्चर्यानें पाहणें.

Admīr'er, *n.* (ॲड्-मायरर्)—one who admires; a lover. गुण गाणारा, कौतुक करणारा; प्रणयी, प्रेम दाखविणारा.

Ădmīr'ingly̆, *adv.* (ॲड्-मार्-रिंग्-लि)—with admiration. कौतुकानें, सानंदाश्चर्यानें.

Ădmĭss'ĭbĭl''ĭty̆, *n.* (ॲड्-मिं-सि-बि-लि-टि)—quality of being admissible. ग्राह्यता.

Admĭss'ĭble, *a.* (ॲड्-मिं सि-बल्)—capable of being admitted or allowed. येऊं देण्याजोगा, प्रतिग्राह्य. [L. *ad*, to & *mittere*, to send]

Admĭ'ssion, *n.* (ॲड्-मि शन्)—act of admitting; fee for admitting; acknowledgment of error, etc. आंत येऊं देणें; प्रवेश फी; स्वीकार.

Admĭt', *v. t.* & *i.* (ॲड्-मिट्)—let in; allow entrance of; accept as valid; acknowledge. आंत येऊं देणें; मान्य करणें. *To admit of*=to leave room for (doubt, improvement). योग्यता किंवा शक्ति असणें. [L. *ad*, to & *mittere*, to send]

Ădmitt'āble, *a.* (ॲड्-मिं-टे-बल्)—capable of being admitted or allowed. येऊं देण्याजोगा, प्रतिग्राह्य.

Admit'tance, *n.* (ॲड्-मिं-टन्स्)—act or power of entering; entrance. प्रवेश; प्रवेश करण्यास मोकळीक.

Admitt'edly̆, *adv.* (ॲड्-मिं टेड्-लि)—confessedly, by admission or concession. प्रतिज्ञात अशा रीतीनें, कबूल केल्यावरून.

Admĭx', *v. t.* (ॲड्-मि'क्स्)—add as ingredient to, mingle with something else. मिश्रण करणें, मिसळणें. [L. *ad*, to & *mixtum*, to mix]

Ădmix'ture, *n.* (ॲड् मि'क्स्-चर्)—what is added to the chief ingredient of a mixture. मिश्रण, मिसळ, मिश्रित केलेला पदार्थ.

Admŏn'ish, *v. t.* (ॲड्-मॉ'निश्)—exhort, warn counsel against, remind; reprove. कान उघडणें; ताकीद देणें; खरडपट्टी काढणें. Admonishment, *n.* [L. *ad*, to & *monere*, to warn]

Admŏni'tion, *n.* (ॲड्-मॉ नि'शन्)—instruction, caution, warning; gentle or solemn reproof. ताकीद; शब्दांचा मार, कान उघाडणी.

Ădmo'nitorў, *a.* (ॲड्-मॉ'-नि-टरि)—containing admonition. सूचनापर, उपदेशपर.

Ado', *n.* (*adōō*, अ-डू')—fuss; labour, pains, difficulty. गोंधळ; उपद्व्याप, दगदग, खटाटोप. *With much ado*=with great fuss. मारून-मुटकून, मोठ्या प्रयासानें. *To make much ado about nothing*=अवडंबर माजविणें; डोंगर पोखरून उंदीर काढणें.

Adō'bė, *n.* (ॲ-डो'बि)—unburnt brick dried in the sun. कच्ची उन्हांत वाळलेली वीट.

Ădolĕs'cence,-ncy, *nn.* (ॲड्-ओ-ले'-सेन्स्, ०सि)—state of growing; the period of ripening, youth. वाढती दशा; ज्वानी. [L. *ad*, & *olescere*, to grow]

Ădolĕs'cent, *a.* (ॲ-डो-ले'सेन्ट्)—between childhood and manhood. वाढता, चढत्या वयाचा. *n.* an adolescent person. जवान, तरुण, तरणाबांड.

Adō'nĭs, *n.* (ॲ-डो'निस्)—a beautiful youth loved by venus; beau, dandy. मदनासारखा सुंदर पुरुष; नखरेबाज मनुष्य.

Ăd'onīze, *v. t. & i.* (ॲ'डोनाइझ्)—deck out the person, adorn; adorn oneself. छान-छोकी करणें, शृंगारणें; डामडौल करणें.

Adŏpt', *v. t.* (अ-डॉ'प्ट्)—take as one's child; take another's idea; choose (profession etc.). दत्तक घेणें; दुसऱ्याची कल्पना घेणें; स्वीकारणें. [L. *ad*, to & *optare*, to choose]

Adopt'āble, *a.* (अ-डॉ'प्टे-बल्)—capable of or fit for being adopted. दत्तक घेण्यास योग्य, स्वीकारण्यास लायक.

Adŏp'tion, *n.* (अ-डॉ'प्शन)—the act of adpoting. मांडीवर घेणें, दत्तक घेणें; स्वीकारणें.

Adŏpt'ĭve, *a.* (ॲ-डॉ'प्टिव्ह्)—due to adoption; apt to adopt. दत्तक घेणारा; स्वीकारण्याला योग्य.

Adŏr'able, *a.* (अ-डो'अरे-बल्)—worthy of love, deserving the utmost love and admiration. आदरणीय, पूज्य. Ador'ableness, *n.*

Ador'ably, *adv.* (अ-डो'अरब्-लि)—in a manner worthy of adoration. पूज्यतापूर्वक, आदरणीयतेनें.

Adorā'tion, *n.* (ॲ-डोअ-रे'शन्)—homage; worship. वंदन; पूजा, आराधना.

Adōre', *v. t.* (अ-डो'अर्)—regard with deep respect and affection; worship; pay divine honours to. अत्यंत प्रीति करणें, स्नेहयुक्त आदर असणें; पूजा करणें, भजणें. [L. *ad*, to & *orare*, to pray]

Adōr'er, *n.* (अ-डो'अरर्)—an admirer; lover. प्रशंसा करणारा, भक्त, आराधक; प्रीति करणारा.

Ado'ringly, *adv.* (अ-डो'अ-रिंग्-लि)—with adoration. पूज्य बुद्धीनें, भक्तिपूर्वक.

Adŏrn', *v. t.* (अ-डॉ'र्न्)—deck with ornaments; be an ornament to. भूषविणें; सुशोभित करणें. [L. *ad*, to & *ornare*, Sk. वर्ण्, to deck]

Adŏrn'mĕnt, *n.* (अ-डॉ'र्न्-मेन्ट्)—ornament, decoration, embellishment. भूषण, भूषविणें, शोभा, सुशोभित करणें.

Adown', *prep.* (अ-डा'उन्)—from a higher to a lower part of, down; downwards along. वरून खालीं; उतरत. *adv.* on the ground, at the bottom. जमिनीवर, खालीं.

Adrē'nal, *a.* (ॲ-ड्री'नल्)—near the kidney. मूत्रपिंडाजवळ. *n.* suprarenal capsule. मूत्र-पिंडावरील कोश किंवा पिशवी.

Adrē'nalin. *n.* (ॲ-ड्री'-न-लिन्)—a secretion of the adrenal ductless glands extracted from *animals for medicinal use.* मूत्रपिंडाजवळील ग्रंथींचा स्राव.

Adrĭft', *adv.* (अ-ड्रि'फ्ट्)—in a drifting state; at the mercy of wind and tide or of circumstances. वाहता; वाऱ्याच्या आणि *लाटांच्या पूर्ण स्वाधीन असलेला,* परिस्थितीच्या आधीन. To be adrift=तरंगणें, वहावणें, इतस्ततः जाणें. To cast adrift=प्रवाहाधीन करणें, वाऱ्यावर टाकणें. To get adrift = प्रवाहांत पडणें, वाऱ्यावर पसरणें.

Adrŏĭt', *a.* (अ-ड्रॉ'इट्)—dexterous, skilful. कुशल, पटाईत. Adroit'ly, *adv.* कुशलतेनें. [L. *a.*, to, & *directus*, straight]

Adroit'ness, *n.* (अ-ड्रॉ'इट्-नेस्)—dexterity, skill. हुशारी, चलाखी, कौशल्य.

Adrў', *pred. a.* & *adv.* (अ-ड्रा'य्)—thirsty, in want of drink, athirst. तहानेलेला.

Adsciti'tious. *a.* (-sĭtĭ'shŭs, ॲड्-सि-टि'-शस्)—added from without, additional; supplemental. पूरणार्थ बाहेरून आंत घेतलेला; पुरवणीचा, पूरक. [L. *ad*, to & *sciscere*, to inquire]

Ădstrĭc'tion. *n.* (ॲड्-स्ट्रि'क्-शन्)—a binding fast; costiveness. घट्ट धरणें; बद्धकोष्ठ, मलावरोध.

Ăd'ūlāte, *v. t.* (ॲ'ड्यूलेट्)—flatter basely. हांजी हांजी करणें. [L. *adulari*, to flatter]

Ăd'ūlātion, *n.* (ॲ'ड्युलेशन्)—excessive flattery. हांजी हांजी, खुशामत.

Ad ūlātor, *n.* (ॲ'-ड्यु-ले-टर्)—a flatterer. खुशामत्या, अवास्तव स्तुति करणारा.

Ad'ūlātorў, *a.* (ॲ'-ड्यु-ले-टरि)—flattering, excessively or servilely praising. खुशामतीचा.

Adŭlt', *a*, (ॲ-ड'ल्ट्)—grown up; mature. वयांत आलेला; प्रौढ. *n.* a grown-up person. वयांत आलेला मनुष्य. To become adult= वयांत येणें. Adult'ness, *n.* [L. *ad*, to & *alere*, to nourish]

Adŭl'terant, *a.* (ॲ-ड'ल्ट-रन्ट्)—used in adulterating. मिसळण्यांत आलेली. *n.* a thing employed in adulterating. हलक्या जातीची मिसळविण्याची वस्तु.

Adŭl'terāte, *v. t.* (ॲ-ड'ल्टरेट्)—falsify by *mixing with baser ingredients.* वाईट द्रव्यें मिसळणें. *a.* spurious, counterfeit; stained by adultery. बनावट; मिश्रणानें बिघडलेला. [L. *ad*, to & *alter*, another]

Adŭlterā'tion, *n.* (ॲ-डल्टरे'शन्)—the act of adulterating. भेळ, मिसळ, मिश्रण, अशुद्धीकरण.

Adŭl'terer, *n.* (ॲ-ड'ल्टरर्)—a man *guilty* of adultery. व्यभिचार करणारा.

Adŭl'terĕss, *n.* (ॲ-ड'ल्टरेस्)—a woman guilty of adultery. व्यभिचार करणारी स्त्री.

Adŭl'terīne, *a.* (ॲ-ड'ल्ट-राइन)—of adultery; adulterated, spurious. व्यभिचारापासून झालेली, अनौरस; भेसळलेला, बनावट.

Adŭl'terous, *a.* (ॲ-ड'ल्टरस्)—guilty of adultery. व्यभिचारी, बाहेरख्याली. Adul'terouly, *adv.*

Adŭl'terў, *n.* (ॲ-ड'ल्टरि)—sexual intercourse of man with woman not his wife, either or both being married. व्यभिचार, जारकर्म, परस्त्र्यागमन.

Adŭ'mbral, *a.* (ॲ-ड'म्ब्रल्)—overshadowing, shady. छाया पाडणारा, छायामय. [L. *ad*, & *umbra*, shade]

Adŭ'mbrant, adŭ'mbrative, *aa.* (ॲ-ड'म्ब्रन्ट्, ॲ-ड'म्ब्रेटिव्ह्)—adumbrating or giving a faint shadow. अल्पछायायुक्त, दिग्दर्शन करणारा.

Adŭm'brāte, *v. t.* (ॲ-ड'म्ब्रेट्)—sketch in outline; indicate faintly; foreshadow. प्रतिच्छाया काढणें; दिग्दर्शन करणें, झांक दाखविणें; पूर्वचिन्ह दर्शविणें.

Ădŭmbrā'tion, *n.* (ॲ-डम्-ब्रे'-शन्)—matter shadowed out; a faint sketch, an imperfect representation. छाया, प्रतिबिंब; अल्पवर्णन; पडच्छाया. [L. *ad*, to & *umbra*, a shadow]

Adŭnc'ous, *a.* (ॲ-ड'ङ्-कस्)—hooked, bent or made in the form of a hook. वांकविलेला, आंकडीच्या आकारासारखा केलेला.

Adŭst', *a.* (अ-ड'स्ट्)—parched; sun-burnt. रुक्ष, रखरखीत; उन्हानें जळून गेलेलें. [L. *ad*, to & *urere*, to burn]

Advānce', *v. t.* & *i.* (ॲड्-व्हां'न्स्)—move or put forward; help on; make claim; hasten event; lend money; raise price. पुढें जाणें, पुढें करणें, प्रतिपादणें; मदत करून उत्तेजन देणें; हक्क सांगणें; जलदीनें घडवून आणणें; उसनें देणें; किंमत वाढविणें. *n.* going forward, progress; overture; rise in price; loan. पुढें जाणें, प्रगति; प्रस्ताव, उपन्यास; किंमतींत वाढ; उसनवारी कर्ज. In advance=beforehand, before an equivalent is received. आगाऊ. Advanc'er, *n.*

Advān'ced, *a.* (ॲड्-व्हा'न्स्ड्)—in the front rank; improved; far on in progress, ahead of the times. अग्रभागीं असलेला; सुधारलेला; पुढें सरसावलेला.

Advance'mĕnt, *n.* (ॲड्-व्हा'न्स्-मेन्ट्)—moving forward; improvement; promotion. पुढें जाणें; सुधारणा; बढती.

Advan tāge, *n.* (ॲड्-व्हा'न्टेज्)—superiority over, stronger position, gain; favourable circumstance. वर्चस्व; लाभ; गोटीची अनुकूलता; सुसंधि. To have the advantage of=to have a better position than. स्थिति अधिक चांगली असणें, अधिक होणें. (*E. g.* You have the advantage of me, i. e. you know me and I do not know you). To gain *an advantage over=to* acquire a better position than. जिंकणें, पाणी पाजणें. To take advantage of=to avail oneself of (a circumstance); to overreach (a person). °चा फायदा घेणें, संधि साधणें, °चा उपयोग करून घेणें; उलटून फसवणें. To take a person at advantage=to take a person by surprise. एखाद्याला अनपेक्षित गांठणें. To be seen or heard to advantage=to be seen or heard in a way to exhibit the merits. खुलून दिसणें, विशेष शोभा येणें. To show or act to advantage=to beautify. शोभवणें. Advantage and disadvantage=लाभालाभ, हिताहित. *v. t.* to be an advantage to; to help, profit. उपयोग होणें; नफा किंवा फायदा करणें.

Advantā'geous, *a.* (-jŭs, ॲड्-व्हान्टे'जस्)—giving advantage; beneficial to. सोयीचा; फायदेशीर, हितावह. Advanta'geously, *adv.* Advanta'geousness, *n.*

Ăd'vĕnt, *n.* (ॲड्'व्हेन्ट्)—coming of an important *person or event.* आगमन; घडून येणें, आरंभ, सुरुवात. [L. *ad*, to & *venire*, to come]

Ădvĕnti'tious, *a.* (ॲड्-व्हेन्टि'-शस्)—accidental, casual; foreign. आकस्मिक, आगंतुक; बाहेरचा, परकी, परदेशाचा.

Ădvĕn'ture, *n.* (ॲड्-व्हें'-चर्)—daring enterprise, hazardous deed; unexpected experience or incidents. साहस, धाडस, धोक्याचें काम; धाडसाच्या गोष्टी, विलक्षण गोष्ट. *v. t. & i.* to risk, venture. धोक्यांत घालणें; साहस करणें.

Ădvĕn'turer, *n.* (ॲड्-व्हें'-चरर्)—one who seeks adventures; speculator; one who lives by his wits. साहसी; उलाढाली करणारा; स्वतःच्या बुद्धीवर उपजीविका करणारा. Adven'turess, *n.f.*

Ădvĕn'turous, *a.* (ॲड्-व्हें'चरस्)—enterprising, venturesome. साहसी, उलाढाल्या, अचाट काम करणारा. Adven'turously, *adv.*

Ăd'vĕrb, *n.* (ॲ'ड्-व्हर्ब्)—word qualifying an adjective, verb, or adverb. क्रियाविशेषण (अव्यय). [L. *ad*, to & *verbum*, a word]

Ădvĕrb'ial, *a.* (ॲड्-व्ह'र्बि-अल्)—relating to or like an adverb. क्रियाविशेषणासंबंधीं, क्रियाविशेषणाच्या अर्थाचा. Adverb'ially, *adv.*

Ăd'versarў, *n.* (ॲ'ड्-व्हर्सरि)—an antagonist, an enemy, a foe. सामनेवाला, प्रतिपक्षी, शत्रु.

Ădversā'tĭve, *a.* (ॲड्-व्हर्से'-टिव्ह्)—expressing opposition or antithesis. विरोधदर्शक, पक्षांतरबोधक.

Ăd'vĕrse, *a.* (ॲ'ड्-व्हर्स्)—opposed, inimical, hostile; turned against, placed opposite. विरुद्ध, प्रतिकूल; विरुद्ध असलेला. Adverse'ly, *adv.* [L. *ad*, to & *vetere*, to turn]

Ăd'versenĕss, *n.* (ॲ'ड्-व्हर्स्-नेस्)—adverse circumstances. विरोध, विपरीतता, प्रातिकूल्य.

Advers'ity, *n.* (ॲड्-व्ह'र्सिटि)—trouble; misfortune. संकट, विपत्ति.

Advĕrt', *v. i.* (ॲड्-व्ह'र्ट्)—refer or allude to. (संबंधानें) उल्लेख करणें, सुचविणें. [L. *ad*, to & *vetere*, to turn]

Ădvert'ence, Ădvert'ency, *nn.* (ॲड्-व्ह'र्-टेन्स्, °टेन्सि)—attention, regard, consideration, heedfulness. अवधान, ध्यान, लक्ष, अनुसंधान.

Ădvert'ent *a.* (ॲड्-व्ह'र्टेन्ट्)—attentive, heedful. सावधान, लक्ष असलेला.

Ăd'vertīse, *v. t. & i.* (-z-, ॲ'ड्-व्हर्टाइझ्)—give public notice of by placards, announce in newspapers etc., to notify. जाहीर किंवा प्रसिद्ध करणें, डांगोरा पिटवणें. Advertis'er, *n.* Advertis'ing, *a.*

Ădvĕr'tisemĕnt, *n.* (-z-, ॲड्-व्ह'र्टिझ्-मेन्ट्)—a public notice. जाहिरात, जाहीरनामा, प्रसिद्धीकरण.

Advīce', *n.* (ॲड्-व्हा'इस्)—opinion given as to future action; information. उपदेश; मसलत, सल्ला, खबर. (*pl.*) notice of dispatch of goods; communications from a distance. माल पाठविल्याबद्दल सूचना; दुरून पत्रव्यवहार. Commercial advice, Letter of advice= सूचनापत्र.

Advī'sāble, *a.* (-z-,ॲड्-व्हा'यू-झेबल्)—expedient, prudent, desirable, judicious. उचित; इष्ट, न्याय्य.

Advīse', *v. t. & i.* (-z-,ॲड्-व्हा'इझ्)—give advice to; take counsel with; annouce consignment; notify. उपदेश करणें; सल्ला घेणें; माल पाठविल्याचें कळविणें; जाहीर करणें. [L. *ad*, to & *vides*, I see]

Ădvīsābĭ'lĭtў, *n.* (ॲड्-व्हाय्-झॅ-बि'-लिटि)—quality of being advisable, desirability, fitness. इष्टता, योग्यता, लायकी.

Advīsed' *a.* (ॲड्-व्हा'इझ्ड्)—considered, done with advice, deliberate; judicious. बुद्धिपुरःसर; विचारानें हातीं घेतलेलें (कृत्य), योग्य.

Advī'sĕdlў, *adv.* (ॲड्-व्हा'यू-झेड्-लि)—deliberately, purposely, with intention; judiciously. जाणूनबुजून; विचारपूर्वक.

Advī'sorў, *a.* (ॲड्-व्हा'यू-झरि)—giving advice, consisting in giving advice. सल्ला देणारा, सल्ला देण्याची शक्ति असलेला; उपदेशपर.

Ăd'vocacў, *n.* (ॲ'ड्-व्हो-कसि)—support or recommendation of policy, etc. वकिली, पक्षसमर्थन, कैवार. [L. *ad*, to & *vocare*, to call]

Ăd'vocāte, *n.* (ॲ'ड्-व्हो-केट्)—one who pleads for another; professional pleader; one who supports a policy, etc. दुसऱ्याचे वतीनें बोलणारा; वकील; पक्षसमर्थक. *v. t.* to plead for another. वकिली करणें, कैवार घेणें, बाजू उचलून धरणें.

Advows'on, *n.* (-z-, ॲड्-व्हा'उ-झन्)—right of presentation to a benefice. इंग्लंडांतील सरकारी धर्मखात्यांत धर्मोपदेशकाच्या जागेची नेमणूक करण्याचा हक्क. [L. *advocatus*, a patron]

Ăd'ўtum, *n.* (pl. *-ta*, ॲडिटम्)—innermost part of temple; private chamber, sanctum. देवळाचा गाभारा; पवित्र स्थान, एकांत खोली. [L. *a*, not & *dyein*, to enter]

Ădze, *n.* (ॲड्झ्)—kind of axe with arched blade. तासणी, वाकस. To cut with an adze=तासणें. Work done with an adze= तासकाम.

Ae'dīle, *n.* (ई'डाइल्)—Roman magistrate who superintended public works, police, etc. प्राचीन रोम शहरांतील इमारती, मार्केटें वगैरे वरचा वरिष्ठ प्रतीचा कोतवाल किंवा मॅजिस्ट्रेट.

Ae'ger, *n.* (ēj-, ई'जर्)—note certifying that student is ill. विद्यार्थी आजारी असल्याबद्दल दाखला.

Ae'gĭs, *n.* (ई'जिस्)—shield of Zeus or Athena; protection, impregnable defence. ग्रीक लोकांच्या मुख्य देवतेची ढाल; रक्षण, परित्राण.

Aegrō'tăt, *n.* (ई-ग्रो'टॅट्)—certificate that student is *too ill to attend* examination, etc.

आजारीपणामुळें हजर राहतां येत नाहीं असा वैद्यानें दिलेला दाखला.

Aeō'lian, *a.* (ई-ओ'लि-अन्)—of Aeolus, god of winds. वायुदेवता ईओलिससंबंधी. *Aeolian harp*=instrument giving sounds on exposure to wind. एक प्रकारचें तंतुवाद्य.

Ae'on, E'on, *n.* (ई'ऑन्)—a long indefinite space of time, immense time. फार कालावधि.

A'erāte, *v. t.* (ए'अरेट्)—expose to the action of air; charge with carbonic acid gas. हवेनें शुद्ध करणें, वायु घालणें; कॅर्बानिक ॲसिड गॅस भरणें. Aerated water=soda-water, lemonade, etc. कॅर्बानिक ॲसिडयुक्त पेय, सोडावॉटर वगैरे.

Āer'ĭal, *a.* (एई'-रिअल्)—of air, gaseous; ethereal; existing in the air. वायुसंबंधीं; अंतरिक्षांतील; हवेंत असलेला.

A'erie, Aer'ȳ, *n.* (ए'अरि, आ'यरि)—nest of bird that builds high up; dwelling perched high up. उंच स्थानीं बांधलेलें घरटें; उच्च स्थानीं बांधलेलें राहण्याचें ठिकाण. [L. *aer*, air]

A'erĭfōrm, *a.* (ए'अ-रि-फॉर्म्)—having the nature or of the form of air, gaseous; unsubstantial. वायुरूपी; निःसत्त्व, पोकळ.

Āerobăt'ĭcs, *n. pl.* (ए-अरो-बॅ'टिक्स्)—feats of expert aviation. आकाशयानांतून केलेलीं अचाट कामें.

Āero'drōme, *n.* (एअरो'ड्रोम्)—aviation ground, ground for aviating airships, &c. आकाशयानांकरितां मुद्दाम तयार केलेली जागा किंवा पटांगण.

Āe'rolīte,-lĭth, *n.* (ए'-अरो-लाइट्, ए'-अरो-लिथ्)—meteorite. आकाशांतून पडलेला दगड, उल्का. [Gr. *aer*, air, & *lithos*, a stone]

Āerodȳnăm'ĭcs, *n. pl.* (ए-अरो-डाय्-नॅ'मिक्स्)—the physics of gases in motion. वायुगतिशास्त्र. [Gr. *aer*, air, & *dynamis*, power]

Ā'eronaut, *n.* (ए'अरो-नॉट्)—aerial navigator. विमानांत बसून आकाशांत फिरणारा, वैमानिक.

Āeronau'tĭc,-ĭcal, *aa.* (ए-अरो-नॉ'टिक्, °टि-कल्)—about aerial navigator. वैमानिकासंबंधीं.

Āeronau'tĭcs, *n.* (ए-अरो-नॉ'टिक्स्)—the science or art of aerial navigation. विमानशास्त्र.

Ā'eroplāne, *n.* (ए'अरो-प्लेन्)—a flying machine heavier than air using planes. विमान.

Ā'erostăt, *n.* (ए'अरो-स्टॅट्)—a balloonist, aviator. वैमानिक.

Āerostăt'ĭcs, *n. pl.* (ए-अरो-स्टॅ'टिक्स्)—physics of gases in equilibrium; science of air navigation. वायुस्थितिशास्त्र; विमानशास्त्र.

Aesthĕt'ĭc,-tĭcal, *aa.* (ईस्थे'टिक्,-°कल्)—concerned with or in accordance with appreciation of the beautiful. सुंदर वस्तूंच्या गुणग्राहकतेसंबंधीं, सौंदर्यविज्ञानशास्त्राविषयीं.

Aesthĕt'ĭcs, *n.* (ईस्थे'टिक्स्)—the science of the beautiful. सौंदर्यविज्ञानशास्त्र.

Aesthĕt'ĭcĭsm, *n.* (ईस्-थे'-टि-सिझम्)—the principles of good taste, doctrines of aesthetics. सौंदर्यविज्ञानशास्त्राचीं तत्त्वें.

Aes'thēte, *n.* (ई'स्थीट्)—professed appreciator of the beautiful. सौंदर्यविज्ञानशास्त्रज्ञ.

Aes'tĭval, Estĭ'val, *a.* (ए'स्-टि-व्हल् or ई-स्टा'य्-व्हल्)—belonging to summer, appearing in summer. उन्हाळ्यांतील.

Aetĭŏl'ŏgȳ, *n.* (ई-टि-ऑ'लॉ-जि)—the doctrine of causation; assignment of a cause or reason. कारणविज्ञानशास्त्र; कारणनिर्देश. Aetiolog'ical, *a.* [Gr. *aitia*, cause, & *logos*, discourse]

Afăr', *adv.* (अ-फा'र्)—at a distance. लांब, दूर.

Ăffabĭl'ĭtȳ, *n.* (ॲ-फ-बि'लिटि)—readiness to converse; civility. सौजन्य; सभ्यता. [L. *ad*, to & *fari*, to speak]

Ăf'fāble, *a.* (ॲ'फे-बल्)—easy of address; courteous. तोंडाचा गोड, मनमिळाऊ, बोलूनचालून भला; सुजन, सभ्य.

Affair', *n.* (अ-फे'अर्)—business, concern, matter. काम, धंदा, व्यवहार, प्रकरण, विशेष काम. [L. *ad*, & *facere*, to do]

Affĕct', *v. t.* (ॲ-फे'क्ट्)—produce an effect on; pose, pretend; move, touch the feelings. परिणाम करणें; ढोंग करणें; गहिंवर येणें; मनावर परिणाम करणें, कळवळणें.

Ăffectā'tion, *n.* (ॲ-फेक्टे'शन्)—artificial manner; pretentious or studied display, pretence. तोरा; स्तोम, ढोंग.

Affĕct'ed, *a.* (अ-फे'क्टिड्)—disposed; full of affectation; moved, touched. परिणाम झालेला; ढोंगाचा, वरपांगी; कंठ भरून आलेला, सद्गदित. To be affected=कंठ दाटून येणें.

Affĕc'tion, *n.* (अ-फे'क्शन्)—goodwill, love; malady, disease. कृपाकटाक्ष, प्रेम; रोग, विकार. To pretend great *affection* for=गळ्यांत गळा घालणें. A gouty *affection*=वातविकार. *Affection* of the lungs=फुफ्फुसांचा विकार. [L. *affectio*, affection]

Affĕc'tionāte, *a.* (अ-फे'क्श-नेट्)—warm in affection, attached, loving. मायाळू, प्रेमळ. Affec'tionately, *adv.* प्रेमानें.

Affeer', *v. t.* (ॲ-फि'अर्)—(*Law*) to assess or settle as an arbitrary fine. मनाला वाटेल तो दंड वगैरे निश्चित ठरविणें.

Aff'erĕnt, *a.* (ॲ'-फ-रन्ट्)—carrying to or inwards (of vessels or nerves of animals). मज्जाभिवाहक, मज्जाभिगामी.

Affī'ance, *v. t.* (अ-फा'यन्स्)—promise in marriage. वाङ्‌निश्चय करणें. *n.* trust, faith

reposed; betrothal. श्रद्धा; वाङ्निश्चय. [L. *ad*, to & *fides*, faith]

Ăffĭdā'vĭt, *n.* (ॲ-फि-डे'व्हिट्)—written statement on oath. शपथपूर्वक लेखी जबानी.

Ăffĭl'ĭable, *a.* (ॲ-फि'-लि-एबल्)—capable of being affiliated. संबंध जोडण्याला लायक, शाखारूपानें जोडण्याला योग्य.

Affĭl'ĭāte, *v. t.* (ॲ-फि'लि-एट्)—adopt, attach to; fix paternity and maintenance of illegitimate child on. शाखारूपानें जोडणें, स्वसंबंधी करणें; अनौरस संततीच्चें जनकत्व व निर्वाहाचें साधन ठरविणें, उत्पत्ति ठरविणें. Affil'iator, *n.* [L. *ad*, to & *filius*, a son]

Ăffĭl'ĭā''tion, *n.* (ॲ-फि'लि-ए''-शन्)—the settlement of the paternity of a child on its true father; association of a branch to a main society. अनौरस संततीच्चें जनकत्व ठरविणें; शाखारूपानें जोडणें.

Affĭn'ĭtў, *n.* (ॲ-फि'नि-टि)—relationship; resemblance; chemical attraction; union. आप्तभाव, संबंध; सादृश्य; आकर्षणशक्ति; मिलाफ.

Affirm', *v. t. & i.* (ॲ-फ'र्म्)—state as a fact; make affirmation. वस्तुस्थिति सांगणें; प्रतिज्ञापूर्वक विधान करणें. [L. *ad*, to & *firmare*, to make firm]

Ăffirmā'tion, *n.* (ॲ-फर्मे'शन्)—declaration by one who consciensiously declines oath. सत्य स्मरून करावयाची प्रतिज्ञा, निश्चितकथन.

Ăffirm'ātĭve, *a.* (ॲ-फ'र्मे-टिव्ह्)—affirming. होकारार्थी. To answer in the affirmative= to answer yes, to say that a thing is so. होय म्हणणें, होकार दर्शविणें.

Ăffirm'ātĭvelў, *adv.* (ॲ-फ'र्मे-टिव्ह्-लि)—in an affirmative manner; positively. होय म्हणून; निश्चितपूर्वक, खात्रीनें, निःसंशय.

Ăffirm'atorў, *a.* (ॲ-फ'र्मे-टरि)—that affirms, positive, dogmatic. मुक्रर किंवा मंजूर करणारा.

Affix', *v. t.* (ॲफि'क्स्)—fasten, append, attach. बसविणें, जोडणें; डकविणें. To affix one's seal to=०वर मोहर करणें. *n.* thing affixed, addition; prefix or suffix. जोडलेली वस्तु; मागें किंवा पुढें जोडण्याचा प्रत्यय. Affix'al, *a.* [L. *ad*, to & *figare*, to fix]

Afflā'tŭs, *n.* (ॲ-फ्ले'टस्)—inspiration; the inspiration of the poet. ईश्वरी प्रेरणा; (कवीची) स्फूर्ति. [L. *ad*, to & *flare*, to blow]

Afflĭct', *v. t.* (ॲ-फ्लि'क्ट्)—pain, distress, trouble, grieve. त्रास किंवा दुःख देणें. Afflict'er, *n.* [L. *ad*, to & *fligere*, to dash to the ground]

Afflĭc'tion, *n.* (ॲफ्लि'क्शन्)—distress, pain, grief, misery. पीडा, दुःख.

Ăff'luĕnce, *n.* (-lōō-, ॲ'फ्लु-एन्स्)—wealth, abundance, copiousness, opulence, great plenty. संपत्ति, समृद्धि, दौलत, विपुलता.

Ăff'luĕnt, *a.* (-lōō-, ॲ'-फ्लु-एन्ट्)—rich, abundant; abounding in riches. संपन्न, समृद्ध; विपुल. *n.* tributary stream. मोठ्या नदीला मिळणारी लहान नदी किंवा नाला, ओढा, ओहोळ.

Ăff'lŭx, *n.* (ॲ'-फ्लक्स्)—a flow to a point; that which flows to, accession. एखाद्या ठिकाणीं वाहात जाणें; लोंढा, फुगोटी.

Affōrd', *v. t.* (ॲ-फो'र्ड्)—spare time or money for; supply, furnish. खर्चण्याचें सामर्थ्य किंवा सवड असणें; पुरवठा करणें.

Affŏ'rĕst, *v. t.* (अफॉ'रिस्ट्)—convert into a forest; to turn into forest land. अरण्य करणें, अरण्यवत् करून सोडणें. Afforesta'tion, *n.*

Affrăn'chīse, *v. t.* (ॲ-फ्रॅ'न्चाइझ्)—to make free; to liberate from servitude. स्वतंत्र करणें; दास्यापासून मुक्त करणें. Affran'chīsement, *n.* दास्यमुक्तता, स्वातंत्र्य.

Affray', *n.* (ॲफ्रे')—breach of the peace by fighting or riot, a noisy fight, a brawl. भांडणानें किंवा दंग्यानें झालेला शांतताभंग, मारामारी, दंगल. *v. t.* to frighten, to terrify. भिवविणें, भय घालणें, घाबरवून सोडणें.

Affrīght', *v. t.* (-īt, ॲ-फ्रा'इट्)—frighten. भिवविणें, धाक घालणें. *n.* alarm; sudden or great fear, terror. धोका; धास्ती, त्रास, दहशत.

Affront', *v. t.* (-ŭnt, ॲ-फ्र'न्ट्)—insult openly; face defiantly. तोंडावर अपमान करणें; मगरुरीनें तोंडास तोंड देणें. *n.* open insult. उघड उपमर्द. To put an *affront* upon, to offer an *affront* to=उघड उघड अपमान करणें. To take affront=रुसणें, चिडणें, खिजणें, वाईट वाटणें. [L. *ad*, & *frontis*, face]

Affront'ĭng, *n.* (ॲ-फ्र'न्-टिंग्)—contumelious; abusive. अपमानात्मक; निंदापर, तोंडाळ.

Affū'sion, *n.* (-zhn, ॲ-फ्यू'झन्)—pouring or sprinkling on of (water); matter poured. मार्जन करणें; सोडलेली धार.

Afield', *adv.* (अ-फी'ल्ड्)—on, in or to the field; at a distance. शेतांत; दूर अंतरावर.

Aflāme', *adv.* (अ-फ्ले'म्)—flaming, in flames, in a glow. जळत, प्रकाशत.

Afloat', *adv.* (अ-फ्लो'ट्)—in a floating condition; at sea; out of debt. तरंगत; समुद्रांत; कर्जमुक्त. A rumour is afloat (*i. e.* in circulation) = गप्प उठली आहे.

Afoot', *adv.* (अ-फु'ट्)—on foot; in progress. in a state of being planned for execution. पायीं, पायानें; चालू, सुरू. To set afoot= चालू करणें, प्रारंभ करणें.

Afōre', *adv.* (अ-फो'र)—in front, in the fore-

part of a vessel. पुढें, समोर; जहाजाच्या पुढल्या भागीं. [*a*, of & *fore*, front]

Afōre'nāmed, *a.* (अ-फों'र्-नेम्ड्)—previously named, named before. पूर्वोक्त, मागील.

Afore'said, *a.* (अफों'र्-सेड्)—previously said. पूर्वी सांगितलेलें, पूर्वोक्त, सदरील.

Afōre'thought, *a.* (अ-फों'र्-थॉट्)—premeditated. आगाऊच विचार केलेला, सांकल्पिक.

Afōre'time, *adv.* (अ-फों'र्-टाइम्)—in time past, previously. गतकाळीं, पूर्वी.

Afraid', *a.* (अ-फ्रे'ड्)—alarmed, in fear, feeling fear; timid. भयभीत, घाबरलेला; भ्याड. To be afraid *of*=०चें भय वाटणें. I am afraid=मला शंका वाटते, मी साशंक आहें.

Afresh', *adv.* (अफ्रे'श्)—with a fresh start, with fresh beginning, anew; again. नव्यानें; पुनः. To do afresh=फिरून करणें.

Aft, *adv.* (ā-, आफ्ट्)—in, near, to or towards the stern of a ship. जहाजाच्या मागल्या भागाकडे, वरामाकडे. Fore and aft=गलबताच्या एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत.

Af'ter, *adv.* (आ'फ्टर्)—behind; later. पाठीमागें; नंतर. *prep.* behind; past (an hour); in pursuit or search of; about; later than; according to. पाठीमागें; नंतर; पाठलाग करीत; विषयीं; मागाहून; अनुसरून. *a.* later, hinder. पाठीमागचा, पश्चिम. Tree *after* tree=झाडान झाड. One *after* another=एका पाठीमागून एक, क्रमशः. *After all*=in spite of all that has happened or been said. कांहीं झालें तरी, शेवटीं. To call or name after=०चें नांव देणें. After a model=नमुन्यावरहुकूम.

Af'terbirth, *n.* (आ'फ्टरबर्थ्)—membrane enveloping foetus in womb. गर्भवेष्टन, वार.

Af'ter-crŏp, *n.* (आ'फ्टर्-क्रॉप्)—a second crop. दुसरें पीक, गिमवस, वांगणें, वांगणयाचें पीक.

Af'ter-dămp, *n.* (आ'फ्टर्-डॅम्प्)—gas left in mine after fire-damp explosion. खाणींत अग्निस्फोट झाल्यानंतर राहिलेला गॅस.

Af'terglow, *n.* (-ō, आ'फ्टर्-ग्लो)—glow in the west after sunset. सूर्यास्तानंतर पश्चिम दिशेला दिसणारा प्रकाश.

A'fter-grass, *n.* (ā-, आ'फ्टर्-ग्रास्)—grass that grows after first crop has been mown for hay. दुसऱ्या कापणीचें गवत.

Af'ter-măth, *n.* (आ'फ्टर्-मॅथ्)—grass that grows after first crop has been mown, aftergrass. पहिली कापणी झाल्यानंतर उगवलेलें गवत, दुसरी फूट, दुसरा फुटवा.

Af'termōst, *adv.* (आ'फ्टर्-मोस्ट्)—most aft, nearest the stern. सर्वांच्या पाठीमागचा.

Afternōōn', *n.* (आ'फ्टर्-नून्)—time between noon and evening. तिसरा प्रहर.

Af'terthought, *n.* (आ'फ्टर्-थॉट्)—idea etc. that occurs to one later. मागून सुचलेली कल्पना, पश्चाद्बुद्धि, पश्चाद्विचार.

Af'terwards, *adv.* (-z, आ'फ्टर्-वर्ड्झ्)—later, subsequently. मागून, नंतर, मागाहून, उपरांतिक.

Again', *adv.* (अगे'न्)—another time, once more; further, besides. फिरून, आणखी एकदां; शिवाय. Again and again, Time and again=repeatedly. पुनःपुनः. Ever and again, Now and again=occasionally. कधींकधीं, प्रसंगानुसार. As much again=twice as much. आणखी एवढा, ०च्या दुप्पट. Half as much again=one and a half times as much. ०च्या दीडपट.

Against', *prep.* (अगे'न्स्ट्)—in opposition to, in contrast to; in anticipation of; by the time that. विरुद्ध, प्रतिकूल, उलटा; लक्षून, संधान ठेवून; साठीं, करितां; समयीं.

Agāpe', *adv.* (अगे'प्)—open-mouthed, gaping with wonder or expectation, on the gape. तोंड वासून, आ पसरून.

Ă'gāte, *n.* (ॲ'गेट्)—a precious stone composed of layers of quartz of different tints. एका जातीचा दगड, गोमेद.

Age, *n.* (एज्)—length of life or existence; historical or other period; latter part of life. आयुष्य, वय; युग; वृद्धापकाळ, वृद्धावस्था. *v. t.* & *i.* to grow old; show signs of age; cause to grow old. वृद्ध होणें; वयोवस्था दर्शविणें; जुना करणें. To come of age, To be of age=वयांत येणें. Brazen age=कांशाळीचा काळ. Iron age=कलियुग.

Aged, *a.* (ājd, एज्ड्)—of the age of. अमुक वयाचा. (ā'jĭd, ए'जिड्)—old. वृद्ध, म्हातारा. Aged'ness, *n.* वृद्धावस्था.

Age'lĕss, *a.* (ए'ज्-लेस्)—never growing old. कधींहि वृद्ध न होणारा, अजर, जरारहित.

Ā'gencȳ, *n.* (ए'जन्सि)—action; instrumentality; office of agent; business establishment. कृत्य; कर्तृत्व, अडत; एजंटाचें ऑफिस, गुमास्तेगिरी; कारखाना. [L. *agere*, to do]

Agĕn'dă, *n. pl.* (अजे'न्डा)—the items of business to be considered at a meeting. सभेचा कार्यक्रम, कामाचें टिपण. [L. *agenda*, thing to be done]

Ā'gent, *n.* (ए'जन्ट्)—person or thing producing an effect; one who represents a person on a firm in business. कर्ता; प्रतिनिधि, गुमास्ता, कारभारी, मुनीम, अडत्या.

Agglŏm'erāte, *v. t.* & *i.* (अग्लॉ'मेरेट्)—collect or gather into a mass. एकत्र करणें किंवा होणें, रास करणें, गोळा करणें. [L. *ad*, to & *glomus*, a ball of yarn]

Agglŏmerā'tion, *n.* (अग्लॉमेरे'शन्)—a growing or heaping together, a mass. गोळा, संचय.
Agglŏm'erātive, *a.* (अग्लॉ'मेरेटिव्ह्)—heaping together. संचय किंवा गोळा करणारा.
Agglut'ināte, *v. t. & i.* (-lōō-, अग्लू'टिनेट्)—unite as with glue; form (words) into compounds. सरसानें चिकटवणें; शब्द जोडणें. Agglutina'tion, *n.*; Agglut'inative, *a.* [L. *ad*, to & *gluten*, glue]
Ăgg'randīze, *v. t.* (ॲ'ग्रन्डाइझ्)—increase (power, rank or wealth of), exaggerate. भरभराट करणें, महत्त्व वाढविणें, वढती करणें. [L. *ad*, to & *gradis*, great]
Ăgg'randīzemĕnt, *n.* (ॲ'ग्रन्डिझ्-मेन्ट्)—act of aggrandizing; state of being aggrandized, augmentation. फाजील चढती, भरभराट.
Ăgg'ravāte, *v. t.* (ॲ'ग्रव्हेट्)—make more grievous, increase the gravity of; annoy, provoke. कठीण अवस्था वाढविणें, अधिक दुःसह करणें, विकोपास नेणें; कुरापत काढणें. [L. *ad*, to & *gravis*, heavy]
Ăggravā'tion, *n.* (ॲग्रव्हे'शन्)—the act of making worse, provocation. अधिक वाईट किंवा दुःसह करणें. Agg'ravātor, *n.*
Ăgg'rĕgāte, *a.* (ॲ'ग्रिगेट्)—collected, total. एकत्र केलेला, एकूण. *n.* whole collection; sum total. संग्रह; एकूण जमा. *v. t. & i.* to collect together, unite. एकत्र करणें. *In the* aggregate=as a whole. एकंदरीनें पाहतां, एकंदरींत. [L. *ad*, to & *gregis*, a flock]
Aggrĕgā'tion, *n.* (ॲग्रिगे'शन्)—the act of collecting together, collection. समूह, समुदाय. Agg'rĕgātive, *a.* एकत्रित.
Aggrĕ'ssion, *n.* (ॲग्रे'शन्)—unprovoked attack, inroad. आगळीक, कुरापत.
Aggrĕss'ive, *a.* (ॲग्रे'सिव्ह्)—making the first attack. प्रथम हल्ला करणारा, कुरापत काढणारा.
Aggrĕss'or, *n.* (ॲग्रे'सर्)—one that begins to attack or injure. प्रथम हल्ला करणारा मनुष्य, आगळीक करणारा, मूळ कुरापत काढणारा.
Aggrieved', *a.* (-vd, ॲग्री'व्हड्)—injured, having a grievance. पीडित, दुःखमग्न, गांजलेला.
Aghast', *a.* (-gä, अगा'स्ट्)—terrified, amazed. भीतीनें कावराबावरा, घाबरलेला; आश्चर्यचकित, भांबावलेला. To be struck aghast=आंगावर कांटा उभा राहणें, पांचावर धारण बसणें.
Ā'gīle, *a.* (ăj-, ॲ'जाइल्)—quick-moving; nimble, active, brisk. चपळ; जलदगतीचा, चलाख. [L. *agilis*, nimble]
Agĭl'ĭtў, *n.* (ॲजि'लिटि)—activity, quickness. चपलता, शीघ्रगति, चलाखी, सुटसुटीतपणा.
Ā'gĭō, *n.* (*pl.* -os; ए'जि-ओ)—charge for changing paper money into cash or one currency into another. वटाव, वरचा फरक.
Ā'gĭōtage, *n.* (ए'जि-ओ-टेज्)—exchange business. वट्ट्याचा किंवा वटावाचा धंदा.
Ā'gĭtāte, *v. t. & i.* (ॲ'जिटेट्)—shake about; excite, disturb the mind or passions; discuss. हालवणें; खवळणें; वाटाघाट किंवा चळवळ करणें. [L. *agere*, to drive]
Ăgĭtā'tion, *n.* (ॲजिटे'शन्)—disturbed state of mind; keeping of a matter before the public. मनाची प्रक्षुब्धता; चळवळ, जनक्षोभ.
Ăg'ĭtātor, *n.* (ॲ'जिटेटर्)—one who excites or keeps up a public agitation. चळवळ करणारा.
Ăg'lĕt, Aig'lĕt, *n.* (ॲ'ग्-लिट्, ए'ग्-लिट्)—metal tag of a lace; catkin. लेसच्या टोंकाला असलेलें धातूचें टोपण; एक प्रकारचें फूल.
Ăg'nail, *n.* (ॲ'ग्नेल्)—torn skin at root of finger-nail; soreness resulting from it. नखुरडें; नखुरड्यापासून होणारें दुःख.
Ăg'nāte, *a.* (ॲ'ग्नेट्)—descended from same male ancestor of same clan or nation. एकाच गोत्रांत जन्मलेला, एकाच जातीचा किंवा राष्ट्राचा. *n.* a person related on the father's side or through males only. सगोत्री.
Ăgnō'mĕn, *n.* (ॲग्नो'मिन्)—additional name or epithet of a person. दुसरें नांव.
Agnŏs'tĭc, *n.* (अग्नॉ'स्टिक्)—one who holds that nothing is to be known of a God or of anything but material phenomena. अज्ञेयवादी; ईश्वर किंवा सृष्टीखेरीज इतर गोष्टीचें ज्ञान होणें शक्य नाहीं असें म्हणणारा. *a.* holding the theory or doctrine of agnosticism. अज्ञेयवाद मानणारा. [Gr. *gnostikos*, good at knowing; *a*, not & *gno*, to know]
Agnŏs'tĭcism, *n.* (अग्नॉ'स्टिसिझम्)—the doctrine held by an agnostic. अज्ञेयवाद.
Agō', *adv.* (ॲगो')—in time past, in time gone by. कांहीं काळापूर्वी, पूर्वी.
Agŏg', *adv.* (अगॉ'ग्)—eager, on the look-out. उत्सुकतेनें, हुरळल्यासारखें.
Agō'ing, *adv.* (अगो'इंग्)—going on. चालता, चालू. To set a mill *agoing*=गिरण चालू करणें.
Ag'onĭc, *a.* (ॲ'गोनिक्)—making no angle. कोन न करणारा, कोनरहित.
Ăg'onīze, *v. t. & i.* (ॲ'गोनाइझ्)—cause agony to, torture; make desperate efforts. दुःख देणें, हाल करणें; निकराचा प्रयत्न करणें.
Ăg'onў, *n.* (ॲ'गनि)—intense bodily or mental suffering; a severe struggle. शारीरिक किंवा मानसिक तीव्र वेदना; जोराची धडपड.
Ăgoraphō'bĭa, *n.* (ॲगोरफो'बिआ)—morbid dread of public places. समाजाची जबर दहशत. [Gr. *agora*, assembly & *phobea*]

Agrār'ĭan, *a.* (ॲग्रे'रिअन्)—relating to landed property, of cultivated land. जिरायती, शेतजमिनीसंबंधीं. [L. *ager*, a field]

Agree', *v. i.* (ॲग्री')—consent; concur; be in harmony with; be wholesome to or for. संमति देणें; एकमत होणें; जमणें; (हवा) मानवणें.

Agree'āble, *a.* (-री- अग्रि'एबल्)—pleasing; well-disposed; conformable. सुखदायक; अनुकूल; अनुरूप, जुळेल असा. Agree'āblenĕss, *n.*, Agree'ably, *adv.* अनुरूप; सुखानें.

Agree'mĕnt, *n.* (ॲग्रि'मेन्ट्)—mutual understanding; legal contract. परस्पर संमति किंवा रुकार; करार, ठराव, करारनामा.

Agrĕs'tĭc, *a.* (ॲग्रे'स्टिक्)—rural, rustic, of the country. ग्राम्य, खेडवळ, शेतकीचा.

Agrĭcŭl'tural, *a.* (ॲग्रिकं'ल्चरल्)—regarding cultivation of soil. शेतीभातीसंबंधीं.

Ăg'rĭcŭlture, *n.* (ॲ'ग्रिकल्चर्)—cultivation of soil, husbandry. शेतकी, शेतीभाती. [L. *ager*, a field, & *cultura*, cultivation]

Ăgrĭcŭl'turĭst, Ăgrĭcŭ'lturălĭst, *nn.* (ॲग्रिकं'ल्चरिस्ट्,ॲग्रिकं'ल्चरॅलिस्ट्)—cultivator of soil, husbandman, farmer. शेतकरी, कुणबी.

Agrŏs'tĭs, *n.* (अग्रॉ'स्टिस्)—bent grass. दूर्वा.

Aground', *adv.* (अग्रा'उन्ड्)—upon the bottom of shallow water. उथळ पाण्याच्या तळाशीं, जमिनीलगत. To be *aground*=जमिनीस लागणें, जमिनीला लागून असणें.

Ā'gue, *n.* (ए'ग्यू)—malarial fever (with cold, hot and sweating stages); fit of shivering. हिंवताप, शीतज्वर; शिरशिरी, हुडहुडी.

Ā'gūed, *a.* (ए'ग्यूड्)—having ague. हिंवताप ज्याला आला आहे असा, थंडीनें हुडहुडणारा.

Ā'gūĭsh, *a.* (ए'ग्यूइश्)—of the nature of ague; subject to or suffering from ague; coming by fits and starts. हिंवतापासारखा; हिंवतापानें पीडलेला; कधींकधीं येणारा.

Ah, Aha', *inter.* (आ, आ-हा')—these express sorrow, surprise, admiration, etc. हा, हाहा! हाय हाय, अरेरे, अबब!

Ahead', *adv.* (-hĕd, अहे'ड्)—in advance, in front; forward. पुढें, समोर; आघाडीस. To go *ahead*=पुढारणें, पुढें जाणें. To get *ahead* of=॰च्या पुढें जाणें.

Aid, *v. t.* (ād, एड्)—help, assist; promote. मदत करणें; साहाय्य करणें. *n.* help; helper; helpful thing. साहाय्य; मदतनीस; उपयोगी वस्तु. [L. *ad*, to & *juvare*, to help]

Aide'-de-camp, *n.* (ā de kŏng, ए'-ड-कॉंग्)—[*pl. Aides'-de-camp*—ā de kŏngz, ए'ड-कॉंग्झ्] officer assisting general by carrying orders, etc. लष्करी खात्यांत मुख्याधिकाऱ्याचा निरोप नेणारा-आणणारा मनुष्य, मिरोप्या, जासूद, नकीब. [Fr. *lit.* field-assistant]

Ai'grĕtte, *n.* (ए'ग्रिट्)—tuft of feathers or hair; spray of gems, etc. पिसांचा किंवा केसांचा झुबका; रत्नांचा गुच्छ.

Ai'guille, *n.* (-gw-, ए'ग्विल्)—sharp peak of rock. तीक्ष्ण खडकाचें शिखर.

Ail, *v. t.* & *i.* (एल्)—feel pain, trouble, afflict; be ill. दुखणें, विकार होणें; आजारी असणें. I ail, I am ailing=माझ्या जिवाला बरें वाटत नाहीं. What ails you?=तुला काय होतें? तूं कशानें आजारी आहेस?

Ail'mĕnt, *n.* (ए'ल्मेन्ट्)—indisposition, illness; disease. विकृति; रोग.

Aim, *v. t.* & *i.* (एम्)—direct at; point at; direct one's ambition. नेम धरणें किंवा असणें; ॰ची महत्त्वाकांक्षा बाळगणें. *n.* aiming; object aimed at; purpose. नेम; ध्येय, उद्देश; हेतु. Unerring aim=अचूक संधान. Of single aim (or purpose)=अनन्यवृत्ति. [L. *ad*, to & *aestimare*, to estimate]

Aim'lĕss, *a.* (ए'म्लेस्)—without purpose, without fixed aim, purposeless. ध्येयरहित, ज्यांत विशिष्ट हेतु नाहीं असा.

Aim'lĕsslȳ, *adv.* (ए'म्-लेसलि)—without any aim or purpose. विशिष्ट हेतु नसतां.

Air, *n.* (एअर्)—gaseous mixture of oxygen and nitrogen enveloping the earth; atmosphere; open space; confident bearing. हवा, वायु; वातावरण; खुली जागा; झोंक किंवा डौल. In the open *air*=exposed to the *air*. उघड्या हवेंत, वाऱ्यांत. In the *air*=in mid-space. अधांतरीं, अंतरिक्षांत. To take *air*=to become known. बाहेर फुटणें, माहीत होणें, कळणें. Quite in the *air*=quite uncertain. अगदीं अनिश्चित. Castles in the *air*=visionary projects. मनःसृष्टि, मनोराज्य. *Air*-bladder=वायुकोश, हवेनें भरलेली पिशवी. *Air*-cushion=वायूनें फुगवलेली पिशवी *pl.* affected manners. छानछोकी. *v. t.* expose to air, ventilate; make known, show off. वाळत घालणें, मोकळ्या हवेंत ठेवणें; लोकांपुढें मांडणें, प्रसिद्ध करणें. [L. *aer*, air]

Air'crăft, *n.* (ए'अर्-क्राफ्ट्)—aeroplanes, airships and balloons. आकाशयानें, विमानें.

Air'-gŭn, *n.* (ए'अर्-गन्)—gun using compressed air as a propelling force. दारूशिवाय हवेच्या दाबानें उडणारी बंदूक.

Air'lĕss, *a.* (ए'अर्-लेस्)—stuffy; still, calm. कोंदट, गुदमरवणारा; शांत, स्तब्ध.

Air'-liner, *n.* (ए'अर्-लाय्-नर्)—large passenger air-craft. उतारूंची ने-आण करणारें मोठें विमान.

Air'man, *n.* (ए'अर्-मन्)—aviator. वैमानिक.

Air'plāne, *n.* (ए'अर्-प्लेन्)—aeroplane. विमान

Air'-pŏcket, *n.* (ए'अर्-पॉकेट्)—apparent vaccuum in air causing aeroplane to drop some distance. हवा असलेली पिशवी किंवा कप्पा.

Air'-pŭmp, *n.* (ए'अर्-पम्प्)—instrument for pumping out air. हवा काढून घेण्याचें यंत्र.

Air'-raid, *n.* (ए'अर्-रेड्)—attack by aircraft. विमानांनीं केलेला हल्ला.

Air'shĭp, *n.* (ए'अर्-शिप्)—flying machine lighter than air. वायुयान.

Air'-tīght, *a.* (ए'अर्-टाइट्)—so tight as to be impermeable to air. हवा न शिरण्याइतका घट्ट बांधलेला, वायुनिरोधक.

Air'way, *n.* (ए'अर्-वे)—a passage for air-ventilating passage in mine; route regularly followed by aircraft. खाणींतील हवेचा मार्ग; आकाशांतून विमानें जाण्याचा रस्ता.

Air'ȳ, *a.* (ए'अरि)—breezy; light, thin; sprightly. हवाशीर; पातळ; चैनी, आनंदी.

Aisle, *n.* (īl, आइल्)—division of church; passage between rows of pews. चर्चचा एक भाग: सभामंडपाच्या दोहों बाजूचें प्रत्येक दालन. [L. *ala*, a wing]

Ajär', *adv.* (अजा'र्)—slightly open; at variance. अर्धवट उघडा (दरवाजा); बेबनावानें.

Akĭm'bō, *adv.* (अकिं'म्बो)—with hands on hips and elbows turned out. कोंपर वर करून व ढुंगणावर हात ठेवून, कमानदार.

Akĭn', *pred a.* (अकि'न्)—related by blood; of similar or kindred character, of the same properties. आप्त, नातलग; सजातीय.

Ăl'abäster, *n.* (ॲ'लबास्टर्)—kinds of carbonate or sulphate of lime. एका जातीचा संगमरवरी दगडासारखा पांढरा दगड.

Alăck', *Alack'-a-day, int.* (अलॅ'क्, अलॅ'क्-अ-डे)—(exclamation expressing sorrow) alas the day! अरेरे! हाय हाय!!

Alăc'rĭtȳ, *n.* (अलॅ'क्रिटि)—briskness, cheerful readiness. उत्साह, उत्सुकता, धमक, उतावळ.

Alärm', *n.* (अला'र्म्)—call to arms, warning sound; warning of approaching danger; hubbub. सूचना, गजर; भयाची सूचना; हूल, हुल्लड. To take *alarm* at=धास्ती घेणें, बाचकणें. *v. t.* give the alarm to; disturb, frighten. भयाची सूचना देणें; भिवविणें, भीति दाखविणें. [L. *ad*, to & *arma*, arms]

Alarm'ism, *n.* (अला'र्मिझम्)—panic-mongering, fostering a panic. हूल उठवणें.

Alarm'ist, *n.* (अला'र्मिस्ट्)—a panic-monger. हूल उठवणारा, भय भाकणारा.

Alä'rŭm, *n.* (अलॅ'रम्)—signal of alarm; an alarm-clock. भयसूचक खूण: गजराचें घड्याळ.

Alăs', *int.* (अला'स्)—exclamation expressing grief. हाय हाय! अरेरे!!

Ălb, *n.* (ॲल्ब्)—white vestment reaching to feet, worn by priests, etc. रोमन कॅथॉलिक धर्मोपदेशकाचा पांढरा झगा.

Ăl'bacore, *n.* (ॲ'ल्बकोअर्)—large sea-fish of the tunny kind. मोठा समुद्रांतील मासा.

Ăl'batrŏs, *n.* (ॲ'ल्बट्रॉस्)—type of Austrian aeroplane. ऑस्ट्रिआंतील विमान.

Ăl'batrŏss, *n.* (ॲ'ल्बट्रॉस्)—the largest sea-fowl ever known. सर्वांत मोठा समुद्रपक्षी.

Alb'ēit, *conj.* (awl-, ऑ'ल्-बी-इट्)—although. यद्यपि, जरी, असें आहे तरी.

Ăl'bert, *n.* (ॲ'ल्बर्ट्)—kind of watch-chain. एका तऱ्हेची घड्याळाची सांखळी, शेडा.

Albĕs'cĕnt, *a.* (आल्बे'सेन्ट्)—growing white. पांढरा होणारा, फिकट रंगाचा.

Ălbi'nō, *n.* (-bē-, *pl.* -os, ॲल्बी'नो)—person (or animal) with white hair and skin and eyes of a pink colour. पांढऱ्या कातडीचा व केंसाचा आणि गुलाबी डोळे असलेला मनुष्य किंवा इतर प्राणी. Albi'ness, *n. fem.*

Ăl'bŭm, (ॲ'ल्बम्)—blank book for autographs, photographs, etc. हस्तलेख, चित्रें वगैरे ठेवण्याचें कोरें पुस्तक, संग्रहपुस्तक.

Ălbū'mĕn, *n.* (ॲल्ब्यू'मेन्)—white of egg; a white substance found in animal and vegetable bodies. (अंड्यांतील) श्वेतकल्क, गर्भपोषक द्रव्य. [L. *albus*, white]

Ălbū'minŏid, *a.* (ॲल्ब्यू'मिनॉइड्)—like albumen. श्वेतकल्कासारखा. *n.* one of a class of nitrogenous compounds derived from animal tissues. श्वेतकल्कयुक्त पदार्थ.

Ălbŭrn'ŭm. *n.* (ॲल्ब'र्नम्)—sapwood. रसाचें लांकूड, कोंवळें लांकूड.

Ăl'chĕmĭst, *n.* (-k-, ॲ'ल्केमिस्ट्)—one that practises alchemy. किमया करणारा, रसायनी.

Ăl'chĕmīze, *v. t.* (-k-, ॲ'ल्केमाइझ्)—change as by alchemy. किमयेच्या योगानें रूपांतर करणें.

Ăl'chĕmȳ, *n.* (-k-, ॲ'ल्केमि)—transmutation of baser metals into gold. किमया, रसायन. हीण धातूचें उच्च धातूंत रूपांतर करणारें शास्त्र.

Ăl'cohŏl, *n.* (ॲ'ल्को-हॉल्)—pure spirit of wine: any liquor containing alcohol. मद्याचा अर्क: मद्यार्क असलेलें मादक पेय.

Ăl'cohŏlĭc, *a.* (ॲ'ल्को-हॉलिक्)—of or like alcohol. मद्यार्काचा, मद्यार्कधर्मक.

Ăl'cohŏlĭsm, *n.* (ॲ'ल्को-हॉलिझम्)—effect of alcohol on human system, condition of habitual drunkards. दारूचे विकार किंवा परिणाम, अतिशय दारू प्याल्यापासून झालेला रोग.

Ăl'cohŏlīze, *v. t.* (ॲ'ल्को-हॉलाइझ्)—saturate or treat with alcohol. मद्यार्कमिश्रित करणें

Ăl'cōve, *n.* (ॲल्‌-कोव्ह्)—a large recess; recess in room, garden etc.; summer-house. मोठी कमान, मोठा कोनाडा; खोलींतील, बागेंतील वगैरे एकांत जागा; उन्हाळ्याकारितां बागेंतील बंगला.

Al'derman, *n.* (awl-, ऑल्डर्‌-मन्)—civic dignitary next below mayor. नगराध्यक्ष, मेयरच्या खालच्या दर्जाचा अधिकारी.

Al'dermănic, *a.* (ऑल्डर्‌-मॅनिक्)—pompous and portly. थाटमाटाचा, डौली, ढबदार.

Āle, *n.* (एल्)—malt liquor; beer. सातूची केलेली दारू; एक प्रकारची पिण्याची दारू.

Ale'-house, *n.* (एल्‌-हाउस्)—place where ale is retailed. किरकोळ दारू मिळण्याचें ठिकाण.

Alĕm'bic, *n.* (अले'म्बिक्)—apparatus formerly used in distilling. अर्क काढण्याचें यंत्र.

Alert', *a.* (ॲलर्ट्)—watchful, vigilant; nimble. जागरूक, दक्ष; चपळ. On the *alert*=on the look-out. सावधपणानें, टेहळणीवर. Alert'ness, *n.* सावधगिरी, चपळाई.

Ălexăn'drĭne, *n.* (ॲलेग्झॅ'न्ड्राइन्)—a verse of six iambic feet or twelve syllables. इंग्रजी काव्यांत बारा पदें असलेलें वृत्त.

Alfrĕs'cō, *adv.* & *a.* (ॲल्फ्रे'स्को)—in the open air; open-air उघड्या हवेंत; मोकळ्या हवेंतील.

Al'gae, *n. pl.* (jē, ॲल्जी)—sea-weed. समुद्रजन्य शेवाळ, जलशैवाल.

Al'gebra, *n.* (ॲ'ल्जिब्रा)—investigation of the properties of numbers by means of general symbols. बीजगणित.

Al'gebrāĭst, Al'gebrĭst, *nn.* (ॲल्‌-जिब्रइस्ट्, ॲ'ल्जिब्रिस्ट्)—one skilled in the science of Algebra. बीजगणितज्ञ.

Ā'lias, *adv.* (ए'लि-ॲस्)—on other occasions. उर्फ. *n. assumed name.* दुसरें नांव, टोपणनांव.

Al'ibi, *n.* (ॲ'लिबाय् *pl.* -is)—plea of being elsewhere. अन्य ठिकाणीं असल्याचें प्रतिपादन. [L. *alibi*, elsewhere]

A'liĕn, *a.* (ए'लिएन्)—not one's own; foreign; out of harmony. परकीय; विदेशी; बेसूर. *n.* stranger, foreigner. परका, परदेशचा मनुष्य.

A'lĭĕnable, *a.* (ए'लिएनेबल्)—*capable of being* transferred to another. दुसऱ्याचे हातीं देण्याजोगा. Ā'lienability, Ā'lienātor, *nn.*

Ā'lienāte, *v. t.* (ए'लिएनेट्)—estrange; transfer; turn away, divert (*from*). स्नेह तोडणें; दुसऱ्याच्या हातीं देणें; मन फिरविणें.

Āliĕnā'tion, *n.* (एलिएने'शन्)—*estrangement*; insanity. परकीय भाव; बुद्धिभ्रंश, मन उठणें.

Ālĭĕnee', *n.* (ए-लि-एनी') one to whom transfer to property is made. मालमत्ता किंवा इस्टेट ज्याचे स्वाधीन केली तो इसम.

Ā'lĭĕnĭsm, *n.* (ए'लिएनिझम्)—*the position of* being a foreigner; study and treatment of mental diseases. परदेशस्थपणा; मानसिक रोगांचा अभ्यास व उपचार.

Ā'liĕnĭst, *n.* (ए'लिएनिस्ट्)—mad-doctor, doctor who treats mad men. वेड्यांचा डॉक्टर.

Alīght', *v. i.* (-īt, अला'इट्)—dismount, descend; come down. (घोड्यावरून किंवा गाडींतून) खालीं उतरणें; खालीं येणें. *a.* on fire, lighted, kindled. जळत असलेलें.

Alīgn', Alīne', *v. t.* & *i.* (-īn, अला'इन्)—to place or form in a line. रांगेनें उभे करणें, (सैन्याची) रचना करणें.

Alīgn'ment, *n.* (अला'इन्‌-मेन्ट्)—arrangement in a line. रांगेनें रचणें, रचना.

Alīke', *a.* (अला'इक्)—similar, like. सारखा, सदृश. *adv.* similarly, in like manner. त्यासारखा, त्याचप्रमाणें.

Ăl'imĕnt, *n.* (ॲ'लिमेन्ट्)—food. आहार, पोषण, पौष्टिक अन्न. [L. *alere*, to nourish]

Ălimen'tal, *a.* (ॲलिमे'न्टल्)—supplying food, nourishing. अन्नाचा पुरवठा करणारें, पौष्टिक.

Ălimĕn'tarў, *a.* (ॲलिमे'न्टरि)—nutritious, nourishing; concerned with nutrition. पुष्टिकारक, पौष्टिक, पोषक; भक्ष्यासंबंधी.

Ălimentā'tion, *n.* (ॲलिमेन्टे'शन्)—nourishment, maintenance. आहार, पोषण, पोषणक्रिया.

Ăl'imonў, *n.* (ॲ'लिमनि)—allowance due to a wife for support. विभक्त झालेल्या बायकोच्या अन्नवस्त्राकरितां नवऱ्यास तिला द्यावा लागणारा पैसा.

Ăl'iquŏt, *a.* (ॲ'लिक्वॉट्)—that divides without remainder. निःशेषभाजक, जिनें दुसऱ्या रकमेस भागिलें असतां बाकी राहत नाहीं ती (संख्या). [L. *alius*, other, and *quot*, how many]

Alīve', *a.* (अला'इव्ह्)—*living; brisk, active*; fully susceptible to. सजीव; जागृत; सतेज, चेतनायुक्त; मर्मज्ञ, गुणग्राहक.

Ăl'kali, *n.* (ॲ'ल्कलि)—substance that neutralises acids. कल्याम्ल, आल्कली, अम्लप्रतियोगी, आंबटपणा घालविणारा क्षार, खार, कलिभस्म.

Ălkalĕs'cĕnt, *a.* (ॲल्कले'सेन्ट्)—slightly alkaline. थोडासा कल्याम्लगुणधर्मक. Alkalĕs'cence, *n.* आल्कलीसारखा होण्याचा गुण.

Ălkăl'ifў, *v. t.* (ॲल्कॅ'लिफाय्)—*to convert into* an alkali. कल्याम्लाचें रूप देणें.

Ăl'kalīne, *a.* (ॲ'ल्कलाइन्)—of the nature of an alkali. आल्कली किंवा कल्याम्लाच्या गुणाचा.

Ăl'kalŏid, *n.* (ॲ'ल्कलॉइड्)—nitrogenous basic substance, substance resembling an alkali. आल्कलीसारखे गुणधर्म असणारे पदार्थ.

All, *n.* (awl, ऑल्)—the whole world, everything. सर्व जग, सर्व काहीं. *a.* the whole *amount, extent or* number. सर्व, सगळा. *pron.* the whole number, every one. सर्व

प्रत्येकजण. *adv.* entirely, quite. पूर्णपणें; अगदीं. *All but*=everything short of (e. g. all but impossible). बहुतेक, प्रायः. *All in all*=of paramount or exclusive importance. अत्यंत महत्त्वाचा. *At all*=in any way. कांहींच, अगदीं. *In all*=in total number. एकूण. *One and all, All and sundry*=all individually and collectively. झाडून सर्व, तमाम, यच्चयावत्. *All right, adv.* satisfactorily, as desired. मनाजोगा, इच्छिल्याप्रमाणें. *pred. a.* safe and sound, in good state, satisfactory. सुरक्षित, चांगल्या स्थितींत, समाधानकारक. *All right!*=I consent, all is right. फार उत्तम, ठीक आहे. *All the same*: (1) just the same, without any difference. अगदीं तसाच. (E. g. It's *all the same* to me whether he goes or not; if it is *all the same* to you=if you don't mind.) (2) in spite of, notwithstanding, however. कांहीं झालें तरी, तथापि. (E. g. *All the same*, I wish you hadn't done it.)

Ăllay', *v. t.* (ॲले')—repress, assuage, pacify, quiet. शमविणें, शांत करणें, नरम करणें.

Ăllēgā'tion, *n.* (ॲलिगे'शन्)—affirmation; plea; assertion (*esp.* one not proved), declaration. निश्चित सांगणें; सबब, आरोप.

Allĕge', *v. t.* (ॲले'ज्)—affirm; state or advance as a fact. निश्चयपूर्वक सांगणें; वस्तुस्थिति म्हणून पुढें मांडणें, पुरावा देणें. [L. *ad*, to & *legare*, to depute]

Allē'giance, *n.* (-jans, ॲली'जन्स्)—duty of subject to sovereign or government; loyalty. राजसेवाधर्म, राजनिष्ठा; निष्ठा, भक्ति.

Ăll'ēgoric, Ăll'ēgorĭcal, *aa.* (ॲलिगॉरिक्, ॲलिगॉरिकल्)—in the manner of an allegory; figurative. दृष्टांतरूप; लाक्षणिक, अन्योक्तिरूप.

Ăll'ēgorīze, *v. t.* (ॲलिगोराइझ्)—treat as an allegory; understand figuratively. रूपकानें दर्शविणें; दृष्टान्त म्हणून समजणें. All'egorist, *n.*

Ăllēgrĕt'to, *adv.* & *a.* (ॲलेग्रे'टो)—in somewhat lively time. द्रुत (गति).

Ălle'grō, *adv.* & *a.* (-lā-, ॲले'ग्रो)—in quick and lively time. द्रुत (गति).

Ăllēlu'ia, *n.* (-lōōya, ॲलिलू'या)—song of praise. स्तुतिगीत, स्तुतिस्तोत्र.

Ă'llēgorў, *n.* (ॲ'लिगरि)—narrative describing one subject under the guise of another. रूपक, अन्योक्ति, अप्रस्तुतप्रशंसा. (Gr. *allos*, other, & *agoreuein*, to speak]

Allē'vĭāte, *v.t.* (ॲली'व्हिएट्)—mitigate, lessen. शांत करणें; (दुःख वगैरे) कमी करणें.

Allēvĭā'tion, *n.* (ॲलीव्हिए'शन्)—act of relieving or making light. उपशमन; हलकें करणें.

Allēvia'tor, *n.* उपशमन करणारा.

Ăll'ey, *n.* (ॲ'लि)—narrow street, passage; back lane. गल्ली, अरुंद रस्ता; पाठीमागची आळी. *Blind alley*=an alley closed at end. बाहेर जाण्याला वाट नसलेला बोळ. [L. *ad*, to & *nare*, to swim]

All'-fours, *n.* (ऑ'ल्-फोर्स्)—one's legs and arms. हातपाय. To go on *all fours*=लहान मुलांप्रमाणें रांगणें. It does not go *all fours*=तें सर्वांशीं जुळत नाहीं.

Allī'ance, *n.* (अला'यन्स्)—relation of allies, confederation; union by marriage. सख्यसंबंध; शरीरसंबंध, विवाहसंबंध.

Ăll'ĭgātor, *n.* (ॲ'लिगेटर्)—crocodile, a kind of large lizard. मगर, सुसर. Grasp or seizure of an alligator=मगरमिठी.

Allĭterā'tion, *n.* (ॲलिटरे'शन्)—commencement of several words in the same sentence with the same letter. प्रास, अनुप्रास, एका मागून एक येणाऱ्या शब्दांचे आरंभीं एकाच अक्षराची पुनरावृत्ति. Alli'teral, *a.* प्रासयुक्त. (E. g. Round and round the rugged rascal ran.) [L. *ad*, to & *litera*, a letter]

Allĭt'erātive, *a.* (ॲलि'टरेटिव्ह्)—pertaining to alliteration. अनुप्रासासंबंधीं. Allĭt'erāte, *v. i.*

Ăll'ocāte, *v. t.* (ॲ'लोकेट्)—assign to, set aside, apportion. नेमून देणें, वांटून देणें. [L. *ad*, to & *locare*, to place]

Ălloca'tion, *n.* (ॲलोके'शन्)—allotment. वांटणी.

Allō'dĭal, *a.* (ॲलो'डिअल्)—not held of a superior, freehold. स्वतःच्या मालकीचा.

Allō'dĭŭm, *n.* (ॲलो'डिअम्)—estate held in absolute ownership, freehold estate. केवळ स्वतःच्या मालकीची जहागीर, स्वसत्ताक वतन.

Ăllŏp'athў, *n.* (ॲलॉ'पथि)—treatment of disease by inducing a different tendency. भिन्न अगर उलट स्थिति होईल अशा प्रकारें औषधोपचार करून व्याधिनाश करण्याची पद्धति, व्याधिविपरीत चिकित्सा. Ăllopă'thĭc, *a.* Allopa'thically, *adv.* Ăllo'păthĭst, *n.* [Gr. *allos*, other & *pathos*, disease]

Allŏt', *v. t.* (अलॉ'ट्)—assign, distribute by lot. विभागून देणें, चिठ्या टाकून विभागणें.

Allŏt'ment, *n.* (अलॉ'ट्मेन्ट्)—assignment; small plot of land let for cultivation. वांटप, वांटणी, विभागणी; शेती करण्याकरितां भाड्यानें दिलेला जमिनीचा भाग.

Allŏt'tee, *n.* (अलॉ'टी)—one to whom allotment or assignment is made, a plot-holder. ज्याला कांहीं भाग मिळाला आहे तो.

Allow', *v. t.* & *i.* (अला'उ)—admit; own, acknowledge; permit; give periodically;

add, deduct. मान्य करणें; परवानगी देणें; नेमणुकीणें देणें ; कमजास्त करणें.

Allow'able, *a.* (अला'उपबल्)—that may be allowed. मान्य करण्याजोगा, योग्य, वाजवी.

Allow'ance, *n.* (अला'उअन्स्)—fixed sum allowed; deduction from account, etc. देऊं केलेली ठराविक रक्कम; कमी केलेली रक्कम, सूट. *Annual allowance*=वर्षासन. *Extra allowance*=खेरीज मुशाहिरा, जादा भत्ता.

Al'lowědlў, *adv.* (अ'लाउइड्लि)—admittedly. मान्य केल्याप्रमाणें, कबूल केल्यावरून.

Alloy', *v. t.* (अलॉ'इ्)—mix with baser metal; debase. हीणकस धातूबरोबर मिसळणें; न्यूनता किंवा कमीपणा आणणें. *n.* baser metal mixed with gold; any base mixture. भेसळ, उत्तम धातूंत कमी दराची घातलेली धातु, हीण पदार्थ.

All'-round, *n.* (ऑ'ल्-राउन्ड्)—with ability in all departments. सर्व कामांत निष्णात.

All'spīce, *n.* (ऑ'ल्-स्पाइस्)—Jamaica pepper. शीतळचिनी, कापुरचिनी, कंकोळ.

Allude', *v. i.* (ॲल्यू'ड्)—refer indirectly to, hint at. अप्रत्यक्ष रीतीनें सुचवणें, अनुलक्षून बोलणें, उल्लेख करणें. [L. *ad*, at & *ludere*, to play]

Allūre', *v. t.* (ॲल्यु'अर्)—lure, entice, tempt; charm. मोह घालणें; भुलवणें.

Allūre'ment, *n.* (ॲल्यु'अर्-मेन्ट्)—that which entices or allures. भुलवणें, मोह, लालूच, आमिष.

Allu'sion, *n.* (-lōōzhn, ॲल्यू'झन्)—indirect reference; hint. उल्लेख, संदर्भ; सूचना.

Allu'sĭve, *a.* (-lōō-, अल्यू'झिव्ह्)—hinting at. सूचनात्मक, अप्रत्यक्ष सूचनेचा.

Allu'vĭal, *a.* (ॲल्यू'व्हिअल्)—full of deposit of earth, sand, etc. left by flood. पुरानें वाहून आलेल्या माती, वाळु वगैरे खळमळीनें भरलेलें.

Alluv'ĭon, *n.* (-loo-, ॲल्यू'व्हिअन्)—wash of sea or river against shore; matter deposited by flood. समुद्रांतून किंवा नद्यांतून येऊन तीरावर सांठलेला खळमळ; पुरानें वाहून आलेली माती वगैरे.

Alluv'ĭŭm, *n.* (lōō-, ॲल्यू'व्हिअम्)—(*pl.* -*ia*) deposit of flood. समुद्राच्या किंवा नदीच्या प्रवाहाबरोबर वाहून आलेली घाण.

Ăllў', *v. t.* (ॲला'इ्)—join in confederation, connect by marriage, form relation for special object. सख्य करणें; शरीरसंबंध करणें; संबंध जोडणें. *n.* allied state or person. दोस्त राष्ट्र; सख्य असलेला, दोस्त. [L. *ad*, to & *ligare*, to bind]

Ăl mă Ma'ter, *n.* (ॲ'ल्मा मे'टर्)—one's university or school. स्वतः ज्या ठिकाणीं शिक्षण घेतलें तें विश्वविद्यालय किंवा शाळा, विद्यापीठ.

Al'manăc, *n.* (awl- ऑ'ल्मनॅक्)—yearly calendar of months and days. पंचांग.

Almi'ghty, *a.* (awlmītĭ, ऑल्मा'इटि)—infinitely powerful. सर्वशक्तिमान् (परमेश्वर).

Almīr'a, *n.* (ॲल्मा'यूरा)—cupboard, press, chest of drawers, etc. कपाट, आलमीरा.

Alm'ond, *n.* (ăm-,आ'मन्ड्)—kernel of a fruit allied to plum. बदाम, बदामगर.

Ăl'mōner, *n.* (ॲ'ल्मोनर्)—official distributor of alms. दानाध्यक्ष, दानाधिकारी.

Al'mōst, *adv.* (awl-, ऑ'ल्मोस्ट्)—very nearly, all but. बहुतकरून, प्रायः, जवळजवळ. My work is almost done=माझें काम बहुतेक संपत आलें आहे. It is almost five o'clock=पांच वाजावयास आले. He had almost reached the village=तो गांवाला पोहोंचलाच होता.

Alms, *n.* (ămz, आम्झ्)—charitable relief or donation. भिक्षा, धर्मादाय. To live on alms=भीक मागून पोट भरणें.

Ăl'ōe, *n.* (ॲ'लो)—plant with erect spikes of flowers and bitter juice; (*pl.*) purgative drug from aloe juice. कोरफड, कोरकांडें, कुंवारकांडें; काळाबोळ.

Ăl'ōes-wŏŏd, *n.* ॲ'लोज़्वुड्)—the heart-wood of large spreading trees. अगर, अगरु.

Aloft', *adv.* (-aw-, अलॉ'फ्ट्)—high up, overhead; up in the rigging. उंच, वर; डोलकाठीवर.

Alō'ne, *a.* (अलो'न्)—solitary, by or to oneself. एकटा. *adv.* only, singly, without company. एकट्यानें. To let or leave alone=to abstain from interfering with. सोडून देणें, जाऊं देणें, ॰च्या वाटेस न जाणें.

Alŏng', *prep.* (अलॉ'ङ्ग्)—through the length or any part of the length of. वरून, बाजूनें. *adv.* in company; onward, in progress. बरोबर; पुढें. *All along*=all the time. अथपासून इतिपर्यंत, आरंभापासून शेवटपर्यंत. To get along=to get onward. उत्कर्ष पावणें, भरभराट होणें. Along with=in company with, in conjunction with. बरोबर, सह, समवेत. Along-shore, *a.*=by the shore, along and on the shore. किनाऱ्यानें, किनाऱ्याच्या बाजूनें. Alongside, *adv.*=close to side of ship. गलबताच्या बाजूलगत. Alongside of=side by side with. एकमेकांच्या जवळ जवळ, एकमेकांच्या अगदीं लगत.

Alōōf', *adv.* (अलू'फ्)—away, apart. दूर, अलग. To stand or keep or hold *aloof*=to stand apart. अलिप्त राहणें, दूर राहणें.

Alōōf'nĕss, *n.* (अलू'फ्-नेस्)—unconcern, lack of sympathy. अलिप्तपणा, तुटकपणा.

Aloud', *adv.* (अला'उड्)—loudly, with a loud voice. मोठ्यानें, मोठ्या स्वरानें.

Ălp, *n.* (ॲल्प्)—mountain-peak, summit of a mountain. पर्वताचें शिखर.

Ălpăc'a, *n.* (ॲल्पॅ'का)—llama with long wool; wool of llama; fabric made from the wool of llama. लांब लोंकर असलेलें लामा नांवाचें एक जनावर, त्याची लोंकर; आलपाक कापड.

Ăl'pĕnstŏck, *n.* (ॲ'ल्पेन्स्टॉक्)—a strong tall iron-shod staff used in climbing. चढतांना उपयोगांत आणण्याची काठी.

Ăl'pha, *n.* (ॲ'ल्फा)—first letter in Greek alphabet. ग्रीक लिपींतील पहिला वर्ण. From *Alpha to Omega*=from beginning to end. आरंभापासून शेवटपर्यंत, अथपासून इतिपर्यंत.

Ăl'phăbĕt, *n.* (ॲ'ल्फाबेट्)—letters used in a language. वर्णमाला, मूल वर्ण; मूळाक्षरें. Alphabĕt'ic, Alphabĕt'ical, *aa.*

Ălphabĕt'icallў, *adv.* (ॲल्फाबे'टिकलि)—in the order of the alphabet. वर्णानुक्रमें; विल्हेवारीनें.

Ăl'pīne, *a.* (ॲ'ल्पाइन्)—of the Alps; lofty. आल्प्स पर्वतासंबंधीं; फार उंच, अत्युच्च.

Alread'ў, *adv.* (-awlrĕdĭ, ऑल्रे'डि)—beforehand, even now. आधींच, अगोदर.

Al'sō, *adv.* (awl-, ऑ'ल्-सो)—besides, too, further, in addition. ही, देखील.

Al'tar, *n.* (awl-, ऑ'ल्टर्)—flat-topped block for offerings to a deity. वेदी, यज्ञवेदी.

Al'tar-piece, *n.* (ऑ'ल्टर्-पीस्)—painting or sculpture behind altar. स्थंडिलाच्या मागें केलेलें चितारी काम किंवा खोदकाम.

Al'ter, *v. t.* & *i.* (awl-, ऑ'ल्टर्)—change in character, position, etc.; modify. बदलणें, फेरफार करणें; कमजास्त करणें.

Alterā'tion, *n.* (ऑल्टरे'शन्)—change, modification. बदल, फेरफार, रूपांतर, विकृति.

Al'terātive, *a.* (awl-, ऑ'ल्टरेटिव्ह्)—tending to alteration. बदलणारा, फेरफार करणारा, फरक करण्यास समर्थ. *n.* medicine or treatment that alters processes of nutrition. शरीरास सर्व प्रकारें सुख देणारें औषध.

Al'tercāte, *v. i.* (awl-, ऑ'ल्टर्केट्)—dispute hotly, wrangle (*with*). वितंडवाद करणें; तोंडास तोंड देणें. [L. *alter*, another]

Altercā'tion, *n.* (awl-, ऑल्टर्के'शन्)—a dispute with anger, warm contention in words. तोंडास तोंड, हमरीतुमरी, झटापट.

Alter'nāte, *a.* (awl-, ऑल्ट'र्नेट्)—occurring each after one of the other kind. एक सोडून एक. On alternate days=एक दिवसा आड. *v. t.* & *i.* perform by turns, occur or happen in alternate order. आळीपाळीनें करणें, एक सोडून एक आळीपाळीनें येणें.

Alter'nātelў, *adv.* (ऑल्ट'र्-नेट्लि)—in an alternate manner, by turns. एक सोडून एक.

Alternā'tion, *n.* (ऑल्टर्ने'शन्)—reciprocal succession. परस्पर पालट, अदलाबदल.

Altern'ātive, *a.* (ऑल्ट'र्-नेटिव्ह्)—offering a choice between two things. वैकल्पिक. *n.* choice between two or more things. विकल्प, दोन गोष्टींतून एकीची निवड.-tively, *adv.*

Ăl'ternātor, *n.* (awl-, ऑ'ल्टरनेटर्)—a dynamo for producing alternating currents. एक प्रकारचें गतिमापक यंत्र.

Although', *conj.* (awl*thō*, ऑल्दो')—though, admit all that. यद्यपि, जरी.

Ăltĭm'ĕter, *n.* (ॲल्टि'मिटर्)—aeronautical instrument showing height above sea-level. समुद्राच्या पृष्ठभागापासून वरील एकंदर उंची मोजण्याचें यंत्र.

Al'tĭtūde, *n.* (आ'ल्टिट्यूड्)—vertical height; height above sea-level; (usu. *pl.*) high place, elevation, exaltation, eminence. उंची; समुद्रसपाटीपासूनची उंची; उच्च स्थान.

Altogĕth'er, *adv.* (awl-, -*th*-, ऑल्टु'दर्)—completely, entirely; on the whole. निखालस, सर्वस्वीं, अगदीं; सर्व मिळून.

Ăl'truism, *n.* (-ōō-, ॲ'ल्टुइझम्)—devotion to humanity, regard for others as a principle of action. परार्थनिरता, परहितनिष्ठा, परोपकारबुद्धि. Ăl'truist, *n.*; Ăltruĭs'tĭc, *a.*

Ăl'ŭm, *n.* (ॲ'लम्)—a mineral whitish transparent astringent salt. फटकी, तुरटी.

Alum'ĭnă, *n.* (अल्'मिना)—oxide of aluminium. एक प्रकारची माती, अल्युमिनिअमच्या व ऑक्सिजनच्या संयोगानें बनलेला पदार्थ.

Ălūmĭn'ĭŭm, *n.* (ॲल्यूमि'निअम्)—a white metal with a bluish tinge. एक प्रकारची पांढरी व हलकी कथलासारख्या रंगाची धातु.

Ălum'ĭnous, *a.* (-lōō-, ॲल्'मिनस्)—of alum or alumina. तुरटीचा, फटकीचा.

Alŭm'nŭs, *n.* (ॲल'म्नस्)—(*pl. alumni*) pupil of school or university. अमुक एक शाळेचा अगर विश्वविद्यालयाचा विद्यार्थी, अमुक एक विद्यालयांत शिकून तयार झालेला विद्यार्थी.

Al'ways, *adv.* (awl-, -z, ऑ'ल्वेझ्)—at all times; on all occasions. सर्वदा; नेहमीं.

Ăm, (ॲम्)—1st per. sing. of verb *to be*. (*To be* या क्रियापदाचें वर्तमानकाळीं प्रथमपुरुषाचें एकवचनाचें रूप) (मी) आहें.

Amain', *adv.* (अमे'न्)—with force; in haste. झपाट्यानें, मोठ्या जोरानें; धांदलीनें, घाईनें.

Amăl'gam, *n.* (अमॅ'ल्गम्)—mixture of a metal with mercury; plastic mixture. पारदमिश्र धातु; पारदमिश्रण. [Gr. *malassein*, to soften]

Amăl'gamāte, *v. t.* & *i.* (अमॅ'ल्-गमेट्)—mix; unite, combine. मिसळणें; एकत्र होणें.

Amălgamā'tion, *n.* (अमॅल्गमे'शन्)—mixture; union, combination. मिसळ; संमेलन, मिलाफ,

एक होणें, एकीकरण, एकत्र होणें, सायुज्यता. Amalgama'tive, *a.* Amalgama'tor, *n.*

Amănūĕn'sĭs, *n.* (pl. -*nses*, अॅमन्युए'न्सिस्)—clerk who writes from dictation. दुसऱ्यानें सांगितलेला मजकूर लिहिणारा कारकून.

Ăm'arănth, *n.* (ॲ'मरॅन्थ्)—kinds of plant with coloured foliage; imaginary unfading flower. कोरांटी, गुलमखर; एक काल्पनिक कधींहि न कोमेजणारें फूल. [Gr. *a*, not & *mar*, to waste away]

Ămarăn'thīne, *a.* (ॲमॅरॅ'न्थाइन्)—pertaining to amaranth; unfading. कोरांटीचे फुलासारखें, जांभळटसर; कधींहि न कोमेजणारें.

Amăss', *v. t.* (अमॅ'स्)—heap together; accumulate. गोळा करणें; संचय करणें, सांठविणें. [L. *ad*, to & *massa*, a mass]

Ăm'ateur, *n.* (-टा, ॲ'म-ट्युअर्)—one who is fond *of*; one who cultivates a thing as a pastime. शोकी, हौशी, कलाव्यसनी; धंदेवाला नसून करमणूक म्हणून कारागिरीचें काम किंवा अभ्यास हौशीनें करणारा मनुष्य.

Ăm'atĭve, *a* (ॲ'मटिव्ह्)—disposed to love, amorous. विषयी, विलासी, कामी.

Ăm'atŏl, *n.* (ॲ'मटॉल्)—a high explosive. उत्स्फोटक किंवा भडकणारें द्रव्य.

Ăm'ătorȳ, *n.* (ॲ'मेटरि)—of lovers, amorous. प्रेमीजनांसंबंधीं, प्रेमजनक, शृंगारिक.

Amāze', *v. t.* (अमे'झ्)—overwhelm with wonder. आश्चर्यचकित करणें, थक्क करणें To be amazed=तोंडांत बोट घालणें, चकणें.

Amāze'ment, *n.* (अमे'झ्-मेन्ट्)—astonishment, wonder, confusion. विस्मय, आश्चर्य, अचंबा.

Amāz'ĭng, *a.* (अमे'झिंग्)—very wonderful, astonishing. फार आश्चर्यकारक, अद्भुत.

Ăm'azŏn, *n.* (ॲ'मझॉन्)—female warrior; a warlike or masculine woman, virago. शूर स्त्री; पुरुषी स्त्री, जहांबाज बाई.

Ămbā'ges, *n. pl.* (-jēz, ॲम्बे'जीझ्)—roundabout ways. द्राविडी प्राणायाम, आडेवेढे. [L. *ambi*, about, & *agere*, to drive]

Ămbăss'ador, *n.* (ॲम्बॅ'सडर्)—minister sent to a foreign court. राजदूत, राजाच्या परदरबारीं जाणारा वकील. [L. *ambactus*, a dependant]

Ăm'ber, *n.* (ॲ'म्बर्)—a yellow translucent fossil resin. जमिनींत सांपडणारा पिंवळसर रंगाचा एक सुगंधी पदार्थ, तैलस्फाटिक, तृणमणि.

Ăm'bergris, *n.* (-ēs, ॲ'म्बरग्रीस्)—a fragrant substance of an ash-gray colour obtained from the sperm-whale. उदी अंबर, एका जातीचे माशाचे अंगापासून उत्पन्न होणारा सुगंधी पदार्थ.

Ămbĭdĕx'ter, *a.* (ॲम्बिडे'क्स्टर्)—able to use both hands alike; double-dealing. दोन्ही हातांनीं सारखा, सव्यसाची; उभयपक्षाला सारखा फसवणारा. [L. *ambo*, both & *dexter*, the right hand]

Ămbĭdĕxtĕ'rĭtȳ, *n.* (ॲम्बिडेक्स्टे'रिटि)—superior cleverness or adaptability. सव्यसाचित्व, फार हुशारी. Ămbĭdĕxte'rous, -dextrous, *a.*

Ăm'bĭent, *a.* (ॲ'म्बिएन्ट्)—going round about, surrounding. वेष्टन करणारा, वेढणारा, घेरणारा. [*ambi*, about & *ire*, to go]

Ămbĭgū'ĭtȳ, *n.* (ॲम्बिग्यू'इटि)—doubtfulness of meaning, uncertaintly of signification. अर्थाचा संदिग्धपणा, द्व्यर्थता, दुटप्पीपणा.

Ămbĭg'ūous, *a.* (ॲम्बि'ग्युअस्)—of doubtful meaning; uncertain, of uncertain signification. संदिग्ध, द्व्यर्थी; अनिश्चित (अर्थाचा).

Ăm'bĭt, *n.* (ॲ'म्बिट्)—confines, scope, circumference, circuit. मर्यादा, सीमा, हद्द, विस्तार.

Ămbĭ'tion, *n.* (ॲम्बि'शन्)—desire for distinction; aspiration, object of aspiration. महत्त्वाकांक्षा; मोठेपणाची हांव, ऐश्वर्याकांक्षा.

Ămbĭ'tious, *a.* (-shus, ॲम्बि'शस्)—ardently desirous, full of ambition. महत्त्वाकांक्षी.

Ăm'ble, *v. i.* (ॲ'म्बल्)—move at easy pace. साध्या गतीनें चालणें. *n.* easy pace. सहज गति, साधी चाल. [L. *ambulare*, to walk about]

Ămbrō'sĭa, *n.* (-zĭa, ॲम्ब्रो'झिआ)—food of the gods; thing delightful to taste or smell. देवांचें अन्न, सुधा, अमृत; स्वादिष्ट वस्तु. Ămbrō'sial, *a.* [L. *a*, not & *mors*, death]

Ăm'būlance, *n.* (ॲ'म्बुलन्स्)—moving hospital; conveyance for sick or wounded persons. फिरता दवाखाना; आजारी किंवा जखमी लोकांकरितां गाडी. [L. *ambulare*, to walk about]

Ăm'būlātorȳ, *a.* (ॲ'म्ब्यूलेटरि)—of or for walking. चालता, फिरता, भटकण्याचा. *n.* place for walking; cloister. फिरण्याची जागा; घराजवळील हिंडण्याफिरण्याची जागा.

Ămbŭscāde', *n.* (ॲम्बस्के'ड्)—a hiding to attack by surprise; a body of troops in concealment; the hidden place of ambush. दबा धरणें, दडी; दबा धरून राहिलेलें सैन्य; शत्रूवर हल्ला करण्याच्या हेतूनें दबा धरलेली जागा.

Ăm'bush, *n.* (-ŏŏ-, ॲ'म्बुश्)—troops concealed in woods etc.; concealment to attack by surprise. दबा धरून राहिलेलें सैन्य; दबा धरणें.

Amē'liorāte, *v. t. & i.* (ॲमी'लिओरेट्)—make or become better. अधिक चांगलें करणें किंवा होणें, उन्नति करणें. Ame'liorator, *n.* Ame'liorative, *a.* [L. *ad*, to & *melior*, better]

Amēlĭorā'tion, *n.* (अमीलिओरे'शन्)—the condition of being made better; improvement. सुधारण्याची स्थिति; सुधारणा, बरें करणें.

Amĕn', *inter.* (आमें'न्)—so be it. तथास्तु.

Amē'nāble, *a.* (ॲमीं'नेबल्)—responsible, accountable; tractable. जबाबदार, जाब देणारा; ऐकून घेऊन त्याप्रमाणें चालणारा, वळवतां येणारा, अनुनेय. Ame'nably, *adv.* Amē'nability, *n.* [Fr. *a*, to & *mener*, to lead]

Amĕnd', *v. t.* & *i.* (ॲमें'न्ड्)—abandon evil ways, correct, improve; make improvements. सुधारणें, टीक होणें; दुरुस्त करणें. [L. *emendare*, free from faults]

Amĕnd'ment, *n.* (अमें'न्ड्-मेन्ट्)—change for the better; proposed alteration. सुधारणा, दुरुस्ती; उपसूचना, प्रतिसूचना.

Amĕnds', *n.* (-z, अमें'न्ड्झ्)—compensation. मोबदला, भरपाई. To make *amends*=to supply a loss. निस्तरणें; नुकसान भरपाई करणें.

Amē'nĭty̆, *n.* (ॲमीं'निटि)—pleasantness. रमणीयता. (*pl.*) agreeable manners. चांगली वागणूक, स्वभावाचा चांगुलपणा.

Amerce', *v. t.* (ॲमर्'स्)—fine, punish by a fine. द्रव्यदंड करणें, दंड देण्याची शिक्षा देणें. Amer'ciable, *a.*; Amerce'ment, *n.*

Amĕ'rĭcan, *n.* (अमे'रिकन्)—of America or United states. अमेरिका खंडांतील. *n.* citizen of America. अमेरिका खंडांतील रहिवासी.

Amĕ'rĭcănĭsm, *n.* (अमे'रिकॅनिझम्)—word or phrase peculiar to America; attachment to America. अमेरिकन भाषेंतील विशेष शब्दप्रयोग; अमेरिकेविषयीं प्रेम.

Ăm'ĕthy̆st, *n.* (ॲ'मिथिस्ट्)—a precious stone of purple violet colour. एक प्रकारचा मौल्यवान खडा, याकुत. Am'ethystine, *a.*

Ā'mĭable, *a.* (ए'मिएबल्)—lovable, inspiring friendliness. प्रेमळ, प्रेमास पात्र, स्नेह उत्पन्न करणारा, मनमिळाऊ. Amiabi'lity, *n.*

Ăm'ĭcāble, *a.* (ॲ'मिकेबल्)—friendly; done in a friendly spirit. मित्रत्वाचा, सलोख्याचा, सलोख्यानें केलेला. Amicabi'lity, *n.*

Ăm'ĭcābly̆, *adv.* (ॲ'मिकेब्लि)—in a friendly manner. मित्रत्वानें, सलोख्यानें.

Amĭd', Amĭdst', *prep.* (अमि'ड्, अमि'ड्स्ट्)—in the middle of, among. मध्यें, मध्यभागीं.

Amĭd'shĭps, *adv.* (अमि'ड्शिप्स्)—in the middle of ships. जहाजांच्या मध्यभागीं.

Amĭss', *adv.* (अमि'स्)—out of order, badly, wrongly, untowardly. गैरवाजवी, अयोग्य रीतीनें To take *amiss*=to take offence at. उलटा अर्थ घेणें, चीड येणें, अपमान झालासा वाटणें. *Not amiss*=appropriate. योग्य.

Ăm'ĭty̆, *n.* (ॲ'मिटि)—friendship, friendly relations. सख्य, स्नेहभाव, दोस्ती, (राष्ट्रांराष्ट्रांमधील) सुहृद्भाव. [L. *amicus*, a friend]

Ăm'mēter, *n.* (ॲ'म्-मिटर्)—an instrument for measuring force of electric currents. विद्युत्प्रवाह मोजण्याचें यंत्र, विद्युत्प्रवाहमापक यंत्र.

Ammō'nĭa, *n.* (ॲमो'निआ)—a colourless pungent gas with strong alkaline reaction. एक प्रकारचा वायुरूप पदार्थ, नवसागर. Ammō'nĭăc, Ammō'nĭacal, Ammō'nĭcāted, *aa.*

Ămm'onīte, *n.* (ॲ'मनाइट्)—coil-shaped fossil shell. एक शिंगासारखा खनिज पदार्थ.

Ammūnĭ'tion, *n.* (ॲम्यूनि'शन्)—military stores (of powder, shot, etc.). दारूगोळा, युद्धसामुग्री. [L. *munire*, to fortify]

Ămnē'sĭa, *n.* (ॲम्नी'सिआ)—loss of memory, forgetfulness. स्मृतिभ्रंश, विस्मृति. [Gr. *a*, not & *mnesis*, memory]

Ăm'nĕsty̆, *n.* (ॲ'म्नेस्टि)—act of oblivion; general pardon. (राजकीय गुन्हेगारांच्या) माफीचा ठराव; सरसकट माफी, पूर्ण क्षमा. [Gr. *a*, not & *mna*, to remember]

Amoe'ba, *n.* (-mē-, ॲमी'बा)—microscopic animalcule perpetually changing shape. नेहमीं आकार बदलणारा इंद्रियरहित सूक्ष्म जंतु. (*pl.* amaebae, -bas)

Among', Amongst', *prep.* (-mŭ-, अमं'ग्, अमं'ग्स्ट्)—in the midst of, in the number of; reciprocally. मध्यें, आंत, च्या बरोबर; आपापसांत. From *among*=मधून, पैकीं.

Ā-mŏ'ral, *a.* (ए-मॉ'रल्)—non-moral, out of morals. नीतीशीं संबंध नसलेला, अनैतिक.

Ăm'ŏrous, *a.* (ॲ'मरस्)—in love, loving; relating to love. कामेच्छु, विलासी; शृंगारिक.

Amŏrph'ĭsm, *n.* (अमॉ'र्फिझम्)—a state of being amorphous or without crystallization even in the minutest particles. बेडौलपणा, बेढबपणा. [Gr. *a*, not & *morphe*, form]

Amŏrph'ous, *a.* (अमॉ'र्फस्)—shapeless; anomalous. आकृतिविरहित, बेढब; असंबद्ध.

Amŏrt'īze, *v. t.* (अमॉ'र्टाइझ्)—extinguish debt, especially by means of a sinking fund. (ऋणविमोचक निधींतून पुन्हां न वाढेल अशा रीतीनें) कर्ज फेडणें. Amŏrtīzā'tion, *n.* [L. *ad*, to & *mortis*, death]

Amount', *v. i.* (अमा'उन्ट्)—be equivalent to; reach the total of. शीं पुष्कळ बाबतींत साम्य असणें, तात्पर्य असणें; एकूण जमा होणें. *n.* total; quantity. एकूण जमा, रास; परिमाण. Gross *amount*=गोळाबेरीज, एकंदर आकार. [L. *a*, to & *mons*, *mont*, a hill]

Amour', *n.* (-ōōr, ॲमू'र्)—love-affair, intrigue. प्रेमविषय, प्रेमकारस्थान, इष्कबाजी.

Ămpĕlŏp'sĭs, *n.* (ॲम्पिलॉ'प्-सिस्)—kinds of vine-creeper. एक जातीची द्राक्षांची वेल.

Ăm'pere, *n.* (-pēr, ॲं'म्पिअर्)—unit of electric current. विजेच्या प्रवाहशक्तीचें प्रमाण.

Ăm'persănd, *n.* (अॅ'म्परसॅन्ड्)—the sign & (and). 'आणि' या अर्था & ही खूण.

Ămphĭb'ĭan, *a.* & *n.* (ॲम्फि'बिअन्)—(animal) living both on land and in water; (aeroplane) designed to rise from and alight on either land or water. जळीं स्थळीं राहण्यास समर्थ असा (प्राणी); जमिनीवर व पाण्यांत उतरतां येण्याजोगें विमान.

Amphĭb'ĭous, *a.* (ॲम्फि'बिअस्)—living both on land and in water. जमिनीवर व पाण्यांत राहणारा, जलस्थलवासी.

Am'phĭthĕătre, *n.* (ॲ'म्फिथिएटर्)—semi-circular gallery in theatre. अर्धचंद्राकार नाटकगृहांतील वरचा मजला.

Ăm'phora, *n.* (ॲ'म्फोरा)—Greek or Roman two-handled vessel. दोन कान असलेलें ग्रीक किंवा रोमन भांडें.

Ăm'ple, *a.* (ॲ'म्पल्)—spacious, extensive; abundant; quite enough. प्रशस्त; विपुल; अगदीं पुरेसा. A'mply, *adv.*; A'mpleness, *n.*

Ămplĭfĭcā'tion, *n.* (ॲम्प्लिफिके'शन्)—extension, enlargement; making the most of a thing. वाढविणें, विस्तार; पाल्हाळ.

Ăm'plĭfȳ, *v. t.* & *i.* (ॲ'म्प्लिफाय्)—enhance, enlarge, expatiate. वाढविणें, विस्तार करून बोलणें किंवा लिहिणें, फुगवून सांगणें. [L. *amplus*, ample, & *facere*, to make]

Ăm'plĭtūde, *n.* (ॲ'म्प्लिट्यूड्)—breadth; abundance; wide range; dignity; the distance between the east point of a horizon at which a heavenly body rises, or from the west point at which it sets. प्रशस्तपणा, विपुलता; विस्तीर्णता, अघळपघळपणा; मोठेपणा; प्रौढी; (खगोलविद्येंत) सूर्य तारे किंवा इतर ग्रह हे क्षितिजाच्या ज्या बिंदूंत उगवतात किंवा मावळतात तो बिंदु आणि क्षितिजावरील पूर्व किंवा पश्चिम बिंदु ह्यांच्यामध्यें जो कंस सांपडतो तो.

Ămpŭll'a, *n.* (ॲम्प'ला)—Roman globular two-handled flask. खुजासारखें दोन कान असलेलें रोमन भांडें. (*pl.* Ampullae-ॲम्प'ली)

Ăm'pūtāte, *v. t.* (ॲ'म्प्यूटेट्)—cut off (limb etc.). कापून काढणें, छाटणें, कलम करणें.

Ămpūtā'tion, *n.* (ॲम्प्यूटे'शन्)—the act of cutting off a limb. अंगच्छेदन. Ăm'pūtātor, *n.*

Amŭ'ck, *adv.* (ॲम'क्)—(run about) in frenzied thirst for blood. रक्तलालसेनें उन्मत्त होऊन, अविचारानें, माथेफिरूपणानें.

Ăm'ūlĕt, *n.* (ॲ'म्यूलेट्)—thing worn as a charm against evil. (चेटुक, भूतबाधा व इतर रोग यांचें निवारण करणारा) मंत्रसिद्ध ताईत.

Amūse', *v. t.* (-z, ॲम्यू'झ्)—excite the risible faculty; find diversion for; entertain. करमणूक करणें; रमवणें; मनोरंजन करणें.

Amū'sement, *n.* (-z, अम्यू'झ्-मेन्ट्)—pleasant diversion; excitement of risible faculty; pastime. मनोरंजन; करमणूक; मौज.

Ăn, *a.* (ॲन्)—any one. कोणताहि एक (indefinite article). *conj.* if. जर.

Ănabăp'tĭst, *n.* (ॲनबॅ'प्टिस्ट्)—one who baptizes over again. दुसऱ्यांदा ज्याचा बाप्तिस्मा झाला आहे असा. [Gr. *ana*, again & *baptistes*]

Ănabăp'tĭsm, *n.* (ॲनबॅ'प्टिझम्)—re-baptism; doctrine of anabaptists. पुन्हा दुसऱ्यांदा बाप्तिस्मा देणें; प्रौढबाप्तिस्मावाद.

Ană'chrŏnĭsm, *n.* (-k-, ॲनॅ'क्रॉनिझम्)—chronological error; thing out of harmony with the period. कालगणनेमध्यें चूक, कालक्रमविपर्यय; कालक्रमविपरीत गोष्ट. [Gr. *ana*, back & *chronos*, time]

Anaē'mĭa, *n.* (ॲनी'मिआ)—lack of blood; unhealthy pallor. रक्त कमी होणें, रक्तक्षय; विकारी फिकटपणा. Anae'mic, *a.* [Gr. *an*, not & *haima*, blood]

Ănaesthē'sĭa, *n.* (ॲनीस्थी'सिआ)—insensible condition. सर्वांगास किंवा कांहीं विशेष भागास बधिरता येणें, बधिरावस्था, सुप्ति.

Ănaesthĕt'ĭc, *a.* (ॲनीस्थे'टिक्)—producing anaesthesia. बधिरता उत्पन्न करणारा.

Ăn'agrăm, *n.* (ॲ'नग्रॅम्)—word or phrase formed from letters of another. एका शब्दाचीं अक्षरें फिरवून त्यांचा नवा शब्द करणें. Ănagrammă'tĭc, -tical, *aa.* -mătĭst, *n.*

Ā'nal, *a.* (ए'नल्)—of the anus, pertaining to the anus. गुदद्वाराचें, मलद्वारासंबंधीं.

Ăn'alĕcts, *n. pl.* (ॲ'नलेक्ट्स्)—literary gleanings. (निरनिराळ्या ग्रंथांतील) वेंचे, गाथाळग्रंथ. [Gr. *ana*, up & *legein*, to gather]

Ănalĕp'tĭc, *a.* & *n.* (ॲनले'प्टिक्)—restorative (medicine). पौष्टिक, पुष्टिकारक (औषध).

Ănălgē'sĭă, *n.* (ॲनॅल्जी'सिआ)—absence of pain. दुःखाचा अभाव. Ănălgĕ'tĭc, *a.*

Analog'ĭcal, *a.* (ॲनलॉ'जिकल्)—according to analogy; expressing an analogy, analogous. सारखा; सदृश. [Gr. *ana*, according to, & *logos*, ratio]

Anăl'ogous, *a.* (ॲनॅ'लोगस्)—similar, parallel, proportional, corresponding. सारखा, समांतर.

Ăn'alŏgue, *n.* (ॲ'नलॉग्)—a word or body resembling another. सदृश शब्द, सारखा पदार्थ.

Anăl'ogȳ, *n.* (ॲनॅ'लॉजि)—parallelism, similarity; reasoning from parallel cases.

समांतरता, साम्य; तुलना, उपमिति. Ănalŏg'ical, *a.*; Āna'lŏgīze, *v. t.* & *i.*; Ăna'lŏgĭst, *n.*

Ăn'alȳse, *v. t.* (-z, ॲ'नलाइझ्)—ascertain the elements of; examine minutely the constitution of. मूळचीं तत्त्वें निराळीं करणें; पृथक्करण करणें. [Gr. *ana*, up, & *lyein*, to loose]

Anăl'ȳsĭs, *n.* (ॲनॅ'लिसिस्)—resolution into simple elements. पृथक्करण, मूलतत्त्वशोधन. (*plu.* Ănălysēs –ॲनॅ'लिसीस्)

Ăn'alȳst, *n.* (ॲ'नलिस्ट्)—one who analyses. पृथक्करण करणारा, मूलतत्त्वशोधक.

Ănalȳt'ic, Ănalȳt'ĭcal, *aa.* (ॲनलि'टिक्, ॲनालि'टिकल्)—pertaining to analysis, employing the analytic method; resolving into first principles. पृथक्करणविषयक, मूलतत्त्वशोधात्मक.

Ăn'apaest, *n.* (ॲ'नपीस्ट्)—*a metrical foot* of three syllables (˘ ˘ ¯). पहिलीं दोन पदें लघु आणि तिसरें दीर्घ असा गण (˘ ˘ ¯).

Ănăr'chĭc, -chĭcal, *aa.* (ॲना'र्किक्, ॲना'र्किकल्)—lawless, without government. अंदाधुंदीचा, बेबंद्. [Gr. *an*, not, and *arche*, rule]

Ăn'archĭst, *n.* (-k-, ॲ'नर्किस्ट्)—advocate of anarchy, one who excites revolt in a state. बेबंदशाही माजविणारा, राजसत्ताविरोधक.

Ăn'ărchȳ, *n.* (-k-, ॲ'नार्कि)—absence of government; *disorder.* अराजक स्थिति, बेबंदशाही; बंडाळी. An'archism, *n.*

Anăstomŏ'sĭs, *n.* (ॲनॅस्टॉमॉ'सिस्)—cross connection between arteries, branches, rivers, etc. तंतुसंयोग, वाहिनींचा संधि. [Gr. *ana*, again & *stoma*, a mouth]

Anăth'ėma, *n.* (ॲनॅ'थिमा)—solemn curse; accursed thing. बहिष्कार, शाप; शापित वस्तु, बहिष्कृत केलेली वस्तु. Anăth'ėmatīze, *v. t.*

Ănătŏm'ĭcal, *a.* (ॲनॅटॉ'मिकल्)—belonging to anatomy; structural. शारीरशास्त्रासंबंधीं; शरीरछेदनविद्येसंबंधीं; रचनेसंबंधीं.

Anăt'omȳ, *n.* (ॲनॅ'टोमि)—science of bodily structure; dissection; a mere *skeleton.* शारीरशास्त्र; शरीराचे अवयव निराळे करणें; केवळ अस्थिपंजर. Ănat'ŏmĭst, *n.* शारीरशास्त्रज्ञ.

Ăn'cėstor, *n.* (ॲ'न्-सिस्टर)—forefather. पूर्वज, वाडवडील. [L. *ante*, before, & *cedere*, to go]

Ăncĕs'tral, *a.* (ॲन्से'स्ट्रल्)—*belonging to* ancestors, inherited from forefathers. वाडवडलार्जित, परंपरागत, पिढीजाद्.

Ăn'cĕstrȳ, *n.* (ॲ'न्सेस्ट्रि)—ancient honourable descent, lineage. कुलपरंपरा, खानदानी.

Ănc'hor, *n.* (-k-, ॲ'ङ्कर्)—*an iron instrument* for holding ships at rest in water. गलबताचा नांगर. Sheet *anchor*=largest anchor; (*fig.*) source of confidence. जहाजाचा सर्वांत मोठा नांगर; सर्वांत मोठा आश्रय, शेवटचा तरणोपाय. To cast *anchor*=to let down anchor. नांगर टाकणें. To weigh *anchor*= to take up anchor. गलबत हांकारणें. *At anchor*=anchored. नांगरलेलें. *v. t.* & *i.* secure ship with anchor; fix one's hope on. नांगर टाकणें; एखाद्यावर आशा धरून असणें.

Ănc'horāge, *n.* (-k-, ॲ'ङ्करेज्)—place for ship lying at anchor. नांगर टाकण्याची जागा, खुटवा.

Anc'horėt, Ănc'horīte, *n.* (-k-, ॲ'ङ्करिट्, ॲ'ङ्कराइट्)—hermit, recluse; person of secluded habits. अरण्यवासी, तापसी, वैरागी; एकांतवासी. (*fem.* Anchoress, Aancress)

Ăn cient, *a.* (ए'न्शन्ट्)—of times long past, old. प्राचीन, पुरातन, जुना. The *Ancient* of Days=God. ईश्वर. *The ancients*=civilized nations of antiquity. पूर्वीचे सुधारलेले देश. *n.* an ensign. निशाण.

Ăn'cĭllarȳ, *a.* (ॲ'न्सिलरि)—subservient, subordinate. हाताखालील, गौणभूत, दुय्यम.

Ănd, *conj.* (ॲन्ड्)—*connecting words, clauses.* and sentences. आणि, व. And so forth= वगैरे, इत्यादि. And yet=तथापि.

Ăndăn'tė, *a.* (ॲन्डॅ'न्टि)—(of *Music*) moderately slow. सारख्या धिम्या तालाचें (गाणें).

Ăn'dīron, *n.* (-īrn, ॲ'न्डायर्न्)—a fire-dog for *supporting burning* wood on an open hearth. जळाऊ लांकडाला आधार म्हणून केलेली लोखंडी योजना.

An'ĕcdōte, *n.* (ॲ'नेक्डोट्)—narrative of detached incidents, single passage of private life. आख्यायिका, उपाख्यान, अप्रसिद्ध कथा. [Gr. *an*, not & *didonai*, to give]

Ăn'ĕcdōtāge, *n.* (ॲ'नेक्डोटेज्)—*telling* of anecdotes, esp. in old age. गोष्ट सांगण्याची म्हातारपणची हौस. Ănĕcdō'tal, *a.*; Ăn'ĕcdōtĭst, *n.* चटकदार गोष्टी लिहिणारा.

Anēle', *v. t.* (ॲनी'ल्)—to anoint, give extreme *unction to.* उटणें लावणें, माखणें, मर्दन करणें.

Anėmŏm'ėter, *n.* (ॲनिमॉ'मिटर्)—instrument for measuring force of wind. वायूची गति मोजण्याचें यंत्र, वायुगतिमापक यंत्र. [Gr. *anemos*, wind & *metron*, measure]

Anĕm'onė, *n.* (ॲने'मोनि)—a woodland flower, wind-flower. एक प्रकारचें रानटी फूल.

Anĕnt', *prep.* (अने'न्ट्)—concerning, about, respecting, regarding. विषयीं, बद्दल.

Ăn'erŏĭd, *a.* (ॲ'नरॉइड्)—not employing fluid. अनार्द्र, अप्रवाही. Ănerŏĭd barometer, *n.*= barometer that measures air-pressure by its action on lid of box exhausted of air. अप्रवाही भारमापक. [Gr. *a*, not & *neros*, wet]

Ăn'eurўsm, -ĭsm, *n.* (ॲ'न्युरिझम्)—morbid dilation of an artery; abnormal enlargement. धमनीला आलेली सूज; विषम वाढ. [Gr. *ana*, up & *eurus*, broad]

Anew', *adv.* (अन्यू')—again, once more, over again, afresh. पुनः, नव्यानें, फिरून.

Ā'ngel, *n.* (-j-, ए'न्जल्)—divine messenger; attendant spirit; obliging person; old English gold coin. देवदूत; रक्षक देवता; उपकार करणारा; इंग्लंडांतील एक प्राचीन सोन्याचें चलनी नाणें. Ăngĕl'ic, *a.*

Ăngĕl'ĭca, *n.* (ॲन्जे'लिका)—a wild or garden aromatic plant. हळदी चाफा.

Ăng'er, *n.* (ॲ'ङ्गर्)—hot displeasure. राग, क्रोध. *v. t.* excite anger in, irritate, provoke. राग आणणें, क्रोध उत्पन्न करणें.

Ăng'le, *n.* (ॲ'ङ्गल्)—the space between two meeting lines; a corner; a fish-hook. कोन; कोंपरा; गळ. Acute angle=लघु कोन. Alternate angle=व्युत्क्रम कोन. Complementary angle=कोटि कोन. Corresponding angle=अनुरूप कोन. External angle=बाह्य कोन. Internal angle=अंतःकोन. Oblique angle=विषम कोन. Obtuse angle=विशाल कोन. Opposite angle=अभिमुख कोन. Right angle=काटकोन, समकोन. Supplementary angle=पूरक कोन. Vertical angle=शिरस्थ कोन. Angle at the circumference=परिघ-कोन. Angle in a segment=वर्तुलखंडांतील कोन. *v. i.* fish with rod, hook and bait. गळ टाकून मासे धरणें. [L. *angulus*, an angle]

Ăng'ler, *n.* (ॲ'ङ्ग्लर्)—a fisher. मासे धरणारा.

Ăng'lĭcĭsm, *n.* (ॲ'ङ्ग्लिसिझम्)—English idiom. इंग्रजी भाषेचा संप्रदाय.

Anglo-mā'nĭa, *n.* (अँग्लोमे'निआ)—excessive admiration of English customs. इंग्रजी रीतिभातीविषयीं अतिशय वेड.

Anglo-phō'bia, *n.* (अँग्लो-फो'बिआ)—fear and dislike of England. इंग्रज लोकांबद्दल वाटणारी भीति व तिटकारा.

Anglo-Săx'on, *a.* (ॲङ्ग्लो-सॅ'क्सन्)—of the English before the Norman conquest. नॉर्मन विजयापूर्वीच्या इंग्रज लोकांसंबंधीं. *n.* the English before the Norman conquest; old English language before 1100. नॉर्मन विजयापूर्वीचे इंग्रज लोक; इसवी सन ११०० पूर्वी प्रचलित असलेली इंग्रजी भाषा.

Ăng'lĭcīze, *v. t.* (ॲ'ङ्ग्लिसाइझ्)—to make English. इंग्रजी भाषेचें रूप देणें.

Ănglo-In'dian, *n.* (ॲङ्ग्लो-इं'डिअन्)—person of British birth but living or having lived long in India. हिंदुस्थानांत पुष्कळ दिवस राहणारा किंवा राहिलेला इंग्रज.

Ăngō'la, *n.* (अँगो'ला)—fabric made from wool of Angora goat. अँगोरा येथील बकऱ्यांच्या लोकरीपासून तयार केलेलें कापड.

Ăn'grĭlў, *adv.* (अँग्रिलि)—in anger. रागानें.

Ăng rў, *a.* (ॲ'ङ्ग्रि)—feeling or showing anger; inflamed, painful. क्रुद्ध, रागावलेला; सुजलेली, दुःख देणारी (जखम वगैरे).

Ăng'uish, *n.* (ॲ'ङ्ग्विश्)—severe mental or bodily pain. मानसिक पीडा, मनोवेदना, यातना. [L. *angustia*, perplexity]

Ăng'ūlar, *a.* (ॲ'ङ्ग्युलर्)—having angles, sharp-cornered. कोण असलेला; अणीदार.

Ăngūlăr'ĭtў, *n.* (ॲङ्ग्युलॅ'रिटि)—the quality of being angular. सकोणता. Angularity of disposition=स्वभावाच्या खाणाखोचा.

Ăn'ĭlīne, *n.* (ॲ'निलाइन्)—a product of coaltar obtained from indigo and the source of many dyes. निळीपासून केलेला पदार्थ.

Ănĭmădvĕr'sion, *n.* (ॲनिमॅड्व्ह'र्शन्)—remarks by way of criticism or reproof. बोल, दोषारोप, कडक टीका, विरुद्ध टीका.

Ănĭmădvĕrt', *v. t.* (ॲनिमॅड्व्ह'र्ट्)—to pass criticism or censure upon, to remark. दोष लावणें, कडक टीका करणें. [L. *aniums*, the mind, *ad*, & *vertere*, to turn]

Ăn'ĭmal, *n.* (ॲ'निमल्)—a living being; a creature other than man. प्राणि; जनावर, पशु. *a.* of animals; carnal, sensual. प्राणिविषयक; विषयासंबंधीं, वैषयिक.

Ănĭmăl'cūle, *n.* (ॲनिमॅ'ल्क्यूल्)—microscopic animal. अतिक्षुद्र जंतु, अगदीं लहान जीव.

Ăn'ĭmălĭsm, *n.* (ॲ'निमॅलिझम्)—exercise of animal faculties. शरीरधर्म, शरीरव्यापार.

Ănĭmăl'ĭtў, *n.* (ॲनिमॅ'लिटि)—state of being an animal, animal nature. प्राणिस्वभाव.

Ăn'ĭmalīze, *v. t.* (ॲ'निमलाइझ्)—convert into animal substance; sensualize. शरीरांत प्राणिद्रव्यरूपानें विकार पावणें; कामवासना जागृत करणें. Ănĭmalīza'tion, *n.*

Ăn'ĭmāte, *v. t.* (ॲ'निमेट्)—breathe life into; encourage, inspirit, enliven, invigorate. सचेतन करणें; प्रोत्साहन देणें, चेतविणें, चेव आणणें. *a.* living, not inanimate. सजीव, जिवन्त, सचेतन. [L. *anima*, breath]

Ănĭmā'tion, *n.* (ॲनिमे'शन्)—ardour, life, vivacity, sprightliness, vigour. उत्तेजन, चेव, उत्साह, चेतना, तेज. Ăn'ĭmātor, *n.*

Ănĭmŏs'ĭtў, *n.* (ॲनिमॉ'सिटि)—violent hatred, hostility, enmity. वैरभाव, शत्रुत्व, वैमनस्य, द्वेषभाव. [L. *animus*, the mind]

Ăn'imŭs, *n.* (ॲ'निमस्)—bitter feeling against, hostile spirit. द्वेषबुद्धि.

Ăn'ise, *n.* (ॲ'निस्)—plant with aromatic seed with very useful seeds. बडीशेप.

Ăn'iseed, *n.* (ॲ'निसीड्)—the seed of the anise. बडीशेपेचें बीं, बडीशेप.

Ăn'kle, *n.* (ॲ'ङ्कल्)—joint connecting foot with leg. पायाचा घोटा, पाऊल आणि त्याचे वरील हाडाचा सांधा. Ănk'le-bone, *n.* घोटा.

Ănk'lĕt, *n.* (ॲ'ङ्क्लेट्)—support or ornament for the ankle. वाळा, पैंजण, तोरड्या, सांखळ्या.

Ănn'a, *n.* (ॲ'ना)—sixteenth part of a rupee. रुपयाचा सोळावा भाग, आणा.

Ănn'alist, *n.* (ॲ'नलिस्ट्)—writer of annals. सालवार इतिहास लिहिणारा.

Ănn'als, *n. pl.* (-z, ॲ'नल्झ्)—narrative of events year by year; records. प्रतिवार्षिक वृत्तांत, सालवार बखर. [L. *annus*, a year]

Ănneal', *v. t.* (ॲनी'ल्)—toughen by gradually diminishing heat, temper. तापवून नरम करणें, (रंग चढविण्याकरितां वस्तु) तापविणें.

Annĕx', *v. t.* (ॲने'क्स्)—add, append, attach; take possession of. नवीन जोडणें, सामील करणें; खालसा करणें. *n.* (*also* Ănnexe), supplementary building. जोड इमारत, जोड संस्था.

Ănnĕxā'tion, *n.* (ॲनेक्से'शन्)—addition; act of annexing, appropriation of territory. जोडणें, लावणें; नवीन प्रांत जोडणें, खालसा करणें.

Annī'hilāte, *v. t.* (-nīī-, ॲना'यूइलेट्)—destroy the existence of utterly. पूर्णपणें नाश करणें. [L. *ad*, to and *nihil*, nothing]

Annihila'tion, *n.* (अनायूइले'शन्)—utter destruction, nothingness. सत्यनाश, विध्वंस, उच्छेद. Anni'hilator, *n.*

Ănnivers'arў, *n.* (ॲनिव्ह'र्सरि)—yearly return of a date; celebration of this. प्रतिवार्षिक दिवस, वार्षिक स्मारक, वार्षिकोत्सव; जयन्ती किंवा पुण्यतिथि. Anniversary of birth=वाढदिवस, जयन्ती. Anniversary of death=मृततिथि, श्राद्धतिथि, पुण्यतिथि. [L. *annus*, a year & *verto*]

Ănn'otāte, *v. t.* & *i.* (ॲ'नोटेट्)—add notes to book, etc.; make notes on, mark written remarks on. पुस्तकाला वगैरे टीपा जोडणें; टीपा देणें. [L. *ad*, to & *notare*, to note]

Ănnotā'tion, *n.* (ॲनोटे'शन्)—a note of explanation, comment. टिप्पणी, टीपा; भाष्य.

Ănn'otātor, *n.* (ॲ'नोटेटर्)—a writer of notes; commentator. टीपा देणारा; भाष्यकार.

Announce', *v. t.* (ॲना'उन्स्)—proclaim, give notice of. प्रसिद्ध किंवा जाहीर करणें.

Announce'mĕnt, *n.* (ॲना'उन्स्-मेन्ट्)—proclamation, declaration, publication. प्रसिद्धि, जाहीरनामा, जाहीर खबर.

Annoy', *v. t.* (ॲनॉ'य्)—irritate, molest. अतित्रास देणें, छळणें, उपद्रव करणें.

Annoy'ance, *n.* (अनॉ'यन्स्)—molestation, vexation. अति त्रास, छळ, उपद्रव.

Ănn'ūal, *a.* (ॲ'न्युअल्)—reckoned by the year; recurring yearly. वार्षिक; प्रतिवार्षिक, सालाबाद. *n.* plant living only for a year; yearly periodical. वर्षभर टिकणारें झाड किंवा औषधी; वार्षिक पुस्तक, सांवत्सरिक.

Ănn'ūallў, *adv.* (ॲ'न्युअलि)—year by year, returning every year. प्रतिवर्षी, दरसाल.

Ănnū'itant, *n.* (ॲन्यु'इटन्ट्)—one who holds an annuity. वर्षासन असलेला वर्षासनदार.

Ănnū'itў, *n.* (ॲन्यू'इटि)—yearly grant or sum. वर्षासन, वार्षिक नेमणूक.

Ănnŭl', *v. t.* (ॲन'ल्)—abolish, cancel; declare invalid, invalidate. रद्द करणें; बेकायदेशीर ठरविणें. Annul'ment, *n.*

Ănn'ūlar, *a.* (ॲ'न्युलर्)—ring-shaped. मण्डलाकार. [L. *annulus*, a ring]

Ănn'ūlāte, Ănn'ūlāted, *aa.* (ॲ'न्युलेट्, ॲ'न्युलेटेड्)—furnished or marked with rings or circles like rings. मंडलमुद्रित, कंकणवत्.

Annŭn'ciāte, *v. t.* (-shĭ-, अन'न्शिएट्)—proclaim, announce. जाहीर करणें.

Annŭnciā'tion, *n.* (ॲनन्सिए'शन्)—announcement. जाहीर करणें. Annŭn'ciātor, *n.*

An'ōde, *n.* (ॲ'नोड्)—the path by which electric current leaves the positive pole; the positive pole. उद्गामी मार्ग; घनध्रुव.

Ăn'odўne, *a.* (ॲ'नोडाइन्)—pain-killing; soothing. दुःखनाशक; उपशमक. *n.* drug to allay pain. दुःखहारक किंवा वेदनाशामक औषध.

Anŏint', *v. t.* (अनॉ'इन्ट्)—apply ointment or oil to; smear, rub over with oil or unctous substance. मलम किंवा तेल लावणें; फांसणें.

Anŏm'alous, *a.* (ॲनॉ'मलस्)—irregular, abnormal. नियमविरुद्ध, असंबद्ध, विलक्षण.

Anŏm'alў, *n.* (ॲनॉ'मलि)—irregularity. नियमविरुद्ध किंवा रूढिविरुद्ध गोष्ट.

Anŏn', *adv.* (ॲनॉ'न्)—soon, presently. लवकर, लागलाच. Ever and *anon*=every now and then. नेहमीं, वरचेवर.

Ănŏnў'mĭtў, *n.* (ॲनॉनि'मिटि)—state of being anonymous. निनांवी होणें, निनांवीपणा.

Anŏn'ўmous, *a.* (ॲनॉ'निमस्)—of unknown name, of unknown authorship. अनामक, निनांवी. [Gr. *an*, not & *onoma*, a name]

Ănŏph'ēlēs, *n.* (ॲनॉ'फिलीस्)—kinds of (esp. malarial) mosquito. हिंवतापाचे डास.

Anoth'er, *a.* (-udh-, अॅन'दर्)—an additional (one), a different (one). दुसरा, निराळा. *pron.* another one. दुसरा एक.

An'swer, *v. t.* & *i.* (-ser, आं'न्सर्)—make a reply to; be responsible for; correspond to. जबाब किंवा उत्तर देणें; जबाबदार असणें; मिळणें, जुळणें. Unable to *answer*=निरुत्तर. To answer *again*=उलटून बोलणें, उलट जबाब देणें. To *answer* the purpose=to fulfil the purpose. हेतु सिद्धीस नेणें. Will not *answer*=will not do or succeed. चालणार नाहीं. *Answer* (summons to) the door=द्वार ठोठावल्यावर तें जाऊन उघडणें. To *answer* a crime=अपराधाबद्दल शिक्षा भोगणें. To *answer* to a call=ओ देणें, हांक देणें. To *answer* to God=ईश्वराजवळ जाब देणें. *n.* a reply. उत्तर, जबाब. In answer to=उत्तर देतांना, उत्तर म्हणून.

An'swerāble, *a.* (आं'न्सरेबल्)—responsible, accountable. जबाबदार, जाब देणारा.

Ănt, *n.* (ॲन्ट्)—a small insect. मुंगी. White ant=वाळवी. Red ant=उंबील.

Ăntăg'onĭsm, *n.* (ॲन्टॅ'गॉनिझम्)—active opposition; opposing principle, contrariety of things or principles. विरोध, वैमनस्य; प्रतिपक्षता.

Ăntăg'onĭst, *n.* (ॲन्टॅ'गोनिस्ट्)—opponent, adversary. प्रतिपक्षी, विरोधी. Antăgonĭs'tĭc, *a.*

Antă'gonīze, *v. t.* (ॲन्टॅ'गोनाइझ्)—counteract; provoke to opposition, make into an enemy. विरोध करणें, शत्रुत्व संपादणें.

Ăntärc'tĭc, *a.* (ॲन्टा'र्क्टिक्)—of south polar regions. दक्षिणध्रुवाकडील. Antarct'ical, *a.*

Ăntĕ-cē'dĕnce, *n.* (ॲन्टिसी'डेन्स्)—precedence, priority. पूर्वसिद्धि, पूर्वास्तित्व, पहिल्यानें असणें. [L. *ante*, before & *cedere* to go]

Ăntĕcē'dent, *a.* (ॲन्टिसी'डेन्ट्)—previous to. पूर्वगामी. *n.* preceding event or circumstance. पूर्वी घडलेली गोष्ट. (*pl.*) a person's past history. एकाद्याचा पूर्वेतिहास.

Ăn'tĕchămber, *n.* (ॲ'न्टि-चेम्बर्)—room leading to the chief apartment. दिवाणखान्याच्या अलीकडील खोली, सदरेची खोली.

Ăntĕdāte', *v. t.* (ॲन्टिडे'ट्)—affix or assign an earlier than the true date to. मागील तारीख घालणें. [L. *ante*, before & *date*]

Ăntĕdĭluv'ian, *a.* (-lōō-, ॲन्टिडिलू'व्हिअन्)—before the flood; antiquated. प्रलयपूर्वकालिक, जलप्रलयापूर्वीचा; गतकालीन.

Ăn'tĕlōpe, *n.* (ॲ'न्टिलोप्)—deer-like ruminant. हरिण, मृग. Black antelope=काळवीट.

Ăntĕmŭn'dāne, *a.* (ॲन्टिम'न्डेन्)—existing or occurring before creation of the world. पृथ्वीच्या पूर्वीचा, पृथ्वीच्या उत्पत्तीच्या आधींचा. [L. *ante*, before & *mundus*, the world]

Ăntĕpĕnŭlt', -ĭmāte, *aa.* (ॲन्टिपिन'ल्ट्, °न'ल्टि-मेट्)—the last syllable of a word except two. उपान्त्यवर्णापूर्वीचा (वर्ण). [L. *ante*, before, *pene*, almost and *ultimus*, last]

Ăntĕnā'tal, *a.* (ॲन्टिने'टल्)—existing or happening before birth. जन्मापूर्वीचा.

Ăntĕnn'a, *n.* (ॲन्टे'ना)—feelers or horns found on heads of insects. किड्यांच्या तोंडावरील मिशा. (*pl.* Ănte nnae-ॲन्टे'नी)

Ăntēr'ior, *a* (ॲन्टी'रिअर्)—prior to; more to the front. पूर्वीचा, अगोदरचा; अग्रवर्ती, पुढें असलेला. Anterio'rity, *n.*

Ăn'tĕrōōm, *n.* (ॲ'न्टिरूम्)—room leading to another. दिवाणखान्याच्या अलीकडील खोली.

Ănthelmĭn'tĭc, *n.* (ॲन्थेल्मि'न्टिक्)—medicine of use against intestinal worms. कृमिनाशक औषध. (also Ănthelminthic) [Gr. *anti*, against and *helmins*, a worm]

Ăn'thĕm, *n.* (ॲ'न्थेम्)—prose composition set to sacred music; song of praise. स्तोत्र; स्तुतिगीत. National *anthem*=राष्ट्रीय गीत. [Gr. *anti*, against, & *phone*, sound]

Ăn'ther, *n.* (ॲ'न्थर्)—part of stamen containing pollen. केसराग्र, परागकोश. Ăn'theral, *a.* Ăn'thĕrōĭd. [Gr. *anthos*, a flower]

Ănt'-hĭll, *n.* (ॲ'न्ट्-हिल्)—a mound over ants' nest. मुंग्यांचें वारूळ, भोम, भोमाड.

Ănthŏl'ogy̆, *n.* (ॲन्थॉ'लोजि)—collection of small choice poems, epigrams. लहान निवडक चुटक्यांचा किंवा कवितांचा संग्रह, गद्यपद्यपुष्पसमुदाय. Ănthŏ'logist, *a.* [Gr. *anthos*, flower & *logia*, a collection]

Ăn'thrăx, *n.* (ॲ'न्थ्रॅक्स्)—malignant boil; a malignant disease of sheep and cattle. काळपुळी; काळपुळीचा आजार.

Ăn'thrŏpŏĭd, *a.* (ॲ'न्थ्रोपॉइड्)—man-like, resembling man. मनुष्यासारखा. *n.* man-like ape. मनुष्यसदृश प्राणी, माकड.

Ănthropŏl'ogy̆, *n.* (ॲन्थ्रोपॉ'लॉजि)—whole science of man; study of man as an animal. मानुष्यकशास्त्र; मनुष्यजातींच्या आचाररूढींचा इतिहास. Ănthropolŏg'ical, *a.*; Ănthropo'logist, *n.* [Gr. *anthropos*, a man & *logos*, discourse]

Ănthrŏpomŏrph'īze, *v. t.* (ॲन्थ्रोपॉमॉ'र्फाइझ्)—attribute human form or personality to God or Deities. ईश्वराला मनुष्याचा आकार व त्याचे गुण वगैरे आहेत असें म्हणणें, सगुणरूप देणें. Anthropomor'phic, *a.* -phism, -phist, *nn.* [Gr. *anthropos*, man, & *morphe*, form]

Ănthropŏph'agī, *n. pl.* (ॲन्थ्रोपॉ'फ़जाय्)—cannibals, man-eaters. नरभक्षक, मनुष्यें खाणारे.

Ănthropŏph'agous, *a.* (ॲन्थ्रोपॉ'फ़गस्)—man-eating. मनुष्यें खाणारा. -phăgÿ, *n.* (॰फ़ॅजि)

Ănti-, *prep.* (ॲन्टि-)—opposite, against. विरुद्ध (या अर्थी योजिला जाणारा उपसर्ग).

Ăn'tĭc, *n.* (ॲ'न्टिक्)—grotesque posture or trick, caper. थट्टामस्करी. *a.* grotesque, fantastic. थट्टेचा, माकडचेष्टेचा.

Ăntĭ'cĭpāte, *v. t.* (ॲन्टि'सिपेट्)—look forward to, expect; use in advance; forestall. अपेक्षा करणें; आगाऊ भोग घेणें; आघाडी मारणें. [L. *ante*, before, & *capere*, to take]

Ăntĭcĭpā'tion, *n.* (ॲन्टिसिपे'शन्)—expectation; foretaste. अपेक्षा, आशा, अटकळ, होरा; पूर्वज्ञान. -tor, *n.*; -tive, -tory, *aa.*

Ăntĭclī'măx, *n.* (ॲन्टिक्ला'यॅमॅक्स्)—lame conclusion to anything promising a climax. एक अर्थालंकार, सारालंकारविपक्ष.

Ăn'tĭdōte, *n.* (ॲ'न्टिडोट्)—medicine used to counteract disease or poison (*against*, *for*, *to*). रोगावर किंवा विषावर वस्ताद औषध, विषापहारक औषध. Ăn'tĭdōtal, *a.*

Ăn'tĭmonÿ, *n.* (ॲ'न्टिमनि)—a brittle metallic silver-white element used in medicine, etc. सुरम्याची धातु, सुरमा.

Ăntĭn'omÿ, *n.* (ॲन्टि'नॉमि)—contradiction in law or authorities or conclusions. दोन कायद्यांचा परस्पर विरोध, वचनद्वयविरोध. [L. *anti*, against & *nomos*, law]

Ăntĭp'athÿ, *n.* (ॲन्टि'पथि)—constitutional or settled aversion to. स्वाभाविक वैर, शाश्वतिक विरोध. Ăntipath'ĭc, Ăntipathet'ic, *aa.*

Ăn'tĭphon, *n.* (ॲ'न्टिफ़ॉन्)—verse or sentence sung by one choir in answer to another. दोन गायकगणांनीं एकामागून एक गाइलेलें गाणें.

Ăntiph'onal, *a.* (ॲन्टि'फ़ॉनल्)—sung alternately. एकापाठीमागून एक गाइलेला.

Ăntĭph'onarÿ, *n.* (ॲन्टि'फ़ॉनरि)—a book of antiphons. प्रश्नोत्तररूपी धर्मगीतांचें पुस्तक.

Ăntĭph'onÿ, *n.* (ॲन्टि'फ़ॉनि)—antiphonal singing. आळीपाळीनें गाणें.

Ăntĭp'odēs, *n. pl.* (-z, ॲन्टि'पोडीझ्)—region of the earth diametrically opposite (esp. to our own). भूगोलावर ज्याठिकाणीं आपण राहतों त्याच्या समोर अगदीं विरुद्ध दिशेला असणारा प्रदेश. Ăntip'odal, -dē'an, *aa.* [Gr. *anti*, opposite, and *pedes*, foot]

Ăn'tĭquarÿ, *n.* (ॲ'न्टिक्वरि)—student or collector of antiquities. प्राचीन वस्तूंचा शोध करणारा, प्राचीनवस्तुशोधक, प्राचीनविद्यापंडित. [L. *antiquus*, ancient]

Ăntĭquār'ian, *a.* & *n.* (ॲन्टिक्वे'रिअन्)—(one) connected with the study of antiquities. प्राचीनवस्तुसंशोधक. Antiquarianism, *n.*

Ăn'tĭquāted, *a.* (ॲ'न्टिक्वेटेड्)—out of date, obsolete. जुना, गतकालीन, निरुपयुक्त.

Ăntique', *a.* (-ēk, ॲन्टी'क्)—of or dating from old times; old-fashioned. प्राचीनकाळचा, जुना. *n.* relic of ancient art or of old times. प्राचीन काळचे किंवा जुने कलाकौशल्याचे पदार्थ. [L. *antiquus*, ancient]

Ăntĭq'uĭtÿ, *n.* (ॲन्टि'क्विटि)—old times, esp. before the middle ages; the ancients. प्राचीन काळ, मध्ययुगाच्या पूर्वीचा काळ; प्राचीन लोक. *pl.* customs of the ancients; ancient relics. (अने॰) प्राचीन काळच्या लोकांच्या चालीरीति; प्राचीन काळच्या वस्तु.

Ăntĭscŏrbū'tic, *a.* & *n.* (ॲन्टिस्कॉर्ब्यू'टिक्)—(a medicine) against scurvy. 'स्कर्व्ही' रोगावर (औषध), नाविकरक्तपित्तनाशक (औषध).

Ăntĭsĕp'tĭc, *a.* (ॲन्टिसे'प्टिक्)—preventing putrefaction. सडूं न देणारें, किडे पडूं न देणारें (द्रव्य). [Gr. *anti*, against and *sepein* to rot]

Ăntĭth'ĕsĭs, *n.* (ॲन्टि'थिसिस्)—opposition of word, contrast. विरोध, शब्दार्थविपर्यास. (*pl.* Antithesēs)

Ăntithĕt'ic, -cal, *aa.* (ॲन्टिथे'टिक्, ॰टिकल्)—contrasted, consisting of two opposites. विरोध असलेला, विरोधमय.

Ănt'ler, *n.* (ॲ'न्ट्लर्)—branched horn of a deer. सांबरांच्या शिंगांचा फांटा, हरणाच्या शृंगशाखा.

Ăn'tonÿm, *n.* (ॲन्टो'निम्)—a word of contrary meaning to another. विरुद्धार्थक शब्द.

Ā'nŭs, *n.* (ए'नस्)—posterior opening of alimentary canal in animals. पश्चिमद्वार, मलद्वार.

Ăn'vĭl, *n.* (ॲ'न्व्हिल्)—iron block on which smith works metal. ऐरण. To be on the *anvil* = घाटत असणें.

Ănxī'etÿ, *n.* (ăngz-, ॲङ्झा'यटि)—troubled state of mind, uneasiness. काळजी, अस्वस्थता.

Ă'nxious, *a.* (ăngk'shŭs, ॲ'ङ्क्शस्)—troubled, uneasy in mind; desirous to do. चिंतातुर, अस्वस्थ; कार्योत्सुक.

Ă'nÿ, *a.* (ĕnĭ, ए'नि)—one, some, every. कोणीहि, कोणताहि.

Ăn'ybŏdÿ, *n.* or *pron.* (ए'निबॉडि)—any person; a person of consequence. कोणताहि मनुष्य; कांहीं किंमतीचा मनुष्य.

Ăn'yhow, *adv.* (ए'निहाउ)—in any way whatever; in any case, at any rate; at random. कोणत्याहि तऱ्हेनें, कांहीं झालें तरी; विचार न करतां, वाटेल तसें.

A'nyone, *n.* (ए'नि-वन्)—anybody. कोणताहि.
A'nўthĭng, *n.* (ए'नि-थिंग्)—any thing. कांहींहि.
An'yway, *adv.* (ए'नि-वे)—at any rate. कांहीं झालें तरी, निदानपक्षीं.
An'yways, -wise, *adv.* (ए'नि-वेज्, ए'नि-वाइज्)—in any way. कोणत्याहि तऱ्हेनें, कसेंहि.
A'nўwhēre, *adv.* (ए'नि-व्हेअर्)—at any place. कोठेंहि, कोणत्याहि ठिकाणीं.
A'ŏrĭst, *n.* (ए'ऑरिस्ट्)—a past tense denoting occurrence merely. सामान्यभूतकाळ.
Aŏrt'a, *n.* (अऑ'र्टा)—great artery issuing from left ventricle of heart. रक्ताशयाची मुख्य धमनी. Aŏrt'ic, *a.* महाधमनीचा.
Apāce', *adv.* (अपे'स्)—with a quick pace, swiftly, fast. जलद गतीनें, लवकर.
Apache', *n.* (-äsh, अपा'श्)—a street ruffian. रस्त्यावरील गुंड, आडदांड.
Ăp'anage, Ăpp-, *n.* (अॅ'पनिज्)—provision for younger children; dependency; perquisite. लहान मुलांकरितां केलेली तरतूद; आनुषंगिक गोष्ट, पराधीनता; अवांतर मासि, भत्ता.
Apart', *adv.* (अपा'र्ट्)—aside, away from others; separately. दूर; अलग.
Apärt'mĕnt, *n.* (अपा'र्ट्मेन्ट्)—a single room. खोली. *pl.* a suite of rooms; lodgings. खोल्या; राहण्याची जागा.
Ăpathĕt'ĭc, *a.* (अॅपथे'टिक्)—without feeling; insensible to emotion. भावनारहित; उदासीन, मंद. [Gr. *a*, not and *pathos*, suffering]
Ăp'athў, *n.* (अॅ'पथि)—insensibility, indifference; mental indolence. मनोविकाराचा अभाव, उदासीनता; मान्द्य, जडता.
Āpe, *n.* (एप्)—a tailless monkey; imitator. शेपटी नसलेलें माकड; नक्कल करणारा. *v. t.* imitate, mimic. नक्कल करणें. To play the ape=to mimic. माकडचेष्टा करणें.
Apē'rĭent, *a.* (अपे'रिएन्ट्)—laxative. सौम्य रेचक.
Ap'erture, *n.* (अॅ'पर्चर्)—opening, gap. भोंक, रंध्र. [L. *aperire*, to open]
Ā'perў, *n.* (ए'परि)—mimicry. नक्कल, अविचारानें केलेलें अनुकरण.
Ā'pĕx, *n.* (ए'पेक्स्)—tip, topmost point, pointed end. टोंक, कळस, शिखर.
Aphā'sĭa, *n.* (अफे'झिआ)—loss of speech. वाक्शक्तिवैकल्य, वाचाभंग.
Aphē'lion, *n.* (अफी'लिअन्) (*pl.* Aphelii)—point of orbit far from the sun. ग्रहांच्या कक्षेंतील सूर्यापासून अतिदूर बिंदु, उच्चस्थान. [Gr. *apo*, from & *helios*, the sun]
Ăph'ĭs, *n.* (अॅ'फिस्)—plant lice, minute insects. भाजीपाल्याचे पानावरील कीड. *pl.* Ăphĭdēs; Aphĭd'ĭan, *a.* & *n.*

Ăph'orĭsm, *n.* (अॅ'फोरिझम्)—short pithy maxim; definition. सूत्र, थोड्या शब्दांत निर्दिष्ट केलेलें तत्त्व; व्याख्या, लक्षण. Aphorĭs'tĭc, *a.*
Āpĭār'ĭan, *a.* (एपिए'रिअन्)—pertaining to bee-keeping. मधमाशा पाळण्यासंबंधीं.
Ā'pĭarў, *n.* (ए'पिअरि)—place where bees are kept. मधमाशा राखून ठेवण्याचें स्थळ, मधुमक्षिकालय. [L. *apis*, a bee]
Ā'pĭcal, *a.* (ए'पिकल्)—of or at the apex. टोंकाजवळचा, टोंकासंबंधींचा.
Ā'pĭcŭlture, *n.* (ए'पिकल्चर्)—bee-keeping. मधमाशा पाळणें. [L. *apis*, a bee & culture]
Apiece', *adv.* (अपी'स्)—individually, severally, each. एकएकास, प्रत्येकास.
Ā'pĭsh, *a.* (ए'पिश्)—of or like an ape, foolish, foppish. नकल्या, मर्कटस्वभावाचा.
Apŏc'alўpse, *n.* (अपॉ'कॅलिप्स्)—revelation, discovery, disclosure. प्रगट करणें.
Apŏc'ŏpē, *n.* (अपॉ'कोपि)—cutting off an end of a word. अन्त्याक्षरलोप. [Gr. *apo*, off and *cope*, a cutting]
Apŏd'osĭs, *n.* (अपॉ'डॉसिस्)—consequent clause in conditional sentence. संकेतार्थक वाक्यांतील पुढील पोटवाक्य. *pl.* Apŏd'osēs.
Ăp'ogee, *n.* (अॅ'पॉजी)—point in an orbit farthest from the earth; climax. पृथ्वीपासून अतिदूरचा चंद्राचे (कक्षेंतील) गमनमार्गांतील बिंदु, सीमा, कळस.
Apŏll'ō, *n.* (अपॉ'लो)—Greek sun-god; the sun; man of great beauty. ग्रीक लोकांचा सूर्यदेव; सूर्य; अत्यंत सुंदर पुरुष.
Apŏlogĕt'ĭc, *a.* (अपॉलॉजे'टिक्)—regretfully acknowledging fault; of the nature of an apology, vindicatory. दोषनिवारक; क्षमा व्हावी अशा अर्थाचा. *n. pl.* reasoned defence. विचारपूर्वक केलेलें समर्थन.
Apŏl'ogĭst, *n.* (अपॉ'लॉजिस्ट्)-one who defends by argument. युक्तिवादानें आत्मसमर्थन करणारा.
Apŏl'ogīze, *v. i.* (अपॉ'लोजाइझ्)—make an apology. क्षमा किंवा माफी मागणें.
Ăp'ologue, *n.* (-ŏg, अॅ'पोलॉग्)—moral fable or allegory. उपदेशपर कल्पित गोष्ट.
Apŏl'ogў, *n.* (अपॉ'लॉजि)—regretful acknowledgement of offence; explanation, vindication. केलेल्या अपराधाबद्दल खेद प्रदर्शित करणें; स्पष्टीकरण, समर्थन.
Ăp'ophthĕgm, *n.* (अॅ'पॉफ्थेम्)—terse or pithy saying. नीतिवचन, सूक्ति, प्रसिद्धोक्ति. Apophthegma'tĭc, *a.* (अपॉफ्थेग्मॅ'टिक्)
Ăp'oplĕxў, *n.* (अॅ'पॉप्लेक्सि)—a malady suddenly arresting powers of sense and motion. एकाएकीं गैरशुद्धि आणणारा एक रोग. Apoplec tic, *a.*

Ăp'osĭopē"sĭs, *n.* (pl. -sēs) (अॅपॅसायॅपी''सिस्)—sudden breaking off in speech. बोलतांना एकदम थांबणें. [Gr. *apo*, from and *siopao*, I am silent]

Apŏs'tasy̆, *n.* (अपॉ'स्टसि)—abandonment of one's religion, party, etc. स्वधर्मत्याग, स्वपक्षत्याग. Apos'tatīze, *v. i.*

Apŏs'tāte, *n.* (अपॉ'स्टेट्)—one guilty of apostasy. स्वधर्मत्यागी, धर्मभ्रष्ट, पतित.

Apŏs'tle, *n.* (अपॉ'सल्)—missionary; leader of reform. धर्मप्रचारक; सुधारणाग्रणी.

Apŏs'trŏphē, *n.* (अपॉ'स्ट्रॉफि)—exclamatory address; sign of omitted letter, sign of possessive case. परोक्षसंबोधन; गाळलेल्या अक्षराबद्दल किंवा षष्ठीप्रत्ययाची (') ही खूण.

Apŏth'ĕcary̆, *n.* (अपॉ'थिकरि)—druggist; chemist. औषधें तयार करून विकणारा; गांधी.

Apŏthēŏ'sĭs, *n.* (*pl.* -osēs) (ॲपॉथिओ'सिस्)—deification; transformation; deified ideal. देवरूपी मानणें; रूपांतर; देवरूपी उद्दिष्ट. Apŏth'-eosīze, *v. t.* ईश्वरतुल्य मानणें.

Appal', *v. t.* (-awl, अपॉ'ल्)—dismay; terrify. दहशत घालणें; पांचावर धारण बसवणें.

Ăppară'tŭs, *n.* (ॲपरे'टस्)—appliances for scientific or other work. उपकरणें, यंत्रसामग्री, साहित्य (*pl.* the same or rarely Apparatuses) [L. *ad*, & *parare*, to make ready]

Appă'rĕl, *v. t.* (अॅ'रेल्)—dress, attire. कपडे घालणें; पोषाख करणें. *n.* (no plural) dress, clothes, clothing. कपडे, पोशाख.

Appă'rent, *a.* (अॅ'रेन्ट्)—manifest, palpable; seeming. स्पष्ट, उघड; दिसण्यांत येणारा, दिखाऊ, वरकरणी. Heir Apparent=whose right cannot be superseded by birth of nearer heir. ज्यास खात्रीनें अधिकार किंवा मालमत्ता मिळणार असा ज्येष्ट वारस, युवराज.

Ăpparĭ'tion, *n.* (ॲपरि'शन्)—appearance; a ghost. उदय, दृग्गोचरता; छाया, भूत.

Appă'rĭtor, *n.* (अॅ'रिटर्)—herald; usher. अग्रदूत, निरोप्या; ओळख करून देणारा.

Appeal', *v. i.* & *t.* (-ēl, अपी'ल्)—apply to higher court; call upon for corroboration; make a request. वरच्या न्यायाधीशाकडे खटला नेणें; खरेपणाबद्दल आह्वान देणें; विनंति करणें. *n.* act or right of appealing. अपील, वरच्या अधिकाऱ्याकडे खटला नेणें; विनंति, मदतीकरितां विनवणी. [Fr. *ad*, to and *pello*, I drive]

Appear', *v. i.* (अपि'अर्)—become visible; present oneself; be published; seem. दिसणें; स्वतः हजर राहणें; प्रसिद्ध होणें; वाटणें.

Appear'ance, *n.* (अपि'अरन्स्)—appearing; seeming; look, aspect. दिसणें; वाटणें; चेहरा, स्वरूप. (*pl.*) outward show of prosperity, friendly relations, etc. बाह्यस्वरूप. In appearance=outwardly. दिसण्यांत. To put in an appearance=To show oneself. स्वतः हजर असणें. *To all appearance*=so far as can be seen. सर्व बाजूनें दिसण्याला, दिसण्यांत. *To keep* up appearances=to keep up outward show. वरकरणी भपका करणें.

Appease', *v. t.* (-z, अपी'झ्)—pacify, soothe; satisfy. सान्त्वन करणें; समाधान करणें.

Appĕll'ant, *a.* (अपे'लन्ट्)—concerned with appeals. अपीलासंबंधींचें. *n.* one who appeals to higher court. अपील करणारा, विवादी.

Appĕll'ate, *a.* (अपे'लेट्)—(court) hearing appeals. अपीलांचा विचार करणारें (कोर्ट).

Ăppĕllā'tion, *n.* (ॲपेले'शन्)—name, title; nomenclature. नांव, संज्ञा; परिभाषा.

Appĕll'ătive, *a.* & *n.* (अपे'लेटिव्ह्)—designating a class, common; common noun. जातिवाचक, सामान्य; सामान्य नाम.

Appĕnd', *v. t.* (ॲपे'न्ड्)—attach as an accessory; add to. पुरवणी जोडणें; जोडणें. [L. *ad*, to & *pendere*, to hang]

Appĕnd'age, *n.* (अपे'न्डिज्)—accompaniment. जोडलेला किंवा आनुषंगिक पदार्थ, अनुबंध.

Appĕndicī'tĭs, *n.* (अपेन्डि-सा'इ-टिस्)—inflammation of vermiform appendix of intestine of the caecum. आंतडीची सूज.

Appĕn'dĭx, *n.* (अपे'न्डिक्स्)—subsidiary addition, supplement. परिशिष्ट; पुरवणी. (pl. Appendixes or Appendices-ॲपेन्डिसीझ्)

Ăppertain', *v. i.* (ॲपर्टे'न्)—belong to; relate to. ०चें असणें; मालकीचें असणें.

Ăpp'ĕtīte, *n.* (ॲ'पिटाइट्)—desire or craving for food, pleasure, etc.; relish for food. भूक; वासना, कामना; अन्नवासना.

Ăpp'ĕtīzer, *n.* (ॲ'पिटाइ-झर्)—thing that gives appetite. भूक प्रदीप्त करणारी वस्तु, अग्निप्रदीपन.

Ăpp'ĕtīzĭng, *a.* (ॲ'पिटाइझिंग्)—inviting, attracting. प्रदीपक, चित्ताकर्षक, मोहक.

Applaud', *v. t.* & *i.* (अप्लॉ'ड्)—express approval (esp. by clapping); commend. वाहवा करणें; प्रशंसा करणें.

Applause', *n.* (-z, ॲप्लॉ'झ्)—loud approbation; acclamation. धन्यवाद; प्रशंसा.

Ăp'ple, *n.* (ॲ'पल्)—fruit of the apple tree. सफरचंद (फळ). Apple of the eye *i. e.* the pupil. डोळ्यांतील बाहुली, तारका. Apple of the eye=any cherished object. जिवाचा कलिजा, गळ्यांतला ताईत. To upset one's *apple-cart*=to spoil one's plans. एखाद्याचे बेत ढासळणें. Apple-pie order=perfect order. पूर्ण व्यवस्था.

Applī'ance, *n.* (ॲप्लाॅयन्स्)—thing applied as a means; instrument; device. साधनीभूत वस्तु; साधन, उपकरण; योजना.

Ăpp'lĭcabĭl''itў, *n.* (ॲ''प्लिकॅबि'लिटि)—the quality of being applicable. लायकी; योजण्याची योग्यता, व्यवहार्यता.

Ăpp'lĭcable, *a.* (ॲ'प्लिकेबल्)—that applies or may be applied; having reference, appropriate (to). लावण्याजोगता, व्यवहार्य; योग्य.

Ăpp'lĭcant, *n.* (ॲ'प्लिकन्ट्)—one who applies or makes application. अर्जदार.

Ăpplĭcā'tion, *n.* (ॲप्लिके'शन्)—request or demand; diligence; bearing of a thing, relevancy. विनंति, अर्ज; व्यासंग; योजणूक, विनियोग, प्रयोग.

Applȳ', *v. t.* & *i.* (ॲप्ला'य्)—put close; administer; to make request, request; attend closely to. लगत ठेवणें; उपाय योजणें; विनंति किंवा अर्ज करणें; लक्ष लावणें. [L. *ad*, to & *placare*, to fold]

Appoint', *v. t.* (अपॉ'इन्ट्)—fix (time etc.); prescribe, ordain; assign post to. (वेळ) नेमून देणें; ठरवणें; नेमणूक करणें.

Appoĭnt'mĕnt, *n.* (अपॉ'इन्ट्मेन्ट्)—engagement, assignation; (*pl.*) outfit. भेटण्याची ठरवून दिलेली वेळ; नेमणूक; (अने॰) प्रवासी सामान.

Appōr'tion, *v. t.* (अपो'र्शन्)—assign as share, portion out. विभागून देणें, भाग पाडून देणें. Appor'tionment, *n.* विभागणी, वांटणी.

Ăpp'ōsĭte, *a.* (-z-, ॲ'पोझिट्)—well put, to the point. यथोचित, प्रसंगानुसार, समर्पक. [L. *ad*, to & *ponere*, to put]

Ăpp'osĭtion, *n.* (ॲ'पोझिशन्)—juxtaposition, placing side by side. स्थितिसांनिध्य, दोन नामें एका विभक्तींत असणें, समानाधिकरण.

Appraise', *v. t.* (अप्रे'झ्)—fix price of, estimate. किंमत ठरविणें. Apprais'al, Appraise'-ment, *nn.* [L. *ad*, to & *pretium*, a price]

Apprē'ciable, *a.* (-sha-, ॲप्री'शेबल्)—capable of being estimated; perceptible. परिमाण समजण्याजोगा, विशेष परिमाणाचा; सुस्पष्ट, बराचसा.

Apprē'ciāte, *v. t.* & *i.* (ॲप्री'शिएट्)—set high value on; estimate rightly; rise in value. मोल ठरविणें; गुण किंवा योग्यता ओळखणें; किंमत वाढणें. Appre'ciative, Appre'ciatory, *aa.* [L. *ad*, to & *pretium*, a price]

Apprē'ciātion, *n.* (-shi-, ॲप्री'शिएशन्)—estimation; adequate recognition; rise in value; critique. किंमत; गुणपरीक्षा, पारख, किंमतीची वाढ; गुणदोषविवेचन.

Ăpprĕhĕnd', *v. t.* (ॲप्रिहे'न्ड्)—seize, arrest; understand; anticipate with fear. पकडणें; समजणें; धास्ती किंवा भीति पडणें. [L. *ad*, to & *prehendere*, to seize]

Ăpprĕhĕn'sĭble, *a.* (ॲप्रिहे'न्सिबल्)—perceptible to senses. इंद्रियगोचर. Apprehensibi'lity, *n.*

Ăpprĕhĕn'sion, *n.* (ॲप्रिहे'न्शन्)—arrest; understanding; dread. पकडणें; ज्ञान, बुद्धि; भीति.

Ăpprĕhĕn'sĭve, *a.* (ॲप्रिहे'न्सिव्ह्)—afraid, expecting evil, fearful. भयभीत, भितरा.

Apprĕn'tĭce, *n.* (ॲप्रे'न्टिस्)—learner bound to employer for specified term. कांहीं कालपर्यंत धंदा किंवा इतर कांहीं शिकण्याकरितां राहिलेला मनुष्य, उमेदवार. *v. t.* bind as an apprentice. शिकण्याकरितां करारानें ठेवणें.

Apprĕn'tĭceshĭp, *n.* (ॲप्रे'न्टिस्-शिप्)—the time an apprentice serves. (काम वगैरे) शिकण्याचा काल, उमेदवारी.

Apprīse', *v. t.* (-z, ॲप्रा'इझ्)—give notice of, inform. सूचना देणें, खबर देणें, कळविणें.

Apprīze', *v. t.* (ॲप्रा'इझ्)—appraise, set a value on. किंमत ठरविणें.

Approach', *v. t.* & *i.* (ॲप्रो'च्)—come near to; make overtures to. जवळ जाणें; एकाद्या बाबतींत प्रथम बोलणें करणें. *n.* access, way or progress towards. आगमन, शिरकाव, मार्ग. [L. *ad*, to & *prope*, near]

App'robāte, *v. t.* (ॲ'प्रोबेट्)—approve formally, sanction. पसंत करणें.

Approbā'tion, *n.* (ॲप्रोबे'शन्)—sanction, approval. पसंती. To meet the approbation of = पसंतीस पडणें, मनास येणें. App'robatory, *a.*

Apprō'prĭāte, *a.* (ॲप्रो'प्रिएट्)—suitable, proper. योग्य, उचित. *v. t.* take possession of, devote to. आपलासा करणें, कामीं लावणें. [L. *ad*, to & *proprius*, one's own]

Apprōprĭā'tion, *n.* (ॲप्रोप्रिए'शन्)—application to a particular use. अमुक एक कामाकडे लावणें. Appró'priator, *n.*; Appro'priative, *a.*

Approv'al, *n.* (-ōō-, ॲप्रू'व्हल्)—favourable opinion, approbation, sanction. पसंती, मान्यता, मंजुरी.

Approve', *v. t.* & *i.* (-ōōv, अप्रू'व्ह्)—pronounce good; have favourable opinion of. पसंत करणें; मर्जीस येणें, पसंतीस येणें.

Approved', *a.* (-ōōv-, ॲप्रू'व्हड्)—pronounced to be good or satisfactory, accepted. मान्य किंवा पसंत केलेला.

Approv'er, *n.* (-ōōv-, ॲप्रू'व्हर्)—one who turns King's evidence. माफीचा साक्षीदार.

Approx'ĭmāte, *a.* (ॲप्रॉ'क्सिमेट्)—fairly correct; near to. जवळ जवळ बरोबर; ठोकळ, जवळ जवळ. *v. t.* & *i.* be or make near to. जवळ जवळ बरोबर असणें किंवा करणें. [L. *ad*, to & *proximus*, nearest]

Apprŏxĭmā'tion, *n.* (अप्रॉक्सिमे'शन्)—close approach, tolerably exact estimate or amount. जवळ जवळ बरोबर असणें, अंदाजी उत्तर.

Appŭr'tėnance, *n.* (अप'र्टिनन्स्)—appendage; that which belongs to something else; (*pl.*) belongings. अंगभूत वस्तु; मालकीच्या वस्तु.

Ā'prĭcŏt, *n.* (ए'प्रिकॉट्)—orange-coloured stone-fruit allied to plum. अलुबुखारासारखें एक प्रकारचें विलायती फळ.

Ā'prĭl, *n.* (ए'प्रिल्)—fourth month of the English year. इंग्रजी वर्षाचा चवथा महिना. April-fool=one sportively imposed upon on April 1. एप्रिल महिन्याचे पहिले तारखेस ज्याची मजेनें विलक्षण मस्करी केली आहे असा.

Ā'pron, *n.* (ए'प्रन्)—garment worn in front of body. कंबरेला बांधण्याचें मलवस्त्र. [L. *mappa*, a napkin]

Ăpropos', *adv.* (-pō, अॅप्रॉपो')—to the point or purpose. समयोचित, वेळेस योग्य. Apropos of=in connexion with. ०च्या संबंधीं.

Ăpse, *n.* (अॅप्स्)—arched or domed recess at the end of church. चर्चच्या शेवटच्या बाजूला अर्धवर्तुलाकार घुमट असलेला इमारतीचा भाग.

Ăp'sĭdal, *a.* (अॅ'प्सिडल्)—of the form of an apse. अर्धवर्तुलाकार घुमटासारखा.

Ăp'sĭs, *n.* (*pl.* ăp'sĭdēs) (अॅ'प्सिस्)—aphelion or perihelion of planet. ग्रहांच्या अगर उपग्रहांच्या कक्षेतील सूर्यापासून अति दूर अगर अति समीप अशा दोन बिंदूंपैकीं एक, उच्च किंवा नीच बिंदु.

Apt, *a.* (अॅप्ट्)—suitable, appropriate; quick; ready; inclined. योग्य; सिद्ध, तयार; ०कडे कल असलेला. Apt'ly, *adv.*; Apt'ness, *n.*

Ăp'tĭtūde, *n.* (अॅ'प्टिट्यूड्)—fitness; talent. योग्यता; बुद्धि, हुशारी.

Aquār'ĭŭm, *n.* (अॅक्वे'रिअम्)—tank for aquatic plants or animals. वनस्पति अगर मासे ठेवण्याकरितां केलेलें तळें. [L. *aqua*, water]

Aquār'ĭŭs, *n.* (अॅक्वे'रिअस्)—the eleventh sign of the zodiac. कुंभरास.

Aquăt'ĭc, *a.* (अॅक्वॅ'टिक्)—living in or near water. पाण्यांत किंवा पाण्याजवळ राहणारा. *pl.* water sports. जलक्रीडा, पाण्यांतील खेळ.

Ă'quatint, *n.* (अॅ'क्वॅटिन्ट्)—engraving on copper. तांब्यावर केलेलें खोदकाम

Ă'quėdŭct, *n.* (अॅ'क्विडक्ट्)—artificial channel for water; conduit. नहर; जलप्रणाली.

Ā'quėous, *a.* (ए'क्विअस्)—of water, of the nature of water, watery. जलरूप, जलमय.

Ă'quĭlīne, *a.* (अॅ'क्विलाइन्)—curved and hooked like the beak of an eagle. गरुडासारखी.

Ă'rāble, *a.* (अॅ'रेबल्)—fit for tillage. लागवड करण्याला योग्य. [Gr. *aroein*, to plough]

Arb'ĭter, *n.* (är-, आ'र्बिटर्)—a judge, an umpire, arbitrator. पंच, मध्यस्थ, अमीन, लवाद.

Arb'ĭtrăment, *n.* (आ'र्बिट्रमेन्ट्)—determination, award, decision. लवादाचा निवाडा.

Arb'ĭtrarў, *n.* (आ'र्बिट्ररि)—capricious; despotic. मनास येईल तसा, लहरी; स्वतंत्र, जुलमी.

Arb'ĭtrāte, *v. t. & i.* (आ'र्बिट्रेट्)—determine, settle dispute. मध्यस्थी करून निकाल करणें, निवाडा करणें, लवाद करणें.

Arbĭtrā'tion, *n.* (आर्बिट्रे'शन्)—function or decision of an arbitrator, determination. लवादी, मध्यस्थी, लवादाचा निकाल.

Arbĭtrāt'or, *n.* (आर्बिट्रे'टर्)—one appointed to settle dispute. पंच, मध्यस्थी करणारा, लवाद.

Arborā'ceous, *a.* (-shus, आर्बरे'शस्)—tree-like. झाडांसारखा. [L. *arbor*, a tree]

Arbōr'ėal, *a.* (आर्बो'रिअल्)—belonging or pertaining to trees. झाडांसंबंधीं.

Arbōr'ėous, *a.* (आर्बो'रिअस्)—full of or abounding in trees. वृक्षमय.

Arborĕs'cent, *a.* (आर्बरे'सेन्ट्)—tree-like in growth or general appearance. वाढींत किंवा दिसण्यांत झाडासारखा. Arbores'cence, *n.*

Arb'orĭcŭlture, *n.* (आ'र्बॉरिकल्चर्)—cultivation of trees and shrubs. मोठ्या किंवा लहान झाडांची केलेली लागवड. Arboricul'tural, *a.*; Arboricul'turist, *n.*

Arb'our, *n.* (आ'र्बर्)—shady nook, bower of creepers. लताकुंज, लतागृह, लतामंडप. [L. *arbor*, a tree]

Arc, *n.* (आर्क्)—part of circumference of circle. वर्तुळाच्या परिघाचा भाग.

Arcāde', *n.* (आर्के'ड्)—covered walk lined with shops; row of arches. दुतर्फी दुकानें असलेला छायेचा रस्ता; कमानींची रांग.

Ar'cānŭm, *n.* (आ'र्केनम्)—mystery, secret. रहस्य, गूढार्थ, अद्भुत.

Arch, *n.* (आर्च्)—curved structure (supporting bridge etc.), curve. कमान, तोरण. *a.* roguish, saucy. लबाड, अहल, उद्धट.

Archaeŏl'ogў, *n.* (-kĭ-, आर्किऑ'लॅजि)—study of antiquities or of prehistoric remains. पुरातनवस्तुशास्त्र. Archaeol'ogĭcal, *a.* प्राचीनवस्तुशास्त्रासंबंधीं. Archaeol'ogist, *n.* पुराणवस्तुशास्त्रज्ञ, पुराणवस्तुशास्त्रवेत्ता.

Archā'ĭc, *a.* (-k-, आर्के'इक्)—primitive, antiquated; no longer in common use. पुरातन, जुना; आर्ष, प्रचारांत नसलेला.

Ar'chāĭsm, *n.* (आ'र्केइझम्)—retention of what is old or obsolete; use of the archaic. जुनें तसेंच चालू ठेवणें; जुना शब्दप्रयोग.

Arc'hāngel, *n.* (-k-, आ'र्कएंजल्)—a chief

angel, angel of the highest rank or order. श्रेष्ठवर्गांतील देवदूत. Archăngĕ'lic, *a*.

Archbĭsh'op, *n*. (आर्च्-बिं'शप्)—chief bishop, metropolitan. मुख्य धर्माध्यक्ष.

Archbĭsh'opric, *n*. (आर्च्-बिं'शप्रिक्)—the jurisdiction or office of archbishop. मुख्य धर्माध्यक्षाचा अधिकार किंवा स्थान.

Archdeac'on, *n*. (आर्च्-डी'कन्)—Church dignitary next below bishop. मुख्य बिशपचा साहाय्यकारी, मुख्य डीकन.

Archdeac'onrỹ, *n*. (आर्च्-डी'कन्रि)—jurisdiction of archdeacon. बिशपच्या साहाय्यकाऱ्याच्या अधिकारांतील प्रदेश.

Archdĭ'ocĕse, *n*. (आर्च्-डा'योसीज्)—archbishop's see. आर्चबिशपच्या अधिकारांतील प्रांत.

Arch'dūke, *n*. (आ'र्च्-ड्यूक्)—son of Emperor of Austria. ऑस्ट्रिआ देशाचा राजपुत्र.

Arch'er, *n*. (आ'र्चर्)—one who shoots with bow and arrows. तिरंदाज, धनुर्धर.

Arch'erỹ, *n*. (आ'र्चरि)—use of bow and arrows. तिरंदाजी, धनुर्विद्या.

Arc'hetȳpe, *n*. (-k-, आ'र्किटाइप्)—original model, prototype. मूळ प्रत, अस्सल, मूळ नमुना. [Gr. *arche*, origin, and *typos*, type]

Archĭpel'agō, *n*. (-k-, आर्किपें'लगो)—sea with many islands; group of islands. पुष्कळ बेटें असलेला समुद्र; द्वीपसमूह. [Gr. *archi*, chief, and *pelagos*, sea]

Arc'hĭtĕct, *n*. (-k-, आ'र्किटेक्ट्)—one who prepares plans for building. शिल्पकार, कारागीर, इमारतशास्त्र जाणणारा.

Arc'hĭtĕcture, *n*. (-k-, आ'र्किटेक्चर्)—science of building. शिल्पशास्त्र, इमारतशास्त्र.

Arc'hives, *n. pl*. (kīvz-, आ'र्काइव्ह्ज्)—public records; place where public records are kept. सरकारी जुने कागद, दफ्तर; दफ्तरखाना.

Arc'hĭvĭst, *n*. (-k-, आ'र्काइव्हिस्ट्)—keeper of archives. दप्तराचा रक्षक, दप्तरदार.

Arch'way, *n*. (आ'र्च्-वे)—arched entrance, vaulted passage. कमानीचा दरवाजा.

Arch'wise, *adv*. (आ'र्च्-वाइझ्)—in the form of an arch, like an arch. कमानीसारखा.

Arc'tĭc, *a*. (आ'र्क्टिक्)—of the north pole, northern; frigid. उत्तरध्रुवाकडील; थंड.

Ard'ent, *a*. (आ'र्डन्ट्)—eager, zealous, fervent; burning. उत्कंठित, उत्कट; कडक.

Ard'our, *n*. (-der, आ'र्डर्)—fierce heat; warm emotion; fervour, zeal. दाह, तलखी; कळवळा; उत्साह, उत्कण्ठा. [L. *ardere*, to burn]

Ard'ūous, *a*. (आ'र्ड्युअस्)—hard; strenuous. कठीण; दुर्घट, असाध्य. [L. *arduus*, high]

Ār'ĕa, *n*. (ए'रिआ)—extent of surface, region; scope, range; sunk court before basement of house. क्षेत्रफळ; क्षेत्र; अंगण.

Ă'rĕca, *n*. (अॅ'रिका)—a kind of palm. पोफळीचें झाड. A'rĕca-nŭt, *n*.=पोफळ, सुपारी.

Arē'na, *n*. (अरी'ना)—centre of amphitheatre; scene of conflict. रंगभूमीचा मध्यभाग; रणांगण, मल्लभूमि, पटांगण, आखाडा.

Arĕnā'ceous, *a*. (-shus, अॅरिने'शस्)—sandy. रेताड, वालुकामय. [L. *arena*, sand]

Ar'gent, *a*. (आ'र्जन्ट्)—like silver. रुप्यासारखा चकचकीत. *n*. silver. रुपें.

Argentĭ'fĕrous, *a*. (आर्जेंटि'फरस्)—yielding silver. रजतात्मक, रजतोत्पादक.

Ar'gil, *n*. (आ'र्जिल्)—potter's clay. भांडीं करण्याची माती, पांढरी माती. [L. *argilla*, white clay]

Argĭlā'ceous, *a*. (आर्जिले'शस्)—of the nature of clay. कुंभारमातीचा.

Arg'on, *n*. (आ'र्गॉन्)—a gas, an inert constituent of the atmosphere. हवेंतील एका जातीचा गॅस. [L. *argos*, inert]

Arg'osỹ, *n*. (आर्गो'सि)—richly laden ship. मोठें व्यापारी गलबत, बारकस.

Arg'ūable, *a*. (आ'र्ग्यूएबल्)—capable of being argued. वाटाघाट किंवा वादविवाद करण्यास योग्य.

Arg'ūe, *v. t. & i*. (आ'र्ग्यू)—maintain by reasoning; prove; show; show by inference; reason. वादविवाद करणें; प्रमाण दाखविणें; दाखविणें; सप्रमाण सिद्ध करणें; वाटाघाट करणें.

Arg'ūfȳ, *v. i*. (आ'र्ग्यूफाय्)—argue for the sake of controversy. वादविवादाकरितां चर्चा करणें. [L. *argutare*, to prove]

Argū'mĕnt, *n*. (आर्ग्यू'मेन्ट्)—reason advanced; debate; summary of book. सबब, वादविवाद; पुस्तकाचा सारांश. Line of argument=प्रमाणसरणि, वादविवाद करण्याची पद्धति.

Argūmĕntā'tion, *n*. (आर्ग्यूमेन्टे'शन्)—process of argument, methodical reasoning; debate. व्यवस्थेशीर वादविवाद; वाटाघाट, चर्चा.

Argūmĕn'tātive, *a*. (आर्ग्यूमे'न्टेटिव्ह्)—addicted to reasoning, fond of arguing; logical. विवादप्रिय, वितंडवादी, न्यायानुसार, तर्कशास्त्रशुद्ध.

Arg'ŭs, *n*. (आ'र्गस्)—a fabulous person with hundred eyes. ग्रीक पुराणांतील एक शंभर डोळे असलेला प्राणी. [Gr. *argos*, bright]

Arg'ŭs-eyed, *a*. (आ'र्गस्-आइड्)—vigilant, watchful, extremely observant. दक्ष, सावध.

A'rĭd, *a*. (अॅ'रिड्)—dry, barren, parched; uninteresting. रुक्ष, रखरखीत; नीरस.

Arĭd'ĭtỹ, *n*. (अॅरि'डिटि)—dryness. रुक्षता, रखरखीतपणा. [L. *aridus*, dry]

Ar'ies, *n.* (ए'रिईझ्)—the Ram, first zodiacal constellation. मेष, मेषरास.

Aright', *adv.* (-it, अरा'इट्)—rightly, justly, duly. बरोबर, ठाकठीक, व्यवस्थेशीर.

Arise', *v. i.* (-z, अरा'इझ्)—appear; spring up; occur. उदय पावणें; उत्पन्न होणें; घडून येणें. Arise out of=proceed. ०वरून प्राप्त होणें.

Aristoc'racy, *n.* (ॲरिस्टॉ'क्रसि)—the nobility; government by the nobility; government by the best citizens. अमीर उमराव; अमीर उमरावांच्या सत्तेचें राज्य; उत्तम नागरिकांनीं चालविलेलें राज्य. [Gr. *aristos*, best, and *cratos*, Sk. क्रतु power]

A'ristocrat, *n.* (ॲरिस्टॉक्रॅट्)—member of aristocracy. अमीर उमरावांपैकीं एक.

Aristocrat'ic, *a.* (ॲरिस्टॉक्रॅ'टिक्)—of the aristocracy; grand, stylish. वडे लोकांच्या; थोर, वैभवशाली, डामडौली.

Arith'metic, *n.* (अरि'थ्-मिटिक्)—science of numbers; computation, use of figures. अंकगणित; हिशेब. [Gr. *arithmos*, number]

Arithmet'ical, *a.* (ॲरिथ्-मे'टिकल्)—according to arithmetic. अंकगणिताप्रमाणें, गणितानुसार.

Arithmeti'cian, *n.* (अरिथ्मिटि'शन्)—one skilled in arithmetic. अंकगणितज्ञ.

Ark, *n.* (आर्क्)—covered floating vessel; a chest. आच्छादिलेलें तरंगतें जहाज; पेटी. Noah's ark=toy ark with animals. नोआचें गलबत.

Arm, *n.* (आर्म्)—upper limb of human body; sleeve; branch; a weapon. बाहु, दंड; बाही, अस्तनी; फांदी; शस्त्र, हत्यार. *v. t. & i.* furnish with arms; take up arms; provide, furnish. सशस्त्र होणें; हत्यार उचलणें; तरतूद करणें. In one's arms=पोटाशीं. Arm of the sea= खाडी, फांसू. Arm-in-arm=with arms interlinked. हातांत हात घालून. With open arms= cordially. मनापासून, अंतःकरणपूर्वक. To keep at arm's length=to avoid familiarity with. सलगी न करणें, अतिपरिचय होऊं न देणें. A stand of arms=a set for one soldier. एका शिपायाच्या सर्व हत्याराचा संच. To take up arms= to arm oneself. शस्त्र उचलणें. Up in arms= actively engaged in rebellion, etc. उचडपणें बंड करण्याच्या तयारींत. To lay down arms=to cease hostilities. लढाई बंद करणें. Under arms=in battle array. लढाईकरितां तयार.

Arma'da, *n.* (आर्मे'डा)—a fleet of armed ships, fleet of warships. आरमार, लढाऊ गलबतांचा समुदाय. [L. *arma*, arms]

Armadill'o, *n.* (आर्मडि'लो) (*pl.* Armadillos) an animal with a hard bony shell divided into bands or belts. कठीण कवच असलेला पट्ट्यापट्ट्याचा एक प्राणी.

Arma'ment, *n.* (आर्मे'मेन्ट्)—force equipped for war; military equipment. युद्धाकरितां सज्ज केलेलें आरमार; युद्धाची सामग्री.

Arm'ature, *n.* (आ'र्मचर्)—arms, armour; piece of soft iron placed in contact with poles of magnet. चिलखत; लोहचुंबकाची दोन टोकें जोडणारी लोखंडाची पट्टी.

Arm'istice, *n.* (आ'र्मिस्टिस्)—cessation from arms; short truce. लढाईची तहकुबी; तात्पुरता तह. Armistice Day, 11th November, kept as anniversary of the armistice (1918) that ended hostilities in the great war. ११ नोव्हेंबर, १९१८ सालीं महायुद्ध थांबल्याबद्दल साजरा केला जाणारा वार्षिक दिन.

Arm'let, *n.* (आ'र्म्-लिट्)—a band worn round arm; a small inlet of sea or branch of a river. कंकण; लहान खाडी.

Armor'ial, *a.* (आर्मो'रिअल्)—of heraldic arms, belonging to coats of arms. शूर सरदारांच्या ढालीचा, ध्वजादि विचित्र चिन्हांचा.

Arm'ory, *n.* (आ'र्मरि)—heraldry, armour or arms. कुलमानद्योतक ध्वजादि चित्रित चिन्हें.

Arm'our, *n.* (-mer, आ'र्मर्)—defensive covering worn in fighting; protective steel or iron covering of warship. चिलखत, कवच; लढाऊ गलबताचा लोखंडी किंवा पोलादी पत्रा.

Arm'ourer, *n.* (आ'र्मरर्)—maker of arms; official in charge of arms and armour. शस्त्रें तयार करणारा; हत्याराधिपति.

Arm'oury, *n.* (आ'र्मरि)—a place where arms are kept, a repository of arms, arsenal. हत्यारें ठेवण्याची जागा, शस्त्रागार, शिलेखाना.

Arm'y, *n.* (आ'र्मि)—land forces of a State; vast number. लष्कर, फौज; मोठी संख्या, मोठा समुदाय. Standing army=army of professional soldiers permanently on foot. पगारी सेना, स्थायिक सैन्य, खडी फौज.

Aro'ma, *n.* (ॲरो'मा)—fragrance, pleasant odour, sweet smell; subtle pervasive quality. सुवास, सुगंध; बुद्धीचें कौशल्य.

Aromat'ic, *a.* (ॲरोमॅ'टिक्)—fragrant. सुवासिक.

Around', *adv.* (अरा'उन्ड्)—on every side, all round. सभोंवती, आसमंतात. *prep.* on every side of. ०च्या प्रत्येक बाजूला, आसपास.

Arouse', *v. t.* (-z, अरा'उझ्)—rouse, awaken; stir up into activity. उठविणें, जागा करणें; चेतना उत्पन्न करणें, चेतवणें.

A'rrack, *n.* (ॲ'रॅक्)—spirituous liquor, especially that made from coco-palm. ताडी, माडी, शिंदीची दारू.

Arraign. v. t. (-ān, ॲरेन्)—indict, accuse; find fault with. कायदेशीर दोषारोप करणें; दोष काढणें. Arraign'ment, n. दोषारोप. [L. ad, to & rationem, reason]

Arrānge', v. t. & i. (ॲरेंज्)—put in order; settle; form plans. व्यवस्थित मांडणें; बंदोबस्त करणें; तजवीज करणें, व्यवस्था करणें. [L. ad, to & ranger, to range]

Arrānge'mĕnt, n. (-jm-, ॲरेंज्-मेन्ट्)—thing arranged; settlement; (pl.) plans. व्यवस्था; तजवीज; युक्ति, तोड.

Ă'rrant, a. (ॲ'रन्ट्)—downright, notorious. अट्टल, चिलंदर, इरसाल.

Ă'rras, n. (ॲ'रास्)—tapestry; hangings of tapestry. वेलबुट्टीदार कापड; कापडी पडदे.

Array', v. t. (ॲरे')—dress (esp with display); marshal (forces). थाटमाट करणें; सैन्याची रचना करणें. n. dress; imposing series; martial order. पोषाख; थाटानें केलेली रचना; फौजेची रांग. [L. ad, to and rai, order]

Arrear', n. (ॲरि'अर्)—that which is behind; (pl.) outstanding debts; work etc. in which one is behindhand. मुदत टळून राहिलेला, तुंबलेला; (अने०) थकलेली बाकी; शिल्लक राहिलेलें काम वगैरे. In arrears of=बाकी चढलेलें, पाठीमागें राहिलेलें.

Arrear'age, n. (ॲरि'अरिज्)—being in arrears; debt. बाकी असणें; कर्ज.

Arrĕst', v. t. (ॲरे'स्ट्)—stop, seize by authority; apprehend; catch the attention of. थांबविणें, राजाज्ञेनें पकडणें: गतिनिरोध करणें; चित्त वेधणें. n. legal apprehension; stoppage. सरकारी हुकुमानें पकडणें, निरोध, प्रतिरोध. Under arrest=under legal restraint. पोलीसच्या ताब्यांत. [L. ad, & restare, to remain]

Arrīv'al, n. (अरा'इव्हल्)—coming to the end of journey or destination; appearance on scene. पोहोंचणें, आगमन; येणें.

Arrīve', v. t. (अरा'इव्ह्)—come to destination or end of journey; attain an object; establish one's position. मुक्कामीं पोहोंचणें; हेतु साध्य करणें; स्वत्व स्थापन करणें.

Ă'rrŏgance, n. (ॲ'रोगन्स्)—insolence of bearing; haughtiness. उद्धटपणा, मगरुरी; ताठा.

Ă'rrogant, a. (ॲ'रोगन्ट्)—making undue claims, overbearing, presumptuous, haughty. गर्विष्ठ, उद्धट, मगरूर, आढ्यतेचा.

Ă'rrogāte, v. t. (ॲ'रोगेट्)—claim unduly, demand overbearingly. नसती आढ्यता बाळगणें. [L. ad, to & rogare, to ask]

Ărrogā'tion, n. (ॲरोगे'शन्)—unjust claim; unwarrantable assumption. पोकळ आढ्यता; नसता अभिमान, स्तोम.

Ă'rrow, n. (-ō, ॲ'रो)—a straight slender pointed missile shot from bow; indication mark. बाण; दर्शविण्याची खूण, शरचिन्ह.

A'rrowrōōt, n. (ॲ'रोरूट्)—a plant from which nutritious starch is prepared, a nutritive medicinal food. तवकीर, आरारूट.

Ars'ĕnal, n. (आ'र्सेनल्)—place for storage or manufacture of war material. तोफखाना, युद्धसाहित्यगृह, शस्त्रागार, शस्त्रगृह.

Ars'ĕnĭc, n. (आ'र्सेनिक्)—a well-known violent poison. सोमल, एक भयंकर विष.

Arsē'nious, a. (आर्सी'निअस्)—containing arsenic. सोमलाची धातु ज्यांत आहे असा.

Ars'on, n. (आ'र्सन्)—wilful setting on fire of houses or other property. मुद्दाम घरें वगैरे जाळणें, दुसऱ्याची मिळकत अदावतीनें जाळणें.

Art, n. (आर्ट्)—skill esp. applied to design, cunning. कसब, युक्ति. pl. certain branches of learning. कला. Fine arts=arts in which mind and imagination are chiefly concerned; music, painting, sculpture, architecture and poetry. ललितकला; संगीत, चित्रकला, खोदकाम, इमारतशास्त्र आणि काव्य.

Artēr'ial, a. (आर्टी'रिअल्)—of the nature of an artery. नाडीसारखा, धमनीचा.

Artēr'ialīze, v. t. (आर्टी'रिअलाइझ्)—convert into arterial blood; furnish with arterial system. शुद्धवाहिनीचा करणें; नाडीचक्रसहित करणें.

Art'ery̆, n. (आ'र्टरि)—any of the tubes by which blood is conveyed from the heart to all parts of the body. नाडी, धमनी.

Artē'sion well, n. (-zhn, आर्टी'झन् वेल्)—deep well made by boring until water is reached. जमिनींत पाण्याची शीर सांपडेपर्यंत यंत्रानें खोदून वर आणलेल्या झऱ्याचें पाण्याची विहीर.

Art'ful, a. (आ'र्ट्-फुल्)—cunning, crafty, deceitful, sly. धूर्त, कावेबाज, कुशल, फसव्या.

Arthrī'tĭs, n. (आर्थ्रा'इ-टिस्)—inflammation of joint; gout. संधिदाह; सांध्यांत दाह उत्पन्न करणारा रोग. Arthrĭt'ic, a.

Art'icle, n. (आ'र्टिकल्)—clause of agreement, treaty etc.; short literary composition; any particular thing; a part of speech. कलम; छोटा लेख; वस्तु; उपपद. In the article of death=in the moment of death. मरणसमयीं. v. t. to draw up in articles; to bind by articles of apprenticeship. कलमबंदी करणें; शिकण्याकरितां करारनाम्यानें बांधून घेणें. Articled clerk=सॉलिसिटर होण्याकरितां उमेदवार.

Art'ĭchōke, n. (आ'र्टिचोक्)—an edible vegetable. एक जातीची भाजी.

Artĭc'ūlar, *a.* (आर्टिक्युलर्)—of or belonging to the joints. संधिगत, सांध्यासंबंधी.

Artĭc'ūlāte, *a.* (आर्टिक्युलेट्)—having joints; *divided into* words or syllables. संधियुक्त; स्पष्टोच्चारक. *v. t. & i.* speak distinctly; connect by joints. स्पष्ट बोलणें; सांधणें.

Artĭcūlā'tion, *n.* (आर्टिक्युले'शन्)—articulate speech; jointing. स्पष्ट बोलणें; सांधा.

Art'ĭfice, *n.* (आ'र्टिफिस्)—device, contrivance; skill. युक्ति, शक्कल; कृति.

Artĭf'ĭcer, *n.* (आर्टि'फिसर्)—craftsman; inventor (*of*). कारागीर; कल्पक शिल्पकार.

Artĭfĭ'cial, *a.* (-shl, आर्टिफि'शल्)—produced by art; feigned, affected. कृत्रिम, कृतिसिद्ध; खोटा, बनावट.

Artĭficĭal'ĭtȳ, *n.* (आर्टिफि-शिॲ'लिटि)—being produced by art or artificial. कृत्रिमपणा

Artĭll'erȳ, *n.* (आर्टि'लरि)—cannon; great guns, ordnance branch of troops or army. तोफखाना; तोफखान्यांतील लोक.

Artĭsăn', *n.* (-z-, आर्टिझॅ'न्)—mechanic, craftsman. कारागीर, हस्तव्यवसायी, शिल्पकार.

Art'ĭst, *n.* (आ'र्टिस्ट्)—one who practises one of the fine arts; one who makes his craft a fine art. शिल्पकार; कारागीर, कसबी, शिल्पज्ञ.

Artiste', *n.* (-tē-, आर्टी'स्ट्)—professional singer, dancer, etc.; an opera-dancer. धंदेवाईक गायक, नृत्यकर्ता वगैरे.

Art'ĭstĭc, *a.* (आ'र्टिस्टिक्)—according to art. conformed to art. कौशल्यपूर्ण, खुबीदार.

Art'less, *a.* (आ'र्ट्लिस्)—guileless, simple; lacking art, crude. निष्कपटी, सरळ मनाचा; कलाकौशल्यरहित. Art'lessness, *n.*

As, *adv. & conj.* (-z, ॲझ्)—in the same degree; similarly; while, when; since, seeing that; for example. जितका; त्याचप्रमाणें, म्हणून; जेव्हां; ज्याअर्थी; उदाहरणार्थ. *rel. pron.* that, who, which. जें. As far as=जितका, तितका; ०पर्यंत. As good as one's word=वचन पुरें करणारा. As though. as if, as it were=as if it were actually so. जणूं काय, जणूं. As from=०पासून. As regards=so far as it concerns. ०च्या विषयीं म्हटलें तर. As to=with respect to. विषयीं As yet=up to this time. अद्यापपर्यंत अजून. (I thought) as much=(I thought) so. तसेंच. As well (as)=in addition (to) आणखी तसेंच. As good as dead=practically dead. मृतप्राय. As long as=जोंपर्यंत.

As, *n.* (ॲस)—Roman copper coin. रोममधील अर्धा औंस वजनाचें एक तांब्याचें नाणें.

Asafoet'ĭda, *n.* (-fēt-, ॲसफी'टिडा)—resinous gum with smell of garlic. हिंग.

Ascĕnd', *v. t. & i.* (ॲसे'न्ड्)—go or come up: rise, mount, climb; go along towards the source. वर चढणें; उदय होणें; (नदीच्या) उगमाकडे जाणें. [L. *ad.* & *scandere*, to climb]

Ascĕn'dancȳ, -encȳ, *n.* (असे'न्डन्सि)—dominant control, sway, powerful influence. प्राबल्य, वर्चस्व, प्राधान्य.

Ascĕn'dant, -ent, *a.* (ॲसे'न्डन्ट्)—rising; predominant. उदयाप्रत आलेला, उदित; वरचढ. *n.* ascendant point or degree of zodiac; horoscope. उच्चस्थान; जन्मकुंडली. In the ascendant=supreme, dominating. प्रबल.

Ascĕn'sion, *n.* (-shn, ॲसे'न्शन्)—ascent; *rising of celestial body.* आरोहण; उदय. Ascension Day=Holy Thursday. ख्रिस्ती धर्मांत ख्राइस्ट देहासकट आकाशांत गेला तो दिवस. Right ascension=celestial longitude. मेषराशीजवळच्या संपातबिंदूपासून कोणत्याहि ग्रहाचें किंवा ताऱ्याचें अंतर, विषुवांश.

Ascĕnt', *n.* (ॲसे'न्ट्)—ascending, rising; upward path or slope. चढण; चढाव. Ascent and descent=चढउतार, चढणउतरण. Steep ascent=उभा चढ.

Ăscertain', *v. t.* (ॲसर्टे'न्)—to make certain or sure, to determine, to find out. निश्चित ठरविणें.

Ăsertain'āble, *a.* (ॲसर्टे'नेबल्)—fit to be ascertained. निर्धार किंवा निर्णय करण्याजोगा.

Ăscertain'mĕnt, *n.* (ॲसर्टे'न्मेन्ट्)—act of ascertaining. निश्चय करणें, निर्णय, निर्धार.

Ascĕt'ĭc, *a.* (ॲसे'टिक्)—severely abstinent; severe in self-discipline. विरक्त, तपोनिष्ठ. *n.* a person who practises austerity. तपश्चरण करणारा, वैरागी, तपस्वी.

Ascĕt'ĭcism, *n.* (ॲसे'टिसिझम्)—the practice of ascetics, self-mortification. तपश्चर्या, वैराग्य.

Ascrībe', *v. t.* (ॲस्क्रा'इब्)—attribute, impute; assign. आंगीं लावणें; आरोपणें; नेमून देणें.

Ascrĭp'tion, *n.* (ॲस्क्रि'प्शन्)—act of ascribing *or attributing.* आरोपणें, आंगीं लावणें.

Asĕp'sĭs, *n.* (असे'प्सिस्)—absence of putrefactive matter or harmful bacteria; the aseptic method in surgery. सडून किंवा कुजून न जाणें; शस्त्रविद्येतील एक प्रकार.

Asĕp'tĭc, *a.* (असे'प्टिक्)—preventing putrefaction. सडून किंवा कुजून न जाईल असा.

Asĕx'ūal, *a.* (असे'क्स्यूअल्)—non-sexual, without distinctive organs of sense. स्त्रीपुरुषभेदरहित, स्त्रीपुरुषभेद नसणारा.

Ash, *n.* (ॲश्)—a forest tree; powdery residue of what is burnt. एक प्रकारचें झाड; राख.

(*pl.*) remains of human body after cremation. दहनविधीनंतरची शरीराची रक्षा, चिताभस्म. To lay in ashes=to burn to the ground. जाळून भस्म करणें. Ash Wednesday=the first day of Lent ख्रिस्ती लोकांच्या 'लेन्ट' नांवाच्या ४० दिवसांच्या उपवासाचा पहिला दिवस. Sackcloth and ashes=in the state of repentance. दुःखाच्या किंवा पश्चात्तापाच्या स्थितींत. To bring back the ashes=to wipe out the defeat (in cricket). पराजयाचा डाग धुवून टाकणें. To reduce to ashes=भस्म करणें.

Ăsh'en, *a.* (ॲ'शन्)—of ash; like ashes, pale; grey. 'ॲश' झाडाचा बनविलेला; राखेसारखा, फिकट; राखीरंगाचा, भुरकट.

Ashāmed', *a.* (-md, अशे'म्ड्)—abashed, conscious of shame. लाजलेला, खजील, ओशाळा.

Ăsh'lar, *n.* (ॲ'शुलर्)—square-hewn stone; masonry of square-hewn stones. चौरस दगड; चौरस घडलेल्या दगडांचें बांधकाम.

Ăsh'laring, *n.* (ॲ'शुलरिंग्)—ashlar masonry. चौरस घडलेल्या दगडांचें बांधकाम.

Ashōre', *adv.* (अशो'अर्)—to or on the shore, on the land. किनाऱ्यावर.

Ash'ỹ, *a.* (ॲशि)—of or like ashes; pale. राखेचा, भस्मी रंगाचा; फिकट.

Aside', *adv.* (असा'इड्)—to or on one side, away, apart. पलीकडे, दूर. *n.* words spoken aside (*by actors*). आत्मगत किंवा स्वगत भाषण. To set aside=to quash (verdict). नामंजूर करणें, विचारांत न घेणें.

Ăs'inine, *a.* (ॲ'सिनाइन्)—of asses; stupid. गाढवांचा; मूर्ख, बुद्धिहीन.

Ask, *v. t. & i.* (आस्क्)—inquire, put a question; seek by request; make a request. चौकशी करणें; विचारणें; विनंति करणें.

Askănce', Askant', *adv.* (आस्कॅ'न्स्,०स्कॅ'न्ट्)—sideways; with indirect meaning. बाजूनें, तिरका; उलट अर्थानें. To look *askance* at=to view suspiciously. संशयित मनानें पाहणें.

Askew', *adv. & pred. a.* (अस्क्यू')—obliquely, awry. तिरकस, वांकडा, ओझरता. To look askew=not to look straight in the face. तिरक्या नजरेनें पाहणें.

Aslănt', *adv.* (अस्ला'न्ट्)—obliquely. तिरकस, ओझरता. *prep.* slantingly across. तिरका.

Asleep', *adv. & pred. a.* (अस्ली'प्)—in a state of sleep; benumbed. झोंपी गेलेला; गारठलेला. Fast asleep, Sound asleep=गाढ झोंप लागलेला. Half asleep=निजसुरा. To fall asleep=झोंप लागणें.

Aslōpe', *adv.* (अस्लो'प्)—on a slope, crosswise. उतरता, कलता, उतरणीनें.

Ăsp, *n.* (ॲस्प्)—small venomous serpent. एक जातीचा लहान विषारी साप.

Aspă'răgŭs, *n.* (अस्पॅ'रॅगस्)—plant whose vernal shoots are a table delicacy. शतावरीचें झाड, शतावरी.

Ăs'pĕct, *n.* (ॲ'स्पेक्ट्)—way a thing presents itself to eye or mind; direction in which a thing fronts; phase; look, expression. स्वरूप, आकार; अवस्थान; अवस्था; चेहरा, मुद्रा

Aspĕ'rĭtỹ, *n.* (अस्पे'रिटि)—harshness, roughness; sharpness (of temper). तीव्रता, खरखरीतपणा; जहालपणा.

Asperse', *v. t.* (अस्प'र्स्)—defame, traduce, attack the reputation of; calumniate. काळोखी लावणें, अब्रूवर घाला घालणें; आळ घेणें.

Asper'sion, *n.* (अस्प'र्शन्)—calumny, slander; *a sprinkling*. आक्षेप, निंदा; प्रोक्षण.

Ăs'phălt, *n.* (ॲ'स्फॅल्ट्)—a bituminous substance; mixture of bitumen, pitch and sand. शिलाजिताची एक जात, एका जातीचें डामर; वाळू वगैरेचें मिश्रण, लादा. *v. t.* lay (road) with asphalt. डामर लावणें.

Ăs'phodĕl, *n.* (ॲ'स्फॉडेल्)—a kind of plants of the lily family. एक जातीचें भुईकमळ.

Ăsphỹx'ia, -xỹ, *nn.* (ॲस्फि'क्सिआ, ॲस्फि'क्सि)—suspended animation due to lack of oxygen in blood, suffocation. गुदमरणें, श्वासावरोध. Ăsphỹx'ial, *a.* [Gr. *a*, not & *sphyxis*, the pulse]

Ăsphỹx'iāte, *v. t.* (ॲस्फि'क्सिएट्)—to cause asphyxia, to suffocate. श्वासावरोध करणें, श्वास कोंडणें.

Ăs'pĭrāte, *a. & n.* (ॲ'स्पिरेट्)—(consonant) pronounced with a breathing, blended with sound of *h*; the sound of *h*. महाप्राणोच्चार; जोराच्या उच्चाराचा वर्ण ह्.

Ăspĭrā'tion, *n.* (ॲस्पिरे'शन्)—drawing of breath; an ardent desire; ambition. महाप्राणोच्चारण; उत्कट इच्छा, हांव; महत्त्वाकांक्षा.

Aspire', *v. i.* (अस्पा'यर्)—cherish elevated aims, feel earnest desire or ambition; reach high. महत्त्वाकांक्षा बाळगणें; उच्चस्थानीं जाणें. [L. *ad*, to & *spirare*, to breathe]

Asquint', *adv.* (अस्क्वि'न्ट्)—with a squint, toward one side. तिरपें, काण्या डोळ्यानें.

Ăss, *n.* (ॲस्)—long-eared quadruped; stupid fellow. गाढव; मूर्ख मनुष्य, ढोणपा.

Assail', *v. t.* (असे'ल्)—attack, assault. हल्ला करणें, घाला घालणें. [L. *ad*, to & *salire*, to leap]

Assail'able, *a.* (असे'लेबल्)—that may be assailed, open to attack. हल्ला करण्याजोगा.

Assail'ant, *n.* (असे'लन्ट्)—one who assails, one that attacks. हल्ला करणारा.

Assăss'ĭn, *n.* (असॅ'सिन्)—one hired to kill another treacherously; a murderer. कपटानें खून करणारा; गुप्त मारेकरी.

Assăss'ĭnāte, *v. t.* (असॅ'सिनेट्)—kill by treacherous violence. विश्वासघातानें ठार मारणें. Assă'ssinātor, *n.* गुप्त रीतीनें खून करणारा.

Assăssĭnā'tion, *n.* (अॅसॅसिने'शन्)—treacherous murder. विश्वासघातानें ठार मारणें, खून.

Assault', *n.* (अॅसॉ'ल्ट्)—a sudden attack; unlawful personal attack. घाला, हल्ला; अंगावर धावून जाणें. *v. t.* make violent attack upon; assail. अंगावर धावून जाणें. Assault of arms, Assault at arms=attack in fencing, display of military exercises. एक प्रकारची हत्यारांची लष्करी कवाईत.

Assay', *n.* (अॅसे')—trial of metal; test. धातूची पारख; परीक्षा. *v. t.* try the purity of (precious metals); attempt task. पारख करणें; करून प्रयत्न करणें.

Assĕm'blage, *n.* (अॅसे'म्ब्लेज्)—collection, company, mass, concourse. समूह, जमाव.

Assĕm'ble, *v. t.* & *i.* (अॅसे'म्बल्)—bring or come together; collect; fit together parts of. एकत्र आणणें किंवा येणें; जमा करणें; निरनिराळे भाग एकत्र बसवणें.

Assĕm'blȳ, *n.* (अॅसे'म्ब्लि)—gathering of persons (esp. of deliberative body). सभा, समाज.

Assĕnt', *v. i.* (अॅसे'न्ट्)—agree to; defer or accede to. कबूल करणें; रुकार देणें. *n.* concurrence; sanction. अनुमति; रुकार. Assen'tor, *n.*

Assĕn'tient, *a.* (-shĭ-, असे'न्शिएन्ट्)—(a person) that assents. संमति दर्शविणारा, रुकार देणारा.

Assert', *v. t.* (अॅस'र्ट्)—maintain one's claim to; declare, state. निश्चितपणें सांगणें; प्रतिपादन करणें. *To assert oneself*=insist upon one's rights; declare. स्वतःच्या हक्कांचें जारीनें समर्थन करणें; आपलें घोडें पुढें ढकलणें.

Asser'tion, *n.* (अॅस'र्शन्)—insistence upon a right; affirmation, positive statement. हक्क प्रस्थापित करणें; निश्चित विधान.

Asser'tive, *a.* (अॅस'र्टिव्ह्)—positive, dogmatic. (आपलें म्हणणें) आग्रहानें पुढें मांडणारा.

Asser'tor, *n.* (अॅस'र्टर्)—one who asserts; champion, advocate (*of*). हक्क सांगणारा; दुसऱ्याकरितां लढणारा, तरफदार.

Assĕss', *v. t.* (अॅसे'स्)—fix amount of rate; value for taxation. कर बसविणें; कराची आकारणी करणें. [L. *ad*, to & *sedere*, to sit]

Assĕss'mĕnt, *n.* (अॅसे'स्-मेन्ट्)—valuation for the purpose of assessing; the sum assessed. कर बसविणें; कर, जमाबंदी.

Assĕss'or, *n.* (अॅसे'सर्)—one who assesses taxes; adviser to judge or magistrate. कर बसविणारा; न्यायाधीशाचा सल्लागार.

Ass'ĕts, *n. pl.* (अॅ'सेट्स्)—all the available property of person or company; (*sing.*) item of this property; any possession, any useful quality. मालमत्ता; मालमत्तेचा प्रत्येक तपशील; मालमत्ता, उपयुक्त गुण.

Assĕv'erāte, *v. t.* (असे'व्हरेट्)—to declare solemnly. सत्य स्मरून बोलणें. Assev'erator, *n.*

Assĕverā'tion, *n.* (अॅसेव्हरे'शन्)—solemn affirmation. सत्यविधान, शपथेवर बोलणें.

Ăssĭdū'ĭtȳ, *n.* (अॅसिड्यु'इटि)—constant attention. आसक्ति, दीर्घोद्योग; व्यासंग.

Assĭd'ūous, *a.* (अॅसि'ड्युअस्)—diligent, unremitting. दक्ष, व्यासंगी.

Assīgn', *v. t.* (-In, अॅसा'इन्)—make over formally; allot; appoint; ascribe. स्वाधीन करणें; नेमून देणें; योजना करणें, नेमणें; (कारण) दाखवणें. *n.* one to whom property or right is legally transferred. ज्याचे नांवें मालमत्ता करणें असतें तो मुखत्यार. [L. *ad*, to & *signum*, a mark or sign]

Assīgn'able, *a.* (अॅसा'इनेबल्)—that may be assigned. नेमून देण्याजोगा, निर्देश करण्याजोगा, सांगण्यासारखा.

Ăss'ĭgnăt, *n.* (अॅ'सिग्नॅट्)—paper money issued by revolutionary government of France. फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळीं सरकारनें चालू केलेला कागदी पैसा.

Ăssĭgnā'tion, *n.* (अॅसिग्ने'शन्)—apportionment; formal transference; appointment of time and place for interview. विभागून देणें; वेचन देणें; नियमित स्थळीं आणि वेळीं नियमित भेटण्याचा संकेत, संकेत.

Assīgnee', *n.* (अॅसाय्-नी')—one appointed to act for another; one to whom property or right is legally transferred. मुखत्यार, मुखत्यारी; वेचन घेणारा, वेचनदार.

Assīgn'mĕnt, *n.* (असा'इन्-मेन्ट्)—allotment; legal transference; document effecting legal transference; statement (of reasons). नेमून देणें; ज्याचे योगानें हक्क किंवा मालकी बदलली जाते असा लेख, वेचन; वेचनपत्र; (कारणांची) यादी. Assignment deed=वेचनपत्र.

Assĭm'ĭlāte, *v. t.* & *i.* (अॅसि'मिलेट्)—make or become like; absorb, be absorbed; digest. सारखा करणें किंवा होणें; मिळून जाणें; एकरूप होणें; जिरवणें, पचवणें. [L. *ad*, to, and *similis*, Sk. सम, like]

Assĭmĭlā'tion, *n.* (अॅसिमिले'शन्)—the act of assimilating. एकीकरण, एकरूप करणें; जिरणें,

जिरवणें; अन्नाचा परिपाक. Assim'ilator, *n.* Assi'milative, Assi'milatory, *aa.*

Assist', *v. t.* & *i.* (ॲसि'स्ट्)—help, aid; be present at. मदत करणें; हजर राहणें.

Assist'ance, *n.* (ॲसि'स्टन्स्)—help, aid, support, succour. मदत, साहाय्य.

Assis'tant, *a.* (ॲसि'स्टन्ट्)—helping. साहाय्य करणारा. *n.* helper, subordinate worker. मदतनीस, हाताखालील कामगार.

Assize', *n.* (असा'इझ्)—statutory price of bread and ale; *pl.* periodical courts of justice held by judges on circuit. ब्रेड व दारू यांची कायद्यानें ठरविलेली किंमत, धारण, भाव; (अने०) तालुक्यांत फिरत्या न्यायसभा.

Asso'ciate, *v. t.* & *i.* (-shi-,ॲसो'शिएट्)—unite together; have intercourse with; connect in idea. मिसळणें, संबंध जोडणें; सलगी ठेवणें, संगतीनें राहणें; एकमत असणें. *n.* partner, companion; accomplice; subordinate member of an association. भागीदार, सोबती; साथीदार; एखाद्या मंडळाचा सभासद. [L. *ad*, to & *socius*, a companion]

Associa'tion, *n.* (असोसिए'शन्)—organized body of persons; connexion of ideas; intercourse. मंडळी, समाज; (विचार) संगति; जोड, सहवास, संयोग. *Association* of ideas= mental connection between an object and ideas connected with it. एका कल्पनेवरून कांहीं कारणानें दुसरी कल्पना भासविणारी मानसिक शक्ति, विचारसंगति, विचारसाहचर्य.

As'sonance, *n.* (ॲ'सोनन्स्)—*resemblance of* sound between two syllables; rhyme depending on identity of vowel-sounds only. एकस्वरता, स्वरसाम्य; स्वरसाम्यावर अवलंबून असणारा यमक.

Assort', *v. t.* & *i.* (ॲसॉ'र्ट्)—arrange in sorts; harmonize. वर्ग लावणें; योग्य असणें.

Assort'ed, *a.* (ॲसॉ'र्टेड्)—selected, classified. निवडक, विल्हेवारीनें लावलेला.

Assort'ment, *n.* (ॲसॉ'र्ट्मेन्ट्)—assorting; assorted set of goods. प्रत लावणें; विल्हेवारी, वर्गीकरण. [L. *ad*, to and *sors*, a lot]

Assuage', *v. t.* (-sw-, ॲस्वे'ज्)—soothe, allay, mitigate. शांत करणें, हलका करणें, शमवणें.

Assua'gement, *n.* (अस्वे'ज्मेन्ट्)—mitigation, abatement. हलका करणें, उपशमन.

Assume', *v. t.* (ॲस्यू'म्)—take upon oneself; usurp authority; take for granted; to pretend to possess; to be arrogant. शिरावर घेणें, अंगिकार करणें; गैरवाजवी हक्क सांगणें; धरून चालणें; बहाणा करणें, आव आणणें; गर्विष्ठ होणें, ताठ्यांत असणें. [L. *ad*, to & *sumere*, to take]

Assum'ing, *a.* (अस्यू'मिंग्)—taking much upon oneself, arrogance. आढ्यतेचा, कुरेंबाज.

Assump'tion, *n.* (ॲस'म्प्शन्)—the act of assuming; thing assumed; arrogance. अंगीकार, आधाराशिवाय गृहीत धरणें; प्रमाणावांचून मानलेली गोष्ट; डौल, ताठा.

Assump'tive, *a* (ॲस'म्प्टिव्ह्)—taken for granted. गृहीत धरून चाललेला.

Assur'ance, *n.* (-shoo-, ॲशू'रन्स्)—positive assertion; self-confidence; insurance (of life). खातरी; आत्मविश्वास; (आयुष्याचा) विमा.

Assure', *v. t.* (-shoo-, ॲशू'र्)—make positive or confident assertions; satisfy, convince; insure (life). निश्चयपूर्वक सांगणें; समाधान किंवा खातरी करणें; (आयुष्याचा) विमा उतरणें.

Assured'ly, *adv.* (ॲशूरे'ड्लि)—certainly, indubitably. खातरीनें, निश्चयपूर्वक.

Assur'gent, *a.* (ॲस'र्जन्ट्)—rising; aggressive. उगवता, वाढता; कुरापत काढणारा.

As'ter, *n.* (ॲ'स्टर्)—kinds of plant with showy radiated flower. अस्मानी रंगाचें व तान्यासारखें फूल असलेलें एक फुलझाड. [Gr. *aster*, a star]

As'terisk, *n.* (ॲ'स्टेरिस्क्)—star used to mark words for reference or distinction (*). नक्षत्राचे आकाराची फुली ही खूण, चौफुली.

As'terism, *n.* (ॲ'स्टेरिझम्)—a small cluster of stars, a constellation. नक्षत्रगण, नक्षत्रसमुदाय.

Astern', *adv.* (ॲस्ट'र्न्)—in the stern, behind. (गलबताच्या) मागल्या बाजूस.

As'teroid, *n.* (ॲ'स्टेरॉइड्)—any of the small planets revolving round the sun between orbits of Mars and Jupiter. मंगळ व बृहस्पति यांच्या कक्षांमधून सूर्याभोंवतीं फिरणारे अल्पग्रह. *a.* star-shaped. नक्षत्राच्या आकाराचा.

Asth'ma, *n.* (ॲ'स्मा, or ॲ'स्थ्मा)—a disease marked by difficulty in breathing. दमा.

Asthmat'ic, *a.* (ॲस्थ्मॅ'टिक्)—caused by asthma. दम्याचा. *n.* person suffering from asthma. दमेकरी.

Astig'matism, *n.* (ॲस्टि'ग्मॅटिझम्)—defect in eye preventing proper focusing. एक प्रकारचा दृष्टिदोष Astigmat'ic, *a.*

Astir', *adv.* (अस्ट'र्)—in motion; out of bed. हालचाल करीत; बिछान्याबाहेर.

Aston'ish, *v. t* (ॲस्टॉ'निश्)—amaze, surprise, astound. चकित करणें, थक्क करणें.

Aston'ishing, *a.* (ॲस्टॉ'निशिंग्)—surprising, amazing. आश्चर्यजनक, चमत्कारिक.

Aston'ishment, *n.* (ॲस्टॉ'निश्-मेन्ट्)—amazement, wonder. विस्मय, आश्चर्य.

Astound', *v. t.* (ॲस्टा'उन्ड्)—amaze, astonish, stun. चकित करणें, थक्क करून सोडणें.

Ăs'tral, *a.* (ॲस्ट्रल्)—starry, star-like, of stars; spiritual. तार्‍यांचा; आध्यात्मिक.

Astray', *adv.* (अस्ट्रे)—out of the right way. वाट चुकून, चुकीच्या मार्गानें. To go astray= वहकणें, वांकडें पाऊल पडणें. To lead astray= कुमार्गाकडे नेणें, चुकीच्या मार्गानें नेणें.

Astrīde', *adv.* (अस्ट्राइड्)—with legs wide apart or one on each side (*of*). पाय फांकून, दोन्हीकडे पाय टाकून.

Astrĭn'gent, *a.* (-nj-, अस्ट्रिं'जेन्ट्)—causing contraction or compression; austere, severe. संकुचित करणारें, स्तंभक; तुरट, कडक. *n.* astringent medicine. स्तंभक किंवा तुरट पदार्थ किंवा औषध. Astring'ency, *n.* [L. *ad*, to & *stringere*, to bind]

As'trolābe, *n.* (ॲ'स्ट्रॉलेब्)—instrument formerly used in taking altitudes etc. सूर्य व इतर तारे यांची क्षितिजापासून उंची मोजण्याचें पूर्वी प्रचारांत असलेलें एक यंत्र, वेधयंत्र.

Astrŏl'oger, *n.* (ॲस्ट्रॉ'लॉजर्)—one that foretells events by the stars. फलज्योतिषी, प्रश्नज्योतिषी, मुहूर्त सांगणारा जोशी.

Astrŏlŏg'ical, *a.* (ॲस्ट्रॉलॉ'जिकल्)—relating to astrology. फलज्योतिषासंबंधीं.

Astrŏl'ogy̆, *n.* (ॲस्ट्रॉ'लॉजि)—study of occult influence of stars on human affairs. फलज्योतिष, नक्षत्रफलगणनशास्त्र. [Gr. *astron*, a star, & *logos*, knowledge]

Astrŏn'omer, *n.* (ॲस्ट्रॉ'नॉमर्)—a student of astronomy. खगोल विद्येचा अभ्यासक, खगोलवेत्ता.

Astrŏn'omĭcal, *a.* (ॲस्ट्रॉ'नॉमिकल्)—relating to astronomy. खगोलविद्येसंबंधीं, ज्योतिषाचा, ज्योतिषविषयक. Also *Astron'omic.*

Astrŏn'omy̆, *n.* (ॲस्ट्रॉ'नॉमि)—science of the heavenly bodies. खगोलशास्त्र, ज्योतिर्विद्या. [Gr. *astron*, a star & *nomos*, a law]

Astūte', *a.* (अस्टयू'ट्)—shrewd; crafty. धूर्त; कावेबाज. Astu'tely, *adv.*; Astu'teness, *n.*

Asŭn'der, *adv.* (ॲस'न्डर्)—apart, in pieces. पृथक्, अलग, निरनिराळा. To tear asunder= to tear to pieces. तुटून पडणें, तुटणें.

Asy̆'lŭm, *n.* (असा'यूलम्)—institution for afflicted persons; shelter, refuge; sanctuary. रुग्णालय; आश्रय; आश्रयस्थान.

Asy̆mm'etry̆, *n.* (असि'मेट्रि)—want of symmetry or proportion between parts of a thing. समप्रमाण किंवा सारखेपणा नसणें.

At, *prep.* (ॲट्)—in, by, toward, on, near or close to, with direction towards. आंत, कडे.

Ăt'avĭsm, *n.* (ॲ'टव्हिझम्)—resemblance to remote ancestors rather than parents, reversion to earlier type; recurrence of disease after intermission of some generations. जुन्या पिढीच्या वळणाकडे जाणें; आनुवंशिक रोग, कुलागत रोग. At'avĭs'tic, *a.* पिढीजात, जुन्या वळणाकडे जाण्याचा. [L. *atavus*, an ancestor]

Atăx'y̆, *n.* (अटॅ'क्सि)—irregularity of animal functions. इंद्रियव्यापारांतील अनियमितता, कम्पवायु. [Gr. *a*, not & *taxis*, order]

Ā'theĭsm, *n.* (ए'थिइझम्)—disbelief in the existence of God. अनीश्वरवाद, नास्तिकता.

Ā'theĭst, *n.* (ए'थिइस्ट्)—one that denies the existence of God. नास्तिक, अनीश्वरवादी.

Ăthenae'ŭm, *n.* (ॲथिनी'अम्)—literary or scientific club; library. वाङ्मय कलादिकांच्या उत्तेजनार्थ संस्था, ज्ञानवर्धक संस्था, विद्यामंदिर, सरस्वतीमंदिर; पुस्तकालय. [Gr. *Athene*, the goddess of wisdom]

Athirst', *a.* (अथ'र्स्ट्)—thirsty, wanting drink, eager for. तहानेलेला; उत्सुक.

Ăth'lēte, *n.* (ॲ'थ्लीट्)—one who competes or excels in physical exercises. तालिमबाज.

Ăthlĕt'ĭc, *a.* (ॲथ्ले'टिक्)—physically powerful; of athletes. धट्टाकट्टा; पहिलवानांसंबंधीं. *n. pl.* physical exercises; athletic sports. तालीम, शारीरिक व्यायाम; व्यायामाचे खेळ. Athlet'ĭcĭsm, *n.* पहिलवानकी, मल्लविद्या.

Ăt'-hōme, *n.* (ॲ'ट्-होम्)—reception of visitors within certain hours during which host or hostess or both have announced that they will be at home. मित्रसंमेलन, खाना.

Athwart', *adv.* & *prep.* (अथ्वॉ'र्ट्)—across (esp. obliquely). आडवा, मध्यें.

Ăt'las, *n.* (ॲ'ट्लास्)—volume of maps, collection of maps in a volume. नकाशांचें पुस्तक.

Ăt'mŏsphēre, *n.* (ॲ'ट्मॉस्फिअर्)—the air that surrounds the earth; mental environment. वातावरण; मानसिक किंवा नैतिक परिस्थिति, आवरण. [Gr. *atmos*, air, & *sphaira*, a sphere]

Ăt'mŏsphĕrĭc, *a.* (ॲ'ट्मॉस्फेरिक्)—belonging to the atmosphere. वातावरणासंबंधीं. Also *Atmospher'ical, a.*

Atŏ'll, *n.* (अटॉ'ल्)—a coral island or a round coral reef enclosing lagoon. खाजणांतील वाटोळा पोंवळ्याचा खडक.

Ăt'om, *n.* (ॲ'टम्)—body too small to be divided; minute portion or thing. परमाणु; अतिसूक्ष्म पदार्थ. [Gr. *a*, not & *tomos*, cut]

Ătŏm'ĭc, *a.* (ॲटॉ'मिक्)—of atoms. परमाणूसंबंधीं.

Ătomĭ'cĭty̆, *n.* (ॲटॉमि'सिटि)—the number of atoms in the molecule of an element. परमाणुता, परमाणुसंयोगप्रमाण.

Ăt'ŏmĭsm, *n.* (ॲ'टॉमिझ्म्)—atomic philosophy or theory, doctrine of action of individual atoms. परमाणुवाद, सूक्ष्मवाद.

Ăt'ŏmĭst, *n.* (ॲ'टॉमिस्ट्)—holder of atomic theory or philosophy. परमाणुवादी.

Ăt'omīze, *v. t.* (ॲ'टॉमाइझ्)—reduce to atoms or very small particles. परमाणुरूप देणें.

Ăt'omīzer, *n.* (ॲ'टॉमाइझर्)—instrument for spraying liquids. तुषारयंत्र.

Ăt'omȳ, *n.* (ॲ'टॉमि)—atom, tiny being; emaciated body. परमाणु, अतिसूक्ष्म जंतु; अस्थिपंजर, सुदामजी.

Atōne', *v. t.* (अटो'न्)—expiate; make up for. प्रायश्चित्त घेणें; भरपाई करणें.

Atōne'ment, *n.* (ॲटो'न्-मेन्ट्)—act of atoning; expiation, satisfaction. प्रायश्चित्त; भरपाई.

Atŏn'ĭc, *a.* (अटॉ'निक्)—unaccented, unstressed. स्वराघात न दिलेला.

Atŏp', *adv.* (अटॉ'प्)—on or at the top (*of*). वर, वरती, शेंड्यावर.

Ătrabĭl'ious, *a.* (ॲट्रबि'ल्यस्)—melancholy, gloomy; splenetic. खिन्न, उदासीन, विषण्ण; चिडखोर. [L. *atra*, black, and *bilis*, bile]

Atrō'cious, *a.* (-shus, अट्रो'शस्)—horrible; extremely heinous, gross. उग्र, राक्षसी; बीभत्स.

Ătrŏ'cĭtȳ, *n.* (अट्रॉ'सिटि)—heinous wickedness; wicked deed. अत्यंत दुष्टता; अघोर कृत्य.

Ăt'rŏphȳ, *n.* (ॲ'ट्रोफि)—wasting away for lack of nourishment. अपोषणक्षय, एकांगक्षय. [Gr. *a*, without & *trophe*, nourishment]

Attăch', *v. t. & i.* (अटॅ'च्)—fasten, join; attribute to; adhere; bind in friendship, make devoted; seize by legal authority. बांधणें; आरोप करणें; चिकटणें; प्रीति जडविणें; टांच लावणें. [L. *ad*, to & *tangere*, to touch]

Attăch'é, *n.* (-shā, अटॅ'शे)—one attached to ambassador's suite. एका राष्ट्राच्या तर्फे दुसऱ्या राष्ट्रामध्यें ठेवलेल्या वकिलाचा मदतनीस, दुय्यम.

Attăch'mĕnt, *n.* (अटॅ'च्-मेन्ट्)—a fastening; legal seizure; union or bond of affection (*for*). बंधन; जप्ति, टांच; प्रेम.

Attăck', *v. t.* (अटॅ'क्)—fall upon, assault, assail. हल्ला करणें; घाला घालणें. *n.* assault, onset. हल्ला, घाला, चढाई, आक्रमण.

Attain,' *v. t. & i.* (ॲटे'न्)—reach, arrive at; gain, accomplish. प्राप्त होणें, पोहोंचणें, मिळवणें, सिद्धीस नेणें. [L. *ad*, & *tangere*, to touch]

Attain'āble, *a.* (ॲटे'नबल्)—that may be attained, accessible. मिळण्याजोगा, साध्य.

Attain'der, *n.* (ॲटे'न्डर्)—consequences of death or outlawry (forfeiture of estate, corruption of blood, extinction of civil rights). देहान्त शिक्षेचे किंवा बहिष्काराचे परिणाम, सामाजिक हक्क हिसकावून घेणें.

Attain'mĕnt, *n.* (ॲटे'न्-मेन्ट्)—act of attaining; thing attained. संपादणें, प्राप्ति; संपादित वस्तु. (*pl.*) degree of education or skill attained, personal accomplishment. संपादिलेलें शिक्षण किंवा कलाकौशल्य.

Attaint', *v. t.* (अटे'न्ट्)—subject to attainder; infect; sully. राजद्रोही ठरवून सर्व हक्क काढून घेणें; दूषित करणें; दूषण लावणें, कलंकित करणें.

Attĕm'per, *v. t.* (ॲटे'म्पर्)—qualify by admixture; accommodate to; modify, temper. बेताचा किंवा सौम्य करणें; परिस्थितीला योग्य करणें; फेरफार करणें, बदलणें.

Attĕmpt', *v. t.* (अटे'म्प्ट्)—try. प्रयत्न करणें. *n.* attempting, endeavour. उद्योग, प्रयत्न. To attempt the life of=to try to kill. ठार मारण्याचा प्रयत्न करणें.

Attĕnd', *v. t. & i.* (ॲटे'न्ड्)—apply one's mind to; be present (*at*); accompany; wait upon. लक्ष देणें; हजर राहणें, जवळ असणें; बरोबर असणें; सेवा करणें. [L. *ad*, to and *tendere*, to stretch]

Attĕn'dance, *n.* (ॲटे'न्डन्स्)—act of attending; the persons present. हजिरी; नोकरी, सेवा; हजर असलेले लोक. To dance attendance on=to attend the convenience of. ० च्या सुखसोयीकडे लक्ष देणें.

Attĕnd ant, *a.* (ॲटे'न्डन्ट्)—*waiting on*; accompanying. सेवा करणारा; बरोबर असणारा. *n.* servant. सेवक.

Attĕn'tion, *n.* (ॲटे'न्शन्)—act of applying one's mind, close mental application, attending; (*pl.*) ceremonious politeness; courtship, addresses. लक्ष, अवधान; (अने०) आदरसत्कार; लग्नासाठीं आर्जव, मनधरणी.

Attĕn'tive, *a.* (ॲटे'न्टिव्)—heedful, observant; polite. तत्पर, लक्ष देणारा; नम्र. Atten'tively, *adv.*; Atten'tiveness, *n.*

Attĕn'ūate, *v. t.* (ॲटे'न्युएट्)—make slender or thin; reduce in force or value. पातळ किंवा बारीक करणें; जोर कमी करणें, सत्त्वहीन करणें. *a.* slender; rarefied. कृश, बारीक, विरळ केलेला. Attĕnua'tion, *n.* [L. *ad*, to & *tenuis*, Sk. तनु, thin]

Attĕst', *v. t.* (ॲटे'स्ट्)—bear witness to, certify; put on oath or solemn declaration. साक्ष देणें; दाखला देणें; शपथेवर सांगणें.

Attĕstā'tion, *n.* (अटेस्टे'शन्)—formal confirmation (by signature, oath, etc.). खरेपणाविषयीं केलेली सही, सही, साक्ष.

Ătt'ic, *n.* (ॲ'टिक्)—room in the top story of a house, a garret. पोटमाळ्यावरची खोली, अगदीं वरच्या मजल्यावरील खोली.

Attire', *v. t.* (अटा'यर्)—dress (*esp.* with fine clothes), array. पोषाख घालणें, सजवणें, सज्ज करणें. *n.* dress, apparel. पोषाख, पेहराव.

Ătt'itūde, *n.* (ॲ'टिट्यूड्)—posture of body; settled behaviour as showing *opinion.* अंगाची ढब, शरीराची ठेवण, मनाचा कल, रोंख, धोरण, दिशा. [*L. attitudo,* fitness]

Ăttitū'dinize, *v. t.* (ॲटिट्यू'डिनाइझ्)—assume *attitudes; show affectation.* विशेष मुद्रा धारण करणें; उगाच डौल दाखवणें.

Attorn'ey, *n.* (-er- अटॅ'र्नि)—one's business or legal representative; solicitor. वकील; मुखत्यार. *Attorney General*=legal officer empowered to act in all cases in which the State is a party. सरकारतर्फेचा मुख्य वकील. *pl.* Attorn'eys.

Attrăct', *v. t.* (अट्रॅ'क्ट्)—draw to oneself; allure, entice. (मन) आकर्षून घेणें, आपल्याकडे ओढणें; मोह घालणें, मोहून टाकणें. Attra'ctor, *n.* [L. *ad,* to & *trahere,* to draw]

Attrăc'tion, *n.* (अट्रॅ'क्शन्)—act of attracting; thing that attracts; charm, inducement. आकर्षण; मोहक वस्तु; मोह, मोहपाश, ओढा. Attraction of gravity=गुरुत्वाकर्षण. Magnetic attraction=action of magnet in drawing iron. लोहचुंबकाकर्षण. Molecular attraction=परमाणूंचें आकर्षण. Capillary attraction=attraction by which liquid is drawn up through hair-like tube. केशाकर्षण.

Attrăc'tive, *a.* (अट्रॅ'क्टिव्ह्)—inviting, pleasing. आकर्षक, मोहक, मोह घालणारा.

Attrĭb'ūte, *v. t.* (ॲट्रि'ब्यूट्)—ascribe as belonging or appropriate *to;* refer *to;* assign *to.* आरोपणें; संबंध लावणें; माथीं घालणें. *n.* quality ascribed to a person or thing; characteristic quality. निशाणी, विशेष गुणधर्म.

Attrĭbū'tion, *n.* (अट्रिब्यू'शन्)—ascription. आरोपणें, आंगीं विरुद्ध लावणें, संबंध लावणें.

Attrĭb'ūtive, *a.* (ॲट्रि'ब्युटिव्ह्)—expressing an attribute; qualifying. विशेषणदर्शक; गुण दर्शविणारें. *n.* word denoting an attribute. adjective. विशेषण. *Attributively*=विशेषणरूपानें, विशेषण म्हणून.

Attri'tĕd, *a.* (अट्रा'यटेड्)—worn by friction or abrasion. घर्षणानें झिजलेला.

Attrĭ'tion, *n.* (ॲट्रि'शन्)—friction; abrasion. wearing out. घांसणें, घर्षण; चोळवटणें. झीज. [L. *ad,* to & *tritum,* to rub]

Attūne', *v. t.* (ॲट्यू'न्)—bring into musical accord; adapt; tune. एकसुराचा करणें; मेळ घालणें; सूर लावणें. [L. *ad,* to & tune]

Aub'ŭrn, *a.* (ऑ'बर्न्)—golden-brown. सोनसळा, पिंगट, पिंगळा. [L. *albus,* white]

Auc'tion, *n.* (ऑ'क्शन्)—sale in which articles are sold to highest bidder. लिलाव. Dutch auction=sale in which price is reduced by auctioneer till a purchaser is found. पहिल्या प्रथमच लिलाववाल्यानें भारी किंमत सांगून मग खालीं खालीं उतरवणारी लिलावाची पद्धत.

Auctioneer', *n.* (ऑक्शनि'अर्)—holder of auctions. लिलांव करणारा, लिलांववाला.

Auctioneer'ing, *n.* (ऑक्शनि'अरिंग्)—work of auctioneer. लिलांव करणें, लिलांव.

Audā'cious, *a.* (-shus-, ऑडे'शस्)—daring, bold; impudent. शूर, धीट; उद्धट.

Audă'cĭtў, *n.* (ऑडॅ'सिटि)—boldness, daring spirit; reprehensible boldness, impudence. धीटपणा, धाष्टर्य; उद्धटपणा. Also, *Auda'ciousness, n.* [L. *audere,* to dare]

Aud'ible, *a.* (ऑ'डिबल्)—that can be heard, perceptible to the ear. ऐकूं येण्याजोगा. Audibi'lity, *n.* [L. *audire,* to hear]

Aud'ĭence, *n.* (ऑ'डिएन्स्)—a hearer's attention; assembly of listeners; formal interview. श्रोत्याचें लक्ष; श्रोतृसमाज; औपचारिक किंवा ठरींव मुलाखत. To give audience=to listen. ऐकणें.

Aud'it, *n.* (ऑ'डिट्)—official examination of accounts. अधिकारयुक्त हिशेबतपासणी. *v. t.* examine accounts officially. अधिकारानें हिशेब तपासणें. [*L. auditus,* a hearing]

Audĭ'tion, *n.* (ऑडि'शन्)—power of hearing; listening; trial hearing of applicant. श्रवणशक्ति; ऐकणें; (गायकाचें वगैरे) परीक्षा म्हणून (गाणें) ऐकणें.

Au'ditor, *n.* (ऑ'डिटर्)—a hearer; one who audits. श्रोता; हिशेब तपासणारा.

Auditor'ial, *a.* (ऑडिटो'रिअल्)—connected with an audit. शेवटच्या हिशेबतपासणीसंबंधीं.

Auditor'ĭum, *n.* (ऑडिटो'रिअम्)—part of building occupied by audience. श्रोत्यांची बसण्याची जागा, प्रेक्षकस्थान.

Aud'ĭtorў, *a.* (ऑ'डिटरि)—of hearing. श्रवणासंबंधीं. *n.* hearers, audience, assembly of hearers. श्रोतृसमाज, श्रोतेमंडळी.

Aug'er, *n.* (ऑ'गर्)—a boring-tool. सळई, वेधन. Screw auger=गिरमिट.

Aught, *n.* (ऑट्)—anything. कांहींहि वस्तु.

Augmĕnt', *v. t.* & *i.* (ऑमॅ'न्ट्)—increase: prefix the augment to. वाढणें, वाढवणें;

आगम लावणें. *n.* increase; vowel prefixed. वृद्धि, वाढ; पाठीमागें जोडलेला स्वर, आगम.
Augmĕntā'tion, *n.* (ऑग्मेन्टे'शन्)—enlargement, increase, addition. वृद्धि, वाढ.
Augmĕn'tătive, *a.* (ऑग्मे'न्टेटिव्ह्)—having the property of increasing; increasing in force the idea of the original word. वाढण्यासारखा; अर्थवृद्धिकारक (शब्द).
Aug'ur, *n.* (ऑ'गर्)—soothsayer; prophet. शकुन पाहणारा; भविष्यवादी. *v. t.* & *i.* predict, anticipate, foresee; promise. भाकीत करणें; आगाऊ अनुमान करणें. [L. *avis*, bird & *garrire*, to chatter]
Aug'ŭrў, *n.* (ऑ'ग्यूरि)—divination; omen; prophecy. शकुनविद्या; शकुन; भविष्य.
Augŭst', *a.* (ऑग'स्ट्)—venerable, imposing. आदरणीय; भव्य. *n.* the eighth month of the English year. इंग्रजी वर्षाचा आठवा महिना.
Auk, *n.* (ऑक्)—a northern sea-bird with short wings used as paddles. एक आंखूड पंखाचा उत्तरेकडील समुद्रावरील पक्षी.
Aunt, *n.* (ānt, आन्ट्)—parent's sister or sister-in-law. आत, मामी, मावशी, चुलती.
Aur'a, *n.* (ऑ'रा)—subtle emanation from anything; atmosphere diffused by or attending a person. व्यावर्तक चिन्ह, लक्षण; (मनुष्यासभोंवतालचें) तेजोमंडल.
Aur'al, *a.* (ऑ'रल्)—of the ear; learned by ear. कानाचा, कानासंबंधीं; कानानें कळलेला.
Aurē'ola, *n.* (ऑरी'ओला)—a celestial crown, a halo. दिव्य मुकुट, प्रभामंडळ.
Aur'eōle, *n.* (ऑ'रिओल्)—gold disk or circle of light depicted round the head, halo (esp. that which is seen in eclipses). देवतांचे वगैरे देहाभोंवतीं चित्रांत काढलेलें दिव्य तेजोमंडल.
Aur'icle, *n.* (ऑ'रिकल्)—external ear; either upper cavity of the heart. बाहेरील कान; रक्ताशयाचा वर असलेला अवयव, ऊर्ध्वाशय. [L. *auris*, an ear]
Aurĭc'ŭla, *n.* (ऑरि'क्युला)—kinds of flowering plant. एका जातीचीं फुलझाडें.
Aurĭc'ŭlar, *a.* (ऑरि'क्यूलर्)—of the ear or hearing; told privately in the ear. कानाचा, श्रवणासंबंधीं; गुप्तपणें कानांत सांगितलेला.
Aurĭf'ĕrous, *a.* (ऑरि'फेरस्)—yielding gold. सोनें ज्यांतून उत्पन्न होईल अशी (वस्तु). [L. *aurum*, gold & *ferre*, to bear]
Aur'ist, *n.* (ऑ'रिस्ट्)—ear specialist. कर्णवैद्य.
Aurōr'a, *n.* (ऑरो'रा)—goddess of dawn. उषादेवता, प्रातःकाल, अरुण. Aurōr'a bōrĕā'lĭs (ऑरो'रा बोरिए'लिस्)=northern lights. उत्तरगोलार्धांतील अरुणप्रकाश. Aurora austrā'lĭs (ऑरोरा ऑस्ट्रे'लिस्)=southern lights. दक्षिणगोलार्धांतील अरुणप्रकाश.
Auscultā'tion, *n.* (ऑस्कल्टे'शन्)—act of listening to movement of the heart, etc. हृदय किंवा छाती तपासणें. Auscul'tătory, *a.*
Aus'pĭce, *n.* (ऑ'स्पिस्)—omen, prognostic. शुभचिन्ह, शकुन. (*pl.*) prosperous lead, patronage. आश्रय, कृपाछत्र. *Under the auspices of* =च्या आश्रयाखालीं, च्या तर्फे.
Auspĭ'cious, *a.* (-shus, ऑस्पि'शस्)—having omens of success, of good omen; promising. शुभ, मंगल, मंगलदायक; अनुकूल, इष्ट.
Austēre', *a.* (ऑस्टि'अर्)—morally strict; severely simple; stern; rough to the taste. उग्र; अत्यंत सरळ; कडक; चवीला वाईट.
Austĕ'rĭtў, *n.* (ऑस्टे'रिटि)—severity, harsh discipline; asceticism; rigour. कठोरता, कडकपणा; उग्र तपश्चर्या; करडेपणा.
Aus'tral, *a.* (ऑ'स्ट्रल्)—southern. दक्षिणेकडील.
Authĕn'tĭc, *a.* (ऑथे'न्टिक्)—trustworthy, reliable, entitled to acceptance; genuine. विश्वसनीय; खरा, अस्सल.
Authĕn'tĭcāte, *v. t.* (ऑथे'न्टिकेट्)—establish the truth, authorship or validity of. सत्यता किंवा कर्तृत्व सप्रमाण सिद्ध करणें, प्रमाण दाखवून खरा ठरविणें, शाबीत करणें. Authenticā'tion, Authen'ticātor, *nn.*
Authĕntĭ'cĭtў, *n.* (ऑथेन्टि'सिटि)—genuineness, reality. सत्यता, खरेपणा, अस्सलपणा.
Auth'or, *n.* (ऑ'थर्)—writer of book, etc.; originator. ग्रन्थकर्ता; कर्ता, जनक. Auth'oress, *n.*; Authŏr'ial, *a.*; Auth'orshĭp, *n.*
Authŏr'ĭtătive, *a.* (ऑथॉ'रिटेटिव्ह्)—commanding, imperative; possessing or claiming authority; proceeding from competent authority. दरारा असलेला, प्रामाण्य असलेला, सप्रमाण; अधिकारयुक्त.
Authŏ'rĭtў, *n.* (ऑथॉ'रिटि)—power or right to enforce obedience; personal influence; anything cited as authority. सत्ता, अधिकार; कदर, वजन; आधार, आप्तवचन.
Auth'orīze, *v. t.* (ऑ'थॅराइझ्)—sanction; give authority to. परवानगी देणें; अधिकारपत्र देणें. Authorīzā'tion, *n.* मुखत्यारी, अधिकार.
Autobiŏ'grapher, *n.* (ऑटॉबायॉ'ग्रॅफर्)—one who writes his own history. आत्मचरित्रलेखक.
Autobiogrā'phĭc, *a.* (ऑटॉबायॉग्रॅ'फिक्)—pertaining to autobiography, engaged in autobiography. स्वतः लिहिलेल्या आपल्या चरित्राविषयीं, आत्मचरित्रासंबंधीं, आत्मचरित्रमय. Also, Autobio-gra'phical, *a.*

Autōbīŏg'raphy̆, *n.* (ऑटोबायॉग्रफि)—one's life written by oneself. आत्मचरित्र. [Gr. *autos*, self, *bios*, life, *graphein*, to write]

Aut'ocăr, *n.* (ऑ'टो-कार्)—road-vehicle driven by mechanical power. मोटार गाडी.

Autŏ'chthon, *n.* (-k-, ऑटॉ'क्थॉन्)—*original or earliest known inhabitants, aborigines.* मूळचे किंवा अगदीं प्राचीन रहिवासी. Auto'chthonous, *a.* [Gr. *autos*, self and *chthon*, the earth]

Autoc'racy̆, *n.* (ऑटॉ'क्रसि)—absolute uncontrolled rule. अनियंत्रित राज्यकारभार.

Auto'crăt, *n.* (ऑटॉ'क्रॅट्)—*absolute ruler.* अनियंत्रित राज्य करणारा राजा, सुलतान.

Autocră'tic, -cal, *aa.* (ऑटोक्रॅ'टिक् -•कल्)—ruling absolutely or by one's own power. एकसत्ताक राज्य असलेला, सुलतानी.

Aut'ogrăph, *n.* (ऑ'टॉग्राफ्)—author's own manuscript; one's own handwriting, *signature.* ग्रंथकर्त्याचें स्वहस्तलिखित; स्वहस्तलेख, सही. Aut'ographic, *a.* स्वदस्तुरचा, स्वहस्ताक्षराचा. [Gr. *autos*, self *&* *graphe*, writing]

Autogy̆r'ō, *n.* (ऑटोजा'यूरो)—a form of aeroplane that can descend vertically by means of a windmill revolving freely on its own shaft. एक प्रकारचें उभेंच्या उभेंच खालीं येणारें विमान.

Automăt'ic, *a.* (ऑटोमॅ'टिक्)—self-moving, mechanical; unconscious. आपोआप चालणारें; न कळतां होणारें. [Gr. *autos*, & *ma*, *to strive*]

Autŏm'ătism, *n.* (ऑटॉ'मॅटिझम्)—mechanical *routine; involuntary* action. यंत्राप्रमाणें ठरीव नित्यक्रम; स्वयंचलनशक्ति.

Autŏm'aton, *n.* (ऑटॉ'मॅटन्)—thing endued with spontaneous motion; piece of mechanism; person whose actions are mechanical. आपोआप गति असलेली वस्तु; आपोआप चालणारें यंत्र; परिपाठानुरूप वागणारा मनुष्य.

Automobile', *n.* (-ēl, ऑटोमोबी'ल्)-an auto-car or similar vehicle, motor-car. मोटार गाडी.

Autŏn'omy̆, *n.* (ऑटॉ'नमि)—the power or right of self-government. स्वाधीन शासनपद्धति, राजकीय स्वातंत्र्य. Autŏn'omous, *a.* [Gr. *autos*, self and *nomos*, law, rule]

Autŏp'sy̆, *n.* (ऑटॉ'प्सि)—personal inspection; post-mortem. प्रत्यक्ष परीक्षा; परीक्षणार्थ मृतदेहाचें व्यवच्छेदन. [Gr. *autos*, & *opsis*, sight]

Auto-suggĕs'tion, *n.* (ऑटॉ-सजे'स्चन्)—hypnotic suggestion proceeding from the subject himself. झोंप आणणारी स्वयंसूचना.

Aut'otȳpe, *n.* (ऑ'टो-टाइप्)—facsimile; permanent photographic printing process for reproducing in monochrome. अस्सल बरहुकूम सुळावरून काढलेली प्रत; कांचेवरच्या उलट प्रतिमेवरून सुलट प्रतिमा घेणें. [Gr. *autos*, self & *typos*, form]

Aut'ŭmn, *n.* (-m, ऑ'टम्)—third season of the year; season of incipient decay. शरद् ऋतु; सराईचे दिवस, खरीपाची वेळ.

Autŭm'nal, *a.* (ऑट'म्नल्)-*of* autumn; past the prime or middle stage of life. हिंवाळ्याचा, शरदृतूसंबंधीं; उतारवयासंबंधीं.

Auxĭl'iary̆, *a.* (ऑग्झि'ल्यरि)—helpful, subsidiary. साहाय्यकारी. Auxiliaries=auxiliary troops=foreign or allied troops in a nation's service. कुमकेस आलेली फौज, कुमक.

Avail', *v. t. & i.* (अव्हे'ल्)—be of use or assistance; help, benefit. उपयोगीं पडणें; कामास येणें, फायदा करून घेणें. *n.* use, profit. उपयोग; फायदा. To avail oneself *of*=to profit by, to take advantage of. •चा आपल्याला फायदा करून घेणें. Of no avail, without avail, to little avail=of no use. निरुपयोगी, व्यर्थ. [L *ad & valere*, to be strong]

Avail'āble, *a.* (अव्हे'लेबल्)—capable of being used, at one's disposal, within one's reach. उपयोगीं पडण्याजोगा, मिळणें किंवा भेटणें शक्य, सुगम, सुलभ, चालू.

Ăv'alănche, *n.* (-nsh, अॅ'व्हलान्श्)—*falling* mass of snow, earth and ice. डोंगरावरून घसरणारा बर्फाचा खडक, हिमानी. [L. *ad*, to & *vallis*, a valley]

Ăv'arice, *n.* (अॅ'व्हरिस्)—greed of gain, cupidity; eager desire to get or keep. द्रव्यलोभ; हांव, लालसा. [L. *avarus*, *greedy*]

Ăvarĭ'cious, *a.* (-shus, अॅव्हरि'शस्)—extremely covetous, greedy. अतिलोभी, हांवरा.

Avăst', *int. nauti.* (अव्हा'स्ट्)—stop, cease. थांबा, पुरे करा, हांहां !

Avaunt', *int.* (अव्हॉ'न्ट्)—away ! begone ! चालता हो, तोंड काळें कर.

Ā'vē, *int. & n.* (ए'व्हि)—hail, welcome; farewell. सुस्वागतम्; जयजय, नमस्कार, नमस्ते.

Avĕnge', *v. t.* (अॅव्हें'ज्)—inflict retribution on behalf of; exact retribution for. न्यायबुद्धीनें प्रतिकार करणें; उलट नुकसान करणें. To be avenged=to avenge oneself; *to* take vengeance for *(injury).* प्रतिकार करणें; उलट सूड घेणें. [L. *a & vindicare*, to avenge]

Av'enūe, *n.* (अॅ'व्हेन्यू)—*roadway; a means of attainment;* approach to house bordered by trees; way of approach. मार्ग; सफलतेचें साधन; दुतर्फा झाडीचा रस्ता; प्रवेशमार्ग.

Aver', *v. t.* (ॲव्ह'र्)—assert, affirm; prove (a plea). प्रतिज्ञेनें सांगणें; सिद्ध करून देणें.

Aver'ment, *n.* (अव्ह'मेन्ट्)—positive assertion. प्रतिज्ञापूर्वक विधान, निश्चयपूर्वक बोलणें.

Ăv'erage, *n.* (ॲ'व्हरिज्)—arithmetical mean; ordinary standard. सरासरी; साधारण प्रमाण. *a.* estimated by average; of the usual standard. सरासरीनें गणललें; साधारण, मध्यम. *v. t.* estimate or reach the average of. सरासरी काढणें, सरासरीनें भरणें. On the or on an average=on a medial estimate. सरासरी, स्थूलतः, स्थूलमानानें.

Averse', *a.* (ॲव्ह'र्स्)—opposed, disinclined (*to*, *from*); unwilling (*to* do). विरुद्ध, पराङ्मुख, तिटकारा दाखविणारा; नाखूष.

Aver'sion, *n.* (ॲव्ह'र्शन्)—dislike or antipathy; thing or person one dislikes. नावड, तिटकारा, कंटाळा; तिरस्कार्य वस्तु किंवा मनुष्य.

Avert', *v. t.* (ॲव्ह'र्ट्)—ward off; turn away (eyes, thoughts, *from*). टाळणें; दूर करणें, परत लावणें. [L. *a*, from & *verto*, I turn]

A'vian, *a.* (ए-, ए'व्हिअन्)—pertaining or belonging to birds. पक्ष्यांसंबंधीं.

Ā'vĭarў, *n.* (ए'व्हिअरि)—large cage or building for keeping birds. पक्ष्यांचा शिकारखाना, खुराडा. [L. *avis*, a bird]

Ā'vĭate, *v. i.* (ए'व्हिएट्)—manage or travel in aircraft. विमान चालविणें, विमानांतून जाणें.

Āvĭā'tion, *n.* (एव्हिए'शन्)—the art of flying through the air on a flying-machine. विमान चालविण्याची विद्या, वैमानिक कला.

Āvĭāt'or, *n.* (एव्हिए'टर्)—one who aviates or travels in aircraft. वैमानिक.

Ăv'id, *a.* (ॲ'व्हिड्)—eager; greedy (*of*, *for*). उत्सुक; लोभी, हांवरा. Ăv'idlў, *adv.*

Ăvĭd'ĭtў, *n.* (ॲव्हि'डिटि)—intenseness of desire, eagerness; greed. उत्सुकता; लोभ, हांव.

Āvĭŏtte', *n.* (एव्हिए'ट्)—engineless man-worked aeroplane. एंजिनरहित मनुष्यानें चालविलेलें विमान.

Ăvocā'tion, *n.* (ॲव्होके'शन्)—vocation, calling. काम, धंदा, पेशा, व्यवसाय. [L. *ad*, from, and *vocare*, to call]

Avoid', *v. t.* (अव्हॉ'इड्)—shun, keep away from; annul. टाळणें, चुकवणें; रद्द करणें.

Avoid'able, *a.* (अव्हॉ'इडेबल्)—that can be avoided. टाळतां येण्याजोगा.

Avoi'dance, *n.* (अव्हॉ'यडन्स्)—act of avoiding. टाळणें, वर्ज करणें.

Ăvoirdūpoĭs', *n.* (-er-, -z, ॲव्हरड्यूपॉ'इझ्)—system of weights used for ordinary goods. एक प्रकारचीं इंग्रजी वजनाचीं परिमाणें.

Avouch', *v. t.* (अव्हा'उच्)—guarantee truth of; affirm. प्रतिज्ञेनें सांगणें; प्रतिपादन करणें.

Avow', *v.t.* (अव्हा'उ)—admit, confess, acknowledge, declare openly. उघड कबूल करणें.

Avow'al, *n.* (अव्हा'उअल्)—an open admission, frank acknowledgement उघड कबुली.

Avow'edlў, *adv.* (अव्हा'उड्लि)—in an open manner. सांगून सवरून, उघड उघड.

Avŭl'sion, *n.* (ॲव्ह'ल्शन्)—a forcible tearing away. जोरानें अलग करणें, फाडणें.

Avŭn'cūlar, *a.* (ॲव्ह'ङ्क्यूलर्)—of or resembling an uncle. मामाचा, मामासारखा.

Await', *v. t.* (अवे'ट्)—wait for; (of things) be in store for. वाट पाहणें, खोळंबणें; (करितां) राखून ठेवलेलें असणें.

Awāke', *v. t.* & *i.* (अवे'क्)—(*pa. t.* awoke, *p. p.* awaked *or* awoke) rouse from sleep; become active. जागें करणें किंवा होणें, उठणें; सावध होणें. *pred. a.* not asleep, vigilant. जागृत, सावध. *Awake to*=aware of. सावध, माहितगार. *To be awake* = जागें असणें, जागणें.

Awā'ken, *v. t.* & *i.* (अवे'कन्)—awake; arouse the consciousness of; to become awake. जागें करणें; चेतना उत्पन्न करणें, जागृत होणें.

Award', *v. t.* (-wŏrd, अवॉ'अर्ड्)—adjudge to. निर्णय करून देणें. *n.* judicial sentence; payment or penalty awarded. पंचांचा ठराव, निवाडा; फैसला, दिलेला निर्णय.

Awāre', *a.* (अवे'अर्)—conscious, not ignorant of. सावध, माहितगार.

Awash', *pred. a.* (-wŏ-, अवॉ'श्)—flush with or washed by the waves. लाटांच्या आधीन, लाटांनीं वाहलेला.

Away', *adv.* (अवे')—to or at a distance. दूर, लांब. To go away=निघून जाणें. To give away=देऊन टाकणें. To throw away=टाकून देणें. To run away=पळून जाणें. Out and away=तुलना न करतां येणारें. Away with=go away with, take away! घेऊन जा! (Cannot) away with=get on with, tolerate. सहन करणें. To make away with=to destroy. नाश करणें.

Awe, *n.* (ऑ)—reverential fear. दरारा, जरब. *v. t.* inspire with awe. धाक दाखवणें, दरारा बसवणें. To stand in awe of=वचकणें, जुमानणें. Awe'less, *a.* ज्याचा दरारा बसत नाहीं असा. Awe'some, *a.* dread, terrible. दारुण, भयंकर.

Awe'strŭck, *a.* (ऑ'स्ट्रक्)—struck with reverential fear. धाक बसलेला.

Aw'ful, *a.* (ऑ'फुल्)—inspiring awe. दराऱ्याचा. Aw'fully, *adv.* फार मोठ्या प्रमाणानें, भयंकर रीतीनें.

Aw'fulness, *n.* (ऑ'फुल्-नेस्)—reverential fear. सादर भीति, दरारा, वचक.

Awhile', *adv.* (अव्हा'इल्)—for a time. कांहीं काळपर्यंत, अंमळसा, जरा.

Awk'ward, *a.* (ऑ'क्वर्ड्)—ill-adapted for use; hard to deal with; clumsy. गैरसोईचा; अडाणी; बेडौल, चमत्कारिक.

Awl, *n.* (ऑल्)—a small pricking-tool, pricker. (चांभाराची) आरी.

Awn, *n.* (ऑन्)—beard of grain, etc. (गवताचें किंवा धान्यावरचें) कूंस, कुसूं, कुसळ. Awn'y̆, *a.* ज्याला कुसें फार आहेत असा.

Awn'ing, *n.* (ऑ'निंग्)—canvas roof; shelter. छत; आश्रय. To cover with an awning=छत घालणें.

Awry̆, *adv.* (arī, अरा'य्)—crookedly, amiss. तिरपा, वांकडा. To look awry=to look askance. काण्या डोळ्यानें पाहणें. To go or run or tread *awry*=to do wrong. चुकीच्या मार्गानें जाणें.

Ăxe, *n.* (ॲक्स्)—tool for chopping. कुऱ्हाड. To put the axe in the helve=to solve a puzzle. कूटप्रश्न सोडवणें, अडचण दूर करणें An axe to grind=private ends to serve. स्वार्थ साधणें, आपलें घोडें पुढें ढकलणें.

Ăx'ĭal, *a.* (ॲ'क्सिअल्)—pertaining to an axis. आंसाविषयीं, कण्यासंबंधीं.

Ăx'ĭom, *n.* (ॲ'क्सिअम्)—self-evident truth; established principle, maxim. प्रत्यक्षसिद्ध वचन; सिद्ध तत्त्व, म्हण.

Ăxĭomă'tĭc, -ĭcal, *aa.* (ॲक्सिऑमॅ'टिक्, °कल्)—self-evident; characterized by axioms; full of maxims. स्वतःसिद्ध; सिद्धतत्त्वविशिष्ट; म्हणींनीं युक्त, म्हणींनीं भरलेलें.

Ăx'ĭs, *n.* (ॲ'क्सिस्)—(*pl.* axes) imaginary line round which a body rotates, a straight line between poles or ends. कणा, आंस, अक्ष.

Ă'xle, *n.* (ॲ'क्सल्)—spindle on or with which a wheel revolves. चाकांचा आंस; कणा.

Ă'xle-tree, *n.* (ॲ'क्सल्-ट्री)—bar connecting pair of carriage-wheels. आंस, कणा.

Ay, *int.* (ī, आय्)—yes. होय. *n.* (*pl.* ayes) affirmative answer or vote. होकारार्थी उत्तर, अनुकूल मत.

Aye, *adv.* (ā, ए)—always, for all occasions. नेहमीं, सतत. For *aye*=for ever. सर्वकाल.

Azā'lea, *n.* (अझे'लिआ)—kinds of flowering shrubby plant. एक प्रकारचें फुलझाड.

Ăz'ĭmŭth, *n.* (ॲ'झिमथ्)—vertical arc of sky from zenith to horizon. सूर्य किंवा तारा यापासून क्षितिजावर काढलेला लंब आणि क्षितिजाचा उत्तर किंवा दक्षिण बिंदु ह्यांच्यामध्यें जो क्षितिजाचा कंस सांपडतो तो, समांश.

Azŏ'ic, *a.* (अझॉ'इक्)—having no trace of life. प्राणरहित.

A'zure, *n.* (ॲ'झर्)—blue unclouded sky; blue colour; bright blue pigment. नीलवर्ण निरभ्र आकाश; नील वर्ण; तकतकीत निळा रंग. *a.* sky-blue. अस्मानी, आकाशासारखा निळा.

B

B, (बी)—second letter of the English alphabet. इंग्रजी वर्णमालेंतील दुसरा वर्ण.

Baa, *n.* (bä, बा)—bleat of a sheep. बें बें करणें. *v. i.* bleat. बें बें करणें.

Bā'al, *n.* (बे'अल्)—phoenician god; a false god. प्राचीन फिनिशिअन लोकांचा मुख्य देव; कल्पित देव. (*Pl.* Ba'alim—बे'ऑलिम्)

Băb'ble, *v. i. & t.* (बॅ'बल्)—talk idly; divulge foolishly. बोबडें बोलणें; वडबडणें; बहकणें. *n.* idle talk. बडबड; बोबडे बोल.

Băb'bler, *n.* (बॅ'बलर्)—one who babbles, a chatterer; teller of secrets; long-legged Thrush. बोबडा, बडबड्या; गुप्त गोष्टी सांगणारा; लांब पायाचा (युरोपांतील) कोकिळेसारखा पक्षी.

Bābe, *n.* (बेब्)—baby. तान्हें मूल.

Bā'bel, *n.* (बे'बल्)—confused noise of talk, confused scene. गडबड, बजबज, बलबलपुरी.

Babirous'sa, *n.* (-rōō-, बॅबिरू'सा)—an East Asiatic wild hog. उत्तर आशियांतील एक जातीचें रानटी डुकर.

Bāb'ĭsh, *a.* (बे'बिश्)—childish. पोरकट, लहान मुलासारखा.

Babōōn', *n.* (बबू'न्)—a large African and South-Asiatic monkey. अति मोठा वानर.

Bā'by̆, *n.* (बे'बि)—an infant, a very young child; childish person. तान्हें मूल; पोरकट मनुष्य. Bābyish, *a.*

Bā'by̆-färmer, *n.* (बे'बि-फार्मर्)—a farmer who contracts to keep babies. मुलें पोसणारा भाडोत्री पालक.

Bā'by̆hōōd, *n.* (बे'बि-हुड्)—the state of being a baby. तान्हेपणा, पोरपण, बाल्यावस्था.

Bă'by̆lon, *n.* (बॅ'बि-लॉन्)—the capital of Chaldean empire; any great empire or vicious city. कॅल्डिअन साम्राज्याची राजधानी; कोणतेंहि मोठें साम्राज्य, व्यसनांनीं परिपूर्ण असें शहर. Băby̆lō'nĭan, *a.* & *n.*

Băccalaur'ĕate, *n.* (बॅक्-कॅ-लॉ'रिएट्)—the degree of Bachelor. बॅचेलरची पदवी.

Băcc'arat, *n.* (-ä, बॅकॅरा)—a game of cards played by any number of players or rather betters and a banker. जुगारी लोकांचा एक पत्त्यांचा खेळ.

Băcc'hănal, *a.* (बॅ'कॅ-नल्)—of Bacchus or his rites, riotous and drunken, noisy. बॅकसच्या

उत्सवाचा, छाकदा, दारूबाजीचा. *n.* Bacchant; reveller. बॅकसचा उत्सव, दारूबाज; चैनी.

Băcc'hănt, *n.* (बॅ'कॅन्ट्)—priest or votary of Bacchus. बॅकसचा पुजारी किंवा भक्त. Băc'-chăntĕ, *fem. n.* (बॅ'कॅन्टि); *pl.* Bac'cantes.

Băcc'hĭc, *a.* (बॅ'किक्)—relating to Bacchus; jovial; drunken. बॅकस देवतेचा; चैनी, रंगेल; दारू प्यालेला.

Băcc'hŭs, *n.* (बॅ'कस्)—Greek god of wine. ग्रीक लोकांची दारूची देवता.

Băch'ĕlor, *n.* (बॅ'चेलर्)—an unmarried man; one who has taken the university degree. अविवाहित पुरुष, ब्रह्मचारी; विश्वविद्यालयांतील पदवी घेतलेला, पदवीधर.

Băch'ĕlorhood, *n.* (बॅ'चेलर्-हुड्)—unmarried life. अविवाहितावस्था, ब्रह्मचर्य.

Băcĭll'ŭs, *n.* (बॅसि'लस्, *pl.* Băcill'ī, बॅसि'लाय्)—a name of microscopic organisms or germs resembling little rods that often swarm in the blood of animals in morbid states. प्राण्यांच्या रक्तांत उत्पन्न होणारे फार सूक्ष्म जंतु. Băcĭll'ary̆, *a.* यष्टिजंतुमय, यष्टिजंतूचा. [L. *Bacillus*, a little rod]

Băck, *n.* (बॅक्)—hinder surface of human body; upper surface of animal's body; hind part of things; the rear; a large shallow vat or vessel. पाठ; पृष्ठभाग; पिछाडी; एक मोठें उथळ भांडें. *a.* situated behind, covering past period. मागील, मागचा. *adv.* to the rear; into an earlier position. मागें, पाठीमागें; पाठमोरा. *v. t.* & *i.* put back-ground to; support; ride upon, break in to the saddle; countersign, endorse; cause to move back. पाठीमागें घालणें; पाठबळ देणें; पाठीवर चढणें, सवार होणें; पाठीवर लिहिणें; मागें घेणें, हटवणें. To *back* a sail or yard=to lay a sail or yard to face wind. जहाज चालूं नये म्हणून वाऱ्याकडे तोंड करून शीड उभारणें. To *back* water=to reverse boat's motion with oars. उलट दिशेनें वल्हवणें. To go *back* from or upon one's word=to go away from a promise. वचन न पाळणें. To answer *back*=to retort. उलट जबाब देणें. *Back* and forth=to and fro. पुढेंमागें. At the *back of*=behind in support, pursuit or concealment. पाठीवर, पाठीमागें. Behind one's *back*=पाठीमागें, अप्रत्यक्ष. To turn one's *back* upon=to run away from, abandon. ऐनवेळीं सोडणें, त्याग करणें. With one's *back* to wall=hard pressed. कचाट्यांत सांपडलेला. To have on one's *back*=to be burdened with. ॰चा भार होणें. To put, get or set person's *back* up=to make a person angry. एकाद्याला राग आणणें, चिथवणें. To break one's *back*=to overburden one. अतिशय ओझ्यानें लादणें. On the *back* of=in addition to. आणखी, शिवाय, पेक्षां जास्त. *Back* number, (*slang*) out-of-date method, person, etc. प्रचलित नसलेली रीत, व्यक्ति वगैरे. To *back* out of=to withdraw from. काढून मागें घेणें. To take a *back* seat=to efface or humble oneself. स्वतःला दिसेनासा करणें, नम्रता स्वीकारणें. *Back* talk, (*sl.*) impudent answer. उद्धट उत्तर. To *back* up=to support. आधार देणें, टेंकू देणें.

Băck'bīte, *v. t.* (बॅ'क्-बाइट्)—to speak evil behind one's back, slander. चहाडी सांगणें, पाठीमागें निंदा करणें.

Băck'bīter, *n.* (बॅ'क्-बायटर्)—one that slanders, a calumniator of the absent. चहाडखोर, पाठीमागें निंदा करणारा.

Băck'-blŏcks, *n.* (बॅ'क्-ब्लॉक्स्)—furthermost fringe of settlement. वसाहतींतील अत्यंत दूरचा कडेचा भाग.

Băck'board, *n.* (बॅ'क्-बोर्ड्)—a board for the back, a board strapped across child's back to straiten it. पाठ सरळ व्हावी म्हणून पाठीला बांधण्याची फळी.

Băck'bōne, *n.* (बॅ'क्-बोन्)—spine, main support; firmness of character. पाठीचा कणा; मुख्य आधारस्तंभ; स्वभावस्थैर्य. To the *backbone*=thoroughly. पूर्णपणें, हाडामांसीं.

Băckdoor', (-ŏr, बॅक्-डो'अर्)—door at the back of house, a private passage. मागलें दार, मागीलदार, खासगी रस्ता.

Băck'er, *n.* (बॅ'कर्)—one who bets. पैज मारणारा.

Băckgămm'on, *n.* (बॅक्-गॅ'मन्)—a game on double board with draughts and dice. सोंगट्यांचे खेळासारखा एक प्रकारचा खेळ.

Băck'ground, *n.* (बॅ'क्-ग्राउन्ड्)—back part of scene; obscurity, retirement, a state of being out of view. चित्रांतील मागची जागा; अप्रसिद्धि.

Băck'hand, Băck-hăn'ded, *aa.* (बॅ'क्-हॅन्ड्, बॅक्-हॅ'न्डेड्)—delivered with back of hand; indirect; sloping back or to the left. हाताच्या पाठीनें दिलेला (ठोसा); अप्रत्यक्ष, वरकरणी; तिरकस, तिरपा.

Băck-hăn'der, *n.* (बॅक्-हॅ'न्डर्)—a blow delivered with back of hand; indirect attack. हाताच्या पाठीनें दिलेला ठोसा; न कळत किंवा कपटाचा हल्ला.

Băck'ing, *n.* (बॅ'किंग्)—support; succour. आश्रय, आधार; साहाय्य, मदत.

Băckslīde', *v. i.* (बॅक्-स्लाइड्)—relapse into sin or disbelief. धर्मभ्रष्ट होणें, पतित होणें, सन्मार्ग सोडणें.

Băck'slīder, *n.* (बॅक्-स्लायडर्)—an apostate. धर्मभ्रष्ट, पतित.

Băckstairs', *n. plu.* (बॅक्-स्टे'अर्स्)—stairs in the back part of a house, private stairs. मागला जिना, खासगी जिना. *a.* secret, underhand. गुप्त, लपूनछपूनचा, आडमार्गाचा.

Băck'stitch, *v. t.* (बॅ'क्-स्टिच्)—sew with overlapping stitches. एकमेकाला लागून टांके चालून शिवणें. *n.* a stitch sewn in this way. एकमेकाला लागून घातलेला टांका.

Băck'sword, *n.* (बॅ'क्-सोर्ड्)—one-edged sword; singlestick. एकधारी तरवार; दांडपट्टा.

Băck'veld (t), *n.* (बॅ'क्-व्हेल्ट्)—remoter parts of the veld or velt. दक्षिण आफ्रिकेंतील अरण्यराहित प्रदेशांतील अत्यंत दूरचा भाग.

Băck'ward, *adv.* (बॅ'क्-वर्ड्)—back foremost; reverse way. मागें; उलटा. (Also, Băck'-wards) *a.* slow in learning, behind in progress. अभ्यासांत मागें पडलेला, मागासलेला. Backward and forward=to and fro. उलटासुलटा, पुढेंमागें; धरसोडपणाचा.

Băck'water, *n.* (बॅक्-वॉटर्)—still water beside stream and fed by its back flow. नदीच्या प्रवाहाजवळचें सांठलेलें संथ पाणी, कोंडून ठेवलेलें पाणी, धरणाचें पाणी.

Băck'wŏods, *n. pl.* (बॅ'क्-वुड्झ्)—outlying woody or forest districts of a country. देशाच्या बाहेरील अरण्यमय प्रदेश.

Băck'wŏodsman, *n.* (बॅ'क्-वुड्झमन्)—a settler in backwoods. दूर अंतरावर असलेल्या प्रदेशांतील रहिवासी.

Bā'con, *n.* (बे'कन्)—cured back and sides of a pig. मीठ घालून वाळविलेलें डुकराचें मांस.

Băctēr'ĭal, *a.* (बॅक्टी'रिअल्)—pertaining to bacterium. सूक्ष्म जंतु असलेला.

Băctērĭŏl'ogy̆, *n.* (बॅक्टीरिऑ'लॉजि)—the doctrine or study of bacteria. सूक्ष्मजंतुशास्त्र. Bacteriol'ogist, *n.* सूक्ष्मजंतुशास्त्रवेत्ता.

Băctēr'ĭŭm, *n.* (*pl.* Băctē'rĭă) (बॅक्-टी'रिअम्)—microscopic rod-shaped vegetable organism found in decomposing liquids. एकपेशीमय अत्यंत सूक्ष्म जंतु.

Băd, *a.* (बॅड्)—worthless, defective, inefficient, not valid; wicked; corrupt; injurious; painful; ill. वाईट, खराब; दुष्ट; ओंगळ; नुकसानकारक; दुःखदायक; आजारी. To make bad worse=कांड्याचा नायटा करणें, जास्त घोंटाळा करणें. He is gone to the bad=तो भिकेस लागला आहे; त्याचें वर्तन बिघडलें आहे. Bad coin=खोटें नाणें. Bad debts=debts that are not recoverable. बुडीत कर्ज. Bad faith=कपट, लबाडी. To go bad=to decay. कुजणें. With bad grace=reluctantly. नाखुशीनें. Bad shot=wrong guess. चुकीचा तर्क. Bad blood=ill-feeling. वितुष्ट, वैमनस्य. Bad turn=उलटा फेरा. On bad terms=वितुष्ट भावानें. To be in a bad humour=तब्यत न लागणें. To be in bad temper=रागावलेला असणें. To have a bad time of it=कठीण दिवस येणें, दिवस फिरणें. To put a bad construction upon=भलताच विपरीत अर्थ करणें To view in a bad light=दोषदृष्टीनें पाहणें.

Bad, Bade, *p. t.* (बॅड्)—[Bid या धातूचा भूतकाळ] हुकूम केला, आज्ञा केली.

Bădge, *n.* (बॅज्)—thing worn as a mark, sign or token. पट्टा, निशाणी, चिन्ह, बिल्ला.

Bădg'er, *n.* (बॅ'जर्)—a hawker (esp. of provisions); a quadruped between weasel and bear (living in a burrow, nocturnal in habits and feeding on vegetables and small quadrupeds); fishing-fly and painting brush (made of the hair of badger). फेरीनें माल विकणारा, फेरीवाला; जमिनींत बीळ करून राहणारें, रात्रीं फिरणारें व भाजीपाला किंवा इतर लहान प्राणी खाऊन राहणारें कोल्ह्याएवढें एक चतुष्पाद जनावर; बॅजर जनावराच्या केंसाचा कुंचला. *v. t.* bait, pester, worry, persecute. हाल हाल करणें, छळणें, जीव खाणें. Badger-baiting, badger-drawing=setting dogs to draw badger from its burrow or a cask. बॅजर नांवाच्या जनावराला बिळांतून हुसकावून लावण्याकरितां कुत्रे सोडण्याचा खेळ. Badger-legged=with legs of unequal length. उंच सखल पायांचा.

Băd'ly, *adv.* (बॅ'ड्लि)—defectively, unsuccessfully; to a serious extent; cruelly, dangerously; very much (*e. g.* want a thing *badly*). अपूर्णपणें, अयशस्वी रीतीनें; अतिशय; निष्ठुरपणानें, भयंकर; निकडीनें.

Băd'minton, *n.* (बॅ'ड्-मिन्टन्)—game with nest, rackets and shuttlecocks. एक प्रकारचा खेळ, पिच्छकंदुक खेळ.

Băd'nĕss, *n.* (बॅ'ड्-नेस्)—being bad; evil; want of good qualities. वाईटपणा; वाईट गोष्ट; चांगल्या गुणांचा अभाव.

Băf'fle, *v. t.* (बॅ'फल्)—foil, frustrate, defeat, thwart; perplex. निष्फळ करणें; गोंधळून सोडणें.

Băf'fling, *a.* (बॅ'फ्-लिंग्)—peprlexing, bewildering. गोंधळविणारा.

Băff'ÿ, *n.* (बॅफि)—wooden golf club. लांकडी गोल्फ खेळण्याची काठी.

Baft, *n.* (बॅफ्ट्)—coarse cheap cotton fabric exported to Africa. आफ्रिकेंत पाठविलें जाणारें स्वस्त कापसाचें कापड.

Băg, *n.* (बॅग्)—receptacle with opening at top, sac in body (for honey, poison, etc.); all a sportsman has shot. पिशवी ; केलेली सर्व शिकार. *v. t.* & *i.* to put in a bag ; to secure game. पिशवींत घालणें; शिकार साधणें. Bag of bones=a lean creature. रोडावलेला प्राणी, हाडांचा सांपळा. Whole bag of tricks=every device, everything, all the lot. प्रत्येक उपाय, सर्व डावपेंच, सर्व कांहीं. In the bottom of the bag=as the last resource. शेवटचा उपाय म्हणून. To let the cat out of the bag= to reveal a secret (esp. involuntarily). गुप्त गोष्ट बाहेर पडणें, भ्रमाचा भोंपळा फुटणें. *Bag and baggage*=with all belongings (*esp.* of utter expulsion). चंबुगबाळें, असेल नसेल तें सर्व. To give one the bag=नाउमेद करणें. To give one the bag to hold. एखाद्याचें मन दुसऱ्या गोष्टीकडे लावून आपण निसटून जाणें.

Băgă'sse, *n.* (बॅगॅस्)—refuse products in sugar-making. उंसाचीं चिपाडें.

Băgatĕlle', *n.* (बॅ-ग-टे'ल्)—a mere trifle, a thing of no importance ; a game played on a board having at the end nine holes into which balls are to be struck with a cue or mace. क्षुल्लक गोष्ट, क्षुद्र गोष्ट; एक प्रकारचा बिलिअर्डसारखा खेळ.

Băg'ful, *n.* (बॅग्-फुल्)—a full bag. भरलेली पिशवी.

Băgg'ÿ, *a.* (बॅगि)—loose-hanging. (पिशवी सारखा) ढिला, पोकळ.

Băgg'age, *n.* (बॅगिज्)—portable equipment of army; luggage; good-for-nothing woman (now only used playfully), a saucy girl. लष्करी सामान ; प्रवासांतलें सामान, लटांबर ; कुचकामी स्त्री, द्वांडगी मुलगी.

Băg'man, *n.* (बॅग्-मन्)—a commercial traveller ; a packman. फिरता व्यापारी ; फेरीवाला.

Băgn'io, *n.* (-nyō, बॅन्यो)—an oriental prison ; brothel. पौर्वात्य तुरुंग; वेश्यालय, कुंटणखाना.

Băg'pīpe, *n.* (gen. *plu.*)—a musical wind instrument. पिशवीचें पंचनलिका वाद्य, पंचवेणुवाद्य.

Băg-pīp'er, *n.* (बॅग्-पा'इपर्)—one who plays upon a bagpipe. पंचवेणुवाद्य वाजवणारा.

Bail, *n.* (बेल्)—security for prisoner's appearance ; person who becomes surety. जामीनकी; जामीनदार. *v. t.* to become bail for and secure liberation of ; deliver goods in trust. जामीनावर मुक्तता करणें; विश्वासानें सामान हवालीं करणें.

Bail, *n.* (बेल्)—outer line of fortification formed of stakes ; wall of castle court, court ; bar separating horses in open stable ; (Crick.) either of the crosspieces over the three stumps. किल्ल्याची बाहेरील तटबंदी ; मेढेकोट ; तबेल्यांतील दोन घोड्यांमधील फळी ; उभ्या काठ्यांवर उभी असणारी फिरकी, विटी. Bailer=विटी उडवणारा चेंडू.

Bail, Bāle, *v. t.* (बेल्)—to throw water out of boats with bowls. होडींतील पाणी उपसून टाकणें. Bailer=पाणी उपसण्याचें भांडें.

Bail'able, *a.* (बे'लेबल्)—admitting of bail (offence). जामीन घेऊन सोडण्याजोगा.

Bailee', *n.* (बेली')—one to whom goods are entrusted. ज्याचे स्वाधीन माल अनामत केलेला असतो तो.

Bail'ie, *n.* (-lĭ, बे'लि)—Scotch municipal officer corresponding to alderman. मेयरच्या दर्जाचा स्कॉट्लंडमधील म्युनिसिपल अधिकारी.

Bail'iff, *n.* (बे'लिफ्)—sheriff's officer ; agent of lord of manor ; steward. नाझरच्या हाताखालचा एक अधिकारी, समन्स लावणारा किंवा बजावणारा बेलीफ, शेरीफाचा हुकुम बजावणारा ; जहागीरदाराचा मुनीम ; कारभारी.

Bail'iwick, *n.* (बे'लि-विक्)—the district or jurisdiction of bailiff. बेलिफच्या अधिकारांतील प्रदेश.

Bail'ment, *n.* (बे'ल्-मेन्ट्)—liberation on bail ; delivery of goods in trust. अपराध्याला जामीनावर सोडणें ; स्वाधीन केलेला माल परत देणें.

Bail'or, *n.* (बे'लर्)—one who delivers goods to another for a stated purpose. अनामत माल स्वाधीन करणारा, निक्षेप्ता.

Bairn, *n.* (बेर्न्)—(Sc.) child. मूल.

Bait, *v. t.* & *i.* (बेट्)—worry persons by jeers ; give food to ; stop at inn ; put bait on or in. सतावून सोडणें ; दाणा, वैरण वगैरेची सोय करणें ; खाणावळींत उतरणें ; आमिष दाखविणें. *n.* food to entice prey; allurement; halt for refreshment or rest. आमिष ; लालूच ; उपाहाराकरितां उतरणें, थोडासा मुक्काम करणें.

Baize, *n.* (बेझ्)—coarse woollen stuff used for coverings. लोंकरीचा खरबरीत कपडा.

Bāke, *v. t.* & *i.* (बेक्)—cook by dry heat ; be or become baked. भाजणें ; भट्टींत घालून भाजणें. Bake-stone, *n.* भट्टींतील तव्यासारखा दगड.

Bāke'-house, *n.* (बे'क्-हाउस्)—a house or building for baking. रोटी भाजण्याचें स्थान, रोटीखाना, भटारखाना.

Bā'ker, *n.* (बे'कर्)—professional bread-maker. रोटीवाला. Baker's dozen=thirteen. तेरा. Pull devil, pull baker=encouragement to both sides. दोन्ही बाजूला उत्तेजन. Baker-legged=knock-kneed. आंत फिरलेल्या गुडघ्याचा, संहतजानु.

Bā'kery, *n.* (बे'करि)—bakehouse. भटारखाना, भट्टी.

Bāk'ing-powder, *n.* (बे'किंग्-पॉवडर्)—a substitute for yeast. भाजतांना उपयोगांत आणलें जाणारें पीठ.

Băk'sheesh, *n.* (बॅ'क्षीश्)—gratuity, tip. बक्षीस.

Băl'ance, *n.* (बॅ'लन्स्)—weighing-apparatus; regulating-gear(of clock, etc.); equilibrium; preponderating weight or amount; remainder. तराजू; घड्याळाचें वगैरे चक्र; समतोलपणा; तोल; बाकी राहिलेली रक्कम. *v. t.* & *i.* weigh; equalize, match; bring or come into equilibrium. तोलणें; बरोबरी करणें; समतोल करणें किंवा होणें. To hold the balance=to have the power to decide. निर्णय देण्याचें सामर्थ्य असणें. Balance of power=no state greatly preponderant. (निरनिराळ्या राष्ट्रांतील) शक्तीचा समतोलपणा. To lose one's balance=to fall physically, to be upset mentally. तोल जाऊन पडणें, चित्तस्थैर्य न राहणें. Balance-wheel=a wheel regulating the beat in a watch. (घड्याळांतील) तुलाचक्र. To strike a balance=to determine a balance. जमा व खर्च यांची बाकी शिल्लक काढणें. Balance of trade=difference between imports and exports. आयात आणि निर्गत यांमधील फरक. Balance in hand=the amount remaining over after realizing assets and meeting liabilities. कर्ज देऊन राहिलेली शिल्लक. Balance due=deficiency. अपूर्णता, अभाव.

Băl'ance-sheet, *n.* (बॅ'लन्स्-शीट्)—statement of assets and liabilities. आढावापत्रक, तेरीज.

Băl'conў, *n.* (बॅ'ल्-कनि)—outside balustraded platform with access from upper-floor window. सज्जा, बाल्कनी.

Bald, *a.* (-awld, बॉल्ड्)—with scalp wholly or partly hairless; without feathers; bare. टक्कल पडलेला; पिसें नसलेला; मोकळा, उघडा, बोडका. To go bald-headed=(*sl.*) to stake everything, disregard consequences. असेल नसेल तें पणाला लावणें, परिणाम न जुमानणें.

Băl'dachĭn, -quĭn, *n.* (-k-, बॅल्-ड-किन्)—the canopy over altar, throne, or doorway. धर्मगुरूचें छत्र, सिंहासनावरील छत.

Bal'derdăsh, *n.* (बॉ'ल्डर्-डॅश्)—jumble of words, senseless prate, nonsense. व्यर्थ बडबड, बटवट, बकबक.

Bal'drĭc, *n.* (बॉ'ल्ड्रिक्)—belt (for sword, bugle, etc.) hung from shoulder to opposite hip. खांद्यावरून समोरच्या बगलेंत घालण्याचा तलवार किंवा रणशिंग अडकविण्याकरितां केलेला पट्टा.

Bāle, *n.* (बेल्)—evil, destruction, woe; package of merchandise. दुःख, नाश, अरिष्ट, अनर्थ; मालाचा गट्ठा.

Ba'leful, *a.* (बे'ल्फुल्)—pernicious, destructive, malignant. दुष्ट, अपायकारक, नुकसानकारक.

Balk, Baulk, *n.* (bawk, बॉक्)—roughly squared timber beam; stumbling-block; sanctuary area on billiard table; ridge left unploughed. मोठें वहाल; मोठी अडचण; बिलिअर्ड खेळांत टेबलावरील बचावाची जागा; नांगरल्याशिवाय राहिलेली जागा. *v. t.* & *i.* thwart, hinder; discourage, startle; jib, shy. अडथळा करणें; निराश करणें, आशाभंग करणें; अडखळत चालणें, बिचकणें.

Ball, *n.* (बॉल्)—solid or hollow sphere; missile (for cannon, rifle, etc.); social assembly for dancing. चेंडू; बंदुकीची वगैरे गोळी; नृत्य, स्त्रीपुरुषांचा नाच. *v. t.* form lumps, गोळे तयार करणें. Balled up=confused and so unable to go on. गोंधळलेला (वक्ता). No ball=delivery (of a ball) breaking rules. नियमाविरुद्ध फेंकलेला चेंडू. Ball of eye=eye within lids. बुबुळ, नेत्रगोल. To have the ball at one's feet=to see one's way to success. यशाचा मार्ग स्पष्ट दिसणें, एखादी वस्तु पूर्णपणें स्वाधीन असणें. To keep up the ball rolling=to do one's part (in talk, etc.). बोलण्यांत वगैरे स्वतःचा भाग तेवढा करणें. The ball is with you=it is your turn. आतां तुझी पाळी आहे. *Ball and socket*=joint with greatest possible freedom. जास्तींत जास्त मोकळेपणा ठेवून केलेला संधि किंवा जोड. Ball-firing=firing with ball cartridge. गोळीबार.

Băll'ad, *n.* (बॅ'लड्)—simple song; narrative poem in short stanzas. साधें गाणें; लावणी, पोवाडा.

Băll'adrў, *n.* (बॅ'लड्रि)—ballad poetry. पोवाडे, काव्य, लावणीकाव्य.

Băll'ad-mŏnger, *n.* (बॅ'लड्-मँगर्)—dealer in ballads, an inferior poet. (पोवाडे करणारा) दुय्यम कवि.

Ballade', *n.* (-äd, बॅला'ड्)—a poem of one or more triplets of 7 or 8 lined stanzas ending with refrain and envoy. प्रत्येक श्लोकाच्या शेवटीं ध्रुपद असलेलें अशा सात किंवा आठ ओळींच्या कांहीं श्लोकांची एक कविता.

Băll'ast, *n.* (बॅ'लस्ट्)—heavy material placed in ship's hold for stability; experience

(and principles, etc.) that give stability to character. गलबताचा तळ पाण्यांत राहिजे तेवढा बुडावा म्हणून दगड, लोखंड वगैरे त्यांत घातलेलें वजन, निरीम; मनुष्याला स्थिरता आणणारा अनुभव, तत्त्वें वगैरे. *v. t.* furnish with ballast. (जहाजांत किंवा लोखंडी रस्त्यावर) खडी घालणें, निरीम भरणें.

Băll'et, *n.* (-lā, बॅ'ले)—combined performance of professional dancers. हावभावपूर्वक नृत्य, मुग्धनाट्य.

Balli'sta, *n.* (*pl.* Ballistae) (बॅलि'स्टा)—ancient military engine (for hurling stones, etc.). प्राचीन लोकांचें वेढ्यांतील जागेवर दगड वगैरे फेंकण्याचें यंत्र, अश्मक्षेपनयंत्र.

Ballis'tic, *a.* (बॅलि'स्टिक्)—of projectiles, of hurling power. अस्त्र किंवा दगड फेंकण्यासंबंधीं, क्षेपनसामर्थ्यविषयक. *n. pl.* Ballis'tics, the science of hurling stones. अश्मक्षेपनशास्त्र.

Băll'onĕt, *n.* (बॅ'लॉनेट्)—one of the interior gasbags of an airship. वायुयानांतील एक गॅसची पिशवी.

Balloon', *n.* (ब-लून्)—round air-tight envelope inflated with gas so as to rise in air. आकाशयान, वाटोळें विमान.

Balloo͞n'er, *n.* (बलू'नर्)—one who travels in a balloon. विमानांतून जाणारा, वैमानिक.

Balloo͞n'ist, *n.* (बलू'निस्ट्)—one who pilots a balloon. विमान चालविणारा, वैमानिक.

Băll'ot, *n.* (बॅ'लट्)—secret voting; ball, ticket or paper used in ballot; lot-drawing. गुप्त मतदान; गुप्त मत देण्याची चिठ्ठी वगैरे; चिठ्ठ्या. *v. i.* give secret vote, vote by ballot; draw lots. चिठ्ठ्या टाकून गुप्त रीतीनें मत देणें; चिठ्ठ्या टाकणें. Ballot-box=a box used in voting or lot-drawing. मतपत्रिका आंत टाकण्याची पेटी.

Băll'ȳ, *a.* & *adv.* (बॅ'लि)—(*sl.*) it expresses speakar's impatience, disgust, etc. बोलणाराच्या उतावीळपणा, तिरस्कार वगैरे दाखविणारा शब्द. (E. g. Stung by a *bally* wasp, too *bally* tired; whose *bully* fault is that?)

Băll'ȳrăg, *v. t.* & *i.* (बॅ'लि-रॅग्)—play practical jokes; indulge in horse-play. हातमस्करी करणें; धांगडधिंगा घालणें.

Bäln, *n.* (बाम्)—fragrant exudation; ointment; healing or soothing influence; the tree that yields balm. सुगंधित चीक; सुगंधि मलम; उपशामक औषध; सुगंधित चीक ज्याच्यापासून मिळतो तें झाड.

Bălmŏ'răl, *n.* (बॅल्मॉ'रॅल्)—kind of boot, petticoat, and Scotch cap. एक जातीचा बूट, घागरा व स्कॉच टोपी.

Bälm'ȳ, *n.* (बा'मि)—of or like balm; fragrant, mild, soothing. सुगंधित चिकाचा; सुगंधि, नरम, सुखकर.

Bal'sam, *n.* (bawl-, बॉ'ल्सम्)—balm; kinds of ointment; a flowering plant. सुवासिक उटणें; मलम; एक फुलझाड. [Gr. *balsamon*, a fragrant gum]

Balsăm'ic, *a.* (bawl-, बॉल्-सॅ'मिक्)—balmy, soft, mitigating, mild. उपशमकारक, मृदु, मृदु करणारें. *n.* a medicine of smooth and oily consistence. एक हुषारी आणणारें औषध.

Băl'ŭster, *n* (बॅ'लस्टर्)—short pear-shaped pillar; post supporting handrail of staircase; (*pl.*) posts and handrail लहान पिअरच्या आकाराचा खांब; कठड्याचा गज; (अने०) खांब आणि हातकठडा.

Bălŭstrāde', *n.* (बॅ-लस्ट्रे'ड्)—row of balusters with rail or coping as parapet to balcony, etc. नक्षीदार चपट्या गरादांचा कठडा.

Băm̆boo͞', *n.* (बॅम्बू')—(*pl.* Bamboos) a tropical giant grass; stem of the giant grass as stick or material. बांबू; काळक, वांसा.

Băm̆boo͞zle, *v. t.* (बॅम्बू'झल्)—hoax, cheat *into* doing something, cheat out of property, etc.; mystify. तोंडाला पानें पुसणें, फसविणें; गोंधळांत पाडणें.

Băn, *v. t.* (बॅन्)—prohibit, interdict. मनाई करणें, प्रतिबंध करणें. *n.* a curse; formal prohibition. शाप; मनाई, प्रतिबंध, निषेध *Under a ban*=Under a tacit prohibition by public opinion. वाळींत टाकलेला, बहिष्कार घातलेला, बहिष्कृत.

Bā'nal, *a.* (बे'नल् or बॅ'नल्)—hackneyed, commonplace, trite, vulgar. सर्वांचे तोंडचा, सर्वत्र प्रचलित, सर्वसाधारण.

Bănăl'itȳ, *n.* (बेनॅ'लिटि)—triteness; a commonplace. जुनेपणा, उच्छिष्टत्व; क्षुल्लक गोष्ट.

Banä'na, *n.* (बना'ना)—a fruit tree, its fruit. सोनकेळ, सोनकेळें.

Bănd, *n.* (बॅन्ड्)—flat strip of thin material; belt; body of musicians; group of persons पट्टी, बंध; पट्टा; वाद्य वाजविणाऱ्यांचा ताफा, बँड; समुदाय, टोळी. *v. t.* to form into a league; put a band on; mark with stripes. जूट करणें, एकत्र करणें; पट्टीनें बांधणें; पट्टे ओढणें. Bandbox=a box of a paper-covered chip or cardboard for millinery. टोप्या ठेवण्याची जाड कागदाची पेटी. As if come out of a bandbox=as if come out of extreme neatness. अत्यंत नीटनेटका. Band-saw=endless saw running over wheels. पट्ट्याची करवत. Band of Hope=Total-abstinence

Association. मद्यपाननिषेधी संस्था. Bandmaster=conductor of a musical band. बँड वाजविणाऱ्या मंडळींचा मुख्य. Bandstand=platform for a musical band. सार्वजनिक वाद्यस्थान. Bandsman=member of a musical band. बाजेवाला.

Bănd'age, *n.* (बॅन्डिज्)—stripe of material for binding up (limb, wound, etc.). जखम वगैरे बांधण्याचा पट्टा. *v. t.* to tie up with bandage. पट्टयानें बांधणें.

Băndănn'a, *n.* (बॅन्डॅ'ना)—coloured handkerchief with yellow or white spots. पिंवळे अथवा पांढरे ठिपके असलेला रंगीत हातरुमाल.

Băndeau', *n.* (-dō, बॅन्-डो') (*pl.* Bandeaux, बॅन्-डोझ्)—woman's hair-fillet; fitting band inside woman's hat. बायकांची केंस बांधण्याची पट्टी; बायकांच्या हॅटच्या आंतल्या बाजूस कडेबरोबर लावण्याची पट्टी.

Băn'dicōōt, *n.* (बॅ'न्-डि-कूट्)—(India) a rat as large as a cat; (Austral.) an insectivorous marsupial. मांजराएवढी मोठी घूस; कीटक खाणारा ओटीजवळच्या पिशवींत पोरें नेणारा प्राणी.

Băn'dĭt, *n.* (बॅ'न्डिट्)—(*pl.* Banditt'i, -ts) an outlaw; a brigand, robber. हद्दपार केलेला मनुष्य; दरवडेकरी.

Băn'dŏg, *n.* (बॅ'न्-डॉग्)—chained dog; mastiff, bloodhound. नेहमीं बांधलेला पहारा करणारा कुत्रा; वासावरून माग लावणारा शिकारी कुत्रा.

Băndoleer', Bandolier', *n.* (बॅन्-डॉ-लि'अर्)—shoulderbelt with cartridge loops. दारूगोळ्याचे तोस्तान अडकविण्याकरितां एक रुंद असा कातड्याचा पट्टा.

Băn'doline, *n.* (बॅ'न्-डॉ-लिन्)—gummy preparation for fixing the hair. केंस सारखे चिकटून राहण्याकरितां तयार केलेला चिकट पदार्थ.

Băn'dy̆, *v. t.* (बॅ'न्डि)—throw or pass to and fro; discuss; exchange. इकडे तिकडे फेंकणें किंवा जाणें; वादविवाद करणें; अदलाबदल करणें. *n.* hockey; curved stick used in hockey; Indian carriage, cart or buggy. हॉकीचा खेळ; हॉकीच्या खेळांतील चेंडू खेळण्याची टोंकाजवळ वांकडी असलेली काठी; एक प्रकारची हिन्दी गाडी. *a.* (of legs) wide apart at the knees. फेंगडा, फेंगड्या पायाचा.

Bāne, *n.* (बेन्)—cause of ruin, ruin; deadly poison. हानीचें मूळ; जालीम विष.

Bāne'ful, *a.* (बे'न्-फुल्)—full of bane, pernicious, destructive; poisonous. अपायकारक, घातक, मारक; विषारी, विषयुक्त. Bane'fully, *adv.* घातुक रीतीनें. Bane'fulness, *n.* घातुकपणा.

Băng, *v. t. & i.* (बँग्)—strike or shut noisily; make sound as of blow or explosion; thrash. धाडकन मारणें किंवा बंद करणें; जोरानें वाजणें; आपटणें. *n.* a sharp blow; loud noise. दणका; प्रचंड आवाज. *adv.* with a bang; abruptly; (colloq.) quite right. धाडकन; एकाएकीं, अकस्मात; अगदीं बरोबर.

Băng'le, *n.* (बँगल्)—ring bracelet or anklet. बांगडी, चुडा, कांकण, वाळा.

Băn'ian, Băn'yan, *n.* (बॅ'नि-अन्)—a Hindu trader; (Beng.) native broker to European house; Indian flannel jacket; Indian fig whose branches root themselves over large area. वाणी, वैश्य, व्यापारी; युरोपिअन लोकांचा हिंदी दलाल; एक प्रकारचें गरम जाकीट; वटवृक्ष, वड. Banian day=a day on which no meat is served out. खलाशांस मांस खाण्यास न मिळण्याचा दिवस.

Băn'ish, *v. t.* (बॅ'निश्)—condemn to exile; dismiss from one's presence or mind. हद्दपार करणें; प्रत्यक्ष किंवा मनानेंहि घालवून देणें, मनांतून दूर करणें.

Băn'ishment, *n.* (बॅ'निश्-मेन्ट्)—expulsion from one's own country. हद्दपारी, देशबहिष्कृति.

Băn'ister, *n.* (बॅ'निस्टर्)—baluster. कठड्याचा गज.

Băn'jō, *n.* (बॅ'न्-जो) (*pl.* Banjos)—stringed musical instrument (with guitar neck and head, tomborine body, played with fingers). सतारीसारखें पांच तारांचें एक वाद्य.

Băn'jōist, *n.* (बॅ'न्-जो-इस्ट्)—a banjo player. बॅन्जो वाद्य वाजविणारा.

Bănk, *n.* (बँक्)—raised shelf of ground; artificial slope; ground at edge of river; flat-topped mass of cloud; establishment for custody of money; the money before the keeper of gaming-table; galley-rower's bench; tier in galley; row of organ keys. बांध; कृत्रिम उतरण; (नदीचें) तीर; सपाट शिखराचा मेघसमूह; सावकारी पेढी, बँक; जुगाऱ्यांचें भांडवल; वल्हीं मारण्याकरितां बसावयाची उंच जागा; एकावर एक बांधलेल्या वल्ह्यांची उभी ओळ; तंतुवाद्याच्या चाव्या. *v. t. & i.* contain or confine with banks, embank; (Aviation) travel with one side higher; keep money at bank, deposit (money, etc.) at bank. बांध घालणें; बांधणें, विमान एका बाजूला उंच करून चालवणें; पेढीवर पैसे वगैरे ठेवणें. To *bank on* or *upon*=to base one's hopes on, to reckon reliable. एखाद्याच्या भरंवशावर राहणें. To *bank up*=to rise or heap into banks. ढीग करणें. To bank up a fire=to pack fire tightly for slow-burning. (विस्तव पुष्कळ वेळ राखण्याकरितां) निखाऱ्यावर राख घालणें. *Bank-bill*=a bill drawn by one bank on another. एका

पेढीनें दुसऱ्या पेढीवर लिहिलेली (दर्शनी किंवा मुद्तीची) हुंडी. *Bank-book*=a book containing customer's private copy of his account with bank. पेढीवर पैसे ठेवणाराची पैसे भरणाराजवळ असलेली खातेवही. *Bank-credit*=an arrangement by which a customer may overdraw on security given. जितक्या रकमेपर्यंत जामिनगिरी दिली असते तितकी रक्कम मिळण्याची पेढीशीं असलेली पत. *Bank holiday*—a day on which all banks and most shops are legally closed. ज्या दिवशीं बँका व इतर पुष्कळ दुकानें बंद असतात तो सुटीचा दिवस. *Bank-note*, a banker's promissory note payable to bearer on demand. रोख पैशाऐवजीं चालणारी हुंडी *Bank-rate*=announced percentage at which Bank of England is prepared to discount bills. बँकेचा दर. *Savings-bank*—संचयोत्तेजक पेढी.

Băn'kable, *a.* (बँकेबल्)—that will be received at a bank. पेढीवर ठेवण्यास लायक.

Bănk'er, *n.* (बँकर्)—proprietor or director of a bank; keeper of gaming bank. पेढीवाला, सावकार, सराफ; जुगाऱ्यांचें भांडवल ठेवणारा.

Bănk'er, *n.* (बँकर्)—labourer; (Hunting) horse that jumps on and off banks too large to clear; wooden or stone bench for trimming bricks or stone on. कामकरी मजूर; मोठमोठाले बांध वगैरे ओलांडून जाणारा घोडा; गवंडी लोक ज्या लांकडी किंवा दगडी बांकावर विटा किंवा दगड घडतात तें बांक.

Bănk'ĕt, *n.* (बँकिट्)—auriferous conglomerate like pudding-stone found in South Africa. ज्यांतून सोनें निघतें असा दक्षिण आफ्रिकेंतील वाटोळ्या लहान दगडासारखा मिश्र रेतीचा गड्डा.

Bănk'ĭng, *n.* (बँकिंग्)—business of banks, bankers, business. पेढीचा व्यापार, सावकारी.

Bănk'rŭpt, *n* (बँक्-रप्ट्)—an insolvent person. दिवाळें निघालेला, दिवाळखोर, नादार.

Bănk'rŭptcy̆, *n.* (बँक्-रप्ट्-सि)—insolvency, inability to pay all debts. नादारी, दिवाळें.

Bănks'hall, *n.* (बँग्स्-हॉल्) (Anglo-Ind)—a ware-house; the office of a harbour-master or port authority. वखार; बंदरअधिकाऱ्याचें ऑफिस.

Bank'sia, *n.* (बँक्-शा)—a flowering shrub. एका जातीचें फुलझाड.

Bănn'er, *n.* (बॅनर्)—flag (of a king, country, army, friendly society, etc.), ensign, standard. निशाण, झेंडा, पताका, बावटा.

Bănn'erĕt, *n.* (बॅनरिट्)—knight with vassals under his banner; one knighted on field for valour. स्वतःचे निशाणाखालीं दुसरे ताबेदार लढवण्ये नेणारा सरदार; लढाईंतील शौर्याबद्दल दिलेली पदवी.

Bănn'erol, *n.* (बॅनेरॉल्)—banner borne at great men's funerals and placed over tomb. मोठ्या लोकांच्या मेतयात्रेच्या वेळीं नेलें जाणारें व त्यांच्या थडग्यावर लावलेलें निशाण.

Bann'ock, *n.* (बॅनॉक्)—home-made loaf (usu. unleavened, flat and round or oval). घरीं तयार केलेला बिन आंबवणाचा पाव.

Banns, *n. plu.* (बॅन्झ्)—notice in church of intended marriage, thrice read to give opportunity of objection. चर्चमध्यें तीनदां वाचली जाणारी लग्नाची जाहीर पत्रिका.

Bănq'uĕt, *n.* (बँक्विट्)—sumptuous feast, dinner with speeches. मेजवानी, मिष्टान्नपानसमारंभ. *v. t. & i.* regale (person); take part in a banquet. मेजवानी देणें; मेजवानींत भाग घेणें.

Bănquette', *n.* (-ket, बँकेट्)—a firing-step (in trenches, etc.); bench behind driver in public stage-coach. उभें राहून गोळीबार करण्याकरितां तटाच्या आंतील वरळ; गाडी हांकणाऱ्याच्या मागचें सखल बांक. [Fr. *banque*, a bench]

Băn'shee, *n.* (बॅन्-शी)—a spirit whose wail portends death in a house. ज्याचा आक्रोश एखाद्या घरांत मृत्यु सुचवितो असें भूत.

Băn'tam, *n.* (बॅन्-टम्)—a small kind of fowl; small but spirited person; a boxing-weight (8 st. 6 lb.). एक जातीचा लहान पक्षी; लहान पण तरतरीत मनुष्य; आठ स्टोन व सहा पौंडाचें वजन.

Băn'ter, *n.* (बॅन्टर्)—humorous ridicule. थट्टा, उपहास. *v. t. & i.* make fun of, jest. थट्टा करणें, मस्करी करणें.

Băn'tling, *n.* (बॅन्ट्-लिंग्)—a brat, a little child. लहान मूल.

Ban'y̆an, *n.* (बनिअन्)—a kind of tree. वडाचें झाड, वड, वटवृक्ष.

Bā'obăb, *n.* (बेऑबॅब्)—an African tree with a huge stem and edible fruit. एक आफ्रिकेंतील मोठा बुंधा असलेला फलवृक्ष.

Băp'tĭsm, *n.* (बॅप्-टिझम्)—religious rite for purification and admission to the church. बाप्तिस्मा, ख्रिस्ती होण्याचा विधि. शुद्धिस्नानविधि. Băptis'mal, *a.* बाप्तिस्म्याविषयींचा. *Baptism of blood*=martyrdom. ख्रिस्ती धर्माकरितां माणत्याग. *Baptism of fire*=soldier's first battle. योद्ध्याचें पहिलें युद्ध.

Băp'tĭst, *n.* (बॅप्-टिस्ट्)—one who baptizes; one of a sect objecting to infant baptism and practising immersion. बाप्तिस्मा देणारा; लहान मुलांना बाप्तिस्मा देऊं नये असें प्रतिपादणारा.

Băp'tĭstery̆, *n.* (बॅप्-टिस्टरि)—part of church used for baptism. बाप्तिस्मा करण्याची जागा.

Băptīze', *v. t.* (बॅप्-टा'इझ्)—administer baptism to; christen; give a name to. ख्रिस्ती धर्माची दीक्षा देणें, बाप्तिस्मा देणें; ख्रिश्चन करणें; नांव ठेवणें.

Băr, *n.* (बार्)—long-shaped piece of rigid material; slip of silver below clasp as additional distinction; barrier; (*Mus.*) vertical line dividing piece into equal time-parts; counter at which refreshments are served. अडसर; लगड, कांब; अडथळा; गायनतालाचें आवर्तन, आवर्त; फराळाचें सामान देण्याची जागा. *v. t.* fasten with bars; keep in or out fastened with bars; obstruct, prevent; exclude. अडसर घालणें; गज घालून आंत येण्यास किंवा बाहेर जाण्यास प्रतिबंध करणें; अडथळा करणें, आड येणें; वगळणें. *Trial at bar*=trial in King's Bench division. वरिष्ठ कोर्टांत चार न्यायाधीशांपुढें होणारी महत्त्वाच्या खटल्याची चौकशी. *To be called to the bar* (i. e. that in Inns of court separating benchers)=to be admitted a barrister. बॅरिस्टरची सनद मिळणें. *To be called within the bar* (i. e. that in courts within which king's counsels plead)=to be appointed king's counsel. सरकारी वकील नेमला जाणें. *The bar*=barristers, the profession of barristers. बॅरिस्टर लोक, बॅरिस्टरांचा धंदा. The prisoner at the bar=पिंजऱ्यांत उभा केलेला कैदी. Bar sinister=a badge of bastardy. अनौरस स्थितीचें चिन्ह.

Bärb, *n.* (बार्ब्)—recurved point (of arrow, fish-hook, etc.); Barbary horse or pigeon. बाणाचें अगर गळाचें वांकलेलें टोंक, कांटा, आंकडा; बार्बरी देशांतील घोडा किंवा कबूतर. *v. t.* to furnish with barb आंकडा लावणें, उलट कांटा घालणें. *Barbed wire*=wire for fences and especially as obstruction in war, with wire prickles at intervals. कांटेरी तार.

Barbār'ĭan, *a.* (बार्बे रि-अन्)—uncivilized, wild; uncultured. अशिक्षित, रानटी; अडाणी. *n.* uncivilized person. रानटी मनुष्य, जंगली माणूस.

Bärbă'rĭc, *a.* (बार्-बॅ रिक्)—rude, uncultured. रानटी, क्रूर.

Bärb'arĭsm, *n.* (बा'र्-बॅ-रिझ्म्)—rude or uncultured state; uncultured expression. अशिक्षितपणा, रानटी स्थिति; अडाणी भाषा, अपशब्द.

Bärbă'rĭtў, *n.* (बार्-बॅ'रिटि)—savage cruelty, ferociousness, inhumanity. रानटीपणा, निर्दयता, माणुसकीचा अभाव.

Bärb'arīze, *v. t. & i.* (बा'र्बॅ-राइझ्)—make or become barbarous. अशिक्षित करणें किंवा होणें, रानटी करणें. Bärbarīzā'tion, *n.*

Bärb'ărous, *a.* (बा'र्-बॅ-रस्)—uncivilized, uncultured, ignorant; cruel. अशिक्षित, अडाणी; क्रूर.

Bärb'ecūe, *n.* (बा'र्बिक्यू)—framework for smoking or broiling; hog, ox, etc. roasted whole; large entertainment with whole-roasting; floor for drying coffee-beans. धूर सोडण्याकरितां किंवा भाजण्याकरितां केलेली लांकडी चौकट, सबंध भाजलेला डुकर, बैल, वगैरे; सबंध भाजलेल्या डुकराची वगैरे मेजवानी; कॉफीच्या बिया वाळवण्याकरितां केलेली जागा. *v. t.* roast whole. सबंध भाजणें.

Bärb'ĕl, *n.* (बा'र्बेल्)—a large European fresh-water fish with fleshy filaments hanging from mouth. तोंडाजवळ दाढीसारखे चार मांसाचे लांब झुबके असलेला गोड्या पाण्यांतील मासा.

Bärb'er, *n.* (बा'र्बर्)—one who shaves beards and cuts hair, a hair-dresser. न्हावी, नापिक. *Barber's block*=block for making and displaying wigs. केंसाचे टोप करण्याचा वाटोळा ठोकळा. *Barber's itch*=skin disease said to be communicated in shaving. वस्त्र्याच्या योगानें जडलेला चामडीचा रोग. *Barber's pole*=a pole spirally painted and used as sign. तांबड्या काळ्या पट्ट्यांचें न्हाव्याचें निशाण.

Bärb'errў, *n.* (बा'र्बेरि)—a yellow-flowered shrub; the oblong red berry of the shrub. पिंवळीं फुलें व तांबडीं फळें असणारें एक कांटेरी झाड; त्या झाडाचीं तांबडीं फळें.

Bärb'ĕt, *n.* (बा'र्बेट्)—a bird with bristle-tufts at base of bill; a dog having long curly hair. उष्ण कटिबंधांतील एक कोकिळेसारखा पक्षी; एक लांब कुरळ केंसाचा कुत्रा.

Bärbĕtte', *n.* (बार्बे'ट्)—platform within fort or in ship from which guns fire over parapet. किल्ल्यांत किंवा जहाजांत बंदुका मारण्याकरितां केलेली उंच जागा.

Bärb'ĭcan, *n.* (बा'र्बिकन्)—outer defence to city or castle (esp. tower over gate). नगर किंवा किल्ला यांचे रक्षणार्थ बांधलेला पहारे बसण्याचा बुरूज, नगररक्षक बुरूज.

Bärc'arōle, *n.* (बा'र्-कॅरोल्)—a song of gondolier. गँडोला होडीच्या वल्हेकऱ्याचें गाणें.

Bärd, *n.* (बार्ड्)—minstrel; a poet; armour for breast and flanks of a war-horse. स्तुतिपाठक, भाट; कवि; लढाऊ घोड्याचें छाती आणि बरगड्यांचें चिलखत.

Bärd'ĭc, *a.* (बा'र्डिक्)—pertaining to bards or their poetry. भाटासंबंधीं, भाटाच्या पोवाड्यांसंबंधीं.

Bärd'lĭng, *n.* (बा'र्ड्-लिंग्)—an inferior or a mediocre poet. अल्प किंवा मध्यम बुद्धीचा कवि.

Bāre, *a.* (बेअर्)—unclothed, uncovered; exposed; unadorned; scanty; mere. वस्त्रहीन; उघडा; भूषणरहित; थोडासा; केवळ. *v. t.* make bare, strip. उघडा करणें.

Bāre'băcked, *a.* (बें'अर्-बॅक्ट्)—having the back uncovered, unsaddled. उघड्या पाठीचा, बिगरखोगीर, खोगीर नसलेला.

Bāre'faced, *a.* (बें'अर्-फेस्ट्)—with the face bare or uncovered; shameless; impudent. उघड्या तोंडाचा; निर्लज्ज; उद्धट.

Bāre'lў, *adv.* (बें'अर्लि)—scarcely, hardly. क्वचितच.

Bärg'ain, *n.* (-gĭn, बा'र्गिन्)—agreement on terms of purchase, compact; thing acquired by bargain. किफायतीचा सौदा, ठराव; विकत घेतलेली वस्तु. *Good bargain*=result cheaply bought. सवंग सौदा. *Bad bargain*=result dearly bought. महाग सौदा. *Dutch bargain* or *wet bargain*=bargain closed with drink. ज्याच्या शेवटीं पेय दिलें जातें असा सौदा. *Into the bargain*=beyond the strict terms, moreover. वर, शिवाय, आणखी. *To strike a bargain*=to come to terms. सौदा ठरविणें. *To make the best of a bad bargain*=to take misfortune etc. cheerfully. वाईट परिस्थितीचा शक्यतोंवर फायदा घेणें, संकटाला आनंदानें तोंड देणें. *v. t.* haggle, dispute, stipulate. घासाघीस घालणें, बोली करणें, सट्टा करणें. *To bargain for*=to be prepared for; to expect. तयार असणें; अपेक्षा करणें To bargain *away*= to part with for a consideration. सट्टा करून घालविणें. Bar'gainer, *n.* सौदा करणारा.

Bärge, *n.* (बार्ज्)—flat-bottomed freight-boat; house-boat. वाहतुकीची होडी; पडाव. Bär'ge-board=ornamental screen to two gable beams. (पाऊस आंत येऊं नये म्हणून) नक्षीदार चांदईच्या कड्यानें लावलेली फळी. Bär'ge-course=roof projecting two gable beams. वाशांच्या पुढें आलेलें छप्पर.

Bärgee', *n.* (बार्-जी')—a man in charge of a barge. क्रीडानौकेवरील खलाशांचा मुख्य.

Bă'ritōne, *a.* & *n.* (बॅ'रि-टोन्)—(a voice) between tenor and bass. मध्यस्थानांतील स्वर व खरज स्वर यांमधील (स्वर).

Bār'ĭŭm, *n.* (बे'रिअम्)—a white metallic element. रुप्यासारखी पांढरी धातु, बेरिअम धातु.

Bärk, *n.* (बार्क्)—outer sheath of a tree trunk and branches; tan; quinine. झाडाची साल; कातडी कमावण्याची साल; क्विनाइन, कोयनेल. *v. t.* strip tree of the bark; abrade. सोलणें, साल काढणें; (कातडी) घांसणें.

Bärk, Bärque, *n.* (बार्क्)—a three-masted vessel; ship; small boat. एक तीन डोलकाठ्या असलेलें जहाज; जहाज; लहान होडी.

Bärk, *n.* (बार्क्)—usual cry of dogs, foxes, squirrels; (*fig.*) sound of gunfire, report of gun; cough. कुत्र्याचें भुंकणें, कोल्ह्याचें किंवा खारीचें ओरडणें; बंदुकीचा आवाज; खोकला, कफ. *v. i.* & *t.* utter sharp explosive cry speak petulantly; cough. भुंकणें; तिरसटपणें बोलणें; खोकणें. To bark *at*=to abuse. निंदा किंवा हेटाळणी करणें. *To bark up the wrong tree*=to denounce a wrong person, etc. भलत्याच व्यक्तीची बदनामी करणें. Barking dogs seldom bite, Cf. Mar. idiom. बोलेल तो करील काय? गर्जेल (ढग) तो पडेल काय? Barking-iron=पिस्तूल.

Bär'ker, *n.* (बा'र्-कर्)—noisy assailant; pistol, gun; auction-tout. ओरडून हल्ला करणारा; पिस्तूल, बंदूक; लिलांवाकरितां दलाली करणारा.

Bärl'ey, *n.* (बा'र्लि)—grain that malt is made of. जव, सातू. Barley-broth=strong ale. यवाची फार अमली दारू. Barley corn= grain of barley; one-third of an inch. सातूचा एक दाणा; इंचाचा तिसरा भाग. Barley-meal=flour ground from barley. सातूचें पीठ Barley-sugar=a twisted sweetmeat. जवाच्या काढ्यांत तयार केलेला गोड पदार्थ. Barley-water=a soothing decoction of pearl barley for invalids. यवाचा काढा, यवक्वाथ. Pearl barley=मोत्यासारखे वाटोळे यवाचे दाणे.

Bär'maid, *n.* (बा'र्-मेड्)—a woman attendant at a bar. फराळाचे दुकानांतील बाईनोकर.

Bär'man, *n.* (बा'र्-मन्)—an attendant at refreshment bar. फराळाच्या दुकानांतील नोकर.

Bärm, *n.* (बार्म्)—froth on fermenting malt liquor, yeast. सातूच्या दारूवरील फेंस, दारूचा फेंस. Bär'mў, *a.* frothy. फेंसाळ. Barmy on the crumpet=wrong in the head, cracked. डोकें फिरलेला, चक्रम.

Bärm'ecīde, *a.* (बा'र्मिसाइड्)—illusory, imaginary, disappointing. मायावी, काल्पनिक, निराशाजनक. *n.* giver of illusory gifts. मायावी किंवा खोट्या देणग्या देणारा. [This is a name of Arabian-Nights prince whose feast to beggar was rich dish-covers with nothing below them.]

Bärn, *n.* (बार्न्)—covered building for storing grain and such other things. धान्याचें किंवा दुसऱ्या तशाच वस्तु सांठविण्याचें कोठार.

Barn'-door, *n.* (बा'र्न्-डोअर्)—(*fig.*) target too large to be missed. सहसा नेम न चुकावा

इतकें मोठें लक्ष्य. Barn-stormer, *n.* strolling player. फिरता खेळाडू. Barn-yard=farmyard. कोठाराभोंवतालचें आवार.

Bärn'ácle, *n.* (usu. *plu.*) (बा'र्-नॅ-कल्)—pincers placed on horse's nose to keep him still (in shoeing, etc.); (*pl.*) spectacles. घोड्याला नाल वगैरे मारतांना त्यानें हालूं नये म्हणून नाकावर घातला जाणारा चिमटा, काजगी; चष्मा.

Bär'năcle, *n.* (बा'र्-नॅ-कल्)—Arctic goose visiting Britain in winter; crustacean clinging to ship's bottom; follower who cannot be shaken off. हिंवाळ्यांत ब्रिटनमध्यें येणारा आर्क्टिक प्रदेशांतील हंस; जहाजाच्या तळाशीं चिकटून राहणारा खेंकड्यासारखा प्राणी; पूर्ण चिकटून राहणारा अनुयायी.

Bărŏ'lŏgy̆, *n.* (बॅरॉ'लॉजि)—science of weight. मापण्याचें किंवा वजनाचें शास्त्र.

Bărŏm'ėter, *n.* (बॅरॉ'मिटर्)—instrument measuring atmospheric pressure and used to forecast weather. हवेचा भार मोजण्याचें यंत्र, वायुमापक यंत्र. Băromĕt'rĭc, Bărŏmĕt'rĭcal, *aa.* भारमापकाचा. [Gr. *baros*, weight.]

Bă'ron, *n.* (बॅ'रन्)—title of the lowest rank in the peerage. विलायतेंत वडे लोकांची एक शेवटची पदवी. Baron of beef=double sirloin undivided. न कापलेला दोन्ही बाजूचा वरील कटिप्रदेश.

Bă'ronage, *n.* (बॅ'र-निज्)—the barons; book with list of barons. सर्व बॅरन लोकांची मंडळी; बॅरन लोकांची यादी.

Băr'oness, *n.* (बॅ'रनेस्)—Baron's wife; lady holding the same rank as a baron. बॅरनची बायको; बॅरनच्या सारखे हक्क असलेली स्त्री.

Bă'ronet, *n.* (बॅ'रो-निट्)—one of the lowest hereditary titled order. वंशपरंपरेनें चालू असलेली बॅरनच्या खालची पदवी, बॅरोनेट. Baronetcy, *n.* Baronet's rank. बॅरोनेटची पदवी.

Băr'onĕtage, *n.* (बॅ'रो-ने-टिज्)—Baronets collectively; book with list of barons. बॅरोनेट मंडळी; बॅरन लोकांची यादी असलेलें पुस्तक.

Bărō'nĭal, *a.* (बॅरो'निअल्)—of a baron, of barons. बॅरनसंबंधींचा, बॅरन लोकांचा.

Bă'rony̆, *n.* (बॅ'रनि)—baron's rank, domain of a baron; (in Ireland) a territorial division; (Scotch) a large manor. बॅरनचा दर्जा, बॅरनचा प्रदेश; आयर्लंड देशांतील एक भाग; मोठी जहागीर.

Baro'que, *a.*(-ōk,बॅरो'क्)—grotesque, whimsical. विचित्र, तऱ्हेवाईक. *n.* whimsical style or ornamentation. चमत्कारिक पद्धति, तऱ्हेवाईक नकशीचें काम.

Barou'che, *n.* (-ōōsh, बरू'श्)—a four-wheeled carriage with a falling top for four occupants and a driver. पडत्या झांकणाची चारचाकी गाडी. (यांत चार माणसें व हांकणारा इतकीं बसण्याची जागा असते.)

Bărque, *n.* (बार्क्)-a bark, a small vessel, boat. एक लहान होडी, नाव, लहान जहाज, जहाज

Bă'rrăck, *n.* (*usu. pl.*) (बॅ'रॅक्)—building for lodging soldiers; building of severely dull appearance. शिपाई राहाण्याची चाळ, बराक; अगदीं अशोभित घर. *v. t.* place in barracks; hoot, jeer at (players in cricket etc.). बराकींत ठेवणें; हुर्यो करणें, चेष्टेनें हंसणें.

Barracoo'n, *n.* (बॅरॅकू'न्)—set of sheds or enclosure (for slaves, convicts, etc.). गुलामांना किंवा कैद्यांना ठेवण्याकरितां तयार केलेली जागा.

Bărr'age, *n.* (बा'रिज्)—a dam or embankment built across a river; (*mil.*) gunfire so directed as to make a given line impassable. एखाद्या रांगेंत प्रवेश करणें अशक्य करण्याकरितां केलेला बंदुकीचा मार; नदी अडविण्याकरितां घातलेला बंधारा.

Bă'rrator, -er, *n.* (बॅ'रॅटर्)—one who excites suits at law; malicious raiser of discord. कोर्टांत कज्जे करण्यास उत्तेजन देणारा, कज्जेदलाल; द्वेषानें भांडणें उपस्थित करणारा.

Ba'rratry̆, *n.* (बॅ'रॅट्रि)—vexatious litigation or incitement to lawsuits and quarrels; fraud or gross negligence of a shipmaster or crew in the management of his ship. दावा आणण्यास किंवा कज्जा करण्यास उत्तेजन देणें; गलबतांतील व्यवस्थेमध्यें कप्तानाची किंवा खलाश्यांची लबाडी किंवा पूर्ण दुर्लक्ष.

Bă'rrel, *n.* (बॅ'रेल्)—cylindrical wooden vessel; contents of such a vessel; metal tube of a gun; a cylinder. पिंप; पिंपांतील पदार्थ; बंदुकीची नळी; पिंपासारखी लांब नळी. *v. t.* to put in barrels. पिंपांत घालणें किंवा ठेवणें. (*p. p.* barrelled)

Ba'rrel-organ, *n.* (बॅ'रेल्-ऑर्गन्)—a musical instrument with a barrel or cylinder acting mechanically on keys. पिंपासारखें एक वाजविण्याचें यंत्र.

Bă'rren, *a.* (बॅ'रन्)—not bearing, incapable of bearing (children, fruit, etc.); unprofitable. वंध्या, वांझ, नापीक, ओसाड; बिनफायद्याचा; निरर्थक, व्यर्थ.

Barrĕt'ter, *n.* (बॅरे'टर्)—an instrument used in wireless receivers for controlling current supply. बिनतारी संदेश घेण्यांत उपयोगांत आणलेलें यंत्र.

Bărrĭcā'de, *n.* (बॅ-रि-के'ड्)—hastily erected rampart (across street etc. of barrel, carts, stones, furniture); a barrier, obstruction. तात्पुरती केलेली मेढेबंदी; प्रतिबंध, आडकाठी. *v. t.* to block or defend with a barrier, to bar or obstruct. मेढेबंदीनें कोंडणें; प्रतिबंध किंवा अडथळा करणें.

Bă'rrĭer, *n.* (बॅ'रि-अर्)—fence, rail, etc. barring advance or access; obstacle; a line of separation. प्रवेश बंद करण्याकरितां घातलेलें कुंपण वगैरे; विघ्न, प्रतिबंध, अटकाव; सरहद्द.

Bă'rrĭster, *n.* (बॅ'रिस्टर्)—a lawyer entitled to practise in the superior courts. वरिष्ठ कोर्टांतील वकील, बॅरिस्टर.

Bă'rrow, *n.* (-ō, बॅ'रो)—(in names) hill; prehistoric grave-mound, tumulus; a hand-barrow; a two-wheeled hand-cart; an infant's long sleeveless flannel coat. टेकडी; अगदीं प्राचीन स्मशानांतील मातीचा अगर दगडांचा ढीग; हातगाडी; दुचाकी लहान गाडी; लहान मुलांचें बिनबाह्यांचें गरम कापडाचें कुडतें.

Bärt'er, *v. t. & i.* (बा र्टर्)—exchange (goods, rights, etc.). अदलाबदल करणें. *n.* trade by exchange. अदलाबदल, फेरमोबदला.

Bärtĭzăn', *n.* (बार्-टि-झॅ'न्)—battlemented parapet at the top of church tower or castle. चर्चच्या शिखरावरील किंवा किल्ल्यावरील जंग्यांची छातीएवढी उंच भिंत.

Bärt'on, *n.* (बा'र्टन्)—a farm-yard. शेतांतील घराचें अंगण.

Bā'sal, *a.* (बे'सल्)—of or forming the base; fundamental. तळाचा; मूलभूत, मुख्य.

Bă'salt, *n.* (-sawlt, बॅ'सॉल्ट्)—a dark green or brown igneous rock. एक अत्यंत हिरवा अग्नियुक्त दगड. Basa'ltĭc, Basa'ltĭform, *aa.*

Băs'cūle bridge, *n.* (बॅ'स्-क्यूल् ब्रिज्)—a kind of bridge worked by counterpoise. एक प्रकारचा हलता पूल.

Base, *a.* (बेस्)—morally low, mean, ignoble, debased; of inferior value. हलकट, नीच; हिणकस. *n.* foundation, bottom; groundwork, principle, starting-point; (*Mil.*) a tract of country from which the operations of an army proceed; (*Chem.*) an electro-positive compound body that unites with acids to form salts. पाया, तळ; आदितत्व, आरम्भस्थान; लढाई सुरू करण्यास सोइस्कर असा तळ; अम्लाशीं संयुक्त होऊन लवण उत्पन्न करणारा पदार्थ, लवणोत्पादक धातु. *v. t.* found, rest on; establish. पायावर रचणें; बसवणें, स्थापित करणें.

Bāse'ball, *n.* (बे'स्-बॉल्)—a popular American game played with bat and ball (with nine players on each side); a ball used in the game. बॅटचेंडूनीं खेळण्याचा अमेरिकेंतील एक खेळ; या खेळांतील चेंडू.

Bāse'born, *n.* (बे'स्-बॉर्न्)—of low birth; illegitimate. हीन कुळांत जन्मलेला; अनौरस, दासीपुत्र.

Bāse'less, *a.* (बे'स्-लिस्)—groundless, unfounded. निराधार, आधारशून्य, मुळांत कांहीं नसलेला.

Bā'selỹ, *adv.* (बे'स्-लि)—meanly, dishonourably. हलकेपणानें, नीच वृत्तीनें.

Bāse'ment, *n.* (बे'स्-मेन्ट्)—lowest part of structure; story below ground level. तळभाग; तळघर.

Băsh, *v. t.* (बॅश्)—strike heavily so as to smash *in.* चकाचूर होण्याइतकें जोरानें मारणें.

Băshaw', *n.* (बॅशॉ')—a pasha, Turkish or Egyptian officer of high rank. तुर्कस्तानांतील किंवा इजिप्तमधील मोठा हुद्देदार

Băsh'ful, *a.* (बॅ'श्-फुल्)—shy, modest to excess, sheepish. लाजाळू, लज्जाशील, लाजरा

Băshĭ-bazouk', *n.* (-zōōk, बॅशि-बॅझू'क्)—mercenary of Turkish irregulars (notorious for pillage and brutality). तुर्कस्तानांतील नियमित नोकरीस नसलेल्या सैन्यापैकीं भाडोत्री शिपाई.

Bā'sĭc, *a.* (बे'सिक्)—of, at or forming the base; fundamental; (*Chem.*) having the base atomically more than the acid. मुळाचा, मूलभूत, आधारभूत; अम्लापेक्षां जास्त भस्म असलेलें (लवण).

Basĭ'citỹ, *n* (बॅसि'सिटि)—the power of an acid of combining with one or more atoms of a base. भस्माबरोबर संयुक्त होण्याची शक्ति.

Băs'ĭl, *n.* (बॅ'झिल्)—an aromatic herb. तुळस.

Basĭl'ica, *n.* (बॅसि'लिका)—a royal palace; an ancient Roman public oblong hall with double colonnade and apse. राजवाडा; दुतर्फा खांबांची रांग व अर्धवर्तुलाकार घुमट असलेला एक प्राचीन रोममधील सार्वजनिक लांबट दिवाणखाना. [Gr. *basilikos*, royal (house)]

Basĭl'icon, *n.* (बॅसि'लिकॉन्)—an ointment composed of yellow wax, black pitch and resin. पिवळें मेण, काळें डामर व राळ हीं घालून केलेलें एक जातीचें मलम.

Băs'ĭlisk, *n.* (-z-, बॅ'झिलिस्क्)—a fabulous reptile blasting by its breath or look; a lizard with crest inflated at will. ज्याच्या श्वासानें किंवा दृष्टिक्षेपानें मरण येतें असा एक काल्पनिक सरपटणारा प्राणी; ज्याला डोक्यावरील शेंडीसारखा भाग वाटेल तेव्हां वाढवितां येतो असा एक जातीचा सरडा. [Gr. *basileus*, a king]

Bā'sin, *n.* (बे'सन्)—a round vessel for holding water, etc.; a tract of country drained by a river; a land-locked harbour. पातेलें, हौद; नदीचा पाणवठा, ज्या प्रदेशांतून एखादी नदी किंवा तिला मिळणाऱ्या नद्या वाहतात तो प्रदेश, गोदी.

Bā'sĭs, *n.* (बे'सिस्)—foundation, thing to work upon; main principle. मूळ, पाया, आधार; मुख्य तत्त्व, आधाराचा सिद्धान्त. (*pl.* Bā'sēs, बे'सीस्). [L. or Gr. *basis*, the foundation]

Băsk, *v. i.* (बास्क्)—lie or sit warming oneself in the sun. ऊन्ह खाणें, उन्हांत बसणें, ऊब घेणें.

Băs'kĕt, *n.* (बा'स्किट्)—wicker vessel (of plaited cane, etc.); the contents of a basket. टोपली, करंडी; करंडीभर. *v. t.* to put in a basket. टोपलींत टाकणें.

Băs'ketful, *n.* (बा'स्किट्-फुल्)—the quantity contained in a basket. टोपलीभर.

Băs'rĕlief, *n.* (बॅ'स्-रिलीफ्)—shallow carving of sculpture on background. थोडेंच बाहेर आलेलें कोरींव काम, उठाऱ्याचें काम, बाह्यगोल उठावाचें नकसकाम. (Also, Băss'-relief)

Băss, *n.* (बॅस्)—a kind of fish of the perch family. एक जातीचा मासा.

Băss, Băst, *n.* (बॅस्, बॅस्ट्)—the inner bark of the lime tree. लांब तंतूंची लिंबाचे झाडाची आंतील साल.

Bāss, *a.* (बेस्)—deep-sounding; of lowest part in harmonized music. गंभीर आवाजाचा; खरज, घोगरा. *n.* low voice; a man with bass voice. खरज सूर; खरज सुरांत गाणारा.

Bāss'-viol, *n.* (बे'स्-व्हायॅल्)—violoncello. खरज सुरांतील गाण्याबरोबर वाजविण्याचें तंतुवाद्य.

Băs'sĕt, *n.* (बॅ'सिट्)—a short-legged badger-dog; an obsolete card-game. आंखूड पायाचा व मोठ्या शरीराचा शिकारी कुत्रा; एक प्रकारचा (सध्यां प्रचारांत नसलेला) पत्त्यांचा खेळ.

Băssĭnĕt', *n.* (बॅसिने'ट्)—a hooded wicker cradle or perambulator. आच्छादन असलेला लहान मुलांचा वेरणीचा पाळणा किंवा हातगाडी.

Bassōōn', *n.* (बॅसू'न्)—a wooden double-reed instrument (used as bass to oboe). एक प्रकारचें सुखवाद्य, भोंवारा

Băst, *n.* (बॅस्ट्)—the inner bark of lime; other flexible fibrous barks. लिंबाची आंतील साल, तंतू असलेली साल.

Băs'tard, *a.* (बॅ'स्टर्ड्)—born out of wedlock; hybrid, counterfeit. अवैवाहिक संबंधापासून झालेला, अनौरस, दासीचा; मिथ्या, खोटा. *n.* an illegitimate child; a counterfeit thing. दासीपुत्र; बनावट वस्तु किंवा गोष्ट.

Băs'tardīze, *v. t.* (बॅ'स्टर्-डाइझ्)—to declare illegitimate. अनौरस किंवा बेकायदेशीर आहे असें जाहीर करणें. Ba'stardiza''tion, *n.*

Bă'stardy̆, *n.* (बॅ'स्टर्डि)—illegitimacy. अनौरस स्थिति, दासीपुत्रत्व. *Bastardy order*=order for the support of illegitimate child by putative father. मानलेल्या बापाकडून अनौरस मुलाच्या रक्षणाकरितां दिलेला हुकूम.

Bāste, *v. t.* (बेस्ट्)—sew together with temporary stitches, tack; thrash, cudgel; to moisten (roasting meat) with fat. धावदोरा घालणें, टांके घालणें; झोडपणें, मारणें; मांस भाजतांना त्यावर चरबी वगैरे घालणें.

Bastille', *n.* (-ईल, बॅस्टी'ल्)—fortress; Paris prison fortress destroyed in 1789; prison. किल्ला; सन १७८९ त फ्रान्सांतील बंडवाल्या लोकांनीं पाडून टाकिलेला तुरुंग म्हणून उपयोग केला गेलेला किल्ला; तुरुंग.

Băstĭnā'dō, *n.* & *v. t.* (बॅस्टिने'डो)—caning or to cane on soles of feet. तळपायांवर छडीनें मार देणें. (*pl.* Bastinadoes)

Băs'tĭon, *n.* (बॅ'स्टिअॅन्)—pentagonal projection from a fortification. बुरूज. Băs'tioned, *a.* (बॅ'स्टिअॅन्ड्)—बुरूज असलेला.

Băt, *n.* (बॅट्)—a nocturnal mouse-like winged quadruped; wooden implement for striking ball (esp. in cricket); batsman. वाघूळ; खेळण्याची बॅट; बॅटनें खेळणारा. *Wild bat*= वडवाघूळ. Bătty, *a.* वडवाघुळाचा, वडवाघुळासारखा. Băt-fowling, *n.* रात्रीं विसांवा घेत असलेल्या पक्ष्यांची पारध. *v. i.* & *t.* to use bat, to have innings. बॅटनें खेळणें. Băts'man, *n.* बॅटनें खेळणारा. Băt'ting, *n.* चेंडूफळीनें खेळणें.

Băt, *n.* (बॅट्)—pace of stroke or step. मारण्याचा वेग, चालण्याची गति. *To bat round*, *v. i.* to have a good time; go from place to place in quest of pleasure. सुयोग असणें; सुखशोधार्थ जागोजाग फिरणें.

Bătch, *n.* (बॅच्)—loaves baked at a time; group, collection of things. पावांची भट्टी; टोळी, वस्तुसमुदाय. Bătch-cake, Bătch-loaf= a small loaf. लहान पाव.

Bāte, *v. t.* & *i.* (बेट्)—let down; fall off in force; restrain; deduct. उतरणें; जोर कमी होणें; नियमन करणें; वजा करणें. *n.* rage. राग, आवेश, गुस्सा. (*Also* Bait)

Bateau', *n.* (बॅटो')—a light broad and flat river-boat used in French Canada. फ्रेंच कानडांतील हलकी रुंद व सपाट नदींतील नाव. (*pl.* Bateaux, बॅटोझ्)

Băth, *n.* (बाथ्)—washing, immersion; vessel or place for bathing in; order of knight-

hood; (*pl.* बाद्स्) bathing-place. स्नान, धुणें; नहाणी, स्नानाची जागा; इंग्लंडांतील सरदाराची एक मोठी पदवी; स्नानगृह, स्नानाची जागा. *v. t.* give a bath to. स्नान घालणें. *Air-bath*, exposure of naked body to air. स्वच्छ हवेचें स्नान. *Sun-bath*, उन्हाचें स्नान. *Bath of blood*=carnage. कत्तल. K. B.=Knight of the Bath; also K. G. C. B.=Knight of the Grand Cross of the Bath.

Bäth'-brick, *n.* (बा'थ्-ब्रिक्)—a preparation for cleaning metal. सुऱ्या, कातऱ्या वगैरे साफ करण्याकरितां तयार केलेलें (जस्त व तांबें यांचें समान) मिश्रण.

Bäth'-chair, *n.* (बा'थ्-चेअर्)—wheeled chair for an invalid. जाया झालेल्या माणसाकरितां एक चाकें असलेली खुर्ची.

Bäth'-stone, *n.* (बा'थ्-स्टोन्)—a stone quarried at Bath for building purposes. बाथ नांवाच्या इंग्लंडच्या पश्चिमेकडील शहरांत असलेल्या खाणींतील इमारतीचा दगड.

Bāthe, *v. t. & i.* (बेद्)—immerse in water, etc.; moisten all over; take a bath; envelop. पाण्यांत वगैरे बुडविणें; आंघोळ करणें; सर्वांग ओलें होणें; वेष्टणें. *n.* bathing. स्नान. Bāther, *n.* आंघोळ करणारा. Bāthing machine, *n.*—a wheeled dressing-box for sea-bathing. पाण्यांत नेतां येण्याजोगी झांकलेली गाडी.

Băthŏ'mĕtor, *n.* (बॅथॉ'मिटर्)—a spring balance used in ascertaining the depth of water. पाण्याची खोली मोजण्याचें यंत्र, जलवेधमापन यंत्र.

Bā'thŏs, *n.* (बे'थॉस्, बॅ'थॉस्)—fall from sublime to ridiculous; anti-climax; performance absurdly below occasion. बोलतांना किंवा लिहितांना क्रमाक्रमानें मोठ्या महत्त्वाच्या गोष्टीवरून हास्यास्पद गोष्टीवर येणें; सारप्रतिलोमालंकार; प्रसंगाला अत्यंत अनुचित अशी कृति.

Băt'man, *n.* (बॅ'ट्-मन्)—officer's or warrant-officer's servant. वॉरंट बजावणाऱ्या अधिकाऱ्याचा नोकर.

Băt'on, *n.* (बॅ'टन्)—staff of office; conductor's wand for beating time. अधिकारदंड; ताल धरण्याची काठी.

Batrā'chĭan, *a.* (-k-, बॅट्रे'किअन्)—of frogs or other animals that discard gills and tail. बेडकांचा किंवा तत्सदृश प्राण्यांचा. *n.* an animal that discards gills and tail. बेडकाच्या जातीचा प्राणी.

Battăl'ion, *n.* (बटॅ'ल्यन्)—a large body of men in battle-array; a body forming part of regiment. पलटण; सैन्याची तुकडी, पायदळाची तुकडी.

Bătt'els, *n. plu.*(बॅ'टल्स्)—college account at Oxford for board and provisions supplied, or for all college expenses. ऑक्सफर्ड येथील कॉलेजांतील खर्चाचा सर्व हिशोब.

Bătt'en, *n.* (बॅ'टन्)—a long piece of wood used for flooring; a plank; one of the slips of wood used to keep a tarpaulin close over a hatchway. लांब फळीचा तुकडा, रीफ; फळी; गलबताच्या मजल्यावरील ताडपत्री घट्ट बसण्याकरितां लावलेल्या लांकडाच्या चिपेपैकीं एक. *v. t.* strengthen or fasten with battens. चिपेनें किंवा पट्टीनें घट्ट जोडणें. *v. i.* to feed; to grow fat. खाऊं घालणें; लठ्ठ होणें.

Bătt'er, *v. t. & i.* (बॅ'टर्)—strike repeatedly so as to bruise or break; criticize severely. इजा होईपर्यंत किंवा तुटेपर्यंत मारणें; कडक टीका करणें. *n.* a mixture of several ingredients beaten together with some liquid and used in cookery; defect in printing type or stereotype plate. अंडीं, पीठ, दारू वगैरेचें मिश्रण; टाइपावर किंवा टाइपाच्या तोंडावर आलेला खोंगा. Battering ram, *n.* ancient military engine for battering down walls (consisting of a large beam having an iron head resembling that of a ram). आघातांनीं भिंती पाडण्याचें किंवा किल्ला फोडण्याचें यंत्र.

Bătt'ery, *n.* (बॅ'टरि)—set of guns with their men and horses; platform for guns; apparatus for storing electricity; infliction of blows or menacing touch to clothes or person. तोफांची तुकडी; तोफखाना; विजेची बॅटरी; मारहाण करणें, मारा, कायद्याविरुद्ध केलेला हल्ला. To change one's battery=हल्ला करण्याची दिशा बदलणें, मोर्चा फिरवणें.

Băt'tle, *n.* (बॅ'टल्)—combat (esp. of organized forces). युद्ध. *v. i.* struggle with or against. युद्ध करणें, झगडणें. A drawn *battle*=दोन्ही पक्षांची बरोबरी झालेली लढाई. A pitched battle=व्यूहबद्ध सेनेची लढाई. A good beginning is half the battle=चांगला आरंभ करणें म्हणजे अर्धी लढाई जिंकणें (जय मिळविणें) होय. To give, join or do battle=युद्ध करणें. To raise the battle-cry=रणशब्द उच्चारणें, सिंहनाद करणें.

Bă'ttle-āxe, *n.* (बॅ'टल्-अॅक्स्)—an axe anciently used as a weapon of war. युद्धपरशु.

Bă'ttle-cruiser, *n.* (बॅ'टल्-क्रूझर्)—a heavy gunned ship of higher speed and lighter armour than battle-ship. साध्या लढाऊ जहाजापेक्षां जास्त गतीचें व हलकें चिलखत व मोठ्या तोफा असलेलें जहाज, क्रूझर.

Băt'tledōre, *n.* (बॅटल्-डोअर्)—a wooden instrument used in washing; a bat for striking shuttlecock, a racket. एक धुण्याचें लांकडी साधन; पिच्छकंदुक खेळांतील बॅट, रॅकेट. Battledore and shuttlecock=एक प्रकारचा पिच्छकंदुक खेळ.

Băt'tle-ment, *n.* (usu. in *pl.*) (बॅटल्-मेन्ट्)—indented parapet. जंग्यांची भिंत, जंगी. Battlemented, *a.* जंग्यांची भिंत आहे असा.

Băt'tle-piece, *n.* (बॅटल्-पीस्)—a picture or literary description of a battle scene. युद्धांतील देखाव्याचें एखादें चित्र किंवा वर्णन.

Băt'tle-plāne, *n.* (बॅटल्-प्लेन्)—a large fighting aeroplane. एक मोठें लढाऊ विमान.

Băt'tle-shĭp, *n.* (बॅटल्-शिप्)—a ship armoured for regular engagement. लढाऊ जहाज.

Battue', *n.* (bătoo, बॅटू')—driving away of game by beaters to sportsmen's station; battue shooting party; wholesale slaughter. पारध साधण्याकरितां केलेला पशुपक्ष्यांचा पाठलाग; शिकारी लोक; सरसहा कत्तल. [*Fr. battre*, to beat]

Bau'ble, *n.* (बॉबल्)—showy trinket; a trifle. मुलामी वस्तु, मुलामाचें नकली खेळणें; क्षुल्लक गोष्ट.

Baulk, See Balk.

Baw'bee, *n.* (बॉ'बी)—a half-penny. अर्धी पेनी (एक नाणें).

Bawd, *n.* (बॉड्)—a procuress, a pander; obscene talk. कुंटीण; बीभत्स भाषण.

Baw'dy̆, *a.* (बॉ'डि)—obscene. बीभत्स. A bawdy-house=a brothel. कुंटणखाना, वेश्यागृह.

Bawl, *v. t. & i.* (बॉल्)—speak noisily. ओरडणें.

Bay, *n.* (बे)—a kind of laurel with deep green leaves; (*plu.*) conqueror's or poet's bay wreath; a part of the sea filling wide-mouthed opening of land; recess in mountains; bark of a large dog; a reddish-brown horse; division of a wall between columns or buttresses; space added to room by advancing window from wall line. हिरवींगार पानें असलेलें झाड; विद्वत्तेची कीर्ति, जयचिन्ह; उपसागर; पर्वतांतील एकांतस्थान; मोठ्या कुत्र्याचें भोंकणें; उदी रंगाचा घोडा; खांबांनीं किंवा इतर कोणत्या कारणांनीं झालेला भिंतीचा किंवा छपराचा खण; वाढलेला खोलीचा भाग. *a.* reddish-brown. पिंगट. *At bay*=so hard pressed by enemies as to be compelled to turn round and face them. शत्रु अत्यंत जवळ आला असतांना पळतां येणें अशक्य आहे अशा वेळीं नाइलाजास्तव त्याच्याशीं सामना करण्याच्या स्थितींत. *v. t. & i.* to bark, to bark at. भोंकणें, तुटून पडणें. To bay the moon=चंद्रावर भुंकणें, बलाढ्य शत्रूशीं सामना करणें. To bring to bay=पाठीस लागून सामना देणें भाग पाडणें. To hold or keep at bay=सावजाचा पाठलाग करून त्यास सामना देण्यास लावणें. To stand or be at bay=come to close quarters with. नाइलाजास्तव सामना देण्यास तयार असणें.

Bāy'bĕrry̆, *n.* (बे'-बेरि)—the fruit of a West-Indian tree. दालचिनी.

Bay'ŏnĕt, *n.* (बे'ऑ-निट्)—a stabbing blade attached to a rifle. संगीन. *v. t.* to stab with a bayonet. संगिनीनें मारणें.

Bay'rŭm, *n.* (बे'रम्)—a perfume distilled from bayberry leaves. दालचिनीचा अर्क.

Bay'salt, *n.* (बे'सॉल्ट्)—salt got from sea-water by evaporation. समुद्राचें मीठ.

Bay'wĭndow, *n.* (बे'-विन्डो)—a window which projects outwards so as to form a kind of bay or recess within. भिंतीच्या बाहेर असलेली खिडकी.

Bazaar, *n.* (बझा'र्)—an Oriental market; a fancy fair. बाजार; मौजेचा बाजार.

Bē, *v. i.* (बी)—exist, occur; remain, continue; have a certain state or quality. अस्तित्वांत असणें, घडणें; चालू राहाणें; होणें, अमुक एक स्थितींत असणें.

Beach, *n.* (बीच्)—sandy or pebbly shore of sea, shore between high and low water-mark; water-worn pebbles. समुद्रकिनारा; पुळण, रेताड जमीन. *v. t. to run* (*boat or ship*) ashore, haul up. किनाऱ्याच्या रेतींत जहाज घालणें.

Beach cŏm'ber, *n.* (-ōmer, बीच्-कों'मर्)—a long rolling wave; a white man (in Pacific Islands, etc.) who lives by collecting jetsam. किनाऱ्यावर आदळणारी मोठी लाट; पॅसिफिक बेटांतील वादळांत गलबतांतून पाण्यांत फेंकलेला माल काढून उपजीविका करणारा मनुष्य.

Beac'on, *n.* (बी'कन्)—signal-fire on hill or pole; signal; signal-station; lighthouse; guide or warning. भयसूचक दीप; खूण, इशारा; भयसूचक दिवा असलेलें ठिकाण; दीपस्तंभ; मार्गदर्शक खूण, भयाची सूचना. *v. t.* give light to, guide; supply with beacons. मार्ग दर्शविणें; दीपस्तंभाची व्यवस्था करणें.

Bead, *n.* (बीड्)—small ball pierced for threading with others; a small knob in front sight of a gun; moulding like row of beads. (लांकडाचा किंवा कांचेचा) मणी; बंदुकीची माशी; मण्यांच्या माळेसारखें ओतकाम. *v. t.* furnish with beads; string together. मणी घालणें; एकत्र गुंफणें. *To tell one's beads*=जप करणें,

जपमाळ ओढणें. *To draw a bead on*=to take aim at. नेम धरणें.

Bead'ing, *n.* (बीं'डिंग्)—bead moulding. मण्यासारखा फंगोरा.

Bea'dle, *n.* (बीं'डल्)—parish officer, church or court officer; mace-bearer. ख्रिस्ती देवळांतील शिपायासारखा अधिकारी; कोर्टांतील नांवें पुकारणारा अधिकारी, गदाधारी, चोपदार.

Bea'dledom, *n.* (बीं'डल्-डम्)—stupid officiousness. पुढें पुढें करण्याची मूर्ख संवय, नाचरेपणा

Bead'-roll, *n.* (बीं'ड्-रोल्)—a list of names, a long series (of persons to be prayed for). (ज्या लोकांकरितां जप करावयाचा त्यांच्या) नांवाची यादी, लांब मालिका.

Beads'man, *n.* (बीं'ड्झ्-मन्)—pensioner bound to pray for benefactor, almsman. हितकर्त्याकरितां ईश प्रार्थना करणारा भिक्षुक, जपकरी.

Bea'dy̆, *a.* (बीं'डि)—(of eyes) bright and small; covered with beads or drops. लहान पण तेजस्वी; मण्यांनीं किंवा थेंबांनीं भरलेला.

Bea'gle, *n.* (बीं'गल्)—a small smooth-haired hanging-eared hound (used in hare-hunting); spy; bailiff. एक जातीचा लहान शिकारी कुत्रा; गुप्त पोलीस, हेर; बेलीफ.

Beak, *n.* (बीक्)—a bird's bill; a hooked nose; projection at prow of ancient warship; a spout; (Sl.) a magistrate. पक्ष्याची चोंच; चोंचेसारखें नाक; जहाजाच्या नाळेकडील अणीदार भाग; तोटी, नळी; (मुलकी किंवा फौजदारी) न्यायाधीश.

Beak'er, *n.* (बीं'कर्)—a large drinking cup; a lipped glass for experiments पिण्याचा मोठा प्याला; अपकारा.

Beam, *n.* (बीम्)—long piece of squared timber supported at each end; ray of light or of electric radiation; bar of balance; horizontal cross-timbers of a ship; radiance, bright look, smile. वहाल; किरण; तराजूची दांडी; जहाजाचे आडवे दांडे; तेज, तेजस्वी मुद्रा, हास्य. *v. t. & i.* emit light, shine; look radiantly upon. किरण पाडणें, प्रकाशणें; टवटवणें, तेज पाडणें. *To kick the beam*, to prove the lighter, be defeated. जास्त हलकें होणें, पराभूत होणें. *On her beam-ends*, on her size, almost capsizing (fig. in danger, at a loss). अगदीं बाजूवर, उलटण्याच्या बेतांत, संकटावस्थेंत. *Beam system*, wireless tele-graphy in which a short-wave beam is projected undispersed by reflection from a parabolic mirror. बिनतारायंत्र संदेश पद्धति.

Bea'my̆, *a.* (बीं'मि)—radiant; huge; broad (of ships). तेजस्वी; प्रचंड; रुंद (गलबत).

Bean, *n.* (बीन्)—plant with kidney-shaped seed in long pods; seed of coffee and other plants. द्विदल धान्य, फळद्रूप, घेवडा; कॉफीचें बीं. *Full of beans, bean-fed*, in high spirits. पाणीदार, तेजस्वी (घोडा). *Old bean*, a familiar term of address to a parent, etc. आईबापाला हांक मारण्याची एक विशिष्ट पद्धति. *To give one beans*, (Sl.) to punish or scold. शिक्षा करणें, खरडपट्टी काढणें. Every bean has its black=प्रत्येकामध्यें कांहींतरी व्यंग असतेंच. He has found the bean in the cake=त्याला अवचित पैशाचा लाभ झाला. He knows how many beans go to make five=तो कांहीं केल्या फसावयाचा नाहीं.

Bea'n-feast, *n.* (बी'न्-फीस्ट्)—employer's annual dinner to work-people, fete, merry time आपल्या हाताखालच्या कामकरी लोकांस मालकानें दिलेलें वार्षिक भोजन.

Bea'nō, *n.* (बीं'नो)—any frolicsome enjoyment. खुशालीखुशाली, मौज, चैन.

Bear, *n.* (बेअर्)—heavy thick-furred quadruped; rough surly person; speculation for a fall in price of stocks. अस्वल; आडमुठ्या खाष्ट माणूस; स्टॉकच्या किंमती उतरण्याचा सट्टा. *v. t. & i.* carry or support; endure, tolerate; give birth to; produce, yield. नेणें, धारण करणें; सोसणें, सहन करणें; जन्म देणें; उत्पन्न करणें. [Past tense, *bore* (बोअर्); pp. *borne* (बोअर्न्). *Born* is the passive participle in the sense of 'brought forth by a female', as, the child was *born*; but we say actively, she has *borne* a child. *Born* is also used attributively, *borne* not so used]. *To bear down*= to overcome by force. खालीं दडपणें, चेपणें. *To bear out*, to give support or countenance, to establish, to justify. सत्यता प्रस्थापित करणें, पाठिंबा देणें. *To bear up*, to support. आधार देणें, पाठिंबा देणें. *To bear a hand*, to lend aid, to give assistance. मदत करणें. *To bear in mind*, to remember. लक्षांत ठेवणें. *To bear up*, to have fortitude, to be firm, not to sink. धैर्य धरणें, खंबीर असणें, मन खचूं न देणें. *To bear with*, to tolerate. सोसणें, सहन करणें. To bear witness or testimony= साक्ष देणें. To bear away=(बक्षीस),जिंकून नेणें. *To bear out*, to corroborate. समर्थन करणें. To bear (any one) company=सोबत करणें. To béar one'self (*i. e.* behave) well= नीट रीतीनें वागणें. Borne on the books of= paid by. देऊन टाकलेलें. *To bear hand upon*, to oppress. त्रास देणें. To bring to bear upon=वर अंमल करवणें.

Bear'able, *a.* (बे'अरेबल्)—that can be borne, tolerable, endurable. सह्य, सहन करण्याजोगा. Bear'ably, *adv.*

Bear'-baiting, *n.* (बे'अर्-बे-टिंग्)—the sport of baiting bears with dogs. कुत्र्यांकडून अस्वलांना त्रास देण्याचा एक मार्ग.

Beard, *n.* (बिअर्ड्)—hair of the lower part of the face; awn of grass. दाढी ; कूस. *v.t.* oppose openly, defy. आव्हान देणें, तुच्छ लेखणें. (E. g. *Beard* the lion in his den). Beard'ĕd= दाढीवाला. Beard'less, *a.* youthful. दाढी न फुटलेला, तरुण.

Bear'er, *n.* (बे'अरर्)—bringer of a letter, etc; presenter of cheque; domestic servant. पत्रें वगैरे आणणारा ; चेक हजर करणारा ; घरचा किंवा खासगी नोकर.

Bear'-gärden, *n.* (बे'अर्-गार्डन्)—a place in which bears were kept for sport; a place of disorder or tumult. अस्वलांचा बाग ; बाजारवाडा.

Bear'ing, *n.* (बे'अरिंग्)—behaviour; relation, aspect; direction, relative position. वर्तणूक ; संबंध ; कल, रोख. To lose one's bearings=मन गोंधळून जाणें. To bring one to his bearings=एखाद्याला ताळ्यावर आणणें.

Bear'ing-rein, *n.* (बे'अरिंग्-रेन्)—the rein by which the head of a horse is held up in driving. घोड्याची मान ओढून धरण्याची लगाम.

Bear'ish, *a.* (बे'अरिश्)—partaking of the qualities of a bear. अस्वलासारखा.

Bear's'-grease, *n.* (बे'अर्स्-ग्रीस्)—the fat of a bear or some other animal used for promoting the growth of the hair; pomade. केंसवाढीकरितां उपयोगांत आणली जाणारी अस्वलाची चरबी ; केसांना लावण्याचें घट्ट तेल, पोमेड.

Bear'skin, *n.* (बे'अर्-स्किन्)—the tall fur cap worn by certain British soldiers. कांहीं ब्रिटिश सैनिकांची उंच अशी केंसांची टोपी.

Bear'ward, Bear'-leader, *nn.* (बे'अर्-वॉर्ड्, बे'अर्-लीडर्)—the keeper of a bear; a travelling tutor. अस्वलाच्या खेळावर पोट भरणारा, दरवेशी ; प्रवासरक्षक.

Beast, *n.* (बीस्ट्)—animal, quadruped; brutal man. पशु, चतुष्पाद प्राणी ; पशुतुल्य मनुष्य, निष्ठुर मनुष्य. Beast of burden= ओझ्याचें जनावर. *Beast of prey, wild beast*= जंगली जनावर, श्वापद.

Beast'lĭness, *n.* (बी'स्ट्-लि-नेस्)—brutality, coarseness, filthiness. पशुवृत्ति, निर्दयपणा, ओंगळपणा.

Beast'lȳ, *a.* (बी'स्ट्-लि)—bestial, brutal; dirty, disgusting. पशुतुल्य, क्रूर ; घाणेरडा, तिरस्कार येण्याजोगा.

Beat, *v. t. & i.* (बीट्)—strike repeatedly; flog or whip; hammer metal; defeat; overcome; mark (time, etc.) with regular strokes. मारणें ; चाबकानें मारणें ; घाव घालणें, ठोकणें ; पराभव करणें ; ताल धरणें. *n.* stroke on drum; measured sequence of strokes; throbbing धाप ; ताल ; नाडी उडणें, ठोका. To beat the breast=ऊर किंवा छाती बडवणें. *To beat black and blue*=काळा निळा होईपर्यंत मारणें. *To beat the air*, to strive in vain. व्यर्थ प्रयत्न करणें. To beat at door=to knock loudly. जोरानें दरवाजा ठोकणें. To beat a path or track=वर्दळीनें नवीन रस्ता पाडणें. *To beat hollow*, to beat easily. सहज रीतीनें पाडाव करणें. He beats cockfighting, *i. e.* he is extremely exhilarating. तो अत्यंत आनंदांत आहे. To beat down price or seller to cheapen or bargain with. किंमत उतरून पाडणें. *To beat about the bush*, to approach any subject slowly, shilly-shally. द्राविडी प्राणायाम करणें, निष्कारण पाल्हाळ लावणें. To beat up (recruits, etc.)=to collect. (लष्करांत भरती करण्याकरितां नवीन लोक) गोळा करणें. *To beat up the quarters of*, to visit. एखाद्याला जाऊन भेटणें. *To beat one's brains*, to search for ideas. कल्पना शोधून काढणें. *To beat parley*, to propose terms. अटी सुचविणें. To beat a retreat=to retire. माघार घेणें. *To beat time*, to regulate time in music by the motion of the hand or foot or something else. ताल धरणें.

Beat'er, *n.* (बी'टर्)—a man employed to rouse game; implement for beating flat. पारध्याकरितां सावज कचाट्यांत आणणारा माणूस ; कांडण्याचें मुसळ.

Bēătĭf'ic, *a.* (बीॲटि'फिक्)—making blessed. सुखकारक.

Bēăt'ifȳ, *v. t.* (बि-ॲ'टि-फाय्)—make supremely happy or blessed. अत्यंत सुखी करणें, परमानंद देणें. Beatifica'tion, *n.*

Bēăt'itūde, *n.* (बिॲ'टि-ट्यूड्)—blessedness, felicity of the highest kind; consummate bliss. आनन्द, परमसुख.

Beau, *n.* (बो)—(*pl.* Beaux=बोझ्) a man who is fond of fine dress, fop; a lover, a male sweet-heart. नखरेबाज मनुष्य, छानछोकी ; प्रेम करणारा.

Beau Idé'al, *n.* (बो आय्-डि'अल्)—one's highest type of excellence or beauty. उत्कृष्ट गुण, उत्कृष्टपणाची परमावधि, सौंदर्याचा पुतळा.

Beau'tēous, *a.* (बू-, ब्यू'टि-अस्)—endowed with beauty, fair, very handsome. सौंदर्यानें युक्त, सुंदर, सुस्वरूप, देखणा.

Beau'tifier, *n.* (ब्यू'टि-फायर्)—a thing that beautifies, one that makes beautiful. शोभादायक वस्तु, सुशोभित करणारा.

Beaut'ĭful, *a.* (ब्यू'टि-फुल्)—highly pleasing (to the eye, ear or the mind), having beauty; capital, excellent. सुंदर, सौंदर्यवान; मुख्य, अत्युत्तम, उत्कृष्ट.

Beauti'fy̆, *v.t.* (ब्यू'टि-फाय्)—make beautiful, to adorn, grace. सुशोभित करणें, शोभविणें, शोभा आणणें.

Beau'ty̆, *n.* (ब्यू'टि)—combination of qualities that delight the sight or mind; person or thing possessing this beauty. सौंदर्य; सुंदर मनुष्य किंवा वस्तु. *Beauty is but skin deep*, one cannot judge by appearances. बाह्य स्वरूपावरून परीक्षा करणें शक्य नाहीं. *That's the beauty of it*, that is the particular point that gives satisfaction. हीच विशेष समाधानाची गोष्ट.

Beau'ty̆-sleep, *n.* (ब्यू'टि-स्लीप्)—sleep before midnight. मध्यरात्रीपूर्वीची झोंप.

Beau'ty̆-spŏt, *n.* (ब्यू'टि-स्पॉट्)—a patch placed on the face of a woman to heighten beauty; a beautiful scene. तीट, सौंदर्य-तिलक; सुंदर देखावा.

Beav'er, *n.* (बी'व्हर्)—amphibious broad-tailed soft-furred rodent; the fur of rodent quadruped; a hat made of the fur; the lower face-guard of a helmet. एक जल-स्थलचर प्राणी; त्या प्राण्याची लोंकर; त्या लोंकरीची टोपी; शिरस्त्राणाचा खालचा भाग, मुखत्राण.

Becall', *v. t.* (kawl, बिकॉ'ल्)—call (person) names. नांवें ठेवणें.

Becalm', *v. t.* (-ăm, बि-का'म्)—make calm or quiet. शांत करणें.

Bécāme', *past tense* of Become.

Bécause', *adv.* (बि-कॉ'झ्)—by reason. कारणानें, मुळें. *conj.* for the reason that, inasmuch as, since. ज्याअर्थी, कारण. Because of= कारितां, साठीं,

Bĕck, *v. t.* & *i.* (बेक्)—beckon. हातानें किंवा मानेनें खूण करणें. *n.* significant nod or gesture; brook, mountain-stream. हाताची किंवा मानेची खूण, इशारत; लहान ओढा, नाला. *At one's beck, At one's beck and call*=of entire dominion and obedience. पूर्ण हुकुमांत, पूर्ण कह्यांत, अर्ध्या वचनांत.

Bĕ'ckit, *n.* (बे'किट्)—(Naut.) a contrivance for securing loose ropes, tackle, or spars. सुट्या दोऱ्या एकत्र घट्ट ठेवण्याचें साधन.

Bĕck'on, *v. i.* & *t.* (बे'कन्)—make mute signal; summon by signal. न बोलतां खूण करणें; खूण करून बोलावणें.

Bécloud', *v. t.* (बि-क्लाउ'ड्)—cover with clouds; darken, obscure. मेघाच्छादित करणें; मलिन करणें, निस्तेज करणें.

Bécome, *v. t.* & *i.* (-ŭm, बि-कम्)—come to be, begin to be; suit, befit, look well on. होणें, बनणें; साजणें, शोभणें. What has *become of* (*i. e.* happened to) him? त्याला काय झालें?

Bécom'ing, *a.* (बि-क'मिंग्)—fit, suitable, proper; graceful. योग्य, साजेसा; शोभणारा.

Bécom'ingly, *adv.* (बि-क'मिंग्लि)—suitably; gracefully. योग्य रीतीनें; शोभेसा, साजेसा.

Bĕd, *n.* (बेड्)—a couch to sleep on; an animal's resting-place, litter; a flat base on which a thing rests; garden plot for plants; bottom of sea, river, etc.; stratum. बिच्छाना; गुरांकरितां केलेला गवताचा बिच्छाना; बैठक; (बागेचा) वाफा; (नदीचें) पात्र, तास; थर. *v. t.* prepare bed for; plant in a bed. बिच्छाना घालणें; झाड लावणें, रुजत घालणें. *Bed and board*, entertainment; connubial relations. मेजवानी, पाहुणचार; वैवाहिक संबंध. *Narrow bed*, the grave. थडगें. *Bed of down*, or *flowers*, or *roses*, easy position. सुखकारक जागा, सुखाची स्थिति. *Bed of sickness*, invalid state. अशक्तपणा *Brought to bed*, in child-birth. बाळंत, प्रसूतिदशेंत. *To die in one's bed*, to die of natural causes. स्वाभाविक कारणांनीं मरणें. *To go to bed*, to retire for the night. निजावयास जाणें, निजणें. *To take to one's bed*, to become ill. आजारी पडणें *To keep one's bed*, to be ill. आजारी असणें. *To make the bed*, to arrange the coverings of a bed. बिच्छाना घालणें, गादी घालणें. *To lie in the bed one has made*, to take consequences of one's acts. जसें करावें तसें भरावें लागणें, आपलें आपल्याला निस्तरावें लागणें. *Got out of bed on the wrong side*, is bad-tempered for the day. तात्पुरता रागावलेला.

Bĕdăb'ble, *v. t.* (बिडॅ'बल्)—to splash with liquid, to sprinkle. शिंपडणें.

Bĕdaub', *v. t.* (बिडॉ'ब्)—to smear with paint, etc. रंग वगैरे फांसणें, सारवणें.

Bĕd'-chāmber, *n.* (बे'ड्-चेम्बर्)—a bedroom. निजावयाची खोली, शयनगृह.

Bĕd'clothes, *n. pl.* (बे'ड्-क्लोद्झ्)—sheets, blankets, pillows etc. for the bed. चादर, पांघरुणें वगैरे.

Bĕd'dĭng, *n.* (बे'डिंग्)—mattress and bed-clothes. बिच्छाना.

Bĕdeck', *v. t.* (बि-डे'क्)—adorn, grace. सुशोभित करणें, शोभा देणें.

Bē'del, *n.* (बी'डल्)—an official (at Oxford and Cambridge) with duties chiefly processional. मिरवणुकीसंबंधींची व्यवस्था करणारा (ऑक्स्फर्ड आणि केंब्रिज येथील) अधिकारी.

Bēdĕv'ĭl, *v. t.* (बिडे'व्हिल्)—to treat very cruelly; bewitch. अतिशय क्रूरपणानें वागवणें; चेटुक करणें, भुरळ घालणें.

Bēdĕv'ĭlment, *n.* (बिडे'व्हिल्मेन्ट्)—maddening trouble or confusion. भयंकर गोंधळ.

Bēdew', *v t.* (बि-ड्यू')—cover with drops, moisten. ओला करणें, दंवानें भिजवणें.

Bĕd'-fĕllow, *n.* (बे'ड्-फेलो)—a sharer of the bed, associate. अंथरुणांतला सोबती किंवा सोबतीण.

Bedĭm', *v. t.* (बि-डि'म्)—make dim. अंधुक करणें.

Bĕd'păn, *n.* (बे'ड्-पॅन्)—an invalid's chamber utensil for use in bed. आजारी मनुष्याचें मलपात्र, शौचतस्त.

Bĕd'plāte, *n.* (बे'ड्-प्लेट्)—metal plate forming the base of a machine; garden plot filled with plants; bottom of sea, river, etc. यंत्राची किंवा इतर सांगाड्याची तळची बैठक; लहान झाडांनीं भरलेला बागेचा भाग; समुद्राचा किंवा नदीचा वगैरे तळ.

Bĕd'pōst, *n.* (बे'ड्-पोस्ट्)—the post of a bedstead. पलंगाचा खूर, मच्छरदाणीच्या चौकटीचा पाय. *Between you and me and the bedpost*, in confidence. खासगी रीतीनें, आपल्यांतच. *In the twinkling of a bedpost*, अगदीं शक्य तेवढ्या त्वरेनें.

Bēdră'bbled, *a.* (बिड्रॅ'बल्ड्)—dirty with rain and mud. पाऊस व चिखल यानें घाणेरडा झालेला.

Bēdră'ggle, *v. t.* (बिड्रॅ'गल्)—to soil by drawing along on mud. ओल्यावर किंवा चिखलांत ओढून मळवणें.

Bēdī'zen, *v. t.* (बिडा'इ-झन्)—to dress out gaudily. भपकेबाज किंवा रंगेल पोषाख करणें.

Bĕd'lam, *n.* (बे'ड्-लॅम्)—a mad-house, an hospital for lunatics; a place or scene of uproar. वेड्यांचें इस्पितळ; दंग्याचें माहेरघर.

Bĕd'lămīte, *n.* (बे'ड्-लॅ-माइट्)—a lunatic, a madman. वेडा, दिवाणा मनुष्य.

Bĕdouin', *n.* (-ōō-ēn, बेडुईन्)—Arab of the desert; gipsy. पाठीवर बिऱ्हाड घेऊन फिरणारे अरब लोक; जिप्सी, काळा माणूस.

Bĕd'-rĭdden, *a.* (बे'ड्-रिडन्)—confined to bed by age or infirmity. अंथरुणाला खिळलेला. (*Also*, Bedrid).

Bĕd'-rock, *n.* (बे'ड्-रॉक्)—a solid rock below superficial formations; (*fig.*) foundation, bottom. बाहेरील भागाच्या खालील भरींव दगड; पाया, तळ.

Bĕd'-room, *n.* (बे'ड्-रूम्)—a room for sleeping in. निजण्याची खोली.

Bĕd'-spread, *n.* (बे'ड्-स्प्रेड्)—a coverlet. चादर, पलंगपोस.

Bĕd'-stead, *n.* (बे'ड्-स्टेड्)—a frame for supporting a bed. खाट, पलंग, बाज, माचा.

Bĕd'straw, *n.* (बे'ड्-स्ट्रॉ)—kinds of plant. गादींत घालावयाचें गवत.

Bĕd'-tick, *n.* (बे'ड्-टिक्)—a large bag of feathers etc. for bed. पलंगांकरितां केलेली एक मोठी पिसांची पिशवी.

Bee, *n.* (बी)—a social insect producing wax and honey; a busy worker. भुंगा, भ्रमर; सतत उद्योग करणारा मनुष्य.

Beech, *n.* (बीच्)—a smooth-barked glossy-leaved tree; wood of the tree. एक प्रकारचा वृक्ष; बीच वृक्षाचें लाकूड.

Beech'en, *a.* (बी'चन्)—of the wood or bark of the beech. बीच वृक्षाच्या झाडाचा किंवा सालीचा.

Beech'-măst, *n.* (बी'च्-मास्ट्)—the mast or nuts of the beech-tree. बीच झाडाची बोंड-कांटी, बीच झाडाचीं फळें.

Beef, *n.* (बीफ्)—flesh of ox, bull or cow. गोमांस.

Beef'-eater, *n.* (बी'फ्-ईटर्)—a yeoman of the royal guard of England. राजाचे स्वयंसेवक घोडेस्वार.

Beef'-steak, *n.* (बी'फ्-स्टीक्)—a slice of beef. गोमांसाचा तुकडा.

Beef'-tea, *n* (बी'फ्-टी)—a stewed beef juice for invalids. गोमांसाचा रसा.

Beef'ȳ, *a.* (बी'फि)—like beef, solid, muscular. भरींव, मांसल.

Been, *past participle* of the verb Be.

Bee'-hīve, *n.* (बी'हाइव्ह्)—house for bees. मधमाशांचें पोळें.

Bee'līne, *n.* (बी'लाइन्)—the direct line or nearest distance between two places. अगदीं जवळचा मार्ग, दोन स्थळांमधील अगदीं जवळचें कमींत कमी अंतर.

Bee'-master, *n.* (बी'-मास्टर्)—the keeper of bees. मधमाशा राखणारा मनुष्य.

Beer, *n.* (बिअर्)—alcoholic liquor. एक प्रकारची दारू *To think no small beer of*, to have high opinion of. ॰च्या विषयीं फार चांगलें मत असणें.

Beer'-house, *n.* (बि'अर्-हाउस्)—a house licensed for beer but not for spirits. बिअरचें दुकान, बिअरचा पिठा.

Beer'-money, *n.* (बि'अर्-मनि)—allowance in lieu of beer. (लष्करी शिपायांना) बिअरच्या ऐवजीं दिलेला पैसा.

Beer'ȳ, *a.* (बि'अरि)—betraying influence of beer, intoxicated. बिअरचा अंमल असलेला, झिंगलेला.

Bees'tings, *n. pl.* (बीं'स्टिंग्झ्)—first milk of cow after purturition. गाय व्याल्यानंतर पहिल्यानें काढलेलें दूध.

Bee's'-wăx, *n.* (बीं'झ्-वॅक्स्)—the wax collected by bees for comb. मधमाशांनीं जमविलेलें मेण.

Bees'wing, *n.* (बीं'झ्-विंग्)—second crust in long-kept port; old wine. पुष्कळ दिवस ठेवलेल्या दारूवरील खुरशी; जुनी पोर्ट दारू.

Beet, *n.* (बीट्)—kinds of plant with root (used for sugar-making etc.). ज्याच्यापासून साखर तयार होते असें मुळ्या असलेलें झाड, एक जातीची मुळ्यासारखी भाजी.

Bee'tle, *n.* (बीं'टल्)—a kind of insect; a heavy headed tool (for ramming, crushing etc.). एक प्रकारचा किडा; (दगड किंवा खडी ठोकण्याकरितां) एक जड हत्यार, मोगरा. *v. i.* beat with beetle; to overhang, to jut. मोगरीनें ठोकणें, ठोकण्याच्या यंत्रांत घालून साफसफाई करणें; पुढें येणें. *a.* projecting; shaggy; scowling. पुढें आलेला; लांब रांठ केंस असलेला; कपाळाला आंठ्या पडलेला, रागीट. *Beetle-brain*, a blockhead. ठोंब्या, मंदबुद्धीचा. *Beetle-eyed*, a short-sighted person. कोत्या दृष्टीचा मनुष्य.

Beet le-browed, *a.* (बीं'टल्-ब्रौड्)—having prominent brows, with overhanging brow. फुगीर भुंवया असलेला.

Beet'le-crŭsher, *n.* (बीं'टल्-क्रशर्)—a large boot or foot. एक मोठा बूट किंवा पाय.

Beet'-root, *n.* (बीं'ट्-रूट्)—the root of the beet plant. बीट झाडाचें मूळ, चुकंदर.

Bĕfall', *v. t. & i.* (बि-फॉं'ल्)—happen, happen to. प्राप्त होणें, घडणें, गुदरणें.

Bĕfĭt', *v. t.* (बि-फिं'ट्)—be suited to, be fitted for, be right. ठीक किंवा योग्य होणें, शोभणें

Bĕfĭt'tĭng, *a.* (बि-फिं'टिंग्)—suitable, becoming, meet, appropriate. साजेल असा, शोभेल असा, योग्य. Befittingly, *adv.*

Bĕfŏg', *v. t.* (बि-फॉं'ग्)—envelop in fog, obscure. धुक्यानें भरणें, अंधुक करणें.

Bĕfool', *v. t.* (बि-फूं'ल्)—to make a fool of, to dupe. मूर्ख बनविणें, ठकविणें.

Bĕfore', *adv.* (बि-फो'अर्)—ahead; in front; previously, already. पुढें; समोर; अगोदर, आगाऊ. *prep.* in front of, ahead of; in the presence of; earlier than. समोर, पुढें; समक्ष; आधीं, अगोदर. *conj.* sooner than; rather. ॰च्या आधीं; पेक्षां.

Bĕfōre'bănd, *adv.* (बि-फो'र्-हॅन्ड्)—in anticipation, in advance, in readiness, before the line. आधींच, आगाऊ, दुसरी गोष्ट करण्यापूर्वी. To be beforehand with=anticipate, forestall. आगाऊ करणें किंवा घेणें, आघाडी मारणें. *Before-hand with the world*, having money in hand. जगाच्या पुढें, हातांत पैसा खेळत असलेला.

Bĕfoul', *v. t.* (बि-फा'उल्)—to make foul, to soil. घाणेरडा करणें.

Bĕfriend', *v. t.* (बि-फ्रें'न्ड्)—act as a friend to; help at need, favour. मित्रत्वानें वागणें; मदत देणें, मेहेरबानी करणें.

Bĕg, *v. t. & i.* (बेग्)—ask for something by way of alms; live by begging; ask for favour; make entreaty. भिक्षा मागणें; भीक मागून उपजीविका करणें; कृपा भाकणें; प्रार्थना किंवा विनंति करणें. *To beg the question*, to assume by implication the very fact one is trying to prove. वादग्रस्त विषयाचा सिद्धांत सिद्ध करण्याकरितां त्याच सिद्धांताची सत्यता गृहीत धरणें. *To go abegging*, to find no proper accepter. भीक मागत जाणें, (योग्य मनुष्य न मिळाल्यामुळें) भलत्याच मनुष्याच्या हातीं जाणें.

Bĕgăn, *past tense* of Begin.

Bĕgĕt', *v. t.* (बि-गे'ट्)—procreate, give rise to, generate. जन्मास आणणें, उत्पन्न करणें.

Bĕgĕt'ter, *n.* (बि-गे'टर्)—one who begets; a father. उत्पन्नकर्ता; जनक, बाप.

Bĕgg'ar, *n.* (बे'गर्)—one who begs, one who lives by begging; poor or penniless person. भिकारी; अतिदरिद्री माणूस. *v. t.* to reduce to poverty; outshine, reduce to silence. भिकेस लावणें; वर्णनातीत असणें. This scene beggars all description=हा देखावा वर्णनातीत आहे. *Beggar-my-neighbour*, a card game. भेङ्गचीं पानें सर्व हरेपर्यंत खेळला जाणारा एक पत्त्यांचा खेळ.

Bĕgg'arly, *a.* (बे'गर्लि)—poor, needy; mean, contemptible; intellectually poor. दरिद्री, कंगाल; हलकट; बुद्धीला कमी.

Bĕgg'arў, *n.* (बे'गरि)—extreme poverty. अत्यंत दारिद्र्य, अति दरिद्रदशा.

Bĕgĭn', *v. t. & i.* (बि-गि'न्)—set about, make a start with, originate. आरंभणें, आरंभ करणें, सुरू होणें. *To begin at*, to start from. ॰पासून आरंभ करणें. *To begin with*, in the first place. प्रथमतः. *To begin upon*, to set to work at. अमुक एक कामाला आरंभ करणें. *To begin the world*, to start in life. आयुष्याला आरंभ करणें.

Bĕgĭn'ner, *n.* (बि-गि'नर्)—one who starts anything; a learner. आरंभ करणारा, नवशिक्या; नूतनाभ्यासी.

Bĕgĭn'ning, *n.* (बि-गि'निंग्)—time at which a thing begins; source, origin; the first part. सुरवात, उपक्रम, प्रारंभ; उगम; आरंभीचा भाग. *The beginning of the end*, the first

clear sign of the final result. शेवटच्या निर्णयाचें पहिलें स्पष्ट चिन्ह.

Bėgird', *v. t.* (बि-गंर्ड्)—to gird round about, to bind, to surround, to encompass. वेष्टणें, सभोंवती बांधणें.

Bėgone', *int.* (बि-गॉन्)—away with you! get you gone! go away. चालता हो.

Bėgō'nĭa, *n.* (बि-गो'निआ)—a plant with petal-less flowers and ornamental foliage. पाकळ्यारहित फुलें असलेलें व शोभिवंत पानें असलेलें एक झाड.

Begot, Begotten, *past tense* and *past participle* of Beget.

Bėgrīme', *v. t.* (बि-ग्रा'इम्)—to make grimy, to soil deeply. किटविणें, मळानें रापणें.

Bėgrŭdge', *v. t.* (बि-ग्रंज्)—to grudge, to envy the possession of. ०चा हेवा करणें.

Bėguile', *v. t.* (बि-गा'इल्)—delude, cheat; charm; amuse; cause (time, etc.) to pass easily. फसविणें; मोहून टाकणें; करमणूक करणें; वेळ सुखानें घालविणें. Beguil'ement, *n.*

Bē'gŭm, *n.* (बीं'गम्)—a Mohammedan queen or lady of rank. मुसलमानी राणी किंवा उच्च दर्जाची स्त्री.

Begun, *past participle* of Begin.

Bėhälf', *n.* (बि-हा'फ्)—part, interest. पक्ष, हित. In behalf of=०च्या फायद्याकरितां. On behalf of =०च्या वतीनें, ०च्या तर्फे.

Bėhāve', *v. i. & refl.* (बि-हे'व्ह्)—to conduct oneself, act in a specified manner. वागणें, वर्तणूक ठेवणें, आचरणें. *Behave towards*, treat (well, etc.). वागविणें.

Bėhā'vĭour, *n.* (बि-हे'व्हिअर्)—manners, conduct, way of behaving. चालचलणूक, वर्तणूक, वागण्याची तऱ्हा. *To be on one's good behaviour*, to do one's best under protection. वर्तणुकीची कसोटी लागणें. During good behaviour=चांगली वर्तणूक आहे तोंपर्यंत

Bėhead', *v. t.* (बि-हे'ड्)—cut off the head of, execute by cutting off the head. शीर कापून टाकणें, शिरच्छेद करणें.

Bėhĕld', *past tense* and *pp.* of Behold.

Bėhē'mŏth, *n.* (बिहीं'मॉथ् or बीं'इमॉथ्)—a huge creature. एक भला मोठा प्राणी.

Bėhĕst', *n.* (बि-हें'स्ट्)—command, precept, mandate. आज्ञा, हुकूम.

Bėhīnd', *adv. & prep.* (बि-हा'इन्ड्)—in or to the rear; in concealment; too late; in arrear. पाठीमागें; आड; फार उशिरां; मागें. *Behind the scenes*, in private. गुप्त रीतीनें, खासगी. *To put behind one*, refuse to consider. विचार करण्याचें नाकारणें. *Behind one's back*, without his knowledge. ०च्या नकळत, त्याला माहीत नसतांना. *Behind time*, unpunctual. (काम वगैरे) वेळेवर किंवा वक्तशीर न करणारा. *Behind the times*, antiquated. जुना झालेला, गतकालिक.

Bėhōld', *v. t.* (बि-हो'ल्ड्)—see with the eyes; take notice, observe. पाहणें; लक्ष देणें, निरीक्षण करणें.

Bėhō'lden, *a.* (बि-हो'ल्डन्)—under obligation to, obliged, indebted. आभारी, उपकारी, उपकारबद्ध.

Bėhoof', *n.* (बि-हू'फ्)—use, advantage. फायदा, नफा.

Bėhōve', Behōōve', *v. t.* (बि-हो'व्ह्, बि-हू'व्ह्)—be incumbent on; befit. आवश्यक असणें; योग्य होणें, शोभणें.

Beige, *n.* (bāzh, बेझ्)—a kind of dress-material of undyed unbleached wool; the colour of this material. न रंगविलेलें कोरें करकरीत एक जातीचें लोंकरीचें कापड; या कापडाचा रंग. *a.* of the colour of this material. या कापडाच्या रंगासारखा रंग असलेला.

Bē'ĭng, *n.* (बी'इंग्)—existence; person or thing that exists; constitution. अस्तित्व; सजीव प्राणी; स्थिति. *In being*, existing. अस्तित्वांत असलेला. *Supreme Being*, God. परमेश्वर, ईश्वर.

Bėlā'bour, *v. t.* (बि-ले'बर्)—to beat soundly, thrash, thump. खूप चोप देणें.

Bėlā'ted, *a.* (बि-ले'टिड्)—overtaken by darkness; coming too late. अंधारांत सांपडलेला; फार उशिरां आलेला.

Bėlaud', *v. t.* (बि-लॉ'ड्)—to load with praise, heap praises on, laud, praise highly. स्तुतीचा वर्षाव करणें, प्रशंसा करणें.

Bėlay', *v. t.* (बि-ले')—to coil rope (round cleat, etc.) to secure it. खुंट्याभोंवतीं लांब दोरखंड गुंडाळणें. *Belay*, (slang). stop! enough! थांबा, पुरे करा. *Belaying-pin*, fixed wooden or iron pin for belaying on. बोटींतील दोरखंड गुंडाळण्याचा खुंटा.

Bĕlch, *v. i. & t.* (बेल्च्)—emit wind noisily from stomach through mouth; (of volcano, gun, etc.) emit fire, smoke, etc. ढेंकर देणें; विस्तव, धूर वगैरे बाहेर टाकणें. *n.* belching; eructation. ढेंकर; उद्गार, बाहेर टाकणें.

Bĕl'cher, *n.* (बे'ल्चर्)—a parti-coloured neckerchief. अनेकरंगित गळ्याला बांधण्याचा रुमाल.

Bĕl'dam, Bĕl'dāme, *n.* (बे'ल्डॅम्, बे'ल्डेम्)—hag, old woman; virage. म्हातारडी; कृत्या.

Bėleag'uer, *v. t.* (बि-ली'गर्)—to besiege. वेढा घालणें, कोंडमारा करणें.

Bĕl'emnite, *n.* (बे'लेम्‌-नाइट्‌)—a tapering sharp-pointed fossil bone of extinct cuttlefish. सध्यां अस्तित्वांत नसलेल्या एका माशाचें निमुळतें तीक्ष्ण टोंकाचें दगडासारखें झालेलें हाड.

Bĕl'frȳ, *n.* (बे'ल्फ्रि)—bell tower; bell space in church tower. घंटा असलेला बुरूज, घांट बांधण्याची जागा. Bel'fried, *a.*

Bĕlie', *v. t.* (बि-ला'य्‌)—fail to confirm or act up to; give false notion of. खोटेपणा आणणें, उलटा भासविणें; खोटा ठरवणें, खोटें वर्णन देणें, आळ घालणें. To belie one's hopes= निराशा करणें.

Bĕlief', *n.* (बि-ली'फ्‌)—trust, confidence; acceptance of a thing as true; what one believes; creed, religion. विश्वास; भरंवसा; विश्वसित गोष्ट, श्रद्धाविषय; धर्म, पंथ. *To the best of my belief,* in my genuine opinion. माझ्या खऱ्या मताप्रमाणें.

Bĕlieve', *v. t. & i.* (बि ली'व्‌)—accept as true; have faith in; be of opinion *that.* विश्वास ठेवणें, सत्य मानणें; विश्वास असणें; मत असणें. *To make believe,* to pretend. ढोंग करणें. Believ'able, *a.* विश्वसनीय.

Bĕliev'er, *n.* (बि-ली'व्हर्‌)—one who believes; (*esp.*) adherent of one's religion. श्रद्धा असणारा, भाविक; आस्तिक.

Bĕlike', *adv.* (बि-ला'इक्‌)—probably; perhaps. बहुतकरून, बहुधा; कदाचित्‌, न कळे, न जाणों.

Bĕlĭt'tle, *v. t.* (बि-लि'टल्‌)—to lower, to make small, depreciate, disparage, dwarf. कमी दर्जाचा करणें, मानहानि करणें, हिणवणें.

Bĕll, *n.* (बेल्‌)—a cup-shaped metal instrument emitting musical sound when struck; a bell-shaped object. घंटा, घांट; घंटेसारखी वस्तु. (Naut.) *One to eight bells,* half hours of watch. जहाजावरील दर अर्ध्या तासाची घंटा. *To bear* (or *carry away*) *the bell,* to be first to win. पहिला येणें, जिंकणें. *Sound or clear as a bell,* quite sound or clear. अगदीं उत्तम किंवा स्पष्ट. *v. t.* furnish with bells. घंटा बांधणें. *To bell the cat*=मांजराच्या गळ्यांत घंटा बांधणें; *fig.* take the danger of a common enterprise on oneself. एखाद्या धोक्याच्या कामांत पुढाकार घेणें. *v. t.* (also *n.*) make the cry of a stag or buck at the rutting-time. डुरकणें, गर्जना करणें.

Bĕlladŏnn'a, *a.* (बेलॅ-डॉ'ना)—deadly nightshade; drug got from it. एक विषारी वनस्पति; बेलाडोना औषध.

Bĕlle, *n.* (बेल्‌)—a handsome woman, reigning beauty. अत्यंत देखणी स्त्री, स्त्रीरत्न, चटकचांदणी.

Bĕlles-let'tres, *n.* (बेल्‌-ले'टर्‌)—studies or writings of purely literary kind. केवळ वाङ्मयात्मक लेख.

Bell'-founder, *n.* (बे'ल्‌-फाउन्डर्‌)—a man who founds or casts bells. घंटा बनवणारा, घंटा ओतणारा.

Bell'-hănger, *n.* (बे'ल्‌-हॅंगर्‌)—an artisan who puts up bells and wires. घंटा व तारा बांधणारा कारागीर.

Bĕll'icōse, *a.* (बे'लि-कोस्‌)—inclined to fight. भांडखोर. Bellicŏ'sity, *n.*

Bĕlli'gerencȳ, *n.* (बेलि'जेरन्सि)—status of a nation etc. engaged in conflict or war. युद्धांत गुंतलेल्या देशाची वगैरे स्थिति.

Bĕlli'gerent, *a.* (बे-लि'जे-रन्ट्‌)—waging regular war; engaged in conflict. युद्ध चालू ठेवणारा; भांडणांत किंवा युद्धांत गुंतलेला. (Also, *n.*)

Bell'man, *n.* (बे'ल्‌-मन्‌)—a public crier who uses a bell. घंटेनें थाळी पिटणारा.

Bĕll'metal, *n.* (बे'ल्‌-मेटल्‌)—a mixture of copper and tin (used for making bells). कांसें.

Bĕll'ona, *n.* (बेलो'ना)—war personified; a woman of commanding presence. रणदेवता; रणशूर स्त्री.

Bĕll'ow, *v. i. & t.* (बे'लो)—roar like bull; shout with pain; utter loudly and angrily. हंबरणें, डुरकणें; दुःखानें ओरडणें; मोठ्यानें आणि रागानें बोलणें. *n.* bellowing sound. हंबरणें, डरकाळी.

Bĕll'ows, *n. plu.* (बे'लोझ्‌)—contrivance for driving air into (fire, organ, etc.). भाता, वाजाच्या पेटीचा भाता.

Bell'-rĭnger, *n.* (बे'ल्‌-रिंगर्‌)—one whose business is to ring the church or other bell. घंटा वाजविणारा. Bell-ringing, *n.* घंटा वाजविणें.

Bell'wether, *n.* (बे'ल्‌-वेदर्‌)—leading sheep of flock with a bell on the neck, a ringleader. कळपांतील गळ्यांत घांट असलेली म्होरकी मेंढी; दंगेखोर मंडळीचा म्होरक्या.

Bell'ȳ, *n.* (बे'लि)—abdomen, stomach. पोट. *v. t. & i.* swell out, to fill as a sail with wind. फुगणें, फुगवणें. Belly-worship=अधाशीपणा. Belly-timber=food. अन्न. Belly-pinched= starving. उपाशी. Belly-ache=colic. पोटशूल.

Be'llȳful, *a.* (बे'लि-फुल्‌)—as much as one wants of anything. पोटभर, पाहिजे तेवढा.

Bĕlŏng', *v. t.* (बि-लॉं'ग्‌)—be the property of, be attached to. च्या मालकीचें किंवा सत्तेचें असणें, संबंध असणें.

Bĕlŏng'ings, *n. plu.* (बि-लॉं'गिंज्‌)—one's property or relatives. जिनगी, चीजवस्त; गोतलग, आप्तइष्ट.

Bĕlov'ĕd, *a.* (बि-ल'व्हिड्)—dearly loved. प्रिय, जिवलग. *n.* a beloved person. प्रेमाचें माणूस, प्रियकर, प्रियतमा.

Bĕlow', *adv.* (बि-लो')—at or to a lower level; in a lower position or rank. खालीं, खालतीं. *prep.* lower than, unworthy of, beneath. खालीं, नालायक. *Below flattery,* too low to be affected by flattery. खुशामतीनें सुद्धां कांहीं काम न होण्याइतका कमी दर्जाचा. *Below one's breath,* less audibly than. अधिक अस्पष्ट रीतीनें.

Bĕlt, *n.* (बेल्ट्)—strip (of leather, etc.) worn round waist, strap connecting wheels; a sash. कमरपट्टा, कटिबंध, पट्टा; खांद्यावरून घालण्याचा पट्टा. *To hit below the belt,* to fight unfairly. अन्यायानें लढणें. *Great Belt, Little Belt,* channels into the Baltic. बाल्टिकमधील सामुद्रधुन्या. *v. t.* to put belt round; to thrash with belt. पट्टा घालणें, सभोंवतीं गुंडाळणें; पट्ट्यानें चोप देणें.

Bĕl'vedere, *n.* (बे'ल्व्हि-डि-अर्)—raised turret to view scenery from. देखावा पाहाण्याकरितां उभारलेला मनोरा, प्रासादशृंग.

Bē'ma, *n.* (बी'मा)—a platform in ancient Athenian public assembly. जुन्या अॅथेन्स शहरांतील वक्त्यांकरितां उभें केलेलें उच्च स्थान.

Bĕmīre', *v. t.* (बिमा'यर्)—to drag or sink in the mire, to cover with mire. चिखलानें मळवणें, मलिन करणें, चिखलानें भरणें.

Bĕmoan', *v. t.* (बि-मो'न्)—to lament, express sorrow for. शोक करणें.

Bĕmūse', *v. t.* (-z, बिम्यू'झ्)—stupefy. मूढ करणें, गोंधळून टाकणें.

Bĕnch, *n.* (बेंच्)—a long seat of wood or stone; judge's or magistrate's seat; court of law; working-table (of carpenter, etc.); (collect.) judges or magistrates; level stretch on mountain-side. बांक; न्यायाधिशाची गादी, न्यायासन; धर्मासन, कोर्ट; सुतारांचें वगैरे काम करण्याचें टेबल; न्यायाधीशमंडळ; पर्वताच्या बाजूवरील सपाटीची जागा. *To be raised to the bench* or *to be on the bench,* to be made or to be a judge or bishop. न्यायाधिशाच्या किंवा बिशपच्या पदवीला चढणें, न्यायाधीश किंवा बिशप होणें.

Bĕnch'er, *n.* (बें'चर्)—senior member (sharing management) of Inns of Court. एखाद्या कोर्टांतील जुना वकील.

Bĕnd, *v. t. & i.* (बेन्ड्)—force into a curve or angle, incline from the vertical; submit, force to submit. वांकणें, वांकवणें; नमणें, नमविणें. *n.* bending, curve; bent part of a thing; shape in which hides are tanned. वांक, वळसा; वळलेला किंवा वांकवलेला भाग; कातडीं कमावण्याचा सांचा. *Bend-leather,* thickest leather used for soles. जुताच्या तळव्याकरितां कमावलेलें मऊ कापड. *Bend sinister,* (Herald.) parallel line indicating bastardy. अनौरसत्व किंवा हीनकुलता दाखविण्याकरितां काढलेली समान्तर रेषा.

Bĕn'der, *n.* (बें'न्-डर्)—(Slang) a six-penny bit. सहा पेनीचें नाणें.

Bĕneath', *adv. & prep.* (बि-नी'थ्)—below, under; unworthy of. खालीं; अयोग्य, कमी प्रतीचा, न शोभणारा.

Bĕnĕdi'cĭtē, Bĕnĕdĭc'tus, *nn.* (बे-नि-डा'य्-सिटि, बेनिडि'क्टस्)—blessing invoked, grace at table, one of the canticles. मागितलेला आशीर्वाद, भोजनाच्या वेळीं करावयाची ईश्वराची प्रार्थना, लहान स्तोत्र.

Bĕn'ĕdĭck, *n.* (बें'नि-डिक्)—newly-married man (esp. confirmed bachelor who marries). पुष्कळ दिवस ब्रह्मचारी राहून मग लग्न केलेला मनुष्य, नुकतेंच लग्न झालेला मनुष्य, नवोढ.

Bĕnĕdĭc'tion, *n.* (बे-नि-डि'क्शन्)—utterance of a blessing, a blessing. आशीर्वचन, आशीर्वाद, दुवा. [L. *bene,* well & *dicere, dictum,* to say]

Bĕnĕdĭc'tory, *a* (बे-नि-डि'क्टरि)—of benediction, expressing benediction. आशीर्वादात्मक, आशीर्वादार्थक.

Bĕnĕfăc'tion, *n.* (बे-नि-फॅ'क्शन्)—doing good, charitable gift. उपकार, दान, दानधर्म, देणगी.

Benefăc'tor, *n.* (बे-नि-फॅ'क्टर्)—one who has given friendly aid, one who confers a benefit, patron; donor. उपकारकर्ता, आश्रयदाता; दाता. Benefac'tress, *n. f.* उपकारकर्त्री. [L. *bene,* well & *facere,* factum, to make or do]

Bĕn'ĕfĭce, *n.* (बे'नि-फिस्)—church revenue for the maintenance of divine service, church living. चर्चमधील उपाध्यायाची वृत्ति. [L. *bene,* well & *facere,* to make or do]

Bĕnĕ'fĭced, *a.* (-st, बेनि'फिस्ट्)—possessed of a benefice or church preferment. उपाध्यायाची वृत्ति ज्याला मिळते आहे असा.

Bĕnĕf'ĭcent, *a.* (बि-ने'फिसेंन्ट्)—doing good, actively kind, bountiful, liberal. उपकार करणारा, परोपकारी, उदार.

Bĕnĕf'ĭcence, *n.* (बि-ने'-फि-सेन्स्)—active goodness, bounty. परोपकार, दयाधर्म.

Bĕnĕfĭ'cial, *a.* (बे-नि-फि'शल्)—advantageous, serviceable. फायदेशीर, हितकारक, उपकारक. Benefi'cially, *adv.* हित होईल अशा रीतीनें.

Bĕnĕfĭ'ciarў, *a.* (-sha-, बेनिफि'शरि)—holding by feudal tenure; connected with the receipt of benefits, profits or advantages. मांडलिकत्व असणारा; देणगीचा किंवा अन्य फायद्याच्या उपभोग घेणारा. *n.* one who holds a living; receiver of benefits, one who receives something as a free gift. उपाध्यायाच्या वृत्तीवर राहणारा; देणगीचा किंवा फायद्याचा उपभोग घेणारा.

Bĕn'ĕfĭt, *n.* (बे'नि-फिट्)—advantage, profit; allowance from Benefit Society etc.; performance (at theatre, game, etc.) of which proceeds go to a particular player or person; (Sl.) fine time or job. हित, फायदा; संस्थेकडून मिळणारी जादा रक्कम; धर्मार्थ किंवा बक्षिसार्थ दिलेला खेळ वगैरे; छान वेळ किंवा काम. *For the benefit of*, on behalf of. ०च्या वतीनें, ०च्या करितां. *The benefit of the doubt*, assuming innocence rather than guilt. संशयाचा फायदा, दोषाच्या ऐवजीं निर्दोषी आहे असें गृहीत धरून. *Benefit Club* or *Society*, club or society for mutual insurance against illness or age. परस्परसाहाय्यकारी मंडळी. *v. t. & i.* do good to; receive benefit. हित करणें, चांगलें करणें; फायदा मिळणें.

Bĕnĕv'olence, *n.* (बि-नें'व्हो-लेन्स्)—disposition to do good; good will; (Eng. His.) forced loan. चांगलें करण्याची इच्छा, उपकारबुद्धि; सदिच्छा; बळजबरीनें घेतलेलें कर्ज.

Bĕnĕv'olent, *a.* (बिने'व्हो-लेन्ट्)—desirous of doing good, charitable. जनहितेच्छु, परोपकारी, दानधर्मशील. Benev'olently, *adv.* परोपकारबुद्धीनें. [L. *bene*, well & *volere*, *volens*, to wish]

Bĕnīght'ed, *a.* (बि-ना'इटिड्)—overtaken by night; involved in intellectual or moral darkness, ignorant. अंधारांत सांपडलेला; अज्ञानग्रस्त, पापांत बुडालेला.

Bĕnīgn', *a.* (बि-ना'इन्)—kindly, gentle; favourable, salutary; mild, not-malignant. दयाशील, भला; उपयुक्त, फायदेशीर, हितकर; उग्र नसलेला, सौम्य.

Bĕnĭg'nant, *a.* (बि-नि'ग्नन्ट्)—bestowing kindness, kindly, gracious. कृपाळू, दयाशील. Benig'nantly, *adv.*

Benĭ'gnĭtў, *n.* (बेनि'ग्निटि)—kindliness, kindness. दयाळूपणा. (Also Benig'nancy, *n.*)

Bĕn'ĭson, *n.* (-zn, बें'नि-झन्)—a benediction, a blessing. आशीर्वाद.

Bent, *n.* (बेन्ट्)—ready rushlike stiff-stemmed grass of various kinds; (also *bennet*) stiff flower-stalk of grasses; couch-grass; heath, unenclosed pasture. फार बारीक काडीचें ताठ गवत; बाजरीचा वगैरे कडबा; लांब पसरणारीं मुळें असलेलें एक जातीचें गवत; लहान-सहान झाडें असलेलें ओसाड मैदान.

Bent, *past tense & past participle* of Bend.

Bĕnt, *n.* (बेन्ट्)—inclination, bias, tendency. झोंक, तोल, कल. *To the top of one's bent*, to one's heart's content. यथेच्छ.

Bĕn'thămĭsm, *n.* (बें'न्टॅ-मिझम्)—doctrine of the greatest happiness of the greatest number as guiding principle of ethics. पुष्कळांचें पुष्कळ सुख साधणारा तत्त्ववाद, समाजहित-बाहुल्यवाद.

Bĕnŭmb', *v. t.* (बि-नं'म्)—to make numb or torpid, paralyse, deprive of sensation. सुन्न करणें, निरुपयोगी करणें, स्पर्शज्ञान नाहींसें करणें. To be benumbed by cold, थंडीनें गारठणें किंवा कांकडणें.

Bĕn'zēne, *n.* (बें'न्-झीन्)—an aromatic hydrocarbon got from coal-tar. हायड्रोजेन व कार्बन यांचा संयुक्त पदार्थ.

Ben'zīne, *n.* (बें'न्-झिन्)—mixture of liquid hydrocarbons got from mineral oils and used for removing grease-stains. हायड्रोजन व कार्बन यांचें तेलकट डाग घालविणारें एक द्रव मिश्रण.

Bĕn'zōĭn, *n.* (बें'न्झो-इन्)—an aromatic resin. देवधूप, शिलारस.

Bĕn'zol, Bĕn'zole, *n.* (बें'न्-झॉल्, बें'न्-झोल्)= Benzene.

Ben'zolīne, *n.* (बें'न्-झॉलिन्)—Benzine.

Bĕqueath', *v. t.* (-dh, बि-क्वी'द्)—leave by will; transmit to posterity. मृत्युपत्रांत लिहून ठेवणें; संततीला देऊन टाकणें.

Bĕquĕst', *n.* (बि-क्वे'स्ट्)—bequeathing, anything left by will to posterity. मृत्युलेखदान.

Bĕrā'te, *v. t.* (बिरे'ट्)—scold. खरडपट्टी काढणें.

Bere, *n.* (बिअर्)—a species of barley having six rows in the ear. कणसामध्यें सहा रांगा असलेलें एक जातीचे जव.

Bereave', *v. t.* (बि-री'व्ह्)—rob, deprive; leave desolate. हिरावून घेणें, नागवणें; एकटा सोडून देणें, (pa. t. *bereaved* or *bereft*)

Bereave'ment, *n.* (बि-री'व्ह्-मेन्ट्)—loss by death, deprivation. मृत्यूमुळें झालेली हानि, नागवणूक, वियोग.

Bĕ'ret, *n.* (-ĭ, बे'रि)—a kind of tam-o'-shanter cap. एक जातीची वाटोळी कपाळावर घट्ट बसणारी लोंकरीची किंवा कापडाची टोपी.

Berg, *n.* (बर्ग्)—iceberg; mountain. बर्फाचा पर्वत; पर्वत.

Berg'amot, *n.* (बर्ग-मॉट्)—a tree of orange kind; perfume from the fruit of that tree; a kind of pear. एक नारिंगाच्या जातीचें झाड; त्या झाडाच्या फळापासून काढलेलें सुवासिक तेल; एक जातीचें पिअर झाड किंवा फळ.

Bèrhyme', *v. t.* (बि-र्हा'इम)—write verses about. ॰च्या विषयीं कविता लिहिणें.

Bĕ'rĭbĕrĭ, *n.* (बे'रि-बेरि)—a disease like dropsy prevalent in India. सर्वांग सुजून होणाऱ्या रोगासारखा एक हिंदुस्थानांत प्रचलित असलेला रोग.

Berlĭn', *n.* (बर्-लि'न्)—a four-wheeled covered carriage with a hooded seat behind. एक जातीची चार चाकांची गाडी. (Also, *Berline*). *Berlin black*, iron-varnish. लोखंडाला करण्याचें व्हार्निश किंवा रोगण. *Berlin wool*, a fine dyed knitting wool. एक सुरेख रंगवलेली वीणकामाची लोंकर.

Bĕ'rry, *n.* (बे'रि)—any small round juicy, stoneless fruit. बीं नसलेलें कोणतेंहि लहान वाटोळें रसयुक्त फळ. Berried, *a.* बोरांचा, मांसल फळें असलेला.

Bers'erker, *n.* (बर्-सर्-कर्)—a wild Norse warrior fighting with violence and fury. नॉर्वेमधील आवेशानें लढणारा योद्धा. (Also Bers'erk)

Berth, *n.* (बर्थ्)—sea-room, ship's place at wharf; sleeping place; situation, appointment. नांगरलेल्या गलबताची जागा; गलबतांत निजावयाची जागा; जागा, सोय. *To give wide berth to*, to avoid. ॰च्या पासून दूर राहणें, टाळणें. *v. t.* to moor ship in berth; provide sleeping berth for. गलबताचा नांगर टाकणें; निजावयाच्या जागेची सोय करणें.

Bèseech', *v. t.* (बि-सीं'च्)—entreat, ask earnestly for; beg eagerly for. याचना करणें; विनंति करून मागणें. (*past t.* Besought बिसॉट्)

Besee'chĭng, *a.* (बिसीं'चिंग्)—suppliant (of look, tone, etc.). मिनतीनें वागणारा, दीनवाणा. Besee'chingly, *adv.* मिनतवारीनें.

Bèseem', *v. t.* (बि-सी'म्)—suit, be fitting for, be worthy of. शोभणें, साजणें, योग्य होणें, योग्य दिसणें.

Bèsee'mingly, *adv.* (बिसीं'मिंग्-लि)—in a fit or proper manner. शोभेल अशा रीतीनें, योग्य तऱ्हेनें.

Bèset', *v. i.* (बि-से'ट्)—hem in; assail. घेरणें; पाठीस लागणें. *Besetting sin*, sin that most frequently tempts one. सदोदित पाठपुरावा करणारें पाप.

Bèshrew', *v. t.* (बि-श्रू')—to wish a curse to, execrate. वाईट इच्छिणें, शाप देणें.

Bèsīde', *prep.* (बि-सा'इड्)—at the side of, close to; compared with; aside of. बाजूस, जवळ, पार्श्वभागीं; ॰च्या बरोबर तुलना केली असतां; एकीकडे, आडबाजूस. *Beside oneself*, out of one's wits. भानावर नसलेला, बेशुद्ध स्थितींत.

Bèsīdes', *prep.* (बि सा'इड्झ्)—in addition to; therwise than, except. आणखी; शिवाय. *adv.* also, as well; else. आणखी, शिवाय, खेरीज; दुसरा.

Bèsiege', *v. t.* (बि-सीं'ज्)—lay siege to, surround with armed forces; crowd round; assail with requests. वेढा घालणें; कोंडून धरणें; विनंतीवर विनंति करून त्रास देणें.

Bèslăv'er, *v. t.* (बिस्लॅ'व्हर्)—to cover with slaver; flatter fulsomely. लाळीनें मळवणें; फाजील खुशामत करणें.

Bèslŏb'ber, *v. t.* (बिस्लॉ'बर्)—to cover with slaver; flatter fulsomely; kiss effusively. लाळीनें बरबटवणें; खूप स्तुति करणें; खूप मुके घेणें.

Bèsmear', *v. t.* (बि-स्मि'अर्)—smear over with greasy or sticky stuff, bedaub, soil. लेपटणें, फांसणें, माखणें, मळवणें.

Bèsmirch', *v.t.* (बि-स्म'र्च्)—soil, discolour; dim brightness of. धुरकटवणें, डाग पाडणें; मळवणें.

Bē'som, *n.* (बी'झम्)—long-handled broom made of twigs. लांब दांड्याची केरसुणी, खराटा.

Bèsŏt', *v. t.* (बि-सॉ'ट्)—stupefy mentally or morally. धुंदी आणणें, मूढ बनविणें, धुंग करणें.

Bèsought, (बिसॉट्)—*Pa. t.* of Beseech.

Bèspăn'gle, *v. t.* (बि-स्पॅं'ग्ल्)—cover with spangles, sprinkle with something brilliant. टिकल्यांनीं सुशोभित करणें, चकचकीत करणें.

Bèspătt'er, *v. t.* (बिस्पॅ'टर्)—spatter all over; cover with abuse or flattery. शिंतोडे उडवणें, सडासारवण करणें; बदनामी करणें, फाजील खुशामत करणें.

Bèspeak', *v. t.* (बि-स्पी'क्)—engage beforehand; order (goods); be evidence of. अगोदर सांगून ठेवणें; (माल) मागविणें; आधीं सुचवणें, दर्शविणें. *Bespoke bootmaker etc.*, opposed to ready-made dealer. तयार मालाचा व्यापार करणाऱ्यांच्या विरुद्ध असलेला.

Bèsprin'kle, *v. t.* (बि-स्प्रिं'कल्)—sprinkle or strew over *with*, scatter over. सर्व बाजूंना पसरणें, सर्वभर शिंपडणें.

Bĕss'ĕmer prō'cĕss, *n.* (बे'सिमर् प्रो'सेस्)—method of getting steel made directly from molten cast-iron by driving through it air so as to drive off carbon and impurities. बिसेमरची पोलाद तयार करण्याची विशेष पद्धत.

Bĕst, *a.* (बेस्ट्)—having good qualities in the highest degree. अत्युत्तम. *adv.* in the best

way. अतिशय उत्तम रीतीनें. (Superlative of *good* or *well*) *The best part*, most. पुष्कळसा भाग. *Had best*, would find it wisest to. चांगलें झालें असतें. *Best man*, bridegroom's supporter. नवऱ्याचा पाठराखा, टोकणा. *To put best leg* or *foot foremost*, to go at full pace. भरधांव (जलद गतीनें) जाणें. *Bad is the best*, no good event possible. चांगली गोष्ट अशक्य. *To do one's best*, to do all one can. पराकाष्टा किंवा शिकस्त करणें. *To have the best of it*, to win in argument, etc. वादविवादांत वगैरे जिंकणें. *To make the best of things*, to be contented. संतुष्ट असणें. *To make the best of one's way*, to go as fast as possible. होतां होईल तों लवकर जाणें. *At best*, on the most hopeful view. होईल तितक्या उत्तम तऱ्हेनें, फार फार झालें तर. *Did it for the best*, did it with good intentions. ती गोष्ट सद्धेतूनें (चांगल्याकरितां) केली. *To the best of one's power etc.*, as far as one's power etc. allows. यथाशक्ति, शक्त्यनुसार. *The best is the enemy of the good*, too high standard bars progress. अत्युच्च प्रमाण हें प्रगतीच्या आड येतें. *v. t.* (colloq.) get the better of, worst. ०च्या वर ताण करणें.

Bėstead', *v. t. & i.* (-ĕd, बिस्टे'ड्)—to avail, help. मदत करणें, फायदेशीर होणें.

Bėstĕd', *p. p.* (with *ill*, *hard*, *sore*, etc.) (बिस्टेड्)—situated, circumstanced, pressed. (वाईट किंवा कठीण) परिस्थितींत सांपडलेला.

Bĕs'tĭal, *a.* (बे'स्टि-अल्)—beastly, of beasts; brutish, barbarous; depraved, lustful, obscene. जनावरांसंबंधीं; पशुतुल्य, क्रूर; निंद्य, दुष्ट, अश्लील. Bes'tially, *adv.*

Bĕstĭăl'ity, *n.* (बेस्टिॲ'-लिटि)—beastliness. पशुपणा, पशुतुल्य वर्तन.

Bes'tialīze, *v. t.* (बे'स्टिअलाइझ्)—to make bestial or like a beast, to brutalize. पशूसारखें करणें किंवा वागविणें.

Bĕs'tĭarȳ, *n.* (बे'स्टिअरि)—one of those books written in the middle ages treating fancifully of the qualities of beasts. मध्ययुगांत लिहिलेला कल्पित किंवा खऱ्या प्राण्यांचा इतिहास.

Bėstir', *v. refl.* (बि-स्टर्'र्)—exert, rouse oneself. स्वतः खटपट करणें.

Bėstow', *v. t.* (बि-स्टो')—confer as gift; deposit. समर्पण करणें, दान करणें; सांठवणें, सांठा करणें.

Bėstow'al, *n.* (बिस्टो'अल्)—act of bestowing, disposal. देणें, दान करणें, समर्पण. (Also, Bestow'ment, *n.*)

Bėstrew', *v. t.* (-rōō, बि-स्ट्रू')—strew; lie scattered over. चहूंकडे पातळ पसरणें; पेरणें, विखरणें.

Bėstrīde', *v. t.* (बि-स्ट्रा'इड्)—sit astride on (horse, chair, etc.), stand astride over. दोन बाजूंना पाय टाकून बसणें किंवा उभा राहणें. (*past t.* Bestrōde; *p.p.* Bėstrĭdden, Bestrĭd, Bėstrōde)

Bĕt, *v. i. & t.* (बेट्)—risk one's money etc. against another's on the result of a doubtful event. पैज मारणें, प्रतिज्ञा करणें. *n.* a wager. पैज, पण, प्रतिज्ञा. *You bet*, you may take it as certain. निश्चित समज. *A betting-book*, a book for entering bets in. पैजा नोंदण्याचें पुस्तक.

Bėtake', *v. refl.* (बि-टे'क्)—to go to; to have recourse to, to resort. आश्रयाकरितां जाणें; अवलंब करणें. *To betake oneself to*, to try some course or means; to go to a place or person. अमुक एक मार्ग अवलंबणें; आश्रय घेणें. (*past t.* Betŏŏk, *p. p.* Betaken)

Bē'tel, *n.* (बी'टल्)—leaf of a plant chewed with areca nut. नागवेल, पानवेल, विड्याचें पान.

Bē'tel-nŭt, *n.* (बी'टल्-नट्)—areca nut. सुपारी, पोफळ.

Bĕth'el, *n.* (बे'थेल्)—hallowed spot; a place of worship. पवित्र ठिकाण; पूजास्थान.

Bethĭnk', *v. refl.* (बि-थिं'क्)—reflect, stop to think, take into one's head *to*. विचार करणें, मनन करणें, लक्षांत आणणें.

Bėtīde', *v. i. & t.* (बि-टा'इड्)—happen, happen to; befall. घडणें, गुदरणें, प्राप्त होणें; ०वर बेतणें.

Bėtīmes', *adv.* (-mz, बि-टा'इम्झ्)—early in (day, year, life, etc.), in good time, seasonably. लवकर, वेळेवर, उशीर न होतां, योग्य वेळीं.

Bėtō'ken, *v. t.* (बि-टो'कन्)—augur, indicate, suggest, be a sign of. दर्शविणें, सुचवणें, भासवणें.

Bėtray', *v. t.* (बि-ट्रे')—give up or reveal treacherously (person or thing *to* enemy), be disloyal to; reveal involuntarily. विश्वासघात करणें, गळा कापणें; नाखुषीनें उघड करणें, प्रगट करणें.

Bėtray'al, *n.* (बि-ट्रे'अल्)—a breach of trust, an act of treachery. विश्वासघात.

Bėtrōth', *v. t.* (-dh, बिट्रो'द्)—bind with promise to marry, pledge to marriage. लग्नाबद्दल वचनबद्ध होणें. (Usu. in *p. p.*)

Betrōth'al, *n.* (बिट्रो'दल्)—mutual promise or contract of marriage. लग्न करण्याबद्दल परस्परवचन, वाङ्‌निश्चय.

Bĕtt'er, *a.* (बे'टर्)—(compar. of *good* or *well*) having good qualities in a higher degree. अधिक चांगला. *n.* more skilful person. अधिक

कुशल मनुष्य. *pl.* persons of higher rank. वरिष्ठ दर्जाचे लोक. *adv.* in a better degree. जास्त बरें, जास्त चांगल्या तऱ्हेनें. *No better than*, practically. वस्तुतः, खरोखरी, व्यवहारांत. *One's better feelings*, higher self. स्वतःचा अधिक मोठेपणा. *Better part*, most. बहुतेक. One's *better half*, wife. पत्नी. *For better for worse*, on terms of accepting all results. बरें होवो वा वाईट होवो तरी, कोणत्याहि परिस्थितींत. *Had better*, would find it wiser to. अधिक बरें झालें असतें. *To be better* or *to get better*, to be less unwell. प्रकृति सुधारणें, आजार कमी होणें. *Better than one's word*, more liberal than one promised to be. कबूल केल्यापेक्षां अधिक उदार. *To get the better of*, to defeat, to outwit. पराजय करणें, वर्चस्व मिळविणें. *To think better of it*, to change one's mind. चांगला विचार करून मत बदलणें, गुणदृष्टीनें पाहणें. *Better off*, richer, more comfortable. चांगला श्रीमंत किंवा सुखी. *v. t. & i.* improve, improve upon, surpass. सुधारणें, बरा होणें, मागें टाकणें, सरशी करणें. *To better oneself*, to get better situation (wages, etc.). एकंदर स्थिति सुधारणें.

Bet'ter, Bĕt'tor, *n.* (बे'टर्)—one who bets, पैज लावणारा, जुगारी.

Bĕtt'erment, *n.* (बे'टर्-मेन्ट्)—making better, improvement. सुधारणा.

Bėtween', *prep.* (बिट्-वी'न्)—in or into a space or interval. दोन वस्तूंच्या किंवा स्थलांच्या मध्यें, दरम्यान. *Between ourselves, between you and me*, confined to us both. तुझ्या माझ्यांत, फक्त तुला व मला ठाऊक. *Far between*, at wide intervals. पुष्कळ अंतरानें असणाऱ्या, आशा पूर्ण निष्फळ झालेला. *A between-maid*, a servant assisting two others (e. g. a cook and a house-maid). दुसऱ्या दोन व्यक्तींना मदत करणारा नोकर. *Between wind and water*, at a vulnerable point. मर्मस्थानीं, वर्मी. *Between devil and deep sea*, with no escape. पळून जाण्याला मार्ग नसलेला. *Betwixt and between*, half-and-half. मध्यम स्थितींत (धड उत्तम नाहीं, धड वाईट नाहीं). *To stand between*, to mediate, be protector. मध्यस्ती करणें, रक्षक असणें. *Betweenwhiles*, *prep.* in the intervals. मधून मधून, कधीं कधीं.

Bėtwĭxt', *prep. & adv.* (बि-ट्वि'क्स्ट्)—between. दोहोंमध्यें.

Bĕv'el, *n.* (बे'व्हल्)—a tool for forming or taking angles; sloping edge or surface. कोन काढण्याचें यंत्र, विषमकोन; उतरती कडा किंवा पृष्ठभाग. *v. t. & i.* to slant or incline off to a bevel edge; to have other than a right angle. काटकोनांत नसणें, झुकता असणें; काटकोनाशिवाय दुसरा कोणताहि कोन असणें. *Bevel-edge*, edge as in a chisel. उताराची किंवा तिरकस धार. *Bevel-gear*, working one shaft from another as an angle to it by bevel wheels. दोन तिरकस दांत्यांच्या चक्रांची रचना. *Bevel-wheel*, a toothed wheel with the teeth cut to a bevel. तिरकस दांत्यांचें चाक.

Bĕv'erage, *n.* (बे'व्ह-रिज्)—liquor for drinking. मादक पेय, पिण्याची दारू.

Bĕv'y̆, *n.* (बे'व्हि)—a company (of ladies, roes, quails, larks). झुंड, समुदाय, घोळका.

Bėwail', *v. t. & i.* (बि-वे'ल्)—wail over, mourn for. शोक करणें.

Bėware', *v. i. & t.* (बि-वे'अर्)—take heed, be on one's guard. सावध असणें, जपणें, संभाळून असणें. (This verb is not inflected.)

Bėwĭl'der, *v. t.* (बि-वि'ल्डर्)—confound, perplex, confuse, lead astray. गोंधळणें, घाबरवणें, भांबावणें. Bewilderingly, *adv.*

Bėwĭl'derment, *n.* (बिवि'ल्डर्-मेन्ट्)—confusion of mind, perplexity. बावरणें, चित्तवैकल्य, गोंधळ.

Bėwĭtch', *v. t.* (बि-वि'च्)—affect by magic, cast magic spell on; delight exceedingly. जादूटोणा करणें, भारणें, मोहनी घालणें; आनंद देणें.

Bewĭtch'ing, *a.* (बिवि'चिंग्)—fascinating, captivating, enchanting. मोहक, चित्तवेधक, भारण्यासारखा. Bewitch'ingly, *adv.*

Bėwĭtch'ment, *n.* (बिवि'च्-मेन्ट्)—power of bewitching or charming, fascination. मोहिनी, भुरळ, भूल.

Bėwray', *v. t.* (bĭrā, बि-रे')—to reveal or disclose perfidiously, betray. विश्वासघातानें दर्शविणें, उघड करणें.

Bey, *n.* (bā, बे)—Turkish governor. तुर्कस्तानांतील गव्हर्नर, तुर्की सुभेदार.

Bėyŏnd', *adv. & prep.* (बि-यॉ'न्ड्)—at or to the farther side, further on; besides, more than; except. पलीकडे; अधिक, पुढें; शिवाय. *Beyond measure*, exceedingly. प्रमाणाबाहेर, अतिशय. *The beyond*, the future life, the unknown. भविष्यकाळ, अगम्य. *The back of beyond*, the remotest corner of the world. जगांतील अतिशय लांबचें स्थळ.

Be'zel, *n.* (बे'झल्)—sloped edge (of chisel, etc.); oblique faces of cut gem; groove holding watch-glass or gem. तासणीच्या पानाची निमुळती धार; कापलेल्या रत्नाचा तिरकस बाह्य भाग; कांच बसवण्याची खांचदार कडी.

Bézique', *n.* (-ēk, बि-झीं'क्)—a card-game. एक पत्त्यांचा खेळ, बिझिक खेळ.

Bī'as, *n.* (बा'यस्)—*predisposition, prejudice*; oblique direction; a weight on the side of a bowl which turns it from a straight line (in the game of bowls). मनाचा कल, वाईट ग्रह; वांक, वळण; (पेल्यांच्या खेळांत पेल्याच्या) एका बाजूला ठेवलेलें वजन (ज्या वजनानें पेल्यांची गति सरळ रेषेपासून कलती होते). *v. t.* to incline to one side, to give a bias to; to prejudice. वळविणें, झोंक किंवा कल देणें; एकाच बाजूला मनाची प्रवृत्ति करणें, पक्षपात करणें. (*Past p.* biased, biassed, बा'यस्ट्)

Bĭb, *v. i. & t.* (बिब्)—to sip, tipple, drink frequently. चाखणें, घुटका घेणें, वारंवार पिणें. *n.* a child's chin-cloth to keep dress-front clean; apron-top. लहान मुलांचें लाळेरें; मलवस्त्राचा वरील भाग. *Best bib & tucker*, best clothes. उत्तम कपडे. Bib'ber, *n.* one who drinks frequently. वारंवार मद्य पिणारा.

Bī'ble, *n.* (बा'इ-बल्)—Old and New Testament. खिस्ती धर्मपुस्तक, बायबल (जुना व नवा करार).

Bĭb'lical, *a.* (बि'ब्-लि-कल्)—of or concerning the Bible, contained in the Bible. बायबलचें, बायबलासंबंधीं, बायबलमध्यें असलेलें.

Bibliog'rapher, *n.* (बिब्लिऑ'ग्रफर्)—one who writes about books. ग्रंथकोशकार.

Bĭblĭŏg'raphy, *n.* (बिब्लि-ऑ'ग्रफि)—history of books (their editions, etc.); list of books. पुस्तकें त्यांच्या आवृत्त्या वगैरेंचा इतिहास; पुस्तकांची यादी. Bibliog'raphic, -al, *aa.*

Bĭblĭŏl'ator, *n.* (बिब्लिऑ'लॅटर्)—a worshipper of books. पुस्तकांची पूजा करणारा, ग्रंथपूजक. [Gr. *biblos*, a book and *logos*, discourse]

Bĭblĭŏl'atry, *n.* (बिब्लिऑ'लॅट्रि)—worship paid to books; excessive reverence for any book (esp. the Scriptures). पुस्तकांना दिलेला मान; कोणत्याहि पुस्तकाबद्दल अत्यादर. Bibliol'atrous, *adj.*

Bĭblĭomā'nia, *n.* (बिब्लिऑमे'निआ)—a rage for collecting rare and curious books. दुर्मिळ किंवा अपूर्व पुस्तकें जमविण्याचा शोख, ग्रंथसंग्रहाचें व्यसन. [Gr. *biblos*, a book and *mania*, madness]

Bibliomā'niac, *n.* (बिब्लिऑमे'निॲक्)—a great book-collector. मोठा ग्रंथसंग्राहक.

Bĭb'lĭophĭle, *n.* (बि'ब्लिऑफाइल्)—a book-lover. पुस्तकप्रेमी, पुस्तकांचा छंद असणारा. [Gr. *biblos*, a book & *philos*, friend]

Bĭb'lĭopōle, *n.* (बि'ब्लिऑपोल्)—a seller of (esp. rare) books. (विशेषतः दुर्मिळ) पुस्तकें विकणारा. [Gr. *biblos*, & *polein*, to sell]

Bĭblĭŏp'olў, *n.* (बिब्लिऑ'पॉलि)—selling of books. पुस्तकें विकणें.

Bĭb'ūlous, *a.* (बि'ब्यूलस्)—absorbent; addicted to drink. शोषक, स्पंजासारखा; मद्य पिणारा.

Bīcam'eral, *a.* (बाय्-कॅ'मेरल्)—with two (legislative) chambers. कायदे करणाऱ्या दोन सभा असलेला. [*Bi*+L. *camera*, chamber]

Bīcărb'onate, *n.* (बाय्-कार्'बनेट्)—carbonate containing a double amount of the acid. दुप्पट ॲसिड असलेला कार्बनेट.

Bīce, *n.* (बाइस्)—a dull blue or green pigment. फिकट निळ्या किंवा हिरव्या रंगाची पूड.

Bīcĕntē'nary, *a.* (बाय्-सेन्टी'नरि)—pertaining to two hundred years. दोनशें वर्षांचा. *n.* two hundredth anniversary or its celebration. द्विशतसांवत्सरिक उत्सव. [L. *bis*, twice & *centum*, a hundred]

Bīcĕnte'nnĭal, *a.* (बाय्-सेंटे'निअल्)—lasting or occurring every two hundred years. द्विशतवार्षिक, द्विशतसांवत्सरिक.

Bīcĕph'alus, *a.* (बाय्-से'फलस्)—two-headed. दोन डोक्यांचा. [Bi + Gr. *kephale*, Sk. कपाल the head]

Bī'cĕps, *n.* (बा'य्-सेप्स्, *pl.* bīcepses)—a muscle having two heads or double attachment. द्विशिरस्स्नायु. [Bi+*caputa*, head]

Bĭck'er, *v. i.* (बि'कर्)—quarrel, wrangle; (of stream, rain, etc.) brawl, patter; flash, glitter. भांडणें, तंटा करणें; खळखळ वाहणें; झुळझुळ हालणें.

Bĭck'ering, *n.* (बि'करिंग्)—wrangling, quarrelling. भांडण, तंटा.

Bīcŭs'pĭd, *a.* (बाय् क'स्पिड्)—two-cusped, (tooth) with two cusps or points. दोन टोकें असलेला, द्व्यग्र, द्विस्कंध (उपदाढ). [Bi + L. *cuspis*, point]

Bī'cўcle, *n.* (बा'य्-सि-कल्)—two-wheeled velocipede or vehicle. दोन चाकांची गाडी, बायसिकल. *v. i.* ride on bicycle. बायसिकलवर बसणें. Bi'cyclist, *n.* सायकलवर बसणारा. [Bi+Gr. *kuklos*, a wheel]

Bĭd, *v. t. & i* (बिड्)—command; invite; offer price. आज्ञा करणें; बोलावणें; (लिलांवांत) किंमत सांगणें. (*Past t.* bad, băde—बॅड्, bid; *p.p.* bidden, bid.) *n.* offer of price. देऊं केलेली किंमत, मागणी. *To bid defiance to* =धमकी देणें, सामन्यास बोलावणें. *To bid fair to do*, to show promise of doing. संभवनीय दिसणें, करण्याचा संभव दाखवणें. *To make a bid for*, to make an attempt to secure (favour, prize, etc.). मिळवण्याचा प्रयत्न करणें. *Bidding-prayer*, a prayer inviting

congregation to join. सर्वांनीं विशेष मागणी करण्याची प्रार्थना. *To bid adieu (goodbye, farewell) to*=जातांना निरोप घेणें.

Bĭdd'able, *a.* (बि'डेब्ल्)—ready to do what one bids, obedient, docile. आज्ञाधारक, सांगेल तें करणारा.

Bĭ'dder, *n.* (बि'डर्)—one who bids; one who offers a price at an auction. हुकुम करणारा; लिलावांत किंमत बोलणारा.

Bĭd'derў, *Bid'ree*, *n.* (बि'डरि, बि'ड्री)—an alloy of copper, tin, lead and zinc. तांबें, कथील, शिसें आणि जस्त यांचें मिश्रण.

Bĭdd'ĭng, *n.* (बि'डिंग्)—invitation; order, injunction, command; offers at an auction. आमंत्रण, बोलावणें; आज्ञा, हुकूम; लिलावांत किंमत बोलणें.

Bīde, *v. t.* & *i.* (बाइड्)—abide. वस्ती करणें, राहाणें. *To bide one's time*, to await best opportunity. उत्तम संधीची वाट पाहणें.

Bīenn'ial, *a.* (बाय्-ए'-नि-अल्)—two year long, two-yearly, taking place once in two years. द्विवार्षिक, दोन वर्षांत एकदां घडणारा.

Bier, *n.* (बिअर्)—stand on which coffin or corpse is taken to the grave. तिरडी, ताटी.

Biff, *n.* (बिफ्)—a smart blow. एक जोराचा ठोसा. *v. t.* to strike (person). एकाद्याला मारणें.

Bĭff'ĭn, *n.* (बि'फिन्)—a red cooking apple. एक जातीचें लाल फळ.

Bī'fĭd, *a.* (बा'य्-फिड्)—divided by a deep cleft into two parts. द्विधा विभागलेलें.

Bī'fōliate, *a.* (बा'य्-फो-लि-एट्)—of two leaves. दोनच लहान पानें असलेलें, द्विदल. [Bi+L. *folium*, a leaf]

Bī'fŭrcāte, *v. t.* & *i.* (बा'य्-फर्-केट्)—divide into two branches, fork. दोन शाखा करणें. *a.* forked. दुखांद्याचा, बेळक्याचा. Bifurca'-tion, *n.* विभक्तीकरण.

Bĭg, *a.* (बिग्)—large, of the largest kind, grown up; pregnant; important; boastful. मोठा; गरोदर; महत्त्वाचा; मगरूर, घमेंडखोर. *A big bug, a big wig*, an important person. बडें प्रस्थ. *To get (or grow) too big for one's boots*, (Sl.) to become conceited, to put on airs. चढेल बनणें, शिटावणें. *To look big*, to look boastfully. दिमाख करणें, दुसऱ्याला तुच्छ लेखणें. *To talk big* (i. e. boastfully)= बढाई मारणें, बढाइकी मारून दहशत घालणें.

Bĭg'amĭst, *n.* (बि'गमिस्ट्)—one who has married two husbands or two wives at a time. एकाच वेळीं असलेल्या दोन नवऱ्यांची बायको किंवा दोन बायकांचा नवरा.

Bĭ'gamous, *a.* (बि'गॅमस्)—guilty of or involving bigamy. द्विभार्याकरणाचा, द्विभर्तृकरणाचा.

Bĭg'amў, *n.* (बि'ग-मि)—having two wives or husbands at once. एकाच वेळीं दोन बायका किंवा दोन नवरे असणें. [Bi+Gr. *gamos*, marriage]

Bight, *n.* (bīt, बाइट्)—a loop of rope; a recess of coast, small bay. अढी, दोरीचें वेटोळें; उपसागर.

Bĭg'ot, *n.* (बि'गट्)—violent and unreasonable adherent of a creed or view. धर्मवेडा, धर्मवेड असलेला, कट्टा उपासक, हेकेखोर.

Bĭ'goted, *a.* (बि'गटेड्)—having the character of a bigot; blindly attached to some creed (opinion, practice, or ritual). धर्मवेडा, धर्मवेड असलेला; स्वमताग्रही, एककल्ली.

Bĭg'otrў, *n.* (बि'गट्रि)—great prejudice. स्वमताचा फाजील अभिमान, धर्मवेड, दुराग्रह.

Bĭ'jou, *n.* (bē'zhōō, बी'झू)—a jewel, trinket. एक रत्न, विशेष कारागिरीचा दागिना. (*Pl.* bijoux—बी'झू) *a.* small and elegant. लहान आणि सुंदर.

Bijou'terie, *n.* (बिजु'टरी)—jewelry. नकशीचे जवाहीर किंवा दागिने.

Bīke, *n.* & *v. i.* (बाइक्)—(colloq.) bicycle. बायसिकल, बायसिकलवर बसणें.

Bīlăt'eral, *a.* (बाय्-लॅ'टरल्)—of (on or with) two sides, between two parties. दोन बाजू असलेला, दोन बाजूंमधील. [Bi+L. *latus*, *lateris*, side]

Bĭl'berrў, *n.* (बि'ल्-बेरि)—a shrub with a deep-blue edible fruit, whortleberry. एक निळेंभोर खाण्यासारखें फळ असलेलें लहान झाड, त्या झाडाचें फळ.

Bĭl'bō, *n.* (बि'ल्बो)—a rapier, a sword. एक लहान तलवार. (*pl.* bilbos)

Bĭl'boes, *n. pl.* (ōz, बि'ल्बोझ)—an iron bar with sliding shackles for prisoners. कैद्यांच्या हातांत किंवा पायांत घालण्याच्या खोड्यासारख्या बिड्या.

Bīle, *n.* (बाइल्)—bitter fluid secreted by liver to aid digestion; derangement of bile; peevishness. पित्त; पित्तांत बिघाड; तिरसटपणा, चिडखोरपणा. *Bile-stone*, calculus in gall-bladder. पित्तातिशयानें झालेला खुतखडा.

Bĭlge, *n.* (बिल्ज्)—the nearly horizontal part of a ship's bottom; the belly of a barrel. गलबताचें पोट, गमतड; पिंपाचें पोट *Bilge-keel*, timber fastened under bilge to prevent rolling. इकडे तिकडे हालूं नये म्हणून गमतडीच्या खालीं बसविलेलें लांकूड. *Bilge-water*, stinking water collected in bilge. गमतडींत सांठलेलें घाणेरडें पाणी, घमत. *v. t.* & *i.* to stave in

the bilge of, to spring a leak in the bilge or bottom; bulge, swell out. गाबडें पडणें, घमत करणें; फुगारा येणें.

Bil'iarў, *a.* (बि'ल्यरि)—of the bile. पित्ताचा, पित्तासंबंधीं.

Bīling'ual, *a.* (बाय्-लिं'ग्वल्)—(of, in, or) speaking two languages. दोन भाषेंतील, दोन भाषा बोलणारा.

Bil'ious, *a.* (बि'ल्यस्)—liable to or affected by derangement of the bile; peevish. पित्तकर, पित्तक्षोभी, पित्तासंबंधीं; चिडखोर, तापट. Bil'iousness, *n.*

Bilk, *v. t.* (बिल्क्)—evade payment; cheat, give the slip to. पैसे देण्याचें टाळणें; फसविणें, हातावर तुरी देणें.

Board, *n.* (बोअर्ड्)—a thin plank; table; daily meals; council table, councillors, committee. फळी; (जेवावयाचें) मेज; दररोजचें जेवणखाण; पंच, सभा, संघ, मंडळ, सभासद. *On board*=on ship, train, etc. गलबतावर, गाडींत, वगैरे. *v. t. & i.* cover with board; provide or be provided with meals at fixed time; come alongside (ship), embark on. तक्तपोशी करणें; ठराविक वेळीं जेऊं घालणें; (गलबतादिकांवर) चढणें. *Boards* (*pl.*)=the stage. रंगभूमि. *Above board*, open, openly. उघडा, उघड्यावर. *To sweep the board*, to take all the cards or stakes. पत्त्याचे खेळांत सर्व बक्षिसें जिंकणें. *Bed and board*, conjugal relations. नवराबायकोचें नातें, वैवाहिक संबंध. *Groaning board*, plentiful meal. विपुल जेवण. *To go by the board*, गलबताच्या तक्तपोशीवरून खालीं पडणें; पूर्ण नाश होणें, पायमल्ली होणें.

Board'er, *n.* (बो'अर्डर्)—one who is lodged and fed at a certain price; boy at a boarding-school. दुसऱ्याकडे जेवण्याखाण्यास राहिलेला मनुष्य; जेवण्याखाण्याची सोय करणाऱ्या शाळेंतील विद्यार्थी.

Board'-fence, *n.* (बो'अर्ड्-फेन्स्)—a close fence of boards. फळ्यांचें घट्ट कुंपण किंवा कुडण.

Board'-wages, *n.* (बो'अर्ड्-वेजिस्)—servant's pay in lieu of food. खाण्यापिण्याऐवजीं नोकराला दिलेला पगार.

Board'-walk, *n.* (बो'अर्ड्-वॉक्)—foot-way of boards. फळ्या घालून केलेला पायरस्ता.

Board'ing-house, Board'ing-school, *nn.* (बो'र्डिंग्-हाउस्, बो'र्डिंग्-स्कूल्)—the house or school where persons or boys and girls board (with the teacher). वसतिगृह, मुलांची खाण्यापिण्याची सोय असलेली शाळा.

Boast, *n.* (बोस्ट्)—vain glorious statement; thing or fact one is proud of. बढाई, फुशारकी; अभिमानाची गोष्ट. *v. t. & i.* brag *of* or *about*; possess as thing to be proud of; magnify one's actions. शेखी मिरवणें; बढाई मारणें, स्वतःची बढाई मिरवणें. *To make boast of*, to announce proudly. गर्वानें जाहीर करणें.

Boas'tful, *a.* (बो'स्ट्-फुल्)—given to boasting; apt to brag or boast. फुशारकी सांगणारा, शेखी मिरवणारा; आत्मश्लाघी, बढाईखोर. Boas't-

fully, *adv.* फुशारकीनें, शेखीनें. Boas't-fulness, *n.*

Boat, *n.* (बोट्)—a small open oared or sailing vessel, steamer; a boat-shaped receptacle. लहान होडी, बोट; होडीच्या आकाराचें पात्र किंवा वाहन. *v. i.* to go or sail in a boat, to amuse oneself in a boat. बोटींतून जाणें, मौजेखातर होडींतून जाणें. *To take boat*, to embark. होडींत चढणें. *To be in the same boat with*, to have like risks etc. समदुःखी असणें, एकाच संकटांत असणें. *To have an oar in every one's boat*, to be a meddlesome person. दुसऱ्याच्या कामांत उगाच ढवळाढवळ करणें.

Boat'er, *n.* (बोटर्)—a hard straw hat (as worn in boating). एक ताठ गवताची टोपी.

Boat-hook, *n.* (बो'ट्-हुक्)—a long pole with hook and spike. आंकडा व मोठा खिळा असलेला एक लांब दांडा.

Boat'house, *n.* (बो'ट्-हाउस्)—a shed at water's edge for keeping boats. नदीकांठीं किंवा खाडीकांठीं होडी ठेवण्याची जागा.

Boat'-man, *n.* (बो'ट्-मन्)—a man who lets out boats; a waterman. होड्या भाड्यानें देणारा, होडीवाला; कसलेला वल्हेकरी.

Boat'-race, *n.* (बो'ट्-रेस्)—a rowing contest. वल्हविण्याची शर्यत, होडींची शर्यत.

Boat'swain, *n.* (bō'sn, बो'सन्)—ship's officer in charge of sails, etc. गलबतावरील एक अधिकारी.

Bŏb, *n.* (बॉब्)—weight on pendulum, etc.; bobbed hair; knot of hair, curl; horse's docked tail; (Metre) short line at the end of a stanza; jerk, bounding movement; curtsy; kinds of change in bell-ringing. लंबकाचा लोलक, ओळंब्याचें वजन; खांद्यापर्यंत पडतील असे कापलेले केंस; केंसांचा झुबका; शेंडा कापलेले घोड्याचे केंस; कवितेच्या शेवटीं असलेली लहान ओळ, ध्रुपद, पालुपद; एकदम झटकन हालवणें, हिसका; खीचें किंवा लहान मुलाचें नमन; (देवळांतील) घंटांचा आवाज बदलण्याची विशेष रीति. *v. t. & i.* move up and down; rap; jerk; cut (hair) to hang short of shoulders. खालींवर हालणें; थापट देणें, लटलट हालविणें; (केंस) खांद्यापर्यंत पडतील असे कापणें. *To bob up like a cork*, to be active or conspicuous again after defeat. पराजय झाल्यानंतर पुनः उद्योगमग्न होणें.

Bŏb, *n.* (बॉब्)—(*Sl.*; *plu.* same) a shilling. एक शिलिंग. *Dry bob*, cricketing Etonian. ईटनमधील क्रिकेटपटु. *Wet bob*, boating Etonian. ईटनमधील नाव चालविणारा.

Bŏbb'erў, *n.* (बॉ'बरि)—noisy disturbance, row. गलबला, गडबड.

Bŏbb'in, *n.* (बॉ'बिन्)—a cylinder for holding thread etc., reel, spool; a small bar and string for raising a door-latch. सुत वगैरे गुंडाळण्याची पोकळ वाटोळी कांडी, रीळ, बॉबिन; दरवाजाची कडी काढण्याकरितां तयार केलेला एक लहान दांडा व दोरी.

Bŏbb'inĕt, *n.* (बॉ'बिनेट्)—a machine-made cotton net imitating lace made with bobbins on pillow. यंत्रानें तयार केलेली सुताची फीत.

Bŏbb'ish, *a.* (बॉ'बिश्)—(*sl.*) brisk, well, (esp. *pretty bobbish*). चपळ, चलाख, चांगला.

Bŏbb'ў, *n.* (बॉ'बि)—(*sl.*) a policeman. पोलिस शिपाई.

Bŏb'olĭnk, *n.* (बॉ'बॉलिंक्)—the song-bird of the United States (so called from its cry). उत्तर अमेरिकेंतील एक गाणारा पक्षी.

Bŏb'-slĕd, Bŏb-sleigh, *n.* (बॉ'ब्-स्लेड्, बॉ'ब्-स्ले)—two short sleighs coupled for drawing logs or for tobogganing. खेळण्याकरितां किंवा लांकडाचे ओंढे ओढण्याकरितां बर्फावरून घसरणाऱ्या जोडलेल्या दोन लहान गाड्या.

Bŏb'stay, *n.* (बॉ'ब्-स्टे)—a rope holding bowsprit down. गलबताचा नाळदांडा खालीं धरण्याकरितां असलेली दोरी.

Bŏb'tail, *n.* (बॉ'ब्-टेल्)—docked tail; a horse or dog with a docked tail. झुपकेदार तुटकी शेंपूट; झुबकेदार शेंपटी असलेला घोडा किंवा कुत्रा. *a.* bobtailed. झुबकेदार शेंपटी असलेला. *Tag-rag and bobtail*, the rabble. बाजारबुणगे.

Bŏb'wĭg, *a.* (बॉ'ब्-विग्)—short-curled, not full-bottomed. आंखुड केंसाचा. *n.* a wig of short hair. आंखुड केंसाचा टोप.

Bŏche, *n.* & *a.* (-sh, बॉश्)—German. जर्मन, जर्मनींतील.

Bōde, *v. t.* & *i.* (बोड्)—foresee, foretell; portend. भविष्य सांगणें; शकुन देणें; पूर्व-सूचना करणें.

Bōde'ful, *a.* (बो'ड्-फुल्)—threatening, fore-boding, ominous. अशुभसूचक, अशुभलक्षणाचा, शकुनाचा.

Bŏd'ice, *n.* (बॉ'डिस्)—close-fitting part of woman's dress down to waist; inner vest over stays. कंचुकी, चोळी, कांचोळी; बॉडिस.

Bo'died, *a.* (बॉ'डिड्)—possessed of a body, embodied. देह असलेला, देही, शरीरी.

Bŏ'dĭless, *a.* (बॉ'डि-लेस्)—incorporeal; separated from the body. अमूर्त; देह नसलेला, शरीररहित.

Bo'dĭlȳ, *a.* (बॉ'डिलि)—of or affecting the body. शरीराचा, शारीरिक. *adv.* in person; with the whole bulk, as a whole. स्वतः प्रत्यक्ष; अगदीं, सर्व, पूर्णपणें.

Bŏ'dkĭn, *n.* (बॉ'ड्किन्)—*a pointless thick* needle with large eye for drawing tape etc. through hem; a long pin for fastening hair. मुंढा दाभण; बायकांचा केंस अटकविण्याचा कांटा, आंकडा. *To ride* or *sit bodkin*, to be squeezed between two persons. दोन मनुष्यांमध्यें अगदीं चेंगरून बसणें.

Bŏd'ȳ, *n.* (बॉ'डि)—a man or animal dead or alive; trunk apart from head and limbs; upper garment (minus sleeves and collar), bodice; person; aggregate of persons or things; solidity, substance. सजीव किंवा निर्जीव शरीर; डोकें आणि शरीराचे अवयव खेरीज करून राहिलेला शरीराचा भाग; अंगाबरोबर घट्ट बसणारा कमरेपर्यंतचा कपडा, बॉडिस; मनुष्य; टोळी, गट, मुख्य भाग, जड द्रव्य. *v. t.* give, mental shape to (with usu. *forth*); exhibit in outward shape; typify. आकृति देणें, आकार देऊन रूपास आणणें; नमुना म्हणून देणें. *To keep body and soul together*, to remain alive. कसेंतरी जगण्याइतकें खाऊन जिवंत राहणें. *Body of Christ*, sacramental bread. संस्कारित अन्न. *In a body*, all together. सर्व मिळून, एकजुटीनें. *Body politic*, State. राजसंस्था, एकाच राजनीतीनें चालणारी संस्था. *Heavenly body*, the sun, star, etc. सूर्य, चंद्र, तारे वगैरे.

Bŏd'ȳ-guard, *n.* (बॉ'डि-गार्ड्)—retinue, escort, personal guard. हुजरात, शरीररक्षक.

Bŏdȳ'-servant, *n.* (बॉ'डि-सर्व्हन्ट्)—a valet, a personal attendant. खिद्‌मतगार, हुजऱ्या.

Bō'er, *n.* (बो'अर्)—a South-African of Dutch descent. दक्षिण आफ्रिकेंतील डच वसाहतवाला. *a.* of the Boers. बोअर लोकांचा.

Bŏg, *n.* (बॉग्)—a piece of wet spongy ground, morass. दलदल. *v. t.* to submerge in bog. दलदलींत किंवा चिखलांत रुतणें.

Bŏg'gle, *v. i.* (बॉ'गल्)—start with fright; hesitate, demur (*at* or *about*); equivocate; fumble. भीतीनें दचकणें; कांकूं करणें, अडखळणें; संदिग्ध किंवा दुटप्पी बोलणें; चांचपडणें, अडल्याप्रमाणें शोधणें.

Bŏg'-trŏtter, *n.* (बॉ'ग्-ट्रॉटर्)—an Irishman. आयर्लंडांतील शेतकरी.

Bŏg'gy, *a.* (बॉ'गि)—spongy, marshy, miry. दलदलीत, चिखलाचा.

Bō'gie, *n.* (बो'गि)—an undercarriage, with two or more wheel-pairs, pivoted below the end of a locomotive or railway-car. गाडीचा डबा, दोन अथवा अधिक चाकांच्या जोड्यांवर बसविलेली सखल चौकट, रुळावर चालणारी लांब चौकट.

Bō'gle, *n.* (बो'गल्)—a phantom, goblin; bugbear, scarecrow. भूत, पिशाच्च; बागुलबोवा, फाटकेतुटके कपडे घातलेलें बाहुलें.

Bō'gŭs, *a.* (बो'गस्)—counterfeit, sham. खोटें, बनावट.

Bō'gy, Bō'gey, *n.* (बो'गि)—the devil, goblin; bugbear. भूत, पिशाच्च, राक्षस; बागुलबोवा. *Bogey, Colonel Bogey*, score that good golfer should do hole or course in. गोल्फ खेळामध्यें चांगल्या खेळाडूनें केलेला स्कोअर.

Bōhea', *n.* (-hē, बोही')—black tea of lowest quality (last crop of the season). अगदीं हलक्या प्रतीचा काळा चहा.

Bōhē'mĭan, *a.* & *n.* (बोही'-मिअन्)—socially unconventional; a man of free and easy habits, manners, and sometimes morals (esp. of artists, etc.). सामाजिक दृष्ट्या स्वतंत्र वृत्तीचा, शिष्टाचाररहित; हव्या त्या ठिकाणीं बसणारा, हवें तें खाणारा (असा नट, ग्रंथकार किंवा इतर कसबी). Bōhē'mĭănĭsm, *n.*; Bōhē'mĭanīze, *v. t.*

Boĭl, *n.* (बॉइल्)—hard inflamed tumour; boiling heat. गळूं, केसतूड; अत्यंत उष्णता. *v. i.* & *t.* bubble up with heat; be agitated; cook by boiling. उकळणें; ऊत येणें; शिजणें, शिजवणें. *To boil over*, overflow, be overflowed by bubbling up. ओतणें, ओतूं जाणें. *To boil down* or *away*, to reduce or convert to vapour by boiling. उकळून उकळून आटून जाणें. *To keep the pot boiling*, to get a living. चरितार्थ चालणें, पोटापाण्यास मिळणें. *Boiling hot*, boiling, very hot. उकळता, फार कढत. *His blood boils*, he was very indignant. तो रागानें लाल झाला आहे. *Boiled shirt*, cotton or linen shirt with starched front. पुढील भागाला खळ असलेला सुती किंवा तागाच्या कापडाचा शर्ट.

Boĭl'er, *n.* (बॉ'इ-लर्)—vessel for boiling, esp. for making steam in engine; water-heating tank. वाफ तयार करण्याचें पात्र; कढई. *Boiler deck*, lower deck of a steamer. आगबोटींतील वाफभांडें ठेवण्याकरितां केलेला लहानसा मजला.

Boĭl'ĭng, *n.* (बॉ'इ-लिंग्)—food prepared by boiling. उकळून तयार केलेलें अन्न.

Boĭl'ing-poĭnt, *n.* (बॉ'इलिंग्-पॉइंट्)—temperature at which anything boils (water at sea-level, 212° F., 100° C.); high excitement. पाणी उकळण्याच्या वेळची उष्णता; फार खळबळ, भयंकर क्षोभ.

Boist'erous, *a.* (बॉइ'स्टरस्)—violent, rough (wind, sea, behaviour, speech, persons); noisily cheerful. सोसाट्याचा; आडदांड, गडबड्या, धांदल्या. Boi'sterously, *adv.* सोसाट्यानें, आडदांडपणानें.

Bold, *a.* (बोल्ड्)—courageous, enterprising, confident; impudent, immodest; vigorous, well-marked, clear (imagination, drawing, description, features, etc.). धीट, धाडसी; अविचारी, उद्धट; जोराचा, स्पष्ट. Bo'ldly, *adv.* धाडस करून, बेधडक. Bo'ldness, *n.* निर्भयपणा, धाडस, उद्दामपणा. *To make bold, To make so bold as*, presume, venture. धाटर्य करणें, धाडस करणें.

Bōle, *n.* (बोल्)—the body or stem of a tree, the trunk. झाडाचा बुंधा, झाडाचें खोड.

Boler'ō, *n.* (बॉले'अरो) (pl. Boleros)—a Spanish dance; a woman's short loose jacket with or without sleeves. स्पॅनिश लोकांचा नाच; बायकांचें लहान सैल जाकीट.

Bōll, *n.* (बोल्)—the pod or capsule of a plant, a round seed-vessel of flax, cotton, etc. झाडाचें बोंड, ताग, कापूस वगैरेचें बोंड.

Bŏ'llard, *n.* (बॉ'लर्ड्)—a strong post fixed on a wharf or quay for securing ropes. दोऱ्या बांधण्याकरितां धक्क्यावर बसवलेला मजबूत खांब.

Bŏl'shĕvĭck, *n.* (बॉ'ल्-शिव्हिक्)—an advocate of proletarian dictatorship in Russia by soviets, Russian communist; any revolutionary. रशियांतील कनिष्ठ वर्ग किंवा मजूर वर्ग यांचीच सत्ता असावी असें प्रतिपादन करणारा, बोल्शेव्हिक, रशियांतील कम्युनिस्ट; क्रांतिकारक. Bo'lshevism, *n.*; Bo'lshevist, *n.* & *a.*

Bō'lster, *n.* (बो'ल्स्टर्)—long stuffed pillow. तक्या, लोड. *v. t.* & *i.* support with bolster, prop up; fight with bolsters. गाद्या लावणें, आधार देणें, टेकू देणें, उचलून धरणें; तक्ये घेऊन भांडणें.

Bōlt, *n.* (बोल्ट्)—a short heavy arrow of cross-bow; door-fastening; headed metal pin secured with rivet or nut; running away. वज्र; खीळ, दरवाजाचें अडकवण; खिळी, अडसर; पलायन करणें. *v. i.* & *t.* dart off, run away; gulp down unchewed; fasten (door) with bolt. निसटणें, पळून जाणें; गटागट खाणें; खीळ लावणें. *adv.* quite (upright). सरळ उभा. *Bolt from the blue*, complete surprise. अकल्पित आश्चर्याची गोष्ट. *Fool's bolt soon shot*, a fool soon speaks and is soon silenced. मूर्ख मनुष्य बोलतो आणि लगेच स्तब्ध होतो. *To bolt in*, shut in by bolting door. दरवाजा लावून आंत अडकवून ठेवणें. *To bolt out*, to exclude by bolting door. दरवाजा लावून आंत येऊं न देणें.

Bōlt, Boult, *v. t.* (बोल्ट्)—to sift; investigate. चाळणें; पूर्ण चौकशी करणें, छाननी करणें.

Bōlt'er, *n.* (बो'ल्टर्)—a political deserter. राजकीय फरारी.

Bōl'ter, Boul'ter, *n.* (बो'ल्टर्)—a sieve, a sifting machine. चाळण, चाळणी.

Bō'lus, *n.* (बो'लस्)—a big pill. मोठी गोळी, गुटिका.

Bŏmb, *n.* (बॉम्)—a case of explosive fired from gun or thrown by hand. कुलपी गोळा, बॉम. *v. t.* & *i.* to assail with bombs, to throw bombs. कुलपी गोळे मारणें, कुलपी गोळ्यांचा भडिमार करणें. *Bomb-proof, a.* (shelter) strong enough to resist shells, safe from bombs. कुलपी गोळ्यांनींहि अभेद्य, कुलपी गोळ्यांपासून सुरक्षित.

Bŏmbärd', *v. t.* (बॉ'म्बार्ड्)—to batter with shot and shell (esp. of warships attacking town); to assail persistently (with abuse, argument etc.). कुलपी गोळ्यांचा भडिमार करणें; शिवीगाळ करून हल्ला करणें. Bombar'dment, *n.*

Bombardier', *n.* (bŭmb-, बम्बार्डि'अर्)—an artillery non-commissioned officer who is appointed to the service of mortars and howitzers. तोफखान्यावरील एक बिनसनदी ('कमिशन' नसलेला) अधिकारी.

Bŏm'basine, *n.* (-zēn, बॉ'म्बझीन्, or बम्बझीन्)—a twilled fabric (ordinarily black) of worsted with silk or cotton or alone (much used for mourning). (विशेषतः सुतकाच्या वेळीं वापरलें जाणारें) ट्विलचें किंवा दोरव्याचें कापड. [Gr. *bombyx*, silk]

Bŏm'bast, *n.* (बॉ'म्बस्ट्)—high-sounding words, inflated talk. दबदार किंवा बढाईचें बोलणें, निरर्थक भाषण. Bombas'tic, *a.* दबदार, डौलाचा.

Bŏm'ber, *n.* (-mer, बॉ'मर्)—a soldier or aeroplane using bombs. बॉम फेंकणारा शिपाई किंवा विमान.

Bonăn'za, *n.* (बोनॅ'न्झा)—a rich mine; source of great wealth. संपत्तीची खाण; विपुल संपत्तीचें साधन.

Bŏn'bŏn, *n.* (बॉ'न्-बॉन्)—sweetmeat, a Christmas cracker. खाऊ, मिठाई.

Bŏnd, *n.* (बॉन्ड्)—that which binds or unites; covenant or binding agreement; fetters, chains. बंधन; रोखा, दस्तऐवज; सांखळी, शृंखला. *v. t.* to place goods in bond; to guarantee payment by issue of bonds. खत करून देणें, गहाण ठेवणें; बॉंड्स काढून पैसे देण्याची हमी घेणें. *Bond-holder, n.* person holding a bond. मुदतीचे कर्जरोखे विकत घेणारा. *Bonded ware-*

Boo'dle, *n.* (बूडल्)—money for political bribery, etc.; a card-game. राजकीय लाचलुचपतीकरितां ठेवलेला पैसा; एक प्रकारचा पत्त्यांचा खेळ.

Book, *n.* (बुक्)—any printed or written literary composition forming a considerable collection of leaves made available for reading; a volume; a division of a volume; a particular part (generally including several chapters or sections); a division of a subject in the same volume; a register or record; person's bets on a race. पुस्तक; ग्रंथ; ग्रंथाच्या एक भाग, पुस्तक; ग्रंथाचा विशिष्ट भाग; एकाच ग्रंथांतील विषयविभाग; हिशोबाचें वगैरे पुस्तक, चोपडी, रजिस्टर; शर्यतींतील पैजा. *A book of reference*, a book not read continuously but used intermittently for information. संदर्भग्रंथ. *To take a leaf out of somebody's book*, to imitate one. एखाद्याचें अनुकरण किंवा नक्कल करणें. *Without book*, without authority, from memory. पुस्तकांवांचून, स्मरणानें. *In good books*, in favour. मर्जींतील. *In bad* or *black books*, in disfavour. गैरमर्जींतील. *To bring to book*, to call to account. खुलासा करण्यास लावणें. *v. t.* to enter in a book or list; secure (seat, etc.) in advance. नोंद करणें; आगाऊ जागा मिळवून ठेवणें.

Book'-binder, *n.* (बुक्-बाइन्डर्)—one who binds books. पुस्तकें बांधणारा.

Book'-binding, *n.* (बुक्-बाइन्डिंग्)—the act or practice of binding books. पुस्तकें बांधणें.

Book'-case, *n.* (बुक्-केस्)—a case with shelves for books. पुस्तकें ठेवण्याचें कपाट किंवा मांडणी.

Book'-concern, *n.* (बुक्-कन्सर्न्)—a publishing house. प्रकाशनगृह.

Book'ie, *n.* (बुकि)—(slang) a betting bookmaker. पैजांची नोंदवही ठेवणारा.

Book'ing-clerk, *n.* (बुकिंग्-क्लार्क्)—a clerk who issues tickets. तिकिटें विकणारा कारकून.

Book'ing-office, *n.* (बुकिंग्-ऑफिस्)—an office for sale of tickets. तिकिटें विकण्याचें ऑफिस, तिकिट ऑफिस. (Also, Booking-hall)

Book'ish, *a.* (बुकिश्)—given to book-lore. पुस्तकव्यसनी, पुस्तकप्रिय.

Book'-keeper, *n.* (बुक्-कीपर्)—one who keeps accounts. हिशेब ठेवणारा, मुनीम.

Book'-keeping, *n.* (बुक्-कीपिंग्)—the art of recording mercantile transactions in a regular and systematic manner. हिशेब ठेवण्याची विद्या, जमाखर्च.

Book'-maker, *n.* (बुक्-मेकर्)—one who compiles books for profit; a professional betting man. फायद्याकरितां पुस्तकें लिहिणारा; धंदेवाईक पैज मारणारा.

Book'muslin, (बुक्-मझ्लिन्)—a fine kind of muslin folded like a book. पुस्तकासारखी घडी केलेली एक जातीची उत्तम मलमल.

Book'-plate, *n.* (बुक्-प्लेट्)—a special label with owner's name, crest, etc. for pasting into books. पुस्तकांत लावण्याची मालकाच्या नांवाची चिठ्ठी.

Book'-post, *n.* (बुक्-पोस्ट्)—that arrangement in the post office by which books, printed matter, and manuscripts are conveyed at a special rate. पुस्तकें, छापील कागद वगैरे विशिष्ट दरानें पाठविण्याची पोस्टाची व्यवस्था.

Book'-seller, *n.* (बुक्-सेलर्)—one who sells books. पुस्तकें विकणारा, ग्रंथविक्रेता. Book-selling, *n.* पुस्तकें विकणें.

Book'-shop, *n.* (बुक्-शॉप्)—a shop for sale of books. पुस्तकांचें दुकान. (Also, Book-stall, Book-store)

Book'-work, *n.* (बुक्-वर्क्)—the study of rules etc. (as opposed to practice). केवळ पुस्तकांचा अभ्यास.

Book'worm, *n.* (बुक्-वर्म्)—a book-destroying maggot; a great reader. कसर; वाचनाचा अत्यंत शोखी.

Boom, *n.* (बूम्)—a spar stretching sail-foot and attached at one end of the mast; floating timber barrier (across harbour etc.); deep resonant sound; sensational activity in commerce, etc. शिडाचें कापड तळाशीं लांब ताणण्याकरितां वापरलेली काठी, शीड ताणण्याची तळकाठी; बंदरांत आडवा बांधलेला तरंगता लांकडी प्रतिबंध; मोठा घुमणारा आवाज; व्यापारांतील खळबळ. *v. i. & t.* to emit boom; to be in great demand; to win sudden popularity for (an invention, cause, etc.), by advertising. घुमघुमणें; मोठी मागणी असणें; एकदम लोकप्रियता संपादन करणें.

Boo'merang, *n.* (बूमरँग्)—an Australian missile of curved wood that can be so thrown as to return to the thrower. लढाईच्या वेळीं आस्ट्रेलियन लोक वापरीत असलेला वांकडा सोटा.

Boon, *n.* (बून्)—a request; a favour, gift. विनवणी; दान, कृपा, वर. *a.* bounteous; congenial, jolly, convivial. उदार; आनंदी, उल्हासी.

Boor, *n.* (बुअर्)—a rustic, rude peasant; ill-mannered man. खेडवळ; अडाणी माणूस, गांवढळ. Boor'ish, *a.* unmannerly. गांवढळ, खेडवळ. Boor'ishly, *adv.*; Boor'ishness, *n.*

Boost, *n.* (बूस्ट्)—a hoist, lift-up; puff. (माल वगैरे) वर उचलून नेण्याचें साधन किंवा यंत्र: फुंकारा, झपाटा. *v. t.* to help with a push, boom; (Electr.) to supplement voltage of battery. जोर देऊन पुढें आणणें, तेजी आणणें; विद्युच्चालक शक्तीच्या व्होल्टाला मदत करणें.

Boo'ster, *n.* (बूस्टर्)—an indefatigable promoter. अविश्रांत श्रम करून भरभराटीस आणणारा.

Boot, *n.* (बूट्)—a foot-covering of leather, etc. coming above the ankle; (hist.) an instrument of torture; a luggage-receptacle in a coach under the guard's and coachman's seat. घोट्यापर्यंत येणारा उंच जोडा, बूट: छळ करण्याचें साधन; गाडींत सामान ठेवण्याची पेटी. *Boot is on the other leg*, truth or responsibility lies just the other way round. सत्य किंवा जबाबदारी ही दुसऱ्याच बाजूला आहे. *To have one's heart in one's boots*, to be in terror. अतिशय भयभीत होणें, गर्भगळित होणें. *To die in one's boots*, to die not in bed. (चांगली तब्यत असतांना) एकाएकीं मरण येणें. *Boot and saddle*, cavalry signal to mount. घोड्यावर सज्ज होण्यास (रणवाद्य फुंकून) केलेली सूचना. *To boot*, as well; into the bargain. आणखी, शिवाय; फायद्यांत. *Boot-hose*=पायमोजा. *v. i. impers.* to be of avail. लाभणें, लाधणें. [E. g. It boots us little; what boots it?]

Boo'ted, *a.* (बूटिड्)—having boots on. बूट घातलेला.

Bootee', *n.* (बूटी')—kinds of lady's and infant's boot. बायकांचा किंवा अगदीं लहान मुलांचा बूट.

Booth, *n.* (बूद्)—structure of canvas or wood (erected at fairs, etc.). जत्रेंत वगैरे तात्पुरतें बांधलेलें दुकान.

Boot'-jack, *n.* (बूट्-जॅक्)—an appliance for pulling boots off. बूट काढण्याची पद्धत.

Boot'-lace, *n.* (बूट्-लेस्)—a string or leather strip for lacing boots. बूट बांधण्याची दोरी, बुटाची लेस.

Boot'legger, *n.* (बूट्-लेगर्)—one who smuggles or sells by retail prohibited liquor. कायद्यानें मना केलेली दारू (जकात दिल्याशिवाय) चोरून नेणारा किंवा किरकोळ विकणारा. Bootlegging, *n.*

Boots, *n.* (बूट्स्)—a servant at an inn (who cleans boots, conveys luggage, etc.). धर्मशाळेंतील बूट वगैरे साफ करणारा नोकर.

Boot'less, *a.* (बूट्लेस्)—unavailing; without boots. निरर्थक, व्यर्थ; बुटाशिवाय, बूट नसलेला.

Boot'-maker, *n.* (बूट्-मेकर्)—one whose occupation is to make boots. बूट तयार करणारा.

Boot'-trees, *n. pl.* (बूट्-ट्रीज्)—moulds for keeping boots in shape. बुटांला आकार आणण्याचे ठोकळे.

Boo'ty, *n.* (बूटि)—spoil taken from an enemy in war, pillage, plunder or profit acquired in common, a prize. लूट, लुटीचा माल.

Booze, *v. i.* (बूझ्)—to fuddle oneself with drink, to drink largely. दारू झोंकणें, दारू यथेच्छ पिणें. *n.* a drinking-bout; a drink. मद्य वगैरे पिण्याची चढाओढ; मद्य, पेय. *Booze-hoisting*, (slang) drinking liquor. मद्यपान.

Boo'zy, *a.* (बूझि)—drunk, merry with liquor, given to drink. प्यालेला, दारूनें गुंग झालेला.

Bo-pee'p, *n.* (बो-पी'प्)—a game of hiding and suddenly appearing to child. कुकडीकूका खेळ, कुकू.

Bora'cic, *a.* (बोरॅ'सिक्)—of borax. सवागीचा, टांकणखारासंबंधीं.

Bo'rage, *n.* (बॅ-, बॅ'रिज्)—a blue-flowered plant (used to flavour claret-cup, etc.). एक निळीं फुलें असलेलें लहान झाड.

Bor'ax, *n.* (बो'रॅक्स्)—a salt used as antiseptic and in soldering. टांकणखार, क्षार, पाचनक.

Bordeaux', *n.* (-dō, बॉर्डो')—a southern French wine, claret. दक्षिण फ्रान्समधील दारू.

Bord'er, *n.* (बॉर्डर्)—side, edge, boundary or part near it; distinct edging round anything. सीमा, हद्द; कडा. *v. t. & i.* to be a border to; to finish a thing off with a border. चिकटून असणें, लगत असणें; गोट किंवा कांठ लावणें. *To border upon*, to resemble. सारखा दिसणें.

Bord'erer, *n.* (बॉर्डरर्)—living on the border; a dweller on the English and Scottish frontier. शिवशेजारी; इंग्लंड आणि स्कॉटलंड यांच्या सरहद्दीवर राहणारा.

Bore, *past tense* of Bear.

Bore, *v. t. & i.* (बोअर्)—to make a hole (esp. with a revolving tool); to weary by tediousness; to push another, push aside. (गिरमिटानें) भोंक पाडणें; कंटाळा आणणें, त्रास देणें; दुसऱ्याला पुढें ढकलणें, पुढें घुसणें. *n.* the hollow of the gun-barrel, its diameter, calibre; a tiresome person, twaddler. (बंदुकीची किंवा इतर नळीची) लांब पोकळी, बंदुकीच्या नळीचें भोंक; व्यर्थ बोलून कंटाळा आणणारा, त्रासदायक मनुष्य, व्याप.

Bore, *n.* (बोअर्)—a tide-wave of exceptional height rushing up estuary. नदीच्या मुखा जवळ उसळणारी भरतीची प्रचंड लाट.

Bor'eŭs, *n.* (बो'रिअस्)—the north wind. उत्तरेकडील वारा.

Bor'eal, *a.* (बो'रिअल्)—of Boreas, of the north. उत्तरेकडील वाऱ्यासंबंधीं, उत्तरेकडचा.

Bore'dom, *n.* (बो'अर्डम्)—being bored, ennui, bored state. त्रास, थकवा.

Bŏ'ric, *a.* (बॉ'रिक्)—of boron. बोरॉन (या रसायनशास्त्रांतील) मूलतत्त्वासंबंधीं.

Born, *a.* (बॉर्न्)—destined from birth. उपजत, जन्मतःच. *To be born*, to come into the world by birth. जन्मणें. *Born of*, owing origin to. ०पासून झालेला. *Born with a silver spoon in the mouth*, destined to wealth. गर्भश्रीमंत. *Born under a lucky star*, destined to good luck. चांगल्या नक्षत्रावर जन्मलेला. *In all my born days*, in all my life. आजन्मांत, सर्व जन्मांत.

Bŏr'ŏn, *n.* (बो'रॉन्)—a non-metallic solid element (a dark-brown powder). एक रसायनशास्त्रांतील मूलतत्त्व, बोरॉन.

Bo'rough, *n.*(-ŏ, ब'रो)—a town with a municipal corporation. म्युनिसिपालिटी असलेलें शहर. *Rotten borough*, a borough no longer (before 1832) having real constituency. मोडकळीला आलेला बरो, लोकसंख्येच्या मानानें फार थोडी वस्ती असूनहि प्रतिनिधि निवडून देणारें शहर. (अशीं शहरें १८३२ नंतर इंग्लंडांत रद्द केलेलीं आहेत.)

Bŏ'rrow, *v. t.* & *i.* (-ŏ, बॉ'रो)—to get temporary use of (with promise of returning); to borrow money; to plagiarize; (Golf) to allow for the wind or slope. उसणें घेणें; कर्ज काढणें; दुसऱ्याचे ग्रंथांतून चोरून घेणें; वाऱ्याला किंवा उतरणीला जागा देणें. *Borrowed plumes*, *fig.* उसना मोठेपणा.

Bor'stal, *n.* (बॉ'र्स्टल्)—*Borstal system*, system of imprisonment for young criminals. लहान गुन्हेगारांकरितां कैदपद्धति. (Borstal is in Kent).

Bor'zoi, *n.* (बॉअ'र्-झॉय्)—a Russian wolf-hound. रशियांतील एक शिकारी कुत्र्यांची जात.

Bos, *n.* (बॉस्)—(slang) a bad shot or guess. चुकीचा नेम किंवा अंदाज. *v. i.* & *t.* to miss, to bungle. ढोबळ चूक करणें.

Bŏs'cage, Bŏs'kage, *n.* (बॉ'स्-किज्)—shrubs of trees, masses of trees or shrubs. जंगल, झाडी.

Bosch, *n.* (bŏsh, बॉश्)—(South-African) a wood, a bush. रान, झुडुप.

Bosch'bok, *n.* (बॉ'श्-बॉक्)—an antelope, a bushbuck. हरिण, काळवीट.

Bosch'man, *n.* (बॉ'श्-मन्)—Bushman. अरण्यांत राहणारा.

Bosch'vark, *n.* (बॉ'श्-वर्क्)—species of wild pig. एका जातीचें रानटी डुकर.

Bosch'veld, (-velt), *n.* (बॉ'श्-वेल्ट्)—a bush country. झाडाझुडुपांचा प्रदेश.

Bosh, *n.* & *int.* (बॉश्)—(colloq.) a foolish talk, nonsense. मूर्खपणाचें बोलणें, व्यर्थ बडबड. *v. t.* (slang) to make a fool of, to tease मूर्ख बनवणें, त्रास देणें.

Bŏs'ky̆, *a.* (बॉ'स्कि)—wooded, bushy, with shrubs or trees. झाडेंझुडुपें असलेला.

Bo'som, *n.* (bŏŏz-, बु'झम्)—the breast, that part which is about the breast; an expanse or onfolding space. छाती, वक्षःस्थळ; विस्तार. *Bo'som friend*, a confidential friend. जिवलग मित्र, जीवश्च कण्ठश्च सखा.

Bŏss, *n.* (बॉस्)—the master, manager, or overseer; a round knob or stud, a protuberance. वरचा अधिकारी, मॅनेजर; गोंडा, बोंड पुढें आलेला भाग. *v. t.* to be the boss of, to control. धनी होणें, ताब्यांत ठेवणें. *To boss the show*, to make all arrangements. (एखाद्या नवीन कामाची) सर्व कांहीं व्यवस्था करणें. *Bossed*, *a.* having bosses. गोंडे असलेला.

Bŏt, *n.* (बॉट्)—a parasitic worm. एक अन्योपजीवी किडा. *The bots*, a horse disease caused by the worm. त्या किड्यापासून होणारा एक घोड्यांचा रोग.

Botăn'ic, Botăn'ical, *aa.* (बॉटॅ'निक्, बॉटॅ'निकल्)—of botany. वनस्पतिशास्त्रासंबंधीं, वनस्पतींची.

Bŏt'anist, *n.* (बॉ'ट-निस्ट्)—a student of botany. वनस्पतिशास्त्राचा अभ्यासक, वनस्पतिशास्त्रवेत्ता.

Bŏt'anize, *v. i.* (बॉ'टनाइझ्)—to study plants. वनस्पतिशास्त्राचा अभ्यास करणें.

Bŏt'any̆, *n.* (बॉ'टनि)—the science of plants. वनस्पतिशास्त्र.

Bŏtch, *v. t.* (बॉच्)—to patch, to mend clumsily. ओबडधोबड ठिगळ मारणें. *n.* a clumsy patch. ठिगळ. Botcher, *n.* ओबडधोबड काम करणारा.

Bŏth, *a.* (बोथ्)—the pair of. दोन्ही. *pron.* both persons or things. दोन्ही इसम किंवा वस्तु.

Bŏth'er, *v. t.* & *i.* (-dh-, बॉ'दर्)—to give trouble to; to perplex; to take trouble. त्रास देणें; सतावणें; खस्ता खाणें, त्रास घेणें. *n.* worried state, fuss. दगदग, नसता उपद्व्याप. Botherā'tion, *n.* & *int.*

Bŏth'ersome, *a.* (बॉ'दर्-सम्)—bothering. त्रासदायक.

Bŏ'thy̆, Bŏ'thie, *n.* (बॉ'दि)—a hut, a cottage; one-roomed building in which workmen are lodged. झोंपडी; एक खोलीचें घर.

Bō'-tree, *n.* (बो'-ट्री)—the name given in Ceylon to the Pipal tree (allied to the Banian) पिंपळाचें झाड.

Bŏt'tle, *n.* (बॉ'टल्)—a narrow-necked vessel (with a cork or stopper); a bundle of hay or straw. बाटली, शिसा ; बाळलेल्या गवताची पेंढी. *v. t.* to store in bottles; (slang) to nab, to catch. बाटलींत भरून ठेवणें, शिशींत ओतणें; पकडणें, पकडून ठेवणें. *To bottle up*, to conceal for a time, restrain (anger, etc.). लपवून ठेवणें, दाबून ठेवणें. *The bottle*, drinking. पान, मद्यपान. *Over a bottle*, while drinking. पीत असतांना. *To bring up on the bottle*, not to be fed on the breast. वरच्या दुधावर पोसणें. *To look for a needle in the bottle of hay*, to make a hopeless search. निरर्थक शोध करणें.

Bott'le-hōlder, *n.* (बॉ'टल्-होल्डर्)—an attendant in a boxing match (administering refreshment, etc.). ठोंसाठोंशीच्या खेळांतील गड्याचा पाठिराखा.

Bott'le-washer, *n.* (बॉ'टल्-वॉशर्)—an underling. बगल्या, हस्तक, क्षुद्र मनुष्य.

Bŏtt'om, *n.* (बॉ'टम्)—the lowest part of anything, the base; what is below the surface; the bottom of a ship's hull. बूड; तळ; जहाजाचा तळभाग. *v. t.* to touch the bottom of (sea, etc.), to sound; to find the extent or real nature of, to find the truth of. तळाला स्पर्श करणें, तळाचा थांग लागणें; खरें स्वरूप किंवा सत्य शोधून काढणें. *To stand on own bottom*, to be independent. स्वतंत्र असणें, आपल्या पायांवर उभें राहणें. *Bottom up*, upside down. उलटापालटा, उलथापालथा. *To go* or *send to the bottom*, to sink. बुडणें, बुडवणें. *To touch the bottom*, to be at the lowest point or on firm facts. तळ लागणें, बूड गांठणें. *To* or *from the bottom of one's heart*, genuinely, profoundly. अगदीं अंतःकरणापासून, मनःपूर्वक. *To be at the bottom of*, to be the cause of. मुळाशीं असणें, कारण असणें. *Bet your bottom dollar*, stake all. सर्व कांहीं पणाला लाव.

Bŏtt'om-land, *n.* (बॉ'टम्-लॅन्ड)—the low land along a river. नदीच्या बाजूची सखल जमीन.

Bŏtt'omless, *a.* (बॉ'टम्-लेस्) —without the bottom (a chair, etc.); unfathomable तळ नसलेला; अगाध.

Bŏtt'ommōst, *a.* (बॉ'टम्-मोस्ट्)—lowest down. अगदीं खालीं किंवा अत्यंत खोल असलेला.

Bŏtt'omrȳ, *n.* (बॉ'टम्-रि)—borrowing of money by the owner on the security of a ship. जहाज तारण ठेवून कर्ज काढणें.

Bŏt'ūlĭsm, *n.* (बॉ'ट्युलिझम्)—sausage-poisoning. कबाबविष.

Boud'oir, *n.* (bōōd'war, बू'डू-वॉर्)—a lady's small private room. जनानखाना.

Bough, *n.* (बाउ)—a branch of a tree. झाडाची फांदी.

Bought, *pa. t.* & *pa. p.* of Buy.

Bou'gie, *n.* (bōōzhē, बू'झी)—a surgical instrument for exploring passages of the body. सळई, वत्ती.

Boui'llon, *n.* (bōōlyawn, बू'ल्-यॉं)—broth, soup. मांसाचें कढण, रसा, सूप.

Boul'der, *n.* (bōl-, बो'ल्डर्)—a large water-worn rounded stone, cobble; a detached rock. पाण्यानें घांसून वाटोळा झालेला मोठा दगड, गोटा; सुटा झालेला खडक.

Boule'vard, *n.* (bōōl'vär, बू'ल्-व्हार्)—a broad street with lines or rows of trees. दुतर्फा झाडांच्या रांगा असलेला रुंद रस्ता.

Bounce, *v. i.* & *t.*(बाउन्स्)—to spring up after striking ground; jump up (esp. in anger); hustle or bluff. सटकन वर उडणें; रागानें उडी मारणें; बढाई सांगणें, दडपून घुसणें. *n.* a rebound from ground; a swagger, boastfulness; an assurance. जमिनीवरून परत उंच उडणें; घमेंड, फुशारकी; खातरी. *adv.* startlingly, suddenly, noisily. दचकून, एकदम, सटकन.

Bou'ncer, *n.* (बा'उन्सर्)—one who bounces; an unblushing lie, a great lie; a big specimen, a thing big of its kind. धाडकन उडी मारणारा; धडधडीत खोटी गोष्ट; कोणत्याहि जातीची मोठी वस्तु.

Boun'cing, *a.* (बा'उन्सिंग्)—big and hearty. मजबूत आणि चलाख, दणकट.

Bound, *n.* (बाउन्ड्)—(usu. in *pl.*) encircling boundary, limit; recoil of ball, *etc.*; a springy upward or forward movement. मर्यादा, सीमा; (चेंडू वगैरे) उडणें; पुढें जाणें, उडी. *a.* ready to start, on the way for. जाणारा, जाण्याच्या बेतांत असलेला. *v. t.* & *i.* to set bounds to, to limit, to be the boundary of; to recoil from wall or ground; to spring, leap. मर्यादा असणें, हद्द घालणें; भिंतीवरून किंवा जमिनीवरून परत उडणें; उडणें, उडी मारणें. *To advance by leaps and bounds*, to advance with startling speed. विलक्षण गतीनें पुढें जाणें. *Bound up with*, having the same interests as. एकच हितसंबंध असलेला. *Bound to win*, certain to win. खात्रीनें जिंकणारा. *Out of bounds*, beyond the limits set by school rules. शाळेच्या नियमांचें उल्लंघन करणारा.

Bound, Bounden, *pa. t.* & *pa. p.* of Bind. *Bounden duty*, आवश्यक कर्तव्य.

Boun'dary, *n.* (बाउंन्डरि)—the line dividing a country etc. from another. बांध, मर्यादा, हद्द.

Boun'der, *n.* (बा'उन्डर्)—one that bounds; (colloq.) a cheerfully or noisily ill-bred person. उडणारा, झडप घालणारा; रंगेल आडदांड माणूस.

Boun'dless, *a.* (बा'उन्ड्-लेस्)—without bound or limit, unlimited, unconfined. अमर्याद, विपुल, मर्यादारहित.

Boun'teous, Boun'tiful, *aa.* (बाउं'न्टिअस्, बाउं'न्टिफुल्)—showing bounty, generous; profuse. दानशूर, उदार, सढळ दाताचा; पुष्कळ, विपुल.

Boun'ty, *n.* (बाउं'न्टि)—profuse giving, charitable gifts; a premium to encourage trade or industry. औदार्य, बक्षीस; व्यापारास उत्तेजनार्थ सरकारी मदत.

Bouquet', *n.* (bōōkā', बु-के')—a bunch of flowers, cut flowers arranged for carrying in the hand; perfume of wine. फुलांचा गुच्छ, तुरा, झुबका; दारूचा सुगंध, मजेचा सुवास.

Bou'quetin, *n.* (bōō'ke-, बु'केटिन्)—the Alpine wild goat. आल्प्स पर्वतांतील रानटी बोकड.

Bour'bon, *n.* (बु'र्-बॉन्)—(polit.) a stubborn conservative; Kentucky whisky. हट्टी किंवा पक्का रूढमार्गवादी; एक जातीची व्हिस्की दारू.

Bourg'eois, *a.* & *n.* (bōōrzh-wā, बु'र्झ्-वा)—(a member) of the class between the gentry and the labourers, of shop-keeping middle class. मध्यम स्थितीचा नगरवासी, व्यापारी-उद्मी.

Bourgeois', *n.* (berjois, बर्-जॉ'इस्)—a printing type between the long primer and the brevier, a nine-point printing type. बर्जॉइस नांवाचा एक लहान टाइप.

Bourgeoisie', *n.* (bōōrzhwāzē, बुर्झ्-वाझी')—the bourgeois class. मध्यम स्थितीचे लोक, मध्यम स्थितीचे व्यापारी लोक.

Bourn, *n.* (बोअर्न्)—a small stream. ओढा.

Bourn, Bourne, *n.* (बोअर्न्)—a goal or destination, limit. अंतिम हेतु, जाण्याचें ठिकाण, मर्यादा, सीमा.

Bourse, *n.* (बुअर्स्)—foreign money-market (esp. that of Paris), a place where merchants assemble for general business. सराफबाजार, उद्मी लोकांचा अड्डा.

Bout, *n.* (बाउट्)—a spell or turn; a trial of strength. दम, पाळी; अवसान, शक्तीची परीक्षा, चढाओढ. *This bout,* on this occasion. यामसंगीं.

Bo'vine, *a.* (बो'व्हाइन्)—of oxen; dull, inert. बैलांचा, गुरांविषयींचा; मंद, सुस्त, मठ्ठ.

Bov'ril, *n.* (बॉ'व्ह्-रिल्)—a meat extract used like beef-tea. मांसाचा अर्क.

Bow, *n.* (बो)—a weapon for shooting arrows; an implement used in playing fiddle etc.; a slip-knot with a loop or two; an ornamental knot of ribbon. धनुष्य; (सारंगी किंवा ताऊस वाजविण्याचा) कमानदार गज; निसरगांठ; निसरगांठ मारलेली फीत. *Two strings to one's bow,* more resources than one. पैसे मिळविण्याचीं एकापेक्षां जास्त साधनें. *To draw the long bow,* to exaggerate. अतिशयोक्ति करणें.

Bow, *v. i.* & *t.* (बाउ)—to bend or kneel (in sign of submission or reverence), to signify submission to authority; to incline one's head in salutation. वांकणें, शिरसावंद्य करणें, नमणें; नमस्कार करणें. *n.* a fore-end of the boat or a ship; the rower nearest the bow. जहाजाच्या पुढचा भाग; पुढच्या भागाजवळ वल्हवणारा मनुष्य. *Bowing acquaintance,* acquaintance that stops at bowing, slight acquaintance. नमस्कार करण्यापुरती ओळख, थोडीशी ओळख. *Bowed down* (i. e. crushed) *by care,* काळजीनें खंगलेला. *To make one's bow,* to retire. (लवून थाटानें रंगभूमीवरून) परत जाणें. *On the bow,* within 45° of the point right ahead. अगदीं डोक्यावर सरळ रेषेपासून ४५° अंशाच्या आंत.

Bowd'lerize, *v. t.* (बा'उड्-ल-राइझ्)—to expurgate a book. (पुस्तकांतील) खोडसाळ किंवा वाईट भाग गाळून टाकणें. Bowdlerism, Bowdlerization, *nn.*

Bow'els, *n. pl.* (बॉ'विल्झ्)—entrails, one's inside; feelings of compassion. आंतडीं, आंतील भाग; करुणावृत्ति.

Bow'er, *n.* (बा'उ-अर्)—a dwelling, a lady's room; an arbour; a leafy nook; the anchor at ship's bow. स्त्रियांची घरांतील खासगी खोली; लतागृह; पर्णमय कोंपरा; गलबताच्या नाळेकडील नांगर.

Bow'-head, *n.* (बो'हेड्)—Greenland whale. ग्रीनलँडमधील व्हेल मासा.

Bow'ie, Bow'ie-knife, *nn.* (बो'इ, बो'इ-नाइफ्)—a long hunting knife (used in *U. S.*). एक लांब सुरा, खंजीर. (याचें पातें १५ इंच लांब असतें.)

Bowl, *n.* (बोल्)—a basin (esp. for drink or food); the hollow of a tobacco-pipe, spoon, etc.; a ball. पेला, वाटी; चिलीम, चमचा वगैरेंचा पोकळ भाग; चेंडू. *v. i.* & *t.* to deliver a ball; to put a batsman out by bowling. चेंडू फेंकणें; चेंडू लोळत जाईल असा फुईसरपटत फेंकून 'आउट' करणें.

Bowl, *n.* (बोल्)—(*pl.*) a game played on green with biased wooden balls; (Sing.)

a biased wooden ball; a ball used in skittles. काष्ठगोलकाचा खेळ; काष्ठगोलक, लांकडी चेंडू; स्किटल् खेळांतील चेंडू.

Bow'legged, *a.* (बो'लेग्ड्)—bandy, having legs wide apart at the knees. फेंगड्या पायांचा, फेंगडा.

Bow'ling-green, *n.* (बो'लिंग्-ग्रीन्)—the ground for bowls. चेंडू चांगला फेंकतां यावा म्हणून तयार केलेली जागा.

Bow'ling, *n.* (बो'लिंग्)—the game of skittles. काष्ठगोलकाचा खेळ.

Bow'ling-alley, *n.* (बो'लिंग्-ॲलि)—an enclosure for skittles. स्किटल खेळाकरितां राखून ठेवलेली मर्यादित जागा.

Bow'ling-crease, *n.* (बो'लिंग्-क्रीस्)—a line from behind which the bowler in cricket delivers balls. ज्या रेषेच्या पाठीमागून चेंडू टाकावयाचा ती रेष.

Bowl'er, *n.* (बो'लर्)—a person bowling at cricket; a player at bowls; a hard felt hat. (क्रिकेट खेळांत) चेंडू फेंकणारा, चेंडू देणारा; काष्ठगोलक खेळांतील खेळाडू; एका जातीची ताठ फेल्टची टोपी.

Bow'line, *n.* (bō-lin, बो'लिन्)—a knot in making fixed the end loop, a simple but very secure knot. एक साधी पण मजबूत गांठ.

Bow'man, *n.* (बो'मन्)—a man who shoots with the bow, an archer. तिरंदाज, धनुर्धारी.

Bow'sprit, *n.* (bō-, बो'स्प्रिट्)—a spar running forwards from a ship's bow. गलबताच्या नाळापासून पुढें असणारी डोलकाठी.

Bow'-window, *n.* (बो'विन्डो)—a curved bay-window. अर्धवर्तुलाकार खिडकी.

Bow'yer, *n.* (bō-, बो'यर्)—a maker or seller of bows. धनुष्यें तयार करणारा किंवा विकणारा.

Box, *n.* (बॉक्स्)—a chest; a blow; a driver's seat in front of a carriage; a small compartment in a theatre; kinds of evergreen shrub; wood of this shrub; a slap with the hand (*on the ears*); a hut for sentry or signalmen. पेटी; ठोसा; गाडी हांकणाराची बसावयाची जागा; नाटकगृहांतील एक निराळी खोली; एका जातीचें लहान झाड; त्या झाडाचें लांकूड; बुक्का, ठोसा; पहारेकऱ्याची किंवा सिग्नल देणाराची लहान झोंपडी. *v. t. & i.* to put in a box; to fight with boxing-gloves or bare fists. पेटींत घालून ठेवणें; बुक्काबुक्की करणें, ठोसाठोंसी करणें. *In the same box*, in the same predicament. एकाच कठीण परिस्थितींत. *In the wrong box*, in an awkward position. चमत्कारिक स्थितींत, भलत्याच परिस्थितींत. *To box up*, to confine uncomfortably, to squeeze together. दुःखद स्थितींत एकत्र अडकवून ठेवणें. *To box the watch*, to overturn a watchman in his box. पहारेकऱ्याला त्याच्याच जागेंत उलथून पाडणें. *To box the compass*, (Naut.) to rehearse the points in correct order; (fig.) to make complete revolution and end where one began (in politics, argument, etc.). योग्य क्रमानें दिशा सांगणें; पूर्ण फेर घेणें आणि ज्या ठिकाणीं आरंभ केला त्याच ठिकाणीं शेवट करणें.

Bŏx'-car, *n.* (बॉ'क्स्-कार्)—an enclosed freight-car. झांकलेली मालाची गाडी.

Box'cloth, *n.* (बॉ'क्स्-क्लॉथ्)—a close-woven stuff like buff. कमावलेल्या कातड्यासारखें घट्ट विणलेलें कापड.

Box'er, *n.* (बॉ'क्सर्)—a glove-fighter or pugilist; a member of Chinese anti-foreign secret society. ठोसाठोशी करणारा, मुष्टियोद्धा; चिनी लोकांच्या परकीय लोकांच्या विरुद्ध असलेल्या मंडळाचा सभासद.

Bŏx'ing, *n.* (बॉ'क्सिंग्)—an act of fighting with fists (usually gloved). बाहुयुद्ध, ठोसाठोंशीचा खेळ.

Bŏx'ing-day, *n.* (बॉ'क्सिंग्-डे)—the first week-day after Christmas when Christmas-boxes are given. नजराण्याच्या ख्रिस्मस पेट्या देण्याचा ख्रिस्मस नंतरचा पहिला दिवस.

Bŏx'ing-gloves, *n.* (बॉ'क्सिंग्-ग्लव्ह्ज)—padded gloves used in boxing. ठोसाठोंशीच्या खेळांतील हातमोजे.

Bŏx'-office, *n.* (बॉ'क्स्-ऑफिस्)—a place for booking seats. जागेचीं तिकिटें मिळण्याचें ठिकाण.

Bŏx'seat, *n.* (बॉ'क्स्-सीट्)—the seat beside the driver on box. गाडी हांकणाऱ्याजवळ बसण्याची जागा.

Bŏx'-wood, *n.* (बॉ'क्स्-वुड्)—the wood of the box-tree. बॉक्स झाडाचें लांकूड.

Boy, *n.* (बॉय्)—a male child or youth, a son; a native male servant. मुलगा, पुत्र; नोकर, नोकर मनुष्य.

Bŏy'cŏtt, *v. t.* (बॉ'य्-कॉट्)—to refuse to hold relation with. बहिष्कार घालणें. *n.* systematic refusal of social or commercial relations. सामाजिक किंवा व्यापारी बहिष्कार.

Bŏy'hŏod, *n.* (बॉ'य्-हुड्)—boyish age; boys. बाळपण; मुलें.

Bŏy'ish, *a.* (बॉ'यिश्)—of boys; lively or high-spirited. मुलांचें, पोरकट; आनंदी, उत्साही.

Boy'scouts, *n. pl.* (बॉ'य्-स्काउट्स्)—organizations founded for developing character and physique of boys. मुलांचें शील व शरीर

सुधारण्याकरितां काढलेल्या संस्था. (Also, Boys' Brigade.)

Brāce, *v. t.* (ब्रेस्)—to strengthen or tighten, to give firmness to, to fasten tightly. बळकटी आणणें, ताणून घट्ट करणें. *n.* a thing that braces or connects; (*pl.*) trouser-suspenders; a pair or couple. कसणी, ओढणी; (अने०) इजार वगैरे अडकविण्याचा खांकेबंद; जोडी.

Brāce'lėt, *n.* (ब्रे'स्लिट्)—an ornament for the arm or wrist. करभूषण, कंकण, कडें, बांगडी. Brā'celeted, *a.*

Brā'cer, *n.* (ब्रे'सर्)—pick-me-up; a wrist-guard in archery and fencing. हुशारी आणणारें पेय; मनगटाला बांधण्याचा पट्टा, कसणी.

Brach, *n.* (ब्रॅच्)—a bitch hound. शिकारी कुत्री.

Brā'chial, *a.* (-k-, ब्रे'किअल्)—of the arm, like an arm. बाहूच्या, बाहूसारखा.

Brăchycephă'lic, *a.* (-kisi-, ब्रॅकिसिफॅ'लिक्)—short-headed. लहान डोक्याचा. [Gr. *brachys*, short, & kephale, Sk. कपाल, a head]

Brā'cing, *a.* (ब्रे'सिंग्)—invigorating, stimulating. जोमदार, हुशारी किंवा बळकटी आणणारा.

Bră'cken, *n.* (ब्रॅ'कन्)—a fern abundant on heaths; any large fern; a mass of ferns. ओसाड मैदानांत विपुल वाढणारा नेचा किंवा नेचरी; कोणताहि मोठा नेचा; नेच्यांचा समुदाय.

Brăck'ėt, *n.* (ब्रॅ'किट्)—a projection from a wall serving as a support, corbel; an angular support for something fastened to a wall; marks (such as [ ], { }) used in pairs for enclosing word or figures. भिंतींत बसविलेले दगडी किंवा लांकडी घोडे; भिंतींत फळी वगैरे मजबूत बसण्याकरितां दिलेला टेकू, ब्रॅकेट; कंस. *v. t.* to support with a bracket; to enclose in brackets; to couple (names, etc.) together. ब्रॅकेट लावून टेकू देणें; कंस घालणें; नांवें वगैरे एकत्र घालणें. *Bracketed*, equal. सारखा.

Brăck'ish, *a.* (ब्रॅ'किश्)—between fresh and salt, saltish (of water). खारट, मचूळ.

Brăct, *n.* (ब्रॅक्ट्)—a small leaf or scale below calyx. फुलाच्या देंठाशीं असलेलें लहान पान.

Brăc'tėate, *a.* (ब्रॅ'क्टिएट्)—having bracts. देंठाशीं लहान पानें असलेलें.

Brăd, *n.* (ब्रॅड्)—a thin flat slightly-headed nail. टेकस, एक लहान जातीची चूक.

Brăd'awl, *n.* (ब्रॅ'डॉल्)—a small boring tool. एक लहान भोंक पाडण्याचें हत्यार.

Brăd'burÿ, *n.* (ब्रॅड्-बरि)—(Slang) a currency note (esp. for £ 1). (विशेषतः एक पौंडाची) चलनी नोट.

Brae, *n.* (-ā, ब्रे)—(Sc.) a steep bank, a hill-side. उतरण, टेंकडीची बाजू, टेंकाड.

Brăg, *v. i. & t.* (ब्रॅग्)—to talk boastfully, to boast of. बढाई मारणें. *n.* a boastful statement or talk; a card-game like poker. बढाई, फुशारकी, आत्मप्रशंसा, आत्मप्रौढी. शेखी; पत्त्यांचा एक प्रकारचा खेळ.

Brăggadō'ciō, *n.* (-shi-, ब्रॅगॅडो'शिओ)—bragging talk, empty vaunting; a boaster. फुशारकी, बढाईखोरपणा; बढाईखोर, बढाई मारणारा.

Brăgg'art, *n.* (ब्रॅ'गर्ट्)—a boaster, (attrib.) bragging. घमेंडखोर, आत्मश्लाघी.

Brahmapoo'tra, Brahma, *nn.* (ब्रम्हपु'त्र, ब्रह्म)—a kind of domestic fowl. एका जातीचा पाळीव पक्षी.

Brahm'in, *n.* (ब्रा'मिन्)—a member of the Hindu priestly caste. ब्राह्मण. Brahminee, *n.* a female Brahmin; belonging to the Brahmans. ब्राह्मणी; ब्राह्मणाचा. Brahmi'-nism, *n.* ब्राह्मणत्व.

Braid, *n.* (ब्रेड्)—a plaited tress of hair; silk or thread or wire woven into a band. वेणी; विणलेली दोरी किंवा तार. *v. t.* to form into a braid, to trim with a braid; to interweave. वेणी घालणें; गुंफणें.

Brain, *n.* (ब्रेन्)—nervous organ in the interior of skull. मेंदू. (*Pl.*) substance of the brain, intellectual ability. बुद्धि, अक्कल. *v. t.* to dash out brains of. कपाळमोक्ष करणें, डोकें फोडणें, ठार करणें. *To blow out one's brains*, to shoot him in the head. डोक्यांत गोळी घालणें. *To cudgel one's brain*, to think hard. फार विचार करणें. *To have something on the brain*, to be crazy about it. मेंदू जीर्ण होणें, वेडसर होणें. *To turn one's brain*, to make him vain and silly. बढाईखोर व मूर्ख बनविणें.

Brain'-făg, *n.* (ब्रे'न्-फॅग्)—nervous exhaustion. मेंदूचा शीण.

Brain'-păn, *n.* (ब्रे'न्-पॅन्)—cranium, skull. मेंदूची कवटी, डोकें.

Brain'ÿ, *a.* (ब्रे'नि)—mentally smart, inventive. चलाखबुद्धीचा, शोधक.

Braise, *v. t.* (-z, ब्रेझ्)—to stew (with fire above and below) tender (with bacon, herbs, etc.). (मंद अग्नीवर) वाफ देणें, शिजविणें, रांधणें.

Brāke, *n.* (ब्रेक्)—an apparatus for checking the motion of a wheel, vehicle or train; a large wagonette; a heavy harrow; a bracken; a thicket, brushwood. गति कमी किंवा बंद करण्याचें यंत्र; मोठा चार चाकी गाडीचा डबा; दंताळें, फॅसाटी; नेचा, नेचरी; कांटेरान, झुडपी झाडी, दाट जाळ्यांचें जंगल.

Brākes man, *n.* (ब्रे'क्स्-मन्)—a man in charge of the brake. आगगाडीचा वेग कमी करणारा, ब्रेक ज्याच्या ताब्यांत असतो तो.

Brāke'-văn, *n.* (ब्रे'क्-व्हॅन्)—a guard's compartment in which the train-brake is worked. आगगाडीचा ब्रेकडबा.

Brăm'ah, *n.* (ब्रॅ'मा)—a kind of lock; a key of that lock. एक जातीचें कुलप; त्या कुलपाची किल्ली.

Brăm'ble, *n.* (ब्रॅ'म्बल्)—blackberry bush; any wild prickly shrub; (Sc.) blackberry. कांटेझाड, कांटा; कोणतेंहि कांटेरी झाड; गौरीफळ.

Brăm'blĭng, *n.* (ब्रॅ'म्ब्लिंग्)—the mountain finch. पर्वतावरील एक जातीचा लहान पक्षी.

Brăm'blȳ, *a.* (ब्रॅ'म्ब्लि)—full of brambles. कांटेझाडांनीं भरलेलें.

Brăn, *n.* (ब्रॅन्)—husks separated from flour. कोंडा, भुसा.

Brăn'-pie, *n.* (ब्रॅ'न्-पाय्)—a tub of bran into which children dip for toys. भुशांनीं भरलेलें लांकडाचें पिंप.

Brănch, *n.* (ब्रान्च्)—a shoot of a tree, a small bough, a twig; an offshoot or subdivision of something. झाडाची फांदी, खांदी; कोणत्याहि गोष्टीची शाखा. *v. i.* to send branches forth; to divide into distinct parts. शाखा पसरणें, फांटे फुटणें; निरनिराळे भाग करणें. *Root-and-branch, a.* thorough, radical. पूर्ण, मुळापासूनचा. *Root and branch, adv.* thoroughly, radically. पूर्णपणें, मुळांफांद्यांसकट.

Brănched, Brăn'chy, *aa.* (ब्रान्च्ट्, ब्रान्चि)—having branches, with many branches. पुष्कळ फांद्या असलेला, पुष्कळ शाखांचा.

Brănd, *n.* (ब्रॅन्ड्)—a piece of burning or smouldering wood, a torch; a sword; an iron stamp used red-hot; stigma; particular kind of goods. कोलीत, मशाल; तलवार; डाग; कलंक; व्यापाराची खूण, छाप. *v. t.* to stamp with brand, impress indelibly; to stigmatize. डाग देणें; कायमचा ठसा उमटवणें; कलंक लावणें, काळें फांसणें. *A brand from the burning,* a rescued person, a convert. आलेल्या संकटांतून शिताफीनें बचावलेला मनुष्य, दुसऱ्या धर्मांत आलेला मनुष्य.

Brăn'dĭsh, *v. t.* (ब्रॅ'न्डिश्)—to wave about or flourish (a weapon or threat as preliminary to action or in display). (दहशत घालण्याकरितां) परजणें, फिरवणें.

Brănd'-new, *a.* (ब्रॅ'न्ड्-न्यू)—conspicuously new. नुकताच तयार झालेला, कोराकरकरित.

Brăn'dȳ, *n.* (ब्रॅ'न्डि)—a strong spirit distilled from wine or grapes. एक प्रकारची दारू, ब्रॅन्डी.

Brănt, *n.*=Brent.

Brăsh, *n.* (ब्रॅश्)—loose broken rock or ice; refuse of boughs of trees. खडकाचे किंवा बर्फाचे तुकडे; (झाडाची कापलेली) निकामी डाहाळी. *a.* (slang) brittle; hasty, saucy. ठिसूळ, अल्पकाळ टिकणारा; अल्लड, उद्धट.

Brăss, *n.* (ब्रास्)—yellow alloy of copper with zinc; sepulchral plate or table of brass; (fig.) effrontery, impudence; (sl.) money. पितळ; मृताच्या स्मरणार्थ त्याचा चेहरा ज्याच्यावर काढला जातो अशी पट्टी, पितळेची स्मरणपट्टी; निर्लज्जपणा, उद्धटपणा; पैसा. *The brass,* the brass instruments of a band. पितळेचीं वाद्यें (शिंग, तुतारी वगैरे). *Brass band,* set of musicians with brass instruments. पितळेचीं वाद्यें वाजविणारी मंडळी. *Brass farthing,* least possible amount. अगदीं कमींत कमी रक्कम, क्षुल्लक रक्कम. [E. g. I don't care a brass farthing.] *Brass hat,* (army slang) officer of high rank. मोठा अधिकारी. *Brass tacks,* (slang) actual details, real business. प्रत्यक्ष, बारीकसारीक गोष्ट, खरें काम. [E. g. Get down to brass tacks.]

Brăssärd', *n.* (ब्रासा'र्ड्)—a badge worn on the arm. बाहूवरील खूण.

Brăss'ȳ, *a.* (ब्रा'सि)—like brass in colour, sound or taste; impudent; pretentious. पितळेसारखा, पितळेच्या रंगाचा; उद्धट; आत्मश्लाघाखोर. *n.* brass-soled golf-club. पितळेच्या बुडाची गोल्फ खेळण्याची काठी.

Brăt, *n.* (ब्रॅट्)—child (contempt.). पोरटा, पोर, कारटा.

Bravă'dō, *n.* (ब्राव्हे'डो)—ostentatious or simulated boldness, show of courage, bold front. दिखाऊ किंवा खोटें धाष्ट्र्य, फुशारकी.

Brāve, *a.* (ब्रेव्ह्)—ready to confront and steady in enduring danger or pain, fearless of danger or pain; finely dressed, showy, excellent. शूर, धाडसी; उमदा, छानदार. *v. t.* to defy, dare, challenge. न डगमगतां झगडणें, धैर्यानें तोंड देणें, आव्हान करणें. *n.* a Red-Indian warrior. उत्तर अमेरिकेंतील शूर इन्डियन. *Brave it out,* carry oneself defiantly under suspicion or blame. संशयित किंवा दोषी असतांना बेपर्वाईनें वागणें.

Brā'verȳ, *n.* (ब्रे'व्हरि)—brave conduct or temper; bright colours, fine clothes. शौर्य, मर्दुमकी; सुंदर कपडे.

Bră'vō, *n.* (ब्रा'व्हो)—hired assassin or bully; cry of bravo! मारेकरी; वाहवा करणें. *int.* excellent! well done! भले शाबास, भले, वाहवा!

Bravur'a, *n.* (-ōōr-, ब्रॅव्हू'रा)—a passage of music requiring exceptional powers, brilliant or ambitious execution. अतिशय अलंकारयुक्त गीत किंवा राग.

Brawl, *n.* (ब्रॉल्)—squabble, noisy quarrel. आरडाओरड करून भांडणें. *v. i.* engage in a brawl ; (of stream) to be noisy; to murmur. भांडणें, कलागत करणें ; आवाज करणें.

Brawn, *n.* (ब्रॉन्)—muscle, lean flesh ; pickled or potted boar's flesh, meat of pig's head. शरीराचा मांसल भाग ; डुकराच्या डोक्याचें मांस.

Brawn'ȳ, *a.* (ब्रॉ'नि)—strong, muscular. मांसल, बळकट, गोंडस.

Brǎ'xȳ, *n.* (ब्रॅ'क्सि)—(Sc.) splenic apoplexy in sheep ; mutton of a sheep dying from the disease. मेंढ्यांना होणारा एक रोग; या रोगानें मेलेल्या मेंढीचें मांस.

Bray, *n.* (ब्रे)—an ass's cry : a blare of trumpet, etc. गर्दभध्वनि ; तुतारी वगैरेचा आवाज. *v. i.* & *t.* to emit bray ; to pound in mortar. (गाढव) ओरडणें; कुटून भुकटी करणें. *To bray out,* to utter harshly. जोरानें कर्कश आवाज करणें.

Brāze, *v. t.* (ब्रेझ्)—to solder with alloy of brass and zinc; to colour like brass. पितळेनें मढविणें, पितळ आणि जस्त यांच्या मिश्रणानें जोडणें ; पितळेसारखा रंग देणें.

Brā'zen, *a.* (ब्रे'झन्)—of or like brass, made of brass, strong, yellow or harsh-sounding as brass; shameless. पितळेचें, पितळी ; निर्लज्ज, कोडगा. *v. t. Brazen out,* carry off shamelessly ; make shameless. कोडगेपणानें वागणें ; निर्लज्ज बनवणें. *Brazen-faced,* shameless. निर्लज्ज, कोडगा. *Brazen age,* the third stage in human deterioration (golden, silver, brazen and iron). मानवी ऱ्हासाची तिसरी पायरी, पितळयुग.

Brā'zier, *n.* (ब्रे'झर्)—a brass-worker ; a pan or iron basket holding lighted charcoal or coke as portable heater. कांसार, कांस्यकार; लोखंडी (इकडे तिकडे नेतां येणारी) शेगडी.

Brazĭl', *n.* (ब्रॅझि'ल्)—(Also, Brazil-wood) red wood (of an East-Indian tree or of South-American species). उत्तर हिंदुस्थानांतील किंवा दक्षिण अमेरिकेंतील एका जातीचें तांबड्या रंगाचें लांकूड.

Brazĭl'-nŭt, *n.* (ब्रॅझि'ल्-नट्)—a large three-cornered nut. एक मोठें तिकोनी फळ.

the price of stocks. चाढीकरितां सट्टा करणें; ठेवीची किंमत वाढविण्याचा प्रयत्न करणें. *A bull in the China shop*, a reckless or clumsy destroyer. अविचारानें नाजूक वस्तूंची नासाडी करणारा. *To take the bull by the horns*, to meet and not to evade any difficulty. संकटाला निश्चयानें तोंड देणें. *John Bull*, an Englishman. इंग्रज, इंग्लिश मनुष्य. *To make a bull's-eye*, मोठा घोरला फायदा करणें. *Bull-calf*, a young bull. खोंड, पाडा. *To bull-doze*, (sl.) to compel by show of force; bully. धाकानें भाग पाडणें; दहशत घालणें. *Bull-fight*, baiting of bulls with horsemen etc. बैलांची व घोडेस्वारांची वगैरे झुंजाझुंज. *Bull-puncher*, a bullock-driver. बैल गाडी हांकणारा. *Bull-whack*, an ox-whip. बैलाचा चाबूक.

Bull'ace, *n.* (bŏŏl'is, बुलिस्)—a small wild plum. एक लहान मनूक किंवा बेहाणा.

Bull'dog, *n.* (-ŏŏ-, बुल्-डॉग्)—a breed of dog noted for tenacity; a tenacious person; University proctor's attendant. मोठ्या कुत्र्याची एक जात; निग्रही मनुष्य, विलक्षण धैर्य दाखविणारा मनुष्य; युनिव्हर्सिटींतील प्रॉक्टर म्हणून अधिकाऱ्याचा नोकर.

Bull'ĕt, *n.* (-ŏŏ-, बुलिट्)—a missile of lead or other metal (for rifle, pistol, or machine-gun), a cannon-ball. (बंदुकीची वगैरे) गोळी.

Bull'ĕtĭn, *n.* (-ŏŏ-, बुलि-टिन्)—a short official statement (of public event or invalid's condition). सरकारी त्रोटक समाचारपत्र, प्रकृतिमानपत्र.

Bull finch, *n.* (-ŏŏ-, बुल्-फिन्च्)—a fine-plumaged song-bird; quickset hedge with ditch. एक सुंदर पिसारा असलेला गाणारा पक्षी; घट्ट कुंपण.

Bull'ion, *n.* (-ŏŏ-, बुल्यन्)—gold or silver in the lump or by weight. लगडीचें सोनें-चांदी सोन्याचांदीची लगड.

Bŭ'ffĕt, *n.* (बफिट्)—a blow with the hand; a blow dealt by wave, etc. or by fortune; a side-board; a recessed cupboard. ठोंसा, मुष्टिप्रहार; थप्पड; लहान घडवंची, फडताळ. *v. t. & i.* to deal blows to; to struggle with. ठोंसे देणें; तंटा करणें, भांडणें.

Buff'et, *n.* (bŏŏ'fā, बुफे)—a refreshment bar. फराळाचें दुकान, उपाहारगृह.

Bŭffoon, *n.* (बफ़ून्)—a person who makes himself ridiculous to raise laughter, a coarse jester, a mimic. नकल्या, खुपमस्कऱ्या, विदूषक, थट्टेबाज.

Bŭffōōn'erў, *n.* (बफ़ूनरि)—the arts and practices of a buffoon, low jests. कमी दर्जाची थट्टा, मस्करी, थट्टामस्करी.

Bŭg, *n.* (बग्)—a small blood-sucking insect infesting beds. ढेंकूण, मत्कुण. *A big bug*, a person of importance. बडा मनुष्य.

Bŭg'abōō, *n.* (बगॅबू)—an object of baseless terror. निराधार भीतीचा विषय.

Bŭg'bear, *n.* (बग्-बेअर्)—an object of terror; a dreaded event, etc. बागुलबोवा; धास्ती वाटणारा प्रसंग.

Bull'ionist, *n.* (bŏŏl'yon-, बुल्-यनिस्ट्)—an advocate of metallic currency. धातूचें चलनी नाणें असावें असें प्रतिपादन करणारा, धातुनाणकवादी.

Bull'ock, *n.* (-ŏŏ-, बुलक्)—a gelded or castrated bull. घडवलेला बैल.

Bull's-eye, *n.* (-ŏŏlz-ī, बुल्झ्-आय्)—a hemispherical lens, any circular opening for the admission of light or air; a small lantern with a lens on one side to concentrate the light; the centre of a target; a kind of sweet-meat. झरोका, गवाक्ष; एक लहान एका बाजूला अर्धवाटोळी कांच असलेला कंदील; निशाणाचा मध्य; एक जातीची मिठाई.

Bull'ў, *n.* (-ŏŏ-, बुलि)—a hired ruffian; a blusterer; a school-boy tyrant; tinned beef; (Football) scrummage in the Eton game. भाडोत्री दांडगा मनुष्य; लठ्ठनिरंजन; शाळेंतल्या मुलांतील गुंड; व्यवस्थित राहण्याकरितां कथलाच्या डब्यांत घालून ठेवलेलें गोमांस; फुटबॉल खेळांत चेंडू मारण्याची सर्वांची झटापट. *v. i. & t.* to play the bully, to browbeat, to overawe by threats. धमकावणें, दांडदपट देणें, दरडावणें. *a.* first-rate, slap-up, quite up to date. अगदीं पहिल्या प्रतीचा, अगदीं नवीन पद्धतीचा. *To bully off*, to start play in hockey with crossed sticks. हॉकींत खेळाला सुरवात करणें. *To bullyrag*, (sl.) to maltreat, ballyrag. वाईट रीतीनें वागवणें, शिवीगाळ दांसडणें, धाक घालणें.

Bul'rŭsh, *n.* (-ŏŏ-, बुल्-रश्)—a tall rush (esp. reed-mace), papyrus. मोठ्या जातीचा लव्हाळा.

Bul'wark, *n.* (-ŏŏ-, बुल्-वर्क्)—the earthwork or other material defence; a person or principle that protects; a ship's side above deck. बुरूज, तट; रक्षण करणारा मनुष्य किंवा तत्त्व; डेकवरील जहाजाची बाजू.

Bŭm, *a.* (बम्)—(sl.) worthless, good-for-nothing. निरुपयोगी, कुचकामाचा. *n.* a loafer, ne'er-do-well. भटक्या, रिकामटेकडा, कुचकामाचा माणूस. *v. i. & t.* to drink to excess; to tramp, to live the life of a vagabond. अतिशय पिणें; भटकून काळ घालवणें.

Bŭm-bail'iff, *n.* (बम्-बेलिफ्)—a sheriff's officer employed for arrests (from touching

debtor on the back). पकडण्याकरितां नेमलेला शेरिफचा अधिकारी, एक कनिष्ट मतीचा बेलिफ.

Bŭm'-boat, *n.* (बॅम्-बोट्)—a boat plying with fresh provisions for a ship. किनाऱ्यापासून दूर असणाऱ्या जहाजावर अन्नसामुग्री नेणारी लहान व रुंद होडी, बांबोट.

Bŭm'ble-bee, *n.* (बॅम्बल्-बी)—a loud-humming bee. गुणगुण करणारी मोठी मधमाशी.

Bŭm'bledom, *n.* (बॅम्बल्डम्)—consequential minor officials and their ways. दिमाखदार लहान अधिकारी आणि त्यांचे मार्ग.

Bŭm'ble-pŭppy̆, *n.* (बॅम्बल्-पपि)—whist, tennis etc. played unscientifically. अशास्त्र रीतीनें खेळलेला व्हिस्ट, टेनिस वगैरे खेळ.

Bŭm'mer, *n.* (बॅमर्)—a worthless loafer. कुचकाम्या भटकणारा माणूस.

Bŭmp, *n.* (बम्प्)—a dull-sounding blow, collision, knock; swelling caused by a collision; a prominence on skull, protuberance. धडका, ठोसा, बुक्का; ठोशामुळें आलेली सूज, टेंगूळ; डोक्यावरील ठिकठिकाणचा उंचवटा, उन्नत भाग. *adv.* with a bump, suddenly, violently. धाडकन, एकदम, जोरानें. *v. t. & i.* to strike heavily against, to come into collision with; to jolt; (of cricket-ball) to rise abruptly. धाडकन आपटून लागणें, एखाद्या वस्तूवर आपटणें; हबकणें, हादरणें; (चेंडू) एकदम वर उडणें. *Bumpy, a.* full of bumps; causing jolts. पुष्कळ धक्के बसलेला; हबकणारा, हादरणारा.

Bŭm'per, *n.* (बॅम्पर्)—a brimmer, brimming glass; a great harvest; a full theatre; a record score (in games); (motoring) a spring fender for mitigating collisions. पुरा भरलेला प्याला; मोठें पीक; गच्च भरलेलें नाटकगृह; खेळांत कल्पनेच्या बाहेर झालेला स्कोअर; अपघात कमी व्हावे म्हणून ठेवलेला स्प्रिंगचा रक्षक.

Bŭmp'kin, *n.* (बॅम्प्-किन्)—an awkward country lout. खेडवळ, गांवढ्या, गांवढळ माणूस.

Bump'tious, *a.* (बॅम्प्-शस्)—self-assertive, disposed to quarrel, domineering. आढ्यता बाळगणारा, सदोदित आपलेंच घोडें पुढें ढकलणारा.

Bŭn, *n.* (बन्)—a small soft currant cake; hair dressed in bun shape; (personifying name of) a squirrel, rabbit. पुरी, पाव, पोळी, पुरणाची पोळी; पोळीच्या आकारासारखे व्यवस्थित कापलेले केंस; खार, ससा.

Bŭnch, *n.* (बन्च्)—set of things growing or fastened together (flowers, grapes, keys); group of people; herd of cattle. झुबका, गुच्छ; लोकसमूह; गुरांचा कळप. *v. t. & i.* to arrange in bunch or bunches; to gather in folds; to come or cling together. घोस किंवा झुबका करणें; घड येणें; एकत्र येणें किंवा चिकटणें. *Best of the bunch*, best of the lot. सर्वांत उत्तम. *Bunch of the fives*, the fist or hand. पांची बोटांची आंवळलेली मूठ, हात.

Bun'chy, *a.* (बॅन्-चि)—forming a bunch. गोंडेदार, झुबकेदार.

Bŭn'cō, *v. t.* (बॅन्-को)—(sl.) to swindle. फसविणें, उपटाउपटी करणें.

Bŭnd, *n.* (बन्ड्)—an embankment, causeway, quay. बांध, बंधारा, धक्का, घांट.

Bŭn'der, *n.* (बॅन्-डर्)—a landing-place or quay; seaport; harbour. उतरण्याची जागा, धक्का; समुद्राचें बंदर; बंदर.

Bŭn'der-boat, *n.* (बॅन्डर्-बोट्)—a boat used in communicating with ships in harbour etc. बंदरांतील बोट, बंदरनाव.

Bŭn'dle, *n.* (बॅन्डल्)—odds and ends tied up in cloth; set (of sticks, iron rods etc.) bound up together. गाठोडें, जुडकें; जुडी. *v. t. & i.* to tie in a bundle; to throw confusedly into a receptacle; to go or send (esp. a person) unceremoniously (*or in a hurry*) *out, off, away.* जुडकें (वगैरे) बांधणें; मोट बांधून फेंकून देणें; गाशा गुंडाळणें, एकदम चालता होणें किंवा घालवणें.

Bŭng, *n.* (बङ्)—a stopper of cork or other material for the bung-hole; (sl.) a lie. दट्टा, बूच, गुडदी; खोटें. *v. t.* to stop up. दट्टा बसवणें, दट्ट्यानें तोंड बंद करणें. *Bunged up,* (of eye, nose, pipe etc.) closed or stopped up with. मिटलेला, बंद केलेला, गुडदी ठोकलेला. *Bung-hole,* a hole by which a cask is filled. पिंपाचें तोंड.

Bung'alow, *n.* (-lō, बॅङ्-लो)—a one-storied or lightly built house. बंगला, छोटेखानी घर.

Bŭng'le, *v. i. & t.* (बॅङ्गल्)—to go awkwardly to work, to perform in a clumsy way; to mismanage, to fail to accomplish (task). अव्यवस्थितपणें कामाला जाणें, अडाणी रीतीनें काम करणें; गोंधळ करणें, चुकणें. *n.* a piece of bungling. अव्यवस्थित काम, ढोबळ चूक.

Bŭn'ion, *n.* (बॅन्यन्)—an inflamed swelling on foot. दाह होत असणारी पायावरील सूज.

Bŭnk, *n.* (बंक्)—a sleeping-berth. (गलबतांत) निजावयाची जागा, निजण्याबसण्याची लांकडी पेटी. *v. i.* to have a bed, to go to bed. अंथरुण मिळणें, निजणें. *To bunk, to do a bunk,* to abscond, to vanish. पळून जाणें, नाहींसा होणें. *Bunk-house,* a house with berths for lumberers etc. लांकडें तोडण्याकरितां (रानांत) निजावयाची सोय असलेलें घर. (Also, =Bunkum).

Bŭnk'er, *n.* (बं'कर्)—a ship's coal-bin; a receptacle; a sandpit or other obstruction for free dealing with balls (in Golf); (fig.) an obstacle. जहाजांत कोळसे ठेवण्याचें भांडें; पात्र; गोल्फ खेळामध्यें चेंडू सरळ न जाऊं देणारे खांचखळगे; अडथळा, प्रतिबंध, विघ्न. *Bunkered, pa. a.* entangled in a bunker. खांचखळग्यांत अडकलेला.

Bŭnk'ŭm, Bŭn'combe, *n.* (बं'ङ्कम्)—an insincere talk, humbug, claptrap, sophistry. लबाडीचें बोलणें, निरर्थक भाषण, खोटें खरें भासविणें.

Bŭm'malō, *n.* (ब'मॅलो)—a small fish found off Southern Asia (used, when dried, as a relish). एक जातीचा लहान मासा.

Bŭnn'ȳ, *n.* (ब'नि)—a pet name for rabbit. ससाचें आवडतें नांव, आवडता ससा. *Bunny-hug*, an American dance. अमेरिकेंतील एक प्रकारचें नृत्य.

Bun'sen burn'er, *n.* (-ŏŏn-, बु'न्-सेन् बर्नर्)—an invention for burning mixed air and gas, giving great heat. हवा आणि गॅस एकत्र जाळून मोठी उष्णता देणारा एक नवा शोध.

Bŭnt, *n.* (बन्ट्)—the baggy middle part of sail; baseball batted to point within the infield. वाऱ्यानें फुगणारा शिडाचा मधला ढिला भाग; आंतील क्षेत्रामध्येंच पॉइन्टजवळ बॅटेनें टाकलेला बेसबॉल. *Bunt-line*, a rope used in furling sail. शीड गुंडाळतांना लागणारी दोरी.

Bŭn'tĭng, *n.* (ब'न्-टिंग्)—kinds of small bird; flags; open-made worsted stuff used for flags. लहान पक्ष्यांची जात; पताका, निशाणें; निशाणें वगैरे करण्याचा पातळ व निरनिराळ्या रंगाचा विरविरीत कपडा.

Buoy, *n.* (boi, बॉय्)—anchored float as navigation mark, etc. (समुद्रामध्यें खडक दाखविण्याकरितां) पाण्यावर तरंगणारे शंकु, तरण्याचा ताफा, सांगड. *v. t.* to bring to surface of water, to keep afloat; to sustain (person, courage, etc.), uplift; to mark with buoys. तरंगत ठेवणें; धैर्य किंवा अवसान देणें, हिंमत देणें; तरंगणाऱ्या शंकूंनीं खूण दाखविणें. (usu. with *up*).

Buoy'age, *n.* (बॉ'यिज्)—providing of buoys. बोयऱ्यांचा पुरवठा करणें.

Buoy'ancȳ, *n.* (बॉ'यन्सि)—the power of floating on the surface of water or in the atmosphere; vivacity, cheerfulness, recuperative power. तरण्याची शक्ति, प्लवनसामर्थ्य; आनंदी वृत्ति, रंगेलपणा, उल्हास.

Buoy'ant, *a.* (बॉ'यन्ट्)—apt to float, light; cheerful. तरण्यासारखा, हलका; आनंदी, रंगेल.

Bur, *n.* (बर्)—clinging seed-vessel or other part of a plant; a plant producing burs; a person hard to shake off. कोणत्याहि झाडाचें चिकटून राहणारें बीजकवच किंवा अन्य भाग; चिकटून राहणारें बीजकवच असलेलें झाड; एखाद्या जागेपासून हालविण्याला कठीण असा मनुष्य.

Burb'errȳ, *n.* (ब'र्-बेरि)—a waterproof material; a garment made of the waterproof material. जलप्रतिबंधक पदार्थ किंवा कापड; जलप्रतिबंधक कापडाचा कपडा.

Burb'ot, *n.* (ब'र्-बॉट्)—an eel-like flat-headed bearded fresh-water fish. एक जातीचा गोड्या पाण्यांतील मासा.

Bŭrd'en, *n.* (ब'र्डन्)—*a load, a task; weight of* grief, obligatory expense; refrain of song, theme. ओझें, गळ्यावर धोंड; दुःखाचा भार; आवश्यक खर्च; ध्रुपद, पालुपद. *v. t.* to load, to encumber, to lie heavy on. ओझें लादणें, जड असणें, भाराक्रांत होणें. (*Burthen*=a ship's carrying capacity, tonnage; bearing of loads. ओझें नेण्याची पात्रता, टनी वजन, टनी दास्तान, भरवण, बारदान.) *Burden of proof*, the obligation to prove falling on the maker of a statement. पुराव्याची जबाबदारी, दाव्यांतील वादग्रस्त गोष्टी शाबीत करण्याचा बोजा.

Bŭrd'ensome, *a.* (ब'र्डन्-सम्)—imposing a burden, oppressive, wearying. जड, दुःसह, अवघड, नेण्याला कठीण, भारी, जाचणारा.

Bur'dock, *n.* (ब'र्-डॉक्)—a coarse plant with prickly flowers and dock-like leaves. कांटेरी फुलें व झुबकेदार पानें असलेलें एक लहान झाड.

Būreau', *n.* (-rō, ब्यू-रो')—(pl. Bureaux, ब्यूरोझ्) a writing-desk with drawers, escritoire; chest of drawers; office (esp. of a Government department). खणांचें टेबल; खणांचें कपाट; कचेरी, खातें.

Būreau'cracȳ, *n.*(-rō-, ब्यू-रॉ'क्रसि)—government by bureaux, centralization, officialism. निरनिराळीं खातीं करून राज्यकारभार चालविणारें अधिकारमंडळ, नोकरशाही. Bureaucra'tic, *a.* Bureau'crat, *n.* नोकरशाहीचा कट्टा अभिमानी.

Burg, *n.* (बर्ग्)—(sl.) a town. शहर.

Burgee', *n.* (बर्-गी')—a small swallow-tailed pennant (used by yachts etc.) एक लहान पाकोळीच्या शेपटीसारखी पताका.

Bur'geon, *n.* (-jn, ब'र्जन्)—a young shoot, a bud. लहान अंकुर, कोंभ, कळी. *v. i.* to put forth young shoots, to spring forth as bud, to begin to grow. कोंभ फुटणें, कळी येणें, वाढीस लागणें.

Bur'gĕss, *n.* (ब'र्जिस्)—an inhabitant of a borough with full municipal rights, a citizen; a member of parliament for a borough, corporate town or university.

नागरिकत्वाचे सर्व हक्क असलेला रहिवासी, नगरवासी; एकाद्या वरो, शहर किंवा विश्वविद्यालयातर्फेचा पार्लमेन्टचा सभासद.

Bur'gh, *n.* (bŭ'ru, ब'र्)—a Scotch borough. स्कॉटलंडमधील बरो.

Bur'gher, *n.* (-ger, ब'गॅर्)—a citizen or member of a borough. नगरवासी, नगरप्रतिनिधि.

Bŭrg'lar, *n.* (ब'र्ग्लर्)—a person attempting burglary, one who breaks into a house by night with an intent to commit felony. घरफोड्या, भिंतफोड्या, अट्टल चोर.

Bŭrg'lary̆, *n.* (ब'र्ग्लरि)—breaking into a house by night with felonious intent, house-breaking. चोरी करण्याच्या हेतूनें रात्रीं घर फोडणें, घरफोडी. Burglarious, *a.* घरफोडीविषयीं.

Bur'gle, *v. t. & i.* (ब'गल्)—to commit burglary, to enter or rob (a house) burglariously. चोरी करण्याच्या इरायानें रात्रीं घर फोडणें.

Bur'gomäster, *n.* (ब'र्गो-मास्टर्)—the mayor of Dutch or Flemish town. हॉलंड किंवा फ्लॅन्डर्स शहराचा मेयर (नगराध्यक्ष).

Bur'gundy̆, *n.* (ब'र्गन्डि)—kinds of wine. एका जातीची लाल दारू.

Bu'rĭal, *n.* (bĕ-, बे'रिअल्)—burying (esp. of dead body); funeral. जमिनींत पुरणें, प्रेतसंस्कार. *Burial-case*, coffin. प्रेताची पेटी. *Burial-ground*, cemetery. प्रेतें पुरण्याची जागा, स्मशान, कबरस्थान. *Burial-service*, religious form (esp. that in the prayer-book) at funeral. प्रेतसंस्कारविधि, और्ध्वदेहिक कर्म.

Bŭr'ĭn, *n.* (ब्यू'अरिन्)—a tool for engraving on copper. तांब्यावर नकशी काढण्याचें पोलादी हत्यार, तक्षणी.

Bŭrke, *v. t.* (बर्क्)—to murder (esp. by stifling); to stifle inquiry, hush up. नाकतोंड दाबून ठार मारणें; चौकशी आंतल्या आंत दाबून टाकणें, चौकशी न करणें.

Bŭrlesque', *a.* (बर्लें'स्क्)—of derisively imitative kind. हास्यरसप्रधान. *n.* a dramatic or literary parody. हास्यरसप्रधान नाटक किंवा लेख, महसन, थट्टात्मक भाषण. *v. t.* to make or give burlesque of, to ridicule. हास्यजनक विडंबन करणें, हसूं येण्यासारखी नक्कल करणें.

Bŭrl'y̆, *a.* (ब'र्लि)—of stout sturdy build, corpulent. मजबूत बांध्याचा, गलेलठ्ठ.

Bŭrn, *v. i. & t.* (बर्न्)—(pa. t. *burnt*, sometimes *burned*) to consume or be consumed by fire; to feel intense heat or emotion; to injure by burning. जळणें, जाळणें; फार उष्णता भासणें; भाजणें. *To burn away*, *to burn out*, to burn to nothing, to burn to extinction. जळून राख होणें. *To burn up*, to get rid of by fire. जाळून नाहींसें करणें. *To burn out*, to consume the contents of. जाळून खाक करणें किंवा होणें. *To burn one's boats*, to commit oneself irrevocably to a course. परत जाण्याचीं साधनें नाहीशीं करणें. *To burn up*, to flash into blaze. भडकून उजेड पडणें. *To burn down*, *to burn low*, to burn less vigorously as fuel fails. कमी कमी जळत येणें. *To burn blue*, to give blue light. निळा उजेड पडणें. *To burn a candle at both ends*, not to husband energy. उधळपट्टी करणें. *To burn day light*, to use artificial light by day. दिवसांच दिवा लावणें. *To burn the midnight oil*, to work late at night. रात्रीं उशिरापर्यंत काम करणें. *Money burns hole in pocket*, money clamours to be spent. पैसे भराभर खर्च होण्याला लागणें, खिशाला भोंक पडणें. *To burn one's fingers*, to suffer for meddling or rashness. मध्यस्थीत किंवा उतावळेपणामुळें नुकसान सोसावयास लागणें, चट्टा बसणें. *To burn in* or *into*, to impress indelibly. मनावर कायमचा ठसा उमटणें किंवा उमटविणें. *To burn*, to get near discovery or truth (as in child's game). लपविलेल्या वस्तूकडे बिनचूक जाणें. *To burn the water*, to spear salmon by torchlight. मशालीच्या उजेडांत माशाला भाला मारणें. *n.* a brook, a stream; a sore or mark on body made by burning; burnt area (in a forest etc.). ओढा, नाला, ओहोळ; भाजलेल्याची खूण, चरका, चट्टा; लास, जळलेली जागा.

Bŭrn'er, *n.* (ब'र्नर्)—the part (of a lamp, etc.) that shapes the flame. कंदिलाचा वगैरे बर्नर, वातीचें घर.

Burn'et, *n.* (ब'र्निट्)—a brown-flowered plant. पिंगट रंगाचीं फुलें असलेलें लहान झाड.

Burn'ing, *Pa. a.* (ब'र्निंग्)—much heated, verly hot, scorching. संतप्त, दाहक, धगधगीत, झोंबणारा.. *Burning-glass*, a glass which collects the rays of the sun into a focus producing an intense heat. दाहमणि, सूर्यकांतमणि. *Burning shame* or *disgrace*, flagrant shame or disgrace. उघड उघड लज्जास्पद गोष्ट. *Burning question*, hotly discussed or exciting question. जोरजोरानें वादविवाद केला जाणारा विषय. *Burning (i. e. strong) scent*, चांगलाच वास येणें, माग लागणें. *Burnt offering*, sacrifice made by burning. आहुति, होम, हवनद्रव्य.

Bŭrn'ĭsh, *v. t. & i.* (ब'र्निश्)—to polish by friction, to make smooth bright and glossy. उजाळा देणें, उजळणें, सफाई करणें.

Burnt, *Pa. t.* of Burn.

Burr, *n.* (बर्)—a whirring sound; the sound of a strongly pronounced *r*. भर्र असा आवाज करणें; ऱ्चा कठोर आवाज.

Bŭ'rrō, *n.* (ब'रो)—a donkey. गाढव.

Bŭ'rrow, *n.* (-ō, ब'रो)—a hole excavated by animals as a dwelling. बीळ *v. i.* & *t.* to make or live in a burrow; to excavate; to retire out of sight; to investigate (mystery etc.). बीळ खणणें, बिळांत राहणें, बिळांत लपणें; खणून काढणें; दृष्टीआड जाणें; गूढ गोष्टीचा शोध लावणें.

Bûrs'ar, *n.* (ब'र्-सर्)—a treasurer (esp. of a college); holder of a bursary. विश्वविद्यालयाचा खजिनदार, खजिनदार; (स्कॉच युनिव्हर्सिटींत) शिष्यवृत्ति मिळविणारा विद्यार्थी, धर्मार्थ ठेवलेला स्कॉच विद्यार्थी.

Bûrsā'rial, *a.* (बर्-से'रिअल्)—of a bursary, of a bursar. विद्यालयाच्या खजिन्याविषयीं, मदत दिलेल्या विद्यार्थ्यांचा.

Burs'ary, *n.* (ब'र्-सरि)—the treasury of a college or monastery; an allowance to a poor scholar. विद्यालयाचा खजिना किंवा तिजोरी; गरीब विद्यार्थ्यास दिलेली मदत.

Bûrst, *v. i.* & *t.* (*Pa. t.* & *Pa. p.* burst) (बर्स्ट्)—to fly violently; to give way suddenly, explode; to rush forth. जोरानें उडणें; जोरानें फुटणें; (अश्रु) कोसळणें. *n.* collapse, sudden issuing forth, bursting, explosion, outbreak; spurt; continuous gallop. स्फोट, झटका, उफळी, धडाका, चार; उमाळा, झटका; सारखें भरधांव जाणें. *To burst in*, to come into room, interrupt. जोरानें आंत घुसून मार्ग काढणें, अडथळा करणें. *To burst out*, to exclaim. जोरानें ओरडणें. *To burst into tears*, to break into tears. रडें कोसळणें. *To burst out laughing*, to break into laughter. हांसतां हांसतां पोट दुखणें, हशा पिकणें. *To burst upon* (*i. e.* overrun) *enemy's country*, शत्रूच्या देशांत पळजबरीनें घुसणें. *To burst into* (*i. e.* to open) *blossom*, मोहोर येण्यास आरंभ होणें. *To burst* (*i. e.* be full) *with joy*, आनंदाचें भरतें येणें. *To burst up*, to explode, to bring or come to utter collapse. फुटून धुरळा होणें, कोसळून पडणें.

Bu'ry̆, *v. t.* (bĕ-, बे'रि)—to inter, to hide in earth; to put away, forget, to consign to oblivion; to commit (a corpse) to earth or tomb or sea; to celebrate burial rites over; to withdraw from view (face in hands, hands in pockets). पुरणें, गुडमासी देणें; विसरून जाणें, स्मृतिशेष करणें; प्रेत पुरून टाकणें; प्रेत पुरल्यावर प्रेतविधि करणें; लपविणें, झांकणें. *To have buried*, to have lost. नाहींसें होणें. *To bury the hatchet*, to renounce a quarrel. भांडण बंद करणें.

Bŭs, *n.* (बस्)—(*pl.* Buses) an omnibus; an aeroplane; a motor-car. चार चाकाची मोठी गाडी, बस; विमान; मोटारगाडी.

Bŭs'by̆, *n.* (-z-, ब'झ्-बि)—a tall fur cap with a cloth bag on the right side (worn by hussars and others). उजव्या बाजूला एक कापडी पिशवी असलेली उंच लोंकरी टोपी.

Bush, *n.* (-ŏŏ-, बुश्)—a shrub, clump of shrubs; woodland, untilled district; bunch of ivy as ancient vintner's sign; luxuriant growth of hair etc. झुडूप; झाडाचा प्रदेश, रान, ओसाड प्रदेश; आयव्ही नांवाच्या लतेचा गुच्छ, (हा इंग्लंडांतील खाणावळीबाहेर निशाणादाखल लावलेला असतो); केसांची वगैरे भरपूर वाढ. *Good wine needs no bush*, चांगल्या दारूला पुष्कळ जाहिरात लागत नाहीं. *Cf.* सूर्याला दाखविण्याकरितां मशालीची जरूरी नाहीं. *To take to the bush*, झाडाझुडपांचा आश्रय घेणें. *To beat about the bush*, द्राविडी प्राणायाम करणें, पाल्हाळ लावणें. *Bush-fighter*, a person used to fighting in the bush. गनिमी काव्यानें लढणारा. *Bush-fighting*, guerilla warfare. गनिमी काव्यानें लढणें. *Bush-bean*, kidney-bean. उडीद. *Bush-buck*, a small African antelope. एक लहान आफ्रिकेंतील काळवीट. *Bush-hog*, a wild pig of South Africa. दक्षिण आफ्रिकेंतील एक जातीचें रानटी डुकर. *Bush-hook*, a bill-hook. आंकडी असलेला मोठा कोयता. *Bush lawyer*, a New Zealand bramble. न्यू झीलंडमधील एक कांटेरी झाड. *Bushman*, an earliest known South African native race; dweller or traveller in a bush. अगदीं प्राचीन अरण्यांत राहणारा; वनवासी. *Bush-ranger*, Australian brigand living in a bush. अरण्यांत चोरून राहिलेला गुन्हेगार. *To bushwhack*, to work one's way through a bush. गनिमी काव्यानें फिरणें किंवा लढणें. *Bush-whacker*, a person who cuts down bush; a backwoodsman; an implement for cutting brushwood. झाडेंझुडपें तोडणारा; दूर अंतरावर असलेल्या झाड अरण्यांत राहणारा; झुडपें तोडण्याची कुऱ्हाड.

Bushed, *a.* (bŏŏsht, बुश्ट्)—lost in a bush. झुडपांत झांकलेला, नाहींसा झालेला.

Bush'el, *n.* (-ŏŏ-, बु'शेल्)—a measure of capacity (for corn, etc.). एक आठ गॅलनाचें कैली माप, बुशेल. *Not to hide light or candle under a bushel*, to set an example. उदाहरण

घालून देणें. *To measure others' corn by one's own bushel*, to judge others by oneself. आपल्यावरून जग ओळखणें.

Bush'ȳ, *a.* (-ŏŏ-, बु'शि)—like a bush; abounding in bushes, growing thickly. झुडपासारखा; झुडपांचा, झुडपाळ. दाट, निबिड.

Bus'iness, *n.* (bĭz'nĭs, बि'झ्-निस्)—one's occupation or affairs; one's province or duty; work or employment; (Theatr.) action, dumb-show; a commercial firm or its interests. काम, धंदा; स्वकर्म; काम, उद्योग, उद्योगधंदा; मूक नाटक; मुग्धाभिनय; व्यापारी पेढी, व्यापार, देवघेव. *To make it one's business to*, to undertake. एखादी गोष्ट करण्याचें हातीं घेणें. *He means business*, he is in earnest त्याचें कार्यांत अंतःकरण आहे. त्याची काम करण्याची खरीखुरी इच्छा आहे. *On business*, with definite purpose. विशिष्ट हेतूनें, विशिष्ट कार्याकरितां. *Business as usual*, things will proceed in spite of disturbing circumstances. व्यत्ययाला न जुमानतां सर्व कांहीं सुरळीत चालेल. *Business end of tin tack*, the point of business. कार्यहेतु. *Business hours, hours of business*, hours of regular work. नियमित कामाची वेळ. *Business man*, a man used to dealings with men and matters; a man engaged in commerce. व्यवहारांत पडलेला माणूस; व्यापारांत गुंतलेला मनुष्य. *A man of business*, an agent, attorney. दलाल. वकील. *Mind your own business, go about your business*, स्वतःच्या कामाकडे लक्ष दे, दुसऱ्याच्या भानगडींत पडूं नको. *Sound about his business*, त्याला आपल्या कामावर जावयाला लाव, घालवून दे *Has no business to*, has no right. कोणताहि हक्क नाहीं. *To do one's business*, to kill him. ठार मारणें. *Good business*! Well done! शाबास! भले बहाद्दर.

Bus'iness-like, *a.* (बि'झ्-निस्-लाइक्)—systematic, practical, prompt, well-ordered. पद्धतीला अनुसरून, व्यवहारी, तत्पर, व्यवस्थित, टापटिपीचा.

Bŭsk, *n.* (बस्क्)—a rigid strip stiffening corset-front. चोळीच्या पुढच्या भागाला ताठपणा आणण्याकरितां घातलेला तुकडा.

Bŭs'kĭn, *n.* (ब'स्किन्)—a high boot; an ancient tragic actor's boot; the tragic drama. पोटरीपर्यंत येणारा बूट; प्राचीन काळांतील नटाचा बूट; शोकपर्यवसायी नाटक. *To put on the buskin*, to write or act a tragedy. शोकपर्यवसायी नाटक लिहिणें किंवा करून दाखविणें.

Bŭs'kĭned, *a.* (ब'स्किन्ड्)—wearing a buskin. बस्किन जोडा घातलेला.

Bŭss, *n.* (बस्)—a kiss. मुका, चुंबन. *v. t.* to kiss. मुका घेणें, चुंबन घेणें.

Bŭst, *n.* (बस्ट्)—the upper front of the body, bosom (esp. of a woman), the chest; sculptured head, shoulders, and chest; contour of breast and neck. (बायकांचा) छातीचा भाग; वरच्या शरीराचा पुतळा; अर्धपुतळा.

Bust, *n.* & *v. i.* (बस्ट्)=(Sl. or vulgar) Burst.

Bŭs'tard, *n.* (ब'स्टर्ड्)—a large swift running bird. माळढोंक, एक जातीचा पक्षी.

Bŭ'stle, *v. i.* & *t.* (ब'सल्)—to make show of activity, bestir oneself; to make (others) hurry or work hard; to hurry about. व्याप किंवा धांवाधांव करणें, गडबड करणें; धामधूम करायला लावणें: नाचानाच करणें. *n.* excited activity, hurry; the padding inside the top of, a woman's skirt behind. धांवाधांव, धामधूम, गडबड; बायकांच्या परकराच्या पाठीमागें वरील भागाच्या आंत घातलेला कापडाचा वगैरे भाग.

Bus'ȳ, *a* (bĭzĭ, बि'झि)—working with concentrated attention, fully employed; fussy, meddlesome. उद्योगी, कामांत दंग, कार्यव्यग्र; लुचरा, लुडबुड्या. *v. i.* to engage, occupy, keep busy. उद्योग करीत राहणें किंवा ठेवणें, कामांत गुंतवणें. *Busy idle*, spending energy on trifles. आपली ताकद क्षुद्र गोष्टींवर खर्चणें.

Bŭt, *adv.* (बट्)—only. फक्त, केवळ. *prep.* except, without, outside of or apart from. शिवाय, वांचून. *conj* unless, if not, yet, still. परंतु, नाहींतर. तथापि. *But for this*, were it not so, without this. असें नसलें तर, याशिवाय. *But then*, but on the other hand. परंतु दुसऱ्या पक्षीं.

Butch'er, *n.* (bŏŏ-, बु'चर्)—a slaughterer of animals for food, meat-dealer; one who delights in bloodshed. कसाई, खाटीक; रक्तपातांत आनंद मानणारा. *v. t.* to slaughter mercilessly; to ruin by bad reading or editing, to damage by harsh criticism. निर्दयपणानें कत्तल करणें: वाईट वाचनानें किंवा लेखनानें नाश करणें, कडक टीकेनें नुकसान करणें. *The butcher, the baker, the candlestick-maker*, people of all trades. सर्व धंद्याचे लोक. *Butcher's bill*, a list of people killed in war. लढाईंत ठार मारलेल्या लोकांची यादी. *Butcher-bird*, a kind of shrike. टीव पक्षी. *Butcher's broom*, a low spiny-leaved evergreen (=*Knee Holly*). एक प्रकारची वनस्पति. (या वनस्पतीच्या केरसुणीसारख्या झुबक्याचा इंग्लंडांत खाटीक लोक केरसुणीसारखा

उपयोग करितात.) *Butcher's meat*, खाटकानें कापलेल्या जनावरांचें खाण्याचें मांस.

Bu'tcherlў, *a.* (बु'चर्-लि)—fit for or like a butcher, coarse, brutal. bloody. खाटकाला योग्य, खाटकासारखा, रानवट, निष्ठुर, रक्तप्रिय.

Buch'erў, *n.* (bŏŏ-, बु'चरि)—needless or cruel slaughter of people, massacre; slaughtering department (in barracks, camp, ship, etc.); butcher's trade. लोकांची निष्कारण कत्तल, काटाकाट; कसाईखाना; खाटकाचा धंदा.

But'ler, *n.* (ब'ट्-लर्)—a man-servant in charge of wine, plate, etc.; a head servant. कोठावळा; बटलर, वाकनीस.

Bŭtt, *n.* (बट्)—a large cask (108–140 gallons); a mound behind a target; an object of ridicule, a person habitually teased; the thicker end of an object. मोठें पिंप; निशाण मारण्याचें लक्ष्य, हास्यास्पद विषय, थट्टेचें पात्र; कोणत्याहि वस्तूचें जाड टोंक, बूड, बुडखा. *v. i. & t.* to push or run one's head into, to go headlong into, to strike with the head. टक्कर देणें, घुसणें, ढोसणें, खुपसणें. *To give a fish the butt*, to turn the butt of a rod towards a fish for firmer hold. माशानें वद्द धरावें म्हणून काठीचा बुडखा त्याच्याकडे करणें. *Butt, butt-end*, remnant. शेष, अवशेष. *Butt-end*, the thicker end. बूड, बुडखा. *To come butt* (or *full butt*) *against*, to run into. आंत घुसणें. *To butt in*, to intervene, meddle. मध्यें पडणें, मध्यस्थी करणें.

Butte, *n.* (būt, ब्यूट्)—an isolated hill or peak rising abruptly. टेंकाड, टेंकडी.

Bŭtt'er, *n.* (ब'टर्)—a yellow fatty food-substance made from cream. लोणी, मस्का *v. t.* to spread butter on; to flatter grossly. लोणी लावणें; मस्का लावणें (*fig.*). *To look as if butter would not melt in the mouth*, to be demure. अतिशय नम्र दिसणें, वरवर विनय दाखविणें. *Butter-boat*, sauce-boat. द्रोण, डोणा. *Butter-fingered*, *a.* given to letting things slip, unable to hold things (esp. a catch at cricket). बुळबुळीत हाताचा, हातांत वस्तु वद्द ठेवण्याला असमर्थ. *Butter-fingers*, a butter-fingered person. जो आपल्या हातांतून चेंडु धरण्याऐवजीं जाऊं देतो तो. *Butter-milk*, liquid left after butter-making. ताक. *Butter-sauce*, sauce made of melted butter, flour, etc. ताक, पीठ वगैरे पासून तयार केलेलें कालवण, तोंडी लावणें. *Fine words butter no parsnips*, mere professions are valueless. केवळ लाघवी भाषण हें निरुपयोगी होय.

Bŭtt'er-cŭp, *n.* (ब'टर्-कप्)—kinds of yellow-flowered plant. एक पिंवळीं फुलें असलेलें लहान झाड.

Bŭtt'erflў, *n.* (ब'टर्-फ्लाय्)—an insect with large wings (often of brilliant colours); a showy person, a trifler. फुलपाखरूं, पतंग; भपकेबाज मनुष्य, खुशालचेंडु.

Butt'er-nŭt, *n.* (ब'टर्-नट्)—a large oily nut of the white walnut-tree of North America; the white walnut-tree. उत्तर अमेरिकेंतील सफेत अक्रोड; सफेत अक्रोडाचें झाड.

Butt'er-wort, *n.* (ब'टर्-वर्ट्)—a fleshy-leaved violet-flowered bog-plant. एक जांभळीं फुलें असलेलें झाड.

Bŭtt'erў, *n.* (ब'टरि)—a place (in colleges, etc.) where provisions are kept. दुभत्याची खोली, खाद्यसंभारगृह, कोठी. *Buttery-hatch*, half-door over which provisions are issued. ज्या ठिकाणाहून सामान दिलें जातें तें अर्धें दार.

Bŭtt'ock, *n.* (ब'टॉक्)—either protuberance of the seat of the body; the hind part of beasts; (*pl.*) a seat, hind quarters. ढुंगण; पाठीमागचा भाग; बैठक, पाठीमागची बसण्याची जागा, मागचा पुठा.

Bŭtt'on, *n.* (ब'टन्)—a knob or disk sewn to a garment (to fasten it to pass through the buttonhole, or for ornament); an unopened flower-bud; a knob, handle, catch (as in electric bell). गुंडी, बटण; फुलाची कळी; विजेच्या दिव्याचें बटण. *v. t. & i.* to fasten with buttons (usu. with *up*, *in*, *into*). बटणें लावणें, गुंड्या अडकवणें. *A boy in buttons*, a page. नोकर, चाकर, हुजऱ्या. *To take by the buttons*, to detain. खोळंबून ठेवणें, थांबविणें. *To touch the button*, to produce a complicated result by a simple action. साध्या कृत्यानें कठिण परिणाम होणें. *Buttonhole*, *n.* a hole into which a button fits; a flower or flowers to be worn in a buttonhole. बटण घालण्याचें भोंक, बटणाचा काच; बटणाच्या काचामध्यें घालण्याचें फूल किंवा फुलें. *v. t.* to seize a person to secure his attention. लक्ष वेधण्याकरितां एखाद्या मनुष्याला धरणें. *Button-hook*, a hook for fastening buttons. बटणें अडकविण्याचा हुक किंवा आंकडा. *Buttons*, *n. sing.* a liveried page. पूर्ण पेहेराव केलेला हुजऱ्या, नोकर.

Bŭtt'rĕss, *n.* (ब'ट्-रिस्)—a support (built against a wall, etc.); a prop; a person etc. that strengthens a cause etc. भिंतीच्या

बाजूला बांधलेला टेंकावा, टेंकू; आश्रय; एखाद्या कामकाजाला बळकटी आणणारा माणूस. *v. t.* to support by a buttress, to strengthen. टेंकू देणें, मजबुती आणणें.

Bŭx'om, *a.* (ब'क्सम्)—plump, comely. गोंडस, गोजिरवाणा.

Buy, *v. t.* (bī, बाय्)—to obtain in exchange of money or other consideration; to obtain by bribery. विकत घेणें, खरेदी करणें; लांच देऊन आपलासा करणें. (*Pa. t.* Bought). *n.* a bargain. सौदा. *To buy in*, to buy a stock of, to withdraw at auction by naming higher price than the highest offered. थाऊक माल खरेदी करणें, (पुरी किंमत येत नसली म्हणजे) लिलांवांत वस्तूच्या जुन्या मालकाकरितां विकत घेणें. *To buy into*, to buy stock or shares in (the Funds or a Company). कंपनीचे भाग विकत घेणें. *To buy off*, to get rid by payment of (a claim, claimer, black-mailer), to get (soldier) discharged by payment. पैसा देऊन वाद मिटविणें, पैसा देऊन लष्करी नोकरींतून मुक्त करणें. *To buy out*, to pay a person to give up a post, property etc. जागा, इस्टेट वगैरे सोडून देण्याकरितां एखाद्याला पैसे देणें. *To buy over*, to bribe. लांच देऊन आपलासा करणें. *To buy up*, to buy as much as possible of, to absorb (other firm, etc.) by purchase. एकदम सर्व माल विकत घेणें, दुसरी फर्म वगैरे खरेदी करून एकत्र करणें. *To buy a pig in poke*, to commit oneself inconsiderately. विचार न करतां गुंतला जाणें. Buy'able, *a.*

Buy'er, *n.* (बा'यर्)—one who buys. विकत घेणारा, गिऱ्हाईक.

Bŭzz, *n.* (बझ्)—humming like bees; a confused sound. गुणगुणणें; फुसफुसणें, कुजबूज. *v. i. & t.* to make a buzz; to spread secretly. गुणगुणणें; गुप्तपणें प्रसार करणें, कुजबूज करणें. *Buzz-saw*, a circular saw. वर्तुलाकार करवत. *To buzz an applause*, to utter an applause by speaking together. एकत्र बोलून वाहवा करणें. *To buzz (stones)*, to throw hard. जोरानें फेंकणें.

Bŭzz'ard, *n.* (ब'झर्ड्)—kinds of falcons, kind of vulture. एक जातीचा बहिरीससाणा; एक जातीचें गिधाड.

Bŭzz'er, *n.* (ब'झर्)—a steam-whistle; an electric buzzing-machine for sending signals; (Army sl.) a signaller. वाफेची शिटी; सिग्नल देण्याचें विजेचें यंत्र; सिग्नल देणारा.

Bȳ, *adv.* (बाय्)—near, at hand; aside, in reserve; past. जवळ; बाजूला; जवळून. *prep.* near to, beside, within reach of; along, via, past; surrounded with; through the action, agency, means, or instrumentality of; as soon as, not later than; in accordance with. जवळ; द्वारा, मार्फत; वेष्टित; कडून; नें, ॰च्या आंत; प्रमाणें *By and by*, before long. थोड्या वेळानें. *n.* the future. भविष्यकाल, भवितव्य. *To stand by*, to be faithfu. to, to help. विश्वासू असणें, मदत करणें. *To abide by*, to accept, observe. स्वीकारणें, पाळणें. *To come by*, to obtain. मिळणें. *By oneself*, alone. एकटा, दुसऱ्याच्या मदतीशिवाय. *By the way*, as one goes, parenthetically. जातां जातां, सहजासहज मध्येंच घातलेलें. *To swear by vegetarianism*, to declare complete belief in. पूर्ण विश्वास प्रगट करणें.

Bȳ-blow, *n.* (बा'य्-ब्लो)—a side-blow at some one else than the main opponent; a bastard child. भलत्यालाच लागलेला ओझरता फटका; अनौरस मूल.

Bye, *n.* (बाय्)—a run made at cricket without ball being struck by the batsman. बॅटला चेंडू लागल्याशिवाय काढलेली धांव.

By'-election, *n.* (बा'य्-इलेक्शन्)—an election caused by death or resignation. मधलीच निवडणूक, पोटनिवडणूक.

Bȳ'-ĕnd, *n.* (बा'य्-एन्ड्)—a side or secret purpose. खासगी किंवा गुप्त हेतु.

By'gone, *a.* (बा'य्-गॉन्)—no longer existent, past, departed, antiquated. अस्तित्वांत नसलेलें, गत. *n. pl.* the past, past offences. भूतकाळ, झालेल्या गोष्टी. *Let bygones be bygones*, forgive and forget. झालेल्या गोष्टी विसरून जा.

By'-lane, *n.* (बा'य्-लेन्)—a side lane. आडगल्ली, आडरस्ता.

By'law, Bye'law, *n.* (बा'य्-लॉ)—a regulation made by a local authority, etc. अवांतर कायदा, पोटकायदा.

By'-name, *n.* (बा'य्-नेम्)—a nickname. टोपणनांव.

Bȳ'-pass, *n.* (बा'य्-पास्)—a secondary gas-jet always alight from which the main jet is lit when wanted; a piece of new road relieving traffic by connecting two points of the old. ज्याच्यापासून जरूर पडेल तेव्हां मुख्य नळी पेटविली जाते अशी नेहमीं पेटलेली दुय्यम प्रतीची गॅस सोडण्याची नळी; जुन्याला जोडणारा नवीन रस्त्याचा भाग.

By'-păth, *n.* (बा'य्-पाथ्)—an unfrequented path. आडमार्ग.

Bȳ'-play, *n.* (बा'य्-प्ले)—a dumb show of

minor characters on the stage. गर्भनाटक, उपनाटक.

By̆'-product, *n.* (बा'यू-प्रॉडक्ट्)—a thing or substance produced incidentally in the manufacturing of something else. मुख्य पदार्थाचें अंगभूत होणारा पदार्थ, अवांतर उत्पन्न.

Byre, *n.* (बायर्)—a cow-house. गाईंचा गोठा.

By̆'-road, *n.* (बा'यू-रोड्)—a little frequented road. आडरस्ता.

By'stander, *n.* (बा'यू-स्टँडर्)—a spectator. प्रेक्षक.

By̆'-street, *n.* (बा'यू-स्ट्रीट्)—an out-of-the-way street. विशेष प्रचारांत नसलेला रस्ता, आडमार्ग.

By the by, (बा'यू-दि-बाय्)—incidentally, parenthetically. सहज आठवण झाल्यावरून, प्रसंगानुरूपानें. (Also, *by the bye*)

By̆'-way, *n.* (बा'यू-वे)—a secluded road or track; a short cut; less known department of any subject. आडमार्ग, आडरस्ता; अगदीं जवळचा रस्ता; कोणत्याहि विषयाचा विशेष माहीत नसलेला विभाग.

By̆'wŏner, *n.* (बा'यू-वोनर्)—a sub-occupier of a farm land (paying rent in kind or service). भाड्यानें पोटशेती करणारा.

By'word, *n.* (बा'यू-वर्ड्)—a familiar saying; an object of derision. परिचित म्हण, न्याय; हास्यविषय.

By̆'work, *n.* (बा'यू-वर्क्)—a work done by the way, work done at leisure moments. फावल्या वेळांत केलेलें काम.

By̆zăn'tine, *a.* (बायू-झॅ'न्-टाइन्)—of Byzantium or Constantinople; of the architectural style of the Eastern Roman Empire (round arch, cross, dome, circle, mosaic). कॉन्स्टँन्टिनोपलसंबंधीं; पौर्वात्य रोमन साम्राज्यांतील विशिष्ट खोदकामपद्धतीविषयीं.

C

C, (सी)—the third letter of the English alphabet; the Roman numeral 100; (Mus.) the first note of natural major scale. इंग्रजी वर्णमालेंतील तिसरा वर्ण; १०० या रोमन आंकडा; स्वरसप्तकांतील प्रथम स्वराची संज्ञा, षड्जस्वर.

Ca'aba, *n.* (का'अबा)—the sacred building at Mecca, Mohammedan Holy of Holies cotaining the black stone. काअबा, मुसलमान लोकांची मक्केतील अतिपवित्र मशीद. (या मशिदींत आग्नेयी भागाला काळा दगड आहे. हा दगड धार्मिक मुसलमान लोक स्वर्गांतून आणिला आहे असें समजतात.)

Căb, *n.* (कॅब्)—a hackney carriage (esp. of brougham or hansom shape or taxi). एका घोड्याची हांकणाची भाड्याची गाडी. *v. i.* to go by a cab, to go in a cab. कॅब गाडींतून जाणें. *Cabman*, driver of a cab. कॅब गाडी हांकणारा. *Cabstand*, a place where cabs stand for hire. कॅब गाड्या उभ्या राहण्याची जागा, भाड्याचीं गाड्यांचा अड्डा.

Cabăl', *n.* (कॅबॅ'ल्)—a secret intrigue; a political clique, faction. गुप्त कारस्थान, मसलत, कट; राजकीय कट, फाटाफूट. *v. i.* to join in or act as a cabal. गुप्त मसलत करणें, राजकीय कटाला सामील होणें. *The Cabal*, 'Committee for Foreign Affairs' under Charles II, esp. Clifford, Arlington, Buck ingham, Ashley, and Lauderdale (1672), precursor of modern Cabinet. इंग्लंडच्या राजा दुसरा चार्ल्स याचें परराष्ट्रमंडळ.

Căbb'age, *n.* (-ij, कॅ'बिज्)—kinds of green vegetable with round heart. कोबीचा कांदा, कोबी. *v. i.* to form a head like a cabbage. कोबीच्या आकारासारखें डोकें होणें.

Căbb'age, *n.* (कॅ'बिज्)—shreds (or large pieces) of cloth appropriated in cutting out clothes. घेतून कापल्यानंतर राहिलेले कापडाचे मोठे तुकडे. *v. t.* to appropriate (pieces of cloth, etc.) surreptitiously. घेतून राहिलेल्या कापडाचे तुकडे चोरणें, कपटानें आपलासा करणें.

Căb'ala, Căbb'ala, *n.* (कॅ'बॅला)—Jewish oral tradition; occult lore, mystic interpretation, esoteric doctrine. ज्यू लोकांच्या धर्मशास्त्राचें परंपरागत भाष्य; गूढविद्या, रहस्यविद्या. Căb'alism, Cabb'alism, *n.* कॅबालापंथ, कॅबालासंप्रदाय, गूढार्थत्व. Cabbalistic, *a.*; Cabbalist, *n.* ज्यू धर्मशास्त्रवेत्ता.

Că'bby̆, *n.* (कॅ'बि)—(colloq.) a cabman. भाड्याची गाडी हांकणारा.

Cā'ber, *n.* (के'बर्)—a roughly trimmed pine-trunk used in Scotch Highland Sport of *tossing the caber.* खेळण्याकरितां तयार केलेलें पाइन झाडाचें खोड.

Căb'in, *n* (कॅ'बिन्)—a small dwelling (esp. of wood); a hut; a private or public room on a ship. लहानशी राहण्याची जागा; झोंपडी; गलबतांतील खोली. *Cabin-boy*, a boy waiting on officers or passengers. गलबतांत अधिकाऱ्यांच्या किंवा उतारूंच्या सेवेकरितां ठेवलेला नोकर. *Cabined*, *a.* confined or cramped in a small space. अगदीं थोड्याशा जागेंत कोंडून ठेवलेला.

Căb'inet, *n.* (कॅ'बि-निट्)—a closet, a private room; a body of Ministers attending councils with the Prime Minister; a case with drawers or shelves or com-

partments. लहान खोली, खास दिवाणखाना; मन्त्रिमंडळ, मुख्य प्रधानमंडळ; खण असलेलें कपाट किंवा पेटी. *Cabinet council*, a meeting of council of about twelve or or twenty chief ministers of state. राजाच्या मुख्य मंत्र्यांची सभा. *Cabinet crisis*, difficulties involving change of government or resignation of some members of the Cabinet. प्रधानमंडळाची चलाविचल, प्रधानमंडळाचा डळमळितपणा. *Cabinet edition*, an edition between the library edition and the popular edition. पुस्तकालयांतील प्रतीपेक्षां आकारानें व किंमतीनें थोडी लहान प्रत. *Cabinet photograph*, a size larger than carte-de-visite. छायाचित्राचा कार्डापेक्षां थोडा मोठा आकार. *Cabinet-maker*, a skilled joiner. नकशीदार पेट्या व इतर लांकडी सामान तयार करणारा सुतार. *Cabinet-making*, *n.*

Că'ble, *n.* (केंबल्)—an anchor rope or chain (as measure) 200 fathoms; a thick rope of wire or hemp; a submarine line containing insulated wires, a message sent by a submarine line. गलबताच्या नांगराचा दोरखंड किंवा सांखळी; जाड दोरखंड किंवा तार; जलमार्गानें नेलेलें तारायंत्र; जलमार्गानें पाठविलेली तार. *v. i.* & *t.* to use telegraphic cable, to wire message by a telegraphic cable. पाण्यांतील तारेचा उपयोग करणें, तार करणें.

Că'ble-căr, *n.* (केंबल्-कार्)—a tram-car worked by an underground cable. जमिनीखालून नेलेल्या तारांनीं चालणारी ट्रॅमगाडी.

Că'blegrăm, *n.* (केंबल्ग्रॅम्)—a message sent by an oceanic telegraph cable. समुद्रांतून नेलेल्या तारेंतून गेलेली किंवा पाठविलेली बातमी.

Cabŏbs', *n. pl.* (कबॉब्ज्)—meat roasted in small pieces on skewers; roast meat. मांसाचें पक्वान्न, कबाब; शिजवलेलें मांस.

Cabōō'dle, *n.* (कबूडल्)—(Sl.) group, lot, set. टोळी, समुदाय. *The whole caboodle*, all the the lot (persons or things). सर्वच्या सर्व, सर्व समुदाय.

Cabōōse', *n.* (कबूस्)—a cooking-room on the ship's deck; a car (for the use of a conductor, brakeman, etc.) on freight-train. गलबतावरील स्वयंपाकाची खोली, मालाच्या गाडीवरील एक डबा.

Căbrĭolet', *n.* (-lā, कॅब्रिऑले)—a light two-wheeled hooded one-horse chaise. एका घोड्याची अर्ध्या झांकणाची दुचाकी गाडी

Caca'ō, *n.* (कॅकेओ)—the tree or its seed giving cocoa and chocolate. कॅकाओ झाड किंवा फळ. (याच्या बियांपासून कोको व चॉकोलेट तयार होतें.)

Căche, *n.* (-sh, कॅश्)—store of food etc. left behind for future use by explorers etc. पुढें उपयोगी पडावी म्हणून शिल्लक ठेवलेली धान्यसामुग्री वगैरे. *v. t.* to place or store in cache. (धान्य दारूगोळा वगैरे) शिल्लक ठेवणें, लपवून ठेवणें.

Că'chet, *n.* (kăshā, कॅशे)—marks of authenticity, distinguishing mark; any distinctive stamp. खरें असल्याबद्दलची खूण, विशेष चिन्ह; विशिष्ट शिक्का.

Că'chĭnnāte, *v. i.* (कॅकिनेट्)—to laugh loudly. मोठ्यानें हंसणें, खदखदां हंसणें.

Că'chinnā''tion, *n.* (-kĭ-, कॅकिने'शन्)—loud or immoderate laughter. अट्टाहास, मोठ्यानें हंसणें. Ca'chinatory, *a.* मोठ्या हंशाचा.

Ca'chou, *n.* (kăshōō, कॅशू)—a pill used by smokers to sweeten the breath. (श्वासोच्छ्वासाची घाण दूर करणारी) मंजिष्ट व काजू यांची केलेली गोळी.

Cacique', *n.* (-sēk, कसीक्)—an aboriginal prince or chief of the West Indies and tropical America. वेस्ट इंडीजमधील अगदीं मूळचा राजा.

Căc'kle, *n.* (कॅकल्)—clucking of hen, calling of geese; glibe inconsequent talk. कलकल, हंसशब्द; उगीच व्यर्थ बडबड, जल्पना. *v. i.* & *t.* to make clucking of hen after laying; to indulge in noisy talk. खुटखुट आवाज करणें; बडबडणें.

Căcodē'mon, *n.* (कॅकॉडीमन्)—an evil spirit; a malignant person. पिशाच्च, राक्षस; दुष्ट मनुष्य.

Căcoē'thēs, *n.* (-z, कॅकोईथेझ्)—an ill habit, an itch for doing something unadvisable or foolish. हाडींमाशीं खिळलेली वाईट संवय, कुकर्मकंडु.

Căco'graphy̆, *n.* (कॅकॉग्रफि)—bad handwriting or spelling. वाईट हस्ताक्षर, अशुद्ध लेखन.

Caco'phonous, *a.* (कॅकॉफोनस्)—ill-sounding. वाईट किंवा कर्कश आवाजाचा.

Căcŏph'ŏny̆, *n.* (कॅ-कॉफॅनि)—an ugly sound (esp. of words or music). कर्कश आवाज, बेसूर, बदसूर. [Gr. *kakos* bad, & *phone*, to sound]

Că'ctŭs, *n.* (कॅक्टस्)—a juicy plant with thick fleshy stem (usually no leaves and clusters of spines). अमेरिकेंत उष्ण प्रदेशांत होणारी एक कांटेरी वनस्पति. Căctā'ceous, *a.*

Căd, *n.* (कॅड्)—a low ill-bred fellow, a mean vulgar fellow: an omnibus conductor; a hanger-on employed about (esp. school and college) games; a member of lower classes; a person guilty or capable of ungentlemanly conduct, a blackguard.

हलकट, अशिक्षित मनुष्य; ऑम्निबस गाडीचा कन्डक्टर; खेळासंबंधीं नेमलेला अनुयायी; खालच्या वर्णाचा माणूस; असभ्य मनुष्य, लुच्चा, हरामखोर.

Că'ddish, a. (कॅ'डिश्)—dishonourable, ill-bred. नीच, कलंक लावणारा, असभ्य, उद्धट.

Cădăv'erous, a. (कॅडॅ'व्हरस्)—of corpse-like pallor, deadly pale. प्रेतकळेचा, प्रेतसदृश, मढ्यासारखा. [L. cadaver, a corpse]

Că'ddie, n. (कॅडि)—a golf-player's attendant. गोल्फ खेळणाराचा बरोबर असणारा नोकर.

Că'ddis, Că'ddice, n. (कॅ'डिस्)—a water-larva in cylindrical case of stems etc. पाण्यामध्यें असणारा कोशांतील किडा.

Că'ddy̆, n. (कॅडि)—a small box for holding tea. चहा ठेवण्याची लहान पेटी.

Cā'dence, n. (केडन्स्)—rhythm, measured movement of sound; intonation; close of musical phrase. आवाजाचा चढाव किंवा उतार; स्वरभेद; गाण्याचा विराम, स्वरसंक्रम.

Cădĕt', n. (कॅडे'ट्)—a younger son; a student in naval or military college; (Austral.) a young gentleman who is learning farming on a large farm. धाकटा मुलगा; नाविक किंवा लष्करी कॉलेजांतील विद्यार्थी किंवा उमेदवारी करणारा मनुष्य; मोठ्या शेतावर शेती शिकत असलेला तरुण गृहस्थ.

Cădge, v. i. & t. (कॅज्)—to go about peddling or begging; to get by begging. भिक्षा मागत फिरणें; भीक मागून मिळविणें.

Că'dger, n. (कॅ'जर्)—a pedlar, a street hawker; a beggar, loafer. फेरीवाला, रस्त्यांतून जिन्नस विकणारा; भीक मागत फिरणारा, भिकारी.

Ca'di, Ka'di, n. (का'दि)—a Mohammedan judge, a civil judge (usu. of a town, etc.) among Turks, Arabs & Persians. काजी, ग्रामन्यायाधीश, मुसलमानांचे जातिधर्मासंबंधीं खटले तोडणारा न्यायाधीश.

Căd'miŭm, n. (कॅड्-मिअम्)—a bluish-white metal resembling tin. जस्तासारखी एक निळसर पांढरी धातु. Cadmium-yellow, an intense yellow pigment. एक अत्यंत निळें मलम.

Ca'dre, n. (का'डर्)—a framework, scheme (Mil.) a permanent establishment of a regiment forming nucleus for expansion at need. रचना, योजना; व्यवस्था; सैन्यविभागाची कायमची व्यवस्था.

Cădū'cēŭs, n. (कॅड्यू'सिअस्)—(Pl. Cadu'cēī, कॅड्यू'सेआय्)—the ancient herald's wand (esp. as symbol of Mercury). प्राचीन देवदूताची काठी.

Cadū'cous, a. (कॅड्यू'कस्)—fleeting, unenduring, perishable; falling off when work is done. निघून जाणारें, न टिकणारें, नाशवंत; (काम झाल्यावर) आपोआप गळून पडणारें.

Cădū'city, n. आपोआप गळून पडण्याचा धर्म.

Cae'cŭm, n. (सी'कम्) (Pl. Cae'ca, सी'का)—the blind gut or first part of the large intestine. अंधान्त्र, मोठ्या आंतडीचा आरंभीचा भाग. Caécal, a.; Caeci'tis, n.

Cae'sar, n. (सी'झर्)—Roman Emperor from Augustus to Hadrian; an autocrat. रोमन बादशहा सीझर; अनियंत्रित राजा, सुलतान. Caesar's wife, a person required to be above suspicion. ज्याचा संशयसुद्धां घेणें शक्य नाहीं असा इसम.

Cae'sarism, n. (सी'झरिझम्)—belief in autocracy. एकतंत्री राज्यकारभारावर विश्वास, राजाचा अनियंत्रित वर्तनक्रम. Cae'sarist, n. सीझरच्या अनियंत्रित राज्यतंत्राचा अभिमानी.

Caesu'a, n. (siz-, सि-झ्यु'अ)—the point of natural pause in a metrical line. कवितेच्या ओळींत मध्येंच थांबण्याचें स्थळ, यति. Caesū'ral, a.

Că'fé, n. (kă'fā, कॅफे)—a coffee-house or restaurant. उपाहारगृह, चहाकॉफीचें दुकान, फराळाचें दुकान.

Căfĕtĕr'ia, n. (कॅफिटि'अरिआ)—a restaurant where the patrons serve themselves with food. आश्रयदाते उपाहिकाणीं स्वतःच वाढून घेतात असें फराळाचें दुकान.

Că'ffeïne, n. (कॅफिआइन्)—vegetable alkaloid found in coffee and tea plants. कॉफी व चहाच्या झाडांमध्यें सांपडणारें आल्कली द्रव्य.

Cāge, n. (केज्)—a fixed or portable prison of wire or with bars (esp. for birds or beasts); a prison. पिंजरा; तुरुंग, बंदीखाना. v. t. to confine in a cage. पिंजऱ्यांत कोंडणें.

Căhōōt', n. (कॅहू'ट्)—in cahoot, in cahoots, in league or partnership. संघांत किंवा भागीदारींत.

Caïque', n. (ka-ēk', कइ'क्)—a Turkish rowboat. तुर्कस्तानांतील वल्हवण्याची होडी.

Cairn, n. (केर्न्)—a pyramid of stones. दगडी बुरूज, मनोरा.

Cairngŏrm', n. (केर्न्-गॉ'र्म्) a yellow or wine-coloured gem-stone. पिवळा अथवा तांबडा रंगाचा स्फटिकमय खडा.

Cai'sson, n. (के'सन्)—an ammunition chest or wagon; a watertight case used in laying foundations under water. दारूगोळ्याची पेटी किंवा छकडा; पाण्याखालीं पाया घालण्याकरितां म्हणून तयार केलेली आंत पाणी न शिरणारी पेटी.

Cait'iff, n. (के'टिफ्)—a coward or rascal, a base or despicable person. भीरु, हरामी.

Căjōle', v. t. (कॅ-जो'ल्)—to persuade or sooth

by flattery or deceit. फुसलावणें, गोड बोलून ठकवणें. Cajolery, Cajolement, *nn.*

Căke, *n.* (केक्)—a small flat loaf; a flattish compact mass; a compound of bread sweetened with sugar, currants and other ingredients. चपाती, पोळी; (साबणाची वगैरे) वडी; एक साहेबी गोड पक्वान्न, केक. *v. t. & i.* to form into cohesive mass, to harden. पोळी करणें, वडी बनवणें, घट्ट करणें. *Cakes and ale*, merry-making. चैन, मजा, सर्व प्रकारचें संसारसुख. *To take the cake*, to carry off the honours. शर्यतींत पहिल्या प्रतीचें बक्षीस मिळविणें. *Cake-walk*, a dance developed from a negro contest in graceful walking with cake for the prize. एक प्रकारचा नाच. Căk'ÿ, *a.* lumpy, cohesive. गोळ्यासारखा, घट्ट.

Cal'abash, *n.* (कॅल-बॅश्)—kinds of gourd and fruit-tree; a shell from these as a drinking or cooking vessel. भोंपळा; तुंबडी.

Călaboose', *n.* (कॅलबूस्)—(colloq.) a prison. तुरुंग.

Călamăn'der, *n.* (कॅल-मॅं'डर्)—a hard cabinet wood of Ceylon and India. एक सीलोनी ताठ लांकूड.

Calăm'ĭtous, *a.* (कलॅ'मि-टस्)—causing or marked by calamity. दुःखद, विपत्तीचा, हालअपेष्टेचा.

Calăm'ĭtÿ, *n.* (कलॅ'मि-टि)—adversity, deep distress, grave disaster; distressed state. विपत्ति, मोठें संकट; हाल, हालअपेष्टा.

Calăsh', *n.* (कलॅ'श्)—a hooded carriage; a carriage-hood; a hood protecting bonnet, etc.; a two-wheeled one-seated vehicle with the driver's seat on the splash-board. आच्छादनयुक्त गाडी; गाडीचें आच्छादन; (तोंडावरचा) बुरखा; एक दुचाकी एक स्वारी बसण्याजोगी गाडी.

Călcā'rĕous, *a.* (कॅल्के'रिअस)—containing carbonate of lime; of limestone. खडू किंवा चुनखडा असलेला; चुनखडीचा.

Călcĕolā'rĭa, *n.* (कॅल्-सिओले'रिआ)—a plant with slipper-shaped flower. पादत्राणाच्या आकृतीसारखें फूल असलेलें झाड.

Căl'cĭfÿ, *v. t. & i.* (कॅ'ल्सिफाय्)—to convert or be converted into lime; to replace by lime; petrify. चुना होणें, चुन्याच्या स्थितींत येणें; चुना बनणें; (चुन्यासारखा) घट्ट दगड बनणें. Calcification, *n.*; Calcifiable, *a.*

Căl'cine, *v. t. & i.* (कॅ'ल्-सिन्)—to reduce to powder by burning, to reduce to a friable state; to be converted by heat into a powder. उष्णता लावून भस्म करणें; उष्णतेच्या योगानें भस्म होणें. Calcination, *n.*

Căl'cĭŭm, *n.* (कॅ'ल्-सि-अम्)—a yellow metal the basis of lime. एक प्रकारची धातु, रसायन शास्त्रांतील एक मूलतत्त्व. [L. *calx, calcis*, lime]

Căl'cūlāte, *v. t. & i.* (कॅ'ल्-क्यु-लेट्)—to compute by figures, to ascertain by exact reckoning; to suppose, believe. हिशेब करणें, गणणें; हिशेब करून ताडून पाहणें; तर्क करणें, वाटणें. *Calculating-machine*, a machine that does sums automatically. आपोआप बेरजा करणारें यंत्र.

Căl'cūlāted, *a.* (कॅ'ल्क्यु-ले-टेड्)—intentional, prearranged. जाणूनबुजून केलेला, बुद्धिपूर्वक, पूर्वसंकल्पित.

Călcūlā'tion, *n.* (कॅल्क्युले'शन्)—reckoning, result got by reckoning; forecast. गणणें, गणित, शेवटचा आंकडा; अंदाज, अजमास, कयास, अटकळ.

Că'lcūlātor, *n.* (कॅ'ल्क्युलेटर्)—one who calculates; a set of tables for use in calculating-machine. गणना करणारा, विचारी; हिशोब करण्याचीं कोष्टकें, गणनयंत्र, हिशेब करण्याचें यंत्र.

Că'lcūlŭs, *n.* (कॅ'ल्क्युलस्) (*Pl.* Calculi)—(Med.) a stone, concretion of some part of the body; (Maths.) a particular method of calculation. खडा; गणिताची एक उच्च शाखा, कलन. *Urinary calculus*, मूतखडा. [L. *calculus*, a pebble]

Chīde, *v. t. & i.* (चाइड्)—to rebuke, to scold, to contend in angry words, to blame for a fault. धमकावणें, रागें भरणें. (*Pa. t.* chid, *p. p.* chidden *or* chid)

Chief, *n.* (चीफ्)—a leader or ruler; head of a tribe or clan. नायक, अधिपति; टोळीचा पुढारी. *a.* first in importance or influence, prominent, leading. प्रमुख, मुख्य. The Chief Justice=सर न्यायाधीश. *In chief*, most of all, especially. सर्वांत मुख्य गोष्ट म्हणजे, विशेषतः

Chief'lȳ, *adv.* (ची'फ्-लि)—above the rest; mainly but not exclusively. प्राधान्येंकरून; सर्वसाधारणपणें, प्रायः.

Chief'tain, *n.* (-ĭn, ची'फ्-टिन्)—a military leader; the chief of a clan or a tribe or a robber-band, the headman of a large group. लष्करी पुढारी; कोणत्याहि टोळीचा मुख्य, सरदार, नायक. Chieftaincy, Chieftainship, *nn.* the position of a chieftain. सरदारी, आधिपत्य, प्रमुखत्व.

Chĭff'-chăff, *n.* (चि'फ्-चॅफ्)—a bird of the warbler family. एका जातीचा पक्षी.

Chĭf'fŏn, *n.* (sh-, शि'फॉन्)—a very thin kind of cloth used in women's clothes, thin gauze. एका जातीचें अत्यंत पातळ कापड. (*Pl.*) adornments of female dress. बायकांच्या पोषाखाला शोभादायक झालर वगैरे.

Chĭffŏnier', *n.* (sh-, शिफॉनि'अर्)—a low movable cupboard or sideboard. लहान हालविता येणारें कपाट.

Chignon', *n.* (shĭnŏn', शिन्यॉ'न्)—a mass of hair worn by a woman at the back of the head. डोक्याच्या पाठीमागच्या बाजूला ठेविलेला केसांचा झुबका.

Chĭg'oe, *n.* (चि'गो)—a species of flea of the West Indies and South America (burrowing into skin). एक जातीचें पिसू.

Chil'blain, *n.* (चि'ल्ब्लेन्)—itching sore on hand, foot, ear or nose (from exposure to cold). थंडीनें आंग फुटणें, जाळवात, थंडीची भेग.

Child, *n.* (चाइल्ड्)—(*pl.* children) a young human being; descendant or follower or product of. मूल; वंशज, अनुयायी किंवा उत्पत्ति. Child's play, बालक्रीडा, अगदीं साधी गोष्ट. *With child*, pregnant. गरोदर.

Child'-bed, Child-birth, *nn.* (चा'इल्ड्-बेड्, चा'इल्ड्-बर्थ्)—parturition, travail, labour. बाळंतपण, प्रसूति.

Chil'dermas, *n.* (चि'ल्डर्मस्)—the festival of Holy Innocents, 28th December. २८ डिसेंबरला होणारा एक ख्रिस्चन सण

Child'hood, *n.* (चा'इल्ड्-हुड्)—the state or period of being a child. बालपण, बाल्यावस्था. *Second childhood*, dotage. म्हातारचळ, साठीबुध्दी.

Child'ish, *a.* (चा'इल्डिश्)—of or like a child, improper for a grown-up person. मुलाचें, पोरकट. Childishly, *adv.*; Childishness, *n.*

Child'less, *a.* (चाइ'ल्ड्-लेस्)—having no child. मूल नसलेला, संततिहीन. Childlessness, *n.*

Child'like, *a.* (चा'इल्ड्-लाइक्)—innocent, frank, simple. निरपराधी, मोकळ्या मनाचा, सरळ, लेंकुरबुद्धीचा.

Chill, *n.* (चिल्)—unpleasant coldness of air. सरदी. *a.* lacking warmth. शीतल, थंड. *v. t. & i.* to make or become cold, to depress, to dispirit. थंड करणें किंवा विमनस्क करणें, हिरमोड करणें, नाउमेद करणें. *To take chill off water* or *claret*, to warm slightly. थंडीचा कांटा मोडेसा करणें, किंचित् ऊन करणें. *To cast a chill* (*i. e.* depressing influence) *over*, हिरमोड करणें, भग्नोत्साह करणें.

Chill'i, *n.* (चि'लि)—a fruit (usually red) with a very hot taste. मिरची.

Chill'y, *a.* (चि'लि)—rather cold, sensitive to cold; cold-mannered. थंडावलेला, थंड; गैरशिस्त, असभ्य.

Chime, *n.* (चाइम्)—a set of attuned bells; succession of notes given by them. घंटांचा गजर; स्वरसंयोग. *v. i. & t.* to ring chimes on bells; to agree, to fall in with; to show hour by chiming. ताल मिळणें; जुळणें, मेळ बसणें; घंटा वाजवून वेळ दाखविणें.

Chimer'a, Chimaer'a, *n.* (काइमि'अरा, किमि'अरा)—a monster with lion's head, goat's body and serpent's tail and which breathed smoke; a bogy; a wild impossible scheme or fancy. सिंहासारखें तोंड, बोकडासारखें धड व सर्पासारखें शेंपूट असलेला तोंडांतून धूर येत असलेला (ग्रीक पुराणांत वर्णिलेला) राक्षस; काल्पनिक राक्षस; असंभव कल्पना.

Chimĕ'rical, *a.* (किमे'रिकल्)—imaginary, fanciful. काल्पनिक.

Chĭm'ney, *n.* (चि'म्-नि)—a structure by which smoke or steam is carried off; a glass tube protecting lamp-flame; a narrow crack in a mountain side by which cliff may be climbed. धुराडें; कांचेची नळी, चिमणी; पर्वतांतील अरुंद चीर किंवा तडा. *Chimney-sweeper*, one who sweeps chimneys. धुराडीं झाडणारा.

Chĭmpănzee', *n.* (चिम्-पॅन्झी')—An African ape resembling man, a large monkey-like creature. एक चिंपॅन्झी नांवाचा वानरासारखा प्राणी.

Chĭn, *n.* (चिन्)—front of the lower jaw, part of the face below the mouth. हनवटी, हनुवटी. *Up to the chin, Chin-deep*, deeply immersed. खोलवर बुडालेला.

Chī'na, *n.* (चा'इना)—ware made of china clay, porcelain. चिनीमातीचीं भांडीं. China-clay, चिनी माती.

Chĭnchill'a, *n.* (चिन्-चि'ला)—a grey fur. करड्या रंगाची लोंकर.

Chĭn'-chĭn, *int.* (चि'न्-चिन्)—a word of greeting and farewell. स्वागत करण्याच्या किंवा निरोप घेण्याचे वेळीं योजिला जाणारा शब्द.

Chīne, *n.* (चाइन्)—a deep narrow ravine; the backbone; the joint of meat from the backbone; a hill-ridge. खोल अरुंद दरी; पाठीचा कणा; जेवणाकरितां शिजविलेली जनावराची पाठ; टेंकडीचा माथा.

Chīnēse', *a.* (चाइनी'झ्)—of China. चीन देशाचा. *n.* (*Pl.* same) Chinese language; a native of China. चिनी भाषा; चीन देशाचा मनुष्य. *Chinese lantern*, a folding lantern of coloured paper. रंगीत कागदाचा घडीचा कंदील. Chīnee', *n.* (*Sl.*) a Chinaman. चिनी मनुष्य.

Chĭnk, *n.* (चिंक्)—a clinking sound; a narrow slit, a peephole; (sl.) a coin. छण छण आवाज; चीर, चोरखिडकी; नाणें. *v. i. & t.* to emit a chink; to shake coins together with chink. भेग पडणें; छणछण आवाज करणें. *Chink*, *n.* (Sl.)—a Chinaman. चिनी मनुष्य.

Chĭntz, *n.* (चिन्ट्झ्)—a colour-printed glazed cotton cloth. रंगीत छापील कापड, चीट.

Chĭp, *v. t. & i.* (चिप्)—to break the edge of, to cut into small pieces; to suffer chipping. ढलपे काढणें; तुकडे करणें. *n.* a piece cut off; chipped place. तुकडा, ढलपा; तासलेली जागा. *Chips*, *pl.* (colloq.) potatoes cut small and

fried. तळून काढलेले बटाट्यांचे लहान लहान कातळे. *Dry as a chip*, flavourless, uninteresting. बेचव, नीरस, निःस्वाद. *A chip of the old block*, a son resembling father. जुन्या खोडाची डलपी, बापासारखा बेटा. Cf. सिंहाचा बच्चा. *To chip in*, to interrupt. अडथळा करणें.

Chĭp'muck, Chĭp'munk, *n.* (चि'प्-मक्, चि'प्-मंक्)—a North American squirrel. उत्तर अमेरिकेंतील एक जातीची खार.

Chĭpp'endāle, *n.* (चि'पेन्डेल्)—a light style of drawing-room furniture. दिवाणखान्यांतील एक जातीचें हलकें लांकडी सामान.

Chĭpp'ȳ, *a.* (चि'पि)—dry, uninteresting; (*sl.*) parched; irritable. कोरडा, सुका, नीरस; सुकलेला; चिडखोर.

Chĭrŏmăncȳ, *n.* (k-, का'इरोमॅन्सि)—foretelling by inspecting the hands. हातावरून भविष्य सांगणें, हस्तसामुद्रिक. [Gr. *cheir*, the hand, & *mantein*, to foretell]

Chirŏp'odȳ, *n.* (k-, काइरॉ'पॉडि)—treatment of hands, feet, nails, corns, etc. हात, पाय, नखें वगैरेवर उपचार. Chiropodist, *n.* हातपाय वगैरेंचा वैद्य. [Gr. *cheir*, Sk. कर, the hand, & *pous*, *podos*, Sk. पद्, the foot]

Chirp, *n.* (चर्प्)—a short sharp note as of a sparrow. चिंव चिंव करणें. *v. i.* & *t.* to emit chirps; to talk merrily, to speak feebly. चिंव चिंव करणें; मजेनें बोलणें, हळू बोलणें.

Chirp'ȳ, *a.* (च'र्पि)—lively, cheerful. आनंदी, उल्हासी. Chirpiness, *n.*

Chĭ'rrŭp, *n.* (चि'रप्)—a chirping sound. चिंव चिंव आवाज.

Chis'el, *n.* (चि'झल्)—an edged tool for cutting. चिंधणें. *v. i.* to cut with a chisel; to defraud, to treat unfairly. चिंधण्यानें कापणें, तासणें; फसविणें.

Chĭt, *n.* (चिट्)—a young child, a little woman. बच्चा; लहान स्त्री, पोर.

Chĭt, Chĭtt'ȳ, *nn.* (चिट्, चि'टि)—a note or written paper (esp. character given to a servant). [Hind. चिठ्ठी, or Sk. चिन्ह, *mark*]

Chĭt'chăt, *n.* (चि'ट्-चॅट्)—a small talk, light conversation, gossip. गप्पा, वार्ता.

Chĭtt'erlings, *n. pl.* (चि'टर्-लिंग्झ्)—smaller intestines of beasts esp. as cooked for food. डुकराच्या वगैरे पोटांतील लहान आंतडें.

Chĭ'valrous, *a.* (शि'व्हल्रस्)—characteristic of an ideal knight, gallant, honourable, courteous, disinterested, disinterestedly devoted to the cause of the weak or oppressed, valorous or generous to foes. अनुकरणीय अशा सरदाराला शोभेल असें, सन्माननीय, स्वार्थ नसतांना आर्तत्राणाकरितां झटणारे, शत्रूशींहि उदार. (Also, Chivalric, *n.*)

Chĭv'alrȳ, *n.* (शि'व्हल्-रि)—medieval knightly system; inclination to defend weaker party; knights or gallant gentlemen. मध्ययुगांतील सरदारी पद्धत; अशक्तांना मदत करण्याची बुद्धि, औदार्य, दाक्षिण्य; सरदार लोक.

Chive, *n.* (चाइव्ह्)—a herb of leak kind. एक प्रकारची वनस्पति.

Chloral, *n.* (kl-, क्लोरल्)—a hypnotic and anaesthetic, a substance used to induce sleep. झुंगी आणणारें औषध.

Chlor'īde, *n.* (kl-, क्लो'राइड्)—a compound of chlorine. क्लोरीनचें मिश्रण.

Chlor'īne, *n.* (kl-, -ēn, क्लो'रीन्)—a yellow-green gas which makes things lose their colour and become white. एक हिरवट पिवळ्या रंगाचा गॅस, क्लोरीन.

Chlor'odȳne, *n.* (kl-, क्लो'रोडाइन्)—a patent anodyne. एक पोटदुखीवर व झुलाबावर औषध.

Chlŏ'rofŏrm, *n.* (क्लॉ'रो-फॉर्म्)—a thin liquid whose inhaled vapour produces insensibility. बेशुद्धि आणणारें हुंगण्याचें औषध.

Chlŏr'oformĭst, *n.* (क्लो'रोफॉर्मिस्ट्)—a surgeon's assistant giving chloroform. क्लोरोफॉर्म देणारा शस्त्रवैद्याचा मदतनीस.

Chlor'ophȳll, *n.* (kl-, क्लॉ'रॅफिल्)—the colouring matter of the green parts of plants. पानांतील हिरव्या रंगाचें द्रव्य. [Gr. *chloros*, light green, & *phyllon*, a leaf]

Chlorō'sĭs, *n.* (क्लोरो'सिस्)—an anaemic disease in young women, green-sickness. हरितरोग, पित्तपंडु, नीरक्तता.

Chŏck, *n.* (चॉक्)—a block of wood, a wedge, a wooden block used to prevent things from rolling. पाचरवजा ठोकळा, पाचर, खोबण. *v. t.* to make fast with chocks. पाचरीनें मजबूत करणें, गच्च बसविणें.

Chock'-full, *adv.* (चॉ'क्-फुल्)—stuffed. पूर्ण भरलेला, गच्च बसलेला.

Chŏ'colāte, *n.* (चॉ'को-लेट्)—paste or cake of ground cacao seed; a sweet hot drink; dark brown colour. एक प्रकारचें खाद्य, चॉकोलेट; एक गोड गरम पेय; काळासुरा; रंग. *a.* chocolate-coloured. काळ्यासुऱ्या रंगाचा, धुपेली वांगुस रंगाचा.

Chŏĭce, *n.* (चॉइस्)—an act of choosing; preference; variety to choose from; a thing chosen. निवडणें; पसंती; निवडावयाच्या वस्तु; निवडलेली वस्तु. *a.* of picked quality; exquisite. निवडक, शेलका; उत्कृष्ट, उत्तम, सरस. *To make choice of*, to select. निवड

करणें, पसंत करणें. *To take one's choice*, to decide between possibilities. आपल्या आवडीप्रमाणें निवड करणें. *For choice*, by preference, if one must select, (स्वतःवर सोपविलें असतांना) पसंतीनें. *Hobson's choice*, to take *or* leave the one offer. ह्या नाहीं तर सोडून द्या असें म्हणून जुलमानें करावयास लावलेली निवड. *At choice*, at pleasure. मनाला वाटेल तर, इच्छेप्रमाणें.

Choir, *n.* (क्वायर्)—an organized band of singers; the chancel of a church; birds singing. उपासनागीत म्हणणारा गायकसमूह; चर्चमधील पूर्वेकडचा भाग; गाणारे पक्षी. *v. t. & i.* to sing in chorus. एकत्र गाणें.

Chōke, *v. t. & i.* (चोक्)—to stop the breath of, to suffocate, to block up a passage; to have a coughing-fit. श्वास थांबवणें, गुदमरणें, मार्ग बंद करणें; कफ दाटणें, घुटमळणें.

Chōke'cherry, *n.* (चो'क्-चेरि)—an astringent wild cherry. तुरट रानटी चेरी नांवाचें झाड व फळ.

Choke'-dămp, *n.* (चो'क्-डॅम्प्)—a heavy gas essentially carbon dioxide (in mines, wells, etc.). कोळशांच्या खाणींत सांपडणारा विषारी वायु.

Chō'ker, *n.* (चो'कर्)—that which chokes; a white tie; a high stand-up collar. श्वास कोंडणारा; पांढरी गळेटी; उंच ताठ कॉलर.

Chō'kȳ, *n.* (चो'कि)—a custom or toll station; a lock-up. जकात नाकें; चौकी, बंदीखाना.

Chŏl'er, *n.* (कॉ'लर्)—bile; anger; irascibility. पित्त; राग, क्रोध; तमोगुण, पित्तस्वभाव.

Chŏl'ĕra, *n.* (कॉ'लेरा)—bilious disorder with diarrhoea and vomiting. जरीमरी, पटकी, विषूचिका, कॉलेरा.

Chŏl'ĕrĭc, *a.* (कॉ'ले-रिक्)—irascible, angry. रागीट, चिडखोर.

Choōse, *v. t. & i.* (चूझ्)—to make a choice. of, to select out of a greater number, to decide as between alternatives; to be pleased. निवडणें, पसंत करणें, पसंतीस येणें; आवडणें. *To pick and choose*, to select carefully, to be fastidious. काळजीपूर्वक निवडणें. *There is nothing to choose between them*, they are equal. त्यांच्यांत निवडण्यासारखें कांहींच नाहीं, ते दोन्ही सारखेच आहेत.

Chŏp, *v. t. & i.* (चॉप्)—to cut with an axe or a heavy edge-tool; to mince; to cut words short; to swing this way and that. तोडणें; बारीक बारीक तुकडे करणें; भाषण मध्येंच थांबवणें; हेलकावे खाणें. *n.* a chopping stroke; a small cut-off portion. घाव; कापलेला लहानसा तुकडा. *To chop up*, to cut into small pieces. बारीक बारीक तुकडे करणें. *To chop in*, to intervene in talk. बोलतांना मध्येंच तोंड घालणें. *To chop back*, to reverse one's direction suddenly, to double. गेल्या रस्त्यानें एकदम मागें वळणें. *To chop up* or *out*, to come to surface. पृष्ठभागाला येणें. *Chopping sea*, sea with jerky motion. क्षुब्ध झालेला समुद्र. *Chop-house*, a cheap restaurant. स्वस्त असें फराळाचें दुकान. *To chop round, To chop about*, (esp. of wind) to change direction suddenly. एकाएकीं दिशा बदलणें. *To chop logic*, to bandy arguments. हमरीतुमरीचा वादविवाद करणें.

Chŏp, *n.* =Chap.

Chŏp, *n.* (चॉप्)—(India, China) seal, license, passport, permit; (China) trade-mark, a brand of goods, official impress or stamp. छाप, परवाना; व्यापाराची खूण, विशिष्ट शिक्का.

Chŏpp'er, *n.* (चॉ'पर्)—a large bladed short axe; a cleaver. लहान कुऱ्हाड; कापणी, तासणी, (खाटकाची) सुरी.

Chŏp'stĭck, *n.* (चॉ'प्-स्टिक्)—(*pl.*) sticks used by the Chinese as fork in eating. चिनी लोकांकडून जेवतांना वापरले जाणारे हस्तिदंती कांटे.

Chor'al, *a.* (k-, को'रल्)—of or sung by a choir; of or with chorus. गाणाऱ्या मंडळींचा; एकत्र गाण्यासह.

Chorăle', Chorăl', *n.* (कोरा'ल्)—a simple tune or hymn. साधा सूर, साधें गाणें, भजनगीत.

Chor'alĭst, *n.* (कॉ'रलिस्ट्)—a choral singer. भजनगीत गाणारा.

Chŏrd, *n.* (कॉर्ड्)—a string (of harp, etc.); a string of the emotions; the straight line joining ends of an arc; harmonious combination of simultaneous notes. तंतु, तार; भावनातंतु; (भूमितींतील) ज्या, चापकर्ण; स्वरमेळ, तालसूर. *To touch the right chord*, to appeal skilfully to the emotion. भावनेला बरोबर स्पर्श करणें.

Chore, *n.* (चोअर्)—an odd job; (*usu. pl.*) daily light work (of house, farm, etc.). किरकोळ काम; दररोजचें साधें काम. *v. i.* to do odd jobs, to chare. किरकोळ काम करणें, दररोजचें काम करणें.

Chŏ'rĭster, *n.* (कॉ'रिस्टर्)—a member of a choir; a choir-boy. गायकगणांतला एक गाणारा; बरोबर गाणारा, सहगायक.

Chor'tle, *v. i.* (चॉ'र्टल्)—to chuckle loudly, to laugh by making a peculiar noise in the throat and through the nose. गालांतल्या गालांत किंवा तोंडांतल्या तोंडांत हंसणें.

Chŏr'ŭs, *n.* (कॉ'रस्)—a band of singers, a choir; a thing sung or said by many at once; the refrain of a song. गाणाऱ्यांची मंडळी; सर्वांनीं एकसुरांत म्हटलेलें गाणें वगैरे; ध्रुवद्, ध्रुवपद्, आंकणकडवें. *v. t.* to say or sing in chorus. एकसुरांत गाणें, एकाच सुरांत म्हणणें.

Chose, Chosen, *pa. t.* & *p. p.* of Choose.

Chough, *n.* (चफ्)—a red-legged crow. एक लाल पाय असलेला कावळा.

Chouse, *v. t.* & *n.* (चाउझ्)—to swindle, to trick. फसवणें, ठकवणें, फसवणूक.

Chow'der, *n.* (चा'उडर्)—fish and vegetables cooked together in milk. दुधांत एकेठिकाणीं शिजवलेले मासे व भाजी.

Chrĭ'sm, *n.* (क्रि'झम्)—consecrated oil. संस्कारानें पवित्र केलेलें तेल.

Christ, *n.* (क्राइस्ट्)—the Anointed, the Messiah. येशू ख्रिस्त.

Christ'en, *v. t.* (क्रि'सन्)—to baptize and give a name to a child. बाप्तिस्मा देऊन मुलाचें नांव ठेवणें, ख्रिस्ती बनविणें.

Chrĭ'stening, *n.* (क्रि'स-निंग्)—the ceremony of baptism. बाप्तिस्मा देण्याचा विधि, ख्रिश्चन करण्याचा विधि.

Chrĭ'stendom, *n.* (क्रि'सन्-डम्)—Christian countries as a whole. एकंदर सर्व ख्रिस्ती देश.

Chrĭ'stian, *a.* (क्रि'स्टिअन्)—professing Christian religion; of Christ or his teaching; civilized. ख्रिस्तीधर्मानुयायी; येशू ख्रिस्ताचा; सुधारलेला. *n.* a professor of the religion of Christ; civilized being; a decent person. ख्रिस्ती, ख्रिस्ताचा अनुयायी; सुधारलेला इसम; व्यवस्थित मनुष्य. *Christian era*, the era counted from the supposed year of Christ's birth. ख्रिस्ती शक, इसवी सन. *Christian name*, the name given at christening. बाप्तिस्मा देतांना ठेवलेलें नांव. *Christian Science*, the system by which christian faith is alleged to overcome disease etc. without medical treatment. धर्मश्रद्धेनें औषधोपचाराशिवाय रोग बरे करण्याची पद्धति. *Christian Scientist*, *n.*

Chrĭstiăn'ĭty, *n.* (क्रिस्टिॲ'नि-टि)—Christian faith, quality or character. ख्रिस्तीधर्म, ख्रिस्तीधर्ममत.

Chrĭs'tianize, *v.t.* (-cha-, क्रि'सचनाइझ्)—to make Christian. ख्रिस्ती करणें, ख्रिस्ती धर्मांत आणणें.

Christ'like, *a.* (क्राइ'स्ट्-लाइक्)—partaking of the nature and attributes of Christ. ख्राइस्टचा स्वभाव व गुण असलेला.

Chrĭst'mas, *n.* (क्रि'स्-मस्)—Christmas-day or Christmas-tide. नाताळ (२४ डिसेंबर ते १ जानेवारी). *Christmas-box*, a small box given as a present at Christmas. ख्रिस्मसच्या वेळीं बक्षीस म्हणून दिलेली लहान पेटी. *Christmas card*, a card that is posted at Christmas as greeting of good will. नाताळांत मित्रानें मित्राला पाठविलेलें कार्ड किंवा पत्र. *Christmas Day*, the day of festival of Christ's birth, 25th Dec. नाताळ, येशू ख्रिस्ताच्या जन्मोत्सवाचा पहिला दिवस, २५ डिसेंबर. *Christmas rose*, a white-flowered winter-blossoming hellebore. एका जातीचें पांढरीं फुलें असलेलें फुलझाड. *Christmas-tide*, the holiday season from 24th Dec. to 1st Jan. नाताळ २४ डिसेंबर ते १ जानेवारी. *Christmas-tree*, a small tree set up in a room and hung with candles and presents. ज्या फांदीला नाताळांतील देणग्या व मेणबत्त्या टांगतात अशी खोलींत उभी केलेली लहान झाडाची फांदी. *Christmasy*, *a.* of festive appearance. उत्सवासारखा दिसणारा.

Chromăt'ic, *a.* (क्रोमॅ'टिक्)—of colours, in colours. रंगाचा, रंगांत असलेला. [Gr. *chroma*, colour]

Chromăt'ics, *n.* (क्रोमॅ'टिक्स्)—the science of colour. रंगाचें शास्त्र.

Chrōme, *n.* (क्रोम्)—a pigment got from compounds of chromium. क्रोमिअम धातूच्या मिश्रणापासून झालेला रंग.

Chrō'mium, *n.* (क्रो'मिअम्)—a metal. एका जातीची धातु.

Chrōmolĭth'ogrăph, Chrō'mō, *nn.* (क्रोमोलि'थोग्राफ्, क्रो'मो)—a picture lithographed in colours. शिळेवरील रंगीबेरंगी काढलेलें चित्र.

Chrŏ'nic, *a.* (क्रॉ'निक्)—constantly present or recurring; of a long standing, confirmed, permanent; (vul.) bad, intense. नेहमीं असणारा किंवा उद्भवणारा; बद्धमूल, जुनाट, कायमचा; वाईट, फारच जास्त झालेला.

Chrŏn'icle, *n.* (क्रॉ'नि-कल्)—a register of events in order of time. कालक्रमवृत्तान्त, बखर. *v. t.* to enter in chronicle or diary, to record in a newspaper. बखरींत किंवा डायरींत लिहून ठेवणें; वर्तमानपत्रांत नमूद करणें. Chronicler, *n.*

Chrŏnŏlŏ'gical, *a.* (क्रॉ-नॉ-लॉ'जि-कल्)—according to the sequence or order of time. कालक्रमानुसार.

Chrŏnŏl'ŏgy, *n.* (क्रॉ-नॉ-लॉ'जि)—the science of computing dates; the arrangement or table of events with dates for historic purposes. कालगणनविद्या; शकानुक्रम.

Chrŏnŏm'eter, *n.* (क्रॉ-नॉ'मि-टर्)—a time-measuring instrument. काल समजण्याचें साधन, घटीयंत्र, कालमापकयंत्र.

Chrўs'alĭs, *n.* (क्रि'स-लिस्)—the form taken by an insect before becoming winged. किड्यांची रूपांतरपूर्वावस्था.

Chrўsăn'thĕmum, *n.* (क्रिसॅ'न्-थिमम्)—a garden plant flowering in autumn. शरद् ऋतूंत फुलणारें एक फुलझाड.

Chrўsobĕ'rўl, Chrўs'olīte, Chrўs'oprāse, *nn.* (क्रिसॉबे'रिल्, क्रि'सोलाइट्, क्रि'सोप्रेझ्)—precious stones of different colours. निरनिराळ्या रंगाचे मौल्यवान् दगड.

Chŭb, *n.* (चब्)—a thick river fish. नदींतला एक मोठा मासा.

Chŭbb'ў, *a.* (च'बि)—plump, round-faced, having a large fat face. गबदुल, वाटोळ्या तोंडाचा.

Chŭck, *v. i.* & *t.* (चक्)—to utter the call of fowls; to touch gently (under the chin); to fling, to throw carelessly. खुटखुटणें, खुटखुट करणें; खालून आघात करून हनुवटी उचलणें; एकदम निष्काळजीपणानें फेंकणें, टाकणें. *To give one the chuck*, to dismiss. काढून टाकणें. *To chuck away*, to waste, to lose. व्यर्थ घालवणें, गमावणें. *To chuck up the sponge*, to give up contest or attempt. स्पर्धा किंवा प्रयत्न सोडून देणें. *To chuck up*, to abandon in disgust. तिटकारा येऊन सोडून देणें. *To chuck out*, to expel (a troublesome person etc.) एखाद्याला घालवून देणें. *Chuck it*, cease. थांबवा, बंद करा. *Chuck-farthing*, a kind of quoit game with coins. एक जातीचा बांगडीचा खेळ. *A chucker-out*, one who expels (a troublesome person) from meeting etc. एखाद्या त्रासदायक माणसाला घालवून देणारा.

Chuck, *n.* (चक्)—an instrument which holds a piece of wood or metal while it is turned round and round for cutting into shape. पकडणारा चंद्रक, कातकामाच्या सांच्यावरील थाळी. (*usu. voc.*) darling. लाडकें मूल, बच्चा. (sl.) food. अन्न. *int.* a word calling fowls or urging a horse. चकचक, चकचक (असा आवाज करणें).

Chuck'er, *n.* (च'कर्)—each of the periods into which the game of polo is divided. पोलो खेळाचा प्रत्येक विभाग. (Cf. Mar. चक्कर.)

Chŭc'kle, *n.* (च'कल्)—a quiet laugh; a hen's call. गालांतल्या गालांत हंसणें; कोंबडीचा शब्द करणें. (Also *v. i.*)

Chŭc'kle-head, *n.* (च'कल्-हेड्)—a dolt, a stupid fellow. मूर्ख, अक्कलशून्य.

Chu'ckle-headed, *a.* (च'कल्-हेडेड्)—doltish, stupid. मूर्ख, अडाणी.

Chŭm, *n.* (चम्)—a familiar friend. परम स्नेही, जिवलग मित्र. *v. i.* To be intimate with, to occupy same rooms together. सख्य असणें, एकाच खोलींत राहणें. *New chum*, a recent immigrant. देश सोडून नुकताच आलेला रहिवासी.

Chŭmm'ў, *n.* (च'मि)—a type of car-body. गाडीची एक प्रकारची सपाट बैठक.

Chŭmp, *n.* (चम्प्)—(colloq.) a lump of wood; the thick end of a loin of mutton; (sl.) head; blockhead. लाकडाचा ठोकळा, ओंढा; जडबुडखा; डोकें; मद्द, डोणपा. *Off one's chump*, mad with excitement etc. डोकें ठिकाणावर नसलेला.

Chŭnk, *n.* (चंक्)—(colloq.) a thick lump cut off (wood, bread, cheese, etc.). कापलेला जाड भाग.

Chŭrch, *n.* (चर्च्)—a building for Christian worship; a collective body of Christians; the body adhering to one particular form of worship; the clerical profession. ख्रिस्ती देऊळ; ख्रिस्ती समाज; एकाच धर्माची मंडळी; ख्रिस्ती उपाध्येगिरी *v. t.* to hold church service over a woman after childbirth. प्रसूतीनंतर स्त्रीबद्दल प्रार्थना करणें, बाळंतपणानंतर देवळांत जाणें. *Churchman, Churchwoman*, a member of the established church. अँग्लिकन चर्चचा अनुयायी किंवा सभासद. *Churchward'en*, (चर्च-वॉ'र्डन्) =an elected lay representative of a parish; a long clay smoking pipe. देवालयाचा एक निवडलेला प्रतिनिधि; एक लांब चिकणमातीचा तंबाखू ओढण्याचा पाइप.

Chŭrch'yărd, *n.* (च'र्च्-यार्ड्)—the enclosed ground round a church. चर्चच्या भोंवतालची प्रेतभूमि, स्मशान. Fat churchyard=many deaths. पुष्कळ मृत्यु.

Chŭrl, *n.* (चर्ल्)—an ill-bred fellow; a niggard; (arch.) a peasant, a low-born person. अशिक्षित मनुष्य, गांवढळ; कवडीचुंबक, कंजूष, चिक्कू; शेतकरी, हलक्या कुळांत जन्मलेला, अकुलीन.

Chŭrl'ĭsh, *a.* (च'र्लिश्)—surly, rude. खट्याळ, उद्धट.

Chŭrn, *n.* (चर्न्)—a butter-making machine; a large milk-can. माथणी, रवी; मोठें दुधाचें भांडें. *v. i.* & *t.* to make butter by agitating in a churn; to stir to and fro. लोणी काढणें, घुसळणें; जोरानें इकडे तिकडे हालवणें. *A churning*, amount of butter made at once. एकाच वेळीं निघालेलें लोणी.

Chute, *n.* (shōōt, शूट्)—a slide for conveying things to a lower level; rapid smooth fall

of water over a slope. वरहु खालच्या सपाटीवर आणण्याकरितां असलेली एक सरकती फळी; घसरणीवरून वाहणारा जलद पाण्याचा झोत.

Chyle, *n.* (kil, काइल्)—a milky fluid into which chyme is converted. अन्नरस, पोटांत पचलेल्या अन्नाचें आनांत रूपांतर.

Chyme, *n.* (kīm, काइम्)—food converted by gastric secretion into acid pulp. अर्धपक्व अन्न, आमरस.

Cica'da, *n.* (सिके'डा)—a tree-insect which makes a loud noise. झाडांत मोठा आवाज करणारा एक कृमि.

Cic'ătrice, *n.* (सि'कॅ-ट्रिस्)—the scar of a healed wound, a mark remaining after a wound. व्रण, चट्टा, क्षतचिन्ह.

Cic'atrize, *v. i.* & *t.* (सि'क-ट्राइझ्)—to skin over, to heal up. जखम भरून येणें, खपली धरेसा करणें. Cicatrization, *n.*

Ci'cely, *n.* (सि'सेलि)—kinds of flowering plant. कांहीं जातीचीं फुलझाडें.

Cicerō'nē, *n.* (chicha-, चिचरो'नि)—a guide who shows the interesting parts of a building or a city. एखाद्या इमारतीचे किंवा शहराचे विशेष मनोरंजक भाग दाखविणारा मार्गदर्शक.

Cicerō'nian, *a.* (सिसेरो निअन्)—pure as Cicero's Latin. सिसरोच्या भाषासरणीसारखा शुद्ध. *n.* an expert in Cicero. सिसरोच्या भाषेंत निष्णात.

Ci'der, *n.* (सा'इडर्)—fermented drink from apple-juice. ॲपल नांवाच्या फळाचा खतखतवलेला रस, दारू.

Cigăr', *n.* (सिगा'र्)—a small tobacco-leaf rolled into cylinder. वाटोळें गुंडाळलेलें तंबाखूचें पान, सिगार.

Cigarĕtte', *n.* (सि-ग-रे'ट्)—cut tobacco rolled in paper. कागदाची विलायती तंबाखूची विडी, सिगारेट.

Cil'ia, *n. pl.* (सि'लिआ)—eye-lashes; a fringe on a leaf or an insect's wing. पापण्यांचे केंस; पानावरील किंवा पंखावरील पापणीच्या केंसासारखी आकृति. *Ciliary*, *a.* (सि'ल्यरि)—पापणीच्या केंसासंबंधीं.

Cimmĕ'rian, *a.* (सिमे'रिअन्)—extremely dark, thick, gloomy. अत्यंत अंधारमय, गाढ किंवा दाट (अंधार).

Cinch, *n.* & *v. t.* (s-, सिन्च्)—a sure hold, advantage, easy job; to fasten firmly, to girth tightly up. खात्रीची पकड, फायदा, सोपें काम; घट्ट धरणें, घट्ट आवळून धरणें.

Cinchō'na, *n.* (-k-, सिंको'ना)—the tree from which quinine (a bitter medicine used for fever) is obtained. ज्या झाडापासून क्विनीन तयार होतें तें झाड, सिंकोनाचें झाड.

Cinc'ture, *n.* (सिं'क्चर्)—a band worn round the middle of the body, a girdle, belt, fillet. कमरपट्टा, पट्टा.

Cin'der, *n.* (सि'न्डर्)—slag; piece of coal that has ceased to burn. गाळ, रेंगाड; न जळलेला कोळसा. *Hot-cinders*, फोपेटा, फुफाटा. Cindery, *a.*

Cinderĕll'a dănce, *n.* (सिन्डरे'ला डान्स्)—a gathering for dancing which ends at 12 o'clock at night. रात्रीं १२ वाजतां संपणारा नाच.

Cin'der-păth, *n.* (सि'न्डर्-पाथ्)—a running track. धांवता मार्ग.

Cin'ĕma, *n.* (सि'नि-मा)—cinematograph theatre. सिनेमाचें थिएटर. *The cinema*, cinematography, moving pictures. हालतीं चित्रें, चलचित्रपट.

Cinĕmat'ŏgrăph, *n.* (सि-नि-मॅ'टो-ग्राफ्)—an apparatus producing pictures of motion. हालतीं चित्रें दाखविणारें यंत्र. Cinematographic, *a.*; Cinematography, *n.*

Cin'ĕphōne, *n.* (सि'निफोन्)—a gramophone fitted with some device to synchronize cinematograph with the sounds produced by it. एकाच वेळीं सिनेमाच्या आवाजाबरोबर आवाज असणारा ग्रामोफोन.

Cinerăr'ia, *n.* (सिनरे'रिआ)—kinds of flowering plant with ashy down on leaves. एका जातीचीं फुलझाडें.

Cin'erary, *a.* (सि'नररि)—of ashes (esp. of urn holding cremated ashes). (प्रेत) भस्माचा, भस्म किंवा राख ठेवण्याचा.

Cingalese', Sinhalese, *n.* (सिंगली'झ्, सिंहलीझ्)—of Ceylon. सीलोनचा, सिंहलद्वीपांतील. *n.* a native or language of Ceylon. सीलोनचा रहिवासी, सीलोनमधील लोकांची भाषा.

Cinn'ăbar, *n.* (सिं'नबार्)—red mercuric sulphide, vermillion. रक्तपारद, लाल पारा.

Cinn'ămon, *n.* (सि'नॅ-मन्)—an East Indian tree, a brown powder made from the inner covering of the tree used to give a yellow colour and special taste; yellowish-brown colour. दालचिनी, दालचिनीची पूड; दालचिनीच्या रंगाचा, तांबूस पिंगट रंग.

Cinque, *n.* (सिंक्)—the five at dice and cards पंजा, (इस्पिकचा) पंजा, पांच.

Cinque'foil, *n.* (सिंक्-फॉइल्)—a plant with five-lobed leaves. पांच कमानींचें फूल.

Ci'pher, *n.* (सा'इ-फर्)—arithmetical symbol 0; secret writing; a monogram; a person or thing of no importance. शून्य, शून्य

सांकेतिक लिपि; नांवाचीं जोडलेलीं आद्याक्षरें; कवडी मोलाचा मनुष्य किंवा जिन्नस. *v. i. & t.* to do sums, to work out; to put into cipher writing. हिशेब करणें, आंकडे मोडणें, उदाहरणें करणें; सांकेतिक लिपींत लिहिणें.

Cir'cė, *n.* (स'र्सि)—an enchantress, a temptress. मोह किंवा भुरळ घालणारी, मोहिनी.

Circē'an, *a.* (सर्सि'अन्)—pertaining to Circe, enchanting, tempting. सर्सीसंबंधीं, मोह किंवा जादू घालणारी.

Cir'cle, *n.* (स'र्कल्)—a perfectly round plane figure; a roundish enclosure, a ring; a set or coterie or class; a period or cycle. वर्तुळ; मंडळ; मंडळी; नियमित काल. *v. i. & t.* to move in a circle, to revolve; to surround. वर्तुळांत फिरणें, गिरकी मारणें, गरगर फिरणें; घेरणें.

Circ'lėt, *n.* (स'र्क्लिट्)—a small circle; a circular band as ornament for the head, a chaplet. लहान वर्तुळ; भूषण म्हणून बांधण्याचा डोक्याचा वर्तुलाकृति पट्टा, कडें.

Circ uit, *n.* (स'र्किट्)—circular or circuitous course. फेरा, फेरी.

Circū'itous, *a.* (सर्क्यू'इटस्)—going in a circuit, round-about, indirect. फेऱ्याचा, वांकडा, म्राविडी प्राणायामाचा.

Circ'ūlar, *a.* (स'र्क्यु-लर्)—having the shape of a circle; moving in a circle. वर्तुलाकृति; चक्राप्रमाणें फिरणारा. *n.* a printed letter or notice sent round to many people. जाहिरात, प्रसिद्धिपत्रक, सर्क्युलर. Circularize, *v.t.* to send a circular to. नोटिस किंवा सर्क्युलर पाठविणें.

Circ'ūlāte, *v. i. & t.* (स'र्क्यु-लेट्)—to go round; to send round; to give currency to. फिरणें; फिरवणें; प्रसिद्ध करणें.

Circūlā'tion, *n.* (सर्क्यु-ले'शन्)—a movement from and back to the starting-point; passing from place to place or hand to hand; current coins; the extent of sale (of newspapers, etc). परिभ्रमण; एका जागेवरून दुसऱ्या जागीं किंवा एका हातांतून दुसऱ्या हातांत जाणें; चालू नाणीं; वर्तमानपत्रें वगैरेंचें विक्रीचें प्रमाण, प्रसार, फैलाव. *Circulation of blood*, रुधिराभिसरण. Circulator, *n.* प्रसारक, प्रसार करणारा. Circulatory, *a.* सर्वांना उद्देशून लिहिलेला, अभिसरणोपयोगी.

Circŭmăm'bient, *a.* (सर्कॅमॅ'म्बि-यन्ट्)—surrounding, encompassing, being on all sides. सभोंवार असणारा, परिवेष्टक, वेढणारा.

Circumăm'būlāte, *v. t. & i.* (सर्कॅमॅ'म्ब्यु-लेट्)—to walk round, to beat about the bush. सभोंवता फिरणें, प्रदक्षिणा घालणें, वळसा मारणें.

Cir'cumcise, *v. t.* (-z, स'र्कम्साइझ्)—to cut off the foreskin of (as Jewish or Mohammedan rite, or surgically); to purify spiritually. सुंता करणें; धार्मिक रीत्या पवित्र करणें.

Circŭmci'sion, *n.* (सर्कम्सि'झन्)—Jewish religious rite or surgical operation of cutting off the foreskin. सुंता.

Circŭm'ference, *n.* (सर्कॅ'म्फ-रन्स्)—the line enclosing a circle; the distance round a thing. परिघ, घेरा, परिधि, वेढा.

Circŭmflex, *a. & n.* (स'र्कम्-फ्लेक्स्)—a mark (^) over a vowel to indicate length, etc. स्वरित चिन्ह असलेला, स्वरितचिन्ह.

Circŭm'fluent, *a.* (-ŏŏ-, सर्कॅ'म्-फ्लुयन्ट्)—flowing round, ambient. सर्व बाजूंना पसरणारा, सभोंवती वाहणारा.

Circumfūse', *v. t.* (सर्कम्-फ्यू'झ्)—to pour round; to bathe, to surround. चहूंकडे पसरणें, भोंवतीं ओतणें; सभोंवार घेणें.

Circumgȳrā'tion, *n.* (सर्कम्-जाइ-रे'शन्)—turning round, rotation, turning this way and that. सभोंवतीं फिरणें, परिभ्रमण. [L. *circum*, around, & *gyrare*, to turn]

Circumjā'cent, *a.* (सर्कम्-जे'सन्ट्)—lying round, surrounding, situated around. सभोंवती असलेला, शेजारचा. [L. *circum*, around, & *jacere*, to lie]

Circŭmlōcū'tion, *n.* (सर्कम्लो-क्यू'शन्)—a round about expression; an evasive talk. म्राविडी-प्राणायाम; चर्पटपंजरी. Circumlocutory, *a.* [L. *circum*, around, & *locutus*, to speak]

Circŭmnăv'igāte, *v. t.* (सर्कम्नॅ'व्हि-गेट्)—to sail round, to pass round by water. गलबतांतून प्रदक्षिणा घालणें. Circumnavigation, *n.* गलबतांत बसून केलेली पृथ्वीप्रदक्षिणा. Circumnavigator, *n.* [L. *circum*, around, & *navigare*, to sail]

Circumpō'lar, *a.* (सर्कम्पो'लर्)—about or near one of the earth's poles. पृथ्वीच्या ध्रुवासंबंधीं, पृथ्वीच्या ध्रुवाजवळ. [L. *circum*, around, & *polus*, pole]

Circ'ŭmscrībe, *v. t.* (स'र्कम्स्क्राइब्)—to enclose or outline; to mark or lay down the limits of; to confine. घेरणें; मर्यादा घालणें; आळा घालणें; मर्यादा करून देणें, मर्यादित करणें.

Circŭmscrip'tion, *n* —(सर्कम्स्क्रि'प्शन्)—limitation, boundary, limited district; inscription round a coin etc. हद्द, मर्यादा, नियमन, मर्यादित स्थळ; नाण्याच्या वगैरे भोंवतीं खोदणें.

Circŭmsō'lar, *a.* (सर्कम्-सो'लर्)—revolving round the sun, being near the sun. सूर्याभोंवतीं फिरणारा, सूर्याजवळ असलेला.

Circ'ŭmspĕct, *a.* (स'कॅम्स्पेक्ट्)—cautious, wary, taking everything into account. दूरदर्शी; प्रत्येक गोष्ट लक्षांत घेणारा, चौकस, सर्व बाजूंचा विचार करणारा.

Circŭmspĕc'tion, *n.* (सर्कम्-स्पे'क्शन्)—exercise of caution, thoughtfulness. सावधानता, मागची पुढची दृष्टि.

Cir'cŭmstance, (स'कॅम्स्टन्स्)—(*pl.*)all the surroundings of an act; a person's material welfare or situation; an occurrence or detail. भोंवतालची स्थिति, परिस्थिति; अवस्था, दशा; घडलेली गोष्ट, तफशील. *In or under the circumstances*, since these things are so, owing to or making allowance for the circumstances. अशी परिस्थिति असल्यामुळें, अशा परिस्थितींत. *Under no circumstances*, not whatever happens, never. कांहीं झालें तरी नाहीं. *Without circumstance*, unceremoniously. बेमुरवतपणानें. शिष्टाचार न पाळतां.

Circ'ŭmstănced, *a.* (स'कॅम्-स्टॅन्स्ट्)—in such and such circumstances. अमुक एक स्थितींत असलेला.

Circŭmstăn'tial, *a.* (सर्कम्-स्टॅ'न्शल्)—with many details; accidental, not essential; particular, minute; inferred from the circumstances of the case. विस्तृत; आगंतुक, अनावश्यक; विशेषित, सूक्ष्म; परिस्थितीवरून ताडलेला. Circumstantiality, *n.* आनुषंगिकत्व, आनुषंगिक माहिती, विस्तार.

Circumvallā'tion, *n.* (सर्कम्वॅले'शन्)—a rampart or entrenchments made round a place. एकाद्या जागेभोंवती चोहोंकडून केलेली तटबंदी. [L. *circum*, around & *vallum*, a rampart]

Circŭmvĕnt', *v. t.* (सर्कम्-व्हे'न्ट्)—to overreach; to outwit, to deceive. वरचढ करणें; उलटा फसवणें, तोंडाला पानें पुसणें.

Circ'ŭs, *n.* (स'कॅस्)—the arena for equestrian and other exhibitions; an open circle with streets converging on it; a travelling show of trained horses, etc. घोड्यांचें व इतर प्रदर्शन करण्याची जागा; सर्व रस्ते ज्या ठिकाणीं मिळतात असें उघडें मैदान; माणसें व जनावरें यांच्या कसरतीचा खेळ, सर्कस.

Cirque, *n.* (सर्क्)—an arena, a natural amphi theatre. सर्कस, स्वाभाविक दीर्घवर्तुलाकार नाटकगृह.

Ci'rrīpĕd, *n.* (सि'रिपेड्)—kinds of hard-shelled animals. एका जातीचे कठीण कवचाचे प्राणि.

Ci'rrŭs, *n.* (सि'रस्)—(*pl.* cirrī, सिराइ) very high white clouds. फार उंच असलेले शुभ्र ढग.

Cis'tern, *n.* (सि'स्टर्न्)—a reservoir for storing water. टांकी, हौद.

Ci'stŭs, *n.* (सि'स्टस्)—kind of flowering shrub, rock-rose. एक जातीचीं फुलझाडें.

Cĭt'adĕl, *n.* (सि'टडेल्)—a fortress protecting or dominating a city, a strong place of arms. शहराच्या बचावाकरितां बांधलेला किल्ला, बालेकिल्ला.

Cītā'tion, *n.* (साइ-टे'शन्)—an official summons to appear as before a court, a summons; reverence, enumeration, mention. कोर्टांत हजर राहण्याविषयीं हुकूम; उतारा, अवतरण, उल्लेख.

Cīte, *v. t.* (साइट्)—to summon at law; to mention as an example, to adduce as an instance, to quote in support. सरकारच्या हुकुमानें बोलावणें; उदाहरण म्हणून पुढें करणें, आधार म्हणून देणें, उतारा घेणें.

Cĭth'ern, Cittern, *nn.* (सि'दर्न्, सि'टर्न्)—a lute, a guitar. एक तंतुवाद्य, गिटार.

Cĭti'zĕn, *n.* (सि-टि'झेन्)—a townsman, a civilian; an inhabitant of. नगरवासी; राष्ट्रवासी. *Citizen of the world*, a cosmopolitan. जगन्मित्र, वसुधैवकुटुंबी. Citizenship, *n.* पौरजनत्व, नागरिक म्हणून असलेला हक्क.

Cĭt'rāte, *n.* (सि'ट्रेट्)—salt of citric acid. लिंबाच्या रसाचे गुणधर्म असणारा क्षार, सिट्रिक अम्लाचें लवण.

Cĭt'rĭc ă'cid, *n.* (सि'ट्रिक् अॅ'सिड्)—an acid existing in the juice of the citron. लिंबाचें अम्ल.

Cĭt'ron, *n.* (सि'ट्रन्)—the fruit of lemon kind but larger; lemon colour. महाळुंग; लिंबांचा रंग.

Cĭt'ȳ, *n.* (सि'टि)—the important town. मोठें नगर, शहर. *Holy City*, Jerusalem, Heaven. जेरूसलेम, स्वर्ग. *Eternal City*, *City of the Seven Hills*, Rome. रोम. *Celestial City*, *Heavenly City*, *City of God*, Paradise. स्वर्ग, नंदनवन. *The City*, the business part of London. लंडन शहराचा मोठ्या व्यापाराचा भाग.

Cĭv'ĕt, *n.* (सि'व्हिट्)—a fox-like animal with a peculiar smell. जवादी मांजर.

Cĭv'ic, *a.* (सि'व्हिक्)—having to do with a city, of city or citizenship, relating to civil affairs. शहराचा, नगरवासीय, नागरिक.

Cĭv'ics, *n.* (सि'व्हिक्स्)—the study of government (esp. city government), principles of civic duty. राजनीति.

Cĭv'ies, *n. pl.* (सि'व्हिझ्)—civilian clothes. मुलकी खात्यांतील लोकांचे कपडे.

Cĭv'il, *a.* (सि'व्हिल्)—of a citizen community; nonmilitary; polite, obliging; not criminal. लोकव्यवहाराचा, मुलकी; सभ्य, उपकारशील; दिवाणी. *Civil servant*, a person employed by the government (not a member of the army of king's warships). मुलकी खात्यांतील

नोकर, मुलकी अधिकारी. *Civil list*, Parliamentary allowance for King's household & royal pensions. राजाच्या खासगी खर्चाकरितां तोडून दिलेली नेमणूक. *Civil service*, all non-warlike branches of State administration. मुलकी खात्याची नोकरी.

Civ'il war, *n.* (सि'व्हिल् वॉर्)—a war between sections of the same state. एकाच राज्यांत दोन पक्षांची लढाई.

Civil'ian, *n.* (सि-व्हि'लिअन्)—a person not in or of navy or army, any member of a country who is not a soldier. आरमार किंवा सैन्य यांत नसलेला अधिकारी.

Civil'ity, *n.*(सि-व्हि'लि-टि)—readiness to oblige; (*pl.*)acts of courtesy. दाक्षिण्य, सौजन्य; उपकार.

Civiliza'tion, *n.* (सि-व्हि-लिझे'शन्)—advanced stage of social development. सुशिक्षितावस्था, सुधारणा.

Civ'ilize, *v. t.* (सि'व्हि-लाइझ्)—to bring out of barbarism; to enlighten, to refine; to elevate in social life. रानटीपणा घालवणें; शिक्षित करणें; सुधारणें.

Clack, *n.* (क्लॅक्)—a sharp sound; a clatter of tongues. बडबड, टकटक; गजघंटेचा आवाज. *v. t.* to make a sharp sound. खणखण होणें, खडखडणें, जोराचा आवाज करणें.

Clăd, *a.* (*Pa. t. & p. p.* of Clothe) (क्लॅड्)—clothed, covered; adorned, endowed with. कपडे घातलेला; अलंकृत, युक्त.

Claim, *v. t.* (क्लेम्)—to demand as one's due; to proclaim; to have a right to; to assert claim; to assert. हक्क सांगणें; जाहीर करणें; अधिकार असणें; हक्कानें मागणें; प्रतिपादन करणें. *n.* a demand of a right or supposed right; a right or title *to.* हक्क, वारसा, अधिकार. *A claim-jumper*, an appropriator of another's claim. दुसऱ्याचा हक्क हिरावून घेणारा.

Clai'mant, *n.* (क्ले'मन्ट्)—a claiming party, (esp. in a law-suit), one who asserts a right or title. हक्क सांगणारा, वारसा सांगणारा, वारसदार.

Clairvoy'ance, *n.* (क्लेअर्-व्हॉ'यन्स्)—faculty of seeing mentally what is happening or exists out of sight; exceptional insight. दृष्टीच्या आड असलेल्या वस्तु मनानें पाहण्याची शक्ति; अलौकिक अंतर्दृष्टि. Clair'-voyant, *n. & a.* सूक्ष्मदर्शी, अंतर्ज्ञान असलेला.

Clăm, *n.* (क्लॅम्)—an edible shell-fish. एक जातीचा शिंपींतला मासा.

Clā'mant, *a.* (क्ले'मन्ट्)—noisy, insistent; urgent. मोठ्यानें गलबला करणारा; जरूरीचा, निकडीचा.

Clămm'y, *a.* (क्लॅ'मि)—soft and sticky, coldly damp and adhesive. चिकट, चिकचिकीत.

Clăm'orous, *a.* (क्लॅ'मरस्)—noisy with the tongue, vociferous. गोंगाट करणारा, गलबल्या.

Clăm'our, *n.* (क्लॅ'मर्)—a shouting, confused noise; a loud protest or demand. गलबला, गोंगाट; जोराचा निषेध किंवा जोरानें सांगणें. *v. i.* to vociferate, to make a confused noise. गोंगाट करणें, गलबला करणें, ओरड करणें. *To clamour down*, to silence. स्तब्ध करणें, गप्प बसवणें.

Clămp, *n.* (क्लॅम्प्)—a brace or band of iron; a gripping appliance tightened by a screw. लोखंडाची पट्टी, आधारपट्टी, बंधन; पकड. *v. t.* to strengthen or fasten with a clamp. सांधपट्टीनें पक्का करणें, पकडीनें घट्ट धरणें.

Clăn, *n.* (क्लॅन्)—Scotch highlanders with a common ancestor; a tribe; a family holding much together; a party or coterie. एकच पूर्वज असलेले स्कॉटलंडमधील हायलंडर लोक; टोळी; कुळ, घराणें; मित्रमंडळ, कंपू. Clannish, *a.* टोळीचा, विशिष्ट कुळाच्या फाजील अभिमान असणारा.

Clăndes'tine, *a.* (क्लॅन्डे'स्टिन्)—done secretly and wrongfully or unlawfully, surreptitious, secret. छुपछुप केलेला, गुप्त, चोरीचा.

Clăng, *n.* (क्लॅङ्)—a loud resonant metallic sound. मोठा खणखण आवाज. *v. i.* to make a clang. ठणठण वाजणें, खणखण आवाज करणें.

Clăn'gour, *n.* (क्लॅ'ङर्)—succession or prevalence of clanging noises, a continued clanging. सारखा खणखण वाजणारा आवाज.

Clănk, *n.* (क्लॅङ्क्)—a sound as of a heavy chain shaken. जड सांखळीचा वगैरे होणारा आवाज, झणत्कार. *v. t. & i.* to make a clank, to cause to make a clank. झणत्कार करणें किंवा होणें.

Clăn'ship, *n.* (क्लॅ'न्-शिप्)—prevalence of a clannish feeling. आपापल्या टोळीसंबंधानें असलेला फाजील अभिमान.

Clăp, *v. t. & i.* (क्लॅप्)—to strike palms loudly together; to strike with a quick motion; to flap (a wing) audibly. टाळ्या वाजवणें; जोरानें ठोकणें; पंख फडफडवणें. *n.* an explosive noise; a spell of hand-clapping. गडगडाट, मेघगर्जना; टाळ्यांचा गजर, हर्षगर्जना. *To clap on the back*, to slap on the back in encouragement or congratulation. उत्तेजनार्थ किंवा अभिनंदनार्थ पाठ थोपटणें. *To clap up* (*peace* or *bargain*), to make hastily or carelessly. घाईनें किंवा निष्काळजीपणानें करणें. *To clap wings on*, to catch sight of. दिसणें, दृष्टीस पडणें.

Clăp'board, *n.* (क्लॅ'प्-बोअर्ड्)—a narrow board for weather-boarding frame buildings. (लांकडांच्या घरें झांकण्याकरितां केलेला) पातळसा तक्ता.

Clăp'nĕt, *n.* (क्लॅ'प्-नेट्)—a net closed by a pulling strip. दोरी ओढल्याबरोबर बंद होणारें जाळें.

Clăpp'er, *n.* (क्लॅ'पर्)—one that claps; the tongue or striker of a bell; the hand or wind rattle for scaring birds. टाळी वाजवणारा; (घंटेचा) लोळा, टोला; पक्ष्यांना भिवविण्याकरितां केलेला आवाज.

Clăp'per-claw, *v. t.* (क्लॅ'पर्-क्लॉ)—to scratch and hit; to abuse, to criticize spitefully. ओरखडणें आणि मारणें; निंदा करणें, द्वेषानें टीका करणें.

Clăp'trăp, *n.* (क्लॅ'प्-ट्रॅप्)—language or doings meant to catch applause. टाळ्या मिळण्याकरितां वापरलेली भाषा. *a.* showy, playing to the gallery. शाबासकी मिळविण्याकरितां केलेला, खोटा, दिखाऊ, भेगडी.

Clăque, *n.* (-k, क्लाक्)—a hired body of applauders, hired applauders. भाडोत्री टाळ्या पिटणारी मंडळी.

Clă'rendon, *n.* (क्लॅ'रेन्डन्)—a thick-faced type. वाटोळ्या वळणाच्या ओबूड टाइप, क्लॅरेंडन टाइप.

Clă'ret, *n.* (क्लॅ'रेट्)—kinds of red wine imported from Bordeaux. एक प्रकारची तांबूस दारू, क्लॅरेट दारू. *To tap one's claret*, to make one's nose bleed with a blow of the fist बुक्का मारून नाकांतून रक्त काढणें.

Clă'rĭfȳ, *v. t. & i.* (क्लॅ'रि-फाय्)—to free from obscurity; to free from impurities; to become transparent. साफ करणें; निर्मळ करणें; पारदर्शक किंवा अगदीं स्वच्छ करणें. *To clarify butter*, लोणी कढवणें, तूप करणें.

Clă'rĭnĕt, *n.* (क्लॅ'रिनेट्)—a reed instrument with holes and keys; a wooden single reed organ-stop. एक लहान वाद्य; लहान कर्णा. Clarinestist, *n.* बांसरी वाजविणारा.

Clă'rĭon, *n.* (क्लॅ'रिअन्)—a trumpet sound, a shrill trumpet; a rousing call to action. रणशिंग, तुतारी, सनई; उद्योगाला लागण्याबद्दल जोराचें आव्हान.

Clarĭŏnet', *n.* (क्लरि-ओने'ट्)—a clarinet, a reed instrument with holes and keys. बांसरी, सनई, लहान कर्णा.

Clă'rĭtȳ, *n.* (क्लॅ'रिटि)—brilliancy, splendour, clearness. स्वच्छता, स्पष्टता, प्रशस्तपणा.

Clärk'ĭa, *n.* (क्ला'र्किआ)—a garden flower. एक बागेंतील फूल.

Clăsh, *n.* (क्लॅश्)—a loud broken sound as of cymbals; collision; conflict. झांजेच्याप्रमाणें मोठा आवाज; एकमेकांचा धक्का, टक्कर; विरोध. *v. t. & i.* to make a clash; to be at variance with; to bring together with clash. मोठा आवाज करणें; विरुद्ध असणें; एकमेकांवर आपटणें.

Clăsp, *n.* (क्लास्प्)—a contrivance for fastening; a buckle, etc.; a grip of arms or hand; an embrace, a hand-shake. फांसा, अडकवण; चकल; घट्ट धरणें, पकड; आलिंगन, हस्तांदोलन. *v. t. & i.* to fasten up; to encircle, to embrace, to grasp. अडकवणें; घेरणें, आलिंगन देणें, घट्ट धरणें. *A clasp-knife*, a folding knife with a catch fixing the blade when open. मिटतां येणारी सुरी किंवा चाकू. *To clasp hands*, to shake hands emotionally, to make common cause with. भावनापूर्वक हस्तांदोलन करणें, एकाद्या कार्याच्या साथीदार होणें. *To clasp one's hands*, to interlace fingers. हातांत हात घालणें.

Clăss, *n.* (क्लास्)—rank or order of society; a set of students taught; any set of persons or things differentiated by quality from others. जात; वर्ग; निरनिराळ्या दर्जाचे लोक किंवा वस्तु. *v. t.* to assign to a class वर्ग करणें, वर्गवारी लावणें, विल्हेवार लावणें. *Class-book*, a book designed for use by students in a class. वर्गाकरितां नेमलेलें पुस्तक, वर्गपुस्तक.

Clăss'ĭc, *a.* (क्लॅ'सिक्)—of allowed excellence, approved, standard; of the first order or rank. उत्तम, सर्वमान्य, सरस, प्रमाणभूत; पहिल्या दर्जाचा. *n.* classic writer or artist; ancient Greek or Latin writer; a work of art which will always be considered as good, any great literary work; (*pl.*) study of ancient Greek and Latin. पहिल्या दर्जाचा लेखक किंवा कलाभिज्ञ; प्राचीन ग्रीक किंवा लॅटिन लेखक; कोणत्याहि कालेचें श्रेष्ठ काम, कोणताहि मोठा विद्वत्तापूर्ण ग्रंथ; (अने०) प्राचीन ग्रीक किंवा लॅटिनचा अभ्यास.

Clăss'ĭcal, *a.* (क्लॅ'सि-कल्)—of the standard Greek and Latin authors; (of education) based on Greek and Latin authors. प्रमाणभूत ग्रीक आणि लॅटिन ग्रंथकारांचा; ग्रीक व लॅटिन ग्रंथकारांचें (अध्ययन).

Clă'ssĭcĭsm, *n.* (क्लॅ'सिसिझम्)—conformity to or adaptation of classical style; a classical idiom or expression, a Greek or Latin idiom; classical scholastic. सर्वोत्कृष्टतेचें मान; सर्वोत्कृष्ट ग्रंथांत वापरलेली भाषासरणी; सर्वमान्य विद्वत्ता. Classicist, *n.* ललितकलांतील सर्वश्रेष्ठ कृतींचा अभिमानी.

Clăssĭfĭcā'tion, *n.* (क्लॅसि-फि-के'शन्)—systematic arrangement in classes. वर्गवारी, विल्हेवारी, मतवारी, वर्गीकरण. Classificatory, *a.*

Clăss'ĭfȳ, *v. t.* (क्ला'सि-फाय्)—to arrange or distribute in classes, to class. वर्गवारी लावणें, वर्ग करणें.

Clă'ssȳ, *a.* (क्ला'सि)—(Sl.) superior. उत्तम प्रतीचा, अधिक चांगला.

Clatt'er, *n.* (क्लॅ'टर्)—a rattling sound; a sound; a noisy talk. खडखडाट, गोंगाट. *v. i.* to make a clatter, to fall with a clatter. खडखडणें, खडखडून पडणें, कडकडणें.

Clause, *n.* (क्लॉझ्)—a single proviso in treaty or law or contract; a sentence or part of a sentence. कलम, पोटकलम; वाक्य किंवा वाक्याचा भाग, पोटवाक्य.

Claus'tral, *a.* (क्लॉस्ट्रल्)—of the cloister monastic, narrow. मठाचा, मठासंबंधीं, आकुंचित.

Claustrophō'bia, *n.* (क्लॉस्ट्रोफो'बिआ)—morbid dread of closed places. बंद असलेल्या ठिकाणाबद्दल मनाला वाटणारी धास्ती.

Clave, *Pa. t.* of Cleave.

Clăv'ĭchord, *n.* (-k-, क्लॅ'व्हिकॉर्ड्)—the first string-instrument with a keyboard (predecessor of piano). पिआनोच्या पूर्वीचें पहिलें तंतुवाद्य.

Clăv'ĭcle, *n.* (क्लॅ'व्हि-कल्)—collar-bone; merry-thought of birds. गळ्याभोंवतालचें हाड; पक्ष्याच्या छातीचें कांट्यासारखें असलेलें हाड. Clavicular, *a.*

Claw, *n.* (क्लॉ)—the pointed horny nail of a beast's or bird's foot; an ugly hand; a grappling iron. पंजा, कुरूप किंवा ओंगळ हात; नखी. *v. t.* & *i.* to scratch or maul with claws or finger-nails; to clutch hold of. नखांनीं तोडणें किंवा बोचकरणें; पंजांत धरणें, पंजांनीं बोचकरणें. *To pare or cut the claws of*, to disarm. शास्त्रें काढून घेणें. *Claw-hammer*, a hammer with bent split end for extracting nails. खिळे किंवा चुका काढण्याची हातोडी.

Clay, *n.* (क्ले)—stiff tenacious earth; substance of the body. चिकणमाती; शरीरद्रव्य. *White clay*=गोपीचंदन. *To wet or moisten one's clay*, to drink. पिणें, दारू पिणें. *Clay-pipe*, tobacco-pipe made of clay. तंबाकू ओढण्याचा पाइप किंवा चिलीम. *Clay-cold*, cold as clay (usually of the dead). मातीसारखा थंड, अचेतन, निर्जीव. Clay'ey, *a.* (क्ले'इ)—of clay. मातीचा, शेडीचा.

Clay'more, *n.* (क्ले'मोअर्)—an ancient Scottish two-edged broad-sword. जुनी स्कॉटिश लोक वापरीत असलेली दुधारी तलवार, तेलंगणी तलवार.

Clean, *a.* (क्लीन्)—free from dirt; unsoiled; free from defilement or disease; complete, decisive. मलरहित; निर्मळ; कलंकरहित, रोगहीन; पूर्ण निर्णयात्मक. *adv.* completely, altogether. पूर्णपणें, सर्वथा. *v. t.* to make clean, to cleanse. साफ करणें, स्वच्छ करणें. *n.* process of cleaning. शुद्ध करण्याची रीत. *Clean hands, Clean-handed, Clean-handedness*, innocence, innocent. निरपराध, निर्दोष, निरपराधी, निर्दोषी. *Clean-fingered*, unbribed. लांच न घेतलेला. *Clean slate*, freedon from all commitments. कोणत्याहि बंधनापासून मुक्तता. *Clean tongue*, abstinence from foul talk. कधींहि घाणेरडें न बोलणें, सरळ किंवा गोड वाणी. *To show a clean pair of heels*, to escape by speed. पळ काढणें, निसटून जाणें, निघून जाणें. *To make a clean breast of*, to confess. मोकळ्या मनानें कबूल करणें. *Clean-cut*, sharply outlined. स्पष्ट रूपरेषा असलेला. *To clean up*, to put things tidy. व्यवस्थेशीर ठेवणें. *To clean out*, to empty, to strip. उपसा करणें, धुवून टाकणें; निष्कांचन करणें.

Clean'lȳ, *adv.* (क्ली'न्-लि)—in a clean manner. स्वच्छ किंवा शुद्ध तऱ्हेनें. *a* (क्लॅ'न्लि) habitually clean; attentive to cleanness. नेहमीं स्वच्छ; स्वच्छतेकडे लक्ष असलेला. Cleanlily, *adv.* (क्लॅ'न्लिलि)—स्वच्छतेनें. Cleanliness, *n.* (क्लॅ'न्लिनेस्)—स्वच्छता, साफसुफी.

Cleanse, *v. t.* (क्लेन्झ्)—to purify from sin; to make clean, to remove filth. पापापासून शुद्ध करणें; स्वच्छ करणें.

Clear, *a.* (क्लिअर्)—transparent; not clouded; distinct, intelligible, manifest; not dim; well-defined, unobstructed, open. स्वच्छ; निरभ्र, स्पष्ट, समजण्याजोगा, उघड; अंधुकतारहित; स्पष्टतऱ्हेनें मांडलेला, निर्विघ्न, मोकळा. *v. t.* & *i.* to make or become clear; to show or declare innocent; to remove any encumbrance; to make a sum as net gain. स्पष्ट करणें किंवा होणें; निरपराधी दाखविणें; अडचण दूर करणें; निव्वळ नफा मिळविणें. *Clear conscience*, feeling that one is innocent. निर्दोष अंतःकरण. *Clear-sighted*, *a.* विशद्‌बुद्धीचा, मर्मज्ञ, दूरदर्शी. *Clearsightedness*, *n.* *The coast is clear*, no one is on the coast to see or interfere. किनारा निर्भय आहे. *Clear-cut*, well-defined. स्पष्ट, स्पष्टपणें निर्दिष्ट केलेला. *To clear one's throat*, to clear the throat by slight coughing. घसा साफ करणें. *To clear the decks for action*, to make the decks ready to fight. लढाईकरितां जहाजाचा वरील भाग मोकळा करणें. *To clear*

land, to cut down trees etc. for cultivating. झाडें वगैरे कापून जागा साफ करणें. *To clear out of the way*, to remove an obstruction. अडथळा दूर करणें. *To clear away*, to remove, (mist) to disappear. काढून टाकणें, साफ करणें; नाहींसें होणें. *To clear off*, to get rid of, to melt away, to go away. मोकळा होणें, वितळून जाणें, नाहींसा होणें, निघून जाणें. *To clear out*, to empty; to make off. मोकळें करणें; निघून जाणें, वाट धरणें. *To clear up*, to solve (a mystery), to make tidy; (weather) to grow clear. सोडविणें, नीट करणें, खुलासा करणें; स्वच्छ होणें. *To keep clear of*, च्या भानगडींत न पडणें, पासून अलिप्त राहणें. *To get clear of*, संकटांतून पार पडणें.

Clear'ance, *n.* (क्लि'अ-रन्स्)—removal of obstructions; selling or throwing away things not needed; the distance between a moving object and some other thing, space allowed for the passing of two parts; (certificate of) clearing of a ship at the Custom-House. अडथळा दूर करणें; वाईट माल काढून टाकणें; दोन पदार्थांतील अंतर; गलबत तपासल्याचा दाखला.

Clear'ing, *n.* (क्लि'अरिंग्)—a piece of land cleared for cultivation. लागवडीकरितां साफ केलेली जागा.

Clear'ly̆, *adv.* (क्लि'अर्लि)—yes, no doubt, evidently, obviously, explicitly. होय, खात्रीनें, निश्चयपूर्वक.

Clear'-sighted, *a.* (क्लि'अर्-साइटेड्)—having acuteness of sight, discerning. हुशार, दीर्घदृष्टि, मर्मज्ञ.

Cleat, *n.* (क्लीट्)—a tightening wedge; a piece of wood or iron bolted on for fastening ropes to. दोरीला ताण देण्याकरितां दोरींत आडवी घातलेली लांकडी किंवा लोखंडी पट्टी; (जहाजाच्या बाजूवर मारलेलें दोरी बांधण्याचें) लांकडी किंवा लोखंडी टुपेळकें.

Cleav'age, *n.* (क्ली'व्हिज्)—the way in which a thing tends to split. तडकण्यासारखा दगड वगैरेंत आलेला ठिसूळपणा.

Cŏmm'ons, *n*. *pl*. (कॉ'मन्झ्)—the common people; the lower house of Parliament; food, diet. सामान्य दर्जाचे लोक; लोकप्रतिनिधींचें सभागृह; अन्न, पथ्याचें अन्न. *On short commons*, getting little food. अपुऱ्या अन्नावर, तोडलेल्या अन्नावर.

Cŏmm'onwealth, *n*. (कॉ'मन्वेल्थ्)—general body of the people; a free community. लोकसमाज; स्वतंत्र समाज.

Commō'tion, *n*. (क-मो'शन्)—physical disturbance, bustle, confusion, agitated stir. क्षोभ, गडबड, गोंधळ, बंडाळी, दंगा.

Cŏmm'ūnal, *a*. (कॉ'म्यूनल्)—of a commune; on communalistic principles. लहान परगण्याचा; ज्ञातिविषयक. *Comm'unalism*, *n*. theory of government by local autonomy. स्थानिक लोकांकडून राज्यकारभार चालविण्याचें तत्त्व. *Comm'unalistic*, *a*.

Cŏmm'ūne, *n*. (कॉ'म्यून्)—small territorial administrative district. लहान स्वतंत्र परगणा. *v. i.* to hold intimate converse with. सप्रेम संभाषण करणें, हितगुज करणें.

Cŏmmū'nĭcant, *n*. (कॉम्यू'निकन्ट्)—one who (esp. regularly) receives Holy Communion; one who imparts information. ख्रिस्ती लोकांमध्यें प्रभुभोजन घेणारा; बातमी देणारा.

Cŏmmū'nĭcāte, *v. t. & i.* (कॉम्यू'निकेट्)—impart to others, have communication with, have intercourse, correspond. कळविणें; विदित करणें; दळणवळण होणें.

Commūnĭcā'tion, *n*. (क-म्यू-निके'शन्)—imparting or exchange of information; connexion between places. कळवणें, बातमी सांगणें; दळणवळण.

Commū'nĭcātĭve, *a*. (क-म्यू'नि-के-टिव्ह्)—given to talking openly; not reserved. बोलका; मोकळ्या मनाचा.

Commū'nion, *n*. (क-म्यू'न्यन्)—intercourse; celebration of Lord's supper, common participation. दळणवळण, सख्यसंबंध; येशूख्रिस्त भोजनोत्सव.

Commū'nĭque, *n*. (क-म्यू'निके)—an official intimation. सरकारी जाहीरपत्रक.

Cŏmm'ūnism, *n*. (कॉ'म्यू-निझम्)—community of goods as a social system. राष्ट्राची सर्व मालमत्ता ही लोकांच्या उपयोगी आली पाहिजे हें मत, समाजसमतावाद, समाजसत्तावाद. *Comm'unist*, *n.*; *Comm'unistic*, *a*.

Commū'nĭtў, *n*. (क-म्यू'निटि)—joint ownership and enjoyment; body of persons, etc. having community of life. समाईक मालकी; मंडळी, समाज. *Community singing*, singing in which all present join. हजर असलेले सर्व लोक ज्यांत भाग घेतात असें गाणें.

Cŏmm'ūtator, *n*. (कॉ'म्यूटेटर्)—one who commutes; a device for altering the course of electric current. अदलाबदल करणारा, शिक्षा कमी करणारा; विजेचा प्रवाह उलट दिशेला लावण्याकरितां विद्युद्यंत्राला लावलेलें उपकरण, परिवर्तक. *Commutation ticket*, रेल्वेचें कमी दराचें सीझन तिकीट.

Cŏmmūte', *v. t. & i.* (कॉम्यू'ट्)—to buy off by exchange, to put one thing in place of another; to diminish; to change. अदलाबदल करणें, कमी करणें, बदलणें.

Cŏm'păct, *n*. (कॉ'म्पॅक्ट्)—a binding agreement or understanding made with any one. करार, प्रतिज्ञा.

Cŏmpăct', *a*. (कॉम्पॅ'क्ट्)—close, dense; well-knit; terse. घट्ट, दाट; सुटसुटीत; आटपसर, थोडक्यांत चांगलें. *v. t.* to make compact; to join firmly together. करार करणें, घट्ट करणें.

Compan'ion, *n*. (कम्पॅ'न्यन्)—a comrade, a mate; an associate; a thing that matches another; a member of the lowest grade of the order of knighthood. संगती, सोबती; सहचर; तुल्य किंवा

सारखी असणारी वस्तु; अगदीं खालच्या प्रतीचा कनिष्ठ उमराव. *v. t. & i.* to act as a companion to, to associate with. सोबती होणें, सोबत करणें. *Companion-hatch*, wooden covering over companion-way. कॅबिनकडे जाणाऱ्या जिन्यावरील लांकडी छपर. *Companion-hatchway*, an opening in the deck leading to cabin. डेकवरून कॅबिनकडे जाण्याचा रस्ता. *Companion ladder*, a ladder from deck to cabin. डेकवरून कॅबिनकडे जाण्याची शिडी. *Companion-way*, staircase to cabin. कॅबिनकडे जाण्याचा जिना.

Compă'nionable. *a.* (कम्पॅ'निअनेबल्)—sociable. सहवास करण्याला योग्य, सहवासयोग्य.

Compăn'ionship, *n.* (कम्पॅ'न्यन्-शिप्)—fellowship, association. सख्य, मित्रत्व, साहचर्य.

Com'panў, *n.* (क'म्पनि)—being with another or others; persons assembled together; guest; body of persons combined for commercial or other end; a group of 100 to 200 men in army commanded by a captain. संगति, साहचर्य, सहवास; मंडळी; पाहुणा; व्यापारादिकांकरितां एकत्र जुळलेली मंडळी, कंपनी; सैन्याची एक तुकडी, कंपनी. *In company*, not alone. संगें किंवा बरोबर कोणी आहे असा. *To bear or keep a person company*, to accompany a person. एखाद्याबरोबर जाणें. *To weep for company*, to weep because one's companion weeps. आपला सोबती रडतो म्हणून रडणें. *To keep company*, to associate as lovers. प्रेमी जनांप्रमाणें एकमेकांबरोबर असणें, संगत धरणें. *To do in good company*, because better men have done the same. चांगलीं माणसें तसें करतात म्हणून तसें करणें. *Company manners*, the artificial behaviour put on before stranger. परकी माणसापुढें केलेली दिखाऊ-कृत्रिम वागणूक. *Ship's company*, the whole crew of the ship. जहाजावरील सर्व कामगार लोक. *Bad company leads to ruin*, असंगाशीं संग आणि प्राणाशीं गांठ.

Cŏm'părable, *a.* (कॉ'म्पे-रेबल्)—susceptible of comparison *with*; fit to be compared *to*. समतोल; तुलना करण्याजोगा, तुलनीय.

Compă'rătive, *a.* (कम्पॅ'रे-टिव्ह्)—working or perceiving by comparison; not absolute. तुलनात्मक; अपूर्ण.

Compare', *v. t. & i.* (कम्पे'अर्)—to liken to; to estimate similarity of; to put side by side for comparison; to bear comparison with. बरोबरी करणें; साम्य दाखविणें; तुलना करणें; तुल्य किंवा बरोबरीचा असणें. *To compare notes*, to exchange views. परस्पर विचारविनिमय करणें.

Compă'rison, *n.* (कम्पॅ'रिझन्)—comparing; a simile or illustration. बरोबरी, तुलना; उपमा. *In comparison with*, compared to. ०शीं तुलना केली असतां. *Degrees of comparison*, positive, comparative and superlative. विशेषणांचा व क्रियाविशेषणांचा तरतमभाव.

Compärt'měnt, *n.* (कम्पा'र्ट्-मेन्ट्)—a division; space partitioned off. निराळा भाग; विभाग, निराळी खोली.

Com'pass, *n.* (क'म्पस्)—circuit, extent, area, range; an instrument for describing circles on paper. फेरा किंवा वळसा, आटोका, टप्पा, आवांका; वर्तुळें काढण्याचें यंत्र, कंपास. *v. t.* to go round, to surround, to hem in, to attain, to procure, to accomplish, to bring about. घेरा किंवा वेढा घालणें; मात करणें, घडवून आणणें. *Within the compass of*, inside, not beyond. आंत, आवाक्यांत.

Compă'ssion, *n.* (कम्पॅ'शन्)—pity, sympathy. दया, करुणा. *To have compassion on*, दया दाखवणें.

Compă'ssionăte, *a.* (कम्पॅ'शनेट्)—feeling or showing compassion. दयाळू, दयाशील. *v. t.* to regard or treat with compassion. दया करणें, दयेनें वागविणें.

Compăt'ible, *a.* (कॉम्पॅ'टिबल्)-consistent; suitable, agreeable with. जुळणारा; अविरुद्ध, अनुरूप.

Cŏmpăt'riot, *n.* (कॉम्पॅ'ट्रिअट्)-fellow-countryman, one from the same country. स्वदेशाचा मनुष्य, स्वदेशबांधव.

Cŏmpeer', *n.* (कॉम्पि'अर्)—an equal, peer; comrade. समान दर्जाचा; सोबती; भाई, मित्र. [L. *com*, with; & *par*, equal.]

Compěl', *v. t.* (कम्पे'ल्)—to force or constrain; to bring about irresistibly, to bring about (an action) by force. भाग पाडणें; करावयाला लावणें.

Cŏmpěn'dious, *a.* (कॉम्पे'न्डि-अस्)—abridged, brief, containing much in a little space, brief but comprehensive. थोडक्यांत आणलेला, संक्षिप्त; संक्षेपरूप; सारभूत.

Cŏmpěn'dium, *n.* (कॉम्पे'न्डि-अम्)—an abridgement or summary, abstract, epitome. संक्षेप, सारांश. (*pl.* compendiums, compendia)

Cŏm'pensăte, *v. t. & i.* (कॉ'म्पिन्सेट्)—to counterbalance; to recompense, to make up for, to pay for. समतोल करणें किंवा होणें; भरून देणें, भरपाई करणें. *Compensa'tor*, *n.* तोटा भरून देणारा. *Compensa'tory*. *a.* हानिपूरक, भरपाई करणारा. [L. *com*, *con*, together; & *pensare*, *pensatum*, to weigh.]

Cŏmpensā'tion, *n.* (कॉम्पिन्से'शन्)—that which compensates. नुकसानभरपाई, मोबदला.

Compete', *v. i.* (कॉम्पी'ट्)—to strive against others; to contend for a prize. दुसऱ्या विरुद्ध प्रयत्न करणें; चढाओढ करणें; यश मिळविण्याची खटपट करणें.

Cŏm'petence, *n.* (कॉ'म्पि-टेन्स्)—competent ability; a sufficiency. लायकी, कार्यक्षमता; सत्ता, अधिकार; निर्वाहापुरतें धन. *Com'petency*, *n.*

Cŏm'petent, *a.* (कॉ'म्पिटन्ट्)—having the necessary qualifications; open or permissible; qualified for. कार्यक्षम; चालण्याजोगा, योग्य; अधिकृत.

Cŏmpetĭ'tion, *n.* (कॉम्पिटि'शन्)—competing; striving against; contest. स्पर्धा; चढाओढ; अहमहमिका.

Compĕtĭ'tive, *a.* (कॉम्पेटि'टिव्ह्)—pertaining to competition. चढाओढीचा, चढाओढीसंबंधीं.

Compĕtĭ'tor, *n.* (कॉम्पेटि'टर्)—one who competes, a rival. स्पर्धा करणारा, प्रतिस्पर्धी, उमेदवार.

Cŏmpilā'tion, *n.* (कॉम्पिले'शन्)—that which is compiled; a book. संग्रह केलेलें; संग्रहग्रंथ.

Compīle', *v. t.* (कम्पा'इल्)—to collect together, to collect and arrange facts together. संग्रह करणें, जमवून एके ठिकाणीं करणें.

Complā'cĕncy̆, *n.* (कम्ले'सेन्सि)—pleasure; self-satisfaction; gratification. आनंद; संतोष; प्रसन्नता.

Complā'cent, *a.* (कम्ले'सन्ट्)—self-satisfied, satisfied with oneself; in pleasant mood. स्वसंतुष्ट; प्रसन्नचित्त, समाधानी.

Complain', *v. i.* (कम्ले'न्)—to bewail; to make a complaint; to inform against. दुःख करणें; फिर्याद करणें; तक्रार सांगणें.

Complain'ant, *n.* (कम्ले'नन्ट्)—one who complains, a plaintiff in certain suits. तक्रार करणारा, फिर्यादी.

Complaint', *n.* (कम्ले'न्ट्)—statement that one is aggrieved or dissatisfied; formal protest; bodily ailment. तक्रार, फिर्याद; कायदेशीर निषेध; रोग, आजार.

Cŏmplaisănce', *n.* (कॉम-प्लि्झॅ'न्स)—obligingness, politeness, deference, civility; desire of pleasing. सभ्यता; संतुष्ट करण्याची इच्छा.

Complaisant', *a.* (कम्-प्लि्झॅ'न्ट्)—disposed to please, yielding to the wishes of others and eager to please, obliging. बोलूनचालून गोड, उपकारशील.

Cŏm'plĕmĕnt, *n.* (कॉ'म्प्लिमेन्ट्)—what completes or coexists with; complete set or provision; full number. पूरक भाग, पुरवणी; भरणा; पूर्ण संख्या.

Cŏmplĕmĕnt', *v. t.* (कॉम्प्लिमे'न्ट्)—to act as complement to. उणेपणा भरून काढणें, पूरक असणें, पुरवणी करणें.

Cŏmplĕmĕnt'ary̆, *a.* (कॉम्प्लिमे'न्टरि)—being a complement to. पूर्ण करणारा, पुरवणी करणारा; पूरक.

Complēte', *a.* (कम्प्ली'ट्)—having all its parts; finished. सर्व भाग असलेला; सकल, पूर्ण. *v. t.* to bring to entirety, to finish. पूर्ण करणें, शेवटास नेणें.

Complē'tion, *n.* (कम्प्ली'शन्)—completing. शेवट, समाप्ति, पूर्णता.

Cŏm'plĕx, *a.* (का'म्प्लेक्स्)—consisting of parts; complicated, involved. अनेक भाग असलेला; गुंतागुंतीचा, बिकट. *A complex*, (in the mind) a set of ideas or desires (which one does not know one possesses, yet) which have an effect on one's behaviour. ज्यांचा एखाद्याच्या वागणुकीवर विशिष्ट परिणाम होतो असे विचार, गंड.

Complē'xion, *n.* (कम्ले'क्शन्)—the colour of the face, colouring and skin-texture of the face; aspect. तुकवर्ण, चेहरा; स्वरूप, आकार. *To put a different complexion on it*, to make a thing appear different. एखादी गोष्ट निराळी भासविणें.

Cŏm'plĕxĭty̆, *n.* (कॉ'म्प्लेक्सिटि)—state of being complex, complexness, intricacy. गुंतागुंत, घोटाळा.

Complī'ance, *n.* (कम्ला'यन्स्)—acquiescence. मान्यता, रुकार.

Complī'ant, *a.* (कम्प्ला'यन्ट्)—yielding. हार घेणारा; नमणारा.

Cŏm'plĭcāte, *v. t.* (कॉ'म्प्लिकेट्)—to make complicated, to entangle. गुंतागुंत करणें, गुंतवणें, बिकट करणें.

Cŏm'plĭcātĕd, *a.* (कॉ'म्प्लि-के-टिड्)—intricate, involved, hard to unravel. अवघड, गुंतागुंतीचा, बिकट.

Cŏmplĭcā'tion, *n.* (कॉम्प्लिके'शन्)—complicated situation, entanglement, intricacy, complicating circumstance. गुंतागुंत, गोंधळ, बिघडलेली परिस्थिति.

Cŏm'plĭmĕnt, *n.* (कॉ'म्प्लि-मेन्ट्)—polite expression, implication of praise. आदरवचन; गर्भित स्तुति. *To make one a compliment*, ०ची उत्तम रीतीनें वाखाणणी करणें. *To make* or *pay* or *send one's compliments to*, नमस्कार करणें, नमस्कार सांगणें.

Cŏmplĭmĕnt', *v. t.* (कॉम्प्लिमे'न्ट्)—to pay compliments to, to express admiration for; to flatter. गौरव करणें, मान देणें, खुशामत करणें.

Cŏmplĭmĕnt'ary̆, *a.* (कॉम्प्लि-मे'न्टरि)—laudatory; by way of compliment. प्रशंसापूर्ण; स्तुतिरूप, औपचारिक.

Cŏm'plin, Cŏm'pline, *n.* (कॉ'म्प्लिन्)—last service of the day. दिवसाची शेवटची प्रार्थना, संध्याकाळची प्रार्थना.

Comply', *v. i.* (कम्प्ला'य्)—to act according to request or command or rules. मान्य करणें, रुकार देणें, स्वीकारणें.

Cŏmpō'nent, *a.* (कॉम्पो'नन्ट्)—going to the making of a whole; constituent. घटक, पूरक; अंगभूत.

Cŏmpŏrt', *v. t. & i.* (कॉम्पॉ'र्ट्)—to behave or conduct oneself; to be compatible or in harmony with. वर्तन ठेवणें, वागणें; सुसंगत असणें, जुळणें, -शीं मिळणें.

Compōse', *v. i. & t.* (कम्पो'झ्)—to form or constitute; to construct in one's mind; to become tranquil; to make up or reconcile; to set up type. बनवणें; मनांत रचणें, शांत होणें; समेट करणें; टाइप जुळणें.

Compōsed', *a.* (कम्पो'झ्ड्)—quiet, calm. शांत, स्वस्थ.

Compōsed'ly, *adv.* (कम्पो'झ्ड्-लि)—calmly. शांत चित्तानें.

Compō'ser, *n.* (कम्पो'झर्)—(कवन, काव्य, कविता) रचणारा.

Cŏm'pŏsite, *a.* (कॉ'म्पोझिट्)—consisting of different parts or materials, made up of parts. निरनिराळे भाग जुळवून केलेला, संमिश्र, संयुक्त.

Cŏmposi'tion, *n.* (कॉम्पो-झि'शन)—composing, thing composed; a mixture; agreement or compromise. रचना, जुळलेली वस्तु, कवन, प्रबंध; मिश्रण, करार, समेट.

Compŏs'itor, *n.* (कम्पॉ'झि-टर्)—a type-setter. टाईप जुळविणारा, टंक-जुळारी.

Cŏm'pŏst, *n.* (कॉ'म्पॉस्ट्)—compound manure; combination. मिश्र खत; मिश्रण, एकीकरण.

Compō'sure, *n.* (कम्पो'झर्)—calmness. शांतता, शांत स्वभाव.

Cŏm'pōte, *n.* (कॉ'म्पोट्)—fruit preserved in syrup. सरबतांत मुरवलेलें फळ.

Compound', *v. t. & i.* (कम्पा'उन्ड्)—to mix or combine into a whole; to settle by mutual concession; to commute. मिसळून एकत्र करणें; मिळवणें; तडजोड करणें. *To compound a debt,* to pay off a debt by one large payment less than the whole amount owed. देणें असलेल्या रकमेपेक्षां कमी परंतु एकदम मोठी रक्कम देऊन कर्ज फेडून टाकणें. तडजोड करून कर्ज फेडणें. *To compound a felony,* to forbear prosecution on some private motive, to help in an unlawful act. कांहीं खासगी हेतूकरितां फिर्याद मागें घेणें, बेकायदेशीर कृत्यांत मदत करणें.

Cŏm'pound, *a.* (कॉ'म्पाउन्ड्)—composite; compounded; not simple. संमिश्र; मिसळलेला; चक्रवाढीचा. *n.* a mixture; compound word; an enclosure (round a house, factory, etc.). मिश्रण; सामासिक शब्द, समास; आवार, पटांगण, वाडी, कंपाउंड.

Com'pounder, *n.* (कं'म्पाउन्डर्)—one who compounds. (रोग्यांकरितां दवाखान्यांत) औषधें बनविणारा.

Cŏmprĕhĕnd', *v. t.* (कॉम्प्रिहे'न्ड्)— to grasp mentally; to be inclusive of; to comprise; to include, to take in. समजणें, आकलन करणें; समावेश होणें; धरणें, आंत घेणें, समावेश करणें.

Cŏmprĕhĕn'sible, *a.* (कॉम्प्रि-हे'न्सि-बल्)—intelligible, conceivable by the mind, that may be understood; that may be comprised. स्पष्ट, समजण्याजोगा; समावेश करण्याजोगा.

Cŏmprĕhĕn'sion, *n.* (कॉम्प्रिहे'न्शन्)—understanding; inclusion; grasp. समज, बोध; समावेश; आकलन.

Cŏmprĕhĕn'sive, *a.* (कॉम्प्रिहे'न्सिव्ह्)—embracing much; of wide scope. बहुसमावेशक; बहुव्यापक.

Comprĕss', *v. t.* (कम्प्रे'स्)—to squeeze together; to bring into smaller compass, to press tightly together. पिळणें; दाबणें. *Compressibil'ity, n.* संपीड्यता, दाबणें. *Compres'sion, n.* संपीडन, संकलन, दाबणें. *A compress,* (कॉ'म्प्रेस्), a piece of wet cloth tied tightly on to a wound, a pad for compressing. दाबण्याची पट्टी, दाबून बांधण्याची वरपडी.

Comprīse', *v. t.* (कम्प्रा'इझ्)— to contain, to include, to be made up of. समावेश करणें, आंत घेणें, अंतर्भाव करणें.

Cŏm'promīse, *n.* (कॉ'म्प्रो-माइझ्)—an agreement attained by mutual concession. तडजोड. *v. t.* to adjust by mutual concessions; to bring oneself under suspicion. तडजोड किंवा लवाद करणें; स्वतःला धोक्यांत घालणें. *To compromise oneself,* to make people think that one may have done wrong. आपण कांहीं चूक केली आहे असें लोकांना भासविणें.

Cŏmprovin'cial, *a. & n.* (कॉम्-प्रॉ-व्हि'न्शल्)—of the same province. एकाच विभागाचा.

Comptrō'ller, *n.* (क-न्ट्रो'लर्)—a controller, an officer or examiner of accounts. नियंता, हिशेब तपासणारा अधिकारी, हिशेबतपासनीस.

Compŭl'sion, *n.* (कम्प'ल्शन्)—constraint, obligation. जुलूम, जबरदस्ती, सक्ति. *Under* or *upon compulsion,* because one is compelled. बळजबरीनें, सक्तीनें.

Compŭl'sory, *a.* (कम्प'ल्सरि)—done or acting under compulsion, that which must be done,

brought about by force. आवश्यक, केलेंच पाहिजे असें, जुलमाचें.

Compunc'tion, *n.* (कम्प'ङ्क्शन्)—pricking of conscience, remorse, contrition, pity, sorrow for a cruel act. पस्तावा, पश्चात्ताप.

Compute', *v. t.* (कम्प्यू'ट्)—to calculate, to reckon, to count, to estimate, to rate. गणणें, मोजणें, संख्या काढणें. *Comput'able a.* गणना करण्याजोगा. *Computa'tion, n.* गणना, अजमास.

Com'rade, *n.* (कॉ'-म्रिड्)—a mate or fellow; a companion or associate. सोबती; बरोबर असणारा मित्र. *Com'radeship, n.* सोबत, मैत्री.

Con, *v. t.* (कॉन्)—to study or learn; to direct steering of ship. संथा घेणें, घोकणें, पाठ करणें; सुकाणूं धरणें, गलबताचें सुकाणूं चालविणें.

Cona'tion, *n.* (कॅने'शन्)—the exertion of willing that desire or aversion shall issue in action. इच्छा, संकल्प, क्रियाप्रवर्तक हेतु.

Concatena'tion, *n.* (कन्कॅटिने'शन्)—connexion as of chain-links; a string or series (of ideas, events, etc.), a chain of events. शृंखला, सांखळी, श्रेणी, संबंध, परंपरा.

Conc'ave, *a.* (कॉ'न्केव्ह्)—of interior curvature, curved inwards. अंतर्गोल.

Concav'ity, *n.* (कॉन्कॅ'व्हिटी)—inner or interior curvature, hollowness, hollow. गोल पोकळी, अंतर्गोलता.

Conceal', *v. t.* (कन्सी'ल्)—to withdraw from observation, to hide or keep secret, to keep from being known. लपवणें, गुप्त ठेवणें.

Conceal'ment, *n.* (कन्सी'ल्मेन्ट्)—act of keeping secret; suppression of the truth; a hiding-place. गुप्त ठेवणें; खरी गोष्ट लपवून ठेवणें, दाबादाबी, छपवाछपवी; दडून बसण्याची जागा.

Concede', *v. t.* (कन्सी'ड्)—to grant; to admit as true; to allow, to yield after disagreeing. मान्य करणें; खरी आहे असें कबूल करणें ; सोडणें.

Conceit', *n.* (कन्सी'ट्)—an overweening notion of oneself; vanity; farfetched comparison. मीपणा, अहंभाव; दिमाख; बढाई; क्लिष्ट तुलना.

Conceit'ed, *a.* (कन्सी'टेड्)—having a high notion or too good an opinion of oneself; vain. अहंमन्य, बढाईखोर; पोकळ डौली.

Conceive', *v. t. & i.* (कन्सी'व्ह्)—to become pregnant; to think of, to imagine, to form in the mind; to formulate in words. गर्भधारणा करणें; मनांत योजणें; प्रतिपादन करणें, रचणें.

Con'centrate, *v. t. & i.* (कॉ'न्सेन्ट्रेट्)—to bring to bear or bring together (e.g. soldiers) on one point; to collect one's thoughts or efforts, to employ all one's power or attention *upon*; to increase the strength of a liquid by boiling it down. समकेंद्र करणें; चित्तैकाग्र्य करणें, विचार एकत्र आणणें; आटवून किंवा गाळून तीव्रता वाढविणें. *To concentrate on*, to give one's whole mind *to*. पूर्ण लक्ष देणें, चित्तैकाग्र्य करणें.

Concentra'tion, *n.* (कॉन्सेन्ट्रे'शन्)—collection to one point; mental faculty or exclusive attention. केंद्रीकरण; मनःसामर्थ्य, चित्तैकाग्र्य.

Concent'ric, *a.* (कॉन्से'न्ट्रिक्)—having a common or the same centre (*with*). एकच मध्यबिंदु असलेलें, समकेंद्रक, एककेंद्रक. *Concentric fire*, firing concentrated on a point. एकाच ठिकाणावर केलेला गोळीबार. *Concen'trically, adv.*; *Concentricity, n.*

Con'cept, *n.* (कॉ'न्सेप्ट्)—idea of a class of objects; an abstract general notion. कल्पना; समज, विचार.

Concep'tion, *n.* (कन्से'प्शन्)—conceiving; pregnancy; an idea. विचार; गर्भधारणा; कल्पना, *Conceptional, a.*

Concep'tive, *a.* (कन्से'प्टिव्ह्)—capable of conceiving (mentally). कल्पक.

Concep'tual, *a.* (कन्से'प्च्युअल्)—of menta conceptions. कल्पनाविषयक.

Concern', *v. t.* (कन्स'र्न्)—to relate to; to affect, to be relevant to; to mix oneself up in; to feel anxiety about. संबंध असणें; ब्बद्दल वाटणें; समर्पक असणें; मिसळून जाणें; काळजी वाटणें. *n.* a thing that concerns one; (*pl.*) one's affairs; solicitude; firm or enterprise. संबंधीची गोष्ट; (अने०) स्वतःचा उद्योगधंदा; काळजी, कळकळ; धंदा, साहस. *To be concerned in*, to take part in. एखाद्या गोष्टींत भाग घेणें. *I am not concerned*, it is not my business *to*. त्यांत माझा संबंध नाहीं.

Concern'ing, *prep.* (कन्स'र्निंग्)—about. विषयीं, संबंधीं.

Concern'ment, *n.* (कन्स'र्न्मेन्ट्)—affair, business; importance; being concerned (*with*); anxiety. काम, उद्योग, धंदा; महत्त्व; संबंध; कळकळ, काळजी. *Of vital concernment*, अत्यंत महत्त्वाचा.

Con'cert, *n.* (कॉ'न्सर्ट्)—combined state; a musical entertainment; combination of voices or sounds. ऐकमत्य, एकोपा; संगीत जलसा; एकस्वर, एकसूर. *Concert grand*, a grand piano of brilliant tone. उत्तम आवाजाचा पिआनो. *Concert-pitch*, a pitch slightly higher than the ordinary. तारस्वर, नेहेमींपेक्षां चढविलेला स्वर.

Concert', *v. t.* (कन्स'र्ट्)—to plan, to contrive; to pre-arrange. युक्ति योजणें, मसलत करणें;

आगाऊ व्यवस्था करणें. *Concert'ed*, arranged in parts. निरनिराळ्या भागांत रचलेलें, योजिलेलें (पद्य, गायनवादन इ.).

Cŏncerti'na, *n.* (कॅन्सर्टी'ना)—a portable musical wind instrument with a set of keys at each end, a wind-instrument pumped by the hands. बेंडबाजा, बाजा.

Concertō', *n.* (कन्चे'अर्टो)—a composition for solo instrument accompanied by orchestra. विशिष्ट वाद्यांत वाजविण्याकरितां रचलेली चीज किंवा गत.

Concĕ'ssion, *n.* (कन्से'शन्)—conceding; thing conceded, grant; monopoly or similar privilege. कबूल करणें; सवलत, सूट; मक्ता किंवा त्यासारखा हक्क, विशेष हक्क. *Concessionaire'*, *n.* holder of a concession (esp. of monopoly given by government to a foreigner). सरकाराकडून विशेष सवलत मिळालेला मनुष्य. *Conce'ssive*, *a.* सवलतीचा, सवलत देणारा.

Conch, *n.* (कॉंक्)—a shellfish or its shell. कालव, शंख.

Conchŏ'logy, *n.* (कॉन्कॉ'लॉजि)—study of shells and shell-fish. शंखशास्त्र.

Concil'iāte, *v. t.* (कॉन्सि'लिएट्)—to propitiate; to gain the friendship of, win over from hostility; to reconcile. मर्जी प्रसन्न करून घेणें, मनधरणी करणें; अनुकूल करणें; मिळवून घेणें. *Concil'iator*, *n.* मनधरणी करणारा. *Concil'iatory*, *a.* सामोपचाराचा, मनमिळाऊ.

Concilia'tion, *n.* (कन्सि-लि-ए'शन्)—bringing of opponents into harmony, reconcilement; use of conciliating measures. प्रतिपक्षयाचें मन वळविणें, मनधरणी, गोडी; सामोपचाराचा उपयोग.

Concīse', *a.* (कन्सा'इस्)—brief and comprehensive; condensed. थोडक्यांत पण पूर्ण असलेला; संक्षिप्त.

Cŏnc'lāve, *n.* (कॅं'क्लेव्ह्)—a meeting for secret consultation; the meeting-place or assembly of cardinals to the election of Pope. खासगी सभा, गुप्तसभा, गुप्तमंडळी; पोपची निवडणूक करण्याकरितां होणारी कार्डिनल लोकांची सभा.

Conclude', *v. t. & i.* (कन्क्लू'ड्)—to bring about as a result; to come to an end; to finish, to settle; to infer. शेवट करणें; समाप्त होणें; संपणें, ठरविणें; अनुमान करणें.

Conclu'sion, *n.* (कन्क्लू'झन्)—ending, close; inference; final opinion. शेवट, समाप्ति; अनुमान; निश्चित मत, सिद्धान्त. *To try conclusions with*, to engage in a trial of skill etc. *with*. प्रचीती किंवा अनुभव घेणें. *Foregone conclusion*, अगाऊच ठरलेला निर्णय. *In conclusion*, सारांशरूपानें, थोडक्यांत; सरते शेवटीं.

Conclu'sive, *a.* (कन्क्लू'सिव्ह्)—convincing, decisive, final. निर्णायक, खात्री करणारा.

Concŏct', *v. t.* (कन्कॉ'क्ट्)—to compound; to fabricate; to make in concert. मिसळणें; खोटी गोष्ट रचणें; संगनमत करणें.

Concoc'tion, *n.* (कन्कॉ'क्शन्)—concocting; concocted thing. बनविणें; बनावट गोष्ट, खोटी हकीगत.

Concŏm'itance, *n.* (कन्कॉ'मिटन्स्)—being together, co-existence. एकाच वेळीं अस्तित्वांत असणें, समन्वय.

Concŏm'itant, *a.* (कन्कॉ'मि-टन्ट्)—attendant, going together, that which goes with something else, accompanying. सहचारी, बरोबर असणारा, जोडीदार.

Cŏnc'ŏrd, *n.* (कॉं'कॉर्ड्)—harmonious relations, peace; agreement (in gender, person, etc.) between words. जुळता संबंध, मिलाफ, ऐक्य; दोन शब्दांमध्यें (पुरुष, लिंग, वचन यांचा) मेळ, समानाधिकरण. *Concord'ance*, *n.* ऐक्य, मेळ, कारकसंबंध; अनुक्रमणिका.

Cŏnc'ŏrdant, *a.* (कॉं'कॉर्डन्ट्)—agreeing, in harmony, agreeable, harmonious. जुळणारा, एकमताचा.

Cŏncŏr'dat, *n.* (कॉन्कॉ'र्डट्)—a friendly agreement between Pope and secular government. धर्मगुरु आणि सरकार यांमधील सख्य करार.

Cŏnc'ourse, *n.* (कॉं'कोअर्स्)—a flocking together; a crowd, throng. एकत्र जमणें; जमाव, गर्दी, समुदाय.

Cŏnc'rēte, *a.* (कॉं'क्रीट्)—having objective reality; not abstract, real. प्रत्यक्ष दिसणारें; साकार. *n.* a concrete thing or word; a stone-like material (used for roads, buildings, etc.). प्रत्यक्ष सिद्ध वस्तु किंवा शब्द, गुणधर्मयुक्त पदार्थ; चुगड, सिमेंट, वगैरेंचें मिश्रण, कॉंक्रिट.

Conc'ūbīne, *n.* (कॉं'क्यु-बाइन्)—a woman who cohabits with a man without marriage. वारांगना, वेश्या.

Concŭr', *v. i.* (कन्क'र्)—to occur together, to coincide; to agree. एकत्र घडणें, जुळणें; एकमत असणें, संमति देणें. [L. *con*, together and *currere*, to run.]

Concŭ'rrence, *n.* (कन्क'रन्स्)—agreement. एकमत, मतैक्य.

Concŭr'rent, *a.* (कन्क'रन्ट्)—concurring, agreeing in the same act. एकचित्त, बरोबर असणारा.

Concŭ'ssion, *n.* (कन्क'शन्)—a violent shaking or shock; head injury due to heavy blow.

धक्का, गचका ; जोराच्या धक्कयानें होवयाला झालेली दुखापत.

Condĕmn', *v. t.* (कन्डे'म्)—to censure, to blame ; to give a judicial decision against ; to pronounce unfit for use. निंदा करणें, दोष देणें ; शिक्षा फर्मावणें ; निरुपयोगी ठरवणें. *Condem'nable*, *a.* नालायक ठरविण्याजोगा ; शिक्षार्ह ; निंद्य. *Condem'natory*, *a.*

Cŏndĕmnā'tion, *n.* (कॉन्डिम्ने'शन्)— censure ; judicial conviction ; ground for condemning. निंदा ; दंडनियोजन, शिक्षा देणें; दंडहेतु, दोषकारण.

Cŏndĕnsā'tion, *n.* (कॉन्डेन्से'शन्)—act of condensing ; condensed mass. दृढ होणें, दृढीकरण ; दृढीभवन.

Condĕnse', *v. t. & i.* (कन्डे'न्स्)—to make denser or briefer ; to compress ; to consolidate ; to express the meaning in fewer words. गोठवणें, अधिक घट्ट किंवा लहान करणें ; दाबणें ; दृढ करणें ; संकलन करणें ; थोडक्यांत अर्थ सांगणें.

Conden'ser, *n.* (कन्डे'न्सर्)—part of a machine which makes gas into liquid ; an instrument which stores electricity; a curved glass which brings light together into a beam. वायुरूप पदार्थाचें द्रवीभवन करणारा यंत्राचा भाग; वीज सांठविण्याचें एक यंत्र ; प्रकाशाचें एकीकरण करणारी एक वक्र काच.

Cŏndĕscĕnd', *v. i.* (कॉन्डिसे'न्ड्)—to deign to do ; to stoop from dignity. अभिमान सोडून वागणें ; लीनता धरणें.

Cŏndĕscĕn'sion, *n.* (कॉन्डिसे'न्शन्)-condescending manner or act, affability to inferiors. अनुग्रह, निरभिमान, प्रसाद, लीनतेचें वर्तन, लीनता.

Condīgn', *a.* (कन्डा'इन्)—adequate, well deserved and well suited to the wrong act. योग्य, यथायोग्य, अनुरूप, रास्त.

Cŏn'dĭmĕnt, *n.* (कॉ'न्डिमेन्ट्)—relish or seasoning for use with food, matter added to food to make it taste nicer. मसाला, तोंडीलावणें, व्यंजन.

Condĭ'tion, *n.* (कन्डि'शन्)—quality ; state ; state of body ; attribute ; (*pl.*) circumstance ; stipulation ; social rank. गुण ; स्थिति ; शरीरावस्था, विशेष गुण ; (अने०) परिस्थिति ; शर्त, मुद्दा, अट ; सामाजिक दर्जा. *Condition precedent*, condition that must be fulfilled before something else is done. आधीं पुरी करण्याची अट. *On condition that*, if, provided that. जर, असें असलें तर. *In condition*, in good condition. चांगल्या स्थितींत. *Out of condition*, in bad condition. वाईट स्थितींत. *v. t.* to be a condition of ; to make terms ; to stipulate. स्थिति किंवा अट असणें ; अटी घालणें ; करार करणें.

Condĭ'tional, *a.* (कन्डि'शनल्)—made or granted on certain terms, not absolute. अटीचा, सशर्त.

Condōle', *v. i.* (कन्डो'ल्)—to express sympathy in sorrow with, to express pity for. दुःखांत सहानुभूति दर्शविणें किंवा व्यक्त करणें.

Condō'lence, *n.* (कन्डो'लन्स्)—expression of sympathy in another's sorrow. दुसऱ्याच्या दुःखाबद्दल सहानुभूति व्यक्त करणें, दुःखप्रदर्शन.

Condōne', *v. t.* (कन्-डो'न्)—to treat as non-existent, to pardon. अस्तित्वांत नाहीं असें मानणें ; क्षमा करणें. *Condona'tion*, *n.* माफी, सूट, क्षमा.

Condūce', *v. i.* (कन्ड्यू'स्)—to help to produce or effect. उपयोगास येणें, साधक होणें, मदत करणें.

Condū'cive, *a.* (कन्ड्यू'सिव्ह्)—tending to or having a tendency to help. उपयोगी, साधक.

Cŏn'dŭct, *n.* (कॉ'न्डक्ट्)—one's actions, personal deportment ; management ; convoy, escort. वर्तणूक, वर्तन ; व्यवस्था ; वाटेनें रक्षणाकरितां दिलेले लोक, वाटाड्या, मार्गदर्शक.

Condŭct', *v. t.* (कन्ड'क्ट्)—to lead, to escort ; to control, to manage ; to behave oneself ; to transmit, to allow to pass. वाट दाखवून पोहोंचविणें, नेणें, वाट दाखविणें ; ताब्या ठेवणें, व्यवस्था पाहणें ; स्वतः आचरण करणें ; वाहकतेनें (उष्णता, वीज, प्रकाश) पोहोंचविणें ; पार जाऊं देणें. *Conduct'ible*, *a.* वाहून नेण्यासारखा, वाहून नेण्याजोगा, वाह्य.

Condŭc'tor, *a.* (कन्ड'क्टर्)—an official in charge of passengers ; a conductive substance or object. उतारूंवर लक्ष ठेवणारा नोकर, कण्डक्टर ; उष्णतावाहक पदार्थ किंवा वस्तु. *Lightning-conductor*, a rod at the top of a building conducting electricity away into earth. वीज नेणारी तार, विद्युद्वाहक दांडा. *Conduct'ress*, *n. fem.* गाण्यांतील नायिका, पुढारीण.

Con'duit, *n.* (क'न्डिट्, कॉ'न्डिट्)—a surface drain channel or a pipe, aqueduct. पाणी नेण्याचा नळ, नहर, सारणी.

Cōne, *n.* (कोन्)—tapering figure with circular base. गोपुच्छाकृति शंकु, (शंकूसारखा) सुळका.

Confăb'ūlāte, *v. i.* (कन्फॅ'ब्युलेट्)—to take familiarly together, to chat. गप्पा मारणें, गप्पागोष्टी करणें. *Confabulation*, *n.* [L. *con*, together and *fabulare*, to converse]

Confĕc'tion, *n.* (कन्फे'क्शन्)—a sweet-stuff ; light and elegant article of female dress. मिठाई; बायकांचा एक हलका आणि सुंदर कपडा.

Confĕc'tioner, *n.* (कन्फे'क्शनर्)—a dealer in cakes and sweets. मिठाई करणारा, मिठाईवाला, हलवाई.

Confec'tionery, *n.* (कन्फे'क्शनरि)—cakes and sweets. मेवामिठाई, मिठाई.

Confed'eracy, *n.* (कन्फे'डरासि)—a league; conspiracy; a league of confederate States. संघ; कट, संगनमत; राष्ट्रमंडळ, एकत्र संगनमत असलेलीं राष्ट्रें.

Confed'erate, *a.* (कन्फे'डरेट्)—leagued together, joined by agreement for a common purpose, तहानें बांधलेलीं, एकत्र झालेलीं. *v. t. & i.* to make league with; to make a confederation. संघ करणें; एकत्र होणें.

Confedera'tion, *n.* (कान्फेडरे'शन्)—a permanent union of sovereign States for common external action. एकाच पक्षांत मिळालेले लोक किंवा संस्थानें, राष्ट्रसंघ.

Con'fer, Cf., *v. imperat.* (कॉ'न्फर्)—Compare. ताडून पहा, पहा.

Confer', *v. t. & i.* (कन्फ'र्)—to bestow on; to take counsel *with*; to meet for discussion. देणें; मत घेणें; विचाराकरितां एकत्र जमणें; सहविचार करणें.

Con'ference, *n.* (कॉ'न्फरन्स्)—a meeting for discussion; exchange of views. विचार करण्यासाठीं बैठक; वादविवाद, विचारविनिमय.

Confess', *v. t. & i.* (कन्फे'स्)—to acknowledge; to plead guilty to; to disclose one's sin to confessor; to hear confession of. कबूल करणें; दोष पदरीं घेणें; धर्मोपाध्यायाजवळ पापांचा झाडा देणें; पापें कबूल केलेलीं ऐकणें.

Confe'ssor, *n.* (कन्फे'सर्)—a priest who hears others confess. पापें कबूल केलेलीं ऐकणारा धर्मोपाध्याय.

Confess'edly, *adv.* (कन्फे'सिड्लि)—avowedly, undeniably, admittedly. उघड, निर्विवाद, निःसंशय.

Confe'ssion, *n.* (कन्फे'शन्)—acknowledgement (of guilt, etc.); confession to priest; statement of one's principles. गुन्हा वगैरे कबूल करणें; उपाध्यायाजवळ पापनिवेदन किंवा पापाचा कबुलीजबाब; स्वतत्त्वनिवेदन.

Confett'i, *n. pl.* (कन्फे'टि)—sweets or disks of coloured paper which are thrown at newly-married people as they leave the church. नुकत्याच लग्न झालेल्या लोकांवर चर्चमधून बाहेर पडतांना टाकले जाणारे रंगीत कागदाचे किंवा मिठाईचे तुकडे. *Confett'o, n. sing.* [It., = sweet-meat.]

Confidant', *n.* (कॉन्-फि-डॅ'न्ट्)—a person to whom one confides one's private affairs. अत्यंत विश्वासू मित्र. *Confidante', n. fem.*

Confide', *v. i. & t.* (कन्-फा'इड्)—to repose confidence in; to impart. भरंवसा असणें, विश्वास ठेवणें; सोपवणें, देणें. *Confid'ing, a.* unsuspicious. विश्वास असलेला.

Con'fidence, *n.* (कॉ'न्फिडन्स्)—firm trust; confidence in oneself, self-reliance, assurance, assured intimacy. पूर्ण विश्वास; आत्मविश्वास; खात्री, भरंवसा. *Told in confidence*, told as a secret. गुप्त गोष्ट म्हणून सांगितलेली. *In one's confidence*, allowed to know one's private affairs. एखाद्याच्या विश्वासांतला, खासगी गोष्टीसुद्धां ज्याला सांगितल्या जातात असा. *Confidence trick*, a trick persuading a victim to entrust valuables to one as a sign of confidence. आपल्यावर जास्त विश्वास उत्पन्न करून एखाद्याला लुबाडण्याची युक्ति, भामटेगिरी.

Con'fident, *a.* (कॉ'न्फिडेन्ट्)—feeling or showing assurance; positive; self-reliant. खात्री असणारा, निःशंक; निभ्रांत, निश्चयपूर्वक; आत्मविश्वासी. *Con'fidently, adv.* विश्वासानें, विश्वासपूर्वक; खात्रीनें; उमेदीनें.

Confiden'tial, *a.* (कॉन्फिडे'न्शल्)—that is to be kept secret, imparted in confidence; enjoying confidence. गुप्त, खासगी; विश्वासू, भरंवशाचा. *Confiden'tially, adv.*

Configura'tion, *n.* (कॉन्फिग्यूरे'शन्)—aspect as produced by relative position of parts. अवयवांच्या आकारावरून झालेलें सापेक्ष स्वरूप, बाह्य स्वरूप, ग्रहांची सापेक्ष स्थिति.

Confine', *v. t.* (कन्-फा'इन्)—to keep within limits; to imprison, to hold in custody; (*pass.*) to be brought to bed of a child. मर्यादा करून देणें; कैदेंत ठेवणें, कोंडणें; बाळंत किंवा प्रसूत होणें (to be confined).

Con'fine, *n.* (कॉ'न्फाइन्)—a boundary; (*pl.*) the border or edge. हद्द, मर्यादा; (अने०) कडा किंवा सीमा.

Confine'ment, *n.* (कन्फा'इन्मेन्ट्)—being confined; imprisonment; the lying-in of a woman, child-birth. बांधलें जाणें; कैद, बंदी; बाळंतपण, प्रसूति.

Confirm', *v. t.* (कन्फ'र्म्)—to make stronger, to put past doubt, to ratify; to corroborate; to administer confirmation to. बळकट करणें; कायम करणें, मंजूर करणें; पुराव्यास बळकटी आणणें; मंजुरी देणें, सही करणें. *To confirm a child*, to receive a child into the church. (बाप्तिस्मा दिल्यानंतर) मुलाचा दृढीकरण संस्कार करणें. *Confirmed*, बळकट केलेला, दृढ झालेला, पक्का. *A confirmed bachelor*, an un-married man who will never marry. कधींहि लग्न न करूं इच्छिणारा पक्का ब्रह्मचारी.

Confirmā'tion, *n.* (कन्फर्मे'शन्)—a corroborating circumstance or statement ; a rite in which persons confirm the vows made for them at baptism. पुष्टि, समर्थन, बळकटी, मंजुरी ; खिस्ती धर्म स्वीकारल्यावर त्याचा पूर्तिसंस्कार.

Cŏn'fiscāte, *v. t.* (कॉन्फिस्केट्)—to seize private property for the public treasury ; to seize as by authority, to appropriate by way of penalty, to seize a person's land or goods as a punishment. खासगी मालमत्ता सरकारांत जप्त करणें : शिक्षा म्हणून अधिकारानें जप्त करणें.

Cŏnfiscā'tion, *n.* (कॉन्-फिस्के'शन्)—seizure of private property as punishment. सरकारजमा करणें, जप्ती, दण्डार्थ हरण.

Conflagrā'tion, *n.* (कॉन्फ्लग्रे'शन्)—a widespread fire, a general burning ; a great outbreak (of war, etc.). आगीचा डोंब, वणवा ; (युद्ध वगैरेचा) भयंकर उद्भव

Cŏn'flict, *n.* (कॉ'न्-फ्लिक्ट्)—a trial of strength ; a fight, a disagreement ; conflicting state. झगडा, झुंज ; भांडण ; विरोध *v. i.* (कन्फ्लि'क्ट्)—to be at odds or inconsistent with ; to contest with. एकमेकांशीं टक्कर होणें, विरोध असणें ; झुंजणें, लढणें.

Cŏn'fluence, Cŏn'flŭx, *nn.* (कॉ'न्फ्लुअन्स्, कॉ'न्फ्लक्स्)—a meeting of confluents ; a concourse. संगम ; जमाव, संघ

Cŏn'fluent, *a.* (कॉ'न्फ्लुअन्ट्)—merging into one, running into one another. एकत्र मिळून जाणारा, संगम होणारा, मिळणारा.

Confŏrm', *v. t. & i.* (कन्फॉ'र्म्)—to adapt, to be shaped according to the form of ; to make like ; to comply with rules or general custom. जुळवून घेणें ; सारखा करणें ; विशिष्ट आचाराप्रमाणें किंवा संप्रदायानुरूप वागणें.

Confŏrm'āble, *a.* (कन्फॉ'र्मेबल्)—suitable, adapted or corresponding to. अनुरूप, नियमानुसार.

Confŏrmā'tion, *n.* (कन्फॉर्मे'शन्)—particular structure of a thing ; adaptation *to*. कोणत्याहि वस्तूची बनावट किंवा रचना ; अनुरूपता.

Confŏr'mist, *n.* (कन्फॉ'र्मिस्ट्)—one who conforms to the usages of the church of England. चर्च ऑफ् इंग्लंडला किंवा कायद्यानें स्थापलेल्या धर्माला अनुसरून वागणारा, प्रवृत्तधर्मानुसारी.

Confŏrm'ĭtў̆, *n.* (कन्फॉ'र्मिटि)—correspondence to or harmony with, agreement. सारखेपणा, अनुरूपता. *In conformity with*, according to, अन्वयें, बरहुकूम.

Confound', *v. t.* (कन्फा'उन्ड्)—to mix up, to confuse, to throw into confusion, to astound; to baffle. संकर करणें, गडबडणें, आश्चर्यचकित करणें; गोंधळून जाणें. *Confound it! Confound you!* जळो तें. आग लागो त्याला! सत्यानाश होवो तुझा! *A confounded* (i.e. very very) *long time*. भयंकर वेळ झाली.

Cŏnfrătern'ĭtў̆, *n.* (कॉन्फ्रॅट'र्निटि)—a brotherhood, (esp. religious or charitable) ; a body, gang. मंडळी, समाज, टोळी. [L. *con*. together & *frater*, Sk. भ्रातृ, a brother]

Cŏn'frere, *n.* (कॉ'न्-फ्रेअर्)—a fellow worker. बरोबर काम करणारा, सहकारी, कार्यबंधु.

Confront', *v. t.* (कन्फ्र'न्ट्)—to bring face to face *with* ; to face or be confronted with ; to resist. समोरासमोर आणणें, रुजुवात करणें ; तोंड देणें ; प्रतिबंध करणें.

Confūse', *v. t.* (कन्फ्यू'झ्)—to throw into disorder; to obscure, to mix up : to mistake one thing for another. गोंधळ करून टाकणें ; दुर्बोध करणें, मिसळणें ; चुकणें. *Confu'sedly adv.*

Confū'sion, *n.* (कन्फ्यू'झन्)—confused state ; tumult ; discomfiture. गोंधळ; घोटाळा; पराजय, निराशा. *Confusion worse confounded*, confusion made worse than it was. होता त्याच्यापेक्षां जास्त गोंधळ.

Confūte', *v. t.* (कन्फ्यू'ट्)—to prove to be untrue. खोटा आहे असें सिद्ध करणें, खंडन करणें, चूक ठरवणें. *Confuta'tion n.* खंडन.

Con'ge, *n.* (कॉ'न्झे)—dismissal. शेवटचा निरोप, रामराम, सलाम. *To take one's conge*, to say goodbye. जातांना निरोप घेणें.

Congeal', *v. t. & i.* (कंजी'ल्)—to solidify by freezing or otherwise ; to become thick ; to become hard. थिजणें, थिजवणें ; गोठणें, घट्ट होणें. *Congela'tion*, *n.* (कॉन्जिले'शन्)—congealing. थिजणें, गोठणें, घनीभाव.

Congēn'ial, *a.* (कंजी'निअल्)—of kindred temper; suiting one's likes and dislikes ; pleasurable to. सारख्या स्वभावाचा ; स्वभावाला अनुकूल ; सुखकारक. *Congenial'ity*, *n.* अनुकूलता, साधर्म्य, स्वभावसाम्य. [L. *con*. with & *genialis*, jovial]

Congĕn'ĭtal, *a.* (कंजे'निटल्)—inborn, born with one ; dating from birth. सहज, बरोबर जन्मलेला; जन्मापासूनचा. [L. *con*, together and *genitum*, to beget.]

Cŏn'ger, *n.* (कॉं'गर्)—a large snake-like fish caught for food. एक मोठा सापाच्या आकाराचा मासा.

Congĕs'tĕd, *a.* (कन्जे'स्टिड्)—suffering congestion ; accumulated to excess. रक्तस्तंभन-रक्तसंचय-झालेला ; गर्दी असलेला, दाट.

Congĕs'tion, *n.* (कन्जे'स्चन्)—abnormal accumulation (of blood, population, etc.). प्रमाणाबाहेर एकत्र जमणें, गांठ, ग्रन्थि, रक्तसंचय ; दाट वस्ती.

Conglŏm'erāte, *n.* (कन्ग्लॉ'म-रेट्)—a mass of pebbles cemented into a kind of stone; a mixture of things. लहान दगडांपासून केलेला एक मोठा दगड; वस्तुमिश्रण. *v. t. & i.* to collect into a mass. एक गोळा होणें, पिंड बनणें.

Conglŏmerā'tion, *n.* (कन्ग्लॉ-मरे'शन्)—a collection into a mass; a collection. ढीग, गठ्ठा; रास, समूह, संचय.

Congrăt'ūlāte, *v. t.* (कन्ग्रॅ'च्युलेट्)—to offer congratulations to; to felicitate, to express pleasure at another's good fortune. अभिनंदन करणें; आनंद प्रदर्शित करणें. *To congratulate oneself*, to think oneself happy. आनंद किंवा समाधान मानणें. *Congratula'tory*, *a.* अभिनंदनपर.

Congrătūlā'tion, *n.* (कन्ग्रॅच्युले'शन्)—an expression of pleasure in another's good fortune (*usu. pl.*). दुसऱ्याबरोबर आनंद मानणें; अभिनंदन.

Cŏng'rĕgāte, *v. t. & i.* (कॉ'ग्रि-गेट्)—to flock together, to assemble, to meet in a crowd. एकत्र येणें किंवा जमणें, संमेलन होणें.

Cŏngrĕgā'tion, *n.* (कॉंग्रि-गे'शन्)—an assemblage, a company or assembly of people (esp. for religious worship). सभा, समाज, प्रार्थनेकरितां जमलेली मंडळी. *Congrega'tional*, *a.*

Cŏng'rĕss, *n.* (कॉं'ग्रेस्)—a formal meeting of delegates for discussion; the group of persons who make laws in America. महासभा, कॉंग्रेस; अमेरिकेंतील कायदेमंडळ.

Cŏng'ruence, *n.* (कॉं'ग्रुअन्स्)—agreement, consistency. मेळ, मिलाफ, समन्वय. (Also, *Cong'ruency*, *n.*)

Cŏng'ruent, *a.* (कॉं'ग्रु-अन्ट्)—harmonious; able to be fitted one on the top of another, corresponding; agreeing. एकरूप; एकावर एक बरोबर बसणारा, जुळणारा; सम; समरूप.

Cŏngru'itў, *n.* (कॉंग्रू'इटि)—accordance; harmonious relation; correspondence. मेळ; मिलाफ; अनुसंधान. *Cong'ruous*, *a.*

Cŏn'ic, Cŏn'ical, *a.* (कॉ'निक, कॉ'निकल्)—cone-shaped, having the form of a cone. निमुळता, गोपुच्छाकार, शंकूसारखा. *Conics*, conic section, शंकुच्छेद (गणित-शास्त्र).

Cŏ'nifer, *n.* (को'निफर्)—a cone-bearing plant. आढवें-बुंध्याला-वाढणारें झाड, कोनाकृति फळें येणारें झाड.

Conif'erous, *a.* (कॉनि'फरस्)—bearing fruit-cones. कोन असलेलें, शंकूच्या आकाराचें.

Conjĕc'ture, *n.* (कंजे'क्चर्)—guessing, guesswork, surmise. अटकळ, अनुमान, तर्क. *v. t. & i.* to guess. तर्क करणें, तर्क बांधणें.

Conjĕc'tural, *a.* (कंजे'क्चरल्)—depending on conjecture, done or said by guess. तर्कानुमेय, अनुमानिक.

Conjŏin', *v. t. & i.* (कन्जॉ'इन्)—to make into or become a single whole. एकत्र जोडणें, संयोग करणें; संयुक्त होणें, मिळणें. *Conjoint'*, *a.* जोडलेला, सांधलेला, संयुक्त.

Cŏn'jugal, *a.* (कॉं'न्जु-गल्)—having to do with marriage; between married persons. विवाहाचा, विवाह-विषयक; दंपत्यसंबंधीं, जोडप्यामधील.

Cŏn'jugāte, *v. t. & i.* (का'न्जुगेट्)—to inflect (a verb) through its forms, to give the forms of a verb. क्रियापद किंवा धातु चालविणें. *a.* conjoint; growing in pairs. संयुक्त, जोडलेला; जोडीजोडीनें वाढणारा.

Cŏnjugā'tion, *n.* (कॉन्जुगे'शन्)— conjoining; inflexion scheme of verbs. एकत्र जोडणें; क्रियापदें चालविणें; गण.

Conjŭnct', *a.* (कन्जं'क्ट्)—associated with or assisting another. जोडलेला, मदत करणारा, संयुक्त.

Conjŭnc'tion, *n.* (कन्ज'क्शन्)—conjoining; simultaneous occurrence; word used to connect sentences and words together. एकत्र जोडणें; युति, एकाच राशींत येणें; उभयान्वयी अव्यय. *In conjunction with*, together with. एकत्र, मिळून.

Conjŭnc'ture, *n.* (कन्जं'क्चर्)—position of affairs at a particular moment, a combination of events. कठीण प्रसंग, योगायोग.

Cŏnjurā'tion, *a.* (कॉन्जुरे'शन्)—a solemn entreaty; incantation. कळकळीची विनंति; मंत्र, जादू.

Conjure', *v. t.* (कान्जु'अर)—to entreat solemnly to do something. एखादी गोष्ट करण्याला कळकळीची विनंति करणें.

Con'jure, *v. t. & i.* (क'न्जर्)—to produce magical effects; to do sleight-of-hand trick; to call up a spirit of the dead. जादू करणें, मंत्रप्रयोग करणें; हातचलाखीचे खेळ करणें; जादूनें किंवा मंत्रानें (पिशाच्च वगैरे) अंगांत आणणें. *Conjuring tricks*, clever tricks of a magical kind done to amuse. करमणुकीकरितां केलेले जादूचे खेळ. *A name to conjure with*, a name of vast influence. जोरदार वजन असलेलें नांव. *To conjure up*, to cause to appear to the fancy. कल्पनेनें दिसायला लावणें. (मंत्र घालून) दृष्टिगोचर करणें; नवीन बनवणें, कल्पिणें.

Con'jurer, Con'juror, *n.* (क'न्जरर्)—an adept at sleight-of-hand. हातचलाखीमध्यें वाकबगार, जादूगार.

Cŏnk, *n.* (कॉङ्क्)—nose. नाक, नासिका. *Conk'y*, *a.* & *n.* big-nosed (person). मोठ्या नाकाचा मनुष्य, गरुडनाक्या.

Connāte', *a.* (कनें'ट्)–innate, belonging naturally (*to*); of like nature; (of leaves) united at the base. स्वाभाविक; नैसर्गिक; सारख्या स्वभावाचा; बुडाशीं एकत्र झालेला, संयुक्तमूल.

Connă'tural, *a.* (कॅनें'चरल्)—congenital; of the same nature. स्वाभाविक, सजातीय; समधर्मक.

Connĕct', *v. t.* & *i.* (कने'क्ट्)—to join together, to link, to unite, to combine, to have a close relation. जोडणें, संबंध जोडणें. *Well connected*, connected with persons of good position. चांगल्या लोकांशीं संबंध असलेला.

Connĕc'tive, *a.* (कने'क्टिव्ह्)-serving as connexion, tending to connect. संबंध जोडणारा, संयोजक.

Connĕ'xion, Connĕc'tion, *n.* (कने'क्शन्)—state of being linked together, communication, intercourse; that which connects; relation; relationship. जोडणें, संयोग, संबंध; संदर्भ, धोरण; संबंध; नातें.

Cŏn'ning-tower, *n.* (कॉ'निंग् टॉवर्)—a low armoured tower on a warship used by the officers guiding the ship. लढाऊ गलबतावरील सुकाणधाऱ्या अधिकाऱ्यांची उंचावरील संरक्षित जागा.

Connī'vance, *n.* (कना'य्-व्हन्स्)—pretence of being unaware, pretended ignorance; winking at offence, tacit permission. डोळेझांक; अपराधाकडे कानाडोळा करणें, मूक संमति.

Connīve', *v. i.* (कना'इव्ह्)—to look on in connivance at misdoing, to help wrong-doers secretly, to pretend not to see wrong-doing. वाईट कृत्यांकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करणें, डोळेझांक करणें, ऐकलें न ऐकलें करणें, उपेक्षिणें.

Cŏnnoisseur', *n.* (कॉनिस'र्)—a critical judge (*of*, *in*, matters of taste). मार्मिक परीक्षक, गुणज्ञ, गुणग्राहक, मर्मज्ञ, सुरुची.

Connōte', *v. t.* (क-नो'ट्)—to imply, to betoken; to mean; to include in its meaning, to signify along with the primary sense. ध्वनित करणें, सुचवणें, दर्शवणें; अर्थ असणें, गर्भितार्थ असणें. *Conno'tative*, *a.* गुणवाचक, जातिनिर्देशक.

Connōtā'tion, *n.* (क-नोटे'शन्)—implied meaning. गर्भितार्थ.

Cŏnnū'bial, *a.* (कॉन्यू'बि-अल्)—connected with marriage, conjugal, matrimonial. विवाहसंबंधीचा, दांपतिक, नवराबायकोचा.

Cō'noid, *a.* (को'नॉइड्)—more or less conical. साधारणपणें शंकूच्या आकृतीचा (पदार्थ).

Cŏnq'uer, *v. t.* & *i.* (कॉं'कर्)—to overcome; to acquire by conquest; to master one's difficulties or passions, to win a victory over. पराभव करणें; हस्तगत करून घेणें; संकटें किंवा मनोविकार यांच्यावर जय मिळविणें, संयमन करणें.

Cŏnq'ueror, *n.* (कॉं'करर्)—a person who conquers. विजयी, जेता.

Cŏnq'uest, *n.* (कॉं'क्वेस्ट्)—conquering; what is won by subjugation, a thing conquered. जिंकणें, विजय; जितवस्तु. *To make a conquest* (*of*), to win a person's affections. एखाद्याचें प्रेम संपादन करणें.

Cŏnsănguĭn'ĕous, *a.* (कॉन्सँग्वि'निअस्)—related by birth, of the same blood or family; near of kin. एकरक्तसंबंधी; अत्यंत जवळचा नातलग.

Cŏnsănguĭn'ĭty̆, *n.* (कॉन्सँग्वि'निटि)—kinship, blood-relationship. रक्तसंबंध.

Cŏn'science, *n.* (कॉ'न्शन्स्)—the inner feeling distinguishing between right and wrong; सदसद्विवेकबुद्धि; चांगल्या किंवा वाईट कृत्याची जाणीव. *To have the conscience to*, to have the impudence to. धैर्य किंवा धीटपणा असणें. *Conscience Clause*, धर्मासंबंधीं बाबतींत सवलत देणारें कायद्याचें कलम. *Conscience money*, money paid because one feels one ought to pay, not because one is forced to pay. मनाला देणें योग्य वाटतें म्हणून दिलेला पैसा. (चुकविलेला मालावरील कर इ.)

Cŏnscĭĕn'tious, *a.* (कॉन्-सिए'न्शस्)—obedient to the dictates of conscience, sincere, scrupulous. नेकीचा, न्यायनिष्ठ, इमानी.

Cŏn'scious, *a.* (कॉ'न्शस्)—having knowledge of one's thoughts and feelings; awake to one's surroundings; aware of. स्वतःचे विचार व भावना जाणणारा, जाणता; परिस्थितीचें ज्ञान असलेला; जाणीव असलेला.

Cŏn'sciousness, *n.* (कॉ'न्शस्-नेस्)—a person's thoughts and feelings as a whole. देहभान, जाणीव. *Bereft of consciousness*, बेशुद्ध, बेसावध. *To return to consciousness*, शुद्धीवर येणें, देहभानावर येणें. *To lose consciousness*, to faint. बेशुद्ध होणें, मूर्च्छित होणें.

Conscrībe', *v. t.* (कन्स्क्रा'इब्)—to enrol by conscription. सक्तीनें लष्करी कामावर नांव नोंदणें, सक्तीनें लष्करभरती करणें.

Cŏn'script, *n.* (कॉ'न्स्क्रिप्ट्)—a man who is forced by law to become a soldier. लष्करी कामाकरितां नांव नोंदून ठेवलेला मनुष्य.

Conscrĭp'tion, *n.* (कॉन्स्क्रि'प्शन्)—compulsory enrolment for national service. राष्ट्रसेवेकरितां लष्करांत किंवा आरमारांत सक्तीनें नांव नोंदणें.

Cŏn'sĕcrāte, *v. t.* (कॉन्सि-क्रेट्)-to make sacred; to devote to sacred purpose; to sanctify. पवित्र करणें; पवित्र कार्याकरितां वाहणें; शुद्ध करणें. *Consecra'tor*, *n.* अभिषेक करणारा; प्रस्थापक; देवाला अर्पण करणारा. *Consecra'tory*, *a.*

Cŏnsĕcrā'tion, *n.* (कॉन्सि-क्रे'शन्)—setting apart for sacred purposes; dedication. पवित्र कार्याकरितां वाहणें. अभिषेक, अभिषेचन; अर्पण करणें.

Consĕc'ūtĭve, *a.* (कन्से'क्युटिव्ह्)—following in order, consequential; orderly and unbroken. लागोपाठचा, मागून येणारा, एकापाठीमागून एक.

Consĕn'sus, *n.* (कन्से'न्सस्)—agreement (of opinion) on the part of all concerned. सर्वांचें मतैक्य, संमति, अनुमति.

Consĕnt', *v. i.* (कन्से'न्ट्)—to agree to; to acquiesce in. रुकार देणें; कबूल होणें. *n.* an agreement; consenting or words expressing consent. रुकार, अनुमति. *Age of consent*, age at which the consent (esp. of a girl to seduction) is valid in law. संमतिवय. *With one consent*, unanimously. सर्वानुमतें, एकमतानें.

Cŏnsĕntā'nĕous, *a.* (कॉन्सेन्टे'निअस्)—in accord; done by common consent. योग्य, अनुरूप; संमत, एकविचारानें केलेलें.

Consĕn'tient, *a.* (कन्से'न्शन्ट्)-agreeing. एकमताचा. अनुकूल.

Cŏn'sĕquence, *a.* (कॉ'न्सिक्वन्स्)—that which comes from any cause or principle; importance; moment; influential position. फळ, परिणाम; महत्त्व; मोठेपणा; वजनदार स्थान, मोठा दर्जा. *To take the consequences*, to accept whatever results from one's choice or act. परिणाम भोगणें. *In consequence*, as a result (of). परिणाम म्हणून, यास्तव.

Cŏn'sĕquĕnt, *a.* (कॉ'न्सिक्वेन्ट्)—that results; following as a consequence or result. आनुषंगिक; परिणाम म्हणून.

Cŏnsĕquĕn'tial, *a.* (कॉन्सिक्वे'न्शल्)—of the nature of a corollary; self-important; having important results. उपसिद्धान्तासारखा; अहंमन्य, महत्त्वाचा, मानी; परिणामकारक.

Cŏn'sĕquĕntlў, *adv. & conj.* (कॉ'न्सि-क्वेन्ट्-लि)—as a result, accordingly, therefore. परिणामीं, यास्तव, म्हणून.

Conserv'ancў, *n.* (कन्स'र्व्हन्सि)—a board controlling a river or a port, a group of persons in charge of preserving forest or rivers. नदी, बंदर किंवा अरण्य यांचें रक्षण करणारें मंडळ.

Cŏnservā'tion, *n.* (कॉन्सर्व्हे'शन्)—preserving; keeping from decay or from being destroyed; continuance; conserved state. जपून ठेवणें; चालू ठेवणें; जपलेली स्थिति. *Conservation of energy*, invariability in quantity of total energy of any system of bodies (including the universe). शक्तीचें प्रकृतिनित्यत्व, शक्तिसंस्थिति.

Conserv'atĭve, *a.* (कन्स'र्व्हटिव्ह्)—wishing to keep things as they are, of conserving tendency; opposed to change; moderate. आहे ती स्थिति बरी समजणारा; नवीन सुधारणेचा द्वेष्टा; मध्यम, साधारण. *n.* a member of the Conservative party; a person of conservative disposition, one who does not want any change in government. इंग्लंडांतील कॉन्सर्व्हेटिव्ह पक्षाचा अनुयायी; चालू स्थिति हीच बरी असें म्हणणारा मनुष्य. *Conserva'tism*, *n.* रूढिप्रियता.

Conservatoire', *n.* (कन्सर्व्हट्वा'र्)—a public school of music or art. संगीत, कला इत्यादि विशेष विषय शिकविण्याची सार्वजनिक शाळा.

Conserv'atorў, *n.* (कन्स'र्-व्हेटरि)—a green-house for tender plants, a glass house for flowers. वनस्पति सुरक्षित ठेवण्याचें स्थळ, वनस्पतिरक्षणस्थान.

Conserve', *v. t.* (कन्स'र्व्ह्)—to preserve; to keep from decay or change, to keep safe. राखून ठेवणें; नाश होऊं नये म्हणून जपून ठेवणें. *n. pl.* (कन्स'र्व्हज्) preserved fruit, a fruit cooked with sugar so that it can be kept for a long time. साखरेंत घालून ठेवलेलें फळ, मुरंबा, साखरेंत मुरविलेला पदार्थ.

Consĭd'er, *v. t & i.* (कन्सि'डर्)—to contemplate; to think about; to hold a certain opinion; deliberate thoughtfully; to reckon with, to take into account; to show consideration for. विचार करणें; वाटणें, मत असणें; मनन करणें; गणणें, विचारांत घेणें; योग्य विचार करणें. *To consider others*, to think of the feelings and wishes of others. दुसऱ्याला काय वाटतें याचा -दुसऱ्यांच्या भावनांचा-विचार करणें.

Consĭd'erable, *a.* (कन्सि'डरेबल्)—rather important, of some importance; worthy of regard, worth considering; large. काहीं महत्त्वाचा; विचार करण्याजोगा, योग्य, संभावित; मोठा, धरान्यसा.

Consĭd'erate, *a.* (कन्सि'डरेट्)—thoughtful for the feelings or right of others, kind. विचारी, दुसऱ्याच्या भावना किंवा हक्क यांचा विचार करणारा, दयाळू. *Consid'erately*, *adv.* विचारानें, विचारपूर्वक. *Consid'erateness*, *n.*

Consĭderā'tion, *n.* (कन्सिडरे'शन्)—considering; a thing worth considering; a thing given or done as inducement; considerateness. विचार करणें; विचार करण्याजोगी गोष्ट; मोबदला;

विचारीपणा. *To take into consideration*, to consider. विचार करणें, विचारांत घेणें. *Under consideration*, being considered. विचारांत असलेला, विचार चालू असलेला. *In consideration of*, in return for, on account of. ०करितां, ०मुळें. *Mature consideration*, पोक्त विचार.

Consīgn', *v. t.* (कन्सा'इन्)—to entrust, to put in charge (of a person), to commit or hand over; to send goods for delivery. सोंपवणें; हवालीं करणें; (अडत्याकडे) माल पाठविणें.

Consīgnee', **Consīg'nor**, *na.* (कन्सायनी', कन्सा'यनॉर्)—a person to whom or by whom goods are consigned. ज्याच्याकडे किंवा ज्याच्याकडून माल पाठविला आहे तो.

Consīgn'mĕnt, *n.* (कन्सा'इन्मेन्ट्)—consigning; goods sent (to a trader for selling.). माल पाठविणें; पाठविलेला माल.

Consĭst', *v. i.* (कन्सि'स्ट्)—to be made up of; to be composed of; to be compatible with. ०चा असणें, ०आंत असणें; संगत किंवा अनुरूप असणें.

Consĭs'tence, *n.* (कन्सि'स्टन्स्)—degree of density (in liquid, etc.). घट्टपणा, घनता, सांद्रता.

Consĭst'encȳ, *n.* (कन्सि'स्टन्सि)—being consistent, agreement, harmony, congruity. मेळ, मिलाफ, संगति, अनुसंधान, धर, नेम.

Consĭst'ent, *a.* (कन्सि'स्टन्ट्)—compatible, not contradictory, harmonious; constant to same principles. जुळता, योग्य, अविरुद्ध; सुसंगत.

Consolā'tion, *n.* (कॉन्सोले'शन्)—alleviation of grief or disappointment, consoling circumstance. दुःखपरिहार, समाधान.

Consōle', *v. t.* (कन्सो'ल्)—to bring consolation to, to cheer in distress, to solace, to comfort in sorrow. समाधान करणें, सांत्वन करणें.

Cŏn'sōle, *n.* (कॉ'न्-सोल्)—a bracket serving as a ledge to support something. आधार म्हणून अडकवण्याचा ब्रॅकेट किंवा कंस.

Consŏl'idāte, *v. t.&i.* (कन्सॉ'लिडेट्)—to solidify, to bring together and make stong; to strengthen; to combine (statutes, debts, &c.) into a single whole. घट्ट करणें; दृढ करणें; (कायदे, कर्ज वगैरे) एकत्र करणें, एक करणें. *Consol'idat'ion*, *n.* दृढीकरण, घट्ट करणें, घट्ट होणें. *Consol'idator*, *n.* सांधणारा, जोडणारा. *Consol'-idatory*, *a.*

Consŏls', *n. pl.* (कन्सॉ'ल्झ्)—Government consolidated stock. (इंग्लंडांतील) सरकारी कर्जरोखे.

Cŏn'sŏnance, *n.* (कॉ'न्सो-नन्स्)—agreement in sound, musical concord; agreement in meaning or taste. स्वरसंयोग; मेळ, मिलाफ, अनुरूपता, संगतता.

Cŏn'sonant, *a.* (कॉ'न्सोनन्ट्)—agreeing in sound, agreeable, consistent. जुळणारा, सुसंगत. *n.* nonvowel letter; a sound that forms a syllable only in combination with a vowel. स्वररहित अक्षर, व्यंजन. *Consonan'tal*, *a.* व्यंजनासंबंधीं, व्यंजनाविषयीं.

Cŏn'sŏrt, *n.* (कॉ'न्सॉर्ट्)—a spouse; a partner; a ship sailing with another. नवरा किंवा बायको; भागीदार; दुसऱ्या जहाजाबरोबर जाणारें जहाज. *King consort*, *prince consort*, queen's husband. राज्य करणाऱ्या राणीचा नवरा.

Consŏrt', *v. i.* (कन्सॉ'र्ट्)—to associate or keep company; to be in harmony. सहवास करणें; मिलाफानें असणें.

Conspĕc'tus, *n.* (कन्स्पे'क्टस्)—a general view; a synopsis, an epitome, a short account of a whole subject. दिग्दर्शन; सार, टांचण, मसुदा.

Conspĭc'ūous, *a.* (कन्स्पि'क्युअस्)—striking to the eye, attracting notice, readily seen; eminent, remarkable. सहज दिसण्यासारखा; प्रमुख.

Conspĭ'racȳ, *n.* (कन्स्पि'रसि)—a plot or plotting for some evil-doing, a secret plan to do an unlawful act or to change the government by force. कट, कपटप्रबन्ध, गुप्त मसलत.

Conspĭ'rator, *n.* (कन्-स्पि'रेटर्)—a man engaged in a conspiracy. कट करणारा, कटांत सामील असलेला.

Conspīre', *v. i.* (कन्स्पा'यर्)—to take part in a conspiracy; to agree together. कटांत भाग घेणें; संगनमत करणें.

Con'stāble, *n.* (कॉ'न्स्टेबल्)—a great officer of the royal house-hold; a policeman below the sergeant's rank. राजघराण्यांतील मोठा अधिकारी; सार्जंटच्यापेक्षां खालच्या दर्जाचा पोलीस अधिकारी, कान्स्टेबल. *To outrun the constable*, to run into debt. कर्जबाजारी होणें, उत्पन्नापेक्षां जास्त खर्च होणें.

Constăb'ūlary, *n.* (कन्स्टॅ'ब्युलरि)—the police force, the body of constables. पोलीस फौज, सर्व शिपाई लोक.

Cŏn'stancȳ, *n.* (कॉ'न्स्टन्सि)—faithfulness; unchangingness, tenacious adherence; steadiness, firmness. इमान; सततपणा; स्थिरता, स्थैर्य.

Cŏn'stant, *a.* (कॉ'न्स्टन्ट्)—not subject to variation, remaining unchanged; continual; firm. न बदलणारा; सारखा असणारा; स्थिर.

Cŏn'stantlȳ, *adv.* (कॉ'न्स्टन्ट्-लि)—invariably, continually, always; often. नित्य, नेहमीं; वारंवार.

Cŏnstellā'tion, *n.* (कॉन्स्टेले'शन्)—fixed stars *forming* a group *to* the eye. नक्षत्रांचा समुदाय, नक्षत्रगण, नक्षत्रपुंज, ग्रह.

Cŏnsternā'tion, *n.* (कॉन्स्टर्ने'शन्)-paralysing sense of calamity, a feeling of great surprise and fear. त्रेधा, गाळण, पांचावर धारण.

Cŏn'stĭpāte, *v. t.* (कॉं'न्स्टिपेट्)—to make costive, to affect with constipation. मलावरोध करणें. *Constipa'ted*, having great difficulty in clearing the bowels. बद्धकोष्ठ.

Cŏnstĭpā'tion, *n.* (कॉन्-स्टि-पे'शन्)—difficulty in evacuating the bowels. बद्धकोष्ठ, मलावरोध.

Constĭt'ūency, *n.* (कन्स्टि'ट्युएन्सि)—the body of people electing a representative to the government; the place represented; the people who support a business (e. g. by buying from it). प्रतिनिधि निवडणारी मंडळी; ज्याचा प्रतिनिधि निवडला जातो ती जागा, मतदारसंघ; धंद्याला आश्रय देणारे लोक.

Constĭt'ūent, *a.* (कन्स्टि'ट्युअन्ट्)—making part of a whole; appointing, electing. मूलभूत, बीजभूत; निवडणारा. *n.* a constituent part; a member of an elective body; a voter. वस्तुघटक; निवडून देणारा सभासद; मतदार.

Cŏn'stĭtūte, *v. t.* (कॉं'न्स्टि-ट्यूट्)—to appoint, to make into; to establish; to be the essence or components of. नेमणें, मिळून होणें; योजना करणें; तत्त्व किंवा भाग असणें, रचणें; अंगभूत असणें, बनवणें.

Cŏnstĭtū'tion, *n.* (कॉन्स्टिट्यू'शन्)— constituent parts, essential nature; bodily predisposition, mental character; form in which a State is organized; system of laws and customs. घटकावयव, प्रकृति; देहस्वभाव; राज्यपद्धति; कायदे आणि चालीरीति यांची पद्धति. *The written constitution*, the document embodying the laws upon which the government of a country is built up. शासनपद्धति, राज्यव्यवस्थेचे कायदे.

Cŏnstĭtū'tional, *a.* (कॉन्स्टि-ट्यू'शनल्)—of or due to one's constitution; in harmony with the constitution of the State. स्वाभाविक, स्वभावसिद्ध, जातीचा, स्वभावाचा; राज्यव्यवस्थानुरूप, सनदशीर. *n.* a walk taken as a healthy exercise. शरीरप्रकृतीकरितां घेतलेला फिरण्याचा व्यायाम. *Constitu'tionalism*, *n.* constitutional government; adherence to constitutional principles. नियमबद्ध राज्यपद्धति; राज्यनियमानुसारित्व. *Constitu'tionalist*, *n.* सनदशीर राज्यपद्धतीचा अनुयायी.

Cŏn'stĭtūtive, *a.* (कॉं'न्-स्टि-ट्यू-टिव्ह्)— constructive, formative; essential; component. नियोजक, कारणभूत; महत्त्वाचा, आवश्यक; अवयवभूत, अंगभूत.

Constrain,' *v. t.* (कन्स्ट्रे'न्)—*to compel; to* hinder by force; to hold in constraint, to confine, to bind. भाग पाडणें; बळजबरीनें अटकाव करणें; ताब्यांत ठेवणें; जखडणें. *Constrained*, *a.* forced, embarrassed. जबरदस्तीनें केलेला, पेंचांत पडलेला.

Constraint', *n.* (कन्स्ट्रे'न्ट्)—compulsion; repression of feeling; embarrassment. बळजबरी; भावनानिग्रह, निग्रह, निर्बंध; पेंच, अडचण.

Constrĭct', *v. t.* (कन्स्ट्रि'क्ट्)—to press together tightly, to compress; to encircle and squeeze. संकोचन करणें, आंग चोरणें, दृबणें, वेढून घट्ट धरणें. *Constric'tive*, *a.* संकोच करणारा. *Constric'tor*, *n.* आंग मारणारा-चोरणारा, संकोचक; (Zool.) अजगर. *Constrictive muscle*, संकोचन स्नायु, संकोचक.

Construct', *v. t.* (कन्स्ट्र'क्ट्)—to fit together, to frame, to build. एकत्र करणें, रचणें, बांधणें. *Construc'tor*, *n.*

Construc'tion, *n.* (कन्स्ट्र'क्शन्)—a thing constructed; a syntactical connexion; an interpretation. रचलेली वस्तु; रचना, बांधणी; वाक्यार्थ, अभिप्राय. *He put a bad construction upon the words*, he gave the words a bad meaning. त्यानें त्या शब्दांचा भलताच (वाईट) अर्थ केला. *Construc'tional*, *a.*

Construc'tive, *a.* (कन्स्ट्र'क्टिव्ह्)—tending to construction; of a positive kind. कार्यप्रवर्तक; विधायक, घटनात्मक.

Cŏn'strue, *v. t.* (कॉं'न्स्ट्रू)—to put interpretation upon, to explain part by part; to put into another language, to translate. जुळणें, अर्थ लावणें; अनुवाद करणें.

Cŏnsubstăn'tial, *a.* (कॉन्सब्स्टॅ'न्शल्)—of one substance, of the same substance. एकद्रव्य, एकरूप, समानद्रव्यक, एकाच तत्त्वाचा. *Consubstantia'tion*, *n.* presence of body and blood of Christ in the Eucharist. युकारिस्टमध्यें येशूख्रिस्ताचें शरीर व रक्त यांचें एकत्र अस्तित्व.

Cŏn'sŭl, *n.* (कॉं'न्सल्)—a Roman official; the State agent in a foreign town. रोमन अधिकारी; परराष्ट्रांतील सरकारचा एजन्ट, परराष्ट्रीय व्यापारी वकील.

Cŏn'sŭlar, *a.* (कॉं'न्-स्यु-लर्)-of a consul, relating to a consul. कॉन्सलचा, कॉन्सलसंबंधीं.

Cŏn'sŭlate, *n.* (कॉं'न्-स्यु-लेट्)—the house and office of a consul. कॉन्सलचा हुद्दा व राहण्याचें ठिकाण, परराष्ट्रीय वकिलात.

Consŭlt', *v. t. & i.* (कन्स'ल्ट्)—to take counsel with, to seek the advice of another; seek information or advice from; to have regard to. सल्ला घेणें; माहिती किंवा मसलत विचारणें; विचार करणें.

Consŭlt'ātion, *n.* (कन्स'ल्टेशन्)—consulting, deliberation; meeting to consult, conference. सल्ला, मसलत; विचार करण्याकरितां सभा.

Consŭl'tātive, *a.* (कन्स'ल्टेटिव्ह्)—deliberative, advisory. सल्ला घेण्याजोगा, मसलतीसंबंधीं, उपदेश करणारा, सल्लामसलत देणारा.

Consūme', *v. t. & i.* (कन्स्यू'म्)—to destroy, to use up, to eat or drink; to waste away; to be exhausted. नाश करणें, खर्चणें, खाणें किंवा पिणें; झिजून जाणें; संपणें.

Consū'mėdly, *adv.* (कन्-स्यू'मिड्-लि)—excessively. फारच, अतिशय.

Cŏnsū'mer, *n.* (कन्-स्यू'मर्)—one who uses an article, user of a product. माल वापरणारा, गिऱ्हाईक.

Consŭmm'ate, *a.* (कन्स'मेट्)—of the highest perfection or completeness. संपूर्ण, पुरा, पूर्ण.

Con'sŭmmāte, *v. t.* (कॉ'न्समेट्)—to bring to completion, to make perfect, to finish; to be the crown of. पूर्ण किंवा पुरता करणें; कळस होणें. *Con'summator*, *n.*

Consŭmmā'tion, *n.* (कॉन्-समे'शन्)—completion (esp. of marriage); desired end, goal; perfection; a perfected thing. सिद्धता, पूर्ति; इष्ट हेतु, साध्य; पूर्णता; पूर्णता पावलेली वस्तु किंवा गोष्ट.

Consŭmp'tion, *n.* (कन्स'म्प्-शन्)—consuming; decay, destruction; a wasting disease (esp. tuberculosis). खाऊन टाकणें, फडशा, नाश; ऱ्हास; क्षयरोग, कफक्षय. [L. *con*, wholly and *sumere*, *sumptus*, to take.]

Consŭmp'tive, *a.* (कन्स'म्प्-टिव्ह्)—tending to or affected with tuberculosis. क्षयी, क्षयरोग झालेला. *n.* one who is suffering from consumption or tuberculosis. क्षयरोगी.

Cŏn'tăct, *n.* (कॉ'न्टॅक्ट्)—touch; connexion, close union or juncture of bodies. स्पर्श, संपर्क; संबंध. *To be in contact with*, लगत किंवा लागून असणें. *To come into contact with*, to come across, to meet. संबंध येणें, भेटणें. [L. *con*, wholly & *tangere*, *tanctum*, to touch.]

Contā'gion, *n.* (कॅन्टे'जन्)—an infection, communication of disease by contact; corrupting influence. स्पर्शजन्य रोग; वाईट वातावरण.

Cŏntā'gious, *a.* (कॉन्टे'जस्)—infectious, catching, communicating a disease by contact, able to be passed on by touch. स्पर्शानें लागणारा, स्पर्शजन्य, संसर्गजन्य, सांसर्गिक.

Contain', *v. t.* (कन्टे'न्)—to have within, to include; to comprise; to restrain. आंत असणें; समावेश होणें; ताब्यांत ठेवणें. *A container*, a vessel used to contain anything. आंत कांहींहि ठेवतां येणारें भांडें.

Contăm'ināte, *v. t.* (कन्टॅ'मिनेट्)—to tarnish, to pollute, to make dirty, to have a bad effect on, to infect. भ्रष्ट करणें, दूषित करणें, बाटविणें.

Contĕmn', *v. t.* (कन्टे'म्)—to feel contempt for; to regard scornfully, to consider bad or worthless. तिरस्कार करणें; तुच्छ मानणें.

Cŏn'templāte, *v. t.* (कॉ'न्टेम्प्लेट्)—to survey steadily with eyes or mind; to have in view, to look at and think about. ध्यान करणें, मनन करणें; मनांत असणें; पाहून विचार करणें. *Con'templator*, *n.* ध्यान करणारा, ध्यानस्थ. [L. *con*, & *templum*, open space for observation.]

Cŏntemplā'tion, *n.* (कॉन्टेम्प्ले'शन्)—meditative, state, continued attention of the mind. ध्यान, समाधि.

Contĕm'plative, *a.* (कॉन्टे'म्-प्लेटिव्ह्)—meditative, thoughtful. विचार करण्याजोगा, विचारपूर्ण, विचारमग्न.

Contĕmporā'nėous, *a.* (कॉन्टेम्पोरे'निअस्)—belonging to or living at the same time. समकालीन, एककालीन.

Contĕm'porarў, *a* (कन्टे'म्पोररि)—belonging to the same time, of equal age. समकालीन. एकाच वेळीं असणारा. *n.* a contemporary person or newspaper. समकालीन मनुष्य किंवा वर्तमानपत्र.

Contĕmpt', *n.* (कन्टे'म्प्ट्)—feeling of scorn; disrespect; disobedience to lawful authority. तिटकारा, तिरस्कार, अपमान; कायद्याची अवज्ञा करणें, आज्ञाभंग. *Contempt of Court*, disobeying a judge. कोर्टाची अवज्ञा.

Contĕmp'tible, *a.* (कन्टे'म्प्टिबल्)—deserving contempt, despicable, mean. तिरस्करणीय, गर्हणीय, तुच्छ, नीच.

Contĕmp'tūous, *a.* (कन्टे'म्प्-च्युअस्)—feeling or showing contempt; apt to despise, scornful; insolent. अनादरयुक्त, तिरस्कार आणण्याजोगा; तिरस्कार करण्याला योग्य; उद्धट. *Contemp'tuously*, *adv.* नाक मुरडून, अनादरानें.

Contĕnd', *v. i. & t.* (कन्टे'न्ड्)—to strive for; to act in emulation; to dispute, to contest; to maintain. प्रयत्न करणें, झगडणें, स्पर्धा करणें; भांडणें, युक्तिवाद करणें; म्हणणें असणें

Contending, being in rivalry. विरुद्ध असणारा, विरोधी.

Content', *a.* (कन्टें'न्ट्)—satisfied with; ready to accept. समाधानी, संतुष्ट; स्वीकारण्याला तयार. *v. t.* to make content; to meet the demands of. समाधान करणें; मागणी पूर्ण करणें. *n.* contentment; the amount that a vessel can contain; (*pl.*) what is contained; the table of contents of a book. समाधान; (जहाजाचें) भरवग, भरताड; (अने०) आंत असलेला जिन्नस, मजकूर; पुस्तकाची अनुक्रमणिका. *To one's heart's content*, आतृप्ति, समाधान होईपर्यंत. *Well content*, well pleased. चांगला संतुष्ट झालेला. *To content oneself*, to be satisfied *with*. समाधान होणें.

Content'ĕd', *a.* (कन्टें'न्टेड्)—enjoying contentment, satisfied, easy in mind. समाधानी, संतुष्ट *Content'edly*, *adv.*; *content'edness*, *n.*

Contĕnt'mĕnt, *n.* (कन्टें'न्ट्-मेन्ट्)—satisfaction of the mind, content, happiness. समाधान, सुख.

Contĕn'tion, *n.* (कन्टें'न्शन्)—a quarrel, a strife; what a disputant contends; opinion. भांडण; विवादिक गोष्ट, विवादवस्तु; मत, म्हणणें.

Contĕn'tious, *a.* (कन्टें'न्शस्)—given to or involving contention, quarrelsome. भांडखोर, तक्रारी, विवादात्मक.

Conterm'inous, *a.* (कन्-टर्'मिनस्)—having a common boundary or end. एकच सीमा असलेला, निकटवर्ती, सीमेवरचा.

Contĕst', *v.t.& i.* (कन्टें'स्ट्)—to impugn, to controvert; to contend or compete for, to struggle to defeat; to disagree with an opinion. दोष दाखवणें, वादविवाद करणें; भांडणें, चढाओढ करणें; विरुद्ध मत असणें. *Contes'table*, *a.* वाद करण्याजोगा, वादास्पद. *Contest'ant*, *n.* one who contests. स्पर्धा करणारा, निवडणुकीस उभा असलेला, प्रतिस्पर्धी. *To contest an election*, निवडणूक लढविणें.

Cŏn'tĕst, *n.* (कॉ'न्टेस्ट्)—contending, a struggle, a strife; controversy; a competition. भांडण; वादविवाद; चढाओढ.

Cŏn'tĕxt, *n.* (कॉ'न्टेक्स्ट्)—what precedes and follows word or passage of a discourse, the place in a book or speech in which a particular word or passage is found. वाक्यसंबंध, मागचा पुढचा संदर्भ. *Contex'tual*, *a.* संदर्भाचा, संदर्भाविषयीं.

Cŏntigū'ĭtў, *n.* (कॉन्टिग्यू'इटि)—contact; nearness, proximity. संबंध; सान्निध्य, संलग्नता.

Contĭg'ūous, *a.* (कन्टि'ग्यू-अस्)—adjoining, near, touching, next to, neighbouring. जोडून असलेला, पुढचा; जवळचा.

Cŏn'tĭnĕnce, *n.* (कॉ'न्टिनेन्स्)—restraint of the desires and passions, chastity. संयमन, ब्रह्मचर्य.

Cŏn'tĭnĕnt, *a.* (कॉ'न्टिनेन्ट्)—1 self-restraining. संयमी, आत्मसंयमन करणारा. 2. *n.* the mainland of Europe; any of the main divisions of the earth. इंग्लंड, स्कॉटलंड व आयर्लंड यांशिवाय युरोप खंडांतील सर्व देश; खंड.

Contĭnĕn'tal, *a.* (कॉन्टिनें'न्टल्)—of a continent. खंडाचा, खंडाविषयीं.

Contĭn'gencў, *n.* (कन्टि'न्जान्सि)—being contingent; contingent event. दैवयोगानें होणारा; आकस्मिक गोष्ट.

Contĭn'gent, *a.* (कन्टि'न्जन्ट्)—that may happen, uncertain; conditional. कदाचित घडून येणारा; अट असलेला, सापेक्ष. *n.* a quota of draft of troops. फौजेची तुकडी.

Contĭn'ūal, *a.* (कन्टि'न्यु-अल्)—occurring on every occasion; seeming incessant. वारंवार घडणारा, निरंतर; सतत दिसणारा.

Contĭn'ūance, *n.* (कन्टि'न्युअन्स्)—continuing in existence or operation; duration. चालू ठेवणें, टिकणें; चालू असण्याचा काळ. *Of long continuance*, lasting long. पुष्कळ काळ टिकणारा.

Continuā'tion, *n.* (कन्टिन्युए'शन्)—going on with or resuming something; a thing that continues something else. पुढें चालू ठेवणें, विस्तार, संतति, वृद्धि; चालू ठेवणारी गोष्ट, खंड, परिशिष्ट.

Contĭn'ūe, *v. t. & i.* (कन्टि'न्यू)—to go on with without stopping; to remain in existence; to take up again, to go on again after a pause. पुढें चालवणें; अस्तित्वांत असणें; पुन्हा हातांत घेणें.

Contĭnū'ĭtў, *n.* (कन्टिन्यू'इटि)—uniterrupted connexion, close union of parts. अखंडता, सातत्य.

Contĭn'ūous, *n.* (कन्टि'न्यूअस्)—connected without break, uninterrupted. निरंतर, अविरत, अखंड.

Contŏrt', *v. t.* (कन्टॉ'र्ट्)—to twist or force out of normal shape, to bend out of natural shape. मुरगळणें, जोरानें पिळणें. *Contor'tion*, *n.* twisting; twisted shape (esp. of the face or body). पिळवटणें, वाकडे तिकडे करणें; आळेपिळे, अळोकेपिळोके.

Contor'tionist, *n.* (कन्टॉ'र्-शनिस्ट्)—one who contorts his or her body into any strange shape to amuse people, an acrobat. शरीराला वाटेल तसें वाकडें तिकडें वळविणारा, गोलांटी-कोलांटी-उड्या मारणारा, कोल्हाटी, नाडेभोरपी, डोंबारी.

Cŏn'tour, *n.* (कॉ'न्टुअर्)—the outline (of a figure, an object, coast, &c.). आकृति, वस्तु, किनारा वगैरेंची रूपरेषा, बाह्य आराखडा.

Contra-, *prep.* (कॉन्ट्रा)—against, opposite. विरुद्ध.

Cŏn'trabănd, *n.* (कॉं'न्ट्रबॅन्ड्)—prohibited traffic ; smuggled goods ; unlawful trade in goods smuggled into a country. कायद्यानें ज्याचा व्यापार मना केला आहे असा (जिन्नस) ; जकात चुकवून आणलेला माल ; बेकायदेशीर रीतीनें आणलेल्या मालाचा व्यापार. *Contraban'dist*, *n.* a smuggler. मना केलेला माल देशांत आणणारा, गैरकायदेशीर व्यापार करणारा. *Contraband of war*, anything forfidden to be supplied by the neutrals at the time of war. युद्धाचे वेळीं मना केलेला माल.

Contracĕp'tive, *a.* & *n.* (कॉन्ट्रसे'प्टिव्ह्)—preventive of uterine conception. गर्भधारणाप्रतिबंधक (उपाय). *Contracep'tion*, *n.* use of contraceptives. गर्भधारणाप्रतिबंधक उपाय-योजना, उपाय योजणें.

Cŏn'tract, *n.* (कॉं'न्ट्रॅक्ट्)—business agreement, bargain ; a compact. करार, सौदा ; करारनामा.

Contract', *v. i.* & *t.* (कन्ट्रॅ'क्ट्)—to make a contract ; to catch (cold, &c.) ; to draw together ; to make or become smaller ; to shorten. करार करणें ; (पडसें वगैरे) येणें ; एकत्र आंखडून घेणें ; लहान करणें किंवा होणें ; कमी करणें. *To contract oneself out of*, *To contract out of*, *To contract out*, to enter into a legal engagement for exemption or exclusion from provisions of law, etc. कायद्याच्या कचाट्याच्या बाहेर राहाण्याकरितां विशेष करार करणें. *Contra'ctual*, *a.* of a contract. कंत्राटाचा, कराराचा.

Contrăc'tile, *a.* (कन्ट्रॅ'क्टाइल्)—capable of or producing contraction. संकोचन करणारा, संकोचनक्षम.

Contrăc'tion, *n.* (कॉन्ट्रॅ'क्शन्)—shrinking ; diminution ; word-shortening or contracted word. आंखडणें ; संकोच, आकुंचन ; शब्दसंक्षेप, संक्षिप्त शब्द.

Contrăc'tor, *n.* (कॉन्ट्रॅ'क्टर्)—the maker of a contract ; a builder (of buildings, etc.). करार करणारा, मक्तेदार ; (इमारती वगैरे) बांधणारा, कंत्राटदार.

Cŏntradict', *v. t.* & *i.* (कॉन्ट्रॅडि'क्ट्) to deny ; to say the opposite, to oppose verbally ; to be at variance with. नाकबूल करणें ; उलट बोलणें, खंडन करणें ; विरुद्ध असणें.

Cŏntradic'tion, *n.* (कॉन्ट्रॅडि'क्शन्)—a verbal denial ; direct opposition ; inconsistency, contrariety. तोंडी नाकबुली ; प्रत्यक्ष विरोध ; विसंगतता, विपर्यास. *Contradiction in terms*, plainly self-contradictory statement or words. अगदीं परस्परविरोधी वचन, विसंगत बोलणें, वदतोव्याघात.

Cŏntradic'tory, *a.* (कॉन्ट्रॅडि'क्टरि)— mutually opposed or inconsistent ; conflicting. विरोध करणारा ; विरुद्ध, विसंगत.

Cŏntradistinc'tion, *n.* (कॉन्ट्रडिस्टिं'क्शन्)—distinction by contrast, distinction by opposite qualities. विरुद्धगुणजन्य भेद, विरोध ; व्यतिरेक.

Contradĭsting'uish, *v. t.* (कॉन्ट्रडिस्टिं'ग्विश्)— to distinguish by opposite qualities ; to set in sharp contrast. विरुद्ध गुणांवरून भेद पाहणें ; अत्यंत विरोध दाखविणें.

Contrăl'to, *n.* (कन्ट्रॅ'ल्टो)—the deep singing voice of a woman. स्त्रीचा खोल गाण्याचा आवाज.

Contrăp'tion, *n.* (कन्ट्रॅ'प्शन्)— any new and strange-looking machine or instrument. एखादें नवीन चमत्कारिक दिसणारें यंत्र किंवा हत्यार.

Cŏntrari'ety, *n.* (कॉन्ट्रा'इटि)— contrariness, opposition, disagreement ; inconsistency. विरुद्धता, विरोध ; असंबद्धता.

Cŏn'trariwīse, *adv.* (कॉं'न्ट्रिवाइझ्)—on the other hand ; in the opposite way. उलट, उलट पक्षीं.

Cŏn'trary̆, *a.* (कॉं'न्ट्रि)—opposed in nature or tendency or direction, unfavourable. विपरीत, विरुद्ध, उलटा. *A contrary* (कन्ट्रे'अरि) *person*, a person who always does the opposite of what is wanted. जें करायला पाहिजे त्याच्या नेहमीं विरुद्ध करणारा इसम. *Con'trarily*, *adv.* उलट, विपरीत भावानें, विरुद्ध. *To the contrary*, to the opposite effect. विरुद्ध, उलट.

Cŏn'trăst, *n.* (कॉं'न्ट्रास्ट्)—the difference between things as shown by placing them against each other ; a thing in marked contrast to another. गुणवैधर्म्य, फरक, अंतर ; एका वस्तूपेक्षां दुसरी अत्यंत विरुद्ध वस्तु किंवा गोष्ट.

Contrăst', *v. t.* & *i.* (कन्ट्रा'स्ट्)—to put side by side so as to show the difference, to be in contrast. परस्परांचें गुणवैधर्म्य असणें, विरोध दाखविणें.

Cŏntravēne', *v. t.* (कॉन्ट्र-व्हीं'न्)—to infringe, to conflict with, to go against. (कायदा) तोडणें, उल्लंघणें, आडवा येणें, विरुद्ध जाणें.

Cŏntravĕn'tion, *n.* (कॉन्ट्रॅव्हे'न्शन्)— opposition ; infringement. विरोध, अडथळा ; उल्लंघन. *In contravention of*, violating. मोडून, उल्लंघन करून.

Cŏn'tretemps, *n.* (कॉं'ट्र-टॉं)—an unexpected and unfortunate event, an unlucky accident; अनपेक्षित दुर्दैवी प्रसंग, आकस्मिक बाधा.

Contrib'ūte, *v. t.* & *i.* (कन्ट्रि'ब्यूट्)—to give to a common stock, to bear a part. वर्गणी देणें, हातभार लावणें. *To contribute to a newspaper.*

to write something for a newspaper. वर्तमानपत्राकरितां मजकूर-लेख-लिहिणें. *To contribute to*, to help to bring about. घडवून आणण्याला मदत करणें, साह्यकारी होणें.

Cŏntrĭbū'tion, *n.* (कॉन्ट्रि-ब्यू'शन्)—payment made in aid of a common fund or collection ; a thing or help or a literary article contributed. वर्गणी ; साहाय्य, मदत, (वर्तमानपत्राकरितां पाठविलेला) लेख.

Contrĭb'ūtor, *n* (कन्ट्रि'ब्यूटर्)—one that bears a part ; a subscriber ; a writer (to a newspaper, &c.). साहाय्यकर्ता ; वर्गणीदार ; वर्तमानपत्रांत वगैरे लेख लिहिणारा.

Contrĭb'ūtory̆, *a.* (कन्ट्रि'ब्युटरि)—that contributes ; contributing to some purpose or fund. भर घालणारा, सहकारी ; भरीचा, सहाय ; वर्गणी देणारा.

Cŏn'trīte, *a.* (कॉ'न्ट्राइट्)—sorrowing for sin, penitent, repentant. पश्चात्तापी, अनुतापी.

Cŏntrĭ'tion, *n.* (कॉन्ट्रि'शन्)—sorrow for sin. पश्चात्ताप, चुटपूट.

Contrīv'ance, *n.* (कन्ट्रा'इ-व्हन्स्)— contriving, a plan, a scheme, a machination ; a contrived article or appliance. युक्ति, इलाज, शक्कल, क्लृप्ति ; तयार केलेली वस्तु किंवा साहित्य.

Contrīve', *v. t. & i.* (कन्ट्रा'इव्ह्)— to devise, to think out ; to plan, to manage. योजणें, विचार करणें ; युक्ति योजणें, तजवीज करणें. *Contri'ver*, *n.* युक्ति योजणारा, कल्पक, योजक.

Contrōl', *n.* (कन्ट्रो'ल्)— restraint ; means of checking the results of a book-keeping or experiment ; safeguarding ; supervision. ताबा ; तपासण्याचें साधन ; आवर, आळा ; सत्ता, अधिकार. *v. t.* to have control of ; to govern ; to restrain. ताबा असणें ; अधिकार चालवणें ; आवरणें.

Contrō'ller, *n.* (कन्ट्रो'लर्)—an officer controlling expenditure ; one that governs. नियामक, नियंता, खर्चावर ताबा ठेवणारा अधिकारी ; सत्ता चालविणारा.

Cŏntrover'sial, *a.* (कॉन्ट्रव्ह'र्शल्)—of controversy ; open to controversy, disputable. वादविवादासंबंधीं ; वादग्रस्त.

Cŏn'troversy̆, *n.* (कॉ'न्ट्र-व्हर्सि)—opposition in debate or dispute ; disputation, esp. argument conducted in the press. वादविवाद, शंका व समाधान. *Without or beyond controversy*, unquestionably. निःसंशय.

Cŏntrovert', *v. t.* (कॉन्ट्रव्ह'र्ट्)—to show that an opinion is not correct, to call in question ; to dispute the truth of. वाद उपस्थित करणें ; च्या सत्यतेबद्दल- खरेपणाबद्दल- भांडणें.

Cŏn'tūmā'cious, *a.* (कॉ'न्ट्युमे'शस्)—insubordinate, disobedient (esp. to the order of a court). शिरजोर, हट्टखोर, आग्रही ; कोर्टाचा हुकूम न मानणारा.

Cŏn'tūmacy̆, *n.* (कॉ'न्ट्यू-मसि)—stubborn disobedience. जाणूनबुजून आज्ञाभंग करणें, अवज्ञा, दुराग्रह.

Cŏn'tŭmely̆, *n.* (कॉ'न्ट्यू-मिलि)–insulting language or treatment, disgrace. अवज्ञा, अपमान, अवहेलना, विटंबना.

Contūse', *v. t.* (कन्ट्यू'झ्)—to bruise, to injure the body by a blow without breaking the skin. चेंचणें, (अंग) ठेंचणें.

Contū'sion, *n.* (कन्ट्यू'झन्)—bruise. ठेंचणें, चेंचून झालेली दुखापत.

Conŭn'drum, *n.* (कनं'ड्रम्)—a riddle. कोडें, उखाणा, कूट.

Cŏnvalĕsce', *v. i.* (कॉन्व्हॅले'स्)—to be convalescent, to recover health after sickness, to get better by resting after an illness. हिंडता फिरता किंवा रोगमुक्त होणें.

Cŏnvalĕs'cence, *n.* (कॉन्व्हॅले'सन्स्)—convalescent state, recovery from sickness. हिंडतेफिरतेपणा, रोगमुक्तता.

Cŏnvalĕs'cent, *a.* (कॉन्व्हॅले'सन्ट्)–recovering from sickness. दुखण्यांतून उठलेला. *n.* a person recovering from illness. दुखण्यांतून उठलेला मनुष्य.

Convēne', *v. t. & i.* (कन्व्ही'न्)— to call together, to summon ; to hold a meeting. बोलावणें ; सभा भरवणें.

Convē'nĭence, *n.* (कन्व्ही'नि-अन्स्)—what suits one ; a useful appliance ; (*pl.*) comforts. अनुकूलता, योग्यपणा ; सोय ; उपयुक्तता ; (अने०) सुखसोयी. *At your convenience*, in a way or at a time convenient to you. आपल्या सोयीप्रमाणें, यथावकाश. *To make a convenience of one*, to abuse one's good nature. एखाद्याच्या सुस्वभावाचा नालस्ती करणें.

Convē'nĭent, *a.* (कन्व्ही'नियन्ट्)—fit, suitable ; well-adapted ; commodious, not troublesome, opportune. योग्य ; उपयुक्त, सोइस्कर ; अगदीं सोईवार.

Cŏn'vĕnt, *n.* (कॉ'न्व्हेन्ट्)–a religious community, esp. of women ; the building occupied by a religious community of women. मठ, आश्रम ; मठगृह.

Convĕn'tĭcle, *n.* (कन्व्हे'न्टिक्ल्)—a meeting or meeting-house used for prayer to God (esp. by the dissenters, i. e. those who are not members of the Church of England). डिसेंटर लोकांचें सभागृह किंवा प्रार्थनागृह.

Convĕn'tion, *n.* (कन्व्हे'न्शन्)—convening; an assembly for transaction of business; an agreement; a custom. बोलावणें; सभा; करार; संकेत, पद्धति, रूढि.

Convĕn'tional, *a.* (कन्व्हे'न्शनल्)—depending on custom, not natural, not spontaneous, resting on mere usage. रूढिबद्ध, जनरूढीचा, शिष्टाचाराचा. *Conven'tionality*, *n.* सांकेतिकता, रूढिबद्धता. *Conven'tionalize*, *v.t.* रूढीनें ठरविणें, संकेतसिद्ध नियमानें ठरविणें.

Convĕn'tŭal, *a.* (कन्व्हे'न्चुअल्)—of convents. मठांचा, मठांसंबंधीं.

Converge', *v. i. & t.* (कन्व्ह'र्ज्)—to move with or show gradual approximation, to come together at one point. हळू हळू अगदीं जवळ येणें, एकाच केंद्राकडे येणें, एककेंद्राभिमुख होणें. *Conver'gent*, *a.* केंद्राभिमुख. *Conver'gence*, *n.* एककेंद्राभिमुखता.

Convers'able, *a.* (कॉन्व्ह'र्सेबल्)—fond of or pleasant in conversation; fit for social intercourse. संभाषणोत्सुक, संभाषण करण्याजोगा, समाजाला-संगतीला-लायक.

Cŏn'versant, *a.* (कॉ'न्व्हर्सन्ट्)—well acquainted with a subject; familiar. प्रवीण, निष्णात; परिचित. *To be conversant with*, to have the knowledge of. च्या परिचय असणें, वहिवाटणें.

Cŏnversā'tion, *n.* (कॉन्व्हर्से'शन्)—familiar discourse; intercourse. संभाषण; बोलणें चालणें. *Conversa'tional*, *a.* of conversation; colloquial. संभाषणासंबंधीं; बोलण्यांतच वापरलेला, बोलीचा. *Conversa'tionalist*, *n.* a practised talker. चांगला बोलणारा, संभाषणपटु.

Cŏnversazĭō'nĕ, *n.* (कॉन्व्हर्सॅट्सि-ओ'नि)—a social meeting of scientific or artistic kind. शास्त्रीय किंवा कलाविषयक विषयांवर बोलण्याकरितां भरलेली सभा. विद्वत्संभाषणसभा.

Converse', *v. i.* (कन्व्ह'र्स्)—to hold conversation, to talk together in a friendly way, to commune. संभाषण करणें, एकमेकांशीं बोलणें.

Cŏn'verse, *n.* (कॉ'न्व्हर्स्)—a familiar talk, discourse; communings. गप्पागोष्टी करणें; संभाषण, बोलणें.

Cŏn'verse, *a.* (कॉ'न्व्हर्स्)—turned round or upside down; put the other way. उलटा; व्यस्त. उलट, प्रतिलोम. *n.* a converse statement or position. विरुद्ध वचन, विरुद्ध स्थिति.

Conver'sion, *n.* (कन्व्ह'र्शन्)—a change of opinions or conduct, a change from one state into another. एका स्थितींतून दुसऱ्या स्थितींतील बदल, रूपान्तर, धर्मान्तर.

Convert', *v. t.* (कन्व्ह'र्ट्)—to change into another substance; to bring over to another opinion; to turn to godliness. रूप बदलणें; मत बदलवणें, मतांतर-धर्मांतर-करविणें; ईश्वरभक्तीकडे मन वळवणें. *Conver'tible*, *a.* capable of conversion, that may be converted. रूपान्तर करण्याजोगा, परिवर्तनीय. [L. *con*, & *vertere*, *versum*, to turn.]

Cŏn'vert, *n.* (कॉ'न्व्हर्ट्)—a person converted, one who has changed his religion. परधर्मांत आलेला मनुष्य.

Cŏn'vĕx, *a.* (कॉ'न्व्हेक्स्)—of exterior curvature. गोलबाह्य, बहिर्गोल, कूर्मपृष्ठाकार, (opposed to *Concave*). *Convex'ity*, *n.* convex surface. बाह्यगोल पृष्ठभाग, बहिर्गोल पृष्ठभाग.

Convey', *v. t.* (कन्व्हे')—to transport; to transmit; to transfer, to carry, to take from one place to another; to make known; to seem to mean; to make over, to give land or house to another by a written paper according to law. नेणें; पाठवणें, पार जाऊं देणें; स्थलांतर करणें; जाहीर करणें; अर्थ ध्वनित करणें; हवालीं करणें; हस्तगत करणें.

Convey'ance, *n.* (कन्व्हे'अन्स्)—a carriage; deed conveying property. वाहन, गाडी; वेचनपत्र.

Convĭct', *v. t.* (कन्व्हि'क्ट्)—to prove guilty, to prove wrong-doing in a court of law. दोषी ठरविणें, अपराध शाबीत करणें, पुराव्यानें सिद्ध करणें.

Cŏn'vict, *n.* (कॉ'न्व्हिक्ट्)—a person proved or found guilty, a sentenced criminal. शिक्षा झालेला गुन्हेगार.

Convĭc'tion, *n.* (कन्व्हि'क्शन्)—convicting; verdict of guilty; firm belief, what one believes to be true or right. दोषी ठरवणें; दोषी असल्याबद्दल निवाडा किंवा निकाल; ठाम किंवा निश्चित मत, खात्री, विश्वास, प्रत्यय.

Convĭnce', *v. t.* (कन्व्हि'न्स्)—to bring to a belief, to cause to believe; to produce conviction, to satisfy by showing proof. विश्वास पटवणें; खात्री करणें.

Convĭv'ĭal, *a.* (कन्व्हि'व्हि-अल्)—of or for a feast; festive, merry, being happy together. मेजवानीचा, मेजवानीकरितां; सणाचा, आनंदाचा.

Convĭvĭăl'ĭtў, *n.* (कन्व्हि-व्हिॲ'लिटि)—a convivial temper, good humour, mirth. आनंदी स्वभाव, आनंद, चैनीपणा.

Cŏnvōcā'tion, *n.* (कॉन्व्हो-के'शन्)—convoking, the act of calling together a meeting, a meeting of the university (esp. for conferring degrees). एकत्र बोलावणें, युनिव्हर्सिटीचा पदवीदानसमारंभ.

Convōke', *v. t.* (कन्व्हो'क्)—to call together; to summon to an assembly. एके ठिकाणीं बोलावणें; सभेला बोलावणें.

Cŏn'volute, Cŏn'voluted, *aa.* (कॉ'न्व्हलूट्, कॉ'न्व्हलूटिड्)-rolled up, rolled together, coiled. गुंडाळलेला, गुरळी केलेला.

Cŏnvŏlu'tion, *n.* (कॉन्व्हॉलू'शन्)—coiled state; one turn of a coil or spiral, fold, twist. गुंडाळणें; गुंडाळें. वेटोळें, पळी. पीळ. (अवयवाची) वळकटी.

Convol'vūlus, *n.* (कन्व्हॉ'ल्व्ह्युलस्)— kinds of twining plant. तदतद नांवाची वनस्पति. वेल.

Convŏy', *v. t.* (कन्व्हॉ'य्)—to escort (a ship, etc.) for defence; to conduct or escort. सुरक्षिततेकरितां बरोबर देणें: बरोबर जाऊन सुखरूप पोहोंचता करणें.

Cŏn'voy, *n.* (कॉ'न्व्हॉय्)— an escort, convoyed party, a member of soldiers going with supply-carts as a guard. मार्गदर्शक. पहारे संरक्षणाकरितां दिलेले लोक.

Convŭlse', *v. t.* (कन्व्ह'ल्स्)—to affect with convulsion or convulsions. आंगाविळे देणें. फेपरें येणें.

Convŭl'sion, *n.* (कन्व्ह'ल्शन्)—shaking of the limbs or the whole body caused by illness, bodily seizure with muscular spasms (*usu. pl.* and esp. as a disorder of children); any irregular or violent motion; (*pl.*) uncontrollable laughter. आंकडी, फेंपऱ्याचे हांसडे किंवा आळेपिळे: उलथापालथ. क्षोभ; (अने०) अनावर हास्य.

Cō'nȳ, Cō'ney, *n.* (को'नि)—a wild rabbit. ससा. रानससा. सशासारखें रानटी जनावर.

Cōō, *n.* (कू)—a soft murmuring sound as of dove. घुमणें, घूंघूं करणें. *v. i. & t.* to talk amorously or softly, act in a loving manner. प्रेमानें किंवा अगदीं हळू बोलणें. *To bill and coo*, to converse amorously, to say cooingly, to make love. प्रेमानें गुलूगुलू बोलणें. प्रेम दाखविणें.

Cŏŏk, *v. t. & i.* (कुक्)—to prepare food by heat; to cook food; to undergo cooking; to falsify (accounts, &c.). अन्न शिजवणें; स्वयंपाक तयार करणें; शिजणें; हिशेब खोटा बनविणें. *n.* one who does cooking. स्वयंपाकी, आचारी. *To cook accounts*, to make incorrect accounts of money look correct. बनावट हिशेब तयार करणें. *I shall cook his goose*, I shall do for him, I shall ruin his plans. त्याचे बेत मी हाणून पाडीन.

Cŏŏk'er, *n.* (कु'कर्)—a cooking apparatus. स्वयंपाक तयार करण्याचें यंत्र. कुकर.

Cŏŏk'erȳ, *n.* (कु'करि)—the art of cooking. स्वयंपाकविद्या, पाकशास्त्र.

Cŏŏk'ie, Cŏŏk'ȳ, (कु'कि)—a thin, dry, sweet cake. एक जातीची पातळ, सुखी, गोड पोळी.

Cōōl, *a.* (कूल्)—cold to a slight degree, unperturbed, self-possessed; lacking zeal or cordiality. थोडासा शीतल, थंड: शांत, स्थिरवृत्ति, न रागावणारा; उदास, प्रेमरहित. *v. t. & i.* to make or become cool; to lose ardour or zeal. शांत करणें, थंड होणें; उत्साह कमी होणें.

Cōōl'er, *n.* (कू'लर्)—a vessel for cooling, a vessel in which a thing is cooled. थंड करण्याचें भांडें, शीतक.

Cōōl'ie, *n.* (कू'लि)—a hired labourer. हेलकरी, मजूर, हमाल.

Coomb, Combe, *n.* (कूम्)—a hollow on the flank of a hill, a steep valley. खोरें, उभी दरी.

Cōōn, *n.* (कून्)—a racoon, a bushy-tailed animal. एक जातीचा मांसभक्षक प्राणी. *Coon songs*, songs of African slaves in America. अमेरिकेंतील आफ्रिकन गुलामांचीं गाणीं.

Cōōp, *n.* (कूप्)—a cage or pen for confining fowls. खुराडें, (पक्ष्यांचा) पिंजरा. *v. t.* to put in coop; to shut up in narrow compass. पिंजऱ्यांत घालून ठेवणें; अगदीं थोड्या जागेंत कोंडून ठेवणें.

Cōōp'er, *n.* (कू'पर्)—a maker or repairer of casks for dry goods or liquids. पिंपें तयार किंवा दुरुस्त करणारा. *Coop'erage*, *n.* cooper's work or charges. पिंपें तयार करणें, पिंपांची किंमत.

Cō-ŏp'erāte, *v. i.* (को-ऑ'परेट्)—to make joint efforts, to help one another in a common aim. परस्पर मदतीनें कार्य करणें, सहकार्य करणें. *Co-op'erative*, *a.* working together. मिळून काम करणारा. सहकारी. *Co-op'erator*, *n.* साह्यकारी, मदतनीस.

Cō-ŏperā'tion, *n.* (को-ऑप-रे'शन्)—production or distribution by co-operators who share the profits, working together to the same ends. सहकार, सहकारिता, परस्परसाहाय्य.

Cō-ŏpt', *v. t.* (को-ऑ'प्ट्)—to elect into a body by the votes of existing members. आपल्यापैकींच एखाद्याची नेमणूक करणें, निवडून घेणें. *Co-opta'tion*, *n.*; *Co-opta'tive*, *a.*

Cō-ōrd'inate, *a.* (को-ऑ'र्डिनेट्)—equal in status. एकपदवीचा, समान दर्जाचा. *n.* (*pl.*) set of distances from, known points or lines or planes sufficing in combination to fix thing's position. कोणत्याहि बिंदूचें स्थान निश्चित करण्यास लागणाऱ्या दोन रेषा; सापेक्ष रेषा. *v. t.* to cause to work together for the same purpose.

एकाच हेतूकरितां सहकार्य करावयास लावणें. *Co-ordina'tion*, *n.* सहवर्गीकरण, परस्परानुकूल कार्य, सहकारिता, सहकार्य. *Co-ordina'tor*, *n.*; *Co-ordi'native*, *a.*

Coot, *n.* (कूट्)—kinds of water-bird. पाणबुड्या पक्षी, पाणकोंबडा.

Cŏp, *v. t.* (कॉप्)—to catch. पकडणें. *Cop it*, catch it, receive punishment. धर, शिक्षा घे.

Cō'pal, *n.* (कोपल्)—the hard juice of certain trees, kinds of resin used for varnish. चंद्रस.

Copärt'ner, *n.* (को-पा'र्ट्नर्)—a joint partner with others in some business. पातीदार, भागीदार.

Copärt'nership, *n.* (को-पा'र्ट्नर्-शिप्)—association with others in something. भागी, भागीदारी, पाती. (Also, Copar'tnery, *n.*)

Cōpe, *n.* (कोप्)—a vestment like long cloak; (*fig.*) the vault (of heaven); coping (of a wall, &c.). लांब झगा; (आकाशाची) कमान; भिंतीचा उतरता भाग. *v. t.* to provide with a coping. वरवंडी- वरंडी- घालणें.

Cōpe, *v. i.* (कोप्)—to contend with; to oppose; to keep level with (task, &c.). झुंजणें; बरोबरी करणें; टक्कर देणें. *To cope over*, to project like a coping. वरवंडीसारखा पुढें येणें. *To cope with*, to deal successfully with a difficulty. झगडून यशस्वी होणें, तोंड देणें.

Cō'ping, *n.* (को'पिंग्)—the top course of masonry. भिंतीचा अगदीं वरचा निमुळता भाग, वरवंडी. *Coping-stone*, *n.* the stone used in coping; (fig.) consummation. वरवंडीकरितां घातलेला दगड; पूर्णता, पूर्ति.

Cō'pious, *a.* (को'पिअस्)—plentiful; abounding in words; exuberant. पुष्कळ, विपुल; शब्दमय; अतिशय.

Cŏpp'er, *n.* (कॉ'पर्)—metal of brownish-pink colour, bronze coin; washing cauldron; (attrib.) made of copper. तांबें; तांब्याचें नाणें; धुण्याची चालडी; तांब्याचा, ताम्र. *v. t.* to cover with copper. तांब्यानें मढविणें.

Cŏpp'er-plāte, *n.* (कॉ'पर्-प्लेट्)—copper plate for engraving or etching; print taken from the plate. तांब्याचा पत्रा; तांब्याचा शिक्का, ताम्रपट, ताम्रफलक.

Cŏpp'ersmith, *n.* (कॉ'पर्-स्मिथ्)— artificer in copper, one who works in copper. तांबट.

Cŏpp'eras, *n.* (कॉ'परस्)—green vitriol. हिराकस.

Cŏpp'ice, Cŏpse, *nn.* (कॉ'पिस्, कॉप्स्)—wood of small trees grown for periodical cutting. झाडी, झुडुप.

Cŏp'ra, *n.* (कॉ'प्रा)— dried coconut kernels. सुकें खोबरें.

Cŏp'ūlă, *n.* (कॉ'प्युला)-the part of the verb *to be* connecting the subject with the predicate. उद्देश्य आणि विधेय यांस जोडणारा शब्द.

Cŏp'ūlāte, *v. i.* (कॉ'प्युलेट्)—to unite sexually. मैथुनसंबंध ठेवणें.

Copūlā'tion, *n.* (कॉप्युले'शन्)— sexual union; grammatical or logical connection. मैथुन, संभोग; संयोग.

Cŏp'ūlātive, *a.* (कॉ'प्यू-ले-टिव्ह्)—serving as copula, serving to connect, connecting predicate with subject; of sexual union. उद्देश्य व विधेय यांस जोडणारा; मैथुनसंबंधीचा.

Cŏ'pỹ, *n.* (कॉ'पि)—reproduction of something; pattern of handwriting; matter to be set up in type; school exercise for translation. नक्कल; हस्ताक्षराचा नमुना; (छापखान्यांत देण्याची) मूळप्रत, हस्तलिखित; पुस्ती, किता. *v. t. & i.* to make a copy of; to imitate; to crib from a neighbour in an examination. जसेंच्या तसें उतरून घेणें; अनुकरण करणें; परीक्षेच्या वेळीं चोरून नक्कल करणें.

Cŏ'pỹ-book, *n.* (कॉ'पि-बुक्)—a book of handwriting exercise. कित्त्यांची वही, कित्तेवही, खरडेवही.

Cŏp'ỹhōld, *n.* (कॉ'पि-होल्ड्)—the land tenure resting on custom of a manor. जमिनीचा पट्टा, सनद. *a.* held by the land tenure. पट्ट्यानें घेतलेली. *Cop'yholder*, *n.* पट्टेदारी जमिनीचा मालक.

Cŏp'ỹist, *n.* (कॉ'पि-इस्ट्)—an imitator, a transcriber. नक्कल करणारा, तयार मत करणारा लेखक.

Cŏpỹ'right, *n.* (कॉपि'-राइट्)—the exclusive right to print and sell copies of a work. ग्रंथावरचा मालकी हक्क. *v. t.* to secure copyrights of. ग्रंथावरील हक्क संपादन करणें.

Coquĕt', *v. i.* (कॉके'ट्)—to play the coquette, to flirt; to dally or trifle. नखरा करणें; विषयक्रीडा करणें.

Cō'quetrỹ, *n.* (को'किट्रि)—coquetting, coquettish appearance. नखरा, विशेष तऱ्हेचे हावभाव.

Cŏquĕtte', *n.* (कॉ-के'ट्)—a woman who plays with men's affections. नखरेबाज चंचल स्त्री.

Cŏquĕtt'ish, *a.* (कॉके'टिश्)—artfully enticing or consciously pretty. कृत्रिम तऱ्हेनें चित्त वेधणारी, नखरेबाज.

Cŏ'racle, *n.* (कॉ'रॅकल्)—a boat made of a large basket covered with leather (used on Welsh and Irish lakes & rivers). चामड्यानें मढविलेली मोठ्या टोपलीसारखी केलेली होडी, टोकार.

Cŏ'ral, *n.* (कॉ'रल्)—a hard stone-like material made by insects in the ocean; toy of polished coral for children cutting teeth; (*attrib.*) red as coral, red-brown. प्रवाळ, पोवळें; दांत येणाऱ्या मुलांकरितां एक पोंवळ्याचें खेळणें, चोखणें; पोंवळ्यासारखें लाल. *Coral-island*, an island formed by the growth of coral. प्रवाळाचें बेट, प्रवाळद्वीप.

Cŏ'ralline, *a.* (कॉ'रलाइन्)—of coral, like coral, coral-red. पोंवळ्याचें, पोंवळ्यासारखें, पोंवळ्यासारखें लाल.

Corb'el, *n.* (कॉ'र्बल्)-a stone or timber projection from a wall. भिंतींत बसविलेले दगडी किंवा लांकडी घोडे.

Cŏr'bie, *n.* (कॉ'र्बि)— a raven, a carrion crow. डोमकावळा.

Cŏrd, *n.* (कॉर्ड्)—a rope of small diameter or thick string; a measure for wood. दोरी, दोरखंड; लांकडाचें एक माप. *v. t.* to secure with a cord; to make (wood) into cords. दोरीनें बांधणें; माप घेण्याकरितां लांकडाची रास करणें. *Corded cloth*, cloth having raised lines on it like strings. दोऱ्याचें कापड, दोरवा.

Cŏrd'age, *n.* (कॉ'र्डिज्)—a number of cords or ropes. दोरखंडें.

Cŏrd'ial, *a.* (कॉ'र्डिअल्)—stimulating; heartfelt, sincere, hearty, warm. पुष्टिकारक; मनापासूनचा, सप्रेम, मनःपूर्वक, प्रेमाचा. *n.* a pleasant drink; liquor; heartening influence. पुष्टिकारक पेय; कडक दारू; उत्तेजक बल,-वजन,-महत्त्व.

Cŏrdĭăl'ĭtȳ, *n.* (कॉर्डिॲ'लिटि)—sincerity; warm affection. निष्कपटपणा, खरेपणा; प्रेमभाव.

Cŏrd'ite, *n.* (कॉ'र्डाइट्)— a smokeless explosive. धूर न निघणारी बंदुकीची दारू किंवा अन्य स्फोटक द्रव्य, बिनधुराची बंदुकीची दारू.

Cŏrd'on, *n.*, (कॉ'र्डन्)—a string course; a chain of military posts; a line or ring (of police, &c.): an ornamental cord or braid. कंगोरा, कंगणी; लष्करी ठाण्यांची सांखळी; पोलिसांची वगैरे उभी केलेली रांग किंवा गराडा; उंची शोभिवंत बंद.

Cŏrduroy', *n.* (कॉर्डरॉ'य्)-a thick (cotton) material with raised lines on it. सुती मखमल.

Cord'wainer, *n.* (कॉ'र्ड्-वेनर्)-a shoemaker. चांभार.

Cōre, *n.* (कोअर्)— the heart or innermost part of anything; the horny capsule (containing seeds of apple, &c.); the hard centre of boils or corns. कोणत्याहि वस्तूचा अगदीं आंतील भाग; कणीस; मध्य, मगज.

Cō-relĭ'gionĭst, *n.* (को-रिलि'जनिस्ट्)—a person of the same religion. एकाच धर्माचा मनुष्य, धर्मबंधु.

Cŏreŏp'sis, *n.* (कॉरिऑ'प्सिस्)-a plant with yellow flowers. पिंवळीं फुलें असलेलें एक झाड.

Cō-respŏn'dent, *n.* (को-रिस्पॉ'न्डन्ट्)—the man said (in a court of law) to have taken away a wife's love for her husband. (घटस्फोटाच्या फिर्यादींतील) सहप्रतिवादी.

Cŏriā'ceous, *a.* (कॉरि-ए'शस्)—leathery, made of leather. कमावलेल्या कातड्याचा.

Cŏriăn'der, *n.* (कॉरिॲ'न्डर्)—a plant with fruit used as flavouring. कोथिंबीर, धना.

Cŏrk, *n.* (कॉर्क्)—a bark of the cork-tree; a piece of cork as float or as a bottle-stopper. कॉर्क झाडाची साल; बुडदी, बूच. *v. t.* to close up with a cork; to bottle up one's feelings. बूच लावणें; आपल्या मनोभावना दडपून टाकणें. *Cork-jacket*, a jacket padded with cork for supporting a person in water. पाण्यांत तरंगतां यावें म्हणून बुचें भरून तयार केलेलें जाकीट, बूच-जाकीट. *Corked wine*, wine which has got a bad taste from being kept too long. फार दिवसांची जुनी असल्याकारणानें बाईट झालेली दारू. *Cork-screw*, a steel screw for drawing corks from bottles. बाटलीचें बूच काढण्याचा स्क्रू.

Cŏr'kage, *n.* (कॉ'-र्किज्)—corking or uncorking of bottles; the money paid on a strong drink brought by a guest into a hotel. बाटल्यांचें बूच घालणें किंवा काढणें; स्वतः आणविलेल्या दारूबद्दल हॉटेलमध्यें द्यावा लागणारा चार्ज किंवा आकार.

Cŏrk'ȳ, *a.* (कॉ'र्कि)—buoyant, lively. आनंदी, उल्हासी.

Cŏrm'orant, *n.* (कॉ'मरन्ट्)—a voracious sea-bird; a rapacious person. करढोक (पक्षी); खादाड मनुष्य, अधाशी माणूस.

Cŏrn, *n.* (कॉर्न्)—a grain or seed of an edible grain-bearing plant; (*collect.*) cereals in growth or their seed after threshing. धान्याचा दाणा; धान्य. *v. t.* to preserve (meat) by sprinkling with salt. बरेच दिवस मीठ घालून ठेवणें, खारवणें. *Corn-exchange*, corn mart. दाणेबाजार. *Corn-factor*, corn merchant. धान्याचा घाऊक व्यापारी. *Corn floor*, खळें. *Corn-flower*, a blue-flowered plant growing among corn. शेतांत उगवणारें एक प्रकारचें गवत. *To tread out corn*, धान्य मळणें. Whilst you've corn to give out, you will have friends round about. असतील शितें, तर मिळतील भुतें.

Cŏrn, *n.* (कॉर्न्)—the hard thick skin on the foot caused by rubbing of the shoe. पायाला किंवा पायाच्या बोटांना बुटाच्या योगानें पडलेला घट्टा, जोड्याचा घट्टा, किणा. *To tread on one's*

corns, to hurt one's feelings. एखाद्याचें मन दुखविणें.

Cŏrn'chăndler, *n.* (कॉर्न्-चँड्लर्)—a retail dealer in corn. किरकोळ जिन्नस विकणारा भुसारी, मोदी, दाणेवाला.

Cŏrn'ēă, *n.* (कॉर्निआ)—the horny transparent structure in front of the eyeball, the thin glassy covering of the eye. डोळ्याचें बुब्बुळ.

Cŏrn'er, *n.* (कॉर्नर्)—the angle (of a room, box, &c.), that part of a room where two sides meet; a remote place; a humble niche. कोन; दूरची जागा, आडोसा, एकवसा, कानाकोपरा; लहानसा कोपरा. *v. t.* to drive into a corner; to drive a person into a difficult place from which he cannot get out; to buy up the whole stock of something so as to raise the price. कोपऱ्यांत ढकलणें; मोठ्या अडचणींत पाडणें, संकटांत घालणें; पुढें हव्या त्या किंमतीला विकतां यावा म्हणून सर्व किंवा जितका मिळेल तितका माल एकट्यानेंच खरेदी करणें, सट्टा करणें. *To turn the corner*, to pass round a corner into another street; (fig.) to pass a critical point. कोपऱ्यावर वळणें; संकटांतून पार पडणें, कठीण वेळेंतून निभावणें. *To cut off a corner*, to avoid a corner by a short cut. जवळच्या रस्त्यानें जाऊन कोपरा-वांकण-टाळणें. *To drive into a corner*, to drive into a difficult position from which there is no escape. भयंकर अडचणींत घालणें. *Within the four corners of*, च्या चतुःसीमेंत. *Nook and corner*, कोनाकोपरा.

Cŏrn'er-stōne, *n.* (कॉर्नर्-स्टोन्)—a special stone put at a corner of a new building; (*fig.*) indispensable part or basis. कोनशिला, मुख्य दगड; अतिमहत्त्वाची गोष्ट, पाया, आधार.

Cŏrn'ĕt, *n.* (कॉर्निट्)—an instrument of trumpet class; (*hist.*) a junior officer of cavalry troop. तोंडानें वाजविण्याचें शिंग; घोडे-स्वारांचा एक अंमलदार.

Cŏrn'ice, *n.* (कॉर्निस्)—the moulding of a room wall just below ceiling; the projection under which curtains hang. कंगोरा, कंगणी; कार्निस, गलथा.

Cŏrnūcō'pĭa, *n.* (कॉर्न्युकोपिआ)—a horn of plenty, the representation of horn filled with fruit, flowers and grain and used as a symbol of plenty and peace. ज्यांतून फुलें, फळें, व धान्य निघालेलीं दाखविलेलीं असतात असें विपुलतादर्शक कृत्रिम शिंग.

Corŏll'ă, *n.* (करॉला)—the flower's inner part consisting of petals. पुष्पदल, फुलांच्या पाकळ्या.

Corŏll'ary, *n.* (करॉलरि)—a proposition that follows without the need of a separate proof from the one proved. आनुषंगिक सिद्ध गोष्ट, उपसिद्धान्त.

Cŏronā'tion, *n.* (कॉ-रो-ने'शन्)—the ceremony of crowning a sovereign. पट्टाभिषेक, राज्याभिषेक.

Cŏ'rōnal, *n.* (कॉ'रोनल्)—a circlet for the head. मुकुट. *a.* of the crown of the head. डोक्याच्या वरच्या भागाचा, शिरोभागासंबंधीं.

Cŏ'roner, *n.* (कॉ'रोनर्)—the officer holding an inquest on a corpse to ascertain the cause of death. अपघाती मरणाची चौकशी करणारा अधिकारी, कॉरोनर. *Co'ronership*, *n.*

Cŏ'ronĕt, *n.* (कॉ'रो-निट्)—a peer's or peeress's small crown. सरदारी लहान मुकुट. *Co'roneted*, *a.*

Cŏ'rporal, *n.* (कॉ'पॉरल्)—a non-commissioned officer below sergeant. (फौजेंतील) नाईक. *a.* of the body. शरीराचा, शारीरिक. *Corporal punishment*, punishment by beating. देहदण्ड, मारण्याची शिक्षा.

Cŏrporă'lĭty, *n.* (कॉर्पॅरॅ'लिटि)—being or having a body. सदेहता, देहवत्त्व, शरीर असलेली स्थिति.

Cŏrp'orate, *a.* (कॉर्पॅरिट्)—united in a group and given power by law to do business acting as one person, forming one group. संयुक्त, सामुदायिक, समुदित, एकव्यक्तीभूत, श्रेणीभूत.

Cŏrpŏră'tion, *n.* (कॉर्पॅरे'शन्)—a body of persons authorized to act as an individual. एक व्यक्ति म्हणून समजलें जाणारें अधिकृत मंडळ, संस्था, जमात. He has a big *corporation* (a large belly or stomach). त्याचें मोठें पोट आहे.

Cŏr'porator, *n.* (कॉ'र्-पोरेटर्)—member of a corporation. कॉर्पोरेशनचा किंवा जमातीचा किंवा संस्थेचा सभासद.

Cŏrpor'ēal, *a.* (कॉर्पो'रिअल्)—having a body; material, tangible. शारीरिक; भौतिक, स्पर्श करतां येण्यासारखें, स्पृश्य. *Corporeal'ity*, *n.* देहित्व, जडता.

Cŏrp'osant, *n.* (कॉर्पोझन्ट्)—a ball of light seen on a ship in a storm. जहाजावर दिसणारा वादळी विद्युत्प्रकाश.

Corps, *n.* (कोअर्, अने० कोअर्झ्)—a military force, a large body of soldiers; an organized body. पलटण, दल, चक्र; मंडळ.

Cŏrpse, *n.* (कॉर्प्स्)—the dead body of a human being. प्रेत, शव.

Cŏrp'ūlence, *n.* (कॉ'र्प्यु-लन्स्)—bulkiness of the body, excessive fatness. लट्ठपणा, मेदोवृद्धि.

Cŏrp'ūlent, *a.* (कॉ'र्प्यु-लन्ट्)—fleshy, bulky, very fat. स्थूल, गलेलठ्ठ.

Cŏrp'ŭs, *n.* (कॉ'पंस्)—the body of writings of a particular kind ; a collection. विशिष्ट प्रकारच्या लेखांचा संग्रह ; समुच्चय, संग्रह, समुदाय. *Corpus juris*, a body of law. कायदेकानू. *Corpus delicti*, all that goes to make a breach of law. कायदा मोडण्याचा गुन्हा शाबीत करण्यास लागणारा आवश्यक पुरावा.

Cŏrp'ŭscle, *n.* (कॉ'पंसल्)—a microscopic or minute body ; an atom, a particle. अतिसूक्ष्म शरीर ; परमाणु, कण.

Cŏ'rrăl, *n.* (कॉ'रॅल्)—a circular fence in which animals are kept prisoners. कोंडवाडा, गोठा, मेंढवाडा.

Corrĕct', *a.* (करे'क्ट्)—in accordance with the facts ; true, accurate ; proper. वस्तुस्थित्यनुसार ; सत्य, तंतोतंत बरोबर ; योग्य. *v. t.* to set right ; to admonish for a fault ; to counteract, to neutralize ; to punish. बरोबर करणें ; दोषाबद्दल कान उपटणें ; प्रतिकार करणें, शुद्ध करणें ; शिक्षा करणें. *Correct'or, n.* दुरुस्त करणारा, सुधारणारा.

Corrĕc'tion, *n.* (करे'क्शन्)—correcting, setting right ; amendment, removal of faults or errors. शुद्ध करणें ; सुधारणूक, चुकीची दुरुस्ती. *House of correction*, a house where disorderly persons are confined, a bridewell. कैदखाना, तुरुंग.

Corrĕct'ĭtūde, *n.* (करे'क्टि-ट्यूड्)—correct behaviour, correctness of conduct. शुद्ध किंवा योग्य वर्तणूक.

Corrĕc'tive, *a.* (करे'क्टिव्)—serving or tending to correct. सुधारतां येणारा, सुधारणारा. *n.* a corrective measure or drug. समधात करणारा–दोषशोधक–उपाय किंवा औषध.

Cŏ'rrelate, *v. i. & t.* (कॉ'रिलेट्)–to show how two things depend on each other. परस्परसंबंध असणें,–दाखविणें. *n.* each of two related things. परस्परसंबंध असलेली गोष्ट.

Correlā'tion, *n.* (कॉ-रिले'शन्)—mutual relations. परस्पर किंवा एकमेकांचा संबंध, परस्परान्वय.

Corrĕl'ătive, *a.* (कोरे'लेटिव्)—having reciprocal relation. परस्पर किंवा अन्योन्य संबंध असलेला.

Cŏrrespŏnd', *v. i.* (कॉ-रिस्पॉ'न्ड्)—to have points of agreement with, to be analogous ; to exchange letters with. मिळणें, जमणें ; सारखा असणें ; पत्रव्यवहार करणें.

Cŏrrespŏn'dence, *n.* (कॉ-रिस्पॉ'न्डन्स्)—the relation between things that answer to each other in some respect ; analogy ; exchange of letters ; letters. दोन पदार्थांमध्यें असलेला कांहीं बाबतींत जुळणारा संबंध ; अनुरूपता, सादृश्य ; पत्रव्यवहार ; पत्रें.

Cŏrrespŏn'dent, *a.* (कॉ-रिस्पॉ'न्डन्ट्)-corresponding. जुळणारा, जमणारा. *n.* one who writes a letter to another or for a newspaper ; an agent. पत्रव्यवहार करणारा, वर्तमानपत्राचा बातमीदार ; गुमास्ता, अडत्या.

Cŏ'rrĭdŏr, *n.* (कॉ'रिडोअर्)—a passage or gallery with doors leading into many rooms. गॅलरी, निरनिराळ्या खोल्यांमधून जाण्याचा रस्ता, सज्जा.

Cŏrrĭgĕn'dum, *n.* (कॉरिजे'न्डम्)–(*pl.* Corrigenda) a thing to be corrected, (esp. in a book). चुकीची दुरुस्ती, शुद्धि, शुद्धिपत्र.

Cŏ'rrĭgible, *a.* (कॉ'रि-जिबल्)— capable of being corrected, open to correction. सुधारण्याजोगा, सुधारतां येण्यासारखा.

Corrŏb'orant, *a.* & *n.* (करॉ'बोरन्ट्)–strengthening ; a tonic. पुष्टिकारक, शक्तिवर्धक ; शक्तिवर्धक औषध.

Corrŏb'ŏrāte, *v. t.* (करॉ'बोरेट्)— to give support to ; to confirm, formally to make sure. समर्थन करणें ; पुष्टि देणें, बळकट करणें. *Corrobora'tion, n.* पुष्टीकरण, बळकटी, आधार, पुष्टि. *Corrob'orator, n.* पुष्टि देणारा. *Corrob'orative, Corrob'oratory, aa.* पुष्टिकारक, बळवर्धक, बळकटी आणणारा.

Corrōde', *v. t. & i.* (करो'ड्)—to affect with or suffer corrosion ; to eat into, to eat away slowly. आंत झिजत जाणें, चरणें ; कुरतडणें, खाणें.

Corrō'sion, *n.* (करो'झन्)—wearing away from the surface inwards. वरून आंत आंत झिजत जाणें, खाणें, खणणें, खणती.

Corrō'sĭve, *a.* (करो'सिव्)—producing corrosion, consuming. खादक, चरणारा, आंत झिजत जाणारा, तीव्र, मर्मच्छेदक. *n.* a corrosive agent. खादक–नाशक–वस्तु.

Cŏ'rrugāte, *v. t. & i.* (कॉ'रुगेट्)—to contract into wrinkles or folds ; to bend into ridges. सुरकुत्या पडणें ; पन्हळ पाडणें. *Corrugated iron*, sheets of iron pressed into many small waves. वांकवून पन्हळ पाडलेले पत्रे, पन्हळी पत्रे. *Corruga'tion, n.* सुरकुती, पन्हळ, खांच. *Co'rrugator, n.* a brow-contracting muscle. ज्या स्नायूनें कपाळाला सुरकुती पडते तो, भ्रूसंवलिनी. *To corrugate the forehead*, कपाळाला आंठ्या पाडणें.

Corrŭpt', *a.* (करप्ट्)—decayed, rotten ; depraved ; doing wrong for money. सडका, कुजलेला ; दुष्ट, आचारभ्रष्ट ; लांचखाऊ. *v. t. & i.* to make corrupt, to deprave ; to bribe ; to rot, to decompose. बिघडवणें, दुष्ट बनवणें ; लांच खाणें ; कुजणें, सडणें. *Corruptibil'ity, n.*

Corrŭp'tion, *n.* (करप्शन्)—corrupting ; corrupt state ; depravity. कुजवणें, भ्रष्ट करणें ; भ्रष्टता ; दुष्टता, नीचपणा.

Cŏrs'äge, *n.* (कॉ'र्साझ्)—the upper garment of a woman's dress, what a woman is wearing about the bust. चोळी, कंचुकी.

Cŏrs'air, *n.* (कॉ'र्स्-एअ्)—one who attacks and steals from ships at sea, a pirate, a sea-robber; a privateer. चांचा, समुद्रांत हल्ला करून लुटणारा; चांच्यांचें गलबत.

Cŏrse, *n.* (कॉर्स्)—(*poet.*) corpse. प्रेत, शव.

Cŏrs'ĕt, *n.* (कॉ'र्सिट्)—a pair of stays, a stiff under-garment worn by women to give a good shape to the body. कांचोळी, चोळी, उरस्त्राण.

Cŏrs'lĕt, Cŏr'selĕt, *n.* (कॉ'र्स्लिट्)—piece of armour covering trunk; woman's tight-fitting garment. प्राण्याचें वक्षस्थळ, उरस्त्राण, चिलखत; स्त्रियांचें अंगाबरोबर घट्ट असणारें वस्त्र.

Cŏrtege', *n.* (कॉर्टे'झ्)—a procession, train of people following solemnly one behind another (esp. at a funeral). परिवारगण, लवाजमा; प्रेताबरोबर जाणारी मंडळी, प्रेतयात्रा.

Cŏr'tĕx, *n.* (कॉ'र्टेक्स्)—the outer covering of some organs, esp. the outer grey matter of the brain; the bark or rind. (मेंदूची) कवची; झाडाची साल.

Cŏrt'ĭcal, *a.* (कॉ'र्टि-कल्)—of the nature of a cortex or of rind or bark. सालीचा, सालीसारखा.

Cŏ'ruscāte, *v. i.* (कॉ'रस्केट्)—to flash, to shine, to sparkle. चमकणें, झळकणें, झगझगणें.

Cŏruscā'tion, *n.* (कॉरस्के'शन्)—a flash, quick vibration of light. (विजेसारखी) चमक, झळक.

Cŏrv'ée, *n.* (कॉ'र्व्हे)—the system of exacting unpaid labour. विनमोबदला काम करून घेण्याची पद्धति, वेठबिगार.

Cŏrvĕtte', *n.* (कॉर्व्हे'ट्)—a flush-decked warship with one tier of guns. तोफांची एकच रांग असलेलें एक लढाऊ जहाज.

Cŏrv'īne, *a.* (कॉ'र्व्हाइन्)—pertaining to a raven or crow. काकजातीय, कावळ्यासंबंधीं.

Cosaque', *n.* (कोसा'क्)—a cracker bonbon. एक प्रकारची खुसखुशीत मिठाई.

Cŏsh'er, *v. t.* (कॉ'शर्)—to pamper, to coddle. फाजील लाड करणें.

Cō-sĭg'nātory, *n.* (को-सि'ग्नेटरि)—a person or State signing a document with others. दुसऱ्यांबरोबर सही करणारा, जोड-सही करणारा.

Cō'sīne, *n.* (को'साइन्)—the sine of the complement of a given angle. कोटिज्या, कोभुजज्या.

Cŏsmĕt'ic, *a.* (कॉझ्-मे'टिक्)—beautifying. सुशोभित करणारा. *n.* a preparation for the hair or skin. उटणें, अंगविलेपन.

Cŏs'mĭc, *a.* (कॉ'झ्मिक्)-of the universe. विश्वासंबंधीं.

Cŏsmŏg'ony, *n.* (कॉझ्मॉ'गॉनि)— the origin or creation of the universe; the theory or doctrine of the creation or formation of the universe. जगदुत्पत्ति; जगदुत्पत्तिविचार, सृष्टिशास्त्र.

Cŏsmŏg'raphy, *n.* (कॉझ्मॉ'ग्रफि)-the description or mapping of the universe or the earth. विश्वाचें किंवा पृथ्वीचें वर्णन, जगद्वर्णन. *Cosmog'rapher, n.* विश्ववर्णनज्ञ *Cosmograph'ic, Cosmograph'ical, aa.* विश्ववर्णनासंबंधीं. [Gr. *kosmos*, the world, & *graphein*, to write]

Cŏsmŏl'ŏgy̆, *n.* (कॉझ्मॉ'लॉजि)—the study of the universe in all its parts. विश्वोत्पत्तिशास्त्र, सृष्टिविद्या. *Cosmolog'ical, a.* विश्वरचनाशास्त्रासंबंधीं. *Cosmol'ogist, n.* विश्वरचनाशास्त्रज्ञ. [Gr. *kosmos*, the world, & *logos*, discourse]

Cosmŏpŏl'ĭtan, *a.* (कॉझ्मॉपॉ'लिटन्)—of all parts of the world; free from national prejudices. विश्वबंधुत्वाचा; मनाचा उदार. *n.* a person feeling at home in any country. विश्वबंधु, जगन्मित्र. *Cosmopol'itanism, n.* वसुधैव कुटुंबवृत्ति; विश्वबंधुत्व. [Gr. *kosmos*, the world, & *polites*, a citizen, *polis*, a city]

Cŏs'mŏs, *n.* (कॉ'झ्मॉस्)—the universe as embodiment of order and harmony; an ordered system (of ideas, &c.). व्यवस्थित जग, विश्वघटनोपपत्ति, व्यवस्थित विचारपद्धति.

Cŏss'ăck, *n.* (कॉ'सॅक्)— a race famous as light cavalry; (*pl.*) trousers. रशिअन लष्करी घोडेस्वार म्हणून प्रसिद्ध असलेली जात; (अनेº) तुमान.

Cŏss'ĕt, *v. t.* (कॉ'सिट्)—to pamper, to pet, to treat very tenderly. लाड करणें, गोंजारणें.

Cost, *v. t.* (कास्ट्)—to involve the payment or sacrifice of; to have as price. खर्च पडणें: किंमत असणें. *n.* what a thing costs; (*pl.*) legal expenses. किंमत; (अनेº) फिर्यादीचा खर्च. *Prime cost, Cost price,* price at which a thing is bought. मूळ किंमत, खरेदीची किंमत. *At the cost of,* at the expense of losing. पदरचा खर्चून,-जाऊन. *To a person's cost,* to his loss. नुकसानींत, नुकसान म्हणून. *At all costs,* कांहीं झालें तरी.

Cŏs'tal, *a.* (कॉ'स्टल्)—of the ribs बरगड्यांचा, बरगड्यांसंबंधीं, पार्श्वीय.

Cŏs'tard, *n.* (कॉ'स्टर्ड्)—a large ribbed apple. वाटोळें गरगरीत फळ.

Cŏs'ter, Cŏs'termonger, *nn.* (कॉ'स्टर्, कॉ'स्टर्-मङ्गर्)—a man who sells (fruit, fish, etc.) from barrow in a street, a hawker. फेरीवाला.

Cŏs'tīve, *a.* (कॉ'स्टिव्ह्)—constipated, having the bowels bound. जड कोठ्याचा, बद्धकोष्ठ.

Cost'ly̆, *a.* (का'स्ट्-लि)—costing much, sold at high price; expensive; sumptuous. जास्त किंमतीचा; खर्चाचा; बहुमूल्य.

Cŏstūme', *n.* (कॉस्ट्यू'म्)—one's outer clothes; an established style or mode of dress. पोशाख; वेष, पेहराव.

Cŏstū'mier, *n.* (कॉस्ट्यू'मिअर्)—one who makes and sells women's dresses. स्त्रियांचा पोषाख तयार करून विकणारा.

Cō'sy̆, **Co'zy̆**, *a.* (को'झि)—snug, comfortable. सुखकर, ऊबदार, निवाऱ्याचा; मनमिळाऊ. *n.* a quilted cover - for a teapot to retain warmth. चहा वगैरे ऊन रहावा म्हणून चहादाणीवर घातलेलें लेपडीचें झांकण.

Cŏt, *n.* (कॉट्)—a small cottage; a small erection for shelter, a cote; a light portable bedstead. झोंपडी; खोपट, पर्णकुटी, माचा, पलंग, खाट.

Cōte, *n.* (कोट्)—a shelter for animals. वरडें, गोठा, खुराडें.

Cō'terie, *n.* (को'टरि)—a set of persons with exclusive interests; a select circle. मित्रमंडळ; निवडक मंडळी, कंपू.

Cŏtt'age, *n.* (कॉ'टिज्)—a small house (esp. in the country); residence at a pleasure-resort. झोंपडी; सुबक बंगला.

Cott'ager, *n.* (कॉ'टिजर्)—a dweller or an inhabitant of a cottage. झोंपडींत राहाणारा, कुटीरस्थ.

Cŏtt'ar, **Cŏtt'er**, *n.* (कॉ'टर्)—a Scottish peasant occupying a cottage on a farm and labouring on the farm at a fixed rate when required. शेतावर मांगर-खोपट-बांधून राहणारा शेतकरी.-कूळ.

Cŏtt'er, *n.* (कॉ'टर्)—kinds of key, wedge, or pin. चावी.

Cŏtt'on, *n.* (कॉ'टन्)—a plant; the white downy fibrous covering of its seeds; thread spun or cloth woven from cotton. कापशीचें झाड; कापूस; कापसाचें सूत, सुताचें कापड. *v. t.* to be compatible or congruous; to take to a person or custom. सारखें असणें; बंधुत्वानें वागणें, (एखाद्याविषयीं) मनांत प्रीति उत्पन्न होणें. *Cott'ony*, *a.* कापसाचें, कापसाप्रमाणें मऊ.

Cŏty̆lē'don, *n.* (कॉटिली'डन्)—the primary or seed leaf in plant embryos. दल, डाळिंबी.

Couch, *n.* (काउच्)—a piece of furniture made for reclining on. पलंग, मंचक, कोच. *v. i. & t.* to have one's bed or lair; to lie ready to spring; to set down or express in specified terms. बिछाना किंवा आश्रयस्थान असणें; झडप घालण्याकरितां दडून बसणें; लपविणें, गर्भित करणें, स्पष्ट शब्दांत सांगणें किंवा लिहिणें, भाषेनें दर्शविणें. *Couch-grass*, grass-weed with long creeping roots, a common weed. एक जातीचें निरुपयोगी गवत.

Couch'ant *a.* (का'उचन्ट्)—lying with the body resting on the legs and the head raised. मान वर करून बसलेला, उभा धरून बसलेला.

Cough, *n.* (कॉफ्)—expulsion of air from the lungs; noise made by cough; respiratory affection impelling to frequent coughs. खोकणें; खोकला; मधून मधून येणारा खोकला. *v. t. & i.* to make cough, to force air from the throat suddenly and with noise. खोकणें, खांकरणें.

Coun'cil, *n.* (का'उन्सिल्)—any deliberative or administrative body. मसलत करणारी मंडळी, मंत्रिमंडळ. *War Council*, युद्धमंडळ. *Privy Council*, वरिष्ठ न्यायसभा. *Executive Council*, कार्यकारी मंडळ. *Legislative Council*, कायदे-कानू करणारी सभा, विधिमंडळ.

Coun'cillor, *n.* (का'उन्सि-लर्)— the member of a council. काउन्सिलचा सभासद, मंत्री.

Coun'sel, *n.* (का'उन्सेल्)—deliberation or debate; advice; a barrister. विचार; उपदेश, सल्ला-मसलत; बॅरिस्टर, वकील. *To keep one's own counsel*, to say nothing about one's plans. स्वतःचे बेत गुप्त ठेवणें. *King's Counsel*, (K.C.) counsel to the crown, taking precedence of ordinary barristers. राजाचा सनदी वकील. (ह्याला पगार नसतो, परंतु प्रत्येक कोर्टांत बॅरिस्टरांपेक्षां अग्रमान असतो.)

Coun'sĕllor, *n.* (का'उन्सेलर्)—an adviser. उपदेश करणारा.

Count, *v. t. & i.* (काउन्ट्)—to reckon the number of by counting; to include or be included in reckoning; to have as numerical value. गणना करणें; गणणें, मोजतांना धरणें; मोजणें. *n.* one's reckoning; a counting; an item in indictment; the title of a foreign noble. गणणें; मोजणें; लेखी फिर्यादींतील कलम, मुद्दा; एक पदवी, उमराव. *To keep count*, to be aware how many there have been. किती आहेत हें माहित असणें. *To lose count*, to fail to know how many there have been. किती आहेत हें न समजणें. *To count up*, to find the sum of. मोजणें, बेरीज करणें. *To count on* or *upon*, to expect confidently. ०वर भिस्त ठेवणें, भरंवसा ठेवणें, अवलंबून राहणें.

Count'enance, *n.* (का'उन्टिनन्स्)—expression of the face; a favouring look; moral support. मुद्रा, चेहरा, चर्या; कृपादृष्टि, मेहेरनजर; नैतिक पाठबळ.

v. t. to give countenance to; to look on with favour at. उत्तेजन देणें, कैवार घेणें, नैतिक पाठबळ देणें; कृपादृष्टीनें पाहणें. *To keep one's countenance,* to maintain composure, to show no feeling, to refrain from laughing. मनोवृत्तीचे विकार तोंडावर दिसूं न देणें, हंसण्याच्या वेळीं सुद्धां न हंसणें. *To put out of countenance,* to cause to show shame, to disconcert. मान खालीं घालावयास लावणें, फजीती करणें, लाजविणें.

Coun'ter. *n.* (का'उन्टर)—a small disk used in scoring at cards; a token; a banker's or shopkeeper's table. नरद, चकती; खूण; दुकानांतील किंवा बँकेंतील पैसे देण्याघेण्याची जागा, गल्ल्याची जागा, गल्ला.

Coun'ter, *n.* (का'उन्टर्)—part between horse's shoulders and below its neck; curved part of stern; fencing-parry. घोड्याची मान व खांदा यांमधील शरीराचा भाग,-छाती; नावेचा नाळीकडील बांकदार भाग; उलट ठोंसा. *a.* opposite. उलटा, विरुद्ध. *adv.* in the contrary direction. विरुद्ध दिशेनें. *v. t. & i.* to meet or baffle (an opponent) with an answering move, to strike back at. सामना देणें, उलट ठोंसा मारणें.

Counteract', *v. t.* (काउन्टरॅ'क्ट्)—to act against and bring to nothing, to hinder by contrary action. उलट प्रयत्न किंवा प्रतिक्रिया करणें.

Coun'ter-attăck, *v. t. & i. & n.* (का'उन्टर्-अटॅक्)—to attack after the close of an enemy's attack. शत्रूवर उलट हल्ला (करणें).

Counter-attrăc'tion, *n.* (काउन्टर्-अट्रॅ'क्शन्)-attraction of contrary tendency, rival attraction. विरुद्धाकर्षण.

Counterbăl'ance, *n* (काउन्टर्-बॅ'लन्स्)—a weight balancing another. दुसऱ्याइतकें बरोबर वजन, आभंड. *v. t.* to neutralize by contrary power or influence. तोलास तोल देणें, समतोल राखणें, तोलून धरणें.

Coun'terblăst, *n.* (का'उन्टर्-ब्लास्ट्)—energetic declaration against something. कोणत्याहि गोष्टीविरुद्ध ठांसून सांगणें, विरोधी गोष्ट.

Coun'ter-chärge, *n. & v. t.* (का'उन्टर्-चार्ज्)—to charge in answer to another. उलट आरोप करणें, प्रतिदोषारोप.

Coun'tercheck, *n.* (का'उन्टर्-चेक्)—a check that operates against another; a retort. रोधास प्रतिरोध, दावावर दुसरा दाव; उलट सणसणीत जबाब.

Coun'ter-claim, *n.* (काउ'न्टर्-क्लेम्)—a claim set up against another, a claim set up by the defendant in a suit. दुसऱ्याच्या विरुद्ध हक्काची मागणी, फिर्यादींतील प्रतिवादीची मागणी.

Coun'terfeit, *a. & n.* (का'उन्टर्-फिट्)—(a thing) made in imitation, forged; not genuine. नकली (वस्तु); बनावट; खोटा. *v. t* (का'उन्टर्-फीट्) to imitate; to forge; to simulate. नक्कल करणें; खोटी-नकली-वस्तु बनाविणें; ढोंग करणें.

Coun'terfoĭl, *n.* (का'उन्टर्-फॉइल्)—the part (of a cheque, receipt, &c.) retained as record. दप्तरीं ठेवलेला चेक, पावती वगैरेचा दुसरा भाग, स्थळप्रत.

Count'ermănd, *n.* (का'उन्टर्-मान्ड्)—an order issued in revocation of previous one. उलट हुकूम, मनाई हुकूम, प्रति-विधि.

Countermănd', *v. t.* (काउन्टरमॅ'न्ड्)—to revoke orders, to give a command to stop another command; to recall by a countermand. हुकूम परत घेणें; उलट हुकूम देणें.

Coun'termärch, *n. & v. i. & t.* (का'उन्टर्-मार्च्)—to march in a contrary direction to that previously followed. विरुद्ध चाल, विरुद्ध दिशेनें जाणें, उलट कूच.

Coun'termärk, *n.* (का'उन्टर्-मार्क्)—an additional mark on goods. मालावर केलेली दुसरी खूण, प्रतिचिह्न, प्रतिलक्षण.

Coun'termīne, *n.* (का'उन्टर्-माइन्)—a mine made to blow up enemy's mine before it is ready. शत्रूच्या सुरुंगाचा पत्ता काढण्यासाठीं तयार केलेला प्रतिसुरुंग. *v. t. & i.* to make a mine under the ground to destroy enemy's mine; to counterplot. प्रतिसुरुंग लावणें; गुप्त कारस्थानानें एखाद्याची मसलत फसविणें.

Coun'terpane, *n.* (का'उन्टर्-पेन्,-पिन्)—a coverlet or quilt of bed. (चौकोनी पट्ट्यांचा) पलंगपोस, चादर, सरपोस.

Coun'terpärt, *n.* (का'उन्टर्-पार्ट्)—a thing resembling another; a corresponding part. अगदीं सारखी वस्तु; सारखा भाग.

Coun'terplŏt, *n.* (का'उन्टर्-प्लॉट्)—a plot contrived to defeat another. एक कट हाणून पाडण्याकरितां दुसरा कट. *v. t.* to devise a counterplot against. विरुद्ध कट करणें.

Coun'terpoīse, *n.* (कॉ'उन्टर्-पॉइझ्)—a counterbalancing weight or force; equilibrium. बरोबर दुसऱ्या इतकें वजन, आभंड; समतुलना. *v. t.* to counterbalance; to compensate. समतोल करणें, सारखें तोलणें; भरपाई करणें.

Coun'tersīgn, *v. t.* (का'उन्टर्-साइन्)—to add a confirming signature to. बरोबर असल्याबद्दल (दुसऱ्यानें) सही करणें, मखलाशी,-जोडसही,-करणें. *n.* a word to be given in answer to a soldier on guard; countermark. खुणेचा शब्द, परवलीचा

शब्द, परवल; उलट खूण. *Countersig'nature*, जोडसही.

Countersink', *v. t.* (काउन्टर्-सिं'क्)—to make a hole for the head of a screw so that it may go down level with the surface. खिळा बसवण्याकरितां छेदाचा कांठ निमुळता करणें.

Countervail', *v. t. & i.* (काउन्टर्-व्हे'ल्)—to counter-balance; to avail against. समतोल करणें; उलट फायदा घेणें.

Coun'terwork, *v. t.* (कां'उन्टर्-वर्क्)—to try to frustrate. निष्फळ करण्याचा प्रयत्न करणें. विरुद्ध काम करणें.

Coun'tess, *n.* (का'उन्टिस्)—the wife or the widow of a count or earl, the title of a nobleman's wife (or daughter). काउन्ट किंवा अर्लची बायको.

Coun'ting-house, *n.* (काउ'न्टिंग्-हउस्)—a building or room devoted to keeping accounts, an office. व्यापाऱ्याची जमाखर्च लिहिण्याची जागा, पेढी.

Count'less, *a.* (का'उन्ट्-लिस्)—too many to count, numberless, innumerable असंख्य, अगणित.

Coun'trified, *a.* (क'न्ट्रिफाइड्)—rural in appearance or manners. दिसण्यांत ग्राम्य, वागण्यांत खेडवळ.

Coun'try, *n.* (क'न्ट्रि)—a region; a territory of a nation; the land of one's birth; rural districts. प्रदेश; देश, राष्ट्र; जन्मभूमि; खेडेगांव, खेडेंपाडें, गांवढें. *Country dance*, any rural or native English dance (esp. one in which couples stand face to face in two long lines). परस्परसंमुख स्त्रीपुरुषनृत्य. *Country house*, *country seat*, residence of a country gentleman. शहराबाहेर खेड्यांत राहाण्यासाठीं बांधून ठेवलेलें घर. खेड्यांतील घर. *Country-man*, a rustic member of labourer class; a man of one's own country. खेडेगांवचा माणूस, गांवढा; देशबंधु. *Countryside*, a particular rural district; inhabitants of the district. खेड्यापाड्याचा भाग; खेड्यापाड्याचे रहिवासी.

Coun'ty, *n.* (का'उन्टि)—a territorial division of U. K., a shire; people of a county, the county families. परगणा, पेटा; पेट्यांतील लोक किंवा कुटुंबें. *County borough*, a borough ranking as administrative county. परगण्याचा एक भाग. *County council*, the elected governing body of an administrative county. परगण्याचा कारभार चालविण्याकरितां निवडलेलें मंडळ. *County court*, a court of civil actions. काउंटीच्या हद्दींतील न्यायदान करणारें कोर्ट.

Coup, *n.* (कू)—a blow; a successful piece of business. ठोसा, गुद्दा; एखादा यशस्वी कार्यभाग. *Coup d'etat*, (कूडेटा') a sudden act of government making a great change. एकदम मोठा फरक घडवून आणण्याकरितां सरकारनें योजिलेले तांतडीचे उपाय. प्रचंड उलथापालथ. *Coup de grace*, (कू ड ग्रास्) a finishing stroke causing death. ज्याच्या योगानें मरण येईल असा मारलेला एकच जोराचा घांव. शेवटचा घांव. *Coup de main* (कू ड मॅड्) a sudden vigorous attack. एकदम जोराचा हल्ला. आकस्मिक हल्ला, घाला, छापा.

Coupe, *n.* (कू'पे)—a close carriage for two; a half-compartment at the end of a railway carriage. दोघांना बसतां येईल अशी आच्छादित गाडी; आगगाडीच्या टोंकाला असलेला अर्धा डबा.

Cou'ple, *n.* (क'पल्)—a leash for two hounds; a married or engaged pair; two, a brace. कैची; विवाहित जोडपें; दोन, जोडी. *v. t. & i.* to link or fasten or associate together. एकत्र करणें, जोडणें, जोडी बांधणें. *A couple of*, two. दोन.

Coup'let, *n.* (क'प्-लिट्)—a pair of successive lines of rhyming verse. दोहरा, एकाच यमकाच्या लागोपाठ दोन ओळी.

Coup'on, *n.* (कू'पन्)—a detachable ticket entitling the holder to something. एक प्रकारचें तिकिट, जोडपत्र, चिठ्ठी, प्रतिपत्रिका.

Cou'rage, *n.* (क'रिज्)—bravery, boldness; intrepidity, daring, fortitude. शौर्य, धीटपणा; धैर्य, धाडस. *To take courage*, *To pluck up courage*, धैर्य धरणें, अवसान धरणें, दम धरणें. *To lose courage*, धीर सोडणें, हातपाय गाळणें. *To take one's courage in both hands*, to nerve oneself to a venture. धाडस करण्याला तयार होणें. *Dutch courage*, a feeling of courage produced by strong drink. दारू पिऊन आलेलें अवसान, दारूच्या धुंदींतील धैर्य. *Courage of one's opinions*, courage to act up to one's opinions. आपल्या निश्चित मताप्रमाणें वागण्याचें धैर्य.

Coura'geous, *a.* (करे'जस्)—brave, daring. शूर, धैर्यशील, धैर्यवान्.

Cou'rier, *n.* (कु'रिअर्)—an express messenger; a servant employed to make travelling arrangements. निरोप पोहोंचविणारा, निरोप्या, जासूद; हलकारा.

Course, *n.* (कोअर्स्)—going on in space or time; a race or career; a line of conduct or action; a series; the ground on which a race is run; the distinct part of a meal. मार्ग, गति; धांव,

दौड, ओघ; वृत्ति, वागणूक; मालिका, श्रेणी; शर्यतीची जागा; (भोजनाचा) अनुक्रम. *v. t. & i.* to pursue (a game); to run about, to run (esp. of liquids); to chase. पारध करणें; जलद धांवणें; पाठलाग करणें. *To change one's course,* मार्ग बदलणें. *Course of events,* वृत्तपरंपरा. *In the course of,* during. दरम्यान, चाललें असतांना. *In due course,* in the natural order. योग्य वेळीं. *Of course,* naturally, certainly. साहजिक रीत्या, अलबत, खचीत, अर्थात्. *A matter of course,* the natural thing. साहजिक गोष्ट. *To turn to an evil course,* वाईट मार्गाला लावणें. *A woman in course,* रजस्वला, विटाळशी स्त्री.

Cour'ser, *n.* (को'र्सर्)—a swift horse. जलद गतीचा घोडा.

Court, *n.* (कोर्ट्)—the space enclosed by a wall or buildings; confined yard; the area within walls or marked boundaries used in some games; a sovereign's residence; the king's establishment and retinue; an assembly of judges or other persons acting as tribunal; the place in which justice is administered. भिंती किंवा इमारती यांनीं व्यापलेली जागा; अंगण; खेळण्याचें पटांगण; राजवाडा; राजकचेरी, राजपरिवार; न्यायाधीश; न्यायसभा, कोर्ट. *v. t.* to pay court to; to seek the favour or love of; to invite. मनधरणी करणें; कृपेची किंवा प्रेमाची याचना करणें; प्रेम संपादन करण्याचा प्रयत्न करणें; बोलावणें, ओढवून घेणें. *To hold a court,* to hold a gathering of people in the presence of the king. दरबार भरविणें. *Civil court,* दिवाणी अदालत, दिवाणी कोर्ट. *Criminal court,* फौजदारी अदालत, फौजदारी कोर्ट. *To pay one's court to,* मर्जी संपादन करण्याकरितां हांजी हांजी करणें. *Court card,* king, queen, knave. पत्त्यांतील राजा, राणी, गुलाम. *Courtyard,* the space enclosed by buildings. अंगण.

Court'eous, *a.* (को'र्टिअस्, क'र्टिअस्)—very polite or considerate in manners. आदरसत्कारी, आदरशील, सभ्य, रीतरिवाज जाणणारा.

Courtesăn', Courtezăn', *n.* (कोर्टि-झॅ'न्)-a refined or high-placed harlot. उच्च दर्जाची वेश्या, कलावंतीण, वारांगना.

Court'esy, *n.* (को'र्टिसि, क'र्टिसि)—courteous behaviour or disposition, politeness. सभ्यपणाची वागणूक किंवा स्वभाव.

Court'ier, *n.* (को'र्टिअर्)—frequenter of royal court, a person of court by manners. राजदरबारी मनुष्य, खुशामत्या, राजपुरुष.

Court'lў, *a.* (को'र्ट्-लि)—in the manner of Courts; very polite, ceremonious; flattreing. दरबारी; आदरसत्कारशील; आर्जवी, खुशामत किंवा हांजी हांजी करणारा.

Court'mărtial, *n.* (को'र्ट्-मार्शल्)—judicial court of naval or military officers. नाविक किंवा लष्करी अधिकाऱ्यांची चौकशी करणारें कोर्ट, लष्करी न्यायसभा. *v. t.* to try by court martial. लष्करी कोर्टानें चौकशी करणें.

Court'ship, *n.* (को'र्ट्-शिप्)—courting, wooing (esp. of the intended wife). लग्नासाठीं केलेलें प्रेमाराधन, वधूचें आर्जव, प्रियाराधन.

Court'yărd, *n.* (को'र्ट्-यार्ड्)—space enclosed by a building. घरापुढील जागा, आवार, अंगण.

Cous'in, *n.* (क'झिन्)—a child of one's uncle or aunt. चुलतभावंड, आतेभावंड, मामेभावंड, मावसभावंड.

Cōve, *n.* (कोव्)—a small bay or inlet of coast. लहान खाडी.

Co'vĕnant, *n.* (क'व्हि-नन्ट्)—a compact, bargain, a solemn promise or agreement; sealed contract. करार, करारनामा; शिक्कामोर्तब केलेला करार. *v. t. & i.* to make a covenant with. करार किंवा ठराव करणें.

Co'vĕnanted, *a.* (क'व्हिनन्टेड्)—bound by a covenant. करारानें दिलेला, करारबद्ध, सनदी.

Co'vĕnanter, *n.* (कॅ'व्हिनन्टर्)-one who covenants, an adherent of the Covenants of 1638 & 1643. स्कॉटलंड देशांतील धर्म पाळण्यासंबंधानें १६३८ व १६४३ सालीं झालेल्या करारांचें समर्थन करून त्याप्रमाणें वागणारा.

Cŏv'entrў, *n.* (कॉ'व्हन्ट्रि)—*To send one to Coventry,* to refuse to speak to a person, to refuse to associate with a person. एखाद्याबरोबर बोलण्याचें किंवा संबंध ठेवण्याचें नाकारणें.

Co'ver, *v. t.* (क'व्हर्)—to be over the whole top of; to overlie, to lie above; to conceal or shield; to suffice to defray (expenses). आच्छादणें; वर असणें; लपविणें, झांकणें; (खर्च) भागण्यापुरतें असणें. *n.* a thing that covers the whole or part of something; a shelter; a screen or pretence. आच्छादन; आश्रय; आडपडदा, ढोंग. *Under cover of (darkness),* hidden by. झांकलेलें, आड.च्या आडून. *Under cover of friendship,* while pretending to be a friend. मित्रत्वाचें सोंग करून.

Co'verlet, *n.* (क'व्हर्लिट्)—the outer covering of a bed, counter-pane, quilt. चादर, पलंगपोस, दुलई.

Co'verpoint, *n.* (क'व्हर्-पॉइन्ट्)—(Crick.) the fielder behind the point to stop balls the first man misses. क्रिकेटच्या खेळांत 'पॉइन्ट' च्या पाठीमागें चेंडू पकडणारा खेळगडी, त्याची जागा.

Co'vert, *a.* (क'व्हर्ट्)—secret, disguised; not open or explicit गुप्त; उघड किंवा स्पष्ट नसलेला. *n.* a wood or thicket affording cover for game. (जनावराची) लपून राहण्याची जागा, आश्रयस्थान. *Covert coat*, a short light overcoat. वर घालण्याचा आंखूड व हलका कोट.

Co'verture, *n.* (क'व्हर्चर्)—covering, shelter; wife's position under husband's care. आच्छादन, रक्षणस्थान; विवाहित स्त्रीची स्थिति, भर्तृवशता.

Co'vet, *v. t.* (क'व्हिट्)—to long to possess, to desire eagerly. अन्यायानें मिळविण्याचा अभिलाष धरणें, लोभ करणें.

Co'vetous, *a.* (क'व्हिटस्)—avaricious, grasping, greedy or eager for gain. हावरा, लोभिष्ट, अभिलाषी.

Cov'ey, *n.* (क'व्हि)—brood of partridges, (esp. flying together), a group of birds (esp. those shot for food). पक्ष्यांची वीण, पिलें; लहान पक्ष्यांची झुंड किंवा थवा.

Cow, *n.* (काउ)—female ox, esp. of domestic kind. गाय, धेनु. *v. t.* to intimidate. दडपावणें, धमकावणें, भेडसावणें, उत्साहभंग करणें.

Cow'ard, *n.* (कौ'वर्ड्)—faint-hearted person, a man of no courage; (*attrib.*) cowardly. नामर्द, भ्याड मनुष्य; भ्याड.

Cŏw'ardice, *n.* (कौ'वर्डिस्)—cowardly conduct, want of courage to face danger. भ्याडपणाची वागणूक, भित्रेपणा.

Cŏw'ardlў, *a.* (कौ'वर्ड्-लि)—of or like a coward, faint-hearted, timid. भित्रा, भ्याड, नामर्दपणाचा.

Cow'boy, *n.* (का'उ-बॉय्)—a boy who takes charge of cows. गुराखी, गाई राखणारा, गोवारी, गवळी.

Cow'er, *v. i.* (का'उ-अर्)—to crouch or shrink with fear or with cold. दबणें, भयानें किंवा थंडीनें दबकणें,-कांपणें.

Cow'herd, *n.* (का'उ-हर्ड्)—one who tends cows at pasture. गुराखी, गवळी, गोपाळ.

Cowl, *n.* (काउल्)—monk's hooded cloak; a metal top for a chimney, a metal cover (e. g. over a machine). युरोपिअन मठवाशांची टोपी; धातूचें आच्छादन किंवा टोपी. *Cowled*, *a.* टोपी घातलेला.

Cow'-pox, *n.* (का'उ-पॉक्स्)—a disease on cows' teats. गोस्तन, शीतला, कांजिण्या.

Cowr'ie, *n.* (का'उरि)—a smal sea shell. कवडी, कपर्दक.

Cow'slip, *n.* (का'उस्लिप्)—a yellow-flowered plant growing in pastures. पिंवळीं फुलें असलेलें एक फुलझाड.

Cŏx, *n.* (कॉक्स्)—coxswain, esp. of a racing boat. शर्यतीच्या बोटीचा कर्णधार, सुकाणूं धरणारा, तांडेल. *v. t. & i.* to act as a cox. सुकाणधार-तांडेल-होणें.

Cŏx'cŏmb, *n.* (कॉ'क्स्-कोम्)—a person given to showing off, a foolish fellow dressed in a foolish way. नखरेबाज, पमेंढीनंवून, बढाईखोर, वृथाभिमानी मूर्ख मनुष्य. *Cox'combry*, *n.* नखरेबाजी, कुर्रा, अक्कडबाजी.

Cox'swain, *n.* (कॉ'क्स्-वेन्, कॉ'क्सन्)—a boat's helmsman, esp. one in charge of ship's boat; steersman of a racing boat. सुकाणूं धरणारा, कर्णधार; शर्यतीच्या बोटीचा कर्णधार.

Cŏy, *a.* (कॉय्)—soft, gentle, modest; shy (*usu.* of girl). सौम्य, नम्र; बुरकणारी, लाजरी (मुलगी).

Co'zen, *v. t. & i.* (क'झन्)—to cheat, to defraud. ठकवणें, फसवणें *Co'zenage*, *n.* ठगाई, कपट.

Crăb, *n.* (क्रॅब्)—a creature with a hard shell and ten legs, esp. edible species; a crab-apple. खेंकडा; एक रानफळ. *v. t. & i.* to speak ill of, to find fault with, to scratch, to claw. एकाद्याबद्दल वाईट बोलणें, दोष काढणें; खरचटणें, आंकड्यानें ओरबडणें. *To catch a crab*, to get the oar jammed under water by a faulty stroke. वल्हें पाण्यांत बुडविण्यांत किंवा बाहेर काढण्यांत-वल्हें मारण्यांत-चूक करणें. *To turn out crabs*, to end in a failure. शेवटीं अपयश येणें. *Claw of a crab*, आंकडा. *To walk crab-wise*, to walk sideways. खेंकड्याप्रमाणें एका बाजूनें चालणें.

Crăbb'ed, Crăbb'ў, *aa.* (क्रॅ'बिड्, क्रॅ'बि)—cross-grained, bad-tempered, perverse, cantankerous. खट्याळ, हिरवट, तिरसट.

Crăck, *n.* (क्रॅक्)—a sudden sharp noise; a sounding blow; fracture; piece of burglary; a talk. एकदम मोठा आवाज; जोराचा धक्का; भेग, तडा; लहानसा दरवडा; बोलणें, संलाप. *v.i. & t.* to suffer a crack or partial break; (of a whip, &c.) to make crack; (of voice) to suffer change of tone. तडकणें, फुटणें; (चाबकानें) फोडणें; गळा किंवा आवाज फुटणें. *a.* of great reputation. सुप्रसिद्ध, नामांकित. *Cracked*, *Crack-brained*, *aa.* वेडसर, विक्षिप्त. *To crack jokes*, to utter jokes, to say amusing things. थट्टा करणें, विनोद करणें. *To crack up a person*, to praise a person. एखाद्याची स्तुति करणें. *To crack up*, to show signs of age or decay. जीर्ण झाल्यामुळें तडकणें, तडा जाणें. *A crack on the head*, a hard blow. जोराचा तडाका, ठोसा. *A crack player*, a very good player. फार चांगला – उत्तम – खेळाडू. *In a crack*, in a

moment. एका क्षणांत, क्षणांतच *To crack a bottle*, to empty or drink bottle. बाटली उघडून पिणें. *To crack a crib*, to break into a house. घर फोडून आंत शिरणें, घरफोडी करणें. *Crack-jaw*, (a word) difficult to pronounce. जबडा फाडणारा, उच्चारण्याला कठीण (शब्द).

Crăck'er, *n.* (क्रॅ'कर्)—kind of firework; an explosive bonbon; a thin hard biscuit. फटाकडी, फटाका, किंकरें; पातळ व कुरकुरीत बिस्किट. *A nut-crackers*, an instrument for cracking nuts. आडकित्ता.

Crăc'kle, *n.* (क्रॅ'कल्)—a sound of repeated slight cracking. तुडतुड आवाज. *v. i.* to make a noise like walking on dry leaves. तडतड किंवा करकर आवाज करणें, तुडतुडणें.

Crăck'ling, *n.* (क्रॅ'क्-लिंग्)—a cracking sound; the crisp skin of roast pigs' flesh. तडतडाट, खडखड आवाज; भाजलेल्या डुकराची कुरकुरीत कातडी.

Crăck'nel, *n.* (क्रॅ'क्-नेल्)—a crisp soft biscuit. कुरकुरीत नरम बिस्कीट.

Crăcks'man, *n.* (क्रॅ'क्स्-मन्)—a burglar, a thief who breaks into houses. घरफोड्या, दरवडेखोर.

Crād'le, *n.* (क्रे'डल्)—an infant's bed on rockers; the place in which a thing is first nurtured; a frame for conveying something; gold-washing basket. पाळणा; संगोपनस्थान; वाहन; सोनें चाळण्याची चाळणी, पाळणा. *v. t.* to place in a cradle. पाळण्यांत ठेवणें, पाळण्यांत घालणें. *From the cradle*, जन्मापासून, आरंभापासून.

Crā'dlĭng, *n.* (क्रे'ड्-लिंग्)—a wood or iron framework used in building. बांधकामाच्या उपयोगी पडण्याकारितां तयार केलेला लांकडी किंवा लोखंडी घोडा, परात.

Crăft, *n.* (क्राफ्ट्)—skill, cunning; an art, trade; a boat, vessel or vessels. कसब, कावा, चातुर्य; कला, हुन्नर; गलबत, गलबतांचा समुदाय.

Crăfts'man, *n.* (क्रा'फ्ट्स्-मन्)-one who practises a craft, an artificer, a mechanic. कारागीर, शिल्पी. *Crafts'manship*, *n.* कारागिरीचें काम, कारागिरी.

Crăf'tў, *a.* (क्रा'फ्टि)—cunning, artful. कावेबाज, कपटी, धूर्त.

Crăg, *n.* (क्रॅग्)—a steep rugged rock. खडपा, सुळका, कडा.

Crăgs'man, *n.* (क्रॅ'ग्स्-मन्)—a skilled climber of rocks. सुळक्यावर किंवा खडपावर चढण्यांत निष्णात मनुष्य.

Crăm, *v. t. & i.* (क्रॅम्)—to fill to repletion; to fill the mind with facts, &c. required for examination; to pack tightly; to eat greedily. चिकार भरणें; घोकंपट्टी करणें; घट्ट दडपून भरणें; अधाशीपणानें खाणें. *n.* the crowded or close-packed state; cramming for examination; (sl.) a lie. चिकार किंवा दडपून भरणें; परीक्षेकरितां घोकंपट्टी करणें; खोटें, खोटी गोष्ट. *A cram'mer*, a person who crams examinees; (sl.) a lie. परीक्षेकरितां घोकंपट्टी करवून मुलें तयार करणारा; खोटी गोष्ट.

Crăm'bō, *n.* (क्रॅ'म्बो)—a game in which one player gives a word to which another finds a rhyme. भेंड्या लावणें, भेंड्या.

Crămp, *n.* (क्रॅम्प्)—a contraction of muscles from sudden chill, strain, &c.; kinds of clamp for holding masonry or timbers together. वळ, पेटका; आंकड्यांची कांब. *v. t.* to restrict; to enclose too narrowly, to hold firm. प्रतिबंध करणें; अगदीं अरुंद जागेंत घेरणें, आखडणें.

Crăm'ped, *a.* (क्रॅ'म्प्ड्)—affected with muscular cramp; too narrow (space); too small or close (handwriting). पेटके येत असलेला; अत्यंत अरुंद; फारच लहान किंवा जवळ जवळ लिहिलेलें (अक्षर).

Crăm'pons, *n. pl.* (क्रॅ'म्पन्झ्)—iron plates with spikes attached to boots (for walking on ice, etc.). बुटांकरितां आंकडे असलेल्या लोखंडी पट्या.

Crăn'berrў, *n.* (क्रॅ'न्-बेरि)—a small red fruit. एक जातीचें लहान लाल फळ.

Crāne, *n.* (क्रेन्)—a large wading bird, with long bill, legs and neck; a machine for moving heavy weights. बगळा, करकोचा, सारस पक्षी; (जड वजन उचलण्याची) यारी. *v. t. & i.* to stretch one's neck or head; to move weights with a crane. आपली मान किंवा डोकें उंच करणें; यारीनें सामान उचलणें, यारीनें चढविणें. *To crane one's neck*, to stretch out the neck so as to see better. चांगलें दिसावें म्हणून मान लांब करणें, उंच करणें.

Crā'nĭŭm, *n.* (क्रे'नि-अम्)—(*Pl.* Crania) bones enclosing the brain, the brain-pan; the skull. करटी, कपाळ; मस्तक. *Cra'nial*, *a.* डोक्याच्या कवटीसंबंधीं *Crāniolo'gical*, *a.* मस्तकाकार शास्त्रासंबंधीं. *Crāniol'ogist*, *n.* मस्तकाकारशास्त्रवेत्ता. *Craniol'ogy*, *n.* मस्तकविज्ञानशास्त्र.

Crănk *n.* (क्रॅङ्क्)—a handle used for turning a wheel; the part of a machine which changes the up and down movement into a circular one or vice versa; fanciful speech; an eccentric person, a person with peculiar ideas. चाक फिरविण्याचा दांडा; यंत्र वाटोळें फिरविण्याकरितां केलेला पेंच; चमत्कारिक बोलणें,

वक्रोक्ति ; विक्षिप्त माणूस, लहरी मनुष्य. *Crank'y, a.* shaky ; capricious, eccentric. हालविणारा ; लहरी, विक्षिप्त.

Crăn'nŏg, *n.* (क्रॅ'नॉग्)—an ancient lake-dwelling in Scotland or Ireland. स्कॉटलंड किंवा आयर्लंड-मधील सरोवरावरील प्राचीनकाळीं राहाण्याचें ठिकाण.

Crănn'y̆, *n.* (क्रॅ'नि)—a chink, a crevice, a small crack. चीर, फट, भेग *Crann'ied, a.* पुष्कळ फटी असलेला, बहुच्छिद्र.

Crāpe, *n.* (क्रेप्)—a gauzy wrinkled fabric, *usu.* of black silk. बारीक झिरझिरीत काळें कापड, वाल

Crăp'ūlence, *n.* (क्रॅ'प्युलन्स्)-the state occasioned by excessive drinking or eating. अतिशय दारू पिण्यामुळें किंवा खाण्यामुळें झालेली स्थिति, मद्यजन्य-विकार. *Crăp'ulent, Crăp'ulous, aa.* feeling ill after drinking too much. झिंगून आजारी पडलेला, कैफ चढलेला.

Crăsh, *n.* (क्रॅश्)—a violent fall or impact ; a sudden downfall or collapse ; a coarse linen cloth. जोरानें पडणें, धडधडाट ; एकाएकीं अधःपात, नाश, जबर ठोकर, दिवाळें ; तागाचें जाडें भरडें कापड. *v. t.* to fall with a crash ; to make a loud crash. धाडकन पडणें, फुटून पडणें ; कडाडणें. *With a crash,* धाडकन्.

Crăss, *a.* (क्रॅस्)—grossly stupid ; without sensibility ; of thick coarse texture, coarse ; gross, complete. अतिमूर्ख ; अक्कलशून्य ; जाड्या सुताचें, जाड, घट्ट, भरड ; पूर्ण (अज्ञान).

Cră'ssitūde, *n.* (क्रॅ'सिट्यूड्)—grossness ; gross stupidity. जाडी, जाडपणा ; अत्यंत मूर्खपणा.

Crāte, *n.* (क्रेट्)—an open-work case of wooden bars or wicker for goods. सांकाटा, टोपली, करंडी, हारा, पाटी.

Crā'ter *n.* (क्रे'टर्)—a volcano-mouth ; a bowl-shaped cavity. ज्वालामुखी पर्वताचें मुख ; वाटोळा खळगा किंवा वाटोळी खांच.

Cravăt', *n.* (क्रव्हॅ'ट्)—a kind of neckcloth, a piece of cloth worn round the neck. कंठवस्त्र ; गळेबंद, गळपट्टी.

Crāve, *v.i. & t.* (क्रेव्ह्)—to have a vehement desire for ; to request, to beg for. हांव सुटणें ; विनंति करणें, याचना करणें.

Crā'ven, *a.* (क्रे'व्हन्)—without courage, cowardly ; abject. भ्याड, भित्रा ; नीच. *n.* a cowardly person or animal. नामर्द मनुष्य, भित्रा प्राणी. *To cry craven,* to surrender. 'शरण आलों' असें म्हणणें, शरण जाणें.

Craw, *n.* (क्रॉ)—a crop of bird or insects. पाखरांच्या गळ्यांतील अन्नाशयाची पिशवी, कोठा.

Crawl, *v. i.* (क्रॉल्)—to advance on hands or knees or on the belly ; to move with extreme slowness ; to creep, to sneak about. रांगणें, सरपटत जाणें ; मुंगीच्या पायानें चालणें, अत्यंत हळू जाणें ; गुपचुप निघून जाणें. *n.* crawling motion ; a slow walk ; a fast stroke in swimming ; a pen in shallow water for fish etc. सरपटणें, रांगणें; मंद गति ; पोहोतांना जोरानें हात मारणें ; समुद्राचे कांठीं मासे, कालवें वगैरेसाठीं केलेली जागा,-वाडा.

Craw'ler, *n.* (क्रॉ'लर्)-one that crawls ; a baby's overall ; a louse ; a cab moving slowly in search of fare. रांगणारा, रखडत जाणारा ; लहान मुलाचा अंगरखा ; ऊ ; भाडें मिळण्याकरितां हळुहळु चालविली जाणारी गाडी.

Cray'fish, Craw'fish, *nn.* (क्रे'फिश् , क्रॉ'फिश्)—a freshwater creature with a shell and ten legs. गोड्या पाण्यांतील खेंकडा, चिमोरा, चिमोरें.

Crāy'on, *n.* (क्रे'ऑन्)—a stick or pencil of coloured chalk ; a picture drawn with crayons. रंगीत खडूची कांडी ; रंगीत खडूच्या कांड्यांनीं काढलेलें चित्र.

Crā'ze, *v. t.* (क्रेझ्)—to drive crazy, to cause to become mad. डोकें फिरवणें, वेड लावणें. *n.* general or individual mania. सार्वत्रिक किंवा वैयक्तिक वेड. *To be the craze,* to be generally sought or affected. सर्वांकडून मिळण्याचा प्रयत्न केला जाणें, सर्वांना वेड लावणें. *Crazing mill,* a mill for crushing tin ore. खाणींतील जस्ताची माती कुटण्याची चक्की.

Crā'zy̆, *a.* (क्रे'झि)—unsound, shaky ; mad ; half-witted ; madly eager for. वेडसर, वेडा ; अर्धवट ; अत्यंत उत्सुक.

Creak, *n.* (क्रीक्)—a harsh noise as of unoiled hinge. करकर आवाज. *v. i.* to emit a sharp noise. करकरणें, करकर वाजणें.

Cream, *n.* (क्रीम्)—the oily part of milk convertible into butter ; the best part of anything, the pick. मलई, साय ; कोणत्याहि गोष्टीचा निवडक किंवा उत्तम भाग. *v. t. & i.* to form cream or scum ; to skim off the cream. साय धरणें ; साय काढून घेणें, सार घेणें. *a.* cream-coloured, yellowish white. साईच्या रंगाचा, फिका पिंवळा. *Cream'y, a.* साईचा, साईसारखा.

Crea'mery̆, *a.* (क्री'मरि)—a butter-factory ; a shop where milk, cream, etc. are sold. लोणी तयार करण्याचा कारखाना ; दूध, मलई, वगैरे विकण्याचें दुकान.

Crease, *n.* (क्रीझ्)—a line made by folding ; a wrinkle ; (*Crick.*) a white line defining the position of the bowler and the limit of

the batsman's ground. घुमट, पट्टीची खूण; क्रिकेटच्या खेळांत विकेटच्या पुढें काढलेली मर्यादेची रेघ. *v. t. & i.* to make or develop creases. मोडसळ पाडणें,-पडणें.

Create', *v. t.* (क्रिए'ट्)—to bring into existence; to invest with rank; to originate, to shape and organize. उत्पन्न करणें; मोठी पदवी देणें; उपस्थित करणें, प्रारंभ करणें. *Crea'tive, a.* उत्पादक, जनक.

Crea'tion, *n.* (क्रिए'शन्)—the act of creating (esp. the world); all created things; production of the human mind. उत्पत्ति, सृष्टि; सृष्ट वस्तु, मत्पक्ष सृष्टि; मनःकल्पित गोष्ट.

Crea'tor, *n.* (क्रिए'टर्)—the Supreme Being; one who creates. जगत्कर्ता परमेश्वर; उत्पन्नकर्ता, उत्पादक. *Crea'tress, n. fem.*

Crea'ture, *n.* (क्री'चर्)—any human being, or animal; a person's dependant or tool; a contemptible person. मनुष्यप्राणी, प्राणी; ताटाखालचें मांजर, बाहुलें, बगलबच्चा, दुसऱ्याचा मिंधा, तिरस्करणीय मनुष्य.

Creche, *n.* (क्रेश्)—a public nursery for infants or children, a place where children are looked after while the mothers are at work. लहान मुलांचें सार्वजनिक संगोपनस्थान.

Cre'dence, *n.* (क्री'डन्स्)—the act of believing; belief; credit. विश्वास, श्रद्धा, विश्वासाचें कारण. *To give credence to*, to believe. विश्वास ठेवणें.

Creden'tials, *n. pl.* (क्रिडें'न्शल्झ्)—letters of recommendation, papers which prove that one may be trusted. शिफारसपत्रें, मुखत्यारनामा, लायकीची खूण.

Cred'ible, *a.* (क्रे'डिबल्)—believable; worthy of belief. विश्वास ठेवण्याजोगा, विश्वसनीय, विश्वासास पात्र. *Credibi'lity, n.* विश्वसनीयता, विश्वासपात्रता.

Cred'it, *n.* (क्रे'डिट्)—belief, trust; good reputation; allowing of deferred payment; a sum at a person's disposal in bank. श्रद्धा, विश्वास; प्रतिष्ठा, नांवलौकिक; उधारी; जमा असलेली रक्कम. *v. t.* to believe; to carry to credit side of account. विश्वास ठेवणें, जमा करणें.

Cred'itable, *a.* (क्रे'डि-टेबल्)—praiseworthy, worthy of praise, that brings credit or honour. स्तुत्य, प्रशंसनीय.

Cred'itor, *n.* (क्रे'डि-टर्)—a person or body to whom one owes money. धनको, सावकार.

Cre'do, *n.* (क्री'डो)—creed. धर्ममार्ग, पंथ, संप्रदाय, मत.

Cred'ulous, *a.* (क्रे'ड्युलस्)—too ready to believe, unsuspecting, easily deceived. श्रद्धाळू, भोळसट. *Credu'lity, n.* too great a willingness to believe. भोळेपणा, कानपिसेपणा.

Creed, *n.* (क्रीड्)—the formal summary of Christian doctrine; a set of opinions or fundamental points of belief on any subject. ख्रिश्चन धर्मतत्त्व; पंथ, मार्ग, मत.

Creek, *n.* (क्रीक्)—an inlet on the sea-coast or the arm of river; a brook or small stream. खाडी; लहान ओढा.

Creep, *v. i.* (क्रीप्)—to crawl along the ground; to move stealthily or slowly; to be servile; to experience shivering sensation. सरपटत जाणें; चोरून जाणें; अत्यंत नम्र होणें; थरथर कांपणें. *To creep in*, नकळत आंत येणें,-जाणें. *To make one's flesh creep*, frighten. भिवविणें, घाबरविणें. *Creep'y, a.* causing fear. भीतिदायक.

Creep'er, *n.* (क्री'पर्)—a creeping or climbing plant, a plant which grows along the ground or up the wall. लता, वेल.

Cremate', *v. t.* (क्रिमे'ट्)—to consume by fire (as method of disposing of corpses), to burn a dead body. प्रेत अग्निसात् करणें, जाळणें. *Crema'tion, n.* प्रेत जाळणें, प्रेतदहन. *Crema'tor, n.* (प्रेतें) दहन करणारा; प्रेतें दहन करण्याची भट्टी.

Cremator'ium, *n.* (क्रेमॅटॉ'रि-अम्)—establishment for cremation, a place where dead bodies are burnt. प्रेताचे दहनादि संस्कार करण्याची जागा, स्मशानभूमि.

Cre'ole, *n.* (क्री'ओल्)—person born in the West Indies. वेस्ट इंडीजमध्यें जन्मलेला इसम.

Cre'osote, *n.* (क्री'असोट्)—an oily liquid obtained from coal (used for killing seeds of disease and protecting things from decay). कोळशापासून काढलेला एक प्रकारचा तेलासारखा द्रव पदार्थ.

Crepe, *n.* (क्रेप्)—a thin cloth or paper with many small folds or waves in it. सुरकुतलेला चुणी असलेलें पातळ कापड किंवा कागद.

Crep'itate, *v. i.* (क्रे'पि-टेट्)—to make a crackling noise. कडकड आवाज करणें, तडतडणें, तडतड आवाज होणें. *Crepita'tion, n.* तडतड आवाज.

Crept, *Pa. t. & pa. p.* of **Creep**.

Crepus'cular, *a.* (क्रिप'स्क्युलर)—of twilight; (Zool.) active etc. at twilight; dim. संधिप्रकाशाचा; संधिप्रकाशकालीन; अंधुक.

Crescen'do, *adv.* (क्रेशे'न्डो)—with gradually increasing volume, louder and louder. अधिकाधिक मोठ्यानें, जोरानें (वाजविण्याचें-गाण्याचें गीत).

Crĕs'cent, *n.* (क्रे'सेन्ट्)—the figure of the moon in the first or last quarter; a Mohammedan badge; a row of houses of curved shape. चंद्रकोर; मुसलमानांची चंद्रकोरेप्रमाणें असणारी खूण; घरांची कमानदार रांग. *a.* crescent-shaped. अर्धचंद्राकृति. शुक्लपक्षांतील चंद्रासारखा.

Crĕss, *n.* (क्रेस्)—a plant with pungent edible leaves. आळीव. अहाळींव. हाळींव झाड.

Crĕss'et, *n.* (क्रे'सिट्)—a fire-basket slung to give light. निशाणीचा-खुणेचा दिवा. संकेतदीप.

Crĕst, *n.* (क्रेस्ट्)—the comb or tuft on an animal's head; a plume or central ridge (of horse &c.); the top of a mountain; the curl or foam on a wave. शेंडी. तुरा; शिरस्त्राणामध्यें असलेला पिसारा; घोड्याची वगैरे आयाळ; पर्वताचें शिखर; (लाटेचा) वरचा भाग किंवा माथा.

Crĕst'fallen, *a.* (क्रे'स्ट्-फॉलन्)—with drooping crest, abashed, mortified, dejected, bowed down, dispirited. मानभंग झालेला, खिन्न, उदास.

Cretā'ceous, *a.* (क्रिटे'शस्)—of the nature of chalk, chalky. खडूसारखा, खडूचा.

Crē'tin, *n.* (क्री'टिन्)—a deformed idiot. कुरूप मूर्ख मनुष्य.

Crē'tinism, *n.* (क्री'टिनिझम्)—combination of idiocy and deformity. मूर्खपणा आणि कुरूपता यांचें एकीकरण. *Cre'tinous, a.*

Crĕ'tŏnne, *n.* (क्रे'टॉन्)—an unglazed colour-printed cotton cloth. रंगीत छापील सुती कापड.

Crevăsse', *n.* (क्रि-व्हॅ'स्)—a deep open split or chasm in a great mass of ice on a mountain side. बर्फाच्या नदींतील मोठी भेग. चीर. खांच.

Crĕv'ice, *n.* (क्रे'व्हिस्)—a chink, fissure, a small crack. फट. भेग. चीर.

Crew, *Pa. t.* of crow.

Crew, *n.* (क्रू)—a ship's or boat's company; a set; a gang, a mob. नावाडी लोक. जहाजावरचे खलाशी; तांडा. टोळी. जमाव.

Crib, *n.* (क्रिब्)—a barred rack for fodder; a child's bed; a plagiarism; a translation for (*esp.* illegitimate) use of students. गव्हाण; लहान मुलाचा बिछाना; चोरून घेतलेला मजकूर; विद्यार्थ्यांच्या उपयोगाकरितां केलेलें भाषांतर *v. t. & i.* to confine in a small space; to steal ideas and give them out as one's own; to look secretly at a book or other boy's paper in an examination. लहान जागेंत कोंडून ठेवणें; दुसऱ्याच्या कल्पना चोरून स्वतःच्या म्हणून प्रसिद्ध करणें; परीक्षेंत 'कॉपी' करणें.

Cribb'age, *n.* (क्रि'बिज्)—a game played with cards and a board with many holes in it, a small stick being moved from one hole to another to count points won. एक तक्त्याचा पत्त्यांचा खेळ. *Cribbage-board, n.*

Crick, *n.* (क्रिक्)—a painful stiffness of the neck. मानेच्या स्नायूचा पेटका. उसण.

Crick'et, *n.* (क्रि'किट्)—a chirping insect; an open-air game with ball, bats and wickets. राळ. झिल्ली. रातकिडा; क्रिकेटचा किंवा चेंडूफळीचा इंग्रजी खेळ. Crick'eter, *n.* one who plays at cricket. क्रिकेट खेळणारा. Crick'eting, *n.* playing at cricket. क्रिकेट खेळणें. *That's not cricket*, that is not fair, that infringes the code of fair play. ती गोष्ट रास्त नाहीं.

Cri'er, *n.* (क्रा'यर्)—an officer who makes public announcements. जाहीर दवंडी पिटणारा. थाळी पिटणारा.

Crime, *n.* (क्राइम्)—an act punishable by law, a wicked act; a sin. अपराध, मोठा गुन्हा; दुष्ट कृत्य; पाप.

Crim'inal, *a.* (क्रि'मि-नल्)—of the nature of crime; relating to crimes. गुन्ह्याच्या स्वरूपाचा; फौजदारी गुन्ह्याचा. *n.* a person guilty of crime, a law-breaker. गुन्हेगार. *Criminal'ity, n.* state of being a criminal. अपराधीपणा, अपराध.

Crim'ināte, *v. t. & i.* (क्रि'मि-नेट्)—to impute a crime to; to prove guilty of crime; to censure. दोषारोप करणें. दोष लावणें; अपराधी किंवा गुन्हेगार ठरविणें; निंदा करणें. *Crimina'tion, n.* गुन्हेगार ठरविणें. *Crim'inative, Crim'inatory, aa.* दोषारोप करणारा, दोषावह.

Criminŏl'ogy̆, *n.* (क्रिमिनॉ'लॉजि)—the science of crime. गुन्ह्यांचें-गुन्ह्याचा तपास लावण्याचें-शास्त्र.

Crim'iny̆, *int.* (क्रि'मिनि)—an expression of surprise. आश्चर्योद्गार.

Crimp, *n.* (क्रिम्प्)—an agent who entraps men for seamen or soldiers. लष्कराच्या किंवा आरमाराच्या नोकरींत फसवून नेणारा अडत्या. दलाल. *v. t.* to entrap for service in the army or navy; to press into small folds. लष्करांत फसवून नेणें; घडी घालणें. सुरकुत्या घालणें.

Crim'son, *a. & n.* (क्रि'म्झन्)—rich deep red (colour). किरमिजी रंगाचा; किरमिजी रं[illegible]. *v. t. & i.* to turn crimson; to dye crimson. किरमिजी रंग येणें किंवा देणें

Cringe, *v. i.* (क्रिंज्)—to cower; to fawn, to behave obsequiously, to bend low or go down on the knees because of fear or shame. दबकणें; पुढें पुढें नाचणें. हांजी हांजी करणें. धुंकी झेलणें.

Crin'kle, *n.* (क्रिं'कल्)—a wrinkle; a short bend or turn. सुरकुती. चूण; लहानसें वांकण किंवा

थांक. *v. t. & i.* to bend into many small folds. सुरकुणें, दुमडणें, दुमडून जाणें. *Crink'ly, adv.* सुरकुत्यांचा.

Crĭn'oline, *n.* (क्रि'नलिन्)—a woman's garment with large circles of wire to hold it out in a bell-like shape. एक प्रकारचा स्त्रियांचा घाटोळा फुगीर गोलाकार होणारा झगा.

Crĭp'ple, *n.* (क्रि'पल्)—a lame person. लंगडा मनुष्य. *v. t.* to lame, to disable, to render ineffective; (*fig.*) to impair, to hurt and make useless. लंगडा करणें, पंगू करणें; हानि किंवा नुकसानी करणें.

Crī'sis, *n.* (क्रा'यू-सिस्)—a turning-point; the time of acute danger. अवस्थान्तर; आणीबाणीची वेळ, संकटप्रसंग, अति कठीण प्रसंग. *Crī'ses,* (क्रा'इसीझ्) (*pl*).

Crĭsp, *a.* (क्रिस्प्)—brittle; bracing; brisk, decisive; curly. कुडकुडीत; टवटवीत, पुष्टिकारक; घमघमीत, निर्णायक; कुरळे. *v. t. & i.* to press into short folds; to make or become crisp. लहान घड्या पाडणें; खुसखुशीत करणें किंवा होणें. *Crisp air,* fresh and strength-giving air. मोकळी, तरतरी आणणारी हवा.

Crĭss'-cross, *a.* (क्रि'स्-क्रास्)—crossing in different directions. निरनिराळ्या ठिकाणीं वांकड्यातिकड्या झालेल्या (ओळी).

Crĭs'tāte, *a.* (क्रि'स्टेट्)—having a crest. शिखा किंवा तुरा असलेला.

Critē'rion, *n.* (क्राय्-टी'रिऑन्)—a principle taken as standard in judging, a measure; a test. इयत्ता, ठराविक प्रमाण, कसोटी. (*pl. Critē'riă,* क्राय्-टी'रिआ).

Crĭt'ic, *n.* (क्रि'टिक्)—a judge of literary or artistic works, a person who attempts or is skilled in criticism, a connoisseur. परीक्षक, टीकाकार.

Crĭt'ical, *a.* (क्रि'टि-कल्)—censorious, fault-finding; skilled in criticism; of the nature of a crisis. निंदाखोर, दोषदर्शी; टीकाकुशल; आणीबाणीचा.

Crĭ'ticăster, *n.* (क्रि'टिकॅस्टर्)—a feeble critic. क्षुद्र टीकाकार, हलकट-हलक्या प्रतीचा-टीकाकार.

Crĭt'icism, *n.* (क्रि'टि-सिझ्म)—judging of merit; an animadversion; a critical observation or examination. गुणागुणविवेचन, गुणदोषविवेचन, कडक टीका; योग्य परीक्षण.

Crĭt'icize, *v. t. & i.* (क्रि'टि-साइझ्)—to discuss critically, to pass judgment on the merits or faults; to find fault with. गुणदोष दाखविणें, टीका करणें; दोष काढणें.

Critique', *n.* (क्रिटी'क्)—a critical essay, a criticism, a review. गुणदोषविवेचनात्मक निबंध, परीक्षण.

Croak, *n.* (क्रोक्)—a deep hoarse note of a frog or raven. बेडकाचें किंवा कावळ्याचें ओरडणें. *v. i. & t.* to utter a croak, to be hoarse; to talk gloomily. डरांव डरांव करणें; उद्विग्नतेनें बोलणें, सदोदित रड गाणें. *Croak'y, a.*

Croak'er, *n.* (क्रो'कर्)—a prophet of ill. अशुभ बोलणारा, अभद्रभाक्या, रड्या.

Crō'chet, *n.* (क्रो'शि)—a kind of knitting with hooked needle. सुताचें किंवा लोकरीचें एक प्रकारचें वीणकाम.

Crŏck, *n.* (क्रॉक्)—an earthenware jar, an earthen vessel, a pot or pitcher; a broken-down horse; worn-out or disabled person. मातीचें भाजलेलें भांडें, खुजा; निरुपयोगी घोडा; म्हातारा किंवा निरुपयोगी मनुष्य.

Crŏck'erў, *n.* (क्रॉ'करि)—earthenware (vessels, plates, &c.), earthen dishes used in eating. मातीचीं भाजलेलीं गाडगींमडकीं, मातीचीं भांडीं.

Crŏck'et, *n.* (क्रॉ'किट्)—a small ornament (*usually* a bud or curled leaf) on inclined sides of a pinnacle. एक लहान खोदीव-कोरीव-शोभिवंत वस्तु.

Crŏc'odile, *n.* (क्रॉ'को-डाइल्)—a large amphibious reptile, a large water animal; a hypocritical enemy; (colloq.) girls' school walking two & two. सुसर, नक्र, मगर; ढोंगी किंवा कपटी शत्रु; शाळेंत जातांना मुलींचें जोडी जोडीनें चालणें. *To shed crocodile tears,* to pretend to be sorry, to shed false or affected tears. नक्राश्रु ढाळणें, मायावीपणानें रडणें.

Crō'cŭs, *n.* (क्रो'-कस्)—a spring flower; a peroxide of iron used for polishing. एक वसंतऋतूंत येणारें फूल; पिंवळ्या रंगाची भुकी.

Croes'ŭs, *n.* (क्री'सस्)—a wealthy man. श्रीमंत मनुष्य, कुबेर, धनजोट.

Croft, *n.* (क्राफ्ट्)—a small piece of arable land close to house. घराजवळची जमीन, वाडी. *Crof'ter, n.* लहान शेतवाडी करणारा.

Crōne, *n.* (क्रोन्)—a withered old woman, a very old woman. अत्यंत म्हातारी स्त्री, थेरडी.

Crō'nў, *n.* (क्रो'नि)—a familiar friend, an intimate companion. सलगीचा किंवा जिवलग मित्र.

Crŏŏk, *n.* (क्रुक्)—a hooked staff, (*esp.* of a shepherd or a bishop); a bend, a curve; a wry turn; a swindler, a criminal. आंकडा असलेली काठी, वांक, वांकदार दांडा,-दंड, सोटा; कपट, युक्ति; लबाड कपटी मनुष्य, चोरांचा

साधी. *v. t. & i.* to bend into a crook. वांकणें. वळणें. *By hook or by crook*, by some means or other. कसेंहि करून, कोणत्याहि उपायानें.

Crŏoked, *a.* (क्रुक्ट्)—having a cross handle, crutched. कुबडी असलेला.

Crŏok'ĕd, *a.* (क्रु'किड्)—not straight, bent, twisted; not straightforward, deceitful, not honest. वांकडा, वाकलेला, तेढा; वक्र, सरळ नसलेला, कुटिल, खोटा, कपटी. *Crook'edly, adv.*; *Crook'edness, n.* वांकडेपणा, कौटिल्य, वक्रता.

Crōōn, *n.* (क्रून्)—a low monotonous singing. हळुहळू आपल्याशींच गाणें, गुणगुणणें. *v. i. & t.* to hum or sing softly. आपल्याशींच गुणगुणणें.

Crop, *n.* (क्रॉप्)—a pouch in bird's gullet; the thick end of a whip, a whip-handle; the produce of cultivated lands; cropping of hair. पांखराच्या गळ्यांतील पिशवी; चाबकाचें जाड टोंक, चाबकाची मूठ; पीक, उभें शेत, पीकपाणी; डोक्यावरचे केंस कापणें. *v. t. & i.* to poll or clip; to bite off or eat down (grass, &c.); to sow, to plant, to raise a crop; to reap; to yield harvest. खुडणें, तोडणें; गवत चावणें किंवा खाणें; पेरणें, (झाड) लावणें, शेत करणें; कापणी करणें; पीक येणें. *To crop up*, to appear unexpectedly. अनपेक्षित रीतीनें घडून येणें. *Crop-eared*, with ears cut short. मुंड्या कानाचा.

Crŏp'per, *n.* (क्रॉ'पर्)—a person or thing that crops; (sl.) a heavy fall. पीक कापणारा; धरतें झाड; जोरानें पडणें. *To come a cropper*, to fall (e. g. from a horse); to fail badly. घोड्यावरून वगैरे पडणें; सपशेल चुकणें किंवा पडणें.

Crō'quet, *n.* (क्रो'कि)—a lawn game with hoops, wooden balls, and mallets. एक प्रकारचा काठीनें खेळण्याचा खेळ.

Croquette', *n.* (क्रोके'ट्)—a ball meat baked or cooked in fat. भाजलेला किंवा चरबींत शिजवलेला मांसाचा गोळा.

Dăll'y, *v. i.* (डॅ'लि)—to spend time in idleness or vacillation. आळसांत वेळ घालवणें, अळंटळं करणें. *To dally with*, to play carelessly with. चैनींत कालक्रमण करणें, रमणें. *To dally away*, to consume to no purpose. व्यर्थ घालविणें.

Dăll'iance, *n.* (डॅ'लि-अन्स्)—fondling; love-making; delay, delaying. कामचेष्टा, विलास; विलंब, अळंटळं.

Dălmā'tian, *n.* (डॅल्मे'शन्)—a white dog with black spots. काळे काळे ठिपके असलेला पांढरा कुत्रा.

Dăm, *n.* (डॅम्)—a barrier checking the downward flow of water; a female parent, mother (*usu.* of beast), a mother-animal. धरण, बंधारा; (जनावरांची) आई, मादी. *The devil and his dam*, the powers of evil. दुष्ट शक्ति.

Dăm'age, *n.* (डॅ'मेज्)—harm; injury; loss; (*pl.*) the sum claimed or adjudged for damage. इजा, हानि, नुकसान; (अने०) नुकसान-भरपाई म्हणून मागितलेली रक्कम. *v. t.* to do harm, to injure. नुकसान करणें, अपाय करणें.

Dămascēne', *v. t.* (डॅमसीन्)—to ornament metal with inlaid silver or gold. चांदी किंवा सोनें धातूमध्यें बसवून दागिना तयार करणें. (Also, Dămaskeen', *v. t.*).

Dămascēne', *n.* (डॅमसी'न्)—a damson. मनुका.

Dăm'ăsk, *n.* (डॅ'मास्क्)—kinds of woven material of silk or linen, beautiful silk with raised figures worked into it; a fine steel made in Damascus; a light rose colour. एक प्रकारचें रेशमी अगर तागाचें वेलबुट्टीचें अगर भरजरी कापड; डॅमास्कसमध्यें तयार झालेलें पोलाद; फिका गुलाबी रंग.

Dāme, *n.* (डेम्)—a lady; a matron. बाई, घरची कारभारीण; प्रौढ किंवा वयस्क बाई. *Dame school*, a small elementary school kept by an old woman. वृद्ध बाईनें घातलेली लहानशी प्राथमिक शाळा.

Dăm'măr, *n.* (डॅमार्)—name of various resins, esp. the cat's-eye resin. डामर, डांबर, यक्षधूप.

Dămn, *v. t. & i.* (डॅम्)—to doom to eternal torment, to condemn with curses; to give hostile reception to (play); to censure severely or condemn; to curse. अधोगति देणें, नरकांत टाकणें; शाप देणें; तिरस्कारानें स्वागत करणें; निंदा करणें, धिक्कारणें; दोष लावणें, शिव्याशाप देणें.

Dăm'nāble, *a.* (डॅ'म्नेबल्)—deserving damnation, hateful, detestable, pernicious. तिरस्करणीय, द्वेष्य.

Dămnā'tion, *n.* (डॅम्ने'शन्)—eternal punishment in hell; condemnation. नरकवास, अधोगति; धिक्कार.

Dăm'nātory, *a.* (डॅ'म्नेटरि)—conveying censure. निंदात्मक.

Dămned, *a. & adv.* (डॅम्ड्)—detestable, hateful, damnable; damnably. तिरस्करणीय, निंद्य, त्याज्य; तिरस्कारानें.

Dăm'nĭfy, *v. t.* (डॅ'म्नि-फाय्)—to cause an injury to. इजा करणें. *Damnifica'tion*, *n.* an injury caused. उपद्रव देणें, अपाय, हानि.

Dămp, *n.* (डॅम्प्)—diffused moisture. सरदी, सर्द हवा. *a.* not in the normal dry state; affected with moisture. दमट; दमसर, ओला. *v. t.* to make slightly wet; to deaden, to depress, to dispirit, to make spiritless. दमट करणें; हिरमोड करणें, धैर्य खचवणें, नाउमेद करणें. *Fire damp*, a poisonous gas found in the coal mines. कोळशांच्या खाणींत असलेला विषारी वायु. *To damp down*, to make a fire burn more slowly; to make an instrument sound less loudly. विस्तव मंद करणें; आवाज कमी करणें, मंद करणें. *To damp one's feelings*, to cause loss of joy or hope. एखाद्याचा हिरमोड करणें, निराशा करणें.

Dăm'per, *n.* (डॅ'म्पर्)—a person or thing that depresses; that which makes the fire burn more slowly; a thin cake of flour and water. नाउमेद करणारा इसम किंवा गोष्ट; ज्याच्यायोगानें विस्तव मंद होतो तें; पिठाची केलेली पातळ पोळी. *To cast a damper on a party*, to cause a party to be less merry. आनंदांत कमीपणा आणणें.

Dăm'sĕl, *n.* (डॅ'म्झेल्)—a young girl. तरुणी, युवती.

Dăm'son, *n.* (डॅ'म्-झन्)—a small dark-blue stone-fruit. मनुका.

Dănce, *v. i. & t.* (डान्स्)—to move nimbly (with rhythmic steps, glides, &c. *usu.* to music); to jump about, to move in a lively way. नृत्य करणें; इकडे तिकडे नाचणें, आनंदानें थयथय नाचणें. *n.* a piece of dancing; a dancing party. नृत्य, नाच; नाचणारी मंडळी. *To dance to one's tune or pipe*, to follow one's lead. एखाद्याला पूर्णपणें अनुसरणें, पुढाऱ्याला अनुसरून वागणें. *To dance upon nothing*, to be hanged. फांशी दिला जाणें, फांसावर लटकणें. *To dance attendance upon*, to be kept waiting by, to follow about. हात जोडून सेवेस तत्पर राहाणें, पुढें पुढें करणें, हांजीहांजी करणें. *To lead* (a person) *a dance*, to entangle one in a useless pursuit or toil. नाडे नाचविणें, एखाद्याला निष्कारण त्रास देणें. *St. Vitus's dance*, a disorder in children. एक मुलांचा रोग, कंपवात.

Dăn'cer, *n.* (डा'न्सर्)—one who engages in dancing, esp. one who dances in public for pay. नाचणारा, नाच्या, नाचरा.

Dăn'cĭng-girl, *n.* (डा'न्सिंग्-गर्ल्)—a female professional dancer, a nautch-girl. कलावंतीण, नाचणारी मुलगी.

Dăndĕli'on, *n.* (डॅन्डि-ला'यन्)—a yellow-flowered wild plant. एक पिवळीं फुलें येणारें फुलझाड.

Dăn'der, *n.* (डॅ'न्-डर्)—temper, anger, indignation. राग, क्रोध, आवेश. *To get one's dander up*, to grow angry, to make one angry. रागावणें, राग आणणें.

Dăn'dle, *v. t.* (डॅ'न्डल्)—to dance or nurse (a child) in the arms. (मुलाला) हातावर नाचवणें -झेलणें, लालन करणें, गोंजारणें.

Dăn'drŭff, **Dan'drĭff**, *n.* (डॅ'न्ड्रफ्, डॅ'न्ड्रिफ्)—the dead skin in small scales among the hair. खवडा, डोक्यांतला कोंडा.

Dăn'dy̆, *n.* (डॅ'न्डि)—a man paying excessive attention to smartness in dress. अकडबाज, अतिशय नटणारा मनुष्य. *Dan'dyism*, नटवेपणा, नखरेबाजी.

Dā'nger, *n.* (डे'न्जर्)—risk, hazard, insecurity, liability or exposure to harm. भय, धोका, प्राणसंकट.

Dān'gerous, *a.* (डे'न्जरस्)—risky; which may cause harm. संकटाचा, धोक्याचा; अपायकारक, भयंकर, जिवावरचा.

Dăng'le, *v. t. & i.* (डॅं'गल्)—to be loosely suspended; to hold in suspense; to linger as a lover. ओळकंबा घेणें, लटकत राहाणें; मुग्ध राहाणें; पाठोपाठ फिरणें. *Dan'gler*, *n.* दुसऱ्याचे तंत्रानें वागणारा, नादीं मनुष्य.

Dănk, *a.* (डॅंक्)—oozy, damp, cold and wet. ओला, ओलसर.

Dăph'nė, *n.* (डॅ'फ्-नि)—a flowering shrub. एक प्रकारचें फुलझाड.

Dăpp'er, *a.* (डॅ'पर्)—neat, precise, (usually of a small person) neat and well-dressed. सुबक, व्यवस्थेशीर, झकपक.

Dăp'ple, *v. t.* (डॅ'पल्)—to variegate with rounded spots. रंगीबेरंगी करणें, चित्रविचित्र करणें. *Dappled*, spotted. ठिपके ठिपके असलेला. *Dapple grey*, *a.* & *n.* अबलख, चित्रवर्णी, पंचरंगी (घोडा).

Dāre, *v. t.* (डेअर्)—to venture; to have courage or impudence for any purpose; to defy, to challenge. धजणें, धाडस करणें; हिंमतीनें पाऊल टाकणें; आह्वान देणें. *I dare say*, I am prepared to believe, I do not deny. मी खात्रीपूर्वक सांगतों.

Dāre'dĕvĭl, *a.* (डे'अर्-डेव्हिल्)—reckless अविचारी. *n.* a reckless person, a desperado; a person who is not afraid of the greatest danger. अविचारी मनुष्य; अत्यंत धाडसी मनुष्य.

Dā'ring, *n.* (डे'अरिंग्)—adventurous courage. धाडस, साहस, धाष्टर्य, धिटाई. *a.* bold, fearless. धीट, साहसी.

Därk, *a.* (डार्क्)—with little or no light; gloomy; obscure, secret; brown-complexioned. अंधाराचा; काळोखाचा; उदास; दुर्बोध; गुह्य; काळसर, काळा. *n.* absence of light; want of knowledge; dark colour. काळोख, अंधार; अडाणीपणा, अज्ञान; काळा रंग. *Dark red*, deep red. दाट किंवा गर्द लाल. *To keep dark*, to remain in hiding. बाजूला राहाणें, अज्ञात राहणें, मौन धरणें. *To keep in the dark*, अंधारांत ठेवणें, गुप्त ठेवणें, स्फोट होऊं न देणें. *A leap in the dark*, a rash step or enterprise. धाडसी किंवा अविचारी कृत्य.

Därk'en, *v. t. & i.* (डा'र्कन्)—to make or become dark; to perplex. काळा करणें किंवा होणें; घोंटाळा करणें, गोंधळविणें.

Därk'lĭng, *adv. & a.* (डा'र्क्-लिंग्)—in the dark. अंधारांत, अंधारांतील.

Därk'ness, *n.* (डा-र्क्'निस्)—absence of light; ignorance; wickedness. अंधार, काळोख; अज्ञान; दुष्टपणा.

Därk'some, *a.* (डा'र्क्-सम्)—gloomy; obscure. उदास; दुर्बोध.

Dărk'y̆, Dărk'ey, *n.* (डा'र्कि)—a man with a black skin. कृष्णवर्णाचा मनुष्य, नीग्रो.

Dărl'ing, *n.* (डा'र्लिंग्)—a beloved person or animal. जिवलग मनुष्य किंवा प्राणी, गळ्यांतील ताईत, लाल. *a.* much beloved or prized, favourite. जिवलग, अत्यंत आवडता.

Dărn, *v. t.* (डार्न्)—to mend hole with needle and yarn or thread ; (sl.) to damn. रफू करणें; धिक्कारणें, तुच्छ लेखणें. *n.* place darned. रफू.

Dărn'el, *n.* (डा'र्नेल्)—a weed growing in corn. धान्यांत उगवणारें रान.

Dărt, *n.* (डार्ट्)—a light javelin or other pointed missile; darting motion. बरची, भाला; जलद् गति, धांव. *v. t. & i.* to throw a missile; to emit suddenly; to go rapidly. अस्त्र फेंकणें; एकदम टाकणें; जलद् जाणें.

Dăsh, *v. t. & i.* (डॅश्)-to shatter ; to knock with violence, to send violently ; to go with haste ; to adulterate. मोडणें, तुकडे करणें; आदळणें, आपटणें; धांदलीनें जाणें; मिश्रण-भेसळ-करणें. *n.* rush or sudden advance; spirit, activity, showy smartness; a stroke (—); a slight infusion of. आकस्मिक हल्ला; उसळी, तडफ; अपसारणचिन्ह (—); किंचित् भेळ,-मिसळ. *To cut a dash,* to make oneself noticed as a fine fellow. स्वतः उमदा मनुष्य असल्याबद्दल निदर्शनास आणणें, दिमाख दाखविणें. *Dash-board,* a mud-shield in front of a vehicle. घोड्याच्या खुरानें उडालेलें पाणी, चिखल वगैरे थांबविण्याकरितां गाडीच्या पुढच्या बाजूला लावलेली फळी, अडकफळी.

Dăsh'ing, *a.* (डॅ'शिंग्)—impetuous, active, spirited ; showy, gay. पाणीदार, हिंमतवान; भपकेदार, दिखाऊ.

Dăs'tard, *n.* (डॅ'स्टर्ड्)—a brutal coward, a low fellow without courage, one who meanly shrinks from danger. भितरा, भ्याड, नामर्द. *Das'tardly, a.* cowardly, meanly timid, base, भितरेपणाचा, नामर्दपणाचा.

Dāte, *n.* (डेट्)—an oblong stone-fruit; a tree bearing this; a day or time of a thing's occurrence; a period to which a work belongs. खजूर; तारीख; कालमर्यादा, काळ, समय. *v. t.* to mark with a date; to count time, to reckon ; to become recognizable as of a particular period. तारीख किंवा मिति घालणें; काल मोजणें, गणणें; अमुक एक काळाचा आहे असें जाणणें, नक्की कालमर्यादा ठरवणें. *Date'less, a.* undated, endless. बिनमितीचा, बिनतारखेचा, अनवधि, अनन्त. *To go out of date,* to become obsolete, मागें पडणें, जुना-शिळा-होणें. *Up to date,* meeting or according to the latest requirements or knowledge, as now used. आधुनिक साधनांनीं युक्त, आधुनिक ज्ञान असलेला, सद्यःप्रचलित, अद्ययावत्.

Dā'tive, *a.* & *n.* (डे'टिव्ह्)—(the case) proper to the remoter object or recipient. चतुर्थी (विभक्ति), संप्रदान.

Dā'tŭm, *n.* (डे'टम्)—(*pl.* Dā'tă) something known or assumed as basis for inference; fixed starting-point (of scale, &c.). गृहीत धरलेली किंवा मानलेली गोष्ट, गमक; ठराविक आरंभस्थान.

Daub, *v. t. & i.* (डॉब्)—to coat (a wall, &c.) with clay, &c.; to smear; to paint roughly or unskilfully. लेपणें; फांसणें; चितारणें, कसेंतरी-ओबडधोबड-रंगवणें. *n.* stuff daubed on ; a rough picture. लेप, भरकटीत रंगविलेलें चित्र. *Daub'er, Daub'ster, nn.* a bad painter. ओबडधोबड चित्र रंगवणारा.

Daught'er, *n.* (डॉ'टर्)—one's female child; female member of a family. मुलगी, कन्या; कुटुंबांतील-वंशांतील-मुलगी.

Daught'er-in-law, *n.* (डॉ'टर्-इन्-लॉ)—son's wife. सून.

Daunt, *v. t.* (डॉन्ट्)—to frighten into giving up a purpose, to prevent a person from acting by fear, to control by fear. कोणतीहि हातची गोष्ट सोडून देण्याइतकें घाबरणें. *Nothing daunted,* not frightened. न भ्यालेला, धीट.

Daunt'less, *a.* (डॉ'न्ट्-लेस्)—not to be daunted, bold, fearless, not afraid of anything, intrepid. धीट, निर्भय, कधींहि न डगमगणारा.

Dauph'in, *n.* (डॉ'फिन्)—the eldest son of the King of France. फ्रान्स देशाचा युवराज. *Dauph'iness, n. fem.* the wife of Dauphin. फ्रान्सच्या युवराजाची पत्नी.

Dăv'enport, *n.* (डॅ'व्हन्पोर्ट्)—a small writing-table. लिहिण्याचें एक लहान मेज.

Dăvit', *n* (डॅ'व्हिट्)—curved bars on the edge of a ship by means of which a small boat is swung out and lowered. जहाजाच्या बाजूवरील काटकोनी तरफ, यारी.

Dā'vy̆, *n.* (डे'व्हि)—a miner's safety lamp. खाणीवाल्याचा रक्षकदीप.

Dā'vy̆ Jones's lŏck'er, *n.* (डे'व्हि जोन्झिझ् लॉ'कर्)—the sea regarded as a grave, the bottom of the sea. [Davy Jones is an imaginary spirit of the sea who has a larger box in which he puts everything that sinks.] समुद्र-समाधि, जलसमाधि, समुद्राचा तळ.

Daw, *n.* (डॉ)—a kind of small crow. एक जातीचा लहान कावळा.

Daw'dle, *v. i.* (डॉ'डल्)—to idle or waste time, to stand about doing nothing, to trifle. आळसांत वेळ व्यर्थ घालवणें, गमणें, रमणें.

Dawn, *v. i.* (डॉन्)—to begin to grow light; to appear faintly. उजाडणें, उदय होणें; अंधुक दिसणें. *n.* the first light; daybreak; incipient gleam; the first appearance. अरुणोदय; पहांट; आरंभीचा प्रकाश; प्रथम दर्शन. *The first dawning*, beginning. आरंभ. *To dawn upon*, to begin to be perceptible to, to begin to understand. समजावयाला लागणें.

Day, *n.* (डे)—the time during which the sun is above the horizon; daylight, dawn; a distinctive period. दिवस; दिवसाचा प्रकाश, प्रभात; अहोरात्र (२४ तास). *All day, All the day*, throughout the day. दिवसभर. *Day-break, break of day*, dawn. प्रभात, पहांट. *Day-dream*, reverie or castle in the air. मनोराज्य, दिवास्वप्न. *By day*, by daylight. दिवसां. *The other day*, on a day not long ago. परवां, कांहीं दिवसांपूर्वी. *To keep one's day*, to be punctual. वक्तशीर असणें. *This day week*, on the same day of next. पुढच्या आठवड्यांत याच दिवशीं. *Every dog has his day*, no one is always unlucky, all persons have some happy times. प्रत्येकाच्या आयुष्यांत कांहीं दिवस तरी सुखाचे असतात. *Fallen on evil days*, in misfortune. संकटांत, वाईट-पडता-काळ आलेला. *A day after the fair*, too late for an opportunity. फार उशीरां, वराती पाठीमागून घोडें. *To win the day*, to win a battle. दिवस जिंकणें, लढाईंत यश मिळविणें. *Days of grace*, further days allowed beyond the fixed time for paying a debt. कर्ज देण्याच्या ठरलेल्या मुदतीपेक्षां दिलेली जादा तीन दिवसांची सवलत.

Day'-book, *n.* (डे'बुक्)—a book in which sales &c. are noted for later transfer to ledger. रोजखर्डा, कीर्द.

Day'light, *n.* (डे'लाइट्)—light prevailing from sunrise to sunset, the light of the sun; dawn; publicity. दिवसाचा उजेड, सूर्यप्रकाश; प्रभात; प्रसिद्धि. *Day-light-saving*, putting back the clock one hour in summer so as to get a longer day. उन्हाळ्यांत दिवस मोठा मिळावा म्हणून घड्याळ एक तास पाठीमागें करणें.

Dāze, *v. t.* (डेझ्)—to stupefy, to bewilder, to stun, to dazzle. गुंग करणें, गोंधळवणें, चकित करणें.

Dăz'zle, *v. t.* (डॅझल्)—to confuse the sight by overpowering brightness; to tempt by brilliant prospects. दिपवून सोडणें, दिपविणें; मोठी आशा दाखवून भूल घालणें.

Dea'con, *n.* (डी'कन्)—an officer of the church below a priest. उपाध्यायाच्या हाताखालचा चर्चचा अधिकारी. *Dea'coness*, *n. fem.*

Dead, *a.* (डेड्)—no longer alive; without spiritual life; obsolete; inanimate; dull, devoid of force. मृत, मेलेला; धर्माचे बाबतींत शिथिल; अप्रचलित, प्रचारांत नसलेला; निर्जीव; विकारशून्य, निःसार. *n.* inertness, gloom. भर, ऐनभर. *adv.* profoundly, absolutely, completely. तीव्रपणें, निखालस, पूर्णपणें. *A dead sleep*, a very deep sleep. फार गाढ झोंप. *The dead centre*, the exact middle point. मध्यबिंदु. *The dead of night*, the darkest part of the night. मध्यरात्र, काळोखी रात्र. *To make a dead set at*, to go straight towards. •कडे अगदीं सरळ जाणें. *A dead shot*, a shot never failing to hit. अचूक नेम.

Dead'-beat, *a.* (डे'ड्-बीट्)—utterly exhausted. पूर्ण थकलेला, जेरीस आलेला.

Dead'en, *v. t. & i.* (डे'डन्)—to darken, to dim, to deprive of or lose (vitality, &c.); to make insensible to. तेजोन्हास करणें, मन कठोर करणें; स्पर्शज्ञान नाहींसें करणें.

Dead'-heat, *n.* (डे'ड्-हीट्)—a race in which winners finish exactly even. ज्या शर्यतींत कोणाचीही सरशी होत नाहीं अशी.

Dead'lĕtter, *n.* (डे'ड्-लेटर्)—a law no longer observed; an unclaimed letter at the post office. अंमलांत न आणला जाणारा-लुतार्थ-कायदा; बिनवारशी पत्र.

Dead'-lŏck, (डे'ड्-लॉक्)—state of affairs in which it is impossible to advance or recede, a disagreement which cannot be settled. पुढें जाणें किंवा मागें जाणें शक्य नाहीं अशी स्थिति, कामाची बंदी, कुचंबणा.

Dead'lў, *a.* (डे'ड्-लि)—as if dead, causing fatal injury or death; intense. प्राणघातक, मारक; अत्यंत, तीव्र. *Deadly pale*, death-like pale, white-faced. मृतवत् फिकट, फिकट चेहऱ्याचा.

Dead march, *n.* (डेड्-मार्च्)—funeral music. प्रेतयात्रेचे वेळीं वाजवावयाचें गीत.

Deaf, *a.* (डेफ्)—unable to hear, wholly or partly without hearing; inattentive. बहिरा; लक्ष नसलेला, गैरसावध. *To turn a deaf ear to*, not to give ear to, to refuse to listen. लक्ष देण्याचें नाकारणें, कानाडोळा करणें. *Deaf-mute*, *a.* unable to hear or speak. बहिरा व मुका.

Deaf'en, *v. t.* (डे'फन्) to deprive of hearing, esp. temporarily. (तात्पुरता) बहिरा करणें, कानठळी बसवणें.

Deal, *n.* (डील्)—a soft white wood, fir or pine wood; a 9 inches deal board. देवदारूचें लांकूड ; ९ इंचांची देवदारी फळी.

Deal, *v. t. & i.* (डील्)—to distribute to a number of people; to assign as a share; to deliver a blow; to bargain or do business with. वांटून देणें; भाग म्हणून देणें; (ठोंसा) देणें; व्यवहार करणें. *n.* a part, a quantity, an amount; dealing at cards; piece of bargaining. भाग, मान, वांटणी; (पत्त्यांची) वांटणी; देवघेव, व्यवहार. *A great deal, A good deal,* a large or considerable amount. पुष्कळ, पुष्कळसा. *To deal with a matter,* to settle a matter. एखाद्या गोष्टीचा निर्णय करणें,-ठरविणें. *To deal with* (a question), to decide, to answer. निर्णय करणें, उत्तर देणें

Deal'er, *n.* (डील्अर्)—a person dealing at cards; a trader; a trafficker. पत्ते वांटून देणारा; व्यापारी, उदमी; धंदा करणारा.

Deal'ings, *n. pl.* (डी'लिंग्ज्)—a person's conduct or transactions; intercourse. वर्तन, व्यवहार; देवघेव.

Dealt, (डेल्ट्) *pa. t.* of Deal.

Dean, *n.* (डीन्)—the head of the chapter of a cathedral; the fellow of a college with disciplinary functions. बिशपाच्या खालच्या प्रतीचा धर्माधिकारी; शासनादि सत्ता असलेला कॉलेजचा अधिकारी; शिक्षणशाखाध्यक्ष. *Dean'ery, n.* dean's house or office. डीनचें राहण्याचें ठिकाण, डीनचा अधिकार.

Dear, *a.* (डिअर्)—beloved; precious to; costly; not cheap. आवडता, लाडका, प्रिय; मौल्यवान; उंच मोलाचा; महाग. *n.* the beloved one; a charming person or thing. जीवप्राण, प्राणनाथ, प्रियकर; सुंदर मनुष्य किंवा वस्तु. Dear me! Oh dear! अरेरे, अगई.

Dear'est, *n.* (डि'अरिस्ट्)—the most beloved one, one most dearly loved. अत्यंत जिवलग मनुष्य.

Dearth, *n.* (डर्थ्)—scarcity and dearness of food; a deficiency. महागाई, महर्गता, दुष्काळ; उणीव, वाण.

Death, (डेथ्)—dying, end of life; being dead; want of spiritual life. मरण; मृतावस्था; आध्यात्मिक ऱ्हास. *Death-adder, n.* एक जातीचा भयंकर सर्प. *Death-blow, n.* घातक मार, प्राणघातक गुद्दा. *Death-damp, n.* मरणसमयीं येणारा घाम. *Death's door, n.* मृत्यूचें दार, यमद्वार. *To do or put to death,* to kill. ठार मारणें. *Death rattle,* the sound heard in a person's throat at the moment of death. मरणाच्या वेळेची घरघर. *Sick unto death,* sick to the utmost. कमालीचा किंवा भयंकर किंवा मरणाचा आजारी. *Tired to death,* completely fatigued. फारच दमलेला.

Death'dūties, (डे'थ् ड्यूटीज्)—the tax levied before property passes to an heir. मालमत्ता वारसाचे स्वाधीन होण्यापूर्वी सरकारास द्यावा लागणारा मृतवारसा कर, वारसपट्टी.

Death'less, *a.* (डे'थ्-लिस्)—not subject to death, immortal; never dying. अमर; कधींहि न मरणारा.

Death'ly, *a. & adv.* (डे'थ्लि)-resembling death; still; pale. मृत्युसमान; स्तब्ध; फिकट.

Death'warrant, *n.* (डे'थ्-वॉरंट्)—the order for a criminal's execution; that which ruins one completely. फांशी देण्याचा हुकूम; सर्वस्वाचा नाश करणारी गोष्ट.

Debā'cle, *n.* (डिबा'कल्)—sudden ruin, utter collaspe or disorganization or rout. आकस्मिक नाश, एकाएकीं झालेला अपसानघात, दाणादाण.

Debär, *v. t.* (डिबा'र्)—to bar from entrance, to exclude, to preclude. आंत येऊं न देणें, प्रतिबंध करणें, मना करणें. [L. *de,* from, & *bar.*]

Debärkā'tion, *n.* (डिबार्के'शन्)—disembarkation, landing from a ship. गलबतांतून उतरणें. [L. *de,* from, & *barque,* a boat]

Debāse', *v. t.* (डिबे'स्)—to make of less value, to lower in character, quality or value; to adulterate metal (of coinage). खालच्या पायरीवर आणणें, हलकट करणें; हिणकस करणें, कमी दराचा करणें. *Debase'ment, n.* अपकर्ष, मानहानि; हिणकस करणें. [L. *de,* down, & *base,* low]

Debāte', *v. t. & i.* (डिबे'ट्)—to contest, to fight for; to discuss; to consider or deliberate in one's mind. वादाघाद करणें; वादविवाद करणें; विचार करणें, विचारांत असणें. *n.* controversy, discussion. वादविवाद, वादावाद. *Debā'table, a.* subject to dispute. वादात्मक, वादग्रस्त, वादावाद करण्यासारखा. *Debā'ter, n.* a person skilled in argument. वादविवादांत कुशल, विवादपटु. *A debating society,* a society in which political and other questions are debated. चर्चामंडळ. [L. *de,* down, & *battere,* to beat]

Debauch', *v. t.* (डिबॉ'च्)—to pervert from virtue; to vitiate (taste); to seduce. भ्रष्ट करणें; बिघडवणें; वाईट मार्गाला लावणें. *n.* a bout of sensual indulgence. दुर्व्यसन.

Dĕbauchee', *n.* (डे-बॉशी')—a person addicted to debauchery, a viciously sensual person. दुर्व्यसनी, बाहेरख्याली मनुष्य, बदफैली.

Debauch'ery, *n.* (डि-बॉ'चरि)—indulgence in or prevalence of sensual habits. दुर्व्यसन, बाहेरख्यालीपणा.

Dĕbĕn'ture, *n.* (डिबें'चर्)—a sealed bond of corporation acknowledging a sum on which interest is due till the principal is repaid. कर्जरोखा, प्रतिज्ञापत्र.

Dĕbĭl'ĭtāte, *v. t.* (डिबि'लिटेट्)—to cause debility in, to weaken, to enfeeble. कमजोर किंवा निःशक्त करणें. [L. *debilis*, weak ; *de*, away and *bilis*, Sk. बल, strength]

Dĕbĭl'ĭtȳ, *n.* (डि-बि'लिटि)—languor of the body, feebleness, weakness. कमकुवतपणा, दुर्बलता, अशक्तता, कमजोरी.

Dĕb'ĭt, *n.* (डे'बिट्)—an entry in the account of a sum owing. रक्कम नांवें लिहिणें. *v. t.* to charge with a sum, to enter against. खर्ची घालणें, खात्यावर मांडणें. *To debit an account*, खात्यांत नांवें लिहिणें.

Dĕbōnair', *a.* (डे-बो-ने'र्)-gracious, kind, genial, having nice manners, unembarrassed. मनमिळाऊ, सुशील, सभ्य, गोंधळून न जाणारा.

Dĕbouch', *v. i.* (डि-बूं'श्)—to issue (from a ravine, woods, &c.) into an open ground (of troops, rivers, &c.), to flow out of. दया घरण्याच्या जागेपासून बाहेर मैदानांत येणें, बाहेर वाहणें,वहात राहणें. *Debouch'ment*, *n.*

Dĕb'ris, *n.* (डे'ब्री)—strewn fragments, drifted accumulation, broken useless pieces. मोडके-तोडके तुकडे, गोळा केलेला कचरा, दगडामातीचा ढीग.

Dĕbt, *n.* (डेट्)—what is owed, liability ; state of owing something. कर्ज ; ऋणी असणें. *A bad debt*, a debt which will never be paid. बुडीत कर्ज. *Debt of nature*, death. मृत्यु, मरण.

Dĕbt'or, *n.* (डे'टर्)—a person in debt. देणेकरी, ऋणको.

Dēbŭs', *v. t. & i.* (डिब'स्)—(Mil.) to unload or alight from motor vehicles. लष्करी सामान किंवा सैनिक मोटार गाड्यांतून उतरविणें.

Debut, *n.* (डे'बु)—one's first appearance in society or as a performer, a person's first performance. समाजापुढें किंवा लोकांपुढें पहिल्यानें येणें, प्रथम दर्शन, प्रथम प्रयत्न, प्रारंभ. *De'butant*, *n.* (डे'बुटाङ्) वक्ता या नाट्यानें प्रथमच लोकांपुढें येणारा, प्रारंभ करणारा.

De'butante, *n.* (डे'बुटान्ट्)—a young woman in her first year of being called to parties other than children's parties. समाजांत पहिल्यानेंच पुढें येणारी स्त्री.

Dĕc'ad, Dĕc'ade, *n.* (डे'कड्)—an aggregate or period of ten years ; a set of ten. दहा वर्षांचा काल ; दशक.

Dĕc'adence, *n.* (डे'क-डन्स्)-deterioration ; decline (of a nation, art, &c.). ऱ्हास, नाश ; (देशाची वगैरे) उतरती कळा, अवनति.

Dĕ'cadent, *a.* (डे'कडन्ट्)—decaying, declining ; becoming worse. उतरती कळा लागलेला ; अधिक वाईट होणारा, बिघडणारा.

Dĕc'ăgŏn, *n.* (डे'कॅ-गॉन्)—a plane figure with ten sides and angles. दहा कोन असलेला, दशकोन.

Dĕc'alŏgue, *n.* (डे'क-लॉग्)—the Ten Commandments in the Bible. (मोझेसला देवानें दिलेल्या) दहा आज्ञा, आज्ञादशक.

Dĕc'ămēter, *n.* (डे'कॅ-मिटर्)—ten metres. दहा मीटर, दश मात्रा.

Dēcămp', *v. i.* (डि-कॅ'म्प्)—to break up or leave camp ; to abscond, to go away suddenly, to take oneself off. तळ उठवणें ; पळणें, गाशा गुंडाळणें.

Dēcănt', *v. t.* (डि-कॅ'न्ट्)—to pour off (wine, &c.) leaving sediment behind. गाळ जाऊं न देतां गाळणें, जपून ओतणें, गाळणें.

Dēcăn'ter, *n.* (डिकॅ'न्टर्)—a stoppered bottle in which wine is brought to table. दारूचें मोठें कांचेचें भांडें.

Dēcăp'ĭtāte, *v. t.* (डिकॅ'पि-टेट्)-to behead, to cut off the head. शिरच्छेद करणें. *Decapita'tion n.*

Dēcay' *v. i. & t* (डिके')-to rot, to decompose ; to decline (in power, wealth, energy, &c.), to become worse or less. कुजणें, नाश पावणें ; सामर्थ्य, संपत्ति, ताकद, वगैरे कमी होणें. *n.* decline or falling off ; break-up of health ; decomposition. उतरता पाया ; शरीरसंपत्तीचा ऱ्हास ; कुजणें, सडणें.

Dēcease', *n.* (डिसी'स्)—death, departure from life. मरण, मृत्यु, जीवितापक्रमण, परलोकगमन. *v. i.* to die, to depart from life. मरणें, प्राण सोडणें. *Deceased'*, *a.* मयत, स्वर्गवासी, मृत.

Dēceit', *n.* (डिसी'ट्)—piece of deception, deceitfulness, guilefulness, fraud, stratagem, misleading appearance. कपट, दगलबाजी, फसवणूक, छल, प्रतारणा.

Dēceit'ful, *a.* (डिसी'ट्फुल्)—given to deceit, fraudulent. कपटी, दगलबाज. *Deceit'fully*, *adv.* ; *Deceit'fulness*, *n.* दगलबाजी, कापट्य.

Deceive', *v. t.* (डिसी'व्ह्)—to persuade of what is false ; to mislead, to take in ; to disappoint. फसवणें ; गैरसमज करून फसवणें ; आशाभंग करणें, निराशा करणें.

Dē'cency, *n.* (डी'सन्सि)-decentness; the recognized code of propriety. सभ्यता, व्यवस्थितपणा ; शिष्टाचार. *The decencies*, the decorous observances, requirements of a decent life. शिष्टाचार, व्यवस्थित राहाणीच्या गरजा.

Dēcĕnn'ial, *a.* (डिसे'निअल्)—recurring every ten years. दहा दहा वर्षांनीं येणारा, दशवार्षिक.

Dē'cent, *a.* (डी'सेन्ट्)—seemly; not immodest or obscene; respectable; passable; good enough, not causing shame or shock to others. योग्य; सभ्य; संभावित; चालण्याजोगा; चांगला.

Dēcen'tralize, *v. t.* (डीसें'ट्रलाइझ्)—to undo the centralization of; to confer local government on. एकाच केंद्रांत जमूं न देणें, अधिकारविभागणी करणें; स्थानिक राज्याधिकार देणें. *Decentraliza'tion*, *n.*

Decĕp'tion, *n.* (डिसे'प्शन्)—fraud, double-dealing, deceiving or being deceived; a thing that deceives. फसवणें, फसवणूक, कपट; फसवणारी वस्तु.

Decĕp'tive, *a.* (डिसे'प्टिव्ह्)—apt to mislead; of a misleading kind. फसवण्याजोगा; फसवणारा.

Decide', *v. t. & i.* (डि-सा'इड्)—to settle by giving victory to one side, to judge and settle a question; to give judgment; to resolve, to form a definite opinion. निकाल करणें; निर्णय देणें, निश्चय करणें.

Deci'ded, *a.* (डिसा'इ-डिड्)—definite or unquestionable; not vacillating. निर्णयात्मक, निश्चित; न डळमळणारें.

Deci'dedly, *adv.* (डिसा'इ-डेड्-लि)—undeniably, undoubtedly, clearly, indisputedly. निखालस, निःसंशय.

Deci'dūous, *a.* (डिसि'ड्युअस्)—shedding periodically or normally; fleeting, transitory. गळून जाणारा; अल्पकाल टिकणारा.

Dĕ'cigrăm, **Dĕ'cigramme**, *n.* (डे'सिग्रॅम्)—one-tenth of a gram. ग्रॅम नांवाच्या वजनाचा दहावा हिस्सा. [L. *decimus*, tenth & gram]

Dĕ'cimal, *a.* (डे'सि-मल्)—of tenths, proceeding by tens. दशांशाचा, दशांश. *n.* a decimal fraction. दशांश अपूर्णांक. *Decimal figure* or *point*, दशांश चिन्ह. *De'cimalize*, *v. t.*; *Decimaliza'tion*, *n.*

Dĕ'cimal fraction, *n.* (डे'सिमल्-फ्रॅक्शन्)—a fraction with a power of 10 as denominator. दशांश अपूर्णांक.

Dĕ'cimāte, *v. t.* (डे'सिमेट्)—to put to death one in ten of; to kill large numbers of. दहावा भाग नाहींसा करणें; पुष्कळ लोक ठार मारणें. *Decima'tion*, *n.*; *Decima'tor*, *n.* नासधूस करणारा.

Dĕ'cimēter, *n.* (डे'सिमीटर्)—one tenth of a metre. एकदशांश मीटर (३·९३७ इंच).

Deci'pher, *v. t.* (डि-सा'इ-फर्)—to make out (cipher, bad writing, hieroglyphics, &c.), to discover the meaning of difficult or secret writing. सांकेतिक अर्थ लावणें, उलगडा करणें. *Deci'pherment*, *n.*

Deci'sion, *n.* (डि-सि'झन्)—act of deciding; settlement of an issue; conclusion come to; firmness. निर्णय करणें; निवाडा; निर्णय; धैर्य, करारीपणा.

Deci'sive, *a.* (डि-सा'इ-सिव्ह्)—that decides an issue or contributes to a decision, deciding, conclusive. निर्णायक, निश्चयात्मक.

Dĕck, *n.* (डेक्)—the platform in ship. जहाजावरील मजला, डेक. *v. t.* to array, to decorate, to dress in fine clothes, to ornament. सजवणें, शृंगारणें.

Declaim', *v. t. & i.* (डिक्ले'म्)—to speak oratorically or a set oration, to inveigh passionately, to speak with strong feeling. वक्तृत्वपूर्ण बोलणें; निर्भर्त्सना करणें, जोरानें उलट बोलणें.

Dĕclamā'tion, *n.* (डेक्लमे'शन्)—a set rhetorical oration, declaiming; impassioned speech, harangue. वक्तृत्वपूर्ण भाषण, निर्भर्त्सना; आवेशयुक्त भाषण. *Decla'matory*, *a.* अलंकारमय भाषणाचा, वक्तृत्वपूर्ण.

Dĕclarā'tion, *n.* (डेक्लरे'शन)—declaring, announcement; an emphatic or deliberate or formal statement. जाहीर करणें, घोषणा; जाहीरनामा, जाहीर वचन, प्रतिज्ञा. *Decla'ratory*, *a.* प्रसिद्ध किंवा जाहीर करणारा.

Declāre', *v. t. & i.* (डिक्ले'अर्)—to assert emphatically; to publish, to proclaim; to affirm, to tell explicitly; (Customs) to name (dutiable goods) as in one's possession. स्पष्ट सांगणें; प्रसिद्ध करणें, जाहीर करणें; प्रतिज्ञेनें सांगणें; (जकात आकारण्याजोग्या मालाची) यादी व वर्णन देणें.

Declĕn'sion, *n.* (डिक्ले'न्शन्)—a falling-off from a standard; (*Gram.*) manner of declining nouns. उतरती कळा, ऱ्हास; विभक्तिरूपें सांगणें.

Dĕclinā'tion, *n.* (डे-क्लि-ने'-शन्)—downward bend; angular distance of star; deflexion of compass-needle. उतरता कल, झोंक; विषुववृत्तापासून ताऱ्याचें किंवा ग्रहाचें अंतर, क्रांति; होकायंत्रांतील लोहचुंबकाची च्युति.

Decline', *v. i. & t.* (डि-क्ला'इन्)—to show a downward tendency; to decrease, to deteriorate; to refuse; to rehearse or make the case forms of (nouns, &c.). कलणें, झुकणें; कमी होणें, ऱ्हास पावणें; नाकारणें, नको म्हणणें; नाम चालविणें, नाम वगैरेची विभक्ति वगैरे सांगणें. *n.* gradual decrease or deterioration; decay; wasting disease, a slow loss of strength. उतरती कळा; नाश; क्षयरोग.

Decliv'ity, *n.* (डि-क्लि'व्हि-टि)—downward slope (of a mountain-side, etc.) उतरण, वरंगळ.

Declutch', *v. i.* (डिक्ल'च्)—to disengage a clutch. चाप सोडणें, चाप काढून घेणें.

Decoc'tion, *n.* (डि-कॉ'क्शन्)—an extract, extraction of essence got by boiling. काढा, कषाय.

Decode', *v. t.* (डिको'ड्)—to decipher (code telegram etc.). अर्थ लावणें, अर्थाचा उलगडा करणें.

Decompose', *v. t. & i.* (डी-कम्पो'झ्)—to separate (substance) into its elements; to rot, to decay, to putrefy. घटकावयव पृथक् करणें; नासणें, कुजणें, सडणें.

Decomposi'tion, *n.* (डी-कॉम्पो-झि'शन्)—separation into parts; rotting, decay. पृथक्करण; कुजणें, नाश.

Decontrol', *v. t.* (डीकन्ट्रो'ल्)—to release (trade, etc.) from Government control. सरकारच्या ताब्यांतून काढून घेणें.

Dec'orate, *v. t.* (डे'को-रेट्)—to adorn, to embellish, to beautify; to invest with a badge of honour. भूषविणें, सुशोभित करणें; शृंगारणें, सजवणें. *Decora'tor, n.*

Decora'tion, *n.* (डे-को-रे'शन)—decorating; an ornament; a badge or medal; (*pl.*) flags &c. put up on festive occasion. सजवणें; अलंकार; खूण, पदक; (अने०) उत्सवाच्या दिवशीं लावलीं जाणारीं निशाणें, पताका वगैरे.

Decor'ous, *a.* (डि-को'रस्)—not offending against decency or seemliness, seemly, dignified and decent, fitting and polite. शिष्ट, सभ्य, सविनय.

Decor'um, *n.* (डि-को'रम्)—seemliness, propriety, etiquette, decency. विनय, सभ्यता, शिष्टाचार.

Decoy', *n.* (डि-कॉ'य्)—a netted pond into which wild duck may be enticed; a bird or person used to entice others; a trick, an enticement. बदकें वगैरे पकडण्याकरितां जाळें टाकलेलें डबकें; फसवणारा पक्षी किंवा मनुष्य; फसवणूक. *v. t.* to entice by a decoy, to deceive a person into coming into danger. मोह घालून पाशांत पाडणें.

Decrease', *v. t. & i.* (डि-क्री'स्)—to diminish, to lessen. कमी करणें, कमी होणें, ऱ्हास होणें.

De'crease, *n.* (डी'क्रीस्)—diminution, lessening. मंदी, क्षय, ऱ्हास, कमी होणें.

Decree', *n.* (डिक्री')—the command of a king or government, authoritative order; judicial decision. अधिकारयुक्त हुकूम; हुकूमनामा, निवाडा. *v. t.* to ordain by a decree. निवाडा करणें, हुकूम करणें. *Decree ni'si* (डिक्री ना'इसाय्), an order for divorce unless cause for contrary is shown within a fixed period. घटस्फोटाचा हुकूम.

Dec'rement, *n.* (डे'-क्रि-मेन्ट्)—decrease. उतार, तूट, क्षय.

Decrep'it, *a.* (डि-क्रे'पिट्)—weak from old age, enfeebled or broken down with age; infirm. जराग्रस्त, जरठ; लुळापांगळा. *Decrep'itude, n.* जरा, वार्धक्य, म्हातारपण.

Decre'tal, *n.* (डिक्री'टल्)—Papal decree. पोपचें आज्ञापत्र.

Decry', *v. t.* (डि-क्रा'य्)—to speak ill of, to say bad things about, to disparage, to cry down. निंदा-नालस्ती करणें, दोष लावणें, एखाद्याच्या नांवानें शंख करणें.

Dec'uple, *a.* (डे'क्यू-पल्)—*tenfold.* दसपट, दहापट. *n.* a tenfold amount. दसपट रक्कम. *v. t. & i.* to multiply by ten. दहांनीं गुणणें, दसपट करणें.

Ded'icate, *v. t.* (डे'डि-केट्)—to devote to the service of God; to give up to some special purpose; to inscribe (a book, &c.), to show that a book is written in his honour. देवाला अर्पण करणें; (कोणत्याहि विशेष कामाला) वाहून घेणें; (पुस्तक वगैरे) अर्पण करणें. *Dedica'tion, n.* समर्पण; अर्पणपत्रिका. *Dedica'tor, n.* अर्पण करणारा. *Dedica'tory, a.* अर्पणविषयक.

Deduce', *v. t.* (डि-ड्यू'स्)—to infer; to draw as a conclusion from facts. तर्क करणें; अनुमान काढणें. *Dedu'cible, a.* अनुमानसाध्य, अनुमेय.

Deduct', *v. t.* (डि-ड'क्ट्)—to subtract; to take away or withhold. वजा करणें; काढून घेणें, मागें घेणें.

Deduc'tion, *n.* (डि-ड'क्शन्)—an amount deducted; deducing; an inference. वजा केलेली रक्कम; तर्क बांधणें; अनुमान.

Deduc'tive, *a.* (डिड'क्टिव्ह्)—of or reasoning by deduction. अनुमानाचा, आनुमानिक, निगमनात्मक.

Deed, *n.* (डीड्)—an action, a feat, a thing consciously done; a fact, reality; a legal document. जाणूनबुजून केलेलें कृत्य; काम, कार्य, क्रिया; वस्तुस्थिति; दस्तऐवज, करार, लेख.

Deem, *v. t.* (डीम्)—to believe; to consider, to think, to suppose, to judge. मानणें, वाटणें, विचार करणें. *To deem highly of*, to have high opinion of. चांगलें मत असणें,-समजणें,-लेखणें.

Deem'ster, *n.* (डी'म्स्टर्)—one of the two judges of the Isle of Man. आइल् ऑफ् मॅन् बेटांतील दोन न्यायाधिशांपैकीं एक.

Deep, *a.* (डीप्)— [illegible] far down or far in; immersed in; not superficial, profound;

heartfelt; hard to fathom. खोल; गढून गेलेला; गंभीर; मनापासूनचें; पाताळयंत्री, दुर्बोध. *n.* an abyss, a pit; the sea. मोठा खड्डा, खांच; समुद्र. *adv.* far down or in. अतिशय खोल.

Deep'en, *v. t. & i.* (डी'पन्)—to make deep or deeper; to become deep. खोल करणें, जास्त खोल करणें, अधिक तीव्र करणें; खोल होणें, गंभीर होणें.

Deer, *n.* (डिअर्)—a beautiful wild animal (the males have wide branching horns). हरिण, मृग, कुरंग. *Deer-forest,* wild land reserved for deerstalking. हरिणांकरितां ठेवलेलें राखीव रान. *Deer-hound,* a large rough-haired greyhound. हरिणाची शिकार करणारा कुत्रा. *Deer-stalker,* a sportsman stalking deer; a pattern of cloth hat. लपूनछपून हरणाची शिकार करणारा पारधी; एक जातीची कापडी टोपी.

Dēfāce', *v.t.* (डिफे'स्)—to disfigure, to deform; to make illegible. विरूप करणें; बिघडवणें, अस्पष्ट करणें. *Deface'ment, n.* विरूप करणें; खंडन; विरूपता.

Dē făc'to, *a. & adv.* (डी फॅ'क्टो)—in fact. वस्तुतः, खराखुरा (हक्क असो वा नसो).

Dē'falcāte, *v. i.* (डी'फल्केट्)—to take away, to be guilty of defalcation, to use other people's money for one's own purposes. पैशाची अफरातफर करणें, दुसऱ्याचा पैसा वापरणें.

Dēfalcā'tion, *n.* (डी-फल्के'शन्)—misappropriation of funds; breach of trust concerning money. पैशाची अफरातफर; पैशाच्या बाबतींत विश्वासघात.

Dēfāme', *v. t.* (डिफे'म्)—to attack the good fame of, to try to damage the good name of a person, to calumniate, to slander. बदनामी करणें, अब्रू घेणें. *Defam'atory, a.* अब्रुनुकसानीचा नालस्तीचा.

Dĕfamā'tion, *n.* (डेफमे'शन्)—attack on good fame, slander, calumny. बदनामी, बेअब्रू, अब्रुनुकसानी.

Dēfault', *n.* (डि-फॉ'ल्ट्)—failure to act or appear or pay. कोणत्याहि कामांत हलगर्जीपणा किंवा चूक. कसूर, गफलत. *v. i.* to fail to meet obligations. देणें वेळेवर न देणें, वेळेवर हजर न राहणें, वचन न पाळणें.

Dēfeat', *v. t.* (डि-फी'ट्)—to worst in battle or other contest, to beat, to cause to fail; to frustrate, to baffle. पराजय करणें; निरुपयोगी किंवा व्यर्थ करणें, मोड-भंग-करणें. *n.* lost battle or contest; frustration. पाडाव, पराजय; अपयश, भंग, मोड. *To defeat one's hopes,* आशाभंग करणें.

Dĕf'ecāte, *v. t. & i.* (डे'फिकेट्)—to clear of impurities, to refine; to void excrement. मळ काढून टाकणें, स्वच्छ करणें; घाण निघून जाणें. *Defeca'tion, n.* शोधन, मलापकर्षण. *Defeca'tor, n.*

Dēfĕct', *n.* (डि-फे'क्ट्)—lack of something; a shortcoming, a blemish, a small fault. उणीव, न्यूनता; कमीपणा, दोष.

Dēfĕc'tion, *n.* (डि-फे'क्शन्)—abandonment of one's leader or cause, deserting a leader; failing to do one's duty. आपल्या पुढाऱ्याचा त्याग, बंड; कर्तव्य करण्याला चुकणें.

Dēfĕc'tive, *a.* (डिफे'क्टिव्ह्)—incomplete, faulty; wanting, deficient. अपूर्ण, दोषी; उणीव असलेला.

Dēfĕnce', *n.* (डि-फे'न्स्)—defending, guard, protection, justification, resistance of attack; (*pl.*) fortifications; defendant's case in law-suit. रक्षण, बचाव; तटबंदी; फिर्यादींत प्रतिवादीची बाजू, त्याचा जबाब, त्याचें म्हणणें. *Defence'less, a.* बचावाचें साधन नसलेला, तटबंदी नसलेला.

Dēfĕnd', *v. t. & i.* (डि-फे'न्ड्)—to ward off an attack from; to keep safe, to protect; to conduct the defence in a law-suit. रक्षण किंवा बचाव करणें; सुरक्षित ठेवणें; प्रतिवादीची बाजू मांडणें, ०च्या वतीनें बोलणें, समर्थन करणें. *Defen'der, n.* संरक्षक, रक्षणकर्ता.

Dēfĕn'dant, *n.* (डिफे'न्डन्ट्)—a defender, a person accused or sued in court of law. आरोपी, प्रतिवादी, प्रतिपक्षी, सामनेवाला.

Dēfĕn'sible, *a.* (डि-फे'न्सि-बल्)—easily defended; justifiable. सहज बचाव करण्याजोगा; प्रतिपाद्य, युक्त. *Defen'sibil'ity, n.* रक्षण करितां येण्याची शक्यता, रक्षणक्षमता.

Dēfĕn'sive, *a.* (डि-फे'न्सिव्ह्)—serving for defence, proper for defence. बचावाचा, रक्षणोपयोगी. *To be, to stand, on the defensive,* आत्मसंरक्षणाच्या तयारीनें राहणें.

Dēfer', *v. t.* (डि-फ'र्)—to put off, to postpone. लांबणीवर टाकणें, पुढें ढकलणें. *v. i.* to change one's course in deference to another's advice. मुरवतीखातर हो म्हणणें, सांगण्याला मान देणें, चें ऐकणें. *Defer'ment, n.* लांबणीवर टाकणें, दिरंगाई.

Dĕf'erence, *a.* (डे'फरन्स्)—compliance with (advice, &c. of another); respectful conduct, regard, respect. भीडभाड, मुरवत; सन्मान, आदर. *Deferen'tial, a.* showing deference. भिडस्त, मर्यादशील, मुरवतीचा.

Dēfī'ance, *n.* (डि-फा'यन्स्)—challenge to fight; open refusal to obey. लढाईस आव्हान; आज्ञा धाब्यावर बसवणें, अवगणना, अवज्ञा.

Défi'ant, *a.* (डि-फा'यन्ट्)—showing no fear or respect, fearlessly refusing to obey; expressing defiance, boldness or insolence. मगरुरीचा, उद्दामपणाचा, उद्धट, उर्मट.

Dĕfi'ciency̆, *n.* (डे-फि'शन्सि)—lack or shortage; a thing wanting; deficit. उणीव, न्यूनता; न्यून वस्तु; तूट, खूट.

Dĕfi'cient, *a.* (डेफि'शन्ट्)—insufficient (in quantity, force, &c.), wanting, imperfect. उणा, अपुरता.

Dĕfi'cit, *n.* (डीफि'सिट्, डे-)-deficiency (in a sum of money, &c.); excess of liabilities over assets, a lack, falling short. पैशाची कमतरता; तूट, खूट.

Défile', *v. i.* (डि-फा'इल्)—to march in a file, to march off in a line. रांगेनें चाल करणें, कूच करणें. *n.* (डी'फाइल्) a gorge or pass, a narrow valley between mountains. खिंड.

Défile', *v. t.* (डि फा'इल्)—to make dirty, to pollute; to profane. मलिन करणें, कलंक लावणें; अपवित्र करणें, भ्रष्ट करणें.*-ment*, *n.* भ्रष्टाकार, कलंक, विटाळ.

Défine', *v. t.* (डि-फा'इन्)—to mark out (limits, boundary), to fix or show clearly; to state the meaning precisely. मर्यादा घालून देणें; स्पष्ट करून दाखविणें; व्याख्या सांगणें. [L. *de*, down, & finire, to end]

Dĕf'ĭnĭte, *a.* (डे'फि-निट्)—with exact limits; determinate, distinct, precise. समर्याद; निश्चित, स्पष्ट, असंदिग्ध.

Dĕfini'tion, *n.* (डे-फि-नि'शन्)—statement or explanation of the precise meaning of a term. लक्षण, व्याख्या.

Défi'nĭtive, *a.* (डिफि'निटिव्)—decisive, unconditional, final, not subject to revision. निश्चित, असंदिग्ध, नक्की.

Déflāte', *v. t* (डिफ्ले'ट्)—to let the air or gas out; to reduce inflated prices. हवा किंवा गॅस बाहेर सोडणें; वाढलेल्या किंमती कमी करणें. *Defla'tion*, *n.*

Déflĕct', *v. t. & i.* (डि-फ्लें'क्ट्)—to turn aside from the straight course, to swerve. सरळ मार्ग सोडून जाणें, बहकणें, आडमार्गास लावणें, वक्र करणें. *Deflec'tion*, *Deflex'ion*, *n.* सरळ मार्ग सोडणें, सन्मार्गच्युति; (Bot.) व्यावृत्ति, वहिर्णति; विक्षेप; वक्रता.

Déflŏw'er, *v. t.* (डि-फ्लॉ'वर्)—to deprive of virginity; to ravage; to strip of flowers; to seduce. कौमार्यभंग करणें, कुमारीत्व नष्ट करणें; भ्रष्ट करणें; फुलें काढून घेणें.-नेणें; फुसलावणें.

Défŏrm', *v. t.* (डि-फॉ'र्म्)—to spoil the aspect or shape of; to disfigure. स्वरूप किंवा आकार बिघडवणें; विरूप करणें. *Deformed'*, *pa. p.* कुरूप.

Dĕfŏrmā'tion, *n.* (डीफॉर्मे'शन्)—perverted or changed form. विकृत रूप, कुधारणा.

Défŏr'mĭty̆, *n.* (डि-फॉ'र्मिटि)-ugliness, distortion, deformed state; abnormality, defect. विरूपता; व्यंग, खोड, दोष.

Défraud', *v. t.* (डि-फ्रॉ'ड्)—to deprive fraudulently, to cheat, to obtain money by deceiving. कपटानें हिरावून घेणें, फसवणें, ठकवणें.

Défray', *v. t.* (डिफ्रे')—to provide expense of, to discharge, to pay, to bear. खर्चाची व्यवस्था करणें, फेडणें, वारणें.

Dĕft, *a.* (*डेफ्ट्*)*—dextrous, adroit, skilful.* कुशल, चतुर.

Défŭnct', *a.* (डिफं'क्ट्)—dead; obsolete. मृत; अप्रचलित.

Défy̆', *v. t.* (डिफा'य्)—to challenge to do or prove something; to resist openly; to present insuperable obstacles to. कोणतीहि गोष्ट (सिद्ध) करण्याला आव्हान करणें; उघड प्रतिकार करणें; अनिवार्य संकटें उपस्थित करणें.

Dégĕn'eracy̆, *n.* (डि-जे'नरसि)—degenerate state, a growing worse or inferior, meanness. निकृष्ट स्थिति, वैगुण्य.

Dégĕn'erate, *a.* (डि-जे'नरिट्)—having lost qualities proper to the kind. सद्गुणभ्रष्ट, निकृष्ट. *v. i.* (डिजे'नरेट्)—to become degenerate, to become worse. सद्गुणभ्रष्ट होणें. *n.* (डिजे'नरिट्) —a person of very bad character. अत्यंत वाईट वर्तणुकीचा मनुष्य, अधम. *Degenera'tion*, *n.* अधोगति, अवनति, नीच अवस्था, ऱ्हास.

Dĕglutĭ'tion, *n.* (डीग्लुटि'शन्)-swallowing. गिळणें, निगरण.

Dĕgradā'tion, *n.* (डे-ग्रडे'शन्)—degrading; disgrace; thing that degrades. अपकर्ष, अवनति; अपमान, कमीपणा, मानहानि; कमीपणा आणणारी गोष्ट.

Dégrāde', *v. t.* (डि-ग्रे'ड्)—to reduce to lower rank; to debase. खालच्या पायरीवर आणणें; कमी दर्जाचा करणें. *Degrad'ing*, *a.* कमीपणा आणणारा, बेअब्रूचा

Dégree', *n.* (डि-ग्री')—a stage in ascending or descending scale; a unit of angular or of thermometric measurement; university rank, a title given for learning in a university. उच्च किंवा नीच पायरी; (यंत्रावरील) अंश, डिग्री; विश्वविद्यालयांतील पदवी. *By degrees*, slowly. हळूहळू, पायरी पायरीनें. *Forbidden degrees*, शरीरसंबंधास वर्ज्य पिढ्या. *In the smaller degree*, अणुमात्र, काडीमात्र. *To a great degree*,

अतिशय, फार. *To this degree*, या मर्यादेपर्यंत, इतपत.

Dehis'cent, *a.* (डिहि'सेन्ट्)— gaping, bursting open (seed-vessels). उकलणारें (बोंड, शेंग), स्फुटनशील, फुटीर.

De'ify, *v. t.* (डी'इफाय्)—to make a god of, to treat as if a deity or god; to worship. देव मानणें; पूजा करणें. *Deifica'tion*, *n.* देवपदास चढविणें; अकटोविकट स्तुति.

Deign, *v. t. & i.* (डेन्)—to condescend to do; to vouchsafe, to be not too proud to, to grant. मेहेरबानी करून करणें; कृपा करून देणें.

De'ism, *n.* (डी'इ-झम्)—belief in the existence of God without accepting revelation. एकेश्वरी मत. *De'ist*, *n.* केवलेश्वरवादी. *De'istic*, *a.* केवलेश्वरमतासंबंधीं. [L. *deus*, Sk. देव, god]

De'ity, *n.* (डी'इटि)—divine status or nature; a god. देवत्व, देवपणा; देव. The Deity = परमेश्वर.

Deject', *v. t.* (डि-जे'क्ट्)—to dispirit, to cast down, to depress, to sadden. उत्साहभंग करणें, उदास करणें, खिन्नता आणणें. *Dejec'ted*, *a.* having low spirits, sad. खिन्न, विमनस्क, विषण्ण, दुःखी.

Dejec'tion, *n.* (डि-जे'क्शन्)— downcast mood, depression, melancholy. उदासीनता, खिन्नता, विषाद.

De jur'e, *a. & adv.* (डी जुअरि)—rightful, by right. हक्काचा, हक्कदार, हक्कानें.

Delaine', *n.* (डिले'न्)—a light dress-fabric. एक जातीचें तलम कापड.

Dela'tion, *n.* (डिले'शन्)—act of informing against a person, accusation. एखाद्याच्या विरुद्ध माहिती सांगणें, दोषारोप.

Delay', *v. t. & i.* (डिले')—to put off; to hinder, to frustrate; to be tardy, to act slowly on purpose. पुढें ढकलणें; अडथळा करणें; विलंब लावणें. *n.* lack of dispatch; hindrance. विलंब; अडथळा.

Delec'table, *a.* (डिले'क्टेबल्)-delightful, pleasant. आनंददायक.

Delecta'tion, *n.* (डी-लेक्टे'शन्)— enjoyment. अत्यानंद, हर्ष, आल्हाद.

Del'egacy, *n.* (डे'लिगसि)—a body of delegates. प्रतिनिधिमंडळ.

Delega'tion, *n.* (डेलिगे'शन्)— delegating; a group of delegates, representatives. देऊन टाकणें, हवालीं करणें, प्रतिनिधि म्हणून पाठविणें; प्रतिनिधिमंडळ.

Del'egate, *v. t.* (डे'लि-गेट्)—to send as representative to a council or conference; to commit (authority) to representative. प्रतिनिधि म्हणून पाठविणें; प्रतिनिधींना अधिकार देणें. *n.* (डे'लिगिट्)— a representative, a substitute. प्रतिनिधि, वकील.

Delete', *v. t.* (डि-ली'ट्)—to strike out part of something written or printed, to blot out, to erase. खोडून टाकणें, काढून टाकणें, गाळणें. *Dele'tion*, *n.*

Deleter'ious, *a.* (डेलि-टी'रिअस्)—harmful, injurious. अपायकारक, नाशक; विषारी.

Delf, *n.* (डेल्फ्)—a kind of earthenware एका जातीचीं मातीचीं भांडीं.

Delib'erate, *v. i. & t.* (डिलि'बरेट्)—to take counsel, to hold debate; to weigh, to consider. विचार घेणें, वादविवाद करणें; विचार करणें. *a.* (डेलि'बरिट्)—intentional; fully considered, cautious, not hasty. बुद्धिपूर्वक; पूर्ण विचारांतीं केलेला.

Delibera'tion, *n.* (डिलि-बरे'शन्)—weighing in mind, careful consideration, thoughtful consideration, circumspection. मसलत, मागला पुढला विचार. *Delib'erative*, *a.* विचाराचा, पोक्त विचार करणारा.

Del'icacy, *n.* (डे'लि-कसि)—delicateness; refined feeling; a dainty. नाजुकपणा; मर्यादशीलता, दाक्षिण्य; मिष्टान्न.

Del'icate, *a.* (डे'लि-केट्)—dainty, luxurious; tender or easily harmed; fastidious; slender, fine, exquisite; sensitive. मिजासखोर; सुकुमार, नाजूक; खोडकर; चोखंदळ; सुरेख, आकारानें सुंदर, रमणीय; मनाचा हलका, हळवा.

Deli'cious, *a.* (डि-लि'शस्)—highly delightful, esp. to taste or smell. गोड, रुचकर, मजेदार.

Delight', *v. t. & i.* (डिला'इट्)—to please highly; to take great pleasure in. आनंद देणें, रमणें. *n.* high pleasure; a thing that gives great pleasure. अत्यानंद; आनंद देणारी वस्तु. *Delight'ful*, *Delight'some*, *aa.* आनंददायक, आल्हादक, मनोरंजक.

Delimita'tion, *n.* (डिलिमिटे'शन्)—assigning of limits or boundaries. मर्यादा आंखून देणें.

Delin'eate, *v. t.* (डि-लि'नि-एट्)—to portray by drawing or description, to describe a person carefully. चित्र रेखाटणें, वर्णन करणें. *Delinea'tion*, *n.* रेखणें, चित्र, आलेख्य, नकाशा. *Delin'eator*, *n.*

Delinq'uency, *n.* (डि-लिं'क्विन्सि)—failure to do one's duty, neglect of duty; guilt; misdeed. कर्तव्याची उपेक्षा; अपराध; दुष्कृत्य.

Delinq'uent, *n.* (डिलिं'क्वेन्ट्)—a person who fails in his duty or commits an offence, an offender. कर्तव्यभ्रष्ट, अपराधी, दोषी, गुन्हेगार.

Dĕlĭquĕsce', *v. i.* (डॅलिक्वे'स्)—to undergo change to liquid form ; to melt away. हवेच्या योगानें पाणी होणें; वितळून जाणें, विद्रुत होणें. *Deliques'cence, n.*; *deliques'cent, a.*

Dēlĭ'rĭous, *a.* (डिलि'रिअस्)—wandering in the mind and saying meaningless things, affected with delirium ; raving ; wildly excited. बेशुद्ध; बरळणारा, वात झालेला; अति संतापलेला.

Dēlĭ'rĭŭm, *n.* (डि-लि'रिअम्)—disordered state of mind ; wildly excited mood. चित्तविभ्रम; उन्मादवायु ; अति संतप्त मनःस्थिति. *Delirium tre'mens*, a disorder due to heavy drinking. अति दारू पिऊन होणारा उन्माद.

Dēlĭv'er, *v. t.* (डि-लि'व्हर्)—to rescue, to save, to set free ; to transfer or hand over to another ; to convey (letters, goods) to addressee or purchaser ; to aim (a blow, cricket-ball, attack); to give birth to ; to utter (a speech). सोडवणें, मुक्त करणें; दुसऱ्याच्या स्वाधीन करणें; (पत्रें, माल वगैरे) देणें, पोहोंचता करणें; (चेंडू वगैरे) फेंकणें; जन्म देणें; भाषण करणें, बोलणें. *To be delivered of*, to give birth to. ॰ला जन्म देणें.

Dēlĭv'erance, *n.* (डि लि'व्हरन्स्)—setting free ; a consequential utterance सुटका, सोडवणूक, मुक्तता; महत्त्वाचें भाषण किंवा व्याख्यान.

Dēlĭv'erў, *n.* (डि-लि'व्हरि)—delivering or being delivered ; periodical distribution of letters or goods ; person's manner of delivering a speech or a ball, &c. मुक्तता; पत्रें वांटणें, पत्रांचा बटवडा; व्याख्यान वगैरे देण्याची पद्धत, चेंडू फेंकण्याची शैली, चेंडूफेंक.

Dell, *n.* (डेल्)—a small valley covered over with trees. वृक्षाच्छादित अशी लहान दरी, खोरें.

Dĕl'phian, Dĕl'phĭc, *aa.* (डे'ल्फिअन्, डे'ल्फिक्)—of the oracle of Delphi, oracular ; obscure, ambiguous. (ग्रीस देशांतील) डेल्फी शहरांतील प्रश्नदेवताविषयक; मोघम, संदिग्ध, द्व्यर्थी.

Dĕl'tă, *n.* (डे'ल्टा)—the Greek letter written Δ ; a triangular alluvial tract at some rivers' mouths. एक ग्रीक मूळाक्षर; (नदीच्या मुखाजवळील) तिकोनी फांट्यांतील प्रदेश, संदरबन, दोआब.

Delude', *v. t.* (डि-ल्यू'ड्)—to fool, to deceive. मूर्ख करणें, फसवणें.

Dĕl'ūge, *n.* & *v. t.* (डे'ल्यूज्)—flood, a heavy downpour of water ; a rush of questions, words, etc. पूर येणें, पूर, जलप्रलय; प्रश्नांचा वगैरे भडिमार.

Delu'sion, *n.* (डि-ल्यू'झन्)—a false belief ; a source of vain hope. चुकीचा समज; मोह, भ्रांति, कपट, माया.

Dēlus'ĭve, *a.* (डि-ल्यू'सिव्ह्)—raising vain hopes ; deceptive, beguiling. भ्रामक; फसवणारा, कपटी.

Dĕlve, *v. t.* (डे'ल्व्ह्)—to dig, to labour with a spade ; to search deeply into. खणणें; खोल शोध करणें, (च्या आंत शिरून) धांगपत्ता काढणें,-लावणें. *n.* a cavity, a wrinkle. पोकळी, खाडा, खांच, दरी.

Dĕm'agŏgue, *n.* (डे'मॅ-गॉग्)—democratic orator or agitator (who trusts to moving people's feelings rather than to reason). लोकांना बोलून गार करणारा वक्ता किंवा चळवळ करणारा, लोकनायक, पुढारी. *Demagog'ic, a.*

Dēmănd', *n.* (डि-मा'न्ड्)—a request made as of right ; call for a commodity, &c. हक्काची मागणी; (पदार्थ किंवा अन्य वस्तूंना असलेली) मागणी. *v. t.* to claim, to ask for peremptorily. हक्कानें मागणें; निक्षून मागणी करणें. *Payable on demand*, payable as soon as the demand is made. मागणी करितांच द्यावयाचा. *To be in demand*, ॰ची मागणी असणें, ॰ला भाव असणें.

Dēmărcā'tion, *n.* (डी-मार्के'शन्)— division between adjacent areas, separation. सीमा, शींव, हद्द, परिच्छेद.

Dēmean', *v. t.* (डिमी'न्)—to lower the dignity of, to degrade. किंमत किंवा इभ्रत कमी करणें. *v. refl.* to behave, to conduct oneself ; to lower oneself. वागणें, वागणूक ठेवणें; स्वतःला कमीपणा आणणें.

Dēmean'our, *n.* (डिमी'नर्)—behaviour. वर्तणूक, आचरण.

Dēmĕn'ted, *a.* (डिमे'न्टिड्)—beside oneself, mad. मूढ, वेडा, विचारहीन.

Dēmĕ'rĭt, *n.* (डीमे'रिट्)—a fault, a defect, a bad point of character. दोष, व्यंग, पाप.

Dēmesne', *n.* (-ēn, डिमी'न्)—possession of land with unrestricted rights ; a territory ; a landed estate round a great house. अबाधित हक्क असलेली-भोगवट्याची जमीन,-जागा; प्रान्त; मोठ्या वाड्याभोंवतालची मालकीची जागा.

Dĕm'ĭgod, *n.* (डे'मि-गॉड्)— a being half divine and half human or bestial. उपदेवता, देवयोनि, गंधर्व, यक्ष.

Dĕm'ĭjohn, *n.* (डे'मिजॉन्)—a large wicker-cased bottle. एक मोठी वेताचें आच्छादन असलेली बाटली.

Dĕ'mĭ-mŏnde, *n.* (डे'मि-मॉन्ड्)—a class of woman of doubtful reputation. कुप्रसिद्ध स्त्रियांचा एक वर्ग.

Dĕ'mĭ-rĕp, *n.* (डे'मि-रेप्)—a woman of suspected chastity. संशयित पातिव्रत्य असलेली स्त्री.

Dĕmīse', *v. t.* (डिमा'इझ्)—to convey (estate) to another by will or lease. (मृत्युपत्रानें) वारसास देणें; कौलानें-भाडेपट्टीनें-देणें. *n.* transfer of an estate by will; a person's death. मृत्युपत्र करून वारसाच्या नांवावर चढवून देणें; मृत्यु, मरण.

Dimin'utive, *a.* (डि-मि'न्यू-टिव्ह्)—implying smallness; tiny, undersized. लहानपणा दाखविणारा; लहान, लघु आकाराचा. *n.* अल्पार्थवाचक नाम.

Dim'ity, *n.* (डि'मिटि)—a kind of cotton fabric. डुमेटीचें कापड.

Dim'ple, *n.* (डि'म्पल्)—a small hollow, (esp. in the cheek or chin); a ripple in water. गालाची किंवा हनुवटीची खळगी, कपोलभंग; लहान लाट. *v. t. & i.* खळगी येणें, -असणें, लाटा येणें. *Dim'ply*, *a.*

Dĭn, *n.* (डिन्)—a continuous roar of confused notes. एकसारखा मोठा आवाज, कोलाहल, गोंगाट. *v. t.* to stun with a noise ; to ram (a fact, advice) into a person or his ears. कानठाळी बसणें; कानीं कपाळीं ओरडणें. (मनावर) ठसवणें. Din'ful, *a.* आवाजानें भरलेला, गोंगाटाचा. *To din into the ears of*, to continue saying the same thing over and over again. तीच तीच गोष्ट कानावर आदळीत असणें, कानींकपाळीं ओरडणें.

Dīne, *v. t. & i.* (डाइन्)—to take dinner ; to entertain at dinner. भोजन करणें, जेवणें; भोजन घालणें. *To dine on* or *off*, (भात वगैरे) जेवणें. *To dine with Duke Humphrey*, to go without dinner. उपाशीं राहणें. *A dining-room*, a room used for meals. जेवणाची खोली. *Din'er*, *n.* one who dines ; a railway car in which dinner is provided. जेवणारा; आगगाडींतील जेवणाचा डबा. *Din'er-out*, a person much sought as a dinner guest. नेहेमीं दुसऱ्याकडे-दुसऱ्या मंडळींत-घराबाहेर-जेवणारा.

Dĭng, *v. t. & i.* (डिंग्)—to throw, to dash, to hurl ; to ring (as a bell), to tell again and again in a wearisome way. जोरानें फेंकणें, आदळणें; (घंटा) वाजवणें; चऱ्हाट वळविणें.

Dĭng'-dŏng', *n.* (डिं'ग्-डाँ'ग्)—the sound of two bells rung alternately. एका पाठीमागून एक वाजविल्या जाणाऱ्या दोन घंटांचा आवाज, घंटानाद, गजर. Also, *adv.*

Dĭn'ghy, Dĭn'gey, *n.* (डिं'गि)—a small boat. लहान होडी, नाव.

Dĭn'gle, *n.* (डिं'गल्)-a deep dell, a small valley. खोल दरी.

Dĭn'gō, *n.* (डिं'गो)—(*pl. Ding'oes*) an Australian wild dog. ऑस्ट्रेलियांतील एक रानटी कुत्रा.

Dĭn'gy̆, *a.* (डिं'जि)—dull-coloured ; grimy ; dirty-looking. मलिन, मळकट; किटलेला; घाणेरडा. *Din'gily, adv.; Din'giness, n.*

Dĭn'ky̆, *a.* (डिं'कि)—pretty, neat ; of attractive appearance. सुरेख, नीट; आकर्षक.

Dĭnn'er, *n.* (डिं'नर्)—chief meal of the day ; a banquet. दिवसाचें मुख्य भोजन; भोजनसमारंभ, मेजवानी. *Dinner-wagon*, *n.* a movable sideboard on castored legs. अन्नसामग्री ठेवण्याचा मेज.

Dī'nosaur, *n.* (डा'इ-न-सॉअर्)—a very large reptile of very ancient times. फार प्राचीन काळचा एक भला मोठा प्राणी.-सर्प. *Dinosaur'ian, a.*

Dĭnt, *n.* (डिन्ट्)—a blow or stroke ; dent. ठोका, ठसा, पोंचा, पळ; (चाकाचा) दांता, खोचा. *v. t.* to dent. खोंचे पाडणें. *By dint of*, by means of, in virtue of. ०च्या मुळें, च्या बळावर,-जोरानें.

Dī'ocēse, *n.* (डा'यसिस्)—a bishop's district, the part of the country in the charge of a bishop. बिशपाच्या अधिकाराखालचा प्रदेश, बिशपच्या वृत्तीचा प्रदेश. *Dio'cesan*, *a.* (डायॉ'सिझन्) बिशपच्या अधिकाराचा किंवा अधिकारांतील. *n.* ख्रिस्ती धर्माधिकारी,-बिशप.

Dīora'ma, *n.* (डाइऑरा'मा)—a spectacular painting. हुबेहुब देखाव्याचें चित्र, प्रदर्शन. *Diora'mic, a.* [Gr. *di*, through & *orama*, a sight]

Dīŏx'īde, *n.* (डाइ-ऑ'क्साइड्)—oxide with two parts of oxygen to one of the metal. द्विप्राणिल.

Dĭp, *v. t. & i.* (डिप्)—to put or let down into liquid, to immerse ; to go under water and emerge quickly ; to read or study cursorily ; to lower for a moment ; to involve in debt. (पाण्यांत) बुडविणें; (पाण्यांत) बुडी मारणें, बुचकळणें; वरवर वाचणें किंवा अभ्यास करणें; क्षणभर खालीं उतरणें; कर्जांत बुडणें. *n.* an act of dipping ; a downward slope ; a short bath ; a tallow candle. बुडी किंवा बुचकळी मारणें; उतार, उतरण; थोडका वेळ स्नान; मेणबत्ती. *To dip into one's pocket*, to spend money. पैसे खर्चणें. *To dip the flag*, to lower the flag for a short time. निशाण कांहीं वेळ खालीं करणें.

Dĭphthĕr'ĭa, *n.* (डिफ्-थि'अरिआ)—a serious and easily spread disease of the throat. घटसर्प; वलयरोग *Diphtheri'tic, a.*

Dĭph'thong, *n.* (डि'फ्-थॉंग्)—union of two vowels in one sound ; digraph ; ligature. संधिस्वर; द्विस्वर; स्वरसंयोग.

Dĭplō'ma, *n.* (डिप्लो'मा)-the voucher of a person's title to some degree or status. सनद, पदवी, पत्रक, दाखला.

Dĭplō'macy̆, *n.* (डिप्लो'मसि)—management of international relations ; tact. परराष्ट्रांशीं शिष्टाई करण्याचें काम, कारस्थान, मसलत; कौशल्य, चातुर्य.

Dĭp'lomăt, *n.* (डि'प्ल-मॅट्)—one skilled in diplomacy ; one who has skill in securing advantages. राजदूतकामांत कुशल, राजकारणी; स्वार्थ साधण्यांत कुशल असलेला.

Dĭplomăt'ĭc, *a.* (डिप्लॅ-मॅ'टिक्)— of diplomacy ; engaged or skilled in diplomacy ; (of statements) uncandid. परराष्ट्रकार्यासंबंधीं; राजकारणी; कुशल, चतुर; आंतल्या गांठीचें.

Dĭplo'mătĭst, *n.* (डिप्लो'मॅ-टिस्ट्)—a member of diplomatic service ; an adroit negotiator.

clever in dealing with other people so as to get them to agree. परराष्ट्रकार्यकर्ता; राजकार्यनिपुण मनुष्य, राजकारणी.

Dĭp'per, *n.* (डि'पर्)—one who dips in the water; a kind of bird; a cup-like vessel on a handle for taking up liquid. पाण्यांत बुडी मारणारा; पाणबुड्या पक्षी; पळी, डवली. *The dipper,* (Astron.) Great Bear. सप्तर्षी तारे.

Dĭpsomā'nĭa, *n.* (डिप्समे'निआ)—mad desire for a strong drink. मादक पेयाची तीव्र इच्छा. *Dipsoma'niac, a.*

Dĭp'teral, *a.* (डि'प्टरल्)—with double columns. दुखांबी, दुहेरी खांबाचें.

Dĭp'terous, *a.* (डि'प्टरस्)—two-winged; (Bot.) with two wing-like appendages. द्विपक्ष, दुपंखी.

Dire, *a.* (डायर्)—dread, terrible, fearful, very bad. घोर, भयंकर, उग्र.

Direct', *a* (डिरे'क्ट्, डाइरे'क्ट्)—straight, not crooked or round about; frank. सरळ, अवक्र; साफ, स्पष्ट, मोकळा. *adv.* by the direct route; without intermediaries. सरळ मार्गानें; मध्यस्थी न घालतां. *v t.* to put in the direct way by instructions; to tell the way to (place, &c.); to address (a letter, &c.) to; to command, to order. सरळ मार्ग दाखवणें; वाट दाखवणें; पत्ता लिहून पाठवणें; आज्ञा किंवा हुकूम करणें. *Direct action,* संप, सत्याग्रह वगैरेंनीं सरकारवर आणलेलें दडपण.

Dirĕc'tion, *n.* (डिरे'क्शन्)—directing; orders or instructions; address of letter, &c.; course; aim. मार्ग दाखविणें; हुकूम, सांगणी; पत्रावरील पत्ता; मार्ग, दिशा; झोंक, रोख. *In the direction of,* towards. कडे, च्या दिशेला.

Dirĕc'tive, *a.* (डिरे'क्टिव्ह्)—giving guidance. योग्य मार्ग दाखविणारा, मार्गदर्शक.

Dirĕct'lÿ, *adv.* (डिरे'क्ट्-लि)—in direct manner; at once, without delay. प्रत्यक्ष रीतीनें; एकदम, विलंब न लावतां.

Dirĕc'tor, *n.* (डिरे'क्टर्)—superintendent, manager, a member of a board directing affairs of a company; an apparatus controlling direction in instruments etc. कोणत्याहि कंपनीच्या व्यवहार किंवा व्यवस्था पाहणारा मुख्य अधिकारी, चालक-व्यवस्थापक-मंडळांतील एक; गतिनियामक योजना, -यंत्र. *Direc'torship, n.*; *Direc'tress, n. fem.*

Dĭrec'torate, *n.* (डिरे'क्टरेट्)—a body or board of directors. व्यवस्थापकमंडळ, नियामकमंडळ.

Dĭrĕc'tory, *n.* (डिरे'क्टरि)—a book of rules; a list of names of people with their addresses and other details. नियमांचें पुस्तक; शहराच्या किंवा अन्य ठिकाणच्या रहिवाश्यांच्या नांवाच्या व पत्यांच्या नोंदीचें पुस्तक, दर्शिका, यादी.

Dīre'ful, *a.* (डा'यर्-फुल्)—dire, dreadful. भयानक, घोर, उग्र.

Dirge, *n.* (डर्ज्)—a song of mourning. प्रेत पुरतांना म्हणावयाचें गाणें, शोकगीत.

Dĭ'rĭgible, *n.* (डि'रिजिबल्)—a balloon or airship. वाटेल त्या दिशेस नेतां येणारें वायुयान, आकाशयान, विमान. *a.* which can be guided. वाटेल त्या दिशेला नेतां येण्याजोगें.

Dirk, *n.* (डर्क्)—a short sword, a dagger. सुरा, खंजीर.

Dirt, *n.* (डर्ट्)—mud, filth, mire; earth, soil; worthless things or people; a foul talk. चिखल; माती, घाण; केरकचरा; निरुपयोगी वस्तु किंवा लोक; घाणेरडें बोलणें. *v. t.* to make foul. घाणेरडें करणें. *Yellow dirt,* gold. सोनें. *Dirt-cheap,* मातीमोल, अति स्वस्त. *To eat dirt,* अपमान निमूटपणें सहन करणें.

Dirt'ÿ, *a.* (ड'र्टि)—soiled, foul; unclean; obscene, filthy; mean, despicable; wet and windy. मळलेला, घाणेरडा; अस्वच्छ; बीभत्स, अमंगळ; नीच, तिरस्करणीय; दमट किंवा वादळी (हवा). *v. t.* to foul, to soil घाण करणें, मलिन करणें, मळवणें.

Dis-, *pref.* (डिस्)—away or separate; not. अलग, दूर, वेगळा; अभाव, नकार.

Disabĭl'ĭtÿ, *n.* (डिसॅबि'लिटि)—a thing that incapacitates or disqualifies, the state of not being able, weakness. असमर्थता, दुर्बलता; (कायदेशीर) अपात्रता; अयोग्यता, नालायकी.

Dĭsā'ble, *v. t.* (डिसे'बल्)—to make unable to act or move, to incapacitate, to wound. (हालण्याला किंवा कोणतीहि गोष्ट करण्याला) असमर्थ करणें, निःशक्त करणें, नालायक करणें. *Disa'blement, n.*

Dĭsabūse', *v.t.* (डिसअब्यू'झ्)—to undeceive, to free from wrong ideas. भ्रम घालविणें, खोटा समज दूर करणें

Dĭsaccord', *v. i.* (डिस्-अकॉ'र्ड्)-to be at variance. न जुळणें, एकोपा नसणें.

Disadvăn'tage, *n.* (डिस्-ॲड्व्हा'न्टेज्)—unfavourable conditions; detriment, injury. गैरसोय; हानि, अपाय. *-ous, a.* अहितकारक, तोट्याचा, अनिष्ट, प्रतिकूल.

Dĭsaffĕc'tĕd, *a.* (डिस्-अफे'क्टिड्)-discontented; ill-disposed; disloyal. असंतुष्ट; मन बिथरलेला; राजद्रोही.

Dĭsaffĕc'tion, *n.* (डिस्-अफे'क्शन्)—dislike, ill-will, discontentedness; disloyalty. असंतुष्टता; अप्रीति, अराजनिष्ठा.

Dĭsagree', *v. i.* (डिस्-अॅग्री')—to differ; to fail to agree with; to quarrel. मतभेद असणें; तफावत असणें; भांडणें. *Disagree'ment, n.*

Dĭsăgree'able, *a.* (डिस्-अॅग्रि-'एबल्)—unpleasant; ill-tempered. अप्रिय, नापसंत; वाईट स्वभावाचा. *n.* (*usu. pl.*) troubles, worries. कटु अनुभव, त्रास, दुःख.

Dĭsallow', *v. t* (डिस्-अला'उ)—to disapprove of, to reject; to prohibit. नाकारणें, प्रतिबंध करणें, मनाई-निषेध करणें.

Dĭsăppear', *v. i.* (डिस्-अॅपि'अर्)—to pass from sight, to vanish, to become invisible. अदृश्य होणें, नाहींसा होणें. *Disappear'ance, n.*

Dĭsappoint', *v. t.* (डिस्-अपॉ'इन्ट्)—to fail to fulfil; to defeat the hopes of; to break appointment with. निराशा करणें; आशाभंग करणें; संकेत मोडणें. *-ing, a.* निराशाजनक; *-ingly, adv.*; *Disappoin'tedly, adv.*

Dĭsappoint'ment, *n.* (डिस्-अपॉ'इन्ट्मेन्ट्)—failure to fulfil; the defeat of hopes. निराशा, आशाभंग.

Dĭsăpprobā'tion, *n.* (डिस्-अॅप्रो-बे'शन्)—disapproval, censure (expressed or unexpressed). नापसंती, अमान्यता.

Dĭsapprove', *v. t. & i.* (डिस्-अ-प्रू'व्)—to have unfavourable opinion of, to hold a bad opinion of, not to be in favour of. नापसंती दर्शविणें, अमान्य करणें. *Disapprov'al, n.* नापसंती.

Dĭsärm', *v. t.* (डिस्-आ'र्म्)—to deprive of weapons; to pacify hostility or suspicions of. हत्यारें काढून घेणें, निःशस्त्र करणें; वैरभाव नाहींसा करणें, संशय निवारण करणें.

Dĭsärm'ament, *n.* (डिस्-आ'र्म-मेन्ट्)—abandonment or reduction of warlike establishment. युद्धसामुग्री कमी करणें, निःशस्त्रीकरण.

Dĭsarrănge', *v. t.* (डिस्-अॅरें'ज्)—to put out of order. अस्ताव्यस्त-अव्यवस्थित-करणें. *-ment, n.*

Dĭsarray', *v. t.* (डिस्-अरे')—to throw into disorder. विस्कळीत करणें. *n.* a state of disorder. गोंधळ, अव्यवस्था.

Dĭsăs'ter, *n.* (डिझा'स्टर्)—a sudden or great misfortune, a mishap, a calamity. अनर्थ, दुर्दैव, अरिष्ट, संकट.

Dĭsăs'trous, *a.* (डिझा'स्ट्रस्)—full of great misfortune, calamitous, gloomy. अनर्थावह, संकटमय.*-ly, adv.*

Dĭsavow', *v. t.* (डिस्-अव्हा'उ)—to disown; to deny knowledge of; to repudiate. नाकारणें; नाकबूल करणें; खरें न मानणें. *Disavow'al, n.* नाकबुली, नकार.

Dĭsbănd', *v. t. & i.* (डिस्-बॅ'न्ड्)—to let soldiers go out of the army, to break up an army, to disembody (troops); to be broken up; to disperse. लष्करी नोकरींतून मोकळें करणें, (लष्कर) मोडणें; मोडणें; उधळून लावणें. *-ment, n.*

Dĭsbĕlieve', *v. t. & i.* (डिस्-बिली'व्ह्)—to refuse credence to; to be a sceptic. विश्वास न ठेवणें; नास्तिक होणें. *Dis'belief, n*

Dĭsbŭrd'en, *v. t.* (डिस्-ब'र्डन्)—to relieve of a burden, to unload; to ease the mind. ओझें उतरणें; मनाला स्वस्थता देणें, मनावरचें दडपण कमी होणें.

Dĭsbŭrse', *v. t. & i.* (डिसब'र्स्)—to spend out, to expend, to pay out; to make an outlay. देऊन टाकणें; बटवडा करणें. *Disburse'ment, n.* खर्च, व्यय, बटवडा.

Disc, *n.* See Disk.

Dĭscärd', *v. t. & i.* (डिस्का'र्ड्)—to throw out or reject; to give up; to dismiss, to discharge, to put away. फेंकून देणें, नाकारणें; टाकून देणें; काढून टाकणें, हाकून देणें. *n.* discarding at cards; a discarded card. (पानें) फेंकून देणें; फेंकून दिलेलें पान.

Dĭscern', *v. t.* (डिझ'र्न्)—to make out or descry to distinguish. पाहणें, निर्णय करणें; भेद पाहणें, निरनिराळा दाखविणें. *-ible, a.*; *Discern'ing, a.* having insight. सूक्ष्मदर्शी, शहाणा.

Dĭscern'ment, *n.* (डि-झ'र्न-मेन्ट्)—insight; critical sagacity. सूक्ष्म दृष्टि; तारतम्य जाणण्याची शक्ति, निर्णय करण्याचें सामर्थ्य.

Dĭschärge', *v. t. & i.* (डिस्चा'र्ज्)—to disburden, to unload; to disembark; to dismiss, to cashier; to release; to let flow; to send as a missile; to fire; to acquit oneself of (duty, debt). ओझें उतरणें; खालीं करणें; (कामावरून वगैरे) काढून टाकणें; (कायदेशीर रीतीनें) दोषमुक्त करणें; वाहूं देणें; (बाण वगैरे) सोडणें; बंदुक मारणें; (कर्तव्यकर्म) बजावणें. *n.* act of discharging or being discharged; poisonous matter which comes out of a wound. फेड; बडतर्फी, रजा; स्राव, पाझर.

Dĭsci'ple, *n.* (डि-सा'यूपल्)—a follower of a (great) teacher or leader. शिष्य, चेला, अनुयायी.*-ship, n.* शिष्यत्व.

Dĭsciplinăr'ian, *n.* (डि-सि-प्लिने'रिअन्)—a maintainer of strict discipline. कडक शिस्तीचा माणूस, शिस्तीचा भोक्ता.

Dĭs'ciplinarў, *a.* (डि'सि-प्लि-नरि)—of or promoting discipline, intended for discipline. शिस्तीचा, शिस्तीविषयीं.

Dis'cipline, *n.* (डि'सिप्लिन्)—training that produces self-control, orderliness and obedience. वळण, शिस्त ; अट्ल, ठेंच ; आज्ञाधारकपणा ; शिक्षा, शासन ; प्रायश्चित. *v. t.* to train with discipline. शिस्त लावणें.

Disclaim', *v. t. & i.* (डिस्क्ले'म्)—to disown, to disavow, to reject any connection with. अंगाबाहेर टाकणें, नाकारणें, (हक्क) न मानणें, (जबाबदारी, संबंध) न मानणें.*-er, n.*

Disclose', *v. t.* (डिस्क्लो'झ्)—to expose or lay open to view, to reveal, to unveil, to make known what has been secret. प्रगट करणें, उघडकीस आणणें, जाहीर करणें.

Disclo'sure, *n.* (डिस्क्लो'झर्)—utterance of what was secret; a thing that is made known. प्रगटीकरण ; उघडकीस आणलेली गोष्ट.

Discol'our, *v. t. & i.* (डिस्क'लर्)—to change the colour of ; to destroy the natural or right colour of. रंग खराब करणें ; रंग बिघडणें,-उडणें ; शोभा घालवणें. *-ment, n.* ; *Discolo(u)ra'tion, n.* रंग बदलणें, वैवर्ण्य, डाग.

Discom'fit, *v. t.* (डिस्क'म्फिट्)—to defeat ; to baffle ; to disconcert, to give an unpleasant shock. पराजय करणें, दाणादाण-धुव्वा उडविणें ; हताश करणें ; मनोभंग करणें.

Discom'fiture, *n.* (डिस्क'म्फिचर्)—*defeat, rout.* पराभव, पराजय ; दाणादाण, घाबरगुंडी.

Discom'fort, *n.* (डिस्क'म्फर्ट्)—uneasiness of body or mind. मनाची किंवा शरीराची अस्वस्थता. *v. t.* to make uneasy, to agitate, to ruffle, to vex. खिन्न-नाउमेद-करणें ; अस्वस्थ करणें.

Discom'mon, *v. t.* (डिस्-कॉ'मन्)—to enclose common land. समाईक जागेला आवार किंवा कुंपण घालणें.

Discompose', *v. t.* (डिस्-कम्पो'झ्)—to deprive of composure, to disturb. मन उद्विग्न करणें, त्रास देणें.

Discompo'sure, *n.* (डिस्कम्पो'झर्)—disturbance, disorder, agitation, perturbation. त्रास, गोंधळ, अस्वस्थता.

Disconcert', *v. t.* (डिस्कन्स'र्ट्)—to derange or upset ; to embarrass, to disturb, to ruffle. धांदल करणें, गोंधळवणें, व्यग्र करणें, (एकोपा-मेळ) मोडणें. *Disconcert'ment, n.* अस्वस्थता, गोंधळ, मतभेद.

Disconnect', *v. t.* (डिस्कने'क्ट्)—to sever connexion of ; to separate, to disjoin. संबंध तोडणें, निराळा करणें, संबंध तोडून टाकणें. *Disconnected, a.* incoherent. असंबद्ध, विस्कळित ; *-ly, adv.* ; *-ness, n.* विस्कळितपणा.

Discon'solate, *a.* (डिस्कॉ'न्सलेट्)— hopeless ; downcast for loss of something, sorrowful, sad, melancholy. समाधान करण्यास कठीण ; खिन्न, उदासीन. *-ly, adv.*

Discontent', *n.* (डिस्कन्टे'न्ट्)—unsatisfied state of mind, uneasiness of mind, dissatisfaction. असमाधान. *a.* असमाधानी, असंतुष्ट, नाखुष. *v. t.* नाखुष करणें.

Disconten'ted, *a.* (डिस्-कन्टे'न्टिड्)—not satisfied, feeling discontent. असंतुष्ट, अतृप्त.

Disconti'nue, *v. t.* (डिस्-कन्टि'न्यू)—to leave off, not to go on with, to put an end to, to stop. सोडणें ; टाकणें, बंद करणें. *Discontin'uance, n.* खंड, अडथळा, विघ्न. *Discontin'uous, a.* not continuous. सारखा नसलेला, खंडित. *Discontinuity, n.* सारखें नसणें, सातत्याभाव ; अविराम.

Dis'cord, *n.* (डि'स्कॉर्ड्)—disagreement, strife ; harsh noise ; want of harmony, disagreement of sounds. बेबनाव, भांडण ; कर्कश स्वर, बेसूर, बदसूरपणा ; स्वरांचा मेळ नसणें. *Discor'dant, a.* विषम, विसंगत, बेसूर. *Discord'ance, n.* विसंगतता.

Dis'count, *n.* (डि'स्काउन्ट्)—deduction from amount of a bill ; (fig.) allowance made for exaggeration. सूट, बटाव, कमिशन ; अतिशयोक्तींत बाद, जमेस न धरणें. *v. t.* (डिस्का'उन्ट्)-to lessen, to detract from ; to allow for exaggeration. कमी करणें; अतिशयोक्तींत बाद करणें. *At a discount,* below the normal price, depreciated. कमी किंमतीनें. *To discount a story,* to believe only a part of the story. गोष्टींतील कांहीं भागच विश्वसनीय मानणें.

Discount'enance, *v. t.* (डिस्-का'उन्टिनन्स्)-to refuse to look on with favour, to show dislike for a plan ; to discourage. हिरमोड करणें ; पाठिंबा न देणें ; नाउमेद करणें.

Discou'rage, *v. t.* (डिस्क'रेज्)—to cause one to lose courage, to reduce the confidence or spirits of ; to deter. धैर्य खच्चवणें ; मोडती घालणें. *Discou'ragement, n.* नाउमेद ; मोडती.

Dis'course, *n.* (डि'स्कोर्स्)— a lecture, sermon, or other exposition ; a talk or conversation. व्याख्यान, प्रवचन ; संभाषण, संवाद. *v. i.* (डिस्को'अर्स्)-utter a discourse ; to converse, to talk. प्रवचन-भाषण करणें ; संभाषण करणें, बोलणें.

Discourt'eous, *a.* (डिस्को'र्टिअस्, डिस्क'-)—not polite, rude, uncivil, void of courtesy. आडदांड, उर्मट, उद्धट ; असभ्य. *Discourt'esy, n.* ill-manners, incivility. असभ्यता, अविनय.

Disco'ver, *v. t* (डिस्क'व्हर्)—to find out, to detect ; to make known. शोधून काढणें, शोध

करणें; प्रगट करणें. *Disco'verer, n.* शोध करणारा, शोधक.

Dĭsco'vert, *a.* (डिस्क'व्हर्ट्)-(Legal) an unmarried or widowed (woman). अविवाहित किंवा विधवा (स्त्री).

Dĭsco'very, *n.* (डिस्क'व्हरि)—disclosure, discovering; thing discovered. शोध; शोधून काढलेली वस्तु.

Dĭscrĕd'it, *v. t.* (डिस्क्रे'डिट्)—to refuse belief to; to bring disbelief or disrepute on. भरंवसा न ठेवणें, अविश्वास उत्पन्न करणें, अपकीर्ति करणें. *n.* a discredited state; a disrepute, want of credit or good reputation. नापत, गैरभरंवसा; अपकीर्ति. *Discre'ditable, a.* causing harm to one's reputation or good name. नापत करणारा, नांवाला कलंक लावणारा.

Dĭscreet', *a.* (डिस्क्री'ट्)—prudent; cautious in speech or action. दूरदर्शी; विवेकी, धोरणी, सुज्ञ, सावध, धूर्त.-*ly, adv.*

Dĭscrĕp'ancy, *n.* (डिस्क्रे'पन्सि)—difference; failure to tally, divergence. अंतर, भेद; तफावत. *Discrep'ant, a.* विसंगत, विरुद्ध.

Dĭs'crēte, *a.* (डि'स्क्रीट्)—separate, distinct. निराळा, वियुक्त, सुटा, मोकळा, व्यक्त, अमूर्त. -*ness, n.*

Dĭscrĕ'tion, *n.* (डिस्क्रे'शन्)—discreetness, carefulness and good judgment; liberty of action. विचार, विवेक, अक्कल, सावधगिरी, तारतम्य; मुखत्यारी, स्वतंत्रता. *At the discretion of,* depending on the decision arrived at by. -च्या योग्य विचारानें. *To surrender at discretion,* to be treated as another decides. दुसरा ठरवील त्याप्रमाणें बिनशर्त कबूल होणें, -च्या बाहेर नसणें. *Years* or *age of discretion,* age at which one becomes a responsible person. प्रौढ वय. -*ary, a.*

Dĭscrĭm'ĭnāte, *v. t. & i.* (डिस्क्रि'मिनेट्)—to see the difference between, to choose with judgment. तारतम्य पाहून पसंत करणें, विवेक असणें. *To discriminate against,* to treat unfairly. दुजाभावानें वागविणें, भिन्न दूर ठरविणें. *Discrimina'tion, n.*

Dĭscŭrs'ĭve, *a.* (डिस्क'र्सिव्ह्)—rambling, wandering, not sticking to the main subject. चंचल बुद्धीचा, विषयान्तर करणारा.

Dĭs'cŭs, *n.* (डि'स्-कस्)—a flat round object used for throwing. फेंकून मारण्याचा एक चपटा वाटोळा तुकडा, चक्र.

Dĭscuss', (डिस्क'स्)—to talk about, to examine by argument, to debate, to reason together; to eat or drink. वाटाघाट किंवा भवति न भवति करणें, वादविवाद करणें; खाणें पिणें. *To discuss a bottle of wine,* to share or drink in a leisurely way. सावकाशपणें पिऊन टाकणें. *Discus'sible, a.; Discus'sion, n.* वादविवाद, वाटाघाट, चर्चा.

Dĭsdain', *v. t.* (डिस्डे'न्)—to scorn; to treat as unworthy of notice or of oneself. तिरस्कार करणें, तुच्छ मानणें. *n.* a contemptuous neglect or dislike, a feeling of disrespect for. तिटकारा, तिरस्कार. *Disdain'ful, a.* तिरस्कारपूर्ण, तिटकारा आणणारा.

Dĭsease', *n.* (डिझी'झ्)–illness, a serious derangement of health; a bodily disorder. विकार, दुखणें; रोग.

Dĭseased', *a.* (डिझी'झ्ड्)—affected with disease; morbid; depraved. रोगी, दुखणेकरी; रोगट; नासका.

Dĭsĕmbärk', *v. t. & i.* (डिस्-इम्बा'र्क)—to put or go ashore, to get off a boat, to land. जहाजांतून जमिनीवर उतरणें. -*a'tion, n.*

Dĭsĕmbŏdў', *v. t.* (डिस्-इम्बॉ'डि)—to set free from the body. शरीरापासून मुक्त करणें, देहानिराळा करणें. *Disembo'diment, n.*

Dĭsĕmbo'wel, *v. t.* (डिस्-इम्बॉ'वेल्)—to remove or cut out bowels from the body; to rip up. शरीरांतून बाहेर काढणें, आंतडीं फाडणें, चिरणें.

Dĭsĕnchant', *v. t.* (डिस्-इन्चा'न्ट्)—to free from the effects of magic; to disillusion. मोहनी दूर करणें, भ्रम घालवणें.

Dĭsĕngāged', *a.* (डिस्इन्गे'ज्ड्)—at leisure; vacant. मोकळा, रिकामा; निरुपयोगी.

Dĭsĕntăngle', *v. t.* (डिस्इन्टॅ'गल्)—to untie a knot, to extricate; to unravel; to untwist. गुंतागुंत काढणें; सोडवणें; अलग-मोकळा-करणें. -*ment, n.*

Dĭsĕnthral', *v. t.* (डिस्-इन्थ्रॉ'ल्)—to free from bondage, or slavery. दास्यमुक्त करणें, स्वातंत्र्य देणें. -*ment, n.*

Dĭsfā'vour, *n.* (डिस्-फे'व्हर्)-dislike; disapproval, being disliked. अवकृपा; नापसंती, नावड. *v. t.* to regard or treat with disfavour. अवकृपा करणें, नापसंती दर्शविणें.

Dĭsfĭg'ure, *v. t.* (डिस्-फि'गर)—to mar the appearance of, to harm the beauty or shape of; to sully. विरूप करणें, व्यंगता आणणें; बिघडवणें. -*ment, n.* विरूपता; डाग, कलंक.

Dĭsfrăn'chīse, *v. t.* (डिस्-फ्रॅ'चाइझ्)— to deprive of right of electing or voting. निवडण्याचा किंवा मतदानाचा हक्क काढून घेणें, नागरिकत्वाचा अधिकार काढून घेणें. *Disfran'chisement, n.*

Dĭsgorge', *v. t.* (डिस्-गॉ'र्ज्)—to bring out from the throat what has been eaten; to give up (e. g. what is stolen). ओकून टाकणें; (नाइला-जानें) परत देऊन टाकणें.

Dĭsgrāce', *n.* (डिस्-ग्रे'स्)—a loss of respect or favour; downfall; ignominy. मानहानि; पतन; बदनाम, कलंक, डाग; निंद्य गोष्ट. *v. t.* to dismiss from favour; to be a disgrace to, to bring shame or dishonour upon. मर्जीतून उतरणें; कालिमा लावणें.

Dĭsgrāce'ful, *a.* (डिस्-ग्रे'स्-फुल्)— shameful लाजिरवाणा.

Dĭsgrŭn'tled, *a.* (डिस्ग्र'न्टल्ड्)—discontented, in a bad temper. असंतुष्ट, कुरकूर करणारा.

Dĭsguise', *v. t.* (डिस्-गा'इझ्)—to make unrecognizable; to pass off as something else; to cloak or hide. ओळखेनासा करणें; आपण दुसरा कोणीतरी अशी बतावणी करणें; वेष बदलणें, छपवणें, लपविणें. *n.* disguised state; a device or garb used to disguise. वेषबदल; सोंग, कपटवेष. *Disguised in*, वेष घेतलेला. *Blessing in disguise*, an apparent evil that results in good. परिणामीं हितकर अशी बाह्यत: कटु गोष्ट. *To throw off one's disguise*, to reveal one's intentions. हेतु उघड करून सांगणें. *Disguised in* or *with drink* or *liquor*, drunk. झिंगलेला, दारू प्यालेला.

Dĭsgŭst', *n.* (डिस्ग'स्ट्)—a strong feeling of dislike, a violent distaste; a keen disappointment. किळस, तिटकारा, वीट, कंटाळा; तीव्र निराशा. *v. t.* affect with disgust. तिटकारा किंवा वीट येणें. *-ful*, *a.*

Dĭsh, *n.* (डिश्)— shallow vessel for holding food; a particular kind of food. ताट, तबक; विशिष्ट प्रकारचें अन्न, पक्वान्न, ताट. *v. t.* to put in dishes for serving; to frustrate. ताटें-पानें वाढणें; चीत करणें. *A standing dish*, a topic that appears regularly. नियमित येणारा विषय. *To dish up*, to put food in a dish and serve it. ताटांत अन्न घालून वाढणें.

Dĭshabille', *n.* (डिस्-अबी'ल्)—not fully dressed state; undress garment. सर्व कपडे घातलेले नसणें; (घरांत घालण्याचा) पायघोळ झगा, कफनी.

Dĭsheart'en, *v. t.* (डिस्-हा'र्टन्)—to discourage; to deject, to depress, to cause to lose hope. नाउमेद करणें; विमनस्क करणें. *-ment*, *n.*

Dĭshĕv'elled, *a.* (डिस्-हे'व्हल्ड्)—with disordered hair; unkempt, untidy. (केंस) पिंजारलेला; अव्यवस्थित, गैद्दी.

Dĭshŏn'ĕst, *a.* (डिस्-ऑ'निस्ट्)— fraudulent; knavish; insincere. लबाड; बेइमानी; अप्रमाणिक.

Dĭshŏn'our, *v. t.* (डिस्-ऑ'नर्)—to treat with contumely; to bring dishonour upon; to refuse to honour or pay. अपमान किंवा अप्रतिष्ठा करणें; (चेक किंवा हुंडी) नाकारणें, न स्वीकारणें. *n.* dishonoured state; loss of repute. अपमान, अप्रतिष्ठा.

Dĭshŏn'ourable, *a.* (डिस्-ऑ'नरेबल्)— shameful, base; unprincipled. लाजिरवाणा; विचारशून्य, नीच.

Dĭsĭllu'sion, *v. t.* (डिस्-इल्यु'झन्)—to open the eyes of, to wake to realities; to free from a wrong idea. (चे) डोळे उघडविणें,- उघडायला लावणें; भ्रम नाहींसा करणें. *-ment*, *n.*

Dĭsĭnclīnā'tion, *n.* (डिस्-इन्क्लिने'शन्)—slight dislike or unwillingness. नावड, नाखुषी, अनादर, विरुद्ध कल.

Dĭsĭnclīne', *v. t.* (डिस्-इन्क्ला'इन्)—to inspire with disinclination; to make disaffected. मनाचा कल नसणें; असंतुष्ट करणें.

Dĭsĭnfĕct', *v. t.* (डिस्-इन्फे'क्ट्)—to purge of or cleanse from infection; to make clean and free from all seeds of disease. शुद्ध करणें. दूषित हवा स्वच्छ करणें. *-ant*, *a.* & *n.* रोग-जंतु-नाशक, सूक्ष्मकृमिघ्न (औषध). *Disinfec'tion*, *n.* शुद्ध करणें.

Dĭsĭngĕn'ūous, *a.* (डिस्-इन्जे'न्यु-अस्)—insincere; not candid. खोटा, कपटी; मनाचा कुजका. *-ly*, *adv.*; *-ness*, *n.*

Dĭsĭnhĕ'rĭt, *v. t.* (डिस्-इन्-हे'रिट्)—to deprive of right of inheriting, to take away a natural right. वारसा काढून घेणें, बेवारस करणें. *-ance*, *n.*

Dĭsĭn'tĕgrāte, *v. t.* & *i.* (डिस्-इ'न्टि-ग्रेट्)—to separate into the component parts; to lose cohesion, to break into pieces. अवयव वेगळे करणें; एकोपा जाणें, संबंध सुटणें, पृथक्करण होणें. *-tion*, *n.* फुटणें, विश्लेषण; चूर्णक्रिया; (खडक वगैरे) फुटून जाण्याची क्रिया; भाग निरनिराळे होणें.

Dĭsĭnter', *v. t.* (डिस्-इन्ट'र्)—to take out of a grave, to unbury, to exhume; to unearth. पुरलेलें बाहेर काढणें; खणून बाहेर काढणें, उजेडांत-उघडकीस आणणें. *-ment*, *n.*

Dĭsĭn'terĕsted, *n.* (डिस्-इ'न्टरिस्टिड्)—not influenced by self-interest or partiality. निर्लोभी, स्वार्थरहित, निष्कामबुद्धीचा, तटस्थ, उदासीन. *-ly*, *adv.*; *-ness*, *n.* स्वार्थनिरपेक्षता, निःस्पृहता, निःपक्षपात.

Dĭsjoin', *v. t.* (डिस्-जॉ'इन्)—to separate, to disunite. वेगळा करणें, संबंध तोडणें.

Dĭsjoint', *v. t.* (डिस्-जॉ'इन्ट्)—to separate the joints of; dislocate. सांधे वेगळे वेगळे करणें,

-उकटणें ; स्थानभ्रष्ट करणें. *Disjoint'ed, a.* सांधा उकटलेला ; स्थानभ्रष्ट ; असंबद्ध (भाषण).

Dĭsjŭnc'tion, *n.* (डिस्जं'क्शन्)-disjoining, separation. वियोग ; (Logic) पक्षान्तर वाक्य. *Disjunc'tive, a.* वियोगकारी ; विभाजक.

Dĭsk, Dĭsc, *n.* (डिस्क्)—a thin flat circular object or semblance of this. बिंब, मंडल ; वर्तुळ, चक्र ; (Bot.) कर्णिका ; चपटी बांगडी.

Dĭslīke', *v. t.* (डिस्ला'इक्)—to feel aversion to. नावडणें, तिरस्कार करणें. *n.* a feeling of aversion नावड, अप्रीति, द्वेष.

Dĭs'locāte, *v. t.* (डि'स्-लेकट्)— to put limb out of joint, to put out of its proper place, to put out of gear, to throw into disorder. सांधा उखळणें ; गोंधळ करणें. *Disloca'tion, n.* सांधा उखळणें ; अव्यवस्था, गोंधळ.

Dĭslŏdge', *v. t.* (डिस्-लॉ'ज्)—to force out of position occupied, to remove from the place. स्थानापासून उठवून लावणें, हुसकून देणें,-लावणें. *-ment, n.*

Dĭsloy'al, *a* (डिस्लॉ'यल्)—unfaithful ; untrue to allegiance ; disaffected. विश्वासघातकी ; राजद्रोही ; असंतुष्ट. *Disloy'alty, n.* अराजनिष्ठा, बेइमानी.

Dĭs'mal, *a.* (डि'झ्-मल्)—sorrowful, cheerless ; dreary. खिन्न ; भयाण, उदास.

Dĭsmăn'tle, *v. t.* (डिस्-मॅ'टल्)—to deprive of defences, equipment, or furniture ; to take away all (the sails and fittings from a ship). संरक्षण, सरंजाम किंवा सामानसुमान काढून घेणें.

Dĭsmäst'ed, *a.* (डिस्-मा'स्टेड्)—having lost its masts. डोलकाठ्या नसलेला.

Dĭsmay', *n.* (डिस्-मे')—loss of courage ; horrified amazement. दहशत, भय, धाक ; त्रेधा, भीति. *v. t.* to affect with loss of courage ; to reduce to despair. गाळण उडणें, दहशत बसणें, त्रेधा उडवणें ; निराश होणें.

Dĭsmĕm'ber, *v. t.* (डिस्-मे'म्बर्)—to cut the limbs off a body ; to cut to pieces. अवयव तोडणें ; तुकडे तुकडे करणें. *Dismem'berment, n.* अवयवच्छेदन.

Dĭsmiss', *v. t.* (डिस्-मि'स्)—to send away, to disband ; to discharge, to cashier ; to put out of one's thought. घालवून देणें ; (कामावरून) काढून टाकणें ; ०बद्दल विचार न करणें. *Dismi'ssal, n.* पाठवणी ; बडतर्फी.

Dĭsmount', *v. i. & t.* (डिस्-मा'उन्ट्)—to alight or cause to alight from horseback, to take down a thing from that upon which it is mounted. घोड्यावरून खालीं उतरणें ; वरून खालीं आणणें ; (यंत्र) खालीं उतरणें, -अलग करणें.

Dĭsobē'dience, *n.* (डिस्-ओबी'डिअन्स्)—disobeying ; rebelliousness. आज्ञाभंग ; शिरजोरपणा. *Disobe'dient, a.* हुकूम मोडणारा, अवज्ञा करणारा, आज्ञाभंग करणारा.

Dĭsobey', *v. i. & t.* (डिस्-ओबे')—to disregard orders ; to break rules. आज्ञा न जुमानणें ; नियमभंग करणें.

Dĭsoblīge', *v. t.* (डिस्-अब्ला'इज्)—to refuse to consult the convenience or wishes of. उपयोगीं न पडणें, सोय न पाहणें, नाखूष करणें, विरुद्ध वागणें. *Disobli'ging, a.* अनुपकारी, कधींहि उपयोगी न पडणारा.

Dĭsŏrd'er, *n.* (डिस्-ऑ'र्डर्)—confusion ; bodily or mental ailment ; infractions of discipline. अव्यवस्था, गोंधळ ; विकृति, रोग ; बंडाळी, गैरशिस्त. *v. t.* to disturb the healthy working of. गोंधळ माजवणें, रोग- विकृति- उत्पन्न करणें.

Dĭsŏrd'erlў, *a.* (डिस्-ऑ'र्डर्लि)—untidy ; riotous or illdisciplined. अव्यवस्थित ; दंगेखोर, शिस्तहीन.

Dĭsŏrg'anize, *v. t.* (डिस्-ऑ'र्गनाइझ्)—to destroy a system of ; to throw into disorder, to put out of working order. विघटित करणें ; रचना मोडणें, अव्यवस्था माजणें. *-za'tion, n.* अव्यवस्था, गोंधळ.

Dĭsown', *v. t.* (डिस्-ओ'न्)—to refuse to accept as being one's own ; to repudiate, to disclaim ; to renounce, to deny. माझें नाहीं असें म्हणणें ; त्याग करणें ; नाकारणें.

Dĭspă'rage, *v. t.* (डिस्-पॅ'रेज्)—to speak slightingly of ; to depreciate, to speak bad things about. तुच्छतापूर्वक बोलणें ; कमी दर्जाचा लेखणें. *-ment, n.* ; *Dispa'ragingly, adv.* तुच्छतादर्शक-अपमानकारक-रीतीनें.

Dĭspă'rĭtў, *n.* (डिस्-पॅ'रिटि)— unequal state or degrees ; inequality, disproportion. तफावत ; न्यूनाधिक्य, अंतर, फरक, भेद, विषमता.

Dĭspă'ssionate, *a.* (डिस्-पॅ'शनिट्)— free from passion or strong feeling ; devoid of emotion ; impartial. विकाररहित ; निःपक्षपाती. *-ness, n.* ; *-ly, adv.*

Dĭspătch', Despatch', *v. t.* (डिस्पॅ'च्)—to send to destination, to send off quickly ; to kill ; to get business done promptly. मुक्कामीं-मुक्कामाला-पाठविणें ; ठार मारणें ; काम तातडतोब उरकणें. *n.* dispatching ; rapidity ; a speedy performance ; an official message. पाठविणें ; जलदी, त्वरा ; (सरकारी) खलिता.

Dĭspĕl', *v. t.* (डिस्-पे'ल्)—to dissipate ; to disperse, to drive away, to banish, to clear away (fears or darkness). नाहींसा करणें, दूर करणें, घालविणें.

Dĭspĕn'sable, *a.* (डिस्पे'न्सब्‌ल्)—that can be dispensed with or dispensed. सोडण्याला योग्य, अनावश्यक.

Dĭspĕn'sarў, *n.* (डिस्पे'न्सरि)—the place where medicine is mixed and given out. दवाखाना. औषधालय.

Dĭspensā'tion, *n.* (डिस्पेन्से'शन्)—dealing out ; ordering of the world by providence; that which is enjoined; arrangement made by Nature or Providence; doing without. वांटणें, विभागणी; ईश्वरी सूत्र, नेमानेम; विहितधर्म; दैवी योजना-घटना; माफी, सूट; अभाव.

Dĭspĕnse', *v. t. & i.* (डिस्पे'न्स्)—to deal out (justice, &c.); to make up and issue medicines; to exempt. वांटून देणें, न्याय करणें; औषध तयार करून देणें; माफ करणें. *To dispense with*, do without, discharge. च्या वांचून चालणें, काढून टाकणें. *Dispen'ser*, *n.* देणारा; औषधें तयार करून देणारा.

Dĭsperse', *v. t. & i.* (डिस्प'र्स्)—to break up from assembled state, to scatter; to go or make go various ways. पसरणें, बरखास्त होणें; निरनिराळ्या दिशेला जाणें, पांगापांग होणें, विकीर्ण होणें. *Dispers'al*, *n.*; *Dispers'ion*, *n.* फांकणें, पांगणें; गोठलेलें रक्त फांकणें; विकिरण.

Dĭspĭ'rĭt, *v. t.* (डिस्पि'रिट्)-to make despondent, to dishearten, to discourage. मनोभंग करणें, हिंमत खचवणें. *Dispi'ritedly*, *adv.*

Dĭspĭ'rĭted, *a.* (डिस्पि'रिटिड्)—sad and without hope. उमेद खचलेला, उदास.

Displāce', *v. t.* (डिस्प्ले'स्)—to shift from proper position; to oust, to remove from office. स्थळ पालटणें; कापून लावणें; कामावरून काढणें.

Dĭsplā'cement, *n.* (डिस्-प्ले'स्-मेन्ट्)—displacing; the amount of water displaced by a ship; the depth to which a ship sinks into the water. स्थलच्युति, स्थलांतर करणें,- होणें; तरंगत्या गलबतानें बाजूला सारलेलें पाणी; गलबताची पाण्यांत बुडालेली खोली.

Display', *v. t.* (डिस्प्ले')—to spread out to view; to exhibit. दिसण्याकरितां बाहेर काढणें, प्रदर्शन करणें. *n.* displaying; exhibition; ostentation; (Print.) arrangement of type with a view to calling attention. दाखविणें; प्रदर्शन; थाटमाट, भपका; ठळक टाईप घालून (विशेष रीतीनें) नजरेंत भरविणें,-सुव्यक्त करणें.

Displease', *v. t.* (डिस्-प्ली'झ्)—to offend; to make angry; to excite disapprobation of. मन दुखवणें; राग आणणें; नाखुष करणें. *Displea'sing*, *a.*; *-ly*, *adv.*

Dĭsplea'sure, *n.* (डिस्प्ले'झर्)—indignation, resentment; annoyance, vexation, disfavour. राग; त्रास; अवकृपा, असंतोष.

Dĭsplume', *v. t.* (डिस्-प्लू'म्)—to deprive of feathers, honour etc. पिसें-पिसारा काढून टाकणें, शोभा हरण करणें, शोभा -अपमान -करणें.

Dĭspō'sal, *n.* (डिस्-पो'झल्)—disposing of; bestowal; sale; management. विनियोग; देणें; विक्री; व्यवस्था. *At one's disposal*, स्वाधीन.

Dĭsport', *v. i.* (डिस्-पो'र्ट्)—to amuse oneself. स्वतःची करमणूक करणें, रमवणें. *n.* a pastime. करमणूक, गंमत.

Dĭspōse', *v. t. & i.* (डि-स्पो'झ्)—to place in order; to adjust; to incline the mind to do; to bestow. व्यवस्थित ठेवणें; बरोबर मांडणी करणें; मन वळवणें, मनाचा कल असणें; देणें. *To dispose of*, to get rid of, to set oneself free from. मुक्त होणें, देऊन टाकणें. *Dispo'sable*, *a.* विल्हेवाट लावतां येण्याजोगा; हातचा, स्वाधीन.

Dĭsposi'tion, *n.* (डिस्पोझि'शन्)—setting in order; the arrangement; temperament, a person's natural way of feeling and acting; dispensation; bestowal by deed or will; व्यवस्था-करणें,-लावणें; रचना, मांडणी, व्यवस्था; स्वभाव; (ईश्वरी) न्याय देणें; करारपत्रानें,-मृत्युपत्रानें-देऊन टाकणें.

Dĭspossĕss', *v. t.* (डिस्-पझे'स्)—to deprive of possession, to oust or dislodge. ताबा काढून घेणें, हुसकावून लावणें.*-ion*, *n.*

Dĭspraise', *v. t. & n.* (डिस्प्रे'झ्)—disparage, censure. कमी किंमत, प्रशंसा, निंदा (करणें).

Dĭsproōf', *n.* (डिस्-प्रू'फ्)—refutation. खंडन, निराकरण.

Dĭspropor'tionāte, *a.* (डिस्-प्रपो'र्शनेट्)—not duly proportioned, unsymmetrical, unequal. विजोड, बेडोल.*-ly*, *adv.*

Dĭsprove', *v. t.* (डिस्प्रू'व्)—to prove to be false or erroneous, to show the fallacy of; to refute. खोटा आहे हें सिद्ध करणें; खोटेपणा दाखवणें; खण्डन करणें.

Dĭs'pūtāble, *a.* (डि'स्प्यू-टेबल्)—open to question. वादग्रस्त.

Dĭs'pūtant, *n.* (डि'स्प्यू-टन्ट्)—one who disputes, a controversialist. वादविवाद करणारा, वादी.

Dĭspūtā'tion, *n.* (डिस्प्यूटे'शन्)—an argumentative debate, a discourse or treatise. वादविवाद, वाद, चर्चा, संवाद, चर्चात्मक प्रबंध, निबंध.

Dĭspūtā'tious, *a.* (डिस्प्यूटे'शस्)—fond of argument, quarrelsome. वादप्रिय, तंटेखोर, अतिवादी, तक्रारी.

Dispūte', *v. i. & t.* (डिस्प्यू'ट्)—to hold a debate; to quarrel, to controvert; to resist. वादविवाद करणें; भांडणें, आक्षेप घेणें; प्रतिकार करणें. *n.* a controversy, a debate; a quarrel; a difference of opinion. वादविवाद; भांडण; मतभेद. [L. *dis*, apart & *putare*, to think]

Dĭsqualificā'tion, *n.* (डिस्-क्वॉलिफिके'शन्)—that which makes unfit; disability. नालायकी आणणारी गोष्ट; नालायकी, अयोग्यता, अपात्रता.

Dĭsqual'ify, *v. t.* (डिस्क्वॉ'लि-फाय्)—to make unfit or ineligible. अयोग्य किंवा नालायक ठरविणें, कायदेशीर हक्क-अधिकार-काढून घेणें.

Dĭsquī'et, *n.* (डिस्-क्वा'एट्)—uneasiness, anxiety. अस्वस्थता, तळमळ. *v. t.* to make uneasy, to perturb. मनाच्या शांततेचा भंग करणें, अस्वस्थ करणें. *a.* uneasy, disturbed. अस्वस्थ, अशांत, क्षुब्ध.—*ness*, *n.*

Dĭsquī'etūde, *n.* (डिस्क्वा'इट्यूड्)—uneasiness, perturbation, anxiety. मनाची अस्वस्थता, तळमळ, व्यग्रता.

Dĭsquĭsĭ'tion, *n.* (डिस्क्विझि'शन्)—an inquiry; a long speech, a long written report about some subject, a treatise. संशोधन, विवेचन, प्रबंध, परीक्षण.—*al*, *a.*

Dĭsregärd', *v. t.* (डिस्-रिगा'र्ड्)—to ignore, to be uninfluenced by. अवमानणें; दुर्लक्ष करणें. *n.* neglect. अवमान, उपेक्षा.

Dĭsrĕ'pūtable, *a.* (डिस् रे'प्युटब्ल्)—having a bad character, bearing a bad name, not respectable. वाईट नांवलौकिक असलेला, असंभावित, असभ्य, निंद्य.—*ness*, *n.*

Dĭsrepūte', *n.* (डिस्-रिप्यू'ट्)—dishonour, ill-repute; discredit. अपकीर्ति; अप्रतिष्ठा.

Dĭsrespĕct', *n.* (डिस्-रिस्पे'क्ट्)—lack of deference, want of respect or reverence. अनादर, अपमान. *Disrespect'ful*, *a.* showing want of respect, unpolite, rude. अनादर करणारा, अपमानकारक, उद्धट.

Dĭsrōbe', *v. t. & i.* (डिस्-रो'ब्)—to take off the clothes or dress, to undress. कपडे काढून टाकणें, विवस्त्र करणें; उघडा करणें.

Dĭsrŭpt', *v. t.* (डिस्-र'प्ट्)—to shatter; to separate, to sever. तुकडे तुकडे करणें; निराळा करणें. *Disrup'tion*, *n.* मोडणें, भंग, फाटाफूट. *Disrup'tive*, *a.*

Dĭssătisfăc'tion, *n.* (डिस्-सॅटिस्फॅ'क्शन्)—want of satisfaction, discontent. असंतोष, असमाधान, अतृप्ति.

Dĭssăt'isfy, *v. t.* (डिस्-सॅ'टिस्फाय्)—to fail to satisfy, to make discontented. नाखुष करणें, असंतुष्ट करणें.

Dĭssĕct', *v. t.* (डिस्-से'क्ट्)—to cut in pieces; to anatomize; to examine or criticize. फाडणें, तुकडे करणें; अभ्यासासाठीं प्रेत फाडणें, व्यवच्छेद करणें; खरमरीत टीका करणें, चिंधड्या उडवणें. *Dissec'tion*, *n.* अवयवच्छेदन, फाडाफाडी; पृथक्करण. *Dissec'tor*, *n.* शस्त्रानें फाडणारा, व्यवच्छेदक.

Dĭssĕm'ble, *v. t. & i.* (डिस्-से'म्बल्)—to conceal or disguise; to be hypocritical, to hide one's feelings. लपवणें; कपट किंवा सोंग करणें, बहाणा करणें. *Dissem'bler*, *n.* ढोंगी, लुच्चा, दांभिक.

Dĭssĕm'ĭnāte, *v. t.* (डि-से'मिनेट्)—to spread abroad, to propagate, to circulate. बाहेर प्रसार करणें, पसरणें. *Dissemina'tion*, *n.* propagation, diffusion. प्रसार, फैलाव. *Dissemina'tor*, *n.* प्रसार करणारा, प्रसारक.

Dĭssĕn'sion, *n.* (डि-से'न्शन्)—disunion, contention, strife. कलह, बखेडा, फाटाफूट.

Dĭssĕnt', *v. i.* (डि-से'न्ट्)—to differ in opinion. मतभेद असणें. *n.* disagreement; difference of opinion. विरोध, मतभेद.

Dĭssĕnt'er, *n.* (डि-से'न्टर्)—one who dissents or does not agree with the teachings of the Church of England. भिन्नधर्मपंथी, धर्मविरोधी.

Dĭssĕn'tient, *a. & n.* (डि-से'न्शन्ट्)—not agreeing, dissenting. प्रतिकूल मत असणारा, भिन्न धर्माचा.

Dĭssertā'tion, *n.* (डि-सर्टे'शन्)—a formal discourse; an essay, a disquisition. विवरण, प्रबंध, निबंध.

Dĭsser'vĭce, *n.* (डिस्-स'र्व्हिस्)—a bad turn done to a person or cause, a harmful action. नुकसान, हानि, अपाय, अहित.

Dĭssĕ'ver, *v. t. & i.* (डिस्-से'व्हर्)—to disunite, to separate, to cut apart. दोन तुकडे करून टाकणें, विस्कळित करणें, पांगापांग करणें, वेगळा होणें.

Diss'ĭdence, *n.* (डि'सिडन्स्)-disagreement. मतभेद, विरोध.

Diss'ĭdent, *a.* (डि'सिडन्ट्)—not in agreement, conflicting. न जुळणारा, भिन्न मताचा.

Dĭssĭm'ĭlar, *a.* (डि-सि'मिलर्)-unlike. असदृश, भिन्न, विजातीय. *Dissimila'rity*, *n.* असादृश्य, भिन्नता.

Dĭssĭm'ūlāte, *v. t. & i.* (डि-सि'म्यू-लेट्)— to practise deceit, to feign, to pretend, to hide one's feelings. फसवणें, कपट करणें. *Dissimula'tion*, *n.* ढोंग करणें; ढोंग, कपट. *Dissimula'tor*, *n.* ढोंगी मनुष्य.

Diss'ĭpāte, *v. t. & i.* (डि'सिपेट्)—to dispel; to squander, to fritter away. नाहींसा करणें; उधळणें, घालवून टाकणें; नासाडी-खराबी करणें.—*d*, *a.*; *Dissipa'tion*, *n.* व्यर्थ अपव्यय, व्यसनीपणा; क्षुल्लक गोष्ट.

Disso'ciāte, *v. t.* (डि-सो'शिएट्)—to separate, to disunite, to part; (Chem.) decompose. वेगळा करणें, संबंध तोडणें; विश्लेषण करणें. *Dissocia'tion. n.* वेगळें करणें, दुफळी, फूट. *Dissocia'tive, a.* वेगळें करणारा, दुफळी पाडणारा.

Disso'lubi'lity, *n.* (डिस'लुबि'लिटि)—capacity of being dissolved. वितळून जाण्याची स्थिति, विघटनीयता.

Diss'oluble, *a.* (डि'सलूबल्)—dissolvable. वितळून जाण्याजोगा, नाश पावण्याजोगा; पृथक्करणीय; (सभा) विसर्जन करण्याजोगा; (बंधन) तोडण्याजोगा.

Diss'ölute, *a.* (डि'सो-लूट्)—given to bad life, loose in behaviour and morals. दुर्व्यसनी, दुर्वर्तनी, दुराचारी.

Dissōlu'tion, *n.* (डि-सो-लू'शन्)—melting; death; annulment of marriage or other bond. सोडवणें, वितळविणें; मृत्यु; काडीमोड, विसर्जन.

Dissōlve', *v. t & i.* (डिझॉ'ल्व्ह्)—to decompose; to melt, to make or become liquid; to put an end to; to undo. भिन्न करणें; वितळविणें, (उष्णतेनें) द्रावण करणें; विसर्जन करणें; समाप्त - रद्द - करणें; संबंध तोडणें. *Dissolved in tears*, weeping. रडत असलेला, रडणारा. [L. *dis*, apart & *solvere*, to loosen]

Dissōl'vent, *n.* (डिझॉ'ल्व्हन्ट्)—a substance that has the power of dissolving or melting another, a solvent. वितळविणारा पदार्थ.

Diss'onant, *a.* (डि'सनन्ट्)—jarring, clashing; discordant, disagreeing, not agreeing in sound. बेसूर (आवाज); न जुळणारा. *Diss'onance, n.* बेसूर, बदसूर; विरुद्धपणा.

Dissuāde', *v. t.* (डि-स्वे'ड्)—to turn from a purpose by argument, to advise to refrain; to hinder. मन फिरवणें; निवृत्त करणें; अडथळा करणें. *Dissua'sion, n.*; *-sive, a.*

Dis'taff, *n.* (डि'स्टाफ्)—the staff from which the wool is pulled in spinning. सूत काढण्याची चरकी. *The distaff*, spinning. सूत काढणें. *On the distaff side*, on the female side of the family. जनानखान्यासंबंधीं, स्त्रियांसंबंधीं.

Dis'tance, *n.* (डि'स्टन्स)—the length from one point to another; remoteness; distant behaviour. अंतर दूर असणें; सलगी नसणें. *v. t.* to leave far behind. फार मागें टाकणें, दूर अंतरावर ठेवणें. *To keep one's distance*, not to approach too near, to avoid familiarity. आपली मर्यादा राखणें, जास्त सलोखा टाळणें. *At a distance*, far away. फार दूर. *At this distance of time*, इतके दिवस लोटल्यानंतर.

Dis'tant, *a.* (डि'स्टन्ट्)—at a considerable or specified distance; indistinct. दूरचा, लांबचा; अस्पष्ट. *Distant in manner*, not friendly or familiar. विशेष सलगी न दाखविणारा.

Distāste', *n.* (डिस्टे'स्ट्)—dislike; aversion. नावड, तिरस्कार.

Distāste'ful, *a.* (डिस्टे'स्टफुल्)—disagreeable to the taste; causing dislike. अस्वादिष्ट; तिटकारा आणणारा.

Distĕm'per, *n.* (डिस्टे'म्पर्)—a waterpaint for walls; a disease of dogs; a disordered condition. भिंतींना देण्याचा एक मिश्र रंग; कुत्र्यांचा एक रोग; अस्वस्थता, बेचैन, विकार, विकृति. *v. t.* to paint in distemper. मिश्र रंग देणें. *Distem'pered, a.* अस्वस्थ, वेडा, मन ठिकाणावर नसलेला.

Distĕnd', *v. t.* (डिस्टे'न्ड्)—to swell out or be dilated by pressure from within, to cause to swell. फुगवणें, ताणणें. *Disten'sible, a.* फुगण्याजोगा, फुगवण्यालायक. *Disten'sion, n.* फुगणें, फुगारा, ताण.

Dis'tich, *n.* (डि'स्टिक्)—a couplet. दोहरा, दोन चरणी कविता.

Distil', *v. t. & i.* (डिस्टि'ल्)—to trickle, to come or give forth in drops अर्क काढणें, थेंब पाडणें, गाळून शुद्ध करणें, ऊर्ध्वपातन करणें. *Distilla'tion, n.* ऊर्ध्वपातन करणें,-क्रिया, शोधनक्रिया; अर्क, सत्त्व.

Disti'llery, *n.* (डिस्टि'लरि)—an establishment where whisky is made. कलालाची भट्टी, शराबभट्टी.

Distinct', *a.* (डिस्टि'न्क्ट्)—clearly seen, clear, easily discernible; separate or differing in identity. स्पष्ट दिसण्याजोगा, सुव्यक्त; भिन्न, पृथक्.

Distinc'tion, *n.* (डिस्टिं'क्शन्)—difference; a thing that differentiates; a mark of honour; an excellence; individuality. भेद; तारतम्य, प्रतिष्ठा; विशेष सद्गुण; वैशिष्ट्य.

Distinct'tive, *a.* (डिस्टिं'क्टिव्ह्)—ditsinguishing; characteristic. भिन्नता दाखविणारा, भेददर्शक; विशेष, विशिष्ट.

Disting'uish, *v. t. & i.* (डिस्टिं'ग्विश्)—to draw or make distinctions between; to characterize; to recognize; to make oneself prominent. तारतम्य किंवा फरक करणें; गुणवर्णन करणें; ओळखणें; नांवलौकिक संपादणें. *To distinguish oneself*, to make oneself famous. स्वतःला प्रसिद्धीस आणणें, नांव कमावणें. *Disting'uished, a.* विशिष्ट, सिद्ध; नामांकित, प्रसिद्ध, थोर.

Distŏrt', *v. t.* (डिस्टॉ'र्ट्)—to pull or twist out of shape; to misrepresent. वांकडा करणें, विरूप

करणें; विपर्यास करून सांगणें. *Distor'tion*, *n.* विकृति, विपर्यास; अंगवैकल्य.

Distract', *v. t.* (डिस्ट्रॅक्ट्)—to cause one's mind to wander in different directions, to bewilder. भांबावून टाकणें, गोंधळवणें.

Distract'ed, *a.* (डिस्ट्रॅ'क्टिड्)-driven mad, infuriated; bewildered. वेडा झालेला; कावरा बावरा, भांबावून गेलेला.

Distrac'tion, *n.* (डिस्ट्रॅ'क्शन्)—diversion; anger, perplexity; confusion, dissension. चित्तविभ्रम, व्यग्रता; राग, गोंधळ; ओढाताण, तिरपीट.

Distrain', *v. i.* (डिस्ट्रे'न्)—to seize goods for debt. (कर्जफेडीकरितां) माल जप्त करणें.

Distraint', *n.* (डिस्ट्रे'न्ट्)—legal seizure of goods as payment for debt. अटकावून ठेवणें, कर्जाबद्दल जप्ती.

Distress', *n.* (डिस्ट्रे'स्)—mental pain; pressure of want, danger or fatigue; (Law) distraint. मानसिक दुःख; दुर्दशा, विपत्ति; जप्ती. *v. t.* to pain mentally; to exhaust. दुःख देणें, हाल करणें; जेरीस आणणें. *Distress'ful*, *a.* दुःखमय.

Distrib'ute, *v. t.* (डिस्ट्रि'ब्यूट्)—to deal out; to give each a share of; to classify. वांटणें; वांटणी करणें; विभाग-वर्गीकरण-करणें. *Distribu'tion*, *n.* वांटा; विभाग; दान. *Distri'butor*, *n.* वांटून देणारा.

Distrib'utive, *a* (डिस्ट्रि'ब्यूटिव्ह्)-that which distributes, concerned in distribution; referring to each individual of a class. विभाग किंवा वांटणी करणारा; उपजातिदर्शक, व्यक्तिदर्शक (विशेषण किंवा सर्वनाम).

Dis'trict, *n.* (डि'स्ट्रिक्ट्)—a region; a province; a territory. मुलूख, प्रदेश; जिल्हा; प्रांत.

Distrust', *n.* (डिस्ट्र'स्ट्)—want of trust; doubt, suspicion. अविश्वास; शंका, संशय. *v. t.* to have no confidence in. विश्वास न ठेवणें, अविश्वास धरणें. *Distrust'ful*, *a.* अविश्वासी, शंकेखोर.

Disturb', *v. t.* (डिस्ट'र्ब्)—to break the rest or quiet of; to worry; to disorganize. मन ग्रासून टाकणें, शांतताभंग करणें; त्रास देणें; विघटित करणें.

Disturb'ance, *n.* (डिस्ट'र्बन्स्)—trouble; disturbed state, tumult. त्रास देणें; अस्वस्थ स्थिति, क्षुब्धता, दंगा. *To cause a disturbance*, to make a noise; to start a fight. गडबड करणें; भांडण आरंभणें, दंगा करणें.

Disu'nion, *n.* (डिस्यू'न्यन्)—separation; want of union; dissension. वियोग; ताटातूट; भांडण, कलह.

Disunite', *v. t. & i.* (डिस्युना'इट्)—to separate or become separate; to divide. निराळा करणें, विभक्त होणें; फुटणें.

Disuse', *v. t.* (डिस्यू'झ्)—to cease to use. उपयोगांत आणण्याचें सोडणें किंवा बंद करणें. *n.* (डिस्यू'स्)—a disused state; a state of not being used. गैरवळण, अनभ्यास. *To fall into disuse*, to go out of use. निरुपयोगी होणें.

Disyll'able, *n.* (डिसि'लबल्)—a word or metrical foot of two syllables. दोन अवयवांचा शब्द. *Disylla'bic*, *a.*

Ditch, *n.* (डिच्)—a trench made in the earth, a deep water channel for carrying off water. चर, खंदक. *v. i. & t.* to make or repair ditches; to drain by a ditch. खंदक खणणें; चर खणून-पाटानें-पाणी बाहेर काढून लावणें. *To die in the last ditch*, to fight to the last. शेवटपर्यंत लढणें.

Dith'er, *v. t.* (डि'दर्)—to tremble, to quiver. कापणें, कम्प सुटणें.

Ditt'o, *n.* (डि'टो)—a substitute for repetition of word or phrase, the same. जशाचा तसाच शब्द किंवा शब्दसमूह, कित्ता, सदर.

Ditt'y, *n.* (डि'टि)—a short simple song. लहान सोपें गाणें, गीत.

Diurn'al, *a.* (डाय'र्नल्)—in or of the day. दैनिक.

Di'vagate, *v. i.* (डा'इव्हगेट्)-to digress. विषयान्तर करणें, बहकणें. *Divaga'tion*, *n.*

Dive, *v. i.* (डाइव्ह्)—to plunge or jump head foremost into water; to seek *for* by diving; to make deep inquiry into. पाण्यांत बुडी मारणें; पाण्यांत शोधणें; खोल चौकशी करणें, (कोणत्याही कामांत) पूर्ण लक्ष घालणें. *n.* act of diving; a place where bad men live or plan evil deeds. बुडी; वाईट लोकांचें राहण्याचें ठिकाण, अड्डा.

Di'ver, *n.* (डा'इव्हर्)—one who descends into deep water; kinds of diving-bird. पाणबुड्या, (पाण्यांत) बुडी मारणारा; पाणबुड्या पक्षी.

Diverge', *v. t.* (डाइव्ह'र्ज्)—to take a different direction; to go off sideways; to digress. मार्ग सोडणें, दुसरी दिशा घेणें; फांकणें; वाहवत जाणें. *Diver'gent*, *a.* फांकणारा, अपसरण करणारा. *Diver'gence*, *n.* पसरणें, अपसरण; फेर, तफावत.

Di'vers, *a.* (डा'इव्हर्झ्)— sundry, several. नानाविध, कित्येक.

Diverse', *a.* (डाइव्ह'र्स्)-of differing kinds, differing from. निरनिराळ्या प्रकारचा, भिन्न.

Divers'ify, *v. t.* (डाइव्ह'र्सिफाय्)—to introduce variety into; to vary. फेरफार करणें, पालटणें.

Dīver'sion, *n.* (डाइ-व्ह'र्शन्)—diverting, deviation, amusement. रमवणें, फेरफार; करमणूक.

Dīvers'ĭtỹ, *n.* (डाइ-व्ह'र्सिटि)-diverseness. भिन्नता, निराळेपणा.

Dīvert', *v. t.* (डाइ-व्ह'र्ट्)— to turn in another direction; to get rid of; to draw off attention of; to entertain, to amuse. भिन्न दिशेला वळवणें; मुक्त होणें; दुसरीकडे लक्ष लावणें; करमणूक करणें, रमविणें.

Dīver'tĭng, *a.* (डाइ-व्ह'र्टिंग)—amusing. मनोरंजक, गंमतीचा.

Dīvĕst', *v. t.* (डाइ-व्हे'स्ट्)—to unclothe, to strip, to lay bare. नग्न करणें, नागवणें, उघडा करणें. *Divest'ment*, *n.* हिरावून घेणें, नागवणूक.

Dīvīde, *v. t. & i.* (डिव्हा'इड्)—*to separate into* parts; to sunder, to cut off; set at variance; to distribute; to ascertain how many times one number contains another. विभाग करणें; कापून टाकणें; मतभेद पाडणें, दुही माजविणें; विभागून देणें; वांटून देणें; भागणें.

Dĭv'ĭdend, *n.* (डि'व्हिडन्ड्)—a number to be divided by divisor; a sum payable as interest on profit or share. भाज्य संख्या; नफ्याचा हिस्सा, भाग.

Dīvī'der, *n.* (डिव्हा'यूडर)—that which divides; (*pl.*) a pair of measuring compasses. भाजक; (अने०) सारख्या टोकांचा भाग पाडण्याचा कंपास, कैवार.

Divĭnā'tion, *n.* (डिव्हिने'शन्)—the act of telling the unknown or the future by the aid of magic. प्रश्न किंवा शकुन सांगणें, शकुन.

Dīvīne', *a.* (डिव्हा'इन्)—having to do with God; sacred; superhumanly beautiful or excellent. ईश्वरी; पवित्र; अत्यंत सुंदर. *n.* a priest, a theologian. धर्मगुरु, वेदान्ती, ब्रह्मज्ञानी. *v. t. & i.* to foresee, to predict, to conjecture; to practise divination. भाकीत करणें, भविष्य सांगणें, अनुमान किंवा तर्क करणें; शकुन पाहणें. *Divine'ly*, *adv.* by God. ईश्वराकडून. *To sing divinely*, to sing nicely or very well. उत्तम तऱ्हेनें-सर्वोत्कृष्ट-गाणें.

Dīvī'nĭng-rŏd, *n.* (डिव्हा'इनिंग् रॉड्)—a switch used by dowser to detect underground water or *minerals*. (भूमिगत पाणी किंवा धातु कोठें सांपडेल तें सांगणाऱ्या) पानाड्याची काठी, पक्षिणीची कांडी.

Dĭvĭn'ĭtỹ, *n.* (डिव्हि'निटि)—divineness; a god; the divine Being; the study of the nature of God, theology. देवपणा; देव; ईश्वर; ब्रह्मज्ञान.

Dĭvĭs'ĭble, *a.* (डिव्हि'झिबल्)—that can be divided. पूर्ण भाग जाईल असा, विभाज्य. *Divisibil'ity*, *n.* विभाज्यता.

Dĭvĭ'sion, *n.* (डिव्हि'झन्)—the act of dividing; one of the parts into which something is divided; a part of an army (of about 20,000 men). भागणें, भागाकार; भाग, वर्ग, परिच्छेद, सैन्याचा विभाग,-तुकडी.

Dĭvōrce', *n.* (डिव्हो'र्स्)—dissolution of marriage; separation between things that should go together. काडीमोड, घटस्फोट; वास्तविक एकत्र राहाणाऱ्या वस्तूंचा वियोग. *v. t.* to separate by divorce; to destroy the union of. विवाहसंबंध तोडणें, काडीमोड करणें; निराळा करणें.

Dĭvŭlge', *v. t.* (डिव्ह'ल्ज्)—to let out (secret), to tell what has been secret; to make public. (गुप्त गोष्ट) फोडणें; जाहीर करणें.

Dĭzz'ỹ, *a.* (डि'झि)—*giddy, dazed, unsteady*; causing dizziness. घेरी आलेला, अस्वस्थ; घेरी आणणारा. *Dizz'iness*, *n.* चक्कर, घेरी, भोंवळ.

Do, *v. t.* (डू)—to perform, to effect, to execute; to deal with, to set in order; to solve, to exhaust. करणें; व्यवस्थित करणें, सोडवणें; दमवणें. *v. i.* to act or proceed, to succeed, to make an end; to fare, to be suitable, to suffice. ०चें आचरण करणें, आचरणें, शेवटास नेणें; पुरेसें होणें; ठीक असणें. *To do away*, to remove; to put an end to. काढून टाकणें; नाहींसा करणें. *To do into*, to translate. भाषान्तर करणें. *To do over*, to perform again, to repeat. पुन्हां करणें, फिरून करणें. *To do without*, to dispense with. ०वांचून चालणें, कमी करणें. *To have done*, to have finished. संपविणें. *To have done with*, to have finished with. पुरें करणें, काम संपणें, गरज सरणें. *To do the polite*, to show courtesy. सभ्यता दाखविणें. *To do to death*, to kill. ठार मारणें. *To do in the eye*, to deceive, to cheat. फसविणें, ठकविणें. *To do justice to*, to show that one appreciates fully. योग्य मान देणें, पूर्ण पसंत पडल्याचें दर्शविणें. *That will do*, that is enough. तें पुरे, बस्स. *Done to a turn*, perfectly cooked. पूर्णपणें शिजवलेलें. *To have to do with*, to have concern with. (शीं) संबंध असणें. *To have nothing to do with*, to have no concern with. (शीं) संबंध नसणें. *To do for*, to kill. ठार मारणें. *To do out* (*a room*), to clean. साफ करणें. *How do you do?* आपलें कसें काय चाललें आहे? कसें काय? ठीक आहे ना? *Done up*, completely ruined; tired. सर्वस्वी नाश पावलेला; दमलेला. *n.* a trick; a feast or party of guests. लबाडी; मेजवानी; पाहुणे मंडळी.

Dō'cile, *a.* (डॉ'साइल्)—easy to teach and willing to obey, easily taught or led. सांगितल्याप्रमाणें ऐकणारा, गरीब, सालस. *Docil'ity*, *n.*

Dŏck, *n.* (डॉक्)—a basin for loading and repairing of ships; an enclosure in a court for a prisoner; a common plant in England. आगबोटी राहण्याची किंवा नीट करण्याची जागा, गोदी; कोर्टांत कैदी उभा राहण्याची जागा; इंग्लंडांतील एक झाड, लोलिका. *v. t.* to cut off a part. कापणें, छाटणें, कापून आंखूड करणें. *Dock'er, n* गोदींतील कामगार,- मजूर.

Dŏck'ĕt, *n.* (डॉ'किट्)— an endorsement on a document showing its subject or contents; a list of things to be done; a set of papers tied together with an endorsement and a short description of the contents. दस्तैवजावर आंतील मजकूर किंवा विषय असलेला शेरा, विषयनिर्देश. करावयाच्या गोष्टींची यादी; गोपवाऱ्यासह शेरा असलेले एकत्र केलेले कागद. *v.i.* to write on the back of a long report a summary of what it contains. गोपवारा काढून लिहिणें.

Dŏck'yärd, *n.* (डॉ'क्-यार्ड्)—an enclosure for building and repairing ships. आगबोटी वगैरे बांधण्याची किंवा दुरुस्त करण्याची जागा.

Dŏc'tor, *n.* (डॉ'क्टर्)— holder of the highest university degree in any faculty; a qualified medical practitioner. विश्वविद्यालयांतील अत्युच्च पदवी धारण करणारा; डॉक्टर, चिकित्सक. *v. t.* *To doctor a thing*, to repair a thing. वस्तु दुरुस्त करणें. *To doctor food*, to mix food with other things of bad quality. अन्नांत हलक्या प्रतीच्या वस्तु मिसळणें. *To doctor accounts*, to make accounts seem true. जमाखर्च बरोबर आहेत असें भासविणें,- दाखविणें. *Doc'toress, Doc'tress, n.* a woman medical practitioner. स्त्रीवैद्य, डॉक्टरीण.

Dŏ'ctorāte, *n.* (डॉ'क्टरेट्)—doctor's degree; persons holding the doctor's degree. डॉक्टरची पदवी; डॉक्टरची पदवी धारण करणारे गृहस्थ.

Dŏctrīnaire', *n.* (डॉक्ट्रिने'अर्)— a person who applies principles even in matters where they are unsuitable or impossible. हटवादी किंवा स्वमताग्रही मनुष्य. *Doctrinair'ism, n.* हटवाद्याचीं तत्त्वें.

Dŏc'trīne, *n.* (डॉ'क्ट्रिन्)— what is taught; a particular dogma, a set of beliefs. शिक्षण, तत्त्व; धर्मतत्त्व. *Doctri'nal, a.*

Dŏc'ūment, *n.* (डॉ'क्युमन्ट्)— something that furnishes evidence, a legal deed or other piece of writing. कायदेशीर लेख, दस्तऐवज. *Documenta'tion, n.* लेखी पुरावा तयार करणें.

Dŏcūmĕn'tary̆, *a.* (डॉक्युमे'न्टरि)—consisting of written documents. दस्तऐवजाच्या स्वरूपाचा, लेखी (पुरावा).

Dŏdd'er, *v. t.* (डॉ'डर्)—to walk unsteadily or totter like an old man. लटपटत चालणें, लटपटणें, कांपणें. *n.* a kind of plant. आकाशवेल.

Dōdĕc'agon, *n.* (डोडे'कगन्)—a plane figure of twelve sides. बारा बाजू असलेली आकृति, द्वादश कोणाकृति, द्वादशभुज. *Dodecahed'ron, n.* a solid figure of twelve faces. बारा पृष्ठभाग असलेला घन. *Dodecasyll'able, n.* a verse of twelve syllables. बारा अवयवी कविता.

Dŏdge, *n.* (डॉज्)—a swerving or zigzag movement; a trick, a piece of duplicity; a wrinkle or ingenious method. नागमोडी चाल, वक्रगति; लबाडी, युक्ति; नामी कल्पना, तोड. *v. t. & i.* to escape (duty) by means of a trick, to elude; to make a dodge into hiding; to treat evasively. चुकवणें; टाळणें; टोलवाटोलवी करणें. *Dodg'er, n.* (डॉ'जर्)—a shifty person; a small handbill. (एखाद्याला फसविण्याची) युक्ति लढविणारा; लहान हस्तपत्रक.

Dō'dō, *n.* (डो'डो)-an extinct bird. एक अस्तित्वांत नसलेला पक्षी.

Doe, *n.* (डो)—a female of fallow deer, hare, or rabbit. हरिणी, सशाची मादी.

Dŏff, *v. t.* (डॉफ्)—to take off. (टोपी वगैरे) काढून घेणें,- टाकणें.

Dŏg, *n.* (डॉग्)—a common animal of various breeds, wild and domesticated; a worthless man or boy; a *lucky* or *sly* fellow; an iron frame for supporting burning wood in a fireplace. कुत्रा; निरुपयोगी मनुष्य; दैववान किंवा लबाड मनुष्य; विस्तवांतील वस्तु धरण्याकरितां केलेला चिमटा किंवा पकड. *v. t.* to follow closely; to pursue, to track. पाठोपाठ जाणें; पाठलाग करणें. *To go to the dogs*, to be ruined in character. चुलींत जाणें, मसणांत जाणें. *Every dog has his day*, no one is always unlucky. कांहीं दिवस सासूचे कांहीं दिवस सुनेचे. *To throw to the dogs*, to throw away. उकिरड्यावर फेंकून देणें. *To give a dog a bad name and hang him*, goodness is not proof against censure. कोणाचें नुकसान करावयाचें असलें तर आधीं त्याची नालस्ती करणें. *A dog in the manger*, one who does not wish to use a thing, and yet will not allow others to use it; one who does not allow others to enjoy what is useless to him. आपणाला निरुपयोगी असलेली वस्तुहि दुसऱ्याला उपभोगूं न देणारा मनुष्य, गव्हाणींतल्या

कुत्र्याप्रमाणें वागणारा. *To lead a dog's life,* to have many troubles. पुष्कळशा अडचणींत आयुष्य घालविणें. *Let sleeping dogs lie,* leave alone things that are likely to cause trouble. त्रासदायक गोष्टी दूर राहूं द्या. *Dogs of war,* havoc. धुमाकूळ, धुमश्चक्री, अंदाधुंदी, अराजकता. *Dog days,* very hot days. भयंकर उन्हाळ्याचे दिवस. *Dogeared,* (a book) having the corners of the pages turned down. पानांचे कोंपरे मोडलेलें पुस्तक.

Dŏg'cärt, *n.* (डॉग्-कार्ट्)–a two-wheeled driving cart. घोड्याची दुचाकी उंच गाडी.

Dŏgg'ed, *a.* (डॉगिड्)—tenacious, persistent. निग्रही, हट्टी.

Dŏgg'erel, *n.* (डॉगरल्)—slipshod or unpoetic verses, a rough foolish poetry. हलक्या दर्जाची कविता, भिकारडें काव्य.

Dŏg'mä, *n.* (डॉग्मा)—a principle, a tenet; docrinal system. तत्त्व, ठराविक मत, प्रमाणवचन, आदेश, तात्त्विक पद्धति.

Dŏgmăt'ic, *a.* (डॉग्मॅटिक्)—of the nature of dogma; authoritatively laid down, stated as indisputable, given to dogmatizing. निश्चित स्वरूपाचा, ठाम; हटवादी.

Dŏg'mătism, *n.* (डॉग्मॅटिझम्)—dogmatizing temper. स्वमताग्रह, हटवादी स्वभाव.

Dŏg'matize, *v. i.* (डॉग्मटाइझ्)—to assert positively. आग्रहानें प्रतिपादन करणें, निश्चितपूर्वक सांगणें.

Dŏg'rose, *n.* (डॉग्-रोज्)—the wild rose. रानटी गुलाब.

Dŏg'-star, *n.* (डॉग्-स्टार्)—the brightest star in the heavens, Sirius. लुब्धक तारा.

Dŏg'-tired, *a.* (डॉग्-टायर्ड्)—very tired. अतिशय दमलेला, थकला भागलेला, श्रान्त.

Dŏg'-watch, *n.* (डॉग्-वॉच्)—the shortest period of two hours (4 to 6 a. m., and 6 to 8 p. m.). गलबतावरील २ तासांचा पहारा.

Doil'y̆, *n.* (डॉइलि)—a small-napkin or ornamental cloth put under a dish or other pot on the table. टेबलावर भांड्यांच्या खालीं ठेवलेला लहान रुमाल.

Do'ings, *n. pl.* (डूइंग्झ्)—things done; events; behaviour. कृत्यें, कृत गोष्टी; घडलेल्या गोष्टी; वागणूक.

Doit, *n.* (डॉइट्)— a very small sum. अगदीं लहान रक्कम, कवडी, दिडकी दुगाणी.

Dŏl'drŭms, *n. pl.* (डॉल्ड्रम्झ्)—a place on the ocean where ships cannot move as there is no wind. ज्या ठिकाणीं वारा नसतो असा समुद्राचा निर्वात भाग. *To be in the doldrums,* to be in a low and sad state of mind. उद्विग्न मनःस्थितींत असणें.

Dōle, *n.* (डोल्)—a charitable gift (of measured amount); payment of unemployment insurance; woe. भिक्षा, लहानसा वांटा; बैठें वेतन; दुःख, शोक. *v. t.* to deal out; to distribute. वांटणें; वांटून देणें. *To dole out,* to give out a small part at a time, प्रत्येक वेळेला दान म्हणून थोडा वांटा देणें, डोल देणें.

Dōle'ful, *a.* (डोल्-फुल्)—dreary, dismal, melancholy. उदास, दुःखी, विषण्ण, उतरलेल्या तोंडाचा.

Dŏll, *n.* (डॉल्)—a child's toy representing a baby, a pretty silly woman or child. (लहान मुलींची खेळण्याची) बाहुली; सुरेख मूर्ख स्त्री किंवा मूल.

Dŏll'ar, *n.* (डॉलर्)–a coin and money of account in U. S., Canada, and elsewhere=100 cents, (4 *s.* 1½ *d.*). अमेरिकेंतील एक नाणें.

Dŏl'orous, *a.* (डॉलरस्)— painful, sad, dismal. शोककारक, खेदकारक, दुःखी, खिन्न, विषण्ण.

Dŏl'our, *n.* (डॉलर्)— sorrow, distress. दुःख, क्लेश.

Dŏl'phĭn, *n.* (डॉल्फिन्)—a sea animal six to eight feet long; a fish noted for its changes of colour in dying. एक मोठा समुद्रप्राणी; मरतांना रंग बदलणारा एक मोठा मासा.

Dōlt, *a.* (डोल्ट्)—a stupid fellow, a fool. मूर्ख, टोणपा. *Dol'tish, a.* जडबुद्धि, मूर्ख.

Domain', *n.* (डमेन्)–lands as held or ruled over; an estate or realm; the right to rule over a land; sphere or scope. अधिकाराखालचा प्रदेश; राज्य; जमिनीवरील मालकी; आटोका, टप्पा, क्षेत्र.

Dōme, *n.* (डोम्)—a rounded vault as roof; a stately building; the sky. घुमट; भव्य इमारत; आकाश. *Domed, a.* घुमट असलेला.

Domes'day, *n.* (डूम्झ्डे)—land record made in 1086. १०८६ सालीं केलेली इंग्लंडमधील जमिनीची पाहणी,-नोंदणी पुस्तक

Domĕs'tĭc, *a.* (डोमेस्टिक्)—of the home, household, or family affairs; of one's own country; home-keeping. घरांतला, माणसाळलेला, पाळींव; स्वदेशांतील; घर सोडून बाहेर न जाणारा. *n.* a household servant. घरांतील नोकर.

Domĕs'tĭcāte, *v. t.* (डोमेस्टिकेट्)—to naturalize (plant); to tame (animal). हवापाण्याचा सराव पाडणें; माणसाळवणें. *Domestica'tion, n.* माणसाळवणें. *Domes'ticator, n.* माणसाळवणारा.

Domĕs'tĭcāted, *a.* (डोमेस्टिकेटेड्)—devoted to home life. माणसाळलेला, पाळींव, घरसंबंधींचा.

Dŏmĕstĭ'cĭty̆, *n.* (डॉमिस्टिसिटी)—home life, privacy; homeliness. खासगी जीवन; घरगुतीपणा.

Dŏm'ĭcile, *n.* (डॉ'मि-साइल्)—person's regular place of abode, the place where one lives. नेहमींची राहण्याची जागा, वसतिस्थान, कायमचा ठावठिकाण. *Dom'iciled, a.* कायमचें घर-वस्ती-करून राहिलेला, कायम रहिवासी.

Dŏm'ĭnant, *a.* (डॉ'मिनन्ट्)—dominating, prevailing, established in power. जोराचा, प्रबल, प्रधान. *Dom'inance, n.* प्राबल्य, अधिकार, सत्ता.

Dŏm'ĭnāte, *v. t. & i.* (डॉ'मिनेट्)—to have commanding influence over, to rule, to be the most important, to rise above. वर्चस्व असणें, वरचष्मा असणें, सत्ता गाजवणें, जबरदस्त होणें.

Dŏmĭnā'tion, *n.* (डॉमिने'शन्)-ascendancy, supremacy, authority. अंमल, वरचष्मा.

Dŏmĭneer', *v. i.* (डॉ-मिनी'अर्)—to behave overbearingly; to tyrannize over, to rule by force. ताठ्यानें वागणें; कडक अंमल गाजवणें.

Domĭn'ĭcal, *a.* (डॉमि'निकल्)-of Sunday. रविवारचा.

Dŏm'ĭnie, *n.* (डॉ'मिनी)—a schoolmaster in Scotland. शाळेंतील शिक्षक.

Domĭn'ion, *n.* (डोमि'न्यन्)—sovereignty or lordship; domination; territory or sovereign or government, a country ruled by one government. आधिपत्य, राज्यपद; सत्ता, अंमल; सरकारच्या ताब्यांतील मुलूख, साम्राज्यविभाग.

Dŏm'ĭnō, *n* (डॉ'मिनो)—a loose garment and covering for the face to conceal identity; (*pl.*) a game played with 28 pieces of wood with white spots on them. ओळखतां येऊं नये म्हणून घालण्याचा सैल झगा, कपटवेष, मुखवटा; एक प्रकारचा सोंगट्यांसारखा खेळ.

Dŏn, *v. t.* (डॉन्)—to put on (a garment). अंगांत घालणें,-चढवणें. *n.* a teacher in a University; a title of a gentleman or nobleman in Spain. विश्वविद्यालयांतील शिक्षक, प्राध्यापक; स्पेनमधील सद्गृहस्थाची किंवा सरदाराची एक पदवी.

Donāte', *v. t.* (डोने'ट्)—to make a donation, to give. देणगी देणें.

Donā'tion, *n.* (डोने'शन्)—gift to a fund or institution; benefaction. दान, देणगी, बक्षीस.

Dŏn'jŏn, *n.* (डॉ'न्जॉन्)—great tower or keep of castle. किल्ल्याचा मुख्य बुरूज.

Dŏnk'ey, *n.* (डॉं'कि)—an ass; a stupid fellow. गाढव; जडबुद्धीचा किंवा मूर्ख मनुष्य.

Dŏnn'a, *n.* (डॉ'ना)—an Italian, Spanish or Portuguese lady. इटली, स्पेन किंवा पोर्तुगालमधील सभ्य स्त्री.

Dō'nor, *n.* (डो'नर्)—a giver, a bestower. देणारा, दाता.

Do-no'thing, *a. & n.* (डू-न'थिंग्)—doing nothing, idle; an idler. आळशी; रिकामटेकडा; आळशी मनुष्य.

Dōōm, *n.* (डूम्)—fate, destiny; judicial sentence; the Last Judgment. दैव, नशीब; न्यायाधिशानें दिलेली शिक्षा; अखेरचा (प्रलयकालचा) न्याय. *v. t.* to condemn, to sentence. शिक्षेचा हुकूम देणें, शिक्षा फर्मावणें.

Dōōms'day, *n.* (डू'म्ज्-डे)—the Last Judgment. शिक्षेचा किंवा मरणाचा दिवस, जगाच्या न्यायाचा दिवस.

Door, *n.* (डोअर्)—a barrier at the entrance to a building, room, safe; a means of approach. दार, दरवाजा; प्रवेशाचें साधन, प्रवेशद्वार. *Doorway, n.* an entrance to a building. दरवाजा, घरांत जाण्याचा रस्ता. *Out of doors*, in the open air. उघड्यावर, मोकळ्या हवेंत. *To lay at a person's door*, to blame a person for. एखाद्याला दोष देणें. *Next door*, in the next house. लगतच्या किंवा शेजारच्या घरांत.

Door'keeper, *n.* (डो'अर्-कीपर्)—a porter. द्वारपाल, देवडीवरचा शिपाई.

Dōpe, *n.* (डोप्)—a thick liquid used for machines; a paint used on the wings of airplanes; a narcotic drug. यंत्रांकरितां वापरलें जाणारें एक प्रकारचें तेल; विमानांच्या पंखांना लावण्याचा रंग; एक मादक औषध. *v. t. & i.* तेल-रंग लावणें; मादक पदार्थ सेवन करणें; (शर्यतीच्या वगैरे) निकालाचा पूर्व-अंदाज करणें.

Dŏrm'ant, *a.* (डॉ'मन्ट्)—lying inactive as in sleep; concealed. झोंपेंतल्याप्रमाणें हालचाल न करणारा, स्वस्थ; गुप्त. *Dorm'ancy, n.*

Dŏrm'er-window, *n.* (डॉ'मर्-विन्डो)—an upright window set in a sloping roof. उतरत्या छपरांतील उभी खिडकी.

Dŏrm'itorў, *n.* (डॉ'मिटरि)—a sleeping-room with a number of beds; suburban district of city people's residences. पुष्कळ बिछाने असलेली निजण्याची खोली, शेजघर; शहरवासीयांचीं निवासस्थानें असलेलीं उपनगरें,-खेड्यापाड्यांतील विभाग.

Dŏr'mouse, *n.* (डॉ'र्-माउस्)—a small mouse-like animal with a long furry tail. (एक जातीचा) रानउंदीर.

Dŏ'rothў bag, *n.* (डॉ'रोथि बॅग्)—a lady's open-topped hand-bag hung at wrist. मनगटावर घेण्याची स्त्रियांची बॅग,-हातथैली.

Dŏr'sal, *n.* (डॉ'र्-सल्)—having to do with the back. पाठीचा, पृष्ठभागाचा.

Dŏ'rў, *n.* (डॉ'रि)—a flat-bottomed boat; a sea-fish. (मच्छिमारी) लहान होडी; समुद्रांतील मासा.

Dōse, *n.* (डोस्)—an amount of medicine taken at one time; anything unpleasant which has to be taken. प्रमाणशीर औषध, डोस; कर्तव्य असलेला अप्रिय भाग, कटुकर्तव्य. *v. t.* औषधाचा भाग,–औषध देणें; मिश्रण करणें.

Dŏss, *v. i.* (डॉस्)—to go to bed, to sleep in a doss-house. निजणें, गवताच्या बिछान्यावर झोंपणें. *Doss-house,* a sleeping place for the very poor. अगदीं गरीबांकरितां झोंपण्याची जागा.

Dŏss'ier, *n.* (डॉ'सिअर्)— a collection of papers about a person's antecedents or the like. एखाद्या विषयींच्या कागदपत्रांचा संग्रह, (व्यक्तीचा) पूर्वेतिहास, पूर्वचरित्र.

Dŏt, *n.* (डॉट्)—a small spot, a point; a small child, a tiny object; the money a woman brings with her at marriage. बिंदु, शून्य; लहान मूल, अगदीं लहान वस्तु; लग्नाच्या वेळीं मिळालेलें स्त्रीधन. *v. t.* to mark with a dot or dots; to place here and there. शून्य देणें, ठिपके ठिपके देणें; इतस्ततः ठेवणें. *Dott'y, a.* dotted; limping; mad. ठिपक्यांचा; लंगडा, डळमळीत; वेडा.

Dō'tage, *n.* (डो'टिज्)— feeble-minded old age. म्हातारचळ, (वृद्धावस्थेतील) मानसिक दुर्बलता.

Dō'tard, *n* (डो'टर्ड्)—a man in his dotage; an old fool. म्हातारचळ लागलेला; वृद्ध मूर्ख मनुष्य.

Dōte, *v. i.* (डोट्)—to be feeble-minded or silly; to be passionately fond of. म्हातारचळ लागणें; अतिप्रेमानें लुब्ध होणें. *To dote upon,* to love in a foolish way. भुलून जाणें, प्रेमानें वेडा होणें.

Dŏtt'erel, *n.* (डॉ'टरल्)— a kind of shore bird. एक अतिशय मूर्ख पक्षी.

Dŏtt'le, *n.* (डॉ'टल्)—the remaining part of tobacco in a smoked pipe. चिलीम ओढल्यानंतर चिलमींत शिल्लक राहलेला तंबाकू.

Dou'ble, *a.* (ड'बल्)—twofold; consisting of two parts; of two kinds; deceitful. दुप्पट; दुहेरी; दोन प्रकारचा; कपटी, दगलबाज. *adv.* twice the amount; two together. दोनदां; एकत्र दोन. *n.* a person or thing mistakable for another; a game between two pairs of players; twice the amount. दुसऱ्याबद्दल चुकून समजला जाणारा इसम किंवा वस्तु; दोघांमध्यें खेळण्याचा खेळ; दुप्पट. *v. t. & i.* to make or become double; to increase twofold; to clench (fist); to make a sudden turn; to play two parts in the same piece; to go or get round. दुप्पट करणें किंवा होणें; दुप्पट वाढविणें; मूठ वळाविणें,–आवळणें; एकदम वळणें; (एकाच खेळांत–नाटकांत–नटानें) दुहेरी काम करणें; भोंवतालीं फिरणें, वळसा घालणें. *A double door,* a door having two parts. दोन भाग असलेला दरवाजा. *To advance at the double,* to run. धांवणें. *One's double,* a person who looks just similar. अगदीं सारखा दिसणारा मनुष्य. *To double up,* to fold up, to sit closer. दुमडणें, घडी करणें; अगदीं जवळ बसणें. *To double back,* to bend back, to run back. पाठीमागें वळणें, पाठीमागें धांवणें.

Dou'ble-cross, *v. t.* (ड'बल्-क्रॉस्)— to betray, to deceive, to sell to both the sides. फसवणें, दोन्ही पक्षांना विकणें.

Dou'ble-dealer, *n.* (ड'बल्-डीलर्)—an insincere, dishonest person. अविश्वासी मनुष्य, कपटी, दुटप्पी.

Dou'ble-dealing, *n.* (ड'बल्-डीलिंग्)—dishonesty. दुटप्पी व्यवहार, लबाडी. *a.* dishonest. लबाड, दुतोंड्या.

Dou'ble-edged, *a.* (ड'बल्-एज्ड्)—(an argument) damaging to the user as well as to the opponent. दुधारी.

Dou'ble-fāced, *a.* (ड'बल्-फेस्ड्)—friendly in one's presence but secretly unfriendly, hypocritical. वरवर गोड बोलणारा, ढोंगी.

Dou'ble-quick, *adv.* (ड'बल्-क्विक्)—very quickly. फारच जलद.

Doub'lĕt, *n.* (ड'ब्लिट्)—a man's close body-garment. बंडी, अंगाबरोबर घालण्याची बंडी.

Doublōōn', *n.* (डब्लू'न्)—a gold coin in Spain (worth slightly over £ 1). स्पेन देशांतील एक सोन्याचें नाणें.

Doubt, *n.* (डाउट्)—a feeling of uncertainty; a state not allowing of certainty; suspicion. संशय; अनिर्णय, अनिश्चय; शंका; संदेह. *v. t. & i.* to question the truth of, to be uncertain; to disbelieve in; to feel distrust of; to be apprehensive. शंका येणें; विश्वास न ठेवणें; गैरविश्वास वाटणें; भीति वाटणें.

Doubt'ful, *a.* (डा'उट्-फुल्)—feeling or giving rise to doubt; uncertain. साशंक, संशयास्पद; अनिश्चित.

Doubt'lĕss, *adv.* (डा'उट्-लिस्)-certainly. खात्रीनें.

Douche, *n.* (डूश्)—a jet of water forced into any part of the body externally or internally. फवाऱ्यांत स्नान, पिचकारी.

Dough, *n.* (डो)—flour mixed with water ready for baking. मळलेलें पीठ, तिंबलेली कणीक.

Dought'y, *a.* (डा'उटि)—able, valiant, brave. शूर, पराक्रमी.

Dour, *a.* (डुअर्)—silent and unwilling to change an idea, stubborn. हट्टी, दुराग्रही.

Douse, *v. t.* (डाउस्)—to put into water; to throw water on; to put out a light, to extinguish; (डाउझ्) to use divining rod. पाण्यांत बुडविणें; पाणी फेंकणें; मालविणें; पानाड्याच्या काठीचा-पक्षिणीच्या कांडीचा-उपयोग करणें.

Dove, *n.* (डव्ह्)—a pigeon; a type of gentleness or innocence. कबूतर; सौम्यतेचा किंवा निर्दोषीपणाचा मासला.

Dove'cŏt, *n.* (ड'व्ह्-कॉट्)—a pigeon-house, a house built for doves to live in. कबुतरखाना, खुराडें. Also, *Dove'cote.*

Dove'tail, *n.* (ड'व्ह्-टेल्)—a joint shaped like a dove's tail. कळाशी, दांता. *v. t. & i.* to fit together very well. नीट तऱ्हेनें सांधणें.

Dow'ager, *n.* (डा'वजर्)—a woman with a title or property derived from her late husband. मृत पतीच्या पश्चात् त्याच्या पदवीची किंवा संपत्तीची मालकीण. *The Dowager queen,* the wife of the dead king. मृत राजाची राणी.

Dowd'y̆, *a.* (डा'उडि)—lacking smartness, ill-dressed, badly dressed. तेजोहीन, गबाळ पोषाख केलेला. *n.* a badly dressed woman. गचाळ पोषाख केलेली स्त्री.

Dow'er, *n.* (डा'उअर्)—a widow's share for life of husband's estate; a natural gift or talent. पतीच्या संपत्तींतील पत्नीचा भाग; स्वाभाविक देणगी किंवा बुद्धि. *v. t.* to give dowry to; to endow with talent. स्त्रीधन किंवा हुंडा देणें; बुद्धियुक्त असणें.

Down, *n.* (डाउन्)—an open high land; a fine soft short hair or feathers. माळजमीन; लव, लोंकर, पक्ष्यांचे मऊ पर. *adv.* towards or in a lower place or state; from earlier to later time; on the ground. खालीं, खालच्या स्थितींत; प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत; जमिनीवर. *prep.* downwards along, through, or into; at a lower part. खालीं, उपड्या, पालथा. *a.* directed downwards. खालच्या बाजूकडील, उतरता. *Ups and downs,* good and bad fortune. उच्च व नीच अवस्था, चांगली व वाईट स्थिति. *To be down on, to have a down on,* to dislike specially, to tend to be hard upon. विशेष तिरस्कार करणें. *To do down,* to deceive. फसविणें. *To down a person,* to beat or conquer a person. एकाद्याला मारणें किंवा जिंकणें. *To be down with,* to be down in bed with. ०नें आजारी असणें, अंथरुणाला खिळणें. *Down'y,* *a.* लव असलेला; मऊ, सुखदायक; (*Sl.*) जाणता, धूर्त.

Down'căst, *a.* (डा'उन्-कास्ट्)—(of eyes) looking down; (of person) dejected, very low in spirits. अधोमुख; खिन्न, उदासीन.

Down'fall, *n.* (डा'उन्-फॉल्)—a fall from prosperity or power; downpour. अधःपात, अधिकारभ्रष्टता; वर्षाव.

Down'hearted, *a.* (डा'उन्-हार्टेड्)—despondent, dejected. उद्विग्न, विषण्ण.

Down'hill, *n.* (डा'उन्-हिल्)—a downward slope. उतरण. *a.* descending; declining. उतरता, घसरता.

Down'pour, *n.* (डा'उन्-पोअर्)—heavy fall of rain, &c. भयंकर जोराचा वर्षाव, पावसाची मुसळधार.

Down'rīght, *a* (डॉ'उन्-राइट्)—plain, straightforward; blunt; undisguised. साधा, सरळ, धोपट; स्पष्ट. *adv.* thoroughly, quite. निखालस, पूर्णपणें.

Downs, *n. pl.* (डाउन्झ्)—low hill covered with grass. गवतानें आच्छादलेल्या लहान टेकड्या.

Downstairs', *adv., n., & a.* (डाउन्-स्टे'अर्झ्)—in the lower part of a house. तळमजल्यावर, खालीं; तळमजला; तळमजल्याचा.

Down'trŏdden, *a.* (डा'उन्-ट्रॉडन्)—not getting proper treatment, oppressed. पायांखालीं तुडवलेला, चांगल्या तऱ्हेनें न वागलेला, दडलेला.

Down'ward, *a. & adv.* (डा'उन्-वर्ड्)-Downwards, *adv.*-from higher to a lower place. खालीं; खालीं जाणारा; अधोगामी; खालचा.

Dow'rȳ, *n.* (डा'उरि)—the property brought by a wife at marriage; a talent. लग्नाच्या वेळीं मिळालेली संपत्ति, स्त्रीधन; बुद्धि, अक्कल, शहाणपणा.

Dowse, See Douse.

Dows'er, *n.* (डा'उझर्)—a man who finds underground water by means of a dowsing-rod. विशिष्ट काठीच्या साहाय्यानें जमिनींत पाण्याची जागा शोधून काढणारा, पानाड्या.

Dow'sing rod, *n.* (डा'उझिंग्रॉड्)— पानाड्याची काठी.

Dŏxŏl'ogȳ, *n.* (डॉक्सॉ'लजि)—a short song of praise to God. ईशस्तुतिपर गाणें, स्तोत्र.

Doy'en, *n.* (डॉ'इयन्)—the oldest member (of a body of colleagues). सर्वांत जुना सहकारी,-सभासद.

Dōze, *v. i.* (डोझ्)—to yield to sleep, to be half asleep. डुलकी घेणें. *n.* a light sleep. डुलकी.

Do'zen, *n.* (ड'झन्)—a set of twelve. बारा, डझन *A baker's dozen,* thirteen. तेरा.

Drăb, *a.* (ड्रॅब्)—of dull light colour, dull; uninteresting. भुऱ्या रंगाचा, फिकट; मनोरंजक नसणारें. *n.* a prostitute. वेश्या; व्यभिचारिणी.

Drăchm, Dram, *n.* (ड्रॅम)—a unit of weight 1/16 oz., 1/8 oz. १/१६ किंवा १/८ औंसाचें वजन, ड्राम.

Draff, *n.* (ड्राफ्)—refuse, dregs. कचरा, गाळ, गदूळ.

Dräft', *n.* (ड्राफ्ट्)—a body of soldiers chosen to be sent to another place; an order for drawing money, bill or cheque drawn; a sketch of work to be done, a rough copy of a document. निवडक शिपायांची टोळी; हुंडी, हुंडीचिठ्ठी; मसुदा. *v. t.* to dispatch (men) as a draft; to make a draft of (document). निवडक लोक पाठविणें; मसुदा तयार करणें.

Dräfts'man, *n.* (ड्राफ्ट्स्मन्)—a man who draws plans. नकाशे किंवा नमुने काढणारा.

Drăg, *v. t. & i.* (ड्रॅग्)—to draw along with force, to trail or go heavily. ओढणें, फरपट काढणें. *n.* a check on progress, a retarded motion; a thing which is dragged, a coach-like 4-horse vehicle. गतिप्रतिबंध; लोढणा, आडकाठी; चार घोड्यांच्या गाडीसारखी गाडी. *To drag in*, to introduce (a subject) irrelevantly. अप्रस्तुत विषय मुद्दाम पुढें आणणें. *To drag on*, to be tedious. कंटाळवाणा होणें. *To drag out*, to protract. लांचविणें.

Drăg'gle, *v. t. & i.* (ड्रॅगल्)—to make dirty and wet by trailing; to hang trailing. चिखलांत किंवा ओलांत मळवणें, खराब करणें; लोळत ठेवणें.

Drăg'oman, *n.* (ड्रॅगमन्)—an interpreter and travellers' guide. वाटसरूंचा मार्गदर्शक दुभाष्या.

Drăg'on, *n.* (ड्रॅगन्)—an imaginary fire-breathing monster; a vigilant person. अग्निसारखा श्वास टाकणारा सपक्ष सर्प; दक्ष मनुष्य.

Drăg'onflȳ, *n.* (ड्रॅगन्-फ्लाय्)—a long-bodied flying insect. लांबट शरीराचा एक कीटक.

Dragoōn', *n.* (ड्रगून्)—a horse-soldier; a mounted infantry man. घोडेस्वार शिपाई; घोड्यावर बसलेला पायदळांतील मनुष्य. *v. t.* to subject to oppression; to force into submission or obedience. अति त्रास देणें; शरण यावयाला लावणें.

Drain, *v. t. & i.* (ड्रेन्)—to draw off (liquid) by ditches or pipes; to drink to the dregs, to exhaust; to run dry. पाट काढणें, काढून टाकणें; गाळ राहीपर्यंत पिऊन टाकणें; संपविणें; कोरडें करणें. *n.* a channel or pipe carrying off dirty water; a continued loss. नाला, मोरी, जलमार्ग; सारखें कमी होणें, गळती, अपनयन (*fig.*).

Drain'age, *n.* (ड्रेनिज्)—the water or waste carried away; the pipes or channels that carry away waste water. वाहून नेलें जाणारें पाणेरडें पाणी किंवा इतर घाण; पाणी वाहून नेण्याची मोरी, गटार, नाला.

Drăke, *n.* (ड्रेक्)—a male duck; a fly used in fishing. बदक, कलहंस; मासे मारण्याच्या गळाला लावण्याची एक जातीची माशी.

Drăm, *n.* (ड्रॅम्)—a drachm; a small draught of strong drink. एका प्रकारचें वजन; दारूचा घुटका.

Drä'mä, *n.* (ड्रामा)—a stage play; the dramatic art; play-like series of events. नाटक; नाट्यकला; नाटकांतल्याप्रमाणें घडलेल्या गोष्टी.

Dramăt'ic, *a.* (ड्रमॅटिक्)—of drama; forcible, theatrical; striking; vivid. नाटकाचा; जोरदार, नाटकी; विलक्षण, लक्षांत भरण्यासारखा; स्पष्ट.

Drăm'atist, *n.* (ड्रॅमटिस्ट्)—a playwright. नाटककार.

Drăm'atize, *v. t.* (ड्रॅम-टाइझ्)—to turn into a drama. नाटकरूपानें लिहिणें, नाटकांत रूपांतर करणें, नाट्यरूप देणें.

Dră'per, *n.* (ड्रेपर्)—a dealer in cloth or fabrics for clothing. कापड विकणारा, कापडविक्या.

Dră'perȳ, *n.* (ड्रेपरि)—draper's wares or trade; clothing or hangings disposed in folds. निरनिराळें कापड; पडदा, झालर, वगैरे तऱ्हेचें घड्या वगैरे करून दुकानांत लोंबत ठेवलेलें कापड.

Drăs'tic, *a.* (ड्रॅस्टिक्)—strongly operative; vigorous; violent; thorough. भयंकर परिणामकारक; जोरदार, जबर; पूर्ण, आमूलाग्र.

Drăt, *v. t.* (ड्रॅट्)—to curse, to bother. तळतळाट देणें, त्रास देणें.

Draught, *n.* (ड्राफ्ट्)—traction; one drawing of a net; one continuous act of drinking; a dose of medicine; depth of water ship draws; current of air; artist's skech for a picture. ओढणें; जाळें काढणें; घोट, घुटका; औषधाचा डोस, भाग; गलबताला लागणारी पाण्याची खोली; वाऱ्याचा झोत; रेखाटलेलें चित्र, नकाशा. *Draught-horse*, *n.* a strong horse for pulling heavy things. मोठीं ओझीं ओढणारा घोडा.

Draughts, *n.* (ड्राफ्ट्स्)—a game played by two people each with 12 round pieces on a chess-board of 64 squares. बुद्धिबळांचा खेळ.

Draughts'man, *n.* (ड्राफ्ट्स्-मन्)-(*fem. Draughts-woman*) a person who makes drawings. नकाशे काढणारा.

Draw, *n.* (ड्रॉ)-act of drawing; a game finished but neither side having won. ओढणें; दोन्हीं बाजूंच्या संमतीनें मध्येंच बंद केलेला खेळ. *v. t. & i.*

to pull, to drag, to haul; to attract; to derive, to deduce, to infer; to inhale; to extract; to entice; to extort; to force; to elicit; to pull into or out of position; to make a picture by tracing lines; to describe in words; to write out (bill, cheque); to bring (game) to an undecided conclusion. ओढणें; आकर्षण करणें; अनुमान काढणें; श्वास आंत घेणें; (रस) काढणें; फुसलावून नेणें; बळजबरीनें घेणें; (माहिती) काढून घेणें; आंत घेणें किंवा काढून टाकणें; चित्र रेखाटणें; वर्णन करणें; (हुंडी) लिहिणें; दोन्हीं बाजूंच्या संमतीनें खेळ मध्येंच थांबविणें, खेळाचा अनिश्चित निर्णय करणें. *To draw on*, to allure; to bring about; to approach. मन वळवणें; घडवून आणणें; जवळ येणें. *To draw rein*, to check horse; to pull oneself up. लगाम खेंचणें; स्वतःला आवरणें. *To draw the long bow*, to exaggerate, to tell lying tales. अतिशयोक्ति करणें; थाता मारणें.

Draw'băck, *n.* (ड्रॉ'बॅक्)—a thing that qualifies satisfaction; an amount of excise or import duty remitted or repaid on exports. उणीव, वाण; सूट, सोडलेला पैसा.

Draw'bridge, *n.* (ड्रॉ'ब्रिज्)—a bridge hinged for drawing up or drawing aside. काढतां घालतां येण्याजोगा पूल, ओढता किंवा हालता पूल.

Draw'er, *n.* (ड्रॉ'अर्)—one who draws; a sliding box-like container in a table or chest; (*pl.*) a two-legged undergarment. ओढणारा, काढणारा; टेबलाचा वगैरे खण; (अने०) जांघिया, इजार, चोळणा.

Draw'ing, *n.* (ड्रॉ'इंग्)—act of pulling, dragging, or hauling; a picture drawn with a pencil; a sketch. ओढणें; पेन्सिलीनें काढलेलें चित्र; रूपरेषा, नकाशा, आराखडा.

Draw'ing-room, *n.* (ड्रॉ'इंग्रूम्)—a reception-room, a room for guests in a home. पाहुण्यांचें स्वागत करण्याची बैठकीची जागा, दिवाणखाना.

Drawl, *v. i. & t.* (ड्रॉल्)—to speak slowly (making each word long). हेल काढून बोलणें. *n.* indolent or affected slowness of speech. हळूहळू हेल काढून केलेलें भाषण.

Draw'-wĕll, *n.* (ड्रॉ'वेल्)—a well with a rope and a bucket for drawing water. पाणी काढण्याकरितां दोरी व बादली असणारी विहीर.

Dray, *n.* (ड्रे)—a low heavy four-wheeled cart; a squirrel's nest. ओझ्याची गाडी, छकडा; खारीचें घरटें.

Dread, *v. t. & i.* (ड्रेड्)—to anticipate with terror; to be in great fear of, to fear greatly. दहशत बाळगणें; फार भिणें. *n.* great fear; awe. मोठें भय; धास्ती, दहशत. *a.* dreaded, भीतिदायक.

Dread'ful, *a.* (ड्रेड्'फुल्)—terrible; troublesome or horrid. भयंकर; त्रासदायक, दारुण.

Dread'nought, *n.* (ड्रे'ड्-नॉट्)—a kind of heavy coat and cloth; a powerful modern large warship; one who fears nothing. एक प्रकारचें जाड कापड; एक प्रकारचें मजबूत मोठें लढाऊ जहाज, बेडर जहाज; निधड्या छातीचा मनुष्य.

Dream, *n.* (ड्रीम्)-a sleeping vision; indulgence in fancy; a day dream, reverie. स्वप्न; कल्पनातरंग; दिवसाचें स्वप्न, तन्द्री. *v. t. & i.* to experience a dream; allow oneself to believe or think that; fall into reverie. स्वप्न पाहणें किंवा पडणें; मनाला वाटूं देणें; तन्द्री लागणें, कल्पना चालविणें. *Dream'y*, *a.* स्वप्नानुभवी, स्वप्नमय, स्वप्नासंबंधीं.

Dream'lănd, *n.* (ड्री'म्-लंड्)—region outside the laws of nature. निसर्गाच्या बाहेरील प्रदेश, स्वप्नसृष्टि.

Drear'y, Drear, *aa.* (ड्रे'अरि, ड्रेअर्)— dismal, cheerless, sad, gloomy, dull. उदासवाणा, भयाण, सुना.

Drĕdge', *n.* (ड्रे'ज्)— an apparatus for clearing mud, any instrument used to gather or take by dragging; oyster-net. चिखल काढण्याचें यंत्र; कालवें पकडण्याचें जाळें. *v. i. & t.* to clear by means of a dredge; to scatter (sugar) over. यंत्रानें गाळ काढणें; ०वर साखर पेरणें.

Drĕdg'er, *n.* (ड्रे'जर्)— one who fishes with a dredge; a dredge; a pot with holes in the top used for scattering sugar, salt or flour. कालवें पकडणारा; गाळ काढण्याचें यंत्र; साखर वगैरे पेरण्याकरितां भोकें असलेलें भांडें.

Drĕg, *n.* (ड्रेग्)—(*pl.*) sediment, grounds, refuse; (*sing.*) a small remnant. (अने०) गाळ, गदळ, रेंदा; (एक०) शिल्लक राहिलेला थोडासा भाग.

Drĕnch, *v. t.* (ड्रेंच्)—to wet all over; to force (a beast) to take a dose. चिंब भिजविणें; घोट्यानें पाजणें. *n.* a dose for a beast. गुरांना घोट्यानें पाजण्याचें औषध.

Drĕss, *v. t. & i.* (ड्रेस्)—to clothe, to clothe one-self; to wash and bind up (a wound); to prepare food; to trim. पोषाख घालणें किंवा करणें; (जखम) बांधणें; अन्न शिजवून तयार करणें; सजविणें. *n.* clothing (*esp.* external), garments, habit, apparel. कपडे, पोषाख. *To dress ship*, to put up many flags on a ship. गलबतावर पुष्कळ निशाणें लावणें. *To dress by the right*, to look to the right and get into the line.

उजवीकडे पाहून रांगेंत जाऊन उभा राहाणें. *To dress down*, to scold. खरडपट्टी काढणें. *Full dress*, ceremonial clothes. समारंभाच्या वेळीं घालण्याचे कपडे, पूर्ण पोषाख. *Dress'y*, *a*. wearing fine clothes, always well-dressed. भपकेदार पोषाख करणारा, पोषाखी.

Drĕss cir'cle, *n*. (ड्रेस्-सर्'कल्)—the first gallery in theatres. नाटकगृहांतील पहिली गॅलरी,-सज्जा.

Drĕss'er, *n*. (ड्रे'सर्)—one who dresses a wound; a fitting in a kitchen with shelves. जखम धुवून बांधणारा; स्वयंपाकाचीं भांडीं ठेवण्याचें फडताळ.

Drĕss'ing, *n*. (ड्रे'सिंग्)—the act of putting on clothes; material which is put on a wound; a mixture of oil and other matter served with some foods. कपडे घालणें, पोषाख करणें; मलमपट्टी; मसाला. *Dressing-case*, *n*. कपडे वगैरे ठेवण्याची पेटी, स्त्रियांची फणीघराची आरसा-पेटी. *Dressing-gown*, *n*. a long garment used when one is undressed. पायघोळ झगा, सैल झगा.

Drew, *pa. t.* of Draw.

Drĭb'ble, *v. t. & i.* (ड्रि'बल्)—to flow or let flow in drops; to work ball forward with repeated touches of feet. थेंब थेंब गळणें किंवा पाडणें; चेंडू पायानें पुढें पुढें सरकवीत नेणें. *n*. पावसाची झिमझिम.

Drĭb'lĕt, *n*. (ड्रि'ब्-लिट्)—a small instalment; a small amount (of liquid). लहान हप्ता, अल्पांश.

Dried, *pa. t.* of Dry.

Drĭft, *n* (ड्रिफ्ट्)—being driven by current; inaction; meaning of speaker's words; matter heaped by wind or collected by water. वाऱ्यानें वाहून नेणें; सुस्तपणा; बोलण्याचा मतलब, भावार्थ, अभिप्राय; वाऱ्यानें किंवा पाण्यानें वाहून आलेला ढीग. *v. i. & t.* to be carried by the current; to heap or be heaped into drifts; to go aimlessly. प्रवाहाबरोबर वाहात जाणें; जोरानें वाहून जाऊन ढीग होणें किंवा करणें; वाहवत जाणें. *A snow-drift*, snow blown by the wind to form a small hill. वाहून आलेला बर्फाचा ढीग. *A drift-net*, a net employed in mine-sweeping. सुरुंग गोळा करून मार्ग मोकळा करण्याचें जाळें. *Drif'ter*, *n*. सुरुंग काढणारी बोट.

Drĭft'wŏŏd, *n*. (ड्रिफ्ट्-वुड्)—wood blown on to the shore by wind. वाऱ्यानें वाहात आलेलीं लांकडें.

Drĭll, *n*. (ड्रिल्)—a boring tool or machine; exercising of soldiers in correct movements; training by giving muscle practice; a seed-sowing machine; a small furrow; a coarse twilled fabric; a kind of baboon. विंधण्याचें हत्यार, सामता; लष्करी तालीम, कवाईत; बीं पेरण्याचें यंत्र; लहान फाळ, कुळव; एक प्रकारचें जाड कापड; एक जातीचा मोठा वानर. *v. t. & i.* to make a hole through or into; to subject to or undergo drill; to sow in rows. भोंक पाडणें, विंधणें; कवाईत शिकवणें किंवा शिकणें; रांगेनें पेरणें; पाभरीनें पेरणें.

Drĭnk, *v. i. & t.* (ड्रिंक्)—to swallow liquid, to take in liquid with the mouth; to absorb moisture. पिणें; शोषून घेणें. *n*. any liquid used for drinking; act of drinking. पिण्याचा पदार्थ, पेय; पानक्रिया, पिणें. *To take to drink*, to begin to drink too much wine or some strong drink. अति दारू किंवा दुसरें मादक पेय पिण्याची संवय लावून घेणें. *Drink'ables*, *n. (pl.)* पिण्याचे-पेय-पदार्थ.

Drĭp, *v. i. & t.* (ड्रिप्)—to fall or let fall in drops. थेंब थेंब गळणें किंवा गळूं देणें, स्रवणें, पाझरणें. *n*. a small drop of liquid. लहानसा थेंब, टप टप गळणें.

Drĭpp'ing, *n*. (ड्रि'पिंग्)—fat used in cooking. स्वयंपाकांत वापरली जाणारी चरबी.

Drīve, *v. t. & i.* (ड्राइव्ह्)—to urge onwards by force; to chase (game) from the large area into small; to convey or be conveyed in a vehicle; to impel, to propel, to carry along. हांकणें; (लहान जागेंत) हांकून नेणें; गाडींतून नेणें किंवा फिरणें; पुढें ढकलणें किंवा नेणें. *n*. excursion in a carriage; a carriage road; driving of game, cattle, or enemy. गाडींतून बसून फिरणें; गाडीचा रस्ता; हांकलून लावणें. *To drive a nail*, to hit a nail in. चूक आंत ठोकणें. *To let drive at*, to aim a blow at. मारण्याकरितां नेम धरणें. *What are you driving at?* What is your intention? तुमचें म्हणणें काय आहे?

Drĭv'el, *v. i.* (ड्रि'व्हल्)—to slaver; to talk like an idiot. लाळ गळणें; मूर्खासारखें बोलणें. *n*. foolish talk. मूर्खपणाचें बोलणें. *Driv'eller*, *n*.

Driven, *pa. p.* of Drive.

Drī'ver, *n*. (ड्रा'इव्हर्)—one who or that which drives; a coachman. हांकणारा; गाडीवान.

Drĭz'zle, *v. i.* (ड्रि'झल्)—to fall in fine dense rain. सुरेख सारखा पाऊस पडणें, झिरीमिरी पाऊस पडणें.

Drōll, *a*. (ड्रोल्)—amusing, odd, queer, peculiar, causing laughter. मौजेचा, विनोदी, चमत्कारिक, विलक्षण, गमतीचा.

Drōll'erў, *n*. (ड्रो'लरि)-quaint humour. थट्टामस्करी.

Drŏm'ĕdarў, *n*. (ड्रॉ'मिडरि)—an Arabian camel, a camel bred for riding. एकमदारी उंट.

Drōne, *n.* (ड्रोन्)—a male or non-worker bee; an idler; a deep monotonous hum. मधमाशीचा नर; काम न करणारा, भोजनभाऊ; सारखी गुणगुण.

Droōp, *v. t. &i.* (ड्रूप्)—to incline or hang down; to languish; to lose heart. मान खालीं घालणें; खालीं वांकणें; म्लान होणें; खचणें, धीर सोडणें.

Drŏp, *n.* (ड्रॉप्)—a portion of liquid; a draught of strong drink; sweetmeat; painted curtain let down between acts; dropping or fall. थेंब; घोट; साखरेची मिठाई; खालीं पडणें, पतन; दर्शनी पडदा, मुखपट, अंकाचा पडदा. *v. i. &t.* to fall or shed in drops; to let fall; to lose money; to leave hold of; to sink to lower level; to sink to ground. थेंब थेंब पडणें किंवा पाडणें; पडूं देणें; पैसे सांडणें; सोडून देणें; खालीं जाणें; जमिनीवर पडणें. *To drop a brick,* to say or do something very foolish when in company. मंडळींत असतांना कांहींतरी मूर्खपणाचें कृत्य करणें किंवा बोलणें. *To drop one at one's house,* to let one get down from the car at one's house. एखाद्याला गाडींतून नेऊन त्याच्या घराजवळ उतरणें. *To drop a person,* to cease to be friendly to a person. एखाद्याची मैत्री सोडून देणें. *To drop in,* to make an unexpected visit to a friend. मित्राला अनपेक्षित भेट देणें.

Drŏp'cŭrtain, *n.* (ड्रॉ'प्-कर्टन्)—a curtain let down between the acts in a theatre. नाटकाच्या दोन अंकांच्या मध्यें पडणारा पडदा, अंकाचा पडदा, मुखपट.

Drŏp'lĕt, *n.* (ड्रॉ'प्-लिट्)—a little drop. लहान थेंब.

Drŏpp'ings, *n. pl.* (ड्रॉ'पिंग्ज्)—what has dropped; the dung of animals. गळलेलें, पडलेलें; शेण, लीद.

Drŏp'sy̆, *n.* (ड्रॉ'प्सि)—a disease with watery fluid collecting in the body. जलसंचय, हातपाय सुजणें, सर्वांग सुजणें, शोथ. *Drop'sical, a.*

Drŏs'ky̆, Drŏsh'ky̆, *n.* (ड्रॉ'स्कि)—a light four-wheeled horse-carrige used in Russia. रशियांतील चारचाकी गाडी.

Drŏss, *n.* (ड्रॉस्)—scum of molten metal; impurities; refuse. गाळ; कीट, मळ; रेंदाड. *Dross'y, a.* गाळ असलेला.

Drought, *n.* (ड्राउट्)—thirst; continuous dry weather, wanting rain. तहान, कोरड, शोप, अनावृष्टि, अवृष्टि. *Drought'y, a.* अवर्षणाचा. *Drouth, n. (poet.)* शोष, कोरड, अवर्षण.

Drove, *pa. t.* of Drive.

Drōve, *n.* (ड्रोव्ह्)—a moving herd or flock; a crowd in motion. गुरांचा तांडा, कळप; चालती गर्दी.

Drō'ver, *n.* (ड्रो'व्हर्)—a driver of or dealer in cattle. गुरें हांकणारा किंवा विकणारा, हेडवाला, हेड्या.

Drown, *v. i. & t.* (ड्राउन्)—to be suffocated, to suffocate, by immersion; to drench or flood; to deaden (grief) with drink. बुडुन मरणें; चिंब भिजणें; दारू पिऊन दुःख मारणें. *To drown a voice,* to make so much noise so that it cannot be heard. आवाज ऐकूं न जाईसा करणें.

Drowse, *v. i.* (ड्राउझ्)—to be half asleep. अर्धवट झोंपेंत असणें, गुंगी येणें, झोंपेच्या गुंगींत असणें.

Drow'sy̆, *a.* (ड्रा'उझि)—half asleep, sleepy. अर्धवट निजलेला, पेंगत असलेला; झोंपाळू.

Drŭb, *n.* (ड्रब्)—to beat with a stick. ठोकणें, चोपणें. *Drub'bing, n.* thrashing. ठोकणें.

Drŭdge, *v. i.* (ड्रज्)—to work hard at distasteful tasks. कामाडकष्ट करणें. *n.* a person who does hard unpleasant work for little pay. कामाडकष्ट करणारा, कष्टाळू, खप्या.

Drŭdg'ery̆, *n.* (ड्र'जरि)—a hard distasteful work, toilsome work. कामाडकष्ट, अति त्रासदायक काम.

Drŭg, *n.* (ड्रग्)—a simple substance used in medicine; an unsalable commodity. औषधि द्रव्य; न विकला जाणारा पदार्थ. *v. t. & i.* to give drugs to, to take drugs. औषधें देणें किंवा घेणें. *Drug-store,* औषधें विकण्याचें दुकान.

Drŭgg'ĕt, *n.* (ड्र'गिट्)—a woollen floor-covering, an over-carpet. गालिचा.

Drŭgg'ist, *n.* (ड्र'गिस्ट्)—a dealer in drugs, maker and dispenser of medicines. औषधें विकणारा, गांधी.

Dru'id, *n.* (ड्रु'इड्)—an ancient French or British priest. प्राचीन काळचा फ्रेंच किंवा ब्रिटिश लोकांचा पाद्री. *Dru'idess, Dru'idism, nn.*

Drŭm, *n.* (ड्रम्)—a musical instrument of various kinds; a round structure or object; middle portion of the ear. पडघम, ढोल, मृदंग; पडघमासारखें उभट वाटोळें पात्र; मध्यकर्ण, कर्णविवर. *v. t. & i.* to beat a drum with sticks; to make a loud noise with wings. पडघम वाजविणें; पंखांनीं मोठा आवाज करणें. *To drum a thing into a boy's head,* to cause a boy to remember a thing by saying it over and over again. तीच तीच गोष्ट वारंवार सांगून

एखाद्याच्या स्मरणांत ठसाविणें. *Drum-head*, *n.* the skin of a drum. पडघमाचें कातडें. *Drum-stick*, *n.* the stick for beating a drum; lower joint of cooked fowl's leg; a kind of Indian vegetable. शिजवलेल्या कोंबड्या वद्काच्या तंगडीचा खालचा सांधा; पडघम वाजविण्याची काठी. शेगटाची -शेवग्याची-शेंग.

Drŭmm'er, *n.* (ड्रॅमर्)—a player of a drum. पडघम वाजविणारा.

Drŭnk, *pa. p.* of Drink.

Drŭnk, *pred. a.* (ड्रंक्)—intoxicated, overcome by strong drink. प्यालेला. झिंगलेला; दारूचा कैफ चढलेला. *n.* (*Sl.*) दारूची निशा, कैफ. *Drunk'en*, *a.* झिंगलेला, दारू प्यालेला.

Drŭnk'ard, *n.* (ड्रं'कर्ड्)—a person who often drinks too much wine, addicted to a strong drink. दारूबाज, दारू पिणारा.

Drupe, *n.* (ड्रूप्)—a stone-fruit. आंत बीं असलेलें फळ, अष्टिवर्गाचें फळ.

Drȳ, *a.* (ड्राय्)—without or deficient in moisture; without rain; thirsty; hard; uninteresting. कोरडा, सुका, शुष्क; बिनपावसाचा; तहानेलेला; कठीण; शुष्क, नीरस. *v. t. & i.* to make or become dry; to take out all the water from. सुकणें किंवा सुकवणें.

Drȳ'ad, *n.* (ड्रा'यड्)—a wood-nymph, a spirit of the forest. वनदेवता.

Drȳ-dock', *n.* (ड्राय्-डॉ'क्)—a place in which a ship is taken out of water for repair. पाण्याच्या बाहेर गलबत दुरुस्त करण्याचें ठिकाण, कोरडी-सुकी-गोदी.

Drȳ'er, *a.* (ड्रा'यर्)—more dry.: अधिक सुका किंवा कोरडा. *n.* an instrument or machine used for drying. सुकविण्याचें यंत्र.

Drȳ-goods', *n.* (ड्राय्-गु'ड्स्)— non-liquid goods. धान्य वगैरे कोरडे पदार्थ; सुती-लोकरी कापड.

Drȳ-nŭrse', *n.* (ड्राय्-नर्'स्)—a woman tending but not suckling a child. अंगावर न पाजणारी दाई.

Drȳ-rŏt', *n.* (ड्राय्-रॉ'ट्)—a diseased growth in wood; moral or social decay. लांकडांतील कीड, सडकें लांकूड; नैतिक किंवा सामाजिक अधःपात.

Drȳ'shŏd, *a.* (ड्रा'य्-शॉड्)—with feet dry. पाय न भिजवितां, सुक्या पावलांनीं.

Dū'al, *a.* (ड्यू'अल्)—of double nature; forming a pair; twofold. दोन तऱ्हेचा; जोडीचा; दुप्पट. *n.* dual number or form. द्विवचन. *Du'alize*, *v. t.*; *Du'ality*, *n.* द्वित्व.

Dū'alism, *n.* (ड्यू'अॅ-लिझम्)—duality; recognition of two independent principles or powers. द्वैतमत; द्वैतवाद. *Du'alist*, *n.* द्वीश्वरवादी; दोन अधिकार चालविणारा. *Dualis'tic*, *a.*

Dŭb, *v. t.* (डब्)—to confer kinghthood on; to give a person a title or nickname. नाइटची पदवी देणें. 'सर' हा किताब देणें. *n.* a foolish fellow. मूर्ख मनुष्य.

Dŭb'ber, *n.* (ड'बर्)—a large leathern vessel used for holding or transporting oil or ghee. डबा, बुधला.

Dŭbb'in, Dŭbb'ing. *n.* (ड'बिन्, ड'बिंग्)—an oily matter used for making leather soft. चामडें नरम करण्याचा एक तेलकट पदार्थ.

Dūbi'ety̆, *n.* (ड्यूबा'युइटि)—a feeling of doubt. अनिश्चय, संशय, शंकेखोरपणा.

Dū'bious, *a.* (ड्यु'बिअस्)—doubtful, not clear or decided; uncertain. संशयास्पद; अस्पष्ट, संशययुक्त; अनिश्चित. *Du'biousness*, *n.*; *Du'biously*, *adv.*

Dūbitā'tion, *n.* (ड्युबिटे'शन्)—hesitation, doubting. कांकूं, टंगळमंगळ, शंका घेणें. *Du'bitative*, *a.* expressing doubt. शंकास्पद, संशयखोर.

Dū'cal, *a.* (ड्यू'कल्)— having to do with a duke or nobleman. ड्यूकसंबंधीं.

Dŭc'at, *n.* (ड'कट्)—a gold coin worth about 9*s*., formerly used in Europe. एक जुनें ९ शिलिंग किंमतीचें सोन्याचें नाणें.

Dŭch'ess, *n.* (ड'चिस्)—a duke's wife or widow, (*Sl.*) coster's wife. ड्यूकची बायको, किंवा विधवा; फळविक्याची बायको.

Dŭch'y̆, *n.* (ड'चि)— the part of a country under the control of a Duke. ड्यूकच्या ताब्यांतील मुलूख.

Duck, *n.* (डक्)—a kind of swimming bird; a heavy cloth; *(pl.)* trousers; batsman's score of 0. बदक; एक नांवाचें कापड; डकची इजार-तुमान; (क्रिकेट) शून्य धांव. *v. i. & t.* to dip head under water and emerge; to push head of (a person) under water; to move the body down quickly so as to save the head from a blow; to drop curtsy. पाण्यांत बुडी मारून लागलेंच बाहेर येणें; बुडवणें; मार टाळण्या-करितां डोकें एकदम खालीं करणें; खालीं वांकणें. *Like water off duck's back*, without any effect (on the hearer). कांहींहि परिणाम न होतां, उपड्या घड्यावर पाणी. *In two shakes of duck's tail*, instantly, at once. तात्काळतोंच. *To take to it like a duck to water*, to learn naturally and very easily. स्वाभाविक व सहज तऱ्हेनें शिकणें.

Ducks and drakes, a game in which one makes stones jump along the surface of water. भाकरीचा किंवा भिंगरीचा पाण्यांतील खेळ. *To play ducks and drakes with one's money*, to waste money wildly, to squander. पैशाची उधळपट्टी करणें. *A lame duck*, a person or ship which cannot move properly. शक्तिहीन मनुष्य, बरोबर न चालणारें जहाज. *A duck's egg*, 0 (in Cricket and other games). शून्य धांव.

Dŭck'lĭng, *n.* (ड'क्-लिंग्)—a young duck. बदकाचें पिल्लूं.

Dŭck'y̆, *n.* (ड'कि)—darling. लाडका, आवडता, प्रियतम.

Dŭct, *n.* (डक्ट्)—a conduit, a tube. नळ, नाली ; (शरीरांतील) नलिका.

Dŭc'tile, *a.* (ड'क्टाइल्)—capable of being drawn into wire which can easily be pulled into a thread ; plastic ; docile. तार काढतां येण्याजोगा ; लवचिक ; नरम. *Ductil'ity*, *n.* तंतुभवनयोग्यता.

Dŭd, *n.* (डड्)—a useless person or thing. निरुपयोगी मनुष्य किंवा वस्तु. *n. pl.* clothes, rags, garments. फाटकेतुटके कपडे, जीर्णवस्त्रें.

Dūde, *n.* (ड्यूड्)—a man who loves to wear fine clothes, a foppish person. भपकेबाज मनुष्य.

Dŭdg'eon, *n.* (ड'जन्)—anger, resentment ; state of wrath or indignation. राग, रुसवा ; खप्पामर्जी.

Due, *a.* (ड्यू)—that ought to be given to a person ; proper, adequate ; owing, payable as a debt or an obligation. रास्त असलेलें देणें, देय ; योग्य ; बाकी ; देणें. *adv.* exactly ; duly. तसेंच, अगदीं बरोबर ; योग्य तऱ्हेनें. *n.* a person's fair share ; (*usu. pl.*) fixed toll or fee. योग्य भाग; ठराविक कर किंवा आकार. *To give a man his due*, to give a man what is right. वाजवी आहे तें देणें. *To give the devil his due*, to be fair even to the worst, to be just even to a bad person. अत्यंत वाईट इसमालाहि योग्य तो न्याय देणें. *In due time*, *In due course*, in the usual way, at the proper time. वेळ आली म्हणजे, योग्य वेळीं. *Due west*, straight towards the west. थेट पश्चिमेकडे.

Dū'ĕl, *n.* (ड्यु'इल्)—a fight with weapons between two persons ; a two-sided contest. दोन मनुष्यांची सशस्त्र लढाई; द्वंद्वयुद्ध. *v. t.* द्वंद्वयुद्ध करणें.

Dū'ellist, *n.* (ड्यु'इलिस्ट्)—a duel-fighter. द्वंद्वयोद्धा.

Dūĕnn'a, *n.* (ड्युए'ना)—a governess, a female guardian. दाई, परिचारिका.

Dūĕt', *n.* (ड्युएट्)—any piece of music performed by two people. दोघांनीं गाण्याकरितां रचलेलें गीत, द्वंद्वगीत.

Dŭff'el, *n.* (ड'फल्)—a coarse woollen cloth. जाडेंभरडें लोंकरीचें कापड.

Dŭ'ffer, *n.* (ड'फर्)—a foolish fellow ; a slow learner. मूर्ख मनुष्य ; बुद्धिमंद, ठोंब्या.

Dŭg, *pa. t.* & *pa. p.* of Dig.

Dŭg, *n.* (डग्)—an udder, a beast's teat. आंचळ, सड.

Du'gŏng, *n.* (डू'गॉग्)—a large fish-like creature found in the sea, also called 'sea-cow'. माशासारखा एक मोठा समुद्रांतील सस्तन प्राणी.

Dŭg-'out', *n.* (ड'ग्-आउट्)—a boat made by hollowing out a tree ; an underground shelter in war-time ; a very old army officer recalled to serve in war. झाड पोखरून केलेली नाव ; युद्धकाळासाठीं केलेलें जमिनीखालील आश्रयस्थान, खंदक, भुयार ; युद्धांत भाग घेण्याकरितां पुनः बोलावलेला सेवानिवृत्त सैन्याधिकारी.

Dūke, *n.* (ड्यूक्)—a British peer of highest rank below a prince. अत्यंत मोठ्या दर्जाचा ब्रिटिश सरदार, ड्यूक. *Duke'dom*, *n.* duchy ; duke's dignity. ड्यूकच्या ताब्यांतील प्रदेश ; ड्यूकचा किताब.

Dŭl'cet, *a.* (ड'ल्-सिट्)—sweet, soothing. श्रवणमधुर, रसाळ.

Dŭl'cĭmer, *n.* (ड'ल्-सिमर्)—a musical instrument with strings hit with a striker. एक प्रकारचें तंतुवाद्य.

Dŭll, *a.* (डल्)—slow of understanding ; not bright ; wanting liveliness ; uninteresting ; not sharp ; not active. मंदबुद्धीचा ; निस्तेज ; सौंदर्यरहित ; नीरस ; मठ्ठ, जड ; सुस्त, मंद. *v.t.* & *i.* निस्तेज-नीरस करणें ; मंदावणें.

Dŭll'ard, *n.* (ड'लर्ड्)—a slow-witted person, one who is slow of understanding. मंदबुद्धीचा मनुष्य, मंदबुद्धि, मूर्ख.

Dū'ly, *adv.* (ड्यू'लि)—properly, fitly, rightly ; sufficiently ; punctually, at the proper time. यथायोग्य ; पूर्णपणें ; यथास्थित ; वेळेवर.

Dŭmb, *a.* (डम्)—unable to speak ; silent, taciturn ; not speaking. मुका ; स्तब्ध, मुखस्तंभ ; मूक. *Dumb show*, a show giving ideas to people by means of the hands without speaking. मूकनाटक, मुग्धाभिनय. *To strike dumb*, आश्चर्यचकित करून सोडणें.

Dŭmb'-bĕll, *n* (ड'म्बेल्)—a short bar used in pairs to exercise muscles, a wood or iron

weight used in exercising the arms. मुद्गल, डंबेल.

Dŭmb'found, *v. t.* (ड'म्फाउन्ड्)—to confound to dumbness, to cause one to lose the power of speech. गोंधळून स्वस्थ बसायला लावणें, बोबडी वळवणें.

Dumb-wait'er, *n.* (डम्-वे'टर्)—a movable table used for serving food. अन्न वाढण्याकरितां केलेलें फिरतें मेज,-टेबल.

Dŭm'dŭm, *n.* (ड'म्-डम्)—a soft-nosed expanding bullet. मऊ नाकाची वाढणारी बंदुकीची गोळी.

Dŭmm'y̆, *n.* (ड'मि)—a sham article; a mere tool; a lay figure. खोटी वस्तु; केवळ बाहुलें; नक्कल, बनावट प्रतिमा. *a.* sham. खोटें, बनावट.

Dŭmp, *v. t.* (डम्प्)—to throw down in a mass; to set down carelessly; to sell goods in a foreign country at a very low price. खालीं फेंकून देणें; निष्काळजीपणानें ठेवणें; परकी देशांत अगदीं कमी किंमतींत माल विकणें. *n.* a place in the open for storing goods; a place for throwing waste matter. माल ठेवण्याची उघडी जागा; कचरा टाकण्याची जागा, उकिरडा. *To be in the dumps*, to be sad and spiritless. दुःखी आणि खिन्न असणें.

Dŭmp'lĭng, *n.* (ड'म्प्-लिंग्)—a boiled ball of dough. मळलेल्या कणकेचा शिजविलेला गोळा.

Dŭm'py̆, *a.* (ड'म्पि)—short and stout. ठेंगणा पण मजबूत.

Dŭn, *a.* (डन्)—of dull greyish brown. काळसर, जरदा, मळ्या. *n.* an importunate creditor. तगादा लावणारा धनको. *v. t.* to demand payment of a debt. पैशाचा तगादा लावणें.

Dŭnce, *n.* (डन्स्)—a bad learner; a dullard. अक्षरशत्रु; ठोंब्या.

Dŭn'derhead, *n.* (ड'न्डरहेड्)—a fool, a blockhead. मूर्ख किंवा मठ्ठ मनुष्य.

Dūne, *n.* (ड्यून्)—a sandhill. वाळूचा ढिगारा, वाळूची टेंकडी.

Dŭng, *n.* (डंग्)—excrement of animals; manure. गोमय, शेण; खत. *Dung'hill*, *n.* उकिरडा.

Dŭng'aree, *n* (डंगरी)—a coarse Indian cloth. जाडेंभरडें कापसाचें कापड.

Dŭn'geon, *n.* (ड'न्जन्)—a dark underground prison. अंधारकोठडी.

Dūodē'nŭm, *n.* (ड्यूओडी'नम्)—the first 12 inches of the bowel. लघ्वन्त्र, वितस्त्यन्त्र.

Dūpe, *v. t* (ड्यूप्)—to deceive and make use of. फसविणें, ठकवणें. *n.* person who is deceived, one who is unknowingly used by another for a wrong purpose. सहज फसला जाणारा, भोळा मनुष्य.

Dū'ple, *a.* (ड्यू'पल्)—double. दुप्पट.

Dū'plĕx, *a.* (ड्यू'प्लेक्स्)—of two parts, twofold. दुहेरा, दुप्पट. *Duplex lamp*, a lamp with two wicks. दोन वातींचा दिवा.

Dū'plĭcate, *a.* (ड्यू'प्लिकिट्)—double; exactly like or reproducing another example. दुप्पट, अगदीं सारखा. *n.* an exact copy. दुसरी प्रत, नक्कल, उतारा. *v. t.* (ड्यू'प्लिकेट) to make copies of. दुसरी प्रत करणें.

Dū'plicātor, *n.* (ड्यू'प्लिकेटर्)—a machine for making many copies. अनेक प्रति-नकला-काढण्याचें यंत्र.

Dūplĭ'cĭty̆, *n.* (ड्यूप्लि'सिटि)—the act of being dishonest, double-mindedness, deceitfulness. दुजाभाव, फसवेगिरी, लबाडी.

Endear', *v. t* (इन्-डि'अर्)— to make dear, to cause to be loved. प्रिय करणें, आवडता करणें.

Endear'ment, *n.* (इन्डि'अर्-मेन्ट्)—an act of endearing, tender affection, loving words or act. लाडिकपणा, लाडीगोडी, प्रेम, ममता.

Endeav'our, *v. i. & t.* (इन्डे'व्हर्)— to try, to strive. प्रयत्न करणें. *n.* an attempt, an effort. प्रयत्न.

Endĕm'ic, *a.* (एन्डे'मिक्)-regularly found present in certain people or places. विशिष्ट जागीं किंवा विशिष्ट लोकांमध्यें होणारा (रोग). *n.* स्थानिक-विशिष्टजागीं होणारा-रोग. *Endemi' city, n.*

En'dive, *n.* (ए'न्डिव्ह्)—a bitter plant used for food. एक कडू (सूर्यफूल किंवा शेवती या जातीची) काळी वनस्पति.

End'lĕss, *a.* (ए'न्ड्-लिस्)—unending, without end, continual. ज्याला शेवट नाहीं असा, निरंतर, सतत.

Endŏg'amȳ, *n.* (एन्डॉ'गमि)—the custom of marrying only within the tribe. स्वज्ञातिशरीरसंबंध, आपल्याच ज्ञातींत विवाहसंबंध करणें. *Endog'amous, a.*

Endŏrse', *v. t.* (इन्डॉ'र्स्)—to write on the back of a document; to confirm, to agree with what has been said or done. दस्तऐवज, हुंडी

वगैरेच्या पाठीवर लिहिणें; शेरा लिहून पसंती दाखविणें. *Endorse'ment, n.*

Endow', *v. t.* (इन्डा'उ)—to give a permanent income to; to invest with powers or qualities. आंदण किंवा देणगी देणें; शक्ति, गुण वगैरेनीं युक्त करणें. *Well endowed by nature*, clever and beautiful by birth. जन्मतःच हुषार व सुंदर. *Endow'ment, n.* नेमणूक, वर्षासन.

Endūe', *v. t.* (इन्ड्यू)—to clothe with; to give. नेसवणें, घालणें; देणें.

Endūr'ance, *n.* (इन्ड्यु'अरन्स्)-power of enduring, sufferance, fortitude. सहनशक्ति, चिकाटी, धैर्य.

Endūre', *v. t. & i.* (इन्ड्यु'अर्)—to undergo; to bear; to last, to remain. भोगणें, सोसणें; सहन करणें; टिकणें. *I can't endure him*, I hate him. मी त्याचा द्वेष करितों.

En'ĕmä, *n.* (ए'निमा, इनी'मा)—an injection of liquid into the rectum; the syringe used. पिचकारीचें औषध; बस्ती, पिचकारी.

En'ĕmy̆, *n.* (ए'निमि)—one who is unfriendly, a hostile person, an opponent. प्रतिपक्षी, शत्रु.

Energĕt'ic, *a.* (एनर्जे'टिक्)—forcible; operative; vigorous; full of energy, powerful, efficatious. जोरदार; परिणामकारक; बळकट; चिकाटीचा, जोमदार, उत्साहपूर्ण.

En'ergy̆, *n.* (ए'नर्जि)—force, vigour, activity; capacity for work. जोर, जोम, हिंमत; उत्साह, शक्ति.

En'ervāte, *v. t.* (ए'नर्व्हेट्)—to deprive of vigour, to enfeeble, to cause to become weak, to debilitate. कमजोर किंवा दुर्बळ करणें, निःसत्त्व करणें.

Enfee'ble, *v. t.* (इन्फी'बल्)—to make feeble. दुर्बळ करणें. *Enfee'blement, n.* weakness. कमकुवतपणा, अशक्तता.

Enfilāde', *n.* (एन्-फि-ले'ड्)—a place on a battle-field which can be shot at from one end to the other. एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत गोळ्या घालतां येतील अशी रक्षणक्षेत्रांतील जागा. *v. i.* to shoot at a line of men from one end. रांगेंतील लोकांना एका टोंकापासून गोळी घालणें.

Enfōld', *v. t.* (इन्-फो'ल्ड्)—to wrap; to embrace. आच्छादणें; मिठी मारणें.

Enforce', *v. t.* (इन्फो'र्स्)—to press, to urge; to compel observance of, to make people obey (a law). आग्रह करणें; बळजबरीनें अंमलांत आणणें, अंमलबजावणी करणें.

Enforce'ment, *n.* (इन्फो'र्स्-मेन्ट)—act of enforcing, compulsion. बळजबरी, अंमलबजावणी.

Enfrăn'chīse, *v. t.* (इन्फ्रॅ'न्चाइझ्)—to set free; to give the right to elect members (to government), to give electoral franchise to. मुक्त करणें, स्वातंत्र्य देणें; मतदानाचा हक्क देणें. *Enfran'chisement, n.* बंधमुक्तता, स्वातंत्र्य; नागरिकत्वाचे हक्क देणें.

Engāge', *v. t.* (इगे'ज्)—to bind by contract or promise; to pledge oneself; to employ; to occupy; to bring or come into conflict. वचन किंवा करारबद्ध होणें; वचन देणें; कामाला लावणें; कामांत गुंतणें; झगडा करणें, झगड्यांत सांपडणें. *To engage oneself to*, to promise. वचन देणें. *To be engaged to*, to promise to marry. लग्न करण्याचें वचन देणें. *To engage a room*, to order a room to be kept for one. जागा राखून ठेवणें. *An engaging manner*, a pleasing manner. आकर्षक रीत. *To engage an enemy*, to join battle with an enemy. शत्रूबरोबर युद्ध करणें.

Engāge'ment, *n.* (इगे'ज्-मन्ट्)—a promise; a promise to marry; a promise to meet or go out with a person; a battle. बोली, करार, वचन; लग्न करण्याचें वचन; संकेत, वायदा; लढाई, सामना.

Engĕn'der, *v. t.* (इजे'न्डर्)—to give rise to, to generate, to procreate, to be the cause of. उत्पन्न करणें, कारणीभूत होणें.

En'gine, *n.* (ए'न्जिन्)—a machine which produces power; a locomotive; a means, an instrument. यंत्र, एंजिन, आगगाडीचें (वाफेचें) यंत्र; साधन, हत्यार.

Engineer', *n.* (एन्जिनि'अर्)—one who designs and constructs military works or works of public utility; one skilled in mechanical engineering work. रस्ते, घरें, वगैरेचीं कामें करण्यामध्यें कुशल, शिल्पकलाभिज्ञ; वास्तुविद्याविशारद. *v. t. & i.* to construct, to manage or to act as an engineer; to contrive, make and carry out a secret plan. रस्ते, घरें, वगैरेचें काम करणें; युक्ति काढणें. *Engineer'ing, a.*

Eng'lish, *a.* (इं'ग्लिश्)—of England. इंग्लंडचा. *n.* the English language. इंग्रजी भाषा, आङ्ग्लभाषा. *Eng'lishman, n.* इंग्रज गृहस्थ. *Eng'lishwoman, n.* इंग्रज स्त्री.

Engorge', *v. t* (इगॉ'र्ज्)—to swallow. गिळून टाकणें, गट्ट करणें. *Engorged with blood*, full of blood. रक्तानें भरलेलें.

Engräft', *v. t.* (इग्रा'फ्ट्)—to insert; to implant; to incorporate; to add. आंत घालणें, शिरकाव करून देणें; मनावर ठसा उमटवणें; समावेश करणें, जोडणें.

Engrain', *n.* (इन्ग्रे'न्)—to cause to sink deeply into. मजबूत ठसवणें, पक्का (रंग) देणें. *Engrained habits*, habits that have become part of one's character. पक्क्या किंवा दृढ झालेल्या -हाडींमासीं खिळलेल्या-संबंधी.

Engrăve', *v. t.* (इन्ग्रे'व्)—to cut in lines on a metal plate for printing; to carve; to impress deeply (on memory). खोदणें; कोरणें; मनावर ठसवणें, बिंबवणें. *Engra'vings, n.* कोरणें; नकशीकाम, खोदकाम.

Engrŏss', *v. t.* (इन्ग्रॉ'स्)—to write out in large letters or in a legal form; to monopolize; to absorb. मोठ्या अक्षरांनीं लिहिणें; कायदेशीर स्वरूपांत लिहिणें; ग्रासणें, मक्ता घेणें; गुंग किंवा तल्लीन होणें. *An engrossing story*, a very interesting story. फार मजेदार गोष्ट. *Engross'ment, n.*

Engŭlf', *v. t.* (एन्ग'ल्फ्)—to swallow up (usu. in *pass.*), to overwhelm. गट्ट किंवा गडप करणें, दडपून टाकणें. *-ment, n.*

Enhănce', *v. t.* (इन्हॅ'न्स्)—to heighten, to intensify; to exaggerate. वाढवणें, अधिक करणें; फुगवून सांगणें. *Enhance'ment, n.* वाढ, चढ' वृद्धि.

Enĭg'mă, *n.* (इनि'ग्मा)—a riddle; a person or thing that is difficult to understand. कोडें; गूढ मनुष्य किंवा वस्तु. *Enigmat'ic, -al, a.* कोड्यासारखा, गूढ.

Enjŏin', *v. t.* (इन्जॉ'इन्)—to prescribe; to command. कायदा घालून देणें; हुकूम करणें, आज्ञा देणें. *To enjoin silence upon*, to order to be silent. स्तब्ध राहण्याचा हुकूम सोडणें.

Enjoy', *v. t.* (इन्जॉ'य्)—to take delight in; to have or possess the use of. आनंद मानणें; सुखोपभोग घेणें, उपभोगणें. *Enjoy'able, a.* pleasant. उपभोग घेण्यासारखा. *Enjoy'ment, n.* संभोग, सुख, आनंद.

Enkĭn'dle, *v. t.* (इन्कि'न्डल्)—to set on fire. आग लावणें, चेतवणें.

Enlāce', *v. t.* (इन्-ले'स्)—to bind or twist together. एकत्र बांधणें, -गुंफणें.

Enlärge', *v. t. & i.* (इन्ला'र्ज्)—to expand, to grow larger; to expatiate, to speak for a long time on some subject. वाढवणें; मोठा करणें किंवा होणें; विस्तृत विवरण करणें. *Enlarge'ment, n.* a larger copy of a small picture. आकाराची वाढ, लहान चित्राची मोठी प्रत.

Enlight'en, *v. t.* (इन्ला'इटन्)—to cause to understand, to instruct; to inform; to shed light on. बोध करणें; ज्ञान देणें; प्रकाश पाडणें. *Enlight'enment, n.* प्रकाश; अज्ञाननाश, ज्ञानदान.

Enlĭst', *v. t. & i.* (इन्लि'स्ट्)—to engage or be engaged for military service; to get the support of. लष्करी नोकरीकरितां पटांत नांव दाखल करणें; आश्रय मिळणें. *Enlist'ment, n.*

Enli'ven, *v. t.* (इन्ला'यू-व्हन्)—to make bright and full of action, to animate, to inspirit, to brighten. चेतना उत्पन्न करणें, उल्हसित करणें, तरतरी आणणें. *Enli'venment, n.*

En măsse, *adv.* (ऑं मॅस्)—all together, in a body. सर्व मिळून, सर्वांनीं, संघशः.

Enmĕsh', *v. t.* (इन्मे'श्)—to catch in a net. जाळ्यांत पकडणें.

En'mĭtў, *n.* (ए'न्मिटि)—hatred, hostility. द्वेष, शत्रुत्व.

Enn'ui, *n.* (ऑं'न्वी)—tiredness caused by lack of interest, feeling of boredom. कंटाळा, वीट.

Enŏrm'ĭtў, *n.* (इनॉ'र्मिटि)—great wickedness; crime; deviation from right. अतिदुष्टता; घोर पातक; अत्याचार.

Enŏrm'ous, *a.* (इनॉ'र्मस्)—very large. अवाढव्य, प्रचंड.

Enough', *a.* (इन'फ्)—sufficient. पुरेसा, पाहिजे तितका. *n.* as much or many as necessary. पुरवठा, पर्याप्ति. *adv.* to the necessary degree. पुरेसें, बस्स.

Enquīre', *v. t. & i.* (इन्क्वा'यर्)—to ask about. चौकशी करणें. *Enquir'y, n.* तपास, चौकशी, शोध.

Enrāge', *v. t.* (इन्रे'ज्)—to make furious, to make very angry. संतापविणें, फार राग आणणें.

Enrăp'tūre, *v. t.* (इन्रॅ'प्चर्)—to transport with pleasure, to delight intensely. अत्यानंदित करणें.

Enrĭch', *v. t.* (इन्रि'च्)—to make rich. सधन करणें. *-ment, n.*

Enrol', *v. t.* (इन्रो'ल्)—to insert a name in a list; to incorporate as a member; to register a deed; to record. पटावर नांव दाखल करणें; सभासद होणें; दस्तऐवज रजिस्टर करणें; नमूद करून ठेवणें. Enrol'ment, *n.* नांवनिशी, रजिस्टर.

En route, *adv.* (ऑं रूट्)—वाटेंत, मार्गावर

Enshrīne', *v. t.* (इन्श्रा'इन्)—to enclose as in shrine; to cherish. देवाऱ्यांतल्याप्रमाणें बसविणें; प्रेमदृष्टीनें मनांत बाळगणें, प्रेमाच्या देव्हाऱ्यांत बसविणें. *His name is enshrined in our memory*, he will always be remembered with love. त्याचें नांव नेहेमीं प्रेमानें स्मरलें जाईल.

Enshroud', *v. t.* (इन्श्रा'उड्)-to cover completely. पूर्ण आच्छादणें, आच्छादित करणें, झांकणें.

En'sign, *n.* (ए'न्साइन्)—a badge, an emblem ; a banner, a flag ; the lowest commissioned officer in infantry. चिन्ह, लक्षण; निशाण, ध्वज; निशाण वाहणारा, पायदळांतील कनिष्ठ दर्जाचा अधिकारी.

En'silage, *n.* (ए'न्-सि-लिज्)-green food or fodder for cattle preserved in air-tight chamber and used during the winter. हवाबंद अशा खोलींत सांठवून ठेवलेलें गवत किंवा चारा. *Ensile'*, *v. t.* गवत सांठवून ठेवणें.

Enslāve', *v. t.* (इन्स्ले'व्ह्)—make a slave. दास बनविणें, गुलामगिरींत टाकणें. *-ment*, *n.*

Ensnāre', *v. t.* (इन्स्ने'अर्)—to get a person or creature into a trap, entrap. जाळ्यांत पकडणें.

Ensūe', *v. t. & i.* (इन्स्यू')—to happen later ; to result from. मागाहून घडणें; उद्भवणें, ०च्या परिणाम होणें.

Ensure, *v. i. & t.* (इन्शु'अर्)—to make safe or certain ; to secure. सुरक्षित करणें ; प्राप्त होईल अशी खात्री करणें.

Entăb'lature, *n.* (इन्टॅ'ब्लचर्)—the part of an order above the column. खांबाच्या वरचा भाग-कंगोरा व तुळई.

Entail', *v t.* (इन्टे'ल्)—to settle landed estate on persons ; to impose on ; to necessitate, to make necessary. जमीन वंशपरंपरा देणें; वंशपरंपरागत करणें ; लादणें, भाग पाडणें. *n.* दान किंवा विक्री करतां न येणारी वंशपरंपरेनें मिळालेली मिळकत.

Entăng'le, *v. t.* (इन्टॅं'गल्)—to catch in a snare ; to involve in difficulties, to get a person into one's power. जाळ्यांत पकडणें, फसवणें ; गुंतागुंत करणें ; अडचणींत गोवणें. *Entang'lement*, *n.* गुंतागुंत ; गुंतागुंत करणारी गोष्ट.

En'ter, *v. i. & t.* (ए'न्टर्)—to go or come in ; to insert in a book. आंत जाणें, प्रवेश करणें ; पुस्तकांत वगैरे लिहिणें. *To enter the church*, to take orders. पाद्री होणें. *To enter an appearance*, to show oneself (at a meeting). हजर राहणें. *To enter a protest*, to make a formal objection. निषेध व्यक्त करणें. *To enter into*, to engage in (conversation, agreement). संभाषणांत गुंतणें, करार करणें. *To enter upon*, to begin, to begin to deal with. आरंभ करणें. *To enter into details*, to tell all the small points about. बारीकसारीक गोष्टी सांगणें. *To enter into (a game)*, to take part in. भाग घेणें. *To enter into* (the feelings or spirit of), to understand. समजणें, समजून घेणें.

Entĕ'ric, *a.* (एन्टे'रिक्)—of the intestines. आंतड्यांसंबंधींचा. *Enteric fever*, a dangerous disease of the bowels, typhoid. आन्त्र ज्वर, विषम ज्वर. *Enteri'tis*, *n.* आंतडीं सुजणें, आंतड्यांची सूज.

En'terprise, *n.* (ए'न्टर्-प्राइझ्)—a bold undertaking, a hazardous attempt. साहस कर्म, धाडस, जोखीम.

En'terprīsing, *a.* (ए'न्टर्-प्राइझिंग्)—full of enterprise, willing to do daring things, adventurous, venturesome. धाडसी, साहसी.

Entertain', *v. t.* (एन्टर्-टे'न्)— to receive as a guest ; to amuse ; to harbour ; to keep in mind. आदरातिथ्य करणें ; करमणूक करणें ; आश्रय देणें ; मनांत ठेवणें, मनांत बाळगणें. *Entertain'ing*, *a.* amusing. मनोरंजक, करमणूक करणारा.

Entertain'ment, *n.* (एन्टर्टे'न्मेन्ट्)—hospitality ; an amusement ; a public performance. पाहुणचार, आदरातिथ्य; करमणूक; मेजवानी, जाहीर खेळ.

Enthral', *v. t.* (इन्थ्रॉ'ल्)—to bring into bondage, to make a slave of, to enslave ; to captivate. दास करणें; चित्त वेधणें. *Enthrall'ing*, *a.* very interesting. फारच मनोरंजक.

Enthrōne', *v. t.* (इन्-थ्रो'न्)—to put a king on a throne, to make a person a king. राजाला सिंहासनावर बसविणें, राजा करणें. *Enthroned in our hearts*, much loved and respected. त्याच्यावर आमचें फार प्रेम व आदर आहे.

Enthū'siăsm, *n.* (इन्थ्यू'झि-ॲझम्)—a strong feeling of admiration for some one or something, ardent zeal. उत्साह, उत्सुकता.

Enthū'siăst, *n.* (इन्थ्यू'झि-ॲस्ट)—a person full of enthusiasm, one who is very eager and interested in some idea. अत्युत्साही मनुष्य, उत्साही.

Entīce', *v. t.* (इन्टा'इस्)—to allure, to induce, to draw away, to draw over. मोह घालणें, लालूच दाखवून वळविणें. *Entice'ment*, *n.* आशा दाखवून वळविणें ; आमिष, लालूच.

Entīre', *a.* (इन्टा'यर्)—complete, whole, unbroken, undamaged. पूर्ण, सर्व, सगळा, समग्र.

Entīre'lў, *adv.* (इन्टा'यर्-लि)—wholly. पूर्णपणें.

Entīre'tў, *n.* (एन्टा'यर्टि)—the sum total. पूर्णता, अखंडपणा.

Entī'tle, *v. t.* (एन्टा'य्-टल्)—to give (a book) the title of ; to give a claim to. पुस्तकाला वगैरे नांव देणें ; अधिकार देणें, अधिकृत करणें.

En'titў, *n.* (ए'न्टिटि)—a thing with real existence, any real thing. अस्तित्वांत असलेली वस्तु, पदार्थ, अस्तित्व, सत्त्व.

Entomb', *v. t.* (इन्टू'म्)—to place in a tomb, to serve as a tomb for. थडग्यांत ठेवणें, गाडणें.

Entomŏl'ogy̆, *n.* (एन्टामॉ'लजि)—the study of insects, the science that treats of insects. कीटकशास्त्र.

En'trails, *n. pl.* (ए'न्ट्रेल्झ्)—the inner parts of an animal. आंतील भाग, कोथळा, आंतडीं, अंत्रें.

Entrain', *v. t. & i.* (इन्-ट्रे'न्)—to put (troops) into a train, to get into a train. गाडींत चढविणें. गाडींत चढणें.

Entrăm'mel, *v. t.* (इन्-ट्रॅ'मल्)—to tie up as in a net. जाळ्यांत पकडणें.

Entrănce', *v. t* (इन्-ट्रा'न्स्)—to throw into a trance, to cause to be in a state of great wonder and delight. देहभान नाहींसें करणें, समाधि लावणें.

En'trance, *n.* (ए'न्ट्रन्स्)—coming or going in; the right of admission; the door or passage for an entrance. प्रवेश; आंत शिरण्याचा हक्क; द्वार, प्रवेशमार्ग

En'trant, *n.* (ए'न्-ट्रन्ट्)—one who goes in; one who takes part in (a race, an examination). आंत जाणारा; भाग घेणारा.

Entrăp', *v. t.* (इन्-ट्रॅ'प्)—to catch in a trap. पिंजऱ्यांत पकडणें, कोंडणें.

Entreat', *v. t.* (इन्ट्री'ट्)—to ask earnestly; to beg. काकुळतीनें विचारणें; विनंति करणें, विनवणें.

Entreat'y̆, *n.* (इन्ट्री'टि)—an earnest request. विनवणी, विनंति.

Entrĕnch', *v. t.* (इन्-ट्रे'न्च्)—to protect a place or an army with trenches. खंदकांच्या साहाय्यानें रक्षण करणें. *Entrench'ment, n.*

Entrŭst', *v. t.* (इन्ट्र'स्ट्)—to charge with (duty); to confide to (thing, secret), to give in trust. स्वाधीन किंवा हवालीं करणें; विश्वासानें ठेवणें.

En'trȳ, *n.* (ए'न्ट्रि)—the act of coming or going in; an entrance; an alley; entering, an item entered. आंत शिरणें; प्रवेश; आळी, गल्ली; नोंद करणें, नोंद.

Entwīne', *v. t.* (इन्-ट्वा'इन्)—to twist round and round; to grow all around. भोंवतालीं गुंडाळणें; सभोंवार वाढणें.

Enū'merāte, *v. t.* (इन्यू'मरेट्)—to count; to specify, to name one by one. संख्येनें मोजणें, गणणें; एकामागून एक सांगणें. *Enumera'tion, n.* गणना, यादी, संख्या. *Enum'erator, n.* गणना करणारा. *Enum'erative, a.*

Enŭn'cĭāte, *v. t.* (इन'न्शिएट्)—to state definitely, proclaim; to pronounce. नक्की विधान करणें; (ची) प्रतिज्ञा म्हणणें, -मांडणें; प्रतिपादन करणें; उच्चारणें. *Enuncia'tion, n.* प्रतिज्ञा, स्पष्टोच्चार. *Enun'ciator, n.* प्रतिज्ञा करणारा. *Enun'ciative, a.*

Envĕl'op, *v. t.* (इन्व्हे'लप्)—to wrap up, to cover; to surround (enemy). आच्छादणें, गुंडाळणें, लपेटणें; घेरणें. *Envel'opment, n.*

En'velōpe, *n.* (ए'न्व्ह-लोप्, ऑ'-)—a cover of a letter; a wrapper, a covering. लखोटा; वेष्टन, कव्हर.

Envŏn'om, *v. t.* (इन्-व्हे'नम्)—to put poison on or into; to fill with hatred. विष घालणें; द्वेषानें भरणें.

En'vĭable, *a.* (ए'न्व्हि-अबल्)—worthy of envy, calculated to excite envy. ईर्ष्याजनक, स्पृहणीय.

En'vĭous, *a.* (ए'न्व्हिअस्)—full of envy. मत्सरी, हेवेखोर.

Envīr'on, *v. t.* (इन्व्हा'इरन्)—वेढणें, घेरणें.

Envīr'onment, *n.* (इन्व्हा'युरन्मन्ट्)—surrounding; surrounding objects or circumstances. भोंवतालचा प्रदेश; परिस्थिति, सभोंवतालची स्थिति.

Envīr'ons, *n. pl.* (एन्व्हा'इरन्झ्, ए'न्व्हिरॉन्झ्)—district round a town, those parts of a town which lie outside. (शहराच्या) आसपासचा प्रदेश; सभोंवतालचा प्रदेश, नगरोपान्त.

Envi'sage, *v. t.* (इन्व्हि'झिज्)—to look in the face; to view, to form a picture in the mind; to contemplate. तोंडाकडे पाहणें; पाहणें; ध्यान करणें.

En'voy, *n.* (ए'न्व्हॉय्)—a special messenger of high rank sent from one government to another. जासूद, दूत.

En'vy̆, *n.* (ए'न्व्हि)—a bitter contemplation of another's success, the feeling of hate or ill will caused by the sight of another's success or wealth. हेवा, मत्सर. *v. t.* to feel envy of, to desire something owned by another and hate the owner for having it. हेवा करणें.

Enwrăp', *v. t* (इन्रॅ'प्)—to wrap, to enfold. वेष्टणें, गुंडाळणें.

En'zȳme, *n.* (ए'न्झाइम्)—(Chem.) an unorganized ferment. फेंस उत्पन्न करणारा अविकारी विद्राव्य पदार्थ. फेनकद्रव्य.

Ep'aulĕt, Ep'aulĕtte, *n.* (ए'पोलेट्)—an ornament worn on the shoulders by soldiers, ship's officers and others. खांद्यावर लावण्याचा पट्टा, -फीत, खांदफीत.

Ephĕm'eral, *a.* (इफे'मरल्)—short-lived; transitory. अत्यल्पकालिक, अल्पायुषी; क्षणिक, क्षणभंगुर.

Ephemeral'ity, *n.* क्षणभंगुरता. *Emphem'era*, *n.* एकच दिवस जगणारी माशी, -कीटक; अल्पायुषी वस्तु.

Ep'ic, *n.* (ए'पिक्)—a long poem narrating heroic deeds or embodying a nation's history. वीरचरित्र, महाकाव्य. *a.* of heroic type or scale. वीररसयुक्त, वीररसात्मक.

Ep'icūre, *n.* (ए'पि-क्युअर्)—one who is dainty in eating or drinking. चैनी, विलासी, मिष्टान्नभोक्ता. *Epicure'an*, *a.* having to do with the teaching that what gives pleasure is good and what gives pain is evil. चैनबाजीचा, विलासी.

Epĭdĕm'ic, *a.* (एपिडे'मिक्)—prevalent for the time among community, (a disease) which passes from one person to another very quickly. सर्वत्र फैलाव झालेला, सांथीचा.

Epĭderm'is, *n.* (एपिड'र्मिस्)—the outside part of the skin. अगदीं वरची कातडी, बाह्यत्वचा.

Ep'ĭgrăm, *n.* (ए'पि-ग्रॅम्)—a short poem with witty ending; a pointed saying, a few words expressing a clever or amusing thought. चटकदार लहान कविता; चुटका. *Epigrammat'ic*, *a.* झणझणीत, चुटक्याचा.

Ep'ĭgrăph, *n.* (ए'पिग्राफ्)—an inscription, a quotation or a motto. स्मारकावर किंवा थडग्यावर लिहिलेला लेख, वास्तुलेख; वचन; बोधचिन्ह.

Ep'ĭlĕpsy̆, *n.* (ए'पिलेप्सि)—a disease of the brain in which person falls down unconscious with spasms and foaming. अपस्मार, फेंपरें.

Ep'ĭlŏgue, *n.* (ए'पिलॉग्)—the concluding part of a book; a speech or short poem delivered at the end of a play. समारोप, उपसंहार; भरतवाक्य.

Epĭs'copal, *a.* (एपि'स्कपल्)—having to do with bishops. बिशपांसंबंधीं, बिशपांच्या सत्तेतला. *Epis'copacy*, *n.* government of the bishops; the bishops. बिशपांनीं चालविलेला समाजाचा कारभार; बिशपवर्ग. *Episcopa'lian*, *a.* of the government of the bishops; a church of the bishops. बिशपांनीं चालविलेल्या कारभारासंबंधीं; बिशपांनीं चालविलेलें चर्च. *n.* an adherent or member of a church governed by the bishops. बिशपांनीं चालविलेल्या चर्चचा अनुयायी किंवा सभासद. *Epis'copate*, *n.* the bishops. बिशपांचा वर्ग.

Ep'ĭsōde, *n.* (ए'पिसोड्)—an incidental narrative or series of events. अवांतर कथा, गोष्टींतील गोष्ट, उपाख्यान. *Episod'ic*, *a.* उपकथेचा, उपकथेंत सांगितलेला.

Epĭs'tle, *n.* (इपि'सल्)—a letter, usually long and important. (लांबलचक व महत्त्वाचें) पत्र, पद्यात्मक पत्र.

Epĭs'tolary̆, *a.* (एपि'स्-टलरि)—of or carried on by letters. पत्रांचा, पत्रांत सांगितलेला.

Ep'ĭtăph, *n.* (ए'पिटाफ्)—words inscribed on a tomb, an inscription; that which is written on a stone above a grave. थडग्यावर खोदलेला लेख.

Ep'ĭthĕt, *n.* (ए'पिथेट्)—an adjective expressing quality or attribute; an appellation. गुणवाचक विशेषण; नांव.

Epĭt'omė, *n.* (एपि'टॉमि)—a summary, an abstract, a short account of a book or speech. संक्षेप, सार, सारांश.

Epĭt'omize, *v. t.* (इपि'टॉमाइझ्)—to summarize. सारांश सांगणें.

E'pŏch, *n.* (ई'पॉक्)—the beginning of an era; a period marked by a notable event. युगारंभ; स्मरणीय गोष्टींचा कालावधि. *E'poch-making*, *a.* very important, notable, significant. फार महत्त्वाचा.

Ep'opee, *n.* (ए'पपी)—an epic poem. महाकाव्य.

E'quable, *a.* (ई'क्वब्ल्)—uniform, even; not easily disturbed, not changing suddenly; never very hot nor very cold. समान, सारखा; सहसा न खवळणारा, शान्त; समशीतोष्ण.

E'qual, *a.* (ई'क्वल्)—the same in number, size, merit, weight; adequate; evenly matched. सारखा; योग्य; बरोबरीचा, तुल्यबल, समर्थ, कार्यक्षम. *n.* a person of the same rank. बरोबरीचा किंवा समान दर्जाचा मनुष्य. *v. t.* to be equal to. बरोबरीचा असणें. *He is equal to his work*, he is able to do his work. तो तें काम करण्याला समर्थ आहे. *Equal to the occasion*, able to meet or deal with whatever happens. प्रसंगास तोंड देणारा. *He treated us equally*, he treated us both alike. त्यानें दोघांना सारखें वागवलें.

Equal'ity̆, *n.* (इक्वॉ'लिटि)—being equal. बरोबरी, समानता.

E'qualize, *v. t. & i.* (ई'क्वलाइझ्)—to make equal; to reach the opponent's score (in games). सारखा किंवा समान करणें; खेळांत विरुद्ध पक्षाची बरोबरी करणें. *Equaliza'tion*, *n.* बरोबरी करणें, सारखेपणा.

Equanĭm'ity̆, *n.* (ईक्वनि'मिटि)—evenness of mind, composure, calm. मनाचा समतोलपणा, शान्ति, शान्तवृत्ति.

Equāte', *v. t.* (इक्वे'ट्)—to make equal. सारखें करणें, समीकरण करणें.

Equā'tion, *n.* (इक्वे'शन्)—making equal, balancing; (*Math.*) statement of equality. बरोबरी करणें; समीकरण.-*al*, *a.*

Equā'tor, *n.* (इक्वे'टर्)—a great circle of the earth, equidistant from the poles, an imaginary line round the middle of the earth halfway between the north and south poles. विषुववृत्त, भूमध्यरेषा. *Equator'ial*, *a.* विषुव वृत्ताचा, भूमध्यरेषेजवळचा.

Eq'uerry̆, *n.* (ए'क्वरि)—an officer of a king's court in charge of horses; an officer of British royal household. अश्वाधिकारी, पागेवरील मुख्य; पागनीस.

Eques'trian, *a.* (इक्वे'स्ट्रिअन्)—pertaining to horses, of horseriding. अश्वविषयक, घोड्यावर बसण्यासंबंधीं. *n.* घोडेस्वार, तुरंगी.

Equiăng'ūlar, *a.* (ईक्विॲं'ग्युलर्)—consisting of or having equal angles. सर्व कोण सारखे असलेला, समकोण.

Equidis'tant, *a.* (ईक्वि-डि'स्टन्ट्)-at equal distances. समांतर.

Equilăt'eral, *a.* (इक्विलॅ'टरल्)—having all sides equal. सर्व बाजू सारख्या असलेला, समभुज.

Equilib'rium, *n.* (ईक्विलि'ब्रिअम्)-a state in which a thing is held level or steady because there is equal weight on both the sides, a state of balance; mental balance. समतोल, समतुलना; मनाचा समतोलपणा.

E'quīne, *a.* (ई'क्वाइन्)—having to do with horses, like a horse. घोड्यांचा; अश्वसदृश.

E'quinŏx, *n.* (ई'क्विनॉक्स्)-the time at which the sun crosses equator (about March 21 and September 22) and day and night are equal. रात्र व दिवस सारखा असणारा काल, विषुव. *Equinoc'tial*, *a.* विषुवासंबंधीं.

Equip', *v. t.* (इक्वि'प्)—to fit out, to furnish, to supply with the requisites; to dress for journey. आवश्यक वस्तूंचा पुरवठा करणें; प्रवासाकरितां पोषाख करणें. *Equip'ment*, *n.* तयारी करणें; तयारी, सिद्धता; सरंजाम, सामग्री.

Eq'uipage, *n.* (ए'क्वि-पेज्)—carriage, horses, and attendants, retinue, accoutrements; requisites, outfit. गाड्या, घोडे व नोकरचाकर; लवाजमा, इतमाम.

E'quipoise, *n.* (ई'क्विपॉइझ्)—equilibrium; counterbalancing weight. समतुलना; पासंग, धडा.

Eq'uitable, *a.* (ए'क्विटेबल्)—fair, just. न्याय्य, योग्य.

Equitā'tion, *n.* (एक्विटे'शन्)—the art of horse-riding. घोड्यावर बसण्याची कला, अश्वारोहणकला.

Eq'uity̆, *n.* (ए'क्विटि)—fairness; principles of justice supplementing law. खरा न्याय, निःपक्षपात, न्यायबुद्धि; कायद्याला सहाय्यकारी न्यायतत्त्वें, सारासारविचारन्याय, व्यवहारन्याय.

Equiv'alent, *a.* (इक्वि'व्हलन्ट्)—equal in value; corresponding. सारख्या किंमतीचा; एकार्थाचा. *n.* समतोल वस्तु -मोबदला; तुल्यशक्तिक. *Equiv'alence*, *Equiv'alency*, *nn.* समतोलपणा; समानार्थकता; तेवढीच रक्कम.

Equiv'ocal, *a.* (इक्वि'व्हकल्)—of double or doubtful meaning; dubious. दोन अर्थांचा, दुटप्पी; संशयास्पद. *Equivocal'ity*, *n.*

Equi'vocāte, *v. i.* (इक्वि'व्हकेट्)—to use words ambiguously. संदिग्ध किंवा दुटप्पी बोलणें. *Equivoca'tion*, *n.*

Er'ä, *n.* (ई'अरा)—the system of chronology starting from a particular period, a time in history usually begun from some important event. शक. The Christian era = ख्रिस्ती शक.

Erăd'icāte, *v. t* (इरॅ'डिकेट्)—to root out, to extirpate, to exterminate, to destroy completely समूळ उपटून टाकणें, निर्मूलन करणें. *Eradica'tion*, *n.* निर्मूलन, नाश. *Era'dicator*, *n.*

Erāse', *v. t.* (इरे'झ्)—to rub out, to obliterate. पुसून टाकणें, नाहींसें करणें, (मनांतून) काढून टाकणें. *Era'sure*, *n.* rubbing out, a word rubbed out. खोडाखोडी, खोडलेला शब्द.

Ére, *prep. & conj* (एअर्)—before; sooner than. पूर्वी; अगोदर. Ere long = लवकरच.

Erĕct', *a.* (इरे'क्ट्)—upright, vertical, standing up on end. ताठ, उभा. *v. t.* to make erect; to build; to form. उभा करणें; बांधणें, रचणें. *Erec'tion*, *n.* a building. इमारत, घर *Erec'tor*, *n.* बांधणारा, उत्थापक.

Erĕc'tile, *a.* (इरे'क्टाइल्)—which can be made to stand up straight. सरळ उभा करतां येण्याजोगा.

E'remīte, *n.* (इ'रिमाइट्)—यति, जोगी, संन्यासी. *Eremit'ic*, *a.*

Erg'ō, *adv.* (अ'र्गो)—therefore. म्हणून.

Erm'ine, *n.* (अ'र्मिन्)—a small animal with thick white fur in winter, with a black end to its tail; white fur or ermine. एक लहान लोकरीचा प्राणी; त्या प्राण्याची लोंकर.

Erne, *n.* (अर्न्)—the golden eagle. सुवर्ण गरुडपक्षी.

Erōde', *v. t.* (इरो'ड्)—gnaw away; wear out, corrode. खाऊन टाकणें; झिजवून टाकणें. *Ero'sion*, *n.* खाऊन टाकणें, खाद. *Ero'sive*, *a.*

Erŏt'ic, *a.* (एरॉ'टिक्)—of love, amatory. प्रेमसंबंधीं, शृंगारिक.

Err, *v. i.* (अर्)—to make mistakes; to be incorrect; to sin. चुका करणें; चूक असणें; पाप करणें.

E'rrand, *n.* (ए'रन्ड्)—a short journey made to carry a commission. निरोप नेण्याकरितां छोटा प्रवास, निरोप, संदेश. *Errand-boy*, *n.* a boy employed on errands. निरोप्या.

E'rrant, *a.* (ए'रन्ट्)—roaming in quest of adventure; itinerant; erring. भटकणारा; भटक्या; चुकारतट्टू. *-ry*, *n.*

Errăt'ic, *a.* (एरॅ'टिक्)—लहरी, अनियमित.

Errā'tŭm, *n.* (एरे'टम्)—an error in printing. छापण्याची चूक.

Errō'neous, *a.* (एरो'निअस्)—incorrect. चूक, चुकीचा, अशुद्ध.

E'rror, *n.* (ए'रर्)—a mistake; a wrong opinion; transgression. चूक; चुकीचें मत; अतिक्रम.

Erst, **Erst'while**, *a. & adv.* (अर्स्ट्, अ'र्स्ट् व्हाइल्)—former, formerly. पूर्वीचा, पूर्वी.

Eructā'tion, *n.* (ई-रक्टे'शन्)—a sending of gas from the stomach up through the mouth. ढेंकर, ढेंकर देणें.

E'rudite, *a.* (ए'रु-डाइट्)—deeply read, learned. विद्वान्, निष्णात, पारंगत.

Erudi'tion, *n* (एरुडि'शन्)—learning. विद्वत्ता, विद्या.

Erŭpt', *v. i.* (इर'प्ट्)—to break out फुटणें, फुटून बाहेर पडणें. [L. *e*, out & *rumpere*, to break]

Erŭp'tion, *n.* (इर'प्शन्)—an outbreak (of volcano, anger); rash, pimples. जोरानें बाहेर पडणें, स्फोट; पुरळ. *Erup'tive*, *a.*

Erўsip'elas, *n.* (एरिसि'पिलस्)—a serious disease producing red colour on the skin. धांवरें.

Escalāde', *n.* (एस्कले'ड्)—scaling of walls with ladders. शिड्या लावून चढणें.

Es'calātor, *n.* (ए'स्कलेटर्)—a moving staircase. हालता जिना.

Escapāde', *n.* (एस्कपे'ड्)—a wild and exciting act; a daring disobeying of rules. आवेशानें केलेलें कृत्य; धडधडीत नियमभंग.

Escāpe', *v. t. & i.* (इस्के'प्)—to get free; to find a way out; to elude, to avoid. मोकळा होणें; बाहेर जाण्याला मार्ग शोधणें; चुकवणें, टाळणें. *n.* escaping; leakage. टाळणें, अंगचुकवा, बचाव; बाहेर जाण्याचा मार्ग. *He escaped being hurt*, he was fortunate not to be hurt. सुदैवानें त्याला इजा झाली नाहीं. *Means of escape*, तरणोपाय. *Escape'ment*, *n.* the part of a clock which makes the noise "tick-tick" and keeps the clock running. ज्याच्या योगानें घड्याळ चालू राहतें ती घड्याळाची कळ.

Escărp', *n.* (इस्का'र्प्)—a steep slope just below the wall of a fort. किल्ल्याच्या भिंतीच्या खालील सरळ उतरता भाग. *Escarp'ment*, *n.*

Eschatŏl'ŏgў, *n.* (एस्कटॉ'लॉजि)—the doctrine of death and judgement. मृत्यु व और्ध्वदेहिक शिक्षाशास्त्र.

Escheat', *n.* (इस्ची'ट्)—lapse of property to crown; property seized by the king as a punishment or because the owner had no descendants. सरकारजमा होणें; सरकारजमा झालेला बेवारसी माल. *v. t. & i.* सरकारजमा होणें.

Eschew', *v t.* (इस्चू)—to abstain from, to shun, to avoid, to fly from. पासून दूर राहणें, टाळणें.

Es'cŏrt, *n.* (ए'स्कॉर्ट्)—a body of armed men as guard; a person accompanying another as protection. पहारेकरी; संरक्षणाकरितां बरोबर दिलेला इसम. *v. t.* (इस्कॉ'अर्ट्) to go along with to protect or in order to show the way. संरक्षणाकरितां किंवा वाट दाखविण्याकरितां बरोबर जाणें.

Es'critoire, *n.* (ए'स्-क्रिट्वार्)—a small writing-desk with a top which opens downward for writing and is closed when not in use. लिहावयाचें लहान मेज, लहान टेबल.

Es'cŭlent, *a.* (ए'स्क्युलन्ट्)—fit for food. खाण्याला योग्य. *n.* खाद्य पदार्थ.

Escŭtch'eon, *n.* (एस्क'चन्)—a shield on which the signs of titled families are painted; a pivoted keyhole cover. कुलसन्मानद्योतक चिन्हें असलेली ढाल; किल्ली घालण्याचे भोंकावर बसविलेला पत्रा,-ढापण.

Eskimo, **Esquimau**, *n.* (एस्किमो')—a member of a North American race. एस्किमो जातीचे लोक.

Esotĕ'ric, *a.* (एसॉटे'रिक्)—meant for the initiated; private, confidential. दीक्षा दिलेल्या लोकांकरितांच असलेला; गुप्त, खासगी, एकांतांत सांगितलेला.

Espĕ'cial, *a.* (इस्पे'शल्)—chief; more than ordinary; particular. मुख्य; विशेष प्रकारचा; विशिष्ट.

Espĕ'ciallў, *adv.* (इस्पे'शलि)—chiefly; more than in other cases. मुख्यत्वेंकरून, विशेषेंकरून.

Esperăn'tō, *n.* (एस्पॅरॅ'न्टो)—a specially made, easily learnt, universal language. मुद्दाम तयार केलेली सर्वांना शिकतां येण्याजोगी भाषा.

Es'pĭonage, *n.* (ए'-स्पिअनिज्)—spying; use of spies. हेरणें, टेहळणी करणें, हेरगिरी; चारप्रयोग, हेरांची योजना.

Esplanāde', *n.* (एस्प्लने'ड्)—level space, esp. one used as promenade. किल्ल्याचे पुढील सपाट मैदान.

Espous'al, *n.* (इस्पा'उझल्)—decisions to support some idea or work; marriage, betrothal. अंगीकार, स्वीकार, कैवार; लग्न, विवाहनिश्चय.

Espouse', *v. t.* (इस्पा'उझ्)—to marry; to uphold, to champion, to support (a cause). लग्न करणें; पक्ष उचलून धरणें.

Esprit', *n.* (एस्प्री')—sprightliness, wit. अभिमान, आपलेपणा, बुद्धि.-*de corps*, (-ड'कोअर्)-स्वपक्षाभिमान.

Espȳ', *v. t.* (इस्पा'इ)—to catch sight of, to see from a distance. दृष्टीस पडणें, दुरून पाहणें.

Esquīre', *n.* (इस्क्वा'यर्)—a title of courtesy; a squire. एक बहुमानाची पदवी किंवा किताब; शिलेदार. (abbr. *Esq.*)

Essay, *n.* (ए'से)—a literary composition; an attempt. निबंध; प्रयत्न. *v. t.* (एसे') to try, to endeavour; to test. प्रयत्न करणें; परीक्षा घेणें. *Ess'ayist*, *n.* an essay-writer. निबंधलेखक, निबंधकार.

Ess'ence, *n.* (ए'सन्स्)—existence or entity; an indispensable quality or element; perfume. खरी वस्तु; आवश्यक गुण किंवा तत्त्व; अर्क, सुगंध.

Essĕn'tial, *a.* (इसे'न्शल्)—of or constituting a thing's essence, very necessary, indispensable. घटकतत्त्वाचा, स्वभावसिद्ध; आवश्यक. *n.* an indispensable element. आवश्यक तत्त्व. *Essentia'lity*, *n.* आवश्यकता.

Estăb'lĭsh, *v. t.* (इस्टॅ'ब्लिश्)—to set up; to settle; to place beyond dispute. स्थापना करणें; नेमणें; सिद्ध करून देणें.

Estăb'lĭshment, *n.* (इस्टॅ'ब्लिश्-मेन्ट्)—establishing; the established church; staff; a house of business. स्थापना; प्रस्थापित चर्च; कामावर नेमलेले लोक; कारखाना.

Estāte', *n.* (इस्टे'ट्)—rank; place in life; landed property or movables; one's assets and liabilities. स्थिति, पदवी; सामाजिक योग्यता, दर्जा; स्थावर जंगम मालमत्ता; देणें घेणें. *Man's estate*, प्रौढ स्थिति. *The three estates*, Lords Spiritual, Lords Temporal, Commons. धार्मिक लॉर्ड, ऐहिक लॉर्ड व कॉमन्स. *The fourth estate*, the press. वर्तमानपत्रें, वर्तमानपत्रांची संस्था.

Esteem', *v. t.* (इस्टी'म्)—to think highly of; to consider. चांगला आहे असें समजणें, प्रशंसा करणें; विचार करणें. *n.* a favourable opinion, regard. प्रशंसा, आदर, बहुमान.

Es'tĭmable, *a.* (ए'स्टि-मबल्)—worthy of esteem or respect. स्तुतीस पात्र, प्रशंसनीय.

Es'tĭmate, *n.* (ए'स्टिमिट्)—an account of the probable cost of doing a certain piece of work, approximate judgement of value. सरासरी किंमत, अंदाज. *v. t.* (ए'स्टिमेट्) to form an estimate of. अंदाज करणें, किंमत ठरविणें. *Es'timator*, *n.* अंदाज करणारा.

Estĭmā'tion, *n.* (एस्टिमे'शन्)—judgement; opinion; esteem. अंदाज, अनुमान; मत; चांगलें मत.

Estŏpp'el, *n.* (इस्टॉ'पेल्)—the being precluded from a course by previous action of one's own. स्वतःच्या पूर्वकृतीनें आलेला मार्गांतील अडथळा, प्रतिबंध, प्रतिबंधक कबुली.

Estrānge', *v. t.* (एस्ट्रे'न्ज्)—to alienate a person from another, to cause to become unfriendly. संबंध तोडणें, अलग राहणें, दूरदूर ठेवणें. *Estrange'ment*, *n.* परकेपणा, अलगपणा, स्नेहाचा अभाव.

Es'tūary, *n.* (ए'स्त्यु-अरि)—the broad mouth of river into which the sea flows, a firth. खाडी, भरतीचें पाणी आंत घेणारें नदीचें मुख, फासूं.

Et cĕt'era, *phr.* (एट्-से'टरा)—and others, of the like kind, and the rest, and so on. इत्यादि, वगैरे. (abbr. *etc.*, &c.)

Etch, *v. t. & i.* (एच्)—to engrave with acids on metal plate etc. आम्लानें नक्षी कोरणें, आम्ल-लेखन करणें.

Etern'al, *a.* (इट'र्नल्)—without beginning or end, lasting for ever, that always (has existed and) will exist; constant. अनाद्यन्त; सनातन, शाश्वत.

Etern'ity, *n.* (इट'र्निटि)—being eternal; infinite time; future life; the life after death. सनातनत्व; शाश्वत काल; पुढील आयुष्य.

E'ther, *n.* (ई'थर्)—clear sky, region above clouds. निरभ्र आकाश, ढगांच्या वरील प्रदेश.

Ethēr'eal, *a.* (इथी'रिअल्)—very light, like air, airy; heavenly. हलका, उडून जाणाऱ्या जलद्रव्यासारखा, हवेशीर; स्वर्गीय.

Eth'ĭcs, *n. pl.* (ए'थिक्स्)—the study of right and wrong in human behaviour, the science of morals or moral duty; moral principles. नीतिशास्त्र, नीतितत्त्वें. *Eth'ic*, *Eth'ical*, *aa.* नैतिक, नीतिविषयक, नीतिपर.

Eth'nĭc, -al, *a.* (ए'थ्-निक्, -कल्)—having to do with races of people, heathen. (मनुष्यांच्या) भिन्नजातिविषयक, मूर्तिपूजक लोकांसंबंधीं. [Gr. *ethnos*, a nation]

Ethnŏl'ogy̆, *n.* (एथ्नॉ'लॉजि)—the science of races, the study of the races of man. मानवजातिशास्त्र.

Etiquette', *n.* (एटिके'ट्)-rules of good behaviour, conventional rules of manners; unwritten code of professional conduct. सभ्याचरणपद्धति; शिष्टाचार, सभ्यतेचे नियम.

Ety̆mŏl'ogy̆, *n.* (एटिमॉ'लजि)—(account of) word's formation and sense-development, the study of the history of words. व्युत्पत्ति, व्युत्पत्तिशास्त्र, निरुक्त. *Etymolo'gical*, *a.* व्युत्पत्तीसंबंधीं. *Etymo'logize*, *v. t.* & *i.* व्युत्पत्ति ठरविणें. *Etymo'logist*, *n.* व्युत्पत्तिशास्त्रज्ञ, व्युत्पत्तिकार.

Eucaly̆p'tus, *n.* (यूकलि'प्टस्)—a tree which produces a strong smelling oil used in medicine. युकलिप्टस नांवाचें झाड.

Eu'chre, *n.* (यू'कर्)—an American card-game. एक प्रकारच्या पत्त्यांचा खेळ. *v. t.* to gain advantage over. दुसऱ्यावर मात करणें, चीत मारणें.

Eugĕn'ics, *n.* (यूजे'निक्स्)—the science of improving the human race or producing fine animals by care in choosing the fathers and mothers. प्राणिसुधारणाशास्त्र, सुप्रजाजननशास्त्र. *Eu'genist*, *n.*

Eul'ogize, *v. t.* (यू'लजाइझ्)—to speak well of, to extol, to praise highly. स्तुति करणें, प्रशंसा करणें. *Eul'ogist*, *n.* स्तुतिपाठक, प्रशंसक. *Eulogis'tic*, *a.* स्तुतिपर, प्रशंसायुक्त.

Eul'ogy̆, *n.* (यू'लजि)— speech or writing in praise of person; praise. प्रशंसापर भाषण किंवा लेख; पोवाडा, गुणगान, स्तुति.

Eun'uch, *n.* (यू'नक्)—a castrated person. नपुंसक, षंढ.

Euph'ĕmĭsm, *n.* (यू'फि-मिझम्)—the substitution of a mild for blunt expression, a pleasant way of saying an unpleasant truth. कडु अर्थ गोड शब्दांनीं सांगणें. एक अर्थालंकार. *Euphemist'ic*, *a.* सौम्य शब्दप्रयोग असलेला.

Euph'ony̆, *n.* (यू'फॉनि)-pleasantness or smoothness of sound, esp. in words. सुस्वरोच्चार, मधुरोच्चार. *Eupho'nious*, *a.* sounding well. कर्णमधुर. *Euphon'ic*, *a.*; *Euph'onize*, *v. t.*, *Eupho'nium*, *n.* a brass instrument of music. एक पितळी सुस्वर वाद्य.

Euph'ūĭsm, *n.* (यू'फ्यु-इझम्)—high-flown style of writing, high-flown diction. उच्च लेखनपद्धति, कठीण व मोठमोठे शब्द योजून लिहिण्याची – बोलण्याची पद्धति. *Euph'uist*, *n.*

Eurās'ian, *a.* (यूरे'शिअन्)—of mixed European and Asiatic parentage. युरोपिअन व एशिअन स्त्रीपुरुषांपासून झालेली संतति.

Euthana'sia, *n.* (यूथने'झिआ)—any painless and easy death. सुखाचें मरण. [Gr. *eu*, well & *thanatos*, death]

Evăc'ūate, *v. t.* (इव्हॅ'क्युएट्)—to make empty, to clear; to withdraw from, to leave. रिकामा करणें, खालीं करणें; स्थळ सोडून जाणें. *Evacua'tion*, *n.* रिकामा करणें, सोडून जाणें.

Evāde', *v. t.* (इव्हे'ड्)—to escape from, to avoid; to elude, to slip away from, to baffle. चुकवणें, टाळणें; झुलवणें. *To evade the law*, to act dishonestly and yet just not to break the law. कायद्याच्या कचाट्यांत न सापडतां अप्रामाणिक कृत्य करणें.

Evanĕs'cent, *a.* (इव्हॅने'सन्ट्)—quickly fading, liable to disappear, quickly disappearing. लवकर नाहींसा होणारा, क्षणिक. *Evanes'cence*, *n.*; *Evanesce'*, *v. i.* (एव्हने'स्) दृष्टीआड होणें, अदृश्य होणें.

Evăn'gelist, *n.* (इव्हॅ'न्जलिस्ट्)—a teacher of good news; a writer of one of the four Gospels (books of the Bible which tell the life of Christ). सुवार्ता सांगणारा शिक्षक; बायबलच्या चार ग्रंथांपैकीं शुभवर्तमानलेखक. *Evangeli'stic*, *a.*; *Evan'gelize*, *v. t.* to preach the Gospel to; to convert to Christianity. शुभवर्तमानाचा उपदेश करणें; क्रिश्चन धर्मांत घेणें.

Evăp'orāte, *v. t.* & *i.* (इव्हॅ'पेरेट्)—to turn into vapour, to change a liquid into a gas, to exhale moisture. वाफ होणें, वाफ करून सोडणें, बाष्पीभवन करणें, -होणें, अदृश्य होणें. *Evapora'tion*, *n.* बाष्पीभवन, वायुरूपानें उडून जाणें.

Evā'sion, *n.* (इव्हे'झन्)-act or means of evading; a shuffling excuse. उडवाउडव, टाळाटाळ; चुकविण्याचें साधन.

Evā'sĭve, *a.* (इव्हे'झिव्ह्)—elusive, trying to avoid. उडवाउडवीचा, टाळाटाळीचा.

Eve, *n.* (ईव्ह्)—the evening or day before a festival; the time just before an important event; evening. कोणत्याहि सणाच्या पूर्वीची संध्याकाळ किंवा दिवस; कोणतीहि महत्त्वाची गोष्ट घडण्याच्या लगत पूर्वीचा काळ; संध्याकाळ.

E'ven, *n.* (ई'व्हन्)—evening. संध्याकाळ. *a.* level, smooth; uniform; equable, calm; divisible by 2. सपाट, सारखा; एकसारखा; बरोबर सारखा; शान्त; सम. *v. t.* to make equal; to treat as equal. सारखा करणें; सारखा मानणें. *adv.* neither more nor less than; simply; notwithstanding; just at the moment. अगदीं

परोपर ; केवळ ; हि, सुद्धां ; त्याचक्षणीं. *Even if*, although, यद्यपि, जरी.

Eve'ning, *n.* (ई'व्ह्-निंग्)—the close of the day (esp. sunset to bedtime). संध्याकाळ, सायंकाळ, प्रदोष.

Event', *n.* (इव्हें'ट्)—occurrence of a thing; an item of a programme, esp. in sports; result; an important happening. घडलेली किंवा घडणारी गोष्ट ; कार्यक्रमांतील प्रत्येक भाग ; परिणाम ; घडणें, घडून येणें, महत्त्वाची गोष्ट. *In the event of his death*, if he dies. जर तो मेला तर. *At all events*, whatever happens. कांहीं झालें तरी.

Event'ful, *a.* (इव्हें'ट्-फुल्)—full of incidents. घडामोडीचा, महत्त्वाचा.

E'ventide, *n.* (ई'व्हन्-टाइड्)—the evening संध्याकाळ.

Even'tual, *a.* (इव्हें'च्यु-अल्)—happening under certain conditions; final, last. आनुषंगिक, परिणामाचा ; अंतिम.

Eventual'ity, *n.* (इव्हेंच्युॲ'लिटि)—the possible event. शक्य गोष्ट, शक्यता.

Ev'er, *adv.* (ए'व्हर्)—at all times; always; at any time. सर्व काळीं ; सर्वदा ; कोणत्याही वेळीं. *Ever and anon*, from time to time. वेळोवेळीं. *For ever, For evermore*, always. नेहमीं, सर्वदा. *Ever so*, अतिशय, फार.

Ev'ergreen, *n.* (ए'व्हर्-ग्रीन्)—any tree or plant which does not leave its leaves in winter. नेहमीं हिरवें असणारें-सदापर्णी-झाड. *a.* always green or fresh. नेहमीं हिरवें किंवा टवटवीत असणारें, सदापर्णी

Everlas'ting, *a.* (एव्हर्ला'स्टिंग्)—lasting for ever; perpetual. चिरकाल टिकणारा, नित्य, शाश्वत *n.* नित्यता, चिरकालिकता, शाश्वती ; सुकल्यावरही रंग टिकणारें फूल.

Evermore', *adv.* (एव्हर्-मो'अर्)—for ever, always, unceasingly, eternally. सदोदित, सर्वदा, नेहमीं.

Ev'ery, *a.* (ए'व्ह्-रि)—each one of all. प्रत्येक, एकेक. *Every other day*, on alternate days. एक दिवसा आड. *Every bit as*, quite as. अगदीं तसेंच. *Every now and then*, from time to time. हरघडी, वेळोवेळीं. *Ev'ery-body, Ev'eryone, pron.* प्रत्येकजण, एकूणएक. *Every-day, a.* occurring everyday; ordinary. दररोज घडणारा ; नेहमींचा.

Ev'ery-where, *adv.* (ए'व्ह्रि-व्हेअर्)—in every place, in all places. प्रत्येक ठिकाणीं, सर्वत्र.

Evict', *v. t.* (इव्हि'क्ट्)—to expel a person by legal process. कायदेशीर मार्गानें घालवून देणें, हुसकावून लावणें, काढून टाकणें.

Ev'idence, *n.* (ए'व्हि-डन्स्)—indication, sign; facts available as proof, anything which helps to prove a fact. चिन्ह, लक्षण ; साक्ष, साक्षीपुरावा. *v. t.* to be evidence of; to indicate. पुरावा देणें ; दर्शविणें. *To turn King's or Queen's evidence*, to give evidence against one's accomplices. आपल्या साथीदारांविरुद्ध सरकारचे बाजूनें साक्ष देणें, माफीचा साक्षीदार होणें. *In evidence*, conspicuous, clear. स्पष्ट.

Ev'ident, *a.* (ए'व्हिडन्ट्)—plain and clear to the mind, obvious, manifest. स्पष्ट, प्रकट.

Eviden'tial, *a.* (एव्हिडें'न्शल्)—relating to or furnishing evidence; proving. साक्षीसंबंधी, साक्षीपुराव्याचा ; स्पष्ट सिद्ध करणारा. *Eviden'tiary, a.*

E'vil, *a.* (ई'व्हिल्)—bad, harmful. वाईट ; दुष्ट. *n.* an evil thing; a sin; harm. वाईट गोष्ट ; पाप ; इजा, दुःख. *Evil-doer, n.* a sinner. दुष्ट कृत्य करणारा, पापी. *The evil one*, the Devil, Satan. सैतान. *The evil eye*, an eye that brings bad fortune, a malicious look. वाईट दृष्टि, दुष्ट नजर. *An evil tongue*, a slanderous tongue. निंदाखोर, निंदक. *To speak evil of*, to slander. निंदा करणें.

Evince', *v. t.* (इव्हि'न्स्)—to show; to indicate. दाखविणें, दर्शविणें.

Evis'cerate, *v. t.* (इव्हि'सरेट्)—to cut out the inner parts of the body. आंतडीं कापून बाहेर काढणें. [L. *e*, out & *viscera*, the bowels]

Evoca'tion, *n.* (ईव्होके'शन्)—act of calling out. बोलावणें, उठविणें. *Evoc'atory, a.*

Evoke', *v. t.* (इव्हो'क्)—to call up (feelings), to summon forth. आवाहन करणें, जागृत करणें. *To evoke spirits of the dead*, भुतें उठविणें. *To evoke a feeling*, to produce a feeling. भावना उत्पन्न करणें.

Evolu'tion, *n.* (ईव्हलू'शन्)—the way in which simple forms of life, by slow changes, grow into other higher forms of life, development. उत्क्रान्ति, विकास, परिणति. *Evolu'tional, Evolu'tionary, aa.*; *Evolu'tionism, n.*; *Evolu'tionist, n.* उत्क्रांतिवादी, उत्क्रान्तितत्त्व खरें मानणारा.

Evolve', *v. t. & i.* (इव्हॉ'ल्व्ह्)—to unfold, to open out; to set forth in order; to develop by natural process. उघड करणें ; अनुक्रमानें पुढें मांडणें ; निसर्गरीत्या वाढणें.

Ewe, *n.* (यू)—a female sheep. मेंढी.

Ew'er, *n.* (यू'अर्)—a pitcher, a water-jug, a large water-pot with handle. घडा, खुजा.

Exa̋'cerbāte, *v. t.* (एक्सॅ'सर्बेट्)—to cause bitterness of feeling to increase, to aggravate, to irritate. चिडवणें, चीड आणणें. *Exacerba'tion, n.*

Exa̋ct, *a.* (एग्झॅ'क्ट्)—precise, accurate, strictly correct. अगदीं बरोबर, तंतोतंत. *v. t.* to enforce payment of (fees, obedience). बळजबरीनें (कोणतीहि गोष्ट) करून घेणें, वसूल करणें, निघेल तितकें काढून घेणें. *Exac'tion, n.* जुलूम, जबरदस्ती, बळजबरी, बळजबरीनें घेणें.

Exa̋ct'ing, *a.* (इग्झॅ'क्टिंग्)—demanding much work or care. कडक, करडा, जास्तींत जास्त काम करून घेणारा.

Exa̋c'titūde, *n.* (इग्झॅ'क्टिट्यूड्)—exactness, great care in being correct. तंतोतंतपणा, अगदीं बरोबर असण्याची मोठी काळजी.

Exa̋ct'ly̆, *adv.* (इग्झॅ'क्ट्लि)—quite so, precisely, accurately, correctly. अगदीं तसेंच, अगदीं बरोबर.

Exa̋'ggerāte, *v. t.* (इग्झॅ'जरेट्)—to carry beyond truth; to overstate. तिखटमीठ लावून सांगणें; अतिशयोक्ति करणें. *Exaggera'tion, n.* overstatement. अतिशयोक्ति. *Exa'ggerator, n.* अतिशयोक्ति करणारा. *Exa'ggerative, a.* अतिशयोक्तिपूर्ण.

Exalt', *v. t.* (इग्झॉ'ल्ट्)—to raise in rank or power; to magnify, to praise, to extol. पदवीनें किंवा सामर्थ्यानें वाढविणें, मोठ्या पदास चढविणें; स्तुति करणें, प्रशंसा करणें.

Exaltā'tion, *n.* (एक्सॉल्टे'शन्)—a state of great excitement and of pleasure, elation, rapture. उच्चता, अत्यानंद.

Exalt'ed, *a.* (एग्झॉ'ल्टिड्)—high, noble. उच्च, उदात्त, उन्नत.

Exa̋mĭnā'tion, *n.* (इग्झॅमिने'शन्)—minute inspection; testing of knowledge or ability by questions. बारीक सारीक तपासणी; परीक्षा, शोध.

Exa̋m'ĭne, *v. t. & i.* (इग्झॅ'मिन्)—to investigate or inquire *into*; to test proficiency of (pupils) by questions. बारीक सारीक पूर्ण चौकशी करणें; परीक्षा घेणें. *Exam'iner, n.* परीक्षक. *Examinee', n.* a person examined. परीक्षा देणारा, परीक्षेस बसणारा.

Exa̋m'ple, *n.* (इग्झा'म्पल्)—a thing illustrating general rule; a model, a pattern; a specimen; a precedent. उदाहरण; कित्ता; नमुना; मागील दाखला, दृष्टान्त. *To set a good example,* to behave so well that others may perhaps do the same. कित्ता घालून देणें. *To make an example of,* to punish in such a way that others may be afraid to act in the same way. दुसऱ्यावर जरब बसण्याकरितां कडक शिक्षा देणें.

Exa̋s'perāte, *v. t.* (एग्झॅ'स्परेट्)—to irritate (a person); to aggravate (pain). खिजवणें; चेतवणें; प्रक्षुब्ध करणें. *Exaspera'tion, n.* चिथावणी, चेव. *Exas'perator, n.* चिथावणी देणारा. *Exas'perated, pa. p.* क्षुब्ध, क्रुद्ध, त्रस्त.

Ex'cavāte, *v. t.* (ए'क्स् कव्हेट्)—to hollow out; to remove soil by digging, to dig. पोखरणें; खणून टाकणें. *Excava'tion, n.*; *Ex'cavator, n.*

Exceed', *v. t. & i.* (इक्सी'ड्)—to be greater than, to go beyond what is necessary or allowed; to be pre-eminent. अधिक होणें, मर्यादेपलीकडे जाणें; मागें टाकणें, चढ करणें.

Exceed'ingly̆, *adv.* (इक्सी'डिंग् लि)—very, very greatly. फार, अत्यंत.

Exce̋l', *v. t. & i.* (इक्से'ल्)—to go beyond, to surpass; to be pre eminent. मागें टाकणें, वरचढ करणें; श्रेष्ठ असणें.

Ex'cellence, *n.* (ए'क्सलन्स्)—great merit. मोठा सद्गुण.

Ex'cellency̆, *n.* (ए'क्सलन्सि)–title of ambassadors, governors, & their wives. गव्हर्नर वगैरे अधिकाऱ्यांची पदवी.

Ex'cellent, *a.* (ए'क्सलन्ट्)—very good. अत्युत्कृष्ट.

Exce̋l'sior, *int.* (इक्से'ल्-सि-ऑर्)—let us try to go higher or do better. आपण वरचढ किंवा अधिक चांगले होऊं या!

Exce̋pt', *v. t. & i.* (इक्से'प्ट्)—to exclude (from general statement); to make objection against. वगळणें, अपवाद करणें; हरकत घेणें. *prep.* (*Excepting*) not including; but. खेरीज करून, शिवाय. *conj.* unless. असें नाहीं तर, शिवाय.

Exce̋p'tion, *n.* (इक्से'प्शन्)—excepting; thing or case excepted; objection; slight anger or resentment. वगळलेली वस्तु; अडथळा, अपवाद; रोष. *To take exception to,* to object to, to disagree with, to be angry at. हरकत घेणें, रागावणें. *With the exception of,* except. शिवाय, खेरीज करून.

Exce̋p'tional, *a.* (इक्से'प्शनल्)— forming an exception; unusual, better than usual. अपवादात्मक; असाधारण, विशेष, अलौकिक.

Excerpt', *v. t.* (इक्स'र्प्ट्)—to extract, to quote (a passage from a book). पुस्तकांतील उतारा घेणें. *n.* a short interesting passage taken out of a book. (पुस्तकांतील) उतारा, वेंचा. *-ion, n.*

Excĕss', *n.* (इक्से'स्)—the fact of exceeding; the amount by which a thing exceeds; unreasonable indulgence. अतिशय; वाजवीहून अधिक; अतिरेक, बेसुमारपणा. *Excesses*, too much eating and drinking. खाण्याचा किंवा पिण्याचा अतिरेक. *In excess of*, more than. ० च्या पेक्षां अधिक, जास्त.

Excĕss'ive, *a.* (इक्से'सिव्ह्)—overmuch, immoderate. अतिशय, फाजील, बेसुमार, कमालीचा.

Exchānge', *n.* (इक्स्चें'ज्)—giving one thing and receiving another in its place; the mode of settling debts without use of money; the building where merchants assemble for trade. अदलाबदल; हुंडी; सराफबाजार. *v. t. & i.* to give something and receive something else for it, to give in exchange; to interchange. अदलाबदल करणें, विनिमय करणें; आपसांत बदलणें. *Exchan'geable*, *a.* capable of being exchanged. अदलाबदल करतां येण्याजोगा. *Exchangeabi'lity*, *n.*

Exchĕq'uer, *n.* (एक्स्चे'कर्)—national treasury; money of private persons. राष्ट्रीय खजिना; खाजगी द्रव्य.

Excīse', *v. t.* (एक्सा'इझ्)—to cut out or off. तोडून टाकणें, कापून निराळा करणें, कापणें.

Excĭ'sion, *n.* (एक्सि'झन्)—the act of cutting out or off; a part cut out. कापून काढणें छेदन; कापून काढलेला भाग. [L. *ex*, out & *caedere*, to cut]

Excīse', *n.* (एक्सा'इझ्)—duty charged on certain home goods, such as wine and strong drink. देशी मालावर ठेवलेला कर, अन्तर्गत मालावरील जकात.

Excī'table, *a.* (एक्सा'इ-टेबल्)—capable of being excited, easily stirred up. उत्तेजनीय, शीघ्रकोपी, चिडखोर.

Excitā'tion, *n.* (एक्साइ-टे'शन्)—exciting, rousing; stimulation. उत्तजन, संताप; उद्दीपन.

Excīte', *v. t.* (इक्सा'इट्)—to set in motion; to stir up; to stimulate to activity; to move to strong emotion. जागृत करणें; चेतविणें; उत्पन्न करणें; उद्दीपित करणें.

Excīte'mĕnt, *n.* (इक्सा'इट्-मेन्ट्)—agitation; excited state of mind. खळबळ; क्षुब्ध मनःस्थिति, मनःक्षोभ.

Exclaim', *v. i. & t* (एक्स्क्ले'म्)—to cry out suddenly, to utter with vehemence, to shout. मोठ्यानें ओरडून बोलणें, उद्गारणें.

Exclamā'tion, *n.* (एक्स्क्लमे'शन्)—a loud utterance, a vehement outcry; clamour. ओरड, आवेशयुक्त उद्गार.

Exclude', *v. t.* (इक्स्क्लू'ड्)—to shut out; to make impossible, to preclude. आंत येऊं न देणें; अशक्य करणें, प्रतिबंध करणें.

Exclu'sion, *n.* (एक्स्क्लू'झन्)—act of shutting out or rejecting. बहिष्कृति, अन्तर्भाव न करणें.

Exclus'ive, *a.* (एक्स्क्लू'झिव्ह्)—excluding; not inclusive; kept for a special class. सोडून; न धरतां, विशेष, केवळ; विशेष वर्गाकरितां असलेलें.

Excŏ'gitāte, *v. t.* (एक्स्-कॉ'जिटेट्)—to think out, to devise. विचार करून योजणें, कल्पना शोधून काढणें. *Excogita'tion*, *n.*; *Excogita'tor*, *n.*

Excommū'nĭcāte, *v. t.* (एक्स्कम्यू'निकेट्)—to cut off from a community, to put out of group; to take away the special rights of a member of the Christian Church. बहिष्कार घालणें, वाळींत टाकणें; धर्मांतून घालवून देणें, काढून टाकणें. *Excommunica'tion*, *n.* धर्मबहिष्कार, वाळींत टाकणें. *Excommu'nicator*, *n.*; *Excommun'icative*, *a.*; *Excommu'nicatory*, *a.* बहिष्कारासंबंधीं.

Ex'crēment, *n.* (ए'क्स्-क्रिमन्ट्)—waste matter discharged from bowels, dung, (*often pl.*). अन्नमल, मळ, विष्ठा; शेण. *-al*, *-i'tious*, *aa.* विष्ठेसंबंधीं, अन्नमलविषयक, किट्टरूप.

Excrĕs'cence, *n.* (इक्स्क्रे'सन्स्)—an abnormal or morbid outgrowth on animal or vegetable body; (fig.) an incumbrance. (मांस-) वृद्धि, अवाळू, चामखीळ, गंड, गुंज, बांडगूळ; नड, पीडा, ब्याद. *Excrescen'tial*, *a.*

Excrĕs'cent, *a.* (इक्स्क्रे'सन्ट्)—growing abnormally; redundant. (निरुपयोगी) जास्ती वाढणारा; अनावश्यक, फाजील.

Excrē'ta, *n.* (एक्स्क्री'टा)—(*pl.*) waste thrown out from body. (शरीरांतून बाहेर टाकला गेलेला) मळ, मलमूत्र, विष्ठा, किट्ट.

Excrēte', *v. t.* (एक्स्क्री'ट्)—(of animals or plants) separate and expel from system (waste matters etc.) विसर्जन करणें, बाहेर टाकणें, मलमूत्र विसर्जन करणें, उत्सर्ग करणें, हगणें. *-tion*, *n.*; *-tive*, *-tory*, *aa.* उत्सर्जक, (मल-मूत्र-) विसर्जक.

Excru'ciāte, *v. t.* (इक्स्क्रू'शिएट्)—to pain acutely (person's senses; esp. in *part.* as *adj*); torture mentally. यातना,-तीव्र वेदना-होणें; हाल करणें, पीडा देणें. *-ting*, *a.* यातनाकारक, अति वेदनांचा, प्राणहर. *-tingly*, *adv.*; *-tion*, *n.* (-शिएशन्) यातना, पीडा, दुःख.

Ex'cŭlpāte, *v. t.* (ए'क्स्कल्पेट्)—to clear *from* imputation, to regard as innocent. निर्दोषी ठरविणें, दोषमुक्त करणें. *-tion*, *n.*; *-tory*, *a.*

Excur'rent, *a.* (एक्स्कु'रन्ट्)—running out; (Bot.) projecting. बाहेर धांवणारा,-पसरणारा; (of blood) धमनीचा; बहिर्वाहक; ऊर्ध्ववर्धक (उ॰ पोपयींचें झाड).

Excur'sion, *n.* (एक्स्कर्'शन्)—a short journey or trip taken for pleasure; ramble (fig.); a sally; (Astr.) deviation from regular path. (करमणुकीसाठीं केलेली) छोटी सफर. सहल. फेरफटका, पर्यटन. विपर्यांतर, चक्कर्ण; स्वारी. हल्ला. चाल; नेहमींच्या भ्रमणमार्गापासून दूर जाणें. *Excursion train,* (कमी दराच्या तिकिटांत) सफरीची (आग॰) गाडी. *Excur'sionist,* सफरी. सहल करणारा. *Excur'sional, Excursion'-ary, aa.*

Excur'sive, *a.* (इक्स्कु'र्सिव्ह)—digressive. भटकणारा. बहकणारा. स्वैरगामी. *-ly, adv.; -ness, n.*

Excurs'us, *n.* (इक्स्कु'र्सस्)—(*pl. -uses*) detailed discussion of the special point in a book, esp in appendix. परिशिष्ट. पुरवणी.

Excuse', *v. t.* (इक्स्क्यू'झ्)—to lessen blame; to forgive; to grant exemption to. सबब सांगणें; क्षमा करणें. माफी करणें. माफी देणें. गय करणें; मोकळीक देणें. *n.* (-स्) an apology; exculpation. माफी. कारण. सबब; सोडवणूक. मुक्तता. *-s'able a.* क्षमार्ह. *-'satory, a.* दोषनिवारक.

Ex'eat, *n* (ए'क्सिॲट्)—(in schools etc) leave of absence. रजा. तात्पुरत्या रजेची परवानगी.

Ex'ecrable, *a.* (ए'क्सिक्रबल्)—abominable. अतिनिंद्य. दुष्ट. तिरस्करणीय. *-ly, adv.*

Ex'ecrate, *v. t. & i.* (ए'क्सिक्रेट्)—to express or feel abhorrence for; utter curses. तिरस्कार दाखविणें. -वाटणें; शाप देणें. *-tion, n., -tive, a., -tory, a & n.*

Exec'utant, *n.* (इग्झे'क्युटन्ट्)—a performer (esp. of music). बजवय्या. वाजवणारा.

Ex'ecute, *v. t.* (ए'क्सिक्यूट्)—to carry out; to perform; to put to death. सिद्ध करणें. बजावणें. अमलांत आणणें. पुर करणें; छेडणें. गाऊन दाखवणें; देहान्त शासन करणें. शिरच्छेद करणें. *-table, a.*

Execu'tion, *n.* (एक्सिक्यू'शन्)—executing; skill in performing music; destructive work; seizure of goods for debt; capital punishment. बजावणें. अमलांत आणणें. संपादन. साधणूक; वाजवण्याचें कौशल्य. हातोटी; (हल्याराची) मारक शक्ति नाश; कर्जासाठीं (मालमत्तेची) जप्ति. (कोर्टाच्या हुकमाची) बजावणी; देहांत शिक्षा. *-er, n* शिरच्छेद करणारा. मांग.

Exec'utive, *a.* (एग्झे'क्यूटिव्ह्)—concerned with execution esp. of laws and sentences. कायदे वगैरे अमलांत आणणारें; शासनविषयक. *n.* executive branch of government or of a society. राज्यसूत्रें हालविणारें मंडळ; अंमलबजावणी करणारे अधिकारी. नियामक मंडळ. *The E.,* (U. S.) संस्थानचा गव्हर्नर. सं. संस्थानांचा अध्यक्ष.

Exec'utor, *n.* (इग्झे'क्यूटर्)—a person appointed by testator to execute his will. मृत्युपत्रांत लिहिल्याप्रमाणें व्यवस्था करणारा. मृत्युपत्रव्यवस्थापक; (ए'क्सिक्यूटर्) करणारा. बजावणारा.

Exege'sis, *n* (एक्सिजी'सिस्)—exposition, esp. of scripture. (धर्मशास्त्र-) स्पष्टीकरण. विवरण. *Exeget'ic (al), aa.; -ically, adv.*

Exem'plar, *n.* (इग्झे'म्प्लर्)—a model, type. कित्ता. नमुना.

Exem'plary, *a.* (इग्झे'म्प्लरि)—fit to be imitated; serving as example. अनुकरणीय; कित्ता घेण्याजोगा; दृष्टान्तादाखल; (Law) वृहशत.-जरब. बसविण्याजोगा.

Exem'plify, *v. t.* (इग्झे'म्प्लिफाय्)—to give or be an example of; to copy. उदाहरण देणें किंवा असणें, उदाहरणानें दाखविणें; नक्कल करणें. *-fication, n.*

Exempt', *a.* (इग्झे'म्प्ट्)-free (from), not subject. मुक्त. माफ. मोकळा. *v. t.* to make exempt. माफ करणें, कर वगैरे न घेणें.

Exemp'tion, *n.* (इग्झे'म्प्शन्)—being exempt, freedom, immunity, privilege. माफी. मोकळीक. सवलत. सोडवणूक. वर्जन.

Ex'equies, *n. pl.* (ए'क्सिक्विझ्)—funeral rites. क्रिया. उत्तरकार्य. और्ध्वदेहिक. अंत्यसंस्कार.

Ex'ercise, *n.* (ए'क्सर्साइझ्)—employment (of faculties, &c.); practice; use of limbs (in walking &c.); (task set for) bodily or mental training; (*pl.*) military drill, athletics, etc.; composition set to pupils; act of worship; (*U. S.*) formal programme of events. उपयोग करणें. चालवणें; सराव. अभ्यास. तालीम. मेहनत. व्यायाम; कसरत; लष्करी कवाईत; धडा. पाठ; अनुष्ठान. आचरण; (ठरविलेला) कार्यक्रम. *v. t. & i.* to use; to give exercise to; to take exercise; to perplex, to worry. उपयोग करणें; व्यायाम देणें; विचार करावयास लावणें; व्यायाम घेणें; काळजी किंवा हुरहूर लागणें. छळणूक करणें. *-sable, a.*

Exert', *v. t.* (इग्झ'र्ट्)—to exercise; to bring to bear; to put forth. उपयोग करणें; कामीं लावणें; झटणें; चढवून आणणें; करणें; खर्च करणें. *To e. oneself,* strive (*to* do, *for* a thing). मेहनत करणें.-घेणें. झटणें. *-ion, n.* परिश्रम. प्रयत्न. प्रयास.

Exert'ion, *n.* (एग्झ'र्शन्)—an effort. उद्योग, प्रयत्न.

Ex'eunt, *v. i.* (ए'क्सिअन्ट्)—(stage direction) they leave the stage पडद्यांत जातात. *E. omnes*, सर्व पात्रें पडद्यांत जातात. [L.=they go out]

Exfo'liate, *v. i.* (एक्स्फो'लिएट्)—to come off in scales or layers. (साल, त्वचा यांचे) कळपे गळून पडणें, (झाडांचे,-सालींचे) कळपे-तुकडे-उडून जाणें.-*tion*, *n.*

Exhala'tion, *n.* (एक्सले'शन्)—evaporation ; puff of breath ; short burst (of anger etc.) ; mist, vapour. वाफ होऊन जाणें ; उच्छ्वास ; (रागाचा) उष्ण श्वास ; बाष्प, धूम.

Exhale', *v. t. & i.* (एक्स्हे'ल्)—to give off or be given off in vapour ; to breathe out. वाफ काढून सोडणें, वाफ होऊन जाणें, उडून जाणें; श्वास बाहेर टाकणें, उच्छ्वास करणें

Exhaust', *v. t.* (इग्झॉ'स्ट्)—to draw off ; to consume, to use up ; to empty of contents ; to tire out. काढून टाकणें ; खर्चणें, फडशा करणें ; रिकामा करणें ; वायु-शून्य, -निर्वात, करणें ; दमवणें, शिणविणें, भागवणें. *n.* a passage for exit of used steam etc. ; process of exhausting vessel of air. श्रान्त बाष्प ; पात्रांतून हवा बाहेर काढून टाकण्याची पद्धति. -*ibility*, *n.* ;-*ible*, *a.* थकवून टाकतां येण्यासारखा.

Exhaus'tion, *n.* (इग्झॉ'स्शन्)—exhausting ; total loss of strength ; arrival at a conclusion by eliminating alternatives. संपवून टाकणें, रिकामा करणें ; भागवटा, ग्लानि, क्षीणता ; (पर्यायांचा पूर्ण विचार करून) निश्चय करणें, ठाम मत बनविणें.

Exhaus'tive, *a.* (इग्झॉ'स्टिव्ह्)—tending to exhaust; comprehensive. थकवणारा ; परिपूर्ण, सर्वग्राही, निःशेष.-*ly*, adv. ;-*ness*, *n.*

Exhib'it, *v. t.* (इग्झि'बिट्)—to display ; to manifest ; to show publicly. दाखविणें, (निशाणी,-दाखला) सादर करणें, पुढें ठेवणें, प्रकट करणें ; प्रदर्शनांत मांडणें,-ठेवणें. *n.* a thing exhibited. प्रदर्शनांतील वस्तु, वस्तुसंग्रह ; (Law) निशाणी, दाखला, लेख.

Exhibi'tion, *n.* (एक्सिबि'शन्)—show, display ; any public show (of works of art, etc.) ; fixed sum given to student for term of years. दाखविणें ; प्रदर्शन, देखावा ; विद्यार्थ्यास मिळणारें वेतन, शिष्यवृत्ति. *To make an e. of oneself*, behave so as to be laughed at. (मूर्खासारखें वागून) स्वतःचें हंसें करून घेणें. *The Great E.*, first e. on a large scale, London, 1851. लंडनमधील पहिलें मोठें प्रदर्शन. *Exhibi'tioner*, *n.* a student holding an exhibition. नेमणूक असलेला विद्यार्थी, शिष्यवृत्ति धारण करणारा.

Exhib'itor, *n.* (इग्झि'बिटर्), प्रदर्शनांत वस्तू ठेवणारा. *Exhibi'tionism*, *n.* देखावा, -भपका-करण्याची प्रवृत्ति ; शरीरावयव उघडे करून दाख-विण्याचें वेड.

Exhil'arate, *v. t.* (इग्झि'लरेट्)—to enliven, to make cheerful, to make glad or joyous. उल्हसित किंवा आनंदी करणें, उल्हास आणणें, (चें) मनरंजन करणें.-*tion*, *n.* आनंद देणें ; संतोष, उल्हास, आनंदवृत्ति.-*tive*, *a.* ; *Exhil'arant*, *a.* & *n.* उल्हासजनक, आनंददायक (वस्तु इ.).

Exhort', *v. t.* (इग्झॉ'र्ट्)-to admonish earnestly ; urge to action ; advocate. आग्रहानें उपदेश करणें, प्रवृत्त करणें, बजावणें ; बळविणें ; पुरस्कार करणें, प्रोत्साहन देणें. -*ative*, -*atory*, *aa.*

Exhorta'tion, *nn.* (एक्सॉर्टे'शन्)—admonition, good advice, homily, counsel. सांगी, कान-उघडणी, आग्रहाचा उपदेश, प्रबोधन, जागृति, प्रोत्साहन.

Exhume', *v. t.* (एक्स्ह्यू'म्)—to disinter, dig out (lit. & fig.). (पुरलेलें) उकरून बाहेर काढणें, खणून काढणें, उकरून काढणें.-*mation*, *n.* उकरणें, उत्खनन. (L. *ex.* out of ; *humus*, ground]

Ex'igence, -*cy*, *n.* (ए'क्सि-जन्स् -न्सि)—an urgent need. जरूरी, गरज, ओढ, तारांबळ, अडचण, पंचाईत, आणीबाणीचा प्रसंग, आपत्ति.

Ex'igent, *a.* (ए'क्सिजन्ट्)—urgent ; exacting. निकडीचा, तातडीचा ; ताणाताणीचा, गरजेचा.

Ex'igible, *a.* (ए'क्सिजिबल्)-that may be exacted, (*against*, *from*, person). काढून घेण्याजोगा, वसूल करण्याजोगा.

Exig'uous, *a.* (एक्सि'ग्यूअस्)—scanty, small. तुटपुंजा, लहान, अल्प. *Exigu'ity*, *n.*

Ex'ile, *n.* (ए'क्साइल्)—penal banishment ; long absence from one's country ; a banished person. हद्दपारी ; देशत्याग ; हद्दपार केलेला,-दूरदेशीं गेलेला मनुष्य. *v. t.* to banish, to drive from one's country. हद्दपार करणें.

Exist', *v t.* (इग्झि'स्ट्)—to be, to have being ; to live, to sustain life. चालू राहणें, अस्तित्वांत असणें, जिवंत असणें,-राहणें. -*ent*, *a.* जिवंत असणारा, विद्यमान, चालू.

Exis'tence, *n.* (इग्झि'स्टन्स्)—fact or mode of living ; all that exists. अस्तित्व, चालू स्थिति ; आयुष्य, जीवित; अस्तित्वांत असलेलें सर्व, प्राणी, विद्यमान वस्तु. *In e.*, विद्यमान,-अस्तित्वांत,-चालू असलेला. *Existen'tial*, *a.*

Ex'it, *n.* (ए'क्सिट्)—going out ; way out ; departure ; death. बाहेर जाणें ; बाहेर जाण्याचा रस्ता ; पडद्याआड जाणें, निर्गमन, निष्क्रमण ; मरण.

v. i. (pl. *exeunt,* ए'ग्झिअन्ट्). (stage direction) goes off stage. पडद्यांत जातो, निष्कान्त (होतो).

Ex li'bris, *n.* (एक्स् ला'इब्रिस्)—a book-plate. पुस्तकावरील नांवाची चिठी,-खूण. [L = from library]

Ex'ŏdŭs, *n.* (ए'क्सोडस्)—departure. बाहेर जाणें, निर्गत, निर्गमन.

Ex offi'cio, *adv. & a.* (एक्स् अफि'शिओ)—in virtue of one's office. अधिकारसंबंधीं, हुद्यामुळें करावयाचा,-झालेला अधिकार-परत्वें, हुद्याच्या नात्यानें.

Exŏg'amy̆, *n.* (एग्झॉ'गमि)—custom compelling a man to marry outside his tribe. असगोत्र विवाह (चाल). *Exog'amous, a.*

Exo'genous, *a.* (एक्सॉ'जिनस्)—(Bot.) growing outside. बाह्यवर्धक (झाड, उ० आंबा, फणस).

Exŏn'erāte, *v. t.* (इग्झॉ'नरेट्)—to free from blame; to exculpate; release (from duty). दोषमुक्त करणें; दोष उडवणें, जबाबदारींतून मुक्त करणें.*-tion, n.*

Exŏrb'ĭtant, *a.* (इग्झॉ'अर्बिटन्ट्)-grossly excessive; extravagant, enormous. बेसुमार; अमर्याद भारी, कमालीचा, अनियमित *-nce, n.;-ly, adv.*

Ex'ŏrcīze, *v. t.* (ए'क्सॉअर्साइझ्)—to expel (evil spirit) by invocation &c. भूत घालवून देणें, भूतबाधा नाहींशी करणें. *-ism, n.; -ist, n.* पंचाक्षरी, मांत्रिक.

Exŏrd'ĭŭm, *n.* (एक्सॉ'अर्डिअम्)—an introductory part of a discourse or treatise. उपोद्घात, उपन्यास, आरंभ *Exord'ial, a.*

Exotĕ'rĭc, *a.* (एक्सटे'रिक्)—(of doctrines etc.) intelligible to outsiders; (of disciples) not admitted to esoteric teaching; ordinary, popular. सार्वजनिक, उत्तान; रहस्यबाह्य. गुह्योपदेशबाह्य (शिष्य): सामान्य, सुलभ. *Exote'rics, n. pl.* ॲरिस्टाटलचीं जाहीर व्याख्यानें.

Exŏt'ĭc, *a.* (इग्झॉ'टिक्)—introduced from abroad. परदेशी, विलायती. *n.* परदेशी-विलायती-झाड, चालरीत, इ.

Expănd', *v. t. & i.* (इक्स्पॅ'न्ड्)—to spread out; to develop *into*; to increase, swell in bulk, become genial. पसरणें, विस्तारणें; वाढवणें, लांबवणें, विस्तार करणें, (Math.) विस्तार करणें; मोठा करणें, वाढणें, खुलणें, उमलणें. [L. *ex*, out; *pandere pans*, spread]

Expănse', *n.* (इक्स्पॅ'न्स्)—wide area or extent; expansion. मोठा विस्तार, सपाटी, तळपट, अवाढव्य मैदान; विस्तार. *-sible, a.* पसरतां येण्याजोगा, प्रसारणीय. *-sibility, n.* प्रसरणशीलता.

Expăn'sĭle, *a.* (इक्स्पॅ'न्साइल्, -सिल्)—(capable) of expansion. प्रसरणाचा, विस्तारयोग्य.

Expăn'sion, *n.* (इक्स्पॅ'न्शन्)—the act of expanding; space; (Com.) extension of transactions; increase in bulk of steam in the cylinder of an engine. पसरणें; फैलाव, वृद्धि; अवकाश, जागा; (देवघेवीचा, व्यापाराचा) फैलाव, वृद्धि. (Math.) विस्तार, विस्तृत रूप; (इंजिनाच्या नळकांड्यांतील) वाफेच्या परिमाणाची वाढ. *E. of the currency,* चलनी नाण्यांची-चलनाची वाढ,-वृद्धि, चलनवृद्धि. *-ist, n.* चलनवृद्धीचा पुरस्कर्ता. *Triple-e. engine,* तीन नळकांड्यांतून वाफ पसरणारें यंत्र. *Cubical e*, घनप्रसरण.

Expăn'sĭve, *a.* (इक्स्पॅ'न्सिव्ह्)—able or tending to expand; extensive; genial; comprehensive. प्रसारशील, प्रसरणशील; विस्तृत; सौम्य; व्यापक. *-ly, adv.; -ness, n.; -vity, n* प्रसरणशीलता.

Ex part'ē, *adv & a.* (एक्स् पा र्टि)—(Law) on or in the interest of one side only; (*a exp.*) made thus. एकपक्षी, एकतर्फी; एकतर्फी केलेलें. *An ex.-p. statement,* एकतर्फी विधान. [L]

Expā'tiāte, *v. i.* (इक्स्पे'शिएट्)—to wander, to move at large, to speak or write copiously (on). वाहवत जाणें, चहकणें; विस्तारानें बोलणें किंवा लिहिणें, विषय वाढविणें, विस्तृत विवेचन करणें. *-tion, n.; -tory, a.*

Expăt'rĭāte, *v. i.* (इक्स्पॅ'ट्रिएट्)—to banish; (*reflex.*) emigrate; renounce citizenship. हद्दपार करणें, देशांतर करणें; नागरिकत्वाचे हक्क सोडणें. *-tion, n.* [L *ex*, out; *patria*, fatherland]

Expĕct', *v. t.* (इक्स्पे'क्ट्)—to reckon on, to anticipate; to look for; to suppose, think. अपेक्षा करणें; वाट पाहणें, मार्गप्रतीक्षा करणें; कल्पना करणें, अटकळ करणें. *-ancy, n.* अपेक्षा, अटकळ, संभव.

Expĕc'tant, *a.* (इक्स्पे'क्टन्ट्)—expecting (*of*); looking for; (Med) characterized by waiting for events; (Law) reversionary. अपेक्षा करणारा; वाट पाहणारा; अगदीं थोड्याच वेळां औषध देऊन रोग आपोआप बरा होऊं देणारी (चिकित्सा), परिणामापेक्षी; अन्यभोगोत्तरप्राप्य. *n* आशा करणारा, उमेदवार.

Expĕctā'tion, *n.* (एक्स्पेक्टे'शन्)—anticipation; what one expects; probability. अपेक्षा, अंदाज, अटकळ; अपेक्षित वस्तु; संभव; (*n. pl.*) वारसा हक्काचा संभव.

Expĕc'torant, *a. & n.* (इक्स्पे'क्टरन्ट्)—(medicine) which promotes expectoration. कफ पाडणारें, कफोद्गारक (औषध).

Expĕc'torāte, *v. t. & i.* (इक्स्पे'क्टरेट्)—to cough or spit out from chest or lungs. थुंकून टाकणें,

खोकून खोकून करून बाहेर पडणें, -पाडणें, उत्सर्ग करणें, थुंकणें. *-tion, n.*; *-tor, n.* [L. *ex*, & *pectus -oris*, breast]

Expē'dient, *a.* (एक्स्पी'डिअन्ट्)—suitable, advantageous, advisable; more politic than just. योग्य, लायक; उपयुक्त. *n.* contrivance, device. उपाय, युक्ति, साधन, सोय, तोड. *-nce, -ncy, nn.*; *-ly, adv.*

Ex'pedite, *v. t.* (ए'क्स्पिडाइट्)— to help on or facilitate the progress of, to dispatch, to hasten, to quicken, to accelerate. त्वरा करण्यास लावणें, पळत पाठवणें, त्वरित करणें, शीघ्रगतीनें उरकणें.

Expedi'tion, *n.* (एक्स्पिडि'शन्)— promptness, dispatch; (men, fleet, sent on) journey or voyage for some definite purpose. चपळाई, त्वरा, घाई, जलदी; आक्रमण, कूच, मोहीम, मोहिमेवर पाठविलेलें सैन्य, आरमार. *-ary, a.* स्वारीचा, मोहिमेसंबंधीं. *-ist, n.*

Expedi'tious, *a.* (एक्स् पिडि'शस्)—done or doing speedily; suited for speedy performance त्वरेनें केलेला, -करणारा, -होणारा; त्वरेचा, घाईचा, तातडीचा. *-ly, adv.*; *-ness, n.*

Expĕl', *v. t.* (इक्स्पे'ल्)—to throw out, to eject, to drive out, to force to leave. बाहेर घालवणें, हांकून देणें, काढून टाकणें. *Expel'lent, a.*

Expĕnd', *v. t.* (इक्स्पे'न्ड्)—to spend (money, time, care); to use up, to consume; (Naut.) wind spare rope round spar. खर्च किंवा व्यय करणें; खलास करणें, संपविणें; जादा दोरखंड गुंडाळून ठेवणें.

Expĕn'diture, *n.* (इक्स्पे'न्डिचर्)— expending; amount expended, disbursement. खर्च करणें; खर्च केलेली रक्कम, खर्च, व्यय.

Expense', *n.* (इक्स्पे'न्स्)—cost, charge. किंमत, खर्च, (*pl.*) खर्च, गुंतवलेला पैसा. *A laugh at his e.*, त्याचें हंसें होणें, त्याला हंसणें.

Expĕn'sive, *a.* (इक्स्पे'न्सिव्)—costly; extravagant. खर्चाचा, महाग, फार किंमतीचा; खर्चिक, उधळपट्टीचा. *-ly, adv.*; *-ness, n.*

Expēr'ience, *n.* (इक्स्पी'अरिअन्स्)—knowledge based on personal observation or contact; incident that affects one. अनुभव, स्वानुभव, प्रयोगपरीक्षा, प्रयोगज्ञान; प्रचीति, भोग. *v. t.* to find by experience, to suffer, to undergo. अनुभव घेणें, निदर्शनास येणें; सोसणें. *Experien'tial, a.* of experience. अनुभवाचा, अनुभवजन्य, प्रतीतीचा; *-ism, n.* अनुभवजन्य ज्ञानवाद.

Expēr'ienced, *a.* (इक्स्पी'अरिअन्स्ट्)—having got much experience; knowing. अनुभवलेला, अनुभवशीर, अनुभविक; ज्ञाता, वाकबगार.

Expĕ'riment, *n.* (इक्स्पे'रिमन्ट्)—procedure tried on the chance of success or as a test. पारख, अनुभव, परीक्षा, प्रयोग. *v. i.* (-मेन्ट्) to make an experiment (*on, with*). प्रयोग करून पाहणें, प्रयोग,-परीक्षा करणें. *-ation, n.*

Expĕrimĕn'tal, *a.* (इक्स्पेरिमे'न्टल्)—based on or done by way of experiment. प्रयोगासंबंधीं, अनुभवजन्य, प्रयोगात्मक, परीक्षात्मक *-ist, n.* प्रयोग करून,-अनुभव घेऊन,-पाहणारा. *-ize, v. t.* to try experiments. प्रयोग करून पाहणें.

Expert', *a.* (इक्स्प'र्ट्)—practised, skilful, (*at, in*). कुशल, प्रवीण, कसबी. *n.* (ए'क्स्पर्ट्), a person expert in a subject. अनुभवशीर, वाकबगार, -मनुष्य, चतुर पारखी.

Ex'piāte, *v. t.* (ए'क्स्पिएट्)—to pay the penalty of, to make amends for (sin). प्रायश्चित्त घेणें, पापक्षालन करणें, निस्तरणें. *-tion, n.* प्रायश्चित्त घेणें, प्रक्षालन, परिमार्जन. *-tor, n.* प्रायश्चित्त घेणारा, निस्तरणारा. *-tory, a.* परिमार्जक, प्रायश्चित्तात्मक. *Ex'piable, a.* प्रायश्चित्त घेण्याजोगें, परिमार्जनीय.

Expire', *v. i. & t.* (इक्स्पा'यर्)—to breathe out; to die; (of fire) to die out; (of period) to come to an end; (of law etc.) become void, or extinct. श्वास बाहेर सोडणें,-टाकणें; मरणें; विझणें; संपणें, शेवट किंवा अंत होणें, संपविणें; मुदत पुरी होणें,-संपणें. *Expira'tion, n.* (एक्स्पिरे'शन्), बाहेर सोडणें, उच्छ्वसन, निःश्वास; शेवट, अंत. *Expir'atory, n.* (इक्स्पा'इरटरि), उच्छ्वाससंबंधीं.

Expīr'y̆, *n.* (इक्स्पा'यरि)—termination, end. शेवट, अंत, समाप्ति, मुदत संपणें.

Expis'cāte, *v. t.* (एक्स्पि'स्केट्)—(Sc.) to find out by skilful means. (शिताफीनें, खुबीनें,) शोधून काढणें.

Explain', *v. t.* (इक्स्प्ले'न्)—to make known; to make intelligible; to account for (conduct etc.). समजावून सांगणें, विवरण करणें; उलगडा करणें, अर्थ स्पष्ट करणें; कारण सांगणें, जाब देणें. *To e. away*, to modify or do away with (esp. offensive language) by explanation. (लागट भाषेचा-शब्दांचा) खुलासा करणें,-स्पष्टीकरण करणें. *To e. oneself*, स्वतःचें म्हणणें अधिक स्पष्ट करून सांगणें, वागणुकीचा जाब देणें. *-able, a.* व्याख्येय, उलगडा करण्याजोगा. [L. *ex*, out; *planus*, flat]

Explanā'tion, *n.* (एक्स्प्ले'शन्)—statement or circumstance that explains. स्पष्टीकरण, विवरण, खुलासा करणारी गोष्ट, खुलासा, समजूत.

Explăn'atory̆, *a.* (इक्स्प्लॅ'नेटरि)-serving to explain. उलगडा करणारा, अर्थ स्पष्ट करणारा, विवरणात्मक, अर्थबोधक.

Exple'tive, *a.* & *n.* (एक्स्प्लि'टिव्ह्, इक्स्प्ली'टिव्ह्)—serving to fill out sentence &c. पादपूरण, वाक्यपूरक शब्द,-(शपथ).

Ex'plicable, *a.* (ए'क्स्प्लिकब्ल्)—explainable. समजण्यासारखा, व्याख्येय, अर्थ समजून सांगण्याजोगा.

Ex'plicate, *v. t.* (ए'क्स्प्लिकेट्)—to develop (idea, principle, etc.). विवरण करणें, उलगडा करणें. *-tive, -tory, a.* विवरणात्मक.

Expli'cit, *a.* (इक्स्प्लि'सिट्)—expressly stated; (of persons) outspoken, plain in language; definite. अगदीं स्पष्ट, उघड, स्वच्छ, बिनभानगडीचा; निर्भीड, स्पष्टवक्ता; ठराविक, निश्चित.

Explode', *v. i.* & *t.* (इक्स्प्लो'ड्)—to discredit; to go off with loud noise, to burst with a report and sudden violence. अपकीर्ति करणें, निरुपयोगी म्हणून धुडकावून लावणें; मोठा आवाज करून फुटणें, भडका होणें, स्फोट होणें.

Ex'ploit, *n.* (ए'क्स्प्लॉइट्)—a brilliant feat, a heroic act, a deed of renown. पराक्रम, शूर कृत्य, महत्कृत्य. *v. t.* (इक्स्-प्लॉ'इट्) to work (a mine etc); to utilize for one's own ends. उपयोगांत आणणें, चालू करणें; स्वार्थाकरितां अयोग्य रीतीनें नफा मिळविणें, अवास्तव उपयोग करणें. *-ation, n.; -able, a.* उपयोगी, फायदेशीर. *-age, n.*

Explore', *v. t.* (इक्स्प्लो'अर्)—to examine (country) by going through; examine (wound) by touch; to inquire into. शोध करणें, शोधून काढणें, संशोधन करणें; (जखम) स्पर्श करून तपासणें; तपास करणें,-लावणें. *-ration, n.* शोध, संशोधन; *-rative, a., -ratory, a.; Explor'er, n.* शोधक; शोध (लावण्याचें) साहित्य.

Explo'sion, *n.* (इक्स्प्लो'झन्)—going off with loud noise; outbreak (of anger). आवाज होऊन फुटणें; स्फोट, भडका, धडाका.

Explo'sive, *a.* (इक्स्प्लो'सिव्ह्)—tending to explode, readily exploding. स्फोटक (द्रव्य), दारू,-स्फोट होऊन उडणारा. *n.* an explosive agent or material. सुरंग, दारू, स्फोटक पदार्थ,-वस्तु,-द्रव्य. *-ly, adv., -ness, n., High e.* भयंकर स्फोटक वस्तु, -सुरंग, इ.

Expo'nent, *a.* & *n.* (इक्स्पो'नन्ट्)—(a person, thing) that explains or interprets; executant (of music etc.); a type, representative; algebraic symbol, index. द्योतक, निदर्शक (चिन्ह), उदाहरण, दाखला, निशाणी; (गाणें, वाद्य) गाणारा, वाजविणारा; (बीजगणितांत) घातचिन्ह, घात. *-ial, a.* घातप्रकारासंबंधीं; *n.* घातफल.

Export', *v. t.* (इक्स्पॉ'र्ट्)—to send goods to another country. (विक्रीसाठीं) माल दुसऱ्या देशांत पाठविणें, परदेशीं पाठविणें. *n.* (ए'क्स्पॉर्ट्) an exported article; (*usu. pl.*) the amount exported. परदेशीं (विक्रीसाठीं) पाठविलेली वस्तु, निर्यात माल, निर्गत माल, -व्यापार. *-ation, n.* परदेशीं माल पाठविणें, निर्यात; निर्यात माल. *-able, a. Export duty,* निर्यात मालावरील कर,-जकात.

Expose', *v. t.* (इक्स्पो'झ्)—to leave unprotected; to subject to (risk, criticism &c.); (Photog.) subject (plate) to light; exhibit for sale; disclose (secret), unmask (villain). उघडा टाकणें, उघड्यावर टाकणें, धोक्यांत घालणें, वश्य करणें; (फोटो०) चित्रपट (प्लेट) प्रकाशांत ठेवणें; विक्रीकरितां ठेवणें; उघडकीस आणणें, उघडा करणें, (बिंग) चव्हाट्यावर आणणें.

Expo'sé, *n.* (एक्स्पो'झे)—statement of facts; showing up (of a discreditable thing). वस्तुस्थितिनिदर्शन; उघडकीस आणणें, उघडीक. [F]

Exposi'tion, *n.* (एक्स्पोझि'शन्)— description, explanation; exhibition of goods; exposure. वर्णन, स्पष्टीकरण; प्रदर्शन; प्रकाशदर्शन, उघड्यावर ठेवणें.

Expos'itor, *n.* (इक्स्पॉ'झिटर्)—a person, thing, that expounds. टीकाकार, व्याख्याकार, विवरणकर्ता. *-y, a.* स्पष्टार्थबोधक, टीकात्मक. *Expos'itive, a.* वर्णनात्मक; स्पष्टार्थबोधक.

Ex post fac'to, *a.* (एक्स् पोस्ट् फॅ'क्टो)—(*-law*), retrospective. गुन्हा घडल्यानंतर त्या अपराधास शिक्षा देण्यासाठीं केलेला (कायदा). [L]

Expos'tulate, *v. i.* (इक्स्पॉ'स्ट्युलेट्)—to make (*esp.* friendly) remonstrance. कानउघाडणी करणें, समजुतीच्या चार गोष्टी सांगणें, निर्भीड उपदेश करणें. *-tion, n.* कानउघाडणी, खरमरीत उपदेश. *-tor, n.* कानउघाडणी करणारा. *-tory, a.* कानउघाडणीचा.

Expo'sure, *n.* (इक्स्पो'झर्)— being exposed, exposing (*to* air, cold etc.); abandoning; display; unmasking; an aspect. उघडा पडणें, -करणें, -टाकणें, (*Phot.*) उजेडांत ठेवणें, उजेड-प्रकाश देणें; त्याग, टाकून देणें; प्रदर्शन, मांडणावळ; उघडें करणें, उजेडांत आणणें; देखावा, दृश्य.

Expound', *v. t.* (इक्स्पा'उन्ड्)—to set forth in detail; to explain; to interpret. सविस्तर सांगणें; उघड किंवा स्पष्ट करणें; विवरण किंवा स्पष्टीकरण करणें (धर्मशास्त्राचें).

Express', *v. t* (इक्स्प्रे'स्)—to represent in words, to make known; squeeze out; omit; send by express. शब्दांनीं बोलून दाखविणें, व्यक्त करणें; विदित करणें, कळविणें; पिळून काढणें, बाहेर टाकणें; खास जासुदाबरोबर पाठविणें. *a.* definitely stated, explicit; meant for specia

purpose. स्पष्ट, उघड; खास. *n.* express train; messenger; an express rifle. जलद जाणारी आगगाडी; मुद्दाम पाठविलला जासूद; जलद गोळ्या सोडणारी बंदूक. *adv.* with speed. घाइनें, ताबडतोबीनें, जलदीनें. *E. train*, जलद गतीची आगगाडी. *E. delivery*, पत्राचा जलद बटवडा. *Express'ly, adv., Express'ible, a.* उच्चारणीय.

Expre̋'ssion, *n.* (इक्स्प्रे'शन्)—expressing; word, phrase; aspect of face; tone; style; (Alg.) collection of symbols expressing a quantity; (Art) mode of expressing character, etc.; (Mus.) execution that expresses the feeling. बोलणें, व्यक्त करणें, बोलून दाखविणें, पिळून काढणं; शब्द, शब्दसमूह; मुद्रा, चेहरा; बोलणें; बोलण्याची वगैरे (मनांत भरण्याजोगी) ढब; पदसमुच्चय, पदसंघात, पदावलि; मुद्रा, ठेवण; (भावना-) पारपोष, -उठाव. *-al, a.* अर्थसूचक, कल्पनासूचक, मुद्रेसंबंधीचा, शब्दसमूहाचा.*-less,a.*

Expre̋ss'ive, *a.* (इक्स्प्रे'सिव्ह्)—serving to express; significant. वाचक, बोधक; सूचक. *-ly, adv.*; *-ness, n.*

Expro̍'priate, *v. t.* (एक्स्प्रो'प्रिएट्)—to disposses, to take away. मालकी- ताबा- काढून घेणें.

Expŭl'sion, *n.* (इक्स्प'ल्शन्)—expelling, driving away by violence; banishment. काढून टाकणें, उच्चाटन; हद्दपारी.*-sive, a. & n.* (Med.) निष्कासक, निःसारक.

Expŭnge', *v. t.* (इक्स्प'न्ज्)—to remove, to omit. खोडून टाकणें, पुसून टाकणें, गाळणें, काट मारणें, नष्ट करणें. *Expunc'tion, n.* विलोप, नाश, रद्द करणें, पुसून टाकणें.

Ex'purgate, *v. t.* (ए'क्स्पर्गेट्)—to purge, purify; remove objectionable matter (from book etc.). शुद्ध करणें, सोवळा करणें; आक्षेपार्ह भाग गाळून-काढून टाकणें. *tion, n.* विशुद्धीकरण, शोधन.*-tor, n.* शुद्ध, पवित्र करणारा. *Ex'purgatory,-tor'ial, aa.* पावक, विशुद्धकारक.

Ex'quisite, *a.* (ए'क्स्-क्विझिट्)—of extreme beauty or delicacy; acute, keen. अत्युत्तम, फार नामी, सर्वोत्कृष्ट; पराकाष्ठेचा. अतिशय, चिकित्सक, सूक्ष्म-दृष्टीचा *n.* a coxcomb, a fop. नटवा, अक्कडबाज. *-ly, adv.* बहारीनें, सुंदरपणें, पराकाष्ठेचा.

Exsan'guine, *a.* (एक्स्सॅं'ङ्ग्विन्)—lacking blood. रक्तहीन, रक्तविरहित.*-nate, v. t.* to drain of blood. रक्त शोषून घेणें, रक्तहीन करणें.

Exscind', *v. t.* (इक्सि'न्ड्)—to cut off, excise. तोडून टाकणें, कापून निराळा करणें.

Exsert', *v. t.* (इक्स'र्ट्)—(Biol.) to put forth. बाहेर टाकणें.

Ex-ser'vice, *a.* (एक्स्-स'र्व्हिस्)—that has been formerly in fighting services. लष्करी-सेवानिवृत्त.

Ex'siccate, *v. t.* (ए'क्सिकेट्)—to dry up, drain, dry. कोरडा करणें, ओलावा नाहींसा करणें.

Ex'tant, *a.* (ए'क्स्टन्ट्, इक्स्टॅ'न्ट्)—still existing, in being, now subsisting. अद्याप अस्तित्वांत असलेला, वर्तमान, चालू, प्रचलित.

Exte̋m'pore, *adv. & a.* (इक्स्टे'म्पोरि)—without preparation, off-hand. तयारी न करतां, आयत्या वेळीं, आयत्या वेळचा, समयस्फूर्त *-ra'neous, -rary, aa.* प्रसंगीं सुचलेला, आयत्या वेळचा, समयस्फूर्त.

Exte̋m'porize, *v. t. & i.* (इक्स्टे'म्पराइझ्)—to compose, or produce, or speak extempore. आयत्यावेळीं रचणें,-तयार करणें,-बनविणें; पूर्वतयारी-विना-समयस्फूर्त-भाषण करणें.*-zation, n.*

Extĕnd', *v. t. & i.* (इक्स्टे'न्ड्)—to stretch out; to reach; to prolong; to enlarge; accord to; tax the powers of; (Law) value (land), seize (land) for debt. पसरणें; ०पर्यंत असणें; लांबविणें, पुढें ढकलणें; वाढविणें; लागू करणें, पुढें करणें; अर्पण करणें, देणें, दाखविणें; ताण पाडणें, -पडणें; (कर्जासाठीं) जमिनीची किंमत करणें, जमीन ताब्यांत घेणें. *Extend'ible, a.*; *Exten'sible, a.* पसरलेला, विस्तारित, विस्तार्य, प्रसार्य;*-bility, n.*

Exte̋'nsile, *a.* (इक्स्टे'न्साइल्,-न्सिल्)—that can be enlarged or stretched out. वाढवितां-लांबवितां-येण्याजोगा.

Extĕn'sion, *n.* (इक्स्टे'न्शन्)—extending; enlargement, additional part पसरणें; विस्तार, व्याप्ति; फैलाव; (Physics) प्रसरणशीलत्व, वितति; (Commerce) वाढवलेली मुदत.

Extĕn'sive, *a.* (इक्स्टे'न्सिव्ह्)—large, far-reaching, wide, comprehensive प्रशस्त, विशाल; लांबरुंद; व्यापक, पसाऱ्याचा *-ly, adv.*; *-ness, n.*

Extĕn'sor, *n.* (इक्स्टे'न्सर्)—(*-muscle*), a muscle that straightens a joint. वितानक,-प्रतानक-पेशी,-स्नायु.

Extĕnt', *n* (इक्स्टे'न्ट्)—space covered; large space or tract; size. विस्तार; विस्तृत जागा; आकार, मर्यादा, व्याप्ति; (Law) किंमत, आकार.

Extĕn'uate, *v. t.* (इक्स्टे'न्युएट्)—to lessen; to mitigate. कमी करणें, हलका करणें, सौम्य स्वरूप देणें, सबब सांगणें.*-tion, n.*; *-tor, n.*

Extēr'ior, *a.* (इक्स्टी'अरिअर्)—external, not interior, outer, outward. बाहेरचा, बाहेरील, बाह्य. *n.* बाह्य देखावा, बाह्यस्वरूप, बाह्यांग.

Exterm'inate, *v. t.* (इक्स्ट'र्मिनेट्)—to root out, to destroy utterly, to extirpate. समूळ उपटून टाकणें, निसंतान करणें, समूळ नाश करणें, अंत करणें.*-tion, n.*;*-tor, n.*

Extern'al, *a.* (इक्स्टर्'नल्)—outside; outward. बाहेरील, बाह्यदेशीय; बाह्य, दृश्य, आनुषंगिक. *n. pl.* non-essentials, outward features. अनावश्यक गाष्टी, अवांतर गोष्टी, बाह्यांग, बाह्यरूप. *Exter'nalism*, *n.* इंद्रियगोचरता; बाह्यवस्तुविज्ञानवाद *External'ity*, *n.* बाह्यता. *Externa'lly*, *adv.* बाहेरून, वरून, बाह्यतः.

Extern'alize, *v. t.* (इक्स्टर्'नलाइझ्)—to give, to attribute, external existence to. आकार,-रूप, देणें.

Exterritor'ial, *a.* (एक्स्टेरिटॉ'अरिअल्)—(of ambassadors etc.) free from the jurisdiction of the territory one resides in. प्रांतीय-देशीय-अंमलाबाहेरचा, देशीय कायद्यांस लागू न होणारा.

Extinct', *a.* (एक्स्टिंक्'ट्)—no longer burning, quenched; that has died out. मालवलेला, विझलेला, रूक्ष, निद्रिस्त; मयत, निर्वंश; लुप्त.

Extinc'tion, *n.* (इक्स्-टिं'क्शन्)—making or becoming extinct; wiping out (of debt); destruction. मालवणें, नाहींसा करणें, -होणें; (कर्ज) फेड; नाश, उच्छेद, विध्वंस. *Extinc'tive*, *a.*

Exting'uish, *v. t.* (एक्स्टिं'ग्विश्)—to put out, to quench; to obscure, eclipse; to wipe out (debt). मालवणें, शांतवणें; मागें टाकणें, वर ताण करणें; नाहींसें करणें; फेडणें. *-er*, *n.* a cap for extinguishing candle. मेणबत्ती विझविण्याची टोपी, -चें साधन. *-able*, *a.*; *-ment*, *n.* मालवणें, नाश, विध्वंस; (Law) अधिकारलोप, कर्तव्यलोप.

Ex'tirpāte, *v. t.* (ए'क्स्टर्पेट्)—to root out, to destroy utterly, to eradicate. उपटून टाकणें, समूळ नाहींसें करणें, निर्मूलन करणें, पाळेंमुळें खणून काढणें. *-tion*, *n.* उच्छेद, नाश, निर्मूलन. *-tor*, *n.* [L *ex*, out; *stirps*, stem, root]

Extŏl', *v. t.* (इक्स्टॉ'ल्)—to praise enthusiastically, to laud, to commend. मनापासून स्तुति करणें, वाखाणणें.

Extŏrt', *v. t.* (इक्स्टॉ'र्ट्)—to get by force, to exact by compulsion *(from)*. जबरीनें घेणें, पिळून काढणें, ओढून ताणून (अर्थ) लावणें. *-ive*, *a.*

Extŏr'tion, *n.* (इक्स्टॉ'र्शन्)—extorting (esp. of money); illegal exaction. बळजबरीनें घेणें, अन्यायानें बळकावणें, पिळून काढणें; बेकायदेशीर रीतीनें वसूल करणें. *-er*, *n.*; *-ate*, *a.* using, given to, extortion; (of prices) exhorbitant. अन्यायी, जुलमाचा, जुलमी; बेसुमार, भरमसाट (किंमती इ.)

Ex'tra, *a.* (ए'क्स्ट्रा)—beyond what is due, additional; larger, better, of superior quality. जास्त; अधिक, अधिक चांगला, अत्युत्तम, उत्कृष्ट. *adv.* more than usually; additionally. नेहमींपेक्षां जास्त; जादा, अधिक *n.* an extra thing; thing charged extra; (Crick.) a run not scored off bat. जादा वस्तु, जादा आकार पडणारी गोष्ट, -वस्तु; इतर धांव. *E. binding*, विशेष चांगल्या तऱ्हेची बांधणी. *E. special edition*, latest. (संध्याकाळच्या वर्तमानपत्राची) शेवटची -जादा -आवृत्ति.

Extrăct', *v. t.* (इक्स्ट्रॅ'क्ट्)—to take out; draw forth; to copy out, to quote; deduce, derive (principle, pleasure *from*); (Math.) find (root of a number). उपटून काढणें, उत्पाटन करणें, काढून घेणें; उतारा घेणें; उतारा काढणें, -देणें; मिळवणें, मिळविणें; (संख्येचें मूळ) काढणें. *n.* (ए'क्स्ट्रॅक्ट्)—essence; concentrated preparation; passage from book, &c. अर्क, सार, काढा, कषाय; वेंचा, सार, उद्धृत भाग. *-or*, *n.*; *-able*, *a.*

Extrăc'tion, *n.* (इक्स्ट्रॅ'क्शन्)—extracting; descent, lineage, origin, birth. काढणें, उपटणें; वंश, कुळ, जन्म, जाति. *Extrac'tive*, *a.* of extraction. बाहेर काढतां येण्यासारखा, निष्कर्षोपयोगी. *E. industries*, अर्क,-सार,-कषायोत्पादक उद्योगधंदा, -कारखाना.

Ex'tradite, *v. t.* (ए'क्स्ट्रडाइट्)—to give up fugitive foreign criminal. परदेशस्थ आरोपीला परत (त्या देशाच्या अधिकाऱ्यांकडे) करणें. *Extradi'table*, *a.* प्रत्यर्पणीय (आरोपी). *Extradi'tion*, *n.* आरोपीला परत करून देणें, -तद्देशीय अधिकाऱ्यांच्या हातीं देणें.

Extrajudi'cial, *a.* (एक्स्ट्राज्युडि'शल्)—not made in court; not legally authorized. अतिन्याय्य; कायदेशीररीत्या अनधिकृत.

Extramŭn'dāne, *a.* (एक्स्ट्रमन्'डेन्)—outside the world. इहलोकबाह्य, विश्वातीत.

Extramŭr'al, *a* (एक्स्ट्रम्यू'अरल्)—outside the walls of a town etc. शहराच्या तटबंदीच्या बाहेरचा.

Extrā'neous, *a.* (इक्स्ट्रे'निअस्)—of external origin; not naturally belonging; foreign. बाहेरचा; बाह्य; अनवश्यक, परकीय, विदेशीय, अप्रस्तुत. *-ly*, *adv.*; *-ness*, *n.*

Extra offi'cial, *a.* (एक्स्ट्र-ऑफि'शल्)—not pertaining to an office. अधिकारबाह्य.

Extraŏrd'inarў, *a.* (एक्स्ट्रॉ'र्डिनरि, एक्स्ट्रॉऑ'र्डिनरि)—out of usual course, specially employed; exceptional, surprising. विशेष, विलक्षण, विशिष्ट, मुद्दाम नेमलेला; लोकोत्तर, असाधारण. *n. pl.* सैन्याचें जादा वेतन. *-rily*, *adv.*

Extrăv'agance, *n.* (इक्स्ट्रॅ'व्हगन्स्)—extravagant expenditure; want of restraint. अपव्यय,

उधळपट्टी; अमर्यादितपणा, अतिक्रम, विलक्षणपणा, विचित्रपणा.

Extrăv'agant, *a.* (इक्स्ट्रॅ'व्हगन्ट्)—wild, absurd; (of price etc.) exhorbitant; profuse, wasteful. भरमसाट, अमर्याद; बेसुमार, कमालीचा; उधळा. खर्चिक, अपव्ययी.*-ly, adv.*

Extrăvagăn'za, *n.* (इक्स्ट्रॅव्हगॅ'न्झा)—fantastic composition (literary, musical, or dramatical), language, behaviour. विचित्र,-काल्पनिक, लिखाण,-भाषा,-वागणूक.

Extrăv'asāte, *v. t. & i.* (एक्स्ट्रॅ'व्हसेट्)—to force out(fluid etc.) from its vessel; flow out. (रक्त इ. द्रव पदार्थ वाहिन्यांतून) बाहेर झिरपणें,-टाकणें; बहिस्संचय करणें.*-tion, n.* [L. *extra*, out of, and *vas*, vessel]

Extrēme', *a.* (एक्स्ट्री'म्)—outermost, situated at the end, farthest from the centre; severe, stringent; last; going to great lengths अगदीं बाहेरचा, कडेचा, टोंकाचा, अग्रवर्ती; अति तीव्र, कडक; अखेरचा, निदानींचा, शेवटचा; जबर, परमावधीचा, पराकाष्ठेचा. *n.* thing at either end; extreme degree or measures; (Logic) either of the extreme terms of a syllogism; (Math.) first, last, term of a series or ratio. शेवटच्या टोंकावरील वस्तु; पराकाष्ठा, कळस, कडेलोट, हद्द; शेवटचें किंवा पहिलें पद; आद्यपद, अंत्यपद. *In e. danger*, पराकाष्ठेच्या संकटांत, धोक्यांत. *In the e.*, extremely. पराकाष्ठेचा, अतिशयच. *Avoid ee.*, 'अति सर्वत्र वर्जयेत्'. *The ee.*, संकटाचा, आणीबाणीचा,-प्रसंग. *To go to ee.*, *run to an e.*, take an e. course. अतिरेक करणें. निर्वाणीचा उपाय योजणें, अत्यंत कठोर-कडक-मार्ग अवलंबणें. *Extreme'ly, adv.* पराकाष्ठेचा, कमालीनें, अत्यंत. *Extreme'ness, n.*

Extrē'mĭst, *n.* (इक्स्ट्री'मिस्ट्)—an advocate of extreme measures. कळस करणारा, जहालमतवादी, जहालपक्षीय.*—mism, n.*

Extrĕm'ĭtȳ, *n.* (इक्स्ट्रे'मिटि)—extreme point, end; extreme distress; (usu. pl.) extreme measures. टोंक शेवट; दुःखाचा कळस, कठीण प्रसंग; शेवटचा उपाय. *The ee.*, hands and feet. हातपाय.

Ex'trĭcāte, *v. t.* (एʼक्स्ट्रिकेट्)—to disentangle, to release, to free from difficulties. सोडवणें, मुक्त करणें; (Chem.) पृथक् करणें.*-tor, n* ; *-tion, n.*

Extrĭn'sĭc, *a.* (एक्स्ट्रि'न्सिक्)—not inherent or intrinsic; extraneous, external, outward. बाहेरील, बाह्य; अंगचा नसलेला. *-ally, adv.*

Extrorse', *a.* (एक्स्ट्रॉ'र्स्)—(Bot.) facing outwards. बहिर्मुख.

Ex'trovert, *n.* (एʼक्स्ट्रव्हर्ट्)—(Psychol.) a person not given to introspection. अनात्मदर्शी, बहिर्दृष्टि मनुष्य, अन्तर्दृष्टि करून न पाहणारा.

Extrude', *v. t.* (इक्स्ट्रू'ड्)—to thrust out (from). बाहेर टाकणें,-काढणें, घालवून देणें. *Extru'sion, n.* हकालपट्टी, बहिर्निष्कासन;*-sive, a.*

Exu'berant, *a.* (इग्झ्यू'बरन्ट्)—luxuriant, prolific, effusive; plenteous, copious. पुष्कळ, अतिशय; विपुल, समृद्ध; अलंकारिक (भाषा), मनमुराद. *-nce, n.* भर, चंगळ, रेलचेल, समृद्धि, वैपुल्य, प्रकर्ष, उत्कर्ष. *-ly, adv.*

Exū'berate, *v. i.* (इग्झ्यू'बरेट्)—to abound; indulge *in.* विपुलता असणें: चंगळ असणें.

Exude', *v. i. & t.* (इग्झ्यू'ड्)—to ooze out (like sweat); to give off (moisture). ओघळणें; पाझरणें, गळणें, निचरणें; बाहेर टाकणें, निर्यासन करणें. *-da'tion, n.*; *-'dative, a.*

Exŭlt', *v. i.* (इग्झ'ल्ट्)—to rejoice with triumph, (*at, in, over*), to be glad above measure. अत्यानंद पावणें, विजयानंद होणें, टाळ्या पिटणें. *-ant, a.* प्रमुदित, विजयानंदित.*-antly, adv.*; *-ancy, n.*, *-ation, n* परमानंद, हर्षनिर्भर, आनंदातिरेक.

Exū'vĭae, *n. pl.* (एग्स्यू'व्हिइ)—animal's cast skin, shell, etc. प्राण्यांनीं टाकलेलें कवच,-मेंग,-कात. *Exu'viate, v. t.* कात-मेंग-टाकणें;*-tion, n.*

Ey'as, *n.* (आ'यस्)— a young hawk not yet completely trained. शिकाऊ ससाणा (पक्षी).

Eye, *n.* (आय्) - organ of sight; an iris of this; an eye-like thing, a hole; observation, perception. नयन, नेत्र, डोळा; डोळ्याचें बुबुळ; लहान भोंक, डोळ्यासारखा पदार्थ, मोरपिसाऱ्यावरील डोळा; नेढें; अवलोकन, दृष्टि, टापू, दृष्टांत, नजर, पारख. *v. t.* to observe, to watch closely or suspiciously. रोंखून पाहणें, निरखून पाहणें, टक लावून पाहणें. *In the wind's eye*, in the direction of wind. वाऱ्याच्या दिशेनें. *Eye of day*, the sun. सूर्य, दिनमणि. *Evil e.*, पापदृष्टि. *Mind your e.*, take care. नजर राख. *To pipe, put one's finger in, one's e.*, weep. अश्रू ढाळणें, रडणें. *A beam, mote, in one's e.*, डोळ्यांतील मुसळ,-कुसळ. *E. for e.*, retaliation. ठोशास ठोसा, प्रतिकार. *Clap, set. ee. on*, पाहणें, नजर टाकणें. *To be all ee.*, watch intently. लक्षपूर्वक पाहणें, नीट न्याहाळणें. *Up to the ee.*, पुरेपूर, मनसोक्त. *To open one's ee to.* डोळे उघडणें, समजून-कळून-येणें. *My eye (s)!* ओ हो! अबब! *To lose an e.*, दृष्टि जाणें, डोळा जाणें. *To see with half an e.*, at a glance. एकदां नजर टाकून-वरवर-पाहणें. *To have an e. to*, have as

one's object. हेतुपूर्वक पाहणें, सहेतुक पाहणें, वर नजर असणें. *With an e. to*, च्या हेतूनें. *To keep an e. on*, वर नजर ठेवणें, पहारा करणें. *Have an e. for*, a due sense for. ची नजर असणें. *In the mind's e.*, अंतश्चक्षूनें, कल्पनेनें, अपेक्षेनें. *To see e. to e. with*, agree entirely with. शीं पूर्ण मतैक्य असणें. *To throw dust in the ee. of*, च्या डोळ्यांत धूळ फेंकणें, ला ठकविणें, चकाविणें. *To make ee. at*, प्रेमी नजरेनें पाहणें, डोळा मारणें, कामी दृष्टीनें पाहणें. *To cast sheep's ee.*, कामुक दृष्टीनें पाहणें, डोळा मारणें. *E.-ball*, डोळ्यांतील बुबुळ-बाहुली. *An e. of needle*, (सुईचें) नेढें. *Hook and e.*, kind of fastening for dress. कपड्याचें एक प्रकारचें बंधप *Glass e.*, कृत्रिम डोळा, कांचेचा डोळा *E. ball*, बुबुळ. *E. bath,-cup*, औषधी पाण्यानें डोळे धुण्याचा पेला. *E.-bolt*, भोंकवाली कडी,-कडीचा दांडा. *E.-bright*, plant formerly used to cure weak eyes. नेत्ररोगावरची औषधी वनस्पति. *E.-glass*, (*pl.*) डोळ्याचें भिंग, उपनेत्र, चष्मा ; सूक्ष्मदर्शक भिंग *E.-opener* enlightening or surprising fact etc. डोळे उघडायला लावणारी,-आश्चर्यचकित करणारी गोष्ट,-घटना इ. *E.-piece*, lense (s). नेत्रकाच, दुर्बिणीचें आपल्याकडील बाजूचें भिंग. *E. servant*, तोंडदेखलें काम करणारा, नजरचुकार-कामचुकार नोकर. *E. service*, केवळ धन्याच्या नजरेआलीं असे तोंच केलेली नोकरी. *E shot*, दृष्टीचा टप्पा. *E. sight*, दृष्टि. नजर. *E sore*, an ugly object. thing that offends the sight. नेत्रशल्य. डोळ्यांत खुपणारी,-अप्रिय,-वस्तु. *E. splice*, दोरीचा फांस,-ची फांसकी *E. strings*, muscles, nerves, tendons of e. अक्षिकंडरा. *E.-tooth*, (दांताचा) सुळा सुळका. प्राण्याचा वरचा सुळा (दांत). *E.-water*, अश्रु ; डोळ्यांचें औषध, औषधी पाणी. *E. wash*, (sl.) mere professions, humbug डोळे पुसणें, डोळ्यांत धूळफेंक, फसवणूक. *Eyed, eyeless, aa.*

Eye'brow, *n.* (आ'यू-ब्रौ)—fringe of hair over eye, the hairy arch above the eye. भुंवई, भ्रुकुटी. *To knit the e.*, भुंवया चढवणें, रागावणें.

Eye'lăsh, *n.* (आ'यू-लॅश्)—hair (s) on eyelid. डोळ्याच्या पापणीचे केस.

Eye'let, *n.* (आयु'लिट्)—a small hole in cloth, sail, etc. for lace, ring etc. ; a loop hole ; a small eye. छिद्र, भोंक. डोळा ; दारें, खिडकी ; लहानसा डोळा.

Eye'lid, *n.* (आ'यू-लिड्)—either cover of eye. डोळ्याची पापणी, पातें. *To hang on the eyelids*, (fig.) नांवापुरताच आधार -अधिकार -असणें.

Eye'-witnĕss, *n.* (आ'यू-विट्नेस्)—one who can testify from his own observation. प्रत्यक्षदर्शी, साक्षी, वस्तुस्थिति प्रत्यक्ष पाहिलेला साक्षीदार.

Eyot, *n.* (एट्)—a small isle in river. नदींतील लहान बेट.

Eyre, *n.* (एअर्)—a circuit, circuit court. फेरा, फिरती न्यायकचेरी, न्यायाधिशांचा दौरा.

Ey'rie, *n.* (आ'यू-रि)—aerie, the nest of a bird of prey. हिंस्र पक्ष्यांची घरटीं बांधण्याची जागा, पक्ष्याचें घरटें. [F *Aire*, nest of hawks]

F

F, (एफ्)—sixth letter of the English alphabet; (Mus ; also *fa*) fourth note of diatonic scale of C major. इंग्रजी वर्णमालेंतील सहावें अक्षर ; शुद्ध स्वरसप्तकांतील चवथा स्वर (मध्यम). *F sharp*, (joc.) पुशी, क्षुद्र प्राणी. *F*, fine (in pencils), Fahrenheit. उंची (पेन्सिल), फारेनहाइट (उष्णतामापक).

Fā'bian, *a.* (फे'बिअन्)— *-policy*, cautiously persistent. सावध व धोरणी (कावा). [L *Fabius*' Commander against Hannibal]

Fā'ble, *n.* (फे'बल्)—a story (esp. supernatural one) not based on fact ; a lie ; a plot of play etc. ; a short moral tale. दंतकथा, कल्पित कथा ; कंडी, थापा, गप्पा ; असत्य, खोटें ; कथानक; लहान नीतिपर कथा. *v. i. & t.* to tell fictitious tales ; celebrate in fable. कल्पित गोष्टी,-कथा सांगणें, लिहिणें ; कल्पित वर्णन करणें ; पुराणप्रसिद्धि देणें. *Fa'bled, pa. p.* दंतकथेंतील,-संबंधीं ; पुराणांतरीं वर्णिलेला. *Fa'bler, n.* कल्पितकथालेखक ; कंड्या पिकविणारा.

Făb'ric, *n.* (फॅ'ब्रिक्)—a thing put together ; building ; woven material, texture, cloth. एकत्रित वस्तु, जुळणी, जोडकाम, उभारणी, बांधणी; इमारत, बांधीव काम ; वीण, पोत, विणणें, कारागिरी. *Textile f.*, विणलेलें कापड.

Făb'ricāte, *v. t.* (फॅ'ब्रिकेट्)—to invent (lie, &c.) ; to forge (a document) ; (U. S.) make by plan. जोडणें, जडविणें, बनवणें ; (दस्तऐवज वगैरे) खोटा तयार करणें, बनावट करणें ; मेहनतीनें, -योजून तयार करणें. *-tion, n.* कुभांड, थोतांड, बनावट गोष्ट, कंडी. *-tor, n.* बांधणारा, रचणारा, कारागीर ; कुभांड रचणारा, बनवाबनवी करणारा.

Făb'ūlist, *n.* (फॅ'ब्युलिस्ट्)—a composer of fables, a liar. कल्पित कथा लिहिणारा, दंतकथा रचणारा; खोटें बोलणारा.

Făb'ūlous, *n.* (फॅ'ब्युलस्)—famed in fable ; incredible, hardly to be believed. काल्पनिक, कल्पित ; बनावट, अविश्वसनीय, कमालीचा मोठा, कल्पनातीत. *-ly, adv.; -ness, n., Fabulos'ity, n.*

Facade', *n.* (फसा'ड्)—face of building towards street or open space. इमारतीचा दर्शनीभाग, मुखभाग, दर्शनी बाजू. [F]

Fāce, *n.* (फेस्)—front of the head; front right side; dial-plate of a clock; expression; grimace, aspect; surface. तोंड, मुख, चेहरा; दर्शनी बाजू, उजवी बाजू, समोरचा भाग; (घड्याळाची) तबकडी; स्वरूप, मुद्रा, रूप, बाह्यचर्या; बहिरंग, बाह्यरूप, देखावा; पृष्ठ (भाग). *v. t. & i.* to meet firmly; to be opposite to; (Mil.) turn, cause to turn, in some direction; (Golf) strike ball full; cover (surface) with layer, dress (surface) of; coat (tea) with colouring matter. धैर्यानें तोंड देणें, सहन करणें; समोर असणें, -राहणें; (दिशेला) तोंड वळणें, -वळविणें; (गोल्फचा चेंडू) जोरानें टोलावणें; (त्या पृष्ठभागावर) दुसरा थर बसविणें, त्या तोंडावर (शोभेसाठीं, सुरक्षिततेसाठीं) बसविणें; (चहाला) रंगाचें पूट देणें. *To look one in the f.*, वर मान करून पाहणें, नजरेस नजर भिडविणें. *To show one's f.*, appear. तोंड दाखविणें, पुढें येणें. *F. to f.* (with), समोरासमोर, समक्ष. *To set one's f. against*, oppose. निषेध-प्रतिकार-करणें. *With sun in one's f.*, तोंडासमोर ऊन असतां. *To fly in the f. of*, openly disobey. धडधडीत न जुमानणें, -आज्ञाभंग करणें. *In f. of*, त्या समोर. *In the f. of, in f. of*, despite. ला न जुमानतां, ची पर्वा न करतां. *To one's f.*, त्या डोळ्यांदेखत, ऐकत असतां. *In the f. of day*, openly उघड उघड. *To pull, wear, a long f.*, look serious or dismal. गंभीर किंवा आंबट चेहरा करणें. *To make, pull, a f. or ff.*, वेंचकुल्या दाखविणें, वेडावणें, तोंडें वेडीं वांकडीं करणें. *To have the f.*, लाज न वाटणें. *To save one's f.*, (आपली किंवा दुसऱ्याची) लाज, -अब्रू, -राखणें. *On the f of it*, वरवर पाहतां, जास्त खोलांत न शिरतां. *To f. matter out*, (एखादी गोष्ट) शेवटास नेणें. *To f. opponent down*, प्रतिपक्ष्याला धाबरविणें, -भिवविणें. *To f. the music*, not quail at the moment of trial. धैर्यानें प्रसंगाला तोंड देणें, संकटें सोसणें. *F.-ache*, neuralgia मज्जातंतुव्यथा. *F.-card*, (पत्त्यांतील) राजा, राणी, गुलाम. *F -value*, दर्शनी किंमत

Fa'cer, *n.* (फे'सर्)—a blow in face; sudden difficulty. तोंडावर मारलेला ठोसा, -गुद्दा, -चपराक; हार, धोक्यांत पडणें, आकस्मिक प्रसंग.

Fă'cĕt, *n* (फॅ'सिट्)—one side of many-sided body, esp. cut gem; one segment of a compound eye. (रत्नाचा, वस्तूचा) पैलू; नेत्रविभाग.

Facē'tiae, *n. pl* (फसी'शिई)—pleasantries; books of humorous or obscene character. गंमत, विनोद, थट्टामस्करी; विनोदी किंवा ग्राम्य पुस्तकें.

Facē'tious, *a* (फसी'शस्)—marked by pleasantry. गमत्या, विनोदी, थट्टेबाईक. *-ly, adv.; -ness, n.*

Fă'cia, *n.* (फॅ'शा, फे'शा)—a plate over shop-front with name etc. दुकानाची दर्शनी (नांवाची) पाटी.

Fā'cial, *a.* (फे'शल्)—of the face. चेहऱ्याचा, मुखासंबंधीं, दर्शनी.

Fă'cile, *a.* (फॅ'साइल्)—easy, working easily; fluent; flexible. सोपा, सुकर, सुगम, सहज होणारा; चपल; जलद; लवचीक, मृदु.

Fă'cĭlė prĭn'cĕps, *pred. a.* (फॅ'सिलि प्रि'न्सेप्स्)—easily first. सहजा सहजीं पहिला. [L]

Făcĭl'ĭtāte, *v. t* (फॅसि'लिटेट्)—to make easy; to promote. सोपा करणें, सुलभ करणें, पुरस्कार करणें. *Facilita'tion, n.; -tor, n.*

Făcĭl'ĭtў, *n.* (फॅसि'लिटि)—absence of difficulty; dexterity; (*usu. pl.*) convenient opportunities; pliancy. सोय; सोपेपणा, हातोटी, कौशल्य; (अने०) संधि, साधन, नरमपणा, ढिलेपणा.

Fā'cĭng, *n.* (फे'सिंग्)—coating of different material; (*pl*) cuffs, etc, of soldier's jacket; turning in some direction. निराळ्या वस्तूचें दर्शनी आवरण, भिंतीची दर्शनी फरसबंदी; लष्करी शिपायाच्या कुडत्याचीं हाताचीं वगैरे निराळ्या रंगाचीं घडणें; तोंड वळवणें.

Făcsĭm'ĭlė, *n. & v. t.* (फॅक्-सि'मिलि)—an exact copy. हुबेहूब नक्कल, -प्रत, प्रतिरूप, प्रतिलेख (करणें).

Făct, *n.* (फॅक्ट्)—a thing done; a thing known to be true; an act, an event केलेली गोष्ट, घडलेली गोष्ट, झालेलें कार्य; वस्तुस्थिति, खरा प्रकार, सत्यता, विधान; कृत्य, हकीगत. *In f.*, वस्तुतः, खरें म्हटलें तर, तत्त्वतः. *Matter of f.*, independent of inference. खरी खरी हकीगत; (used adjectively) prosaic सरळ, साधासुधा, नित्याचा. *As a matter of f.*, खरोखरी, खरी गोष्ट पाहूं गेलें असतां. *The f. of the matter*, वस्तुस्थिति, खरी खरी हकीगत.

Făc'tion, *n.* (फॅ'क्शन्)—self interested or unscrupulous party (esp. in politics); prevalence of party spirit. तट, (राजकारणांतील) पक्ष, टोळी, फळी; पक्षभावनाप्राबल्य.*-al,- Fac'tious, aa.; -ly, adv.; -ness, n.*

Făctĭ'tious, *a.* (फॅक्टि'शस्)—designedly got up, artificial. कृत्रिम, बनावट, खोटा.*-ly, adv.; -ness, n.*

Făc'tĭtive, *a.* (फॅ'क्टिटिव्)—*-verb*, expressing idea of making to be something. कारक, फलद्योतक, प्रयोजक, (क्रियापद).*-ly, adv.*

Făc'tor, *n.* (फॅ'क्टर्)—agent; a merchant buying and selling on commission; (Sc.) land agent; any of the numbers whose product is the given number; element in a result. अडत्या, गुमास्ता; दलाली घेऊन खरेदीविक्री करणारा व्यापारी. दलाल; वहिवाटदार; गुणपद, गुण्यपद, गुणकपद, अवयव; कारण, कारणीभूत गोष्ट. *Fa'ctorage*, *n.* अडत, दलाली. *Factor'ial*, *a.* & *n.* (Math) product of series of factors in arithmetical progression; product of an integer and all the lower integers. (अंकगणित-श्रेणींतील) गुणकपदावलीचा गुणाकार; एकादिचयाङ्क *-term*, एकादिचयाङ्कघात, एकादिघात; *f.* 4, L4, = 4×3×2×1, चतुरन्त-एकादि-घात.

Făc'torў, *n.* (फॅ'क्टरि)—a manufactory; merchant company's foreign trading station. कारखाना; शिल्पशाळा; परदेशी व्यापारी मंडळीची पेढी,-वखार. *F. acts*, कारखान्यांतील मजुरांसाठीं कायदेकानू,-सरकारी नियम.

Făctō'tum, *n.* (फॅक्टो'टम्)—a man of all work. हरकामी, हरकाम्या नोकर. [L *fac* (*ere*), to do; *totum*, whole, every thing.]

Făc'ula, *n.* (फॅ'क्युला)—(Astron.; pl.-*ae*) a bright spot or streak on the sun. सूर्यबिंबावरील चकचकणारा ठिपका,-रेषा.

Făc'ŭltătive, *a.* (फॅ'कल्टेटिव्ह्)—of a faculty; permissive, optional. शक्तिविषयक, विद्याशाखीय; अनुज्ञेय, वैकल्पिक.

Făc'ŭltў, *a.* (फॅ'कल्टि)—aptitude for particular action; physical or mental power; branch of science &c.; authorization. कार्यप्रवृत्ति; शक्ति, सामर्थ्य, बळ, बुद्धीची देणगी, बुद्धि (-सामर्थ्य); विश्वविद्यालयांतील विद्याशाखा, ज्ञानशाखा, (कोणत्याहि धंद्यांतील) मंडळी; सत्ता, हक्क.

Făd, *n.* (फॅड्)—pet notion, craze. आवडती कल्पना, नाद, लहर, छंद.-*dist*, *n.* नादी,-लहरी,-छांदिष्ट मनुष्य;-*dism*, *n.*;-*dish*,-*dy*, *aa.*

Fāde, *v. t.* & *i.* (फेड्)—to droop, to wither; to (or, cause to) lose freshness or colour; to disappear gradually. सुकणें, निस्तेज होणें, कोमेजणें; रंग विटणें-उतरणें; हळुहळु नाहींसा होणें, लयास जाणें.-*less*, *a.*;-*lessly*, *adv.*; *Fad'ed*, कोमेजलेला, सुकलेला.

Fae'ces, *n. pl.* (फीं'सीझ्)—sediment; excrement of bowels. गाळ, मळ; पुरीष, विष्ठा. *Faec'al*, *a.*

Fā'erĭe, Fā'ery, *n.* (फे'अरि)—fairy land, the fairies, (esp. as represented by Spencer); (attrib.) fancied, visionary. पऱ्यांची भूमी, पऱ्या, काल्पनिक सुंदर देवता; काल्पनिक, मनःकल्पित.

Făg, *v. i.* & *t.* (फॅग्)—to toil; to grow or make weary; (at schools) do service for juniors. काबाडकष्ट करणें; थकणें, दमणें, दमविणें, भागवणें; वरच्या वर्गांतील मुलांचीं कामें करणें. *n.* a drudgery; a junior liable to fag; (sl.) a cigarette. काबाडकष्ट, दमणूक, थकवा; खालच्या वर्गांतील सेवेकरी मुलगा; सिगरेट, विडी. *F. out*, (Cricket) to field. क्षेत्ररक्षण करणें

Făg'ĕnd, *n.* (फॅ'ग्-एन्ड्)—refuse, meaner part, inferior remnant; very end. गाळ, गाळसाळ, रद्दड काम; अगदीं शेवटचें टोंक,-भाग.

Făgg'ot, *n.* (फॅ'गट्)—bundle of sticks for fuel, or of steel rods; a kind of dish. मोळी, लांकडाचा भारा, पोलादी कांबींचा भारा; एक प्रकारचें पक्वान्न,-जेवण. *Also*, Fagot.

Fahr'enheit, *a.* (फा'रेनहाइट्)—thermometer, with 32° and 212° for freezing and boiling points. उष्णतामापक यंत्रासंबंधीं (३२ अंशांवर पाणी थिजतें व २१२ अंशांवर पाण्यास आधण येतें अशा रचनेचें) उष्णतामापक यंत्र. (abbr. F.) [name of German inventor]

Fail, *v. i.* & *t.* (फेल्)—to be missing; to be deficient; to break down; not to succeed; to disappoint; neglect. चुकणें; कमी पडणें; बंद पडणें; अपयश येणें; निराश करणें; दुर्लक्ष करणें. *n. Without fail*, for certain. न चुकतां, खात्रीनें, कांहीं झालें तरी.

Fail'ing, *n.* (फे'लिंग्)-deficiency; failure; foible, fault, weakness. उणीव, कमीपणा; अपयश, दिवाळें; दोष, न्यूनत्व, दुर्बलता. *prep.* in default of. च्या ऐवजीं, असें नसेल तर, नाहीं तर.

Fail'ure, *n.* (फे'ल्यर्)—non-performance, non-occurrence; running short; ill success; bankruptcy; unsuccessful person or thing. न करणें, न घडणें, चूक, कसूर; कमतरता, खोट, ठोकर; हार, नापास होणें; अपयश; दिवाळें; अयशस्वी मनुष्य किंवा वस्तु.

Fain, *pred. a.* (फेन्)—1. well-pleased (*to*); only too glad. संतुष्ट; आनंदी, शौकी, हौशी. *adv. Would fain*, gladly. आनंदानें, खुषीनें. 2 *Fain*, *-s*, *Fen(s)*, (फेन्, फेन्झ्)—child's formula claiming exemption from unwelcome office. नकोरे बाबा! (तेवढें काम; अशा अर्थी).

Fā'inéant, *a.* (फे'नेऑं)—idle, inactive. आळशी, सुस्त, रेम्याडोक्या. *n.* an idler. निरुद्योगी, सुस्त मनुष्य. [F]

Faint, *a.* (फेन्ट्)—feeble; inclined to swoon; dim, pale; timid दुर्बल; मूर्च्छा आलेला; अंधुक, फिका; भित्रा, नेभळट, पोंचट. *v. i.* & *n.* to swoon, a swoon. मूर्च्छित होणें; मूर्च्छा. *F.-heart*, a coward. भित्रा, भ्याड मनुष्य. *F.-hearted*, *a.* भित्रा, नेभळट, भागूबाई;-*ly*, *adv.*;

-ness. *n.*; *Fain'tish*, *a.* अंधुक, पुसट. *Fain'tly*, *adv.*; *Fain'tness*, *n.* बेशुद्धि, मूर्च्छा, ग्लानि; अस्पष्टता, निस्तेजपणा; भित्रेपणा, नामर्दपणा. *Faints*, *n. pl.* दारू गाळण्याच्या आरंभीं व शेवटीं वर येणारी अशुद्ध मळी.

Fair, *n.* (फेअर्)—periodical gathering for sale of goods, often with shows and entertainments. मेळा, जत्रा, जत्रेचा बाजार. *A day after the f.*, *too late* उशिरां, वेळ टळून गेल्यावर, 'वरातीपाठीमागून घोडें'. *F.-ground*, जत्रेचें आवार, -जागा. [L. *feria*, holiday]

Fair, *a.* (फेअर्)—beautiful; blond, not dark; just, equitable; of moderate quality or amount; (of weather) favourable. सुरेख, सुंदर; गोरा; न्याय्य, रास्त, नेमका, इमानी, नेकीचा; विपुल; अनुकूल, उघडाचा, निरभ्र. *adv.* in fair manner. यथान्याय्य, उघड, सरळपणानें *The f. sex*, *the f.*, women. स्त्रीजात, स्त्रिया *A f.*, a woman. स्त्री, सुंदरी. *F. speeches* अघळपघळ रास्त भाषणें. *A f. complexion*,-*man*, देखणा, गोरा, -चेहरा. -मनुष्य. *F. copy*, स्वच्छ, सुवाच्य प्रत. *F. and square*, *a. & adv.* सरळ, प्रामाणिक, साफ (-पणानें). *All's f. in love and war*, प्रेम आणि युद्ध यांत सर्व कांहीं (बरेंवाईट) न्याय्यच ठरतें. *F. weather friends*, not good at need. 'चालत्या घोड्यावरील गोमाशी', संकटाचे-जरूरीचे-वेळीं उपयोगीं न पडणारे मित्र. *By f. means*, सरळ, न्याय्य, -मार्गानें. *F.-way*, नदीप्रवाहांतील तारवें-नौका-चालतात तोपर्यंतचा मार्ग; गोल्फ खेळांतील नियमित मार्ग, -दिशा, -रेषा. *To speak one f.*, विनयशीलपणानें बोलणें. *F.-spoken* (of person), विनयशील, सभ्य. *F. & softly*, संभाळून, बेतानें. *Fair'ish*, *a.*

Fair'ing, *n.* (फे'अरिंग्)—a present bought at a fair. भेट म्हणून जत्रेंत खरेदी केलेली वस्तु.

Fair'ly, *adv.* (फे'अर्लि)—utterly; rather. पूर्णपणें; सामान्यतः.

Fair'play, *n.* (फे'अर्-प्ले)—equal opportunities, just treatment. सारखी संधि; न्याय्य वागणूक, न्याय.

Fair'trade, *n.* (फे'अर्ट्रेड्)—Free trade conditional on reciprocity. परस्पर विनिमयाच्या अटीचा खुला व्यापार.

Fair'y, *n.* (फे'अरि)—a *fay*, *small supernatural* being with magical powers. परी, अप्सरा, यक्षिणी, वनदेवता. *a.* of fairies; fairy-like. परीचा, अप्सरांचा, परीसारखा, काल्पनिक. *F. lamps*, रोषणाईचे (कांचेचे) दिवे. *F. -land*, home of fairies; enchanted land. अप्सरांचें, -वनदेवतांचें निवासस्थान; भुताटकीची जागा; अति सुखाचें काल्पनिक स्थान. *F. ring*, गवताचा काळसर वर्तुळाकार भाग (यावर पऱ्या नाचतात अशी कल्पना). *F. tale*, tale of fairies; marvellous account. वनदेवतांची कथा, -गोष्ट; काल्पनिक. -विलक्षण गोष्ट.

Fait accom'pli, *n.* (फेट् आकॉं'प्ली)—thing done and past arguing about. ठाम अविवादिक गोष्ट, -मुद्दा. [F]

Faith, *n.* (फेथ्)—trust; belief in religious doctrine or divine truth; religion; loyalty, fidelity, confidence. श्रद्धा, विश्वास; धर्मश्रद्धा; धर्म; धर्मपंथ; मत, निष्ठा.

Faith'ful, *a.* (फे'थ्-फुल्)—loyal, constant; true, accurate. विश्वासू, इमानी; खरा, यथातथ्य. *The f.*, *n. pl.* महंमदाचे अनुयायी.-*fully*, *adv.*

Faith'less, *a.* (फे'थ्-लिस्)—perfidious, false. बेइमानी, खोटा, अविश्वासी, नास्तिक, विश्वासघातकी. *-ly*, *adv.*; *-ness*, *n.*

Fake, *v. t. & n.* (फेक्)—1. (Naut.) to coil rope; one round of a coil. दोर गुंडाळणें; दोराचें वेटोळें. 2. *v t.* to do up. बनवणें, फसविणें. *n.* faking; faked-up thing. बनवणें, बनावट गोष्ट. *Fa'ker*, *n.* (*U. S.*) फेरीवाला.

Fal'chion, *n.* (फॉ'ल्चन्)—a broad curved sword. लहान वांकडी तलवार.

Fa'lcon, *n.* (फॉ'कन्)—a small diurnal bird of prey trained to hawk for sport. बहिरीससाणा. *-er*, बहिरीससाण्यांना शिकविणारा. *-ry*, *n.* ससाण्यांची पारध करणें; त्यांना पाळणें;-धंदा

Fal'stool, *n.* (फॉ'ल्स्टूल्)-bishop's armless chair; a *small desk for kneeling at.* धर्माधिकाऱ्याची बिनहाताची खुर्ची; दुमडणारी घडवंची.

Fall, *v. i.* (फॉल्)—to descend freely; drop, come down; lose high position; abate, droop, hang down; collapse; sin, perish; lapse; occur. खालीं येणें, पडणें, पतन होणें; गळणें, निघणें, ओसरणें; च्युत,-भ्रष्ट होणें; कमी होणें, नरमणें, बसणें, गळणें; खचणें, नाश,-ऱ्हास होणें; नयच्युत होणें, विनाश पावणें; कडे येणें, -जाणें; येणें, घडणें. *n.* falling; amount (of rain etc.) that falls; (U. S.) autumn; (often pl.) cataract; descent, drop; downfall, ruin; kind of veil; amount of timber cut down. पडणें, पतन, च्युति, भ्रंश; (वर्षाव, वृष्टि,-) पतन,-मान; (झाडाचीं पानें गळतात तो ऋतु) पावसाळा; धबधबा; उतार, खोली, उतरणें, कमी होणें; विनाश, ऱ्हास, अस्त; एक प्रकारचा पडदा; तोडलेलें इमारती लाकूड. *Falling star*, a meteor. उल्का, तुटलेला तारा. *Lambs f.*, are born. कोंकरें जन्मतात. *Fallen angel*, स्वर्गभ्रष्ट देवता. *Face falls*, चेहरा उतरतो, चेहऱ्यावर आश्चर्य-गोंधळलेलेपणा-दिसतो. *Falling sickness*, अपस्मार, फेपरें. [*With*

prepp.] *To f. behind*, be passed by. च्या मागें पडणें. *F. for*, (U. S.) ला मोहित,-वश होणें. *F. into* (*line*), रांगेंत उभें राहणें; (*conversation with*), शीं संभाषण,-बोलणें सुरू करणें; (*habit* etc.) (संवय इ.) लावून घेणें. *F. up*, *-upon*, हल्ला करणें, शीं गांठ पडणें. *F. up,-upon one's feet or legs*, get well out of difficulty. अडचणींतून पुरी सुटका होणें. संकटमुक्त होणें. *F. to*, take to, begin. आरंभ करणें, कामाला लागणें. *F. under*, अंतर्भाव होणें. च्या अंमलांत असणें,-येणें. *F. within*, be included in. च्यांत धरलें जाणें, अंतर्भाव होणें. [*With advv.*] *To f. astern*, (of ship) drop behind. मागें राहणें. *F. away*, सोडून जाणें, बंड करणें; भ्रष्ट होणें, धर्मांतर करणें; फिका,-मंद,-कमी होणें, सुकणें, वाळणें, नाश पावणें. *F. back*, माघार घेणें. *F. back upon*, चा आश्रय करणें. *F. behind*, lag. मागें पडणें. *F. foul of*, शीं टक्कर होणें,-भांडणें, वर हल्ला करणें. *F. in*, (Mil.) नेमलेल्या जागीं रांगेंत उभें करणें,-राहणें; (of buildings etc) खचणें, बसणें; (of debt etc.) मुदत संपणें *F. in with*, अकस्मात भेट होणें, गांठ पडणें; मताशीं जुळतें घेणें. मतैक्य होणें, कबूल करणें. *F. off*, गळून पडणें; झडणें, कमी होणें, माघार घेणें; घिपडणें; सुकाणूला (जहाज) न वळणें; बंड करणें. *F. on*, हल्ल्यांत भाग घेणें, खाण्याला सुरवात करणें *F. out*, भांडण होणें, पडणें, होणें; (Mil.) रांग सोडून जाणें,-मोडणें. *F. out of*, सोडून देणें (संवय इ.). *F. short*, तूट येणें, कमी पडणें. *F. short of*, न मिळणें. *F. through*, मध्येंच पडणें,-सिद्धीस न जाणें. *F. to*, begin eating or fighting. हातातोंडाच्या लढाईला,-खऱ्या लढाईला-आरंभ करणें. *F. of the year* or *leaf*, पर्जन्यकाळ. *The F. of man*, Adam's sin and its results. ॲडमचें (ज्ञानफळ चाखण्याचें) पाप व त्याचीं फळें. *Fell*, *pa. t.*; *Fallen*, *pa. p.*

Fallā'cious, *a.* (फॅले'शस्)—containing a fallacy; delusive, deceitful, misleading. हेत्वाभासाचा, हेत्वाभासमूलक; भ्रामक, भ्रमात्मक, दुष्ट, असत्य, भ्रांतिकारक.*-ly*, *adv.*,*-ness*, *n.*

Făll'acy̆, *n.* (फॅ'लसि)—misleading argument; de'usiveness, deception, deceitfulness; flaw in syllogism. चुकीचा युक्तिवाद; मिथ्याभास, भ्रम, आभास; दूषित अनुमान, हेत्वाभास, पक्षाभास. [L *fallere*, to deceive]

Făl-lăl', *n.* (फॅलूलॅ'ल्)—a piece of finery. भपकेबाज,-चैनीची वस्तु.

Făll'ible, *a.* (फॅ'लिबल्)—liable to err or be erroneous. चुकीला पात्र, स्खलनशील, चुकीचा. *-bility*, *n.*

Făll'ow, *a.* (फॅ'लो)—uncultivated. पडित, बिनलागवडीचा, (fig.) ओसाड, नापीक, ठणठणीत. *n.* land ploughed but not cropped. पडित जमीन. *v. t.* to break up land. जमीन नांगरून फोडून (पडीत) ठेवणें.

Făll'ow, *a.* (फॅ'लो)—of pale brownish or reddish yellow. पिंगट, पिंवळट, पिंवळसर, तांबूस पिवळा. *F. deer*, एकजातीचा लहान हरीण.

False, *a.* (फॉल्स्)—erroneous, deceptive; deceitful; lying; spurious; so-called. खोटा, चुकीचा, फसवा; लबाडीचा, लबाड, अप्रामाणिक; खोटा, नकली, बनावट; नांवापुरता, नांवाचा. *adv.* *to play person f.*, cheat, betray. ठकवणें, बेइमान,-कृतघ्न होणें. *F. bottom*, जहाजाच्या किंवा पेटीच्या खऱ्या तळाच्यावरचा कृत्रिम तळ. *F. tune*, बदसूर, बेसूर आवाज. *F.-face*, मुखवटा, झांकण.*-ly*, *adv.*;*-ness*, *fal'sity*, *nn.*

False'hŏŏd, *n.* (फॉ'ल्स्-हुड्)—untrue assertion, untruth, falseness, lying, lie(s). खोटेपणा, खोटें, असत्य.

Falsĕtt'ō, *n.* (फॉल्से'टो)—voice above one's natural range. कृत्रिम,-तार,-स्वर.

Fal'sĭfy̆, *v. t.* (फॉ'ल्सिफाय्)-to alter fraudulently; to misrepresent, to pervert; to disappoint. लबाडीनें बदलणें; विपर्यास करणें; खोटें स्वरूप देणें; निराश होणें.*-fication*, *n.*

Fal'ter, *v. i. & t.* (फॉ'ल्टर्)—to stagger; say hesitatingly, speak with broken words. अडखळणें; अडखळत-तोतरें-बोलणें.*-ingly*, *adv.*

Fāme, *n.* (फेम्)—public report, rumour; reputation, celebrity, renown. प्रसिद्धि; अफवा, कीर्ति. नांव, लौकिक. *Famed*, *a. & pa. p.* प्रसिद्ध, नामांकित.

Fămĭl'iar, *a.* (फॅमि'ल्यर्)—intimate; well-known; common; over-free; amorously intimate with. अति परिचित; सुप्रसिद्ध; परिपाठांतील, घरगुती; अघळपघळ; अनैतिक परिचयाचा. *n.* दोस्त, सोबती; हुकमी भूत, पिशाच्च.

Fămĭliă'rĭty̆, *n.* (फॅमिलिॲ'रिटि)—intimacy. दाट परिचय. *F. breeds contempt*, अतिपरिचय खोटा, मान राहात नाहीं; अतिपरिचयादवज्ञा.

Fămĭl'iarize, *v. t.* (फॅमि'ल्यराइझ्)—make familiar, accustom. परिचयाचा करणें *-zation*, *n.*

Făm'ĭly̆, *n.* (फॅ'मिलि)—a household; a set of parents and children or of relations; person's children; lineage; a race. कुटुंब; कुटुंबांतील मंडळी; मुलेंबाळें; कुळ; वंश, घराणें, जाति, वर्ग. *Happy f.*, animals of different kinds in one cage. एकाच पिंजऱ्यांत ठवलेले निरनिराळ्या जातीचे प्राणी. *Of f.*, nobly born. घरंदाज, कुलीन, चांगल्या कुळांत जन्मलेला. *F. hotel*, कुटुंबांकरितां विशेष सवलतींची खाणावळ. *In a f. way*, घरगुती

नात्यानें. *In the f. way*, with child. गरोदर. *F. Bible*, कुटुंबामध्यें उपयोग करण्याचें मोठ पायबल (धर्मग्रंथ, पोथी). *F. coach*, मोठी बंदिस्त गाडी; एक प्रकारचा (हार-जितीचा) खेळ. *F. likeness*, नातेवाइकांतील सारखेपणा,-सादृश्य, अस्पष्ट सादृश्य. *F. man*, कुटुंबवत्सल मनुष्य; घरगुती मनुष्य. *F. tree*, वंशावळीचा तक्ता, वंशावळ. [L. *familia*, a houshold]

Făm'ine, *n.* (फॅ'मिन्)—general want, extreme scarcity of food, etc.; starvation. दुष्काळ, दुर्भिक्ष, टंचाई, महर्गता; उपासमार, अन्नान्नदशा. *F. prices*, दुष्काळामुळें वाढलेल्या किंमती. *To die of f.*, उपासमार होऊन मरणें. [L. *fames*, hunger]

Făm'ish, *v. t. & i.* (फॅ'मिश्)—to reduce (or to be reduced) to extreme hunger. उपाशीं मारणें किंवा मरणें. *To be famishing*, (colloq.) feel hungry. पोटांत आग पेटणें, भूक लागणें.

Fā'mous, *a.* (फे'मस्)—celebrated, renowned, (*for*); (colloq.) very good, excellent. सुप्रसिद्ध, प्रख्यात, नामांकित, नामवंत, विख्यात; उत्तम. *-ly, adv.*

Fā'mulus, *n.* (फॅ'म्युलस्)— (*pl. -li*) an attendant on magician. जादूगाराचा नोकर.

Făn, *n.* (फॅन्)—winnowing-machine; ventilating apparatus; (Naut.) a blade of screw, propeller; a small sail (of windmill). सूप, झटकणें; पंखा, विंझण, व्यजन, पंख्यासारखी वस्तु: मळसूत्राचें पातें, बोटीचा पंखा; पवनचक्कीचें लहान शीड. *v. t.* to winnow; move air with a fan; stimulate; blow gently on, cool; spread out in fan shape. पाखडणें; पंख्यानें वारा घालणें, चेतवणें, झुळझुळ वाहणें, थंडाई आणणें; व्यजनाकार पसरणें,-होणें. *F. light*, fan-shaped window over door. दरवाज्यावरील व्यजनाकार (पंख्याच्या आकाराची) खिडकी. *F. palm*, (व्यजनाकार पर्णयुक्त) ताडाचें झाड, पंख्याचा ताड. *F. tail*, पंख्याच्या आकाराची शेंपटी; एक जातीचें कबुतर; कोळशाच्या खाणींतील मजुराची टोपी. *To f. the flame*, increase excitement. चेतवणें, प्रज्वलित करणें, गाधळ वाढविणें.

Făn, *n.* (फॅन्)—a devotee of specified thing. (चा) शोकीन, भक्त. *Film fans*, चित्रपटांचे शोकीन लोक, सिनेमावेडे लोक.

Fanăt'ic, *a.* (फनॅ'टिक्)—filled with mistaken enthusiasm, esp. in religion. धर्माबद्दल खोटा अभिमान बाळगणारा, धर्मवेडा. *n.* a fanatic person. धर्मवेडा मनुष्य. *-'ism, n.* (फनॅ'टिसिझम्) धर्मवेड, धर्मांधता.

Făn'cier, *n.* (फॅ'न्सिअर्)—one who is governed by fancy; one who has a special liking for an object; one who keeps and breeds for sale birds and animals. लहरी, छांदिष्ट मनुष्य; (चा) भोक्ता, शोकिन; (कुत्रे,-घोडे,-पांखरें-) विक्या. *A dog f.* कुत्र्यांचा शोकीन, कुत्रेवाला.

Făn'ciful, *a.* (फॅ'न्सिफुल्)—indulging in fancies; capricious; imaginary, unreal; odd-looking. छंदखोर; लहरी; मनःकल्पित, खोटा; चमत्कारिक, विलक्षण.*-ness, n.*; *Fan'cifully, adv.*

Făn'cy̆, *n.* (फॅ'न्सि)—faculty of imagination; delusion; supposition; caprice, whim; taste. कल्पनाशक्ति, कल्पकता; आभास; कल्पना, तर्क, तरंग, लहर; आवड, गोडी, अभिरुचि. *a.* ornamental, not plain; of whimsical kind, extravagant. भपकेदार, चैनीचा, मनोहर, हरतऱ्हेचा; शोकी, सुंदर, चित्रविचित्र, भरमसाट, भारी. *v. t.* to conceive, to imagine; to take a fancy to, like; (colloq.) have a good conceit of (oneself). कल्पना करणें, तर्क करणें; पसंत पडणें, आवडणें; (स्वतःविषयीं) भलतीच घमेंड असणें, मोठें समजणें. *To catch the f. of*, please. चें मन राखणें, खूष करणें. *The f.*, शोकीन लोक. *F. free*, not in love. प्रेम,-आवड,-नसणारा, प्रेम न बसलेला,-ली. *F. dress*, ऐतिहासिक किंवा कल्पित गोष्टींतील भूमिकेला साजेसा पोषाख. *F. d.-ball, f.-ball*, निरनिराळ्या सोंगांना किंवा भूमिकांना योग्य असा पोषाख घालून केलेला नाच. *F. work*, ornamental sewing, etc. नकशीचें विणकाम. *F. fair*, मौजेच्या वस्तूंचा बाजार, मीना बाजार. *At a f. price*, भरमसाट,-अवाच्या सवा,-किंमतीला. *F. man*, प्रियकर; वेश्येच्या पैशावर जगणारा.

Fāne, *n.* (फेन्)—(poet.) a temple. देऊळ.

Făn'fāre, *n.* (फॅ'न्फेअर्)—a flourish of trumpets, bugles, etc. भेरीरव, तुताऱ्यांचा आवाज, शिंगांचा बाजा. [F]

Fănfāronāde', *n.* (फॅन्फॅरने'ड्)—brag; fanfare. घढाई, आत्मश्लाघा; तुतारी वाजविणें, तुताऱ्यांचा निनाद.

Făng, *n.* (फॅन्ग्)—canine tooth; serpent's venom-tooth; prong of tooth; spike of tool held in the stock. सुळा, सुळका, सुळा दांत; (सर्पाचा) विषारी दांत; दंतमूळ; हत्याराचा (मुठींत घसवावयाचा) खिळा,-सुळा. *v. t.* to prime (pump) by pouring in water to start it. पंप (आंत पाणी ओतून) सुरू करणें.*-ed, -less, aa.*

Făntasia, *n.* (फॅन्टझी'आ,-न्टा'झिआ)—a musical composition in which form is subservient to fancy. निरंकुश काव्य, स्वैर काव्य.

Făn'tăst, Phan'tast, *n.* (फॅ'न्टॅस्ट्)—a visionary. विक्षिप्त मनुष्य.

Făntăs'tic, *a.* (फँटॅ'स्टिक्)—extravagantly fanciful; grotesque, quaint. छांदिष्ट; विलक्षण, हास्यजनक, विचित्र, तऱ्हेवाईक. *-al'ity*, *-ism*, *nn*.

Făn'tasy̆, **Ph-**, *n.* (फॅ'न्टासि)-faculty of imagination; mental image, fanciful design. कल्पनाशक्ति; मनःकल्पित मूर्ति, आकार, नमुना.

Fär, *adv.* (फार्)—at or to great distance; by much. दूर, लांब, लांबवर; पुष्कळ अंशीं. *n.* great distance. मोठें अंतर. *a.* distant, remote. दूरचा, लांबचा. *F. away.* लांबचा, पूर्वीचा; (of look etc.) शून्यमनस्क. *F. between*, infrequent. क्वचित्-फार अंतरानें-होणारा. *F.-famed*, widely known, सुप्रसिद्ध, विख्यात. *F.-fetched*, (of simile etc.) not obvious, forced. क्लिष्ट, ओढून ताणून लावलेला, काढलेला. *F.-flung*, widely extended. विस्तृत. *F. gone*, अतिशय आजारी, वेडा, (कर्जांत) रुतलेला. *F. off*, दूर, दूरचा. *F.-reaching*, दूरवर जाणारा,-पोंचणारा,-परिणाम करणारा. *F.-seeing*,*-sighted*, prudent, seeing distant things best. दूरदृष्टि, दीर्घदृष्टि, पोक्त, दूरवस्तें नीट पाहणारा. *As f. as*, जेथपर्यंत तेथपर्यंत, ज्या इतका,-पावेतों. *By f.*, फार, बहुत. *How f.*, कोठपर्यंत? कोठपावेतों? *So f.*, तेथपर्यंत, तेथपावेतों, त्या घटकेपर्यंत. *Farther*,*-thest*; *further*,*-thest*, compa & superl.

Fă'rad, *n.* (फॅ'रड्)—the electro-magnetic unit of capacity. विद्युच्चुंबनीय एकं.*-a'ic*, *a.* (of current) inductive, induced. प्रवर्तक, प्रवर्तित, (प्रवाह). [*From Faraday*, scientist]

Färce, *n.* (फार्स्)—a dramatic piece intended to excite laughter; absurdly futile proceeding, empty pageantry. हास्यजनक नाटकाचा चुटका, प्रहसन; हास्यास्पद गोष्ट, पतावणी, सोंग, तमाशा. *Far'cical*, *a.* प्रहसनात्मक.

Färd'el, *n.* (फा'र्डॅल्)—(arch.) a bundle, burden. जुडी, बोजकें, ओझें.

Färe, *n.* (फेअर्)—cost of passenger's conveyance; food; a passenger in hired vehicle. प्रवासाचें भाडें; अन्न, खाण्याचे पदार्थ; भाडोत्री उतारू. *v. i.* to happen, to turn out; to get on; to be fed; journey, travel. घडून येणें; चालणें, प्रगति करणें; जेऊं घालणें; प्रवास करणें, जाणें. *F. forth*, start. (प्रवासाला) निघणें. *How fares it?* कसें काय चाललें आहे?-होत आहे?

Fărewĕll', *int.* (फेअर्-वे'ल्)—good-bye. नमस्कार! यावें! *n.* leave-taking; act of departure. आज्ञा; प्रयाण, निरोप.

Fär'fĕtchĕd, *a.* (फा'र्-फेचेड्)—not obvious, forced, strained. ओढून ताणून केलेला (अर्थ), दूरान्वयी.

Fari'na, *n.* (फरा'यना)—flour or meal of corn, nuts etc.; powder; (Bot.) pollen; (Chem.) starch. पीठ, पिष्ट; पूड; (पुष्प-) रेणु, पराग; पिष्ट, पिठूळपणा. *Farina'ceous*, *a.* (फॅरिने'शस्) पिठाचा, पिष्टमय; पिठूळ. *Fa'rinose*, *a.* mealy. पिष्टोत्पादक, कोंडशीसारखा पदार्थ असलेला. [L. *far*, corn]

Färl, *n.* (फार्ल्)—(Sc.) thin-cake. पातळ भाकरीचा तुकडा.

Färm, *n.* (फार्म्)—tract of land cultivated by a tenant, a portion of land under cultivation. धान्यानें केलेली जमीन, शेत, शेतजमीन. *v. i. & t.* to take proceeds of (tax, office) on payment of fixed sum; till the soil; be a farmer. मक्ता, खंड घेणें, खंडानें देणें; (जमिनीची) लागवड,-मशागत करणें, नांगरणें; शेतांत खपणें,-राबणें. *F.*, *F.-house*, शेतावरील घर, खोपट,-मांगर. *F. stead*, शेत व त्यावरील घरें वगैरे, शेतवाडी. *F. yard*, शेताचें आवार, वाडी.

Färm'er, *n.* (फा'र्मर्)—one who farms land. शेतकरी.

Făr'ō, *n.* (फें'अरो)—a gambling card-game. पत्त्यांचा जुगारी खेळ.

Farra'gō, *n.* (फरा'गो,फरे'गो)-medley, hotchpotch. खिचडी, मिसळ, पंचमेळ, बजबजपुरी.*-ginous*, *a.* पंचमेळीचा.

Fă'rrier, *n.* (फॅ'रिअर्)—a smith who shoes horses, shoeing-smith; horse-doctor. नाल मारणारा; अश्ववैद्य. *Fa'rriery*, *n.* नालबंदी (काम), अश्ववैद्यक.

Fă'rrow, *n.* (फॅ'रो)—a litter of pigs. डुकराचें वेत. *v. t. & i.* (डुकर) विणें.

Fart, *n. & v. i.* (फार्ट्)—(to emit) wind from the anus. पादणें; अपान वायू, पाद.

Färth'er, *adv.* (फा'र्दर्)—more far; (usu. *fur-*) also, in addition. अधिक दूर; आणखी. *a.* more distant or advanced; (usu. *fur-*) more. अतिशय लांब किंवा पराच पुढें गेलेला; शिवाय, आणखी.*-most*, *a.* अतिशय लांबचा, दूरचा. *Farth'est*, *a. & adv.* अतिशय दूरचा, लांबचा; अतिशय लांबवर.

Färth'ing, *n.* (फा'र्दिंग्)—quarter of a penny; a very small price. तीन पै किंमतीचें एक इंग्रजी नाणें, फार्दिंग; अल्पस्वल्प किंमत, कवडी, दमडी.

Făs'cēs, *n. pl.* (फॅ'सीझ्)—(Rom. hist.) a bundle of rods with axe in the middle; ensigns of authority. (मध्यें कुऱ्हाड असलेली) काठ्यांची जुडी, अधिकारचिन्हें.

Fă'scia, *n.* (फॅ'शिआ)—long flat surface; band. कानोशीचा सपाट लांकडी-दगडी-पृष्ठभाग; वळचणी-

खालचा सपाट भाग; पट्टा; पातळ पापुद्रा, तंतुमय स्नायूंचें पातळ आवरण.

Făs'cĭcle, Făs'cicūle, *n.* (फॅ'सिकल्, फॅ'सिक्यूल्)—bunch, bundle; part of a book. जुडका; पुस्तकाचा भाग.

Fas'cĭnāte, *v. t.* (फॅ'सिनेट्)—to charm irresistibly, to enchant, to bewitch, to captivate. मोह घालणें, भारणें, नजरबंदी करणें, मोहिनी घालणें.-*tion, n.* भारणी, मोहिनी.-*tor, n.*

Fascine', *n.* (फॅसी'न्)—a long faggot used for engineering purposes and for lining trenches. लांब जुडी, -मोळी, - लांकडाचा भारा.

Făs'cĭsm, Făscis'mo, *n.* (फॅ'सिझम्, फॅशी'झ्मो)—principles and organization of the patriotic movement in Italy under Mussolini. इटली देशांतील नवीन राष्ट्रीय पंथाचीं तत्त्वें व घटना. *Fas'cist, Fascis'ta,* (फॅशी'स्टा, *pl. -ti,* -टी), इटली देशांतील राष्ट्रीय पंथ, त्याचा अनुयायी. [It. *fascio,* bundle, group]

Făsh, *v. t. & n.* (फॅश्)—(Sc.) bother, trouble. त्रास कटकट (देणें).

Fă'shion, *n.* (फॅशन्)—make, shape, style; way, manner; custom, esp. in dress. आकार, बेतणी; पद्धत, चाल, रीत; परिपाठ, वहिवाट, लोकप्रचार. *v. t.* to form, to shape. घनवणें, घडणें, घडवणें, करणें. *After the f. of,* like. च्या सारखा. *After a f., in a f.,* थोडासा, कांहीं, कसाबसा, जेमतेम. *F.-plate,* picture showing fashion of dress. तयार कपड्यांचा नमुना दाखविणारें चित्र. *To set the f.,* नवीन प्रघात सुरू करणें. *A man of f.,* सभ्य शिष्ट मनुष्य. *-fashioned, a.*

Fă'shionable, *a.* (फॅ'शनेबल्)—characteristic of persons of fashion. सभ्यसंप्रदायाचा, शिष्टमान्य. *n.* सभ्य, शिष्ट, मनुष्य. *-ly, adv.; -ness, n.*

Făst, *v. i.* (फास्ट्)—to go without food (esp. as religious observance). उपवास करणें, उपोषण करणें, उपाशीं राहणें, लंघन करणें. *n.* fasting, going without food. उपवास, उपोषण, उपास, लंघन.

Făst, *a.* (फास्ट्)—firm, fixed, steady; rapid, pleasure-seeking. दृढ, घट्ट, ठाम, स्थिर; जलद, चलाख, चपल, शीघ्रगति; सुखैषी, चैनी, सोकाजी. *adv.* firmly, tightly; quickly; extravagantly. घट्ट, मजबूत; जलदीनें, घाईनें, त्वरित; उधळेपणानें. *F. friend, friendship,* जिवलग, जिवश्चकंठश्च, -मित्र, मैत्री. *F. asleep,* गाढ निजलेला. *F. colour,* न जाणारा, न विरणारा, पक्का रंग. *To make f.,* fasten. घट्ट बांधणें. *To play f. and loose,* be unreliable. अविश्वासूपणें वागणें, धरसोड करणें, बोलणें एक करणें एक असें वागणें. *The door is f.,* बंद केलेला दरवाजा. *Watch is f.,* घड्याळ पुढें आहे. *F. person,* चैनी मनुष्य. *F. cricket ground,* जीवरून चेंडू चटकन वर उडतो,-उशी घेतो, अशी जमीन,-क्रीडांगण. *F. bind f. find,* lock up what you would not lose. जें हरवूं नये तें नीट कुलुपांत घालून ठेवणें. *Sleep f.,* गाढ झोंपीं जाणें. *To live f.,* live in a dissipated way, मागचा पुढचा विचार न करतां चैनींत राहणें. *F. by, -beside,* (*poet.*) अगदीं नजीक, -जवळ, हाताशीं, कानाशीं. *Fast'ish, a.*

Fă'sten, *v. t. & i.* (फा'सन्)—to attach, to fix, to secure; to become fast. अडकवणें, जाम बसवणें, स्थिर करणें, लावणें, घट्ट बांधणें; चिलगून किंवा घट्ट धरणें. *To f. quarrel upon,* (शीं) भांडण उकरून काढणें. *Fa'stening, n.* खिळण, बंधन, बंधप; बांधणें. *Fa'stener, Fa'stening, nn.* चिमटा, बंधप, बंधन.

Făst'ness, *n.* (फा'स्ट्निस्)—firmness, strength; a stronghold; rapidity. घट्टपणा, मजबुती, बळकटी, (रंगाचा) पक्केपणा, टिकाऊपणा; कोट, किल्ला, मजबुतीचें ठिकाण; जलदी, चपळाई, त्वरा.

Făs'tī, *n. pl.* (फॅ'स्टाय्)—records, annals. दप्तर, कागदपत्र, बखर. [L. = calendar].

Făstĭd'ious, *a.* (फॅस्टि'डिअस्)—squeamish, delicate to a fault, hard to please. खोडकर, दुराराध्य, चोखंदळ. *-ly, adv; -ness, n.*

Fastĭ'giate, *a.* (फस्टि'जिअट्)—(Bot.) with conical or tapering outline. शंक्वाकार, -अणकुचीदार, आकाराचा.

Făt, *a.* (फॅट्)—well-fed, plump; greasy, oily; fertile, profitable; resinuous. पुष्ट, लठ्ठ; तेलकट, चिकण, स्निग्ध, सुपीक, कसदार, फायदेशीर, पुष्कळ उत्पन्नाचा; राळेचा, राळेसारखा. *n.* oily substance in animal bodies. चरबी, मेद, मेण. *v. t. & i. To fatten,* लठ्ठ करणें.-होणें, फुगणें, माजणें. *To cut up f.,* पुष्कळ पैसा मागें ठेवणें. *To cut it f.,* दिमाख दाखविणें, प्रदर्शन करणें. *A f. lot,* पुष्कळ; (*iron.*) अत्यल्प. *F.-head,* a dolt. मठ्ठडोक्याचा, मूर्ख. *F.-witted,* बेअकली, मूर्ख. *The f. is in the fire,* गोंधळ माजला आहे, भडका उडणार.

Fā'tal, *a.* (फे'टल्)—destructive, ruinous; deadly, ending in death; ill-advised; of destiny. नाशकारक; घातकी, प्राणघातक; अनर्थावह; दैवाचा, दैवी. *F. thread,* आयुष्याची दोरी, आयुष्य. *F. shears,* death. मृत्यु, मरण. *Fa'tally, adv.* दैवयोगानें, नाशात्मक रीतीनें, मृत्युकारक.

Fā'talism, *n.* (फे'टलिझम्)—belief that all is predetermined; submission to all that happens as inevitable. अदृष्टवाद; प्रारब्धवाद, दैववाद, भवितव्यतावाद, दैवाधीनता. *-ist, n.* दैववादी मनुष्य. *-istic, a.*

Fatal'ity, *n.* (फेटॅलिटि)—supremacy of fate; calamity; death by accident. दैवाधीनता. दुर्दैव. संकट; अपघाताने मृत्यु.

Fa'ta morga'na, *n.* (फा'टा मॉर्गा'ना)—a kind of mirage seen, esp. in strait of Messina. (मसीनाच्या सामुद्रधुनीवरच दिसणारें) एक प्रकारचें मृगजळ. [It. *Morgana*, female name]

Fāte, *n.* (फेट्)—power predetermining events from eternity; what is destined; death, destruction; (Mythol.) a goddess, one of the three Greek goddesses, of destiny पूर्वसंचित, प्रारब्ध, नशीब, दैव; दैवलिखित: मृत्यु. नाश, काळ, मरण; सटवी. तीन सटव्यांपैकीं एक. *v. t.* to preordain, दैवीं असणें.-लिहिणें. *Fated*, *p.a.* *p.* doomed. दैवघटित, प्रारब्धनिर्मित, ठरवलेले, नशीबीं असलेला. ज्याचे विनाश व्हावयाचा.

Fāte'ful, *a.* (फेट्फुल्)—prophetic; fraught with destiny; decisive; fatal. दैवी, सांकेतिक: दैवघटित: भवितव्य दाखवणारा,-ठरवणारा: अंतिम, प्राणघातक.

Fä'ther, *n.* (फा'दर्)—male parent; forefather; originator; priest of religious order &c.; eldest member; (pl.) elders. पिता, बाप: वाडवडील: जनक; उत्पादक: अधर्मी गुरु,-धर्मगुरु,-सभासद; वडिलधारी माणसें, बापजादे, पितर. *v. t.* to beget, to originate; to pass as father or author of. चा जनक होणें, उत्पन्न करणें; स्वतःस आपणाकडे घेणें, सिरावर घेणें,-लादणें, उत्पादक किंवा कर्ता होणें. *The wish is f. to the thought*, one believes because one wishes to. इच्छा आहे म्हणून विश्वास होतो. *The child is f. to the man*, मोठेपणीं मूल कसें होईल हें त्याच्या लहानपणींच दिसून येतें. *F. of lies*, the devil. सैतान. *The Holy F.*, the Pope. पोप धर्मगुरु. *Like f., like son*, बाप तसा मुलगा, बाप तसा बेटा. *Adoptive f.*, दत्तक बाप. *Natural f.*, जनक बाप; आपल्यापासून झालेल्या मुलाचा बाप. *Spiritual f.*, उपाध्याय. *F.-hood*, *n.*, *F.-less*, *a.* *F.-ly*, *a.* like a father. पितृतुल्य, बापासारखा.

Fä'ther-in-law, *n.* (फा'दर्-इन्-लॉ)—wife's or husband's father. सासरा, श्वशुर.

Fä'therland, *n.* (फा'दर्लँड्)—one's country, the country of one's ancestors. स्वदेश, जन्मभूमि *The F.-l.*, Germany. जर्मन देश.

Fäth'om, *n.* (फॅ'दम्)—measure of 6 ft, esp. in soundings; quantity of wood 6 ft. square in section, of any length. (पाण्याची खोली मोजण्याचें) सहाफुटी माप, वांव: सहा फूट चौरस जाडीचें लांकूड. *v. t.* to sound (water); to comprehend. पाण्याची खोली मोजणें; समजणें, पोत लावणें, कल्पना करणें.-*less*, *a.* अगाध, बेथाग; कल्पनातीत;-*lessly*, *adv.* *F.-line*, *n.* a sailor's line with lead for taking soundings. बुडीद.

Fati'dical, *a.* (फटि'डिकल्)—gifted with prophetic power. भविष्यज्ञानी, शकुनज्ञ.

Fatigue', *n.* (फटी'ग्)—weariness from exertion; a task that wearies; soldier's non-military duty. श्रम, थकवा: कष्टाचें काम. सैनिकाचें बिन-लष्करी काम. *v. t.* to employ to weariness, to tire (metal). थकवणें, भागवणें. शीण आणणें; (धातु) नरम करणें. *Fatiga'ting*, *F.-less*, *a.a.*

Făt'ling, *n.* (फॅट्लिङ्)—a young fatted animal. लहान लठ्ठ प्राणी.

Fătt'en, *v. t. & i.* (फॅट्न्)—to make or grow fat; enrich (soil). पोसणें, पुष्ट करणें, लठ्ठ होणें. जमीनीस खत घालणें; (जमीन) खत घालून सुपीक करणें.

Fătt'y, *a.* (फॅ'टि)—of or like fat. चरबीचा. चरबीसारखा. लठ्ठ. *n.* (usu. voc.) a fat child. गुटगुटीत, गलेलठ्ठ, गब्बूल मूल.

Făt'ūous, *a.* (फॅट्युअस्)—silly, senseless; impotent. वेडगळ, बेअक्कल, मूर्ख, अज्ञानमूलक; नामर्द.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.* *Fatu'ity*, *n.* भ्रम, वेडगळपणा, वेड, मूढता.

Fault, *n.* (फॉल्ट्)—defect, blemish; a slight offence, misdeed; (Hunt) loss of scent, check so caused; (Tennis etc.) ball wrongly served; (Geol.) break in continuity of strata; (Telegr.) leakage चूक, उणीव, दोष, व्यंग, अभाव: अपराध, दुष्कृत्य; (शिकारी जनावराचा) वास सुटणें, गंधच्युति. शिकारीस येणें अडथळा; चेंडू मारण्यांत चूक; भूस्तरीं भंग, स्तरच्युति: विजेच्या तारेंतील दोष. *Generous to a f.*, प्रमाणाबाहेर, फाजील-उदार. *With all ff.*, at buyer's risk. घेणेंरी जबाबदारीच्या, विकत घेणाऱ्याच्या जोखमीवर. *To find f. with*, दोष,-चूक,-काढणें. दोष लावणें. *In f.*, दोषी, दोषार्ह. *To be at f.*, गोंधळांत पडणें. गोंधळणें. *F.-finding*, *a. & n.* दोष काढणें,-काढणारा. निंदक, निंदा. *F.-finder* *n.*, *F.-less*, *a.* निर्दोष. *Fault'y*, *a.* सदोष.-*tily*, *adv.*;-*tiness*, *n.*

Faun, *n.* (फॉन्)—Latin rural deity. कल्पित वनदेवता.

Faun'a, *n.* (फॉ'ना)—the animals of a region or epoch. प्रादेशिक-युगीन-प्राणी.

Fā'vour, *n.* (फे'वर्)-liking, goodwill, approval; partiality; aid; thing given or worn as mark of favour; (arch.) looks. लोभ, पसंती, कृपा, पक्षपात; मदत, उपकार, आभार; नजर, देणगी; चेहरा, रूप. *v. t.* to regard or treat with favour; to oblige; to treat with

partiality, resemble in features. मेहरबानी करणें; कृपा करणें, उपकार करणें; पक्षपात करणें; (चेहऱ्यांत) सादृश्य असणें, सदृशमुख असणें. *To find f. in the eyes of*, be liked by. (ला) आवडणें, प्रिय असणें. *To curry f.*, लाळ घोटणें, लांगूलचालन -हांजी हांजी -करणें. *Your f. of yesterday is received*, आपलें कृपा (पत्र.) काल मिळालें. *By your f.*, (च्या) अनुज्ञेनें, परवानगीनें. *In f. of*, च्या वतीनें, -बाजूनें, च्या नांवानें, -नांवावर. *Favoured*, *pa. p.* having unusual advantages, having a certain appearance. कृपेंतला, मर्जींतला, (च्या) स्वरूपाचा. *Fa'vouring*, *a.*

Fā'vourāble, *a.* (फे'व्हरबल्)— well-disposed; commendatory; promising, auspicious, helpful, suitable. अनुकूल; इष्ट; शुभकर, उपयुक्त, उपकारक, सोयीचा. *-ness*, *n*; *-bly*, *adv.*

Fā'vourĭte, *a.* (फे'व्हरिट्)—habitually preferred. आवडता, प्रिय. *n.* a favourite person; a horse etc. expected to win contest. आवडता किंवा प्रिय मनुष्य. कृपापात्र, प्रियपात्र, गळ्यांतला ताईत, बगलबच्चा; खात्रीनें शर्यत जिंकील असा, खात्रीचा घोडा (वगैरे). *-tism*, *n.* practice of having favourites. पक्षपात, तरफदारी, प्रपंच, पंक्तिभेद.

Fawn, *n.* (फॉन्)— fallow deer in first year; light yellowish brown colour. हरणाचें पाडस; पिंगट उदी रंग. *a.* fawn-coloured. उदी रंगाचा. *v. i. & t.* to bring forth; show affection by frisking, etc.; to lavish caresses upon; to behave servilely. पाडस घालणें -विणें; पुढच्यापुढें नाचणें, कुरवाळणें; हांजी हांजी करणें, लांगूलचालन करणें. *To f. on,-upon*, (कुत्र्यानें) शेंपूट हालवणें, नाचणें इ. *F. upon*, (मनुष्यानें) हांजी हांजी करणें. *Fawn'ing*, *a.*, *-ly*, *adv.* हांजी हांजी करून.

Fay, *n.* (फे)—(*Poet.*) a fairy. परी, अप्सरा.

Faze, *v. t.* (फेझ्)—(*U. S.*, *sl.*) to discompose, disturb. बिघडविणें, चलबिचल करणें.

Fē'altȳ, *n.* (फी'अल्टि)—faithful adherence. स्वामिभक्ति, प्रजाधर्म, राजनिष्ठा, इमान, विश्वास. [L. *fidelis*, *fides*, faith]

Fear, *n.* (फिअर्)—painful emotion caused by impending evil; alarm, dread. भीति, भय, जरब; दरारा, दहशत, धास्ती, आदर. *v. i. & t.* to be afraid, be anxious, shrink from, fear God. भिणें, भीति वाटणें, दहशत वाटणें, उत्कंठित असणें, आशंका घेणें, (मनांत) आदर,-भय वाटणें. *For f. of* (*that*), lest. नाहींतर, न जाणों. *Without f. or favour*, impartially. निःपक्षपातानें, भीडभाड न धरतां. *No f.*, it is not likely. तें असंभवनीय,-अशक्य. *Never f.*, घाबरूं नको, धास्ती नको.

Fear'ful, *a.* (फि'अर्फुल्)— terrible; afraid; (colloq.) annoying; reverential. भयाण, भयानक, भेसूर, भयंकर: भ्यालेला, भित्रा, भ्याड; त्रासदायक, कंटाळवाणा; आदरयुक्त, आदरशील. *-ness n.*; *-lly*, *adv.*

Fear'lĕss, *a.* (फि'अर्लिस्)—feeling no fear; brave. निर्भय, निःशंक, धीट, शूर. *-ly*, *adv.*; *-ness*, *n.*

Fear'some, *n.* (फि'अरसम्)—formidable. भयंकर, भयानक.

Feas'ible, *a.* (फी'झिबल्)—practicable, possible; plausible. करतां येण्यासारखा, साध्य, सुकर, सुलभ, शक्य, लायकी. *-bility*, *n.* सुसाध्यता, घटनीयता; सुकरता.

Feast, *n.* (फीस्ट्)—joyful religious anniversary; annual village festival; sumptuous entertainment; (*fig.*) gratification to the senses or mind. सण, उत्सव, वर्षाचा दिवस; गांवचा वार्षिक उत्सव; मेजवानी, समाराधना, जेवणावळ; करमणूक, दिवाळी, समाधान. *v. i. & t.* to (cause to) partake of feast, to fare sumptuously; to regale. मेजवानी करणें,-देणें; ताव,-हात मारणें, तृप्त करणें, संतुष्ट होणें, खूप होणें, मजा, चैन,-करणें. *F. of reason*, intellectual talk. बौद्धिक करमणूक,-वादविवाद. *Feast'er*, *n.*

Feat, *n.* (फीट्)—a notable act, esp. of valour; surprising performance. मोठी कामगिरी, महत्कृत्य; पराक्रम, विक्रम, मात, कुशल कर्म, हातचलाखीचें काम. *a.* (arch.) smart, dextrous, चलाख, तल्लख, चतुर, कुशल. *-ly*, *adv.*

Feath'er, *n.* (फे'दर्)—the plume or quill of birds; plumage; a ridge of upright hair; feather-like flow in gem; (Rowing) action of feathering. पीस, पर, पंख, पिच्छ; पिसारा; केंसाचा उभा झुपका, भोंवरा; रत्नावरील पिसासारखा चरा; उभें वल्हें मारणें. *v. t. & i.* to furnish, line, or coat with feathers; enrich; turn oar so as to pass edgeways. पिसें लावणें, पिसांनीं मढविणें; शोभिवंत करणें, संपन्न करणें; वल्हें उभें मारणें. *To show the white f.*, भित्रेपणा दाखविणें. *Birds of a f.*, एका माळेचे मणि (लोक). *A f. in one's cap*, मान, प्रतिष्ठा. *To f. one's nest*, enrich oneself, आपली तुंबडी भरणें. *F.-bed*, पराची गादी. *F.-brain*(*ed*),*-head*(*ed*), *-pate*(*d*), silly (person). मूर्ख, खुळचट. *F.-weight*, हलक्या वजनाचा मनुष्य, हलकी वस्तु. *Feath'ered*, *a.*; *Feath'ery*, *a.* पिसांचा, पिसें असलेला, सपिच्छ. *Feath'ering*, *n.* पिसारा; बाणाचीं पिसें; पक्ष्याच्या अंगावरील पिसांची रचना; फुलांतील पिसासारखा भाग.

Fea'ture, *n.* (फी'चर्)—(*usu. pl.*) external appearance; characteristic part of a thing.

बाह्य स्वरूप, तोंडवळा, चेहरा; आकारविशेष, लक्षण, चिन्ह. *v. t.* to be a feature of; portray; show on cinema screen. चें लक्षण असणें; रंगविणें, दाखविणें; रुपेरी पडद्यावर (सिनेमांत) दाखविणें. *F.-less, a.* तोंडवळ्यांत वैशिष्ट्य नसलेला.

Fē'brĭfūge, *n.* (फी'ब्रिफ्यूज्, फे-)—a medicine to reduce fever; cooling drink ज्वरनाशक औषध; थंड,-शीतल,-पेय.

Fē'brile, *a.* (फी'ब्रिल्)—of fever, feverish. तापाचा, ज्वरसूचक.

Fĕb'ruarў, *n.* (फे'ब्रुअरि)—second month of the English year. इंग्रजी वर्षाचा, दुसरा महिना.

Fĕck'less, *a.* (फे'क्लिस्)—feeble, futile, lacking purpose or resource. क्षुद्र, निरर्थक, निराधार, व्यर्थ.

Fĕc'ūlence, *n.* (फे'क्यूलन्स्)—turbidness, dregs. गढूळपणा, गदळ, रेंदा, गाळ.-*lent, a.* turbid, fetid. रेंद्याचा, गाळाचा, गढूळ, गदळ.

Fē'cŭnd, *a.* (फी'कन्ड्, फे'-)—fertile, prolific; fertilizing. सुपीक, विपुल, अवंध्य; सुपीक करणारा.-*ity, n.* सुपीकपणा; बहुप्रजोत्पादनशक्ति, प्रजननशीलत्व.

Fē'cŭndāte, *v. t.* (फी'कन्डेट्)—to make fruitful; impregnate. फलद करणें; अमोघ,-फलित,-करणें; गर्भाधान करणें, प्रजनन करणें, रेतसिंचन करणें. -*tion, n.* रेतस्सेचन, गर्भाधान.

Fed, See *Feed. Fed up,* tired, bored. कंटाळलेला, त्रासलेला, त्रस्त.

Fĕd'eral, *a.* (फे'डरल्)—(of States) united, but independent in internal affairs. एकत्र परंतु स्वायत्त (राष्ट्रें), संयुक्त, तहानें बांधलेला. -*ism, n.*; -*ist, n.* संयुक्ततावादी.

Fĕd'erāte, *v. t. & i.* (फे'डरेट्)—to unite on federal basis or for common object. स्वायत्ततेच्या तत्त्वावर, -पायावर, -एकत्र होणें, संयुक्त होणें, -करणें; सामान्य उद्देशास्तव एकत्रित होणें. *a* (फे'डरट्) संयुक्त, संघटित. -*tion, n.* संघ, जूट, संयुक्त होणें. -*tive, a.* संयुक्त.

Fee, *n.* (फी)—sum payable to others for services; charge; gratuity; inherited estate; fief. वेतन, मेहनताना, कामाबद्दल द्यावा लागणारा मोबदला, फी; आकार; पारितोषिक; वडिलार्जित मालमत्ता; मोकासा, वेतनादाखल जमीन, जहागीर. *v.t.* to pay fee to; engage for fee. मेहनताना देणें; फी देऊन बोलावणें, -काम सांगणें. *F. simple,* वंशपरंपरा चालणारें वेतन (म्हणून विन अटीनें दिलेली जमीन), *F. tail,* वंशपरंपरा सशर्त वेतन म्हणून दिलेली जमीन, -वडिलोपार्जित मालमत्ता. *To hold in f. simple* or *f.,* have as absolute property. केवळ स्वतःच्या मालकीचीच अशी मालमत्ता असणें. *Retaining f.,* सचकार, बयाणा.

Fee'ble, *a.* (फी'बल्)—weak; wanting in character or intelligence or force or effect; dim, indistinct. निःशक्त, कमजोर, दुर्बळ; बुद्धिहीन, दुबळा, कमजोर; अस्पष्ट, अंधुक. -*ness, n.;* -*bly, adv.*

Feed, *v. t. & i.* (फीड्)—to supply with food; to graze (cattle); comfort, keep in hope; keep supplied; eat. खाऊं घालणें, पालनपोषण करणें; चारणें (गुरें); तृप्त करणें, (आशेवर) झुलवणें, पोसणें; पुरवठा करणें (यंत्राला); खाणें, जेवणें, चरणें. *n.* the act of feeding; meal; pasturage; fodder. पोषण, पुरवठा, (यंत्राला) भरवण; खुराक, आहार, भोजन; वैरण, चारा. *F. on,* consume. फस्त करणें. *F. up,* पुष्ट करणें, तृप्त करणें. *Out at f.,* चरायला सोडलेलीं (गुरें). *Off one's f.,* तोंडाला रुचि नसणें. *Fed, pa. t.*

Feed'er, *n.* (फी'डर्)—one who eats; one who feeds a machine; child's feeding-bottle or bib; a tributary; feeding apparatus in a machine; player who tosses ball to striker. खाणारा, आहारी, जीवी; (यंत्राला) भर घालणारा; दूध पाजण्याची बाटली; मुलाच्या छातीवरचें मळवस्त्र; (नदीचा) ओढा, फांटा, पोषक प्रवाह; पुरवठा करणारें उपयंत्र, पोषक; चेंडू उंच करून-आपटून फेंकणारा.

Feed'-pīpe, *n.* (फी'ड्पाइप्)—a pipe carrying water etc. to machine. यंत्राची पोषक नळी.

Feel, *v. t. & i* (फील्)—to explore or perceive by touch; to experience; to be affected by; to have pity for; (Mil.) reconnoitre. स्पर्श करणें, स्पर्शेंद्रियद्वारा जाणणें, चाचपून पाहणें; अनुभव येणें, मनाला लावणें, -वाटणें; -भासणें, दया येणें; टेहळणी, -पाहणी करणें. *n.* sense of touch; testing by touch; sensation. स्पर्शेंद्रिय; स्पर्शज्ञान: कशाचा तरी भास. *To f. the pulse,* नाडी पाहणें. *To f. one's legs* or *feet,* घट्ट आधार मिळणें; निश्चित असणें. *To f. well,* बरें वाटणें.

Feel'er, *n.* (फी'लर्)—an organ of touch in some animals; tentative suggestion; (Mil.) scout. (प्राण्यांचें) स्पर्शेंद्रिय, कांहीं प्राण्यांच्या मिशा; (दुसऱ्याचें मत अजमावण्याकरितां) खडा टाकून पाहणें, सूचना; लष्करी टेहेळ्या.

Feel'ing, *n.* (फी'लिंग्)—sense of touch; physical sensation; emotion; (*pl.*) susceptibilities; opinion. स्पर्शेंद्रिय; स्पर्श; (मनो-)विकार; कळवळा, भावना; मत. *a.* कोमल, कनवाळू, सहृदय; कळकळीचा, कळवळ्याचा.

Feign, *v. t. & i.* (फेन्)—to pretend; to invent to forge, imagine. बहाणा करणें, ढोंग करणें; बनावट करणें, योजणें, कल्पिणें. *Feign'ed*, *a.* कल्पित, खोटा, ढोंगी, बनावट.

Feint, *n.* (फेन्ट्)—a sham attack, blow, etc. to deceive opponent; pretence. हूल, हुलकावणी, डावपेंच; ढोंग, सोंग, छल, मिष. *v. t.* हूल दाखविणें.

Feist, *n.* (फाइस्ट्)—(*U. S.*) a small dog. लहान कुत्रा.

Fĕld'spar, *n.* (फे'ल्डस्पार्)—a kind of mineral. सोमकांत, चंद्रकांत: (खनिज पाषाण).

Fėlĭ'cĭtāte, *v. t.* (फ़िलि'सिटेट्)—to make happy (rare); congratulate. सुखी करणें; अभिनंदन करणें, आनंद प्रदर्शित करणें. *-tion. n.* (usu. *pl.*)

Fėlĭ'cĭtous, *a.* (फ़िलि'सिटस्)— extremely appropriate. apt, well-chosen, happy. योग्य, पाहिजे तसा, सुखी, उचित सुखी.

Fėlĭ'cĭtў, *n.* (फ़िलि'सिटि)—great happiness; bliss, joys of heaven, blissfulness. मोठें सुख, परमानंद, कल्याण, सौभाग्य.

Fe'line, *a.* (फी'लाइन्)—of cats; cat-like. मांजराचा, बिडालजातीय; कपटी, लबाड, विश्वासघाताचा. *Felin'ity*, *n.*

Fell, *pa. t.* of Fall

Fĕll', *n.* (फेल्)—animal's hide or skin; thick matted wool; (in names) mountain; stretch of moor-land; amount of timber cut. जनावराचें कातडें, सकेश चामडें; खडकाळ टेंकडी,-पर्वत; माळरान, दलदलीचा प्रदेश; तोडलेलें इमारती लांकूड, लांकूडतोड. *a.* fierce; destructive. भयंकर, क्रूर; घातक. *v. t.* to strike down; to cut down (a tree); stitch down (seam). पाडणें; तोडणें, तोडून घालणें; शिवणें, शिवून काढणें.

Fĕll'oe, Fĕll'ў, *n.* (फे'लि,-लो,-लि)—outer circle, or section of circumference, of wheel. चाकाचा बाहेरचा वर्तुळाकार घेर, अर्धेकड, चांक, पाटा, कड.

Fĕll'ow, *n.* (फे'लो)—comrade, associate; member of some learned societies; counterpart, equal, other of pair; elected stipendiary gradute doing research; (colloq.) man, boy. सोबती, साथीदार, गडी, इसम; सन्मान्य सभासद; जोडीपैकीं एक, जोडीचा; नर, मादी; वृत्तिधारी पदवीधर (संशोधक); मनुष्य, माणूस, पोऱ्या, मुलगा. *a.* of same class; associated in joint action, etc. तत्सम, तुल्य, तद्वर्गीय; साथी, जोडीदार. *Stone dead hath no f.*, मृतासारखा गुप्त गोष्ट राखणारा दुसरा कोणी नाहीं. *F. commoner*, फेलोंच्या टेबलावर (पंक्तींत) जेवणारा विद्यार्थी. *Poor f.!* गरीब बिचारा! *The f.*, लुच्चा, लबाड, क्षुद्र मनुष्य. *F.-creature*, जातभाई, प्राणी, सजातीय प्राणी, बंधु. *F.-citizen*, सहनागरीक, नागरीकभाई,-बंधु. *F.-countryman*, देशबंधु. *F.-student*, सहाध्यायी, गुरुबंधु. *F.-worker*, सहकारी.

Fĕll'ow-feeling, *n.* (फे'लो-फीलिंग्)—a like or kindred feeling, sympathy. सहानुभूति, कळवळा, दया, अनुकंपा.

Fell'owshĭp, *n.* (फे'लो-शिप्)—companionship; status of college fellow; (Arith.) sharing of profit and loss. सोबत, संगत; फेलोची जागा, शिष्यवृत्ति; भागीदारी, पार्ती, सरकत, सरकतवांटणी.

Fĕlō dė sē, *n.* (फेलोडिसी)—(*pl.* felones, -felos) self murderer; self-murder (no *pl.*) आत्मघातकी, आत्महत्या करणारा; आत्महत्या.

Fĕll'ў, *n.* (फे'लि)—circumference of a wheel. चाकाचा घेर.

Fĕl'on, *n.* (फे'लन्)—a criminal; small abscess. घोर अपराधी, खुनी; लहान गळू, फोड, नखुरडें. *a. & n.* cruel, wicked, murderous; one who has committed felony. दुष्ट, खुनी; घोर अपराधी. *Felo'nious*, *a.* (फ़िलो'निअस्) criminal; (Law) of, involving, felony. स्वामिद्रोही; घोर अपराधाचा, खून दरोडा वगैरे गुन्ह्यासंबंधी, देहान्त शिक्षेजोगा (गुन्हा). *-ly, adv.*

Fĕl'onў, *n.* (फे'लनि)—a crime graver than misdemeanour. भयंकर गुन्हा, अत्यंत घोर अपराध, देहान्त शिक्षेजोगा गुन्हा.

Fĕlt, *n.* (फ़ेल्ट्)—cloth of matted wool etc. एक जातीचा बुरणूस, जीन, नमदा. *v. t. & i.* to make into felt; become matted. फेल्टसारखा कपडा तयार करणें; फेल्ट कपडा चढवणें; बुरणुसाप्रमाणें होणें. *F. hat*, फेल्ट-जीनची -टोपी. *Felty*, *a.*

Felt, *pa. t.* of *Feel*.

Fėlŭcc'a, *n.* (फ़िल'का)—a small coasting vessel with oars or sails or both. लहान पडाव.

Fē'māle, *a.* (फी'मेल्)—of the offsping-bearing sex; (Bot.) fruit-bearing; having pistil and no stamens; of women; of inferior quality; (in instruments etc.) fitted to receive corresponding male part. स्त्री, मादी, स्त्रीजातीय; गर्भतंतुकेसरयुक्त, स्त्रीकेसरयुक्त; जनानी, स्त्रीधर्मी; हलक्या प्रतीचा, सौम्य; मादी. *n.* a female person or animal; (vulg.) a woman, girl. स्त्री, मादी; बायको, बाई, मुलगी.

Fĕmĭnăl'ĭtў, *n.* (फेमिनॅ'लिटि)—female nature or peculiarity. स्त्रीजातीचा स्वभाव,-चें वैशिष्ट्य.

Fĕm'ĭnĭne, *a.* (फे'मिनिन्)—of women; womanly; effeminate; having the gender proper to women's names. स्त्रियांचा; बायकांना शोभणारा,

कोमल, नाजूक, दुर्बळ; न्याड, नामर्द; स्त्रीलिंगी. *Femine'ity, Feminin'ity, nn.*

Fĕm'inism, *n.* (फे'मिनिझम्)—influence of women; belief in or advocacy of it. स्त्रीजातीचें वर्चस्व; स्त्रीवर्चस्वावरील विश्वास, त्याचा पुरस्कार. *-ist, n.; Fem'inize, v. t. & i.* स्त्री, स्त्रैण, स्त्रीलिंगी होणें, -करणें.

Fĕn, *n.* (फेन्)—a low marshy tract of land, a swamp where water stagnates. पाणथळ जमीन, दलदल. *Fenn'y, a.*

Fĕnce, *n.* (फेन्स्)—a hedge &c. enclosing a field; art of using sword; guard in machine; receiver, receiving house, of stolen property. कुंपण, वई, आवार, कोट; दांडपट्टा (खेळण्याचें कसब); चाप; चोरीचा माल घेणारा, चोरबाजार. *v. t. & i.* to surround as with fence; practise sword-play; (fig.) evade; deal in stolen goods. कुंपण घालणें; दांडपट्टा खेळणें; युक्तिवाद खेळणें, -करणें; चोरीच्या मालाचा व्यापार करणें. *To sit on the f.,* तटस्थ राहणें, बाजू न घेणें.

Fĕnce'less, *a.* (फेन्स्'लिस्)—not enclosed; (poet.) unfortified, defenceless. उघडा, कुंपण नसलेला; अरक्षित, तटबंदी नसलेला.

Fĕn'cer, *n.* (फेन्सर्)—one who practises art of using sword; (of horse) one that leaps fences. दांडपट्टा शिकविणारा,-खेळणारा; कुंपणावरून उडी मारणारा घोडा.

Fĕn'cible, *n.* (फे'न्सिबल्)—(hist.) a soldier liable only for home defence. देशांतल्या देशांत नोकरी करणारा सैनिक.

Fĕn'cing, *n* (फे'न्सिंग्)—art of sword-play; (material for) fences. दांडपट्ट्याचा खेळ,-सराव,-अभ्यास; कुंपणाचें सामान, काठ्या, शिर्री; कुंपण, आवार. *F.-cully,* चोरीचा माल सांठवून ठेवणारा. *F.-ken,* चोरीच्या मालाची वखार.

Fĕnd, *v. t. & i.* (फेन्ड्)—to ward *off,* keep *away*; provide *for.* दूर राखणें, वारणें, निवारणें; (स्वतःसाठीं) तरतूद करणें, बचाव करणें. *Fen'der, n.* thing used to keep something off; frame round hearth. निवारक, (धक्क्याला जहाज आपटूं नये म्हणून जहाजाच्या बाजूस सोडलेलें) जाड दोरखंडाचें वेटोळें, डफरा; चुलीचा आडोसा,-ची पाळ. *-less, a.*

Fĕnes'trate, *a.* (फेने'स्ट्रेट्)—(bot., zool.) with small window-like perforations. गवाक्षसदृश जाळीचा, छिद्रांचा. *-tion, n.* इमारतींतील खिडक्यांची रचना; जाळीदार, सच्छिद्र असणें. [L. *fenestra,* window]

Fē'nian, *a. & n.* (फी'निअन्)—one of a league among the Irish in U. S. for overthrowing English rule in Ireland. (इंग्रजी राज्य उलथून पाडणाऱ्या गटापैकीं) आयरिश क्रांतिकारक.*-ism, n.*

Fĕnn'el, *n.* (फे'नल्)—yellow-flowered fragrant herb used in sauces. (एक जातीची) बडीशोप.

Fĕn'ŭgreek, *n.* (फे'न्यूग्रीक्)—leguminous plant with seeds. मेथी, मेथोडा.

Feoff, *n.* (फेफ्)—fief; territory held in fee. तावा, मालकी; बक्षी करून मिळालेली जमीन. *-ee', -'er, -'or, nn.* बक्षीस करून जमीन घेणारा, देणारा.*-ment, n.*

Fēr'al, Fēr'ine, *n.* (फी'अरल्,फी'अराइन्)—wild; uncultivated; brutal. रानटी, जंगली; पढीत; घातक, प्राणनाशक.

Fĕ'retory, *a.* (फे'रिटरि)—a shrine; tomb; bier. समाधि, छत्री; थडगें; तिरडी, ताटी.

Fēr'ial, *a.* (फी'अरिअल्)—(of day) ordinary. (आठवड्यांतील, उपास तापासाचा नव्हे असा) सामान्य, साधा (दिवस).

Ferm'ĕnt, *n.* (फ'र्मेन्ट्)—fermenting agent; tumult. आंबविणारा पदार्थ, मंड, किण्व, विपाक; क्षोभ, गडबड, गोंधळ. *v. t. & i.* (फर्मे'न्ट्), to suffer, subject to, fermentation; excite, foment. विपाक उत्पन्न होणें,-करणें, आंबवणें; प्रक्षुब्ध होणें, करणें.*-able,-ative, aa.*

Fermentā'tion, *n.* (फर्मेन्टे'शन्)—process like that induced by leaven in dough; agitation, excitement. आंबवणें, फसफसणें, फदफदणें; मनाचा क्षोभ, अस्वास्थ्य, क्षोभ.

Fern, *n.* (फर्न्)—(Bot.) kinds of vascular cryptogamous plants. नेचा, नेचरी, सीतेचे केंस. *Fern'ery, n.* नेच्याचे रोप तयार करण्याची जागा. *Fern'y, a.*

Ferō'cious, *a.* (फरो'शस्)—fierce, cruel. क्रूर, निष्ठुर, हिंस्र, हिंसक. *-ly, adv.*

Ferŏ'city, *a.* (फरॉ'सिटि)—savage wildness or fierceness, savageness, cruelty. रानटीपणा, क्रौर्य.

Fĕ'rreous, *a.* (फे'रिअस्)—of, containing, iron. लोखंडाचा, लोखंडी, लोहमय.

Fĕ'rrĕt, *n.* (फे'रिट्)—a kind of polecat used in catching rabbits, etc; detective; a tape. एक जनावर (पारध) शोधून काढणारा; फीत. *v. i. & t.* फेरिट जनावराच्या साह्यानें शिकार करणें; शोध काढणें.

Fĕ'rrotȳpe, *n.* (फे'रटाइप्)—positive photograph on thin iron plate; this process. पातळ लोखंडी पत्र्यावर काढलेला फोटो,-छायाचित्र; तें काढण्याची पद्धति.

Ferru'gĭnous, *a.* (फरू'जिनस्)—of iron rust; rust-coloured. लोहांश असलेला; लोखंडाच्या गंजाच्या रंगाचा, तांबूस, पिंगट.

Fĕ'rrule,-rel, *n.* (फे'रल्)—a ring or cap of metal. मायणी, घसवी, लोहवलय.

Fĕr'ry, *n.* (फे'रि)—a place or provision for ferrying; right of ferrying; a small boat. तरीची जागा, उतार, तर; तरीचा मक्ता; जाण्यायेण्याची नाव. *v. t. & i.* तरीपार नेणें,-जाणें. *F.-man,* तर्या, नावाडी. *Fe'rriage, n.* तरीनें नेणें; तरीचें भाडें.

Fert'ile, *a.* (फ'र्टाइल्,-टिल्)—bearing or producing abundantly; fruitful. सुपीक; फलोत्पादक; कल्पक, सुपीक डोक्याचा. *-lity, n.* सुपीकपणा फलवत्ता.

Fert'ilize, *v. t.* (फ'र्टिलाइझ्)—to make fertile, to fecundate. सुपीक करणें; (गर्भ) आहित करणें, गाभवणें. *-zation, -zor, nn.*

Fĕ'rula, *n.* (फे'रुला)—(Bot.) giant fennel. एक जातीची घहीशेप. *Fe'rule, n. & v. t.* flat ruler for punishing boys. पंतोजीची पट्टी, छडी (-नें शिक्षा करणें.)

Ferv'ent, *a* (फ'र्व्हन्ट्)—hot, glowing; ardent, intense, zealous. उष्ण, तेजस्वी; उत्साही, तीव्र, तीक्ष्ण, कळकळीचा. *Ferv'ency, Ferv'our, nn.*

Ferv'id, *a.* (फ'र्व्हिड्)—ardent. उष्ण, उत्सुक, उत्साही, कळकळीचा.

Fĕs'cue, *n.* (फे'स्क्यू)—teacher's pointer; kind of grass. लहान काठी, छडी; एक जातीचें गवत.

Fĕs'tal, *a.* (फे'स्टल्)—of a feast; gay. सणावाराचा; मौजेचा.

Fĕs'ter, *v. i.* (फे'स्टर्)—to generate matter; rankle; rot. पुवळणें, चिडणें, उतणें, (गळूं) पिकवणें. *n.* गळूं; सळ.

Fĕs'tival, *n.* (फे'स्टिव्हल्)—day of a feast; celebration, merry-making. उत्सव, सणाचा दिवस; सण, आनंद, मजा.

Fĕs'tive, *a.* (फे'स्टिव्ह्)—of a feast; joyous, gay, mirthful. मेजवानीचा आनंदाचा, मौजेचा. *-ly, adv.*

Fĕstiv'ity, *n.* (फेस्टि'व्हिटि)—gaiety, festive celebration, the mirth of a feast. आनंद, मौज, उत्सव, सण.

Fĕstoon', *n.* (फे'स्टून्)—a hanging chain (of flowers, ribbons, &c.). फुलांची किंवा रंगीत पदार्थांची केलेली माळ, तोरण, माळ, हार. *v. t.* माळा, तोरण लावून शोभा आणणें.

Fĕtch, *v. t. & i.* (फेच्)—to go for and bring back; to draw forth; to be sold for; to deal (a blow). जाऊन आणणें; (रडें, अश्रू) काढणें, -आणणें; किंमत आणणें, किंमत येणें; (टोला) देणें. *n.* trick; far-reaching effort; person's double. युक्ति, डाव; दीर्घ श्रम, परिश्रम; जिवंत समंध, भूत, छायापुरुष.

Fĕtch'ing, *a.* (फे'चिंग्)—attractive. मनोहर, आनंददायक.

Fête, *n.* (फेट्)—a festival, an entertainment. सण, उत्सव, उत्सवदिन, जत्रा, मेजवानी. *v. t.* to entertain, make much of. मेजवानी देणें; (एकाद्याचा) गौरव करणें, उदो उदो करणें. *Fete champetre,* (फेट्शांपे'ट्र), out-door fete. वन-भोजन. *F. day,* उत्सव दिन, वाढदिवस. [F]

Fē'tid, Foe'tid, *a.* (फी'टिड्, फे'टिड्)—stinking. वाशेळा, दुर्गंधीचा, कुजणारा, सडका. *-ly, adv., -ness, n.*

Fē'tish, *n.* (फी'टिश्, फे-)—an inanimate object worshipped by savages; a principle etc. irrationally reverenced. रानटी लोक पूजा करितात ती मूर्ति -दृष्टींतील जड वस्तु; अति आवडीची वस्तु, स्तोम माजविलेलें तत्त्व इ. *-ism, n.* मंतरलेल्या,-भारलेल्या,-दैवी म्हणून मानलेल्या जडवस्तूची पूजा. *-ist, n.* भारलेल्या जड वस्तूचा पूजक. Also, *Fe'tich (e), n.*

Fĕt'lŏck, *n.* (फे'ट्लॉक्)—part of horse's leg where tuft of hair grows. घोड्याच्या खुरावरील केंस, -ती जागा, नेवर, नेवरावरील केंस.

Fĕtt'er, *n.* (फे'टर्)—a shackle for the feet; a band; (*pl.*) captivity; restraint. पायबेडी, बंधन; (अने०) कैद, बंदिवास. *v. t.* to bind as with fetters, impede. बिड्या घालणें, प्रतिबंध करणें, अटकाव करणें. *F. lock,* D या आकाराचा घोड्याचा पायबंद. *F.-less, a.* मोकळा, निरंकुश, मुक्त.

Fĕt'tle, *n.* (फे'टल्)—condition. स्थिति, ठाकठीक.

Fetus, See *Foetus.*

Feu, *n.* (फ्यू)—perpetual lease at fixed rent; piece of land so held. ठराविक भाडें घेऊन निरंतर भोगवट्यासाठीं देणें; -अशी दिलेली जमीन.

Feud, *n.* (फ्यूड्)—lasting mutual hostility; fief, feudal benefice, territory held in fee. कलह, भांडण, हाडवैर; जहागीर, कुणबावा, मोकासा.

Feud'al, *n.* (फ्यू'डल्)—of a feud or fief, held of a lord on condition of service. नोकरी करण्याच्या अटीवर दिलेल्या जहागिरीसंबंधीं, मोकाशाचा. *F. system,* लष्करी जहागिरीची पद्धत. *Feud'alism, n.* (लष्करी किंवा इतर नोकरी करण्याच्या अटीवर मिळालेली) मोकासदारी, जहागिरदारी. *Feud'alist, n.* लष्करी जहागीर देण्याच्या पद्धतीचा कैवारी.

Feud'atory, *a. & n.* (फ्यू'डटरि)—feudally suject to; a feudal vassal. लष्करी नोकरीबद्दल जहागीर धारण करणारा, मोकाशानें घेतलेला. *n.* मोकाशी, सरदार, सामंत.

Fē'ver, *n.* (फी'व्हर्)—morbid condition with temperature ; nervous excitement. ताप, ज्वर; उत्कंठातिरेक, मनःक्षोभ. *v. t.* to throw into fever. ताप येणें, संतप्त.-क्षुब्ध होणें. *Fe'vered*, (*pa. p., fig.*) restless, agitated. अस्वस्थ, क्षुब्ध, संतप्त. *F.-heat*, तापाची आग,-उष्णता. *F.-trap*, तापाचे जंतु साठविणारी रोगट जागा,-स्थळ. *Fe'verous*, *a.* तापकरी, ज्वरकरी (स्थळ, हवामानाची जागा).

Fē'verish, *a.* (फी'व्हरिश्)—having symptoms of fever ; excited, restless ; (of place) feverous. तापाचीं पूर्वचिन्हें धादत असलेला ; कसर आलेला ; अस्वस्थ, चंचल ; तापकरी, ज्वरकरी. *-ly, adv., -ness, n.*

Fē'verfew, *n.* (फी'व्हर्फ्यू)—a herb formerly used as a febrifuge. ज्वरनाशक वनस्पति.

Few, *a. & n.* (फ्यू)— not many, small in number. थोडे, अगदीं थोडे, दोन चार, चार पांच, अल्पसंख्या. *A f.* (opp. to none), थोडेसे, कांहीं. *The f.*, अल्पसंख्य, शिष्ट, सभ्य. *Not a f*, many. पुष्कळ, बरेच. *A good f.*, a fair number (*of*). बरेचसे लोक. *A f.* (*sl.*) बरेचसे, निःसंशय. *In f.*, संक्षेपानें. *Few'ness*, *n.* अल्पता, थोडकेपणा, थोडेपणा.

Fey, *a.* (फे)— with the mind in abnormal state ; fated to die. मनाची अस्वस्थता असलेला, आसन्नमरण.

Fēz, *n.* (फेझ्)—Turkish cap. तुर्की टोपी.

Fianc'e, *n.* (फीआ'न्से)—one's betrothed (male). वाङ्‌निश्चत वर, विवाहवचनबद्ध पुरुष.*-ee*, (*fem.*) वाङ्‌निश्चित वधू. [F]

Fiăs'cō, *n.* (फीॲ'स्को)—(*pl. -os*) an ignominious and notorious failure, break-down. अपयश, फजिती, विचका, बोऱ्या.

Fī'at, *n.* (फा'यट्)— authorization ; decree. अधिकार ; हुकूम, आज्ञा, फर्मान, आदेश. [L=be it done]

Fib, *n. & v. i.* (फिब्)—(to tell) a trivial lie. क्षुल्लक गोष्टींत लबाडी, खोटें (बोलणें). *Fibb'er, Fib'ster, nn.* गप्पाड्या, बाताड्या.

Fib, *n. & v. t.* (फिब्)—(Boxing) (to hit) a blow. ठोंसा देणें.

Fī'bre, *n.* (फा'इबर्)—a thread-like filament ; (substance formed of fibres ; fibrous structure; character ; small root or twig. तंतु, तांत, सूत, दोरा ; तंतुमय पदार्थ, तंतुसारखा पदार्थ, तंतुमय कच्चा माल (कापूस, रेशीम) ; तंतुमय रचना ; शील, दम, पाणी ; अगदीं लहान मूळ किंवा फांदी. *F. silk*, artificial silk. कृत्रिम रेशीम. *Fi'bred*, *a.* (फा'इबर्ड्), तंतूंचा केलेला,-बनविलेला, तंतुमय. *Fi'brous*, *a.*

Fī'bril, *n.* (फा'इब्रिल्)—small fibre. बारीक तंतू, तंतुकडी.

Fī'brin, *n.* (फा'इब्रिन्)—coagulable lymph found in animals and plants. रक्ततंतुबीज, तान्तव, रक्तांतील एक पांढरें तंतुमय द्रव्य.*-ous, a.*

Fī'broid, *a.* (फा'इब्रइड्)—fibre-like. तंतूसारखा, तंतुमय रचनेचा. *n.* fibroid uterine tumour. गर्भाशयांतील तंतुमय ग्रंथी.

Fibro'ma, *n.* (फा'इब्रो'मा)—(*pl.-ta*), fibrous tumour. तंतुमय ग्रंथी, तंतुमय- त्वचेनें बनलेलें घाळूक.

Fib'ūla, *n.* (फि'ब्यूला)—(*pl.-ae,-as*), splint bone on outer side of leg ; brooch. गुल्फास्थि, बहिर्जंघास्थि, पायाच्या दोन हाडांपैकीं एक ; अडकवण. *Fib'ular, a.*

Fic'kle, *a.* (फि'कल्)—inconstant, changeable. चंचल (-बुध्दीचा,-मनाचा), अस्थिर.*-ness, n.*

Fic'tile, *a.* (फि'क्टाइल्)—made by a potter ; of pottery. कुंभारानें केलेला, मातीचा ; मातीच्या भांड्यांचा.

Fic'tion, *n.*: (फि'क्शन्)—feigning, invention ; invented statement or narrative, novels, etc.; conventionally accepted falsehood. कल्पनेनें निर्माण करणें, कल्पिणें ; कल्पना, रचना, मानससृष्टि ; कल्पित कथा, कादंबरी इ. वाङ्‌मय ; व्यंगपूरक कल्पना.*-al, a.* कल्पनेचा, काल्पनिक, कादंबरी-संबंधीं.*-ist, n.* कादंबरीकार.

Ficti'tious, *a.* (फिक्टि'शस्)—not genuine ; assumed, imaginary ; of, in, novels. असत्य ; रचलेला, कल्पित, बनावट ; कादंबरीचा, कादंबरीं-तील, काल्पनिक.*-ly, adv.*;*-ness, n.*

Fic'tive, *a.* (फि'क्टिव्ह्)—creating, created, by imagination. कल्पनासूचक, काल्पनिक.

Fid'dle, *n.* (फि'डल्)—a violin ; (Naut.) a contrivance for stopping things from rolling off table ; (Bot.) a kind of dock with fiddle-shaped leaves. एक तंतुवाद्य, सारंगी ; (टेबलावरून वस्तु घसरूं नयेत म्हणून) फिडलसारखी मांडणी ; एक फिडलसारख्या पानांची वनस्पति. *v. i. & t.* to play the fiddle ; be idle, potter, move aimlessly. सारंगी वाजवणें ; आळशीपणानें वागणें, उगाच हाताचीं बोटें हालवणें, बोटांचे चाळे करणें, भटकणें. *Fit as a f.*, in good condition and spirits. हुशारींत, स्वस्थचित्त. *To play first, second, f.*, पुढाकार घेणें, पुढारी होणें, च्या हाताखालीं काम करणें. चा हस्तक बनणें. *Face as long as a f.*, a dismal face. आंबट, दुःखीकष्टी, चेहरा. *Hang up one's f. when one comes home*, बाहेर बहुभाष, विनोदी पण घरांत सुखस्तंभ. *F.bow,-stick*, सारंगी वाजविण्याची काठी, कमान, गज.

F.stick(s), *F.-stickend*, nonsense. छट्, छे! कुचकामाची गोष्ट. *Fiddle faddle*, *n.* क्षुल्लक गोष्ट, नसती उठाठेव; रिकामटेकडा. *a.* क्षुद्र, क्षुल्लक. *int.* छट्! *v. i.* उगाच माशा मारणें.

Fidd'ler, *n.* (फि'ड्लर्)—a player on fiddle, esp. for hire; kind of small crab. (भाडोत्री) सारंगीवाला; लहान खेकडा, कुरली.

Fidd'ling, *a.* (फि'ड्लिंग्)—petty, trifling. क्षुद्र, कुचकामाचा.

Fidĕl'itў, *n.* (फिडे'लिटि)—faithfulness, loyalty; accuracy. इमानीपणा, निःसीम भक्ति; सत्यता, तंतोतंतपणा.

Fidg'ĕt, *n.* (फि'जिट्)—an uneasy restless state or mood, restlessness; one who fidgets, act of bustling. चळवळ, अस्वास्थ्य, चुळबूळ, चुळबूळ, हालचाल,-करणारा,-करविणारा; धांदल, हालचाल. *v. i. & t.* चुळबूळ करणें, चळवळणें, अस्वस्थ करणें. *Fidg'ety*, *a.* अस्वस्थ, चळवळ्या; *-tiness*, *n.*

Fid'ibus, *n.* (फि'डिबस)—a paper spill for lighting candles, etc. (मेणबत्ती वगैरे पेटविण्याची) कागदाची चिरफळी.

Fidū'cial, *a.* (फाइड्यू'शल्)—having the nature of trust or reliance. भरंवशाचा, अढळ; निश्चल म्हणून मानलेला.

Fidū'ciarў, *n.* (फाइड्यू'शरि)—held or given in trust. विश्वासाचा, अढळ, विश्वासात्मक. *n.* a trustee. विश्वस्त.

Fie, *int.* (फाय्)—expressing sense of outraged propriety. *F. upon you!* छी, थू, धिक्कार!

Fief, *n.* (फीफ्)—estate held under condition of service. नोकरी करण्याच्या अटीनें दिलेली जहागीर, मोकासा.

Field, *n.* (फील्ड्)—ground, esp. for pasture or tillage; a battle, the ground where battle is fought; a tract rich in some natural product; expanse of sea, snow, etc.; (Crick.) fielders; area or sphere of operation etc.; (attrib.) found in the open country. क्षेत्र, शेत, वाडी, वावर, वाडगें, माळ; लढाई, युद्ध; रणक्षेत्र, समरांगण, रणमैदान; (खनिजद्रव्यें असलेला) प्रदेश, (खनिजद्रव्यें असलेली) जमीन; विस्तार; (क्रिकेटच्या खेळांतील) क्षेत्ररक्षक; कार्यक्षेत्र, अवसर, वाव, संधि; मैदानांतील, शेतांतील (विशे॰). *v. i. & t.* to act as fieldsman; to stop and return ball. क्षेत्ररक्षण करणें; चेंडू थांबविणें व परत देणें. *Battle-f.*, रणक्षेत्र. *Fair f. and no favour*, equal conditions in contest. उभयपक्षीं सारख्या अटींचा-निःपक्षपाती-सामना. *To hold the f.*, आपली जागा कायम राखणें *To take the f.*, स्वारीला-लढाईला- प्रारंभ करणें. *To keep the f.* लढाई चालू ठेवणें. *A good f.*, many and good competitors. पुष्कळ व चांगले (खेळांतील) प्रतिस्पर्धी,-खेळाडू. *F. allowance*, रणांगणावरील अधिकाऱ्याला मिळणारें ज्यादा वेतन. *F. artillery*, *-battery*, गाड्यावरच्या हलक्या तोफा, हलक्या तोफांचा ताफा. *F.-cornet*, magistrate of township. शहराचा मॅजिस्ट्रेट-अधिकारी *F.-day*, (Mil.) manoeuvring exercise or right; (fig.) great occasion, important debate; an athletic meeting (U. S.) कवायतीचा, गोळीबाराचा दिवस; सणाचा दिवस, महत्त्वाचा वादविवाद; कुस्त्यांचा फड, शारीरिक खेळांचा दिवस. *F.-driver*, भटक्या जनावरांना पकडून कोंडवाड्यांत घालणारा अधिकारी. *F.-fare*, a kind of thrush spending winter in Britain. मदनसारिकेसारखा पक्षी. *F.-glass*, binocular telescope for outdoor use; a small telescope. दोन्ही डोळ्यांनीं पाहाण्याची लहान दुर्बीण; यथावर्णदर्शक दुर्बीण. *F. greys*, German soldiers in servics uniform. लष्करी गणवेषधारी जर्मन सैनिक. *F.-hospital*, ambulance; temporary hospital near battlefield. शुश्रूषापथक; रणक्षेत्रावरील तात्पुरता दवाखाना; इस्पितळ. *F.-Marshal*, general officer of the highest rank. रणधुरंधर, सर-सेनापति, रणगाजी. *F.-night*, (fig.) f. day. उत्सवाचा, सणाचा,-दिवस. *F.-officer*, कॅप्टनच्या वरच्या दर्जाचा व जनरलच्या खालचा लष्करी अधिकारी. *F.-s'man*, (क्रिकेट इ) खेळांतील क्षेत्ररक्षक. *F.-sports*, outdoor sports, esp. hunting, shooting and fishing. (पारध, शिकार, निशाणबाजी, मासे मारणें वगैरे) मैदानी खेळ. *F.-work*, temporary fortification. तात्पुरती तटबंदी. *F.-wards*, *adv.*

Field'er, *n.* (फी'ल्डर्)—fieldsman at cricket. क्रिकेटच्या खेळांत चेंडू अडवणारा किंवा झेलणारा. *Field'ing*, क्षेत्ररक्षण.

Fiend, *n.* (फीन्ड्)—the devil; superhumanly wicked or clever person. भूत, पिशाच्च; सैतान; अत्यंत दुष्ट क्रूर मनुष्य, अति हुशार मनुष्य.*-ish*, *a.*

Fierce, *a.* (फिअर्स्)—violent in hostility; raging, vehement; intense. भयंकर, क्रूर; उग्र, आवेशी, कडक, तीव्र.*-ly*, *adv*; *-ness*, *n.*

Fier'ў, *a.* (फा'यरि)—consisting of fire, flaming, flashing; easily provoked, irritable; spirited; (of cricket pitch) making ball rise dangerously. अग्नियुक्त; जाज्वल्य; तापट; कडक; पाणीदार; चडू जोरानें उडी घेतो अशी घट्ट (जमीन). *Fier'ily*, *adv.*; *fier'iness*, *n.*

Fife, *n.* (फाइफ्)—a. shrill military flute; a fifer. मुरली, पावा, रणतुर, रणवाजंत्र; रणवाजंत्री. *v. i. & t.* रणवाजंत्र वाजविणें,-वाजणें. *Fi'fer, n.* रणवाजंत्र वाजविणारा.

Fifteen', *a. & n.* (फिफ्टी'न्)—one more than fourteen, 15, XV; Rugby foot-ball side of 15 players. पंधरा; रग्बि फुटबॉल खेळांतील पंधरा खेळाडूंचा संघ. *The f.*, १७१५ मधील जेकोबाइट पक्षाचें बंड. *Fifteen'th, a. & n.* पंधरावा.

Fifth, *a. & n.* (फिफ्थ्)—next after fourth. पांचवा; पंचमांश, पांचवा भाग; पंचम स्वर. *To smite under the f. rib*, kill. ठार मारणें. *Fifth'ly, adv.*

Fif'tў, *a. & n.* (फिं'फ्टि)—five times ten.-50, L. पन्नास. *Fifty fifty, (U. S.)* half and half, equal shares. निम्मेनिम, सारखा वांटा. *I have fifty things to tell you*, मला बऱ्याच गोष्टी तुला सांगावयाच्या आहेत. *The fifties*, ४९ ते ६० या वर्षांमधील काळ. *Fif'tieth, a. & n.* पन्नासावा. *Fiftyfold, a. & adv.* पन्नासपट.

Fig, *n.* (फिग्)—a soft pear-shaped many-seeded fruit.; the tree, a valueless thing. अंजीर, अंजिराचें झाड, किंमतहीन वस्तु, कवडी, कसपट. *F. tree*, अंजीराचें झाड. *Under one's vine and f.-tree*, safe at home. घरांत सुरक्षित *Don't care a f. for that*, त्याची पर्वा करूं नको. *A f. for—*,! फें! हट्! *F-leaf*, a device for concealing what is indecorous. अश्लील-असभ्य,-गोष्ट,- वस्तु,- लपविण्याची युक्ति. *F.-wort*, पिंगट फुलांची वनस्पति.

Fig, *v. t.* (फिग्)—*F.-out* (a person), dress up, adorn. (मनुष्याला) सजविणें, (घोड्याला) नटविणें, थाटमाट करणें. *n.* dress, equipment, condition. पोषाख, थाटमाट, भपका; स्थिति.

Fight, *v. i. & t.* (फाइट्)—to contend in battle or single combat or with the fists; to maintain against an opponent, contend over (question), win one's *way* by fighting; set on (cocks, dogs) to fight; manoeuvre in battle. लढणें, लढाई,-युद्ध-करणें, झगडणें, शीं सामना करणें, -देणें; निकाल लावून घेणें, लढविणें; धकाधकीनें मार्ग काढणें; झुंज लावणें; टक्कर लावणें; लढाईंत,-युद्धांत-डावपेंच लढविणें. *n.* fighting battle; (*figu.*) strife, conflict. युद्ध; लढाई; भांडण, झगडा. *To f. off*, repel with effort. प्रयासानें निवारणें. *To f. it out*, settle by fighting. सोक्षमोक्ष करणें-लावणें, निकाल लावून घेणें. *F. shy of*, keep aloof from. पासून अलग राहणें, धाडस न करणें, हात न लावणें. *Running f.*, शत्रूचा पाठलाग करीत चालविलेलें युद्ध. *Sham f.*, लुटपुटूची-कवायतीची लढाई. *Stand-up f.*, उघड उघड लढाई *To show f.*, not to yield tamely. दोन हात करणें, भ्याडपणें शरण न जाणें. *Fight'er, n.* योद्धा, लढवय्या. *Fight'ing, n.* युद्धोपयोगी, लढाईच्या उपयोगाचा लढाईचा. *Fought*, (फॉट्) *pa.* t. &. *pa.* p.

Fig'ment, *n.* (फि'ग्मन्ट्)—an invented statement; imaginary thing. कल्पिलेली,-रचलेली गोष्ट, मानससृष्टि, खोटी गोष्ट.

Fig'ūrant, *n.* (फि'ग्यूरन्ट्)—a ballet dancer. मुग्धनाट्यांतील नट, मुग्ध-नर्तक.-*te*,fem. मुग्धनाट्य-नर्तकी.

Figūrā'tion, *n.* (फिग्युरे'शन् .-फिगरे) an act of formation; shape बनणें, घडणें; आकार, आकृति.

Fig'ūrative, *a.* (फि'ग्युरेटिव्ह्)—metaphorical, emblematic; pictorial, plastic. लाक्षणिक, औपचारिक, अन्योक्तीचा; अलंकारिक, अलंकारमधुर; चित्राचा, प्रतिकृतिसंबंधीं. *-ly, adv.*; *—ness, n.*

Fig'ure, *n.* (फि'गर्)—an external form; bodily shape; an image; a diagram, an illustration; a statue emblem, type, simile; likeness; horoscope; (Logic) the form of a slloygism according to position of middle term; (Rhet.) any deviation from the plainest form of statement; eovlution in dancing; a character denoting, a number (0, 1, 2, &c.). आकार, बाह्य रूप; आकृति; मूर्ति, पतिमा; आकृति, घनाकृति, चित्राकृति पुतळा, चित्र, छबी, तसबीर; प्रतिबिंब, प्रतिरूप, नमुना; सादृश्य; जन्मकुंडली; (तर्क०) आकार, अनुमानवाक्यप्रकार; (अलं०) रूपक, अलंकारिक भाषा; पदन्यास, नाचाचीं पावलें: अंक, आंकडा, आंख, संख्यादर्शक चिन्ह. *v. t. & i.* to represent in diagram or picture; imagine; estimate, be estimated; appear; mark with numbers or prices, cipher, आकृतींत,-चित्रांत दाखविणें, चित्र काढणें; कल्पना करणें; किंमत ठरविणें, -ठरणें; दिसणें; किंमत,- किंमतीचा अंक मांडणें; मोजणें, गणती करणें. *To keep one's f.*, शरीरानें आहे तसेंच राहणें, लठ्ठ न होणें. *A person of f.*, प्रसिद्ध पुरुष. *Double ff*, १० ते १०० यांमधील आंकडे. *Reach three ff.*, (क्रिकेटच्या खेळांत) शंभर धांवा काढणें. *F. of speech*, भाषेचे अलंकार. *F.-caster*, ज्योतिषी.

Fig'ure head, *n.* (फि'गरहेड्)—a carved bust, etc. over ship's cutwater; merely nominal leader, etc.; (Joc.) person's face. गलबताच्या नाळीवरील खोदीव पुतळा, आकृति; नांवाचा पुढारी, नामधारी; माणसाचा चेहरा.

Fig'ūrine', *n.* (फिग्यु'रिन्)—statuette. लहान पुतळा, -आकृति.

Fila'ment, *n.* (फि'लमन्ट्)-thread-like body, fibre; part of stamen that supports another. तंतु, सूत्र; केसर .—*ary*,—*ous*, *aa*.

Fil'ature, *n.* (फि'लचर्)-reeling silk from cocoons. रेशमी कोसल्यांतील चेटोळेदार रेशीम.

Filch, *v. t.* (फिल्च्)—to steal, to pilfer. भुरटी चोरी करणें.

File, *n.* (फाइल्)—an instrument for reducing or smoothing objects; (*sl.*) artful person; a stiff pointed wire or other device for holding papers; an orderely collection of papers; a row (of persons &c.) one behind another. कानस, कानसण्याचें हत्यार; लबाड,-कावेबाज,- मनुष्य; अडकवणें (कागदाची वगैरे) फाइल क्रमवार लावलेले कागदपत्र; रांग, ओळ. *v. i. & t.* to smooth, reduce, remove with a file; polish; to march in a file; to place papers on a file. कानस मारणें, कानशीनें घासणें; घासून गुळगुळीत करणें; एका पाठीमागून एक रांगेनें जाणें; फाइलमध्यें कागद ठेवणें, निशाणी क्रमांक घालून खटल्यांत दाखल करणें; रांगेनें चालणें,-चालवणें. To *bite*, or *gnaw*, *f.* कानस कुरतडणें म्ह. अशक्य गोष्ट करण्याचा प्रयत्न करणें.

Fil'ial, *a.* (फि'लिअल्, फा'इ-)-of or befitting a son or daughter. मुलग्याला किंवा मुलीला योग्य असा, अपत्यसंबंधाचा. (L *filias*, a son)

Filia'tion, *n.* (फिलिए'शन्, फाइलि—)—parentage; descent; branch of a society. पुत्रत्व, पुत्रत्वाचें नातें; वंशीयता; वंशावळ, शाखा.

Fil'ibuster, *n.* (फि'लिबस्टर्)—one who wages unauthorized warfare against foreign State; an obstructionist. बंडखोर, पेंढारी; विरोध करणारा, कायदेकानू करण्यामध्यें अडथळा करणारा. *v. i.* बंडखोरी करणें, अडथळा करणें, विरोध करणें

Fil'igree, **Fil'agree**, *n.* (फि'लिग्री फि'लग्री)—fine tracery of gold, silver or copper wire; anything delicate, light and showy. नाजूक जरतारी काम,—कलाबतूचें काम; नाजूक, हलकी व दिखाऊ वस्तु.—*d*, *a*.

Fill, *v. t. & i.* (फिल्)—to make or become full; to spread over, to pervade; to satisfy, to satiate; to occupy; (of dentist) block up (hollow tooth with gold). भरणें, भरून देणें; पूर्ण भरून राहाणें, व्यापणें, तृप्त करणें, भरून टाकणें, मन विटणें, चा वीट येणें; ची जागा घेणें, काम करणें; दांतांतील रिकामी जागा भरून काढणें. *n.* a full supply. तृप्ति, पुरेसें, -पोटभर, -अन्न, भरती, भरणा. *The sails f.*, शिडांत वारा भरला.—शिरला.—आहे. *To f. the bill*, be the only chief item; do all that is required, suffice. (बिलांतील) एकच मुख्य बाब असणें, महत्त्वाचा प्रमुख भाग असणें;सर्व आवश्यक तेवढें करणें; पुरे होणें. *To f. in*, (मध्यें) भरणें. *F. out*, enlarge, become enlarged, to the proper limit. पुरें तयार करणें,-वाढविणें. *F. up*, तुडुंब भरणें; भरून टाकणें, छोरणें, बुजवणें. *To drink, have, one's f.*, ओ येइतों पिणें, यथेच्छ खाणें पिणें, आकंठ पान करणें. *Fill'er*, *n.* vessel etc. for filling others. भरणारें मापाचें भांडें. *Fill'ing*, *n.* भरणें, भरणी, पूरण.

Fill'et, *n.* (फि'लिट्)—a little band to tie about the hair, ribbon for hair; thin narrow strip; (*pl.*) animal's loins; undercut of sirloin; boneless strip of fish; (Archit.) narrow flat band between mouldings; raised ridge or rim on any surface; (Book-bind.) plain line impressed on cover;-horizontal division of shield. केंस बांधण्याचा दोर, फीत, आगवळ बारीक अरुंद पट्टी; प्राण्याची-जनावराची कंबर, पृष्ठभाग; पुठ्ठ्याच्या मांसाचा तुकडा, माशाची हाडरहित पट्टी,-भाग; नक्षीकामांतील अरुंद सपाट जाड पट्टी, उंचवट्याची कडा; मलपृष्ठावरील खोदलेली साधी रेषा; ढालीचा आडवा छेद,-विभाग. *v. t.* to bind, encircle, with fillet; divide (fish) into fillets. पट्टीनें बांधणें, फीत लावणें; (माशाचे) हाड काढून तुकडे करणें.

Fill'ip, *n.* (फि'लिप्)—smart stroke given with the finger; stimulus; mere trifle. टिचकी; प्रेरणा, जागृति, उत्तेजन; चुटकी, क्षुद्र बाबत. *v. t.* to strike slightly and smartly; give fillip to. टिचकी मारणें; प्रेरणा-उत्तेजन-देणें.

Fill'y, *n.* (फि'लि)—female foal; (*sl.*) a girl. लहान घोडी, शिंगी, तरुण तरतरीत मुलगी, फुटाणी, माशी.

Film, *n.* (फिल्म्)—thin skin or layer; coating on photographic paper or plate; celluloid roll used in cinema, its contents as shown; dimness over eyes; fine thread. पातळ कातडी किंवा थर, तवंग; फोटोच्या कागदावरील, कांचेवरील आवरण, सिनेमाची फिल्म; (डोळ्यावरील) सारा, कोशेटा, पटल, (कोळ्याच्या जाळ्याचा इ.) धागा, दोरा. *v.t. & i.* to cover, become covered, with film; take picture of (scene) for the cinema. तवंगानें, साऱ्यानें, सूक्ष्म पडद्यानें-झाकणें; सिनेमासाठीं देखावे घेणें, चित्रित करणें. *F.-fan*, सिनेमा शोकीन. *F.-star*, सुप्रसिद्ध सिनेमा नट, नटी. *Fil'my*, *a.* सपटल; साऱ्याचा, तवंगाचा; तंतुमय. *Fil'miness*, *n.*; *Fil'mily*, *adv.*

Fil'oselle, *n.* (फि'लसेल्)—floss-silk. लडीचें-कच्चें-रेशीम.

Fil'ter, *n.* (फि'ल्टर्)—device for cleaning liquid from impurities. गाळणें, पाणी स्वच्छ करणारा

साच्छिद्र पदार्थ, गळतीचं यंत्र. *v. t.* & *i.* to pass (liquid) or flow through filter; percolate; (of news) leak out. गाळून स्वच्छ करणें, गळण, पाझरणें, झिरपणें, (बातमी) पसरणें, -फुटणें, कर्णोपकर्णीं होणें. *Fil'trate*, गाळणींतून गाळणें. *Filtra'tion*, *n.* गाळण्याची,—शुद्ध करण्याची -पद्धति. *Filter-paper*, गाळणकागद..

Filth, *n.* (फिल्थ्)—loathsome dirt; garbage, foul language. अति घाण; दुर्गंधी-गलिच्छ-घाणेरडी, भाषा. *Fil'thy*, *a.*

Fin, *n.* (फिन्)—fish's propelling and steering organ; (*sl.*) hand. (माशाचा) पंख, पंखासारखा अवयव; हात. *Tip us your f.*, shake hands. हस्तांदोलन कर.—*ned*,-*less*, *a.*

Fi'nal, *a.* (फा'इ-नल्)—at the end, coming last; conclusive, decisive. अंत्य, शेवटील; अंतिम, निकालाचा, निर्णायक. *n.* अंतिम सामना, शेवटची परीक्षा. *Fi'nally*, *adv.* शेवटीं, अखेर.

Fina'lè, *n.* (फिना'लि)—last movement of instrumental composition; close of opera etc. अखेरची गत,-चीज; गीताचा शेवटचा भाग, शेवट.

Final'ity, *n.* (फाइनॅ'लिटि)—final act, state, utterance; being final. शेवटची पायरी, संपूर्णता, अंत, शेवट.

Finance', *n.* (फाइ-नॅ'-न्स्, फिनॅ'-)-management of (public) money; (*pl.*) pecuniary resources. पैशाची-सार्वजनिक पैशाची-व्यवस्था; (अने०) पैशाचें किंवा आर्थिक उत्पन्न, संस्थानाचा महसूल, जमा (धंदा). *v. t.* & *i.* to find capital for; deal with money. (धंद्यासाठीं) भांडवलाची व्यवस्था करणें, पैशाची देव-घेव करणें. *Finan'cial*, *a.* उत्पन्नाचा, पैशासंबंधीं जमाबंदी-विषयक; *F.-year*, जमामहसुलाचें वर्ष. *Finan'cier*, *n.* जमीनमहसूल खात्याचा तज्ज्ञ, भांडवलवाला, भांडवल पुरविणारा.

Find, *v. t.* (फाइन्ड्)—(*found*, *pa. t.*) to come across, to meet with, to obtain; to discover, to ascertain; to determine; to supply. गांठणें, मिळवणें; शोधून काढणें; खातरी करणें; समजणें, निर्णय करणें, दाखला,-प्रत्यय येणें; पुरवठा करणें. *n.* discovery of treasure, etc. शोध, तलास, लाभ, प्राप्ति. *To f. oneself*, स्वतःला योग्य असा धंदा शोधून काढणें; तरतूद करणें. *F. out*, हुडकून काढणें; उकलणें; जाणणें. *All found*, with all necessaries provided. सर्व आवश्यक गोष्टीं-खर्चा-सह.

Fi'nder, *n.* (फा'इन्डर्)—discoverer; small telescope attached to large one. शोधणारा, उपदुर्बीण.

Fi'nding, *n.* (फा'इन्डिंग्)—verdict of jury. (ज्यूरीचा-पंचांचा-) निकाल.

Fine, *n.* (फाइन्)—a sum fixed as penalty; sum paid for privilege. दंड, दंडाची रक्कम; पागडी (भाडोत्यानें दिलेली जादा रक्कम.) *v. i.* & *t.* to punish by fine. दंड करणें; पगडी देणें. *In f.*, सारांश, शेवटीं.

Fine, *a.* (फाइन्)—of high quality; refined, pure; thin, in small particles; excellent; handsome, imposing; bright, free from rain; smart, showy; dainty, fastidious; complimentray. छानदार, नामी; शुद्ध; तलम, अत्यंत सूक्ष्म; अत्युत्कृष्ट; सुरेख; निरभ्र; भपकेदार, तरतरीत; चविष्ट, चोखंदळ; खुषामतीचे, भलावणुकीचे, अघळपघळ स्तुतिपर. *n.* fine weather. निरभ्र-स्वच्छ-हवा. *adv.* finely. चांगल्या रीतीनें, उत्तम प्रकारें. *v. t.* & *i.* to make (beer) clear; (of liquid) become clear; (with *away*, *down*, *off*) make or become finer, -thinner; *taper*. शुद्ध करणें; शुद्ध होणें; जास्त तलम, बारीक करणें; टोंकदार-निमुळतें-होणें. *F. pencil*, of hard lead for making f. lines. अगदीं बारीक रेषा काढण्याची कठीण शिसपेन्सिल. *F. pen*, बारीक टोंकाची लेखणी. *A f. distinction*, अति सूक्ष्म भेद. *A f. friend you are!*, (iron.) काय पण छान (वाईट) मित्र! वाहवारे मित्र! *One f. day*, कोणे एके काळीं, एकदां, पूर्वी. *One of these f. days*, some day. पुढें, कधीं काळीं. *F. arts*, poetry music, painting and sculpture appealing to sense of beauty. साहित्य संगीतादि (सौंदर्यप्रधान) कला. *F.-draw*, *v. t.* to sew together with imperceptible join. शिवण न दिसेल इतक्या सफाईनें शिवणें, बेमालूम रफू करणें. *F.-drawn*, *a.* subtle, extremely thin; (Athlet.) trained down in weight. सूक्ष्म, अतिशय बारीक,-नाजूक; प्रमाणांत वजन कमी झालेला (मल्ल). *F. gentleman*, *-lady*, नाजूक छानछोकी पुरुष, स्त्री. *F. spun*, delicate; unpractical. अति सूक्ष्म, तलम; अव्यवहारी (तत्त्व इ.). *Fin'ish*, *a.*; *Fine'ly*, *adv.*; *Fine'ness*, *n.* बारीकपणा; तलमपणा; दूम, सुंदरपणा; सूक्ष्मता.

Fi'nery, *n.* (फा'इनरि)—show, splendour; showy dress or decoration; hearth where cast iron is made malleable. भपका, बाह्य शोभा, भपकेदार पोषाख; लोखंडाची भट्टी.

Finesse', *n.* & *v. t.* & *i.* (फिने'स्)— delicate manipulation; artfulness. डावपेंच, युक्ति, कपटसंधान (करणें, -लढवणें).

Fing'er, *n.* (फिं'ङ्गर्)—one of the four terminal members of the hand; finger-like object; part of glove that holds finger. हाताचें बोट, अंगुळी; बोटासारख्या आकाराची वस्तु; हातमोजाच्या बोटाचा भाग. *v. t.* to touch, turn about, with the fingers; take (bribe etc.); play

with finger. बोटांनीं स्पर्श करणें, बोटांनीं हालविणें, -फिरविणें ; (लांच) घेणें ; बोटांनीं (वाद्य) वाजविणें. *Thumb f.*, आंगठा. *Index f.*, तर्जनी, आंगठ्याजवळचें बोट. *Middle f.*, मधलें बोट, मध्यमा, कर्णिका. *Ring f.*, आंगठीचें बोट, करांगळीजवळचें बोट. *Little f.*, करंगळी, आंगठी. *Done by the f. of God*, ईश्वरी नेमानेमानें घडलेलें. *To look through one's ff. at*, pretend not to see. पाहात नाहीं असें ढोंग-असा बहाणा-करणें,-दाखविणें. *To stir a f.*, make the least effort. अगदीं अल्पसा प्रयत्न करणें. *His ff. are all thumbs*, he is clumsy. तो आडमुठ्या आहे. *With a wet f.*, easily. सहजगत्या, आपोआप. *My ff. itch*, माझीं बोटें-हात-शिवशिवत आहेत, अधीर आहें. *To have a f. in the pie*, take part in a matter. एकाद्या गोष्टींत हात घालणें,-भाग घेणें. *To let slip through one's ff.*, lose hold of. च्या ताब्या सोडणें, हातांतून सोडणें. *To have at one's f.-tips*, or *f.-ends*, know familiarly. हातखंडा, तोंडपाठ,-असणें, सुबोद्धत असणें. *To the f.-nails*, completely. पूर्णपणें. *F.-alphabet,-language*, बोटांच्या खुणांची-करपल्लवी-भाषा, करपल्लवी. *F. post*, sign-post at the turning of road. रस्त्याच्या वळणावरील बोटाच्या खुणेचा खांब. *F. print*, (गुन्हेगारांना ओळखून काढण्यासाठीं) बोटाचा ठसा. *F. stall*, cover of leather or rubber to protect finger. अंगुलीरक्षक. *F.-less*, *F.-ed*. *aa.*

Fĭng'erĭng, *n.* (फिं'ङ्गरिंग्)—management of the fingers in playing upon an instrument; wool for stockings. वाद्यावर बोटें फिरविणें, अंगुलिप्रयोग, बोटांनीं वाद्यवादन ; पायमोज्यासाठीं लोंकर.

Fī'nial, *n.* (फा'इनिअल्)—(Archit.) ornamental top to gable, canopy, etc. (चांदई, छत वगैरेचा) वरचा नक्षीदार भाग.

Fĭn'ical, Fĭn'ickĭng, Fĭn'ĭkin, *aa.* (फि'निकल्, फि'निकिंग्,-किन्)—over-nice, fastidious; too much finished. चापचोप्या, ठाकठिकीचा, चोखंदळ ; अतिशय ठाकठिकीचा. *Fin'ically, adv.*; *Finical'ity*, *Fin'icalness*, *nn.*

Fī'nĭs, *n.* (फा'इनिस्)—the end, conclusion. समाप्ति ; शेवट.

Fĭ'nĭsh, *v. t. & i.* (फि'निश्)—to bring to an end, to come to the end; to perfect, to put final touches to; kill, dispatch, overcome completely. शेवटास नेणें, संपवणें, आटोपणें, संपणें ; शेवटचा सफाईचा हात देणें, ठार मारणें, नाहींसा करणें, पूर्ण-पुरा-चीत करणें. *n.* last stage; decisive result: completed state, completion. शेवट ; निर्णायक निकाल ; पूर्णता, समाप्ति, शेवटचा हात, चकाकी. *To fight to a f.*, एका पक्षाचा पूर्ण पराभव होईपर्यंतचा निर्णायक सामना लढणें.

Fĭn'ĭsher, *n.* (फि'निशर्)—one who finishes; a workman doing final operation; a crushing blow, etc. संपविणारा, पूर्ण करणारा ; कामाला शेवटचा हात,-संस्कार,-देणारा (मनुष्य, यंत्र); सणसणीत तडाखा, शेवटचा तडाखा.

Fī'nite, *a.* (फा'इ-नाइट)—bounded, limited. मर्यादित, समर्याद.

Fĭnn'an, *n.* (फि'नन्)—*F.-haddock*, smoke-cured haddock. धुरावलेला (कॉडसारखा) मासा.

Fĭnn'y̆, *a.* (फि'नि)—like or having fins; of fish. माशाच्या पंखासारखा, सपक्ष ; माशासंबंधीं, मत्स्यप्रचुर.

Fiord, Fjord, *n.* (फिऑर्ड्)—long narrow arm of the sea between cliffs as in Norway. उंच कड्यांमधील लांब अरुंद आखात,-खाडी.

Fir, *n.* (फर्)—*F. tree*, kinds of coniferous tree, their wood. देवदार वृक्ष ; त्याचें लांकूड. *F.-apple*, *-ball*, *-cone*, देवदाराचें फळ. *Firr'y*, *a.*

Fīre, *n.* (फायर्)—state of combustion; flame, glow; burning fuel; conflagration; burning heat; fervour, spirit, poetic inspiration; firing of guns. अग्नि ; ज्योत ; आगटी, शेकोटी, परसा, वित्तव ; दावाग्नि ; दाह, उष्णता ; उत्साह, त्वेष, काव्य, प्रतिभा ; गोळीबार, मारा. *v. t. & i.* to set fire to; to kindle; to catch fire; to become heated or excited; cause to explode; (of gun) go off. आग लावणें, पेटवणें ; पेटणें ; आग लावणें ; तापणें ; स्फोट उडवणें, दारूगोळा सोडणें, बंदूक झाडणें. *To set f. to*, kindle. ला आग लावणें, पेटवणें, जाळणें. *To strike f.*, (घर्षणानें) अग्नि उत्पन्न करणें. *No smoke without fire*, always some ground for rumour. लोकवार्तेच्या मुळाशीं कांहीं तर कारण असतेंच,-आधार असतोच. *On f.*, burning, excited. जळणारें ; अत्युत्सुक, प्रक्षुब्ध. *To set on f.*, पेटवणें ; भडका उडवणें, प्रक्षुब्ध करणें. *To set Thames on f.*, do something remarkable. मोठें विलक्षण कृत्य करणें, अघटित गोष्ट करणें. *Out of frying-pan into f.*, आगींतून फोफाट्यांत. *To pour oil on f.*, आगींत तेल ओतणें, जास्त पेटवणें,-भडकवणें. *To go through f. and water*, सर्व प्रकारच्या भयंकर संकटांना तोंड देणें. *F. and sword*, जाळपोळ व खून,-कत्तल. *Greek f.*, शत्रूचीं जहाजें वगैरे पेटवून देण्याचें स्फोटक द्रव्य. *St. Anthony's f.*, धांवरें, अग्निविसर्प (रोग). *St. Elmo's f.*, वादळांत जहाजावर दिसणारा विजेचा झोत. *Under f.*, being shot at. (बंदुकीच्या, तोफांच्या) माऱ्यांत. *F.-alarm*, आगीची (आग लागल्याची) सूचना देणारें यंत्र. *F. ball*, अग्निगोलक, उल्का ; स्फोटक गोळा. *F.-brick*, आगीनें

न जळणारी-पक्की-वीट. *F.-damp*, खाणींतील कार्बननें बनलेला जलजनक वायु,- उज्ज. *F. dog*, आगीच्या भट्टींत लाकडें ठेवण्याची मंडपी. *F.-eater*, juggler who eats fire; a great fighter. अग्नि, आग खाऊन दाखविणारा जादूगार; पट्टीचा भांडखोर. -लढवय्या. -मल्ल. *F.-eyed*, (*poet.*) with glowing eyes. सतेज नेत्रांचा, तेजस्वी नेत्र असलेला. *F. guard*, चुलीची पाळ. *F. insurance*, आगीचा विमा. *F.-irons*, चिमटा इ. भट्टीचीं हत्यारें. *F.-lock*, चापाची जुनी बंदूक. *F.-man*, आग-घाला मनुष्य; आग विझविणारा- बंबवाला- मनुष्य. *F. new*, कोरा करकरीत, चकचकीत. *F.-pan*, शेगडी, आगटें. *F.-place*, भिंतींतील चूल, चुला. *F.-plug* (*abbr. F.;P.*), आग विझविण्याच्या पाणी मारण्याच्या नळासाठीं पाण्याच्या मुख्य नळाला असलेली चावी,-सांधा. *F.-water*, whisky. कडक जळजळीत दारू. *F.-wood*, जळण, सरपण, इंधन. *F.-worship*, अग्निपूजा. *To f. up*, एकदम भडकणें, -रागावणें. *F. salute*, सन्मानार्थ बंदुकी झाडणें,- तोफा झाडणें; तोफांची, बंदुकांची, सलामी देणें. *F. broadside*, लढाऊ जहाजावरील एका बाजूच्या सर्व तोफा डागणें. *F. away*, begin, go ahead. सुरवात करणें, पुढें जाणें. *F.* (*out*), (U. S.) expel, dismiss (a person). हाकलून देणें, काढून टाकणें. *F.-proof*, आगबंद, आगीपासून सुरक्षित. *F.-less*, *a.*

Fire'ärm, *n.* (फा'यर्-आर्म्)—a gun, pistol. बंदूक, पिस्तुल.

Fire'bränd, *n.* (फा'यर्-ब्रॅन्ड्)—piece of burning wood; kindler of strife. कोलीत; भांडण लावणारा, आगलाव्या, कळीचा नारद.

Fire'-brigäde, *n* (फा'यर्-ब्रिगेड्)—organized body of firemen. आग विझविणारे लोक, आगीचा बंबवाली टोळी.

Fire'-bŭg, *n.* (फा'यर्बग्)—(*U. S.*) an incendiary. दुष्टाव्यानें,-वेडासुळें,- आग लावणारा, आगलाव्या.

Fire'engine, *n.* (फा'यर्इंजिन्)—engine for putting out fire. आग विझविणारा-आगीचा-बंब.

Fire'flȳ, *n.* (फा'यर्-फ्लाय्)—a winged insect emitting phosphorescent light at night. काजवा.

Fir'ing, *n.* (फा'यरिंग्)—fuel; act of letting off firearms; cauterizing. जळण, जळवण; गोळीबार, मारगिरि; गूळ, -गोदा, -चोरा देणें. *F. iron*, डागणी, डाहणी.

Firk'in, *n.* (फ'र्किन्)—a small cask; half kilderkin. लहान पिंप; अर्धें पिंप (माप).

Fire'work, *n.* (फा'यर्-वर्क्)—a device giving spectacular effect by use of combustibles; (*fig., pl.*) display of wit, etc. दारूकाम, दारू; बुद्धीचें तेज, प्रतिभानल, आविष्कार.

Firm, *n.* (फर्म्)—partners in business. धंद्यांतील भागीदार; पेढी, मंडळी. *Long f.*, माल खरेदी करून पैसे बुडविणारी टोळी.

Firm, *a.* (फर्म्)—of solid structure; fixed, steady; steadfast, resolute; (of offer) not liable to cancellation after acceptance; (of prices) maintaining their level or value. मजबूत, बळकट; स्थिर, घट्ट, घन, खंबीर; निश्चयी, निर्धाराचा; ठाम, कायम असलेला, निश्चित; न बदलणारी, स्थिर (किंमत). *adv. firmly*. घट्ट, बळकट; धैर्यानें, चिकाटीनें, दृढनिश्चयपूर्वक. *v. t. & i.* to solidify; fix firmly. घट्ट, घन करणें; घट्ट-मजबूत बसविणें, बसणें, मूळ धरणें, जाम बसणें. *Firm'ly, adv.*; *Firm'ness*, *n.* कठीणपणा, नेट, निग्रह, जोर, बळकटी.

Firm'ament, *n.* (फ'र्मॅमन्ट्)—vault of heaven. आकाश, नभ, नभोमंडळ. —*al*, *a.* नभोमंडळाचा, अंतरिक्ष.

First, *a.* (फर्स्ट्)—the ordinal of 1; earliest in time or order; of highest repute. प्रथम; अगदीं पहिला, प्रथमचा, आधींचा; सर्वांत पुढें; यशस्वान्, सर्वोत्कृष्ट. *n.* first class honours at university, etc.; first prize at show; (*pl.*) best quality. विश्वविद्यालयीन परीक्षेंतील प्रथम श्रेणी; प्रदर्शनांतील पहिलें बक्षीस,-पारितोषिक, पहिला क्रमांक; सर्वोत्कृष्ट नमुना, जात. *adv.* before all, or something else; for the first time. प्रथमतः, सर्वांपूर्वी; पहिल्यांदा, प्रथम. *At f. sight,-view,-blush*, prima facie. सकृद्दर्शनीं, वर वर पाहतां. *To come in f.*, शर्यत जिंकणें. *In the f. place*, to begin with, प्रथम, पहिल्यांदा. *F. aid*, प्राथमिक उपचार. *F.-born*, eldest (child). ज्येष्ठ (अपत्य), पहिलें-वडील-मूल. *F.-class*, *a., n. and adv.* पहिल्या प्रतीचा, उंची, प्रथम श्रेणींतील (उत्तीर्ण विद्यार्थी); (आगगाडींतील उतारूंचा) पहिला वर्ग; पहिल्या वर्गानें (प्रवास करणें). *F. coat*, रंगाचा पहिला हात. *F. cost*, मूळ किंमत. *F.day*, Sunday. रविवार. *F. floor*, (तळमजल्यावरचा) पहिला मजला; (*U. S.*) तळमजला. *F. form*, पहिली इयत्ता. *F.-fruit*, (*usu. pl.*) season's first products as offered to God; f. results of work. नवान्न, नवधान्य, पाड, नवाळी; पहिलीं फळें. *F. hand*, मुळांतून मिळविलेली, प्रत्यक्ष; *At f.-hand*, directly. प्रत्यक्ष. *F. night* (*er*), खेळाचा पहिला प्रयोग (हटकून पाहणारा). *F. rate*, पहिल्या प्रतीचा-सर्वोत्कृष्ट. *F.-rate powers*, पहिल्या प्रतीचीं-श्रेष्ठ, राष्ट्रें. *From the f.*, पहिल्यापासून. *From f. to last*, *of*, throughout. साद्यंत, अव्वलपासून अखेरपर्यंत. *At f.*, आरंभीं *F come f. served*, हजीर तो वजीर. *F. and last*, on the whole. एकंदरीनें, एकंदरींत. *F. or last*, आजना उद्यां, केव्हांतरी. *F.-ly*, *adv.*

First'lings, *n pl.* (फ'र्स्ट्लिंझ्)—first fruits. पहिलें वेत्, पहिली वीण, पहिली गोष्ट, पहिला विचार, पहिलें काम.

Firth, Frith, *n.* (फर्थ्, फ्रिथ्)—an arm of the sea, an estuary. आखात, खाडी.

Fisc, Fisk, *n.* (फिस्क्)—treasury of ancient Rome, (rare) exchequer. प्राचीन रोमन राजस्वकोष; राज्याचा वसूल.

Fis'cal, *a.* (फि'स्कल्)—of public treasury or revenue. राजाच्या किंवा सरकारी वसुलासंबंधीं. *n.* legal, official; kind of shrike. न्यायाधिकारी (द्.आफ्रि.) पक्षी. *F. policy*, (आयात मालावरील) जकातीचें धोरण. *Fis'cally, adv.*

Fish, *n.* (फिश्)—an animal living in water; flesh of fish; (colloq.) a person (usu. with *queer, cool*). मासा, मत्स्य, मासळी; माशाचें मांस; माणूस. *v. i. & t.* to try to catch fish; to try to get information indirectly. मासे मारणें; अप्रत्यक्ष रीतीनें माहिती मिळविणें, युक्तीनें प्रयत्न करणें. *Pretty kettle of f.*, confusion. गोंधळ, अव्यवस्था, अस्ताव्यस्तपणा. *A f. out of water*, अस्वस्थचित्त मनुष्य, गोंधळून गेलेला मनुष्य. *Drink like a f.*, अतिपान करणें. *To feed the ff.*, be drowned, be sea-sick. बुडणें, दर्या लागणें. *All's f. that came to his net*, मिळेल तेवढें पदरांत टाकतो. *There's as good f. in the sea as ever came out of it*, no fear of scarcity. तूट पडण्याची भीति नाहीं. *Queer f.*, चक्रम-तमासगीर माणूस. *Neither f., flesh, nor good red herring*, अनिश्चित स्वरूपाची गोष्ट, हेंही नाहीं, तेंही नाहीं. *Other f. to fry*, अधिक महत्त्वाचें काम. *F.-ball*, माशाची पोळी. *F.-carver*, मासे कापण्याची सुरी. *F.-hook*, गळ, गरी. *F. pond*, मत्स्यकुंड, समुद्र. *F.-story*, भरमसाट,-अविश्वसनीय गोष्ट. *F.-wife*, कोळीण, मासेविकी.

Fish, *n.* (फिश्)—a piece of wood for strengthening mast; flat plate of iron etc. strengthening beam; piece of ivory. डोलकाठीला मजबुती आणणारी जोडपट्टी; माशाच्या आकाराचें जोड पहाल; हस्तिदंती पट्टी. *v. t.* जोडपट्टी देणें. *F. plate*, दोन रुळांच्या सांध्यावरची सांधपट्टी.

Fish'erman, *n.* (फि'शर्-मन्)—one who lives by fishing, angler. मासे धरणारा, कोळी. *Fish'er, n.* मासे धरणारा; (sl.) कागदी चलन.

Fish'ery, *n.* (फि'शरि)—business of fishing; fishing-rod. मासे धरण्याचा -मच्छेमारीचा- धंदा, दालद; मच्छेमारीची जागा.

Fish'ing, *n.* (फि'शिंग्)—taking fish; angling. मासे पकडणें; गळी टाकणें. *F.-line,-net,-rod,-tackle*, मासे पकडण्याची दोरी, जाळें, काठी, साधन.

Fish'y, *a.* (फि'शि)—of or like fish; bounding in fish; (sl.) dubious. माशांचा, माशांसारखा, माशांनीं युक्त; संशयित. *F.-eye*, मेंगळी दृष्टि, शून्य नजर.

Fiss'ile, *a.* (फि'साइल)—tending to split. भेग,-तडा-पडणारा,-पडायला आलेला. *Fi'ssion, n.* तडे पडणें.

Fi'ssure, *n.* (फि'शर्)—cleft, split; (Bot., Anat.) narrow opening in organ; cleavage. भेग; अरुंद द्वार, चीर, फट, तडा, तीर. *v. t.* split. चिरणें, भेग पाडणें, विभागणें.

Fist, *n.* (फिस्ट्)—a clenched hand, hand, handwriting. घट्ट केलेली मूठ, मुष्टि, हात, हस्ताक्षर. *v. t.* to strike with fist; (Naut.) handle (sail etc.) ठोसे लगावणें; मारणें; (शीड, वल्हें) हातानें चालाविणें. *Fis'tic (al.), aa.* हात धाईवर येणारा, ठोसा ठोशी करणारा. *Fisticuffs, n. pl.* हातकुटी, धच्चाधच्ची.

Fis'tulä, *n.* (फि'स्ट्यूला)—a natural pipe or spout (in whales, insects, etc.); a pipe-like ulcer. तोटी, नळी; भगेंद्र, भगंदर, द्विमुखी,-बहुमुखी-नाडीव्रण. *Fis'tular,—lous, aa.*

Fit, Fytte, *n.* (फिट्)—section of a poem. कवितेचा विभाग,-पाद.

Fit, *n.* (फिट्)—sudden seizure of hysteria, sudden transitory state. (रोगाचा) झटका, झपाटा; आवेग, तिडीक; तब्यत, लहर. *To give one a f.*, एकाद्याला घाबरविणें,-तडाखा लगावणें. *To beat one into, give one, ff.*, सहज पाडाव करणें,—जिंकणें. *By ff. (and starts)*, धरून सोडून, अधून मधून, लहरीप्रमाणें. *Fit'ful, a. Fit'fully, adv.*; *Fit'fulness n.* लहरीपणा.

Fit, *a.* (फिट्)—qualified, competent, worthy; becoming, proper; in good health or condition. योग्य, लायक, उपयोगी, क्षम, अनुरूप; जोगा, जोगता, योग्य, तयार; निरोगी. *v. t. & i.* to be in harmony with, to be of right size and shape; to adapt; to make competent; to supply. योग्य दिसणें, शोभणें, साजणें, ठीक होणें, अगदीं बरोबर होणें, जमणें; जम बसवणें; लायक करणें; सज्ज करणें, युक्त करणें. *n.* the way a garment fits, जुळणी, बेत, (कपडा) ठाकठीक बसणें,-होणें. *Survival of the fittest*, बळी तो कान पिळी (हा न्याय). *To f. on*, (कपडा) घालून पाहणें. *F. out,-up*, equip. युक्त,-सज्ज,-करणें; पूर्ण तयारी करणें. *F.-out, n.* equipment. तयारी, सज्जता.

Fit'ful, *a.* (फि'ट्-फुल्)—active by fits and starts; spasmodic, intermittent. चंचल; लहरी, अनिश्चित, छांदिष्ट.

Fit'ness, *n.* (फि'ट्नेस्)—being fit; moral worthiness; propriety. योग्यता; लायकी, शिस्तपणा; औचित्य. *The f. of things*, वाजवीपणा, न्याय्यता.

Fitt'er, *n.* (फि'टर्)—one who fits, specially in various trades. यंत्रें वगैरे जोडून बसविणारा, सांधणारा, जुळारी, जोडारी.

Fitt'ing, *n.* (फि'टिंग्)—(usu. pl.) fixtures, apparatus. जोडकाम, जोडकामाचें साहित्य,-साधनें, उपकरणें. *a.* becoming, proper. साजेसा, योग्य, उचित.—*ly*, *adv.*

Five, *a.* & *n.* (फाइव्ह्)—one more than four, (5, V). पंच, पांच. *n.* the number five; a set of five things; a card, die, with five pips. पांचाचा आंकडा, पांच; पंचकडी, फाढ; पांच ठिपक्यांचें पान, पंच्या, पांचाचा फासा. *Bunch of ff.*, hand. (पांच बोटांचा) हात. *F. fold*, *a.* & *adv.* repeated five times. पांचपट,-टीनें. *F.-hundred*, (U.S.) एक पत्त्यांचा खेळ. *F.-penny*, (फि'पेनि), पांच पेन्स किंमतीचें, दराचें. *F.-percents*, stock or shares paying 5%. ५ दराची ठेव,-रोखे. *Fi'ver*, *n.* (*sl.*) पांच पौंडाची नोट, (कागदी चलन); ५ डॉलरचें बिल,-आकार. *Fives*, (फाइव्ह्ज्), a kind of ball game. एक प्रकारचा चेंडूचा खेळ. [*Sk. Panchan, five*]

Fix, *v.t.* & *i.* (फिक्स्)—to fasten, to secure; direct steadily (eyes, attention) on; identify, locate; to attract and hold attention; to settle, to specify (price, date, &c.); get the better of, win over. जाम करणें, घट्ट बसवणें; स्थिरावणें, लावणें, टक लावून पहाणें; निश्चित करणें, कायम करणें, आकर्षण करणें; ठरविणें; मुक्रर करणें; वर पगडा बसविणें, वश करणें. *Fix'er*, *n.* (U.S.) कायदे मोडणाऱ्यांच्या वतीनें न्यायाधीश, पंच वगैरेंना वश करून घेणारा. *Fix'ings*, *n. pl.* सिद्धता, साफसूफ करणें, टाकठीक. *Fixed*, *a.* —*acid*, *oil*, न उडून जाणारें द्रव्य, तेल; *F. property*, स्थावर मिळकत, घरें व जमीन. *n.* a dilemma, a difficult position. पंचाईत, अडचण, पेंच, संकट.

Fixa'tion, *n.* (फिक्से'शन्)—fixing, being fixed; coagulation; process of combining gas with solid. स्थिर करणें, स्थिरता; घट्ट होणें; वायूचें घनाशीं संयोजन करण्याची पद्धति, स्थिरीकरण. *Fix'ature*, *n.* केंस घट्ट बसविणारें चिकटवण, स्थिरीकरणद्रव्य.

Fix'edly, *adv.* (फि'क्सिड्लि)—intently. स्थिरपणानें. *Fix'edness*, *n.*

Fix'ity, *n.* (फि'क्सिटि)—fixed state; security. ठामपणा, स्थिरता; निश्चितपणा.

Fix'ture, *n.* (फि'क्स्चर्)—a thing fixed; (*pl. Law*) articles affixed to freehold; (date fixed for) match, etc. ठाम, ठरीव, कायम-गोष्ट; (पूर्ण मालकीच्या वतनांतील) मालकानें स्वतः बसविलेल्या (दारें खिडक्या इमारती वगैरे) वस्तु; सामना, खेळ, शर्यत वगैरे (चा निश्चित केलेला दिवस).

Fizz, *v. i.* (फिझ्)—to hiss. फसफसणें, फुरफुर करणें. *n.* फसफस आवाज; फसफसणारें पेय, शाम्पेन दारू. *Fiz'zle*, *v. i.* to hiss feebly. फसफसणें. *n.* फसफस आवाज; फजिती, वायफळ यत्न.

Flabb'ergast, *v. t.* (फ्लॅ'बर्गास्ट्)-to dumbfound. आश्चर्यानें बोबडी वळवणें, निरुत्तर करणें.

Flabb'y, *a.* (फ्लॅ'बि)—(of flesh, &c.) limp, not firm; (*fig.*) nerveless, feeble. गुबगुबीत, फोपशा; अशक्त, कमजोर. *Flabb'iness*, *n.*

Flabell'ate, **Flabell'iform**, *aa.* —(फ्लॅबे'लेट्, फ्लॅबे'लिफॉर्म्)-(Bot., Zool.) fan-shaped. पंख्याच्या आकाराचा, व्यजनाकार.

Flac'cid, *a.* (फ्लॅ'क्सिड्)—flabby. लिबलिबीत, विळविळीत, चिलचिलीत.-*ity*, *n.*

Flag, *n.* (फ्लॅग्)—a standard, an ensign, a signal; tail of dog. निशाण, झेंडा, बावटा, ध्वज, निशाणी; कुत्र्याचें शेंपूट. *v. t.* & *i.* to inform by flag-signals; to hang down; to droop; to fall off in interest. बावट्यांनीं कळविणें; लुळा करणें, लोंबकळणें, ढिला पडणें; वांकणें; कमी होणें, मरगळणें, शिथिल होणें. *Black f.*, चांच्ये लोकांचें निशाण; गुन्हेगाराला फांशी देतांना तुरुंगावर लावतात तें काळें निशाण. *White f.*, *f. of truce*, युद्धतहकुबीदर्शक,-तहाचें पांढरें निशाण. *Yellow f.*, (आजारी लोकांच्या) इस्पितळावरील निशाण, सांसर्गिक रोगराई असलेल्या जहाजावरील पिवळें निशाण. *To lower* or *strike one's f.*, (शरण आल्याची खूण म्हणून) निशाण उतरणें,-पाडणें. *To dip f.*, (सलामी देण्याकरितां) निशाण खालीं करून एकदम वर करणें. *To hoist one's f.*, assume command. अधिकार हातीं घेणें. *To strike one's f.*, अधिकारत्याग करणें. *F.-boat*, जलशर्यतींतील खुणेची निशाणधारी बोट. *F. captain*, captain of f.-ship. आरमारी निशाण-जहाजाचा नायक. *F.—day*, लहान निशाणें जाणाऱ्या येणाऱ्यांना विकून एखाद्या कार्याकरितां पैसे जमविण्याचा दिवस; (U.S.) १४ जून हा दिवस. *F. officer*, vice- or rear-admiral, आरमारी नायक, उप-नायक, सारंग, दर्यासारंगाच्या खालचा अधिकारी. *F.—man*, signaller at races, etc. शर्यतींतील निशाण दाखविणारा. *F.-ship*, having admiral on board. दर्यासारंगाचें जहाज. *F.-staff*, निशाणाचा खांब. *F.-station*, बावटा दाखविल्यावरच आगगाडी थांबते. ती जागा, तें

(स्टेशन). *F.-wagging,* (mil. sl.) signalling. हातांत बावटे-निशाणें-घेऊन त्यांनीं खुणा करणें, संदेश पोंचविणें. *F.-waver,* an agitator. चळवळ्या, चळवळ करणारा.

Flăg, *n.* (फ्लॅग्)—kinds of water-plant. जलरुह, जलवनस्पती.

Flăg, *n.* (फ्लॅग्)—(*-stone*) a flat slab of rock; (*pl.*) pavement of flag-stones; (*f.-feather*) quill feather of bird's wing. ठिसूळ पातळ पत्र्यासारखा दगड, फरशा दगड; फरशा दगडांची फरसबंदी; पक्षाच्या पंखाचें दांडेरी पीस. *v. t.* to pave with flags. फरशा दगडांची फरसबंदी करणें.

Flagĕll'ant, *n.* (फ्लजे'लन्ट्)—one who scourges himself. (पापक्षालनार्थ) स्वतःस कोरडे मारून घेणारा. *a.* self-scourging; given to flogging. स्वतःचा निषेध,-धिक्कार करणारा; फटके मारून घेणारा. *Fla'gellate, v. t.* चाबकानें मारणें; *—tion,—tor, nn.*

Flăgeolĕt', *n.* (फ्लॅजोले'ट्)—a wind instrument with mouth-piece at end. एक प्रकारचें अलगूज, अलगुजें.

Flagĭ'tious, *a.* (फ्लजि'शस्)—deeply criminal, heinous. अति निंद्य, घोर.*-ly, adv.,-ness, n.*

Flăg'on, *n.* (फ्लॅ'गन्)—a vessel to hold liquor. सुरई, चंबू.

Flā'grant, *a.* (फ्ले'ग्रन्ट्)—flaming, glowing, glaring; scandalous. ठळक, उघड, धडधडीत; निंदास्पद, भयंकर, नीच.*—ly, adv.;-ncy, n.* ढळढळीतपणा, ठळकपणा.

Flail, *n.* (फ्लेल्)—a hand-threshing instrument. धान्य झोडण्याची काठी, मोगरी, चडवणी,(-चें) यंत्र.

Flair, *n.* (फ्लेअर्)—selective instinct for what is good, paying, etc. (बरेंवाईट, फायदेशीर जाणण्याची) उपजतबुद्धि, तारतम्यज्ञान. [F]

Flāke, *n.* (फ्लेक्)—a rack; a stage for drying fish etc. मांडणी, उंचावर मारलेली फळी; माचा.

Flāke, *n.* (फ्लेक्)—a light fleecy tuft or piece (esp. of snow), a thin broad piece; a layer; portion of ignited matter thrown off. कळपा, ढलपा, वर्फाचा अगदीं पातळ रुंद तुकडा; थर; कीट, काजळी, किटाळ. *v. i. & t.* to fall in, sprinkle, with flakes; ..., come (off, etc.) in flakes. वर्फाचे थर बसणें, ढलपे,-कपचे पडणें; कपचे उडणें. *Flak'y, a.*

Flăm, *n.* (फ्लॅम्)—a sham story, hoax. बनावट गोष्ट, फसवणूक.

Flăm'beau, *n.* (फ्लॅ'म्बो)—(*pl.-x,-s,-झ्*) a lighted torch. मशाल, दिवटी, चूड. [L. *Flamma,* flame]

Flămboy'ant, *a.* (फ्लॅम्बॉ'यन्ट्)—marked by wavy flame-like lines; gorgeous. हालत्या ज्वालाकार रेषा असलेला; शोभिवंत रंगाचा. *n.* kinds of flame-coloured flowers. लाल रंगाचीं फुलें.

Flāme, *n.* (फ्लेम्)—visible combustion; bright light; passion (esp. love); a sweetheart; kinds of moth. ज्वाला; जाळ; मनोविकार, प्रेम; प्रियकर, प्रेयसी, प्राणवल्लभ (-भा); एक जातीचा पतंग,-कीटक. *v. i.* to emit flames; break out into anger; gleam. ज्वाळा येणें,-उठणें; (रागानें) भडकणें; प्रकाशणें. *The ff.,* आग, ज्वाळा. *To fan the f.,* मनोविकार अधिक भडकविणें. *F. up.,* भयंकर लाजणें. *F.-less ; F.-y, aa.* ज्वालामय. *Fla'ming, a.* very hot or bright; exaggerated. झगझगीत, झक्क, उज्ज्वल; अतिशयित, अतिशयोक्तीचें.

Flām'ĕn, *n.* (फ्ले'मेन्)—a god's priest. देवाचा पुजारी.

Flamĭn'gō, *n.* (फ्लमिं'गो)—(*pl.-es*) a bird with long legs and neck. (लांब पायाचा व लांब मानेचा) हंसक पक्षी.

Flamm'enwerfer, *n.* (फ्लॅ'मन्व्हेअर्फर्)—a machine spouting liquid fire in war. युद्धांत प्रवाही अग्नि वर्षाव करणारें यंत्र. [G]

Flâneur, *n.* (फ्ला'नर्)—an idler. भटक्या, आळशी.

Flănge, *n.* (फ्लॅन्ज्)—a projecting flat rim, collar or rib. बाहेरची कड,-कडा, बाह्यपाळी. *v. t.* to provide with a flange. बाहेरची कडा लावणें, बसविणें,-काढणें.

Flănk, *n.* (फ्लॅंक्)—a fleshy side of body between ribs and hip; a side of building, mountain etc. or of body of troops or fleet. कटिपार्श्वभाग; इमारतीची बाजू, सैन्याची डावी किंव उजवी बाजू. *v. t.* to guard or strengthen on the flank; take in flank; march past flank of. बाजू राखणें,-संभाळणें,-मजबूत करणें; बाजूवर हल्ला करणें; त्या बाजूनें कूच करणें.*—er, n.* बाजूची तटबंदी; (*pl.*) फौजेंतील तुकडीच्या बाजूची लढाऊ टोळी, त्यांनीं शत्रूशीं केलेली झटापट.

Flănn'el, *n.* (फ्लॅ'नेल्)—open woollen stuff; (*pl.*) white f. trousers, f. bandages etc. एक प्रकारचें लोंकरीचें मऊ कापड, फ्लॅनेलची तुमान, बंधप इ. *a.* फ्लॅनेलचा केलेला. *Flannelette', n.* फ्लॅनेलसारखें दिसणारें सुती कापड. *Flann'elled, a.* (फ्लॅ'नल्ड्), dressed in flannels. फ्लॅनेलचे कपडे घातलेला.

Flăp, *v. t. & i.* (फ्लॅप्)—to strike, to drive (flies, &c.) with a broad thing; (of bird) to strike with flat of wing; to sway about, to flutter. फडफडवणें, हडपणें, झटकावणें; (पंखानें) फडफडावणें; फडफडणें, फडफड वाजणें. *n.* a

light stroke of a broad thing; broad hanging piece. झटका, फडफड; झोल, घेर, झांकण, पाळी, खिस्तक, विंझुणा. *F.-jack*, small cake. लहान पाव.

Flăpp'er, *n.* (फ्लॅ'पर्)—a flat fly-killer; a flap; a young wild duck etc.; (*sl.*) a girl not yet out; (*sl.*) a hand. माशा मारण्याचें फटकणें,-झडकणें; पाळी; रानटी बदक; चार चौघांत न फिरणारी,-समाजांत न वावरणारी-मुलगी; हात.

Flāre, *v. i.* (फ्लेअर्)—to blaze with a bright unsteady flame, bulge upwards (of ship's sides). भडाभड जळणें, भडकणें; झळकणें; वरवर फुगीर होत जाणें. *n.* bright unsteady light; signal light at sea; outburst of flame, anger, display. ढळढळीत प्रकाश; दीपस्तंभावरील प्रकाश; ज्योत; क्रोधानल, भडका, भपका. *F. up*, एकदम भडकणें, क्षुब्ध होणें; *F.-up, n.* ज्वाळांचा डोंब; रागाचा भडका; मजा मारणाऱ्यांचा गोंधळ, गडबड.

Flăsh, *v. i. & t.* (फ्लॅश्)—to break into a flame or sparks; to gleam; to appear or occur suddenly, fill or flood with water. चकमकणें; चकाकणें; एकदम दिसणें किंवा घडणें, अकस्मात सुचणें; पाण्यानें भरून टाकणें. *n.* sudden short blaze; an instant; sudden short access; signal light at sea; rush of water; ostentation. क्षणिक चकाकी,-चमक,-भडका,-झळ; क्षण, पळ, चक्र होण्यास लागणारी वेळ; (बुद्धीची, अकलेची) चमक; पाण्याचा सोडलेला झोत. जलमय करणें; डामडौल, ढोंग, दिमाख. *a.* gaudy; counterfeit; slang; connected with thieves, etc. दिखाऊ, भपकेदार; नकली; हलकट, ग्राम्य; चोर, लफंगे यांसंबंधीं. *To f. in the pan*, to fail after showy start. (तोफेची) रंजक उडणें; दिमाखानें प्रारंभ करून अपयश येणें. *To f. up or out*, to show sudden passion. एकदम रागाचा झटका येणें, भडक होणें. *News was flashed*, sent by telegraph. विद्युत्संदेशानें (तारेनें) बातमी पसरली. *F.-light*, विद्युद्दीपिका, झोतमय प्रकाश, प्रकाशाचा झोत (खुणेसाठीं, दीपगृहासाठीं, रात्रीं फोटो काढण्यासाठीं). *F.-point, Flashing point*, temperature at which vapour from oil etc. ignites. (ज्या उष्णतामानावर ज्वालाग्राही वाफ निघते तो) स्फुरणबिंदु.

Flăsh'ing, *n.* (फ्लॅ'शिंग्)—a strip of metal to obviate flooding or soaking. पाणी आंत शिरूं किंवा झिरपूं नये म्हणून मारलेली धातूची पट्टी.

Flăsh'ȳ, *a.* (फ्लॅ'शि)—gaudy; fiery; without taste. लखलखीत, भडक; उग्र, तामसी; बेचव, नीरस. *Flash'ily, adv.,—iness, n.*

Flăsk, *n.* (फ्लास्क्)—pocket-bottle of metal or glass; gunpowder case. शिसा, कुपी, बाटली-सारखें भांडें; बंदुकीची दारू ठेवण्याची पिशवी.—*'et, n.* a small flask; long shallow basket. लहान कुपी; लांबट उथळ टोपली.

Flăt, *a.* (फ्लॅट्)—horizontal, level; prostrate; even, smooth; dull, lifeless; slow-witted; dejected; (Mus.) below true pitch. सपाट, समान, चढउतार नसलेला; भुईसपाट, जमीनदोस्त, पडलेला; गुळगुळीत, कंटाळवाणा, बेचव; मंदबुद्धि; हताश, खिन्न; मृदु, कोमल (सुरांत). *n.* plain, lowland, level ground; suite of rooms on one floor; a flat-bottomed boat; a shallow basket; (sl.) a duffer; (Mus.) note a semi-tone below natural pitch; (Theatr.) section of scenery mounted on frame. पटांगण, माळ, भाटी, भाट; एका मजल्यावरील सर्व खोल्या,-मजला; सपाट तळाची होडी; उथळ टोपली; रेम्या डोक्या, मंदबुद्धि-मनुष्य; कोमल स्वर, त्याची खूण; चौकटीवर बसविलेला देखाव्याचा भाग. *v. t.* to make flat (in manufacturing processes). सपाट, गुळगुळीत-करणें. *To lay f.*, पाडून टाकणें, जमीनदोस्त करणें. *F. tint*, uniform. सारखेपणा. *F. denial*, उघड,-स्पष्ट,-नकार. *That's f.*, त्यांत कांहीं शंका नाहीं. *To fall f.*, निष्फळ, निरर्थक,-होणें. *The market is f.*, बाजार (भाव) पडून राहिला आहे, विशेष घडामोड नाहीं. *F. speech,-beer*, अळणी, बेचव भाषण,-दारू. *F.-boat*, उथळ पाण्यांत चालणारी सपाट (तळाची) होडी. *F.-car*, (U. S.) rail-road freight car without sides or roof. (बाजवा किंवा छपर नसलेला) उघडा डबा. *F.-fish*, एक जातीचा मासा. *F.-footed*, बांकरहित पावलाचा; (U. S.) हट्टी, मठ्ठ. *F.-iron*, इस्तरी. *F.-race*, over level ground. सपाट जमिनीवरील शर्यत. *F.-rate*, प्रमाणांत कमीजास्त न होणारा, एकच एक दर. *To join the ff.*, (transf.) make a thing into a coherent whole. एकजिनसी करणें, एकजीव आहे-सलग आहे-असें भासविणें. *Flat'ly, adv.* निक्षून, साफ. *F.-wise, F.-ways, adv. F.-ness, n.*

Flătt'en, *v. t. & i.* (फ्लॅ'टन्)—to make or become flat. सपाट,-चपटा,-करणें,-होणें.

Flătt'er, *v. t.* (फ्लॅ'टर्)—to fawn upon, to praise falsely, to overpraise; exaggerate good looks of. खुशामत करणें, खोटी स्तुति करणें, फाजील वहावा-स्तुति-करणें; (आहे त्यापेक्षां) जास्त सजवणें,-उठावदार करणें,-दाखविणें, अधिक खुलवून दाखविणें. *-er, n.* तोंडपुज्या, खुशामत्या. *-ingly, adv.*

Flatt'erȳ *n.* (फ्लॅ'टरि)—overpraise. खुशामत, खुशमस्करी, हांजी हांजी, मिथ्या प्रशंसा.

Flăt'ūlent, *a.* (फ्लॅ'टयुलन्ट्)—generating gas; inflated, pretentious, vain, puffy. फुगलेलें,

वातग्रस्त, वातकर, वातुळ; बढाईखोर, दांभिक, फुगलेला. *Flat'ulence,-ncy, nn.* वातग्रस्तता, कोष्ठवायु; फुशारकी. *Flat'ulently, adv.*

Flaunt, *v. i. & t.* (फ्लॉन्ट्)—to wave proudly; to display oneself. दिमाखानें हालवणें; डामडौल करणें, दिमाख करणें,-मारणें. *n.* flaunting motion. डौलाची हालचाल, दिमाख, प्रदर्शन.

Flaut'ist, *n.* (फ्लॉ'टिस्ट)—a flute-player. पावरी वाजविणारा. [It.]

Fla'vin, *n.* (फ्ले'व्हिन्, फ्लॅ'-)—surgical antiseptic and yellow dye. विनसडविणारा पिवळा चीक,-रंग.

Fla'vour, *n.* (फ्ले'व्हर्)—mixed sensation of smell and taste; distinctive taste. स्वादयुक्त रुचि; विशेष चव, लज्जत. *v. t.* to give flavour to, to season. स्वादयुक्त करणें; विशेष चव आणणें, लज्जत आणणें.*-ing, n.;-less, a.* बेचव, नीरस, पाणचट.

Flaw, *n.* (फ्लॉ)—a crack, a rent; a blemish; defect in document, etc. तडा भेग, चीर, फट, दोरवा; दोष, व्यंग, खोड; कायद्याच्या दृष्टीनें उणीव,-दोष. *v. t. & i.* to crack, damage, mar. तडकणें, भेग पडणें, तडा उडणें; नुकसान होणें, उणीव असणें, बिघडविणें.*-less, a.* निर्भेग, निर्दोष.

Flaw, *n.* (फ्लॉ)—a squall of wind; short storm. वाऱ्याचा सपाटा, लहानसें वादळ.

Flax, *n.* (फ्लॅक्स्)—a plant known for its textile fibre and its seeds. आळशी, अंबाडी, जवस.

Flax'en, *a.* (फ्लॅ'क्सन्)—of flax; (of hair) pale yellowish brown. अंबाडीचा; फिकट पिंवळसर पिंगट (केस).

Flay, *v. t.* (फ्ले)—to strip off skin or hide; to peel off; to criticize severely; plunder (person), pare off (turf). चामडी काढणें, सोलणें; कडक टीका करणें, वाभाडे काढणें; लुबाडणें; (गवत) कापून टाकणें. *F.-flint,* पिळून पैसे काढणारा, चिक्कू.

Flea, *n.* (फ्ली)—a small wingless jumping insect; a small or contemptible person. पिसू, पुशी; क्षुद्र-तुच्छ-माणूस. *F.-bane,* (Bot.) kinds of plant. कडू कारली, काळी जिरी, (ह्या वनस्पतींच्या वासानें पिसवा जातात). *F.-wort,* इसपगोल (वनस्पति). *F.-bite,* पिसूचा दंश; क्षुल्लक गोष्ट; क्षुल्लक दुखापत. *To send one away with a f. in his ear,* कानपिचकी देऊन रवाना करणें.

Fleck, *n.* (फ्लेक्)—skin-spot, freckle; a patch (of colour, &c.); a speck. ठिपका, खूण; पट्टा; डाग. *v. t.* ठिपका,-डाग,-पाडणें, चित्रविचित्र करणें.*-er, v. t.* रंगीबेरंगी करणें.

Fled, *pa. t. & pa. p. of* Flee.

Fledge, *v. t.* (फ्लेज्)—to provide or furnish with feathers or down. पंख फुटणें, लव येणें, लवेनें-पंखानें आच्छादित करणें,-झांकणें.*-less, a.*

Fledg(e)ling, *n.* (फ्लेज्लिङ्)—a young bird; inexperienced person. नुकतेच पंख फुटलेलें पिलूं; अनुभव नसलेला मनुष्य.

Flee, *v. i. & t.* (फ्ली)—*(fled)* to run away, to take to flight; to shun. पळून जाणें, पळ काढणें; टाळणें.

Fleece, *n.* (फ्लीस्)—woolly covering (esp. of sheep); wool shorn from a sheep; woolly head of hair; thing like a fleece, whitecloud etc.; thin sheet of cotton or wool fibre. लोंकरीचें आच्छादन, मेंढ्याची लोंकर, भीस; एका मेंढीची एका कापणीची लोंकर; केसाळ झुबका, -डोकें; लोंकरीसारखी वस्तु, पांढरा ढग; कापसाचा; किंवा लोंकरीचा पातळ पडदा. *v. t.* to shear. (sheep); to strip, to plunder; overspread. (मेंढी) भादरणें, फसविणें; लुबाडणें, लुबाडून घेणें; झांकणें, झांकून टाकणें. *Fleeced, a.* लोंकरीनें आच्छादलेला; लुबाडलेला. *Flee'cy, a.* लोंकर असलेला; लोंकरीचा; लोंकरीसारखा.

Fleer, *v. i.* (फ्लीअर्)—to laugh inpudently or mockingly; jeer. हंसून टर उडवणें, अवहेलना-तिरस्कार,-करणें, वेडावणें; थट्टा करणें. *n.* a mocking look or speech. उपहासदर्शक चेहरा, उपहासात्मक भाषण.

Fleet, *v. i.* (फ्लीट्)—to glide away, to pass rapidly, slip *away.* झपाट्यानें जाणें, निसटून जाणें. *n.* naval armament; ships or boats sailing in company; creek, inlet. आरमार; लढाऊ गलबतांचा ताफा,-समुदाय; खाडी, आखात. *a.* swift of foot, nimble; shallow. चपळ, वेगवान्, नश्वर, क्षणभंगुर; उथळ (पाणी), वरवर. *A f. of cabs, taxis.* एकाच मालकाच्या गाड्यांचा तांडा,-समुदाय. *The F.,* stream, now covered sewer, running into the Thames. टेम्स नदीला मिळणारा नाला; फ्लीट नांवाच्या तुरुंग. *F. marriage,* performed by a *F. parson,* or disreputable clergyman in and about the *F.* ready to marry clandestinely. चोरटें लग्न, गुप्त विवाह (चोरटीं लग्नें लावणाऱ्या पोटभरू उपाध्यायानें लावलेलें). *F. street.* वृत्तपत्रें, छापखाने (यांची गल्ली). *F.-ly, adv.* चपळाईनें, त्वरेनें; *F.-ness, n. Fleeting, a.* क्षणिक, क्षणभंगुर, चपळ; *-ly, adv.* अति वेगानें.

Flem'ing, *n.* (फ्ले'मिंग्)—an inhabitant of Flanders. फ्लॅन्डर्सचा रहिवाशी. *Flem'ish, a. &.*

n. फ्लॅन्डर्सच्या,-ची भाषा ; *v. i.* (of hound) (मागावर असतां शिकारी कुत्र्याचें)अंग व शेंपटी थरथर कांपणें.

Flĕnch,—nse, *v. t.* (फ्लेन्च्,-न्स्)—to cut up (whale); flay (seal). (व्हेल माशाचे) तुकडे करणें ; (सील मासा) सोलणें.

Flĕsh, *n.* (फ्लेश्)—soft substance between the skin and the bones; animal food, meat; pulpy substance of fruit or plant; fat; visible surface of human body; the sensual appetites; near relations. मांस ; मांसाहार, मांसान्न ; गर, मगज, घलक ; चरबी , मांसलपणा, अंगकांति,-वर्ण ; इंद्रियोपभोगेच्छा, विषयवासना, कामवासना ; जवळचे आप्त, सोयरेधायरे. *v. t.* to incite (hound etc.) by taste of blood, initiate in bloodshed; use (sword etc.) for first time on flesh. पारधीच्या मांसाची चटक लावणें; पारध करण्याची चटक लावणें ; प्रथमच मांसावर (हत्यार) चालविणें. *F. and blood*, शरीर, रक्तमांस, मनुष्यजात,-स्वभाव. *One's own f. and blood*, near relations, एकाच रक्ताचे नातेवाईक , वंशीय. *F. and fell*, the whole body. सर्व शरीर (त्यांतील सर्व जड पदार्थ) ; *adv.* entirely, पूर्णपणें. *Proud f.*, जखमेवर येणारा कांस्यासारखा पुरळ. *To make* one's *f. creep*, frighten or horrify one, esp. with dread of the supernatural. गर्भगळित करणें, भेदरविणें. *To lose f.*, शरीरानें खंगणें, मांस झडणें. *To put on f.*, लठ्ठ होणें, कापूस जमविणें. *In f.*, fat. लठ्ठ, स्थूल. *All f.*, सर्व शरीरधारी प्राणिमात्र. *In the f.*, सदेहस्थितींत. *After the f.*, जडदेहाच्या रूपाचा. *F. pots*, high living. श्रीमंती, उच्च राहणी. *Sins of the f.*, unchastity. व्यभिचार, *F. colour*, yellowish pink. पिंवळसर गुलाबी रंग. *F.-less, a.*

Flĕsh'er, *n.* (फ्ले'शर्)—a butcher; a fleshing knife. खाटीक ; चामडीं साफ करण्याचा चाकू.

Flĕsh'ings, *n. pl.* (फ्ले'शिंझ्)—tight-fitting flesh-coloured garment. पिंवळसर गुलाबी वर्णाचें तंग वस्त्र,-अंगरखा.

Flĕsh'lў, *a.* (फ्ले'श्लि)—carnal, worldly. विषयी, रजोगुणी, ऐहिक.-*liness, n.*

Flĕsh'y, *a.* (फ्ले'शि)—plump; of or like flesh. मांसल, पुष्ट ; मांसाचा, मांसासारखा ; (Bot.) गरभरू, भरदार.

Flĕx'ible, *a.* (फ्ले'क्सिबल्)—easily bent; pliable; supple. वांकवितां येणारा, लवचीक ; लवका ; नरम. -*bility, n. Flex, n.* लवकी विद्युत्स्थापित तार.

Flĕ'xion, *n.* (फ्ले'क्शन्)—bending, bent state; a bent part. वांकणें, वक्रता ; वक्रभाग, वळण. *Also Fle'xure, n.*

Flĕx'or, *n.* (फ्ले'क्सर्)—a muscle which bends a part of the body. लवणारा स्नायु.

Flĕx'ŭous, *a.* (फ्ले'क्स्यूअस्)—winding. वळणाचा, नागमोडी. *Flexuos'ity, n.*

Flew, *pa. t. of Fly. Flews, n. pl.* (शिकारी कुत्र्याचे इ.) लोंबते ओंठ.

Flick, *n. & v. t.* (फ्लिक्)—(to strike) a light-blow. हळूच तडाका-फटकारा-मारणें.

Flick'er, *v. i.* (फ्लि'कर्)—to flutter, to shine or burn unsteadily. लुकलुक प्रकाशणें किंवा जळणें, लुकलुकणें. *n.* लिकलिकणारा प्रकाश, फडफड, झूळझूळ.

Flight, *n.* (फ्लाइट्)—act or mode of flying through air; flock of birds or insects; swift passage of time; a series (of stairs etc.); volley of arrows; running away. हवेंत उडणें, उड्डाण, भरारी ; पक्ष्यांची झुंड, कळप ; वेळ लवकर निघून जाणें ; परंपरा, जिना, सोपान ; बाणांचा वर्षाव ; पलायन, माघार. *v. t.* to shoot. नेम धरून बंदुकीनें मारणें. *To take to f.*, run away. पळून जाणें. *Put to f.*, दाणादाण उडविणें. *F. lieutenant*, हवाईदलांतील अधिकारी (ब्रिटिश).

Flight'ў, *a.* (फ्लाइ'टि)—fickle, changeable, half-witted. चंचल, अस्थिर, लहरी, मनोराज्यांत दंग असणारा.-*tily, adv.* ;-*tiness, n.*

Flim'sў, *a.* (फ्लि'म्झि)—slight, frail; paltry, shallow. पातळ, झिरझिरीत ; कुचकामाचा, उथळ. *n.* पातळ कागद ; व्यापारी हुंडी.

Flinch, *v, i.* (फ्लिंच्)—to draw back (from pain or danger), to shrink. कचरणें, कच खाणें, पराङ्मुख होणें.

Fling, *v. i. & t.* (फ्लिंग्)—(*flung*) to rush, to go violently; to throw, to hurl. जोरानें घुसणें, -जाणें ; फेंकणें, जोरानें हापटणें. *n.* a throw, cast; impetuous dance. फेंक, ढोला, दुगाणी, लाथ ; आवेशाचा,-जोराजोराचा नाच. *To have a f. at*, चा प्रयत्न करणें ; ची टर उडविणें. *To f.* (fact, etc.) *in one's teeth*, त्याच्याच शब्दानें त्याचे दांत पाडणें.

Flint, *n.* (फ्लिंट्)—a hard stone found in steel-grey lumps; anything very hard; a very hard stone formerly used for striking fire; piece of flint used with steel to produce fire, esp. in f.-lock gun. गारगोटी; फार कठीण पदार्थ ; गार, गारगोटी, गारगोटीचा दगड ; (बंदुकींतील) पोलादाच्या जोडीची बंदूक झाडण्याची गारगोटी. *F. and steel*, गारगोटी आणि पोलादाचा तुकडा. *To wring water from a f.*, to work miracles. गारगोटींतून पाणी काढणें, दगडास पाझर फोडणें, " प्रयत्नें वाळूचे कण रगडितां

तेलहि गळे.' *To skin a f.*, be miserly or greedy. कवडीचुंबक,-अधाशी,-असणें. *To set one's face like a f.*, be determined. निग्रही-करारीपणा दाखविणें. *F. glass*, गारगोटीची कांच. *F. -lock*, (lock of) gun discharged by spark from f. गारगोटीची बंदूक,-बंदुकीचा चाप. *Flin'ty, a., -tiness, n.*

Flĭp, *v. t. & i.* (फ्लिप्)—to propel, strike with a flip; make a flick. सपाटा,-झटका,-देऊन चालू करणें; हळू तडाखा मारणें. *n.* a flick; mixture of beer and spirits. तडाखा; मिश्र दारू.

Flĭp'flăp, *n.* (फ्लि'प् फ्लॅप्)—a kind of somersault; a cracker; a machine with passenger cars hung at end. कोलांटी उडी; फताकडी, दारूकाम; (जत्रेंतील) गरगर फिरणारें यंत्र, पाळणे.

Flĭpp'ant, *a.* (फ्लि'पन्ट्)—treating a serious thing lightly; disrespectful. महत्त्वाची गोष्ट क्षुल्लक लेखणारा; अनादरशील, बालिश, अक्कलशून्य. *-ly, adv.*; *-ancy, n.* छिचोरपणा, वावदूकता.

Flĭpp'er, *n.* (फ्लि'पर्)—limb used by turtle etc. in swimming; a hand. (कांसवाचा वगैरे) पोहण्याच्या उपयोगाचा अवयव; हात.

Flirt, *v. t. & i.* (फ्लर्ट्)—to fillip, to jerk; to play at courtship. टिचकी मारून फेंकणें; हिसका देणें; नखरा करून मन वेधणें, प्रणयचेष्टा करणें. *n.* a sudden jerk; a man or woman who encourages attention for amusement. हिसका, झटका; नखरा करून खोटें प्रेम दाखविणारी स्त्री, नखरेबाज तरुण. *-ish,-y, aa.*; *-ation, n.* नखरा, तोरा, प्रणयचेष्टा करणें. *-a'tious, a.*

Flĭt, *v. i.* (फ्लिट्)—to depart; to pass or fly lightly or rapidly about; to die down. स्थलांतर करणें, निघून जाणें; उडून जाणें, भरारी मारणें; विझणें. *Flit'ter, v. i.* to flit about, flutter. इकडे तिकडे फडफडणें, पंख फडफडावणें; *F.-mouse*, a bat. वटवाघूळ.

Flĭtch, *n.* (फ्लिच्)—side of hog salted; a slice of timber from tree-trunk. मीठ लावून वाळवलेली डुकराची बरगडी; (जोडतुळईची) लांकडी फळी.

Flĭv'ver, *n.* (फ्लि'व्हर्)—Ford motor-car. फोर्ड मोटरगाडी. (U. S.).

Float, *v. i. & t.* (फ्लोट्)—to rest or drift on surface of liquid; to circulate (rumour); hover *before* eye or mind; (of water) support, bear along; waft through air; (Commerc.) be in circulation, (of company or scheme) launch. तरंगणें, पोहणें, प्लवन होणें; (बातमी) पसरणें,-पसरविणें; डोळ्यापुढें,-मनांत,-घोळत राहणें; तरवणें, तरंगत ठेवणें,-नेणें; वहावणें; हवेंतून तरंगत जाणें; चालू असणें, पत असणें; (धंदा वगैरे) चालू करणें. *n.* a hollow metallic ball; a thing that floats or rests on surface of liquid; a raft; a tool for smoothing plaster; single-cut file; (Theatr.) foot-lights; a kind of low cart. धातूचा पोकळ गोळा; ताफा, सांगड; तर; करणी, नहला; कानस; (नाटकाच्या रंगभूमीवरील) तळचे दिवे; सखल गाडी. *On the f.*, floating. तरंगणारा. *F.-board*, one of the boards of water-wheel or paddle wheel. पाय-रहाटाची पायंड्याची फळी, आगबोटीच्या पंख्याची फळी. *F.-bridge*, तराफ्यांचा पूल. *Float'able, a.*

Float'age, *n.* (फ्लो'टिज्)—floating (wreckage); ships etc. afloat on river; part of ship above water-line. तरणें, तरतेपणा; तरंगणारा (मोडक्या जहाजाचा वगैरे) सांगाडा; नदींतील तरतीं जहाजें; जलरेषेच्या वरचा जहाजाचा भाग.

Floatā'tion, Flot-, *n.* (फ्लोटे'शन्)—floating; starting of company or scheme. तरंगणें, प्लवन; उभारणें, सुरू करणें (कंपनी, मंडळी, योजना).

Float'ing, *a.* (फ्लो'टिंग्)—that floats; variable. तरता, तरंगता; बदलणारा. *F. bridge*, तरता, झुलता, पूल; पुढें मागें सारतां येण्याजोगा दुहेरी पूल; उतरण्याची शिडी. *F. light*, तरती बत्ती, (भयसूचक) तरता नौकादीप. *F. capital*, चालू खर्चाकरतां वापरण्याचें भांडवल.

Flŏck, *n.* (फ्लॉक्)—a lock or tuft (of wool, &c.); (*pl.*) wool-refuse, etc.; powdered wool or cloth for making wall-paper. (लोंकरीची किंवा केंसाची) बट, झुपका, पुंजका; (बिछान्यांत भरण्यासाठीं) यंत्रानें चुरलेला (लोंकरीचा,-चिंध्यांचा) भुगा; (भिंतीला लावण्याच्या कागदासाठीं) बारीक चाळलेला लोंकरीचा-चिंध्यांचा-भुगा. *F.-bed*, राठ लोंकरीनें भरलेला बिछाना. *F. -paper*, लव चिकटवलेला कागद. *Floc'cose, a.* लोंकरीसारखा; (Bot.) केंसांचे झुपके असलेला. *Floc'cus*, शेंपटीचा गोंडा; पिसारा.

Flŏck, *n.* (फ्लॉक्)—a large number of people; animals of one kind feeding or kept together; a congregation with relation to its pastor. लोकांचा समुदाय, घोळका, जमाव; झुंड, थवा, कळप, खिल्लार; खिस्ती लोकांचा कळप, खिस्तभक्त मेळा. *v. t.* to congregate, to go in flocks. जमणें, एकत्र येणें, एकवटणें, थवा जमणें, थवा करून जाणें. *F. master*, मेंढपाळ, धनगर.

Floe, *n.* (फ्लो)—a large sheet of floating ice in the ocean. तरणारा बर्फाचा मोठा तुकडा.

Flŏg, *v. t.* (फ्लॉग्)—to whip, to lash, to beat (with a whip, stick, &c.); (sl.) excel. काठीनें किंवा चाबकानें मारणें, फटके मारणें; वर ताण करणें, मागें टाकणें. *Flog'ging*, *n.*

Flood, *n.* (फ्लड्)—inflow of tide; inundation; downpour; river, stream, sea. भरती; पूर, रेलचेल; जलप्रलय; वृष्टि; नदी, प्रवाह, समुद्र. *v. t. & i.* to inundate, to irrigate; to come in great quantities, have uterine discharge. जलमय करणें; भरून टाकणें; (स्त्रियांचा) विटाळ सुरू होणें. *F.-and field*, (poet.) sea and land. पाणी व जमीन. *The F.*, *Noah's f.*, महाप्रलय, जलप्रलय (बायबलमध्यें वर्णिलेला). *F.-gate*, lower gate of lock, sluice. धरणाच्या दरवाजा, जलद्वार, जलनिर्गम.

Floor, *n.* (फ्लोअर्)—lower surface of a room, boards etc. of which it is made; bottom of sea, cave, etc.; part of the house assigned to members; a story; level area. जमीन, तक्तपोशी; तळ; सभासद बसण्याची जागा; मजला, माळा; सपाट जमीन,-पृष्ठभाग. *v. t.* to furnish with floor; knock down; confound, nonplus; overcome; (at school) tell (boy) to sit down as not knowing lesson. जमीन,-फरसबंदी,-करणें; खालीं पाडणें; निरुत्तर करणें, गोंधळविणें; पाडाव करणें; (शाळेंत, उत्तर ठाऊक नसणाऱ्या मुलाला,) खालीं बसवणें. *To take the f.*, (esp. U. S.) speak in debate. वादविवादांत भाग घेणें,-बोलणें. *Ground f.*, तळमजला. *First f.*, पहिला-वरचा-मजला. *F.-cloth*, जमीनीवर हांतरण्याचें कापड. *F.-walker*, (U. S.) an overseer in large retail store. मोठ्या दुकानांतील देखरेख ठेवणारा. *To f. the paper*, प्रत्येक प्रश्न सोडविणें. *F.-less*, *a.* *Floor'ing*, *n.* खोलीचा तळ; मजल्याची जमीन करण्याचा मालमसाला.

Floor'er, *n.* (फ्लोअर्)—a knock-down blow; disconcerting news, etc.; paper or question hard to answer. कोसळून पाडणारा सपाटा, तडाखा; बेचैन करणारी बातमी, निरुत्तर करणारें उत्तर; कठीण प्रश्नपत्रिका, प्रश्न.

Flŏp, *v. i. & t.* (फ्लॉप्)—to sway about heavily; sit down ungainly; cause to fall with a thud. डचमळणें, डुचमळणें; फतकण घालून बसणें; धपकन टाकणें,-पाडणें. *n.* धप् आवाज, फतकण. *adv.* धपदिशीं, डुचमळवून. *F.! F.!* (*int.*) थल्थल्!

Flor'a, *n.* (फ्लॉअरा)—(*pl.-ae,-as*), (a list of) plants of a region. एकाद्या प्रदेशांतील वनस्पतिसमूह. *Flor'al*, *a.* विशिष्ट वनस्पतिसमूहाचा; फुलांचा; *F.-zone*, tract of earth with special vegetable characteristics. वनस्पतिविशेष, वनस्पतिविशिष्ट-कटिबंध,-भूप्रदेश. [L= goddess of flowers]

Flŏren'tine, *a. & n.* (फ्लॉरॅन्टाइन्)—(an inhabitant) of Florence; kind of twilled silk. फ्लॉरेन्सचा (रहिवासी); एक प्रकारचें दोरव्याचें रेशमी कापड.

Florĕs'cence, *n.* (फ्लॉरे'सन्स्)—putting forth of blossoms, flowering time or state. मोहोर येणें, फुलणें, पुष्पोद्गम, फुलण्याची वेळ,-चा हंगाम, मोहोरलेली स्थिति.—*'cent*, *a.* मोहोरणारा, फुलणारा.

Flor'et, *n.* (फ्लॉ'अरिट्)—any of the small flowers of a composite flower; a small flower. पुष्पक, (शेवंतीच्या फुलांतील मध्यभागाचें) लहान फूल.

Flor'iculture, *n.* (फ्लॉ'रि-कल्चर्)—cultivation of flowers. फुलांची मशागत, फुलझाडें तयार करण्याची विद्या.—*ral*, *a.*;—*rist*, *n.* पुष्पोत्पत्तिकलाभिज्ञ, पुष्पसंवर्धनज्ञ.

Flŏ'rid, *a.* (फ्लॉ'रिड्)—ornate, flowery; showy; ruddy, high-coloured. पुष्पमय, अलंकृत, अलंकारप्रचुर; भपकेदार; लालबुंद, लालभडक. *-ity,-ness*, *nn.*;*-ly*, *adv.*

Flŏ'rin, *n.* (फ्लॉ'रिन्)—an English silver coin (2s.); (hist.) English gold coin. दोन शिलिंगांचें चांदीचें इंग्रजी नाणें; (जुनें-प्राचीन-) इंग्लिश सोन्याचें नाणें.

Flor'ist, *n.* (फ्लॉ'अरिस्ट्, 'रिस्ट्)—one who deals in, raises, or studies flowers. फुलमाळी, फुलारी, पुष्पसंवर्धनविद्याभ्यासी.

Flor'uit, *n.* (फ्लॉ'अरुइट्)—period at which a person lived. मनुष्याचा जीवनकाल. [L.=he flourished]

Flŏss, *n.* (फ्लॉस्)—rough silk enveloping cocoon; (Bot.) the slender styles of the pistillate flowers of maize. कच्चें रेशीम, त्याचा धागा; मक्याच्या कणसाचे तंतू,-केसर. *F.-silk*, लडीचें कच्चें रेशीम.—*'y*, *a.*

Flŏtill'ă, *n.* (फ्लॉटि'ला)—a small fleet. लहान आरमार, आरमारी काफला.

Flŏt'sam, *n.* (फ्लॉ'ट्सम्)—a floating wreckage; oyster-spawn. तरंगणारा (फुटक्या जहाजाचा वगैरे) सांगाडा; कालवाचीं अंडीं.

Flounce, *v. i. & n.* (फ्लाउन्स्)—to go or move abruptly or impatiently. हातपाय आपटणें, चडफडणें; धडपड, चडफड, आदळआपट. *n.* ornamental strip round woman's skirt. झालरीसारखा झग्याचा झोल. *v. t.* चुण्यांचा कांठ, -किनार,-लावणें.

Floun'der, *n.* (फ्लाउं'डर्)—a small flat-fish. एक प्रकारचा समुद्रांतील मासा. *v. i. & n.*

to struggle and plunge; proceed in bungling or struggling fashion. धडपडणें; पडत झडत जाणें.

Flour, *n.* (फ्लॉअर्)—finer part of meal got by bolting. पीठ, कणीक. *v. t.* to sprinkle with f.; (U. S.) grind into f. (वर) पीठ पसरणें; (चें) पीठ करणें, दळणें. *F.-mill*, पिठाची गिरणी. *Flour'y*, *a.* (वर) कणीक पसरलेला.

Flou'rish, *v. i.* & *t.* (फ्ल'रिश्)—to grow vigorously; to thrive, to prosper; to wave, to throw about; prelude fancifully. पोसणें; भरभराट होणें; हातवारे करणें, (तरवार) परजणें, लेखणीचे फाटे ओढणें; गाण्यांची जोड करणें. *n.* ornamental curve in writing; waving of weapon, hand, etc.; florid passage; fanfare of horns; prosperity (rare). वेलबुट्टीदार फांटा, फटकारा; हातवारे, (तलवारीचें) परजणें; अलंकारिक भाषण,-उतारा; तुतारीचा घोष; भरभराट.—*y*, *a.*

Flout, *v. t.* & *i.* (फ्लाउट्)—to express contempt for by word or act; to scoff at. तिरस्कार दाखविणें; उपहास करणें. *n.* mocking speech or act. उपहास, टर, अवज्ञा.

Flow, *v. i.* (फ्लो)—to glide along as a stream; to circulate; to gush out; to be in flood; (of talk) move easily; (of dress) hang easily. वाहणें; पसरणें; जोरानें बाहेर येणें; पूर येणें; सरळ ओघ चालणें; मोकळेपणानें लोंबणें,-हालणें. *n.* flowing; rise of tide; copious supply. प्रवाह; भरती; ओघ, भरपूर पुरवठा. *Ebb and f.*, ओहोटीनंतर भरती (येणें).

Flŏw'er, *n.* (फ्लॉ'वर्)—reproductive organ in plant; blossom, a flowering plant; state of blooming; best part, pick of; prime of; (*pl.*) powder left after sublimation; (*pl.*) ornamental phrases. बीजकोश, पुष्पकोश; मोहोर, प्रसून; फूल, पुष्प; सुमन; बहर, भर; शेलकीं मनुष्यें, निवडक (लोक); ऐन भर, ज्वानी; (गंधकाचें वगैरे) फूल; चुरशी, निवळी; अलंकारिक भाषा,-शब्दप्रयोग. *v. i.* & *t.* to bloom, to blossom, to embellish with flower or floral design; cause plant to flower. फुलणें, मोहोर येणें, मोहोरणें; कृत्रिम फुलें,-वेलबुटी,-काढणें, बुटीदार करणें; फुलविणें. *In the f. of his age*, तारुण्याच्या भर ज्वानींत, ऐन तारुण्यांत. *In f.*, फुललेला. *F. girl*, फुलें विकणारी मुलगी, माळीण. *F. piece*, a picture of ff. फुलांचें चित्र. *F. pot*, फुलझाडाची (मातीची) कुंडी. *F.-show*, फुलांचें प्रदर्शन. *Flow'erage*, *n.* state of flowers; flowers in general. पुष्पावस्था; पुष्पसमुदाय, फुलोरा. *Flow'eret*, *n.* a small flower; a floret. लघु पुष्प; पुष्पांतर्गत लघु पुष्प. *Flower'ed*, *Flower'less*, *aa.*, *Flower'er*, (उशिरां, लवकर) फुलणारें झाड, मोहोरणारा वृक्ष.

Flŏw'erў, *a.* (फ्लॉ'वरि)—abounding in flowers; full of fine words. पुष्कळ फुलें असलेला, पुष्पमय; अलंकारिक. *-riness*, *n.*

Flown, 1 *pa. p.* of Fly. 2. *a.* swollen. गर्वानें फुगलेला.

Flŭc'tūāte, *v. i.* (फ्ल'क्च्यु-एट्)—to vary; to rise and fall; to be unstable; move up and down like waves. हेलकावे खाणें; चढउतार होणें; (मन) अस्थिर असणें, घुटमळणें; लाटांप्रमाणें वरखालीं होणें. *-tion*, *n.* चढउतार, हेलकावा, अस्थिरता, चंचलता.

Flue, *n.* (फ्लू)—1. fluff of cotton, etc.; 2. a fishing-net; 3. smoke-duct in chimney; tube for conducting heat; fissure in organ mouth -pipes; 4. *flu* (e), influenza. कापसाची लव, मृदुलोम; मासे पागण्याचें जाळें, पाग; धुराड्यांतील धुराचा मार्ग, धूम्रमार्ग, सार्णें; उष्ण हवा-ज्वाळा-वाहक नळी; अलगुजांतील जिवणींतील भेग,-खाप; इन्फ्लुएंझा ताप.

Flu'ent, *a.* (फ्लू'अन्ट्)—copious and ready, flowing. विपुल, अस्खलित, सारखा प्रवाह चालू असलेला, ओघवत्, बदलणारा. *Flu'ency*, *n.* वाणीचा अस्खलितपणा, ओघ, सुरळीतपणा. *-ently*, *adv.*

Flŭff, *n.* (फ्लफ्)—feathery stuff given off by blankets, etc.; soft fur or down; theatrical part imperfectly known. (गरम कापडाचा, घोंगडीचा) धागा, वृशा; मृदुलोम, मऊ लोंकर, लव, पर; नाटकांतील नटाचें अर्धवट पाठ भाषण. *v. t.* to put soft surface on; make into fluff; shake oneself up into fluffy mass; blunder in theatrical part. पृष्ठभाग मऊ करणें; मऊ लोंकर बनविणें,-मऊ धागे काढणें; (आंगावर) लव उभी करणें; (नटानें) भाषणांत घोडचूक करणें. *Fluff'y*, *a.*

Flu'id, *n.* (फ्लू'इड्)—moving substance (*e. g.* gas or liquid). द्रव पदार्थ, प्रवाही पदार्थ. *a.* moving readily, not rigid. प्रवाही, सद्रव, वायुरूप. *-'ity*, *n.* द्रवत्व, द्रवस्थिति, वहनशीलता. *-'ify*, *v. t.* to make fluid. द्रव,-पातळ,-प्रवाही करणें.

Fluke, *n.* (फ्लूक)—a triangular plate on the arm of an anchor; barbed head of lance; (*pl.*) whale's tail; kinds of parasitic worm in sheep's liver; kind of kidney potato. जहाजाच्या नांगराचा फाळ; त्रिशूल; देवमाशाची शेंपटी; मेंढीच्या पोटांतील बांडगुळासारखा वाढणारा किडा; लंबवर्तुळाकार बटाटा.

Fluke, *n.* (फ्लूक्)—a lucky accidental stroke. अनपेक्षित टोला,-तडाखा, आकस्मिक लाभ. *v. i. & t.* to make fluke; get, or hit by fluke. चुकून टोला मारणें,-लागणें; आकस्मिक लाभ होणें. *Fluk'y, a.*

Flŭmm'erў, *n.* (फ्ल'मरि)—kinds of sweet dish; empty compliments; trifles. एक गोड पक्वान्न; मिथ्या प्रशंसा, व्याजस्तुति; क्षुल्लक गोष्ट.

Flung, *pa. t.* of Fling.

Flŭnk'ey, *n.* (फ्लंकि)—(*pl. -eys*) a footman; toady. हुजऱ्या, लाळघोट्या. *-ism, n.*

Flu'or, *n.* (फ्लुअर्)—1. menstrual flux. आर्तव, विटाळ. *F. albus*, पांढरी धुपणी, प्रदर (रोग). 2. kinds of gem-like mineral containing fluorine. गारगोटीसारखा खनिज पदार्थ, चित्र खनिज. *Flu'orine, n.* फ्लुअ.

Fluores'cence, *n.* (फ्लुरे'सन्स्)—coloured luminosity produced by direct action of light. प्रकाशाच्या योगानें उत्पन्न होणारी रंगीत चकाकी.

Flŭ'rrў, *n.* (फ्ल'रि)—nervous hurry, agitation; gust, squall; a whale's death throes. गडबड, क्षोभ, क्षुब्धता; वाऱ्याचा झटका, अल्प वृष्टि, वावटळ; देवमाशाच्या मरण कालच्या यातना. *v. t.* to agitate. क्षुब्ध करणें, घाबरवणें.

Flŭsh, *v. i. & t.* (फ्लश्)— to spurt, to rush out; to cleanse (drain) by flow of water; to glow, to blush; encourage. भळभळ वाहणें; पाण्याच्या स्रोतानें धुवून काढणें, जलमय करणें, लाली येणें,-चढणें, लाजणें; जोर येणें. *n.* rush of water; flushing of drain; sudden abundance; rush of emotion, elation; glow, blush, freshness, vigour. पाण्याचा लोट; गटार पाण्यानें भरून धुवून काढणें; बहर; लहर; लाली, टवटवी, तजेला. *a.* in flood; having plenty; (of money) abundant; level with. जलमय, पूर्ण; समृद्ध, रगड; भरपूर, विपुल (पैसा); सपाट (केलेला).

Flŭsh, *n.* (फ्लश्)— a set of cards all of one suit. पत्त्यांची एकाच रंगाचीं सर्व पानें.

Flŭs'ter, *v. t. & i.* (फ्ल'स्टर्)—to confuse; be in a flurry, be agitated. गोंधळवणें, गांगरवणें; गांगरणें, क्षुब्ध होणें, झिंगल्यासारखें करणें. *n.* गोंधळ, क्षोभ.

Flute, *n.* (फ्लूट्)—a musical instrument with blow-hole and finger-holes or keys; a flute-player; semi-cylindrical groove. मुरली, पांवा, बांसरी; बांसरी वाजविणारा; (भिंतीच्या खांबांतील इ.) पन्हळी, खांचणी. *v. t. & i.* पांवा वाजविणें; मुरलीप्रमाणें आवाज काढणें; खांचणी करणें; -पाडणें. *Flu'tist, n.* बांसरीवाला.

Flŭtt'er, *v. i. & t.* (फ्ल'टर्)--to flap wings without flying or in short flights; to be agitated, to agitate; hover; move irregularly. (पंख) फडफडवणें; मन अस्थिर करणें किंवा होणें, क्षुब्ध होणें; घिरट्या घालणें, घुटमळत राहणें. *n.* fluttering; tremulous excitement, stir, sensation; speculation; gamble. फडफड; मनाचें अस्थैर्य, चलबिचल, धडपड; सट्टा, जुगार.

Flu'tў *a.* (फ्लू'टि)—soft and clear in tone. मृदु मंजुळ आवाजाचा.

Flu'vial, Flu'viatile, *aa.* (फ्लू'व्हिअल्,—व्हिअटाइल्-टिल्)-of, found in, rivers. नदीचा, नदींतील, नद्यांनीं उत्पन्न केलेला. [L. *fluvius*, a river]

Flŭx, *n.* (फ्लक्स्)-morbid or excessive discharge of blood, excrement; flowing; inflow of tide; flood of talk etc.; continuous succession of charges; substance mixed with metal etc. to help fusion; (Math.) continued motion; (Physics) rate of flow of any fluid. ढाळ, ढेंढळ, हगवण, स्राव; वाहणें, प्रवाह, स्राव, (माणसांची) रीघ; भरतीचा प्रवाह, भरती; शब्दपूर, शब्दांचा भडिमार; सतत फेरबदल; संमिश्रक (द्रव्य), ज्यानें दोन धातु पातळ होऊन एकजीव होतात असा क्षार; सतत गति; द्रवाची प्रवहनगति, प्रवहनकाल. *v. i. & t.* to issue in a flux; make fluid, fuse. स्राव होणें, प्रवाहानें वाहणें; रस करणें, वितळविणें, संमिश्र करणें. *F. & reflux* (often fig.) भरतीओहोटी, चढउतार. *A line is the f. of a point*, बिंदूची सतत गति म्हणजे रेषा होय.

Flŭ'xion, *n.* (फ्ल'क्शन्)—flowing, continuous change (rare); (Math.) rate of change of a continuously varying quantity. वाहणें, स्राव, प्रवाह, सर्वोदित बदल; तात्कालिक गति.*-al, -ary, aa.*

Fly, *n.* (फ्लाय्)—a two-winged insect; kinds of plant-disease caused by flies; natural or artificial fly as a fishing bait; flying, distance flown; a one-horse hackney carriage; a lap on garment to cover button-holes; a flap at entrance of tent; a part of flag; (Theatr. pl.) space over proscenium; speed-regulating device in machines. माशी, मक्षिका; (माशांमुळें होणारा) वनस्पतींचा रोग; माशीसारखा गळ; उडणें, उड्डाणाचें अंतर; एक घोड्याची हलकी गाडी; गुंड्यांची वरची पट्टी,-झांकणपट्टी; तंबूच्या दरवाजावरील पडदा; (बावट्याचा) फरारा, ध्वजपट; रंगभूमीचा वरून लोंबणारा पडदा ऊर्ध्वपट (पडदा); गति मनतोल राखणारें चाक,-योजना, गतिचक्र. *A f. on wheel*, स्वतःच्या वजनाचा-शब्दाचा फाजील अभिमान बाळगणारा. *To break f. on wheel*, प्रमाणाबाहेर शक्ति खर्च करणें. *A f.*

in the ointment, a trifling circumstance that spoils enjoyment. दुधांत मिठाचा खडा. *F.-blow*, *n.* माशीचें अंडें ; *v. t.* (जखमेंत माशीनें) सडी घालणें, सडाविणें, नासाविणें. *F.-blown*, tainted. सडलेला. *F.-flap*, a flap for driving away ff. चौरी. *F.-leaf*, पुस्तकाचें पहिलें किंवा शेवटचें कोरें पान, मलपृष्ठ. *F.-net*, मच्छरदाणी *F.-sheet*, जाहीरपत्रक, हस्तपत्रक. *F.-wheel*, गतिचक्र.

Flȳ, *v. i. & t.* (फ्लाय्)- (flew *pa. t.*; flown *pa. p.*) to move through air; to travel swiftly; jump clear over ; set or keep flying; to hasten, to rush ; to flee. हवेंत उडणें, उंच जाणें, उड्डाण करणें ; विमानांतून जाणें ; वरून अलग उडी मारणें ; उडवणें, फडकत ठेवणें ; त्वरेनें जाणें , सटकन निसटणें, सपाट्यानें धावत जाणें ; पळून जाणें. *To f. high*, महत्त्वाकांक्षा धरणें. *High-flown* (style) exalted, bombastic. अत्युच्च, शब्दावडंबराची. *The bird is flown*, the person wanted has escaped. ज्याला पकडावयाचें त्या इसमानें हातावर तुरी दिल्या. *To f. at higher game*, (fig.) have nobler ambitions. उच्च महत्त्वाकांक्षा धरणें. *To f. kite*, पैसा उभा करणें, वारा कसा वाहतो तें पाहणें. *As the crow flies*, नाकासमोर. *To. f. at, upon*, एकदम तुटून पडणें, वर घसरणें. *F. out*, उसळणें, खाडकन रागावणें. *To let f.*, एकदम (बंदूक, अस्त्र) सोडणें, झाडणें. *F.-away*, सैल, मोकळा (झगा, वस्त्र) ; लहरी, छांदिष्ट (मनुष्य). *F.-by-night*, निशाचर, रातोरात पळून जाणारा.

Flȳ, *a* (फ्लाय्)—(sl.) knowing, wide-awake. ज्ञाता, सावध.

Flȳ'er, Flī'er, *n.* (फ्ला'यर्)-a bird etc. that flies; a fast running animal etc. ; airman ; flying jump. उडणारा पक्षी ; जलद धांवणारें जनावर, गाडी; वैमानिक; धांवती उडी.

Flȳ'ing, *a. & n.* (फ्ला'इङ्)—उडणारा, उडणें, उड्डाण. *F.-boat*, a kind of sea-plane. (पाण्यावरून उडणारी व पाण्यावर उतरूं शकणारी) उडतनौका, विमान. *F.-column*, a body of troops for rapid marching. जलदगति लष्करी टोळी. *F.-fish*, उडणाऱ्या माशांची जात. *F.-fox*, वटवाघूळ. *F.-jump*, a leap with running start. जोरानें धांवत येऊन मारलेली उडी. *F.-man*, airman. वैमानिक. *F.-Officer*, R. A. F. rank below flight-lieutenant. शाही विमानदलांतील एक हुद्याची जागा. *F.-squad*, police detachment with motor cars etc. for rapid pursuit. (त्वरित पाठलागासाठीं जलद वाहनांतून जाणारे) धांवते शिपाई,-त्यांची टोळी. *F.-start*, passing starting point at full speed. (शर्यतीच्या) सुरवातीपासूनच भरधांव निघणें,-सुटणें.

Foal, *n.* (फोल्)—young (of a horse, ass, &c.). शिंगरूं, घोडीचा, गाढवीचा बच्चा. *v. t. & i.* (शिंगरूं) इ. जन्मणें, प्रसवणें.

Foam, *n.* (फोम्)—froth formed in liquid ; froth of saliva or perspiration. ; (*poet.*) the sea. फेंस; तोंडांतील फेंस, फेण; कफ; समुद्र. *v. i.* फेंस येणें, फेंसाळ होणें, क्रोधयुक्त होणें.-*y*, *a.* फेनिल, फेंसाळ.

Fŏb, *n*, (फॉब्)—a small pocket for watch, (U. S.) short chain or ribbon for watch. घड्याळ ठेवण्याचा खिसा, कप्पा ; घड्याळाची आंखूड सांखळी किंवा फीत. *v. t.* खिशांत घालणें. 2. *v. t.* to cheat, palm off. फसविणें, ठकविणें.

Fō'cal, *a.* (फो'कल्) of, at, a focus. केंद्रीय, केंद्रस्थ, नाभीस्थ. *F.-distance*, केन्द्रान्तर, नाभिगतान्तर.-*ize*, *v. t.* केंद्रांत आणणें.-*ization*, -*n.*

Fō'cus, *n.* (फो'कस्)—a point at which rays meet after reflection or refraction ; a central point. किरण एकत्र जमण्याचें स्थान ; केंद्र, केंद्रस्थान. *v. i.* & *t.* to adjust focus of (lens, eye) ; to concentrate (mind &c.) on. केंद्रांत आणणें, केंद्रस्थ करणें, केंद्रस्थानीं आणणें, चित्तैकाग्र्य करणें. *pl.* Foci, Focuses (फो'साय्, फोकसिस्)

Fŏdd'er, *n.* (फॉ'डर्)—dried food or hay (for cattle, horses or sheep). चारा, वैरण, गवतकाडी, घासपात. *v. t.* वैरण घालणें.-*less a.*

Foe, *n.* (फो)—an enemy ; an opponent. शत्रु ; प्रतिपक्षी, दुश्मन, वैरी.-*man*, प्रतिभट, युद्धांतील शत्रु.

Foe'tus, Fē'tus, *n.* (फी'टस्)—developed embryo in womb or egg. गर्भ ; भ्रूण, गाभ. **Foe'tal**, *a.* (फी'टल्)—Foeticide, *n.* भ्रूणहत्या.

Fŏg, *n.* (फॉग्)—vapour suspended at or near the earth's surface ; thick mist ; (photog.), cloud on developed plate. धुकट वातावरण ; दाट धुकें, धुव्हें ; धुक्यासारखा पापुद्रा, पडदा. *v. t.* धुक्यानें झांकणें, पुसट करणें, गांगराविणें; धुक्याचें निशाण दाखविणें. *Fogg'y*, *a.*

Fŏg *n.* (फॉग्)—aftermath, long grass. एकदां कापून झाल्यानंतर पुन्हां फुटणारें) पालवीचें गवत ; उंच गवत.

Fo'gȳ, Fo'gey, *n.* (फो'गि)—*old f.*, old-fashioned fellow. जुना पुराणा मनुष्य.

Foi'ble, *n.* (फॉइ'बल्)—a weak point, a fault ; point half of sword. उणें, व्यंग, वर्म, छिद्र; तरवारीचें टोंकाचें अर्धें पातें.

Foil, *n.* (फॉइल्)—a thin sheet of metal. पातळ पत्रा, वर्ख, कोंदण. *v. t. & i.* to baffle, to parry; to spoil scent. घडूं न देणें, बेत फसवणें ; बिघडवणें. *2. n.* a blunt-edged sword used in fencing. निधारी-बोथट-तलवार, दांडपट्टा.

Foist, *v. t.* (फॉइस्ट्)—to introduce surreptitiously or wrongfully ; to palm off on. खोटी वस्तु खरी आहे असें भासवणें; घुसडून देणें, चनवणें, घुसडणें, प्रक्षेप करणें.

Fŏkk'er, *n.* (फॉ'कर्)—a German fighting aeroplane. एक लढाऊ जर्मन विमान. [*F.*, Dutch inventor]

Fōld, *n.* (फोल्ड्)—(usu. *sheep-f.*) enclosure for sheep; (*fig.*) church, a body of believers. मेंढवाडा; कळप, पंथ. *v. t.* to enclose (sheep) in fold. मेंढवाड्यांत घालणें.-कोंडणें.

Fōld, *v. t. & i.* (फोल्ड्)— to double a flexible thing over upon itself; to be folded; clasp (arms etc.); embrace; envelop, wrap. घडी करणें, घडी घालणें; दुमडणें; हात जोडणें,-जुळणें; वेंगाटणें, कवटाळणें, आलिंगन देणें; झांकणें, लपाविणें, वेष्टणें. *n.* folding; hollow or nook (in mountain); coil; line made by folding. दुमडणें, दुमड, चूण; (पर्वतांतील) पोकळी, दुमड, कोंपरा; वेटाळें; दुमडून पडलेली घडी, रेषा, दूण. *-fold*, (*suf.*) showing times or repetitions.-पट,-गुण.

Fō'lder, *n.* (फो'ल्डर्)—paper-folding instrument; (*pl.*) folding eye-glasses. (कागदाच्या घड्या पाडण्याची) मुकी सुरी; घडीचा चष्मा.

Fōliā'ceous, *a.* (फोलिए'शस्)—of or like leaves; with organs like leaves; laminated. पानांचा, पानांसारखा; पर्णाकार अवयवांचा; कातळेवजा रचनेचा.

Fō'liage, *n.* (फो'लिइज्)—leaves, leafage. पानें, पालवी, झुबका, घोंस, गेंद, पत्तीची नक्षी.

Fō'liar, *a.* (फो'लिअर्)—of leaves. पर्णमय, पल्लवासंबंधीं.

Fō'liate, *a.* (फो'लिअट्)—of leaves, पर्णांचा, पर्णासारखा. *v. t. & i.* (फो'लिएट्), to split into laminae; decorate (arch, door-head) with foils; number leaves of (book) consecutively. पालवणें, पालवी फुटणें; वर्ख,-बेगड,-लावून चित्रविणें; (पोथीच्या पुस्तकाच्या) पानांस अनुक्रमांक देणें.—*tion*, *n.*

Fō'liō, *n.* (फो'लिओ)—(*pl.-es*), once-folded sheet of paper giving two folios or four pages; book of largest size; leaf of paper; number of words taken as unit in reckoning length of document; page-number of printed book; page of ledger. दुचंदी कागद,-पान, दुंडा; फार मोठ्या आकाराचें पुस्तक; पृष्ठ, पत्र, पान; (एका पानांत असणारी) ठराविक शब्दसंख्या; छापील पानाचा अनुक्रमांक,-आंकडा; खातेवहीचें-खतावणीचें-पान.

Fōlk, *n.* (फोक्)—people in general; nation; race; relatives. लोक, जनसमूह; राष्ट्र; वंश; नातेवाईक.

Fōlk'lore, *n.* (फोक्-लोअर्)—traditional beliefs; study of these. दंतकथा, कहाण्या, त्यांचा अभ्यास,-संशोधन.

Fŏll'icle, *n.* (फॉ'लिकल्)—(Bot.) small sack; cocoon. गोणिकाफल; आंतल्या दुमडीवर फुटणारी शेंग (उदा. रुईचें फळ, सांवरीचें बोंड.) *Follic'ular*, *-'ulated*, *aa.* गोणिका फलांचा-फलांसारखा.

Fŏll'ow, *v. t. & i.* (फॉ'लो)—to go or come after; to pursue; to take as a guide; to be the necessary inference; to grasp the meaning of. अनुसरणें; पाठलाग करणें; पुरे पुरे करणें; नेतृत्व स्वीकारणें; चा परिणाम असणें; परतून निघणें; उद्भवणें; अनुमान काढणें; अथ समजणें, लक्षांत घेणें,-येणें. *To f. one's nose*, leave one's route to chance. दैवावर हवाला ठेवणें. *To f. the plough*, be plough man. शेतकऱ्याचा धंदा करणें, शेतकरी बनणें. *F. the sea*, खलाशी बनणें. *As follows*, पुढीलप्रमाणें, येणेंप्रमाणें, पुढें लिहिल्याप्रमाणें. *F. on*, *v. i.* (Crick., of side) go in again out of turn. (कमी धांवा झाल्यामुळें) पुन्हां खेळायला जाणें; *n.* पाळी येण्याच्या अगोदरच पुन्हां भाग पडलेलें खेळणें. *F. out*, शेवटपर्यंत पिच्छा पुरवणें. *F.-up*, धिम्मेपणानें चालू ठेवणें, पिच्छा पुरवणें, चिकाटी धरणें; *n.* (at restaurants) supplementary portion of half the quantity. पुरवणी वाढप. *To f. suit*, त्याच रंगाचें-बाजूचें-पान,-पत्ता,-टाकणें.

Fŏll'ower, *n.* (फॉ'लोअर्)—an adherent, an admirer of maidservant. अनुयायी, अनुगामी, शिष्य; दासीच्या नादीं लागणारा.

Fŏll'owing, *n.* (फॉ'लोइंग्)—body of adherents. अनुयायिवर्ग.

Fŏll'y, *n.* (फॉ'लि)—foolishness; a foolish act, silly or light-minded conduct. अज्ञान, मूर्खपणा; मूर्खपणाचें कृत्य, वेडाचार.

Foment', *v. t.* (फमें'न्ट्)—to bathe with lotion, to foster, to encourage, to stir up. शेकणें, ऊन देणें, गरम पाण्यानें धुणें; चेतवणें, संवर्धन-जोपासना-करणें, पेटविणें. *Fomenta'tion*, *n.*

Fŏnd, *a.* (फॉन्ड्)—tender, loving; doting; foolishly credulous. ममताळू, मेमळ; आसक्त, लंपट; मूर्ख. *F. of*, चा भोक्ता.—*ly*, *adv.*; *-ness*, *n.*

Fŏn'dant, *n.* (फॉ'न्डन्ट्)—a kind of sweetmeat. एक पक्वान्न, मिठाई.

Fŏn'dle, *v. i.* & *t.* (फॉ'न्डल्)—to caress. गोंजारणें, लाड करणें.

Fŏnt, *n.* (फॉन्ट्)—receptacle for baptismal water; oil reservoir of lamp. बाप्तिस्मापात्र, तीर्थपात्र; दिव्याचें टवळें, चवडें.

Fŏn'tal, *a.* (फॉ'न्टल्)—original; baptismal. मूळचें; बाप्तिस्मासंबंधीं.

Fontanel,' -le, *n.* (फॉन्टेने'ल्)—membranous space in infant's head. लहान मुलांची टाळू.

Fōōd, *n.* (फूड्)—victuals, nourishment; material for the mind. अन्न, भक्ष्य, आहार, भोजन, पोषण, पोषकवस्तु; मनाला पोषक अन्न, विचार्य-विषय. *F.-stuff*, खाण्याचा पदार्थ.

Fōōl, *n.* (फूल्)—a silly person, a simpleton; an unwise person; (*hist.*) a jester, a clown; a dish of stewed fruit. मूर्ख मनुष्य, भोळा, वेडा, भोळसर, अक्कलशून्य; विदूषक, खुषमस्कऱ्या; दूध, मलई इत्यादींतील फळांचा रसा. *v. i.* & *t.* to play the fool; to trifle; to cheat, to dupe. मूर्खासारखें वागणें, गमणें, माशा मारणें; हास्यास्पद करणें; फसवणें, वेड्यांत काढणें, चकवणें. *To be a f. to*, शीं तुलना करतां हास्यास्पद ठरणें. *To play the f.*, blunder, trifle. घोडचूक करणें, अचरटपणा करणें, इंशावारी नेणें. *No f. like an old f.*, (esp.) म्हातारा नवरा-प्रेमी-गमतीदार. *To make a f. of*, ला फसविणें, ची थट्टा,-निराशा,-करणें. *Be a f. for one's pains*, व्यर्थ श्रम करणें. *All fools' day*, (ज्या दिवशीं लोकांना गंमतीनें फसवतात तो) १ एप्रिल हा दिवस; *April f.*, १ एप्रिल ह्या दिवशीं गंमतीनें फसविला गेलेला मनुष्य. *To send, go, on f.'s errand*, fruitless one. निरर्थक फेरा घालविणें,-घालणें. *F'-s paradise*, illusory happiness. मूर्खपणाचा शोक, वेड्यांचा बाजार, वेडा नाद, खूळ. *F.' s cap, foolscap*, ancient jester's cap with bells; dunce's conical paper cap; writing or printing paper 15–17 × 12–13½ inches. विदूषकाची टोपी; वेडप्याची कागदी टोपी; लिहावयाचा किंवा छपाईचा ठराविक आकाराचा कागद, ताव. *F. proof*, *a.* (of rules etc.) स्पष्ट, सरळ, फसगत न करणारे (नियम).

Fōōl'erў, *n.* (फू'लरि)—*fooling; foolish* act or thing. वेडेपणा; वेडाचार, वेड, खूळ.

Fōōl'hărdў, *a.* (फू'ल्-हार्डि)—foolishly venturesome; needlessly daring. अविचारानें धाडस करणारा; अविचारी, धसमुसळ्या. *-diness, n.*

Fōōl'ĭsh, *a.* (फू'लिश्)—void of understanding; indiscreet; stupid. अक्कलशून्य; अविचारी; मूर्ख, खुळकट, हास्यास्पद. *-ly, adv.;-ness, n.*

Fŏŏt, *n.* (फुट्)—(*pl.* feet) termination of a leg; step, pace, tread; infantry; a metrical unit with one syllable accented; linear measure of ·12 in.; lower part, base; (Zool.) kinds of adhesive organs in invertebrates; (*Bot.*) part by which petal is attached; (*pl.* foots) dregs, oil refuse, coarse sugar. चरण, पद; पाऊल; पायदळ; (कवितेंतील) पाद, चरण ओळ, गण; बारा इंचांचें माप; खालील भाग, तळ, पायथा, पाया, आधार, मजबुती; बिनकण्याच्या प्राण्याचा जमिनीसरपटचा-खालचा-भाग, पाय; बुंधा, बुडखा; तळचा गाळ, सांखा, रेंदा, मळी, अशुद्ध साखर. *v. t.* (*f. up*) to add up (account); pay (bill); (*f. it*) trip, dance; walk, go; put new foot to stocking; strike with the talon. हिशोब करणें, मिळविणें; हिशोब चुकता करणें; नृत्य करणें, नाच करणें, नाचणें; पायीं जाणें, चालणें; पायमोजाला नवा तळ बसविणें; नखी मारणें. *To have ff. of clay*, be liable to overthrow. पराभूत करूं शकणें. *Swift of foot*, जलद चालणारा. *To have one f. in grave*, मरणोन्मुख असणें. *With one's feet foremost*, स्मशानांत (प्रेत) नेलें जाणें. *Set put, have one's f. on the neck of*, च्या मानेवर पाय देणें, पूर्णपणें ताब्यांत ठेवणें, पराभूत करणें. *On one's feet*, standing, in health, with a livelihood. उभा, प्रकृतीनें चांगला, स्वतःचें पोट भरणारा- कामधंदा असलेला. *To keep one's feet*, उभें राहणें, न पडणें. *To put one's f. down*, (*fig.*) take up firm position. मताचा आग्रह न सोडणें, निश्चयानें वागणें, निश्चय न सोडणें. *To put one's f. in it*, blunder. घोडचूक करणें. *On f.*, पायीं, सुरू, चालू. *Tread under f.*, oppress. जुलूम करणें. *Under f.*, पायाखालीं; जमिनीवर. *F. & mouth (disease)*, a fever, esp. in horned cattle. गुरांचा ताप -रोग. *F.-board*, पायफळी, पायठा. *F.-boy*, पोऱ्या, हुजऱ्या, *F.-fall*, पावलाचा आवाज, पाऊल. *F. guard*, पायवळांतील शेलके पाहरेकरी. *F.-hill*, पर्वताच्या पायथ्याची टेंकडी, टेंकाड. *F.-hold*, पाय ठेवायला आधार, आश्रय, टेंका. *F. -lights*, screened lights in front of stage. रंगभूमीवरील तळचे दिवे, तलप्रकाश. *F.-note*, (पृष्ठाचे खालीं दिलेली) तळटीप. *F. pad*, पादचारी वाटमाऱ्या. *F.-path*, पायवाट, पाऊलवाट. *F.-pound*, एक पौंड ओझें जमिनीपासून एक फूट वर उचलण्यास लागणारी शक्ति. *F.-print*, पावलाचा ठसा, पाऊल, पदचिन्ह, *F.-race*, धावण्याची शर्यत. *F.-rule*, एक फुटाचें माप, फुटपट्टी. *F.-sore*, चालून पायांस फोड आलेला, पाय सुजलेला. *F.-step*, पाऊल, चिन्ह, खूण. *F.-stool*, पादपीठ. *F.-wear*, पादत्राण. *-footed, Foot'less, aa.*

Fŏŏt'ball, *n.* (फु'ट्-बॉल्)—a large round or elliptical inflated ball. पायानें खेळण्याचा चेंडू, पदकंदुक. *-er, n.*; *Foot'er*, (*sl.*) फुटबालचा खेळ.

Fŏŏt'ing, *n.* (फु'टिंग्)—foothold; secure position; degree of intimacy; admittance (to trade, society, &c.). पायाला आधार; बंदोबस्त ; पगडा ; आश्रय.

Fŏp, *n.* (फॉप्)—a dandy, a vain man. अक्कड-बाज, नखरेबाज मनुष्य.

Fŏr, *prep.* (फॉर्)—in place of; in defence or favour of; with a view to; as regards, in the direction of; because of, on acconnt of. ऐवजीं; करितां; संबंधीं; मुळें. *conj.* (introducing a new sentence) कारण.

Fŏrasmuch'as, *adv.* (फॉर् ॲज़्मच्'च् ॲज़्)—since, because. कारण.

Fŏ'rage, *n.* (फॉ'रिज्)—food for horses and cattle. घोड्यांची किंवा गुरांची चंदी, वैरण.

Fŏ'ray, *n.* (फॉ'रे)—an incursion, a raid. आक्रमण, हल्ला.

Forbear, *n.* (फो'र्बेअर्,फर्ब'अर्)—(usu. *pl.*) forefathers. पूर्वज, वाडवडील.

Forbear', *v. t. & i.* (फर्बे'अर्)—to abstain from ; to give up; not to mention ; to be patient. मन आवरणें, पासून दूर राहणें; सोडणें, गय करणें; न सांगणें; धीर धरणें, दम धरणें. *-ingly, adv.*

Forbear'ance, *n.* (फर्बे'अरन्स्)—command of temper; long-suffering. धैर्य; सहनशीलता, धीर, दम, संयम, शांति.

Forbid', *v. t.* (फर्बि'ड्)—to prohibit, to interdict, to command not to do; to oppose. मना करणें, मनाई करणें; अडथळा करणें. *Forbidd'ing, a.* repellent. मना-निषेध-करणारा, निवारक; तिटकारा आणणारा. *God forbid!*, may it not happen! असें न होवो! *Forbidden fruit*, a thing desired because it is not allowed. निषिद्ध फळ, निषिद्ध गोष्टीची-सुखाची-हाव.

Force, *n.* (फॉर्स्)—strength, violence, intense effort; influence; (Phys.) action; (*pl.*) troops; compulsion; a waterfall. जोर, बळजबरी, सामर्थ्य ; वजन; (Phys.) शक्ति, प्रेरणा ; (अनेo) सैन्य; बलात्कार, जुलूम; धबधबा. *v. t.* to constrain, to compel; to drive, propel; break open by force. बलात्कार करणें, (करण्याला) भाग पाडणें; हांकलणें, प्रेरणा देणें; चालना देणें; जोरानें फोडणें,-उघडणें. *For'cedly, adv.*

Force'ful, *a.* (फॉ'र्स्-फुल्)—forcible, जोरदार. *-ly adv.*; *-ness, n.*

Fŏr'cĕps, *n.* (फॉ'र्सेप्स्)—surgical pincers; (Zool.) forceps-like organ. शस्त्रवैद्याचा चिमटा, संदंशयंत्र, सांडस; (प्राण्यांचा) चिमट्यासारखा अवयव.

For'cible, *n.* (फो'र्सिबल्)—done by or involving force; telling, effective. जोरदार, प्रबळ, परिणामकारक, परिणामकारी.—*ness, n.*; *For'cibly, adv.*

For'cite, *n.* (फॉ'र्साइट्)—an explosive. स्फोटक गोळा.

Ford, *n.* (फॉर्ड्)—a shallow place (where river, &c. may be crossed). उतार; पायउतार, पार. *v. t.* to wade across a river. नदींतून चालत पलीकडे जाणें, पायीं उतरणें. *-able, a.*; *-less, a.*

Fordone', *a.* (फॉर्ड'न्)—utterly wearied. श्रान्त, अगदीं थकून गेलेला.

Fore, *adv.* (फोअर्)—in front. पुढें. *a.* situated in the front. पुढील, पुढचा, अग्र. *n.* fore part or bow of a ship. पुढील भाग. *To the fore*, on the spot, ready to hand, alive. हजर, जवळ, हाताजवळचा, हाताशीं, जिवंत. *Come to the fore*, take the leading part. मुख्य भाग घेणें, पुढारी होणें.

Forearm, *n.* (फो'अर् आर्म्)—arm from elbow to wrist. कोपराच्या खालीं मनगटापर्यंतचा हात. *v. t.* (फॉअर्आ'र्म)—to arm beforehand. आगाऊ तजवीज-व्यवस्था-करून ठेवणें.

Forebōde', *v. t.* (फर्-बो'ड्)—to betoken, to portend, to have presentiment of. पुढील गोष्ट आगाऊ सुचविणें; भाकीत करणें. *Forbo'ding, n.* prediction, omen, presentiment (esp. of evil). भाकीत, शकुन, दुश्चिन्ह, अपशकुन. *Forbod'ingly, adv.*

Forecăst', *v. t.* (फोअर्-का'स्ट्)—to estimate or conjecture beforehand. आगाऊ भविष्य कल्पिणें. *n.* (फो'अर्-कास्ट्) conjectural estimate. आगाऊ अंदाज, भाकीत, भविष्य.

Forecastle, **Fo'c'sle**, *n.* (फो'क्सल्)—the short raised deck at the bow; forward part under deck in a merchant ship. गलबताचा नाळीकडील उंच भाग; व्यापारी गलबताचा डेक-मजल्या-खालील पुढें आलेला भाग.

Fore'făther, *n.* (फो'अर्-फाद़र्)—(*pl.*) those from whom one's father or mother is descended; the earlier generations. (अनेo) वाडवडील; मागील पिढ्या.

Fore'finger, *n.* (फो'अर्-फिंगर्)—*first* or *index* finger, the finger next to the thumb. आंगठ्याजवळचें बोट, तर्जनी.

Fore'front, *n.* (फो'अर्फ्रंट्)—very front, foremost part. अगदीं पुढचा-दर्शनी-भाग, अग्रभाग, आघाडी.

Forego', *v. t. & i.* (फोअर्-गो')—to precede in place or time; (*forgo*) to quit, renounce. (च्या) आधींच होऊन-ठरून-जाणें; सोडणें, सोडून देणें. *Forego'ing*, आधींचा, पूर्वोक्त. *Foregone conclusion*, decision or opinion come to in advance of the evidence or necessary facts, prejudice. पूर्वसंकल्पित मत; आगाऊच ठरून गेलेलें मत.

Fore'ground, *n.* (फो'अर् ग्राउंड्)—part of view (esp. in a picture) nearest the observer; the most conspicuous position. अग्रभाग, पूर्वभाग; अगदीं ठळक भाग.

Fore'hănd, *n.* (फो'अर् हँड्)—the part of a horse before rider. घोडेस्वाराच्या पुढचा घोड्याचा भाग. *a.* not back-handed. हात पुढें करून मारलेला (टोला).

Fore'head, *n.* (फॉ'रिड्)—part of the face above the eyebrows. कपाळ, भालप्रदेश, ललाट, निढळ.

Fŏ'reign, *a.* (फॉ'रिन्)— not of or in one's country; alien, dissimilar, irrelevant, extraneous. परदेशी, विदेशी; परकीय, विजातीय, असंबद्ध.

Fŏ'reigner, *n.* (फॉ'रिनर्)—alien, stranger, one born in or belonging to another country. परदेशांतील मनुष्य, परकी, विजातीय, पर.

Forejŭdge', *v. t.* (फोअर्जज्)—to judge before hearing evidence. (पुरावा ऐकण्यापूर्वींच) न्याय करणें, निवाडा करणें, ठरविणें.

Fōreknow', *v. t.* (फोअर्नो')—to know beforehand. आगाऊच जाणणें, भविष्यज्ञान असणें. *Foreknow'ledge*, *n.* (फोअर्नॉ'लिज्) पूर्वज्ञान.

Fore'land, *n.* (फो'अर्लॅन्ड्)—a promontory; the land lying in front. भूशिर; समोरची भूमि,-समोरचा प्रदेश.

Fore'lĕg, *n.* (फो'अर्लेग्)—beast's front leg. पशूचा-जनावराचा-पुढचा पाय.

Fōre'lŏck, *n.* (फो'अर्-लॉक्)—lock of hair just above the forehead. कपाळाजवळचे पुढील केंस. 2. a linchpin. निसुळती चपटी खीळ, लांकडाच्या सांध्याला मारण्याची दाळ. *To take time, occasion, by the forelock*, not to let slip an opportunity. संधि साधणें, वाहत्या गंगेंत हात धुवून घेणें.

Fōre'man, *n.* (फो'अर्-मन्)—workman superintending others; the principal juror. दुसऱ्या कामगारांवर देखरेख ठेवणारा कामगार, मुकादम; सरपंच, पंचांचा म्होरक्या.

Fōre'most, *a.* (फो'अर्-मोस्ट्)—first in place or order, chief, best. मुख्य, प्रमुख, अग्रेसर, उत्तम. *adv.* in the first place. अगदीं प्रथम.

Fōre'nōōn, *n.* (फो'अर्-नून्)—day till noon. दुपारपर्यंतची वेळ.

Forĕn'sic, *a.* (फॅरे'न्सिक्)—of courts of law. कोर्टासंबंधीं, न्यायसभेंत वापरण्याचा.

Foreordain', *v. t.* (फोअर्ऑर्डे'न्)—to appoint beforehand. अगोदर योजून ठेवणें. *Foreordina'tion*, *n.* पूर्वयोजना.

Forerŭn', *v. t.* (फोअर्र'न्)—to be a precursor of, foreshadow. पूर्वी जाणें, आगाऊ सुचविणें,-विदित करणें.

Fōrerunn'er, *n.* (फोर्-र'नर्)—precursor; an ancestor. पुढें जाणारा; पूर्वचिन्ह, अग्रलक्षण; पूर्वज.

Fōresee', *v. t.* (फोर्-सी')—to see or know beforehand, to foreknow. आगाऊ पाहाणें, अगोदर ताडणें.-*ing*, *a.*;- *ingly*, *adv.*

Fōreshăd'ow, *v. t.* (फोअर्-शॅ'डो)—to prefigure, to be a type of. पूर्वीच व्यक्त करणें, पूर्वचिन्ह दाखविणें.

Fore'shōre, *n.* (फो'अर्शोअर्)—shore between high and low water marks. भरती-ओहोटीच्या मधला किनारा, किनाऱ्यालगतचा प्रदेश.

Foreshort'en, *v. t.* (फोअर् शॉ'र्टन्)—to portray or show (object) with the apparent shortening due to visual perspective. (चित्रकलेंत) यथार्थदर्शन चित्र घेऊन चित्राचा पुढील-दर्शनी भाग-ह्रस्व दाखविणें, पुढें रुंद व मागें अरुंद करणें, लहान करणें.

Fore'sight, *n.* (फो'अर्-साइट्)—foreseeing, foreknowledge; provident care; front sight of gun. दूरदृष्टि; पुढील काळजी, पुढचा विचार; बंदुकीची पुढची मासकी,-माशी.

Fore'skin, *n.* (फो'अर् स्किन्)—prepuce. (पुरुषाच्या जननेंद्रियाची) पुढची चामडी, शिश्नशीर्षाच्छादिनी त्वचा.

Fŏ'rest, *n.* (फॉ'रिस्ट्)—a large tract covered chiefly with trees and undergrowth. अरण्य, वन, रान. *v. t.* to plant with trees, make into a forest. झाडें-वृक्ष-लावणें; वन-अरण्य-जंगलें वाढविणें. *For'estry*, *n.* अरण्य; वनरक्षणविद्या, जंगलें राखण्याची विद्या.

Fŏ'rester, *n.* (फॉ'रिस्टर्)—an officer in charge of a forest; dweller in a forest. जंगलखात्याचा अधिकारी; अरण्याधिकारी; रानांत राहाणारा, वनचर, रानटी मनुष्य.

Fōrestall, *v. t.* (फोअर्-स्टॉ'ल्)—to be beforehand with; to anticipate. आघाडी साधणें; आधींच अपेक्षा करणें.

Foretaste, *n.* (फो'अर्टेस्ट्)—partial enjoyment or suffering (*of*) in advance, anticipation.

आगाऊ उपभोग, मासला, चुणूक. *v. t.* (फोअर्टे'स्ट्) to have foretaste, anticipate. (चा) पूर्वानुभव देणें, अनुभव चाखणें, आगाऊ कल्पना करणें.

Fōretĕll', *v. t.* (फोअर्-टे'ल्)—to predict, to prophesy; to be the precursor of. भाकीत करणें; सर्वांच्या आधीं सांगणें.

Fōre'thought, *n.* (फो'अर्-थॉट्)—provident care; deliberate intention. दूरदृष्टि, पूर्व विचार, भविष्यज्ञान; बुद्धिपूर्वक हेतु.

Forewarn', *v. t.* (फोअर्वो'अर्न्)—to warn beforehand. पूर्वींच इषारा देणें, आगाऊ सूचना देणें.

Fōre'word, *n.* (फो'अर्-वर्ड्)—preface, introductory remarks in a book. प्रस्तावना, उपोद्घात, आरंभींचे चार शब्द.

Forf'eit, *a.* (फॉ'र्-फिट्)—lost owing to crime or fault. अपराधामुळें गमावलेला. *n.* forfeited thing; fine, penalty. अपराधाकरितां जप्त केलेली वस्तु; दंड, शिक्षा. *v. t.* to pay or surrender as penalty. दंडादाखल देणें, हक्क गमावणें. *-able*, *a.*

Forf'eiture, *n.* (फॉ'र्-फिचर्)—forfeiting. दंड, जप्ती.

Forfĕnd', *v. t.* (फॉअफें'न्ड्)—(*God forfend!*) to avert. टाळणें, निवारणें.

Forgăth'er, *v. i.* (फॉअर् गॅ'द्र्)—to assemble, to associate, to converse. एकत्र जमणें, संभाषण करणें.

Forgave, *pa. t.* of forgive.

Forge, *v. i.* (फॉअर्ज्)—to make way or advance gradually, or with difficulty. धिमेपणानें मार्ग काढणें, पुढें जाणें, कष्टानें प्रगति करणें. *Forge ahead*, take lead in race. शर्यतींत पुढें राहणें.

Forge, *n.* (फॉअर्ज्)—a smithy; furnace or hearth for melting or refining metal. लोहाराची भट्टी, लोहारशाळा. *v. t. & i.* to shape by heating in fire and hammering; to invent (a tale, lie); to counterfeit, to invent (a lie). अग्नींत तापवून आणि ठोकून घडविणें; खोटा बनवणें, खोटा करणें, बनावट करणें; थापा मारणें.

Fŏr'gerў, *n.* (फॉ'अर्जरि)—forging or falsifying of document. बनावट खोटा लेख किंवा कागद, खोटी-सही.

Forgĕt', *v. t. & i.* (फर्गे'ट्)—to lose remembrance of; to neglect, to overlook. (ची ओळख) विसरणें; दुर्लक्ष करणें, टाळणें. *To forget oneself*, to neglet one's own interests; to be entirely unselfish; to lose one's dignity. स्वतःचें भान न राहणें, भांबावणें; स्वार्थत्याग करणें; अयोग्य कृत्य करणें, स्वतःचा दर्जा विसरणें. *Forgive and forget*, झालें गेलें विसरून जाणें, दिलसफाई करणें. *Forget'-me-not*, (फर्गे'ट् मिनॉट्) a small herb bearing a beautiful yellow-eyed blue flower as a sign of fidelity. नीलपुष्पी फुलझाड. *Forget-me-not blue*, निळा रंग. *Forget'table*, *a.*

Forgĕt'ful, *a.* (फर्गे'ट्-फुल्)—(*of*) apt to forget. विसराळू, विसरभोळा, निष्काळजी. *-ness*, *n.* विसरभोळेपणा; विस्मृति; दुर्लक्ष. *Forget'fully*, *adv.*

Forgĭve', *v. t.* (फर्-गि'व्ह्)—to pardon (as an offence); to remit, to overlook. क्षमा करणें; माफ करणें, सोडून देणें. *-ness*, *n.* pardon. क्षमा, शांति; सूट, माफी. *Forgiv'able*, *a.* *Forgiv'ing*, *a.*, *-ly*, *adv.* *-ness*, *n.* क्षमाशीलता.

Forgō', *v. t.* (फर्-गो')—to go without, to relinquish, to give up, to renounce, to resign. सोडून देणें, त्याग करणें.

Fŏrk, *n.* (फॉर्क्)—pronged instrument for digging, or used in eating; forking, bifurcation; prong. खुरपणें; (जेवणाच्या वेळीं वापरण्याचा) कांटा; बेळकें, बेचक; बेळकी; फांटा, शाखा. *v. t. & i.* to form fork; to branch; to dig with fork. पात्या-फांद्या-फुटणें; खुरपण्यानें खणणें. *Fork'y*, *a.*; *Fork out*, or *over*, to hand *over*, to pay. देऊन टाकणें.

Forlŏrn', *a.* (फर्-लॉ'र्न्)—forsaken; in pitiful condition. निराश्रित, निराधार, अनाथ; कळवळा येण्यासारखा. *Forlorn hope*, a storming party; a desperate enterprise. तुफानी हल्ला चढविणारी लष्करी तुकडी; जिवावर उदार होऊन केलेलें साहस.

Fŏrm, *n.* (फॉर्म्)—shape, arrangement of parts, visible aspect; a class in a school; a set order of words; formality; good condition or style; a bench; hare's lair; (Gram.) the particular shape of a word or part of speech; (Print; also *forme*) body of type secured in a chase for printing at one impression. आकार, आकृति; वर्ग; अनुक्रम; शिष्टाचार; सुस्थिति, रूप, पद्धति; बांक; ससाची बसावयाची किंवा निजायची जागा; रूप; (छापण्यासाठीं तयार केलेला) जुळींव ठशांचा संच, फर्मा. *v. t. & i.* to fashion, to mould; to take shape; to make up, to amount to; (Mil.) draw up in order. घडणें, घडवणें; आकार घेणें; एकंदर होणें, बनणें, एकत्र होणें; शिस्तींत उभे करणें,-रचना करणें.

Fŏrm'al, *a.* (फॉ'र्मल्)—perfunctory; prim, stiff, methodical. वरपांगी; कायदेशीर, औपचारिक. *Form'alism*, *n.* कर्मठपणा, तंत्रप्रियता, नियमांचें

कटक पालन. *Form'alist, n.* आचारप्रिय, तंत्रप्रिय.

Fŏrmăl'ity̆, *n.* (फॉर्मॅ'लिटि)—formal act or conduct; *primness, precision.* धर्मक्रिया, विधि; बाह्योपचार; उपचार, रीति, शिष्टाचार.

Forma'lize, *v. t.* (फॉ'अर्मलाइझ्)—to give definite form to; to make formal. विशिष्ट रूप देणें; कायदेशीर- यथाविधि-करणें.

Form'at, *n.* (फॉ'अर्मा)—the shape and size of a book. पुस्तकाचा आकार.

Fŏrmā'tion, *n.* (फॉर्मे'शन्)—forming, production, a thing formed. रचणें, रचना, घडणें; घटना, बनाव.

Form'ative, *a.* (फॉ'अर्मेटिव्ह्)—serving to form; (of suffix, etc.) used in forming words. आकार किंवा रूप देणारा; तद्धित (प्रत्यय). *n.* उपसर्ग, प्रत्यय; साधित शब्द.

Forme, *n.* (फॉअर्म्)— body of type locked up in chase for printing. (छापण्यासाठीं तयार केलेला) जुळींव ठशांचा संच, फर्मा.

Fŏrm'er, *a. & pron.* (फॉ'र्मर्)—of the past, earlier, first-named. मागचा, मागील; पहिला, पूर्वोक्त.

Fŏrm'erly̆, *adv.* (फॉ'मर्लि)—in former times. मागें, पूर्वी.

Form'ic, *a.* (फॉ'अर्मिक्)—(*-acid*, colourless acid contained in fluid) emitted by ants. पिपीलिकाम्लासंबंधीं; मुंग्यांचा. [L. *formica*, ant]

Fŏrm'idable, *a.* (फॉ'मिडबल्)—causing dread, exciting fear or apprehension. भयंकर, भीतिजनक, घोर, भयानक. *-ness, n*; *Form'idably, adv.*

Form'less, *a.* (फॉ'अर्म्लिस्)— shapeless, without regular form. निराकार. *-ness, n.*; *-ly, adv.*

Fŏrm'ūlă, *n.* (फॉ'र्म्युला)—a prescribed form, systematic or set form of words or symbols; recipe., पद्धत, रीति, सरणि, नियमबन्ध, विधि; सिद्धांत, सूत्र; संकेत; औषधपत्रिका, औषधाची यादी. *Form'ulary, a.* of formulas. सिद्धांतांचा, विहित, उक्त. *n.* सिद्धांतसंग्रह.

Fŏrm'ūlāte, *v. t.* (फॉ'र्म्युलेट्)—to express systematically, to state precisely. पद्धतशीर रीतीनें प्रतिपादन करणें; सूत्ररूपानें मांडणें. *Formula'tion, n.* सूत्रीकरण, सिद्धांतरूप देणें. *Form'ulator, n.*

Forn'icāte, *v. i.* (फॉ'निकेट्)—to have unlawful sexual intercourse; to commit fornication. व्यभिचार करणें; अविवाहित स्त्रीशीं- कुमारिकेशीं- ऐच्छिक गमन करणें.- संभोग करणें; वेश्यागमन करणें. *Fornica'tion, n.* sexual intercourse with an unmarried woman. अविवाहित स्त्रीशीं संभोग, कुमारिकागमन, वेश्यागमन. *For'nicator, n.* बाहेरख्याली पुरुष.

Forsāke', *n.* (फर्से'क्)—*to give up, to renounce;* to desert, to abandon; to refuse. सोडून देणें; त्याग करणें, टाकणें; नाकारणें.

Fŏrsōōth', *adv.* (फॉर्सू'थ्)—in very truth, no doubt, indeed, certainly. निःसंशय, खरोखर.

Forspĕnt', *a.* (फॉर्स्पे'न्ट्)—tired out. थकलेला, श्रान्त.

Fŏrswear', *v. t.* (फॉर्-स्वे'अर्)—to abjure, to renounce; to perjure oneself. शपथपूर्वक त्याग करणें; खोटी शपथ घेणें,- खाणें.

Fort, *n.* (फॉर्ट्)—a fortified place; trading station. कोट, किल्ला, दुर्ग; वखार. *Fort'alice, n.* a small fort. लहान किल्ला, गढी.

Forte, *n.* (फॉअर्ट्)—one's *strong point*; the swordblade from hilt to middle. विशेष प्रमुख गुण; तलवारीच्या मुठीजवळचा मजबूत भाग.

Fort'e, *adv.* (फॉ'अर्टि)—(*Mus.*) loudly. मोठ्यानें, जोरानें.

Forth, *adv. & prep.* (फोर्थ्)—forward; out of doors; onwards in time. पुढें; बाहेर; मागाहून; च्या बाहेर. *And so forth*, and so on. इत्यादि. *Forthright', adv.* सरळ, एकदम. *a.* सरळ जाणारा; उघड बोलणारा; बाकबगार.

Forth'coming, *a.* (फो'र्थ्-कमिंग्)—about to come forth; approaching. लवकरच घडून येणारा; नजीकचा, तयार, सिद्ध.

Forth'with, *adv.* (फो'र्थ्-विथ्)—at once, without delay, immediately. एकदम, विलंब न लावतां, तात्काल, तापडतोब.

Fŏrtifică'tion, *n.* (फॉर्टि-फिके'शन्)—(*usu. pl.*) defensive work(s), a fortified place. तटबंदी, किल्ला, कोट.

Gŏr'geous, *a.* (गॉ'र्जस्)—richly coloured; (of diction) splendid, dazzling. चांगल्या रंगाचा, भडक; भपकेदार, डौलदार. *-ly, adv.*; *-ness, n.* झकझकाट, भडकपणा.

Gor'gĕt, *n.* (गॉ'र्जिट)—a piece of armour for throat; woman's wimple; a necklace; patch of colour on the throat of a bird etc.; a channel-shaped steel instrument used in operations for stone etc. कंठत्राण, ठुशी; (स्त्रियांचें) डोक्यावरील (ताणी कापडाचें) आच्छादन; गळपट्टा; पक्ष्याच्या मानेवरील-कंठावरील-रंगीत पट्टा, कंठ; शस्त्रक्रिया करण्याचें पन्हळीदार शस्त्र.

Gŏrg'on, *n. & a.* (गॉ'र्-गन्)—(Gk mythol.) one of three snake-haired terrible women; a terrible or repulsive woman; very ugly person. ग्रीक पुराणांतील सर्पासारखे केंस असलेल्या तीन भयंकर स्त्रिया; भयानक राक्षसी स्त्री; विद्रूप मूर्ति. *-ize, v. t.* to stare at like a gorgon. भेसूर दृष्टीनें पाहून घाबरविणें, चोबडी वळविणें. *Gorgo'nian, a.*

Gorgonzō'la, *n.* (गॉर्गन्झो'ला)—a rich cheese. उत्कृष्ट खवा.

Gorill'ă, *n.* (गॉरि'ला)—a large ferocious anthropoid ape. (आफ्रिका खंडांतील) एक मोठा भयंकर मनुष्याकृति वानर, माकड.

Gŏrm'andize, *v. i.* (गॉर्म'न्डाइझ्)—to eat like a glutton, to swallow voraciously. अधाशासारखें खाणें. *-zer, n.* अधाशी.

Gŏrse, *n.* (गॉर्स्)—a prickly yellow-flowered shrub; furze. पिंवळ्या फुलांचें कांटेरी फुलझाड; कांटेरी झुडुप. *Gors'y, a.*

Gōr'ÿ, *a.* (गो'अरि)—covered with blood. रक्तबंबाळ, रक्तानें माखलेला.

Gŏsh, *int.* (गॉश्)—(Also, *by g.*) by God. देवाच्यान्.

Gŏs'hawk, *n.* (गॉ'स्हाक्)—a large short-winged hawk. एक मोठा ससाणा पक्षी.

Gō'shen, *n.* (गो'शन्)—place of light or plenty. उजेडाची किंवा समृद्ध जागा.

Gŏs'ling, *n.* (गॉ'झ्-लिंग्)—a young goose. लहान हंस.

Gŏs'pel, *n.* (गॉ'स्पेल्)—glad tidings, esp. those preached by Christ; Christian revelation; one of the four narratives of Christ's life; a thing that may safely be believed; the principle that one acts upon, believes in, or preaches. शुभवार्ता, (ख्रिस्तानें उपदेशिलेलें) शुभवर्तमान, ख्रिस्ती धर्मग्रंथ; ख्रिस्त चरित्राचें निरूपण,-शुभवर्तमान; सत्य-ब्रह्म-वाक्य, वेदवाक्य; (आचरणांत आणलें जाणारें-विश्वास असलेलें-प्रचारिलें जाणारें) तत्त्वतःचें तत्त्व. *G.-truth*, truth contained in g., something as true as g. ख्रिस्ती शुभवर्तमानांतील सत्य गोष्ट, निर्विवाद सत्य गोष्ट. *Gos'peller, n.* reader of gospel in the Communion service. (ईश्वरोपासनेच्या वेळीं) शुभवर्तमानांतील अध्याय वाचणारा. *Hot gospeller*, धर्मवेडा प्रचारक. [OE *god spel*, good tidings]

Gŏss'amer, *n.* (गॉ'समर्)—a filmy substance of small spider's webs; a flimsy thing; delicate gauze; a thin waterproof garment. कोळ्याच्या जाळ्याचा धागा, म्हातारी, वाततूल; क्षुद्र वस्तु; नाजूक जाळी; पाणी आंत न येऊं देणारा पातळ आंगरखा. *-ed,-y, aa.*

Gŏss'ip, *n.* (गॉ'सिप्)—familiar acquaintance; tattler, esp. woman; idle talk. दाट परिचयाचा इसम, सोबती, गडी, दोस्त; गप्पीदास, गोष्टीवेल्हाळ स्त्री; गपसप, थाप, वार्ता. *v. i.* to talk idly. गप्पा मारणें, वाता मारणें. *-y, a.*; *-er, n*; *-ry, n.* गप्पा, संवटण, मेतकूट.

Gossōōn', *n.* (गसू'न्)—(Anglo-Ir.) a lad. पोऱ्या, मुलगा.

Got, (गॉट्)—*pa. t.* & *pa. p.* of Get. *Got-up*, factitious, artificially produced or adorned. कृत्रिम, बनावट, मुद्दाम-कृत्रिम रीतीनें-बनविलेलें-मढविलेलें.

Gō'tha, *n.* (गो'टा)—a type of large German aeroplane. एक मोठें जर्मन आकाशयान, विमान.

Gŏt'ham, *n.* (गॉ'ट्हॅम्)—a typical foolish town. नमुनेदार मूर्ख-गांवढळ गांव. *Wise man of G.*, a fool. मूर्ख, भोळसट, गांवढळ. *-ite*, *n.* गॉटहम गांवचा खेडवळ, दीडशहाणा, अकलेचा खंदक.

Gŏth'ic, *a.* (गॉ'थिक्)—(Archit.) in the pointed-arch style ; barbarous ; (of type) German, black-letter. (बांधकाम) अणकुचीदार कमानीच्या रचनेचें ; रानटी, आडदांड ; विशिष्ट आकाराचा गॉथिक टाइप्, ठसा. *n.* Gothic language, architecture, type. गॉथिक भाषा, शिल्पशास्त्र,-बांधणी,-ठसा.

Gotten, (गॉटन्)—*pa. p.* of Get.

Gouge, *n.* (गाउज्, गूज्)—a concave-bladed chisel ; a groove ; a cheat. विंधण्याचें अऊत, नाख्या, सऱ्या ; खोंबण, पोकळी, पन्हळी ; ठक, लुच्चा. *v. t.* to cut with a g. ; to force (*out*, esp. person's eye) as with a g. (नाख्यानें) पन्हळी-खोंबण-पाडणें ; आंगठ्याच्या नखानें (डोळा) उपटून काढणें.

Gourd, *n.* (गोअर्ड्, गुअर्ड्)—a trailing or climbing plant ; dried rind of the tree used as a bottle. भोंपळा, कमंडलु, तुंबा. *-ful*, *a.*

Gourm'and, *n.* (गु'अर्मॅन्ड्)—a lover of delicacies. खादुनंदन, खादू, औदरिक. *a.* gluttonous. खादाड.

Gout, *n.* (गाउट्)—a disease with inflammation, esp. of great toe ; a drop esp. of blood ; wheat-disease caused by gout-fly. (पायाच्या आंगठ्याला सूज आणणारा) संधिविकार, वातरक्त ; ठिपका, थेंब, बिंदु ; धान्याचा रोग. *Gouties*, *n. pl.* over-shoes, अंगोदरच्या जोड्यावरून-बुटावरून-घालण्याचे मोठे जोडे,-बूट. *Gout'y*, *a.*, *Gout'ily*, *adv.*, *Gout'iness*, *n.*

Gov'ern, *v. t.* & *i.* (ग'व्हर्न्)—to rule with authority ; to conduct the policy and affairs (of State &c.); to curb, to control ; to influence ; (Gram.) to have depending on it. अधिकार चालवणें ; राज्य करणें ; ताब्यांत ठेवणें, नियमन करणें ; वजन पाडणें ; (व्याकरणांत) विशेष विभक्ति लावणें, च्या प्रमाणें चालणें. *-ance*, *n.* ताबा, हुकमत, सत्ता.

Go'verness, *n.* (ग'व्हर्निस्)—a female teacher (esp. in private household). लहान मुलांस शिकविण्यास ठेवलेली शिक्षकीण. *G.-car(t)*, light two-wheeled cart. हलकी दुचाकी गाडी.

Go'vernment, *n.* (ग'व्हर्न्-मेन्ट्)—form of polity ; persons governing a state. राज्यकारभार ; सरकार. *To form a g.*, मंत्रिमंडळ बनविणें. *-al*, *a.*

Go'vernor, *n.* (ग'व्हर्नर्)—a ruler ; an official governing a province or town ; one's employer or father ; (Mech.) automatic regulator. राज्य करणारा ; इलाखाधिपति ; मालक, धनी, बाप ; यंत्रांतील नियामक सांचा.

Gowk, *n.* (गाउक्)—the European cuckoo ; a fool. युरोपांतील कोकिळा ; वेडसर, मूर्ख.

Gown, *n.* (गाउन्)—a woman's upper garment, frock ; a robe (of alderman, judge, &c.). पोलकें, फ्रॉक ; (अधिकार-व्यवसाय-दर्शक) झगा. *-s'man*, member of a university ; a civilian. विश्वविद्यालयाचा सभासद, झगेवाला मुलकी अधिकारी. *Gow'ned*, *pa. p.* झगा घातलेला.

Grăb, *v. t.* & *i.* (ग्रॅब्)—to seize suddenly ; to appropriate greedily ; to arrest, capture ; to make snatch *at*. एकदम पकडणें ; बळकावून बसणें ; पकडणें, धरणें ; हिसका देणें. *n.* sudden grasp or seizure ; rapacious proceedings esp in politics or commerce ; (Mech.) a device or implement for clutching. पकड, मिठी, धकाधकीचा कारभार ; पकड, गुराब. *-grab'ber*, *n.* देखतचोर.

Grăb'ble, *v. i.* (ग्रॅ'बल्)—to grope about. चाचपडणें, चाचपडत, -सरपटत जाणें.

Grăbb'ȳ, *n.* (ग्रॅ'बि)—(*Naut. sl.*) a soldier. सैनिक, शिपाई, लष्करी शिपाई.

Grāce, *n.* (ग्रेस्)—pleasing quality, charm ; air, bearing ; an embellishment of extra note or notes ; goodwill as ground of concession ; divine regenerating and inspiring influence ; delay granted ; thanks-giving at meals. शोभा, लावण्य ; ढब, रुबाब, डौल, चांगुलपणा ; अलंकारिक सुरावट, तान ; अनुग्रह, कृपा ईश्वरी कृपा ; सवलत ; जेवणापूर्वीची प्रार्थना. *v. t.* to add grace to, to adorn ; to honour ; to favour. सुशोभित करणें ; मोठेपणा देणें ; अनुग्रह करणें. *With a good g.*, खुषीनें, डौलानें. *With a bad g.*, नाखुषीनें, कुरकुरत. *The Graces*, (Gk Myth.) [illegible] देवता. *To be in one's good graces*, enjoy his favour or liking. मर्जीतला-कृपेतला असणें. *The year of grace*, इ. स. (अमुक). *In this year of g.*, usu. iron., when Christianity has been so long established. इ. स. च्या ह्या वर्षी (मुद्दां). *Days of g.*, time allowed

by law for payment of bill of exchange or insurance premium after it falls due, usu. three days. हप्ता भरण्याची सवलतीची मुदत (तीन दिवस). *His, her, your g.*, ड्यूक, त्याची बायको, आर्चबिशपची पदवी. *G.-less. a.* निर्लज्ज, कोडगा, निर्ढावलेला, अधार्मिक. *-ly, adv., -ness, n.*

Grāce'ful, *a.* (ग्रे'स्-फुल्)—beautiful with dignity, full of charm, attractive. सुंदर, डौलदार, गोजिरा, आकर्षक. *-ness, n.; -lly, adv.*

Grā'cious, *a.* (ग्रे'शस्)—pleasing ; kindly ; full of grace, merciful. आनंददायक ; कृपाळू ; दयापूर्ण ; दयाशील. *Good g. ! my g. !* (int. for *g. god !*) (आश्चर्यदर्शक उद्गारवाचक अव्यय). *-ly, adv.; -ness, n.*

Gradāte', *v. i. & t.* (ग्रॅडे'ट्)—to pass or cause to pass by gradations from one shade to another ; to arrange in gradations. रंग हळू हळू पालटणें,-पालटविणें, रंगच्छटा बदलणें ; क्रमवार रचना करणें.

Gradā'tion, *n.* (ग्रॅडे'शन्)—each stage in transition or advance ; arrangement in grades ; series of degrees in rank, merit etc. ; (Fine arts) a gradual passing from one tint to another. अनुक्रम, क्रम, पायरी ; क्रमवार रचना ; परंपरा, श्रेणि ; रंग हळू हळू पालटणें, क्रमिक वर्णांतर. *-al, a.; -ally, adv.*

Grāde, *n.* (ग्रेड्)—a degree in rank, merit etc.; (Math.) the hundredth part of a right angle ; (cattle-breeding) variety produced by crossing native stock with superior breed ; a slope, gradient ; (Zool.) group supposed to have branched from parent stock at same stage of development. पायरी, दर्जा, स्थान ; काटकोनाचा शंभरावा भाग ; श्रेष्ठ जातीचीं जनावरें व स्थानिक जनावरें यांच्या भेसळीनें उत्पन्न झालेली चांगली अवलाद ; चढण, उतरण, चढ-उतार मोजण्याचें माप,-प्रमाण ; (प्राण्यांचा) मुख्य वर्ग. *v. t.* to arrange in grades ; to sort ; to give gradations of colour to ; to reduce (road, canal) to easy gradients ; (cattle-breeding) to cross with better breed. अनुक्रम लावणें, प्रती लावणें; रंगाच्या क्रमवार छटा देणें ; सोपा चढ-उतार देणें, एकच चढ-उतारांत आणणें ; (चांगली अवलाद उत्पन्न करण्यासाठीं) श्रेष्ठ प्रतीच्या जनावराशीं संकर करविणें. *On the up-g*, rising. चढणीचा, चढता. *On the down-g*, falling. उतरणीचा, उतरता.

Grā'dely, *a.* (ग्रे'ड्लि)—excellent, thorough ; handsome ; real, true, proper. उत्कृष्ट, पूर्ण, उत्तम ; सुंदर ; खरा, अस्सल, योग्य.

Grā'dient, *n.* (ग्रे'डिअन्ट्)—amount of slope, inclination in road, railway, etc.; proportional rise or fall in thermometer or barometer in passing from one region to another. चढाचें-उताराचें मान,-प्रमाण ; तपमापक-वायुभारमापक-नळींतील स्थलमानाप्रमाणें होणारा चढ-उतार.

Grā'din (e), *n.* (ग्रे'डिन्, ग्रॅ'डीन्)—one of series of low steps or tier of seats. पायऱ्या पायऱ्यांची मांडणी,-तींतील एक पायरी,-बैठक.

Grăd'ūal, *a.* (ग्रॅ'ड्युअल्)—happening by degrees; not steep or abrupt. अनुक्रमानें घडणारा ; क्रमाक्रमाचा. *-lly, adv., -ness, n.*

Grăd'ūate, *v. i. & t.* (ग्रॅ'ड्युएट्)—to take or admit to academic degree; to arrange in gradations ; to mark out in degrees or portions ; to concentrate (solution) by evaportaion. विश्वविद्यालयांतील पदवी देणें किंवा घेणें ; यथाक्रम रचणें; अंश-भाग-मांडणें, भाग दाखविणें ; बाष्पीभवनानें ठराविक घनपणा आणणें. *n.* (-इट्) the holder of academic degree ; chemist's graduated measuring glass. विश्वविद्यालयाचा पदवीधर ; औषध तयार करण्याचा अंश मांडलेला मापाचा पेला, अंशांचें कांचपात्र. *-tor, n., -tion, n.*

Graffi'to, *n.* (ग्रॅफी'टो)—drawing or writing scratched on (ancient) wall. प्राचीन भिंतीवरील रेखाटलेलें चित्र किंवा लेख. [It.]

Graft, *n.* (ग्राफ्ट्)—a shoot, a scion, planted in slit of another stock ; (surg.) a portion of transplanted living tissue ; process of grafting ; place where graft is inserted. कलम, खुंटी, दुसऱ्या झाडावर बांधलेलें कलम ; जखम भरून काढण्याकरितां बाहेरचें योजिलेलें-पेशीजाल,-शरीरघटक धातु ; कलम करणें ; कलम लावलेली-खुंटीची-जागा. *v. t.* to insert graft; (*fig.*) to insert or fix *in* or *upon* so as to produce vital union ; to transplant living tissue. कलम बांधणें,-करणें, खुंटी मारणें ; एकजीव -संलग्न-करून टाकणें ; बाहेरील शरीरघटक धातु-मांस-कातडें आणून योजणें, गात्रसंधान करणें.

Graft, *n.* (ग्राफ्ट्)—the depth of earth that may be thrown up at once with spade ; crescent-bladed spade. कुदळीचा-फावड्याचा एक टॅंव, एक टॅंव खणून उकरलेली माती ; वांटोळ्या-चंद्रकोर आकृतीची कुदळ, पिकाव.

Graft, *n.* (ग्राफ्ट्)—(practices for securing) illicit spoils in politics or municipal business. राजकारणी-स्थानिक स्वराज्य संस्थेंतील-गैरवाजवी लाचलुचपत, नफेबाजी,-लूट, अशा नफेबाजीची पद्धति. *v. i.* (अशी) लूट मारणें, हात -डल्ला मारणें. *-er, n.* लांच खाणारा.

Grail, *n.* (ग्रेल्)—platter used by Christ at the Last Supper. अंत्य भोजनासाठीं ख्रिस्तानें वापरलेला थाळा, ताट. Also *holy g.*, *saint g.*, *sangreal*.

Grail, *n.* (ग्रेल्)—comb-maker's file. फण्या तयार करण्याची कानस.

Grain, *n.* (ग्रेन्)—a fruit or corn of a cereal; (collect.) corn; a particle, least possible amount; (*pl.*) refuse malt after brewing; unit of weight; texture in skin, wood, stone, etc.; the arrangement of lines of fibre in wood, (*fig.*) nature, temper, tendency; (poet.) dye, colour. दाणा, कण; धान्य, दाणागोटा, अन्न; लवलेश, अल्पांश, कण, गाळ, रेंदा, चोथा; (गव्हाच्या कणसांतील मधल्या दाण्याइतकें) एक इंग्रजी वजन; घटना, रचना, वीण; लांकडांतील दोरा, तंतु, रेषा, स्वभाव, प्रकृति; रंग (किरमिजी, तांबूस). *v. t. & i.* to form into grains; to dye in grain; to paint in imitation of the grain of wood, marble etc.; to take the hair off the skin. बारीक बारीक कण होणें, रवाळ होणें,-बनणें; (किरमिजी, तांबूस) पक्का रंग देणें; (लांकूड, दगड इ० च्या दोऱ्यांसारखे) दोरे काढून रंगविणें; (चामड्यावरील) केंस काढणें, चामडें साफ करणें. *Against the g.*, contrary to inclination. स्वभावधर्माविरुद्ध, मनाविरुद्ध. *G.-ed*, *G.-y*, *G.-less*, *aa.* *Grain'er*, *n.* कातडें कमावतांना घालण्याची कडुतराची शीट; (चामड्यावरील केंस काढण्याची आरी; लांकडासारखा रंग देणारा,- रंग देण्याचा कुंचला. *Grain'ing*, *n.* grain-painting. लांकडांतील दोऱ्यांसारखे रंगविणें.

Grăm, *n.* (ग्रॅम्)—chick-pea; (Also, gramme) a unit of weight in metric system चणा, हरभरा; एक वजनी माप.

Grăminā'ceous, **Gramĭn'eous**, *aa.* (ग्रेमिने'शस्, ग्रमि'निअस्)—of, like, grass, grassy. गवताचा, गवतासारखा; तृणजातीय, गवताळ. *Graminiv'orous*, *a.* grass-eating. गवत खाणारा, तृणाहारी.

Grămm'alogue, *n.* (ग्रॅ'मलॉग्)—(short-hand) word represented by single sign; such sign. (लघुलिपींत) एकेरी खुणेनें दर्शविलेला शब्द, तशी खूण.

Grămm'ar, *n.* (ग्रॅ'मर्)—science of the sounds, inflexions and constructions used in a language; a book on grammar; person's manner of using grammatical forms, speech or writing regarded as good or bad by the rules of grammar; elements of an art or science. व्याकरण, व्याकरणशास्त्र; व्याकरणाचें पुस्तक,-चा ग्रंथ; व्याकरणदृष्ट्या शुद्ध किंवा अशुद्ध भाषा; मूलतत्त्वविचार *G.-school*, school founded for teaching of Latin, now of the public school type; (U. S.) school between primary and high school. लॅटिन भाषेचें व्याकरण शिकविण्याची प्राथमिक शिक्षणाची शाळा; प्राथमिक शिक्षणाच्या नंतर व्याकरण शिकविण्याची शाळा. *G.-less*, *a.*

Grammār'ian, *n.* (ग्रमे'रिअन्)—one versed in grammar, a philologist व्याकरणज्ञ, वैय्याकरणी, शब्दव्युत्पत्तिज्ञ.

Grammăt'ical, *a.* (ग्रमॅ'टिकल्)—of or according to the rules of grammar. व्याकरणासंबंधी, व्याकरणविषयक.-*lly*, *adv.* व्याकरणदृष्ट्या.

Grămme, **Grăm**, *n.* (ग्रॅम्)—a French unit of weight=15·432 grains. एक प्रकारचें वजनी माप, ग्रॅम.

Grăm'ophōne, *n.* (ग्रॅ'मोफोन्)—phonograph, esp. of the kind reproducing music, speech, &c. ध्वनिलेखकयंत्र.

Grăm'pus, *n.* (ग्रॅ'म्पस्)—kinds of blowing and spouting cetacean; a person who breathes loud. एक मोठा मासा; मोठ्यानें श्वास घेणारा-सोडणारा-मनुष्य.

Grăn'ary̆, *n.* (ग्रॅ'नरि)—a storehouse for grain; a region fertile in, and esp. exporting, much corn. धान्याचें कोठार, अन्नकोठ, धान्यसमृद्ध-सुपीक-प्रदेश. [L. *granum*, grain]

Grănd, *a.* (ग्रॅन्ड्)—chief, of highest rank; of chief importance, imposing, lofty, noble, elevated, magnificent; belonging to high society; (colloq.) excellent; (in names of relationships) in the second degree of ascent or descent. मुख्य, श्रेष्ठ; भव्य, उदात्त, थोर, उच्च, महान्, विशाल; वरच्या-थोर-वर्गाचा; अप्रतिम; (वंशज) खालच्या किंवा वरच्या पिढीतील. *n.* a grand piano. एक मोठें पेटीसारखें, आडव्या तारांचें, वाद्य,-पिआनो. *Gran'dad*, *n.* आजोबा. *Gran'dam(e)*, *n.* आजी. *G.-total*, बहु-एकूण-बेरीज. *To do the g.*, to put on airs. दिमाख दाखविणें. *G.-style*, उच्च लेखनपद्धति. *The Grand Old Man*, *G. O. M.*, इंग्लंडचा मुत्सद्दी ग्लॅड्स्टन. *G. stand*, principal stand for spectators at races etc. (खेळ, शर्यती वगैरे पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठीं) उंच बैठकांची मुख्य जागा. *G. tour*, विलायतेंतील शिक्षणक्रम पुरा करण्यासाठीं युरोपांतील मुख्य शहरें पाहण्यासाठीं केलेली सफर. *G.-ly*, *adv.*; *G.-ness*, *n.*

Grănd'child, *n.* (ग्रॅ'न्ड्-चाइल्ड्)—one's child's child. नातवंड.

Grănd'daughter, *n.* (ग्रॅ'न्ड्-डॉटर्)—one's child's daughter. नात.

Grănd'făther, *n.* (ग्रँ'ड्-फादर्)—one's parent's father. आजा, पितामह, आजोबा. *Grandfather's clock*, worked by weights in tall wooden case. उंच लाकडी पेटींतलें वजनांच्या साह्यानें चालणारें ठुनाट. आजेबाच्या काळचें घड्याळ.

Grănd'mother, *n.* (ग्रँ'ड्-मद्र्)—one's parent's mother. आजी. *v. t.* coddle, etc. आजीबाई-सारखे लाड करणें.

Grănd'parent, *n.* (ग्रँ'ड् पेरेन्ट्)—one's parent's parents. आजा, आजी.

Grănd'sīre, *n.* (ग्रँ'ड्-सायर्)-grandfather. आजोबा.

Grănd'son, *n.* (ग्रँ'ड्-सन्)—one's child's son. नातू.

Grăndee', *n.* (ग्रॅन्डी')—foreign noble of high rank; great personage. अमीर उमराव; वडा मनुष्य, थोर व्यक्ति.

Grăn'deur, *n.* (ग्रॅ'जर्, ग्रँ'ड्यर्)—high rank, eminence; majesty, splendour. उच्च पदवी, मोठेपणा; प्रताप, तेज, भव्यता.

Grăndĭl'oquent, *a.* (ग्रँडि'लॅक्विन्ट्)— pompous or inflated in language. प्रगल्भ भाषण करणारा, मोठमोठे शब्द योजणारा, शब्दावडंबरी.*;-nce, n.* प्रगल्भ भाषण.*-ly, adv.*

Grăn'diōse, *a.* (ग्रॅ'न्डिओस्)—imposing, splendid, pompous; on a large scale. मनोवेधक, भव्य, भपकेबाज; मोठ्या प्रमाणावरील. *-sity, n.; -ly,.adv.*

Grānge, *n.* (ग्रेन्ज्)—a country-house with farm buildings; a barn (arch.); agricultural association. शेतावरील वाडा, खोपट; धान्याचें कोठार; शेतकऱ्यांचा संघ.

Grā'ngerize, *v. t.* (ग्रे'न्जराइझ्)—to illustrate (a book) with extra prints etc. often cut from other books. इतर पुस्तकांतील वगैरे अधिक चित्रें घालून (ग्रंथ) सजविणें,-उपयुक्त करणें. *-zation,-zer, nn.*

Gră'nĭte, *n.* (ग्रॅ'निट्)—granular crystalline rock of quartz, mica, etc. used for a building. वज्रतुंड, वज्र (नांवाचा इमारती बांधण्याचा दगड-यांतील घटक पदार्थांचे कण वेगळाले दिसतात). *To bite on g.*, to waste pains, persist in vain. निरर्थक श्रम करणें, व्यर्थ-निष्फळ-चिकाटी धरणें. *G.-ware*, ग्रॅनिट सारखीं दिसणारीं मातीचीं भांडीं; ठुलामा दिलेलीं लोखंडी भांडीं.*-tic,-tiform, aa.;-toid, a. & n.*

Grănn'ÿ, *n.* (ग्रॅ'नि)—(colloq.) grand-mother; reef-knot crossed the wrong way. आजीबाई; उलटी मारलेली दुहेरी गांठ.

Grānt, *v. t.* (ग्रान्ट्)—to consent to give; to concede; to permit; to admit; to bestow (right) formally, to transfer (property) legally. (मागितल्यावरून) देणें, देण्याला संमति देणें; कबूल-मान्य-करणें,-असणें; परवानगी देणें; मान्य करणें; (हक्क) देऊन टाकणें, दुसऱ्याच्या नांवावर कायदेशीर चढवून देणें. *n.* granting; formal conferment, legal assignment; a thing, esp. sum, granted. देणें, मान्य करणें; दान, इनाम (पत्र), सनद; बक्षीस, द्रव्यसहाय्य, मदत. *I g. you*, I admit. मी मान्य करतों, कबूल. *To take for granted*, assume. गृहीत धरणें. *G.-in-aid*, मदत-देणगी. *Grantee'*, *n.* इनाम घेणारा,-पावणारा. *Grantor'*, *n.* इनाम-बक्षिस-देणारा. *Grant'able, a.*

Grăn'ūlar, *a.* (ग्रॅ'न्युलर्)—of of like grains, with granulated surface. खवळ, कणीदार; खवळ पृष्ठभागाचा,-रचनेचा.*-ly, adv.; -ity, n.*

Grăn'ūlāte, *v. t. & i.* (ग्रॅ'न्युलेट्)—to form into grains; to roughen surface of; (of wound) form small prominences as beginning of healing, heal. दाणेदार-खवळ-करणें,-बनणें; पृष्ठभाग खरबरीत करणें; (जखम इ.) माठळणें, शेजेस येणें, बरें होऊं लागणें. *G.*, (ग्रॅ'न्युलट्) *a.* खवळदार, कणीदार.*-tion,-tor, nn.*

Grăn'ūle, *n.* (ग्रॅ'न्यूल्)—a small grain. लहान कण,-रवा.

Grāpe, *n.* (ग्रेप्)—a green or purple berry growing in clusters on vine; a grape-shot; diseased growth on the pastern (of horse etc.). द्राक्ष; कुलपी गोळा; घोड्याच्या पायाचा रोग,-गळूं. *G. stone*, द्राक्षांतील बी. *G. sugar*, द्राक्षाफलशर्करा, ग्लूकोस. *G. vine*, द्राक्षाची वेल; घर्फावरील घसरगुंडीच्या खेळाचा एक प्रकार. *The gg. are sour, sour gg.*, (इसापनीतींतील) आंबट द्राक्षें, हवी असणारी परंतु अप्राप्य म्हणून नको म्हटलेली गोष्ट. *Grap'ery, n.* द्राक्षांची बाग. *Grap'y, a.*

Grăph, *n.* (ग्रॅफ्)—a symbolic diagram expressing a system of connexions by spots or circles. सांकेतिक आकृति,-चित्र,-रेखाचित्र. *n. & v. t.* (to multiply with) a gelatine copying apparatus. अनेक प्रती काढणें,-काढण्याचें यंत्र.

Grăph'ĭc, *a.* (ग्रॅ'फिक्)—vividly descriptive, pictorial, vivid; of writing; (of minerals) showing marks like writing; of diagrams. स्वरूपदर्शक, हुबेहूब वर्णनात्मक, सचित्र; लेखनाचा, लेखनकलेचा; लिहिल्या सारख्या खुणा असलेलें (खनिज द्रव्य); आकृतियुक्त.*-al, a.*

Grăp'nel, *n.* (ग्रॅ'प्-नल्)—a small many-fluked anchor; a grappling iron. एक लहान नांगर, गळ.

Grăp'ple, *n.* (ग्रॅ'पल)—a clutching instrument; grip, as of wrestler; close contest. गळ; पेंच, पकड; मिठी *v. t. & i.* to seize; to grip with

hands; to come to close quarters with. पकडणें; घट्ट धरणें; अंगाशीं भिडणें, नेटानें टक्कर देणें, झोंबी खेळणें. *To g. with*, शीं झगडणें. *Grappling iron*, गळ.

Gräsp, *v. t. & i.* (ग्रास्प्)—to clutch, to seize or hold firmly; to understand, to realize; to seize greedily. हातांत गच्च धरणें; ग्रहण करणें, अर्थ समजणें; अधाशीपणानें धरणें,-पकडणें. *n.* fast hold, grip; mental hold, mastery. आकलनशक्ति, पकड; मनावर ठसणें, प्रभुत्व. *To g. nettle*, अडचणीला-संकटाला-धैर्यानें तोंड देणें. *Within one's g.*, आवांक्यांत, हातचें. *Beyond one's g.*, आवांक्याबाहेरचें. *G.-able, a. G.-ingly, adv.*

Gräss, *n.* (ग्रास्)—herbage, pasture; pasture-land; grass-covered ground; (Mining) earth's surface, pit-head. गवत, रान; चराऊ गवताळ जमीन; तृणाच्छादित जमीन; भूपृष्ठ, खाणीच्या वरचा भाग. *v. t.* to cover with turf; to knock down. वर गवत उगवणें, गवताळ करणें, गवतानें झांकणें; खालीं पाडणें, लोळविणें. *Not let g. grow under one's feet, g. does not grow under one's feet*, of a person who wastes no time in doing something. कोणतीहि गोष्ट करण्यांत विलंब न लावणें, दिरंगाई न करणें. *At g.*, (fig.) out of work, making holiday, etc. बेकार, सुटी घेणारा. *G. widow*, (sl.) wife whose husband is absent from her. पति जवळ नसलेली, जिचा पति दूर देशीं राहतो, अशी बायको.

Gräss'höpper, *n.* (ग्रा'स्-हॉपर्)—a jumping chirping insect, an insect that hops among grass. टोळ, नाकतोडा.

Grate, *n.* (ग्रेट्)—a metal frame confining fuel in a fire-place; grating. (शेगडीला-चुलीला) बसविलेली लोखंडी गजांची जाळी; जाळीचा कठडा. *v. t. & i.* to rub to small particles on a rough surface; to grind, to creak; to have irritating effect. (किसणीवर) किसणें, घांसून कीस काढणें,-करणें; करकरणें, कर्कश आवाज होणें; चिडविणें, चीड आणणें. *G.-d*, जाळीचा कठडा घातलेला (चुला). *G.-less, a.; Grat'ingly, adv.* करकरां वाजत.*-grater, n.*

Grāte'ful, *a.* (ग्रे'ट्-फुल्)-thankful (to a person, for a thing); feeling or showing gratitude. कृतज्ञ; कृतज्ञता दाखविणारा.*-lly, adv.*;*-ness, n.*

Grăt'ifȳ, *v. t.* (ग्रॅ'टि-फाय्)—to remunerate; to please, to delight; to indulge to satisfaction. मोबदला देणें; संतोषविणें; तृप्त करणें. *-fication, n.*; *-ing, a.*

Grā'ting, *n.* (ग्रे'टिंग्)—a framework of parallel or crossed bars; (Opt.) a set of parallel wires, or surface of glass etc. ruled with parallel lines, for producing spectra by diffraction. गजांची जाळी, जाळीचा कठडा; अपभवनानें विच्छिन्नकिरण तयार व्हावे ःम्हणून बनविलेली समांतर रेषांची जाळी, कांचेच्या पृष्ठभागावरील समांतर रेषा.

Grā'tis, *adv. & a.* (ग्रे'टिस्)—free of charge. फुकट, मोफत, विनामूल्य. [L. *gratia*, favour]

Grăt'itūde, *n.* (ग्रॅ'टि-ट्यूड्)—being thankful for and ready to return kindness. कृतज्ञता, उपकार स्मरणें.

Grătū'itous, *a.* (ग्रॅट्यु'इटस्)—got or done gratis; uncalled for, motiveless. मोफतचें; न मागतां दिलेलें, अनाहूत, आगंतुक, निर्हेतुक, निष्कारण. *-ly, adv.*; *-ness, n.*

Grătū'itȳ, *n.* (ग्रॅट्यु'इटि)—a free gift money present for services, tip. देणगी, बक्षीस, इनाम.

Grătū'lātorȳ, *a.* (ग्रॅट्यूलेटरि)— conveying congratulations, complimentary. अभिनंदनपर. *Grat'ulate, -tion, n.* अभिनंदन (करणें).

Gravā'mĕn, *n.* (ग्रव्हे'मेन्)—a grievance; essence of accusation. (फिर्यादीची) तक्रार, फिर्याद (-कारण); तक्रारींतील तात्पर्य, सारांश.

Grāve, *n.* (ग्रेव्ह्)—a hole dug for a corpse; being dead, death, Hades; a trench for digging up potatoes etc.; (*fig.*) a receptacle of what is dead. प्रेत पुरण्याचा खळगा, खाडा; मरण, मृत्यु, नाश, नरक; चर, मळी; थडगें, समाधी, कबर. *v. t.* to engrave, carve; to fix indelibly (*on, in*, mind etc.); (arch.) to bury. खोदणें, कोरून ठेवणें; मनावर पक्के ठसविणें, बिंबविणें; थडग्यांत पुरणें, गाडणें. *Secret as the g.*, quite. अगदीं- निखालस- गुप्त. *To make one turn in his g.*, (of act etc.) जिवंत असता तर अशा कृत्यानें दचकलाच असता, त्याला मरणप्राय दुःख झालें असतें. *Some one walking on my grave*, (एकाद्याला निष्कारण धडकी भरते-भीति वाटते तेव्हां). *G.-clothes*, प्रेतवस्त्रें, कफन. *G.-digger*, थडगें- खाडा- खणणारा; एक जातीचा कृमि,- कीटक. *G. stone*, थडग्यावरील दगड. *G.-yard*, burial ground. स्मशान, कबरस्थान. *Graven image*, खोदून तयार केलेली देवाची मूर्ति. *Graven, -ed, pa. p.*

Grāve, *a.* (ग्रेव्ह्)—serious, weighty; dignified, solemn; not showy; (accent) low-pitched, not acute. गंभीर, भयंकर, मोठा, गंभीर मनाचा; साधा, भपकेबाज नसलेला; प्लुत, खोल, गंभीर (स्वर). *G.-ly, adv.*

Grāve, *v. t.* (ग्रेव्ह्)—to clean (ship's bottom) by burning and tarring while aground or

in graving dock. गलबताचा तळ जमिनीवर किंवा सुक्या गोदींत साफसूफ करणें.

Grăv'el, *n.* (ग्रॅव्हेल्)—coarse sand and small stones; (Geol.) a stratum of gravel, esp. one containing gold; aggregations of visible urinary crystals. रेंव, रेती, कंकर, बारीक खडी; (सोनें-सोन्याचे कण-असलेला) भूगर्भांतील रेंवेचा थर; अश्मरी, मुतखडा (रोग). *v. t.* to lay with gravel; to puzzle. (वर) रेंव, रेती, खडी-पसरणें; तोंड बंद पाडणें, गोंधळविणें. *Grav'elly, a.*

Gră'vĭd, *a.* (ग्रॅ'व्हिड्)—pregnant. गर्भार, गर्भवती, सुपीक.

Grăv'ĭtāte, *v. i.* (ग्रॅ'व्हिटेट्)—to move or tend towards the centre, by force of gravity; to sink as by gravity; (*fig.*) to be attracted towards; (Diamond-digging) to manipulate so that heavy stones sink to bottom. गुरुत्वाकर्षण होणें, मध्यकेंद्राभिसरण करणें; खालीं जाणें, बुडणें. (कडे) कल-गति-असणें; हिऱ्यांच्या खाणींत) खणतांना जड हिरे तळीं राहतील अशा रीतीनें रेती चाळणें.

Grăv'ĭtātion, *n.* (ग्रॅ'व्हिटेशन्)—tendency to move or tend towards the centre. गुरुत्वाकर्षण, विश्वांतील सर्व वस्तूंचें परस्पराकर्षण. *-al, a.*

Grăv'ĭtў, *n.* (ग्रॅ'व्हिटि)—solemnity; importance; weight or weightiness; a body's attraction to the centre of the earth. गांभीर्य; महत्त्व, गौरव; भार; गुरुत्व, गुरुत्वमध्याकर्षण.

Grā'vў, *n.* (ग्रे'व्हि)—juices that exude from flesh in and after cooking; dressing for food. पक्वमांस, रसा, (शिजतांना) मांसांतून गळणारा रस; पातळ मसाला.

Gray, *a.* (ग्रे)—coloured like ashes or lead; white with old age. करडा, भुरा; केंस पिकलेला. *-ling, n.* गोड्या पाण्यांतील एक पांढरा-करडा मासा; एक जातीचें फूलपांखरूं.

Grāze, *v. i. & t.* (ग्रेझ्)—to feed on growing grass; to pasture cattle; to touch lightly in passing, to abrade skin etc. in rubbing past. चरणें, गवत खाणें; गुरें चारणें; चाटून घासून-जाणें, खरचटणें. *n.* grazing; an abrasion. चाटून जाणें; खरचटणें. *Gra'zier, n.* (ग्रे'झर्)—विकण्याकरितां गुरें पाळून त्यांची निगा राखणारा. *Gra'zing, n.* pasture; grass feed. कुरण, गुरें चारण्याचें मैदान.

Grease, *n.* (ग्रीस्)—melted fat of a dead animal; fatty or oily matter; disease in horse's heels. वंगण, ओंगण; चरबी, मारखण, चिकटा; घोड्याच्या टांचेंतील सूज, भेंडी. *v. t.* (ग्रीझ्)—to lubricate or soil with g.; to affect horse with g.; to bribe. वंगण घालणें,-करणें; घोड्याच्या टांचेला भेंडी रोग उत्पन्न करणें; लांच देणें, मूठ दाबणें. *Grea'ser, n.* आगबोटींतील मुख्य आगवाला. *Greas'y, a.* तेलकट.

Great, *a.* (ग्रेट्)—large in bulk or number; considerable in extent or time; important, pre-eminent; of great ability; hard, difficult; familiar; pregnant. मोठा, थोर, वडा; मोठ्या विस्ताराचा; कर्तृत्ववान, अलौकिक, विलक्षण बुद्धीचा, महत्त्वाचा, प्रमुख; मोठ्या योग्यतेचा; कठीण, जड; ओळखीचा, नात्याचा; गरोदर, गर्भवती, गाभण. *A g. while ago,* फार फार पूर्वी, फार काळापूर्वी. *G. with child,* pregnant. गर्भवती, गरोदर. *The g. world,* high society. उच्च वर्गीय लोक, वडे लोक. (*Alexander*) *the g., the g.* (*Mongal*), सुप्रसिद्ध थोर. *G. aunt,* one's parent's aunt. (आत्या-) आजी. *G. nephew, -niece,* पुतण्याचा मुलगा,-मुलगी, नातू, नात *Greatest happiness of the greatest number,* तत्त्वज्ञ 'बेन्थॅमाचें' पुष्कळांचें पुष्कळ सुख' हें मुख्य तत्त्व. *G. go,* final examination for B. A. at cambridge. बी. ए. पदवीची शेवटची परीक्षा (केंब्रिजची). *G. house,* chief house in village etc. खेड्यांतील वगैरे प्रमुख-मोठें-घर. *Greats, n. pl.* Oxford B. A. final examination. (ऑक्सफर्डची) बी. ए पदवीची शेवटची परीक्षा. *The great,* वडे-थोर-लोक. *G. and small,* लहानथोर, गरीब-श्रीमंत. *G.-hearted,* थोर अंतःकरणाचा, थोर-उदार-मनाचा. *G.-ness, n.* मोठेपण, थोरपण, वैभव, थोरवी. *Great'ly, adv.* पुष्कळ, अतिशय.

Greatcoat', *n.* (ग्रेट्कोट्)—an overcoat. वरचा (मोठा-सैल-पायघोळ) अंगरखा. *-ed, -less, aa.*

Greave, *n.* (ग्रीव्ह्)—(*usu. pl.*) piece of armour for shins. गुडघ्यापासून खालच्या पायाचें कवच, जंघात्राण.

Greaves, *n. pl.* (ग्रीव्हझ्)—tallow refuse. (गाळलेल्या) चरबीचा गाळ, रेंदा.

Grēbe, *n.* (ग्रीब्)—a diving bird; its plumage. एक पाणबुड्या पक्षी, त्याचीं पिसें.

Grē'cian, *a.* (ग्री'शन्)—ग्रीस देशाचें,-देशासंबंधीं. *G. knot,* डोक्याच्यामागें स्त्रियांनीं केसांचा आंबाडा-वेणी घालण्याची पद्धति. *G. nose,* अवक्र सरळ नाक. *G. slippers,* पौर्वात्य पद्धतीच्या वाहणा. *G., n.* a Greek scholar. ग्रीकभाषाप्रवीण, पंडित.

Greed, *n.* (ग्रीड्)—insatiate desire for food or wealth; an eager desire or longing. अधाशीपणा; लोभ, हांव.

Greed'ў, *a.* (ग्री'डि)—gluttonous, avaricious. अधाशी, लोभी, हांवरा. *Greed'ily, adv., -iness, n.* [Skr. *gridh*, to be greedy]

Greek, *n.* (ग्रीक्)—a native of Greece; Greek language. ग्रीस देशांतील रहिवासी; ग्रीक भाषा. *a.* of Greece or its people, Hellenic. ग्रीस देशाचा, ग्रीस देशच्या रहिवाशांचा, प्राचीन ग्रीसचा. *G. to me*, beyond my comprehension. न समजण्याजोगें, आटोक्यापलीकडचें. *G. gift*, अपाय व्हावा म्हणून दिलेली देणगी, खोटी-लबाडीची-देणगी.

Green, *a.* (ग्रीन्)—of colour like grass; unripe, young; inexperienced; not seasoned or dried; pale, sickly; jealous; full of vitality. हिरवा; अपक्व; अननुभवी; कोंवळा, कच्चा; फिकट, रोगट (चेहरा); मत्सरी; जोमदार, सतेज, रसाळ. *n.* green colour; green part of thing; (*pl.*) vegetables; grass-plot. हिरवा रंग; कोणत्यादि वस्तूचा हिरवा भाग; (अने०) भाजीपाला; गवत-जमीन, ओलवण. कुरण. *v. i. & t.* to become or make green; (*sl.*) to hoax. हिरवा होणें,-करणें, हिरवा रंग देणें; फसविणें, ठकाविणें. *G. eye*, jealousy. मत्सर, हेवा; *-eyed*, *a. In the g. tree*, under good conditions. सुस्थितींत. *In the dry tree*, under bad conditions. वाईट स्थितींत. *A g. wound*, ताजी-ओली-जखम. *G. gro'cer*, काछी, ताजी भाजी विकणारा, *-gro'cery*, *n.*, *G. horn*, *n.* साधाभोळा, नवशिका मनुष्य. *G. stone*, *n.* kind of jade. एक प्रकारचा मौल्यवान् 'मर्गस', दगड,-हिरा. *G. stuff*, भाजीपाला. *G. sward n.* turf. आंखूड हिरव्या गवताची जमीन,-मैदान. *G. wood*, *n.* woodland in spring or summer. हरित वनश्री, दाट हिरवें रान. *Green'ish*, *-ny*, *aa. Green'ly*, *adv.*, *-ness*, *n.*

Green'bǎck, *n.* (ग्री'न्बॅक्)—(U. S.) a legal tender note. कायदेशीर कागदी चलन, हुंडी.

Green'erў, *n.* (ग्री'नरि)—vegetation. हिरवळ.

Green'finch, *n.* (ग्री'न्-फिंच्)—a bird with gold and green plumage. पिवळ्या आणि हिरव्या पिसाऱ्याचा पक्षी.

Green'house, *n.* (ग्री'न्-हउस्)—glass house for rearing plants. लहान रोपट्यांच्या वाढीसाठीं केलेलें कांचेचें घर.

Green'rōom, *n.* (ग्री'न्-रूम्)—retiring room for actors off the stage. नटांची सजण्याची खोली, नेपथ्यशाला, नेपथ्य.

Greet, *v. t.* (ग्रीट्)—to accost with salutation; to salute, to receive; to meet (ear, eye). भेटल्यावर नमस्कार करणें; वंदन करणें, स्वागत करणें; दृष्टीस पडणें, कानावर येणें.

Greet, *v. i.* (ग्रीट्)—(Sc.) to weep. रुदन करणें, रडणें.

Gregǎr'ious, *a.* (ग्रिगे'अरिअस्)—living in flocks or communities; (Bot.) growing in clusters; fond of company. कळप-संघ-करून राहणारा; झुपक्यांनीं वाढणारा; संगति-प्रिय, समाज प्रिय.*-ly*, *adv.*; *-ness*, *n.*

Grenāde', *n.* (ग्रिने'ड्)—explosive shell. दारूनें भरलेला गोळा, स्फोटक गोळा, हिंगणभेद.*-dier*, *n.* स्फोटक हातगोळा फेकणारा सैनिक.

Grey, *a.* (ग्रे)—coloured like ashes or lead; clouded, dull. करडा, भुऱ्या रंगाचा; फिकट. *n.* करडा रंग; करड्या रंगाचा घोडा; धंद्राचा आणणारा अंधुक प्रकाश. *v. t. & i.* करडा, भुरकट,-करणें-होणें.

Grey'hound, *n.* (ग्रे'हाउन्ड्)—a tall, very slender swift dog kept for the chase. शिकारी कुत्रा.

Grief, *n.* (ग्रीफ्)—sorrow, deep trouble. दुःख, शोक. *To come to g.*, आपत्ति, संकट-ओढवणें, फसणें, पडणें.

Griev'ance, *n.* (ग्री'व्हन्स्)—real or fancied ground of complaint, hardship. तक्रारीची बाब, गाऱ्हाणें, अडचण, संकट, क्लेश, पीडा.

Grieve, *v. t. & i.* (ग्रीव्ह्)—to cause to feel grief; to be in pain; to mourn, to sorrow. दुःख देणें, दुखवणें; दुःखांत असणें; शोक करणें, चिंता करणें, दिलगीर होणें.

Griev'ous, *a.* (ग्री'व्हस्)—oppressive, painful; (of pain etc.) severe; flagrant, heinous. त्रासदायक, दुःखद, तीव्र; जबर, भयंकर.

Griff'in, *n.* (ग्रि'फिन्)—(Anglo-Ind.) a newly arrived European; a greenhorn. नुकताच विलायतेहून आलेला युरोपिअन गृहस्थ; भोळसट, नवखा.

Griff'in, **Griff'on**, **Grўph'on**, *n.* (ग्रि'फिन्,-फन्)—a fabulous creature half lion and half eagle; (*griffon*) a kind of vulture, a coarse-haired dog. (शरीर व पाय सिंहासारखे आणि पंख व चोंच गरुडासारखी असणारा) गरुड-सिंह प्राणी,-राक्षस; एक मोठें गिधाड, एक जातीचा शिकारी कुत्रा.

Grǐg, *n.* (ग्रिग्)—a small eel; a grass-hopper, a cricket. लहान वाम,-वांब-मासा; टोळ, राळ, रातकिडा.

Grǐll, *n.* (ग्रिल्)—a gridiron; grilled food; (also *g.-room*) room where food is served and grilled; (also *grille*) grating, latticed screen, esp. in door for observing callers. तळाशीं लोखंडी जाळी असलेलें भांडें; भाजलेला पदार्थ, भाजप; जेवणघर-स्वयंपाकघर; दरवाजाला बसविलेली जाळीदार चौकट. *v. t. & i.* to broil on grill (fig. of great heat). भाजणें, शेकणें; (अति उष्णतेनें) भाजून-करपून-निघणें *-age*, *n.* heavy framework or cross-timbering

as foundation for building. इमारतीचा भुसभुशीत जमिनींतील मजबूत जाळीदार लांकडी पाया.

Grilse, *n.* (ग्रिल्स्)—a young salmon. 'सामन' माशाचें पोर.

Grĭm, *a.* (ग्रिम्)—stern, merciless; of harsh aspect; ghastly, joyless. कठोर, निर्दय; उग्र स्वरूपाचा; उदास, भकास, खिन्न. *-ly, adv.; -ness, n.*

Grĭmāce', *n.* (ग्रिमे'स्)—a wry face made in disgust or in jest; affected look, affectation. माकडचेष्टा, वांकुली; ढोंगी मुद्रा, ढोंग. *v. i.* to make grimaces. वांकुल्या करणें, तोंडें वेडीं-वांकडीं करणें. *-cer, -cicr, nn.*

Grĭmal'kĭn, *n.* (ग्रिमॅ'ल्किन्)—an old she-cat; a spiteful old woman. म्हातारी मांजरी,-भाटी; चुट्टी, थेरडी.

Grīme, *n.* (ग्राइम्)—soot, dirt, deeply ingrained. मळ, किटण, पुट. *v. t.* to blacken, to dirt. मळकट करणें, कीट धरणें. *-my, a.; -miness, n.*

Grĭn, *v. i. & n.* (ग्रिन्)—to show teeth in pain or in smile. दुःखांत किंवा हंसतांना दांत विचकणें, दांत विचकून हंसणें. *To g. and bear it*, शांतपणानें सहन करणें.

Grīnd, *v. t. & i.* (ग्राइन्ड्)—to crush to small particles; to sharpen; to harass with exactions, oppress; to toil, to study hard, to teach (subject, pupil *in* it) laboriously; to rub gratingly. दळणें, पीठ करणें, भरडणें; घांसणें, धार लावणें, पाजळणें; छळणें, गांजणें, पिळून काढणें; अंगमेहनत श्रम-करणें; (पुस्तकांचें) पीठ पाडणें, अभ्यासाच्या घोक्या लावणें, (विषय) घोकून घोकून शिकविणें; कर कर आवाज करणें, करकरणें, घांसटणें. *n.* grinding; hard work; walk for exercise; a plodding student; steeple chase. दळण, दळणें, दळप; कष्ट, श्रम; व्यायामासाठीं फिरणें; घोकंपट्टी करणारा विद्यार्थी, घोड्याची शर्यत.

Grī'nder, *n.* (ग्रा'इन्डर्)—the molar tooth; grinding machine; one who grinds. दाढ, चिरट, चक्की; दळणारा.

Grīnd'stōne, *n.* (ग्रा'इन्ड्-स्टोन्)—revolving disk for grinding and polishing. धार लावण्याचें चाक, निसणा. *To hold, keep, one's nose to the grindstone*, to make him work incessantly. एखाद्याला सारखें घाण्याला जुंपणें, छळणें.

Grĭp, *n.* (ग्रिप्)—a firm hold, grasp; mastery, control of a subject. घट्ट मूठ, [illegible]; (कोणत्याहि विषयाचें) पूर्ण आकलन, ताबा. *v. t. & i.* to grasp tightly, to take firm hold. घट्ट धरणें, गच्च पकडणें. *At gg., come to gg.*, हातघाई (-वर येणें). *G. sack*, a hand-bag. लहान-हातांतून नेण्याची-हातपिशवी.

Grīpe, *v. t.* (ग्राइप्)—to clutch, to grip; to oppress; to affect with colic pains. मुठींत धरणें; त्रास देणें; (पोटांत) कळा-मुरडा-येणें. *n.* a grip; hold, control; (*pl.*) colic pains. पकड, मूठ; ताबा; मुरडा, तिडीक.

Grĭppe, *n.* (ग्रिप्)—influenza. इन्फ्लुएंझा ताप.

Grĭs'lȳ, *a.* (ग्रि'झ्लि)—causing terror. भयंकर, दारुण, भयानक.

Grĭst, *n.* (ग्रिस्ट्)—corn for grinding; malt crushed for brewing. दळण, दळप; दारू तयार करण्यासाठीं सातूचें पीठ करणें. *Brings g. to the mill*, is profitable. फायद्याचें कलम आणून देतो, फायदा करून देतो. *All is g. that comes to his mill*, he utilizes everything. तो प्रत्येक गोष्टीचा उपयोग करून घेतो, हातीं धरतो त्याचें सोनें बनवितो.

Grĭst, *n.* (ग्रिस्ट्)—size or thickness of yarn or rope. सुताचा-दोरीचा-आकार, जाडी.

Grĭ'stle, *n.* (ग्रि'सल्)—tough flexible tissue, cartilage. अस्थिकूर्चा, कोमलास्थि. *Gri'stly*, (ग्रि'स्लि) *a.*

Grĭt, *n.* (ग्रिट्)—particles of sand; (also *grit'stone*) coarse sand-stone; grain or structure of stone; (colloq.) pluck, endurance. रेंव, रेवा, कचर; खडबडीत रेंवाळ-रेतीचा-दगड; दगडाची बनावट; हिंमत, धैर्य, छाती. *v. i. & t.* to make a grating sound; to grind. करकरणें, घांसटणें; (दांत) चावणें. *Gritt'y, a.* रेंवाळ; हिंमतवान.

Grĭts, *n. pl.* (ग्रिट्स्)—coarse oatmeal. भरड, कणी, रवा.

Grĭz'zled, **Grĭzz'ly**, *aa.* (ग्रि'झल्ड्, ग्रि'झ्लि)—grey, grey-haired. करडें, करड्या रंगाचें. *Grizzly, bear*, उत्तर अमेरिकेंतील उग्र धिप्पाड अस्वल.

Groan, *v. i. & t.* (ग्रोन्)—to make deep sound expressing pain or the like; to be oppressed; long for. कण्हणें, कुंथणें, विव्हळणें; गांजलें जाणें; ची प्रबळ इच्छा धरणें. *n.* कण्हणें, विव्हळणें, हायहाय. *-ingly, adv.*

Groat, *n.* (ग्रोट्)—a silver coin =4d; small sum. चार पेन्सचें चांदीचें नाणें; लहान रक्कम, चवली-पावली.

Groats, *n. pl.* (ग्रोट्स्)—hulled grain. भरडलेलें धान्य.

Grŏ'cer, *n.* (ग्रो'सर्)—a dealer in spices, tea, sugar and domestic stores. किराणा जिन्नस विकणारा, वाणी. *G. 'sitch*, eczema caused by handling sugar. एक त्वचेचा रोग, कंडुरोग.

Grŏ'cery, *n.* (ग्रो'सरि)—grocer's trade or goods. किराणा व्यापार, किराणा जिन्नस, वाणसौदा.

Grŏg, *n.* (ग्रॉग्)—drink of spirit and water; a social meeting with grog. केवळ जलमिश्रित मद्य, दारूपाणी; मद्यपानमंडळ. *v. i. & t.* to drink g.; to extract spirit from (empty cask) by pouring hot water. मद्य पिणें; गरम पाणी ओतून (रिकाम्या पिंपांतून) मद्य-दारू-काढून घेणें. *G.-blossom*, pimple or redness on nose due to excessive drinking. अतिशय दारू पिणाऱ्या लोकांच्या नाकावर दिसणाऱ्या पुटकुळ्या,-लाली. *Grogg'y, a.* drunk; unsteady. अति प्यालेला, झिंगलेला, झोकांड्या जात असलेला; लटपटणारा. *Grog'giness, n.*

Grŏg'ram, *n.* (ग्रॉ'ग्रम्)—coarse fabric of silk, mohair etc., often stiffened with gum. खळ लावलेलें जाडेंभरडें कापड. [*F. gros grain*, large grain]

Groin, *n.* (ग्राइन्)—depression between belly and thigh; (Arch.) edge formed by intersecting vaults, fillet covering this. मांडीचा सांधा, जांघ, आडसंधि; (घुमटाचे दोन डेरे एकत्र जुळण्यानें होणारा) जंघाकोन, त्यावरील पट्टी. *v. t.* to build with groins. जंघाकोनांनीं बांधकाम करणें.*-ing, n.*

Grōōm, *n.* (ग्रूम्)—an officer of Royal Household; a servant who tends horses; a bridegroom. राजघराण्यांतील कारभारी; घोडेवाला, मोतद्दार; नवरा, वर. *v. t.* to tend (a horse), to feed and take care of. घोड्याची निगा राखणें; पालन करणें. *Well-groomed*, (of persons) neatly got up. व्यवस्थित केंस, दाढी असलेला, टाकटीक. *Grooms'man*, a friend attending bride-groom at wedding. (नवऱ्याचा) करवला, टोंकणा,-ण्या.

Grōōve, *n* (ग्रूव्ह्)—channel or hollow; routine. खाजणी, कोरणी, पाट, चोगदा; कामाचें रहाटगाडगें, ठराविक क्रम, गाडा. *v. t.* to make groove in. खोदणें, खांच पाडणें.*-vy, a.,-viness, n.*

Grōpe, *v. i.* (ग्रोप्)—to feel about as in dark; to search blindly. अंधारांत चांचपणें; चांचपत शोधून काढणें. *Grop'ingly, adv.*

Grō'sbeak, *n.* (ग्रो'स्बीक्)—kinds of small bird with a large strong beak. मोठी व मजबूत चोंच असलेला लहान पक्षी.

Grōss, *a.* (ग्रोस्)—luxuriant, rank; total, not net; rude, rough, coarse; indecent. फार सुपीक; स्थूल, समग्र; भसडा, जाडाभरडा; बीभत्स, चावट, पशुतुल्य, नीच. *n.* the bulk; twelve dozen. एकंदर, ठोकरास; बारा डझन (१४४). *In (the) g.*, in a general way. सामान्यपणें, एकंदरीनें. *Gros'sly, adv. Gros'sness, n.*

Grŏt, *n.* (ग्रॉट्)—(poet.) a grotto. गुहा, गुंफा.

Grotĕsque', *n.* (ग्रॅटे'स्क्)—a style of decorative art; distorted figure. मनुष्य व पशु-आकृति आणि झाडांची पालवी यांच्या विचित्र-विलक्षण-रचनेचें शोभेचें चित्रकाम-खोदकाम; विलक्षण आकृति,-देखावा. *a.* distorted; incongruous; absurd, ludicrous, fantastic. वेडाविद्रा; असंबद्ध; हास्यास्पद.*-ly, adv,-ness,-rie, nn.* वेडेविद्रेपणा, विरूपता.

Grŏtt'o, *n.* (ग्रॉ'टो)—a picturesque cave; a structure imitating a cave. सुंदर गुहा; कृत्रिम गुहा, लेणें, गुंफा.*-ed, a.*

Ground, *n.* (ग्राउन्ड्)—surface of earth; bottom of sea or water; foundation; motive; (pl.) dregs, esp. of coffee; substratum, underlying part; (pl.) enclosed land attached to house; land; floor or level; (Painting etc.) surface worked upon. जमीन, भूमि, भुई, देश, मुलूख; समुद्राचा किंवा पाण्याचा तळ; पाया, आधार; हेतु, मूळ कारण, प्रयोजन; गाळ, सांका, रेंदा; तळचा भाग, खालचा भाग; घराभोंवतालची जमीन, जमीनजुमला, आवार; जमीन, वतन, शेतभात; पृष्ठभाग, सपाटी; भूमिका, तलभाग. *v. t. & i.* to fix or place on the g.; to base upon cause or principle; to instruct thoroughly (in elements); to run ashore; to lay (esp. hands) on g.; (Electr.) connect with earth as conductor; alight on g. जमिनीवर बसविणें,-ठेवणें; सबळ कारण असणें, तत्त्वाचा आधार देणें, आधारलेलें असणें; ओनामा-मूलतत्त्वें-घोटविणें,-पक्कीं शिकविणें; तळाला लागणें, कोरड्या जमिनीवर लागणें; जमिनीवर (हात) टेकणें; (जमिनींत) विद्युत्प्रवाह नेणें; जमिनीवर उतरणें. *To touch g.*, मुद्यावर येणें. *To take g.*, (of ship) strand. (जहाज) जमिनीवर लागणें. *On the g. of*, by reason or under pretext of. च्या कारणामुळें, सबबीमुळें. *On public gg.*, सार्वजनिक हिताच्या दृष्टीनें. *To fall*, or *be dashed to, the g.*, (of scheme, hope) be abandoned, fail. सोडून देणें, फसणें, निष्फळ-व्यर्थ-होणें. *Down to the g.*, (colloq.) thoroughly पूर्णपणें, सर्व बाजूंनीं. *Above g.*, alive. जिवंत. *To cut the g. from under one's feet*, एकाद्याचें म्हणणें किंवा बेत सपशेल उलटविणें,-फसविणें,-हाणून पाडणें. *To cover much g.*, बरेंच परिणामकारी-दूरवर परिणाम-

कारक-होणें. *To stand one's g.*, आपला मुद्दा-बेत-न सोडणें, त्याला घट्ट धरून राहणें. *To shift one's g.*, मत-बेत-बदलणें. *To gain g.*, advance. पुढें जाणें, प्रगति करणें. *To lose, give, g.*, retreat. माघार घेणें *Forbidden g.*, टाळण्याचा विषय. *G.-colour*, रंगाचा पहिला हात. *G. game*, hares, rabbits etc. ससे इ. ची शिकार. *G. nut*, भुईमूग (शेंग). *Ground (s)-man*, man in charge of cricket ground. क्रिकेट खेळण्याच्या मैदानाचा रखवालदार,-रक्षक. *G.-rent*, rent paid for ground leased for building. इमारतीचें भुई-भाडें. *G.-swell*, पूर्वी होऊन गेलेल्या वादळामुळें खवळलेला समुद्र. *G. torpedo*, fixed to bottom of the sea. समुद्राच्या तळाशीं लावलेला पाणसुरुंग. *Ground'y, a.* गाळ-सांका-धरणारें. *Ground'edly, adv.*

Ground'-floor, *n.* (ग्रा'उन्ड-फ्लोअर्)—story of a house on level of outside ground. तळ मजला. *To get in on the g.-f.*, मूळ चालकांबरोबर समान हक्कानें धंद्यांत घेतलें जाणें.

Ground'work, *n.* (ग्रा'उन्ड्-वर्क्)—foundation; chief ingredient, fundamentals. पाया, बुडखा, मूळ, आधार; मुख्य तत्त्व,-घटक द्रव्य.

Groun'ding, *n.* (ग्रा'उन्डिंग्)-drill in the elements of a subject. कोणत्याहि विषयाचा मूळ पाया.

Ground'less, *a.* (ग्रा'उन्ड्-लिस्)—without motive or foundation, baseless. निष्कारण, निराधार. *-ly, adv.*; *-ness, n.*

Ground, *pa. t. & pa. p.* of Grind.

Ground'ling, *n.* (ग्रा'उंड्लिंग्)—kinds of fish living at bottom; a creeping or dwarf plant; a person of inferior taste. तळाशीं राहणाऱ्या माशांची जात; वेल, खुजट झाड; हीन अभिरुचीचा मनुष्य.

Ground'sel, *n* (ग्रा'उंड्सल्)—kinds of weed. (पिंजऱ्यांतल्या पक्ष्यांचा) चारा, वनस्पति. 2. lowest part of wooden frame-work, threshold. लांकडी चौकटीचा खालचा पाया, लांकडी बैठक, पाया, उंबरठा.

Group, *n.* (ग्रूप्)—a number of persons or things near together or belonging or classed together. गट, पक्ष, जमाव, टोळी, समुच्चय, समुदाय, वर्ग, गण, उपवर्ग, (Fine arts) वस्तूंचा गट. *v. t. & i.* to form, to fall, into a group; to classify. गट-पक्ष-संघ करणें,-बनणें, जमाव करणें; वर्गीकरण करणें, वर्ग पाडणें. *G. captain*, R. A. F. (Royal Air Force) officer. शाही विमानदलाचा अधिकारी.

Grou'per, *n.* (ग्रू'पर्)—kinds of W.-Ind. and Austral. fish. एक जातीचा मासा.

Grouse, *n.* (ग्राउस्)—the heath-cock or moor-fowl. एक जातीचा पक्षी. 2. *v. i. & n.* (*sl.*) grumble. कुरकूर (करणें).

Grout, *n.* (ग्राउट्)—thin fluid mortar for filling joints of masonry and brick work; (*pl.*) dregs. (दरजा भरण्याचा) कमावलेला भरभरीत चुना; गाळ, रेंदा. *v. t.* to finish with g. भरभरीत चुन्यानें दरजांमधील सांधे भरून काढणें.

Grout, *v. i. & t.* (ग्राउट्)—(of pigs) to turn up (earth) with snout. (डुकरांचें) मुसकुटानें माती उकरणें, उकरणें.

Grōve, *n.* (ग्रोव्ह्)—a small wood; a group of growing trees. उपवन; राई, वृक्षवाटिका, वन, राजी. *-d,-less,-vy, aa.*

Grŏv'el, *v. i.* (ग्रॉ'व्हल्)—to lie prone; to abase oneself, to be low or mean. (झेलपटपणामुळें) जमीन धरणें-धरून चालणें, सरपटत जाणें; हलकट बनणें. *Grov'elling, pr. pa.* abject, low, base. निकृष्ट, नीच, अधम; *-lly, adv. Groveller, n.*

Grow, *v. i. & t.* (ग्रो)—to develop or exist as living plant; to be found in some place; to spring up; to produce by cultivation; to increase (in size, height, amount, &c.); to let grow; (pass) to be covered with some growth. वाढणें; आढळणें; रुजणें; उत्पन्न करणें, पिकवणें; मोठा होणें, वाढत जाणें; वाढूं देणें; वाढवणें, वरच्या वाढीनें झांकलें जाणें, आवृत-आच्छादित-होणें. *To g. into one, together*, coalesce. एकत्र वाढणें,-उगवणें, एकजीव होणें. *To g. downwards*, diminish. कमी कमी होत जाणें. *To g. up*, पुरी वाढ होणें, ज्वानींत येणें; जमिनींतून वर येणें, पूर्ण वाढ होणें; रूढ होणें, (दाढी इ.) वाढविणें. *G.-able, a. G.-ingly, adv. Grown-up, a. & n.* adult. वयांत आलेला, तरुण, प्रौढ, थोर.

Grow'er, *n.* (ग्रो'अर्)—one who grows fruit etc.; plant that grows in a specified way. (फळें इ.) पिकविणारा; वाढणारा.

Growl, *v. i. & t. & n.* (ग्राउल्)—(make) guttural sound of anger *at*; rumble; murmur of an angry person, complaint गुरकावणी; गुरगुरणें; कुरकुर करणें, कुरकूर.*-ingly, adv.*

Growl'er, *n.* (ग्रा'उलर्)—one who growls; a four-wheeled cab; (*sl.*) beer-jug. गुरगुरणारा, कुरकुरणारा, कुरकुऱ्या; चारचाकी गाडी; दारूचा खुजा.

Grown, *pa. p.* of Grow.

Growth, *n.* (ग्रोथ्)—increase; what has grown or is growing; morbid formation. वाढ, विस्तार; पूर्णावस्था, भर; रोगट वाढ, सूज.

Groyne, *n.* (ग्रॉइन्)—a structure run out to stop shifting of sea-beach. समुद्राच्या लाटांनीं किनारा धुपूं नये म्हणून बांधलेला लांकडी-दगडी-बांध, धक्का.

Grŭb, *n.* (ग्रब्)—larva of an insect, caterpillar; a dull drudge, a literary hack; (cricket) a ball bowled along ground; (sl.) food, a feed. कोशपक्षकिडयाच्या पूर्वावस्थेतील नेत्र. कुसरूड, सुरवंट; कंटाळवाणें काम करणारा, भाडोत्री लेखक; भुईसरपट चेंडू; अन्न, जेवण.

Grŭb, *v. i. & t.* (ग्रब्)—to dig superficially to clear ground of roots etc.; to search; to plod, toil (*on, along, away*); (*sl.*) to feed. जमीन वरवर खणणें; पाळेंमुळें खणून टाकून साफ करणें; शोधणें; काबाडकष्ट करणें, राबणें; अन्न-जेवण-घालणें *G.-axe*, *n.* खुरपें; *G.-hoe*, खुरपें (रान उपटण्याचें); *G.-hook*, खुरप्या नांगर. *Grub'ber*, *n.* खुरपणारा; खुरपण्याचें हत्यार, खुरपणें. *Grub'by*, *a.* dirty; of, infested with, grubs. मलिन, घाणेरडा; रान-पाळेंमुळें-असलेला. *G.-street*, *n.* (सतराव्या शतकांत लंडनमध्यें) कमी दर्जाचे, गरजू ग्रंथकार व वर्तमान-पत्रकर्ते राहात ती गल्ली; *a.* असल्या लेखकांचा, भाडोत्री.

Grŭdge, *v. t.* (ग्रज्)—to be unwilling to give or allow. देण्याला नाखूष असणें, कुरकुरणें. *n.* resentment, ill-will from envy or sense of injury. आकस, चुरस, पीळ, अढी. *To have a g. against, to bear, owe, one a g.*, एखाद्या-विषयीं मनांत द्वेष,-अढी,-धरणें. *Grudg'ing*, *pr. p.* reluctant. नाखूष, असंतुष्ट. *Grudg'ingly*, *adv.* नाखुषीनें.

Gru'ĕl, *n.* (ग्रु'इल्)—liquid food of oatmeal; severe punishment. कणेरी, पेज; कांजी, मंड; कडक शासन,-शिक्षा. *v. t* (*sl.*) कडक शिक्षा करणें. *To have, get, one's g.*, शिक्षा होणें, मपाटून मार खाणें, पराभूत होणें, ठार मारलें जाणें. *To give one his g.*, कडक शिक्षा देणें. *Gru'elling*, *n.* कडक वागवणूक.

Grue'some, *a.* (ग्रु'सम्)—horrible, frightful. घोर, भयंकर; भयानक. *-ly, adv.*; *-ness, n.*

Grŭff, *a.* (ग्रफ्)—surly, laconic, rough-mannered, rough-voiced. उद्धट, द्वाड, रुक्ष, त्रोटक, आडदांड, कर्कश, कठोर (आवाजाचा). *-ish, a.*; *-ly, adv.*, *-ness, n.*

Grŭm'ble, *v. i. & t.* (ग्र'म्बल्)—to utter grumble; to complain, to murmur. कुरकुर करणें; तक्रार करणें. *n.* faint growl, murmur, complaint. कुरकुर, तक्रार. *-er, n.*

Grume, *n.* (ग्रूम्)—(med.) a clot of blood, viscous fluid. गठडी, गुठळी, चिकट. *-mous, a* [L. *grumus*, small heap]

Grŭm'pȳ, **Grŭm'pĭsh**, *aa.* (ग्र'म्पि, ग्र'म्पिश्)—ill-tempered. रागीट, चिडखोर. *Grum'pily*, *adv.*, *Grum'piness, n.*

Grŭnt, *v. i. & t. & n.* (ग्रन्ट्)—(to utter) a deep sound like a hog; express discontent: (डुकराचें) डुरडुर करणें, डुरकणें, गुरकणें, रें रें करणें. *-er, n.* a pig. डुकर. *-ingly, adv.*

Grȳ'sbŏk, *n.* (ग्रा'इस्बॉक्)—a small grey S. Afr. antelope. लहान करडें काळवीट,-हरिण.

Gua'nō, *n* (ग्वा'नो)—excrement of sea-fowl used as manure, artificial manure. माशांचें खत.

Guarantee', *n.* (गॅरन्टी')—the giver of guaranty or security; guaranty; recipient of guaranty. हमीदार, जामीन; जिम्मा, लेखी जिम्मेदारी, हवाला, जामीनकी; जामीन,-हवाला,-घेणारा. *v. t.* to be a guarantee for; to answer for; to engage, to secure (*against, from*, risk etc. or *in*). जामीन होणें; हमी घेणें; खात्रीनें सांगणें, हवाला देणें किंवा घेणें. *Gua'rantor, n.* जामीन; विम्याच्या धर्तीवर खजिनदार वगैरे जबाबदार कामगारांच्या सचोटीबद्दल हवाला घेणाऱ्या मंडळ्या.

Gua'rantȳ, *n.* (गॅ'रन्टि)—a written or other undertaking to answer for performance of obligation, a ground of security. लेखी हमी, जिम्मेदारी, हवाला.

Guard, *n.* (गार्ड्)—a defensive posture; a watch, vigilant state; a protector; a sentry; an official in charge of a train; body of soldiers protecting place or person, escort; (*pl*) household troops; a device to prevent injury or accident. रखवाली, पहारा, सावधगिरी, दक्षता; रक्षण करणारा, रखवालदार, पहारेकरी; आगगाडीची सर्व जबाबदारी ज्याच्यावर असते तो गार्ड, रक्षक; चौकी-वरील शिपाई, रक्षक सैनिक,-शिपाई; खाजगी सैनिक,-सैन्य; रक्षक पट्टा, संरक्षक साधन, त्राण, कठडा, पिंजरा. *v. t. & i.* to protect, to defend; to take precautions; to keep in check. रक्षण करणें; सावधगिरी ठेवणें; ताब्यांत ठेवणें. *To take g.*, (क्रिकेटच्या खेळांत) चेंडूसमनन-खेळणाऱ्यानें बॅट टेंकण्याची जागा अजमावून घेणें; *to give g.* फलंदाजाला पंचानें बॅट टेंकण्याची जागा अजमाव-ण्याला मदत करणें. *To keep g, be on g*, पहारा करणें. *On one's g.*, prepared against attack etc. सावध, हुशार. *Off one's g.*, गैरसावध, अव-धान नसलेला. *G. of honour*, सन्मानार्थ सलामी. *G. chain*, सांखळीवजा पट्टा. *G. house*, लष्करी पहारेकऱ्यांची चौकी, चावडी. *G. rail*, संरक्षक कठडा. *Guards'man*, soldier of the Guards. खाजगी तैनातींतील सैनिक. *G.-less*, *a.*, *Guardedly*, adv.,—*edness, n.*

Guard'ian, *n.* (गा'र्डिअन्)—one who guards, keeper, protector; custodian. पालक, रक्षक, (Law) (अज्ञान) पालक; रखवालदार. *-angel*, राखण देवता, अधिदेवता, स्थानदेवता; वाली, पाठीराखा. *-ship*, *n.* पालकत्व.

Gua'vă, *n.* (ग्व 'व्हा) —a tropical tree with acid fruit used for jelly. पेरूचें झाड, पेरू.

Gudg'eon, *n.* (ग'जन्)—a small fresh-water fish used as bait; a person easily duped. एक गोडा मासा; भोलानाथ, भोळसट मनुष्य. 2. a pivot at the end of beam, axle etc., on which bell, wheel, works; socket in which rudder works. पिन, चावी, उथळें, खुपसें.

Guel'der rōse, *n.* (गे'ल्डर रोझ्)—a plant with balls of white flowers. पांढऱ्या झुबकेदार फुलांचें फुलझाड.

Guerd'on, *n.* & *v. t.* (ग'र्डन्)—(Poet.) reward, recompense. पारितोषिक, मोबदला, फळ, -देणें. *-less*, *a.*

Guern'sey, *n.* (ग'र्न्झि)—thick knitted woollen (usu. blue) outer tunic or jersey worn by sailors, workmen, and children. घट्ट विणीचें लोंकरी (निळें) कुडतें,—आंगरखा.

Guerĭll'ă, Guerrĭll'ă, *n.* (गेरि'ला)-*G.war*, irregular war waged independently by small bodies, a man engaged in this. गनिमी काव्यानें चालविलेलें युद्ध, गनिमी काव्याची लढाई; गनिमी सैनिक.

Guĕss, *v. t.* & *i.* (गेस्)—to conjecture, think likely. तर्क बांधणें, अटकळ बांधणें, अनुमान करणें. *n.* a rough estimate, conjecture. अजमास, तर्क, अनुमान, अंदाज, समज. *I guess*, (U.S.) I know, I am sure. मला ठाऊक आहे, माझी खात्री आहे. *G. work*, guessing. अंदाज, अनुमान-धपका.

Guĕst *n.* (गेस्ट्)—a visitor or friend entertained at one's house; a person lodging at a hotel or boarding-house; animal or vegetable parasite. पाहुणा, अतिथि, अभ्यागत, खानावळींत उतरणारा पाहुणा, मुसाफर, बांडगूळ. *Paying g.*, a boarder. पैसे देऊन खाणावळींत जेवणारा. *G. chamber*, अतिथिगृह. *G.-ship*, *n.*

Guest'-rope, Guess'-rope, (गे'स्ट् रोप, गे'स् रोप्)—second rope fastened to boat in tow to steady it; rope slung outside a ship to give hold for boats coming alongside. गलबत स्थिर करणारा दुसरा दोर, नांगर; इतर लहान पडावांना आधार देणारा गलबताच्या बाहेर ताणलला दोर.

Gŭff, *n.* (गफ्)—(U.S.) an empty talk. पोकळ-वायफळ-बडबड.

Gŭffaw', *n.*, *v. i.* & *t.* (गफॉ')—(to make, say, with) coarse laugh. हाहा करून मोठ्यानें हसणें, हसून बोलणें.

Guid'ance, *n.* (गा'इ-डन्स्)—act of guiding; direction; a leading. मार्ग दाखविणें; दिशा; योग्य मार्ग.

Guide, *n.* (गाइड्)—one who shows the way, an adviser; directing principle; (Mil.) one of company formed for reconnoitring etc.; (Naut.) ship on which rest of the fleet regulate their movements; (also, g. book) book of information about place etc.; a manual; (Mech.) a bar or rod directing motion; a guage etc. controlling tool; thing marking a position or guiding the eye. मार्गदर्शक, वाटाड्या, उपदेशक; तत्त्वदर्शक; लष्करी हेहेळ्या, वाटाड्या; वाटाडें जहाज; मार्गदर्शक माहितीचें पुस्तक; अंकलिपी, प्राथमिक पुस्तक; वाटाड्या, खुणेचा सांचा, (पाण्याच्या चक्रींतील) चक्राला जोडलेली वाटाडी नळी; यंत्र-नियामक साधन; स्थानदर्शक खूण,-वस्तु. *G. post*, वाट दाखविणारा खुणेचा खांब. *G. rope*, यारीला लावलेल्या ओझ्याला योग्य गति देणारा दोर. *G.-way*, groove, track. खांचणी, मार्ग. *v. t.* to act as a gide to; to lead, to direct. वाटाड्या होणें, दिशा दाखवणें, मार्गाला लावणें. *G.-less*, *Guid'able*, *aa.*

Guid'on, *n.* (गा'इडन्)—a small flag narrowing to point at free end. (लष्करी) खुणा दाखविण्याचा बावटा, (विशिष्ट चिन्हांकित) झेंडा, बावटा.

Guĭld, Gild, *n.* (गिल्ड्)—a society for mutual aid or with common object; a business corporation. परस्परसाहाय्यार्थ व स्वहितसंरक्षणार्थ संस्था, संघ, मंडळ; व्यापारी संघ.

Guild'-hall, *n.* (गि'ल्ड्-हॉल्)—a town hall. सार्वजनिक दिवाणखाना, नगरभवन.

Guĭle, *n.* (गाइल्)—treachery, deceit. विश्वासघात, कपट, कावा, माया, चेहूक. *-ful*, *a.*; *-fully*, *adv.*, *-fulness*, *n.*; *-less*, *a.*, *-lessly*, *adv.* *-lessness*, *n.*

Guill'emot, *n.* (गि'लिमॉट्)—a kind of sea-bird. एक समुद्रावरील-दर्यावरील-पक्षी.

Guilloche', *n.* (गिलो'श्)—an architectural ornament imitating braided ribbons. विणलेल्या फितींसारखें शोभिवंत शिल्पकाम.

Guĭllotine', *n.* (गिलॉटी'न्)—a beheading-machine; a machine for cutting paper; a surgical instrument; (Parl.) closure. शिरच्छेद करण्याचें यंत्र; कागद कापण्याचें यंत्र, गिलोटीन;

शस्त्रवैद्यकाचें छेद करण्याचें शस्त्र; (पार्लमेंटमध्यें) एखादा कायदा पास करतांना विरोधकांवर नियंत्रण घालण्यासाठीं मतें देण्यावर वेळाचें घातलेलें नियंत्रण. [F G. inventor, 1789]

Guilt, *n*. (गिल्ट्)—the having committed an offence; culpability. गुन्हा, दोष, अपराध: दण्डार्हता, शिक्षेला पात्र असणें, सदोषता.

Guilt'less, *a*. (गि'ल्ट्-लस्)—innocent; not having knowledge or possession of. निरपराधी, निर्दोष, निष्कलंक; अनभिज्ञ, कच्चा, नेणता, रहित, नसलेला. *G. of Greek*, ग्रीक भाषा येत नसलेला. *G. of moustache*, मिशा नसलेला. *G.-ly, adv.*, *G.-ness, n.*

Guil'tў, *a*. (गि'ल्टि)—having committed an offence; culpable, criminal. दोषी, अपराधी; दोषदर्शक, सदोष. *-tily, adv., -tiness, n.*

Guin'ea, *n*. (गि'नि)-part of W. coast of Africa; a coin of 21 s. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावरील 'गिनी' प्रांत; २१ शिलिंगाचें नाणें.

Guise, *n*. (गाइज्)—external (esp. assumed) appearance; pretence. बाह्य स्वरूप; वेष, ढोंग, मिष. *Under, in, the g. of*, च्या वेषांत,-वेषानें [illegible]

Guitär', *n*. (गिटा'र्)—a six-stringed lute played with the hand. ततुवाद्य, सतार, सारंगी, वीणा. *v. i.* गिटार वाजविणें. *-ist, n.* गिटारवादक,-वाजविणारा, सारंगीवाला.

Gŭlch, *n*. (गल्च्)—a ravine, esp. one with gold deposit. (भूमिगत सोनें असलेली) दरी, खोरें.

Gūles, *a. & n.* (ग्यूल्झ्)—(Herald.) red. तांबडा-(रंग).

Gŭlf, *n*. (गल्फ्)—a piece of sea like a bay; a deep hollow, chasm; an impassable dividing line, a wide interval; (*poet.*) profound depth, the sea; a whirlpool. आखात; मोठा चर, खळगा; महदन्तर; अगाध, खोली, समुद्र; भोंवरा, आखात.

Gŭll, *n. & v. t.* (गल्)—dupe, fool. फसवणें, मूर्ख बनवणें.

Gŭll, *n*. (गल्)—a web-footed sea-fowl. दर्यांतील एक जातीचा पक्षी.

Gŭll'ible, *a*. (ग'लि-बल्)—easily imposed on, easily gulled or cheated. सहज फसविला जाणारा, सहज फसणारा.*-bility, n.*; *Gull'ish, a.*

Gŭll'ĕt, *n*. (ग'लिट्)—food-passage from mouth to stomach; throat; a channel for water, a strait, a defile. अन्नाची नळी, अन्नमार्ग; घसा, गळा; पाण्याचा पाट, सामुद्रधुनी, खिंड.

Gŭll'ў, *n*. (ग'लि)—a water-worn ravine; a gutter, a drain; 2, a large knife. घळ, ओहोळ; गटार, नाला; मोठा सुरा. *v. t.* पन्हळ पाडणें. *G. hole*, गटाराचें तोंड. *G.-drain*, गटाराचा पाट (मुख्य गटाराला मिळणारा).

Gūlŏs'itў, *n*. (ग्युलॉ'सिटि)—excessive appetite. खादाड, पोटांतला राक्षस.

Gŭlp, *v. t. & i.* (गल्प्)—to swallow (down) hastily or with effort; to gasp, to choke. गटागट खाणें, गट्ट करणें; गुदमरणें. *n.* घोटासरसें पिणें, घोट, घांस.

Gŭm, *n*. (गम्)—firm flesh in which the teeth stand. दातांची हिरडी. *G. boil*, हिरडीचा फोड.

Gŭm, *n*. (गम्)—viscid secretion of some trees and shrubs that hardens in drying but is soluble in water, used as glue; a *gum-tree*, kinds of eucalyptus; (*pl.*) kinds of sweetmeat; (*pl., sl.*) rubber boots; morbid secretion of gum as disease of fruit-trees; secretion in eye. (झाडाचा) चीक, डिंक, गोंद; गोंदाचें झाड; खाऊच्या गोळ्या, वड्या; रबराचे बूट,-जोडे; फळझाडांचा एक रोग; डोळ्यांतील चिपडा, शेण्या. *v. t. & i.* to apply g. to; to fasten with g.; to exude g. गोंद लावणें; गोंद लावून चिकटविणें; डिंक-चीक-बाहेर टाकणें. *Up a g. tree*, in a fix. घोटाळ्यांत पडलेला, गोंधळलेला, भांबावलेला. *G. Arabic*, मस्ताई-अरबी-गोंद. *G. dragon*, tragacanth. एक प्रकारचा औषधी डिंक.

Gŭm, *n*. (गम्)—(vulg.) God. देव.

Gŭmm'ў, *a*. (ग'मि)—sticky; exuding gum; swollen. चिकट; गोंद-चीक-बाहेर टाकणारा; सुजलेला.

Gŭmp'tion, *n*. (ग'म्प्-शन्)—practical sense, enterprising spirit, go; (Painting) vehicle for colour. बुद्धि, अक्कल, धैर्य, हिय्या; रंग-साधन.

Gŭn, *n*. (गन्)—firearms; member of shooting party. (छऱ्यांची, काडतुसी) बंदूक, तोफ; शिकारी टोळीपैकीं एक. *Sure as a g.*, certainly. खात्रीनें, निःसंशय. *To stand, stick, to one's guns*, आपली जागा-मुद्दा-धरून राहणें. *Son of a g.*, क्षुद्र, हलकट, पाजी. *Great g.*, थोर शक्ति,-माणूस. *To blow great gg.*, तुफानी-वादळी-वारा सुटणें. *G. boat*, a small warship with heavy guns. तोफी युद्धनौका. *G.-cotton*, an explosive prepared by saturating cotton with nitric and sulphuric acids. नत्रिक व गंधक आम्लामध्यें भिजवून तयार केलेला विस्फोटक तूल,-कापूस. *G. fire*, firing of morning or evening g. to show time. सकाळ-संध्याकाळच्या वेळीं वेळ दर्शविण्यासाठीं सोडलेली तोफ. *G.-man*, an armed civilian; (U. S.) an armed robber. शस्त्रधारी-बंदूकवाला-निनलष्करी नागरिक,-दरोडेखोर. *G.-metal*,

तोफा ओतण्याचें कासें (धातु.) *G.-runner, -running*, परतंत्र देशांत चोरून-बेकायदेशीर-शस्त्रास्त्रें, बंदुका वगैरे आणणारा,-आणणें. *G.-shot*, range of a gun. गोळीचा टप्पा. *G.-smith*, बंदुका ओतणारा-तयार करणारा-लोहार *G.-stock*, (ज्याच्यावर बंदुकीची नळी बसविलेली असते तो) लांकडाचा दस्ता, कुंदा.-*gunned*, *gun'less*, *aa.*

Gunn'el, *n.* (ग'नल्)—a small sea-fish. समुद्रांतील एक लहान मासा.

Gunnel, *n* See Gunwale.

Gŭnn'er, *n.* (ग'नर्)—game-shooter; officer or man of artillery; (Naut.) warrant officer in charge of battery. शिकारी, पारधी; तोफखान्यावरील अधिकारी, गोलंदाज; जहाजावरील गोलंदाज खलाशी-अंमलदार. *G.'s daughter*, खलाश्यांना फटक्यांची शिक्षा देण्यासाठीं ज्या तोफेला बांधतात ती तोफ. *To kiss, marry, g.'s daughter*, फटक्यांची शिक्षा खाणें.

Gunn'era, *n.* (ग'नेरा)—the prickly rhubarb. मोठ्या शोभिवंत पानांचें कांटेरी झाड.

Gŭn'powder, *n.* (ग'न्-पॉवडर्)—explosive of saltpetre, sulphur and charcoal; fine green tea. बंदुकीची दारू, अग्निचूर्ण; खाळ चहाची पूड. *White g.*, आधुनिक स्फोटक द्रव्य.

Gŭnn'erў, *n.* (ग'नरि)—management of large guns. गोलंदाजी, तोफा करण्याची व उडवण्याची कला, तोफा उडविणें.

Gŭnn'ing, *n.* (ग'निंग्)—(*to go g.*,) shooting (of game). गोळी घालून शिकार मारणें.

Gŭnn'y, *n.* (ग'नि)—coarse sacking, sack, of jute fibre. गोणपाट, गोणी [Hind.]

Gŭn'ter, *n.* (ग'न्टर्)—(*G.'s scale*), flat 2-ft rule with scales etc. for solving mechanically problems in navigation etc. (नाविक व जमीन मोजणीचें गणित याच्या उपयोगाची) दोन फूट लांबीची गन्टरची गणित-पट्टी.

Gŭn'wale, Gunn'el, *n.* (ग'नल्)—upper edge of ship's side. वहाण,-णी, वाणी.

Grugitā'tion, *n.* (गर्जिटे'शन्)—surging, bubbling motion or sound. उसळणें, लाटा येणें, बुडबुडे, त्यांचा आवाज.

Gur'gle, *v. i. & t. & n.* (ग'र्गल्)—(make) bubbling sound. गुडगुड आवाज करणें.

Gŭsh, *n.* (गश्)—a sudden or copious stream; effusiveness. जोराचा प्रवाह; उमाळा, उफाळा. *v. i. & t.* to flow with a gush; to speak or behave with a gush. भडभड-जोरानें-बाहेर पडणें; भडाभड बोलणें, भडाभड व्यक्त करणें.-*er*, *n*; -*ingly*, *adv.*; -*y*, *a.*

Gŭss'ĕt, *n.* (ग'सिट्)—a triangle let into garment to strengthen or enlarge; strengthening iron bracket. कळी, बगल, चिडी; (मजबुतीसाठीं) लोखंडी आधार, कंस.

Gŭst, *n.* (गस्ट्)—a sudden violent rush of wind; burst (of rain, smoke, anger, &c.). झपाट्याचा किंवा सोसाट्याचा वारा; पाऊस वगैरेचा सोसाटा, झपाटा, सपाटा, झटका.-*y*, *a.*,-*ily*, *adv.*

Gŭst, *n.* (गस्ट्)—sense of taste, keen relish, flavour. जीभ, रुचि, चव.-*ation*, *n.*; -*atory*, *a.* चवदार, रुचकर.

Gŭs'tō, *n.* (ग'स्टो)—special flavour; zest, enjoyment. विशेष रुचि, चव; उत्साह; उपभोग.

Gŭt, *n.* (गट्)—a narrow passage of water; (*pl.*) bowels or entrails; intestine; belly as seat of appetite; material for violin strings (made from intestines of animals); material for fishing-lines (made from intestines of silkworm). प्रणाली, पाण्याचा अरुंद प्रवाह; आंतडें, आंतडीं; उदर, जठर, पोट; (प्राण्याच्या आंतड्यांची) तांत; रेशमी किड्याच्या कोथळ्यापासून काढलेलें दोऱ्या तयार करण्याचें साधन. *v. t.* to remove guts of; to remove, destroy, internal fittings of (house); to extract essence of book; eat greedily. (चीं) आंतडीं काढणें,-उपसणें; लुटणें, रिकामा करणें, खलास-साफ-करणें; (चें) सार-तात्पर्य-काढणें; अधाशीपणानें खाणें. *Has no guts in it*, is of no real value, or force. त्याचा काडीचाही उपयोग नाहीं, त्याच्यांत राम -जोर-नाहीं.

Gŭtta-perch'a, *n.* (गटा-प'र्चा)—horny flexible substance of juice of some Malayan trees. गटा-पर्चा रबर.

Gŭtt'er *n.* (ग'टर्)—a shallow trough below eaves, a channel in a street carrying off water; a channel, or groove. पन्हळ, गटार, मोरी, नाला; कोरण, खोबण, खांच. *v. t. & i.* to furrow, (of candle) to melt away. गटार-मोरी-काढणें,-बनविणें; (मेणबत्ती) जळून वितळणें. *G. child*, *G. snipe*, a street arab. भटकें उनाड पोर. *G. man*, रस्त्यांतून हलक्या व स्वस्त वस्तु विकणारा.

Gŭtt'ural, *a.* (ग टरल्)—of, produced in, throat. कंठ्य, कंठस्थ, कंठवर्गीय, कवर्गाचा. *n.* कंठस्वर, कवर्गीय अक्षर. -*ize*, *v. t.* कंठांतून आवाज काढणें. -*ism*, *n.*,—*lly*, *adv.*

Gŭtt'y, *n.* (ग'टि)—(Golf) gutta-percha ball. गटापर्चा रबराचा चेंडू.

Guy, *n.* (गाय्)—a rope, chain, to steady crain-load or secure a tent. यारीच्या ओझ्याला

समतोल ठेवणारी. तंबूला घट्ट बसविणारी सांखळी.-दोरी. *v. t.* सांखळीनें-दोऱ्यांनीं-घट्ट करणें.

Guy, *n.* (गाय्)—an effigy of Guy Fawkes burnt on 5th Nov.; a fright; a fellow, a boy; act of decamping. गाय् फॉक्सचा पुतळा; भयंकर-विद्रूप-पोषाख केलेला इसम; इसम, मुलगा; हातावर तुरी देणें, सूंबाल्या करणें. *v. t.* to ridicule. थट्टा करणें, टर उडविणें. *To give the g. to*, escape from. च्या हातावर तुरी देणें. *To do a g.*, नाहींसें होणें.

Gŭz'zle, *v. i. & t.* (ग'झल्)—to drink, eat, greedily. आधाशीपणानें पिणें, खाणे,

Gȳm, *n.* (जिम्)—(sl) gymnasium. तालीमखाना, व्यायामशाळा.

Gȳmkhä'nä, *n.* (जिम्-का'ना)—a place for display of athletic sports. व्यायामशाळा; व्यायामाचे खेळ.

Gȳmnā'sĭŭm, *n.* (जिम्-ने'-झि-अम्)—a room or place fitted up for gymnastics; German school of highest grade preparing for universities. तालीमखाना, व्यायामशाळा; उच्च दुय्यम शाळा.

Gȳm'năst, *n.* (जिं'म्-नॅस्ट्)—an expert in gymnastics. पहिलवान, मल्ल, तालीमबाज.

Gȳmnăs'tĭc, *a.* (जिम्नॅ'स्टिक)—of gymnastics. व्यायामविषयक. *n.* course or mode of bodily or mental discipline; (*pl.*) muscular exercises (esp. as done in gymnasium). व्यायामाचा कार्यक्रम,-ची पद्धति, (बौद्धिक) तालीम; (अने०) व्यायाम, मल्लविद्या.

Gȳnaecŏl'ogȳ, *n.* (जायनिकॉ'लाज, गा-)—science of women's diseases. स्त्रीरोगविज्ञान,-चिकित्सा.

Gȳp'sum, *n.* (जि'प्सम्)—mineral from which plaster of Paris is made. कुलनार, कर्पूरशिलाजित (धातु).

Gȳp'sȳ, *n.* (जि'प्सि)—gipsy; a deceitful woman. एका भटकणाऱ्या जातींतील मनुष्य; काळीकुट्ट स्त्री; कावेबाज स्त्री.

Gȳrāte', *v. i.* (जायरे'ट्)—to move in circle or spiral. वाटोळें-वर्तुलाकार-फिरणें. *-tion, n.*; *-tory, a.*

Gȳr'ō, *n.* (जा'यरो)—Gyroscope. भ्रमणदर्शक. *Gyrose', a.* (Bot.) चुणलेलें व सुरकुत्या पडलेलें.

Gȳve, *n.* (*usu. pl.*) *& v. t.* (जाइव्ह्)—fetter, shackle; to chain. शृंखला, बंधन; बंधन घालणें.

H

H, (एच्)-eighth letter of the English alphabet. इंग्रजी वर्णमालेंतील आठवा वर्ण.

Ha, *int.* (हा)—an interjection expressing joy, surprise, grief. हा! हाहा!

Hā'beăs cor'pŭs, *n.* (हे'बिअॅस्-कॉ'पस्)—a writ requiring a person to be brought before a judge. कैद्याला न्यायासनासमोर प्रत्यक्ष हजर करण्याची लेखी आज्ञा.

Hăb'erdăsher, *n.* (हॅ'बर्डॅशर्)—a dealer in small articles of dress etc. फीत, दोरा, गुंड्या वगैरे विकणारा फेरीवाला. *-y, n.* किरकोळ जिन्नस.

Hăb'ergeon, *n.* (हॅ'बर्जन्)—sleeveless coat of mail. बिनबाह्यांचें चिलखत.

Hăbil'ĭment, *n.* (*pl.*) (हॅबि'लिमन्ट्)—dress, clothes. पोषाख, कपडे, पेहेराव.

Hăb'ĭt, *n.* (हॅ'बिट्)—settled tendency or practice; constitution (of body or mind); (Bot, Zool.) mode of growth; dress. संवय, सराव, खोड, चटक; भावना, तब्येत; वाढण्याची रीत, -तऱ्हा; पोषाख, कपडे. *v. t.* to clothe. कपडे घालणें.

Hăb'ĭtable, *a.* (हॅ'बिटे-बल्)—that can be inhabited by human beings. राहाण्याला योग्य, वस्तीला योग्य, वासार्ह *-bil'ity, n.* वासार्हता.

Hăb'ĭtant, *n.* (हॅ'बिटन्ट्)—an inhabitant. रहिवासी; (ॲबीटॉ') (a descendant of) French settler in Canada. कॅनडांतील फ्रेंच वसाहतवाला, -त्याचा वंशज.

Hăb'ĭtăt, *n.* (हॅ'बिटॅट्)—the natural home of a plant or animal. मूलस्थान, उत्पत्तिस्थान; जन्मस्थान.

Hăbitā'tion, *n.* (हॅबि-टे'शन्)—inhabiting; a place of abode, dwelling, residence. राहाणें; वसतिस्थान, वसति, ठिकाण, गृह.

Hăbĭt'ūal, *a.* (हॅबि'टयुअल्)—customary; given to some habit. नेहमींचा; संवयीचा, संवयींतला, चालीचा. *-ally, adv.*; *-alness, n.*

Hăbĭt'ūāte, *v. t.* (हॅबि'टयुएट्)—to accustom, to make familiar by frequent use. संवय लावणें, अभ्यास असणें. *-tion, n.*

Hăb'ĭtūde, *n.* (हॅ'बिटयूड्)—a customary mode of action; habit of body or of action; tendency. संवय, सराव; परिचय, ढब, रीत; कल.

Habit'ué, *n.* (हॅबि'टयूए)—a habitual visitor or resident. नेहमींचा पाहुणा,-रहिवासी. [F]

Hachures, *n. pl.* (हॅच्युअर्स्)—lines used in hill-shading to indicate the slope. टेंकडीची उतरण दर्शविणाऱ्या (नकाशांतील) रेषा. [F]

Hăck, *n.* (हॅक्)—a hired horse; a horse for ordinary riding; a common drudge. भाडोत्री घोडा; बसण्याकरितां घेतलेला घोडा; घोडकें, तट्टू; भाडोत्री (लेखक इ.), भाड्याचा चाकर. *a.* hired,

भाडोत्री. *v. t. & i* निरयाचा,- सामान्य,- करणें; घोड्यावर बसणें; भाडोत्री घोडें करणें. [*abbr.* of Hackney]

Hăck, *n.* (हॅक्)—a mattock; a pick; a gash, a wound; a kick on the shins (in Foot-ball); a frame for drying bricks. खांप पाडण्याचें हत्यार; मोटें पिकांव; घांव, जखम; पायाच्या नळीवर मारलेली लाथ; (विटा वगैरे) सुकत घालण्याची जाळी, जाळीची चौकट. *v. t. & i.* to cut, to mangle; to kick shin of; to cough in a short broken manner. तोडणें, खापलणें, तोतरें बोलणें; पायाच्या नळीवर लाथ मारणें; ओढत ओढत,- दूचत दूचत,- खोकणें, हांसडा लागणें, ख्याक् ख्याक् खोकणें.

Hăck'erў, *n.* (हॅ'करि)—an Indian bullock-cart, a horse-carriage. बैलगाडी, खटारा, घोड्याची गाडी.

Hăc'kle, *n.* (हॅ'क्ल्)—a steel flax-comb; long feathers on the neck of a domestic cock etc.; a fishing-fly dressed with hackle. (ताग, कच्चें रेशीम वगैरे विंचरण्याची) फणी, पिंजणी; कोंबड्याच्या मानेवरील पिसें. शेंडी; (मासे पकडण्यासाठीं) पिसांची केलेली कृत्रिम माशी. *v. t.* to dress (flax etc. or fly) with hackle. विंचरून साफ करणें; (माशीला) पिसें लावणें. 2. to hack. खांपा पाडणें; कापणें, तोडणें. *With his hackles up*, (of a cock, dog, man) angry, ready to fight. क्रुद्ध रागानें लढायला फुरफुरलेला. *Hack'ly*, *a.* rough, jagged. ओबडधोबड, खडबडीत, दांताळ, दांते,-खांचा,-पाडलेला.

Hăck'ney, *n.* (हॅ'क्नि)—a horse for ordinary riding; a drudge. बसावयाचा घोडा, तट्टू; भाडोत्री, लेखणीचे कष्ट करणारा, भाडोत्री लेखक. *v. t.* to make common or trite. प्रचारांतील करणें. *Hack'neyed*, *a.* made common or trite. निरयाचा, शिळा, उष्टा.

Hăck'ney-coach, *n.* (हॅ'क्नि-कोच्)—a coach or vehicle kept for hire. भाड्याची गाडी. Also, *Hackney-carriage*, *n.*

Had, *pa. t. & pa. p.* of Have.

Hăd'dock, *n.* (हॅ'डाक्)—a fish allied to cod. कॉड सारखा एक मोठा मासा.

Hā'dēs, *n.* (हे'डीझ्)—abode of the dead. प्रेतलोक, यमलोक. [a name of Pluto]

Hădj'ĭ, Hăjj'ĭ, *n.* (हॅ'जि)—a Mohammedan pilgrim who has been to Mecca. मक्केची यात्रा केलेला मुसलमान (यात्रेकरू). [Arab.]

Haem'al, *a.* (ही'मल्)—of the blood; situated on same side of body as the heart and blood-vessels. रक्ताचा, रक्तासंबंधीं; शरीरांत रक्ताशय व हृदय यांच्या बाजूस असलेला. [Gk. *haima*, blood]

Haemăt'ic, *a.* (हीमॅ'टिक्)—of or containing blood. रक्ताचा, रक्त असलेला. *n.* रक्तावर परिणाम करणारें-रक्तवर्धक-औषध.

Haem'atite, Hĕm'–, *n.* (ही'मटाइट्, हे'–)—a red or brown iron ore. तांबूस किंवा पिंगट अशुद्ध लोखंड.

Haemoglō'bĭn, *n.* (हीमग्लो'बिन्)—the colouring matter of red corpuscles of blood. (रक्तामध्यें असणारें) रक्तरंजक द्रव्य.

Haemorrhage, Hem–, *n.* (हे'मोरिज्)—the escape of blood from blood-vessels. रक्तस्राव.

Haemorrhoids, Hem–, *n. pl.* (हे'मोराइड्झ्)—piles. अर्श, मूळव्याध.

Hăf'nĭum, *n.* (हॅ'फ्निअम्)—a rare metal discovered in 1923. एक दुर्मीळ धातु.

Hăft, *n.* (हाफ्ट्)—handle of knife &c. सुरी वगैरेची मूठ. *v. t.* सुरीला मूठ घालणें,-बसाविणें.

Hăg, *n* (हॅग्)—an ugly old woman. कुरूप वृद्ध स्त्री, हिडिंबा, जखीण. *H.-ridden*, *a.* afflicted by a nightmare. जाखिणीनें पछाडलेला, झोपेंत भिणारा,- दचकणारा.

Hăg, *n.* (हॅग्)—a quagmire. दलदल, पाणथळ.

Hăgg'ard, *a.* (हॅ'गर्ड्)—wild-looking; (of hawk) untamed. निस्तेज, खप्पड; जंगली,- रानटी (ससाणा). *n.* रानटी ससाणा. *-ness*, *n.*

Hăgg'ĭs, *n.* (हॅ'गिस्)—heart, lungs and liver of sheep boiled in maw. मेंढराचें काळीज.

Hăg'gle, *v. i. & n.* (हॅ'गल्)—dispute (esp. *about*, *over*, price or terms). खिटखिट, घासाघीस (चालणें किंवा करणें).

Hagio–, *pref.* (हॅगिओ–)—*in comb*, saint, -ly. संत, संतांचें (या अर्थी). *Ha'giarchy*, (हॅ'गिआर्कि) the rule, order, of saints. संन्यासिसत्ताक-राज्य. *Hagioc'racy*, *n.* उपाध्यायसत्ताक राज्यपद्धति, संतांचें राज्य. *Hagiog'rapha*, *n. pl.* Hebrew Scriptures not included under Law and Prophets. यहुदी धर्मशास्त्रें, संतचरित्रें. *Hagiol'ogy*, *n.* संतचरित्रमाला.

Ha'-ha, *n.* (हा'हा)—sunk fence bounding garden etc. जमिनींत खोल पुरलेलें कुंपण. 2. **Ha ha!** int. showing laughter. हा हा! (हास्यदर्शक).

Hail, *n* (हेल्)—frozen vapour falling down in pellets (*hail-stones*); a shower of missiles, curses etc. गार, गारा, करका; वर्षाव. *v. i. & t.* to pour down hail; (*fig.*) to pour down, to come down like hail; to salute; to greet as; to call to; to be come *from*.

गारांचा पाऊस पडणें; गारांसारखें खालीं पडणें; वर्षाव होणें,- करणें; नमस्कार करणें; स्वागत करणें; हटकणें, हांक मारणें; अमुक एक ठिकाणाहून येणें, -सुटणें, ठिकाणचा असणें. *int.* an expression of greeting. स्वस्ति! कल्याण असो! सुस्वागतम्! नमस्कार! *n.* a salutation. नमस्कार, रामराम, सलामी. *H. storm*, गारांचें वादळ. *It hails*, गारा पडतात. *H. fellow, h. fellow well met*, intimate, too intimate *with*. दोस्त, मित्र, दाट मैत्री असलेला. *Within h.*, नमस्कार करण्या-इतका- हांक मारण्याइतका- जवळ. *Hail'y, a.*

Hair, *n.* (हेअर्)—any or all of the fine filaments growing from the skin; (of plants) an outgrowth of the epidermis, consisting of one or several elongated cells; a hair-like thing; a jot. केश, केंस, लोंकर, लोम, बाल; केंस, लव, लोम; केंसासारखी बारीक वस्तु; लेश, कण. *Against the h.*, against the grain. स्वभावाविरुद्ध, प्रतिलोम रीतीनें. *To a h.*, exactly. तंतोतंत. *To keep one's h. on*, keep cool. शांत राहणें. *Not turn a h.*, न थकतां, शांत रीतीनें *H. stands on end*, भीतीनें रोमांच उभा राहतो. *H. breadth*, minute distance. केंसभर अंतर. *H. breadth escape*, very narrow. जेमतेम-कसेंतरी ऐन वेळीं निभावणें, धोक्यांत वांचणें. *H. brush*, केशमार्जनी. *H. dresser*, केंस कापणारा न्हावी, केशरचनाकार न्हावी. *H. net,-oil,-pin*, केंसांसाठीं जाळी,-तेल,-आंकडा. *H. splitting, a. & n.* over-subtle (ty). (रिकामा) काथ्याकूट (करणें.) *Hair'y, a.* केशमय, लोममय, केसांचा, खरबरीत. *H.-like, a.; Hairiness, n. -haired, h.- less, aa.*

Hăke, *n.* (हेक्)—a fish like the cod. कॉडसारखा मासा. 2 a wooden frame-work. लांकडी चौकट; also, *Haik.*

Hăl'berd, *n.* (हॅल्बर्ड्)—(*hist.*) combined spear and battle-axe. भाला आणि परशु एकांतच असलेलें शस्त्र, भाले-कुऱ्हाड.- *ier', n.* भाला-परशुधारी मनुष्य. Also, Hal'bert.

Hăl'cyŏn, *a.* (हॅल्-सिऑन्)—a bird fabled to calm the sea; the king-fisher. एक जातीचा पक्षी. *a.* peaceful, quiet. शांत, निर्वात. *H. days*, शांततेचा काळ,-चे दिवस.

Hāle, *a.* (हेल्)—robust, vigorous. धट्टाकट्टा, बळकट, जोमदार.- *ness, n. 2. v. t.* to drag, draw, forcibly. जोरानें-जोमानें-ओढणें.

Hälf, *n.* (हाफ्)—(*pl. halves*), either of two (esp. equal) parts into which a thing is divided; (colloq.) h.-pint,-mile,-back, -holiday; a school-term. *अर्धा भाग, अर्धांश,* निम्मे, अर्धेल; अर्धे पाइंट माप,-मैल इ.; शाळेची सहामाही. *a.* amounting to half. अर्ध, अर्धा, निम्मा, निम्माशिम्मा. *adv.* in part, equally. हिश्शानें, सारखा सारखा, निम्म्यानें. *Better h.*, wife. अर्धांगी, पत्नी. *To do a thing by hh.*, imperfectly. अपुरें काम करणें. *To go hh.* (*with* a person *in* a thing), सारखा-निम्माहिस्सा-भाग-मिळणें. *To cry hh.*, बरोबरीनें भागहिस्सा-मिळण्याची मागणी करणें. *Is h. the battle*, कार्यसिद्धीकडे बरीच आघाडी मारली आहे, निम्मेअधीक काम झालें आहे. *H. as much again, H. as many again*, दीडपट. *H. back*, (Football) (फुटबॉलच्या खेळांत) आघाडीच्या खेळाडूंच्या लगत मागचा खेळाडू, -त्याची जागा. *H.—baked*, (fig.) half-witted, incomplete. अर्धवट, कच्चें मडकें असलेला, अपुरा. *H. blood, H. breed*, सापत्न,-भिन्नपैतृक-संबंध, *H.blooded*, वर्णसंकरजन्य, भ्रष्ट, पतित. *H. brother,-sister*, सावत्र भाऊ,-बहीण. *H. caste* युरोपिअन व हिंदु किंवा मुसलमान अशा आईबापांचें मूल, वर्णसंकरजन्य मूल. *H. crown*, २½ शिलिंगाचें नाणें. *H. mast high*, दुःख-शोक-दर्शक डोलकाठीच्या थोडें खालीं उतरलेलें (निशाण). *H. volley*, (क्रिकेटमध्यें) पुन्हां उशी घेतल्यावर सहज मारतां येण्याजोगा टाकलेला चेंडू.

Hälf-heart'ed, *a.* (हाफ्-हा'र्टेड्)—far from enthusiastic, lacking courage or zeal. उत्साहरहित, धैर्यरहित.

Halfpenny, *n.* (हे'पनि)—a bronze coin worth *half of a penny. ब्रांझ धातूचें अर्धपेनी नाणें.* *To turn up again like a bad h.*, चिकाटीनें न चुकतां करणें. *H. worth*, (हेपंथ्, हॅपॉर्थ्) दीड दमडीचें, अर्धपेनी किंमतीचें.

Hăl'ibut, Hŏl'-, *n.* (हॅलिबट्, हॉ'-)—a large flat fish used for food. एक मोठा चपटा मासा.

Halieut'ic, *a. & n.* (हॅल्यू'टिक्)—(*n. pl.*, art) of fishing. मासे मारण्याची कला.

Hall, *n.* (हॉल्)—a large room for public business, a large public room; entrance-passage of a house; residence of a landed proprietor; building of a guild; college dining-room. दिवाणखाना, सार्वजनिक सभागृह; घराच्या प्रवेशद्वाराजवळची खोली; जमीनदाराचें राहण्याचें घर; व्यापारीसंघाची इमारत, अड्डा; कॉलेजमधील जेवणाचा दिवाणखाना. *H. mark, n.* कसाचा-प्रतीचा-शिक्का, (*fig.*) शिक्कामोर्तब, छाप, पसंती; *v. t.* छाप मारणें.

Hallelujah, *n.* (हॅलेलू'या)—song of praise. ईश्वराची स्तुति करा अशा अर्थाचें गायन, 'हालेलूया'.

Hăll'iard, *n.* (हॅ'लिअर्ड्)—tackle for raising and lowering sail etc. *शिडें वर-खालीं करण्याची* दोरी,-दोरखंडें, कांड.

Hallo′, Hallca′, *int.* (हॅलो′)—calling attention or expressing surprise. ए ! हो ! (हांक मारण्याकरण्याकरितां, आश्चर्यदर्शक). *n. & v. i.* ए ! हो ! (हांक मारणें, उद्गार काढणें).

Halloo′ *v. i. & t.* (हॅलू′)—to cry 'halloo' esp. to dogs ; to urge on (dogs) with shouts ; to shout to attract attention. (कुत्र्यांना) हांक मारणें ; हांकाटी करून (कुत्र्यांना) उत्तेजन देणें, पिटाळणें ; लक्ष वेधण्याकरितां मोठ्यानें हांक मारणें. *Do not h. until you are out of the wood,* (Prov.) संकटांतून पुरी सुटका होण्यापूर्वीच सुरक्षित आहों असें समजूं नका.

Hăll′ow, *v. t. & i.* (हॅ′लो)—to chase with shouts ; to incite with shouts ; to shout to incite dogs etc. आरोळ्या मारून पाठलाग करणें ; आरोळ्या मारून उत्तेजन देणें ; कुत्र्यांना चेतविणें.

Hăll′ow, *v. t.* (हॅ′लो)—to make or honour as holy, to consecrate, to sanctify. पवित्र करणें, पवित्र मानणें. *n.* a saint साधु, सत्पुरुष.—*mas,* All Saints Day. नोव्हेंबरचा पहिला दिवस.

Hăllucĭnā′tion, *n.* (हॅलू-सि-ने′शन्)—an illusion; the apparent perception of an object not present; a mistake. भूल, मोह, भ्रम; अदृश्य वस्तूचा भास, दृग्भ्रम, इंद्रजाल ; चुकीची समजूत. *-tory, a.*

Hā′lō, *n.* (हे′लो)—a circle (round the sun, the moon, &c.); disk of light round head of saint; (fig.) ideal glory. सूर्याच्या किंवा चंद्राच्या भोंवतालचें वलय, कडें, खळें, परिवेष; तेजोवलय; श्रेष्ठ तेज. *v. t.* भोंवतीं वेष्टण करणें.

Halt, *n.* (हॉल्ट्)—temporary stoppage on march or journey. मुक्काम, तळ, डेरा, विराम. *v. t. & i.* to come or bring to a stand. थांबणें, थांबविणें, तळ देणें, मुक्काम करावयास-थांबावयास-लावणें.

Halt, *a.* (हॉल्ट्)—lame; crippled. लंगडा; पंगू-दुबळा-झालेला. *v. i.* to walk hesitatingly; to hesitate; to limp; (of argument, verse etc.) be defective. चोंटाळल्यासारखें चालणें ; संशयांत पडणें, विचारांत पडणें; लंगडणें; सदोष असणें, तालांत-तालशुद्ध-नसणें.—*ingly, adv.* अडखळत, लंगडत-लंगडत.

Hal′ter, *n.* (हॉ′ल्टर्)—a rope or strap with a noose for horses or cattle; a rope for hanging a person ; death by hanging. (घोड्याची वगैरे) काढणी, चागदोर; फांशीं देण्याची दोरी, गळफास; फांसावर चढणें,-मरण. *v. t.* to fasten (*up*) with a halter; to hang (a person) with a halter. काढणीनें बांधणें, काढणी गळ्यांत घालणें; फांशीं देणें. *To h.-break, v. t.* (घोड्याला) काढणीची—चागदोराची-संवय लावणें.

Hälve, *v. t.* (हाव्ह्)—to divide into halves; to reduce to a half; to share equally; to fit (crossing timbers) together by cutting out half thickness of each at the joining place. दोन अगदीं सारखे भाग करणें; निम्मे करणें; सारखा सारखा वांटा घेणें; प्रत्येकाच्या जाडीचा जोडण्याच्या जागीं अर्धा अर्धा भाग कापून दोन लांकडें जोडणें, त्यांचा सांधा जमविणें. *By halves* (*n. pl.*), अंशतः, अर्धवट. (Golf) *To halve a hole with,* (दुसऱ्या-प्रतिस्पर्धी) खेळाडूच्या इतक्याच टोल्यांत चेंडू भोंकांत-घरांत-घालणें,-एक डाव करणें.

Hălyard, *n.* (हॅल्यर्ड्)—See Halliard.

Hăm, *n.* (हॅम्)—the back of thigh, thigh and buttock; thigh of hog salted and smoked. मांडीचा मागचा भाग, मांडी व ढुंगण; खारवून वाळविलेली डुकराची मांडी,-लवण.

Hăm, *n.* (हॅम्)—(hist.) a town, a village. नगर, खेडेगांव.

Hămădrȳ′ăd, *n.* (हॅमॅड्रा′यॅड्)—(Gk Myth.) a wood nymph; a venomous Indian serpent; a baboon. (ग्रीक) वनदेवता; विषारी साप; मोठा वानर.

Hames, *n. pl.* (हेम्झ्)—two curved pieces of wood or metal in the harness of a draught horse. (गाडीच्या घोड्याच्या गळेबंदाला असलेल्या) कड्या, पट्टेकड्या.

Hăm′lĕt, *n.* (हॅ′म्-लिट्)—a small village. लहान खेडें, वाडी.

Hămm′er, *n.* (हॅ′मर्)—an instrument for driving nails &c. हातोडा, हातोडी. *v. t. & i.* to strike or drive with or as with a hammer; (colloq.) to inflict heavy defeats in war or games ; (St. Exch.) to declare defaulter. हातोड्यानें ठोकणें,-ठोकून आकृति देणें ; सपाटून पराभव करणें,-मार देणें ; (हातोड्याचे तीन ठोके मारून एखाद्याला) नादार-दिवाळखोर-ठरविणें. *To come under the h.,* to be sold by auction, (चें) लिलांव करणें, लिलांवानें विकणें. *Knight of the h.,* a black-smith. लोहार. *H. & tongs,* with might and main. मोठ्या बळानें, सर्व शक्ति एकवटून. *H. cloth,* cloth covering a coach-box. गाडी हांकणाऱ्याच्या बैठकीच्या पेटीवरील कपडा. *H.-head,* हातोड्याचें डोकें ; एक प्रकारचा शार्क मासा, आफ्रिकेंतील पक्षी. *H.-man,-smith,* घणकरी, घणानें-हातोड्यानें-काम करणारा *To h. out,* devise. योजणें, ठरविणें. *H.-less, a.*

Hămm′ock, *n.* (हॅ′मॅक्)—a bed (of canvas, &c.) hung by cords at ends. कितानासारख्या

जाड कापडाचा) खलाशाचा झोळीसारखा बिछाना, झुला.

Hăm'per, *v. t.* (हॅम्पर्)—to obstruct movement of; (fig.) to impede, to hinder. मार्गगति खुंटवणें, अटकावणें, अडथळा करणें, घोटाळा करणें, विरोध करणें. *n.* (naut.) necessary but cumbrous part of equipment of a vessel. 2. basket-work packing-case; hamper of food. गलबतावरील आवश्यक परंतु अडगळ करणाऱ्या वस्तु; टोपली, पेटारा, हारा; अन्नाचा हारा.

Hăm'shăckle, *v. t.* (हॅम्-शॅकल्)—to shackle (horse etc.) with a rope connecting head and foreleg. (घोड्याचा) पुढचा पाय व डोकें दोरानें बांधणें.

Hăm'ster, *n.* (हॅम्स्टर्)—a rodent like a large rat. मोठ्या घुशीसारखा कुरतडणारा प्राणी.

Hăm'strĭng, *n.* (हॅमस्ट्रिंग)—the string or tendon of the thigh. (गुडघ्याच्या मागची) घोंडशीर, कुच्या. *v. t.* घोंडशीर तोडून लंगडा-पंगू करणें.

Hănd, *n.* (हॅन्ड्)—an extremity of human arm comprising palm and fingers; a forefoot of a quadruped; a manual worker (in a factory, &c.); style of writing; the cards held by one person in play; index, pointer of a clock &c.; measure of horse's height, 4 inches; authority, disposal. हात, हस्त, कर, पंजा; कामकरी, मजूर; अक्षर, अक्षराचें वळण; पत्त्याचा हात, डाव; (घड्याळाचा) कांटा; चार इंच उंचीचें माप, चौंगा; सत्ता, अधिकार, शक्ति, हात. *v. t.* to hold out hand to, to give or transmit with the hand. हात पुढें करणें, हात देणें; हातानें उचलून देणें. *To give one's h. to,* लग्नाचें वचन देणें. *A legible h.,* सुवाच्य हस्ताक्षर, अक्षर. *As witness the h. of,* साक्षीदार म्हणून ची सही. *At h.,* close by, about to happen soon. जवळच, समीप, लवकरच घडून येण्याजोगें. *By h.,* हातीं, हातानें, अंगमेहनतीनें. *To bring up by h.,* बाहेरच्या-बाटलीच्या दुधावर (मुलाला) पोसणें. *For one's own h.,* on one's own account. स्वतःच, आपणहून. *(To live) from h. to mouth,* कशीबशी हातातोंडाची गांठ घालणें, जेमतेम पोट भरणें. *In h.,* हातांतलें, हातचें, स्वाधीनचें, हातीं घेतलेलें (काम इ.). *Off-h.,* without preparation. तयारी न करतां, ऐनवेळचें, हातोहातीं. *On h.,* स्वतःच्या ताब्यांत, स्वाधीन. *On one's hh.,* स्वतःवर जबाबदारी म्हणून पडलेलें,-असलेलें. *On all hh.,* to, from, all quarters. सर्व बाजूंना, सर्वत्र, चोहींकडून. *On the one h., on the other h.,* ह्या पक्षीं, त्या पक्षीं. *Out of h.,* at once. एकदम, स्वयंस्फूर्त, आयत्या वेळचें, आटोक्याबाहेर गेलेलें, ताबा सुटलेलें. *To h.,* आटोक्यांतलें, मिळालेलें. *To one's h.,* (श्रम न करतां) अगदीं हातांतलें, हातचें. *To bear a h.,* to take part *in.* (च्यांत) भाग घेणें, हात असणें. *To come to h.,* प्राप्त होणें, मिळणें, हातीं येणें. *To do a h.'s turn,* अगदीं अत्यल्प श्रम करणें, इकडची काडी तिकडे करणें. *To lay hh. on,* स्पर्श करणें, धरणें *To take in h.,* to undertake. हातीं घेणें. *To change hh.,* (मिळकत) एकाच्या हातून (ताब्यांतून) दुसऱ्याच्या हातीं जाणें, मालकी बदलणें. *Clean hh.,* innocence. निरपराधीपणा. *With a heavy h.,* oppressively. कडक रीतीनें, करडेपणानें. *With a high h.,* boldly, arrogantly. धिटाईनें, उद्धटपणानें. *To have, to keep, one's h. in,* चा सराव-संवय-असणें. *His h. is out,* संवय-सराव-सुटला आहे. *(To win) hh. down,* easily. सहजासहजीं-लीलेनें-जिंकणें. *Hh. off,* चल ! दूर रहा ! स्पर्श करूं नको ! हात लावूं नको ! *Hh. up !* (शरण ये याअर्थी) ' हात वर कर ' (इषारा). *H. in h.,* हातांत हात घालून. *To go h. in h. with,* शीं हातांत हात घालून चालणें, अगदीं जुळून-बरोबरीनें-संगतीनें असणें. *H over h.* or *fist,* (दोरीवर चढतांना) हातावर हात टेकीत; दोन्हीं हात टेकीत; झपाट्यानें, भराभर. *H. to h.* (fight), हातघाई (ची लढत). *To bind (one) h. and foot,* मुसक्या बांधणें, हातपाय जाम बांधून-जखडून-टाकणें. *H. bag,* हातपिशवी. *H cart,* हातगाडी. *H. made,* हातीं बनविलेलें. (यंत्रानें नव्हे). *H.-maid (en),* दासी, स्त्री, नोकर, परिचारिका. *H.-rail,* जिन्यावरील हात टेंकण्याचा कठडा. *H. shake,* हस्तांदोलन.*-handed, h -less, aa.*

Hănd'bill, *n.* (हॅन्ड्-बिल्)—a notice or loose printed sheet circulated by hand. हस्तपत्रक, हस्तपत्रिका.

Hănd'book, *n.* (हॅन्ड्-बुक्)—a short treatise, a guide-book for travellers, a manual. लहान पुस्तक.

Hănd'cŭff, *n.* (हॅन्ड्-कफ्)—(*pl.*) pair or metal rings joined by a short chain. हातबेडी, हातविडी. *v. t.* to secure with handcuffs. हातबेडी घालणें.

Hand'ful, *n.* (हॅन्ड्-फुल्)—enough to fill the hand; a small number or quantity; a troublesome person or task. मूठभर; फार थोडे; त्रासदायक मनुष्य, खिचकट काम.

Hand'gallop, *n.* (हॅन्ड्गॅलप्)—an easy gallop. माधी सोपी दुडकी चाल, साधी चौकचाल.

Hand'glass, *n.* (हॅन्ड्ग्लास्)—a small mirror with a handle. मुठवाला आरसा, आरशी.

Hăn'dĭcăp, *v. t.* (हॅन्डि-कॅप्)—to place (a person) at a disadvantage. अडथळा घालणें,

अडचणींत घालणें. *n.* a race or contest in which competitors are equalized by start, difference of weight etc.; a hindrance. सारखी संधि-सवलत-सर्व खेळाडूंना मिळण्याची योजना असलेली शर्यत. तीसाठीं अडथळा, प्रतिबंध. *-capper*, *n.*

Hăn'dĭcrăft, *n.* (हॅ'न्डि-क्राफ्ट्)—work performed by the hand, manual art, trade or skill. कला, हातकाम, हुन्नर, हस्तकौशल्य.*-sman*, *n.* हुन्नरवाला, शिल्पी.

Hăn'dĭwork, *n.* (हॅ'न्डिवर्क्)—work or thing done or made by the hands or by any one's personal agency. हस्तकौशल्याचें-हातींचें-काम, वस्तु, (स्वतःची) कारागिरी.

Hănd'kerchief, *n.* (हॅ'ङ्कर्-चिफ्)—a square (of linen, silk, &c.) used to wipe the face or cover the neck. हातरुमाल. *Pocket h.*, खिशांतील हातरुमाल. *Neck h.*, *neckerchief*, गळ्याभोंवतालीं गुंडाळण्याचा रुमाल. *To throw the h. to*, एकाद्यावर मेहेरनजर-कृपा-करणें. (खेळांत) पाठलाग करण्याची (हातरुमाल फेंकून) सूचना देणें.

Hăn'dle, *n.* (हॅन्डल्)—part of a thing by which it is held; a fact that may be taken advantage of. मूठ, दांडा, कान; साधन, करण. *v. t.* to touch or feel with the hands; to manage, to deal with; to treat; to treat in discourse; to deal in (goods). हात लावून पाहणें, हातांत धरणें; व्यवस्था करणें, वापरणें, वहिवाटणें; वागविणें; (विषयावर) ऊहापोह करणें, लिहिणें, प्रतिपादन करणें; व्यवहार-व्यापार-करणें. *H. of the face*, the nose. नाक. *A h. to one's name*, title. पदवी.

Hăn'dley-pāge, *n.* (हॅ'न्ड्लेपेज्)—a type of large aeroplane. मोठें विमान. [maker]

Hănd'sel, *n.* (हॅ'न्सल्)—New-Year gift; earnest money; a foretaste. नूतन वर्षाचें बक्षीस, देणगी; बयाणा, सचकार; पूर्वानुभव, चुणूक. *v. t.* to give *h.* to; to be the first to try. देणगी,-बयाणा,-देणें; मुहूर्त करणें.

Hănd'some, *a.* (हॅ'न्सम्)—of fine appearance, well-formed, shapely; generous; (of price etc.) considerable. सुंदर, देखणा; उदार; बराच; पुष्कळ. *H. is that h. does*, ज्याची कृति चांगली तो चांगला (सुंदर). *H.-ly*, *adv.*; *H.-ness*, *n.*

Hănd'writing, *n.* (हॅ'न्ड्-राइटिंग्)—way a person writes, the peculiar way of writing. हस्ताक्षर.

Hăn'dy̆, *a.* (हॅ'ंडि)—ready to the hand; convenient for use; clever with the hands. हाताशीं, हाताजवळ, हुकमी; आटोपसर, सोईस्कर; हाताचा कुशल, क्रियाकुशल. *H.-dandy*, a child's game. (मिटलेल्या मुठींत काय आहे तें ओळखण्याचा) मुलांचा खेळ, 'जिंक जिंक पोरा कोणत्या हातीं खडा' हा खेळ. *H.-man*, हरकामी (खलाशी). *Hand'ily*, *adv.*; *-iness*, *n.*

Hăng, *v. t.* & *i.* (हॅंग्)—to cause a thing to be supported (by hooks, &c.) from above; to attach (wall-paper); to decorate (wall); to droop; to hover; to rest upon; (*pa. t.* & *pa. p.* *hanged*) to suspend on gibbet as capital punishment. टांगणें, लोंबकळत ठेवणें, खालीं सोडणें; (भिंतीला) कागद चिटकविणें; (चित्रें इ० टांगून भिंत) सुशोभित करणें; वांकणें, लोंबत राहणें; (वर) घिरट्या घालणें; वर आधारणें, अवलंबून असणें; फांसावर चढविणें,-लटकावणें, फांशीं जाणें. *n.* a downward droop or bend; the way a thing hangs. लटकणी, लोंबकळ; लोंबकळण्याची तऱ्हा. *H. I*, *H. it*, *H. you I* etc. जळो! मरो! मर! (या अर्थी). *To h. the head*, (लाजेनें-शरमेनें) मान खालीं घालणें. *To h. in the balance*, अनिश्चित असणें, अर्धवट स्थितींत असणें. *To h. about*, to loiter. रिकामटेकडें भटकणें, रमणें, गमणें. *To h. fire*, be slow in going off. (पिस्तूल-बंदूक इ०) लवकर न झडणें,-न झाडली जाणें. (fig.) साव-काशीनें होणें, रखडत पडणें. *To h. heavy*, (of time) (वेळ) जातां न जाणें, कंटाळवाणा होणें. *To h. on*, वर अवलंबून असणें, कडे नीट लक्ष देणें. *To h. back*, कचरणें, घोंटाळणें, माघार घेणें. *To h. behind*, पाठीं राहणें, मागें पडणें. *To h. out*, खालीं लोंबकळणें, खालीं येणें,-डोकावणें, (*sl.*) राहणें. *To h. together*, (ला) ताळ-मेळ-बसणें, जुळतें असणें, संबद्ध असणें. *To h. up*, to suspend, (fig.) to put aside, postpone, indefinitely. टांगणें, लटकत ठेवणें, लटकावणें, बाजूला टाकणें, पुढें ढकलणें (अनियमित काळपर्यंत). *H.-dog*, *a.* & *n.* base and sneaking (fellow). हलकट, पाजी, नीच (मनुष्य). *H.-man*, an executioner. फांशी देणारा मनुष्य, मांग, चांडाळ. *To get the h. of*, ची ढब साधणें, समजणें, कळणें. *Not a h.*, (colloq.) not at all. मुळींच नाहीं.

Hăng'ar, *n.* (हॅंङ्गर्)—a shed for housing aeroplane etc. विमानें ठेवण्याची जागा, विमानतळ. [F]

Hăng'er, *n.* (हॅंगर्)—a person or thing that hangs; that by which a thing hangs; a short sword. फांशी देणारा, टांगणारा, टांगलेली वस्तु; ज्याला वस्तु टांगतात तें (खुंटी, कमरेचा पट्टा, इ.); आंखूड तलवार, खांडें. *H.-on*, a follower, a dependant. अनुयायी, आश्रित.

Hăng'ing, *pr. pa.* & *n.* (हॅं'गिंग्)—(in vbl. senses.) लोंबकळणें, लटकणें. (*-s; n. pl.*) drapery for walls etc. (भिंतीवरील) झालर, पडदे. *H. committee*, प्रदर्शनांत मांडण्याच्या चित्रांची निवड करणारें मंडळ,-मंडळी. *H. garden*, उंचवट्यावरची-झुलती-कृत्रिम बाग. *A h. matter*, शेवटीं फांशीची शिक्षा होण्याजोगी गोष्ट,-खटला.

Hăng'nail, *n.* (हॅं'ग्नेल्)—agnail. (नखाचा) नर.

Hănk, *n.* (हॅंक्)—a parcel or skein of cotton thread (840 yds.), worsted (560 yds.); (Naut.) a ring of rope or iron for fixing stay-sails to stays; hold, influence. सुताची (८४० वार लांब) गुंडी, लोंकरीची (५६० वार लांब) गुंडी,-गुंडा; शिडाच्या टोंकाच्या दोरीचें नाक; वजन, जरब, धाक.

Hăn'ker, *v. i.* (हॅं'कर्)—to crave *after*. अत्यंत उत्कंठा असणें, तहान लागणें.*-ing, n.*

Hănk'ÿ-pănk'ÿ, *n.* (हॅं'कि-पॅं'कि)—trickery. फसवेगिरी, हातचलाखी.

Hăp, *n.* (हॅप्)—a chance; luck; chance occurrence. योगायोग, दैवयोग; नशीब; अवाचित घडून येणें. *v. i.* to happen. घडणें, घडून येणें.

Hăphă'zard, *n.* (हॅप्-हॅं'झर्ड्)—mere chance, accident (*at, by, h.*). दैवगति. *a.* casual. सहजासहजीं होणारा. *adv.* casually. सहजगत्या.

Hăp'less, *a.* (हॅं'प्-लिस्)—unlucky, unfortunate. दुर्दैवी, हतभागी, भाग्यहीन.*-ly, adv.*

Hăp'lÿ, *adv.* (हॅं'प्लि)—perhaps; by chance. कदाचित्; प्रसंगवशात्.

Hăpp'en, *v. i.* (हॅं'पन्)—to come to pass, to take place, to fall out, to occur; to come *upon* by chance. घडून येणें, घडणें; आढळणें, सहजगत्या नजरेस पडणें.*-ing, n.* घडून येणें, घडलेली गोष्ट.

Hăpp'ÿ, *a.* (हॅं'पि)—lucky, fortunate; content; glad; felicitous; apt. दैववान्; समाधानी; आनंदी; सुखी; योग्य, समर्थ, क्षम. *H. family*, (पूर्वापार हाडवैर असलेले परंतु एकाच पिंजऱ्यांत कोंडून ठेवल्यावर) स्नेहभावानें एकत्र नांदणारे प्राणी, नांवाची दोस्ती. *H.-go-lucky, a.* haphazard. ढकलपंचीचा, चालढकलीचा, दैवाधीन. *Hap'pily, adv.* सुदैवानें, सुखांत, आनंदानें, खुषीनें. *Hap'piness, n.* सुदैव, उत्कर्ष, सौख्य, स्वाभाविक लावण्य-गोडी,-सौंदर्य.

Hära-kĭ'rĭ, *n.* (हाराकिं'रि)—suicide by disembowelment, happy dispatch. जपानी वरच्या वर्गांतील व्यक्तींनीं पोट फाडून घेऊन केलेली आत्महत्या, सुखाचें मरण. [Jap. *hara*, belly; *kiri*, cut]

Harăngue', *n.* (हरॅं'ङ्ग)—speech to assembly; vehement address. समाजाला उद्देशून केलेलें भाषण; जोरदार भाषण, बडबड, टकळी. *v. i. & t.* (आवेशयुक्त) भाषण करणें, (पुढें) भाषण-बडबड-करणें.

Hă'rass, *v. t.* (हॅं'रॅस्)—to worry, to trouble; to attack repeatedly. त्रास देणें, सतावणें; नको नकोसें करणें, जेरीस आणणें.*-ment, n.* छळणें, छळ, गांजणूक.

Härb'inger, *n.* (हा'र्बि-जर्)—one who announces another's approach; forerunner, precursor. आगमनाची सूचना देणारा, पुढें पाठविलेला मनुष्य, अग्रदूत, अग्रेसर; आगमसूचक, पूर्वसूचना देणारा. *v. t* to announce the approach of. (ची) आगम-सूचना देणें.

Härb'our, *n.* (हा'र्बर्)—a place of shelter for ships; shelter. बंदर, नांगरवाडा; आश्रय, थारा. *v. i. & t.* to come to anchor in harbour; to give shelter to; entertain or cherish in the mind. (गलबतानें) बंदर करणें, नांगर टाकणें; आश्रय देणें; थारा देणें, मनांत बाळगणें.*-age, n.* (a place of) shelter. आश्रयस्थान, आसरा.

Härd, *a.* (हार्ड्)—firm, solid; stern, unyielding, cruel; difficult to bear or do; inclement, severe; strenuous; (of liquor)- strong; stingy; (of prices) high; (phonetics) (said of certain consonants, as c in cut). कठीण, भरींव; कडक, निष्ठुर; असह्य, दुष्कर; रखरखीत; कष्टाळू; कडक, तल्लख (दारू); कृपण; चिक्कू, चिकट, चिकटोळा; भारी, कडाडलेल्या (किंमती); कठोर (व्यंजन). *adv.* strenuously, severely; with difficulty. मेहनतीनें, सपाटून, रगडून; कष्टानें, अडचणीनें, मुष्किलीनें. *n.* a beach or jetty for landing; (sl.) hard labour. (गलबतांतून जमिनीवर उतरण्याचा) उतार, धक्का, बंदरधक्का; सक्तमजूरी, सश्रम कारावास. *H. cash*, रोकड, नाणें, रोख पैसा (कागदी नव्हे). *H. facts*, निर्विवाद- संशयातीत-गोष्टी,-सत्य. *A h. nut to crack*, a hard problem, a person hard to make out or influence. चिकट-अवघड-प्रश्न, मनांतलें न समजूं देणारा-दाद न देणारा-मनुष्य. *H. of hearing*, somewhat deaf. अर्धवट बहिरा. *H. winter*, कडक-तीव्र-हिंवाळा. *H. water*, खनिज क्षारांमुळें धुण्याच्या उपयोगाला अयोग्य पाणी. *H. row to hoe*, कठीण काम. *To be h. put to it*, be in difficulties. अडचणींत-संकटांत-सांपडणें. *To die h.*, शेवटपर्यंत धडपड करून-चिवटपणानें-मरणें. *H. by*, close by. नजीक, जवळ, समीप. *H. upon*, close to. च्या लगत,-जवळ. *To run* (a person) *hard*, पाठलाग करणें. *H. and fast*, (of rules) कडक (नियम),

ठराविक, ठरींव. *H. bake*, almond toffee, बदामी मेवा. *H. bitten* लढण्यांत-दोन हात करण्यांत चिवट. *H.-favoured,-featured*, राकट चेहऱ्याचा, ओबडधोबड. *H.-fisted*, stingy चिक्कू, कृपण *H.-headed*, व्यवहारी, चाणाक्ष. *H. lines*, worse fortune than one deserves. कठीण प्रसंग,-अवस्था, दुर्दैव. *H. set*, rigid, tight. ताट, घट्ट; उबविलें जाणारें (अंडें); भुकेलेला (माणूस). *H. up*, short of money. पैशाची चणचण असलेला, ओढवस्तीचा. *H.-ness*, *n.*

Härd'en, *v. t. & i.* (हा'ड्न्)—to make or grow hard, callous or robust. कठीण करणें किंवा होणें, कठोर बनणें.

Härd'-hearted, *n.* (हा'र्ड्-हार्टेड्)—cruel, unfeeling, merciless, pitiless, inhuman, पाषाणहृदय, निर्दय.*-ly, adv.;-ness, n.*

Härd'ihood, *n.* (हा'र्डि-हुड्)—audacity, boldness धिटाई, धैर्य, हिंमत, छाती, ताकद.

Härd'ly̆, *adv.* (हा'र्ड्-लि)—with difficulty, severely, rigorously; scarcely. कष्टानें, प्रयासानें, कठोरपणानें. क्वचितच.

Härd'ship, *n.* (हा'र्ड्-शिप्)—severe suffering or privation, affliction, oppression, injustice. दुःख, कष्ट, संकट, हाल.

Härd'up, *a.* (हा'र्ड्-अप्)—short of money. द्रव्यहीन.

Härd'ware, *n.* (हा'र्ड्-वेअर्)— iron-mongery. लोखंडी जिन्नस,- जड सामान.

Härd'y̆, *a* (हा'र्डि)—bold; robust; capable of resisting exposure; (of plants) able to grow in the open air all the year. धीट, धारिष्टवान्, हिंमती, धट्टाकट्टा; कणखर, काटक, राट, भक्कम; बाराहि महिने उघड्या हवेंत वाढणारा. *H. annual*, उघड्या हवेंत वाढणारें; (*fig.*) दर वर्षाला पुढें येणारा विषय,-री गोष्ट, प्रतिवार्षिक गोष्ट. *Hard'ily, adv., -diness, n.*

Härd'y, *n.* (हा'र्डि)—the blacksmith's bar of hard iron for cutting metal on etc. लोहाराच्या धातु वगैरे तोडण्याचा भक्कम दांडा.

Hāre, *n.* (हेअर्)—a speedy rodent with long ears, short tail and divided upper lip. ससा, शशक. *Mad as a March h.*, (hare in breeding season). मार्च महिन्यांतील वाफेला आलेल्या.- आणणाऱ्या सशाप्रमाणें रंगेल,- वेडा,- पिसाट. *To hold (or run) with the h. and run (or hunt) with the hounds*, to keep in with both the sides. दुटप्पी वर्तन ठेवणें, धरसोड करणें. *H. and hounds*, paper-chase दौडपकडीचा खेळ. (दोन गडी सशांप्रमाणें पुढें धावून बाकीचे शिकारी कुत्र्यांप्रमाणें त्यांचा पाठलाग करितात तो) ससाकुत्र्यांचा खेळ. *H. -bell*, कांटेरिया पानांचें फुलझाड. *H. -brained*, rash, wild. उरफाट्या काळजाचा, साहसी. *H. -lip*, तुटका,- फाटका वरला ओंठ. *H.'s foot*, species of clover, corkwood tree. एक जातीची वनस्पति,- रान, एक जातीचें हलक्या सच्छिद्र लांकडाचें झाड.

Hār'em,-am, *n.* (हे'अरम्)—women's part of Mohammedan dwelling; its occupants; a Mohammedan sacred place. जनानखाना, अन्तःपुर, अवरोध; अन्तःपुरांतील स्त्रिया, जनाना, कबिला. मुसलमानांचें पवित्र स्थान *H. skirt*, (*sl.*) स्त्रियांचा मल चोळणा, लहुंगा.

Hăr'icot, *n.* (हॅ'रिको)—ragout usu. of mutton. (बकऱ्याच्या मांसाचा) रस,- पट्टार्थ. *H. (bean)*, French bean. फरसबी (भाजी).

Härk, *v. i.* (हार्क्)—to listen (to); to lend the ear; (as call to hounds) go (forward). ऐकणें, कान देणें; जाणें. *int.* ऐका! ऐक! *H. back*, to retrace course to find scent; (*fig.*) to revert to a subject. माग काढण्यासाठीं परत येणें,-वळणें; मूळपदावर येणें.

Harl(e), *n.* (हर्ल्)—a barb, fibre, of a feather. पिसाचा धागा,- तंतु.

Härl'equin, *n.* (हा'र्लिक्विन्)—(in a pantomime) mute character invisible to clown and pantaloon, a buffoon. (मुग्ध नाट्यांतील) एक मुग्ध नट; विदूषक, मसकऱ्या, वैहासिक. *-ade' n.* विदूषक-प्रधान प्रहसन.

Härl'ot, *n.* (हा'र्लट्)—a prostitute. वेश्या; वारांगना, कलावंतीण. *v. i.* कलावंतीणीचा धंदा,- शिंदळकी करणें. *-ry, n.* वेश्यावृत्ति, शिनळकी, बाह्य भपका.

Härm, *n. & v. t.* (हार्म्)—mischief, wickedness; to damage, to hurt. नुकसान, इजा; नुकसान करणें, दुखवणें. *Out of harm's way*, in safety. सुरक्षिततेंत, सुरक्षित, सुखरूप.

Härm'ful, *a.* (हा'र्म्-फुल्)—that does harm. नुकसानकारक.

Härm'less, *a.* (हा'र्म्-लेस्)—that does no harm. निरुपद्रवी.

Härmŏn'ic, *a.* (हार्मॉ'निक्)—of, in, harmony. जुळणीचा, मेळाचा, सुसंगत; (Math.) हरात्मक, एकतान. *n.* जुळणीचा स्वर.*-s, n. pl.* स्वरशास्त्र.

Härmŏn'ica,-cŏn, *nn.* (हार्मॉ'निका,-कॉन्)—kinds of musical instrument. जलतरंग (वाद्य).

Härmō'nious, *a* (हार्मो'निअस्)—in concord; free from dissent; tuneful; sweet-sounding. मिळाफाचा; सुसंगत; समताल; एकताल; कर्णमधुर. *-ly, adv.*

Härm'onist, *n.* (हा'र्मनिस्ट्)—a person skilled in harmony; a musician. स्वरज्ञानी, स्वरज्ञ; गायक, शास्त्रशुद्ध संगीतकार.

Härmō'nium, *n.* (हार्मो'निअम)—a keyboard instrument with metal reeds. वाजाची पेटी, हार्मोनियम.

Härm'onize, *v. t. & i.* (हा'र्मनाइझ्)—to bring into harmony, to be in harmony; to form chords for melody. मेळ घालणें, मेळ असणें, जुळणें, जम बसणें; सूर जमविणें.*-zation, n.*

Härm'onў, *n.* (हा'र्मनि)—agreement, concord; melodious sound; collation of parallel narratives. मेळ, मिलाफ, ऐक्य, एकवाक्यता; मधुर आवाज; सुसंगत जुळणी लावणारा ग्रंथ, संगतिदर्शक ग्रंथ.

Härn'ess, (हा'र्निस्)—gear of draught horses &c.; defensive armour; (fig.) working equipment; an apparatus in a loom for shifting, warp-threads. घोड्याचा सरंजाम, ओढण, अश्वसामुग्री; रक्षणार्थ चिलखत; चालू साधनसामग्री; (मागाच्या) वया व त्या खालीं-वर करण्याचा सरंजाम. *v. t.* to put harness on (a horse etc.); (fig.) to utilize (river, waterfall etc.) for motive power. सरंजाम घालणें, खोगीर चढवणें; (नदी, धबधबा यांचा) यंत्रें चालविण्यासाठीं शक्ति उत्पन्न करण्याकरितां उपयोग करून घेणें,-उपयोजणें. *In h.*, दररोजचें नित्याचें-काम करीत असतां. *To die in h.*, लढतां लढतां-नित्याचा कामधंदा करीत असतां-मरणें,-मरण येणें.

Härp, *n.* (हार्प्)—a musical instrument with strings played by the fingers. वीणा, सारंगी. *v. i.* to play on a harp; to dwell tediously *on* a subject. वीणा वाजविणें; एकाच विषयावर कंटाळा येईपर्यंत तुणतुणें वाजवीत बसणें,-घोलत बसणें, घोकणी करणें, छंद-जपमाळ-घेणें.*-er,-ist, nn.* हार्प-सारंगीवाला,-सारंगी-वाजविणारा.

Härpōōn' *n.* (हार्पून्)—a spear to strike whales. मगर, मासे किंवा इतर मोठे प्राणी मारण्याची बरची. *v. t.* to strike, pierce, with a harpoon. बरचीनें (मोठे मासे) मारणें,-भोसकणें. *H. gun*, बरची फेंकण्याची बंदूक.

Härp'sichord, *n.* (हा'र्प्सिकॉर्ड्)—a stringed instrument with a key-board. एक प्रकारचें तंतुवाद्य.

Härp'ў, *n.* (हा'र्पि)—(Gk Myth.) a rapacious monster; a rapacious person. (स्त्रीचें तोंड व गिधाडाचें धड असलेला) हिंस्र राक्षस; दुसऱ्यावर धाड घालणारा मनुष्य, गिधाड. *H. eagle*, दक्षिण अमेरिकेंतील हिंस्र पक्षी.

Härq'uebus, Ar-, *n.* (हा'र्क्विबस्, आ'र्-)—(hist.) a portable gun supported on a tripod तिपायीवर ठेवण्याची लहान बंदूक.

Hă'rridan, *n.* (हॅ'रिडन्)—a haggard old woman; a vixen. म्हातारी, हडळ; वृद्ध वेश्या.

Hă'rrier, *n.* (हॅ'रिअर्)—a hound used in hunting hares; (*pl.*) a pack of hounds; kind of falcon. ससेपारधी कुत्रा; ससेपारधी झुंडी, ससा.

Hă'rrow, *n.* (हॅ'रो)—a frame with iron teeth for breaking clods &c. दंताळें, कुळव, गुंड. *v. t.* to draw a harrow over; to wound; to distress, to wound (feelings, &c.); 2 to harry, spoil. दंताळें फिरविणें; जखम करणें, खरचटविणें; दुःख देणें, काळजाला घरे पाडणें; लुटणें, लुबाडणें, छळणें. *Under the h.*, in distress. दुःखांत, संकटांत. *H.-ing, a.*

Hă'rrў, *v. t.* (हॅ'रि)—to plunder, ravage, spoil (land, people); to harass. लुटणें, उध्वस्त करणें; गांजणें, छळणें.

Härsh, *a.* (हार्श्)—severe, unfeeling; rough to the touch, ear or taste. निर्दय, निष्ठुर, करडा; खडबडीत, कर्कश, रुक्ष.*-ly, adv.,-ness, n.* खडबडीतपणा, कठोरपणा, निष्ठुरता, कर्णकटुता.

Härt, *n.* (हार्ट्)—the male of (esp. red) deer, (esp. after fifth year). हरिण, हरण. *H. of ten*, शिंगांना दहा फांटे फुटलेलें हरण. *H.'s horn*, हरणाच्या शिंगांतून मिळणारा पदार्थ. *H.'s tongue*, a fern. एक जातीची वनस्पति, नेचा.

Hăr'um-scăr'um, *a. & n.* (हॅ'अरम्-स्के'अरम्)-reckless (person, conduct). धांदलया, धांदरट, अविचारी, द्वड (मनुष्य, वागणूक).

Härv'est, *n.* (हा'र्वेस्ट्)—(a season for) reaping and storing of grain &c.; a season's yield; (fig.) product of any action. कापणीचा हंगाम, सुगी; पीक, उत्पन्न; श्रमाचें चीज, फळ, मोबदला. *v. t.* to reap and gather in; to lay up. कापणी करणें, पीक काढून घेणें,-गोळा करणें; सांठवणें, संग्रह करणें. *H. home*, कापणीच्या हंगामाचा शेवट, सुगीचा सण. *H. moon*, सप्टेंबर २२-२३ तारखेचा पौर्णिमेचा चंद्र, शरदृतूंतील पौर्णिमा. *H. mouse*, वाढत्या धान्याच्या कणसांत घरटें करून राहणारा लहान उंदीर. *Har'vester*, *n.* a reaper; a reaping machine; a harvest bug. कापणी करणारा,-रें यंत्र; पिकाची कीड.

Has, see Have.

Hăsh, *v. t.* (हॅश्)—(*h. up*,) to cut in small pieces. खिमा करणें, चोंचारून तुकडे करणें. *n.* a dish of hashed meat; repetition. खिमा; नव्याजुन्याची खिचडी, पुनरावृत्ति. *To make a*

h. of, चुरगळणें, चेंदामेंदा करणें. *To settle a person's h.*, एकाद्याची चटणी करणें,-खिमा उडविणें.

Hăsp, *n.* (हास्)—the clasp of a padlock; a hank of yarn. कडी; सूत गुंडाळण्याची चाती. *v. t.* कडी घालणें,-लावणें.

Hăss'ock, *n.* (हॅ'साक्)—a kneeling cushion. गुडघे टेंकण्याची जाड चटई.

Hāste, *n.* (हेस्ट्)—urgency of movement, hurry; rashness. त्वरा, धांदल; उतावळ, गडबड. *v. i.* to hasten. घाई करणें. *To make h.*, त्वरा करणें.

Hā'sten, *v. t. & i.* (हे'सन्)—to proceed or go quickly; to cause to hasten; to accelerate (work etc.). जलद् जाणें; त्वरा करायला लावणें; जलद्-त्वरेनें-(काम) उरकणें.

Hā'stў, *a.* (हे'स्टि)—speedy, hurried; precipitate, rash; quick-tempered. जलद्; अविचारी, उतावळा; तापट, रागीट. *Has'tily, adv.* घाईनें, उतावीळपणानें. *Has'tiness, n.* जलदी, त्वरा, उतावीळ.

Hăt, *n.* (हॅट्)—an out-door head-covering. (साहेबी) उभी टोपी. *v. t.* टोपी घालणें, टोपीनें झांकणें. *Top h., high h., chimney-pot h.*, रेशमी उभट-उंच-(साहेबी) टोपी. *Opera h.*, घडीची उभट टोपी. *Cardinal's h., red h.*, (fig.) कार्डिनलचा-धर्माधिकाऱ्याचा अधिकार. *H. in hand, a. & adv.* servile, servilely. मिंधा, लाचार, नम्र (पणानें). *To send round the h.*, (टोपी फिरवून) वर्गणी मागणें. To talk through one's *h.*, (sl.) घमेंड मारणें, दिमाख दाखविणें, अतिशयोक्ति करणें. *As black as my h.*, काळाकुट्ट. *H. trick*, (Crick.) taking three wickets by successive balls. लागोपाठ तीन चेंडूंनीं तीन गडी बाद करणें. *Bad h.*, (sl.) वाईट चालीचा-असभ्य-हलकट मनुष्य. *H.-ful a., H.-less, a., Hatter, n.* टोप्या करणारा, विकणारा, टोपीवाला.

Hătch, *v. t. & i.* (हॅच्)—to produce by incubation, to bring the young to maturity, to bring or come forth from egg; to form (a plot). अंड्यास ऊब देणें, अंडें फोडून बाहेर येणें किंवा आणणें; (कट, व्यूह) रचणें. *n.* hatching; brood hatched. पिलें काढणें,-होणें; वीण, वेत. *Hh., catches, marriages, and dispatches*, जनन (जन्म), लग्नें जुळणें, विवाह, व मृत्यु यांची वर्तमानपत्रांतील नोंद,-यादी.

Hătch, *n.* (हॅच्)—the lower half of divided door; an aperture in a door, wall, floor or deck; (Naut.) a hatch-way, a cover used in closing it; a flood-gate. जाळीच्या-दिंडी-दरवाजाच्या खालचा अर्धा भाग; खिडकी, भोंक; गलबताच्या मजल्यांतील चौकोनी मार्ग,-त्याचें झांकण; उघडी, सांड. *Under hh.*, गलबताच्या मजल्याखालीं, (fig.) दृष्टीआड खोल, मेलेला. *H. way, n.* (माल खालीं नेण्याचा) गलबताच्या मजल्यांतील चौकोनी मार्ग,-वाट.

Hătch, *v. t.* (हॅच्)—to engrave (usu. parallel) lines on (surface). (पृष्ठभागावर समांतर) सूक्ष्म रेषा कोरणें,-खोदणें. *n.* कोरीव,-खोदीव-रेषा.

Hătch'et, *n.* (हॅ'चिट्)—a light short axe. लहान हलकी कुऱ्हाड, परशु. *H. face*, लांबट, तीक्ष्ण, उग्र मुद्रा, चेहरा. *To bury the h.*, स्नेह संपादणें, समेट करणें. *To throw the h.*, अतिशयोक्ति करणें. *To throw the helve after the h.*, to add new loss to that already incurred. नुकसानींत भर पडणें.

Hătch'ment, *n.* (हॅ'च्मन्ट्)—an escutcheon; an armorial tablet of deceased person. कुलचिन्हांकित ढाल; मृत सरदाराचें ढालतलवार वगैरेंनीं युक्त असें स्मृतिचिन्ह.

Hāte, *v. t.* (हेट्)—to dislike strongly, to detest, to loathe; to bear malice to. द्वेष करणें; वैर असणें. *n.* hatred. द्वेष, तिरस्कार, वैर. *Morning h.* (army sl.) सकाळची जर्मन तोफांची सरबत्ती. *Hat'able, n.*

Hāte'ful, *a.* (हे'ट्फुल्)—exciting hatred. द्वेषी, ओंगळ, द्वेषजनक. *-lly, adv., -ness, n.*

Hā'tred, *n.* (हे'ट्रिड्)—active dislike; ill-will. द्वेष, मत्सर.

Hau'berk, *n.* (हॉ'बर्क्)—(hist.) coat of mail. (लोखंडी लहान लहान कड्यांचें) चिलखत.

Haugh, *n.* (हॉफ्, हॉक्)—a piece of flat alluvial land by river. नदीकांठचा पुरानें माती वगैरे सांचून झालेला सुपीक प्रदेश.

Haught'ў, *a.* (हॉ'टि)—proud, arrogant, dignified. गर्विष्ठ, मगरूर; थोर. *Haught'ily, adv.* आढ्यतेनें, गर्विष्ठपणानें, दिमाखानें. *-iness, n.* दिमाख, गर्व, आढ्यता.

Haul, *v. t. & i.* (हॉल्)—to pull or drag forcibly; to turn a ship's course; (of wind) to shift. जोरानें ओढणें, खेंचणें; जहाजाची दिशा बदलणें; (वारा) बदलणें. *n.* hauling; amount gained. जोराचा हिसका, जोरानें ओढणें; एकदम झालेला लाभ, एका झपाट्यास झालेली मिळकत.—*age, n.* conveyance of loads, the charge for it. ओढणें, माल-ओझीं वाहणें-नेणें; नेणावळ, वाहणावळ.—*ier, n.* ओढणारा, कोळशाच्या खाणींतील कोळसा वर ओढण्याचीं पिंपें; भाड्यानें माल वाहून नेणारा खटारेवाला. *To haul*

over the coals, (colloq.) हाताशीं धरणें, खरडपट्टी काढणें.

Haulm, Halm, *n.* (हाम्)—stalk, stem, stalks of beans, peas etc. बुंधा, बुडखा, जुडी.

Haunch, *n.* (हॉन्च्, हान्च्)—part of the body between ribs and thigh; leg and loin of deer etc. as food; (Archit.) side of arch between crown and piers. कटिप्रदेश, जघन, पार्श्वभाग, खवाटा; (हरिणाची वगैरे) तंगडी व खवाटा (मांस); मध्यापासून वांकणापर्यंतचा कमानीचा कोणत्याहि बाजूचा माथ्याचा भाग, खवाटा.

Haunt, *v. t. & i.* (हॉन्ट्)—to frequent (a place); to frequent company of (a person); (of thoughts etc.) to visit (a person) frequently; to stay habitually. (एकाद्या ठिकाणीं) नेहमीं जाणें येणें; (एकाद्याच्या) संगतींत नेहमीं असणें; वारंवार उद्भवणें, पाठीस लागणें; संचार असणें. *n.* a place much resorted to (often fig.). अड्डा, बैठक, माहेरघर. Haunted, *pa. p.* frequented by ghosts. भुताचा संचार असलेला, झपाटलेला.

Haut'boy, Ho'boy, O'boe, *n.* (हो'बॉय्, ओ'बॉय्)—a high-pitched wooden wind instrument; a reed-stop on organ; a species of strawberry. सनईसारखें एक वाद्य; बोरूची-लांकडी-जिव्हाळी; एक जातीचें बोर,-फळ.

Hauteur', *n.* (होट'र्)—haughtiness of manner. उद्धटपणा, मगरूरी, दर्प. [F]

Hăve, *v. t. & i. & aux.* (हॅव्)—to own, possess; to enjoy, to suffer; to contain; to be under necessity; to permit (person) to; to know; to retain; to engage in. जवळ असणें, मालकीचें असणें; उपभोगणें, भोगणें; आंत -ला-असणें; भाग असणें; (करूं, चालूं) देणें; जाणणें, येणें; ठेवणें; संबंध-चालू-ठेवणें. *n.* (sl.) a swindle, take-in; possession; (*Haves & have-nots*), rich and poor. फसवणूक, ठकबाजी, बनवाबनवी; संचय, मालमत्ता; श्रीमंत आणि गरीब लोक. *To h. a try*, प्रयत्न करणें. *As Plato has it*, expresses it. प्लेटोच्या म्हणण्याप्रमाणें. *Let him h. it*, त्याला चांगली शिक्षा कर, त्याची चांगली कानउघाडणी कर. *To be had*, (sl.) फसविलें जाणें. *To h. one up*, (एकाद्याला) न्यायालयांत-कोर्टांत-खेंचणें. *H. it your own way*, बरें बुवा, तुझ्याचप्रमाणें! बस्स पुरे! *To h. at*, वर हल्ला चढविणें. *To h. done*, to stop. बंद करणें, पुरें करणें. *To h. on*, (कपडे) चढविणें, चढवीत असणें. *To h. it out*, to settle dispute (with person), to get a tooth extracted. तडजोड करणें, (भांडण) मिटविणें, दांत काढवून घेणें. *Had rather go*, would prefer to go. जाणें परवडेल,-पसंत पडेल. *Had better go*, जाईल तर बरें,-हिताचें. *Had he known*, if he had known. जर त्याला कळलें-ठाऊक-असतें (तर). *Has*, (हॅझ्), 3rd sing., *pre.*; *Had*, (हॅड्), *pa. t. & pa. p.*

Hā'ven, *n.* (हे'व्हन्)—a harbour, a port; (fig. *h. of rest*) a refuge. बंदर, नांगरवाडा; आधार, आश्रयस्थान, निवारा

Hăv'ersăck, *n.* (हॅ'व्हरसॅक्)—a canvas bag for soldier's provisions. लष्करी शिपायाची (शिधा वगैरे ठेवण्याची) पोतडी,-थैली.

Hăv'ing, *n.* (हॅ'व्हिंग्)—(*in pl.*) property, belongings. मालमत्ता, (स्वतःचें) सामानसुमान.

Hăv'oc, *n.* (हॅ'व्हक्)—devastation. नाश, अनर्थ, प्रलय. *v. t.* to devastate. नाश-उजाड-करणें, उध्वस्त करणें.

Haw, *n.* (हॉ)—(a fruit of) hawthorn; (hist.) a hedge, an enclosure. कांटेरी झाड, त्याचें फळ; कुंपण, आवार. *H. buck*, गांवढळ मनुष्य. *H.'finch*, मोठ्या मजबूत चोंचीचा एक लहान पक्षी.

Haw, *n.* (हॉ)—third eyelid of a horse, dog etc., cartilage within inner corner of eye. (घोड्याची इ.) डोळ्याची तिसरी पापणी, तिसरें नेत्रचर्म, डोळ्याच्या आंतील कोंपऱ्याचें मृदु अस्थींचें वेष्टन,-कूर्चा.

Haw-Haw, *int. & n. & v. i.* (हॉ-हॉ)—a boisterous laugh. हा-हा करून (मोठ्यानें) हसणें, विकट हास्य (करणें). 2. ha-ha, sunk fence round a garden. बागेभोंवतालचें जमिनींत पुरलेलें मोरव्यांचें कुंपण.

Hawk, *n.* (हॉक्)—a bird of prey used in falconry; a rapacious person. घहिरीससाण्याच्या जातीचा पक्षी, श्येन, शेन; अधाशी, लुटारू, -मनुष्य. *v. i. & t.* to hunt with a hawk: (*h. at*) to hunt as a hawk does; to hunt insects. शेन पक्ष्याकडून शिकार करणें; शेन पक्ष्याप्रमाणें पकडणें; किडे पकडणें. *H.-eyed*, तीक्ष्णदृष्टि, तीक्ष्ण नजरेचा-दृष्टीचा. *H.-nosed*, गरुडनाक्या. *To know a h. from a handsaw* (hernshaw), to have ordinary discernment. सामान्य सारासारदृष्टि असणें. *H.-ish*, *H.-like aa.*

Hawk, *v. i. & t.* (हॉक्)—to clear the throat noisily; bring *up* from throat. खाकरून घसा साफ करणें; (थुंकी, कफ) घशांतून वर आणणें, खाकरणें.

Hawk, *v. t.* (हॉक्)—to carry (goods) about for sale, to peddle. फेरीनें विकणें, दारोदार-दारा-

वर विकणें. *Hawk'er, n.* an itinerant dealer. फेरीवाला.

Hawk, *n.* (हॉक्)—plasterer's square board with a handle. (गिलावा काढणाऱ्याची) गिलावा घेण्याची मूठवाली चौकोनी फळी.

Hawse, *n.* (हॉझ्)—a hawse-hole; situation of the cables when a vessel is moored with two anchors. (दोरखंडें बाहेर सोडण्याचा गलबताच्या नाकीवरील) डोळा, आंख; (गलबत दोन्ही नांगर टाकून राहिल्यावरची) दोरखंडांची स्थिति. *Haw'ser, n.* (हॉ'सर्,-अर्)—a large rope, a cable, often of steel. मोठा दोरखंड, (पोलादी) दोरखंड, चऱ्हाट.

Haw'thorn, *n.* (हॉ'थार्न्)— a thorny shrub bearing haws. एक कांटेरी फळझाड, झुडूप (कुंपणाच्या उपयोगाचें).

Hay, *n.* (हे)—grass mown and dried for fodder. वाळलेलें गवत, सुकी वैरण, सुका घास. *v. t. & i.* to put (land) under hay, to make into hay; to make hay. जमिनीवर वाळलेलें गवत घालणें, गवत वाळविणें; वैरणीकरितां गवत कापून वाळविणें. *To make h. of*, to throw into confusion. अस्ताव्यस्त टाकणें, गोंधळ करणें. *To make h. while the sun shines*, to seize opportunities. संधि साधणें, वाहत्या गंगेंत हात धुणें. *H. cock*, वाळलेल्या गवताची उडवी, -टी. *H. fever*, summer disorder due to pollen or dust. गवताच्या तुसानें,-धुळीनें,-येणारें पडसें, खोकला. *H. fork*, वाळत घातलेलें गवत परतण्याची, गवत उडवीवर रचण्याची डेळकी. *Hay-rick, H.-stack*, वाळलेल्या गवताची उडी, उडवें, गंज.

Hăz'ard, *n.* (हॅ'झर्ड्)—a game at dice with complicated chances; chance; danger, risk. फाशांचा तवकलीचा खेळ; दैव, जोखीम; भय, धोका. *v. t.* to expose to hazard; to run the hazard *of*; to venture on. धोक्यांत घालणें; संकटांत पाडणें; संभव पाहणें.*-ous, a.* धोक्याचा; नशिबाचा, अनिश्चित. *-ously, adv.,-ousness, n.*

Hāze, *n.* (हेझ्)—fog, mist; obscurity, dimness, mental obscurity. धुकें; संदिग्धता, अंधार, मानसिक तेजोऱ्हास. *v. t.* to make hazy. धुकट,-धुरकट,-धूसर करणें.

Hāze, *v. t.* (हेझ्)—(Naut.) to harass with overwork; to bully. अवघड काम सांगून छळणें, सतावणें, वठणीस आणणें; त्रास देणें.

Hā'zel, *n.* (हे'झल्)—a bush with fruit, *h.-nut*, its wood, stick; reddish brown colour (of eyes). एक झुडूप,-झाड; त्याचें लांकूड, काठी; तांबुस पिंगट रंग. *-lly, a.*

Hā'zy̆, *a.* (हे'झि)—misty; vague; slightly drunk. धुक्याचा; अंधुक, अस्पष्ट; झिंगलेला.*-zily, adv.;-ziness, n.*

Hē, *pron.* (ही)—the male person or animal in question. तो, तो पुरुष. *n. (pl. Hes) & a.* पुरुष, पुंलिंगी. *He-goat*, बकरा. *He-man, (U.S.)* बलवान मनुष्य, धैर्याचा मनुष्य. *He-togs, (sl.)* पुरुषाचे कपडे.

Head, *n.* (हेड्)—the upper part of a body; a ruler, a chief, a principal person, head master; the source of a stream; a division in discourse; culmination; seat of intellect or imagination; life; a person; a thing like head in form: the antlers of a deer; (Naut.) sea-men's latrine in ship's bows; foam; cream. डोकें; अधिपति, मुख्य, मुख्याधिकारी; प्रवाहाचा उगम; प्रकरण, भाग; कळस, शिखर; मेंदू, मगज, डोकें; जीवित; इसम, जण; माथा, शेंडा, कणीस, झुपका; काळविटाच्या शिंगाच्या शाखा; खलाशांची मुती; दारूवरचा फेंस; दुधावरची साई. *v. t. & i.* to lead, to influence, to direct; to put oneself or be put at the head; to get ahead of; to furnish with a head; (also *h. down*) to lop off head of; to oppose; to front; (of ship) to make *for* (a place). पुढाकार घेणें, वजन पाडणें, (कार्याची) दिशा दाखविणें; प्रमुख होणें,-असणें; पुढें जाणें, आघाडी मारणें; (ला) तोंड बसविणें, शेंड,-माथा,-करणें,-छाटणें; शेंडा छाटून-कापून-टाकणें; तोंड देणें; कडे तोंड असणें; (कडे) जाणें. *Cannot make h. or tail*, cannot understand. समजत नाहीं. *King's or Queen's h. (sl.)*, पोस्टाचें तिकिट. *A hot h.*, hasty person. उतावळा इसम. *At the h. of*, च्या पुढें, अग्रणी, पुढारी. *To come to a h.*, तोंड फुटणें, पिकणें, शेवट-कळस होणें. *Old h. on young shoulders*, वयानें लहान पण शहाणपण मोठें. *Off one's h.*, crazy. वेडा, माथेफिरू. *Could do it on my h.*, (sl.) (मला) तें अगदीं सोपें जाईल. *Over one's h.*, above one, esp. of danger; beyond one's comprehension. डोक्यावर (येणारें संकट); न समजण्याजोगें, बुद्धीपलीकडचें. *By the h. and ears*, forcibly. जोरानें, बळजबरीनें. *Over h. and ears*, पुरेपूर बुडलेला. *From h. to foot*, नखशिखांत, सर्व शरीरभर. *H. of hair*, पुष्कळ केंस असलेलें,-केंसाळ डोकें. *H. over heels*, topsyturvy. खालीं डोकें वर पाय, उलटा. *By h. and shoulders*, पुरेपूर बुडलेला, बराच, पुष्कळ. *To keep one's h.*, to keep cool. डोकें शांत ठेवणें. *To keep one's h. above water, (fig.)* ऋणांत-कर्जांत-नसणें. *To lose one's h.*,

to be beheaded, to become confused. शिरच्छेद होणें, भान विसरणें, गोंधळांत पडणें,- गोंधळ होणें. *To make h.*, पुढें जाणें,-दामटणें,- ढकलणें. *To make h. against*, यशस्वी प्रतिकार करणें. *To put* (a thing) *into* (person's) *h.*, एकाद्याच्या डोक्यांत (गोष्ट) भरविणें, सुचविणें. *H. first, H. foremost*, सूरसुडी, खालीं डोकें करून मारलेली. (*fig.*) अकस्मात्, उतावीळपणें. *To give* (*a horse*) *his h.*, (घोड्याला) मोकळा-स्वैर-जाऊं देणें,-सोडणें. *To lay* (*our* etc.) *heads together*, एकत्र विचारविनिमय करणें. *To take* (a person's) *h. off*, एकाद्याला बोलून,-चढवून-कंटाळा आणणें,-बेजार करणें. *To beat* (a person's) *h. off*, एकाद्यावर वरताण करणें, त्याला मागें टाकणें. *H. dress*, (विशेषतः स्त्रियांचें) शिरस्त्राण, शिरोवेष्टन. *H. gear*, टोपी, रुमाल, शिरोवेष्टन. *H. line*, पुस्तकाच्या पानावरील मथळ्याची ओळ. *H. man*, नायक, म्होरक्या, पुढारी. *H. master*, मुख्याध्यापक. *H. mistress*, मुख्याध्यापिका. *H. money*, डोईपट्टी. *H. phones*, telephone or wireless receiver attachable to listener's ears. (संदेश ऐकणाऱ्यानें) कानाला लावण्याचा संदेशग्राहक. *H. spring*, मूळ, उगम, उत्पत्तिस्थान. *H. stall*, डोक्याभोंवतीं गच्च बसणारा लगामीचा किंवा गळेबंदाचा भाग. *H.-stone*, थडग्यावरील दगड. *H. stone*, chief stone in foundation etc. पायाचा मुख्य दगड, कोना. *H. work*, डोक्याचें काम, मानसिक श्रम.-*headed*, *Head'less*, *aa.*

Head'ăche, *n.* (हे'ड्-एक्)—pain in the head. मस्तकशूळ, डोकेंदुखी.-*achy*, *a.*

Head'er, *n.* (हे'डर्)—a plunge into water head first. खालीं डोकें करून पाण्यांत मारलेली बुडी.

Head'ing, *n.* (हे'डिंग्)—that which stands at the head, the title at the head of an article or a page. मथळा.

Head'land, *n.* (हे'ड्-लॅन्ड्)—a promontory; a strip of land left unploughed at the end of field. टोंक, भुशिर; (शेताच्या बाजूची-कुंपणाजवळची) न नांगरलेली जमिनीची पट्टी, कडपट्टी.

Head'long, *adv.* (हे'ड्-लॉन्ग्)— with the head foremost, rashly, precipitately. अविचारानें, मागेंपुढें न पाहतां.

Head'piece, *n.* (हे'ड्पीस्)—a helmet; intellect, a man of intellect; an ornamental engraving at the head of chapter etc. शिरस्त्राण; डोकें, बुद्धि, बुद्धिमान मनुष्य; (पुस्तकांतील प्रकरणाच्या आरंभीची) शोभेची वेलबुटी, चित्र इ.

Headquart'ers, *n. pl.* (हेड्-क्वॉ'टर्स्)—centre of operations; commander-in-chief's residence. हुकूम सुटण्याची जागा, मुख्य कार्यालय, मुख्य ठाणें; सेनापतीचें राहण्याचें ठिकाण.

Heads'man, *n.* (हे'ड्झ्मन्)—an executioner; a man in command of a whaling boat. मांग, शिरच्छेद करणारा; देवमासे पकडणाऱ्या बोटीचा नाखवा.

Head'strŏng, *a.* (हे'ड्-स्ट्रॉंग्)—self-willed. हट्टी, हेकेखोर. -*ness*, *n.* हट्टीपणा, हेकेखोरपणा.

Head'way, *n.* (हे'ड्-वे)—progress. प्रगति, (जहाजाची) गति.

Head'y̆, *a.* (हे'डि)—intoxicating; rash, impetuous. मादक, अंमली (दारू इ.); हूड, उल्लू, बेगवान.—*dily*, *adv.*,—*diness*, *n.*

Heal, *v. t.* & *i.* (हील्)—to restore to health; to cure of a disease or wound; to become sound; to reconcile. निरोगी करणें; बरा करणें किंवा होणें; प्रकृति निर्दोष होणें; मिटविणें, समेट करणें. *H.-all*, universal remedy. त्रैलोक्यचिंतामणि (गुटिका इ.), सार्वत्रिक गुणकारी वनस्पति. *Heal'er*, *n.* *Time is a great healer*, काळ हा मानसिक व्यथा बरी करणारा आहे.

Health, *n.* (हेल्थ्)—soundness of body; condition of body; (*fig.*) soundness of mind, a sound state of mind; toast drunk in a person's honour. आरोग्य; शरीरस्थिति; मनःस्वास्थ्य; आरोग्यचिंतनार्थ पान,-पिणें.—*ful*, *a.* निरोगी; आरोग्यदायक; पथ्यकर, हितकर,—*fully*, *adv.*, —*fulness*, *n.*

Health'y, *a.* (हे'ल्थि)—having or conducive to good health. निरोगी; शरीरास हितकर. *Health'ily*, *adv.*,-*iness*, *n.*

Heap, *n.* (हीप्)—group of things lying one on another; (colloq.) a large number or amount. समुच्चय, ढीग, रास; गर्दी, जमाव, मोठी संख्या. *v. t.* to pile in a heap; to load; to accumulate. रास करणें; लादणें; सांठविणें, सांचविणें. *Struck all of a heap*, mentally prostrated. मानसिक दैन्य आलेला, शरणागत, केंविलवाणा.

Hear, *v.t.* & *i.* (हिअर्)—to perceive with ear; to listen or give audience to; to be informed of; to listen judicially to (a case etc.); to grant (a prayer). ऐकणें; श्रवण करणें; कानावर पडणें; माहिती मिळणें, कळणें; (खटला, सुनावणी) ऐकणें; चें ऐकणें, रुकार देणें. *To h. one out*, एकाद्याचें म्हणणें पूर्ण ऐकून घेणें. *To h. from*, कडून पत्र,-निरोप-येणें. -*er*, *n.* श्रोता.

Hear'ing, *n.* (हिं'अरिंग्)—act of perceiving by the ear; the sense of perceiving sound; reach of the ear; a listening to facts and evidence. ऐकणें, श्रवण; श्रवणशक्ति, श्रुति; ऐकूं येण्याइतकें अंतर; सुनावणी (खटल्याची) ऐकणें, चौकशी करणें. *Hard of h.*, deaf. बहिरा, भेरा. *To give one a fair h.*, एकाद्याचें म्हणणें निःपक्षपात बुद्धीनें ऐकणें.

Heark'en, Har-, *v. i.* (हा'र्कन्)—to listen to. ऐकणें, लक्ष देणें.

Hear'say, *n.* (हिं'अरसे)—a gossip, a report, a rumour. लोकवार्ता, वातमी, अफवा, सांगोसांगी गोष्ट.

Hearse, *n.* (हर्स्)—a car for conveying the dead to the grave, a bier. प्रेत नेण्याची गाडी, तिरडी.

Heart, *n.* (हार्ट्)—organ of circulation; seat of the emotions or affections; soul, mind; courage; central or vital part, essence; (of land) fertility; (pl.) a suit of playing-cards marked with hearts. रक्ताशय, हृदय; अंतःकरण; मन; हिंमत, अवसान, धैर्य; केंद्रस्थान, मध्यभाग, सत्त्व; सुपीकता, जोम, कस; (अने०) (लाल) बदामाचीं पत्त्याचीं पानें. *Smoker's h.*, heart disorder due to smoking. धूम्रपानानें होणारा काळजाचा रोग. *H. to h.*, मनमोकळेपणानें. *H.-to-h. talks*, मनमोकळेपणानें-खुल्या दिलानें-बोलणें,-बोलणीं करणें. *After one's (own) h.*, इच्छेनुसार. *My hh.*, (Naut.) शूर खलाशी. *H. of oak*, timber; a courageous man. ओकचें इमारती लांकूड; धैर्यवान-शूर-निधड्या छातीचा मनुष्य. *At h.*, मनाचा, अंतःकरणाचा,-पासून. *By h.*, तोंडपाठ, मुखोद्गत. *From one's h.*, sincerely. मनापासून. *In one's h.*, secretly. मनांतल्या मनांत, गुप्तपणें. *In h.*, जोमांत, उत्साहानें. *Out of h.*, in low spirits. खिन्न, दुःखी, उद्विग्न. *With all one's h.*, sincerely. अगदीं मनापासून, पूर्ण सदिच्छेनें. *To have* a thing *at h.*, एकाद्या गोष्टींत विशेष लक्ष घालणें, -ची विशेष आवड असणें. *To lay* a thing *to h.*, एकाद्या गोष्टीचा गंभीरपणें विचार करणें. *Searchings of h.*, misgivings. संशय, कांक्षा, किंतु, अविश्वास. *H. and hand*, enthusiastically. उत्सुकतेनें, मनःपूर्वक. *In one's h. of hh.*, अगदीं मनांतील-गुप्त-भावनेप्रमाणें, अंतःकरणांत. *H. and soul*, with all one's energy. तनमनधनेंकरून, सर्व बळ एकवटून. *To have one's h. in one's mouth*, to be violently alarmed or startled. धास्ती वाटणें, एकदम दचकणें. *His h. is in the right place*, त्याचा हेतु चांगला आहे, सद्हेतु आहे. *To take h. of grace*, धैर्य धरणें. *To wear one's h. upon one's sleeve*, to lack proper reserve. मनांत-तोंडांत-न राहणें. *It does my h. good*, त्या गोष्टीमुळें मला आनंद होतो,-वाटतो. *H.-ache*, चिंता, हृद्रोग. *H.-beat*, छातीचा ठोका,-ची धडधड; (fig.) भावना. *H.-blood*, *H.'s-blood*, life-blood, life. जीवित, आयुष्य. *H.-break*, crushing sorrow. छाती फुटेल इतकें-भयंकर-दुःख. *H.-breaking,-broken*, छाती फाटेल इतकें, भेदरून गेलेला. *H.-burn*, छातीची-शीं-जळजळ. *H. burning*, jealousy, grudge. हेवा, दावा, जळफळ, गुप्त वैर. *H.-disease*, काळजाचा रोग. *H.-rending*, हृदयद्रावक. *H. sick*, despondent. निराश, हताश. *H.-sore*, मन दुखावलेला, मनाला लावून राहिलेला. *H.-strings*, one's deepest affections. मनापासूनचें-सखोल-प्रेम. *H.-whole*, not in love, sincere. निष्काम, अनन्यभावयुक्त, पूर्ण अंतःकरणाचा,-मनाचा.-*hearted*, *a.*-हृदयी.

Heart'en, *v. t. & i.* (हा'र्टन्)—to inspirit, to cheer (*up*, *on*). उत्तेजन देणें, धैर्य-प्रोत्साहन-जोर देणें.

Heart'felt, *a.* (हा'र्ट्-फेल्ट्)—sincere. मनापासूनचा, प्रामाणिक.

Hearth, *n.* (हार्थ्)—floor of fireplace. चूल, चुलीची जागा, आगटी, शेकोटी. *H. stone*, चुलीचा दगड.

Heart'ily, *adv.* (हा'र्टिलि)—in hearty manner; very. मनःपूर्वक, कळकळीनें, खरोखर; अतिशय, फार.

Heart'less, *a.* (हा'र्ट्-लिस्)—without affection, cruel, unfeeling, pitiless. निर्दय, निष्करुण, क्रूर, दुष्ट.-*ly*, *adv.*,-*ness*, *n.* कठोरता, निष्ठुरपणा.

Hearts'ease, *n.* (हा'र्ट्सईझ्)—pansy. एक फूलझाड.

Heart'y, *a.* (हा'र्टि)-vigorous; genial; sincere; (of meals) copious, large to satisfaction. जोमदार; आनंदी; निष्कपटी; भरपूर, आकंठ (भोजन). *My hearties*, *n.*, (as address to sailors) माझ्या शूर खलाशांनो! *Heart'iness*, *n.*

Heat, *n.* (हीट्)—hotness; hot weather; inflamed state of body; anger; pungency of flavour; single effort; warmth of feeling; violent state (of debate etc.); course at a race; sexual excitement in animals. उष्ण, उष्णता, गरमी; उष्ण हवा; ताप, दाह, आंगाचा होंच; राग; तिखटपणा, झणझणीतपणा; एकच दम, तडाखा, एलगार; कडाका, भर; चांचपणीचा सामना,-ची शर्यत; (जनावरांचा) कामप्रकोप, माज, उधान. *v. t. & i.* to make or become hot; to inflame. तापणें, तापविणें; क्षुब्ध करणें,

पेटविणें, चेतविणें. *Red, white, h.*, धातु लाल, पांढरी, होण्याइतकी उष्णता,-आंच. *Latent h.*, घनपदार्थाचा द्रव, किंवा वाफ, व द्रवाची वाफ होण्याइतकी उष्णता. *Specific h.*, विशिष्ट उष्णता. *Prickly h.*, उष्ण देशांत अंगावर येणारें घामोळें. *At a h.*, झटक्यासरशीं, एका दमांत. *H. wave*, प्रचंड उष्णतेची, स्थलांतर करणारी, लाट. *Heat'er*, *n.* तापविणारा, तापक, तापविण्याचें यंत्र (चुला, इ.). *Heat'edly, adv.*

Heath, *n.* (हीथ्)—a flat waste tract of land; kinds of shrub. ओसाड जमीन, रान, जंगल; एक प्रकारचें झुडूप. *H.-bell*, हीथ् झुडुपाचें फूल. *Heathy, a.* झुडुपाळ.

Heath'en, *a. & n.* (हीं'दन्)—one who is not Christian, Jewish, or Mohammedan; an unenlightened person. रानटी अधर्मी मनुष्य; अज्ञाणी मनुष्य, रानटी, अशिक्षित.*-dom, -ism, nn.;-ish, a.,-ishness, n.*

Hea'ther, *n.* (हे'दर्)—kinds of shrub; a heath, ling. लहान रानटी झुडूप,-झाड; रान, जंगल.*-y, a.*

Heave, *v. t. & i.* (हीव्ह्)—to lift; to raise; to utter (groan, sigh) with effort; to throw; (Naut.) to haul up by rope, to pull (*at* rope); to rise as waves, swell up; to displace. वर उचलणें; उठविणें; (उसासा) टाकणें, सोडणें; फेंकणें, दोरीनें ओढणें; खेंचणें; (दोरी) खेंचणें, ओढणें; उचंबळाविणें, उचंबळणें, फुगणें, भरून येणें; (थर इ.) दुसऱ्याच्या जागीं येणें,-वर येणें. *n.* heaving, displacement; (*pl.*) a disease of horses. वरखालीं होणें, उचंबळ, स्थलांतर; (अने.) घोड्यांचा रोग. *To h. to*, गलबत थांबविणें, उभें करणें, नांगरणें. *To h. in sight*, to become visible. दिसूं लागणें, दृष्टीस पडणें. *H. ho*, 'हैलेंचेसे', नांगर वर ओढतांना खलाशांचा जोर येण्याकरितां मोठा आवाज. *H. of the sea*, समुद्राच्या लाटांच्या हेलकाव्यांनीं गलबताच्या गतीला मिळणारा जोर.

Hea'ven, *n.* (हे'व्हन्)—the sky, the firmament; the regions above; the abode of God and his angels; place of bliss; God, Providence. आकाश, आभाळ, गगन, अंतरिक्ष; भूलोकाच्या वरचे लोक; स्वर्ग, देवलोक, सुरलोक; परमसुखाचें धाम, मोक्ष; देव, परमेश्वर, परमात्मा. *Seventh h., h. of hh.*, (ज्यू लोकांच्या मतें) सत-सात-स्वर्गीतील अत्युच्च सातवा स्वर्ग. *By h.*, good hh.! देवाच्यान्! नशीबच! देव भलें करो! *H.-born*, of divine origin. दैवी, स्वर्गीय. *H.-ward, a.; H.-ward,-s, adv.*

Hea'venly̆, *a.* (हे'व्हन्लि)—of heaven, divine; of the sky. स्वर्गीय; दिव्य; आकाशांतील. *The H. city*, paradise. नंदनवन. *H.-minded*, holy. पवित्र, भक्त, निष्ठ.*-liness, n.*

Hea'vĭly̆, *adv.* (हे'व्हिलि)—laboriously, densely, with ponderousness; sorrowfully, dejectedly. फार जोरानें; दुःखानें, खिन्न अंतःकरणानें.

Hea'vy̆, *a.* (हे'व्हि)—of great weight, ponderous; of great specific gravity; abundant; dull, tedious; oppressive, grievous, hard to bear, sad; laden *with*; striking or falling with force; (of ground) clinging; (of food) hard to digest; (of sky) overcast; clumsy; intellectually slow; unwieldy; despondent; drowsy; (Mil.) carrying heavy arms. भारी, जड; मोठें वजनशीर,- विशिष्ट गुरुत्वाचें; विपुल, समृद्ध; मंद, कंटाळवाणें; त्रासदायक, पीडक, जाचक, असह्य, दुःखित; (नें) भारावलेलें,-लादलेलें; जोराचा, जबर, वेगाचा; चिकट (जमीन); पचण्यास कठीण, जड, अपथ्य (अन्न); अभ्राच्छादित, काळें; ओबडधोबड; मंदबुद्धीचा; अवजड, वजनशीर; हताश, निराश; झोपाळू; अवजड रणसाहित्यवाहू,-वाहक. *n.* (*pl.*) Dragoon Guards; heavy artillery. रक्षक घोडदळ; जड तोफखाना. *adv.* heavily. अतिशय, वजनदाररीतीनें. *H. metal*, (fig.) प्रबळ-भयंकर-शत्रु,-प्रतिपक्षी. *H. news*, दुःखाची-दुःखकारक बातमी. *Time hangs h.*, passes slowly. वेळ जातां जात नाहीं,-कंटाळवाणा वाटतो. *H.-armed*, जड शस्त्रास्त्रें किंवा चिलखत धारण करणारा. *H.-hearted*, खिन्न, दुःखी, उदासीन, सचिंत. *H.-weight*, boxing weight, 11 stone 4 lb. भारी वजनाचा मुष्टियोद्धा,-त्याचें वजन. *Heav'iness, n.* वजन, जडपणा, जडत्व, सुस्ती, इ. *Heavy'ish, a.*

Hĕb'domad, *n.* (हे'ब्डोमॅड्)—a week. आठवडा, सप्ताह. *Hebdom'adal, a.* weekly. सात दिवसांचा, साप्ताहिक. [Gk *hepta*, Sk. *sapta*, seven]

Hē'bē, *n.* (ही'बि)—(Gk Myth.) the goddess of youth; (joc.) a waitress. यौवनदेवता; वाढपीण, स्त्रीनोकर.

Hĕb'ĕtate, *v. t. & i.* (हे'बेटेट्)—to make, become, dull. बोथट करणें,-होणें, तीव्रता मोडणें.

Hēbrā'ic, *a.* (हीब्रे'इक्)—of Hebrew or the Hebrews. हीब्रू भाषेचा, हीब्रू लोकांसंबंधीं.*-ically, adv.*; *He'braism, n.* हीब्रू लोकांचा स्वभावविशेष; हीब्रू लोकांची चालरीत, त्यांच्या भाषेंतील विशेष शब्दप्रयोग. *He'braist, n.* हीब्रूभाषा पंडित,-शास्त्रवेत्ता, हीब्रू धर्मानुयायी.

Hē'brew, *n.* (ही'ब्रू)—Israelite, Jew; the language of the ancient Hebrews; (colloq.) unintelligible speech. हीब्रू, ज्यू; त्यांची भाषा;

न समजणारी भाषा. *a.* हीब्रू (जात, भाषा). *H.-wise*, (of writing) उजवीकडून डावीकडे (लिहिण्याची पद्धत).

Hĕc'atŏmb, *n.* (हे'कटॉम्)—a great public sacrifice (of a 100 oxen). शतगोमेध, शतबलिदान, सरसहा कत्तल.

Hĕck, *n.* (हेक्)—a frame obstructing passage of fish in a river. मासे धरण्याची ताटी.

Hĕc'kle, *v. t.* & *n.* (हे'कल्)—to catechize (esp. a candidate) severely ; to dress *flax, hemp*, with a hackle. खोंचून प्रश्न विचारणें; पिंजणीनें-फणीनें विंचरणें, विंचरून साफ करणें.

Hĕc'tĭc, *a.* (हे'क्टिक्)—consumptive; morbidly flushed; exciting, wild. क्षयाचा, क्षयी; रोगट, लाली-सूज-आलेला; स्फुरण आणणारें, विकारी, क्षोभक. *n. hectic fever*, patient, flush. कफ-क्षय-ज्वर, कफक्षयांत येणारा रोजचा ताप, कफक्षयी, पू-स्राव. [Gk *hektikos*, habitual]

Hĕcto-, (हेक्टो)—*in comb.*=100. शत-,शंभर. *H.-gram(me)*, शंभर ग्रामचें वजन.—*graph*, an apparatus for multiplying copies. (चरबीचा मध-ग्लिसरिन-लावून सरसाच्या पाटावर) पुष्कळ प्रति काढण्याचें यंत्र.—*litre, liter*, (-लीटर्), शंभर लीटरचें (३·५३१ घन फुटाचें) घनमाप. *-metre*, (-मीटर्), शंभर मीटर, (३२८·०८१ फूट).

Hĕc'tor, *n.* (हे'क्टर्)—a bully, a blustering fellow. तिस्मारखान, अरेराव. *v. t. & i.* to bully, to bluster. गुरकावणें, अरेरावी करणें, चढाईच्या गोष्टी करणें. [Gk *Hektor*, Trojan hero in *Iliad*]

Hed'dles, *n. pl.* (हे'डल्स्)—(weaving) small cords or wires through which the warp is passed in a loom before going through the reed. (विणकामांतील) वया, ओंव्या.

Hĕdge, *n.* (हेज्)—a fence of bushes or low trees; a line of things or persons forming a barrier; (fig.) a barrier; (Betting) an act, means, of hedging. वय, वई, कुंपण, आवार; वाटेंतील-मार्गांतील-अडगळ, अडथळा; (जुगाराच्या खेळांत) एकाद्यावरील संकट-बोजा-कमी करणें, त्याचें साधन. *v. t. & i.* to surround with a hedge; to make or trim hedges; to hem *in*; to fence *off*; to secure oneself against loss (in betting); to avoid committing oneself. वय-कुंपण घालणें, आवार-वईवाडा-करणें; वई करणें,-छाटणें; वेढणें, कोंडणें; कुंपण घालून दूर टेवणें,-आंत येऊं न देणें; (जुगारांत) नुकसानी न येईल अशी काळजी घेणें; स्वतःला गुंतवून न घेणें. *Quickset h.*, जिवंत झुडपांचें कुंपण; *dead h.*, तोडलेल्या फांद्यांची-शिऱ्यांची वई. *It doesn't grow on every h.*, it is rare. तें दुर्मीळ आहे. *H. priest*, अशिक्षित गांवढळ उपाध्याय. *H.-row*, (हेज्-रो)bushes forming a hedge. झुडपांचें कुंपण. *H.-school*, गांवढळ शाळा, तात्यापंतोजीची शाळा. *H. sparrow*, (हेज्-स्पॅरो), a song-bird. एक गाणारा पक्षी. *-er*, *n.* वई घालणारा,-दुरुस्त करणारा.

Hĕdge'hŏg, *n.* (हे'ज्-हॉग्)—kinds of spiny animals; a porcupine; prickly seed-vessel of some plants; a person hard to get on with. एक जातीचें जनावर; साळू, साळिंदर; कांहीं वनस्पतींचें कांटेरी बीज-पात्र,-बोंड; हेकट,-हट्टी,-न पटवून घेणारा मनुष्य.*-ggy*, *a.* दुराराध्य (मनुष्य).

Hēdŏn'ĭc, *a.* (हीडॉ'निक्)—of pleasure. सुखासंबंधी. *n. pl.* सुखापेक्षक कर्मवाद.

Hē'donĭsm, *n.* (ही'डॉ-निझम्)—the doctrine that pleasure is the chief good. सुख हेंच अंतिम साध्य मानणारें मत.*-ist*, *n.*;*-istic*, *a.* [Gk *hedone*, pleasure]

Heed, *v. t.* (हीड्)—to attend to, to take notice of. मनावर घेणें, लक्ष देणें. *n.* care, attention. काळजी, लक्ष, अवधान, जपणें.*-ful*, *a.* सावध, सावधान.*-fully*, *adv.*,*-fulness*, *n.*

Heed'less, *a.* (ही'ड्-लेस्)—negligent, careless, inattentive. दुर्लक्ष करणारा, निष्काळजी, गैरसावध. *-ly, adv.*,*-ness*, *n.*

Hee'-haw', *n.* (ही' हॉ')—the ass's bray ; a loud laugh. गाढवाचें ओरडणें, रासभध्वनि; मोठ्यानें हंसणें. [imit.]

Heel, *n.* (हील्)—the hinder part of human foot; a quadruped's hind foot; hinder part of hoof, (*pl.*) hind feet; part of stocking etc. that covers heel, part of boot that supports heel ; a thing like heel in shape or position. पायाची टांच, खोट; जनावराचा खूर, पाय; खुराचा मागचा भाग, (अने॰) जनावराचे मागचे पाय; पायाची टांच झांकणारा (पायमोजाचा) भाग, जोड्याची खोट, बुटाचा तळ; टांचेच्या आकाराची वस्तु. *v. i. & t.* to touch ground with heel; to furnish (boot) with heel; to chase or follow closely; (Football) to pass ball *out* with the heels; (Golf) to strike (ball) with the club-heel. (नाचतांना वगैरे) जमिनीला खोट लावणें; (जोड्याला) खोट घालणें; पाठलाग करणें; टांचेनें पदकंदुक प्रति-पक्षयांच्या मार्गे पार उडविणें; गोलफदांडूच्या वांकड्या टोंकानें चेंडू हाणणें. *The h. of Achilles*, the only weak point or spot. एकटा एकच दोष, मर्म, भेद्य स्थल. *At h., at, on, upon, one's hh.* अगदीं मागोमाग, पाठोपाठ. *To h.*, (o'

dog), अगदीं मागोमाग, हांकेसरसा येणारा (कुत्रा). *Hh. over head, head over hh.*, खालीं डोकें वर पाय (अशी स्थिति), उफराटा, उलटा, कोलांटी (उडी). *To kick one's hh.*, तिष्ठत-वाट पहात-उभें राहणें. *To lay, clap, by the hh.*, to imprison. पायांत बिड्या-बेड्या-ठोकणें, तुरुंगांत टाकणें. *To show a clean pair of hh., to take to one's heels*, to run away. पळून जाणें, पोबारा करणें, धूम ठोकणें. *To have the hh. of*, धांवून मागें टाकणें.-च्या पुढें जाणें. *To turn on one's h.*, झटकन मागें वळणें. (Cribbage) *his hh.*, पत्त्याचीं पानें वांटणाऱ्यानें फोडलेला गुलाम (दोन गुण). *H.-ball*, a shoe-maker's composition of wax and lamp-black. (जोड्यांना पालीश-सफाई-करण्याचें) काजळी मेण. *H. tap*, जोड्यांतील टांचेच्या चामड्याचा जाडपणा; कांचेच्या पेल्याच्या तळीं राहिलेली दारू. *Heel'ed, a.* (U. S.) रिव्हॉल्व्हर-पिस्तूल-घेतलेला; पैसे पुरविलेला.

Heel, *v. i. & t.* (हील्)—(of ship) to lean or tip to one side; to make heel. (गलबत) एका बाजूस कलंडणें,-कलणें; कलंडावयास-कलण्यास-लावणें. *n.* inclination of heeling ship. कलंडणाऱ्या गलबताचा कल,-झोंक.

Hĕft, *n.* (हेफ्ट्)—(U. S.) weight. वजन. *v. t.* वजन अजमावण्याकरितां उचलणें. *Hef'ty, a.* मजबूत, धट्टाकट्टा; जड.

Hĕgĕmŏn'ic, *a.* (हीगिमॉ'निक्, हेजि—)—ruling, supreme. मुख्य, सर्वश्रेष्ठ. *Hegem'ony, n.* leadership. धुरीणत्व, पुढारीपण. [Gk *hegemon*, a leader]

Hei'fer, *n.* (हे'फर्)—a young cow that has not had a calf. वासरूं न झालेली गाय, कालवड, पाडी, गोजी.

Heigh, *int.* (हे)—an expression of encouragement or inquiry. हा! हा! *H.-ho*! अरे बापरे! दमलों!

Height, *n.* (हाइट्)—measure from base to top; elevation above ground or sea level; high point, top; utmost degree. उंची; उंचवटा; शिखर; कळस, भर, पराकाष्ठा.

Height'en, *v. t. & i.* (हा'इटन्)—to make or raise higher; to intensify; to exaggerate; to rise. उंच करणें; वाढवणें, उत्कर्ष करणें, चढवणें; अतिशयोक्ति करणें; वाढणें.

Hei'nous, *a.* (हे'नस्)—atrocious, hateful. घोर, उग्र, अघोर, किळसवाणा, ओंगळ (गुन्हा, गुन्हेगार). *-ly, adv.,-ness, n.* अघोरपणा, ओंगळपणा.

Heir, *n.* (एअर्)—a person entitled to property or rank as legal representative of the former holder; one to whom something is due. वारस, दायाद, वारसदार; (चा) वांटेकरी, हक्कदार वारसदार. *H. apparent*, युवराज, पुढील-भावी-हक्कदार. *H.-at-law*, एकाच रक्तसंबंधानें वारस-दार,-हक्कदार.*-dom, n.* वारसा.*-ess, n. fem.* वारसदारीण, हक्कदारिण, स्त्रीवारस. *H.-loom*, (वंशपरंपरागत मिळकतीबरोबर) वारसाहक्कानें मिळणाऱ्या वस्तु; वंशपरंपरागत वतन, (अ॰ं॰) गुण इ. *H.-less, a.*; *H.-ship*, वारससंबंध, वारसा (हक्क).

Held, *pa. t. & pa. p.* of Hold.

Hĕl'ical, *a.* (हे'लिकल्)—spiral. कानाच्या पाळी-सारखा, वर वर चढत जाणारा, नागमोडी, सर्पिल. *-lly, adv.*

Hĕl'icon, *n.* (हे'लिकॉन्)—the mountain sacred to Muses; the source of poetic inspiration. (ग्रीक) विद्यादेवतांचें निवासस्थान असलेला पर्वत; काव्यस्फूर्तीचा उगम,-चें मूळ.*-co'nian, a.*

Hĕl'icŏpter, *n.* (हे'लिकॉप्टर्)—a flying-machine that should rise vertically by airscrews. हवा कापणाऱ्या मळसूत्री स्क्रूनें सरळ उंच जाणारें विमान. [Gk *helikos*, screw, *pteron*, wing]

Hēlio-, (हीलिओ-)—in comb.=sun. सौर. *-cen'tric, a.* सूर्याला मध्य कल्पून मोजलेला, सूर्य-केन्द्रक.*-chromy, n.* रंगीत-स्वाभाविक रंगांतील-प्रकाशलेख, छायाचित्र, फोटो.*-graph*, प्रकाशलेख, फोटो; सूर्याचा प्रकाशलेख घेण्याचें यंत्र; सूर्य-प्रकाशाची चमक दाखवून संदेश देणारें यंत्र. *v. t.* अशा यंत्रानें संदेश पाठविणें.*-m'eter. n.* दोन ताऱ्यांमधील अंतर मोजण्याचें यंत्र, तारांतरमापक. *-scope*, सूर्य पाहण्याची दुर्बीण, सूर्यदर्शक (यंत्र). *-the'rapy*, use of sun-baths in treating diseases. सूर्यप्रकाशानें-(रोग्याला) उन्हांत बसवून-रोग बरे करणें, आतपस्नान.*-trope, n.* सूर्यकमळ, त्याचा रंग,-वास. रक्त धांवविणारा दगडी तार्ईत; साधनयंत्र.*-trop'ic, a.* प्रकाशोन्मुख-सूर्यप्रकाशाच्या दिशेनें वळणारी (वनस्पति,-रें झाड).

Hē'lium, *n.* (हीलिअम)—a transparent gas first inferred in sun's atmosphere सूर्याभोंवतील वातावरणांत प्रथम शोध लागलेला एक विरल वायु, पारदर्शक वायु.

Hē'lix, *n.* (ही'लिक्स्, हे'लिक्स्)—a spiral; the external part of the ear; a snail-shell. पेंच, पेंच; कानाची पाळ,-पाळी; गोगलगाईच्या जातीचा किडा.

Hĕll, *n.* (हेल्)—abode of the dead or of the damned; a state of misery; a gaming-house; (*sl.*) drunken frolic. नरक, पाताळ; अधोगति; दुःस्थिति, दुर्दशा; जुगारी अड्डा; दारु-ड्यांचा गोंधळ,-नाच. *A h. of a noise*, considerable noise. भयंकर गोंगाट. *H.-cat*, भयंकर,-

क्रूर-स्त्री, हडळ, जखीण. *To ride h. for leather*, भयंकर वेगानें (घोड्यावरून) दौड मारणें.-*ish*, *a*. नरकाचा, अतिदुष्ट.-*ishly*, *adv*., -*ishness*, *n*.; -*ward*, *adv*.

Hĕll'ebōre, *n*. (हे'लिबोअर्)—kinds of plant. (पूर्वी वेडसरपणा घालविण्यासाठीं उपयोगांत येणारी) काळी कुटकी, कडुरोहिणी; कांहीं प्रकारचीं झाडें, वनस्पति.

Hĕll'ēne, *n*. (हे'लीन्)—a native of ancient or modern Greece. ग्रीस देशाचा रहिवासी, ग्रीक मनुष्य.-*nic*, *a*.; -*nism*, *n*. ग्रीक भाषेचा शब्द-प्रयोग; ग्रीस देशाची संस्कृति.-*nist*, *n*. ग्रीक भाषा-पंडित; ग्रीक भाषा बोलणारा परकी मनुष्य.

Hĕlm, *n*. (हेल्म्)—tiller or wheel for managing rudder; the steerage; guidance. सुकाणूं, सुकाण, कर्ण; सुकाणूं धरणें; सूत्रधारकत्व, चालकत्व. *v. t.* सुकाणूं धरणें, सूत्रें चालविणें. *To take the h.*, to assume control. चालकत्व पतकरणें, चालक-नियंता-होणें. *Helms'man*, *n*. a steersman. सुकाण्या, कर्णधार, चालक.

Hĕlm, *n*. (हेल्म्)—(arch.) a helmet; (also *h. cloud*) a cloud forming over mountain in a storm. शिरस्त्राण, जिरेटोप; वादळाचे वेळीं पर्वतावर बनणारा ढगाचा टोप.-*ed*, *a*. शिरस्त्राण घातलेला.

Hĕl'mĕt, *n*. (हे'ल्मिट्)—a defensive head-cover; a kind of hat for hot climates; the upper part of a retort; a helmet-like thing or cover of a flower, or mollusc. शिरस्त्राण; उष्ण देशांत वापरण्याची साहेबी टोपी, नलिकामुकुट; शिरस्त्राणा-सारखी टोपी,-सारखें कवच,-कवच.-*ed*, *a*.

Hĕl'mĭnth, *n*. (हे'ल्मिन्थ्)—(intestinal) worm. (आंतड्यांतील) कृमि.-*ic*,-*oid*, *aa*. कृमीच्या आकृतीचा, कृमीसारखा.-*ology*, *n*. कृमिशास्त्र.

Hĕl'ot, *n*. (हे'लट्)—a Spartan slave; a serf. प्राचीन स्पार्टामधील गुलाम; दास, बंदा नोकर. -*ism*,-*try*, *nn*.,-*ize*, *v. t.*

Hĕlp, *v. t.* (हेल्प्)—to aid, to assist; to remedy; to prevent, to avoid. मदत करणें; उपाय करणें; टाळणें. *n*. aid; remedy; helper; (U. S.) a domestic servant. मदत; इलाज, उपाय; मदतनीस; घरकाम करणारा नोकर-चाकर. *To h. forward*,-*on*, (पुढें नेण्यास) हातभार लावणें, मदत करणें. *To h. out*, (दुसऱ्यास संकटांतून) वाचविणें, बाहेर काढणें. *To help* (a person) *on with coat*, अंगरखा घालायला मदत करणें. *To help* (one) *off with coat*, अंगरखा-कोट-काढायला मदत करणें. *To help* (a person) *to*, to serve (him) with (food). (अन्नाचा, खाद्य पदार्थाचा, जेवतांना) पुरवठा करणें, (पदार्थ) वाढणें. *Help'ing*, *n*. मदत; वाढप, वाढलेलें जेवण, पदार्थ इ.

Hĕlp'ful, *a*. (हे'ल्प्-फुल्)—that gives assistance, useful, serviceable. उपयोगी, उपयोगीं पडणारा, उपयुक्त.-*ness*, *n*.,-*lly*, *adv*.

Hĕlp'lĕss, *a*. (हे'ल्प्-लिस्)—unable to help oneself, without help, feeble, weak. असहाय, अशक्त, दुर्बळ.-*ly*, *adv*., -*ness*, *n*.

Hĕlp'māte, Hĕlp'meet, *nn*. (हे'ल्प्मेट्,-मीट्)—a helpful companion esp. husband or wife. सहाय, मदतगार, पति किंवा अर्धांगी,-पत्नी.

Hĕl'ter-skĕl'ter, *adv*., *a*. & *n*. (हे'ल्टर्-स्के'ल्टर्)—in disordered haste. सैरावैरा, इतस्ततः; धांदल, गडबड.

Hĕlve, *n*. (हेल्व्ह्)—handle of a tool. हत्याराचा दांडा, मूठ.

Hĕm, *n*. (हेम्)—the border of a garment turned down and sewed; a border, margin. गोट, दुमडून शिवलेली कडा; मुरड; किनारी, कांठ. *v. t.* to sew edge; to enclose, to confine. मुरड घालून शिवणें, मुरडणें; घेरणें, वेढणें.

Hĕm, *int*. (हेम्)—(calling attention or expressing hesitation). हुं! ऊंहूं! *n*. हुं! ऊंहूं! शब्द. *v. i.* to utter *hem*, to clear throat, to hesitate in speech. हुं! ऊंहूं-करणें, खांकरणें, घसा साफ करणें, बोलतांना अडखळणें.

Hĕmi,- *pref*. (हेमि-)—(Gk) half. अर्ध.- -*crania*, *n*. अर्धी कपाळदुखी, अर्धशिशी.-*cycle*, *n*. a half-moon figure. अर्धचंद्राकृति.-*ple'gia*, *n*. paralysis of one side. अर्धांग (वायु), पक्षघात.-*ptera*, *n*. (एकावर एक पंख असलेल्या प्राण्यांचा) अर्धपक्ष कीटकवर्ग.

Hĕm'isphere, *n*. (हे'मि-स्फीअर्)—half sphere; half the celestial sphere; half the earth. अर्धगोल; खगोलार्ध; भूगोलार्ध, पृथ्वीचा अर्धा भाग. -*eric*,-*erical*, *aa*.

Hĕm'ĭstich, *n*. (हे'मिस्टिक्)—half line of a verse, a verse not completed. श्लोकार्ध, चरण.

Hĕm'lŏck, *n*. (हे'म्लॉक्)—a poisonous plant used as sedative, potion got from this. एक औषधी विषारी वनस्पति,-त्यापासून काढलेला अर्क,-रस.

Hemorrhage, see Haem-.

Hĕmp, *n*. (हेम्प्)—herbaceous plant, native of India, with fibre used for rope, &c.; its cortical fibre; (facet.) a rope for hanging; plants yielding fibre. ताग, सण, अंबाडी; तागाचें साल, दोर; फांशी देण्याचा दोर; तंतु काढतां येणाऱ्या वनस्पति.—*en*, *a*. तागाचा, अंबाडीचा, तागासारखा.

Hĕm-stitch, *n.* & *v. t.* (हेॅम्स्टिच्)—a kind of ornamental stich. शोभेची शिवण (घालणें).

Hĕn, *n.* (हेन्)—female of birds of the common domestic fowl; any female bird. कोंबडी; (पक्ष्यांची) मादी. *Like a h. with one chicken*, absurdly fussy. विलक्षण गडबड्या,-धांदरट. *H. & chickens*, डेझी व इतर (फुल-) झाडें. *H.-coop*, *n.* खुराडें, खुडी. *H. crab*, *H. lobster*, (स्त्रीलिंगी) खेंकडा, मासा. *H.-harrier*, एक जातीचा हिंस्र पक्षी,-ससाणा. *H.-hearted*, faint-hearted. दुर्बळ, स्त्रीहृदयी. *H.-party*, स्त्रीसंमेलन. *H.-roost*, कोंबडीं-बदकें-रात्रीचीं झोंपतात ती जागा,-तें खुराडें. [A.S., fem. of *hano*, cock]

Hĕn'bāne, *n.* (हेॅन्-बेन्)—narcotic and poisonous drug, a poisonous herb. भांग, गांजा, खुरासनी ओंव्याचें झाड, खुरासनी ओंवा.

Hĕn'pĕcked, *a.* (हेॅन्-पेक्ट्)—domineered over by one's wife. बायकोच्या ताब्यांत असलेला, स्त्रीवश, बाइल्या, बाईलबुध्या.

Hĕnce, *adv.* (हेन्स्)—from here; from now; as a result of or inference from this. येथून, आतांपासून; ह्यामुळें, म्हणून, ह्या कारणास्तव. *H.*! (poet.) go away. नीघ ! *H. with*, away with. घेऊन जा. *Go h.*, die. मर! *Three years h.*, आजपासून तीन वर्षांनीं.

Hĕnce'fōrth, **Hĕnce'fŏrward**, *adv.* (हेॅन्स्-फोर्थ्, हेॅन्स्-फॉर्वर्ड्)—from this time forward. यापुढें, अतःपर.

Hĕnch'man, *n.* (हेॅन्च्मन्)—(hist.) a squire, a page of honour; a trusty follower; a political supporter. तैनातींतील सैनिक, हुजऱ्या; अनुचर, अनुयायी; (राजकीय) मतानुयायी, पक्षीय.

Hĕndĕc'agon, *n.* (हेन्डे'कगॉन्)—a plane figure of eleven angles or sides. एकादश कोणाकृति, एकादश कोन. [Gk *hendeca*, eleven]

Hĕndĕcasўll'able, *n.* (हेन्डेकसि'लबल्)—अकरा अवयवी-अक्षरी-कविता.

Hĕndi'adўs, *n.* (हेन्डा'य्-अडिस्)—expression of a complex idea by two words connected by 'and', *e. g. in cups & gold* for *in golden cups*. 'आणि' नें जोडलेल्या दोन निराळ्या शब्दांनीं एकच कल्पना सांगणें. [Gk=one thing by two]

Hĕn'nў *a.* (हेॅनि)—hen-like. कोंबडीच्या बदकासारखें. *n.* a hen-like cock. कोंबडीसारखा कोंबडा.

Hĕn'rў, *n.* (हेॅन्रि)—unit of inductance. चुम्बकीय प्रवर्तनाचा,-उपपादनाचा,-एकं.

Hepăt'ic, *a.* (हिपॅ'टिक्)—of or good for the liver; like the liver in colour or form. यकृताचा, यकृतासंबंधीं; यकृताच्या रंगाचा,-आकाराचा. [Gk *hepar*, liver]

Hepta-, (हेप्ट-)—in comb., seven. सप्त,-सात- *H.-chord*, *n.* सात-तारी वाद्य. सप्तस्वरयोजना. *H.-glot*, *a.* & *n.* सात भाषेंतील (ग्रंथ) *H.-gon*, a plane rectilineal figure of seven sides. सप्तकोणाकृति, सप्तकोण; *-al*, *a.* *H.-hed'ron*, a solid of seven faces. सात बाजूंचा घन.

Hĕp'tad, *n.* (हे'प्टड्)—a set or group of seven. सातांचा संच,-समुदाय.

Hĕp'tărchў, *n.* (हे'प्टार्कि)—a government by seven rulers. सप्तसत्ताक राज्य. *-chic*,*-chical*, *aa.*

Her, *pron.* & *a.* (हर्)—(objective and possessive case of She.) तिला, तिचा. (colloq.) ती. *Hers*, तिचा.

Hĕ'rald, *n.* (हे'रल्ड्)—an officer who made State proclamations, etc.; a messenger; a forerunner. ललकाऱ्या, भाट; वार्ताहर, निरोप्या, दूत; पुढें जाऊन बातमी कळविणारा, अग्रदूत, सूचक. *v. t.* to proclaim, to foretell. पुकारा करणें, ललकारी देणें, पूर्वसूचना देणें.

Herb, *n.* (हर्ब्)—a plant (whose leaves, &c. are used for food, medicine, &c.), a plant the stem of which dies every year. वनस्पति (ज्याचें मूळ दर वर्षास सुकून मरतें असा) रोपा, वुडि, औषधि. *Herba'ceous*, *a.* वनस्पतीचा,-*border*, (in gardens) नेहमीं फुलणाऱ्या फुलझाडांचा विभाग. *Her'bal*, *a.* & *n.* वनस्पतीसंबंधीं (पुस्तक), वनस्पतिगुणधर्मवर्णनात्मक ग्रंथ. *Her'balist*, *n.* वनस्पतिवेत्ता; काष्ठौषधिविक्रेता, वनस्पति विकणारा, गांधी. *Herb'arium*, *n.* शुष्क वनस्पति ठेवण्याची पेटी, कपाट इ. *Herb'iferous*, *a.* वनस्पति धारण करणारा. *Herb'ivorous*, *a.* वनस्पति खाऊन राहणारा, शाकतृणादिजीवी. *Herb'y*, *a.* वनस्पतिप्रचुर, वनस्पतिगुणधर्मी.

Herb'age, *n.* (ह'र्बिज्)—herbs; pasturage, green food for beasts; (Law) right of pasture on another's ground. झाडपाला; ओला चारा, हिरवळ; गुरेंचराईचा हक्क.

Hercū'lēan, *a.* (हर्क्यू'लिअन्)—strong as Hercules; (of task) of great difficulty. हरक्यूलीझसारखा; महत्प्रयासाचें, अतिदुष्कर.

Her'culēs, *n.* (ह'र्क्युलीज्)—a Greek hero famous for his strength; a strong man; northern constellation. (ग्रीक पुराणांतील) महाशक्तिमान योद्धा हर्क्यूलीझ, बलभीम; शक्तिमान् मनुष्य, मल्ल; उत्तर गोलार्धांतील 'शौरि' तारकापुंज. *Pillars of H.*, जिब्राल्टरच्या सामुद्रधुनीच्या दोन्हीं बाजूचे खडक. (*fig.*) अंत्यसीमा,-मर्यादा.

Herd, *n.* (हर्ड्)—a company of animals, esp. cattle, feeding or travelling together; the common people; a herdsman. (जनावरांचा, गुरांचा) कळप, तांडा, झुंड, खिल्लार; घोळका, जमाव;-पाळ, धनगर, गुराखी, हेटकरी. *v. i. & t.* to go in a herd; to tend (sheep etc.). कळप करून राहणें,-जाणें, जमावानें-घोळक्यानें-जाणें; पाळणें, निगा राखणें. *The h. instinct*, gregariousness and mutual influence as a psychological factor. कळप-संघ-करून राहण्याची प्रवृत्ति, संघप्रियता. *H.-book*, जनावरांच्या-डुकरांच्या-वंशावळीचें पुस्तक. *A cow-h.*, गुराखी, गाई राखणारा.

Herds'man, *n.* (हर्ड्स्-मन्)—keepr of herds. धनगर, गुराखी.

Here, *adv.* (हिअर्)—in or to this place; at this point; in this life; now; in this matter. या ठिकाणीं, येथें; या वेळीं; या जन्मीं, इहलोकीं; आतां; ह्या गोष्टींत. *n.* this place or point. हें स्थान,-ठिकाण. *Here!* (हजेरी देतांना) हजर! *H. below*, ह्या जगांत, इहलोकीं. *H. & there*, in various places. आजूबाजूस, इकडेतिकडे, जागोजाग. *H., there and everywhere*, all about. सर्वत्र. *Neither h. nor there*, not to the point, of no importance. लागू न पडणारा, गैरलागू, मुळींच महत्त्व नसलेला (मुद्दा). *H. about,-s*, येथेंच जवळपास. *H. at*, (arch.) ह्या ठिकाणीं. *H. by*, by this means, as a result. यानें यावरून, यामुळें. *H.inafter*, *adv.* या (लेखांत इ.) पुढें, खालीं. *H. of*, *adv.* येथचा, येथील. *H.to*, याला. *H.under*, below. खालीं (पुस्तकांत इ.). *H.upon*, ह्याजवर, ह्यावरून, म्हणून. *H.-with*, (:पत्राच्या) सोबत, जोडून, ह्यासहित.

Here'ăfter, *adv.* (हि'अर्-आफ्टर्)—in the future, in the next world. पुढच्या काळांत, परलोकीं. *n.* भविष्यकाळ, भावी-पर-लोक.

Here'tofore, *adv.* (हि'अर्-टुफोर्)—formerly. पूर्वी, मागें.

Hĕrĕd'ĭtable, *a.* (हिरे'डिटबल्)—that can be inherited. वारशानें मिळणारा.-*bility*, *n.* वंशपरंपरा-प्राप्यता.

Hĕrĕd'ĭtament, *n.* (हिरे'डिटमेन्ट्, हेरिडि'-)—property that can be inherited; real property; inheritance. वारशानें मिळणारी मिळकत; खरी-मालकीची-मालमत्ता; वारसा.

Hĕrĕd'ĭtarў, *a.* (हिरे'डिटरि)—descending by inheritance; transmitted from one generation to another; of inheritance. आनुवंशिक, वडिलोपार्जित; वंशपरंपरागत, पिढीजाद; वारशाचा. -*rily*, *adv.* वंशपरंपरेनें.-*riness*, *n.*;-*rian*, *n.* आनुवंशिकतामतानुवादी.

Hĕrĕd'ĭtў, *n.* (हिरे'डिटि)—tendency of like to beget like. आनुवंशिकता, पिढीजादपणा.-*tism*, *n.*

Hĕ'resў, *n.* (हे'रिसि)—an opinion contrary to an accepted doctrine. स्थापितमतविरोधी मत, पाखंडमत.

Hĕ'retic, *n.* (हे'रिटिक्)—holder of a heresy. धोतांड्या, पाखंडी. *Heret'ical*, *a.*

Hĕ'rĭtable, *a.* (हे'रिटबल्)—that can be inherited; capable of inheriting. वंशपरंपरा चालणारें, वंशपरंपरोपभोग्य; वारसा सांगणारा, रिक्थहारी (व्यक्ति).-*ably*, *adv.*

Hĕ'rĭtage, *n.* (हे'रिटिज्)—what is or may be inherited; one's portion or lot; (bibl.) the ancient Israelites. वडिलोपार्जित मिळकत; वारसा, वतन, वांटा, भाग्य; (ईश्वराचे लाडके) प्राचीन इस्राइल लोक.

Hĕ'rĭtor, *n.* (हे'रिटर्)—one who inherits, a proprietor. वारसदार, मालक, धनी.

Hermăph'rodite, *n.* (हर्मॅ'फ्रडाइट्)-a human being, animal, or plant with characteristics of both sexes; a person, thing, combining opposite qualities; a ship with two kinds of craft. हिजडा, हिजडी, द्विलिंगी प्राणी,-वनस्पति, स्त्रीकेसर-पुंकेसरयुक्त पुष्प; विरुद्धगुणयुक्त पुरुष, व्यक्ति किंवा वस्तु; दोन तऱ्हेच्या संयुक्त रचनेचें जहाज. *a.* उभयलिंगी, विरुद्धगुणयुक्त.-*dit'ic*,-*dit'ical*, *aa.*, -*tism*, *n.* [Gk. *Hermaphroditos*, son of Hermes and Aphrodite who, when bathing, grew together with the nymph Salmacis into one person.]

Her'mēs, *n.* (हर्'मीझ्)—(Gk Myth.) a messenger of the gods, god of science, eloquence etc. ग्रीक देवता, किमया-वक्तृत्वादिकलांची देवता.

Hermĕt'ic, *a.* (हर्मे'टिक्)—of alchemy. किमयेचा, रसायनाचा. *H. art*, किमया, रसायनविद्या. *H. seal*, वायुप्रतिबंधक बूच,-गच्च-बद्द बंद करणें. -*tically*, *adv.* वायु न शिरेल अशा रीतीनें, गच्च.

Herm'ĭt, *n.* (ह'र्मिट्)-a person living in solitude, an anchorite, a recluse. बैरागी, वानप्रस्थ, तपस्वी, योगी. *H.-crab*, दुसऱ्या कवचधारी प्राण्यानें टाकलेल्या कवचांत राहून आपलें रक्षण करणारा एक जातीचा खेंकडा,-ची कुर्ली.

Herm'ĭtage, *n.* (ह'र्मिटिज्)—hermit's abode; a solitary abode; a French wine. पर्णकुटी, आश्रम; एकांतवासाची जागा; एक प्रकारची फ्रेंच दारू.

Hern'ĭa, *n.* (ह'र्निआ)—a rupture, esp. of the abdomen. शीर उतरणें, अंतर्गळ (रोग).-*ial*, -*iary.*, *aa.*-*iot'omy*, *n.* अन्तर्गळाची छेदनक्रिया.

Hēr'ō, *n.* (ही'अरो)—a demigod; a man admired for great or noble deeds; chief man in a poem, play, or story. (ग्रीक) यक्ष, गंधर्व; शूर, मर्द, रणधीर; (काव्यांतील वगैरे) मुख्य व्यक्ति, नायक. *H. worship,-pper*, विभूति-पूजा,-पूजक, फाजील स्तोम माजविणारा.

Hērō'ic, *a.* (हिरो'इक्)—of, fit for, worthy of, having qualities of, a hero; (of poetry) dealing with heroes; (of language) high-flown; bold. मर्दपणाचें, शूराचें, शौर्याचें; वीररसात्मक (काव्य); प्रौढ, अलंकारिक (भाषा); मर्द, शूर. *n.* a heroic verse; (*pl.*) high-flown language. वीररसात्मक काव्य; प्रौढ भाषा. *-ically, adv.*

Hĕroi-cŏm'ic, *a.* (हेरोइ-कॉ'मिक्)—combining the heroic and the comic. हास्यवीरात्मक, हास्यवीररसप्रचुर.

Hērō'in, *n.* (हिरो'इन्)—a morphia preparation. अफूचा सत्त्वांश, गुंगी आणणारें द्रव्य.

Hĕ'rōine, *n.* (हे'रोइन्)—a female hero; chief woman in a poem, novel, etc. वीरा, शूर स्त्री; नायिका.

Hĕ'rōism, *n.* (हे'रोइझम्)—heroic conduct. शौर्य, प्रभाव, मर्दुमकी. *He'roize, v. t. & i.* प्रमुख नायक-वीर-करणें, (ला) विभूति मानणें; वीररसात्मक करणें;-मुख्य नायकाचें काम करणें.

Hĕ'rŏn, Hern, *n.* (हे'रॅन्, हर्न्)—a long-legged wading bird. कुर्कोची, क्रौंच, बगळा (पक्षी). *-ry, n.* a place where herons breed. बगळ्यांची विण्याची जागा,-चें उत्पत्तिस्थान.

Her'pēs, *n.* (ह'र्पीझ्)—a skin disease with patches of small vesicles upon an inflammatory base. तापाच्या पुटकळ्या येणें, तोंडावर ज्वर उमटणें.

Herr, *n.* (हेअर्)—(*pl.* Herren) German equivalent of *Mr.* 'श्रीयुत', 'मिस्टर' या अर्थी (पुरुषांना नांवापूर्वी लावावयाचा) जर्मन शब्द.

Hĕ'rrĭng, *n.* (हे'रिंग्)—a North-Atlantic fish, much used for food. 'हेरिंग' जातीचा मासा. *H. bone*, हेरिंगच्या हाडांसारख्या रचनेची शिवण, दगडांची-कौलांची-नागमोडी रचना. - मांडणी. *H.-pond*, North Atlantic. उत्तर अटलांटिक महासागर.

Hers, see Her.

Hersĕlf', *pron.* (हर्से'ल्फ्)—emphatic and reflexive form of *she, her.* ती स्वतः, तिनें स्वतः. *She is not herself*, in her normal state. ती शुद्धीवर-भानावर-नाहीं.

Hertz, *n.* (हर्ट्झ्)—(Electr.) a term denoting frequency of one cycle per second. (विद्युत्शास्त्रांत) दर सेकंदाला एका फेऱ्याच्या होणाऱ्या आवृत्त्यांची संज्ञा. *Hert'zian telegraphy*, wireless telegraphy. बिनतारी संदेश (यंत्र). *Hert'zian waves*, electric waves. विद्युल्लहरी (यांमुळें बिनतारी संदेश पाठवितां येतो).

Hĕs'ĭtant, *a.* (हे'झिटन्ट्)—hesitating; irresolute. कांकूं करणारा, घुटमळणारा, अनिश्चित; अनिश्चयी. *Hes'itance,-cy, nn.* hesitation. घुटमळणें, अनिश्चितता.

Hĕs'ĭtāte, *v. i.* (हे'झिटेट्)—to feel or show indecision; to scruple. कांकूं करणें, गुळमुळणें; आशंकणें, शंका घेणें. *Hesita'tion, n.* कांकूं, धरसोड, आशंका, किंतू. *Hes'itatingly, adv.* अडखळत, कुरकुरत. *Hes'itative, a.*

Hĕspēr'ĭan, *a.* (हेस्पी'अरिअन्)—(poet.) western. पश्चिमेकडील, पश्चिम, पाश्चात्य.

Hĕs'perus, *n.* (हे'स्परस्)—the evening star. शुक्राची चांदणी, शुक्रतारा.

Hĕ'ssian, *a.* (हे'शन्)—of Hesse in Germany. जर्मनींतील हेसचा. *n.* a coarse cloth; a *Hessian boot*, high boot first worn by H. *troops.* जाडेंभरडें कापड; उंच बूट. *H. fly*, a fly whose larva destroys wheat. गव्हांवर कीड घालणारी माशी.

Hĕst, *n.* (हेस्ट्)—(arch.) behest. आज्ञा, शब्द, आदेश.

Hĕtaer'a, Hetair'a, *n.* (हेटी'अरा,-टा'इरा)—a courtesan, a harlot. नायकीण, वेश्या, वारांगना. *-rism, n.* उघड स्वैराचार; टोळीमधील स्वैर विवाहपद्धति.

Hĕtero-, (हेटरो-)—(*Heter*, before vowel) other, different. भिन्न, इतर, वाम. [GK *heteros*, Sk *Itara*, other]

Hĕt'erodŏx, *a.* (हे'टरॉडॉक्स्)—not orthodox, contrary to established opinions. पाखंडी, सुधारक.-*y, n.* भिन्न मत, -धर्म.

Hĕt'erodȳne,-nĭng, *n.* (हे'टरोडाइन्,-निंग्)—(in wireless reception) the pulsation due to simultaneous sounding of waves that are nearly of same length. (बिनतारी संदेश-आकाशवाणी-ऐकतांना) जवळ जवळ सारख्या अंतरावरून येणाऱ्या वायुलहरींच्या एकसमयानें येणाऱ्या आवाजामुळें होणारा (आवाजांतील) कंप.

Hĕterogē'nĕous, *a.* (हेटरोजी'निअस्)—diverse in kind or race; composed of diverse elements. विजातीय, भिन्नधर्मीय; विधर्मक, विविधगुणयुक्त. *-nial, a.,-ne'ity, n.* वैजात्य, वैधर्म्य.-*ousness, n.,-ly, adv.*

Hĕterogĕn'ĕsĭs, *n.* (हेटरोजे'निसिस्)—birth other than from parent of the same kind; sponta-

neous generation. भिन्नधर्मीय वंशोत्पत्ति;तात्कालिक -आपोआप-उत्पत्ति.

Hĕt'man, *n.* (हे'ट्मन्)—the chief or general of the Cossacks, Polish military commander. कॉसॅक लोकांचा सेनापति, पोलिश सेनापति.

Heurĭs'tĭc, *a.* (ह्यूरि'स्टिक्)—serving to discover. संशोधनात्मक, स्वतः शोधून काढण्याचा. *H. method, Heuristics,* a system of education under which the pupil is trained to find out things for himself. (शिक्षण शास्त्रांतील) स्वतः-शोधनपद्धति, स्वतःशिक्षणपद्धति, स्वतःच विद्यार्थ्याला नवीन नवीन गोष्टी शोधण्यास शिकविण्याची पद्धति.

Hew, *v. t. & i.* (ह्यू)—to chop, to cut (with axe etc.), to cut into shape; to cut coal from seam. कापणें, तोडणें; कापून आकार आणणें,-देणें; खाणींतील थरांतून कोळसा तोडून काढणें.*-er, n.* तोडणारा, तोड्या, बेलदार. *Hewed, Hewn, pa. p.*

Hex-, Hexa-, (हेक्स्-, हेक्सा-)—in comb., six. षट्-, षट. *Hex'ad, n.* a set or group of six. सहांचा संच,-समुदाय. *Hexahed'ron,* (हेक्स्-हे'ड्रन्)—a figure having six faces. सहा पृष्ठभागांची आकृति.*-hed'ral, a. Hexam'eter, n.* a line of six metrical feet. सहा गणांची कवितेची ओळ, षट्पदीचरण,*-etric,-etrical, a. Hex'astyle, a. & n.* (a portico) of six columns. सहा खांबी (इमारत,-देवडी).

Hĕx'agon, *n.* (हें'क्स-गॉन्)—a plain figure having six angles and six sides. षट्कोण. *Hexag'-onal, a.* षट्कोणी.

Hey, *int.* (हे)—(calling attention, or of joy, etc.) ये! ए! हे! *H. for-!* शाबास! वाहवा! *H.-day,* ओ हो! हा हा!

Hey'day, *n.* (हे'डे)—bloom, prime, flush (of youth, prosperity etc.). ऐन भर, बहर, कमाल, उल्हास, हर्ष.

Hī, *int.* (हाय्)—(calling attention.) हे! अहो! हो!

Hīă'tus, *n.* (हाय्ए'टस्)—a break or gap; a break between two vowels. खिंड, भगदाड; (हस्तलिखित प्रतींत) तुटक-अर्धवट-भाग, खंड, भंग, (व्याक॰) प्रगृह्य.

Hī'bernāte, *v. i.* (हा'इबर्नेट्)—to pass the winter in torpor or (of persons) in mild climate; (fig.) to remain inactive. (जनावरांचें) हिंवाळा सुस्तींत घालविणें, (मनुष्यांचें) हिंवाळ्यांत स्थलांतर करणें, सौम्य प्रदेशांत हिंवाळा घालविणें,-काढणें; स्वस्थ-निष्क्रिय-राहणें.*-tion, n.,-nant, a.*

Hibern'ĭan, *a. & n.* (हाय्ब'र्निअन्)—(native) of Ireland, Irish (man). आयर्लंडचा, आयरिश (रहिवासी).

Hĭcc'ŭp, *n.* (हि'कप्)—spasm of respiratory organs. उचकी. Also, Hic'cough. *v. i. & t.* उचकी येणें,-लागणें, उचकत बोलणें.

Hĭck, *n.* (हिक्)—(U. S.) a farmer, countryman. शेतकरी, गांवढळ, प्रांतीय मनुष्य.

Hĭd, Hĭdden, *pa. p.* of hide. गुप्त, प्रच्छन्न, अज्ञात.

Hīde, *n.* (हाइड्)—animal's skin, raw or dressed; human skin. चामडें, कातडें; माणसाची चामडी, चामडें. *H. bound,* (of cattle) with skin clinging close as a result of bad feeding; (fig.) narrow-minded. हाडें बाहेर पडलेलें, रोडकें (जनावर); क्षुद्रमनस्क, हलक्या मनाचा.

Hīde, *v. i. & t.* (हाइड्)—to put or keep (a thing) out of sight; to conceal oneself; to conceal a fact; to flog. दृष्टीआड करणें; लपविणें, लपणें; छपविणें; फटके मारणें. *To h. one's head,* (लाजेनें) तोंड लपविणें, तोंड दाखवावयाला लाज वाटणें. *H. & seek,* a children's game; (also fig.). लपंडाव, लपालपी, डोळेझांकणी (खेळ); (अलं॰) लपवाछपवी. *Hid, pa. t.; hidden, hid, pa. p.*

Hīde, *n.* (हाइड्)—(hist.)—a measure of land (about 120 acres). १२० एकर जमिनीचा तुकडा.

Hĭd'ĕous, *a.* (हि'डिअस्)—frightful; horrible; repulsive, revolting. भीषण; भयानक; तिरस्करणीय; हिडिस.*-ly, adv.,-ness, n.* भेसूरपणा, अघोरपणा, हिडीसपणा.

Hī'dĭng, *n.* (हा'इडिंग्)—thrashing. चामडी लोळविणें, झोडपून काढणें, मारणें.

Hī'dĭng, *n.* (हा'इडिंग्)—the act; the place of concealment. लपविणें, लपवणूक, प्रच्छादन; लपून राहण्याची जागा. *To be in h.,* remain hidden. लपून राहणें, अज्ञातवासांत राहणें. *H.-place,* लपून राहण्याची जागा, अज्ञातवासस्थळ.

Hīe, *v. i.* (हाय्)—to go quickly. जलद-हां हां म्हणतां-जाणें, लगे लगें जाणें.

Hī'erărch, *n.* (हा'यरार्क्)—the chief priest; an archbishop. मुख्य आचार्य, मुख्य पुरोहित; मुख्य धर्माधिकारी. *Hi'erarchy, n.* (हा'यरार्कि)—each of the three divisions of angels; the angels; priestly government; any graded priesthood or other organization. देवदूतांच्या तीन प्रकारांपैकीं एक; देवदूत; धर्माधिकाऱ्यांची सत्ता; धर्ममंडळ, आचार्यसंप्रदाय; वरिष्ठापासून कनिष्ठापर्यंतची पायरीपायरीनें केलेली अधिकार-विभागणी, अधिकारपरंपरा, अशा अधिकारी वर्गाची संस्था.*-archic, -archical, aa., -archism, n.* [Gk *hieros*, sacred, *arkhes*, ruler]

Hīerăt'ĭc, *a.* (हायुइरॅ'टिक्)—of the priests; priestly. (प्राचीन इजिप्त व ग्रीक) उपाध्यायांचा; धर्माधिकाऱ्यांचा; धार्मिक.

Hi'eroglyph, *n.* (हा'इरोग्लिफ्)—the sacred characters of the ancient Egyptian language; picture-writing, figure of an object standing for one word or sound; a secret symbol; writing difficult to make out. प्राचीन इजिप्शिअन भाषेची पवित्र लिपी; चित्रलिपी, चित्राक्षर; सांकेतिक अक्षर, गूढ चिन्ह; न समजणारें-न लागणारें-लिखाण,-हस्ताक्षर,-लेख.-*'ic*, *a.* चित्रलिपींत, चित्राक्षरांत-लिहिलेलें; प्रतीकात्मक, वैशिष्ट्यसूचक, सांकेतिक; (*n. pl.*) चित्राक्षरलेखन. *-ical*, *a.*, *-ically*, *adv.*

Hig'gle, *v. i.* (हि'गल्)—to be tedious and nice in bargaining, to dispute about terms; to chaffer. घासाघीस करणें, ओढून धरणें, सौदा करणें.

Hig'gledy-pig'gledy, *adv.*, *a.* & *n.* (हि'गल्डि-पि'गल्डि)—(in) utter confusion. अस्ताव्यस्त (पणें), उलटापालट, सांवळा गोंधळ.

High, *a.* (हाइ)—of great or specified upward extent; of exalted rank or superior quality; (of sound) acute in pitch; tempestuous; exorbitant in price; (of meat or game) slightly tainted; (of time) far advanced; extreme in opinion. उंच, उंच ठिकाणचा, तुंग, उंचीचा; उच्च, श्रेष्ठ, परम, बडा, मोठ्या पदवीचा; उंच, चढा, किनरा, पहाडी (स्वर, आवाज.); जोराचा, सोसाट्याचा, वादळी, प्रचंड, प्रबळ; भारी किंमतीचा, उंची, महाग; किंचित् वाशेळें,-वास मारणारें (मांस, अन्न, शिकार); ऐन, भर, खडी (वेळ); कट्टर मताचा, हटवादी, दुराग्रही. *n.* a high place, elevation; superior region. उच्च स्थान, उंचवटा; उच्च-श्रेष्ठ-प्रदेश, आकाश. *adv.* far up, aloft; in or to a high degree; at a high price; at or to a high pitch. अगदीं उंच, उच्चस्थानीं, वर; फार, अतिशय; मोठ्या-भारी-किंमतीला; उंच-मोठ्या-पहाडी स्वरांत. *The Most High*, God. परमेश्वर. *H. art*, उच्च प्रतीची कला. *H. spirit*, courageous, enterprising. शूर-धाडसी-स्वभाव,-मन. *A h. opinion of*, विषयीं फार अनुकूल मत. *H. life*, वरच्या वर्गाचें श्रीमंती-जीवन. *H. colour*, गहिरा-तांबडा-रंग, तांबडा-लालबुंद चेहरा,-वर्णकांति, लज्जेची लाली. *It is h. time to go*, फार वेळ झाला (आतां गेलें पाहिजे). *H. & dry*, (of ship) out of the water, (*fig.*) out of the current of events. (पाण्याच्या बाहेर) सुक्या जमिनीवर असलेलें (गलबत), अलिप्त. *H. & Low*, (people) of all conditions, (*adv.*) everywhere. सर्व दर्जाचे (लोक)-गरीब श्रीमंत, सर्वत्र. *H. & mighty*, arrogant, उन्मत्त, चढेल. *On the h. ropes*, (colloq.) चढेल, गर्वानें फुगलेला, क्रुद्ध, तिरस्कारपूर्ण. *On h.*, in or to heaven, आकाशांत, स्वर्गांत, स्वर्गलोकाकडे. *From on h.*, आकाशांतून, उंचावरून. *To play h.*, मोठा जुगार खेळणें, मोठें-जड-परयाचें पान खेळणें,-टाकणें. *To run h.*, (of sea, fig. of feelings) भरतीच्या मोठ्या लाटा येणें, खवळणें, खळबळ उडणें. *H.-blower*, (of horse) नाकपुड्या मोठ्या आवाजानें फुरफुरविणारा. *H.-born*, उच्चकुलीन, थोर कुळांतला. *H. brow*, श्रेष्ठ विचारी मनुष्य. *H. Court*, वरिष्ठ न्यायालय. *H. day*, सणाचा दिवस, दुपारची वेळ. *H.-flyer*, *H.-flier*, (*fig.*) an ambitious person, one who has high-flown notions. महत्त्वाकांक्षी मनुष्य, अतिरेकी मतें असलेला मनुष्य. *H.-pitched*, उंच (स्वर), किनरा-पहाडी (आवाज), उभें, उंच (छपर, आढें), (स्वभावानें) थोर, उच्च. *H. priest*, (ज्यू लोकांचा) मुख्य उपाध्याय. *H. road*, मुख्य रस्ता, राजरस्ता, राजमार्ग. *H. strung*, very sensitive. अति नाजूक, अति हळवा. *H. tea*, tea at which meat is served. मांसपदार्थांसह चहा (संध्याकाळचें जेवण). *H. water*, high tide. पूर्ण भरती, उधान. *H. watermark*, पूर्ण भरतीची रेषा,-खूण, (fig.) जास्तींत जास्त चढ. *H. wrought*, *a.* highly finished, worked up to a high degree. मोठ्या कुशलतेनें तयार केलेलें, बनावटीचें, उद्दीप्त, खूप चेतविलेला.

High'-flown, *a.* (हा'इ-फ्लोन्)—elevated; extravagant; bombastic. उच्च; बेताल, फाजील; डवडार, डौली, अलंकारिक (भाषा).

High'-handed, *a.* (हा'इ-हॅन्डेड्)—acting with a high hand, overbearing, arbitrary. उद्दाम, दंडेलीचें, स्वैर, स्वच्छंद *-ness*, *n.* अरेरावी, स्वच्छंदीपणा.

High'lander, *n.* (हा'इलन्डर्)—an inhabitant of (the Scotch) highlands. (स्कॉटलंडमधील) पहाडी लोक, डोंगराळ देशांतील लोक,-रहिवासी. *High'lands*, *n.* (Sc. ही'लन्ड्स्), (उत्तर स्कॉटलंडमधील) उंचवट्याचा डोंगराळ प्रदेश, पहाडी मुलूख.

High'ly, *adv.* (हा'इलि)—greatly, in a high or great degree, at a high rate. फार, अतिशय, महाग.*-paid*, मोठ्या वेतनाचा,-पगाराचा.*-descended*, थोर कुळांतील.

High'minded, *a.* (हा'इ-माइन्डेड्)—morally elevated proud, arrogant. थोर मनाचा, उदार, उदार मनस्क; गर्विष्ठ.*-ness*, *n.*

High'ness, *n.* (हा'इनिस्)—the title of princes; elevation above the surface. (मांडलिक) राजांच्या नांवापूर्वी लावण्याचें उपपद; उंची, उंचपणा.

High' school, *n.* (हा'इ स्कूल)—the chief public school in a town providing secondary edu-

cation. दुय्यम शिक्षण पूर्ण देणारी शाळा, दुय्यम शिक्षणाची शाळा.

Hīgh'-spĭrĭted, *a.* (हा'इ-स्पिरिटेड्)—of courageous spirit, bold, daring. धीट मनाचा, धैर्यशाली, शूर, साहसी, धाडसी.

Hight, *pa. p.* (हाइट्)—(arch.) called, named. नांवाचा.

Hīgh'jacker, *n.* (हा'इजॅकर्)—(U. S.) an armed bandit who preys upon smugglers of illicit liquor. चोरून दारू आणणाऱ्यांना धाक दाखवून पैसे काढणारा सशस्त्र लुटारू.

Hīgh'way, *n.* (हा'इ-वे)—a public road, main road, main route. राजमार्ग, हमरस्ता.

Hīgh'wayman, *n.* (हा'इ-वे-मन्)—a man who robs on the public road or highway. वाटमाऱ्या, चोर.

Hĭlār'ĭous, *a.* (हिले'अरिअस्)—cheerful, merry. आनंदी.-*ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Hĭlă'rĭtў, *n.* (हिलॅ'रिटि)—merriment. आनंद, उल्हास, मौज.

Hĭll, *n.* (हिल्)—eminence, a small mountain; heap, pile, mound. डोंगर, टेंकडी; ढीग, रास. *v. t.* टेंकडी बनणें, मातीचा कूड-ढीग-करणें. *The hills*, हवा खाण्याचें ठिकाण. *Hill'y*, *a.* डोंगराळ. *Hill'iness*, *n.*

Hillo', **Hilloa'**, *int.* (हिलो', हि'लो)—(for hailing or expressing surprise) हे हो!

Hĭll'ock, *n.* (हि'लक्)—a small hill; a mound. टेंपर, टेंकाड.

Hĭlt, *n.* (हिल्ट्)—handle of a sword. (तलवारीची) मूठ, दस्ता, परज. *v. t.* मूठ घालणें *To prove up to the h.*, completely. पुरेपूर सिद्ध करणें,-भाप घालणें.

Hi'lum, *n.* (हा'इलम्)—(Bot.) the eye of a bean, the point of attachment of seed to seed-vessel. (घेवडा वगैरेच्या) बीचा डोळा, बीजनाभि. फलकोशांत जेथें बीं लागलेलें असतें ती जागा.

Hĭm, *pron.* (हिम्)—objective case, colloq. subjective case of He. त्याला, तो. *Himself'*, *pron.* the emphatic and reflexive form of He and Him. तो स्वतः, त्याला स्वतःला. *He is not himself*, तो भानावर-शुद्धीवर-नाहीं, त्याचें मन ठिकाणावर नाहीं.

Hīnd, *n.* (हाइन्ड्)—the female of (esp. red) deer. हरिणी, मृगी.

Hīnd, *n.* (हाइन्ड्)—a farm servant, married and skilled farm workman provided with a cottage on the farm; a steward; a rustic. शेतावरील मजूर; शेतावर खोपटांत कुटुंबासह राहणारा शेतकरी; व्यवस्थापक; गांवढळ, खेडवळ.

Hīnd, **Hīnd'er**, *aa.* (हाइन्ड्, हा'इन्डर्)—at the back, posterior, backward. मागचा, पाठीमागचा *Hind'most*, *a.* सर्वांत मागचा, शेवटचा.

Hĭnd'er, *v. t.* (हि'न्डर्)—to impede; to prevent the progress of, to check. अटकाव करणें; अडथळा करणें, मोडा-खोडा-घालणें.

Hĭndi', *a.* (हिन्दी')—of N. India. उत्तरहिंदुस्थानी. *n.* हिन्दी भाषा. *Hindu'*, *Hindoo'*, *a.* (हिन्दू', हि'न्दू)—Indian. हिन्दुस्थानचा. *n.* हिंदुधर्मीय, हिंदुधर्मानुयायी; *-ism*, *n.* हिंदु धर्म. *Hindusta'ni*, *n.* (हिन्दुस्ता'नी)—*a.* & *n.* हिंदुस्तानचा, हिंदुस्तानी भाषा, उर्दू.

Hĭn'drance, *n.* (हि'न्ड्रन्स्)—obstruction. अडथळा, हरकत, विघ्न.

Hĭng, *n.* (हिंग्)—the drug asafoetida. हिंग.

Hĭnge, *n.* (हिन्ज्)—a movable joint like that by which a door is hung on a post; a natural joint doing similar work; (fig.) critical point on which all turns. बिजागर; सांधा; मुद्याची गोष्ट, इंगित, मख्खी, सूत्र. *v. t.* & *i.* to attach with hinge; (fig.) to turn, to stand or depend *on*. बिजागर बसाविणें; फिरविणें, वर अवलंबून असणें. *Off the hh.*, in disordered state. विस्कळित, बिघडलेलें. *-ged*, *-geless*, *aa.*

Hĭnn'ў, *n.* (हि'नि)—an offspring of she-ass by stallion. (वळू) घोड्यापासून गाढवीला झालेली अवलाद, खेचर.

Hĭnn'ў, **-nie**, (हि'नि)—(Sc.) a sweet-heart. प्रेयसी, प्रिया. (See Honey.)

Hĭnt, *n.* (हिन्ट्)—a covert suggestion; a slight indication. सूचना; इशारा, दिग्दर्शन, चुणूक. *v. t.* & *i.* to suggest covertly, to make indirect allusion. सुचवणें, ध्वनित करणें, उल्लेख करणें. *To h. at*, ची सूचना देणें.

Hĭn'terland, *n.* (हि'न्टर्-लन्ड्)—the district behind that lying along the coast or river's banks. (किनाऱ्याच्या किंवा नदीच्या तीराच्या) पाठीमागील प्रदेश, पार्श्व प्रदेश, पृष्ठवर्ती भाग, प्रदेश. [G]

Hĭp, *n.* (हिप्)—projection of pelvis and upper part of thigh-bone; (Arch.) arris of roof from ridge to eaves. ढुंगण, कटिप्रदेश, कंबर; छपराचा कोनवाशाचा भाग. *To have* (a person) *on the h.*, चा फायदा घेणें. *To smite h. and thigh*, सपाटून तडाखा मारणें, बींमोड करणें, फडशा उडविणें. *H.-bath*, कटिस्नान. *-hipped*, *a.*

Hĭp, **Hĕp**, *n* (हिप्, हेप्)—fruit of (wild) rose. (रान) गुलाब-कळी.

Hip, Hyp, *n.* (हिप्)—morbid depression. खिन्नता, गळल्यासारखें वाटणें. *v. t.* to make low-spirited. उदास-खिन्न-करणें.

Hip, *int.* (हिप्)—(introducing united cheer.) *Hip, hip, hurrah!* हे! हो!

Hipe, *v. t. & n.* (हिप्)—to throw (an antagonist in wrestling) in a particular way; such a throw. (प्रतिपक्षाला मल्लयुद्धांत) विशिष्ट तऱ्हेनें फेंकणें,-हापटणें; अशी हापटी.

Hip'po, *n.* (हि'पो)—(colloq.) a hippopotamus. जलाश्व, पाणघोडा. [abbr.]

Hippo- (हिपो-)—(in comb.) horse. घोडा, अश्व. *-phagy*, घोड्याचें मांस खाण्याची चाल. [Gk *hippos*, horse]

Hippocam'pus, *n.* (हिपोकॅ'म्पस्)—(*pl.-pi*) kinds of small fish; a sea-horse. लहान जातीचा मासा; समुद्रांतील अश्वाकार मासा. *H. major, -minor*, (Anat.) eminences on the floor of each lateral ventricle of brain. मस्तिष्क-विवराच्या प्रत्येक बाजूच्या पृष्ठभागावरील फुगीरपणा.

Hipp'ocras, *n.* (हि'पक्रॅस्)—(hist.) spiced wine. मसालेदार दारू-मद्य.

Hipp'odrome, *n.* (हि'पड्रोम्)—a course for chariot races etc.; a circus. (रथांच्या, घोड्यांच्या इ.) शर्यतीचें मैदान,-रिंगण; चित्रांचा व घोड्यांचा खेळ.

Hipp'ogriff,-yph, *n,* (हि'पग्रिफ्)—a fabulous griffin-like creature with horse's body. अश्व-शरीरधारी काल्पनिक राक्षस.

Hippopot'amus, *n.* (हिपपॉ'टमस्)—African river-horse. पाणघोडा, जलाश्व.

Hir'cine, *a.* (हि'र्साइन्)—goat-like. बकऱ्यासारखा, मेषसदृश. [L *hircus*, goat]

Hire, *n.* (हायर्)—payment for use of a thing, labour, &c., a reward. भाडें, मोल, वेतन, बक्षीस. *v. t.* to employ or procure on hire. भाड्यानें घेणें किंवा देणें, व्याजानें (पैसे) काढणें. *On h.*, भाड्यानें देण्याचें. *H. purchase, h. system*, हप्तेबंदीनें वस्तु खरेदी घेण्याची पद्धति. *Hir'er, n.* वस्तु भाड्यानें देणारा-घेणारा. *Hir'able, a.*

Hire'ling, *n.* (हा'यलिंग्)—one who works for hire, a mercenary person. मजुरदार, भाडोत्री.

Hirs'ute, *a.* (हि'र्स्यूट्)—hairy, shaggy. केसाळ, मिसाळ, लोममय.

His, *pron. & a.* (हिझ्)—possessive of He. त्याचा-ची-चें.

His'pid, *a.* (हि'स्पिड्)—(Bot., Zool.) shaggy; bristly. खडबडीत, केसाळ, लोममय; तीव्रकेशयुक्त.

Hiss, *n.* (हिस्)—sharp sound of *s* as a sign of disapproval. फूत्कार, फुस्कारा, सीत्कार. *v. i. & t.* to make a hiss; to express disapproval. फुसकारणें, सूंसूं करणें; हुशहुश करून नापसंति दर्शविणें, हुसकणें, हुसकावून लावणें.

Hist, *int.* (हिस्ट्)—(used to call attention, enjoin silence, or incite a dog etc.) चुप्! गप्! हं! छुः!

Histo-, (हिस्टो-)—in comb., web, tissue. जाळें, पिंड. *Histol'ogy, n.* the science of organic tissues. सूक्ष्मपिंडरचनाशास्त्र.*-ogical, a.-ogist, n.*

Histor'ian, *n.* (हिस्टॉ'रिअन्)—writer of history. इतिहासकार, इतिहासज्ञ.

Histo'ric, *a.* (हिस्टॉ'रिक्)—noted in history. इतिहासप्रसिद्ध.

Histor'ical, *a.* (हिस्टॉ'रिकल्)—pertaining to history; belonging to the past; (of picture, novel etc.) dealing with historical events, historic. ऐतिहासिक; गतकालीन; ऐतिहासिक गोष्टींचें वर्णन करणारें, इतिहासरूप,-निदर्शक; इतिहासप्रसिद्ध. *H. evidence*, इतिहासाचा-ऐतिहासिक-पुरावा.*-lly, adv.*

Histori'city, *n.* (हिस्टरि'सिटि)—historical character, genuineness. ऐतिहासिकता, इतिहास-सिद्धता, खरेपणा.

Historiog'rapher, *n.* (हिस्टॉरिऑ'ग्रफर्)—writer of history, an official historian of a court. इतिहास-लेखक (कामगार, अधिकारी).*-graphy, n.* इतिहासलेखन.

His'tory, *n.* (हि'स्टरि)—a methodical record of public events; past events, study of these; an eventful career. इतिहास; गतगोष्टी, गत-गोष्टींचा अभ्यास; चरित्र, पुरावृत्त.

His'trion, *n.* (हि'स्ट्रिअन्)—a stage-player. नट, नाटकी मनुष्य.

Histrion'ic, *a.* (हिस्ट्रिऑ'निक्)—of acting, stagy; hypocritical. अभिनयाविषयीं, नाटकासंबंधीं; दांभिक. *n. pl.* theatricals; stagy language; pretence. (अने०) नाटकासंबंधीं गोष्टी; नाटकी भाषा; ढोंग, मिष. *-ism, -icism. nn.; -ically, adv.*

Hit, *v. t. & i.* (हिट्)—to strike with a blow or missile, to aim a blow; to light upon; to find; to affect sensibly; to suit; to arrive at. ठोसा मारणें, हाणणें; उतरणें, लाग साधणें; सुचणें; धक्का बसणें, ठोकर बसणें-लागणें; (शीं) जमणें,-जुळणें; येणें, पोंचणें. *n.* a blow; stroke of satire (*at*); success. तडाखा, आघात, टोला; टोमणा; लाग, यश. *Hard h.*, (पैशाच्या वगैरे) अडचणींत सांपडलेला. *To h. upon*, (नशिबानें) मिळणें,

लाभणें, सुचणें. *To h. off*, to imitate to a nicety. अचूक अनुकरण करणें. *To h. below the belt*, to play foul. लबाडी करणें. लबाडीनें ठोकर देणें, फसविणें, खोटा डाव-पेंच-टाकणें,-घालणें. *To h. it*, *to hit the (right) nail on the head*, बरोबर अंदाज करणें,-ताडणें, खरें खुरें सांगणें. *To h. it off*, जुळणें, जमणें. *To h. out*, जोरानें तडाखा लगावणें.

Hitch, *v. t. & i.* (हिच्)—to move with a jerk; to fasten with loop, &c.; to become so fastened; to shift. हिसके देत जाणें किंवा ओढणें; बांधून टाकणें; अडकवणें, अडकणें; हालवणें. *n.* a jerk; an impediment; (Naut.) kinds of noose. हिसका; अडथळा; सुरगांठ.

Hith'er, *adv.* (हि'द़र्)—to this place. इकडे. *a.* इकडचा, इकडील. *H. ward*, ह्या दिशेनें. *Hither & thither*, इकडे तिकडे, चोहींकडे.

Hitherto', *adv.* (हिद़र्-टू')—up to now. आतांपर्यंत.

Hive, *n.* (हाइव्ह्)—(also, *beehive*) artificial home for bees; a busy swarming place. मधमाशांचें पोळें; गर्दीची जागा, पोळका, गर्दी. *v. t. & i.* to place or enter in a hive; to house snugly; to hoard up; to live together (like bees). पोळ्यांत ठेवणें,-जाणें; जमावानें ठेवणें; सांठविणें; जमावानें-पोळक्यानें राहणें.

Hives, *n. pl.* (हाइव्हझ्)—skin eruption; inflammation of bowels etc. कातडीवरील पुटकुळ्या, पुरळ; सूज.

Ho, *int.* (हो)—expressing surprise, etc., calling attention, added to name of destination. हो! हो हो! रे! इष्टस्थलदर्शक प्रत्यय.

Hoar, *a.* (होअर्)—grey-haired; white. पांढऱ्या केसांचा; शुभ्र, शुरकट. *n.* hoar-frost. बर्फ.

Hoar'frost, *n.* (हो'अर्-फ्रॉस्ट्)—white frost, white particles of frozen dew. थिजलेलें दंवाचें बर्फ, हिम, गोठलेल्या दंवाचे कण.

Hoard, *n.* (होअर्ड्)—a stock, a store. सांठा, निधि, संचय, हबोलें. *v. t. & i.* to amass or keep in hoard; to husband privily; to treasure up. सांठवणें; गुप्त रीतीनें सांठवून ठेवणें; जमविणें, जमणें.

Hoard'ing, *n.* (हो'अर्डिङ्)—a high board fence round building during erection or repairs. (इमारतीच्या बांधकामाच्या किंवा दुरुस्तीच्या वेळीं) फळ्यांचें सभोंवार उंच कुंपण,-आवार.

Hoarse, *a.* (होअर्स्)—(of voice) rough, husky; having a hoarse voice. घोगरा, कर्कश, फुटलेला; घोगऱ्या गळ्याचा.-*ly*, *adv.*,-*ness*, *n.*,-*en*, *v. t. & i.* घसा बसविणें,-बसणें, घोगरा करणें,-होणें.

Hoar'y, *a.* (हो'अरि)—white or grey with age; venerable; (Bot.) covered with short white hairs. पिकलेल्या केसांचा; सन्माननीय; श्वेतलोमयुक्त, आंखूड व सफेत लव असलेला. *Hoar'iness*, *n.*

Hoax, *v. t.* (होक्स्)—to deceive by way of joke, to play a trick upon. थट्टेनें फसवणें, थट्टा करणें, चकवणें. *n.* such a deception. फसवणूक, चलाखी, चकवणूक.

Hŏb, *n.* (हॉब्)—a side easing of a fire-place; a peg; the hub of a wheel. (चुलीचा) वैल; मेख, खुंटी; (चाकाचें) तुंब.-*nail*, बुटाच्या तळव्याला मारण्याची मोठ्या डोक्याची-गुलाची-चूक.

Hŏb'ble, *v. i. & t.* (हॉ'बल्)—to walk lamely, to limp; (fig.) to proceed haltingly; to tie together legs (of horse) to keep it from straying. लंगडत चालणें, लंगडणें; अडखळत-चांचपडत (काम) करणें,-बोलणें,-भाषण करणें; (घोड्याच्या) पायांत खोडा घालणें, दोन्ही पाय बांधून टाकणें. *n.* a limping gait; an awkward situation; a rope etc. for hobbling a horse. लंगडी गति, लंगडी चाल; पेंच, अडचण, घोंटाळा; पायबंद (दोर इ.). *H. skirt*, (ज्यानें चालतांना अडथळा होतो असा) पायाशीं तंग-घट्ट-चोळणा.

Hŏb'bledehoy', *n.* (हॉ'बल्डिहॉ'यू)—an awkward youth between boyhood and manhood. (वाढीला लागलेला, दिसण्यांत) चमत्कारिक मोठा मुलगा,-तरुण.-*hood*,-*ism*, *nn.*-*ish*, *a.* Also, *Hobbad-*, *Hobbed-*.

Hŏbb'y̆, *n.* (हॉ'बि)—a favourite pursuit outside one's main occupation; a small horse; a small falcon. आवडता विषय, छन्द, नाद; तट्टू; लहान ससाणा.

Hŏbb'y̆-horse, *n.* (हॉ'बि-हॉर्स्)—a wicker horse for morris dance etc.; a rocking-horse; a child's stick with horse's head; a horse on merry-go-round; a hobby. लव्हाळ्याचा-काटक्यांचा-घोडा; लांकडी हालता-डुलता-घोडा; (मुलांच्या खेळांतील) काठीचा घोडा; (जत्रेंतील) फिरत्या चक्राचा घोडा; छंद; नाद.

Hŏb'gŏblin, *n.* (हॉ'गॉब्लिन्)—an elf, a bogy. पिशाच, भूत, बागूलबुवा.

Hŏb'nŏb, *v. i.* (हॉ'ब्नॉब्)—to drink together; to associate familiarly (*with*). सह (दारू) पिणें, सह (मद्य) पान करणें; (शीं) दोस्तीनें-मिळून मिसळून-वागणें. [F. *hob or nob*, give & take]

Hō'bō, *n.* (हो'बो)—a wandering workman or tramp. फिरता कारागीर, भटक्या.

Hŏck, *n.* (हॉक्)—the joint of animal's hindleg. (जनावराच्या) मागच्या पायांतील घोंटा. 2. kinds

of white wine. श्वेत मद्य, दारू. 3. *v. t.* (*sl.*) to pawn, to pledge. गहाण टाकणें.

Hŏck'ey, *n.* (हॉ'कि)—a game with ball and curved sticks between goals. चेंडूदांडूचा हॉकीचा खेळ.

Hō'cus, *v. t.* (हो'कस्)—to hoax; to drug. फसविणें; (मनुष्याला) गुंगीचें औषध देणें, मादक पेयानें गुंगविणें, मादक द्रव्य घालून भेसळ करणें.

Hō'cus-pō'cus, *n.* (हो'कस्-पो'कस्)—jugglery, trickery used by conjurers. गारुड्याची हातचलाखी, जादुगिरी, थातुरमातुर, छांदूं. *v. t. & i.* फसविणें, जादू करणें.

Hŏd, *n.* (हॉड्)—a trough on staff for carrying mortar, bricks etc. (दांडेवालें) लांकडी घमेलें (इमारतीच्या बांधकामासाठीं चुना वगैरे वाहून नेण्याचें).-*man*, *n.* a labourer carrying a hod, (*fig.*) a mechanical worker, a literary hack. लांकडी घमेलें वाहणारा मजूर, (अलं०) यंत्राप्रमाणें काम करणारा, भाडोत्री लेखक.

Hŏdd'en, *n.* (हॉ'डन्)—(Sc.) a coarse woollen cloth. जाडेभरडें लोंकरी कापड. *H. grey*, करड्या रंगाचें लोंकरी कापड, खेडवळ-खेडुताचें-कपडे.

Hŏdge, *n.* (हॉज्)—an English farm-labourer. इंग्लिश शेतकरी,-शेतावरील मजूर.

Hŏdge'-pŏdge', *n.* (हॉ'जपॉ'ज्)—hotch-potch. पंचभेळ, खिचडमिचड.

Hŏdŏm'eter, *n.* (हॉडॉ'मिटर्)—*an instrument for* measuring distance travelled by a wheeled vehicle. चाकें असलेलें वाहन किती अंतर चाललें हें मोजण्याचें यंत्र.

Hoe, *n* (हो)—a tool for cutting up weeds, &c. कुदळ, खोरें, खुरपें, फावडें. *v. t.* to loosen ground or remove weeds with a hoe. कुदळीनें खणणें, कुदळणें.

Hŏg, *n.* (हॉग्)—swine, esp. castrated boar; young sheep before first shearing; a greedy person. डुक्कर, सूकर, डुकर; अगदीं लहान मेंढी; (डुकरासारखा) गलिच्छ, अधाशी मनुष्य. *v. t. & i.* to raise (back etc.), to rise archwise in the centre; to cut (mane) short. (पाठ) उंच करणें, मध्यें डुकराच्या पाठीसारखें-कमानदार-वर येणें,-उंच होणें; उभे केंस कापणें. *To go the whole hog*, to do the thing thoroughly. एकादी गोष्ट शेवटास पोंचविणें,-पूर्णपणें करणें, पूर्णपणें वाहून घेणें. *H. back*, *h.'s back*, crested hill ridge. टेंकडीची उंच कडा, उंच सुळका,-सूळ. *H.-fish*, डोक्यावर कांट्यासारखे केंस असलेला मासा. *H.like*, greedy. अधाशी, लोभी. *H. mane*, घोड्याची कापलेली-आंखूड केलेली-आयाळ. *H.-plum*, अंबाडा. *H. sty*, डुकरांची जागा, डुकरवाडा. *H. wash*, डुकरांना घालण्याचें खरकटें मरकटें (पाणी). *Hogg'ish*, *hog-like*, *aa. Hogg'ishly*, *adv.*,-*ishness*, *n. Hog'ling*, *n.*

Hŏgs'head, *n.* (हॉ'ग्झ्-हेड्)—a large cask; a measure (abbr. *hhd*), 52½ gallons. मोठें पिंप; साडे बावन गॅलनचें एक माप.

Hoick, **Hoik**, *v. t. & i.* (हॉइक्)—to force an aeroplane to turn abruptly upward. विमान एकदम वर चढविणें.

Hoist, *pa. p.* (हॉइस्ट्)—*H. with his own petard*, blown up by his own bomb meant for others. स्वतः लावलेल्या सुरुंगानें स्वतःच उडवून लावलेला, दुसऱ्याचें वाईट करतां स्वतःचेंच वाईट झालेला.

Hoist, *v. t.* (हॉइस्ट्)—to raise aloft (esp flags); to raise with a tackle, &c. उभारणें, उंच फडकविणें, उचलणें. *n.* उचलणें, उभारणें, उचलणारें यंत्र, पाळणा.

Hoit'ÿ-toit'ÿ, *a.* (हाॅ'इटि-टाॅ'इटि)—haughty, frolicsome. उद्धट, खेळकर, खोडकर. *n.* riotous or giddy conduct. खट्याळपणा, मायेफिरूपणा. *int.* (आश्चर्यदर्शक) अरे च्या !

Hō'key-pō'key, *n.* (हो'कि-पो'कि)—hocus-pocus; cheap icecream sold by street vendors. हातचलाखी; रस्त्यांत विकलें जाणारें स्वस्त आइस्क्रीम, थंडी मलई.

Hōld, *v. t. & i.* (होल्ड्)—to keep fast, to grasp; to keep in particular attitude; to possess; to contain, to have room for; to observe, to celebrate; to restrain; to think, to believe; (Mil.) to keep possession of (a place); (of judge) to lay down, decide (that); to apply; not to give way; to keep going. धरणें, धरून ठेवणें; विशिष्ट स्थितींत ठेवणें,-राखणें; ताब्यांत असणें; मावणें, समावेश होणें; (उत्सव वगैरे) करणें, भरविणें; आवरणें; प्रतिपादणें, मत असणें, वाटणें; (ठिकाण, जागा) ताब्यांत ठेवणें, न सोडणें; (न्यायाधिशाचें) निकाल देणें, कायद्यानें ठरविणें; लागू होणें,-असणें; न तुटणें, अखंड राहणें; चालू असणें. *n.* grasp; means of holding; a place of custody; a fortified place; the cavity below the deck for cargo. पकड, कबजा; अडकवण, दाव; कैद, कोठी; किल्ला; डेकच्या खालील माल ठेवण्याची जागा, फाळका. *To h. to bail*, to bind. जामीन घेणें. *To h. one's hand*, शिक्षा-कृति-न करणें, हात आवरणें. *To h. by*,-*to*, to adhere to. न सोडणें, चिकटून राहणें. *To h. with*, to approve of. पसंत करणें. *To hold good*,-*true*, (नियम इ.) लागू असणें,-पडणें, खरा असणें. *H!* (arch.) हां! थांब! धीर धर! *To h. one's head high*, to behave proudly. गर्वानें वागणें, मान वर करून वागणें,-राहणें. *To h. up one's head*, खिन्न-उदास-न

होणें, मान खालीं घालून न बसणें. *To h. one's ground, to h. one's own,* not give way. हार न जाणें आपला मुद्दा-हेका-न सोडणें. *To h. water,* (fig.) to be sound, bear examination. न गळणें; पायाशुद्ध असणें, निभावणें, टिकणें, निभणें. *To h. aloof,* शीं संबंध न ठेवणें, अलिप्त राहणें. *To h. back,* to restrain, hesitate, refrain *from.* आवरणें, बंधन-लगाम-घालणें, कांकूं करणें, पासून दूर राहणें. *To h. forth,* to speak publicly. जाहीर-सभेंत-भाषण करणें, जाहीर प्रतिपादन करणें, चारचौघांत बोलणें. *H. hard,* घट्ट धर! *H. in,* आवरणें, कह्यांत ठेवणें. *H. off,* to delay. विलंब लावणें, उशीर करणें. *H. on,* keep one's grasp on something, stop. धरून राहणें, थांबणें, बंद करणें. *H. out,* पसरणें, पुढें-देऊं-करणें, लालूच दाखविणें, सहन करणें, चिकाटी धरणें. *H. over,* postpone. पुढें ढकलणें, दिरंगाईवर टाकणें. *H. up,* support, sustain, display, obstruct, stop and rob on highway, (of horse) not fall. आधार देणें, टिकाव धरणें, प्रदर्शन करणें, उघड्यावर-चवाट्यावर-आणणें, अडथळा करणें, वाटमारेपणा करून लुटणें, (घोडा) न घसरणें, -पडणें. *H.-all,* a portable case for clothes etc. (कपडे, हांतरूण पांघरूण वगैरे) सर्वसंग्राहक प्रवासी पिशवी.-बिछाना. *H. -back,* hindrance. अडथळा, विघ्न, गाडीची ढक. *H. fast,* वस्तु घट्ट बसण्या-करितां मारलेला खिळा, हूक इ., आधार, आश्रय. *Held, pa. t., Held, Holden,* (arch.) *pa. p.*

Hō'lder, *n.* (हो'ल्डर्)—one who holds anything; a tenant; a temporary accupant of office etc.; a device for holding (*cigar-h.,* pen-h., etc.). धरणारा, (हुंडीचा) मालक; पोटधरेकरी, कूळ; (जागेवर) तात्पुरती नेमणूक झालेला; मूठ, दांडा, नळी, धारक.

Hōld'ing, *n.* (हो'ल्डिंग्)—tenure of land; land or stocks, &c. held. पट्ट्यानें दिलेली जमीन; भाड्यानें वगैरे घेतलेली जमीन, हुंडी-रोखे (घेतलेले).

Hōle, *n.* (होल्)-a hollow place, a gap; animal's burrow; a wretched place; a cavity into which a ball must be got in some games, (Golf) point scored by player who gets ball from one hole to another with the fewest strokes; perforation; (sl.) awkward situation. खळगा, खांच, भोंक; विवर, बीळ, घर; गलिच्छ जागा; कांहीं खेळांत (चेंडू दवडण्याचा) खळगा, भोंक, घर, (गोल्फच्या खेळांत) असा चेंडू थोडक्या टोल्यांत दवडून मिळविलेला गुण,-डाव; जाळीचें भोंक, जाळी, छिद्र; पेंच, अडचण. *v. t. & i.* to make holes in; to pierce side of (ship); to make (a tunnel); (Mining) to dig through; to put or drive (a ball) into a hole. भोंकें पाडणें, खळगे पाडणे, (गल-बताच्या) बाजूंत भोंक पाडणें, शिरणें; (विवर, बोगदा) खणणें, तयार करणें; (खाणींत) खोल खणीत जाणें; (चेंडू) भोंकांत-घरांत-दवडणें. *To pick hh. in,* to find fault with. छिद्र-दोष-पाहणें, छिद्रान्वेषण करणें. *To make h. in,* to use a large amount of. मोठा खळ-खळगा-पडणें, बराच भाग वापरला जाणें, खर्चून जाणें. *Round peg in a square h., Square peg in a round h.,* a person not fitted for his place. न जुळ-णारा-अयोग्य-मनुष्य. *H.& corner,* गुप्त, लपाडीचा. *Hol'ey, a.*

Hŏl'iday, *n.* (हॉ'लिडि)—a day of cessation from work or of recreation; (*pl.*) vacation. सुटीचा किंवा सणाचा दिवस, सण, रजा, पर्वणी; सुटी. *To make h., take a h.,* कामावर न जाणें, रजा घेणें. *H. clothes,* सणावारीं घालण्याचे-उंची-कपडे. [*holy day*]

Hō'lĭlў, *adv.* (हो'लिलि)—in a holy manner. पवित्रपणानें, शुचिर्भूतपणें, निर्मळपणें.

Hō'liness, *n.* (हो'लिनेस्)—freedom from sin, sanctity. निष्पापता, पवित्रपणा, शुद्धि. *H., his H.,* पोपची पदवी, शंकराचार्यांची पदवी, पुण्य-राशि,-निधि.

Holl'a, *int.* (हॉ'ला)—(for shouting). ओलो! होलो!

Hŏll'and, *n.* (हॉ'लन्ड्)—a fine linen fabric made in Holland. तलम तागी कापड. *-s, n.* a grain spirit. धान्यापासून केलेलें मद्य, दारू.

Hŏll'o, *int. & n.* (हॉ'लो)—calling attention. हे! हो! (अशी आरोळी, हांक). *Holl'o, Holloa', v. i. & t.* to shout, to call out; to call to hounds. आरोळी मारणें, मोठ्यानें हांक मारणें; शिकारी कुत्र्यांना हांक मारणें,-हांकारणें.

Hŏll'ow, *a.* (हॉ'लो)—having a hole; empty; (*fig.*) false, unreal. पोकळ; रिकामा; खोटा. *n.* a hollow place; hole; valley. खळगा; ढोल, विवर; दरी. *v. t.* (also) *h. out,* to excavate; to bend into a hollow shape. खणून काढणें; पोकळ आकार देणें, वांकविणें; पोकळी तयार करणें. *Beaten h.,* (*adv.*) completely. सपशेल चीत, पूर्णपणें पराभूत. *H.-eyed,* डोळे खोल गेलेला, कोंड्या डोळ्यांचा. *H.-hearted,* insincere. मनाचा कुजका *H. race,* पोकळ-विशेष चढाओढ नसलेली-शर्यत. *H.-ly, adv., H.-ness, n.*

Hŏll'ў, *n.* (हॉ'लि)—an evergreen shrub with red berries. तांबड्या फळांचें सदापर्णी झुडूप.

Hŏll'ўhŏck, *n.* (हॉ'लिहॉक्)—a tall plant with large showy flowers. मोठ्या भपकेबाज फुलांचें उंच फुलझाड.

Hŏ'llȳwood, *n.* (हॉ'लिवुड्)—moving pictures of American type, chiefly made at Hollywood in California. अमेरिकन चलच्चित्रपट (हॉलिवुड येथें तयार झालेले).

Hōlm, Hōlme, *n.* (होम्)—an islet in a river; low flat land near a river, submerged in time of flood. जूं, जुवा (लहान बेट, नदींतील); (भरतीच्या वेळीं पाणी भरणारी) नदीकांठची सखल-सपाट-जमीन.

Hōlm, *n.* (होम्)—(*h. oak*), an evergreen oak. सदापर्णी ओक वृक्ष.

Hŏlo-, (हॉलो-)—in comb., Gk *holos*, whole. पूर्ण, सर्व-. *Hol'ograph, a. & n.* स्वदस्तुरचा-संपूर्ण स्वहस्तलिखित-लेख. *Holohe'dral*, (of crystal) पूर्ण समांतरपणा राखणाऱ्या सर्व बाजू असलेला (स्फटिक). *Holometa'bola, n. pl.* ज्यांचें स्वरूप पूर्ण बदलतें असे कीटक,-किडे, पूर्ण रूपांतर होणारे कीटक. *Holophote, n.* दिव्याचा सर्व उजेड उपयोगांत आणण्याचें-एकत्रित करण्याचें-साधन.

Hŏl'ŏcaust, *n.* (हॉ'लोकॉस्ट्)—whole burnt-offering; (*fig.*) wholesale sacrifice or destruction. पूर्ण हुतभाग, होम.; पूर्ण नाश, कत्तल.

Hō'lster, *n.* (हो'ल्स्टर्)—a leather case for pistol. पिस्तूल ठेवण्याची चामड्याची पिशवी.

Hōlt, *n.* (होल्ट्)—(poet.) a copse; a wooded hill. झुडपाळ प्रदेश, रान; जंगलें असलेली टेंकडी.

Hō'lȳ, *a.* (हो'लि)—belonging or devoted to God; of high moral or spiritual excellence; consecrated, sacred. ईश्वरपरायण, भाविक; धार्मिक, नीतिमान्; पवित्र. *n.* inner chamber of sanctuary in Jewish temple, *h. of hh.*, innermost shrine. हिब्रू-ज्यू-लोकांच्या जेरुसलेम येथील देवळाचा आंतील सोंवळा गाभारा, देवघर, देवाचा गाभारा. *H. day*, धार्मिक सणाचा दिवस, धार्मिक उत्सव, सण. *H. Ghost, H. Spirit*, (त्रिमूर्तींतील) पवित्र आत्मा. *H. Joe*, (naut.) a pious person. धार्मिक वृत्तीचा मनुष्य. *H. terror*, (*sl.*) a formidable person, a bore (child). भयंकर माणूस, त्रासदायक मूल. *H. Thursday*, Ascension Day. ईस्टर रविवार पुर्वीच्या आठवड्यांतील गुरुवार. *H. water*, तीर्थोदक, गंगोदक, पवित्र पाणी. *H. week*, ईस्टर रविवार-पूर्वीचा आठवडा. *H. writ*, holy writings collectively, the Bible. पवित्र धर्मशास्त्रें, धर्मग्रंथ, ख्रिस्ती लोकांचें बायबल.

Hō'lȳstōne, *n.* (हो'लिस्टोन्)—a sandstone for scouring decks. (बोटींतील) तक्तपोशी घांसण्याचा रेंवाळ दगड. *v. t.* अशा दगडानें तक्तपोशी घासणें.

Hŏm'age, *n.* (हॉ'मिज्)—formal acknowledgement of allegiance; (*fig.*) tribute paid to a person or merit. सेवा, उपासना; पूजा, नमन, मान, सत्कार, सन्मान. *To pay h. to, to do h. to* (a person, his qualities), ला मान देणें.

Hōme, *n.* (होम्)—a dwelling-place; fixed residence; native land; habitation or seat; an institution of refuge or rest; (in games) a goal. स्वतःचें घर, राहण्याचें ठिकाण; जन्मभूमि, मातृभूमि, ठिकाण, स्थान; आश्रम, आश्रयस्थान, स्थान; डाव. *a.* pertaining to home; not foreign. घरचा, खासगी, घरगुती; परकी नव्हे असा, स्वदेशी. *adv.* to or at one's home; the point aimed at. घरीं, घराकडे; नेमलेल्या ठिकाणीं, मर्मस्थानीं, मर्म भेदून. *v. i. & t.* to go home (esp. of pigeons); to furnish with a home. निवासस्थानाकडे- घराकडे- जाणें; घर करून देणें. *Long h., Last h.*, the grave. थडगें, स्मशान, अंत्य विश्रांतिस्थान. *At h.*, स्वगृहीं, स्वदेशांत, स्वस्थ, सुखानें, (एखाद्या विषयांत) प्रवीण, माहीतगार, पूर्ण ज्ञान असलेला, घरांत. *Not at home*, घरांत नाहींत, बाहेर गेले आहेत. *At-home', n.* निमंत्रित पाहुण्यांना मेजवानी, भोजन-सत्कार समारंभ. *To come h. to*, affect intimately. अंगास येणें, जिव्हारीं लागणें. *H.born*, native. घरचा, स्वदेशी, तद्देशीय. *H.-bred*, घरांत वाढवलेला. *H.-coming*, स्वगृहीं- स्वदेशीं-परत येणें. *H.-felt*, वर्मी लागलेला. *H.-keeping, a.* stay-at-home. नेहमीं घरांत असणारा, घर-कोंबडा. *H.-made*, घरगुती, घरीं तयार केलेलें, घरांत उपयोगाचें. *H. Rule*, (आयरिश) स्वराज्य. *H.-sick*, depressed by absence from home. कुटुंबविरहानें दुःखी झालेला, गृहविरहदुःखी. *H.-sickness*, कुटुंबविरहदुःख. *H. spun, a. & n.* cloth of home spun yarn; plain, homely. घरीं सूत कातून विणलेला कपडा; साधें, घरगुती. *H. stead*, घर गोठा वगैरे, शेत. *H.-less, a.* घरदाररहित. *H.-like, a.*

Hōme'lȳ, *a.* (हों'-म्-लि)—plain; unpretending; not beautiful; primitive. साधा; निरहंकारी, लीन; सामान्य, दहाजणांसारखा; मूळचा, घरगुती. *-liness, n.*

Homeopathy, See Homoeopathy.

Homĕ'rĭc, *a.* (होमे'रिक्)—of Homer, in the style of Homer; heroic. होमर कवीचा; होमरच्या धर्तीवरील; शौर्याचा, वीराचा.

Hōme'ward, *a. & adv.* (हो'म्-वर्ड्)—towards home or one's native land. घराकडे, मातृ-भूमिकडे. *H. bound*, स्वदेशाकडे जाणारें-आण्याच्या तयारींत असणारें (जहाज). [Also, Home'wards]

Hŏm'ĭcide, *n.* (हॉ'मि-साइड्)—killing or killer of a human being. मनुष्यवध, मनुष्यवध कर-णारा. *-dal, a.* मनुष्यवधाचा,-वधासंबंधीं.

Hŏm'ilў, *n.* (हॉ'मिलि)—a sermon ; a serious discourse or admonition. धार्मिक उपदेश ; धर्मोपदेश, प्रवचन, कानउघाडणी. *Homilet'ic*, *a.* धर्मोपदेशपर ; *n. pl.* प्रवचनपटुत्व.

Hō'ming, *a.* (हो'-मिंग्)—that goes home ; (of pigeons) trained to fly home. घरीं-स्वस्थानीं -जाणारा ; मूळ ठिकाणीं-स्वदेशीं-परत जाण्यास शिकविलेलें (कबूतर).

Hŏm'iny, *n.* (हॉ'मिनि)—coarsely ground maize boiled in water or milk. मक्याच्या रव्याची खीर, कण्हेरी.

Hō'mo, *n.* (हो'मो)—(zool.) a man. मनुष्य *H. sapiens*, (wise) man regarded as species. मनुष्यवर्ग.

Hŏmo-, (हॉमो-)—in comb., Gk *homos*, same. सम-. *Homocen'tric*, having the same centre. समकेंद्रक, एकच मध्यबिंदू असलेला. *Ho'mogamous*, (Bot.) having all florets of the same sex. एकलिंगी लघुपुष्पांचा. *H.-genet'ic* सम-एक-वंशीय, एकमूलक. *H.-phone*, a word having same sound as another, but of different meaning or origin (as *fair*, जत्रा, *fair*, सुंदर). (भिन्नार्थदर्शक) तुल्यवर्णोच्चारी शब्द.

Hŏmoeŏp'athў, *n.* (होमिऑ'पथि)—treatment of diseases by drugs that in healthy persons would produce symptoms like those of the disease. ज्या पदार्थाच्या सेवनानें निरोगी माणसाला एखादा विकार होतो तो पदार्थ तो विकार झालेल्या रोग्याला देऊन रोग बरे करण्याची पद्धत, व्याधिविपर्यस्तार्थकारी चिकित्सा, समचिकित्सा. *-'ath*, *n.* समचिकित्सक. *-ath'ic*, *a.* समचिकित्सेचा.

Hŏmŏgē'neous, *a.* (हॉमोजी'निअस्)—of the same kind or nature ; uniform. एकजातीय, सजातीय; एकजिनसी, (alge.) समगुणक, समघातिक. *-ly*, *adv.*; *-ness*, *n.*; *-ne'ity*, *n.* uniformity. सजातीयता, साधर्म्य, समघातता.

Homŏl'ŏgāte, *v. t.* (हमॉ'लॅगेट्)—to admit, to acknowledge ; to confirm. कबूल-मान्य-करणें ; दुजोरा देणें. *-tion*, *n.*

Homŏl'ogous, *a.* (हमॉ'लगस्)—having the same relation or value ; corresponding. समधर्मीय, एकजातीय, सममूलक, एकारपद ; सदृश, अनुरूप. *Hom'ologue*, *n.* तुल्यजातीय वस्तु. *Homol'ogy*, *n.* समधर्मता, समश्रेणिकता, सममूलकता.

Hŏm'onўm, *n.* (हॉ'मोनिम्)—a word of the same form as another but of different sense ; a namesake. भिन्नार्थदर्शक समोच्चारी शब्द ; एकाच नांवाचा, समाननामा. *-mous*, *a.*

Hōne, *n.* (होन्)—whetstone, esp. for razor. निसणा, साण. *v. t.* साणेवर घासणें, धार लावणें.

Hŏn'est, *a.* (ऑ'निस्ट्)—upright ; not cheating or stealing ; chaste ; good, worthy. इमानी, प्रामाणिक ; सचोटीचा ; सात्त्विक, पवित्र, शुद्ध ; चांगलें, योग्य. *To make an h. woman of*, फूस लावून नेलेल्या स्त्रीशीं विवाह करणें. *Hon'estly*, *adv.* प्रामाणिकपणानें.

Hŏn'estў, *n.* (ऑ'निस्टि)—uprightness ; truthfulness ; a kind of plant with purple flowers. प्रामाणिकपणा, सचोटी, इमान ; खरेपणा; एक जातीचें फूलझाड. *H. is the best policy*, सचोटीनें वागणें हा उत्तम व्यवहार,-उत्तम मार्ग.

Ho'ney, *n.* (ह'नि)—sweet fluid collected from flowers by bees &c.; sweetness; (also Sc. *hinnie*, *hinny*) sweetheart, darling. मधु, मध, मधासारखा गोड पदार्थ ; मधुरता, गोडी ; आवडती, प्रियकर, जिवलग. *H.-bee*, *n.* मधमाशी, मधुकर. *H. buzzard*, एक प्रकारचा मधमाशांच्या अळ्या खाणारा पक्षी. *H.-dew*, sweet sticky substance found on leaves and stems, an ideally sweet substance, tobacco sweetened with molasses. पानें व झाडांचे बुंधे यांवर येणारा गोड चिकट पदार्थ, -चीक, सर्वोत्कृष्ट गोड पदार्थ,-वस्तु, काकवीचें पाणी लावलेला तंबाखू. *H.-suckle*, a climbing shrub ; woodbine. एक पिवळ्या फुलांचें फूलझाड, फूलवेल ; एकजातीची विडी,-सिगारेट. *H. sweet*, *a.* मधाप्रमाणें गोड. *Ho'neyed*, *Ho'nied*, *a.* sweet. गोड, मधुर.

Hon'eycōmb, *n.* (ह'नि-कोम्)—bees' wax structure of hexagonal cells for honey and eggs; a cavernous flow in metal ; ornamental or other work hexagonally arranged. मधमाशांचें पोळें, पोळा, पोळी ; धातूंतील पोकळी-सच्छिद्रता दोष, तडा ; षट्कोनी रचनेचें काम. *v. t.* सच्छिद्र करणें, भोकें भोकें पाडणें, षट्कोनी रचना करणें.

Ho'neymōōn, *n.* (ह'नि-मून्)—holiday of newly married couple. नुकत्याच लग्न झालेल्या जोडप्याचा आनंदमास, गर्भाधान, मधुचंद्र. *v. i.* to spend honey-moon (*in*, *at*, a place). लग्नानंतर जोडप्यानें मजेंत काळ घालविणें, मधुचंद्र उपभोगणें.

Hŏng, *n.* (हॉग्)—(in China) a set of buildings used as a factory etc.; foreign trading establishment. (कारखान्याच्या) इमारतींची रांग; परदेशी लोकांची वखार, व्यापारी संस्था.

Hŏnk, *n.* (हॉंक्)—wild goose's cry ; sound of a motor horn. रानटी हंसाचें ओरडणें ; मोटरच्या शिंगाचा आवाज.

Honorār'ĭŭm, *n.*(ऑनरे'रिअम, हॉ-)—*fee for services* rendered. परिश्रमांबद्दल दिलेली फी किंवा बक्षीस, सन्मानवेतन.

Hŏn'orary̆, *a*. (ऑ'नरि)—conferred by way of honour; unpaid. प्रतिष्ठा म्हणून केलेला किंवा दिलेला; विनपगारी, सन्मान्य.

Hŏnorif'ic, *a*. & *n*. (ऑनरि'फिक्)—implying respect. सन्मानयुक्त, सन्मानदर्शक,-सूचक (वचन).

Hŏn'our, *n*. (ऑ'नर्)—glory, high reputation; chastity; a mark of respect; (*pl.*) distinction for proficiency in examination, &c.; (Golf) right of driving off first as having won last hole; (in Whist) ace, king, queen, knave, of trumps; (in Bridge the ten also); (Commerc.) acceptance. प्रतिष्ठा, थोर कीर्ति; अब्रू, पावित्र्य, पातिव्रत्य; बहुमान, सन्मानचिन्ह; (अने०) विद्याशाखेंत मिळविलेलें नैपुण्य; (गोल्फच्या खेळांत) मागील डाव-गुण-जिंकल्यामुळें पहिल्यानें खेळण्याचा मान,-हक्क; हुकमाचा एक्का, राजा, राणी, गुलाम; (बिजमध्यें) दश्शा; (हुंडीचा) स्वीकार. *v. t.* to respect highly; to confer honour on; to accept or pay a bill of exchange when due. मान देणें, पूज्य मानणें; (हुंडी वगैरे) सचकारणें, पटविणें. *Your, his, H.*, सन्मानदर्शक पदवी. *Last hh., funeral hh.*, प्रेतयात्रेचे वेळचा शेवटचा मानसन्मान. *Military hh.*, marks of respect paid by troops at the burial of officer, to royalty, etc. लष्करी मानसन्मान,-सलामी. *Hh. of war*, (विजयी सैन्यानें) पराभव पावलेल्या सैन्यास दिलेले (निशाणासहित कूच करणें वगैरे) विशिष्ट हक्क. *In h. of*, च्या स्मरणार्थ. *Bound in h.*, नैतिक जबाबदारी असलेला, मनानें बांधलेला. *Upon my h.*, गळ्याच्यान्! कुळशील स्मरून. *Code of h., law of h.*, शिष्टसंप्रदाय, पूर्वापार चालत आलेले वर्तनाचे नियम,-पद्धति. *Hon'oured*, *a*. मान दिलेला.

Hŏn'ourable, *a*. (ऑ'नरबल्)—deserving or bringing honour; generous; title (*Hon.*). प्रतिष्ठेचा, नामदार, संभावित, सन्मान्य, थोर मनाचा, उदार; नामदार, नेकनामदार. *-bly, adv.*

Hŏŏd, *n*. (हुड्)—covering for the head and neck; a thing like a hood; a badge worn over the gown to show university degree. कानटोपी, शीर्षाच्छादन; टोपी, बुरखा, फडा; पदवीधरांच्या झग्याला पाठीवर असलेला शोभामूलक झोल, हुड. *v. t.* to cover with hood. बुरख्यानें-टोपीनें-झांकणें, छपविणें. *-ed, a.*

Hŏŏd'ie,-dy, *n*. (हु'डि)—(Also *h. crow*) a hooded crow. एक जातीचा कावळा.

Hōōd'lum, *n*. (हू'डलम्)—(*U.S., sl.*) a street rowdy. मवाली, आडदांड, दंगेखोर.

Hoo'doo, *n*. (हू'डू)—bad luck. दुर्दैव, वाईट नशीब. *v. t.* एकाद्याला संकटांत घालणें.

Hŏŏd'wĭnk, *v. t.* (हु'ड्-विंक्)—to blindfold, to impose on, to deceive, to humbug. (एकाद्याचे) डोळे बांधणें, नजरबंदी करणें, फसवणें, भूलथाप देणें.

Hōōf, *n*. (हूफ्)—the horny casing of the foot of the horse and other equine animals; (joc.) human foot. खुर; माणसाचा पाय, पाऊल. *v. t. & i.* to strike with a hoof; to kick; to go on foot. खूर मारणें, खुरानें आपटणें; लाथ मारणें; पायीं जाणें.-*hoofed, a.*

Hŏŏk, *n*. (हुक्)—bent piece of wire, &c. for catching hold or for hanging things on; (also *fish-hook*) a bent piece of wire for catching fish; (fig.) a trap, a snare; a stroke in cricket or golf; a curved cutting instrument; a sharp bend. आंकडा, आंकडी, कडी; मासे पकडण्याची गरी; सांपळा, जाळें; टोला; (आंकड्यासारखा) कोयता, विळा, थोडसें; वांकण. *v. t. & i.* to grasp, to secure; to fasten; to catch (fish, fig. husband) with a hook; (Crick.) to play (ball) round from off to on side without hitting it at the pitch; (Golf) to drive widely to left side. आंकड्यांत धरणें, पकडणें, घट्ट बांधणें; गरीनें (मासे) पकडणें, (नवऱ्याला) मुठींत ठेवणें; (क्रिकेट०) चेंडू एकदम वळविणें, (गोल्फ) दूर डाव्या बाजूला दवडणें. *Reaping h.*, (गवत, धान्य) कापण्याचा कोयता, विळा. *H. & eye*, हुकाचें (कपड्याला) अडकनणें. *By h. or by crook*, by fair means or foul. बऱ्या वाईट मार्गानें, येन केन प्रकारेण. *To drop off the hh.*, (sl.) die. मरणें. *On one's own h.*, (sl.) स्वतःच्या हिंमतीवर,-आंगावर. *To take one's h., h. it*, make off, run away. पाय काढणें, निघून-पळून-जाणें. *H.-nosed*, गरुडनाक्या.

Hook'er, *n* (हु'कर्)—kinds of small sailing-ships. शिडांचें जहाज, शिडवाली होडी. *The old h.*, गलबत, होडकें.

Hoo'ligan, *n*. (हू'लिगन्)—one of a gang of street roughs. रस्त्यांत मारामारी करणाऱ्या गुंडांपैकीं एक, मवाली, दंगेखोर.-*ism, n.*

Hōōp, *n*. (हूप्)—a band of metal (for binding cask, &c.); a wooden or iron circle trundled by a child; a circle of elastic material for expanding woman's skirt; an iron arch used in croquet. गाडा, आडा, विडी; मुलें फिरवितात तें कडें, वर्तुलाकार गाडा; चक्कर, चक्र; क्रोकि खेळांतील लोखंडी कमान. *v. t.* to bind with a hoop; to encircle. पट्टयानें-कड्यानें-बांधणें; वेढणें, वेरणें, मध्यें धरणें. *H.-petticoat*, चक्कर लावून फुगीर केलेला झगा.

Hōōp, *v. i.* (हूप्)—to cry hoop. हुप् हुप् करणें, ओरडणें, मोठ्यानें खोकणें. *n.* the cry hoop;

the sound heard in hooping-cough. हुप् हुप् आरोळी ; खसखस खोकला,-खोकणें.

Hoop'ing-cough, *n.* (हू'पिंग्-कॉफ्)—a disease with convulsive cough. डांग्या खोकला.

Hoop'oe, *n.* (हू'पू)—a S.-European bird with a large crest. सुतार (पक्षी).

Hoosh, *n.* (हूश्)—(sl.) a hotch-potch in Arctic travel. आर्क्टिकमधील प्रवासाची शिधा-सामुग्री.

Hoot, *v. i. & t.* (हूट्)—to make a loud sound (esp. of disapproval); (of owl) to utter cry; to sound. हुर्यो हुर्यो करणें, हुडकवणें; ओरडणें; (मोटर वगैरे) आवाज करणें. *n.* a sound of derision etc.; an owl's cry. हिडिस फिडीस, शुक्रु, हड्हड्; घुबडाचें ओरडणें, घूंघूं. *Not care a h., not worth a h.,* (U. S.) not worth anything. कःपदार्थ, क्षुल्लक. Hoot! Hoots! *int.* हत्त! हुर्र! थूः! हट्! *Hoot'er, n.* steam whistle. शिटी, भोंगा.

Hootch, *n.* (हूच्)—(sl.) a strong drink. मादक पेय, मद्य.

Hoove, *n.* (हूव्ह्)—a cattle disease, with stomach inflation due to green fodder. गुरांचा पोट-फुगी रोग.

Hoo'verize, *v. i.* (हू'व्हराइझ्)—(sl.) to economize, esp. in use of food. (अन्नाची) काटकसर करणें.

Hop, *n.* (हॉप्)—a plant with bitter cones to flavour beer etc.; (pl.) these cones. एक तुरट फळांचें झाड,-वनस्पति; (मद्याला-दारूला-चव आणण्याकरितां) हॉपचीं फळें. *v. t. & i.* to bear, gather, hops; to flavour with hops. हॉप फळें धरणें,-गोळा करणें; हॉप फळांनीं चव-स्वाद-आणणें.

Hop, *v. i. & t.* (हॉप्)—(of person) to spring on one foot, (of animals) with all feet at once; to jump over (a ditch etc.). एका पायावर उडी मारणें, लंगडत चालणें, (जनावरांचें) लंगडी घालणें, चौखूर उडी मारणें; वरून उडी मारणें. *n.* a hopping; a jump; a dance. उडी मारणें; उडी; नाच (-णें). *To h. the twig* or *stick*, (sl.) to depart suddenly, die. अकस्मात निघून जाणें, मरणें. *H. (it)*, go away. चल, निघून जा. *H. off*, (of aeroplane) to start. (विमान) निघणें, उडणें. *Hop o'-my-thumb*, a dwarf. खुजा-ठेंगू-वामन-मूर्ति मनुष्य. *Hopscotch*, a child's game of hopping over scotches or lines. मुलांचा लंग-डीचा खेळ. *On the h.*, bustling about. नाचरा, धांदरट. *H., skip* (or *step*) *& jump*, an exercise in which these three movements are done in sequence. एक प्रकारचा व्यायाम,-खेळ.

Hope, *n.* (होप्)—expectation and desire; trust; probability; a person or thing that hope centres in. आशा; उमेद, विश्वास; संभव; आशा-विषय. *v. i. & t.* to expect and desire; to feel hope. अपेक्षा करणें; आशा बाळगणें, विश्वास-भरंवसा-ठेवणें. *Hoping against hope*, clinging to a mere possibility. व्यर्थ आशा करीत राहणें. *Hope'less, a.* निराश, हताश; निराशेचा, उपायहीन, निराशाजनक,*-ly, adv., -ness, n.* निराशा.

Hope'ful, *a.* (हो'प्-फुल्)—feeling hope; promising. आशा असलेला, आशायुक्त; होतकरू, आशा-जनक. *n. young h.*, होतकरू मुलगा,-गी.*-lly, adv.,-ness, n.*

Hopp'er, *n.* (हॉ'पर्)—a person etc. that hops; a hopping-insect; a device, an inverted pyramid or cone, for feeding grain into mill; a barge or vessel for carrying away mud etc.; 2. a hop-picker. लंगडणारा; उडणारा कीटक,-पतंग; (गिरणींत) यंत्राला धान्य पुरविणारें वैरणें; कचरा-चिखल-वाहून नेणारा पडाव; हॉप गोळा करणारा.

Hop'ple, *v. t.* (हॉ'पल्)—to fasten together legs of (a horse etc.). पायांत खोडा घालणें, जखडणें. *n.* खोडा, पदशृंखला.

Horde, *n.* (होअर्ड्)—a gang, troop. टोळी, थवा, बाजारबुणगें.

Hori'zon, *n.* (होरा'इ-झन्)—the line at which the earth and the sky appear to meet; a boundary of mental outlook etc. क्षितिज, धार, दिगन्त; टप्पा, पोंच.

Horizon'tal, *a.* (हॉरिझॉ'न्टल्)—parallel to the plane of the horizon, level; of or at the horizon. सपाट, आडवा; क्षितिजाचा, क्षितिजा-बरोबर. *n.* a horizontal line, bar, etc. आडवी रेघ, आडवा दांडा.*-tality, n.,-tally, adv.* क्षितिजाशीं समान, आडवा.

Hor'mone, *n.* (हॉ'र्मोन्)—(Physiol.) kinds of internal secretion that pass into the blood and stimulate the organs to action. इंद्रिय-क्रिया-प्रवर्तक आन्तरोत्सर्ग,-स्राव.

Horn, *n.* (हॉर्न्)—curved and pointed excrescence on the head of cattle, &c.; projection on the head of other animals; deer-antler; a thing or vessel made of horn; a wind-instrument; arm or branch of a bay, river etc. शिंग, शृंग; (किड्याची वगैरे) मिशी; हरणाचें

Ice, *n.* (आइस्)—frozen water; (with pl.) frozen confection, ice-cream, water-ice. (कृत्रिम) बर्फ, गोठलेलें पाणी; बर्फाचे गोड पदार्थ,-पेयें. *v. t.* to freeze; to cover with ice; to cool (wine) in ice; to cover with concreted sugar. गोठणें; बर्फांत ठेवणें; बर्फांत ठेवून (दारू) थंड करणें; वर घट्ट साखर पेरणें. *To break the i.*, (fig.) to make a beginning, to break through reserve or stiffness. आरंभ करणें, प्राथमिक अडचणी दूर करणें, उपक्रम करणें. *Ice age*, the glacial period. हिमानीयुग. *I.-blink*, बर्फावरून परावर्तन पावणारा प्रकाश,-कवडसा. *I. boat*, बर्फावरून चालणारी होडी,-बोट, (also *i.-breaker*) बर्फ फोडून जाणारी बोट. *I.-cream*, थंडी मलई. *I.-field*, (ध्रुवांजवळील) बर्फ-क्षेत्र. *I. man*, बर्फावरून चालण्यांत-जाण्यांत-पटाईत मनुष्य; बर्फविक्या. *I.-pack*, drift ice. हलतें-तरंगणारें-बर्फ. *I.-pick*, बर्फ फोडण्याचें हत्यार.

Ice'berg, *n.* (आ'इस्-बर्ग्)—a vast mass of floating ice in the ocean; an unemotional person. बर्फाचा डोंगर, हिम पर्वत; भावनारहित-थंडप्रकृति-मनुष्य.

Ichneum'on, *n.* (इक्-न्यू'मन्)—weasel-like quadruped that destroys crocodiles' eggs; (also *i. fly*) a kind of insect. मुंगूस, नकुल; एक प्रकारचा कीटक.

I'chor, *n.* (आ'इ-कॉर्)—(Gk Myth.) fluid flowing like blood in the veins of gods; watery discharge from wound, etc. देवींच्या वाहिन्यांतील रक्ताऐवजीं असलेला पातळ पदार्थ, दिव्यरस; लस, जखमेंतून वाहणारें पाणी, नासका पु. *I'chorous, a.*

Ichthyo-, (इक्थिओ-)—in comb., (before a vowel Ichthy-), Gk=fish. मत्स्य. *-o'grapher, -graphy, nn.* मत्स्यवर्णनकार, मत्स्यवर्णन. *Ich'thyoid, a.* fish-like. माशासारखा, मत्स्यसदृश, *n.* मत्स्यसदृश पृष्ठवंशी प्राणी.*-l'atry, n.* मत्स्यमूर्तिपूजा, मत्स्यदेवपूजा. *-lite, n.* fossil fish.

अश्मीभूत मत्स्य. *-logy, n.* natural history of fishes. मत्स्यविज्ञानशास्त्र.*-logical, a.,-logist, n.* मत्स्यविज्ञानवेत्ता.*-phagi,-phagist, nn.* मत्स्याहार, मत्स्याहारी. मासे खाणारा.*-phagous, a.* माशांवर उपजीविका करणारा. *Ichthyornis,* सदंत पक्ष्यांची (अस्तित्वांत नसलेली) एक जात. *Ichthyosaur'us, n.* an extinct marine animal. (हल्लीं न सांपडणारा) प्रचंड मासा, जलचर प्राणी.

Ichthyō'sĭs, *n* (इक्थिओ'सिस्)—(med.) a disease in which the epidermis becomes dry and horny. ज्यामुळें त्वचा जाड व खडबडीत होऊन माशाचे अंगासारखी दिसते असा त्वग्रोग, मत्स्यचर्मकुष्ठ.

I'cicle, *n.* (आ् यू-सिक्ल्)—tapering spike of ice hanging from eaves &c. लोलकासारखा लोंबणारा बर्फाचा तुकडा.

I'cle, *a.* (इ'क्ल्)—(nursery) little. लहान, इवलें.

I'con, *n.* (आ यूकॉन्)—an image, a statue; a sacred painting, etc. मूर्ति, प्रतिमा ; पवित्र चित्रकाम इ. *-'ic, a.* मूर्तीचा, चित्रासारखा ; (पुतळ्यांच्या) रूढ पद्धतीचा.

Icŏn'ŏclăsm, *n.* (आयूकॉ'नॉक्लॅझम्)—breaking of images. मूर्तिभंजन, मूर्ति फोडणें.

Icŏn'oclăst, *n.* (आयु-कॉ नो-क्लॅस्ट्)—a breaker or destroyer of images, (fig.) one who assails cherished belief. मूर्ति फोडणारा, मूर्तिभञ्जक ; रूढ समजुती मोडणारा, रूढिविध्वंसक.*-ic, a.*

Icosahe'dron, *n.* (आयूकोसहे'ड्रन्)—a solid contained by 20 plane faces. वीस समान बाजूंचा घन, विंशतिफलक.

Ic'tus, *n.* (इ'क्टस्)—metrical stress. (छंदःशास्त्रांत) आघात, जोर.

I'cў, *a.* (आ'यूसि)—abounding in ice; very cold; (of manners) chilling. हिमप्रचुर, बर्फमय, अति थंड ; प्रेमोष्मशून्य, रांकट.

Id, *n.* (इड्)—(Biol.) the unit of germ-plasm; (psycho-anal.) *the* instinctive impulses of the individual. मूलांकुराच्या जीवनरसाचा एकं ; (मनोविश्लेषणशास्त्रांत) व्यक्तीगत प्राण्याच्या स्वाभाविक भावना, प्रेरणा.

Ide'ă, *n.* (आ'य-डिआ)—a notion conceived by the mind; vague belief, fancy; plan, intention, aim. कल्पना ; कल्पनाचित्र, मनोगतकल्पना; मत, तर्क ; (कायम ठरलेला) विचार, हेतु, संकल्प, *The young i.,* the child's mind. बालकाचें मन. *Idea'd, Ideaed, aa., Idea'less, a.*

Ide'al, *a.* (आय्-डी'अल्)—perfect; existing only in idea; visionary. उत्कृष्ट, परम, अत्युच्च, श्रेष्ठ ; कल्पनामय ; कल्पित. *n.* perfect type; an actual thing as standard for imitation. उत्कृष्ट नमुना, साध्य, ध्येय ; अनुकरणीय उत्तम गोष्ट. *Ide'ally, adv.*

Ide'alĭsm, *n.* (आयूडी'अलिझम्)—the representation of things in ideal form; imaginative treatment; (Philos.) the system of thought in which the object of external perception is held to consist of ideas. वस्तूंचा अत्युत्कृष्टपणा दाखविणें, परम कल्पना ; कल्पनासृष्टीचें रूप देणें ; कल्पनामयत्ववाद, कल्पनावाद. *Ide'alist, n* कल्पनासृष्टींत दंग असणारा, कल्पनामयत्ववादी, कल्पनावादी ; मायावादी. *-listic, a., Ideal'ity, n.* quality of being ideal; imaginative faculty. मनोमयता ; काल्पनिकता, साध्यता, ध्येयवादिता ; कल्पनाशक्ति.

Ide'alīze, *v. t. & i.* (आयूडी'अलाइझ्)—to make or treat as ideal, to become ideal. कल्पना करणें, कल्पनासृष्टीचें रूप देणें, अंतिम ध्येय मानणें,-असणें. *-lization, n.* कल्पनास्वरूप देणें.

Idē'āte, *v. t. & i.* (आयूडी'एट्)—to imagine; to form ideas. कल्पना करणें ; मनोगत प्रतिमा बनविणें. *-tion, n., -tional, a.*

I'dĕm, *n.* or *adv.* (आ'यूडम्)—(abbr. *id*) (in) the same author; (इ-') (in) the same word. त्याच ग्रंथांत ; त्याच शब्दांत, वरच्याप्रमाणें, सदरहू. *I quod,* (इ-) the same as. सदरहू, तद्वत् [L]

Idĕn'tĭc, *a.* (आयूडे'न्टिक्)—*i. note,* simultaneous and uniformly worded (expression of opinion); identical. एकाच अर्थाचा व आशयाचा निरोप (खलिता); अभिन्न, एकरूप.

Idĕn'tĭcal, *a.* (आयू-डे'न्टिकल्)—the same; agreeing in all details *with*; (Logic, Math.) expressing an identity. तोच, एकच ; तंतोतंत जुळणारा, अभिन्न ; सरूप. *-ally, adv.*

Idĕn'tĭfў, *v. t.* (आय्-डे'न्टि-फाय्)—to treat as identical; to associate oneself with (a party, policy, &c); to establish the identity of. तोच आहे असें मानणें ; एकरूप किंवा तद्रूप करणें ; तोच आहे असें सिद्ध करणें. *-fication, n.* सरूपता, ओळख पटविणें. *-fiable, a.*

Idĕn'tĭtў, *n.* (आयू-डे'न्टिटि)—absolute sameness; individuality; (Alg.) equality of two expressions; equation expressing this. अगदीं साम्य, पूर्ण समानता, तादात्म्य ; व्यक्तिता, व्यक्तीची खूण,- ओळख ; सरूपता, सरूपसमीकरण.

Ideo-, *pref.* (आयूडिओ, -इ-)—in comb. = idea. कल्पना-. *I. gram, -graph,* (आ'यूडिओग्रॅम्, -ग्रॅफ्)—character indicating the idea of a

thing without its name. कल्पनादर्शक चिन्ह (चिनी लिपींतील). -graph'ical, a., -graphy, n. Ideologue, n. कल्पनावादी, कल्पनासृष्टींत रमणारा. -logy, n. science of ideas; visionary speculation. कल्पनाशास्त्र; कल्पनातरंग; -logical, a.; -logist, n.

Ides, n. pl. (आइड्‌झ्)—(in ancient Rome) eighth day after nones, 15th of March, May, July, October, 13th of other months. मार्च, मे, जुलै, ऑक्टोबर या महिन्यांची १५ तारीख. व बाकीच्यांची १३ तारीख.

Id est, (इड् एस्ट्)—(abbr. i. e.) that is to say. म्हणजे. [L]

Id'iocy, n. (इ'डिअसि)—extreme imbecility, hopeless insanity or madness. खूळ, वेड, बुद्धीची कमतरता, भ्रमिष्टपणा.

Id'iom, n. (इ'डि-अम्)—language, peculiarity of phraseology. भाषावैशिष्ट्य; वाक्संप्रदाय.

आळशी चाकर.-कपी. I'dly, adv निरर्थकपणें, आळसानें, आळसांत, निष्काळजीपणानें. I'dlesse, n. Idleness रिकामपणा, आळस, सुस्ती.

I'dol, n. (आ'इ-डल्)—an image as object of worship; a false god, an object of devotion; (Logic) false mental conception, मूर्ति, प्रतिमा, खोटा देव, देवमूर्ति, भक्तीचा विषय, पूज्य वस्तूची प्रतिमा, दैवत, भ्रामक कल्पना, भ्रम, चूक. Idols of the tribe, (L idola tribus) limitations of human mind मनुष्यमात्राच्या उणीवा.-चे दोष, -of the cave, (L -specus) prejudices of an individual mind. व्यक्तिविशेषाच्या उणीवा.-चुका, दोष, -of the market, (L-fori) influence of words केवळ शब्दांमुळें होणाऱ्या चुका, भ्रामक शब्दयोजनेचे दोष. of the theatre, (L -theatri) philosophical prepossessions भ्रामक विचारसरणीमुळें होणारे दोष.

Ig'nĭs făt'ūus, *n.* (इ'ग्निस् फॅ'ट्युअस्)—phosphorescent light seen on marshy ground; a delusive hope or gain. भुताचें कोलीत, दलदलीवर दिसणारा प्रकाश; भ्रामक आशा, मोह, भूल.

Ignite', *v. t. & i.* (इग्ना'इट्)—to set fire to; to take fire; to make intensely hot; (chem.) to heat to the point of combustion. आग लावणें, पेटवणें; पेट घेणें, जळूं लागणें; अति तप्त करणें; कडक उष्णता-आंच-देणें.*-t'able*, *a.* प्रज्वलनीय, ज्वालाग्राही, पेटण्याजोगा. *Ignit'ion*, *n.* आग लावणें, जाळणें, प्रज्वलन.

Ignō'ble, *a.* (इग्नो'बल्)—of low birth or position; mean, base. हीन कुळांत किंवा स्थितींत जन्मलेला; अधम, नीच, क्षुद्र, हलकट.*-ness*, *n.-bly*, *adv.*

Ignomĭn'ious, *a.* (इग्नॉमि'निअस्)—mean, shameful, dishonourable, worthy of contempt. क्षुद्र, अपमानास्पद, लज्जास्पद.*-ly*, *adv.*

Ig'nomĭnў, *n.* (इ'ग्नॉमिनि)—public disgrace, dishonour, infamy; infamous conduct. अप्रतिष्ठा, बदनामी; दुर्वर्तन, शरमेची गोष्ट, लाजिरवाणें काम.

Ignorā'mus, *n.* (इग्नरे'मस्)—an ignorant person. अडाणी, ठोंब्या, माहिती नसलेला.

Ig'norance, *n.* (इ'ग्नरन्स्)—want of knowledge. अज्ञान, अज्ञानत्व, अजाणपणा, अज्ञानांधकार. *Where i. is bliss, 'tis folly to be wise*, अज्ञान (कांहीं वेळां) ज्ञानापेक्षां चांगलें असतें. 'अज्ञात तें शुद्ध'.

Ig'norant, *a.* (इ'ग्नरन्ट्)—illiterate, lacking knowledge; uninformed (*of*, *in*). ज्ञानहीन, अडाणी, मूर्ख, अजाणता. *-ly*, *adv.*

Ignorā'tio, ele'nchī, *n.* (इग्नरे'शिओ इले'न्काय्)—(logic) an argument that appears to refute opponent. तर्काभास, अप्रकृतानुमितीचा हेत्वाभास.

Ignōre', *v. t.* (इग्नो'अर्)—to refuse to take notice of, to shut the eyes to; to reject. दुर्लक्ष करणें, कानाडोळा करणें; (साक्षी पुरावा भरपूर नसल्यामुळें) मान्य न करणें, विचारांत न घेणें. [F-L *in-*,not, *gno-*, know]

Igua'na, *n.* (इग्वा'ना)—a kind of lizard. घोरपड, गोधा. *Iguan'odon*, *n.* huge fossil lizard. प्रचंड अश्मीभूत घोरपड.

I'lĕx, *n.* (आ'यलेक्स्)—holm-oak; (Bot.) a genus including holly. सदापर्णी ओक वृक्ष; हॉलि जातीच्या वनस्पतींचा वर्ग.

Il'ĭăc, *a.* (इ'लिॲक्)—of the flank (bone). लहान आंतड्याच्या खालच्या भागाचा, सूक्ष्मांत्रमूलासंबंधी. *I. passion*, उदावर्त (रोग).

Il'ĭad, *n.* (इ'लिअड्)—an epic poem by Homer and describing the siege of Troy. होमरकृत महाकाव्य 'इलिअड' *I. of woes*, (fig.) दुःखपरंपरा.

Il'ium, *n.* (इ'लिअम्)—(*pl.-ia*) hip-bone. कढेचें हाड, कटिकपाल.

Ilk, *a.* (इल्क्)—(Sc.) the same. तोच, सदृश. *Of that ilk*, त्याच नांवाचा. *That ilk*, (vulg.) that family, class or set. तोच वंश, वर्ग, गट.

Ill, *a.* (इल्)—out of health, sick; evil, harmful; faulty, deficient; morally bad; (arch.) difficult. आजारी; वाईट, दुष्ट; अशुद्ध, पापी, दुष्ट; कठीण. *n.* evil; harm; (*pl.*) misfortunes. दुःख; अनिष्ट, अपाय, दुःख, रोग, व्याधि, संकट. *adv.* badly, unfavourably; with pain or difficulty; imperfectly, scarcely. वाईट रीतीनें; कष्टानें, प्रतिकूल; अपुरा, क्वचितच. *To be taken i.*, आजारी पडणें. *I. fame*, अपकीर्ति, दुष्कीर्ति, अनीति. *I. will*, animosity, strife. वैर, भांडण. *I. nature*, दुष्ट स्वभाव. *I. humour,-temper*, गैरमर्जी, खप्पा मर्जी, राग. *To do an i. turn to a person*, एकाद्याला अपकार करणें, दुष्टपणा करणें, त्याचें अहित करणें. *To speak i. of*, च्या विरुद्ध बोलणें. *To take* (a thing) *i.*, take offence at. चा राग येणें, नें अपमान झालासा वाटणें. *I. at ease*, embarrassed, uneasy. गोंधळलेला, अस्वस्थ. *I.-advised,-visedly*, (इल्ॲड्व्हा'इझ्ड्लि) imprudent,-ly. अदूरदृष्टि, अविचारी,-चाराचें,-चारानें. *I.-affected*, not well disposed. प्रतिकूल ग्रह-मत-असलेला. *I.-bred*, rude. उद्धट, गैरशिस्त. *I. breeding*, bad manners. असभ्य चालरीत. *I.-conditioned*, वाईट स्वभावाचा, वाईट स्थितींतला. *I.-disposed*, वाइटाकडे कल असलेला, दुष्ट, (विषयीं) चांगलें मत नसलेला. *I.-fated*, दुर्दैवी, अपशकुनी. *I.-favoured*, uncomely, objectionable. दिसण्यांत विद्रूप, हरकत घेण्याजोग, न आवडणारा. *I.-gotten*, gained by evil means. हपापानें मिळविलेलें, वाईट उपायांनीं-रीतीनें-मिळविलेलें. *I.-humoured*, दुष्ट स्वभावाचा, चिडखोर. *I.-judged*, unwise. वेडेपणाचा, अव्यवहारी. *I.-mannered*, रीतभात नसलेला, उद्धट. *I.-omened*, attended by bad omens. दुश्चिन्हांचा, अपशकुनी. *I.-starred*, unlucky. जन्मतःच वाईट ग्रह पडलेला, कमनशिबी, भद्र्या कपाळाचा. *I.-tempered*, morose. दुःखी, उदास, खिन्न. *I.-timed*, unseasonable. अवेळचा, बिनहंगामी. *I.-treat*, *I.-use*, to treat badly. वाईट रीतीनें वागविणें, छळणें.

Illā'tion, *n.* (इले'शन्)—the act of inferring; deduction, conclusion; the thing deduced. तर्क बांधणें; तर्क, अनुमान; अनुमित गोष्ट.

Illā'tĭve, *a.* (इले'टिव्ह्)—that may be inferred, inferential. तर्काचा, आनुमानिक, परिणामबोधक. *I. particle*, अनुमानवाचक अव्यय.*-ly*, *adv.*

Illē'gal, *a.* (इली'गल्)—not legal, contrary to law. बेकायदेशीर, कायद्याविरुद्ध, अन्याय्य, अधर्म्य. *Illegal'ity, n., Ille'gally, adv.* गैरकायद्यानें, अन्यायानें.

Illĕ'gĭble, *a.* (इले'जिबल्)—not legible, that cannot be read, unreadable. अस्पष्ट, वाचण्याला कठीण. *Illĕgibil'ity, n.* गिजमीडपणा, दुर्वाच्यता. *Illeg'ibly, adv.*

Illĕgĭt'ĭmate, *a. & n.* (इलि-जि'टि-मिट्)—not legitimate; bastard, born out of wedlock, wrongly inferred; abnormal. बेकायदेशीर; अनौरस, दासीपुत्र; तर्कशास्त्रविरुद्ध; अस्वाभाविक. *v. t.* (-मेट्)—to declare illegitimate. गैरकायदा-शास्त्रविरुद्ध-अनौरस ठरविणें. *Illegit'imacy, n.* bastardy. अनौरसता, जारजता. *-timately, adv.*

Illib'eral, *a.* (इलि'बरल्)—vulgar, narrow-minded; sordid, stingy. अशिक्षित, ग्राम्य, आकुंचित मनाचा, अनुदार; कृपण, चिक्कू.*-'ity, n., -ally, adv.*

Illĭ'cĭt, *a.* (इलि'सिट्)—unlawful; forbidden. बेकायदेशीर, गैरकायदा, अन्याय्य, निषिद्ध.*-ly, adv.*

Illĭm'ĭtable, *a.* (इलि'मिटेबल्)—boundless. अमर्याद, निस्सीम.*-tability, n.,-tableness, n.,-tably, adv.*

Illĭt'eracy̆, *n.* (इलि'टरसि)—want of learning. निरक्षरता.

Illĭt'erate, *a. & n.* (इलि'टरेट्)—unlettered, not educated, unlearned; unable to read. अशिक्षित; निरक्षर, अक्षरशत्रु (मनुष्य). *-ness,* निरक्षरता.

Ill'nĕss, *n.* (इल्-निस्)—ill health, sickness. दुखणें, आजार.

Illŏ'gĭcal, *a.* (इलॉ'जिकल्)—devoid of logic, contrary to sound reasoning. तर्कविरुद्ध, न्यायविरुद्ध, अयुक्तिक.*-cally, adv., -cal'ity, n.*

Illth, *n.* (इल्थ्)—(rare) an evil state. वाईट स्थिति, दुर्दशा.

Illume', *v. t.* (इल्यूम्)—(poet.) to make bright. प्रकाशित करणें.

Illu'mĭnant, *a.* (इल्यु'मिनन्ट्)—serving to illuminate. प्रकाशित करणारा, वर प्रकाश पाडणारा. *n.* agent of light. दिव्याचा प्रकाश पाडणारें साधन, कांच, आरसा.

Illu'mĭnāte, *v. t.* (इल्यु'मिनेट्)—to light up; to throw light on; to decorate with lights as a sign of festivity; to decorate (initial letter in manuscript etc.) with gold, silver and bright colour. प्रकाशित करणें; कोणत्याहि गोष्टीवर प्रकाश पाडणें; रोशनाई करणें, आरास करणें; आद्याक्षराला सोनेरी वगैरे वेलबुट्टी काढणें. *-tion, n., -tor, n., -tive, a.* प्रकाशक.

Illu'mĭne, *v. t.* (इल्यु'मिन्)—(poet.) to light up; to enlighten intellectually. प्रकाशित करणें; (बुद्धीचा) प्रकाश पाडणें.

Illu'sion, *n.* (इल्यु'झन्)—deceptive appearance, statement or belief, mockery; a transparent tulle. मोह, भ्रम, जादू, अविद्या; तलम झिरझिरीत रेशमी जाळी.

Illu'sionĭst, *n.* (इल्यु'झनिस्ट्)—one who does believe in objective existence; a conjurer. दृश्य वस्तु ही माया आहे असें मानणारा, मायावादी; इंद्रजालिक, जादूगार. *Illu'sionism,* मायावाद, जग मिथ्या आहे असें मानणें.

Illu'sĭve, *a.* (इल्यु'सिव्ह)—deceptive. भ्रामक, मोहक, फसविणारें, मायामय. *-ly, adv. -ness, n.*

Illu'sory̆, *a.* (इल्यु'सरि)—deceptive. भ्रामक, मायावी. *-rily adv., -riness, n.*

Ill',ustrāte, *v. t.* (इ'लस्ट्रेट्)—to make clear esp. by examples or drawings; to adorn with pictures or designs. उदाहरणें देऊन किंवा काढून स्पष्ट करणें; चित्रांनीं-आकृतींनीं-सुशोभित करणें. *-tor, n.* स्पष्टीकरण करणारा. *-tive, a.* explanatory. स्पष्टीकरणात्मक, दृष्टान्ताचा, प्रकाशक. *-tively, adv.*

Illŭstrā'tion, *n.* (इलस्ट्रे'शन्)—elucidation; an example; drawing, &c. in a book. स्पष्टीकरण; उदाहरण, दाखला; पुस्तकांतील चित्रें.

Illŭs'trious, *a.* (इल'स्ट्रिअस्)—distinguished by the reputation of greatness, renowned. नामांकित, प्रसिद्ध. *-ly, adv., -ness, n.* श्रेष्ठता, मोठेपण, कीर्ति, नांव.

Im'age, *n.* (इ'मिज्)—imitation of object's external form, as a statue; an idol; an optical counterpart produced by rays of light reflected from a mirror, refracted through lens, etc., a counterpart; type; form; simile, metaphor; idea, conception. प्रतिरूप, पुतळा, प्रतिमा, तसबीर; देवताप्रतिमा, मूर्ति; प्रतिबिंब, बिंब; हुबेहूब नमुना; नक्कल; नमुना; सारखेपणा; दाखला, उदाहरण, दृष्टान्त, रूपक; कल्पना, भास, आभास. *v. t.* to imagine; to mirror; to describe vividly; to portray. कल्पना करणें; प्रतिबिंब पाडणें; हुबेहूब वर्णन करणें; तसबीर-छबी- रेखाटणें. *I.-less, a. I.-able, a.* कल्पना करतां येण्याजोगें, कल्पनीय, *-ably, adv.*

Im'agery̆, *a.* (इ'मिजरि)—images; statuary images; figurative illustration. मूर्ति; प्रतिमा, पुतळा; कल्पनासृष्टि, काल्पनिक वर्णन.

Imă'gĭnal, *a.* (इमॅ'जिनल्)—of an insect imago. किड्याच्या पूर्णस्थितीच्या स्वरूपाचा.

Imă'ginary, *a.* (इमॅ'जिनरि)—existing only in or due to imagination. मनःकल्पित, कल्पित, काल्पनिक. *-arily, adv.*

Imă'ginātion, *n.* (इमॅ'जिनेशन्)— imagining; mental faculty forming images of objects not present; fancy; creative faculty of the mind. कल्पना करणें, कल्पनाशक्ति; कल्पना, भावना, विचार; प्रतिभा.

Imă'ginative, *a.* (इमॅ'जिनटिव्ह्)— proceeding from the imagination; full of imagination, creative, given to imagining. कल्पनेपासून निघणारें, कल्पनोद्भूत; कल्पक, प्रतिभावान. *-ly, adv., -ness, n.*

Imă'gine, *v. t.* (इमॅ'जिन्)—to form mental image of, to conceive, to suppose; to think; to fancy. कल्पना करणें; मनाशीं ताडून पहाणें, विचार करणें, वाटणें.

Imā'gō, *n.* (इमे'गो)—the last or perfect state of insect's life. किड्याचें (सर्व रूपांतरें होऊन झालेलें) शेवटचें पूर्ण स्थितींतलें स्वरूप,-पूर्णावस्था.

Im'becile, *a.* (इ'म्बिसिल्)—mentally weak; physically weak; idiotic, extremely foolish, silly. मनानें दुर्बल; अशक्त, क्लीब, मंद; अत्यंत मूर्ख. *-ly, adv., -cil'ity, n.* दुर्बलता, क्लैब्य.

Imbibe' *v. t.* (इम्बा'इब्)—to drink in; to drink; to inhale; to absorb. शोषणें; पिणें; श्वास आंत घेणें, शोषून घेणें. *Imbibi'tion, n.* शोषण, ग्रहण.

Im'bricate, *v. t. & i.* (इ'म्ब्रिकेट्)—to arrange (leaves etc.), be arranged, so as to overlap like tiles. कौलें-पत्रा-प्रमाणें एक एकावर लावणें,-लागणें. *a.* (-कट्) overlapping कौलाप्रमाणें एक एकावर पडलेला. *-tion, n., -tive, a.*

Imbro'glio, *n.* (इम्ब्रो'ल्यो)—confused heap; complicated situation. अस्ताव्यस्त ढीग,-ढिगारा, घोटाळा, गोंधळ, भानगड.

Imbrue', *v. t.* (इम्ब्रू')—to stain. हात माखून घेणें.

Imbue', *v. t.* (इम्ब्यू')—to soak, to drench in a fluid, to saturate (with), to dye (with); to inspire (with), to imbrue. भिजवणें, लिप्त करणें; चेतना आणणें; माखणें.

Im'itable, *a.* (इ'मिटब्ल्)—worthy of imitation. अनुकरणीय, अनुकरण-नक्कल-करतां येण्यासारखा. *-bil'ity, n.* अनुकरणीयता.

Im'itāte, *v. t.* (इ'मिटेट्)—to follow the example of; to mimic; to be like. कित्ता-वळण-घेणें, अनुसरणें; नक्कल करणें; धाटणी उतरणें, अनुकरण करणें. *Im'itator, n.* अनुकरण-नक्कल-करणारा.

Imitā'tion, *n.* (इमिटे'शन्)—imitating; a copy, likeness; counterfeit (often attrib.) (Mus.) repetition of melody etc. in another part or voice. अनुकरण करणें, उदाहरण घेणें; नक्कल, सादृश्य, साम्य; कृत्रिम, बनावट, खोटा; तानेची (गाण्याची) नक्कल, जोड, साथ. *I. silk,* कृत्रिम-खोटें-रेशीम.

Im'itative, *a.* (इ'मिटटिव्ह्)—following the model or example (*of*), inclined to imitate; counterfeit. (चें) अनुकरण करणारा, अनुकरणप्रिय; नकली. *I. arts,* painting and sculpture. चित्रकाम व खोदकाम या (अनुकरणानें शिकण्याच्या किंवा अनुकरणानें झालेल्या) कला. *I. word,* अनुकरणवाचक शब्द. *-ly, adv., -ness, n.*

Immăc'ūlate, *a.* (इमॅ'क्युलट्)—pure, spotless; unstained, without blemish; not spotted. पवित्र, निष्कलंक, निर्दोष, निर्मळ, विमल; विमठिपक्यांचा,-डागांचा. *I. conception,* (of Virgin Mary, as born free from the taint of original sin.) अपौरुषेय गर्भाधान. *-lacy, n. -lateness, n.* निर्दोषपणा, निष्कलंकत्व. *-lately, adv.*

Imm'anent, *a.* (इ'मॅनन्ट्)—inherent (*in*); (of God) pervading the universe. अंतर्भूत, अंतर्गत, आंत असणारा; विश्वव्यापी (परमेश्वर). *-nence, -nency, nn.* अंतर्भाव, व्यापकता.

Immatēr'ial, *a.* (इमटी'अरिअल्)—incorporeal; unimportant. अजड, निराकार; अनावश्यक, महत्त्वाचा नाहीं असा, क्षुल्लक. *-al'ity, n.* अजडत्व, निराकारत्व. *-alize, v. t.* निराकार बनविणें. *-alism, n.* the doctrine that matter does not exist in itself apart from perception. जडाभाववाद, निराकारवाद. *-alist, n.*

Immature', *a.* (इमॅच्यु'अर्)—not mature. अपक्व, अप्रौढ. *-rity, n.*

Immea'surable, *a.* (इमॅ'झरब्ल्)—not measurable; immense. अमेय, अपरिमित; अमर्याद, अफाट, पुष्कळ. *-ness, n., -abil'ity, n. -ably, adv.*

Imme'diate, *a.* (इमी'डिअट्)—not separated by any intervening medium; without intervening medium, direct; occurring at once, without intervention of time; nearest, next. मधें जोडलेला, लगतचा; प्रत्यक्षकारी, प्रत्यक्ष; तात्कालिक, तेव्हांचा, अव्यवहितकालिक; शेजारी, जवळचा. *I. inference,* (तर्क०) अव्यवहित अनुमान. *I. reply,* तापडतोबीचें उत्तर. *-ness, n., -diacy, n.* साक्षात् संबंध, अव्यवधान.

Immē'diately, *adv.* (इमी'डिअट्-लि)—without delay, instantly, forthwith. विलंब न लावतां, तात्काळच, सत्वर.

Immĕmor'ial, *a.* (इमिमॉ'रिअल्)-beyond memory, of unknown duration. स्मरणाच्या पलीकडचा, स्मृत्यतीत, फार पुरातन काळचा, पुरातन.-*ially, adv.*

Immĕnse', *a.* (इमे'न्स्)—vast, huge ; (sl.) very good. फार मोठा, अमर्याद ; फार उत्तम.-*ly, adv.* vastly ; very. फारच, अमर्यादपणें ; अतिशय. -*ness, n.*

Immĕns'itȳ, *n.* (इमे'न्सिटि)—vastness ; infinity. अवाढव्यपणा, अफाटपणा ; अनंतत्व, अमर्यादत्व.

Immerse', *v. t.* (इम'र्स्)—to dip, to plunge ; to put under water ; to involve deeply, absorb. (द्रवांत, पाण्यांत) बुडविणें ; मज्जन करणें ; (कर्जांत, विचारांत) बुडलें जाणें, निमग्न करणें, वेधून घेणें, गुंतविणें.

Immer'sion, *n.* (इम'र्शन्)—immersing ; baptism by plunging whole person in water ; (fig.) absorption (in thought etc.); (Astr.) the disappearance of a celestial body behind another or in its shadow (opp. to *emersion*). बुडविणें, निमज्जन ; स्नान, अवगाहन (करवून बाप्तिस्मा देणें); निमग्नता, तंद्री, तन्मयता ; अस्त, निमज्जन, निमीलन, ग्रहण.

Imm'ĭgrant, *a. & n.* (इ'मिग्रन्ट्)—(a person) immigrating or removing into a country. देशांतर करणारा, परदेशीं रहावयास जाणारा (इसम).

Imm'ĭgrāte, *v. i. & t.* (इ'मिग्रेट्)—to remove into a country for permanent residence ; to bring in as settler. देशान्तर करणें ; वसाहत करविणें.-*tion, n.*

Imm'ĭnence, *n.* (इ'मिनन्स्)—being imminent. जवळ येऊन ठेपणें, निकटवर्तित्व.

Imm'ĭnent, *a.* (इ'मिनन्ट्)—(of danger, &c.) about to happen soon, impending. येऊन ठेपलेलें, भिडलेलें (संकट वगैरे), आसन्न.-*ly, adv.*

Immĭs'cĭble, *a.* (इमि'सिबल्)—that cannot be mixed. मिश्रण करतां न येणारा, अमेलनीय.

Immĭt'ĭgable, *a.* (इमि'टिगबल्)—that cannot be softened or toned down or appeased. कमी करतां न येण्यासारखा, असांत्वनीय.-*ably, adv.*

Immĭx'ture, *n.* (इमि'क्स्चर्)—mixing up ; being involved (*in*). मिश्रित होणें, गुंतागुंत होणें ; गुरफटणें.

Immō'bĭle, *a.* (इमो'बिल्)—immovable ; not mobile ; motionless, fixed. न हलवितां येणारा ; स्थिर ; स्तब्ध, घट्ट बसलेला. -*bility, n.* अचलता, स्थिरपणा, स्थाणुत्व. -*bilize, v. t.* to fix immovably ; to make (troops) incapable of being shifted ; to withdraw (specie) from circulation. घट्ट बसविणें ; (सैन्य) न हालवितां येईलसें करणें ; चलन-नाणें-बंद करणें,-काढून घेणें ;-*ization, n.*

Immŏd'erate, *a.* (इमॉ'डरेट्)—excessive, wanting in moderation. अमर्याद, अनेमस्त.-*ly, adv.*

Immŏd'ĕst, *a.* (इमॉ'डिस्ट्)—indecent, indelicate ; impudent. निर्लज्ज ; उद्धट, दांडगा, धृष्ट.-*y, n.* उद्धटपणा, दांडगाई, निर्लज्जपणा.-*ly, adv.*

Imm'ŏlāte, *v. t.* (इ'मोलेट्)—to sacrifice ; to kill in a sacrifice. बळी देणें ; यज्ञांत ठार मारणें, बलिदान करणें.-*tion, n.,-tor, n.*

Immŏ'ral, *a.* (इमॉ'रल्)—contrary to morality, morally wrong or evil ; dissolute. अनीतीचा, अन्यायाचा ; दुर्व्यसनी, दुर्वृत्त.-*ral'ity, n.-rally, adv.*

Immort'al, *a.* (इमॉ'र्टल्)—not mortal, undying ; famous of all time ; constant, long-lasting. अमर ; सर्वकाळीं प्रसिद्ध ; स्थिर, चिरकालिक. *n.* an immortal being, (*pl.*) gods of antiquity ; a person, esp. author, of enduring fame ; (pl.) royal bodyguard of ancient Persia. अमर्त्य, अमर व्यक्ति, देव ; मरुद्गण ; चिरकीर्ति पुरुष,-व्यक्ति,-लेखक ; प्राचीन इराणमधील बादशहाचे शरीररक्षक.-*ity, n.* अमरत्व, चिरस्थायित्व, शाश्वती.

Immort'alīze, *v. t.* (इमॉ'र्टलाइझ्)—to make immortal (esp. in fame). अमर करणें, कीर्ति शाश्वत करणें, अजरामर करणें.

Immort'allȳ, *adv.* (इमॉ'र्टलि)—eternally ; (colloq.) very, infinitely. अमरत्वानें, कायमपणानें ; अतिशय, मर्यादेबाहेर, बेसुमार.

Immortĕlle', *n.* (इमॉर्टे'ल्)—a flower of papery texture retaining colour when dried. सुकून गेल्यावर सुद्धां रंग कायम टिकणारें फूल.

Immo'vable, *a.* (इमू'व्हबल्)—not movable ; unyielding ; (Law, of property) consisting of land, houses, etc. अचल, स्थिर ; स्थिर मनाचा ; दृढनिश्चयी ; जमीन, घरदार वगैरे स्थावर (मिळकत). *n. pl.* fixtures. स्थावर मिळकत, मालमत्ता, चीजवस्त.-*bility, n., -ness, n., -bly, adv.*

Immūne', *a. & n.* (इम्यू'न्)—exempt, secure. मुक्त, अबाधित, रहित (मनुष्य).

Immū'nitȳ, *n.* (इम्यू'निटि)—exemption ; freedom (*from*); being proof against contagion, etc. (*from*). सूट, माफी ; मोकळीक, मुक्ति, अभाव ; निर्भयता.

Im'mūnīze, *v. t.* (इ'म्यूनाइझ्)—to render immune (*against* contagion). रोगाच्या संसर्गापासून मुक्त करणें. -*zation, n.*

Immūre', *v. t.* (इम्यू'अर्)—to enclose within walls, to confine, to imprison, to shut up. कैद करणें ; कोंडून ठेवणें.—*ment, n.*

Immū'table, *a.* (इम्यू'टब्ल्)—unchangeable ; invariable, unalterable. निर्विकार, न बदलणारा. —*ability, n.,—ably, adv.*

Imp, *n.* (इम्प्)—a little malignant spirit, little devil ; a mischievous child ; a child. सैतान, भूत ; खोडकर मूल ; मूल.

Imp, *v. t.* (इम्प्)—to strengthen the flight of a bird (*imp the wings of*); to enlarge, to eke *out.* तुटलेला किंवा कमकुवत पंख नवीन पीस घालून दुरुस्त करणें, (पक्ष्याला) उडण्यालायक शक्ति आणणें ; भरपूर तयारी करून देणें, सरंजाम देणें, समर्थ करणें.

Im'păct, *n.* (इ'म्पॅक्ट्)—collision, striking. धक्का, धडका, टक्कर, आघात, संघात. *v. t.* (इम्पॅ'क्ट्) to press, fix, firmly (*into, in.*). घट्ट चेपणें, दाबणें, बसविणें.—*pac'tion, n.*

Impair', *v. t.* (इम्पे'अर्)—to make worse, to deteriorate, to damage, to weaken. बिघडविणें, नुकसानी करणें, दुर्बल करणें.—*ment, n.* दुर्बलता ; इजा, अपाय.

Impāle', *v. t.* (इम्पे'ल्)—to transfix on a stake ; esp. as a form of capital punishment ; (Herald.) to combine (two coats of arms) by placing side by side on one shield ; (rare) to fence in with stakes. सुळावर चढविणें, सुळीं देणें ; (दोन कुलमानद्योतक ध्वजादिचिन्हें) एकाच ढालीवर जवळजवळ एकत्र दाखविणें ; मोख्यांचें कुंपण करणें, आवार करणें,-घालणें. —*ment, n.* शूलारोपण ; आवार, कुंपण. [L. *im*, in, *palus*, a stake]

Impăl'pable, *a.* (इम्पॅ'ल्पेबल्)—not to be perceived by touch ; not easily grasped or apprehended by the mind. अति सूक्ष्म, स्पर्शानें न कळणारें ; सहज न समजणारें, दुर्बोध्य, अवघड. —*bility, n., —bly, adv.*

Impăl'ūdĭsm, *n.* (इम्पॅ'ल्यूडिझम्)—morbid state, with tendency to intermittent fevers. (मधून मधून तापकरी असणें, प्लीहा वाढणें, अशी) रोगट स्थिति.

Impanel', *v. t.* (इम्पॅन'ल्)—to enter in a list or on a piece of parchment called a panel, to empanel. पंचांची यादी ठरविणें,- पंचांच्या वगैरे यादींत नांव घालणें.

Impark', *v. t.* (इम्पा'र्क्)—to enclose (beasts) in a park ; to enclose (land) for a park. मृगयाभूमींत- शिकारीच्या रानांत- (पशू) कोंडणें,- अडकावून ठेवणें ; (जागेला) आवार घालणें. —*ation, n.*

Impärt', *v. t.* (इम्पा'र्ट्)—to give a share of ; to communicate to. अंश देणें ; कळवणें, विदित करणें, उघड करून दाखविणें, देणें.—*ation, n. —ment, n.*

Impär'tial, *a.* (इम्पा'र्शल्)—not partial ; unprejudiced, equitable, fair. निःपक्षपाती, समदृष्टि ; न्याय्य, योग्य. —*ity, n.* (इम्पार्शिॲ'लिटि) निःपक्षपात, समदृष्टि. —*ally, adv.*

Impăss'able, *a.* (इम्पा'सेबल्)—that cannot be traversed, that cannot be passed over. दुस्तर, दुर्गम. —*bility, n.; —ness, n.* अगम्यता, दुस्तरपणा.

Impăsse', *n.* (इम्पा'स्, इम्पॅ'स्)—a blind alley ; deadlock ; fix. रस्ता नसलेली- बंद- गल्ली ; कामाची पूर्ण बंदी, खंड, अडथळा ; पेंच, अडचण.

Impăss'ĭble, *a.* (इम्पॅ'सिबल्)—not liable to pain or injury, showing no sign of emotion. दुःखरहित, दुःखातीत, निगरगट्ट, कोडगा. —*bility, —ness, nn.* , —*bly, adv.*

Impă'ssioned, *a.* (इम्पॅ'शन्ड्)—animated, excited, deeply moved ; ardent. विकारवश ; उत्सुक.

Impăss'ĭve, *a.* (इम्पॅ'सिव्ह्)—void of feeling or emotion ; serene ; not subject to suffering. मनाला कांहीं न वाटणारा, भावनारहित ; गंभीर ; मनाला लावून न घेणारा, दुःखातीत, निगरगट्ट. —*ly, adv.* ; —*ness*, —*iv'ity, n.*

Impăs'to, *n.* (इम्पॅ'स्टो)—(paint.) laying on of colour thickly. दाट रंग लावणें, दाट रंगविणें. *Impas'te, v. t.* खळीनें बंद करणें, चिकटविणें ; खळ करणें ; दाट रंगांनीं रंगविणें. [It.]

Impă'tient, *a.* (इम्पे'शन्ट्)—not patient ; not enduring delay, intolerant (of). उतावळा, अधीर ; असहनशील, असहिष्णु. —*ly, adv.*, —*tience, n.* अधीरपणा, उतावळेपणा, औत्सुक्य.

Impawn', *v. t.* (इम्पॉ'न्)—to put in pawn ; (*fig.*) to pledge. तारण गहाण लावणें ; वचन देणें.

Impay'able, *a.* (इम्पे'अबल्)—beyond price ; (colloq.) going beyond limits. किंमतीहून जास्त ; मर्यादेबाहेरचें.

Impeach', *v. t.* (इम्पी'च्)—to call in question ; to disparage ; to accuse (a person) *of*, to charge (*with*) ; to find fault with ; to accuse of treason etc. before a competent tribunal. संशय घेणें,- येणें, शंका काढणें ; उणेपणा-दोष-काढणें ; आरोप करणें ; नांवें ठेवणें ; नाक मुरडणें ; न्यायासनापुढें चौकशी करविणें. —*able, a.* दोषार्ह. —*ment, n.* (सरकारी कामगारावर दोषारोप ठेवून त्यास) चौकशीसाठीं

न्यायासनासमोर आणणें. (सार्वजनिक स्वरूपाच्या मोठ्या गुन्ह्याबद्दल) आरोप करणें; शंका, तक्रार.

Impecc'able, *a.* (इम्पे'क्बल्)—not liable to sin; (of things) faultless. पापसंभवशून्य, पापरहित, निष्पाप; निर्दोष, खोटी ठेवण्याला जागा नसलेलें. *-bility*, *n.*, *-bly*, *adv.*, *-ccant*, *a.* पापरहित, निष्पाप. [L *im*, not, *peccare*, sin]

Impecu'nious, *a.* (इम्पिक्यू'निअस्)—having no money, poor. निर्द्रव्य, गरीब, धनहीन. *-nios'ity*, *n.* (-निऑ'सिटि) धनहीनता, गरिबी. [L *im*, not, *pecunia*, money]

Impe'dance, *n.* (इम्पी'डन्स्)—(electr.) virtual resistance due to self-induction in an electrified body. विद्युत्संचारित वस्तूंत स्वतः प्रवर्तनामुळें होणारा भ्रामक- आगन्तुक-विरोध.

Impede', *v. t.* (इम्पी'ड्)—to stop or delay the progress of, to retard; to hinder. विघ्न- अडथळा-करणें; मोडती घालणें, अटकविणें.

Imped'iment, *n.* (इम्पे'डिमन्ट्)—hindrance. विघ्न, अडथळा, प्रतिबंध. *I.* (*in* one's *speech*), stammer. बोलतांना अडखळणें, वाक्स्खलन. *Imped'iments*, *n. pl.* (also, *-ta.*) baggage, esp. of army. (सैन्याचें) सामानसुमान. *-al*, *a.* बाधक, नडीचा.

Impel', *v. t.* (इम्पे'ल्)—to drive, to force; to propel; to incite to action. जोरानें हांकणें; पुढें ढकलणें; प्रवृत्त करणें. *-ellent*, *a.* & *n.* प्रवर्तक (शक्ति इ.).

Impend', *v. i.* (इम्पे'न्ड्)—to hang over; to be imminent, to threaten. डोक्यावर येऊन ठेपणें; येऊन भिडणें, नेटणें. *-ence*, *-ency*, *nn.*, *-ent*, *a.*

Impen'etrable, *a.* (इम्पे'निट्रबल्)—not penetrable; impervious (*to*, *by*, ideas, &c.), inscrutable. अभेद्य, निर्भेद्य; मनावर परिणाम न होऊं देणारा; गहन, अचिन्त्य. *-bility*, *n.* *-ness*, *n.* अभेद्यता, निर्भेद्यता, कठोरपणा, मूर्खपणा. *-bly*, *adv.*

Impen'etrate, *v. t.* (इम्पे'निट्रेट्)—to penetrate deeply. आंत खोल शिरणें, भेद करणें.

Impen'itent, *a.* (इम्पे'निटन्ट्)—not penitent; obdurate. अनुतापशून्य, पश्चात्ताप न पावणारा; कठोर मनाचा, हट्टी. *Impen'itence*,*-cy*, *nn.*, *-ly*, *adv.*

Impe'rative, *a.* (इम्पे'रेटिव्)—(Gram.) expressing command; peremptory; obligatory, necessary; urgent. आज्ञासूचक, आज्ञार्थक; जबरदस्तीचे; आवश्यक, अवश्यकर्तव्य, जरूरीचा; निकडीचा. *n.* आज्ञार्थ.*-ly*, *adv.*-*ness*, *n.* *Imperatival*, *a.* आज्ञार्थक.

Impera'tor, *n.* (इम्परे'टर्)—(Rom-Hist.) commander; an emperor. (यशस्वी) सेनापति; बादशहा.

Impercep'tible, *a.* (इम्पर्से'प्टिबल्)—not perceptible; very slight or gradual. अगोचर, अव्यक्त; अतिसूक्ष्म.*-tibly*, *adv.* कळत न कळत, हळूच.

Imper'fect, *a.* (इम्प'र्फिक्ट्)—not perfect; incomplete; faulty, defective. अपुरा; अपूर्ण; सदोष, दोषयुक्त, सव्यंग. *n.* अपूर्ण भूतकाळ. *I.tense*, अपूर्ण भूतकाळ.*-ly*, *adv.* अपूर्णपणें, अर्धवट (रीतीनें).*-tion*, *n.* अपूर्णता, न्यूनता, कसर, गोम.

Imper'forate, *a.* (इम्प'र्फरेट्)—not perforated, not pierced; (Anat.) lacking the normal opening. भोंकें न पाडलेला, अच्छिद्र, नीरंध्र; गुदद्वाररहित.

Impe'rial, *a.* (इम्पी'अरिअल्)—of an empire; of an emperor; of superior excellence, supreme; majestic; magnificent; (of paper) of large size, 22×32 in. सार्वभौमिक, साम्राज्याचा, बादशाही, सम्राटाचा; सर्वश्रेष्ठ; तेजस्वी; भव्य; मोठ्या आकाराचा (२२×३२) इंची कागद. *n.* a small part of beard under a man's lower lip; a trunk for luggage on the top of a coach; a Russian tsarist gold coin of 8 dollars. खालच्या ओंठावर ठेवलेला दाढीचा लहान झुपका; सामानाची पेटी; (सुमारें २५ रुपये किंमतीचें) जुनें सोन्याचें (रशिअन) नाणें. *I. Institute*, ब्रिटिश साम्राज्याच्या निरनिराळ्या विभागांतील व्यापारवृद्धीसाठीं लंडनमधील संस्था,-संस्थेची इमारत. *I. preference*, साम्राज्यांतील देशांतून येणाऱ्या आयात मालावर परकी देशच्या मालाहून कमी जकात ठेवण्याचें धोरण. *Imper'ially*, *adv.*

Impe'rialism, *n.* (इम्पी'अरिअलिझम्)—the rule of an emperor, esp. when despotic or arbitrary; the extension of British Empire where trade requires protection of the flag; the union of different parts of the British Empire; the belief in the value of colonies and dependencies. (जुलमी, स्वच्छंदी) बादशाही सत्ता; ब्रिटिश साम्राज्यविस्तार; ब्रिटिश साम्राज्यांतील विभागांची-देशांची-एकी, जूट; साम्राज्यशाही, साम्राज्याचें वारें.*-listic*, *a.*,*-lize*, *v. t.*

Impe'rialist, *n.* (इम्पी'अरिअलिस्ट्)—an advocate of imperialism or of imperial rule. साम्राज्यवादी, साम्राज्यशाहीचा पुरस्कर्ता,-अभिमानी.

Impe'ril, *v. t.* (इम्पे'रिल्)—to endanger. धोक्यांत घालणें, संकटांत पाडणें, वर मरण आणणें.

Impe'rious, *a.* (इम्पी'अरिअस्)—domineering; commanding; urgent, not capable of being resisted; arrogant. कडक, करडा; हुकूम चालविणारा; जरूरी आवश्यक, तांतडीचा, निकडीचा;

मगरूर, गर्विष्ठ.-*ly, adv.* करडेपणानें. निकडीनें. *-ness, n.*

Impĕ'rĭshable, *a.* (इम्पे'रिशब्ल्)—that cannot perish. अक्षय, अविनाशी, अक्षर, न नासणारा, न विघडणारा.-*ability, n.,-ableness, n.* शाश्वती, टिकाऊपणा.-*ably, adv.*

Impĕ'rium, *n.* (इम्पे'रिअम्, इम्पी'आरिअम्)-absolute power; empire. पूर्ण सत्ता, अनियंत्रित सत्ता; साम्राज्य. *I. in imperio,* दुसऱ्याच्या सत्तेखालीं अनियंत्रित-पूर्ण-सत्ता. [L]

Imperm'anent, *a.* (इम्प'र्मनन्ट्)—not permanent. तात्पुरता, कामचलाऊ, कायमचा नव्हे असा. *-anence,-anency, nn.*

Imperm'eable, *a.* (इम्प'र्मिअब्ल्)—that cannot be passed through; (physics) that does not permit the passage of fluids. अभेद्य, अप्रवेश्य; आंत द्रव पदार्थ-पाणी-न शिरणारा.-*ability, n.*

Impermĭ'ssĭble, *a.* (इमर्मि'सिब्ल्)—not permissible. अननुज्ञेय, न चालणारा.

Imperscrĭp'tĭble, *a.* (इम्पस्क्रि'प्टिब्ल्)—not backed by written authority. लेखी अनुज्ञा-परवानगी-नसलेला, लेखी आधार नसलेला.

Imper'sonal, *a.* (इम्प'र्सनल्)—having no personality or personal reference. अव्यक्तिक; व्यक्तिभावरहित, अव्यक्तिवाचक. *I. verb,* (Gram.) अकर्तृक-भाववाचक-क्रियापद. *-ality, n., -ally, adv.* व्यक्तिबोध न करतां, सामान्यपणें, उभारत; भाववाचकपणानें.

Imper'sonăte, *v. t.* (इम्प'र्सनेट्)—to personify; to play the part of. अमुक एक मनुष्य तो मीच अशी वतावणी करणें; ०ची भूमिका घेणें, ०चा वेष घेणें.-*tion, n.-tor, n.*

Impert'ĭnent, *a.* (इम्प'र्टिनेन्ट्)—insolent, rude, saucy; irrelevant; intrusive; absurd. उद्धट, मगरूर; अप्रस्तुत; अप्रासंगिक; आगंतुक; अस्थानीं, चमत्कारिक, विलक्षण.-*nence, n., -nently, adv.*

Impertŭrb'able, *a.* (इम्पर्ट'र्बब्ल्)—that cannot be perturbed or agitated, not excitable; calm. अक्षोभ्य; शान्त.-*ability, n., -ableness, n.* अक्षोभ्यता, अक्षोभ, नित्य शांति.-*ably, adv.*

Imperv'ious, *a.* (इम्प'र्व्हिअस्)—unpassable; impenetrable; (*fig.*) inaccessible. अगम्य; अभेद्य; गहन, असाध्य. *I. to argument etc.,* (fig.) deaf. (दुसऱ्याचें म्हणणें वगैरे) न ऐकून घेणारा, हेकट.-*ly, adv.,-ness, n.*

Impeti'go, *n.* (इम्पेटा'इगो)—a pustular disease of the skin. (आंगावर पुटकळ्या उठतात असा) त्वचेचा रोग, विस्फोटक (क्षुद्र कुष्ट). *-ti'ginous, a.*

Im'petrate, *v. t.* (इ'म्पट्रेट्)—to obtain by request; to ask for. विनंति करून मिळविणें; ची मागणी करणें, मागणें. *-tration, n., -tratory, a.*

Impĕt'ūous, *a.* (इम्पे'ट्यूअस्)—moving violently or fast; acting rashly. जलदगतीचा, वेगवान; उतावीळ, साहसी, अमर्षी. *-os'ity, n.* झपाटा, धाडसीपणा, उतावळेपणा. *-ness, n. -ly, adv.*

Im'pĕtus, *n.* (इ'म्पिटस्)—a moving force; momentum; impulse. जोर; गतीचा वेग; उत्तेजन, चलन, चालना.

Im'pĭ, *n.* (इ'म्पि)—a body of kafir warriors. काफिर योद्धे. [Zulu]

Impī'ĕtȳ, *n.* (इम्पा'इटि)—lack of piety. अधर्म, धर्मनिंदा, अनादर, अश्रद्धा.

Impĭnge', *v. i. & t.* (इम्पि'न्ज्)—to make impact (*on, upon*), to make thing dash against. वर धडकणें, जोरानें आदळणें,- आदळविणें. *-ment, n.*

Im'pĭous, *a.* (इ'म्पिअस्)—not pious; wicked. अपुण्यशील, अधर्मी; दुष्ट. *-ly, adv.*

Im'pĭsh, *a.* (इ'म्पिश्)—of or like an imp सैतानाचा, भुतासारखा. *-ly, adv. -ness, n.*

Impĭt'ĕous, *a.* (इम्पि'टिअस्)—(*poet.*) pitiless. निर्दय, निष्ठुर.

Implăc'able, *a.* (इम्प्लॅ'केब्ल् -प्ले-)—not appeasable; inexorable. अनाराध्य; दुराराध्य, पाषाणहृदयी, अतिद्वेषी, कट्टा. *-bility, n., -bly, adv.*

Implacĕn'tal, *a.* (इम्प्लसे'न्टल्)—with no placenta. जरायु-वार-बीजबंध-रहित, वार नसलेला.

Implănt', *v. t.* (इम्प्ला'न्ट्)—to insert, to fix; to plant ideas in the mind, to instil. आंत लावणें; मनांत बिंबविणें, रोपण करणें. *-ation, n.*

Implĕ'dge, *v. t.* (इम्प्ले'ज्)—to put in pledge, to pawn. तारण-गहाण-टाकणें.

Im'plĕment, *n.* (इ'म्प्लिमन्ट्)—a tool, a utensil. हत्यार, औत, अवजार; साधन, उपकरण. *v. t.* (-मेन्ट्) to carry into effect. अंमलांत आणणें, पुरा-पूर्ण-करणें.

Imple'tion, *n.* (इम्प्ली'शन्)—filling; fullness. भरणें, पूरण; पूर्णता, पूर्णपणा.

Im'plĭcăte, *v. t.* (इ'म्प्लिकेट्)—to entangle; to involve into connection with; to imply. गुंतवणें; गुंतणें; ध्वनित असणें. *n.* (इ'म्प्लिकट्) thing implied. ध्वनितार्थ, अटकळ, ध्वनि. *To be implicated,* गोंवलेला-गुंतलेला-असणें. *Implica'tion, n.* गोवणें, गुंतागुंती, आक्षेप, ध्वनि, लक्ष्यार्थ. *Im'plicative, a.*

Implĭ'cĭt, *a.* (इम्प्लि'सिट्)—involved though not expressed; unquestioning. गर्भित, ध्वनित,

अंतर्गत; साफ, निखालस, अनन्यभावाचा. *-ly, adv., -ness, n.*

Implōre′, *v. t.* (इम्प्लो′अर्)—to beg earnestly. विनवणी करणें, मागणें, काकुळतीस आणणें. *-ringly, adv., -ringness, n.*

Implȳ′, *v. t.* (इम्प्ला′य्)—to involve the truth of; to mean; to insinuate. सत्यांश असणें; गर्भितार्थ असणें; सुचवणें, गर्भित करणें. *Im′plied, a.* ध्वनित, गर्भित, फलित. *Impli′edly, adv.*

Impŏl′icȳ, *n.* (इम्पॉ′लिसि)—bad policy; injudiciousness. चुकीचें धोरण, चुकीचा व्यवहार; अविचार, अदूरदर्शीपणा.

Impolīte′, *a.* (इम्पोला′इट्)—uncivil, rude. असभ्य, उद्धट. *-ly, adv., -ness, n.*

Impŏl′itic, *a.* (इम्पॉ′लिटिक्)—injudicious. अविवेकी, अदूरदर्शी, अनर्थावह. *-ically, adv.*

Impŏn′derable, *a.* (इम्पॉ′न्डरबल्)—having no weight; very light. निर्भार, गुरुत्वहीन; अतिशय हलका. *n.* निर्भार द्रव्यपदार्थ.

Impŏrt′, *v. t.* (इम्पॉ′र्ट्)—to bring in (esp. foreign goods) from abroad; to imply, to mean. आयात करणें, दुसऱ्या देशांतून आपल्या देशांत आणणें; सुचविणें, अर्थ असणें, महत्त्वाचा असणें. *n.* (इ′म्पॉर्ट्) meaning; implication; importance; (*usu, pl.*) imported commodity. अर्थ; गर्भितार्थ; महत्त्व; (अने०) परदेशांतून आणलेला माल, आयात माल. *-able, a., -ation, n., -er, n.* (मालाची) आयात करणारा.

Impŏrt′ance, *n.* (इम्पॉ′र्टन्स्)—being important; weight, significance; dignity; pompousness. महत्त्वाचा असणें; महत्त्व, प्रभाव; वजन; मातब्बरी, मोठेपण; डौल.

Impŏrt′ant, *a.* (इम्पॉ′र्टन्ट्)-of great consequence; momentous; pompous. उपयोगी, महत्त्वशीर, महत्त्वाचा; वजनदार; भारदस्त, भारी.*-ly, adv.*

Impŏrt′ūnate, *a.* (इम्पॉ′र्ट्युनट्)—persistent in solicitation, urgent in request or demand; (of affairs) urgent. आग्रही, चेंगट, चिवट, गळेपडू, अत्याग्रही; निकडीचा, तांतडीचा.*-ly, adv.,-′nity, n.* अतियाचना,-प्रार्थना, गळ.

Impŏr′tūne, *v. t.* (इम्पॉ′र्ट्यून्,-ट्यू′न्)—to solicit pressingly and repeatedly. पुनः पुनः विनवणी करणें, आग्रह करणें, गळ घालणें.

Impōse′, *v. t. & i.* (इम्पो′झ्)—to place (a thing) on; to lay (tax) on; to palm off on; (Print.) to lay (pages of type) in proper order and secure them in a chase; to exert influence (*on* person). लादणें, माथीं मारणें; (कर) बसवणें; गळ्यांत बांधणें; जुळविलेल्या टंकांचीं-खिळ्यांचीं-पानें नीट लावून चौकटींत घट्ट बसविणें; (वर) वजन पाडणें. *To impose upon*, to overawe; to deceive. दरारा बसविणें; ठकविणें.

Impō′sing, *a.* (इम्पो′झिंग्)—impressive, formidable, esp. in appearance. दृष्टदार, भव्य स्वरूपाचा, भव्य, रुबाबदार, दिसण्यांत वजनशीर.*-ly, adv.,-ness, n.*

Imposi′tion, *n.* (इम्पोझि′शन्)—laying on; impost, tax; deception; overcharge; work set as punishment at school, (abbr. *impo, impot*). वर घालणें, ठेवणें; बसविलेला कर, जकात, भार, बोजा; फसवणूक; जादा कर; शिक्षा म्हणून विद्यार्थ्यांस दिलेलें काम.

Impŏss′ible, *a.* (इम्पॉ′सिबल्)—not possible; difficult, incapable of being accomplished; (colloq.) intolerable. अशक्य; अवघड, कठीण, दुःसाध्य, असाध्य; असह्य, भयंकर, न सोसवणारा. *-bility, n.* अशक्यता, असाध्यता, असंभव. *-bly, adv.*

Im′pōst, *n.* (इ′म्पोस्ट्)—a tax, duty; a tribute; (sl.) the weight a horse carries in handicap; the bearing arch, the upper course of a pillar. (आयात मालावरील) कर, जकात, खंडणी; (शर्यतींत धांवणाऱ्या) घोड्याला न्यावें लागणारें वजन; वरील आधाराची कमान, खांबाचा वरचा भाग.

Impŏs′tor, *n.* (इम्पॉ′स्टर्)—one who assumes a false character; a swindler. तोतया, वेषधारी, फसव्या; भोंदू, वंचक, ठक. *-trous, a.*

Impos′tūme, Impos′thūme, *n.* (इम्पॉ′स्ट्युम्)—a purulent swelling, an abscess. गळूं, विद्रधि.

Impos′ture, *n.* (इम्पॉ′स्चर्)—a fraud practised by an impostor, deception, sham. फसवणूक, ठकबाजी.

Impot, See Imposition.

Im′potent, *a.* (इ′म्पोटन्ट्)—powerless; decrepit; without sexual power. कमजोर, अशक्त, दुर्बळ; खप्पड; नपुंसक, पुरुषत्वहीन, पाउणेआठ, बुळा. *-ence, -ency, nn.* कमजोरी, दुर्बळता, बुळेपणा, नपुंसकत्व, क्लैब्य.*-ly, adv.* ष्याउ-नामर्द-पणानें.

Impound′, *v. t.* (इम्पा′उन्ड्)—to shut up (cattle etc.) in a pound; to shut up as in a pound; to take legal possession of; to confiscate. कोंडवाड्यांत घालणें,-कोंडणें; कोंडून ठेवणें; कायदेशीर ताबा घेणें; जप्त करणें.

Impŏv′erish, *v. t.* (इम्पॉ′व्हरिश्)—to make poor; to exhaust the strength of. गरीब- भिकारी- दरिद्री करणें, भिकेस लावणें; दुर्बळ करणें, निःसत्त्व करणें. *-ment, n.* दरिद्रता, निर्धनता, निःसत्त्वपणा, दुर्बळता.

Imprăc'tĭcable, *a.* (इम्प्रॅ'क्टि-कबल्)—not practicable, impossible; unmanageable; (of roads) impassable. अव्यवहार्य, अकार्य, असाध्य; अनावर, हेकट, अगम्य; दुर्गम, अवघड (रस्ता). *-ness, n., -cability, n., -cably, adv.*

Im'prĕcāte, *v. t.* (इ'म्प्रिकेट्)—to invoke a curse or some evil upon. वाईट होवो असें इच्छिणें, शाप देणें. *-tion, n.* शापवचन; *-tory, a.*

Imprĕg'nable, *a.* (इम्प्रे'ग्नेबल्)—able to resist an attack, proof against an attack. अजिंक्य, अभेद्य, दुर्धर, बिकट. *-ability, n., -ably, adv.*

Imprĕg'nāte, *v. t.* (इम्प्रे'ग्नेट्)—to make pregnant, (Biol.) to fecundate; to fill (*with*), to transmit into; to saturate (*with*). गर्भवती करणें, गर्भस्थापन करणें, फळवणें; फलभरित-सुपीक-करणें; (एका वस्तूचे अंश-गुणधर्म-) दुसऱ्या वस्तूंत आणणें,-घालणें, आंत ओतणें, पूर्ण करणें,-भरणें. *a.* (इम्प्रे'ग्नट्) pregnant, permeated with. गर्भार, गर्भवती, गाभण, फलदायक, सुपीक; गुणयुक्त, गुणमिश्रित. *-tion, n.*

Imprĕsar'ĭō, *n.* (इम्प्रेझा'रिओ)—an organizer of public entertainment. नाटकमंडळीचा चालक, -व्यवस्थापक. [It.]

Imprēscrĭp'tĭble, *a.* (इम्प्रिस्क्रि'प्टिबल्)—not subject to prescription, that cannot be legally taken away. जुनी वहिवाट किंवा पुरातन भोगवटा यांनीं उत्पन्न किंवा नष्ट न होणारा (हक्क), स्वतःसिद्ध, कायद्यानें अहार्य.

Imprĕss, *v. t.* (इम्प्रे'स्)—to imprint or stamp by pressure; to enforce, to fix; to affect or to influence deeply. ठसा किंवा छाप मारणें, अंकित-मुद्रित-करणें; ठसवणें; (मनावर) बिंबवणें. *n.* (इ'म्प्रेस्), stamping; a mark impressed; (*fig.*) a characteristic mark. छाप मारणें, मुद्रण; छाप, ठसा; विशेष लक्षण, चिन्ह. *-ible, a.* ठसा उमटवितां येण्यासारखा, संस्कारक्षम; *-ibility, n.*

Impress', *v. t.* (इम्प्रे'स्)—to force (men) to serve in army or navy; to seize (goods) for public service; to enlist, to make use of. (सरकारी) कामाकरितां वेठीस धरणें;-(माल) जप्त करणें; चा उपयोग करून घेणें. *-ment, n.*

Imprĕ'ssion, *n.* (इम्प्रे'शन्)—impressing, a mark impressed; a print from type or engraving, an edition, copies printed at a time; effect produced on mind; a (vague) belief. ठसा उमटविणें, छाप मारणें, मुद्रण; ठसा, छाप; आवृत्ति; परिणाम, संस्कार; मत, समजूत, अस्पष्ट कल्पना. *-able, a.* easily influenced. शीघ्रसंस्कारग्रहणक्षम. *-ability, n.* संस्कारग्रहणक्षमता.

Imprĕ'ssionism, *n.* (इम्प्रे'शनिझम्)—a method of painting or writing so as to give general tone and effect without detail. (बारीकसारीक गोष्टी न सजवितां) एकंदरीनें परिणामकारी अशी चित्रणपद्धति,-लेखनपद्धति. *-nary, -nis'tic, aa., -ist, n.*

Imprĕss'ive, *a.* (इम्प्रे'सिव्ह्)—(of language, scene etc.) able to excite deep feeling, affecting. भव्य, मनांत ठसणारा, (मनावर) चांगला परिणाम करणारा, मनोवेधक, हृदयंगम. *-ly, adv., -ness, n.*

Im'prĕst, *n.* (इम्प्रे'स्ट्)—money advanced to a person to be used in State business. सरकारी कामकाजासाठीं-उद्योगधंद्यासाठीं-एखाद्या व्यक्तीला दिलेलें कर्ज.

Imprĭmā'tur, *n.* (इम्प्रिमे'टर्)—an official license to print a book; (fig) a sanction. पुस्तक छापण्याची सरकारी परवानगी, मुद्रणाज्ञा; अनुमति, अधिकार. [L,=let it be printed]

Imprī'mĭs, *adv.* (इम्प्रा'इमिस्)—in the first place. प्रथमतः, पहिल्यांदा. [L]

Imprĭnt', *v. t.* (इम्प्रि'न्ट्)—to impress a mark on; to fix on the mind or memory. छाप, ठसा उमटविणें; मनावर ठसवणें,-बिंबविणें. *n.* (इ'म्प्रिन्ट्) an impression, a stamp; *printer's i.* or *publisher's i.,* name of printer or publisher in a book, newspaper, etc. छाप, ठसा; (पुस्तकाच्या वगैरे मुखपृष्ठावर किंवा शेवटीं छापलेलें) मुद्रकाचें किंवा प्रकाशकाचें नांव.

Imprĭs'on, *v. t.* (इम्प्रि'झन्)—to incarcerate, to put into prison; to confine, to shut up. कैद करणें, तुरुंगांत टाकणें; कोंडून ठेवणें, अटकविणें. *-ment, n.* कैद, बंदी; अटकाव, अटक, विरोध.

Imprŏb'able, *a.* (इम्प्रॉ'बबल्)—not likely to be true; incredible. असंभाव्य, कठीण, दुर्घट; अविश्वसनीय. *Improb'ability, n.; -ably, adv.*

Imprŏb'ĭty, *n.* (इम्प्रॉ'बिटि)—wickedness; dishonesty. दुष्टपणा; अप्रामाणिकपणा, कपट, लबाडी. [L *im,* not, *probus,* honest]

Imprŏmp'tū, *adv. & a. & n.* (इम्प्रॉ'म्प्टयू)—extempore, off-hand. विचार केल्यावांचून; आयत्या वेळीं केलेलें, कामचलाऊ, चालचलाऊ, शीघ्र. *n.* शीघ्र-तात्कालिक-रचना, कवन इ.

Imprŏp'er, *a.* (इम्प्रॉ'पर्)—inaccurate, wrong; unseemly, indecent. खोटा, चुकीचा; अयोग्य, अनुचित, अयुक्त, गैरवाजवी. *I. fraction,* greater than 1, with numerator greater than denominator. (अंश छेदापेक्षां अधिक असा) विषम अपूर्णांक. *-ly, adv.* अयोग्य रीतीनें.

Impro'prĭāte, *v. t.* (इम्प्रो'प्रिएट्)—to annex (ecclesiastical benefice) to a corporation of

person, as property; to place (tithes) in lay hands. धर्मादाय-उपाध्यायाची-वृत्ति संस्थेला किंवा व्यक्तीला देऊन टाकणें; धर्मोपाध्याय नसलेल्या- सामान्य मनुष्याच्या- हातीं धर्मवेतन-जहागीर-देणें. (-प्रिअट्), *a.*, *-riation*, *n.*, *-riator*, *n.*

Impropri'ety, *n.* (इम्प्रोप्रा'यइटि)— incorrectness; unfitness; indecency. चूक; अयोग्यता; अनुचितता, गैरवाजवीपणा.

Improv'able, *a.* (इम्प्रू'व्हबल्)—that can be improved, adapted for cultivation. सुधारण्याजोगा; लागवडीला अनुकूल-लायक-केलेला.*-bility*, *n.*, *-ness*, *n.*

Improve', *v. t. & i.* (इम्प्रू'व्ह्)—to make or become better; to make good use of (occasion, opportunity). सुधारणें, सुधारणा करणें; चांगला उपयोग करणें, सदुपयोग करणें. *To i. away*, to get rid of by improvements. सुधारणा करून (दोष) काढून टाकणें. *To i. upon*, जास्त सुधारणा करणें, अधिक चांगलें करणें. *Improve'ment*, *n.* सुधारणा करणें, सुधारणा, वृद्धि, वाढ, उत्कर्ष, सदुपयोग.

Impro'ver, *n.* (इम्प्रू'व्हर्)—one who improves anything; one who serves a further term of apprenticeship to improve his skill. सुधारणा घडवून आणणारा.- करणारा; धंद्यांतील -कलेंतील-नवशिका उमेदवार.

Improv'ident, *a.* (इम्प्रॉ'व्हिडन्ट्)—wanting foresight, unforeseeing; thriftless; heedless. अदूरदर्शी; उधळ्या, निष्काळजी, दुर्लक्ष करणारा. *-dence*, *n.*, *-dently*, *adv.*

Improvisa'tor, *n.* (इम्प्रॉव्हिझे'टर्)—शीघ्रकवि, एकदम एखादें काम करणारा. *-sation*, *n.*, *-sator'ial*, *a.*, *-satory*, *a.*, *Im'provised*, *a.* कामचलाऊ, चालचलाऊ.

Im'provise, *v. t.* (इं'म्प्रो-व्हाइझ्)—to compose or utter extempore; to bring about on a sudden; to do anything off-hand. आयत्या वेळीं रचणें किंवा बोलणें; एकाएकीं घडवून आणणें; पूर्वतयारीवांचून एकादी गोष्ट करणें.

Imprud'ent, *a.* (इम्प्रू'डन्ट्)—rash, indiscreet. अविचारी, असमंजस, अविचाराचा. *-dence*, *n.* अदूरदृष्टि, अविचार. *-dently*, *adv.* अविवेकानें.

Im'pudent, *a.* (इं'म्प्युडन्ट्)—shameless; pert, insolent, bold-faced, impertinent. निर्लज्ज; द्वांडगा, उद्धट. *Im'pudence*, *n.* निर्लज्जपणा, उद्धटपणा, धिटाई, धार्ष्ट्य. *-dently*, *adv.* उद्धटपणानें, धिटाईनें. *Impudi'city*, *n.* निर्लज्जपणा, उद्धटपणा.

Impugn', *v. t.* (इम्प्यू'न्)—to call in question, to challenge, to contradict. विरुद्ध बोलणें. दूषण देणें, संशय घेणें. *-able*, *a.*, *-ment*, *n.*

Impu'issant, *a.* (इम्प्यू'इसन्ट्)—impotent, weak. नामर्द, कमजोर, दुर्बळ. [F]

Im'pulse, *n.* (इं'म्पल्स्)-impelling, push; impetus; a sudden tendency to act without reflection, a sudden resolution to act; (Dynam.) indefinitely large force enduring a very short time but producing finite momentum e. g. blow of hammer. ढकलणें, वेग, जोर; हुरूप; मनोविकारांची एकदम उचल, आवेश, उकळी, कड, उत्तेजन; (घणाच्या ठोक्यासारखा) मोठा आघात, ठोका.

Impul'sion, *n.* (इम्प'ल्शन्)—impelling, push; mental impulse; an impetus. धक्क्यानें पुढें ढकलणें, धक्का; मानसिक प्रेरणा, आवेश; जोर, प्रेरणा.

Impul'sive, *a.* (इम्प'ल्सिव्ह्)—tending to impel; actuated by impulse. चालविणारा, प्रेरक, प्रवर्तक; लहरीप्रमाणें वागणारा, मनांतल्या उमाळ्याप्रमाणें-उकळीप्रमाणें-वागणारा. *-ly*, *adv.*, *-ness*, *n.*

Impu'nity, *n.* (इम्प्यू'निटि)—exemption from loss or punishment, (*with i.*). नुकसानीची किंवा शिक्षेची माफी, अहानि, निर्भयता.

Impure, *a.* (इम्प्यु'अर्)-not pure, dirty; unchaste, adulterated, mixed (with another colour). घाणेरडा; अपवित्र; मिश्रित, भेसळ, संमिश्र. *-ly*, *adv.*, ; *Impur'ity*, *n.*

Impute', *v. t.* (इम्प्यू'ट्)—to set to the account of, to attribute to; to ascribe. आरोप करणें, ठपका ठेवणें; माथां मारणें; दुसऱ्याच्या नांवें मांडणें.-लिहिणें. *Imput'able*, *a.* आरोपणीय, आरोप्य, दोष देण्यालायक; *-ability*, *n.* *Imputa'tion*, *n.* आंगीं लावणें, आरोपण, दोष, ठपका, शब्द, बातमी, अभिप्राय. *Imput'ative*, *a.*, *-tively*, *adv.*

In, *prep.* (इन्)—within (limits of space, time, circumstance etc.); into; during. (च्या) आंत; मध्यें, माजीं, माझारीं; अवधींत. *In India*, Bombay etc. (of any large city or town etc.). हिंदुस्थानांत, मुंबईंत. *In white, mourning*, (of dress etc.), पांढरे कपडे घातलेला, सुतकांत इ. *In Shakespeare*, शेक्सपीअरच्या ग्रंथांत. *Blind in one eye*, (of part affected) एका डोळ्यानें आंधळा. *Not one in a hundred*, (of ratio) शंभरांत एकहि नाहीं. *In my opinion*, माझ्या मतें. *In fetters*, बेड्या घातलेला, शृंखलाबद्ध. *In cash*, supplied with cash. रोखींनें. *In liquor*, दारूच्या नशेंत. *In crossing the river*, (while). नदी

Inscru'table, *a.* (इन्स्क्रू'टबल्)—mysterious, impenetrable, unsearchable. अतर्क्य, गूढ, गहन, शोधून काढण्यास अशक्य.*-ability, n.,-ness, n., -ably, adv.*

In'sĕct, *n.* (इ'न्सेक्ट्)—small invertebrate animal ; (fig.) an insignificant person or creature. कीटक, किडा, कृमि, जंतु ; क्षुद्र मनुष्य,

वस्तु. *I. powder*, जंतुनाशक पूड.-*ivora, n. pl.* किडे खाऊन राहणारे प्राणी, कीटभोजी स्तन्य प्राणी. -*ivore, n.*, -*iv'orous, a.* insect-eating. किडे खाऊन जगणारा, कीटकोपजीवी.-*icide, n.* insect-killer. कीटक-नाशक, जंतुनाशक (औषध इ.);-*cid'al, a.*;-*ol'ogy, n.* कीटकशास्त्र.

Insĕctār'ium, *n.* (इन्सेक्टे'अरिअम्)—a place for keeping insects. निरनिराळ्या जातीचे किडे सांठवून ठेवण्याची जागा, कीटकगृह.

Insecūre', *a.* (इन्‌सिक्यू'अर्)—unsafe. असुरक्षित, धोक्याचा.-*ly, adv.*

Insecūr'ĭtў, *n.* (इन्सिक्यु'अरिटि)—uncertainty. अनिश्चितता, धोका.

Insĕm'ĭnāte, *v. t.* (इन्से'मिनेट्)—to sow (seed, *in*). बीं घालणें,-पेरणें, बीजारोपण करणें.-*tion, n.* [L *in* & *seminis*, seed]

Insĕn'sate, *a.* (इन्से'न्सट्)—void of sense, stupid; without physical sensation. अक्कलशून्य, बेअकली, मूर्ख; इंद्रियचैतन्यशून्य, कमजोर.-*ly, adv.*

Insĕnsĭb'ĭlĭtў, *n.* (इन्सेन्सि'बिलिटि)—lack of mental feeling or emotion; indifference (*to*); swoon. संवेदनाशून्यता, भावनारहितपणा; गैर लक्ष, दुर्लक्ष; अचेतनत्व, सुस्ती, गुंगी.

Insĕn'sĭble, *a.* (इन्से'न्सिबल्)—imperceptible; unconscious; void of feeling, unfeeling, callous; unaware. अलक्ष्य, अगोचर; बेसावध; भावनाशून्य, निर्दय, निष्ठुर; अजाण.-*bly, adv.* imperceptibly. नकळत, आस्ते आस्ते, धिम्मेपणानें.

Insĕn'sĭtive, *a.* (इन्से'न्सिटिव्ह्)—not sensitive (*to* touch etc.). असंवेदक, संवेदनारहित, भावनारहित, परिणाम न होणारा.-*ness, n.*

Insĕn'tient, *a.* (इन्से'न्शिअन्ट्)—inanimate. अचेतन, निर्जीव, जड, संवेदनाशून्य.

Insĕp'arable, *a.* (इन्से'परबल्)—that cannot be separated. अलग न होणारा, वेगळा करतां न येणारा, नित्यसंबंधी. *n.* (usu. *pl.*) an inseparable person or thing, esp. a friend. अलग न होणारा इसम,-री वस्तु, मित्र. *I. prefix*, a prefix that cannot be used as a separate word (e.g. *dis-*, *un-*). स्वतंत्रपणें शब्द म्हणून उपयोजितां न येणारा उपसर्ग.-*bly, adv.*, -*bility, n.* अविश्लेष्यता, समवायित्व, नित्यसंबंध.

Insert', *v. t.* (इन्स'र्ट्)—to set in or among; to place in or among other things; to introduce; to include. आंत घालणें, घुसडणें; शिरकाव करून देणें; समावेश करणें, अंतर्गत-दाखल-करणें.

Inser'tion, *n.* (इन्स'र्शन्)—inserting; a thing inserted; ornamental needlework etc. inserted into plain material; (Anat.) mode of attachment of muscle, organ etc. आंत घालणें; मध्येंच घातलेला मजकूर किंवा वस्तु; शोभेचें भरतकाम; हाड आणि स्नायु जेथें चिकटलेला असतो तें स्थान, तेथील रचना, स्नायुबद्धस्थान.

In'sĕt, *n.* (इ'न्सेट्)—extra page or pages inserted in a sheet or book; a small map etc. inserted within larger one; a piece let into dress. (आंत घातलेलें) जादा पान,-पानें; मोठ्या नकाशांत-चित्रांत-बसविलेला लहान नकाशा,-चित्र; कपड्याला लावलेली दुसरी कापी,-बगल,-पट्टी. *v. t.* (इन्से'ट्).

Insīde, *n.* (इ'न्सा'इड्)—inner side or part; interior; (of path) side next to wall; (इन्सा'इड्), an inside passenger; (colloq.) stomach and bowels. आंतली बाजू, आंतला भाग, अंतर्भाग; अंतर्याम, अंतरंग, हृदय; भिंतीबरोबरची (रस्त्याची) आंतील बाजू; वाहनांतील उतारू; पोट व आंतडीं. *a.* (इ'-) situated on or in the inside; derived from the inside. आंतील, पोटांतला, अंतस्थ. *adv.* (इन्सा'इड्) & *prep.* (इ'न्साइड्)—on the inside of, in the interior of. आंत, आंतल्या बाजूस. *The in'side' of a week*, middle part. आठवड्याचा मध्य. *Turned in'side out*, आंतला भाग बाहेर असा, उरफाटा, उलटा-केलेला. *I. information*, अंतस्थ बातमी, गुप्त-खाजगी-वार्ता. *I. of a week*, एका आठवड्याच्या आंत.

Insīd'er, *n.* (इन्सा'इडर्)—one who is in a society etc.; one who is in the secret. संस्थेंतील-संघांतील-एक सभासद; गुप्त गोष्टींत अंग असणारा, कटांतील एक, अंतस्थ माहीतगार.

Insĭd'ious, *a.* (इन्सि'डिअस्)-treacherous; proceeding secretly or subtly. विश्वासघातकी, कावेबाज, कपटी; सूक्ष्मवर्धक, न उमगतां वाढणारा (रोग इ.). -*ly, adv.*,-*ness, n.*

In'sight, *n.* (इ'न्साइट्)—thorough knowledge, mental penetration. पूर्ण ज्ञान, परिचय, अभिज्ञान, सूक्ष्म दृष्टि, अवगाहनशक्ति.

Insĭg'nĭā, *n. pl.* (इन्सि'ग्निआ)—badges, distinguishing marks of office or honour (of). सन्मानचिन्हें, लक्षणें.

Insignĭf'ĭcant, *a.* (इन्सिग्नि'फिकन्ट्)—unimportant; immaterial, trivial, meaningless. क्षुद्र, क्षुल्लक; गौण, निरर्थक, अर्थहीन.-*cance*,-*cancy, nn.* निरर्थकत्व, क्षुद्रपणा, नीचता.-*cantly, adv.*

Insĭncere', *a.* (इन्सिन्सी'अर्)—not sincere; disingenuous, hypocritical, trivial. खोट्या दिलाचा; कपटी, कृत्रिम, क्षुद्र, वरकरणी, वायफळ. -*ly, adv.* कपटानें, वरकरणीपणानें.

Insincĕ'rĭty, *n.* (इन्सिन्से'रिटि)—want of sincerity. खोटेपणा, कपटभाव, दुजाभाव, वरकरणीपणा.

Insĭn'ūāte, *v. t.* (इन्सि'न्यूएट्)—to wheedle; to introduce gradually or subtly; to hint, to suggest, to instil. पोटांत शिरणें, मर्जी संपादणें; हळूहळू शिरकाव करवणें; सुचवणें, वक्रोक्ति करणें, पर्यायानें सुचविणें, मनांत भरावणें.-*tingly*, *adv.*, -'*tion*, *n.* आंत शिरणें, मर्जी संपादणें, लाघव, वशीकरण, सूचना, पर्यायोक्ति, खोंच.-*tor*, *n.*, -*tive*, *a.*

Insĭp'id, *a.* (इन्सि'पिड्)—flavourless, dull, lifeless, spiritless. स्वादरहित, अळणी, पचपचीत, नीरस, बेचव, निःसत्त्व.-*ity*, *n.*,-*ness*, *n.* बेचवपणा, नीरसता.-*ly*, *adv.*

Insĭst', *v. i. & t.* (इन्सि'स्ट्)—to emphasize; to maintain positively; to demand persistently, to be persistent or pressing. खणपटीस बसणें; आग्रह धरणें; पिच्छा पुरवणें, चोकणी घेणें.-*ence*, -*ency*, *nn.* आग्रह, हट्ट, चोप.-*ent*, *a.* आग्रहाचा, खणपटीचा;-*ently*, *adv.*

In sĭ'tū, (इन् सा'इट्यू)—in its original place. त्याच्या मूळ स्थानीं.-जागीं.

Insobrī'ety, *n.* (इन्सब्रा'यटि)—intemperance, esp. in drinking. अतिरेक, अति (मद्य-) माशन.

Insolā'tion, *n.* (इन्सोले'शन्)—exposure to sun's rays. सूर्यप्रकाशांत उघडें ठेवणें.-सूर्यपुट देणें, आतपस्नान, उन्हाचा झटका, तिरीप. [L *in* & *sol*, the sun]

In'solent, *a.* (इ'न्सोलन्ट्)—offensively contemptuous; insulting. उद्धट, उर्मट; मस्त, चढेल; अपमानास्पद, मगरूरीचा.-*lence*, *n.* उद्धटपणा, उद्दामपणा, दांडगाई, मगरूरी.-*ly*, *adv.* दांडगाईनें, उद्धटपणानें.

Insŏl'ūble, *a.* (इन्सॉ'ल्यूबल्)—not to be solved; not to be dissolved. सोडवण्याला कठीण, अवघड, बिकट; न विरघळणारा, अविद्राव्य, अद्रावणीय. -*bility*,-*bleness*, *nn.* अद्रावणीयता, अविद्राव्यता. -*bly*, *adv.*

Insŏl'vencȳ, *n.* (इन्सॉ'ल्व्हन्सि)—inability to pay debts. नादारी, नादारपणा, दिवाळें, निर्धनता, दिवाळखोरी.

Insŏl'vent, *a. & n.* (इन्सॉ'ल्व्हन्ट्)—(a debtor) unable to pay debts; relating to insolvents. नादार, दिवाळें वाजलेला, मुक्त न होऊं शकणारा; नादारीचा, नादारांसंबंधीं. *I. laws*, नादारीचे कायदे.

Insŏm'nĭă, *a.* (इन्सॉ'म्निआ)—want of sleep, unnatural sleeplessness. निद्रानाश, झोंप न येणें. [L *in* & *somnus*, sleep]

Insomŭch', *adv.* (इन्-सो-म'च्)—to such a degree, in such wise (*that*). इतकें, येथपर्यंत, अशा प्रकारें (कीं).

Insou'ciant, *n.* (इन्सू'सिअन्ट्)—careless, unconcerned. निष्काळजी, बेफिकीर.-*ciance*, *n.* [F]

Inspăn', *v. t. & i.* (इन्स्पॅ'न्)—(S.-Afr.) to yoke (oxen etc. in team) to a vehicle; to harness. गाडीला (बैलांची इ. जोडी) जुंपणें.-जोडणें; चारचाकी गाडी-खटारा-जोडणें,-सिद्ध करणें.

Inspĕct', *v. t.* (इन्स्पे'क्ट्)—to look closely into; to examine officially. शोध करणें, शोधणें, बारकाईनें पाहणें; तपासणी करणें, परीक्षा घेणें, निरीक्षण करणें, समीक्षण करणें.-*ion*, *n.* (-क्शन्) शोध, तपासणी, परीक्षा, देखरेख, पाहणी.-*or*, *n.* तपासणी-शोध-देखरेख करणारा अधिकारी; सार्जंटच्या वरचा पोलिस अधिकारी.-*orship*, *n.*,-*oral*, -*orial*, *aa.*,-*orate*, *n.* office of an inspector; a body of inspectors; a district under an inspector. तपासनिसाची कचेरी; तपासणी करणारें अधिकारी-मंडळ; अधिकाऱ्याच्या ताब्यांतील प्रांत-जिल्हा.

Inspirā'tion, *n.* (इन्स्पिरे'शन्)—the act of inspiring; a breath; superior, elevating or exciting influence; sudden happy idea; divine influence. श्वासाबरोबर आंत घेणें, अंतःश्वसन; श्वास, दम, निःश्वास; स्फूर्ति, प्रेरणा, धीर, दम, हिंमत; आकस्मिक स्फूर्ति; ईश्वरी-दैवी-प्रेरणा, संचार. *Verbal i.*, (धर्मशास्त्रांतील प्रत्येक शब्द-वचन-दैवी स्फूर्तीनें सांगितलें अशी) शाब्दिक ईश्वरी स्फूर्ति. *Plenary i.*, (शास्त्रांतील सर्व विषयांसंबंधीं) पूर्ण प्रेरणा. *Moral i.*, (धार्मिक व नैतिक विषयांसंबंधीं) नैतिक प्रेरणा.-*ism*, *n.*,-*ist*, *n.*; -*al*, *a.* अंतःस्फूर्त, दैवीप्रेरणायुक्त, दैवी-ईश्वरी-निःश्वसनोद्भूत.

In'spirātor, *n.* (इ'न्स्पिरेटर्)—an apparatus for drawing in air or vapour. हवा किंवा वाफ आंत ओढून घेण्याचें यंत्र, वाष्पान्तःश्वसनक यंत्र.

Inspīr'atorȳ, *a.* (इन्स्पा'इरटरि)—of breathing in. अन्तःश्वसनाचें,-संबंधीं.

Inspīre', *v. t.* (इन्स्पा'यर्)—to breathe in, to inhale; to infuse thought or feeling into; to animate, to rouse. श्वास आंत घेणें; विचार किंवा भावना उत्पन्न करणें, प्रेरणा करणें, स्फूर्ति देणें; धैर्य-उत्तेजन-देणें, जागृत करणें. *An inspired article* (in a journal), मोठ्या वजनदार व्यक्तीनें गुप्तपणें सुचविल्यामुळें-त्याच्या प्रेरणेनें-लिहिलेला (मासिकांतील-वर्तमानपत्रांतील-) लेख.

Inspĭ'rit, *v. t.* (इन्स्पि'रिट्)—to put life into, to animate; to encourage. चैतन्य-जोम-उत्साह आणणें.-देणें; प्रोत्साहन देणें, धीर देणें.-*ing*, *a.*

Inspiss'āte, *v. t.* (इन्स्पि'सेट्)—to thicken, condense, by the evaporation of moisture. घट्ट करणें, दाट करणें, वाळवणें, गोठवणें.-*ation*, *n.* घट्ट-दाट-करणें, घनता.

Instabil'ity, *n.* (इन्स्टॅबि'लिटि)—lack of (esp. moral) stability, inconstancy. (नैतिक) अस्थिरता, चंचलपणा, अस्थैर्य.

Install', *v. t.* (इन्स्टॉ'ल्)—to place in office with ceremony; to establish in a place or post. विधिपूर्वक अधिकारपदावर स्थापन करणें, वस्त्रें देणें, अभिषेक करणें : जागेवर स्थापणें,-बसवणें. *-ant, a. & n.,-a'tion, n.* नवाधिकार देणें, अभिषेक, यंत्रें वगैरे जागेवर बसविणें,-जोडणें.

Instal'ment, *n.* (इन्स्टॉ'ल्मन्ट्)—part payment of a debt; part of a whole. कर्जाचा हप्ता; अंश, भाग.

In'stance, *n.* (इ'न्स्टन्स्)—an example; a particular case; a request; (Law) process, suit. नमुना, उदाहरण; दृष्टान्त; विनंति, आग्रह, प्रार्थना; फिर्यादीचा जबाब देण्याकरितां प्रतिवादीस केलेलें बोलावणें, फिर्याद, तक्रार. *v. t.* to cite (a case) as an instance; to be an instance of. च्या दाखला-चें उदाहरण-देणें,-असणें. *For i.*, for example. उदाहरणार्थ. *At the i. of*, च्या विनंतीवरून,-सूचनेवरून. *In the first i.*, प्रथमतः प्रारंभीं, पहिल्या वेळीं. *The court of first i.*, प्राथमिक तक्रार-अर्ज-फिर्याद-नोंदविण्याचें कोर्ट, खालचें कोर्ट,-न्यायालय.

In'stancy, *n.* (इ'न्स्टन्सि)—urgency. त्वरा, घाई, तांतड, आग्रह.

In'stant, *a.* (इ'न्स्टन्ट्)—urgent, pressing; immediate, making no delay, (abbr. *inst.*) of the current month. तांतडीचा, आग्रहाचा; तात्कालिक; चालू महिन्याच्या. *n.* a precise moment; a short time. क्षण; थोडा वेळ.

Instanta'ne, *n.* (अँस्टँन्टा'ने)—a snapshot, (fig.) a short sketch. झटकन्-त्वरित-घेतलेला फोटो,-छायालेख, अगदीं त्रोटक गोषवारा,-सारांश. [F]

Instanta'neous, *a.* (इन्स्टन्टे'निअस्)—occurring or done in an instant; (Dynam.) existing at a particular instant. तात्कालिक, तत्क्षणिक; विशिष्ट क्षणीं चालू-अस्तित्वांत-असलेला.*-ly, adv., -ness, n.*

Instan'ter, *adv.* (इन्स्ट'न्टर्)—at once, immediately. तात्काळ, ताबडतोब.

In'stantly, *adv.* (इ'न्स्टन्ट्लि)—at once, forthwith. ताबडतोब, तात्काळ, लगेच.

In stā'tū quō (इन् स्टे'टयू क्वो)— *-ante*, in the same position as before. पूर्ववत्, पूर्वीच्या स्थितींत.

Instaura'tion, *n.* (इन्स्टारे'शन्)—restoration, renewal. पुनःस्थापना, पुन्हां नवीन करणें,-बनविणें. *-tor, n.*

Instead', *adv.* (इन्स्टे'ड्)—(usu. followed by *of*) as a substitute, in place of. (च्या) मोबदला, ऐवजीं, जागीं.

In'step, *n.* (इ'न्स्टेप्)—the top of foot between toes and ankle; the part of shoe etc. fitting this; a thing shaped like an instep. पायाची धूर, धुरी, पायाचा शिरदळ, शिरोपरि भाग; पायाच्या धुरेवरील बुटाचा-जोड्याचा-भाग; पायाच्या धुरेच्या आकाराची वस्तु.

In'stigate, *v. t.* (इ'न्स्टिगेट्)-to incite to or bring about (a revolt, murder, &c.). (वाईट कामास) मोत्साहन देणें, चिथविणें, फूस देणें, चढवणें.*-tion, n.* चिथवणूक, फूस.*-tor, n.* चिथावणारा, भर देणारा.

Instil', *v. t.* (इन्स्टि'ल्)—to put into by drops, to put ideas into the mind gradually, to infuse slowly or by degrees. थेंब थेंब घालणें, आंत पागळवणें, हळूहळू मनावर ठसविणें, मनांत भरविणें; शिरवणें. Also, *Instill. Instillation,-tilment, nn.*

Instinct, *n.*(इ'न्-स्टिंक्ट्)-innate impulse; intuition, intuitive feeling. उपजत स्वभाव, उपजत बुद्धि, अंगचें ज्ञान, शहाणपण; अंतःस्फूर्ति, मनाची प्रेरणा. *a.* (इन्स्टिं'क्ट्) imbued, charged (with life, beauty etc.). अंगीं मुरलेला, उपजतचा.*-ive, a., -ively, adv.* उपजत बुद्धीनें, स्वभावतः.

In'stitute, *v. t.* (इ'न्-स्टिट्यूट्)—to establish; to set on foot; to appoint to an office. नवीन स्थापणें, चालू करणें, सुरू करणें; (धर्माधिकाऱ्याची वृत्ति) नेमणें, नेमून देणें. *n.* organized body for promotion of public object; its building; (pl.) digest of the elements of a subject, esp. jurisprudence. संघ, संस्था, समाज; संस्थेची इमारत; मूलतत्त्वसारसंग्रह, संहिता, स्मृति, न्यायतत्त्वशास्त्र-सार.

Institū'tion, *n.* (इन्स्टि-टयू'शन्)—instituting; established law or custom; a familiar object; establishment (of person) in cure of souls; an organization for promotion of some public object, its building. स्थापना (करणें); विधि, नियम, रूढि; नेहमींचा-परिचयाचा-विषय, व्यक्ति; धर्माधिकाऱ्याची नेमणूक; सार्वजनिक संस्था, तिची इमारत.*-al, a.*

Instruct', *v. t.* (इन्स्ट्र'क्ट्)—to teach; to inform; to advise, to give information to; to direct. पढविणें, सांगणें, शिकवणें; कळवणें; (वकिलाला) माहिती करून देणें,-पुरविणें, माहिती देणें; दिशा दाखवणें, मार्गदर्शन करणें.

Instruc'tion, *n.* (इन्स्ट्र'क्शन्)—education, teaching; information; (esp. *pl.*) authoritative direction, orders; (*pl.*) directions to a solicitor or counsel. शिक्षण, शिकविणें; माहिती, ज्ञान; हुकूम, आज्ञा; (वकिलाला दिलेली) समजूत, (कज्जाची) माहिती, समजावणी.*-al, a.*

Instrŭc'tive, *a.* (इन्स्ट्र'क्टिव्ह्)—conveying instruction or knowledge, enlightening. उपदेशात्मक, बोधपर, ज्ञानपर.*-ly*, *adv.*,*-ness*, *n.*

Instrŭc'tor, *n.* (इन्स्ट्र'क्टर्)—a teacher; (U. S.) a teacher ranking below a professor. शिक्षक, गुरु, अध्यापक; प्राध्यापकाच्या खालच्या दर्जाचा अध्यापक.*-tress*, *n. fem.* स्त्रीशिक्षक, शिक्षकीण.

In'strument, *n.* (इ'न्स्ट्रुमेन्ट्)—a tool, implement; contrivance producing musical sounds; a formal, esp. legal document; a thing used in performing an action. हत्यार, शस्त्र, यंत्र, उपकरण; वाद्य, वाजंत्र; दस्तऐवज, खत, लेख, पत्र; करण, साधन, प्रयोज्य. *v. t.* to arrange (music) for instruments. वाद्यावर वाजविण्यासारखें (संगीत) रचणें. *Musical i.*, वाजंत्र, वाद्य. *Stringed ii.*, तंतुवाद्यें.

Instrumĕn'tal, *a.* (इन्स्ट्रुमे'न्टल्)—conducive as means to some end; of or performed on instruments; of an instrument. साधनीभूत, कारणीभूत; वाद्यासंबंधीं, वाद्योत्पन्न, वाद्यावर वाजविण्याजोगें; शस्त्राचा, हत्याराचा, शस्त्रसाधित. *I. case*, (Gram.) तृतीया विभक्ति, करणविभक्ति. *Instrumen'talist*, *n.* one who plays on musical instruments. वाद्यवादक, वाद्य वाजविणारा.*-tally*, *adv.*

Instrumĕntăl'ĭtў, *n.* (इन्स्ट्रुमेन्टॅ'लिटि)—agency. मार्फत, गुजारत, कारकत्व, साधनत्व, साधन.

Instrumĕntā'tion, *n.* (इन्स्ट्रुमेन्टे'शन्)-arrangement of music for instruments; an operation with surgical or other instrument; instrumentality. वाद्यवादनानुकूल संगीत रचना; शस्त्रक्रिया; साधन, कारकत्व, गुजारत.

Insŭbōrd'ĭnate, *a.* (इन्सबॉ'र्डिनट्)-not submitting, disobedient; unruly. आज्ञा मोडणारा; शिरजोर, अनिवार.*-'tion*, *n.* आज्ञाभंग, शिरजोरी.

Insŭbstăn'tial, *a.* (इन्सब्स्टॅ'न्शल्)—not real; lacking substance. असत्य; भासमान.*-ity*, *n.*

Insŭff'erable, *a.* (इन्-स'फरबल्)—unbearably arrogant, intolerable. असह्य, दुःसह.*-ably*, *adv.*

Insŭffi'cient, *a.* (इन्सफि'शन्ट्)—not enough, inadequate to any need or purpose. अपुरता, अपुरा, अपूर्ण, न्यून, अयोग्य.*-ly*, *adv.*,*-ciency*, *n.* अपुरतेपणा, वाण, कसर, हीनता.

In'sŭfflate, *v. t.* (इ'न्सफ्लेट्)—to blow, breathe, into the cavity of the body. फुंकर घालणें, फुंकरणें, श्वास पेणें, फुंकरानें औषध घालणें.*-tor*, *n.*,*-tion*, *n.* फुंकरणें, श्वास, प्रधमन.

In'sūlar, *a.* (इ'न्स्यूलर्)—belonging to an island; narrow-minded. बेटाचा, बेटासंबंधीं; द्वीपवासजन्य, क्षुद्रवृत्तीचा.*-ism*, *n.* *Insular'ity*, *n.* द्वीपता, जलवेष्टितत्व, बेटांत राहणें, बेटांतील वास. *In'sularly*, *adv.*

In'sūlāte, *v. t.* (इ'न्स्यूलेट्)—to make (land) into an island; to isolate; to separate a thing by a non-conductor. (चें) द्वीप-बेट-बनविणें; अलग करणें, वेगळा करणें,-ठेवणें; रोधन करणें, पृथग्न्यास करणें, विद्युत्स्थापन करणें.*-tion*, *n.*, *-tor*, *n.* रोधक, विद्युद्रोधक.

In'sūlĭn, *n.* (इ'न्स्युलिन्)—a specific for diabetes extracted from the islets of Langerhans. मधुमेहावर रामबाण उपाय,-इलाज.

Insŭlt, *n.* (इ'न्सल्ट्)—scornful abuse; affront. अपमान, अनादर, तिरस्कार, मानहानि, उपमर्द. *v. t.* (इन्स'ल्ट्) to treat with an insult. अपमान करणें, उपमर्द करणें, हेटाळणें.*-ingly*, *adv.*

Insū'perable, *a.* (इन्स्यू'परेबल्)—that cannot be got over, insurmountable, invincible. अलंघ्य, दुस्तर, अनिवार्य.*-ability*, *n.*,*-ably*, *adv.*

Insŭpport'able, *a.* (इनसपॉ'र्टेबल्)—unbearable. दुःसह, असह्य, अति कठीण.*-ably*, *adv.*

Insur'ance, *n.* (इन्शु'अरन्स्)—contract to indemnify insured against loss or damage (to poperty, life &c.), premium. जिवाची किंवा जिनगीची हमी, विमा, विम्याचा हप्ता, हप्त्याची रक्कम.

Insur'ant, *n.* (इन्शु'अरन्ट्)—a person to whom an insurance policy is issued. विमा उतरणारा, विमेदार.

Insure', *v. t. & i.* (इन्शु'अर्)—to issue or take out insurance policy, to assure (one's life). विमा उतरणें,-उतरविणें. *The insured*, the person to whom payment is secured. (घराचा वगैरे) विमा उतरल्यामुळें ज्याला (मालकाला) त्या विम्याचे पैसे मिळणार तो, विम्यामुळें नुकसानीपासून सुरक्षित,-रक्षण मिळणारा. *Insur'able*, *a.* विमा उतरण्यालायक,-योग्य. *Insur'er*, *n.* one who insures property in consideration of premium, an under-writer. हप्ते घेऊन (मालमत्तेचा) विमा उतरणारा दलाल, (जहाजांच्या) विम्याचा दलाल.

Insŭr'gent, *a.* (इन्स'र्जन्ट्)—in revolt, rebellious; (of sea etc.) rushing in. बंडखोर, राजद्रोही; आंत घुसणारा, वाढणारा. *n.* a rebel. बंडखोर-राजद्रोही-मनुष्य.*-ency*, *n.* बंड, विद्रोह.

Insŭrmoun'table, *a.* (इन्सर्मा'उन्टबल्)—insuperable. दुस्तर, दुर्लंघ्य, दुरतिक्रम.*-ably*, *adv.*

Insurrĕc'tion, *n.* (इन्सरे'क्शन्)—an incipient rebellion, a rising against established authority. बंड, दंगा, उठाव, उपद्रव.*-tional*, *a.* *-tionary*, *a.*,*-tionist*, *n.*

Insuscep'tible, *a.* (इन्ससे'प्टिबल्)—not capable of feeling, affected. वेदनाशक्तिशून्य, भावनारहीत, ग्रहणाक्षम.-*bility*, *n.*

Intact', *a.* (इन्टॅ'क्ट्)—untouched, uninjured, unimpaired; entire. स्पर्श न केलेला, जशाचा तसा, शाबूद, अस्पृष्ट; अखंड, अविकल.

Inta'gliated, *a.* (इन्टॅ'लिएटेड्)—carved on the surface. पृष्ठभागावर कोरलेला.

Inta'glio, *n.* (इन्टॅ'लिओ)—an engraved design; a stone or gem with an incised design. खोदलेली आकृति,-लें चित्र; चित्र-आकृति-कोरलेला दगड,-लें रत्न. *v. t.* (चित्र, आकृति) खोदणें, कोरणें.

In'take, *n.* (इ'न्टेक्)—the place of taking water into a pipe etc. from a river etc.; an inlet; an abrupt narrowing in pipe etc.; land reclaimed from moor. नदींतून नळांत इ. पाणी घेण्याची जागा; समुद्राचें फांटूं,-आखात; एकदम निमुळता होणारा भाग; दलदलींतून मुक्त केलेली जमीन.

Intan'gible, *a.* (इन्टॅ'जिबल्)—that cannot be touched; that cannot be grasped mentally. स्पर्श करतां न येणारा, अस्पर्शनीय; सूक्ष्म, आकलन न होणारा.-*bly*, *adv.*,-*bility*, *n.* अस्पर्श्यता, सूक्ष्मता.

In'teger, *n.* (इ'न्टिजर्)—a whole number; thing complete in itself. पूर्णांक, पूर्ण संख्या; पूर्ण वस्तु.

In'tegral, *a.* (इ'न्टिग्रल्)-complete, whole, entire, not fractional. संपूर्ण, अखंड, सबंध, अभिन्न, पूर्ण, पूर्णांकयुक्त, पूर्णांकाचा. *n.* the quantity of which a given function is the differential coefficient. ज्याचें गृहीत फल हें तात्कालिक गतिदर्शक गुणक आहे अशी संख्या. *I. calculus*, calculus dealing with finding and properties of integrals of functions. मूलपरिणति, समाहार-गणित, चलराशीकलन.-*ality*, *n.*,-*ally*, *adv.*

In'tegrant, *a.* (इ'न्टिग्रन्ट्)—component. घटक, पूरक.

In'tegrate, *v. t.* (इ'न्टिग्रेट्)—to complete, to form into a whole; to indicate average or sum of, to give the sum or total of. संकलन-उपचय-करणें, पूर्ण करणें; एकत्र बेरीज करणें. *a.* (-ग्रट्) made up of parts; whole. विभागांचा बनलेला; संपूर्ण, अखंड.-*tor*, *n.*;-*tion*, *n.* उपचय, एकत्रीभाव, बेरीज.-*tive*, *a.*

Integ'rity, *n.* (इन्टे'ग्रिटि)—entireness, a genuine state, entirety; honesty. पूर्णता, सत्यता, अखंडता, प्रामाणिकपणा, सच्चोटी.

Integ'ument, *n.* (इन्टे'ग्यूमन्ट्)—the outer protective covering, skin, husk, rind. त्वचा, आवरण, तूस, साल, टरफल, इ.-*ary*, *a.*

In'tellect, *n.* (इ'न्टिलेक्ट्)—faculty of knowing and reasoning; understanding, person of intellect. बुद्धि, अक्कल, प्रज्ञा; ग्रहणशक्ति; बुद्धिमान मनुष्य, प्राज्ञ.-*tion*, *n.* बुद्धिक्रिया, बुद्धिव्यापार, बोध, ज्ञान.-*tive*, *a.* बुद्धिविषयक, बुद्धिविशिष्ट.

Intellec'tual, *a.* & *n.* (इन्टिले'क्टयुअल्)—of the intellect; enlightened. बुद्धिविषयक; सज्ञान, बुद्धिमान् (लोक).-*lity*, *n.*, -*lization*, *n.*, -*lize*, *v. t.* & *i.*,-*lly*, *adv.* कल्पनेनें, बुद्धीनें, अकलेनें.

Intellec'tualism, *n.* (इन्टिले'क्टयूअलिझम्)—the doctrine that knowledge is wholly or mainly derived from pure reason बुद्धिप्राधान्यज्ञानवाद, बुद्धिजन्यज्ञानवाद.-*list*, *n.*

Intell'igence, *n.* (इन्टे'लिजन्स्)—intellect; quickness of understanding, sagacity; a rational being; information, news. बुद्धि, शहाणपण, ज्ञान, समज, बुद्धिचातुर्य; विचारशील प्राणी; बातमी, खबर. *I. department*, (लष्करी) माहिती-खबर-मिळविणारी संस्था, माहिती खातें, वार्ताहरांचें खातें. -*gen'tial*, *a.*

Intell'igencer, *n.* (इन्टे'लिजन्सर्)—one who brings news, an informant; a secret agent, a spy. बातमी आणणारा, वार्ताहर, दूत; गुप्त हेर, चार.

Intell'igent, *a.* (इन्टे'लिजन्ट्)—having intellect; showing (a high degree of) understanding. बुद्धिमान, बुद्धिविशिष्ट, ज्ञानशक्तिक; सुजाण, शहाणा, मोठा चतुर.-*ly*, *adv.*

Intelligent'zia,-sia, *a.* (इन्टेलिजे'न्ट्झिआ)-a group of people (esp. the Russian) aspiring to independent thinking. स्वतंत्र विचारेच्छु लोकांचा वर्ग, बुद्धिमान लोक.

Intell'igible, *a.* (इन्टे'लिजिबल्)—that can be understood, comprehensible *to*; (Philos.) that can be apprehended only by the intellect, not by the senses. समजण्याजोगा, स्पष्ट, गम्य, ज्ञेय; केवल बुद्धिग्राह्य, अतींद्रिय.-*bly*, *adv.*, स्पष्टपणें, साफ.-*bility*, *n.* बुद्धिगम्यता, ज्ञेयता.

Intem'perate, *a.* (इन्टे'म्परट्)-immoderate, violent; excessively indulgent of appetite; addicted to drinking. अपरिमित, असंयमी, आवेशी; अनितभोगी, अति खादाड; अतिपानी, मद्यपी, दारुड्या. -*rance*, *n.* अतिरेक, असंयम, स्वैर वर्तन, अतिभोजन,-पान.-*ly*, *adv.*

Intend', *v. t.* (इन्टे'न्ड्)—to purpose, to design; to destine for a purpose; to mean. हेतु-उद्देश-असणें, बेत-इरादा-असणें; योजणें, हेतु धरणें.

Inten'dant, *n.* (इन्टे'न्डन्ट्)—a superintendent or manager of public business etc. व्यवस्थापक, प्रमुख, वरिष्ठ अधिकारी.-*dancy*, *n.*

Intĕnd'ed, *n.* (इन्टे'न्डेड्)—(colloq.) an affianced lover. मनसोद्दिष्ट, विवाहोद्दिष्ट वधू,-वर.

Intĕnd'ment, *n.* (इन्टे'न्ड्मन्ट्)—true meaning as fixed by law. कायद्यानें ठरविलेला खरा अर्थ. कायदेशीर अर्थ.

Intĕnse', *a.* (इन्टे'न्स्)—existing in a high degree; violent, vehement; strenuous; strained; eager; feeling, apt to feel, intense emotion. अतिशय, पराकाष्ठेचा, भारी, जबर; जोराचा, आवेशाचा; जोमदार; ताणलेला, ताठ; उत्सुक; भावनावश, भावनाशील.-*ly*, *adv.* अति, भारी, एकतानतेनें, ध्यासंगपूर्वक.-*ness*, *n.*, *Inten'sity*, *n.* तीव्रता, तीक्ष्णता, प्रखरपणा, कडाका, ताण, नेट, ध्यासंग, ताणावा.

Intĕn'sify, *v. t.* & *i.* (इन्टे'न्सिफाइ)—to make or become intense; to heighten, to aggravate. अधिक तीव्र करणें,-होणें; चेतविणें, जास्त वाढविणें, विकोपाला नेणें.-*fication*, *n.* (*phot.*) घनीकरण.

Intĕn'sion, *n.* (इन्टे'न्शन्)—intensity, high degree, of a quality; strenuous exertion of mind or will; (logic) the sum of the qualities implied by a general name, the comprehension of connotation. गुणाचा उत्कर्ष,-प्रकर्ष,-चाढ; (मनावरील-इच्छाशक्तीवरील) ताण; जातिवाचक शब्दावरून निर्दिष्ट होणारा गुणसमुदाय, गुणव्यंजकता.

Intĕn'sive, *a.* (इन्टे'न्सिव्)—of or in intensity; producing intensity; forced; assiduous; (Gram.) giving force; concentrated; (Econ.) serving to increase production of a given area. तीव्रतेचा, जोराचा, नेटानें; तीव्रता-तीक्ष्णता-उत्पन्न करणारा; नेटाचा; चिकाटीचा, जबर; आधिक्यदर्शक, उत्कर्षबोधक, प्रकर्षबोधक; एककेंद्रीभूत, एकाच ठिकाणावर लक्ष असलेला, एकाच विषयावर लक्ष ठेवलेला; विशिष्ट क्षेत्रांतील उत्पन्न-पिक-वाढविणारा. *I. bombardment*, एकाच केंद्रावर-ठिकाणावर-केलेला जोराचा मारा. *I. inoculation*, (Med.) in which intensity of matter introduced is increased in successive operations. प्रत्येक खेपेला अधिकाधिक जोराची लस टोंचणें,-लसिकाधान करणें.-*ly*, *adv.*

Intĕnt', *n.* (इन्टे'न्ट्)—intention, purpose. उद्देश, आशय, हेतु, मतलब. *a.* resolved; bent on; absorbed; eager. निश्चित, ठाम बेत केलेला; तत्पर; मग्न, तल्लीन; सोत्सुक. *To all intents & purposes*, practically, virtually. व्यवहारदृष्ट्या, वस्तुतः, खरोखरी, सर्वस्वी. *I.-ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Intĕn'tion, *n.* (इन्टे'न्शन्)—intending; purpose, aim; (pl.) purposes in respect of proposal of marriage; (Logic) conception. मनांत योजणें, मन लावणें; उद्दिष्ट, हेतु, ध्येय, संकल्प; विवाहोद्दिष्टें, विवाहहेतु; वस्तुबोध, वस्तुज्ञान, कोणत्याही पदार्थाची बोधांत आलेली कल्पना. *Second i.*, (Med.) healing of a wound by granulation. जखम इ. होलेस येऊन-मांसकुर-बरी होणें. *First i.*, healing of a wound by immediate reunion of parts. जखम न मावळतां एकदम सांधणें,-बरी होणें. *Well-inten'tioned*, *a.* सद्धेतूचा, सद्धेतुमूलक. *Ill-inten'tioned*, *a.* वाईट हेतु धरून केलेला, दुष्टतामूलक.

Intĕn'tional, *a.* (इन्टे'न्शनल्)—done on purpose, intended, designed. हेतुपुरःसर-जाणून बुजून-केलेला, सहेतुक, बुद्धिपुरःसर.-*ally*, *adv.* समजून उमजून, बुद्ध्या, मुद्दाम.

Inter', *v. t.* (इन्टर्)—to place in earth or tomb; to bury. जमिनी-ति-थडग्यांत-घालणें, ठेवणें; पुरणें. [L *in* & *terra*, earth]

Inter, *prep.* (इन्टर्)—between, among. आंत, मध्यें. *I. a'lia*, (इन्टर् ए'लिआ) among other things. तसेंच, इतर गोष्टींबरोबर, शिवाय. *I. nos*, (-नॉस्) between ourselves. आपसांत, आपणा दोघांत. *I. se*, between themselves. त्यांच्या त्यांच्यांत. *I. vi'vos*, between the living. हयात-जिवंत-असणाऱ्यांमध्यें. [L]

Inter-, *pref.* (इन्टर्-)—among, between. आंत, मध्यें.

In'teract, *n.* (इ'न्टरॅक्ट्)—an interval between two acts of a play; an interlude. नाटकाच्या दोन अंकांमधील वेळ,-सुटी,-विश्रांति; उपांक, विष्कंभ (क).

Interăct', *v. i.* (इन्टरॅ'क्ट्)—to act reciprocally or on each other. परस्पर-एकमेकांवर-क्रिया करणें. -*tive*, *a.*,-*tion*, *n.* परस्परक्रिया, अन्योन्यक्रिया.

Interblĕnd', *v. t.* & *i.* (इन्टर्ब्ले'न्ड्)—to mingle (things, one *with* another); to mingle or blend with each other. मिसळणें, मिश्रण करणें; एकमेकांत मिसळणें, एकजीव-मिश्रित-होणें.

Interbreed', *v. t.* & *i.* (इन्टर्ब्री'ड्)—to cross-breed with each other. संकर करविणें, संकर-मिश्रजातीय-अपत्य उत्पन्न करणें; आपापसांत संकर करणें.

Intercăl'ary, *a.* (इन्टर्कॅ'लरि)—(of day or month) inserted between others to harmonize the calendar with the solar year; (of year) having such addition; interpolated. मध्यें घातलेला, अधिक, धोंड (दिवस, महिना); अधिक मासाचें-दिवसाचें-(वर्ष); मध्यें घातलेला, येणारा.

Inter'calate, *v. t.* (इन्टर्कॅलेट्)—to insert; to interpose. (अधिक दिवस इ.) मध्यें घालणें,-धरणें; (अस्वाभाविकपणें) मध्यें घालणें,-उत्पन्न करणें (थर इ.).-*lation*, *n.*

Intercede', *v. i.* (इन्टर्सी'ड्)—to plead; to mediate. च्या वतीनें बोलणें; रदबदली करणें. मध्यस्थी करणें, भीड घालणें.

Intercept', *v. t.* (इन्टर्से'प्ट्)—to seize, to catch (on the way); to stop in transit; to cut off; (Math.) to mark off space between two points etc. (मार्गांत) पकडणें, धरणें; अडकवणें; अटकाव करणें. जाऊं न देणें, गतिरोध करणें; तोडणें, छेदणें; आंत घेणें, अंतर्भूत करणें. *-tion,-tor, nn.,-tive, a.*

Interce'ssion, *n.* (इन्टर्से'शन्)—the act of pleading for another. मध्यें पडणें, मध्यस्थी, परार्थ प्रार्थना, रदबदली. *-ssor, n.* समेट-रदबदली-करणारा. *-ssorial, a.,-ssory, a.*

Interchange, *v. t.* (इन्टर्चे'न्ज्)—to exchange (things) with each other; to put each of (two things) in the other's place; to alternate. (दोन इसमांनीं, वस्तूंची) अदलाबदल करणें, विनिमय करणें; दोन वस्तूंच्या जागा बदलणें; आळीपाळीनें आणणें. *n.* (इ'-) exchange between persons; alternation. अदलाबदल,-लीचा व्यवहार, विनिमय; आलटपालट, एक आड एक येणें. *-ability,-ableness, nn.,-able, a.,* विनिमय-योग्य, परस्परानुगामी.

Intercolo'nial, *a.* (इन्टर्कलो'निअल्)—existing, carried on, between different colonies. वसाहती-वसाहतींमधील, आंतर-वसाहतींचा.

Intercommu'nicate, *v. i.* (इन्टर्कम्यू'निकेट्)—to have intercourse with. परस्पर-संबंध ठेवणें, परस्परांशीं व्यवहार करणें, दळणवळण असणें,-चालू राहणें. *-cation, n.* परस्पर-व्यवहार,-संबंध,-दळणवळण.

Intercommu'nion, *n.* (इन्टर्कम्यू'न्यन्)—intimate intercourse; mutual relation. परस्पर समागम, -संघट्टण,-दळणवळण; परस्परसंबंध.

Intercommu'nity, *n.* (इन्टर्कम्यू'निटि)—being or having things in common to various parties. अनेक ज्ञातींशीं-समाजांशीं-सामान्यता, सामान्य-व्यवहार, परस्परसंबंधैक्यता.

In'tercourse, *n.* (इ'न्टर्कोर्स्)—social communication; trade between countries etc.; communion between man and God; sexual connection. सामाजिक-व्यक्तींमधील परस्पर-संबंध, दळणवळण; देशांदेशांतील व्यापार; देव आणि मनुष्य (भक्त) यांमधील संबंध, सख्य, भक्ति, निष्ठा; संभोग, मैथुन, रति.

Intercurr'ent, *a.* (इन्टर्क'रन्ट्)—intervening; (of disease) occurring during the progress of another, recurring at intervals. मधला, मध्यें येणारा, मध्यंतरींचा; (एका रोगापोटीं) उद्भवणारा,-असणारा, मधून मधून येणारा,-उद्भवणारा.*-ence, n.*

Interdepend', *v. i.* (इन्टर्डिपे'न्ड्)—to depend on each other. परस्परांवर अवलंबून असणें, अन्योन्याश्रयी असणें,-होणें.*-ence,-ency, nn.* अन्योन्याश्रय, परस्परावलंबिता.*-ent, a.,-ently, adv.*

Interdict, *v. t.* (इन्टर्डि'क्ट्)-to prohibit (action); to forbid; to restrain. मनाई करणें, बंद ठेवणें,-पाडणें; निषेध करणें, पंक्तिबाह्य करणें; बंधन घालणें. *n.* (इ'-) an authoritative prohibition. अधिकृत मनाई,-निषेध, द्वाही, अटकाव, प्रतिबंध, (रोमन कॅथॉ.) समाजबहिष्कृतता.*-tion, n., -tory, a.*

In'terest, *n.* (इ'न्टरिस्ट्)—a legal concern, title, right; pecuniary stake; concern; selfish benefit; a share; personal influence; persons interested in particular business; money paid for the use of a loan. कायदेशीर हितसंबंध, अधिकार, हक्क; गुंतविलेला पैसा, आर्थिक हितसंबंध; आस्था, अगत्य; स्वार्थ, स्वहित; हिस्सा, पाती, भाग; वजन; व्यापारी मंडळ,-ळी; व्याज, मिति, वृद्धि. *v. t.* to excite interest of; to cause (a person) to take interest in. चित्त-लक्ष-वेधणें, (मनांत) आस्था उत्पन्न करणें, (मन) जडवणें, ओढ लावणें. *To make i.,* to bring personal interest to bear (*with* a person). (एकाद्यावर) वजन घालणें,-पाडणें,-खर्चणें. *With i.,* जोरानें, सव्याज. *Simple i.,* सरळव्याज. *Compound i.,* चक्रवाढव्याज. *In an interesting condition,* pregnant. गरोदर, गर्भार. *In'terested, pa. p.* कळकळीचा, आस्थेवाईक, हितबद्ध, संबंधी, सहेतुक, स्वार्थी, अपमतलबी;*-edly, adv.*

In'teresting, *a.* (इ'न्टरिस्टिंग्)—exciting interest, engaging the attention. चित्तवेधक, मनोरंजक, आस्था उत्पन्न करणारा.*-ly, adv.* मनोरंजक रीतीनें.

Interfere', *v. i.* (इन्टर्फी'अर्)—(of things) to come into collision or opposition (*with*); (of person) to meddle, to intervene; (Physics, of waves of light etc.) to strike against each other; (of horse) to knock one leg against another. आडवा येणें, वर आदळणें, टक्कर होणें; मध्यें पडणें, नसती उठाठेव करणें; (प्रकाशलहरी) एकमेकांवर आदळणें; (घोड्याचा) एक पाय दुसऱ्यावर घासटणें,-आपटणें, पायांची घासाघास होणें.

Interfer'ence, *n.* (इन्टर्फी'अरन्स्)—meddling. मध्यें पडणें, ढवळाढवळ, लुडबूड, समाघात, घोटाळा.

Inter'fluent, *a.* (इन्ट'र्फ्लुअन्ट्)—flowing into each other. परस्परांत वाहणारा, परस्परवाही.

Interfuse', *v. t. & i.* (इन्टर्फ्यू'झ्)—to mix; to blend. (शीं) मेसळ-मिश्रण-करणें; एक जीव करणें.-होणें.*-sion, n.*

In'terim, *n.* (इ'न्टेरिम्)-meantime. मधील अवकाश, मधला-दरम्यानचा-काळ. *a.* intervening ; provisional, मधील, मधला, तात्पुरता; हंगामी, चालचलाऊ, मधल्या काळापुरता. *adv.* meanwhile. दरम्यान. *I. dividend*, वार्षिक नफापत्रक प्रसिद्ध करण्यापूर्वी दिलेला नफावांटणींतील हिस्सा. *I. order*, मध्यंतरीय-तात्पुरता-हुकूम.

Intĕr'ior, *a.* (इन्टी'अरिअर्)—situated within ; inland ; internal, domestic ; inward. आंतला, आंतील ; (समुद्रापासून) दूर, देशाच्या आंतला, अंतःप्रदेशांतील, अंतर्देशीय ; घरगुती, खाजगत ; अंतस्थ, मनांतला. *n.* an inland part ; inside, internal part of a thing ; inner nature or soul ; home affairs of a country. अंतःप्रदेश ; आंतील बाजू,-भाग, अभ्यंतर, गाभा ; मन, अंतःकरण ; गृहखातें, गृहमंत्र्याच्या अधिकारांतील गोष्टी, गृहकारभार.*-ly, adv.*

Interjā'cent, *a.* (इन्टर्जे'सन्ट्)—lying between, intermediate. (दोन वस्तूंच्या) मध्यें असणारा, मध्यस्थित, मधला.

Interjĕct', *v. t.* (इन्टर्जे'क्ट्)—to throw between, interpose, abruptly ; to remark parenthetically. मध्येंच (शब्द, उद्गार) फेंकणें, बोलणें, घालणें ; मध्यप्रक्षेपण करणें.

Interjĕc'tion, *n.* (इन्टर्जे'क्शन्)—exclamation, ejaculation. उद्गार, केवलप्रयोगी अव्यय.*-al, -tory, aa.* ;*-ally, adv.* ;*-tor, n.*

Interlāce', *v. t. & i.* (इन्टर्ले'स्)—to unite as by lacing together ; to entangle ; to interweave. विणणें, गुंफणें, गांठवणें ; गुंतागुंत करणें, एकमेकांत अडकविणें,-अडकणें ; एकांत एक विणणें.*-ment, n.*

Interlard', *v. t.* (इन्टर्ला'र्ड्)—to mix, diversify, (writing, speech, *with* foreign words). (लिहिण्यांत-बोलण्यांत) परकी शब्द घुसडणें, अशा भेसळीनें वैचित्र्य उत्पन्न करणें.

In'terleaf, *n.* (इ'न्टर्लीफ्)—a (blank) leaf inserted between leaves of a book. (पुस्तकाच्या दोन पानां) मध्यें घातलेलें अधिक-जादा-कोरें पान.

Interleave', *v. t.* (इन्टर्ली'व्ह्)—to insert blank leaves between printed leaves in a book. पुस्तकांत छापील पानांबरोबर (कोरीं) पानें घालून बांधणें.

Interline', *v. t.* (इन्टर्ला'इन्)—to insert words between lines ; to write in alternate lines. ओळींच्यामध्यें शब्द लिहिणें,-घालणें, शोध घालणें ; एकेक ओळ सोडून लिहिणें.*-linea'tion, n.* दोन ओळींमध्यें लिहिणें, शोध, एकांतच्या ओळीनें लिहिणें.

Interlĭn'ear, *a.* (इन्टर्लि'निअर्)—written, printed, between the lines. ओळींच्यामध्यें लिहिलेला, छापलेला (मजकूर).

Interlĭnk', *v. t.* (इन्टर्लि'ंक्)—to connect by uniting links, to join. दुवे जोडणें, दुव्यांनीं सांधणें, जोडणें.

Interlŏck', *v. i. & t.* (इन्टर्-लॉ'क्)—to be locked together ; to lock or clasp together, to lock one in another firmly ; (Railways) to connect (levers for signals etc.) by bolts to ensure uniformity of movement. कुलुपानें किंवा कडीनें जोडणें ; एकांत एक अडकविणें, एकत्र जुळणें, मिठी मारणें ; सांधे जुळविणें, सांधणें.

Interlŏc'ūtor, *n.* (इन्टर्लॉ'क्यूटर्)—one who takes part in a dialogue or conversation. संवादांत-संभाषणांत-भाग घेणारा, संभाषणकर्ता, प्रश्नकर्ता. *My i.*, माझ्याशीं संभाषण करणारी व्यक्ति.*-tress, -trix, nn.* संभाषण-संवाद-कर्त्री. *-tory, a.* संवादात्मक, संभाषणरूप, संवादरूपी.

Interlŏcū'tion, *n.* (इन्टर्-लॉक्यू'शन्)—dialogue. संवाद.

Interlōpe', *v. i.* (इन्टर्लो'प्)—to intrude ; to thrust oneself into others' affairs, esp. for gain ; to traffic without licence. मध्यें पडणें, लुडबूड करणें ; इतरांच्या व्यवहारांत स्वतःच्या फायद्यासाठीं शिरकाव करून घेणें ; परवान्याशिवाय व्यापार करणें.*-per, n.* लुडबुड्या, विनपरवाना व्यापारी.

In'terlude, *n.* (इ'न्टर्-लूड्)—a pause between acts of a play ; a short entertainment (piece of music, event, &c.) interposed. नाटकाच्या दोन अंकांमधील विश्रांती ; दोन अंकांमध्यें गायन वगैरे करमणूक, विष्कंभ (क).

Intermă'rry̆, *v. i.* (इन्टर्-मॅ'रि)—to become connected by marriage with members of different tribes or families, or with near relations. अंतर्ज्ञातिविवाह करणें, आंतर्जातीय विवाह करणें, जवळच्या नात्यांत लग्न करणें. *-ma'rriage, n.*

Intermĕd'dle, *v. i.* (इन्टर्-मे'डल्)—to interpose *in*, *with*, others' concerns. दुसऱ्याच्या कामांत मध्यें पडणें, लुडबूड-ढवळाढवळ-करणें.

Intermē'dĭary̆, *a.* (इन्टर्मी'डिअरि)-acting between parties, mediatory ; intermediate. दलालीचा, मध्यस्थीचा ; मध्यस्थ. *n.* मध्यस्थ इसम.

Intermē'dĭate, *a.* (इन्टर्-मी'डिअट्)—intervening, interposed. मध्यें असलेला, मधील, अंतःस्थित. *n.* मधील वस्तु, मध्यस्थ-मध्यम-वस्तु. *v. i.* (-डिएट्)-mediate between. मध्यें असणें, मध्यस्थी करणें.

Intermē'dĭum, *n.* (इन्टर्मी'डिअम्)—an intermediate thing, a medium. मधील वस्तु, माध्यम.

Interm'ent, *n.* (इन्ट'र्मेन्ट्)—burial. पुरणें, प्रेतसंस्कार.

Interme'zzo, *n.* (इन्टर्मे'झो)—a short light dramatic or other performance between acts of drama or opera. नाटकांच्या-खेळाच्या-अंकांमधील करमणूक. [It.]

Interm'inable, *a.* (इन्ट'र्मिनबल्)—endless, tediously long. न संपणारा, अमर्याद, असीम.*-ness*, *n.*,*-bly*, *adv.*

Intermingle, *v. t. & i.* (इन्टरमिं'ङ्गल्)—to mix together. मिसळणें, एकीकरण करणें,-होणें.

Intermi'ssion, *n.* (इन्टर्-मि'शन्)—a pause ; cessation for a time, stop, rest. खंड, तहकुबी, विश्रांति. *Without i.*, सतत, न थांबतां, अखंड.

Intermit', *v. t. & i.* (इन्टर्मि'ट्)—to suspend, to discontinue ; to interrupt ; to stop for a time. थांबविणें, बंद पाडणें ; खंड पाडणें ; मधून मधून (ताप) निघणें,-राहणें.*-itt'ence*, *n.*

Intermitt'ent, *a.* (इन्टर्मि'टेन्ट्)—that intermits, ceasing at intervals. मधून मधून येणारा, थांबून येणारा,-वाहणारा, आंतरिक, अंतरित.*-ly*, *adv.* [L. *inter*, & *mittere*, to send]

Intermix,' *v. t. & i.* (इन्टर्मि'क्स्)-to mix together. एकत्र मिसळणें,-करणें, संमिश्रण करणें, मिश्रित होणें. *-ture*, *n.* मिश्रण, भेसळ, मिसळ.

Intern', *v. t.* (इन्ट'र्न्)—to confine within prescribed limits. अमुक एक हद्दीच्या बाहेर जाऊं न देणें, स्थानबद्ध (अटक-कैद) करणें.*-ment*, *n.* स्थानबद्धता.

Intern'al, *a.* (इन्ट'र्नल्)—of or in the inside ; intrinsic ; of the domestic affairs of a country ; of the mind or soul, inward. आंतील भागाचा, आंतील ; मूळचा, आंगचा, स्वाभाविक, हाडाचा ; देशांतला, अंतर्देशीय, गृहखात्याचा ; मनाचा, आत्मिक. *I. evidence*, अंतर्गत पुरावा. *Intern'als*, *n. pl.* intrinsic qualities. आंगचे-मूळचे-स्वाभाविक गुण.*-al'ity*, *n.*;*-ally*, *adv.* आंत, आंतल्या बाजूनें, मनांतून, पोटांत.

Interna'tional, *a.* (इन्टर्-नॅ'शनल्)—existing or carried on between different nations ; of the International Working Men's Associations (for promoting joint political action of working classes in all countries). आंतरराष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय कामकरी संघांचा. *n.* one who takes part in an international (usu. athletic) contests or match ; I. Working Men's Associations. आंतरराष्ट्रीय सामन्यांत भाग घेणारा ; (जगांतील सर्व राष्ट्रांच्या कामकरी वर्गाचें हित साधणारा) आंतरराष्ट्रीय कामकरी संघ. *The first I.*, Marxist, 1862-73. मार्क्सचा आंतरराष्ट्रीय कामकरी संघ. *The second I.*, French socialist, 1889. फ्रेन्च् समाजसत्तावाद्यांचा संघ. *The third I.*, Russian communist, abbr. Comintern, 1918. इ. स. १९१८ सालीं स्थापन झालेला रशियांतील समाजसत्तावादी आंतरराष्ट्रीय संघ. *The Internationale'*, (इन्टर्नॅशना'ल्) a French socialistic hymn. फ्रेंच समाजसत्तावाद्यांचें गीत. *International'ity*, *n.*,*-ally*, *adv.*

Interna'tionalist, *n.* (इन्टर्नॅ'शनलिस्ट्)—one who advocates community of interests between nations ; one versed in international law. आंतरराष्ट्रीय समतावादी ; आंतरराष्ट्रीय कायदेपंडीत. *-ism*, *n.*

Interna'tionalize, *v. t.* (इन्टर्नॅ'शनलाइझ्)-to make international, to bring (territory) under combined protection of different nations. आंतरराष्ट्रीय करणें, आंतरराष्ट्रीय संरक्षणाखालीं (प्रदेश) आणणें.*-za'tion*, *n.*

Interne'cine, *a.* (इन्टर्-नी'साइन्)—mutually destructive ; deadly, causing great slaughter. परस्परविघातक ; भयंकर, (दोन्ही पक्षांचा) संहार करणारा. [L *inter & necare*, to kill]

Internode', *n.* (इन्टर्नो'ड्)—(Bot.) part of the stem between two nodes or points of the stem, (Anat.) slender part between two joints. कांडें, पेर.

Internun'cial, *a.* (इन्टर्न'न्शिअल्)—(of nerves) joining different parts of the system. (शरीराचे) निरनिराळे अवयव जोडणारा (स्नायु, मज्जातंतु).

Internun'cio, *n.* (इन्टर्न'न्शिओ)—the Pope's ambassador ; (Hist.) a messenger or minister. पोपचा दूत,-वकील,-उपप्रतिनिधि ; दूत, परराष्ट्रीय वकील. [L *inter & nuntius*, messenger]

Interos'culate, *v. i.* (इन्टर्ऑ'स्क्युलेट्)—to intermingle with each other to form a connecting link. एकमेकांशीं मिसळणें,-जुळणें, जोडणारा दुवा असणें,-होणें.*-tion*, *n.*

Interpell'ate, *v. t.* (इन्टर्पे'लेट्)—to interrupt to demand explanation from (the Minister concerned, in legislative councils). (कायदेमंडळांत त्या त्या प्रधानाला) प्रश्न विचारणें, कामकाजांत खोटी-अडथळा-पाडुन प्रश्न विचारून खुलासा करून घेणें.*-tion*, *n.* (कायदेमंडळांतील) वादविवादांत उपस्थित होणारा प्रश्न,-मुद्दा, अडथळा, खोटी. *-tor*, *n.*

Interpen'etrate, *v. t. & i.* (इन्टर्पे'निट्रेट्)—to pervade, to penetrate thoroughly or mutually. पूर्ण व्यापणें,-आंतपर्यंत शिरणें,-प्रवेश करणें, परस्परांत शिरणें.*-tra'tion*, *n.*,*-trative*, *a.*

In'terplay, *n.* (इं'न्टर्प्ले)—reciprocal play or action. परस्पर-देवाणघेवाणीचा-खेळ, परस्परक्रिया, -प्रयोग.

Interplead', *v. i.* (इन्टर्प्ली'ड्)—to litigate with each other in order to settle a point in which

a third party is concerned. (ज्यांत तिसऱ्याचा संबंध येतो त्या मुद्याचा निकाल लावण्यासाठीं) आपापसांत (दोन पक्षांनीं-व्यक्तींनीं) वाद खेळणें,-कज्जा लढविणें.

Interp'ŏlāte, *v. t.* (इन्टर्'र्-पोलेट्)—to make (esp. misleading) insertions in; to interject in talk; to add a spurious word or passage to; (Math.) to fill up intermediate term in series. मध्यें घुसडणें; मध्यें तोंड घालणें; खोटा-पदरचा-शब्द किंवा उतारा मध्येंच घुसडणें, प्रक्षेपण करणें; मधील पद (श्रेणींत) भरणें.*-tion*, *n.*, *-tor*, *n.*

Interpōse', *v. t. & i.* (इन्टर्-पो'झ्)—to insert between others; to interject a remark; to intervene; to make an interruption. दोहोंच्या मध्यें घालणें; मध्यें घोलणें; मध्यस्थी करणें, मध्यें पडणें, -येणें; अडथळा आणणें, -करणें. *-sal*, *n.*, *-si'tion*, *n.* अंतरागमन, मध्यें येणें; मध्यस्थी.

Interp'rĕt, *v. t. & i.* (इन्टर्'र्-प्रिट्)—to explain; to render, to represent; to translate; to act as interpreter. अर्थ सांगणें, चा अर्थ करणें, निवरण करणें, उलगडा करणें; कलात्मक कृतींत-चित्रांत-दर्शविणें; भाषांतर करणें; दुभाषेपणा करणें.*-ation*, *n.* उलगडा, स्पष्टीकरण, खुलासा, व्याख्या, भाषांतर, स्वरूपनिर्णय. *-able*,*-ative*, *aa.*

Interp'rĕter, *n.* (इन्टर्'र्-प्रिटर्)—an expositor; one who translates orally. विवरणकर्ता; दुभाषा, तोंडी भाषांतर करणारा.*-tress*, *n. f.*,*-ship*, *n.*

Interrĕg'num, *n.* (इन्टररे'ग्नम्)—interval between successive reigns; an interval, a pause. (एक राजा जाऊन दुसरा गादीवर बसेपर्यंतचा) मधला काळ, मधली कारकीर्द; मधली रजा, खंड. [L *inter*, between, & *regnum*, rule]

Interrelā'tion, *n.* (इन्टररिले'शन्)—mutual relation. परस्पर संबंध.*-ship*, *n.*

Intĕ'rrogāte, *v. t.* (इन्टे'रोगेट्)-to question closely or formally, to examine by questions. कसून प्रश्न करणें, प्रश्न विचारून तपासणी-चौकशी-करणें, पुसतपास-पुरशीस-करणें.*-tor*, *n.*

Intĕrrogā'tion, *n.* (इन्टेरोगे'शन्)-asking questions; a question. प्रश्न विचारणें; प्रश्न. *Point*, *mark*, *note*, *of i.*, प्रश्नचिन्ह, ?

Interrŏg'ative, *a.* (इन्टरॉ'गेटिव्ह्)—of or suited to questions, expressed in the form of a question. प्रश्नार्थक, प्रश्नात्मक. *n.* प्रश्नार्थक शब्द, सर्वनाम इ.

Interrŏg'atorў, *a.* (इन्टरॉ'गटरि)—of inquiry. प्रश्नरूप, प्रश्नार्थक. *n.* a question; a set of questions put to accused person. प्रश्न; आरोपीला विचारलेले प्रश्न,-ली प्रश्नमालिका.

Interrŭpt', *v. t.* (इन्टर'प्ट्)—to break in upon; to break the uniformity or continuity of; to obstruct (a view, &c.). मध्येंच अडथळा-अटकाव-हरकत करणें, मोडा घालणें, व्यत्यय येणें; (चा) *भंग करणें, खंड पाडणें, क्रमभंग करणें; आड* येणें, अडथळा करणें.*-ion*, *n.* अडथळा, हरकत, प्रतिबंध, खंड, क्रमभंग.*-edly*, *adv.*,*-er*, *n.*, *-ory*, *a.*

Intersĕct', *v. t. & i.* (इन्टर्-से'क्ट्)—to divide (a thing) by crossing it, to cut asunder; (of lines etc.) to cross, cut, each other. मध्यें कापणें, छेदणें, तोडणें, तुटणें; (रेषा) परस्परांना छेदणें.

Intersĕc'tion, *n.* (इन्टर्-से'क्शन्)—intersecting; a point or line common to intersecting lines or planes. छेदन, छेदणें; छेदबिंदु, छेद.*-al*, *a.*

In'terspāce, *n.* (इ'न्टर्स्पेस्)—space between two things. मधली जागा, मधलें अंतर.

Intersperse', *v. t.* (इन्टर्-स्प'र्स्)—to scatter (things) between; to diversify. मधून मधून टाकणें, इकडे तिकडे पसरणें, विकीर्ण करणें; विचित्रता आणणें.*-sper'sion*, *n.*

Interstĕll'ar, *a.* (इन्टर्स्टे'लर्)—between stars. तारामंडलमध्यवर्ती, ताऱ्यांच्या मधला.

Inters'tīce, *n.* (इन्ट'र्-स्टिस्)—a chink, a crevice, a gap; an intervening space. फट, भेग, चीर, झरोका, दरज, दर्ज; मधलें अंतर, अवकाश. *Intersti'tial*, *a.* (इन्टर्स्टि'शल्) फटीमधील, फटींसंबंधीं, शरिराच्या पेशींमधील.

Interstrăt'ified, *a.* (इन्टर्स्ट्रॅ'टिफाइड्)-interspersed (*with* strata). आंत थर होऊन बसलेला, आंतरस्तरीभूत.*-fica'tion*, *n.*

Intertwine', *v. t. & i.* (इन्टर्-ट्वा'इन्)—to twine closely together, to unite by twining. एकत्र गुंफणें,-वळणें, गुंतविणें, गुंतणें, गुरफटणें.*-ment*, *n.*

In'terval, *n.* (इ'न्टर्-व्हल्)—intervening time or space; a pause, a break; (Mus.) the difference of pitch between sounds. मधला काळ, अवकाश; अंतर, भाग, खंड, भंग; (दोन सुरांमधील) अंतर, आंतरा.*-all'ic*, *a.*

Intervēne', *v. i.* (इन्टर्-व्ही'न्)—to come in as something extraneous; to occur in the meantime; to come between persons or things; to interfere, to mediate; (Law) to interpose in a law-suit to which one was not an original party. आगंतुक म्हणून आंत येणें,-मध्यें पडणें; मध्यें येणें; आड येणें; आंत हात घालणें, मध्यस्थी करणें; मूळ पक्षकार नसतांना खटल्यांत-मुकदम्यांत (पक्षकारांमध्यें) मध्यस्थी करणें,-सामील होणें.*-vener*, *n.*,*-venient*, *a.* मध्यें पडणारा,

मधला, व्यवहित, मध्यें होणारा,-घडणारा; बाधक, विघ्न करणारा.

Interven'tion, *n.* (इन्टर्-व्हें'न्शन्)—interference, mediation, interposition. मध्यें पडणें, मध्यस्थिति, व्यवधान; मध्यस्थी.

In'terview, *n.* (इं'न्टर्-व्ह्यू)—meeting of persons face to face (for purpose of discussion, business, &c.), a conference of thoughts. भेट, मुलाखत. *v. t.* मुलाखत घेणें.*-er*, *n.*

Intervolve', *v. t.* (इन्टर्व्हॉ'ल्व्ह्)—to wind, to roll up, (things) within each other. एकांत एक (वस्तु) गुंडाळणें,-गुंडळी करणें. परस्परग्रथित करणें.

Interweave', *v. t.* (इन्टर्-वी'व्ह्)—to weave together; to blend intimately. एकत्र गुंफणें-विणणें; अगदीं एकत्र मिळविणें.-मिसळणें.

Interwind', *v. t. & i.* (इन्टर्वा'इन्ड्)—to wind together. एकत्र गुंडाळणें.

Intes'tate, *a.* (इन्टे'स्टट्)—not having made a will, not disposed of by will. मृत्युपत्र न करतां, कायदेशीर मृत्युलेख केल्यावांचून मरणारा, मृत्युपत्रानें व्यवस्था न लावलेला. *n.* अकृतमृत्युलेख मनुष्य. *Intes'tacy*, *n.* कायदेशीर मृत्युपत्र न करतां मरणें.

Intes'tine, *n.* (इन्टे'स्टिन्)—(usu. *pl.*) lower part of alimentary canal. आंतडीं, आंतडें, अंत्र. *a.* (of wars etc.) internal, domestic, civil; wholly within a body. आंतला, अंतस्थ, अन्तर्वर्ती, आपापसांतील यादवीचा; कोठ्यांतील, शरीरांतर्गत. *Large i.*, स्थूलांत्र. *Small i.*, सूक्ष्मांत्र.*-nal*, *a.* (इन्टे'स्टिनल्,-स्टाइनल्) आंतड्याचा, आंत्रिक, अंत्रसंबंधीं.

In'timate, *a.* (इं'न्टिमट्)—closely acquainted; familiar; close; intrinsic. दाट परिचयाचा, दृढ, गाढ; सलगीचा, घरोब्याचा, जिवलग; खरा, खराखुरा. *n.* an intimate friend. जिवलग मित्र. *v. t.* (इं'न्टिमेट्) to make known, to state; to imply, to hint. जाणवणें, सुचविणें, माहिती देणें, सांगणें; दर्शविणें, सुचविणें. *In'timacy*, *n.* सलगी, सख्य, घरोबा, निकट परिचय.*-tely*, *adv.*,*-tion*, *n.* सूचना, इषारा, बातमी, माहिती.

Intim'idate, *v. t.* (इन्टि'मिडेट्)—to put in fear or dread, to inspire with fear, to frighten, to cow. भिवविणें, दहशत घालणें, दडावणें, हिंमत खचवणें, (चे) पाय मोडणें.*-tion*, *n.* भय, भीति, धाक, दहशत.*-tor*, *n.*

In'to, *prep.* (इं'न्टु)-expressing motion or direction to a point within, or change to a state. आंत, मध्यें, कडे.

In'toed, *a.* (इं'न्टोड्)—having the toes turned inwards. पायाचीं बोटें आंत वळलेला.

Intol'erable, *a.* (इन्टॉ'लरबल्)-not to be endured; enormous. असह्य, दुःसह; अतिशय, असंख्यात.*-ness*, *n.*,*-ably*, *adv.* सोसवेनासा, असह्यपणानें.

Intol'erant, *a.* (इन्टॉ'लरन्ट्)—not tolerant (*of*). असहिष्णु (इतर धर्ममतांविषयीं).*-rance*, पर (धर्म) मतासहिष्णुता.*-rantly*, *adv.*

In'tonate, Intone, *vv. t.* (इं'न्टनेट्, इन्टो'न्)—to recite in a singing voice; to utter with a particular tone. गाइल्यासारखें-गाण्याच्या आवाजांत-पाठ म्हणणें; हेल काढीत बोलणें, विशिष्ट स्वरांत बोलणें.

Intona'tion, *n.* (इन्टोने'शन्)—intoning; modulation of voice, accent, &c. सुस्वर गाणें, गाण्याच्या आवाजांत म्हणणें; स्वरभेद, स्वर कमीजास्त करणें.

In to'to, *adv.* (इन् टो'टो)—पूर्णपणें.

Intox'icant, *a.* (इन्टॉ'क्सिकन्ट्)-intoxicating. मादक अंमली. *n.* मादक-अंमली-द्रारू, मद्य.

Intox'icate, *v. t.* (इन्टॉ'क्सिकेट्)—to make drunk; to excite, to elate, beyond self-control. कैफ-धुंदी-आणणें, झिंगविणें; माज आणणें, उन्मत्त करणें.*-ting*, *a.*,*-tion*, *n.* कैफ, अंमल. [L *in & toxicare*, to smear with poison, Gk *toxa*, arrows]

Intra-, (इन्ट्रा)—in comb.=on the inside, within. आंतील, आंत, अंतर्. *I.-cranial*, within the skull. कवटीच्या आंतील. *I.-national*, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय नव्हे असा.

Intrac'table, *a.* (इन्ट्रॅ'क्टबल्)—not docile, refractory; (of things) not easily dealt with or managed. कह्यांत न राहणारा, अनिवार्य, हट्टी, हटवादी; अनिवार, बेसुमार.*-ness*,*-ability*, *nn* हट्टीपणा, दुर्धर्षता, अनिवारपणा.*-ably*, *adv.*

Intra'dos, *n.* (इन्ट्रे'डॉस्)—interior curve of an arch. कमानीचें आंतील वांकण.

Intramur'al, *a.* (इन्ट्राम्यू'अरल्)—existing, done, within the walls. शहराच्या तटाच्या-भिंतींच्या-आंतील, भित्त्यंतरवर्ती.

Intran'sigent, *a.* (इन्ट्रॅ'न्झिजन्ट्)-uncompromising in politics. राजकारणांत कट्टर, हेकेखोर. *n.* कट्टर लोकसत्तावादी (मनुष्य).

Intran'sitive, *a.* (इन्ट्रा'न्सिटिव्ह्)—not taking direct object, not having an object. अकर्मक (क्रियापद).*-ly*, *adv.*

In'trant, *n.* (इं'न्ट्रन्ट्)—one who enters a college etc. प्रवेश करणारा, आंत येणारा.

Intrep'id, *a.* (इन्ट्रे'पिड्)—fearless; brave. निर्भय; शूर.*-ity*, *n.*,*-ly*, *adv.*

In'tricate, *a.* (इं'न्ट्रिकट्)—entangled; involved; complicated, obscure. गुंतागुंतीचा; भानगडीचा; समजण्यास अवघड, क्लिष्ट, गहन.*-cacy*, *n.*;*-ly*, *adv.*

Intrigue', *n.* (इन्ट्रीग्)—a plot; secret amour, an illicit connection between two persons. कारस्थान, कपट, चक्रव्यूह, भानगडीचें कथानक; कुलंगडें, व्यभिचार, जारकर्म. *v. i. & t.* to carry on intrigue or underhand plot, to employ secret influence (*with*); to carry on illicit love (*with*); to rouse the interest or curiosity of. कारस्थान-गुप्त कट-करणें,-रचणें, (वर) गुप्त वजन पाडणें; जारकर्म करणें, (शीं) चोरून संबंध ठेवणें; औत्सुक्य वाढविणें, जिज्ञासा जागृत करणें. *In'trigant,-guant, n.,-te, n. f.* कट करणारा,-री.

Intrin'sic, *a.* (इन्ट्रि'न्सिक्)—being within; inherent; essential. अंगभूत, मूळचा, अंतर्गत; स्वाभाविक; महत्त्वाचा, आवश्यक.*-cally, adv.*

Intro-, (इन्ट्रो-)—in comb.=to the inside. अंतर्, आंतील बाजूला. *I.-flex'ion*, inward bending. अंतर्वक्रता. *I.-gres'sion*, अंतर्गमन, आंत जाणें,-येणें.

Introduce', *v. t.* (इन्ट्रोड्यू'स्)—to bring in, to usher in, to bring forward; to make (person) known to another; to bring into notice; to bring before parliament. आंत आणणें, सुरवात करणें, प्रचारांत आणणें, पुढें आणणें; परिचय-ओळख-करून देणें; नजरेस आणणें; आंत घालणें; सभागृहापुढें (ठराव वगैरे) आणणें.

Laud'able, *a.* (लॉ'डेबल्)—commendable; (Medical) healthy, sound. स्तुत्य, प्रशंसनीय; (वैद्यकशास्त्रांत) आरोग्यदर्शक, हितावह. *Laud'ability*, *n.* स्तुतिपात्रता, स्तवनयोग्यता.

Laud'anŭm, *n.* (लॉ'ड्-नम्)—opium prepared in spirit of wine, alcoholic tincture of opium. अफूचा अर्क.

Laudā'tion, *n.* (लॉडे'शन्)—praising, panegyric, praise, commendation. स्तुति, प्रशंसा.

Laugh, *v. i. & t.* (लाफ्)—to make the sounds usual in expressing amusement, exultation, and scorn; to utter with a laugh, to treat with contempt. हंसणें. *n.* sound or act of laughing. हंसण्याचा आवाज, हास्य. *To laugh in one's sleeve*, to be secretly amused. मनांतल्या मनांत हंसणें, गुदगुल्या होणें. *To laugh on the wrong side of mouth*, रडण्याची पाळी येणें, अश्रु गळणें. *He laughs best who laughs last*, गोड शेवट होईपर्यंत-संकटमुक्त होईपर्यंत-हसूं नये. *To laugh at*, (ची) थट्टा करणें, टर उडविणें, हंसणें. *To laugh a person out of court*, हंशावारी (दुसऱ्याचें म्हणणें) न ऐकणें. *To laugh away*, हंसून-थट्टा मस्करींत-वेळ घालविणें; हंशावारी घालविणें. *To laugh down*, हंसून बंद पाडणें,-गप्प बसविणें. *To l. off*, हंसून दुर्लक्ष करणें. *To l. over*, हंसून वादविवाद करणें. *To join in the laugh*, दुसऱ्यानें केलेली चेष्टा-थट्टा-हंशावारी नेणें,-खेद न मानणें. *To have or get the laugh of*, प्रतिस्पर्ध्यावर बाजू उलटविणें. *Laugh'er*, *n.*; *Laugh'ing*, *a.*; *Laugh'ingly*, *adv.*

Laugh'able, *a.* (ला'फेबल्)—ridiculous, ludicrous, exciting laughter; amusing. हास्यजनक; मनोरंजक.

Laugh'ĭng-gas, *n.* (ला'फिंग् गॅस्)—a gas that excites laughter. हास्योत्पादक वायु.

Laugh'ĭng-stŏck, *n.* (ला'फिंग्-स्टॉक्)—an object of general derision or ridicule. हास्यविषय, हास्यास्पद गोष्ट.

Laugh'ter, *n.* (ला'फ्टर्)—an act of laughing. हंसें.

Launch, *v. t. & i.* (लॉंच्, लांच्)—to hurl, to send forth; to start on a course; to set vessel afloat. फेंकणें; सुरू करणें; (जहाज) लोटणें. *n.* a large boat. मोठी नाव, पगार, बोट. *Steam launch*, लहान आगबोट.

Laun'dress, *n.* (लॉ'न्ड्रेस्)—a woman who washes and gets up linen, a washer-woman. परटीण, धोबीण. [L *lavare*, to wash]

Laun'drў, *n.* (लॉ'न्ड्रि)—establishment for washing clothes. कपडे धुवून मिळण्याचें ठिकाण.

Laur'eate, *a.* (लॉ'रिअट्)-wreathed or decked or invested with laurel. लॉरेल वनस्पतीच्या माळेनें भूषित. *n. Poet l.*, पगारी राजकवि.-*ship*, *n.*

Lau'rel, *n.* (लॉ'रेल्)—kinds of glossy-leaved shrub; (*pl.*) honour, fame. एक प्रकारचें लहान झुडुप; कीर्ति, मान, सन्मान, गौरव. *v. t.* to wreathe with *l.*, लॉरेलनें भूषविणें. *To look to one's*

laurels, आपलें थोरपण कमी न होण्याविषयीं सावध असणें. *To reap, win, ll.*, यश-मान-मिळविणें. *To rest on one's ll.*, आहे तेवढाच नांवलौकिक संभाळून राहणें.

Lau'relled, *a.* (लॉ'रेल्ड्)—wreathed with laurel. लारेल-माला-विभूषित, विद्वान्.

Laurusti'nus, Laures-, *n.* (लॉरस्टा'इनस्)—an evergreen flowering shrub. एक सदापर्णी फूलझाड.

Lä'vä, *n.* (लां'व्हा)—matter discharged in fluid form by volcano. ज्वालामुखी पर्वतांतून वाहणारा तप्त रस, ज्वालामुखी रस.

Lăv'atorў, *n.* (लॅ'व्हेटरि)—a room or place for washing hands and face. (हात व तोंड) धुण्याची जागा, स्नानगृह.

Lāve, *v. t.* (लेव्ह्)—to wash, to bathe; to wash against, to flow along. (अंग) धुणें, अंघोळ करणें, क्षालन करणें; बाजूनें वाहणें (प्रवाह इत्यादि).

Lāve'ment, *n.* (ले'व्ह्मन्ट्)—(med.) injection, enema. औषध (शरीरांत) टोंचणें, बस्ती.

Lăv'ender, *n.* (लॅ'व्हिन्डर्)—a fragrant-flowered shrub, an aromatic plant; the pale purple colour of lavender flowers. एक सुवासिक वनस्पति: तांबूस, जांभळा किंवा निळा रंग. *v. t.* (वर) लव्हेंडर पाणी शिंपडणें *L.-water*, लवेंडरचें सुवासिक पाणी,-अत्तर. *To lay up in lavender*, to put aside for future use. (पुढील उपयोगासाठीं) राखून ठेवणें, हातचा राखून ठेवणें.

Lā'ver, *n.* (ले'व्हर्)—kinds of (edible) marine algae. शेवाळ, जलशेवाळ.

Lā'ver, *n.* (ले'व्हर्)—a large vessel for washing; spiritual cleansing. घंगाळ, प्रक्षालनपात्र; आध्यात्मिक शुद्धि.

Lăv'erock, *n.* (लॅ'व्हरॉक्)—a lark. चंडोल पक्षी.

Lăv'ish, *a.* (लॅ'व्हिश्)—profuse, prodigal; over-abundant. सढळ, उधळ्या, खर्चीक; वाजवीपेक्षां फाजील, अपरिमित, घळघळीत. *v. t.* to bestow or spend lavishly. फाजील खर्च करणें, उधळणें, उधळपट्टी करणें. *Lavish of money*, पैसे उधळणारा; *L. in giving*, सढळ हातानें देणारा. *Lav'ishly, adv.* सढळ हातानें. *Lav'ishness, n.* उधळेपणा. *Lav'ishment, n.* उधळपट्टी करणें, सढळ हातानें देणें.

Law, *n.* (लॉ)—a rule established among a community and enjoining or prohibiting certain action. नियम, कायदा, कार्याकार्यनिर्बंध, धर्मशास्त्र, धर्म, न्याय, नीति. *To be a law unto oneself*, रूढिविरुद्ध वागणें. *To lay down the law*, नियम घालून देणें. *To go to law*, कोर्टाकडे खटला नेणें. *To take the law into one's own hands*, to redress one's wrong by force. दंडेली करून आपल्या अपकाराचा प्रतिकार करणें, दंडेली करणें. *To take-to have-the l. of*, (ला) कायद्याचे कचाटींत धरणें. *L.-abiding*, obedient to the laws. कायदे पाळणारा, न्यायानुसारी. *L.-court*, न्यायालय. *Law'-giver*, न्यायप्रवर्तक, स्मृतिकार. *Law'-point*, कायद्याचा मुद्दा. *Law'-suit*, खटला, मुकदमा.

Law, laws, *int* (लॉ, लॉज्)—(vulg.) expressing astonishment. बापरे! ओहो! [var. of lo]

Law'ful, *a.* (लॉ'फुल्)—permitted or appointed by law, not illegal, (of child) illegitimate. कायद्याला अनुसरून असणारा, कायदेशीर; अनौरस (संतति).*-fully, adv.,-ness, n.*

Law'less, *a.* (लॉ'लिस्)—having no laws; unrestrained by law, contrary to or disobedient to law; unbridled. कायदे नसलेला; बेकायदेशीर; अनिर्बन्ध.*-ness, n.*

Lawn, *n.* (लॉन्)—a close-mown piece of turf (in gardens, &c.); a kind of fine linen. जमिनीबरोबर कापलेलें गवत असलेलें पटांगण; एक जातीचें बारीक कापड. *L.-mower*, गवत कापण्याचें यंत्र. *L.-sprinkler*, गवताळ पटांगणावर पाणी शिंपडण्याचें यंत्र,-नळी. *Lawn'y, a.* गवताचें मैदान असलेला, मैदानासारखा, उघडा.

Lawn, *n.* (लॉन्)—kind of fine linen. सणाचें उंची कापड.*-y, a.*

Law'yer, *n.* (लॉ'यर्)—a person pursuing law as a profession, a practitioner of law. वकील, कायदेपंडीत, न्यायशास्त्रज्ञ. *Penang lawyer*, walking stick of Penang palm. पेनँग झाडाची (हातांत धरण्याची) काठी.

Lăx, *a.* (लॅक्स्)—negligent; not strict or rigidly exact; loose; vague. निष्काळजी; नरम; ढिला, विरविरीत; संदिग्ध. *Lax'ity, n.* सैलपणा, हलगर्जीपणा. *Lax'ly, adv.* ढिलेपणानें. 2. *n.* a Swedish or Norwegian salmon. सॅमन जातीचा मासा.

Lăx'ative, *a.* (लॅ'क्सटिव्ह्)—loosening the bowels. कोठा साफ करणारा, सारक. *n.* a gentle purgative. सौम्य रेचक, कोठा साफ करणारें औषध.

Lay, (ले)—*pa. t.* of lie.

Lay, *n.* (ले)—a minstrel's song, ballad, a lyrical poem, song of birds. गीत, पोवाडा, पक्ष्यांचें गाणें. *a.* non-clerical; non-professional, amateur; (Cards) other than trump. गृहस्थ; अनभिज्ञ; हुकुमाखेरीज इतर (पत्ते). *Lay'-man*, सामान्य मनुष्य, (कायदा, वैद्यक यांत) अनि-

ण्यात मनुष्य. *v. t.* to deposit on a surface; to impose, to enjoin; to bury; to calm, to allay; to wager; to produce (an egg). ठेवणें, मांडणें; लादणें, बसविणें; पुरणें; शांत करणें; पैज मारणें; (अंडीं) घालणें. *To lay bare*, उघडा करणें, उघडकीस आणणें. *To l. (eggs)*, (अंडीं) घालणें. *To l. down*, पणाला लावणें; टाकणें, देणें, सोडणें; खालीं ठेवणें, *To l. hands on*, to seize, पकडणें, धरणें. *To l. heads together*, to consult, to confer. एकत्र विचार करणें. *To l. hold of* or *on*, पकडणें, धरणें. *To l. waste*, नाश करणें; उध्वस्त करणें. *To l. aside* or *by*, शिलकीस ठेवणें, सांठविणें; सोडणें, टाकणें. *To l. down (one's arms)*, शरण जाणें. *To l. in*, (चा) संग्रह करणें; धपके देणें. *To l. on*, (कर) बसविणें, (तडाखे) देणें, (रंग) लावणें. *To l. out*, मांडणें, रचणें, बाग वगैरे तयार करणें, ठेवींत-व्यापारांत-पैसे गुंतविणें, (स्वतः) परिश्रम करणें. *To lay up*, सांठविणें, (जहाज) कामांतून रद्द करणें. (*Passive*) *to be laid up*, अंथरुणावर-घरांत-पडून राहणें, आजारी असणें. (N.) *Lay*, धंदाउद्योग; (देशाची) रचना, ठेवण, दिशा इ०. *Laid*, *pa. t.*

Lay'er, *n.* (ले'अर्)—one that lays; thickness of a matter laid over a surface; a shoot fastened down to take root. ठेवणारा; थर; झाडाचा कोंब, झाडाचा फांटा. *v. t.* to propagate (plant) by layer. झाडाचे फांटे जमिनींत पुरून कोंब वाढवणें.

Layĕtte', *n.* (लये'ट्)—clothes, toilet etc. needed for new-born child. नवीन जन्मलेल्या बालकासाठीं कपडे वगैरे.

Lay fig'ure, *n.* (ले फि'गर्)—a jointed wooden figure of human body used by artists; an unimportant person; unreal character in a novel. मनुष्याकृति लांकडी ठोंकळा; क्षुद्र मनुष्य; कादंबरींतील काल्पनिक व्यक्ति.

Lay'man, *a.* (लें'मन्)—a person not in orders; a person without professional or special knowledge of a subject. भिक्षुक नव्हे तो, गृहस्थ; अनभिज्ञ मनुष्य.

Lăz'ar, *n.* (लॅ'झर्)—a beggar with leprosy. कोड्या, महारोगी, रक्तपित्या भिकारी. [L *lazarus*, a beggar]

Lay'stall, *n.* (लें'स्टाल्)—a refuse heap. कचऱ्याचा ढीग.

Lăzarĕtt'ŏ, *n.* (लॅझरे'टो)—a hospital for lepers, a hospital for quarantine; after part of ship's hold used for stores. महारोग्यांचें इस्पितळ, दवाखाना; गलबताच्या मागील तळचा कोठीचा भाग.

Lā'zy̆, *a.* (ले'झि)—averse to work; indolent; inducing indolence. कामचुकार; आळशी; आळस आणणारा. *Laze*, *v. i. & n.* (colloq.) to indulge in laziness, (*n.*) *lazy time*. आळसांत वेळ घालवणें; आळसांत घालवलेला वेळ. *Lazy bones*, a lazy person. आळशी मनुष्य. *Lazy bed*, bed for potato-growing about 6 ft wide. सहा फूट रुंदीची बटाट्यासाठीं मळी. *La'zily*, *adv.* आळसानें, सुस्तपणें. *La'ziness*, *n.*

Lea, *n.* (ली)—1. a piece of meadow or arable or pasture land, a grassy plain. कुरण, गवतजमीन. 2. a measure of yarn (300, 200 etc. yards). सूत मोजण्याचें माप.

Leach, *v. t.* (लीच्)—to make (liquid) percolate; to subject to action of percolating fluid; to purge by such means. झिरपविणें; गाळणें, भिजविणें; शोधणें, निचरविणें.

Lead, *v. t. & i.* (लीड्)—to force to go with one; to conduct, to guide; to show the way towards; to experience a life of specified kind; to play (card) as first player. घेऊन जाणें; सल्लामसलत देणें; मार्ग दाखविणें; (आयुष्य) घालविणें; पत्ते प्रथम खेळणें, पहिली उतारी करणें. *n.* performance done as example; leader's place, guidance, precedence; right to playing cards first; string etc. for leading dog. पुढाकार; पुढारीपण; (पत्ते) पहिली उतारी; कुत्र्याच्या गळ्यांतील दोरी इ०. *To lead to*, ०कडे जाणें. *All roads l. to Rome*, (अलं०) सगळ्याचें तात्पर्य हेंच, किंवा सगळ्याचा शेवट हाच. *To lead* one *a dance*, to give him much trouble to secure his end. मार्गांत अडथळे आणणें. *To l.* one *a life*, एकाद्याला सारखा त्रास देणें. *To l. astray*, वाईट मार्गाला लावणें. *To be led away*, to be induced to follow unthinkingly. विचार न करतां करायला लावणें. *To l. off*, सुरुवात करणें. *To l. on*, मन वळवून पुढें नेणें. *To l. up to*, हळूहळू पर्यवसान होणें,-स्थितीला नेणें. *Led*, *pa. t.*

Lead, *n.* (लेड्)—a heavy soft grey metal. शिसें, शिशाची पट्टी. *Black-lead*, शिशाचा दगड. *Red l.*, शेंदूर. *White l.*, सफेता. *L. comb*, शिशाची (केंस काळे करण्याची) फणी. *L. pencil*, शिसपेन्सिल. *v. t.* to cover with lead (वर) शिसें चढवणें, शिशानें मढवणें. *Pl. leads*, sheets of lead for covering roofs. (छपरावर) घालण्याचे शिशाचे पत्रे.

Lead'er, *n.* (ली'डर्)-one who leads or conducts; leading article. पुढारी, म्होरक्या, अग्रेसर; अग्रलेख.

Lea'den, *a.* (ले'डन्)—consisting of lead; lead-coloured; heavy, sombre. शिशाचा; शिशाच्या रंगाचा; जड, सुस्त; सुस्ती-जडत्व-आणणारा.

Leaderette', *n.* (लीडरे'ट्)—a short leading article in a newspaper. लहानसा संपादकीय लेख. संपादकीय स्फुट.

Lead'ing, *a.* (ली'डिंग्)—chief; of most importance; giving guidance. प्रमुख; अत्यंत महत्त्वाचा; मार्गदर्शक. *Leading article*, संपादकीय अग्रलेख. *L. question*, a question so formed as to prompt the answer desired. (इष्ट उत्तर सुचविलें आहे असा) सूचक प्रश्न.

Leaf, *n.* (लीफ्)—(*pl. leaves*) single member of plant's foliage; a petal (*e. g. rose-l.*); foliage; very thin sheet; tooth of pinion; section of sheet of paper of which each side is a page; hinged flap of a table, &c. पान, पर्ण; पत्र, दळ; पाकळी (गुलाबाची); पालवी; पातळ पान,-पत्रा; चाकाचा—चक्राचा—दांता; (कागदाचें) पान; टेबलाची वगैरे खालींवर करतां येणारी फळी. *v. i.* to put forth leaves. पानें येणें, पालवी फुटणें. *Leaf'y*, *a.* दाट पानांचा, पर्ण-रचित. *To turn over new leaf*, to mend one's ways. वागणुकींत सुधारणा-बदल-करणें. *Fall of the l.*, autumn. पावसाळा (झाडांचीं पानें गळून पडण्याचा काळ). *In l.*, पालवी फुटलेला, सपल्लव. *L. brass*, brass foil, पितळी पत्रा,-वर्ख. *L. mould*, कुजलेल्या पानांच्याची माती.-*leafed*, *L.-less*, *L.-y*, *aa.* पर्णमय, पानांचा. *L.-iness*, *n.*, *L.-less*, *a.* पर्णशून्य, निपानी. *L.-lessness*, *n.*

Leaf, *n.* (लीफ्)—(sl.) leave of absence, furlough. (हक्काची) रजा, सुटी. (=leave)

Leaf'age, *n.* (ली'फिज्)—foliage. पानें, पालवी.

Leaf'let, *n.* (ली'फ्-लिट्)—a little leaf; one division of compound leaf; printed paper (single or folded) for distribution. लहान पान, उपपर्ण, दल, दळ; छापील हस्तपत्रक.

League, *n.* (लीग्)—1. a measure of distance (usually about 3 miles); 2. a compact for mutual help; an alliance, the parties to it. सुमारें दीड कोसांचें अंतर; परस्परसाहाय्यकारी संघ, जूट; संघाचे भागीदार. *v. t. & i.* to combine in league. जूट करणें. संघ बनणें. *In league with*, allied with. शीं संघटित झालेला, मैत्री असलेला. *League match*, संघांतील पोट-संघांच्या किंवा मंडळांच्या खेळाचे सामने. *L. of Nations*, १९१९ मध्यें स्थापन झालेला राष्ट्रसंघ. *Leag'uer*, *n.* member of a league. संघाचा सभासद. 2 siege; besieger's camp. वेढा; वेढा घालणाऱ्यांची छावणी. *Leag'ued*, *a.*, *pa. t. & pa. p.* जुडलेला.

Leak, *n.* (लीक्)—a hole or passage through which liquid, &c. makes its way in or out. गळती, भोंक, छिद्र. *v. i.* to pass or let (water, &c.) pass through a leak; (of secrets etc.) to transpire, to come *out* gradually. गळणें, पाझरणें, झिरपणें; (गुप्त गोष्ट इ.) हळूहळू बाहेर फुटणें, बाहेर येणें, उघडकीस येणें. *To spring a l.*, गळती लागणें, पाणी घेणें. *Leak'y*, *a.* having leaks. गळणारा, पाझरता; भडभड्या. *Leak'iness*, *n.*

Leak'age, *n.* (ली'केज्)—what leaks out or in; transpiring of secrets; unexplained disappearance of money. पाझर, गळती, घट, घस; गुप्त गोष्टीचा स्फोट; पैशाची (अफरातफरीमुळें) घट.

Leal, *a.* (लील्)—loyal; honest. निष्ठायुक्त; भक्तियुक्त; प्रामाणिक.

Lean, *a.* (लीन्)—wanting flesh, having no superfluous fat, thin; unremunerative; (of meat) not fat. सडपातळ, रोड; कमी मिळकतीचा; बिनचरबीचें (मांस). *v. i. & t.* to be in or put in a sloping position; to be inclined or partial to; to rely or depend *on, upon.* कलणें, वांकणें; कल किंवा पक्षपात असणें; (वर) विश्वासून-अवलंबून-असणें. *n.* an inclination, slope. झोंक, कल, बांक, वळण. *To l. to*, कलणें; टेंकणें, ओठंगणें. *L.-to*, *n.* pent-house, पडवी. *L.-ness*, *n.* (*pa. t. & pa. p. leaned* or *leant*, लेन्ट्)

Lean'ing, *n.* (ली'निंग्)—tendency, inclination, bias, predilection. झोंक, कल, प्रवृत्ति, ओढा.

Leap, *v. i. & t. & n.* (लीप्)—jump. उडी मारणें, उडी. *Look before you leap*, जपून पाउल टाकावें. *Leap-frog*, a game in which players vault over others bending down. बेडुककुदी, बेडकासारखाखेळ. *Leap in the dark*, hazardous attempt of doubtful issue. अविचारी कृत्य. *By leaps & bounds*, with startingly rapid progress. मोठ्या झपाट्यानें (प्रगति होणें). *Leap'ed* or *leapt*, *pa. t. & pa. p.*

Leap'-year, *n.* (ली'प्-यिअर्)—a year with 29th Feb. as an intercalary day. ज्या वर्षी फेब्रुवारी महिन्याचे २९ दिवस असतात तें वर्ष.

Learn, *v. t. & i.* (लर्न्)—to acquire by study, to get knowledge; to find out; (vulg.) to teach. शिकणें; शोधून काढणें, समजणें, माहिती करून घेणें; शिकविणें. *To l. by heart* or *rote*, to commit to memory. तोंडपाठ करणें. *I am* or *have yet to learn*, I do not know (showing disbelief). मला ठाऊक नव्हतें, कळून आलें. *Learn'er*, *n.* शिकाऊ, नवशिक्या, -विद्यार्थी. *Learn'able*, *a.* शिकण्याजोगा. *Learned* or *learnt*, *pa. t. & pa. p.*

Learn'ed, *a.* (ल'र्निड्)—having much knowledge, deeply read, erudite. चांगला शिकलेला, विद्वान्.

The learn'ed, विद्वान लोक. *A l. fool*, पढतमूर्ख. *L.-ly, adv.*

Learn'ing, *n.* (ल'र्निंग्)—knowledge got by study ; erudition, scholarship. शिक्षण ; विद्वत्ता. *The new learning*, studies of Greek, introduced into England in the 16th century, renaissance. ग्रीक विद्येचें पुनरुज्जीवन.

Lease, *n.* (लीस्)—a contract by which land or tenement is conveyed for a term by its owner (the *lessor*) to a tenant (the *lessee*) usually for a rent, tenure by grant or permission. जमीन वगैरे खंडानें देणें. *v. t.* to grant or take on lease. कौलानें-खंडानें-देणें, -घेणें. *Lease-hold*, tenure or tenement on lease. कौलानें घेतलेला. *L.-holder*, मक्तेदार, कौलदार. *A new lease of life*, prospect of living due to recovered health or removal of anxiety. (प्रकृती सुधारल्यानें) पुनर्जन्म, पुनर्जीवन. *Leas'able, a.* [Fr. *laisser*, to let]

Lease, *n.* (लीस्)—crossing of warp-threads in a loom ; cord with eye to receive warp-thread. मागावरील उभ्या सुताची-ताण्याची-वीण ; वशारण्याचा-उभें सूत ओवण्याचा -डोळेवाला धागा,-दोर.

Leash, *n.* (लीश्)—a thong for holding dogs ; a set of three hounds etc. ; (Weaving) a cord with eye to receive warping thread. कुत्र्याला बांधावयाची दोरी,-वादी,-काढणी : तिकडी, त्रीक ; (मागावरील) उभें सूत ओंवण्याचा डोळेवाला धागा,-दोर. *v. t.* to bind by a leash. वादीनें बांधणें.

Leas'ing, *n.* (ली'झिंग्)—(Bibl.) falsehood, lie. (बायबल°) खोटेपणा, खोटें, असत्य.

Least, *a.* (लीस्ट्)—smallest. कमींत कमी. *adv.* in the smallest or lowest degree. कमींत कमी. *n.* the least amount. कमीत कमी, अगदीं थोडें. *To say the l. of it*, to put the case moderately. थोडक्यांत सांगणें. *L. said soonest mended*, discussion will only make things worse. न बोलावें हें चांगलें. *At l.* or *at the l*, कमीत कमी, निदान पक्ष, गेला बाजार. *Not in the l.*, बिलकूल नाहीं, मुळींच नाहीं. *L.-ways, L.-wise, advv.* or at least, or rather. निदान तरी, किमानपक्ष.

Leat, *n.* (लीट्)—an open water-course. पाण्याचा उघडा पाट, पन्हळ.

Lea'ther, *n.* (ले'दर्)—material made by tanning or otherwise dressing hides ; (sl.) cricket-ball ; one's skin. कमावलेलें कातडें, चामडें ; क्रिकेटचा चेंडू ; स्वतःची कातडी. *v. t.* to cover etc. with leather ; to flog. चामड्यानें झांकणें ; फटके मारणें. *L.-head*, block-head. निर्बुद्ध, ढ मनुष्य. *L.-hunting*, (sl.) fielding at cricket. क्रिकेट खेळांत क्षेत्ररक्षण. *L. jacket*, kinds of fish ; cranefly grub. एका जातीचे मासे ; किडे, कीड (जमिनींतील). *L.-wood*, kinds of tough-barked tree. चिवट सालीचीं एक प्रकारचीं झाडें. *Leatherette'*, (लेद्रे'ट्) imitation leather. कृत्रिम चामडें. *Patent l.*, काळें तुळतुळीत चामडें. *American l.*, kind of oil-cloth. एक-प्रकारचें तेलकट कापड. *Nothing like leather*, one's own goods will serve all purposes. आपलें जें आहे तेवढ्यावर सर्व भागेल. *Lea'thern, a.* कातड्याचा ; चामड्याचा. *Leath'eroid, n.* cotton paper chemically treated. रासायनिक क्रियेनें बनविलेला चामड्यासारखा दिसणारा कागद. *Leath'ery, a.* चिवट, चामट.

Leave, *n.* (लीव्ह्)—permission ; permission to be absent from duty or to withdraw. अनुज्ञा, परवानगी ; रजा, मोकळीक, सूट. *v. t. & i.* to let remain ; to bequeath ; to abstain from ; to go away (from); to trust or commit to another ; to abandon. राहूं देणें ; संततीसाठीं मागें ठेवणें ; संबंध न ठेवणें, अलिप्त राहणें ; सोडून जाणें ; दुसऱ्याच्या स्वाधीन करणें ; त्याग करणें. *To leave alone*, एकटा सोडणें, सोडून देणें. *To l. off*, सोडणें, टाकणें ; बंद ठेवणें ; त्याग करणें. *To l. out*, to omit. वगळणें. *To l. to one's self*, ची गोष्ट न बोलणें, च्या वाटेला न जाणें. *To l. with*, च्या पाशीं देणें,-ठेवणें. *To l. to*, कडे सोपविणें. *Leav'ing, n.* सोडणें, त्याग. *To take (one's) l. (of)*, to bid farewell (to). निरोप घेणें. *Take l. of one's senses*, to go mad. वेडा होणें.

Leaved, *a.* (लीव्ह्ड्)—having leaves ; having folds. पानांचा, सपर्ण ; फळ्यांचा, पड्यांचा. *Two-leaved*, दु-फळी (टेबल वगैरे).

Lea'ven, *n.* (ले'व्हन्)—a substance used to make dough ferment and rise ; admixture of some quality. आंबवण ; मिश्रण. *v. t.* to taint, to vitiate ; to treat with leaven. खराब करणें ; आंबवण घालून फुगवणें,-मिश्रण करणें.

Leav'ings, *n. pl.* (ली'व्हिंग्झ)—what some one has left as worthless, &c. अवशेष, उरलेंसुरलें, उच्छिष्ट.

Lĕch'er, *n.* (ले'चर्)—a man given to lewdness, debauchee. छंदी, इष्कबाज, रांडबाज-मनुष्य. *Lech'erous, a.* lustful. छंदी, स्त्रैण. *Lech'ery, n.* बाहेरख्याली, इष्कबाजी.

Lĕc'tern, *n.* (ले'क्टर्न्)—a reading or singing desk in church. (ख्रिस्ती देवळांतील, बायबल ठेवून वाचण्याचें) उच्चपीठ.

Lĕc'tionarў, *n.* (ले'क्शनरि)—portions of Scripture appointed to be read in churches. ख्रिस्ती देवळांत वाचण्यासाठीं नेमलेले बायबलचे पाठ.

Lĕc'ture, *n.* (ले'क्चर्)—a discourse delivered to a class or other audience; piece of admonition, a formal reproof. प्रवचन, व्याख्यान; कानउघाडणी. *v. i. & t.* to deliver a lecture; to admonish. व्याख्यान देणें; कानउघाडणी करणें. *To read* one *a lecture*, to reprove one. एकाद्याची कानउघडणी करणें. *Lec'turer*, (ले'क्चरर्) *n.*; *Lec'tureship*, *n.* व्याख्यात्याची-अध्यापकाची-जागा. [L *lectum*, *read*]

Lĕd, *pa. t. & pa. p.* of Lead.

Lĕdge, *n.* (लेज्)—a narrow shelf or projection; a ridge of rock below sea-level; a stratum of metal-bearing rock. फळी, तक्ता; पाण्यांतील खडकाचा कंगोरा; धातुयुक्त खडकाचा थर. *Led'gy*, *Ledged*, *aa.*

Lĕdg'er, *n.* (ले'जर्)—a book in which a firm's debtor-and-creditor accounts are kept; flat grave-stone. पक्की खतावणी, खातेवही; थडग्यावरची शिळा.

Lee, *n.* (ली)—a shelter given by a neighbouring object; side of something away from the wind (opp. *windward*, *weather side*). निवाऱ्याची जागा, आसरा; वाऱ्यापासून दूरची बाजू.

Lee'ward, *a. & adv.* (ल्यू'अर्ड्, ली'वर्ड्)—on or towards the side turned from the wind. निवाऱ्याच्या स्थानीं, वाऱ्याच्या विरुद्ध दिशेला, वायुविमुख. *n.* leeward direction or region. निवाऱ्याच्या स्थानाची दिशा, प्रदेश. *Lee'ward way*, drift of ship to leeward. निवाऱ्याच्या ठिकाणीं जहाजाचा मोर्चा फिरणें. *To make up leeway*, *much leeway to make up*, struggle out of bad position. वाईट स्थितींतून बाहेर पडण्याची धडपड करणें.

Leech, *n.* (लीच्)—a physician; a blood-sucking worm used in bleeding; a person who sucks profits out of others. वैद्य, चिकित्सक; जळू; जळूप्रमाणें दुसऱ्यापासून पिळून फायदा काढणारा. *Leechcraft*, art of healing, वैद्यकी. *To stick like a leech*, जळूप्रमाणें चिकटून राहणें,-न सोडणें.

Leech, *n.* (लीच्)—*perpendicular or sloping side* of a sail. शिडाची उभी किंवा तिरपी बाजू.

Leek, *n.* (लीक्)—onion-like herb. एक प्रकारचा कंद, कांदा. *To eat the leek*, to pocket affront. अपमान गिळणें,-निमूटपणें सहन करणें.

Leer, *n. & v. i.* (लीर्)—glance with lascivious or malign expression. वांकडा डोळा, नेत्रकटाक्ष, दुष्ट-वाईट-नजर (-नजरेनें पाहणें). *Leer'y a.* knowing, sly. धूर्त; लबाड, लुच्चा. *Leer'ingly, adv.* डोळे मारून, वांकड्या डोळ्यानें.

Lees, *n. pl.* (लीझ्)—sediment of wine, &c.; worst part after best is gone. दारूचा गाळ; गाळसाळ.

Lĕft, *a.* (लेफ्ट्)—of or situated on the side opposite to the right. डावा, डाव्या हाताचा. *n.* the left side. डावी बाजू. *The left*, (in politics) the advanced or radical party. (राजकारणांत) विरुद्धपक्षीय मंडळी; सुधारणावादी लोक. *To marry with the left hand*, प्रतिलोम विवाह करणें, उच्च दर्जाच्या मनुष्यानें कमी दर्जाच्या स्त्रीशीं विवाह करणें. *Lefthanded*, *a.* डावखुरा. *Left-hander*, *n.* *Leftward*, *a. & adv.*, *Leftwards*, *adv.*

Lĕg, *n.* (लेग्)—one of the limbs on which a person or an animal walks and stands; (Crick.) that part of the 'on'-side of the field near the playing batsman. पाय, तंगडी; (क्रिकेटमध्यें) चेंडूमनच्या डाव्या बाजूस थोडा मागें उभा राहणारा क्षेत्ररक्षक. *Legbail'*, making off, decamping. पोबारा करणें, पळ काढणें. *To stand on* one's *own legs*, स्वावलंबी होणें. *To pull* one's *leg*, एकाद्याचे पाय मागें ओढणें, (त्याला) मूर्खांत काढणें. *To take to* one's *legs*, पळून जाणें, पळ काढणें. *On* one's *last legs*, मृत्यूच्या दाढेंत. *Leg before wicket*, *l. b. w.*, (क्रिकेटमध्यें) खेळाडू बाद होण्याचें एक कारण, पायचीत होणें. *On one's legs*, स्वतःच्या पायावर (उभा-बोलावयास उभा- राहिलेला).

Lĕg'acў, *n.* (ले'गसि)—a gift left by will; (*fig.*) something handed down by predecessor. मृत्युपत्रानें मिळालेली देणगी; पूर्वीच्या इसमानें स्वाधीन केलेली चीजवस्तु, वारसा.

Lē'gal, *a.* (ली'गल्)—of or based on law; lawful, judicial, created by law. कायद्याचा; कायदेशीर. *Legal tender*, money that creditor is bound to accept in payment. कायदेशीर चलन, चलनी नाणें. *Le'gally*, *adv.* कायदेशीरपणें. [L *lex-legis*, *law*]

Legăl'itў, *n.* (लिगॅ'लिटि)—lawfulness. कायदेशीरपणा.

Lē'galize, *v. t.* (ली'गलाइझ्)—to make lawful, to bring into harmony with law. कायदेशीर करणें.

Lĕg'ate, *n.* (ले'गेट्)—(papal) ambassador. (पोपचा) प्रतिनिधि; (राष्ट्रीय) वकील.

Lĕgatee', *n.* (लेगटी')—recipient of a legacy, one to whom a legacy is bequeathed. मृत्युपत्रानें झालेला वारस.

Lĕgā'tion, *n.* (लिगे'शन्)—a body of deputies; a diplomatic minister and his suite; his residence. वकीलमंडळ; (परराष्ट्रीय) वकील व त्याचा लवाजमा, वकिलात (ठाणें).

Lĕ'gend, *n.* (ले'जन्ड्)—1. a non-historical narrative, a traditional story, a myth. आख्यायिका, दंतकथा. *The (Golden) Legend*, particular 13th century collection. तेराव्या शतकांतील संत-चरित्रमाला. 2. inscription or motto, esp. on a coin or medal. नाण्यावरील किंवा पदकावरील कोरलेलें वचन. *Le'gendry*, *n.* [L *legere*, read]

Lĕ'gendarў, *a.* (ले'जन्डरि)—famous or existing only in legend, fabulous, traditional. कल्पित, पुराणोक्त, दंतकथात्मक.

Lĕ'gerdemain, *n.* (ले'जर्डिमेन्)—a sleight of hand, juggling, a deceptive performance; sophistry. हातचलाखीचा खेळ, गारूड; खोटा युक्तिवाद. [French *leger de main*, light of hand]

Lĕgg'ing, *n.* (ले'गिंग्)—(usu. in pl.) outer covering of leather, usu. for lower leg; a cricket pad. पायावर बांधण्याचें चामडें, पॅड.

Lĕghorn', *n.* (लेगॉ'र्न्)—kind of plaited straw for hats; a hat of it; breed of fowls. टोप्यांसाठीं एक प्रकारचें गवत, गवताची टोपी; कोंबड्यांची जात.

Lĕ'gible, *a.* (ले'जिब्ल्)—(of hand-writing) easily read. सुवाच्य, स्पष्ट. *Legibi'lity*, *n.* सुवाच्यता, स्पष्टता. *Le'gibly*, *adv.* सुवाच्य, स्पष्टपणें.

Lē'gion, *n.* (ली'जन्)—a division of armies, a military force; great number. (सहा हजारी) फौज; मोठी संख्या. *British l.*, सेवानिवृत्त सैनिकांची राष्ट्रीय संस्था. *Le'gionary*, *a.* (ली'जॉनरि), सैन्यांतील तुकडीचा. *n.* तुकडींतील सैनिक.

Lĕ'gislāte, *v. i.* (ले'जिस्लेट्)—to make laws. कायदे करणें. *Le'gislation*, *n.* law-making; laws made. कायदे करणें; केलेले कायदे, कायदेकानू.

Lĕ'gislātive, *a.* (ले'जिस्लेटिव्ह्)—law-making. कायदे करणारा.

Lĕ'gislator, *n.* (ले'जिस्लेटर्)—a law-giver, a member of legislative body. स्मृतिकार, कायदे रचणारा; विधिमंडळाचा सभासद. *Le'gislatress*, *n.* a female legislator. कायदेकानू करणारी स्त्री.

Lĕ'gislāture, *n.* (ले'जिस्लेचर्)-legislative body or legislating power of a State. कायदेमंडळ.

Lĕgit'imacў, *n.* (लिजि'टि-मसि)—being legitimate, lawfulness, legality. कायदेशीरपणा, सयुक्तिकता, औरसता, वारसदारी.

Lĕgit'imate, *a.* (लिजि'टिमट्)—lawful; regular, proper, genuine, not false. कायदेशीर, न्याय्य; योग्य, खरा. *v. t.* (लिजि'टिमट्), to legitimatize. कायदेशीर ठरविणें.

Lĕ'gume, **Legū'men**, *nn.* (ले'ग्युम्, लग्यू'मेन्)—fruit, edible part, pod, of leguminous plant; vegetable used for food. (वाटाणे, तुरी वगैरेंच्या) शेंगा, त्यांतील दाणे; कडधान्य, कडदण. *Legu'minous*, *a.* कडदणाचा, द्विदलजातीचा, शेंगेचा.

Leis'ure, *n.* (ले'झर्)—spare time; freedom from pressing business. रिकामपणा; फुरसत. *At l.*, *at* one's *l.*, फावल्या वेळीं, यथावकाश. *To find leisure*, फुरसत होणें, सवड काढणें. *Lei'sured*, *a.* having plenty of leisure. पुष्कळ फुरसत असलेला, धिम्मा. *Lei'surely*, (ले'झर्लि) *a.* deliberate, not hurried. फुरसतीचा, सावकाशीचा; *adv.* without hurry. सावकाशीनें.

Lĕm'an, *n.* (ले'मन्)—(archaic) unlawful lover, sweetheart. यार, जार, वल्लभ, प्रियकर.

Le'mma, *n.* (ले'मा)—assumed or demonstrated proposition; motto. पूर्वसिद्ध गोष्ट, अवलंबन, सिद्धान्त, ब्रीदवाक्य.

Lĕm'on, *n.* (ले'मन्)—a pale-yellow acid fruit; its colour; tree bearing it, (sl.) unattractive girl. लिंबू, त्याचा रंग; लिंबाचें झाड, लिंबीण; कुरूप मुलगी. *Lemon grass*, गवती चहा, अतिगंध. *L. squash*, लिंबू व सोडापाणी.

Lĕmonāde', *n.* (लेमने'ड्)—a drink made from or flavoured like lemon-juice. लिंबाचें सरबत, पन्हें.

Lĕm'ur, *n.* (ले'मर्)-kinds of nocturnal mammal allied to monkeys. रात्रीं फिरणारा वानरासारखा पशु.

Lĕnd, *v. t.* (लेन्ड्)—to grant temporary use of (a thing); to let out at interest or for hire; to bestow, to contribute; to accommodate (oneself) to. थोडा वेळ वापरण्यास देणें; व्याजीं किंवा भाड्यानें देणें; देणें; सराव करून घेणें, मिळतें घेणें. *To lend ear*, *an ear*, one's *ears*, to listen. कान देणें, लक्ष देणें. *To l. a hand* or *a helping hand*, to help. मदत करणें. *Thing lends itself to*, is serviceable for. च्या उपयोगीं असणें. *Lend'able*, *a.* कर्जाऊ देण्याजोगा. *Lend'er*, *n.* धनको, सावकार. *Lend'ing*, *n.* उसनें देणें, कर्ज देणें, उसनी दिलेली वस्तु. (*lent*, *pa. t.* & *pa. p.*)

Lĕngth, *n.* (लेंग्थ्)—measurement from end to end in space or time, long duration, distance. लांबी, अंतर. *To keep one at arm's length*, to avoid intimacy with. ला दूर ठेवणें, शीं संबंध न ठेवणें. *A good length ball*, a ball that pitches at right length. योग्य अंतरावर टप घेणारा चेंडू (फेंकलेला). *At length*, सरते शेवटीं ; विस्तारानें. *To such a l.*, येथवर, येथपावेतों. *To go to the l. of*, (पर्यंत) पल्ला-मजल-मारणें. *Length'en*, *v. t. & i.* (लें'ग्थन्), to make or become longer. अधिक लांब करणें, वाढवणें. *Length'ways*, *adv.* लांबीकडे.

Lĕngth'wise, *adv. & a.*, **Leng'thy̆**, *a.* (लें'ग्थ्-वाइझ्, लें'ग्थि)-of unusual or undue length. लांबलचक, लंबा, अतिशय लांब.

Lē'nience, **Lē'niency̆**, **Lĕn'ĭty̆**, *nn.* (लीं'न्येन्स्, लीं'न्येन्सि, ले'निटि)—gentleness, mildness; clemency. सौम्यता ; दया.

Lē'nient, *a.* (लीं'न्येन्ट्)—indisposed to or marked by absence of severity. नरम, सौम्य, सदय.

Lĕn'ĭtĭve, *a. & n.* (ले'निटिव्ह्)—soothing or gently laxative (drug). सौम्य करणारें (मलम), सौम्य (रेचक).

Lĕns, *n.* (लेन्झ्)—a piece of glass spherically convex on one or both sides (used in spectacles, &c.) दुर्बिणीची किंवा चष्म्याची कांच. (*pl.* Len'ses).

Lĕnt, (लेन्ट्)—*pa. t. & pa. p.* of Lend.

Lent, *n.* (लेन्ट्)—period of fasting and penitence from Ash Wednesday to Easter Eve. 'लेन्ट्' नांवाचा चाळीस दिवसांचा उपवास. *Len'ten*, *a.* of, or in, or suited to Lent. 'लेन्ट्' उपासासंबंधीं. *Lents*, केंब्रिजशहरीं होणाऱ्या लेन्ट्सणांतील नौकाशर्यती. *Lenten fare*, मांस-रहित (साधें) अन्न. *Lenten face*, dismal look. उतरलेला चेहरा.

Lĕn'til, *n.* (ले'न्टिल्)—an edible seed. मसूर. *Lenti'cular*, *a.* lentil-shaped ; of the lens of the eye. जवासारखा ; बाह्यगोल कांचेसारखा.

Lĕn'tisk, *n.* (ले'न्टिस्क्)—the mastic tree. रुमामस्तकीचें (डिंकाचा प्रकार) झाड.

Lē'ō, *n.* (लीं'ओ)—the lion, a sign of zodiac. सिंहरास. *Le'onine*, (लीं'अनाइन्) *a.* 1. lion-like. सिंहासारखें ; सिंहाचा. 2. *Leonine,-verse*, लॅटिन कविता-प्रकार.

Leo'pard, *n.* (ले'पर्ड्)—a large carnivorous beast with dark-spotted fawn coat; panther. ढाण्या वाघ ; चित्ता. *Leo'pardess*, *n. f.* वाघीण, चित्तीण. *Can the leopard change his spots ?* character persists. मूळ स्वभाव जात (बदलत) नाहीं, स्वभावो दुरतिक्रमः.

Lĕp'er, *n.* (ले'पर्)—a person with leprosy. महारोगी.

Lĕpĭdŏp'terous, *a.* (लेपिडॉ'प्टरस्)—of the Lepidoptera or insects with four scale-covered wings, such as moths and butterflies. पतंगाच्या जातीच्या कीटकांसंबंधीं, पंखाला खवले असलेल्या वल्कपक्षकीटकवर्गाचा.

Lĕp'orine, *a.* (लें'पराइन्)—of the hare-kind. सशाच्या जातीचा. [L *leporis*, the hare]

Lĕp'rosy̆, *n.* (ले'प्रसि)—an endemic chronic constitutional disease ; (*fig.*) moral corruption. महारोग, रक्तपिती ; नीतिभ्रष्टता. *Lep'rous*, *a.* महारोगी, कोड्या ; रक्तपितीचा.

Lese-mă̆j'esty̆, *n.* (लीझ्मॅ'जिस्टि)-treason. राजद्रोह.

Lē'sion, *n.* (लीं'झन्)—an injurious change in the action or texture of an organ. जखम, खत, दुखापत.

Lĕss, *a.* (लेस्)—smaller ; of lower rank or degree ; a lesser quantity of, fewer. लहान ; कमी दर्जाचा ; कमी. *n.* a less amount ; a less quantity or number. कमी परिमाण ; कमी संख्या, लहान भाग. *adv.* to a less degree or amount. कमी, थोडा. *prep.* minus, with the deduction of. उणें, वजा. *May your shadow never be less*, may you not grow thin. पातळ-बारीक-होऊं नको ! *Homeless*, निराधार ; *doubtless*, निस्संशय.

Lĕssee', *n.* (लेसी')—a person who holds a lease. मक्तेदार.

Lĕss'en, *v. i. & t.* (ले'सन्)—to diminish, to make less. कमी होणें, कमी करणें.

Lĕss'er, *a.* (लें'सर्)—not so great as the other or the rest ; minor. कमी, अल्पतर ; लहान गौण. [*double comparat., less,-er*]

Lĕss'on, *n.* (ले'सन्)—a thing to be learnt by a pupil ; a warning experience ; reproof, rebuke ; an example ; systematic instruction in subject (*pl.*). धडा, पाठ ; खडा अनुभव, अद्दल, शहाणपण ; कानउघाडणी ; उदाहरण ; विषयाचें पद्धतवार शिक्षण,-तालीम. *v. t.* to discipline. शिस्त लावणें ; शिकविणें, पढविणें. *To get a severe lesson*, ठेंच खाणें, चांगली अद्दल घडणें. *To take a l. from*, धडा शिकणें, बोध घेणें. *Less'oned*, *pa. p* शिकवलेला, पढवलेला, घोकया.

Lĕss'or, *n.* (लें'सॉर्)—a person that grants a lease, one who lets for a term of years. खंडानें-कौलानें-देणारा.

Lĕst, *conj.* (लेस्ट्)—in order that—not ; for fear that. कदाचित्, यदा कदाचित् ; न जाणों.

Lĕt, *v. t. & i.* (लेट्)—to allow or enable or cause to; to grant use of for rent or hire; to cause or allow to escape. परवानगी किंवा मोकळीक देणें; भाड्यानें देणें; पळून जाऊं देणें. *To let blood*, रक्त-शीर-काढणें. *To let*, भाड्यानें देण्याचें. *To let alone*, वाटेला न जाणें, सोडून देणें. *To l. down*, निराश करणें, सोडणें. *To l. go*, सैल करणें, सोडणें, सोडून देणें. *To l. in*, आंत घेणें. *To l. off*, सोडणें, (बंदूक) झाडणें; माफ करणें, सोडून देणें. *To l. out*, पळून जाऊं देणें; सैल करणें; कठोर शब्द वापरणें, तडाखा मारणें; बाहेर फोडणें. (*Let, pa. t. & pa. p.*)

Lĕt, *v. t.* (लेट्)—to hinder, to obstruct. अडथळा करणें. *n.* a hindrance. अडथळा, अटकाव. *Without let or hindrance*, रोकटोक. 2. a suffix forming nouns. नामें बनविणारा प्रत्यय. e. g. *a ring-let, a streamlet, an armlet*, etc. लहान आंगठी, लहान ओढा, कंकण, इ.

Lē'thal, *a.* (ली'थल्)—causing or designed to cause death. प्राणनाशक, प्राणघातक. *Lethal'ity*, *n.* प्राणनाशकता.

Lĕth'argy̆, *n.* (ले'थर्जि)—torpid or apathetic state, inaction, inattention, dulness. सुस्ती, सुस्ती. *Lethar'gic*, *a.* (लिथा'र्जिक्) सुस्त, झोपाळू.

Lĕtt'er, *n.* (ले'टर्)—any of the symbols of which written words are composed; written message, epistle; literal meaning; (*pl.*) learning, erudition; literature, authorship as a profession. अक्षर, वर्ण; पत्र; अक्षरशः अर्थ; (अने०) विद्वत्ता; वाङ्मय, ग्रन्थकर्तृत्व. *Letter-perfect*, (Theatr.) knowing one's part perfectly. आपलें काम बरोबर करणारा-जाणणारा (नट). *L. press*, नकला काढण्याचा छाप,-यंत्र, चित्रासंबंधीं वर्णनात्मक लिखाण,-मजकूर. *L. weight*, पोस्टाचीं पत्रें व वजन करण्याचा कांटा; कागद उडूं नये म्हणून त्यावर ठेवण्याचें वजन. *Letters patent*, सनद.

Lĕtt'ered, *a.* (ले'टर्ड्)—well-read. चांगला शिकलेला, विद्वान्.

Lĕ'ttuce, *n.* (ले'टिस्)—a herb grown for salad, लेटिसची वनस्पति.

Leuc'ocy̆te, *n.* (ल्यू'कोसाइट्)—colourless blood corpuscle. (रक्तांतील) श्वेत रक्त-कण.

Lĕvănt', *v. i.* (लिव्हॅं'न्ट्)—1. to abscond without paying one's debts, to run away, to decamp. (कर्ज न देतां) पळून जाणें. 2. *n.* the East Mediterranean region. भूमध्य समुद्राच्या पूर्वेकडील प्रदेश. *Levan'ter*, *n.* easterly wind in the Levant. लिव्हँन्ट् प्रदेशांतील पूर्वेकडून वाहणारा वारा. *Levan'tine*, *a.* of the Levant. लिव्हॅंन्टसंबंधीं. *n.* a native of the Levant. लिव्हॅंन्टमधील रहिवासी.

Lĕv'ee, *n.* (ले'व्हि)—1. sovereign's reception for men only; any gathering of visitors. राजाचा दरबार; पाहुणेमंडळ. 2. *n.* (लिव्ही', ले'व्हि) an embankment to prevent overflow of river; a landing-place. (अमेरिकेंतील) नदीचा बांध, धक्का.

Lĕv'el, *n.* (ले'व्हल्)—a horizontal line or plane; an instrument for giving or testing a horizontal line or plane; a social or intellectual standard; a flat country. क्षितिजाशीं समांतर रेषा, सपाटी; पातळी, पाणसळ, साधन (-नी); सामाजिक किंवा शैक्षणिक दर्जा; सपाट प्रदेश. *a.* horizontal; on an equality with; even; in the same line with anything. समांतर; बरोबरीचा; सारखा, सपाट; एकाच रेषेंत असलेला. *v. t. & i.* to make level, even, or uniform; to place on the same level; to lay low, to raze, to abolish; to take aim at. सपाट किंवा सारखा करणें; एकाच पातळींत ठेवणें; जमीनदोस्त करणें; नेम धरणें. *Level-headed*, निःपक्षपाती (मनुष्य). *To do one's level best*, आटोकाट प्रयत्न करणें, यत्न करावयास न चुकणें. *Lev'el crossing*, intersection of road and railway, etc. without bridge. रस्ता व रेल्वे एकमेकांस आडवे जातात तें स्थळ.

Lĕv'eller, *n.* (ले'व्हलर्)—one who levels; a person who would abolish social distinctions. बरोबर-सारखा-सपाट करणारा; सामाजिक भेदभाव नष्ट करूं इच्छिणारा.

Lē'ver, *n.* (ली'व्हर्)—a bar or other rigid structure used as a mechanical aid to raise a weight; a tool used in prizing. उटाळी, टेंका; तरफ. *v. t.* to move with lever. तरफेनें हालवणें. *Le'verage*, *n.* (ली'व्हरिज्) advantage given by use of lever; means of accomplishing one's purpose, influence. तरफेनें झालेला यांत्रिक लाभ; साधन, वजन.

Lĕv'erĕt, *n.* (ले'व्हरिट्)—a young hare. ससाचें पिलूं.

Lēvī'athan, *n.* (लिव्हा'यथन्)—a sea-monster of immense size; a huge ship; anything large of its kind; a person of formidable ability, power, or wealth. देवमासा; प्रचंड जहाज; अगडबंब वस्तु (तज्जातीय); बडें धेंड (श्रीमंत, बुद्धिमान इ०).

Lĕv'igāte, *v. t.* (ले'व्हिगेट्)—to rub down into powder or paste, to make fine, soft & smooth. वाटणें, उगाळणें. *Leviga'tion*, *n.* [L *levis*, smooth & *agere*, to make]

Lĕv'in, *n.* (ले'व्हन्)—(poet.) lightning. (काव्यांत) विजेचा चकचकाट.

Lĕv'ĭtў, *n.* (लॅ'व्हिटि)—disposition to make light of weighty matters; unseasonable jocularity; frivolity. पोरकटपणा; अप्रयोजक विनोद; हलकेपणा.

Lĕv'ў, *v. t. & n.* (लॅ'व्हि)—to raise or impose compulsorily, to collect (taxes). (कर वगैरे) बसविणें, लादणें; जमा करणें, वसूल करणें.

Lewd, *a.* (ल्यूड्)—lustful, libidinous; despicable, indecent. विषयासक्त; असभ्य, अश्लील. *Lewd'ly*, *adv.* कामुकपणानें, कामबुद्धीनें. *Lewd'ness*, *n.* कामीपणा, कामुकता.

Lew'is gun, *n.* (ल्यू'इस् गन्)—kind of a machine-gun. एक प्रकारची बंदुक,-तोफ. [*Lewis*, inventor]

Lĕxicŏg'rapher, *n.* (लेक्सिकॉ'ग्रफर्)—the author or compiler of dictionaries. कोशकार.

Lĕxicŏg'raphў, *n.* (लेक्सिकॉ'ग्रफि)—the art of compiling a dictionary. कोशरचनाकला.

Lex'icon, *n.* (लॅ'क्सिकॉन्)—a dictionary. शब्दकोश, कोश. [Gk *lexis*, a word, & *legein*, to speak]

Liabil'ity, *n.* (लायबि'लिटि)—being liable; (*pl.*) sums or amount which one is under obligation to pay, debt. जबाबदारी; (अने॰) कर्ज, देणें.

Li'able, *a.* (ला'यबल्)—legally bound, subject to, answerable for; exposed to. जबाबदार, अधीन; जोगा; योग्य.

Liais'on, *n.* (लिए'झन्)-illicit amour; connection, touch. व्यभिचार; ऐक्य, संबंध.

Li'ar, *n.* (ला'यर्)—a person who utters an intentionally false statement. जाणूनबुजून खोटें बोलणारा.

Libā'tion, *n.* (लाइबे'शन्)—a drink offering. पान, मद्यदान; पिण्याकरितां ओतलेलें पेय.

Li'bel, *n.* (ला'इ-बल्)—a published statement damaging to a person's reputation; a false defamatory statement. बेअब्रू करणारा लेख; खोटें बदनामी करणारें विधान. *v. t.* to defame falsely, to misrepresent maliciously. बेअब्रू करणें.

Li'bellous, *a.* (ला'इ-बेलस्)—defamatory. बदनामी करणारा, अब्रूनुकसानी करणारा.

Lib'eral, *a.* (लि'बरल्)—open-handed, generous; abundant; open-minded, unprejudiced; of the Liberal party. सढळ, उदार; विपुल; उदार मनाचा; उदारमतवादी पक्षाचा. *n.* an advocate of democratic reform, a member of the Liberal party. उदारमतवादी; उदारमतवादी पक्षाचा सभासद. *Lib'eralism*, *n.* उदारमतवादी तत्त्वें. *Liberal education*, (मन उदात्त करणारें) उदात्त शिक्षण (धंदे शिक्षण नव्हे तें). *Lib'erally*, *adv.* उदार मनानें, उदारपणानें; सढळ हातानें; अर्थाला धरून (शब्दशः नव्हे, असें भाषांतर वगैरे).

Liberăl'ity, *n.* (लिबरॅ'लिटि)—munificence; freedom from narrow views. औदार्य, दानशीलता; मनाचा उदारपणा.

Lib'eralise, *v. t.* (लि'बरलाइझ्)—to free from narrowness. कोतेपणापासून अलिप्त-दूर-करणें, विशाल करणें. *Liberalisa'tion*, *n.*

Lib'erāte, *v. t.* (लि'बरेट्)—to set at liberty, to release. मुक्त करणें. *Libera'tion*, *n.* मोकळा करणें, सोडणें; मोकळीक, सुटका. *Lib'erator*, *n.* सोडणारा, मुक्तिदाता. *Libera'tionism*, (लिबरे'शनिझम्)-राजसत्तेपासून धर्मसंस्था स्वतंत्र करण्याचें धोरण. [L *liber*, free (man)]

Lib'ertine, *n. & a.* (लि'बर्टिन्)—one free from restraint, a licentious man; a free-thinker. स्वैरवर्तनी, स्त्रीव्यसनी; शास्त्र न मानणारा. *Chartered libertine*, a person allowed to do as he pleases मनःपूत-स्वैर-वागणारा मनुष्य. *Lib'ertinism*, *n.* बदफैलीपणा, स्वैराचार, पापाचरण.

Lib'ertў, *n.* (लि'बर्टि)—being free, freedom; right or power to do as one pleases; a piece of presumption; (*pl.*) privileges enjoyed by prescription or grant. स्वातंत्र्य; पाहिजे तें करण्याची मुभा किंवा मोकळीक, मुखत्यारी; धृष्ट, परवानगी; सवलत, अधिकार, हक्क. *Natural liberty*, नैसर्गिक स्वातंत्र्य. *Civil l.*, नागरिक स्वातंत्र्य, नागरिकत्वाचे हक्क. *L. of conscience*, कोणताही धर्मपंथ अनुसरण्याची मुभा, स्वमतस्वातंत्र्य. *L. of the press*, मुद्रण-स्वातंत्र्य, लेखन-स्वातंत्र्य. *To take the l. of doing,-to do*, आज्ञा घेतल्यावांचून करणें. *To take liberties* (*with*), (शीं) फाजील सलगी ठेवणें. *At l.*, free, मोकळा. *To set at l.*, to liberate. मुक्त करणें, सोडणें. *L. man*, a sailor with leave to go ashore. किनाऱ्यावर उतरण्याची-जाण्याची-परवानगी मिळालेला खलाशी.

Libi'dinous, *a.* (लिबि'डिनस्)—lustful. विषयी, कामुक.

Li'bra, *n.* (ला'इब्रा)—a pound weight (1 lb.); a pound sterling (£ s. d.); the Scales, the seventh sign of the Zodiac. वजनी पौंड; (नाणें) पौंड (२० शिलिंग); तुला-तूळ-रास. (*pl.* librae).

Librār'ian, *n.* (लाइ-ब्रे'रिअन्)—the keeper or custodian of a library. पुस्तकालयाधिकारी. *Librar'ianship*, ग्रंथालयाधिकाऱ्याचा हुद्दा.

Li'brarў, *n.* (ला'इ-ब्ररि)—collection of books or place in which l. is kept; a reading and writing room in a house. पुस्तकसंग्रह, पुस्तकालय; लिहिण्यावाचण्याची खोली. *Free l.*, मोफत वाचनालय. *Walking l.*, a person of erudition.

विद्वान, विद्यापारंगत मनुष्य, पंडित. *L. edition*, ग्रंथालयांत ठेवण्यासारखी मजबूत प्रत,·ग्रंथ. [*French -librairie*, bookshop]

Līce, *n. pl.* (लाइस्)—*plu. of* louse. उवा.

Lī'cence, *n.* (ला'इ-सेन्स्)—permission to do something otherwise prohibited ; university certificate of competence in some faculty ; excessive liberty of action, exorbitant freedom. परवाना, परवानगी, हुकूम ; सनद, अनुज्ञापत्र ; फाजील मोकळीक. (*Poetic*) *licence*, irregularity in grammar, metre, perspective etc. (कवींचें) निरंकुशत्व, रचनास्वातंत्र्य.

Li'cense,-ce, *v. t.* (ला'इसेन्स्)—to authorize ; to grant licence to or for. अधिकार-हुकूम-परवानगी देणें. *Li'censable*, *a.* परवाना देण्याजोगा. *Li'censed*, *a.* परवाना मिळालेला. *Licensee'*, *n.* परवाना धारण करणारा, मक्तेदार. *Li'censer*, *n.* परवाना देणारा अधिकारी.

Licĕn'tīate, *n.* (लाइसें'न्शिएट्)—holder of a certificate from a collegiate or examining body, one who has licence. ज्याच्याजवळ सनद आहे असा, सनदवाला.

Licĕn'tious, *a.* (लाइ-से'न्शस्)—immoral in sexual relations, dissolute, libidinous. व्यभिचारी, बेबंद, मर्यादातिरेक करणारा. *Licen'tiously*, *adv.* बेतालपणानें. *Licen'tiousness*, *n.* उच्छृंखलपणा, दुराचार, कामासक्ति.

Li'chen, *n.* (ला'इ-केन्)—1. kinds of flowerless plant forming a crust on stones, tree-trunks, &c. दगड किंवा झाड यांवरील शेवाळ ; दगडफूल. *Li'chened*, *a.* ; *Lichenol'ogy*, *n.* ' लायकेन ' शास्त्र. 2. a skin disease with reddish eruption. त्वचेवरील दाट व लाल पुरळ. *Li'chenous*, *a.* (असा) पुरळ आलेला.

Lĭck, *v. t.* (लिक्)—to pass tongue over, to take up by licking ; to play lightly over ; (sl.) to thrash, to defeat. चाटणें, चाटून वर घेणें ; चाटून जाणें ; ठोक देणें, मागें टाकणें, पराभव करणें. *n.* act of licking ; a smart blow ; a small quantity. चाटणें ; फटका ; अल्पांश. *Li'cking*, *n.* *Lick'spittle*, *n.* दुसऱ्याची थुंकी झेलणारा, दुसऱ्याच्या कच्छपीं लागणारा. *To lick* one's *chops* or *lips*, (भुकेनें तोंडाला पाणी सुटून) जिभल्या चाटणें. *To lick into shape*, to give proper form to, (ला) योग्य आकार देणें. *To lick* one's *shoes*, to show servility to him. ची हांजी हांजी करणें. *To l. the dust*, to fall, be vanquished. लढाईत पडणें, पराभव पावणें. *Licks creation*, is beyond everything. सर्वांवर ताण करतें. *This licks me*, हें माझ्या कल्पनातीत आहे. (*As hard as he could*) *lick*,—go. जाणें.

Lĭck'erish, *a.* (लि'करिश्)—fond of dainty fare ; greedy ; lecherous, eager to taste or enjoy. चांगलें चांगलें खाण्यास चटावलेला ; अधाशी ; लाळघोट्या.

Lĭck'ing, *n.* (लि'किंग्)—a thrashing, defeat. मारपीट, मार, पराभव.

Lĭc'tor, *n.* (लि'क्टर्)—a Roman official bearing axe and rods before magistrate. रोमन मॅजिस्ट्रेट-बरोबर असणारा अधिकारी.

Lĭd, *n.* (लिड्)—a cover fitting an aperture ; (Bot.) operculum. झांकण ; शिंबिकापुट. *Eye-lid*, डोळ्याची पापणी. *With the lid off*, with all horrors etc. exposed to view. सर्व भयंकर दृश्यें-गोष्टी-नजरेसमोर आणणें, उघड करणें. *To put the lid on*, सर्वांवर ताण करणें, शेवट करणें. *Lid'ded*, *a.* आच्छादित. *Lid'less*, *a.* झांकण नसलेला, उघड्या तोंडाचा ; झोंप न लागणारा, जागृत.

Lie, *n.* (लाय्)—an intentional false statement, imposture ; false belief. खोटें ; खोटी गोष्ट ; लबाडी, ठकवणूक ; मिथ्यावाद, खोटी श्रद्धा. *v. i.* to tell a lie ; to be deceptive. खोटें बोलणें, फसवणें. *To tell a lie*, खोटें बोलणें. *To act a lie*, खोटें न बोलतां फसवणें. *White l.*, a lie excused or justified by its motive. अनपायकारक असत्य भाषण ; अहेतुमूलक खोटें भाषण. *To give* one *the lie*, to accuse him of lying, खोटेपणाचा आरोप करणें, खोट्यांत काढणें. *To give the l. to* (*words*), खोटें ठरविणें, (चा) खोटेपणा दाखविणें. *To lie in one's teeth, throat*, निलाजरेपणानें खोटें बोलणें-सांगणें. *He lies like a gas-meter*, he lies freely. वाटेल तसें खोटें बोलतो, दडपून खोटें बोलतो. *Lying*, *pr. p.* ; *Lied*, *pa. t.* & *pa. p.*

Lie, *v. i.* (लाय्)—to rest on a bed or couch, to be at rest on something ; to be spread out to view ; to be comprised ; (Law) to be sustainable or admissible. खोटें बोलणें ; फसवणें ; आडवा होणें, निजणें ; पसरलेलें असणें ; अंतर्भूत होणें ; (घेण्यायोग्य, विचारांत घेण्याजोगा) असणें. *n.* way, direction, or position in which a thing lies. बैठक, परिस्थिति, पड, बसण, स्थिति. *Let sleeping dogs lie*, विवादिक-मतभेद-भांडण -होणाऱ्या विषयाचा विचार न करणें. *To l. heavy* (*on*), दडपण पडणें, चिरडणें. *To l. in the way*, नडणें, अडथळा करणें. *To l. in wait,-in ambush*, दबा धरून बसणें, लपणें. *To lie in ruins* or *the dust*, जमीनदोस्त होणें. *As far as in me lies*, to the best of my

power, माझ्या हातांत असे तों, शक्यतोंवर. *To lie by*, पडून राहणें; जवळ असणें; विश्रांति घेणें. *To l. down*, माघार घेणें, कमीपणा सोसणें. *To l. in*, चाळंत होणें. *Lying-in hospital*, सूतिकागृह. *To l. off*, (naut.) किनाऱ्यापासून थोडें दूर उभें राहणें. *To l. over*, मुदतीबाहेर राहणें, भिजत पडणें. *To l. to*, (naut.) (गलबत) जवळजवळ थांबणें, उभें राहणें, थाकसी घेणें. *To l. up*, निजून-पडून-घसून राहणें; अंथरूण धरणें; (गलबत) गोदींत जाणें, निकामी होणें. *Lie'abed*, a late riser, उशिरां निजून उठणारा, सूर्यवंशी. *Lay*, *pa. t.*, *Lain*, *pa. p.*, *Lying*, *pr. p.* [L *lectus*, bed]

Lief, *adv.*. (लीफ्)—with as much or more willingness. तितक्याच किंवा अधिक खुषीनें. *As lief*, *liefer*, अधिक खुषीनें.

Liege, *a.* (लीज्)—entitled to receive allegiance. सत्ताधीश. *n.* one's liege lord or superior; vassal or subject. सत्ताधीश प्रभु; ताबेदार, हुकुमबंदा. *L. lord*, सत्ताधीश स्वामी. *L. man*, हुकूमदार, दास.

Li'en, *n.* (लीं'एन्)—a right to hold another's property till debt on it is paid (usu. *a l. on* or *upon*). तारण हक्क, कायदेशीर दावा.

Lieu, *n.* (ल्यू)—*In lieu*=instead (of). च्या ऐवजीं, च्या जागीं. [L *locus*, place]

Lieutĕn'ant, *n.* (लेफ्-टे'नन्ट्)-a vicegerent or deputy or subordinate commander; a navy or army officer. नायक, मुतालीक; (in navy-लटे'नन्ट्), आरमारांतील किंवा फौजेंतील एक अंमलदार. *Lieuten'ancy*, *n.* [Fr. *lieu*, place & L *tenere*, to hold]

Life, *n.* (लाइफ्)—the active principle peculiar to animals and plants; living state; living things and their movements; energy or vivacity; events of individual's existence or written story of them; the business and pleasures of the world. जीव, चैतन्य; सजीव स्थिति; संसार; उमेद; चरित्र; संसारयात्रा. *Life assurance*, insurance of one's life. आयुष्याचा विमा. *L.-belt*, a belt of buoyant material to support body in water. (पाण्यांत) तरंगत ठेवणारा पट्टा. *L. blood*, जीवनाला आवश्यक रक्त; जीवनतत्त्व. *L. buoy*, an appliance for keeping person afloat, तरंगत ठेवणारा भोंवरा. *L. Guards*, two House-hold cavalry regiments, घोडेस्वारांचीं दोन पथकें (हुजरातीचीं). *L. preserver*, a short stick with loaded end. प्राणरक्षक लहान दंडुका. *Life-rent*, तहाहयात उत्पन्न. *Life-sentence*, जन्मठेपीची शिक्षा. *L.-size*, पूर्ण आकाराचा. *L.-time*, आयुष्य, हयात. *A matter of life and death*, जिवावरचा, आणीबाणीचा, निकराचा प्रश्न, गोष्ट. *To come-bring-to life*, शुद्धीवर येणें,-आणणें. *cannot for the life of me*, प्राणावर बेतलें तरी. *A cat has nine lives*, a cat is hard to kill, मांजराला ठार मारणें कठीण. *To bring into life*, जन्म देणें, जन्मास घालणें. *To enter into public life*, सार्वजनिक कामांत जीवनांत-शिरणें. *To rise against one's life*, जिवावर-प्राणावर-उठणें. *Eternal*, *everlasting*, *life*, मुक्ति, मोक्ष.

Life'less, *a.* (लाइफ्-लिस्)—dead; lacking in animation, destitute of vigour or spirit. मृत; निर्जीव.

Life'like, *a.* (लाइफ्-लाइक्)—realistic or vivid, true to the life. जिवंत मनुष्यासारखा, यथावस्तु, हुबेहुब.

Lift, *v. t. & i.* (लिफ्ट्)—to raise to higher level to take up; to hoist, to elevate, to raise to a position; to steal, to plagiarize; (of cloud, darkness etc.) to cease to obstruct; to pay (mortgage) and so take up. वर उचलणें; उचलून घेणें; वर चढवणें; चोरून नेणें, उपटणें, उचलणें, लेखनचौर्य करणें; (ढग, काळोख) उचलणें, नाहींसा होणें, दृष्टीआड होणें; गहाण सोडवणें. *n.* lifting; apparatus for raising and lowering people from floor to floor. वर उचलणें, उन्नति; एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर चढविणारें किंवा खालीं आणणारें यंत्र,-साधन, पाळणा, लिफ्ट. *To lift up* or *l.* one's *hands* or *heart*, (शपथ घेण्याकरितां) हात वर करणें. *To l. one's hand*, शपथ घेणें. *To l. a hand (to do)*, अल्पसा प्रयत्न करणें. *never lifted a hand against one*, never struck him. कधींहि (मारण्यासाठीं त्याला) हात लावला नाहीं. *To l. up* one's *head*, आजारांतून उठणें; डोकें वर काढणें, उदयास येणें, वैभवाला चढणें, आनंदित होणें. *To l. up* one's *heel*, to kick, लाथ मारणें, पाय उगारणें. *To l. up* one's *horn*, महत्त्वाकांक्षा बाळगणें, गर्विष्ठ बनणें *To l. up a cry*, one's *voice*, to cry out मोठ्यानें ओरडणें,-आवाज करणें. *To give* one *a lift*, to take him up into vehicle for part of the way. वाटेंत एकाद्याला आपल्या गाडींत घेऊन पोंचविणें, मदत करणें.

Lĭg'ament, *n.* (लिं'गमेंट्)—tough fibrous tissue binding bones together, band, fastening. अस्थिबंधन.

Lĭg'ature, *n. & v. t.* (लि'गेचर्)—tie or bandage. बंधन, पट्टी (नें बांधणें).

Light, *n.* (लाइट्)—the natural agent that makes things visible; a burning candle; brightness of eyes or aspect; mental illumination. प्रकाश; दिवा, उजेड; डोळ्यांतील वगैरे तेज; ज्ञान.

a. having plenty of light; pale, not deep; not heavy, of little weight; easy to wield or digest or do; not ponderous; elegant; not grave or important, trivial; inconstant; loose; not dense or tenacious. प्रकाशमय; फिकट, हलका; पेलण्याला किंवा पचण्याला हलका; अविचारी; छचोर, आनंदी; क्षुद्र; अस्थिर; ढिला; पातळ, विरळ. *v. t. & i.* to set burning; to begin burning; to show the way with a light; to brighten with animation, to enlighten, to kindle; to come by chance upon. दिवा लावणें, पेटवणें; पेटणें; उजेड दाखविणें; प्रफुल्लित होणें; सहजगत्या येणें,-दिसणें. *To come, bring, to light*, उघडकीस येणें,-आणणें. *To see the l.*, जन्माला येणें, बाहेर येणें, प्रसिद्ध होणें. *L. of one's eyes, a beloved person.* प्रिय मनुष्य. *To throw, shed, light upon*, (एखाद्या गोष्टीवर) अधिक प्रकाश पाडणें, माहिती सांगणें. *In the l. of*, च्या अनुरोधानें; च्या सारखा. *In a good l.*, चांगली उठावदार दिसेल अशी, चांगल्या उजेडांत. *To strike a l.*, (काडी वगैरे) पेटविणें. *L. due,-duty*, a toll on ships for maintaining *l. houses & l. ships*, दीपगृहांच्या व दीपदर्शक जहाजांच्या खर्चासाठीं जहाजांवरील कर. *To stand in* one's *light*, (च्या) मार्गांत येणें, अडथळा करणें, हिताच्या आड येणें. *In this light*, अशा दृष्टीनें,-रीतीनें. (*Pl.*) *We have many new lights upon it since then*, नवीन नवीन गोष्टी आमच्या नजरेस आल्या. *According to one's lights*, आपल्या बुद्धीप्रमाणें. *Lit up*, (U.S.) drunk. प्यालेला, झिंगलेला. *Light-fingered*, (said of pickpockets etc.) हाताळ, चोरटा, खिसेकापू. *L. headed*, चावचळलेला, भ्रांतबुद्धि; अविचारी. *L. horse*, आडहत्यारी घोडेस्वार. *L. infantry*, सुटसुटीत पायदळ. *L. -minded*, हलक्या मनाचा, क्षुद्र. *Light o' love*, wanton woman, व्यभिचारी स्त्री. *L. weight*, a person under average weight. (वजनानें) हलका मनुष्य. (*pa. t. & pa. p. Lighted* or *lit*).

Light'en, *v. t. & i.* (लाॅ'इटन्)—1. to make or grow lighter; to reduce weight of; to relieve of care; to mitigate. हलका करणें-होणें; (चा) भार कमी करणें, काळजी दूर करणें; कमी करणें. 2. to suffuse with light or shed light on; to emit lightning; (of eyes) to flash. प्रकाशित करणें. (वर) प्रकाश पाडणें; (वीज) चमकणें; लकाकणें, चकाकणें.

Light'er, *n.* (लाॅ'इटर्)—a flat-bottomed or other boat for shifting goods between ship and land, etc. सामान उतरण्याचा व चढवण्याचा उघडा पडाव. *Light'erage*, *n.* fees for such shifting. पडावांतून मालाची उतरणावळ.

Light'hearted, *a.* (लाॅ'इट्-हार्टेड्)—free from grief or anxiety, gay, untroubled. आनंदी, उल्हासी.

Light'house, *n.* (लाॅ'इट्-हाउस्)—a structure with beacon light for guiding or warning ships. दीपगृह, दीपस्तंभ.

Light'ning, *n.* (लाॅ'इट्-निंग्)—discharging of electricity from cloud to cloud or ground. वीज. *Lightning conductor* or *rod*, a metal rod or wire fixed to a building to divert lightning to earth. इमारतीवरील विद्युद्वाहक धातूचा दांडा किंवा तार. *L. strike*, a labour strike without legal notice by way of surprise. आकस्मिक (विद्युद्वेगानें पसरणारा) कामगारांचा संप

Lights, *n. pl.* (लाइट्स्)—lungs of animals as food. जनावरांचीं फुप्फुसें.

Light'some, *a.* (ला'इट्सम्)—1. gracefully light; merry, agile. उल्हासी, आनंदी, रंगेल. 2. (*rare*) light-giving, luminous, well-lighted, bright. प्रकाशमय, उजेडाचा, तेजस्वी.

Lign-al'oes, *n.* (लाइनॅ'लोझ्)-aloes-wood. अगरुवृक्ष.

Lig'neous, *a.* (लि'ग्निअस्)—of the nature of wood; wooden, made of wood, having wood. लांकडासारखा; लांकडाचा; काष्ठमय.

Like, *a.* (लाइक्)—resembling another or the original. सारखा, सदृश. *prep.* in the manner of; to the same degree as. प्रमाणें; सारखें. *adv.* in the same manner. त्याचप्रमाणें. *n.* counterpart, equal; a like thing or person; (*pl.*) likings. दुसरा सारखा-जोड-भाग; सारखी वस्तु किंवा व्यक्ति; (अने०) आवड. *v. t.* to find agreeable or satisfactory; to feel attracted by. पसंत पडणें; आवडणें. *Like father like son*, बाप तसा बेटा. *To feel like working*, काम करावेंसें वाटणें. *L.-minded*, सारख्या स्वभावाचे. *L. a shot*, willingly, regardless of consequences, कुरकुर न करतां, मनापासून. *The likes of me*, persons so humble as I. माझ्यासारखे सामान्य लोक. *The likes of you*, (colloq.) persons so distinguished like you. आपल्यासारखे थोर लोक. *Likes and dislikes*, आवडी निवडी.

Like'lihood, *n.* (ला'इक्-लिहुड्)-probability. संभव, रंग, सुमार.

Like'ly, *a.* (ला'इक्-लि)—probable; such as may well happen or prove to be true; promising, apparently suitable. संभवनीय; विश्वसनीय.

होतकरू, बोरप, *adv.* probably, as may be expected. बहुधा, बहुतकरून.

Li'ken, *v. t.* (ला'इकन्)—to represent as comparable or similar to. सारखा करणें,-मानणें; तुलना करणें.

Like'ness, *n.* (ला'इक्-निस्)—resemblance; semblance; portrait. सादृश्य; रूप, आकार; तसबीर, चित्र.

Like'wise, *adv.* & *conj.* (ला'इक्-वाइझ्)—similarly; also, moreover. त्याचप्रमाणें, सुद्धां, आणखी.

Li'king, *n.* (ला'इ-किंग्)—one's taste; regard or taste or predilection for. आवड, अभिरुचि, कल.

Li'lac, *n.* (ला'इलॅक्)—a flowering shrub, a pale violet coloured flower. एक फुलझाड; (त्याचें) अस्मानी फिकट जांभळ्या रंगाचें फूल. *a.* lilac-coloured. फिकट जांभळ्या रंगाचें.

Lillipu'tian, *a.* & *n.* (लिलिप्यू'शन्)—a native of Lilliput; pygmy, dwarf, a person of very small size. लिलिपुट बेटांतील रहिवासी; ठेंगू मनुष्य, वामनमूर्ति. [*Lilliput* in *Gulliver's Travels*, *-ian*]

Lilt, *v. t.* & *i.* (लिल्ट्)—to sing with rhythmical effect. तालसुरावर गाणें, गळ्यावर गाणें. *n.* such effect; song marked by it. तालसूर; गळ्यावर गाइलेलें गाणें.

Lil'y, *n.* (लि'लि)—kinds of plant with showy and fragrant flower; the fleur-de-lis. भुई-कमळ, दिसण्यांत सुंदर व सुवासिक फुलें असलेलें फुलझाड; कमलपुष्प. *Lily of the valley*, a spring flower of small white bells, लहान पांढऱ्या घंटावजा पाकळ्यांचें वसंतऋतूंतील फूल. *Lilies & roses*, fair complexion. सुंदर गौरवर्णी चेहरा. *The lilies*, फ्रान्स देशाच्या जुन्या बुर्बोन राज-घराण्याचें राजचिन्ह. *Lily mind,-hand*, गोरी पान मुलगी,-शुभ्र कोमल हात. *Lily-livered*, cowardly, भ्याड, भित्रा. *L. white*, as white as a lily, लिलीप्रमाणें शुभ्र. *Li'lied*, *a.*

Limb, *n.* (लिम्)—a leg, arm, or wing; the main branch of a tree; 2. (Astr.) specified edge of sun, moon, etc.; edge of surface; expanded part of petal, leaf etc. पाय, हात किंवा पंख; झाडाची मुख्य फांदी; कडा; किनार; पाकळीचें-पानाचें-टोक इ०. *v. t.* to disable, to pull to pieces. शक्तिहीन करणें, तुकडे करणें. *To escape with life & limb*, without grave injury. विशेष दुखापत न होतां निसटणें. *L. of the devil* or *Satan*, खोडकर मूल. *L. of the law*, वकील, पोलीस इ०.*-limbed*, *a.* अंगी, सावयव. *Limb'less*, *a.* अवयवरहित, निरवयव.

Lim'ber, *a.* (लिं'बर्)—1. easily bent, yielding, flexible; lithe, agile. लवचीक; चपळ. *L. neck*, *n.* a disease of poultry. कोंबड्यांचा आजार. 2. *n.* a detachable front of gun-carriage. तोफगाडीची, अलग करतां येणारी, बैठक. *v. t.* to attach limber to gun. तोफगाडीच्या बैठकीवर तोफ बसविणें.

Lime, *n.* (लाइम्)—fruit of lemon kinds. लिंबू, *L. tree*, लिंबाचें झाड, लिंबुणी, लिंबुणि. *L. juice*. लिंबाच्या रसाचें पेय. *Li'mey*, *n.* (*sl.*) इंग्लिश खलाशी.

Lime, *n.* (लाइम्)—white caustic substance got by burning kinds of rock. चुना. *v. t.* to smear (twigs) with bird-lime; to snare (birds) thus; to treat with lime. (डहाळ्यांना) चिकटा लावणें; चिकटा लावून पक्षी पकडणें; चुना लावणें. *Lime-stone*, चुनखडी.

Lime'kiln, *n.* (ला'इम्-किल्न्)—a furnace for making lime. चुन्याची भट्टी, चुना तयार करण्याची भट्टी, चुनेभट्टी.

Lime'light, *n.* (ला'इम्-लाइट्)—intense light given by heating lime; (*fig.*) glare of publicity. चुन्याच्या उष्णतेच्या योगानें पडलेला प्रखर प्रकाश; प्रसिद्धि, लौकिक.

Lim'it, *n.* (लि'मिट्)—a bounding line; a terminal point; a bound that may not or cannot be passed. मर्यादा; हद्द, सीमा; शेवटची मर्यादा. *v. t.* to set limits to; to serve as a limit to; to restrict. मर्यादा घालणें; मर्यादित करणें; आळा घालणें. *L. man*, a competitor receiving maximum start in a handicap. शर्यतींत जास्तींत जास्त सवलत मिळालेला खेळाडू. *Lim'itary*, *a.* restrictive, नियामक, मर्यादा घालणारा. *Limited company*, भागीदारांची नियमित (जोखमाची) कंपनी (संस्था). *Limited monarchy*, नियंत्रित राजसत्ता (opp. *absolute*, अनियंत्रित). *Lim'itless*, *a.* मर्यादा नसलेला. *Lim'itative*, *a.* मर्यादा--नियंत्रण घालणारा. *Limited*, *pa. p.* scanty. अल्प, बेताचेंच.

Limita'tion, *n.* (लिमिटे'शन्)—limiting; limited condition or disability. मर्यादा; इयत्ता, मुदत.

Limn, *v. t.* (लिम्)—to paint (picture); to portray. (चित्र) रंगविणें; (चित्र) काढणें. *Lim'ner*, *n.* (लि'मर्), चित्रकार, चितारी.

Lim'ousine, *n.* (लि'मुझीन्)—a motor-car with closed body and roof over the driver. बंदिस्त व आच्छादित मोटार गाडी.

Limp, *v. i.* (लिम्प्)—to go with a lame gait; to halt. लंगडत चालणें; थांबणें, थबकणें, अडखळणें. *n.* a lame walk. लंगडत चाल,-चालणें. *a.* flexible,

pliant, neither stiff nor springy; without energy. लवचीक; शक्तिहीन. *Limp'ingly, adv.* अडखळत, लंगडत लंगडत. *Li'mply, adv.* लवचीकपणें. *Limp'ness, n.* लवचीकपणा, अशक्तता.

Lĭm'pĕt, *n.* (लि'म्पिट्)—a tent-shaped shell-fish sticking tight to a rock; (fig.) a person, esp. State employee, who clings to office. तंबूच्या आकाराचा, खडकाला चिकटून राहणारा (कालव, खेंकडा वगैरे प्राणी); नोकरीला चिकटून राहणारा इसम.

Lĭm'pĭd, *a.* (लि'म्पिड्)—transparently clear, translucent, pure (of liquids, atmosphere, eyes, literary style). स्फटिकासारखा स्वच्छ, निवळ, नितळ, शुद्ध. *Lim'pidly, adv.; Limpi'dity, Lim'pidness, nn.* स्वच्छपणा, निवळपणा.

Lĭnch'pĭn, *n.* (लिं'च्-पिन्)—pin passed through axle-end to keep wheel on, axle-pin. गाडीच्या चाकाची खीळ.

Lĭn'den, *n.* (लि'न्-डेन्)—the lime-tree. लिंबाचें झाड.

Līne, *n.* (लाइन्)—a piece of cord; a long narrow mark; a row of persons or things; lineage; a track or course or direction; a limit or boundary; contour or outline; the equator; a measure of 12th of an inch; (pl.) driving reins; set of field-works or boundaries of encampment; regular regiments, esp. infantry. दोरी, सुतळ; ओळ, रेघ; मनुष्यांची किंवा वस्तूंची रांग; वंशावळ; मार्ग, दिशा; सीमा, मर्यादा, हद्द; बाह्यरेषा; विषुववृत्त, भूमध्यरेषा; इंचाच्या 1/12 माप; (अने०) लगाम; खंदक, मोर्चा, छावणी, सैन्याच्या तळाची मर्यादा; पायदळ. *v. t. & i.* to mark with lines; to post men or take post or stand at intervals along a road, hedge, &c.; to put in the inside of, to put lining into, to serve as lining of. रेघा काढणें; रांगेनें उभें करणें; अस्तर घालणें. *Hard lines*, bad luck, hardship. दुर्दैव, कठीण प्रसंग, हाय हाय! *To give one line enough*, एकाद्याला तात्पुरती मुभा देणें (नंतर तावडींत धरण्यासाठीं). *By rule & l.*, with precision. यथासूत्र, अचुक बरोबर. *Line drawing* or *engraving*, टांकानें किंवा पेन्सिलीनें रेखा-रेघा-चित्र काढणें,-खोदणें. *L. of life*, fortune, दीर्घायुष्य-भाग्य-दर्शक हस्तरेषा. *To toe the line*, (*fig.*) to accept party programme, एकाद्या पक्षाच्या कार्यक्रम मान्य करणें. *To read between the lines*, to detect hidden meaning in document, speech etc., लिहिण्यांतील, भाषणांतील, गुप्त हेतु (गर्भितार्थ) शोधून काढणें. *To line through*, to cross out, खोडणें, खोडून टाकणें. *Every cloud has a silver lining*, there is good in every evil. वाइटांतून चांगलें निघतेंच. *Lines'man*, a soldier of line regiment; an umpire's assistant. पायदळाचा शिपाई; (खेळांतील) लवादाचा-मध्यस्थाचा-मदतनीस.

Lĭn'ĕage, *n.* (लि'निएज्)–descent, pedigree, race, progeny, family, house. वंश, वंशपरंपरा.

Lĭn'ĕal, *a.* (लि'निअल्)—in the direct line of descent or ancestry. वंशपरंपरागत, आनुवंशिक. *Lin'eally, adv.* वंशपरंपरेनें.

Lĭn'ĕament, *n.* (लि'निअमेन्ट्)–(*usu. pl.*) distinctive feature(s) or characteristic(s) (esp. of the face); feature, form, make. आकृतिविशेष; ठेवण, आंगलट.

Lĭn'ĕar, *a.* (लि'निअर्)—of or in lines; long and narrow and of uniform breadth. ओळीचा, रेषारूप; सारख्या रुंदीचा अरुंद व लांबट. *Lin'early, adv.*

Lĭn'ĕn, *a.* (लि'निन्)—made of flax, resembling linen cloth. तागाचें. *n.* linen cloth. तागाचें कापड.

Lĭn'ĕn-drāper, *n.* (लि'निन्-ड्रेपर्)—a person who deals in linen, calico, &c. तागाचें कापड विकणारा,-कापडव्यापारी.

Lī'ner, *n.* (ला'इनर्)—a ship of a line of passenger-ships, a vessel belonging to a line. उतारूंचें गलबत, एकाद्या कंपनीचें जहाज (आगबोट).

Lĭng, *n.* (लिंग्)—a sea-fish; kinds of heather. एक समुद्रांतला मासा; एक प्रकारचीं झुडुपें.

Lingerie, *n.* (लँझरी)—linen articles; women's underclothing. तागी वस्तु; स्त्रियांचें अंतःप्रावरण, आंतील चड्डी, झगा वगैरे. [*French*]

Lĭng'ō, *n.* (लि'ङ्गो)—foreign language; queer way of talking. (परकी) बोली, भाषा; घेडगुजरी भाषा.

Lĭng'ua fra'nca, *n.* (लि'ङ्ग्वा फ्रँ'न्का)—any mixed jargon serving as medium of instruction. सर्वसामान्य-घेडगुजरी-भाषा, राष्ट्रव्यवहारभाषा.

Lĭng'er, *v. i.* (लिं'गर्)—to be slow to depart; to seem long; to stay about, to dally; to be protracted. रेंगाळणें; लांबसा वाटणें; इकडे तिकडे वेळ घालवणें; लांबवणें. *Ling'erer, n.* चेंगट, चेंगट्या, सुस्त. *Ling'eringly, adv.* रेंगाळत, रखडत रखडत. *A lingering disease*, रेंगाळणारें दुखणें.

Lĭng'ual, *a.* (लिं'ग्वल्)–pronounced by the tongue, of the tongue, of speech. जिह्वेसंबंधीं, भाषणाचा, मूर्धन्य.

Lĭn'guist, *n.* (लिं'ग्विस्ट्)—a person skilled in foreign languages. परकीयभाषाकोविद, अनेक भाषा जाणणारा. *Lingui'stic*, *a.* भाषाविषयक, भाषेसंबंधीं.

Lĭn'iment, *n.* (लि'निमन्ट्)—a liquid for rubbing into an affected part, embrocation. चोळण्याचें औषध.

Lī'nĭng, *n.* (ला'इनिंग्)—a layer of material applied to the inside of a garment, &c. कापडाचें वगैरे अस्तर, मढवणी, मढण.

Lĭnk, *n.* (लिंक्)—one loop or ring of a chain or of knitted work, &c.; member of a series; a measure of 7·92 in.; (hist.) a torch made of tow and pitch. कडी; दुवा, बंधन; ७·९२ इंचाचें माप; मशाल, दिवटी. *Link-boy*, *L.-man*, मशालजी, दिवट्या. *v. t. & i.* to connect, to join together; to clasp or intertwine. एकत्र करणें, जोडणें; जुळणें. *Link'age*, *n.*

Lĭnks, *n. pl.* (लिंक्स्)—ground on which golf is played; sandy ground near sea-shore. 'गोल्फ' नांवाचा खेळ खेळण्याचें मैदान; समुद्रकांठचें वाळवंट.

Lĭnn, *n.* (लिन्)—(chiefly Scotch) a waterfall; pool below this; a precipice, ravine. धबधबा; त्याखालील जलसंचय; कडा, दरी.

Lĭnn'ĕt, *n.* (लिं'निट्)—a song-bird. एक गाणारा पक्षी.

Lĭnō'leum, *n.* (लिनो'लिअम्)—(also *lino*, abbreviated) floor-covering of canvas thickly coated with a preparation of linseed. जमिनीवर आंथरण्याचें एक प्रकारचें तागी कापड.

Lī'notȳpe, *n.* (ला'इ-नोटाइप्)—a machine producing stereotyped lines of type. आपोआप टाइपांच्या-टंकांच्या-ओळी ज्याच्यावर तयार होतात तें यंत्र. [=line o' type]

Lĭn'seed, *n.* (लिं'न्सीड्)—seed of flax. अळशी, तागाचें बीं. *L. cake*, जवसाची पेंड. *L. meal*, जवसाचें पीठ.

Lĭn'stŏck, *n.* (लि'न्स्टॉक्)—a staff holding match for firing a gun. (तोफ डागण्याकरितां) तोडा, बत्ती.

Lĭnt, *n.* (लिन्ट्)—flax, linen with one side made fluffy by scraping. जखमेवर पट्या वगैरे बांधण्याकरितां एक जातीचें मऊ तागाचें कापड.

Lĭn'tel, *n.* (लिं'न्टल्)—wood or stone across top of door or window. दरवाजाची वरील चौकट. *Lin'telled*, *a.*

Lī'on, *n.* (ला'यन्)—a large carnivorous beast noted for his courage; a sign of the zodiac; a courageous person; a famous or conspicuous person much sought after. सिंह; सिंहरास; सिंहासारखा शूर-पराक्रमी-पुरुष; विलक्षण-असामान्य-पुरुष. *Lion in the way* or *path*, (काल्पनिक) अडथळा. *L.'s mouth*, धोक्याची स्थिति. *L.'s share*, फारच मोठा व श्रेष्ठ हिस्सा,-भाग. *L.'s skin*, धैर्याचा खोटा आव. *To twist lion's tail*, to defy or insult England. इंग्लंडला तुच्छ लेखणें, ०चा अपमान करणें. *Lion-hearted*, *a.* निधड्या छातीचा. *To see, show, the lions*, (शहरांतील) प्रेक्षणीय गोष्टी पाहणें,-दाखविणें. *Lion hunter*, मोठ्या लोकांच्या कच्छपीं लागणारा. *The British Lion*, ब्रिटिश सिंह (राष्ट्र). *Li'oness*, *n. f.* सिंहीण, सिंही. *To li'onize*, *v. t. & i.* to treat person as a celebrity. एकाद्याचा चढेजाव वाढवणें, दिव्हारे माजवणें.

Lĭp, *n.* (लिप्)—either edge of the opening into the mouth; brim of a vessel; saucy talk, impudence. ओंठ; (भांड्याचा) कांठ; उर्मट भाषण. *v. t.* to touch with lips, to apply lips to; (*of* water) just to touch, lap; to murmur. ओठांनीं स्पर्श करणें, मुका घेणें; (पाण्याचा) स्पर्श होणें, वरून जाणें; मृदु आवाज होणें; तोंडांतल्या तोंडांत-ओंठांतल्या ओंठांत,-बोलणें. *To open* one's *lips*, बोलणें, बोलूं लागणें. *To pass* one's *lips*, ओंठाबाहेर-तोंडावाटे-(शब्द) निघणें. *To hang the l.*, हिरवटपणें-हिरमुसलें-बसणें. *To lick, to smack*, one's *lips*, तोंडाला पाणी सुटणें *lip-*, *from the lips only*, professed, not sincere. कृत्रिम, दिखाऊ. (*lip-service*, वरपांगी सेवा, भक्ति; *lip-homage*, वर वर दाखवलेली-कृत्रिम-शाब्दिक-स्वामिनिष्ठा). *L. deep*, उथळ, मनापासून नसलेला. *L. language*, (बहिऱ्या मुक्यांसाठीं) ओंठांची भाषा. *Lip-salve*, सुजलेल्या ओंठासाठीं मलम; खुषामत. *Lip-stick*, a stick of cosmetic for roughing lips. ओंठशलाका, ओंठ रंगविण्यासाठीं सुगंधी कांडी *Lip-sympathy*, शाब्दिक, वरपांगी,-सहानुभूति. *Lipped*, *a.* ओंठाचा, वळलेल्या कांठाचा.

Lĭp'per, *n.* (लि'पर्)—(naut.) rippling or ruffled motion, surface roughness, of the sea. समुद्राच्या पृष्ठभागावरील लाटांची हालचाल, खळखळाट, लाटा.

Lĭquāte', *v. t.* (लिक्वे'ट्)—to separate or purify (metals) by liquefying. वितळवून (धातु) वेगळी करणें,-शुद्ध करणें.

Lĭ'quefy, *v. t. & i.* (लि'क्विफाइ)—to make or become liquid, to melt, to dissolve by heat. पातळ करणें, वितळविणें. *Liquefac'tion*, *n.* पातळ करणें, द्रवीकरण.

Lĭquĕs'cent, *a.* (लिक्वे'सन्ट्)—being liquid. पातळ होणारा, द्रवणारा, द्रविष्णु.

Liqueur', *n.* (लिक्यूर्')—kinds of strong alcoholic liquor. जहाल दारू.

Liq'uid, *a.* & *n.* (लि'क्विड्)—having a consistence like that of water or oil; (of sounds) fluent, not discordant; one of the letters l, r, m, n; not fixed, unstable. प्रवाही (पदार्थ), द्रवरूप; द्रवरूप, जलरूप; कोमल, मृदु, सुस्वर (स्वर); एल्, आर्, एम्, एन् पैकीं एक अक्षर; अस्थिर, चंचल.

Liq'uidate, *v. t.* & *i.* (लि'क्विडेट्)—to settle, to pay off (a debt); to wind up the affairs of (a company, &c.) कर्ज फेडणें; (कंपनीचे) सर्व व्यवहार आटोपते घेणें. *Liq'uidator*, *n.* (बुडत्या कंपनीचा) देण्याघेण्याचा व्यवहार पाहणारा अधिकारी.

Liquida'tion, *n.* (लिक्विडे'शन्)—process of winding up affairs; settling and adjusting debts. निरवानिरव; कर्जाची व्यवस्था व फेड करणें. *To go into l.*, दिवाळें काढणें.

Liq'uor, *n.* (लि'कर्)—alcoholic or other drink. दारू, मद्य. *In l.*, *the worse for l.*, दारू प्यालेला, झिंगलेला. *v. t.* & *i.* (चामडें, जोडे) कमावणें; (सातू) पाण्यांत भिजविणें, आंबविणें. To *l. up*, *to l.*, दारू-मद्य-पिणें.

Liq'uorice, *n.* (लि'करिस्)-black substance used in medicine and as sweetmeat; plant from whose root it is obtained. ज्येष्ठमध, रतनगुंज. [L *liquiritia*, Gk. *glukus*, sweet, & *rhiza*, root]

Lira, *n* (ली'अरा)—an Italian frank coin. इटालिअन नाणें (महायुद्धापूर्वी १० पेन्स किंमतीचें).

Lisp, *v. i.* & *t.* & *n.* (लिस्प्)-to fail to pronounce the sibilants (*s*, *z*, *sh*) clearly, to speak imperfectly. बोबडें बोलणें, अस्पष्ट-अडखळत-बोलणें.

Liss'om, *a.* (लि'सम्)—lithe, agile. सुटसुटीत, चपळ.

List, *n.* (लिस्ट्)-(*pl.*) tilting-ground; roll or catalogue or inventory; a border of cloth. रंगण, आखाडा; याद्दी, नांवनिशीवार याद्दी; किनार, कांठ. *v. t.* & *i.* to enter in a list; to be pleasing to; to be inclined to do; to lean over to one side; (arch.) to listen (to). याद्दींत नांव दाखल करणें; आवडणें; मर्जीस येणें; एका बाजूला कलणें; ऐकणें, लक्ष,-कान,-देणें.

Li'sten, *v. i.* (लि'सन्)—to make effort to hear something; to give ear to. ऐकण्याचा प्रयत्न करणें; कान देणें. *To listen in*, to tap telephonic communication; to use broadcast receiver. टेलिफोनवर बोलणें,-ऐकणें; ध्वनिग्राहकानें (आकाशवाणीवर) भाषणें ऐकणें, रेडिओवर ऐकणें. *Li'stener*, *n.* (लि'स्नर्) श्रोता.

List'less, *a.* (लि'स्ट्-लिस्)—without inclination or energy; languid. उदासीन, निःस्पृह; सुस्त.

Lit, *pa. t.* & *pa. p.* of Light.

Lit'any, *n.* (लि'टनि)—a solemn public prayer. शांतिप्रार्थना, शांतिपाठ, अरिष्टशांत्यर्थ सामुदायिक प्रार्थना.

Litchi, *n.* (लीट्शी')—a tree, or its fruit, orig. from China, grown in Bengal. बंगालमधील एक फळ-झाड.

Lit'eracy, *n.* (लि'टरसि)—ability to read and write. लिहितां वाचतां येण्याची पात्रता, साक्षरता.

Lit'eral, *a.* (लि'टरल्)—of the letters or a letter; exactly corresponding to the original, giving words their ordinary sense. अक्षराचा; शब्दशः किंवा अक्षरशः (अर्थ). *Lit'eralism*, *n.* मूळ अक्षराला-अक्षरशः अर्थाला-चिकटून राहणें.

Lit'erary, *a.* (लि'टररि)—of or constituting or concerned with literature. विद्याविषयक, विद्याव्यासंगी, वाङ्मयप्रेमी.

Lit'erate, *a.* & *n.* (लि'टरेट्)—lettered, learned, able to read and write. लिहितां वाचतां येणारा, साक्षर.

Litera'ti, *n. pl.* (लिटरे'टाइ)—the lettered or learned. पंडितमंडळ, विद्वत्समाज.

Litera'tim, *adv.* (लिटरे'टिम्)—letter for letter. शब्दास शब्द, शब्दशः, अक्षरशः.

Lit'erature, *n.* (लि'टरेचर्)—books and written composition valued for form and style; the realm of letters; (colloq.) printed matter. उत्तम पुस्तकें-ग्रंथ किंवा लेख; वाङ्मय; छापील मजकूर. *Light literature*, मनोरंजक कल्पित ग्रंथ,-पुस्तकें, कल्पित गोष्टी.

Lithe, *a.* (लाइद्)—pliant, supple; flexible, easily bent. लवचीक; सहज वांकणारा, वळणारा. *Lithe'some*, चपळ, हुशार, तरतरीत. *Lithe'ness*, *n.* लवचीकपणा, नरमाई.

Lith'ograph, *v. t.* (लि'थग्राफ्)—to engrave or draw on stone and print impressions from it. शिळाछापावर खोदून छापणें. *n.* such impression. शिळाछाप. *Lithog'rapher*, *n.* (लिथॉ'ग्रफर्) शिळाछापाचें काम करणारा. *Lithograph'ic*, *a.* (लिथग्रॅ'फिक्) शिळाछापासंबंधीं.

Lithog'raphy, *n.* (लिथॉ'ग्रफि)—the art or process of engraving on stone and printing impression from it. शिळाछापाची कला,-विद्या.

Lithot'omy, *n.* (लिथॉ'टमि)—(surg.) cutting operation for stone in the bladder. मूतखड्यावरील शस्त्रक्रिया.

Lit'igant, *a.* (लि'टिगन्ट्)—disposed to litigate, engaged in lawsuit. वादी, वाद सांगणारा. *n.* party to a law-suit. पक्षकार, वादी.

Lit'igate, *v. i. & t.* (लि'टिगेट्)—to go to law for decision; to contest at law. न्याय मागणें; दावा घालणें,-लावणें, वाद सांगणें,-खेळणें.

Liti'gious, *a.* (लिटि'जस्)—fond of litigation; contentious. भांडखोर, कज्जेखुलाल; वाद सांगण्यासारखा, वादाचा.

Lit'mus, *n.* (लि'ट्मस्)—blue colouring-matter got from lichens. लायकेन पत्रस्पतीपासून काढलेला निळा (जांभळा) रंग. *L.-paper*, (ॲसिडें-क्षार-ओळखण्याचा) लिट्मस (-रंगीत) कागद.

Litre, *n.* (ली'टर्)—a unit of capacity in metric system (about 1¾ pints). (सुमारें) 1¾ पिंटचें माप.

Lit'ter, *n.* (लि'टर्)—carrying-couch used as a carriage; a heap of straw (for animals to lie upon); the young brought forth at a birth; odds and ends lying about. डोली, पाळणा; (गुरांकरितां) गवताची शय्या, गवताचा बिछाना; वीण, वेत; केरकचरा, पडझड, घाण. *v. t. & i.* to provide (horse etc.) with litter; to make place untidy; to bring forth young. गवती बिछाना तयार करणें; केरकचरा टाकून अस्वच्छ करणें; विणें.

Litterateur, *n.* (लीटेरा'टर)—a man of letters. विद्वान मनुष्य. [*French*]

Lit'tle, *a.* (लि'टल्)—not great or big; small in quantity; short in stature or distance or time; unimportant; paltry or mean. लहान; थोडा; ठेंगणा; अल्प; क्षुद्र. *n.* or *pron.* only a small amount. अल्पांश. *adv.* to a small extent only; not at all. अंमळ, किंचित्; मुळींच नाहीं. *The little finger*, करंगळी. *Little ones*, children or cubs etc. मुलें, मुलेंबाळें, पिलें इ०. *The l. people*, fairies. परी, कल्पित देवता. *A little*, थोडा, थोडका, कांहींसा, थोडा (वेळ). *The l.*, क्षुद्र माणसें; लहान गोष्ट,-वस्तु. *In little*, अल्पांशानें, लहान प्रमाणावर. *l. Englander*, ग्रेट ब्रिटननें आपल्या वसाहतींची वगैरे जबाबदारी पतकरावी हें तत्त्व प्रतिपादणारे (उदारमतवादी) (opp. imperialist). *l. go*, (colloq.) केंब्रिज विश्वविद्यालयांत बी. ए. च्या शिक्षणक्रमांतील पहिली परिक्षा. *l. Mary*. (colloq.) the stomach, उदर, पोट. *Litt'leness*, *n.* लहानपणा, कोतेपणा, क्षुद्रता. *By l. & l.*, *l. & l.*, by degrees, हळूहळू, अंशाअंशानें, क्रमाक्रमानें. (*Little*, *less* or *lesser*, *least*; also *smaller*, *smallest*, *Comparat. & Superl.*).

Li'ttoral, *a.* (लि'टरल)—of or on the shore; close to the sea. तीरस्थ, समुद्रकिनाऱ्याचा; समुद्रकांठचा, सहीचा. *n.* littoral district of a country. समुद्रकांठचा प्रदेश. [L *litus oris*, the shore]

Lit'urgy̆, *n.* (लि'टर्जि)—a Church's formularies for public worship. ख्रिस्ती सार्वजनिक प्रार्थनाविधी. *Litur'gical*, *a.*

Liv'able, *a.* (लि'व्हेबल्)—(of house, room, climate, etc.) fit to live in; (of life) worth living; easy to live with. राहण्याला योग्य; जगण्यास योग्य; सहवासयोग्य.

Live, *v. i. & t.* (लिव्ह्)—to have life; to be or continue alive; to pass or spend; to dwell; to subsist *up, upon*; to conduct oneself in a specified way; to enjoy life to the full. जिवंत असणें; जिवंत राहणें, जगणें; आयुष्य कंठणें; राहणें, वसति करणें; गुजराण करणें; ठराविक मार्ग क्रमणें-पद्धतीनें वागणें; पूर्ण उपभोगणें, जीविताचें सार्थक करणें. *Living wage*, जगण्यापुरती मजुरी-उत्पन्न,-पगार. *Live & let live*, दुसऱ्याच्या दोषांकडे कानाडोळा करा (म्हणजे ते आपल्या दोषांकडे तसें करतील); जगा व जगूं द्या. *To l. from hand to mouth*, कसेंबसें पोट भरणें, जेमतेम उदरनिर्वाह करणें, 'हातातोंडाची गांठ घालणें.' *To l. up to* one's *principles*, स्वतत्त्वांप्रमाणें आचरण करणें 'बोले तैसा चाले.'

Live, *a.* (लाइव्ह्)—that is alive or real or active; not dead or fictitious or exhausted. जिवंत; उत्साही, जागृत. *Live* (लाइव्ह्) *issus*, महत्त्वाची बाब. *L. embers*, जळजळीत निखारे. *L. stock*, animals kept or dealt with for use or profit. गुरेंढोरें, जनावरें, जीवसंपत्ति *L. wire*, विजेचा प्रवाह चालू असलेली तार. [live=alive, used attrib.]

Live'lihood, *n.* (ला'इव्ह्-लि-हुड्)—means of living, sustenance. उपजीविकेचें साधन, उदरनिर्वाह.

Live'lŏng, *a.* (लि'व्ह्लॉग्)—the whole (tedious or delightful) length of. सगळा; लांबलचक, कंटाळवाणा.

Live'ly̆, *a.* (ला'इव्ह-लि)—lifelike or realistic; full of life or energy; gay; (joc.) exciting or dangerous. हुबेहुब, उठावदार; उत्साहपूर्ण; आनंदी, रंगेल; भावनोद्दीपक, भयानक.

Li'ven, *v. t. & i.* (ला'इव्हन्)—to brighten up. उत्तेजित करणें, उल्लसित करणें.

Li'ver, *n.* (लि'व्हर्)—1. an organ secreting bile and purifying the blood. यकृत्, पित्ताशय. *L. complaint*, यकृत्‌ची व्यथा. *Hot liver*, विषयासक्तता, रंगेलवृत्ति. *White* or *lily l.*, भ्याडपणा, नामर्दपणा. *L. line*, एक हस्तरेषा. *L. wing*, (*joc.*) right arm, उजवा हात. *Li'verless*, *a.*; *Li'very*, *a.* पित्ताशयात्मक, यकृत्‌च्या रंगाचा;

चिवट, कणखर (जमीन); पित्तप्रकोप झालेला, चिडखोर.

Lĭv'er, *n.* (लि'व्हर्)-one who lives in a specified way (clean, loose, liver). ठराविक तऱ्हेच्या राहणीचा मनुष्य. *A good liver,* सद्गुणी मनुष्य; सदाचार-संपन्न.

Lĭv'erў, *n.* (लि'व्हरि)—distinctive clothes (worn by any body of persons). विशिष्ट तऱ्हेचा पोषाख, पेहराव. *To sue* one's *livery,* वयांत आल्यावर वारसाहक्काचा दावा मांडणें. *Livery stable,* घोड्यांचा अड्डा, भाड्यानें गाड्या-घोडे पुरविण्याचा कारखाना. *l. man,* खास पोषाखवाला नोकर; घोड्यांच्या अड्ड्यांचा मालक किंवा नोकर, गाड्याघोडेवाला.

Lĭv'id, *a.* (लि'व्हिड्)—black and blue, of bluish leaden colour. काळ्या निळ्या रंगाचा. *Livid'ity, n., Li'vidly, adv.*

Lĭv'ing, *n.* (लि'व्हिंग्)—livelihood; a benefice. उपजीविकेचें साधन; वृत्ति. *a.* now alive; lifelike, exact. जिवंत; हुबेहुब. *Plain living & high thinking,* साधी राहणी व उच्च विचारसरणी. *L. room,* रोजची बैठकीची खोली. *L. wage,* जगण्यापुरती-पोटापाण्यापुरती-मोलमजुरी.

Lixĭ'viate, *v. t.* (लिक्सि'व्हिएट्)—to separate (substance) into soluble and insoluble constituents by percolation of water. क्षार काढण्यासाठीं धुणें, (राखेंतील) धुऊन क्षार काढणें.

Lĭz'ard, *n.* (लि'झर्ड्)—kinds of many four-legged tailed reptile. चोपई, सरडा, पाल.

Lla'ma, la'ma, *n.* (ला'मा)—a woolly ruminant used in S. America as a beast of burden. द. अमिरिकेंतील एक ओझें वाहणारें (उंटासारखें) जनावर.

Lloyd's, *n.* (लॉ'इड्झ्)—an incorporated society of marine under-writers. (पाण्यावरील जहाजें वगैरेंचा) नाविक विमा उतरणारी संस्था. *L. list,* नाविक वार्ता पुरविणारें वर्तमानपत्र. *L. register,* निरनिराळ्या जहाजांची वार्षिक यादी. [*orig. 17th-c. coffee-house established by Lloyd*]

Lo, *int.* (लो)—look, see, behold, observe. पहा!

Loach, *n.* (लोच्)—a small fresh-water fish. गोड्या पाण्यांतील एक जातीचा लहान मासा.

Load, *n.* (लोड्)—what is carried or borne; an amount that a cart, &c. can carry. ओझें, भार; भरणा, भरताड. *v. t. & i.* to put a load on; to burden; to charge (a gun, &c). लादणें, भरताड करणें; भार घालणें: बार भरणें. *To take a load off* one's *mind,* मनावरचा बोजा दूर (हलका) करणें. *L. (water) line,* ship's water-line when laden. (गलबत पाण्यांत किती बुडेपर्यंत भरताड भरावें हें दाखविणारी) भरताड-रेषा.

Load'stōne, *n.* (लो'ड्-स्टोन्)-a magnet. लोहचुंबक; अकर्षिणारी वस्तु. Also, lode'stone.

Loaf, *n.* (लोफ्)—a piece of bread. पाव, रोट. *L. sugar,* शुद्ध केलेल्या साखरेचा शंकूसारखा गोळा. *Loaves & fishes,* personal profit as inducement to religious profession or public service. व्यक्तिगत फायद्याची गोष्ट. *Half a loaf is better than no bread,* (a motto) सर्व नाशापेक्षां अर्ध-नाश परवडला; सगळा नाहीं तर अर्धाच पुरे! (म्हण). *v. i.* to spend time idly or lazily. आळसांत वेळ घालवणें. *To l. (time) away,* वेळ फुकट-भटक्या मारीत-दवडणें.

Loaf'er, *n.* (लो'फर्)—a low idler. भटक्या, भीकमाग्या.

Loam, *n.* (लोम्)—a rich soil of clay, sand, and decayed vegetable matter. चिकणमाती. *Loam'y, a.* चिकणमातीचा, चिकणमातीसारखा.

Loan, *n.* (लोन्)—a thing lent; a sum of money to be returned with or without interest. उसनी दिलेली वस्तु; उसनी किंवा व्याजीं दिलेली रक्कम. *v. t.* to grant loan of. उसनें देणें. *On loan,* उसनवार. *L. collection,* प्रदर्शनासाठीं मालकानें उसना दिलेला चित्रांचा वगैरे संग्रह. *L. holder,* कर्जरोखे धारण करणारा, गहाणदार. *L. office,* व्याजानें कर्जाऊ रकमा देण्याघेण्याची कचेरी.

Loath, Loth, *a.* (लोथ्)—disinclined, reluctant, unwilling, averse. नाखुष, नाराज, असंतुष्ट. *Nothing loath,* quite willing or willingly; अगदीं खुषी,-खुषीनें. *L.-to-depart,* tune played as farwell. निरोप देण्यासाठीं गाइलेला सूर (गाणें.).

Loathe, *v. t.* (लोद्)—to regard with disgust, to abhor, to abominate. तिटकारा येणें, किळस येणें. *Loath'ing, n.* कंटाळा, वीट, तिरस्कार. *Loath'ingly, adv.* कंटाळा करून, द्वेषानें.

Loath'some, *a.* (लो'थ्-सम्)—exciting nausea or disgust; odious. तिटकारा येण्याजोगा; किळसवाणा.

Lŏb, *v. i. & t.* (लॉब्)—to walk, run, or move heavily or clumsily or slowly (often *along*); to toss, bowl, or send (ball) with slow or high-pitched motion. जड पावलें टाकणें, सुस्तपणें चालणें; चेंडू उणादिशीं वर उडविणें, चेंडू हळू फेंकणें. *n.* ball bowled underhand a cricket or sent high in air at tennis. (क्रिकेट) खालून टाकलेला चेंडू, (टेनिस०) वर उंच उडालेला चेंडू.

Lō'bāte, *a.* (लो'बेट्)-having lobes. पाळी असलेलें. पाळीदार.

Lŏbb'y̆, *n.* (लॉ'बि)—a porch, an entrance-hall; ante-room or corridor. द्वारमंडप ; सदरेची पुढली खोली. गॅलरी. *Lobb'ying*, *n.* frequenting of parliamentary lobby to solicit votes, etc. मतें मिळविण्याकरितां कायदेमंडळाच्या शेजारचे खोलींत जाणें. *Division lobby*, मतमोजणीच्या वेळीं दोन्ही पक्षांचे लोक दोन निरनिराळ्या विभागांत जातात तो विभाग.-खोली. [L *lobia*, lodge]

Lōbe, *n.* (लोब्)—the lower pendulous part of the outer ear, a flap of other natural objects. कानाचा खालील भाग. पाळी. Lobed, *a.*

Lŏb'ster, *n.* (लॉ'ब्स्टर्)—a long-tailed clawed shellfish (used by some for food). एक लांब शेंपटीचा मासा. समुद्रांतील खेंकडा. *L. eyed*, with protruding eyes. पुढें आलेल्या-वटवटीत-डोळ्यांचा. *L. pot*, लॉब्स्टर मासे पकडण्याचें साधन (टोपली).

Lŏb'ūlar, *a.* (लॉ'ब्युलर्)—lobe-shaped. पाळीच्या आकाराचा.

Lŏb'ūle, *n.* (लॉ'ब्यूल्)—a small lobe. लहान पाळी.

Lō'cal, *a.* (लो'कल्)—of the place; belonging to or peculiar to some place or places. जागेचा ; स्थानिक. *L. government*, स्थानिक स्वराज्य. *L. examination*, examinations held by universities at centres convenient for candidates. सोईस्कर अशा निरनिराळ्या केंद्रांत विश्वविद्यालयानें घेतलेली परीक्षा. *L. option*, veto. दारुबंदी करण्याविषयीं त्या त्या विभागांतील मत-स्वातंत्र्य,-मत. *L. disease*, स्थानविशिष्ट रोग. *Lo'cally*, *adv.* स्थानपरत्वें. स्थलपरत्वें. *Lo'cal*, *n.* स्थानिक रहिवाशी ; ठिकाणची बातमी ; शहराच्या आसपास जागारी आगगाडी. [L *locus*, place]

Locale', *n.* (लोका'ल्)—a scene or locality of operations or events. जेथें गोष्टी किंवा हकीकती घडल्या ती जागा ; तें स्थान.

Lō'calism, *n.* (लो'कलिझम्)—an attachment to a place; a local idiom, custom etc. एकाद्या स्थानाविषयीं आवड. स्थानिक प्रेम ; स्थानिक म्हण, रीतभात, इ.

Local'ity̆, *n.* (लोकॅ'लिटि)—a thing's position; site or scene of something; faculty of remembering places etc. जागा ; स्थान ; स्थानिक ज्ञान-ओळख-माहिती असणें. स्थलज्ञान.

Lō'calize, *v. t.* (लो'कलाइझ्)—to make local, to decentralize. स्थानिक (-ठिकाणचा) करणें. ठिकाण ठरविणें. स्थानीं निश्चित करणें. *Localiza'tion*, *n.* स्थलनिश्चय. स्थाननिश्चय.

Locāte', *v. t. & i.* (लोके'ट्)—to state the locality of; to discover the exact place of; to establish in a place. स्थान सांगणें ; घरोघर जागा शोधून काढणें. स्थान ठरवणें ; घर करून-जम बसवून-राहणें. *Loca'tion*, *n.* (लोके'शन्) ठेवणें. वसविणें ; स्थान. स्थळ (ठरविणें).

Lŏc'ative, *a.* (लॉ'केटिव्)—(*Gram.*) denoting place where. स्थळवाचक. स्थानवाचक. *n.* locative case. सप्तमी विभक्ति.

Lŏch, *n.* (लॉक्)—a Scotch lake or arm of the sea; a lake. स्कॉटलंडमधील सरोवर ; सरोवर. आखात.

Lŏck, *n.* (लॉक्)—a tuft of hair or wool; (*pl.*) the hair; fastening for a door, &c.; mechanism by which a gun is fired; a section of river or canal confined within sluiced gates; interlocking. केंसाची बट ; (अने०) केंस ; कुलूप. टाळें ; बंदुकीचा चाप ; (बोटी आंत-बाहेर येण्याच्या) दरवाज्यांमधील नदीचा किंवा कालव्याचा भाग ; अडचण. जखडण. पेंच. *v. t. & i.* to fasten with a lock, to shut up, to confine. कुलूप घालणें. बंदोबस्तांत ठेवणें. *Lock jaw*, दांतखिळी. दांतखीळ (बसणें). *L.-keeper*, a custodian of river or canal lock. नदीच्या किंवा कालव्याच्या वेशीचा रखवालदार. *L. smith*, a maker and mender of locks. कुलुपें नीट करणारा. कुलुपें करणारा. लोहार. *Under lock and key*, locked up. कडीकुलुपांत. बंदोबस्तानें. *Lock, stock & barrel*, whole of a thing, completely. पूर्णपणें. सगळेंच्या सगळें. *L Hospital*, hospital for venereal diseases. गुप्त रोगांचा दवाखाना. *L. fast*, secured with a lock. कुलूप लावलेला. बंदिस्त. *To lock the stable door after the horse has been stolen*, बैल गेला. झोंपा केला.

Lŏck'er, *n.* (लॉ'कर्)—a small cupboard, esp. one reserved for an individual in a public room; one who locks; that which locks. किल्लीकुलुपाचा खण ; कुलूप लावणारा. बंद करणारा ; अडकवण.

Lŏck'ĕt, *n.* (लॉ'किट्)—a small gold or silver case (for portrait or esp. a lock of hair). लहान सोन्याची किंवा चांदीची पेटी किंवा ताईत.

Lŏck'out, *n.* (लॉ'क्-आउट्)—exclusion of workmen by an employer in a dispute as to wages, &c. मजुरांना वठणीवर आणण्याकरितां त्यांना कामावरून दूर करणें.

Lŏck'up, *n.* (लॉ'क्-अप्)—a room or place for detention of prisoners; (*time of*) locking up school etc. for the night. कच्चा कैदखाना. अटकखाना ; शाळा वगैरे बंद होण्याची वेळ.

Lōcomō'tion, *n.* (लोकमो'शन्)—going from one place to another; power of accomplishing

this. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें, स्थलांतर, गमन; गमनशक्ति, चलनशक्ति

Lō'comōtive, *a.* (लो'कमोटिव्ह्)—of or having or effecting locomotion; not stationary, moving from place to place. गति असणारा; स्थिर नसणारा; चलनशील, जंगम. *n.* a locomotive engine, आगगाडीचें वाफेचें यंत्र. *A locomotive person*, a person constantly travelling. चिरप्रवासी, भटक्या. *Use your locomotives*, (legs), पायांचा उपयोग कर, चालूं लाग, पळ.

Lō'cum tē'nēns, *n.* (लो'कम् टी'नेन्झ्)—a deputy acting for clergyman, doctor etc. in his absence. (उपाध्यक्ष, डॉक्टर वगैरेचा) प्रतिनिधी, मुतालिक.

Lō'cus, *n.* (लो'कस्)—(*pl. Loci*, लोसाय्) an exact place of something; (Math.) a curve etc. made by all the points satisfying certain conditions, or by the defined motion of a point or line or surface. स्थान, ठिकाण, नक्की जागा; कक्षा, बिन्दुपथ, रेषापथ. *Locus classicus*, the best known or most authoritative passage on a subject. एखाद्या विषयावरील प्रमाणभूत उतारा. *L. in quo*, a scene of event. प्रसंग घडण्याचें ठिकाण. *L. standi*, recognized position, right to intervene, appear in court etc. कायदेशीर हक्क, विशेष हक्क.

Lō'cust, *n.* (लो'कस्ट्)—a destructive winged insect migrating in swarms; kinds of tree and their fruit. टोळ, शलभ; एक प्रकारची वनस्पति व तिचें फळ.

Locū'tion, *n.* (लोक्यू'शन्)—style of speech, mode of expression; a phrase or idiom. भाषणशैली; वाक्संप्रदाय.

Lōde, *n.* (लोड्)—a vein of metal ore; a water-course. अशुद्ध धातूची शीर, रेषा; पाण्याचा पाट. *L. stone*, लोहचुंबक, चुंबकधर्मी पाषाण.

Lōde'stār, *n.* (लो'ड्-स्टार्)—the pole-star; guiding principle or object. ध्रुवाचा तारा; मार्गदर्शक तत्त्व किंवा वस्तु.

Lŏdge, *n.* (लॉज्)—a place where members of a branch meet; a small house; gatekeeper's cottage or porter's room. सभासद एके ठिकाणीं जमण्याचें स्थान; लहान घर; द्वाररक्षकाची झोंपडी, चौकी, हमालाची खोली-कोठडी. *v. t. & i.* to provide with sleeping quarters; to reside as a lodger; to fix in; to settle; to place. निजण्यासाठी जागा देणें; भाडोत्री जागा घेऊन राहणें; स्थापित करणें; वसविणें; ठेवणें. *Lodg'er*, a person paying for accommodation in another's house, भाडोत्री, भाड्यानें जागा घेऊन राहणारा, बिऱ्हाडकरू. *Lodg'ement*, (लॉ'ज्मंट्) a stable position gained, foothold; a deposit of money; accumulation of matter intercepted in fall or transit. (फायीज केलेल्या हल्ल्यांत) मोर्चा ठोकणें, पाय रोवणें, ठिकाणा पावणें; पैशाची ठेव; खालीं पडतांना किंवा स्थानांतर करतांना सांचलेली वस्तु.

Lŏdg'ing, *n.* (लॉ'जिंग्)—a place where one lodges. वसतिस्थान, राहण्याचें ठिकाण.

Lŏft, *n.* (लॉफ्ट्)—an upper room directly covered by the roof; a gallery in a church or hall; a pigeon-house; a flock of pigeons; (Golf) backward slope in club-head, lofting stroke. शेवटचा उंच माळा, पोटमाळा; उंच गॅलरी; कबुतरांची राहण्याची जागा; कबुतरांचा थवा; (गोल्फची) वांकड्या चोंचाची काठी, चेंडू उंच उडविणारा टोला. *v. t.* to hit (golf-ball) high up; to keep (pigeons) in a loft. (गोल्फचा चेंडू) उंच उडविणें; कबुतरांना खुराड्यांत ठेवणें.

Lŏf'tў, *a.* (लॉ'फ्टि)—of imposing height; haughty; exalted, high-flown. उंच; भव्य; घमेंडखोर; वैभवशाली, थोर.

Lŏg, *n.* (लॉग्)—an unhewn piece of a felled tree; apparatus for gauging ship's speed. ओंडका, ओंडा; नौकागतिमापक यन्त्र. *Log-roll*, *v. t.*, *log-rolling*, *n. & a.* mutual puffery. परस्पर पोत गाजविणें, पोकळ स्तुति करणें. *Log'-wood*, wood of American tree yielding dye. पतंगाचें लाकूड किंवा झाड (ज्यापासून रंग काढतात.).

Lŏg'book, *n.* (लॉ'ग्-बुक्)—a book containing daily record of ship's rate of progress, &c. गलबताच्या रोजनामा; (प्रवासाची वगैरे) रोजनिशी.

Lŏg'arithm, *n.* (लॉ'गॅरिथम्)—one of a series of reckoning-numbers tabulated for simplifying computation. घातांकगणित, घातगणन. *Logarith'mic*, *a.* *Common Logarithms*, those whose base is 10. दशमूलकघातगणन. (e. g. the log of 1,000 is 3; $(10)^3 = 1000$). [From Gk. *logos*, reckoning, ratio & *arithmos*, number]

Lŏgg'erhead, *n.* (लॉ'गर्-हेड्)—a block-head, fool. मठ्ठ, ठोणधा, मूर्ख. *At loggerheads* (*with*), engaged in a dispute; on bad terms. भांडणावर किंवा हातघाईवर आलेले; सख्याचा संबंध नसलेले.

Lŏgg'ia, *n.* (लॉ'ज्या)—an open-sided gallery or arcade. उघडा सज्जा.

Lŏ'gic, *n.* (लॉ'जिक्)—the science of reasoning; power of convincing. तर्कशास्त्र, न्याय; खात्री करण्याचें सामर्थ्य.

Lŏ'gical, *a.* (लॉ'जिकल्)—of logic ; in conformity with the laws of logic ; defensible on the ground of consistency. तर्कशास्त्राचा, न्याय शास्त्राचा ; तर्कशास्त्रानुसार, तार्किक ; तर्काला जडण्या-जोगे, तर्कशास्त्रशुद्ध. Lo'gically, *adv.*

Lŏgi'cian, *n.* (लॉजि'शन्)—a person well-versed or skilled in logic. तर्कशास्त्री, नैय्यायिक.

Logŏm'achy̆, *n.* (लॉगॉ'मॅकि)—a war of words, dispute about words. वाग्युद्ध, शब्दच्छल, शुष्कवाद.

Loin, *n.* (लाइन्)—(*pl.*) the back part between the hipbone and the ribs. कमर, कटिप्रदेश. (*sing.*) joint of meat cut from the loins. जनावराच्या मधल्या भागाचें (खाण्याकरितां) मांस. *To gird up one's loins*, to prepare for journey or effort. कमर बांधणें, सज्ज किंवा तयार होणें. *Fruit, child of–sprung from–*, one's *loins*, स्वतःचें अपत्य. *Loin-cloth*, लंगोटी, कटि-वस्त्र, पंचा. *Loined, a.*

Loit'er, *v. i.* (लॉ'इ-टर्)—to linger on the way ; to hang about ; to be dilatory. आळसानें रेंगून राहणें, रेंगाळणें ; रमत रमत चालणें ; मागें. *Loit'erer, n.* रेंगाळणारा, भटक्या. *Loit'eringly, adv.* रमत रमत, रेंगाळत.

Lŏll, *v. i. & t.* (लॉल्)—to recline or stand in a lazy attitude ; to hang out (the tongue) ; (of tongue) to hang out. अस्ताव्यस्त पडणें ; जीभ बाहेर काढणें ; जीभ बाहेर पडणें. *Lo'llingly, adv.*

Lŏll'ard, *n.* (लॉ'लर्ड्)—one of the 14th century heretics holding views like those of Wycliff. चौदाव्या शतकांतील पाखंडी-मतांविरुद्ध पंथ. *—ism,-ry, nn.*

Lŏll'ipŏp, *n.* (लॉ'लिपॉप्)—(Usu. pl.) sweet-meat(s), sugar-plum(s). मेवामिठाई, साखरफुटाणे.

Lo'ndon pride, *n.* (लं'डन् प्राइड्)—a saxifrage. खडकावरील वनस्पति.

Lōne, Lōne'ly̆, *a.* (लोन्, लो'न्-लि)—solitary, isolated, unfrequented ; companionless, not having others near. एकटा, निर्जन, विविक्त ; असहाय, सडा. *Lone'some, a.* feeling or making feel lonely. निर्जन, उदास, भयाण, भयानक. *Lone'somely, adv.* उदासपणानें. *Lone'someness, n.* उदासपणा, निर्जनता.

Lŏng, *a.* (लॉङ्)—protracted ; dilatory ; of specified length. लांबवलेला ; रेंगट, दीर्घसूत्री ; लांब. *adv.* for a long time. पुष्कळ वेळपर्यंत. *n.* a long interval or period ; a long vowel or syllable. दीर्घ काळ ; दीर्घ स्वर, गुरु. *v. i.* to yearn or wish vehemently, to desire earnestly. उत्कट इच्छा असणें. *In the long run*, eventually. सरतेशेवटीं. *Long-armed*, लांब हातांचा, आजानुबाहु. *Long cloth*, a kind of calico. एक जातीचें उंची सुती कापड. *L. field, l. off, l. on*, a man fielding at bowler's left or right rear. (क्रिकेटमध्यें) चेंडूटाक्याच्या डाव्या किंवा उजव्या बाजूस मागें क्षेत्ररक्षण करणारा. *Long-eared*, one who is stupid as an ass. लांबकानाचा, गाढव, मूर्ख. *L. firm*, a set of swindlers who obtain goods and do not pay. माल घेऊन पैसे न देणाऱ्या फसव्या लोकांची टोळी. *L.-headed*, sagacious. दूरदर्शी, दूरवर विचार करणारा. *L. shanks*, a stilt or long-legged plover. एक लांबपायाचा पक्षी. *To draw the long bow*, to tell exaggerated or invented stories. भरमसाट थापा मारणें, काल्पनिक गोष्टी सांगणें. *The long & the short of it*, all that can or need be said. सारांश, तात्पर्य, इत्यर्थ. *As long as*, जोंपर्यंत, जों पावेतों. *Ere long*, लवकरच. *How long*, कोठवर, कोठपावेतों. *Long ago*, फार दिवसांपूर्वी, मागें. *So long*, तोंपर्यंत, पुनश्च भेटू. *L. standing*, that has long existed. फार दिवसांचें, पुरातन. *L. suffering*, bearing provocation patiently. त्रास शांतपणें सहन करणारा. *Long'ish, a.*; *Long-ways, l.-wise, adv.* in a direction parallel with a thing's length. लांबीच्या बाजूनें. *Long'er*, अधिक लांब. *Longest*, (super.) सर्वांहून लांब.

Lŏngĕv'ity̆, *n.* (लांजे'व्हिटि)—long life. दीर्घायुष्य.

Lŏng'ing, *n.* (लॉ'ङिङ्)—an eager desire, a craving or unnatural appetite. उत्कट इच्छा, अभिलाष, आशा, भूक, डोहाळे.

Lŏn'gitūde, *n.* (लॉ'न्जिट्यूड्)—angular distance east or west from the meridian. लांबी, रेखांश, रेखांतर.

Long'shore-man, *n.* (लॉ'ङ्शोअरमन्)—a landsman employed in loading ships, shorefishing etc. धक्क्यावरचा हमाल, मासे धरणारा, इ. [For *along shore man*]

Lōōb'y̆, *n.* (लूबि)—a silly fellow. मूर्ख मनुष्य, अडाणी.

Lōōk, *v. i. & t.* (लुक्)—to use or direct one's eyes (at) ; to make a search ; to have specified appearance or aspect ; to face or be turned in specified direction. दृष्टि फेंकणें ; शोधणें ; दिसणें ; तोंड फिरवणें. *n.* act of looking ; gaze or glance ; expression of the eyes ; appearance or aspect ; (*pl.*) (personal) appearance. पाहणें ; दृष्टि, मुद्रा ; स्वरूप ; (अनेक) चर्या, चेहरा. (*With preps*) *To look after*, to attend to, to take care of, to search. संभाळणें, काळजी घेणें, विचार-पूस करणें, शोध करणें. *To l. for*, to expect

search for. वाट पाहणें, शोधणें. *To l. into*, निरीक्षण करणें, चौकशी करणें, विचार करणें. *To l. on*, लेखणें, मोजणें, पाहणें. *To l. over*, to inspect, overlook or pardon. तपासणें, कानाडोळा करणें, क्षमा करणें. *To l. through*, डोकावून पाहणें, भेदक नजरेनें किंवा अंतर्ज्ञानानें पाहणें-तपासणें, दिसून येणें, वर वर पाहणें. *To l. to*, विचार करणें, नजर ठेवणें, विश्वासून राहणें. *To l. upon*, to regard with specified feeling. विशिष्ट भावनेनें पाहणें. (*With advv.*) *To look about*, सावध असणें, चा शोध करणें. *To l. down* (*up*) *on*, to consider oneself superior to. तिरस्कार करणें, कस्पटासमान मानणें. *To l. forward to*, आशा करणें. *To l. up to*, to respect, to venerate. आदर दाखविणें, मान देणें. *To l. well*, साजेसा दिसणें, शोभून दिसणें. *Look before you leap*, avoid precipitate action. साहस करूं नका, पुढें पाहून पाऊल टाका. *Let* (*one*) *l. at home*, make mental search. आत्मनिरीक्षण कर. *Look you*, (imperat.) observe, mind. नीट ध्यानांत धर, पहा. *Look sharp*, lose no time, bestir oneself. वेळ दवडूं नको. आटप. *Good looks*, beauty, सौंदर्य.

Lŏoker-on′, *n.* (लुकर-ऑ'न्)—(pl. lookers-on) a spectator. प्रेक्षक, तमासगीर, बघ्या.

Look-in′, *n.* (लुकइ'न्)—a casual visit. सहज गांठ, सहजासहजीं भेट. *To have a look-in*, to come near winning, to have a chance. जवळजवळ यश येणें, यशाची आशा असणें.

Lŏok′ing-glăss, *n.* (लु'किंग्-ग्लास्)—a mirror. आरसा.

Lŏok′out′, *n.* (लु'क्-अ'उट)—watch; post of observation; a man stationed to watch; view; a person's own concern. टेहळणी; टेहळणीचें ठिकाण; टेहळणी करणारा इसम; देखावा; व्यक्तिगत संबंध पाहाणें.

Lōom, *n.* (लूम्)—weaving machine. शिवण्याचा माग. *v. i.* to appear dimly; to be seen in a vague magnified shape. अस्पष्ट दिसणें; दुरून अस्पष्ट-अस्वाभाविक-स्वरूप दिसणें.

Lōon, *n.* (लून्)—1. a scamp, an idler; a lad. हरामी, पाजी, दुर्जन; लहान मुलगा. 2. a kind of diving bird. पाणबुडा पक्षी.

Lōop, *n.* (लूप्)—a figure made by a curve that crosses itself, noose. फांस, वाळा, दोरीचा फांस, कानी. *v. t. & i.* to make loop or loops in; to form a loop; to fasten with a loop or loops. दोरीचा फांस करणें; आंकड्यानें बांधणें, फांसानें बांधणें, गांठवणें. *Loop-line*, a piece of railway or telegraph that leaves main line and joins it again. रेल्वेचा-तारेचा-जोड फांटा. *To loop the loop*, (of airman) to execute somersault. (वैमानिक) हवेंत विमानाची कोलांटी उडी मारतो ती कृति करणें, (खालीं डोकें वर पाय), विमानांतून किंवा दुकाचीवरून कोलांटी गिरकी मारणें.

Lōop′hōle, *n.* (लू'प्-होल्)—a narrow slit in a wall; (*fig.*) a means of evasion. भिंतींतील फट; पळवाट, सवड.

Lōose, *a.* (लूस्)—free from ties, released from bonds or restraint; not fixed or tight; not exact or literal; careless; wanton, incontinent. बंधमुक्त, मोकळा; ढिला, सैल; अक्षरशः नाहीं तो; निष्काळजी; दुर्वृत्त, व्यभिचारी. *v. t.* to let loose, to untie; to free from constraint. सैल सोडणें, हाकारणें. बंदर सोडणें; बंधमुक्त करणें; मोकळा सोडणें *n.* freedom from restraint. मोकळीक. *Loose end*, *at a l. end*, without definite occupation. ठराविक धंदाउद्योग नसलेला, बेकार. *L. fish*, a dissolute person. स्वैराचारी मनुष्य, दुर्वृत्त मनुष्य. *Loose′ly*, *adv.*, *Loose′ness*, *n.* ढिलेपणा; उच्छृंखलपणा, व्यभिचार.

Lōos′en, *v. t. & i.* (लू'सन्)—to make or become less tight or firm; to relax. ढिला होणें, सैल करणें; मोकळा करणें.

Lōot, *n.* (लूट्)—booty, spoil. लूट. *v. t. & i.* to plunder. लुटणें, लूट घेणें.

Lŏp, *v. t.* (लॉप्)—to cut away branches or twigs of trees; to cut off. झाडाच्या फांद्या तोडणें; तोडणें. *v. i.* to hang limply. खालीं लोंबणें, लोंबकळणें. *Lop′pings*, *n. pl.* तोडणी, छाटणी, कवळकाठी. *Lop-eared*, *a.* लोंबत्या कानाचा. *L.-ear*, a kind of rabbit. एक जातीचा ससा. *L. sided*, with one side lower etc.; unevenly balanced. एक बाजू सखल किंवा लहान असलेला; समतोल नसलेला.

Lŏquā′cious, *n.* (लॉक्वे'शस्)—talkative, babbling, given to continual talking. बोलका, वाचाळ, बोलघेवडा.

Lŏquă′city, *n.* (लॉक्वॅ'सिटि)—talkativeness. वाचाळता. [L *loquax*, speak]

Lŏrd, *n.* (लॉर्ड्)—superior, master, owner, husband; God; a British title of a nobleman. वरिष्ट, अधिपति, मालक, पति; परमेश्वर; 'लॉर्ड' ही पदवी. *Lord!* (int.) expressing wonder etc. (उद्गारवाचक) आश्चर्यार्थक. *My lord*, (मिलॉर्ड्) (voc.) polite way of addressing l., mayor or judge of supreme court. खावंद! सरकार! (सन्मानदर्शक). *v. t. & i.* To play lord over, to domineer. स्वामित्व गाजविणें, कडक अंमल गाजविणें, सत्ता चालविणें. *Lord′ling*, young or petty lord. लहान सरदार. *Lord′ly*, *a.* as of, or beseeming, a lord. उमरावासारखा-

शोभेसा ; 2. haughty, imperious. उद्धट, तिरस्करणीय. *Lord'ship*, *n.* rule over, ownership of ; domain or manor ; lord's personality. सत्ता, मालकी ; जमीनदारी, जहागिरी ; धनीपणाचा दबाव,-ऐश्वर्य. *Your lordship, his l.*, खावंद !, सरकार ! *Lords & ladies*, wild arum. रानटी वनस्पती.

Lord's, *n.* (लॉर्ड्ज़्)—(used for) Lord's cricket ground in London, headquarters of the M.C.C. and English cricket. लंडनमधील लॉर्ड्सचें क्रिकेट-क्रीडांगण, इंग्लंडमधील क्रिकेट खेळाचें मुख्य ठाणें. [f. Thomas *Lord*, maker of successive grounds named after him]

Lōre, *n.* (लोअर्)-store of knowledge, erudition ; a body of tradition and facts. विद्या, विद्वत्ता ; (परंपरा-प्राप्त) ज्ञान.

Lŏrn, *a.* (लॉर्न्)—desolate, forlorn. निराधार, अनाथ.

Lŏ'rrў, *n.* (लॉ'रि)—a long low sideless wagon ; a large truck. एक मोठी गाडी ; गाडीचा मोठा डबा.

Lose, *v. t. & i.* (लूझ्)—to be deprived of ; to let pass from one's control ; to get rid of ; to forfeit ; to be worsted in ; to suffer loss, to suffer detriment ; to cause the loss of to. हरवणें ; मुकणें, आंचवणें ; सुटणें ; जप्त करणें किंवा होणें ; हरणें, हार जाणें ; नुकसान होणें ; नाश करणें. *Lost, pa. p.* (लॉस्ट्) vanished ; not to be found ; deprived of help ; astray. हरवलेला ; नष्ट झालेला ; निराधार ; भटकलेला. *Los'er, n.* (लूझर्) one who is deprived of anything ; not a winner. हरणारा ; हारखाऊ. *To lose ground*, मागें पडणें, उतरती कळा लागणें. *To l. heart*, धैर्य खचणें. *To l. one's head*, डोकें ताळ्यावर नसणें, डोकें फिरणें. *To l. one's life*, प्राणाला मुकणें. *To l. sight of*, दृष्टीआड होणें, विस्मरण होणें. *Los'able, a.* हरण्यासारखा.

Lŏss, *n.* (लॉस्)—losing ; what is lost ; detriment resulting from losing. हरवणें, हरवलेली वस्तु ; नुकसान. *At a loss* (for, to discover etc.), puzzled, at fault. थक्क,-कुंठित,-अक्कल-गुंग झालेला.

Lŏt, *n.* (लॉट्)—a share, fortune, destiny ; appointed task ; article or set of articles put up for sale at auction, &c. ; a considerable number or amount. हिस्सा, भाग्य, दैव ; नेमलेलें काम ; गट, लाट ; विपुलता ; रेलचेल. *v. t.* to divide into lots. गट करणें, विभाग पाडणें. *To draw, to cast, lots*, सोडतचिठी उचलणें. *To throw*, or *cast in*, one's *lot with*, to share fortunes of, दैवाचे वाटेकरी-भागीदार-होणें. *Bad lot*, vicious person. वाईट चालीचा मनुष्य, दुर्गुणी मनुष्य. *The lot*, the whole number or quantity. एकंदर संख्या किंवा वस्तु, एकवट गट,-भाग.

Loth, *a.* (लॉथ्)—*See* Loath.

Lothăr'ĭō, *n.* (लॉथे'रिओ)—(pl.-os) a libertine, a rake. व्यसनी, चंगीभंगी, फंदी मनुष्य.

Lō'tion, *n.* (लो'शन्)—a wash for wounds or the skin. औषधी पाणी, जखम धुण्याचें औषध.

Lŏtt'erў, *n.* (लॉ'टरि)—1 gamble in which prizes are won by lot or chance by ticket-holders. सोडत, लाटरी. *L. wheel*, सोडतीचे अंक फिरविण्याचें यंत्र. 2. (fig.) a thing that defies calculation (life, marriage, is a lottery). (अलं॰) नशिबाची पारख, सोडत. [fr. It. *lotteria*, lottery]

Lō'tus, *n.* (लो'टस्)—a water-lily ; a legendary plant possessing the eater with luxurious languor. कमळ ; कमलिनी. *Lotus eater*, a person given to indolent enjoyment. आळशी चैनबाज मनुष्य. *L. eating*, *a. & n.*; *L. land*, a place of indolent enjoyment. चैनबाजीची जागा.

Loud, *a.* (लाउड्)—strongly audible, sonorous ; noisy ; obtrusive. मोठा, उंच स्वराचा ; गलबल्या, भडक, उद्धट, लुच्चा. Loud, Loud'ly, *adv.* with loud voice. मोठ्यानें. *Loud speaker*, a wireless receiver loud enough to be heard without head phones. ध्वनिक्षेपक यंत्र.

Lough, *n.* (लॉक्)—An Irish lake or arm of sea. आयर्लंडमधील सरोवर किंवा समुद्राचें फाटें.

Lounge, *v. i.* (लाउन्ज्)—to loll, to recline ; to stand about lazily, to idle. रिकामा पडून राहणें ; भटकणें, निष्कारण फिरणें. *n.* a spell of, a place for, lounging ; a sofa or deep chair. भटकणें, रिकामटेकडेपणा, चावडी, चव्हाटा, गप्पाष्टकांचा अड्डा, सज्जा किंवा बाहेरील दिवाणखाना ; कोच, खोलसर खुर्ची. *Loun'ger*, *n.* रिकामटेकडा. *Loun'gly, adv.*

Lour, Lower, *v. i.* (लॉवर्)—to frown, to look sullen ; (of sky, &c) to look dark and threatening. दुर्मुखणें, आंठ्या घालणें ; (आकाश) काळें होणें, मेघाच्छादित होणें. *n.* a scowl ; gloominess of clouds etc. भिवया चढवणें, कपाळाला आंठ्या ; ढगांची काळोखी इ. *Lour'y, a.*

Louse, *n.* (लाउस्)—(pl. *lice*, लाइस्) kinds of parasitic insect. ऊ. *Lous'y* (ला'उझि) *a.* infested with lice. उवांनीं भरलेला, बुजबुजलेला गोचिड्यांनीं भरलेला. *Lous'iness*, *n.* उवांचा बुजबुजाट.

Lout, *n.* (लाउट्)—1. a hulking or rough-mannered fellow, a mean awkward fellow. धुंभ,

आडमुठ्या, नकल्या, विदूषक. *Lout'ish*, *a.* 2. *v. i.* to bow. वंदन करणें.

Lou'ver, Lou'vre, *n.* (लू'व्हर्)—erection on roof with unglazed side-openings for ventilation, &c.; a set of boards or glass slips set like slats of Venetian blinds to admit air but exclude rain. हवेसाठीं बसविलेलीं तावदानें किंवा फळ्या, धुराडें, धारें.

Lo'vable, *a.* (लव्हेबल्)—inspiring affection, worthy of love, amiable. प्रेमोत्पादक, प्रेमास पात्र, प्रेमळ. *Lo'vably*, *adv.*, *Lo'vableness*, *n.*

Love, *n.* (लव्ह्)—fondness, warm affection; sexual passion; sweet-heart or object beloved; (Games) no score, nil. लोभ, स्नेह, प्रेम; अनुराग; प्रेमपात्र, प्रेमाचें माणूस, प्रियकर वस्तु; (खेळांत) एका पक्षाला मुळींच गुण न मिळणें, सर्वांच्या सर्व हात हरणें. *v. t. & i.* to be in love (with), to be tenderly attached; to feel affection for; to delight in; to admire; to like to see. प्रेम असणें; प्रेम करणें; आनंद वाटणें; प्रशंसा करणें; पहायला आवडणें. *Love-affair*, amour. प्रेमसंबंध. *Love-all*, state of game before either side has scored. दोन्ही पक्षाचे सारखे हात होणें. *L. apple*, (old name for) tomato. टमॅटो (फळ), वेल वायंगें. *L. begotten*, illegitimate. अनौरस, विवाहबाह्य. *L. bird*, a kind of small parrot. एक जातीचा लहान पोपट. *L. child*, illegitimate child. अनौरस संतति, बेकायदेशीर संतति. *L.-in-a-mist*, blue-flowered garden plant. निळ्या फुलांचें फुलझाड. *L. letter*, प्रेमपत्रिका,-पत्र. *L.-lies-bleeding*, a garden plant with drooping red spike. लोंब-णाऱ्या तांबड्या कणसाचें रोपटें. *L. lorn*, pining with love, deserted by one's love. विरही, प्रेम-भंग झालेला. *L. match*, प्रीतिविवाह. *L. sick*, languishing with love. प्रेमासाठीं झुरणारा, काम-पीडित, कामतप्त. *L. song*, प्रेमगीत. *L. story*, प्रेम-कथा, शृंगार कथा, कादंबरी. *L. token*, प्रेमाची खूण. *Lo've worthy*, *a.* *For love or money*, by any means. कांहीं केल्या, कोणत्याहि प्रकारें. *Labour of love*, labour that one delights in. हौसेखातर हातीं घेतलेलें काम. *There's no love lost between them*, they dislike each other. ते एकमेकांचा तिरस्कार करतात. *In love*, प्रेमपाशांत. *In l. with*, च्या प्रेमांत गुंतणें, वस्तूंची -धंद्याची आवड वाटणें. *To fall in l. with*, मोहित होणें, (वर) प्रेम बसणें. *To make l.*, प्रेम करणें. *L. making*, *n.* प्रेमाराधन. *My love!* प्रिये! प्रिय पत्नि! *Lord love you!*, excl. of surprise at person's mistake etc. [उद्गारवाचक, (आश्चर्यार्थक) एकाद्याच्या चुकीविषयीं वाक्प्रचार]

Love'less, *a.* (लव्ह्लिस्)—unloving, or unloved, or both. प्रेमांकुररहित, प्रेमरहित, प्रेम न केला गेलेला.

Love'ly, *a.* (लव्ह्-लि)—exquisitely beautiful; delightful, enchanting. अत्यंत सुंदर; आनंददायक. *Love'liness*, *n.*

Lo'ver, *n.* (लव्हर्)—a woman's suitor or sweetheart; the admirer or devotee of something, one who likes strongly; (pl.) a pair in love. प्रेमी जन, वल्लभ; प्रशंसा करणारा भक्त; प्रेमी युग्म, जोडपें, जोडा. *Lo'verless*, *a.* *Lo'verlike*, *Lo'verly*, *aa. & advv.*

Lo'ving, *a.* (लव्हिंग्)—kind, affectionate. दयाळू, प्रेमळ. *Loving Cup*, large drinking vessel passed round at banquet. मोठें पेय-पात्र. *L. kindness*, tender consideration. दया, माया, वात्सल्य. *Lo'vingly*, *adv.*, *Lo'vingness*, *n.*

Love'-sick, *n.* (लव्ह्-सिक्)—sick or languishing with love. मदनपीडित, प्रेमविह्वल, प्रेमवेडा.

Low, *n.* (लो)—1. the sound made by cows. हंबरडा, हंबरणें. *v. i.* to utter low. हंबरणें.

Low, *a.* (लो)—not placed high or reaching far up; not attaining a high degree; of humble rank; no longer full or abundant; lacking in vigour; degraded or vulgar. खालसर, सखल; खालच्या दर्जाचा; खालचा; थोडका; निःसत्त्व; हलकट, क्षुद्र. *adv* in or to low place, not on high; on low diet; for low stakes; in low voice. खालीं, जमिनीबरोबर; कमी सत्त्वाचें अन्न मिळालेला; कमी किंमतीला; हलक्या आवाजांत. *L. born*, of humble birth. हीन-नीच-कुळांतील. *L. bred*, of vulgar manners. हीन कुळांत वाढलेला, उद्धट, ग्राम्य, आडदांड. *Low boy*, a chest of drawers on short legs. आंखूड पायांचें खणांचें कपाट. *L. brow*, (*sl.*) unintellectual, निर्बुद्ध, ठोंम्या, *L. pressure*, हवेचा कमी दाब. *L. spirits*, विषाद, खिन्नता, म्लानता. *L. tide*, level of sea between ebb and flow. ओहोटी. *L. water* ओहोटी. *In low water*, out of funds etc. पैशाचा अभाव असणें, आंतबट्टा, दिवाळखोरी. *L. water mark*, lowest point reached by ebb-tide. ओहोटीची खूण,-रेषा.

Low'er, *v. t. & i.* (लोंअर्)—to let or haul down; to make or become lower; to humble, to be degrading to; to reduce the bodily condition of. खालीं ओढणें, उतरणें; खालीं होणें किंवा करणें; मानहानि होणें, मानभंग करणें; ठेंगणा करणें. *L. class*, of the lower orders. खालच्या वर्गाचे. *L. deck*, गलबताचा खालचा मजला. *The l. deck*, petty officers and men of the Navy or of a ship. आरमारांतील किंवा जहाजावरील खालचे अधि-कारी, खलाशी. *L. orders*, people of inferior

social status. समाजांतील खालच्या दर्जाचे लोक. *L. world*, Hades, hell. नरक (लोक). *Lowermost*, *a.* सर्वांहून खालचा, कनिष्ठ प्रतीचा.

Low'er, *v. i.* (लॉ'अर्)—*See* Lour.

Low'land, *n.* (लो'लंड्)—a low-lying country. सखल जमीन, तळघाट, हेटमांत. *a.* of or in a low-lying country, or the Lowlands. सखल प्रदेशाचा-प्रदेशांतील. *Low'lands*, (लो'लंड्झ्) *n.* less mountainous part of Scotland. स्कॉटलंड देशाचा सखल प्रदेश. *Low'lander*, *n.* an inhabitant of Low-lands. लो-लंड्झमधील रहिवासी.

Low'lў, *a.* (लो'लि)—humble, unpretending. नम्र, साधा, निरभिमानी. *adv.* in low manner. सविनय, नम्रपणें. *Low'lily*, *adv.*, *Low'liness*, *n.*

Loy'al, *n.* (लॉ'यल्)—constant to friends or associates, faithful; true to allegiance; devoted to the sovereign. इमानी, विश्वासू; स्वामिभक्त; राजनिष्ठ.—*ism*, *n.* राजनिष्ठा. *Loy'alist*, *n.* इमानी राजनिष्ठ मनुष्य, स्वामिभक्त, स्वराज्यभक्त.

Loy'altў, *n.* (लॉ'यल्टि)—adherence to the sovereign, firm allegiance, fidelity. राजनिष्ठा, निष्ठा; पातिव्रत्य, सत्त्व, स्वदारनिष्ठा, पत्नीशीं एकनिष्ठपणा. [L *legalis*, legal]

Lŏz'enge, *n.* (लॉ'झिन्ज्)—a rhombus or diamond figure, esp. as heraldic bearing; a shield or small pane of glass of this shape; a small tablet of medicine, food or sweet stuff. समांतर समभुज चौकोन; ह्या आकाराचें पदक, किंवा कांचेचें तावदान; औषधाची किंवा खाऊची लहान वडी.

£. s. d., *n.* (एं'लेसडी)—pounds, shillings, and pence; money, riches. पौंड, शिलिंग, पेन्स; पैसा, संपत्ति. *L. S. De'ism*, money worship. धनाची पूजा, पैसा हाच परमेश्वर मानणें.

Lŭbb'er, *n.* (ल'बर्)—a clumsy fellow, a lout. लठ्ठेश्वर, अडाणी-आडमुठा मनुष्य, आडदांड मनुष्य. *Lubb'erly*, *a. & adv.* awkward, unskilful. ओबडधोबड, अडाणी, ठोंब्या, धसमुसळ्या, बोजड.

Lu'brĭcāte, *v. t.* (लू'ब्रिकेट्)—to oil or grease (machinery); to make slippery. यंत्राला तेल घालणें, ओंगण (वंगण) लावणें; गुळगुळीत करणें. *Lu'bricant*, *n.* substance used to oil machinery. वंगण, मऊपणा-गुळगुळीतपणा आणण्याचें साधन (तेल वगैरे). *Lu'brication*, *n.* गुळगुळीतपणा, स्निग्धीकरण, गुळगुळीत करणें. *Lu'bricator*, *n.* ओंगणपात्र-पेला; गुळगुळीतपणा आणणारा.

Lubrĭ'cĭtў, *n.* (लूब्रि'सिटि)—slipperiness; skill in evasion; lewdness. गुळगुळीतपणा, गुळगुळीतपणा, स्निग्धता; निसटण्याचें-टाळाटाळी करण्याचें-कौशल्य; कामुकपणा, कामांधता. *Lubri'cious*, *Lubri'cous*, *aa.*

Lucerne', *n.* (लूस'र्न्)—a cloverlike fodder-plant. विलायती गवत, घोडेघास.

Lucĭă'nĭc, *a.* (लूसिॲ'निक्)—after the manner of Lucian, witty and scoffing. लूसिअन प्रमाणें लिहिलेलें, विनोदी व उपहासात्मक.

Lu'cid, *a.* (लू'सिड्)—free from obscurity; clearly expressed or arranged; bright. निर्मळ, स्वच्छ; सुबोध, सुस्पष्ट; तेजस्वी, चकचकीत. *Lucid interval*, period of sanity between attacks of madness, or of quiet between disturbances. विनवेडाची स्थिती, दरम्यानच्या स्वस्थतेचा काळ. *Lucid'ity*, *n.*, *Lu'cidly*, *adv.*

Lu'cĭfer, *n.* (लू'सिफर्)—the morning star; Satan; a match ignitible by friction. शुक्र, शुक्राचा तारा; सैतान; आगकाडी.

Lŭck, *n.* (लक्)—good or ill fortune. दैव, नशीब. *L. less*, *a.* unfortunate, unhappy. दुर्दैवी, कमनशिबी. *As luck would have it*, सुदैवानें किंवा दुर्दैवानें. *Down on* one's *l.*, दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडलेला. *Try* one's *luck*, (खेळांत वगैरे) दैवाची परीक्षा पाहणें. *Just my l.*, I am unlucky as usual. नेहमींप्रमाणेंच माझें दुर्दैव ओढवलें,-अपयश आलें. *Have the l.*, be fortunate enough to. नशिबाचा जोर असणें. *For l.*, to bring good luck. चांगलें-नशीब-दैव उघडण्यासाठीं. *In luck*, दैवीं असणें; *out of l.*, have no luck. दैवांत नसणें, नशिबांत नसणें.

Lŭck'ў, *a.* (ल'कि)—favoured by fortune, in luck; due to luck rather than skill or merit, fortunate. दैववान, भाग्यशाली; सुदैवाचा, भाग्याचा. *Lucky-bag,-tub*, of hidden toys etc. into which each comer dips. खेळणीं वगैरे आंत ठेवलेली सोडतीची पिशवी. *You're a lucky dog*, form of congratulation esp. to an accepted lover. (प्रियकराला संबोधिण्याचा प्रकार.) *L. beggar*, *L. bargee*, of or to a person in luck. दैववान! नशिबाचा! *Lucki'ness*, *n.* दैवयोग, भाग्यशालीपणा.

Lu'crătĭve, *a.* (लू'क्रटिव्)—yielding considerable profit, gainful, profitable. नफ्याचा, किफायतशीर.

Lu'cre, *n.* (लू'कर्)—pecuniary gain as a motive. द्रव्यप्राप्ती, लाभ.

Lucŭbrā'tion, *n.* (लूक्यूब्रे'शन्)—nocturnal study; an essay or dissertation. रात्रीं जागून केलेला अभ्यास, ध्यान, चिंतन; (वाङ्मयात्मक) निबंध, ग्रंथ.

Lu'cŭlent, *a.* (लू'क्यूलेन्ट्)—clear; lucid. स्पष्ट; स्वच्छ.

Lu'dĭcrous, *a* (लू'डिक्रस्)—absurd, ridiculous. laughable. हास्यास्पद, हास्यप्रद, हास्यजनक.

Lŭff, *n. & v. t. & i.* (लफ्)—to bring ship's head nearer the wind. गलबताची नाळ वाऱ्याकडे करणें. *n.* नाळीच्या जवळचा गलबताचा सर्वांत रुंद भाग.

Lŭg, *v. t. & i.* (लग्)—to drag with effort or violence; to pull hard at. जोरानें ओढणें-खेंचणें, धरून ओढणें. *n.* the act of lugging, hard or rough pull. खेंचणें, ओढणें, जोराचा हिसडा, हिसका. 2. an ear. कान, कानाची पाळ, कानपा.

Lŭgg'age, *n.* (ल'गेज्)—a traveller's packages or baggage. प्रवासाचें सामानसुमान.

Lugū'brious, *a.* (लूग्यू'ब्रिअस्)—doleful. दुःखदायक, विषण्ण.

Luke'warm, *a* (लूक्-वॉर्म्)—neither hot nor cold; half-hearted. कोमट; कमी आस्थेचा, उदासीन.

Lŭll, *v. t. & i.* (लल्)—to send to sleep; to soothe; (of storm or noise) to lessen, to fall quiet. अंगाई करून निजविणें; सान्त्वन करणें; (वादळ) कमी होणें. *n.* intermission in storm or pain. वादळानंतरची शांतता, दुःख कमी होणें. *Lu'llingly, adv.* शांतवून, अंगाई करून.

Lŭll'abȳ, *n. & v. t.* (ल'लबाय्)—a lulling song or sound. पाळणा, अंगाई गीत (गाणें).

Lumbā'go, *n.* (लम्बे'गो)—(*pl.*-os) a rheumatic affection of the muscles about the loins. उसण, कटिवात. *Lumba'ginous,* (लम्बे'जिनस्) *a.* उसणेसंबंधीं, कटिवातासंबंधीं. [L *lumbus*, loin]

Lŭm'bar, *a.* (ल'म्बर्)—of, or in, the loins. कमरेंतील, कमरेचा.

Lŭm'ber, *a.* (ल'म्बर्)—disused articles; anything useless and cumbersome; roughly prepared timber. अडगळ; निरुपयोगी सामान; लांकडाचा ओंडका. *L. room,* अडगळीची खोली, सटरफटर सामानाची खोली. *v.t. & i.* 1. to cumber or obstruct; to go heavily and noisily. अस्ताव्यस्त डाळणें,-रचणें, अडगळ करणें; जिवावर पाऊल टाकणें, धडपडत चालणें. 2. to cut and prepare forest timber. जंगलांतील इमारती लांकूड तोडणें. *Lu'mberer, n.* रानतोड्या, जंगलतोड्या.

Lumière, *n.* (लूमिएअर्)—*L. process,* a colour photography method. रंगीत छायाचित्र काढण्याची पद्धति. *L. plate,* रंगीत छायाचित्र काढण्याची (प्लेट) कांच. [Brothers L., inventors]

Lu'mĭnarȳ, *n.* (लू'मिनरि)—shedder of light, esp. the sun or the moon; a light; a person noted for learning, &c. सूर्यचंद्रादि तेजस्वी गोल; प्रदीप; विद्वद्रत्न.

Lumĭnĭf'erous, *a.* (लूमिनि'फरस्)—producing or transmitting light. प्रकाशद, प्रकाशवाहक, तेजोवाहक.

Lu'mĭnous, *a.* (लू'मिनस्)—shedding light. प्रकाशमान. *Luminos'ity, n.* तेजस्विता, तेजोमयता. *Lu'minously, adv.* प्रकाश पाडून, तेजस्वीपणें.

Lŭmp, *n.* (लम्प्)—compact shapeless mass; the whole taken together; protuberance or swelling; a heavy ungainly person. गड्डा, ढिपळ; गड्डा; टेंगूळ; सुस्त जड मनुष्य. *v. t. & i.* to class together; to take in the lump; to go heavily; to dump down in a mass. *v.t.* to be pleased at, to put up with ungraciously. एक रास करणें, एकत्र करणें; एकदम मोडणें,-लिहिणें; जड पावलांनीं चालणें; अडगळींत टाकणें; संतुष्ट होणें, समाधान मानून घेणें. *In the lump,* एकूण. *L. fish,* fish clinging to objects by means of sucking disk on belly. पोटानें पदार्थांना चिकटून राहणारा एक मासा. *L. sugar,* loaf sugar broken or cut into lumps or cubes. खडीसाखर. *L. sum,* a sum covering number of items, a sum paid down at once in lieu of instalments. ठोकळ रक्कम, रोख दिलेली रक्कम (हप्तेबंदीनें न दिलेली ती).

Lŭm'pĭsh, *a.* (ल'म्पिश्)—heavy; clumsy; dull. जड, स्थूल; ओबडधोबड; आळशी, सुस्त.

Lŭm'pȳ, *a.* (ल'म्पि)—full of or covered with lumps; (of water) choppy, cut up by wind into small waves. गुठळ्यांचा, गड्ड्यांचा, ढेंपाळ; वीचिमय, लाटा आलेलें (पाणी).

Lu'nacȳ, *n.* (लू'नसि)—insanity; folly. वेड; मूर्खपणा.

Lu'nar, *a.* (लू'नर्)—of, in, depending on or caused by the moon. चंद्राचा, चांद्र. *L. month,* चांद्रमास (चार आठवड्यांचा). *L. day,* तिथि. *L. eclipse,* चंद्रग्रहण. *L. politics,* unpractical questions. अव्यवहारी गोष्टी,-प्रश्न. [L *luna*, the moon]

Lu'nāte, *a.* (लू'नेट्)—crescent-shaped. अर्धचंद्राकार.

Lu'natic, *a.* (लू'नटिक्)—mad, insane; outrageously foolish. वेडा; अत्यंत मूर्ख, पिसाटलेला. *n.* a lunatic person. माथेफिरू-वेडा मनुष्य. *L. asylum,* वेड्यांचा दवाखाना.

Lŭnch, Lŭn'cheon, *nn.* (लंच्, ल'न्चन्)—mid-day meal; light refreshment taken between breakfast and dinner. दोन प्रहरचें जेवण; अल्पाहार. *Lunch, v.i. & t.* to take lunch, to provide lunch for. जेवण करणें, जेवण घालणें.

Lŭng, *n.* (लंग्)—either of the pair of air-breathing organs in animals. फुफ्फुस. *Lung'er*, *n.* (लं'गर्) consumptive. क्षयी मनुष्य.

Lŭnge, *n.*, *v. t.* & *i.* (लंज्)—a thrust with sword etc., a sudden delivery of blow or kick; plunge. तलवारीनें खुपसणें, आकस्मिक तडाखा-लाथ-देणें; खुपसणें.

Lu'pīne, *a.* (लू'पाइन्)—of or like wolves. लांडग्यांच्या-सारखा. [L *lupus*, a wolf]

Lu'pĭne, *n.* (लू'पिन्)—kinds of garden and fodder plant; (pl.) its seeds. बागेंतील व चराईच्या वनस्पति; (अने०) त्यांचें बी.

Lu'pus, *n.* (लू'पस्)—an ulcerous skin-disease. नाकाला होणारा त्वग्रोग, वृकविकार. *Lu'poid*, *Lu'pous*, *aa.* [L *lupus*, a wolf].

Lŭrch, *n.* (लर्च्)—In phr. *To leave in lurch* = desert one in difficulties. तोंडघशीं पाडणें, अवसानघात करणें. *n.* sudden shifting of the weight to one side. झोकांडी. *v. i.* to make a lurch; to go with lurches. कलंडणें, झोकांडी जाणें, धडपडत जाणें.

Lŭrch'er, *n.* (ल'चर्)—a petty thief, a swindler, a spy; a cross-bred dog used esp. by poachers भुरटा चोर, फसव्या, टेहेळ्या; एक जातीचा कुत्रा (चोरट्यांचा साथीदार).

Lure, *n.* (ल्यूअर्)—something used to entice. आमिष, लालूच. *v. t.* to recall with lure; to entice; to attract. आमिष दाखवून पकडणें; लालूच दाखवणें.

Lŭr'id, *a.* (ल्यू'अरिड्)—ghastly, glaring, or terrible (in colour, &c.), pale yellow. भयानक, घोर, दृष्टी दिपविणारा, अंधुक, मलिन, निस्तेज. *Casts a lurid light on* (facts or character), भडक रीतीनें, भयानकपणें,-वर्णन करणें,-रंगविणें.

Lŭrk, *v. i.* (लर्क्)—to keep out of sight; to be hidden, to be latent or elusive. तोंड चुकवणें, टाळाटाळ करणें; दडून बसणें, अदृश्य असणें. *n.* *On the lurk*, spying. चोरून नजर ठेवणारा, पाळत ठेवणारा. *Lurking place*, hiding place. दबा धरून बसण्याची-लपण्याची-जागा, दडण, लपण.

Lŭ'scious, *a.* (ल'शस्)—richly sweet in taste or smell; sickly sweet; over-rich in sound, imagery or voluptuous suggestion (of language or literary style). मिठास, अति गोड, अति मधुर; वीट आणणारें; मनावर पकड बसविणारी (भाषा इ०), अति मोहक.

Lŭsh, *a.* (लश्)—1. luxuriant, succulent. जोमदार, भरदार, कसदार (गवत). 2. (slang) *n.* liquor, drink. दारू. *Lushy*, *a.* drunk. झिंगलेला.

Lŭst, *n.* (लस्ट्)—passionate enjoyment or desire; lascivious passion. हांव, लालसा; पापवासना, विषयसुखेच्छा. *v. i.* to have passionate longing. पापवासना धरणें, लुब्ध होणें, लोभणें. *Lust'ful*, *a.* हावरा, दुष्टबुद्धीचा, कामुक.

Lŭstrā'tion, *n.* (लस्ट्रे'शन्)—ceremonial washing or other rite of purification. हवन करून केलेली शुद्धी, शुद्धीकरण, पवित्रीकरण. *Lus'tral*, *a.* used in lustration. शुद्धीचा, शुद्धिकारक, पावक.

Lŭs'tre, *n.* (ल'स्टर्)—gloss, shining surface, brilliance; splendour. तुळतुळीतपणा; चमक, तेज; रंगरूप, नांव, नांवरूप. *To add lustre to*, to throw or shed light on, (वर) प्रकाश पाडणें. *v. t.* to put lustre on (cloth, pottery etc.). झिलई-चकाकी-देणें.

Lŭs'trĭne, Lute'strĭng, *nn.* (ल'स्ट्रिन्, लू'टस्ट्रिङ्)—a glossy silk fabric. एक प्रकारचें झगझगीत रेशमी कापड.

Lŭs'trous, *a.* (ल'स्ट्रस्)—shining; full of lustre, luminous. तेजस्वी; कांतिमान्, पाणीदार, चकचकीत.

Lŭs'trum, Lŭs'tre, *n.* (ल'स्ट्रम्, ल'स्टर्)-(pl.-tra, -trums,-tres) a period of five years. वर्षपंचक, पांच वर्षांचा काल.

Lŭs'tў, *a.* (ल'स्टि)—healthy and strong, robust, healthful, vigorous, lively. धट्टाकट्टा, सुदृढ; जोमदार, बलवान, जाड, लठ्ठ. *Lus'tihood, Lus'tiness*, *nn.*; *Lus'tily*, *adv.* जीव तोडून, जोमानें.

Lute, *n.* (लूट्)—1. a guitar-like instrument. इंग्रजी वीणा, तुंबरा. *Lu'tanist*, *n.* a luteplayer. वीणावादक. 2. *n.* & *v. t.* clay or cement used to stop hole, make joint airtight etc. लुकण, चिकट माती (लावणें, छिद्र सांधणें).

Lŭxŭr'iant, *a.* (लक्स्यू'रिअन्ट्)-profuse; (*of style*) florid. अतिशय, वाजवीपेक्षां फाजील; अलंकारिक (भाषा, शैली). *Luxur'iance*, *n.* माज, वृद्धि, विपुलता, रेलचेल.

Lŭxŭr'ious, *a.* (लक्स्यू'रिअस्)—fond of luxury; selfindulgent; exuberant. विलासी; चैनी; विपुल.

Lŭxŭr'iāte, *v. i.* (लक्स्यू'रिएट्)—to feel keen delight in; to grow profusely. अत्यानंद वाटणें, चैन करणें; जोमानें वाढणें, फोफावणें.

Lŭx'urў, *n.* (ल'क्शरि)—gratification of the senses; a desirable thing that can be done without. विषयवासनातृप्ति, चैन, विलास; ऐषआरामाचा-चैनीचा-पदार्थ.

Lўcē'um, *n.* (लायसी'अम्)—the garden in which Aristotle taught; a lecture-hall. ॲरिस्टॉटलचें उद्यान,-विद्यापीठ; सभागृह.

Lўdd'īte, *n.* (लि'डाइट्)—an explosive for shells. स्फोटक द्रव्य.

Lўe, *n.* (लाय्)—water alkalized with wood, ashes etc. for washing. (धुण्यासाठीं) साबणांत वापरण्याचें पोट्याश खाराचें किंवा सोडाखाराचें मिश्रण.

Lў'ing-in', *n.* (लाॅ'यिंग् इ'न्)-being in child-birth. बाळंतपण ; (attrib.) *lying-in hospital.* (बाळंतपणाचें) सूतिकागृह.

Lўke'-wāke, *n.* (ला'इक्-वेक्)—watch kept at night over a dead body. प्रेतावरचा रात्रीचा पहारा.

Lўmph, *n.* (लिम्फ्)—pure water ; colourless fluid from organs of the body ; matter from cowpox vesicles used in vaccination. शुद्ध पाणी ; लसिका, श्वेतधातु ; गोस्तन देवींची लस. *Lymphat'ic*, *a.* of or secreting lymph. लसिकेचा, शोषकरससंबंधीं ; रस-वाहक. *n.* a vein-like vessel conveying lymph. शोषकरसवाहिनी

Lўnch, *v. t.* (लिंच्)—to execute by procedure or a self-constituted court that summarily executes offender. आपल्याच अधिकारांत जबरदस्तीनें देहान्त शिक्षा ठोठावणें, जिवंत जाळणें.

Lўnx, *n* (लिंक्स्)—kind of animal of the cat tribe noted for keen sight. कोळसुंदा, (तीक्ष्ण नजरेचें) रानमांजर. *L. eyed*, sharp-sighted. सूक्ष्म नजरेचा, काकदृष्टि.

Lўre, *n.* (लायर्)—obsolete U-shaped stringed instrument of the harp kind. एक तंतुवाद्य, सारंगी. *L. bird*, a bird with lyre-shaped tail. सारंगीच्या आकारासारखी शेंपटी असलेला पक्षी.

Lў'rĭc, *a.* (लि'रिक्)—of or for the lyre ; of the nature of song. वीण्याचा, वीण्यावर गाण्याजोगा, वैणिक ; गानयोग्य, कवनयोग्य. *n.* a lyric poem, (*pl.*) lyric verses. वीण्यावर गाण्याजोगी कविता' वैणिक काव्य, वीणागीताचे,-भावगीताचे,-श्लोक.

Lў'rĭcal, *a.* (लि'रिकल्)—resembling lyric poetry ; high-flown. वीण्यावर गाण्याजोग्या-वैणिक-काव्यासारखा ; उच्च, उद्दीप्त.

Lyr'ĭst, *n.* (ला'यरिस्ट्)—player on the lyre or the harp. सारंगीवाला, सारंगी वाजविणारा.

M

M, (एम्)—thirteenth letter of the English alphabet ; Roman numeral 1,000. इंग्रजी वर्णमालेंतील तेरावा वर्ण ; रोमन संख्या १,०००.

Ma, *n.* (मा)—(vulg.) mamma. आई, मा, ममा.

Ma'am, *n.* (मॅम्)—madam, my lady. बाईसाहेब, मालकीण साहेब, मेम.

Maca'bre, *a.* (मका'बर्)-gruesomely imaginative. भयानक, भयंकर काल्पनिक. *Danse m.*, dance of death. मृत्यूचा नाच, यमराजाचें थैमान.

Macăd'am, *a. & n.* (मकॅ'डम्)—road-surface got by compacting stone broken small. खडी घातलेला (रस्ता).*-ize*, *v. t.* रस्त्यावर खडी घालणें. *-ization*, *n.* खडी घालणें. [from *J.L.McAdam*, the inventor]

Măcarō'nĭ, *n.* (मॅकरो'नि)—wheaten paste formed into long tubes for cooking; 18th cent. dandy. कणकेची गुलाब छडी ; १८ व्या शतकांतील शोकीन गृहस्थ.

Măcarŏ'nĭc, *a.* (मॅकरॉ'निक्)—(of verse) containing Latin or other foreign words, native words with Latin endings etc. ; medley. मिश्र भाषेचा, घेडगुजरी भाषेचा ; (भाषेच्या) खिचडीचा. *n. pl.* macaronic verse. घेडगुजरी भाषेंतील कविता.

Măcarōōn', *n.* (मॅकरू'न्)-a small cake or biscuit of ground almonds etc. बदामी केक किंवा बिस्किट.

Māce, *n.* (मस्)—a medieval hammer-like weapon ; a large-headed staff of office ; nutmeg-husks dried and used us spice. गदा ; अधिकाऱ्याचा दंडधारी जो दंड धारण करतो तो, सोडगा ; जायपत्री. *Mace bearer*, an official carrying this staff. वेत्रधर, भालदार, चोपदार.

Mă'cerāte, *v. t. & i.* (मॅ'सरेट्)—to make or become soft by soaking ; to make lean by fasting, to cause to waste away. भिजविणें, भिजवून नरम करणें,-होणें ; शरीरआळविणें, उपासानें कृश करणें,-होणें. *Macera'tion*, *n.* मऊ करणें, रोडावणें, भिजत घालणें.

Mă'chiavĕl, *n.* (मॅ'किअव्हेल्)—an unscrupulous schemer ; one who practises duplicity in statecraft. कावेबाज,-धूर्त,-दुटप्पी-मुत्सद्दी. कारस्थानी मनुष्य. *Machiavell'ian*, *a.* (मॅकिअव्हे'लिअन्)—लुच्चा, धूर्त, दुटप्पी वर्तनाचा, कारस्थानी. [*f. Niccolo Machiavelli*, of Florence, d. 1527]

Măchĭnā'tion, *n.* (मॅकिने'शन्)—(*usu. pl.*) intrigue ; underhand devices. योजना, युक्ति ; कट, कारस्थान.

Machine', *n.* (मशी'न्)—apparatus ; bicycle ; motor-car, vehicle ; controlling organization in politics, etc ; a person who acts mechanically and without intelligence, or with unfailing regularity. यंत्र, सांचा ; दोन चाकांची सायकल ; मोटार गाडी, वाहन ; राजकीय कंपू ; यंत्राप्रमाणें वागणारा निर्बुद्ध मनुष्य. *v. t.* to print, to sew etc.with a machine. यंत्रानें छापणें, शिवणें

A sewing m., शिवण्याचें यंत्र. *A printing m.*, छापण्याचें यंत्र. *Machine gun*, mounted gun mechanically loaded and fired, delivering continuous fire. सतत गोळया सोडणारी घोड्यावरील तोफ,-बंदूक. *Machinemade*, made by machine, यांत्रिक, यंत्राचा, यंत्रानें केलेला.

Machi'nery, *n.* (मशी'नरि)—machines; mechanism; organization; contrivance, esp. supernatural persons and incidents, used in literary work. यंत्रें; यंत्ररचना; रचना, व्यवस्था; (अलौकिक व्यक्ति व गोष्टी यांची) कथानकांतील योजना.

Machi'nist, *n.* (मशी'निस्ट्)—a maker of machinery; a worker of (esp. a sewing) machine. यंत्रें बनविणारा, यंत्रकार; यंत्र चालविणारा.

Măck'erel, *n.* (मॅ'करेल्)—a sea fish barred with blue and silver. एक जातीचा, पांढुरके ठिपके असलेला, समुद्रांतील मासा. *M. breeze,-gale*, strong and so favourable to *m.* catching. मॅकरेल माशांना पकडण्याला अनुकूल असा वारा. *M. sky*, sky dappled with small white fleecy clouds. लहान लहान पांढुरक्या पातळ ढगांनीं चितारलेलें आकाश.

Măck'ĭntŏsh, *n.* (मॅ'किन्टॉश्)—cloth waterproofed with rubber; cloth, coat, of this. रबराच्या योगानें आंत पाणी न जाईल असें कापड; अशा कापडाचा झगा, पावसाळी कोट.

Măc'rocŏsm, *n.* (मॅ'क्रॉझम्)—the great world, the universe; any great whole. विश्व, ब्रह्मांड, त्रिभुवन; विशाल संपन्न वस्तु. [f. Gk *makros*, long, large]

Măc'ūla, *n.* (मॅ'क्यूला)-(*pl.-lae*) spot of different colour from its surroundings. डाग, ठिपका, कलंक, कातडीवरील खूण.

Măd, *a.* (मॅड्)—of disordered mind, insane; rabid; wildly foolish; (colloq.) annoyed. वेडा; पिसाळलेला; मूर्ख; त्रस्त, त्रासलेला. *Mad doctor*, doctor treating the mad. वेड्यांचा वैद्य (डॉक्टर). *M. house*, a lunatic asylum. वेड्यांचा दवाखाना (इस्पितळ). *M. man,-woman*, माथेफिरू-वेडा पुरुष, वेडी स्त्री.

Măd'am, *n.* (मॅ'डम्)—my lady; polite form of address to women. बाईसाहेब; मडमसाहेब.

Măd'căp, *n.* (मॅ'ड्-कॅप्)—reckless person. अविचारी मनुष्य, वेडापीर, दिवाणा.

Mădd'en, *v. t. & i.* (मॅ'डन्)—to make mad; to irritate; to grow mad, to chafe. वेड लावणें; चिडवणें; वेडा होणें.

Mădd'er, *n.* (मॅ'डर्)—kinds of red dye and plants yielding them. विलायती लाल मंजिष्ठ (रंग व वेल).

Măd'rĭgal, *n.* (मॅ'ड्रिगल्)—a love song. प्रेमगीत.

Mael'strom, *n.* (मे'ल्स्ट्रॉम्)—a whirlpool; a whirl or rush of affairs. पाण्याचा आवर्त, भोंवरा; (गोष्टींची) गुंतागुंत, धडामोड, त्वरा, झपाटा.

Măgazine', *n.* (मॅगझी'न्)—store for explosives, arms, or military provisions; literary miscellany. शस्त्रागार, दारूखाना; नियतकालिक.

Măg'dalen, *n.* (मॅ'ग्डालिन्)—a reformed prostitute. सुधारलेली वेश्या.

Magĕn'ta, *n.* (मॅजे'न्टा)—a crimson aniline dye. किरमिजी रंग. *a.* coloured like magenta. किरमिजी रंगाचें.

Măgg'ot, *n.* (मॅ'गट्)—grub or larva. किडा, अळी.

Mă'gĭc, *n.* (मॅ'जिक्)—witchcraft; mysterious agency or power. जादू; चेटुक, पिशाचविद्या. *Mag'ical*, *a.* of, like or affected by magic. जादूचें, गौडबंगाली.

Măgi'cian, *n.* (मॅजि'शन्)—one skilled in magic: necromancer. जादूगार; चेटक्या, भुताटक्या.

Măgistēr'ĭal, *a.* (मॅजिस्टी'रिअल्)-of a magistrate; dictatorial. मॅजिस्ट्रेटचा; अधिकारयुक्त, अहंकारयुक्त, चढेल.

Mă'gĭstracy̆, *n.* (मॅ'जिस्ट्रसि)—the magistrates; a magisterial office. मॅजिस्ट्रेटमंडळ; मॅजिस्ट्रेटचा हुद्दा.

Mă'gĭstrāte, *n.* (मॅ'जिस्ट्रेट्)—a civil officer administering law; a justice. न्यायाधिकारी; फौजदारी न्यायाधीश; दिवाणी अधिकारी.

Măgnănĭm'ĭty̆, *n.* (मॅग्नॅनि'मिटि)—dignity of spirit, greatness of mind; generosity. मनाचा मोठेपणा; औदार्य, थोरवी.

Măgnăn'ĭmous, *a.* (मॅग्नॅ'निमस्)—high-souled; liberal and honourable. उदारमनाचा; थोर, दिलदार.

Măg'nāte, *n.* (मॅ'ग्नेट्)—a person influential by wealth or position, a great man. वजनदार गृहस्थ, थोर माणूस. [L *magnus*, great]

Măgnē'sia, *n.* (मॅग्नी'शा)—an oxide of magnesium; also, a carbonate of magnesium used in medicine. मग्न धातूचा क्षार; मॅग्नेशा धातूचें चूर्ण (सौम्य रेचकासाठीं औषधांत योजतात). *Magne'sian*, *a.* of magnesia. मॅग्नेशा धातूचें.

Măgnē'sĭum, *n.* (मॅग्नी'सिअम्)—a chemical element, base of magnesia. मॅग्नेशम् (मग्न) धातू.

Măg'nĕt, *n.* (मॅ'ग्निट्)—a piece of iron having the property of attracting iron and of pointing north; thing that attracts. लोहचुंबक; आकर्षक वस्तु.

Măgnĕt'ic, *a.* (मॅग्ने'टिक्)—of or like or acting as a magnet; exercising attraction; mesmeric. लोहचुंबकाचा; आकर्षक, आकर्षणशील; मोहक, मोहिनी घालणारा. *M. needle*, लोहचुंबक कांटा. *Magnet'ics*, *n. pl.* science of magneticism. लोहाकर्षणशास्त्र.

Măg'nĕtism, *n.* (मॅ'ग्निटिझम्)—magnetic phenomena; natural agency producing these; (*fig.*) attraction, personal charm. लोहाकर्षण चमत्कार; लोहाकर्षणशास्त्र, लोहचुंबनशास्त्र; आकर्षण, व्यक्तिगत मोहकता, मोहिनी. *Animal m.*, mesmerism. मोहिनीविद्या, मोहनधर्म, मनोवशीकरण विद्या. *Terrestrial m.*, magnetic properties of the earth as a whole. भूचुंबकत्व.

Măg'nĕtize, *v. t.* (मॅ'ग्निटाइझ्)—to make into a magnet; to attract like a magnet. लोहचुंबकत्व आणणें; चुंबित करणें, आकर्षण करणें, वश करणें.

Măgnē'tō, *n.* (मॅग्नी'टो)—(*pl.-os*) a magneto-electric machine, in igniting apparatus of petrol engine. चुंबकीय विद्युद्यंत्र, पेट्रोलवर चालणाऱ्या यंत्राचें गतिप्रेरक साधन.

Măgnō'tophōne, *n.* (मॅग्नी'टाफान्)-a form of microphone. एक प्रकारचें ध्वनिक्षेपक यंत्र.

Măgnĭf'ĭcent, *a.* (मॅग्नि'फिसेन्ट्)—grand in appearance, splendid; imposing; first-class. छानदार; भव्य; उत्तम, ठीक, छान. *Magnif'icence*, *n.* भव्यता, शोभा, थाटमाट. *Magnif'icently*, *adv.* भपक्यानें, दिमाखानें, भव्यपणानें.

Măg'nĭfier, *a.* (मॅ'ग्निफायर्)—one that magnifies, a magnifying lens. मोठा करून दाखविणारा, सूक्ष्मदर्शक भिंग.

Măg'nĭfȳ, *v. t.* (मॅ'ग्निफाय्)—to show on an enlarged scale, to increase the power or glory of; to extol, to exalt. मोठा करून दाखवणें, वाखाणणें, पराचा कावळा करणें.

Măgnĭl'oquent, *a.* (मॅग्नि'लावर्वेट्)—lofty in expression, boastful. डवदार बोलणारा, मौढ शब्दयोजना करून बोलणारा; घमेंड्या, बढाईखोर. *Magnil'oquence*, *n.* high flown words or style. पल्लेदार शब्दयोजना, डवदार शब्द, मौढ भाषण. *Magnil'oquently*, *adv.* घमेंडीनें, डौलानें. [L *magnus*, great, *loquus*, speaking]

Măg'nĭtūde, *n.* (मॅ'ग्निट्यूड्)—size, bulk; importance. आकार, परिमाण; महत्त्व, थोरवी.

Măgnōl'ia, *n.* (मॅग्नो'लिआ)—a flowering tree. एक फूलझाड, कवठी चांफा.

Măg'pie, *n.* (मॅ'ग्पाय्)—black and white chattering bird; chatterer. नीलकण्ठ पक्षी; बडबड करणारा.

Maid, *n.* (मेड्)—virgin, spinster; young girl; female servant. कुमारी, कुमारिका; लहान मुलगी; परिचारिका, दासी.

Maid'en, *n. & a.* (मे'डन्)—virgin; unmarried; untried; (hist.) a kind of guillotine used at Edinburgh; (Crick.) maiden over, one in which no runs are scored. कुमारिका; लग्न न झालेली; कोराकरीत, प्रथम (प्रयत्न); (ऐति॰) एक फांशी देण्याचें साधन (यंत्र); मुळींच धांवा न देतां केलेली गोलंदाजीची पाळी. *M. name*, लग्नापूर्वीचें कुमारिकेचें नांव. *M. hair*, a delicate fern. एक प्रकारचा नेचा, सितेचे केंस. *Maid'enish,-like,-ly*, *aa.* कुमारिकेसारखा, लाजाळू, लाजरा.

Maid'enhood, *n.* (मे'डन्हुड्)—virginity. कौमार्य. (Also) *Maid'enhead.*

Maid'en speech, *n.* (मे'डन् स्पीच्)—a person's first speech in an assembly. सभाजांत-लोकसभेंत -प्रथमच केलेलें भाषण.

Mail, *n.* (मेल्)—1. armour of metal rings or plates; 2. bag or case of postal letters and papers, the post (esp. oversea post). चिलखत, कवच; डांक, टपाल. *v. t.* to send by mail. टपालानें पाठविणें. *Mailed*, *a.* clad in mail. कवच घातलेला; चिलखती, चिलखत घातलेला. *The mailed fist*, (*fig.*) physical force. आडदांडपणा, शारीरिक बळजोरी.

Maim, *v. t.* (मेम्)—to cripple; to mutilate; to disable. लंगडा करणें; कापून टाकणें; असमर्थ करणें, पंगू करणें.

Main, *a.* (मेन्)—1. chief, principal, most to be regarded or considered. मुख्य, प्रमुख, श्रेष्ठ. *n.* the gross; chief part; the high sea; a main pipe or channel for water, gas, etc. सर्व भाग; मुख्य भाग; महासागर, समुद्र, पाण्याचा-गॅसचा-मुख्य नळ. 2. physical force (only in *with might & main*, जीव तोडून, मोठ्या जोरानें) शक्ति, शरीरसामर्थ्य; बळ. *In the main*, for the most part, ठोकळ मानानें, एकंदरीनें.

Main, *n.* (मेन्)—number called in hazard before throwing of dice; match between fighting cocks. जुगारांतील अंदाजी अंक. कोंबड्यांची झुंबडशर्यत.

Main'land, *n.* (मे'न्-लन्ड्)—a country or continent without its adjacent islands. मुख्य भूप्रदेश, भूखण्ड, मुख्य भूमि.

Main'lȳ, *adv.* (मे'न्-लि)—in the main. मुख्यत्वें-करून.

Main'mast, *n.* (मे'न् मास्ट्)—principal mast. डोलकाठी, गलबताचा मधला डोल.

Main'sail, *n.* (मे'न् सेल्)—lowest sail of main mast. मुख्य शीड, अवजार.

Main'spring, *n.* (मे'न्स्प्रिंग्)—chief spring of watch or clock (also fig.). घड्याळाची मुख्य (स्प्रिंग) कमान, मुख्य हेतु, प्रेरक शक्ति.

Main'stay, *n.* (मे'न्स्टे)—chief support or helper, principal dependence. मुख्य आधार, टेकू.

Maintain', *v. t.* (मेन्टे'न्)—to keep up; keep going; to keep in repair; to support; to assert as true, to uphold, to defend, to vindicate. राखणें; चालवणें, सुरू ठेवणें; शाबूत ठेवणें; संभाळणें, पालनपोषण करणें, खर्च चालविणें; स्थापित करणें. *To m. oneself*, स्वतःचा उदरनिर्वाह चालविणें; आत्मसमर्थन करणें. *Maintain'able, a.*

Main'tenance, *n.* (मे'न्टिनन्स्)—maintaining; a subsistence; (Law) offence of aiding a party in litigation without lawful cause. संभाळ, रक्षण, पालनपोषण; निर्वाह, निर्वाहाचें साधन; बेकायदेशीर रीतीनें दुसऱ्याच्या वाद्यांत ढवळाढवळ करणें. *Cap of m.*, अधिकारदर्शक टोपी, फेटा वगैरे शिरस्त्राण.

Maize, *n.* (मेझ्)—Indian corn. मका.

Măj'ěstў, *n.* (मॅ'जिस्टि)—stateliness of aspect, manner, language, &c. भव्यता; डौल, ढब; ऐश्वर्य, वैभव. *His Majesty, your M.*, in speaking to or of sovereign. हुजूर, महाराज (सार्वभौम राजाचा किताब).

Majěs'tic, *a.* (मॅजे'स्टिक्)—stately. वैभवशाली, भव्य, उदात्त, ऐश्वर्याचा, राजसत्तेचा.

Majŏl'ica, *n.* (मजॉ'लिका)—Italian pottery. इटली देशांतील मातीचीं झिलईदार भांडीं.

Mā'jor, *a.* (मे'जर्)—greater of two units or sets; senior. अधिक मोठा; मुख्य, अधिकसंख्याक, श्रेष्ठ. *n.* a person of full age, a person no longer a minor; a major premise; an army officer ranking above captain. वयांत आलेला, सज्ञान; (तर्कशास्त्र) साध्यप्रमाण, प्रतिज्ञा; कॅप्टनच्या पेक्षां वरच्या दर्जाचा सेनाधिकारी. *Majordo'mo*, (pl.-os) house-steward. घरांतील मुख्य कारभारी, घरकारभारी. *Ma'jor general*, an army officer ranking next to lieutenant general. ले० जनरलच्या खालचा सैन्याधिकारी.

Majŏ'rity, *n.* (मजॉ'रिटि)—the greater number, more than half; coming or being of age; the number by which the winning vote exceeds the next; the rank of major. मोठी संख्या, निमेपेक्षां जास्त संख्या; वयांत येणें; मताधिक्य, बहुमत; मेजरचा हुद्दा. *To join the majority*, to die, मरणें.

Māke, *v. t. & i.* (मेक्)—to create; to manufacture; to amount to, constitute; to acquire by effort, to earn; to produce by cookery; to perform or execute; to take specified direction; to win (trick); to score (runs); to utter or put on record. निर्माण करणें, अस्तित्वांत आणणें; तयार करणें, बनवणें; एकंदर होणें; कमावणें, मिळविणें; शिजवून तयार करणें; कृतींत आणणें; ठराविक दिशेनें जाणें, वळविणें; (डाव, खेळ) जिंकणें; (धांवा) काढणें; विशेष करून सांगणें किंवा लिहून ठेवणें. *n.* the way a thing is made; figure or shape, structure, texture. छाप, घाट; ठेवण; बनावट, घडण. *To make or mar*, to cause success or ruin of. यश किंवा अपयश आणणें. *To m. a bed*, बिछाना घालणें. *To m. amends*, नुकसानभरपाई करून देणें, भरून देणें. *To m. a bag*, to kill a number of game. शिकार करून पुष्कळ पशू मारणें. *To m. a book*, to arrange series of bets on the same event. सट्ट्याच्या आंकड्यांचें वगैरे पुस्तक तयार करणें. *To m. away with*, लांबविणें, ठार मारणें, उधळपट्टी करणें. *To m. off*, to run away, decamp (with stolen goods etc.). पःपलाय करणें. *To m. up* one's *mind to*, चा निश्चय करणें. *To m. much of*, चें स्तोम माजविणें. *To m. little (or light) of*, तुच्छ मानणें, पर्वा न करणें. *To m. of*, चा अर्थ समजणें-काढणें-करणें. *To m. water*, लघवी करणें, मुतणें. *M. peace, n.* भांडण मिटविणारा.

Make'-believe, *n.* (मे'क्-बिलीव्ह्)-pretence, sham. ढोंग, सोंग, बतावणी, लुटुपुटुपणा.

Māke good, *v. t.* (मेक् गुड्)—to fulfil promise, &c.; to make up for defect, to pay expense; to prove a statement; (colloq.) to succeed in undertaking. वचन पाळणें; भरपाई करणें, खर्च देणें; सिद्ध करणें; हातीं घेतलेल्या कामीं यश येणें.

Māke out, *v. t.* (मेक् आउट्)—to draw up or write out (list, &c.); to prove, to represent; to understand, to discover; to extend; to succeed. लिहून काढणें; सिद्ध करणें, दाखविणें; समजणें, शोधून काढणें; वाढविणें; यश मिळवणें.

Māke'shift, *n.* (मे'क्-शिफ्ट्)—a method, tool, &c. used for want of a better. चांगल्याच्या अभावीं कसें तरी चालविणें, (तात्पुरती) युक्ति, हिकमत, तजवीज, इलाज, उपाय.

Māke up, *v. t.* (मेक् अप्)—to supply the deficiency; to complete; (of actor) to adapt face, etc. for his part. उणीव भरून काढणें; मिटविणें, पूर्ण करणें; (नटाचें) रंगणें. *n.* the way actor is made up; the way type is made up into pages; a fabrication; materials used for making up, cosmetics. नटाचें रंगणें-, नटणें-सजणें.

सजवणूक; टाइपांची पृष्ठांत जुळणी; बनावटपणा; चेहरेपट्टी सजविण्याचें साहित्य, रंग व सुवासिक पदार्थ.

Māke'weight, *n.* (मे'क्-वेट्)—a small quantity added to or thrown to make up weight. पासंग.

Mā'ker, *n.* (मे'कर्)—one who makes anything; the Creator. कर्ता, सृष्टिकर्ता; परमेश्वर.

Mā'kĭng, *n.* (मे'किंग्)—act of making; workmanship, structure; (*pl.*) earnings, profits; essential qualities; (sl.) paper and tobacco for rolling a cigarette. तयार करणें; कारागिरी, बनावट; उत्पन्न, नफा, फायदा; आवश्यक गुण; कागद, तंबाखू वगैरे सिगारेट बनविण्याचें साहित्य.

Măl-, *prefix* (मॅल्)—(1) badly, (2) un-. सदोष, वाईट, बद्-, गैर-.

Malăcc'a cāne, *n.* (मलॅ'का केन्)—a rich-brown walking-cane, from the stem of a palm. गर्द पिंगट रंगाची वेतांची काठी.

Măl'achīte, *n.* (मॅ'लकाइट्)—a green mineral. एक हिरवा खनिज पदार्थ.

Măladjŭst'ment, *n.* (मॅलॅड्जस्ट्मेंट्)-faulty adjustment. सदोष जुळणी, नादुरुस्ती, दुर्व्यवस्था.

Măladmĭnĭstrā'tion, *n.* (मॅलॅड्मिनिस्ट्रे'शन्)—faulty or bad administration. सदोष राज्यकारभार, बद्-अंमल.

Măl'adroit, *a.* (मॅ'लड्राइट्)—bungling, tactless. अकुशल, आडमुठ्या, अडाणी, अव्यवहारी. *Mal'adroit'ly*, *adv.*; *mal'adroit'ness*, *n.* अकुशलता.

Măl'adў, *n.* (मॅ'लडि)—ailment, disease. आजार, रोग.

Măl'aise, *n.* (मॅ'लेझ्)—feeling of illness or uneasiness. अस्वस्थता, चैन नसणें.

Măl'apert, *a.* & *n.* (मॅ'लॅपर्ट्)—saucy; forward (person). उद्धट, दांडगा; धीट, धृष्ट (मनुष्य).

Mălăpropos', *adv.* (मॅलॅप्रॅपो')—inopportunely. अवेळीं. *a.* said or done or happening inopportunely. अवेळीं म्हटलेलें,-केलेलें,-घडलेलें. *n.* an inopportune thing. अवेळीं घडलेली गोष्ट.

Malār'ĭă, *n.* (मले'रिआ)—fever due to or produced by mosquito bites. हिंवताप, शीतज्वर. *Malar'ial,-ious*, *aa.*

Malay', *n.* (मॅले')—native, language, of Malacca. मलाक्काबेटांतील रहिवाशी, त्याची भाषा.

Măl'content, *n.* (मॅ'ल्कन्टेन्ट्)—a disaffected or discontented person. असंतुष्ट प्रजाजन, असंतोषी मनुष्य.

Māle, *a.* (मेल्)—of the impregnating sex, masculine. पुरुषजातीचा, मर्दानी. *n.* a male person or animal. पुरुष, नर.

Mălĕdĭc'tion, *n.* (मॅलिडि'क्शन्)—imprecation or curse. अमंगल वचन, शाप. (*opp. to* Benediction). *Maledic'tory*, *a.*

Măl'efactor, *n.* (मॅ'लि-फॅक्टर्)—a criminal; an evildoer (*opp. to* Benefactor). गुन्हेगार; दुसऱ्याचें वाईट करणारा.

Malĕf'ic, Malĕf'icent, *aa.* (मॅले'फिक्, मॅले'फिसन्ट्)-(of magical arts etc.) hurtful, noxious. विघातक, दुष्ट, बाधक, उपद्रवी. *Malef'icence*, *n.*

Malĕv'olent, *a.* (मॅले'व्होलन्ट्)—wishing ill to others, malicious, spiteful. दुसऱ्याचें वाईट इच्छिणारा, दुष्टबुद्धि. *Malev'olence*, *n.*

Mălfeas'ance, *n.* (मॅल्फी'झन्स्)—(law) an official misconduct, evil doing. गैरकायदा वर्तणूक.

Mălformā'tion, *n.* (मॅल्फॉर्मे'शन्)—faulty formation. सदोष घडणें, शारीरिक व्यंग. *Mal'formed*, *a.* (मॅ'ल्फॉर्म्ड्).

Măl'ice, *n.* (मॅ'लिस्)—ill-will; desire to do harm, spite, rancour. द्वेष, आकस; अदावत, चुरस. *To bear m.* (*to*), cherish vindictive feelings (against), (चा) आकस धरणें, द्वेषबुद्धि धरणें. [L *malus*, bad]

Malĭ'cious, *a.* (मॅलि'शस्)—bearing ill-will; wishing to do harm. द्वेषी, मत्सरी; द्वेषमूलक (फिर्याद), अदावत करणारा.

Malign', *v. t.* (मला'इन्)—to slander, to traduce, to defame, to vilify, to misrepresent. निंदा करणें, तुफान रचणें, नालस्ती करणें. *a.* maleficent; (of disease) malignant. अनिष्ट, खडतर; अति तीव्र, दुःसाध्य (रोग).

Malĭg'nant, *a.* (मॅलि'ग्नन्ट्)—outrageously malevolent; (of disease) of the more virulent type; (hist.) a supporter of Charles I against Parliament. अत्यंत दुष्टबुद्धीचा; अतिशय विषारी किंवा घातकी; (इति०) पहिल्या चार्लसचा अनुयायी. *Malig'nancy*, *n.*, *malig'nantly*, *adv.*

Malĭg'nĭtў, *n.* (मॅलि'ग्निटि)—malignant disposition or properties. उभा दावा, खडतर वैर, अत्यंत दुष्ट स्वभाव; (रोगांचा) घातुकपणा, दुस्साध्यता.

Malĭng'er, *v. i.* (मलिं'गर्)—to pretend illness to escape duty (esp. of soldiers & sailors). (काम चुकविण्यासाठीं) आजारीपणाचें ढोंग करणें. *Maling'erer*, *n* चुकारतट्टू.

Măl'ison, *n.* (मॅ'लिझन्)—(arch.) a curse. अपशब्द, शाप, दुष्ट वचन.

Măll'ard, *n.* (मॅ'लर्ड्)—a wild duck; its flesh. जंगली बदक, त्याचें मांस.

Măll'eable, *a.* (मॅ'लिअबल्)—that can be or capable of being shaped by hammering; educable, pliable. ठोकून आकार देण्याजोगा; लवचीक, सहज वळणारा. *Malleabil'ity, n.*

Măll'et, *n.* (मॅ'लिट्)—hammer with large wooden head (for driving pins, chisels, etc.); an implement for striking polo ball. लांकडी हातोडा, मोगरा; पोलोचा चेंडू खेळण्याचें साधन.

Măll'ow, *n.* (मॅ'लो)—kinds of plant. रानटी फुलझाड.

Malmsey, *n.* (मा'म्झि)—a strong sweet wine. माम्झी द्राक्षाची दारू.

Mălnūtri'tion, *n.* (मॅल्-न्यूट्रि'शन्)—underfeeding. उपासमार.

Mălō'dorous, *a.* (मॅलो'डरस्)—stinking. घाण मारणारें, दुर्गंधी.

Mălprăc'tice, *n.* (मॅल्-प्रॅ'क्टिस्)—wrong doing (*usu.* in *pl.*); wrongful procedure. दुष्कृत्य; चुकीची-सदोष-पद्धत.

Malt, *a.* (माल्ट्)—barley or other grain prepared for brewing. सातूचें वाळलेलें सत्व. *v. t.* to convert grain into malt. (धान्याचें-सातूचें) उंबलें करणें.

Măltreat', *v. t.* (मॅल्ट्री'ट्)—to handle roughly, to use badly, to treat roughly. वाईट रीतीनें वागविणें, धुसडणें. *Maltreat'ment, n.* गैरवागणूक, धुसडा.

Mălversā'tion, *n.* (मॅल्व्हर्से'शन्)—corrupt handling of public or trust money. सार्वजनिक पैशांच्या बाबतींत दुर्वर्तन,-अफरातफर.

Mammä', *n.* (ममा')—mother. आई.

Mămm'al, *n.* (मॅ'मल्)—member of the *mammalia* or animals that give suck. सस्तन वर्गातील प्राणी. *Mamma'lian, a.*; *mam'mary, a* of the breasts. स्तनांचें, स्तनसंबंधी. *Mammif'erous, a.* having breasts. सस्तन.

Mămm'on, *n.* (मॅ'मन्)—wealth as an object of pursuit, or evil influence; the purse-proud. संपत्ति, वैभव, लक्ष्मी; धनमत्त.

Mămm'oth, *n.* (मॅ'मथ्)—an extinct elephant; (*attrib.*) huge. सध्यां अस्तित्वांत नसलेली हत्तीची जात; प्रचंड, फार मोठा, विराट, विशाल.

Mămm'y̆, *n.* (मॅ'मि)—mother (in nursery and derisive use); coloured woman in charge of white children. आई; दाई.

Măn, *n.* (मॅन्)—(pl. *men*) a human being; a male (and usu. adult) person; a male servant, a workman; the human race; husband; an ordinary soldier or sailor; a piece at draughts. मनुष्य, पुरुष; नोकर, कामगार; मनुष्यजाति, मानवजाति, लोक; नवरा, दादला; सामान्य शिपाई किंवा खलाशी; मोहरें, सोंगटी. *v. t.* to supply with men; to guard, to fortify. माणसांची भरती करणें; रक्षण करणें, बळकटी आणणें. *Man-at-arms'*, a soldier, esp. medieval. (मध्ययुगीन) शिपाई, सैनिक. *M. child*, male child. मुलगा. *M.-eater*, a cannibal, biting horse, *m.* eating shark or tiger. नरमांसभक्षक, चावरा घोडा, नर-मनुष्य-भक्षक मगर किंवा वाघ. *M. hole*, an opening in floor, sewer, etc. for man to pass through. (जमीन, गटार वगैरेमध्यें) मनुष्याला उतरतां येण्यासारखें तोंड (भोंक). *M. in the moon*, काल्पनिक व्यक्ति (पुरुष). *The m. in the street*, the ordinary man. सामान्य जन, अनभ्यस्त मनुष्य. *M. o'-war'*, an armed navy ship. लढाऊ जहाज. *M. power*, amount of men available for State or other service. मनुष्यबळ. *M. slaughter*, मनुष्यांची कत्तल, मनुष्यवध, (अहेतुक परंतु बेकायदा) सदोष मनुष्यवध. *M. trap*, (esp.) a trap to catch trespassers. बेकायदेशीर प्रवेश करणाऱ्यांना पकडण्याचें साधन. *All to a man*, all without exception. कोणीहि न वगळतां, सर्व. *Man!* (voc. showing impatience or liveliness), *nonsense m.!*, *hurry up m.!* छट् कांहीं तरी बुवा! चल, आटप! *Little man*, young boy. लहान मुलगा. *I'm your m.*, I accept your offer etc. तुझें म्हणणें कबूल *To be one's own m.*, to be free to act, to be in full possession of one's faculties. स्वतंत्र असणें, वागण्याची मुभा असणें; शुद्धीवर असणें.

Măn'acle, *n.* (मॅ'नकल्)—(*usu. pl.*) fetters. हातबेड्या. *v. t.* to fetter with manacles. हातबेड्या घालणें.

Măn'age, *v. t. & i.* (मॅ'नेज्)—to conduct the working of; to have effective control of; to bend to one's will; to cajole; to contrive, to guide, to administer. चालवणें; कह्यांत ठेवणें; युक्तीनें साधणें, युक्तीनें संभाळणें; फुसलावणें; व्यवस्था करणें, कारभार चालविणें.

Măn'agement, *n.* (मॅ'निज्-मेन्ट्)—manner of treating, administration; skilful handling. व्यवस्था; बंदोबस्त, युक्ति. *The management*, governing body, board of directors etc. व्यवस्थापक मंडळ, चालक मंडळ.

Măn'ager, *n.* (मॅ'निजर्)—one who has direction or control. व्यवस्थापक, कारभारी, मॅनेजर. *Man'ageress, n.* a woman manager of hotel etc. खाणावळीण बाई, कारभारीण इ०.

Mănatee', *n.* (मॅनटी')—an aquatic animal, the sea-cow. पाणगाय.

Măn'cĭple, *n.* (मॅ'न्सिपल्)—a steward or catering official in colleges etc. कॉलेजांत खाद्यपेय पुरविणारा अधिकारी.

Măndā'mus, *n.* (मॅन्डे'मस्)—superior court's writ conveying command to lower one. वरिष्ठ कोर्टाच्या खालील कोर्टाला सुटलेला हुकूम.

Măn'darĭn, *n.* (मॅ'न्डरिन्)—a Chinese official ; a party leader who lags behind the times ; a small orange ; deep orange colour. चिनी अधिकारी ; चालू कालाप्रमाणें न सुधारणारा पक्ष-प्रमुख,-पुढारी, अप्रगतिक पुढारी ; लहान नारिंग ; गर्द नारिंगी रंग.

Măn'dāte, *n.* (मॅ'न्डेट्)—authoritative command ; commission to act for another, (esp. one from the League of Nations) ; instruction from electorate, as inferred by its votes. आज्ञा, हुकूम ; (राष्ट्रसंघाकडून मिळालेली) मुखत्यारी ; मताधिक्यावरून सूचित झालेला लोकमताचा आदेश. *Man'datary*, *n.* a receiver or holder of a mandate. हुकूम बजावणारा, मुखत्यारी-आज्ञापत्र-मिळालेला. *Man'datory*, *a.* आज्ञेचा, हुकमाचा, आज्ञासूचक, आज्ञादर्शक.

Măn'dĭble, *n.* (मॅ'न्डिबल्)—lower jaw-bone ; either part of bird's beak ; either half of insect's jaw. खालचा जबडा, जाभाड ; पक्ष्याच्या चोंचीचा वरचा किंवा खालचा भाग ; कीटकाचें अर्धे जाभाड.

Măn'doline, *n.* (मॅ'न्डलिन्)—a kind of lute. एक प्रकारचा वीणा (वाद्य).

Măndrăg'ora, Măn'drāke, *nn.* (मॅन्ड्रॅ'गरा, मॅ'न्ड्रेक्)—a narcotic plant. एक प्रकारची मादक (व विषारी) वनस्पति, लक्ष्मणा, पुत्रदात्री (वनस्पति).

Măn'drel, *n.* (मॅ'न्ड्रल्)—an axis on which material revolves in lathe ; rod round which metal etc. is forged. कातकाम करण्याचा फिरता दांडा, धातु पळविण्याचा वगैरे जाड लोखंडी दांडा.

Măn'drĭll, *n.* (मॅ'न्ड्रिल्)—a large baboon. प्रचंड-मोठा-वानर.

Măn'dūcāte, *v. t.* (मॅ'न्ड्यूकेट्)—to chew. चर्वण करणें.

Māne, *n.* (मेन्)—long hair of horse's or lion's upper side of the neck. आयाळ. *Maned*, *maneless*, *aa.*

Mā'nēs, *n. pl.* (मे'नीझ्)—souls of ancestors ; spirit of dead persons. पितरांचे आत्मे ; मृतात्मा.

Măn'ful, *a.* (मॅ'न्-फुल्)—brave, resolute. शूर, निश्चयाचा.

Măng'anēse, *n.* (मॅं'गनीझ्)—a metal. एक प्रकारची धातु, ' मंगल '.

Mānge, *n.* (मेन्ज्)—a skin disease of dogs etc. गुरांचा चामडीचा रोग, कथला ; (घोड्यांचा) गर, खवडे ; (कुत्र्यांचा) लूत, खरूज. *Man'gy*, *a.*

Măn'ger, *n.* (मे'न्जर्)—eating-trough in stable (for cattle or horses). चारा घालण्याची जागा, गव्हाणी.

Măn'gle, *v. t.* (मॅं'गल्)—1. to hack, to cut about, to mutilate ; to spoil. कापणें, छिन्नविछिन्न करणें ; चिपडविणें, खराबी करणें. 2. to put through mangle. धुतलेल्या वस्त्राच्या घड्या यंत्रानें चोपणें. *n.* a laundry machine for pressing and smoothing linen etc. धोबी लोकांचें धुतलेल्या कापडाच्या घड्या चेपण्याचें यंत्र.

Măngō', *n.* (मँगो')—(*pl.* mangoes) an Indian fruit and tree. आंब्याचें झाड, आंबा. *M. bird*, हिंदुस्थानांतील एक पक्षी ; जमेकांतील गुणगुणारा एक पक्षी. *M.-fish*, a golden-coloured Indian fish. सोनेरी तपस्वी मासा. *M.* (*tree*) *trick*, Indian juggling trick in which a mango tree appears to spring up and bear fruit within an hour or two. हिंदी जादुगिरीचा प्रयोग (एक दोन तासांत आंब्याचें झाड लावून धरतें करण्याचा). [f. Port. *a mango f.* Tamil *mankey*, *man*, *m.* tree fruit]

Măng'ōsteen, *n.* (मॅं'गोस्टीन्)—an E. Indian tree and its fruit. रातंबी, कोकंबी (झाड) ; कोकंब, रातंबा (फळ). [*f.* Malay, *mangustan*]

Măng'rove, *n.* (मॅं'ग्रोव्ह्)—a tropical tree growing in swamps with interlacing roots above ground. उष्णकटिबंधांतील दलदलींत वाढणारें झाड, झुडुप.

Măn'hood, *n.* (मॅ'न्-हुड्)—men of a country ; adult age in males ; manliness, human nature, humanity. देशांतील लोक ; प्रौढ दशा ; मर्दपणा, शौर्य. *M. suffrage*, वयांत आलेल्या सर्व पुरुषांना मताधिकार.

Mā'nĭă, *n.* (मे'निआ)—madness, prevailing craze ; devotion to a hobby. वेड, खूळ ; संवय, छंद, नाद.

Mā'nĭăc, *n.* (मे'निॲक्)—raving madman. वेडा-पिसा.

Măn'ĭcūre, *n.* (मॅ'निक्युअर्)—a person undertaking the treatment of finger-nails and hands ; such treatment. नखें, व हात यांचें सौंदर्य-साधन करणारा धंदेवाईक मनुष्य ; नखसौंदर्यसाधन. *v. t.* to apply such treatment to. नखें वगैरेंची निगा व शोभा राखणें.*-rist*, *n.*

Măn'ĭfest, *a.* (मॅ'निफेस्ट्)—clear to sight or mind ; indubitable. व्यक्त, स्पष्ट ; संशयरहित.

v. t. & i. to make manifest ; to betray. व्यक्त करणें ; प्रगट करणें. *n.* a list of cargo for the Customs. (कस्टम्सच्या अधिकाऱ्यांसाठीं) गलबतांत भरलेल्या मालाची याद्दी.*-tation*, *n.* स्पष्टीकरण, प्रकटीकरण, प्रदर्शन, प्रसिद्धि.

Mănĭfĕs'to, *n.* (मॅनिफे'स्टो)—(*pl.*-os) declaration of policy or intentions issued by a sovereign or leader(s). जाहीरनामा, प्रसिद्धीपत्रक, जाहीरपत्रक.

Măn'ifōld, *a.* (मॅ'नि-फोल्ड्)—of various forms ; many and diverse, numerous. विविध ; बहुत प्रकारचा, बहुविध. *M. writer*, carbon copying-apparatus. एका लेखाच्या अनेक नकला काढण्याचें यंत्र. *v. t.* to multiply copies of letters. पत्राच्या अनेक नकला (यंत्रानें) काढणें.

Măn'ikĭn, *n.* (मॅ'निकिन्)—a little man, a lay figure ; a small tropical American bird ; anatomical model of the body. ठेंगू मनुष्य, लहान मनुष्य, वामनमूर्ति ; मनुष्याचा कागदी नमुना; अमेरिकेंतील लहान पक्षी ; मनुष्याच्या शरीराचा सांगाडा.

Manĭll'a, *n.* (मॅनि'ला)—fibre used for ropes etc.; Manilla cheroot. मॅनिला (फिलिपाइन बेटें) यांतून येणारा ताग ; मॅनिला येथें होणारा चिरूट.

Mănĭp'ūlāte, *v. t.* (मॅनि'प्युलेट्)—to handle; to operate upon or deal skilfully with ; to manage craftily. हातानें तयार करणें; युक्तीनें ताब्यांत ठेवणें, कह्यांत ठेवणें ; लबाडी करणें, लबाडीनें तयार करणें. *Manip'ulable, a.*; *Manip'ulation,-tor, nn.*

Mănkīnd, *n.* (मॅन्का'इन्ड्)—the human species ; (मॅ'न्काइन्ड्) males, esp. those of a household etc. मनुष्यजात ; घरांतील पुरुषमाणसें.

Măn'like, *a.* (मॅ'न्लाइक्)—of or like a man ; (of woman) mannish. मनुष्याचा, पुरुषासारखा ; पुरुषी (स्त्री).

Măn'lў, *a.* (मॅ'न्-लि)—having the qualities or bearing of a man ; firm. मर्दानी, धाडसी ; निश्चयी.

Mănn'a *n.* (मॅ'ना)—food of Israelites in the wilderness ; spiritual food ; sweet juice used in medicine. ईश्वरदत्त अन्न ; वृक्षक्षीर (सौम्य रेचक).

Mănn'équĭn, *n.* (मॅ'निक्विन्,-किन्)—person employed by dressmakers etc. to show off costumes. (शिंपी लोकांचा कपडे घालून सजविण्याचा) मनुष्याकृति ठोकळा.

Mănn'er, *n.* (मॅ'नर्)—way a thing is done or happens ; sort or kind ; style ; (*pl.*) social bearing. रीत ; मार्ग, तऱ्हा ; पद्धति, ढब ; (अने०) चालचर्या, शिष्टाचार. *Mann'erism*, *n.* addiction to a literary or artistic style ; a recurrent trick of style or behaviour. विशिष्ट लेखनशैलीची संवय ; वारंवार दिसून येणाऱ्या बोलण्याचालण्यांतील खोडी. *Mann'erist*, *n.* विशिष्ट पद्धतीचा आग्रही,-अभिमानी ;*-ic a.* *Mann'erless*, *a.* unmannerly. असभ्य, अशिष्ट. *Mann'erly*, *a.* well-behaved. शिष्ट, सभ्याचाराचा. *All manner of*, every kind of. सर्व प्रकारचा, सर्व तऱ्हेचा. *No m. of right*, no right at all. मुळींच हक्क नसणें. *In a manner*, in some sense, to some extent. कांहीं अंशीं, कांहींसा, थोडासा.

Mănn'ĭsh, *a.* (मॅ'निश्)—like a man ; (of women) lacking feminine qualities. पुरुषासारखा ; पुरुषी (स्त्रिया).

Manœu'vre, *n.* (मनू'व्हर्)—strategical or tactical movement ; skilful or crafty plan. युक्तीनें केलेली हालचाल, डावपेंच, हिकमत, कवाईत. *v. i. & t.* to perform or make (troops, ship) perform manœuvre(s) ; to adroitly work oneself or other into or out of a position. सैन्याची किंवा गलबताची हालचाल करणें ; व्यूह रचणें, युक्ति योजणें.

Man-of-war', *n.* (मॅन्-ऑव्ह्-वॉ'र)—a war-vessel, an armed navy ship. लढाऊ जहाज, लढाऊ गलबत. (*pl.* men-of-war).

Măn'ŏr, *n.* (मॅ'नॉर्)—a territorial unit of the feudal period, landed property. जहागीर, देशमुखीची जमीन. *Lord of the manor*, जमीनदार, जहागीरदार, देशमुख. *M.-house*, जहागिरदाराचा वाडा. *Manor'ial*, *a.* जहागीरदाराचा, देशमुखी [L *manere*, to remain]

Mānse, *n.* (मॅन्स्)—ecclesiastical residence, esp. Scotch parish minister's house. ख्रिस्ती उपदेशकाचें निवासस्थान,-राहतें घर.

Măn'sion, *n.* (मॅ'न्शन्)—a large dwelling-house, habitation, abode, dwelling. वाडा, हवेली, महाल.

Măn'suētūde, *n.* (मॅ'न्स्विट्यूड्)—tameness, gentleness, mild temper. सौम्यता, सौम्य स्वभाव.

Măn'tel, *n.* (मॅ'टेल्)—an ornamental structure enclosing the fireplace. धुराड्याच्या पुढचा गलथा. *M. piece*, mantel or mantel shelf. धुराड्या भिंतीवरील फळी किंवा फळीसारखा पुढें आलेला भाग. *M. tree*, a beam across opening of fireplace. चुलीवरील तुळई.

Măn'tel-board, Mantel-shĕlf, *nn.* (मॅ'टेल्-बोर्ड, मॅ'टेल्-शेल्फ्)—a shelf at the top of mantel. चुलीवरील फळी.

Măn'tle, *n.* (मॅ'न्टल्)—a loose sleeveless cloak; something that conceals, a cover. झगा; आवरण, आच्छादन. *v. t. & i.* to envelop, to cover as with mantle; (of liquids) to form a scum; (of blood) to suffuse cheeks; (of face) to blush. लपविणें, झांकणें, पांघरूण घालणें: फेसाळणें, फेणणें; गालावर भरून येणें, लाली चढणें; लाजणें, लज्जायुक्त होणें.

Mănt'lĕt, *n.* (मॅ'न्ट्लिट्)—a short mantle; movable bullet-proof screen for gunners. आखूड झगा; बंदुकीच्या गोळ्यांना दाद न देणारी वरवंडी (छातीएवढी व फिरती भिंत).

Măn'ūal, *a.* (मॅ'न्युअल्)—of or done with the hands, requiring bodily exertion. हाताचा, हातानें केलेला. *n.* a handbook, a primer, a textbook; an organ key-board played with hands. लहान पुस्तक, प्राथमिक पुस्तक, क्रमिक पुस्तक; हातानें वाजविण्याच्या वाजाच्या पेटीच्या सूर-पट्ट्या. *M. alphabet*, मुक्यांनीं खुणांनीं दाखविलेलीं अक्षरें. *Sign m.* हस्ताक्षर, हातची सही. *M. exercise*, बंदुक धरण्याची कवाईत. *M. fire-engine*, आग विझविण्याचें हातीं चालविण्याचें यंत्र. *Man'ually*, *adv.* हातानें. [L *manus*, hand]

Ma'nuka, *n.* (मा'नुका)—(Austral.) a small tree or bush with leaves sometimes used as substitute for tea. (ऑस्ट्रेलियांत) क्वचित् चहाऐवजीं ज्याचीं पानें उपयोगांत आणतात असें झुडुप.

Mănūfăc'tory, *n.* (मॅन्युफॅ'क्टरि)—a factory, a workshop. कारखाना, शिल्पशाळा.

Mănūfăc'ture, *n.* (मॅन्युफॅ'क्चर्)—making of articles or material, esp. in large quantities; branch of such industry; mechanical production of literature. कारखान्यांत वस्तु तयार करणें; असे तयार केलेले पदार्थ; कारखाना. *v. t.* to produce by labour; to work up materials into finished articles; to invent, to fabricate (story). श्रमानें तयार करणें; माल बनवणें, पक्का माल पैदा करणें; (गोष्ट) बनवून सांगणें.

Mănūmĭ'ssion, *n.* (मॅन्युमि'शन्)—setting free, emancipation. दास्यांतून सुटका किंवा मुक्तता. *Manumit'*, *v. t.* to give freedom to slave. गुलामाला दास्य-मुक्त करणें.

Mănūre', *n.* (मॅन्यु'अर्)—dung or other substance used for fertilizing soil. (जमिनीला घालण्याचें) खत. *v. t.* to apply manure to. खतावणें, खत घालणें, खतपाणी घालणें. *Manur'ial*, *a.* खताचा.

Măn'ūscrĭpt, *n.* (मॅ'न्यु-स्क्रिप्ट्)—handwritten copy of matter to be printed, (abbrev. MS., pl. MSS.). हस्तलिखित पुस्तक किंवा दस्तैवज, (छापण्याची) हस्तलिखित प्रत. *a.* handwritten. हस्तलिखित. [L *manus*, the hand; *scriptus*, written]

Mă'nў, *a.* (मे'नि)—numerous, much more than one, forming a large number. पुष्कळ, फार, अनेक. *n.* a multitude, great number; the populace. समुदाय, बरेच लोक; लोकसंख्या, बहुजनसमाज. *As many as*, जितके, जेवढे. *How m.*, किती? *Too m.*, असंख्यात, बेसुमार; डोईजड, भारी. *M. headed beast,-monster*, the populace. जनसमुदाय, लोक. *M. sided*, having many sides, aspects, capabilities etc बहुभुज (आकृति); अनेकविध, पुष्कळ-अनेक-बाजूंनीं विचार करण्यासारखें, चतुरस्र, नानाविषयग्राही.

Măp, *n.* (मॅप्)—flat representation of the earth or some part of it (drawn on paper, etc.). नकाशा, आलेख्य, आराखडा. *v. t.* to make map of; (with *out*) to plan arrangement of. चा नकाशा (आराखडा) काढणें; पद्धतशीर आंखणी करणें, (बेत) ठरविणें.

Mā'ple, *n.* (मे'पल्)—kinds of tree. एक प्रकारचें झाड. *M. leaf*, the emblem of Canada. कॅनडा देशाचें ध्वजचिन्ह. *M. sugar*, sugar got from kind of maple. मेपल झाडापासून काढलेली साखर.

Mär, *v. t.* (मार्)—to impair, to spoil. खराब करणें, बिघडविणें, नासणें. *Marplot*, an officious frustrator of plans. खुशामत करून कार्य बिघडविणारा, कार्यविघातक.

Mă'rabou, *n.* (मॅ'रबू)—a kind of large W.-African stork; its down as trimming etc. पश्चिम आफ्रिकेंतील एक जातीचा मोठा बगळा; त्याचें पीस, त्याची लव, लोकर.

Mă'rabout, *n.* (मॅ'रबूट्)—a Mohammedan hermit or monk, esp. in N. Africa; shrine marking *m.*'s burial place. (उ. आफ्रिकेंतील) फकीर; त्याचें थडगें.

Maraud', *v. i.* (मरॉ'ड्)—to rove in quest of, to plunder, to make raid, to pillage. लुटण्याकरितां हल्ला करणें, लुटणें. *Maraud'er*, *n.* चोर, पेंढारी, लुटारू.

Mär'ble, *n.* (मा'र्बल्)—kinds of limestone used in sculpture and architecture; small ball of stone used in child's game. संगमरवरी दगड; गोटी, गोट्यांचा खेळ. *v. t.* to stain with marble. रंगीबेरंगी करणें.

Märcĕl',-wāve, *nn.* (मार्से'ल्,-वेव्ह्)—kind of artificial wave in hair. केसांचा कृत्रिम कुरळेपणा, मुरड. *M.-wave*, *v. t.* to produce *m. w.* in. केसांना कृत्रिम मुरड घालणें. [*M.*, inventor of method]

March, *v. t. & i.* (मार्च्)—to cause to walk in military manner or with regular paces; (of events) to go steadily on. पुढें चाल करणें, कूच करणें किंवा करवणें; संधपणें निघून जाणें. *n.* action or piece of marching; progress; musical composition adapted for marching to; third month of the English year. पल्ला, कूच, मजल, जाणें; प्रगति; कूच करतांना वाजविण्याचें गीत; इंग्रजी वर्षाचा तिसरा महिना.

March, *n.* (मार्च्)—(usu. pl.) boundary or debatable strip between countries. सीमाप्रांत, विवादिक सरहद्द. *v. i.* to have common boundary (with). (हद्दीला हद्द) लागून असणें.

Mar'chioness, *n.* (मा'र्शनिस्)—wife of a marquis. मार्क्विसची बायको.

Marco'ni, *n.* (मार्को'नि)—a wireless message. बिनतारी संदेश. *v. i. & t.* to send a wireless message. बिनतारी संदेश पाठविणें. *Marco'nigram*, *n.* a wireless message sent by *Marconi's system*. बिनतारी संदेश.

Mare, *n.* (मेअर्)—the female of the horse or of any other equine animal. घोडी. *Mare's nest*, fancied discovery. काल्पनिक-भ्रामक-शोध.

Mar'gin, *n.* (मा'र्जिन्)—a border; a strip near the edge; unprinted space round printed page; extra amount over what is necessary, difference between cost price and selling price; sum deposited with stock-broker to cover risk of loss on transaction of account. कांठ, किनारा; कडेजवळची पट्टी; पुस्तकाच्या पृष्ठावरील सभोंवतालची कोरी जागा, समास, कड; लिहितांना बाजूला सोडलेली जागा; खरेदीविक्रीच्या किंमतींतील फरक, कसर, कमाई, नफा; दलालाजवळ ठेवलेली अनामत रक्कम. *v. t.* to furnish with margin or marginal notes; to deposit *m.* on stock. कोरी जागा सोडणें, कोन्या जागेंत लिहिलेल्या टीपा देणें; पेढीवर अनामत रक्कम ठेवणें.

Mar'ginal, *a.* (मा'र्जिनल्)—written or printed in the margin; of, at, the edge; close to the limit. कडेला किंवा बाजूला लिहिलेला; कडेचा, बाजूचा, कांठावरचा; धारागत, प्रांतस्थ, कडेलगतचा. *Margina'lia*, *n. pl.* marginal notes. समासलिखित टीपा, पृष्ठावरील कोन्या जागेंत लिहिलेल्या टिप्पणी.

Marg'rave, *n.* (मा'र्ग्रेव्)—a title of certain princes of the Holy Roman Empire, a military governor of border province. रोमन साम्राज्यांतील सरदारांची पदवी, सीमाप्रांतावरील लष्करी सरदार.-*vine*, (मा'र्ग्रव्हीन्), margrave's wife. 'मार्ग्रेव्ह' ची बायको.

Marg'uerite, *n.* (मा'र्गरीट्)—kinds of large daisy. डेझी जातीचीं मोठीं फुलें.

Ma'rigold, *n.* (मॅ'रिगोल्ड्)—kinds of golden yellow-flowered plant. झेंडूचें फूल; मखमल, झेंडूचें-मखमलीचें-झाड.

Marine', *a.* (मरी'न्)—of, from, or beside the sea; for use on the sea; of shipping. समुद्राचा, समुद्रासंबंधीं, समुद्राजवळील; समुद्रोपयोगी; गलबताचा, नौकाविषयक. *n.* shipping; soldier serving on board ship. जहाजें, नौकासंपत्ति, जलयाहतुकीचीं साधनें; आरमारी शिपाई-सैनिक. *Mercantile marine*, व्यापारी जहाजें.

Ma'riner, *n.* (मॅ'रिनर्)—a seaman or sailor. खलाशी. *Master mariner*, captain of merchant ship. व्यापारी जहाजाचा-आगबोटीचा-कप्तान.

Mariol'atry, *n.* (मेअरिऑ'लट्रि)—worship of the Virgin. कुमारी मेरीच्या मूर्तीची पूजा.

Marionette', *n.* (मेरिआने'ट्)—a puppet worked with strings. कळसूत्री बाहुलें, (तारेनें किंवा दोरीनें) हालणारी बाहुली.

Ma'rital, *a.* (मॅ'रिटल्)—of a husband; of or between husband and wife, of marriage. पतीचें; पतिपत्नीविषयक, विवाहविषयक. *Maritally*, *adv.* पतिपत्नीनात्यानें, विवाहानें. [L *maritus*, a husband]

Ma'ritime, *a.* (मॅ'रिटाइम्)—situated or dwelling or found near the sea; connected with seafaring. समुद्रकांठचा, दर्यावरील, दर्यावर्दी, समुद्रतीरस्थ; व्यापारी गलबत व आरमार असलेला, जलमार्गव्यापारासंबंधीं. [L *maritimus* (*mare*, sea)]

Marj'oram, *n.* (मा'र्जरम्)—kinds of aromatic herb used in cookery. मरवा, सुरवा (वनस्पति).

Mark, *n.* (मार्क्)—target; a thing aimed at; normal standard; indication of or trace left by something; visible sign, stain, spot, or dent on something; unit in appraising merit of work; a German coin (about 1 s.). निशाणी; वेध्य, लक्ष्य; मर्यादा, इयत्तामान; व्रण; अंक, चिन्ह, खूण, डाग; गुण; जर्मन नाणें (१ शि. किंमतीचें). *v. t. & i.* to distinguish with a mark; to characterize or serve as mark of; to assign marks of merit to; to notice, to observe, to watch; to record as score or act as scorer in games. निशाणी करणें; खूण ठेवणें,-असणें; गुण देणें; लक्ष्यपूर्वक पाहणें, लक्ष देणें, लक्षांत घेणें; खेळांत धांवा किंवा गुण किंवा डाव मोजणें, किंवा गुणमोजकाचें काम करणें. *Plimsoll's mark*, line showing how far ship may be submerged

when *loaded*, गलबताच्या भरताडीची खूण. *Below the m.*, below the standard. नेहमींच्या प्रमाणाच्या खालीं, कमी प्रतीचें. *Up to the mark*, समाधानकारक. *To make one's mark*, to attain distinction. नांव मिळविणें, नांव करणें. *Of mark*, noteworthy. प्रख्यात, नांवलौकिकाचें, महत्त्वाचें. *To mark out*, to trace out boundaries for (ground); to plan (course), to destine. आंखून देणें, मर्यादा आंखणें; मार्ग आंखणें; निवडून काढणें, टिपून काढणें. *To mark off*, to separate by boundary. वेगळें काढणें, परिच्छेद करणें. *Marked*, (pass.) noticeable. लक्षांत येण्यासारखें, पाहण्यासारखें, नजरेंत भरण्यासारखें, प्रख्यात. *Mark'er*, *n*. खूण करणारा, लक्ष देणारा. पुस्तकांतील निशाणी.

Mä̆rk'ĕdly̆, *adv.* (मा'र्किड्लि)—unmistakably, remarkably, evidently. गैरसमज न होऊं देतां, निःसंशय, ठळकपणानें, स्पष्टपणें.

Mä̆rk'ĕt, *n.* (मा'र्किट्)—gathering for sale of commodities or live-stock; space or building used for it; seat of or facilities for trade. बाजार; बाजाराची जागा; व्यापाराचें ठिकाण, व्यापाराचीं सुखसाधनें. *v. t. & i.* to bring or send to or sell in a market; to buy goods in a market. बाजारांत माल विकणें, माल खरेदी करणें; बाजारांत मालाची खरेदीविक्री करणें. *M. cross*, cross erected in *m.* place. बाजारपेठेंत उभारलेला क्रॉस. *M. garden(er)*, growing vegetables for sale. विक्रीसाठीं भाजीपाला करण्याची बाग (मळा), मळेवाला. *M. place*, square in which *m.* is held. बाजारांतील चौक, मंडई, बाजारवाडा. *M. price*, prevailing price resulting from supply and demand. चालू बाजारभाव, निरख. *M. town*, a town having fixed market day(s) बाजार भरण्याचा गांव, बाजारपेठेचा गांव. *Mark'etable*, *a.* fit for sale; in demand. विकाऊ; खपण्याजोगा, गिऱ्हाईक असलेला. *To bring one's eggs or hogs to a bad m.*, to fail in one's schemes. पेच फसणें. *To make a m. of*, to barter away. सौदा करणें, अदलाबदल करणें. *The corn m.*, धान्याचा व्यापार. *To come into the m.*, विक्रीसाठीं मांडलें जाणें. *To put on the m.*, to offer for sale. विक्रीसाठीं मांडणें.

Mä̆rk'ing, *n.* (मा'र्किंग्)—variegated colours of feathers, skin etc. चित्रविचित्र रंग. *M. ink*, ink for marking linen. निशाणीची शाई.

Mä̆rks'man, *n.* (मा'र्क्स्मन्)—(pl.-men), skilled shot, esp. with rifle. (बंदुकीचा) नेम मारण्यांत कुशल.- *ship*, *n.* निशाणबाजी.

Mä̆rl, *n.* (मार्ल्)—kind of rich soil or clay often much used for manure. चिकणमाती. *v. t.* apply *m.* to (ground). चिकणमाती घालणें. *Marl'y*, *a.*

Mä̆rm'ălāde, *n.* (मा'र्मलेड्)—orange jam. नारिंगाचा मुरंबा, फळांच्या गिरांचा मुरांबा.

Mä̆rmor'ĕal, *a.* (मार्मो'रिअल्)—of or pertaining to marble; white or cold or polished as marble. संगमरवरी; संगमरवरी दगडासारखा शुभ्र, गार किंवा गुळगुळीत.

Mä̆rm'osĕt, *n.* (मा'र्मझेट्)—a small bushy-tailed monkey. झुपकेदार शेंपटीचा लहान वानर.

Mä̆rm'ot, *n.* (मॅ'र्मट्)—a rodent allied to the squirrel; a kind of bathing cap. खारीच्या जातीचा प्राणी; स्नान करतांना घालण्याची टोपी.

Maroo̅n', *n.* (मरू'न्)—1. brownish crimson colour; kind of fire-work. पिंगट किरमिजी रंग; दारूकामाचा प्रकार. *a.* maroon-coloured. पिंगट किरमिजी रंगाचें. 2. one of the wild negroes of W. Indies; a marooned person. वेस्ट इंडीज् बेटांतील नीग्रोजातीचा मनुष्य; निर्जन बेटावर टाकलेला. *v. t.* to put and leave ashore on a desert island. ओसाड बेटावर सोडणें.

Mä̆rq'uĭs, Mar'quĕss, *n.* (मा'र्किस्)—a peer ranking between duke and earl. ड्यूक आणि अर्ल् यांच्या मधील दर्जाचा उमराव, मार्किस ही (इंग्लंडांतील) पदवी.

Mă'rriage, *n.* (मॅ'रिज्)—a ceremony of being legally united for life; (*fig.*) union; wedding or wedlock. विवाह, लग्न; संयोग, ऐक्य; लग्नविधि. *Communal m.*, जातीजातींतील विवाह. *Companionate m.*, probationary union of man and woman. पसंतीसाठीं विवाह. *Civil m.*, नोंदणीपद्धतीनें केलेला (धार्मिक विधीशिवाय) विवाह.

Mă'rriageable, *a.* (मॅ'रिजेबल्)—old enough for marriage, fit to be married. विवाहयोग्य, लग्नाजोगा.

Mă'rrow, *n.* (मॅ'रो)—a fatty substance in cavity of bones; the essence, best part; a kind of gourd. चरबी; सत्त्व, सार; एक प्रकारचा भोपळा. *M. bone*, चरबीयुक्त हाड, (*pl.*) the knees. गुडघे. *Ma'rrowy*, *a.*

Mă'rrow, *n.* (मॅ'रो)—a mate, consort, match; very image of. सहचारिणी, वधू, पत्नी; प्रतिरूप.

Mă'rry, *v. t. & i.* (मॅ'रि)—to unite, to give or take in wedlock; to take a wife or husband. लग्न लावणें, लग्न करणें; पति किंवा पत्नी म्हणून स्वीकारणें.

Mä̆rs, *n.* (मार्झ्)—Roman god of war; a planet (of that name); (poet.) war, armies. रोमन लोकांची रणदेवता; मंगळ (तारा); युद्ध, सैन्यें.

Mä̆rsh, *n.* (मार्श्)—a piece of low watery ground. दलदल, पाणथळ प्रदेश. *M gas*, light carburetted hydrogen. कर्बमीश्रित वायु. *Marshy*, *a.* दलदलींतील, दलदलीचा, जलमचुर.

Mărsh'al, *n.* (मा'र्शल्)—kinds of official; master of ceremonies. एक अधिकारी; व्यवस्थापक. *v. t.* to arrange in due order; to conduct. व्यवस्थित रचना करणें; समारंभानें नेणें.

Mărsū'pĭal, *a.* (मार्स्यू'पिअल्)—of the class of animals that carry their young in a pouch. ओंटीजवळच्या पिशवींतून आपलीं पोरें नेणारा (कांगारू जातीचा प्राणी). *n.* marsupial animal. पोरें ओंटीजवळच्या पिशवींतून नेणारा प्राणी.

Mărt, *n.* (मार्ट्)—a place of trade. व्यापाराची पेठ, बाजार, दुकान.

Mărtĕll'ō, *n.* (मार्टे'लो)—(*pl.*-os), tower, a small circular fort for coast defence. (किनाऱ्याच्या रक्षणार्थ) लहान वर्तुळाकार किल्ला,-दुर्ग.

Mărt'ĕn, *n.* (मा'र्टिन्)—a kind of weasel with valuable fur. मौल्यवान लोकर असलेला एक लहान चपळ रानटी प्राणी.

Măr'tial, *a.* (मा'र्शल्)—military, warlike; suited to or loving war. शूर; युद्धाला योग्य, युद्धप्रेमी. *M. law*, military government, by which ordinary law is suspended. लष्करीकायदा, लष्करी अंमल.

Mărt'ĭn, *n.* (मा'र्टिन्)—a bird of swallow kind building mud nest on house walls etc. एक पाकोळी जातीचा पक्षी.

Mărtinĕt', *n.* (मार्टिने'ट्)—precise, punctilious or strict disciplinarian. कडक शिस्तीचा मनुष्य.

Mărt'ingāle, *n.* (मा'र्टिंगेल्)—a check-strap preventing a horse from rearing or throwing up head; a gambling system of doubling the stakes at each venture. घोड्याला ताब्यांत ठेवण्याकरितां बांधण्याचा पट्टा, जेरबंद; प्रत्येक खेपेला मागच्या दुप्पट पैज लावण्याची जुगारीची पद्धत.

Mărt'lĕt, *n.* (मा'र्ट्लिट्)—the swift; a footless heraldic bird. लांब पंखांचा पक्षी; पादरहित पक्षी.

Mărt'yr, *n.* (मा'र्टर्)—a person put to death for adherence to a cause; one who is victimized. स्वधर्मवीर, स्वमतासाठीं ठार मारला गेलेला मनुष्य; बळी. *v. t.* to put to death as martyr; to make a martyr of. धर्मासाठीं ठार मारणें, प्राणांतिक छळणें. *Mar'tyrdom*, *n.* martyr's death; sufferings or discomfort. धर्मार्थ-स्वमतार्थ-प्राणार्पण; स्वमतार्थ सोसलेला छळ,-कष्ट,-हाल. *Martyro'logy*, *n.* a history, collection of tales, of the Christian martyrs. (ख्रिश्चन) धर्मवीरांचा इतिहास.

Mărv'el, *n.* (मा'र्व्हेल्)—a wonderful thing. आश्चर्य, नवल, कौतुक. *v. t.* to feel surprise, to wonder. आश्चर्य करणें, नवल वाटणें. *M. of Peru*, गुलबास, गुलबक्षी, सायंकाळी.

Mărv'ĕllous, *a.* (मा'र्व्हेलस्)—astonishing; extraordinary; preternatural. आश्चर्यकारक; अलौकिक, अद्भुत, विस्मयावह.

Mărx'ian, *a.* & *n.* (मा'र्क्सिअन्)—(an adherent) of the doctrines of the German socialist Karl Marx (1818-83). जर्मन समाजसत्तावादी कार्ल मार्क्सच्या तत्त्वांचा (अनुयायी).

Măs'cot, *n.* (मॅ'स्कॉट्)—a person, animal, or object as a luck-bringer. शुभप्रद, -मंगलदायक,-सुदैव आणणारा मनुष्य, प्राणी किंवा वस्तु.

Ma'scŭlĭne, *a.* (मा'स्क्युलिन्)—of the male gender, male; robust, strong, manly; vigorous; mannish. पुंलिंगी, मर्दानी; कणखर, सशक्त; पौरुषयुक्त. *n.* masculine gender. पुल्लिंग. *Ma'sculineness*, *Masculin'ity*, *nn.* पुरुषस्वभाव, मर्दानीपणा.

Măsh, *n.* (मॅश्)—malt, bran, or other substance mixed with water into a thick liquid for brewing, horse food etc; (sl.) mashed potatoes. चेंदा, काला, खिचडा, कोळ, ठेंचा, आंबोण, आंबवण; कोळलेले बटाटे. *v. t.* to make into mash; to crush to pulp; (sl. of lady-killer) to practise fascination on. चेंदा, ठेंचा, आंबोण करणें; कोळणें, घाटणें; मोहिनी घालणें, भुरळवून सोडणें. *Mash'er*, *n.* (sl.) a lady-killer, a dandy. स्त्रीचें मन मोहून टाकणारा, अक्कडबाज.

Măsk, *n.* (मास्क्)—artificial face worn as disguise; face-covering, a sportive cover for the face. मुखवटा, कृत्रिम मुख; मुखाच्छादन. *v. t.* to cover with a mask; to disguise, hide. मुखवटा घालणें; वेषांतर करणें, लपविणें. *To throw off the mask*, मुळावर येणें, खरें स्वरूप प्रकट करणें.

Mā'son, *n.* (मे'सन्)—builder in and dresser of stone; freemason. गंवडी, कारागीर; 'फ्रीमेसन्' संप्रदाय. *v. t.* to build, to strengthen with masonry. चिऱ्यांचें बांधकाम करणें. *Mason'ic*, *a.* फ्रीमेसन संप्रदायाचा.

Mā'sonrў, *n.* (मे'सन्रि)—the art or occupation of a mason; built-up stones, solid stonework. गंवडीपणा; चिरेबंदी.

Măsque, *n.* (मॅस्क्)—kind of poetic drama with pageantry. करमणुकीचें एक प्रकारचें नाटक.

Măsquerāde', *n.* (मॅस्करे'ड्)—a ball at which masks or fancy dresses are worn. मुखवटे घालून किंवा चित्रविचित्र पोषाख घालून केलेला नाच; संकासुरी खेळ. *v. i.* to assemble in masks, to appear in disguise. गुप्तवेष घेणें, सोंग घेणें, संकासुरी खेळ खेळणें.

Măss, *n.* (मॅस्)—a large body of matter; dense aggregation of objects; (*pl.*) the general body of the people गट्ठा, गठ्ठा, ढीग, रास, जमाव; (अने०) जनसमाज *v. t.* & *i.* to gather into a mass; to concentrate (troops). एकत्र जमणें; सैन्याची जमवाजमव करणें. *The great mass*, the majority (of). बहुसंख्य, पुष्कळ.

The masses, the lower orders. खालच्या दर्जाचे लोक, सामान्य लोक. *In the m.*, in the aggregate. एकूण, एकंदर. *M. meeting*, (राजकारणासाठीं) मोठी सभा, विराट सभा.

Măss, *n.* (मॅस्)—the Eucharist or a celebration of it. रोमन कॅथोलिक धर्मविधि.

Măss'acre, *n.* (मॅ'संकर्)—general slaughter, esp. of unresisting persons. कत्तल, कापाकापी. *v. t.* to make massacre of. (ची) कत्तल करणें.

Măssäge', *n.* (मॅसा'झ्)—kneading and rubbing of the muscles, &c. as curative treatment. (दुखणेकऱ्याचें) आंग वगैरे रगडणें, अंगमर्दन, चंपी करणें, मालिश करणें. *v. t.* to treat (part, person) thus. (शरीराच्या अवयवाची, अंगाची) चंपी करणें. *Masseur'*, *n.* (मॅस'र्) चंपी करणारा धंदेवाईक (मनुष्य). *Masseuse'*, *n.* (.मॅस' झ़्) चंपी करणारी स्त्री. *Ma'sser*, *Ma'ssor*, *nn.*

Măss'if, *n.* (मॅ'सिफ्)—mountain heights forming a compact group. एकत्र जुडगारे पर्वतांचे उंच भाग,-शिखरें, पर्वतशिखरांचा समुदाय.

Măss'ive, *a.* (मॅ'सिव्ह्)—large and heavy or solid, ponderous ; (*fig.*) substantial., भरभक्कम, जड ; भरीव. *Mass'ively*, *adv.*

Măss'ў, *a.* (मॅ'सि)—solid, weighty. भरीव, वजनदार. *Mass'iness*, *n.*

Mäst, *n.* (मास्ट्)—an upright to which ship's yards and sails are attached ; an upright for decorations, wireless telegraphy, etc. डोलकाठी, शिडाची काठी, उंच काठी. *Mast-head*, डोलकाठीचें वरचें टोंक.

Mäst, *n.* (मास्ट्)—fruit of beech, oak, etc as food for pigs. डुकरांना खावयाला घालण्याचीं ओक वगैरे झाडांचीं फळें.

Mä'ster, *n.* (मा'स्टर्)—a man who has authority over or teaches others ; an employer ; a skilled artist or expert ; a lad, a small boy. शिक्षक, अध्यापक ; धनी, स्वामी, यजमान, नायक, मुख्य, नाखवा, तांडेल, मुखत्यार ; पटाइत, धुरंधर ; चिरंजीव, मुलगा. *v. t.* to acquire complete knowledge of ; to worst or reduce to subjection. नैपुण्य संपादन करणें ; वश करून घेणें, जिंकणें, सर करणें, सत्तेखालीं आणणें. *To be master of*, to have at one's disposal. आपल्या ताब्यांत असणें. *To be* one's *own m.*, आपला आपण मालक असणें, स्वतंत्र असणें, सुभा असणें. *To make* oneself *m. of*, to acquire thorough knowledge of or facility in using. (ची) संपूर्ण माहिती मिळविणें, ज्ञान मिळविणें, उपयोगांत आणतां येणें. *the M.*, Christ. येशू ख्रिस्त. *M. of Arts* (abbr. *M. A.*), holder of university degree. एम्. ए. *A master mind*, थोर बुद्धि, विलक्षण बुद्धिमत्ता. *M. key*, key opening many locks, each also opened by separate key. पुष्कळ कुलपांना लागणारी एक मुख्य किल्ली. *M. stroke*, surpassingly skilful act (of policy etc.). चहारीचें काम, पहिल्या प्रतीचें काम, अजब तडाका. *Master-ship*, office of master. स्वामित्व, धनीपणा ; श्रेष्ठता, वर्चस्व. [L *magister*, a master]

Mä'sterpiece, *n.* (मा'स्टर्-पीस्)—best or very fine specimen of an artist's work. मोठ्या कसबाचें काम, उत्तम कृति, उत्कृष्ट काम.

Mä'sterlў, *a.* (मा'स्टर्लि)—of consummate skill ; most excellent, skilful. पूर्ण कौशल्याचा, अत्युत्तम.

Mä'sterў, *n.* (मा'स्टरि)—masterly skill ; dominion ; superiority. नैपुण्य ; आधिपत्य, प्रभुत्व ; श्रेष्ठत्व.

Măs'tic, *n.* (मॅ'स्टिक्)—a kind of resin ; trees yielding this. रुमामस्तकी (हिंक); रुमामस्तकीचीं झाडें. *M. colour*, pale yellow colour. फिकट पिवळा रंग.

Măs'ticāte, *v. t.* (मॅ'स्टिकेट्)—to reduce (food) to pulp by chewing, to chew. चावणें, चर्वण करणें. *—cable, a.;-cation,-cator, nn.*

Mä'stiff, *n.* (मा'स्टिफ्)—a dog of a powerful breed with deep and pendulous lips. धिप्पाड जातीचा रखवाली कुत्रा.

Măs'todon, *n.* (मॅ'स्टोडन्)—an extinct animal allied to elephant. (सध्यां उपलब्ध नसणारा) हत्तीच्या जातीचा प्राणी.

Măs'toid, *a.* (मॅ'स्टॉइड्)—shaped like female breast. स्तनासारख्या आकाराचा. [fr. Gk *Mastos*, breast ; *eidos*, resemblance]

Măs'turbate. *v. i.* (मॅ'स्टर्बेट्)—to practise self-abuse. गुह्यमैथुन,-हस्तमैथुन,-करणें. *Masturba'tion*, *n.*

Măt, *n.* (मॅट्)—piece of material laid on floor to protect surface. चटई, हातरी. *v. t. & i.* to bring or come into a thickly tangled state. गुंतविणें, गुंतणें. *Matted hair*, केंसांचा गुंता,-पेंडा,-जटा, (होणें).

Măt'ador, *n.* (मॅ'टॅडॉर्)—a man appointed to kill bull in bull-fight ; principal card in some games. (मनुष्य व बैल यांच्या टक्करींत) बैलाला ठार मारणारा ; कांहीं खेळांतील प्रमुख पत्ता,-हुकमाचें पान.

Mătch, *n.* (मॅच्)—a slip (of wood, wax, &c.) with head that ignites when rubbed ; a person or thing nearly resembling or corresponding to another ; marriage ; a contest, game. आगकाडी ; बरोबरीचा किंवा तोलाचा मनुष्य, जोडा, जोडीदार ; लग्न ; सामना, खेळ. *v. t. & i.* to find or be a match for ; to show similarity. बरोबरी करणें ; सारखा असणें किंवा

दिसणें. *Match for match*, तेलास-तोल. *To make a m.*, विवाह जुळवून आणणें. *Match-maker*, one fond of scheming to bring about marriges. लग्नें जुळविणारा. *Match-box*, आगपेटी. *Match-wood*, wood suitable for matches, minute splinters. आगकाड्यांना योग्य लांकूड, बारिक बारिक तुकडे. *To make match-wood of*, to utterly smash. साफ मोडून तोडून टाकणें.

Mătch'léss, *a.* (मॅच्-लिस्)—incomparable, that cannot be matched, unequalled. बिनतोडीचा, अप्रतिम.

Mătch'lock, *n.* (मॅच्लॉक्)—an obsolete musket fired with fuse. (जुनी) तोड्याची बंदूक, रंजकेची बंदूक.

Māte, *n.* (मेट्)—one of a pair of birds, lovers, or married people; fellow workman; subordinate officer of merchant-ship. नवरा किंवा बायको, नर किंवा मादी, सोबती; बरोबर काम करणारा; नाखव्याच्या हाताखालचा अंमलदार, दुय्यम तांडेल. *v. t. & i.* to marry, to match; to pair, esp. for breeding. लग्न करणें; एकत्र राहणें,

Māte, *n. & v. t.* (मेट्)—to checkmate in chess. बुद्धिबळाच्या डावांत मात करणें.

Mā'ter, *n.* (मे'टर्)—(school sl.) mother. आई.

Matē'rial, *a.* (मटी'रिअल्)—composed of or connected with matter; unspiritual; considerable, essential. पंचभूतात्मक; भौतिक; महत्त्वाचा; विशेष. *n.* that from which something is made; textile fabric. जिन्नस, द्रव्य; विणकर द्रव्य, धागा. *Material cause*, उत्पादनकारण. *Raw material*, unmanufactured m. कच्चा माल. *Writing materials*, w. requisite. लेखनसाहित्य.

Matē'rialism, *n.* (मटी'रिॲलिझम्)—belief that nothing exists but matter and its manifestations; exclusive attention to material prosperity. देहात्मवाद, आधिभौतिकवाद, जडवाद, जडदेहवाद, संसारविषयासक्ति. *Mater'ialist*, *n. & a.* जडवादी, जडदेहवादी. *Materialis'tic*, *a.* जडवादविषयक, जडवादासंबंधीं.

Matē'rialize, *v. t. & i.* (मटी'रिॲलाइझ्)-to make materialistic; to be fulfilled. जडवादात्मक करणें; पूर्ण होणें, सफळ होणें.

Matē'ria Měd'ica, *n.* (मॅटी'रिआ मॅ'डिका)—remedial substances used in practice of medicine. औषध, औषधी, द्रव्यगुण, औषधिविज्ञान.

Mătern'al, *a.* (मॅट'र्नल्)—of a mother; from or on the side of one's mother. आईचा; आईकडील. *M. uncle*, mother's brother. मामा, मातुल.

Mătern'itў, *n.* (मॅट'र्निटि)—motherhood. मातृत्व, आईपणा. *Maternity home*, — *hospital*, सूतिकागृह.

Măthėmăt'ics, *n.* (मॅथिमॅ'टिक्स्)-science of space, magnitude and number. गणित, गणितशास्त्र. *Mathemat'ical*, *a.*; *Mathemati'cian*, *n.* (मॅथिमटि'शन्) गणिती, गणितशास्त्रज्ञ.

Măt'in, *n.* (मॅ'टिन्)—(*pl.*) morning prayer. प्रातःस्मरण, प्रातर्भजन. *a.* of the morning. प्रातःकाळचा.

Măt'inee, *n.* (मॅ'टिने)—a theatrical performance held early in the day. (नाटकाचा वगैरे) दिवसाचा खेळ.

Mā'triarchў, *n.* (मे'ट्रिआर्कि)—social organization in which mother is head of family. कुटुंबाचें स्वामित्व आईकडे असतें असा समाज, स्त्रीप्रधानसमाज, स्त्रीराज्य.

Mā'tricīde, *n.* (मे'ट्रिसाइड्)—the killing or murder of one's own mother; a person guilty of it. मातृवध, मातृहत्या; मातृघातक. *Ma'tricidal*, *n.*

Mătric'ūlāte, *v. t. & i.* (मॅट्रि'क्युलेट्)—to admit or be admitted as a student in a university. विश्वविद्यालयांत प्रवेश मिळणें, मॅट्रिकची परीक्षा पास होणें. *Matricula'tion*, विश्वविद्यालयाची प्रवेशपरीक्षा.

Măt'rimonў, *n.* (मॅ'ट्रिमनि)—state of having a husband or wife, married state. विवाहितावस्था, लग्न, विवाह. *Matrimo'nial*, *a.* विवाहसंबंधीं, लग्नाचा, वैवाहिक.

Mā'trix, *n.* (मे'ट्रिक्स्)—the womb; mould in which a cast is made; substance in which a mineral is found embedded. गर्भाशय; सांचा, मूस; खनिजगर्भित द्रव्य. (*pl.* matrices मे'ट्रिसीझ्, or matrixes).

Mā'tron, *n.* (मे'ट्रन्)—a married woman, esp. an elderly one; a woman in charge of a hospital; a housekeeper in a school or an institution. प्रौढ विवाहित स्त्री; रुग्णालयांतील मुख्य परिचारिका; मुख्य व्यवस्थापिका, कारभारीण, मेट्रन.

Mătt'er, *n.* (मॅ'टर्)—physical substance; objects of specified kind; material; affair, concern; purulent discharge. द्रव्य, जडवस्तु; विषय; पदार्थ; वृत्तान्त, प्रकरण; काम, कार्य, गोष्ट, मुकादमा, वादविषय; पू. *v. i.* to be of importance, to signify; to make a difference (*to*). महत्त्वाचें असणें; फरक करणें. *No matter*, it is of no importance. कांहीं चिंता नाहीं, परवा नाहीं. *What's the m.?* काय आहे? काय चाललें आहे? *In the m. of*, as regards. (च्या) विषयीं. *M. of course*, thing to be expected in natural course. क्रमप्राप्त गोष्ट, सहज घडणारी गोष्ट. *M. of*

fact, what pertains to the sphere of fact. वस्तुस्थिति, खरी खुरी-सत्य-गोष्ट. *As a m. of fact*, (Law) वादविषयक पुराव्याची शाबिती. *Matt'ery*, *a.* purulent, important. पुयुक्त, पुवाचा, पिकलेला, पुवाळ ; महत्त्वाचा.

Mătt'ĭng, *n.* (मॅ'टिंग्)—fabric used for mats. चटया करण्याचें सामायन.

Mătt'ock, *n.* (मॅ'टक्)—a tool like pick-axe. कुदळ, कुदळी, खुरपें.

Mătt'rĕss, *n.* (मॅ'ट्रिस)—a large cushion on which bedclothes rest. लेप, गादी, गद्देला, बिछाना.

Măt'ūrāte, *v. i.* (मॅ'च्युरेट्)—to come to maturation. (गळूं इत्यादि) पिकणें, पुवळणास येणें; पिकणें, तयार होणें. *Matu'ration*, *n.* ripening of morbific matter, ripening of fruit; maturing, development. पू तयार होणें; फळ पिकणें; पूर्णतावस्था, वाढ.

Matūre', *a.* (मॅच्यु'अर्)—fully developed; ripe; adult. पूर्णतावस्थेस पोहोंचलेला; परिपक्व, प्रौढ; वयांत आलेला. *v. t. & i.* to bring to or reach maturity; to ripen; to develop fully; (of bill) to become due. परिणतावस्थेस येणें; पिकणें; पूर्ण वाढ होणें; (हुंडी इ०) लागू होणें, ची मुद्दत भरणें. *Mature* (careful) *deliberation*, पूर्ण विचार, काळजीपूर्वक विचार. *M. plans*, पूर्ण विचारांतीं ठरलेला बेत, पक्का-ठाम,-बेत किंवा विचार.

Matūr'ĭty̆, *n.* (मॅच्यु'रिटि)—state of being mature, ripeness; full development. परिपक्वता; पूर्ण वाढ.

Mătūtī'nal, *a.* (मॅटयूटा'इनल्)—of or in the morning. प्रातःकालचा, प्रातःकालिक, सकाळचा.

Maud'lin, *a.* (मॉ'ड्-लिन्)—easily moved to tears, weakly sentimental; drunk. मनाचा दुबळा; झिंगलेला.

Maul, *n.* (मॉल्)—a heavy hammer. मोठा हातोडा, मोगरा. *v. t.* to beat and bruise; to handle roughly or carelessly, to damage by criticism. कुटणें, चेंचणें, चेंदा करणें; चुसळणें, खिळखिळें करणें, नुकसान करणें.

Maund, *n.* (मांड्)—a measure of weight. मण.

Maun'der, *v. i.* (मॉं'डर्)—to talk ramblingly; to move, act, listlessly. बडबडणें, बडबडणें; अर्धवटपणें चालणें,-वागणें.

Mau'ser, *n.* (मा'उझर्)—a kind of military rifle. एकजातीची बंदूक.

Mausōlē'ŭm, *n.* (मासोली'अम्)—a building erected as tomb and monument. मोठी कबर किंवा छत्री.

Mauve, *n. & a.* (मोव्ह्)—pale purple. जांभळा किंवा अंजिरी रंग.

Maw, *n.* (मॉ)—gullet or stomach of an animal. प्राण्याचा गळा किंवा कोठा, पोटाची पिशवी. *Maw'worm*, intestinal worm, a hypocrite. जंत; ढोंगी मनुष्य.

Mawk'ĭsh, *a.* (मॉ'किश्)—of faint sickly flavour; feebly sentimental. हिडिस, चिळस आणणारा, बेचव; दुबळ्या मनाचा, भावनाप्रधान.

Măxĭll'ary̆, *a.* (मॅक्सि'लरि)—of the jaw. जबड्याचा, जाभाडाचा.

Măx'ĭm, *n.* (मॅ'क्सिम्)—a machine gun; piece of wisdom or advice expressed in a sentence, an axiom, an aphorism. मोठी बंदूक; नीतिवचन, म्हण.

Măx'ĭmalĭst, *n.* (मॅ'क्सिमलिस्ट्)—a person who holds out for the maximum of his demands and rejects compromises (esp. as variety of Russian socialist). जास्तींतजास्त हक्कांची करारी मागणी करणारा.

Măx'ĭmŭm, *n.* (मॅ'क्सिमम्)—highest recorded or highest possible degree. जास्तींत जास्त संख्या, कमाल पक्ष.

May, *n.* (मे)—the fifth month of the year, a month associated with greenery; hawthorn blossom; (*fig.*) bloom; prime. इंग्रजी पांचवा महिना; हॉथॉर्न् वनस्पतीचा मोहोर; बहर, तारुण्य. *Mayday*, 1st of May as country festival. मेच्या पहिल्या तारखेचा सण. *M. pole*, a flower-decked pole danced round on Mayday. मेच्या सणाच्या दिवशीं सभोंवती नाचण्याकरितां उभारलेली गुढी,-खांब. *M. queen*, a girl chosen as queen on Mayday games. मेच्या सणाच्या खेळांतील राणी. *M. tree*, hawthorn. हॉथॉर्न् नांवाचें कांटेरी झाड. *May'ing*, picking of May flowers. हॉथॉर्न् नांवाच्या झाडाचीं फुलें वेंचणें.

May'be, *n.* (मे'बि)—perhaps. कदाचित्.

Mā̆y'or, *n.* (मे'अर्)—the head of the corporation. नगराध्यक्ष, मेयर. *Mayor'ess*, *n.* mayor's wife, female mayor. नगराध्यक्षाची पत्नी, नगराध्यक्षीण. *May'oralty*, *n.* mayor's office or tenure. नगराध्यक्षपद, किंवा नगराध्यक्षत्वाची मुदत.

Măzarine', *n. & a.* (मॅझरी'न्)—deep blue. गर्द निळा (रंग).

Māze, *n.* (मेझ्)—labyrinth; network of paths or lines; tangle of facts. नागमोडीची वाट; चक्रव्यूह; गोंधळ, घोटाळा. *v. t.* to bewilder, to stupefy. घोटाळ्यांत घालणें, वेधा उडविणें.

Mead, **Mead'ow**, *nn.* (मीड्, मे'डो)—1. piece of grass land (esp. used for hay). कुरण, गुरचरण. 2. fermented honey and water. मध आणि पाणी यांपासून केलेली दारू.

Mea'gre, *a.* (मी'गर्)—having little flesh, lean, scanty, insufficient. रोडका, थोडा, दरिद्री, अल्प, अपुरा, भिकार, नीरस.

Meal, *n.* (मील्)—grain or pulse ground to powder ; taking of food at a certain time ; quantity of milk given by cow at a milking. पीठ ; भोजन, जेवण ; गाय एक वेळ जें दूध देते तें. *M. time*, usual time of eating. रोजची जेवणाची वेळ. *To make a meal of*, to consume. खाऊन टाकणें. *v. i.* to eat a meal. जेवणें, भोजन करणें.

Meal'ie, *n.* (मी'लि)-(South Afr.) maize (usu. *pl.*). मका.—*cob*, seeding head of mealie. मक्याचें भियाणें.

Meal'y, *a.* (मी'लि)—of, like, or containing meal ; spotty ; pale. पिठाचा, पिठासारखा, पिठानें भरलेला, पिठूळ ; ठिपके असलेला (घोडा) ; फिकट (चेहरा). *M.-mouthed*, not out-spoken. आंतल्या गांठीचा, रक्तांड्या, दीनवदन.

Mean, *a.* (मीन्)—low in the scale ; of low degree or poor quality ; ignoble ; ungenerous; stingy ; equidistant from both extremes; intermediate. हलका ; कमी दर्जाचा ; हलकट, क्षुद्र ; अनुदार ; चिकट, भिकार ; मध्य, मधला ; सरासरीचा, मध्यम प्रतीचा. *n.* mean degree or state or course ; (*pl.*) intermediate steps to an end ; resources ; money. मधली मत, स्थिति किंवा मार्ग ; साधनें, उपाय; साहित्य, सामुग्री; पैसा, द्रव्यबल, उत्पन्न. *The golden mean, the happy m.*, सुवर्णमध्य, मध्यम पक्ष. *By all (manner of) means*, in every possible way, at any cost, certainly. सर्वप्रकारें, सर्वथा, बेलाशक, निःसंशय, खचित, अवश्य. *By no (manner of) means*, not at all, certainly not. मुळींच नाहीं, खचित नाहीं. *By means of*, च्या साधनानें, च्या द्वारा. *Mean sea-level*, भरती आणि ओहोटी यांच्या मधील समुद्रजलाची सपाटी.

Mean, *v. t. & i.* (मीन्) - (*pa. t. & pa. p.* meant, मेंट्), to purpose, to design ; to be resolved ; to intend ; to signify. उद्देश किंवा हेतु असणें ; मनांत योजणें ; अर्थ असणें, दर्शविणें. *To mean well to,-by*, to be kindly disposed towards. सद्धेतु असणें; चांगलें मत असणें, मनांतून बरें असणें

Mean'ing, *n.* (मी'निंग्)—what is meant, the sense of words, signification. हेतु, अभिप्राय, अर्थ, तात्पर्य. *With m.*, significantly. हेतुपूर्वक, सहेतुक. *Mean'ingless, a.*

Means, *n.* (*pl.*) (मीन्झ्)—intermediate steps to an end ; resources ; money. साहित्य ; साधन ; द्रव्य,

Mean'time, Mean'while, *advv.* (मी'न्-टाईम्, मी'न्-व्हाइल्)—in the intervening time. मधल्या वेळांत, मध्यंतरीं, दरम्यान.

Meăn'der, *n.* (मिॲ'न्डर्)—departure from a straight course. वक्र गति, नदीचें वांकण, नागमोडी पळणाचा मार्ग. *v. i.* to wind about ; to go deviously. नागमोडी वळणें घेणें, वळसे घेऊन चालणें.

Mea'sles, *n. pl.* (मी'झल्झ्)—infectious human disease with red rash. गोवर, गोवरें. *Meas'ly*, (मी'झ्लि) *a.* of, like, having, measles ; scanty, worthless. गोवराचा, गोवरासारखा, गोवर असलेला ; अपुरा, क्षुद्र.

Mea'sure, *n.* (मे'झर्)—size or quantity in relation to a standard ; prescribed amount ; limit ; rhythm, metre, musical time ; expedient, calculated action ; parliamentary bill or act. माप ; विशिष्ट परिमाण ; प्रमाण, वांटा, भाग, मर्यादा, सीमा; छंद, वृत्त ; उपाय, साधन, युक्ति ; पार्लमेन्टांतील कायद्याचें बिल. *v. t.* to ascertain (size, quantity, &c.) with measure ; to amount to ; to estimate. मोजणें, माप घेणें ; भरणें ; किंमत करणें. *Mea'surement, n.* act of measuring ; (*pl.*) detailed dimensions. मोजमाप, मोजदाद, मापणें, मोजणें, मोजणी ; (अने.) लांबी, रुंदी वगैरे मापें, मोज. *In a* or *some measure*, partly. अंशतः, अल्पांशानें, कांहींसा. *To set measures to*, to limit. मर्यादा घालणें, मर्यादित करणें. *Beyond m.*, excessively. प्रमाणाबाहेर, बेसुमार, अतिशय. *To tread a measure*, to dance. तालावर नृत्य करणें, नाचणें. *To m. one's length*, to fall prostrate. साष्टांग नमस्कार घालणें, सपशेल आडवें पडणें. *To m. swords (with)*, (शीं) दोन हात करणें, बुद्धीचे डावपेंच करणें, शक्ति अजमावणें. *Mea'surable, a.* मोजण्यासारखा, आटोक्यांतला. *Mea'surably, adv; Mea'sured, a.* प्रमाणबद्ध ; तालबद्ध ; मोजका ; मापून दिलेला ; तोलून बोललेलें (भाषण, शब्द).

Meat, *n.* (मीट्)—flesh of beasts as food ; food of any kind ; meal. खाद्य, मांस ; अन्न ; भोजन. *Meat'y, a.* full of meat, full of substance. मांसल, मांसयुक्त, सत्त्वयुक्त. *Green m.*, grass, green vegetables, as food. भाजीपाला. *Meat & drink (to him)*, a great pleasure. फार समाधान, मोठें सुख. *M. safe.* a cupboard for storing meat, usu. of wire gauze etc. मांस ठेवण्याकरितां जाळीचें कपाट.

Meā'tus, *n.* (मिए'टस्)—(anat. ; pl.-us,-uses) a channel, passage, in the body. (मूत्राशय, कर्ण वगैरेचें) द्वार. *Auditory m.*, channel of the ear. कर्णनळ.

Mĕchăn'ic, *n.* (मिकॅ'निक्)—skilled artisan who works with tools, a handicraftsman. कारागीर, शिल्पकार ; यंत्रकलाभिज्ञ.

Mĕchăn'ical, *a.* (मिकॅ'निकल्)—of machines or mechanism ; automatic. यांत्रिक ; आपोआप चालणारें. *The m. powers*, यांत्रिक शक्ति.

Mĕchani'cian, *n.* (मेकॅनि'शन्)—one skilled in constructing machines. यंत्रकलावेत्ता, यंत्रज्ञ, यंत्रकार.

Mĕchăn'ics, *n. pl.* (मिकॅ'निक्स्)—science of motion ; science of machinery. गणितशास्त्र ; यंत्रशास्त्र.

Mĕc'hanĭsm, *n.* (मे'कॅनिझम्)—a mechanical contrivance, the way a machine works ; a piece of machinery ; framework of a story. यंत्रक्रिया ; यंत्र ; गोष्टीची रचना, आराखडा.

Mĕc'hanĭst, *n.* (मे'कॅनिस्ट्)—a mechanician, an expert in mechanics. यंत्रकार, यंत्रज्ञ.

Mĕc'hanize, *v. t.* (मे'कॅनाइझ्)—(-zable), to make mechanical. यांत्रिक करणें. यंत्रांचें साह्य देणें, यंत्रयुक्त करणें. *Mechaniza'tion*, *n.* (esp. Mil.) resort to tanks, aircraft etc. in war. युद्धांत विमानें, रणगाडे वगैरेंचें साह्य घेणें.

Mĕd'al, *n.* (मे'डल्)—a coinlike metal disk (with device, &c.) to serve as a reward of merit. पदक. *Medall'ion*, (मिडॅ'ल्यन्) a large medal ; circular picture or decorative panel. मोठें पदक, उठावाचें पदक, (पदकासारखा) वाटोळा ताईत, शोभेचें वाटोळें तावदान. *The reverse of the medal*, the other side of question. (कोणत्याहि) गोष्टीची,-प्रश्नाची,-दुसरी बाजू, दुसऱ्या बाजूनें विचार (करणें).

Mĕd'allĭst, *n.* (मे'डलिस्ट्)—the winner of a medal as the reward of merit ; an engraver, a designer, of medals. पदक मिळविणारा ; पदककार.

Mĕd'dle, *v. i.* (मे'डल्)—to busy oneself unduly *with* ; to interfere *in*. कामावांचून मध्यें पडणें, लुडबुडणें ; दुसऱ्याच्या कामांत हात घालणें.

Mĕd'dlesome, *a.* (मे'डल्-सम्)—given to meddling. लुडबुड्या, लुचरा.

Mē'dĭal, Mē'dĭan, *aa.* (मी'डिअल्, मी'डिअन्)—in the middle. मध्यस्थित, मध्यगत, मध्यवर्ती ; मध्यदर्शक, मध्यप्रमाणदर्शक.

Mē'dĭāte, *a.* (मी'डिएट्)—involving an intermediary ; without direct connexion. मध्यस्थाच्या तर्फे झालेलें ; मध्यस्थ, अपक्ष. *v. i.* to effect by mediation, to act as go-between or peace-maker. मध्यस्थी करणें, मध्यें येणें,-असणें. *Me'diation*, *n.* मध्यस्थी. *Me'diator*, *n.* मध्यस्थ. *Mediator'ial*, *Me'diatory*, *aa.* मध्यस्थीचा, मध्यस्थाचा. *Me'diatrix*, *n.* मध्यस्थीण, मध्यस्थ स्त्री. [L *medius*, Sk *madhya*, middle]

Mĕd'ĭcal, *a.* (मे'डिकल्)—of medicine. वैद्यकीय. *n.* a medical student. वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी.

Mĕd'ĭcament, *n.* (मे'डिकॅमेन्ट्)—a thing used as medicine, healing application. औषधी द्रव्य, औषध.

Mĕd'ĭcaster, *n.* (मे'डिकॅस्टर)—a quack. वैदू, नाक्काडोळ्याचा वैद्य.

Mĕd'ĭcāte, *v.t.* (मे'डिकेट्)—(*-cable*), to impregnate with medicinal substance, to treat medically. औषधीयुक्त करणें, औषधी करणें, औषधोपचार करणें.

Medĭ'cĭnal, *a.* (मिडि'सिनल्)—having the property of healing, curative. औषधी, रोगहारी.

Mĕdi'cine, *n.* (मे'ड्-सन्)—the art of preserving and restoring health ; drugs, physic. वैद्यक्रिया ; औषध. *v.t.* to administer drugs to. औषधोपचार करणें, औषधपाणी देणें. *M. man*, a magician. जादूटोणा करून रोग बरे करणारा.

Mĕd'ĭco, *n.* (मे'डिको)—(pl.– *os*) doctor. डॉक्टर, वैद्य.

Mĕdiō'val, Mediae'val, *a.* (मेडिई'व्हल्)—of or pertaining to the middle ages. मध्यकालीन, मध्ययुगासंबंधी.*-ism*, *n.* मध्ययुगीन पद्धति. मध्ययुगीनपणा.*—ist*, *n.* मध्ययुगीन-इतिहासवेत्ता, आचारांचा अभिमानी.

Mē'dĭōcre, *a.* (मी'डि-ओकर्)—middling, of moderate degree, second-rate. मध्यम प्रतीचा, सामान्य. *Medioc'rity*, *n.* a mediocre person. मध्यम प्रतीचा मनुष्य.

Mĕd'ĭtāte, *v. t.* & *i.* (मे'डिटेट्)—to plan, to scheme ; to ponder over. योजणें, चिंतणें ; ध्यान करणें, सारखा विचार करणें. *Med'itable*, *a.* *Med'itative*, *a.* ध्यानशील, विचारमग्न, ध्यानमुद्रादर्शक.

Mĕditā'tion, *n.* (मेडिटे'शन्)—reflection. ध्यान, चिंतन.

Mĕditerrā'nean, *a.* & *n.* (मेडिटरे'निअन्)—(of land) remote from coast ; (of water surfaces) land-locked. मध्यदेशस्थ, समुद्रतीरापासून अगदीं दूर (भूमि, प्रदेश) ; भूमध्य, भूवेष्टित (जलाशय). *M.* (*Sea*), भूमध्य (समुद्र.) (L *medius*, middle ; *terra*, earth, land)

Mē'dĭum, *n.* (मी'डिअम्)—(pl.-ums,-a), middle quantity or degree ; means or agency. मध्यम परिमाण, मध्यम पक्ष ; साधन, माध्यम, द्वार, मार्ग. *a.* remote from either extreme. मध्यम, मध्यम प्रतीचा. *M. of circulation*, what serves as instrument of commercial transactions.

e. g. coin. विनिमय चलन (नोटा, नाणें इ.). *M. bowler*, neither fast nor slow. मध्यम गतीचा चेंडू फेंकणारा,-गोलंदाज.

Mĕd'lar, *n.* (मे'ड्लर्)—a tree-fruit eaten when decayed. अति पक्व झाल्यावर खाण्याचें एक फळ.

Mĕd'ley, *n.* (मे'ड्-ले)—heterogeneous mixture, miscellany, jumble, hodge-podge. पंचमेळी खिचडी. *a.* mixed, motley. पंचमेळीचा, घोटाळ्याचा. *v. t.* to make a medley of, to intermix. खिचडा करणें, गोंधळ करणें.

Medu'lla, *n.* (मेड'ला)—marrow of bones; spinal marrow. अस्थिमज्जा, कांडमज्जा. *Medul'lary, a.* of marrow or pith. अस्थिमज्जेचा, मगजासंबंधी, मज्जायुक्त, गीर असलेला.

Meed, *n.* (मीड्)—reward, recompense. बक्षीस, इनाम, पारितोषिक, गुण, लायकी.

Meek, *a.* (मीक्)—submissive ; gentle. लीन ; सौम्य, शांत, गरीब, दीन. *As m. as a lamb,-as Moses*, कोंकराप्रमाणें गरीब. *Meek'ly, adv.* नम्रपणानें, लीनतेनें. *Meek'ness, n.*

Meer'kăt, *n.* (मी'र्कॅट्)—S. African name for two small mammals. द. आफ्रिकेंतील दोन लहान सस्तन प्राण्यांचीं नांवें.

Meer'schaum, *n.* (मी'र्शम्)—a creamy clay used esp. for pipe-bowls ; a pipe with m. clay. (चिलीम करण्याची) एक प्रकारची चिकण माती ; चिकण मातीची चिलीम. [Gk sea-foam, *meer*, sea, *schaum*, foam]

Meet, *a.* (मीट्)—fitting, proper. योग्य, उचित. *v. t. & i.* (*pa. t. & pa. p. met*) to come into contact or company (with); to confront ; to become perceptible to; to satisfy the claims of. गांठ पडणें, भेटणें ; मिळणें, जमणें, सामोरा येणें ; सांपडणें ; पुरा करणें. *n.* assembly preparatory to starting hunt. शिकारी लोकांचा शिकारीसाठीं जमाव. *To meet* (person) *half-way*, to respond to friendly advances of, to come to compromise with. तडजोड करणें, भिडतें घेणें. *To m. the eye, -ear*, to be visible,-audible. दिसणें, ऐकूं येणें. *To m. person's eye*, नजरानजर होणें, पाहणें. *To m. with*, to come across, to experience. अवचित भेटणें, अनुभवणें, तोंड देणें.

Meet'ing, *n.* (मीटिंग्)—assembling ; duel ; contest ; sporting event ; assembly. बैठक ; द्वंद्व ; सामना ; सभा, मेळा, मजलस.

Mĕgalomā'nia, *n.* (मेगॅलमे'निआ)—insane self-exaltation ; mania for big things. प्रतिष्ठोन्माद, गौरवोन्माद. [Gk *megas*, great]

Mĕgalosaur'us, *n.* (मेगॅलासॉ'अरस्)—a huge extinct lizard. हल्लीं अस्तित्वांत नसलेला एक प्रचंड सरडा.

Mĕg'aphone, *n.* (मे'गॅफोन्)—a speaking trumpet. दूरध्वनिक्षेपक कर्णा.

Mē'grim, *n.* (मी'ग्रिम्)—brow-ague; (pl.) low spirits; staggers in horses. अर्धशिशी; लहरी स्वभाव, निरुत्साहीपणा; (घोड्याला येणारी) भोंवळ, चक्कर.

Mĕlanchō'lia, *n.* (मेलॅंको'लिआ)—mental disease marked by melancholy. खेदोन्माद, दुश्चित्तता.

Mĕlanchŏl'ic, *a.* (मेलॅंको'लिक्)—of or liable to melancholia. दुश्चित्ततेचा, विषण्णतेचा,-विकार जडण्याजोगा.

Mĕl'ăncholy̆, *n.* (मे'लंकलि)-mental depression ; lack of cheerfulness. विषण्णता, विषाद ; औदासीन्य, उदासपणा. *a.* sad, depressed in spirits, gloomy. दुःखी, खिन्न, उदासीन, खेदजनक, खिन्नता उत्पन्न करणारा. [Gk. *melas*, black, *khole*, bile]

Mel'ee, *n.* (मे'ले)—a hand-to-hand conflict, a confused fight or struggle or crowd, lively debate. दंगल, हातघाई ; अटीतटीचा,-हमरीतुमरीचा,-वादविवाद.

Mĕl'inite, *n.* (मे'लिनाइट्)—an explosive. स्फोटक पदार्थ.

Mē'liorāte, *v. t.* (मी'लिओरेट्)—to make better, to improve, to ameliorate. चांगला करणें, सुधारणें, शांत करणें, स्थिति सुधारणें.—*ration, n.*

Mĕllif'luent, Mĕllif'luous, *aa.* (मेलि'फ्लुएन्ट्, मेलि'फ्लुअस्)—(of words etc.) honey-sweet. मधासारखा गोड, मधुर, (शब्द इ.).

Mell'ow, *a.* (मे'लो)—soft and rich in flavour, colour, or sound, soft to the ear ; (of earth) rich & loamy ; (of character) softened by age or experience ; partly intoxicated. मृदु, मधुर, मंजुळ ; नरम, मऊ (जमीन) ; पक्व, परिपक्व ; मवाळलेला ; रंगेल, धुंद, मस्त. *v. t. & i.* to make or become mellow. मृदु,-नरम करणें,-होणें. *Mell'owness, n.*

Mĕlō'dious, *a.* (मिलो'डिअस्)—full of melody. मधुर, मंजूळ. *Melo'diously, adv.* ; *Melo'diousness, n.*

Mĕl'odist, *n.* (मे'लडिस्ट्)—a singer ; a composer of melodies. गायन, सुस्वर काव्य करणारा.

Mĕlodra'ma, *n.* (मेलोड्रा'मा)—a drama marked by crude appeals to emotion & happy ending ; language, behaviour, suggestive of this ; (formerly) play with songs interspersed. मनोविकारक्षोभक सुखपर्यवसायी नाटक ; मनोविकारक्षोभक भाषा, अभिनय ; (पूर्वीचें) गायनवादनयुक्त संगीत नाटक. *Melodramat'ic, a.* क्षोभप्रधान-नाट्यसंबंधी.

Mĕl'ody, *n.* (मे'लडि)—sweetness of sound ; songs or music ; sound that delights the ear, the air in harmonized music. स्वरमाधुर्य ; गायन ; मंजुळ स्वर, सूर.

Mĕl'on, *n.* (मे'लन्)—kinds of gourd eaten as fruit. खरबूज. *Water m.*, कलिंगण, कलिंगड.

Mĕlt, *v. i. & t.* (मेल्ट्)—(*pa.p. melted*; and, as adj., *mo'lten*), to pass or convert from solid to liquid form under heat; to dissolve, to dwindle, to vanish. वितळणें. द्रव होणें. वितळविणें; विरघळणें, पान्हा फुटणें, पान्हा फोडणें, कनवाळणें, कमी होणें, नाहींसा होणें. *Melt away*, पार वितळून जाणें, नाहींसा होणें. *To m. down*, मोडून वितळविणें. *To go into the melting pot*, be revolutionized, रूपांतर होणें, क्रांती होणें. *Melting point*, वितळण्याचा अंश, द्रवणांक, द्रवणांश. *Melting process*, द्रवीकरणपद्धति, अशुद्ध धातु गाळण्याची पद्धति. *Melt*, *n.* melted metal; amount melted at a time. वितळविलेली धातु; एका वेळीं वितळविलेलें सर्व द्रव्य किंवा धातु.

Mĕm'ber, *n.* (मे'म्बर्)—a limb or other bodily organ; distinct part of a complex structure; one of a society. अंग, गात्र, अवयव; निराळा भाग, प्रकरण, खंड; सभासद, व्यक्ति. *Unruly member*, tongue. जीभ. *Member of Christ*, Christian. ख्रिश्चन मनुष्य *M. P.*, member of Parliament. पार्लमेंटचा सभासद.

Mĕm'bership, *n.* (मे'म्बर्शिप्)—being a member; number of members. सभासदत्व; सभासदांची संख्या.

Mĕm'brāne, *n.* (मे'म्ब्रेन्)—pliable sheet-like tissue, a thin flexible skin or texture. आंतील त्वचा, वेष्टनत्वचा. *Membrana'ceous*, (मेम्ब्रने'शस्), *Membra'neous*, *aa.* कोमल, मृदु, पातळ, आंतील त्वचेचा, वेष्टनसदृश.

Mĕmĕn'tō, *n.* (मिमे'न्टो)—(*pl.-os*) an object serving as a memorial; a keepsake. स्मरणार्थ वस्तु; आठवणूक, स्मरण, यादगिरी. *M. mori*, (=remember you must die), warning or reminder of death (e. g skull). (डोक्याची कवटी वगैरे) मरणाधीनतेची आठवण करणारें, मृत्युसूचक.

Mem'oir, *n.* (मे'म्वार्)—a brief biography; (*pl.*) account of one's life or experiences; what is treasured in the mind; scientific paper. लहानसें चरित्र; (अने॰) स्वतःचें चरित्र किंवा आठवणी; टांचण, बखर; संशोधनात्मक निबंध.

Mĕm'orable, *a.* (मे'मोरबल्)—likely or worthy to be remembered, remarkable, famous. संस्मरणीय, स्मरण ठेवण्याजोगा. *Memorabil'ia*, *n. pl.* memorable things. संस्मरणीय गोष्टी. *Memorabil'ity*, *n.* संस्मरणीयता. *Mem'orably*, *adv.*

Mĕmorăn'dŭm, *n.* (मेमोरॅ'न्डम्)—(*pl.-da*) a note made for future use, a brief entry in a diary; informal business communication. टांचण, याद; निवेदनपत्रिका, कायदेशीर यादी. *M. of Association*, (एखाद्या) संस्थेच्या व्यावहारिक स्थितीची व उद्देशाची यादी, उद्देशपत्रक.

Mĕmor'ĭal, *a.* (मिमॉ'रिअल्)—commemorative. स्मृतिजनक, स्मारक. *n.* commemorative monument, (*usu. pl.*) chronicles; a written representation made to authorities. स्मारक; स्मरणार्थ टिपणें; अर्ज, विनंतीपत्र. *Memor'ialist*, *n.* signatory of memorial. विनंतीपत्रकावर सही करणारा. *Memor'ialize*, *v. t.* to address memorial to. (ला) विनंतीअर्ज करणें. *M. Day*, 30th May or other day to commemorate those who fell in the U. S. Civil War. अमेरिकेच्या सं॰ संस्थानांतील अंतस्थ यादवींत मृतांच्या स्मरणार्थ दिवस.

Mĕm'orīze, *v. t.* (मे'मराइझ्)—to learn by heart. तोंडपाठ करणें.

Mĕm'orў, *n.* (मे'मरि)—faculty by which things are recalled to or kept in the mind; posthumous repute. धारणाशक्ति, आठवण, स्मरणशक्ति, स्मृति; मरणानंतर होणारी कीर्ति. *Convenient* or *accommodating memory*, सोईस्कर किंवा आवडत्या गोष्टींचें स्मरण,स्मृति. *In m. of*, च्या स्मरणार्थ. *To commit to m.*, तोंडपाठ करणें.

Mĕn'ace, *n.* (मे'निस्)—threat; apparent danger, indication of a probable evil to come. धमकी; दहशत. *v. t.* to threaten. धमकी देणें, धमकावणें, दटावणें, भिवविणें. *Men'acingly*, *adv.*

Menage', *n.* (मेना'झ्)—household, or its management. गृहसंस्था, घर, प्रपंच; संसाराची व्यवस्था, गृहव्यवस्था.

Menă'gerie, *n.* (मिनॅ'जरि)—a show of caged wild animals. जनावरखाना, पशुसंग्रह.

Mĕnd, *v. t. & i.* (मेन्ड्)—to repair, to patch; to put right; to improve upon; to rectify, to advance to a better state. डागडुजी करणें, दुरुस्त करणें; नीट करणें; सुधारणें; शुद्ध करणें. *n.* mended hole or crack. दुरुस्त केलेलें भोंक किंवा चीर. *On the m.*, improving in health or condition. प्रकृति सुधारत असलेला, स्थिति सुधारत असलेला. *To m. matters*, स्थिति सुधारणें. *To m. or end*, to improve or abolish. सुधारणें किंवा नाहींसें करणें. *Men'dable*, *a.*

Mĕndā'cious, *a.* (मेन्डे'शस्)—lying, given to lying or telling untruths. खोटें बोलणारा, लबाड, खोटा, लुच्चा. *Menda'city*, *n.* खोटें भाषण, खोटें बोलण्याची संवय, लबाडी.

Mĕn'delism, *n.* (मे'न्डलिझम्)—theory of heredity tending to reduce to numerical law the recurrence of inherited characters आनुवंशिक गुणांची आवृत्ति संख्येनें ठरविणारा आनुवंशीयतेचा

(मेन्डेल नांवाच्या मानसशास्त्रज्ञानें ठरविलेला) सिद्धान्त. *Mende'lian, a. & n.* [*G. J. Mendel, 1822-84.*]

Mĕn'dĭcant, *n.* (मे'न्डिकन्ट्)—a beggar. भिकारी, याचक, भिक्षु, यति. *M. friars,* भिक्षेवरच राहणारे संन्यासी, भिक्षु. *Men'dicancy, n., Men'dicity, n.*

Mē'nial, *n.* (मी'निअल्)—a household servant. घरचाकर. *a.* fit only for a menial. घरकाम करणारा.

Mĕnĭngī'tis, *n.* (मेनिन्जा'यूटिस्)—inflammation of membrane enclosing the brain. मेंदूच्या वेष्टनाची सूज, मेन्दूचा विकार, मेन्दूज्वर.

Men'sēs, *n. pl.* (मे'न्सीझ्)—monthly discharge from the womb. मासिक विटाळ, मासिक स्राव.

Mĕn'shĕvĭk, *n.* (मे'न्शिव्हिक्)—Russian Socialist of the more moderate party (*cf.* Bolshevik). रशियांतील मवाळ पक्षीय समाजसत्तावादी ('बोल्शेव्हिक'च्या उलट).

Mĕn'strual, *a.* (मे'न्स्ट्रुअल्)-monthly ; pertaining to the menses of females. मासिक ; मासिक विटाळासंबंधीं.

Mĕn'struāte, *v. i.* (मे'न्स्ट्रुएट्)—to discharge the menses. विटाळ येणें ; मासिक स्राव होणें. *Menstrua'tion, n.*

Mĕn'struum, *n.* (मे'न्स्ट्रुअम्)—(*pl.-rua*), solvent liquid. द्रावक, औषधांचें वाहक.

Mĕn'sūrable, *a.* (मे'न्स्युरबल्)—measurable; having fixed rhythm. प्रमाणाचा, मोजण्याजोगा ; तालबद्ध.

Mĕnsūrā'tion, *n.* (मेन्स्यूरे'शन्)—the art or practice of computing measurements. महत्त्वमापन ; मोजणें ; मापन.

Mĕn'tal, *a.* (मे'न्टल्)—of or in the mind. मानसिक, मनाचा. *M. arithmetic,* performed without the use of written figures. तोंडी गणित, तोंडचे हिशेब. *M. patient,* under care for disordered mind. वेड लागलेला रोगी, भ्रमिष्ट रोगी. *Men'tally,* adv. मनांतल्या मनांत, मानसिक श्रम करून. *Men'tal, a.* of the chin. हनुवटीचा.

Mĕntăl'ĭty, *n.* (मेन्टॅ'लिटि)—character of a person's mind ; idiosyncrasy. मनाचा स्वभाव, स्वभाववैचित्र्य.

Men'thŏl, *n.* (मे'न्थॉल्)—camphor-like substance used in relieving pain. कापरासारखें दुःखहारक औषध, मेंथाल.

Mĕn'tion, *v. t.* (मे'न्शन्)—to speak of ; to call attention to. सांगणें ; कळविणें, लिहिणें, उल्लेख करणें *n.* a mentioning. निवेदन, कथन, उल्लेख. *Honourable m.,* award of merit to candidate in examination, work of art etc. not entitled to prize. प्रशस्तिपत्र ; प्रशस्तिपर नामानिर्देश.

Men'tor, *n.* (मे'न्टॉर्)—an experienced and trusted adviser, a counsellor. अनुभविक आणि विश्वस्त उपदेशक, सदुपदेशक.

Mĕn'u, *n.* (मे'न्यु or मेनू)—a bill of fare. भोजनपत्रक, जेवणांतील पदार्थांची यादी.

Mĕphī'tĭs, *n.* (मिफा'इ-टिस्)—noxious emanation from below ground. कुजट पदार्थांतून निघणाऱ्या विषारी वाफा, जमिनींतून निघणारी दूषित हवा, वाफ. *Mephit'ic, a.* घाणेरा, घाणीचा, रोगजनक, दूषित.

Merc'antile, *a.* (म'र्-कन्टाइल्)—trading ; of trade or merchants, commercial. व्यापारी ; व्यापाराचा. *M. theory,* theory that money is the only wealth. पैसा हीच संपत्ति, हा सिद्धान्त. *M. marine,* shipping employed in commerce. व्यापारी जहाजें, व तिचा चालकवर्ग

Mer'cenarў, *a.* (म'र्सिनरि)—working for money or reward ; not disinterested. पैशासाठीं किंवा बक्षिसाकरितां काम करणारा भाडोत्री ; स्वार्थी. *n.* a hired soldier. भाडोत्री शिपाई.

Mer'cer, *n.* (म'र्सर्)—a dealer in silk, velvet and such fabrics. रेशमी किंवा लोकरी कापड विकणारा. *Mer'cery, n.* रेशमी कापड, पट्टवस्त्रें.

Mer'cerīze, *v. t.* (म'र्सराइझ्)—to prepare (cotton goods) for dyeing by use of the chemicals. क्षारांच्या योगानें कापसाचें सूत रेशमाप्रमाणें तकतकीत करणें. *Mercerized, (pa. p.)* having silk gloss due to mercerizing. क्षारांच्या साह्यानें रेशमाप्रमाणें तकतकीत दिसणें.

Merch'andīse, *n.* (म'र्चन्डाइझ्)—mercantile commodities ; goods for sale. व्यापारी जिन्नस ; विक्रीचा माल.

Merch'ant, *n.* (म'र्चन्ट्)—wholesale trader, esp. with foreign countries ; dealer. परदेशाशीं व्यापार करणारा, घाऊक व्यापारी ; व्यापारी. *M. prince,* wealthy m. श्रीमान व्यापारी. *M. ship, Merchantman,* a ship conveying merchandise. व्यापारी जहाज. *M. service,* व्यापारी जहाजांची वाहतूक. *Speed m.,* reckless motorist, बेदरकार मोटार हांकणारा. *Lob m.,* slow bowler. सावकाश व हळू चेंडू फेंकणारा. *Merch'antable, a.* salable ; in demand. विकण्याजोगा ; मागणीचा.

Mer'cĭful, *a.* (म'र्सिफुल्)—disposed to mercy ; compassionate ; kind. दयाशील ; दयाळू ; सदय, कृपाळू

Mer'cĭless, *n.* (म'र्सिलिस्)—cruel, pitiless. निष्ठुर, दयाहीन, निर्दय.

Mercūr'ial, *a.* (मर्क्यु'रिअल्)—of lively temperament ; of or containing mercury. रंगेल, आनंदी ; पाऱ्यासंबंधींचा, पाऱ्याचा.

Merc'ūrў, *n.* (म'र्क्युरि)—a white normally liquid metal, quicksilver ; Roman god, the mess-

enger of Jove; a messenger. पारा; एक रोममधील देवता, बृहस्पतीचा दूत, बुधग्रह; दूत. *The m. is rising*, weather or temper is improving. हवा किंवा पारा सुधारणें; पारा चढणें.

Mer'cy̆, *n.* (म'र्सि)—pity, compassion, compassionateness; a piece of good fortune कृपा, करुणा, दया; सुदैव. *At the m. of*, wholly in the power of, liable to danger or harm from. च्या हातांत सांपडणें, च्या स्वाधीन असणें.

Mēre, *n.* (मिअर्)—a pool or small lake; a boundary. सरोवर; सीमा, हद्द. *a.* neither more nor less than; bare, undiluted. केवळ, फक्त; निर्भेळ, अमिश्रित.

Mere'ly̆, *adv.* (मि'अर्लि)—just, only. केवळ; फक्त.

Mĕretri'cious, *a.* (मेरिट्रि'शस्)—showily attractive; flashy; of, befitting, a harlot. भपकेबाज, दिखाऊ, अलंकारिक; वेश्येचा, वेश्येसंबंधी.

Mĕrgăn'ser, *n.* (मर्गॅ'न्सर्)—a diving fish-eating duck. पाण्यांत बुडी मारणारें मत्स्यभक्षक बदक.

Merge, *v. t. & i.* (मर्ज्)—to lose or cause to lose identity by absorption. गड्ड करणें, मिळून जाणें. *Mer'ger*, *n.* absorption in a greater whole. मोठ्या विभागांत सामील होणें, अंतर्भाव होणें.

Mĕrĭd'ian, *n.* (मिरि'डिअन्)—sun's position at noon; star's highest altitude; circle passing through a place and the N. & S. poles; prime, full splendour; *(attrib.)* culminating; of noon. मध्याह्न; ताऱ्याची अत्युच्च स्थिति; याम्योत्तर वृत्त; भर, बहर, कळस; (विशे०) भराचा, शिकरतीचा, कळसाचा; मध्याह्नाचा. *Calculated for the m. of*, to suit the tastes of (place, people). आवडीनुसार, आवडीनावडीप्रमाणें.

Mĕrĭd'ional, *a.* (मिरि'डिअनल्)—of the south; of a meridian. दक्षिणेकडील; मध्याह्नाचा.

Meringue', *n.* (मरॅं'ग्)—sweet made with white of egg, sugar etc. अंड्याचें बलक, साखर वगैरेंनीं युक्त असा खाऊ.

Meri'no, *n.* (मरी'नो)—*(pl.—os)*, a kind of sheep with fine wool; fine yarn or soft fabric of its wool; fine woollen yarn. उंची लोंकरीच्या मेंढ्यांची जात (स्पेनमधील); त्या मेंढ्यांच्या लोंकरीचे तंतू; उंची लोकरीचें कापड.

Mĕ'rit, *n.* (मे'रिट्)—commendable quality; goodness; *(pl.)* deserts. चांगला गुण; चांगलेपणा; पुण्य; (अने०) गुणदोष. *v. t.* to deserve. योग्य असणें, योग्यता-लायकी-असणें.

Mĕritor'ious, *a.* (मेरिटॉ'रिअस्)—having merit, deserving, praiseworthy. स्तुत्य, गुणवान्.*-ly adv.,-ness, n.*

Merle, *n.* (मर्ल्)—a black bird. एक जातीचा पक्षी.

Merl'in, *n.* (म'र्लइन्)—a kind of falcon. एक जातीचा बहिरी ससाणा.

Merm'aid, *n.* (म'र्मेड्)—a half-human being with head & trunk of a woman & tail of a fish. मत्स्यकन्या, कमरेखालीं मत्स्यासारखी स्त्री.

Merm'an, *n.* (म'र्मन्)—man of the sea with fish tail. कमरेखालीं मत्स्यासारखा पुरुष, मत्स्यपुरुष.

Mĕ'rriment, *n.* (मे'रिमेन्ट्)—gaiety with laughter or noise, amused enjoyment; mirth. हास्यविनोद, हंसणें खिदळणें, नाचतमाशा, थट्टामस्करी, चैन, मौज; आनंद.

Mĕ'rry̆, *a.* (मे'रि)—laughing, given to laughter; full of fun, jovial, hilarious. हास्यमुख, आनंदी; गंमतीचा. *M. andrew*, clown, buffoon. खुषमस्कऱ्या, विदूषक. *M.-go-round*, a revolving machine with wooden horses or cars. लांकडी घोडे किंवा बैठका बसविलेलें फिरतें चक्र, गोल चांक. *M.-making*, festivity. चैन, मजा, उत्सव. *M.-thought*, the forked bone of a bird's breast. पक्ष्याच्या छातीचें कांटेरी हाड. *To make m.*, to be festive. मजा करणें, चैन करणें. *To make m. over*, to make fun of. ची थट्टा करणें.

Mĕsalliance, *n.* (मेझॅ'लिआंस्)—a marriage with person of inferior social position. कमी दर्जाच्या पुरुषाशीं विवाह, प्रतिलोम विवाह. [F]

Meseem's, *v. i.* (मिसी'म्स्)—it seems to me. मला वाटतें, मला भासतें.

Mĕsh, *n.* (मेश्)—one of the spaces between the threads of a net; *(pl.)* something that entangles, a net. जाळ्याच्या धाग्यांतील फट; (अने०) जाळें. *v. t.* to catch in a net; (of teeth of wheel) be engaged. जाळ्यांत पकडणें; (चाकाचे दांते, दांत्यांत) अडकलें जाणें. *In mesh*, engaged. एकमेकांत अडकलेले (चाकाचे दांते).

Mĕs'merism, *n.* (मे'झ्मेरिझम्)—hypnotic state induced in a person by the exercise of another's will-power, animal magnetism. मोहिनीप्रयोग. *Mesme'ric, a.* मोहिनी प्रयोगाचा, मोहन शक्तीचा. *Mesmer'ist, n.* मोहनप्रयोग करणारा, जादूगार, जादूचे प्रयोग करणारा.

Mĕs'merize, *v. t.* (मे'झ्मेराइझ्)—to bring into a state of hypnotic sleep. मोहिनीविद्येनें गुरळ पाडणें.

Mĕss, *n.* (मेस्)—portion of food; untidiness, dirty state; company, esp. in army or navy, feeding together. अन्न, भोजन; खिचडी, चिवडा, गोंधळ घोटाळा, फजिती, अव्यवस्था, गबाळपणा; (नाविकांचें, सैनिकांचें) सहभोजन, भिसी. *v. t. & i.* to make dirty or untidy, to bungle; to take meals *with*. गोंधळ करणें; सहभोजन करणें. *To*

make a m. of, to bungle (undertaking). गोंधळ करणें, फसणें. *Mess-mate*, गलबतावरील सहभोजक (खलाशी), एकाच भिशींत जेवणारा. *Me'ssy, a.*

Mĕss'age, *n.* (मे'सिज्)—communication sent; what a prophet or moralist is inspired to say. निरोप: संदेश. *v. t.* to send as a message; to transmit (plan etc.) by signalling. निरोप म्हणून पाठविणें; खुणांनीं-संकेतचिन्हांनीं (बातमी किंवा बेत) कळविणें.

Mĕss'ĕnger, *n.* (मे'सिंजर्)—bearer of a message. दूत, जासूद.

Mĕss'rs, *n.* (मे'सर्झ्)—title prefixed to name of firm or to list of gentlemen. (मिस्टरच्या अनेकवचनाप्रमाणें) व्यापारी मंडळाच्या किंवा गृहस्थांच्या नांवाच्यापूर्वीं लावण्याची पदवी.

Mĕss'ūage, *n.* (मे'सूइज्)—a dwelling house with out-building and land. घरवाडी.

Mĕtăb'olism, *n.* (मिटॅ'बालिझम्)—the changes undergone by nutritive material in the body. शरीरांतील पाचक द्रव्यानें घडविलेले फरक, चयापचयक्रिया. *Metabol'ic, a.*

Mĕtacărp'us, *n.* (मेटॅका'र्पस्)—the part of hand from the wrist to the finger-roots. हाताचा तळवा.

Mĕt'al, *n.* (मे'टल्)—a class of substance; the broken stones for road-making; (*pl.*) the rails of a railway. धातु; खडी; (अने०) आगगाडीचे रूळ. *v. t.* to fit with metal; to make or mend (road) with metal. धातुमय करणें; खडी घालून रस्ता करणें,-दुरुस्त करणें. *Metall'ic*, of, or as of, metal. धातूचा, धातूप्रमाणें, धातूसारखा. *Metallic currency*, gold, silver, etc. सोनें, चांदी वगैरेचीं नाणीं. *Metallif'erous, a.*, *Met'alline, a.* of the nature of or yielding metal. धातुयुक्त, धातूत्पादक, धातूचा, धातुमय. *Met'allize, v. t.* to give metallic qualities to. धातुरूप देणें.

Mĕtăll'urgy̆, *n.* (मिटॅ'लर्जि)—art of extracting metal from ore and of working in metal. धातुशोधनविद्या, धातुविद्या.-*gist, n.* धातुशोधक, धातुविद्या जाणणारा.

Mĕtamŏrph'ĭc, *a.* (मेटमॉ'र्फिक्)—(of rocks) changed in structure by volcanic or other natural agency. ज्वालामुखीच्या किंवा इतर नैसर्गिक कारणानें मूल रूपांत फरक पडलेले (खडक), मूलरूपान्तरीभूत. *Metamorph'ism, n.* रूपांतरक्षमता.

Mĕtamŏrph'ōse, *v. t.* (मेटमॉ'र्फोझ्)—to subject to metamorphosis. रूपांतर करणें, स्वरूप बदलणें.

Mĕtamŏrph'osĭs, *n.* (मेटमॉ'र्-फॉसिस्)—(*pl.-oses*) change of form, esp. magic transformation, change of character, circumstances etc. रूपांतर, रूपभेद, विकृति. [Gk *meta*, beyond and *morphe*, form]

Mĕt'aphor, *n.* (मे'टफर्)—application of name or descriptive term to an object to which it is not literally applicable. रूपक, दोन सारख्या पदार्थांचें अभेदवर्णन. *Metapho'rical, a.* रूपकाचा, लाक्षणिक.

Mĕtaphy̆s'ĭcs, *n. pl.* (मेटाफि'झिक्स्)—speculations on the nature of being, truth, and knowledge; abstract or subtle talk, mere theory. अध्यात्मविद्या, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, केवळ तात्त्विक भाषण. *-cal, a.,-cian, n.* तत्त्वज्ञानवेत्ता.

Mĕtatărs'us, *n.* (मेटटा'र्सस्)—group of five long bones of foot between tarsus and toes. पायाच्या चवड्याचीं हाडें.—*tars'al, a.* पायाच्या चवड्याचा.

Mĕtăth'esĭs, *n.* (मिटॅ'थिसिस्)—(*pl.-eses*)—transposition of the letters or sounds in a word; (*Chem.*) interchange of atoms between two molecules. शब्दांतील अक्षरांची किंवा उच्चाराची उलटापालट (उदा: उरफाटा, उफराटा इ०), वर्णविपर्यय); परमाणुविपर्यय. [Gk *meta*, over, and *tithemi*, to place]

Mēte, *v. t.* (मीट्)—to measure, to dole. मापणें, मोजणें, मोजून—मापून—देणें. *n.* boundary, boundary stone. मर्यादा, सीमा, हद्द, हद्दीचा दगड.

Mĕtĕmp'sy̆chō''sĭs, *n.* (मिटें'प्-सिको''सिस्)—(*pl. -oses*), migration of soul at death into another body. जन्मांतर, पुनर्जन्म.

Mē'tĕor, *n.* (मी'टिअर्)—any atmospheric phenomenon esp. a shooting star. उल्का, दिव्य उत्पात, आकाशांतून पडणारा तारा.

Mētĕŏ'rĭc, *a.* (मीटिऑ'रिक्)—brilliant and transitory as a meteor, transiently brilliant; of meteors; (fig.) dazzling, rapid. उल्केसारखा तेजस्वी आणि क्षणिक; उल्कासंबंधीं; दृष्टि दिपवून टाकणारा, जलद.

Mē'teorīte, *n.* (मी'टअराइट्)—a fallen meteor, a meteoric stone. आकाशांतून पडलेला तारा, उल्कापाषाण.

Mētĕorŏl'ogy̆, *n.* (मीटिअरॉ'लॉजि)—science of the atmospheric phenomena or weather. वातावरणशास्त्र, हवामानविषयक शास्त्र.-*o'gical, a.* हवामानशास्त्रविषयक.-*gist, n.* हवामानशास्त्रज्ञ.

Mē'ter, *n.* (मी'टर्)—apparatus registering the amount of gas or other fluid that passes through it; a person, a thing, that measures. (पाणी, गॅस, वीज, वगैरे) मापण्याचें यंत्र, मीटर; मापणारा, मोजणारा.

Methinks', *v. impers.* (मिथिं'क्स्)—it seems to me, it appears to me, I think. मला वाटतें, मला भासतें.

Mĕth'od, *n.* (मे'थड्)—way of doing something; orderliness, systematic way; (Nat. Hist.) a scheme of classification. मार्ग, पद्धति, व्यवस्था, अनुक्रम, बेत, कृति, रीत; वर्गीकरण, वर्गीकरण-पद्धति.

Mĕthŏd'ĭcal, *a.* (मिथॉ'डिकल्)—characterised by a method, orderly, systematic. पद्धतशीर, यथाक्रम. *Method'ically, adv.*

Mĕth'odĭst, *n.* (मे'थडिस्ट्)—a member of any of the religious bodies owing their origin to the evangelistic movement of Charles & John Wesley & George Whitefield; (contempt.) a person of strict religious views; one who follows a method esp. in Nat. Hist. कर्मनिष्ठ ख्रिस्ती पंथाचा मनुष्य; कर्मठ मनुष्य; वर्गीकरण-पद्धतिनिष्ठ. *Meth'odism, n.* 'मेथडिस्ट' पंथाचीं मतें.—*distical, a.*

Mĕth'odīze, *v. t.* (मे'थडाइझ्)—to introduce method into. पद्धतशीर करणें, व्यवस्था लावणें.

Mĕth'ȳl, *n.* (मे'थिल्)—the base of wood spirit. पुष्कळ सेंद्रिय संयुक्त पदार्थांचें आवश्यक घटक, काष्ठमद्यार्काचें मूल. *Meth'ylate, v. t.* to mix with methyl. काष्ठमद्यार्कांशीं संयुक्त करणें. *Methylated spirit*, मनुष्यानें पिण्याला अगदीं नालायक केलेली दारू. [Gk *methu*, wine, hule, wood]

Mĕtĭc'ūlous, *a.* (मिटि'क्युलस्)—slavishly accurate or correct or proper. फाजील सावध, अति चिकित्सक.

Mĕtŏn'ȳmȳ, *n.* (मिटॉ'निमि)—substitution of an attribute for the name of the thing meant (*e. g. crown* for *king*). नामाकरितां विशेषण किंवा विशेषनाम योजणें, अजहल्लक्षणा.

Mē'tre, *n.* (मी'टर्)—verse rhythm. छंद, वृत्त. *Me'trist, n.* कविताकार.

Mē'tre, *n* (मी'टर्)—a unit of length (39·37 in) in metric system. लांबी मोजण्याचें मीटर नांवाचें फ्रेंच माप (= ३९·३७ इंच).

Mĕt'ric, Mĕt'rical, *aa.* (मे'ट्रिक् मे'ट्रिकल्)—of or in metre; involving measurement. छंदाचा, वृत्तसंबंधीं; छंदोबद्ध; मोजण्याचा, मापनविषयक. *M. system*, decimal measuring system with the metre and the litre and gramme determined by it, as units of length, capacity and weight. दशांशात्मक मेट्रिक पद्धति. (मीटर, लिटर आणि ग्राम हीं त्या पद्धतींत लांबी, द्रव पदार्थ व वजन मोजण्याचीं अनुक्रमें मुख्य मापें आहेत.)

Mĕtrŏl'ogȳ, *n.* (मिट्रॉ'लजि)—science, system, of weights and measures. वजनमापशास्त्र,-पद्धत. -*gist, n.*

Mĕt'ronome, *n.* (मे'ट्रनोम्)—musician's pendulum giving regular beat at required pace. ताल-मापक (यंत्र).-*nom'ic, a.*

Mĕtrop'olis, *n.* (मिट्रॉ'पॉलिस्)—the mother city, chief city of a State, *Metropolitan's see.* मुख्य शहर, राजधानी; बिशपच्या अधिकारांतील विभाग-प्रदेश.

Mĕtropŏl'itan, *a.* (मेट्रपॉ'लिटन्)—of a metropolis. राजधानीचा. *n.* archbishop. मुख्य-बिशप किंवा धर्माधिकारी.

Mĕt'tle, *n.* (मे'टल्)—spirit, courage, stuff or material, endurance. तेज, धैर्य, सहनशक्ति किंवा ताकद. *M.-some, met'tled, aa.* spirited. तेजस्वी, पाणिदार, जोरदार. To *be on* one's *met'tle*, to be incited to do one's best, जोम दाखविण्याला भाग पडणें, आवेश चढणें.

Mew, *v. i. & t.* (म्यू)—to shut up; to cry like a cat or baby. कोंडून ठेवणें; मांजरासारखें किंवा लहान मुलासारखें ओरडणें. *n.* a cage for hawks. पिंजरा, खुराडें. *Mews*, (pl. as sing.) stable-yard and stables. तबेल्यांची जागा, घोड्यांचे तबेले.

Mew, *n.* (म्यू)—a sea-gull, a seafowl. दर्यावरील पक्षी, केगई.

Miăs'ma, *n.* (मायॅ'झ्मा)—(pl.-*ata*), noxious exhalation from marshes, putrid matter, etc. दूषित रोगजनक हवा.

Mī'că, *n.* (मा'इ-का)—kind of mineral found as crystals separable into thin plates. अभ्रक.

Mĭc'kle, *n.* (मि'कल्)—a large amount. मोठी संख्या. *Many a little*, or *pickle, makes a m.*, थेंबें थेंबें तळें सांचे.

Mī'crōbe, *n.* (मा'इ-क्रोब्)—a minute plant or animal, esp. as cause of a disease. अगदीं सूक्ष्म (रोगजनक) वनस्पति किंवा प्राणी.

Mī'crocŏsm, *n.* (मा'इ-क्रा-कॉझम्)—a man as an epitome of the universe; analogue on a small scale of something, the little world. पिंड, मानवदेह, मनुष्य; सूक्ष्म जगत्. *Microcos'mic, a.* सूक्ष्म विश्वाचा, मानवदेहाचा. [Gk *mikros*, little; *kosmos*, world]

Mī'cron, *n.* (मा'इक्रन्)—millionth of a metre. मीटरचा दशलक्षांश भाग.

Mī'crophōne, *n.* (मा'इ-क्रोफोन्)—a device for making faint-sounds louder. अस्पष्ट शब्द मोठे करणारें यंत्र, सूक्ष्मध्वनिवर्धक यंत्र.

Mī'croscōpe, *n.* (मा'इक्रॉ-स्कोप्)—lens or arrangement of lenses, &c. by which minute objects are made visible. सूक्ष्मदर्शक यंत्र. सूक्ष्मदर्शक भिंग,-कांच. *Microscop'ic, a.* of, with, like, the microscope. सूक्ष्मदर्शक यंत्राचा, सूक्ष्मदर्शकाच्या

साह्यानें केलेला, अतिसूक्ष्म. *Microscop'ical, a.*; *Micros'copy, n.* सूक्ष्मदर्शक यंत्राचा उपयोग, सूक्ष्मदर्शनविद्या.

Mĭcturĭ'tion, *n.* (मिक्टचुरि'शन्)—passing of urine. मूत्रोत्सर्जन, लघवीला अति होणें.

Mĭd, *a.* (मिड्)—that is in the middle, intermediate. मधला, मध्य, मध्यम, मध्यवर्ती. *prep.* amid. मध्यें. *Mid-night*, twelve o'clock at night. मध्यरात्र. *Mid-off*, *Mid-on*, fielders nearer batsman than long-off, and long-on. खेळाडूच्या जवळचे मध्यक्षेत्रांतील क्षेत्ररक्षक.

Mĭd'day, *n.* (मि'ड्-डे)—noon or thereabouts. दुपार, मध्याह्न.

Mĭdd'en, *n.* (मि'डन्)—a dung-hill; a refuse-heap. उकिरडा, कचऱ्याचा ढीग.

Mĭdd'le, *a.* (मि'डल्)—equally distant from the extremes, equidistant from extremities, intermediate in rank, quality, &c. मधला, मधील, मधचा; मध्यम दर्जाचा. *n.* middle point or position; the waist. मध्यबिंदु; मधला भाग, मध्यम प्रदेश, कमर. *M.-aged*, मध्यमवयस्क. *M. finger*, second finger. आंगठ्याजवळचें हाताचें बोट. *M.-man*, a dealer intervening between producer & consumer. मध्यस्थ, अडत्या, दलाल. *In the M. of*, while (doing), during (process). दरम्यान, मध्यें, मध्यंतरीं. *M. weight*, boxing weight from 11 st. 6 lb. to 10 st. 7 lb. मल्लाचें वजन (१६० ते १४० पौंड वजन).

Mĭdd'le Ages, *n.* (मि'डल् एजिस्)—about A. D. 1000-1400. मध्यकाळ, सुमारें १००० ते १४०० इसवी.

Mĭdd'ling, *a.* (मि'ड्-लिंग्)—moderately good; fairly well in health. माफक, मध्यम प्रतीचा; सामान्य. *adv.* fairly or moderately. माफक रीतीनें, सामान्यपणें.

Mĭdge, *n.* (मिज्)—a gnat; a small fly. चिलट; घुंगरूट, कैंचरें, चिलट.

Mĭdg'et, *n.* (मि'जिट्)—diminutive person; photograph of small size. अतिशय लहान मनुष्य, अत्यंत ठेंगू; लहान आकाराचें छायाचित्र.

Mĭd'land, *a.* (मि'ड्-लन्ड्)—remote from the sea or border. समुद्रापासून दूर असलेला, मध्यदेशस्थित. *n.* middle part of country; (*pl.*) the middle countries of England. देशाचा मध्यभाग; (अने०) इंग्लंडांतील समुद्रापासून दूर असे मध्यवर्ती परगणे.

Mĭd'nīght, *n.* (मि'ड्-नाइट्)—the middle of the night, twelve o'clock at night. मध्यरात्र.

Mĭdst, *n.* (मिड्स्ट्)—the middle. मध्य. *prep.* amidst. मध्यें.

Mĭd'summer, *n.* (मि'ड्समर्)—summer solstice, about 21 June. कर्कवृत्त, २१ जूनचा सुमार, उत्तरायणान्त. *Mid-summer madness*, height of madness. मूर्खपणाचा,-वेडेपणाचा, कळस.

Mĭd'wife, *n.* (मि'ड्-वाइफ्)—a woman who assists other women in childbirth. सुईण.

Mĭd'wifery, *n.* (मि'ड्-विफ्रि, मि'डिफ्रि)—obstetrics. सुईणकाम, सईणपणाचा धंदा; सूतिकाशास्त्र.

Mien, *n.* (मीन्)—person's bearing or look as showing person's character or mood. आकार, चर्या, रूप, मुद्रा, डौल, ढब.

Might, *a.* (माइट्)—*pa. t. of* 'May'

Mīght, *n.* (माइट्)—great power or strength or resources, force. मोठें सामर्थ्य, पराक्रम, कुवत, ताकद, तकवा, बळ, शक्ति. *With might & main*, शिकस्त करून, सामर्थ्य किंवा बळ खर्चून.

Mīght'y̆, *a.* (मा'इटि)—having might; displaying great power, massive or huge. पराक्रमी, शक्तिमान्; प्रचंड, अफाट, अचाट, अद्भुत. *adv.* (colloq., iron.) very, quite. अतिशय, फारच, पराकाष्ठेचा. *Might'ily, adv.*; *Might'iness, n.*

Mignonĕtte', *n.* (मिन्योने'ट्)—a plant with fragrant flowers; greyish green colour of these; kinds of lace & fine net. एक सुवासिक फुलझाड; करडा हिरवा रंग; जाळीदार कापड.

Mīgrāte', *v. i.* (माइ-ग्रे'ट्)—to change one's abode; to come and go with the seasons. स्थानांतर करणें; देश किंवा मुलूख पालटणें. *Migra'tion, n.* देशांतर करणें. *Migrat'ory, a.* देशांतर करणारा, भटकणारा. *Mi'grant, a. & n.* that migrates. स्थलांतर करणारा (पक्षी, प्राणी).

Mika'dō, *n.* (मिका'डो)—(*pl.-os*), Emperor of Japan. जपानच्या बादशहाची पदवी.

Mike', *v. i.* (माइक्)—(sl.) to shirk work, to idle. कामचुकारूपणा करणें, आळसांत वेळ दवडणें. *n.* idling or a spell of it. भटकेपणा, आळसाची तंद्री.

Mī'lage, *n.* (मा'इलिज्)—miles travelled, used, etc.; expenses per mile. (अमुक) मैल अंतर, लांबी; दर मैली भाडें, प्रवासखर्च, भत्ता; मैलीतिकिटांचें पुस्तक.

Milch, *a.* (मिल्च्)—giving milk, kept for milk. दुभती, दूध देणारी. *Milch animals*, दुभतीं ढोरें. *Milch cow*, (*fig.*) source of profit, *esp.* a person from whom money is easily drawn. फायद्याचें कलम, ज्याच्याकडून सहज पैसा काढतां येईल असा मनुष्य.

Mild, *a.* (माइल्ड्)—gentle; not severe or harsh or drastic; not bitter. स्वभावानें गरीब, शांत, सौम्य; नरम; मधुर. *Mild'ly, adv.*; *Mild'ness, n.*

Mĭl'dew, *n.* (मि'ल्-ड्यू)—growth of minute fungi on plants, or on leather, &c, exposed to damp. बुरशी, टाका. *v. t. & i.* to taint, to be tainted with mildew. बुरशी येणें, बुरसावणें.

Mile, *n.* (माइल्)—linear measure, measure of length or distance, 1760 yards. मैल, १७६० यार्ड, अर्धा कोस. *Geographical, nautical, mile*, पाण्यांतला मैल, हा ६०८० फुटांचा असतो. *Milestone*, road-side pillar stating milage; (fig.) stage, event, in life. मैलांचा दगड (-खांब), देवारणें; आयुष्यांतील संस्मरणीय काल, -प्रसंग,-पायरी.

Mil'ĭtant, *a.* & *n.* (मि'लिटन्ट्)—fighting, combating, engaged in warfare; combative. लढवय्या, लढणारा; योद्धा (असा पुरुष इ.).

Mil'ĭtarism, *n.* (मि'लिटॅरिझम्)—exaltation of or reliance on military force or method. लष्करी शिपाईगिरी, लष्करी सत्ता किंवा पद्धत ह्यांची वहेजावी, लष्करशाही. *Mil'itarist, n.* लष्करी शिस्तीचा,-पेशाचा,-मनुष्य.

Mil'ĭtarў, *a.* (मि'लिटरि)—pertaining to soldiers or army or land warfare. लष्करी. *n.* the soldiery. लष्कर, फौज.

Mil'ĭtāte, *v. i.* (मि'लिटेट्)—to serve as an argument or influence *against*. लढणें, झगडणें; प्रतिकूल असणें.

Milĭ'tia, *n.* (मिलि'शा)—a branch of British military service enlisted for home defence since 1908 absorbed in Special Reserve. जरूर पडल्यास उपयोगी आणण्याचें लष्कर, जुजवी फौज, शिबंदी. *Militiaman, n.* a member of militia. शिबंदींतील सैनिक.

Milk, *n.* (मिल्क्)—liquid with which mammals feed their young, cow's milk as article of food. दूध, दुग्ध, गाईचें दूध (हें अन्न). *v. t.* to draw milk from; to get money out of, to exploit, (a person); to steal message from; to extract juice etc. दूध काढणें; (एखाद्याला) पिळून पैसे काढणें,-उकळणें; दुसऱ्याची तार चोरून वाचून बातमी काढणें, तिचा फायदा घेणें; पिळून काढणें, लुटणें. *Milk for babes*, simple form of literature, doctrine, etc. opp. to *strong meat*. सोपें, सुलभ वाङ्मय, मत इ. *M. & honey*, चैनीचीं विपुल साधनें. *M. of human kindness*, मनुष्याची नैसर्गिक माया, दयाशीलपणा. *M. white* दुधाप्रमाणें पांढरें.

Milk'maid, *n.* (मि'ल्क्मेड्)—a woman milking cows or working in a dairy, woman selling milk. दूधवाली, गवळण.

Milk'man, *n.* (मि'ल्क्-मन्)—a seller of milk. दूधवाला, गवळी.

Milk'sop, *n.* (मि'ल्क-सॉप्)—an unmanly fellow. दूधखुळा, भेपपात्र, (मनुष्य).

Mil'kў, *a.* (मि'ल्कि)—of, like, mixed with, milk; (of liquid) cloudy, not clear; effeminate, weakly amiable. दुधाचा, दुधासारखा, दूधमय; फेसाळ, अस्वच्छ; कमकुमत, ग्याड, बेहिमती. *M. way*, galaxy. आकाशगंगा, स्वर्गंगा.

Mill, *n.* (मिल्)—a building in which corn is ground; a grinding-machine; factory. धान्य दळण्यांची गिरणी; जातें, घिरट, गिरण; कारखाना. *v. t.* to grind or treat in mill. दळणें, पीठ करणें, गिरणींतून तयार करणें. *Mill board*, stout paste board. जाड कागदी पुठ्ठा. *To put, to go, through the mill*, to subject to, undergo, training or experience. अनुभव, शिक्षण,-देणें,-घेणें. *Mill stone*, जात्याचा,-घिरट्याचा,-पेड. *Mill-race*, current of water that drives the mill-wheel. गिरणीचें मुख्य यंत्र चालविणारा पाण्याचा झोत. *Mill-wright*, one who designs or erects mills. गिरण्यांची उभारणी करणारा, दुरुस्ती करणारा, गिरणीकार.

Mill'hănd, *n.* (मि'ल्-हॅन्ड्)—a factory worker. गिरणी-कामगार.

Millĕnār'ĭan, *a.* & *n.* (मिलिने'रिअन्)—of, expecting, the millennium. *n.* believer in the millennium. हजार वर्षांचा, हजार वर्षांच्या सुखाचा काल येण्याची अपेक्षा करणारा.

Mill'ĕnarў, *a.* (मि'लिनरि)—consisting of a thousand (esp. years). सहस्रसंख्याक, सहस्र वर्षांचा.

Millĕnn'ĭum, *n.* (मिले'निअम्)—a thousand-year period; coming time of happiness on earth. एक हजार वर्षांचा अवधि; पृथ्वीवर येणारा सुखाचा काल. *Millenn'ial, a.*

Mill'ĕpēde, *n.* (मि'लिपीड्)—many-legged creature; wood-louse, etc. अनेक पायांचा किडा. [L *Mille*, a thousand, *pedis*, Sk *pada*, foot]

Mill'er, *n.* (मि'लर्)—one whose business is to grind corn. धान्य दळणारा, चक्कीवाला. *M.,s thumb*, kinds of small fish. लहान जातीचे मासे.

Millĕsm'ĭal, *a.* (मिले'सिमअल्)—thousandth. हजारावा, सहस्रांशात्मक.

Mill'ĕt, *n.* (मि'लिट्)—cereal with minute seeds. बाजरी, ज्वार.

Mill'iard, *n.* (मि'ल्यर्ड्)—a thousand millions. एक अब्ज संख्या.

Mill'iner, *n.* (मि'लिनर्)—maker-up of or dealer in women's hats, ribbons, &c. स्त्रियांच्या टोप्या, पट्ट्या, वगैरे विकणारा. *Mill'inery, n.* स्त्रीवस्त्रसामुग्री. *Man milliner*, (fig.) a man busied in trifling occupations. क्षुद्र, हलक्या, निरुपयोगी कामांत गुंतलेला मनुष्य.

Mill'ion, *n.* (मि'ल्यन्)—ten hundred thousand. दशलक्ष. *The m.*, bulk of the population. सामान्यलोक, जनसमूह.

Millionaire', *n.* (मिल्यनें'अर्)—possessor of a million of money or more; a rich person. कोट्यधीश ; श्रीमंत मनुष्य.

Milt, *n.* (मिल्ट्)—spawn of male fish, spleen in mammals. मत्स्यवीर्य, प्लीहा. *v. t.* to impregnate (*female roe*). माशांचीं अंडीं तयार करणें.

Mime, *n.* (माइम्)—dramatic scene of ancient Greek or Italian common life with mimicry ; a performer in it. नक्कल, विनोद, थट्टा, यांनीं युक्त असें नाटक, त्यांतील पात्र.

Mimē'sis, *n.* (माइमीं'सिस्)—close external resemblance between animal & another animal or inanimate object. बाह्यस्वरूपसाम्य, नक्कल, अनुकरण.

Mimĕt'ic, *a.* (माइमे'टिक्)–of or showing mimesis ; given to mimicry. बाह्य स्वरूपसाम्याचा ; नकला करणारा, थट्टा करणारा.

Mim'ic, *n.* (मि'मिक्)—a person who closely imitates others, a servile imitator. नक्कल करणारा, नकल्या. *a.* feigned, esp. to amuse ; sham ; imitative. नकलेचा, नकली, अनुकरणशील. *v. t.* to copy the speech, or gestures of, esp. to amuse others; to closely imitate. नक्कल करणें, हुबेहूब अनुकरण करणें.

Mĭm'icrў, *n.* (मि'मिक्रि)—mimicking ; an imitative action or objects. अनुकरण, वांकुल्या ; नक्कल, नकलीवस्तु.

Mimō'sa, *n.* (मिमो'झा)-kinds of plant, including sensitive plant. लाजाळू, लाजरी (वनस्पति).

Min'arĕt, *n.* (मिं'नरेट्)—a lofty turret of mosque with one or more balconies. मशिदीचा मनोरा, घुमट, बुरूज.

Min'atorў, *a.* (मिं'नेटरि)—threatening. धमकीचा, भयसूचक, भयानक.

Mince, *v. t. & i.* (मिन्स्)—to cut quite small ; to walk with affectedly short steps. अगदीं बारीक बारीक तुकडे करणें ; सुद्दाम हळू हळू पावलें टाकून चालणें. ठुमकत चालणें. *n.* minced meat. बारीक तुकडे केलेलें मांस, सागोती. *Not to mince matters*, to express oneself politely in condemnation. (दोष किंवा अपराध कमी दाखविण्याकरितां) गुळमुळीत न बोलणें, खरें खरें स्पष्ट सांगणें.

Mīnd, *n.* (माइन्ड्)—the seat of consciousness, thought, volition, and feeling ; intellectual powers ; memory ; opinion. मन ; बुद्धिसामर्थ्य ; स्मरणशक्ति, आठवण ; मत. *v. t.* to bear in mind ; to heed ; to take charge of ; to have any objection. ध्यानांत ठेवणें ; लक्ष देणें, मानणें, ऐकणें ; ताब्यांत घेणें ; हरकत असणें. *Mind'ed*, *a.* disposed, inclined. मनाचा, कलाचा, बेतअसलेला. *To be of* (person's) *mind*, (दुसऱ्याशीं) एकमत असणें, मतैक्य असणें. *To my m.*, as I think. माझ्या मतें. *To be of a* or *one m.*, to agree. मत जुळणें, कबूल होणें. *To know* one's *own m.* स्वतःचें मत बनवून त्याला चिकटून राहणें *To make up* one's *m.* (to do). निश्चय करणें. *To have a good* or *great m.*, to be strongly disposed (to do), अमुक एक गोष्ट करण्याची उत्कट इच्छा असणें. *To be in two minds*, मन द्विधा होणें, निश्चय न होणें. *To give* one's *m. to*, कडे लक्ष देणें. *Mind's eye*, mental view. मनांतला विचार, मन, मत, ज्ञानचक्षू. *Never mind*, कांहीं हरकत नाहीं,-चिंता नाहीं. *Mind one's P's & Q's*, be careful as to one's words or behaviour. शब्द तोलून बोलणें, जपून वागणें. [*Gk means*, Sk *manas*, mind]

Mind'ful, *a.* (मा'इन्ड्-फुल्)—not forgetful. regarding with care, heedful. सावध, न विसरणारा.

Mīne, *pron. & a.* (माइन्)—the one (s) belonging to me ; *a.* belonging to me. माझें. *Me & m.*, my relations. माझे नातेवाईक.

Mīne, *n.* (माइन्)—excavation from which minerals are extracted ; explosive charge placed ready to go off when required ; abundant source (of information etc.) ; iron ore. खाण ; सुरुंग ; निधी, माहेरघर ; खाण *v. t.* to dig for minerals ; to lay explosive charges under or in ; to undermine. (खाण) खणणें, बोगदा खणणें ; सुरुंग लावणें ; गुप्त उपायांनीं नाश करणें. *M.-layer*, *M.-sweeper*, ship used for laying mines,-for clearing away enemy *mines*. सुरुंग पेरणारें जहाज, आगबोट ; शत्रूंचे पाणसुरुंग काढून टाकणारें जहाज. *Mī'ner*, a worker in mine ; a soldier who lays mines. खाणींतील मजूर ; सुरुंग लावणारा.

Mĭn'eral, *a.* (मि'नरल्)—inorganic, not animal or vegetable ; got from the earth by mining. धातुधर्मक; खाणींतला. *n.* a mineral substance. खनिज पदार्थ, धातु. *M. kingdom*, खनिजकोटि. *M. water*, खनिजोदक, धातुधर्मयुक्त पाणी, सोडा वाटर. *Min'eralize*, *v. t.* impregnate with mineral, खनिजरूप करणें, धातूचे गुणधर्म (वस्तूंत) उतरविणें. *Min'eralization*, *n.*

Mĭneră'ogў, *n.* (मिनरॅ'लाजि)—the science of minerals. खनिजशास्त्र, धातुविद्या, धातुपरिज्ञान. *-o'gical*, *a.*, *-gist*, *n.* खनिजशास्त्रवेत्ता.

Mĭn'gle, *v. i. & t.* (मिं'गल्)—to be mixed, to be united with ; to mix, to blend, to confuse. मिळणें ; मिसळणें, एकत्र करणें. *Mingle with*, go about among. मिळून मिसळून जाणें. *M. their* etc. *tears*, weep together. समदुःखी होणें, एकत्र बसून रडणें.

Min'iature, *n.* (मि'निअचर्)—painted portrait on small scale or of small dimensions ; small-scale representation. लहान आकाराची तसबीर ; लघु प्रतिकृति. *a.* small-scale ; diminutive. लहान प्रमाणाचा ; लघु. *Min iaturist*, *n.* (मि'न्यचरिस्ट्) painter of miniatures. लहान चित्रें, रंगीत तसबीर,-काढणारा.

Min'ify, *v. t.* (मि'निफाय्)—to represent as smaller or less important than it is ; lessen in size or importance. कमीपणा आणणें,-करणें ; आकार-महत्त्व,-कमी करणें.

Min'im, *n.* (मि'निम्)—a musical note ; 1/60 of a fluid drachm ; a creature of the smallest size or importance. गाण्यांतील सूर; १/६० ड्राम, थेंब, बिंदु ; अतिशय लहान प्राणी, कृमि, वस्तु, जीवजंतु.

Min'imalist, *n.* (मि'निमॅलिस्ट्)—a person ready to accept a minimum provisionally. कमींत कमी तात्पुरतें स्वीकारण्यास तयार असा मनुष्य.

Min'imize, *v. t.* (मि'निमाइझ्)—to reduce to or estimate at the minimum, to represent as of little moment. अतिशय लहान करणें, किमान मर्यादेंत आणणें, कमी करणें.

Min'imum, *n.* (मि'निमम्)—(*pl.-ima*), least possible amount, the smallest amount or degree. कमींत कमी अंश, अत्यल्प संख्या, लघुतम, न्यूनतम. *M. wage*, कायद्यानें किंवा करारानें ठरविलेलें कमींत कमी वेतन.

Min'ion, *n.* (मि'न्यन्)—a spoilt darling, a favourite ; mere dependant, slave ; (Print.) size of type. लाडावलेलें मूल, बगलबच्चा, मर्जीतील इसम; गुलाम, परावलंबी; एक बारीक टाइपाचें नांव. *Minions of the law*, gaolers, police etc. तुरुंगाधिकारी, शिपाई वगैरे.

Min'ister, *n.* (मि'निस्टर्)—an executive agent ; a person in charge of State department ; an ambassador or State envoy ; a clergyman. कारभारी ; अमात्य, प्रधान, दिवाण ; राजाचा परराष्ट्राकडे पाठविलेला वकील ; उपाध्याय, पाद्री. *v. i. & t.* to give, to afford ; to be serviceable or contributory ; to officiate as a minister of religion. पुरविणें, देणें ; गरज भागविणें ; चाकरी,-सेवाशुश्रूषा,-करणें ; उपाध्येपणा करणें. *Prime m.*, मुख्य दिवाण, मुख्य प्रधान, पंत-अमात्य, पंत-प्रधान.

Minister'ial, *a.* (मिनिस्टी'रिअल्)—of a minister of religion or his office ; of or on the side of the Government ; of minister of State. उपाध्याचा, पाद्र्याचा, उपाध्येपदाचा ; सरकारपक्षाचा, सरकारपक्षीय ; प्रधानाचा, मंत्र्याचा.-*ist*, *n.* government supporter. सरकारपक्षाला पाठिंबा देणारा.

Min'istrant, *a.* (मि'निस्ट्रन्ट्)—ministering. सेवक, नोकरी करणारा ; शुश्रूषा करणारा. *n.* one who ministers. सेवक, शुश्रूषक मनुष्य.

Ministra'tion, *n.* (मिनिस्ट्रे'शन्)—rendering of help ; priestly service. मदत करणें ; चाकरी,-सेवा करणें ; उपाध्येपणा.

Min'istry, *n.* (मि'निस्ट्रि)—priestly office ; ministers of a church, the clergy ; the office of a State minister ; the ministers forming a Government. उपाध्येपण ; चर्चचे पाद्री; प्रधानकी, दिवाणगिरी ; प्रधानमंडळ.

Minn'ow, *n.* (मि'नो)—a small fresh-water fish. गोड्या पाण्यांतला लहान मासा. *Triton among the minnows*, one who seems great from insignificance of others. 'वासरांत लंगडी गाय', इतर क्षुद्र प्राण्यांच्या मानानें मोठा दिसणारा तो.

Mino'an, *a.* (माय्नो'अन्, मिनो'अन्)—of the recently discovered prehistoric culture (3000-1500 B. C.) of Crete, named from King Minos. क्रीटच्या इतिहासपूर्वकालीन संस्कृतिसंबंधीं.

Mi'nor, *a.* (मा'इ-नॉर)—lesser of two units or sets ; of the lesser kind. दोहोंपैकीं लहान; हलका, गौण. *n.* a person under age (21). २१ वर्षांच्या आंतील मनुष्य. (Logic) *M. term*, पक्ष. *M. premiss*, पक्षप्रमाण, केवलवाक्य. *Conversation in a minor key*, doleful conversation. केंदाळवाणें रडकें संभाषण.

Mino'rity, *n.* (माइ-नॉ'रिटि)—being a minor ; the smaller number. अज्ञानदशा ; लहानसंख्या, अल्पपक्ष, अल्पसंख्याक (लोक).

Min'otaur, *n.* (मि'नाटॉर)—*the M.*, fabulous monster, half bull half man, fed with human flesh. कमरेखालीं मनुष्यासारखा व कमरेच्या वर बैलासारखा कल्पित राक्षस, नृवृषभ. [*fr. Minos*, king of crete, & *tauros*, bull]

Min'ster, *n.* (मि'न्स्टर्)—a large church. मोठें खिस्ती देऊळ.

Min'strel, *n.* (मि'न्स्ट्रेल्)—a medieval singer or musician ; a bard, a poet. गायक ; भाट, कवि, शाहीर.

Min'strelsy, *n.* (मि'न्स्ट्रेल्सि)—minstrel's art ; instrumental music, poetry. सवाद्य गायन, पोवाडे ; वाद्यवादन, काव्य.

Mint, *n.* (मिन्ट्)—a place where money is coined ; vast sum (of money). टांकसाळ; भरपूर पुरवठा. *v. t.* to coin money ; to invent, to forge, to fabricate. नाणें पाडणें ; नवीन शोधून काढणें, बनविणें. *Min'tage*, *n.* what is minted : duty paid for minting. (टांकसाळेंत) छापलेलें नाणें ; नाणें-छापणावळ, टांकसाळीची फी. *Mint master*, टांकसाळीचा वरिष्ठ अधिकारी.

Mint, *n.* (मिन्ट्)—an aromatic herb. पुदिना वनस्पति.

Minuet', *n.* (मिन्युए'ट्)—a slow stately dance or music for it. एक प्रकारचा, हळू पावलें टाकून नाचण्याचा, नाच ; त्या नाचाची साथ.

Mi'nus, *prep.* (मा'इ-नस्)—less, less by so much with the deduction of (symbol,–). कमी, उणा, उणें चिन्ह (–); (collq.) *a.* deprived of (as *He came back minus an arm.*), negative. गमावून, घालवून ; उणी (रक्कम).

Min'ute, *n.* (मि'निट्)—the sixtieth part of an hour ; the sixtieth of a degree (in angles); a short time ; an official paper ; (*pl.*) summary of proceedings, short notes. तासाचा साठावा भाग, मिनिट ; अंशाचा साठावा भाग, कला; पळ, क्षण; सरकारी कागद ; (अने०)टिपणें. *v. t.* to draft, to note down. टिपणें करणें, टांचण करणें, मसुदा तयार करणें ; मिनिटें मोजणें. *M. book*, टांचणवही, टांचण पुस्तक. *M. gun*, दर मिनिटानें होणारी तोफ. *M. hand*, घड्याळांतील मिनिट कांटा. *M. mark*, (') अशी मिनिटाची खूण. *To minute down*, to make a note of. टिपून घेणें; टांचून घेणें *Min'utely*, *adv.* (मि'निट्लि) दर मिनिटास, पळापळानें, क्षणोक्षणीं.

Minute', *a.* (माइ-न्यू'ट्, मिन्यू'ट्)—very small ; precise, going into details. अत्यल्प, सूक्ष्म ; बारिकसारिक पाहणारा, तपशीलवार, अगदीं खरा. *Minute'ly*, *adv.* बारकाईनें, सुक्ष्म दृष्टीनें.

Minx, *n.* (मिंक्स्)—a sly girl, hussy. नाचरी पोर.

Mi'ocene, *a.* (मा'योसीन्)—of the middle division of tertiary strata. गाळानें बनलेल्या खडकाच्या वर्गांतील या नांवाच्या खडकांच्या पोटवर्गाविषयीं.

Mi'racle, *n.* (मि'रॅकल्)—an event due to supernatural agency ; a remarkable event, a marvel, a prodigy. लौकिक कर्म, अद्भुत कर्म ; करामत, चमत्कार. *To a m.*, surprisingly well. अद्भुत, सुंदर, आश्चर्यकारक, चांगलें.

Mirac'ulous, *a.* (मिरॅ'क्युलस्)—supernatural, extraordinary ; wonderful. अलौकिक, अद्भुत ; आश्चर्यकारक.

Mirage', *n.* (मिरा'झ्)—an illusion produced by atmospheric conditions. दृग्भ्रम, मृगजळ, मृगतृष्णा.

Mire, *n.* (मायर्)—wet muddy soil, swampy ground ; mud. दलदलीची जागा ; चिखल. *v. t.* to entangle in mud ; to soil ; (fig.) to involve in difficulties. चिखलांत रुतवणें ; चिखलानें खराब करणें ; संकटांत सांपडलें जाणें.

Mi'rror, *n.* (मि'रर्)-an image-reflecting surface ; a looking-glass ; (fig.) what gives faithful reflection or true description of a thing. प्रतिबिंबदर्शक पृष्ठभाग ; आरसा, आदर्श, नमुना ; वस्तूचें अचूक प्रतिबिंब किंवा वर्णन. *v. t.* to reflect image of. प्रतिबिंब पाडणें, दाखविणें.

Mirth, *n.* (मर्थ्)—merriment, glee. आनंद, मौज. *Mir'thful*, आनंदी, हास्यमुख, रंगेल. *Mir'thless*, *a.* उदासीन, खिन्न. *Mir'thfully*, *adv.*; *Mir'thfulness*, *n.*

Mir'y, *a.* (मा'इरि)—muddy. चिखलाचा, चिखलट.

Misadven'ture, *n.* (मिसॅड्व्हें'चर्)—an undesigned evil result ; an unlucky accident. दुर्दैवाची गोष्ट ; अपघात.

Misalli'ance, *n.* (मिस्-अला'यन्स्)—unsuitable marriage, improper connection by marriage. कुसंबंध, अयोग्य विवाह.

Mis'anthorope, *n.* (मि'सॅन्थ्रोप्)—hater of mankind ; one who avoids human society. मनुष्यजातीचा द्वेष करणारा, माणुसघाण्या, माणसांचा संसर्ग नको असणारा. *Misanthrop'ic*, *a.*, *Misan'thropy*, *n.* misanthroper's temper. समाजद्वेष, माणसांचा कंटाळा, एकलकोंडा स्वभाव. [Gk *miseo*, hate & *anthropos*, man]

Misapply', *v. t.* (मिस्-अप्ला'य्)—to apply wrongly, to apply to a wrong purpose. दुरुपयोग करणें, अपव्यय करणें. *Misapplica'tion*, *n.* wrong application, wrong use (esp. of funds). दुर्योजना, दुरुपयोग.

Misapprehend', *v. t.* (मिस्-ॲप्रिहें'न्ड्)—to misunderstand, to take in a wrong sense. गैरसमजूत करणें, गैरसमज करून घेणें,-होणें. *Misapprehen'sion*, *n.* चुकीचा समज, कुकल्पना, गैरसमजूत. *Misapprehen'sive*, *a.*

Misappro'priate, *v. t.* (मिस्-अप्रो'प्रिएट्)—to use (other's money) as one's own. दुसऱ्याचा पैसा स्वतःचा म्हणून वापरणें. *Misappro'priation*, *n.* दुरुपयोग, उधळपट्टी, परस्वापहार.

Misbecome', *v. t.* (मिस्बिक'म्)—to suit ill, to be unbecoming to. न शोभणें, अयोग्य असणें

Misbegot'ten, *a.* (मिस्बिगॉ'टन्)—illegitimate, bastard. व्यभिचाराचा, कुजात.

Misbehave', *v. i. & refl.* (मिस्-बिहे'व्ह्)—to behave ill or improperly. गैरशिस्त रीतीनें वागणें *-viour*, *n.*

Misbelief', *n.* (मिस्-बिली'फ्)—a wrong or erroneous belief ; a false opinion. गैरविश्वास ; खोटें मत *-believer*, *n.*

Miscal'culate, *v. t. & i.* (मिस्कॅ'ल्क्युलेट्)—to calculate wrongly. चुकीचा अंदाज करणें, हिशेबांत चूक करणें. *Miscal'culation*, *n.*

Miscall', *v. t.* (मिस्कॉ'ल्)—to call by wrong name ; to abuse भलत्या-चुकीच्या-नांवानें हांक मारणें, चुकीनें म्हणणें ; अपशब्द बोलणें, शिवीगाळ करणें.

Miscă'rriage, *n.* (मिस्-कॅ'रिज)—failure (of letter) to reach destination; failure (of scheme); miscarrying; a woman's untimely delivery. गळफटणें, गहाळ होणें; अपयश, असिद्धि; फसगत; गर्भपात. *M. of Justice.* न्यायाचा दुरुपयोग.

Miscă'rry̆, *v. i.* (मिस्-कॅ'रि)—to fail of success; (of letter, &c.) not to reach the destination; (of women) to have miscarriage. अपयश मिळणें; न पोहोंचणें; नासावणें, गर्भपात होणें.

Miscĕgenā'tion, *n.* (मिस्सिजिने'शन्)—interbreeding between races, esp. of whites and negroes. निरनिराळ्या जातींचा संकर होऊन प्रजोत्पत्ति होणें.

Miscellā'nea, *n. pl.* (मिसले'निआ)—odds and ends; stray items. नानाविध गोष्टींची खिचडी; विविधवस्तु, किरकोळ जिन्नस, वस्तु.

Miscellā'neous, *a.* (मिसले'निअस्)—consisting of various kinds, diversified. नानाविध, संकीर्ण, मिश्र, विविध.

Mis'cellany̆, *n.* (मि'सलनि)—literary or other medley, mixture of varions kinds. पंचमेळ, विविधलेखसंग्रह, विविधविषयसंग्रह.

Mischănce', *n.* (मिस्-चा'न्स्)—an unlucky event, misfortune, mishap, disaster. दुर्दैवाची गोष्ट, अपघात.

Mis'chief, *n.* (मि'स्चिफ्)—harm, injury; discord; childish scrapes. अपकार, अपाय, अपायाचें कारण; अनर्थ, हानि; बेबनाव; चावटपणा, चेष्टा. *To do* one *a m.*, (vulg.) to wound or kill one. एकाद्याला जखमी किंवा ठार करणें. *To make m.*, to create discord. बेबनाव उत्पन्न करणें. *M.-maker*, खोडकर, दवाळखोर, आगलाव्या. *M.-making*, कळ लावणें, कळलावणी, लावालाव. *The mischief*, devil. दुष्ट, खोडकर मनुष्य.

Mis'chievous, *a.* (मि'स्चिव्हस्)—tending to harm; full of mischief. अपायकारक; चावट, चेष्टेखोर, खोडकर, उपद्व्यापी.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.*

Mi'scible, *a* (मि'सिबल्)—that can be mixed (*with*). मिसळण्याजोगा, मिश्रणार्ह.-*bil'ity*, *n.* मिश्रणार्हता

Misconceive', *v. i. & t.* (मिस्-कन्सी'व्ह्)—to conceive erroneously, to have a wrong idea of; to misunderstand. उलटी समजूत होणें; भलता ग्रह करणें.

Misconcĕp'tion, *n.* (मिस्-कन्से'प्शन्)—a wrong notion; misunderstanding. चुकीची कल्पना; गैरसमजूत.

Miscŏn'dŭct, *n.* (मिस्कॉ'न्डक्ट्)—improper conduct (esp. adultery); bad management. गैरशिस्त वर्तन, अनाचार, व्यभिचार; गैरवहिवाट, दुर्व्यवस्था. *Misconduct'*, *v. t.* (मिस्कन्ड'क्ट्), गैरवर्तन करणें.

Miscŏn'strue, *v. t.* (मिस्-कॉ'न्स्ट्रू)—to put a wrong construction on (word, action), to mistake meaning of (person). चुकीचा अर्थ करणें, भलताच ग्रह करणें. *Misconstruc'tion*, *n.* उलटा अर्थ, विपरीत समजूत.

Miscount', *n., & v. t. & i.* (मिस्का'उन्ट्)—(to make) wrong count, esp. of votes; count (things) wrongly. मोजण्यांत चूक (करणें), चुकीनें मोजणें.

Mis'creant, *n.* (मि'स्क्रिअन्ट्)—a wicked person; (archaic) heretical; depraved. दुष्ट मनुष्य; नास्तिक, दुरात्मा; दुर्जन, शठ.

Misdāte', *v. t.* (मिस्डे'ट्)—to date wrongly. चुकीची तारीख घालणें.

Misdeal', *v. t. & n.* (मिस्डी'ल्)—to make mistake in dealing (cards). पत्ते वाटतांना चूक करणें; चुकीचा व्यवहार करणें.

Misdeed', *n.* (मिस्-डी'ड्)—a sinful act, a crime. पापाचरण; दुष्कर्म, गैरवर्तन.

Misdemean'ant, *n.* (मिस्डिमी'नन्ट्)—a person convicted of misdemeanour. दुर्वर्तनाच्या गुन्ह्याबद्दल शिक्षा झालेला.

Misdēmean'our, *n.* (मिस्डिमी'नर्)—an indictable but not felonious offence. दुराचरण, अपराध.

Misdirect', *v. t.* (मिस्-डिरे'क्ट्)—to direct (a person, a letter, &c.) wrongly. भलत्याच दिशेला लावणें, भलताच पत्ता लिहिणें. *Misdirect'-ion*, *n.*

Misdo'ing, *n.* (मिस्डु'इंग्)—misdeed. कुकर्म, दुष्कर्म, दुराचरण, गुन्हा, अपराध, दोष.

Misdoubt', *v. t.* (मिस्डा'उट्)—to have doubts or suspicions; to be apprehensive; to suspect (that). शंका,-संशय-वाटणें; साशंक असणें.

Mise en scene, *n* (मेझआंसें)—staging of a play, surroundings of an event. नाटक रंगभूमीवर आणणें,-करणें; एकाद्या गोष्टीची साधनसामुग्री, सभोंवारची परिस्थिति. [F]

Mī'ser, *n.* (मा'इ-झर्)—an avaricious person; a hoarder of money. लोभी मनुष्य; कवडीचुंबक, चिक्कू.-*ly*, *a.*

Mī'ser, *n.* (मा'इझर्)—a boring instrument for well-sinking. विहीर खोदण्यासाठीं जमिनीला भोंक पाडण्याचें यंत्र,-सामता.

Mis'erable, *a.* (मि'झरबल्)—pitiable; very unhappy; despicable, contemptible; very poor or mean. दीन; अत्यंत दुःखी; तिरस्करणीय; हलकट, पीडादायक. *Mis'erably*, *adv.*

Misĕ'ricord, *n.* (मिझे'रिकॉर्ड्)—a hinged seat in choir stall. चर्चमधील वाद्यवादकांची उघडझांप करतां येणारी बैठक.

Mis'erў, *n.* (मि'झरि)—acute unhappiness; distressing poverty. अत्यंत दुःख, हाल; विपत्ति, अत्यंत दारिद्र्य.

Misfeas'ance, *n.* (मिस्फी'झन्स्)—wrongful exercise of law-ful authority. कायदेशीर हक्काचा दुरुपयोग.

Misfire', *v. i. & n.* (मिस्फा'यर्)—(of gun, motor engine etc.) fail (ure) to act. (बंदूक, मोटर इंजिन इ०) न चालणें, बंद पडणें.

Mis'fit, *n.* (मि'स्फिट्)—a garment etc. that does not fit. अंगाला बरोबर न बसणारा कपडा.

Misfŏr'tune, *n.* (मिस्-फॉ'र्च्यन्,-ट्यून्)—ill fortune, calamity, mishap; bad luck. संकट, अरिष्ट; दुर्दैव.

Misgĭve', *v. t.* (मिस्-गि'व्ह्)—(-*gave, pa. t.*;-*given, pa.p.*) to fill with doubt; to suggest misgiving to. घाबरणें; भीति-शंका-अविश्वास उत्पन्न करणें.

Misgiv'ing, *n.* (मिस्-गि'व्हिंग्)—apprehension; uneasy doubt; distrust. भीति; संशय, शंका; अविश्वास.

Misgo'vern, *v. t.* (मिस्-ग'व्हर्न्)—to govern badly, to administer unfaithfully. वाईट रीतीनें वागवणें, अव्यवस्थितपणें अंमल चालविणें,-राज्य करणें.-*ment, n.* अव्यवस्था, अंदाधुंदीचा राज्यकारभार.

Misguide', *v. t.* (मिस्-गा'इड्)—to mislead. दिशाभूल करणें. *Misguid'edly, adv.*

Mishan'dle, *v. t.* (मिस्हॅ'न्डल्)—to handle (person, thing) roughly or rudely, to ill-treat. वाईट रीतीनें,-उद्धटपणें-वागविणें.

Mishăp', *n.* (मिस्-हॅ'प्)—a minor calamity. अनिष्टापत्ति, अवचित प्रसंग, दुर्दैवाची गोष्ट.

Misinfŏrm', *v. t.* (मिस्इन्फॉ'र्म्)—to give wrong information to, to mislead. खोटी,-चुकीची माहिती देणें, गैरसमजूत करणें. *Misinforma'tion, n.*

Misinterp'rĕt, *v. t.* (मिसिन्टर्'प्रिट्)—to give wrong interpretation to, to make a wrong inference from. खोटा,-चुकीचा-अर्थ करणें, विपर्यास करणें, चुकीचें अनुमान काढणें. *Misinterpreta'tion, n.*

Misjŭdge', *v. t.* (मिस्ज'ज्)—to judge wrongly; to have a wrong opinion of. विपरीत ग्रह करणें; चुकीचें मत असणें.

Mislay', *v. t.* (मिस्ले')—to put (thing) by accident where it cannot readily be found. अव्यवस्थितपणें टाकणें, गहाळ करणें, हरवणें.

Mislead', *v. t.* (मिस्-ली'ड्)—to lead astray; to give a wrong impression to. चुकीच्या मार्गानें नेणें; गैरसमज करणें.

Mismăn'age, *v. t.* (मिस्मॅ'निज्)—to manage badly or wrongly. बिघाड किंवा अव्यवस्था करणें. -*ment, n.*

Misnāme', *v. t.* (मिस्ने'म्)—to call by wrong name. चुकीचें नांव देणें, चुकीच्या नांवानें हांक मारणें.

Misnō'mer, *n.* (मिस्-नो'मर्)—a name applied wrongly; wrong use of a term. चुकीचें नांव; नांवाचा दुरुपयोग.

Misŏg'amў, *n.* (मिसॉ'गमि)—hatred of marriage. लग्नाचा तिटकारा, विवाहद्वेष. *Misog'amist, n.* विवाहनिंदक,-द्वेष्टा.

Misŏg'ўnў, *n.* (मिसॉ'गिनि)—hatred of women. स्त्रीद्वेष, बायकांचा कंटाळा. *Misog'ynist, n.* स्त्रीद्वेष्टा.

Misplāce', *v. t.* (मिस्प्ले'स्)—to put in wrong place; to bestow (love, etc.) on ill-chosen object. भलत्या ठिकाणीं वस्तु ठेवणें; अनाठायीं, अपात्रीं,-(प्रेम) ठेवणें, करणें. *Misplace'ment, n.*

Misprĭnt', *n. & v. t.* (मिस्प्रि'न्ट्)—to make an error in printing. छापण्यांतील चूक, अशुद्ध करणें.

Misprĭ'sion, *n.* (मिस्प्रि'झन्)—wrong action or omission. चुकी, खोटा ग्रह. *M. of treason*, अपराधाची छपावणी, अपराधाकडे कानाडोळा.

Misprize', *v. t.* (मिस्प्रा'इझ्)—to scorn, to undervalue. तुच्छ लेखणें, किंमत कमी करणें, कमी मानणें.

Mispronounce', *v. t.* (मिस्प्रनाउ'न्स्)—to pronounce wrongly. चुकीचा उच्चार करणें. *Mispronuncia'tion, n.* अशुद्ध उच्चार, उच्चाराची चूक.

Misquōte', *v. t.* (मिस्-क्वोट्)—to quote or cite wrongly. चुकीचा उतारा देणें, चुकीचा आधार देणें. *Misquota'tion, n.*

Misrĕprĕsĕnt', *v. t.* (मिस्-रेप्रिझे'न्ट्)—to represent wrongly; to falsify. विपर्यास करून हकीगत सांगणें; बनावट करणें. *Misrepresenta'tion, n.*

Misrule', *n.* (मिस्-रू'ल्)—bad government. अंदाधुंदी, बजबज. *v. t.* to rule badly. अंदाधुंदीचा राज्यकारभार करणें.

Miss, *v. t. & i.* (मिस्)—to fail to hit, etc.; to pass over; to regret the absence of; to have a failure. नेम वगैरे चुकणें, वरून जाणें; वियोगामुळे चुकल्यासारखें होणें; हरणें, फसणें. *n.* fact of missing. चूक, फसगत. *To miss out*, to leave out (words etc. in reading, writing, etc.). (शब्द) सोडणें, गाळणें, खाणें. *To miss fire*, (बंदुकीचा) बार न होणें; बेत फसणें, उद्देश साध्य न होणें.

Miss, *n.* (मिस्)—unmarried woman or girl. अविवाहित स्त्री, कुमारी. *Miss'ish, a.* like a school girl. शाळकरी मुलीसारखी.

Miss'al, *n.* (मि'सल्)—Roman Catholic mass-book, R. C. book of prayers. रोमन कॅथॉलिक पंथाचें प्रार्थना-पुस्तक.

Miss'el, *n.* (मि'सल्)—*M. thrush*, a large kind of thrush. मोठ्या जातीची सारिका.

Mis-shā'pen, *a* (मिस्-शे'पन्)—deformed. बेढब, कुरूप.

Miss'ile, *n* (मि'साइल्)—a thing or weapon that can be thrown to do damage. फेंकावयाचें शस्त्र, अस्त्र.

Miss'ing, *a.* (मि'सिंग्)—not to be found, wanting, lost. हरवलेला, न सांपडलेला. *The missing*, soldiers neither present after a battle, etc., nor known to have been killed or wounded. थांगपत्ता लागत नसलेले शिपाई. *M. link*, a thing lacking to complete the series; (zool.) hypothetical intermediate type esp. between man & anthropoid apes. चुकलेला दुवा, मनुष्य आणि त्याचे पूर्वज माकड यांच्या मधील जोडणारा सांधा.-स्थिति.

Mi'ssion, *n.* (मि'शन्)—persons sent out as envoys or evangelists; the task or operations of envoys; person's vocation or divinely appointed work in life. धर्मप्रचारकसंघ, प्रसारकमंडळ; दौत्य, दूतकर्म, धर्मप्रसाराचें कार्य; इतिकर्तव्यता, जीवनहेतु, ध्येय.

Mi'ssionary, *n.* (मि'शनरि)—a person who goes on work of religious mission. धर्मप्रसारार्थ पाठविलेला मनुष्य, मिशनरी, प्रेषित.

Miss'is, *n.* (मि'सिस्)—(vulg.) mistress; (joc.) wife. मालकीण; स्त्री, पत्नी.

Miss'ive, *n.* (मि'सिव्ह्)—a letter, esp. an official one. (सरकारी कामाचें) पत्र. *Letter(s) m.*, a letter from sovereign राजाचें आज्ञापत्र.

Mis-spĕll', *v. t.* (मिस्-स्पे'ल्)—to spell wrongly. वर्णविपर्यास करणें, चुकीची वर्णरचना करणें.

Mis-spĕnd', *v. t.* (मिस्-स्पे'न्ड्)—to spend amiss or wastefully. अनाठायीं खर्च करणें, उधळपट्टी करणें.

Mis-stāte', *v. t.* (मिस्-स्टे'ट्)—to state wrongly, to make erroneous representation of. चुकीचें विधान करणें. *Mis-state'ment*, *n* असत्य विधान, विपर्यास.

Mist, *n.* (मिस्ट्)—water-vapour; bleared effect given by tears in the eyes. धुकें; झिम् झिम् पाऊस; अंधेरी, भुरकटपणा, धुंदी. *v. i. & t.* to cover, be covered, as with mist. धुक्यानें आच्छादणें, झांकलें जाणें, धुकें पडणें. *Scotch m.* thick mist frequent on Scottish hills. स्काटलंडमधील टेंकड्यांवरील दाट धुकें. *Mist'ful*, *a.*, *Mist'like*, *a.* & *adv.*

Mistāke', *v. t. & i.* (मिस्टे'क्)—(*-took,-taken*), to come to wrong conclusion about, to misinterpret; to take a person or a thing erroneously for another. भलता ग्रह करणें; चुकणें, भुलणें: चुकीनें एकाला दुसराच समजणें. *Mistak'en*, *pa. p.* due to error, ill-judged. चुकीचा, गैरसमजुतीचा, चुकलेला. *There is no mistaking*, no one can help recognizing (person, fact) ओळख अवश्य पटणारच, चूक होणें शक्यच नाहीं. *and*, or *make, no mistake*, undoubtedly. निःसंशय, खात्रीनें. *Mistak'enly*, *adv.*; *Mistak'enness*, *n.* an error, a blunder; a mistaken opinion or act. चूक; गैरसमजूत, चुकीचा ग्रह.

Mis'ter, *n.* (मि'स्टर्)—(*Mr.*) master, sir. संमानार्थ पुरुषाच्या नांवामागें लावण्याचा शब्द, पदवी. *v. t.* to address as Mr. 'मिस्टर्' म्हणून संबोधणें. *Mr Right*, destined husband. भावी पति.

Mistīme', *v. t.* (मिस्टा'इम्)—to say, do (thing) out of season (esp. in pa. p.). अवेळीं,-अकालीं म्हणणें,-बोलणें,-करणें,-योजणें.

Mis'tletōe, *n.* (मि'स्लटो)-parasitic white berried plant. ओक वगैरे झाडांच्या फांद्यांवर वाढणारी पांढऱ्या फळांची लता,-बांडगूळ,-बांधें.

Mistranslāte', *v. t.* (मिस्ट्रॅन्स्ले'ट्)—to translate incorrectly. चुकीचें भाषांतर करणें. *Mistranslation*, *n.* खोटें,-चुकीचें-भाषांतर.

Mis'trĕss, *n.* (मि'स्ट्रिस्)—a woman in relation to servants; a woman having control; a female teacher; a man's paramour; a female sweetheart. मालकीण; धनीण, गृहस्वामिनी; शिक्षकीण, अध्यापिका; दासी, रखेली; प्रिया, दयिता.

Mis'trŭst, *v. t.* (मि'स्ट्रस्ट्)—to feel no confidence in. अविश्वास वाटणें. *n.* lack of confidence; uneasy doubts, suspicion. अविश्वास; संशय. *Mistrust'ful*, *a.*

Mis'ty, *a.* (मि'स्टि)—of, in, or like mist; of dim outline; obscure. धुक्याचा, धुक्यांत, धुक्यासारखा, तुषारयुक्त; अंधुक, अस्पष्ट, पुसट.

Misŭnderstand', *v. t. & i.* (मिस्-अन्डर्-स्टॅ'न्ड्)—(-stood), to take in wrong sense; to come to a false conclusion about. भलता अर्थ समजणें; गैरसमजूत करणें, उलटी समजूत होणें.*-ing*, *n.* विपरीत ग्रह, मतभेद.

Misūse', *v. t.* (मिस्-यूझ्)—to apply to a wrong use; to ill-treat. दुरुपयोग करणें; वाईट रीतीनें वागविणें. *n.* (मिस्यू'स्), ill-treatment; wrong use. वाईट वागविणें, दुरुपयोग, उधळपट्टी.

Mite, *n.* (माइट्)—anything very small; a small child or person; a small insect found in cheese. अत्यंत लहान वस्तु; लहान मूल, लहान मनुष्य; कीड. *Mi'ty*, *a.* (of cheese) full of mites. किडी पडलेला खवा. *To offer one's mite (of comfort)*, फूल नाहीं फुलाची पाकळी म्हणून देणें. *Not a m.*, not at all. मुळींच नाहीं.

Mĭt'ĭgāte, *v. t.* (मि'टिगेट्)—to appease, to alleviate; to reduce the severity of. सान्त्वन करणें; नरम करणें. *Mitiga'tion, n.* शमवणूक, उतार, हलकें करणें. *Mit'igatory, a., Mit'igator, n.*

Mī'tre, *n.* (मा'इटर्)-a tall cap worn by bishops; episcopal rank; a joint between boards, etc. meeting at right angles. बिशपचा मुकुट, उंच टोपी; बिशपचा मान; दोन लांकडांचा ९०° चा काटकोनाचा सांधा. *v. t.* to put or bestow mitre on; to join with or shape for a mitre joint. बिशपचा मुकुट घालणें; काटकोनानें सांधणें.

Mĭtt, Mĭtten, *nn.* (मिट्, मिटन्)—a glove leaving fingers and thumb-tip bare; (*pl.* sl.) boxing gloves; (sl. *mitt*) hand, fist. बोटें व आंगठ्याचें टोंक उघडें ठेवणारा हातमोजा; (अने.) मुष्टियुद्धाकरितां हातमोजे; हात, मूठ.

Mĭx, *v. t. & i.* (मिक्स्)—to unite or blend into one mass; to become united, to mingle. मिसळणें, एकत्र करणें; एकत्र होणें. *Mixed,* (मिक्स्ट्) *a.* of diverse qualities or elements; of both sexes; confused. मिश्रित, भेसळ केलेला, संकीर्ण; मुलांमुलींचा, स्त्रीपुरुषांचा; सरमिसळ. *To mix up,* to mix thoroughly; to confuse in thought. पुरतें मिसळून जाणें, -टाकणें; विचारांत गोंधळ होणें. *Be mixed up,* be involved. गुंतलें जाणें, गोंधळांत सांपडणें.

Mĭx'ture, *n.* (मि'क्श्चर्)—mixing; compound. esp. a medicinal draught. मिश्रण, भेळ; औषधाचें मिश्रण.

Mĭzz'en măst, *n.* (मि'झन्-मास्ट्)—aftermost mast of three-masted ship. गलबताच्या मागल्या बाजूची डोलकाठी. Also, *Miz'en mast.*

Mnēmŏn'ic, *a.* (निमॉ'निक्)—of or designed to aid the memory. स्मृतिसहायक, स्मृतिप्रवर्तक.-*s, n. (pl.)* mnemonic art or system. स्मृति बळकट करण्याची कला किंवा शास्त्र.

Moan, *n.* (मोन्)—a low inarticulate sound expressing pain or grief. कण्हणें, कुंथणें. *v. i. & t.* to utter moan; to lament, to deplore. शोक करणें, हुंदके देणें, विलाप करणें.

Moat, *n. & v. t.* (मोट्)—a defensive ditch (round a castle, town, or other fortified place). खंदक, चर, (खणणें). *Moat'ed, a.*

Mŏb, *n.* (मॉब्)—a riotous crowd; a promiscuous gathering. आडदांड लोक, गर्दी, लोकांचा घोळका,-अव्यवस्थित समुदाय, लोकांचा जमाव. *v. t. & i.* to crowd upon and hustle or ill-treat, to attack, molest. गर्दी करून हल्ला करणें, उपद्रव होणें,-करणें. *M. law,* law imposed or enforced by *m.* जबरदस्तीचा न्याय, लोकांचा दंडेलीचा कायदा. *Swell m.,* a class of stylishly dressed pickpockets. संभावित खिसेकातरू, ठग, भामटे. *Mob'bish, a.* उच्छृंखळ, गैरकायदा. *Mobo'cracy, n.* बेशिस्त लोकांचा स्वैर अंमल, अज्ञाणी लोकांचा जुलमी अंमल.

Mŏb'-căp, *n.* (मॉ'ब्कॅप्)—woman's indoor cap. घरांत घालण्याची स्त्रियांची टोपी.

Mō'bile, *a.* (मो'बाइल्)-shifting position readily; not fixed, changeable, fickle. सहज हालणारा; सहज हालचाल करतां येणारें (सैन्य); अस्थिर. *Mobil'ity, n.* गमनशीलता, प्रसरणशीलता, रजोगुण.

Mō'bilize, *v. t. & i.* (मो'बिलाइझ्)—to prepare (forces) for active service; to render movable. लढाईकरितां (सैन्य) तयार करून ठेवणें; हलवितां येण्यासारखें करणें. *Mobiliz'ation, n.* लढाईसाठीं एकत्र जमविणें, सैन्याची जमवाजमव.

Mŏcc'asĭn, *n.* (मॉ'कसिन्)—Amer.-Ind soft shoe of deerskin etc. हरणाच्या चामड्याचे मऊ जोडे, -पादत्राण.

Mŏck, *v. t. & i.* (मॉक्)—to scoff at, to ridicule, to mimic; to tantalize with illusion. उपहास करणें, थट्टा-विडंबन-करणें, कुचेष्टा करणें. वेडावणें; आशाभंग करणें, तोंडाला पानें पुसणें, फसवणें. *a.* sham, mimic, counterfeit. खोटा, कृत्रिम, लुटुपुटूचा, कपटाचा, बनावट. *M. heroic, a. & n.* वीररसात्मक भाषासरणीचें विडंबन करणें.

Mŏck'erў, *n.* (मॉ'करि)—derision, laughing stock; futile action. थट्टा, मस्करी, टवाळकी, उपहासविषय; सोंग, मिष, खोटा देखावा.

Mŏck'ing-bird, *n.* (मॉ'किंग्बर्ड्)—an American song-bird that mimics other birds' notes इतर पक्षांच्या आवाजाप्रमाणें आवाज काढणारा अमेरिकन पक्षी.

Mō'dal, *a.* (मो'डल्)—of mode or form and not of substance. रूपाचा, आकाराचा, आकारविषयक, प्रकारदर्शक. *Modal'ity, n.* (esp) method laid down for discharge of obligation, etc. प्रकारदर्शकता, आकारमात्रता.

Mōde, *n.* (मोड्)—a way in which a thing is done; the current fashion. रीत, तऱ्हा, पद्धति; शिष्टसंप्रदाय.

Mŏd'el, *n.* (मॉ'डेल्)—representation of a designed or actual object; a design or style to be followed. नमुना, सांचा, प्रतिमा; किता. *v. t.* to mould, to fashion; to give a shape to, to form. घडणें, तयार करणें, आकार देणें, बनवणें.

Mŏd'erate, *a.* (मॉ'डरिट्)-not given to extremes; (of cost, etc) not excessive; middling in quantity or quality. नेमस्त; माफक; मध्यम, मध्यम प्रतीचा. *n.* a politician of moderate views. नेमस्त; मवाळ राजकारणी पुरुष. *v. t. & i.* (मॉ'डरेट्) to make or become less violent or excessive; to act as a moderator नेमस्त किंवा

माफक करणें; नेमस्तपणा राखण्याकरितां अध्यक्ष होणें.

Mŏderā'tion, *n.* (मॉडरे'शन्)—moderating; moderateness. नेमस्त किंवा माफक करणें; नेमस्तपणा, माफकपणा. *In m.*, in a moderate manner or degree. नेमस्तपणानें.

Mŏd'erātor, *n.* (मॉ'डरेटर्)—one who moderates, a mediator; a kind of oil lamp. (परीक्षेत) नेमस्तपणा राखणारा. आवरणारा; एक जातीचा तेलाचा दिवा. *M.-ship, n.*

Mŏd'ern, *a.* (मॉ'डर्न्)—of the present and recent times; new-fashioned. आधुनिक, अर्वाचीन; नवीन पद्धतीचा. *n.* (esp. in pl.) a person living in modern times (opp. to ancient). अर्वाचीन काळांतील.

Mŏd'ernism, *n* (मॉ'डर्निझ्म्)—tendency to subordinate tradition to harmony with modern thought. अर्वाचीनपणा, नवीनपणा. *Mod'ernist, n.* नवमताभिमानी.

Mŏd'ernize, *v. t & i.* (मॉ'डर्नाइझ्)—to assimilate to modern needs; to adopt modern views नवीन आचारविचारांशीं जुळतें घेणें; नवविचार घेणें,-स्वीकारणें. *Moderniza'tion, n.*

Mŏd'ĕst, *a.* (मॉ'डिस्ट्)—not overrating one's own merit; unassuming; not excessive; pure-minded, decorous. विनयशील; निरभिमानी; परिमित; माफक, मर्यादेचा, शुद्ध मनाचा. *-ly, adv.*

Mŏd'estў, *n.* (मॉ'डिस्टि)—modestness. विनयशीलता, नम्रता.

Mŏd'ĭcum, *n.* (मॉ'डिकम्)—what is barely enough; a little or small quantity. बेतवात, अगदीं बेताचा; अल्पांश.

Mŏd'ĭfy, *v. t.* (मॉ'डिफाय्)—to tone down, to qualify; to make less severe; to change the form of, to alter in some respect. फेरफार करणें, पालटणें; तीव्रता कमी करणें; रूप बदलणें, अंशतः हलका करणें. *Modifica'tion, n. Modifi'able, a.*

Mō'dĭsh, *a* (मो'डिश्)—fashionable. सभ्य संप्रदायाचा, डौलाचा.

Modiste', *n.* (मोडी'स्ट्)—a milliner, a dressmaker. स्त्रियांच्या टोप्या, झगे वगैरे बनविणारा, कपडे शिवणारा.

Mŏd'ūlāte, *v. t. & i.* (मॉ'ड्युलेट्)—to vary or regulate the pitch or proportion, to adjust, to attune; to change the key. प्रमाणांत आणणें; सूर मिळवणें, स्वरभेद करणें, स्वरसप्तक बदलणें. *Modula'tion, n.* स्वरनियमन करणें, स्वरभेद. *Mod'ulator, n.*

Mŏd'ūle, *n.* (मॉ'ड्यूल्)—standard, unit, for measuring. (मापण्याचें) प्रमाण, परिमाण, एकं.

Mō'dus ŏperăn'dī, *n.* (मो'डस् ऑपरॅ'न्डाइ्)—method of procedure. काम करण्याची पद्धत किंवा रीत. *Mo'dus viven'di,* (मो'डस् व्हिव्हे'न्डाइ्), compromise pending settlement of dispute. वादाचा निकाल होईपर्यंतची तात्पुरती तडजोड.

Mofŭss'ĭl, *n.* (मोफ'सिल्)—rural localities as distinct from the chief station. खेडींपाडीं, बाहेरगांव, देश, प्रांत.

Moid'ore, *n.* (माइ'डोअर्)—Portuguese gold coin (27s.). पोर्तुगाल देशाचें सोन्याचें नाणें (=२७ शिलिंग).

Mogul', *n. & a.* (मोग'ल्)—Mongolian. मंगोलिअन जातीचा मनुष्य; (pl.) खेळण्याचे उत्कृष्ट पत्ते. *The (great* or *grand) M.*, दिल्लीचा बादशहा.

Mŏi'etў, *n.* (मॉ'इ इटि)—a half. अर्धा भाग, निम्मा हिस्सा.

Moil, *v. i.* (मॉइल्)—to drudge, to work with painful efforts. काबाडकष्ट करणें, जिवापाड श्रम करणें. *Toil & m.*, धडपड करणें.

Moire, *n.* (म्वार्)—watered fabric, usu silk. गुळगुळीत हेलकावेदार पृष्ठभागाचें सूत, कापड किंवा रेशीम. *Moire',* (म्वा'रे) *a.* having watered surface. हेलकावेदार, गुळगुळीत पृष्ठभाग असलेलें.

Moist, *a.* (मॉइस्ट्)—slightly wet, humid; (of season) rainy; (of disease) marked by discharge of matter etc. ओलसर, दमट; पावसाळी; प्रवाही, वाहणारा. *Moi'stness, n*

Moi'sten, *v. t. & i.* (मॉइ'सन्)—to make or become moist, to wet in a small degree. ओलसर करणें, ओला होणें

Mois'ture, *n.* (मॉइ'स्चर्)—liquid in a diffused or absorbed state, humidity. ओलावा, दमटपणा, आर्द्रता. *Mois'tureless, a.* विनओलाव्याचा, शुष्क, कोरडा.

Mōke, *n.* (मोक्)—(sl.) donkey; a negro. गाढव; नीग्रो जातीचा मनुष्य.

Mō'lar, *a.* (मो'लर्)—(of teeth) serving to grind. चर्वणाचा, चर्वणोपयोगी. *n.* a molar tooth. दाढ.

Molăss'ĕs, *n.* (मोलॅ'सिझ्)—a syrup produced from sugar; treacle. काकवी, मळी, गूळ. [f. Port. f. L. *mel, mellis,* honey]

Mōle, *n.* (मोल्)—a permanent dark excrescence on the skin; a small burrowing animal with short dark fur; stone pier, breakwater or causeway. (अंगावरील) तीळ, चानखीळ; चिचुंद्री; धक्का, बांध. *Blind as a mole,* quite blind. पूर्ण आंधळा.

Mŏ'lecūle, *n.* (मॉ'लिक्यूल् or मो'-)—one of the uniform particles of which a homogeneous substance is composed. अणु, कण, रज. *Molec'ular, a.*

Mōle'hill, *n.* (मो'ल्‌-हिल्)—a mound thrown up by a mole, a very small hill. चिचुंद्रीनें उकिरलेला मातीचा ढीग, वारूळ. *To make mountains out of molehills*, पराचा कावळा करणें, राईचा पर्वत करणें, लहानशा गोष्टीचें अतिशयोक्तीनें वर्णन करणें.

Mōle'skin, *n.* (मो'ल्‌स्किन्)—mole's fur ; kind of fustian like it ; (pl.) clothes, esp. trousers of this. चिचुंद्रीच्या अंगावरील लोंकर, त्या लोंकरीसारखें सुती ड्रिलचें कापड ; त्या कापडाचे कपडे, पायजमे, तुमान.

Molĕst', *v. t.* (मले'स्ट्)—to subject to intentional annoyance, to harass, to vex, to disturb. जाणून बुजून पीडा देणें, उपद्रव देणें, ढवळाढवळ करणें. *Molesta'tion*, *n.*

Mŏll'ĭfy, *v. t.* (मॉ'लि-फाय्)—to soften, to calm down, to appease, to tone down. मऊपणा आणणें, शांतवन करणें, शमविणें, कमी करणें, हलका करणें. *Mollifica'tion*, *n.* नरम-मऊ करणें, नरमपणा, मार्दव, शमन.

Mŏll'usc, *n.* (मॉ'लस्क्)—one of the *Mollusca*, a sub-kingdom of soft-bodied animals, often with hard shells, including snails, oysters, etc. मृदुशरीर प्राण्यांच्या वर्गापैकीं एक. (ह्या वर्गांत गोगलगाई, कालवे वगैरे शिंपायुक्त प्राणी येतात.)

Mŏll'ўcŏddle, *n.* (मॉ'लिकॉडल्)—an effeminate creature. नामर्द, कमजोर, किंवा पौरुषहीन प्राणी, दूधखुळ्या प्राणी. *v. t. & i. to coddle, to coddle oneself.* (स्वतःला) कमजोर करणें, कमजोर-निःसत्त्व-होणें.

Mō'loch, *n.* (मो'लॉक्)—Canaanite idol to which children were sacrificed (often used fig.) ; the thorn-lizard or thorn-devil, a hideous Australian reptile. (नरबलि घेणारा) कॅननाइट लोकांचा देव ; आस्ट्रेलियांतील एक भयंकर सरपटणारें जनावर.

Mŏlўbdē'nŭm, *n.* (मॉलिब्डी'नम्)—a rare silvery-white metallic element. रसायन शास्त्रांतील एक मूलधातु.

Mol'ten, (मो'ल्टन्)—*pa. p.* of Melt. रस केलेला, गाळलेला, प्रवाही ; ओतीव.

Mō'ment, *n.* (मो'मेन्ट्)—a point of time, a brief space of time ; importance, consequence. पळ, क्षण ; महत्त्व.

Mō'mentarў, *a.* (मो'मेन्टरि)—lasting or continuing only a moment, fleeting. क्षणिक, क्षणभंगुर, क्षणापुरता.

Mōmĕn'tous, *a.* (मोमे'न्टस्)—of great importance, important, weighty. फार महत्त्वाचा.

Mōmĕn'tum, *n.* (मोमे'न्टम्)—(*pl.* Momenta) quantity of motion of a moving body ; (pop.) impetus gained by movement. चालण्याची गति, वेगमान ; गतीमुळें येणारा जोर, प्रेरणा.

Mŏn'achal, *a.* (मॉ'नकल्)—monastic. मठाचा, मठासंबंधी ; वैराग्याश्रमाचा. *Mon'achism*, *n.* मठवास, संसारत्याग.

Mŏn'ad, *n.* (मॉ'नॅड्)—a unit; a simple organism assumed as the first term in evolution. (मूळचा अविभाज्य) एक ; मूळ सत्कण, मूळ कारण, मूळ चित्कण. *Monad'ic*, *a.*

Mŏn'arch, *n.* (मॉ'नर्क्)—an imperial or royal ruler of a State, sovereign. राजा, बादशहा. *-ism*, *n.* एकसत्ताक राज्यपद्धति.—*ist*, *n.* राजपक्षीय.

Mŏn'archў, *n.* (मॉ'नर्कि)—a system or State governed by a single person. राजसत्ताक पद्धति, राजसत्ताक देश.

Mŏn'astery, *n.* (मॉ'नॅस्टरि)—residence of a community of monks, an abbey, a priory, a nunnery. मठ, आश्रम. *Monas'tic*, *a.* of monks or monasteries. यतीसंबंधी, मठासंबंधी. *Monas'ticism*, *n.* life in monasteries. मठवास, वैरागीपणा.

Mon'day, *n.* (मं'न्डि)—second day of the week that is sacred to the moon. सोमवार, इन्दुवार. *Black M.*, (school slang) first day of term. सुट्टीनंतरचा पहिला (अभ्यासाचा) दिवस. *St M.*, *M.* as day of little work (w. ref. to saint's-day holidays). अल्पकामाचा वार, सोमवार. [OE *mona*, moon ; *daeg*, day]

Mon'dayish, *a.* (मं'न्डिइश्)—(of clergy) indisposed as result of Sunday work ; (of others) slack as result of Sunday work. रविवारीं काम केल्यामुळें कंटाळलेला, सुस्तावलेला.

Monde, *n.* (मॉन्ड)—the fashionable world, society ; the set in which one moves. छानछोकीचें जग, सभ्य समाज ; स्नेहीसोबत्यांचें मंडळ, परिवार. [F]

Mō'netarў, *n.* (मॉ'नेटरि or मं'-)—of coinage or money, relating to money. नाण्यासंबंधीं, पैसासंबंधीं, सांपत्तिक, द्रव्यासंबंधीं, पैशाअडक्याचा.

Mo'nĕtize, *v. t.* (मं'निटाइझ्)—to make into, or recognize, or put into circulation, as money. नाण्यांच्या रूपांत आणणें, नाणें म्हणून ओळखलें जाणें, नाणें म्हणून वापरणें.

Mo'ney, *n.* (मं'नि)—current coin ; bank notes or other documents representing it ; wealth, affluence. चालू नाणें ; नोटा वगैरे चलन, पैसा, द्रव्य ; संपत्ति. *Money bag*, पैशाची पिशवी, पोतडी, पाकिट. *Moneys-bag*, wealth. संपत्ति. *M. bags*, wealthy or avaricious person. श्रीमंत किंवा हावरा मनुष्य. *M.-box*, closed box into which savings or contributions are dropped through slit. पैसे टाकण्यासाठीं वरतीं भोक असलेली बंदिस्त पेटी. *M.-changer*, one whose busi

ness it is to change money at fixed rate. सराफ, नाणेवटी, नाण्यांची देवघेव करणारा. *M.-grubber*, a person sordidly intent on amassing money. येनकेन द्रव्यसंचय करणारा मनुष्य. *M.-grubbing*, *a.* & *n.* वाटेल त्या मार्गानें द्रव्य-संचय करणें. *M.-lender*, (व्याजानें) कर्जाऊ पैसे देणारा सावकार, धनको. *M.-market*, haunts and operations of dealers in stocks and bills. पैशाच्या, रोख्यांच्या व हुंड्यांच्या उलाढालीचा बाजार, सराफकट्टा, सराफ बाजार, शेअर बाजार. *M.-order*, टपालानें पाठविलेला पैसा. *M.-spinner*, a small spider thought to bring good luck. एक जातीचा लहान कोळी. (तो ज्याच्या अंगावरून जाईल त्याला पुष्कळ पैसा मिळवून देईल, अशी समजूत). *M.-wort*, a plant with round glossy leaves. वाटोळीं चकाकदार पानें असलेली वनस्पति. *M.'s-worth*, anything recognized as equivalent to money. ऐवज. *Paper money*, कागदी नोटा वगैरे चलन. (Proverbs) '*Money makes the mare to go.*' (म्हण) 'दाम करी काम', 'द्रव्येण सर्वे वशः'. '*Time is money*', 'वेळ म्हणजे पैसा.' *To make m.*, पैसा मिळविणें, धनसंचय करणें. *To coin m.*, झपाट्यानें पैसा मिळविणें. *not every man's m.*, not worth its price to every one. प्रत्येकाला पैशाचो किंमत सारखीच असत नाहीं. *Mo'neyless*, *a.* द्रव्यहीन, दरिद्री.

Mon'eyed, *a.* (मनिड्)—wealthy. पैसेवाला, धनिक. *Moneyed interest*, सावकारलोक, धनिकवर्ग.

Mo'nger, *n.* (मंगर्)—dealer, trader (chiefly in combinations). (चा) व्यापारी, व्यवसायी.

Mong'oose, *n.* (मॉंगूस्)—an ichneumon (noted for killing venomous snakes). मुंगूस, नकुल.

Mo'ngrel, *a.* (मंग्रेल्)—of a mixed breed or type, hybrid. संकर जातीचा, मिश्रजातीय. *n.* a mongrel animal; hybrid plant or person. मिश्रजातीय प्राणी,-वनस्पति,-मनुष्य.

Mŏn'ism, *n.* (मॉनिझम्)—forms of doctrine maintaining that there is only one kind of being. अद्वैत मत, एकतत्त्ववाद. *Mon'ist*, *n.* एकतत्त्ववादी, अद्वैतवादी.

Monĭ'tion, *n.* (मॉनिशन्)—admonition; summons. ताकीद, सूचना, समन्स.

Mŏn'itor, *n.* (मॉनिटर्)—a person who gives advice or admonishes; a senior schoolboy placed in authority; an iron-clad heavily gunned & armoured for coast defence. उपदेष्टा; (वर्गातील) अधिकार दिलेला मुख्य विद्यार्थी, मॉनिटर; किनाऱ्याचें रक्षण करणारें चिलखती जहाज. *Monitor'ial*, *a.* (esp. in school sense), *Mon'itress*, *n. f.*

Monk, *n.* (मंक्)—member of male community living apart under religious vows. जोगी, मठवासी. *Monk's hood*, kinds of flowering plants. एकजातीचीं फुलझाडें.

Mo'nkey, *n.* (मंकि)—kinds of mammal closely allied to man; kind of hammer; (sl.) temper; £ 500. माकड, वानर; घण, हातोडा; (मर्कट)-स्वभाव; ५०० पौंड. *v. t.* & *i.* to mimic, mock; to play mischievous tricks. वांकुल्या दाखविणें; खोड्या करणें. *Monkey-bread*, एक जातीचें आफ्रिकेंतील झाडाचें फळ. *M.-nut*, peanut. शेंग, दाणा. *M.-jacket*, खलाशांची तंग बंडी. *M.-puzzle*, एक कांटेरी झाड.

Monk'ish, *a.* (मंकिश्)—of monks. मठवाशाचा, जोग्याचा.

Mŏn'ochord, *n.* (मॉनाकॉर्ड्)—one-stringed musical instrument. एकतारी (वाद्य).

Mŏn'ochrōme, *n.* (मॉनाक्रोम्)—one-colour picture or design. एकरंगी चित्र.

Mŏn'ocle, *n.* (मॉनकल्)—a single eye-glass. एकडोळी चष्मा.

Mŏn'odў, *n.* (मॉनाडि)—dirge. विलापगीत.

Monŏc'ūlar, *a.* (मानॉक्यूलर्)—one-eyed. एकडोळ्या.

Mŏn'odў, *n.* (मॉनडि)—a dirge or elegy. विलापगीत, शोकगीत.

Monŏg'amў, *n.* (मानॉगमि)—a custom by which one man or male has one wife or mate. एकपत्नीव्रत.-*mist*, *n.*;-*mous*, *a.*

Mŏn'ogrăm, *n.* (मॉनाग्रॅम्)—a set of letters interwoven in one design. ठशासाठीं नांवाचीं जोडलेलीं आद्याक्षरें, एकाक्षरी शिक्का.

Mŏn'ogrăph, *n.* (मॉनाग्राफ्)—a treatise on a single subject. एका विशिष्ट विषयावर लिहिलेला छोटासा निबंध.-*ic*, *a.*;-*ist*, *n.*

Mŏn'olith, *n.* (मॉनालिथ्)—a single block of stone as pillar, etc. अखंड खांब, अखंड दगडी कीर्तिस्तंभ. *Monolith'ic*, *a.*

Mŏn'olŏgue, *n.* (मॉनालॉग्)—soliloquy; a dramatic composition in which only one person speaks. आत्मगत भाषण; एकाचेंच भाषण असणारें नाटक, एकपात्री भाषण,-प्रवेश.

Mŏnomā'nia, *n.* (मॉनामेनिआ)—madness on a single subject. एकाच बाबतींतील वेड, एकविषयभ्रम.-*ma'niac*, *a.* छांदिष्ट, एकच विषय घेऊन बसणारा.

Mŏnomĕt'allism, *n.* (मॉनामेटॅलिझम्)—use of one metal as standard of currency. नाण्यासाठीं एकाच धातूचा उपयोग, एकचलनोपयोग.

Mŏn'oplāne, *n.* (मॉनप्लेन्)—an aeroplane with one plane. तोल राखण्यासाठीं एक पंख असलेलें विमान.

Monop'olist, *n.* (मनॉपलिस्ट्)—one who holds or favours a monopoly. मक्ता घेणारा, मक्तेवाला, मक्तेदारीच्या पद्धतीचा पक्षपाती.

Monŏp'olize, *v. t.* (मॅनॉ'पलाइझ्)—to secure monopoly of, to obtain the whole of. मक्ता घेणें, एकट्यानें व्यापून टाकणें, सर्वच्या सर्व खरेदी करणें, -घेणें.-*zation*, *n.*

Mŏnŏp'olÿ, *n.* (मॅनॉ'पलि)—an exclusive privilege of the trade in something ; sole possession or control of anything to the exclusion of others. एकाद्या वस्तूच्या व्यापाराचा पूर्ण मक्ता ; परवाना, मक्ता, पूर्ण ताबा.

Mŏn'orail, *n.* (मॉ'नरेल्)—railway with cars running on a single rail. एकरुळी आगगाडी, एकाच रुळावरून (एकेरी लाइनीवर) चालणारी आगगाडी.

Mŏnosÿll'able, *n.* (मॉनोसि'लेबल्)—a word of one syllable. एकावयवी शब्द. *Monosyllab'ic*, *a.*

Mŏn'othĕism, *n.* (मॉ'नाथीइझम्)—a doctrine that there is only one God. एकेश्वरवाद, एकेश्वरमत. -*theist*, *n.* एकेश्वरवादी ;-*theis'tic*, *a.* एकेश्वरवादविषयक.

Mŏn'otōne, *n.* (मॉ'नाटोन्)—successive sounds or utterance without change of pitch. एकच सूर, एकच सुरांतील आवाज.

Monŏt'onous, *a.* (मनॉ'टनस्)—unvarying in tone ; wearisome. एकाच सुराचा, एकसारखा ; कंटाळवाणा.

Monŏt'onÿ, *n.* (मनॉ'टनि)—uniformity or sameness of sound, monotonousness. एक स्वर, एकप्रकारीपणा, कंटाळवाणेपणा. [Gk *monos*, one ; *tonos*, tone, sound]

Mŏn'otÿpe, *n.* (मॉ'नाटाइप्)-a composing machine that casts & sets up type. हवा तसा एकेक टाईप पाडून तो जुळविण्याचें यंत्र.

Monseigneur, *n.* (मॉसेंय'र्)—French title for dignitaries. थोरा मोठ्यांची फ्रेंच पदवी.

Monsieur, *n.* (मस्य'र्)—(as French title, abbr. M.) Mr ; sir ; a French man. (पदवी) मिस्टर् ; सर् (महाराज) ; फ्रेंच मनुष्य.

Mŏnsōōn', *n.* (मॉन्सून्)—seasonal wind, rainy season. पावसाळी वारा, पावसाळा.

Mŏn'ster, *n.* (मॉ'न्स्टर्)—a mis-shapen creature ; a person or thing of portentous appearance or size ; a miscreant, one unnaturally wicked or evil. चमत्कारिक आकाराचा प्राणी ; भयंकर प्राणी, राक्षस ; दुराचारी मनुष्य. *a.* huge. भव्य, प्रचंड, भयानक.

Mŏn'strance, *n.* (मॉ'न्स्ट्रन्स्)—(R. C. Ch.) vessel in which the host is exposed. रोमन कॅथालिक देवळांत लोकांच्या दर्शनाकरितां ठेवलेलें पात्र.

Mŏnstrŏs'itÿ, *n.* (मॅन्स्ट्रॉ'सिटि)—monstrousness ; a mis-shapen or outrageous thing. प्रचंडपणा, अवाढव्यपणा, राक्षसीपणा, अद्भुतता.

Mon'strous, *a.* (मॉ'न्स्ट्रस्)—of the nature of a monster ; huge ; outrageous. राक्षसी ; प्रचंड ; भयंकर जुलुमाचा.

Mŏ'ntane, *a.* (मॉ'न्टेन्)—of, inhabiting, mountainous country. पर्वतमय प्रदेशाचा, डोंगराळ मुलखांत राहणारा.

Mo'ntĕ, *n.* (मॉ'न्टे)—a Spanish game of chance played with 45 cards. स्पॅनिश लोकांचा पत्त्यांचा (जुगारी) डाव.

Month, *n.* (मन्थ्)—any of the twelve divisions of a year, a calendar month (four weeks). महिना, मास. *Month'ly*, *a.* recurring, payable, etc. once a month. महिन्याचा, मासिक, दर महिन्याला देण्याजोगा ; *n.* a monthly magazine, मासिक (पुस्तक) ; *adv.* once a month. दर महिन्याला. *Monthlies*, *n. pl.* menses. ऋतु, आर्तव, मासिक विटाळ. *Calendar month*, पंचांगांतील महिना. *Lunar m.*, चांद्रमास ; २८ दिवस. *Month of Sundays*, अनियमित काळ. *This day m.*, a month from day. आजपासून एक महिना. *Monthly nurse*, बाळंतपणानंतर पहिल्या महिन्यांतील दाई. *M. rose*, दर महिन्याला फुलणारा (चिनी) गुलाब.

Mŏn'ūment, *n.* (मॉ'न्युमेन्ट्)—written record, anything designed or serving to commemorate something. (स्मारक) लेख, स्मारक.

Mŏnūmĕn'tal, *a.* (मॉन्युमे'न्टल्)—of or serving as monument; colossal or stupendous. स्मारकाचा, स्मारक म्हणून असलेला ; विशाल, भव्य, अद्भुत, चिरस्मरणीय. [L *monere*, to remind]

Mōō, *v. i. & n.* (मू)—(of cow or horse) low हंबरणें, खिंकाळणें.

Mōōch, *v. i. & t.* (मूच्)—(colloq.) to slouch along, to loiter about ; to steal. अक्कडबाजपणें भटकणें, हिंडणें ; चोरणें.

Mōōd, *n.* (मूड्)—(*Gram.*) any of the groups of forms in conjugation of verb that serves to indicate its function ; state of mind or feeling. (व्याकरणांत) क्रियापदाचा रूपप्रकार, अर्थ; मनःस्थिति, लहर ; (logic) अनुमानाचा प्रकार, रूप.

Mōōd'ÿ, *a.* (मू'डि)—subject to changes of mood ; depressed, sullen. अस्थिर मनाचा, चंचलवृत्ति ; उद्विग्न, खिन्न, रुष्ट, रागीट.

Mōōn, *n.* (मून्)—the satellite revolving round the earth in lunar month and reflecting light from the sun ; (poet.) month. चंद्र, चंद्रमा; ग्रह, उपग्रह ; (काव्यांत) महिना, मास. *v. i. & t.* *to go dreamily or listlessly about ; to pass away (time) in listless manner.* वेड्याप्रमाणें भटकणें ; रिकामटेकडेपणानें वेळ घालविणें. *Full moon*, पूर्ण (पूर्णिमेचा) चंद्र. *New m.*, प्रतिपदेचा चंद्र. *M. beam*, चंद्रकिरण. *M. calf*, born fool, उपजत वेडा. *M. light*, चंद्रप्रकाश, चांदणें. *Old m. in new m.'s arms*, *m.* during first quarter.

शुद्ध सप्तमीपर्यंतचा चंद्र. *Moonlight flitting*, भाडें देण्याचें टाळण्यासाठीं रातोरात चिन्हाड चोरून खालीं करणें. *M.-lit*, lit up by *m.*, चंद्रप्रकाशित. *M. shine*, visionary talk or ideas ; smuggled spirits. वेडगळ बोलणें किंवा समजूत ; बेकायदा चोरून आणलेली दारू. *M.shiny*, चंद्रप्रकाशित; भ्रामक, काल्पनिक. [L *mensis*, Gk *men*, month]

Mōōn'-light, Mōōn'shīne, *nn.* (मू'न्-लाइट्, मू'न्-शाइन्)—the light of the moon. चंद्रप्रकाश, चांदणें.

Mōōn'stōne, *n.* (मू'न्-स्टोन्)—a pearly feldspar (used in trinkets or otherwise). चंद्रकांत मणि.

Mōōn'strŭck, *a.* (मू'न्-स्ट्रक)—lunatic. भ्रमिष्ट, वेडा.

Mōōn'ȳ, *a.* (मू'नि)—of, like, the moon ; dreamy. चंद्राचा, चंद्रासारखा ; विचारमग्न, भ्रमिष्ट, वेडा.

Moor, *n.* (मूअर्)—a tract of uncultivated and often heather-clad ground. पाणथळ जमीन, रान, ओसाड प्रदेश *v. t.* attach (boat, &c.) by rope to shore or something fixed. बोट वगैरे घट्ट बांधून ठेवणें, जहाज खुंटवणें, नांगरणें. *Moor'age*, place, charge etc., for mooring. गलबत नांगरण्याची जागा, भाडें, नोर, खुंटणावळ. *Moor land*, पाणथळीची जागा. *M. hen*, पाण-कोंबडी. *Moor'ish*, *Moor'y*, *aa.* पाणथळ, दलदलीचा.

Moor, *n.* (मूअर्)—one of a Mohammedan race of N.-W. Africa. उत्तर आफ्रिकेंतील शिद्दी मनुष्य. *Moor'ish*, *a.*

Mōōr'ing, *n.* (मू'रिंग)—(*usu. pl.*) anchored chains to which boat is moored. नाव बांधलेली जागा ; दोरखंड, नांगर इ. सामायन.

Mōōse, *n.* (मूस्)—N. American elk. उत्तर अमेरिकेंतील सांबर.

Mōōt, *n.* (मूट्)—meeting esp. of legislative or judicial kind; (Law) students' discussion of hypothetical case for practice. लोकसभा ; काल्पनिक खटल्यांत कायदा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची चर्चा, वादविवाद. *v. t.* to raise (a question) for discussion. वादविवादासाठीं (प्रश्न) उपस्थित करणें, वादविवाद करणें. *a.* debatable. वादग्रस्त.

Mōōt'cāse, Moot'pōint, *n.* (मू'ट्-केस्, मू'ट्-पॉइन्ट्)—matter on which opinions differ. वादग्रस्त मुद्दा, लढा, विषय.

Mop, *n.* (मॉप्)—a bundle of yarn, &c. fixed to stick for use in cleaning. काठीला फडके बांधून केलेली झाडणी, दांडपोतेरें. *v. t.* to clean or wipe with mop-head or absorbent stuff ; to wipe tears, sweat (from brow). पोतेऱ्यानें किंवा पोतेऱ्याप्रमाणें झाडणें, पुसणें, साफ करणें ; (डोक्याचा) घाम, अश्रु वगैरे पुसून काढणें. *M. head*, thick head of hair like m., a person with this. झाडणी प्रमाणें दाट केसाचें डोकें, अशा केसांचा मनुष्य. *Mo'ppy*, *a.* ; *To m. the floor with*, to have and use overwhelming advantage of (combatant). (प्रतिपक्षावर) मात करणें, (त्याला) चीत करणें. *To mop up*, साफ पुसून काढणें ; (नफा) खाणें, लाटणें ; (चा) शेवट करणें. [L *mappa*, a napkin]

Mŏp, *v. i. & n.* (मॉप्)—*Mop and mow*, to make grimaces. वांकुल्या दाखविणें, वेडींवांकडीं तोंडें करणें. *Mops & mows*, grimaces. वांकुल्या.

Mōpe, *v. i.* (मोप्)—to be spiritless or gloomy. उदास होऊन बसणें. *n.* a low-spirited person ; (pl.) dumps. उदास मनुष्य ; खिन्नता, उदासपणा. *Mo'pish*, *a.* खिन्न, उदास.

Mō'poke, More'pork, *nn.* (मो'पोक्, मो'र्पोर्क)—(*in N. Zealand*) *an owl* ; (*in Tasmania*) night-jar ; (in Australia) various birds. घुबड ; रात्रीं फिरणारा पक्षी ; निरनिराळे पक्षी. [*imit.* of birds' note]

Moraine', *n.* (मरे'न्)—debris deposited by glacier. बर्फाच्या नदींतील गाळसाळ किंवा कचरा, हिमनदी-गाळ.

Mŏ'ral, *a.* (मॉ'रल्)—concerned with right and wrong conduct ; practising virtue. सदसद्विचारविषयक, नैतिक, नीतिविषयक ; नेकीचा. *n.* the guidance deducible from a fable, incident, &c. ; (*pl.*) conduct of a person, nation, &c. भावार्थ, तात्पर्य ; (अने०) नैतिक वर्तन, आचार. *Moral courage*, नीतिधैर्य, मनोधैर्य. *M. certainty*, probability so great as to admit of no reasonable doubt. (पुराव्याशिवाय) मनाची खात्री, अंतःकरणप्रवृत्ति. *M. sense*, सदसद्विचार-शक्ति, प्रज्ञा. *M. science*, आचारशास्त्र. *M. philosophy*, ethics. नीति-शास्त्र. *M. victory*, defeat, indecisive result, that eventually produces the m. effects of victory. पराभव झाला तरी मनाला वाटणारा नैतिक विजय. *To draw the moral*, तात्पर्य सांगणें. *To point a m.*, to illustrate or apply *a m.* तात्पर्य, भावार्थ, उदाहरण देऊन सांगणें. *The very m. of*, (vulg.) exact likeness of. हुबेहूब सारखेपणा. *Mor'ally*, *adv.* नीतीनें, नीतिदृष्ट्या, न्यायानें. [L *mos*, custom, *pl. mores*, morals]

Morăle', *n.* (मोरा'ल्)—discipline and spirit pervading an army or other body of persons. सैन्यांतील किंवा इतर लोकांतील शिस्त व मनःसामर्थ्य, मनोधैर्य.

Mŏ'ralist, *n.* (मॉ'रलिस्ट्)—a person given to moralizing ; a person for whom morality requires no religious sanction. नीतीचा उपदेश करणारा, नीतिउपदेशक ; केवळ नैतिक, सद्वर्तनी. *Moralist'ic*, *a.*

Morăl'ĭtў, *n.* (मरॅ'लिटि)—ethics; morals; moral conduct; kind of moralizing drama. नीतिशास्त्र, कर्तव्याकर्तव्यविचार; सदाचरण; नीतितत्त्वपूर्ण नाटक, नीतिबोधक नाटक.

Mŏ'ralīze, *v. i. & t.* (मॉ'रलाइझ्)—to talk on the moral aspect of things; to draw the moral of. चा सारांश काढणें, नीति सांगणें; नीतीचा विचार करणें, नीति शिकविणें.

Morăss', *n.* (मोरॅ'स्)—marsh, slough. पाणथळ जमीन, दलदल.

Mŏratŏr'ĭum, *n.* (मॉरटॉ'रिअम्)—legal authorization to defer payment. ऋणकोला देणें देण्यासाठीं दिलेली कायदेशीर सवलत,-मुदतवाढ.

Mŏrb'ĭd, *a.* (मॉ'र्बिड्)—not sound and healthy; diseased, sickly. अस्वस्थ, रोगट; विकारी. *M. anatomy*, विकृत शरीर. *Morbid'ity*, prevalence of disease (in a district), morbidness. आजार, रोगाचें प्रमाण, अस्वस्थता.

Mŏrbĭf'ĭc, *a.* (मॉर्बि'फिक्)—causing disease. रोगकारक, रोगजनक, रोगट

Mŏrd'ant, *a.* (मॉ'र्डन्ट्)—(of wit) biting, stinging; (of pain) acute; (of acids) corrosive or cleansing. बोंचक, मर्मभेदक; तीव्र; जाळून काढणारा, दाहक, साफ करणारा. *n.* mordant substance. दाहक (द्र०) पदार्थ. *Mord'ancy*, *n.*

Mōre, *a.* & *pron.* (मोअर्)—a greater or additional quantity or number (of). आणखी, जास्त. *adv.* to a greater degree or extent or amount. अधिक, आणखी, पुनः. *More & more*, अधिकाधिक. *M. or less*, in greater or less degree. कमीजास्त प्रमाणांत. *To be no more*, to be dead. मरणें, नाहींसें होणें.

Mōreō'ver, *adv.* (मोअरो'व्हर्)—besides what has been already said; and further. आणखी; शिवाय.

Moreen', *n.* (मरी'न्)—a stuff for curtains. पडद्याचें कापड.

Morĕsque', *a.* (मॅरे'स्क्)—Moorish in style. मूर लोकांच्या पद्धतीसारखा.

Morganăt'ĭc, *a.* (मॉर्गनॅ'टिक्)—*M. marriage*, one between man of exalted rank and woman of lower rank, who remains in her former station. प्रतिलोम (विवाह), उच्चवर्णीयाचा हीनवर्णीय स्त्रीशीं झालेला विवाह.

Morgue, *n.* (मॉर्ग्)—a building (esp one formerly in Paris) in which bodies of persons found dead are exposed for identification. (पत्ता लावण्याकरितां) अज्ञातप्रेतगृह, अनाथप्रेतालय.

Mŏ'rĭbŭnd, *a.* (मॉ'रिबन्ड्)—at the point of death, likely soon to perish. मरणोन्मुख, सद्योविनाशी.

Mŏ'rĭon, *n.* (मॉ'रिअन्)—a steel cap. पोलादी टोपी.

Morn, *n.* (मॉर्न्)—(*poet.*) morning. सकाळ, प्रातःकाळ.

Morn'ĭng, *n.* (मॉ'र्निंग्)—the day from dawn till noon or the midday meal; dawn. सकाळ, प्रातःकाळ, प्रभात, पूर्वाह्णकाळ; अरुण देवता. *Good m.*, रामराम, नमस्कार. *M. star*, शुक्राचा तारा, शुक्र. *M. watch*, (Naut.) 4-8 a. m. (सकाळीं ४ ते ८ वाजेपर्यंतचा) सकाळचा पहारा (नाविक).

Morŏcc'ō, *n.* (मरॉ'को)—(pl.-os), leather of goatskin tanned with sumac. बकऱ्याचें कमावलेलें उंची चामडें.

Mŏr'on, *n.* (मॉ'अरन्)—an adult whose mental development is arrested at the stage normal in a 7-year child. सात वर्षांच्या मुलाइतकीच बुद्धीची वाढ झालेला मनुष्य. [Gk *moros*, dull]

Morōse', *a.* (मरो'स्)—of bitter unsociable temper; sullen, gloomy. कटुस्वभावी, खिन्न, दुर्मुखलेला.*-ly*, *adv.*

Morph'eus, *n.* (मॉ'र्फ्यूस्)—God of dreams or sleep. (ग्रीक लोकांची) स्वप्न-(निद्रा)-देवता. *In the arms of M.*, asleep. झोंपी गेलेला

Morph'ĭa, **Morph'ĭne**, *nn.* (मॉ'र्फिआ, मॉ'र्फिन्)—narcotic principle of opium, powerful anodyne. अफूचा अर्क. *Morph'inism*, *n.* state induced by excessive use of morphia. अफूच्या अर्काच्या अतिसेवनामुळें आलेली धुंदी.

Morphŏl'ogў, *n.* (मॉर्फॉ'लजि)-branch of biology, or of philology, dealing with forms. आकारविज्ञान; शब्दरूपविचार.*-gical*, *a*;*-gist*, *n.*

Mŏ'rrĭs, *n.* (मॉ'रिस्)—*M. dance*, kind of dance, with bells, cudgels, etc. मूर लोकांचा आडदांड नाच, टिपर-खेळ.

Mŏ'rrĭs tūbe, *n.* (मॉ'रिस् ट्यूब्)—a small-bore rifle barrel insertable in a rifle for practice on miniature range. लहान टप्प्यावर नेम धरण्याचा सराव करण्यासाठीं बंदुकींत बसविण्याची लहान तोंडाची नळी. [R. *Morris*, the inventor]

Mŏ'rrōw, *n.* (मॉ'रो)—the day that follows a day or event, the day after the present. दुसरा दिवस, उद्यांचा दिवस.

Mŏrse, *n.* (मॉर्स्)—a walrus. समुद्रांतील लांब सुळ्याचा एक प्राणी.

Morse, *n.* (मॉर्स्)—*M. alphabet,-code,-signals, etc.* विद्युत्संदेश पाठविण्याची एक पद्धति.

Mŏrs'el, *n.* (मॉ'र्सल्)—mouthful, bit; a small quantity, a fragment, a little piece. घांस, तुकडा; थोडासा भाग.

Mort'al, *a.* (मॉ'र्टल्)—subject to or causing death; very great. मरणाधीन, नाशवंत; अतिशय. *n.* a human being. मनुष्य प्राणी. *Mort'ally*, *adv.*

Mortăl'ĭtў, *n.* (मॉर्-टॅ'लिटि)—being mortal; human beings; death-rate. मरणाधीनता; मनुष्यप्राणी; मृत्युसंख्या.

Mor'tar, *n.* (मॉ'टर्)—a vessel in which drugs, food, &c. are pounded with a pestle ; mixture of lime, water, etc. used in building; short gun throwing shells. उखळी, खल ; चुना, चुन्याचा गारा ; उखळी तोफ, गरनाळ.

Mortg'age, *n.* (मॉ'र्गिज्)—conveyance of property as security for debt until money is repaid. गहाण. *v. t.* to make over by mortgage, to pledge. गहाण ठेवणें.

Mortg'agor, *n.* (मॉ'र्गेजर्)—the person who mortgages. गहाण ठेवणारा. (*Also* Mortg'ager).

Mortgagee,' *n.* (मॉर्गेजी')—the person to whom mortgage is given or an estate is mortgaged. गहाण घेणारा, धनको.

Mŏrt'ĭfȳ, *v. t. & i.* (मॉ'र्टिफाय्)—to chasten (flesh, &c.) by repression ; to humiliate, to chagrin ; to be affected with gangrene or mortification. चैतन्य नष्ट करणें, जायबंदी करणें ; अपमान किंवा पाणउतारा करणें ; सडणें, झडणें. *Mort'ifying, a.* नासलेला, इंद्रियदमनकारक, मानहानिकारक. *Mortifica'tion, n.*

Mort'ĭse,-ĭce, *n.* (मॉ'र्टिस्)—a hole made in a piece of wood, etc. to receive the end of another piece. खोबण, कडूचें भोंक. *v. t.* to make mortise in ; to join by m. कळाशीसाठीं भोंक पाडणें ; कळाशी करून सांधणें,-जोडणें.

Mort'main, *n.* (मॉ'र्ट्मेन्)—condition of land, etc. held inalienably by a corporation. दुसऱ्याला न विकतां येणाऱ्या स्थावर मिळकतीचा ताबा.

Mort'ūarȳ, *n.* (मॉ'र्ट्यूअरि)—the building for temporary keeping of corpses, a dead-house. प्रेतालय. *a.* of or for burial. मरतिकाचा, मृतासंबंधीं.

Mosā'ĭc, *n.* (मझे'इक्)—a picture or pattern made with small coloured pieces of stone or glass. लहान लहान रंगीत तुकड्यांचें बनविलेलें चित्र किंवा नक्षीकाम.

Mosā'ĭc, *a.* (मझे'इक्)—of Moses. मोझिझचा.

Mŏsque, *n.* (मॉस्क्)—Mohammedan temple, a place of religious worship. मशीद, दरगा.

Mosqui'tō, *n.* (मास्की'टो)—(*pl.-oes*), kinds of gnat (very annoying from the severe bites). चिलट, सुरकुड, मच्छर. *M.-net, M.-curtain*, मच्छरदाणी. *M.-craft*, small light vessels for rapid manœuvring. जलद चालीचीं लहान हलकीं जहाजें.

Mŏss, *n.* (मॉस्)—a small plant growing on moist surfaces ; bog, a place where peat is found. शेवाळ, शैवाल ; दलदल. *v.t.* to cover with *m.* शेवाळानें झांकणें. *Mo'ssy, a.*; *Mo'ssiness, n.* '*Rolling stone gathers no moss*', one who constantly changes his place or employment will not grow rich. 'एक ना धड भाराभर चिंध्या'. *M.-grown*, शेवाळलेला. *M.-trooper*, border free-looter of 17th c. (१७ व्या शतकांतील) लुटारू, पुंड, वाटमारा.

Mōst, *a.* (मोस्ट्)—the greatest number or quantity of. अतिशय, बहुतेक. *pron.* the greatest amount ; the greater part of. सर्वांत जास्त ; अधिक, बहुतेक. *adv.* to a great or the greatest degree or extent or amount. बहुत, विशेषेंकरून. *The most*, बहुतेक भाग. *For the most part*, बहुतकरून, बहुंशीं. *To make the m. of it*, employ it to the best advantage, represent it at the best or worst. शक्य तितका फायदा करून घेणें ; अतिशय बरें-वाईट, असें दाखवून देणें.

Mōst'lȳ, *adv.* (मो'स्ट्-लि)—for the most part, mainly, chiefly, generally speaking. फार करून, बहुधा.

Mōt, *n.* (मो)—(*pl.-s* मोझ्), a witty saying. शहाणपणाचें वचन, सुभाषित.

Mōte, *n.* (मोट्)—a particle of dust. अणु, रजःकण, कण. *M. in* (another's) *eye*, trifling fault if compared to one's own. 'दुसऱ्याच्या डोळ्यांतील कुसळ.' आपल्या दोषाच्या मानानें दुसऱ्याचा अतिशय क्षुद्र दोष, छिद्र.

Mŏth, *n.* (मॉथ्)—kinds of winged insect resembling butterflies ; (*fig.*) a person hovering around temptation. पिंगाणा, पतंग, कसर ; पतंगाप्रमाणें मोहांत गुरफटलेलो. *M.-eaten*, कसरीनें खाल्लेला ; जुना पुराणा, जुनाट. *Moth'y, a.* कसर लागलेलें.

Mo'ther, *n.* (म'दर्)—the female parent ; an old woman ; head of female religious community; apparatus for rearing chickens ; that which has produced or nurtured anything. आई, माता ; वृद्ध स्त्री, (खिस्ती धर्मातील) संतीण, महंतीण ; कोंबडीच्या पिलांना वाढविण्याचें यंत्र ; उत्पत्तिस्थान, मूळ. *a.* native, natural. जन्मसिद्ध. *v. t.* be mother of ; act as mother to. आईप्रमाणें होणें,-वाढवणें,-पाळणें ; मातृभाव दाखविणें. *M. country*, country in relation to its colonies. वसाहतींचा मूळ देश. *M. craft* skill in treatment of offspring. पिलांचीं,-मुलाबाळांची-निगा राखण्याचें कौशल्य. *M. earth*, भूमाता, भूमि ; जमीन. *M. of pearl*, मोत्यांचा शिंपला. *M. wit*, native wit, common sense. व्यवहारज्ञान, प्रज्ञा. *Mother's Day*, मातृदिन. *Mo'therless, Mo'therlike, aa.*, *Mo'therly, a.* मातृवत्, मातेप्रमाणें, मातृसदृश.

Mo'ther, *n.* (म'दर्)—(*M. of vinegar*) dregs or sediments of vinegar. गाळ, चिकटा, थर. *Mo'thery, a.*

Mo'therhŏŏd, *n.* (म'द्र्‌-हुड)—office or state of a mother, state of being a mother. आईपणा, मातृत्व.

Mo'ther-in-law, *n.* (म'द्र्‌-इन्‌-ला)—wife's mother, husband's mother. बायकोची किंवा नवऱ्याची आई, सासू.

Mo'ther-tongue, *n.* (म'द्र्‌-टग्‌)—one's native language; tongue from which others spring. मातृभाषा, जन्मभाषा, स्वभाषा; मूळभाषा, भाषाजननी.

Mōtif', *n.* (मोटी'फ्‌)—a distinct element or feature in a composition; ornament of lace etc. sewn separately on dress. लेखांतील,-निबंधांतील विशेष तत्त्व, विशेष गोष्ट,-मुद्दा; कपड्यावरील फितीनें शिवलेली शोभादायक आकृति,-बिल्ला.

Mō'tion, *n.* (मो'शन्‌)—moving; a gesture; proposal for action to be taken; evacuation of bowels. गति, चलन; अंगविक्षेप, सूचना; (कौन्सिला, केलेली) तोंडी विनंती, अर्ज; शौच, झाडा. *v.t. & i.* to make significant gesture; direct by gesture. खूण करणें, सूचना करणें, खुणेनें सांगणें. *In motion*, moving, not at rest. चालू झालेलें, सुरू झालेलें; अस्थिर. *To put in m.*, गति देणें, चालीस लावणें, सुरू करणें. *Mo'tional, Mo'tionless, aa.*

Mō'tive, *n.* (मो'टिव्ह्‌)—what impels a person to action, cause, object, intention. कारण, निमित्त, हेतु. *a.* productive of motion or action. चालक, प्रेरक, प्रेरणा देणारा, प्रवर्तक, गति देणारा. *v. t.* (also *mo'tivate*), supply a motive to, be the motive or motif of. प्रवृत्त करणें, (चा) हेतु किंवा उद्देश असणें, सहेतुक करणें. *Motiva'tion, Motiv'ity, nn., Mo'tiveless a.*

Mŏt'ley, *a.* (मॉ'ट्‌-लि)—parti-coloured; heterogeneous, diversified. अनेकरंगी, चित्रविचित्र; भिन्नगुणधर्मांचा. *n.* incongruous mixture; fool's particoloured dress. पंचभेळ मिश्रण; विदूषकाचा रंगीबेरंगी पोषाख. *To wear motley*, to play the fool. विदूषकाप्रमाणें वागणें.

Mō'tor, *n.* (मो'टर्‌)—what imparts motion; a machine supplying motive power, internal-combustion engine. चालक शक्ति; गाड्या चालविणारें यंत्र, गत्युत्पादक यंत्र. *a.* propelled by such machine. (मोटर बायसिकल,-बोट, गाडी वगैरे) यंत्रानें चालणारी. *v. i. & t.* to go, convey, by motor-car. मोटरगाडीनें जाणें,-नेणें. *M. man*, (अमेरिकेंत) विजेची गाडी हाकणारा. *Mo'torist, n.* a user of motor car. मोटर गाडींत बसणारा, मोटरगाडी चालविणारा.

Mō'tor-căr, *n.* (मो'टर्‌-कार्‌)—a motor carriage for use on roads. मोटार गाडी.

Mŏt'tle, *v. t.* (मॉ'टल्‌)—to make mottled. (वर निरनिराळ्या रंगाचे) डाग,-ठिपके देणें. *Mot'tled*, (मॉ'टल्ड्‌) *a.* showing colours in blotches. रंगीबेरंगी, रंगीबेरंगी ठिपक्यांचा.

Mŏtt'ō, *n.* (मॉ'टो)—(pl.-oes), a short sentence or phrase chosen for inscription or quotation. म्हण, कित्ता, आदर्शवचन.

Mou'jik, Muzhik, *nn.* (मू'झिक्‌)—Russian peasant; loose fur cape for ladies' wear. रशियांतील शेतकरी; स्त्रियांचा चिनचाह्यांचा सैल झगा.

Mould, *n.* (मोल्ड्‌)—loose earth; soil rich in organic matter; woolly fungous growth formed on moist surface; matrix in which metal is cast; form or character; gauge or pattern used in making mouldings. माती; खताची माती; बुरशी, कगशी; सांचा, ठसा; बनावट, स्वभाव; नमुना, सांचा, प्रतिमा, मूस. *v. t.* to form or shape according to a pattern. नमुन्याप्रमाणें बनविणें. *To become mouldy*, बुरशी येणें. *Man of mould*, mere mortal. केवळ मर्त्य (मनुष्य), क्षुद्र मानव.

Moul'der, *v. i.* (मो'ल्डर्‌)—to decay to dust; crumble away. माती होणें, मातीला मिळणें; झुरत जाणें, क्षीण होणें.

Moul'dĭng, *n.* (मो'ल्डिंग्‌)—a piece of ornament running along some line in a building. (भिंत दरवाजा वगैरेवरील) नक्षीदार कडा, कांठ, कंगोरा.

Moul'dȳ, *a.* (मो'ल्डि)—covered with mould; (fig.) stale, antiquated; (slang) dull, tiresome, boring. बुरसलेला; शिळा, जुनापुराणा; कंटाळवाणा, तापदायक. *n.* (naut. slang) torpedo. सुरुंग.

Moult, *v. t. & i. & n.* (मोल्ट्‌)—to shed feathers; to shed (feathers) in changing plumage. पिसें टाकणें; पंख गाळणें किंवा गळणें, (सापानें) अंगावरील कात टाकणें.

Mound, *n.* (माउन्ड्‌)—a heap or bank of earth, a bulwark, rampart. बांध, बंधारा, टेकडी, तट.

Mount, *n.* (माउन्ट्‌)—a mountain or hill (abbre. *Mt*, preceding name, as *Mt* Everest); (palmistry) fleshy prominence on palm of hand; a card on which a photograph &c. is mounted; a horse for person's use. पर्वत किंवा टेकडी; (हस्तसामुद्रिकांत) तळ हातावरील उंचवटा; फोटोग्राफ वगैरे ज्याच्यावर बसवतात तो पुट्ठा, नक्षी, चौकट; स्वारीचा घोडा. *v. t. & i.* to rise on high, to rise, to ascend, to go upwards; to climb on to. वर चढून जाणें, आरोहण करणें; चढणें किंवा चढवणें, घोड्यावर बसणें,-बसविणें, अढवणें, तयार करणें. *To m. a gem*, रत्न कोंदणांत बसविणें. *To m. guard* (*over*), पहाऱ्यावर जाणें, पहारा करणें. *To m. a play*, नाटक रंगभूमीवर आणणें.

Moun'tain, *n.* (मा'उन्टिन्)—a hill of impressive height; a large heap of something. पर्वत; मोठा ढीग. *Mountains high, M.-high*, very high. अतिशय उंच. *the M.*, पहिल्या फ्रेंच राज्यक्रांतींतील क्रांतिवादी वरचढ पक्ष. *M.-ash*, एक प्रकारचा वृक्ष. *M.-chain*, पर्वतांची रांग. *M.-sickness*, malady caused by rarefied m. air. पर्वतावरील विरळ हवेमुळें आलेला आजार. *M.-wine*, डोंगराळ द्राक्षांची दारू. *Mahomed & the m., Mahomed will go to the m.*, (phrases applied to) the pretender who is not abashed under exposure. ढोंग उघडकीला आलें तरी न शरमणारा ढोंगी मनुष्य (-याला उद्देशून).

Mountaineer', *n.* (माउन्टिनि'अर्)—a dweller in mountains, an inhabitant of a mountain, a mountain climber. पहाडी किंवा डोंगरी मनुष्य; पर्वतावर चढणारा, पर्वतारोहण करणारा.

Moun'tainous, *a.* (मा'उन्टिनस्)—abounding in mountains; huge. डोंगरी, डोंगराळ; भव्य, प्रचंड.

Moun'tebănk, *n.* (मा'उन्टिबँक्)—a quack discoursing and dispensing on platform in street &c.; a charlatan, a quack. स्वतःची जाहिरात करून औषधें विकणारा वैद्य, नाका डोळ्यांचा वैदू; ढोंगी थापेबाज मनुष्य.

Mourn, *v. t. & i.* (मोर्न्)—to be sorrowful or distressed; to grieve for the loss of, to show conventional signs of grief for a period after person's death. रडणें, खेद करणें; शोक करणें, सुतक पाळणें. *Mourn'er*, *n.* one who mourns; a person attending funeral. रडणारा, दुःखी, कष्टी; प्रेतयात्रेला जाणारा. *Mourn'ing*, *n.* lamentation; clothes worn in sign of bereavement. सुतक, दुःख, शोक; सुतकांत वापरण्याचे कपडे.

Mouse, *n.* (माउस्)—*(pl. mice)* kinds of small rodent; (slang) black eye. उंदीर; काळा डोळा. *v. i.* (माउझ्) (of cat or owl) to hunt for or catch mice; to search industriously, to prowl *about* in search of something. उंदरासाठीं लपून बसणें, उंदीर पकडणें; मन लावून शोधणें, एखाद्या गोष्टीसाठीं लपत छपत भटकणें. *Mous'er*, *n.* (मा'उझर्), a mouse-catcher, esp. cat. मांजर पकडणारा (-रें मांजर). *Mouse-ear*, hawk-weed and other plants. कांहीं जातीची वनस्पति. *M. trap*, उंदराचा पिंजरा,-सांपळा.

Mousse, *n.* (मूस्)—a dish of flavoured cream whipped and frozen. एक मलईदार पक्वान्न, थंडगार खाद्य.

Moustăche, *n.* (मुस्टा'श्)—the hair of the upper lip. मिशी.

Mouth, *n.* (माउथ्)—(*pl.* माउद्झ्), the cavity of the head used in eating and speaking; outfall of a river; (sl.) impudent talk. तोंड; मुख; उद्धट बोलणें,-भाषण, धिटाई. *v. t. & i.* (माउद्)—to grimace in speaking, touch with the mouth. बोलतांना तोंड वेडें वांकडें करणें, वेडावणें, डौलानें बोलणें; तोंड लावणें, खाणें, चघळणें. *M. waters at* (food). तोंडाला पाणी सुटतें. *Useless*, *m.*, रिकामटेकडा खाद्र (खान). *Put words into his m.*, त्याला काय म्हणावें तें शिकविणें, पढविणें. *Give m.*, (of dog) bark, bay. भुंकणें. (to be) *down in the m.*, dejected. खिन्न, दुःखी. *To make a wry mouth*, आंबट चेहरा करणें, नापसंतीदर्शक तोंड वेंगाडणें. *M.-filling*, bombastic, inflated. भव्य, डौलाचें, तोंड भरून. *M.-organ*, तोंडानें वाजविण्याचें अलगुजासारखें वाद्य. *Mouth'ed, Mouth'less*, *aa.*, *Mouth'ful*, *n.* घांस, ग्रास.

Mouth'piece, *n.* (मा'उथ्-पीस्)—part of pipe, musical instrument etc., placed between lips; a person commissioned to speak for others. चिलिमेची नळी; वाद्याची तोंडांत धरण्याची नळी, पिपाणी; दुसऱ्याच्या वतीनें बोलणारा.

Mouth'ў, *a.* (मा'उदि)—railing, ranting; bombastic. शिवीगाळ करणारा, मोठमोठ्यानें बोलणारा, डौलानें बोलणारा.

Mov'ables, *n. pl.* (मू'व्हबल्झ्)—personal property, goods, wares, commodities. स्वतःची मालमत्ता, सामानसुमान, चीजवस्त.

Move, *v. t. & i.* (मूव्ह्)—to change position, posture, place or abode; to stir or rouse; to affect with emotion; to propose as resolution. हालणें किंवा हालविणें, सरकणें, सरकवणें, कूच करणें, स्थानांतर करणें; चेतवणें, प्रवृत्त करणें; भावना उद्दीपित करणें; (ठराव) मांडणें. *n.* moving of piece at chess etc.; (*fig.*) a step or proceeding, movement. (प्यादें वगैरे) सरकवणें, हालविणें; पाऊल, पुढें जाणें. (*n.*) *On the move*, moving about. गडबड करणें, धांदल उडविणें. *To make a m.*, to go, esp. rise and go from dinner table etc. उठून जावयाला निघणें. *To get a m. on* (sl.), धांदल करणें. (*vb.*) *To move heaven & earth*, make every effort (*to* do). प्रयत्नाची शिकस्त करणें, आटोकाट प्रयत्न करणें. *The spirit moves me*, I feel inclined (*to* do). मन लागणें, मनांत असणें. *To m. about*, do this often. वारंवार करणें. *To m. in*, नवीन बिऱ्हाडांत राहण्यास जाणें. *To m. on*, पुढें सरकणें, निघून जाणें, घालवून देणें. *Mov'ing*, *a.*; *Mov'ingly*, *adv.*

Move'ment, *n.* (मू'व्ह्-मन्ट्)—motion, moving; combined endeavour; main division of a musical work. हालचाल, गति; चळवळ, गाण्यांतील कंप, मुख्य सूर.

Mo'ver, *n.* (मू'व्हर्)—source of motion; originator; proposer of motion. हालवणारा, गति देणारा, गतिदायक; प्रवर्तक, उत्पादक; ठराव मांडणारा. *Prime m.*, initial source of motive power, author of fruitful idea. मूळ गतिदायक; यशस्वी होणाऱ्या कल्पनेचा जनक.

Mov'ies, *n. pl.* (मू'व्हिझ्)—(sl.) cinema pictures. हालता सिनेमा, चित्रपट, चलचित्रपट.

Movie'tōne, *n.* (मुव्हि'टोन्)—combination of cinematograph and gramophone. बोलता चालता चित्रपट.

Mow, *n.* (माउ)—a stock of hay or corn; a wry face. वाळलेल्या गवताची किंवा धान्याची गंज; वांकुल्या. *M. burnt*, spoiled by becoming overheated in the *m.* गंजींत,-उडव्यांत-उबलेलें.

Mow, *v. t. & i.* (मो)-(*pa.p.* mowed; mown मोन्) to cut (grass, &c.) with a scythe or a machine; to cut down produce of (field) thus; to destroy sweepingly, cut *off* or *down* in great numbers. कोयतीनें किंवा दुसऱ्या यंत्रानें कापणें; शेत कापणें; कत्तल उडविणें, काटाकाट करणें. *Mow'er*, *n.* गवत कापणारा, गवत कापण्याचें यंत्र.

Mr, (मि'स्टर्)—title prefixed to name of man. 'श्रीयुत' (प्रमाणें नांवाच्या मागें लावण्याचा शब्द). *Mrs*, (मि'सिझ्) 'श्रीमती'.

Mŭch, *a.* (मच्)—a great amount of. पुष्कळ, फार, मुबलक. *pron.* a great deal; a great amount of something. पुष्कळसा भाग, बहुतांश. *adv.* to a great degree, by a great deal. पुष्कळसें, बहुत, फार. *Too much*, more than a match for. अतिशय प्रबळ, बलवत्तर. *Much of a size*, about the same size. जवळ जवळ त्याच आकाराचा. *Not m. of a scholar*, not a good scholar. चांगलासा विद्वान नाहीं. *Much'ly*, *adv.*; *Much'ness*, *n.*

Mū'cilage, *n.* (म्यू'सिलेज्)—viscous substance extracted from plant, adhesive gum. बलक, चिकट पदार्थ, चिकट गोंद, पेंगण. *Mucilag'inous*, *a.* चिकट, चिकण, बुळबुळीत.

Mŭck, *n.* (मक्)—farm-yard manure, dirt; (colloq.) anything disgusting; untidy or dirty state. शेताचें खत, शेण, घाण; किळसवाणी वस्तु; घाणेरडी स्थिति, घाणेरडेपणा, गबाळपणा. *v. t. & i.* to make dirty; to bungle, potter. घाणेरडें करणें, खराब करणें; अव्यवस्थितपणें करणें, बिघडविणें. *Muck'er*, *n.* अधःपात; गबाळ्या. *Muck'y*, *a.*

Mū'cus, *n.* (म्यू'कस्)—a thick fluid secreted by mucous membrane. इंद्रियमल, श्लेष्मा. *Mu'cous*, *a.*

Mŭd, *n.* (मड्)—mixture of earth with water; what is polluting. चिखल. *To fling, throw, mud*, बदनामी करणें. *Mud-guard*, चिखलापासून रक्षण करणारा, (सायकलला लावलेला) पत्र्याचा तुकडा. *M. pie*, 'पाय' पक्वान्नाप्रमाणें मुलांनीं केलेलें चिखलाचें खेळणें. *M. lark*, गटारें साफ करणारा मनुष्य, अपवित्र वस्तु.

Mudär', **Madär**, *n.* (मडा'र्)—E. Ind. shrub of which root bark is used in medicine and inner bark yields silky fibre. औषधी मुळ्यांची व आंतील साली्चे रेशमी तंतु निघणारी वनस्पति.

Mŭd'dle, *v. t. & i.* (म'डल्)—to bewilder esp. with drink; to bungle; to mix up; to carry on or put things through in haphazard way. (दारू पिऊन) निशा आणणें, गोंधळांत पडणें; घोंटाळा करणें; गोंधळ करणें. *n.* disorder. गोंधळ, अस्ताव्यस्तपणा, मनाचा घोंटाळा. *To make m. of*, to bungle. अव्यवस्था करणें, घोंटाळा करणें. *Muddle-headed (ness)*, stupid(ity). मूर्ख, मद्द (पणा). *To muddle through*, to attain one's end by no skill of one's own. अंगीं कौशल्य नसतां आपलें काम कसेंबसें करणें.

Mŭdd'ȳ, *a.* (म डि)—dirty with mud; (of water) abounding in mud, turbid. चिखलानें भरलेला; गढूळ. *v. t.* to make muddy. गढूळ करणें, चिखलानें भरणें. *Mudd'ily*, *adv.*; *Mudd'iness*, *n.*

Mŭff, *n.* (मफ्)—a cover (of fur, &c.) for the hands carried by women; a bungler, an unenterprising person. लोंकरीचे थंडीकरितां हातमोजे, हस्तवेष्टन; बिनधडाडीचा मनुष्य; मूर्ख-, बावळट, गबाळ्या मनुष्य. *v. t.* fail in, bungle; miss (catch, ball, chance, etc.). चांचपणें, चुकणें; सोडणें, संधि गमावणें. *Muff'ish*, *a.*

Mŭff'in, *n.* (म'फिन्)—kind of tea-cake eaten hot with butter, a light round cake. एक प्रकारची भाकर,-पोळी. *Muffineer'*, *n.* castor for sprinkling muffins with salt or sugar मीठ किंवा साखर पेरण्याचें भांडें (ज्यांतून तें पोळीवर थोडथोडें पाडतां येईल असें).

Mŭf'fle, *v. t.* (म'फल्)—to wrap up or cover close for warmth; to deaden sound by wrapping up. उबेकरितां गुंडाळणें, गुरफटवणें, झांकून घेणें, फडका वगैरे बांधून आवाज मंद करणें.

Mŭff'ler, *n.* (म'फ्-लर्)—a neck-wrap; a boxing glove; a felt pad to deaden sound between hammer and string of piano. गळपट्टा; खेळतांना मुष्टियुद्ध खेळतांना-घालण्याचा हातमोजा; (सतारीचा आवाज कमी करण्यासाठीं घातलेली) दशी.

Mŭf'tĭ, *n.* (म'फ्टि)—plain clothes worn by an official off duty; Mohammedan priest. अधिकाऱ्याचे (कामाव्यतिरिक्त घालण्याचे) साधे कपडे; (तुर्की) मुसलमानांचा धर्माधिकारी.

Mŭg, *n.* (मग्)—a drinking-vessel; (sl.) mouth or face; a person who mugs; a fool. पिण्याचें

भांडें, पानपात्र ; तोंड, चेहरा ; अति अभ्यास करणारा मनुष्य ; मूर्ख, वेडा मनुष्य. *v. i. & t.* to study hard. अतिशय अभ्यास करणें. *n.* अतिशय अभ्यास करणारा ; परीक्षा.

Mŭgg'ȳ, *a.* (म'गि)—(of weather etc.) warm and moist ; oppressive. उष्ण व दमट (हवा) ; उबान्याचा, अतिशय त्रासदायक.

Mŭg'wŭmp, *n.* (म'ग्वम्प्)—(U. S.) a great man, boss ; one who holds aloof from party politics. थोर मनुष्य, हुकूमशहा, अधिकारी ; राजकारणांतील तटस्थवृत्तीचा मनुष्य.

Norm'an, *n.* (नॉ'र्मन्)—a native of Normandy. नॉर्मंडींतील रहिवासी. *a.* of the Normans. नॉर्मन

Nougat, *n.* (नूगा)—sweet-meat of sugar, nuts, etc. टणक फळांची गोड इंग्रजी मिठाई.

Nought, *n.* (नॉट्)-not anything, nothing, figure 0; no number or quantity. शून्य, पूज्य ; शून्य संख्या. *come, bring, to n.*, be ruined or fail, ruin or baffle. नाश पावणें. व्यर्थ जाणें ; नाश करणें, फशी पाडणें. *To set at n.*, disregard, ridicule. अवमानणें, तुच्छ मानणें. *nn. & crosses*, child's game. लहान मुलांचा खेळ.

Noum'ĕnŏn, *n.* (नाउमिनॉन्)—(*pl.* -ena), object of intellectual intuition. बुद्धिग्राह्य वस्तु, अदृश्य तत्त्व, प्रकृति.

Noun, *n.* (नाउन्)—a word used as the name of a person or thing ; substantive. संकेत शब्द, संज्ञा ; नाम, विशेष्य.

Nou'rĭsh, *v. t.* (न'रिश्)—to sustain with food (*lit. & fig.*); to keep up (hope, resentment, &c.); to foster, to cherish. पालनपोषण करणें ; (आशा, राग) बाळगणें.-*ing*, *a.* पौष्टिक.

Nou'rĭshment, *n.* (न'रिश्-मेन्ट्)—sustenance, food, nutrition, nutriment ; nourishing. जीवन, आहार, पौष्टिकत्व ; पुष्टि.

Nous, *n.* (नाउस्)—the pure intellect ; (sl.) common sense, gumption. बुद्धिमत्ता ; व्यवहारज्ञान, सामान्यज्ञान.

Nŏv'el, *a.* (नॉ'व्हेल्)—of new kind ; strange ; hitherto unkonwn. नवीन, नवा, नवीन तऱ्हेचा ; अद्भुत, अलौकिक, विलक्षण ; अपूर्व. *n.* a fictitious prose tale of considerable length written to amuse reader. कल्पित गोष्ट, कादंबरी, कथा.

Nŏvelĕtte', *n.* (नॉव्हेले'ट्)—a short novel. लहान कादंबरी.

Nŏv'elĭst, *n.* (नॉ'व्हेलिस्ट्)—a writer of novels. कादंबरीकार, कल्पित गोष्ट-कथा-रचणारा.

Nŏv'elīze, *v. t.* (नॉ'व्हलाइझ्)—to convert (drama, facts) into a novel. कादंबरीचें रूप देणें.

Nŏv'eltȳ, *n.* (नॉ'व्हेल्टि)—a novel thing or occurrence, a new or strang thing. नवीन गोष्ट, नावीन्य, अपूर्वता, नवल, कौतुक.

Novĕm'ber, *n.* (नव्हें'बर्)—the eleventh month of the year. इंग्रजी वर्षाचा अकरावा महिना, नोव्हेंबर. [L *novem*, Sk. *navan*, nine]

Nŏv'ĭce, *n.* (नॉ'व्हिस्)—probationary member, probationer ; beginner, tiro. नवशिका ; नवा, नवीन.

Novĭc'iate, Novĭ'tiate, *n.* (नाव्हि'शिएट्)—period of being a novice ; a novice ; novice's quarters. उमेदवारीचा-नवशिकेपणाचा-काळ ; नवशिका; नवशिक्याची राहण्याची जागा.

Now, *adv.* (नाउ)—at the present time ; as the immediate past. आतां, यावेळीं, सांप्रतकाळीं ; नवा, नुकताच. *n.* this time, the present. चालू घडी, वर्तमानकाळ. *N. aday*, *a.* of now-a-days, आजकालचें, सद्यःस्थितीतलें. *From now*, इतःपर. *Just now*, नुकतेंच. *Till now*, आतांपर्यंत. *Every n. & again*, *N. & then*, वारंवार, केव्हां केव्हां, अधून मधून. *N. or never*, this is the nick of time. फक्त आतांच, ह्याच वेळीं.

Now'adays, *adv.* (ना'उ-अ-डे-झ्)—in our time ; as things are now. आजकाल; सद्यःस्थितींत. *n.* these times. सद्यःस्थिति, हल्लींचा काळ.

Nō'where, *adv.* (नो'वेअर्)—not in any place or state, at no place. कोठेंहि नाहीं. *N. else*, दुसऱ्या कोठेंहि नाहीं. *N. near*, not nearly. जवळ जवळ नाहीं. *To be come in n.*, not be placed in race or competition. (शर्यतींत) मुळींच न जिंकणें, फारच हरणें.

Nō'wīse, *adv.* (नो'वाइझ्)—in no way or manner or degree. कोणत्याहि प्रकारानें नाहीं.

Nŏ'xious, *a.* (नॉ'क्शस्)—harmful ; pernicious, unwholesome. अपकारक ; अहितकारक, उपद्रवी, वाईट.-*ly*. *adv.*,-*ness*, *n.* [L *noxa*, harm]

Nŏz'zle, *n.* (नॉ'झल्)—a terminal pipe, a pointed and bored piece (attached to a hose, &c.). तोंड, चोंच, दांडा.

Nū'ance, *n.* (न्यूआन्स्)—delicate difference in shade of meaning, feeling, colour, etc. अर्थ, भावना, रंग वगैरे मध्यें असलेला सूक्ष्म फरक.

Nŭbb'ĭn, *n.* (न'बिन्)—small imperfect ear of maize. मक्याचें लहान कच्चें कणीस.

Nū'bīle, *a.* (न्यू'बिल्)—(of women) marriageable, of an age suitable for marriage. लग्नाला योग्य, विवाहयोग्य. *Nubil'ity*, *n.* विवाहयोग्य दशा, विवाहयोग्यता.

Nū'clēus, *n.* (न्यू'क्लिअस्)—(*pl.-ei*) the central part or a thing around which others collect ; kernel ; the body of a comet. कोणत्याहि वस्तूचा मध्यभाग, केंद्रस्थान ; गर, खोबरें ; केतुनाभि, धूमकेतुकेंद्र.

Nūde, *a.* (न्यूड्)—naked, unclothed ; (law) void. नग्न, विवस्त्र ; पोकळ. *n.* picture or sculpture of nude. नग्नचित्र, नग्नपुतळा. *Nu'dist*, *a. & n.* विवस्त्र, नग्न (सांप्रदायाचा, सांप्रदायिक).

Nū'dĭtȳ, *n.* (न्यू'डिटि)—nakedness ; a specimen of the nude. विवस्त्रता, नागडेपणा, नग्नावस्था ; नग्न चित्राचा नमुना, नग्नमूर्ति,-पुतळा.

Nŭdge, *v. t. & n.* (नज्)—to push with the elbow to bespeak attention. लक्ष वेधण्याकरितां कोपरानें ढवचणें, लक्ष वेधणें, खुणावणें.

Nū'gatorȳ, *a.* (न्यू'गटरि)—futile, trifling ; inoperative, not valid. हलका, पोकळ, व्यर्थ, निष्फळ, निरर्थक ; अपरिणामकारक, अग्राह्य.

Notā'tion, *n.* (नोटे'शन्)—a marking or noting, representing (of numbers, quantities, &c.) by symbols ; any set of such symbols. खुणांनीं लिहिणें. अंकणी. अंकन ; परिपाठी. संकेतलिपी.

Nŏtch, *n.* (नॉच्)—a hollow cut, incision, V-shaped indentation on edge or convex surface ; run scored at cricket ; (U. S.) a defile, a pass. कातरा. खांच ; क्रिकेटमध्यें काढलेली धांव ; दरी, खिंड. *v. t.* to make notches in ; make specified score at cricket.–ला खापी. कातरे-पाडणें ; (क्रिकेटमध्यें) ठराविक धांवा काढणें. *Notch'y, a.*

Nōte, *n.* (नोट्)—a written sign representing single sound in music ; sign, characteristic ; a brief record of facts for speech, &c. (*usu. pl.*) ; comment on a passage in a book ; a short letter ; formal diplomatic communication ; eminence. स्वर, सूर; खूण, चिन्ह, लक्षण ; टिपणें, टांचणें ; स्पष्टीकरणार्थ टीपा ; चिट्ठी ; सरकारी माहितीपत्रक ; लौकिक, कीर्ति, प्रसिद्धि. *v. t.* to observe, to notice ; to set down as a thing to be remembered ; to annotate book etc. लक्ष लावणें ; ध्यानांत ठेवणें ; टिपून ठेवणें ; टिपणें लिहिणें. *Note-book*, स्मरणवही, नोंदवही. *N. paper*, (खाजगी) पत्रें लिहिण्याचा कागद. *A note of hand*, वचनचिठ्ठी. *Of note*, सुप्रसिद्ध, विशेष प्रसिद्ध. *Worthy of n.*, लक्षांत घेण्याजोगा. *To take n. of*, (कडे) लक्ष देणें, ध्यान ठेवणें. *To change one's n.*, to become suddenly more or less aggressive, humble, etc. (वृत्तींत) एकदम बदल होणें.

Nōt'ĕd, *a.* (नो'टेड्)—celebrated, well-known (for). प्रसिद्ध, नहशूर.

Nōte'book, *n.* (नो'ट्बुक्)—a book in which notes or memoranda are set down. टांचणवही, स्मरणवही.

Nōte'worthy̆, *a.* (नो'ट्-वर्दि)—deserving notice, worth remembering, remarkable. लक्षांत ठेवण्यासारखा, स्मरणीय.

No'thĭng, *n.* (न'थिंग्)—not anything, naught ; no amount, nought ; a thing of no importance. कांहींहि नाहीं ; शून्य, पूज्य, थोडेंसुद्धां नाहीं ; क्षुल्लक गोष्ट. *adv.* not at all ; in no way, in no degree. कांहींच नाहीं, अगदीं नाहीं. *Nothing at all*, not a bit. कांहींच नाहीं, मुळींच नाहीं. *Mere n.*, अगदीं क्षुल्लक वस्तु. (To get thing) *for n.*, gratis. फुकट, विनामूल्य. *Good for n.*, कुचकामाचा, कांहीं कामाचा नाहीं असा. *To go for n.*, व्यर्थ होणें. *Can make n. of*, cannot understand, find solution of, use, develop, or deal with. (चा) अर्थ न समजणें, उलगडा न होणें, उपयोग न होणें,–करणें. *Come to n.*, व्यर्थ जाणें, फसणें. *Nothing to*, compared with. शीं तुलना करतां. *Nothing venture nothing have*, साहसा-धाडसा-शिवाय कांहीं प्राप्त होत नसतें. *Dance on n.*, be hanged. फांसावर चढणें, फांशीं दिलें जाणें. *Fade away to n.*, disappear gradually. हळूहळू नाश पावणें. *N.-ness, n.* non-existence, worthlessness. शून्यता, अस्तित्वाभाव, तुच्छता, क्षुल्लक गोष्ट.

Nō'tĭce, *n.* (नो'टिस्)–an intimation, intelligence ; heed, attention ; a warning ; an announcement ; a newspaper review or comment. सूचना ; नजर, लक्ष, धोरण ; (जाहीर) खबर ; समालोचन, अभिप्राय, अवलोकन. *v. t.* to perceive, to take notice of ; to remark upon ; to give notice to. पाहणें, लक्षांत घेणें ; उल्लेख किंवा टीका करणें ; सूचना देणें. *N. board*, a board for posting notice on. सूचनापत्रकें लावण्याचा फळा ; जाहिरातींचा फलक, सूचनाफलक. *To come into n.*, attract attention. लक्ष वेधून घेणें. *Take no n. of*, विशेष सत्कार न करणें,–कडे लक्ष न देणें. *Take n. that*, I warn you that. सूचना देतों कीं. *Baby takes n.*, baby shows signs of intelligence. हुशारी-चलाखी-दाखविणें. *No'ticeable, a.* ; *No'ticeably, adv.*

Nō'tĭfy̆, *v. t.* (नो'टिफाय्)—to report, to give notice of ; to inform. जाहीर करणें, सूचना देणें ; कळविणें, बातमी देणें. *No'tifiable, a.* (of diseases) that must be notified to public-health authorities. आरोग्यखात्याला कळविण्याजोगा,–सूचना दिलीच पाहिजे असा. *No'tification, n.* प्रसिद्धीकरण, विज्ञापना, सूचना, जाहिरात. *No'tified, pa. p.* जाहीर केलेला, जाहीरनामा काढलेला.

Nō'tion, *n.* (नो'शन्)—concept ; idea, conception ; view, opinion ; an appliance, useful article. समज ; कल्पना, भावना ; उद्देश, मत, अभिप्राय ; साधन, उपयुक्त वस्तु, जिनसा. *No'tional, a.* काल्पनिक, कल्पित, तऱ्हेवाईक (मनुष्य).

Nōtogaea', *n.* (नोटाजीआ')—large zoological region, comprising the Australian, New Zealand, and Neo-tropical regions. ऑस्ट्रेलिया, न्यूझीलण्ड, व इतर उष्णकटिबंधांतील नवीन प्रदेशांतील मोठा प्राणिवर्गाचा प्रदेश. [Gk *notos*, south ; *gaia*, land]

Notor'ious, *a.* (नोटॉ'रिअस्)—known and talked of ; known to deserve an ill name, known for something discreditable. प्रसिद्ध, विख्यात ; डंका गाजलेला, कुप्रसिद्ध.*-ly, adv.* ; *Notori'ety, Notori'ousness, nn.* दुर्लौकिक, बोभाटा.

Nŏtwĭthstănd'ĭng, *prep. & adv.* (नॉट्-विद्-स्टॅंडिंग्)—in spite of ; nevertheless. असें असतांहि ; तथापि तरीसुद्धां.

nuncio's office ; tenure of it. पोपच्या वकिलाचे अधिकार, त्याची मुदत.

Nŭnc'ŭpāte, *v. t.* (नं'क्यूपेट्)—to declare, make will, by word of mouth only. तोंडी जाहीर करणें, तोंडी मृत्युपत्र करणें. *-tion,-tor, nn.;-tive, a.* तोंडचा, तोंडी, न लिहिलेला.

Nŭnn'erў, *n.* (न'नरि)—a convent of nuns. जोगिणींचा मठ.

Nŭp'tials, *n. pl.* (न'प्शल्स्)—wedding. लग्न, विवाह. *Nup'tial, a.* wed-lock or wedding. लग्नाचा, विवाहासंबंधीं.

Nŭrse, *n.* (नर्स्)—a woman who suckles another child, or has charge of a child ; a person trained for care of the sick. दाई, धात्री ; रुग्ण परिचारिका, जोपासणूक करणारी नर्स. *v. t. & i.* to suckle, to give a suck ; to act as a nurse to, to be a nurse ; to foment, to encourage, to rear, to nurture, to foster. दूध पाजणें ; रोग्याची शुश्रूषा करणें ; वाढविणें, प्रोत्साहन देणें. *Wet-nurse*, आंगावर पाजणारी दाई. *Dry n.*, लहान मुलांना नुसती संभाळणारी दाई. *N.-child*, दाईनें वाढविलेलें मूल. *N.-maid*, तरूण दाई. *Nursing home*, रुग्णालय, शस्त्रक्रिया वगैरे करण्याचें इस्पितळ.

Nŭrse'ling, *n.* (न'र्स्लिंग्)—one who is nursed, an infant (in relation to its nurse). तान्हें मूल, पाळ.

Nŭrs'erў, *n.* (न'र्सरि)—children's quarters ; plot of ground in which young plants are reared for transplantation ; fish-rearing pond ; place where animal life is developed. बालगृह, मुलांची खोली ; रोपें वाढविण्याची बाग ; मासे वाढविण्याचें तळें ; प्राणिसंवर्धनभूमि.

Nŭr'tūre, *n.* (न'र्चर्)—bringing up, fostering care ; food. पालनपोषण ; आहार, अन्न. *v. t.* to nourish, to bring up, to rear. पालनपोषण करणें, सुशिक्षित करणें, वाढविणें, संवर्धन करणें.

Nŭt, *n.* (नट्)—a fruit consisting of hard shell enclosing edible kernel ; a piece screwed on at the end of a bolt to secure it ; (sl.) head ; dandified young man ; block-head, lunatic ; (pl.) small lumps of coal. (नारळासारखें) कवचीचें किंवा टणक सालीचें फळ ; (बोल्टाची) चकती ; चाकी, फिरकी ; डोकें ; अक्कडबाज तरुण ; मठ डोक्याचा, वेडा ; (अने०) कोळशाचे लहान गोळे. *v. i.* to seek or gather nuts. फळें शोधणें, फळें गोळा करणें. *N.-brown*, coloured like ripe hazelnut (esp. of girl's complexion, & of ale). तांबूस (मुलीचा चेहरा, दारूचा रंग). *N.-cracker*, a bird, एक प्रकारचा पक्षी. *N.-crackers*, आडकित्ता. *N.-gall*, मायफळ. *N.-hatch*, एक लहान पक्षी. *N.-meg*, जायफळ. *N. shell*, कवची, करवंटी, करटी. *In a nutshell*, थोडक्यांत, संक्षेपानें. *N.-tree*, (हेझल्) झाड. *A hard n. to crack*, difficult problem, person or thing hard to deal with. कोडें, कठीण प्रश्न ; वस्ताद मनुष्य. *Off one's n.*, drunk or mad. झिंगलेला, वेडा.

Nūtā'tion, *n.* (न्यूटे'शन्)—nodding ; oscillation of the earth's axis. मान डोलावणें ; पृथ्वीच्या अक्षाचें आंदोलन, अक्षवलन.

Nŭt'mĕg, *n.* (न'ट्मेग्)—hard aromatic seed of an Indian tree (used as spice, &c.). जायफळ. *N.-grater*, जायफळ किसायची किसणी.

Nū'trĭa, *n.* (न्यू'ट्रिआ)—fur of a S.-Amer. rodent. द. अमेरिकेंतील कुरतडणाऱ्या प्राण्याची लोंकर.

Nū'trĭent, *a.* (न्यू'ट्रिअन्ट्)—serving as or conveying nourishment. पोषक, पौष्टिक.

Nū'trĭment, *n.* (न्यू'ट्रिमेन्ट्)—nourishing food, nourishment, food, aliment. पोषक पदार्थ, पौष्टिक द्रव्य.

Nūtrĭ'tion, *n.* (न्यूट्रि'शन्)—food ; nourishing, that which nourishes, nutriment. आहार, अन्न ; पोषण.

Nūtrĭ'tious, *a.* (न्यूट्रि'शस्)—efficient as food पौष्टिक.

Nū'trĭtĭve, *a.* (न्यु'ट्रिटिव्ह्)—nutritious. पौष्टिक.

Nŭtt'ў, *a.* (न'टि)—tasting of nuts ; (sl.) crazy (*upon*). कवचीचीं फळें खाणारा ; लोभी.

Nŭx vŏm'ĭcă, *n.* (नक्स् व्हॉ'मिका)—seed yielding strychnine, a drug containing it. काजरा, कुचला, काजरायुक्त औषध.

Nŭz'zle, *v. i. & t.* (न'झल्)—to work with the nose ; to burrow, press, rub, or sniff with the nose ; to nestle, lie snug. नाकानें चांचपणें,-उकरणें, हुसकणें ; नाक खालीं करून जाणें ; बिलगणें, चिकटणें.

Nўl'ghau, *n.* (नि'ल्गा)—a short-horned Indian antelope. आंखूड शिंगाचें सांबर.

Nўmph, *n.* (निम्फ्)—a semi-divine maiden of sea, mountain or wood ; a maiden, a damsel, a young and attractive woman. जलदेवता, वनदेवता ; अप्सरा, तरुण मोहक स्त्री.

Nўm'pholĕpsў, *n.* (नि'म्फलेप्सि)—rapt state induced by craving for the unattainable. अप्राप्य ध्येयाचें वेड,-ध्यास. *Nym'pholept, n.*

Nўmphomā'nĭa, *n.* (निम्फमे'निआ)—morbid & uncontrollable sexual desire in woman. कामोन्माद.

Nўstăg'mŭs, *n.* (निस्टॅ'ग्मस्)—disease with spasmodic movements of eyeballs. नेत्रविभ्रमरोग, डोळ्यावरची झांक.

Nŭgg'et, *n.* (न'गट्)—lump of gold. सोन्याची लगड, सोन्याचा पाट.

Nūis'ance, *n.* (न्यू'सन्स्)—source of annoyance, plague or pest ; an obnoxious act, circumstance, thing, or person. उपद्रव, पीडा ; उपाधि, जाच. *Commit no n.*, (notice to passengers not to defile place.) घाण करूं नका ! उपद्रव देऊं नका !

Nŭll, *a.* (नल्)—void, not valid ; expressionless ; non-existent. व्यर्थ, निरर्थक ; वावळट (मुद्रा), अस्तित्वांत नसलेलें. *n.* cipher, zero ; dummy letter in a cipher. पूज्य, शून्य ; शून्यांनीं लिहिलेलें कृत्रिम पत्र. *N. & void*, रद्द, निरर्थक.

Nŭll'ifȳ, *v. t.* (न'लिफाय्)—to neutralize ; to render void, to annul, to make invalid. नाहींसा करणें ; रद्द करणें, मोडणें, निरुपयोगी करणें. *Null'ification*, *n.*

Nŭll'itȳ, *n.* (न'लिटि)—lack of force or efficacy ; a non-entity. निरर्थकता, पोकळपणा ; अभाव, रद्दपणा.

Nŭmb, *a.* (नम्)—torpid ; deprived of sensation and motion ; paralysed. बहिरा, बधिर ; सुना, बेशुद्ध, गुंग, सुस्त ; जड. *v. t.* to make numb ; to stupefy, paralyse. बहिरा-सुस्त-करणें, बेशुद्ध करणें. *Num'bly*, *adv.* ; *Num'bness*, *n.*

Nŭm'ber, *n.* (न'म्बर्)—(written No, for numero=in number, with pl. Nos, before distinguishing figure, as house No 15, Nos 6-14), an aggregate word or symbol stating how many ; numbered issue of periodical, &c.; (*pl.*) groups of musical notes ; metrical feet ; verses ; (Gram.) class of word forms as singular, dual, plural. समुदाय ; संख्या, आंकडा; (मासिकाचा वगैरे) अंक ; (अने०) गायनाचे सूर ; छंदांतील चरण ; कविता, श्लोक ; वचन. *v. t.* to count ; to have or amount to a specified number ; to mark or distinguish with a number ; to have lived, live. गणणें, मोजणें ; अमुक एक संख्या असणें ; आंकडा, अंक,-घालणें, मांडणें, लिहिणें ; जगणें, जिवंत असणें. *To lose the n. of one's mess*, to die. मरणें. *One's n. goes up*, he dies. मरतो. Take care of *n. one*, oneself, स्वतः (आपण). (Story issued) *in nn.*, in parts. क्रमशः, प्रत्येक अंकांत क्रमाक्रमानें. *Back n.*, earlier issue of magazine ; (fig.) anything out of date. मासिकाचा, वर्तमानपत्राचा,-मागील अंक ; मागसलेली वस्तु,-गोष्ट. *without n.*, innumerable. असंख्य. *In n.*, संख्येनें. *His days* or *years are numbered*, तो लवकरच मरेल, त्याचें आयुष्य संपत आलें, त्याचे दिवस भरले. *Even n.*, सम संख्या. *Odd n.*, विषम संख्या. *Concrete nn.*, परिमाणवाचक संख्या. *Abstract nn.*, भाववाचक संख्या.

Nŭm'berless, *a.* (न'म्बर्-लेस)—innumerable. असंख्य.

Nū'merable, *a.* (न्यू'मरेबल्)—that may be numbered, countable. मोजतां येण्याजोगा, गणनीय.

Nū'meral, *n.* (न्यू'मरल्)—a word or figure denoting a number. संख्यावाचक शब्द. *a.* of or denoting a number. संख्येचा, संख्यावाचक.

Nūmerā'tion, *n.* (न्यू-मरे'शन्)—act or art of numbering ; conversion of numerals from symbols into words. गणणें, संख्येची मोडणी, संख्यावाचन. *N. table*, अंकांची उजळणी ; पाढा.

Nū'merātor, *n.* (न्यू'मरेटर्)—one who counts ; number above the line in vulgar fractions. मोजणारा ; अंश.

Nūmĕ'rĭcal, *a.* (न्यूमे'रिकल्)—of or denoting number, consisting in numbers. संख्येचा, संख्याविषयक, आंकड्यांचा, बहुसंख्य लोकांचा. *Nume'rically*, *adv.* संख्येनें, आंकड्यांनीं.

Nū'merous, *a.* (न्यू'मरस्)—comprising many units ; (with pl. noun) many. संख्येनें मोठा ; पुष्कळ, बहुत.

Nūmĭsmăt'ĭc, *a.* (न्यूमिझ्मॅ'टिक्)—of coins or coinage. नाण्यांचा, नाण्यासंबंधी. *Numismat'ics*, *n.* science and study of coins and medals. नाण्यांचें,-मुद्रांचें,-शास्त्र ; नाणकशास्त्र, मुद्राशास्त्र. *Numis'matist*, *n.* नाणकशास्त्रवेत्ता. *Numismatol'ogy*, *n.* (इतिहासोपयोगी) नाणकशास्त्र.

Nŭmm'arȳ, Nŭmm'ūlarȳ, *aa.* (न'मरि, न'म्यूलरि)-of, in, coin. नाण्यांचा, नाण्यांत. *Numm'ulite*, *n.* coin-shaped fossil shell. नाण्याच्या आकाराचा शिंपला.

Nŭm'mĕt, *n.* (न'मिट्)—(dial.) lunch. दुपारचें जेवण. [=*noon meat*]

Nŭm'skŭll, *n.* (न'म्स्कल्)—a dolt or his head. ढोंग्या, दगड, त्याचें (मठ्ठ) डोकें.

Nŭn, *n.* (नन्)—a woman living in a convent under a religious vow ; kinds of bird and moth. मठांत राहणारी विरक्त स्त्री, जोगीण, तपस्विनी ; पक्ष्यांची आणि पतंगांची एक जात. *Nun's cloth*, thin woollen stuff. पातळ, लोंकरीचें कापड. *N.'s thread*, fine white sewing cotton. शिवण्याचा पांढरा धागा, दोरा. *N.'s veiling*. thin dress stuff. पातळ वस्त्र. *Nun'-hood*, *Nun'-ship*, *n.* जोगीणपण, तपस्विनीपणा. *Nun'-like*, *Nun'nish*, *aa.*

Nŭn'buoy, *n.* (न'न्बॉय्)—a buoy circular in middle & tapering to each end. शंकूच्या आकृतीची तरती-तरंगणारी-खूण.

Nŭn'cĭō, *n.* (न'न्शिओ)—(pl.–*os*) Pope's envoy. पोपचा वकील. *Nun'ciature*, *n.* (न'न्शटयुअर्)

Obĭt'ūarў, *n.* (ऑबि'ट्यूअरि)—record of death; account of deceased person. मयतयाद; मृत्यु-लेख, मृत मनुष्याचें चरित्र. *a.* recording a death, concerning deceased person. मृत्यूसंबंधीं, मृत मनुष्यासंबंधीं.

Ob'jĕct, *n.* (ऑ'ब्जिक्ट्)—a material thing; a thing aimed at; end, purpose; (*Gram.*) a word governed by a transitive verb or preposition. वस्तु; विषय; हेतु, उद्देश, अभिप्राय; कर्म. *v. t.* & *i.* (ऑब्जे'क्ट) to state or offer reasons against; to announce opposition, to feel dislike or reluctance to. दोष काढणें; आक्षेप घेणें, तक्रार करणें, विरोध करणें. *Object glass* or *lens*, lens in telescope etc. nearest the object. पदार्थाजवळची कांच, पदार्थाभिमुख कांच. *O.-lesson*, वस्तुपाठ, विद्यार्थ्यांपुढें पदार्थ मांडून दिलेला धडा; प्रत्यक्ष अनुभव, व्यवहाराचा धडा.

Objĕc'tion, *n.* (ऑब्जे'क्शन्)—a fault found, objecting; thing objected; an adverse reason; an expression of disapproval. हरकत घेणें; नापसंत गोष्ट; आक्षेप, हरकत; नापसंती, तक्रार. *Objec'tionable*, *a.* open to objection; offensive. हरकत घेण्याजोगा, अग्राह्य, अपमानकारक.

Objĕc'tĭve, *a.* (ऑब्जे'क्टिव्ह्)—external to the mind; actually existing; (of person, writing, picture, etc.) dealing with outward things; (*Gram.*) constructed as or appropriate to the object. आधिभौतिक, इंद्रियग्राह्य, चित्तगोचर; अस्तित्वांत असलेला; बाह्यपदार्थविषयक, प्रत्यक्ष दिसणारा; कर्मपदविषयक. *n.* the objective case. द्वितीया. *Objec'tivism*, *n.* tendency to exalt the objective. आधिभौतिकाला थोर तत्त्व मानणें. *Objec'tivity*, *n.* इंद्रियग्राह्यता.

Objĕc'tor, *n.* (ऑब्जे'क्टर्)—one who objects. आक्षेप-हरकत-घेणारा. *Conscientious o.*, one who pleads conscience in order to be exempted from compulsory service, vaccination, etc. मनोदेवतेला पटत नाहीं म्हणून (आवश्यक) गोष्टीला हरकत घेणारा.

Ob'jurgāte, *v. t.* (ऑ'ब्जर्-गेट्)—to chide, to scold, to reprove, to reprehend. रागावणें, धमकावणें, खरडपट्टी काढणें.—*tion*, *n.* दोष देणें, रागावणें.-*tor*, *n.* दोष देणारा, इ०.-*tory*, *a.* दोषरूप, निंदारूप, कुत्सित.

Oblāte', *a.* (ऑब्ले'ट्)—(of spheroid) flattened at poles. दोन टोकांकडे चपटा, चापट, (गोल).

Ob'late, *n.* (ऑ'ब्लेट्)—person dedicated to monastic or religious life or work. (मठवासाला, धर्मकृत्याला) वाहिलेला किंवा अर्पण केलेला पुरुष, मूल (वगैरे).

Oblā'tion, *n.* (ऑब्ले'शन्)—a thing offered to God; a pious donation. बळी, देवोपहार; धार्मिक देणगी.-*al*, *a.*;-*tory*, *a.*

Ob'lĭgāte, *v. t.* (ऑ'ब्लिगेट्)—to put under legal obligation. (कर्तव्यानें, करारानें) बांधून टाकणें, गुंतवणें, उपकारबद्ध करणें.

Oblĭgā'tion, *n.* (ऑब्लिगे'शन्)—a binding agreement; a written contract or bond; service or benefit received. आवश्यकता, कर्तव्यता, कर्तव्य, बंधन; लेखी करार; उपकार, आभार. *Of o.*, obligatory. बंधनकारक, आवश्यक, मान्न. *To be, to put, under an o.*, उपकारबद्ध असणें,-उपकृत करणें. *To repay an o.*, उपकाराची फेड करणें.

Oblĭg'atorў, *a.* (ऑब्लि'गेटरि)—imposing duty, binding; not optional. बंधनकारक; आवश्यक, मान्न.

Oblīge', *v. t.* (ओब्ला'इज्)—to constrain, to compel, to require; to be binding on; to confer favour on; (pass.) to express gratitude (*to* person *for* small service). भाग पाडणें, करायला लावणें; बंधनकारक असणें; उपकार करणें; आभारी असणें.

Oblĭgee', *n.* (ऑब्लिजी')—(Law) person in whose favour obligor is bound. धनको, सावकार, कायद्यानें ज्याला दिलेंच पाहिजे असा.

Oblī'gĭng, *a.* (ओब्ला'इ-जिंग्)—ready to serve others; accommodating. उपकारशील; परोपकारी, उपकारी.-*ly*, *adv*;-*ness*, *n.*

Ob'lĭgor, *n.* (ऑ'ब्लिगॉर्)—a person legally bound to another. ऋणको, कायद्यानें देण्याला बांधलेला.

Oblique', *a.* (ऑब्ली'क्)—slanting; diverging from straight line or course; indirect or by allusion. कलता; तिरकस; वांकडा, पर्यायाचा. *v. i.* (esp. mil.) to advance obliquely. (सैन्य वगैरे) वांकडें,-तिरकें,-जाणें. *Oblique case*, (Gram.) a case other than nominative. प्रथमा किंवा संबोधन याखेरीज कोणतीहि विभक्ति. *O. oration* or *narration* or *speech*, indirect speech or as in reports. दुसऱ्याच्या भाषेंत सांगितलेला मजकूर,-बातमीपत्रांत सांगितलेला, मजकूर-हकीकत, परोक्षकथन. *Oblique'ly*, *adv*.

Oblĭq'uĭtў, *n.* (ऑब्लि'क्विटि)—deviation from morals, (*esp.*) moral perversity. वांकडेपणा, असदाचरण, नीतिभ्रष्टता.

Oblĭt'erāte, *v. t.* (ऑब्लि'टरेट्)—to make illegible; to efface. अस्पष्ट किंवा दिसेनासें करणें; पुसून टाकणें, नाहींसें करणें.-*tion*, *n.*

O

O, (ओ)—the fifteenth letter of the English alphabet. इंग्रजी वर्णमालेंतील पंधरावा वर्ण.

O, Oh, *int.* (ओ)—prefixed to vocative name (O), or expressing various emotions. अरे, रे; हो! अहो! हे!

Oaf, *n.* (ओफ्)—(pl.-*s, oaves*) awkward lout; misbegotten, deformed, or idiot child; elf's child. मूर्ख वेडाविद्रा माणूस; कुरूप, विद्रूप किंवा वेडसर मूल; घटला ठेवलेलें यक्षिणीचें मूल. *Oaf'ish, a.* मूर्ख, मह, गावढी.

Oak, *n.* (ओक्)—a forest tree with hard wood, acorns, and jagged leaves; its wood; (poet) wooden ships. ओक नांवाचें एक झाड, त्याचें लांकूड; लांकडी जहाजें. *Heart of oak*, शूर दांडगा मनुष्य; इंग्रज खलाशी. *Oak'en, a.* made of *oak*, ओकच्या पानांचा,-लांकडाचा केलेला. *Oak'ling, n.* ओकचा रोपटा. *The Oaks*, race at Epsom for three-year-old fillies. तीन वर्षांच्या घोड्यांची एप्सम् येथें होणारी शर्यत. *Oak-apple, -gall,-wart*, kinds of excrescence produced on oaks by gall-flies. ओक झाडावर किड्यांनीं उत्पन्न केलेला चीक, रस.

Oak'um, *n.* (ओ'कम्)—caulking-fibre got by picking rope to pieces. जुन्या दोरीचा काथ्या, सण. *To pick o.*, ताग पिंजणें, सण सोलणें. (कैद्यांना शिक्षा म्हणून हें काम पूर्वी देत.).

Oar, *n.* (ओअर्)—a bladed pole worked with both hands by one of the rowers of a boat; (with *good* etc.) an oarsman. पतिंगा, वल्हें; वल्हविणारा, वल्हें मारणारा, वल्हेकरी. *v. t. & i.* to row. वल्हविणें. *Chained to the o.*, constrained to work hard & long. दीर्घ श्रम करणें भाग असणें. *To pull a good o.*, चांगलें वल्हवितां येणें. *Put in one's o.*, interfere. दुसऱ्याच्या कारभारांत लुडबुड,-आगंतुकी,-करणें. *To have an o. in every man's boat*, लांडे कारभार करणें, लुडबुड करणें. *To rest on one's oo.*, to cease work for a time. कांहीं वेळ काम थांबविणें,-विश्रांति घेणें.

Oars'man, *n.* (ओअर्स्-मन्)—a rower. वल्हविणारा, वल्हेकरी. *Oarswoman, n.* वल्हविणारी स्त्री. *Oars'-manship, n.* skill in rowing. वल्हवण्याचें कौशल्य.

Oā'sĭs, *n.* (ओए'सिस्)—(*pl. oases*), fertile or green spot in desert. वाळवंटांतील ओलाव्याची किंवा हिरवळीची जागा.

Oast, *n.* (ओस्ट्)—a kiln for hops. सातू वगैरे पासून दारू गाळण्याची भट्टी. *O.-house*, भट्टीचा कारखाना, भट्टीघर.

Oat, *n.* (ओट्)—(*pl.*) grain grown for food; an oat-stem used as shepherd's musical pipe. एक प्रकारचें धान्य; पाव्याच्या उपयोगासाठीं ओट गवताचा बुंधा. *Oat-cake*, ओटची पातळ भाकरी. *O. meal*, ओटचें पीठ. *Oat'en, a.* made of oats or an oat-stem. ओटच्या पिठाचा किंवा बुंध्याचा केलेला. *To sow one's wild oats*, तारुण्यांतील ऐषआराम, चैन.

Oath, *n.* (ओथ्)—(*pl.* oaths ओद्झ्), confirmation of statement by naming of God or other power, name of God, &c. used profanely, imprecation. आणभाक, आण, शपथ (देवाची वगैरे). *To take an o., make* or *swear an o.*, शपथ घेणें. *On oath*, शपथेवर.

Obdūr'ate, *a.* (ऑब्-ड्यू'रेट्)—hardened against good or favour; stubborn कठोर; दुराग्रही, हट्टी. *Obdur'acy, n.*

Obē'dience, *n.* (ओबी'डिअन्स्)—obeying; submission; complying. आज्ञापालन; अधीनता; मानणें. *In o. to*, ला अनुसरून, वरून, प्रमाणें. *Passive o.*, विनशर्त आज्ञापालन.

Obē'dient, *a.* (ओबी'डिअन्ट्)—submissive to superior's will, dutiful, compliant. नम्र, आज्ञाधारक, ताबेदार, आज्ञांकित.

Obeis'ance, *n.* (ओबे'सन्स्)—a bow or curtsy; homage, act of respect. नमस्कार, नमन; मुजरा, वंदन. *Do, make, pay, o.*, नमस्कार, मुजरा, वंदन-करणें.

Ob'ĕlisk, *n.* (ऑ'बिलिस्क्)—a tapering stone shaft of rectangular section; obelus (mark in Ms. or book). मनोरा, स्तंभ; (†) अशी खूण.

Ob'ĕlize, *v. t.* (ऑ'बिलाइझ्)—to mark with obelus. (†) अशी खूण करणें.

Ob'ĕlus, *n.* (ऑ'बिलस्)—(*pl.-li*), mark placed against spurious word etc.; mark of reference (†). शब्द खोडण्यासाठीं केलेली — खूण; टीपदर्शक (†) अशी खूण.

Obēse', *a.* (ओबी'स्)—corpulent, fat. स्थूल, लठ्ठ, मांसल. *Obe'sity, n.* मेदोरोग, लठ्ठपणा.

Obey', *v. t. & i.* (ओबे')—to perform bidding of; to be obedient to. आज्ञा पाळणें; ०चें ऐकणें.

Ob'fuscāte, *v. t.* (ऑ'बफस्केट्)—to darken, obscure (mind etc.); to stupefy, bewilder. गुसदणें, अस्पष्ट करणें, दुर्बोध करणें; गोंधळांत पाडणें. *Obfusca'tion, n.* [L *ob*, near; *fuscus*, dark]

Ob'ĭit, *v. i.* (ऑ'बिइट्)—(abbr. *ob.*)—died (with date of death). (अमुक तारखेला) मेला.

Ob'ĭter dĭc'tum, *n.* (ऑ'बिटर् डि'क्टम)—(pl.-*ta*), casual remark, esp. judge's opinion expressed incidentally. सहजासहजीं केलेलें विधान, न्यायाधिशानें निकालाला अवश्य नाहीं असें सहज ओघानें केलेलें-निष्प्रयोजक-विधान.

Obit'uary, *n.* (ऑबि'ट्यूअरि)—record of death; account of deceased person. मयतयाद; मृत्युलेख, मृत मनुष्याचें चरित्र. *a.* recording a death, concerning deceased person. मृत्यूसंबंधीं, मृत मनुष्यासंबंधीं.

Ob'ject, *n.* (ऑ'ब्जिक्ट्)—a material thing; a thing aimed at; end, purpose; (*Gram.*) a word governed by a transitive verb or preposition. वस्तु; विषय; हेतु, उद्देश, अभिप्राय; कर्म. *v. t. & i.* (ऑब्जे'क्ट) to state or offer reasons against; to announce opposition, to feel dislike or reluctance to. दोष काढणें; आक्षेप घेणें, तक्रार करणें, विरोध करणें. *Object glass* or *lens*, lens in telescope etc. nearest the object. पदार्थाजवळची कांच, पदार्थाभिमुख कांच. *O.-lesson*, वस्तुपाठ, विद्यार्थ्यांपुढें पदार्थ मांडून दिलेला धडा; प्रत्यक्ष अनुभव, व्यवहाराचा धडा.

Objec'tion, *n.* (ऑब्जे'क्शन्)—a fault found, objecting; thing objected; an adverse reason; an expression of disapproval. हरकत घेणें; नापसंत गोष्ट; आक्षेप, हरकत; नापसंती, तक्रार. *Objec'tionable*, *a.* open to objection; offensive. हरकत घेण्याजोगा, अग्राह्य, अपमानकारक.

Objec'tive, *a.* (ऑब्जे'क्टिव्ह्)—external to the mind; actually existing; (of person, writing, picture, etc.) dealing with outward things; (*Gram.*) constructed as or appropriate to the object. आधिभौतिक, इंद्रियग्राह्य, चित्तगोचर; अस्तित्वांत असलेला; बाह्यपदार्थविषयक, प्रत्यक्ष दिसणारा; कर्मपदविषयक. *n.* the objective case. द्वितीया. *Objec'tivism*, *n.* tendency to exalt the objective. आधिभौतिकाला थोर तत्त्व मानणें. *Objec'tivity*, *n.* इंद्रियग्राह्यता.

Objec'tor, *n.* (ऑब्जे'क्टर्)—one who objects. आक्षेप-हरकत-घेणारा. *Conscientious o.*, one who pleads conscience in order to be exempted from compulsory service, vaccination, etc. मनोदेवतेला पटत नाहीं म्हणून (आवश्यक) गोष्टीला हरकत घेणारा.

Ob'jurgate, *v. t.* (ऑ'ब्जर्-गेट्)—to chide, to scold, to reprove, to reprehend. रागावणें, धमकावणें, खरडपट्टी काढणें.—*tion*, *n.* दोष देणें, रागावणें.-*tor*, *n.* दोष देणारा, इ०.-*tory*, *a.* दोषरूप, निंदारूप, कुत्सित.

Oblate', *a.* (ऑब्ले'ट्)—(of spheroid) flattened at poles. दोन टोकांकडे चपटा, चापट, (गोल).

Ob'late, *n.* (ऑ'ब्लेट्)—person dedicated to monastic or religious life or work. (मठवासाला, धर्मकृत्याला) वाहिलेला किंवा अर्पण केलेला पुरुष, मूल (वगैरे).

Obla'tion, *n.* (ऑब्ले'शन्)—a thing offered to God; a pious donation. बळी, देवोपहार; धार्मिक देणगी.-*al*, *a.*;-*tory*, *a.*

Ob'ligate, *v. t.* (ऑ'ब्लिगेट्)—to put under legal obligation. (कर्तव्यानें, करारानें) बांधून टाकणें, गुंतवणें, उपकारबद्ध करणें.

Obliga'tion, *n.* (ऑब्लिगे'शन्)—a binding agreement; a written contract or bond; service or benefit received. आवश्यकता, कर्तव्यता, कर्तव्य, बंधन; लेखी करार; उपकार, आभार. *Of o.*, obligatory. बंधनकारक, आवश्यक, प्राप्त. *To be, to put, under an o.*, उपकारबद्ध असणें,-उपकृत करणें. *To repay an o.*, उपकाराची फेड करणें.

Oblig'atory, *a.* (ऑब्लि'गेटरि)—imposing duty, binding; not optional. बंधनकारक; आवश्यक, प्राप्त.

Oblige', *v. t.* (ओब्ला'इज्)—to constrain, to compel, to require; to be binding on; to confer favour on; (pass.) to express gratitude (*to* person *for* small service). भाग पाडणें, करायला लावणें; बंधनकारक असणें; उपकार करणें; आभारी असणें.

Obligee', *n.* (ऑब्लिजी')—(Law) person in whose favour obligor is bound. धनको, सावकार, कायद्यानें ज्याला दिलेंच पाहिजे असा.

Obli'ging, *a.* (ओब्ला'इ-जिंग्)—ready to serve others; accommodating. उपकारशील; परोपकारी, उपकारी.-*ly*, *adv*;-*ness*, *n.*

Ob'ligor, *n.* (ऑ'ब्लिगॉर्)—a person legally bound to another. ऋणको, कायद्यानें देण्याला बांधलेला.

Oblique', *a.* (ऑब्ली'क्)—slanting; diverging from straight line or course; indirect or by allusion. कलता; तिरकस; वांकडा, पर्यायाचा. *v. i.* (esp. mil.) to advance obliquely. (सैन्य वगैरे) वांकडें,-तिरकें,-जाणें. *Oblique case*, (Gram.) a case other than nominative. प्रथमा किंवा संबोधन याखेरीज कोणतीहि विभक्ति. *O. oration* or *narration* or *speech*, indirect speech or as in reports. दुसऱ्याच्या भाषेंत सांगितलेला मजकूर,-वातमीपत्रांत सांगितलेला, मजकूर-हकीकत, परोक्षकथन. *Oblique'ly*, *adv.*

Obliq'uity, *n.* (ऑब्लि'क्विटि)—deviation from morals, (*esp.*) moral perversity. वांकडेपणा, असदाचरण, नीतिभ्रष्टता.

Oblit'erate, *v. t.* (ऑब्लि'टरेट्)—to make illegible; to efface. अस्पष्ट किंवा दिसेनासें करणें; पुसून टाकणें, नाहींसें करणें.-*tion*, *n.*

Obliv'ion, *n.* (ऑब्लि'व्हिअन्)—state of having or being forgotten, forgetfulness. विसर, विस्मृति, विस्मरण, अपराधाची माफी. *Act, Bill, of o.*, amnesty. (राजकीय गुन्हेगारांच्या) माफीचा कायदा,-ठराव. *To fall into o.*, be forgotten or disused. विसरून जाणें, प्रचारांतून जाणें.

Obliv'ious, *a.* (ऑब्लि'व्हिअस्)—forgetful, unmindful (*of*); (poet.) of, inducing, oblivion. विसराळू, विसरणारा; विस्मरणाचा, विसर पाडणारा, विस्मृतिकारक.*-ly, adv.;-ness, n.*

Ob'lŏng, *a.* (ऑ'ब्लॉग्)—rectangular, greater in breadth than height. लांबोडा, दीर्घ, चतुरस्र (आयत, आकृति, गोल, कागद, पुस्तक, इ.).

Ob'loquy̆, *n.* (ऑ'ब्लॉकि)—abuse, detraction. निंदा, मानहानि.

Obmūtes'cence, *n.* (ऑब्म्यूटे'सन्स्)—obstinate silence. हट्टी मौन, अभाषण.*-cent, a.*

Obnŏ'xious, *a.* (ऑब्नॉ'क्शस्)—offensive, objectionable; disliked, liable to harm or evil (rare). चीड आणणारा, आक्षेपार्ह; नावडा, अनिष्ट; पीडा होण्याला पात्र, दुःख होण्यासारखा.

O'boe, *n.* (ओ'बॉय्)—a wooden double-reed wind instrument, hautboy; organ reed-stop of penetrating tone. उंच आवाज देणारें वाद्य; वाजाच्या पेटींतील उंच स्वराची खुंटी.

O'bol, *n.* (ऑ'बल्)—ancient Greek silver coin (=11d). जुनें ग्रीक चांदीचें नाणें.

Obscēne', *a.* (ऑब्सी'न्)—inauspicious, ill-omened, indecent; lewd. बीभत्स, विचकट; अभद्र. *-ly, adv.*; *Obsce'nity, n.* बीभत्सपणा, दुर्भाषण.

Obscūr'ant, *n.* (ऑब्स्क्यू'अरन्ट्)—opponent of enlightenment. सुधारणाशत्रु, ज्ञानप्रसारशत्रु, अज्ञानप्रिय.*-ism, n.* ज्ञानांधकारप्रियता.*-ist, n.*

Obscūra'tion, *n.* (ऑब्स्क्यूरे'शन्)—an act of darkening; (Astron.) occultation, eclipse. दिसेनासा करणें, झांकून टाकणें; कालिमा, ग्रहण.

Obscūre', *a.* (ऑब्स्क्यू'अर्)—dark, indistinct; hidden, undistinguished; not perspicuous. अंधुक, अस्पष्ट; गूढ, अव्यक्त, अप्रसिद्ध; दुर्बोध. *v. t.* to make obscure or invisible, to make less intelligible. स्पष्ट दिसेनासा करणें, दुर्बोध करणें. *Obscur'ity, n.* अस्पष्टपणा, दुर्बोधता.

Obsecrā'tion, *n.* (ऑब्सिक्रे'शन्)—earnest entreaty. विनंति, प्रार्थना, विनवणी.

Ob'sequies, *n.* (ऑ'ब्सिक्विझ्)—funeral. उत्तरक्रिया, प्रेतसंस्कार. *Obse'quial, a.* और्ध्वदेहिक, उत्तरक्रियेचा,-क्रियेसंबंधी.

Obsē'quious, *a.* (ऑब्सी'क्विअस्)—servilely or meanly compliant, fawning, servile, obedient. आर्जवी, खुशामत्या; आज्ञाधारक, कर्तव्यतत्पर. *-ly, adv.,-ness, n.*

Observ'ance, *n.* (ऑब्झ'र्व्हन्स्)—keeping or performance (of law, observance, etc.); rite, ceremonial act. पालन, अनुष्ठान; विधि, उपचार, मत, नियम, व्रताचरण.

Observ'ant, *a.* (ऑब्झ'र्व्हन्ट्)—good at observing or observation. बारकाईनें पाहणारा, निरीक्षक, आचरणारा.*-ly*, adv.

Observā'tion, *n.* (ऑब्झर्व्हे'शन्)—noticing or being noticed, observance, watching; comment, remark, statement. पाहणें, लक्ष; निरीक्षण, ताऱ्यांचे वगैरे वेध; टीका, मत, विचार, अभिप्राय, प्रत्यक्ष मत. *O.-car,-platform*, in train, esp. in U. S., so built as to give good views. देखावा पाहतां येण्यासारखा, आगगाडींतील डबा, व्यासपीठ, उंचवट्यांचा भाग.

Observ'atory̆, *n.* (ऑब्झ'र्व्हेटरि)—building for astronomical observation. वेधशाळा, ग्रहनक्षत्रादिदर्शनस्थान.

Observe', *v. t. & i.* (ऑब्झ'र्व्ह्)—to keep, to follow, to adhere to; to perceive, to watch, to take notice of; to say by way of comment. पाळणें, अनुसरणें, आचरणें; पाहणें, नजरेस येणें; टीकात्मक बोलणें, टीका करणें. *The observed of all observers*, person etc. on whom etc. attention is concentrated. सर्वांचें लक्ष वेधून घेणारा मनुष्य इ. *Observ'able, a.*

Observ'er, *n.* (ऑब्झ'र्व्हर्)—one who observes, person carried in aeroplane to note enemy's position, etc. निरीक्षण करणारा, विमानांतून शत्रूची टेहळणी करण्यास जाणारा.

Obsĕss', *v. t.* (ऑब्से'स्)—to haunt, to beset, to fill the mind of. वस्ती करणें, भूतसंचार होणें, पाठ पुरवणें, छळणें; मनांत असणें. *Obse'ssion, n.* घेरणें, पछाडणें, वेधणें. *Obsessed by, with*, नें पछाडलेला, व्यग्र झालेला.

Obsĭd'ian, *n.* (ऑब्सि'डिअन्)—a vitreous lava. कांचेसारखा ज्वालामुखीचा रस.

Obsolĕs'cent, *a.* (ऑब्सोले'सन्ट्)—becoming obsolete, gradually disappearing. प्रचारांतून जात चाललेला; हळूहळू लुप्त होणारा.*-cence, n.*

Ob'solēte, *a. & n.* (ऑ'ब्सालीट्)-disused, discarded, gone out of use, out of date. व्यवहारांतून गेलेला, अप्रचलित, मागें पडलेला (मनुष्य, वस्तु). *Ob'soleteness, n.*

Ob'stacle, *n.* (ऑ'ब्स्टेकल्)—hindrance, impediment; obstruction. विघ्न, हरकत, आडकाठी, अडचण; व्यवधान, विघात. *O. race*, one in which artificial or natural obstacles have to be passed. अडचणींची-अडथळ्यांची-शर्यत.

Obstĕt'ric,-ĭcal, *a.* (ऑब्स्टे'-ट्रिक्,-ट्रिकल्)-of midwifery, or child-birth as a branch of medicine and surgery. सुईणपणाचें, स्त्रियांच्या प्रसूतीसंबंधीं, बाळंतपणाचें. *Obstet'rics*, *n.* सुइणीचा धंदा, प्रसूतीशास्त्र. *Obstretri'cian*, *n.*

Ob'stĭnate, *a.* (ऑ'ब्स्टिनेट्)—self-willed, stubborn, intractable, not easily subdued. हट्टी, दुराग्रही, हेंकट.-*ly*, *adv.*; *Ob'stinacy*, *n.* हट्ट, हेंकटपणा, दुराग्रह.

Obstrĕp'erous, *a.* (ऑब्स्ट्रे'परस्)—noisy, wild, clamorous, vociferous. गलबला, गडबड्या, आरडाओरड करणारा.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.* [L *ob*, & *strepere*, to make noise]

Obstrŭct', *v. t. & i.* (ऑब्स्ट्र'क्ट्)—to block up; to retard or prevent the progress of. अडवणें, बंद करणें; अडथळा करणें.

Obstrŭc'tion, *n.* (ऑब्स्ट्र'क्शन्)—hindrance, obstacle, bar or barrier, impediment. अडथळा, विघ्न, हरकत, आडकाठी, प्रतिबंध. *O. guard*, bar fixed before locomotive to remove *oo.* गाडीच्या डब्याच्या पुढला अडथळे दूर करण्याचा आडवा दांडा. *Obstruc'tionist*, *n.*

Obstrŭc'tĭve, *a.* (ऑब्स्ट्र'क्टिव्ह्)—causing delay, or obstruction. हरकत करणारा, अडविणारा.

Obtain', *v. i. & t.* (ऑब्टे'न्)—to acquire; to get, to have granted; to be in vogue, to be received in common use. संपादणें; मिळणें, मिळवणें; चालणें, चालू असणें, रूढ असणें.-*able*, *a.* प्राप्य, लभ्य, मिळण्याजोगा.

Obtrude', *v. t.* (ऑब्ट्रू'ड्)—to thrust importunately forward, (*upon*, or *on* person or his attention), to force into any place. घुसवणें, बळेंच पदरीं बांधणें, घुसडविणें. *Obtrus'ion*, *n.* अडथळा, पुढें घुसणें, लांडा कारभार. *Obtru'sive*, *a.*,-*ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Ob'tūrāte, *v. t.* (ऑ'ब्ट्यूरेट्)—to stop up, seal. बंद करणें, थांबविणें.-*tor*, *n.* obturating appliance. (सील-) बंद करण्याचें साधन.

Obtūse,' *a.* (ऑब्टयू'स्)—of blunt form; not pointed; greater than one right angle and less than two; dull, slow of perception, stupid, wanting in sense. बोथट; टोंक नसलेला; विशाल कोन; जड, मतिमंद.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.*

Ob'verse, *n.* (ऑ'ब्व्हर्स्)–the side of a coin or medal that bears the head or principal design; the front or top side of a thing; counter-part of a fact or truth. नाण्याची-मुखवट्याची-बाजू; कोणत्याहि वस्तूची वरील बाजू; दुसरी-उलटी-बाजू. *a.* narrower at base than at apex; answering as counter-part. वरच्यापेक्षां खालचा भाग अरुंद असलेला; दुसऱ्या बाजूचा.-*ly*, *adv.*

Obvert', *v. t.* (आब्व्ह'र्ट्)—(log.) to infer another proposition with contradictory predicate by changing quality of (proposition). (तर्क०) प्रतियोगाचें अनुमान काढणें. *Obver'sion*, *n.* प्रतियोग.

Ob'vĭāte, *v. t.* (ऑ'ब्‌-व्हिएट्)—to clear away' to get over; to remove, to get rid of; to prevent. दूर करणें; निवारणें, घालवणें; टाळणें.

Ob'vĭous, *a.* (ऑ'ब्व्हिअस्)—seen or realized at the first glance; evident, manifest. सुव्यक्त; स्पष्ट, उघड, प्रत्यक्ष.-*ly*, *adv.* स्पष्टपणें, उघडपणें, सकृद्दर्शनीं;-*ness*, *n.* [L *ob viam*, in the way;-ous]

Ocari'na, *n.* (ऑकरी'ना)—an egg-shaped musical wind instrument. अंडाकृति वाद्य.

Occā'sion, *n.* (आके'झन्)—suitable juncture, opportunity; reason; time marked by a special occurrence; (pl.) affairs, business. योग्य संधि, अवसर; निमित्त, कारण; प्रसंग; धंदा-उद्योग, कामें. *v. t.* to cause, esp. incidentally, to bring about. उपस्थित करणें, उत्पन्न करणें, उत्पादन करणें, घडवून आणणें. *To take o.*, avail oneself of opportunity to do. निमित्त,-संधी,-साधणें. *To take o. by the forelock*, संधी वाया न दवडणें, अडचणीची आगाऊ तरतूद करणें. *To give o. to*, कारण करून देणें, कारणीभूत होणें. *To go about* one's *lawful oo.*, सनदशीर,-कायदेशीर, -कामकाज पाहणें. *To rise to the o.*, to show requisite energy etc. प्रसंगीं योग्य तें आचरणें, प्रसंगीं योग्य धैर्य दाखविणें. (*Up*) *on o.*, whenever need arises, now & then. प्रसंगविशेषीं, प्रसंगोपात्त.

Occā'sional, *a.* (आके'झनल्)—occurring at times, not regular; incidental. कधींमधींचा; नैमित्तिक. प्रसंगविशेषाचा, आगंतुक, प्रसंगप्राप्त.-*ally* *adv.* sometimes, intermittently. कधीं कधीं, मधून मधून. *Occa'sional cause*, प्रासंगिक,-निमित्त,-कारण. *O. licence*, licence to sell liquor only at specified times & places. ठरावीक वेळीं व ठिकाणीं दारूविक्रीचा परवाना, प्रासंगिक परवाना.

Occā'sionalism, *n.* (आके'झनॅलिझम्)—doctrine that volition and sensation are connected with the following & preceding material phenomena not casually but as separate productions of God on the same occasion. प्रासंगिक कारणवाद.

Oc'cident, *n.* (ऑ'क्सिडन्ट्)—the west. पश्चिम. *The Occident*, western Europe, Europe. पश्चिम युरप, युरपखंड. *Occident'al*, *a.* पाश्चात्य, पश्चिमेकडचा. *Occident'alism*, *n.* पाश्चात्य लोकांच्या संबंधी, रीतिभाति, वगैरे. *Occident'alize*,

v. t. पाश्चात्य सुधारणा वगैरे सुरू करणें. *Occident'alist, n.* पाश्चात्य बनलेला पौर्वात्य, पाश्चात्य भाषाप्रवीण.

Oc'cĭput, *n.* (ऑ'क्सिपट्)—back of head. डोक्याचा मागला भाग, मस्तकाचा पृष्ठभाग. *Occip'ital, a.*

Occŭlt', *a.* (ऑक'ल्ट्)—esoteric ; recondite ; mystical ; (Astron.) hidden गुह्य, गहन ; गूढ ; गुप्त, अप्रसिद्ध. *v. t.* (Astron.) to hide by passing in front of. (नक्षत्रें,-ग्रह यांवरून चंद्र जाऊन त्यांना) झांकून टाकणें, गुप्त करणें, पिहित करणें. *Occulting light* in light house, one that is cut off at regular intervals. दीपगृहाच्या फिरत्या दिव्याचा मधून मधून तुटक दिसणारा उजेड. *Occulta'tion, n.* (Astron.) पिधान, तिरोधान, झांकून टाकणें.

Occ'ŭpant, *n.* (ऑ'क्युपन्ट्)—a person holding piece of property or office ; one who resides in, or is in, a place. भोगणारा, व्यापणारा ; राहणारा, वहिवाटणारा. *Occ'upancy, n.* वस्ती, भोग, ताबा, वहिवाट.

Occŭpā'tion, *n.* (ऑक्युपे'शन्)—a calling or employment ; possession. धंदा, उद्योग ; ताबा, व्यापणें, वहिवाट, काम. *Army of o.*, army left to hold occupied region till regular government is set up. नवीन काबीज केलेल्या मुलखांत शांततारक्षणासाठीं ठेवलेलें तात्पुरतें सैन्य. *O. franchise*, right to vote as tenant. भाडेकरू या नात्यानें मतदानाचा हक्क. *O. bridge,-road*, private for use of occupiers of land. केवळ स्थानिक रहिवाशांसाठींच असलेला पूल,-रस्ता.

Occ'ŭpīer, *n.* (ऑ'क्युपायर्)—a person in possession of land, house etc., holder. जमीन, घर वगैरे वापरणारा, वहिवाटदार, राहणारा, भाडोत्री, कूळ.

Occ'ŭpȳ, *v. t.* (ऑ'क्यु-पाय्)—to take military possession of ; to reside in ; to hold (an office) ; to take up, to fill, to be in ; to busy, to keep engaged. बलात्कारानें-जिंकून-व्यापणें, ताब्यांत घेणें ; आंत राहणें ; हुद्दा धारण करणें ; व्यापणें, भरणें, व्यग्र असणें, गुंतलेला असणें. *Occ'upied, o.* oneself, *with or in*, व्यग्र असणें, गुंतून जाणें.

Occur', *v. i.* (ऑक'र्)—to be found here and there ; to come into one's mind ; to take place, to happen. कोठेंतरी आढळणें ; मनांत येणें, सुचणें ; घडणें, उपस्थित होणें. *It occurs* or *occurred to me that*, मला असें सुचतें, आठवतें इ०.

Occu'rrence, *n.* (ऑक'रन्स्)—happening ; any incident or accidental event. घडून येणें ; घडलेली गोष्ट, वृत्तांत. *Is of frequent o.*, often occurs. वारंवार घडतें, घडून येतें.

O'cean, *n.* (ओ'शन्)—great body of water surrounding the land of the globe ; the sea ; immense quantity of (often oo. *of*). महासागर ; समुद्र, दर्या ; विस्तीर्ण प्रदेश, अति मोठी संख्या. *Ocean greyhound*, a swift passenger liner. उतारू नेणारी जलद आगबोट. *O. lane*, आगबोटींचा ठराविक जलमार्ग. *O. tramp*, मालाची बोट. *Ocean'ic, a.* of the ocean. महासागराचा ; अति विस्तीर्ण, फार मोठा.

Ocē'anĭd, *n.* (ओसी'अनिड्)—(*pl.*-*s*, or -*e'nides*), ocean nymph of Greek mythology. ग्रीक लोकांची जलाप्सरा, जलदेवता.

Oceanŏ'graphy, *n.* (ओशनॉ'ग्रफि)—physical geography of the ocean. समुद्ररचनेचें शास्त्र.

O'cĕlot, *n.* (ओ'सिलट्)—S.-Amer. feline animal resembling leopard. चित्त्यासारखें द. अमेरिकेंतील जनावर.

O'chre, *n.* (ओ'कर्)—kinds of earth used as pigments ; pale brownish yellow colour. काव, गेरू, पिवळी माती ; भगवा रंग. *O'chrous, a.* काविचा ; भगवा. [Gk *okhros*, yellow]

Oc'tagon, *n.* (ऑ'क्टगॉन्)—a plane figure with eight angles and eight sides. अष्टकोनाकृति, अष्टकोन.-*al, a.*

Octahĕd'ron, *n.* (आक्टहे'ड्रन्)—a solid figure contained by eight plane faces, and usually by eight triangles. (बहुधा त्रिकोणाकृति) आठ बाजू असलेली घनाकृति, अष्टफलक. -*ral, a.* आठ बाजू असलेला, अष्टफलकाकृति.

Oc'tant, *n.* (ऑ'क्टन्ट्)—a half-quadrant. वर्तुळाचा आठवा भाग, अष्टमांश (४५ अंशाचा).

Oc'tave, *n.* (ऑ'क्टिव्ह्)—the day week of a festival, the eight days including festival and its day week ; (Mus.) an eighth or an interval of eight sounds ; a group or stanza of eight lines ; group of eight ; a wine cask holding 13½ gal. उत्सवाच्या आठवड्याचा पहिला दिवस, उत्सवाचा दिवस व आठवडा ; आठ सुरांपैकीं एक, आठ सुरांमधील विराम ; आठ ओळींची कविता ; आठांचा समुदाय ; १३½ गॅलनचें दारूचें पिंप.

Octā'vō, *n.* (ऑक्टे'व्हो)—(*abbr.* 8vo), (size of book) a book of which each sheet is folded into 8 leaves or 16 pages. अष्टपत्री, अष्टपृष्ठी, (पुस्तक).

Octĕnn'ial, *a.* (ऑक्टे'निअल्)—lasting, recurring every, eight years. आठ वर्षांचा, आठ वर्षें टिकणारा, दर आठ वर्षांनीं येणारा, प्रत्यष्टाब्दिक.

Octĕt', *n.* (ऑक्टे'ट्)—(composition for) eight singers or players ; group of eight lines, esp.

the first eight of sonnet. आठ गायक किंवा वाद्क (त्यांसाठीं पद्य); (चतुर्दशकाच्या किंवा सुनीताच्या) पहिल्या आठ ओळी.

Octo'ber, *n.* (ऑक्टो'बर्)—the tenth month of the English year. इंग्रजी वर्षाचा दहावा महिना. [L *octo*, eight, eighth from *March*, the first month of the Roman year]

Octodo'cĭmō, *n.* (ऑक्टाडे'सिमो)—(*abbr.* 18mo), book of which each sheet in folded into 18 leaves or 36 pages. अठरा पानांच्या साच्याचें पुस्तक, अष्टादशपत्री पुस्तक.

Octogenar'ian, *a.* & *n.* (ऑक्टाजिने'अरिअन्)—eighty-year old (person); of such person. ऐंशीं वर्षांचा (मनुष्य); अशा मनुष्याचा.

Oc'tŏpus, *n.* (ऑ'क्टपस्)—(*pl.-uses*), mollusc with eight suckered arms round mouth; (fig.) formidable power. अष्टपाद् प्राणी, तोंडाभोंवतीं आठ पाय असलेला गोगलगाईच्या वर्गाचा मांसल प्राणी; प्रचंड शक्ति. [Gk *octo*, eight, *pous*, foot]

Octoroon', *n.* (ऑक्टोरू'न्)—offspring of quadroon and white; person of one-eighth negro blood. नीग्रो व युरोपियन यांच्या मिश्र रक्ताची प्रजा; अष्टमांश नीग्रो रक्ताचा मनुष्य.

Octosyll'able, *n.* (ऑक्टासि'लेब्ल्)—verse of eight syllables. अष्टावयवी कवितेची ओळ. *Octosyllab'ic, a.*

Oc'troi, *n.* (ऑ'क्ट्रॉ)—duty on goods entering town, place where, officials by whom, it is levied. म्युनिसिपालिटीची आयात मालावरील जकात, चुंगी; नाका, जकात बसविणारे अधिकारी.

Oc'ūlar, *a.* (ऑ'क्यूलर्)—of, for, or with the eyes or sight; visual. डोळ्यांचा, दृष्टीचा; दृष्टिविषयक, दृग्गोचर, प्रात्यक्षिक. *n.* सूक्ष्मदर्शक वगैरे यंत्र. *O. demonstration*, प्रत्यक्ष प्रमाण.

Oc'ūlist, *n.* (ऑ'क्यू-लिस्ट्)—an eye-specialist. नेत्रवैद्य.

Odd, *a.* (ऑड्)—not even, not divisible by two; additional; casual; extraordinary, strange. विषम, दोन या संख्येनें भाग न जाणारा; जास्ती, अधिक; नैमित्तिक, फुटकळ, किरकोळ; विलक्षण, तऱ्हेवाइक. *n. pl.* (often treated as *sing.*) inequalities; difference; variance, strife; chances in favour of some result. विषम वस्तु; फरक, अंतर; वितुष्ट, भांडण; संभवनीयता. *Odd & even*, a game of chance. एकी बेकी, नकीदुवा (खेळ). *Forty odd*, between 40 & 50. ४० ते ५० च्या दरम्यान. *Sixty o. thousand*, ६० ते ७० हजार. *Odd'fellow*, member of friendly society of Oddfellows. ऑड्फेलोज् नांवाच्या मित्रमंडळाचा सभासद्. *To take odds*, accept the advantage. फायदा करून घेणें. *Odds & ends*, remnants, stray articles. सटरफटर चिजा,-वस्तु. *What's the odds?* what does it matter? काय हरकत आहे? *An odd shoe*, विजोड,-विलग,-जोडा.

Odd'ĭtў, *n.* (ऑ'डिटि)—strangeness; peculiar trait; a queer person. वैचित्र्य; तऱ्हेवाईकपणा, तऱ्हेवाईक मनुष्य, विचित्र-विक्षिप्त-प्राणी.

Odd'ments, *n. pl.* (ऑ'ड्मेन्ट्स्)—odds and ends. अवशेष, सटरफटर वस्तु.

Ode, *n.* (ओड्)—a song, a short poem, a lyric poem of exalted style and tone, usu. bet. 50 & 200 lines in length. गज्जल, गेय कवन, लघुकाव्य.

O'dious, *a.* (ओ'डिअस्)—hateful, deserving hatred, disgusting, repulsive. द्वेषार्ह, तिटकारा येण्याजोगा.-*ly, adv.*

O'dĭum, *n.* (ओ'डिअम्)—hatred, enmity, widespread dislike or reprobation. सर्वांचा द्वेष, किंवा ठपका, अप्रीति, तिरस्कार.

Odontŏl'ogў, *n.* (ऑडन्टॉ'लजि)—science dealing with the teeth. दंतशास्त्र, दंतवैद्यक.

Odorĭf'erous, *a.* (ओडरि'फरस्)—diffusing odour; fragrant. गंधवान्, सगंध; सुवासिक, सुगंधी.

O'dour, *n.* (ओ'डर्)—pleasant or unpleasant smell; fragrance, scent. वास, गंध; सुगंध. *O'dorous, a.*

Oecol'ogy, *n.* (ईकॉ'लजि)—(Biol.) branch of biology dealing with living organism. जिवंत सेंद्रिय प्राण्यांसंबंधीं परिस्थिति,-विचार,-वाद.

Oecūmĕn'ical, *a.* (ईक्युमे'निकल्)—of the whole Christian church; universal. सर्व ख्रिस्ती धर्मासंबंधी; सार्वत्रिक.

Oedē'ma, *n.* (ईडी'मा)—swollen state of tissue etc. (रक्तजल सांचण्यानें आलेली) सूज, शोपशी, जलशोथ.

Oedĭ'pus, *n.* (ई'डिपस्)—solver of riddles. कोडीं सोडविणारा. *O complex*, a sexual complex held by psycho-analysts of the Freudian school to influence the child in regard to the parent of the opposite sex. 'फ्राइड' नामक मानस-शास्त्रज्ञानाच्या अनुयायांनीं मानलेलें लैंगिक आकर्षण,-प्रेम (लहान मुलग्याची आईवर व मुलीची बापावर असलेली प्रेमभावना). मात्रागमन-प्रेरणा. [Gk *Oidipous*, who guessed the Sphinx's riddle, & in ignorance married his mother.]

O'er, *prep.* (ओअर्)—poetic form of *Over*.

Oesŏph'agus, *n.* (ईसॉ'फगस्)—canal from mouth to stomach; gullet. (तोंडापासून पोटापर्यंत असणारी) अन्ननलिका; घसा, गळा.

Oes'trum,-us, *n.* (ई'स्ट्रम्,-स्ट्स्) — gadfly ; stimulus ; vehement impulse. गोमाशी, डांस ; प्रोत्साहन, जोर ; वेगाची,-जोराची,-भावना.

Of, *prep.* (ऑव्ह्) — from ; concerning ; out of ; among. पासून, चा, ची, चें ; संबंधीं, विषयीं, पैकीं ; मध्यें. *of oneself*, spontaneously. आपण होऊन, आपोआप. *Song of songs*, those best deserving the name. सर्वोत्कृष्ट पद्यें,-गाणीं. *Of old*, पूर्वीच्या काळचा. *The manners of today*, आजकालच्या,-चालू,-चालीरीति.

Off, *adv.* (ऑफ्) — away ; at or to a distance ; out of position ; loose, separate, gone ; discontinued, stopped. दूर, लांब, अंतरावर ; बाहेर ; वगळून ; मोकळा, सुटा, वेगळा, सोडून गेलेला ; थांबलेला, बंद झालेला. *prep.* from ; no longer upon. पासून, सोडून, वरून ; निराळा, वेगळा. *a.* farther, far ; (of horses or vehicles etc.) right; (Crick.) coming from or going towards the righthand front-side of the wicket-keeper. पलीकडचा,बाहेरचा, दूरचा; उजवीकडचा; (क्रिकेट खेळांत) यष्टिरक्षकाच्या समोर उजवीकडून किंवा उजवीकडे येणारा. *n.* (Crick.) the 'off' side. यष्टिरक्षकाच्या समोरची उजवी बाजू. *Take oneself, be, make, off*, to depart. निघून जाणें. *Off with you !*, go. चल, नीघ, चालता हो ! *To fall, go, off*, deteriorate, कमी कमी होणें. *Go o.*, fall asleep. झोंपीं जाणें. *Throw o. reserve*, become open or candid. मन मोकळें करून सांग. *Broke o.*, ceased to speak. बोलीभाषण बंद झालें. *Badly o.*, वाईट स्थितींत. *Well o.*, संपन्न स्थितींत, सुखी. *off. & on*, intermittently, waveringly, now & again. अधून मधून, धरसोडीनें, वारंवार. *O. colour*, out of condition, indisposed. दुःस्थितींत. बेचैन, नाराज. *O. the point*, मुद्याला सोडून, गैरलागू. *Off-licence*, licence to sell beer, etc. for consumption off the premises. दुकानाबाहेर दारू विकण्याचा परवाना. *Off-print*, reprint of part of a publication. छापील पुस्तकाच्या वगैरे कांहीं भागाचें पुनर्मुद्रण. *O.-scourings*, worst part of dregs. अतिशय घाणेरडा गाळ, घाण. *O.-side* (Crick.) the ground on the right front of the wicket-keeper ; (Footb.) illegally between ball & opponent's goal. (क्रिकेट०) यष्टिरक्षकाच्या समोरची उजवी बाजू ; (फुटबॉल) चेंडू आणि विरुद्ध पक्षाच्या सीमेमधला मैदानाचा भाग.

Off'al, *n.* (ऑ'फल्) — refuse, waste stuff ; carrion. टाकाऊ किंवा निरुपयोगी पदार्थ, गाळसाळ, वगळ ; शिळें मांस. *O. milk*, inferior milk. कमी दर्जाचें दूध.

Pĕn, *n.* (पेन्)—an implement (of quill, metal, &c.) for writing with ink; writing or literary style; female swan; small enclosure for cows, sheep, etc.; (W. Ind.) farm, plantation. टांक, लेखणी; लेखन (व्यवसाय), लेखनशैली; हंसी; कोंडवाडा, गोठा; शेत, बागायत. *v. t.* to compose and write (letter etc.); to enclose; to put or keep in confined space, to coop. लिहिणें; कागदावर लिहून ठेवणें; आंत घालणें; कोंडून ठेवणें, कोंडणें, कोंडवाड्यांत किंवा गोठ्यांत घालणें. *P. holder,* टांकाचा दांडा. *Fountain p.,* झरणी-

P. & ink, instruments of writing. लेखनसाहित्य; लिखाण. *P.-&-ink*, *a.* लेखनसाहित्याने काढलेलें,-लिहिलेलें. *Pen-knife*, खिशांतील लहान चाकू. *Pen'man*, one who writes a (good, bad, etc.) hand, author. (चरें, वाईट) अक्षर काढणारा, लेखक, ग्रंथकर्ता. *Pen'manship*, लेखनकौशल्य, लेखनशैली. *P.-name*, लेखकाचें टोपणनांव. *Penwiper*, लेखणी पुसण्याचें साधन,-फडकें.

Pē'nal, *a.* (पी'नल्)—relating to or involving punishment; punitive. शिक्षेच्या, दंडाविषयींच्या; दंडास योग्य, शिक्षेस पात्र, कायद्यानें दंडास-शिक्षेस-पात्र. *P. laws*, फौजदारी कायदे. *P. servitude*, imprisonment with hard labour. लांब मुदतीची सक्तमजुरीची शिक्षा. *P. colony*, सक्तमजुरीची शिक्षा झालेल्यांसाठीं वसाहत,-शिक्षा भोगण्याची जागा. *Pe'nally*, *adv.*

Pē'nalize, *v. t.* (पी'नलाइझ्)—to make (action) punishable; (sport) subject (competitor) to penalty. (एखादें कृत्य कायद्यानें) शिक्षेस पात्र ठरविणें; (खेळांतुन नियमांचें उल्लंघन केल्यास) दंड,-अड,-ठेवणें, दंड करणें, शिक्षा करणें.

Pĕn'altў, *n.* (पे'नल्टि)—a fine or other punishment, mulct; disadvantage imposed on previous winner in competition. दंड, शिक्षा, शासन; अड. (*on* or *under*) *the p. of*, disadvantage resulting from (quality etc.). शिक्षेची,-दंडाची,-भीति बाळगून; (हुकूम सोडला असतां होणाऱ्या) शिक्षेकडे लक्ष देऊन.

Pĕn'ance, *n.* (पे'नन्स्)—punishment suffered as an expression of penitence. प्रायश्चित्त, तपश्चर्या. *v. t.* to impose *p.* on एखाद्याला प्रायश्चित्त घेण्यास भाग पाडणें. *To do p.*, to perform *p.*, तपश्चर्या करणें, प्रायश्चित्त घेणें.

Pen'chant, *n.* (पां'शां)—inclination or liking *for*. कल, चट, चटक. [F]

Pĕn'cil, *n.* (पे'न्सिल्)—a writing-implement of black lead; artist's fine paint-brush or style; (Opt.) set of convergent rays; (Geom.) figure formed by set of straight lines meeting at a point. शिसपेन्सिल; कुंचली, चितान्याचें कलम, चितान्याचें कसब, लेखनशलाका; किरणसमूह, किरणजात; एकाच बिंदूपासून निघणाऱ्या पुष्कळ सरळ रेषांची आकृति. *v. t.* to mark, jot down, with writing-pencil; enter (horse's name) in betting book. पेन्सिलीनें खूण करणें, टांचण करणें, लिहिणें; शर्यतीच्या घोड्यांसंबंधींच्या पुस्तकांत (घोड्याचें नांव) नोंदणें. *Pen'cilled*, *pa. p.* marked delicately with thin concentric lines of colour or shading. रंगाच्या किंवा पेन्सिलीच्या सारख्या-बारीक-रेषा असलेला. *P. case*, पेन्सिलीचें टोंपण.

Pĕn'dant, Pĕn-dent, *n.* (पे'न्डन्ट्, पे'न्डन्ट्)—hanging, overhanging; awaiting decision; (Gram.) of which the construction is incomplete. लोंबता, लटकणारा; निकाल लागावयाचा आहे असा, अनिश्चित; अपूर्ण (वाक्य). *n.* an ornament hung from necklace, &c.; thing serving as complement to something else; (Naut. also *pennant*) short rope hanging from head of mast; tapering flag flown at mast head of vessel. झुबका, लोलक; पुरवणी, परिशिष्ट; डोलकाठीच्या वरच्या टोंकावरच्या आंखूड दोर; लांब व अरुंद निशाण.

Pĕnd'ing, *a.* (पे'न्डिंग्)—awaiting settlement; in process. भिजत पडलेला, अनिर्णीत; चालू असलेला. *prep.* during the unsettled state of. अनिश्चित स्थितींत, पर्यंत. *P. these negotiations*, या वाटाघाटी चालू असेपर्यंत.

Pĕn'dūlous, *a.* (पे'न्ड्यूलस्)—hanging so as to swing, fastened to one end, swinging. लोंबता, लोंबकळता.-*ly*, *adv.*

Pĕn'dūlum, *n.* (पे'न्ड्यूलम्)—suspended body swinging to and fro by force of gravity (esp. in a clock); person, thing, that oscillates. लोलक, (घड्याळांतील) लंबक; पुढेमागे झुलणारा मनुष्य, वस्तु. *Swing of the p.*, alternation of power between political parties. राजकीय पक्षांतील अधिकाराची अदलाबदल,-झुकाव.

Penĕ'lope, *n.* (पेनें'लोपि)—chaste wife. पवित्र, पतिव्रता,-स्त्री. [*f.* Gk *Penelope*, wife of Odysseus]

Pĕn'ĕtrāte, *v. i. & t.* (पे'निट्रेट्)—to find access or pass into or through; to find out, to make a way. भेदणें, घुसणें, प्रवेश करणें, आंत शिरणें, शिरकाव करणें; शोधून काढणें, पूर्ण मर्म जाणणें, आकलन करणें.-*ability*, *n.*; *Pen'etrative*, *a.* भेदक, आंत शिरणारा, परिणामकारक, सूक्ष्म बुद्धीच्या, तीक्ष्ण.

Pĕn'ĕtrāting, *a.* (पे'निट्रेटिंग्)—discerning, gifted with insight, piercing; (of voice) easily heard; sharp, acute. सूक्ष्म दृष्टि असलेला; सहज ऐकूं येणारा; तीक्ष्ण.

Pĕnĕtrā'tion, *n.* (पेनिट्रे'शन्)—act of entering a body; (esp.) acute insight, discernment. शरीरांत शिरणें; सूक्ष्म दृष्टि, कुशाग्र बुद्धि.

Pĕng'uin, *n.* (पें'ग्विन्)—a sea-fowl with wings as swimming paddles. समुद्रावरील पक्ष्यांची एक जात.

Pĕnin'sūla, *n.* (पेनि'न्स्यूला)—a piece of land almost surrounded by water, or projecting far into the sea. द्वीपकल्प. *the P.*,

Spain & Portugal. स्पेन आणि पोर्तुगाल (ह्या देशांचें बनलेलें द्वीपकल्प). [L *paene*, almost; *insula*, island]

Pĕnĭn'sūlar, *a*. (पेनि'न्सुलर)—of (the nature of) a peninsula. द्वीपकल्पाचें, द्वीपकल्पासारखें. *n*. inhabitant of a peninsula. द्वीपकल्पांतील रहिवासी.

Pē'nĭs, *n*. (पी'निस्)—the male organ of generation. पुरुषाचें जननेंद्रिय.

Pĕn'itence, *n*. (पे'निटन्स्)—sorrow for one's sins or offences, repentance. पश्चात्ताप, अनुताप.

Pĕn'itĕnt, *a*. (पे'निटेन्ट्)—repentent for sin, contrite. पश्चात्तापी. *n*. a penitent person; one who is doing penance. पश्चात्ताप वाटणारा, प्रायश्चित्त घेणारा.

Pĕnitĕn'tial, *a*. (पेनिटे'न्शल्)—of or relating to penitence or penance. पश्चात्तापाचा, अनुतापाचा.

Pĕnitĕn'tiarў, *n*. (पेनिटे'न्शरि)—reformatory institution; (U.S.) prison. सुधारणागृह; तुरुंग. *a*. of penance or reformatory treatment; (U. S.) (of crime) punishable by term in penitentiary. प्रायश्चित्ताचा, सुधारणेसंबंधीं; सुधारणागृहांत कांहीं काळ-मुदती-पर्यंत राहण्याची शिक्षा देण्यासारखा (गुन्हा).

Pĕnn'ant, *n*. (पे'नन्ट्)—a small tapering flag (esp. that at the mast-head of a ship in commission); a pennon. पताका, (लहानसा) बावटा; निशाण.

Penn'iform, *a*. (पे'निफॉर्म्)—(nat. hist.) having the form or appearance of a feather. पंखाच्या-पिसाच्या,-आकाराचा, पिसासारखा, पंखाकृति. [L *penna*, feather]

Pĕnn'ilĕss, *a*. (पे'निलिस्)—having no money; poor, destitute. निर्धन, कफल्लक, दरिद्री, भुकेकंगाल, रंक, गरीब.

Pĕnn'on, *n*. (पे'नन्)—a long narrow triangular or swallow-tailed tapering flag. निशाण, पताका.

Pĕnn'ў, *n*. (पे'नि)—(pl. *pence*, *pennies*), a bronze coin worth one-twelfth of a shilling (after numeral written *d*.=denarius); an insignificant coin. एक बारांश शिलिंगाचें नाणें, पेनी; क्षुल्लक नाणें. *A pretty penny*, a good sum of money. पुष्कळ पैसा. *A p. for your thoughts* (said to a person abosrbed in thought), (विचारांत गढून गेलेल्याला उद्देशून असें म्हणतात). *In for a p., in for a pound*, एकादी गोष्ट आरंभिली कीं ती कसेंही करून शेवटास नेलीच पाहिजे. *Take care of the pence*, बारीकसारीक गोष्टींत सुद्धां काटकसर करा. *To turn an honest p.*, निढळाच्या घामानें पैसा मिळविणें. *P.-a-line*, *a*. (of writing) cheap, superficial. भाडोत्री, भिकार, टाकाऊ (लिखाण). *P.-a-liner*, भाडोत्री-भिकार,-लेखक. *P. post*, (एका पेनींत पत्रें नेणारें) पेनि टपालखातें. *Pe'nny weight*, (abbr. *dwt*), measure of weight, 24 grains. २४ ग्रेनचें वजन, औंसाचा विसावा भाग. *Penny wise & pound foolish* (policy), careful in small, wasteful in large matters. इळा मोडून खिळा करणें, लहानसहान गोष्टींत काटकसर व मोठ्यांत उधळेपणा(ची प्रवृत्ति). *Pe'nny-wort*, खडकाच्या भेगींत व भिंतीवर वाढणारी वाटोळ्या पानांची एक वेल,-वनस्पति. *Penn'yworth*, *penn'orth*, as much as can be bought for a penny. पेनीच्या किंमतीची वस्तु; सौदा.

Pĕnnўroy'al, *n*. (पेनिरॉ'यल्)—kind of mint formerly used in medicine. पुदिना (वनस्पति).

Pēnŏl'ogў, *n*. (पीनॉ'लजि)—study of punishment and prison discipline. दंडशास्त्र, दंडनीति, शिक्षा आणि तुरुंगांतील शिस्त यांचा अभ्यास. *Penolog'ical*, *a*.: *Penol'ogist*, दंडनीतिज्ञ.

Pĕn'sile, *a*. (पे'न्साइल्,-न्सिल्)—hanging down, pendulous. लोंबता, लटकता, लोंबकळणारा.

Pĕn'sion, *n*. (पे'न्शन्)—periodical payment made to a person in consideration of past service. तैनात, मागील कामगिरीबद्दल बैठा पगार, पेन्शन. *v. t.* to grant pension to, buy over with *p*. ला बैठा पगार, पेन्शन,-देणें; नेमणूक करून देऊन,-तैनातीनें,-वश करून घेणें. *Pen'sionable*, *a*. पेन्शनची, सेवानिवृत्तवेतनाची (नोकरी). *Pen'sionary*, *a*. by way of pension. पेन्शन,-तैनात,-म्हणून. *n*. a pensioner. पेन्शन घेणारा. *Pen'sioner*, *n*. a pensioned person; a hireling. पेन्शन दिला गेलेला मनुष्य, पेन्शनदार, सेवानिवृत्त-वेतन मिळालेला. *To p. off*, पेन्शन देऊन नोकरीवरून कमी करणें. *P.-less*, *a*.

Pĕn'sive, *a*. (पे'न्सिव्ह्)—plunged in thought, thoughtful, employed in serious study. चिंताक्रांत, विचारमग्न.

Pĕn'stock, *n*. (पे'न्स्टॉक्)—a sluice, flood-gate. धरणाचा दरवाजा.

Pĕnt, *a*. (पेन्ट्)—(often used with *up*, *in*), closely confined; not allowed to issue; shut in or up. कोंडलेला; बाहेर जाऊं न दिलेला; बंद केलेला.

Pĕn'tachŏrd, *n*. (पे'न्टाकॉर्ड्)—a musical instrument of five strings; series of five notes. पंचतारी वाद्य; पांच सुरांची सुरावट.

Pĕn'tad, *n*. (पे'न्टाड्)—the number 5; group of five. ५ ही संख्या; पांचांचा समुदाय, पंचकडी.

Pĕn'tagŏn, *n*. (पे'न्टॅगॉन्)—a five-sided plane rectilineal figure. पांच कोन असलेली आकृति, पंचकोण.*-al*, *a*.

Pĕntahĕd'ron, *n.* (पेन्टाहे'ड्रन्)—solid figure of five faces. पांच बाजूंची घनाकृति. *Pentahed'ral, a.*

Pĕntăm'ĕter, *n.* (पेन्टॅ'मिटर्)—Greek and Latin verse of five feet. (ग्रीक व लॅटिन् भाषेंतील) ओळीला पांच यति असलेली कविता.

Pĕn'tateuch, *n.* (पे'न्टाटयुक्)—the first five Old Testament books. जुन्या कराराचे पहिले पांच विभाग,-खंड.

Pĕn'tĕcŏst, *n.* (पे'न्टिकॉस्ट्)—Jewish harvest festival fifty days after Passover; Whit Sunday. यहुदी लोकांचा एक सण. *Pentecos'tal, a.*

Pĕnt'house, *n.* (पे'न्ट्-हउस्)—a sloping roof supported against the wall of a building. पडवी, एकपाखी छपर.

Penult, *n.* (पेन'ल्ट्, पी'नल्ट्)—last syllable but one of a word. शब्दाचें उपांत्याक्षर.

Pĕnŭl'tĭmāte, *a.* & *n.* (पिन'ल्टिमेट्)—*the last but one*, the last (*syllable*) but one. शेवटच्या जवळचा, उपान्त्य (अक्षर).

Pĕnŭm'bra, *n.* (पिन'म्ब्रा)—partly lighted shadow on the skirts of a total shadow. विरल छाया, उपच्छाया, अंधुक छटा. *Pemum'bral, a.* [L *paene*, almost; *umbra*, shadow]

Pĕnūr'ious, *a.* (पिन्यू'रिअस्)—mean, stingy. चिक्कू, दरिद्री, कृपण.

Pĕn'ūrў, *n.* (पे'न्युअरि)—destitution, poverty, want of necessaries of life. कंगाल स्थिति, दारिद्र्य, दरिद्रता.

Pē'ŏn, *n.* (पी'ऑन्, प्यून्)-an attendant, servant; foot-soldier; messenger; (Span. Amer.) day-labourer; (Mex.) enslaved debtor. पायीं चालणारा शिपाई; शिपाई, पट्टेवाला, चपरासी; मजूर, रोजची मजुरी करणारा; कर्जदारी गुलाम, नोकर.

Pē'onў, *n.* (पी'आनि)—garden plant with double red or white flower. तांबड्या अगर पांढऱ्या रंगाच्या फुलांचें फुलझाड.

Peo'ple, *n.* (पी'पल्)-(as *sing.*) a race or nation; (as *pl.*) persons in general; the commonalty; one's parents or other relatives. जाति, राष्ट्र; लोक; समाज; आईबाप व इतर नातेवाईक. *v. t.* to fill with people; to populate; to inhabit. लोकांनीं भरणें; वसाहत करणें; वसवणें, वसति करणें. *Peo'pled, pa. p.* वसाहत केलेला, वसवलेला, लोकवस्ती असलेला. *People's Palace*, East London institution for the use of the working class. कामगार लोकांसाठीं लंडनच्या पूर्वभागांतील संस्था. [L *populus*, people]

Pĕp, *n.* (पेप्)—(U. S. sl.) vigour, go, spirit. जोम, धडाडी, उत्साह. *Peppy, a.* full of life. जोमदार, उत्साहपूर्ण.

Pĕperi'nō *n.* (पेपरी'नो)—light (usu. brown) volcanic rock formed of sand, cinders, etc. हलका सच्छिद्र ज्वालामुखी खडक.

Pĕpp'er, *n.* (पे'पर्)—hot-flavoured berries of certain plants used as seasoning; (fig.) anything pungent. मिरीं, काळीं मिरें; तिखट पदार्थ. *v. t.* to sprinkle or flavour with pepper; besprinkle; hit with missiles; punish severely. ला मिरीं लावणें, मिरपूड घालून चव आणणें; वर्षाव करणें; सडकून,-झोडपून,-काढणें; अति कडक शिक्षा करणें. *P.-box,-castor*, मिरपुडीची डबी. *P.-corn*, dried pepper berry, often specified as nominal rent. (अगदीं थोडें) नांवाचें भाडें.

Pĕpp'ermĭnt, *n.* (पे'पर्-मिन्ट्)—lozenge flavoured with a kind of oil, a kind of mint grown for its essential oil, this oil. पेपरमिंटाच्या वड्या, पेपरमिंट वनस्पति, अर्क.

Pĕpp'erў, *a.* (पे'परि)-like pepper; hot-tempered. तिखट; तापट, चिडखोर, रागीट.

Pĕp'sĭn, *n.* (पे'प्सिन्)—constituent of gastric juice. (जाठर रसांतील) मुख्य पाचक तत्त्व, कृत्रिम पाचक द्रव्य.

Pĕp'tĭc, *a.* (पे'प्टिक्)—digestive. पाचक, अग्निदीपक. *Pep'tics, n. pl.* digestive organs. पचनक्रियेचीं इंद्रियें, पचनेंद्रियें.

Per, *prep.* (पर्)—by, by means or instrumentality of (*per post, rail*, etc.); for each (*per man*). नें, मुळें; प्रति, दर, प्रत्येक. *Per ann'um*, (परॅ'नम्) (so much) by the year, yearly. दरसाल, वार्षिक, प्रतिवर्षी. *P.-cent.*, in every hundred. दर शेंकडा. *P.-contra*, on the other side of the account, on the other hand. दुसऱ्या बाजूनें, उलटपक्षीं. *P. di'em, P. men'sem*, (so much) by the day, month. दरदिवसाला, दरमहा. *P. se*, by its very nature; intrinsically. स्वभावतः, सहजिक.

Pĕradvĕn'ture, *adv.* (पेरॲड्व्हे'चर्)—(arch.) perhaps, perchance; by chance. कदाचित्, कोण जाणें, न जाणों; सहजगत्या. *n.* uncertainty, chance, conjecture. संशय, शंका, संभव.

Perăm'būlāte, *v. t.* & *i.* (परॅ'म्बु-लेट्)—to walk up and down; to go from place to place, to pass through or over and survey. भटकणें, वर खालीं फिरणें; जागोजाग भटकणें,-हिंडणें; हिंडून हद्दींची पाहणी करणें. *Perambula'tion, n.*

Perăm'būlātor, *a.* (परॅ'म्बु-लेटर्)—one who perambulates; child's carriage propelled by hand from behind (colloq. abbr. *Pram*). जागोजाग फिरणारा, भटकणारा; मागून लोटण्याची मुलांची हातगाडी, बाबागाडी.

Perceive', *v. t.* (पर्सी'व्‌)—*to become aware of* by one of the senses; to have knowledge of, to apprehend, to understand. इंद्रियांनीं जाणणें; चें ज्ञान होणें; समजणें, ला दिसणें, वाटणें, ठाऊक होणें,-पडणें. [L *per*, through; *capere*, to take]

Percĕn'tage, *n.* (पर्सें'टेज्‌)—rate per cent; number of in every hundred; proportion. शेंकडा दर; दर शेंकड्यांतील संख्या, शेंकडेवारी; प्रमाण.

Per'cĕpt, *n.* (प'र्सेप्ट्‌)—(Philos.) an object or a product of perception, as opp. to action. ज्ञानविषय, ज्ञानफल, सविकल्प ज्ञानाचा विषय.

Percĕp'tible, *a.* (पर्से'प्टिबल्‌)—such as can be perceived by senses or intellect, perceivable. इंद्रियांनें समजण्याजोगा,-इंद्रियगोचर, ज्ञेय, पटा-वयाजोगा.-*bility*, *n.*; *Percep'tibly*, *adv.* स्पष्टपणें दिसण्याजोगा, इंद्रियगम्य असा.

Percĕp'tion, *n.* (पर्से'प्शन्‌)—act or faculty of *perceiving*; *discernment*; *intuitive recognition* (of truth, aesthetic quality, etc.); (Philos.) action by which the mind refers its sensations to external object as cause; (Law) collection (of rents etc.). समज, बोध, ज्ञान; विषयग्रहणशक्ति, इंद्रियांनें ग्रहण करणें, सविकल्प ज्ञान; (भाडें इ.) गोळा करणें, वसुली.-*al*, *a.*

Percĕp'tive, *a.* (पर्से'प्टिव्‌)—having or concerned in perception. ग्रहणशक्तीचा, ग्रहणशक्तिविषयक, विषयग्रहणोपयोगी. *Perceptiv'ity*, *n.* ग्रहणशक्ति, समजशक्ति.

Perch, *n.* (पर्च्‌)—a bird's resting place; an elevated position; measure of length, $5\frac{1}{2}$ yds; a fresh-water fish. पक्ष्याला बसण्यासाठीं-विश्रांति घेण्यासाठीं-आडवा दांडा,-काठी, पक्ष्यांची राहण्याची जागा; उंच बैठक, उच्च स्थान, निर्भय ठिकाण; साडेपांच यार्डांचें माप; गोड्या पाण्यांतील एका जातीचा मासा. *v. i. & t.* (of bird) to alight or rest on a perch; to put on a high place. उडतांना उतरून बसणें; उच्च स्थानीं ठेवणें. *Bird takes its perch*, (alights). पक्षी खालीं उतरतो. *To hop the p.*, to die. मरण पावणें. *To knock* (person) *off* his *p.*, to vanquish, destroy him. एकाद्याचा पराजय करणें,-नाश करणें.

Perchance', *adv.* (पर्‌-चा'न्स्‌)—perhaps, peradventure, by chance; maybe. कदाचित्‌; न जाणों.

Percip'ient, *a.* (पर्सि'पिअन्ट्‌)—having perception, conscious. विषयग्राहक,-ग्रहणक्षम, सचेतन. *n.* one who perceives esp. (tel. epathy) something outside range of senses. विषयग्रहणक्षम प्राणी; इंद्रियांचे मदतीशिवाय मनांतील विचार जाणणारा,-कळविणारा इसम,-व्यक्ति. *Percip'ience*, *n.*

Per'colāte, *v. t. & i.* (प'र्‌-कलेट्‌)—to make way through pores or perforation; to cause to pass through small interstices or pores. गळणें, पाझरणें; गाळणें.-*tion*, *n.*;-*tor*, *n.* strainer of coffee-pot. कॉफी गाळणारा,-चाळणारा.

Percŭss', *v. t.* (पर्क'स्‌)—(med.) to tap gently with finger or instrument for purposes of diagnosis etc. (छाती वगैरे) हळू ठोकून तपासणें.

Percŭ'ssion, *n.* (पर्क'शन्‌)—striking of a body against another; sound so made; (med.) percussing. (घन) पदार्थांचें एकमेकांवर आदळणें; तडाखा, प्रहार, आघात; तडाख्याचा आवाज; (छाती वगैरे) बोटांनीं ठोकून तपासणें. *P. cap*, small copper cap or cylinder in fire-arm. बंदुकीच्या घोड्याची टोपी, बंदुकीचें केप. *Percuss'ive*, *a.*

Perdi'tion, *n.* (पर्डि'शन्‌)—damnation; entire ruin, utter destruction. अधोगति, नरकवास; विनाश.

Perdū(e)', *pred. a.* (पर्ड्यू')—in ambush; out of sight; hidden. लपून छपून राहिलेला, गनिमी काव्याचा; अदृश्य; लपलेला. *To lie p.*, दृष्टी मारून,-लपून छपून,-राहणें.

Pĕ'rĕgrinăte, *v. i. & t.* (पे'रिग्रिनेट्‌)—to wander through, to travel from place to place. फिरणें, भटकणें, प्रवास करणें.-*tion*, *n.* परिभ्रमण, प्रवास, मुसाफरी.

Pĕ'règrine, *n.* (पे'रिग्रिन्‌)—kind of falcon used in hawking. एक जातीचा पहिरी ससाणा. *a.* (arch.) foreign, imported from abroad, outlandish. परदेशाचा, बाहेरून,-परमुलखांतून,-आणलेला, आगंतुक.

Pĕ'rĕmptorў, *a.* (पे'रिम्टरि)—imperious; urgent, determinate. जाचक, करडा, जोराचा; अगदीं आवश्यक, निखालस; निश्चयी, गंभीर. *Pe'remptorily*, *adv.* निक्षून, निखालस, धडधडीत, ठासून ठासून.

Perĕnn'ial, *a.* (पेरे'न्यल्‌)—not coming to an end; (of plant) coming up year after year. अव्याहत, सततचा; बारमाही. *n.* a *p.* plant. फिरपेरक वर्षें जगणारें झाड.

Per'fect, *a.* (प'र्फिक्ट्‌)—complete, not deficient; faultless; thoroughly learned; thoroughly trained; exact, precise; entire, unqualified; (of tense) expressing action completed. संपूर्ण, अशेष, पूर्ण; दोषहीन, निर्दोष; निष्णात, पारंगत; हुबेहूब, अचूक; सकल, सिद्ध, संपन्न, परिणत; पूर्णक्रियादर्शक. *n.* the perfect tense. पूर्ण-

भूतकाळ. *v. t.* (पर्फे'क्ट्) to consummate, to finish, to make perfect; पूर्ण करणें, प्रवीण करणें. *Perfectibil'ity, n.* पूर्णताक्षमता, पूर्णतेप्रत पावण्याचें सामर्थ्य.

Perfec'tion, *n.* (पर्फे'क्शन्)—being perfect; a perfect state; highest manifestation; (*pl.*) accomplishments, beauties, excellences. पूर्णता होणें; पूर्णतावस्था, प्रावीण्यसिद्धि; पूर्ण स्वरूप; सद्गुण, सौंदर्य.

Perfec'tionist, *n.* (पर्फे'क्शनिस्ट्)—one who holds that religious or moral perfection may be attained. धार्मिक किंवा नैतिक पूर्णता मिळवितां येईल असें मानणारा, पूर्णतावादी.

Perf'ectly̆, *adv.* (पर्फि'क्ट्लि)—quite, quite well. पूर्णपणें, पुरा.

Perfec'tō, *n.* (पर्फे'क्टो)—(U. S.) medium-sized cigar tapered at both ends. दोन्ही टोकांना निमुळती मध्यम आकाराची विडी,-सिगार.

Perf'ĭdy, *n.* (प'र्फिडि)-breach of faith; treachery, faithlessness, disloyalty, लबाडी; विश्वासघात, दगा, बेइमानपणा. *Perfid'ious, a.* [L *per*, away from; *fides*, faith]

Perfō'lĭate, *a.* (पर्फो'लिअट्)—(Bot.) having the stalk apparently passing through the leaf. दांडवेधित (पर्ण), दांड्यास चोहोंबाजूंनीं वेष्टिणारें (पान) (उ. चिघळ). [L *per*, through; *folium*, a leaf]

Perf'ōrāte, *v. t. & i.* (प'र्फोरेट्)—to pierce, to make a hole or holes through by boring; to make rows of holes in (sheet) to separate stamps, coupons etc.; make an opening into; penetrate (into, through, etc.). विंधणें, भोंक पाडणें; भोंकांच्या रांगा पाडणें; तोंड करणें; शिरणें, वेधणें. *Perfora'tion, n.*; *Perf'orator, n.* an instrument for perforating. भोंक पाडण्याचें हत्यार, टोंच्या, सामता, गिरमीट.

Perforce', *adv.* (पर्फो'र्स्)—of necessity. बळें, जुलमानें, जबरदस्तीनें. *n.* (rare) necessity, esp. *of, by, p.* जरुरी, गरज.

Perform', *v. t. & i.* (पर्-फॉ'र्म)—to carry into effect; to accomplish; to go through, to execute; to act. करून टाकणें; संपादणें; उरकणें, सिद्धीस नेणें; कामें, खेळ-करणें, भूमिका घेणें.

Perform'ance, *n.* (पर्-फॉ'र्मन्स्)—accomplished; single presentation of play, &c. संपादलेली वस्तु; प्रयोग, खेळ.

Perform'er, *n.* (पर्फॉ'र्मर्)—(esp.) one who performs before an audience. सोंग आणणारा, नट, प्रेक्षकांसमोर खेळ करून दाखविणारा, बाजंत्री.

Per'fūme, *n.* (प'र्-फ्यूम्)—sweet smell; scent; fragrance. मधुर वास; सुगंधी द्रव्य, सुवासिक तेल, अत्तर; सुवास. *v. t.* (पर्फ्यू'म्) to impart fragrance to, to impregnate with sweet smell (esp. in *pa. p.*). सुवासिक करणें, सुगंध घालणें.

Perfū'mer, *n.* (पर्फ्यू'मर्)—a maker or seller of perfumes. अत्तरें,-सुवासिक तेलें,-बनविणारा, किंवा विकणारा, गंधी, गांधी, अतारी.

Perfū'mery̆, *n.* (पर्फ्यू'मरि)—perfumes in general; the art of preparing perfumes. सुगंधी जिन्नस, -सामान; सुगंधि सामान तयार करण्याची कला.

Perfūnc'tory̆, *a.* (पर्-फं'क्टरि)—done merely to pass muster, superficial, mechanical. उडवाउडवीचा, वरकरणी, चालढकलीचा; यंत्राप्रमाणें, बिनकळकळीनें.-*torily, adv.*

Perfūse', *v. t.* (पर्फ्यू'झ्)—to be sprinkled (with water, etc.); to cover, suffuse (with radiance); to pour (water) through or over. पाण्यानें भिजवणें, (वर) पाणी शिंपडणें; व्यापणें, भरून टाकणें; चिंब भिजविणें, वरून पाणी ओतणें. *Perfu'sion, n.*; *perfu'sive, a.* व्यापणारा, भरून टाकणारा.

Perg'ola, *n.* (प'र्गला)—an arbour or garden walk arched with climbing plants. लतामंडप, लतादिकांनीं आच्छादिलेला बागेतील रस्ता.

Perhăps', *adv.* (पर्-हॅ'प्स्)—(colloq. प्रॅप्स्), it may be, possibly. कदाचित्.

Pe'rĭ, *n.* (पि'रि)—a fairy of Persian mythology, a beautiful girl or woman. इराणी पुराणांतील वनदेवता, सुंदर मुलगी, स्त्री, अप्सरा.

Pĕ'rĭanth, *n.* (पे'रिॲन्थ्)-an outer part of flower, calyx and corolla. पुष्पकोश, परिपुष्प, फुलावरील आवरण.

Pĕricărd'ĭum, *n.* (पेरि-का'र्डिअम्)—(*pl -ia*) membranous sac enclosing the heart. हृदाशय, हृत्कोश. *Pericard'iac,-dial, aa.* हृत्कोषाचा, हृदयाजवळचा.

Pĕr'ĭcărp, *n.* (पे'रिकार्प्)—seed-vessel of a plant. बीजकोष, कवच, फळाची तिहेरी साल, (बियांवरील) तिपदरी वेष्टन.

Pĕrĭcrā'nĭŭm, *n.* (पेरिक्रे'निअम्)—the membrane enclosing the skull; (joc.) skull, brain, intellect. मस्तकाभोंवतालची आवरणत्वचा, शीर्षावरण; डोकें, मेंदू, बुद्धि.

Pĕ'rĭgee, *n.* (पे'रिजी)—that point in planet's (esp. moon's) orbit at which it is nearest to earth, opp. to *apogee.* ग्रहकक्षेचा (चंद्राचा) पृथ्वीपासून समीपतम बिंदु. (चंद्र) नीच स्थान, नीच.

Pĕrĭhē'lion, *n.* (पेरिही'ल्यन्)—the point in planet's orbit nearest the sun. ग्रहकक्षेचा सूर्यापासून समीपतम बिंदु, शीघ्रोच्च.

Pĕ'ril, *n.* (पे'रिल्)—danger, risk. भय, धोका, जोखीम. *v. t.* to put in peril, to imperil. संकटांत पाडणें. *Pe'rilous, a.* धोक्याचा, भयाचा, संकटाचा. *At one's peril*, स्वतःच्या जोखमीवर. *Keep off at your p.*, take the risk if you do not. दूर रहा नाहीं तर धोका आहे.

Perĭm'ĕter, *n.* (पेरि'मिटर्)—a line or set of lines bounding a closed figure; length of this; instrument for measuring the field of vision. आकृतीच्या भोंवतालच्या सर्व रेषा, परिमिति; दृष्टिक्षेत्र मापण्याचें यंत्र.

Pēr'ĭod, *n.* (पी'रिअड्)—amount of time during which something runs its course, usual length of duration; a complete sentence; full-stop symbol; (*pl.*) menses; (*pl.*) rhetorical language; set of figures marked off in large number, as in numeration, recurring decimals, etc. कालमान, मधला काळ, नियत काल, संवत्सर काल, चक्र, ठरलेला अवधि; पूर्ण वाक्य; पूर्णविराम, शेवट, समाप्ति, पूर्णविरामचिन्ह; ऋतु, विटाळाची पाळी; अलंकारिक भाषा; आवर्त दशांशादिकांतील अंकांच्या आकृति. *The p.*, the present day. विद्यमानकाल, चालूकाळ, आजकाल.

Pērĭŏd'ic, *a.* (पीरि-ऑ'डिक्)—recurring or published at regular intervals. नियतकालिक, नियमानें येणारा.

Pērĭŏd'ical, *a.* (पीरिऑ'डिकल्)—coming at fixed times, cyclical, published at certain periods. नियतकालिक. *n.* a publication issued at fixed intervals. नियमितकालानें निघणारें मासिक, त्रैमासिक, वगैरे, नियतकालिक. *Period'ically, adv.*

Pērĭodĭ'cĭtȳ, *n.* (पीरिअडि'सिटि)—the quality or state of being regularly recurrent. नियतकालिकता, नियतकालता.

Pĕrĭpatĕt'ĭc, *a.* (पेरिपटे'टिक्)—itinerant, going from place to place; of the school of Aristotle. फिरणारा, फेऱ्या घालणारा, येरझारा करणारा, जागोजागीं हिंडणारा; ॲरिस्टॉटलच्या मताचा. *n.* follower of Aristotle; (joc.) walker. ॲरिस्टॉटलचा अनुयायी,-शिष्य; हिंडणारा, पायीं फिरणारा, प्रवासी.

Perĭph'erȳ, *n.* (पेरि'फरि)—a bounding line, esp. of a round surface, circumference. परिधि, परिघ, वेढ, घेर.-*eral, a.*;-*erally, adv.*

Pĕrĭph'rasĭs, *n.* (पेरि'फ्रसिस्)—(*pl.*-*ases*), roundabout speech or phrase, circumlocution. पुष्कळ शब्दांनीं विचार व्यक्त करणें, पाल्हाळिक बोलणें, बोलण्याचा फेरा, द्राविडीप्राणायाम, पर्यायोक्त (अलंकार). *Periphras'tic, a.* बहुशब्दात्मक, पाल्हाळिक.-*tically, adv.*

Pĕ'rĭscōpe, *n.* (पे'रिस्कोप्)—kinds of mirror apparatus giving view of things above surface to observer in submarine or trench. पाणबुडीमधल्या किंवा खंदकांतल्या मनुष्यास पृष्ठभागावरील वस्तू दिसतील असा तयार केलेला आरसा.

Pĕ'rĭsh, *v. i. & t.* (पे'रिश्)—to suffer destruction; to lose life; to come to an untimely end; to fail to last; (of cold or exposure) reduce to distress (usu. in pass.). नाश पावणें, बुडणें, फडशा होणें, मरणें; अकालीं शेवट होणें; न टिकणें; संकटांत पडणें, विपन्नावस्था येणें, अति त्रास होणें.

Pĕ'rĭshable, *a.* (पे'रिशेबल्)—liable to perish, that will not last long. नाशवंत, नश्वर, क्षणिक. *n.* (usu. in *pl.*) perishable thing(s). नाशिवंत,-जास्त वेळ न टिकणारा,-माल, भाजीपाला वगैरे.

Pĕ'rĭstȳle, *n.* (पे'रिस्टाइल्)—row of columns round temple, cloister, etc.; space surrounded with these. (देवळाच्या, गाभाऱ्याच्या वगैरे सभोंवारच्या) खांबांची रांग; खांबांच्या रांगांनीं वेष्टिलेली-मधली-जमीन, जागा.

Pĕrĭtone'um, *n.* (पेरिटोनी'अम्)—the membrane lining the abdomen. आंत्रवेष्टन, उदरांतवेष्टन, पर्यंत्रक. *Peritoni'tis, n.* inflammation of the peritoneum. उदराच्या आंतील वेष्टनाचा दाह, पर्यंत्रकदाह.

Pĕ'rĭwig, *n.* (पे'रिविग्)—a wig. कृत्रिम केसांचा लहान टोप,-टोपी. *Pe'riwigged, a.*

Pĕ'rĭwinkle, *n.* (पे'रिविंकल्)—an evergreen trailing plant with light blue flower; an edible shell-fish like small snail. एक प्रकारचें फुलझाड; लहान गोगलगाईसारखा एक जातीचा मासा, घुला, घुळ, खुबा. *Rose p.*, सदाफुली. *P. (blue)*, colour of *pp.* निळसर रंग.

Perj'ure, *v. refl.* (प'र्जर्)—to swear falsely, to give false evidence on oath. खोटी शपथ घेणें; शपथेवर खोटी साक्ष देणें. *Perj'ured, pa. p.* guilty of perjury. खोटी शपथ घेणारा, खोटी साक्ष देणारा. *Perj'urer, n.*

Per'jurȳ, *n.* (प'र्जरि)—act of perjuring oneself. खोटी साक्ष, खोटी शपथ.

Perk, *v. i. & t.* (पर्क्)—(colloq. with *up*) to recover self-confidence; to behave jauntily; to lift up (one's head &c.). आत्मविश्वास संपादणें; ऐटीनें वागणें, नखरा करणें; वर उचलणें. *Perk'y, a.* self-assertive, saucy, pert. पुढें पुढें करणारा, नखरेबाज, मिजासखोर.

Perm'anence, *n.* (प'र्मनन्स्)—duration or permanent quality, fixedness, continuance. स्थिरता, शाश्वती, शाश्वतपणा, टिकाऊपणा.

Perm'anency, *n.* (प'मैनन्सि)—permanent occupation, duration, fixedness. स्थैर्य, शाश्वत स्थिति.

Perm'anent, *a.* (प'मैनन्ट्)—lasting or meant to last; not temporary. टिकाऊ, चिरकालिक; कायमचा, शाश्वत. *P.-set*, condition of metal after being subjected to the strain of use. वापरून वहुतुट झालेली (धातूची) स्थिति. *P. way*, finished road-bed of railway. (आगगाडीचा) लोखंडी पक्का रस्ता.-*ly*, *adv*.

Perm'eable, *a.* (प'र्मिअबल्)-admitting the passage (of fluid, &c.). भेदून आंत शिरण्याजोगा, झिरपण्यासारखा, मुरूं देण्यासारखा. *Perm'eability*, *n.*

Perm'eate, *v. t. & i.* (प'र्मिएट्)-to pass through the pores of, to make way throughout, to pervade; to be diffused. पाझरून आंत जाणें, व्यापणें; चोंहोंकडे पसरणें; मुरून आंत जाणें, प्रवेशणें, भिनणें. *Permea'tion*, *n.*

Permiss'ible, *a.* (पर्-मि'सिबल्)—allowable, that may be permitted. चालण्याजोगा, परवानगी देण्याजोगा.-*bility*, *n.* परवानगी देण्यासारखी स्थिति, अनुज्ञेयता.-*bly*, *adv*.

Permi'ssion, *n.* (पर्मि'शन्)-leave, licence (to do), allowance, liberty granted. परवानगी, मोकळीक, हुकूम, आज्ञा, रजा.

Permiss'ive, *a.* (पर्मि'सिव्)—licensing but not enjoining something, granting liberty. परवानगी देणारा, सोडतां-जाऊं देतां-येण्याजोगा.

Permit', *v. t. & i.* (पर्-मि'ट्)—to allow, to give leave for; to admit of. परवानगी देणें, मोकळीक देणें. *n.* (प'र्मिट्), a written order (for permitting entry, &c.). परवाना, (कस्टम्सच्या) परवान्याची चिट्टी. *Weather permitting*, हवामान साफ,-स्वच्छ,-असल्यास.

Permuta'tion, *n.* (पर्म्यु-टे'शन्)—interchange; (Math.) variation of the order of a series. विनिमय, अदलाबदल; अंकपाश, स्थानविनिमय.

Perni'cious, *a.* (पर्नि'शस्)—destructive, injurious, deadly, noxious. नाशकारक, अपायकारक, अपकारक.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.*

Pernick'ety, *a.* (पर्नि'किटि)—(colloq.) fastidious; ticklish. चोखंदळ, खोडकर; लटपटीत, डळमळीत.

Pe'rorate, *v. i.* (पे'रोरेट्)-to indulge in rhetoric; make a peroration. वक्तृत्वपूर्ण भाषण करणें; भाषणाचा वक्तृत्वपूर्ण उपसंहार करणें.

Perora'tion, *n.* (पेरा-रे'शन्)—a rhetorical passage at the conclusion of a speech. भाषणाचा उपसंहार.

Perpend', *v. t. & i.* (पर्पे'न्ड्)—(arch., joc.) to ponder, to reflect upon. विचार करणें, उहापोह करणें.

Perpendic'ular, *n.* (पर्-पेन्डि'क्युलर्)—at right angles to the plane of horizon, perfectly vertical; erect, quite upright; in standing position; very steep; (Geom.) at right angles (*to* given line, plane or surface). समकोणगामी, उभा; अगदीं सरळ उभा; अगदीं उभ्या चढाचा, सुळ्यासारखा; काटकोनांत असलेला, लंबरूप, लंब. *n.* a perpendicular line; plumb rule or other instrument for showing a perpendicular line; (pl.) two datum-lines used in designing ship & fixing its nominal length; (sl.) meal etc. at which guests stand. लंबरेषा; ओळंबा, ओळंब्यासारखें सुतांत उंची मोजण्याचें साधन; गलबत बांधतांना व तिची लांबी ठरवितांना धरलेल्या दोन गृहीत रेषा; उभें राहून केलेलें जेवण वगैरे. *To be out of p.* or *the p.*, not straight up and down. सरळ रेषेंत-उभें-नसणें. *Perpendicular'ity*, *n.*; *Perpendic'ularly*, *adv*.

Perp'etrate, *v. t.* (प'र्-पिट्रेट्)—to be guilty of; to do or perform, to commit. दोषी होणें; (अपराध, गुन्हा) करणें, दुष्ट कर्म करणें.-*tion*, *n*; -*tor*, *n.* नीच कृत्य करणारा.

Perpet'ual, *a.* (पर्पे'च्युअल्)—eternal; held or holding for life; continuous; (colloq.) frequent, repeated, (as *this perpetual nagging*). शाश्वत; चिरस्थायी; सतत, नित्य, कायमचा; धरचेवरचा, पुन: पुन:चा.-*lly*, *adv*. *P. motion*, सतत गति.

Perpet'uate, *v. t.* (पर्-पे'च्युएट्)—to make perpetual; not to allow to go out of use or memory, to cause to endure. चिरस्थायी करणें, जिवंत जागृत-ठेवणें, विस्मृति न होईल असें करणें, सतत चालेसा करणें. *Perpetua'tion*, *n.*; *Perpet'uator*, *n.*

Perpetu'ity, *n.* (पर्-पेच्यु'इटि)—perpetual continuance or possession, endless duration; perpetual annuity. शाश्वती, चिरस्थायिता, कायमची मुदत, दानवृपटीचा काळ; निरंतर मिळणारें वर्षासन,-वार्षिक नेमणूक.

Perplex', *v. t.* (पर्-प्ले'क्स्)—to bewilder, to puzzle (person, his mind); to complicate, to confuse (matter); to tangle (esp. in *pa. p.*). गोंधळवणें, घोटाळा करणें; गोंधळ करणें; गुंतवणें. *A perplexed question*, गुंतागुंतीचा,-भानगडीचा,-प्रश्न,-बाब.

Perplex'ity, *n.* (पर्प्ले'क्सिटि)—a puzzled state; being at a loss, bewilderment. गोंधळ, तारांबळ, घोळ, गुंतागुंत.

Perq'uisite, *n.* (प'र्‌-क्विझिट्‌)—something obtained for services beyond salary or settled wages ; casual profit, esp. (law) that coming to lord of manor beyond regular revenue. नियमित पगाराशिवाय इतर मिळकत, अवांतर प्राप्ति, भत्ता, अवांतर नफा. ठरावीक सान्याखेरीज जमीनदाराची इतर प्राप्ति.

Pĕ'rrў, *n.* (पे'रि)—fermented drink made from pears. ' पिअर्‌ ' फळांपासून केलेली दारू.

Pers'ecūte, *v. t.* (प'र्सिक्युट्‌)—to subject to ill-treatment ; to harass for heresy ; to worry. गांजणूक करणें, छळणें ; पाखंडीपणाबद्दल छळ करणें ; पाठीस लागणें, राशीस बसणें, ज्या राशीला लागणें. *Persecu'tion*, *n.* पाठ, पिच्छा, छळ, जाचणूक. *Pers'ecutor*, *n.* छळ करणारा. *Persecution mania*, insane delusion that one is persecuted. आपला छळ होत आहे असें वेड,-भ्रम.

Persĕvere', *v. i.* (पर्‌-सि-वि्ह'अर्‌)—to be steadfast ; to persist, (*in* course, *in* doing, *with* task, or abs.) to pursue steadily any course commenced. चिकटून राहणें, स्थिर असणें ; दीर्घ प्रयत्न करणें, खणपटीस बसणें. *Persever'ance*, *n.* दीर्घोद्योग, चिकाटी, नेट, धीर, खिस्ती सद्गुणांना व ईश्वरी कृपेला चिकटून राहणें. *Persever'ingly*, *adv.* चिकाटीनें.

Pers'iflage, *n.* (पे'अर्सिफ़्लाझ्‌)—light irony, raillery. टवाळी, निंदा, कुचाळी.

Persist', *v. i.* (पर्सि'स्ट्‌)—to continue to exist or do something in spite of obstacles, persevere (*in* opinion, course, doing). विघ्नांना न जुमानतां प्रयत्न चालू ठेवणें, नेट धरून असणें, हेका धरून चालणें. *Persis'tent*, *a.* दीर्घप्रयत्नी, दमदार, चिकाटीचा ; (Zool. & Bot.) permanent, (opp. *deciduous*). चिरस्थायी, कायम (उदा० वांगें मिरच्या, पानें, शिंगें, केंस इ०).*-ence,-ency*, *nn.*

Pers'on, *n.* (प'र्सन्‌)—an individual human being (contempt.), or divine being ; one's body or bodily presence ; character in a play ; (Gram.) one of the classes of pronouns and verb forms appropriated to the person speaking, spoken to, or spoken of. माणूस, असामी ; व्यक्ति ; शरीर, शरीराची ठेवण, रूप ; नाटकांतील भूमिका, सोंग, वेष, पात्र ; (व्याक०) पुरुष. *In person*, जातीनें, स्वतः, खुद्द. *In the person of*, च्यांत. *Natural p.*, human being. खरी व्यक्ति, माणूस. *Artificial p.*, (कायद्यानें निर्माण केलेली म्युनिसिपालिटी वगैरे) कृत्रिम व्यक्ति. *First p.*, *p.* speaking. प्रथम पुरुष. *Second p.*, *p.* spoken to. द्वितीय पुरुष. *Third p.*, *p.* spoken of. तृतीय पुरुष.

Pers'onable, *a.* (प'र्सनेबल्‌)—good-looking, handsome, comely. देखणा, सुरेख, सुरूप.

Pers'onage, *n.* (प'र्सनेज्‌)—eminent character ; character in a play. श्रेष्ठ व्यक्ति, प्रस्थ ; नाटकांतील पात्र.

Persō'na grā'ta, *n.* (पर्सो'ना ग्रे'टा)—envoy in whose favour the power to which he goes is predisposed. अधिकृत व (परदरबारी) मान्य वकील.

Pers'onal, *a.* (प'र्सनल्‌)—one's own ; done in person ; individual, private ; directed against or referring to an individual. स्वतःचा, वैयक्तिक, खासगी ; व्यक्तिविषयक ; (व्याक.) पुरुषवाचक. *n. pl.* (U. S.) paragraphs in newspaper relating to individual persons. वर्तमानपत्रांतील व्यक्तिविषयक किंवा खाजगी परिच्छेद. *P. rights*, व्यक्तीचे-वैयक्तिक-हक्क. *P. property,-estate*, जंगम मिळकत,-मालमत्ता.

Personăl'ity, *n.* (पर्सनॅ'लिटि)—existence or distinctive character of any one, individuality ; personage ; (*pl.*) remarks aimed at an individual. व्यक्तित्व, स्वत्व ; बडा मनुष्य, व्यक्ति, प्रस्थ ; व्यक्तिविषयक टीका.

Pers'onally, *adv.* (प'र्सनलि)—in person, in a personal manner, by bodily presence. व्यक्तिशः खुद्द, स्वतः.

Pers'onaltў, *n.* (प'र्सनल्टि)—personal property (in distinction from *real* property). खासगी मिळकत, जंगम मालमत्ता.

Pers'onate, *a.* (प'र्सनिट्‌)—(Bot.) having the opening of the lips closed by upward projection of the lower, as in snap dragon. अग्रगुंठित, झांकल्या तोंडाचा (उ० चांदवेल).

Pers'onāte, *v. t.* (प'र्सनेट्‌)—to play or act the part of ; to pretend to be (another), to assume, to put on. दुसऱ्याचा वेष घेणें, दुसरा आपणच असें खोटें भासविणें. *Persona'tion*, *n.* *-tor*, *n.*

Persŏn'ifў, *v. t.* (पर्सॉ'निफाय्‌)—to attribute personal nature to, to represent with attributes of a person, to symbolize (quality) by figure in human form. वस्तूवर मनुष्यत्वाचा आरोप करणें, चेतनधर्मारोप करणें. *Personifica'tion*, *n.* सचेतनधर्मारोप, मनुष्यगुणारोप ; चेतनगुणोक्ति (अलंकार).

Personnĕl', *n.* (पर्सा-ने'ल्‌)—staff or hands of a business, etc. as opposed to its equipment or plant, persons employed. नोकरलोक, कार्यकारी मंडळ, कामगारमंडळी.

Perspĕc'tive, *n.* (पर्‌-स्पे'क्टिव्ह्‌)—art of drawing so as to give the effect of solidity and

relative distance and size; relative distance and size; relation or proportion between the parts of a subject; vista, view. यथादर्शनचित्रलेखनकला; यथादर्शनवस्तुचित्र; (एखाद्या योजनेच्या,-वस्तूच्या,-) निरनिराळ्या भागांचे परस्परसंबंध किंवा प्रमाण; यथार्थ देखावा,-दृश्य. *a.* of or in perspective. यथादर्शन-चित्रकलेसंबंधी. *In p*, drawn according to rules of *p*., वस्तु जशी दिसते त्याप्रमाणे, यथादर्शनानुरूप (काढलेले). *Perspec'tively, adv.*

Perspica'cious, *a.* (पर्स्पिके'शस्)—having insight; penetrating, discerning. बुद्धीचा; तीक्ष्ण, कुशाग्र-बुद्धीचा, तीक्ष्णनजरेचा. *Perspica'city, n.*

Perspic'uous, *a.* (पर्स्पि'क्युअस्)—expressed with clearness, not obscure; lucid; (of person) clear in expression. स्पष्ट, सुव्यक्त; सुबोध, विशद, उघड; स्पष्ट शब्दांत बोलणारा (मनुष्य). *Perspicu'ity, n.* सुबोधता, स्पष्टता.

Perspire', *v. i. & t.* (पर्स्पाय़र्)—to sweat; to give off (liquid) through pores in form of vapour or moisture. घाम येणें; रंध्रांतून बाष्प-रूपानें (प्रवाही पदार्थ) बाहेर सोडणें,-टाकणें. *Perspir'able, a.* रोमरंध्रांतून विसर्जन करण्यासारखा.

Perspira'tion, *n.* (पर्स्पि-रे'शन्)—exudation of sweat through pores of skin, sweat. घाम, घाम येणें, घर्मस्राव. *Perspir'ative, Perspir'atory, aa.* घामाचा, घर्मविषयक, घाम आणणारा.

Persuade', *v. t.* (पर्स्वे'ड्)—to convince; to impel by argument, expostulation, &c. खातरी करणें; मन वळवणें, समजावणें. *Persuad'ed, pa. p.* convinced (*of* thing, *that*). वळलेला, खात्री पटलेला. *Persua'der, n.* person or thing that persuades; (*pl. sl.*) spurs. मन वळविणारा (मनुष्य,-वस्तु); टांचा. *To clap in the persuaders,* to spur horse. घोड्याला टांच मारणें,-दामटणें.

Persua'sion, *n.* (पर्स्वे'झन्)—act of persuading, conviction; a particular religious belief or sect, settled opinion; (joc.) race, kind, sort, or class. मन वळवणें, खातरी; विशिष्ट धार्मिक मत, पंथ, संप्रदाय; जात, वर्ग, प्रकार. *A man of the Jewish p.*, Jew. ज्यूजातीचा मनुष्य.

Persua'sive, *a.* (पर्-स्वे'सिव्ह्)—efficacious in persuading, calculated to persuade. मन वळविण्यासारखा, खात्री पटविणारा. *n.* inducement, motive. मोह पाडणारी वस्तु, मोहक हेतु.-*ly, adv.*

Pert, *a.* (पर्ट्)—forward, saucy in speech or conduct. उद्दाम, फाजील, धीट, उद्धट, आगाऊ. *Pert'ly, adv., Pert'ness, n.*

Pertain', *v. i.* (पर्टे'न्)—to belong, to relate, to concern, to regard, to have relation (to). चा असणें, चा भाग असणें, संबंध असणें, शीं संबंध जाणें.

Pertina'cious, *a.* (पर्टि-ने'शस्)—persistent, resolute, obstinate, determined. हेकट, दुराग्रही, निश्चयी. *Pertina'city, n.* हट्ट, हेका, दुराग्रह.

Pert'inent, *a.* (प'र्टिनन्ट्)—pertaining, relevent (*to*), to the point, having a real relation to, apposite. यथायोग्य, समर्पक, प्रसंगोचित. *n.* (usu. *pl.*) appurtenance (s). अंगभूत वस्तु, उपांग, मालकीच्या वस्तु. *Pert'inence,-cy, n.*

Perturb', *v. t.* (पर्टर्ब्)—to disturb mentally, to disquiet; to throw into (physical) confusion, to confuse, to agitate. त्रास देणें; क्षोभविणें, खळबळ उडवून देणें, संतापविणें. *Perturba'tion, n., Perturb'ative, a.*

Peruke', *n.* (परूक्)—wig. केसांचा टोप, टोप.

Peru'sal, *n.* (पेरू'झल्)—reading through or thoroughly; examining carefully. लक्षपूर्वक वाचन; निरीक्षण.

Peruse', *v. t.* (पेरूझ्)—to read through or carefully; to scan (features, &c.). समग्र, -लक्षपूर्वक पाहणें, न्याहाळून पाहणें.

Peru'vian, *a.* (परूव्हिअन्)—of Peru. (द० अमेरिकेंतील) पेरू देशासंबंधी, पेरू देशाचा (रहिवासी). *P. bark,* bark of cinchona tree. सिंकोना वृक्षाची साल (यापासून क्विनाइन काढतात).

Pervade', *v. t.* (पर्-व्हे'ड्)—to spread through; to be rife among or through. सर्वत्र पसरणें, व्यापणें, वेढणें, भिनणें. *Perva'sive, a.* व्यापकधर्मी, व्यापक. *Perva'sion, Perva'siveness, nn.*

Perverse', *a.* (पर्व्ह'र्स्)—obstinately or wilfully in the wrong; untractable, wayward; petulant, peevish; wicked; (of verdict) against weight of evidence or judge's direction. विमार्गगामी; कुटिल; चिडखोर, हेकट, हुजतखोर; दुष्ट, कुटिल; पुराव्याच्या विरुद्ध व न्यायाधिशाच्या कलाविरुद्ध दिलेला (निकाल). *Pervers'ity,-sion, nn.*

Pervert', *v. t.* (पर्व्ह'र्ट्)—to turn to wrong use; to interpret wrongly, to misinterpret wilfully; to lead astray. दुरुपयोग करणें; विपर्यास करणें; फिरविणें, कुमार्गाला नेणें, भ्रष्ट करणें. *n.* (प'र्व्हर्ट्) person who adopts another religion, perverted person. असद्धर्मी मनुष्य; कुमार्गगामी मनुष्य.

Perv'ious, *a.* (प'र्व्हिअस्)—allowing passage or access (*to*), penetrable, (fig.) accessible (*to* reason etc). भेद्य, भेदनीय, सच्छिद्र; प्रवेश करण्याजोगा, प्रवेशक्षम.-*ness, n.* प्रवेशक्षमता, अरोधकता, सच्छिद्रता.

Pese'ta, *n.* (पेसे'टा)—Spanish silver coin worth about 10 d. दहा पेन्स किंमतीचें चांदीचें स्पॅनिश नाणें [Sp.]

Pes'ky, *a.* (पे'स्कि)—(U. S. sl.) vexatious, annoying. त्रासदायक, सतावणारा.

Pe'so, *n.* (पे'सो)—a silver coin worth about 4s., used in most S.-Amer. republics. द. अमेरिकेंतील चार शिलिंग किंमतीचें चांदीचें नाणें. [Sp.]

Pes'sary, *n.* (पे'सरि)—(med.) instrument worn in the vagina to prevent uterine displacements.

गर्भाशयाला आधार देण्याकरितां योनिमार्गात ठेवण्याचें साधन, आधारवलय, संततिनियमानाचें एक साधन. [Gk. *pesson*, a small stone]

Pĕss'imism, *n.* (पे'सिमिझम्)—tendency to look at the worst aspect of things (opp. to optimism). दुःखवाद, निराशावाद, नैराश्यवाद. *Pess'imist*, *n.* निराशावादी, रड्या. *Pessimis'tic*, *a.* निराशावादाचा, निराशावादी.

Pĕst, *n.* (पेस्ट्)—troublesome or noxious person, animal, or thing; (now rare) pestilence. त्रासदायक प्राणी किंवा वस्तु, उपाधि, सांथीचा रोग, सांथ. *P. house*, hospital for plague etc. सांसर्गिक रोगगृह, -रोग्यांचें इस्पितळ.

Pĕs'ter, *v. t.* (पे'स्टर्)—to plague, to trouble, to disturb, to annoy; to importune. छळणें, दुःख देणें; खणपटीस बसणें.

Pĕstif'erous, *a.* (पेस्टि'फरस्)—noxious, spreading infection, foul; (*fig.*) bearing moral contagion, pernicious. रोगकारक, सांसर्गिक रोग उत्पन्न करणारा, उपद्रवी, कुचाळ; (नीतिदृष्ट्या) हीन, उपद्रवी, नष्ट.

Pĕs'tilence, *n.* (पे'स्टिलन्स्)—a fatal epidemic disease (esp. bubonic plague). प्राणघातक सांथ, मरी, ग्रंथिज्वर. *Pestilen'tial*, *a.*

Pĕs'tilent, *a.* (पे'स्टिलन्ट्)—deadly or pestiferous; troublesome; obnoxious. घामीचा, मरीचा, घातुक; त्रासदायक, नीतिविघातक; किळसवाणा.

Pĕs'tle, *n.* (पे'सल्)—an instrument for pounding and breaking substances in a mortar. बत्ता, मुसळ. *v. t. & i.* to pound (as) with *p.*; to use *p.* कुटणें, कांडणें; (मुसळानें) सडणें, कुटणें. *P. & mortar*, खलबत्ता.

Pĕt, *n.* (पेट्)—an animal or person on which affection is lavished; a darling, a favourite child; fit of sulks. प्रीतिपात्र, पाळींव आवडता प्राणी; लाडका, आवडता; खिन्नता, उद्विग्नता, रागाचा झटकारा. *v. t.* to treat as a pet, fondle. चे लाड करणें, प्रेमानें वागवणें. *P. aversion*, नावडता विषय. *P. cock*, पाणी, वाफ वगैरे बाहेर सोडण्याचें लहान ग्रूंच,-चावी,-तोटी. *P. name*, one expressing fondness or familiarity. लाडकें नांव. *To take* (usu. *the*) *pet*, *be in a p.*, रागाचा झणकारा येणें.

Pĕt'al, *n.* (पे'टल्)—coloured leaf of a flower. पाकळी, दल. *Pet'alled*, a. पाकळ्यांचा किंवा पाकळ्या असलेला.

Petärd', *n.* (पिटार्ड्)—(hist.) small bomb for attaching to door, etc. to burst it open; kind of firework. दरवाजे वगैरे फोडण्यासाठीं लहान कुलपी गोळा; एक प्रकारचा फटाका.

Pē'ter, *n.* (पी'टर्)—A male Christian name. पुरुषाचें ख्रिश्चन धर्मांतील एक नांव. *To rob P. to pay Paul*, to take away from one to give to another, discharge one debt by incurring another. एकाला लुबाडून दुसऱ्याची भर करणें, एक कर्ज फेडण्यासाठीं दुसरें नवीन कर्ज काढणें. *P. penny*, *P.'s penny or pence*. प्राचीन काळीं पोपला प्रत्येक घरटी दिलेला एक पेनी कर; (१८६० नंतर) पोपला दिलेली ऐच्छिक देणगी.

Pē'ter, *v. i.* (पी'टर्)—(sl.) (with *out*) to give out, to come to an end. शेवट होणें, संपणें.

Pĕt'iole, *n.* (पे'टिओल्)—leaf-stalk. पानाचा देंठ, -देंठ, पर्णदंड.

Peti'tion, *n.* (पिटि'शन्)—a request, an entreaty, prayer or supplication (esp. written). लेखी विनंति, अर्ज. *v. t. & i.* to make a (petition) to, ask humbly. अर्ज करणें, नम्र विनंति करणें.

Peti'tioner, *n.* (पिटि'शनर्)—one who offers a petition. अर्जदार, विनंति करणारा.

Peti'tiō princip'ii, *n.* (पिटि'शिओ प्रिन्सि'पिआय)—begging of the question. विवाद्य,-विवादिक,-गोष्टीचा खेरपणा गृहीत धरणें, सिद्धसाधन, असाधारण हेत्वाभास.

Pĕt'rel, *n.* (पे'ट्रल्)—a small sea-bird associated with storms. समुद्रावरील एक लहान पक्षी.

Pĕt'rify, *v. t. & i.* (पे'ट्रिफाय्)—to turn into stone or stony substance (lit. & fig.); to paralyse with terror; to become rigid. पाषाण -दगड-करणें; भीतीनें गर्भगळित करणें,-होणें, स्तब्ध होणें, भयानें स्तंभित होणें,-चकित होणें। घट्ट,-ताठ-होणें. *Petrifac'tion*, *n.* निष्ठुरता, कठोरपणा, पाषाणहृदयीपणा, पाषाण होणें.

Pĕt'rol, *n.* (पे'ट्रोल्)—petroleum spirit, refined petroleum. शुद्ध केलेलें खानिज तेल, पेट्रोल. *v. t.* to supply (motor) with this. (मोटरमध्यें) पेट्रोल घालणें,-पुरविणें..

Pĕtro'leum, *n.* (पेट्रो'लिअम्)—mineral oil. खनिज तेल. [L & Gk *petra*, rock; oleum, oil]

Pĕtt'icoat, *n.* (पे'टिकोट्)—woman's garment worn immediately beneath dress; (pl.) skirts worn by little children; a woman, girl; (*pl.*) female sex. स्त्रियांचा लेहंगा, घागरा; (लहान मुलांचे) झगे; स्त्री, मुलगी; स्त्रीजात. *a.* feminine. स्त्रियांचा, बायकांसंबंधीं. (*I have known him*) *since he was in pp.*, since he was a child. त्याच्या बाळपणापासून. *P. government*, घरांत किंवा राजकारणांत स्त्रियांचें वर्चस्व.

Pĕtt'ifŏg *v. i.* (पे'टिफॉग)—to practise legal chicanery; quibble, wrangle, about petty points. वकिली लपंडाव खेळणें, मुखत्यारी,-हलक्या प्रतीचीं वकिली कामें,-करणें; लहानसहान गोष्टींत घासाघीस घालणें. *Petti'fogger*, *n.* lawyer of low class; mean or crooked dealer. छोटेखानी,-हलका,-वकील; लटपटी करणारा,-हलकट युक्त्या योजणारा. *Pett'ifogging*, *a.* mean, quibbling. लटपट्या, हलकट.

Pĕtt'ish, *a.* (पे'टिश्)—fretful, a peevish. रागीट, चिडखोर.

Pĕtt'itoes, *n. pl.* (पे'टिटोझ्)—pig's feet. डुकराचे पाय.

Pĕtt'y̆, *a.* (पे'टि)—having little importance, unimportant, trivial, little-minded; minor, inferior. क्षुल्लक, क्षुद्र; अल्प; क्षुद्रमनाचा; लहान, हलक्या किंमतीचा. *Petty cash,* (जमेच्या किंवा खर्चाच्या) हलक्या रकमा. *P. jury,* लहान ज्यूरि, पंचमंडळ (१२ जणांचें). *Pet'ily, adv.; Pet'iness, n.*

Pĕt'ūlant, *a.* (पे'टयुलन्ट्)—out of temper; touchy, irritable, peevish, fretful. तिरसट; शीघ्रकोपी; तिरसटपणाचा, तापट.—*ly, adv.; Petulance, n.*

Pĕtū'nia, *n.* (पिट्यु'निआ)—plant with white, purple or violet flowers of funnel shape; dark violet, purple. पांढरा, जांभळा वगैरे रंगाचीं फुलें असलेलें झाड; (*a.*) जांभळा.

Pew, *n.* (प्यू)—enclosed seat in a church for worshippers; fixed bench with back in church. खिस्ती देवळांत प्रार्थना करण्याकरितां बसण्याची बंदिस्त जागा, पाठीं टेंकण्यासारखें बांक.

Pē'wit, *n.* (पी'विट्)—lapwing or *peewit.* टिटवी.

Pew'ter, *n.* (प्यू'टर्)—grey alloy of tin and other metals; utensils of pewter; (sl.) prize-money. कासें, जस्त; जस्ताचीं-काशाचीं-भांडीं; बक्षिसाची रकम.

Phā'ëton, *n.* (फे'इटन्, फे'टन्)—a light four-wheeled open carriage, usu. pair-horsed. उघडी दोन घोड्यांची चार चाकी गाडी.

Phăl'ănx, *n.* (फॅ'लँक्स्)—a body of infantry in solid oblong formation and in close array; united or organized party or company; each bone of finger or toe; bundle of stamens united by filaments. सैन्यव्यूह, गट, फळी, तुकडी; हाताच्या किंवा पायाच्या बोटाचें प्रत्येक हाड; तंतूंनीं जोडलेला पुंकेसरांचा झुपका.

Phăn'erogăm, *n.* (फॅनरोगॅम्)—plant with pistils and stamens; a flowering plant. सपुष्प वनस्पति, दृश्य-बीज वनस्पति.-*ic, Phanerog'amous, aa.* [Gk *phaneros,* visible; *gamos,* married]

Phăn'tăsm, *n.* (फॅन्टॅझम्)—illusion, phantom; apparition, vision of an absent person. भास, आभास; भूत.

Phăntăsmagor'ia, *n.* (फॅन्टॅझ्मगॉ'अरिआ)—a crowd or succession of dim or doubtfully real person. अंधुक किंवा आभासमान व्यक्तींची गर्दी किंवा देखावा, आभासमान व्यक्ति एकामागून एक दिसणें (मॅजिक लँटर्न-भूतगण कंदिलाचया-खेळांतल्याप्रमाणें). -*go'ric, a.*

Phăn'tasy̆, *n.* (फॅन्टसि)—faculty of imagination. कल्पनाशक्ति, कल्पना.

Phăn'tom, *n.* (फॅन्टम्)—a spectre, an apparition; a dim image; (*attrib.*) unreal. पिशाच्च, भूत; आभास, भ्रम, छाया; अंधुक आकृति, कल्पनाचित्र; खोटा, काल्पनिक. *P. tumour,* temporary swelling. वायुजन्य उदरवृद्धि, गर्भाभास.

Phăr'isee, *n.* (फॅ'रिसी)—one of ancient Jewish sect distinguished by strict observance of traditional & written law & pretensions to sanctity, a formalist; self-righteous person; hypocrite. (प्राचीन यहुदी पंथांतील) कडकडीत कर्मठ यहुदी; धार्मिक मंत्रतंत्राकडे लक्ष पुरविणारा; दांभिक, ढोंगी. *Pharisa'ic,-ical, aa.;-saism, n.*

Phărmaceut'ical, *a.* (फार्मास्यु'टिकल,-क्यू-)—of pharmacy; of the use or sale of medical drugs. औषधिक्रियेचा, औषधिक्रियाशास्त्रासंबंधीं; औषधांचा उपयोग किंवा विक्री यासंबंधीं.-*tics, n.* औषधिनिर्माणविद्या, औषधें तयार करण्याचें विज्ञान. -*tist, n.* औषधें तयार करणारा,-विकणारा.

Phărmacŏl'ogy̆, *n.* (फार्मकॉ'लाजि)—theory of pharmacy. औषधिविज्ञान, औषधिगुणधर्मशास्त्र. -*gist, n.*

Phărmacopoe'ia, *n.* (फार्मकोपी'आ)—book with list and directions for use of drugs; stock of drugs. औषधिगुणधर्मग्रंथ, भेषजसंस्कारग्रंथ; औषधिसंग्रह.

Phărm'acy̆, *n.* (फा'र्मसि)—the art of dispensing drugs; a drug-store. औषधें तयार करण्याची विद्या; औषधालय.

Phăr'ŏs, *n.* (फे'अरॉस)—a lighthouse, a beacon. दीपस्तंभ, दीपगृह. [Gk. *pharos,* island of Alexandria, lighthouse on this]

Phă'ry̆nx, *n.* (फॅ'रिन्क्स्)—the muscular cavity behind the mouth and the nose. घसा, अन्नमार्गाचा वरचा भाग. *Pharyn'geal, a.* (-जि-) घशाचा, सत्वपथाचा, घशांतील.

Phase, *n.* (फेझ्)—a particular stage or state or aspect of the moon or planet at a certain time; stage of development or process. कला, अवस्थान्तर, चन्द्रकला; (विषयाची किंवा विचाराची) बाजू, स्वरूप; दृष्टि, अवस्था. *Pha'sic, a.*

Phea'sant, *n.* (फे'झन्ट)—a game-bird of handsome plumage. एक प्रकारचा पक्षी, तित्तिर, तीतर, कृकण पक्षी. *P.-eyed,* (of flowers) marked like *p.*'s eye. तित्तिरपक्ष्याच्या डोळ्यासारखी खूण असलेले.

Phe'nix, *n.* (फी'निक्स्)—See *Phoenix.*

Phēnŏl'ogy, *n.* (फिनॉ'लाजि)—study of the times of recurring natural phenomena esp. in relation to climatic conditions. हवामानानुसार सृष्टचमत्कारांची पुनरावृत्ति केव्हां केव्हां होते याचें शास्त्र,-अभ्यास.

Phēnŏm'enal, *a.* (फिनॉ'मिनल्)—concerned with phenomena; out of the common; extremely remarkable, astounding. दृश्यचमत्कारविषयक देखाव्याचा; लोकोत्तर; विलक्षण, अद्भुत.

Phēnŏm'enon, *n.* (फिनॉ'मिनन्)—(*pl.*-ena) observed or apparent object or fact or occurrence; a remarkable person or thing; a wonder, something extra-ordinary. दृश्य, देखावा; लोकोत्तर पुरुष किंवा वस्तु; अद्भुत गोष्ट,-घटना.

Phe'nyl, *n.* (फी'निल्, फे'-)—a radical found in

benzene, phenol, etc. दुर्गंधिनाशक खनिज तेल, फिनाइल.

Phi'al, *n.* (फा'यल्)—a small bottle. शिशी, कुपी.

Philăn'der, *v. i.* (फिलॅं'न्डर्)—to amuse oneself with love-making, to dangle after woman. स्त्रियांशीं लाळघोटेपणा करणें, बायकांचे नादीं लागून स्वतःची करमणूक करणें.*-derer, n.* स्त्रीसहवासलोलुप.

Philăn'thropў, *n.* (फिलॅं'न्थ्रपि)—doing good to one's fellowmen. परोपकारबुद्धि, भूतदया, मानवजातीविषयीं प्रेम. *Philanthrop'ic, a.* लोककल्याणाचा; परोपकारी (मनुष्य).

Philăt'ely *n.* (फिलॅ'टलि)—stamp-collecting. तिकिटें गोळा करणें. *Philatel'ic, a.* स्टॅंप,-तिकिटें,-गोळा करण्याच्या नादाचा,-धंद्याचा,-शास्त्राचा. *Philat'elist, n.* तिकिटें गोळा करणारा.

Philharmŏn'ic, *a.* (फिलार्मॉ'निक्)—musical, (persons) fond of music (only in titles of societies). गायनप्रेमी, गायनविषयक (संस्था).

Phil'hellēne, *n.* (फि'लेलीन्)—lover of Greece. ग्रीस देशाचा,-ग्रीसच्या स्वातंत्र्याचा,-अभिमानी.*-hellē'nic, a.;-hell'enism,-ist, nn.* [Gk *Hellen,*=Greece]

Philĭpp'ic, *n.* (फिलि'पिक्)—an invective. निर्भर्त्सनात्मक भाषण,-लेख; भेदक व उत्तेजनपर भाषण.

Phil'ippine, *n.* (फि'लिपीन्)—an almond or other nut with double kernel. बदाम वगैरे दुहेरी कवचीचें फळ.

Phil'istine, *n.* (फि'लिस्टाइन्,-स्टिन्)—an uncultured person. अडाणी मनुष्य. *a.* uncultured. अशिक्षित, अडाणी.*-nism, a.* क्षुद्रबुद्धि.

Philŏl'ogў, *n.* (फिलॉ'लजि)—science of the structure and development of a language. भाषाशास्त्र, शब्देतिहासशास्त्र.*-gical, a.;-gist, n.* भाषाशास्त्रज्ञ.

Phil'omel, *n.* (फि'लोमेल)—(poet.) the nightingale. बुलबुलपक्षी. Also *Philome'la.*

Philoprogĕn'itive, *a.* (फिलाप्रोजे'निटिव्ह्)—prolific; fond of one's offspring. पुष्कळ वाढीचा; अपत्यप्रेमी.

Philŏs'opher, *n.* (फिलॉ'सफर्)—a student or possessor of philosophy or moral or mental science. तत्त्वज्ञानी. *Philosophers' stone,* (हीन धातूचें सोनें करणारा) परीस.

Philŏsŏph'ic,-cal, *aa.* (फिलॉसॉ'फिक्,-कल)—of, consonant with, philosophy; skilled in, devoted to, philosophy (often in title of societies); wise; calm, temperate. तत्त्वज्ञानाचा, तत्त्वज्ञानाशीं जुळता; तत्त्वज्ञानाला वाहिलेला, तत्त्वज्ञानविषयक (संस्था); शहाणपणाचा; शांत, गंभीर, विवेकी, विचारी.

Philos'ophize, *v.i. & t.* (फिलॉ'सफाइझ्)—to play the philosopher; speculate, moralize; render philosophic. तत्त्वज्ञानदृष्टीनें-तात्त्विक-विचार करणें; तत्त्व सांगणें, तात्पर्य काढणें; तात्त्विकपणा आणणें.

Philŏs'ophў, *n.* (फिलॉ'सफि)—pursuit of wisdom or of the knowledge of things and their causes, practical wisdom; equanimity. तत्त्वज्ञान; समानवृत्ति. *Natural p.,* पदार्थविज्ञानशास्त्र. *Moral p.,* नीति, नीतिशास्त्र. [Gk *philos,* loving; *sophia,* wisdom].

Phil'tre, *n.* (फि'ल्टर्)—love-potion. कामोद्दीपक औषध, वशीकरण, मोहनी. Also Phil'ter.

Phiz, *n.* (फिझ्)—(colloq.) person's face with regard to its looks. मुद्रा, चेहरा.

Phlĕbŏt'omў, *n.* (फ्लिबॉ'टमि)—blood-letting as medical operation, opening a vein. शीर तोडणें. *-omize, v. t. & i.* शीर तोडणें. (शरीरांतून) रक्त घेणें.

Phlĕgm, *n.* (फ्लेम)—bronchial mucus ejected by coughing; coolness of character or temper; impassiveness. कफ, श्लेष्मा; थंडपणा; अनास्था, दुर्लक्ष.

Phlegmăt'ic, *a.* (फ्लेग्मॅ'टिक्)—relating to phlegm; not easily agitated; sluggish. कफाचा, कफयुक्त; सहसा क्षुब्ध न होणारा; जड, सुस्त, शीतप्रकृति, थंड, मंद, *—ically, adv.*

Phlŏx, *n.* (फ्लॉक्स)—plant with salver-shaped flower. तावलीसारख्या रुंद फुलांचें फुलझाड.

Phoen'ix, *n.* (फीनिक्स)—a bird, the only one of its kind, fabled to burn itself and rise renewed from its ashes; a unique thing, a singular beauty. स्वतःला जाळून घेतल्यानंतर स्वतःच्या राखेंतून उत्पन्न होणारा एक पक्षी; अद्वितीय गोष्ट, अप्रतिम नमुना, कळस.

Phōne, *n. & v.* (फोन्)—(colloq.) telephone; simple vowel or consonant sound. टेलिफोन (वर बोलणें); स्वर किंवा व्यंजन याचा साधा उच्चार.

Phonĕt'ic, *a.* (फोने'टिक्)—corresponding to vocal sound, representing sounds. ध्वनीचा, ध्वनीसंबंधीं, शब्दाच्या उच्चारासंबंधीं.

Phonĕt'ics, *n.* (फोने'टिक्स)—study of phonetic phenomena, the doctrine of sounds. ध्वनिशास्त्र, वर्णोच्चारशास्त्र.

Phō'ney, *a.* (फो'नि)—(sl.) false, bogus, counterfeit. खोटा, कृत्रिम, बनावट.

Phō'nic, *a.* (फो'निक्)—acoustic, phonetic. ध्वनिसंबंधीं, श्रवणेंद्रियासंबंधीं, ध्वनीचा. *Pho'nics, n.* phonetics. ध्वनिशास्त्र.

Phō'nofilm, *n.* (फो'नॉफिल्म्)—cinematographic film with accompanying sounds supplied by synchronized gramophone record. बोलका चित्रपट.

Phō'nogrăm, *n.* (फो'नॉग्रॅम्)-sound-record made by phonograph; sound-symbol in shorthand. फोनोग्राफनें केलेलें ध्वनिलेखन; लघुलिपींतील ध्वनिदर्शक संज्ञा.

Phō'nogrăph, *n.* (फो'नोग्राफ्)—a character for expressing a sound, an instrument automatically recording and reproducing sounds. ध्वनिलेखनयंत्र, फोनोग्राफ. *Phono'grapher,-raphist, nn.* -फोनोग्राफनें ध्वनिलेखन करणारा. *Phonog'raphy, n.* sound-recording by the phonograph, Pitman's phonetic short-hand. फोनोग्राफनें ध्वनिलेखन करणें,-करण्याची कला; (पिटमनची) लेखनपद्धति.

Phonŏl'ogy *n.* (फॉनॉ'लॉजि)—science of vocal sounds. उच्चारशास्त्र, ध्वनिशास्त्र. *Phonolo'gical, a.*

Phō'notȳpe, *n.* (फो'नाटाइप्)—phonetic printing-type. वर्णानुरूप मुद्रा,-टाइप,-ठसा.

Phŏs'gēne, *n.* (फॉ'स्‌जीन्)-a poison gas, carbon oxychloride, used in the great war. पहिल्या महायुद्धांत उपयोगांत आणलेला विषारी वायु,-धूर.

Phŏs'phāte, *n.* (फॉ'स्फेट्)—a salt of phosphoric acid. फॉस्फेट नांवाचा क्षार. *Phos'phide, n.* a combination of phosphorus with an element or radical. फॉस्फरसचा दुसऱ्या एखाद्या तत्त्वाशीं संयोग होऊन झालेला संयुक्त पदार्थ, स्फुरिल. *Phos'phite, n.* a salt of phosphorous acid. स्फुराम्लाचा क्षार.

Phŏsphoresce', *v. i.* (फॉस्फरे'स्)—to show phosphorescence. स्फुरासमाणें चकाकणें. *Phosphores'cence, n.* faint luminosity in the dark. काळोखांत मंद चकाकणारा वस्तूवरील फॉस्फरसचा उजेड.

Phŏs'phorus, *n.* (फॉ'स्फरस)—a non-metallic elementary substance. मूलतत्त्वांतला एक ज्वालाग्राही घन पदार्थ. *Phosphor'ic, Phos'phorous, aa.* फॉस्फरससंबंधीं, स्फुर, फॉस्फरस असलेला, स्फुरयुक्त.

Phō'tō, *n.* & *v. t.* & *i.* (फो'टो)—(pl.-os), photograph (colloq.). फोटोग्राफ,-छायाचित्र,-(काढणें). *P.-play,* (colloq.) dramatic representation in moving pictures. चलच्चित्रपटांतील चित्रें, त्यांतील हावभाव वगैरे.

Phō'tograph, *n.* (फो'टग्राफ्)—a picture taken by means of light on a sensitive film, a picture obtained by photography. यंत्रानें काढलेलें हुबेहुब छायाचित्र, फोटो. *v. t.* & *i.* to take *p.* of; admit of being photographed. चें छायाचित्र घेणें, चा फोटो काढणें; फोटो काढण्यालायक असणें. *I always p. badly,* come out badly in *p.* माझा फोटो नेहमीं वाईट निघतो. *Photog'raphy, n.* प्रकाशलेखनविद्या, छायाचित्र,-फोटो,-घेण्याची कला.-*ic, a.*

Photŏg'rapher, *n.* (फटॉ'ग्रफर्)—one who takes pictures by means of photography. फोटो काढणारा, छायाचित्रें काढणारा.

Phōtogravūre', *n.* (फोटग्रॅव्ह्यु'अर्)—photograph reproduced by etching on metal. प्रकाशलेख (फोटो), पत्र्यावर कोरून त्यावरून छापलेलें चित्र, कोरलेल्या चित्रावरून चित्रें घेण्याची कला.

Photŏm'eter, *n.* (फटॉ'मिटर्)—instrument for measuring the intensity of light. प्रकाश-तीव्रतामापक यंत्र, प्रकाशाचें प्रखरत्व मोजण्याचें यंत्र. *Photomet'ric, a.; Photom'etry, n.* प्रकाश-मापन.

Phō'tophōne, *n.* (फो'टॅफोन्)—instrument for transmitting sounds by means of light. प्रकाशद्वारा ध्वनि पाठविण्याचें यंत्र.

Phō'tosphēre, *n.* (फो'टॅसफिअर्)—sun's or star's luminous envelope. सूर्य किंवा इतर तारे यांच्या भोंवतालचें) प्रकाशावरण, तेजोमंडळ.-*spheric, a.* तेजोमंडळाचा.

Phōto-telĕg'raphȳ, *n.* (फोटोटिले'ग्रफि)—electric reproduction of pictures, writing, etc. at a distance. विजेच्या योगानें दूर अंतरावरून चित्रें (फोटो-) काढणें,-दूर अंतरावर वाखविणें.

Phōtothe'rapȳ, *n.* (फोटोथे'रपि)—treatment of disease by the influence of light. प्रकाशाच्या योगानें रोग बरे करणें,-औषधोपचार करणें.

Phrāse, *n.* (फ्रेझ्)—a mode of expression, diction; a small group of words; (Mus.) short sequence of notes; (pl.) mere words. वाक्संप्रदाय, वाक्प्रचार, बोलण्याची किंवा लिहिण्याची धाटणी; मार्मिक शब्दप्रयोग; वाक्यांश, वाक्याचा भाग; पदार्चे कडवें; निरर्थक शब्द, व्यर्थ बडबड. *v. t.* to choose phrases for; term. वाक्प्रचार योजणें, शब्दांची निवड करणें; शब्दांत सांगणें. *We have had enough of pp.*, व्यर्थ बडबड पुरे झाली. *P.-monger,* person addicted to fine sounding phrases. शुष्कपांचा,-मार्मिक शब्दप्रयोगांचा,-नेहमीं उपयोग करणारा.

Phrāseŏl'ogȳ, *n.* (फ्रिझिऑ'लजि)—a manner of expression, a choice of words, diction. निवडक शब्द, परिभाषा, वाक्शैली.-*lo'gical, n.*

Phrenŏl'ogȳ, *n.* (फ्रिनॉ'लजि)—study of external cranium as indicative of the affections and mental faculties. मस्तक-सामुद्रिक, कपाळलक्षणविद्या, डोक्याच्या कवटीच्या ठेवणीवरून मनुष्याच्या बुद्धीची वगैरे कल्पना करण्याचें शास्त्र.-*gist, n.* मस्तक-सामुद्रिकज्ञ.

Phthī'sis, *n.* (थाइ-सिस्)—pulmonary consumption; a progressive wasting disease of the lungs. क्षयरोग; कफ, राजयक्ष्मा. *Phthis'ical,* (थि'झिकल्) *a.*

Phȳlăc'terȳ, *n.* (फिलॅ'क्टरि)—a small leather box containing Hebrew texts on vellum, worn by jews; amulet. ज्यू शास्त्रवचनें लिहिलेली चामड्याची पेटी; ताईत, गंडा.

Phȳlloxer'a, *n.* (फिलॉक्सि'अर)—plant-louse injurious to vines. द्राक्षांच्या वेलीवरील कीड.

Phȳs'ic, *n.* (फि'झिक्)—the medical art or profession, the art of healing; (colloq.) drugs. वैद्यकीय कला, वैद्याचा धंदा, वैद्यक, वैद्यकी औषधें, दवा. *v. t.* to dose; (sl.) handle severely. ला औषध देणें, औषधोपचार करणें; कडक रीतीनें वागवणें, -वापरणें.

Phȳs'ical, *a.* (फि'झिकल्)—of nature or according to its laws; of physics. सृष्टिविषयक, शारीरिक; पदार्थविज्ञानशास्त्राचा.-*ically, adv.*

Phȳsi'cian, *n.* (फिझि'शन्)—healer; (also fig.) a qualified medical practitioner. (रोग) बरा करणारा, नीति वगैरे शिकविणारा मनाचा वैद्य; वैद्य, डॉक्टर.

Phȳs'icist, *n.* (फि'झिसिस्ट्)—student of physics or of natural science; believer in the material origin of vital phenomena. पदार्थविज्ञानशास्त्राचा विद्यार्थी, भौतिकशास्त्रज्ञ; भौतिकवादी.

Phўs'ĭcs, *n. pl.* (फि'झिक्स)—the science of the properties and inter-relations of matter and energy. पदार्थविज्ञानशास्त्र, भौतिकशास्त्र.

Phўsiŏgn'omў, *n.* (फिजिऑ'नमि)—the face as index of character; the art of judging character from face and form. चेहऱ्याची ठेवण, तोंडवळा; तोंडावरून-चेहऱ्यावरून-स्वभाव जाणण्याची विद्या.

Phўsiŏg'raphў, *n.* (फिझिऑ'ग्रफि)—description of natural phenomena; physical geography. सृष्टचमत्कारवर्णन; प्राकृतिक भूवर्णन,-भूगोल. *Physiograph'ical, a.*

Phўsiŏl'ogў, *n.* (फिझि-ऑ'लाजि)—the science or study of the functions and phenomena of living beings. प्राणिगुणधर्मशास्त्र, इंद्रियविज्ञानशास्त्र. *Physiolo'gic(al), aa.*; *Physiolo'gist, n.* इंद्रियविज्ञानशास्त्रवेत्ता.

Phўsique', *n.* (फिझी'क्)—a person's bodily structure and development. शरीररचना, शरीरप्रकृति.

Pi, *n.* (पाइ)—Greek letter p, (Math.π) as symbol of ratio of circumference of circle to diameter (3.14159). ग्रीक भाषेंतील एक अक्षर; वर्तुळाच्या परिघाचें व्यासाशीं असणार प्रमाण दाखविणारें चिन्ह (हें प्रमाण २२/७ किंवा ३·१४१५९ असतें.).

Pia ma'ter, *n.* (पा'यामे'टर्)—inner membrane enveloping brain and spinal chord; one's brain or wits. अंतर्मस्तिष्कावरण, मगजावरची त्वचा व मेंदू, बुद्धि, डोकें.

Pi'anĭst, *n.* (पी'अनिस्ट)—a performer on piano. इंग्रजी पियानो (पेटीसारखें वाद्य) वाजविणारा.

Piăn'ō, Piă'nofŏrtė, *nn.* (पिॲ'नो, पिॲ'नोफॉर्टि)—(pl. *pianos*) a metal-stringed keyboard musical instrument. पेटीसारखें एक प्रकारचें इंग्रजी वाद्य, पियानो.

Pia'no, *adv.* & *n.* (पिआ'नो)—(passage to be played) softly. हळू, हलक्या आवाजांत (वाजविण्याचा गाण्याचा भाग).

Pīanō'la, *n.* (पीअनो'ला)—kind of mechanical piano-forte player. पिआनो वाजविण्याचें एक यांत्रिक साधन. [trade name]

Piăs'tre, *n.* (पिॲ'स्टर)—Spanish dollar; Turkish coin 2 d. to 6 d. एक स्पॅनिश नाणें; २ ते ६ पेन्स टर्किश नाणें.

Piăzz'a, *n.* (पिॲ'झा)—square or market-place in Italian town; (U. S.) verandah of house. चौक; घराभोंवतालची गॅलरी,-सज्जा.

Pi'broch, *n.* (पी'ब्रॉक्)—form of bag-pipe music. सनईचें,-मुरलीचें,-वादन.

Pi'ca, *n.* (पा'इ-का)—a size of type (12-point). एक प्रकारचा १२ पॉइंटचा-पाइका टाइप,-टंक.

Pic'ador, *n.* (पि'कॅडॉर्)—a mounted man with lance in bull-fight. बैलांच्या झुंजीच्या खेळांत भाला घेतलेला घोडेस्वार. [Sp. *picar*, prick]

Pĭcarĕsque', *a.* (पिकरे'स्क्)—(of fiction) relating to rogues. लुच्चे लोकांसंबंधीं, ठगांचा.

Pĭcarōōn', *n.* (पिकरू'न्)—a rogue, pirate. लुच्चा मनुष्य, चांचा, चांचेगिरी करणारा मनुष्य. *v. i.* चांचेगिरी करणें.

Pĭcayune', *n.* (पिकॅयू'न्)—a small coin; trifle. एक लहान नाणें; क्षुल्लक गोष्ट. *a.* petty, mean. अति लहान, क्षुद्र, क्षुल्लक.

Piccaninn'ў, *n.* (पिकॅनि 'नि)—a negro child. नीग्रो जातीचें मूल.

Pĭcc'olō, *n.* (पि'कॉलो)—(*pl.*-os), a small high-pitched flute. उंच सुराचा लहान पावा,-पावरी.

Pice, *n.* (पाइस)—a coin of ¼ anna. एक पैसा.

Pĭck, *n.* (पिक्)—implement with sharp-pointed iron cross-bar for breaking up ground; small pointed instrument; the best. पिकाव; कोरणें; निवडक, उत्तम. *v. t. & i.* to break up ground etc.; to probe teeth; to open a lock; to pluck (feathers); to rifle pocket by stealth; to gather, pluck (flower, fruit etc.); to select one's words, way etc. पिकावानें जमीन खणणें; दांत कोरणें; (कुलूप) खिळ्यानें उघडणें; (पिसें) काढणें; खिसे कापणें, कातरणें; गोळा करणें, टिपणें, वेचणें, निवडणें; काळजीपूर्वक योजणें,-आखणें. *To p. holes in*, दोष काढणें, नांवें ठेवणें. *To p. a quarrel with*, शीं भांडणाला मूळ काढणें, भांडण उकरून काढणें. *To p.* (person's) *pocket*, खिसे कापणें, खिसे कापून पैसे चोरणें. *To p. to pieces*, तुकडे तुकडे,-चिंधड्या,-करणें; टीका करून (एकाद्याच्या) चिंधड्या उडविणें. *To p. out*, निवडणें, वेंचून काढणें, अर्थ लावणें. *To p. up*, जमीन खणणें; उचलून घेणें; वर उठणें, स्वतःला सावरणें; (गाडींत वगैरे) घेणें; पुन्हां मिळवणें; प्रकृति सुधारणें; शीं परिचय होणें; (खेळांत) गडी वांटून घेणें. *Pick-lock*, a person who picks locks; an instrument used for this. सळईनें (न कळत) कुलपें उघडणारा चोर; कुलपें उघडण्याची सळई,-हत्यार. *P.-me-up*, stimulating drink. उत्तेजक पेय. *P.-some, a.* fastidious. चोखंदळ, खोडकर, चविष्ट. *P.-thank*, (arch.) sycophant. खुषमस्कऱ्या, तोंडपुज्या. *P.-up*, (क्रिकेटमध्यें चेंडू) झेलणें, वर उचलणें.

Pĭck'ăxe, *n.* (पि'कॅक्स)—a pick. पिकाव.

Pick'erel, *n.* (पि'केरल्)—a young pick. नदींतला लहान मासा.

Pĭck'ĕt, *n.* (पि'किट्)—a peg or pointed stake; a small body of men on military police duty, an advanced guard; a man or party stationed to deter would-be workers during strike. खुंटा, मेख; लष्करी काम करणाऱ्या शिपायांची टोळी; निरोधक लोक. *v. t.* to set with stakes; to tether to peg; to post as a picket. गज किंवा खुंटे घालणें; खुंट्याला बांधणें; निरोधन करणें.

Pĭck'ing, *n.* (पि'किंग्)—(in verbal senses) निवडणें, तोडणें, चोरणें इ. *P. & stealing*, उचलेगिरी, भामटेगिरी.

Pĭck'ings, *n. pl.* (पि'किंग्ज्)—gleanings, remaining scraps; odds and ends of profits (made

by agents, &c.) not always honestly got. चालविलेली सामग्री, माहिती इ०; एजंट वगैरे लोकांनीं निरनिराळ्या मार्गांनीं मिळविलेला नफा.

Pic'kle, *n.* (पि'कल्)—brine or other liquor for preserving food &c.; sorry plight or dirty state; (*usu. pl.*) vegetables preserved in vinegar, &c.; a young rascal, a troublesome child. खारें पाणी, खारवणी; कठीण अवस्था, घुमेलंजी; (अने०) लोणचें, खारवणींत घालून ठेवलेले पदार्थ; उनाडगा, भंडावणारें पोर. *v. t.* to preserve in or treat with pickle; (naut.) rub salt or vinegar on (person's back) after flogging. खारवणें, खारांत घालून ठेवणें; (फटके मारल्यावर) पाठीला मीठ चोळणें. *Pi'ckled, a.* drunk. झिंगलेला, (दारू) प्यालेला.

Pick'pocket, *n.* (पि'क्-पॉकिट्)—a person who steals from the pockets of another. खिसेकापू, भामट्या.

Pick'some, *a.* (पि'क्सम्)—fastidious. चोखंदळ.

Pic'nic, *n.* (पि'क्निक्)—a pleasure excursion including outdoor meal to some place in a country. वनभोजन. *v. t.* to take part in picnic. वनभोजन करणें. *Pic'nicker, n. Pic'nicky, a.* (colloq.)

Picotee', *n.* (पिकॉटी')—carnation with dark-edged petals. काळसर टोंकाच्या पाकळीचा गुलनार, -एक जातीचें फूल.

Pi'cric, *a.* (पि'क्रिक्)—*P. acid,* bitter yellow substance used in dyes and surgery and in explosives. (रंग, शस्त्रक्रिया आणि स्फोटक द्रव्यें यांत वापरण्याचें) अम्ल,-ॲसिड.

Pictor'ial, *a.* (पिक्टॉ'अरिअल्)—with painting or pictures, illustrated by pictures. चित्रांचा, चित्रमय, सचित्र. *n.* a journal with pictures as main feature. सचित्र मासिक.

Pic'ture, *n.* (पि'क्चर्)—a painting or drawing of objects, esp. as work of art; a portrait; a beautiful object; scene, total visual impression produced; (*fig.*) conjuncture or affair. चित्र; तसबीर; सुंदर वस्तु; देखावा, नक्षाशा; योगायोग, स्थिति. *v. t.* to represent to others in words or to oneself in imagination; to depict in painting. चित्र रेखाटणें, चित्र काढणें; हुबेहुब वर्णन करणें, डोळ्यापुढें-मनांत-चित्र उभें करणें. *P.-gallery,* building for exhibition of pictures. चित्रांचें प्रदर्शन-करण्याचा दिवाणखाना. *P.-palace,-theatre,* cinema. चलत्-चित्रपटगृह, सिनेमागृह. *P.-postcard,* सचित्र पोस्टकार्ड. *Out of the p.,* irrelevant. गैरलागू, मुद्याला सोडून. *To come into the p.,* to become interesting. मनोरंजक होणें. (*She looks*) *the very p. of health,* a perfect type. सुंदर नमुना, पूर्ण चित्र, मूर्तिमंत प्रतिमा. *Pic'turize, v. t.* चित्रीकरण करणें.

Picturesque', *a.* (पिक्चरे'स्क्)—such as would be effective in a picture; (of language) graphic in style of writing. चित्रांत शोभेसा, सुंदर; हुबेहुब वर्णन करणारी, अलंकारिक.-*ly, adv.*; -*ness, n.*

Pie, *n.* (पाइ)—a small copper coin, the twelfth part of an anna; kinds of bird, esp. woodpecker; a dish of meat or fruit covered in with paste. एक बारांश आणा, एक पै; सुतारपक्षी; एक प्रकारची पोळी. *To have a finger in the pie,* be concerned in the matter. दुसऱ्याच्या कामांत ढवळाढवळ करणें,-पुढें पुढें करणें,-लुब्रेपणा करणें. *To eat humble pie,* पडतें घेणें, माफी मागणें, स्वतःचें महत्त्व कमी झालेंसें वाटणें. *P.-crust,* baked paste of pie, कणकेचा भाजलेला कडक पापुद्रा. *P.-man,* seller of pie. 'पाय' पक्वान्न विकणारा. *P.-plant,* garden rhubarb. रेवाचिनी, रेवस (वनस्पति).

Pie, *n.* (पाइ)—(print.) (also *printers' pie*) confused mass of type; (*fig.*) chaos. सळमिसळ झालेला टाइप; गोंधळ, गप्पागोंधळ. *v. t.* to mix (type). टाइपांची मिसळामिसळ करणें,-खुर्दा करणें,-पै करणें.

Pie'bald, *a.* (पा'इ-बॉल्ड्)—having white and black in irregular patches; diversified, mongrel, motley, heterogeneous. कांहीं ठिकाणीं पांढरा असलेला नानारंगी, विचित्र, चित्रविचित्ररंगाचा. *n.* a piebald horse or other animal. रंगीबेरंगी घोडा किंवा इतर पशु.

Piece, *n.* (पीस्)—one of the distinct parts of a composite whole; a fragment, a specimen; an exmple; a picture, a drama, or literary or musical composition; enclosed portion of (land); detached portion (*of* a substance), cask (of wine etc.) varying in capacity; cannon, gun, pistol; man at chess, draughts, etc.; coin. भाग, विभाग; तुकडा, खंड; नमुना; उदाहरण; चित्र, नाटक, निबंध, गेय काव्य,-पद्य, लेख; (जमिनीचा) वेढिस्त भाग; (वस्तूचा) वेगळा केलेला भाग,-अंश; (दारूचें) पिंप; तोफ, बंदूक; (बुद्धिबळांतलें) प्यादें, सोंगटी इ. नाणें. *v. t.* to put together, to mend, to patch, to join on. ठिगळें लावणें, सांधणें, जोडणें, (गोष्टीचे, पुराव्याचे) धागेदोरे जमविणें. *P.-goods,* कापडाचे तागे,-ठाण. *P.-work,* जेवढें काम होईल तेवढ्याची मजुरी देण्याचें ठरवून दिलेलें काम, उक्तें काम. *In pieces,* broken. फुटलेलें, तुकडे तुकडे झालेलें. *A p. of one's mind,* one's candid opinion, rebuke. निर्भीड-स्पष्ट-मत, निर्भर्त्सना, कानउघाडणी. *Of a p,* uniform, consistent, in keeping (*with*). एकसारखा, एक मतीचा, सारखा.

Pi'ece de ré'sistance, *n.* (पी'एस् द् रेझी'स्टांस्)—most substantial dish; most important item. अत्युत्कृष्ट पक्वान्न,-जेवण; अत्यंत महत्त्वाचा भाग, -मुद्दा. [F]

Piece'meal, *adv.* (पी'स्-मील्)—part at a time. भागशः, क्रमानें. *a.* done piecemeal. क्रमशः, -भागाभागानें,-केलेलें.

Pied, *a.* (पाइड)—of black and white colours, of mixed colours, party-coloured. चित्रविचित्र रंगाचा, रंगीबेरंगी.

Pier, *n.* (पिअर्)—the support of spans of a bridge; a large pillar or shaft; structure running out into the sea; breakwater. दोन कमानींमधील दगडी खांब; धक्का; पाणी अडवण्याकरितां केलेला बांध. *P. glass*, a large mirror. मोठा आरसा.

Pierce, *v. t. & i.* (पिअर्स्)—to go through like a spear or needle; to penetrate; to bore by a pointed instrument. भोसकणें, टोंचणें; आंत शिरणें, भोंक पाडणें, विंधणें.

Piĕ'rĭan, *a.* (पायए'रिअन्)—of the Muses. विद्याकलांच्या देवतांसंबंधीं. *P. spring*, knowledge, inspiration. ज्ञान, स्फूर्ति.

Pi'etў, *n.* (पा'य-इटि)—piousness. धार्मिकता, धर्मनिष्ठा. -tism, *n.*,-tist, *n.*

Pif'fle, *n. & v. i.* (पि'फल्)—(to talk) silly or commonplace stuff. मूर्खपणाची-सामान्य-बडबड, पटपट (करणें).

Pig, *n.* (पिग्)—a swine, a hog; a person like a pig in greed, dirt etc.; an oblong mass of smelted metal. डुकर; डुकरासारखा अधाशी, घाणेरडा माणूस; वितळविलेल्या धातूचा लांबट गोळा. *v. i.* डुकरें विणें; डुकरासारखें राहणें. *P. headed*, obstinate. हट्टी, हेकेखोर. *P. tail*, लांब शेंडी, वेणी. Pigg'ish, *a.* अधाशी, घाणेरडा. Pigg'ў, *a.*

Pi'geon, *n.* (पि'जन्)—a bird with many varieties, wild and domesticated, the dove; a person who is rooked or plucked, a simpleton. कबुतर; भोळा मनुष्य. *P. hole*, *n.* कपाटांतील खण; *v. t.* खणांत ठेवणें. P. rў, *n.* a dove-cot. कबुतरांचें खुराडें.

Pig'ment, *n.* (पि'मन्ट्)—a colouring matter. रंग, रोगण.

Pig'mў, *n.* (पि'ग्मि)—a very small person or thing, a dwarfish person, a dwarf. ठेंगू मनुष्य, वामनमूर्ति.

Pike, *n.* (पाइक्)—a spear; a large voracious freshwater fish; a peaked hill. भाला, बरची; एक मोठा गोड्या पाण्यांतील मासा; निमुळत्या शिखराची टेंकडी. *P. staff*, a shaft of pike. भाल्याची काठी, शूलदंड. *Plain as a p. s.*, easy to see or comprehend. सुस्पष्ट, उघड.

Pike, *n.* (पाइक्)—a toll-bar; toll; turnpike road. वस्तुरीचा दांडा,-अडसण; दस्तुरी-नाका; फाटकाचा रस्ता. [*turn-pike*]

Pilăs'ter, *n.* (पिलॅ'स्टर)—a rectangular pillar, esp. one set in a wall. भिंतींत बसवलेला चौरस खांब.

Pile, *n.* (पाइल्)—a heap, esp. of flat things laid on one another; a building of imposing height; a piece of timber driven into ground as foundation for building; soft wool; nap on cloth; (*pl.*) a kind of disease. ढीग, रास; मोठा वाडा, इमारत; पायाचा लाकडी ओंडका, रोवलेला खांब; (मेंढीवरील) मऊ लोंकर, लंव; कापडावरील लंव-फूल; (अनेο) मूळव्याध. *v. t.* to lay or throw in pile, to heap, to accumulate; to load. रचणें, ढीग करणें; भार घालणें; दडपणें.

Pil'fer, *v. t. & i.* (पि'ल्फर्)—to steal or thieve in a petty way; to practise petty theft. चुटकी चोरी करणें.-age, *n.*

Pil'grim, *n.* (पि'ल्ग्रिम्)—a person who journeys to a sacred place; a wanderer. यात्रेकरू; फिरस्ता, प्रवासी.

Pil'grimage, *n.* (पि'ल्ग्रि-मेज्)—a pilgrim's journey. यात्रा.

Pilĭ'ferous, *a.* (पायलि'फरस)—(Bot.) having hair. लवदार.

Pill, *n.* (पिल्)—a small ball of medicine to be swallowed whole; (*sl.*) a ball used in any game; (*pl.*) billiards. औषधाची गोळी, गुटिका; चेंडू; बिल्यर्डस (खेळ). *v. t.* गोळी-गुटिका-देणें. *A bitter pill for one to swallow*, कटु अनुभव, अपमान गिळणें. *P. box*, गोळ्यांची पेटी; लहानसें वाहन, परकुल; (जर्मनांनीं गेल्या महायुद्धांत बांधलेली) लहान मजबूत (भूमिगत) गढी.

Pill'age, *n. & v. t. & i.* (पि'लेज्)—forcible seizure of other's goods, things forcibly seized. लुटणें; लूट.

Pill'ar, *n.* (पि'लर्)—a column, a supporter. स्तंभ, खांब.

Pill'ion, *n.* (पि'ल्यन्)—a cushion as a seat. बैठकीची उशी,-गादी. *v. t.* उशी देणें, उशीवर टेकणें. *P. case*, *-slip*, उशीचा अभ्रा.

Pill'orў, *n.* (पि'लरि)—a frame with holes for head and hands in which an offender was placed. मानलोढा. *v. t.* to expose to ridicule or contempt. फटफजीती करणें.

Pill'ow, *n.* (पि'लो)—a cushion on which head rests. उशी.

Pil'ōse, Pil'ous, *aa.* (पा'इलोस,-लस)—hairy. केसाळ, लंव असलेला. *Pilos'ity, n.*

Pi'lot, *n.* (पा'इ-लट्)—a person in charge of ships entering or leaving harbour; a steersman; a guide; a person navigating an aeroplane. तांडेल; सुकाणूवाला; वाटाड्या; विमान चालविणारा, वैमानिक. *v. t.* to act as a pilot of; to guide; to guide through danger or difficulties. कर्णधार बनणें; (अडचणींतून सुरक्षित) बाहेर काढणें.-age, *n.*

Pil'ule, *n.* (पि'ल्यूल्)—a small pill. लहान गोळी, गुटिका.

Pimĕn'to, *n.* (पिमे'न्टो)—Jamaica pepper. कंकोळ.

Pimp, *n. & v. i.* (पिम्प्)—to pander. हीन वासना (पुरी करणें).

Pim'pernĕl, *n.* (पि'म्पर्नेल्)—a plant with small scarlet or blue or white flower found in cornfields and wasteland. एक रानफुलांचें झाड.

Pim'ping, *a.* (पि'म्पिंग)—small, mean; sickly लहान, क्षुद्र; रोगट.

Pim'ple, *n.* (पि'म्पल्)—a small tumour of the skin. पुटकुळी.

Pin, *n.* (पिन्)—a piece of thin stiff wire with point and head used as fastening; a wooden or metal peg, a rivet &c. टांचणी ; खुंटा, खुंटी. *v t.* to fasten with a pin or pins; to hold fast. टांचणी लावणें ; घट्ट धरणें. *P. prick, n.* an act or remark intended to annoy. त्रास देण्याच्या उद्देशानें केलेली गोष्ट, सतावणूक.

Pin'afore, *n.* (पि'नफोअर्)—child's washable covering worn over frock. मुलाचें मळवस्त्र.

Pince-nez, *n.* (पॅं'न्सने)—a pair of eye-glasses with a spring to clip nose. चापाचा चष्मा (F.)

Pin'cers, *n. pl.* (पि'न्सर्झ्)— *a pair of p.,* a gripping tool. चिमटा, गावी.

Pinch, *v. t. & i.* (पिंच्)—to nip with a finger and the thumb; to pain or injure by squeezing; to stint, to be niggardly. चिमटा घेणें ; चेंगरून पीडा देणें ; कंजुषपणा करणें. *n.* a nip, squeeze; stress of want; a small amount, a small quantity; emergency. चिमटा, चिमकुरा ; अडचण, दुःख ; चिमटी, चिमुटभर ; संकट. *That is where the shoe pinches,* that is the difficulty or trouble. खरी अडचण ती येथेंच.

Pinch'bĕck, *n.* (पि'न्चबेक्)—a copper and zinc alloy; cheap jewellery. तांबें व जस्त ह्यांपासून केलेली मिश्र धातु ; नकली दागिने. *a.* counterfeit. नकली, हुलाम्याचें.

Pine, *v. i.* (पाइन्)—to waste away (with grief, want, &c.); to long for, to languish. झुरणीस लागणें ; झुरणें ; छंद घेणें, निस्तेज होणें. *n.* kinds of evergreen needle-leaved coniferous tree. देवदार वृक्ष. Pin'eal, *a.*

Pine'-apple, *n.* (पा'इन्-ॲपल)—a large exotic fruit; (*sl.*) a bomb. अननस ; स्फोटक गोळा, बॉंब.

Pin'fold, *n.* (पि'न्-फोल्ड्)—a pound for stray cattle. गुरांचा कोंडवाडा.

Ping, *n.* (पिंग)—sound of bullet's flight. (बंदुकीच्या) गोळीचा आवाज होणें. *Ping-pong,* table-tennis. टेबल टेनिस (खेळ).

Pin'ion, *n.* (पि'न्यन्)—an outer joint of a bird's wing, a large wing feather; (*poet.*) a wing; a flight-feather. पंखाच्या बाहेरील सांधा ; पक्ष ; पर. *v. i.* पंख छाटणें ; हुसक्या बांधणें.

Pink, *n.* (पिंक्)—pale-red colour, a light red colour. गुलाबी रंग. *a.* pink-coloured. गुलाबी रंगाचा. 2. *v. t.* to run through with a sword; to ornament with perforation. तलवारीनें भोसकणें ; भोंकांची -छिद्रांची-नक्षी करणें.-ỹ, *a.* गुलाबी.

Pinn'acle, *n.* (पि'नॅकल)—a rocky peak, a pointed summit, a pointed turret crowning a buttress or roof; culmination or climax. सुळका, शिखर, कळस.-d, *a.*

Pint, *n.* (पाइन्ट्)—a measure of capacity, one-eighth of a gallon. एक माप, एक अष्टमांश गॅलन.

Pioneer', *n.* (पायॉनि'अर्)—one who leads the way, one of advance corps preparing a road for troops; explorer; one who originates any enterprise. मार्ग चोखाळणारा ; शोध करणारा ; मूळ शोधक. *v. i.* शोध-मार्गदर्शन-करणें.

Pi'ous, *a.* (पा'यस)—devout, religious. भक्तिमान ; धार्मिक.

Pip, *n.* (पिप्)—a seed of apple etc.; a spot on die, playing card etc.; a star on army officer's shoulder; a bird-disease. सफरचंद इ. फळांतील बीं ; फांसा इ. वरील ठिपका ; सैन्यांतील अधिकाऱ्याच्या खांद्यावरील तारा (खूण) ; पक्ष्यांचा एक रोग. *v. t.* to frustrate. निरर्थक करणें. *To have the p.,* तब्येत गरम होणें, विमनस्क होणें, चिडणें. *To p. out,* to die. मरणें.

Pipe, *n.* (पाइप्)—a long tube (of earthenware, metal, &c.); a wind-instrument. नळी ; पन्हळ ; पावा, अलगूज, *v. t. & i.* पावा वाजविणें ; आवाजानें नेणें,-बोलाविणें ; गाणें ; अश्रू गाळणें. *Tobacco p.,* चिलीम.

Pip'er, *n.* (पा'इपर्)—(*esp.*) a bagpiper. पावा वाजविणारा.

Pip'kin, *n.* (पि'प्-किन्)—a small earthenware pot, a small earthen boiler. लहान मातीचें भांडें.

Pippĕtte', *n.* (पिपे'ट्)—a slender tube. लघुनालिका.

Pi'quancỹ, *n.* (पी'कन्सि)—pungency, sharpness, severeness. मर्मभेदकपणा, झणझणीतपणा, तीक्ष्णता.

Pi'quant, *a.* (पी'कन्ट्)—pungent, sharp, appetizing, stimulating. तिखट, तीक्ष्ण, मर्मभेदक, झणझणीत.

Pique, *n.* (पीक्)—pettishness, ill-feeling, enmity, resentment. चीड, खप्पामर्जी, शत्रुत्व, वसवा. *v. t.* चीड आणणें, जागृत करणें.

Piquet', *n.* (पिके'ट्)—a card-game for two. दोघांनीं खेळण्याचा (३२) पत्त्यांचा डाव.

Pir'āte, *n.* (पा'इरेट्)—a sea-robber; a publisher who infringes copyright. समुद्रावरील लुटारू, चांचा ; परवानगीशिवाय दुसऱ्याच्या ग्रंथांतील मजकूर प्रसिद्ध करणारा प्रकाशक. *v. t.* (पाइरे'ट्)—हक्काशिवाय-परवानगीशिवाय प्रकाशित करणें.

Pis'catory, *a.* (पि'स्कटरि)—of fishes or fishing. माशांचा, मच्छीमारीचा. *-rial, a.*

Pistā'chio, *n.* (पिस्टे'शिओ)—a kind of nut with green kernel. पिस्त्याचें झाड, पिस्ता.

Pis'til, *n.* (पि'स्टिल्)—the seed-bearing organ in flowers. पुष्पगर्भतंतु, गर्भकेसर, स्त्रीकेसर.

Pis'tol, *n.* (पि'स्टॉल्)—a small firm-arm designed to be fired with one hand. पिस्तूल. *v. t.* पिस्तुलाची गोळी झाडून जखमी करणें,-ठार मारणें.

Pis'ton, *n.* (पि'स्टन्)—a plug. दट्ट्या, चेपणें.

Pit, *n.* (पिट्)—a natural hole in the ground; a hole made in digging (for minerals, &c.); depression in skin or surface; floor of theatre-auditorium, part of a theatre on the floor. खांच, खळगा ; खाण ; शरीरावरील स्वाभाविक खळगी ; नाटक-

घरांतील शेवटची जागा. *v. t.* खळग्या पाडणें; खळग्यांत सांठविणें; सामना-झुंज-लावणें. *The p.*, hell. नरक. *To dig a p. for,* to try to ensnare. जाळ्यांत पकडणें.

Pit'-a-păt, *adv.* (पिट्-अ-पॅट्)—with palpitation; with light quick steps. धकाधक, धसधस; हलक्या चलती पावलांनीं.

Pitch, *n.* (पिच्)—dark resinous substance; act or process of pitching; height, degree, intensity, gradient; acuteness of tone; part of ground where wickets are pitched. एक काळाकुट्ट पदार्थ, डामर; चेंडू वगैरे ठोकणें; उंचीची पराकाष्ठा, कळस, चढ; मरतम, उच्च स्वर; खेळण्याची जागा. *v. t. & i.* to coat with pitch; to set up in chosen position; to encamp; to throw, to fling, to fall. डामर माखणें,-लावणें; चांगल्या ठिकाणीं उभारणें; तंबू ठोकणें; फेंकणें, पडणें. *Pitchblack,* डांबरासारखा काळा. *Pitched battle,* of set kind, not casual. हातघाईची-घनचक्कर -लढाई. *To p. in,* set to work vigorously. जोमानें -नेटानें-कामाला लागणें. *To p. into,* जोरानें हात मारणें, हल्ला देणें; हल्ला करणें. *To p. upon,* happen to select. निवडणें, पसंत करणें.-ॅ, *a.* काळाकुट्ट.

Pitch'er, *n.* (पि'चर्)—a large jug, ewer. मोठा खुजा, घडा. *P. plant,* घड्याच्या आकाराचीं पानें असलेलें झाड. *Little pp. have long ears,* children overhear much. लहान मुलें चाणाक्ष असतात, आडून पुष्कळ ऐकतात.-*ful, n.*

Pit'eous, *a.* (पि'टिअस्)—deplorable; stirring or claiming pity, miserable. केविलवाणा, करुणाजनक. *-ly, adv., -ness, n.*

Pit'fall, *n.* (पि'ट्फॉल)—covered pit as a trap, a pit lightly covered over. सांपळा, फसण्याची जागा.

Pith, *n.* (पिथ्)—spongy cellular tissue in stems of plants; chief part; vigour, energy, strength, force. गर, मगज; तत्त्व, मुख्य भाग; जोर, बळ. -less, *a.*-कमजोर.

Pith'y, *a.* (पि'थि)—concise; terse and forcible. संक्षेपाचा, आटपसर, नीटनेटका; थोडक्यांत पण जोरदार.

Pit'iable, *a.* (पि'टि-अब्ल्)—deserving of pity, lamentable, wretched, miserable. करुणास्पद, शोचनीय, हीन.

Pit'iful, *a.* (पि'टिफुल्)—compassionate; stirring pity; contemptible. दयाशील, करुणाजनक, तिरस्करणीय.

Pit'iless, *a.* (पि'टिलिस्)—feeling no pity. निर्दय, क्रूर.

Pit'ance, *n.* (पि'टन्स्)—scanty allowance, charity, gift; a small quantity allowed. शिधा; क्षुद्र वेतन.

Pit'y, *n.* (पि'टि)—sorrow for another's suffering; regrettable fact, regrettableness. दया; दुःखास्पद गोष्ट. *v. t.* to feel pity for. कींव येणें, दया येणें. *To have* or *take p. on,* वर दया करणें.

Piv'ot, *n.* (पि'वट्)—a pin on which something turns; a cardinal point in discussion. कांटा; मुख्य मुद्दा.

Plăc'able, *a.* (प्लॅ'केब्ल्)—willing to forgive, easily appeased, mild-tempered. सान्त्वनीय; सुखाराध्य. -bil'ity, *n.*

Plăc'ărd, *n.* (प्लॅ'कार्ड)—a paper with announcement for posting up. प्रसिद्ध ठिकाणीं लावलेली जाहिरात. *v. t.* (प्लका'र्ड) जाहिराती लावणें, जाहिरात करणें.

Placāte', *v. t.* (प्लके'ट्)—to conciliate, to propitiate. खूष करणें, सान्त्वन करणें.

Plāce, *n.* (प्लेस्)—particular part of space; building; situation as public or other servant. जागा, ठिकाण; इमारत; (नोकरीकरितां) रिकामी जागा. *v. t.* to put or dispose in place; to assign rank or order to; put order for goods into the hands of. ठेवणें, दर्जा प्राप्त करून देणें; (सामानाची मागणी) करणें.

Plăcĕn'ta', *n.* (प्लॅसे'न्टा)—spongy organ nourishing the foetus in mammals; part of carpel to which seeds are attached. गर्भवेष्टन, वार; बीजकोष.

Plă'cid, *a.* (प्लॅ'सिड्)—calm, unruffled; not easily disturbed. शांत, सौम्य; सहसा न त्रासणारा.-*ity, n.*

Plā'giarize, *v. i. & t.* (प्ले'जिअराइझ्)—to publish borrowed thoughts, &c. as original; to steal from other's works. दुसऱ्याचे विचार स्वतःचे म्हणून प्रसिद्ध करणें; दुसऱ्याचे ग्रंथांतून कांहीं भाग चोरून घेणें.-rism, *n.* वाङ्मयचौर्य.-rist, *n.*

Plāgue, *n.* (प्लेग)—pestilence; prevalence of some pest. एक भयंकर साथ, मरी; रोगाचा विलक्षण प्रसार; प्लेग. *v. t.* to afflict with *p.*, to pester, to annoy. प्लेग होणें,-ची सांथ पसरणें; सतावणें, त्रास देणें. Plāg'uy, *a., adv.* very. अतिशयच.

Plaid, *n.* (प्लेड)—a long shawl, a rug. शाल, रग, बुरणूस.

Plain, *a.* (प्लेन्)—clear, evident; straightforward; ordinary, homely; not good-looking. स्पष्ट; सरळ; साधा; सुरेख नसलेला. *adv.* intelligibly, clearly. स्पष्टपणें. *n.* level tract of a country. मैदान, सपाटी, पटांगण. *v. i.* to lament. शोक करणें.

Plain'spōken, *a.* (प्ले'न्-स्पोकन्)—frank, speaking plainly or with bluntness. स्पष्ट बोलणारा, स्पष्टवक्ता.

Plaint, *n.* (प्लेन्ट्)—a statement of grievance in court; lamentation. गाऱ्हाणें, फिर्याद; दुःख, खेद.

Plain'tiff, *n.* (प्ले'न्-टिफ्)—the prosecutor in a lawsuit. फिर्यादी, वादी. (Opposite of *Defendant*).

Plain'tive, *a.* (प्ले'न्-टिव्ह्)—mournful-sounding. शोकपूर्ण.

Plait, *n.* (प्लॅट्)—a tress of hair or band of straw made by interlacing. पट्टी, निरी; वेणी. *v. i.* to form into a plait. चुणणें, निऱ्या काढणें; वेणी घालणें.

Plan, *n.* (प्लॅन्)—a diagram, a map; a project, a design. नमुना, नकाशा; कल्पना, योजना, युक्ति, आराखडा. *v. t. & i.* to make a plan of; to make a design for; to arrange beforehand. योजना करणें; नकाशा तयार करणें; आगाऊ व्यवस्था करणें.

Plănchĕtte', *n.* (प्लॅन्-शे'ट्)—*small board used in* psychical experiment. मृत मनुष्याशीं बोलण्याकरितां तयार केलेला फळा.

Plāne, *n.* (प्लेन्)—a level surface; paring-tool for smoothing surface of wood or metal; a kind of tall tree. पातळी; रंधा, रेतणी; एक उंच वृक्ष. *a.* forming or laying in plane, smooth or level as a plane. सारखा, सपाट. *v. t. & i.* to smooth or pare away with. रंधा फिरविणें, गुळगुळीत करणें.

Plăn'et, *n.* (प्लॅनिट्)—a heavenly body revolving round the sun. ग्रह.-*ary, a.*

Plănk, *n.* (प्लॅंक्)—a long flat piece of smoothed timber. फळी, तक्ता *v. t.* to cover with planks. तक्तपोशी करणें.-*ing, n.*

Plănt, *n.* (प्लान्ट्)—member of the vegetable kingdom; equipment for a manufacture. औषधी, वनस्पति; धंद्याची साधनसामुग्री. *v. t.* to place (seed &c.) in the ground to grow; to furnish (land) with people or settlers; to fix firmly, to establish; to deliver (a blow). रुजत घालणें; झाडांची लागवड करणें; वसविणें, रोवणें; ठोसा देणें.-*er, n.*

Plăn'tain, *n.* (प्लॅन्‌-टिन्)—a *tropical tree* and *fruit* like banana. केळीचें झाड, केळ; केळें.

Plăntā'tion, *n.* (प्लॅन्‌-टे'शन्)—a number of trees planted together; an estate for cultivation of cotton &c.; a colony. राई; उपवन; मळा, वाडी; वसाहत.

Pla'nter, *n.* (प्ला'न्टर्)—a cultivator of soil; an occupier of plantation; a machine for planting. शेतकरी; मळेवाला; पेरण्याचें यंत्र.

Plaque, *n.* (प्लाक्)—an ornamental tablet of metal etc. नक्षीकाम केलेली तावली, तबकडी.

Plăsh, *n.* (प्लॅश्)—a sound of plunging into water; a marshy pool, puddle. पाण्यांतील बुडीचा आवाज; पाण्याची उसळी; दलदलीचें डबकें. *v. t. & i.* to make plash; to bend down and interweave hedge-growth, branches or twigs of. उसळणें; शिंपडणें; गुंतविणें, गुंतागुंत होणें.

Plă'sm,-a, *n.* (प्लॅझम्,-मा)—the living matter of a cell; the colourless liquid part of blood etc. पेशींतील सजीव तत्त्व; रंगहीन द्रव पदार्थ.

Plă'ster, *n.* (प्ला'स्टर)—fabric spread with medicinal or adhesive substance for application to the body; plastic mixture spread on walls, &c. मलम, मलमपट्टी; (भिंतीचा) गिलावा. *v. t.* to apply plaster to; to bedaub, to lay on coarsely. गिलावा करणें; लेप देणें.-er, *n.* भिंतींना गिलावा देणारा मजूर.

Plăs'tic, *a.* (प्लास्टिक्)—moulding; giving form to clay, wax &c.; capable of being easily moulded, pliant. घडणारा; रूप देणारा; वळविण्याजोगा, लवचिक. -*city n.* (-टिसिटि) वळवितां येण्याजोगा गुण, लवचिकपणा.

Plat, *n.* (प्ला)—a dish served, item on bill of fare. वाढलेलें जेवण,-ताट, जेवणाच्या आकारांची नोंद.

Plāte, *n.* (प्लेट्)—a flat thin piece or sheet of metal, glass, &c.; shallow circular food vessel. पत्रा, तकट; तबक, ताट. *v. t.* to cover a ship with metal plates; to coat (metal) with deposit of silver, gold or tin. पत्र्यानें मढविणें; चप्याचा वगैरे मुलामा देणें. -*ful, a.* ताटभर अन्न वृ.

Plateau', *n.* (प्लेटो')—a table-land; a tract of elevated or high ground. पठार; उंचवट्यावरील मैदान.

Plăt'form, *n.* (प्लॅट्‌-फार्म)—level surface raised above the surrounding ground or floor; party programme. उंच आसन; व्यासपीठ; कोणत्याहि पक्षाचीं मतें किंवा तत्त्वें.

Plăt'inum, *n.* (प्लॅटिनम्)—a white heavy ductile malleable metal resembling silver. एक प्रकारची रुपेरी पांढरी धातु.

Plăt'itūde, *n.* (प्लॅटिट्यूड)—trite, dull or stupid remark, a truism. शिळी जुनी टीका; उचिष्ट भाषण. -*d'inous, a.*

Platŏn'ic, *a.* (प्लटॉनिक्)—of Plato or his doctrines; confined to words or theory; harmless or ineffectual. प्लेटोचा, प्लेटोच्या तत्त्वांचा; शब्दांना किंवा तत्त्वांना चिकटून राहणारा; निरुपद्रवी; परिणाम न करणारा. *n.* प्लेटोचा शिष्य.

Platōōn', *n.* (प्लटून)—a subdivision of battalion. सैन्याची तुकडी, फलटण.

Plăt'ter, *n.* (प्लॅटर)—a dish or plate. थाळी, परात, ताट.

Plaud'it, *n.* (प्लॉडिट्)—(*usu. in pl.*) round of applause; commendation. शाबासकी, वाहवा; स्तुति.

Plaus'ible, *a.* (प्लॉझिब्‌ल्)—specious; clever at making out a case. दिखाऊ; तोंडावर गोड, लाघवी. -*bil'ity, n.*

Play, *v. i.* (प्ले)—to shift about, to have a free movement; to sport, to trifle, to amuse oneself; to perform on a musical instrument. वळवळणें, व्यापार सुरू ठेवणें; खेळणें; रमविणें; (वाद्य) वाजविणें. *v. t.* to take part in a game; to act a drama, &c.; to perform on a musical instrument. खेळांत भाग घेणें; नाटकांत सोंग घेणें; वाजवणें, वजावणें. *n.* a fitful or light movement, recreation, trifling; a dramatic piece; gambling. लहरी-सहज-हालचाल, क्रीडा, करमणूक, खेळणें; खेळ, नाटक; जुगार.-*er, n.* खेळाडू. *To come into p.,* begin to operate. सुरू होणें. *To make p.,* act vigorously. जोरानें काम करणें. *At p.,* खेळ खेळत असतां. *In p.,* not seriously. सहज गंमत म्हणून. *To go to the p.,* नाटक पहावयास जाणें. *To play* one's *cards,* use one's chances. संधीचा उपयोग करणें. *To p. into the hands of,* act so as to give opportunity to. दुसऱ्याच्या हातीं दोरी देणें, त्याला संधि देणें. *To p. the game,* keep the rules esp. those of a code of honour. नियम पाळणें, सचोटीनें वागणें. *To p. the man,* धैर्यानें व निश्चयानें वागणें. *To p. with,* चा खेळ करणें, शीं क्रूरतेनें वागणें. *Play-house, n.* a theatre. नाटकगृह. *Play'er, n.*

Play'ful, *a.* (प्लेफुल्)—frolicsome, sportive, pleasantly jocular or amusing. गमत्या, खेळाडू.

Play'wright, *n.* (प्ले'राइट)—a dramatist. नाटककार.

Plea, *a.* (प्ली)—an excuse, a pleading; defence; defendant's or prisoner's statement. सबब, कारण; उत्तर, जबाब; प्रतिवाद्याचा किंवा कैद्याचा जबाब.

Pleach, *v. t.* (प्लीच्)—to entwine, to plait, to plash. गुंतणें, गुंफणें; एकमेकांत गुरफटवणें.

Plead, *v. i. & t.* (प्लीड)—to address court as an advocate or party; to allege as a plea; to make an earnest appeal. तर्फे कज्जांत काम चालविणें; सबब सांगणें; कळकळीची विनंति करणें. *To plead guilty*, गुन्हा कबूल करणें.

Plead'er, *n.* (प्ली'डर्)—a professional advocate. वकील.

Plead'ing, *n.* (प्ली'डिंग)—formal statement of charge or defence. कोणत्याही पक्षाचें समर्थन, कैफियत.

Plea'sance, *n.* (प्ले'झन्स्)—pleasure, enjoyment; pleasure ground. सुख, क्रीडा; क्रीडास्थान.

Plea'sant, *a.* (प्ले'झन्ट)—agreeable; giving pleasure, grateful to mind. गोड, सुखावह; आनंददायक. *-ry*, *n.* a jest. विनोद, थट्टामस्करी, करमणूक.

Please, *v. t. & i.* (प्लीझ)—to be agreeable to, to give joy or gratification to; to choose, to be willing. सुखावह होणें, आनंद देणें, संतुष्ट करणें; च्या पसंतीस येणें, पसंत करणें, आवडणें, कबूल,-मान्य, -करणें. *P. yourself*, do as you like. तुझ्या इच्छेप्रमाणें (कर). (*I will take another cup,*) *if you p.*, with your permission. तुमच्या म्हणण्याप्रमाणें. *Ring the bell, p.*, (imperat., orig. = may it please you). घंटा वाजव पाहूं! *Pleased, Pleas'ing, aa. Plea'singly, adv.*

Pleas'urable, *a.* (प्ले'झरेबल्)—giving pleasure, affording gratification, pleasing. सुखावह, आनंददायक.

Pleas'ure, *n.* (प्ले'झर्)—satisfaction, delight; sensuous enjoyment, sensual gratification; will, discretion, choice. संतोष, सौख्य, समाधान, आनंद; सुख; भोगविलास, ऐषआराम, चैन; इच्छा, मर्जी, छंद. (attrib.) designed, etc. for pleasure and not for business. चैनीसाठीं, मजेखातर. *v. t. & i.* to give p. to; to take p. (*in thing, in doing*). ला सुख देणें; सुख वाटणें, मजा वाटणें. *A man of p.*, a profligate. विषयासक्त, दुर्व्यसनी. *It is our p. to*, (royal formula) we are graciously pleased to. आम्हीं कृपावंत होऊन इ० *To take a p. in*, to like. आनंद,-मजा,-वाटणें. *P.-boat*, विहारनौका. *P.-garden, -ground*, सुखोद्यान, क्रीडोद्यान, रमणबाग.

Pleat, *n.* (प्लीट)—band of triple thickness on garment, etc. made by folding. घडी घालून पट्टयाला आणलेला जाडपणा. *v. t.* to make pleat in. (अशा प्रकारें) जाडपणा आणणें. [=*plait*]

Plēbe, *n.* (प्लीब्)—(*sl.*) member of lowest class at U. S. Naval or Military academy. सं. संस्थानांतील नाविक किंवा लष्करी विद्यापीठांतील अगदीं खालच्या वर्गांतील विद्यार्थी.

Plēbei'an, *a. & n.* (प्लिबी'अन्)—a commoner in ancient Rome (opp. to *Patrician*); belonging to the common people; of low birth. कनिष्ठ वर्गाच्या, साधारण लोकांच्या; हीन कुळांतील (-मनुष्य). [L.*plebs*, common people]

Plĕb'iscite, *n.* (प्ले'बिसिट)—(Rom. Hist.) law enacted by commonality in *comitia tributa*; (mod.) decision of a whole people by direct voting. सामान्य लोकांनीं केलेला कायदा; प्रत्यक्ष मतदानानें सर्व लोकांनीं (सगळ्या राष्ट्रानें) दिलेला निर्णय, सार्वमत. [L.*plebs, plebis*, common; *scitum*, decree]

Plĕc'trum, *n.* (प्ले'क्ट्रम)—(*pl.-tra*), an implement of ivory, etc. for plucking strings of lyre, etc. विण्याच्या तारा छेडण्याचें यंत्र,नखी. [Gk *plesso*, strike]

Pledge, *n.* (प्लेज्)—a thing deposited as security; a thing pawned; a token, earnest proof; a toast; a solemn promise; (*fig.*) one's child. गहाण; जामीन, तारण; तारणवस्तु; प्रतिज्ञा, वचन; आरोग्यपान; अभिवचन; स्वतःचें मूल. *v. t.* to deposit as a pledge; to pawn; to bind (oneself); to drink to the health of. गहाण ठेवणें; तारण देणें; वचनांत गुंतवणें, वचनबद्ध होणें; आरोग्यपान करणें. *To take, sign, keep., the p.*, शपथ घेणें, शपथपत्रिकेवर सही करणें, वचन पाळणें. *Pledg'ed, pa. t. & pa. p.* गहाण टाकलेला,-ठेवलेला; कृतप्रतिज्ञ. *Pledg'er, n.* गहाण देणारा,-टाकणारा. *Pledgee', n.* गहाण घेणारा, गहाणदार.

Plĕdg'ĕt, *n.* (प्ले'जिट)—small mass of lint etc. for wound. जखम बांधण्याची घडी,-पट्टी,-बोळा.

Pleiads,-des, *n. pl.* (प्ला'यड्झ्,-डीझ)—seven stars closely grouped in Taurus; (fig. sing.) brilliant group of (usu. 7) persons or things. कृत्तिका नक्षत्र,-पुंज; (तेजस्वी पुरुषांचें,-वस्तूंचें) सप्तक.

Pleis'tocēne, *a. & n.* (प्लि'स्टोसीन्)—(Geol.) (of) the division immediately overlying the pliocene formation. भूगर्भाच्या तृतीय युगाच्या (थराच्या) लगतचा वरचा भाग.

Plē'narȳ, *a.* (प्ली'नरि)—complete, entire; fully attended. पूर्ण, पुरा, समग्र; चिक्कार लोक हजर असलेली (सभा.)

Plĕnipotĕn'tiarȳ, *n.* (प्लेनिपोटे'न्शरि)—envoy or commissioner appointed to act according to his own discretion. पूर्ण अधिकार देऊन दुसऱ्याच्या दरबारीं पाठविलेला वकील, कुलमुखत्यार राष्ट्रीय वकील. *a.* containing or invested with full powers. पूर्ण अधिकार असलेला, कुलमुखत्यार.

Plĕn'itūde, *n.* (प्ले'निट्यूड)—plenty, repletion, abundance; fullness, completeness. विपुलता; पूर्णता, रेलचेल, चंगळ, प्रकर्ष, उत्कर्ष, भरपूरपणा. [L. *plenus*, full]

Plĕn'tĕous, Plĕn'tiful, *aa.* (प्ले'न्टिअस, प्ले'न्टिफुल)—copious, abundant, ample. पुष्कळ, विपुल, भरपूर.

Plĕn'tў, *n.* (प्लेन्टि)—full or adequate supply, abundance (*of*); quite enough. विपुलता, समृद्धि ; सुबत्ता. *adv.* (colloq.) quite. अगदीं, भरपूर.

Plē'ŏnăsm, *n.* (प्लीऑनॅझम)—(*Gram.*) use of more words than are needed to give the sense. शब्दबाहुल्य. Pleonas'tic, *a.* शब्दबाहुल्याचा, अधिकपदवदोषयुक्त. (e. g. *hear with* one's *ears, a false lie.*)

Plĕth'ŏră, *n.* (प्लेथोरा)—excess of red corpuscles in the blood ; oversupply, glut. रक्तबाहुल्य ; लोट, आधिक्य, बेसुमारपणा. Plĕthŏ'ric, *a.*

Pleur'isў, *n.* (प्लूरिसि)—inflammation of the membrane enclosing the lung, usu. caused by chill and marked by pain in chest or side, fever, etc. फुप्फुसावरणदाह, फुप्फुसाच्या त्वचेचा दाह. Pleurit'ic, *a.*

Plĕx'us, *n.* (प्लेक्सस)—net-work, esp. (Anat.) of fibres, etc. (मज्जातंतु वगैरेंचें) जाळें, जाळी, संघात, नाडीचक्र.

Plī'āble, Plī'ant, *aa.* (प्ला'यबल, प्ला'यन्ट)—easy to be bent, flexible, easily bent or influenced ; supple, yielding, accommodating. नरम, मऊ, लवका, लवचीक ; सहज वळणारा, नरम स्वभावाचा. Pliabil'ity, Pli'ancў, *nn.*

Plī'ca, *n.* (प्लाइका)—(pl.-*ae*) fold, as of skin or membrane ; matted filthy condition of hair due to disease. घडी, दुमड ; रोगामुळें केसांच्या जटा होणें.

Plī'cate, *a.* (प्लाइकट)—folded. चुण्या पडलेला, दुमडलेला. Also, Plica'ted, *a.* ; Plica'tion, *n.* folding, fold, folded condition. घडी करणें, घडी, मोड, चूण, दूण.

Plī'ers, *n. pl.* (प्लायर्झ)—pincers with flat grip for bending wire etc. पकड, गावी, चिमटा.

Plight, *v. t.* (प्लाइट)—to pledge, give as surety ; engage (*oneself*) (to person, esp. in p. p. as *plighted lovers*). गहाण ठेवणें, पणास लावणें ; प्रेमवचन देणें, वाङ्‌निश्चय करणें. *n.* an engagement. विवाहनिश्चय, वाङ्‌निश्चय.

Plight, *n.* (प्लाइट)—condition, state ; predicament, risky or dangerous state. अवस्था, स्थिति ; दैना, दशा, गत.

Plinth, *n.* (प्लिन्थ)—a slab or course between ground or floor and pedestal. बैठक, पाया, जोतें.

Plī'ocēne, *a.* & *n.* (प्ला'योसीन)—(Geol.) (*of*) the newest division of Tertiary fomations. भूगर्भाच्या तृतीय विभागाच्या अगदीं नवीन भागाचा.

Plŏd, *v. i.* & *t.* (प्लॉड)—to walk or work doggedly, to drudge, slave (*at*); make one's way laboriously. अति आयासानें चालणें किंवा काम करणें, रखत खडत जाणें ; कष्टानें मार्ग आक्रमणें. *n.* laborious walk or work. कष्टाची चाल, काबाडकष्टाचें काम. Plod'der, *n.* ; Plod'dingly, *adv.*

Plŏt, *n.* (प्लॉट)—a small piece of land ; plan or essential facts of a tale ; conspiracy. जमिनीचा तुकडा ; कथानक, संविधानक, वस्तु, गोष्ट ; कट, कारस्थान, संगनमत, कपटी बेत, *v. t.* & *i.* to devise secretly ; to hatch secret plans ; to represent by chart or map or diagram. युक्ति योजणें ; कट करणें ; नकाशा काढणें, आराखडा काढणें. Plot'ter, *n.* कट करणारा, फंदी, कारस्थानी.

Plough, *n.* (प्लाउ)—implement for furrowing and turning up the soil ; ploughed land ; rejection of candidate in examination. नांगर, आऊत, औत ; नांगरलेली जमीन ; परीक्षेत नापास नाकारणें. *v. t.* & *i.* turn up (land) with a plough ; to furrow, to make a furrow , to advance laboriously (*through*, snow,- book), (sl.) reject (candidate) in examination. नांगरणी करणें, नांगरणें, खांचणी पाडणें ; कष्टानें,-श्रमानें, -मार्ग काढणें ; परीक्षेत (उमेदवार) नापास करणें. *Ice p.*, बर्फाचे खडक फोडण्याचें यंत्र, *P.-tail*, rear of *p.*, (fig.) farm-labour, (as *at the p. tail*). नांगराचा मागचा (वरचा) भाग ; नांगराची मूठ, लुमणी,-णें ; शेतांतील मजुरी,-काम. *Put one's hand to the p.*, undertake task. एकादें काम अंगावर घेऊन स्वतः करूं लागणें.

Plough'man, *n.* (प्ला'उमन)—guider of plough. नांगर धरणारा, नांगऱ्या, शेतकरी, गांवढळ मनुष्य.

Plough'share, *n.* (प्ला'उ-शेअर)—blade of a plough. फाळ.

Plŏ'ver, *n.* (प्ल'व्हर)—kinds of shore-bird. समुद्रकिनाऱ्यावरचे पक्षी.

Ploy, *n.* (प्लॉय)—expedition, undertaking, occupation, job. अंगीकृत कार्य ; काम, धंदा. [perh. f. *employ*].

Plŭck, *v. t.* & *i.* (प्लक)—to strip (a bird) of feathers ; to plunder or swindle ; to summon up ; to pick or gather ; to snatch at ; (sl.) reject candidate in examination. पिसें उपटणें ; बुचाडणें, नागवणें ; (धैर्य) आणणें ; खुडणें, तोडणें, उतरणें, गोळा करणें, काढणें, उपटणें ; परीक्षेत नापास करणें. *n.* a beast's heart, liver, and lungs ; courage ; failure in examination ; plucking, twitch. जनावराचें काळीज ; धैर्य, हिम्मत, दम ; परीक्षेत नापास होणें ; अपयश ; खुडणें, हिसका, हिसडा. *To p. up one's heart, spirits, courage,* to take courage. धैर्य धरणें, हिम्मत धरणें,-आणणें.

Plŭck'ў, *a.* (प्ल'कि)—brave, spirited. शूर, हिंमतवान.

Plŭg, *n.* (प्लग)—something fitting into and stopping a hole ; hard-pressed tobacco , (sl.) worn-out horse. गुडदी, पाचर, दट्टया, चावी, सांधा, बोळा, तंबाखूची गोळी. *v. t.* & *i. to stop with* plug ; put p. into ; (sl.) work hard ; shoot ; strike with fist. गुडदीनें,-दट्टयानें,-बंद करणें ; बुचानें, -गुडदी घालून,-बंद करणें ; कष्टानें काम करणें ; गोळी मारणें ; गुद्दा मारणें.

Plŭm, *n.* (प्लम)—kinds of stonefruit and tree ; a handsome fortune of £ 100,000 ; good thing, best of a collection. आलुबुखार, मनुका, बेदाणा ;

होलन, छाउपा सावकार। उत्तम वस्तु. *P. cake,-duff,-pudding*, cake or pudding containing raisins, currants. etc. बेदाणे वगैरे घालून केलेली 'केक', -भाकरी,-पक्वान्न.

Plumassier', *n.* (प्लूमॅसि'र्)—one who trades or works in ornamental feathers. पिसांचे तुरे वगैरे विकणारा, पिसांच्या सुंदर तुऱ्यांचा व्यापारी. [F]

Plu'mage *n.* (प्लू'मज्)—bird's feathers. पिसारा, पिसें.

Plŭmb, *n.* (प्लम्)—a ball of lead attached to a string for testing perpendicularity of walls; perpendicularity; sounding lead, plummet. ओळंबा, लंबक, तुतांत उभा असणें; गळ. *a.* vertical; level, true. लंब, उभा, सरळ; निधळ, निखालस, शुद्ध. *adv.* vertically; exactly; (sl.) quite, utterly. ओळंब्यांत, लंबरेषेंत; अगदीं, तंतोतंत; निखालस, पूर्णपणें, केवळ. *v. t. & i.* to sound (water); measure (depth); ascertain depth or get to the bottom of; make vertical; work as plumber. (पाण्याचा) अंदाज काढणें, (खोली) मोजणें; -ची खोली अजमावणें, -च्या तळाशीं जाणें; ओळंब्यांत उभें करणें; नळ बसविणें. *P.-line*, string with p. attached. ओळंब्याची दोरी, ओळंबा, लंबरेषा. *Out of p.*, not vertical. लंबरेषेंत, ओळंब्यांत, -नसलेला. *P. nonsense*, शुद्ध गाढवपणा. *P. crazy* शुद्ध वेडा, निखालस वेडा.

Plŭmbā'gō, *n.* (प्लम्बे'गो)—black lead, the material of pencils; the plant leadwort. एक खनिज पदार्थ, -शिसपेनीचा दगड; एक फुलझाड. Plumba'ginous,*a.*

Plŭm'beous, *a.* (प्लम्बिअस्)—like lead, esp. in colour. (रंगानें) शिशासारखा, शिशाच्या रंगाचा.

Plŭmb'er, *n.* (प्ल'मर्)—an artisan who fits and repairs pipes, &c. with lead, &c. नळ वगैरे बसवणारा, शिशाचें-जस्ताचें-काम करणारा.-y, *n.*

Plume, *n.* (प्लूम्)—feather, esp. of the showy sort; feathery ornament (in hat, helmet, hair, &c.). पीस, पर; तुरा, शेखर. *v. t.* to furnish with plume; pride (oneself); (of bird) trim (feathers). पिसें लावणें, पिसांनीं नटाविणें; आत्मश्लाघा बाळगणें, तोरा मिरविणें; पिसें नीट करणें,-मिरविणें, -सारखीं करणें. *Borrowed pp.*, उसनी ऐट. *To plume oneself*, आत्मश्लाघा बाळगणें.

Plumōse', *a.* (प्लूमो'स)—feathered, feather-like. पिसासारखे तंतु असलेला, पिसें असलेला, पिच्छवत्.

Plŭmm'ĕt, *n.* (प्ल'मिट्)—plumb or plumbline, plumbrule; sounding-lead. ओळंबा, लंबक; गळ.

Plŭmp, *a.* (प्लम्प्)—rounded with sufficient flesh or fat, stout, round, chubby; (of statement etc.) direct, uncompromising. गुबगुबीत, लठ्ठ, फुगीर, गोंडस; साफ, निखालस, सरळ, सडेतोड. *v. t. & i.* to deposit or fall or sit abruptly; come unexpectedly upon; vote only for one candidate; express unhesitating preference for. एकदम खालीं पाडणें,-ठेवणें, धपकन् बसणें; एकदम पडणें, कोसळणें; एकाच उमेदवाराला मतें देणें; पूर्ण पाठिंबा देणें. *adv.* abruptly, bluntly. एकदम, अचानक, धपकन्; सडेतोडपणें. *n.* (arch.) company, troop; cluster. सैन्य, कळप; जमाव. Plump'ness, *n.* गुबगुबितपणा, फुगारा.

Plump'er, *n.* (प्ल'म्पर्)—a ball, disk, carried in mouth to fill out hollow cheeks; unsplit vote or its giver. बसके गाल फुगीर दिसण्यासाठीं तोंडांत धरण्याची गोटी; एकाच उमेदवाराला दिलेलें मत, असें मत देणारा.

Plŭn'der, *v. t. & i.* (प्ल'न्डर्)—to carry off goods by open force; to rob, to steal, to embezzle. लुटणें; लुबाडणें, माखणें. *n.* pillage, spoils, robbery; (sl) profit, gain. लूट, मागवणूक; फायदा, नफा. *Plun'derage, n.* जहाजावर होणारी मालाची अफरा-तफर,-लूट. *Plun'derer*, लुटणारा, लुटारू.

Plŭnge, *v. t. & i.* (प्लन्ज्)—to immerse completely; (*fig.*) to put into any state suddenly; to drive or throw oneself impetuously into; (of horse) to start violently forward; (*sl.*) gamble, run into debt; (of ship) pitch. बुडी मारणें, बुडवणें; एकदम एखाद्या स्थितींत लोटणें; उतावीळपणानें लोटून देणें, जोरानें शिरणें,-घुसणें; जोरानें पुढें जाणें, बुडी मारणें, मुसंडी मारणें; जुगार खेळणें, कर्जबाजारी होणें; (गलबताची नाळ) पाण्यांत जाणें, घुसणें, कलणें. बुडी. *n.* plunging action, dive; (*fig.*) critical step. बुडी, डुबकी; उडी, धाडस. *Plunging fire*, fire from guns at higher level. उंचावरून केलेला गोळीबार. *To take the p.*, धाडस करणें, उडी घेणें.

Plŭn'ger, *n.* (प्लँ'जर्)—(*esp.*) pump-piston; (*sl.*) gambler or speculator; cavalry-man. पंपाचा दट्टया; जुगाऱ्या, सट्टेवाला; घोडेस्वार-सैनिक.

Plŭnk, *v. t. & i.* (प्लंक्)—(*U. S.*) to throw or fall heavily or abruptly. जोरानें,-धपदिशीं,-फेकणें,-पडणें. *n.* dull hard blow; (*sl.*) dollar. जोराचा तडाखा; डॉलर (नाणें).

Plu'perf'ĕct, *a. & n.* (प्लूप'र्फिक्ट्)—(-tense) expressing action completed before a past point of time, (as, in Eng., he had called). भूतभूत (काळ).

Plu'ral, *a.* (प्लू'रल्)—more than one in number. अनेक, बहुत. *n.* the plural number, a plural word or form. अनेकवचन; अनेकवचनीं शब्द,-रूप.

Plurăl'ism, *n.* (प्लूरॅ'लिझम्)—holding of plural offices or votes; (philos.) system that recognizes more than one ultimate principle (opp. to *monism*). एकालाच अनेक ठिकाणची (उपाध्येपणाची) वृत्ति असणें,-अनेक मताधिकार असणें; एकाधिकतत्त्व-वाद, अनेकतत्त्ववाद. *Pluralist, n.,-istic, a.*

Plurăl'ĭtў, *n.* (प्लूरॅ'लिटि)—being plural; pluralism; majority of votes. बाहुल्य; अनेकत्व; बहुसंख्या.

Plŭs, *prep.* (प्लस्)—with the addition of. अधिक. *n.* (pl.-*sses*), symbol of addition (+). अधिक, धन, अधिक चिन्ह. *a.* to be added; positive. अधिक-

धन. *P. fours*, a style of men's knicker bockers. पुरुषांचा चोळणा, सैल अर्धी तुमान.

Plŭsh, *n.* (प्लश्)—cloth of silk or cotton with long, soft nap; (pl.) footman's p. breeches. मखमलीसारखें विणलेलें रेशमी किंवा सुती कापड; पायदळाच्या शिपायाचा किंवा नोकराचा मांडीचोळणा, -विजार.

Plu'to, *n.* (प्लूटो)—the God of Hades; a more remote planet than Neptune (discovered 1930) प्राचीन रोमन लोकांची पातालदेवता, यम; 'प्लूटो' ग्रह.

Plutŏc'racy̆, *n.* (प्लूटॉक्रसि)—state in which power belongs to the rich; the wealthy class. धनिकांचें साम्राज्य असलेलें राज्य; सत्ताधारी धनिकवर्ग. *Plu'tocrat, n.* member of plutocracy, rich man. धनिकसत्ताकराज्याचा एक अधिकारी; श्रीमंत मनुष्य. *Plutocrat'ic, a.*

Plutŏn'ic, Plutō'nian, *aa.* (प्लूटॉनिक्,-टोनिअन्)—of Pluto, the God of Hades; (Geol.) igneous, volcanic. पातालाधिपति प्लूटो देवतेचा, नरकाचा; पृथ्वीच्या अंतर्गत उष्णतेचा; ज्वालामुखीचा. *P. rocks, P. theory*, सूत्तर चमत्कार पृथ्वीच्या पोटांतील उष्णतेमुळें होतात हा सिद्धान्त.

Plu'vial, *a.* (प्लूव्हियल्)—(geol.) of or caused by rain. पावसाचा, पर्जन्योत्पन्न.

Pluviŏm'ĕter, *n.* (प्लूव्हिऑमिटर्)—rain-guage. पाऊस मोजण्याचें यंत्र, पर्जन्यमापक यंत्र. *Pluviomet'ric, a.*

Ply̆, *v. t. & i.* (प्लाय्)—to work diligently; to supply pressingly; (of a ship, vehicle, &c.) to go to and fro between places; use, wield, vigorously (tool etc.). झटून काम करणें; आग्रहानें देणें; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाणें, खेप करणें; (हत्यार) वहिवाटणें, चालवणें.

Ply̆, *n.* (प्लाय्)—one thickness or strand; bent, bias. घडी, चुणी, निरी, सुरकुती; कल, वळण, मनाचा झोंक. *P. wood*, strong thin board made by gluing layers with the grains cross-wise. एकावर एक पातळ थर चिकटवून केलेला जाड लांकडी पुठ्ठा,-फळी. *To take a p.*, मनाचा कल वाढणें.

Pneumăt'ic, *a.* (न्युमॅटिक्)—of or acting by wind or air, filled with air. वायूचा, वायुरूप, हवा भरल्यामुळें चालणारा.

Pneumăt'ics, *n. pl.* (न्युमॅटिक्स्)—science of mechanical properties of elastic fluids. यांत्रिक वायुविद्या.

Pneumō'nĭă, *n.* (न्युमोनिआ)—inflammation of the lungs. फुफ्फुसें सुजणें, फुफ्फुसांचा रोग, फुफ्फुसज्वर, एक प्रकारचा ताप. *Pneumon'ic, a.*

Pō'a, Pō'agrass, *n.* (पोआ, पोआग्रास्)—meadow-grass. कुरणांतील गवत.

Poach, *v. t. & i.* (पोच्)—to cook (an egg); to take a game or fish illegally, to kill or destroy a game contrary to law; to thrust; trample, cut up, with hoofs, (of land) become sodden by being trampled; encroach, trespass; obtain advantage by unfair means. अंडीं शिजविणें; पारध किंवा शिकार चोरून नेणें, कायद्याविरुद्ध शिकार करणें; (काठी, बोट) खुपसणें; खुराखालीं तुडवणें; (जमीन) तुडवल्यामुळें नरम होणें; अतिक्रमण करणें; अयोग्य-मार्गानें (स्वार्थसिद्धीस) पुढें जाणें.

Pō'chard, *n.* (पोचर्ड)—A European diving bird with bright reddish-brown head & neck. एक पाणबुडा पक्षी.

Poach'er, *n.* (पोचर्)—a person who poaches. शिकारचोर.

Pock, *n.* (पॉक्)—an eruptive spot (in small pox &c.), pustule raised on skin. देवीचा फोड, कांजिण्याचा व्रण. *P.-marked, a.*

Pŏck'ĕt, *n.* (पॉकिट्)—a small bag inserted in garments; sack of hops or wool; billiard-table bag; cavity in earth or rock; (*fig.*) pecuniary resources. खिसा, कप्पा; मोहाच्या फुलांनीं किंवा लोकरीनें भरलेलें पोतें; (चेंडूकरितां) कप्पा, जाळें; जमिनींतील कप्पा, खळगी; पैसा मिळण्याचीं साधनें, पैसाअडका. (attrib.) of suitable size or shape for carrying in pocket. खिशांत ठेवण्याजोगा-मावण्याजोगा. *v. t.* to put into a pocket; to appropriate; to conceal (feelings); to hem in (competitor) in race; to submit to (affront. injury); (Billiards) drive (ball) into pocket. खिशांत घालणें; आपलासा करणें; दडवून ठेवणें मुकाट्यानें सहन करणें; अडचणींत धरणें; (अपमान) सहन करणें, सोसणें; (चेंडू) जाळ्यांत ढकलणें,-लोटणें. *Empty p.*, person without money. कफल्लक मनुष्य *To put one's pride in one's p.*, मानापमान गुंडाळून ठेवणें. *Out-of-p. expenses*, प्रत्यक्ष झालेला खर्च,-गुंतलेलें भांडवल. *I am 5 s. in p*, माझ्याजवळ पांच शिलिंग आहेत; मी पांच शिलिंग कमविले. *I am 5 s. out of p., by the transaction*, त्या धंद्यांत मी पांच शिलिंग घालवले. *Has him in her p.*, तिनें त्याला मुठींत -कह्यांत-ठेवलें आहे. *P.-book*, नोटबुक, खिशांत राहण्यासारखें पुस्तक. *P. borough*, एकाच व्यक्तीच्या किंवा कुटुंबाच्या मालकीचा गांव. *P. expenses*, किरकोळ खर्च. *P. handkerchief*, खिशांतला हातरुमाल *P. piece*, (ताइताप्रमाणें) खिशांत बाळगलेलें यशस्वी नाणें. *P.-pistol, P. spirit-flask*, खिशांतली दारूची बाटली.

Pŏck'ĕt-money, *n.* (पॉकिट्-मनि)—allowance for occasional expenses. किरकोळ खर्चाकरितां दिलेला पैसा.

Pōcocŭrăn'tĕ, *a. & n.* (पोकोक्युरॅन्टि)—(a person), without enthusiasm, indifferent. निरुत्साही, निष्काळजी (मनुष्य).-tism, *n.* [It=caring little]

Pŏd, *n.* (पॉड्)—long seed-vessel of pea, bean, &c.; cocoon of silk-worm; case of locust's eggs; narrow-necked eel-net. शेंग; (रेशमी किड्यांचा) कोशेटा; ईल मासे धरण्याचें (अरुंद तोंडाचें) जाळें. *v. i. & t.* to form, to bear, pods; take from pods, shell. शेंगा धरणें,-लागणें,-येणें; सोलणें.

Pŏd, *n.* (पॉद्)—small herd of seals or whales. सील, किंवा व्हेल माशांची टोळी,-झुंज. *v. t.* to drive (seals) into a p. (माशांना) एके ठिकाणीं आणणें

Pŏd'agra, *n.* (पॉडग्रा)—gout, esp. in feet. (विशेषतः पायांतील) संधिवात. Podăg'ric, *a*.

Pŏdg'y̆, *a.* (पॉजि)—short and fat. ठेंगू व लठ्ठ.

Pō'ĕm, *n.* (पो'इम्)—a piece of poetry, a metrical composition (esp. of elevated tone); (*fig.*) something akin to a p. कविता, काव्य; काव्यासारखें उदात्त,-आल्हाददायक. *Epic p.*, महाकाव्य.

Pō'ĕsy, *n.* (पो'इसि)—poems or the art of making them, metrical composition. कवित्व, कविता, कवित्वशक्ति.

Pō'ĕt, *n.* (पो'इट्)—maker of poems; writer of (esp. elevated) verse. कविता करणारा; कवि.

Pō'ĕtăster, *n.* (पो'इटॅस्टर्)—a petty versifier. हलका-क्षुद्र-कवि.

Pōĕt'ic,-al, *aa.* (पोएॅटिक्,-कल)—of poets or poetry; (usu.-*ic*) having the good qualities of poetry; (usu.-*ical*) written in verse, (as *p. works*). कवींचा, काव्याचा, काव्यविषयक, कवितेचा; रसपूर्ण, सरस, काव्यरसभरित; पद्यमय, काव्यात्मक; कविताबद्ध. *P. licence*, कवींचें निरंकुशत्व. *P. justice*, स्वसृष्टींतील-कवींचा-न्याय. Pōĕt'ics, *n. pl.* science of or treatise on poetry. काव्यशास्त्र, साहित्य, काव्यविवेचनात्मक ग्रंथ.

Pō'ĕtize, *v. i. & t.* (पो'इटाइझ्)—to play the poet, compose poetry; treat poetically; celebrate in poetry. कविता लिहिणें, काव्यरचना करणें; काव्यांत वर्णन करणें; काव्य लिहून साजरा करणें.

Pō'ĕtry̆, *n.* (पो'इट्रि)—the poet's art or work; expression, esp. in metrical form, of elevated thought or feeling, verse; poems; quality (in anything) that calls for poetical expression. कविता, काव्य; कवन, पद्य; काव्योचित गुण. *Prose p.*, गद्यकाव्य.

Pō'gō, *n.* (पो'गो)—(pl.-*os*), (a game) with toy like one stilt with a spring on which user jumps about. एक प्रकारचा उड्या मारण्याचा खेळ.

Pogrŏm', *n.* (पोग्रॉ'म्)—riot against Jews or other class in Russia. ज्यू किंवा इतर जातीविरुद्ध (रशियांतील) दंगल.

Pŏign'ănt, *a.* (पॉ'इनॅन्ट्)—pungent, stinging; keen, penetrating, very painful, acute, moving; vivid. तिखट, झोंबणारा; तीक्ष्ण, मर्मभेदक; अगदीं स्पष्ट. -'ancy̆, *n.*

Poilu, *n.* (प्वा'लू)—(sl.) modern French soldier. फ्रेंच शिपायाचें टोपणनांव.

Pŏint, *n.* (पॉइन्ट्)—a dot; a particular place or spot; an exact moment; degree of measurement; an item, detail; a thing that counts; a sharp end, tip; projection, promontory; (pl.) (on railway) tapering movable rails for directing train on to another line; fielder at cricket near to point of bat. बिंदु, ठिपका, टिंब; ठराविक जागा,-स्थळ,-ठिकाण; नेमलेली वेळ,-घडी,-क्षण, पळ, टिपण; अगदीं बरोबर वेळ; अंश, प्रमाण; बारीकसारीक गोष्ट, मुद्दा, बाबत, विषय, कलम; मुख्य मुद्दा, महत्त्वाची गोष्ट; टोंक, अणकुची; सुळका; निमुळतें टोंक,-शिखर; (रेल्वेवर) गाडी एका रुळावरून दुसऱ्यावर बदलण्याची जागा; (क्रिकेटमध्यें) खेळणाऱ्याच्या बाजूच्या जवळच्या टोंकावरचा क्षेत्ररक्षक. *v. t. & i.* to sharpen, to furnish with point; to punctuate; to hold (finger, pistols, stick) directed at; (of dogs) to indicate where game is; give p. to by illustration; mark with points for chanting. टोंक करणें; विरामचिन्ह देणें; नेम धरणें; (शिकार) दाखविणें, दर्शविणें; ठळकपणानें मांडणें; (गीतांना) यतिदर्शक चिन्हें देणें. *To give points to* (opponent in game), (प्रतिपक्षावर) डाव करणें; (*fig.*) वर सरशी,-ताण,-करणें. *Come to the point*, मुद्यावर येणें. *To carry one's p.*, आपला हेतु सिद्धीस नेणें. *To make a p.*, मुद्दा शाबीत करणें. *The p. of honour*, मानापमानाचा-अब्रूचा-प्रश्न. *P. of view*, नजर, दृष्टिकोन.

Pŏint'blănk, *adv.* (पॉ'इन्ट्-ब्लँक्)—with aim level and not above the object; (*fig.*) flatly or uncompromisingly. अगदीं सरळ; स्पष्टपणें, निर्भिडपणानें.

Point'-duty, *n.* (पॉ'इन्ट्-ड्यूटि)—duty of constable stationed at particular spot to direct traffic, etc. नाक्यावरचा पहारा, रस्त्यांतील वाहतुकीचें नियंत्रण करणाऱ्या शिपायाचें काम.

Pŏin'tĕd, *a.* (पॉ'इन्टिड्)—having a sharp point, sharp; emphatic; epigrammatic. तीक्ष्ण; जोरदार; चुटकेदार.-ly, *adv.* मुद्याला धरून, स्पष्टपणें.

Point'er, *n.* (पॉ'इन्टर्)—anything that points; indicating-rod used at black-board, etc.; breed of dog trained to point at game; (*pl.*) two stars in Great Bear, straight line through which points nearly to pole-star. दर्शविणारा, दर्शक; (फळ्यावरचें वगैरे दाखविण्याची) छडी,(कागदाची) सुरळी; शिकार दाखविणारा कुत्रा; बृहदृक्षांतील पुलह (सप्तर्षि १) व क्रतु (सप्तर्षि २) हे (उत्तरगोलार्धांतील) तारे.

Point'lĕss, *a.* (पॉ'इन्ट्लिस्)—blunt, not sharp; obtuse, lacking point; not having scored a point. बोथट, टोंक नसलेला; (खेळांत) एकहि गुण-डाव-न मिळालेला.

Pōints'man, *n.* (पॉ'इन्ट्स्मन्)—a man working railway points. रेल्वेच्या रुळांच्या सांध्यावर काम करणारा, सांधे फिरविणारा.

Pŏise, *v. t. & i.* (पॉ'इझ्)—to hold in a balanced or steady position; to be balanced; to hang suspended. समतोल धरणें; तोलणें, बरोबरी करणें; लोंबकळत राहणें. *n.* equilibrium; way thing hangs or balances; state of indecision, suspense. समतोलपणा; वजन, भार; अनिश्चित स्थिति.

Pŏis'on, *n.* (पॉइ'झन्)—substance that kills or injures; harmful principle, influence, &c. विष; अपायकारक तत्त्व. *v. t.* to administer poison to; to fill with prejudice; to spoil. विष घालणें; मन कलुषित करणें, बिघडविणें.-er, *n.*;-ous, *a.* विषारी, अपायकारक. *To hate each other like p.*, to hate bitterly. पक्का द्वेष धरणें. *P. gas*, विषारी धूर,-वायु.

Pōke, *v. t. & i.* (पोक्)—to thrust forward; push the end of a finger, stick, etc. against; make thrusts at; stir (fire) with poker; (colloq.) shut (oneself) *up* in poky place; thrust forward obtrusively. पुढें ढकलणें; बोंचकणें, ढंवचणें; हुंदाडणें, ढोंसणें; (कालथ्यानें) विस्तव प्रज्वलित करणें; कोंदट जागेत (स्वतःला) डांबून धरणें; लुडबूड करणें. *n.* thrust with finger-end etc.; projecting front of bonnet; a bag, sack. ढंवचणें, बोंचकणें; टोपीचा पुढें आलेला भाग; पिशवी, पोतें. *To poke* one's *nose into another's affairs*, मध्यें तोंड घालणें, लुडबूड-चोमडेपणा-करणें. *To. p. about., p. & pry*, चौकसपणा दाखविणें, नसती चवकशी करणें. *To p. fun at*, चेष्टा करणें, टर उडविणें.

Pō'ker, *n.* (पो'कर्)—that which pokes, a metal rod for poking fire; American card-game. विस्तव सारखा करण्याकरितां लोखंडाची सळी; पत्त्यांचा (अमेरिकन) डाव.

Pō'kў, *a.* (पो'कि)—(of room etc.) confined, mean, shabby; (of occupation) petty, obscure. कोंदट, जुनाट, घाणेरडें (घर इ॰); हलका, क्षुद्र (धंदा).

Pō'lar, *a.* (पो'लर्)—of or situated near either pole of the earth; having polarity, magnetic; having positive and negative electricity. ध्रुवाचा; ध्रुवाजवळचा; चुंबकीय ध्रुवाचा; धन व ऋण वैजिक. *Pola'rity, n.* tendency to point to the magnetic poles of earth. ध्रुवाभिमुखता, आकर्षण, ध्रुवीयता. *Polarizaion, n.* ध्रुवीकरण, एकरूपीकरण.

Pōle, *n.* (पोल्)—a long slender rounded piece of wood; a flagstaff; measure-rod, 5½ yards; the two points in the celestial sphere (*North & South* P.) about which the stars appear to revolve; also, *N. & S.* extremities of earth's axis; each of the two opposite points on surface of magnet at which magnetic forces are manifested; each of the two opposed principles, &c.; a native of Poland. खांब, दांडा, सोटा, काठी; ५½ यार्डाचें माप; ध्रुव (उत्तर व दक्षिण); पृथ्वीच्या आंसाचीं उत्तर व दक्षिण टोकें, उत्तर ध्रुवाग्र, दक्षिण ध्रुवाग्र; लोहचुंबकाचा ध्रुव (दोन टोकें), दोन विरुद्ध तत्त्वांपैकी प्रत्येक; पोलंडचा रहिवासी. *Under bare pp.*, (naut.) with no sail set. एकहि शीड न उघडतां,-उभारतां. *Up the p.*, (*sl.*) in a fix. घोटाळ्यांत, अडचणींत *Positive pole*, धनध्रुव. *Negative p.*, ऋणध्रुव.

Pōle'-axe, *n.* (पो'लॅक्स्)—battle-axe; butcher's slaughtering axe. लांब दांड्याची कुऱ्हाड, परशु; खाटकाची कुऱ्हाड. *v. t.* to kill or strike with pole-axe. कुऱ्हाडीनें मारणें.

Pol'e-cat, *n.* (पो'ल्कॅट्)—small fetid animal like a weasel; shunk. कैसाळ मांजर.

Pōl'e-jump, *n.* (पो'ल्जम्प्)—jump with aid of pole carried in the hands. हातांत दांडा घेऊन मारलेली उडी.

Pōle'-star, *n.* (पो'ल्-स्टार्)—a star near North Pole of the heavens; (*fig.*) a thing serving as a guide, lodestar (useful as a guide). ध्रुव, ध्रुवाचा तारा; मार्गदर्शक वस्तु.

Polĕm'ic, *a.* (पलि'मिक्)—of controversy or wordy warfare. वादविवादात्मक, वाग्युद्धाचा. *n.* a controversy or controversialist; (*pl.*) controversy. वादविवाद, वादविवाद करणारा; (अने॰) वादविवाद.

Polĕn'ta *n.* (पले'न्टा)—Italian porridge of chestnuts, maize, etc. एक प्रकारचें इटालियन पक्वान्न.

Police', *n.* (पुली'स्)—the civil force charged with keeping order; public order. स्थानिक बंदोबस्ताकरितां ठेवलेले शिपाई व अधिकारी; सार्वजनिक व्यवस्था, बंदोबस्त. *v. t.* to control or furnish with police; act as police in; (*Mil.*) clean up, put (barrack, camp, etc.) in order. पोलिसबंदोबस्त ठेवणें, पोलिस नेमणें,-ठेवणें; (लष्कर) स्वच्छता-टापटीप-ठेवणें, व्यवस्थित ठेवणें.

Police'-man, *n.* (पुली'स्-मन्)—a member of the police force, a police officer. पोलीसचा शिपाई किंवा अधिकारी.

Pŏl'icў, *n.* (पॉ'लिसि)—statecraft; course of action; sagacious procedure; document containing contract of insurance. राजनीति, राज्यनीति; व्यवहारचातुर्य, धोरण, कार्यकुशलता; विम्याचा करारनामा.

Pŏl'ish, *v. t. & i.* (पॉ'लिश्)—to make or become smooth or glossy by friction; to make cultured; to smarten up. उजळणें, उजाळा देणें; सभ्यता आणणें, सुसंस्कृत करणें; प्रौढता-शिष्टपणा-आणणें; तजेला किंवा तकाकी येणें. *n.* smoothness, glossiness; substance used to give polished surface; refinement. गुळगुळीतपणा; उजाळा, उजाळा देण्याचा पदार्थ; सौजन्य, शिष्टाचारसंपन्नता. *To p. off*, finish off quickly. झटपट उजाळा देणें, -तकाकी आणणें.

Pō'lish, *a.* (पो'लिश्)—of Poland or the Poles. पोलंड देशाचा; ध्रुवाचा.

Pōlite', *a.* (पोला'इट)—cultivated, well-bred; courteous; (of literature) refined, elegant. सभ्य, शिष्ट, प्रौढ, सुसंस्कृत; आदरशील, विनयशील; सुसंस्कृत, शिष्ट (लिखाण). Polite'ness, *n.* courtesy. सभ्यता, शिष्टपणा, सभ्य वर्तन. Polite'ly, *adv.*

Pŏl'itic, *a.* (पॉ'लिटिक्)—judicious, expedient; sagacious, prudent; scheming, crafty. युक्तिबाज,

कारस्थानी ; हुशार, चतुर ; फावेषाज, मतलबी, हिकमती. **Pol'itically**, *adv.*

Polit'ical, *a.* (पोलि'टिकल्)—pertaining to civil government, of the state or its affairs ; of politics. संस्थानचा, राज्यकारभाराचा ; राजकीय, राजनीती-संबंधी. *n. p. agent.* पोलिटिकल एजंट, एक सरकारी अधिकारी. *P. economy,* अर्थशास्त्र. *P. geography, g.* dealing with boundaries & possessions of States. राजकीय भूवर्णन.

Pŏliti'cian, *n.* (पॉलिटि'शन्)—a person engaged or interested in politics. राजनीतिकुशल, राजकारणपटु, मुत्सद्दी.

Pŏl'itics, *n. pl.* (पॉ'लिटिक्स)—the science of government ; affairs of State ; questions of policy ; strife of parties contesting for power. राजनीति ; राज्यकारभार ; राजकारण ; निरनिराळ्या पक्षांतील भांडण. *Is not practical politics,* is too remote to be worth discussing. अव्यवहारी राजकारण.

Pŏl'ity, *n.* (पॉ'लिटि)—a form of civil government ; an organized State. राज्यनीति ; राज्यव्यवस्था, समाजरचना.

Pŏ'lka, *n.* (पॉ'ल्का)—a kind of dance. एक प्रकारचा नाच.

Pōll, *n.* (पोल्)—the head or back part of the head ; counting of votes, voting, number of votes. डोई, डोचकें, डोकें ; मतदारांची संख्या व मतांची नोंद, मतदान. *P.-tax,* डोईपट्टी. *v. t. & i.* to crop hair of ; cut off top of tree or horns of beast ; count votes of, vote, receive votes of. चे केंस कापणें, छाटणें ; (झाडाचा शेंडा किंवा गुराची शिंगें) तोडणें ; मतें मोजणें, मत देणें, मतें मिळविणें.

Pŏll, *n.* (पॉल्)—(*P*–) conventional proper name of parrot. पोपटाचें ठेवलेलें नांव. *P-parrot,* a parrot, a silly babbler. पोपटपंची करणारा, मूर्खपणाची बडबड करणारा.

Pŏll'ack,-ock, *n.* (पॉ'लक्,-लॉक्)—a sea-fish allied to cod. कॉडसारखा एक समुद्रांतील मासा.

Pŏll'ard, *n.* (पॉ'लर्ड)—a tree made by cutting off the top to produce a close head of young shoots ; a hornless animal. वरचा भाग कापलेलें झाड ; शिंगें नसलेलें जनावर.

Pŏll'ĕn, *n.* (पॉ'लिन्)—fertilizing powder discharged from flower's anther. फुलांतील पराग, –रज, पुष्परेणु,–रज.

Pŏll'ināte, *v. t.* (पॉ'लिनेट्)—to fertilize with pollen. परागकण घालणें, परागकण घालून नवीन उत्पत्ति करणें. *Pollina'tion, n.*

Pŏllute', *v. t.* (पोल्यूट्)—to destroy the purity of, to taint or infect morally. भ्रष्ट करणें, बिघडवणें. *-tion, n.* मलिन करणें, अपवित्रता, भ्रष्टाकार.

Pō'lō, *n.* (पो'लो)—a game of Eastern origin like hockey played on horse-back. 'पोलो' नांवाचा घोड्यावर बसून चेंडू खेळण्याचा खेळ. *P.-stick,* पोलो खेळण्याची लांब दांड्याची काठी.

Pŏlonaise', *n.* (पॉलनेझ्)—form of woman's dress ; slow dance of Polish origin. एक प्रकारचा स्त्रियांचा पोषाख ; एक प्रकारचा नाच.

Polō'nium, *n.* (पलो'निअम्)—a highly radio-active element. एक मूलतत्त्व.

Polō'ny̆, *n.* (पलॉ'नि)—kind of sausage. एक प्रकारचें तयार केलेलें मांस.

Pŏltrōōn', *n.* (पॉल्ट्रून्)—a coward. नामर्द, भित्रा. *-ery, n.*

Pŏly- (पॉलि)—in comb.=Gk *polus,* many. पुष्कळ, बहु–, अनेक–.

Pŏl'y̆andry̆, *n.* (पॉ'लिॲन्ड्रि)—polygamy in which one woman has more than one husband, plurality of husbands. अनेक पति करण्याची चाल, बहुपतित्व.-**rous**, *a.* of, practising, polyandry ; (Bot.) with numerous stamens. एकाच वेळीं अनेक पति असलेली (स्त्री) ; अनेक पुंकेसरी (गुलाब, निशिगंध).

Pŏly̆ăn'thus, *n.* (पॉलिॲ'न्थस्)—kinds of cultivated primula. एक जातीचें फूल.

Pŏly̆chromăt'ic, *a.* (पॉलिक्रमॅ'टिक्)—many-coloured. बहुरंगी, पुष्कळ रंगांचा. *Pol'ychrome, n.* (–क्रो–), polychromatic work of art. पुष्कळ रंगांचें चित्रकाम.

Pŏly̆g'amy̆, *n.* (पॉलि'गमि)—state or custom of having more than one wife or more than one husband at once. अनेक बायका किंवा अनेक नवरे असण्याची चाल, बहुपतित्व, बहुपत्नीकत्व. *Polyg'amist, n.* ;*-mous, a.*

Pŏl'y̆glŏt, *a. & n.* (पॉ'लिग्लॉट)—many-tongued, of or in several languages. पुष्कळ भाषा बोलणारा ; बहुभाषाकोविद ; पुष्कळ भाषांचा किंवा भाषांतील (पुस्तक).

Pŏl'y̆gŏn, *n.* (पॉ'लिगॉन्)—a figure with many angles or sides. अनेक कोन किंवा बाजू असलेली आकृति. *Polyg'onal, a.*

Pŏly̆hē̆d'rŏn, *n.* (पॉलिहे'ड्रॉन्)—many-sided solid, a body of many sides. पुष्कळ बाजू असलेला घन पदार्थ, बहुफलक.*-al, a.*

Pŏl'y̆p, *n.* (पॉ'लिप्)—kinds of animal of low organization, as sea-anemones. खालच्या वर्गांतील बहुहस्त प्राणी.

Poly̆ph'ony̆, *n.* (पोलि'फनि)—harmonizing of separate simultaneous melodies. अनेक निरनिराळ्या सुरांचें मिश्रण,-एकीकरण.

Pŏl'y̆pody̆, *n.* (पॉ'लिपोडि)—fern growing on rocks, walls, etc. खडक, भिंत वगैरेंवर वाढणारा नेचा.

Pŏl'y̆pus, *n.* (पॉ'लिपस्)—(pl.*-pi,-puses*), kinds of tumour, esp of nose. अर्श, वेंड.

Pŏ'ly̆syllable, *n.* (पॉ'लि-सिलेबल)—a word having many or more than three syllables. अनेक अक्षरांचा शब्द.*-a'bic, a.*

Pŏly̆tĕc'hnic, *a.* (पॉलिटे'क्निक्)—comprehending many arts, dealing with or devoted to various arts. अनेक कलांसंबंधीचा, अनेक कलांना वाहिलेला

n. a technical school. कलाशिक्षणसंस्था, कलामंदिर.

Pŏ'lўthēism, *n.* (पॉ'लिथिइझम्)—belief in more than one god, doctrine of plurality of gods. अनेकेश्वरी मत. *Pol'ytheist*, *n.* अनेकेश्वरवादी.-*istic*, *a.*

Pomace, *n.* (प'मिस्)—crushed apples in cider-making; any pulp; refuse of fish etc. used as fertilizer. फळांचें सत्त्व; रेंदा, ठेंचा; माशांचें खत, कुटी.

Pomāde', Pomā'tŭm, *nn.* (पोमे'ड्, पोमे'टम्)—scented ointment for the hair. केसांना लावण्याचें सुगंधि मलम.

Pōme, *n.* (पोम्)—succulent fruit with firm fleshy body enclosing carpels forming the core. सिताफळ, रामफळ, सफरचंद या जातीचें फळ.

Pŏme'grănate, *n.* (पॉ'म्-ग्रॅनेट्)—a large tough-rinded fruit containing numerous seeds. डाळिंब.

Pŏmerā'nian, *n.* (पॉमरे'निअन्)—a breed of small dogs. लहान जातीचे कुत्रे.

Pŏm'frĕt, *n.* (पॉ'म्फ्रिट्)—fish found in Indian and Pacific oceans, used as food. सरगुंडलें, सरंगा, (माशांची जात.)

Po'mmĕl, *a.* (प'मेल्)—the knob on the hilt of a sword; front of saddle; horn of side-saddle. तलवारीच्या मुठीचें बोंड किंवा गांठ; खोगिराच्या पुढलें उंच टोंक. *v. t.* to strike with sword-pommel or with fists. कुदवणें, ठुकलणें, बडवणें.

Pŏmp, *n.* (पॉम्प्)—a splendid display; splendour, grandeur, display. स्वारी, मिरवणूक, थाट; डामडौल, भपका, ऐट.

Pŏm'pŏm, *a.* (पॉ'म्-पॉम्)—a quick-firing gun, loaded and fired with great rapidity. जलद उड-णारी बंदूक.

Pŏm'pŏn, *n.* (पॉ' म्पॉन्)—tuft of ribbon, etc. on hat, shoe, etc. टोपी, जोडा वगैरेवरील फितीचा झुबका, टोंक, गांठ.

Pŏm'pous, *a.* (पॉ' म्पस्)—magnificent, splendid; showing self-importance; (of language) inflated, highflown. भपकेदार, भव्य, थाटाचा; स्वतःची थढाई दाखविणारा; डबदार, शब्दावडंबराची (भाषा, शैली). *Pompos'ity*, *n.*; *Pomp'ously*, *adv.*; *Pomp'ousness*, *n.*

Pŏn'chŏ, *n.* (पॉ'न्शो)—(*pl.-os*), S.-Amer.-cloak or cape made of a piece of cloth, etc. with opening for the head. एकाच कापडाचा, डोकें शिरण्यापुरता उघडा, असा मोठा डगला.

Pŏnd, *n.* (पॉ'न्ड्)—a small body of still water artificially formed, (facet.) the sea. डबकें, तळें, तलाव, पुष्करिणी; समुद्र. *v. t. & i.* to hold *back*, dam *up*, (stream); (of water) form a pool or pond. (प्रवाह) अडविणें, अडकविणें, तुंबविणें; तळें, तलाव,-बनणें. *Herring p.*, हेरिंग मासे असलेला समुद्र. *P.-life*, तळ्यांतील जीवजंतु, प्राणी. *Pond'weed*, kinds of aquatic herb growing in still water. दळ, गोड्या पाण्यांतील वनस्पति.

Pŏn'der, *v. t. & i.* (पॉ'न्डर्)—to weigh in mind, to consider with deliberation. विचार करणें, चिंतन करणें. *Pon'deringly*, *adv.* विचार करून, मननपूर्वक.

Pŏn'derable, *a.* (पॉ'न्डरेबल्)-of appreciable weight, material. वजन करण्याजोगता, वजनाचा; चिंत्य, चिंतनीय. *n.* (*esp. in pl.*) material things. चिंत्य, -विचाराई-गोष्टी.

Pŏn'derous, *a.* (पॉ'न्डरस्)—unwieldy by weight; heavy, dull (style). वजनदार; जड, कंटाळवाणी (लेखनपद्धति). *Ponderos'ity*, *n.*

Pŏn'iard, *n.* (पॉ'न्यर्ड्)—a dagger. कट्यार, खंजीर. *v. t.* to stab with *p.* कट्यार भोसकणें; खंजीर खुपसणें, व ठार मारणें.

Pŏn'tiff, *n.* (पॉ'न्टिफ्)—the Pope; bishop; the chief priest, a high-priest. पोप; बिशप; मुख्य धर्माधिकारी. *Pontif'ical*, *a.* episcopal, papal; (of manner, etc.) as of a pontiff. रोमन कॅथॉलिक धर्मगुरूचा, पोपचा; धर्माधिकाऱ्यासारखा. *n.* a book of episcopal rites; (pl.) episcopal vestments. रोमन कॅथॉलिक धर्मविधींचें पुस्तक; पोपचीं वस्त्रें, पोषाख.

Pontōōn', *n.* (पॉन्टू'न्)—a flat-bottomed boat for use with others as supports of temporary bridge, a kind of boat. तात्पुरता पूल बांधण्याची नाव, तराफा, पडाव. *v. t.* to cross river by means of pontoons. नौकेंतून-पडावांतून-पडावांच्या तरत्या पुलावरून नदी ओलांडणें.

Pō'nў, *n.* (पो'नि)—a horse of any small breed; (sl.) £25; translation, crib. तट्टू; २५ पौंड; भाषांतर, टिप्पणी, अर्थपट्टी.

Pōōd, *n.* (पूड्)—a Russian weight (36 lb.). छत्तीस पौंडाचें रशियांतील वजन.

Pōō'dle, *n.* (पू'डल्)—kinds of a pet dog with long curling hair. कुत्रा, केसाळ कुत्र्याची एक जात.

Pooh, *int.* (पूः)—of contempt. तिरस्कारदर्शक अव्यय.

Pooh-Pooh', *v. t.* (पूःपू)—to ridicule. उपहास करणें.

Poo'koo, Puku, *n.* (पू'कु)—red antelope of Central Africa. मध्य आफ्रिकेंतील तांबडा मृग,-हरीण.

Pōōl, *n.* (पूल्)—a small body of still water; puddle; deep place in a river. डबकें, लहान तळें, नदींतील खोल जागा.

Pōōl, *n.* (पूल्)—collective stakes in cards or betting; game for several players on billiard-table with pool taken by winner; combination of manufacturers. पत्त्यांच्या खेळांतील किंवा इतर पातीचा सट्टा; एक प्रकारचा खेळ; कारखानदारांची जूट,-एकी,-कोंडी. *v. t.* to throw into common fund, share (traffic, profits). सर्वसाधारण फंडांत ठेवणें,-टाकणें; (व्यापाराची,-वाहतुकीची, नफ्याची) वांटणी करणें.

Pōōn, *n.* (पून्)—an E.-Ind. tree. एक झाड. *P.-oil.*, oil from seeds of this, used in medicine and for lamps. पून् झाडाच्या बियांचें तेल.

Pōōp, *n.* (पूप्)—stern of a ship; aftermost and highest deck of a ship. गलबताची मागची

बाजू; पिछाडी, वराम; अगदीं मागचा आणि सर्वांत उंच जहाजाचा वरचा भाग. *v. t. & i.* (of wave) break over stern of ship; (of ship) receive (wave) over stern. गलबताच्या वरामावर (लाट) आदळणें; (गलबताच्या) वरामावर लाट घेणें. *Poop'ed, a.*

Poor, *a.* (पुअर्)—having little money or means; (of soil) unproductive; inadequate; despicable, insignificant; deserving pity. गरीब, दरिद्री; कंगाल; निकामी, निकस; अयोग्य; क्षुद्र, भिकार; करुणाजनक. *The poor,* गोरगरीब, दानधर्मावर जगणारे. *P.-box,* गरिबांच्या मदतीसाठीं पेटी, धर्मादायपेटी. *P.-house,* गोरगरिबांसाठीं धर्मशाळा, कंगालखाना.

Poor'lў, *adv.* (पुंअर्-लि)—insufficiently, with little success. अपुरा, यशावांचून. *pred. a.* out of sorts, not in good health. अस्वस्थ, कांहींसा आजारी.

Poor'nĕss, *n.* (पुंअर्निस्)—unproductiveness; lack of some good quality or constituent. नापीकपणा, गुणहीनपणा, धनहीनता, निर्धनता.

Poor-spi'rĭtĕd, *a.* (पुअर्-स्पि'रिटेड्)—of a mean spirit, meek, cowardly. गरीब, दुबळा, धैर्यहीन.

Pŏp, *n.* (पॉप्)—abrupt explosive sound, dot, spot, esp. in marking sheep, etc.; (colloq.) champagne, ginger-beer; (*sl.*) pawning; popular concert; social and debating club at Eton; father. फट् असा आवाज; डाग, ठिपका; शांपेन दारू; गहाण टाकणें; लोकप्रिय करमणूक, खेळ; ईटनमधील समाजसंघ, वादविवादसभा; बाप. *v. i. & t* to make pop; (colloq.) let off (pistol, etc.); go or come unexpectedly or suddenly; put quickly in, down, etc. फट् असा आवाज करणें; (पिस्तूल) उडविणें, बार करणें; फटकन्,-सडकन्-जाणें किंवा येणें; झटकन आंत,-खालीं, -ठेवणें. *adv.* with a pop, suddenly. फट् असा आवाज करून, अकस्मात्, झटकन्, ताडकन्. *To pop the question,* to propose marriage. (मुलीला) मागणी करणें,-घालणें. *P.-gun,* child's toy-gun. फटकळी, खेळांतील बंदूक

Pōpe, *n.* (पोप्)—the bishop of Rome as the head of R. C. church. रोमन कॅथॉलिक धर्माचा मुख्य अधिकारी.*-dom, n.* पोपचा-हुद्दा, पदवी, हुकमत.

Pō'perў, *n.* (पो'परि)—(contempt.) the papal system; Romanizing tendencies. रोमन कॅथॉलिक पंथ;-धर्म.

Pŏp'injay, *n.* (पॉ'पिन्जे)—a parrot; fop, coxcomb, green wood-pecker. पोपट; नखरेबाज-फक्कडलाल-मनुष्य; सुतारपक्षी.

Pō'pĭsh, *a.* (पो'पिश्)—of popery; popistical. पोपचा; रोमन कॅथॉलिक धर्मपंथाचा.

Pŏp'lar *n.* (पॉप्-लर्)—kinds of tree noted for tallness and slenderness. हिवर, हिवराचें झाड, -लाकूड.

Pŏp'lin, *n.* (पॉप्-लिन्)—corded fabric made of silk and worsted. एक प्रकारचें रेशमी कापड.

Pŏpp'ĕt, *n.* (पॉ'पिट्)—darling; lathe-head. आवडतें, लाडकें; चरकाचा,-कातकामाच्या चाकाचा,-शेंडा, -वरचा भाग.

Pŏpp'ied, *a.* (पॉ'पिड्)—having poppies; drugged with opium. खसखस असलेला,-घातलेला; अफूचें विष घातलेला.

Pŏpp'ing-crease, *n.* (पॉ'पिंग-क्रीझ्)—white line 4ft. in front of & parallel to wicket within which batsman must stand. बॅट्समन उभें राहण्याची जागा मर्यादित करणारी रेषा.

Pŏpp'ў, *n.* (पॉ'पि)—kinds of plant with bright showy flowers and milky juice. एक सुंदर फुलें असलेलें झाड. *Flanders poppies, pp.* sacred to dead of great war; as name of those made for and sold on Poppy Day, 11 Nov. गेल्या महायुद्धांतील मृतांना वाहण्याचीं फुलें; नोव्हेंबर ११ या 'पॉपि डे' दिवशीं विकलीं जाणारीं फुलें.

Pŏp'ūlāce, *n.* (पॉप्युलेस्)—the common people, the multitude, the commonalty. सामान्य लोक, साधारण लोक.

Pŏp'ūlar, *a.* (पॉ'प्युलर्)—of, carried on by, the people; generally liked, or admired; adapted to the understanding, taste, or means of the people; prevalent among the people. लोकांचा; सुलभ, सहजसाध्य, लोकमान्य, लोकप्रिय; लोकरूढीचा, लोकप्रसिद्ध. *At p. prices,* at low prices. कमी किंमतींत. *Pop'ularly, adv.* व्यवहारांत, लौकिकांत, सर्वतोमुखीं.

Pŏpūlă'rĭtў, *n.* (पॉप्युलॅ'रिटि)—being generally liked, favour or goodwill of the people. लोकप्रियता.

Pŏp'ūlarize, *v. t.* (पॉ'प्युलराइझ्)—to make popular; extend (suffrage etc.) to common people; present in popular form. लोकप्रिय करणें, सामान्य लोकांत प्रसार करणें; सामान्य लोकांना समजेल असें करणें.

Pŏp'ūlāte, *v. t.* (पॉ'प्युलेट्)—to fill or furnish with inhabitants, to people. वसाहत करणें, वसविणें; लोक भरणें. *Densely populated,* दाट वस्तीचा. *Pop'ulator, n.*

Pŏpūlā'tion, *n.* (पॉप्युले'शन्)—the inhabitants; the number of inhabitants. रहिवासी; लोकसंख्या, प्रजा, वस्ती.

Pŏp'ūlist, *n.* (पॉ'प्युलिस्ट)—an adherent of U. S. political party aiming at public control of railways, graduated income-tax, etc.; adherent of Russian political party advocating collectivism. (अमेरिकेंतील सं. संस्थानांतील) रेल्वे वगैरे लोकसत्ताक असावी असें मानणाऱ्या राजकीय पक्षाचा अनुयायी; (रशियांतील) जमिनी वगैरे सार्वजनिक असाव्या असें मानणाऱ्या राजकीय पक्षाचा अनुयायी.

Pŏp'ūlous, *a.* (पॉ'प्युलस्)—thickly populated. भरवस्तीचा, दाट वस्तीचा.*-ness, n.* भरवस्ती.

Pŏrce'lain, *n.* (पॉ'र्स-लिन्)—the finest kind of earthen or pottery ware, china. चिनी मातीचीं भांडीं. (fig. attrib.) delicate, fragile. नाजूक, फुटणारें, ठिसूळ. *P.-shell,* कवडी.

Pŏrch, *n.* (पॉर्च्)—a portico, a covered approach to the entrance of a building. देवडी, द्वारमंडप.

The P., colonnade at Athens to which Zeno and his disciples resorted; stoic school or philosophy. झिनो आणि त्याचे शिष्य जिथें बसत ती अथेन्समधील खांबांची रांग; (ग्रीक) तत्त्वज्ञानमंदिर, तत्त्वज्ञान.

Pŏr'cine, *a.* (पॉ'सांइन्)—of or like pigs. डुकरांचा, डुकरांसारखा.

Pŏrc'ūpine, *n.* (पॉ'क्यु-पाइन्)—a beast (about two feet long) armed with pointed quills. साळू, साळिंदार.

Pore, *n.* (पोअर्)—one of the small openings making skin, wood, brick, &c. permeable to fluids. छिद्र, भोंक, द्वार; स्वेदरंध्र, रंध्र. *v. i.* to have the eyes or mind intent upon, to look with steady application; to meditate, think intently upon (subject). मन लावणें, चोळेफोड करणें, सारखें पाहणें; चिंतन करणें, विचार,-मनन-करणें. *P.-over*, be absorbed in studying (book etc.). अभ्यासांत गढून जाणें. *P. one's eyes out*, tire them by close reading. एकसारखें वाचून डोळ्यांना शीण देणें,-आणणें.

Pŏrk, *n.* (पॉर्क)—pig's flesh. डुकराचें मांस. *P.-barrel*, (colloq.) congressional grant of money for local public works. स्थानिक सार्वजनिक हिताच्या कामासाठीं पैशाची मदत.

Pŏrk'er, *n.* (पॉ'कर्)—young fattened hog; pig raised for food. लठ्ठ डुकर; खाण्याकरितां पाळलेलें डुकर.

Pŏrnŏg'raphy̆, *n.* (पॉर्नॉ'ग्रफि)—description of manners etc. of harlots, obscene writing. वेश्याव्यवहारवर्णन, बीभत्स लिखाण,-ग्रंथ. [Gk *porne*, a harlot]

Pōr'ous, *a.* (पो'रस्)—having pores; permeable. सच्छिद्र; पाझरणारा. *Poros'ity*, *n.* सच्छिद्रता, विरविरीतपणा.

Pŏrph'yry̆, *n.* (पॉ'र्फिरि)—kinds of rock with crystals embedded in a red or other ground-mass. एक जातीचे कठीण खडक,-दगड.

Pŏrp'oise, *n.* (पॉ'पंस)—a blunt-snouted marine mammal 5 ft. long. गाधा मासा, चपटाळ मासा, डुलका. [L. *porcus*, a hog; *piscis*, a fish. Lit. the hog-like fish]

Pŏ'rridge, *n.* (पॉ'रिज्)—a thickened mass of oat meal or other meal boiled in water or milk. (ओट नांवाच्या धान्याची) लापशी, पेज. *Keep* one's *breath to cool* one's *p.*, keep one's advice etc. for one's own use. आपला उपदेश स्वतःच पाळणें, परोपदेश स्वतःच्या उपयोगीं आणणें.

Pŏ'rringer, *n.* (पॉ'रिंजर्)—a small basin for porridge. लहान भांडें, पेला, वाटी, वाडगा.

Port, *n.* (पोर्ट)—a harbour, haven; a town or place possessing harbour; gate, gateway (of walled town) opening in a ship's side for entrance, etc.; (also *port-hole*) aperture in ship's side to admit light and air; bearing, deportment, mien, demeanour; left of a ship looking forward; a strong sweet red wine of Portugal. बंदर; मांडवी, बंदर असलेलें शहर; तटबंदीच्या शहराची वेस; गलबताच्या बाजूंतील उघडा भाग; गलबताच्या बाजूंतील हवा-उजेडासाठीं वाटोळी खिडकी,-भोंक, -बारी,-जंगी; वर्तणूक, तऱ्हा, ढब, बाह्य स्वरूप; गलबताची डावी बाजू; लाल दारू. *v. t. & i.* to hold (rifle, sword) diagonally in front of body; to turn (*helm, ship*) *to port*; (*of ship*) turn to port. उजव्या हातांत दस्ता धरून डाव्या खांद्यावर बंदूक टाकणें,-तलवार अशा प्रकारें धरणें; बंदराकडे वळवणें,-वळणें. *Free port*, आयातनिर्यातीसाठीं सर्व देशच्या व्यापाऱ्यांना खुलें बंदर; बिनजकातीचें बंदर. *Close p.*, p. lying up river. नदीकांठचें बंदर.

Pōrt'able, *a.* (पॉ'र्टेबल्)—that can be carried about, easily carried; moveable. वाहून नेण्यासारखा; हलणारा, सुटसुटीत, सहज हातांत घेऊन जाण्याजोगा. *Portabil'ity n.*

Pōrt'age, *n.* (पॉ'र्टिज्)—transport of goods or its cost; carrying of goods etc. necessary between two navigable rivers. मालाची ने-आण करणें, त्याची मजुरी, त्याचा खर्च; दोन वाहतुकीच्या नद्यांच्या मध्यें पडाव किंवा माल इकडून तिकडे नेणें.

Pōrt'al, *n.* (पॉ'र्टल)—doorway, gateway; (*anat.*) of the porta or transverse fissure of the lever. द्वार, फाटक, मार्ग, रस्ता, वाट; यकृताच्या मुखापासून निघणारा, यकृतासंबंधीं. *P. vein*, यकृतांतील (सपित्तरक्त वाहणारी) शीर.

Pōrtcŭll'is, *n.* (पॉर्ट-क'लिस्)—a sliding or falling gate, grating raised and lowered in grooves as defence of gateway. द्वाररक्षणार्थ दरवाजाला अडकवलेली व खालींवर करतां येणारी लोखंडी सळयांची चौकट.-*ed*, *a.*

Pōrtĕnd', *v. t.* (पॉर्टे'न्ड्)—to foreshadow, to be an omen or presage of. आगाऊ सुचविणें, दर्शविणें, भविष्य सुचविणें.

Pōr'tent, *n.* (पॉ'र्टेन्ट्)—a thing that portends something; a significant sign; a prodigy; an ill omen. भविष्यसूचक गोष्ट; महत्त्वाची खूण; अद्भुत; अवलक्षण, अरिष्ट, व्यतिपात.

Pōrtĕn'tous, *a.* (पॉर्टे'न्टस्)—of the nature of a portent; solemn. अरिष्टसूचक, आश्चर्यावह; गंभीर, हृदयंगम.

Pōrt'er, *n.* (पॉ'र्टर्)—attendant at door or gate; a person employed to carry burdens esp. servant of railway-company who handles luggage; a dark-brown bitter beer. देवडीवाला, द्वारपाळ; हमाल; एक प्रकारची दारू. *P.-house*, tavern restaurant. पोर्टर दारूचें दुकान,-खाणावळ,-उपाहारगृह. *P.-house steak*, a choice cut of beef. गोमांसाचा तुकडा. *Porterage*, *n.* hire of porters. हमाली, हेल. *P.'s knot*, हमालाच्या खांद्यावरील ओझें वाहण्यासाठीं मऊ गिरदी. [L. *portare*, carry]

Pōrt'fire, *n.* (पॉ'र्ट फायर्)—appliance for igniting fireworks or explosives. दारूकाम किंवा सुरुंग यांना बत्ती लावण्याचें साधन.

Pŏrtfō'liō, *n.* (पॉर्ट्-फो'लिओ)—(*pl.-os*), a case for loose drawings or sheets of paper; office of minister of state. कागद ठेवण्याचें जुगदान; राजमंत्र्याचा हुद्दा किंवा अधिकार.

Pŏrt'icō, *n.* (पॉ'र्टिको)—(*pl.-os*) a colonnade, a kind of porch to a building fronted with columns. इमारतीच्या दर्शनी भागीं असलेली सुंदर वाडोळ्या खांबाची ओसरी, हेलज.

Portiere, *n.* (पॉ'र्त्यिअ)—a curtain over door or doorway. दरवाज्यावरील पडदा. [F. *porte*, gate]

Pŏr'tion, *n.* (पॉ'र्शन्)—a part allotted, a share; helping; dowry; destiny or lot. भाग, हिस्सा, वांटा, अंश, खंड; मदत; स्त्रीधन; नशीब, दैव. *v. t.* to divide into shares or lots; to give dowry to. विभागणें, वांटून देणें, स्त्रीधन म्हणून देणें.*-less, a.* without dowry. स्त्रीधनरहित, हुंड्याशिवाय.

Pŏrt'lў, *a.* (पॉ'र्ट्-लि)—bulky, corpulent; of stately appearance. उमदा, घट्टपुट; भव्य, उमदा, भारदस्त, देखणा. *Port'liness, n.*

Pŏrtmăn'teau, *n.* (पॉर्ट्-मॅ'न्टो)—(*pl.-s,-x*) a leather trunk (for clothes, &c.); (fig.) factitious word blending the sounds and combining the meanings of two others (e. g. *slithy*=lithe & slimy). कपडे वगैरे ठेवण्याकरितां चामड्याची प्रवासी पेटी; (दोन शब्दांचे उच्चार व अर्थ यांच्या मिश्रणानें घनलेला) नवीन घनावट शब्द.

Pŏrt'rait, *n.* (पॉ'र्ट्रिट्)—likeness of a person or an animal; a vivid description or delineation in words. मनुष्याचें किंवा प्राण्याचें हुबेहूब चित्र, तसबीर; हुबेहूब वर्णन, शब्दचित्र.

Pŏrt'raiture, *n.* (पॉ'र्ट्रचर्)—portraying, portrait. चित्र काढणें; चित्र, तसबीर, प्रत, प्रतिमा.

Pŏrtray', *v. t.* (पॉर्ट्रे')—to paint or draw likeness of; to describe graphically. तसबीर किंवा चित्र काढणें; हुबेहूब वर्णन करणें.*-al, n.*

Pŏrt'reeve, *n.* (पॉ'र्ट्रीव्)—officer inferior to mayor in some towns. नगराध्यक्षाच्या खालचा अधिकारी.

Pŏrt'rĕss, *n.* (पॉ'र्ट्रिस्)—a female porter. हेलपाटी करणारी, हमालीण.

Pōse, *v. t. & i.* (पोझ्)—to propound for solution; to arrange in required attitude, to set up or give one-self out *as*; to puzzle (a person) with a question or problem. विचारार्थ पुढें मांडणें; पाहिजे तसें किंवा व्यवस्थेनें बसविणें; डौल मिरविणें; निरुत्तर करणें, अडविणें, प्रश्न विचारून विचारांत पाडणें. *n.* a certain attitude of body or mind, esp. one assumed for effect. ऐट, ढब, डौल.

Po'ser, *n.* (पो'झर्)—a difficult question. बिकट प्रश्न, कूट-गूढ-कठीण-प्रश्न.

Pŏs'ĭt, *v. t.* (पॉ'झिट्)—to lay down as basis of argument or inference; put in position. वादाचा किंवा अनुमानाचा आधार म्हणून मांडणें, गृहीत धरणें, बसविणें, ठेवणें.

Pōsi'tion, *n.* (पोझि'शन्)—the way a thing is placed; state of affairs; mental attitude, posture; rank or status; an office; strategic point or condition; proposition, laying down of this. स्थिति, परिस्थिति, व्यवहारस्थिति, मनःस्थिति, मनाची दृष्टि, कल, दर्जा, अधिकार, नोकरी; मान्याची जागा, लष्करी महत्त्वाचें ठाणें,-ठिकाण; सिद्धान्त, प्रमेय, प्रतिज्ञा, सिद्धान्त मांडणें. *v. t.* place in position, determine p. of. जागेवर स्थापणें, ठेवणें, जागा ठरविणें. *Posi'tional, a. In 'position*, जागेवर, ठिकाणावर. *Out of p.*, जागा सोडून, अस्थानी.

Pŏs'itive, *a.* (पॉ'झिटिव्)—formally or explicitly laid down, definite; unquestionable; absolutely confident in opinion, cocksure; not negative; greater than zero; (*Gram. adjective, degree*) stating simply the existence of the quality without comparison; (*Photog.*) showing lights and shades as seen in nature आधीं ठरविक, निश्चित; निस्संशय, निर्विवाद, स्पष्ट; स्वतंत्र, निरपेक्ष, सापेक्षेतर, मताभिमानी, दुराग्रही; फाजील खात्रीचा; ऋण किंवा उणें नव्हे तें; शून्यापेक्षां अधिक; (व्याक.) मूळ कोटि, मूलगुणदर्शक, साधारण; (फोटो०) निसर्गतः दिसणारे प्रकाश व छाया दाखविणारा, वास्तविक. *n.* positive degree, adjective, quantity, photograph, etc. विशेषणाचें मूल रूप, साधारण कोटि, धन प्रकाशलेख, वास्तविक छायाचित्र. *P. laws*, मनुष्यनिर्मित, कृत्रिम,-कायदे. *P. proof*, खात्रीलायक पुरावा. *P. nuisance*, down-right, out-and-out *n.*, एकदम-निस्संशय-तापदायक. *P. philosophy*, प्रत्यक्षप्रमाण तत्त्वज्ञान, वास्तव-विद्या *P. sign*, +अधिक चिन्ह. *Pos'itively, adv.* खरोखर, वास्तविक; उघड, स्पष्टपणें; निक्षून, हट्टानें.

Pŏs'itivism, *n.* (पॉ'झिटिव्हिझम्)—philosophy of Comte recognizing only positive facts and observable phenomena; religion founded on this. फ्रेंच तत्त्ववेत्ता कॉम्ट्ट यानें प्रतिपादिलेला प्रत्यक्षज्ञानमूलक धर्मपंथ.*-ist, n.* प्रत्यक्षज्ञानवादी.

Pŏ'ssē, *n.* (पॉ'सि)—body (*of* constables), strong force or company. (हवालदारांची,-पोलीस शिपायांची-) तुकडी; मजबूत तुकडी,-लष्कर. *P. Comita'tus*, body of men above age of *15* in a county, whom sheriff may summon to repress riot etc. दंगा वगैरे मोडण्यासाठीं पंधरा वर्षांवरील तरुणांची भरती असलेली स्वयंसेवक-मंडळी.

Possĕss', *v. t.* (पझे'स)—to hold as property; to own, to have; to have the mastery of, to have power over; to infatuate; to seize. स्वामित्व असणें; ०चा मालक असणें; अधिकार असणें; बुद्धिभ्रंश करणें, भुलवणें; घेरणें, भूतसंचार होणें. *Possessed by a devil*, भूतबाधा झालेला, भुतानें पछाडलेला. *To p. oneself of*, take, get, for one's own. स्वतःसाठीं घेणें, मिळविणें. *Be possessed of*, own, have. स्वताच्या मालकीचें असणें.

Possĕ'ssion, *n.* (पझे'शन्)—possessing or being possessed; occupancy, a thing possessed; subject territory, foreign dominions; (*pl.*) property; wealth. मालकी; वहिवाट, धापर, ताबा; माल-

कोची वस्तु; काबीज केलेला मुलूख, ताब्यांतील परमुलूख; (अने०) मालमत्ता.

Posse'ssive, *a.* (पझे'सिव्ह)—of or indicating possession. कबजाचा, स्वामित्ववाचक. *n.* possessive pronoun or case or word. स्वामित्ववाचक सर्वनाम; षष्ठी विभक्ति, षष्ठी विभक्त्यंत शब्द.

Posse'ss'or, *n.* (पझे'सर्)—owner; proprietor. मालक, धनी; बळकावणारा, भोक्ता.-y, *a.* of, or as of, a possessor. मालकाचा, मालकी, कबजाचा, मालकी ताबा असणारा.

Pŏss'et, *n.* (पॉ'सिट्)—hot drink of milk with wine, spice, etc. दुधांत दारू वगैरे घालून केलेलें पेय.

Pŏss'ible, *a.* (पॉ'सिब्ल्)—that can exist, be done, or happen, practicable. संभवनीय, साध्य, शक्य. *n.* full marks, highest possible score. संपूर्ण गुण, जास्तींत जास्त गुण,-गुणसंख्या,-आंकडा. *Do one's p.*, do all one can. शिकस्तीचे प्रयत्न करणें. *As much as p.*, यथाशक्ति.

Pŏssibil'ity, *n.* (पॉसिबि'लिटि)—the state or condition of being possible; occurrence. शक्यता; संभवनीय गोष्ट.

Pŏss'ibly, *adv.* (पॉ'सिब्लि)—perhaps. कदाचित्, न जाणो.

Pŏss'um, *n.* (पॉ'सम्)—(colloq. for) opossum. पोटाच्या पिशवींतून पिलें नेणारें अमेरिकन जनावर; प्राणी. *To play p.*, to feign illness or death (from p.'s habit of feigning death when attacked). आजारीपणाचें किंवा मेल्याचें सोंग करणें.

Pōst, *n.* (पोस्ट्)—upright of timber or metal; official conveying of letters and parcels; appointed station; a place of duty; appointment; trading station; size of paper; local branch of Grand Army of the Republican or American Legion; (Hist.) courier, letter-carrier, mail-cart. खांब, स्तंभ; टपाल, डाक, ठाणें, चौकी; व्यापाराचें ठाणें; कागदाचा आकार; अमेरिकन सैन्याची स्थानिक शाखा; निरोप्या, पत्रें नेणारा, टपालाची-डाकेची-गाडी. *v. t. & i.* to put (letter, &c.) into post; to travel with post-horses; to hurry; to station in particular spot; to enter in ledger; supply with latest information, to display on a post or notice-board. (पत्र वगैरे) टपालांत टाकणें; भरधांव टपाल नेणाऱ्या किंवा प्रवासी घोड्यावरून जाणें; जलदी जाणें, धांव करणें; अमुक एक ठिकाणीं ठेवणें किंवा उभें करणें; पक्क्या खातावणींत -खातेवहींत-नोंदणें,-लिहिणें; अगदीं ताजी बातमी पुरवणें; (खांबाला वगैरे) चिकटविणें. *adv.* with post-horses; express, in haste. भरधांव; तांतडीनें. *Post-boy*, letter-carrier, postilion. पत्रें नेणारा, जासूद, निरोप्या; गाडी ओढणाऱ्या दोन घोड्यांपैकीं एकावरचा स्वार. *P.-card*, पोस्टाचें कार्ड. *P.-chaise*, (पोस्टशेज्), टपालाचा टांगा,-ची गाडी, प्रवाशांचा टांगा. *P.-free*, आगाऊ डाकहांशील लागलेलें,-पोस्टांतून मोफत आलेलें. *P.-haste*, with all speed. अत्यंत वेगानें. *P.-horses*, formerly used in relays by the post or by travellers. टप्प्याटप्प्यांनीं बदलावयाचे टांग्याचे किंवा टपालाचे घोडे. *P.-man*, डाकवाला, पत्रें वांटणारा. *P.-mark*, पोस्टाचा छाप. *P.-master*, पोस्टांतील मुख्य अधिकारी. *P.-paid*, on which postage has been paid. टपाल हंशील-तिकिट-आगाऊ लावलेलें. *The post*, winning post. अखेरची मजल, शर्यतींतील शेवटची जिंकण्याची जागा,-पोंचण्याची जागा.

Pŏst, *prep.* (पोस्ट्)—L. post = after. नंतर, पुढें.

Pō'stage, *n.* (पो'स्टिज्)—the charge for carriage of letters or other articles by post. डाकहांशील, टपालखर्च. *P. stamp*, पोस्टाचें तिकीट.

Pō'stal, *a.* (पो'स्टल्)—of the post office. टपालखात्याचा, पोस्टखात्याचा. *P. union*, union of governments of various countries for regulation of international postage. आंतरराष्ट्रीय टपालहंशील ठरविण्यासाठीं निरनिराळ्या देशाच्या सरकारांचा संघ.

Pōst-dāte', *v. t.* (पोस्ट्-डे'ट्)—to affix or assign a later date than the real one. पुढील तारीख घालणें. *n.* (पो'स्टडेट्) नंतरची-पुढील-तारीख.

Pōst-dilu'vian, *a. & n.* (पोस्ट्डायल्यू'व्हिअन्,-डिल्यू-)—(person) existing after the Flood. (नोहाचे वेळच्या) जलप्रलयानंतरचा (मनुष्य).

Pŏsteen', *n.* (पॉस्टी'न्)—Afghan leathern pelisse. अफगाणी स्त्रियांचा चामड्याचा झगा.

Pō'ster, *n.* (पो'स्टर्)—a posted placard; (Rugby footb.) attempt at goal that passes straight over a post. चिकटवलेली जाहिरात; (फुटबॉलखेळांत) सीमेवरील खांबावरून चेंडू पाठवणें.

Pŏster'ior, *a.* (पॉस्टी'रिअर्)—hinder; later in time or order. पिछाडीचा, पाठीमागचा; नंतरचा, पश्चात्कालीन. *n.* the buttocks. ढुंगण, गुदप्रदेश.

Pŏste'rity, *n.* (पॉस्टे'रिटि)—a person's descendants; later generations. संतति, वंशज; पुढील पिढ्या.

Pō'stern, *n.* (पो'स्टर्न्)—the back or side entrance; a private door. मागलें किंवा बाजूचें दार; खाजगी दरवाजा, चोरखिडकी, दिंडी.

Pōst'-hāste, *adv.* (पो'स्ट्-हेस्ट्)—with all speed. अत्यंत वेगानें.

Pos'thūmous, *a.* (पॉ'स्ट्युमस्)—born or published after the father's or author's death; occurring after death. बापाच्या मृत्यूनंतर जन्मलेला; कर्त्याच्या मृत्यूनंतर प्रसिद्ध झालेला (ग्रंथ); मरणोत्तर घडणारा.

Postil'ion, *n.* (पोस्टि'ल्यन्)—man riding one of the horses that draw a carriage and guiding the team. दोन घोडे जोडलेली गाडी (त्यांपैकीं एकावर बसून) हांकणारा.

Pōst merid'ĭem, *adv.* (पोस्ट्मेरि'डिअम्)—(abbr. *p. m.*) after noon, as 3·20 P. M. दुपारनंतरचा [L.]

Pōst-mŏrt'ĕm, *a.* (पोस्ट्-मॉ'र्टम्)—after death. मरणानंतरचा. *n.* examination made after death. (मृत्यूचें कारण जाणण्याकरितां) मृत्यूनंतरची चौकशी [L.]

Pōst-ōb'it, *a. & n.* (पोस्ट्ऑ'बिट्)—taking effect after death; bond given by expectant heir for money to be paid on succession to the property. मरणानंतर अमलांत येणारा; भावी वारसानें मिळकत ताब्यांत आल्यावर पैसे (कर्ज) फेडण्याचा करारनामा.

Postpōne', *v. t. & i.* (पोस्ट्-पों'न्)—to defer, to put off for a future or later time; treat (thing) as inferior in importance (*to* another); (of ague) be later in coming on. पुढें ढकलणें, लांबणीवर टाकणें; कमी महत्त्वाचा लेखणें, मागें टाकणें; मागून-उशिरां-येणें. *Postpone'ment, n.* तहकुबी, लांबणीवर टाकणें.

Pōst-prăn'dial, *a.* (पोस्ट्-प्रॅ'न्डिअल्)—(of speech, etc.) after-dinner. भोजनोत्तर, जेवणानंतरचें (भाषण इ.) [L. *post*, after; *prandium*, lunch]

Post'script, *n.* (पो'स्क्रिप्ट्)—(abbr. p. s.), addition made at the end of a letter or a book. ताजा कलम, पत्राच्या वगैरे पुरवणी.

Pŏs'tūlāte, *v. t.* (पॉ'स्टयुलेट्)—to demand as a pre-requisite or basis; to lay down as indisputable. सिद्ध आहे असें गृहीत धरून चालणें, गृहीत धरणें; स्वयंसिद्ध मानणें. *n.* (पॉ'स्टयुलिट्), thing postulated. गृहीत गोष्ट, गृहीत घेतलेलें तत्त्व,-सिद्धान्त.

Pŏs'ture, *n.* (पॉ'स्चर्)—carriage, attitude of body or mind; condition, particular state at a certain time. ठेवण; शरीरस्थिति, मनःस्थिति; अवस्था, दशा. *v. t. & i.* to take up a posture for effect, pose. विशिष्ट (शरीर) स्थिति घेणें, आसन घालणें; बतावणी करणें, ढोंग करणें, आविर्भाव आणणें. *P. maker*, acrobat, contortionist. कसरत करणारा, अंगप्रत्यंगाच्या नकला करणारा. *P. master*, कसरत करणारा.

Pō'sȳ, *n.* (पो'झि)—a bunch of flowers; inscribed motto or poetical verse (on ring, &c). पुष्पगुच्छ; मुद्रालेख.

Pŏt, *n.* (पॉट्)—a vessel of earthenware, metal or glass; (usu. *pott*) a size of paper; large sum; (Racing sl.) large sum staked or betted, favourite. मातीचें, कोणत्याहि धातूचें किंवा कांचेचें भांडें, भासन, पात्र; कागदाचा आकार; मोठी रक्कम, खूप पैसा; (शर्यतींत) जुगाराला लावलेला पैसा, आवडता (घोडा इ०). *v. t. & i.* to put into pot for preservation; plant in flower; (Billiards) pocket; bag (game); shoot at, secure. भांड्यांत-घरणींत-भरून ठेवणें; कुंडींत लावणें; (चेंडू) कशांत-कप्प्यांत-घालणें; शिकार साधणें; नेम धरणें, पकडणें. *P.-hook*, भांडीं अडकविण्याचा हुक,-कान, बांकदार अक्षर. *P.-hunter*, बक्षिसावर बक्षिसें मिळविण्यासाठीं चढाओढ करणारा; बाजारांत नेऊन विकण्याकरितां शिकार करणारा. *Big p.*, important person. महत्त्वशीर वजनदार-असामी,-मनुष्य. *The p. calls the kettle black*, person blaming another for fault he too has. स्वतःच्या अंगीं दोष असतां त्याच दोषांबद्दल दुसऱ्यांस नांवें ठेवणें. *To go to p.*, be ruined or destroyed. चुलींत जाणें, रसातळास जाणें. *To make the p. boil*, make a living. पोट भरणें, पोटापुरतें मिळविणें. *Keep the p. boiling*, स्वतःचें पोट भरणें; कोणतीहि गोष्ट तशीच जोरांत चालू ठेवणें. *P. house*, ale-house. दारूचा पिठा, गुत्ता. *Pot'sherd n.* (पॉ'ट्-शर्ड)—a piece or fragment of an earthenware pot. मडक्याचा तुकडा, खापरी.

Pō'table, *a.* (पो'टेबल्)—drinkable. पिण्याला योग्य, पेय. *n. pl.* drinkables. पेय पदार्थ.

Pŏt'ăsh, *n.* (पॉ'टॅश्)—an alkali in an impure state used in soap. एक जातीचा साबणांत वापरण्याचा क्षार.

Pōtăss'ĭŭm, *n.* (पोटॅ'सिअम्)—a white metal. एक पांढरी धातु, पालाश.

Potā'tion, *n.* (पोटे'शन्)—drinking, draught. पिणें, घोट.

Potā'tō, *n.* (पटे'टो)—(pl.-*oes*), a plant with tubers used as food, the tuber of potato. बटाटा. (*Sl.*) *Quite the p.*, *proper thing.* योग्य वस्तु,-गोष्ट. *P.-box,-trap*, mouth. तोंड, मुख.

Poteen', potheen', *n.* (पोटी'न्, पॉटही'न्)—Irish whisky from illicit still. आयरिश लोकांनीं चोरून काढलेली दारू.

Prĕstige', *n.* (प्रेस्टी'झ्)—influence or reputation, influence based on high conduct. अब्रू, नांव, वजन, पत, इभ्रत, प्रतिष्ठा. [F, =illusion, glamour]

Prĕs'tō, *adv.* (प्रे'स्टो)—(used in conjuring) quickly. त्वरित, चटकन, लवकर, जलदी. *a.* rapid, juggling. त्वरित, हातचलाखीचा, नजरबंदीचा.

Prèsūme', *v. t. & i.* (प्रिझ्यू'म्)—to take for granted; to take the liberty, to venture (to do), to make unwarranted advances. कल्पिणें, कल्पना करणें, मानणें; गृहीत धरणें, धाडस करणें, अतिक्रम करणें, आगळीक-धिटाई-करणें, जास्त सवलत देणें. *Presumably,-medly, adv.* as may fairly be or is presumed. अटकळीनें, अनुमानानें, अनुमानावरून, अंदाजानें. *Presu'ming, a.* presumptuous. आढ्यताखोर, वृथाभिमानी, पोकळ अवसानाचा. *To presume (up) on,* take advantage of, make unscrupulous use. चा फायदा घेणें,-ओळखीचा दुरुपयोग करणें.

Presŭmp'tion, *n.* (प्रिझ'म्शन्)—supposition; balance of strong probability; arrogance, assurance. अटकळ, अनुमान, तर्क, अंदाज, कल्पना, बळकट संभव; पोकळ अवसान, आढ्यता.

Presŭmp'tive, *a.* (प्रिझ'म्टिव्ह्)—that may be assumed to be such till the contrary is pro-

supposed. (प्रमाणावांचून) गृहीत धरलेला, अनुमानाचा, अंदाजी, संभवनीय. *P. evidence*, आनुमानिक, -अनुमेय,-पुरावा. *Heir p.*, अधिक जवळचा वारस जन्मेपर्यंत जो वारस मानला जातो तो, आनुमानिक वारस.

Prĕsŭmp'tūous, *a.* (प्रिझ्'म्प्युअस्)—presuming; forward; arrogant. निराधार, आनुमानिक; साहसी, धाडसी; मगरूर.

Prēsuppōse', *v. t.* (प्रीसपो'झ्)—to take for granted; imply the existence of. गृहीत धरणें, पूर्वकल्पना करणें, चें अस्तित्व सुचविणें.

Prēsŭpposi'tion, *n.* (प्रीसपोझि'शन्)—a thing assumed as basis (for argument, &c.). गृहीत धरणें, पूर्वकल्पना.

Prĕtĕnce', *n.* (प्रिटे'न्स्)—pretending, make-believe; pretext; claim. लचाडी, बहाणा; ढोंग, मिष; अधिकार, हक्क.

Prĕtĕnd', *v. t. & i.* (प्रिटे'न्ड्)—to lay claim; to feign; to profess falsely. (चा नसता) हक्क सांगणें; ढोंग करणें; खोटा बहाणा करणें. *To p. to*, try to win in marriage; profess to have (duty etc.). शीं विवाह करण्याचा प्रयत्न करणें; (गुण वगैरे) असण्याचा बहाणा करणें.

Prĕtĕn'der, *n.* (प्रिटे'न्डर्)—claimant to title etc. (नसता) हक्क सांगणारा, तोतया.

Prĕtĕn'sion, *n.* (प्रिटे'न्शन्)—assertion of a claim; pretentiousness. हक्क सांगणें; ढोंग, आढ्यता, बढाई.

Prĕtĕn'tious, *a.* (प्रिटे'न्शस्)—full of pretension, making claim to great merit; ostentatious; lacking in modesty. अहंमन्य; ढोंगी, बढाईखोर; विनयहीन.-*ly, adv*;-*ness, n.*

Prĕt'erite, *a. & n.* (प्रे'टरिट्)—past (tense). भूत; भूतकाळ.

Prētermit', *v. t.* (प्रीटर्मि'ट्)—to pass over without mention; omit to do or perform; leave off for a time. गाळणें, न सांगणें; वगळणें; कांहीं काळ सोडणें, -वगळणें,-टाकणें. *Pretermi'ssion, n.*

Prē'text, *n.* (प्री'टेक्स्ट्)—ostensible reason to cover the real reason; excuse. निमित्त, बहाणा; सबब, मिष. *On* or *under*, or *upon, the p. of* or *that*, professing as one's object etc. हेतूनें निमित्त -बहाणा,-करून.

Prĕ'tty, *a.* (प्रि'टि)—attractive (to the eye, ear, or aesthetic sense), pleasing, neatly arranged; fine or commendable. चित्तवेधक, मोहक; सुंदर, सुरेख, प्रशंसनीय. *adv.* tolerably, fairly. बराच, कांहींसा, बेतानें. *The p.*, fluted or cut part of wine-glass or tumbler, (as *fill it up to the p.*), दारूच्या पेल्याचा कंगोऱ्याचा भाग. *A p. sum*, बराच, -खूप,-रग्गड-पैसा. *My p.* (one), child. माझें मूल, *Pretty-pretty*, aiming too much at prettiness. -सुंदरपणाचा-मोहकपणाचा-अतिरेक करणें. *Pretty-pretties, n. pl.* ornaments, knick-knacks. अलंकार, सुरेख वस्तु, शोभेच्या सुंदर वस्तु. *Pret'tily. adv.* सुबकपणानें, मोहक दिसेलसा. *Pret'tiness, n.*

Prĕvail', *v. i.* (प्रिव्हे'ल्)—to gain the mastery; to attain one's object; to predominate; to be current. वर्चस्व पावणें; हेतु सफल होणें; वरचढ असणें; चालू असणें, प्रचारांत असणें. *To p. (up) on*, persuade (*to* do). मन वळवणें, वळवून घेणें, प्रवृत्त करणें.

Prĕv'alent, *a.* (प्रे'व्हलन्ट्)—in general operation; generally experienced at a time or place. प्रचालित, सर्वसाधारण प्रचारांतला, सर्वत्र फैलावलेला, सुरू-चालू-असलेला. *Prev'alence, n.* प्रचार, प्रघात, फैलाव, प्राबल्य, जोर.

Prĕvă'ricate, *v. i.* (प्रिव्है'रिकेट्)—to speak evasively, to make evasive or misleading statements; to quibble, to equivocate. उडवाउडवीचीं उत्तरें देणें; दुटप्पी बोलणें, घरसोडीचें बोलणें.-*tion, n.* घरसोडीचें बोलणें.-*tor, n.* दुतोंड्या, दुटप्पी बोलणारा.

Prĕvē'nient, *a.* (प्रिव्ही'निअन्ट्)—anticipatory; preceding something else. सापेक्ष; पूर्वीचा, अगोदरचा.

Prĕvĕnt', *v. t.* (प्रिव्हे'न्ट्)—to hinder, to stop, to intercept, to impede, to obstruct; to secure the non-occurrence of; (theol.) go before, guide. अडथळा करणें, थांबविणें; अटकाव किंवा प्रतिबंध करणें, निवारणें; मार्ग दाखविणें, पुढारी होणें.

Prĕvĕn'tion, *n.* (प्रिव्हे'न्शन्)—precaution, forethought; the act of preventing. तरतूद, तजवीज, पूर्व-योजना; प्रतिबंध, प्रतिबंधक उपाय.

Prĕvĕnt'ive, *a.* (प्रिव्हे'न्टिव्ह्)—serving to prevent something (esp. a disease). प्रतिबंधक (उपाय). *n.* preventive agent, drug, measure, etc. निवारक -प्रतिबंधक, औषध, उपाय इ. *P. service*, coast-guards. किनाऱ्याचें रक्षण करणारें सैन्य,-सैनिक.

Prē'vious, *a.* (प्री'व्हिअस्)—coming before in time or order; prior to; (sl.) done or acting hastily. घाईनें,-अविचारानें,-केलेलें,-करणारा; अगोदरचा, आधींचा; पहिला. *adv. p. to*, before. पूर्वी. *Previous question*, (Parl.) question whether vote shall be taken on main question (put to avoid putting of main question). पार्लमेंटमध्यें प्रस्तुत प्रश्नावर वादविवाद बंद करून दुसरा प्रश्न पुढें आणण्याच्या हेतूनें प्रस्तुत विषयावर मतें घ्यावीं कीं काय हा प्रश्न. *Pre'viously, adv.*

Prĕvi'sion, *n.* (प्रिव्हि'झन्)—foresight, foreknowledge. पूर्वदृष्टि, पूर्वज्ञान, दूरदृष्टि, पुढें होणाऱ्या गोष्टींची आगाऊ कल्पना असणें.

Prey, *n.* (प्रे)—an animal hunted and killed by carnivorous animals for food; a person's victim. शिकार, पारध, भक्ष्य. *v. i.* (with *upon*) to devour or plunder habitually; (of disease, emotion) to exert baneful influence, to cause to pine. मारून खाणें, लुटणें; वाईट परिणाम करणें, झिजणीस-झुरणीस-लावणें, क्षीण करणें. *A beast* (or *bird*) *of p.*, हिंस्र पशु,-पक्षी.

Price, *n.* (प्राइस्)—money for which thing is bought or sold; (*fig.*) consideration or sacrifice nece-

sary to obtain a thing. पैसा, किंमत; दाम, दर, निरख, भाव, धारण, मोल. *v. t.* to state the price of; to affix the price to; estimate the value of. किंमत सांगणें; किंमत ठरवणें, भाव,-दर,-लावणें. *P. current, P.-list,* दरांची यादी, किंमतींची, बाजारभावांची-यादी. *Above, beyond, without p.,* so valuable that no *p.* can be stated. बहुमोल, किंमत न करतां येण्यासारखें. *To set p. on (person's) head,* offer reward for (his) capture or death. एखाद्याला पकडण्यासाठीं,-ठार मारण्यासाठीं,-बक्षीस लावणें. *At any p.,* वाटेल तें करून, वाटेल तें नुकसान सोसून, कांहींहि करून. *Every man has his p.,* can be won over by inducement. प्रत्येकाला लांच देऊन (आमिष दाखवून) वश करतां येतें. *Priced, a.* (प्राइस्ड) किंमतीचा, मोलाचा. *Priced catalogue,* वस्तूंच्या किंमती दाखविणारी यादी.

Price'less, *a.* (प्रा'इस्-लेस)—too precious to be priced, invaluable, inestimable; (sl.) ineffably amusing or delightful. अमूल्य, अमोलिक; अत्यंत चित्तवेधक, कल्पनातीत मनोवेधक.

Prick, *v. t. & i.* (प्रिक्)—to pierce slightly with a sharp pointed thing; make minute hole in; to feel sharp pain; to spur, to goad, advance on horse-back, टोंचणें, बोचणें; सूक्ष्म छिद्र पाडणें; झोंबणें, सलणें; टांच मारणें, दामटवणें, घोड्यावरून जाणें. *n.* pricking, mark of it; goad for oxen. टोंचणें, बोचणें; टोंचण्याची खूण, टोंचणी, पराणी. *To p. a* or *the bladder* or *bubble,* show the emptiness of a person or thing that has passed for important. महत्त्व प्राप्त झालेल्या व्यक्तीचा किंवा वस्तूचा पोकळपणा दाखवून देणें, भ्रमाचा भोपळा फोडणें. *P. up* one's *ears,* (of dog), कान टवकारणें; एकदम लक्षपूर्वक ऐकणें. *Pricks of conscience,* मनाची टोंचणी. *To kick against the pp.,* hurt oneself by useless resistance. व्यर्थ प्रतिकार करणें. *P.-eared,* उभ्या कानांचा.

Prick'er, *n.* (प्रि'कर्)—a pricking instrument. टोंचण्याचें हत्यार, टोंचणी, आर.

Pric'kle, *n.* (प्रि'कल्)—sharp growth such as thorn or hedgehog's spine; kind of wicker basket or measure. कांटा, तीक्ष्ण अग्र, तीक्ष्ण टोंक; टोपली, माप *v. i.* feel or gain a pricking sensation. मुंग्या येणें, टोंचणें, बोचणें.

Prick'ly, *a.* (प्रि'क्लि)—having prickles; prickling. कांटेरी, सकंटक; बोचणारा, खाजणारा, शिजणारा. *P. heat,* घामोळें. *P. pear,* name given to various species of prickly plants with pear-shaped edible fruit. कांटेरी फळ झाडें.

Pride, *n.* (प्राइड्)—inordinate self-esteem; feeling of elation and pleasure, object of praise; arrogant bearing. गर्व, अभिमान, अहंकार, आढ्यता; अभिमान गर्व, ताठा. *v. refl.* (with on) to be proud of, to indulge pride, to value one's self. चा अभिमान, बाळगणें, शेखी-प्रतिष्ठा-मिरविणें. *Proper p.,* वाजवी-योग्य -अभिमान. *False p.,* वृथाभिमान, पोकळ गर्व. *Take a pride in,* be proud of. भूषण-अभिमान-वाटणें; ऐट वाटणें. *Peacok in his p.,* पिसारा उभारलेला मोर. *P. of the morning,* mist or shower at sunrise. सूर्योदयाच्या वेळचें धुकें,-वर्षाव.

Prie.-dieu, *n.* (प्रिड्यू)—kneeling-desk, chair with tall sloping back for use in praying. गुडघे टेकण्याचें उतरतें बांक, प्रार्थनेच्या वेळीं वापरण्याची खुर्ची. [F, lit. pray God]

Priest, *n.* (प्रीस्ट्)—a minister of religious worship; a clergyman. उपाध्याय, पुरोहित; पाद्री. *P.-craft,* arts used by ecclesiastics to extend their influence. उपाध्यायवर्गाचे डावपेंच,-कावेबाजपणा. *Priest'ess, n.* उपाध्यायीण, पुजारीण. *P.-hood, n.* उपाध्येपणा; उपाध्यायमंडळी. *Priest'ly, a.*

Prig, *n.* (प्रिग्)—precision in speech or manners; a conceited person; a low or mean thief. भाषणांत किंवा वागणुकींत टापपणा; घमेंड्या-लबाड-मनुष्य; भुरटा चोर. *v. t.* to steal. चोरी करणें. *Prigg'ish, a.* conceited; straitlaced. घमेंड्या, घमेंडखोर; अति चिकित्साखोर.

Prim, *a.* (प्रिम्)—formal; prudish. टापटिपीचा, नीटनेटका; नखरेखोर. *v. t. & i.* to assume *p.* air; form into *p.* expression. नटणें, सजणें, नटवणें, नखरेबाज करणें, ठाकठीक करणें.

Pri'macy, *n.* (प्रा'इ-मसि)—the office of a primate; pre-eminence. प्रधानोपाध्यायाची जागा; प्रामुख्य.

Pri'ma dŏnn'a, *n.* (प्री'मा डॉ'ना)—chief female singer in opera. मुख्य स्त्रीगायिका,

Pri'ma fā'cie, *adv. & a.* (प्रा'इमा फे'शिई)—at first considering; at first sight. प्रथम दृष्ट्या, सकृद्दर्शनीं, वरवर दिसणारा.

Pri'mal, *a.* (प्रा'इमल्)—primitive or primeval; fundamental. आद्य, मूळचा; मुळारंभीचा; प्रथमचा, प्राथमिक.

Pri'mary, *a.* (प्रा'इ-मरि)—original; holding or sharing the first place (in time or importance or development), principal. मूळचा, प्राथमिक; मुख्य, प्रधान, आद्य, अव्वल. *n.* primary colour, planet, etc.; (Pol.) meeting or balloting of voters of a party for choosing delegates to convention or nominating candidates for office. प्राथमिक रंग, मुख्य ग्रह इ०; राजकीय पक्षाची सभा, किंवा सभासदांची मतनोंदणी. *P. battery, b.* in which current is produced. विद्युत् घटमालेंत विद्युत्प्रवाह निर्माण-तयार-होतो. तो, मूळ विद्युद्घटमाला. शिक्षण. *P. school,* प्राथमिक शिक्षणाची शाळा. *P. rocks,* प्रथम-आद्य-युगीन खडक. *P. education,* प्राथमिक शिक्षण.

Pri'māte, *n.* (प्रा'इ-मेट्)—the chief ecclesiastic in churches, archbishop of a province. मुख्य उपाध्याय.

Primā'tēs, *n. pl.* (प्राइमे'टीझ्)—highest order of mammals including man, monkeys, lemurs, and bats. मनुष्य, माकड, वानर व वाघळें या प्राण्यांचा श्रेष्ठ वर्ग.

Pri'me, *a.* (प्राइम्)—chief, most important; primary. fundamental; first rate (esp. of cattle & prov-

isions), of highest quality. मुख्य, प्रमुख; मूळचा, अविभाज्य, अस्सल; उत्तम प्रतीचा, उत्कृष्ट, उंची, शेलका, निवडक. *n.* first or best part of something, the spring of life; state of highest perfection. तारुण्याचा भर, भरज्वानी, यौवन, (आयुष्याचा) उत्तम भाग, सार; निवडक-शेलका-भाग, उत्तमांश; उत्तम स्थिति *v. t.* to prepare (old gun, explosive charge) for being let off; equip with facts; ply with liquor; prepare (wood) for paint. (बंदुकीला, स्फोटक द्रव्याला) रंजक,-काना,-भरणें;-उडविण्याची तयारी करणें; माहिती देणें, पुरविणें; भरपूर दारु पाजणें,-झिंगविणें; रंग देण्याच्या लायकीचें करणें, पहिला (रंगाचा-तेलाचा) हात देणें. *P. cost*, मूळ किंमत. *P. minister*, (इंग्लंडचा) मुख्य, प्रधान. *P. number, factor.* अविभाज्य संख्या,-अवयव (उदा. २, ३, ५, ७, ११ इ.) *P. vertical (circle)*, पूर्वापर वृत्त. *To reach one's prime*, उमेदींत येणें.

Pri'mer, *n.* (प्रा' इ-मर्)—an elementary school-book; a manual, a small book. वर्णमालेचें पुस्तक; लहान मुलांचें पहिलें पुस्तक. *Great, long, primer*, sizes of type. टंकाचे-टायपाचे-प्रकार.

Primē'val, *a.* (प्राइ-मी'व्हल्)—of the first age of the world; original, primitive. पुराणयुगीन, प्राचीन काळचा, आदियुगाचा; मूळचा.—*lly, adv.* प्रथमतः, आदौ.

Pri'ming, *n.* (प्रा' इमिंग)—(*esp.*) powder, mixture, used to prime explosive or wood. रंजकीची दारू, रंजक; स्फोटक द्रव्याला पत्ती लावण्याची दारू. 2. acceleration of the tides taking place from neap to spring tides. भांगाच्या आणि उधानाच्या भरतीमधल्या दिवसांत भरतीची उत्तरोत्तर होणारी वाढ.

Prĭm'itive, *a.* (प्रि'मिटिव्ह्)—ancient; of an early, simple or old-fashioned kind; original. प्राचीन; जुन्या चालीचा, प्राथमिक, मूळचा; असाधित. *n.* a word or colour not derived from another; painter of period before Renaissance, picture by such painter. सिद्ध शब्द,सिद्ध रंग; (युरोपखंडांतील विद्येच्या व कलांच्या) पुनरुज्जीवन-काळापूर्वीचा चित्रकार, त्यानें काढलेलें-रंगविलेलें चित्र.

Primogĕni'ture, *n.* (प्राइमोजे-नि'चर्)—principle by which property descends to the eldest son or child. ज्येष्ठ मुलाला-संततीला-संपत्ति मिळावी हें तत्त्व, ज्येष्ठपणाचा वारसा. *Primogĕ'nitor n.* earliest ancestor. आद्य पूर्वज, मूळपिता; पूर्वज, वाडवडील.

Primŏrd'ial, *a.* (प्राइमॉ'र्डिअल्)—existing at or from the beginning, first in order. पहिल्यापासूनचा, मूळचा, प्राथमिक, अगदीं पहिला, अस्सल.

Prĭm'rōse, *n.* (प्रि'म्रोझ्)—a pale-yellow spring flower; plant bearing it; (attrib.) primrose-coloured. एक जातीचें पिंवळसर फुल,-फुलझाड; या पिंवळसर फुलाच्या रंगाचें. *The p. path*, the pursuit of pleasure. सुखैषणा, सुखाच्या मार्गे लागणें.

Prĭm'ūla, *n.* (प्रि'म्यूला)—kinds of flowering plant including primroses. प्रिमरोझ आदिकरून एका जातीचीं फुलझाडें.

Pri'mŭs, *a.* (प्रा'इमस)—the first. पहिला. *n.* kind of stove burning vaporized oil, P. प्राइमस् स्टव्ह्, -चुला.

Prĭnce, *n.* (प्रिन्स्)—sovereign; ruler of feudatory State; male member of royal family, the chief of any class of men, noble of high rank. राजा; मांडलिक राजा; राजपुत्र; राजा, प्रमुख, सर्वश्रेष्ठ पुरुष. *P. of Peace*, Christ. येशू ख्रिस्त. *P. of darkness, the air, the world*, Satan, सैतान. *P. of Wales*, heir apparent to British throne. ब्रिटिश सिंहासनाचा भावी वारस. *P. Consort*, (राज्यकर्त्या) राणीचा नवरा. *Hamlet without the Prince of Denmark*, thing robbed of its essence. मुख्य तत्त्वच-राम-जीव नाहीं अशी वस्तु,-गोष्ट. *Prince's feather*, kinds of plant. एक जातीचीं फुलझाडें. *P.'s metal*, alloy of copper & zinc. तांबें आणि जस्त यांची भेसळ; कांसें.

Prĭnc'elў, *a.* (प्रि'न्स्लि)—becoming a prince; sumptuous, grand. राजाला शोभणारा; वैभवशाली, भव्य.

Prĭn'cĕss, *n.* (प्रि'न्सेस्)—prince's wife; a female member of the royal family. राणी; राजकन्या, राजकुमारी.

Prĭn'cĭpal, *a.* (प्रि'न्सिपल्)—first in importance; chief, leading. पहिल्या प्रतीचा; मुख्य; प्रमुख. *n.* head of some institution; a person for whom another is an agent; the capital sum originally lent or invested. मुख्याधिकारी; मालक; मूळ दिलेली रक्कम, मुद्दल. *Lady p.*, female head. (शाळा-कॉलेज वगैरेची) मुख्याधिकारिण, स्त्री-प्रमुख. *Prin'cipalship, n. P. in the first degree*, पहिल्या प्रतीचा,-प्रत्यक्ष स्वतः (गुन्हा करणारा.); *P. in the second degree*, त्याचा साथीदार,-मदतनीस *Prin'cipally, adv.* मुख्यत्वेंकरून.

Prĭncĭpăl'itў, *n.* (प्रिन्सिपॅ'लिटि)—a State ruled by a prince, the territory of a prince. मांडलिक राज्य, मांडलिक देश. *The P.*, Wales. वेल्स परगणा,-प्रांत.

Prĭn'cĭple, *n.* (प्रि'न्सिपल्)—primary source or element; fundamental truth; a rule by which conduct may be guided. कारण, बीज; मूलतत्त्व, कारकतत्त्व; सामान्य नियम, तत्त्व. *First principles*, मूलतत्त्वें. *A man of high p.*, उच्च तत्त्वाचा मनुष्य. *On p.*, from settled moral motive. केवळ तत्त्वासाठींच (स्वार्थी हेतूनें नव्हे.)

Print, *n.* (प्रिन्ट्)—mark left on a surface by pressure; impression left on paper by inked type or photography; reading-matter produced from type; cotton fabric stamped in colours; engraving, newspaper, photograph or picture produced from negative. छाप, ठसा; शिक्का, मुद्रा; छापील मजकूर; चीट, छापील कापड; खोंदीव ठसा, वर्तमानपत्र, ऋणकांचेवरून छापलेलें छायाचित्र. *v. t.* to stamp or impress; to produce by means of printing-types; stamp fabrics in colours. ठसा मारणें, मनावर ठसविणें,-बिंबविणें; छापणें, छापविणें, छापून काढणें; कापड छापणें, चीट तयार करणें, खडीं

काढणें. *Finger p, foot p.,* बोटाचा,-पायाचा,-ठसा. (Book is) *in print,* in printed form; on sale. छापून तयार, विक्रीस तयार. *Out of p.,* sold out. आवृत्ति संपलेलें, सध्यां न मिळणारें (पुस्तक). *To rush into p.,* (of writer) publish book, write to newspaper, on insufficient grounds. अपुऱ्या माहितीनें पुस्तक प्रसिद्ध करणें,-वर्तमानपत्रांत लिहिणें. *P. hand, letters, script.* छापीलप्रमाणें हस्ताक्षर, अक्षरें, लेखन. *P. seller,* छापील-खोदीव-माल विकणारा. *P. shop,* छापाच्या मालाचें दुकान. *P. works,* चित्रें वगैरे छापण्याचा कारखाना.

Prin'ter, *n.* (प्रि'न्टर्)—a workman employed as a compositor, a pressman or a machine-minder; an employer or overseer of these workmen. छापखान्यांतील नोकर; छापखानेवाला, छापण्याचें काम करणारा, मुद्रक. *P.'s devil,* an errand-boy. छापखान्यांतील पोऱ्या,-निरोप्या. *Printing, n.* (esp.) the process of impressing words from type; typography. छापणें, छपाई; मुद्रणकला, छापण्याची कला.

Pri'or, *n.* (प्रा'यर्)—superior of a religious house; (in abbey) abbot's deputy; (hist.) chief magistrate in some Italian republics. महंत, मठाधिपति; ॲबटच्या दर्जाचा अधिकारी; (ऐति.) इटालींतील कांहीं संस्थानांचा मुख्य अधिकारी, न्यायाधीश. *a.* earlier; antecedent (to). अगोदरचा; पहिला. *Pri'oress, n.* मठाधिपतीण, महंतीण. *Pri'ory, n.* religious house governed by prior (-ess). मठ.

Prio'rity, *n.* (प्रायॉ'रिटि)—being earlier; precedence, pre-eminence, preference. आद्यता; अग्रमान, मोठेपणा, पहिला मान.

Pri'sm, *n.* (प्रि'झम्)—a solid figure whose two ends are similar, equal and parallel rectilineal figures, and whose sides are parallelograms; transparent body of this form with refracting surfaces; (pl.) prismatic colours. त्रिपार्श्वकांच, चिति; त्रिकोणाकार भिंग,-कांच, त्रिपार्श्वानें भिन्न झालेले सात रंग.

Prismat'ic, *a.* (प्रिझ्-मॅ'टिक्)—rainbow-like; (of colour) such as is produced by refraction through prism; of prism shape. इंद्रधनुष्यासारखा; त्रिपार्श्व कांचेनें दर्शविलेले (रंग); चितीच्या आकाराचा, त्रिपार्श्वआकाराचा. *P. colours,* सात रंग.

Pris'on, *n.* (प्रि'झन्)—a place of captivity for law-breakers, a place of confinement. तुरुंग, कारागृह, बंदिखाना, बंदिशाळा. *v. t.* (poet. rhet.) to imprison. तुरुंगांत घालणें,-अकडवणें.

Pris'oner, *n.* (प्रि'झनर्)—a person kept in prison; war-captive. कैदी, बंदिवान, युद्धांत पकडलेला,-कैद केलेला. *P. at the bar,* कच्चा कैदी, ज्याच्यावरील खटला चालू आहे असा कैदी. *P. of state, state p.,* राजकीय कैदी. *To take person p.,* (एकाद्याला) पकडून कैदी करणें,-कैद करणें.

Pris'tine, *a.* (प्रि'स्टाइन्)—original, first, earliest, primitive; unspoiled by modern tendencies. आद्य, पूर्वीचा, मूळचा; अर्वाचीन चालीरीतींनीं न बिघडलेला.

Prith'ee, *int.* (प्रि'दि)—(arch.) pray, please (as *tell me, p.*). प्रार्थना करणें, कृपा करा. [= (I) pray thee]

Priv'acy, *n.* (प्रा'इ-व्हसि)—seclusion. एकांतता, एकांत.

Pri'vate, *a.* (प्रा'इ-व्हेट्)—not public; secret, confidential; unofficial; reserved, secluded. खाजगत, वैयक्तिक, गुप्त; बिनसरकारी, घरगुती-खाजगी-खात्याचा; एकान्ताचा. *n.* a private soldier (ranking below non-commissioned officers), a common soldier. शिपाई, प्यादा. *In p.,* एकांतीं, गुप्तपणें, पडद्यांत. *P. parts,* genitals. गुह्यांग. (*This is for your*) *p. ear,* confidential. गुप्त, दोघांतच. *Pri'vately, adv.*

Privateer', *n.* (प्राइ-व्हटि' अर्)—a ship or vessel of war having letters of marque; its captain. सरकारी परवाना मिळालेलें खाजगी लढाऊ जहाज; अशा जहाजाचा कप्तान. *a.* acting as privateer. खाजगी लढाऊ जहाजाचें-जहाजावर-काम करणारें.

Priva'tion, *n.* (प्राइ-व्हे'शन्)—want or absence of necessaries or comforts, destitution; hardship; loss, absence (of quality). आवश्यक वस्तूंचा किंवा सुखसोयींचा अभाव, हाल, संकट; (गुणधर्माचा) अभाव. *Cold is the p. of heat,* थंडी म्हणजे उष्णतेचा अभाव होय. *Suffer many pp.,* उपासमार-हाल-होणें.

Priv'ative, *a.* (प्रि'व्हटिव्ह)—denoting the absence of something usually present. हानिकारक, अभावसूचक; (व्याक.) अभावदर्शक (उपसर्ग), नञ् (पद); (तर्क.) अभावदर्शक (पद).

Priv'et, *n* (प्रि'व्हिट्)—a white-flowered evergreen used for hedges. कुंपणाला लावतां येणारीं पांढऱ्या फुलांचीं कांटेरी झुडपें.

Priv'ilege, *n.* (प्रि'व्हिलिज्)—right, advantage or immunity belonging to a person, class or office, peculiar advantage; monopoly, patent. विशेष हक्क, अधिकार, मान, सत्ता; एकमेव अधिकार, राखीव सत्ता, अधिकार. *v. t.* to invest with privilege; exempt from burden. वैयक्तिक-विशेष-अधिकार देणें; माफ-माफी असणें. *P. of Parliament,* पार्लमेंटच्या सभासदांना असणारे विशेष हक्क. *Breach of p.,* दुसऱ्याच्या हक्कांत ढवळाढवळ करणें. *Privileged, a.* विशेष हक्क-अधिकार-असलेला. [L. *privus,* private; *lex,* law]

Priv'ity, *n.* (प्रि'व्हिटि)—being privy to; knowledge shared with another of something kept private; (Law) any relation between two parties that is recognized by law, e. g. that of blood, lease, service. गुप्तता; दुसऱ्याच्या गुप्त गोष्टीची आंतून माहिती; दोन माणसांचा कायदेशीर परस्पर संबंध.

Priv'y, *a.* (प्रि'व्हि)—hidden, secret, private, confidential. गुप्त, खासगी, खास, खाजगत, एकांतवासाचा, गुह्य. *n.* the place for easing nature, a latrine; (Law) person having a part or interest in any action, matter, or thing. संडास, शेतखाना, मुत्री;

हितसंबंध असलेला,-भागीदारी असलेला-मनुष्य. *Privy parts*, external organs of sense. गुह्यांग, उपस्थ. *P. purse*, allowance from public revenue for monarch's private expense. राजाच्या खाजगी खर्चासाठीं तोडून दिलेलें उत्पन्न. *P. seal*, State seal. राजाचें खाजगी शिक्कामोर्तब. *P. Council*, sovereign's private counsellors. राजाचें खाजगी मंत्रिमंडळ; इंग्लंडमधील वरिष्ठ सल्लागार मंडळ, प्रिव्हि कौन्सिल. *P. counsellor,-cillor*, private adviser, esp. (abbr. P. C.) member of Privy Council. खाजगी सल्लागार; इंग्लंडमधील 'प्रिव्ही कौन्सिल' चा सभासद. *Privy to*, in the secret of (person's designs etc.). दुसऱ्याच्या गुप्त बेतांचा-गोष्टींचा-माहीतगार,-अंतस्थ माहितगार.

Prize, *n.* (प्राइझ्)—a reward given as a symbol of victory or superiority; a thing to be striven for; reward in lottery, competition, etc.; a ship or property captured in naval warfare. बक्षीस; इनाम, पारितोषिक, स्पृहणीय वस्तु; सोडत, शर्यत, यांतील पैसा,-बक्षीस,-सोडत; लढाईत धरलेला माल, लूट. *v. t.* to value highly, to set a high value upon, to esteem; to make prize of. बहुमोल लेखणें, मानणें, मोजणें; मोल ठरविणें; लढाईत लूट मारणें. *P. ox,-poem*, बक्षीस मिळालेला बैल,-कविता. *P.-fellow*, परीक्षेत जास्त वर येऊन शिष्यवृत्ति मिळालेला. *P.-fight*, बक्षिसाचें मुष्टियुद्ध. *P.-fighter*, धंदेवाला मुष्टियोद्धा. *P.-man*, winner of specified prize. ठराविक बक्षीस मिळविलेला विद्यार्थी. *P.-ring*, मुष्टियुद्ध खेळण्याचें रंगण; धंदेवाईक मुष्टियोद्धे; मुष्टियुद्धसंस्था.

Prize,-se, *v. t.* (प्राइझ्)—to force open or up by leverage. कांट्यानें-सळईनें-उघडणें. *n.* leverage, purchase. कांटा, जाड सळई, दांडा.

Prō'a, *n.* (प्रो'आ)—kinds of Malay boat, esp. a type of sailing boat. एक प्रकारची मलायांतील शिडाची बोट.

Prō and cŏn, *adv.* (प्रो ॲन्ड् कॉन्)—for and against. अनुकूल व प्रतिकूल. *n. pl.* (pros and cons) the reasons for and against. (एखाद्या गोष्टीचीं) साधकबाधक प्रमाणें.

Prŏbabil'itỳ, *n.* (प्रॅबॅबि'लिटि)—being probable, likelihood; what is probable. संभव, संभाव्यता; संभवनीय गोष्ट. *In all p.*, most likely. बहुतकरून.

Prŏb'able, *a.* (प्रॅ'बेबल्)—that may be expected to happen or prove true or correct, likely, rendering something likely or credible. संभवनीय, संभाव्य.

Prŏb'ablỳ, *adv.* (प्रॅ'बेब्लि)—most likely. बहुतकरून.

Prō'bate, *n.* (प्रो'बट्)—an official proving or proof of a will. मृत्युपत्र खरें असल्याबद्दल सरकारी दाखला, वारसाचा दाखला, वारसपत्र. *v. t.* (-बेट्)—to prove (*will*). (मृत्युपत्र) शाबीत करणें.

Probā'tion, *n.* (प्रोबे'शन्)—testing of a person's conduct or character; noviciate; the period of trial. मनुष्यस्वभावाची कसोटी किंवा पारख; नवशिकेपणा, उमेदवारीची मुदत, उमेदवारी. *On p.*, उमेदवार म्हणून. *P. officer*, (acting as friend and adviser). स्नेही आणि उपदेशक किंवा सल्लागार म्हणून काम करणारा अधिकारी. *Probā'tionary*, *a.* of, serving for, done in the way of, probation. पसंतवारीचा, पसंतीचा, उमेदवारीचा; सत्त्वपरीक्षेचा, *Probā'tioner*, *n.* उमेदवार, तात्पुरता नोकर, नवशिका.

Prōbe, *n.* (प्रोब्)—blunt-ended surgical instrument for exploring wound, &c. जखमेची खोली पाहण्याची सळई. *v. t.* to explore with probe; to examine closely, to search to the bottom. सळईनें पाहणें; पक्का छडा लावणें.

Prōb'itỳ, *n.* (प्रो'बिटि)—uprightness, integrity, incorruptibility, high principle. खरेपणा, सचोटी, इमान.

Prŏb'lĕm, *n.* (प्रॉ'ब्लेम्)—a question or difficulty in need of solution, a knotty point; (Geom.) *proposition in which something has to be done*; (Log.) the question involved in a syllogism; (Physics, Math.) inquiry starting from given conditions to investigate a fact, result, law. प्रश्न, गूढ वादविषय, कृत्य; विकल्पविषय, वाद; सिद्धान्त, उदाहरण. *P. play,-novel*, (in which social or other *p.* is treated). सामाजिक किंवा इतर प्रश्नाचें विवेचन असलेला खेळ,-कादंबरी.

Prŏblĕmăt'ic (al), *a.* (प्रॉब्लेमॅ'टिक्,-कल)—presenting a problem; disputable; unsettled, questionable, doubtful, uncertain. संशयाचा; वादविवादात्मक; प्रश्नात्मक, अनिश्चित.

Probŏs'cis, *a.* (प्रबॉ'सिस्)—elephant's trunk; snout; insect's sucking-tube. हत्तीची सोंड; मनुष्याचें नाक; (कृमि-कीटकांची रस शोषण करण्याची) नळी. *P. monkey*, मोठ्या नाकाचा वानर. *pl.* Prōbos'cĭdes (प्रॉबॉ'सिडीस्); *Proboscid'ean*, *a.* शुंडा,-सोंड, असणारा (सस्तन प्राणी).

Procē'dure, *n.* (प्रोसी'ज्यर्)—mode of conducting business (esp. in parliament) or legal action, a course of action. कार्य करण्याची पद्धति, कामकाज, खटला.

Proceed', *v. i.* (प्रोसी'ड्)—to go on; to make one's way (*to* place); to continue or resume; to take legal proceedings (against), to begin and carry on legal action, to adopt course of action; go on to say; be carried on, take place, come forth, issue, originate. पुढें जाणें, जाऊं लागणें, चालणें; पुढें चालू ठेवणें, खटला करणें; फिर्याद लावणें; पद्धत-तऱ्हा-ठरविणें; पुढें सांगणें, सांगत जाणें,-म्हणणें; चालू-सुरू-होणें; बाहेर येणें; उत्पन्न होणें.

Prōceed'ing, *n.* (प्रोसी'डिंग्)—piece of conduct; (*pl.*) business done at a meeting; (*pl.*) legal steps. कार्य, व्यवहार, काम; (अनेº) सभेंतील कामकाजाची नोंद,-अहवाल; कायदेशीर इलाज.

Prō'ceeds, *n. pl.* (प्रो'सीड्स्)—the produce in money (of a sale, &c.). विक्रीचा पैसा, विक्रीचें उत्पन्न.

Prŏ'cĕss, *n.* (प्रो'सेस्)—state of going on or being carried on; method of operation in manufacture, etc.; an action at law, course of legal proceedings; summons of writ; projection from a bone, etc., out-growth, protuberance. धांव. चाल, गति, प्रवृत्ति; अनुक्रम, पद्धति; खटला, हुकूम. प्रतिवादीस कोर्टात हजर राहण्यासाठीं केलेलें बोलावणें,-समन्स; पुच्छ, शृंग, उंचवटा, आवर्त, पालि. *v. t.* to subject to a legal or manufacturing process; *v. i.* (colloq.) walk in procession. कायदेशीर इलाज-खटला-करणें, (विक्रीसाठीं) माल तयार करणें; मिरवणुकींत सामील होणें,-बरोबर जाणें. *In process of time,* as time goes on. कालमानाप्रमाणें.

Procĕ'ssion, *n.* (प्रोसे'शन्)—a marching forward, array of persons going along in fixed order; (*fig.*) ill-contested race. चाल, गति, गमन; मिरवणूक; बिनचढाओढीची शर्यत. *Procĕ'ssional, a.* of, in, for processions. मिरवणुकीचा, स्वारीचा, उविन्यासंबंधीं, दिंडींत,-दिंडीसंबंधीं, *n.* processional hymn. मिरवणुकीच्या-समारंभाच्या-वेळीं म्हणण्याचें गीत. *Procĕ'ssionist, n.* मिरवणुकींतील मनुष्य, मिरवणुकवाला.

Proces-verbal, *n.* (प्रॉसे'व्हेअर्बा'ल्)—(pl.-baux,-बो). written report of proceedings, minutes; (Fr. Law) written statement of facts in support of charge. (सभेच्या कामकाजाचा) लेखी अहवाल; आरोपाच्या समर्थनार्थ लेखी पुरावा. [F.]

Proclaim', *v. t.* (प्रोक्ले'म्)—to announce publicly and officially; to tell openly; to prohibit (a meeting). जाहीर करणें, दवंडी फिरविणें; उघडपणें सांगणें; (सभेला) प्रतिबंध करणें, सभाबंदी करणें, बेकायदेशीर ठरविणें.

Prŏclamā'tion, *n.* (प्रॅक्लमे'शन्)—proclaiming; formula or document that proclaims. जाहीर करणें; जाहीरनामा.

Procliv'itў, *n.* (प्रॅक्लि'व्हिटि)—natural leaning or tendency to, inclination, propensity. स्वाभाविक कल, प्रवृत्ति, मनाचा ओढा.

Prōcŏn'sul, *n.* (प्रोकॉ'न्सल्)—ancient Roman provincial governor; (rhet.) modern colonial governor; (*pro-consul*) deputy consul. प्राचीन रोमन साम्राज्यांतील प्रांताचा सुभेदार; वसाहतीचा प्रमुख अंमलदार-गव्हर्नर; गव्हर्नरचा-मुख्य अंमलदाराचा-दुय्यम.-*sular, a.*

Prŏcrăs'tĭnāte, *v. i.* (प्रोक्रॅ'स्टिनेट्)—to put off doing things from day to day, to defer; to leave things undone as long as possible. चालढकल करणें, दिवसगतीवर ढकलणें, लांबणीवर टाकणें; दिरंगाई करणें.-*tion, n.* चालढकल, अळंटळं, टाळाटाळ.-*tor,* चेंगट, दीर्घसूत्री. [L. *pro,* off; *castinus,* of tomorrow]

Prō'crĕāte, *v. t.* (प्रो'क्रिएट्)—to produce an offspring, to beget, to generate, to engender. उत्पन्न करणें, जन्म देणें, विस्तार करणें, वाढविणें.-*tion, n.* जनन, उत्पादन, उत्पत्ति.-*tor,* जनक, जनिता, उत्पादक.-*tive, a.* प्रजननशक्तिक, फलदायी.

Prŏc'tor, *n.* (प्रॅ'क्टर्)—University official with disciplinary powers; an attorney in ecclesiastical courts. (इंग्लंडांतील) विश्वविद्यालयांतील एक अधिकारी; वकील, मुखत्यार.

Procŭm'bent, *a.* (प्रोकं'बन्ट्)—prone, lying down; (Bot.) trailing. पालथा पडलेला, उपडा; भुईसरपट वाढणारा, भूमिशाई.

Prŏcūrā'tion, *n.* (प्रॅक्युरे'शन्)—procuring, bringing about; service rendered for acting as another's agent; (fee for) negotiation of loan; procurer's trade or offence. संपादन, मिळवणें, संपादणें, दुसऱ्याचा मुखत्यार म्हणून काम करणें; कर्ज मिळवून देणें (चा मोबदला, मेहनताना), कुंटणगिरीचा व्यापार,-गुन्हा.

Prŏc'ūrātor, *n.* (प्रॉ'क्युरेटर्)—a person's proxy or agent, holder of power of attorney. दुसऱ्याचा मुखत्यार, गुमास्ता, प्रतिनिधि, वकील.

Prōcūre', *v. t.* (प्रोक्यु'अर्)—to succeed in getting; to bring about or cause by others' agency, to effect, to contrive; to act as procurer or procuress. मिळविणें, साध्य करणें; घडवून आणणें, साधणें, संपादणें; कुंटणपणा भडवेगिरी-करणें. *Cannot p. employment,* नोकरी मिळवितां येत नाहीं,-मिळत नाहीं. *Procured his death by poison,* वीष पिऊन मरण ओढवून आणलें. *Procure'ment, n.* मिळविणें, संपादणें, संपादन.

Prōcur'er, *n.* (प्रोक्यु'अरर्)—one who obtains, esp. man or woman who procures women for gratification of another's lust. मिळवणारा; भडवा, कुंटणकी करणारा. *Procur'ess, n. f.* कुंटीण, कुंटण

Prŏd, *v. t.* (प्रॅड्)—to poke with stick, etc. esp. to arouse or urge on; (*fig.*) goad, irritate. टोंचणें, बोंचणें, डंवचणें, भोसकणें; खपवणें, (च्या मागें) टुमणें लावणें. *n.* poke, thrust, pointed instrument. बोंचणी, टोंचणी, पराणी, अगी, अंकुश.

Prŏd'igal, *a.* (प्रॉ'डिगल्)—wasteful, lavish, expending wastefully, lavishly bountiful. खर्चिक, उधळ्या, बेताल *n.* a spendthrift. उधळ्या मनुष्य. *P. son,* (ल्यूकच्या शुभवर्तमानांत वर्णिलेला) उधळ्या मुलगा. *Prodigal'ity, n.* उधळपट्टी, उधळेपणा, अपव्यय.

Prŏdi'gious, *a.* (प्रॉडि'जस्)—marvellous, enormous, extraordinary, very great. अद्भुत, अवाढव्य, अफाट.-*ly, adv.*;-*ness, n.*

Prŏd'igў, *n.* (प्रॉ'डिजि)—a miracle, marvellous thing; wonderful person. आश्चर्य, अद्भुत गोष्ट; विलक्षण मनुष्य, धेंड, मस्य.

Produce', *v. t.* (प्राड्यू'स्)—to bring forward or show for examination; to yield, to give birth

to; to cause or bring about; to make or manufacture; to bring (play, performer, book, etc.) before the public; (Geom.) extend, continue (line *to* a point). दाखवणें, दाखल करणें, हजर करणें; पीक देणें, उत्पन्न,-उत्पत्ति,-करणें; घडवून आणणें; घडवणें, बनवणें; लोकांपुढें आणणें, प्रसिद्ध करणें; (ओळ) वाढविणें, वाढवून पुढें नेणें. *Produ'cible, a.* हजर,-उत्पन्न,-करण्याजोगा,-*bility, n.*

Prŏd'ūce, *n.* (प्रॉ'ड्यूस)—that which is produced, yield, amount produced; agricultural or natural products. उत्पन्न; उपज, निपज. *Raw p.*, कच्चा माल, -उत्पन्न. *Brought to p.*, (of ordnance or military or naval stores) broken up and assorted into classes to be disposed of. विकून टाकण्यासाठीं मोडतोड मालाची केलेली वर्गवारी.

Produ'cer, *n.* (प्रड्यु'सर्)—(in vbl. senses, esp.) person producing articles of consumption or manufacture. उपजवणारा, बनवणारा, उत्पादक.

Prŏd'ŭct, *n.* (प्रॉ'डक्ट्)—a thing produced by natural process or manufacture; result; (*Math.*) quantity given by multiplication of quantities together. उत्पन्न, फळ; परिणाम; गुणाकार, घात.

Prodŭc'tion, *n.* (प्रड'क्शन्)—producing; products; a thing produced by human activity, esp. literary or artistic work. उत्पन्न करणें; पैदास, निपज, उत्पन्न केलेल्या वस्तु; मनुष्यप्रयत्नानें तयार केलेला माल, -कृति, वाङ्मयविषयक किंवा इतर कलाकृति.

Prodŭc'tive, *a.* (प्रड'क्टिव्ह्)—tending to production; producing good crops, fertile; producing commodities of exchangeable value. उत्पन्न, करणारा, उत्पादनक्षम, उत्पादक; सुपीक, बहुफल, मातबर, पिकाऊ; विक्रीचा माल तयार करणारा,-उत्पादक, धनोत्पादक, किफायतीचा. *Produc'tivity, n.*

Pro'ĕm, *n.* (प्रो'इम्)—preface, preamble, to book or speech; prefatory discourse. उपोद्घात, प्रस्तावना. *Proem'ial, a.* उपोद्घाताचा, प्रस्तावनेदाखल, प्रास्ताविक.

Prŏfanā'tion, *n.* (प्रॉफने'शन्)—profaning. बाटवणें, भ्रष्ट करणें, भ्रष्टीकरण.

Profāne', *a.* (प्रोफे'न्)—secular; not possessing sanctity, heathen, unhallowed; irreverent, blasphemous. व्यावहारिक; भ्रष्ट, अधार्मिक, अपवित्र; अश्रद्धाळू, धर्मनिन्दक. *v. t.* to pollute, violate; treat with irreverence or disregard. भ्रष्टविणें, बाटवणें, विटाळविणें; अपमान,-अनादर,-निंदा करणें.

Profăn'itȳ, *n.* (प्रोफॅ'निटि)—blasphemy; profane swearing; irreverent speech or behaviour. धर्मनिन्दा; खोटी शपथ घेणें; अपवित्र भाषण किंवा वागणूक.

Profĕss', *v. t.* (प्रोफे'स)—to represent oneself to feel or believe in, to pretend; to declare oneself to be or to do, have as one's trade or art or profession; teach (subject) as professor. आव घालणें, ढोंग करणें; स्पष्ट बोलून दाखवणें, उघड सांगणें, कबूल करणें; स्वतःचा व्यापार, कला, धंदा म्हणून करणें,-चालवणें; प्राध्यापक म्हणून शिकविणें, प्राध्यापकाचें काम करणें.

Prŏfĕss'ĕdlȳ, *adv.* (प्रोफे'सिड्लि)—according to one's account, avowedly. उघड उघड सांगून, घडघडीत, सांगून-सवरून, प्रसिद्धपणें.

Prŏfĕ'ssion, *n.* (प्रोफे'शन्)—declaration, avowal; vocation or calling esp. of learned or scientific or artistic kind; *the* body of persons engaged in this, esp. (Theatr. sl.) actors. जाहीर करणें, कबुली, स्वीकार; धंदा, पेशा, वृत्ति, उद्योग, व्यवसाय; सुशिक्षित धंदेवाईक मंडळी; नट (नाटकांतील). *The learned pp.*, (divinity, law, medicine). धर्मोपदेश, वकिली, वैद्यक हे सुशिक्षित धंदे. *The medical p.*, वैद्यकी (चा धंदा). *A carpenter by p.*, धंद्यानें सुतार, सुतारकीचा धंदा करणारा.

Profĕ'ssional, *a.* (प्रफे'शनल्)—of the vocations called professions; practising for a livelihood or money; (of game, etc.) played by professionals. धंद्यांचा, उद्योगधंद्यांसंबंधीचा; धंदेवाईक, रोजगारी, रोजगारासाठीं-पोटासाठीं-करणारा; धंदा म्हणून खेळणारा. *n.* a professional man; (abbr. *pro.*) paid performer at cricket, football, etc. धंदेवाला मनुष्य; धंदेवाईक-पगारी-खेळाडू.-*ism, n.* (esp.) practice of employing professionals in games. खेळांत धंदेवाईक खेळाडू नेमण्याची चाल,-पद्धत.

Prŏfĕss'or, *n.* (प्रोफे'सर्)—holder of a university chair or other teacher of high rank (abbr. *Prof.*); one who makes profession (*of* a religion). विश्वविद्यालयांतील उच्च दर्जाचा अध्यापक, प्राध्यापक; धर्माचा वगैरे बाणा बाळगणारा. *P.-ship, n.* प्राध्यापकाची जागा. *Professor'ial, a.* प्राध्यापकाचा,-संबंधीं. *Profess'oriate, n.* the professors of a university. विश्वविद्यालयांतील प्राध्यापक-वर्ग,-मंडळ.

Prŏff'ĕr, *v. t.* (प्रॉ'फर्)—to offer spontaneously, to offer for acceptance, (esp. in p. p.). स्वतःहून देऊं करणें *n.* spontaneous offer. सूचना, म्हणणें, आपणहून देणें.

Profi'ciencȳ, *n.* (प्रोफि'शन्सि)—adeptness; progress or improvement in anything. प्रावीण्य, निपुणता, वाकबगारी; प्रगति, सुधारणा.

Profi'cient, *a. & n.* (प्रोफि'शन्ट्)—fully acquainted with a subject, expert, adept. निपुण, प्रवीण, पारंगत.

Prō'file, *n.* (प्रो'फील्)—outline of the face as seen from the side; any edge outlined against the sky or other background; (Fortif.) transverse vertical section of fort, comparative thickness of earthwork etc. बाजूच्या किंवा अर्ध्या चेहऱ्याची रूपरेषा; मर्यादारेषा; किल्ल्याचा तिरपा उभा परिच्छेद, बांधकामाची जाडी. *Pro'filist, n.* एकडोळी-एकांगी-चित्र काढणारा. *Drawn in p.*, (as seen from one side). एक बाजूनें दिसलेलें असें काढलेलें (चित्र), एक बाजू दाखविणारें.

Prŏf'it, *n.* (प्रॉ'फिट्)—advantage, benefit; (*pl.* or *sing.*) pecuniary gain, excess of returns over outlay. फायदा, हित; आर्थिक लाभ, उत्पन्न, नफा. *v. t.* & *i.* to bring advantage to, to be of service to; to get good; to make gains. फायदेशीर होणें, हितकारक होणें; कल्याण होणें; नफा मिळणें. (Book keep.) *P. & loss account*, निव्वळ नफ्यातोट्याचें अंदाजपत्रक, निव्वळ नफा किंवा तोटा किती झाला हें दाखविणारा ताळेबंद.

Prŏf'itable, *a.* (प्रॉ'फिटेब्ल्)—bringing profit or gain, beneficial, lucrative. हितकारक, किफायतशीर, फायदेशीर.

Prŏfiteer', *v. i.* (प्रॉफिटि'अर्)—to make inordinate profit out of the State's or the consumer's necessities (esp. of contractors and traders in war-time). (सरकारकडून अगर गिऱ्हाइकांकडून नक्तेदारीनें-मक्ते घेऊन) बेसुमार फायदा काढणें. *n.* one who profits thus. अशा तऱ्हेनें भरमसाट फायदा खाणारा.

Prŏf'ligāte, *a.* & *n.* (प्रॉ'फ्लिगेट्)—morally ruined, licentious, dissolute; reckless. व्यसनी, दुर्वृत्त; अविचारी, (-मनुष्य). *Prof'ligacy*, *n.* evil courses. लफंगेगिरी, बदफैली, दुराचरण.

Profound', *a.* (प्रोफा'उन्ड्)—deep in skill or knowledge, of great insight or knowledge; heartfelt; having, coming from, extending to, a great depth. खोल; अभिज्ञ, गाढ ज्ञान असलेला; मनापासूनचा, कळकळीचा; खोल, मोठा, गाढ, खोलीचा. *n.* (poet.) *the* vast depth (*of* ocean, futurity, the soul, etc.). अत्यंत खोलपणा, गहनता, अगाधता.

Profŭn'dity, *n.* (प्रोफ'न्डिटि)—being profound, depth of place or knowledge. गांभीर्य, अगाधता; प्रावीण्य.

Profūse', *a.* (प्रोफ्यू'स्)—lavish, extravagant (*in*, *of*, gifts, promises, expenditure); very copious, excessive, exuberant. सढळ, उधळ्या; विपुल, समृद्ध, रेलचेल.*-ly*, *adv*;*-ness*,*-sion*, *nn.* सढळपणा, औदार्य; चंगाळी, वैपुल्य, समृद्धि.

Profū'sion, *n.* (प्रोफ्यू'झन्)—lavishness, prodigality, profuseness; quantity. सढळपणा, विपुलता, समृद्धि.

Prŏg, *n.* (प्रॉग)—(sl.) food, grub, esp. for journey or excursion. (प्रवासासाठीं) खाणें, खाद्य, पाथेय.

Prŏgĕn'itor, *n.* (प्रॉजे'निटर्)—a person or animal in relation to his descendants. पूर्वज, वाडवडील. *-tress*, *n. f.* स्त्रीपूर्वज.

Prŏg'enȳ, *n.* (प्रॉ'जिनि)—offspring or descendants, children, young ones; (*fig.*) issue, outcome. संतति, अपत्य, मुलेंबाळें, वंशज; निष्पत्ति, फळ, फलश्रुति.

Prŏg'nathous, *a.* (प्रॉ'ग्नॅथस्)—with projecting jaws as in negroes; (of jaws) projecting. नीग्रोप्रमाणें पुढें जबडा आलेला; पुढें आलेला (जबडा). *Prognath'ic*, *a.* [Gk *pro*, before; *gnathos*, jaw]

Prŏgnō'sis, *n.* (प्रॉग्नो'सिस)—(pl.-oses), forecast of course of disease. अटकळ; रोगचिकित्सा.

Prŏgnŏs'tĭc, *n.* (प्रॅग्नॉ'स्टिक्)—indication that something is likely to happen, prediction. पूर्वलक्षण, पूर्वचिन्ह. *a.* foretelling, predictive (*of*). पूर्वसूचक, भविष्यसूचक.

Prŏgnŏs'tĭcāte, *v. t.* (प्रॅग्नॉ'स्टिकेट्)—to foreshow, to foresee, to foretell, to tell beforehand. भविष्यकथन करणें, पूर्वी दाखविणें,-सुचविणें.*-tion*, *n.* भविष्य, भाकित, पूर्वलक्षण.*-tor*, *n.*,*-tive*, *a.*

Pro'gramme, *n.* (प्रो'ग्रॅम्)—a plan of intended proceedings, mode or action; a printed list. कार्यक्रम; ठरलेलीं कामें, क्रमपत्रक, कामांची यादी. *What is the p. for to-day*, what are we going to do to-day? आजचा कार्यक्रम काय आहे? [Gk *pro*, before; *grapho*, write]

Pro'gress, *n.* (प्रो'ग्रेस, प्रो'ग्रिस्)—forward movement; advance; improvement; increase; a journey of state. प्रगमन; प्रगति; सुधारणा; वाढ; दौरा, प्रवास. *v. i.* (प्रॅग्रे'स्) to make progress, to make improvement, to proceed. पुढें जाणें, प्रगति करणें, वाढविणें, सुधारणें.

Progrĕ'ssion, *n.* (प्रोग्रे'शन्)—physical onward movement; (Math.) series of quantities each in the same relation to preceding one; (Mus.) passing from one note or chord to another. पुढें गति, प्रगति; श्रेढी, श्रेणी; आवाजाचा चढउतार, आरोहावरोह. *Arithmetical p.*, गणित श्रेढी; *Geometrical p.*, भूमिति श्रेढी; *Harmonic p.*, गायनात्मक,-हरात्मक,-श्रेढी. *Progrĕ'ssional*, *a.*

Progrĕss'ive, *a.* (प्रोग्रे'सिव्)—forward; increasing; proceeding onward, improving, favouring progress or form. पुढें जाणारा; वाढणारा; प्रगमनशील.

Prōhib'it, *v. t.* (प्रोहि'बिट्)—to forbid the doing, making, practice or use of; to debar, to prevent, to inhibit. मनाई करणें; हरकत किंवा अडथळा करणें, बंदी,-हरकत,-निषेध करणें, अडथळा करणें.

Prohibi'tion, *n.* (प्रोइबि'शन्)—forbidding; edict, order, that forbids something; forbidding by law of sale of intoxicants for common consumption. मनाई; मनाई हुकूम; (मादक पदार्थांच्या विक्रीला कायदेशीर) बंदी,-प्रतिबंध. Prohi'bitory, *a.*

Prohib'itionist, *n.* (प्रोहि'बिशनिस्ट्)—advocate of prohibitive legislation. प्रतिबंधवादी; मद्यपानप्रतिबंधवादी.

Prōhib'itive, *a.* (प्रोहि'बिटिव्)—that prohibits, implying prohibition, forbidding; (of price) high enough to prevent purchase. मना करणारा, प्रतिबंधक; जबर, भारी. *P. tax,-price*, प्रतिबंधक किंवा जबर-भारी-जकात, किंमत.

Projĕct', *v. t.* &. *i.* (प्रजे'क्ट्)—to make plans for; to protrude, to stick out; hurl, send forth, into space; represent as plane surface. युक्ति किंवा योजना करणें; योजना करवणें; पुढें येणें; फेंकणें, प्रक्षेप

करणें; (एकाद्या आकृतीचा रेघा काढून) आराखडा काढणें, प्रत्यालेख काढणें. *n.* (प्रॉ'जेक्ट्), a scheme or plan, design. युक्ति, योजना, कल्पना, काल्पनिक नकाशा.

Projectile, *a.* (प्रोजे'क्टिल्,-क्टाइल्)—impelling; capable of being projected by force, esp. from cannon. पुढें ढकलणारा,-सारणारा,-लोटणारा; प्रक्षेपणीय. *n.* (प्रॉ'जिक्टाइल्, प्रोजे'क्टाइल्,-टिल्), heavy missile; shell, cannon-ball. मोठें अस्त्र; फेंकलली वस्तु, तोफेचा गोळा.

Projĕc'tion, *n.* (प्रजे'क्शन्)—projecting, a part that protrudes; a map made by projecting; alchemist's powder of philosopher's stone; (Geom.) projecting of a figure; representation on plane surface of (any part of) surface of earth or of celestial sphere; mental image viewed as objective reality. पुढें आलेला भाग; नकाशा, चित्र, कंगोरा, देखावा; किमया करतांना वापरण्याची पूड; प्रलंबता, प्रत्यालेख, विक्षेप; पातळीवर काढलेला भूगोलाचा किंवा इतर ग्रहाचा गोलवक्र नकाशा; मूर्त कल्पना, विक्षेप.

Projĕc'tor, *n.* (प्रजे'क्टर्)—one who forms schemes; a promoter of bubble companies; apparatus for projecting rays of light. योजक, योजना तयार करणारा; अशक्य,-अवाढव्य,-कल्पना काढून मंडळ,-कंपनी-बनविणारा; प्रकाशकिरणप्रक्षेपक, -भिंग.

Prolăp'sus, *n.* (प्रोलॅ'प्सस्)—forward or downward displacement of an internal organ. इंद्रियाचा भाग खालीं वर सरकणें,-भ्रंश,-च्युति.

Prō'lāte, *a.* (प्रो'लेट्)—(of sphere) lengthened in the direction of the polar diameter. ध्रुवबिंदू-मधील व्यासाच्या बाजूनें लांब केलेला (गोल).

Prōlĕgŏm'ĕnā, *n. pl.* (प्रोलिगॉ'मिना)—preliminary remarks or dissertation. प्रस्तावना, पूर्वपीठिका, उपोद्घात.

Prōlĕ'psis, *n.* (प्रोली'प्सिस्,-ले'-)—(*pl.-pses*), assumption that something is done or true before it is so. प्रत्यक्ष गोष्ट घडण्यापूर्वी ती घडली आहे,-खरी आहे,-अशी अटकळ, अपेक्षा, अंदाज. *Prole'ptic, a.*

Prōlētăr'ian, *a. & n.* (प्रोलिटे'अरिअन्)—of, member of, the proletariate. सामान्य लोकांविषयीं, खालच्या वर्गाचा (मनुष्य).

Prōlētăr'iat (e), *n.* (प्रोलिटे'अरिअट्)—lowest classes; the common people. खालच्या वर्गाचे -सामान्य -लोक, मजूरवर्ग.

Prŏlĭf'ic *a.* (प्रॉलि'फिक्)—producing offspring; fruitful; abundantly productive. प्रजोत्पादक; फलप्रद, सुपीक.

Prō'lĭx, *a.* (प्रो'लिक्स्)—lengthy; speaking at great length, tedious. लांबलचक; कंटाळवाणा, बयादखोर.

Prŏlĭx'ĭty, *n.* (प्रॉलि'क्सिटि)—great length; tediousness. मोठा विस्तार; कंटाळवाणेपणा, चऱ्हाट, विस्तार, शब्दजाल.

Prō'lŏgue, *n.* (प्रो'लॉग)—poem recited before first part of a play; first of a series (of events, &c.), preface (of *epilogue*). प्रवेशक, नांदी; प्रस्तावना. *v. t.* to introduce, furnish, with a p. प्रस्तावानें सुरू करणें; प्रस्ताव करणें.

Prolŏng', *v. t.* (प्रलॉं'ग्)—to lengthen out, to make longer; to cause to continue. लांबविणें, वाढविणें; पुढें चालविणें, दिरंगाईवर टाकणें. *Prolonged, p. p.* long. लांबविलेलें, फार वेळ चाललेलें, दीर्घकालिक.

Prōlŏngā'tion, *n.* (प्रोलॉंगे'शन्)—a part prolonged; extension; delay. वाढवणें; लांबणीवर टाकणें; विलंब.

Prŏmĕnāde', *n.* (प्रॉमिना'ड्)—a going up and down in a public place; a place used or specially set apart for a public walk. सहल, रपेट, फेरी, विहार; सहल करण्याची जागा. *v. i. & t.* to take *p.*; lead (person etc.) up and down for show. सहल करणें, रपेट करणें, फेरा मारणें; चें प्रदर्शन करणें,—प्रदर्शन करण्यासाठीं फिरविणें.

Prŏm'ĭnence, *n.* (प्रॉ'मिनन्स्)—being prominent; a protuberance. ठळकपणा, प्रामुख्य; पुढें आलला भाग उंचवटा. *Prominency, n.*

Prŏm'ĭnĕnt, *a.* (प्रॉ'मिनेन्ट्)—projecting; conspicuous; distinguished. उंच पुढें आलेला; प्रसिद्ध; प्रमुख, ठळक.

Prŏmĭs'cūous, *a.* (प्रॉमि'स्क्युअस्)—of mixed and disorderly composition, confused; unsorted; indiscriminate; (colloq.) casual. घोटाळ्याचा, सरमिसळीचा, अव्यवस्थित, गचाळ; निर्विशेष; स्वैर, यथेच्छ; सहजगत्या, अहेतुक. *Promiscu'ity, n.* भेदाभेदशून्यता, खिचडी, चिवडा, भेसळ.

Prŏm'ĭse, *n.* (प्रॉ'मिस्)—explicit undertaking to do or not to do something; favourable indications. वचन, शब्द, प्रतिज्ञा, अभिवचन; आशेचें कारण, होतकरूपणा, संभव. *v. t. & i.* to afford hopes or expectations, to undertake to give or procure; to foretell, to show promise. वचन देणें; भविष्य करणें, भाकीत करणें; खात्री देणें, होईल अशी आशा असणें, होईलसें दिसणें. *To p. oneself,* look forward to (a pleasant time etc.). आशा करणें, आशेवर राहणें. *I p. you,* (colloq.) I assure you. मी खात्रीपूर्वक सांगतों, कीं. *Promised land, land of p.,* Canaan, heaven, any place of expected felicity. स्वर्गलोक. *A writer of great p.,* चांगलाच होतकरू लेखक. *Prom'iser, n.* वचन देणारा.

Prŏm'ĭssorў, *a.* (प्रॉ'मिसरि)—of the nature of or containing a promise. अभिवचनात्मक, समतिज्ञ. *A promissory note,* (रोख पैसे देणें असल्याबद्दल) वचन चिठ्ठी, रोखा, चिठ्ठी, दस्तऐवज.

Prŏm'ontorў, *n.* (प्रॉ'मन्टरि)—headland; highland jutting out into sea, etc.; (Anat.) kinds of

protuberance in the body. (उंच) भूशिर; समुद्रांत शिरलेलें जमिनीचें उंच टोंक : टेंगूळ, अवाळूं. [L. *pro*, forward ; *montis*, mountain]

Promōte', *v. t.* (प्रमो'ट्)—to move up to a higher office or position ; to help forward or initiate the process or formation of, to encourage. उन्नति करणें, बढती देणें, चढविणें; उत्तेजित करणें, साहाय्य करणें, उत्तेजन देणें. *Promo'ter*, *n.* encourager ; a person who promotes formation of joint-stock company. पुरस्कर्ता, उत्तेजन देणारा साहाय्यकर्ता ; सहकारी मंडळी स्थापन करण्यामध्यें पुरस्कार घेणारा,-सहकारमंडळप्रवर्तक.

Promō'tion, *a.* (प्रमो'शन्)—advancement. बढती, वाढ.

Prŏmpt, *a.* (प्रॉम्ट्)—done at once or without delay ; ready in action. जलदीचा, तातडतोबीचा, तात्कालिक; तत्पर, चलाख. *v. t.* to incite, to inspire ; to help out (actor, speaker) by reading next words of the part. उत्तेजन देणें, प्रेरणा करणें ; पुढची आठवण करून देणें, (पडद्याच्या आंतून नटाला भाषण) सुचवणें. *n.* thing said to help the memory, esp. of actor. (नटाला पुढच्या भाषणाची आठवण करण्यासाठीं) सांगितलेले शब्द. *For p. cash*, (on the spot). रोख किंमत देऊन.

Prŏmp'ter, *n.* (प्रॉम्प्टर्)—(*esp.*) a person stationed to prompt actors. नटांना (पडद्याच्या आडून) सूचना करणारा.

Prŏmp'ting, *n.* (प्रॉ'म्प्टिंग)—incitement. उठावणी, उचल, उत्तेजन, प्रेरणा; नटाला सूचना.

Prŏmp'titūde, *n.* (प्रॉ'म्प्टिट्यूड्)—promptness, readiness, quickness of decision. दक्षता, चलाखी, तडफ.

Prŏm'ŭlgāte, *v. t.* (प्रॅ'मलेट्)—to publish as coming into force or having authority, to proclaim, to make known. अंमलांत येईल म्हणून प्रसिद्ध करणें, (माहिती) फैलावणें. जाहीर करणें.*-tion*, *n.* प्रसिद्धीकरण, जाहीर करणें.*-tor*, *n.* जाहीर-प्रसिद्ध-करणारा अधिकारी. [L. *promulgare*, to proclaim]

Prōne, *a.* (प्रोन्)—lying face or front downwards ; (loosely) prostrate ; inclined, disposed ; (of ground) having downward aspect or direction ; (loosely) steep, headlong. अधोमुख, अधोवदन, प्रणत; पालथा, उतरता, कलता, फल असलेला, प्रवृत्त; कललेली, उतरती (जमीन); उंच, उंचवटयाची. *-ly*, *adv.*

Prŏng, *n.* (प्रॅंग)—spike of a fork. अणीदार टोंक, कांटा, दांता, शूळ, अणी, टोंक.

Pronŏm'inal, *a.* (प्रोनॉ'मिनल्)—of, or of the nature of, a pronoun. सर्वनामाचा, सर्वनामासंबंधीं.

Prō'noun, *n.* (प्रो'नाउन्)—a word serving as substitute for a noun. नामाच्या ऐवजीं योजलेला शब्द, सर्वनाम. *Personal pp.*, (I, we, thou etc.) पुरुषवाचक सर्वनामें. *Interrogative pp.*, (who, what, which) प्रश्नार्थक सर्वनामें. *Relative pp.*, (who, that, which) संबंधी सर्वनामें. *Possessive pp.*, (my, mine etc.) षष्ठयन्त सर्वनामें. *Demonstrative pp.*, (this, that) दर्शक सर्वनामें. *Distributive pp.*, (each, every, etc.) भिन्नत्वदर्शक सर्व०. *Indefinite pp.*, (any, some, etc.) सामान्य सर्व०

Pronounce', *v. t.* & *i.* (प्रना'उन्स्)—to utter formally, to declare, to affirm, to pass judgement, to give one's opinion ; to articulate. यथाविधि-गंभीरपणानें-सांगणें; निश्चयपूर्वक सांगणें, स्पष्ट मत देणें; उच्चार करणें, उच्चारणें, बोलणें.*-able*, *a.* उच्चार्य, उच्चारण्याजोगा.

Pronounce'mĕnt, *n.* (प्रोना'उन्स्-मेन्ट्)—an official declaration of opinion or judgement. मत जाहीर करणें, निकाल जाहीर करणें, स्पष्ट अभिप्राय देणें.

Pronounced', *a.* (प्रोना'उन्स्ट्)—strongly marked, decided, extreme, glaring. स्पष्ट, निश्चित, ठळक, ठळठळीत.

Pronoun'cing, *a.* (प्रोना'उन्सिंग)—P. dictionary, (शब्दांचे) उच्चार देणारा कोश, उच्चारदर्शक कोश.

Pronŭn'ciā"tion, *n.* (प्रोन'न्सिए"शन्)—the way a word is pronounced, the mode of uttering words. उच्चारणें, उच्चारण, उच्चार, वर्णोच्चार.

a common ancestor; the posterity of; family; kindred people; a particular breed of animals; genus or species of plants; root (of ginger). शर्यत, दौड, ओढ; आयुष्यक्रम; पाण्याचा जोराचा प्रवाह, प्रवाहाची जोरगत; प्रवाहाच्या स्रोताचा मार्ग; घोड्यांच्या शर्यती; घोडा फिरण्याची पट्टी; वंश, जात, ची वंशपरंपरा, संतति; कुळ; जाति, एकाच वंशाचे लोक; विशिष्ट जात, बीज, अवलाद; (वनस्पति) वर्ग; (आल्याचें) मूळ, कांडी, फडा, फणा. *v. i. & t.* to go at full speed; compete in speed with; indulge in horse-racing. अति वेगानें धांवणें,-जाणें,-पळणें, दौड मारणें; (शीं) स्पर्धा,-शर्यत-लावणें, शर्यत खेळणें; घोड्यांच्या शर्यतींत (पैसे) लावणें, घोड्यांच्या शर्यतींचा नाद असणें. *R. ball,* dance held in connexion with races. घोड्यांच्या शर्यतीनिमित्त नाच. *R. card,* programme of races. घोड्यांच्या शर्यतींचा कार्यक्रम-पत्रिका,-माहिती. *Race'course,* ground for horse-racing. घोड्यांच्या शर्यतींचें अंगण,-रंगण,-आवार. *Race'horse,* शर्यतींत धांवणारा घोडा. *R. meeting,* horse-racing fixture. घोड्यांच्या शर्यतीचा कार्यक्रम, वेळ, तारखा वगैरे. *A racing man,* घोड्यांच्या शर्यतीचा नादी. *The racing world,* the turf. टर्फ्-क्लब.

Racēme', *n.* (रसी'म्)—an inflorescence in which separate flowers are attached by short stalks along central stem. पुष्पगुच्छ, बंधनयुक्त मंजरी, देठ असलेली मंजरी, (उ० संकासुर, मोहरी, सुळा). *Ra'cemose, a.* संकासुरी मंजिऱ्या असलेला; संकासुरी मंजिरीसारखा.

Rā'cer, *n.* (रे'सर्)—one who races; a runner; racehorse or yacht or vehicle kept for racing. शर्यत मारणारा; धांवणारा; शर्यतीचा घोडा किंवा बोट किंवा वाहन.

Rā'chis, Rha-, *n.* (रे'किस्)—(pl.-ides), a stem to grasses etc. bearing flower-stalks at short intervals; an axis of pinnately compound leaf or frond; feather-shaft. (गवतांचा, फुलांचा) मुख्य दांडा,-देंठ, पुष्पवंश, मणाल; (पिच्छवत् संयुक्त) पानाची मुख्य शीर,-दांडा, मुख्यपर्णवंश, मणाल (उ० शेवगा, फर्नुनिष); पिसाऱ्याचा दांडा. [Gk *rhakis,* spine]

Rachi'tis, *n.* (रकाइ'टिस्)—rickets. हाडांचा-अस्थींचा -वांकडेपणा, अस्थिकौटिल्य.

Rā'cial, *a.* (रे'शल्)—of a race, of races. जातीचा. जातवार, कुळाचा, वंशवर्धक, जातिनिष्ठ, जातीजातींचा. *Ra'cially, adv.*

Răck, *n.* (रॅक्)—kinds of wooden or metal frame-work for holding fodder, or for keeping various articles on or in, or for torturing victims by stretching the joints; driving clouds; destruction. गव्हाणी; मांडण; घोडा, ताणघोडा; रिकामे धावते ढग, कापशे,-पोकळ,-ढग; नाश, सत्यानाश. *v. t. & i.* to place in or on rack; to torture on the rack; (of disease etc.) inflict torture or strain; draw off (wine, cider) from the lees. गव्हाणींत घांधणें, मांडणीवर ठेवणें; सतावून सोडणें, पिडणें, पीडा देणें; फार ताण पडणें; (दारू) गाळणें. *Go to rack & ruin,* नाश,-विध्वंस,-होणें. *R. wheel,* cog-wheel. दांते असलेलें चक्र. *To r. up horse,* घोड्याला रात्रीं खाण्यासाठीं गव्हाणींत गवत वगैरे घालणें. *A racking headache,* पीडा देणारी,-सतावून सोडणारी,-डोकें-दुखी. *To rack* one's *brains,* मेंदूवर फार ताण पडणें.

Răck'ĕt,-cquet, *n.* (रॅ'किट्)—catgutted bat used in tennis, rackets, etc.; (pl.) a ball-game for two or four with rackets in a court of four plain walls, racket-like snow-shoe. टेनिसची पॅट; दोघांनीं किंवा चौघांनीं खेळण्याचा टेनिस खेळ; चेंडूचा एक खेळ; बर्फावरून जातांना घालण्याचा जोडा. *R.-tail,* टेनिसच्या पॅटीसारखा पिसारा असलेले एक जातीचे पक्षी.

Răck'ĕt, *n.* (रॅ'किट्)—uproar, din; bustle, hurry; social excitement, gaiety, dissipation. गलबला, कलकलाट; गडबड, धांदल, घाई; धांगडधिंगा, दंगा. *v. i.* to live gay life; be much on the move. मजेत राहणें; गडबड,-धांदल,-उडवणें. *Rack'ety, a.* noisy; dissipated. गलबल्या; नादिष्ट, छंदी. *To stand the racket,* come successfully through test, face consequences of action. परीक्षेला उतरणें, कसोटीला उतरणें; परिणाम भोगणें.

Răck'rĕnt, *n.* (रॅक्-रेन्ट्)—greater than reasonable rent that can be exacted. जास्तींत जास्त भाडें. *v. t.* to extract this from tenant. कमालीचें जास्त भाडें -खंड-वसूल करणें.

Raconteur, *n.* (रॅकॉन्ट'र्)—(*fem.-euse,*-न्टं'झ्), teller of anecdotes. दंतकथा सांगणारा. [F.]

Racōōn', *n.* (रॅकू'न्)—a bushy-tailed American nocturnal carnivorous animal. अमेरिकेंतील एक मांसभक्षक प्राणी.

Rā'cy̆, *a.* (रे'सि)—of distinctive quality or vigour; vernacular. झणझणीत, जोरदार; देशी, मुलखी. *R. of the soil,* of homely directness, spirited, lively. झणझणीत, जोमदार, मजेदार.

Răd'dle, *n.* (रॅ'डल्)—red ochre. तांबडी माती,-गेरू *v. t.* to paint with raddle; plaster with rouge. तांबड्या मातीनें रंगविणें,-गिलावा,-रंग,-काढणें.

Rā'dial, *a.* (रे'डिअल्)—of, in, rays; having position or direction of a radius; of radium; of the radius of the fore-arm. किरणांचा, किरणात्मक, किरणासारखा; त्रिज्येसारखा, केंद्रिक, (किरणासारखा) केंद्रापासून निघणारा; 'रेडिअम्' धातूचा; अंगुष्ठ-मूळाश्रित (नाडी). *n.* a radial nerve or artery. नाडी.

Rā'dĭan, *n.* (रे'डिअन्)—an angle at centre of circle subtending arc whose length is equal to the radius. समत्रिज्याकोन, त्रिज्येएवढ्या चापानें वर्तुळ-मध्यबिंदुशीं केलेला कोन.

Rā'dĭance, *n.* (रे'डिअन्स्)—brilliant light; dazzling looks or beauty. चकाकी; चमक, तेज. *Ra'diancy, n.*

Rā'dĭant, *a.* (रे'डिअन्ट्)—emitting rays; issuing or operating radially; beaming with joy, &c;

bright or dazzling. किरण पाहेर टाकणारा; (उष्णता, -प्रकाश,-) किरणविसर्जक, किरणांप्रमाणें मध्यापासून पसरणारा; आनंदानें प्रफुल्लित; दीप्तिमान, तेजस्वी. *n.* point from which heat or light radiates; (Astron.) a radiant point. किरणविसर्जनबिंदु; उल्कासंपातबिंदु.

Ra'diate, *v. t. & i.* (रे'डिएट्)—to diverge or emit from a centre; to emit rays of light or heat; to disseminate (joy, &c.); send or broadcast by wireless; be arranged like spokes. एका केंद्रांतून सरळ पाहेर येणें; किरण पाहेर टाकणें, किरणविसर्जन करणें; (आनंद) पसरणें; बिनतारी संदेशयंत्रानें (बातमी) पाठविणें,-पसरविणें,-जाहीर करणें; चाकाच्या आरांप्रमाणें रचलें जाणें, अरीभवन करणें. *Radia'tion, n.* किरणविसर्जन, अरीभवन. *Ra'diative, a.*

Ra'diator, *n.* (रे'डिएटर्)—(esp.) appliance for warming room etc. by radiation of heat; engine-cooling apparatus in motor car. (खोलींत) उष्णतोत्पादक यंत्र; (मोटार) एंजिन थंड करण्याचें (ठेवण्याचें) साधन,-यंत्र.

Răd'ical, *a.* (रॅ'डिकल्)—of, from, or going to the root; fundamental, inherent, essential; primary; thorough; (math.) of the root of a number or quantity; (bot.) of, springing direct from, the root or the main stem close to it. मुळापासूनचा; तत्त्वाला पोहोंचणारा, महत्त्वाचा; स्वाभाविक, धातुसिद्ध; निःशेष, पूर्ण; करण्यात्मक, मूलक, मूलीय, मुळालाच फुटणारा. *n.* one desiring radical reforms; a word that is itself a root; quantity as root of another, radical sign; (chem.) element or atom, or group of these forming base of compound and remaining unaltered during compound's ordinary chemical changes. आमूलाग्र सुधारणा इच्छिणारा; असाधित किंवा सिद्ध शब्द; करणी, मूल, मूलमापक चिन्ह ($\sqrt{}$, $\sqrt[3]{}$), मूलक. *Rad'calism, n.* radical politics. आमूलाग्र सुधारणावादी पक्षाचीं मतें,-तत्त्वें. *Radical heat,* जीवनाला आवश्यक उष्णता, जन्माची-स्वाभाविक-उष्णता. *R. sign,* मूलमापक चिन्ह ($\sqrt{}$, $\sqrt[3]{}$, $\sqrt[5]{}$). *Rad,* (colloq.) आमूलाग्र सुधारणावादी मनुष्य.

Răd'icle, *n.* (रॅ'डिकल्)—part of seed that develops into the root; root-like sub-division of nerve or vein. मुळाचा मोड, बीज, अंकुर, मूलसदृश शाखा.

Ra'dio, *n.* (रे'डिओ)—wireless telegraphy and telephony; X-rays, Hertzian rays, and their applications. बिनतारी संदेशवाहक, बिनतारी दूरध्वनिक्षेपक यंत्र, रेडिओ; क्ष-किरण, त्यांचे उपचार. *v. t. & i.* to telegraph or broad-cast by wireless; photograph by X-rays; treat with radium. बिनतारी संदेश पाठविणें,-बातमी पसरविणें; क्ष-किरणांनीं छायाचित्र काढणें,-घेणें; रेडियम-धातूचे उपचार करणें. *R.-phare,* wireless signalling station. बिनतारी संदेश पाठविण्याचें ठिकाण. *R.-station,* wireless transmitting station. बिनतारी ध्वनिक्षेपक यंत्र असलेलें ठिकाण; बिनतारी संदेश ज्या ठिकाणाहून पाठवितातात तें ठिकाण.

Radio-, (रेडिओ-)—of rays or radiation; of radium. किरणांचा, किरणकार्यकारी; रेडिअम्धातूचा, तीपासून निघणाऱ्या अदृश्य किरणांचा. *Radio-active,* (रेडिओ अॅ'क्टिव्ह्), exercising radiation; emitting invisible rays that penetrate opaque matter and produce electrical effects. किरणकार्यकारी, विद्युत् किरणांमुळें कार्य करणारा, अदृश्य किरण बाहेर टाकणारा, क्ष-किरणविसर्जक. *R. activity, n. Ra'diograph, n.* an instrument recording sunshine; image on sensitive plate given by Rontgen rays. सूर्याची विसर्जनशक्ति मोजण्याचें यंत्र; किरणलेखक यंत्र; क्ष-किरणांनीं घेतलेला लेख,-प्रतिबिंब. *v. t.* to secure such image of. चा क्ष-किरण-लेख घेणें. *Radiom'eter, n.* instrument showing conversion of radiant energy into mechanical force. किरणभारदर्शक,-मापक यंत्र. *Radios'copy, n.* examination by Rontgen rays. क्ष-किरणांनीं केलेली परीक्षा,-तपासणी. *Radio-telegram,* बिनतारी संदेश.

Răd'ish, *n.* (रॅडिश्)—plant with fleshy pungent root eaten raw. मुळा. *Follicle of a radish.,* मुळ्याची शेंग.

Ra'dium, *n.* (रे'डिअम्)—a metal yielded by pitch-blende and named from its radio-active power. 'रेडिअम्' नांवाची मूळधातु. (हिचा शोध १८९८ त लागला. हिच्यापासून अदृश्य किरण बाहेर पडतात व ते अपारदर्शक वस्तूंतून पलीकडे जातात).

Ra'dius, *n.* (रेडिअस्)—(*pl* Ra'dii—रे'डिआय) straight line from centre to circumference of circle or sphere; any of a set of spokes or other objects diverging from a point like radii of a circle; the thicker and shorter bone of the fore-arm; circular area as measured by its radius; (bot.) outer rim of composite flower-head. व्यासार्ध रेषा, त्रिज्या; त्रिज्येसारखी वस्तु, चाकाची आरी; मनगटाची कांब, मणिबंधास्थि; (वाटोळें) क्षेत्र; पुष्पकिरण, फुलाच्या देंठाची बाह्य कडा.

Ra'dix, *n.* (रेडिक्स्)—(*pl.-ices,-*डिसीझ्), number or symbol used as basis of numeration scale (e. g. ten is the r. of decimal numeration & of common logarithms); source or origin of. संख्यामापनाची मूळ संख्या,-अंक,-चिन्ह; मूळ, आरंभ.

Răff, *n.* (रॅफ्)—riff-raff. निकृष्ट दर्जाचे,-हलकट,-लोक, कचरा, घाण. *Raff'ish, a.* of dissipated appearance; disreputable. घाणेरडा; हलकट, पाजी.

Răff'ia, *n.* (रॅ'फिआ)—a kind of palm; fibre from its leaves. एक जातीचा ताड, ताडपत्रांचा तंतु.

Răff'le, *n.* (रॅ'फल्)—lottery in which article is assigned by drawing lots or throw of dice. सोडतीचा एक प्रकार. *v. t. & i.* to sell by raffle; compete in raffle. सोडतीनें विकणें; सोडतींत घालणें, सोडत खेळणें.

Răffle, *n.* (रॅफल)—rubbish, refuse, lumber, debris. घाण, केरकचरा, अडगळ, कचऱ्याचा-मातीचा -ढीग.

Răft, *n.* (राफ्ट)—a collection of logs, casks, &c., fastened together in the water for transporta tion; flat floating structure of timber. तराफा; तराफा, तर, तरण. *v. t. & i. to transport on raft;* form into a *r.*; cross (water) on raft(s); work raft. तराफ्यावरून ने-आण करणें; (चा) तराफा करणें; तराफ्यानें जाणें; तराफा चालवणें,-हांकणें. *Raftsman*, worker on raft. तराफा चालवणारा.

Ră'fter, *n.* (राफ्टर्)—one of the sloping beams or pieces of timber of a roof. छपराचा वासा. *v. t.* (*usu.* in p. p.) to provide with rafts; half-plo-ugh. वांसे मारणें,-बसविणें; पहिली,-अर्धी,-नांगरटी करणें.

Răg, *n.* (रॅग)—torn or frayed piece of woven material; remnant; (contempt.) flag or hand-kerchief or newspaper. चिंधी; अंश; शेष; निशाणी, हातरुमाल, वर्तमानपत्र. *In rags*, फाटका, फाटका तुटका; फाटके तुटके कपडे घातलेला, चिंध्या नेस-लेला. *R.-baby*, doll made of rr. चिंध्यांची बाहुली. *R.-bag*, उपयोगी चिंध्या ठेवलेली पिशवी. *Ragtag*, *ragtag and bob-tail*, the riff-raff. खालच्या दर्जाचे लोक, हलकट-पाजी-लोक. *R.-time*, music with such syncopation as in negro melodies; (attrib.) farcical (as *a r.-t. army*). नीग्रो लोकांच्या गाण्यां-तील तालसुरासारखें गाणें; प्रहसनात्मक, लुटुपुटूचें, नाटकी. *R.-wheel*, दांते असलेलें चक्र. *R.-wort*, yellow-flo-wered wild plant. पिवळ्या फुलाचें रानटी फुलझाड.

Răg, *n.* (रॅग)—kinds of hard coarse stone break-ing in slabs, large coarse roofing-slate. पातळ कळपे,-फरशी,-पडणारा कठीण दगड; खरखरीत छपरी दगड.

Răg, *v. t. & i.* (रॅग)—(*sl.*) to scold; torment, tease; play rough jokes on; engage in rag. निर्भर्त्सना करणें; त्रास देणें, सतावणें, छळणें; दांडगाईनें थट्टामस्करी करणें; हमरीतुमरीवर येणें. *n.* (sl.) noisy disorderly conduct or scene; spree. गोंधळ, हमरी तुमरी, दांडगाई; धांगडधिंगा.

Răg'amŭffin, *n.* (रॅगमफिन्)—a ragged dirty fellow. हलकट, पाजी,-मनुष्य.

Rāge, *n.* (रेज्)—violent anger; a fit of this; object of widespread temporary popularity. संताप, क्रोध, रागाचा झपाटा, पिसें, छंद. *v. i.* to rave, to storm ; to be angry, to be furious with anger. बादळणें, चवताळणें, अनर्थ किंवा कहर मांडणें, क्षुब्ध होणें, अति संतापणें. *Rage itself out*, (esp. of storm), cease raging. वादळ कमी होणें, थांबणें.

Răgg'ĕd, *a.* (रॅगिड)—rough with sharp or irre-gular points, shaggy, hanging in tufts; torn or frayed; wearing rags. ओबडधोबड, खरखरीत, फाटका; चिंध्या नेसलेला. *R. rhymes*, ओबडधोबड कविता,-गीतें. *R. robin*, a crimson-flowered wild plant. फिर-मिजी रंगाच्या फुलांचें रानटी फुलझाड. *R. school*, free school for poor children. गरीब मुलांकरितां मोफत शिक्षणाची शाळा.

Ragout', *n.* (रॅगू)—meat in small pieces stewed with vegetables and highly seasoned. मसाला घालून शिजविलेले मांसाचे लहान तुकडे,-मांस. *v. t.* to cook thus. अशा तऱ्हेनें मांस शिजविणें.

Raid, *n.* (रेड)—sudden incursion; a surprise visit by police. स्वारी; पोलिसांचा अचानक-एकदम-हल्ला. *v. t. & i.* to make a raid upon; make raid. हल्ला करणें, एकदम छापा घालणें. *Raid'er*, *n.* छापा घाल-णारा, स्वारी करणारा, हल्ला करणारा.

Rail, *n.* (रेल)—level or sloping bar; iron bar making part of the track of a railway or tram-way. गज, कठडा; लोखंडी रस्ता. *v. t.* to furnish or enclose with rails; lay railway-route with rails; convey, travel, by rail. रेल्वेचे रूळ घालणें; आगगा-डीनें ने-आण करणें,-जाणें. *off the rails*, disorganized, out of order, not working right. नादुरुस्त, बरोबर न चालणारा. *By r.*, by railway. रेल्वेनें. *Rails*, (pl. St. Exch.) railway shares. रेल्वेचे शेअर्स,-रोखे. *R.-chair*, iron-holder, attached to sleeper, in which railway rail rests. रेल्वेच्या रुळाचा लोखंडी आधार. *Rail'road*, (U. S.) railway, रेल्वे (मार्ग); *v. t. & i.* to transport or travel by rail, (colloq.) send or put through with great speed. रेल्वेनें (माल) पाठ-विणें ;-ने आण,-प्रवास,-करणें, अतिशय जलदीनें पाठविणें. *Rail'way*, road laid with rails for the transit of trains with passengers and goods; railroad, esp. of those roads with light rails, as of street cars, or elevated or underground-railroads. आगगाड्यांचा रेल्वे-मार्ग.

Rail, *n.* (रेल्)—kinds of bird, (esp. land *r.*, water *r.*). एक जातीचे पक्षी.

Rail, *v. i.* (रेल्)—to use abusive language (*at, against, upon*). शिव्या देणें, अपशब्द बोलणें.

Rail'ing, *n.* (रेलिंग)—a fence or barrier. कुंपण, कठडा.

Raill'erў, *n.* (रेलरि)—banter. विनोद, थट्टा, मस्करी.

Raim'ent, *n.* (रेमन्ट)—clothing, apparel. चिरगूट, वस्त्र.

Rain, *n.* (रेन्)—condensed moisture of atmosphere falling visibly in separate drops; (pl.) *the rains*, the rainy season; rain-like descent of falling liquid or solid particles or bodies. पाऊस, पर्जन्य, बरसात; पावसाळा, वर्षाऋतु; (पावसासारखा) वर्षाव, पाऊस. *v. t. & i.* send down rain; to fall or send down in showers, to pour down. पाऊस पडणें किंवा लागणें; वर्षाव होणें,-करणें, गळणें. *Rain or shine*, whether it rains or not. पाऊस पडो किंवा न पडो, पाऊस असो-नसो. (Naut.) *the Rains*, rainy region of Atlantic 4-10° N. lat. अटलांटिक महासागरांतील पावसाळी भाग (उ० ४ ते १०° अक्षांश). *R.-coat*, waterproof. पावसाळी अंगरखा. *R.-water*, सांठवलेलें पावसाळी (पावसाचें)

पाणी. *It never rains but it pours*, events usually happen several together. पुष्कळ गोष्टी बहुधा एकाच वेळीं घडून येतात. *It rains in*, पाऊस आंत येतो, गळतें होतें. *It has rained itself out*, r. has ceased. पाऊस खळला,-थांबला,-आहे.

Rain'box, *n.* (रे'न्‌बॉक्स)—theatre contrivance imitating sound of rain. (नाटकगृहांतील पावसाचा देखावा दाखविण्याची) पर्जन्य पेटिका.

Rain'bow, *n.* (रे'न्-बो)—arch of prismatic colours formed in rain or spray by the sun's rays. इंद्रधनुष्य. *a.* many-coloured. बहुरंगी, विविधरंगाचा. *All the colours of the rain-bow*, many colours. पुष्कळ रंग.

Rain'dŏctor, *n.* (रे'न्‌डॉक्टर्)—producer of rain by magic. मंत्राच्या सामर्थ्यानें पाऊस पाडणारा.

Rain'fall, *n.* (रे'न्-फॉल्)—quantity of rain that falls within a given area in given time. पर्जन्य, पाऊस.

Rain'gauge, *n.* (रे'न्-गेज्)—an instrument for measuring the quantity of rainfall. पाऊस मापण्याचें यंत्र, पर्जन्यमापक यंत्र.

Rain'y̆, *a.* (रे'नि)—in or on which rain falls; abounding with rain, showery. पावसाचा; वर्षावाचा; पावसाळी.

Raise, *v. t.* (रेझ्)—(with *up*) to set upright; to make stand up; to rouse; to build up; to breed; to utter; to put or take into higher position; to increase the amount or heighten the level of; to levy, to collect, to procure, to extract from earth. उभारणें; उठवणें, उभा करणें, वर उचलणें; जागृत करणें; बांधणें, रचणें; उत्पन्न करणें; उच्चारणें; पुढें आणणें, मोठेपणास चढवणें; दर वाढवणें, उंच करणें; गोळा करणें, जमवणें, मिळवणें; जमिनींतून खणून काढणें, पिकविणें, पैदा,-उत्पन्न,-करणें. *n.* (U. S.) increase in wages, a rise. पगारांत,-रोजनुम्यांत,-वाढ. वेतनवाढ. *To raise the wind*, (fig.) procure money for some purpose. विशिष्ट हेतूकरितां पैसा उभा करणें, -मिळविणें,-गोळा करणें; रोकड पैसा उभारणें. *To r. a dust*, cause turmoil, obscure the truth. गोंधळ घालणें, सत्यापलाप करणें, खरें,-वस्तुस्थिति,-लपविणें *To r. a question*, प्रश्न (विचाराकरितां) उपस्थित करणें. *To r.* one's *voice*, speak. बोलणें, तोंड उघडणें *To r.* one's *hat*, bow. वंदन,-रामराम,-नमस्कार करणें. *To r.* one's *glass to*, drink health of. च्या अभीष्टचिंतनार्थ पिणें. *R.* one's *eyes*, look upwards. वर दृष्टि करून पाहणें. *R.* one's *eyebrows*, भांबावल्यासारखें,-भ्याल्यासारखें,-पाहणें. *R. Cain, hell, the devil, the mischief*, make disturbance. उपद्रव, त्रास,-उत्पन्न करणें. *R. cloth*, make nap on it. कपड्यावर फूल पाडणें. *R. colour* (in dyeing), रंग अधिक तकतकीत करणें. *R. money*, रक्कम उभी,-गोळा,-करणें.

Rais'in, *n.* (रेंझन्)—a dried grape. मनूका, बेदाणा.

Raison d'etre, *n.* (रे'झाँडे'ट्र्)—what accounts for or justifies or has caused a thing's existence. (कोणत्याहि गोष्टीचें) सयुक्तिक कारण, सयुक्तिक उपपत्ति, हेतु. [F]

Rake, *n.* (रेक्)—pole with comb-like cross-bar for drawing hay, &c. together or smoothing loose soil; dissipated or immoral man; raking position or build; croupier's money-raking implement. दांताळें; व्यसनी किंवा फंदी मनुष्य; कल, उतार; जुगाऱ्याचें पैसे गोळा करण्याचें हत्यार,-साधन, पैसे वर-खालीं करण्याचें साधन. *v. t.* & *i.* to use rake; collect, draw together, as with rake; to draw together as with a rake; to ransack, to search over; to give backward inclination to; (of ship) to project at upper part of bow or stern; (of mast, funnel) incline towards stern or rear; (naut.) send shot along (ship) from stern to stern. दांताळ्यानें साफ करणें,-सपाट करणें, दांताळें चालविणें; दांताळ्यानें गोळा करणें; बारकाईनें शोधणें, चाळणें; मागच्या बाजूला कलणें; जहाजाचा किंवा नाळीचा किंवा सुकाणूचा वरचा भाग पुढें येणें; कलणें, वळणें, नाळीकडून सुकाणाकडे तोफा सोडणें.

Rā'kĭsh, *a.* (रे'किश्)—of dissolute appearance or manners, fast; (of ship) smart, seeming to be built for speed. व्यसनी, फंदी, सोदा, इष्कबाज; जलद चालीचें, उमदें, (जहाज).

Răll'ĭ căr (t), *n.* (रॅ'लि-कार्,-र्ट)—light two-wheeled driving-trap for four. दुचाकी हलकी गाडी. (*Ralli*, first purchaser, 1885).

Răll'y̆, *v. t.* & *i.* (रॅ'लि)—to bring or come together for a united effort; revive by effort of will; throw off illness; (of prices) recover from depression; to banter, to chaff. एकत्र गोळा करणें किंवा होणें; जमविणें, जमवाजमव करणें; इच्छाशक्तीनें सावरणें,-थावरणें; (प्रकृति) ताळ्यावर येणें, सुधारणें; (बाजारभाव) सावरणें, चढणें, पूर्वस्थितीवर येणें; उपहास करणें, टर करणें. *n.* coming together in support of a cause, &c.; act of rallying, recovery of energy or spirit; (in tennis, etc.) strokes quickly exchanged. एखाद्या गोष्टीकरितां एकत्र होणें; जमवाजमाव; प्रकृति सुधारणें,-पूर्ववत होणें; झपाट्याचा खेळ (टेनिसचा वगैरे).

Răm, *n.* (रॅम्)—an uncastrated male sheep; thing used for ramming, e. g. battering ram; ship's charging beak or ship having one; pile-driving or hydraulic or pumping machine or parts of them; (Ram) zodiacal sign Aries. मेंढा, एडका; (किल्ल्याच्या भिंती फोडण्याकरितां) झुलता घण; (लढाऊ जहाजाची) नाळेकडची घणासारखी चोंच, घणासारख्या नाळेचें लढाऊ जहाज; ठांसणी बंदूक, ठोकणी, पाणी वर खेचण्याचें यंत्र,-पंप,-पंपाचे भाग; मेष (राशि). *v. t.* to beat firm; squeeze tight; pack closely; butt; (of ship) strike with ram; impress by repetition. ठोकणें, घट्ट ठांसणें; घट्ट आंवळणें; आवळून बांधणें, गच्च भरणें; ठांसणी करणें; घणासारख्या नाळीनें ठोकर देणें; ठाकून

ठोकून पुनः पुन्हां सांगून ठाम बिंबविणें. *Ram-rod,* for ramming home charge of muzzle-loader. बंदूक ठासण्याचा गज. *Ram'mer, n.* (esp.) block of wood for ramming soil. मोगरा, ठोकणी, चोपणी, चोपणें, धुमस, राजमोगरा.

Rā'mal, *a.* (रे'मल)—(bot.) of, proceeding from, a branch. फांदीचा, फांदीपासून निघणारा. [L. *ramus,* branch]

Răm'ble, *n.* (रॅ'म्बल)—to walk without a definite route; to talk in an irrelevant way. भटकणें, हिंडणें; (बोलण्यांत) वाहावत जाणें, भरकटणें, बडबडणें. *n.* an excursion or trip in which one wanders from place to place. रपेट, सहल.

Răm'bler, *n.* (रॅ'म्ब्लर्)—(esp.) kinds of climbing rose. (कांहीं जातींचे) वेल-गुलाब.

Răm'bling, *a.* (रॅ'म्ब्लिंग)—(esp. of street etc.) irregularly arranged, straggling; peripatetic, wandering; disconnected, incoherent. अव्यवस्थित रचनेचा, वेडावांकडा; इच्या तशा वर चढणाऱ्या (वेली); भटकणारा, हिंडणारा; असंबद्ध.

Răm'bŭnctious, *a.* (रॅ'म्बंक्शस)—cantankerous, unruly. भांडखोर, चिडखोर, बंडखोर.

Răm'ifȳ, *v. t. & i.* (रॅ'मिफाय्)—to form branches or subdivisions; to develop into a complicated system, to branch out. विभाग पाडणें; निरनिराळे अनेक फांटे फुटणें, शाखा फुटणें. *Ramifica'tion, n.* शाखा, फाटा, धुमारा.

Ramōse', *a.* (रॅमो'स)—(Bot.) branched, branching. फांदि-फांटे-फुटलेला, शाखा फुटणारा.

Rămp, *v. i. & t.* (रॅम्प्)—to stand on hind legs, with forepaws in air; to assume or be in threatening posture; to ascend or descend to different level; storm, rush about. मागील दोन पायांवर उभा राहणें; झडप घालण्याच्या तयारीनें (उभें) राहणें (सिंहाचें इ०); (भिंतीचें) उंच सखल असणें; अंगावर चालून जाणें, गुरगुरणें. *n.* inclined plane joining two levels of earthwork or wall; upward bend in stair-rail. दोन पातळींमधील उतार, जडण, दोन बांधकामांना जोडणारी पातळी; जिन्याच्या उंच होत जाणाऱ्या कठड्याचें वांकण. 2. *n.* (sl.) attempt to extort payment of fictitious debt; levying of exorbitant prices. भरमसाट कर्जाच्या-देण्याच्या-वसुलीचा प्रयत्न करणें; भरमसाट दर वाढविणें.

Rămpāge', *v. i.* (रॅम्पे'ज)—(joc.) rage, storm, rush about. खवळणें, रागावणें, गुरगुरणें.-*ous, a.*

Răm'pant, *a.* (रॅ'म्पन्ट)—(*Herald.*) ramping; arrant; rank, aggressive, unchecked, unrestrained; having one abutment higher, climbing. मागल्या पायावर उभा, पुढें आलेला; भिलंदर, इरसाल; प्रचलित, माजलेला, जबर, मानाचा; चढता.

Rămp'ārt, *n.* (रॅम्पा'र्ट)—defensive mound of earth; (*fig.*) defence, protection. तट, किल्ल्याची भिंत; संरक्षण, रक्षणाचें साधन. *v. t.* to fortify or protect (as) with *r.* तटबंदी करणें.

Răn'cĭd, *a.* (रॅ'न्-सिड)—smelling or tasting like rank stale fat, strong-scented. खवट, वाशेरा. *Rancid'ity, n.*

Rănc'our, *n.* (रँकर्)—deep-seated enmity, malignant hate; bitterness, malice. हाडवैर, दीर्घद्वेष; धुसस, द्रोह. *Ranc'orous, a.* दीर्घद्वेष करणारा, हाडवैराचा, खुनशी.

Rănd, *n.* (रॅन्ड)—strip of leather between heel and shoe or boot; (S.-Afr.) highlands on either side of river-valley. बुटाचा आंतील पातळ तळ,-तळवा; तडा, टेंच. *The Rand,* जोहान्सबर्ग.

Răndăn', *n.* (रॅन्डॅ'न्)—1. a boat for one sculler and two oarsmen. तिघांनीं वसून जाण्यासारखी होडी. 2. *n.* spree (esp *on the r.*). ख्यालीखुशाली, चैन, नाचरंग, झिंगून दंगामस्ती करणें.

Răn'dom, *n.* (रॅ'न्डम्)—*At random,* haphazard, without aim or purpose. संधानावांचून, वाटेल तसा, बिनहिशेबी, यदृच्छेनें होईल तसा. *a.* made or done at random; (of masonry) with stones of irregular size or shape. नेम न धरतां मारलेला; भरमसाट; ओबडधोबड दगडांचा, वेडावांकडा. *To talk at random,* बरळणें, भरकटणें, हवें तें बोलणें.

Răn'dȳ, *a.* (रॅ'न्डि)—having a rude aggressive manner; loud-tongued; (of cattle etc.) wild, restive, lustful. गांवढळ, जंगली; मोठ्यानें वटवट-बडबड-करणारा; रानटी, ओढाळ (गुरूं); ऐषआरामी, चैनी, व्यसनी. *n.* loud-tongued, coarse-mannered woman; a scold. बडबड,-वटवट,-करणारी आडदांड स्त्री; अपशब्द बोलणारी स्त्री.

Rang, *p. t.* of Ring.

Rānge, *n.* (रेंज्)—a row, line, tier, or series of things; piece of ground with targets for shooting; sphere; scope, compass; register; distance passed over by gun or projectile; cooking fireplace; stretch of grazing or hunting ground. ओळ, रांग; निशाणबाजी करण्याची जागा; टप्पा, पल्ला, पोहोंच, आटोका, मर्यादा; नोंदणी; मारा, टप्पा; चुलींची रांग; मोठें कुरण, शिकारीची जागा. *v. t. & i.* to place or arrange in a row or ranks; to extend, to reach; to vary between limits; to rove, to wander; sail along coast or about sea; throw projectile over. रांगेनें किंवा व्यवस्थित लावणें; सरकणें, पसरणें; पोंचणें; कमीजास्त होणें; भटकणें, हिंडणें, फिरणें, चालणें; कडेनें जाणें; विशिष्ट अंतरापर्यंत मारा करणें. *R.-finder,* instrument for finding distance of object to be shot at. निशाणाचें अंतर मोजण्याचें यंत्र. *Of a long range,* पल्लेदार, लांब पल्ल्याची (बंदूक). *Ranging fancy,* inconstant affections. चंचल प्रेम,-स्नेह. *To range oneself,* take up definite position in society, settle down, e. g. by marrying. समाजांत आपलें स्थान मिळविणें, स्थायिक

होणें. *Ranges with the great writers,* (ranks or finds place *with* or *among*). थोर लेखकांच्या मालिकेंत स्याला स्थान आहे, थोर लेखकांत मोडतो. *Out of range,* आटोक्याबाहेर.

Ră'nger, *n.* (रें'न्जर्)—one who ranges; the keeper of a royal park; (*pl.*) mounted force; senior girl-guide. भटकणारा; जंगलखात्याचा अधिकारी; घोडदळ, घोडेस्वार; मुलींचें वरिष्ठ (बालवीर) पथक.

Ră'ngy, *a.* (रें'न्जि)—(colloq.) (U. S.) capable of ranging; of long slender form. रांग-व्यवस्थित-लावण्यालायक; सडपातळ, बारीक व लांबट आकाराचें.

Rănk, *n.* (रँक्)—row, queue; soldiers in single line abreast; (*pl.*) common soldiers; distinct social class; station; place in a scale. ओळ, रांग; लष्करी शिपायांची रांग; (अने॰) सामान्य लष्करी शिपायांचा वर्ग; विशेष दर्जा; स्थिति; वर्गातील अनुक्रम, स्थान, जागा. *a.* too luxuriant; coarse; loathsome, disgusting; flagrant, gross. उफाड्याचा, जोमदार, कसदार, फार सुपीक; साधा, कमी दर्जाचा; किळसवाणा; ठळक, कमालीचा, निखालस. *v. t. & i.* to arrange in rank; assign a rank to; have relative rank; (Mil.) march past or off. रांगेनें उभें करणें,-बसविणें; योग्य स्थान असणें,-होणें; वर्गवारी,-प्रत,-लावणें; कूच करणें. *The ranks* or *the rank and file,* common soldiers, lower classes. सैन्यांतील खालच्या दर्जाचे सैनिक,-शिपाई; खालच्या दर्जाचे लोक. *To rise from the rr.,* सामान्य दर्जाच्या शिपायापासून वरिष्ठ दर्जाला चढणें, (सामान्य मनुष्य) खालून वर चढणें. *To keep r., break r.,* रांगेंत राहणें, रांग मोडणें. *Persons of r.,* members of nobility. सरदार लोक. *R. and fashion,* high society. उच्च समाज, बडे लोक. *Rank'ly, adv.*; *Rank'ness, n.*

Răn'kle, *v. i.* (रँ'कल्)—to gnaw at the heart; to cause recurring pangs. मन खाणें; सलणें, डांचणें, टोंचणें.

Răn'săck, *v. t.* (रँ'न्-सॅक्)—to search the recesses of, to search thoroughly; to pillage. धुंडाळणें; लुटणें, लुबाडणें. [ON *rann,* house; *saekja,* seek]

Răn'som, *n.* (रँ'न्-सम्)—redeeming of a captive; money or other consideration paid for pardon; blackmail, extortion of money. पैसे भरून कैद्याची मुक्तता; कैद्याच्या सुटकेकरितां दिलेला पैसा, खंडणी, दंड, भीति घालून पैसा उकळणें. *v. t.* to secure release of by paying ransom; redeem; expiate. (खंडणी भरून) सुटका करणें, सोडवणें, बंधमुक्त करणें; सुटका करणें; प्रायश्चित्त देणें. *To hold one to r.,* ओलीस ठेवून घेणें, दंड भरून सुटका करण्यासाठीं अडवून ठेवणें. *Worth a king's r,* of immense value. बहुमोल, अतिशय महत्त्वाचें,-किंमतीचें. *R.-bill,-bond,* undertaking, esp. on part of captured ship, to pay *r.* खंडणी,-दंड,-देण्याचा लेखी करार.

Rănt, *v. i. & t.* (रँन्ट्)—to use bombastic language; recite theatrically; preach noisily. शब्दावडंबरानें बोलणें; नाटकी पद्धतीनें म्हणणें; बडबड लावणें, बडबड करून शिकविणें. *n.* piece of ranting, tirade; empty turgid talk. बटबट, शब्दावडंबर, बडबड, अधिक्षेप, निरर्थक आवेशयुक्त भाषण. *Ran'ter, n.* noisy preacher. आवेशयुक्त भाषण करणारा (मत) प्रचारक.

Ranŭnc'ŭlus, *n.* (रॅन'क्युलस्)—(pl.-*luses,-li*), kinds of plant including butter-cup. एक जातीची वनस्पति.

Răp, *n.* (रॅप्)—a smart slight blow; sound of this, esp. on door, a knock, esp. on door. रपाटा, तडाका; थाप; ठोका, आवाज. *v. t. & i.* to deal a rap to; to make the sound of a rap; to carry away. तडाखा,-सपाटा मारणें, ठोकणें; थाप मारणें; पळवणें. *A rap on the knuckles,* punishment inflicted on child; reproof. (मुलांच्या हाताच्या) पेरावर (शिक्षा म्हणून) तडाखा मारणें, रपाटा मारणें; रागें भरणें; कान उपटणें. *To rap out* (oath, pun, etc.), utter abruptly or on the spur of the moment. आवेशानें उद्गारणें, ठोकून देणें, ऐन वेळीं बोलणें; (of spirits) ठोक्यांनीं-आवाजानें-संदेश देणें.

Răp, *n.* (रॅप्)—a skein of 120 yds of yarn. १२० वार लांब सुताची लडी.

Răp, *n.* (रॅप्)—an atom, the least bit (*don't care a r*). तसू, अणु, लवमात्र, किंचित्.

Rapā'cious, *a.* (रपे'शस्)—grasping, greedy of plunder, avaricious; extortionate; predatory. अधाशी, लोभी; बळजबरीनें पैसे उकळणारा; लुटारू. *Rapa'city, n.*

Rāpe, *n.* (रेप्)—carrying off by force; violation of chastity. जबरदस्ती, लूट, अपहार, जबरी, जुलमानें घेऊन जाणें; बलात्काराचा स्त्रीसंभोग; बलात्कार. *v. t.* to carry off by force; violate chastity of (woman), ravish. लुटणें, जबरदस्तीनें नेणें; बलात्कार करणें, गहजब करणें, अब्रू घेणें, जबरी करणें.

Rāpe, *n.* (रेप्)—plant used as food for sheep; plant with oil-yielding seed; refuse of grapes; vessel used in vinegar-making; any of six administrative divisions of Sussex. शेळ्यामेंढ्यांना खाण्यासारखी वनस्पति; शिरस; द्राक्षांचा चोथा; दारू तयार करण्याचें भांडें; ससेक्स् परगण्याच्या पोटविभागापैकीं एक.

Ră'pid, *a.* (रॅ'पिड्)—speedy, swift; descending, steep. जलद, शीघ्र; उभ्या उताराचा, सुळक्यासारखा खोल. *n.* steep descent in river-bed causing swift current. नदीचा खोल व जलद प्रवाह, शीघ्र प्रवाहाचें नदींतील ठिकाण. *Rap'idly, adv.* जलदीनें, घाईनें, लगबगीनें.

Răpid'itў, *n.* (रॅपि'डिटि)—swiftness, quickness of motions, celerity. जलदी, त्वरा, शीघ्रता, जोर, वेग.

Ră'pier, *n.* (रे'पिअर्)—a light slender sword for thrusting only, small-sword. खुपसण्याची चौधारी तरवार, खांडा. *R. thrust,* (*fig.*) (of delicate or witty repartee). हजीरजबाबीचा,-सफाईदार,-टोमणा-उत्तर.

Răp'ine, *n.* (रॅपिन्)—plundering. लुटणें, लुटालूट.

Rappee', *n.* (रॅपी')—coarse kind of snuff. एक जातीची तपकीर.

Rapport', *n.* (रॅपो'र्ट्)—communication, relationship, connexion. संबंध, एकतान. [F]

Răpprŏche'ment, *n.* (रॅप्रॉश्‌'मां)—re-establishment or recommencement of harmonious relations (between states). संगनमताचा किंवा सलोख्याचा पुनरारंभ, समेट, सलोखा, पुनरैक्य.

Răpscăll'ion, *n.* (रॅप्स्कॅ'ल्यन्)—a rascal, scamp, rogue. लुच्चा, उडाणटप्पू, शठ, लबाड.

Răpt, *a.* (रॅप्ट्)—carried away in spirit; absorbed; enraptured. तल्लीन, तन्मय, गढून गेलेला; विचारमग्न; आनंदमग्न. *Listen with rapt attention*, तल्लीन होऊन, -एकाग्रतेनें,-ऐकणें,-लक्ष देणें.

Răptor'ial, *a.* (रॅप्टॉ'अरिअल्)—predatory. लुटारू, अधाशी; (zool.) of the *Raptores*, an order ot birds of prey. हिंस्र पक्ष्यांचा.

Răp'ture, *n.* (रॅ'प्चर्)—ecstatic delight, extreme joy or pleasure, ecstacy. अत्यानंद, आल्हाद. *To be in, go into, rr.* रंगांत येऊन बोलणें, खुशींत येणें. *Rap'turous, a.*

Rār'a ā'vĭs, *n.* (रेअ'रं एव्हिस्)—kind of person or thing rarely met with. क्वचित् मिळणारा-दिसणारा-मनुष्य, वस्तु. [L, = rare bird]

Rāre, *a.* (रेअर्)—thin, not dense; scarce, uncommon, seldom occurring, of uncommon excellence, remarkably good; (U. S.) (of meat) underdone. पातळ, विरळ, सूक्ष्म; विरळा, दुर्लभ; सर्वोत्कृष्ट, सरस, नामी, अपूर्व; अर्धवट; शिजविलेलें, अर्धकच्चें (मांस). *Rare'ness, n.*

Rār'ĕfy̆, *v. t. & i.* (रे'अरिफाय)—to lessen the density of (air, etc.); refine; make (idea) subtle; become less dense. विरळ करणें,-होणें, पातळ करणें; शुद्ध करणें; अधिक सूक्ष्म करणें; विरल होणें. *Rarefac'tion, n.* पातळ करणें, विरलीभवन. *Rarefica'tion, n., Rar'efactive, a.*

Rāre'ly̆, *adv.* (रे'अर्-लि)—in a rare degree or manner, seldom, not often. विरळा, क्वचितच.

Rār'ity̆, *n.* (रे'अरिटि)—thinness, rareness, uncommonness; a rare thing. विरळपणा; अपूर्वता; अपूर्व वस्तु.

Rā'scal, *n.* (रा'स्कल्)—rogue, knave. लबाड, शठ, लुच्चा, हरामी.-*dom, Rascal'lity, nn., Ra'scally, a.* लुच्चा, पाजी, लुच्चेगिरीचा, सोदेपणाचा.

Răsh, *n.* (रॅश)—skin eruption in spots or patches. त्वचेवरील पुरळ. *a.* hasty, impetuous, overbold; reckless. उतावीळ; फाजील धीट; अविचारी, अदूरदर्शी. *Rash'ly, adv., Rash'ness, n.* अविचार, उतावळेपणा, साहस.

Răsh'er, *n.* (रॅशर्)—thin slice of bacon or ham. मांसाचा पातळसा तुकडा.

Rāsp, *n.* (रास्प्)—coarse file with raised teeth. कानस, कानशी, किसणी. *v. t. & i.* to scrape with a rasp; scrape roughly; grate upon, irritate (person); make grating sound. कानशीनें घासणें; किसणें, तासणें, खरवडणें; संताप आणणें, लागणें, झोंबणें; कर्कश आवाज करणें.

Ras'patory, *n.* (रा'स्पटरि)—rasp used in surgery. (शस्त्रवैद्याचें) घर्षणयंत्र, कानस, घर्षणी.

Ra'spberry, *n.* (रा'झ्बेरि)—(garden shrub with) red or yellow fruit resembling raspberry. एक प्रकारचें तांबडें किंवा पिंवळें फळ, त्यांचें फळझाड.

Răt, *n.* (रॅट्)—kinds of rodent resembling but larger than the mouse; a person who deserts his party or his union. मोठा उंदीर, घूस; (अडचणीच्या वेळीं) स्वतःचा पक्ष सोडणारा, फुटून निघणारा, कामगारसंघांतून फुटून निघणारा, संपांत सामील न होणारा, संपवाल्याच्या जागीं काम करणारा. *v. i.* to hurt or kill rats; (Pol.) desert one's party. उंदीर घुशी-पकडणें,-ठार मारणें; स्वपक्षत्याग करणें. *To smell a rat*, have suspicions. शंका,-संशय-येणें, -वाटणें; वहीम येणें, (चा) वास येणें. *Like a drowned rat*, चिंब भिजलेला मनुष्य. *Rats!*, (*sl.*) nonsense! incredible! मूर्ख कुठला! अबब! *R.-catcher*, उंदीर पकडणारा, उंदीरमाऱ्या, शिकारीचा (नवीन तऱ्हेचा) पोषाख. *Rat'stane, r.*-poison (now only in lit. fig. use). उंदीर मारण्याचें औषध. *Rat's-tail*, उंदराच्या शेंपटीच्या आकाराची वस्तु (उदा. कानस). *Rat'tail*, घोड्याची चिनकेसांची शेपटी, अशा शेंपटीचा घोडा. *R.-trap*, (उंदराचा) सांपळा, पिंजरा, च्याप; दुचाकीचा दांताळ लोखंडी पायडा. *Ratt'y, a.* चिडखोर.

Rā'ta, *n.* (रेटा)—large handsome New Zealand tree with crimson flower and hard red wood न्यूझीलंडमधील एक सुंदर झाड.

Rătafi'a,-fee', *n.* (रॅटफी'आ,-फी')—liqueur flavoured with almonds, etc.; biscuit so flavoured; kind of cherry. एक प्रकारची बदामी चवीची दारू;-बिस्किट एक जातीचें फळ.

Rătaplăn', *n.* & *v. t.* & *i.* (रॅटप्लॅन्)—(make drumming sound. पडघम किंवा ढोल याचा आवाज (करणें); ढोलासारखा आवाज (करणें).

Rătch'ĕt, Rătch, *nn.* (रॅचिट्, रॅच्)—set of teeth in edge of bar or wheel with catch allowing motion in one direction only; (also *r.-wheel*) wheel with rim so toothed. दांतांची,-दांतवाली,-पट्टी; लंबकावरील धरसोडीचें चक्र; कुत्रेवालें (दांतवालें) चक्र.

Rāte, *n.* (रेट्)—statement of numerical proportion between two sets of things; the standard or way of reckoning; (measure of) value, tariff charge, cost, relative speed; assessment levied by local authorities. प्रमाण, मान; धारण, भाव, दर; मोल, भाडें, भाड्याचा दर; किंमत; चाल, प्रमाण, प्रकार; पट्टी, नवसूल, भाडें. *v. t. & i.* to estimate worth or value of; to consider, to regard *as*; to subject to

payment of a local rate; (Naut.) to class under a certain rating. दर किंवा किंमत ठरविणें, लेखणें, गणना करणें; कर बसविणें,-त्यावयास लावणें; (उतारूंचें) वर्गीकरण करणें. *Going at the rate of six miles an hour*, ताशीं सहा मैलांच्या वेगानें जाणारा. *Death-rate* मृत्यूचें प्रमाण. *R. of interest*, व्याजाचा दर. *At that r.*, (colloq.) if this is a fair specimen, if this assumption is true. हें खरें असेल तर, अशा रीतीनें. *At any r.*, कसेंहि असलें तरी, कांहीं झालें तरी. *Rate-payer*, person liable to pay local rates. कर भरणारा, पट्टी भरणारा इसम. *To rate up*, (विम्याचा) नेहमीपेक्षां अधिक हप्ता बसविणें.

Rāte, *v. t. & i.* (रेट्)—to scold angrily; storm *at*. खरडपट्टी काढणें, कानउघाडणी करणें; घसरा करणें.

Rā'teable, *a.* (रे'टेब्ल्)—liable to payment of municipal rates. (स्थानिक) कर बसविण्यालायक,-योग्य, करास पात्र.-*ability*, *n.*

Ra'tel, *n.* (रा'टल्)—S.-African carnivorous quadruped. एक मांसभक्षक पशु.

Rā'the, *a.* (रेद्)—(arch.) coming or blooming early. नेहमींपेक्षां लवकर येणारा,-फुलणारा.

Ră'ther, *adv.* (रा'दर्)—more truly; to a greater extent; somewhat; for choice; sooner; (colloq. in answer) assuredly, most emphatically. अगदीं खरें सांगावयाचें म्हटलें तर; बऱ्याच अंशीं, पुष्कळ अंशीं; अधिक, जास्ती; कांहींसा; पसंतीनें; लवकरच; खात्रीनें, खचित.

Rătĭfĭcā'tion, *n.* (रॅटिफिके'शन्)—confirmation. मंजुरी, संमति, अनुमति, कबुली.

Ră'tĭfȳ, *v. t.* (रॅ'टि फाय्)—to confirm or accept by signature or other formality. (सही करून किंवा संमति देऊन) कायम किंवा मंजूर करणें.

Rā'ting, *n.* (रे'टिंग्)—amount fixed as local or municipal rate; (Naut.) person's position or class in ship's books, (collect.) all persons of a particular rating; tonnage-class of racing-yacht. स्थानिक कराची (ठरीव) रक्कम; उतारूंचा (गलबतावरील) वर्ग, प्रत्येक वर्गांतील सर्व उतारू; शर्यत नौकांचें टनी वजनांप्रमाणें वर्गीकरण.

Rā'ting, *n.* (रे'टिंग्)—angry scolding. खरडपट्टी, रागानें कानउघाडणी करणें.

Rā'tiō, *n.* (रे'शिओ)—(*pl.-os*), the relation or proportion of one thing to another. प्रमाण, परिमाण, गुणोत्तर, मान, दर. *are in the r. of two to three or 2:3*, दोहोंस तीन, २:३ या प्रमाणांत आहेत. *The ratios 1:5 & 20:100 are the same*, १:५ व २०:१०० हीं गुणोत्तरें सारखीं (एकच) आहेत.

Rătiō'cināte, *v. i.* (रॅटिऑ'सिनेट्)—to argue, to reason formally; to use syllogisms. युक्तिवाद करणें; उपपत्ति सांगणें; तर्कपद्धतीनें विचार करणें.-*tion*, *n.* तर्कपद्धती. *Ratio'cinator*, *n*-;-*tive*, *a.*

Ration, *n.* (रे'शन्. रॅ'शन्)—fixed daily allowance of food served out, (*pl.*) provisions. रतीब, शेर, शिधा, अन्न. *v. t.* to limit (person, food) to rations. अन्नसामुग्री नियमित करणें,-वांटून देणें.

Ră'tional, *a.* (रॅ'शनल्)—endowed with reason, able to reason; agreeable to reason; sensible; sane; moderate; of or based on reasoning; (Math. of quantity or ratio) expressible without radical signs (opp. surd). तर्कज्ञ; बुद्धिविशिष्ट, विचारवान्, सुज्ञ; शाहाणा; माफक; सयुक्तिक; अकरणीगत. *n.* (*pl.*) rational dress. युक्त पोषाख. *Has r. leanings in religion*, has doubts about the truth of revelation, the possibility of miracles, etc. त्याची धर्मविषयीं बुद्धिप्रामाण्यता आहे, सयुक्तिक श्रद्धा. *R. function*, अकरणीगत फल. *R. creature*, बुद्धिविशिष्ट प्राणी. *Ra'tionally*, *adv.* तर्कशक्तीनें, बुद्धीनें, समंजसपणानें. *Rational'ity*, *n.* बुद्धिविशिष्टता, तर्कशक्ति, विवेक, समंजसपणा.

Rationā'lĕ, *n.* (रॅशने'लि)—fundamental reason or logical basis of. उपपत्ति, कार्यकारणपरंपरा, आधार, प्रमाण.

Ră'tionalism, *n.* (रॅ'शनॅलिझम्)—practice of explaining the supernatural in religion in a way consonant with reason, or of treating reason as the ultimate authority in religion as elsewhere; theory that reason is the foundation of certainty in knowledge. (धर्माच्या बाबतींत) बुद्धिप्रामाण्यवाद, बुद्धिवाद; (ज्ञान हें बुद्धिमूलक आहे असा) बुद्धिमूलक ज्ञानवाद. *Ra'tionalist*, *n.* & *a.* बुद्धिप्रामाण्यवादी, बुद्धिवादी.-*istic*, *a.* बुद्धिवादाचा, बुद्धिवादात्मक.

Ră'tionalize, *v. t.* & *i.* (रॅ'शनलाइझ्)—to bring into conformity with reason; be or act as a rationalist; (Math.) clear from surds; (Econ.) reform (an industry) by making production balance consumption, and by co-operation of rival producers and of capital and labour. बुद्धिवादाचा करणें, बुद्धिवादी करणें, बुद्धीला पटेलसें करणें; बुद्धिप्रामाण्यवादी असणें; अकरणीरूप देणें; (मालाच्या) उठावाइतकी पैदास; प्रतिस्पर्धी धंदेवाल्यामध्यें संघटना, भांडवल व मजूर यांची संघटना करून उद्योगधंद्यांची सुधारणा करणें.-*zation*, *n.* (esp.) cooperative and scientific organization in industry. उद्योगधंद्यांत सहकारी तत्त्व आणि शास्त्रीय पद्धति आणणें.

Ră'tlin (e),-ling, (रॅटलिन्,-लिंग्)—(usu. pl.) small line (s) fastened across ship's shrouds like ladder-rungs. (डोलकाठीच्या दोरखंडांना बांधलेली) आडवी दोरी, (या शिडीच्या पायऱ्यांप्रमाणें असतात).

Ratoon', *n.* & *v. i.* (रटून्)—(send up) new shoot springing from sugar-cane root after cropping. (पहिल्या वर्षाच्या कापणीनंतरचा) उंसाचा खोडवा, खडवा (फुटणें).

Rattăn', *n.* (रटॅन्)—a palm with long thin many-jointed stems; cane of this. वेताचें झाड, वेताची काठी, वेत, छडी.

Ratt'en, *v. t.* (रॅटन्)—to molest (workman or employer) by abstracting or injuring tools or machinery. (संपाच्या वेळीं हत्यारें काढून घेऊन किंवा यंत्राची नासधूस करून) मजुराला किंवा कारखानदाराला त्रास देणें,-सतावणें.

Răt'tle, *v. i. & t.* (रॅटल्)—to give out rapid succession of short sharp sounds; to cause such sounds by shaking something; move or fall with rattling noise; make move quickly; (sl.) shake nerves of, hustle, frighten; talk in lively thoughtless way (often *on, away, along*); to say or recite rapidly. (गाडी) खडखडणें, घरघरणें, (ढग) गडगडणें, (वीज) कडकडणें, खडखड वाजविणें,-आवाज करणें; घडघडत जाणें किंवा पडणें; जलदीनें-झपाट्यानें चालविणें,-जाणें; गर्भगळीत करणें, धांदल उडविणें, भिवविणें; बडबडत सुटणें, लवलव बोलणें, भरभर-घाईनें-किंवा पाठ म्हणणें, भडाभड बोलणें, *Rattling,* (part.) brisk, vigorous; remarkably (*good*). जोराचा, सोसाट्याचा; अतिशय, फारच (चांगलें). *n.* an instrument or play-thing made to rattle; set of horny rings in rattle-snake's tail; rattling sound; incessant talker; kinds of plant with seeds that rattle in their cases when ripe; empty chatter, trivial talk. खुळखुळा, खुळखुळी काठी; खडखड्या नागाच्या शेंपटीवरील वाटोळीं कडीं,-खवले; गडगडाट, खडखडाट; वटवट करणारा; कांहीं (फुल) झाडांचीं खुळखुळ्यासारखीं वाजणारीं सुकया बियांचीं घोंसें; वटवट, बडबड. *R.-snake,* खडखड्या नाग. *Rattler, n.* (sl.) first-class specimen; (U. S.) rattlesnake. उत्कृष्ट नमुना; खडखड्या नाग. *To rattle the sabre,* threaten war. तलवारींचा खणखणाट उडणें, लढाई-युद्ध-उपस्थित होणें. *To r. fox,* to hunt it close. कोल्ह्याची जवळून शिकार करणें. *R. bill through the House,* कायदेमंडळांत घाईघाईनें ठराव पास करून घेणें. *Death-r.,* मरणापूर्वीची घशांतील घरघर. *The rattles,* croup. मुलांचा घशांचा रोग. *Rattle-brain,-head,-pate,* (person with) empty brain. बिनडोक्याचा, निर्बुद्ध, ढोंग्या, डोक्यांत घटाटे भरलेला (मनुष्य). *R.-brained,-headed,-pated, aa. R.-trap, n. & a.* rickety (vehicle etc.); (pl.) curiosities, odds & ends. मोडकी खिळखिळी (गाडी); सटरफटर (जिनसा, वस्तु).

Răt'ty, *a.* (रॅटि)—(sl.) irritable, touchy. चिडखोर.

Rauc'ous, *a.* (रॉकस)—hoarse; harsh-sounding. घोगरा, घोगऱ्या आवाजाचा; कर्कश आवाज असलेला.

Rau'pō, *n.* (रॉउपो)—Naw Zealand bulrush used for thatching roofs etc. लव्हाळा.

Răv'age, *v. t & i.* (रॅव्हिज्)—to lay waste, to plunder; to make a havoc. नासधूस करणें, लुटणें; उध्वस्त करणें. *n.* (*usu. pl.*) devastation, havoc. नासधूस, सत्यानाश.

Rāve, *v. i. & refl.* (रेव्ह्)—to talk wildly or deliriously or enthusiastically; (of sea or wind) to howl or roar. वेड्याप्रमाणें बडबडणें, वेडांत बडबडणें, बरळणें, आरडाओरड करणें; (समुद्र किंवा वारा) घोंघों वाहणें, सोसाट्यानें वाहणें.

Răv'el, *v. t. & i.* (रॅव्हेल्)—to disentangle; to entangle, to make intricate. उकलणें, गुंता काढणें; गुंतागुंत करणें. *n.* tangle; complication; frayed or loose end. गुंतागुंत; भानगड; सुटें (सुताचें) टोंक, बाहेर आलेलें सूत.

Răv'elin, *n.* (रॅव्हलिन्)—(fortif.) outwork of two faces forming salient angle outside main ditch in front of the curtain. (तटबंदीचा) बाहेरचा तट.

Rā'ven, *n.* (रेव्हन्)—a large black bird of prey of the crow kind; (*attrib.*) black. डोंबकावळा; काळा. *R. locks,* black hair. काळेभोर केंस.

Ră'ven, *v. t. & i.* (रॅव्हन्)—to seek prey or plunder; to devour voraciously; have ravenous appetite (for). भक्ष्य किंवा लूट शोधणें; अधाशीपणानें खाणें, पोटांत खाखा उठणें, वखवखणें.

Ră'venous, *a.* (रॅव्हेनस)—furiously voracious; famishing, eager for gratification. अधाशी; वखवखलेला.

Răv'in, *n.* (रॅव्हिन्)—(poet, rhet.) robbery, rapine; seizing and devouring of prey; spoil. चोरी, लूटमार; भक्ष्य पकडून खाणं; लुटालूट.

Răvine', *n.* (रॅव्हीन्)—a deep and narrow gorge; mountain-cleft. दरी, खोरें, खिंड; घळण, घळ, नाला, ओहोळ. *R. buck,-deer,* the Indian gazelle. एक जातीचा मृग, हरीण, सांबर. [F, = violent rush]

Răv'ish, *v. t.* (रॅव्हिश्)—to carry off by force; to commit a rape upon; to enrapture, to fill with delight. हिरावून नेणें, बलात्कारानें नेणें, हरीआड करणें; (स्त्रीवर) बलात्कार करणें, भ्रष्ट करणें; आनंदमग्न करणें, संतोषविणें, मोहित करणें, भुलविणें. *Rav'ishment, n.* पळकावणें. बलात्कार, अत्यानंद. *Rav'ishing, a.*; *Rav'isher, n.* बलात्कार करणारा.

Raw, *a.* (रॉ)—uncooked; unwrought; crude inexperienced, unskilled; stripped of skin; sore, sensitive to touch; (of weather) damp and chilly. कच्चा; अपक्व; अल्लड, अननुभवी, अप्रबुद्ध कातडी निघालेला, कातडी काढून टाकलेला; कोंवळा, नाजूक; सर्द, दमट (हवा). *n.* a raw place on the skin. चोळवटलेली,-खरचटलेली,-जागा. *v. t.* to rub (esp. horse's back) into rawness. (घोड्याच्या पाठीला) खरारा करणें. *Raw cream,* (दूध तापविल्याशिवाय काढलेली) कच्ची मलई. *R. brick,* कच्ची वीट. *R.-silk,* कच्चें रेशीम, *R.-cloth,* बिन खळीचें कापड. *R.-hide,* न कमावलेलें चामडें. *R.-spirit,* undiluted. पाणी न मिसळलेला मद्यार्क. *R.-material,* कच्चा माल *R.-boned,* with bones almost exposed, हाडकुळा. *R.-head and bloody bones,* nursery bug-bear, death's head and crossbones; (attrib.) crudely horrible (style). बागुलबुवा, बाऊ; रौद्र, भयानक (लेखनपद्धति). *Raw'ish, a.* कच्चासा, कोंवळासा, अर्धवटसा.

Ray, *n.* (रे)—a single line or narrow beam of light; analogous propagation line of heat

other non-luminous physical energy; beginning of enlightening influence; marginal part of daisy, etc.; radial division of starfish; radius of a circle; any of a set of radiating lines or parts or things. किरण, कर, रश्मि; किरण, तंतु, अवशेष, बिंदु; पुष्पाचा परिघ; चक्राकार माशाच्या दोन त्रिज्यांमधील विभाग,-त्रिज्यात्मक विभाग; त्रिज्या; समकेंद्र रेषांपैकीं-वस्तूंपैकीं-एक. *v. i. & t.* to come or send out in or like rays. चकाकणें, बाहेर (किरण) टाकणें, चकचकीत करणें, प्रकाशित करणें. *Rontgen*, or *X, rays*, क्ष-किरण. *Bacquerel rr.*, rays emitted by radio-active bodies. किरणकार्यकारी वस्तूंतून बाहेर टाकलेले किरण. *A r. of hope*, आशेचा किरण,-अंश. *Ray'ed, a.* किरणात्मक, किरण असलेला.

Ray, *n.* (रे)—kinds of edible sea-fish allied to shark. एक जातीचा खाण्यालायक मोठा खारा मासा.

Ray'on, *n.* (रे'यान्)—artificial silk. कृत्रिम बनावट रेशीम, बनावट रेशीम. [F.]

Rāze, Rāse, *v. t.* (रेझ्)—to destroy completely, to demolish, to extirpate; level with the ground; to wipe out. पूर्णपणें नाश करणें, सपाट करणें, जमीनदोस्त करणें, धुळीस मिळवणें; पुसणें, पुसून टाकणें.

Rā'zor, *n.* (रे'झर्)—an instrument for shaving. वस्तरा. *R.-back*, sharp ridge (as *r.* back hill); (U. S.) kind of half-wild hog. तीक्ष्ण,-तुटलेली-कडा; अर्धवट रानटी डुकर. *R.-bill*, kinds of bird with bill shaped like razor. वस्तऱ्याच्या आकारासारखी चोंच असलेले पक्षी. *R.-edge*, sharp mountain ridge; critical situation. पर्वताची तीक्ष्ण-तुटलेली-कडा; आणीबाणीचा प्रसंग. *R.-fish,-shell*, bivalves with shell-like razor-handle. वस्तऱ्याच्या मुठीप्रमाणें कवच असलेले मासे. *R. strop*, पलाटणें, लपाटणें.

Răz'zle (-dăzzle) *n.* (रॅ'झल्डॅझल्)—(sl.) excitement, bustle; spree; undulating merry-go-round. गडबड, धांदल; धांगडधिंगा; (जत्रेंतील) वरखालीं होणारें लांकडी घोड्याचें यंत्रानें फिरणारें चक्र.

Rē, *pref.* (री) -once more, again, anew, afresh, back. फिरून, पुन्हां, उलट. *prep.* in the matter of (च्या) विषयीं, बाबतींत, संबंधीं. *R. infe'cta*, without. having accomplished one's object. आपलें काम न बजावतां,-होतां.

Reach, *v. t. & i.* (रीच्)—to stretch out (the hand etc.), to extend; to get as far as, to attain to, to arrive at; to amount to; to pass or take with outstretched hand. पसरणें, विस्तारणें; जाणें, पोहोंचणें; भरणें, होणें, एकंदर होणें; हात लांब करून देणें किंवा घेणें. *n.* act of reaching; range of the hand; power of the mind; compass, scope; continuous extent, esp. a straight stretch of river; (Naut.) tack. पोचणें; आटोका, अवसान, सुमार, आवांका, पोहोंच, टप्पा; दोन वळणांमधील दृष्टीच्या टापूंत येणारें नदीचें सरळ पात्र; दोर, शिडाचा कोंपरा, गलबताची दिशा. *Out of reach*, आटोक्याबाहेर, *Reach'-me-down, a. & n.* (sl.) ready-made (garment). तयार (कपडा). *Reach'able, a.* पोहोंचण्याजोगा, आटोक्यांतला, आहारांतला. *My income will not reach to it.* माझें उत्पन्न-मिळकत-तितकें भरणार नाहीं. *Mind reaches forward to an ideal*, ध्येय गांठण्याचा-ध्येयापर्यंत पोचण्याचा-प्रयत्न मन करतें. *As far as the eye could reach*, दृष्टि पोचते तोंपर्यंत, नजर पोचते तोंपर्यंत.

Reăct', *v. i.* (रि-ॲ'क्ट्)—to act in return, to produce a reciprocal or responsive effect; to respond to stimulus; undergo change due to some influence; (Chem. of substance applied to another) call out activity, cause manifestation; (Mil.) make counter-attack (s); be actuated by repulsion *against*, tend in reverse or backward direction. उलट परिणाम होणें, उलट कार्य घडणें; उलट खाणें, प्रतिकार करणें, फेरफार,-बदल,-रूपांतर होणें; प्रतिक्रिया घडणें; उलट हल्ला करणें, प्रतिहल्ला चढवणें, प्रतिसारण घडणें; उलट बाजूस जाणें, उलट खाणें, प्रतिगामी होणें.

Reăc'tion, *n.* (रि-ॲ'क्शन्)—response to stimulus; responsive or reciprocal action (esp. *action & re-action*); (Chem.) action set up by one substance in another; retrograde tendency in politics, etc.; (Mil.) counter-stroke; return of previous condition after interval of opposite (e. g. glow felt after cold bath). उलट, प्रतिक्रिया; (क्रियाप्रतिक्रिया, आघातप्रत्याघात); प्रतिकार्य, प्रतिक्रिया; पिछेहाट, माघार, पिछेहाटीचें (राजकारणी) धोरण; प्रतिहल्ला; विरुद्ध क्रियानुभवानंतर प्राप्त होणारी पूर्वस्थिति.

Reăc'tionarў, *a.* (रिॲ'क्शनरि)—retrograde; recoiling from progress. प्रतिगामी; उलट खाणारा, प्रतिक्रियात्मक. *n.* a retrograde person. पिछेहाटीचा पुरस्कर्ता.-*tionist, n. & a.*

Read, *v. t. & i.* (रीड्)—to interpret mentally; to divine; to peruse and reproduce mentally; to study by reading; find (thing) stated, find statement, in print; interpret in certain sense; present (figure etc.) to one reading it. वाचणें, पढणें; भविष्य सांगणें; मनन करणें; अभ्यास करणें; वाचनांत येणें,-आलेलें असणें; अर्थ लावणें, उपपत्ति लावणें, अर्थ सांगणें; दर्शविणें. *n.* time spent in reading. वाचनांत घालविलेला काळ,-वेळ. *To r. person's hand*, हस्तसामुद्रिक पाहणें. *To r. the sky*, आकाशाकडे पाहून हवामानाचा अंदाज सांगणें. *To r.* one *a lesson*, admonish him. ची कानउघाडणी करणें, खरडपट्टी काढणें. *Reading man*, who devotes most of his time to study. अतिशय अभ्यासू मनुष्य. *Read me to sleep*, मला झोंप लागेपर्यंत वाच, *Thermometer reads 35°*. उष्णतामापक यंत्राचा पारा ३५ अंशावर आहे. *To r. between the lines*, search for or discover hidden meanings. गर्भितार्थ ओळखणें,-ताडणें,-शोधून काढणें.

Read, (रेड्)—*pa. t. & pa. p. & a.* वाचलेला; *a well-read man*, बहुश्रुत मनुष्य.

Read'able, *a.* (री'डबल्)—interestingly written; legible. वाचनीय, मनोरंजक; वाचतां येण्याजोगा, स्पष्ट. *-ability, n.*

Read'er, *n.* (रीडर्)—(*esp.*) a publisher's private critic; a printer's proof-corrector; a university lecturer; a book of selections for educational purpose. प्रकाशकाचा सल्लागार-टीकाकार; छापखान्यांतील मुद्रें-मुद्रितें-तपासणारा; विश्वविद्यालयांतील शिक्षक; क्रमिक वाचनपुस्तक. *R.-ship,* office of university reader. विश्वविद्यालयांतील व्याख्यात्याची जागा.

Read'ing, *n.* (रीडिंग्)—perusal of a book; literary knowledge; variation found in another MS or book; one of the three stages of a Bill in each House of Parliament; entertainment at which something is read; interpretation or view taken of; figure etc. shown by graduated instrument. वाचन; पुस्तकी ज्ञान; पाठ, पाठांतर; कायद्याचें स्वरूप मिळण्यापूर्वी कायदेकाउन्सिलांत बिलाचें वाचन; जाहीर वाचन; अर्थ, संगति,-लावणें; तर्क, कल्पना; (भारमापक, उष्णतामापक यंत्रानें) दर्शविलेला अंक, -आंकडा. *R. desk,* desk for supporting book, etc. (वर पुस्तक ठेवून) वाचण्याचें मेज. *R.-room,* room in club, etc. for persons wishing to read. वाचनाची खोली, सार्वजनिक वाचनालय. *First r.,* permitting introduction. (ठरावाचें,-बिलाचें) पहिलें, -प्राथमिक,-वाचन. *Second r,* approving general principles. बिलाचें सामान्य तत्त्व मान्य करण्यासाठीं दुसरें वाचन. *Third r.,* accepting details as amended in committee. शेवटच्या मंजुरीचें तिसरें वाचन.

Rea'dily, *adv.* (रेडिलि)—without reluctance; willingly; easily. आढेवेढे न घेतां; खुषीनें; सहजगत्या.

Rea'diness, *n.* (रेडिनिस्)—prompt compliance; prepared state, promptitude; quickness in argument or action. तयारी, सिद्धता, उत्सुकता; शीघ्रता.

Rea'dy, *a.* (रेडि)—with preparations complete, unreluctant; fit for immediate use or action, in fit state, willing, quick, facile, within reach. तयार, सादर, उभा, सिद्ध, सज्ज; खूप असलेला; वापरण्याला योग्य किंवा तयार; सुस्थितींत असलेला; उत्सुक, उद्यत, इच्छा असलेला; रोखठोक, रोकडा, दक्ष, चपळ, चलाख, हुशार, सोईचा, सोईस्कर, सुगम; जवळचा, हातासरसा. *adv.* beforehand, in readiness. आगाऊ, तत्परतेनें, तयारीनें. तयारींत. *n.* position in which rifle is held before the present; (*sl.*) ready money. ('तयार!' असा हुकूम सुटण्यापूर्वी) शिपायाच्या बंदुकीची सिद्धता, नेम; रोकड, नगद, पैसा. *Ready, present, fire!* (बंदूक सोडण्याच्यापूर्वी दिलेले तीन हुकूम). *Ready-witted, a.* हजरजबाबी, समयसूचक. *To make r.,* prepare. सज्ज करणें, सिद्ध करणें, तयारींत राहणें,-असणें. *R.-money,* actual coin, payment on the spot. रोकड, नगदी पैसा, रोखीचा सौदा, व्यवहार, रोख पैसे मोजणें,-देणें. *R.-reckoner,* book of tables for use in commerce, etc. (व्याज, किंमती वगैरे आकारतांना सोयीचें) तयार-आकारणी-पुस्तक.

Ready'-māde, *a.* (रेडि-मेड्)—(of clothes) made to standard sizes. आयता, तयार, तयार करून ठेवलेला (कपडा).

Rēa'gent, *n.* (रीएजंट्)—(Chem.) substance used to detect presence of another by reaction, reactive substance or force. प्रतिक्रियाद्रव्य, परीक्षकद्रव्य, प्रतिक्रियोत्पादक शक्ति.

Re'al, *n.* (रिअल्)—Spanish monetary unit (about 2½ d.). अडीच पेन्स किंमतीचें स्पेन देशांतील नाणें.

Re'al, *a.* (रिअल्)—actually existing or occurring, objective, genuine, consisting of immovable property such as land or house. अस्तित्वांत असलेली, वास्तविक, मूर्त, प्रत्यक्ष, सत्य, खरी, स्थावर. *Real money,* coin, cash. रोकड पैसा, नाणें, नगद. *R. presence,* of Christ's body and blood in the Eucharist as disputed by theologians. (प्रभुभोजनाच्या वेळीं ख्रिस्ताच्या शरीराची व रक्ताची) प्रत्यक्ष विद्यमानता (ही विवादिक गोष्ट आहे). *R. life,* that lived by actual people, opp. to fictitious and dramatic imitations. वास्तविक जीवन (काल्पनिक किंवा नाटकांत सोंग घेतल्यासारखें नव्हे!). *R. estate,* स्थावर मालमत्ता.

Re'alism, *n.* (रिअलिझम्)—fidelity of representation, truth to nature; doctrine that general ideas have objective existence. हुबेहूबपणा, यथार्थता, सत्यता; वास्तववाद. *Realistic, a.* यथार्थ, सत्य स्वरूपाचें, हुबेहूब, वास्तव, वस्तुगत.

Rēal'ity, *n.* (रिॲलिटि)—being real; likeness to the original; existent thing, real existence; the real nature of. खरेपणा; सत्यस्थिति, सत्य वस्तु, वास्तवता, सत्यता, वस्तुस्थिति, प्रत्यक्ष,-सत्स्वरूप, वस्तुगतता. *In r.,* in fact. वस्तुतः, खरोखरी.

Rē'alize, *v. t.* (रीअलाइझ्)—to convert (a hope, plan, &c.) into fact, make realistic, to apprehend clearly; to convert into money; to fetch as price; amass. साधणें, प्राप्त करून घेणें, कृतींत आणणें, मूर्त स्वरूप देणें, अनुभव घेणें; विकून रोख किंमत घेणें, किंमत येणें, संपत्ति मिळविणें. *Realiza'tion,* कृतींत आणणें, साधणें, साक्षात्कार; वसूल करणें, उगाणी. *Rē'alizable, a.*

Re'ally, *adv.* (रिअलि)—in fact; positively. वस्तुतः, खरोखर. *Really?,* is that so? असें काय! खरें का?

Rē'alty, *n.* (रीअल्टि)—real estate. अचल धन, स्थावर इस्टेट, प्रदेश, प्रांत.

Realm *n.* (रेल्म्)—kingdom; sphere, domain. राज्य, प्रदेश, प्रांत, विषय.

Ream, *n.* (रीम्)—twenty quires or 480-500 sheets of paper. कागदाचें रीम, ४८० ते ५०० कागदांचे ताव. *Printer's r.,* 516 sheets or 21½ quires. ५१६ कागदांचें रीम. (*pl.*) large quantity of paper. पुष्कळ कागद, रिमेच्या रिमें.

Reap, *v. i. & t.* (रीप्)—to cut (grain, &c.) with sickle or machine; to gather harvest from field; to gather in as harvest or reward, to receive as fruit of labour. शेत कापणें; कापणी करणें; फळ मिळणें, संपादन करणें, कापणें, भोगणें. *Reaping hook,* sickle. कोयता, विळी, धान्य कापून पेंढ्या तयार करण्याचें यंत्र. *To reap as one has sown, sow wind and r.*

whirlwind, r. the fruits of, take consequences of one's actions. केल्या कर्मांचीं फळें भोगणें, करावें तसें भरावें. *To r. where one has not sown*, profit by other's toil. आयत्या बिळावर नागोबा होणें, आयत्या पिठावर रेघोट्या ओढणें, दुसऱ्याच्या मेहनतीचा फायदा घेणें.

Reap'er, *n.* (री'पर्)—one who reaps; a machine employed to reap. कापणी करणारा; कापण्याचें यंत्र.

Rear, *v. t. & i.* (रिअर्)—to raise, to build; to bring up, to breed, to cultivate, educate, foster, raise, nourish, grow, (of a horse, &c.) to stand upright on hind legs. उठविणें, बांधणें; लहानाचा मोठा करणें, वाढविणें, पालनपोषण करणें, मोठा करणें, शिकविणें, शिक्षण देणें, उभारणें, उत्पन्न करणें; मागील पायांवर उभा राहणें. *n.* back part of anything, esp. an army or fleet; space or position at the back; (*colloq.*) *w. c. or latrine*; (*attrib.*) hinder, back. पिछाडी, पाठीमागचा भाग; सुंडी, शौचकूप; मागचा, शेवटचा, पिछाडीचा. *Rear'er, n.* वाढविणारा, उंच करणारा, उभारणारा. *To hang on the rear of*, follow with view to attacking. (हल्ला करण्याच्या हेतूनें) पिछाडीवर, पाठीं पाठीं,-राहणें. *Bring, close up, the r.*, come last. सर्वांच्या मागून,-शेवटीं,-येणें. *Take enemy in r.*, attack from behind. शत्रूंच्या पिछाडीवर हल्ला करणें. *Far in the r.*, behind. पाठीमागें. *At the rear of*, behind. च्या पाठीं,-पाठीमागें. *Rear'most, a.* सर्वांच्या पाठीं असलेला, अगदीं पाठचा. *Rear admiral*, flag-officer below vice-admiral. जहाजावरील तिसऱ्या दर्जाचा अधिकारी. *Rear-guard*, पिछाडीची तुकडी, टोळी. *Rear'-ward. a., adv. & n.*; *Rear' wards, adv.* मागें, पाठीकडे, पिछाडीकडे.

Rē-arm', *v. t.* (रीआर्म्)—to provide (troops) with arms of new pattern. (सैन्याला) नवीन तऱ्हेचीं हत्यारें-शस्त्रास्त्रें-देणें, नवीन शस्त्रास्त्रांनीं सज्ज करणें. *Re-arm'ament, n.* आधुनिक पद्धतीची यंत्रसामुग्री.

Reas'on, *n.* (री'झन्)—fact adduced or serving as argument, motive, cause, or justification, the intellectual faculty by which things are judged; sanity; sensible conduct; moderation.; (Log.) one of premises of syllogism, esp. minor premiss when given after conclusion; intellect personified; (in Kant's philos.) faculty transcending the understanding and providing a priori principles, intuition. मुद्दा, हेतु, प्रयोजन, निमित्त, कारण, सबब; बुद्धि। विचारशक्ति, तर्कशक्ति; शहाणपणा; विवेक; रास्तपणा; न्यायीपणा, नेमस्तपणा; (तर्क०) हेतु, प्रमाण; बुद्धि, विचार; (तत्त्व०) प्रतिभा, स्फूर्ति, सहज स्फूर्ति, सहजावबोध. *v. i. & t.* to use argument *with* person by way of persuasion; form or try to reach conclusions by connected thought; think out (consequences etc.). युक्तिवाद,-बुद्धिवाद,-करणें, समजुतीचें बोलणें करणें; तर्क करणें, अनुमान काढणें; वाद करणें, उहापोह करणें, (वर) विचार करणें, संबंधीं विचार करणें. *The woman's reason*, repetition of fact as its own explanation (*e. g. I love him because I love him.*). एकाच गोष्टीची द्विरुक्ति करणें, (स्त्रियांचें) एकच गोष्ट कारण म्हणून सांगणें. *R. of state*, political justification, esp. for immoral proceeding. राजकीय हेतु; कारण. *He complains with r.*, not unjustifiably. त्याच्या म्हणण्यांत तथ्य आहे, तें सकारण आहे. *To bring to r.*, induce to cease from vain resistance.समजुतीवर,ताळ्यावर-आणणें. *It stands to r.*, would be generally admitted. तें ग्राह्य आहे, योग्य आहे, युक्त आहे. *Hear or listen to r.*, suffer oneself to be persuaded. समजूत होणें,-पटणें; अक्कल ऐकणें. *With or without r.*, हक्कनाहक्क. हकनाक, वळेंच. *Rea'soning, n.*

Rea'sonable, *a.* (री'झनेबल्)—sound of judgement, moderate; inexpensive; not extortionate. समंजस; समजूतदार; माफक; कमी खर्चाचा; योग्य, रास्त, नेमस्त, माफक. *Rea'sonableness, n, Rea'sonably, adv.* अक्कलेनें, शहाणपणानें, योग्य रीतीनें; सुमाराचा, बेताचा.

Rēassure', *v. t.* (री-अशुअर्)—to restore to confidence, to dispel apprehensions of. पुन्हां आश्वासन देणें, धीर देणें; भीति नाहींशी करणें.

Reave, Reive, *v. i. & t.* (रीव्ह्)—(arch., poet.; pa. t. & p. p. *reft.*) to commit ravages (usu. *reive*), take by force; carry off. जाळपोळ करणें, बळजबरी करणें, लुटालूट करणें, बळजबरीनें नेणें. *Rei'ver, n.* (री'व्हर्), robber. चोर, लुटारू.

Rēbāte', *v. t.* (रिबे'ट्)—to diminish, to deduct, to make a discount from; to reduce force or effect of, to blunt, to dull. कमी करणें, सूट देणें, कसर कापणें; तीक्ष्णता कमी करणें, बोथट करणें. *n.* (usu. री'बेट्) discount. कसर, द्यावयाच्या रकमेंतून कमी केलेली रक्कम.

Re'bĕck, *n.* (री'बेक्,रे-)—early form of fiddle with three strings. तीनतारी जुन्या काळची सारंगी.

Rĕ'bel, *n.* (रे'बल्)—a person who rises in arms against established government; a person who resists authority or control. राजद्रोही; बंडवाला. (attrib.) rebellious, of rebels, in rebellion. बंडखोर, राजद्रोह्यांचा किंवा बंडखोरांचा; दंगेखोर; राजद्रोही. *v. i.* (रिबे'ल्)—to act as a rebel (*against*), to manifest repugnance to some custom, &c. बंड किंवा दंगा करणें; °वर उठणें, विरुद्ध उठणें, न जुमानणें.

Rēbĕll'ion, *n.* (रिबे'ल्यन्)—armed resistance to an established government; violent resistance to authority. बंड करणें, बंड; अधिकाऱ्यांविरुद्ध दंगा, धुडगूस. *The Great R.*, period of history, 1642-60. इंग्लंडच्या इतिहासांतील १६४२-६० मधला बंडखोरीचा काळ.

Rēbĕll'ious, *a.* (रिबे'ल्यस्)—in rebellion; disposed to defy authority; (of diseases, things) difficult to treat, unmanageable, refractory. दंगेखोर; सत्ता

किंवा अधिकार न जुमानणारा; इलाज न चालणारा, आटोक्यांत न येणारा, शिरजोर.

Rebound', *v. i. & n.* (रिबा'उन्ड)—to spring back after impact; recoil upon agent. उसळी मारणें; उलट खाणें; कार्यावर उलट परिणाम होणें,-उलटणें. *To take* one *on* or *at the r.*, utilize reaction after emotion to persuade him to contrary action. मनांत आलेल्या उसळीचा उलट क्रिया करविण्याकडे उपयोग करणें,-प्रवृत्त करणें.

Rebuff', *n. & v. t.* (रिब'फ्)—to check, to snub, to repulse. टोला, थप्पड, नकार, वाटाण्याच्या अक्षता, मागें ढकलणें.

Rebuke', *v. t. & n.* (रिब्यू'क्)—to reprimand, to reprove, reproof, शब्दाचा मार, धमकी, दबावणी, धमकावणें.

Rebut', *v. t.* (रिब'ट्)—to force back; to refute, to disprove (evidence, charge). मागें हटवणें; खंडन करणें, प्रत्युत्तर देणें; खोडून टाकणें,-काढणें, खोडणें. *Rebutment, Rebut'tal, nn.; Rebutt'ing, pr. p.* खोडून काढणारा, खंडन करणारा.

Recal'citrant, *a. & n.* (रिकॅ'लिसट्रन्ट्)—refusing compliance; refractory. मान्यता न देणारा; दांडगा, शिरजोर, हटवादी, हट्टी, (मनुष्य). *Recal'citrance, n.*

Recal'citrate, *v. i.* (रिकॅ'लिसट्रेट्)—to kick *against*, or *at* rules, refuse compliance, be refractory. लाथाडणें, न जुमानणें, झुगारून देणें, नापसंती दर्शविणें, दुराग्रह धरणें, हट्ट धरणें,-करणें.

Recall', *v. t.* (रिकॉ'ल्)—to summon back; to bring back to memory, remember; to revoke, annul; cancel appointment of (official sent overseas); revive, resuscitate. माघारा बोलावणें, आठवण करणें, स्मरणें; फिरवणें, बदलणें, परत घेणें, रद्द करणें; परत बोलावून रद्द करणें, पुनः जिवंत करणें, पुन्हां जीव आणणें. *n.* summons to come back; (U. S. pol.) removal of public official from office before expiration of his term by popular vote. माघारा किंवा परत बोलावणें; लोकमतानुसार अधिकाऱ्याला अधिकारावरून कमी करणें. *Recallable, a.*

Recant', *v. t. & i.* (रिकॅ'न्ट्)—to disavow former opinion, to unsay, to detract one's words. पहिलें मत फिरवणें; (चुकीचें म्हणून) परत घेणें, चूक कबूल करणें. *Recanta'tion, n.*

Recapit'ulate, *v. t. & i.* (रीकॅपि'टयुलेट्)—to summarize; to go quickly through again; to give an epitome. (कलमवार) सारांश देणें, संक्षेपानें सांगणें; पुनः गोषवारा सांगणें; सिंहावलोकन करणें.*-tion, n.* संक्षेप, गोषवारा, सारांश, सिंहावलोकन.*-tor, n.,-tive, -tory, aa.* सारांशरूपाचा, गोषवाऱ्याचा.

Recast', *v. t.* (रीका'स्ट्)—to put into new shape; to amend the form of. पुन्हां ओतणें, नवा घाट पाडणें, नवीन रूप देणें; पुन्हा नवीन रचना करणें.

Recede', *v. i.* (रिसी'ड्)—to go or shrink back; to slope backwards; to withdraw, (from engagement, opinion), to retreat; to decline in value. पाऊल माघारें घेणें, कच खाणें, हटणें, मागें पडणें; पाठीमागें सरणें; माघार घेणें, किंमत-महत्त्व-कमी होणें. [L. *re*, back, *cedere*, to go]

Receipt', *n.* (रिसी'ट्)—recipe; an amount of money received (*usu. in pl.*); fact or action of receiving or being received into person's hands or possession, written acknowledgement of money received. यादी, याद, पाठ; जमेची रक्कम; पैशाची पोंच; पोंच, भरपाई; जमा, पावती. *v. t.* to give receipt for. पावती लिहिणें, -देणें, पोंच देणें. (arch.) *R. of custom*, custom-house where money is officially received.. जकातीचें-जकात घेण्याचें-सरकारी ठिकाण.

Receive', *v. t. & i.* (रिसी'व्ह्)—to accept the delivery of; to take into one's hands or possession; to allow, to entertain as a guest, to welcome; to accept as true; to get, to come by; bear up against, stand force or weight of, encounter with opposition. घेणें, पावणें; स्वीकारणें; जागा देणें, आदरातिथ्य करणें; खरें आहे असें मानणें, मान्य असणें,-करणें; मिळणें, प्राप्त होणें, येणें; (वजन) सहन करणें, (भार) सोसणें, प्रतिकार करणें. *To r. stolen goods*, (as thief's accomplice). चोरीचा माल ठेवून घेणें, चोराचा साथीदार होणें. *R. a letter, news*, पत्र-बातमी, पोचणें,-मिळणें. *Lord, r. my soul.* (dying man's prayer. मरणाऱ्या मनुष्याची प्रार्थना). *Receiv'ed, pa. t. & pa. p. & a.; Recei'vable, a.*

Receiv'er *n.* (रिसी'व्हर्)—(*esp.*) a person appointed to administer debtor's or disputed property; apparatus designed to receive wireless messages, &c. (also *receiving set*); ear-piece of telephone; person who receives stolen goods. कर्जदाराच्या किंवा वादग्रस्त अशा मालमत्तेची व्यवस्था पाहणारा अधिकारी; बिनतारेचा संदेश वगैरे घेण्याचें यंत्र, टेलिफोनचें कानाला लावण्याचें यंत्र, ग्राहक; चोरीचा माल ठेवून घेणारा. *Receiv'ership, n.* कोर्टानें नेमलेल्या वहिवाटदाराचा हुद्दा, जागा.

Recen'sion, *n.* (रिसे'न्शन्)—revision of a text; a revised text. मूळ लेखाची दुरुस्ती, ग्रंथशोधन, ग्रंथशुद्धी; शुद्ध केलेला मूळ ग्रंथ.

Re'cent, (री'सेन्ट्)—not long past, late; not long established, modern. अलीकडचा; अर्वाचीन, ताजा, नवा. *Re'cency, n.* नवेपणा, ताजेपणा, नूतनता; अर्वाचीनता. *Re'cently, adv.* नुकताच, नवीन, अलीकडे. *Re'centness, n.*

Recep'tacle, *n.* (रिसे'प्टेकल्)—a vessel or space or place for containing things; (Bot.) common base of floral organs, axis of cluster. पात्र, आधार, आशय, धारदान; (अनेक फुलांचा सर्वसाधारण) पुष्पाशय, पुष्पाधिष्ठान, पुष्पासन (उदा० झेंडूच्या फुलांतील खोबरें).

Recep'tion, *n.* (रिसे'प्शन्)—receiving or being received into a place or company; receiving of ideas or impressions into the mind, mental acceptance, recognition of something as true or advi-

sable : welcome of specified kind. शिरकाव, प्रवेश, स्वीकार, अंगीकार ; (मनानें) ग्रहण करणें, अंगीकार, स्वीकार, ग्रहण ; स्वागत, आदरातिथ्य, संभावना, स्वागत-समारंभ. *R. room,* बसण्याउठण्याची खोली,-जागा (*opp. bedroom*). *Warm r.*, vigorous resistance or enthusiastic welcome. जोराचा प्रतिकार, संभावना, किंवा मनःपूर्वक आदरातिथ्य,-स्वागत. The general *r.* of the Newtonian hypothesis, न्यूटनच्या अनुमानांचा सार्वत्रिक स्वीकार.

Rĕcĕp'tīve, *a.* (रिसे'प्टिव्ह्)—able or quick to receive ideas, etc. ; (rare) concerned with receiving. ग्राहक, ग्रहणक्षम, ग्रहणशील ; घेण्यासंबंधीं, स्वागतसंबंधीं. *Recep'tivity, n.* ग्रहिष्णुता, ग्राहकता.

Rĕcĕss', *n.* (रिसे'स्)—vacation ; niche or alcove, retired or secret place ; receding of water, land, glacier, etc. from previous limit, amount by which it recedes, recession (rare) ; (Anat.) fold or indentation in organ. विराम, मधली सुटी ; कोनाडा ; एकान्त, एकान्तस्थान,-जागा ; परतणें, मागें हटणें, माघार, उलट ; पर्वताच्या रांगेंतील मागील भाग ; नलिकाकार पोकळ जागा, नलिकाविवर. *v. t.* to place in a recess, set back ; provide with recesses. कोनाड्यांत ठेवणें, मागें ठेवणें ; कोनाडे, एकान्त जागा,-तयार करणें.

Rĕcĕ'ssion, *n.* (रिसे'शन्)—receding, withdrawal, from a place or point ; preceding part of object, recess. परतणें, मागें हटणें ; आंत गेलेला,-मागें हटणारा,-भाग. *Rece'ssive, a.* receding. मागें जाणारा, माघार घेणारा. *Rece'ssional, a. & n.* (of hymn) sung while clergy and choir withdraw after service ; of the parliamentary recess. प्रार्थनेच्या शेवटीं निघून जाण्याच्या वेळीं म्हणण्याचें (गीत) ; पार्लमेंटच्या सुटीचा, सुटीसंबंधीं. *the R.*, poem of Kipling in *the Five Nations* sung on imperial occasions. किप्लिंग कवीची बादशाही दरबाराचे वेळीं म्हणण्याची कविता.

Rĕchauffe, *n.* (रिशो'फे)—warmed up dish ; rehash. ऊन केलेलें अन्न ; जुन्या साधनांवरून तयार केलेले ग्रंथ.

Rĕcherche, *a.* (रशे'अर्शे)—choice, far fetched (esp. of meals or words carefully thought out). दुर्मिळ, दुःसाध्य, विचारपूर्वक शोधून काढलेला, तयार केलेला.

Rĕcĭd'ivism, *n.* (रिसि'डिव्हिज़म्)—habitual relapse into crime. गुन्हेगारीची प्रवृत्ति, संवय. *Recid'ivist, n.*

Rĕ'cĭpē, *n.* (रे'सिपि)—statement of ingredients and procedure for a medicine or dish ; nostrum. औषधांची यादी, औषधपत्रिका, चिकित्सापत्र, पक्वान्नांचा पाठ ; गुप्त औषध, वट्टी. [L *recipe*, take thou (abbr. R. in prescriptions)]

Rĕcĭp'ĭent, *n.* (रिसि'पिअन्ट)—one who receives, the person who accepts something. ग्राहक, घेणारा, घेऊन पावणारा. *Recip'iency, n.* ग्राहकता, ग्रहण करणें.

Rĕcĭp'rŏcal, *a.* (रिसि'प्रोकल्)—in return ; mutual ; expressing mutual relation, inversely correspondent, complementary ; (Gram.) expressing mutual action or relation. बदल, उलट, परस्पर, अन्योन्य, परस्परसंबंधदर्शक, उलट तसाच. उलट तोच, पूरक *n.* (*Math.*) expression so related to another that their product is 1. ज्या पदाचा दुसऱ्या पदाशीं गुणाकार 1 होतो तें पद, व्युत्क्रम. (1/5 is the r. of 5). *R. term,* व्युत्क्रमपद. *Recip'rocally, adv.* परस्पर, परस्परां, परस्परें, व्युत्क्रमेंकरून.

Rĕcĭp'rŏcāte, *v. t. & i.* (रिसि'प्रोकेट)—to interchange ; to requite in kind ; (Mech.) go with backward and forward motion. अदलाबदल करणें ; विनिमय करणें, मोबदला करणें,-देणें, उलट देणें, उलट करणें ; मागेंपुढें होणें,-जाणें. *Recip'rocator, n.*; *Reciproca'tion, n.* विनिमय, परस्पर देवघेव, व्युत्क्रमीकरण.

Rĕcĭprŏ'cĭty, *n.* (रेसिप्रॉ'सिटि)—reciprocal condition mutual action ; principle or practice of give and take, esp. interchange of privileges between states as basis of commercial relations. परस्पर-अन्योन्यता, व्यापारी संबंधांत (राष्ट्राराष्ट्रांतील) परस्पर भाव, देवाण घेवाण, अदलाबदल, विनिमय.

Rĕcī'tal, *n.* (रिसा'इटल्)—a detailed account or narration of facts ; instrumental, musical or dramatic performance by one person ; act of reciting ; part of document stating facts. सविस्तर हकिगत, निरूपण ; नाटकांतील नकला पाठ म्हणणें, चिजा वाजवून दाखविणें, पाठ म्हणणें, तोंडपाठ म्हणणें ; वस्तुस्थितीनिदर्शक कथन.

Rĕcĭtā'tion, *n.* (रेसिटे'शन्)—(*esp.*) reciting as entertainment ; a piece recited. करमणुकीकरितां म्हणणें ; पाठ, तोंडपाठ म्हणून येण्याकरितां दिलेला उतारा.

Rĕcĭtative', *n.* (रेसिटटी'व्ह्)—musical declamation as in narrative and dialogue of opera and oratorio ; words, part, given in *r.* नाटकांतील वर्णन व संवाद यांतील संगीतक, संगीताचा भाग, संगीताचे-गाण्यांतील-शब्द,-भाग.

Rĕcīte', *v. t. & i.* (रिसा'इट)—to repeat aloud ; to declaim from memory ; to enumerate ; (Law) rehearse facts in document. मोठ्यानें वाचून दाखवणें मोठ्यानें म्हणणें ; पाठ म्हणणें ; कथन करणें ; सांगणें, (कागदपत्रांतील गोष्टींची) सुनावणी करणें, सुनावणें.

Rĕcī'ter, *n.* (रिसा'इटर्)—person who recites ; book of pieces for recitation. तोंडपाठ म्हणणारा ; तोंडपाठ करण्याच्या उताऱ्यांचें पुस्तक.

Rĕck, *v. i. & t.* (रेक्) (rhet. poet.) (in neg. & interrog. sentences only) to reck it, take account of. लक्ष देणें, लक्ष पुरविणें, पर्वा करणें, काळजी वाळगणें.

Rĕck'lĕss, *a.* (रे'क्-लिस)—regardless of consequences ; rash, heedless, having no care or concern. परिणामाकडे लक्ष न देणारा ; बेपरवा, अविचारी, बेफिकीर, साहसी. *Reck'lessly, adv.*; *Reck'lessness, n.*

Rĕck'on, *v. i. & t.* (रे'कन्)—to ascertain number or amount of by counting or calculation ; to compute ; to settle accounts *with* a person ; to

rely or base *upon*; (chiefly southern U. S.) think, suppose, to answer *for*. मोजून,-गणती करून, -ठरविणें; मोजणें, गणती करणें; हिशेब करणें किंवा पाहणें; भरंवसा ठेवणें; अवलंबून राहणें; अदमास करणें, अंदाज करणें; कल्पना बांधणें; जाब,-झाडा,-हिशेब देणें. *To r. without* one's *host*, सामनेवाल्याचा विचार न करणें, गांठ कोणाशीं आहे हें न पहाणें. (*Ready*) *reckoner*, (व्याजाचा, पगाराचा, वगैरे कोष्टकावरून) हिशेब आकारण्याचें पुस्तक, आकारणीपुस्तक.

Rĕckon'ing, *n.* (रेक्'निंग)—tavern bill (arch.); account of time; accounts of debtor and creditor; calculation. खानावळीचा आकार; बिल; वेळाची गणती; मोजणी: कर्जाचे हिशेब; मोजणें; गणती; मोजणी. *Day of r.*, time when something must be atoned for or avenged. (चा) झाडा,-जाब,-देण्याचा दिवस. *Be out in one's r.*, mistaken in calculation or expectation. अदमास चुकणें, अंदाज चुकणें.

Rėclaim', *v. t.* & *i.* & *n.* (रिक्लेम्)—to win from vice or error; to reform, to civilize; to bring (waste land) under cultivation; make protest, say in protest (rare). मार्गावर किंवा ताळ्यावर आणणें; सुधारणें, विद्याचारसंपन्न करणें; (ओसाड जमीन) लागवडीस आणणें, समुद्र हटवून जमीन निर्माण करणें; निषेध करणें,-दर्शविणें. *Past* or *beyond reclaim*, मार्गावर, ताळ्यावर, न येण्याजोगा; लागवडीस न येण्याजोगी. *Reclaim'able, a.*

Rĕ'clinate *a.* (रेक्लिनट)—(Bot.) bending downwards. अवनत, खालीं वांकलेला.

Rėcline', *v. t.* & *i.* (रिक्लाइन्)—to assume or be in recumbent position, to lean back or sideways; to rely *upon*. रेलणें, टेंकून राहणें, निजणें, पासल घेणें, अंग टेकणें, पाठीमागें किंवा बाजूला टेंकणें; अवलंबून असणें.

Rėcluse', *a.* (रिक्लूस्)—living in retirement or isolation. एकान्तांत राहणारा, एकान्तवासी. *n.* a recluse person; a hermit. एकान्तवासी मनुष्य; तपस्वी, योगी [L. *re*, again; *clandere*, to shut up]

Rĕcogni'tion, *n.* (रेकग्नि'शन्)—act of recognizing; acknowledgement. ओळखणें, ओळख; प्रत्यभिज्ञा; कबुली. *Reco'gnitory, a.*

Rĕc'ognizable, *a.* (रे'कग्नाइझेबल्)—that can be identified or detected. ओळखतां येण्याजोगा, ओळखण्यासारखा.-*bility, n.*

Rėcogn'izance, *n.* (रिकॉ'निझन्स)—bond by which person engages before court or magistrate to observe some condition; sum pledged as surety of such observance. (न्यायाधिशापुढें) लिहून दिलेला करार,-जातमुचलका; जातमुचलक्याची रक्कम.

Rėcogn'izant, *a.* (रिकॉ'निझन्ट)—showing recognition or consciousness of. ओळख ठेवणारा,-दाखविणारा, (ची) जाणीव असलेला.

Rĕc'ognize, *v. t.* (रे'कग्नाइझ्)—to know again, to identify as known before; to accord a notice or consideration to; to realize; to admit *that*. जाणणें, ओळखणें, पसंती दर्शविणें; कबूल करणें, मान्य करणें, पसंत करणें. *Recognized schools*, सरकारनें मान्य केलेल्या शाळा.

Rėcoil', *v. i.* (रिकॉ'इल्)—to start back, to shrink in horror or disgust or fear; to rebound after impact; (of fire-arms) kick, be driven backwards by discharge. मागें हटणें, दचकणें; उलटणें, माघार खाणें,-घेणें; मागें हिसका बसणें,-धक्का बसणें, मागें येणें, उशी खाणें. *n.* the fact or sensation of recoiling. माघार, उलट; हिसका, उशी. [L. *re*, again; *cul.*, posterior]

Rĕcollĕct', *v. t.* (रेकले'क्ट्)—to succeed in remembering; to call to mind, to collect again. स्मरणें; आठवणें; आठवण करणें. *To r. oneself*, शुद्धीवर,-ठिकाणावर,-येणें.

Rĕcollĕc'tion, *n.* (रेकले'क्शन्)—person's memory or time over which it extends; remembrance, something recalled to mind. स्मृति, स्मरणकाल, संस्मृति; आठवण, स्मरण. *It is in my r. that*, I remember that. मला असें स्मरतें कीं, माझ्या आठवणींत आहे कीं, *Recollec'tive, a.*

Rĕcommĕnd', *v. t.* (रेकमे'न्ड्)—to commit to the care of; to commend as fit for employment, &c.; to advise (course of action, &c.); (of qualities, conduct, etc.) make acceptable, serve as recommendation of. शिफारस करणें; सल्ला देणें; शिफारशीवजा असणें, ग्राह्य होणें.

Rĕcommĕndā'tion, *n.* (रेकमेन्डे'शन्)—a statement meant to recommend; quality that recommends something. तारीफ, प्रशंसा, शिफारस; शिफारशीला योग्य असा गुण, शिफारस-प्रशंसा-पत्र.-*atory, a.*;-*able, a.* प्रशंसनीय.

Rēcommit', *v. t.* (रीकमिट्)—to commit anew; refer back for further consideration. (ठराव वगैरे) पुन्हां विचारार्थ पाठविणें.-*ment*,-*al, nn.*

Rĕc'ompĕnse, *v. t.* (रे'कम्पेन्स्)—to requite, to make amends to, to compensate. बदला देणें, फेडणें; भरपाई करणें. *n.* reward; requital; compensation. बक्षीस; फेड, बदला; भरपाई.

Rĕc'oncile, *v. t.* (रे'कन्साइल्)—to make friendly after estrangement; to harmonize; make resigned; make compatible, show compatibility of; purify (place) by special service after desecration; heal quarrel. समेट करणें; एकवाक्यता करणें, मेळ बसवणें, ताळा घालणें; सादर होणें, हवाला ठेवणें; अनुरूप-योग्य-करणें, जुळवणें; संगति लावणें; (जागेची) शुद्धि करणें; (भांडण) मिटविणें. *Rec'oncilement, n.*; *Rec'oncilable, a.*; *Reconcilabil'ity, n.*

Rĕconciliā'tion, *n.* (रेकन्सिलिए'शन्)—friendship after estrangement, harmonization. समेट, मिलाफ; एकवाक्यता.

Rĕc'ondite, *a.* (रे'कन्डाइट)—hidden from view or intellect, abstruse; obscure. खोल, गहन; गूढ, दुर्बोध.-*ly, adv.*;-*ness, n.*

Recondi'tion, *v. t.* (रिकन्डि'शन्)—to overhaul and refit ship etc. फेरफार करून (गलबत वगैरे) दुरुस्त करणें, जीर्णोद्धार करणें.

Récŏnn'aissance, *n.* (रिकॉ'निसन्स)—military or naval examination of tract by detachment to locate enemy or ascertain strategic features; reconnoitring survey or party. (शत्रूची,-तटबंदीची,-) टेहळणी, पाहणी, टेहळणी करणारे लोक, -तुकडी. *R. in force*, सैन्याच्या तुकडीनें टेहळणीकरितां केलेला हल्ला.

Récŏnnoi'tre, *v. t. & i.* (रेकॉनॉ'इटर्)—to approach and try to learn the position and condition or strategic features of (enemy, district); to make reconnaissance. शत्रूची किंवा देशाची टेहळणी किंवा पाहणी करणें; टेहळणें, हेरणें. *Reconnoi'trer, n.,-tring, pr. p. & a.*

Récŏrd, *v. t.* (रिकॉ'र्ड्)—to register; to put in writing or other legible shape; celebrate; (of birds) practise (tune) by singing in an undertone. नोंदणें; नोंद करून ठेवणें; प्रसिद्ध करणें; खालच्या आवाजांत म्हणणें,-गाणें.

Rĕc'ord, *n.* (रे'कॉर्ड्)—recorded state, register; official report of proceedings; document or object that records (e. g. gramophone disk); facts known about a person's past; best performance on record; limit hitherto attained. नोंदणी, नोंद, दप्तर; सरकारी कामाकाजाची संगतवार हकीगत; लेख, फोनोची प्लेट,-तबकडी,-चांगडी; एखाद्याचा पूर्वेतिहास; अत्युत्तम ग्रंथ किंवा प्रयोग; आजपर्यंतची कमालीची मर्यादा, कमाल, शिकस्त. *Is on r.*, legally or otherwise recorded. दप्तरांत नमूद केलेलें-नोंदलेलें-आहे. *Matter of r.*, नमूद करून ठेवल्यामुळें सिद्ध-खरी-असलेली गोष्ट. *To travel out of the r.*, introduce irrelevant matter. गैरलागू गोष्ट पुढें आणणें,-मांडणें. *Keep to the r.*, मुद्देसूद बोलणें, गैरलागू गोष्ट पुढें न मांडणें. *Public R. office*, सरकारी दप्तर-कचेरी. *To break* or *cut* or *beat the r.*, outdo all predecessors. पूर्वीच्यांना (पूर्वीच्या नोंदींना, खेळाडूंना, खेळांना वगैरे) चीत मारणें, अप्रतिम (खेळ, वगैरे) दाखविणें. *At r. pace*, best hitherto recorded. अप्रतिम चालीनें,-वेगानें.

Récord'er, *n.* (रिकॉ'र्डर्)—In verbal senses; chief judicial officer of city or borough holding court of quarter sessions; (hist., usu. *pl.*) a kind of flute; recording apparatus in instruments. लिहून ठेवणारा, नोंद करणारा; सरकारी दप्तरदार; एक प्रकारची बांसरी, पांवा; (यंत्रांतील) लेखक, नोंदपत्र.

Récount', *v. t.* (रिका'उन्ट्)—to narrate the particulars of; to tell in detail; count again. तपशीलवार कथन करणें; सविस्तर सांगणें; पुन्हां मोजणें, गणती करणें.

Récoup', *v. t.* (रिकू'प्)—to recompense, to compensate, to indemnify, (Law) deduct, keep back (part of sum due), make such deduction. नुकसान भरून काढणें, भरपाई करणें; (नुकसानी कमी करण्याकरितां) काटणें, कमी करणें. *To r. oneself*, recover what one has expended or lost. पुन्हां परत मिळविणें, नुकसान भरून काढणें. *To r. one's health*, प्रकृति पूर्ववत् सुधारणें. *Recoup'ment, n.* नुकसान भरून देणें; (प्रतिवादीची) काटलेली रक्कम.

Récourse', *n.* (रिको'अर्स्)—resorting to some source of help, a resort in difficulty. अवलंबन, आधार, आश्रय, आसरा. *To have r. to*, adopt as adviser, helper or expedient. (चा) आश्रय करणें, आधार धरणें, अवलंब करणें.

Réco'ver, *v. t. & i.* (रिक'व्हर्)—to regain possession or use or control of; to reclaim; to bring or come back to life; to regain health after sickness, to come to normal state or position; secure restitution or compensation by legal process; get over, cease to feel effects of; retrieve. पुन्हां मिळविणें, भरून काढणें; प्रकृति सुधारणें, पूर्वस्थितीवर येणें; (कायदेशीर इलाज करून) वसूल करणें, नुकसानी भरून घेणें,-मिळविणें; बरें होणें, सुधारणें, थावरणें, रोगमुक्त होणें; भरपाई करणें, भरून काढणें. *n.* position to which sword etc. is brought back in fencing or drill, act of coming to this. (द्वंद्वयुद्धांत वगैरे) हत्यार माघारें घेऊन सांवरणें, अशा पवित्र्यांत राहणें. *To r. oneself*, regain consciousness or calmness or control of limbs or senses. शुद्धीवर,- पूर्वस्थितीवर,- येणें. *To r. one's legs*, stand up after fall. (पडल्यावर पुन्हां) सावरणें, उठून उभें राहणें. *R. sword*, bring it back after thrust, hold it upright with hilt opposite mouth. तलवार हात केल्यावर मागें घेणें, तलवार नाकासमोर सरळ धरणें. *Recovered the shore with difficulty*, मोठ्या मुश्किलीनें परत किनारा गांठला.

Réco'verў, *n.* (रिक'व्हरि)—restoration of something; restoration. पुनर्लाभ, वसूल, बरा करणें; रोगमुक्तता.

Rĕc'réant, *a. & n.* (रे'क्रिअन्ट्)—(rhet., poet.), craven, cowardly, apostate. लबाड, लुच्चा; भित्रा, भेकड; भ्रष्ट; क्रियानष्ट (मनुष्य). *Rec'reancy, n.* apostasy. भ्रष्टता, क्रियानष्टपणा. *Rec'reantly, adv.*

Rĕc'réate, *v. t. & i.* (रे'क्रिएट्)—to refresh, entertain; indulge in recreation, amuse oneself. श्रमपरिहार करणें, ताजातवाना करणें, मन रंजविणें, मनोरंजन करणें. *Rec'reative, a.* श्रमापहारक, मनोरंजक.

Rē-create', *v. t.* (रिक्रिए'ट्)—to create over again. पुनः उत्पन्न,-निर्माण,-करणें.

Rĕcréā'tion, *n.* (रेक्रिए'शन्)—a pastime; relaxation; amusement. क्रीडा, कौतुक; श्रमापहार, विसांवा; करमणूक.

Rĕc'rement, *n.* (रे'क्रिमन्ट्)—waste product, refuse; (physiol.) fluid separated from blood and again absorbed in it (e. g. saliva, bile). घाण, कचरा, गाळसाळ; (रक्तांतील) पुनःशोषित रस, पुनःपाचित रस (लाळ, पित्त वगैरे).

Recrim'ināte, *v. i.* (रिक्रि'मिनेट्)—to indulge in mutual counter charges; to retort an accusation upon another. उलट आरोप करणें; उलट दोष लावणें, उलट आळ घेणें.-*tion*,-*tor*,-*nn.*;-*tive*,-*tory*, *aa.*

Recriminā'tion *n.* (रिक्रिमिने'शन्)—a counter accusation. उलट आरोप किंवा दोष, उलटा दोषारोप; प्रत्यारोप, उलट फिर्याद.

Recrudesce', *v. i.* (रीक्रुडे'स्)—(of sore, disease, discontent, etc.) to break out again. उलटणें, फिरून उद्भवणें, उपटणें.—*des'cent*, *a.* फिरून येणारा, उलटणारा, उपटणारा.

Recrudes'cence, *n.* (रिक्रुडे'सन्स)—fresh or renewed outbreak. (दुखणें वगैरे) उलटणें, पुनः वाढणें; पुनरुद्भव.

Recruit', *n.* (रिक्रूट्)—newly enlisted and not yet trained soldier, peson who joins a society etc.; tiro (often *raw r.*). नवीन शिपाई, नवशिक्या सैनिक; संस्थेचा नवीन होणारा सभासद; नवशिक्या, उमेदवार. *v. t. & i.* to enlist recruits, to gain new supplies of men, to replenish; to reinvigorate; to recover health. (नवीन शिपायांची वगैरे) भरती करणें; भरती करणें; भरून काढणें; पुनः बळकटी आणणें; प्रकृति सुधारणें. —*ment*, *n.* सैन्यांत शिपायांची नवीन भरती, -भरणा. *Recruit'al*, *n.* (प्रकृति) सुधारणें, नीट होणें.

Rec'tal, *a.* (रेक्टल्)—of the rectum. गुदद्वाराविषयीं, मलमार्गविषयक.

Rec'tangle, *n.* (रेक्टंगल्)—a plane rectilinear four-sided figure with four right angles, esp. one with adjacent sides unequal. समचतुष्कोणाकृति, समकोन, आयत. [L. *rectus*, right; *angulus*, angle]

Rectang'ūlar, *a.* (रेक्टॅं'ग्युलर्)—shaped like a rectangle, right-angled, placed at right angles. समचतुष्कोणाकृति असलेला, काटकोनी, काटकोनांत ठेवलेला, काटकोनाचा. *Rectangula'rity*, *n.*; *Rectangu'larly*, *adv.*

Rec'tify, *v. t.* (रे'क्टिफाय्)—to put right, to correct, to make right what is wrong, exchange for what is right, abolish; (chem.) refine, purify by renewed distillation or other process; (Geom.) find straight line equal to curve. बरोबर करणें, सुधारणें, (चुकी) काढून टाकणें, दुरुस्ती करणें; (गाळून) शुद्ध करणें, प्रतिशोधन करणें; वक्ररेषेच्या लांबीची सरळ रेषा (शोधून) काढणें,-निर्माण करणें. -*fication*, *n.* चुकीची दुरुस्ती करणें, सुधारणा; शोधन; संशोधन.-*fier*, *n.*-*fiable*, *a.*

Rectilin'ear,-*eal*, *aa.* (रेक्टिलि'निअर्, ॰निअल्)—in or forming a straight line; bounded or characterized by straight lines. सरळ रेषेचा, सरळ रेषेंतील, सरळ रेषांनीं मर्यादित, सरलरेषात्मक.

Rec'titude, *n.* (रे'क्टिट्यूड्)—moral uprightness, integrity, probity, honesty, (rare) correctness, rightness. नैतिक सचोटी, नीतिमत्ता, खरेपणा, सरळपणा.

Rec'tō, *n.* (रे'क्टो)—right hand page of open book; front of leaf. (उघडलेल्या पुस्तकाचें) उजवीकडचें पान; पानाचा पुढचा दर्शनी भाग.

Rec'tor, *n.* (रे'क्टर्)—the parson of a parish; the head of some educational or religious institutions. धर्मोपदेशक; कांहीं शैक्षणिक किंवा धार्मिक संस्थांचा मुख्य.-*ial*, *a.*;-*ship*, *n.* धर्मोपदेशकाची द्र. जागा, अधिकार. *Rec'tory* *n.* parish rector's benefice or house. खिस्ती धर्मोपदेशकाची वृत्ति, त्याचें राहण्याचें ठिकाण. *Rec'torate*, *n.* रेक्टरची जागा, अधिकार.

Rec'tum, *n.* (रे'क्टम्)—final section of the large intestine, terminating of anus. गुदकांड, मलाशय, मळाचा कोठा.

Recum'bency, *n.* (रिक'म्बन्सि)—posture of lying, rest, repose, idle state. पडून राहणें, विश्रांति, पासल.

Recum'bent, *a.* (रिक'म्बन्ट्)—lying, leaning, reclining, reposing, inactive. आडवा पडून राहिलेला, पासला, आडवा, टेकून राहिलेला.-*ly*, *adv.* पासल घेऊन; कुशीस होऊन.

Recū'perate, *v. t. & i.* (रिक्यू'परेट्)—to restore, be restored, or to recover (from exhaustion, illness, loss, &c.). पुनः मिळविणें, सुधारणें, नुकसान भरून काढणें, आजारांतून उठणें, रोगमुक्तता होणें. *Recu'peration*, *n.*; -*tor*, *n*,-*tive*, *a.* पौष्टिक, शक्तिवर्धक (औषध).

Recur', *v. i.* (रिक'र्)—to go back in thought or speech *to*; to return to mind; to occur again; to be repeated. सुचणें, आठवणें, स्मरणें, स्मरण होणें, पुनः मनांत येणें; फिरून होणें, पुनरावर्तन होणें, पुनरावृत्ति होणें. *Recurring decimals*, आवर्त दशांश. *Recurring curve*, that returns upon itself. e. g. circle. आवर्तवक्र, वर्तुलाकार वक्ररेषा, वर्तुळ.

Recu'rrence, *n.* (रिक'रन्स्)—return. पुनर्घटना, पुनरुपस्थिति; स्मरण, आठवण.

Recu'rrent, *a.* (रिक'रंट्)—(of nerve, vein, branch etc.) turning back so as to reverse direction; occurring again or often or periodically. परत वळणारा, माघारीं येणारा; पुनः पुनः घडणारा, पुनरावर्तक्रम, आवर्तमान, वारंवार येणारा,-घडणारा. *n. r.* artery or nerve, esp. one of the two *r.* laryngeal nerves. आवर्तक (कंठनाडीस्थ) मज्जातंतु.-*ly*, *adv.*

Recurve', *v. t. & i.* (रिक'र्व्ह्)—to bend backwards. पाठीमागें वळणें,-वाकणें,-मुरडणें; पाठीं वळविणें.-*vate*, *a.* पाठीकडे वाकलेला, मागे वळलेला.-*vature*, *n.*

Recū'sant, *n.* (रिक्यू'झन्ट्)—person who refuses submission or compliance, esp. (hist.) one who would not attend Anglican services. सत्ता न जुमानणारा, मान न तुकविणारा, इंग्लिशचर्चची प्रार्थनापद्धति न मानणारा. *Recu'sancy*, *n.* [L. *re.*, against; *causa*, a cause]

Red, *a.* (रेड)—of a colour varying from crimson to orange; having to do with bloodshed, burning, violence or revolution. तांबडा, लाल, आरक्त, लोहित; रक्ताचा, रक्तपाताचा, आगीचा, अत्याचारी, क्रांतिकारक. *n* red colour; red cloth or clothes; red ball at billiards; radical or republican or anarchist. तांबडा रंग, लालट छटा; तांबडें

कापड, तांबडे-लाल-कपडे; 'बिलयर्डस' खेळांतील तांबडा चेंडू; जहाल, लोकसत्तावादी किंवा क्रांतिवादी मनुष्य. *Red-admiral*, a butterfly. एक जातीचें फुलपांखरूं. *R.*-bark, चांगल्या जातीचें सिंकोनाचें झाड. *R.-blind*, colour-blind to red. तांबडा रंग न ओळखणारा,-पाहणारा. *R.-breast*, the robin. लाल पोटरीचा रॉबिन पक्षी. *Red-cross*, St. George's cross, emblem of England; (emblem of) ambulance service in war organized according to Geneva Convention. इंग्लंडचें लाल क्रॉस असलेलें राष्ट्रीय चिन्ह; लढाईतील शुश्रूषापथक (त्याचें लाल क्रॉसचें चिन्ह). *R. ensign*, flag of British merchant-ships. ब्रिटिश व्यापारी जहाजांचें लाल निशाण. *R.-fish*, 'सामन' जातीचा मासा. *R.-flag*, symbol of revolution; battle signal, danger signal. (राज्य) क्रांतीचें निशाण; युद्धाचा बावटा, धोक्याची सूचना (*The R. F.*, अर्वाचीन क्रांतिगीत.) *R. gum*, teething rash in children; kinds of eucalyptus yielding reddish resin. लहान मुलांना दांत येतांना येणारा पुरळ; तांबडा चीक,-डिंक. *R.-herring* smoked herring; subject raised to distract attention from the point in hand. भाजून लाल झालेला 'हेरिंग' जातीचा मासा; चालू मुद्द्यावरून लक्ष दुसरीकडे लावण्याकरतां केलेलें विषयांतर (*Neither fish, flesh nor good r. herring.* अनिश्चित व घोंटाळ्यांत पाडणाऱ्या स्थितीचें). *R.-letter (day)*, marked with red letters in calendar as Saint's day or festival; (*fig.*) memorable as date of joyful occurrence. तांबड्या अक्षरांनीं दाखविलेला सणाचा दिवस; सुवर्णाक्षरांनीं लिहिण्यासारखा, संस्मरणीय (दिवस). *R. light*, danger signal on railways etc. धोक्याच्या सूचनेचा (रेल्वेवरील वगैरे) लाल दिवा, प्रकाश. *R.-poll*, kinds of red-crested birds. लाल तुऱ्याचे पक्षी. *R.-rag*, एखाद्याला राग आणणारी गोष्ट. (बैलाला तांबडी वस्तू चुजविते त्याप्रमाणें). *R.-shank*, एक जातीचे पक्षी. *R.-skin*, American *Indian*, *R. man*, उत्तर अमेरिकेंतील नीग्रो. *R.-start*, a red-tailed song-bird. एक गाणारा पक्षी. *R.-triangle*, emblem of the Y. M. C. A. 'यंग् मेन्स् ख्रिश्चन असोशिएशन' या संस्थेचें लाल त्रिकोणाकृति चिन्ह,-निशाणी,-खूण. *R.-wing*, एक जातीचे पक्षी. *Red with anger*, रागानें लाल झालेला, अतिशय रागावलेला. *With red hands*, रक्तानें हात माखलेला. *Red'ness*, *n.* तांबडेपणा, लाली, रक्तिमा. *Reddy*, *a.*, *Red'ly*, *adv.* (rare.) *Red'coat*, *n.* British soldier. ब्रिटिश शिपाई. *Red'handed*, *adv.*, in the act of crime. प्रत्यक्ष क्रिया करीत असतां, प्रत्यक्ष अपराध करीत असतांना. *To take r.-h.*, प्रत्यक्ष गुन्हा करीत असतां पकडणें. *Redhot*, *a.* heated to redness; (*fig.*)furious, excited. तापून लाल झालेला, लालबुंद; अति रागावलेला. *R.-hot poker*, लाल परागांच्या फुलांचें (फुल-) झाड. *Red'lead n. & v. t.*, a red pigment. शेंदूर (फासणें, लावणें). *Redtape*, *n.* excessive adherence to forms in official transactions. सरकारी कामामध्यें अगदीं बारीकसारीक गोष्टींतसुद्धां महत्त्व देणें. *Red-tapism*, *n.* सरकारी कचेरींतील फाजील शिस्त. *R.-tapery*, *n.* *R.-tapist*, *n.* सरकारी कामांतील फाजील शिस्त पाळणारा.

Rĕdact', *v. t.* (रिडॅक्ट्)—to put into literary form, arrange for publication, edit. वाङ्मयाचें रूप देणें; प्रसिद्ध करण्याकरितां मजकूर तयार करणें, संपादन करणें. *Redac'tor*, *n.*

Rĕdăc'tion, *n.* (रिडॅक्शन्)—putting into literary form; new edition. वाङ्मयाचें रूप देणें; नवीन आवृत्ति.

Rĕdăn', *n.* (रिडॅन्)—field-work with two faces forming salient angle. (कोनाकृती दर्शनी बाजूंची) तात्पुरती तटबंदी.

Rĕdd, *v. t.* (रेड्)—(Sc.) to clear up, arrange, tidy, put right. साफसूफ करणें, व्यवस्थित लावणें,-करणें.

Rĕdd'en, *v. t. & i.* (रे'डन्)—to make or grow red, to become red, to blush. तांबडा होणें; तांबडा करणें,

Rĕdd'ish, *a.* (रे'डिश्)—rather red. तांबूस, आरक्त.

Rēde, *v. t.* (रीड्)—(arch.) to advise; read (riddle). उपदेश करणें, मत देणें; (कोडें) उलगडणें, उघड करून सांगणें, सोडवणें. *n.* (arch.) advice: tale. उपदेश; गोष्ट.

Rēdeem', *v. t.* (रिडीम्)—to buy back; to recover by expenditure of effort; to save, rescue, reclaim; deliver from sin; make amends for, to compensate. परत विकत घेणें; पैसे भरून किंवा प्रयत्नानें सोडविणें; मुक्त करणें, तारणें; पापापासून मुक्त करणें; भरपाई करणें, भरून काढणें.

Rēdeem'er, *n.* (रिडी'मर्)—one who ransoms or redeems; title of Christ. पैसे देऊन सोडविणारा, तारक, उद्धारक, त्राता; येशू ख्रिस्त.

Rĕdĕmp'tion, *n.* (रिडे'म्प्शन्)—redeeming or being redeemed; thing that redeems. पैसे देऊन सोडविणें, सुटका, मुक्तता; तारक गोष्ट, खंडणी, खरेदी. *Past, beyond, without, r.*, so that *r.*, is hopeless. उद्धाराची आशा नसलेला, उद्धार न करतां येण्याजोगा. *In the year of our r. 1918, etc.*, १९१८ सालीं.

Rēdin'tegrāte, *v. t.* (रिडि'न्टिग्रेट्)—to restore to wholeness or unity; re-establish, (तुकडे तुकडे जोडून) वस्तु पहिल्यासारखी करणें, पुनर्घटना करणें, पुन्हां स्थापन करणें.—*tion n*;—*tor, n.*

Rēdīre'ct, *v. t.* (रीडायरे'क्ट्)—to re-address. पत्ता बदलून पाठविणें.

Rĕd'ŏlent, *a.* (रे'डोलन्ट्)—emitting odour, smelling strongly of; suggestive of. सुगंधयुक्त; उग्र; सूचनात्मक, सूचक, दर्शक. *Red'olence*, *n.*

Rēdou'ble, *v. t. & i.* (रिडबल्)—to intensify; increase, multiply. पुष्कळ वाढविणें, जोरदार करणें, दुणावणें, दुप्पट होणें,-करणें.

Rēdoubt', *n.* (रिडा'उट्)—(fortif.) detached outwork without flanking defences. बाहेरील कोट, बाह्य-कोट (तटबंदी).

Redoubt'able, *a.* (रिडा'उ-टेबल्)—(of opponent, warrior, controversialist, etc.) formidable. भयंकर, प्रतापी, प्रचंड, दांडगा.

Rėdound', *v. i.* (रिडा'उन्ड्)—to contribute in the end (to one's advantage, &c.), come as final, परिणामीं (फायदेशीर) होणें, (मध्यें) पर्यवसान होणें, परिणाम-शेवट-असणें, होणें. [*L. re*, back; *unda*, a wave]

Rėdrĕss', *v. t.* (रिड्रे'स्)—to put right again, to remedy, make up for, re-adjust. बंदोबस्त करणें; दूर करणें; दाद घेणें, भरपाई करून देणें, सरळ-नीट-करणें. *n.* redressing; compensation, reparation. (गाऱ्हाणीं) दूर करणें; भरपाई; बंदोबस्त, तजवीज इलाज. *To r. the balance*, restore equality. समतोल करणें.

Rėdūce', *v. t.* (रिड्यू'स्)—to bring down, lower, weaken, impoverish; subdue; convert to another form; diminish; suit or adapt to; compel to do (rare); restore to original or proper position कमी करणें; क्षीण करणें; जिंकणें; दुसरें रूप देणें, चें रूपांतर करणें; कमी-हलका-करणें; झिजविणें, स्वरूप देणे, साजेसा करणें; करण्याला भाग पाडणें; (निखळलेलें हाड) जाग्यावर बसविणें. *To r. rule to practice*, to act on it. नियम आचरणांत आणणें, नियमाप्रमाणें वागणें. *Is in a very reduced state*, feeble. फार अशक्त झाला आहे. *Reduced circumstances*, poverty after prosperity. संपन्न स्थितीनंतर दारिद्र्यावस्था येणें. *R. the establishment*, dismiss officials, cut down expenses. अधिकारी-नोकरवर्ग-कमी करणें, खर्च कमी करणें. *Reduced officers*, काटकसरीसाठीं नोकरीवरून कमी केलेले अधिकारी. *Reduc'ible*, *a.*

Rėduc'tion, *n.* (रिड'क्शन्)—reducing or being reduced; diminution, curtailment; reduced copy of picture, maps etc.; a rule in arithmetic. कमी करणें, कमी होणें; क्षीणता; (चित्र, नकाशा, वगैरेंची) लहान प्रमाणावर काढलेली प्रत; (अंक०) भाजणी, रूपांतरक्रिया. *R. to absurdity*, proof of the falsity of a principle etc. given by producing a logical consequence of it that is absurd; pursuing of a principle to unpractical length. अयुक्त सिद्धांता-कडे जाणें, विसंगतिप्रदर्शन; अव्यवहारी तत्त्वप्रदर्शन,-तत्त्वनिष्ठा.

Reduc'tio ad absurd'um, *n.* (रिड'क्शिओ ॲड् ॲब्स'र्डम्)—reduction, absurdity. अयुक्त सिद्धांताकडे जाणें, असंगतिप्रदर्शन, अनिष्टापत्ति.

Rėdŭn'dant, *a.* (रिड'न्डंट्)—superfluous; excessive; pleonastic; copious; luxuriant; full गरजेपेक्षां जास्त; अतिशय; अनावश्यक शब्दांचा; अगदीं विपुल, पूर्ण. *Redun'dancy*, *n.* *Redun'dance*, *n.*; *Redun'dantly*, *adv.*

Rėdū'plicate, *v. t.* (रिड्यूप्लिकेट्)—to make double, repeat; (gram.) repeat (letter, syllable), form (tense) by reduplication. दुप्पट करणें, पुनरावृत्ति करणें. *Redu'plicative*, *a.*

Rėdū'plicā''tion, *n.* (रिड्यु'प्लिके''शन्)—repetition of the initial syllable. पुनरावृत्ति, पुनरुक्ति, अभ्यास.

Reed, *n.* (रीड्)—kinds of water or marsh plant, with tall straight stalk; musical instrument; a weaver's instrument; (collect. pl.) reeds growing in a marsh or used as material esp. for thatching, wheat straw prepared for thatching; pastoral poetry; vibrating part of sound instruments. बोरू, वेत, वेत्र; वेणु, अलगुज, पिपेरें; (कापड विणण्याची) फणी; (अने०) बोरूचीं-वेतांचीं-झाडें, (शाकारण्याकरितां उपयोगांत येणारे) बोरू, गव्हाचीं काडें; मेंढपाळांचें गाणें, ग्रामीण गीतें; (वाद्याची) जिव्हाळी. *v. t.* to thatch with reed; make (straw) into *r.*; fit (musical instrument) with reed. वेतानें-बोरूनें-शाकारणें; बोरू तयार करणें; जिव्हाळी बसविणें. *Broken reed*, unreliable person or thing. अविश्वासू मनुष्य,-वस्तु. *To lean on a r.*, put trust in weak thing or person. दुर्बळावर विश्वास ठेवणें,-विसंबून राहणें. *R.-organ*, *R.-pipe*, धातूच्या जिव्हाळीचें वाद्य. *Reed'ed*, *a.* (esp.) with vibrating reeds. जिव्हाळी बसविलेला.

Re-ĕd'ify, *v. t.* (रीए'डिफाय्)—to rebuild (house etc.); build up again (hopes, wasted tissue etc.). पुन्हां बांधणें; पुनर्घटना करणें.

Reed'y̆, *a.* (रीडि)—abounding in reeds; like a reed, (of voice) scratchy like a reed instrument. वेतांनीं भरलेला, वेतमय; वेतासारखा (बारीक, लवचीक); फुटका, चिरका (आवाज). *Reed'iness*, *n.*

Reef, *n.* (रीफ्)—one of several strips along the top or bottom of a sail that can be taken in; ridge of rock, sand, etc. about the level of the water's surface; (gold-mining) bed-rock; lode or vein of auriferous quartz. वारा वाढेल त्याप्रमाणें शिडाचा आवळून घेतां येणारा भाग, शिरी; पाण्यांतील खडक, खडकांची ओळ, खराबा; सोन्याचे कण असलेल्या स्फटिकासारख्या पदार्थाचा थर,-शीर; (वरील मातीच्या आधारभूत) तळच्या पायाचा खडक. *v. t.* to take in reefs of (sail), shorten (top mast, paddles of paddle-wheel). शिरी बांधणें; आत ओढून घेणें, आखूड करणें. *To take in a r.*, proceed cautiously. सावधगिरीनें पुढें जाणें,-पुढें पाऊल टाकणें. *R.-knot*, दुहेरी गांठ.

Reef'er, *n.* (रीफर्)—close double breasted stout jacket; (sl.) midshipman. एक प्रकारची तंग मजबूत बंडी; (गलबतावरील) कनिष्ठ दर्जाचा अधिकारी.

Reek, *n.* (रीक्)—foul or stale smell; smoke, vapour, exhalation; fetid atmosphere. घाणेरडा वास, घाण; धूर, वाफ; घाणेरडी हवा. *v. i.* to smell unpleasantly (of), emit vapour, steam, emit smoke. घाण येणें, (वास) दुर्गंधी येणें; वाफ (धूर) निघणें,-येणें, धुमसणें. *The r. of* ... संतापाची वास,-घाणेरडा वास. *Reek'y*, *a.* ... मय, धुरकट, धूम्रमय; घाणेरडा, ...

Reel, *n.* (रील्)—kinds of winding-apparatus; a cylinder for holding wound cotton, &c.; staggering motion; a Scottish dance. सूत गुंडाळण्याचें चाक, चरक, चक्र, दोऱ्याचें रीळ; झोकांडी, झेप; स्कॉटलंडमधील लोकांचा एक प्रकारचा नाच. *v. t* & *i.* to wind on reel; rattle (story, list, verses) off without pause; sway, stagger; be shaken; (of eyes, mind, head) be in a whirl; be dizzy, swim; seem to shake. रिळावर सूत गुंडाळणें; भडाभडा, खडाखड-म्हणणें; झोकांडी जाणें, धडपडणें; हादरून जाणें; फिरणें, गोंधळांत पडणें, गरगर-चक्कर-करणें,-येणें; काळोखी येणें; हालतोसा भासणें. *Off the reel*, (fig.) straight off in rapid succession. एकदम सरळ, लागोपाठ, मध्ये अडथळा न येतां. *Reel'ingly, adv.*

Reeve, *n.* (रीव्ह)—1. (hist.) chief magistrate of town or district; (Canada) president of village or town council; 2. female of the ruff. (ऐति०) शहराचा किंवा प्रांताचा मुख्य अंमलदार; (कॅनडा) ग्राम-शहर-पंचायतीचा अध्यक्ष; एक जातीच्या पक्ष्याची मादी. *v. t.* (Naut.) to pass rope, etc. through ring etc., fasten (rope etc.) by reeving; (of ship) thread (shoals, ice pack). कड्यामधून दोर घालणें; कड्यांत दोर घालून आवळणें, मार्ग काढणें.

Rĕfĕ'ction, *n.* (रिफे'क्शन्)—slight meal; refreshment of food or drink. फराळ; उपाहार, अल्पाहार.

Rĕfĕc'torў, *a.* (रिफे'क्टरि, रे'फिक्टरि)—a room for meals in monastery, &c. मठांतील भोजनगृह. फराळाची खोली.

Rĕfer', *v. t.* & *i.* (रिफ'र्)—to trace or ascribe *to*; assign *to*; send on or direct to some authority or source of information; make allusion *to.* (चा) आधार घेणें; पाहणें; 'शीं' संबंध जोडणें, लावणें; (चा) अभिप्राय घेणें, (चें) मत घेणें, (निर्णयाकरितां कडे) पाठविणें; माहितीकरितां धाडणें, (च्यावर) सोंपविणें; हवाला देणें, हवाळणें, सोपविणें; (चा) उल्लेख करणें. *To r. to drawer*, abbr. R D. banker's note suspending payment etc. of cheque. हुंडीचें-चेकचे-पैसे न देण्याविषयींची,-अडकवून ठेवण्याची-खूण,-शेरा.

Rĕferee', *n.* (रेफरी')—an arbitrator, a person chosen to decide between opposing parties; an umpire. तिऱ्हाईत; मध्यस्थ, लवाद, प्रमाणपुरुष, निर्णेता. *v. i.* to act as referee. मध्यस्थ-लवाद-म्हणून काम करणें.

Rĕf'erence, *n* (रे'फरन्स्)—referring of something to another authority; allusion, a passage referred to; a person vouching for another; (vulg.) testimonial; relation, respect, correspondence, to. आधार, आश्रय, उल्लेख, संदर्भ; दुसऱ्याकरितां खातरी देणारा मनुष्य; प्रशंसापत्र; प्रशस्तिपत्र; परस्पर संबंध,-अवलंबन, प्रमाणबद्धता. *v. t.* to provide (book) with *r.* to authorities. संदर्भ-ग्रंथांची यादी (पुस्तकांत) देणें. *In, with, r. to*, regarding, as regards, about. (च्या) विषयीं, संबंधीं. *Without r. to*, irrespective of. च्या शिवाय, ला न जुमानतां. *Cross r.*, to another passage in same book. एकाच पुस्तकांतील दुसऱ्या उताऱ्याचा हवाला,-संदर्भ. *Book of r.*, संदर्भग्रंथ. *R. library*, library of books that can be consulted but not taken away. संदर्भग्रंथसंग्रह. *Referen'tial, a.*

Rĕfĕrĕn'dum, *n.* (रेफरे'न्डम्)—a system by which a question is submitted to the direct vote of the electorate for final approval or rejection. ज्या पद्धतीनें कोणताहि विषय मतदारसंघाच्या पुढें संमति किंवा नकार देण्याकरितां मांडला जातो ती पद्धत, सार्वजनिक मतमोजणीनें (एखाद्या गोष्टीचा) निर्णय लावण्याची पद्धत.

Rĕfine', *v. t.* & *i.* (रिफा'इन)—to free from impurities or defects, to purify, to clarify; to make elegant or cultured; employ sub'lety of thought or language, make fine distinctions, discourse subtly (*up*) *on*; improve (*up*)*on* by refinements. शुद्ध करणें, मळी काढणें, साफ करणें, शोधन करणें, (सोनें, चांदी वगैरे) गाळणें; सुसंस्कृत करणें, सुविनीत करणें; सूक्ष्म विचार,-भाषा,-योजणें; सूक्ष्म-नाजूक-भेद दाखविणें,-काढणें; सूक्ष्म-विवेचकरीतीनें वादविवाद,-प्रवचन,-करणें, सूक्ष्म विवेचन करणें; संशोधन करून सुधारणें. *Refinedly, adv.*

Rĕfine'mĕnt, *n.* (रिफा'इन्-मेन्ट्)—fineness of taste or feeling or manners; subtle piece of arrangement or reasoning. सभ्यता, सौजन्य; संशोधन, सुधारणा; सूक्ष्म भेद, नाजूक भेद; नाजूकपणा; बुद्धिवादाची सूक्ष्मता.

Rĕfi'ner, *n.* (रिफा'इनर)—purifier, (esp.) person who refines sugar, metal, etc. संशोधन करणारा, शुद्ध करणारा, (साखर, सोनें, चांदी वगैरे) गाळणारा. *Refinery, n.* place where sugar etc. is refined. (साखर वगैरे) शुद्ध-सफेत-करण्याचा कारखाना.

Rĕfit', *v. t.* & *i.* (रीफि'ट्)—to renew or repair ship; (of ship) undergo refilling. जहाज दुरुस्त करणें,-नव्यासारखें करणें; (जहाजाची) दुरुस्ती होणें. *n.* process of refitting. दुरुस्ती (क्रिया), डागडुजी. *—ment, n*

Rĕflĕct', *v. t.* & *i.* (रिफ्ले'क्ट्)—to throw back (light, heat, sound); (of mirror) to show the image of: to throw discredit *on*; to meditate, to consider; to make disparaging remarks *on*; reproduce to eye or mind, exactly correspond in appearance or effect to; (of action, result) bring back or cause to redound; fold back (rare). मार्गे फिरविणें, प्रतिक्षेप,-परावर्तन,-करणें, उष्णी येणें; प्रतिबिंब पाडणें; ठपका देणें, मनन करणें, विचार करणें, दोष देणें, ठपका ठेवणें, दोषास्पद उल्लेख करणें; डोळ्यांसमोर-मनश्चक्षूपुढें-उभें करणें,-राहणें; चें प्रतिबिंब असणें, प्रतिमा असणें; उलट परिणाम होणें, उलटणें; परिणामीं होणें; दुमडणें, दुमडणें.

Reflĕc'tion, *n.* (रिफ्ले'क्शन्)—reflected light, heat, colour, or image; a thing that brings discredit *on*; a thought; reconsideration; mental faculty dealing with products of sensation and perception; mental or verbal comment (*on, upon*).

प्रतिच्छाया, प्रतिबिंब, परावर्तन, प्रतिक्षेप ; दोष किंवा ठपका आणणारी गोष्ट, ठपका ; विचार, मनन, विमर्श ; पुनः विचार करणें, पुनश्चिंतन ; विचारशक्ति, विमर्शनशक्ति, टीका. *Angle of r.*, made by reflected ray with perpendicular to surface. परावर्तन कोन. *Reflec'tional*, *Reflec'tionless*, *aa*.

Réflĕc'tĭve, *a.* (रिफ़्ले'क्टिव्ह्)—throwing back images ; meditative. परावर्तक, प्रतिबिंबग्राही, प्रतिबिंब पाडणारा ; चिंतन करणारा, विचारी, मननशील.

Réflĕct'or, *n.* (रिफ़्ले'क्टर्)—(esp.) appliance for reflecting light or for reflecting image in telescope. किरण परावर्तन होण्यासाठीं (दिव्याचे मागें लावलेली) अन्तर्गोल चकाकित तबकडी, आरसा, परावर्तक ; (दुर्बिणीची) परावर्तक तबकडी.

Re'flĕx, *n.* (री'फ़्लेक्स्)—reflected light or colour or glory ; an image in mirror, &c. ; reflex action. प्रतिबिंबित प्रकाश, रंग, वैभव, उसनें वैभव ; (आरशांतील) प्रतिबिंब, प्रतिरूप, प्रतिच्छाया ; परावर्तनक्रिया. *a.* reactive, reflected ; directed back, reflective, recoiling : introspective. प्रतिबिंबित ; परावृत्त, परत आलेला ; अंतर्मुख झालेला, अंतर्मुख (विचार).

Réflĕx'ĭve, *a.* (रिफ़्ले'क्सिव्ह्)—(*Gram.*) implying an agent's action upon himself. कर्मकर्तृवाच्य ; कर्तृवाचक. *n*, a reflexive word or form कर्मकर्तृवाच्य,-कर्तृवाचक,-शब्द,-रूप.

Rĕf'luent, *a.* (रे'फ़्लुअन्ट्)—back-flowing (of tide, flood, etc.). परत वळणारा, ओहोटीचा. *Refluence*, *n.* ओहोट, ओहोटी. [L. *re*, back ; *fluere*, flow]

Re'flŭx, *n.* (री'फ़्लक्स्)—backward flow. ओहोटी, ओहोट.

Réfŏrm', *v. t. & i.* (रिफ़ॉ'र्म्)—to form again ; to make or become better ; to abolish or cure abuses. पुन्हा करणें, फिरून घनविणें, सुधारणें ; मार्गावर किंवा ताळ्यावर आणणें. *n.* removal of abuses ; amendment ; improvement. सुधारणें ; दुरुस्ती ; सुधारणा. *R.-School*, (U. S.) reformatory. बालगुन्हेगारांसाठीं शाळा. *Reformable*, *a.*

Rĕforma'tion, *n.* (रेफ़र्मे'शन्)—change for the better, esp. in political or religious or social affairs. सुधारणा. *The R.*, प्रॉटेस्टंट धर्मपंथ स्थापन करणाऱ्यांची सोळाव्या शतकांतील धर्मसुधारणेची चळवळ.

Réfŏrma'tĭve, *a.* (रिफ़ॉर्मे'टिव्ह्)—tending to reform. सुधारणापर, सुधारणेचा, सुधारक.

Réfŏrm'atorў, *n.* (रिफ़ॉ'र्मेटरि)—a school for juvenile offenders. लहान वयाच्या अपराध्याकरितां सुधारण्याची शाळा. *a.* reformative. सुधारणा करणारा, सुधारणापर.

Réfŏr'mer, *n.* (रिफ़ॉ'र्मर्)—an advocate of reform ; leader in the Reformation. सुधारक, सुधारणावादी ; सोळाव्या शतकांतील धर्मसुधारणेचा पुढारी.

Réfrăct', *v. t.* (रिफ़्रॅ'क्ट्)—(of water, air, glass, etc.) to deflect (light) where it enters obliquely from a medium of different density ; (Chem.) analyse (nitre) to discover percentage of impurities. निराळें वळण लावणें, वक्रगति देणें, फिरवणें, वक्रीभवन करणें ; सोऱ्याचें पृथक्करण करणें.—*able*, *a.* ; —*ion*, *n.* वक्रीभवन. ;—*ional*,—*ive*, *aa.* वक्रीभवनाचा, वक्रीभवनविषयक.

Réfrăc'tor, *n.* (रिफ़्रॅ'क्टर्)—refracting medium or lens or telescope. वक्रीभवन करणारा (-रें माध्यम, वक्र दुर्बीण).

Réfrăc'torў, *a.* (रिफ़्रॅ'क्टरि)—stubborn ; unmanageable ; rebellious. हट्टी ; काह्यांत न येणारा (रोग वगैरे), दुःसाध्य, हट्टी, चेंगट ; शिरजोर, दांडगा, बंडखोर. —*torily*, *adv.* ;—*toriness*, *n.*

Réfrain', *n.* (रिफ़्रे'न्)—recurring phrase or line, esp. at the end of stanzas. ध्रुपद, अखंड कडवें. *v. t. & i.* to abstain from doing something ; to keep oneself aloof ; to check oneself (*from*). आवरणें ; स्वतः अलग राहणें ; थांबवून धरणें.

Réfrăn'gĭble, *a.* (रिफ़्रॅ'न्जिबल्)—refractable, subject to refraction (as rays of light). वक्रगति देण्यासारखा, वक्रीभवनयोग्य. *Refrangibi'lity*, *n.* वक्रीभवनयोग्यता, वक्रीभवन होणें.

Réfrĕsh', *v. t. & i.* (रिफ़्रे'श्)—to reanimate, to give new strength to, to reinvigorate ; to freshen up (memory) ; (sl.) take drink or food ; (rare) make cool again ; restore (fire, electric battery etc..) with fresh supply. ताजातवाना करणें, टवटवी आणणें ; हुशारी आणणें ; (स्मृति, आठवण) ताजी करणें ; खाऊन पिऊन ताजेतवानें होणें ; (विस्तव कोळसा घालून) पेटता ठेवणें, जागृत ठेवणें.

Réfrĕsh'er, *n.* (रिफ़्रे'शर्)—in vbl. senses ; extra fee to counsel in prolonged case ; (sl.) a drink. ताजातवाना करणारा ; (लांबलेल्या खटल्यांत) वकिलाला दिलेली जादा फी,-मेहनताना ; पेय.

Réfrĕsh'ment, *n.* (रिफ़्रे'श्-मेन्ट्)—a thing that refreshes ; (usu. pl.) food. टवटवी आणणारी वस्तु ; (अने०) उपाहार, अन्न. *R. room*, (at railway station) रेल्वेस्टेशनवरील उपाहारगृह, फराळाचें दुकान. *R. car*, (on train) आगगाडींतील फराळ करण्याचा डबा,-उपाहारगृह.

Réfrĭ'gerant, *a. & n.* (रिफ़्रि'जरन्ट्)—(substance) serving to refrigerate. थंडावा देणारा, गार करणारा, शीतकर, थंड ठेवणारा (पदार्थ,-साधन).

Réfrĭ'gerāte, *v. t.* (रिफ़्रि'जरेट्)—to make cool or cold ; freeze or preserve (food etc.) by exposure to extreme cold. थंड करणें, (पदार्थ न सडावा, अन्न न नासावें, म्हणून किंवा गोठण्याकरितां) अतिशय गारांत ठेवणें, गार ठेवणें,-करणें.—*tion*, *n.* शीतोपचार क्रिया, शीतकरण. *Refri'gerator*, *n.* refrigerating apparatus. (बर्फाच्या साहाय्यानें) पदार्थ गार ठेवण्याची पेटी,-खोली. [L. *re*, back ; *frigus*, cold]

Rĕf'ūge, *a.* (रे'फ़्यूज)—a shelter from pursuit or danger or trouble, retreat ; a person or thing that provides shelter ; raised piece in middle of busy road for crossers to halt on. आश्रय, आसरा, आधार, शरण ; आश्रय देणारा मनुष्य, उपाय,

इलाज, सतोपाय, युक्ति ; रहदारीचा रस्ता ओलांडण्यासाठीं पायीं चालणाऱ्यांना मध्यें थांबण्याची उंचवट जागा, आधारस्थान. *House of r.*, institution for the homeless etc. अनाथालय. *Seek r.*, आसरा,-आश्रय-घेणें. *To take r.*, आसरा करणें. *v. t.* & *i.* (rare) to. give *r.* to, take *r.* आसरा-आधार-देणें,-घेणें. [L. *re*, back ; *fugere*, flee]

Rĕfūgee', *n.* (रेफ्यू-जी')—a person who flees for refuge abroad to escape persecution. शरणागताश्रित, शरणार्थी, छळ टाळण्यासाठीं परागंदा झालेला मनुष्य, निर्वासित.

Rĕfŭl'gent, *a.* (रिफ़'ल्जन्ट्)—casting a bright light, shining, gloriously bright. चकचकीत, तेजस्वी, उज्ज्वल *—gence, n.* ;*—gently, adv.* [L. *re*, intensively ; & *fulgere*, shine]

Rĕfŭnd', *v. t.* & *i.* (रिफ'न्ड्)—to pay back, to repay ; to restore, to reimburse. परत देणें ; पुन्हा भरपाई करणें.*—ment, n.*

Rĕfū'sal, *n.* (रिफ्यू'झल्)—act of refusing ; chance of taking a thing before it is offered to others, preemption. नाकारणें, नकार, अव्हेर, न पतकरणें, पसंती नापसंती. *Will take no r.*, is importunate. अत्याग्रही,-हट्टी,-आहे.

Rĕfūse', *v. t.* & *i.* (रिफ्यू'झ्)—to decline a request or offer, to reject ; to deny what is solicited or required ; not to accept. नाकारणें, नकार देणें, नाहीं म्हणणें; नाकबूल करणें; (विनंति) अमान्य करणें, अर्ज नामंजूर करणें. *Resfus'er, n. Refus' able, a.*

Rĕf'ūse, *n.* (रेफ्यू'स्)—what is left as worthless or not wanted, dregs, scum, dross. कचरा, गाळसाळ, केर.

Rĕfūte', *v. t.* (रिफ्यू'ट्)—to prove falsity or error of, to prove to be false or erroneous ; to rebut by argument. खोटा पाडणें ; खंडन किंवा निराकरण करणें, खोडून काढणें, *Refu'table, a.* खंडनीय, निराकरणीय, खोडून काढण्याजोगा.

Rĕfūtā'tion, *n.* (रेफ्युटे'शन्)—proving to be erroneous, confutation, disproof. खंडन, निराकरण, निरसन, निरास.

Rĕgain', *v. t.* (रिगे'न्)—to recover possession of (esp. *r. consciousness*) ; to reach (a place) again ; recover (one's *feet, footing, legs*). पुन्हां मिळविणें, शुद्धीवर येणें ; पुन्हां पोहोंचणें ; पुन्हां सांवरणें.

Rē'gal, *a.* (री'गल)—of or pertaining to kings, kingly, royal ; magnificent. राजांचा, राजाला शोभणारा ; भव्य, थोर, दरबारी, शोभिवंत. *Regal'ity, n.* royal privilege. राजाचा हक्क,-अधिकार.

Rĕgāle', *n.* (रिगे'ल)— a choice repast. मेजवानी. *v. t.* & *i.* to refresh sumptuously, to entertain choicely *with* ; to give delight to ; to feed oneself choicely. चमचमीत मेजवानी देणें ; संतुष्ट करणें. आनंद देणें ; संतोष-होणें ; चमचमीत भोजन करणें, वर ताव मारणें, वर हात मारणें.*—ment, n.*

Rĕgā'lia, *n. pl.* (रिगे'ल्या)—ensigns of royalty, insignia of royalty used at coronation, &c. ; insignia of an order. राजचिन्हें ; पंथाचें चिन्ह. 2. *n.* large cigar of good quality. उंची विडी.

Rĕgärd', *v. t.* & *i.* (रिगा'र्ड्)—to gaze upon ; to give heed to, to take into account ; to have respect or reverence for ; consider ; (of things) concern, have relation to. लक्षपूर्वक पाहणें, न्याहाळणें, लक्ष देणें, मानणें, गणणें ; सन्मान करणें, समजणें, मानलें जाणें ; शीं संबंध असणें,-येणें. *n.* gaze ; attention, heed, care ; relation ; kindly or respectful feeling ; (*pl.*) good wishes, compliments. नजर, दृष्टि, लक्ष, ध्यान ; संबंध ; सन्मान, आदरबुद्धी, पूज्यबुद्धि ; (अने०) शुभेच्छा, प्रेमभाव. *Does not r. me*, has nothing to do with. माझ्याशीं कांहीं कर्तव्य-संबंध-नाहीं. *As regards, regarding*, about, touching. च्या विषयीं,-संबंधीं. *In r. to*, or *of, with r. to*, regarding, as touching, about. विषयीं, संबंधीं. *Out of r. for*, कडे लक्ष देऊन. *with kind rr.* (*to you all*), *my best rr.*, प्रेमानें, प्रेमपूर्वक, स्नेहभावानें.

Rĕgärd'ant, *a.* (रिगा'र्डन्ट्)—(Heral.) looking backwards ; observant, with steady or intent gaze. मागें पाहणारा ; टक लावून पाहणारा.

Rĕgärd'ful, *a.* (रिगा'र्डफुल्)—having or paying regard, not neglectful. (*of*). दक्ष, सावध, दक्षता पाळणारा.

Rĕgärd'ing, *prep.* (रिगा'र्डिंग)—concerning. संबंधीं.

Rĕgärd'less, *a.* & *adv.* (रिगा'र्ड्-लेस)—taking no account of, heedless, negligent. बेपरवा, बेफिकिरीनें.

Rĕgătt'ă, *n.* (रिगॅ'टा)—a race in which boats or yachts contend for prizes. नावांची शर्यत, नौकांची शर्यत.

Rēgĕlāte', *v. i.* (रीजिले'ट्)—(of fragments of ice, snow, etc.) be fused into frozen mass. (बर्फाच्या तुकड्यांचा) पुन्हां गोठून गोळा होणें, फिरून जमणें.*—tion, n.* बर्फाच्या तुकड्यांचा गोळा. [L. *re*, again ; *gelare* freeze]

Rē'gency, *n.* (री'जन्सि)—office of a regent ; commission acting as regent ; regent's period of office. राजप्रतिनिधीचा अधिकार ; राजप्रतिनिधीमंडळ ; त्यांचा अंमल, कारकीर्द. *The R.*, (in Eng. Hist.) 1810-20. इंग्लंडमधील १८१०-२० वर्षांमधील अंमल.

Rĕgĕn'erāte, *v. t.* & *i.* (रिजे'नरेट्)—to invest with new and higher spiritual nature ; to improve moral condition of ; to breathe more vigorous life into (person, institution etc.) ; generate again, bring or come into renewed existence ; reform oneself. नवा जन्म देणें, आध्यात्मिक उत्क्रान्ति करणें; नीतिमत्ता सुधारणें ; चेतना उत्पन्न करणें, पुनरुज्जीवन करणे, नवा जोम उत्पन्न करणें ; फिरून वाढणें, उत्पन्न करणें, होणें ; स्वतःची सुधारणा करणें. *a.* (रिजे'नरिट्) generated or born anew, spiritually born again ; reformed. पुनरुत्पादित, आध्यात्मिक दृष्ट्या पुन्हां जन्मलेला ; सुधारलेला, संस्कार झालेला. *Regenera-*

tion, n. पुनरुत्पत्ति, पुनरुज्जीवन, नवोद्गम, नव्याने घनणें. —*tive, a.*

Régĕn'erātor, *n.* (रिजें'नरेटर्)—(esp.) fuel-saving firebrick device in furnaces. (भट्टींतील न जळणाऱ्या विटांची) उष्णता राखणारी कमान.

Re'gent, *n.* (री'जन्ट्)—a person administering kingdom during minority, absence, or incapacity of a monarch, ruler, ruling principle (rare); (U. S.) member of governing board in some universities. प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार पाहणारा मनुष्य, रीजंट; शास्ता, प्रमुख तत्त्व; कांहीं विश्वविद्यालयांच्या व्यवस्थापक मंडळाचा सभासद. *a* (following n.) acting as r. प्रतिनिधि म्हणून राज्यकारभार पाहणारा. *Queen, prince etc. r.*, राजाचे ऐवजीं राज्यकारभार चालविणारी राणी, राजपुत्र इ.

Rĕ'gicide, *n.* (रे'जिसाइड्)—one who kills or murders a king; king-killing. राजवध करणारा; राजवध, राजहत्या. *The rr.*, those concerned in trying and executing Charles I. इंग्लंडचा राजा पहिला चार्ल्स याला देहांत शासन करणारे लोक. *Regicid'al, a.* [L. *rex*, a king; *caedere*, to kill]

Rĕgime', *n.* (रेझी'म्)—the method of government; prevailing system of things. राज्यपद्धति; चालू पद्धति, अमदानी, कारकीर्द.

Rĕ'gimĕn, *n.* (रे'जिमेन्)—an orderly government, prescribed diet and habits; (Gram.) syntactic dependence between words; rule, regime (rare). खाण्यापिण्यांत पथ्य, पथ्यापथ्यनियम; कारकसंबंध; अमदानी, कारकीर्द.

Rĕ'giment, *n.* (रे'जमेन्ट्)—permanent unit of an army or a body of troops usually commanded by Lieut. Colonel; (off. sl.) large array or number, legion (usu. *of*). सैन्याची तुकडी, पलटण; सैन्य, सेना, फौज, पुष्कळ संख्या, जमाव. *v. t.* to form into regiment (s), organise in groups. सैन्याच्या तुकड्या पाडणें, (कामकरी लोकांचे वगैरे) गट पाडणें. *Regimen'tal, a.* of a regiment. पलटणीचा, तुकडीचा. *Regimen'tals, n. pl.* (-ल्ज्), regimental uniform. तुकडीचा गणवेष, लष्करी पोषाख. *Regimenta'tion, n.*

Rĕ'gion, *n* (री'जन्)—tract of a country; a separate part of the world; (often pl.) sphere or realm; part round some bodily organ. प्रदेश; विभाग; लोक, भुवन; प्रांत, विषय; चक्र, मंडळ. *Lower rr.*, hell, realm of the dead. नरक, पाताल, अधोभुवन. *Upper rr.*, sky, heaven. आकाश, स्वर्ग (लोक). *The r. of the eyes*, नेत्रमंडळ.

Rĕ'gister, *n.* (रे'जिस्टर्)—a book in which items are recorded for reference; official list; compass of voice or instrument; recording indicator of speed etc.; adjustable plate for widening or narrowing an opening etc. in fire-grate; (print.) exact correspondence of printed matter on two sides of leaf; (photog.) correspondence of focussing screen with plate or film. नोंदपुस्तक, नोंदणी, नोंद, यादी; (आवाजाचा, यंत्राचा) फेर, घेर; वेगमापक (व दर्शक) घड्याळ; सुपडींतील हवा बंद करणारें झांकण; (छापील पानाच्या दोन्ही बाजूंच्या मजकुराचा ओळीस ओळ असा) मेळ; (छायाचित्र) मेळ, एकरूपता. *v. t.* to set down formally, to record in writing; enter or cause to be entered in some register; (of instrument) record automatically, indicate; correspond, make correspond exactly; (U. S.) express (surprise, grief etc.) by bodily movement, etc. लिहून ठेवणें, नोंदणें, नोंद करणें, रजिस्टर करणें; विशिष्ट पुस्तकांत,-तक्त्यांत -नोंदणें, नोंदविणें; (आपोआप) मोजणें, दर्शविणें; मेळ बसणें,-बसविणें; (हावभावांनीं भावना) दर्शविणें. *To r. letter*, टपालांत (पोष्टांत) पत्र वगैरे जादा आकार भरून नोंदविणें. *R. luggage*, प्रवासी सामानाची रेल्वे ऑफिसांत नोंद करणें. *R. oneself*, put one's name on electoral *r.* मत देणाऱ्याच्या यादींत नांव नोंदविणें. *Re'gistrable, a.*

Rĕ'gistrār, *n.* (रे'जिस्ट्रार्)—an official charged with keeping a public register. दफ्तरदार, फडणीस, रजिस्ट्रार. *Re'gistrarship, n.* रजिस्ट्रारची जागा,-हुद्दा.

Rĕgistrā'tion, *n.* (रेजिस्ट्रे'शन्)—act of registering; enrolment. नोंदणें, दफ्तरांत दाखल करणें; नोंद, नोंदणी.

Rĕ'gistrȳ, *n.* (रे'जिस्ट्रि)—place where registers are kept. नोंदणीखात्याची कचेरी. *Married at a r.* or *r. office* or *register office*, (without religious ceremony.). धार्मिक विधि न करितां नोंदणीपद्धतीनें विवाह झालेला. *Servant's registry (office)*, नोकरीसाठीं रिकाम्या जागांची व नोकरीसाठीं अर्ज करणाऱ्यांची नोंद,-नोंदणी कचेरी.

Rĕg'nal, *a* (रे'ग्नल्)—of a reign. राज्यारोहणाचा. *R. year*, राज्यारोहणवर्ष. *R. day*, anniversary of accessions. राज्यारोहणाचा वाढदिवस.

Rĕg'nant, *a.* (रे'ग्नन्ट्)—reigning; (of things, qualities, opinions etc.) predominant, prevalent. राज्य करीत असलेला, राज्य करणारा; विशेष, मुख्य, प्रचलित, चालू. *Queen R.*, queen ruling in her own right and not as consort. राज्य करणारी राणी.

Régŏrge', *v. t. & i.* (रिगॉ'र्ज्)—to bring or cast up again, vomit, disgorge; flow back from pit, channel, etc.; swallow again. उलटून टाकणें, वांति करणें, उलटणें; मागें,-उलट,-वाहणें, पुन्हां गिळणें.

Rē'grĕss, *n.* (री'ग्रेस्)—going back, a passage back; backward tendency. मागें जाणें, प्रतीपगमन; प्रतिगमन; पाठीमागें जाण्याचा कल, परागति, वक्री गति. *v. i.* (Astron.) (रिग्रे'स्), to move backwards. वक्री होणें, माघारीं वळणें, मागें जाणें. *Regress'ive, a.*

Régrĕ'ssion, *n.* (रिग्रे'शन्)—backward movement, reversion, retrogression. प्रतिगमन; उलट जाणें, परागति, वक्रीगति.

Régrĕt', *v. t.* (रिग्रे'ट्)—to be sorry for loss of; be sorry for something past; to grieve at, to

repent. खेद वाटणें, शोक करणें, वाईट वाटणें; दुःख होणें; पश्चात्ताप पावणें, पस्तावा होणें. *n.* sorrow for loss; repentance or vexation, pain of conscience for some fault. शोक, खेद, दुःख; पस्तावा, पश्चात्ताप, रुखरुख. *Regret'ful, a.* full of regret. अनुतप्त, दुःखपूर्ण, दुःख वाटणारा, दुःखाचा. *Regrett'ed, pa. t. & pa. p.*

Régrĕtt'able, *a.* (रिग्रे'टेब्ल्)—undesirable, unwelcome; deserving censure. अनिष्ट, शोचनीय, निंद्य.—*ably, adv.*

Rĕ'gūlar, *a.* (रे'ग्युलर्)—following or exhibiting a principle, harmonious; consistent; having the parts symmetrical, systematic; habitual; not capricious or casual; not defective or amateur; acting or done uniformly; correct; (Eccl.) bound by religious rule, belonging to monastic order; (Gram.) following a normal type of inflection; (colloq.) complete, thorough, indubitable. नियमबद्ध, नियमित; शिस्तवार; प्रमाणबद्ध, रेखीव, पद्धतशीर; नियमानें,-नेमानें-होणारा; कसलेला, तरबेज; समप्रमाण, एकसारखा; अचूक, बरोबर; नियमनिष्ठ, नेमनिष्ठ, व्रती; नियमित (शब्द, क्रियापद इ.); पक्का, निखालस, शुद्ध. *n.* a soldier of the regular or standing army (*usu. in pl.*); one of the regular clergy; person permanently employed. खड्या फौजेंतील सैनिक; धर्मसंस्थेंतील पाद्री; कायम नोकरी असलेला मनुष्य. *A regular (solid)*, सम (घन). *A r. life*, नेमस्त राहणी. *R. people*, living *r.* lives, नेमस्तपणानें राहणारे लोक. *To keep r. hours*, do same thing at same time daily. दररोज नेमल्या वेळीं नेमलेलें काम करणें. *A r. cook*, धंदेवाईक आचारी. *R. soldier*, कायमचा सैनिक. *R. army*, कायमचें (खडें) सैन्य. *A r. rascal, hero*, पक्का लबाड, खंदा वीर. *R. fellow,-guy*, (U. S. sl.) all round good fellow. एकंदरींत चांगला-गुणी-मनुष्य. (*adv.*) *is r. angry*, पक्का-भरपूर-रागावला आहे. *Comes, happens, r.*, नियमितपणें येतें,-घडतें. *Reg'ularize, v. t.* नियमित करणें;-*iza'tion, n.*

Rĕgūlă'rity, *n.* (रेग्युले'रिटि)—conformity to rules, steadiness or uniformity in course. नियमितपणा.

Rĕg'ūlāte, *v. t.* (रे'ग्युलेट्)—to control by rule; to subject to restrictions; to adapt to requirements; to adjust (watch, &c.). कायदा,-नियम,-लावणें, नियमित करणें; शिस्त लावणें; धोरणानें चालविणें; (घड्याळ) बरोबर लावणें, (गति किंवा चाल) सारखी ठेवणें. *Reg'ulative, a.* नियामक.

Rĕgūlā'tion, *n.* (रेग्युले'शन्)—regulating or being regulated; prescribed rule. नियमित ठेवणें; ठराव, कायदा. (*attrib.*) ordinary, usual, formal. सामान्य, नेहमींचा, चालू, ठराविक.

Rĕg'ūlātor, *n.* (रे'ग्युलेटर्)—(*esp.*) part of a watch or other machine that regulates (pace, movements, &c.). गतिव्यवस्थापक (घड्याळ्याचा किंवा यंत्राचा) भाग, (यंत्राची गती सारखी ठेवणारा) दांडा, कांटा, (दिव्याची) फिरकी, चावी.

Rĕg'ūlus, *n.* (रे' ग्युलस्)—(pl-li), (astron.) bright star in Leo (R.); (chem.) purer or metallic part of mineral separated by sinking to bottom in crucible, impure metallic product of smelting various ores; golden-crested wren. सिंहराशींतील एक तेजस्वी तारा, मघा नक्षत्र; (मुशीच्या तळाशीं बसलेला) धातूचा शुद्ध अवशेष, (निरनिराळ्या अशुद्ध धातु गाळून उरलेला) गाळ, अशुद्ध गाळसाळ; (युरोपांतील 'रेन' पक्ष्याची एक जात *Reg'uline, a.* मघा नक्षत्राचा. [L. *rex, regis* king]

Regūr'gitāte, *v. i. & t.* (रिग'जिटेट्)—to gush back; (of stomach or receptacle) pour or cast up again. जोरानें परत येणें, उलटणें; ओकून टाकणें, ओतून टाकणें.—*gita'tion, n.*

Rēhabil'itāte, *v. t.* (रीहॅबि'लिटेट्)—to restore to rights, privileges, reputation, etc. पूर्वींचे अधिकार परत देणें, पूर्वपदारूढ करणें.-*tion, n.*-*tor, n.*

Rēhē'ar, *v. t.* (रीहि' अर्)—to hear (law suit) over again. (फिर्यादीची वगैरे) पुन्हां सुनावणी होणें, पुन्हा चालणें, ऐकणें. *Rehear'ing, n.*

Rèhears'al, *n.* (रिह' सल्)—recital, narration; practice, trial performance. पाठ म्हणणें; तालीम, पूर्व प्रयोग. *Dress r.*, such *r*, in costume, when practice is far advanced. रंगीत,-रंगी,-तालीम.

Rèhearse', *v. t. & i.* (रिह' र्स)—to recite, to say over; to give list of; to enumerate; to repeat in private, to practise (a play &c.). पाठ म्हणणें; हकीकत सांगणें; कथन करणें; तालीम करणें; पूर्वप्रयोग करणें.

Reichs'tag, *n.* (रा'इक्स्टाग)—Parliament of the German federation. जर्मनराष्ट्राचें पार्लमेंट, जर्मनीची पार्लमेंटसभा.

Reign, *n.* (रेन्)—sovereignty, rule; sovereign's period of rule. राजसत्ता, राज्य; राजवट, अमदानी, कारकीर्द. *v. i.* to be a sovereign; to prevail. राज्य करणें; अंमल असणें, वरचढ असणें. *R. of terror*, period of sanguinary excesses by revolutionaries or reactionaries. झोटिंगपादशाही, अंदाधुंदीचें राज्य. *Better to r. in hell than serve in heaven*, बरी ती निरयगति, परवशता शतगुणी करी जाच; स्वर्गांत बंदा गुलाम होऊन राहण्यापेक्षां नरकांतलें राजेपण पत्करलें. *Reigning beauty*. सौंदर्यराणी. *Silence reigns*, all is quiet. सर्वत्र शांततेचें साम्राज्य पसरलें आहे. *Reign'ing, a.*

Reïmbūrse', *v. t.* (री-इम्ब' र्स)—to repay (a person, to replace in treasury, to refund. पुन्हा देणें, परत भरणें, भरून देणें, भरणें.-*ment, n.* [F *re*, back; *im*, in; *bourse*, purse]

Rein, *n.* (रेन्)—a long narrow strap used to guide horse; (*fig.*) means of control (oft. pl. in same senses). लगामाची दोरी; ताब्यांत ठेवण्याचें साधन, सूत्र, लगाम. *v. t.* to check with reins; (*fig.*) to govern, to control. लगाम खेचणें, लगामीनें आवरणें; ताब्यांत ठेवणें, कह्यांत आणणें. *To draw r.*, stop one's horse, pull up, abandon effort, retrench expenditure. घोडा थांबवणें, लगाम खेचणें, प्रयत्न सोडून देणें.

खर्च कमी करणें. *to give horse the rr.* or *r.*, let its own way. घोड्याची लगाम सैल सोडणें, त्याला वाटेल तसा जाऊं देणें. *To give r.* or *the rr. to one's imagination*, let it have free scope. कल्पनाशक्तीला पूर्ण मुभा देणें. *Assume, drop, the rr. of government*, enter upon, resign, office. अधिकार-सत्ता-हातीं घेऊन चालविणें,-सोडणें. *Rein'less*, a. लगाम नसलेला, स्वैर.

Rēincarn'āte, *v. t.* (रीइन्का'र्नेट्)—to be again embodied in flesh, be again living embodiment of. पुनः अवतार धारण करणें, नवा अवतार घेणें. *Reincarna'tion*, *n.* पुनः अवतार, नवा अवतार.

Rein'deer, *n.* (रे' न्-डिअर्)—deer of cold climates used for drawing sledges. उत्तर प्रदेशांतला एक प्रकारचा सांबर.

Rēinfōrce', *v. t.* (री-इन्फो' र्स्)—to support or strengthen by additional men or material; (rare) enforce again, reinforce. जास्त मनुष्यें किंवा साहित्य देऊन बळकटी आणणें, कुमक पाठवून मजबूत करणें, पुन्हा अमलांत आणणें. *n.* thicker part of gun next breech, strengthening part, band etc. added to object. बंदुकीच्या मागचा जाड भाग, मजबुतीचें साधन. *Reinforced concrete*, with metal bars, gratings or wire embedded in it. धातूच्या तारा, किंवा खांब लावून त्यांमध्यें खचून भरलेला चुना, दगड वगैरेचें मिश्रण (इमारतीच्या बांधकामासाठीं).

Rēinfōrce'mēnt, *n.* (री-इन्फो'र्स्-मेन्ट्)—(often *pl.*) additional troops or ships. जादा सैन्य किंवा जहाजें.

Reins, *n. pl.* (रेन्झ्)—(*arch.*) the kidneys; the lower part of the back, loins. मूत्राशय; कमर.

Rēinstāte', *v. t.* (री-इन्स्टे'ट्)—to instate anew, to re-establish in former position; to restore to health or proper order, restore to privileges. पूर्वपदावर स्थापना करणें; प्रकृति सुधारणें; पुनः स्थापित करणें, फिरून ठेवणें, नेमणें, योजणें.—*ment*, *n.* पुनः स्थापना, पुनः नेमणें,-ठेवणें.

Rēinsure', *v. t.* &. *i.* (रीइन्शु'अर्)—to insure against (loss that one has under-written). (पाण्यासंबंधींच्या विम्याचा पुन्हा) विमा उतरणें. *Reinsurance*, *n.*

Rēinvĭgo'rāte, *v. t.* (रीइन्व्हिगो'रेट्)—to make vigorous again. पूर्वीचा जोम आणणें, पुनः शक्ति आणणें.

Rēĭt'erāte, *v. t.* (री-इ'टरेट्)—to repeat over again or several times. फिरून फिरून किंवा अनेक वेळां म्हणणें.-*tion*, *n.*-*tor*, *n.*;-*tive*, *a.*

Reive, reiver,—See Reave.

Rejĕct', *v. t.* (रिजे'क्ट्)—to put aside as not to be accepted, used, etc.; vomit. नाकारणें, झिडकारणें, अमान्य करणें; वांती करणें, ओकून टाकणें. *Rejec'tion* *n.*; *Rejec'tor*, *n.*

Rejoice', *v. t.* & *i.* (रिजॉ'इस्)—to cause joy to, to make glad; to feel joy, to be glad; to celebrate an event. आनंद देणें, हर्षविणें; आनंदणें; हर्ष पावणें; प्रसंग साजरा करणें. *Rejoic'ingly*, *adv.*

Rejoi'cings, *n. pl.* (रिजॉइ'सिंग्झ्)—merrymaking, feeling of joy, festivity. उत्सव, उत्साह, मौज.

Rejoin', *v. i.* & *t.* (रिजॉ'इन्)—to say in answer, to retort; to join (one's companion, etc.) again., reunite. प्रत्युत्तर करणें, उलट जबाब देणें; फिरून भेटणें; पुनर्भेट होणें.

Rejoin'der, *n.* (रिजॉइ'न्डर्)—a retort; (Law) reply to replication. प्रत्युत्तर, उलटजबाब, उत्तरपक्ष, परतजबाब.

Reju'venāte, *v. t.* & *i.* (रिजू'व्हिनेट्)—to make or grow young again. फिरून तारुण्य देणें, पुनः तरुण होणें,-*nation*, *n.*;-*nator*, *n.*

Rejuvenēs'cence, *n.* (रिजूव्हिने'सन्स्)—growing young again, the state of being young again; पुनर्यौवनावस्था; पुनः टवटवीत होणें -*cent*, *a.* पुनः नवीन-तरुण-होणारा, पुनः टवटवीत होणारा.

Relăpse', *v. i.* (रिलॅ'प्स्)—to fall back *into* worse state after improvement. फिरून बिघडणें, उलट खाणें, दुराचरणाकडे-आळसाकडे-वळणें,-उलटणें. *n.* a falling back. फिरून बिघडणें, उलट, माघार.

Relāte', *v. t.* & *i.* (रिले'ट्)—to narrate, to recount; to bring into relation. कथन करणें; हकीकत सांगणें; संबंध किंवा नातें जोडणें, संबंध असणें. *Rela'ted*, (*p. p.*) connected, allied. संबंधी, नातेवाईक, आप्त, आप्तसंबंधी. *Rela'tedness*, *n.*

Relā'tion, *n.* (रिले'शन्)—narration, a narrative; connexion between persons or things; kinsman, kinswoman, relative. निवेदन, निरूपण; संबंध, अन्वय; नातलग, आप्त. *In r. to, with r. to*, as regards. संबंधीं, विषयीं. *Relations are rather strained*, cordiality is impaired. (त्यांचे) संबंध दुरावले आहेत, मैत्रींत बिघाड झाला आहे, बितुष्ट आलें आहे. *Rela'tional*, *a.*;-*ally*, *adv.*

Relā'tionship, *n.* (रिले'शन्-शिप्)—the tie of kindred, kinship; affinity. नातें, आप्तपणा; संबंध.

Rĕl'ative, *a.* (रे'लटिव्ह्)—corresponding in some way; related to each other, having reference to; (Gram.) referring to an expressed or implied antecedent; comparative; correlative. सापेक्ष; संबंधीं, विषयक; तुलनात्मक; परस्परसंबंधीं; संबंधीं. *n.* (*Gram.*) a relative word; a kinsman or kinswoman, a relation; (philos.) *r.* thing or term. संबंधी शब्द; नातलग; संबंधी पदार्थ,-पद. *R. pronoun*, संबंधी सर्वनाम. *Supply is r. to demand*, मागणीच्या प्रमाणांत पुरवठा असतो. *Rel'atively*, *adv.* सापेक्षतेनें, सापेक्ष रीतीनें. (Gram.) *The principal rr. are* who, which, that, what. चार मुख्य संबंधीं शब्दः 'हू', 'व्हिच्', 'दॅट्', व्हॉट्'.

Rĕl'ativism, *n.* (रे'लटिव्हिझम्)—doctrine that knowledge is of relations only. संबंधानुसंबंधि ज्ञानवाद, वस्तुमात्रांमधील परस्पर संबंध जाणल्यानें ज्ञानप्राप्ति होते हा वाद. *Rel'ativist*, *n.* संबंधानुसंबंधीज्ञानवादी.

Rĕlativ'ity, *n.* (रेलटि'व्हिटि)—relativeness; (philos.) Einstein's theory of the universe, based on the

principle that all motion is relative, and regarding space-time as a fourth dimension. संबंधिता, परस्परसंबंध ; आइन्स्टीन नामक तत्त्ववेत्याचा सापेक्षतावाद.

Rĕlăx', *v. t. & i.* (रिलॅ'क्स्)—to cause or allow to become loose or slack; to enfeeble, to enervate, to mitigate; to grow less strict or energetic, to make less severe. सैल सोडणें,-करणें, शिथिल करणें, ढिला होणें,-करणें ; कमी करणें ; सौम्य होणें, सुस्त होणें. *Relaxed throat*, form of sore throat, घशाच्या (सुजेचा) एक रोग. *A relaxing climate*, (opp. *bracing*), सुस्ती आणणारी हवा. *To r. one's efforts, r. in one's efforts*, प्रयत्नांत कसूर करणें, प्रयत्न शिथिल करणें.

Rēlăxā'tion, *n.* (रीलॅक्से'शन्)—partial remission of penalty, duty etc.; diminution of tension, etc.; cessation of restraint, recreation, amusements (शिक्षेची, कर्तव्याची, वगैरे) सूट, कमी होणें,-करणें ; सौम्यपणा, हलकेपणा ; विश्रांति, करमणूक.

Rĕlay', *n.* (रि-ले')—set of fresh horses or gang of men to replace tired ones, gang of men or supply of material similarly used; (Teleg.) instrument reinforcing long distance current with local battery; (Wireless) broadcast of a message, programme, originating at, and received from, another station. दमलेल्यांच्या ऐवजीं बांधण्याकरितां ठेवलेले घोडे, टप्प्याचे घोडे किंवा कामाला लावण्याकरितां ठेवलेलीं माणसें ; टप्प्यावरची बॅटरी, (परठिकाणाहून आलेले संदेश व कार्यक्रम टेलिफोनद्वारें घेऊन) बिनतारी यंत्रानें प्रसृत करणें. *v. t. & i.* to arrange in, provide with, replace by, get relay (s), टप्प्याची व्यवस्था करणें, टप्पे असणें ; बिनतारीनें परठिकाणचे संदेश घेऊन प्रसृत करणें. *R. race*, race between teams of which each runner does part of the distance, the second etc. members of teams starting when 1st e c. ends. (प्रत्येक बाजूपैकी दर एक गडी हप्त्याहप्त्यानें धावून खेळली जाणारी) धावण्याची शर्यत. *R. station*, (Wireless) a transmitting station which receives most of its programme by a telephone line from a distant studio. फार दूरच्या (बिनतारी संदेश-) ठिकाणाहून टेलिफोनद्वारें बिनतारी-संदेश कार्यक्रम-घेऊन तो सगळीकडे प्रसृत करणारें ठिकाण.

Rĕlease', *v. t.* (रि-लीस)—to set free, to liberate, to deliver; to unfasten; to remit, to make over to another; to exhibit (a cinema film) for first time. मुक्त करणें ; सोडवणें ; मिळकतविरील हक्क सोडणें, दुसऱ्याच्या स्वाधीन करणें ; सिनेमा फिल्म पहिल्या प्रथम दाखविणें. *n.* liberation from confinement, fixed position, trouble &c.; written discharge, receipt; conveyance of right or estate. मुक्तता ; सुटका, सोडवणूक, सोडचिठ्ठी, वेदावापत्र. *Releasee', Releas'or, nn.*; *Releas'able, a.*

Rĕl'ĕgāte, *v. t.* (रे'लिगेट्)—to banish, to exile; to consign to an inferior position; to transfer to a person for decision or execution; to refer for information etc. *to*. देशाबाहेर पाठविणें, हद्दपार करणें ; कमी दर्जावर ढकलणें, निर्णयार्थ एखाद्याकडे पाठविणें ; (चौकशीकरितां, माहितीकरितां) पाठविणें. *Relega'tion, n. Rel'egable, a.*

Rĕlent', *v. i.* (रिलेन्ट्)—to relax severity; to give way to compassion. कमी तीव्र,-कठोर,-होणें ; सौम्य होणें ; कळवळा येणें, द्रवणें, कळवळणें, दया येणें. *Relent'ingly, adv.*

Rĕlĕnt'lĕss, *n.* (रिले'न्ट्-लेस)—without tenderness or compassion, merciless, pitiless. निर्दय, पाषाणहृदयी, क्रूर, कठोर.*-ly, adv.*;*-ness, n.*

Rĕl'ĕvant, *a.* (रे'लिव्हन्ट्)—concerned with the matter in hand; appropriate, pertinent *to*. प्रसंगोचित ; समर्पक, प्रस्तुत. *Rel'evance,-cy, nn.* प्रस्तुतता, प्रसंगोचितता. *Rel'evently, adv.* (चालू) विषयाला धरून.

Rĕli'āble, *a.* (रिला'यबल)—that may be relied upon or trusted, trustworthy. विश्वासू, भरंवशाचा. *Reliabil'ity, n.*; *Reli'ableness, n.*; *Reli'ably, adv.* विश्वासानें, भरंवशानें.

Rĕli'ance, *n.* (रिला'यन्स)—act of relying, trust, confidence (*upon, on, in*), dependence, thing depended on विश्वास, भरंवसा, श्रद्धा, आधार, आश्रय, आश्रयस्थान, विश्वासाचें ठिकाण. *Reli'ant, a.*

Rĕl'ic, *n.* (रे'लिक्)—part of holy person's body or belongings kept after his death; memento, souvenir; (*pl.*) dead body of person; what has survived destruction or wasting, residue. साधुसंताच्या देहाचा अवशेष, अस्थी ; स्मृति, स्मारक ; (अनेः) प्रेत ; शेष, अवशेष ; पडका भाग.

Rĕl'ict, *n.* (रे'लिक्ट्)—man's widow. विधवा.

Rĕlief', *n.* (रिली'फ्)—alleviation or end of pain, distress, or anxiety; money or food given to victims of disaster, &c.; delivery of a place from siege; replacing of persons on duty by those appointed to take turn of duty; redress of hardship or grievance; feature that diversifies monotony or relaxes tension; way of carving or moulding in which design stands out from surface; distinctness like this. दुःखपरिहार, दुःखमोचन ; विसावा, विश्रांति ; संकटग्रस्तांना केलेलें साहाय्य ; (वेढ्यांतून) मुक्तता, सुटका ; (पहाऱ्याचा) पालट, सोडवणें ; बदलणें, बदली, बदल्या, सोडविणारा ; गाऱ्हाण्याची दाद, संकटाची दाद लावणें ; (एकसारखेपणाचा कंटाळा घालविणारें) वैचित्र्य, विरोध ; नकाशांतील कांहीं भाग पृष्ठभागापासून उंचसखल दिसतील अशा तऱ्हेनें कोरणें ; उंचसखलपणा, उठाव, उंची ; ठळकपणा, ठळठळीतपणा. *R. works*, building etc. operations started to give work to the unemployed. मदतीचीं कामें ; दुष्काळीं कामें. *A r. fund*, संकटग्रस्तांच्या मदतीसाठीं वर्गणी. *A blank wall without r.*, कंटाळवाणी दिसणारी उघडीनागडी भिंत. *A comic scene follows by way of r.*, कंटाळा घालविण्यासाठीं-वैचित्र्य उत्पन्न करण्यासाठीं-हास्यरसप्रधान प्रसंग दाखविला जातो-

Stands out in r., अगदीं ठळकपणें दृष्टोत्पत्तीस येतो. *General r.*, सामान्य उंची,-उंचपणा.

Relieve', *v. t.* (रिलीव्ह्)—to give relief to; bring, be, a relief to; to bring into relief. आराम देणें, सुटका करणें; दुःखपरिहार करणें; शमविणें, उपशमन करणें; मदत करणें, सोडविणें, उठावदार करणें, ठळकपणा आणणें. *Relieving officer*, official with care of the poor गोरगरिबांची काळजी घेण्यासाठीं नेमलेला अंमलदार. *Relieving arch*, arch built in substance of wall to relieve part below from weight. सुकी कमान. *To relieve one's feelings*, मन (विचार बोलून दाखवून) हलकें करणें. *To r. nature*, मलमूत्र विसर्जन करणें. *To r. guard* पहारा बदलणें, आळीपाळीनें बदली पहारा करणें. *Relievable, a.*

Reli'gion, *n.* (रिलि'जन्)—a system of faith and worship; human recognition of a personal God entitled to obedience; monastic state; action that one is bound to do. धर्म; भक्ति, आस्तिक्यबुद्धि, ईश्वरभक्ति, कर्तव्यकर्म. *To enter into, in r.*, मठवासी-संन्यासी-बनणें. *Established r.* (इंग्लंड-मधील) राजस्थापित धर्म. *Natural r.*,स्वाभाविक धर्म. निसर्गधर्म, *Revealed r.*, ईश्वरप्रेषिताच्या द्वारें प्रगट झालेला धर्म. *R.-less, a.* धर्म नसलेला, धर्महीन.

Reli'gious, *a.* (रिलि'जस्)—imbued with religion, teaching religion; devout; belonging to a monastic order; scrupulous, conscientious. धार्मिक; भक्तिमान्, भाविक, आस्तिक, श्रद्धाळु; मठवासी; सदसद्विवेकपूर्वक, फार, अतिशय. *n.* person bound by monastic vows. (दारिद्र्य, ब्रह्मचर्य, आज्ञापालन ह्या तीन शपथा घेतलेला) रोमन कॅथोलिक जोगी. *Reli'giously, adv.*; *Reli'giousness, n.*

Relinqu'ish, *v. t.* (रिलि'ङ्क्विश्)—to give up; to resign, to surrender, to renounce a claim to. सोडणें; सोडून देणें, (हक्क) सोडणें, त्याग करणें. *—ment, n.*

Reli'quary, *n.* (रिलि'क्वरि)—a receptacle for holding relics. मृताच्या अस्थि वगैरे ठेवण्याची पेटी, भांडें; अवशेष ठेवण्याचें पात्र.

Reliq'uiae, *n. pl.* (रिलि'क्विई)—remains; (Geo.) fossil remains of animals or plants; (Bot.) withered remains of leaves decaying on stem. अवशेष; जमिनींत कुजलेले मृत प्राण्यांचे किंवा वनस्पतीचे अवशेष; देठांवर कुजलेल्या पानांचे अवशेष. [L.]

Rel'ish, *n.* (रे'लिश्)—distinctive flavour or taste of, enjoyment of food or other things, zest; sauce or other appetizer. स्वाद, चव, रुचि, गोडी; कळकळ, अभिरुचि, आवड; तोंडीं लावणें. *v. t. & i.* to serve as relish to; get pleasure out of, to be pleased with, to have a pleasing taste, smack of. स्वादिष्ट असणें; गोड वाटणें; गोड लागणें, खमंग लागणें; चव येणें, पसंत पडणें, बरा वाटणें; चवदार असणें; ची चव, छटा असणें. *No r. for poetry*, कवितेबद्दल गोडी न वाटणें, काव्याविषयीं गोडी नसणें. *Rel'ishable, a* रुचि लागण्यासारखा, आवडण्यासारखा, स्वादिष्ट, रुचकर.

Reluc't, *v. i.* (रिलं'क्ट्)—to feel or show reluctance, make opposition (*at, against*). नाखुशी, तिटकारा, -वाटणें,-दाखविणें, प्रतिकार करणें. *Reluc'tate, v. i.*, *Reluc'tation, n.*

Reluc'tance, *n.* (रिलं'क्टन्स्)—unwillingness. नाखुशी, नाराजी, कंटाळा, विमुखता.

Reluc'tant, *a.* (रिलं'क्टन्ट्)—unwilling to do something, loath, disinclined. नाखुश, नाराज, विन्मुख. *Reluc'tantly, adv.* नाखुषीनें, कष्टानें.

Rely, *v. i.* (रिला'य्)—to put one's trust in; to depend with confidence *on*, (or *upon* person or thing). विश्वास ठेवणें; भरंवसा असणें, पातणें, अवलंबणें.

Remain,' *v. i.* (रिमे'न्)—to be left over; to abide, to stay in some place or condition; to be left behind after any event; (with compl.) continue to be. उरणें, शिल्लक असणें, शिल्लक राहणें; मुक्काम करणें; टिकणें; नांदणें; राहणें, असणें. *R. faithful*, विश्वासू असणें,-राहणें. *I r. Yours truly, etc.*, (पत्राच्या शेवटचा मायना).

Remain'der, *n.* (रिमे'न्डर्)—residue; remaining persons or things, unsold stock, esp. of books; (Arith.) number left after subtraction; (Law) residual interest in estate devised to another, right of succession to title or position on holder's decease. अवशेष; शिल्लक राहिलेले लोक किंवा वस्तु; शिलकी (पुस्तकांचा) सांठा; (अंक.) बाकी, अंतर, शेष; (काय.) अवशिष्ट (राहिलेला) मालकी हक्क, शेष. *R. man*, devisee of r. शेषाधिकारी (cf. *Reversioner*, उत्तराधिकारी). *R. theorem*, अवशेष-सिद्धान्त.

Remains', *n. pl.* (रिमे'न्झ्)—what remains over; surviving parts or amount, remainder, relics of antiquity, a dead body. अवशेष; शिल्लक भाग किंवा रक्कम; प्रेत, शव.

Remand', *v. t.* (रिमा'न्ड्)-to send back (a prisoner) into custody to allow of further evidence being obtained. (पुरा पुरावा मिळेपर्यंत कच्चा कैदी) परत (अटकेंत) पाठविणें. *n.* such recommittal. परत अटकेंत पाठविणें.

Rem'anent, *a.* (रे'मनन्ट्)—remaining, residual. बाकी, अवशिष्ट. *R. magnetism*, that left in iron after electric excitation. अवशिष्ट लोहचुंबकधर्म,-आकर्षण-शक्ति.

Remark', *v. t. & i.* (रिमा'र्क्)—to take notice of, to perceive; to observe; to say by way of comment, make comment upon. (कडे) लक्ष देणें,-पाहणें, लक्षांत घेणें; पाहणें;-टीका करणें. *n.* noticing, an observation; comment; a thing said. पाहणें; टीका; उल्लेख, बोलणें; शेरा मारणें, शेरा. *Worthy of r.*, remarkable. प्रख्यात, प्रसिद्ध. *To make a r.*, speak. बोलणें, टीका करणें, शेरा मारणें.

Remark'able, *a* (रिमा'र्केबल्)—worth notice; exceptional; striking. लक्षांत ठेवण्यासारखा, असामान्य; विलक्षण. *-ably, adv.*;*—ableness, n.*

Rĕmar'ry, *v. t.* (रीमॅरि)—to marry again. पुनर्विवाह करणें,-लावणें. *Remar'riage, n.* पुनर्विवाह.

Rĕm'ĕdy̆, *n.* (रेॅमिडि)—cure for disease or any evil; healing medicine or treatment; redress. उपाय, उपचार; इलाज. *v. t.* to rectify, to counteract; to make good; to cure medically (rare). उपाय करणें; परिहार करणें; (औषधानें) बरें करणें. *Reme'dial, a.* affording a remedy. उपायाचा, इलाजाचा, परिहारक, प्रतिबंधक. *Reme'dially, adv.*; *Rem'ediless, a.* असाध्य, उपाय नसलेला. *Reme'diable, a* परिहार्य,-उपाय,-करण्याजोगा, साध्य.

Rĕmĕm'ber, *v. t.* (रिमे'म्बर)—to retain in the memory; not forget; make present to, tip; to convey greetings from, to put in mind of. स्मरण ठेवणें, आठवणें; न विसरणें; बक्षीस देणें, चिरिमिरी देणें; नमस्कार सांगणें, आठवण करून देणें. *To r. oneself,* bethink oneself of one's manners or intentions after a lapse. (स्वतःच्या वागणुकीची,-च्या विचारांची-) कांहीं काळानंतर स्मृति होणें, आठवण होणें. *R. me kindly to them,* त्यांना माझे नमस्कार सांगा. *Remembered me in his will,* त्यानें आपल्या मृत्युपत्रांत मला देणगी देऊन ठेवली आहे. *R. the waiter,* चाकराला बक्षीस दे. *Remem'berable. a.* स्मरणीय, ध्यानांत ठेवण्यासारखा.

Rĕmĕm'brance, *n.* (रिमे'म्ब्रन्स)—memory, recollection; keepsake, souvenir, memorial, regard; (*pl.*) greetings conveyed through third person. स्मरण, आठवण; आठवणूक, स्मारक, स्मरणार्थ (दिलेली वस्तु; (अने०). दुसऱ्यामार्फत सांगितलेला नमस्कार. *To put in r,* remind. आठवण करणें,-देणें.

Rĕmĕm'brancer, *n.* (रिमे'म्ब्रन्सर)—reminder, memento, of; title of certain officials. आठवण देणारा, स्मरण करणारा; सरकारी (कांहीं) अधिकाऱ्याची पदवी *Legal r.,* सरकारला कायद्याचा सल्ला देणारा वरिष्ठ सरकारी अधिकारी.

Rĕmind', *v. t.* (रिमा'इन्ड्)—to put in mind of, to bring to the remembrance of, cause to remember. आठवण करणें, सुचवणें.

Rĕmi'nder, *n.* (रिमा'इन्डर्)—a speech or thing that reminds, a hint. आठवण करून देणारें भाषण, सूचना, स्मरणपत्र, स्मरणार्थ पत्र.

Rĕmĭnĭs'cence, *n.* (रेमिनि'सन्स)—remembering, recollection; fact or incident of which one remembers the occurrence; recovery of knowledge by mental effort; (*pl.*) collection in literary form of incidents that person remembers; point in thing reminding of other thing. आठवण; आठवणींतील घडलेली गोष्ट; पूर्वस्मृति; (अने०) आयुष्यांतील आठवणी; स्मृतिकारक विषय. *Platonic doctrine of r.,* that all knowledge is such recovery of things known to the soul in previous existences. ह्या जन्मींचें ज्ञान (पूर्वीच्या जन्मांतील ज्ञानाची स्मृति होय, हा प्लेटोचा) पूर्वस्मृति-सिद्धांत. *Reminiscen'tial, a.*

Rĕmĭnĭs'cent, *a.* (रेमिनि'सन्ट्)—recalling the past; reminding one *of,* retrospective. मागील आठवण करून देणारा,-सूचक.-*ly, adv.*

Rĕmise', *v. t.* (रिमा'इज्)—(legal) surrender, make over (right, property). (हक्क) सोडणें.

Rĕmiss', *a.* (रिमि'स्)—careless of duty; negligent; lacking energy. ढिला, शिथिल, कामचुकार, निष्काळजी; बेपरवा; सुस्त.-*ly, adv.*-*ness, n.*

Rĕmiss'ible, *a.* (रिमि'सिब्ल्)—that may be remitted. ढिला करण्यासारखा, सूट देण्यासारखा, क्षमा करण्यासारखा.

Rĕmiss'ion, *a.* (रिमि'शन्)—release, relinquishment; forgiveness, pardon; diminution of force (sins etc.). सुटका; क्षमा, माफी, सूट; बाधा कमी होणें, उतार, उपशम. *Remiss'ive, a.*

Rĕmit', *v. t. & i.* (रिमि'ट्)—to pardon; to refrain from exacting or inflicting (debt, punishment, etc.), to abate, to slacken; to refer (matter) to some authority; send back to lower court; to transmit. क्षमा करणें; सूट देणें; कमी होणें; हवालीं करणें; मुकदमा खालच्या कोर्टाकडे पुन्हां पाठविणें; पैसे (वगैरे) पाठविणें. *Remitter, n.* (पैसे) पाठविणारा; माफी, क्षमा,-करणारा. *Remittee', n.* पैसे घेणारा, ज्याला पैसे पाठविले तो. *Remittal, n.* पाठविणें, सोडणें, देणें.

Rĕmit'tance, *n.* (रिमि'टन्स)—the sum or thing remitted, money sent to a person. पाठविलेला पैसा किंवा वस्तु.

Rĕmit'tent, *a. & n.* (रिमि'टन्ट्)—(fever) that abates at intervals. मधून मधून कमी होणारा (ताप), संतत (ज्वर).

Rĕm'nant, *n.* (रे'म्नन्ट्)—small remaining quantity or piece or number, surviving trace of; fragment, scrap, esp. piece of cloth offered at reduced price. अवशिष्ट भाग, बाकी, शेष; शिल्लक राहिलेला तुकडा, कढका.

Rĕmŏn'strance, *n.* (रिमॉ'न्स्ट्रन्स)—remonstrating, expostulatory counsel or advice, a protest. कानउघाडणी, तक्रार, तक्रार-अर्ज.

Rĕmŏn'strant, *a.* (रिमॉ'न्स्ट्रन्ट्)—of or in remonstrance. कानउघाडणी करणारा, तक्रारीचा. *n.* person who remonstrates. कानउघाडणी करणारा,-तक्रार करणारा,-मनुष्य.

Rĕmŏn'strāte, *v. t. & i.* (रिमॉ'न्स्ट्रेट्)—to make protest, expostulate, (*against* course, *with* person, *on* or *upon* matter), to urge in remonstrance. तक्रार करणें, कान उघडणें, आक्षेप,-हरकत,-घेणें. *Remonstrator, n.*

Rĕmŏrse', *n.* (रिमॉ'र्स)—stings of conscience, bitter repentance, compunction. पश्चात्ताप, खेद, चुरचूर, तळमळ, सदयता.-*ful, a.* filled wtih repentance. पश्चात्ताप झालेला, अनुतप्त.-*less, a.* deaf to compassion. निर्दय, कठोर.

Rĕmōte', *a.* (रिमो'ट्)—far away in place or time; not closely related; far apart; distant from;

out-of-the way, secluded; (chiefly superl. of idea etc.) slight (est), faint (est), least. दूरचा, लांबचा; दूरच्या नात्याचा; अतिशय दूरचा; अंतरावरील; एकांतवासाचा, रहदारीपासून दूरचा; थोडकासा, अगदीं थोडा, यत्किंचित् *A r. village*, अगदीं बाजूचें,-आडवळणी,-खेडें, *Have not the remotest, a very r., conception of what he means*, त्याचें म्हणणें काय आहे याची त्यांना यत्किंचित् सुद्धां कल्पना नाहीं. *Remote'ly, adv.*; *Remote'ness, n.*

Rémount', *v. t. & i.* (रिमा'उन्ट्)—to go up, get on to (hill, horse, etc.), provide with fresh horse (s); go up again; go back *to* specified date, period, source. पुन्हां वर चढणें, पुनः स्वार होणें; घोडे जोडणें, घोडे बदलणें; पुन्हां वर जाणें; मूळ ठराविक-तारीख,-काळ-उगम पाहणें. *n.* horse to replace one killed or worn out. नवीन बदली घोडा.

Rémo'vable, *a.* (रिमू'व्हबल्)—that can be removed or taken away. दूर नेतां-करतां-येण्यासारखा, हालवतां येण्याजोगा, जंगम. *Removabil'ity, n.*

Rémo'val, *n.* (रिमू'व्हल्)—dismissal from a post; change to another place. काढून टाकणें; स्थलान्तर.

Rémove', *v. t. & i.* (रिमू'व्ह्)—to take off or away from place occupied; convey to another place; dismiss; to change one's residence; (pass. of course at dinner) be succeeded by. हालविणें, दूर नेणें, जागा बदलणें; काढणें, काढून टाकणें; घालविणें, दूर करणें; जागा बदलणें; उचलून नेणें, दुसरें (पक्वान्न, खाद्य) आणणें-वाढणें. (p. p.) *remov'ed*, distant from. दूरचा, मध्यें पिढ्या असलेला (नातेवाईक). *n.* stage in gradation; promotion to higher form at school; a form in some schools; (rare) change of residence, removal, departure; distance; a dish that succeeds. पायरी, अंतर, पल्ला, टप्पा; चूल, पिढी; शाळेंत वरच्या वर्गात चढवणें, वर्ग; बिन्हाड बदलणें, निघून जाणें; अंतर; (एका नंतरचें) दुसरें पक्वान्न. *To r. mountains*, do miracle. अद्भुत गोष्ट-चमत्कार-घडवून आणणें. *Boy is removed from school*, taken away by parents. आईबापांनीं नाव काढून नेलेला मुलगा. *Remov'er, n.* बिन्हाड बदलतांना समानसुमान नेण्याचा धंदा करणारा. *My first cousin, once, twice removed*, चुलतभावाचें मूल, किंवा चुलत चुलता; चुलतभावाचें नातवंड किंवा आजोबाचा चुलतभाऊ इ.

Rémū'nerāte, *v. t.* (रिम्यू'नरेट्)—to reward; to pay for service rendered. बक्षीस देणें, मोबदला देणें, पगार देणें.*-tor, n.*

Rémūnerā'tion, *n.* (रिम्यूनरे'शन्)—what is received as pay, reward, recompense. पगार, मोबदला, बक्षीस, भरपाई.

Rémū'nerātive, *a.* (रिम्यू'नरेटिव्ह्)—profitable. किफायतशीर, फायदेशीर.*-ly, adv.*; *-ness, n.*

Rénaiss'ance, *n.* (रिने'सन्स्)—revival of arts and letters in 14th-16 th ce., period of its progress; any similar revival; style of art and architecture developed by it; renewal, new birth. कलांचें व विद्येचें पुनरुज्जीवन, त्यांचा काल; तत्सदृश पुनरुज्जीवन, पुनर्जीवन; कला आणि शिल्प यांचें तत्कालीन पुनरुज्जीवन; नवजन्म, नवावतार.

Rē'nal, *a.* (री'नल्)—of the kidneys. मूत्राशयाचा, मूत्रपिंडसंबंधीं.

Rénăs'cence, *n.* (रिनॅ'सन्स)—rebirth, rejuvenation, reappearance; renaissance. पुनर्जन्म, नवोद्भव, नवजन्म; पुनरुज्जीवन.

Rénăs'cent, *a.* (रिनॅ'सन्ट्)—springing up anew; being re-born. नव्यानें वर येणारा, उद्भवणारा, उत्पन्न होणारा, नवोदित.

Rĕncoun'ter, Rencŏn'tre, *n.* (रेन्-का'उन्टर्, रेन्कॉ'न्टर्) —(rare) encounter, duel; casual meeting. चकमक; अकस्मात् गांठ.

Rĕnd, *v. t. & i.* (रेन्ड्)—to tear or wrench, to force asunder; to split or divide. फाडणें, हिसकणें; फाटणें, चिरणें, टरकणें, विदारणें. *To r. one's garments, hair*, (in sign of grief etc.). (दुःखातिशयानें) अंगावरील वस्त्र फाडणें, केंस उपटणें. *To turn & r. one*, (fig.) abuse him unexpectedly. एखाद्याला अकस्मात् शिविगाळ करणें; अपशब्द बोलणें. *Shouts r. the air*, sound explosively. आरोळ्यांनीं आकाश फाटून-दुमदुमून-गेलें. *To r. in two*, दुफाड करणें. *To r. in pieces*, तुकडे तुकडे करणें. *Pa. t. & pa. p. rent.*

Rĕn'der, *v. t.* (रे'न्डर्)—to give in return; to pay as due; to deliver up; to execute, translate; present, submit; portray; melt (fat) down; (with obj. & compl.) make, came to be, convert into; cover (stone, brick) with first coat of plaster. परत देणें, परत करणें, उलट करणें; देणें असलेलें देणें; स्वाधीन करणें, देऊन टाकणें; पुरें करणें; भाषांतर करणें; जाब,-हिशेब, देणें; चरबी (वितळवून) काढणें; करणें, बनविणें, युक्त करणें; गिलाव्याचा पहिला हात देणें. *n.* (legal) return in money or kind or service made by tenant to superior. (मोबदल्यादाखल) खंड, खंडादाखल चाकरी. *To r. thanks*, (बद्दल) आभार मानणें. *To r. good for evil*, अपकाराची फेड उपकारानें करणें. *Account rendered*, bill previously sent in and not yet paid, phr. used as substitute for repetition of items. पूर्वीच काढून दिलेला पण वसूल न झालेला हिशेबाचा आंकडा, हिशेब. *To render-set, v. t.* plaster (wall etc.) with two coats. (भिंतीला) गिलाव्याचे दोन हात देणें; *n. & a.* (plastering) of two coats. दोन हाती (गिलावा).

Rĕn'dering, *n.* (रे'न्डरिंग)—translation or portrayal, interpretation, exhibition. भाषांतर, तसबीर, चित्र.

Ren'dezvous, *n.* (रॉं'न्-डि-व्हू)—(*pl.* same -व्हूज्) a place appointed for assembling of troops or ships; place of common resort; meeting place agreed on; meeting by appointment. (सैन्य किंवा आरमार एकत्र होण्याचें) संकेतस्थान, एकत्र जमण्याची किंवा भेटण्याची जागा, अड्डा; आधीं ठरवून भेटणें. *v. i.* to meet at *r.* संकेतस्थळीं जमणें,-मिळणें. [F]

Rĕndi'tion, *n.* (रेन्डि'शन्)—(rare) surrender of place or person; (U. S.) translation; act of rendering or performing. स्वाधीन करणें; भाषांतर देणें,-करणें.

Ren'égāde, *n.* (रे'निगेड्)—deserter of party or principles; one who deserts to an enemy, apostate. आपला पक्ष किंवा तत्त्वें सोडणारा, स्वपक्षत्यागी, -मतत्यागी; शत्रुपक्षाला जाऊन मिळणारा; स्वधर्मत्यागी. *v. i.* to turn *r.* आपलें मत, तत्त्व, आपला पक्ष,-धर्म, -सोडणें. *Renega'tion*, *n.*

Rénew', *v. t. & i.* (रिन्यू')—to make new or as good as new; to patch, to fill up, to replace, to re-establish, become new again. नवीन किंवा नव्यासारखा करणें; ठिगळ लावणें, नवा भरणें,-घालणें, बदलून नवा करणें; पुनः नवा होणें,-बनणें. *To r. lease, bill*, भाडेचिठ्ठी, करार वगैरे फिरून नवा करून देणे *To r. garrison*, किल्ल्यांतील सैन्यांत नवीन भरणा करणें, अधिक सैनिक आणणें,-पाठविणें. *Nature dies & is renewed*, वृक्षवनस्पतियुक्त सृष्टि मृत होऊन पुन्हां तीं जोमानें वाढते, मृतसृष्टींत नवचैतन्य येतें. *To r.* one's *youth, strength*, to grow *young, strong, again*, पुनर्यौवन, पुनर्जोम प्राप्त होणें. *Renew'able*, *a.*; *Renew'al*, *n.*

Rĕn'iform, *a.* (री'निफॉर्म्)—(Bot.) kidney-shaped. मूत्रपिंडाकार, गुर्दाकार. (*R. leaf*, उदा. अह्लीचें पान).

Rĕnn'ĕt, *n.* (रे'निट्)—1. curdled milk from calf's stomach, or artificial preparation, used in curdling milk for cheese, etc. (ऊन पाण्याच्या योगानें काढलेलें) वासराच्या जठरांतील पाचक अम्ल, कृत्रिम अम्ल. 2. kinds of dessert apple. मुखशुद्धी-साठीं खाण्याचीं एक जातीचीं फळें.

Rénounce', *v. t.* (रिना'उन्स्)—to surrender, to give up; to repudiate, to forsake; consent formally to abandon; withdraw from, discontinue; follow with card of another suit for want of right one. सोडून देणें, त्याग करणें, टाकून देणें, अगाबाहेर टाकणें; हक्कसंबंध तोडणें,-सोडून देणें, अधिकार सोडून देणें; माघार घेणें, बंद करणें; (पत्त्यांच्या डावांत) दुसऱ्या रंगाचें पान खेळणें (त्या रंगाचें पान नसल्यामुळें). *n.* playing of card of another suit. दुसऱ्या रंगाचे (पत्त्याचें) पान टाकणें. *To r. the world*, जगाच्या-संसाराचा-त्याग करणें.

Rĕn'ōvāte, *v. t* (रे'नोव्हेट्)—to restore to good condition or vigour; to repair. सुस्थिति प्राप्त करून देणें, नवीन शक्ति,-जोम,-आणणें, दुरुस्त करणें, पूर्ववत् करणें. *Renova'tion*, *n.* नवीनीकरण, सुधारणा. *Ren'ovator*, *n.*

Renown', *n.* (रिना'उन्)—fame, high distinction, glory, celebrity, exalted reputation. कीर्ति, मोठें नांव, आख्या, लौकिक. *Man, town, of r., of great r*, famous. प्रसिद्ध, प्रख्यात (पुरुष, शहर इ.). *Renown'ed*, *a.* famous, celebrated. प्रसिद्ध, विख्यात. [L. *re*, again; *nomen*, Sk naman, name]

Rent, (रेन्ट्)—pa. t. & pa. p. of *rend*. फाडलें, फाडलेलें, चिरलें, चिरलेलें.

Rĕnt, *n.* (रेन्ट्)—periodical payment for use of land, house, room; hire for machinery, etc.; a hole torn, a breach, gap, cleft, fissure, tear in garment. खंड, धारा, सारा, वसूल; भाडें; चीर भगदाड, फाळा, छिद्र, वाभाड. *v. t. & i.* to let or hire for rent; be let (*at*); take, occupy, or use at a rent. भाड्यानें देणें, किंवा घेणें; (अमुक) भाड्यानें देणें, भाड्यास लावणें; भाडें देऊन घेणें, वापरणें, मक्त्यानें-खंडानें-घेणें. *R.-charge*, periodical charge on land, etc. reserved to one who is not the owner. जमिनीचा वगैरे मालक नसलेल्याला द्यावयाचा ठराविक मक्ता,-खंड. *R.-free*, *a. & adv.*, with exemption from rent. विनाभाड्यानें, विनामक्त्याचें, मोफत *R.-roll*, register of person's lands etc. with *rr.* due from them, sum of one's income from rent. जमीनदारांच्या जमिनी व त्यांचें भाडें यांची नोंद असलेली वही, खातेदारांच्या जमाबंदीची वही; भाड्याच्या उत्पन्नाची रक्कम. *R. service*, (tenure by) personal service in lieu of or addition to *r.* जमिनीच्या खंडादाखल किंवा खंडाच्या भरीला चाकरी करणें. *Rent'able*, *a.*

Rĕn' tal, *n.* (रे'न्टल्)—a sum payable as rent; income from rents. भाड्याची रक्कम; खंड, वसूल, धारा.

Rénŭnciā'tion, *n.* (रिनन्सिए'शन्)—renouncing, document expressing it; self-denial; giving up of things, abandonment. त्याग, त्यागपत्र; संन्यास, आत्मत्याग, अस्वीकार, त्याग. *Renun'ciant*, *n. & a.* (रिन'न्शिअंट्); *Renun'ciative*, (-शे-) *a.*; *-tory* (-शट्रि) *a.*

Rĕp', rĕpp, rĕps, *n.* (रेप्,-रेप्स्)—textile fabric with corded surface used in upholstery. (खुर्च्या वगैरेंना घालण्याचें) रेघेरेघे जाडेंभरडें कापड.

Rĕp, *n.* (रेप्)—(sl.) person of loose character; (school sl.) verse etc. learnt by heart. वाईट चालीचा,-स्वैर,-मनुष्य; तोंडपाठ केलेली कविता.

Répair', *v. t.* (रिपे'अर्)—to resort; to go *to*; to restore to a good condition, to mend, renovate; remedy; make amends for. आश्रय घेणें; जाणें; दुरुस्त करणें, नीट करणें, जीर्णोद्धार-डागडुजी-करणें; प्रकृति सुधारणें; इलाज करणें; भरपाई करणें. *n.* restoring to sound condition; condition for working or using, resort, haunt. सुधारणा, डागडुजी; दुरुस्ती; स्थान, जागा, अड्डा, निवास, आश्रय. *A place of great, little, r.*, पुष्कळजण, थोडेजण,-जमण्याचें स्थान. *Shop is closed during rr.*, डागडुजीसाठीं,-दुरुस्तीसाठीं,-दुकान बंद आहे. *Is in r.*, सुस्थितींत,-दुरुस्त,-आहे. *Is out of r.*, नादुरुस्त,-बिघडलेलें,-आहे. *Repair'-able*, *a.*

Rēpand', *a.* (रीपां'न्ड्)—(Bot., Zool.) with undulating margin, wavy. विषमकडेचा, लाटेसारखा हेल-काव्याचा. *Repa'ndo-form*, *a.* [L. *re*, again; *pandus*, bent]

Rĕp'arable, *a.* (रे'परबल्)—(of loss etc.) that may be repaired, that can be made good. नुकसान भरून येण्याजोगा, सुधारण्यासारखा.

Rĕparā'tion, *n.* (रेपरे'शन्)—recompense for injury, compensation, amends; (*pl.*) repairs, compensation for war damages. भरपाई, फेड, मोबदला; (अने०) झागडुजी, नुकसानभरपाई.

Rĕpärtee', *n.* (रेपार्टी')—a witty retort. विनोदात्मक प्रत्युत्तर, हजरजबाबी उत्तर.

Rĕpäst', *n.* (रिपा'स्ट्)—a meal (esp. one of specified quality), food, victuals. भोजन, जेवण.

Rĕpa'trīāte, *v. t.* (रिपे'ट्रिएट्, रिपॅ-)—to restore to the native land or one's own country. स्वदेशाला परत पाठविणें, स्वदेशीं परत आणणें. *-tion, n.* [L. *Re*, back; *patria*, fatherland]

Rĕpay', *v. t. & i.* (रिपे')—to pay back; to return, to make return, to requite, to recompense. परत देणें; फेड करणें, मोबदला देणें; भरपाई करणें. *pa. t. & pa. p. Repaid. Repay'able, a; Repay'ment, n.* परत करणें,-देणें,-परत केलेली वस्तु,-दिलेला पैसा; फेड, भरपाई.

Repeal', *v. t.* (रिपी'ल्)—to annul, to revoke. (कायदा वगैरे) रद्द करणें, मोडणें, परत घेणें. *n.* repealing, revocation. रद्द करणें, मोडणें. *Repeal'able, a.*

Rĕpeat', *v. t. & i.* (रिपी'ट्)—to say or do over again; to recite, rehearse; reproduce; recur, appear again or repeatedly; (refl.) recur in same form. पुन्हां सांगणें, फिरून करणें; पुन्हा म्हणणें, पुनरावृत्ति करणें; म्हणून दाखविणें; पुन्हा येणें, वारंवार येणें; पुनरावृत्ति होणें. *n.* (Mus.) passage to be repeated; repeating or thing repeated, mark indicating this; (commerc.) fresh consignment similar to previous one, order given for this. पुन्हां घोळून म्हणण्याचें गीत; (गीत) पुन्हां म्हणणें; पुनरावृत्ति दर्शविणारी खूण, (पसंत पडलेल्या मालाची) पुनः पुनः मागणी. *Language will not bear repeating,* is too foul to repeat. पुन्हां न उच्चारण्यासारखे घाणेरडे शब्द,-घाणेरडी भाषा. *Repeating watch, Repeater,* जबाबी घड्याळ, (कमान दाबल्यावर) किती वाजले हें ठोके वाजवून सांगणारें घड्याळ. *Repeating rifle,* firing several shots without reloading. अनेकबारी बंदूक. *The last three figures repeat,* शेवटचे तीन आंकडे पुनः पुनः येतात, त्यांची पुनरावृत्ति होते. *History repeats itself,* इतिहासाची पुनरावृत्ति होते. *Repeat'able, a.*

Rĕpeat'edlȳ, *adv.* (रिपी'टिड्-लि)—several times, more than once, again and again. वारंवार, कित्येक वेळां, पुनः पुनः, फिरून फिरून, घडोघडीं.

Rĕpeat'er, *n.* (रिपी'टर्)—(esp.) repeating watch; (telegr. etc.) a device for automatically retransmitting signals, etc. from one circuit to another. जबाबी घड्याळ, (कमान दाबल्यावर) किती वाजले हें ठोके वाजवून सांगणारें घड्याळ, न दिसणारा सिग्नल (-खूण) खालीं पडला आहे कीं नाहीं हें आपोआप दाखविणारा विजेनें चालणारा धाकटा सिग्नल (खूण).

Rĕpĕl', *v. t.* (रिपे'ल)—to drive back, to check the advance of, to repulse; to ward off; be repulsive or distasteful to. मागें लोटणें; परतविणें, हटाविणें, (Phys.) प्रतिसारण करणें; निवारणें; तिरस्कार,-कंटाळा, तिटकारा आणणें. *Repelled', pa. t. & pa. p.*

Rĕpĕll'ent, *a.* (रिपे'लन्ट्)—(of manner etc) unsociable, uninviting; (of task) formidable, unattractive; (Phys.) driving back. तिरस्करणीय, घाणेरडी (चालचलणूक, वर्तन); भयंकर, त्रासदायक, कंटाळवाणें (काम इ.); (Phys.) प्रतिसारक.

Rĕpĕnt', *v. t. & i.* (रिपे'न्ट्)—to feel regret or penitence about something. पश्चात्ताप पावणें, खेद वाटणें, पस्तावणें. *You shall repent (of) this,* तुला ह्याबद्दल खात्रीनें पश्चात्ताप होईल. *Have nothing to r. of,* पस्तावण्याचें मुळींच कारण नाहीं. *R. my kindness,* मी दया केली त्याचा आतां मला खेद वाटतो,-पश्चात्ताप वाटतो. *Repent'ant, a.;-ly, adv.*

Rĕpĕnt'ance, *n.* (रिपे'न्टन्स्)—sorrow for sin; penitence, contrition. दुःख, खेद; पश्चात्ताप, पस्तावा, मनस्ताप.

Rĕpercŭ'ssion, *n.* (रीपर्क'शन्)—recoil after impact; (fig.) indirect effect of event etc.; reverberation. (संघर्षानें) परत लोटणें, उलटविणें, प्रतिसारण; (एकाद्या गोष्टीचा) आनुषंगीक परिणाम, प्रतिध्वनि, फळ; प्रतिसंघर्षध्वनि, प्रतिध्वनि.

Rĕp'ertoire, *n.* (रे'पर्ट्वार्)—stock of pieces, etc. that performer or company is prepared to give. (मालाचा) पुरवठा, सांठा.

Rĕp'ertorȳ, *n.* (रे'पर्टरि)—place for finding something; store of information; repertoire. खजिना; भांडार; वखार, कोठी. [F. fr. L. *re*, again; *paris,* I bring forth]

Rĕpĕti'tion, *n.* (रेपिटि'शन्)—repeating or being repeated, recital from memory; copy, replica. पुनरुक्ति, पुन्हा म्हणणें, तोंडपाठ म्हणणें; चित्रांची नक्कल, पुनरावृत्ति.

Rĕpīne', *v. i.* (रिपा'इन्)—to fret, to be discontented, to complain discontentedly. मनांत झुरणें, धुसमुसणें, हुरहुरणें. *Repin'ingly, adv.*

Rĕplāce', *v. t.* (रिप्ले'स)—to put back in place, to refund; to take place of. पुन्हा ठेवणें; दुसऱ्याची जागा घेणें, बदली ठेवणें, जागा भरून काढणें. *Be replaced, (pass.),* be superseded. बदली दुसऱ्याला वर चढवणें. *Replacement, n.*

Rĕplĕn'ish, *v. t.* (रिप्ले'निश्)—to fill up again. पुन्हा भरणें, फिरून भरून काढणें. *Replenished, (pa. p.)* fully stored. भरपूर सांठा असलेला, परिपूर्ण, संपूर्ण. *Replen'ishment, n.* पुन्हां भरणें, भर, पुरवठा.

Rĕplēte', *n.* (रिप्ली'ट्)—filled, well stocked, stuffed, sated, thoroughly imbued. पूर्ण, परिपूर्ण भरलेला. *Reple'tion, n.* पूर्णता, पर्याप्ति. *Full to repletion,* परिपूर्ण.

Rĕp'lĭca, *n.* (रे'प्लिका)—duplicate of work made by the artist; (loosely) copy, fascimile. (मूळ चित्रकारानेंच केलेली) दुसरी प्रत,-दुसरी नक्कल; नक्कल, हुबेहुब प्रत,-नक्कल.

Rĕp'lĭcate, *a.* (रे'प्लिकट्)—(Bot.) folded back on itself. परावलित पर्ण.

Rĕplicā'tion, *n.* (रेप्लिकेशन्)—making of replicas or copies ; echo ; (Law) plaintiff's reply to defendant's plea. नकला,-प्रती,-काढणें,-करणें ; प्रतिध्वनि ; प्रतिवादीचे म्हणण्यास वादीचा जबाब.

Rèplȳ', *v. t. & i.* (रिप्लाय)—to make answer, to respond. उत्तर देणें, बोलणें, म्हणणें, जबाब देणें, प्रत्युत्तर देणें. *n.* replying ; what is replied. म्हणणें, उत्तर, जबाब. *R. paid*, (of telegram) with cost of reply prepaid by sender. उत्तरासाठीं आगाऊ पैसे भरलेली (तार).

Rèport', *v. t. & i.* (रिपोर्ट्)—to bring back account of, to tell as news ; to make official or formal statement ; to inform against ; to give account of. हकीगत कळविणें ; बातमी सांगणें ; अधिकाऱ्याकडे लेखी हकीगत कळविणें ; च्या विरुद्ध बातमी देणें ; कळविणें, बातमी कळविणें,-प्रसिद्ध करणें. *n.* common talk, rumour ; repute ; account given or opinion formally expressed after investigation ; reproduction or epitome of speech or law-case, esp. for newspaper publication ; sound of explosion. वार्ता, बातमी ; लौकिक, कीर्ति ; चौकशीअंतीं कळविलेली हकीगत ; (वर्तमानपत्रासाठीं वगैरे) भाषणाचा वगैरे सारांश ; खटल्याची हकीगत, निवाडा ; बार, आवाज. *It is reported*, commonly said. असें म्हणतात कीं, अशी बातमी आहे. *Reported speech*, oblique narration. आपल्या किंवा तिऱ्हाइताच्या शब्दांत दुसऱ्याचें बोलणें सांगणें. *To r. progress*, state what has been done so far. आतांपर्यंत काय काय झालें तें सांगणें, चें काम कोठपर्यंत आलें तें सांगणें. *The r. goes*, it is said. असें म्हणतात, बोलवा अशी आहे. *Law reports*, खटल्यांच्या निवाड्यांचा छापील संग्रह. *Report'able, a.*

Rèport'er, *n.* (रिपोर्टर्)—(*esp.*) one who reports, a person reporting for newspaper. वर्तमानपत्राचा बातमीदार.

Rèpōse, *v. t.* (रिपोझ्)—to place trust *in*. (विश्वास) ठेवणें,-टाकणें, पातणें., *Repos'al, n. 2. v. i. & t.* to rest, to lay to rest, to give rest to; to be lying or laid, be supported or based on. विश्रांति घेणें, आराम देणें ; निजणें, पडून राहणें, आराम करणें, चा आधार घेणें, वर आधारणें. *n.* rest ; sleep ; peaceful state, settled composure, tranquility, ease of manner. विश्रांति ; झोंप ; स्वास्थ्य, आराम, शांतवृत्ति, प्रसन्नता. *Repose'ful, a.* ;*-fully, adv.*

Rèpŏs'itorȳ, *n.* (रिपॉझिटरि)—a receptacle ; a place where things are stored, a store-house ; museum, warehouse, shop, burial-place ; recipient *of* confidences or secrets. पात्र ; भांडार, कोठार, कोठी, संग्रहालय, वखार, दुकान ; स्मशान, मसणवटी ; विश्वासांतला मनुष्य.

Repousse, *a. & n.* (रपुसे)—(of metal) hammered into relief from reverse side. आंतून ठोकून केलेलें (धातूचें) उठावदार-उठावाचें-काम, उठावाची (नकशी). [F]

Rĕprĕhĕnd', *v. t.* (रेप्रिहेन्ड्)—to rebuke, to censure, to take exception to, to speak of as fault. दोष लावणें, निंदा करणें, नांवें ठेवणें.

Rĕprĕhĕn'sible, *a.* (रेप्रिहेन्सिबल्)—blameworthy. दोषास्पद, दूषणीय, निंद्य, दोषार्ह.*-ibly, adv.*

Rĕprĕhĕn'sion, *n.* (रेप्रिहेन्शन्)—censure, blame. निंदा, दोष.

Rĕprĕsĕnt', *v. t.* (रेप्रिझेन्ट्)—to place likeness of before mind or senses ; to allege that ; to describe or depict as ; to play (character) ; to stand for, to correspond ; to be substitute or deputy for. मांडणें, दर्शविणें, (चें) चित्र उभें करणें, स्वरूप दाखविणें ; भासविणें, विधान करणें, पुढें मांडणें, पटवून देणें ; सांगणें ; वर्णन करणें ; भूमिका घेणें ; सोंग-वेष-घेणें, भूमिका करणें ; दाखविणें, (ची) संज्ञा असणें, दर्शक-वाचक-असणें ; °चे वतीनें असणें ; प्रतिनिधि असणें. *Represent'able, a.*

Rĕprĕsĕntā'tion, *n.* (रेप्रिझेन्टेशन्)—(*esp.*) a calling of attention to something. प्रदर्शन, वर्णन, निवेदन, अर्ज, विनंती. *Proportional r.*, electoral system so arranged that minorities are represented in proportion to their strength. अल्पसंख्यांकांना त्यांच्या संख्येच्या प्रमाणांत मिळालेले मतदानाचे हक्क,-मिळालेल्या जागा. *Representa'tional, a.*

Rĕprĕsĕn'tātive, *n.* (रेप्रिझेन्टेटिव्ह्)—a specimen or typical embodiment of ; person's agent, delegate, substitute, successor or heir ; person representing a constituency. दर्शक, प्रतिनिधि, विशिष्ट उदाहरण ; वकील ; मुखत्यार, मुनीम, बदली, वारस ; (लोकांतर्फेचा) प्रतिनिधि. *a.* typical of a class ; containing typical specimens ; of or based on the representation of constituencies. द्योतक, निदर्शक, प्रतिनिधिरूप ; सर्वजातिसंग्राहक ; प्रातिनिधिक, प्रतिनिधित्वाच्या तत्त्वावर आधारलेला. *n. House of Representatives*, अमेरिकेंतील सं. संस्थानची कनिष्ट प्रतिनिधिसभा.*-ly,-adv.* ;*-ness*,

Rèprĕss', *v. t.* (रिप्रेस)—to keep under ; to put down, to quell, to subdue, to suppress. दाबून ठेवणें ; दबविणें ; चा निकाल करणें ; दडपणें, दडपून टाकणें.*-ible, a.* ;*-ive, a.* दडपशाहीचा ; *-or, n.* दडपशाही करणारा.

Rèprĕss'ion, *n.* (रिप्रेशन्)—In vbl. senses ; (esp. in Psychol.) putting down or subduing of natural promptings. स्वाभाविक मनोवृत्ति दडपून टाकणें,-दाबून ठेवणें, अंतःकरणप्रवृत्तींचा निग्रह.

Rèprieve', *v. t.* (रिप्रीव्ह्)—to suspend the execution of (condemned person) ; to relieve temporarily. फांशीच्या शिक्षेची तहकुबी करणें, देहांतशिक्षा लांबणीवर टाकणें ; तात्पुरता विसांवा,-विश्रांति,-देणें. *n.* (warrant for) remission or commutation of capital sentence ; respite. फांशीच्या शिक्षेंत बदल,-शिक्षेची माफी (करणारा हुकूम) ; स्वस्थता, स्वस्थपणा.

Rĕp'rĭmănd', *n.* (रेप्रिमान्ड्)—official reproof (*for* fault). ठपका, ताकीद. *v. t.* to administer reproof to. ठपका देणें, ताकीद देणें.

Rĕprint', *v. t.* (रीप्रि'न्ट्)—to print again ; to print another edition of. पुन्हां छापणें; दुसरी आवृत्ति काढणें,-छापणें. *n.* (री'प्रिन्ट्)—another printing ; a new edition. पुन्हां छापणें ; नवीन आवृत्ति.

Rĕpri'sal, *n.* (रिप्रा'इझल्)—retaliation. परतफेड, सूड, प्रतिहरण, बदला. *Letters of r.*, official warrant authorizing *r.* लष्करी सूड,-बदला,-घेण्याचा सरकारी हुकूम,-आज्ञापत्र. *To make rr.* or *r.*, सूड घेणें, प्रत्यपकार करणें.

Repri'se, *n.* (रिप्रा'इझ्)—(Law) rent-charge or other payment to be made yearly out of estate : (rare) resumption of action. मालमत्तेवरील वार्षिक कर,-खंडणी ; पुन्हां कामाला सुरुवात (करणें).

Rĕproach', *v. t.* (रिप्रो'च्)—to upbraid, to scold ; (of look, etc.) convey reproach to. ठपका देणें, खरडपट्टी काढणें; तिरस्कारदर्शक असणें, तुच्छता दाखविणें. *n.* upbraiding, censure : a thing that brings discredit. निंदा ; लज्जास्पद गोष्ट, दोष, दूषण, ठपका, लाजिरवाणी गोष्ट. *To heap rr. on*, शिव्यांची लाखोली मोजणें. *Term of r.*, word implying censure. निंदाव्यंजक शब्द, अपशब्द. *Reproach'ful*, *n.* conveying reproach. निंदेचा, निंदात्मक, लाजिरवाणा, *-fully*, *adv.* ;*-fulness*, *n.*

Rĕp'robāte, *v. t.* (रे'प्रबेट्)—to express or feel disapproval of, censure, (of God) cast off. नापसंती दर्शविणें, नापसंत करणें,-वाटणें ; नरकांत टाकणें, मुक्ति न देणें *a.* (रे'प्रबिट्). cast off by God hardened in sin ; unprincipled. ईश्वरानें टाकलेला ; पापांत लोळणारा ; तत्त्वहीन, दुर्वृत्त. *n* (-बिट्) a person abandoned to sin. पापात्मा, पापांत निढावलेला मनुष्य, महापापी. *Reprobā'tion*, *n.* (esp.) rejection by God. नरकांत टाकणें,-लोटणें.*-tor*, *n.*

Rĕproduce', *v. t.* & *i.* (री-प्र-ड्यूस्)—to produce again, to generate ; to produce copy or representation of : to carry on by breeding or propagation. पुन्हां उत्पन्न करणें; पुन्हां पैदा करणें ; (ची) प्रतिमा,-नक्कल-उतरणें, (चा) नकाशा काढणें ; वंशविस्तार करणें, प्रजोत्पत्ति करणें, प्रजोत्पादन करणें. *-cible*, *a.*

Rĕproduc'tion, *n.* (रीप्रड'क्शन्)—(*esp.*) breeding or propagation ; an accurate copy of something. प्रजोत्पादन, फैलाव ; हुबेहुब नक्कल,-प्रतिमा. *Reproduc'tive*, *n.* पुनरुत्पादक, पुनरावर्तक, पुनर्दर्शक ; प्रजोत्पादनविषयक.

Rĕproof', *n.* (रिप्रू'फ्)—blame or an expression of blame, rebuke, reprimand. दोष, ठपका, शब्दप्रहार, तंबी.

Rĕprove', *v. t.* (रिप्रू'व्ह्)—to charge with a fault orally, to rebuke, to blame. खरडपट्टी काढणें, दोष देणें. *Reprov'ingly*, *adv.*

Rep'tant, *a.* (रे'प्टंट्)—(nat. hist.) creeping. रांगणारें, सरपटणारें, भुईसरपट जाणारें.

Rĕp'tile, *n.* (रे'प्टाइल)—an animial that crawls or moves on its belly, crawling animal of the class including snakes ; a mean grovelling person, (oft. attrib.). सरपटणारा प्राणी किंवा जीव, (साप, सुसर, कांसव वगैरे) सरपटणाऱ्या प्राण्यांच्या वर्गांतील एक ; हलकट, नीच, पाजी (मनुष्य). *The r. press*, subservient semi-official newspapers esp. in pre-war Germany. सरकारच्या बगलेंतील पत्रें, सरकारी बगलबच्चीं वर्तमानपत्रें. *Reptil'ian*, *a.* & *n.* ; *Reptilif'erous*, *Reptil'iform*, *aa.* [L. *repere*, crawl]

Rĕpub'lic, *n.* (रिप'ब्लिक्)—a State in which the supremacy of the people is formally acknowledged, commonwealth ; (*fig.*) society of persons or animals with equality between members. लोकसत्ताक राज्य, प्रजासत्ताक राज्य ; समानाधिकारात्मक समाज. *The r. of letters*, literary men, literature. विद्वज्जनसमाज, विद्येचें साम्राज्य.

Rĕpub'lican, *a.* (रिप'ब्लिकन्)—of or characteristic of a republic. लोकसत्ताक राज्यपद्धतीचा. *a.* & *n.* an advocate of a republican government ; member of U. S. political party favouring liberal interpretation of constitution, extension of central power & protective tariff ; (of birds) social, living in large communities. लोकसत्ताकराज्यवादी, प्रजासत्ताकवादी ; अमेरिकेंतील सं. संस्थानांतील उदारमतवादी पक्षाच्या अनुयायी ; समाजप्रिय,-मोठमोठे थवे करून राहणारे पक्षी. *Repub'licanism*, *n.* प्रजासत्ताकपद्धति ; प्रजासत्ताक-लोकसत्ताक-राज्याभिमान.

Rĕpu'diāte, *v. t.* & *i.* (रिप्यू'डिएट्)—to disown, to disavow, to deny ; to refuse to recognize or obey (authority) or discharge (obligation), to refuse to pay ; (of state) refuse to pay public debt ; divorce (one's wife). नाकारणें, नाकबूल करणें ; न जुमानणें, त्याग करणें, सोडून देणें ; (राष्ट्रीय कर्ज) नाकबूल करणें, देण्याचें नाकारणें, काडीमोड करणें, दार (पत्नी) त्याग करणें. *Repudia'tion* *-diator*, *n.*

Rĕpug'nance, *n.* (रिप'ग्नन्स)—aversion (*to*, *against*), disinclination ; unwillingness, inconsistency or incompatibility (*between*, *to*, *with*, *of* ideas, &c.). उद्वेग, तिटकारा, कंटाळा ; नाखुशी, विरोध, वांकडेपणा.

Rĕpug'nant, *a.* (रिप'ग्नन्ट्)—distasteful, contradictory (*to*), incompatible (*with*). नावडता, तिटकारा आणणारा, नापसंत, विरोधी, प्रतिकूल, विरुद्ध, विपरीत.

Rĕpulse', *v. t.* (रिप'ल्स)—to drive back (attack, attacking enemy) by force of arms ; to rebuff, to reject. मागें सारणें, हटवणें ; (वादांत) हटवणें ; झिडकारणें. *n.* defeat, rebuff ; refusal, denial. पिछेहाट, पराभव, थप्पड ; नाकारणें, झिडकारणें.

Rĕpul'sion, *n.* (रिप'ल्शन्)—repulsing (rare) ; (Physics) tendency of bodies to repel each other or increase their mutual distance (opp. *attraction*) ; aversion. परस्परनिवारण ; (विज्ञान०) अपसारण, प्रतिसारण, प्रतिसारणशक्ति ; तिटकारा, किळस, वीट, खंत. *Capillary r.*, tendency in some liquids (e. g. quicksilver in glass) to shrink from wall

of capillary tubes so that upper surface is convex. केशप्रतिसारण, केश-अपसारण.

Repul'sive, *a.* (रिपॅल्सिव्ह्)—exciting repulsion, repellent; loathsome; (Physics) exercising repulsion. निवारक, दूर सारणारा, किळसवाणा; अपसारक, प्रतिसारक.-*ly*, *adv.* ;-*ness*, *n.*

Rep'utable, *a.* (रॅप्यूटेबल्)—of good repute, held in esteem, esteemable. अब्रूचा, चांगल्या कीर्तीचा, शिष्ट, मान्य, आदरणीय. *Rep'utably*, *adv.*

Reputa'tion, *n.* (रॅप्यूटे'शन्)—what is generally said or believed about a person's or thing's character, good name, honour, fame, credit. कीर्ति, नांवलौकिक, ख्याति, नांव, प्रतिष्ठा, गौरव, अब्रू.

Repute', *n.* (रिप्यूट्)—reputation. कीर्ति, नांव, अब्रू. *Repu'ted*, *pa. p.* & *a.* generally considered to be or regarded as. कीर्तीचा, नामांकित,-म्हणून समजला जाणारा. *Repu'tedly*, *adv.* लोकदृष्ट्या, ऐकिवांत, लोकांत. *Is reputed the best doctor*, or *to be*, or *as the best doctor*, सर्वांत चांगला डॉक्टर म्हणून त्याची ख्याति आहे.

Request', *n.* (रिक्वे'स्ट्)—asking for something, a thing asked for; demand. प्रार्थना, विनंति; मागणी. *v. t.* to seek permission *to* do; to ask, to entreat. विनंति करणें; मागणें, प्रार्थणें, विनविणें *You shall have your r.*, तुझी मागणी-विनंति-पुरी केली जाईल. *To make, r. for*, ची,-बद्दल,-विनंति करणें. *By r.*, in response to expressed wish. मागणीवरून, विनंतीवरून.

Req'uiem, *n.* (रॅक्विम्)—mass or musical service for the dead; dirge. मृतव्यक्तीकरितां ईश्वराची प्रार्थना, मृतात्म्याच्या शांतीसाठीं प्रार्थनागीत.

Require', *v. t.* (रिक्वा'यर्)—to demand, to order, to claim or call for, to ask as of right; to lay down as imperative; to need. हक्कानें मागणें, हुकूम करणें; भाग पडणें; गरज असणें, जरूर असणें. *They r. me*, or *of me, to appear*, मला हजर राहण्याविषयीं त्यांनीं हुकूम केला आहे,-भाग पाडलें आहे.

Require'ment, *n.* (रिक्वा'यर्-मेन्ट्)—a thing needed, demand, an essential condition. जरूरी, गरज, (हक्कानें,-सत्तेनें,-) मागणें, आवश्यक गोष्ट.

Req'uisite, *a.* (रॅक्विझिट्)—needed, essential. जरूरीचा, अगत्याचा, आवश्यक. *n.* for accomplishment of some purpose (*for*), requirement. जरूरीची किंवा अगत्याची गोष्ट, आवश्यक वस्तु.-*ness*, *n.*

Requisi'tion, *n.* (रेक्विझि'शन्)—formal demand, usu. made in writing; order to furnish supplies for army, etc.; being called or put into service. कायदेशीर लेखी मागणी; (लष्करासाठीं सामानसुमानाच्या पुरवठ्याची) मागणी करणें; कामावर हजर राहण्याचा किंवा तयारीत राहण्याचा हुकूम. *v. t.* to demand the supply or use of for military purposes; to make a demand for, to press into service. (लष्करी कामाकरितां,-लष्कराकरितां) मागणी करणें, ची मागणी करणें, कामाकरितां मागणें, कामाला-उपयोगाला-लावणें. *Is under* or *in r.*, being used or applied. उपयोगांत आणलेलें असणें. *Put in, call into, r.*, have recourse to. चा आश्रय घेणें, चा उपयोग करणें.

Requite', *v. t.* (रिक्वा'इट्)—to make return for; to reward, to avenge; give in return. परत फेड करणें; बक्षीस देणें, मोबदला देणें, बदला घेणें, उगविणें; उसनें फेडणें, परत करणें. *Requi'tal*, *n.*

Rere'dos, *n.* (रीअरडॉस्)—ornamental screen covering wall above back of altar. वेदीच्या मागच्या बाजूची भिंत सुशोभित करण्याचा शोभेचा पडदा.

Res, *n.* (रीझ्)—thing; property. वस्तु; मालमत्ता. *R. augusta domi*, poverty. दरिद्रता, गरिबी. [L]

Rescind', *v. t.* (रिसि'न्ड्)—to abrogate, to revoke, to cancel, to render null, to make void. मागें घेणें, रद्द करणें. *Resci'ssion*, *n.* (रिसि'झन्), परत करणें, रद्द करणें [L. *re*, again; *scindere*, to cut]

Res'cript, *n.* (री'स्क्रिप्ट्)—Roman emperor's written reply to appeal for guidance esp. from magistrate on legal point; Pope's decision; an edict or official announcement; thing re-written. (प्राचीन) रोमन बादशहाचा निर्णय, ठराव; पोपनें दिलेला निर्णय, -दिलेलें आज्ञापत्र; सरकारी हुकूम,-जाहीरनामा; (जोड) नक्कल.

Res'cue, *v. t.* (रे'स्क्यू)—to deliver from an attack, custody, danger, or harm, (Law) unlawfully liberate (person), forcibly recover (property). सोडवणें, बचाव करणें, बेकायदेशीर सोडवणें, सोडणें, जबरदस्तीनें (मिळकत) ताब्यांत घेणें. *n.* deliverance from restraint or danger, succour, illegal liberation, forcible recovery. सुटका, मुक्तता, मदत, साहाय्य, बचाव; बेकायदेशीर सुटका, जबरदस्तीचा ताबा. *Res'cuer*, *n.*

Research', *n* (रिसर्'च्)—search, inquiry; (usu. pl.) endeavour to discover facts by study or investigation. चौकशी, शोध; संशोधन. *v. t.* to search again. बारकाईनें तपासणें, संशोधन करणें.-*er*, *n.*

Rese'ct, *v. t.* (रिसे'क्ट्)—(surg.) to pare down (bone, cartilage, etc.). (हाडाचीं टोकें वगैरे) कापून काढणें. *Resection*, *n.* (हाडाचीं टोकें) कापून काढण्याची शस्त्रक्रिया.

Resem'ble, *v. t.* (रिझे'म्बल्)—to be like; to have similarity to, to bear similitude of. सारखा असणें, अनुरूप असणें, सादृश्य असणें, बरोबरी करणें. *Resemblance*, *n.* साम्य, अनुरूपता, प्रतिमा; प्रतिच्छाया.

Resent', *v. t.* & *i.* (रिझे'न्ट्)—to show or feel indignation at, to take ill, to consider as affront. रागावणें, संतापणें, राग येणें, संताप-क्रोध येणें.-*ful*, *a.* आकसखोर, लौकर चिडणारा.-*fully*, *adv.* ;-*ment*, *n.*

Reserva'tion, *n.* (रिझर्वे'शन्)—reserve; express or tacit limitation or exception; (Eccl.) right reserved to Pope of nomination to vacant benefice, etc.; (Law) right or interest retained in estate being conveyed, clause reserving it, (U. S.) tract of land reserved for Indian tribe. राखून ठेवणें; मर्यादा, अपवाद, निर्बंध, (राखून ठेवलेली)

अट; पोपचे राखीव अधिकार; (कायदा) (स्वतःकरितां) राखून ठेवलेले अधिकार, राखून ठेवलेल्या हक्काचें कलम; (अमेरिकेतील सं. सं.) तांबड्या इंडियन लोकांकरितां राखीव विभाग. *Mental r.*, qualification tacitly added in making statement, oath, etc. मानसिक संकोच, मनाचा संकोच.

Rĕserve', *v. t.* (रिझ़'र्व्ह)—to postpone use or enjoyment or treatment of; to hold over, to lay up for future time; to retain possession or control of by stipulation. पुढल्या कामासाठीं ठेवणें, राखणें, राखून ठेवणें, उरविणें; ताब्या ठेवणें, हक्क राखून ठेवणें. *n.* something reserved for future use; tract reserved for native tribe or wild animals; (*sing.* or *pl.*) troops held in reserve; forces outside regular army and navy liable to be called out in emergencies; (in games) extra player chosen in case substitute should be needed; limitation or qualification; self-restraint in artistic expression; reticence, lack of cordiality; intentional suppression of truth. राखून ठेवणें, संग्रह; राखून ठेवलेली-राखीव-जागा, राखून ठेवलेली फौज; राखीव,-शिलकी,-फौज; राखीव सैनिक,-नाविकदल, शिलकी भिडू, राखीव खेळाडू, अपवाद, अट, मर्यादा; कलाकृतींतील संयम, संकोच, मुग्धता, कांही राखीव (अस्पष्ट) गोष्टी (ज्या कल्पनेनें ताडावयाच्या त्या); भिडस्तपणा, लाज, भीड, संकोच, संकुचितपणा; सत्यापलाप, खरी गोष्ट मुद्दाम दडपून टाकणें. *Reserved seats*, राखीव जागा. (*I accept your statement*) *without r.*, fully. पूर्णपणें, बिनशर्त. *Sale* or *auction without r.*, not subject to a fixed price's being reached. येईल त्या किंमतीस विकणें, लिलाव करणें. *R. price*, than which less will not be accepted. ठरीव किमान किंमत. *We publish this with all r., all proper rr.*, without endorsing it. त्याच्या खरेंखोटेपणाची ग्वाही न देतां,-आमचें मत राखून ठेवून छापीत आहों.

Rĕserved', *a.* (रिझ़'र्व्ह्ड)—reticent, uncommunicative, cautious, cold. जास्त न बोलणारा, आंतल्या गांठीचा, संकोचवृत्तीचा.

Rĕserv'edly̆, *adv.* (रिझ़'र्व्हिड्लि)—guardedly; without openness, with reserve. सावधगिरीनें, संकोचवृत्तीनें.

Rĕserv'ist, *n.* (रिझ़'र्व्हिस्ट)—member of reserve forces. शिलकी,-राखीव,-सैन्यांतील शिपाई.

Rĕs'ervoir, *n.* (रे'झ़र्व्हॉर)—a place where anything is kept in store, reserve supply of something e. g. knowledge or facts, etc.; a receptacle for fluid, esp. one for storing water. खजिना, सांठवण, सांठा; संग्रह; पाण्याची टांकी, हौद, सांठवण, जलसंचय. *R. pen*, शाई ठेवण्याची सोय असलेली लेखणी,-कलम.

Rĕside', *v. i.* (रिझ़ा'इड)—to have one's home, to dwell, to abide in; (of power, rights) be vested in; (of qualities) be present or inherent in. राहणें, वस्ती करणें, असणें; अंगचा-मूळचा-असणें, जन्मसिद्ध-स्वयंसिद्ध-असणें.

Rĕs'idence, *n.* (रे'झ़िडेन्स)—residing; a place where one resides, habitation; abode. वसती, वास्तव्य, नांदणें, राहणें; वसतिस्थान; मोठें घर. *To have, take up, one's r.*, dwell, begin to dwell. (विन्हाड करून) राहणें. *R. is required*, official etc. must live on the spot. अंमलदारानें ठिकाणावर (बिन्हाड करून,-वस्ती करून,) राहणें आवश्यक आहे.

Rĕs'idency̆, *a.* (रे'झ़िडेन्सि)—the official residence of a political agent or resident; residence. अधिकाऱ्याचें राहण्याचें ठिकाण, वसतिगृह.

Rĕs'ident, *n*, (रे'झ़िडेन्ट)—a permanent inhabitant; a British political agent. कायमचा रहिवासी; राजप्रतिनिधि. *a.* residing; (of birds) non-migratory; having quarters on the spot; inherent, located, *in.* राहणारा, वस्ती करणारा, निवासी; देशान्तर न करणारा, स्थायिक (पक्षी इ.); स्थानिक, त्याच ठिकाणीं राहणारा; अंगचा, मूळचा,-असणारा.

Rĕsidĕn'tial, *a.* (रेझ़िडे'न्शल)—suitable for or occupied by private house; based on residence. खाजगी राहत्या घरांचा,-घरें असलेला,-घरांस योग्य; घरांत राहात असल्यामुळें-भाडें भरीत असल्यामुळें-प्राप्त झालेला (मतदानाचा हक्क).

Rĕsidĕn'tiary̆, *a.* (रेझ़िडे'न्शरि)—bound to or involving or provided for official residence. अंमलदाराला राहण्यासाठीं ठेवलेलें (घर.). *n.* ecclesiastic bound to reside. तेथेंच वस्ती करून राहणारा धर्मोपदेशक,-पाद्री.

Resĭd'ūal, *a.* & *n.* (रिझ़ि'ड्युअल)—left as residuum; (of error) still unaccounted for or eliminated; (Math.) (quantity) resulting from subtraction. शेष, शिल्लक राहिलेला, बाकीचा (अंश, भाग); बाकी राहिलेली, जमा न केलेली (रक्कम, हिशेबांतील चूक), वजाबाकी करून उरलेली (रक्कम), वजाबाकी.

Resĭd'ūary̆, *a.* (रिझ़ि'ड्युअरि)—of the residue of an estate; residual, still remaining. शेषाचा, शेषसंबंधीं; बाकी राहिलेल्यासंबंधीं.

Rĕs'idūe, *n*, (रे'झ़िड्यू)—the remainder, what is left over, the balance; (Chem.) residuum. अवशेष, शिल्लक राहिलेला भाग, बाकी; शेष.

Rĕsĭd'ūum, *n.* (रिझ़ि'ड्युअम्)—(pl.-*dua*), amount not accounted for in calculation; (Chem.) substance left after combustion etc.; lowest stratum of population. हिशेबांत न आलेली रक्कम, अनामत रक्कम; शेष, अवशेष, गाळ; कनिष्ठ दर्जाचे लोक.

Resign', *v. t.* & *i.* (रिझ़ा'इन)—to relinquish, to surrender, to reconcile (oneself) to; to give up office, to retire. सोडून देणें, त्याग करणें, पाणी सोडणें; शरण जाणें, नशिबावर हवाला ठेवणें, मान वांकवणें; राजिनामा देणें, नोकरी सोडणें, घरीं बसणें.

Rĕsigna'tion, *n.* (रेझ़िग्ने'शन्)—resigning of an office, document conveying it; uncomplaining

endurance, surrender, relinquishment. सोडून देणें, राजिनामा; न घोलतां सहन करणें, सोडणें, परित्याग. *Give, send in, one's r.*, (नोकरीचा) राजिनामा पाठवून देणें.

Résigned', *a.* (रिझा'इन्ड्)—having resigned oneself; content to endure; submissive. राजिनामा दिलेला, -देऊन सोडलेला; सहिष्णु, नशिबावर हवाला ठेवलेला, मान वांकविणारा. *Resign'edly, adv.*

Résil'ience, *n.* (रिझि'ल्यन्स)—power of resuming the original form after compression, etc.; elasticity. उडी खाणें, स्थितिस्थापकता; लवचीकपणा, रंगेलपणा, आनंदीवृत्ति,-स्वभाव. *Resil'ient, a.* स्थितिस्थापक; लवचीक; रंगेल. [L. *re*, back; *silire*, jump]

Rĕs'in, *n.* (रे'झिन्)—adhesive substance exuding from certain plants, hardened juice of pines. राळ, यक्षधूप. *v. t.* to apply resin to. राळ लावणें, -माखणें. *Res'inous, a.* राळेच्या गुणाचा, राळेचा, राळेनें माखलेला.

Résist', *v. t. & i.* (रिझि'स्ट्)—to stop the course of; to oppose successfully, to make opposition; to repel, to abstain *from*. प्रतिबंध-प्रतिकार-करणें, अडथळा करणें; विरोध करणें; प्रतिकार करणें, निवारणें. *n.* composition applied to surfaces for protection from some agent employed on them, esp. to parts of calico that are not to take dye. इतर रंग त्या भागांत मिसळूं नये म्हणून त्या भागाला लावण्याचें मिश्रण. *Cannot r. a joke*, थट्टा केल्याशिवाय राहावत नाहीं. *Resis'ter, n.* विरोधक, प्रतिकारक. *Resis'tible a.* प्रतिकार्य, प्रतिकारक्षम. *Resis'tless, a.* too strong to be resisted. अनिवार्य, अप्रतिकार्य.*-lessly, adv. Resis'tant, Resis'tent, Resis'tive, aa.*

Résist'ance, *n.* (रिझि'स्टन्स)—resisting; power of resisting; stopping effect, hindrance, check; (Electr., Magnet., Heat) non-conductivity; part of apparatus used to offer definite resistance to current. अडथळा; प्रतिकार करण्याची शक्ति; प्रतिकार; प्रतिबंध; (विद्युत्) प्रतिबंधक (पेटी, वेटोळी). *Passive r.*, refusal to comply. निःशस्त्र प्रतिकार. *Line of r.*, direction in which it acts. प्रतिकाराची दिशा. *To take line of least r., (fig.)* adopt easiest method or course. सर्वांत सुलभ मार्ग पत्करणें.

Résĭstibil'itў, *n.* (रिझिस्टिबि'लिटि)—being resistible; power of offering resistance. विरोधकता; विरोध-प्रतिबंध-करण्याची शक्ति, विरोधशक्ति.

Rĕs'oluble, *a.* (रे'झोल्युबल्)—capable of being resolved into elements. द्राव्य, विद्राव्य, गाळण्या-जोगा, पृथक् करण्याजोगा.

Rĕs'ōlute, *a.* (रे'झोल्यूट्)—firm of purpose; determined, constant, steadfast, unshaken. करारी, निग्रही; दृढनिश्चयी, नेटाचा, खंबीर, दमदार.*-ly, adv.* दृढनिश्चयानें, नेटानें.

Rĕsōlu'tion, *n.* (रेझोल्यू'शन्)—resolute temper or character or conduct; a thing resolved on; formal expression of opinion of meeting; separation into components; (Med.) disappearance of inflammation without suppuration; (pros.) substitution of two short syllables for one long; solving of doubt, etc. निश्चय, कृतनिश्चय; दृढसंकल्प, निग्रह; करार; (सभेंतील) ठराव; पृथक्करण, मूलतत्त्वें निराळीं करणें,-काढणें; फोड-पुटकुळी-जिरणें, सूज उतरणें; एका गुरूबद्दल दोन लघु स्वर योजणें; शंका-समाधान करणें, (प्रश्नाचा) उलगडा. *Good rr.*, intentions that one formulates mentally for virtuous conduct. सत्संकल्प, सद्वर्तनाविषयींचे संकल्प.

Résŏlve', *v. t. & i.* (रिझॉ'ल्व्ह्)—to disintegrate, analyse, break up into parts; to solve, to settle; to decide upon; to pass vote by resolution; convert or be converted into; (Mus.) convert (discord) or be converted into concord. पृथक्करण करणें, द्रवविणें; सोडविणें, मिटविणें, उलगडणें, निरसन करणें; निश्चय करणें, ठरवणें, ठराव करणें, रूपांतर करणें; केलें जाणें; चें रूप देणें; (विसंवादी सुरांचें) संवादी सुरांत रूपांतर करणें,-होणें. *n.* a mental resolution; courage. निश्चय, संकल्प; धैर्य. *Resolved', pa. p.* (as *a.* resolute. ठराव-निश्चय-केलेला; *pa. p.* used in minutes of meeting,) the following resolution was passed, namely *that*. (पुढील) ठराव संमत (पास) करण्यांत आला (कीं, इ.). *Resolv'edly, adv.*

Resolv'ent, *a. & n.* (रिझॉ'ल्व्हंट्)—(chiefly med. & chem.), (drug etc.) effecting resolution of tumour etc., or division into component parts. (गळूं किंवा सूज) फांकविणारें (औषध); द्रावक, विद्रावक (द्रव्य).

Rĕs'onant, *a.* (रे'झोनन्ट्)—(of sound) echoing, resounding; continuing to sound; (of bodies, rooms, etc.) tending to reinforce or prolong sounds esp. by vibration; (of places) resounding *with*. प्रतिध्वनि करणारा; नादपूर्ण; प्रतिध्वनिजनक; गजबजलेला, दुमदुमलेला. *Res'onance, n.* प्रतिध्वनि, अनुनाद.

Rĕs'onator, *n.* (रे'झोनेटर्)—instrument responding to single note and used for detecting it in combination, appliance for giving resonance to sounds. प्रतिध्वननयंत्र.

Résŏrt', *v. i.* (रिझॉ'र्ट्)—(with *to*) to adopt as an expedient or method; to go to (a person) for aid or advice; to frequent. उपाय योजणें, उपयोग करणें, मदतीकरितां जाणें, आश्रय करणें; खेपा घालणें, ये जा करणें, यात्रा करणें. *n.* resorting to an expedient; a place frequented for some purpose, frequent assembling, a haunt; frequenting. आश्रय, आधार, अवलंब, उपाय; फेरी टाकण्याची जागा, बैठक, स्थान, ठिकाण, अड्डा, चवाठा; येरझार, राबता. *To resort to force*, दंडेली करणें, शक्तीचा उपयोग करणें. *In the last r.*, when all else has failed, as final attempt. शेवटचा उपाय,-निर्वाणीचा उपाय-म्हणून. *Health r.*, हवेशीर-हवेचें-ठिकाण; आरोग्यस्थान.

Rēsort' *v. t.* (रीसॉर्ट्)—to sort again. पुन्हां गट पाडणें, वर्गीकरण करणें.

Résound', *v. i.* & *t.* (रिझा'उन्ड्)—(of place) to ring or echo (*with*); produce echoes, go on sounding; fill place with sound; (of fame, etc.) to be much and loudly mentioned. घुमणें, प्रतिध्वनि करणें,-होणें, -उठणें; दुमदुमणें, दणदणणें; (आवाजानें) दुमदुमून टाकणें; (कीर्ति) दुमदुमून राहणें. *Resound'ingly, adv.*

Résource', *n.* (रिसो'अर्स्)-(*pl.*) means of supplying a want, stock that can be drawn on; country's collective means for support and defence; expedient, device; means of passing the time; practical ingenuity, quick wit. गरज भागविण्याचें साधन, सांठा; देशार्चीं संरक्षणार्चीं साधनें, आगमार व लष्कर; उपाय, तरणोपाय, सोय, गति; वेळ घालविण्याचें साधन; योजकता, युक्ति, हिकमत. *Am at the end of my rr.*, आमचीं अगतिक झालों आहें. *past r.*, शेवटच्या -निर्वाणीच्या-उपाय. *Is full of r.*, हिकमती-युक्तिबाज आहे. *Resource'ful*;*-less, aa.* युक्तिबाज, नाना साधनें असलेला; युक्तिहीन. *Resource'fulness, n.*

Réspĕct', *n.* (रिस्पे'क्ट्)—deferential esteem; (*pl.*) message or attention conveying message; heed or regard to; reference or relation to. सन्मान, आदर, भीड, भीडभाव; (अने०) नमस्कार, रामराम; लक्ष, नजर, दृष्टि, विषय, बाबत, संबंध, संधान, धोरण. *v. t.* to regard with deference, to treat with consideration, avoid insulting or injuring or interfering with; (arch.) pay heed to, relate to, be concerned with (rare). मान देणें; मदरब देणें, परवा करणें; मान ठेवणें,-राखणें, दुसऱ्याचें दया पाळणें -मानणें; (कडे) पाहणें, लक्ष देणें; (च्या) विषयीं,-(ला) अनुलक्षून,-असणें. *With respect to*, विषयीं. *R. of persons*, partiality or favour shown esp. to the powerful. (बलिष्ठांविषयीं) आदर,-पंक्तिप्रपंच, पक्षपात. *In all rr.*, सर्व गोष्टींत, बाबींत. *Is held in r.*, त्याच्याविषयीं (लोकांना) आदर वाटतो. *Self r.*, स्वाभिमान. *Give him my rr.*, त्याला माझे नमस्कार सांगा. (*W'ent*) *to pay his rr. to*, दर्शन घेण्याला, नमस्कार (वगैरे) करण्याला, मुजरा करण्याला. *Respecter of persons*, थोरांचा पक्षपाती. *To respect oneself*, refrain from unworthy conduct or thoughts, have self-respect. चांगली वागणूक ठेवणें, विचारानें पवित्र राहणें, स्वाभिमान बाळगणें. *To r. privileges*, (दुसऱ्याच्या) हक्कांकडे लक्ष देणें,-ते पाळणें.

Réspĕc'table *a.* (रिस्पे'क्टेब्ल्)—deserving respect; of some amount or size or merit, of fair social standing, honest and decent सन्माननीय; बऱ्याचसा जमेस धरण्याजोगा, बराच मोठा; संभावित, शिष्ट, अब्रूदार, प्रतिष्ठित.—*bility, n.*;—*tably, adv.*

Réspĕct'ful, *a.* (रिस्पे'क्ट्फुल्)—showing deference. आदरयुक्त, विनयशील, आदराचा, मर्यादशील.-*fully, adv.*;—*fulness, n.*

Réspĕc'tive, *a.* (रिस्पे'क्टिव्ह्)—each's own; proper to each; individual. आपला, परस्पर, प्रत्येकाचा, ज्याचा त्याचा; वैयक्तिक, सापेक्ष, व्यक्तिविषयक.-*ly, adv.* अनुक्रमें, अनुक्रमानें, क्रमशः.

Rĕspīrā'tion, *n.* (रेस्पिरे'शन्)—breathing, single taking in and expelling of breath; plant's absorption of oxygen and emission of carbon dioxide. श्वास, श्वासोच्छ्वास.

Rĕs'pirātor, *n.* (रे'स्पिरेटर्)—appliance of gauze etc. worn over mouth and breathed through by invalids etc.; (Mil.) kinds of chemical filtering apparatus worn for defence against poison gas. श्वासोच्छ्वासाकरितां जाळीची टोपी,-यंत्र; विषारी वायूपासून रक्षण करणारा मुखवटा. *Res'piratory, a.* श्वासोच्छ्वासाचा, श्वासोच्छ्वासविषयक.

Respire', *v. i.* & *t.* (रिस्पा'यर्)—to breathe; to take breath, to recover one's breath. श्वासोच्छ्वास करणें; श्वास घेणें.

Rĕs'pite, *n.* (रे'स्पाइट्)—delay permitted in the discharge of an obligation or suffering of a penalty; interval of rest or relief. विलंब, शिक्षेची किंवा दंडाची तहकुबी, कर्जाची तहकुबी; विश्रांतीची वेळ, विसांवा. *v. t.* to grant or bring respite to; to reprieve (condemned person); postpone execution or exaction of (sentence, obligation); give temporary relief from; (Mil.) withhold pay (from). विसांवा देणें; (शिक्षेची,-फांशीची) तहकुबी देणें; (कर्जाची) तहकुबी देणें; तात्पुरता उतार देणें, कमी करणें; (पगार) अटकवून ठेवणें.

Résplĕn'dent, *a.* (रिस्प्ले'न्डन्ट्)-shining with brilliant lustre, brilliant, glittering. तेजस्वी, चकचकीत. -*dence*,-*dency, nn.* चकचकीतपणा, तेजस्विपणा. -*dently, adv.*

Réspŏnd', *v. i.* (रिस्पॉ'न्ड्)—to make answer; to show sensitiveness to (an action, stimulus) by behaviour or change; perform corresponding action; (U. S.) be answerable or liable to make payment; (rare) correspond, be analogous. प्रत्युत्तर देणें, जबाब देणें, (खिस्ती लोकांनीं धर्मोपदेशकाला उद्देशून) अनुकूल-ठराविक-उत्तरवाक्यें म्हणणें, प्रतिवचन देणें, जुळणें, जम बसणें; संवादी क्रिया करणें; देण्याला जबाबदार-लायक-असणें; संवादी असणें, जुळता-जुळणारा-असणें.

Réspŏn'dent, *n* (रिस्पॉ'न्डन्ट्)—defendant in a suit esp. in divorce case; one who makes answer, defends thesis, etc. प्रतिवादी, जबाब देणारा. *a.* answering, conformable. उत्तर देणारा, प्रत्युत्तर-जबाब-देणारा; संवादी.

Réspŏnse', *n.* (रिस्पॉ'न्स्)—answer given in word or act, an oracular answer, reply; feeling or movement elicited by stimulus; set answer of congregation. उत्तर, जबाब, समाधान, देवतेचा कौल-जबाब; संवादी क्रिया, इच्छित उत्तर-परिणाम-जबाब; ठराविक प्रतिवचन, उत्तर-वाक्य, उत्तर.

Réspŏnsibil'ity, *n.* (रिस्पॉन्सिबि'लिटि)—being responsible; charge, trust. जबाबदारी; हवाला, [illegible] जोखीम; भर, भार. *Did it on his own r.*, [illegible]

authorization. स्वतःच्या जोखमीवर,-जबाबदारीवर. *Is not afraid of r.*, of having to act without detailed guidance. कोणाच्याहि विशेष मदतीशिवाय, स्वतःच्या हिमतीवर काम करण्याला-तो भीत नाहीं.

Rĕspŏn'sible', *a.* (रिस्पॉन्सिब्ल)—liable to be called to account; of good credit or position; trustworthy. उत्तरदायी, जिम्मेदार, जबाबदार; उच्च दर्जाचा, जबाबदारीचा; विश्वासु, विश्वसनीय. *R. ruler, government*, not autocratic, जबाबदार राजा,-राज्यकर्ता,-राज्यपद्धति ('हम करे सो कायदा' नव्हे ती). *Respon'sibly, adv.*

Rĕspŏn'sions, *n. pl.* (रिस्पॉन्शन्झ्)—first of three examinations for the Oxford B. A. degree. ऑक्सफर्ड विश्वविद्यालयाच्या बी. ए. पदवीसाठीं द्यावयाच्या तीन परीक्षांतील पहिली परीक्षा, (also) *smalls*, colloq.).

Rĕspŏn'sive, *a.* (रिस्पॉन्सिव्ह्)—answering; by way of answer: responding readily to some influence, impressionable, sympathetic. उत्तर देणारा, प्रतिवचन देणारा; उत्तरादाखलचा; संवादी, प्रत्युत्तरदायी, सहानुभूतीचा, प्रतियोगी. *R. co-operation*, प्रतियोगी सहकारिता. *Respon'sively, adv.*;*-siveness, n.* संवादिता, संवादी धर्म.

Rĕst, *v. i.* & *t.* (रेस्ट्)—to be still; to lie in sleep or death; be let alone; to give relief or repose to; to lie or rely *on*; be propped *against*, place for support or foundation upon; to repose trust in. स्वस्थ किंवा शांत असणें; झोपेंत असणें, मेलेला असणें; थांबणें, विश्रांति घेणें,-देणें; विसंबणें; वर अवलंबून राहणें, च्या आधार घेणें,-देणें; टेकावा-नेटावा-असणें, टेकणें, वर बसणें; विश्वास ठेवणें. *v. i.* to remain in specified state. विशिष्ट स्थितींत पडणें,-राहणें,-असणें. *n.* repose or sleep, resting; a prop or support or steadying piece; pause in music, elocution, metre etc. स्वस्थता, झोंप; विश्रांति; आधार, नेटावा, बैठक, लग आधार, विराम. *n.* the remainder, what remains; the others; (Banking) reserve fund; (Commerce.) stock-taking and balancing. बाकी शिल्लक राहिलेला; बाकीचे, इतर, वरकड; गंगाजळी ठेव; शिलकी माल-मोजणी, व हिशेबाचा ताळा (पाहणें). *Rested, p.p.* विश्रांति घेऊन ताजातवाना झालेला. *To r. upon* one's *oars*, temporarily cease rowing or any exertion. वल्हवतांना तात्पुरतें थांबणें, काम करतांना मध्यें विसांवा घेणें. *Rests in the church-yard*, lies buried. थडग्यांत विश्रांति घेत आहे. *The matter cannot r. here*, must be further examined. ह्या गोष्टीचा आणखी छडा लावला पाहिजे. *R.* or *God r. his soul*, may God give it repose. ईश्वर त्याच्या आत्म्याला शांति देवो. *Resting-place*, provided or used for resting. विश्रांतिस्थान,-स्थळ; *Last r.-p.*, the grave. थडगें. *Day of Rest*, Sunday. रविवार. *At r.*, still, not agitated (often of the dead). शांत, स्तब्ध. *To lay to r.*, bury. पुरणें, थडग्यांत पुरणें. *R.-cure*, विश्रांति घेण्याचा इलाज,-उपाय. *R.-house*, a dawk-bungalow. धर्मशाळा, प्रवाशांसाठीं डांक बंगला. *To r. with*, च्या हातीं राहणें.

Rĕs'taurant, *n.* (रें'स्टॉरन्ट्)—a place where refreshments may be had, an eating-house. उपाहारगृह, विश्रांतिगृह. *R.-car*, आगगाडींतील फराळाचा डबा.

Rĕst'ful, *a.* (रें'स्टफुल्)—quiet, soothing. शांत, शांति देणारा, स्वस्थतेचा.

Rĕst'-hărrow, *n.* (रें'स्ट्हॅरो)—a tough-rooted shrub. एक चिवट मुळाचें झुडुप.

Rĕstitū'tion, *n* (रेस्टिट्यू'शन्)—restoring of property, &c. to its owner; reparation, amend, indemnification; (rhet.) restoring of thing to its original state; resumption of original state by elasticity. मालमत्ता मालकाला परत देणें; भरपाई, प्रतिदान; पूर्वस्थितीवर येणें; (स्थितिस्थापकत्वामुळें) पूर्वस्थितीवर येणें; पूर्वस्थिति. *To make r.*, परत देणें. *R. of conjugal rights*, नष्ट वैवाहिक हक्क पुनः परत मिळविणें (साठीं फिर्याद), लग्नामुळें प्राप्त झालेले कायदेशीर हक्क परत मिळविणें.

Rĕst ive, *a.* (रें'स्टिव्ह्)—(of horse) jibbing, refractory; (of person) fretful or obstinate under control, stubborn. अडगारा, अडेल; बेमान करणारा, बेकाम, हट्टी, द्वाड (मनुष्य).*-ly, adv.*;*-ness, n.* अडेलपणा; बेकामपणा, द्वाडपणा.

Rĕst'less, *a.* (रें'स्ट्लिस्)—disinclined to rest, never still, fidgety. विश्रांतिरहित, निद्रारहित, जागरणाचा; तळमळणारा, चैन न पडणारा; चुळबुळ्या, चंचल.*-ly, adv.*;*-ness, n.*

Rĕstorā'tion, *n.* (रिस्टोरे'शन्)—act of restoring; recovery, renewal, re-establishment (of monarchy in Eng. in 1660); model or drawing representing supposed original form of extinct animal, ruined building, etc. परत देणें; सुधारणें, जीर्णोद्धार, पुनःस्थापना; (इंग्लंडमध्यें १६६० या वर्षी झालेली) राजसत्तेची पुनःस्थापना; (हल्लीं अस्तित्वांत नसलेल्या प्राण्याचा, इमारतीचा) काल्पनिक मूळ नमुना, -प्रतिकृति,-आकृति. *Restora'tionism, n.* doctrine that all men will ultimately be restored to happiness in future life पुढील जन्मीं सर्व मनुष्यमात्रांना सुखप्राप्ति होईल, असें मत; (जन्मान्तर) अन्यजन्म -सुखप्राप्ति-वाद.

Rĕstŏr'ative, *a.* (रिस्टो'अरेटिव्ह्)—tending to restore health or strength. आरोग्यवर्धक, बलवर्धक. *n.* restorative medicine or food or agency. बलवर्धक औषध, पौष्टिक अन्न.*-ly, adv.*

Restore', *v. t.* (रिस्टो'अर्)—to give back, to make restitution of; to replace, to put back, to re-establish; (attempt to) bring back to original state by rebuilding, repairing, etc.; make representation of supposed original state of (extinct animal, ruin, etc.); reinstate; bring back to health, cure (person); reinsert by conjecture (missing words, etc.). परत देणें, परत करणें, मागारा देणें; भरपाई करणें; पुनः स्थापना करणें,

पुनः स्थापणें; सुधारणें, निदावणें, दुरुस्ती करणें; मूळ स्थितीचें काल्पनिक चित्र रेखाटणें; पूर्वपदावर स्थापणें; बरा करणें, रोगमुक्त करणें, (प्रकृति) सुधारणें; (गाळलेले शब्द वगैरे) अंदाजानें घालणें. *Restor'able, a.*; *Restor'er, n.*

Rèstrain', *v. t.* (रिस्ट्रेन्) —to keep under control; to repress; to confine. ताब्यांत ठेवणें; दाबांत ठेवणें; निरोध करणें, आवरणें, मर्यादित ठेवणें.-*able, a.* दाबांत ठेवण्यासारखा, आवरतां येण्याजोगा. *Restrainedly, adv.* with moderation; without exuberance or exaggeration. नियमितपणानें, समर्याद; बेताबातानें, अतिशयोक्तिशिवाय.

Rèstraint', *n.* (रिस्ट्रेन्ट्) —check; confinement; self-control; avoidance of exaggeration; reserve; restraining or being restrained. दाब; नियंत्रण, मर्यादा; अटक, कैद, बंदी; आत्मसंयमन; नियमितपणा, मर्यादा, संकोच, भीड, आडपडदा; दाबणें, आवरणें; निरोध, निग्रह. *Without r.*, freely, copiously. सढळपणें, विपुलतेनें. *To be under r.*, esp. as lunatic. अटकेंत, कैदेंत (असणें).

Rèstrict', *v. t.* (रिस्ट्रिक्ट्) —to confine within limits, to bound, to limit (*to, within*). मर्यादा घालणें, आळा घालणें, मर्यादित-संकुचित-करणें.-*ive, a.*; -*ively, adv.*

Rèstric'tion, *n.* (रिस्ट्रिक्शन्) —something that limits action, restraint, reservation. मर्यादा, आळा, बंधन.

Rèsŭlt', *v. t.* (रिझल्ट्) —to follow as a consequence (*from*); to end in a specified way. (पासून) निघणें, उद्भवणें, निपजणें, उत्पन्न होणें; शेवट होणें, परिणाम होणें. *n.* what results, consequence; effect, outcome, issue; product of calculation. परिणाम; निकाल; फळ, निष्पत्ति, सिद्धान्त, मथितार्थ; इष्टफल. *Without r.*, निष्फळ, व्यर्थ.

Rèsŭlt'ant, *a.* (रिझल्टन्ट्) —resulting as the outcome of conflicting tendencies, or of more or less opposed forces. (पासून) होणारा, निघणारा, परिणामी. *n.* composite effect given by such conflict (esp. in Mech.). परिणामी प्रेरणा, फलित प्रेरणा.

Rèsūme', *v. t. & i.* (रिझ्यूम्) —to take again or back; to reoccupy, to recommence, begin again; recapitulate. परत घेणें, फिरून घेणें, परत मिळविणें.-व्यापणें; फिरून सुरू-आरंभ-करणें; गोषवारा सांगणें, थोडक्यांत सांगणें. *To r. thread of* one's *discourse,* भाषणांतील मूळ मुद्यावर येणें, कथासूत्र जुळविणें. *To r. pipe,* go on smoking again. पुन्हां चिलीम भरणें.

Rès'ūme, *n.* (रेझ्युमे) —a recapitulation, a summary. थोडक्यांत गोषवारा, सारांश, संक्षेप.

Rèsŭmp'tion, *n.* (रिझम्प्शन्) —resuming. परत घेणें,-मिळविणें; पुनर्ग्रहण; पुनः सुरवात.-*tive, a.*;-*tively, adv.*

Rèsū'pinate, *a.* (रिस्यूपिनट्) —(Bot. of leaf etc.), inverted, bottom up. व्यस्तवळी (पर्ण).-*pination, n.*

Rèsŭr'gent, *a.* (रिसर्जन्ट्) —rising again after subsidence or defeat or disappearance. पुन्हां डोकें वर काढणें, पुनरुत्थान होणें.-*gence, n.* [L. *re,* again; *surgere,* rise]

Rĕsurrĕct', *v. t.* (रेझुरेक्ट्) —(sl.) exhume; revive practice or memory of. थडग्यांतून खणून काढणें; (संवय, स्मृति यांचा) पुनरुद्धार करणें.

Rĕsurrĕc'tion, *n.* (रेझुरेक्शन्) —the springing into or coming to life at the last day; revival (from disuse, &c.). शेवटच्या दिवशीं पुन्हा जन्मास येणें; पुनरुत्थान, पुनः उठणें, पुनरुद्धार.

Rèsŭs'citāte, *v. t. & i.* (रिससिटेट्) —to revive, to return or restore to life, consciousness, vogue, vigour or vividness. पुनः सजीव करणें, जिवांत जीव येणें, फिरून चेतना येणें, संजीवन करणें.-*citative, a.*; -*citator, n.*; *Resuscita'tion, n.* संजीवन करणें, सावध-हुशार-करणें.

Rē'tail, *n.* (रीटेल्) —sale of goods in small quantities. फुटकळ विक्री, किरकोळ विक्री. *adv.* by retail. फुटकळ रीतीनें, किरकोळीनें. *v. t. & i.* (रिटेल्) to sell by retail, to be retailed; recount, relate details of. किरकोळ विकणें, फुटकळ विकणें,-विकलें जाणें; पूर्वी ऐकलेलें दुसऱ्याला सांगणें, साद्यंत-समग्र-वर्णन करणें. *By r.*, किरकोळ, फुटकळ. *R. trading, dealer,* किरकोळ व्यापार; किरकोळ विकणारा, फुटकळ व्यापारी. *Do you buy wholesale or r.*, तूं घाऊक खरेदी करतोस का किरकोळीनें? *Retail'er, n.*

Rètain', *v. t.* (रिटेन्) —to keep possession of; to keep in mind, not forget; to secure services of by preliminary fee; keep in place, hold fixed; continue to practise or recognize, not abolish or discard. पदरीं ठेवून घेणें; मनांत ठेवणें; (वकिलाला) आगाऊ वेतन देऊन (गुंतवून) ठेवणें; आधारासाठीं राखणें, रोखून धरणें; (तसा) चालू ठेवणें. *Retaining wall,* supporting and confining mass of earth or water. आधार देणारी-थोपवून धरणारी-भिंत. *Retaining force,* (mil.) posted to keep part of enemy inactive. शत्रुसैन्याच्या विभागाला रोखून धरणारें सैन्य. *Retaining fee,* (वकिलाचा) बयाणा, आगाऊ दिलेलें वेतन. *Retain'able, a.*

Rètain'er, *n.* (रिटेनर्) —retaining fee; (hist.) dependant of nobleman, etc.; (Law) formal retention of something as one's own; authorization to retain this. (बॅरिस्टर, वकील वगैरेंना) गुंतवून ठेवण्याकरितां दिलेला बयाणा (फी); सरदाराचा आश्रित, सेवक; स्वतःच्या हक्काचें म्हणून राखून ठेवणें, हक्कपत्र.

Rètăl'iāte, *v. i. & t.* (रिटॅलिएट्) —to repay in kind; to retort upon a person; do as one is done by, esp. return evil, make reprisals; (Pol. Econ.) impose duties on imports from foreign State in return for its import duties. जशास तसें परत करणें, उसनें फेडणें; उट्टें काढणें; जशास तसें करणें; आयात मालावर (जशास तसें या न्यायानें) उलट जकात बसविणें. *Retal'iative, Retal'iatory, aa.*; *Retal'iator, n.*

Rĕtăliā'tion, *n.* (रिटॅलिए'शन्)—return of like for like, reprisal, revenge उसनें फेडणें, सूड, प्रत्यपकार, पदला.

Retard', *v. t.* (रिटा'ई)—to make slow or late, to put off, to postpone; to delay progress or accomplishment of; (motion of tides, waves, etc.) happen, arrive, behind normal or calculated time. कमी करणें, लांबणीवर टाकणें; अडथळा करणें; (ठराविक वेळेच्या) नंतर घडणें,-येणें. *n.* retardation. मंद-कमी-करणें; वेगाचा ऱ्हास; क्षीयमाणान्तर; *Retarda'tion, Retard'ment, nn. Retardative,-atory, nn.* [L. *re*, back; *tardus*, slow]

Rĕtch, *v. i.* (रिच्)—to make motion of vomiting. वांति-ओकारी-काढणें. *n.* such motion or sound of it. अशी ओकारी, वांति, तिचा आवाज.

Rĕtĕn'tion, *n.* (रिटे'न्शन्)—retaining. ठेवणें, राखणें, धारण, धारणाशक्ति; मूत्रावरोध, मलावरोध.

Rĕtĕn'tive, *a.* (रिटे'न्टिव्)—having the power or characteristic of retaining things. धारणाशक्ति असलेला, दृढ, धरून राहणारा, घट्ट, धड. *R. memory*, मेधा, धारणाशक्ति. *R. (of moisture)*, apt to retain it. ओलावा-ओलसरपणा-धरून ठेवणारा, राखणारा. *Reten'tively, adv.; -tiveness, n.*

Rĕt'icence, *n.* (रे'टिसन्स)—reserve in speech, uncommunicativeness. अबोला, मौन, मनांतील विचार लपविणें, मुग्धता, स्तब्धता.

Rĕt'icent, *a.* (रे'टिसन्ट)—reserved in speech, uncommunicative. कमी बोलणारा, घुम्या, भिडस्त, मुग्ध. *-ly, adv.* स्तब्ध राहून, घुमेपणानें.

Rĕtic'ūlate,-lātĕd, *aa.* (रिटि'क्यूलट्,-लेटिड्)—having the appearance of or markings like network; divided into mesh-like compartments. जाळीदार, जाळीचा; जालाकार. [L. *rete*, a net]

Rĕtic'ūlāte, *v. t.* (रिटि'क्यूलेट्)—to mark with reticulations. जाळी करणें, जाळीदार करणें, चौकडीचें काम करणें.

Rĕtic'ūlātion, *n.* (रिटि'क्यूलेशन्)—net-like marking or arrangement (usu. in pl). जाळीचें काम, जाळी, जाळें.

Rĕtic'ūlum, *n.* (रिटि'क्यूलम्)—(*pl.-la*), ruminant's second stomach; net-like structure, reticulated membrane, etc. (रवंथ करणाऱ्या प्राण्याचें) द्वितीय कोट, पोटांतील दुसरी पिशवी; जाळी, जाळीदार अंतरत्वचा.

Rĕt'iform, *a.* (रे'टिफॉर्म्)—net-like, reticulated. जालरूप, जालाकार, जाळ्यासारखा.

Rĕt'ina, *n.* (रे'टिना)—(*pl.-as,-a*), layer at back of eyeball sensitive to light. डोळ्यांतील एक विशिष्ट पडदा, दृष्ट्जालमंडळ, नेत्रादर्श. *Ret'inal, a.; Retini'tis, n.* (med.) दृष्ट्जालमंडलदाह.

Rĕt'icūle, *n.* (रे'टिक्यूल्)—a lady's netted or other bag for carrying things; (Astron.) a Southern constellation. बायकांची जाळीदार हातपिशवी; दक्षिण गोलार्धातील राशि; जालक.

Rĕt'inūe, *n.* (रे'टिन्यू)—great person's suite of attendants, a train of persons. लवाजमा, नोकरचाकर, परिवार.

Retire', *v. i. & t.* (रिटा'यर्)—to withdraw from place or company or occupation; retreat; recede; go to bed; compel to retire from office; (Mil.) order (troops) to retire; (Finance) withdraw (bill, note) from operation or currency; (crick.) voluntarily terminate one's innings; give up public position or service. मागें होणें, पाठीस सरणें; माघार घेणें, मागें जाणें; निजणें, झोपीं जाणें, झोपणें; (सैन्याला) माघार घेण्याला फर्मावणें; (ठराव, नोट) मागें घेणें, रद्द करणें; आपण होऊन आपला डाव थांबविणें; नोकरी सोडणें,-सोडावयास लावणें. *n.* order for troops to retire. (सैन्याला) मागें सरण्याचा, माघार घेण्याचा,-हुकूम. *To r. from the world*, become recluse. एकांतवास पत्करणें, संन्यासी बनणें, जोगी बनणें. *To r. into one self*, be uncommunicative or sociable. जगाशीं संबंध सोडून देणें. *Retiring room*, for retiring to, esp. lavatory. एकांतांत जाण्याची-हातपाय धुण्याची खोली. *Retired pay*, pension. सेवानिवृत्तवेतन. *Retired list*, of retired officers. सेवानिवृत्त अधिकाऱ्यांची नोंद,-यादी.

Retired', *a.* (रिटा'यर्ड)—that has retired from office, etc.; secluded. नोकरी सोडलेला, सेवानिवृत्त, एकांताचा, विविक्त, एकांतवासाचा.

Retire'ment, *n.* (रिटा'यर्-मेन्ट)—seclusion, privacy, solitude, state of having retired from office. एकान्तस्थळ, एकान्त, एकान्तवास; नोकरी किंवा अन्य वृत्ति सोडून घरीं बसणें.

Retir'ing, *a.* (रिटा'यरिंग)—shy; fond of seclusion. संकोचवृत्तीचा, लाजाळू, संकोची; एकांतप्रिय, विविक्तसेवी. *-ly, adv.*

Retŏrt', *v. t. & i.* (रिटॉ'र्ट)—to requite in kind; to make a repartee or counter-charge. उलट करणें; टोमणा मारणें; उत्तरास प्रत्युत्तर देणें. *n.* a thing done in retaliation or said as repartee. सणसणीत जबाब, टोला, प्रत्युत्तर, टोमणा. *Retorted, p. p.* recurved, twisted or bent backwards. पुन्हां-मागें -वळविलेलें.

Retŏrt',[2] *n.* (रिटॉ'र्ट)—a vessel with bent neck used in distilling; kinds of receptacle used in gas-making, etc. ऊर्ध्वपातनयंत्र, बकपात्र, हंसपात्र; धूर,-वायु,-तयार करण्यासाठीं पात्र. *v. t.* to purify (mercury) by heating in retort. हंसपात्रांत घालून (पारा) तापवून शुद्ध करणें,-गाळणें.

Retouch', *v. t.* (रिटच्)—to improve by giving new touches. नवीन छटा देऊन सुधारणें, निर्दोष करणें, (वर) संस्कार करणें; हातानें (फोटोची-छायाचित्राची-उलट प्रतिमा) सुधारणें.

Retrāce', *v. t.* (रिट्रे'स)—to trace back (one's *steps, way*) to source; go back over again. परत (मुळापर्यंत) जाणें; परत येणें,-जाणें; उलट पहात जाणें; मनांत घोळवणें.

Rĕtrăct', *v. t. & i.* (रिट्रॅक्ट्)—to withdraw or pull back (esp. part of one's body); to take back or unsay one's words, to withdraw (a promise., &c.); recant. आंत (ओढून) घेणें, प्रतिकर्षण करणें, आखडणें; बोलणें, परत घेणें,-फिरविणें; शब्द-वचन-परत घेणें, वचनाला फिरणें; उलट खाणें. *Retract'ation, n.* recanting, revoking. परत घेणें; फिरविणें. *Retract'ile, a.* that can be drawn back. मागें ओढतां येण्यासारखा, प्रतिकर्षणीय.-*ility, n. Retrac'tion, n.* pulling back. मागें ओढणें. *Retrac'tive, a.* serving to pull back. मागें ओढण्यासारखा, प्रतिकर्षणीय. *Retract'or, n.* (शस्त्रप्रयोगामध्यें) घावाच्या कडा ओढून धरणारें शस्त्र, (प्रति-)कर्षणी; भाळी; प्रतिकर्षक स्नायु; बोलणें परत घेणारा. [L *re*, back; *trahere*, draw]

Rĕtreat', *v. i.* (रिट्रीट्)—to go back, to retire; recede, slope away. मागें जाणें, परतणें; माघारें घेणें, आंत जाणें. *n.* an act of retreating, military signal for retreating; withdrawing into seclusion; a place of seclusion or shelter, a place of safety. हटणें, मागें सरण्याची-परतण्याची,-इशारत; एकान्त स्थळीं जाणें; एकान्तस्थान, आश्रयस्थान, आसरा, आश्रय. *a. retreating chin, forehead.* पसकी-आंत गेलेली,-हनुवटी,-कपाळ. To beat *a retreat,* abandon undertaking. हातीं घेतलेलें काम सोडून देणें. *To make good* one's *r.,* get safely away. सुरक्षितपणें आंग काढून घेणें,-मागें वळणें,-बाहेर पडणें.

Rĕtrĕnch', *v. t. & i.* (रिट्रेन्च्)—to reduce the amount of, to cut down; to live at a less expense, to economize; (Fortif.) furnish with inner line of defence, usu. consisting of trench and parapet. रकमेंत कपात करणें, कमी करणें, छाटणें; काटकसर करणें; (किल्ल्याच्या वगैरे) आंतून संरक्षक साधन निर्माण करणें.

Rĕtrĕnch'ment, *n.* (रिट्रें'न्च्-मेन्ट्)—reduction of expenses; cutting off, economy; inner trench, parapet provided against loss of outer defences. खर्चांत काटकसर; छाटाछाट; (बाह्यकोटाच्या आंतील) खंदक व तटबंदीची भिंत.

Rĕtribū'tion, *n.* (रेट्रिब्यू'शन्)—recompense, esp. for ill deeds. वाईट कृत्यांबद्दल मोबदला, प्रायश्चित्त, प्रतिफळ.

Retrib'ūtive, *a.* (रिट्रि'ब्युटिव्ह्)—by way of recompense for ill deeds; just, well-deserved. दुष्कर्माबद्दल पारिपत्य करणारा, दुष्कर्मफलदायी; योग्य (शासन).

Retrieve', *v. t. & i. & n.* (रिट्री'व्ह्)—to regain possession of; to restore to a good state; to repair (loss, disaster, error); find and bring in game. ठाकठीक करणें, चांगली स्थिति प्राप्त करून देणें; सुधारणें, (नुकसान) भरून काढणें; (मारलेली) शिकार शोधून आणणें.

Rĕtriev'al, *n.* (रिट्री'व्हल्)—act of retrieving, recovery, restoration. परत मिळविणें, भरपाई, भरून काढणें.

Rĕtriev'er, *n.* (रिट्री'व्हर)—a dog used for retrieving game. मारलेली शिकार शोधून आणणारा कुत्रा.

Rĕtrocĕ'ssion, *n.* (रेट्रसे'शन्)—ceding back of ceded territory, retrogression. परत देणें, प्रतिदान; परतणें, उलटणें, प्रतिगमन.

Rĕ'trogrāde, *a.* (रे'ट्रग्रेड्)—directed backwards; reversing progress. मागें जाणारा, प्रतिगामी; उलट्या प्रगतीचा, उलटा, अपकर्षाचा, ऱ्हासाचा. *n.* (rare) degenerate person; backward tendency. अधोगतीला गेलेला मनुष्य; उलटणें, माघार, अपकर्ष. *v. i.* (Astr.) show retrogration; move backwards, recede; revert. वक्री जाणें,-येणें,-असणें; मागें होणें, परतणें; अपकर्ष होणें. *Re'trogradely,* परत, वक्री.

Rĕtrogrĕss', *v. t.* (रिट्रग्रे'स्)—to move backwards, deteriorate. मागें जाणें, परतणें, उलटणें; खचणें, अपकर्ष होणें.—*ive, a.*

Rĕtrŏgrĕss'ion, *n.* (रिट्रग्रे'शन्)—deterioration; backward movement; (Astron.) retrogradation. अवनति; प्रतिगमन, उलटणें, परतणें; वक्री गति.

Rĕt'rŏspĕct, *n.* (रे'ट्रस्पेक्ट्)—what one looks back upon, backward survey. झालेल्या गोष्टींचें अवलोकन, मागल्याचा विचार, सिंहावलोकन.

Rĕtrospĕc'tion, *n.* (रेट्रस्पे'क्शन्)—meditation on the past. गतावलोकन, गतगोष्टींचें चिंतन, सिंहावलोकन.

Rĕtrŏspĕc'tive, *a.* (रेट्रॅस्पे'क्टिव्ह्)—looking back on past events; (of view) lying behind one, applicable to what has already happened. गतावलोकनाचा, सिंहावलोकनाचा, सिंहावलोकन करणारा; पाठीमागें असलेला, पृष्ठवर्ती; मागील कालाला लागू असणारा, भूतकालसापेक्ष.-*ly, adv.*

Retŭrn', *v. i. & t.* (रिटर्न्)—to come or go back; to revert; to give, send, or pay back; to say in reply; to elect as member for a constituency; state, mention, or describe officially. परत येणें किंवा जाणें; परत फिरणें, परत वळणें, उलटणें; परत पाठविणें,-देणें,-करणें; उत्तर देणें; मतांनीं निवडून देणें, निवडणें, निवडून पाठविणें; (वरिष्ठ अधिकाऱ्याकडे) तक्ता, -यादी,-आंकडे पाठविणें, निकाल सांगणें. *n.* returning or being returned; what is returned; profits of undertaking; official report; (Archit.) part receding from line of front, e. g. side of house or of window-opening; (pl.) kind of mild pipe -tobacco. परत येणें,-जाणें, पुनरागमन, आगमन; फेड, मोबदला; प्राप्ति, मिळकत; जाहीर करण्याकरितां प्रसिद्ध केलेलें सरकारी माहितीपत्रक; हकीकतनामा, पत्रक, आंकडे; आंत गेलेला भाग; (अने०) हलक्या प्रतीचा ओढण्याचा तंबाखू. *To r. to the subject,* मूळ विषयाकडे पुन्हां वळणें. *Unto dust shalt thou r.,* (माती असशी) मातींत मिळशील. *To r. to* one's *old habits,* पुन्हां मूळ स्वभावावर जाणें. *To r. ball,* strike back in tennis etc. चेंडू परत करणें, *Returned empties,* packing, cases etc. sent back. परत पाठविलेले (रिकामे) खोके इ०. *Returning officer,* official conducting election and announcing name of person elected. निवडणुकीचा अधिकारी. *Return ticket,* or *r.,* परतीचें तिकीट, परतप्रवासाचें तिकीट.

Small profits and quick rr., motto of cheap shop relying on large trade. स्वस्त दर व पुष्कळ उलाढाल-व्यापाराचें तत्त्व. *Fielder has a good r.*, (in cricket) sends ball in fast and straight. (क्रिकेटमध्यें) चेंडू जलद व सरळ फेंकणें. *R. match* or *game*, or *r.*, परतीचा सामना. *Return'able a.*

Rĕtuse', *a.* (रिट्यूस)—(Bot.) with broad end and central depression (of leaf or similar part). मध्यें खोलगट आणि टोंकाला जाड (स्थूल) (पात, पर्ण), निम्नस्थूल.

Reū'nion, *n.* (रियू'न्यन्)—renewal of unity; social gathering. पुनर्भेट, पुनर्योग, पुनर्मीलन, स्नेहसंमेलन.

Reūnite', *v. i. & t.* (रियुनाइट्)—to join again. पुनः मिळणें.

Rĕveal', *v. t.* (रिव्हील्)—to make known by supernatural means, to disclose, to divulge, to betray; to show, to let appear. दैविक शक्तीनें आविष्करण करणें, साक्षात्कारानें कळविणें; प्रगट करणें; दाखविणें, बाहेर पडूं देणें, बाहेर आणणें. *n.* internal side surface of opening or recess, esp. of door way or window-aperture. आंतल्या बाजूचा खोलगट पृष्ठभाग.

Rĕvei'lle, *n.* (रिव्हे'लि)—(Mil.) waking signal. (सैनिकांना) सकाळच्या उठविण्याच्या इषारा.

Rĕv'el, *v. i.* (रे'व्हल्)—to make merry, to be riotously festive; to carouse, to take keen delight *in*; throw *away* (money, time) in revelry. मौज करणें, धांगडधिंगा घालणें; अति आनंद मानणें, चैन करणें; चैनींत उडविणें,-घालविणें. *n.* (oft. pl.) revelling, merry-making. धांगडधिंगा, चैन, मजा मारणें. *Rev'eller, n.*

Rĕvĕla'tion, *n.* (रेव्हिले'शन्)—revealing or being revealed; making known by inspiration; striking disclosure, revealing of some fact. आविष्करण, प्रकटीकरण; (ईश्वरानें स्वतः) प्रकट केलेलें ज्ञान; साक्षात्कार; चमत्कार; आश्चर्यकारक गोष्ट, अज्ञात गोष्टींवर प्रकाश पाडणें. *The R.*, *Rr.*, the *Rr.*, abbr. *Rev.*, नव्या करारांतील एक विभाग. *Revel'ationist, n.* धर्मग्रंथ ईश्वरप्रणीत आहेत असें मानणारा, अपौरुषेयवादी.

Rĕv'elry̆, *n.* (रे'व्हल्रि)—noisy festivity. मौज, चैन, बहार.

Rĕvĕnge', *v. t.* (रिव्हे'ञ्ज)—to satisfy oneself by retaliation; to avenge; to take vengeance. उट्टें काढणें; वैर साधणें; सूड घेणें. *n.* a desire for vengeance; an act that satisfies vengeance, (games) opportunity given for reversing former result by return game. सूडाची इच्छा; सूड, वैरप्रतिक्रिया; डावाची संधि, बदला डाव.

Rĕvĕnge'ful, *n.* (रिव्हे'ञ्ज्फुल्)—eager for revenge; vindictive. सूड उगविण्याची बुद्धि असलेला; खुनशी, आकसखोर, सूडबुद्धीनें केलेला.—*fully, adv.*; —*fulness, n.*

Rĕv'ĕnŭe, *n.* (रे'व्हिन्यू)—annual income (esp. that of a State); department collecting state revenue. वार्षिक वसूल, जमाबंदी, महसूल; जमाबंदीखातें. (pl.) *Rev'enues*, collective items of *r.* उत्पन्नाच्या रकमा, -ठोकळ बाबी.

Rĕverb'erāte, *v. t. & i.* (रिव्ह'बरेट्)—to echo or throw or reflect (sound, light, heat), to resound; (rare) rebound, react upon. प्रतिध्वनि करणें,-होणें; परावर्तन होणें; (चेंडू) उडी घेणें; (क्व.) उलट परिणाम करणें.

Rĕverberā'tion, *n.* (रिव्हर्बरे'शन्)—an echo, a rolling sound, a sound reverberated. प्रतिध्वनि, परावर्तन.

Rĕverb'erator, *n.* (रिव्ह'बरेटर्)—reflector, reflecting lamp. परावर्तक, (उजेडाचें) परावर्तन करणारा दिवा.

Rĕvere', *v. t.* (रिव्हि'अर्)—to regard with deep and affectionate or religious respect, venerate. पूज्यबुद्धि असणें, मान ठेवणें, पूज्यबुद्धि दाखविणें,-व्यक्त करणें.

Rĕv'erence, *n.* (रे'व्हरन्स्)—feeling of deep respect, veneration. परम आदर, पूज्यबुद्धि, आदरबुद्धि, श्रद्धा. *v. t.* to regard with *r.*; venerate. पूज्य मानणें, पूज्यबुद्धि-आदर-ठेवणें.

Rĕv'erĕnd, *a.* (रे'व्हरेन्ड्)—deserving reverence by age, character, or associations of the clergy. पूज्य, सन्माननीय, पूजार्ह; उपाध्यायाचा, उपाध्यायवर्गाचा. (abbr.) Rev., of clergyman; *Very Rev.* of dean; *Right Rev.* of bishop; *Most Rev.*, of archbishop, (हा सन्मानदर्शक पदव्या आहेत.) *The r. gentleman*, the clergyman in question. उल्लेख केलेला-ज्याविषयीं आपण बोलतों तो-उपाध्याय.

Rĕv'erent, *a.* (रे'व्हरन्ट्)—feeling or showing reverence. आदराचा, पूज्यबुद्धीचा, आदरभावयुक्त.

Rĕverĕn'tial, *a.* (रेव्हरे'न्शल्)—due of or full of reverence. आदराचा, आदरयुक्त, पूज्यबुद्धीचा, आदर असणारा.

Rĕv'erie, *n.* (रे'व्हरि)—musing; a day-dream, waking dream; (arch.) fantastic notion or theory, delusion; (Mus.) dreamy instrumental piece. भ्रम, भ्रमिष्टता, विचारभ्रमण; मनोराज्य, कल्पनातरंग; अकल्पित कल्पना, भ्रामक तत्त्व; कल्पनातरंगमय पद्य. *Was lost in r.* or *a. r.* कल्पनातरंगांत निमग्न झाला होता. [*F. rever*, to dream]

Revers', *n.* (रव्हे'अर्)—(pl. the same), turned back edge of coat, bodice etc. displaying lining. (कोट, अंगांतलें वगैरेचें) उलटवलेलें टोंक (त्यांतून अस्तर दिसतें असें). [F]

Rĕvers'al, *n.* (रिव्ह'र्सल्)—reversing or being reversed, a change or overthrowing. उलट फिरणें, परावृत्ति, परावर्तन, फरक, उलट.

Rĕverse', *a.* (रिव्ह'र्स्)—contrary in character or order, inverted, upside down, back or backward. उलटा, उफराटा, व्यस्त, विपरीत, विरुद्ध; पालथा, उलट. *v. t. & i.* to invert, to transpose; to

revoke, to annul; turn the other way round or up or inside out. उलट करणें; परिवर्तन करणें, (बाजू) बदलणें, मागें घेणें, रद्द करणें, फिरवणें, उलटणें. *n.* the contrary (*of*); defeat, check; back of coin etc. उलटा, प्रतिपक्ष, विपक्ष; पराजय, मागें-उलट पाऊल, दुर्दैव; (नाणें, पदक इ.-ची) उलट बाजू, मुखवटा नसलेली बाजू. *R. fire, battery*, playing on enemy's rear or into works from rear. शत्रूच्या पाठीमागून हल्ला चढवणें. *To r. engine*, make it work backwards. एंजिन उलटें,-पाठीं-चालविणें. *On the r*, (in motoring) with car moving backwards. मागें-उलटी-मोटरगाडी घेणें. *The rr. of fortune*, दैवाचा उलटा फेरा, आपत्ति, दुर्दैव. *Reversely, adv.* उलटा; व्यतिक्रमानें. *Rever'sible, a.* उलटावयाजोगा, प्रतीपगामी, प्रतिलोम. *Rvers'ibility, n.*

Rêver'sion, *n.* (रिव्हर्शन्)—reverting, return to former state or habit esp. (Biol.) to ancestral type; passing of an estate back to grantor or his heirs; right of succession to such estate. पूर्वस्थितीवर येणें, पूर्वस्थितीला जाणें, पूर्व-मूळ-दशाप्राप्ति; मालमत्ता मालकाला परत देणें,—त्याच्या वारसाला परत मिळणें, पुनर्भोग, उत्तराधिकार. *R. right*, मूळ मालकाच्या वारसाला परत मिळण्याचा हक्क, उत्तराधिकार. *Rever'sioner*, उत्तराधिकारी. *Reversionary, a.*

Rêvert', *v. i.* (रिव्हर्ट्)—to return to former state; to recur in thought or talk, fall in by reversion; fall back into wild state; turn (eyes, steps) back. पूर्वस्थितीवर येणें; मागें वळणें, मूळ विषयावर परत येणें, मूळपदावर येणें, (मूळ मालकाच्या वारसाला) उत्तराधिकारानें मालमत्ता परत येणें; मूळ रानटी स्थितीला येणें; (दृष्टि इ.) मागें वळविणें,-वळणें. *Revert'ible, a.* (of property) subject to reversion. (मूळ मालकाच्या वारसाला) उत्तराधिकारानें परत मिळणारा.

Rêvĕt'ment, *n.* (रिव्हेट्मेन्ट्)—facing of masonry, concrete faggots, etc. on rampart or embankment. किल्ल्याची भिंत, बांध,-यांवरील दर्शनी बांधकाम

Rêview', *n.* (रि-व्ह्यू)—(law) revision; survey inspection; retrospect; critique of a book, &c.; periodical in which events, books, etc. are reviewed; second view. तपासणी; पाहणी; चौकशी; सिंहावलोकन; परीक्षण, समालोचन; नियतकालिक; पुनः पाहणें. *v. t. & i.* to view again; to survey, to look back on; to write review of (a book) hold review (of troop etc.). पुन्हा पाहणें; फिरून मागें पाहणें; परीक्षण करणें, समालोचन करणें, परीक्षणात्मक-टीकात्मक-लेख लिहिणें; (सैन्याची) पाहणी करणें. *Review'able, a.*; *Review'al, n.*

Rêview'er, *n.* (रिव्ह्यूअर्)—writer of or one who writes a review or reviews. गुणदोषविवेचक, परीक्षण करणारा, टीकाकार.

Rêvile', *v. t.* (रिव्हाइल)—to call by ill names; to abuse, to rail at; to vilify, to upbraid. कुटाळी करणें, शिवीगाळ करणें, निंदा करणें, निर्भर्त्सना करणें *Revil'er, Revil'ing, nn.*; *Revil'ingly, adv.*

Rêvise', *v. t.* (रिव्हाइझ्)—to examine and amend faults in, to reconsider and amend. तपासून शुद्ध करणें, तपासणें, सुधारणें, दुरुस्ती करून पक्का करणें, उजळणी करणें. *n.* proof sheets embodying corrections made in earlier proof. सुधारलेलें दुसरें मुद्रित, द्वितीयमुद्रित. *Revi'ser, n.* one who re-examines for correction. तपासणारा, शुद्ध करणारा. *Revised Version*, abbr. R. V., बायबलची सुधारलेली आवृत्ति. *Revi'sory, a.* तपासणीचा, उजळणीचा.

Rêvi'sion, *n.* (रिव्हिझन्)—revising, revisal; revised edition or form. तपासणी, उजळणी, तपासून सुधारणें; सुधारलेली आवृत्ति. *Revi'sional, a.* तपासणीचा, दुरुस्तीचा, उजळणीचा, पुनः तपासून पाहण्याचा.

Rêvi'val, *n.* (रिव्हाइव्हल्)—reviving or being revived; reawakening of fervour; restoration to bodily or mental vigour or to life or consciousness. पुनर्जीवन, पुनरुज्जीवन, पुनरुत्साह, (पुनः) जिवंत होणें-करणें, संजीवन, सावरणें. *Reviv'alism*, *n.* धर्माचें पुनरुज्जीवन, पुनरुज्जीवनमार्ग. *Reviv'alist*, *n.* पुनरुज्जीवनाभिमानी.

Rêvive', *v. i. & t.* (रिव्हाइव्ह्)—to come or bring back to life, consciousness, vigour, notice, or vogue; (Chem.) restore (metal) to natural form. पुन्हां जिवंत करणें किंवा होणें; चेतना आणणें, चेतना येणें, पुन्हां शक्ति-सामर्थ्य-येणें, सावरणें, पुन्हां प्रसिद्धीला येणें,-चालू होणें, अमलांत येणें,-चालू करणें; (धातूला) मूळ स्वरूप देणें,-मूळ स्वरूपांत रूपांतर करणें. *Reviv'able, a.* [L. *re.* again, *vivere*, live]

Rêvi'ver, *n.* (रिव्हाइव्हर्)—In verbal senses; (sl.) a stimulating drink; preparation for restoring faded colour etc. उत्साहवर्धक-जोमाचें-पेय; (फिकट रंगाला) तजेला आणणारें.

Rêviv'ify, *v. t.* (रिव्हिव्हिफाय्)—to restore to vigour or life. to reanimate; (Chem.) to revive.. नवशक्ति देणें, परत चेतना आणणें, पुन्हां जिवंत करणें, पुनरुद्धार करणें; (धातूला) मूळ स्वरूपांत आणणें. *Revivifica'tion, n.*

Rĕv'ocable, *a.* (रे'व्होकेबल्)—that may be revoked. रद्द करण्यासारखा, फिरविण्यासारखा.

Rĕvocā'tion, *n.* (रेव्होके'शन्)—act of revoking, annulment, repeal; (Whist etc.) neglect to follow suit though able to. पुन्हां फिरवणें, रद्द करणें, फिरविणें, खोडणें; (पत्त्याच्या डावांत) त्या रंगाचें पान असून न टाकणें. *n.* (Whist etc.) revoking; (rare) revocation. (पत्त्याच्या डावांत) योग्य त्या रंगाचें पान टाकण्यास चुकणें; फिरवाफिरव, रद्दपणा.

Rêvōke', *v. t. & i.* (रिव्होक्)—to rescind, to withdraw, to cancel, to declare void. मागें घेणें, रद्द करणें.

Rêvōlt', *v. t. & i.* (रिव्होल्ट्)—to rise or fall away or go over in rebellion; to feel revulsion, to affect with disgust. बंड करणें, सरकाराविरुद्ध उठणें,-फितूर होणें; एकाएकीं बदल होणें; वीट येणें, चीड-

किळस-येणें,-वाटणें. *n.* insurrection; rebellious mood; sense of loathing. बंड; फितुरी, स्वपक्षत्याग (-वृत्ति); किळस, वीट. *Revolt'ing, a.* disgusting, horrible. किळसवाणा, क्षोभजनक, उद्वेगजनक, भयंकर, *Revolt'ingly, adv.*

Rĕv'olute, *a.* (रे'व्होल्युट)—1. (Bot.) with back rolled edge. प्रतिवालिताग्र, मागें वळलेल्या कडेचा. 2. *v. i.* (sl.) to engage in political revolution, राज्यक्रांतींत भाग घेणें.

Rĕvōlu'tion, *n.* (रेव्होल्यु'शन्)—revolving; single completion of orbit or rotation; fundamental change, complete change; forcible substitution of new government or ruler for the old. भोंवतीं फिरणें, परिभ्रमण; फेरा, वेढा, प्रदक्षिणा; समूळ पालट, उलटापालट, क्रांति; राज्यक्रांति. *Revolu'tionist, n.* क्रांतिकारक, क्रांतिवादी,-*tionism, n.* क्रांतिकारकपणा, क्रांतिवाद. [L. *re*, again; *volvere*, roll]

Rĕvōlū'tionarў, *a.* & *n.* (रेव्होल्यू'शनरि)—involving great change; (instigator) of political revolution; (rare) of rotation or revolving. उलाढालीचा, चळवळीचा, क्रांतिकारक; राज्यक्रांति घडवून आणणारा, राज्यक्रांतीचा; परिभ्रमणाचा, प्रदक्षिणेचा, फेऱ्याचा.

Rĕvōlu'tionize, *v. t.* (रेव्होल्यु'शनाइझ्)—to reconstruct completely, to bring about a revolution or complete change in. पूर्ण क्रांति घडवून आणणें, उलथापालथ करणें, दांडगे फेरफार घडवून आणणें.

Rĕvŏlve', *v. t.* & *i.* (रिव्हॉ'ल्व्ह्)—to turn round a centre; to rotate; go rolling about. भोंवतीं फिरणें, फेरा घालणें, प्रदक्षिणा करणें, वाटोळा फिरणें; परिभ्रमण करणें,-करविणें, घोळणें, विचार करणें. *To r. problem, fact. in the mind,* ponder over it. प्रश्नाचा-गोष्टीचा-मनांत घोळून घोळून विचार करणें, मनांत घोळत राहणें.

Revŏl'ver, *n.* (रिव्हॉ'ल्व्हर्)—(*esp.*) a pistol that will fire several shots without reloading. अनेकबारी पिस्तूल. *Policy of the big r.,* of threatening foreign states with retaliatory tariff. परराष्ट्रीय आयात मालावर प्रतिकारबुद्धीनें जकात लादण्याची धमकी (परराष्ट्रांना).

Revūe', *n.* (रिव्ह्यू')—loosely constructed play or series of scenes satirizing current events. (चालू घडामोडींवर-परिस्थितीवर टीका करणारें) व्यंग्य-नाटक, प्रहसन, [F.]

Rĕvŭl'sion, *n.* (रिव्ह'ल्शन्)—sudden violent change of feeling; sudden reaction in taste, fortune, trade, etc.; (rare) drawing or being drawn away; (Med.) counter-irritation. भावनेंतील आकस्मिक उलटापालट,-फरक; उलटापालट, विपर्यास; उलट दाह, प्रतिक्षोभ.-*sive, a.*

Reward', *n.* (रिवॉ'र्ड)—return or recompense for service or merit; requital for good or evil; sum offered for detection of criminal, restoration of lost property, etc. बक्षीस, फळ, मोबदला, उलट, प्रतिदान; इनाम, रोख बक्षीस. *v. t.* to give or serve as a reward, repay, recompense. बक्षीस देणें, फळ देणें, परत देणें, मोबदला देणें, उलट करणें. *Reward-less, a.*

Rey'nard, *n.* (रे'नर्ड)—(proper name for) the fox, a fox. कोल्हा.

Rhăb'domăncў, *n.* (रॅ'ब्डोमॅन्सि)—use of divining rod, esp. for discovering subterranean water or ore, dowsing. (भूमिगत जल किंवा धातु शोधून काढण्यासाठीं) दंडाचा-पानाड्याच्या पट्टीचा-उपयोग (करणें), जलसंशोधक दंडाचा-काडीचा-उपयोग.

Rhădamăn'thus, *n.* (रॅडमॅ'न्थस)—stern and incorruptible judge. कडक न्यायाधीश.-*thine, a.* [name of judge in Gk Hades]

Rhăp'sŏdў, *n.* (रॅ'प्सॉडि)—an enthusiastic high-flown utterance or composition, a rambling composition; (Gk. Ant.) on epic poem, or part of it, of length for one recitation. आवेशयुक्त जोरदार भाषण किंवा लेख, असंबद्ध भाषण,-कविता; महाकाव्यांतील एका वृत्तांताच्या वर्णनाचा एकाच वेळेस गातां येईल एवढा भाग. *Rhapsod'ical, a. Rhap'sodist, n.* person who writes rhapsodies (usu. *about, on*); reciter of rhapsody. असंबद्ध काव्य करणारा,-लिहिणारा; (होमरच्या) काव्यांतील उतारे गाणारा.

Rhĕ'nish, *n.* (ऱ्हॉ'निश्)—Rhine wine. ऱ्हाइन् नदीच्या खोऱ्यांतील दारू.

Rheo,-reo-, (रीओ)—(comb. form in electr. terms,) stream, current. प्रवाह. *Rheom'eter, n.* विद्युत्प्रवाहमापक. *Rhe'oscope, n.* विद्युत्प्रवाहदर्शक. *Rheotome, n.* device for interrupting current. विद्युत्प्रवाहव्यवच्छेदक, विद्युद्व्यवच्छेदक. *Rhe'ostat, n.* instrument regulating current to constant degree of force. विद्युत्समस्थापक.

Rhē'tor, *n.* (ऱ्ही'टर)—ancient Greek or Roman teacher or professor of rhetoric; (rare) (mere) orator. प्राचीन ग्रीस किंवा रोममधील साहित्यशास्त्र-वक्तृत्व-शिक्षक; वक्ता.

Rhĕt'oric, *n.* (ऱ्हे'टारिक्)—art of speaking or writing effectively, inflated or exaggerated language, eloquence; persuasiveness of looks or acts. अलंकारशास्त्र, आलंकारिक भाषा, वक्तृत्व; आकर्षकता.

Rhetŏ'rical, *a.* (ऱ्हिटॉ'रिकल्)—of the nature of or exhibiting rhetoric; oratorical. आलंकारिक; वक्तृत्वपूर्ण, वक्तृत्वाचा; छाप पाडणारा. *R, question,* asked not for information but to produce effect. वक्तृत्वाची छाप पाडणारा प्रश्न.-*rically, adv. Rhetorician, n.* (-शन्), rhetorical speaker or writer. उत्कृष्ट वक्ता; अलंकारिक भाषेंत बोलणारा,-लिहिणारा.

Rheum, *n.* (ऱ्हूम्)—humid matter or water secretion collected in eyes, nose, or mouth; catarrh; (pl.) rheumatic pains. श्लेष्मा, कफ, सर्दी, शैत्य; (अने०) आमवात, संधिवात.

Rheumăt'ic, *a.* (ऱ्हूमॅ'टिक्)—subject to rheumatism. संधिवाताचा, संधिवातग्रस्त, संधिवात झालेला. *n. r.*

patient; (pl.) rheumatism. संधिवाताचा रोगी, संधिवात. *R. fever, n.* सांधेदुखीचा ताप.

Rheumă'tickў, *n.* (र्‍हूमॅ'टिकि)—(colloq.) like or having rheumatism. संधिवातासारखा, संधिवातग्रस्त.

Rheu'mătism, *n.* (र्‍हूमॅटिझम्)—a disease marked by inflammation and pain in the joints. संधिवात. *Acute r.*, तीव्र आमवात, फूट.

Rheu'mў, *a.* (र्‍हूमि)—affected with rheum, (of air) damp, raw. चिपडा, पिचका; थंड, गारठ्याची, सर्द. *R.-eyed*, चिपड्या,-पिचक्या,-डोळ्यांचा; अश्रुढाळ (घोडा).

Rhi'nal, *a.* (र्‍हाइनल्)—(anat.) of nostril or nose. नाकपुडीचा, नाकाचा.

Rhino-, (र्‍हाइनॉ-)—comb-form of Gk *rhis, rhinos*, nostril, nose. नाकपुडी-नाक-, *Rhino-pharyngeal*, of nose and pharynx. नाक व घसा यांसंबंधीं. *R.-plastic,-plasty*, (of plastic surgery) of the nose. शस्त्रक्रियेनें नाक दुरूस्त करणें, (करण्याचें); अभिनव नागबंध. *Rhinoscope,-scopic*, नासिकादर्शक, नाक तपासण्याचें यंत्र.

Rhinŏ'cerŏs, *n.* (र्‍हाइनॉ'सरॉस्)—a large animal with a horn or two horns on the nose. गेंडा, खड्ग.

Rhŏ'dium, *n.* (रो'डिअम्)—a hard white metal extracted from the ore of platinum. अशुद्ध 'प्लॅटिनम' धातूंतून काढतां येणारी कठीण पांढरी धातु, र्‍होड.

Rhŏdodĕn'dron, *n.* (र्‍होडाडे'ड्रॉन)—evergreen shrub with large flowers. एक जातीचें नेहमीं हिरवें असणारें फुलझाड.

Rhŏmb, Rhŏm'bŭs, *nn.* (र्‍हॉम्ब्, र्‍हॉ'म्बस्)—(pl.-buses) equilateral but not right-angled parallelogram diamond or lozenge. तुल्य चतुर्भुज, सम चतुर्भुज; या आकाराचा हिरा; (पेपरमिंटची) वडी, इ० *Rhom'bic, a.* rhomb-shaped. सम-चतुर्भुजाचा, समभुजचौकोनाचा,-नी. *Rhom'boid, n.* a parallelogram, neither equilateral nor right-angled. समप्रतिभुज (चौकोन); विषम सम चतुर्भुज. *Rhomboid'al, a.*

Rhu'barb, (र्‍हबार्ब)—purgative made from root of Chinese plant. रेवाचिनी.

Rhўme, Rime, *n.* (र्‍हाइम, राइम्)—identity between terminal sounds of words or verse-lines; a poem with rhymes; a word providing a rhyme. यमक; सयमक कविता, यमक साधलेली कविता; यमकाचा शब्द. *v. t. & i.* to write rhymes, versify; exhibit rhyme; while (time) away in rhyming. सयमक कविता करणें, यमक जुळविणें, कवन करणें, यमक होणें,-साधणें,-मिळणें,-जुळणें; यमकें करण्यांत वेळ घालविणें. *Without r. or reason*, quite unaccountably. ताळ नाहीं तंत्र नाहीं, असा; ताळतंत्ररहित, कारणमीमांसा न होण्याजोगी. *Rhymer,-ster, nn.* writer of rhyme. कविता करणारा, कवि, यमक्या.

Rhў'thm, *n.* (रि'दम्)—measured flow of words in verse or prose; movement with regular succession, metrical movement. लय, मात्रासाम्य, लयसाम्य, तालबद्धता; ताल, मेळ, साम्य; सारखी गति, गतिसाम्य, समगति. *Rhyth'mic,-mical*, (-क्), *aa.* तालबद्ध, लयात्मक, मेळ असलेला, समगतिक.

Rib, *n.* (रिब्)—one of the curved bones round the upper part to the body; an arch supporting a vault; a rod of umbrella-frame; curved timber to which boat's planks are nailed; (joc.) wife, woman. बरगडी, बरगडीचें हाड; पार्श्वास्थि, फांसळी, फांसळीचें हाड, बरगडी; कमान, (पानाचा) दांडा; वलय, शीर; शलाका, छत्रीची काडी; (जहाजाचा) कणा; पत्नी, स्त्री. *v. t.* to provide with ribs, act as rr. of; mark with ridges; half-plough, rafter. दांडा, काडी वगैरे घालणें; (चा) दांडा; कणा वगैरे असणें; कणा, दांडा, रांग वगैरे काढणें; (नांगरून) दांड पाडणें, वरंबा घालणें. *To poke* one *in the rr.*, to draw his attention facetiously. थट्टेखोरपणानें,-विनोदानें,-लक्ष वेधणें. *To smite under fifth rib*, bibl. to stab. भोसकणें. *R.-grass,-wort*, Narrow-leaved Plantain. एक जातीचें गवत,-वनस्पति. *Ribbed, Rib'less, aa. Ribb'ing, n.* ribs or rib-like structure. फांसळ्या; फांसळ्यांच्या आकाराची बांधणी.

Rib'ald, *a.* (रि'बल्ड)—scurrilous, irreverent, indecent. हलकट, असंबद्ध, अश्लील (भाषा, बोलणारा). *n.* a lewd person. हलकट मनुष्य, तोंडाचा फटकळ, अभद्र, बीभत्स.

Rib'aldry, *n.* (रि'बॅल्ड्रि)—ribald talk. अभद्र,-बीभत्स-भाषण, पांचकळ बोलणें.

Ribb'on, Rib'and, *n.* (रि'बन्, रि'बन्ड्)—silk or other fine material woven into a narrow band; piece of this used for ornament; (*pl.*) reins. फीत, नाडी, लगाम, लगामाची दोरी. *To hang in, torn to, rr.*, ragged strips. फाटक्यातुटक्या फिती, (कापडाच्या) पट्ट्या. *To handle, take, the rr.*, drive. (लगाम धरून) हांकलणें. *R.-grass*, slender-leaved kind. बारीकपानी गवत.

Ri'bĕs, *n.* (रा'इबीझ्)—(bot.) kinds of plants including currants, etc. एक जातीची वनस्पति,-झाड,-झुडूप.

Rice, *n.* (राइस)—pearl-white seeds of an oriental plant used as food; the plants. तांदूळ, भात, साळ, साळी. *Boiled rice*, भात. *Husked rice*, तांदूळ. *R.-bird*, Java sparrow, also bobolink. मनिया (पक्षी). *R.-milk*, दूधपाक, खीर. *R.-paper*, kind made from pith of a Formosan plant and used by Chinese artists for painting on (named after rice in error). चिनी लोकांचा चित्रें काढण्याचा एक प्रकारचा कागद.

Rich, *a.* (रिच्)—wealthy, having riches; fertile; valuable, (of dress) splendid, costly; highly amusing; abundant; (of food) containing large proportion of fat, butter, sugar, etc.; (of colours, sounds, smells) mellow, deep, full, not thin. धनिक, श्रीमंत; सुपीक; उंची, मौल्यवान; सुरेख, छान, अत्यंत मनोरंजक; विपुल, सुबलक

मिट (अस); पक्कास; घमघमीत, झगझगीत, चकचकीत, मोठा, उंच. *Rich*-,richly-clad, थाटामाटाचा पोषाख केलेला. *Rich'en, v. t. & i.* (rare); *Rich'ness, n.*

Rich'es, *n.* (रि'चिझ्)—wealth; valuable possessions, opulence, affluence. द्रव्य, संपत्ति; दौलत.

Rich'ly̆, *adv.* (रि'च्-लि)—In adj. senses; fully; abundantly. भपक्यानें, थाटानें; पूर्णपणें, यथायोग्य रीतीनें. *Richly deserves* (a thrashing, to succeed). पुरतेपणी,-पुरेपूर,-लायक आहे.

Rick, *n.* (रिक्)—stack of hay, corn, peas, etc. गंजी, गंज, उडी, उडवें, सुडी. *v. t.* to form into ricks. गंजी रचणें, उडवी घालणें. 2. See Wrick.

Rick'ets *n.* (रि'किट्स)—a children's disease (with softening of bones, bow-legs, &c.). मुलांचा एक रोग, मुडदूस, अस्थिमार्दवरोग.

Rick'ety̆, *a.* (रि'किटि)—of, like or having rickets; shaky, insecure. मुडदुसाचा, मुडदुसासारखा, मुडदूस झालेला; लटपटीत, ढिला.*-etiness, n.*

Ric'ochet, *n.* (रि'कोशे)—skipping on water or ground of a cannon-ball or bullet, hit made after it. पाण्यावरून किंवा जमिनीवरून (तोफेचा) गोळा उडत उडत जाणें; त्याप्रमाणें लागलेला टोला, *v. i. & t.* (*pa. t. & pa. p.*-cheted,-शेड; pr. pa. -cheting,-शेइंग), to skip once or more; hit or aim at with ricochet shot. (एकदां किंवा अधिक वेळां) उडी खाणें; उडी घेणें; उडी घेणाऱ्या गोळीनें-मारानें-नेम धरणें.

Ric'tus, *n.* (रि'-क्टस)—expanse or gape of person's or animal's mouth, bird's beak, or flower with two-lipped corolla. (मनुष्याची) जांभई, (पशूचें) उघडें तोंड, (पक्ष्याची) उघडी चोंच,- पोकळी. [L. *ringi*, open the mouth]

Rid, *v. t.* (रिड्)—(pa. t. *ridded, rid*; pa. p. rid), to disencumber or relieve of; to abolish (pest). मुक्त करणें, सोडवणें; नाहींसा करणें. *a.* free. मुक्त. *To get r. of, be r. of,* पासून मुक्त होणें,-सुटणें, मोकळा होणें.

Ridd'ance, *n.* (रि'डन्स)—getting rid of. सोडवणूक, सुटका, मुक्तता. *A good r.!* (as excl. of joy). सुटलों एकदांचा! *Person* etc. is *a good r.*, better away. त्याच्या तावडींतून सुटलों-तो निघून गेला-छान छान झालें! पीडा गेली!

Rid'dle, *n.* (रि'डल्)—a question designed to test one's ingenuity in divining an answer; a puzzling fact, thing or person; a coarse sieve; plate with pins used in straightening wire. कूट प्रश्न, कोडें, उखाणा, गूढ; जाडी चाळण, घोळणा; तार सरळ करण्याचें यंत्र,-साधन. *v. i. & t.* speak in, propound, riddles; solve a *r.* कोड्यांत बोलणें, गूढ भाषण करणें, कोडीं घालणें; कोडें सोडविणें *v. t.* to sift; pierce in many places with shot (also fig.). चाळणें, घोळणें; (अंगाची इ.) चाळण करणें, भोकें पाडणें; (पुरावा) चाळून-तपासून-पाहणें; प्रश्नांचा भडिमार करणें. *Rid'dingly, adv.*

Ride, *v. i. & t.* (राइड्)—to sit on and be carried by a horse, &c.; to go on a conveyance, manage a horse; to be at anchor; to float buoyantly; to oppress, to tyrannize over; (of sun) seem to float; project or overlap; traverse on horse-back; cause to ride, give ride to, (of ground) be of specified character for riding on. (घोड्यावर) बसून जाणें; (गाडींत) बसून जाणें; सवारी करणें, नांगर टाकून असणें; तरंगणें; जुलूम करणें, वर्चस्व गाजविणें; तरंगत आहेसें दिसणें, अति वेगानें जाणें-फिरणें; वर चढणें, वर पडणें,-अधिक होणें; घोड्यावर बसून-रपेट,-प्रवास,-करणें; वरून नेणें, वाहून नेणें; घोड्यावर बसून जाण्याच्या दृष्टीनें (बरी वाईट जमीन) असणें. *n.* a journey in public conveyance; a road esp. through wood, for riding; (Mil.) batch of mounted recruits, (गाडींतून किंवा घोड्यावरून) रपेट; रपेटीचा मार्ग, घोडेस्वार; नवीन भरतीच्या घोडेस्वारांची तुकडी. *To r. for a fall,* act recklessly, निष्काळजीपणानें,-अविचारानें,-वागणें. *To r.* one *down,* overtake by riding, put one's horse at him, भरधांव घोडा फेंकून (दुसऱ्याला) गांठणें; घोडा दुसऱ्याच्या अंगावर घालणें. *To r. off on* a side issue, use it to evade the main point. मुख्य प्रश्नाला बगल देण्यासाठीं अवांतर गोष्ट काढणें. *To r. out the storm,* come safely through it, (lit & fig.). वादळांतून-संकटांतून निभावून बाहेर पडणें. *To r.* one's *horse,* hobby, jest etc. (to death). आपलेंच घोडें पुढें दामटणें, आपलाच मुद्दा, वेड, नाद, छंद घेऊन बसणें; -अतिरेक करणें. *Ridden by fears, prejudices,* भयग्रस्त, संशय-भ्रम-ग्रस्त. *Priest-ridden,* उपाध्यायवर्गाचें प्राबल्य असलेला. *Rid'able, a.*

Ri'der, *n.* (रा'इडर)—In vbl. senses; additional clause amending or supplementing document; expression of opinion, recommendation, etc. added to verdict; corollary, naturally arising supplement; (Math.) problem; piece in machine etc. that surmounts or bridges or works over others; (Naut. pl.) additional set of timbers or iron plates strengthening ship's frame, (sing.) over-lying rope or rope-turn. घोड्यावर बसणारा, स्वार, स्वारी; पुरवणी-कलम, (निकालाची) पुस्ती; पुरवणी,-मुख्य सिद्धांतावरील प्रश्न, उदाहरण; (यंत्रांतील) जोडणारा भाग,-सांधा,-गलबताला अधिक बळकटी आणणारें लांकूडकाम, दोरीचें वेटोळें. *Ri'derless, a.*

Ridge, *n.* (रिज्)—a line of junction in which two sloping surfaces meet; (agric.) one of a set of raised strips separated by furrows; a long narrow hill-top; a mountain range. कणा, आडें; कांदाळें, कांडें, दंड; लांब चिंचोळें शिखर; पर्वताची रांग, श्रेणी. *v. t. & i.* to break up land into *rr.*; mark with *rr.*; plant in *rr.* कांडीं पाडणें, वरंबा घालणें; रांगा घालणें; कांडीं पाडून त्यांत लावणें. *R.-pole, R.-piece,* आडें, आढें. *Ridged, Ridg'y, aa.* कडा-दांडा-असणारा.

Rid'icūle, *v. t.* (रिडिक्यूल्)—to make a laughing-stock of; to deride, laugh at. उपहास करणें; टर उडवणें, थट्टा करणें. *n.* treatment of a person or thing as ridiculous. उपहास, थट्टा; टर.

Ridic'ūlous, *a.* (रिडि'क्युलस)—deserving to be laughed at as foolish or absurd. उपहासास्पद, हास्यास्पद.-*ly, adv.*;-*ness, n.*

Ri'ding, *n.* (रा'इडिंग्)—In vbl. senses; road for riders. घोड्यावर बसणें, स्वारी; घोडेस्वारांचा रस्ता. *a.* used for riding on; intended for a rider. सवारीचा, बसणीचा, घोडेस्वारासाठीं असलेला. *R.-breeches,* घोड्यावरून रपेट करतांना घालण्याचा चोळणा. *R.-habit,* lady's long skirt for riding. घोड्यावर बसण्याचे वेळीं घालण्याचा स्त्रियांचा झगा. *R.-master,* one who teaches riding. अश्वारोहणशिक्षक, घोड्यावर बसण्यास शिकविणारा. *R.-school,* घोड्यावर बसायला शिकविण्याची शाळा.

Rife, *pred. a.* (राइफ्)—of common occurrence; prevailing; numerous. नेहमीं घडणारा; प्रचलित; विपुल.-*ness, n.*

Riff'-răff, *n.* (रिफ्-रॅफ्)—the rabble; disreputable people. बाजारबुणगे लोक; मवाळी लोक.

Ri'fle, *n.* (रा'इ-फल्)—a musket with grooved barrel; (*pl.*) troops armed with these. एक प्रकारची बंदुक, रायफल नांवाची बंदुक; (अने०) रायफलवालें सैन्य,-शिपाई,-सैनिक. *v. t.* to search and rob; make spiral grooves in (gun etc.); shoot with rifle. लुटणें, बुचाडणें, लुबाडणें; (बंदुकीच्या आंतल्या बाजूला) खोबणी पाडणें; रायफलनें गोळी घालणें. *R.-bird,* एक आस्ट्रेलियांतील पक्षी. *R. brigade,* रायफलवाल्यांची (ब्रिटिश) तुकडी. *R.-corps,* रायफल-स्वयंसेवकतुकडी. *R.-man,* soldier with rifle; member of rifle brigade. बंदुकवाला शिपाई; रायफलतुकडीचा सैनिक. *R.-range,* distance *r.* carries; place for *r.* practice. रायफलबंदुकीचा नेम, पल्ला; चांदमारीचें मैदान. *Ri'fling, n.* arrangement of the grooves in a rifle. बंदुकींतील खोबण्यांची रचना.

Rift, *n.* (रिफ्ट्)—fissure, chasm, crack in earth or rock; rent, crack in an object, opening in cloud etc. चीर, भेग, तडा, पोकळी. *v. t.* (usu. in p.p.) rend apart, cleave. चीर-भेग-पाडणें, उकलवणें. *Little r. within the lute,* अन्तःकलह, शुष्क भांडण. *Riftless, Rifty, aa.*

Rig, *v. t.* (रिग्)—to provide a ship with spars, ropes, &c.; prepare for sea in this respect; to furnish with clothes or equipment; to set *up* hastily or as makeshift. दोरखंडांनीं वगैरे (जहाज) दुरुस्त करणें,-सजवणें; जहाज सजवून जलप्रवासाला सिद्ध करणें; कपडे घालून सजविणें, पोषाख घालणें; सजवणें, सज्ज करणें. *n.* way ship's masts, sails, etc. are arranged; (transf.) person's or thing's look as determined by clothes etc.; (U. S.) carriage or equipage, esp. with its horses. जहाजाचीं शिडें, डोलकाठ्या वगैरेंची रचना; पत्रादिकांनीं आलेली शोभा,-सजावट. *Rig-out, n. & v. t.* प्रवासी तयारी (करून देणें).

Rig, *n.* (रिग्)—trick, dodge, swindle. चेष्टा, टवाळी, लुच्चेगिरी, फसवणूक. *v. t.* to manage by trickery. फसवेगिरीनें चालविणें. *To r. the market,* cause artificial rise or fall in prices. (फसवेगिरीनें) बाजारभावाचा चढउतार करणें.

Rigg'ing, *n.* (रि'गिंग्)—the ropes which support the masts of a ship. जहाजाचीं दोरखंडें.

Right, *a.* (राइट्)—straight; (of angle) of 90°, made by lines meeting perpendicularly; just; proper, not mistaken, correct, true; on or to the right hand; in good or normal condition, sound, sane, satisfactory, well-advised. सरळ; काटकोनाचा, ९० अंशाचा; योग्य, न्याय्य; वाजवी, बरोबर; उजवा, उजव्या हाताकडील; सुस्थितींत असलेला, सुदृढ, सुधा, समाधानकारक, सुनीत, समंजस. *v. t. & i.* to restore to or recover proper position; avenge, vindicate, rehabilitate; (of ship) recover vertical position; to make reparation; to correct, to set in order. ठिकाणीं आणणें, योग्य स्थानीं-ठिकाणीं येणें; न्याय करणें, दाद घेणें; काटकोनांत येणें; सुलट-सरळ-होणें; ताळ्यावर आणणें; बरोबर करणें, सुधारणें, निवाडणें, दुरुस्त करणें; व्यवस्थित करणें. *n.* what is just; fair treatment; justification; (*pl.*) right claim, right condition. सत्य; नीति, न्याय्यता, न्याय; रास्तपणा, औचित्य; अधिकार, सत्ता, हक्क; उजवीकडचा प्रदेश,-भाग,-दिशा; (राज०) परराष्ट्राच्या लोकसभेंतील पुराणमतवादी-सुधारणाविरोधी-सभासद. *adv.* straight; all the way, completely, exactly; justly, properly; to the right hand; very, to the full. थेट, नीट, सरळ; अगदीं बरोबर, ठीक; योग्य तऱ्हेनें; न्यायानें, योग्य मार्गानें; उजव्या बाजूला, उजवीकडे; अगदीं, फारच, अति. *At r. angles,* काटकोनांत, ९० अंशांचा कोन करून. *R. sailing,* due N., S., E., or W. उत्तर, दक्षिण, पूर्व, पश्चिम दिशेनें गलबत जाणें. *On the r. side of 40,* not yet 40 years old. वयानें चाळीस वर्षांच्या आंतील. *In one's r. mind,* not mad. डोकें ठिकाणावर असलेला. *R. you are, all r., r. oh!,* वाहवा! ठीक! बरोबर! अगदीं योग्य! *R. and left, adv.* to or on both sides, on all hands, दोन्हीं बाजूंकडे,-बाजूनीं, सर्वबाजूंनीं; *a.* दोन्हीं बाजूनें-बाजूचा. *R. arm,* उजवा हात, (fig.) one's most reliable helper. उजवा हात, मुख्य साह्यकारी. *The r.,* the juster cause. सत्पक्ष. *To be in the r.,* have justice or truth on one's side. आपली बाजू न्यायाची किंवा सत्याची असणें. *Woman's rr.,* of equality with men. स्त्रियांचे (पुरुषाशीं) समान हक्क. *R. of way,* right established by usage to pass over another's ground, also path subject to such right. दुसऱ्याच्या जमिनींतून जाण्यायेण्याचा चालू वहिवाटीचा हक्क, असा हक्क असलेला रस्ता. *To set* or *put to rr.,* arrange properly. ठाकठीक रचणें, लावणें. *R.*

R. away, immediately, without pause.

न घांवता. *R. angle*, काटकोन. *R. minded*, having virtuous inclinations. सत्प्रवृत्त, सद्वृत्तीचा, सात्त्विक वृत्तीचा. *R. whale*, kind yielding best whale-bone. उत्कृष्ट जातीचा देवमासा.

Righ'teous, *a.* (रा'इचस)—virtuous, upright in conduct, just, honest. गुणवान, नेकीचा, प्रामाणिक, न्याय्य, सात्त्विक.*-ly, adv.* ;*-ness, n.*

Right'ful, *a.* (रा'इट्-फुल्)—legitimately entitled to; justifiable, just, lawful. हक्कदार, न्यायाचा, रास्त, यथान्याय.*-fully, adv. -fulness, n.*

Right'ly̆, *adv.* (रा'इट्-लि)—justly, correctly, properly, justifiably. न्यायानें, यथायोग्य, अगदीं बरोबर.

Ri'gĭd, *a.* (रि'जिड्)—that cannot be bent, inflexible, unyielding; harsh, strict. न वांकणारा, ताठ; कडक, न्यायनिष्ठुर.*-ly, adv.* ताठपणें, कडक रीतीनें.

Ri'gĭdity̆, *n.* (रि'जिडिटि)—inflexibility, harshness, strictness, severity. ताठरपणा, कडकपणा, दक्षता.

Rĭg'marōle, *n.* (रि'ग्मॅरोल्)—meaningless talk or string of words. मूर्ख बडबड, बडबड, गडबडगुंडा. (attrib.) incoherent. असंबद्ध, ताळमेळ नसलेला.

Ri'gŏr, *n.* (रा'यगॉ,रि'-)—(path.) sudden chill with shivering before fever etc. आकस्मिक थंडी वाजून हुडहुडी भरणें. *R. mortis*, stiffening of body after death. मृत्यूनंतर शरीरांतील स्नायू ताठ होणें, प्रेत ताठ होणें. [L. rigere, be stiff]

Rĭg'our, *n.*(रि'गर्)—severity, strictness, harshness; cruel extremity of cold, intense coldness, inclemency; (pl.) harsh measures; logical accuracy. कडकपणा, तीव्रता, कडका, ताठा; कांटा; कडक उपाय; नेमकेपणा, अचूकपणा. *Rig'orism, Rig'orist, nn.*

Rĭg'orous, *a.* (रि'गरस)—severe, strict. कठोर, कडक, *-ly, adv.*

Rĭg'sdăg, *n.* (रि'ग्स्डॅग)—Danish Parliament. डच पार्लमेंट,-लोकसभा.

Rile, *v. t.* (राइल्)—(sl.) to raise anger in, irritate. राग आणणें, चिडविणें.

Rill, *n.* (रिल्)—a tiny stream. लहान ओढा, ओहळ ओघळ. *v. i.* issue or flow as *r.* ओहोळ-ओढा-होऊन वाहणें. *Ri'llet,' n.*

Rille, *n.* (रिल्)—(astron.) trench or narrow valley of moon's surface. चंद्रावरील अरुंद दरी, खंदक.

Rim, *n.* (रिम्)—the raised edge or border of a thing, the margin, verge; outer ring of wheel's frame-work not including tire; frame of sieve, (poet.) circular object; (Naut.) surface of the water. कांठ, किनारा, कडा, चाकांचा कंगोरा; चाळणीचा सांगाडा,-कडा; वाटोळी वस्तु; पाण्याचा पृष्ठभाग. *v. t.* to furnish with *r.*, serve as *r.* to, edge, border. कडा-कांठ-कंगोरा-लावणें,-असणें. *A golden rim*, crown. राजमुकुट. *Rim'less,-rimmed, aa.*

Rime, old form of Rhyme.

Rime, *n.* (राइम्)—white or hoarfrost. हिम, थिजलेलें दंव. *v. t.* to cover with *r.* दंवानें-हिमानें-झांकून जाणें. *Ri'my, a.* तुषारमय, हिममय.

Rind, *n.* (राइन्ड्)—bark, peel, husk, skin, external aspect, surface. साल, त्वचा, सालपट, बाह्यभाग, पृष्ठभाग.

Rĭn'derpĕst, *n.* (रि'न्डरपेस्ट्)—disease of ruminants esp. oxen; cattle-plague. गुरांचा एक रोग,-देवी, पटकी, बुळकांडी. [*G. rinder*, pl. of *rind, ox.*]

Rĭng', *v. i. & t.* (रिंग्)—(*pa. t. rang*, rarely *rung*; *pa. p.* rung), to give forth clear resonant sound; (of place) resound, re-echo; (of ears) be filled with sensation as of bell-ringing; make ring; ring bell; announce or summon by sound of bell. वाजणें, खणखण-घणघण-वाजणें, दणदणणें, दुमदुमणें, घुमणें; (कानांत) झणझणणें, भणभणणें, भिरभिरणें, आवाज होणें; आवाज करणें; घंटा वाजवणें; घंटा वाजवून सांगणें,-बोलावणें. *n.* a ringing sound, resonance; act of ringing bell; set of church bells. नाद, खणखणाट, घणघणाट; घंटा वाजवणें; देवालयांतील घंटांची रांग. *Ringing frost*, in which ground rings under foot. पायाखालची जमीन चालतांना निनादणारें थिजलेलें दंव. *To r. true, false*, (of coin, of sentiments). (नाणें, भावना) यांचा खरेखोटेपणा आवाजावरून समजणें. *To r. the bell*, esp. घंटा वाजवून नोकराला बोलावणें. *To r. the knell of*, बारा वाजवणें; रडपणा जाहीर करणें; नाहींसा करणें. *To r. up*, on telephone, शीं टेलीफोन करून बोलणें.

Rĭng, *n.* (रिंग्)—a circlet of gold worn esp. on finger; circular thing; enclosure for circus-riding, boxing, betting, etc.; combination of persons acting together for control of market or policy; persons, trees, etc. disposed in a circle, such disposition; circular appliance of any material and any size. आंगठी, वळें, वलय, कडें, चक्र; रिंगण; मंडळी, मंडल; वर्तुळाकार महिरपि,-साधन. *v. t. & i.* to encompass, hem in; to fit with ring; put ring in nose of (pig, bull); cut (onions, apples) into *rr.*; (of hawk) rise in spirals; (of hunted fox) take circular course. कठडा घालणें, घेरणें, वर्तुळांत धरून (गुरें इ०) अडविणें; कडें,-वळें,-अडकविणें; नाकांत वेसण घालणें,-कडें अडकाविणें; वाटोळे काप काढणें गिरक्या घेत वर उडणें; वक्रगतीनें जाणें, वेडेवांकडें-वांकणें घेत-जाणें. *Nose-r.*, नथ. *R.-dove*, wood-pigeon. जंगली कबूतर. *R.-finger*, डाव्या हाताचें तिसरें बोट. *R.-master*, manager of circus performance. सर्कशींतील कामें करून घेणारा, 'रिंग मास्तर.' *R.-ouzel*, bird allied to black-bird. एक जातीचा पक्षी. (-)*ringed, Ring'less, aa.*

Rĭn'gent, *a.* (रि'जन्ट)—(bot.) gaping, grinning. विवृतमुख.

Ring'leader, *n.* (रिं'ग-लीडर्)—the leader of a ring of people, instigator in mutiny or riot. (बंडाचा) म्होरक्या, पुढारी, नायक.

Ring'worm, *n.* (रिं'ग-वर्म्)—a contagious skin-disease in circular patches. नायटा, गजकर्ण, दद्रु, चकंदळ.

Ring'let, *n.* (रिं'ग-लिट्)—curly lock of hair, a hanging curl; small ring, ring-shaped mark (rare). झुलूप, कुरळे केस; लहान आंगठी, वलयाकार खूण.-*ed,-y, aa.*

Rink, *n.* (रिंक्)—stretch of ice used for curling or skating; floor for roller-skating. (विशिष्ट तऱ्हेचे जोडे घालून घसरण्याकरितां केलेला) बर्फविस्तार, बर्फांगण; घसरत्या जोड्यांनीं फिरण्यासाठीं केलेलें रंगण,-अंगण,-जमीन. *v. i.* to skate on ring with roller-skates. घसरते जोडे-बूट-घालून बर्फावरून किंवा रंगणांत धांवणें. *Ri'nker, n.*

Rinse, *v. t.* (रिन्स्)—to pour water into and out of to remove dirt, etc.; wash lightly; to cleanse by water. धुणें, विसळणें, आंतून बाहेरून पाण्यानें स्वच्छ करणें, खळबळावून स्वच्छ करणें, आचळणें. *n.* rinsing. स्वच्छ करणें, धुणें.

Ri'ot, *n.* (रा'यट्)—tumult, disorder; disturbance of the peace by a crowd; loose living; unrestrained indulgence or display; (Hunt.) following of any scent indiscriminately. धुमाकूळ, गोंधळ; गर्दी, दंगा; चैन, रंग, ऐषआराम; धुंदाई; बेबंदशाही; अविचारानें केलेला (शिकारीचा) पाठलाग. *v. i.* to make or engage in a riot; to revel, to act in an unrestrained manner. दंगा करणें, गोंधळ करणें; चैन करणें, मजा मारणें. *To run r.*, अद्वातद्वा बोलणें, दंगा करणें, भडकणें, वेडगळणें, विथरणें. *Ri'oter,* बंडवाला. *Ri'otous, a.,-ly, adv ,-ness, n.*

Rip, *v. t. & i.* (रिप्)—to cut or tear open, to split esp. with a single quick motion; strip off or away or open up thus; (of material) be ripped; (of ship) rush along, to search to the bottom. चिरणें, फाडणें, फाडून टाकणें; दरकन फाडणें, उसवणें, उस्तरणें; फाडलें-उघडलें-जाणें; वेगानें जाणें, तळापर्यंत शोधणें. *n.* act of ripping, long tear or cut. चिरणें, फाडणें, चीर, फाड, भेग. *Ripp'er, n.* one who rips; (sl.) first rate person or thing. चिरणारा, फाडणारा, उसवणारा; उत्तम प्रकारचा माणूस, उत्कृष्ट वस्तु. *Ripp'ing, a.* (sl.) splendid, first-rate, enjoyable. उत्तम, पहिल्या प्रतीचे, उपभोग्य, मनोरंजक. *R.-saw,* लाकूड कापण्याची करवत. *Let her r.*, do not check speed or interfere. अडथळा करूं नको, वेग कमी होऊं देऊं नको. *Ripp'ingly, adv.*

Rip., *n.* (रिप्)—a worthless horse; dissolute person; stretch of broken water in sea or river. निरुपयोगी घोडा; छंदी,-पदफैली,-मनुष्य; समुद्रांतील किंवा नदींतील खळखळीचा भाग.

Ripār'ion, *a.* (रा'यपेअरिअन्)—of or on the river-bank. नदीकांठचा, नदीकिनाऱ्यावरील. *R. proprietor, rights,* नदीकांठच्या जमिनीचा मालक, -जमिनीचे हक्क. [*L. ripa,* bank]

Ripe, *a.* (राइप्)—ready to be used; mature, consummate, ready for action. पक्का, पिकलेला, पक्व झालेला; परिपक्व, प्रौढ, पोक्त, प्रगल्भ. *R. lips,* red and full like *r.* fruit. पक्वबिंबाधरोष्ठ, लाल ओंठ. *R. beauty,* of grown woman. तरुणीचें सौंदर्य, ऐन तारुण्य. *Ripe age,* old age. उतार वय, म्हातारपण. *Soon r. soon rotten,* prov. depreciating precocity. लवकर पक्व होतें तें लवकर कुजतें. *Ripe'ly, adv.; Ripe'ness, n.* पक्वता, पिकेपणा, पोक्तपणा, प्रौढपणा.

Ri'pen, *v. t. & i.* (रा'इ-पन्)—to mature, to make or grow ripe, to become ready. पिकणें, पक्वदशेस येणें.

Ripōste', *n.* (रिपो'स्ट्)—quick return thrust in fencing; (*fig.*) counter-stroke, retort. दांडपट्ट्याच्या खेळांतील जलद उलट हात; प्रतिहल्ला, टोमणा. *v. i.* to deliver *r.* उलट हात करणें, प्रतिहल्ला करणें.

Rip'ple, *n.* (रि'पल्)—ruffling of water's surface; small curling waves; bubble of water. पाण्याची खळखळ; लहान लाटा; पाण्याची खळाळी, बुडबूड. *v. i & t.* to form or flow in ripples; make ripples in. खळखळ वाजणें,-वाहणें; लाटा -तरंग-उत्पन्न करणें. *R.-mark,* ridge, ridged surface left on sand or wind by water or wind. पाण्याच्या लाटांनीं किंवा वाऱ्यानें वाळूवर किंवा चिखलावर केलेली खुणेची रेषा,-खूण. *A r. of conversation,* संभाषणांतील हास्य-विनोदतरंग. *Ri'pply, a.; Ripp'let, n.* लहान लाट, बुडबुडा.

Rise, *v. i.* (राइझ्)—(pa. t. rose, रोझ्; p. p. risen, रिझन्), to get up from lying, sitting or kneeling; to get out of bed; to make revolt; to ascend, to soar; to come to surface; to have origin, to flow from; (of meeting etc.) cease to sit for business; project or swell upwards; come to life again; be progressive; develop powers equal to; (poet.) arise. वर उठणें, निजून उठणें; बंड करणें; उदय पावणें; उगवणें; वर चढणें; उंच उडणें; पृष्ठभागाला येणें, उद्भवणें, उत्पन्न होणें; (सभा) संपणें, उठणें, बरखास्त होणें, काम संपणें; पाणी चढणें, फुगणें, भरती-लाटा-येणें; (मेलेला फिरून) उठणें, जिवंत होणें; चढती-पडती-होणें, सुधारणें, पुढें जाणें; बळावणें; (प्रसंगानुरूप) जोर चढणें; उत्पन्न होणें. *n.* an upward incline; social advancement; increase; origin; coming up of sun etc. चढण; चढती पायरी, अभ्युदय, सामाजिक उत्कर्ष; वाढ, उगम; उगवणें, उदय. *To r. from table,* leave meal. जेवणावरून उठणें. *To r. up early,* (निजून) उठणें. *My whole soul rises against it,* finds it intolerable. अति दुःसह वाटतें. *The rising generation,* the young.

पिढी. *Spirits r.*, become more cheerful. अधिक उत्साह वाटतो. *To r. in the world*, सामाजिक दर्जा मिळविणें. *Ask for a r.*, higher wages. अधिक वेतनाची मागणी करणें. *To get* or *take a r. out of one*, एखाद्याला संताप-चीड-आणणें. *Give r. to*, occasion, suggest. घडवून आणणें, कारणीभूत होणें.

Ri'sing, *n.* (रा'इझिंग)—eminence, prominence, (*esp.*) insurrection; boil or pimple. उंचवटा, बंड; गळू.

Ris'ible, *a.* (रि'झिबल)—inclined to laugh; of laughter; (rare) laughable, ludicrous. हसणारा, हसूं येणारा; हास्याचा, हंसण्याचा; हास्यजनक, हंसण्यासारखा. *Risibility, n.* inclination to laugh; risible faculties. हास्यजनकता; हास्यशीलता; हंसण्याची प्रवृत्ति, हास्यप्रवृत्ति.

Risk, *n.* (रिस्क्)—hazard, chance of bad consequences. भय, संकट, जोखीम, धोका. *v. t.* to expose to chance of injury or loss; to venture. धोक्यांत पाडणें; साहस करणें, धाडस-हिय्या-करणें. *R.-money*, (खजीनदाराजवळ) अडीअडचणीकरितां ठेवलेली शिल्लक.

Risk'ȳ, *a.* (रि'स्कि)—full of risk. धोक्याचा, जोखमाचा.

Risquè, *a.* (रिं'स्के)—of doubtul propriety; suggestive of indecency. अश्लील, असभ्य. [F]

Riss'ōle, *n.* (रि'सोल)—fried ball or cake of meat or fish mixed with bread-crumbs, etc. तळलेला मांसाचा गोळा,-भाकरी.

Rite, *n.* (राइट्)—religious or solemn ceremony of observance. विधि, संस्कार, अनुष्ठान, आचार. *Conjugal* or *nuptial rr*, sexual intercourse between husband and wife. पतिपत्नीमधील संभोग. *Rí'teless, a.*

Rit'ūal, *n.* (रि'च्युअल)—a prescribed order for performing religious service; book containing this; performance of ritual acts. संस्कारशास्त्र, आचारपद्धति; संस्कारग्रंथ, कर्मपद्धति; आचारधर्मपालन. *a.* of or with rites. आचारपद्धतीचा, विधीचा, विधिविषयक. *Rit'ualism, n.* attaching of great importance to ritual. कर्मनिष्ठा, आचारनिष्ठा, कर्मकांडसंप्रदाय. *Rit'ualist, n.* आचारसंप्रदायी, कर्मसंप्रदायी.*-istic, a.* कर्मपद्धतीचा, आचारपद्धतिसंप्रदायी.

Ri'vage, *n.* (रा'इव्हिज्)—(poet.) coast, shore, bank. किनारा, तीर, कांठ.

Ri'val, *n.* (रा'इ-व्हल)—a person or thing that competes with another. प्रतिस्पर्धी, चढाओढ करणारा. *v. t. & i.* to vie with, to emulate; to be comparable to, be in rivalry (rare). स्पर्धा करणें, बरोबरी करणें; °शीं प्रतिस्पर्धा करणें.

Ri'valrȳ, *n.* (रा'इ-व्हल्रि)—emulation; being rivals. स्पर्धा, हेवा; प्रतिस्पर्धी असणें, -होणें.

Rive, *v. t. & i.* (राइव्ह्)—(pa. t. rived, riven, रि'व्हन्), to strike or rend asunder; wrench; split; be split. फाडणें, फोडणें, चिरणें, विदारणें; भेग-चीर-जाणें, भेताळणें. *Rí'ver, n.*

Riv'el, *v. i. & t.* (रि'व्हल्)—(arch.) to wrinkle, crumple, shrivel. सुरकुती पडणें, आकुंचन पावणें, चिंबणें.

Riv'er, *n.* (रि'व्हर्)—a large natural stream of water flowing in channel; abundance; the boundary between life and death. नद, नदी; विपुलता, प्रवाह, पूर, पाट; जीवित व मरण यांमधील सीमा-मर्यादा-रेषा. (attrib.) living in, situated or used on river(s). नदी-स्थ; नदीतीरस्थ; नदीवरील. *The r.*, (Ganga). (नदीच्या नांवापूर्वी लावतात.),. *Rr. of blood*, much bloodshed. रक्ताच्या नद्या,-रक्ताचे पाट. *R. bed*, नदीचें पात्र. *R.-god*, नदी-जल-देवता. *R.-horse*, hippopotamus. पाणघोडा. *R. side*, ground along river's bank (often attrib.), नदीकांठच्या प्रदेशाचा, नदीकांठ (चा). (-) *riv'ered, riv'erless, aa.*

Riv'erain, Riv'erine, *aa.* (रि'व्हरिन्,-राइन्)—of or characteristic of a river. नदीचा, नदीसारखा. *Riv'erain, n.* person dwelling by river. नदीकांठीं राहणारा मनुष्य.

Riv'ēt, *n.* (रि'व्हिट)—a nail or bolt used in fastening together (plates of metal, &c,). दोन्ही बाजूला चोळवलेला खिळा, रिवीट. *v. t.* to clinch (bolt); to fasten with rivets; fix, make immovable; to fix one's eyes, &c. upon; to engross. खिळ्यांनीं घट्ट बसणें; खिळ्यांनीं बसवणें, घट्ट करणें; टक लावून पाहणें; गुंग होणें, (लक्ष) वेधून घेणें,-ठेवणें. *Riv'eter, n.*

Riv'iere, *n.* (रि'व्हिएअर्)—gem necklace, esp. of more than one string. (अनेकपदरी) रत्नांचा कंठा, माळ. [F]

Riv'ūlėt, *n.* (रि'व्युलिट्)—a small stream; kinds of moth. ओढा, नाला, पर्या; एक जातीचा पतंग.

Roach, *n.* (रोश)—a fresh-water fish; (naut.) upward curve in foot of square sail. एक गोड्या पाण्यांतला मासा; चौकोनी शिडाच्या तळचें धांकण.

Road, *n.* (रोड)—a way prepared to travel on, an open way or public passage; route, way one means to take; (usu. pl.) piece of water near the shore in which ships can ride at anchor; way of getting to. रस्ता; वाट, मार्ग; किनाऱ्याजवळची गलबतें नांगरण्याची जागा, नांगर-ठाण; (-ला जाण्याचा) मार्ग, रस्ता. *on the r.*, travelling. मार्गावर, प्रवास करणारा. *To take the r.*, set out. निघणें, जाणें. *The r.*, the highway. मुख्य रस्ता, राजमार्ग. *Rule of the r.*, (गाडी, वाटसरू इ.) रस्ता वापरण्याचे नियम. *Royal r. to (success)*, way of attaining without trouble, (चा) सुलभ, सोपा, मार्ग; राजमार्ग. *R.-hog*, reckless motorist etc. बेफाम,-बेदरकार-निष्काळजीपणें-मोटर हांकणारा. *R. house*, (U. S.) inn. खाणावळ. *R.-metal*, broken stone for road-making. खडी. *R. stead*, road for ships. जहाजांचा नांगर-वाडा; खुंटबंदर, चिखली बंदर. *R.-way*, main part of road. रस्त्याचा

मधला-मुख्य-भाग. *R.-worthy,* fit to be used on the road; (of person) fit to travel. रस्त्यावर वापरण्याजोगा; प्रवासालायक. *Road'-ster,* चिखली पंद्रांत नांगरून ठेवलेलें जहाज; अनुभविक प्रवासी.

Roam, *v. i. & t.* (रोम्)—to ramble, to wander about, to rove, to range. रमणें, भटकणें, भटक्या मारीत फिरणें. *n.* a rambling walk. भटकणें, सहल.

Roan, *a.* (रोन्)— (of animal) with coat of which the prevailing colour is thickly interspersed with another, esp. bay or sorrel mixed with white or grey. मगजी (रंग). *n* a roan horse, cow. मगजी रंगाचा घोडा, गाय. 2. *n.* soft sheepskin leather used in book-binding. पुस्तकें बांधण्याचें एक प्रकारचें चामडें.

Roar, *n. & v. i. & t.* (रोअर्)—(utter, send forth) a loud deep hoarse sound as of a lion, or the voice in rage or pain or loud laguhter, or of the sea, thunder etc.; (of place) be full of air, re-echo; say, sing, utter in loud tone. सिंहगर्जना, आरोळी; डरकाळी, गर्जना, दावो, आक्रोश, कल्लोळ, घणघणाट, गलका, आरडाओरड, गडबड, दुशा, दणका, दणाणा, (करणें इ०). *Roarer, n.* (esp.) roaring horse. रोगानें-दुःखानें-खिंकाळणारा घोडा. *Roaring, a.* noisy, boisterous, brisk. आवाज-गर्जना-करणारा; परजणारा, गाजणारा; दणकेबाज.

Roast, *v. t. & i.* (रोस्ट्)—to cook or heat by exposure to the open fire or sun; heat or calcine ore in furnace; undergo roasting; (*sl.*) banter, chaff. विस्तवानें किंवा उन्हानें भाजणें; अशुद्ध धातु भट्टींत भाजणें; भाजलें जाणें; थट्टा-टर-उडवणें. *a.* roasted. भाजलेलें. *n.* भाजलेला पदार्थ.

Roast'er, *n.* (रो'स्टर्)—In vbl. senses; esp. kind of oven for roasting; ore-roasting; furnace; coffee-roasting apparatus; pig, potato, etc. fit for roasting. भाजणारा; भट्टी, चूल, (अशोधित धातु) भाजण्याची भट्टी; कॉफी भाजण्याचें यंत्र; (डुकर, बटाटा वगैरे) भाजण्याजोगा पदार्थ.

Rŏb, *v. t. & i.* (रॉब्)—to despoil violently or feloniously; to deprive of, to commit robbery. लुबाडणें, हिरावून घेणें, लुटणें, लुबाडून घेणें. *Robbed, pa. t. & pa. p.*

Rŏbb'er, *n.* (रॉ'बर्)—one who robs. दरोडेखोर, लुटारू. *Robb'ery, n.* लुटणें, लूट, मोठी चोरी, दरोडा.

Rōbe, *n.* (रोब्)—a long loose garment; (often pl.), such garment as sign of rank or office or profession; (U. S.) dressed skin of buffalo etc. used as rug or garment. लांब झगा, जामा, फरगोल; (पदवी, अधिकार, धंदा-दर्शक) झगा; वस्त्र किंवा पांघरूण म्हणून वापरावयाचें कमावलेलें कातडें. *v. t. & i.* to invest (person) in robe; dress; assume one's robes. अधिकाराचीं वस्त्रें चढविणें,-देणें; झगा घालणें, पोषाख चढविणें. *The long r.,* legal or clerical dress. वकिलाचा किंवा पाद्र्याचा झगा. *Gentlemen of the r.,* lawyers. वकीलवर्ग. *R.-de chambre,* (F), dressing-gown, wrapper. लांब झगा, पांघरूण, आवरण.

Rŏb'in, *n.* (रॉ'बिन्)—a small red-breasted bird. एक जातीचा पक्षी, (Also called *Redbreast*); (U. S.) the migratory thrush. स्थानांतर करणारा एक (अमेरिकेंतील) पक्षी-कोकीळ, सारिका. *R. good fellow,* a sportive goblin.. एक खेळकर भूत. *R. hood,* (type of) medieval forest out-law. मध्ययुगींत रानटी पेंढखोर (त्याचा आदर्श,-नमुना).

Rō'borant, *a., & n.* (रो'बॉरन्ट्)—(med.) strengthening (drug). शक्तिवर्धक (औषधी).

Rō'bot, *n.* (रो'बॉट्)—an apparently human automaton, an intelligent and obedient but impersonal machine; (transf.) machine-like person. मनुष्याकृति यंत्र; यंत्राप्रमाणें असलेला (काम करणारा) मनुष्य.

Rō'burite, *n.* (रो'बराइट्)—a strong flameless explosive. ज्वाला न निघणारें जोरदार स्फोटक द्रव्य.

Robŭst', *a.* (रोब'स्ट्)—of strong health and physique; not weakly, vigorous; sensible, straightforward. धट्टाकट्टा; बळकट; जोरदार, शक्तिवर्धक (व्यायाम); दांडगा, विशाल, जोमाचा, सरळ, ऋजु.*-ly, adv.*; *-ness, n. Robustious, a.* boisterous, self-assertive, noisy. गडबड्या, आपलेंच घोडें पुढें दामटणारा. [L. *robur,* strength]

Rŏc, *n.* (रॉक्)—gigantic bird of Eastern tales. एक प्रचंड पक्षी.

Rŏck, *n.* (रॉक्)—solid part of earth's crust; a mass of this, large detached stone or boulder; (geol.) any particular igneous or stratified mineral constituent of earth's crust including sands, clays, etc.; stone as a substance; kinds of hard sweetmeat. खडक, धोंड, शिला; शिलोच्चय, मोठा विस्तीर्ण खडक, मोठा दगड, धोंडा; (धातुमय) पत्थर, खडक, दगड; घट्ट टणक मिठाईचा प्रकार. *Built, founded, on the r., lit & fig.* secure. अभंग, भंग नसलेला, भक्कम पायावर रचलेला. *R. of ages,* Christ. येशू ख्रिस्त. *To run upon the rr., see rr. ahead,* shipwreck or danger of it. खडकावर आदळून फुटणें,-फुटण्याची भीति. *On the rr.,* (sl.) hard up. संकटांत पडलेला, कठीण अवस्था प्राप्त झालेला. *The R.,* Gibralter. जिब्राल्टरचा कडा,-खडक. *R.-bottom,* (sl., of prices etc.), very lowest. अतिशय कमी, स्वस्त (किंमती). *R.-crystal,* silica, or quartz in hexagonal prisms. षट्पैलू स्फटिक. *R.-dove,-pigeon* kind haunting rocks. खडकावरील कबुतर. *R.-oil,* घासलेट, रॉकेल. *R.-salt,* सिंधुलवण, शेंदेलोण. *R.-tar,* petroleum, पेट्रोलिअम्-फत्रेल-तेल. *R.-work Rock'ery,* झाडें वाढवण्याकरितां सभोंवतीं केलेली दगडांची रास,-गडगा.

Rŏck, 2 *v. t. & i. & n.* (रॉक्)—to make oscillate; to oscillate; to move to and fro in a cradle or in the arms; to sway heavily from side to side.

डोलपणें; हांदुळणें; डुलणें; झोंके देणें; हालविणें. *Rocking'chair*, डुलती खुर्ची, झोंके घेण्याची खुर्ची. *Rock'ing*, (खेळण्यांतला) डुलता लांकडी घोडा. *Rock'ing-stone*, झुलता खडक.

Rŏck'er, *n.* (रॉ'कर्)—one of the curved bars on which a cradle etc. rocks; (U. S.) rocking-chair. पाळण्याचा आडवा व डुलणारा दांडा; डुलती खुर्ची.

Rŏck'ĕt, *n.* (रॉ'किट्)—kinds of flowering plant. एक जातीचीं फुलझाडें.

Rŏck'ĕt, *n.* (रॉ'किट्)—an artificial firework used in fire-work displays, for signalling, to carry line to ship in distress, etc. बाण, कळकीबाण, अग्निबाण, लष्करी खुणेसाठीं सोडलेला बाण, आरमारी बाण. *v. i.* (of pheasant etc.) to fly straight upwards; fly fast and high. तीरासारखा उडणें; बाणासारखें हवेंत उडणें; उंच व जलद उडणें. *Rock'eter, n.*

Rŏck'ȳ, *a.* (रॉ'कि)—of rock; full of rocks; rugged; hard as rock; (rare) unsteady, tottering. खडकाचा; खडकाळ, कातळी; खडकासारखा कठीण; डळमळीत, हालता. *The R. mountains*, (as *n.*) *the Rr.*, उत्तर अमेरिकेंतील पश्चिमेकडचा पर्वत.

Rocō'cō, *a.* (राको'को)—(of furniture, architecture, etc.) much conventional decoration; antiquated. जुनाट ठराविक पद्धतीच्या आराशीचा; जुनापुराणा, जुनाट. *n.* the *r.* style. जुनी पुराणी ठरावीक पद्धतीची नकशी.

Rŏd, *n.* (रॉड्)—a slender straight round stick or metal bar, wand, switch; a cane or birch for flogging; a measure of 5½ yards. दंड, काठी; छडी; साडेपांच यार्डीचें माप, काठी. *Spare the r. & spoil the child*, छडी लागे छम छम विद्या येई घम घम. *Make a r. for one's own back*, prepare trouble for oneself. नसतें विघ्न उपस्थित करणें. *Kiss the r.*, take punishment meekly or gladly. निमूटपणें शिक्षा सोसणें. *Have a. r. in pickle for*, be ready to punish when time comes. वेळ येईल तेव्हां शिक्षा करण्याला तयार असणें. *R.-man, Rod'ster*, angler. मासे पकडणारा.

Rode, *pa. t. of* Ride.

Rō'dent, *n.* (रो'डन्ट्)—an animal of the order *Rodentia* or gnawers, an animal that gnaws. कुरतडणारें जनावर (उंदीर, खार).

Rŏdomontade', *n.* (रोडामान्टे'ड्)—boastful talk, brag. फुशारकी, बढाई. *v. i.* to talk boastfully. फुशारकी-बढाई-मारणें.

Rōe, *n.* (रो)—(*collect. sing.*) a small kind of deer the female of the hart; a mass of eggs in female fish. एक प्रकारचें हरिण; माशांचीं अंडीं *R.-buck*, male roe. हरीण.

Rōgue, *n.* (रोग्)—a rascal, swindler, knave; mischief-loving child; arch or sly person; elephant living apart from the herd and of savage temper, any large wild animal of similar character; horse inclined to shirk work on race-course or in hunting-field. लबाड, लुच्चा; खोडकर मूल; दगलबाज मनुष्य, शठ; एकलकोंडा, मस्त हत्ती; मोठें मस्त जनावर; चुकार तट्टू घोडी. *Ro'guery, n. Ro'guish, a.*

Roil, *v. t.* (राइल्)—(U. S.) to render (water etc.) turbid; annoy. गढूळ,-गढूळ,-करणें; राग आणणें, चीड आणणें; त्रास देणें. *Roil'y, a.* turbid. गढूळ, गढूळलेलें.

Rōi'nĕk, Rooinĕk, *n.* (रो'इनेक्,रूइ-)—a newcomer; a British soldier in Boer war. नवीन येणारा मनुष्य; बोअर युद्धांतील ब्रिटिश सैनिक.

Rois'terer, *n.* (रॉइ'स्टरर्)—noisy reveller; jovial swaggerer. चैन करणारा, थापाड्या, घमेंड्या.

Rōle, *n.* (रोल्)—an actor's part; any conspicuous task or function performed by one. भूमिका; काम, कार्य.

Rōll, *n.* (रोल्)—a cylinder formed by turning paper, cloth etc. over on itself without folding; document in this form, register, list; more or less (semi)-cylindrical straight or curved mass of anything however formed; turned-back edge of something, e. g. coat-collar; cylinder or roller; rolling motion or gait; continuous sound of thunder or drum or shouting. गुंडाळी. वळकटी, सुरळी; कागदांची-लेखाची-गुंडाळी, सुरळी; पट, यादी, नांवनिशी, तक्ता; लाटा, लाट्या, लाटी; मागें परतवलेली कडा, बाजू (कोटाची गळपट्टी); रूळ, लाट्या; हेलकावा, झोंका; हंदुळा, डुलकी चाल; हालणें, वरखालीं होणें; धडाका, दणका; मेघनाद, मेघगर्जना, कडकडाट. *v. t. & i.* to move by turning on the axis; to sway or rock; to sound with vibration; to flatten with a roller; to make into or form a roll; make by rolling; undulate, show undulating motion or surface; wrap *up in* by rolling motion; lie on back and kick about (of horse etc.). लोटीत नेणें, जाणें, घसरणें, (गरगर) लोटणें; डुलणें, डोलणें, हांदुळणें, हालणें, हेलकावे खाणें; फिरवणें, गरगरवणें; सुरावर म्हणणें, घुमणें; रूळानें सपाट करणें; सुरळी करणें, वळकटी करणें; लाटून तयार करणें; वर-खालीं होणें; गुरफटावून घेणें, पांघरणें; लोळण घेणें, लोळी करून पाय झाडणें. *R. of honour*, esp. list of those who have died for their country in war. (स्वदेशा-साठीं धारातीर्थीं देह ठेवणाऱ्या) सन्मान्य वीरांची यादी. *To strike off the rr.*, debar from practising for dishonesty etc. (अप्रामाणिकपणामुळें) धंदा करण्याची मनाई करणें, पटावरून नांव काढून टाकणें (विद्यार्थ्याचें,-वकिलाचें,-पदवीधराचें इ०). *Rr. of fat*, मांसाच्या-चरबीच्या गुठळ्या, वळ्या. *Years r. on* or *by*, go smoothly. वर्षामागून वर्ष धिमेपणानें लोटतें. *R. one over*, send him rolling. घडघडत जावयास लावणें. *To r. cigarettes*, विड्या-सिगारेट-वळणें. *R.-top desk*, घसरत्या-गुंडाळण्याजोग्या-झांकणाचें मेज. *Roll'able, a.*

Rōll'call, *n.* (रो'ल्-कॉल्)—the calling over of a list of names (as of soldiers). नांवनिशीवार हजिरी घेणें, हजिरी.

Rōll'er, *n.* (रो'लर्)—a cylinder used alone or as part of a machine; a long heavy wave. मोठा रूळ, मोठी लाट.

Rō'lling, *a.* (रो'लिंग्)—turning on axis; moving from side to side. आंसावर फिरणें, वाटोळें-गरागरां-फिरणारें; हेलखावे खाणारें. *R.-pin*, a roller for pastry-making. लाटणी, लाटणें. *R.-stock*, railway company's wagons and trucks. रेल्वेकंपनीचे मालाचे उघडे डबे, 'वाघिणी'.

Rŏll'ick, *v. i.* (रॉ'लिक्)—to be jovial and boisterous (esp. in part. as adj.). मजा-दंगल-करणें; धांगडधिंगा घालणें. *n.* exhuberant gaiety; frolic. हुतुतू; मस्ती, दंगल.

Rō'lȳ-pō'lȳ, *n.* (रो'लि-पो'लि)—(*r.-pudding*,) pudding of paste covered with jam and rolled up. एक प्रकारचें पक्वान्न. *a.* (usu. of child) podgy, plump. लट्ठ, बाळसेदार.

Romā'ic, *n.* (रॉमे'इक्)—language of modern Greece. अर्वाचीन ग्रीक भाषा. *a.* of or in Romaic. अर्वाचीन ग्रीक भाषेचा,-भाषेंतील. *Roma'ica*, अर्वाचीन ग्रीस देशांतील राष्ट्रीय नाच.

Rō'man, *a.* (रो'मन्)—of the ancient or modern city of Rome; of the people or the state or the Christian Church of Rome. प्राचीन किंवा अर्वाचीन रोम शहराचा; रोममधील लोकांचा, राज्याचा किंवा ख्रिस्ती धर्माचा. *n.* a member of ancient Roman State; an inhabitant of Rome; Roman Catholic; (Print.) Roman type (abbr., *Rom.*). प्राचीन रोमन साम्राज्याचा नागरीक; रोमचा रहिवासी; रोमन कॅथॉलिक धर्मपंथीय; रोमन टाइप,-टंक. *R. candle*, tube discharging coloured balls in fire-works. फुलबाजा, नळा. *R.-Catholic*, member of the Church of Rome. पोपचा अनुयायी. *R.-numerals*, रोमन आंकडे,-संख्या. (I, V, X, = 1, 5, 10; L = 50; C = 100, D = 500; M = 1000).

Rōmănce', *n.* (रोमॅ'न्स)—medieval tale of chivalry; a tale with scenes and incidents remote from ordinary life; an episode or love affair suggesting romance; (R-) vernacular language of old France developed from Latin; (collect.) the languages so developed (R-). मध्ययुगीन शौर्याची कथा; अद्भुत गोष्ट; कादंबरी, अद्भुत कथा,-वाङ्मय, अद्भुत प्रेमकथा; लॅटिन भाषेवरून निर्माण झालेली प्राचीन फ्रान्स देशाची (बोली) भाषा; अशा रीतीनें निर्माण झालेल्या भाषा. *a.* (of languages) developed from Latin. लॅटिनपासून निघालेली. *v. i.* to exaggerate or distort the truth. अतिशयोक्ति करणें, अद्भुत वर्णन करणें. *Roman'cer*, *n.* writer of romances; a fantastic liar. अद्भुत कथा-कादंबरी-लिहिणारा; काल्पनिक व असत्य कथन करणारा, नकल्या.

Rōmanĕsque', *a.* & *n.* (रोमने'स्क्)—Romance; (Archit.) (in) style of building prevalent in Romanized Europe between the Classical and Gothic periods. लॅटिनवरून बनलेली फ्रान्स देशाची भाषा; रोमन अंमलाखालील युरोपांतील शिल्पकला,-स्थापत्यकला,-कलेचा.

Romăn'ic, *n.* (रोमॅ'निक्)—(of languages) Romance; Romance-speaking; descended from, inheriting civilization etc., of the Romans. लॅटिनवरून बनलेली (भाषा); लॅटिनोद्भव भाषा बोलणारा, रोमन संस्कृतीपासून झालेला.

Rō'manize, *v. t.* & *i.* (रो'मनाइझ्)—to make Roman or R. Catholic; adopt or cause to adopt Roman Catholic beliefs or practices. रोमवासीय किंवा रोमन कॅथॉलिक धर्मपंथाचा करणें; पोपचा अनुयायी होणें; धर्मांतर. *Romanization,-ism,-ist, nn.*

Rōmăn'tic, *a.* (रोमॅ'न्टिक्)—marked by or suggestive of or given to romance; fantastic, visionary; (of literary or artistic method etc.) preferring grandeur or passion or irregular beauty to finish and proportion; (of projects) fantastic, dreamy; (of music) imaginative, passionate. अद्भुत गोष्टींविषयीं; विलक्षण, चमत्कारिक; अद्भुतकथामय, कादंबरीचा; अद्भुत, विचित्र, काल्पनिक, स्वप्नवत् (बेत इ०); विकारमय, कल्पनामय (संगीत). *n.* (*pl.*) romantic ideas or thoughts; a romanticist. अद्भुतप्रेममय-निसर्गमय कल्पनाविशेष, अद्भुतरसात्मक-काव्य किंवा कादंबरी-लेखक, निसर्गप्रधान कवि, लेखक. *Roman'ticism*, *n.* adherence to romantic methods. अद्भुतकथालेखनपद्धति; कल्पनावशता; अद्भुतरसानुसरण-पद्धति. *Roman'ticist*, *a.* writer of the romantic school. भावनाप्रधान लेखक, निसर्गप्रधान सांप्रदायी लेखक, प्रेमकथालेखक.

Rŏm'anȳ, *n.* (रॉ'मनि)—a gipsy; gipsy language. 'जिप्सी' नामक घरदार नसलेल्या भटक्या जातीचा मनुष्य; त्याची भाषा. *a.* gipsy. 'जिप्सी' लोकांची.

Rōme, *n.* (रोम्)—city, ancient state, Empire, or Church of Rome. रोम शहर, प्राचीन रोमन साम्राज्य, रोमचा ख्रिस्तीधर्म. *R.-ward*, *a.* & *adv.*,*-wards*, *adv.* etc. the direction of Roman-Catholicism. रोमन कॅथॉलिक धर्मपंथाच्या दिशेनें. *Romish*, *a.* (contempt.) papistical. पोपचा अनुयायी, रोमन कॅथॉलिक. *Rome was not built in a day*, (encouragement to faint-hearted). (निराशा झालेल्यांना उत्तेजनार्थ हें वचन म्हणतात.) *Do in Rome as Rome does, as the Romans do.* परिस्थितीप्रमाणें चाला.

Rŏmp, *v. i.* (रॉम्प्)—(of children etc.) to play together with chasing, wrestling, etc., (*Racing sl.*) get *along*, *past*, without effort. खिदळणें, बोंकळणें, धांगडधिंगा घालणें, धमाचा,-हुतुतू-खेळणें; (शर्यत) सहज पुढें जाणें; सहज जिंकणें. *n.* child given to romping; (of girl or woman) tom-boy. खिदळणारें मूल; घोडगी, घोडी, दांडगी. *Romp'y*, *a.* *Romp'er*, *n.* child's overall. लहान मुलाचा झगा-, कपडे.

Ron'deau, Rŏn'del, *nn.* (रॉन्डो,-डेल्)—artificial forms of short poem with refrain. दहा किंवा तेरा ओळींच्या कवितेचा प्रकार,-कवितावृत्त.

Röntgen rays, *n. pl.* (रॅन्टयन्‌रेझ्)—(or *X-rays*) form of radiation penetrating many substances impervious to ordinary light. विद्युज्जन्य प्रकाश-किरण, क्षकिरण (सामान्य प्रकाशाविगळे व धातुव्यतिरिक्त इतर पदार्थांना हे पारदर्शक असतात). *Ront'genogram,* क्ष किरणांनीं काढलेलें छायाचित्र. [after *Rontgen,* the discoverer, 1815.]

Rōōd, *n.* (रूड)—a cross or crucifix; quarter of an acre; small piece of land. क्रूसावरील ख्रिस्ताची मूर्ति; एक चतुर्थांश एकर, काठी, जमिनीचा लहानसा तुकडा.

Rōōf, *n.* (रूफ्)—the upper covering of a house or building, top of a covered vehicle. घराचें छप्पर; गाडीचें छप्पर. *v. t.* to cover with a roof, to shelter. छप्पर घालणें; आश्रय देणें. *Under* one's *r.,* in one's house, esp. with ref. to hospitality. च्या घरीं, चा पाहुणा म्हणून. *R. of the world,* high mountain range. उंच पर्वताची रांग (पामीरपर्वत). *R. of the mouth,* ताळु, ताळू, टाळू. *R. tree,* ridge-pole of roof, छपराचें आढें. *Roof'ing, n.* material used for roof. शाकार, शाकारणें, शाकारण्याचें साधन.

Rōōf'er *n.* (रूफर्)—(colloq.) a letter of thanks for entertainment sent by departed visitor. (झालेल्या पाहुणचाराविषयींचें) पाहुण्याचें आभार-प्रदर्शक पत्र.

Rōōk, *v. t.* (रूक्)—to win money from (at cards, &c.) esp. by swindling; to charge (customer) extortionately. खेळांत फसवून पैसे मिळविणें; ठकविणें, फसविणें, (गिऱ्हाइकाकडून) अवाच्यासवा किंमत घेणें. *n.* black hoarse-voiced bird of crow tribe; sharper, esp. at dice and cards; (chess) castle. कावळा, डोंबकावळा; (जुगारांत नवख्यांना) फसविणारा, फसव्या; (बुद्धिबळांतील) हत्ती.

Rōōk'erў, *n.* (रूकरि)—(clump of trees with) colony of rooks; colony of penguins or seals; crowded cluster of mean houses. (झाडवळींतील) कावळ्यांची वसाहत; समुद्रपक्ष्यांची,-सील माशांची-वसाहत, घाणेरड्या घरांची रांग,-आळी.

Rōōm, *n.* (रूम्)—space occupied; capaciousness or ability to accommodate contents; opportunity, scope; apartment in a house; (*pl.*) apartments or lodgings; (transf.) the company in a room. अवकाश, जागा; वाव, सवड,; अवसर, संधि; खोली, कोठडी; (अने०) स्थान, रहाण्याचें ठिकाण, खोल्यांची जागा, खोल्या; खोलींत राहणारे लोक,-मंडळी. *v. i.* (U. S.) to occupy room(s) or share room(s) with. खोल्यांत राहणें, पोटभाडोत्री म्हणून खोलींत राहणें. *To make r.,* जागा करणें, वाट देणें, जागा करून देणें, वाव देणें, खालीं करून देणें. *In the r. of,* instead of, in succession to, as substitute for. च्या जागीं,-ऐवजीं.

Rōōm'er, *n.* (रूमर्)—(U. S.) an occupier of room(s) only, eating out. (जेवणखाण बाहेर करणारा परंतु) खोलींत फक्त राहणारा.

Rōōm'ў, *a.* (रूमि)—spacious, not confined. ऐसपैस, प्रशस्त, विस्तीर्ण, अघळपघळ. *Room'ily, adv.* प्रशस्तपणें. *Room'iness, n.* ऐसपैसपणा, प्रशस्तपणा.

Rōōst, *n.* (रूस्ट्)—a bird's resting place; (transf.) sleeping accommodation. पक्ष्यांचें रात्रीचें थाऱ्याचें ठिकाण, थारा, विश्रांतिस्थान; झोपण्याची सोय, बिछाना, निजण्याची खोली. *v. i.* to occupy a roost, to settle for sleep; to be perched or lodged for the night. झोपेकरितां राहणें; रात्रीकरितां राहणें विश्रांति-झोप-घेणें.

Rōōt,[1] *n.* (रूट्)—the part of a plant that fixes it to the earth and conveys nourishment from the soil to it; (*pl.*) fibres or branches of this; (*usu. pl.*) plants with edible roots; part of bodily, organ, etc. serving as a root; (Mus.) fundamental note of chord; (bibl.) scion; offshoot; bottom, essential substance of; nature; source, means of growth, basis; (*Math.*) the factor of a quantity which multiplied by itself gives that quantity; original element from which words are formed. मूळ, मुळी, मुळ्या, मूळखंड, मुळ्याचे तंतु, खाण्याजोगीं मुळें असलेल्या वनस्पति, बुडखा, बुंध, बुंधा, आधार; मूलस्वर; संतान, अपत्य; तत्त्व, मूलस्वरूप, सत्यांश; उगम, आदि-कारण, पाया; (गणि०) बीज, मूळ,; धातु, मूळशब्द. *v. t. & i.* to take or cause to take root; to establish firmly; to pull up by the root; (of swine etc.) turn up ground in search of food; (often *rout* राउट्) find or bring out after search, etc.; rummage (*among, in*). मूळ धरणें, पाळें घेणें; रुतणें, बद्धमूल होणें; उपटणें, मुळासकट उपटणें, निर्मूलन करणें; (डुकराचें सोंडेनें भक्ष्यार्थ) जमीन उकरणें; शोधून बाहेर काढणें, धुंडाळणें, हुडकणें. *To pull up by the rr.,* (*lit. & fig.*) uproot. मुळासकट उपटणें, पाळेंमुळें खणून काढणें. *Take, strike, r.,* पाळें धरणें, मूळ धरणें, जोर-जीव-घेणें; जोरानें वाढीला लागणें. *Lay axe to r. of* (झाडाच्या, संस्थेच्या) मुळाशीं घाव घालणें, नाशाला आरंभ करणें. *R. & branch,* पूर्ण, पूर्णपणें, समूळ, मुळा-शेंड्यासकट. *Love of money is the r. of all evil,* द्रव्याची हांव हें सर्व पापांचें मूळ आहे. *Square r.,* वर्गमूळ. *Cube r.,* घनमूळ. *Square r., Second r., of 4, r. of 4, r. 4,* चाराचें वर्गमूळ. *Cube or third r. of 27,* $\sqrt[3]{27}$. २७ चें घनमूळ. *To r. out,* exterminate. मुळा-सकट उपटून टाकणें, नायनाट करणें. *Rooted, pa. p.* बद्धमूल, दृढमूळ; (अंत) उगम असलेला. *Rootedly, adv. Rootedness, n.*

Rōōt,[2] *v. i.* (रूट्)—(*sl.*) (*U. S.*) to be active for another by giving encouraging applause or support. वाहवा करून दुसऱ्याला उत्तेजन-प्रोत्साहन-देणें.*-er, n.*

Rōōt'lĕt, *n.* (रू'ट्लिट्)—a small root. लहान मूळ, -मुळी.

Rōpe, *n.* (रोप्)—a stout line made by twisting together strands of hemp, flax, hide or wire; viscid or gelatinous stringy formation in beer or other liquid. दोर, रशी, राजू, दोरखंड; (दारू किंवा इतर आंबूसलेल्या द्रवपदार्थांतील) दोर, दोरा. *v. t. & i.* to fasten with a rope, put rope on; enclose or mark off with rope; (western *U. S.*) catch with lariat; (Mountaineering) connect party with rope; check (horse in racing); (of athlete) not put forth full powers; become ropy or viscid. दोरीनें घट्ट बांधणें,-आवळणें; दोरीला बांधणें; दोरीचें कुंपण घालणें, भोंवताली दोरी बांधणें; दोराच्या फासकीनें (गुरूं) पकडणें; दोरीनें (पर्वतारोहण करणारांना) अडकवणें, बांधणें; (घोडा) दाबणें,-आवरणें; कमी दवडीनें-जोर राखून-जाणें; दोर येणें, आंबणें. *The r.,* halter for hanging person. (मनुष्याला फांशीं देण्याकरितां) फांस. *The rr.,* (रंगणासभोंवार लावलेल्या) दोऱ्या. *To give* one *r., r. enough, to hang himself, plenty of r.* etc., एखाद्याला पूर्ण सवलत-आपली आपणच फजिती करूं-देणें. *R. of sand,* delusive security. विश्वासाला अपात्र-विनखात्रीचें-तारण. *R. of onions, pearls,* कांद्यांची-मोत्यांची-माळ. *Rop'ing, n.*

Rōpe'dāncer, *n.* (रो'प्-डान्सर्)—the performer on a tight-rope. दोरीवर कसरतीचें काम करणारा, कोल्हाटी, नाडेभोरपी. *R. dancing,* दोरीवरचें काम, नाडेभोरीप.

Rop'emanship, *n.* (रो'प्मन्‌शिप्)—skill in rope-walking or r.-climbing. दोरीवरची कसरत करण्याचें -नाडेभोरप्याचें-कौशल्य,-कसब.

Rop'ewalk, *n.* (रो'प्वॉक्)—long piece of ground used for twisting rope. दोरांना पीळ घालण्याची जागा.

Rop'eyard, *n.* (रो'प्यार्ड)—rope-making establishment. दोऱ्या करण्याचा-विणण्याचा-कारखाना.

Rō'py, *a.* (रो'पि)—(of liquid) developing gelatinous stringy formation. दोराळ, आंबलेलें. *Ro'piness, n.*

Rō'quet, *n.* (रो'कि)—striking of a croquet-ball against another. (एक प्रकारच्या चेंडूच्या खेळांत) आपला लांकडी चेंडू दुसऱ्याच्या चेंडूवर मारणें. *v. t. & i.* to make roquet; hit (ball) thus. चेंडूनें दुसऱ्याच्या चेंडूला मारणें; (अशा रीतीनें) चेंडू मारणें.

Rŏrq'ual, *n.* (रॉर्‌'क्वल्)—a whale with dorsal fin. (पाठीवर पंख असलेला) देवमासा.

Rosa'ceous, *a.* (रोझे'शस)—of the Rosaceae or order of plants including the rose. गुलाबवर्गांतील, -वर्गाचा; गुलाबाच्या पाकळ्यांसारखा (पुष्पमुकुट). *Rosa'cean, n.*

Rō'sarȳ, *n.* (रो'झरि)—a rose garden bed; arbour; a garland of roses, a chaplet, prayer; a string of beads. गुलाबाचा बाग, ताटवा, वाफा; (जपण्याची) जपमाळ, स्मरणी.

Rōse, *n.* (रोझ्)—(a prickly shrub bearing) a beautiful and fragrant red, yellow, or white flower; nozzle of watering-pot; light crimson, pink; (*usu. pl.*) rosy complexion; r.-shaped design; protuberance round base of animal's horn or some birds' eye. गुलाबाचें झाड, गुलाब; गुलाबी रंग; (झाडांना पाणी घालण्याच्या) झारीची तोटी,-सोंड; तोंड; गालांवरील लाली,-गुलाब; (पशूच्या शिंगाच्या किंवा कांहीं पक्ष्यांच्या डोळ्याच्या मुळाभोंवतीं असलेलें) उठावळूं, टेंगूळ. *a.* coloured like a pale *r.*, of warm pink. गुलाबी, गुलाबी रंगाचा. *v. t.* (in *pa. p.*) to make rosy. गुलाबी छटा देणें, गुलाबी करणें. *Extract of rose,* गुलाबी अत्तर. *To gather rr.* or *life's rr.,* seek pleasure. सुखासाठीं, भोगविलासासाठीं-धडपडणें. *Path strewn with rr.,* life of delights. आनंदी जीवन, सुखाचें आयुष्य. *Bed of rr.,* सुखाचें-सोपें-विनत्रासाचें काम,-स्थिति. *R. without a thorn,* निर्भेळ सुख,-आनंद. *The r. of,* with place-name, the most beautiful girl or woman in. (-ची) सौंदर्यराणी, गुलाब. *R.-bud,* bud of the rose; a young girl. गुलाबाची कळी; सुंदर मुलगी, तरुणी. *R.-colour,* rosy red, pink; pleasant state or outlook. गुलाबी रंग; सुस्थिति, सुखावह स्थिति,-दृष्टि, आशावाद. *R.-drop,* तांबडे चकदे-फोड-आणणारा त्वचेचा रोग. *Crumpled r.-leaf,* आनंदाचा विरस करणारी किंचित् गोष्ट; न्यूनता. *R.-water,* गुलाबपाणी, (*fig.*) हात जोडणें, विनवणी; जपून वागणें; जपून शस्त्रक्रिया करणें. *R.-window,* वाटोळी खिडकी *R.-wood,* (चित्रांच्या) चौकटी तयार करण्याचें गुलाबी वासाचें लांकूड.

Rōse, *pa. t. of* Rise.

Rō'sĕate, *a.* (रो'झिअट्)—(*lit., fig.*) rose coloured. गुलाबी, गुलाबी रंगाचा.*-ly, adv.*

Rōse'mary, *n.* (रो'झ्मरि)—evergreen fragrant shrub. एक सुवासिक झाड, झुडूप,-वनस्पति.

Rosĕtt'e, *n.* (रोझे'ट्)—rose shaped ornament. गुलाबाच्या फुलाच्या आकाराचा दागिना,-वस्तु,-अवयव.

Rōsicru'cian, *a.* & *n.* (रोझिक्रू'शन्)—(member) of a society devoted to occult lore. गूढविद्या मंडळाचा (सभासद).

Rŏs'in, *n.* (रॉ'झिन्)—resin, esp. in solid form, राळ. *v. t.* to rub (bow, string of fiddle) with rosin. राळेनें माखणें,-चोळणें. *Ros'iny, a.*

Rō'ster, *n.* (रो'स्टर्,-रॉ)—a list or plan showing turns of duty for individuals or companies esp. of a military force. फर्द, पट, कामाची यादी.

Rŏs'tral, *a.* (रॉ'स्ट्रल्)—(of column etc.) adorned with actual or sculptured beaks of captured ships; (zool.) of or on the rostrum. (जिंकलेल्या जहाजांच्या) चंच्वाकार नाळींनीं सुशोभित केलेला (स्तंभ इ०).

Rŏs'trate, *a.* (रॉ'स्ट्रट्)—having a rostrum (zool). चंच्वाकार. *Rostra'ted, a.* चंच्वाकार; चंच्वाकार नाळाच्या आकाराचा (स्तंभ).

Rŏs'triform, *a.* (रॉ'स्ट्रिफॉर्म्)—beak-like. चोंचीसारखा, चंच्वाकार.

Rŏs'trŭm, *n.* (रॉस्ट्रम्)—(*pl.*-*ra*,-*s*), platform for public speaking, pulpit; beak-like part (Zool., Bot.). उच्चासन, व्याख्यानपीठ, व्यासपीठ; चोंचीसारखा भाग, चोंच, चंचू.

Rō'sў, *n.* (रो'झि)—coloured like a red rose. गुलाबी.

Rŏt, *v. i. & t.* (रॉट्)—to undergo decay by putrefaction or from want of use, to bring to corruption; cause to rot, make rotten; (of prisoner) pine away; (sl.) chaff, tease. सडणें, कुजणें, नासणें. *n.* decay, rottenness; sheep disease; (sl.) nonsense, an undesirable state of things; (crick. etc.) sudden series of failures. कुजणें, सडणें; सडी, वादा (जनावरांचा रोग); मूर्खपणा, वेडेपणा, अनिष्ट परिस्थिति; पड, सतत हार (खाणें). *R.-gut, n. & a.* कोठ्याला अपायकारक (दारू,-मद्य). *Don't talk r.,* वटवट बंद कर, वेडेपणाचें,-भलतेंच बोलूं नको.

Rō'ta, *n.* (रो'टा)—a list of persons acting, or duties to be done, in rotation; (R.-C. Ch.) supreme ecclesiastical & secular court. कामगारांची-कामाची -यादी, (रोमन कॅथॉलिक धर्माचें) वरिष्ठ न्यायालय.

Rō'tarў, *a.* (रो'टरि)—acting by rotation. परिभ्रमणात्मक, चक्रगतीचा. *n. r.* machine. चक्राकार (फिरणारें) यंत्र. *R.-club.,* U. S. & British Society for international service to humanity. मानवजातीला मदत करणारी आंतरराष्ट्रीय संस्था. *Rotā'rian, n.*

Rōtāte', *v. i. & t.* (रोटे'ट्)—to move round the axis or centre; to revolve; to arrange (esp. crops) or take in rotation. आंसाभोंवतीं फिरणें,-फिरवणें, चक्रगतीनें फिरणें; वाटोळें फिरणें; आळीपाळीनें (पिकें इ०) काढणें.

Rōtā'tion, *n.* (रोटे'शन्)—rotating; recurrent series or period; regular succession, established order of succession. आसाभोंवतीं फिरणें, वाटोळी फिरणें, चक्रगति; पाळी, आळीपाळी, आलटपालट.-*al, Rotative, aa.*; *Rotator, n.* परिभ्रामक (स्नायु); चक्राकार फिरणारें यंत्र.

Rōte, *n.* (रोट्)—mere habituation; mere unintelligent effort of memory. केवळ संवय; घोकंपट्टी, घोकणें. *To say, know, by r.,* घोकंपट्टी करीत म्हणणें, तोंडपाठ म्हणणें.

Rō'tograph, *n.* (रो'टोग्राफ)—photographic print, esp. of *Ms.* or book. हस्तलिखिताचा किंवा पुस्तकाचा छायाचित्रलेख.

Rŏtt'en, *a.* (रॉ'टन्)—perishing of decay; inefficient, worthless. कुजलेला, सडका; कुचकामाचा, निरुपयोगी.

Rŏtte'n-stone, *n.* (रॉ'टन्स्टोन्)—decomposed siliceous limestone used as polishing-powder. (धातू स्वच्छ करण्याकरितां केलेली) चुनखड्याची पूड.

Rŏtt'er, *n.* (रॉ'टर्)—(*sl.*) a person or thing of little worth. क्षुद्र मनुष्य,-वस्तु.

Rotŭnd', *a.* (रोट'न्ड्)—rounded, plump; sonorous, grandiloquent. वाटोळा, लठ्ठ, स्थूल, गुबगुबीत, वर्तुलाकार; प्रगल्भ भाषण करणारा.

Rōtŭn'dā, *n.* (रोट'न्डा)—a circular or round building, esp. with a dome. वर्तुलाकार घुमट असलेलें घर, गोलघुमट.

Rotŭn'ditў, *n.* (रोट'न्डिटि)—roundness; stoutness, and plumpness of body. वाटोळेपणा, गोलपणा; लठ्ठपणा, स्थूलपणा.

Rou'ble, *n.* (रू'बल्)—Russian silver coin (formerly 2s. 1½d.). रशियांतील चांदीचें नाणें.

Rou'é, *n.* (रू'ए)—a debauchee, rake. व्यभिचारी, दुराचारी.

Rouge, *n.* (रूझ्)—red powder used to colour cheeks and lips; plate-powder of oxide of iron; revolutionary politician. गालांना व ओठांना लावण्याची तांबडी पूड; तांबडी (लोहमाणिलाची) झिलईची पूड; क्रांतिवादी. *a.* red. तांबडा. *v. t. & i.* to colour, adorn oneself, with rouge. (गालांवर -तोंडावर) तांबडा रंग लावणें. *Rouge-et-noire,* (रूझेन्वा'र्), a card-game on table with red and black marks on which stake is laid. एक प्रकारचा पत्त्यांचा डाव. [*F*]

Rough, *a.* (रफ्)—of uneven or irregular surface; not smooth or level; hairy, shaggy; coarse in texture, rugged; violent, disorderly, riotous, stormy, boisterous; riotous; harsh, unfeeling; deficient in finish, incomplete; approximate. खरखरीत; खरबरीत; उंचसखल; केंसाळ, भरड; भरभरीत, जाडेभरडें, उग्र; कडक, निष्ठुर, जहाल, राक्षसी; राठ; क्षुब्ध, तुफानी, खवळलेला; आडदांड, दांडगा, आडमुठ्या; कर्कश, आसुरी; कच्चा, अपूर्ण; स्थूल, कच्चा, अंदाजी. *adv.* in rough manner. आडदांडपणानें. *n.* turbulent fellow of the lower class; rough ground; hard part of life; *the* unfinished or *the* natural state; one of the spikes inserted in roughing horse. दांडगा मनुष्य, दांडगेश्वर; खडबडीत,-उंचसखल,-जमीन; (आयुष्यांतील) टक्केटोणपे, अडचण; असंस्कृत-मूळची-स्थिति; घोड्याच्या नालांतील कांटा,-खिळा. *R. leaf,* उगवणाऱ्या रोपट्याचें पहिलें (खरें) पान. *R.-rice,* unhusked rice, paddy. टरफलासकट भात. *R. manners,* आडदांडपणाची वागणूक. *R. tongue,* habit of rudeness. उर्मट भाषा, उर्मटपणें बोलण्याची संवय. *R. passage,* passing over *r.* sea. तुफानी समुद्रावरून जाणें. *R. stone,* not dressed. न तासलेला दगड. *R. copy,* (of picture, translation), कच्ची प्रत. *R. & ready,* कसाबसा चालेसा, जेमतेम. *R.-&-tumble, a.* अनियमित, धडपड्या, अव्यवस्थित; *n.* haphazard fight, scuffle. आकस्मिक चकमक, सहजासहजीं भांडण. *R.-rider,* a horse-breaker, man who can ride unbroken horses; (*Mil.*) irregular cavalry-man. घोड्यांना शिकवून तयार करणारा;

चाबूकस्वार, घोडदळांतील अनियमित शिपाई. *Is true in the r.*, सामान्यतः खरें आहे. *To r.* one *up the wrong way*, irritate him. एखाद्याला चिडविणें,-राग आणणें- *To r. it*, गैरसोई सोसणें. *Rough'ish, a.; Rough'ness, n. Rough'ly, adv. Roughly speaking*, अदमासानें,-स्थूलमानानें,-अंदाजानें बोलायचें तर.

Rou'ghage, *n.* (रफिज्)—(Dietetics) bran of cereals as mechanical stimulant to bowels. चोथा.

Rough'cast, *a.* (रफ्कास्ट्)—(*of* wall etc.) coated with mixed lime and gravel; (of plan etc.) imperfectly elaborated. रेती व चुना यांचा हात दिलेली,-सारवलेली (भिंत); पूर्ण विचार करून न आंखलेला (बेत), कच्चा बेत. *n.* plaster of lime and gravel for walls. रेती व चुना यांचा गिलावा. *v. t.* coat with *r.*; prepare (plan) in outline. चुना-रेतीचा गिलावा-हात-देणें; आराखडा तयार करणें (बेत,युक्ति).

Rough'hew, *v. t.* (रफ्ह्यू)—to shape out roughly. ओबडधोबड काम करणें. (*p. p.*) *r.-hewed*, uncouth, unrefined. आडदांड, अडाणी, असंस्कृत.

Rough'house, *v. t. & n.* (रफ्हउस)—(*sl.*) (to indulge in) horse-play. घोड्याचा खेळ (त्यांत भाग घेणें).

Rough'luck, *n.* (रफ्लक्)—(colloq.) worse fortune than one deserves. अकल्पित दुर्दैव.

Rough'shod, *a.* (रफ्शॉड्)—(of horse) having shoes with projecting nail heads. कांट्यांच्या नालाचा. *To ride r.-shod*, domineer over. (वर) अरेरावी गाजविणें, स्वतःच्या फायद्यासाठीं दुसऱ्याचा विचार न करणें.

Rough'en, *v. t. & i.* (रफन्)—to make or grow rough. खरखरीत करणें,-होणें; खांचे पाडणें.

Rouleau', *n.* (रूलो')—a cylindrical packet of coins; a coil or roll. नाण्यांचा पुडका; गुंडाळी.

Round, *a.* (राउन्ड्)—spherical or circular or cylindrical; entire, continuous, all together; candid; done with or involving circular motion. गोल, गोलाकार, वाटोळा, गरगरीत, डमरूकार; घाऊक, पूर्ण, सरळ, स्पष्ट; वर्तुलाकार गतीचा, वाटोळें फिरण्याचा. *n.* a round object; revolving motion, circuit, cycle, series; (Mil.) officer's inspection of guards and sentries; one stage in competition; (Mus.) kind of canon for three or more equal voices; (Golf) playing of all holes in course once, bounds, extent *of*; (sculp.) solid form (*as opp. relief*). कडें, वर्तुळ, चक्र; चक्राकार गति, वळसा, वेढा; फेरी; गस्त; पाळी, क्रम; घोळून म्हणण्याचें गाणें; (गोल्फच्या खेळांत) खेळण्याची एकदा पाळी; विस्तार, क्षेत्र, परिघ; घन, आकार. *adv.* circularly; by circuitous way; with rotation; with return to starting point. सभोंवार; गरका मारून, फेऱ्यानें, भोंवाड्यानें. *prep.* about. सभोंवार. *v. t. & i.* to pass round or double; to make a turn; to invest with or assume round shape; bring to well-ordered or complete state; gather up by riding round. वाटोळा जाणें, दुहेरा करणें; वळसा घालणें, फेरी घालणें; वाटोळा करणें,-होणें; सर्व बाजूंनीं सजवणें, नीटनेटका करणें; (गुरें वगैरे) वळवणें, एकत्र करणें. *R. table*, with disk top. गोल-मेज. *The R. Table*, at which king Arthur and his knights sat that none might have precedence. (इंग्लंडचा) आर्थर राजा आणि त्याचे सरदार ज्याभोंवतीं बसत असत तें गोलमेज. *R. table conference*, गोलमेजपरिषद्. *R. face*, गरगरीत वाटोळा चेहरा. *R. trip, voyage*, with return to starting point. गोलफेऱ्याचा प्रवास. *R. robin*, a written petition with signatures in circle to conceal order in which they were written. वर्तुलाकार सह्यांचा अर्ज. *R. numbers*, ३०, १०- वगैरे शून्यांतक संख्या, ठोकळ रक्कम, संख्या. *A r. sum*, बरीच ठोकळ रक्कम. *Rr. of ladder*, शिडीच्या पायऱ्या. *The daily r.*, ordinary occupation of the day. रोजचे व्यवहार, दैनिक व्यवसाय. *To make, go, one's rr.*, (तपासणीसाठीं) फेरी करणें. *News, story, goes the r.*, is passed on. बातमी, गोष्ट,-पसरते. A*n all-r. man*, one of varied talents. (सर्व विषयांत बुद्धि चालविणारा) अष्टपैलू,-चौरस,-मनुष्य. *To show* one *r.*, एकाद्याला सर्व महत्त्वाच्या गोष्टी,-ठिकाणें,-नेऊन दाखविणें. *To bring r., come r.*, ताळ्यावर आणणें,-येणें. *All the year r.*, बारामहिने, बारमाही.

Round'about, *a.* (राउन्ड्अबाउट्)—circuitous, circumlocutory; plump, stout. फेऱ्याचा, वळशाचा, घेऱ्याचा; पर्यायाचें, प्राविडीप्राणायामाचें; गलेलठ्ठ, मजबूत. *n.* circuitous way; piece of circumlocution; merry-go-round. फेराचा,-वळणांचा रस्ता, आडरस्ता; पर्यायानें केलेलें भाषण, पर्यायोक्त वचन; वाटोळें फिरणाऱ्या लांकडी घोड्यांचें किंवा गाड्यांचें (जत्रेंतील खेळ-करमणुकीचें) यंत्र. *adv. & prep.* on all sides, circuitously. सभोंवार, सभोंवतालीं, फेऱ्यानें, भोंवाड्यानें.

Round'arm, *a.* (राउन्ड्आर्म्)—(of bowling in Crick.) delivered with arm horizontal. वाटोळ्या वळणाची (चेंडूफेक).

Roun'del, *n.* (राउन्डेल्)—a small disk; rondeau. लहान चक्र; एक विशिष्ट कविता-वृत्त.

Roun'delay, *n.* (राउन्डिले)—a short simple lay with refrain; bird's song.. छोटेंसें गाणें; पक्ष्याचें गाणें.

Roun'der, *n.* (राउन्डर्)—In vbl. senses of round; (*pl.*) a ball game; (sing.) a player's complete circular run as unit of scoring in it; (*sl.*) a habitual loafer or drunkard. चेंडूचा खेळ; विशिष्ट प्रकारच्या चेंडूच्या खेळांत खेळाडूनें एक वर्तुळाकार फेरा मारून काढलेली धांव; भटक्या, दारुड्या.

Round'ly, *adv.* (राउन्ड्-लि)—bluntly, [illegible] a thoroughgoing way; in [illegible]

स्थूलमानानें; ठोकळमानानें, निखालस, निक्षून, जोरानें, उघडउघड; वाटोळा, सभोंवार, वर्तुलाकार.

Rounds'man, *n.* (राउंन्ड्झ्मन्)—a tradesman's employee going round for orders, etc.; (U. S.) police officer below sergeant with duties of inspection. व्यापाऱ्याचा फेरीवाला-नोकर, अडत्या; (सार्जंटच्या खालचा) पोलीस अधिकारी.

Round'up, *n.* (राउं'न्डअप्)—gathering up by riding round (cattle & transf.). हांकून आणणें, गराडा घालून गोळा-एकत्र-करणें.

Roup, *n.* & *v. t.* (रूप्)—(Sc., north.) sale, sell, by auction. विक्री; लिलावानें विकणें.

Roup, *n.* (रूप्)—kinds of poultry disease. कोंबड्यांना होणारा एक रोग. *Rou'py, a.*

Rouse, *v. t.* & *i.* (राउझ्)—to stir up from sleep or quiescence; to cease to sleep; to become active (usu. up); startle (game) from lair or cover; provoke temper of, inflame with passion; evoke (feelings); stir (liquid); (Naut.) haul vigorously *in, out, up.* जागृत करणें; जागा होणें, उठणें; कार्योद्युक्त होणें; (शिकार) उठवणें, चाळवणें; राग आणणें, मनोविकार प्रबल होणें; (भावना) जागृत करणें; (द्रव पदार्थ) हालविणें; जोरानें ओढणें,-खेंचणें. *n.* (mil.) the reveille; (arch.) draught of liquor. लष्करास जागें करण्याचा इषारा,-खूण; दारूचा घोट. *To r. oneself,* overcome one's indolence. आळस टाकणें. *Wants rousing,* तो आळशी आहे. *A rousing song,* जागृतिपर गीत. *Rou'ser, n.* (*esp.*) implement for rousing beer; outrageous or rousing lie. दारू ढवळण्याचें यंत्र, -साधन; धडधडीत असखलित खोटी गोष्ट,-बात,-गप्प.

Rouse, Roose, *v. t.* (राउझ्, रूझ्)—to sprinkle (herring etc.) with salt in curing. मिठांत घालणें, खारटावणें.

Rout, *n.* (राउट्)—disorderly retreat of defeated troops; a party of revellers or rioters; (Law) assemblage of three or more persons engaged in unlawful act; riot, tumult. सैन्याची दाणादाण, फांकाफांक, मोड; समुदाय, गर्दी; दंगेखोरांचा बेकायदेशीर जमाव; दंगा, गोंधळ. *v. t.* to defeat and throw into confusion; fetch, force,-out. सैन्य उधळणें, दाणदाण करणें; हुडकून काढणें, शोधून काढणें. *Put to r.*, पूर्णपणें पराभव करणें.

Route, *n.* (रूट्, *Mil.* राउट्)—the way taken in getting from starting point to destination (Mil.) marching orders. मार्ग; कूच करण्याचा हुकूम. *En route,* वाटेनें, प्रवासांत, मार्गांत.

Routine', *n.* (रूटीन्)—the fixed order of doing things, practice adhered to from habit. नित्यक्रम, परिपाठ. (attrib.) *r. duties,* performed by rule. सरावाचा, नित्यक्रमाचा, नित्यांतला, शिरस्त्याचीं (नित्य कृत्यें).

Rōve, *v. i.* (रोव्ह्)—to wander without settled destination; to move from place to place; (of eyes) look in changing directions; wander over or through. भटकणें; भटकत फिरणें, जागोजाग जाणें; (दृष्टि) कावरेंबावरें पाहणें, अस्थिर असणें; हिंडणें, हिंडत फिरणें. *2. n.* & *v. t.* silver of cotton, wool, etc. drawn out and slightly twisted. कापसाची,-लोंकरीची, धाग किंवा पेळू (करणें).

Rō'ver, *n.* (रो'व्ह्र्)—a pirate; a wanderer; senior boy-scout. चांचा; भटक्या-; वरिष्ठ बालवीर.

Row, *n.* (रो)—a rank or file; a line of seats. ओळ, पंगत; रांग. *v. i.* & *t.* to propel a boat with oars; to convey in a boat; row race with; be member of boat's crew, (of boat) be fitted with. वल्हविणें; वल्हवून नेणें; शीं वल्हवून शर्यत खेळणें; खलाशांपैकीं एक असणें, -होणें; (वल्ह्यांनीं) युक्त असणें. *n.* spell of rowing; boat-excursion. वल्हविणें; बोटींवरून सफर. *In a r.,* or *rr.,* रांगेनें, रांगांनीं. *A hard r. to hoe,* (*U. S.*) difficult task. कठीण काम, अवघड काम. *R.-boat,* rowing boat. वल्हेंवाली होडी,-बोट. *Row'er n.* वल्हेकरी, वल्हविणारा.

Row, *n.* (राउ)—(colloq.) disturbance, noise. dispute; free fight; being reprimanded. गिल्ला, गोंधळ, आरडाओरड, भांडण; मारामार; खरडपट्टी निघणें. *v. t.* to reprimand, rate. खरडपट्टी काढणें; खडसावणें. *What's the r.?* काय गडबड आहे? *To make, kick up, a r.,* raise noise, make protest. गिल्ला करणें, निषेध व्यक्त करणें. *Row'ing, n,* scolding. खरडपट्टी, कान-उघडणी.

Row'an, *n.* (रो'अन्, रॅं)—(*Sc.*) the mountain ash; its berry. अॅश नांवाचें झाड; त्याचें फळ.

Rowd'y̆, *a.* (रा'उ-डि)—noisy and disorderly. लुच्चा, दंगेखोर. *n.* a rowdy person. आडदांड मनुष्य, गुंड, दंगेखोर. *Rowdyism, Rowd'iness, nn. Rowd'yish, a.*

Row'ĕl, *n.* (रा'उइल्)—spiked revolving disk at end of spur. बुटाच्या टांचेला लावलेलें चक्र.

Row'lock, *n.* (रॅ'लॉक्)—appliance serving as fulcrum for oar. वल्हें टेंकण्याची खुंटी.

Rŏy'al, *a.* (रॉ'यल्)—of, from, suited to, or worthy of a king; belonging to family of, in service or under patronage of, a king or queen; splendid, princely, august, majestic, first-rate. राजाचा, राणीचा, बादशाही, राजाला शोभणारा; राजघराण्यांतला, राजकुटुंबांतला, राजाच्या पदरचा, राजाश्रयाखालील; उत्तम, पहिल्या प्रतीचा, भव्य; प्रचंड, उच्च, सर्वोत्कृष्ट, श्रेष्ठ. *n.* a royal stag, mast or sail; a size of paper. काळवीट, अत्युच्च डोलकाठी, शीड; एक जातीचा छापण्याचा कागद, त्याचा आकार. *R. blue,* a deep pure vivid shade. चकचकीत निळा रंग. *R. burgh,* सनदी गांव. *R. road to,* चा राजमार्ग. *Roy'ally, adv.* राजाला शोभेलसा; थाटामाटानें.

Rŏy'alĭst, *n.* (रॉयलिस्ट्)—a supporter of monarchy, an adherent of a king. राजाचा पक्ष धरणारा, राजसत्तावादी, राजपक्षीय. *Roy'alism, n.* राजसत्ताक राज्यपद्धति, राजसत्तावाद. *Royal'istic, a.*

Rŏy'altў *n.* (रॉयल्टि)—being royal; royal persons; royal licence to work minerals, payment by lessee of mine to landowner; payment to patentee for use of patent; (*usu. pl.*) prerogative of the sovereign; payment to an author for each copy sold. राजेपणा, नृपत्व, राजपद; राजवंशीय मंडळी; खाणींतील धातु खणून काढण्याचा (राजानें दिलेला) अनिर्बंध हक्क, स्वामित्वाची रक्कम; राजाचा विशेष अधिकार,-हक्क; प्रत्येक प्रतीमागें ग्रंथकर्त्याला द्यावा लागणारा मोबदला, स्वामित्वाबद्दल रक्कम.

Rŭb, *v. t. & i.* (रब्)—to subject to friction; to polish, to clean, to freshen or brush *up;* come into contact with; get frayed or worn by friction, take (*stain etc.*) out. घांसणें; चोळणें, घासटणें, मळणें, घोटणें, घर्षण करणें, घांसून-पुसून-स्वच्छ करणें; उजळणें, गंज काढणें; शीं संबंध येणें, घर्षण पावणें, घसट्टन जाणें, झिजणें, (*डाग*) पुसून टाकणें. *n.* spell of rubbing; collision or brush against; impediment or difficulty. घर्षण, घांसणी, मळणी; घटा, घसरा; मेळ, गोम, अडचण, नड, पेंच. *To r. shoulders,* come into contact *with* other people. इतरांशीं निकट संबंध येणें. *There's the r.,* that is the point at which doubt or difficulty arises. हाच मुद्दा खऱ्या अडचणीचा,-पेंचाचा-आहे.

Rŭb'-a-dub, *n. & v. i.* (रॅब् अ-डब्)—(imit.) (to make) rolling sound of drum. नौबदीचा आवाज (करणें).

Rŭbb'er, *n.* (रॅबर्)—a tough elastic substance made from coagulated juice of certain plants, India-rubber; person or appliance employed to rub; (U. S. colloq.) rubber over-shoe; Turkish bath attendant; 2. three successive games between same sides or persons at whist etc.; winning of two games in rubber; third game when each side has won one. (कांहीं) झाडांच्या चिकापासून तयार केलेला) रबर; घासणारा, चोळणारा, रगडणारा, मोहरा, घोटा; रबराचा वरून घालण्याचा जोडा; अंगमर्दन करणारा, चंपी करणारा; २ (पत्त्यांचे वगैरे त्याच भिडूंमधील) लागोपाठ तीन डाव; असे दोन डाव जिंकणें; (प्रत्येक बाजूनें एकेक डाव केला असतां खेळलेला) तिसरा डाव. *Rubberneck,* (U. S., sl.) inquisitive person, excursion motor-car. चौकस मनुष्य; सहल करण्याची मोटारगाडी. *R. stamp,* रबरी शिक्का.

Rŭbb'ĭsh, *n.* (रॅबिश्)—waste or worthless matter; litter, rejected matter, trash; (often excl.) nonsense. केर, कचरा, केरकचरा, गाळसाळ, घाण, निरुपयोगी वस्तु; निरर्थक बडबड, अशक्य गोष्ट,-कल्पना. *A good riddance of bad r.,* ब्याद गेली, पीडा गेली, (बरें झालें!). *Rubb'ishy, a.* of no value. निरुपयोगी, टाकाऊ, गचाळ.

Rŭb'ble, *n.* (रॅबल्)—waste fragments of stone, etc. from old houses; pieces of undressed stone; (Geol.) loose angular stones etc. as covering of some rocks, water-worn stones. (जुन्या घरांच्या पडलेल्या) दगड-विटांचे तुकडे; कपरी, खांडकी; कांहीं खडकांना आच्छादणारे सुटे-सुळके-दगड, पाण्यानें झिजलेला दगड. *Rub'bly, a.*

Rube, *n.* (रूब्)—(U. S.) a farmer, शेतकरी.

Ru'befў,-ify, *v. t.* (रूबिफाय्)—to make red; (Med.) stimulate (skin etc.) to redness. तांबडा, -लाल,-करणें; त्वचेवर लाली चढविणें. *Rubefa'cient, a. Rubefa'ction, n.*

Ru'bicon, *n.* (रूबिकन्)—*The* boundary by passing which one becomes committed to an enterprise. ज्या मर्यादेपलीकडे गेलें असतां धाडस किंवा धोका होईल ती मर्यादा. [name of stream limiting Caesar's province & crossed by him before war with Pompey.]

Ru'bĭcund, *a.* (रूबिकन्ड्)—ruddy, red-faced. लाल, तांबडा, लाल चेहऱ्याचा.

Rubĭd'ium, *n.* (रूबिडियम्)—soft silvery metal. रसायनशास्त्रांतील एक धातुरूप मूलद्रव्य, रूपद. [L. *rubidus,* red]

Ru'brĭc, *n.* (रूब्रिक्)—heading or passage in red. तांबड्या अक्षरांचा मथळा, उतारा.

Ru'bў, *n.* (रूबि)—crimson or rose-coloured precious stone; glowing red colour, red pimple on nose or face; size of type; blood; red wine. माणीक, लाल; लालभडक रंग; तांबडी पुटकुळी; एक प्रकारचा टाइप,-ठसा; रक्त; लाल दारू. *a.* ruby-coloured. माणकाच्या लाल रंगाचा. *v. t.* लाल करणें.

Ruche, *n.* (रूश्)—frill or quilling of gauze, lace etc. (रेशमी विरविरीत कापडाची) किनार, झालर. *Ruched, a.* [F]

Rŭck, *n.* (रक्)—main body of competitors left out of the running. चढाओढींत भाग घेणारांतील प्रमुख मंडळी.

Rŭck, Rŭc'kle, *v. i. & t.* (रक्, रॅकल)—to crease, wrinkle (usu. *up*). घडी,-सुरकुत्या,-पडणें. *Ruc'kle, v. i. & n.* (रॅकल) (make) gurgling sound esp. in throat of dying person. घरघर आवाज (होणें).

Ru'cksăck, *n.* (रुक्सॅक्)—kind of knapsack slung from shoulders & resting on back. (दोन्ही खांद्यांवरून पाठीवर लोंबणारी) पिशवी. [G]

Rŭc'tion, *n.* (रॅक्शन्)—(sl.) dispute, row. भांडण, गोंधळ. *There will be rr.,* things will not be allowed to proceed quietly. गोंधळ माजेल, गोष्टी सुखासमाधानानें पार पडणार नाहींत.

Rud, *n.* (रड्)—a freshwater fish. एक गोड्या पाण्यांतील मासा.

Rŭdd'er, *n.* (रॅडर्)—a flat piece hinged to the stern of a ship or boat for steering with; (fig.) guiding principle. सुकाणूं, सुकाण, कर्ण,

नियामक वस्तु, सुकाणूं. *R. fish,* जहाजाच्या पाठीमागून येणारे मासे. *Rudd'erless, a.*

Rŭd'dle, *n.* (रॅड्ल)—red ochre, used for marking sheep. तांबडी काव,-माती. *v. t.* to mark or colour with *r.* काबीनें खूण करणें,-रंगविणें.

Rŭdd'ў, *a.* (रॅडि)—of red colour, freshly or healthily red or reddish-brown. तांबूस, लालद, टवटवीत, तुकतुकीत, गुलाबी. *Rudd'iness, n.*

Rude, *a.* (रूड्)—primitive, simple, in natural state; uncivilized, uneducated; roughly made, coarse; violent; vigorous, hearty, insolent, offensive, impudent, boisterous. मूळ स्थितींतील, साधा, असंस्कृत; अशिक्षित, रानटी, अडाणी; ओबडधोबड, तीव्र, जोराचा; जोमदार; उद्धट, उद्दाम. *To be r. to,* insult. चा अपमान करणें. *Rude'ly, adv.*; *Rude'ness, n.*

Ru'diment, *n.* (रूडिमेन्ट्)—(*pl.*) elements or first principles of a subject; germ fo something undeveloped; (sing.) part or organ imperfectly developed as having no function (e. g. the breast in males). मूलारंभ, मूलतत्त्व, बीज, कारण; (पक्षूण) निरुपयोगी शरीरावयव.

Rudimĕn'tarў, *a.* (रूडिमेंन्टरि)—not going beyond the rudiments; undeveloped. मूलतत्त्वांचा, प्राथमिक, गर्भरूपी, मूलरूपी. *Rudimen'tal, a.* (rare).

Rue, *v. t.* (रू)—to repent of, to regret; to wish undone or unbefallen. पश्चात्ताप करणें; दुःख किंवा शोक करणे. *n.* (arch.) repentance; compassion, ruth. पश्चात्ताप; दया, करुणा. *Rue'ful, a.* dejected, downcast. रडका, रडवा, रडकुंडा. *Rue'fulness, n. knight of the rueful countenance,* Don Quixote. डॉन क्विझोट (रडका सरदार).

Rue², *n.* (रू)—a bitter-leaved evergreen shrub. सदा हिरवी वनस्पति, ब्राह्मी.

Rŭff, *n.* (रफ्)—projecting starched and goffered neck-frill worn round neck esp. in 16 th c.; band of feathers, hair, or colour round bird's or beast's neck; a kind of domestic pigeon; 2. a small fresh-water fish; 3. a bird of sand-piper kind. मानेभोंवतालची कडक इस्तरीची झालर; (पक्ष्याच्या किंवा पशूच्या) मानेभोंवतालचा (पिसांचा-केंसांचा-रंगाचा) पट्टा; पाळींव कबुतर; गोड्या पाण्यांतील (एक जातीचा) मासा; एक जातीचा पक्षी.

Rŭff,² *n.* (रफ्)—trumping at whist. 'व्हिस्ट' या पत्त्याच्या खेळांत हुकूम सांगणें. *v. t. & i.* to trump. हुकुमानें घेणें, मारणें.

Rŭff'ian, *n.* (रॅफिअन्)—a rough lawless person; a bully, desperado. आडदांड मनुष्य; भाडोत्री दांडगा मनुष्य, गुंड,-मवाली.-*ly, a. Ruff'ianism, n.*

Să'lmon, *n.* (सॅ'मन्)—a silver-scaled fish with orange-pink flesh. सामन नांवाचा एक मासा. *a.* salmon-coloured. तांबूस पिंवळट रंगाचा. S.-*colour* (*ed*), (of) the orange-pink colour of *s.*-flesh तांबूस-नारिंगी-पिंवळट रंग (रंगाचा). *S. trout,* N.-Europ. fish resembling salmon. सॅमन सारखा दिसणारा मासा.

Săl'on, *n.*(सॅलाँ)—reception-room in continental, esp. French, great house; reception of great lady. दिवाणखाना; थोर स्त्रीचें (दिवाणखान्यांत) आगतस्वागत. *The S.,* annual exhibition of living artists' pictures in Paris. कलाकुसरीचें (पॅरिसमधील) वार्षिक प्रदर्शन. [F]

Saloōn', *n.* (सलून्)—a large room fit for assemblies, &c.; a large cabin for ship's passengers; a luxurious railway carriage without compartments; a public room or gallery generally used for specified use; (U. S.) drinking bar. दिवाणखाना, रंगमहाल, सालन; जहाजावरील किंवा आगगाडींतील मुख्य खोली; विशिष्ट कार्याकरितां सजविलेली विस्तृत खोली; दारू पिण्याचें स्थान, दारूदुकान. *S. car, carriage,* (दिवाणखान्याप्रमाणें) सजविलेला (सलग) आगगाडीचा डबा. *Sleeping, dining, s.,* आगगाडींतील निजण्या-जेवण्याचा भव्य सुशोभित डबा. *Billiard, dancing, shaving, s.,* बिल्यर्ड खेळण्याची जागा, सार्वजनिक नृत्यगृह, केशकर्तनालय. *S. keeper,* (U. S.) दारूदुकानाचा मालक.

Sălpĭglŏss'is, *n.* (सॅलिपग्लॉ'सिस)—showy-flowered garden-plant allied to petunia. शोभिवंत फुलांची एक वनस्पति. [*Gk Salpig,* trumpet; *glossa,* tongue.]

Săl'sify̆, *n.* (सॅ'ल्सिफि)—a plant with fleshy root cooked as vegetable. एक जातीची भाजीची वनस्पति.

Salt, *n.* (सॉल्ट्)—substance obtained from sea-water by evaporation or from the earth by mining used as seasoning, or preservative of food, sodiumchloride; (fig.) the elite of; wit; experienced sailor; (Chem.) compound of basic and acid radicals; marsh overflowed by sea; (pl.) exceptional rush of sea-water up river. मीठ, लवण, खार, निमक; सिंध-लवण, शेंदेलोण, सिंध-क्षार; (अलं०) नीतिमान्, अत्युत्कृष्ट, सर्वोत्तम; खोंच, मार्मिकता; अनुभविक जुना खलाशी; क्षार, लवण; खाजण, खारटण (समुद्रकांठची जमीन); उधानाचें पाणी भरणें, उधानाची भरती. *a.* containing, tasting of, or treated with salt; (of plants) growing in sea or salt-marshes; (of tears, grief) bitter;

(of stories,) indecent, spicy ; (of wit) pungent; (of bill, charges) exhorbitant. खारट, लवणयुक्त, खारा, खारावलेला ; समुद्रांत-खारटणजागेंत-होणारा ; दुःखाचा, उद्वेगाचा ; चटकदार, फाजील : खोंचक, झोंबणारी ; फाजील, अतिशय, अवाच्यासवा (आकार). *v. t.* to preserve, season, treat, with salt ; to make salt (lit. & fig). (आंत) मीठ घालणें, खारविणें; (बर्फ वितळून जाण्याकरितां रस्त्यावर) मीठ पसरणें ; मीठ लावणें, तिखटमीठ लावणें (अलं०) ; क्षारद्रवांत (छायाचित्राचा कागद) बुडविणें, -भिजविणें. *Common s.*, रोजच्या खाण्यांतलें मीठ. *White s.*, सफेत बारीक केलेलें मीठ. *S.-cellar*, मिठाचें भांडें, पडगा. *In s.*, मिठांत खारावलेला. *To eat s. with*, (चा) पाहुणा असणें, चा पाहुणचार खाणें. *To eat one's s.*, (चा) निमक खाणें, (ची) नोकरी करणें, (च्यावर) अवलंबून असणें. *Is not with his s.*, not efficient, worth keeping, पगाराइतकी लायकी नसलेला, नालायक. *Take with a grain of s.*, अतिशयोक्तीचा समजणें, वर विश्वास न ठेवणें, थोडें बाद करणें. *The s. of the earth*, थोर-नीतिमान-पुरुष. *Acid s.*, अम्लक्षार. *Epsom s.*, रेचकाचें (इप्सम नांवाचें) मीठ. *To sit above, below, the s.*, (hist.) मेजाच्या प्रमुखभागीं, नोकराचाकरांबरोबर, जेवावयास बसणें. *S. mine*, मिठाची खाण. *S. pit*, मिठाची कोंडी. *S. works*, मिठाचा कारखाना, मिठागर. *Salt'wort*, kinds of marsh plants. दलदलींत वाढणारीं झाडें. *S. water, n.* समुद्राचें पाणी ; अश्रू. *S.-water, a.* समुद्रांतील. *To s. an account*, जिनसाची भरमसाट किंमत लिहिणें. *To s. the books*, जमेकडची रक्कम (खरी असेल त्यापेक्षां) फाजील-अधिक -दाखविणें. *Salt'less, salt'y, aa.*, *salt'iness, n.*

Sălta'tion, *n.* (सॅल्टे'शन्)—leaping, dancing ; sudden transition. उडी मारणें, नाचणें, धागडणें ; आकस्मिक बदल. *Salta'tory, a.* उडी मारणारा, उडी मारण्याच्या उपयोगाचा. *Saltator'ial, a.*

Salt'ed, *pa. p. & a.* (सॉ'ल्टेड्)—In vbl. senses ; (of horses or persons) proof against diseases incident to climate etc. by habituation, hardened. मीठ घातलेला, खारट, क्षारयुक्त; (हवापाण्याच्या संवयीनें) निर्ढावलेला, सरावलेला, सुदृढ.

Sal'ter, *n.* (सॉ'ल्टर्)—manufacturer of, dealer in, salt ; workman at salt works ; person who salts fish, etc. मिठागरी ; मिठाचा व्यापारी ; मिठागरांतील कामगार, मासे-खारवी.

Salt'ern, *n.* (सॉ'ल्टर्न्)—a salt-works. मिठागर.

Sal'tire, *n.* (सॅ'ल्टायर्)—St. Andrew's cross (X) dividing a shield etc. into four compartments. सेंट ॲन्ड्रूचा (X) क्रॉस.

Salt'păn, *n.* (सॉ'ल्ट्-पॅन्)—a hollow near the sea (or a vessel) used in getting salt by evaporation. मीठ तयार करण्याची मिठागरांतील कोंडी. (Also Salt-pit).

Saltpē'tre, *n.* (सॉल्ट्-पी'टर्)—a substance used in making gunpowder ; potassium nitrate. सोरा ; सोरामीठ. [L. *sal*, salt ; *petra*, rock]

Sălu'brĭous, *a.* (सॅलू'ब्रिअस्)—favourable to or promoting health, health-giving. आरोग्यवर्धक, पौष्टिक, आरोग्यकारक. *Salu'brity, n.*

Săl'ūtarў, *a.* (सॅ'ल्यूटरि)—wholesome in operation ; resulting in good, beneficial. पथ्यकारक ; हितावह.

Sălūtā'tion, *n.* (सॅल्यूटे'शन्)—act of saluting ; words used in saluting. नमस्कार, वंदन ; अभिनंदनाचे शब्द.

Salute', *n.* (सॅलूट)—gesture of respect, esp. at meeting or parting ; (Mil., Naut.) prescribed movement or use of flags or discharge of guns in sign of respect ; (joc.) a kiss. नमस्कार, अभिवंदन ; (तोफांची) सलामी ; चुंबन. *v. t. & i.* to make a salute or salutation to ; greet ; kiss. नमस्कार करणें, वंदन करणें ; अभिनंदन करणें ; सलामी देणें ; चुंबन घेणें.

Săl'vage, *n.* (सॅ'ल्व्हेज्)—rescue of property from loss at sea or by fire ; payment made for its rescue ; property salvaged. आगींतून किंवा समुद्रांतून माल वांचविणें ; वांचवणावळ ; वांचवलेला माल. *v. t.* to rescue thus ; (U. S., sl.) appropriate for one's own use. माल वाचवणें ; स्वतःसाठीं ठेवणें.

Săl'varsăn, *n.* (सॅ'ल्व्हार्सॅन्)—drug used esp. in syphilis. (गर्मी, उपदंश रोगावरील) औषधी. [P.]

Sălvā'tion, *n.* (सॅल्व्हे'शन्)—fact or state of being saved from sin and its consequences ; preservation from loss, calamity, etc., thing that preserves from these. मुक्ति, मोक्ष, उद्धार, त्राण, रक्षण, संरक्षण, तारण, बचाव ; रक्षण करणारी गोष्ट, बचावाचा उपाय, तरणोपाय. *To find s.*, be converted ; (joc.) discover formula that will enable one to abandon one's principles, etc. मुक्ति मिळणें ; (आपल्या तत्त्वांच्या विरुद्ध वागण्याकरितां) पळवाट शोधून काढणें. *Be the s. of*, चा तरणोपाय,-बचाव करणारा,-होणें. *S. Army*, religious organization based on a military model. मुक्तिफौज. *Salva'tionist, n.* a member of S. Army ; a revivalist. मुक्तिफौजेचा सैनिक,-अनुयायी ; पुनरुद्धारकर्ता. *Salva'tionism, n.*

Salve, *n.* (सॅल्व्ह)—healing ointment ; something that soothes ; a remedy ; mixture of tar and grease for smearing sheep. मलम ; उपशामक वस्तु ; उपाय ; मेंढ्यांच्या अंगाला लावण्याचें मिश्रण, रंग. *v. t.* to anoint ; smooth over, palliate ; soothe ; harmonize ; smear (sheep) ; save (ship, cargo) from loss at sea, or (property) from fire. (जखमेला) चोळणें, लावणें ; नरम,-बरा,-नाहींसा करणें ; उपशमन करणें ; एकीकरण करणें, समाधान करणें ; माखणें ; रक्षण करणें, बचावणें. *Sal'vable, a.*

Săl'ver, *n.* (सॅ'ल्व्हर्)—a kind of tray for handing refreshment, &c. तबक, थाळा.

Săl'vō, *n.* (सॅ'ल्व्हो)—(pl.-*os*), saving clause, reservation (*of*) ; proviso. तरतूद, फट, सवड, वाट, सोडवण, सबब.

Săl'vō, *n.* (सॅ'ल्व्हो)—(pl.-*oes*), simultaneous discharge of guns as salute, or in battle ;

round of applause. सन्मानार्थ तोफांची सरबत्ती,–सलामी, (नाविक युद्धांत) तोफांचा किंवा इतर स्फोटकांचा सतत भडिमार; जयघोष, टाळ्यांचा कडकडाट.

Săl'volătile, *n.* (सॅल्व्हॉलॅटिलि)—solution of ammonium carbonate, used as restorative in fainting, etc. (मूर्च्छा वगैरे आली असतां) हुंगण्याचें औषध. [mod. L,=volatile salt)

Săl'vor, *n.* (सॅल्व्हर्)—a person or ship that saves a ship or goods from wreck. बुडणाऱ्या जहाजांतील मालाचा बचाव करणारा मनुष्य किंवा जहाज.

Săm, *n.* (सॅम्)—In phr. *Stand sam*, to bear the expense, esp. of drink. आपल्या खर्चानें (दारू) पाजणें. *S. Browne*, लष्करी अधिकाऱ्याचा पट्टा इ.

Săm'bō, *n.* (सॅम्बो)—a half-breed, esp. of Negro and Indian or European parents; (S.-) nick-name for Negro. (नीग्रो व युरोपियन) आईबापांची मिश्र संतति; नीग्रोचें टोपण नांव.

Sāme, *a.* (सेम्)—uniform; unvarying, unchanged; identical; aforesaid, previously referred to. हाच, तोच, एकसारखा, तसाच; न बदलणारा; तोच तोच, सारखा; पूर्वोक्त. *The same, pron.* तोच, तीच, तेंच; *adv.* तेंच, तसेंच. *It is all, just, the same to me*, माझ्या दृष्टीनें त्यांत कांहींच फरक दिसत नाहीं. *much t. s.*, जवळ जवळ एकच,–सारखेंच. *At t. s. time*, (उलट पक्षीं) त्याचबरोबर, तसेंच, त्याच वेळीं. *Think t. s. of, feel t. s. to*, remain in the same mind regarding. (च्या विषयीं) तेंच मत असणें,–राहणें. *All t. s.*, तथापि, तद्यापि, तसें असलें तरी. *Just t. s.*, सारखेंच, एकच. *One and t. s.*, एकूणएक, अगदीं तोच. *Same'ness, n.* ऐक्य, अनन्यभाव, तादात्म्य, अभिन्नता. [AS, *same*, L. *similis*, Skr. *sama*, Gk. *homos*, like]

Săm'ite, *n.* (सॅमाइट)—rich medieval dress-fabric of silk. कशिदा काढलेला उंची रेशमी कपडा.

Săm'lĕt, *n.* (सॅम्लिट)—a young salmon. सामन जातीचा लहान मासा.

Sămm'y̆, *n.* (सॅमि)—(S.-Afr.) Indian who washes clothes. (द. आफ्रिकेंतील तद्देशीय) धोबी,–परीट.

Sămovăr', *n.* (सॅमॉव्हा'र्)—Russian tea-urn with interior heat-tube. (उष्णतारक्षक नळी आंत असलेली) रशिअन चहादाणी. [Russ.=self-boiler]

Să'mple, *n.* (सा'म्पल्)—specimen or pattern. मासला, नमुना. *v. t.* take or give samples of; try the qualities of. चे नमुने घेणें,–देणें; मासला–चव –चाखणें. *S. card*, card with samples of goods attached. मालाचे नमुने चिकटविलेलें पत्रक. *Sa'mpler, n.* नमुने तयार करणारा. 2 girl's piece of embroidery. कशिदा, कशिदाचें,–भरत,–काम. [var. of *example*]

Sam'son,-pson, *n.* (सॅम्सन्)—person of great strength or resembling S. in some respect. बलभीम, बलवान् मनुष्य. *S.'s post*, (Naut.) गलबताचा मजबूत खांब. *Sam'sonite, n.* explosive. स्फोटक (द्रव्य,–अस्त्र).

Săm'urai, *n.* (सॅमुराइ)—member of military caste in old Japan, an army officer in modern Japan. प्राचीन जपानी क्षत्रिय; हल्लींचा जपानी लष्करी अधिकारी.

Sănatōr'ĭŭm, *n.* (सॅनटो'अरिअम्)—establishment for treatment of invalids; a healthy place resorted to for its climate. आरोग्यभुवन; हवा पालटण्याचें ठिकाण.

Săn'ative, Săn'atory̆, *aa.* (सॅ'नटिव्ह, सॅ'नटरि)—tending to health, curative. आरोग्यप्रद, रोगनिवारक, पथ्यकर.

Sănc'tify̆, *v. t.* (सॅं'क्टिफाय)—to consecrate, to make holy; to purify from sin; justify, sanction. शुद्ध करणें; पवित्र करणें; पापमुक्त करणें; अनुज्ञा देणें, मान्यता देणें. *Sanctifica'tion, n.*

Sănctimō'nĭous, *a.* (सॅंक्टिमो'निअस्)—making a show of piety or holiness, hypocritical. दांभिक, बकध्यानी.

Sănc'timony̆, *n.* (सॅं'क्टिमनि)—sanctimoniousness, the mere show of devoutness. दांभिकपणा, बकध्यान.

Sănc'tion, *n.* (सॅं'क्शन्)—penalty or reward attached to a law; influence that causes a rule to be observed; authoritative permission, law, decree (hist.). कायद्यानें ठरविलेला दंड किंवा शिक्षा, अधिकार, आश्रय, प्रमाण, आधार; अनुज्ञा, मंजुरी; कायदा, (राजाची) आज्ञा. *v. t.* to attach or give sanction to; to authorize or countenance or support (action). मंजुरी देणें; अधिकार देणें, मान्यता देणें.

Sănc'tity̆, *n.* (सॅं'क्टिटि)—saintliness; sacredness or inviolability, holiness; (*pl.*) sacred obligations, feelings, etc. साधुता, पावित्र्य; पवित्रपणा, शुचिता, शुद्धता; पवित्र बंधनें, भावना.

Sănc'tŭary̆, *n.* (सॅं'क्चुअरि)—a place recognized as holy or inviolable; church or holiest part of it; private retreat, place of protection; a refuge; right of affording immunity; a place of safety. पवित्र ठिकाण, देवालय, देऊळ; देवळांतील गाभारा; आसरा, आश्रयस्थान; आश्रय; अभयदानाचा हक्क, अभयदान; संरक्षणाची,–बचावाची,–जागा. *To violate* or *break s.*, चर्चचा आश्रय केलेल्या माणसाला पकडणें, –मारहाण करणें. *Take, seek, s.*, निर्भयस्थानाचा आश्रय करणें. *Rights of s.*, निर्भयस्थानाचे हक्क.

Sănc'tum, *n.* (सॅं'क्टम्)—a holy place; a person's private retreat or room. पवित्र ठिकाण, खासगी खोली. *S. sanctor'um*, the holy of holies. (जेरुसलेममधील ज्यू देवालयांतील) अत्यंत पवित्र गाभारा.

Săn'ctus, *n.* (सॅं'क्टस्)—the hymn 'Holy, holy, holy' in the Communion. प्रार्थनेंतील एक गीत. *S. bell*, हें गीत गात असतां वाजविली जाणारी घंटा. [L, holy]

Sănd, *n.* (सॅंड)—powder produced by the wearing down of flint, &c.; shoal or submarine bank of sand, (usu. in pl.) grain of sand; (*pl.*) expanse of sand. वाळू, रेती; पुळण; पाण्याखालील वाळूचा बांध; वाळूचा कण; (अने०) वाळवंट. *v. t.* to sprinkle or mix with sand; polish with sand. वाळू पसरणें,–पेरणें; वाळू मिसळणें; वाळूनें–रेतीनें–घासणें; *S.-bag,' n.* a bag filled with sand for use in

fortification or as weapon. वाळूचें पोतें. *v. t. & i.* fortify with *s.* bags, fill & place *s.* bags, hit (person) with *s.* bag. वाळूच्या पोत्यांनीं रक्षण करणें, वाळूचीं पोतीं भरून रचून ठेवणें, वाळूच्या पोत्यानें (एखाद्याला) मारणें. *S. bank,* भाट, भाटी, लाग, वाळूचा (पाण्याखालील) बांध. *S.-bar,* बंदराच्या तोंडाजवळील, नदीच्या मुखाजवळील, वाळूचा-रेतीचा-बांध. *S. bath* वाळू तापवून तिच्या योगानें सारखी आंच देण्याचें पात्र, वालुकासदन. *S. bed,* stratum of sand, वाळूचा थर. *S. box,* वाळूदाणी, वाळूचा सांचा. *S. boy,* वाळूविक्या. *S. fly,* कंबेर, घुंगरटें. *S.-glass,* reversible glass with sand, used in measuring time. वाळूचें घड्याळ. *S.-hill,* dune. वाळूचें टेंकाड, वाळूची रास. *S. martin,* kind nesting in sandy banks. वाळूच्या बांधांत घरटीं करणारे पक्षी. *S.-paper, n.* (लांकूड वगैरे घांसून साफ करण्याचा) वाळूचा कागद. *v. t.* वाळूच्या कागदानें घांसणें. *S.-piper,* kinds of bird haunting open wet sandy places. एक जातीचे पक्षी. *S. spout,* (वाळवंटांत वादळामुळें उत्पन्न झालेला) वाळूचा स्तंभ,-खांब. *S. stone,* rock of compressed sand. वाळूचा खडक. S. *storm,* वाळवंटांतील वाळूचे ढगच्या ढग उठविणारें वादळ. *Built on s.,* unstable. अस्थिर, नाशिवंत. *The ss. are running out,* घटका भरत आली.

Săn'dal, *n.* (सॅन्डल)—sole without uppers attached to the foot by thongs. खडावा, चपल किंवा पायताण (जोड). *San'dalled, a.* वहाणा-खडावा-घातलेला.

Săn'dalwood, *n,* (सॅन्डल्वुड)—kinds of scented wood. चंदन, चंदनाचें झाड. *Black s.,* कृष्णागरु. *Red s.,* रक्तचंदन. *Sandal tree,* मलबारांतील श्वेत चंदनवृक्ष.

Sănd'-blind, *a.* (सॅन्ड्-ब्लाइन्ड)—dim-sighted. मंददृष्टीचा.

Sănd'wich, *n.* (सॅन्ड्विच्)—two slices of bread with meat or other relish between; (Usu. *S.-man,-boy*) man or boy walking street with two advertisement boards hung one before and one behind. (दोन पावुग्रांमध्यें मांस वगैरेचें कुचकर पुरण घालून केलेला) खाद्यपदार्थ; खांद्यावर मागें पुढें दोन जाहिरातीचे फलक घालून जाहिरात करणारा. *v. t.* to insert (thing, statement, etc.) between others of a different kind. मध्येंच (नवीन पदार्थ, गोष्ट) घुसडून देणें. S.*-board,* मागेंपुढें जाहिराती असलेल्या फलकांची जोडी. [*f. Earl of S.,* said to have eaten slices of bread and toast while gaming for 24 hrs]

Sănd'y̆, *a.* (सॅन्डि)—abounding in sand; (of hair) yellowish-red, (person) with such hair. वालुकामय, रेतीचा, रेताड. तांबूस-पिवळे अशा केंसांचा, स्कॉचमन.

Sane, *a.* (सेन्)—of sound mind; not mad; (of views) moderate, sensible. शुद्धीवर असलेला, हुशार; नेमस्त, शहाणा, समजुतदार.*-ly, adv.*

Sang, *pa. t.* of Sing.

Sang-froid, *n.* (सॉंफ्वा)—coolness in danger or difficulty. मनाची शांति, संकटाच्या वेळची धीरोदात्तता, मनःशांतता. [F]

Săngwifica'tion, *n.* (सॅंग्विफिके'शन्)—formation of, conversion of, food into blood. अन्नरसाचें रक्त करणें, रक्तोत्पादन, रक्तीकरण. [L. sanguis, blood]

Săng'uĭnary̆, *a.* (सॅंग्विनरि)—attended by or delighting in bloodshed. रक्तपातानें भरलेला; रक्तप्रिय, हिंस्र, खुनी, खुनशी.

Săng'uĭne, *a.* (सॅंग्विन्)—habitually hopeful, optimistic, anticipating the best; bright and florid, blood-red; of blood. आशापूर्ण, उत्साही, अवसानी; लाल, लालभडक, लालबुंद; रक्ताचा. *n.* crayon coloured red with iron oxide; a drawing in red chalk. रंगाची तांबडी कांडी; तांबड्या खडूनें काढलेलें रेखाचित्र. *v. t.* (*poet.*) to stain with blood; stain red. रक्ताचे डाग पाडणें, रक्त शिंपडणें; लाल डाग पाडणें. *Sang'uinely, adv.* उमेदीनें, आशेनें. *-ness, n.*

Sănguĭn'eous, *a.* (सॅंग्वि'निअस्)—of blood; of full-blooded temperament; blood-coloured, of red colour. रक्ताचा; पूर्ण उमेद असलेला; रक्तासारखा लालभडक.

Săn'hĕdrĭm, *n.* (सॅ'निड्रिम्)—supreme council and court of justice in ancient Jerusalem, of 71 members. (प्राचीन) यहुदी लोकांची वरिष्ठ सभा.

Săn'ĭtary̆, *n.* (सॅ'निटरि)—of the conditions that affect health, esp. with regard to dirt and infection. आरोग्यरक्षणविषयक, आरोग्यखात्याचा. *Sanitar'ian, n.& a., San'itariness, n.*

Sănĭtā'tion, *n.* (सॅनिटे'शन्)—improving of sanitary conditions, hygiene. आरोग्यरक्षण, आरोग्यवर्धन, आरोग्य, आरोग्यविज्ञान.

Săn'ĭty̆, *n.* (सॅ'निटि)—saneness, mental health; tendency to avoid extreme views. सावधपणा, शुद्धि, शहाणपण, नेमस्तपणा, नियमितपणा.

Sank, *pa. t.* of Sink.

Săns, *prep.* (सॅन्झ्)—(arch.) without. शिवाय. *Sans-culotte',* (breechless) republican of lower classes in French Revolution. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळचा खालच्या वर्गांतील लोकशाहीमतवादी.

Săn'ta Claus', *n.* (सॅन्टा क्लॉ'झ्)—personage who fills children's stockings with Christmas presents by night. लहान मुलांना (नकळत रात्रीच्या वेळीं) ख्रिस्मसच्या देणग्या देणारी वृद्ध पूज्य व्यक्ति, आजोबा.

Săp, *n.* (सॅप्)—the vital juice of plants; (*fig.*) vitality; (also s.-wood) soft outer layers of wood. वनस्पतीचा जीवनरस, रस, अर्क; सत्व, जीव, दम; लांकडाचा बाह्य नरम थर, साल, त्वचा. *v. t.* to drain of sap; exhaust the vigour of; remove sapwood from (log). जीवनरस काढून-शोषून-घेणें; ज्या जोर,-दम,-नाहींसा करणें; (लांकडाच्या ओंडक्याची) बाह्य त्वचा-साल काढणें. *Sap-head,* (U. S.) foolish person. मूर्ख मनुष्य. *S.-less,* esp. an effete.

निर्वीर्य, बलहीन. *Sa'pling*, रोपटें, लहान झाड; (*fig.*) तरुण, जवान. *S.-green*, हिरवट रंग. *Sa'ppy*, *a.* full of sap. जीवनरसपूर्ण, दमदार. *Sap-ful,-less, aa.*; *sapp'iness, n.*

Săp, *n.* (सॅप्)—digging of siege-trenches; covered siege-trench; (sl.) studious or hard-working person; (*fig.*) slow undermining of belief, resolution, etc. वेढ्याच्चे ठिकाणीं खंदक खणणें; आच्छादित खंदक; अभ्यासू किंवा कष्टाळू मनुष्य; हळू हळू नाश, विध्वंस, सुरुंग लावणें. *v. t. &i.* to approach (place) by sap; dig siege, trenches; undermine (wall etc.); destroy (faith) insiduously; (sl.) work hard at books, etc. खंदकावरून (जवळ) जाणें, खंदक खणणें; सुरुंग लावून उडविणें; नाश करणें; विश्वासघातानें-न कळत-(विश्वास, श्रद्धा, इ०) नाहींसें करणें; मेहनत करणें. *Science was sapping old beliefs*, शास्त्रीय ज्ञानानें जुन्या समजुतींचा ऱ्हास होऊं लागला. *Sapp'er, n.* (esp.) private of the Royal Engineers. खंदक खोदणारा. *S. and miner*, किल्ले बांधणें व सुरुंग लावणें या कामावरील (ब्रिटिश) शिपाई.

Săp'an-wood,-pp-, *n.* (सॅपन्‌वुड्)—wood yielding red or yellow dye from tropical Asia and the Indian Archipelago. पतंगाचें लाकूड, पतंग.

Săp'id, *a.* (सॅपिड्)—having (esp. agreeable) flavour, savoury; not tasteless; (of talk, writing) not uninteresting. चवदार, रुचकर, स्वादिष्ट; चित्तवेधक, मन आकर्षणारें. *Sapid'ity, n.* रुचि, स्वाद, चव. [L. *sapidus*, tasty]

Sā'pience, *n.* (सेपियन्स्,से-)—wisdom; knowledge, sageness. शहाणपणा; ज्ञान, शहाणपणाचा आव,-चें ढोंग.

Sa'pient, *a.* (सेपियन्ट्,सॅ-)—aping wisdom, like a wiseacre, would-be wise. शहाणपणा मिरवणारा, चतुर, शहाणा. *Sapien'tial, a.* of wisdom. शहाणपणाचा.

Săpŏnā'ceous, *a.* (सॅपनेशस्)—soapy, of, like, containing soap, साबणासारखा, साबणाचा, फेंसाळ.

Săpph'ic, *a. &n.* (सॅफिक्)—of Sappho (Lesbian lyric poetess, 600 B.C.). सॅफो नामक कवयित्रीचें, -संबंधीं. *S.-stanza,-verse*, सॅफोनें केलेली ग्रीक कविता. *S. vice*, *sapphism, n.* unnatural sexual relations between women. स्त्रियांचा आपापसांतील अनैसर्गिक संभोग.

Săpph'ire, *n.* (सॅफायर्)—a transparent blue precious-stone, a rich blue colour; kinds of humming bird. इंद्रनील मणि, नील (रंग); गाणारा पक्षी. *a.* of *s.* blue. नीलवर्णाचा. *Sapphi'rine, a.*

Săp'r(o),-(सॅप्रो)—comb. form of Gk *sapros*, rotten, in scientific terms; *saprae'mia*, septic poisoning. रक्त दूषविणारें, रक्ताचा पू बनविणारें-विष, पूयजन्य ताप. *Saproge'nic*, कुजविणारा, कुजण्यामुळें झालेला. *Sap'rophile, a. & n.* कुजलेल्या पदार्थांतला (जंतू). *-phyte, n.* कुजलेल्या खतावर-खतामुळें-वाढणारी वनस्पति, -झाड.

Săratō'ga, *n.* (सॅरटोगा)—lady's large travelling trunk. स्त्रियांची मोठी प्रवासी पेटी.

Sarc'ăsm, *n.* (सार्‌कॅझम्)—a taunt; bitter or wounding remark. टोमणा, टोला; तिखट किंवा वर्मी भाषण.

Sarcăs'tic, *a.* (सर्‌कॅस्टिक्)—containing sarcasm; bitterly satirical. टोमण्याचा, वर्मी; तिखट, झोंबणारा. *-tically, adv.*

Sarcō'ma, *n.* (सार्कोमा)—(pl.-ata), tumour of embryonic connective tissue. आवाळूं, गाळूक, टेंगूळ.

Sarcŏph'ăgŭs, *n.* (सार्कॉफगस्)—(pl.-gi), a stone coffin, a stone chest for receiving a dead body. प्रेताची दगडी पेटी.

Sarc'ous, *a.* (सार्कस्)—consisting of flesh or muscle. मांसल, स्नायुयुक्त. [Gk *sarkos*, flesh]

Sard, *n.* (सार्ड्)—a variety of cornelian. आरक्तक, मौल्यवान रत्न.

Sardŏn'ic, *a.* (सर्डॉनिक्)—grimly jocular; full of bitter mockery. कटु थट्टेचा; छद्मी, उपरोधिक.*-ically, adv.*

Sărd'onўx, *n.* (सार्डोनिक्स्)—onyx in which layers alternate with sard. गोमेद, गोमेदक.

Sărgăss'ō, *n.* (सार्गॅसो)—(*pl.-os*), kinds of floating sea-weed. तरंगणारी समुद्र-वनस्पति; गवत.

Sarsaparill'a *n.* (सार्सपरिला)—kinds of smilax; drug made from their roots. एक प्रकारची वनस्पति, तिच्या मुळापासून केलेलें काषाय,-रक्तशुद्धि करणारें औषध.

Sārs'enĕt, sar'c-, *n.* (सार्सनिट्)—soft silk fabric used in lining. (अस्तरासाठीं) तलम रेशमी कापड.

Sārtŏr'ial, *a.* (सार्टॉरिअल्)-of tailors or clothes. शिंप्याचा, शिवणकामाचा, कपड्यांविषयीं.

Săsh, *n.* (सॅश्)—a scarf worn round the waist as part of uniform or as an ornament; the frame holding window-glass usu. made to slide up and down in grooves. कमरबंद, कमरपट्टा; खिडकीची (खालीं वर करितां येणारी) तावदानी चौकट. *Sash'ed, a.*

Săss'afras, *n.* (सॅसॅफ्रस्)-small N. Amer. tree with medicinal bark. (उ. अमेरिकें०) लहान औषधी सालीचें झाड.

Sat, *pa. t.* of Sit.

Sā'tan, *n.* (सेटन्)—personal name for the Devil. सैतान. *Sa'tanism, n.* सैतानीपणा, हेतुपूर्वक दुष्टपणा.

Satăn'ic, *a.* (सटॅनिक्)—diabolical. सैतानी, भयंकर, अतिदुष्ट. *His s. majesty*, satan. सैतानशहा. *S.* school, (बायरन, शेले वगैरे) इंग्लिश धर्मश्रद्धाशून्य कवींचें मंडळ; धर्मश्रद्धाशून्य लेखकवर्ग.

Sătch'el, *n.* (सॅचेल)—a small bag of leather; a school bag. जुगदान, पिशवी. *Satch'elled, a.*

Sāte, *v. t.* (सेट्)—to gratify to the full; to cloy, to surfeit. परितृप्त करणें; वीट आणणें, विटवणें, पुरेपुरेसें होणें. *Sated with*, च्या अतिरेकानें विटलेला. *Sate'less, a.* (poet.) अतृप्त.

Sateen', *n.* (सटीन्)—glossy cotton or woollen fabric. झगझगीत सुती किंवा रेशमी कापड.

Săt'ellite, *n.* (सॅ'टेलाइट्)-hanger-on, dependant; (Astron.) planet revolving round another. लाळघोट्या, बगलबच्चा, आश्रित ; उपग्रह. *Satellitic, a.*

Sāti'āte, *v. t.* (सेशि'एट्)-to feed to the full. परितृप्त करणें. *a.* (से'श्यट) अतितृप्त, विटलेला. *Sa'tiable, a.* (rare), तृप्त होण्यासारखा ; *satia'tion, n.*

Sati'etў, *n.* (सटा'यिटि)—glutted state, feeling of having had too much. तृप्तता, वीट, परितृप्ति.

Săt'in, *n.* (सॅ'टिन्)-silk fabric with glossy surface on one side. एक जातीचें रेशमी कापड. *a.* smooth as satin. सॅटिनसारखें मऊ. *v. t.* to give glossy surface to (paper). (सॅटिनसारखा) तुळतुळीत करणें. *Denmark s.*, स्त्रियांच्या जोड्यांसाठीं वापरण्याचें मऊ सुती कापड. *White s.*, एक जातीचें झाड, वनस्पति ; एक जातीचा पतंग. *S. finish*, चांदीवरील झिलई. *S. paper*, मऊ गुळगुळीत (लिहिण्याचा) कागद. *Sat'inet,—ette*, पातळ सादीनसारखें कापड. *Sat'iny, a.*

Săt'in-wood, *n.* (सॅ'टिन्वुड्)—choice wood of a tropical tree. हेद, हेदू, हेदरू (याच्या पेट्या करतात.)

Săt'ire, *n.* (सॅ'टायर्)—composition in which vice or folly is held up to ridicule; this branch of literature; use of ridicule, sarcasm or irony to expose folly; thing that brings ridicule upon something. औपरोधिक किंवा दुर्गुणनिंदात्मक लेख किंवा काव्य ; औपरोधिक वाङ्मय ; थट्टा, निंदा, उपहास.

Sati'rĭc, *a.* (सॅटि'रिक्)—of or containing satire, sarcastic, bitter. औपरोधिक, उपहासात्मक, निंदात्मक, थट्टेचा.—*al, a.* औपरोधिक, निंदापर ; निंदाप्रचुर-औपरोधिक-लेख लिहिणारा,-वक्ता.

Săt'irĭst, *n.* (सॅ'टिरिस्ट्)—a writer of satires, one who satirizes. उपहासात्मक लेख लिहिणारा, औपरोधिक लेखक,-कवि,-वक्ता.

Săt'irize, *v. t.* (सॅटि'राइझ्)—to assail with satire, censure in a satiric manner. औपरोधिक लेखांचा भडिमार करणें.

Sătĭsfăc'tion, *n.* (सॅटिस्फॅ'क्शन्)—satisfying or being satisfied, thing that satisfies desire or gratifies feeling; gratification of desire; payment of debt; atonement; amends for injury. इच्छा पुरी करणें,-होणें ; समाधानाची,-इच्छा तृप्ति करणारी,-गोष्ट ; समाधान, संतोष ; (कर्जाची) फेड ; प्रायश्चित्त ; (ख्रिस्तानें घेतलेलें) देहान्त प्रायश्चित्त ; मोबदला, भरपाई.

Sătĭsfăc'torў, *a.* (सॅटिस्फॅ'क्टरि)—causing satisfaction; adequate. समाधानकारक, मनाजोगा ; योग्य, संशयनिवर्तक.-*torily, adv.* समाधानकारक रीतीनें ; खात्री होईल अशा रीतीनें.—*toriness, n.* समाधानकारकता.

Săt'ĭsfў, *v. t. & i.* (सॅ'टिस्फाय्)—to meet the wishes of, to content; be accepted as adequate; to pay; to fulfil, to comply with; to still the cravings of; to convince; to be sufficient; (of Christ) make atonement for sins of men. (मनोरथ) पूर्ण करणें ; तृप्त करणें ; पूर्णता होणें,-पावणें ; (कर्जाची) फेड करणें ; (अट) पुरी करणें ; समाधान करणें ; खात्री करणें ; संशय फेडणें ; पुरा किंवा भरपूर असणें ; (लोकांच्या पापांसाठीं) देहान्त प्रायश्चित्त घेणें, पापनिष्कृति करणें. *Rest satisfied*, make or take no further demands or steps. एवढ्यानेंच तृप्त व्हा, स्वस्थ रहा, अधिक मागणी करूं नका. *To satisfy the examiners*, at univ., receive pass without honours. परीक्षेंत (तिसऱ्या वर्गांत) पास होणें. *Satisfiable, a.*; *Satisfying, a.*

Săt'rap, *n.* (सॅ'ट्रप्)—ancient Persian provincial governor; modern subordinate ruler (with implication of tyranny or luxury). प्राचीन पर्शियांतील इलाखाधिपति ; (ऐषआरामांत दिवस घालवणारा) जुलमी गव्हर्नर,-अधिकारी,-राजा.

Săt'ūrate, *v. t.* (सॅ'च्युरेट्)—to fill with moisture, soak, steep; to imbue with or steep in learning, traditions, &c. पुरा भिजविणें, उमलवणें, संपृक्त करणें ; मुरणें, गढून जाणें. *Sat'urated, pa. p.* (of colour) free from admixture of white, full, rich. गर्द, पूर्ण (रंग), संपृक्त. *Sat'urable, a. Satura'tion, n.* पुरा भरणें, संपृक्त करणें, (जलादि द्रवांत एखादा क्षार) शक्य तितका विरघळणें.

Săt'ŭrday, *n.* (सॅ'टर्डे)—the seventh day of the week, the day of the Jewish sabbath. मंदवासर, शनिवार. *S.-to-Monday*, the week-end. आठवड्याच्या शेवटची रजा,-रजेचे दिवस.

Săt'ŭrn, *n.* (सॅ'टर्न्)—Roman god of agriculture; a planet. रोममधील शेतकीची देवता ; शनि, शनैश्चर.

Săturnā'lia, *n. pl.* (सॅटर्ने'लिआ)—Roman festival of Saturn in December (S-); scene or time of wild revelry. रोमन लोकांचा शनि-देवाचा उत्सव ; त्या उत्सवांतील चैनबाजीचा देखावा किंवा समय, धांगडधिंगा, शिमगा. *-lian, a.*

Saturn'ian, *a.* (सटर्'निअन्)—of Saturn. शनीचा, शनिग्रहाचा. *n.* an inhabitant of Saturn. शनिग्रहावरील रहिवासी. *S. verse*, a native Roman verse. प्राचीन रोमन छंद.

Satur'nic, *a.* (सट'र्निक्)—(path.) affected with lead poisoning. शीस-दोष झालेला.

Săt'ŭrnine, *a.* (सॅ'टर्नाइन्)—of a sluggish gloomy temperament, morose, grave. जड, मंद, उदासीन.

Săt'yr, *n.* (सॅ'टर्)—one of the half-human half-bestial woodland beings in the train of Bacchus; a lustful or beastly-minded man; (rare) orangutan. (अर्धपशु,-अर्धनर अशा प्राचीन ग्रीक किंवा रोमन) वनदेवतांपैकीं एक ; प्रबळ कामेच्छू किंवा पशुतुल्य मनुष्य ; नर-वानर.

Sauce, *n.* (सॉस्)—a liquid added to food to give relish, a condiment; (fig.) something that adds piquancy; a solution of salt and other ingredients used in some manufacturing processes; sauciness, impertinent speech, cheek; (U. S.) compote of fruit. चटणी, कोशिंबीर, तोंडीलावणें, मीठतिखट, लज्जत आणणारी गोष्ट ; मालमसाला, मसाला ; उद्धटपणा, उर्मटपणा, ताठ भाषण, औद्धत्य ; फळांचें आंसव,-सरबत. *v. t.* to add sauce to; (*fig.*) make piquant; speak saucily

to. मीठतिखट लावणें, मसाला घालणें, चवदार करणें; झणझणीत-चुरचुरीत-करणें; उर्मटपणानें बोलणें. *Hunger is the best s.*, भूक हेंच खरें तोंडीलावणें आहे, भुकेला कोंडा. *To serve with the same s.*, जशास तसें करणें, -वागणें. *Serve for s.*, कोरड्यास होणें,-उपयोगी पडणें. *S. boat*, तोंडीलावणें,-चटणी,-वाढण्याचें भांडें. *S. box*, an impudent person. उद्धट मनुष्य. *S. pan* cooking pot with lid and handle. कढई.

Sau'cer, *n.* (सॉ'सर्)—a curved plate placed under a cup or flower-pot. बशी, थाळें. *Saucer-eyed*, पटपटीत डोळ्यांचा.

Sau'cy̆, *a.* (सॉ'सि)—impudent to superiors, cheeky; (*sl.*) smart. उद्धट, टाकून बोलणारा; ऐटीचा, तोऱ्याचा, भपकेबाज. *-cily, adv.*; *-ciness, n.* उर्मटपणा, तोरा, गमजा.

Saun'ter, *v. i.* (सॉ'न्टर्)—to walk in a leisurely way, to wander or stroll about idly, (also fig.). भटकणें, रमत रमत फिरणें; चैनींत दवडणें,-काल घालविणें. *n.* a leisurely gait. रमत रमत चालणें, चैनीत भटकणें. *Saun'teringly, adv. Saun'terer, n.*

Sau'sage, *n.* (सॉ'सिज्)—minced meat enclosed in case of thin membrane; (army sl.) kite-balloon. कबाब, किंवा कुल्या चासारखें पक्वान्न; टेहेळणीचें लष्करी विमान.

Sauterne', *n.* (सोटॅर्न्)—kinds of sweet white French wine. पांढरी फ्रेंच दारू,-मद्य.

Săv'age, *a.* (सॅ'व्हिज्)—uncivilized; in primitive state; fierce, cruel; (colloq.) angry; (Herald. of human figure) naked. अशिक्षित; जंगली, रानटी; क्रूर, निर्दय; रागीट, क्रुद्ध; नग्न (मनुष्याकृति). *n.* a member of savage tribe esp. of one living by hunting and fishing; brutal or barbarous person. रानटी मनुष्य, जंगली, रानटी स्थितींतील मनुष्य; नांगहृदयी, राक्षस. *v. t.* (of horse, etc.) attack and bite or trample (person). चावणें, पायांखालीं तुडविणें, लाथाडणें. *Sav'agery, n.* savage condition or state. रानटीपणा, क्रूरपणा, रानटी स्थिति. *Sav'agely, adv. Sav'ageness, n.* रानटीपणा, जंगलीपणा, क्रूरपणा.

Savănn'ah, *n.* (सव्हॅ'ना)—a tree-less plain, great tract of meadow-like land, esp. in tropical America. (मध्य अमेरिकेंतील) गवताळ रान,-कुरणाचा भाग.

Săv'ănt, *n.* (सॅ'व्हाद्)—a man of learning, esp. a distinguished scientist. विद्वान मनुष्य, पंडित, शास्त्रज्ञ.

Sāve, *v. t. & i.* (सेव्ह्)—to rescue or preserve from danger or harm; to keep for future use, husband, reserve; to lay (money) by; bring about the spiritual salvation of; reduce requisite amount of; (Football, etc.) avert a threatened score; avoid losing, be in time for, succeed in catching; make reservation; relieve from need of expending (money, trouble, etc.) or from exposure to (annoyance, etc.). बचाव किंवा रक्षण करणें, वाचवणें; शिल्लक टाकणें, राखून ठेवणें; (पैसा) शिल्लक ठेवणें; तारणें, उद्धार करणें, नरकापासून-पापापासून-वांचवणें; उरवणें, बचत करणें; (खेळांत मोठा डाव) होऊं न देणें, प्रसंग टाळणें; गांठणें, पकडणें, (चें) टिपण साधणें; कट,-सबब,-ठेवणें; सोडवणें, निवारणें. *n.* an act of saving in football, etc. (फुटबॉल वगैरे खेळांत) डाव बचावणें, पडलेली बाजू कांहींशी सावरणें. ऐनवेळेचा बचाव. *prep.* except, but. शिवाय, खेरीज, वांचून. *Conj.* but. शिवाय. *S. me* or *God s. me from my friends*, वेळीअवेळीं अतिस्नेहामुळें सतावणाऱ्या मित्रांपासून मला सोडव! *S. us!*, (आश्चर्यदर्शक उद्गार). *To s. the situation*, संकट टाळणें, वेळ मारून नेणें, बाजू सावरणें. *To s. appearances*, वरकरणी चहाणा करणें (वाईट स्थिति लपविण्याकरितां). *To s. one's breath*, मौन धरणें, गप बसणें. *S. up*, काटकसर करून शिल्लक टाकणें. *You may s. your pains* or *trouble*, श्रम-तसदी-घेऊं नका,-घेणें व्यर्थ आहे. *A stitch in time saves nine*, वेळेवर एक टांका मारला तर पुढचे नऊ टांके तो वांचवितो. *Shall we s. the tide*, भरती असेपर्यंत आपण पोंचूं काय. *Sav'able, a.*, *Sav'er, n.*

Sā'vĭng, *a.* (से'व्हिंग)—(esp.) making a reservation or exception; redeeming. मितव्ययी, हात राखून खर्च करणारा; तारणारा, उद्धारकर्ता, रक्षण करणारा. *n.* (*esp.*) something saved; (*pl.*) an amount of money put by, small sums accumulated by economy. शिल्लक ठेवलेली वस्तु; (अने०) शिल्लक टाकलेले पैसे. *Sa'vings-bank*, शिल्की पैसे सुरक्षित ठेवण्याची (पोटाची) पेढी,-बँक.

Săv'eloy, *n.* (सॅ'व्हलॉय)—a highly-seasoned dried sausage. उत्तम मांसान्न,-पक्वान्न.

Sā'viour, *n.* (से'व्ह्यर्)—a deliverer, a redeemer. तारक, त्राता, रक्षणकर्ता. The Saviour, येशू ख्रिस्त.

Savoir faire, *n.* (सॅ'व्ह्वॉर् फेअर्)—quickness to see and do the right thing; address, tack. प्रत्युत्पन्नमति; कौशल्य, हजरजबाबीपणा. [F]

Sā'vorȳ, *n.* (से'व्हरि)—aromatic kitchen herb. एक प्रकारची स्वादिष्ट वनस्पति;-भाजीपाला.

Sā'vour, *n.* (से'व्हर्)—characteristic taste or smell; admixture or suggestion of some quality. स्वाद, रुचि; चव, विशेष गुण. *v. i.* to have a particular taste; to suggest the presence of. विशेष रुचि असणें; सुचक दाखविणें.

Sā'vourȳ, *a.* (से'व्हरि)—having a good savour, with appetizing taste or smell. स्वादिष्ट, खमंग, रुचकर, चवदार. *n.* मिष्टान्न, पाचक पदार्थ.

Savoy', *n.* (सव्हॉ'य)—a kind of cabbage. एक कोबीसारखा कंद.

Saw, *pa. t.* of See.

Saw, *n.* (सॉ)—an old saying, a maxim. म्हण, न्याय, आहाणा.

Saw, *n.* (सॉ)—an implement with toothed edge for cutting wood, etc.; (zool.) serrated organ or part. करवत, करवती, आरी; करवतीसारखे दांते

असलेला अवयव,-भाग. *v. t. & i.* (*pa. p. sawn, sawed*), to cut or make with saw ; make to-and -fro motion like a hand-saw ; (Book-bind.) make incisions to receive binding-bands in (gathered sheets). करवतीनें कापणें,-चिरणें, चिरकाम करणें ; (हातकरवतीसारखें) पुढें-मागें-जाणें,-सरकणें ; (पुस्तकाचीं पानें बांधतांना त्यांच्या पाठीला) खाचें पाडणें. *Annular, crown, cylinder, s.*, वाटोळें भोंक पाडण्याचें यंत्र,-गिरमिट. *Band s.*, पट्ट्यासारखी चालणारी करवत. *Bow s.*, धनुष्याकार-वक्र-करवत. *Circular s.*, वर्तुलाकार करवत. *Cross-cut s.*, मोपे-वाद-कापण्याची करवत. *Fret s.*, नकशी कापण्याची करवत. *Hack s.*, लोखंड वगैरे धातु कापण्याची करवत. *Hand s.*, हातकरवत. *Jig-s.*, frame-s. worked mechanically in connection with table holding the wood etc. यंत्र -करवत, यांत्रिक करवत. *Jig. s.-puzzle*, यांत्रिक करवतीनें कापलेले निरनिराळे तुकडे जोडण्याचें कोडें. *Pit s.*, एक इसम खोलांत व एक लांकडावर घसून ओढण्याची चिरकामी करवत. *S. bones*, (*sl.*) a surgeon. शस्त्रक्रिया करणारा (डॉक्टर). *S. buck, s.* horse, कापावयाचें लांकूड धरणारा घोडा,-ठोकळा. *S.-doctor*, करवतीचे दांते काढण्याचें यंत्र. *S.-dust*, (चिरकामांतील) भूस, भुसा. *To let the s.-dust out of*, (*fig.*) चा पोकळपणा बाहेर काढणें,-उघडा करणें. *S.-fish*, असिपत्र-मत्स्य, करवतीच्या पात्यासारखी सोंड असलेला मासा. *S.-fly*, क्रकचमक्षिका. *S.-frame,-gate*, करवतीची (लांकडी) मूठ. *S.-horse*, (चिरकामाकरितां) लांकूड ठेवण्याचा घोडा, पायखोडा. *S.-mill*, लांकडाच्या चिरकामाची गिरणी. *S.-pit*, pit in which lower of two men working two-handed saw stands. दोन चिरकाम्यांपैकीं खालच्या इसमासाठीं सखल जागेंत बसण्याचा खड्डा,-सखल जागा. *S.-set, S.-wrest*, करवतीचे दांते घासण्याचें यंत्र,-साधन. *S.-wort*, करवती -पानाचें झाड (यापासून पिवळा रंग काढतात). *S.-wrack*, करवतधारी समुद्रवेल,-वनस्पति.

Saw'der, *n.* (सॉ'डर्)—*Soft s.*, compliments, flattering speeches. स्तुतिविषयक, प्रशंसापर भाषणें.

Saw'yer, *n.* (सॉ'यर्)—a workman who saws timber ; (*U. S.*) an uprooted tree floating or stranded in river ; name of a New Zealand beetle. चिरकाम्या, करवत्या ; नदींतून वाहणारा-अडकून राहिलेला-उपळलेला वृक्ष ; न्यूझिलंडमधील एक किडा.

Sa'xatile, *a.* (सॅ'क्सटिल्)—(nat. hist.) living, growing, on or among rocks. खडकांत राहणारा,-वाढणारा.

Săxe, *n.* (सॅक्स)—a kind of photographic paper ; a shade of dull blue. एक जातीचा (फोटोग्रफीच्या उपयोगी) कागद ; गर्द निळ्या रंगाची छटा.

Săx'ifrage, *n.* (सॅ'क्सिफ्रेज्)—kinds of Alpine or rock plant. एक खडकावर वाढणारें झाड,-वनस्पति.

Săx'on, *n.* (सॅ'क्सन्)—member, language, of a Teutonic people by whom parts of England were occupied in 5th-6th cc. ; a native of Saxony ; an Anglo-saxon. (उत्तर जर्मनींतून इंग्लंडवर स्वारी करणाऱ्यांपैकीं) सॅक्सन मनुष्य, त्याची भाषा ; सॅक्सनी प्रांताचा रहिवासी ; अँग्लोसॅक्सन मनुष्य *a.* of the Saxons ; in Saxon. सॅक्सनलोकांचा, सॅक्सन भाषेंतील.

Săx'ony, *n.* (सॅ'क्सनि)—a fine wool or cloth made of it. उत्तम प्रकारची लोंकर,-लोंकरी कापड. [f. *S.* in Germany]

Săx'ophōne, *n.* (सॅ'क्साफोन्)—a powerful keyed brass reed instrument with large inverted bell. एक मोठ्या आवाजाचें पितळी वाद्य.

Say, *v. t. & i.* (से)—(*pa. t. & pa. p. said* सेड), to utter or recite in speaking voice ; to state, promise ; to speak, tell, express ; adduce, plead ; repeat, rehearse ; form and give opinion or decision as to ; select as example, assume, as near enough. म्हणणें, बोलून दाखविणें ; सांगणें, वचन देणें ; बोलणें, शब्दांनीं व्यक्त करणें ; पुढें मांडणें,-आणणें ; म्हणून दाखविणें, पुन्हां म्हणणें ; मत सांगणें, अभिप्राय-मत-देणें, समजणें, कल्पना करणें. *n.* what one has to say, speech, statement ; opportunity of saying. बोलणें, भाषण, बोलण्याची संधि, मत. *To s. the word*, तोंडावाटे (हुकमाचा) शब्द काढणें, इच्छा व्यक्त करणें. *S. no more*, बोलणें आटप ; गप बस. *S. a good word for*, ची तारीफ-प्रशंसा-करणें. *S. no, yes*, म्हणणें नाकारणें,-स्वीकारणें. *S. out*, express fully or candidly. पूर्णपणें किंवा मोकळ्या मनानें-स्पष्टपणें-बोलून दाखविणें. *S.* one *nay*, ला नाहीं म्हणणें,-नकार देणें. *Had said his s.*, त्याला म्हणायचें तें त्यानें सर्व म्हटलें, त्याचें बोलणें संपलें. *To s. lesson.*, शिक्षकाला धडा म्हणून दाखविणें. *That is to s.*, म्हणजे, दुसऱ्या शब्दांत (बोलावयाचें तर). *Saying and doing*, speech and action. बोलणें (शब्द) आणि कृति (वागणें). *They say, it is said*, असें म्हणतात कीं. *It goes without saying*, तें अगदीं स्पष्ट आहे,-सांगण्याची आवश्यकता नाहीं. *You may well s. so.*, तुम्ही असें खुशाल म्हणावें,-असें म्हणणें रास्तच आहे,-होईल. *Let him have his s.*, त्याला बोलण्याची संधि मिळावी, त्याचें मत कळूं दे.

Say'ing, *n.* (से'इंग)—(*esp.*) a common remark, a maxim. म्हण, गोष्ट, बोलणें, म्हणणें, आहाणा.

Scăb, *n.* (स्कॅब्)—a crust formed over a sore in healing ; kinds of skin-disease and plant-disease ; black-leg. खपली ; खवडा, कोशेरा ; संपांत सामील न होणारा कामगार, संपवाल्याच्या जागीं काम करणारा मजूर. *v. i.* to form scab, heal over. खपली धरणें ;-पडणें. *Scabb'y, a.* खवड्या, खपल्या धरलेला.

Scăbb'ard, *n.* (स्कॅ'बर्ड)—a sheath of sword, &c. म्यान, कोप. *To fling, throw away, the s.*, तलवार म्यानाबाहेर काढणें, एखाद्या गोष्टीचा सोक्षमोक्ष करण्याचा विडा उचलणें. *S.-fish*, a silvery-white sea-fish shaped like sword-s. (तलवारीच्या म्यानाच्या आकारासारखा) चकचकीत पांढरा मासा, कोपमत्स्य.

Scā'bies, *n.* (स्के'बिईझ्)—the itch. खरूज, खवडे. [L. *scabere*, scratch]

Scā'bious, *a.* (स्के'बिअस्)—scabby, affected with mange, itch, etc. खवड्या ; खरूज-नायटा-झालेला.

n. kinds of wild and cultivated flowering herb. (खरजीवर रामबाण) औषधी वनस्पति.

Scă'brous, *a.* (स्कॅब्रस्)—(Zool., Bot., etc.) with rough surface, scurfy; (Literature; of subject, situation, etc.) requiring tactful treatment; hard to handle with decency. खडबडीत (अंगाचा), खरखरीत, खरलोमश (उ० खरवतीचा पाला); (विषय, परिस्थिति) नाजुक, खुबीनें रंगविण्या-मिटविण्याजोगी. *-ness, n.*

Scăff'old, *n.* (स्कॅफॉल्ड्)—the temporary platform supported on poles for the use ot builders; the platform on which a criminal is executed. माळा, परात, परांची, सांगाडा; फांस. *v. t.* to attach scaffolding to (house). (घराला) परांची-पराती-बांधणें. *The s.*, फांसावर लटकणें, फांशी.

Scăff'ōlding, *n.* (स्कॅफोल्डिंग्)—a structure of poles and planks providing builders with platforms; timber for it. परांची, माचा, परात; परातीचें लाकूड-सामान.

Scaglio'la, *n.* (स्कॅल्यो'ला)—Italian plaster-work imitating stone. (दगडी कामासारखें दिसणारें) इटालिअन गिलाव्याचें काम.

Scāl'able, *a.* (स्के'लबल्)—that may be scaled or climbed. चढण्यासारखा, चढून जातां येण्याजोगा.

Scalăr'iform, *a.* (स्कलॅ'रिफार्म्)—(bot., zool.) ladder-shaped. निःश्रेण्याकार; पृष्ठभागावरच्या आडव्या धारा रेघा दाखविणाऱ्या (रसनलिका किंवा शिरा) (उ० सुरू, गौरीचे केस).

Scald, *v. t.* (स्काल्ड)—to injure or pain with hot liquid; to heat (milk) to near boiling-point; cleanse by rinsing with boiling water. भाजणें, पोळणें; कढवणें, उकळी फुटेपर्यंत तापवणें; उकळत्या पाण्यानें धुवून साफ करणें. *n.* injury to skin by scalding. अंग पोळणें, भाजणें, चरका. *Scalding tears,* (अति दुःखाचे) ऊन अश्रू. *Scalded cream,* चांगल्या तापवलेल्या दुधावरची साय. *Scald-head,* चाई, उंदरी (रोग).

Scāle, *n.* (स्केल्)—a thin horny overlapping plate protecting the skin of fishes, &c.; a thin plate or flake,scale; (without a or pl.) tarter on teeth, incrustation etc. (माशाचा वगैरे) खवला; पापुद्रा; उकीरवळी, कवंद, टरफल; कोशेटा; बुरा, बुरी, बुरशी *v. t. & i.* to remove scales or scale from; (of skin, etc.) form or come off in scales. खवले,-खवला,-काढणें; (वाटाणे वगैरे) सोलणें; दांत घुणें; बुरशी काढणें; गम काढणें; पापुद्रा,-खपली इ० वगणें,-निघणें. *S. armour,* कातड्यावर धातूचे खवले जोडलेलें चिलखत. *S.-board,* (आरशाच्या वगैरे पाठचा) पातळ पुठ्ठा. *S. work,* overlapping arrangement. एकमेकांवर चढत जाणारी-सलग-रचना. *Scal'y, Scaleless, aa.*; *Scal'iness, n.*

Scāle, *n.* (स्केल्)—a pan of weighing balance; (pl.) a simple balance on weighing instrument; *the Ss.* (*Astr. pl.*) Libra. तराजूचें पारडें, परडें; (अने०) तराजू, तागडी, काटा; तूळ रास. *v. t.* to weigh in scales (rare); (of thing weighed) show specified weight. (कांट्यांत घालून) वजन करणें; (अमूक) वजन भरणें. *To throw sword into s.,* शस्त्रास्त्रांच्या बळावर मागणी करणें,-हक्क सांगणें. *Turn the s.* (of motive or circumstance), be decisive. निर्णायक ठरणें. *A pair of ss.,* तराजू, कांटा. *Hold the ss. even,* be impartial judge. निःपक्षपातानें न्याय करणें,-देणें; कांटेतोलपणानें न्याय करणें.

Scāle, *n.* (स्केल्)—a series of degrees; graded system; (Mus.) a set of sounds belonging to a musical key arranged in order of pitch; (Math.) (often *s. of notation,*) basis of numerical system as shown in ratio between units in different places of number, relative dimensions (of plan, map, etc.); an instrument for use in measuring, etc. प्रमाण, दर्जा, मापन, मान; प्रमाणशीर पद्धति; स्वरपद्धति, ग्राम; (अंकमापनाचा) ठराविक क्रम, अंकमापनपद्धति; सापेक्ष प्रमाण, लांबी, अंतर; प्रमाणपट्टी, मापनपट्टी. *v. t.* to climb with ladder or otherwise; reduce to common scale; have common scale. चढून जाणें, चढणें; साधारण प्रमाण करणें,-असणें. *To sink in the s.,* खालच्या दर्जाला येणें. *Ordinary, denary* or *decimal s,,* दाशमिक-दशांश-क्रम. *Binary s.* denoting units, twos, fours etc. द्विक्रम. *Scaling-ladder,* भिंतीवर चढण्याची शिडी.

Scalene', *a. & n.* (स्कली'न्)—unequal-sided (triangle). विषमभुज (त्रिकोण.) *S. muscle,* पर्शुकार्षक स्नायु.

Scălp, *n.* (स्कॅल्प्)—skin and hair of the upper part of the head; top of head; this torn off as trophy by Red-Ind. victor; bare rounded hill-top; whale's head without lower jaw. डोक्यावरील कातडी व केंस; टाळकें, डोकें; विजयाचिन्ह म्हणून तांबडा इंडियन शत्रूच्या डोक्याची काढतो ती कातडी; टेंकडीचा उजाड वर्तुळाकार माथा; व्हेल माशाचें (खालचा जबडा नसलेलें) डोकें. *v. t.* to take s. of; criticize savagely; (U. S. sl.) make small quick profit by speculating in tickets, etc. डोक्याची कातडी काढणें; वाभाडे काढणें, भयंकर कडक टीका करणें; (तिकिटांचे वगैरे दर वाढवून) नफेबाजी करणें.

Scăl'pel *n.* (स्कॅल्पेल्)—surgeon's small light knife shaped for holding like pen. शस्त्रक्रिया करण्याची सुरी,-चाकू. [L. *scalpere,* scrape]

Scăl'per, Scau'per, *n.* (स्कॅल्पर्,स्का'-)—gouge used by engravers. विकृत झालेलें हाड खरडून काढण्याचें शस्त्र, खरवडणी.

Scămm'onȳ, *n.* (स्कॅमनि)—purgative resin. रेचक वनस्पती द्रव्य,-पदार्थ.

Scămp, *n.* (स्कॅम्प्)—rascal, good-for-nothing, worthless fellow. सोदा, लुच्चा, उडाणटप्पू मनुष्य. *v. i.* to do (work) negligently. निष्काळजीपणानें काम करणें, घाईघाईनें,-अर्धवट,- काम करणें. *Scam'pish, a.* लुच्चेगिरीचा, पाजीपणाचा, लुच्चा, लबाड.

Scăm'per, *v. i.* (स्कॅम्पर्)—to run like a frightened animal or playing child; to take a scamper

through. (भीतीनें) पळ काढणें, पोबारा करणें ; सटकणें, झुकणें ; दौड काढणें. *n*. scampering run ; gallop on horseback : rapid tour or course of reading. पळ काढणें, पोबारा ; दौड, खडी स्वारी ; जलद-फिरता,-प्रवास, धांवतें वाचन, (पुस्तकाचीं) पानें चाळणें.

Scăn, *v. t. & i.* (स्कॅन्)—to test metre ; to scrutinize closely (horizon, face, etc.) ; (of line, etc.) be metrically correct ; read over with emphasis on rhythm. वृत्त तपासून पाहणें, छंदाच्या मात्रा मोजणें ; बारकाईनें पाहणें, न्याहाळणें, निरखून पाहणें,-तपासणें ; वृत्तदृष्ट्या बरोबर असणें ; ठेक्यावर-तालावर,-वाचणें.

Scăn'dal, *n.* (स्कॅन्डल)—thing that occasions general feeling of outrage or indignation, malicious gossip ; back-biting ; (Law) public affront, irrelevant abusive statement in court. निंदा, निंदास्पद गोष्ट ; कुटाळकी ; लोकापवाद, जनप्रवाद ; भर कोर्टांत केलेली अप्रस्तुत निंदा,-टीका. *Scandalize, v. t.* to shock. निंदा करणें, कंडी उठविणें, दोषारोप करणें, शरमवणें. *Scan'dal-monger, n.* कुटाळ, निंदक, चहाडखोर, चुगलखोर, (खऱ्याखोट्या) कंड्या उठविणारा.

Scăn'dalous, *a.* (स्कॅन्डलस्)—outrageous, disgraceful to reputation ; causing or given to scandal, shameful. अब्रू घेणारा ; कलंक लावणारा ; लज्जास्पद. —*ly, adv.* ;-*ness, n.*

Scăn'dent, *a.* (स्कॅन्डन्ट्)—climbing. चढणारा, आरोहिणी (लता). [L. *scandere*, to climb]

Scăndina'vian, *a. & n.* (स्कॅन्डिनेव्हिअन्)—of the region including Norway, Sweden, Denmark, and Iceland. नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क व आइस्लंड या देशांतील (भाषा ;-रहिवासी).

Scăn'dium, *n.* (स्कॅन्डिअम्)—an element found in the Scandinavian yttrium metals. स्कॅन्डिनेव्हिआ मधील धातूंत सांपडणारें तत्त्व.

Scăn'sion, *n.* (स्कॅन्शन्)—metrical scanning. कवितेच्या मात्रा मोजण्याची पद्धति, मात्रागणन.

Scănsor'ial, *a.* (स्कॅन्सॉरिअल)—(of birds etc.) climbing ; adopted for climbing. चढणारे ; चढण्याच्या उपयोगी.

Scănt, *a.* (स्कॅन्ट्)—barely or not sufficient. अपुरा, तुटपुंजा, तुटपुरता. *v. t.* to stint (food etc.), provide grudgingly. नियंत्रित करणें, नियंत्रण घालणें, कुचराईनें (अपुरें) देणें.—*ly, adv.*

Scănt'ling, *n.* (स्कॅन्ट्लिंग)—a specimen, sample, (*arch.*) ; modicum, small amount of ; a small beam, esp. one under 5 in. square ; size to which stone or timber is to be cut ; set of standard dimensions for parts of structure esp. in ship-building ; a trestle for cask. नमुना, वानगी ; नखभर, तिळभर, अत्यल्प ; (५ इंचाच्या खालील रुंदीचें व जाडीचें) लहान वहाल, वरगा ; गर्भी, ठराविक माप ; (पिंपाची ; घडवंची, बैठक, घोडी.

Scăn'tў, *a.* (स्कॅन्टि)—barely sufficient ; of small amount or extent, defective, (*opp. ample*). अपुरा, अगदीं लहानसर. बेताचा, थोडासा, उणा, अपुरता. *Scan'tily, adv.* थोडका, हात राखून, कुचराईनें.-*tiness. n.* उणेपणा, कृपणपण.

Scāpe, *n.* (स्केप्)—shaft of column ; (bot.) long leafless flower-stalk springing from root ; shaft of feather. दांडा, दांडेरा ; मूलज पुष्पदंड, मूलज पुष्पनाल (उ॰ गुलछबू ,कांदा, घायाळ) ; पिसाचा दांडा, 2. *n. & v. t.* (*arch.*) escape. निसटणें, निभावणें, सुटका.

Scape'goat, *n.* (स्केप्-गोट्)—(O. T.) a goat allowed to escape when Jewish chief priest had laid sins of people upon it ; a person bearing blame due to others. सुटा बोकड, पळी ; दुसऱ्याच्या अपराधाबद्दल दोष लागलेला मनुष्य.

Scāpe'grāce, *n.* (स्केप्-ग्रेस्)—a rascal ; ne'er-do-weel (often playfully of child). (बेअकली) चंचळ मनुष्य, चंचळ पोर,धडपडें मूल.

Scă'phoid, *a. & n.* (स्कॅफॉइड्)—(anat.) boat-shaped (bone). नौकाकृति, गुल्फमध्य (अस्थि).

Scăp'ulă, *n.* (स्कॅप्यूला)—(pl-lae) the shoulder-blade. खवाट्याचें हाड, खवाटा, फलकास्थि.

Scăp'ūlar, *a. & n.* (स्कॅप्यूलर्)—of the scapula ; (*n.*) kinds of monastic vestment ; bandage for shoulder-blade. खवाट्याचा ; संन्याशाचा झगा, -कफनी ; खवाट्याची भाळी,-पट्टी.

Scar, *n.* (स्कार्)—mark left by a wound. डाग, चट्टा, व्रण, (दुःखाचा) चटका. *v. t.* चट्टा, व्रण, पाडणें,-पडणें.

Scăr,Scaur, *n.* (स्कार्,स्कॉअर्)—a precipitous craggy part of mountain side. पर्वताचा कडा, सुळक्यासारखी बाजू.

Scă'rab, *n.* (स्कॅरब्)—sacred beetle of ancient Egypt ; Egyptian germ in the form of a beetle. प्राचीन मिसर देशांतील एक पवित्र कीटक ; त्या कीटकाच्या आकाराचें रत्न.

Scă'ramouch, *n.* (स्कॅरमॉउच्)—a baffoon, boastful coward ; idler, scamp. विदूषक, पोकळ घमेंड्या ; आळशी, भटक्या.

Scārce, *a.* (स्केअर्स्)—not plentiful, rare ; hard to find. अपुरा, थोडा ; विरळ, दुर्लभ. *adv.* scarcely. क्वचित्, विरळा.

Scārce'lў, *adv.* (स्केअर्स्लि)—hardly, only just, with difficulty ; surely not. क्वचित्, विरळा, मोठ्या कष्टानें ; खात्रीनें नाहींच.

Scār'citў, *n.* (स्केअर्सिटि)—insufficiency ; prevailing want of food ; dearth, famine, rareness, infrequency. तुटवडा, कमताई, टंचाई, भीड, चणचण ; (अन्नाची) महर्गता, दुष्काळ.

Scār'cement, *n.* (स्केअर्स्मेंट्)—set-back in a wall, ledge resulting from this. भिंतीचा आंत गेलेला भाग, वळचण.

Scāre, *v. t.* (स्केअर्)—to strike with sudden terror ; to startle and frighten. दचकवणें ; भीतीनें गांगरवणें, पळवून लावणें, (पक्षी) हांकणें, बुजवणें. *n.* unreasoning terror, causeless alarm ; commercial panic. खोटी भीति, बुजगावणी, घाबरटपणा, व्यापारी

वर्गात झालेली धांदल, घबराट. *To s. away*, drive off by fright. भीती दाखवून पळवून लावणें *S. monger*, खोटी भीति-वार्ता-पसरविणारा, गप्प उठविणारा, लोकांना (बातमीनें) गांगरविणारा.

Scāre'crow, *n.* (स्के'अर्‌क्रो)—a figure set (in field, &c.) to scare birds; badly dressed or grotesque-looking person, one dressed meanly. (पक्ष्यांना भिवविण्याकरितां) बाहुलबुवा, बुजगाविणें, बुजगबाहुलें; गबाळ पोषाख केलेला मनुष्य.

Scarf, *n.* (स्कार्फ्)—(*pl. -ves,-fs*), a sort of light shawl; a long strip of material worn round neck, necktie. उपवस्त्र; गळेबंद, गळपट्टा; गळपट्टी. *S. pin,-ring*, गळपट्टीची टांचणी,-हूक,-कडी. *S. skin*, बाह्य (तम) त्वचा, (नखाखालची) बाहेरील कातडी. *Scarfed, a.*

Scarf, *n.* (स्कार्फ्)—a joint uniting two pieces of timber or leather or metal; notch, groove. बसल्याचा सांधा; खांचणी, खांपणी, खांप. *v. t.* to join with scarf ; flench (whale). (बसला पाडून) सांधा बसवणें, -जोडणें, सांधणें; व्हेल माशाचे तुकडे करणें.

Scă'rifȳ, *v. t.* (स्कॅ'रिफाय)—(surg.) to scratch skin or surface of all over; (*fig.*) to criticize mercilessly; to loosen surface of soil, to stir the soil. फांसण्या मारणें, -टाकणें; निर्दयपणानें टीका करणें, (अंतःकरणाला) घरें पाडणें; (जमिनीची) उलपतपालपत करणें, पाळ्या घालणें. *Scarifica'tion, n., scar'ificator, n.* फांसण्या मारण्याचें शस्त्र, प्रच्छादनशस्त्र. *Scar'ifier, n.* (जमीन उकरण्याचें) मोठें दांताळें; रस्ता उकरण्याचें दांताड्याचें यंत्र.

Scăr'ious, *a.* (स्के'अरिअस्)—(bot.) thing dry, and membranaceous. बारीक, शुष्क व पातळ त्वचेनें युक्त.

Scărlati'na, *n.* (स्कार्लटी'ना)—scarlet fever. लोहितांग ज्वर.

Scăr'let, *n.* & *a.* (स्का'र्लेट्)—brilliant red colour; scarlet cloth or clothes. शेंदरी रंग; शेंदरी रंगाचें कापड किंवा कपडे, *Dressed in s.*, शेंदरी रंगाचे कपडे घातलेला. *S. admiral*, एक जातीचें फुलपांखरूं. *S. fever*, infectious fever with s. rash; (joc.) tendency to fall in love with soldiers. लोहितांगज्वर; सैनिकांवर प्रेम करण्याची प्रवृत्ति. *S. hat*, (कार्डिनलची) शेंदरी टोपी. *S. runner*, scarlet,-flowered climbing bean. शेंदरी फुलांची घेवड्याची वेल.

Scărp, *n.* (स्कार्प्)—a steep slope, esp. the inner side of ditch in fortification. सरळ उतरण,-उतार; उभी उतरण,-बाजू,-कडा. *v. t.* उंचीचा-सरळ-उतार देणें. *Scarped*, (pa. p., of hill-side etc.) steep, precipitous. उंच, उभी सुळक्याखारखी.

Scăr'us, *n.* (स्के'अरस्)—kinds of bright hued fish with parrot-like beak, (also *parrot-fish*). शुकचंचू-मत्स्य.

Scāthe, *n.* (स्केद्)—harm suffered. नुकसान, अपाय, इजा, त्रास, चट्टा. *v. t.* to injure by blasting or withering up. नुकसान करणें; इजा पोंचवणें, चट्टा लावणें. *Scathing criticism*, खरमरीत टीका. *Unscathed*, इजा न होतां, चट्टा न लागतां, सहीसलामत.

Scāthe'lĕss, *a.* (स्के'द्-लेस्)—unharmed. नुकसान न झालेला, चट्टा न लागलेला, सुखरूप.

Scato'logy, *n.* (स्कटॉ'लजि)—study of coprolites. (भूमिगत कुजलेल्या प्राण्यांच्या) खताचा अभ्यास,-शास्त्र. [Gk *skatos*, dung]

Scato'phagous, *a.* (स्कॅटॉ'फॅगस्)—feeding on dung. भूस्तरांतर्गत खतावर वाढणारा, जमिनींतील खत-उकीर-खाऊन वाढणारा.

Scătt'er, *v. t.* & *i.* (स्कॅ'टर्)—to throw or put here and there; sprinkle; to disseminate; to disperse; to flee or make flee in all directions. पसरणें, पेरणें, विखुरणें; शिंपडणें; फांकाफांक करणें, पांगणें, पूर्ण मोड-भंग-करणें, पांगापांग करणें; फांकणें, पांगणें, फांकाफांक होणें. *S. brain*, heedless person. अनवधानी, दुर्लक्ष मनुष्य. *S. brained*, heedless, desultory. लक्ष नसलेला, अनवधानी. *Scatt'eringly, adv.*; *Scatt'ered, pa.p.* दूरदूर पसरलेले, पेरलेले, विरळ, तुटक, तुटक.

Scăv'ĕnger, *n.* (स्कॅ'व्हिंजर्)—a person employed to remove refuse from the streets of a city; an animal (esp. S. *beetle*;-*crab*) feeding on carrion; a writer etc. delighting in filthy subjects. झाडूवाला, भंगी, हलालखोर; कुजलेलें मांस खाणारा प्राणी,-किडा; अश्लील विषयांवर लिहिणारा, अश्लील-लेखक. *v. i.* to be, act, as a *s.* भंगीकाम करणें. *Scav'enge, v. t.* & *i.* *Scav'enging, n.* scavenger's work. भंगीकाम, झाडूकाम.

Scenăr'ĭō, *n.* (शेना'रिओ)—(pl. *os*), a table of scenes, etc. in play or opera or cinema play. नाटक, सिनेमा यांतील प्रवेश-लेखन; कथानक-लेखन; कथानक व प्रवेश यांची जुळणी,-लेखन. [It.]

Scēne, *n.* (सीन्)—a theatre-stage, arena for display (now only *fig.*); a place of actual or fictitious occurrence; a piece of continuous action that forms part of a play; agitated colloquy, esp. with display of temper; hangings and woodwork used in dressing up a stage; landscape or view. रंगभूमि; (कोणत्याहि प्रसंगाचें) स्थळ किंवा वर्णन; (नाटकाचा) प्रवेश; दृश्य, देखावा, प्रसंग, प्रसंगाचें वर्णन; प्रदर्शन, तमाशा; दंगल; रंगभूमीवरील पडदे वगैरेंची सजावट, देखावा. *Quit the s.*, (esp.) die. मरून जाणें, जगांतून नाहींसें होणें. *Don't make a s.*, प्रदर्शन-तमाशा-देखावा करून दाखवूं नको. *Behind the ss.*, पडद्याआडचा; आंतील-गुप्त-खाजगी माहिती असणारा. *Change of s.*, प्रवासामुळें दिसणारे निरनिराळे देखावे,-प्रसंग, स्थलांतर, थारापालट. *S.-dock*, पडदे वगैरे ठेवण्याची कोठी,-जागा.

Scē'nerȳ, *n.* (सी'नरि)—stage scenes; the natural features of a district, landscape characteristics. (नाटकांत लागणारे) देखाव्याचें सामान; भोंवतालचा देखावा; निसर्गाचा देखावा, भूप्रदेशरचना.

Scē'nic, *a.* (सी'निक्)—of or on the stage; picturesque in grouping; (of picture etc.) telling

a tale; (of emotion etc.) dramatic, affected. रंगभूमीवरील, नाटकाचा; शोभिवंत, उठावदार (रचनेचा, रचलेला); प्रसंगदर्शक, देखाव्याचा (चित्र व०); नाटकी, खोटा, नकली.

Scent, *v. t.* (सेन्ट्)—to discern by smell; to make fragrant; apply perfume to; sniff to detect the odour of: (*fig.*) begin to suspect the presence or existence of. चा वास येणें, (घ्राणेंद्रियानें) शिकारीचा माग काढणें; सुवासिक करणें; सुगंधित करणें; ला वास लावणें, सुगंध लावणें; हुंगणें, वास घेणें; (चा) वास येणें, (चें) अस्तित्व भासणें. *n.* characteristic odour of something; fragrance; smell left by an animal enabling hounds to track it; (Hare and Hounds) paper laid to guide runners; sense of smell; liquid perfume distilled from flowers, etc. वास; गंध, सुगंध; माग, वास; (धांवण्याच्या शर्यतींत मागून धावणाऱ्यांसाठीं) टाकलेले कागदाचे तुकडे; घ्राणेंद्रिय; सुगंधी तेल, अत्तर. *To s. out*, हुंगून-हुडकून-शोधून काढणें. *To follow up the s.*, (चा) वास-माग-लागणें. *Lose the s.*, माग सांपडेनासा होणें. *Recover the s.*, पुनः माग लागणें,-सांपडणें. *On the s.*, having clue. वासावर, मागावर, धागादोरा सांपडलेला. *Put off the s.*, deceive by false indications. आडरानांत शिरविणें,-फसवणें, हुलकावणी देणें. *S. bag*, (कांहीं प्राण्यांच्या शरिरांतील) विशिष्ट सुगंधि द्रव्ययुक्त पिशवी; त्याविशेषीनें भरलेली पिशवी. *S. bottle*, सुगंधी तेलाची-अत्तराची कुपी. *S. gland*, कस्तुरी वगैरे उत्पन्न करणारी पेशी,-पिंड. *Scented*, *a.* सुगंधी; *S. caper*, चहाची एक जात; *S. fern*, सुगंधी वनस्पति.

Scĕp'sis, *n.* (स्केप्सिस्)—philosophic doubt, sceptical philosophy. तत्त्वज्ञानविषयक संशय, संशयवाद. [*Gk skepsis*, inquiry]

Scĕp'tic, *n.* (स्केप्टिक्)—a person who questions the truth of religious doctrines; a person indisposed to accept as true the received opinion on any particular subject; an atheist. धार्मिक मतांसंबधीं संशय असणारा; संशयवादी; नास्तिक. *-al, a. Scep'ticism, n.* संशयात्मकता; नास्तिकता; संशयवाद.

Scĕp'tre, *n.* (सेप्टर्)—a rod symbolizing sovereignty; royal or imperial authority. राजदंड, राजवेत्र; राजसत्ता, सार्वभौमाधिकार. *Scep'tred*, *Scep'treless*, *aa.*

Schĕd'ūle, *n.* (शेड्यूल्)—a table of details or items. कोष्टकवार यादी, तक्ता, माहितीपत्रक. *v. t.* to make a schedule of, to include in a schedule. याद करणें, यादींत नमूद करणें. (U. S. pr. स्के.-) *S. time*, that stated in time-table. वेळापत्रकांत नमूद केलेली वेळ,-दिलेली वेळ.

Schē'ma, *n.* (स्कीमा)—(pl.-*ta*), synopsis, outline, diagram; (Log.) syllogistic figure; (Gram.) figure of speech; (Kant.) general type. रूपरेषा, योजना; (मध्यम पदानुरूप)-अनुमान-वाक्यप्रकार; (वाक्यांतील) अलंकार; वस्तूची सामान्य रूपरेषा, सामान्य. *Schema'tic, a; Schemati'cally, adv.*

Schēme, *n.* (स्कीम्)—a systematic arrangement; proposed or in operation; an outline, a syllabus; a plan of action; an artful or underhand design; representation of a design. पद्धतशीर रचना; बेत, व्यवस्था, मांडणी; योजना, कल्पना, हिकमत, डाव, उपाय; नकाशा, आराखडा. *v. i. & t.* to make plans; intrigue; plan to bring about. बेत, -योजना,-करणें; युक्ति काढणें, तोड निघणें-काढणें; मसलत-कारस्थान-करणें. *Sche'ming, a.* कारस्थानी, मसलती-हिकमती.

Schē'mer, *n.* (स्कीमर्)—a contriver, a plotter. कारस्थानी, मसलत करणारा, उलाढाल्या, झेंगट्या.

Schĭpp'erkė, *n.* (स्किपर्के, शि-)—a kind of lap-dog. एक जातीचा कुलंगी कुत्रा.

Schĭ'sm, *n.* (सिझम्)—division of a community into factions (rare in gen. sense), esp. separation or division in a church; an offence of causing such separation. भेद, फूट, तट; धर्मामध्यें दोन पंथ होणें, दुफळी; असे भेद पाडण्याचा गुन्हा.

Schĭsmăt'ic, *a.* (सिझ्मॅटिक्)—tending to or guilty of schism. मतभेद पाडणारा, दुफळी होण्याजोगा; (धर्म-) भेद पाडण्याचा गुन्हा करणारा. *n.* a schismatic person. (मूळ धर्मपंथांतून भांडून) वेगळा होणारा मनुष्य. *Schismat'ical, a.*

Schist, *n.* (शिस्ट्)—crystalline rock whose components are arranged in layers. स्फटिकमय खडक,-पत्थर. *Schi'stose, a.* स्फटिकमय, खडकासारखा.

Schŏl'ar, *n.* (स्कॉलर्)—a child at an elementary school; a person's disciple; a learned or erudite person; a student receiving assistance from university or other funds after a competitive examination. शाळेंत जाणारा मुलगा, विद्यार्थी; छात्र, शिष्य; विद्वान मनुष्य, पंडित; छात्रवृत्ति मिळणारा विद्यार्थी. *A s. and a gentleman*, person of good education and breeding. विद्वान व कुलीन मनुष्य.

Schŏl'arlȳ, *a.* (स्कॉलर्लि)—erudite; becoming a scholar or a learned man. विद्वत्तापूर्ण; विद्वत्तेचा; विद्वानाला साजेसा,-शोभेसा.

Schŏl'arshĭp, *n.* (स्कॉलर्-शिप्)—erudition, learning; allowance of money for a student or pupil at an educational institution. विद्वत्ता; छात्रवृत्ति, शिष्यवृत्ति.

Scholăs'tic, *a.* (स्कलॅस्टिक्)—of schools; universities, schooling, educational; academic or pedantic; dealing in logical subtleties. शाळेंतील, शाळेचा, विद्यार्थ्यांचा, विद्यार्थ्याला शोभेसा, पांडित्याचा; तार्किक, सूक्ष्म गोष्टीसंबंधीं. *n.* a schoolman; modern theologian of *s.* tendencies; a Jesuit. मध्ययुगीन शिक्षक; तार्किक; जेस्विट पंथीय. *S. agent*, finding posts for teachers. शिक्षकांना नोकऱ्या मिळवून

देणारा. *S. theology*, तार्किक-सूक्ष्म-धर्मशास्त्र. *Schola-s'ticism, n.* 'स्कूलमन'ची निगमनात्मक तत्त्वज्ञान-पद्धति.

Scho'liast, *n.* (स्कोलिअॅस्ट्)—a writer of scholia. टीकाकार, प्राचीन काव्यांवर व्याकरणविषयक टीपा लिहिणारा.—*ic, a.*

Scho'lium, *n.* (स्कोलिअम्)—(pl.-*ia*), ancient grammarian's marginal note on passage or word in classical author. (प्राचीन वैय्याकरणी) टीका, उपपत्ति, अर्थाविष्करण.

School, *n.* (स्कूल्)—an institution for giving instruction to the young; its buildings; its pupils; lesson time; being educated in a school; medieval lecture-room; any of the branches of study with separate examination at the university; (pl.) university examinations; a group of thinkers or artists with common inspiration or characteristics. शाला; शाळा (विशेषतः प्राथमिक); शालागृह, शाळेची इमारत; शाळेंतील विद्यार्थी; शिक्षणाचा काळ,-ताम; शाळा, शिक्षण, अध्ययन; मध्ययुगीन (तत्त्ववेत्त्यांची) शाळा: व्याख्यान-गृह; विद्येची शाखा. (अने०) विश्व-विद्यालयाच्या परीक्षा; संप्रदाय, पंथ. *v. t.* to send to school (rare); to discipline, to bring under control; to train or accustom to; to tutor; to reprove. शाळेंत घालणें,-पाठविणें; शिस्त लावणें, ताब्यांत ठेवणें; संवय लावणें; पढवणें; कान उघडणें, झाडणें. *Continuation s.*, (प्राथमिक शिक्षण घेऊन धंदाउद्योग करणाऱ्यांकरितां त्यांच्या फावल्या वेळीं) पुढल्या शिक्षणाची शाळा. *Free s.*, मोफत शिक्षणाची शाळा. *High s.*, माध्यमिक शिक्षणाची शाळा. *Technical s.*, कलाभुवन, (शिल्प) कलेची शाळा. *To keep a s.*, खाजगी शाळा चालविणें. *Go to s.*, वर्गाला-तासाला -हजर असणें. *S. doctors*, मध्ययुगीन शिक्षक. *In the s. of adversity*, (*fig.*) विपत्तीच्या शाळेंत, संकटांच्या तालमींत. *S. board*, Local education authority. स्थानिक शिक्षणाधिकारी मंडळ. *S. book*, शालेय पुस्तक. *S. boy,-girl*, शाळकरी मुलगा,-मुलगी,-विद्यार्थी,-विद्यार्थिनी. *S. days*, (मागील) विद्यार्थी दशा, शाळेंत शिकण्याचे दिवस. *S. fee (s)*, शाळेची फी. *S.-fellow*, (त्याच शाळेचा माजी किंवा आजी) विद्यार्थी, शाळाबंधू. *S. house*, (खेडेगांवच्या) शाळेची इमारत. *S. ma'am*, (U. S.) शिक्षकीण. *S. master,-mistress*, शाळा-शिक्षक,-शिक्षकीण. *S. miss*, inexperienced or bashful girl. अननुभवी किंवा लाजाळू मुलगी. *S. teacher*, (विशेषतः प्राथमिक) शिक्षक,-शिक्षकीण. *S. time*, अभ्यासाचे तास,-वेळ. *School'ing, n.* शिकविणें, अध्यापन. [L. *schola*, school]

School, *n. & v. i.* (स्कूल्)—(form) shoal of fish. माशांचा थवा,-समुदाय (घनणें).

School'able, *a.* (स्कूलब्ल्)—liable by age to compulsory education. सक्तीच्या शिक्षणाला वयानें योग्य.

School'man, *n.* (स्कूल्मन्)—a teacher in medieval European university; theologian dealing with religious doctrines by rules of Aristotelian logic. युरोपांतील मध्ययुगीन तत्त्ववेत्ता,-शिक्षक.

Schoon'er, *n.* (स्कूनर्)—a fore-and-aft rigged ship, a small two-masted vessel. दुकाठी गलबत, -तारूं.

Schottische', *n.* (शॉटीश्)—kind of polka; music for it. एक जातीचा नाच; त्याचें वाद्य. [G = scottish]

Sciag'raphy, Ski-, *n.* (सायॅग्रफि, स्कि-)—art of shading in drawing, etc.; photography by Rontgen rays; (usu. sk-); (Arch.) vertical section showing interior of house, etc.; (Astron.) finding of time by shadows as in sun-dial. (चित्रकलेंतील वगैरे) छाया दाखविण्याची कला; 'क्ष' किरणांनीं काढलेलें छायाचित्र,-प्रकाशलेखन; उभा छेद (घराचा वगैरे अंतर्भाग दाखविणारा); (छायायंत्राप्रमाणें) छायेवरून वेळ जाणणें. *Sci'agram, n.* क्षकिरणानें काढलेलें चित्र. *Sci'agrapher, n.,-graphic, a.*

Sciat'ic, *a.* (सायॅटिक्)—of the hip; of or having sciatica. असनास्थिग, जघनास्थींतून जाणारा; जंघापृष्ठशूलाचा,-शूलयुक्त. *S. nerve*, कुल्ला, मांडी, व पायाची पोटरी यांमधून जाणारी मोठी मज्जातंतू, आसनास्थिग मज्जातंतु, गृध्रसीनाडी.

Sciat'ic, *n.* (सायॅटिक्)—neuralgia of hip and thigh, pain in sciatic nerve. जंघापृष्ठशूल, कुल्ला, मांडी व पायाची पोटरी यांतली मोठी मज्जातंतू दुखणें.

Sci'ence, *n.* (सायअन्स्)—knowledge (arch.); systematic and formulated knowledge; any branch of such knowledge; the physical or natural sciences as a whole; special skill, as opp. to strength or natural ability, esp. in boxing, games, etc. विद्या, ज्ञान; शास्त्रीय ज्ञान, शास्त्र; ज्ञानशास्त्र, उपपत्ति, औपपत्तिक ज्ञान, विज्ञान-शाखा; विज्ञान; कसब, प्रावीण्य, कौशल्य, शास्त्र. *Moral s.*, नीतिशास्त्र. *Political s.*, राजकारणशास्त्र, राज्यशासनशास्त्र. *Natural s.*, सृष्टिज्ञान. *A man of s.*, शास्त्रज्ञ. *Exact s.*, admitting of quantitative treatment. (प्रत्यक्ष) मापनसिद्धशास्त्र. *Pure s.*, one depending on deductions from self-evident truths as Mathematics, logic. गृहीतप्रमेयानुवर्ती-प्रत्यक्षसिद्धप्रमेयावलंबी-शुद्ध-शास्त्र (गणित, तर्क) *Applied s.*, व्यवहारोपयोगी शास्त्र, *Physical s.*, (जड-). पदार्थ विज्ञान-(शास्त्र). *Scie'ntial, a.* ज्ञानाचा, ज्ञानसंबंधीं. *Scie'ntially, adv.*

Sci'enter, *adv.* (सायएन्टर्)—(legal) wittingly. जाणूनबुजून, मुद्दाम, सहेतुक.

Scientif'ic, *a.* (सायन्टिफिक्)—according to the principles of science; having or requiring trained skill; accurate. शास्त्रसंबंधीं, शास्त्रीय, शास्त्रोक्त; शास्त्रशुद्ध; बिनचूक, कुशल, कसलेला, कसबी. *S. instruments*, शास्त्रीय (प्रयोगांच्या उपयोगी) उपकरणें. *A s. boxer*, पद्धतशीर लढणारा-कसलेला-मुष्टियोद्धा. *Scientifically, adv.* शास्त्रीय पद्धतीनें, यथाशास्त्र.

Sci'ĕntist, *n.* (सा'यन्टिस्ट्)—a person learned in one or more of the natural sciences. शास्त्रज्ञ, शास्त्रवेत्ता.

Sci'lĭcĕt, *adv.* (सा'यलिसेट्)—(abbr-sc., scil.) to wit, that is to say, namely. म्हणजे, त्याचा अर्थ असा कीं. [L. = *scire licet,* it is allowed to know]

Scĭm'ĕtar, Scĭm'ĭtar, *n.* (सि'मिटर्)—a short curved oriental sword with a convex edge. जंबिया.

Scĭntĭll'ă, *n.* (सिन्टि'ला)—shred or atom. अल्पांश, कण. *Not a* s. *of evidence,* अल्पसा सुद्धां पुरावा नाहीं.

Scĭn'tĭllāte, *v. i.* (सि'न्टिलेट्)—to sparkle as the fixed stars, to twinkle; to emit sparks. लुकलुकणें, चमकणें, चकचकणें; ठिणग्या उडणें. *Scintilla'tion, n.* अग्निकण, ठिणग्या, चकचकणें. *Scin'tillant, a.*

Sci'olism, *n.* (सा'यअलिझम्)—assumption of knowledge; conceit based on fancied wisdom. तुटपुंजें ज्ञान, पांडित्याचा आव,-डौल.

Sci'olist, *n.* (सा'यालिस्ट्)—a person of superficial knowledge. पंडितंमन्य, तुटपुंजें ज्ञान असणारा मनुष्य. खंडपंडित.-*ic, a.*

Sci'on, *n.* (सा'यन्)—a shoot cut for grafting; young member of a (esp. noble) family. कलम, अंकुर, कोंम, फांदी; वंशज, वारस, कुलदीपक.

Scirr'hus, *n.* (सि'रस, स्कि'-)—hard tumour as early stage of cancer. (पुळी, व्रण, याच्या प्रथमावस्थेंतील) कठिण मांसग्रंथि. *Scirr'hous, a.* [Gk *skiros,* hard]

Sci'ssĭle, *a.* (सि'सिल्)—able to be cut. कापतां येण्याजोगा.

Scĭss'ion, *n.* (सि'झन्)—cutting, being cut, division, split. छेदणें, छेद, विभाग.

Scĭss'or, *v. t.* (सि'झर्)—to cut (*off, up, into,*) with scissors, clip out. कातरीनें कापणें, कातरणें, कापून घेणें.

Scĭss'ors, *n. pl.* (सि'झर्झ्)—a cutting implement having a pair of blades. कातरी, कातर. *A pair of s.,* कात्री, कातर. *Where are my s.,* माझी कात्री कोठें आहे. *Button-hole s.,* बटणांचीं-गुंड्यांचीं-भोंकें पाडण्याची व्यवस्था असलेली कात्री. *Lamp, nail,-s.,* वात, नखें,-कापण्याची (विशिष्ट आकाराची) कात्री. *S. and paste,* दुसऱ्या पुस्तकांतील उतारे काढून ग्रंथरचना करणें. *Scissor-bird* or-*tail,* चिमण्यासारखी दुभंग व लांब शेपटी असलेले पक्षी. *Sciss'orwise, adv.*

Sciūr'ine, *a.* (सिउ'अरिन्)—of the squirrel-tribe; squirrel-like. खारीच्या जातीचा; खारीसारखा. *Sciur'oid, a.*

Sclĕr(o),-(स्क्लिअरो-)—comb. form of Gk *skleros,* hard. दृढ-, घट्ट-, कठिन-.

Sclĕrŏt'ic, *a.* (स्क्लिअरॉ'टिक्)—hard, firm. दृढ, घट्ट. *n.* hard opaque coating of eye outside iris forming the white of the eye. डोळ्यांतील पांढरा भाग, बाह्यनेत्रकोष. *Sclero'sis,* कठिनग्रंथिवृद्धि (रोग).

Scŏff, *v. i.* (स्कॉफ्)—to speak derisively of esp. religion or object of respect; to mock or jeer *at,* to ridicule. निंदा-उपहास-करणें; थट्टा करणें, टर उडविणें. *n.* mocking words; a taunt. उपहास; टर, टोमणा, निन्दोक्ति.-*er, n.*;-*ingly, adv.*

Scōld, *v. t. & i.* (स्कोल्ड्)—to find fault noisily; to rail, to rate or rebuke. खरडपट्टी काढणें; दटावून बोलणें. *n.* a railing or nagging woman. अवदसा, कैदाशीण, कर्कशा. *Scold'ing, n.* a rebuke or rating. झाडणें, धमकावणी, झुंडन, बोडंती.

Scŏnce, *n.* (स्कॉन्स)—a fort or earthwork (arch.); shelter, screen; the head, head-piece, the skull; bracket-candlestick. किल्ला, झोंपडी, खोपट; रक्षण, आच्छादन; डोक्याची कवटी; मेणबत्ती ठेवण्याची वर्तुळाकार नळी. *v. t. & n.* (inflict) forfeit for offence against table etiquette. दंड, शिक्षा (करणें).

Scon(e), *n.* (स्कोन्, स्कॉ-)—soft cake of barley meal or wheat-flour. बाजरीच्या किंवा गव्हाच्या पिठाची भाकरी,-पोळी.

Scōōp, *n.* (स्कूप्)—a short-handled deep shovel; coal-scuttle; gouge-like instrument; motion as of scooping; (sl.) large profit made quickly. कोरणी, खवणें, पळा; (कोळशाचें) शिपतर; (शस्त्रक्रियेंतील) चमचा, उपसणें, पोखरणें; झपकन मिळविलेला मोठा फायदा. *v. t.* to lift with a scoop; to hollow out, to excavate. खोऱ्यानें उपसणें; कोरणें, उकरणें, खणणें. *S.-wheel,* पायरहाट.

Scōōt, *v. i.* (स्कूट्)—(sl.) to dart, shoot along; make off. घुसणें, सूं करणें; पळून जाणें. *Scoot'er, n.* child's scooting toy; a machine worked by motor as substitute for bicycle. पायगाडा, पांगुळगाडा (मुलांचा खेळ); यांत्रिक--मोटर-पांगुळगाडा, पायगाडी.

Scōpe, *n.* (स्कोप्)—end aimed at, purpose, intention (rare); outlook; sphere of observation or action; extent, outlet, vent; freedom of action; extent to which person or thing may or can range; (Naut.) length of cable out when ship rides at anchor. हेतु; पुढचा देखावा; क्षेत्र, टप्पा; वाव, अवसर, जागा; मोकळीक; परीघ, विस्तार; (नांगर टाकून उभ्या राहिलेल्या) नांगराच्या दोरीची लांबी.

Scŏrbu'tic, *a.* (स्कॉर्ब्यु'टिक्)—of or affected with scurvy. रक्तपित्तीचा, रक्तपित्तव्याधीचा. *n.* a s. person. रक्तपित्ति झालेला मनुष्य. -*tically, adv.*

Scŏrch, *v. t. & i.* (स्कॉर्च्)—to burn the surface of so as to discolour or injure or pain; become discoloured etc. with heat; (of a motorist or cyclist) go at unreasonably high speed. भाजणें, होरपळणें, पोळणें; (उष्णतेनें) रंग बदलणें,-पालटणें; भयंकर वेगानें जाणें. *n.* भयंकर वेगानें,-बेफाम,-दवडणें,-धावणें, दौड. *Scorch'ing, a.* भाजणें, पोळणें, भाजणारा, पोळणारा;-*ly, adv.* *Scorch'er, n.* (sl.) a fine specimen of its kind. उत्कृष्ट नमुना.

Scōre, *n.* (स्कॉअर्)—a notch cut; a line cut or scratched or drawn; mark showing

starting point in race etc. (rare); (naut.) groove in block or dead-eye to hole strap; reckoning; the number twenty, set of twenty; number of points made by a player or side in game; (Mus.) copy of concerted piece; category, head; (sl.) remark or act by which person scores off another; piece of good fortune. खाप, भेग; रेघ; (शर्यतीची) आरंभस्थानदर्शक रेषा, -मर्यादा; खाजणी, खोरणी; गणणें, मोज, (खाद्य-पेयाचा) आकार, हिशेब; वीस ही संख्या, खेळांतील धांवा, धांवांची किंवा टोल्यांची एकूण बेरीज; सुरावटीस गीताची-पद्याची-प्रत; प्रकार, कारण, सबब, बाबत; (दुसऱ्यावर मात करणारा) टोला, टोमणा, कृत्य; सुदैव, नशीब. *v. t. & i.* to mark with incisions or lines; to slash, to furrow; to record (runs, &c.) in game score; to make or be credited with so many at cricket, &c.; to secure an advantage; (Mus.) write out score; enter item of debt to customer. रेघा मारणें, खापी पाडणें, रेखाटणें; नांगरटी करणें; कोरडे ओढणें; (धांवांची वगैरे) नोंद करणें; विजय संपादणें; वर ताण करणें, सरशी करणें; सुरावटीसह पद्याची प्रत करणें; कर्जाचा, खात्याचा,-हिशेब करणें. *To go off at s.,* (आवडत्या विषयावर) आवेशानें बोलणें, वेगानें चालूं लागणें. *To pay* one's *s.,* हिशेब चुकता करणें,-पुरा करणें. *To pay off old ss.,* (fig.) pay person out for past offence. उसनें फेडणें, उट्टें काढणें, सूड उगवणें. *To keep s.,* (धांवा वगैरे) होत जातील तशा नोंद करणें, लिहिणें. *Three s. and ten,* phr. for normal life of human life. मनुष्याची सामान्य (७० वर्षांची) वयोमर्यादा. *Ss. of people,* लोकांचा बराच मोठा जमाव,-समुदाय. *Rejected on the s. of absurdity,* अशक्य-हास्यास्पद-अयुक्त, (सबब) म्हणून सोडून दिलेलें, त्याज्य ठरविलेलें. *S. out words,* रेघ मारून शब्द खोडून टाकणें. *S. under,* खालीं रेघ मारणें, अधोरेखांकित करणें.

Sco're-card, *n.* (स्को'अर्-कार्ड)—डाव किती झाला हें दाखविणारा (धांवांचा) तक्ता. Also, *scoring-c.*

Scor'er, *n.* (स्को'रर्)—(*esp.*)a keeper of score at cricket etc. (खेळांतील) धांवा मांडणारा, डाव नोंदणारा.

Scŏr'ia, *n.* (स्कॉ'रिआ)—(pl.-*iae*), cellular lava or fragments of it; slag. ज्वालामुखीरसाचें किटण; किटण, कीट.

Scŏrn, *n.* (स्कॉर्न्)—disdain, contempt, derision; an object of contempt. कैटाळा, तिरस्कार, उपहास; तिरस्कारास्पद गोष्ट. *v. t.* to hold in contempt. तिरस्कार करणें, तुच्छ मानणें,-लेखणें. *To laugh to s.,* थट्टा करणें, टर उडविणें. *To think s. of,* तुच्छ मानणें.

Scŏrn'ful, *a.* (स्कॉ'र्नफुल्)—contemptuous, filled with scorn, disdainful. तिरस्कारपूर्ण, निन्दात्मक, तिरस्कारयुक्त.-*fully, adv.* तिरस्कारानें, तुच्छतेनें, अवहेलनेनें.

Scorp'ĭo, *n.* (स्कॉ'र्पिओ)—the Scorpion. वृश्चिकराशि, -रास.

Scorp'ĭoid, *n. & a.* (स्कॉ'र्पिऑइड्)—(bot.) (inflorescence) curled up at end like scorpion's tail and uncurling as flowers develop. वृश्चिकपुच्छाकार, लूमाकार, विंचवासारखा (पुष्पसमुदाय).

Scŏrp'ion, *n.* (स्कॉ'र्पिअन्)—lobster-like arachnid with jointed stinging venomous tail; a whip armed with metal points; kind of ballista. विंचू, वृश्चिक; चाबूक; गोफण.

Scŏt, *n.* (स्कॉट्)—(hist.) tax or rate. कर, पट्टी. 2. a native of Scotland. स्कॉटलंडचा रहिवासी, स्कॉच.

Scŏtch, *v. t.* (स्कॉच्)—(arch.) to disable, wound; prevent (wheel, barrel) from moving down hill by means of wedge, etc. जखमी करणें, अर्धमेला करणें; (चाकाला) उटाळें लावणें, अडथळा करणें, टेका देणें. *n.* a line marked on ground in hop-scotch; a wedge used to Scotch wheel etc. (रेघांवरून उड्या मारण्याच्या मुलांच्या खेळांतील) जमिनीवर ओढलेली रेघ; उटाळें, टेका.

Scŏtch, *a.* (स्कॉच्)—of Scotland or its inhabitants. स्कॉटलंडदेशाचा,-स्कॉटलंडमधील लोकांचा. *n.* स्कॉच भाषा. *Scots, Scottish, a. & n.* स्कॉच्. *Scott'icis, m.* स्कॉच् शब्दयोजना, वाक्प्रचार इ०

Scŏtfree', *a.* (स्कॉट्फ्री')—exempt from the payment of a tax; unharmed or unpunished, clear, safe. कर न देणारा, दंड न झालेला; सुरक्षित, अजीबात मोकळा, धस-जळ-न लागलेला.

Scŏtland yard, *n.* (स्कॉट्लंड् यार्ड)—(used for) the London police, the head-quarters of the detection of crime. लंडनमधील (गुप्त) पोलीस, शिपाई; गुप्त पोलिसांचें ठिकाण.

Scoto'ma, *n.* (स्कॉटो'मा)—obscuration of part of the field of vision. डोळ्यांतील काळा डाग (नेत्ररोग).

Scoun'drel, *n.* (स्का'उन्ड्रल्)—an unscrupulous person; a villain, a man without virtue. पाजी, लुच्चा; बदमाष, हरामी, हरामखोर. -*ism, n.*

Scour, *v. t.* (स्कॉवर्)—to rub bright or clean, rub out; clear out by flushing or flowing through or over; purge (bowels) drastically; clear off by rubbing. घांसणें, उजळणें, उजळा देणें; घांसून काढणें, पुसून टाकणें; (पाण्याचा लोट सोडून गटारें, नळ वगैरे) धुऊन काढणें, साफ करणें; (कोठा) धुणें, धुवून काढणें; (गंज वगैरे) घासून काढणें. *n.* an act or process of scouring; diarrhoea in cattle; substance used for scouring fabrics. धुऊन काढणें,-टाकणें; (गुरांचा) हगवणीचा रोग, हगवण; (गिरणींतील कपडा धुण्याचा) साबण, रासायनिक द्रव्य. *The s. of the tide,* भरतीच्या जोरानें (प्रवाहांतील गाळ) धुपून जाणें. *Scourer, n.*

Scour, *v. i. & t.* (स्का'वर्)—to rove, range; go along hastily, esp. in search or pursuit. भटकणें,

झिंडणें; (च्या शोधार्थ,-पाठलागासाठीं) झपाट्यानें जाणें, घाईनें जाणें.

Scourge, *n.* (स्कर्ज्)—(*arch.*) a whip for chastising persons; a calamity, divine wrath. चाबूक, कोरडा; दैवी आपत्ति, अरिष्ट, दैवी शिक्षा. *v. t.* to chastise or afflict for wrong-doing, to harass, to torment, to use whip on. शिक्षा करणें, छळणें, गांजणें; फटके मारणें. *The white s.*, consumption as an epidemic disease. सांसर्गिक क्षयरोग.

Scout, *n.* (स्काउट्)—(Mil. etc.) a man sent out to reconnoitre; a boy scout; a ship designed for reconnoitring; a small fast single-seat aeroplane; act of seeking military information; kind of bird; (Oxf.) a college servant. (शत्रूंची) टेहेळणी करणारा हेर, टेहळ्या, बॉयूस्काउट, बालवीर; टेहेळणी करणारें जहाज; जलदचालीचें लहान (एक माणसाचें) विमान; कांहीं जातीचे पक्षी; (ऑक्स्०) पुरुष नोकर. *v. i.* to go out or act as s. टेहेळणी-करतां जाणें. टेहेळ्याचें काम करणें. 2. *v. t.* to reject with scorn. (सूचना, कल्पना) धुडकावून लावणें, उडवून लावणें, हुर्यो करणें. *Boy-s.*, बालवीर. *S. master*, टेहेळ्यांचा मुख्य; बालवीरशिक्षक. *On the s.*, टेहेळणी करून लष्करी माहिती आणण्यासाठीं.

Scow, *n.* (स्काउ)—(esp. *U. S.*) flat-bottomed boat. रुंद,-चपट बुडाचें-जहाज.

Scowl, *v. i.* (स्काउल्)—to wear sullen look, to frown, to look sullen or angry. कपाळाला आठ्या घालणें, डोळे वटारणें,-उगारणें. *n.* a scowling aspect, angry frown. डोळे वटारणें, रागीट मुद्रा,-चेहेरा. *S.down*, master or overbear with *s.* डोळे वटारून -रागीट मुद्रेनें-गप्प बसविणें, दरारा दाखविणें, दडपणें. *Scowl'ingly*, *adv.* डोळे वटारून, कपाळाला आठ्या घालून, त्रासून.

Scrăb'ble, *v. i.* & *t.* (स्क्रॅबल्)—to scrawl, to make crooked marks; to scratch or grope or scramble *about.* ओरखडणें, रेघोट्या ओढणें, खरडणें; मेटाकुटीनें चढणें, चापून पाहणें, धडपडणें.

Scrăg, *n.* (स्क्रॅग्)—a skinny person or animal; inferior part of neck of mutton; (sl.) a person's neck. काटकोळा, रोड,-खरबरीत-मनुष्य, प्राणी, वनस्पति इ०; बकऱ्याच्या मानेचें मांस; मनुष्याची मान. *v. t.* to put to death by hanging, wring neck of: (Footb.) tackle by the neck; squeeze neck of by way of torture. गळफांस लावणें, मानगुटी पिरगळणें; (फुटबॉ०) मानेनें चेंडू झेलणें; शिक्षा म्हणून मान पिरगळणें. *Scra'ggy*, *a.* thin & bony. बारीक व हाडकोळा.*-ggily*, *adv.*;*-gginess*, *n.*

Scrăm'ble, *v. i.* & *t.* (स्क्रॅम्बल्)— to make way by clambering, &c.; to struggle with competitors to secure a share of something; throw (coins) to be scrambled for; cook (eggs). मेटाकुटीनें चढणें, झोंबाझोंबी करणें, झडापटी करणें; झोंबाझोंबी करून (पैसे वगैरे) फेंकणें; (अंडीं) उबेनें शिजवणें. *n.* a climb or rough walk; eager struggle or competition for something. मेटाकुटीनें चढणें, कष्टानें चढणें, खडबडीत-कष्टाची-चढ, धडपड, चढाओढ, भीड. *Scram'blingly*, *adv.*

Scrăn, *n.* (स्क्रॅन्)—(sl.) food, victuals. अन्न, अन्नाचे -भाकरीचे तुकडे. *Bad s. to*—(Anglo-Ir.). चें दुर्दैव.

Scră'nnel, *a.* (स्क्रॅनेल्)—(of sound) weak, feeble. अशक्त, दुर्बल (आवाज).

Scrăp, *n.* (स्क्रॅप्)—a small detached piece, shred or fragment; (pl.) odds and ends; picture, paragraph etc. for keeping in a collection; rubbish, waste material for re-working; (sl.) quarrel, fight. तुकडा, कटका, कागदाचा चिठोरा; तुकडा, सटरफटर वस्तु, गाळ-साळ; (संग्रहांत चिकटवून ठेवण्यासाठीं कापून घेतलेलें) चित्र, छेदक इ०; (लोखंड वगैरेची) मोड तोड; आकस्मिक भांडण, कलह. *v. t.* & *i.* to discard as past use; break up; (sl.) quarrel or fight. निरुपयोगी म्हणून टाकून देणें; फोडून-मोडून-तोडून -टाकणें; भांडणें, झोंबाझोंबी करणें. *S. book*, (वर्तमानपत्रांतील कापून घेतलेलीं चित्रें, मजकूर वगैरे) चिकटवून ठेवण्याचें (संग्रह) पुस्तक. *S. of paper*, कागदाचा चिटकोरा, न पाळण्यासारखें अभिवचन (आंतरराष्ट्राचे तह वगैरे). *S. heap*, उकिरडा. *S.-h. policy*, practice of discarding promptly what is past its prime. प्रत्येक वस्तुचा नीट उपयोग होत नाहींसे पाहून ती टाकून देण्याची प्रवृत्ति. *Scra'ppy*, *a.*

Scrāpe, *v. t.* & *i.* (स्क्रेप्)—to level, polish, clean, graze or abrade with scraping instruments; erase; to rub the surface with a sharp instrument; to get or amass by economy or with difficulty; draw along with grating or vibration, play fiddle etc. thus; move one's feet noisily on the floor; make a clumsy bow; be parsimonious, pass along something as to be grazed; to get through with a squeeze (fig.). घांसणें, खरवडणें, तासणें, साफ करणें, भादरणें, उकरणें, खोडून काढणें, खणून काढणें, तीक्ष्ण हत्यारानें (चा) पृष्ठभाग घासणें, खरवडणें; खरकर-फर्कश-वाजवणें; (वक्त्याला अडथळा करण्याकरितां) जमिनीवर पाय घासणें; अडाण्यासारखा मुजरा करणें; काटकसर करणें, चिक्कूपणानें वागणें; घासटून जाणें, चाटून जाणें, निभावणें, (परीक्षेंत जेमतेम) सुटणें, पास होणें; कष्टानें पैसे जमवणें. *n.* act or sound of scraping; awkward predicament, a position of difficulty or perplexity. (लेखणीचा) करकर आवाज, चर्वण, कर्कश शब्द; प्रसंग, अडचण, कुलंगडें लचांड. *S.*-one's *chin*, दाढी करणें. *S.* one's *plate*, ताट चाटून पुसून टाकणें, अन्न शिल्लक न ठेवणें. *S. away*, घासून-झिजून-बारीक करणें,-होणें. *S. down*, पाय घासून -वाजवून-(वक्त्याला) गप्प करणें, बोलूं न देणें. *S. through*, निभावणें, थोडक्यांत सुटणें; परीक्षेंतून कसेंबसें सुटणें (पास होणें). *S.-penny*, miser. चिक्कू मनुष्य, कृपण. *S. acquaintance with*, एखाद्याशीं नवीनच ओळख दाखविणें,-लादणें. *A. s. of the pen*, एक दोनच महत्त्वाचे शब्द खरडणें, उदा० आपली सही. *Scra'ping*, *n.*

Scrā'per, *n.* (स्क्रेपर्)—(*esp.*) metal edge for scraping. किसणी, खवणी; खरवडणें, लोखंडी बूट-

घुसणें (दरवाज्याबाहेरचें). Scra'pings, कीस, खरवड, निपटी.

Scrăpp'y, *a.* (स्क्रॅ'पि)—fragmentary; disconnected; (U. S.) full of fight, pugnacious. तुकड्या-तुकड्यांचा, तुटक, त्रोटक; असंबद्ध; भांडखोर, युद्ध-कलह-प्रिय.

Scrătch, *v. t. & i.* (स्क्रॅच्)—to score surface of, wound slightly with claws or nails or something pointed; get scratched; rub with nails to relieve itching; make hole, strike out, mark through by scratching; erase name of, withdraw, from the list of competitors etc. ओरखडणें, ओरखडा काढणें, (अलं०) वरवर पाहणें, खोल न जाणें; खरचटलें जाणें, ओरखडा येणें; खाजवणें (नखांनीं); उकरणें, उखळणें, खोडणें, विचकुरणें, बोचकारणें; (नांव) खोडणें, खोडून टाकणें, पाठीं घेणें. *n.* a wound or mark or sound made by scratching; slight wound or cut; act of scratching oneself; starting line for race; competitor in handicap receiving no start. बिचकुरा, बोचकुरा; ओरखडा, चरा, बिरखडी; खाजवणें, कंड; (शर्यतीचा) आरंभ करण्याची नेमाची रेघ,-रेषा; बिनसवलतीचा (शर्यतींतील) खेळाडू,-उमेदवार. *a.* scratched together; impromptu; done at short notice. घाईघाईनें जमवलेला, कसाबसा गोळा केलेला; ऐन वेळचा, तात्कालिक; थोड्याच अवकाशांत-वेळेंत-केलेला, थोडक्या सूचनेनें केलेला. *To s. the srufuce of,* विशेष खोलांत न शिरणें; वरवर पाहणें. *S. one's head,* (विचारांत पडल्यामुळें) डोकें खाजवणें. *A s. of the pen,* लेखणीचा फटकारा. *S. cat,* तिरस्करणीय मूल, स्त्री.

Scrătch, *n.* (स्क्रॅच्)—*Old S.,* the devil. भूत, पिशाच.

Scrătch'ў, *a.* (स्क्रॅ'चि)—(of drawing etc.) done in scratches, unskilful or careless; (of pen) making sound of scratching or given to catching in paper; (of crew) of scratch character, not working together. ओरखाडलेलें, निष्काळजीपणानें काढलेलें (रेखाचित्र); कुरकुर वाजणारी, कागदाला भोंक पाडणारी (लेखणी, पेन); विजोड, आयत्या वेळीं जमा केलेली (खलाशी वगैरे मंडळी). *Scracth'ily, adv.*; *-iness, n.*

Scrawl, *v. i. & t.* (स्क्रॉल)—to write in hurried untidy way, to write awkwardly, mark (paper) *over, all over* with bad writing or lines. खरडणें, घिरखडणें, विरखुड्या काढणें, चितारणें. *n.* hurried writing, note or letter. खरडा, गिचमीड, खोडाखोड, घाईघाइनें खरडलेली चिठी,-पत्र.

Scrawn'ў, *a.* (स्क्रॉ'नि)—(U. S.) lean, scraggy, बारीक, हाडकुळा.

Scream, *v. i. & t.* (स्क्रीम्)—to utter a piercing cry; to laugh uncontrollably; to speak or sing with excessive loudness; (of steam, engine, etc.) whistle or hoot shrilly. किंकाळी फोडणें, किंचाळणें; खदखदां हसणें, हंसवणें; मोठ्यानें ओरडणें, ओरडून सांगणें; (कर्कश) शिटी मारणें,-देणें,-वाजणें. *n.* a piercing cry, a shrill cry; paroxysm of laughter; (U. S.) ludicrous occurrence. किंकाळी, कचकचाट, आरोळी; हंसण्याचा भर; हास्यास्पद प्रसंग,-गोष्ट. *Screaming farce, fun,* intensely funny. विलक्षण-अतिशय-मजेदार, गंमतीचा. *S. of a bunch,* (U. S.) lot of good fellows; (contempt.) good-for-nothings. सच्चे लोक, चांगली मंडळी; निरुपयोगी, कुचकामी लोक. *Scream'y, a.*; *Scream'ingly, adv.* *Scream'iness, n.*

Scree, *n.* (स्क्री)—(mountain) slope covered with loose stones that slide down when trodden on (often *pl.*). पर्वताची दगडाळ उतरण, घसरणारे लहान लहान दगड.

Screech, *n., v. i. & t.* (स्क्रीच्)—a scream of fright or pain or anger, a harsh shrill noise. (दुःखाची, भीतीची) किंकाळी, कर्कश स्वर, किंचाळी, भयानक आरोळी (फोडणें). *S. owl,* a barn owl. किंचाळणारें घुबड.

Screed, *n.* (स्क्रीड्)—a long tiresome harangue (esp. list of grievances) or letter; one of the fillets of mortar or strips of wood by which surface to be plastered is divided into compartments. (गाऱ्हाणीं पुढें मांडणारें) लांबलचक कंटाळवाणें व्याख्यान, लेख, पत्र; (गिलावा काढण्यासाठीं जागा विभागणारा) चुन्याचा किंवा लांकडी ठोकळा.

Screen, *n.* (स्क्रीन्)—a partition; a curtain; any object used as protection; sheet for display of lantern pictures; riddle for sorting coal etc. into sizes; board on which notices are posted; body proof against electric or magnetic induction etc. पडदा, आडवण, आडोसा, भिंत; आडपडदा. आसरा, आश्रय, संरक्षण, झाडांची छाया; (चलचित्रपटांतील चित्रें ज्यावर दिसतात तो) रुपेरी पडदा; (कोळसा चाळण्याची) उतरती चाळण; सूचना-फलक; (वीज, लोहचुंबक वगैरेंना प्रतिकार करणारा) अनुत्पादक-अप्रवर्तक-पडदा, आडपडदा. *v. t.* to afford shelter to, hide partly or completely (*from*); protect from detection or penalties; show on cinema screen; sort (coal etc.) with screens. ला आश्रय देणें, पडदा लावणें, आडोसा करणें; रक्षण-बचाव-करणें; लपविणें, पांघरूण घालणें, पाठीशीं घालणें; रुपेरी पडद्यावर (चित्रपटांतील चित्रें) दाखविणें; (कोळसा) चाळण्यांनीं चाळणें. *A cavalry s.,* (मुख्य सैन्याची हालचाल शत्रूच्या टेहळ्यांना न समजावी म्हणून) पुढें केलेले घोडेस्वार, घोडदळाचा आडोसा. *Under s. of night,* रात्रीच्या काळोखाचा आश्रय करून. *Screened coal,* चाळलेला कोळसा. *Screenings,* कोळशाचा चाळून उरलेला गाळसाळ, भुसा.

Screw, *n.* (स्क्रू)—a cylinder with spiral ridge called the thread running round it outside (*male s.*) or inside (*female s.*); metal male s. with slotted head for holding pieces of wood etc. together; wooden or other screw as part of appliance for exerting pressure; oblique curling motion; a miser or extortioner; (*sl.*) salary; unsound horse; revolving shaft with spiral

blades projecting from ship or airship at stern and propelling it; small twisted-up paper of tobacco, etc.; one turn of a screw. स्क्रू, मळसूत्र, पेच; कैची (लाकडाचे तुकडे इ० घट्ट धरण्याची); दाबाची (दाब देणारी) कैची; वर्तुळाकार-वक्र-गति; कद्रू, चिक्कू, पैसा पिळून काढणारा; पगार, वेतन; व्यंग असलेला,-थकलेला,-घोडा; (आगबोटीचा-विमानाचा-) पंखा; लहान कागदी पळी; फिरकी, वळसा. *v. t. & i.* to fasten or tighten with a screw; to press hard on, to oppress; to extort out of; contort, contract; be miserly. स्क्रूनें घट्ट बसवणें; फिरवणें, पिळवटणें, पेंचांत धरणें, चरकांत धरणें, छळ करणें; (पैसा वगैरे) उकळणें; वळ्या-सुरकुत्या-पडणें; चिक्कू असणें. *Male s.*, नर फिरकी,-मळसूत्र. *Female s.*, मादी (फिरकी). *Left-handed s.*, डाव्या फिरकीचा. *Have a s. loose, there is a s. loose*, डोकें-मेंदू-ठिकाणावर नसणें. *Put the s. on*, वर सक्ती करणें. *S. one's courage to the sticking place., s. up one's courage*, धीर धरणें, हिंमत धरणें,-करणें. *S.-cutter*, स्क्रू-मळसूत्र-पाडण्याचें हत्यार. *S. driver*, डिसपीस, पेंचकस. *S.-jack*, मोठमोठें वजन उचलणारा दुमकळस; दंतवैद्याचें शस्त्र,-हत्यार. *S. pine*, केवडा. *S. press*, दाबून टाकण्याचें-दाबण्याचें (पुस्तकें बांधणाऱ्याचें) यंत्र. *S. propeller*, आगबोटीचा-विमानाचा पंखा. *S.-tap*, मादी-स्क्रू पाडण्याचें हत्यार. *S.-wrench*, स्क्रू काढण्याचें यंत्र. *Screw'able, a.*

Screwed, *a.* (स्क्रूड)—(*sl.*) drunk. दारू प्यालेला, झिंगलेला.

Scrib'ble, *v. i. & t.* (स्क्रि'बल्)—to write hurriedly or carelessly; to fill with worthless writing; be (inferior) journalist or author. खरडणें. भरकटणें; वर्तमानपत्रकार-लेखक-कवि बनणें. *n.* scrawl, hasty note. खरडलेली चिठी,-लेख.

Scribe, *n.* (स्क्राइब्)—a person who can write; a clerk or secretary, a writer, a penman; pointed instrument for marking; (Bibl.) interpreter of Jewish law. लेखक, ग्रंथकार, लिहिणारा; कारकून, कारभारी; (विटांवर, चिरकामाच्या लांकडावर) खुणेच्या रेघा मारण्याचें हत्यार; यहुदीधर्मशास्त्रप्रवीण,-शास्त्री.

Scrip, *n.* (स्क्रिप्)—(*arch.*) a wallet; a provisional certificate of money. जुगदान, पिशवी, झोळी; तात्पुरती चिठी, पावती.

Script, *n.* (स्क्रिप्ट्)—handwriting; printing type imitating handwriting; (Law) original document (opp. *copy.*). हस्तलेख; हस्तलेखासारखा टाइप, लिपि; अस्सल दस्तऐवज, कागदपत्र.

Scriptor'ium, *n.* (स्क्रिप्टॉ'अरिअम्)—(*pl.-ia*) a room set apart for writing esp. in a monastery. ग्रंथलेखनशाला; लेखनाची खोली.

Scrip'ture, *n.* (स्क्रि'प्-चर्)—the Bible, a Bible text; *a* or *the* quotation from the Bible, any sacred book or writing; (arch.) inscription. बायबल (धर्मग्रंथ), बायबलची प्रत; बायबलमधील उतारा; (ख्रिश्चन धर्माहून इतर धर्माचा) धर्मग्रंथ; शिलालेख. (*attrib.*) taken from or relating to the Bible. बायबलांतून घेतलेला, बायबलसंबंधीं. *S.-teacher*, (गरीब लोकांना त्यांच्या घरीं) बायबल वाचून दाखविणारा. *Scriptural, a.* (स्क्रिप्चरल्) based on the Bible; of, taken from, the Bible. बायबलाचा आधार असलेला, शास्त्रोक्त; बायबलचा, बायबलमधील. *-turally, adv.* बायबलाप्रमाणें; यथाशास्त्र.

Scriv'ener, *n.* (स्क्रि'व्हेनर्)—(*hist.*) drafter of documents; a notary, broker, money-lender. खतेंपत्रें लिहिणारा; सावकारी दलाल, अडत्या, व्याजबट्टा करणारा, सावकार.

Scrobi'culate,-ated, *aa.* (स्क्रॉ-बि'क्युलट,-लेटिड्)—(bot., zool.) pitted, furrowed. खळग्या-सुरकुत्या-पडलेला. [L. *scrobis*, ditch]

Scrŏf'ŭlă, *n.* (स्क्रॉ'फ्युला)—constitutional disease with glandular swellings of the neck, and tendency to consumption. गंडमाळा (रोग). *-ulous, a.*; *-ulousness, n.*

Scroll, *n.* (स्क्रोल्)—a roll of parchment or paper; a schedule or list; book of ancient roll-form; sculptured ornament imitating roll of parchment, head of fiddle, flourish in writing etc. सुरळी; भूर्जपत्राची-चर्मपत्राची-कागदाची गुंडाळी, चर्मपत्रालिखित पुस्तक; सुरळीच्या आकारानें गुंडाळलेलें; खोदीव सुरळीच्या आकाराचें नक्षीकाम, फिडलचा वांकडा शेंडा, लेखणीचा फांटा; वळण, इ. *v. t. & i.* to curl up like paper; adorn with ss. (in pa. p.). कागदासारखी सुरळी होणें, गुंडाळणें; गुंडाळ्यांनीं शोभा आणणें.

Scrō'tum, *n.* (स्क्रो'टम्)—(*pl.-ta*), the pouch containing the testicles. (पुरुषाचा) अंडाशय, वृषण, अंडकोश. *Scro'tal, a.* अंडकोशाचा. *Scroti'tis, n.* अंडकोश दाह, सूज. *Scro'tocele, n.* अंडकोशवृद्धि.

Scrŭb', *v. t. & i. & n.* (स्क्रब्)—to rub hard with something coarse or bristly; use scrubbing brush; extract for use elements from. जोरानें घांसणें, चोळणें, ब्रशानें चोळणें; उपयोगासाठीं (दगडी कोळशापासून) मूलतत्त्वें काढणें. *Scrub'ber, n.* (esp.) (दगडी कोळशाचें) धूम्रशोधक (यंत्र). *Scrub'bing, n.*

Scrŭb, *n.* (स्क्रब्)—brush-wood, stunted trees; an insignificant person, animal, plant; worn or short bristled brush or moustache. झुडपांचें रान, खुरटलेलीं झाडें; खेटरखाऊ, क्षुद्र-मनुष्य; क्षुद्र प्राणी किंवा वनस्पति, ठोकण झालेला ब्रश,-मिशा. *S.-oak*, अमेरिकेंतील खुरटलेलें ओक (झाड). *Scrub'by, a.* भिकार, गचाळ, खुरट. *Scrub'biness, n.*

Scrŭff, *n.* (स्क्रफ्)—back of the neck as used to grasp and lift or drag. मानेची मागची बाजू, मानगुटी. *Take by the s. of the neck*, मानगुटी पकडणें.

Scrŭmp'tious, *a.* (स्क्रं'प्शस)—(sl.) first-rate, delightful. पहिल्या प्रतीचा, उत्तम.

Scru'ple, *n.* (स्क्रू'पल्)—weight-unit of 20 grains; very small quantity; feeling of doubt or hesitation about something for fear of doing wrong, conscientious objection. वीस ग्रेनचें-दहा गजांचें -वजनी माप; अगदीं अल्प भाग; शंका, किंतु, दिक्कत, विकल्प, संदेह, मनाची दोचणी. *v. t.* to feel or be in-

fluenced by scruples; hesitate owing to scruples. मनांत शंका येणें, दिक्कत वाटणें; काचकूच करणें, ओढतें घेणें. *To make no s. to do*, विनदिक्कत-न कचरतां-करणें. *A man of no s.*, उफराट्या-उलट्या -काळजाचा, कसलीहि दिक्कत न बाळगणारा. *He does not s. to say*, असें म्हणायला त्याला दिक्कत वाटत नाहीं. [L. *scrupus*, sharp stone]

Scru'pūlous, *a.* (स्क्रू'प्युलस्)—careful not to offend; conscientious; marked by extreme care, punctilious. मनांत किंतू आणणारा, अत्यंत पापभीरु; सदसद्विवेकबुद्धीला अनुसरून चालणारा; फार बारीक पाहणारा, अत्यंत सरळ. *Scrupulos'ity, n., Scru'pulously, adv.*;*-pulousness, n.*

Scrutā'tor, *n.* (स्क्रूटे'टर्)—investigator. अन्वेषक, शोधक.

Scrutīneer', *n.* (स्क्रूटिनि'अर्)—one who scrutinizes, an official conducting scrutiny of votes. मतांची मोज करणारा, मतांची ग्राह्याग्राह्यतेविषयीं छाननी करणारा.

Scru'tīnize, *v. t.* (स्क्रू'टिनाइझ्)—to look closely at; to examine critically. निरीक्षण करणें; काळजीपूर्वक तपासणें. *Scru'tinizingly, adv.* चिकित्सकबुद्धीनें, सूक्ष्म रीतीनें.

Scru'tīnў, *n.* (स्क्रू'टिनि)—critical gaze; detailed examination; official examination of votes cast in election to test their validity. न्याहाळून पाहणें, टेहळणी, निरीक्षण; तपास; मतांची छाननी, चौकशी. [L. *scrutari*, search *fr. scruta*, broken pieces]

Scŭd, *v. i.* (स्कड्)—to run or fly straight and fast; skim along; (Naut.) run before the wind. जोरानें किंवा झपाट्यानें जाणें, वाऱ्यापुढें सोसाट्यानें-झांझां करीत जाणें. *n.* scudding motion; vapoury driving clouds. झपाट्याची चाल; वाऱ्यानें वितळणारे ढग.

Scŭf'fle, *v. i.* (स्क'फल्)—to struggle confusedly with pushing about etc. धक्काबुक्की-धक्काधक्की-करणें. *n.* disorderly fight. धक्काधक्की, झोंबाझोंबी, हमरीतुमरी, धक्काबुक्की.

Scŭg, *n.* (स्कग्)—(sch. sl.) person lacking spirit, sociability, sportsmanship, etc. निरुत्साही, एकलकोंड्या इसम.

Scŭll, *n.* (स्कल्)—one of the small oars of which a pair is worked by rover, oar resting in nick on boat's stern to propel like ship's screw. लहान वल्हें; सुकाणूच्या बाजूला बांधून ठेवलेले व पंख्याप्रमाणें पाणी कापणारें वल्हें. *v. i. & t.* to use sculls; propel boat with sculls. वल्हीं मारणें; वल्ह्यांनीं होडी पुढें नेणें,-चालवणें. *Sculler, n.* a sculling boat; one who sculls. दोन वल्ह्यांनीं वल्हविण्याची नाव,-होडी; लहान वल्हें मारणारा.

Scŭll'erў, *n.* (स्क'लरि)—back kitchen in which dishes are washed, &c. स्वयंपाकाच्या मागची धुण्याभांड्याची खोली.

Scŭll'ion, *a.* (स्क'ल्यन्)—a dish-washer. भांडीवाशा.

Scŭlp'tor, *n.* (स्क'ल्प्टर्)—a person who sculptures, one who carves figures. खोदकाम करणारा, मूर्तिकार, नकशीवाला. *Sculp'tress, n. f.*

Scŭlp'ture, *n.* (स्क'ल्प्चर्)—art of forming representations by chiselling, carving, casting, or modelling; a work or works of sculpture; (Zool., Bot.) raised or sunk markings on shell, etc. मूर्ति किंवा पुतळा करण्याची कला, मूर्तिकला; खोदकाम, नकशीचें काम; (शंख वगैरेवरील) निम्नोन्नत भाग, उंचसखल खुणा. *v. t. & i.* to represent in or adorn with or do sculpture. खोदणें, नकशीकाम करणें. *Scul'ptural, a.*

Scŭlpturesque', *a.* (स्कल्प्चरें'स्क्)—fit for or suggesting a sculpture. खोदकामाला योग्य, खोदकामाचा.

Scŭm, *n.* (स्कम्)—impurities that rise to the surface of a liquid; (*fig.*) the worst part or offscourings *of*. (कढवितांना वर आलेली) मळी, तवंग, फेस, कड, गाळ, खरवड. *v. t. & i.* to take *s.* from; be or form a *s.* on, (of liquid) develop *s.* मळी काढणें; (वर) मळी येणें,-जमणें; फेसाळणें. *Scum'my, a.* मळी,-तवंग,-फेस आलेला,-जमलेला.

Scŭpp'er, *n.* (स्क'पर्)—a hole in ship's side to carry off water from desk. जहाजाच्या मजल्यावरील (पाणी बाहेर जाण्यासाठीं) भोंक. *v. t.* (*sl.*) to surprise and massacre, sink (ship, crew), do for. अकस्मात् हल्ला करून कत्तल करणें. (जहाज) बुडविणें, नाश करणें, ठार मारणें.

Scŭrf, *n.* (स्कर्फ्)—flakes on the surface of skin cast off as fresh skin develops below, esp. those of head; any scaly matter on surface. (डोक्यांतील) कोंडा, खरपें, मळ; भूस, मळी. *Scurf'y, a. Scurfi'ness, n.*

Scŭ'rrilous, *a.* (स्क'रिलस्)—grossly or obscenely abusive, opprobrious, foul-mouthed. हलकट, अपशब्दमय, तोंडाचा फटकळ, शिवराळ. *Scu'rril (e), a.* (arch.); *Scurril'ity, n.* पचकळपणा, अभद्रपणा, अश्लील भाषण.

Scŭ'rrў, *v. i.* (स्क'रि)—to run hurriedly (esp. with short quick steps), to hurry. पळून झपाट्यानें जाणें. *n.* an act or sound of scurrying; bustle. झपाटा, सरसर आवाज; गडबड, धांदल. *The scurrying mice*, सुरदिशीं पळून जाणारे उंदीर.

Scŭrv'ў, *a.* (स्क'र्व्हि)—paltry, dishonourable, contemptible, low, mischievous. क्षुद्र, गचाळ, गदळ, हलकट, पाजी. *n.* a disease due to lack of fresh food. रक्तपिती (रोग) *Scurvi'ed, a.* रक्तपिती झालेला. *S. grass*, plant of mustard family used against scurvy. रक्तपितीवर औषधी वनस्पति. *S. leaven*, रक्तपित्त.

Scŭt, *n.* (स्कट्)—a short tail, esp. of rabbit, hare or deer. आंखूड शेपटी, लांडी शेपटी.

Scŭ'tage, *n.* (स्क्यू'टिज्)—(hist.) money paid by feudal land-owner in lieu of personal service

जातीनें नोकरी न करतां जमीन धारण करणाऱ्यानें मालकास दिलेला कर,-खंड.

Scŭtt'er, *v. i.* (स्क'टर्)—to run in fussy or startled way. घाबरून पळून जाणें, सैरावैरा धावणें.

Scŭt'tle, *n.* (स्क'टल्)—a metal pan, a coal-s.; amount of coal that fills a coal-s. शिपतर, घमेल; शिपतरभर कोळसा.

Scŭt'tle, *n.* (स्क'टल्)—a hole with lid in ship's deck or side or in roof or wall. (जहाजाचें) भोंक, झरोका, खिडकी; शहाणें, झरें. *v. t.* to make hole in ships esp. for purpose of sinking. (जहाज बुडविण्यासाठीं) भोंक पाडणें. *v. i.* to scurry; make off; retreat in undignified way. झपाट्यानें पळून जाणें; नामुष्कीनें पळता पाय घेणें,-माघार घेणें. *n.* hurried gate; act of scuttling. लगबगीचें चालणें,-चाल; माघार

Scy'lla, *a.* (सि'ला)—*S. & Charybdis,* six-headed monster living on a rock, and whirlpool, so placed on opposite sides of Straits of Messina that it was hard to steer clear of one without being caught by the other. इटालीच्या किनाऱ्याजवळील मेसिनाच्या आखाताच्या एका बाजूचा खडक, व दुसऱ्या बाजूचा पाण्याचा भोंवरा. खडकावर राक्षस राहतो. तेव्हां या दोहोंमधून निभावून जाणें भयंकर कठीणच, असें प्राचीन ग्रीक लोक मानीत. *From s. to cha.,* एका संकटांतून दुसऱ्या संकटांत, इकडे आड इकडे विहीर, आगींतून फोंफाट्यांत.

Scȳthe, *n.* (साइद्)—a mowing and reaping implement swung with both the hands; blade continuing axle of ancient war-chariot at each end. कोयता, विळा; प्राचीन लढाऊ रथाच्या कण्याच्या दोन्ही टोकांची पट्टी,-पातें. *v. t.* cut with s. कोयत्यानें (गवत वगैरे) कापणें. *Scythed, a.*

Sea, *n.* (सी)—the vast expanse of salt water; swell, great billow; a large lake; a vast quantity or expanse of (*fig.*). समुद्र, सागर, दर्या; उंच-मोठी-लाट; मोठें सरोवर; (अलं०) समुद्र, विपुलता. *On the sea,* जहाजांत वगैरे; समुद्रकिनाऱ्यावर असलेला. *To go to s.,* become a sailor. खलाशाचा धंदा करणें. *Follow the s.,* खलाशी होणें,-बनणें. *Put to s.,* बंदर-किनारा-सोडून जाणें. *At s.,* away from, out of sight of, land; perplexed, not knowing what to do. जमिनीपासून दूर, भरसमुद्रांत, समुद्रावर; गोंधळेला, किंकर्तव्यतामूढ. *The high seas.,* किनाऱ्यापासून तीन मैलांपलीकडचा समुद्र, भरसमुद्र. *Mistress of the s.,* or *ss.,* बलाढ्य-बलिष्ट-आरमारी राष्ट्र. *The seven ss.,* सातसमुद्र (आर्क्टिक, अँन्टार्क्टिक, उ० पॅसिफिक, द० पॅ०, उ० अटलँटिक, द० अट०, हिंदी हे सात महासागर). *A heavy s.,* मोठ्या लाटा उसळत असलेला समुद्र. *Ss. mountains high,* डोंगराएवढ्या-पर्वतप्राय-लाटा. *S. like looking-glass* or *sheet of glass,* quite smooth. अगदीं संथ समुद्र. *Ss. of blood,* अनावर रक्तपात. *S. air,* (आजाऱ्यांकरितां) समुद्रकांठची खारी हवा. *S. anchor,* तुफानाच्या वेळचा तरता नांगर. *S. bear,* उत्तरध्रुवाकडचें पांढरें अस्वल, लोंकयुक्त सील मासा. *S. bells,* समुद्रकांठचें वेल, वेलींचीं झाडें. *S. board,* coast region. समुद्रकिनाऱ्यावरील प्रदेश, समुद्रकांठ. *S. breeze,* खारा वारा, मतलई. *S. borne* (commerce, goods) समुद्रावरचा, जलमार्गानें जाणारा (व्यापार, माल). *S. captain,* दर्यासारंग, जहाजाचा कसलेला-मुरलेला-तांडेल (कप्तान). *S.-cunny,* सुकाण्या, सुकाणूं धरणारा खलाशावरचा अधिकारी. *S.-cow,* तिमिंगलजातीचा मासा, समुद्रांतील प्राणी. *S.-dog,* kinds of seal; dog-fish; old sailor (esp. of the Elizabethan sea-captains). सील मासा, डॉग-मासा, मुरलेला दर्यासारंग. *S.-fight,* दर्यावरील-आरमारी-युद्ध. *S.-front,* part of town facing the sea. शहराचा समुद्राभिमुख भाग. *S.-gauge,* जहाजाची (पाण्यांत बुडालेली) खोली, तलमज्जन; समुद्रतलमापक (यंत्र). *S.-girt,* समुद्रवेष्टित, समुद्रवलयांकित (बेट, इ०). *S.-god,-goddess,* समुद्राची देवता, जलदेवता, वरुण. *S.-gull,* a sea-bird. जलकुक्कुट (पक्षी). *S.-horse,* (जलदेवाच्या रथाचा) पाणघोडा, एक जातीचा मासा. *S.-kale,* एक जातीची भाजी. *S. king,* चांचे लोकांचा राजा. *S.-level,* समुद्रसपाटी. *S. legs,* हालत्या गलबतांत-बोटींत-चालण्याची संवय. *S. line,* समुद्रक्षितिजरेषा. *S.-lion,* मोठ्या कानाचे सील मासे. *S.-man* (-मन्) (pl.-*men*), खलाशी; कसलेला कर्णधार,-सुकाण्या. *S. mew, S. gull,* जलकुक्कुट. *S.-mile,* ६०८० फुटांचा सामुद्रिक मैल. *S.-piece,* समुद्राच्या देखाव्याचें-समुद्रावरील देखाव्याचें-चित्र. *S.-plane,* जलसंचारी विमान, पाण्यावर उतरूं शकणारें विमान. *S. rover,* चांचा, चांचेगिरी करणारें जहाज. *S.-scape,* सामुद्रिक देखाव्याचें चित्र. *S.-serpent,* पाणसाप; पाणबुडी (सर्प) राशि. *S.-side,* समुद्राची बाजू, समुद्र-दर्या-किनाऱ्याची पट्टी. *S.-sunflower,* समुद्रकमळ (प्राणी). *S.-urchin,* समुद्रांड. *S.weed,* समुद्रवेली, समुद्रवनस्पति. *Sea'ward, a., adv. & n.; sea'wards, adv.*

Sea'fāring, *a.* (सी'फेअरिंग्)—occupied in sea voyages, employed in navigation. समुद्रपर्यटन करणारा, दर्यावर्दी. *n.* such occupation. दर्यावर्दीपणाचा धंदा. *S.-farer, n.*

Sea'port, *n.* (सी'पोर्ट्)—a town with harbour. बंदर, बंदरी गांव.

Sea'sick, *a.* (सी'सिक्)—suffering sickness caused by motion of ship etc. बोटीच्या हेलकाव्यानें वांति होणारा, बोट लागलेला. *S.-sickness, n.*

Sea'worthy, *a.* (सी'वर्दि)—(of ship) in fit state to put to sea, strong and well-rigged etc. समुद्रांत लोटण्याजोगें, (डोलकाठी, दोरखंडें वगैरे) मजबूत साहित्य असलेलें (जहाज). *S.-worthiness, n.*

Seal, *n.* (सील्)—impression made on wax; gem or metal stamp used in making seal; act or gift regarded as ratification of; significant mark (*fig.*); an amphibious marine animal. शिक्का, सील, मोहोर, शिक्क्याचा छाप; शिक्कामोर्तब; चिन्ह, खूण; सील नांवाचा जलचर प्राणी. *v. t.* to affix a seal to, to ratify, to confirm; close

securely; stop up; hunt seals. शिक्कामोर्तब करणें, सील करणें; पक्कें करणें; पक्का बंद करणें; सील मासे पकडणें. *Given under my hand and s.*, माझ्या सहीशिक्क्यानिशीं. *To set* one's *s. to*, मंजूर-कायम-करणें. *S ring*, मोहोरेची आंगठी. *S. of love*, प्रेमाचें शिक्कामोर्तब-चुंबन, अपत्यजन्म, इ० *My lips are sealed*, माझें तोंड गप आहे, मला बोलतां कामा नये. *Is a sealed book to me*, हें मला अज्ञातच राहणार. *S. rookery*, सीलमाशांचें उत्पत्तिस्थान.

Seal'ing-wăx, *n.* (सीलिंग-वॅक्स्)—composition for sealing letters, &c. सील करण्याची लाख, सीलाची लाख.

Seam, *n.* (सीम्)—line of junction between two edges, line of separation between strata; thin stratum separating thicker ones. शिवण, टूण; सांधा, भेग, संधिरेषा; सांधणारा पातळ थर. *v. t.* to unite by a seam, to join by seaming. शिवणें, सांधणें, जोडणें. Seam-less, *a.* (esp of garment) made of one piece. विनशिवणींचा, एकसंधी. *Seam'y*, शिवण-टूण-असलेला, सांधलेला. *Seamy side*, आयुष्यांतील कमी महत्त्वाचा भाग, काळी बाजू.

Seam'stress, Semp-, *n.* (सीम्स्ट्रिस्, सेम्स्-)—sewing-woman. शिवणकाम करणारी-विणकाम करणारी-स्त्री.

Se'ance, *n.* (से'आन्स्)—a sitting of a society or deliberative body; a meeting for exhibition or investigation of spiritualistic phenomena. सभा, बैठक, अधिवेशन, सत्र; गूढविद्याचिकित्सा, -संशोधन. [F]

Seanad Eireann, *n.* (शॅनड् एअरन्)—upper chamber of the Irish Free State Legislature. स्वतंत्र आयर्लंडचें कायदेमंडळ.

Sear, *v t.* (सिअर्)—to wither or blast; to scorch with hot iron; to make callous or insensible, to deaden. सुकून जाणें, वाळणें, पोळणें; वाळवणें; भाजणें, चरका देणें; कोडगा किंवा लोचट करणें. *a.* सुकलेला, सुकून गेलेला. *The s., the yellow leaf*, old age. म्हातारपण.

Search, *v. t. & i.* (सर्च्)—to look to find something; to probe or penetrate into. शोधणें, तपास करणें; हुडकणें, कानाकोंपरा शोधणें. *n.* act of searching; investigation: quest. शोध; तपास, झडती. *in search of*, शोधांत, तलासांत. *Right of s*, (मनाई केलेल्या मालाबद्दल तटस्थ राष्ट्रांच्या जहाजांची) झडती घेण्याचा (युध्यमान राष्ट्रांचा) हक्क. *S. warrant*, झडतीचा (सरकारी) हुकूम. *Sear'ching*, कडक, कसून केलेली,-घेतलेली.

Sick'ness, *n.* (सिं'क्-नित्)—being ill, a disease; vomiting or inclination to vomit. आजार, आजारीपणा; रोग; विकार, विकृति; मळमळ, ओकारी. *Sleeping s.*, fatal African disease marked by somnolence and nerve-paralysis. आफ्रिकेंतील निद्रा (प्रधान) रोग (हा सेट्संि माशांमुळें जडतो व प्राणहारक असतो). *Sleepy s.*, a world-wide recently identified disease, distinct from sleeping sickness, though lethargy is a mark of both. (जागतिक, नवीन आढळून आलेला,) सुस्तीप्रधान-रोग.

Side, *n.* (साइड्)—(Math.) one of the surfaces bounding an object; either surface of thing regarded as having only two; one of the lines bounding a superficial figure; the part of the body that is to the right or left; one aspect of a thing; one of two contrasted parties or sets of opponents; slope of a hill; (sl.) swaggering gait or assumption of superiority; line of descent through father or mother; (Billiards) spinning motion given to ball by striking it on side; (attrib.) subordinate. बाजू, पृष्ठभाग, तोंड; बाजू, अंग; पार्श्व, बाह्यरेषा, बाजू; तट, काठ, किनारा; (शरीराची डावी किंवा उजवी) बाजू, कूस, कक्षा; कोणत्याही गोष्टीची एक बाजू; पक्ष, फळी, तरफ, टोळी, मंडळी; उतरण; ताठ्यानें चालणें, -वागणें, तोरा; पक्ष; वंश, शाखा; चेंडूला मिळालेली गिरकी; (विशे०) गौण, अप्रधान, अप्रस्तुत. *v. i. To side with*, to espouse the cause of. बाजू घेणें, पक्ष धरणें. *Sent him six sides of argument*, सहा ताव मजकूर लिहून आपलें म्हणणें त्याला कळविलें. *Right, wrong, s. of cloth*, (कापडाचें) वरचें अंग-वरची बाजू, आंतलें अंग. *S. by s.*, standing close together, esp. for mutual support. चिकटून, लागून; खांद्यास खांदा लावून (परस्परांस साह्य करण्यासाठीं). *Shake* one's *ss.*, laugh heartily. खोखो हंसणें, खदखदां-पोटीं फुटेसतों-हंसणें. *S.-splitting*, हसवून मुरकुंडी वळविणारा. *Debit s., Credit s.*, (जमाखर्चांतील) खर्चाची-बाजू, जमेची बाजू. *S. issue*, गौण-गैरलागू-मुद्दा. *S. line*, फुरसतीचा धंदा, काम, गौण काम. *On one s.*, aside. बाजूला, एकीकडे, एकपक्षीं. *Take ss.*, दोहोंपैकीं एकाचा पक्ष धरणें,-ची बाजू घेणें,-उचलणें. *On this s. of, on this s., the Himalayas*, हिमालयाच्या या बाजूला. *On this s. the grave*, in life. जिवंतपणीं, आयुष्य असेतों. *On the right, wrong, s. of 40*, वयाच्या चाळिशीच्या खालीं,-आंत; चाळिशीच्या वर,-चाळिशी उलटलेला. *On the wrong s. of the door*, shut out. दरवाज्याबाहेर टाकलेला, दार बंद करून घेतलला. *On the mother's side*, आईच्या-मातृ-वंशाकडून. *Puts on, has, too much s.*, फारच घमेंड आहे, फारच मिजाशी आहे; *Si'dy, a.* घमेंडखोर, कुरेंबाज. *S.-arms*, तलवार, बायनेट, पिस्तूल वगैरे (बाजूला लटकावण्याचीं) हत्यारें. *S.-board*, (जेवणाच्या खोलींतील पेशा वगैरे ठेवण्यासाठीं) भिंतीशीं ठेवलेलें मेज,-पेटी.. *S-burn*, (U. S.) short side whisker. बाजूचा आखूड (निशीचा) कल्ला. *S.-car*, a jaunting car; car for passenger (s) attachable to side of motor-cycle. चैनींत फिरण्यासाठीं गाडी; मोटारसायकलच्या बाजूची (बसणाऱ्यासाठीं) बैठक. *S.-long, oblique*, not direct. तिरपा, बाजूकडचा, आडवा. *S.-look*, (नेत्र) कटाक्ष. *S.-note*, marginal note. (मजकुराच्या) बाजूला (समासांत) दिलेली टीप, पार्श्वटीप. *S.-saddle*, (दोन्ही पाय एकाच बाजूला सोडून) स्त्रियांसाठीं घोड्यावर बसण्याचा जीन, खोगीर, जनानी जीन. *S.-seat*, (गाडीच्या) बाजूला टेकून बसण्याची बैठक. *S.-show*, minor attraction at an exhibition, etc. उपप्रेक्षणीय, कमी महत्त्वाचा-खेळाचा-देखाव्याचा-पोटभाग. *Sides'man*, assistant to church-warden. ख्रिस्ती देवळाच्या रखवालदाराचा-

व्यवस्थापकाचा-हुद्दयम. *S.-stroke*, बाजूचा,-बाजूवरील, तडाखा; आकस्मिक गोष्ट; क्षुल्लक-सांदर्भिक-गोष्ट; पोहतांना पाण्यावर हात मारण्याचा प्रकार. *S.-view*, पार्श्व-देखावा. *S.-walk*, (U. S.) foot-path. पदपथ. *S.-wind*, बाजूचा,-कडेचा,-वारा; अप्रत्यक्ष साधन,-वजन. *Side-ways, adv.* बाजूकडे, बाजूने, आडवा.-*sided, a.*;-*sid'edly, adv.*-*sid'edness, n.*; *Sid'eless, a.*

Sidēr'eal, *a.* (सायडी'अरिअल्)—of, determined by means of, the stars. नक्षत्राचा, नाक्षत्र. *S. year*, सौरवर्ष [L. *sideris*, a star]

Side'-light, *n.* (सा'इडलाइट)—light from side; (*fig.*) incidental illustration or information on a subject; (Naut.) red port or green star-board light on ship under way. बाजूचा उजेड; आजूबाजूची-अवांतर-माहिती; (गलबताच्या) बाजूचा तांबडा किंवा हिरवा दिवा.

Side'-slip, *v. i.* (सा'इडस्लिप)—to skid; (Aeronaut.) move sideways instead of forwards. (चाक) घसरणें, सरकणें; (विमान वगैरे पुढें न जातां) बाजूला सरकत सरकत पुढें जाणें. *n.* skid; side-movement; shoot of tree; (*fig.*) illegitimate child; division at side of stage for working scenery. घसरगुंडी; पार्श्वगति; झाडाचा कोंब; अनौरस संतति,-मूल; (देखावा वगैरे तयार करण्याचा) रंगभूमीच्या बाजूचा विभाग.

Side'track, *n.* (सा'इडट्रॅक)—a siding or by-path. बाजूचा-आड-रस्ता, पार्श्वमार्ग. *v. t.* to turn into siding, shunt; postpone consideration of or dealing with. बाजूच्या रस्त्यावर-रुळावर-घेणें; विचार पुढें ढकलणें.

Si'ding, *n.* (सा'इडिंग)—a short track by the side of railway for shunting; (U. S.) boards forming sides of timber-building. बाजूचे रूळ; बाजूच्या फळ्या.

Si'dle, *v. i.* (सा'इडल्)—to walk sidelong esp. in deferential manner. (च्या) बाजूबाजूनें अदबीनें चालणें.

Siege, *n.* (सीज्)—operations of encamped force for gaining possession of a fortified place, continued endeavour to get possession; besieging or being besieged (oft. *fig.*). (किल्ल्याचा किंवा जागेचा ताबा मिळण्याकरितां घातलेला) सैन्याचा वेढा किंवा गराडा; वेढा, चिकाटीचा प्रयत्न. *To lay s. to*, (ला) वेढा घालणें.

Siĕnn'a, *n.* (सिए'ना)—a rich reddish-brown pigment or its colour. तांबुस खडी,-सुरम; त्याचा रंग.

Siĕ'rra, *n.* (सिए'रा)—a chain of jagged mountains, esp. in Spain or America. दंतुर पर्वतांची रांग.

Siĕs'ta, *n.* (सिए'स्टा)—mid-day rest usual in hot countries. (जेवणानंतर दुपारची) पानकुशी, आराम, निद्रेचा डुलका.

Sieve, *n.* (सिव्ह)—utensil with network or perforated bottom through which liquids or fine particles can pass; a person who cannot keep secrets. चाळण, चाळणी, रोवळी, (तांदूळ वगैरे धुण्याकरितां) रोवळी, घोळणा; तोंडांत कोणतीही गोष्ट न राहणारा मनुष्य. *v. t.* sift. चाळणें.

Sift, *v. t. & i.* (सिफ्ट)—to separate with or pass through a sieve; to subject (facts, &c.) to close scrutiny, to examine minutely; (of snow) fall as from sieve. चाळणें, गाळणें; कसोशीनें तपासणी करणें, छाननी करणें; (बर्फ) गाळल्याप्रमाणें गळणें,-पडणें.

Sigh, *v. i.* (साय्)—to draw deep breath as in weariness, etc.; to mourn or yearn *for*; express with sighs; (of wind) make sound like sighing. उसासा टाकणें, सुस्कारा टाकणें; दुःख करणें, (इच्छित,-हरवलेल्या वस्तूबद्दल) हायहाय करणें; सुस्कान्याप्रमाणें-सू सू-वाहणें. *n.* act or sound of sighing, single deep breath. उसासा, सुसकारा, *A s. of relief*, समाधानाचा सुस्कारा, उसासा. *Sigh'ingly, adv.*

Sight, *n.* (साइट)—faculty of vision; a scene or spectacle; seeing or being seen; range of or region open to vision; precise aim with gun or observing instrument, an appliance attached to gun, etc. for assisting this; (colloq.) large quantity. दृक्शक्ति; दृष्टि, डोळे, नजर; दृश्य, देखावा, तमाशा, मौज; पाहणें, अवलोकन, पाहिलें जाणें; दृष्टीचा टप्पा,-टापू,-पल्ला, दृग्विषय; अचूक नेम, (बंदुकीची) माशी, मासकी, मख्खी; विपुलता, पराच, अधिक. *v. t.* to catch sight of (esp. by coming near), adjust sights of, aim (gun) with *ss.*; provide (gun, etc.) with ss. पहाणें, दिसणें, दिसें लागणें; (बंदुकीची) माशी जुळवणें,-लावणें; माशांच्या साह्यानें नेम धरणें; बंदुकीला माशी बसविणें. *Long s.*, requiring objects unusually far for clear definition. दीर्घदृष्टि. *Short* or *near s.*, ऱ्हस्व दृष्टि. *short s.*, (*fig.*) कोती दृष्टि (बुद्धि). *Know by s.*, तोंडओळख असणें. *Loss of s.*, आंधळें होणें, अंधत्व. *Second s.*, power of internal vision by which future or distant occurrences are presented. (भविष्यकाळच्या गोष्टी आगाऊ समजण्याची) अंतर्दृष्टि, अंतर्ज्ञान, भविष्यज्ञानदृष्टि. *Catch, lose, s., of*, नजरेस पडणें, दिसणें; नजरेआड जाणें, दिसेनासा होणें. *Get a s. of*, manage to see. नजरेस पाडून घेणें, कसेंपसें पाहणें. *At, on, s.*, देखतांक्षणींच. *Payable at sight* (a draft etc.), दर्शनी (हुंडी इ.). *At first s.*, prima facie. सकृद्दर्शनीं, वरवर पाहतां. *put out of s.*, दृष्टिआड करणें, कानाडोळा करणें. *out of s., out of mind*, नजरेआडच्या गोष्टी विसरल्या जातात. *out of my s.!*, दृष्टिआड हो! चालता हो! *A s. for sore eyes*, a welcome visitor. आवडीचा पाहुणा. *His face is a perfect s.*, त्याचा चेहरा पहण्यासारखा (जखमांनीं वगैरे विद्रूप) झाला आहे. *S.-worthy*, पाहण्यालायक. *Sighted, a, -edly, adv., -edness, n.*

Sight'less, *a.* (सा'इट्-लेस्)—blind; (poet.) invisible. दृष्टिहीन; आंधळा; अदृश्य.

Sight'ly, *a.* (सा'इट्लि)—worth-seeing, fine. दर्शनीय, देखणा, प्रेक्षणीय, सुरेख. *Sight'liness, n.*

Sight'seer, *n.* (सा'इट्सिअर्)—a person going round to see the sights. प्रेक्षणीय स्थळें, देखावे,-पाहणारा मनुष्य. *Sight'seeing, n.* प्रेक्षणीय स्थळें पाहणें.

Sign, *n*, (साइन्)—a mark traced on surface, etc.; a thing used as symbol of something; indication; symptom or presage or token *of*; miracle as evidence of supernatural power; password; gesture used instead of words; a sign-board; (U. S.) a trace or spoor of animal; any of twelve divisions of zodiac. खूण, लक्षण, प्रतीक, सूचक, निशाणी, चिन्ह; अद्भुत, चमत्कार; इशारत, संकेत; सांकेतिक (अंग-) विशेष,-खूण; नांवाची पाटी; पशूचा-जनावराचा-माग, मागमूस; (बारा राशींपैकीं एक) राशि. *v. t. & i.* to mark with a sign; to affix one's name or initials to, subscribe in one's hand-writing; make a sign *to*. खूण-चिन्ह-निशाणी-करणें, सही करणें, 'दस्तुर,-घालणें,-लावणें; खुणेनें सांगणें,-कळविणें, खूण करणें. *The s. of the cross*, ख्रिश्चन उपाध्याय आशीर्वाद देतांना किंवा सामान्य लोक श्रद्धापूर्वक कपाळावर किंवा छातीवर क्रुसीच्या आकाराची खूण करितात ती (†). *S. manual*, signature written with person's own hand. स्वदस्तूर, (ची) स्वतःच्या अक्षरांत सही, हस्ताक्षर. *positive* or *plus s.*, (+), अधिक चिन्ह, बेरजेची खूण. *Negative* or *minus s.*, (—), उणें चिन्ह, व वजाबाकीची खूण. *S. and countersign*, साथीदारांच्या (हावभावांनीं केलेल्या) गुप्त खुणा. *Ss. of the times*, things showing the tendency of affairs. घडलणारीं परिस्थिति-निदर्शक चिन्हें,-गोष्टी. *Deaf-and-dumb ss.*, करपल्लवी भाषेंतील खुणा. *Make no s.*, कांहींच माहीत नाहीं (नसणें), विरुद्ध न बोलणें. *S.-board*, (दुकानाच्या बाहेरची) नांवाची पाटी. *S.-painter*, नांवाच्या पाट्या रंगविणारा. *S.-post*, a post supporting signboard or set up at cross-roads, etc. to guide travellers. रस्त्यावरील (नांवाच्या) खुणेचा खांब. *To s. away*, फरोक्त खतावर सही करून (हक्क मालमत्ता, वगैरे) दुसऱ्याच्या नांवें करून देणें. *S. assent*, खुणेनें संमति दर्शविणें. *Sign'able, a.*

Sig'nal, *a.* (सि'ग्नल)—of marked quality or importance, notable. विशेष, विलक्षण, मोठा, नामी, महत्त्वाचा. *Sig'nally, adv. n.* sight or sound meant to convey orders or information; message made up of such signals; immediate occasion for some general movement. खूण, इशारत, सिग्नल; खुणांनीं दिलेला संदेश,-निरोप; तात्कालिक कारण,-संधि. *v. t. & i.* to make signals; direct, transmit, or announce by signal. बावटा दाखवणें, खूण करणें; खुणेनें आज्ञा करणें, खुणांनीं (बातमी, संदेश) पाठविणें,-जाहीर-प्रसिद्ध करणें. S. *of distress*, (जहाज धोक्यांत-संकटांत-सांपडलें असतां तोफा डागून) मदतीकरितां दिलेला इशारा,-केलेली खूण. *Storm s.*, वादळाचा बावटा, °ची खूण. *Code of ss. S.-book*, (लष्करी आणि आरमारी) निरोप-संदेश-पाठविण्याच्या खुणांच्या नियमांचें-माहितीचें-पुस्तक. *S.-box*, आगगाडीच्या मार्गावरील बावटा-निशाणी-इशारत-दर्शकाची जागा,-कोठडी (केबिन.). *S.-man*, a signaller. आगगाडीला निशाणी-बावटा-दाखविणारा; तारमास्तर. *Sig'naller, n.*

Sig'nalize, *v. t.* (सि'ग्नलाइझ्)—to make notable; lend distinction to. गाजवणें, मिरविणें; प्रसिद्ध करणें.

Sig'natory, *n.* (सि'ग्नेटरि)—a party (esp. state) to a treaty or other signed agreement. सही करणारा,-करणारें (राष्ट्र).

Sig'nature, *n.* (सि'ग्नेचर्)—signed name or initials; (arch.) significant appearance or mark; (Mus.) indication of key or time following clef; (Print.) indication letter or figure at foot of first page of book-sheet. सही, स्वाक्षरी; चें दर्शक चिन्ह,-खूण; सुराची खूण, सुरावटीची खूण; फर्म्याचा आंकडा,-खूण.

Sign'et, *n.* (सि'ग्निट्)—a small seal (esp. one set in a finger-ring). मुद्रा, शिक्का, आंगठी, मोहोर. *S. ring*, सिक्याची आंगठी.

Signif'icance, *n.* (सिग्नि'फिकन्स्)—expressiveness; meaning; importance, moment, consequence, reasons why a thing is significant. अर्थसूचकता, अर्थबोधकता, अर्थ, अभिप्राय, हेतु, स्वारस्य, महत्त्व असण्याचें कारण, विशद.

Signif'icant, *a.* (सिग्नि'फिकन्ट्)—full of meaning, highly suggestive, expressive; important, noteworthy. सार्थ, अर्थपूर्ण; (अर्थ-) सूचक,-बोधक, हेतुगर्भ, साभिप्राय, महत्त्वाचा. *-ly, adv.*

Significa'tion, *n.* (सिग्निफिके'शन्)—(*esp.*) sense or acceptation of a term, &c. अभिप्राय, अर्थ, आशय.

Signif'icative, *a.* (सिग्नि'फिकेटिव्ह्)—offering signs or presumptive evidence of. सूचक, अर्थबोधक, दर्शक.

Sig'nify, *v. t. & i.* (सि'ग्निफाय्)—to be a sign or presage of; to have as meaning, to import; to intimate or announce; be of importance, matter (esp. negative). चिन्ह असणें; चा अर्थ असणें,-दाखवणें; सुचवणें, कळवणें, खुणेनें समजावणें,-सांगणें. *It does not s.*, त्यांत कांहीं अर्थ-महत्त्व-नाहीं.

Si'gnor, Signor'a, Signori'na, *nn.* (सीन्यॉअर, सिन्यॉ'अरा, सिन्योअरी'ना)—(*pl.-ri,-re,-ne*), Italian gentleman, married lady, unmarried lady (as titles=Sir and Mr., Madam and Mrs., Miss). इटालिअन सद्गृहस्थ, स्त्री, अविवाहित स्त्री-कुमारी (यांच्या नांवापूर्वी लावण्याचे सन्मानदर्शक शब्द).

Si'lage, *n. & v. t.* (सा'इलिज्)—(put into) silo. ओलेपणीं खड्यांत दाबून ठेवणें,-ठेवलेला चारा.

Si'lence, *n.* (सा'इलेन्स)—abstinence from speech or noise; secrecy; taciturnity; absence of sound, stillness; oblivion. मुग्धता, स्तब्धता; गुप्तता, मौन; शांतता, सामसूम, निःशब्दता; विस्मृति. *v. t.* to reduce

to silence, to make silent. गप्प बसवणें, तोंड बंद करणें, निरुत्तर करणें, बंद करणें. *S. gives consent,* ' मौनं संमतिलक्षणम्.' *To keep, break, s.,* मौन धरणें ; तोंड उघडणें किंवा बोलणें. *Put to s., esp.* refute in argument. (मुद्देसूद बोलून-वादविवादांत) निरुत्तर करणें. *In s.,* गुपचुप, आवाज न करतां, गुपपणें. *Silence !,* चूप ! गप ! खामोश !

Si'lencer, *n.* (सा'इलेन्सर्)—(esp.) an apparatus deadening sound of gas escaping from oil-engine, etc. आवाज कमी करण्याचें-आवाजप्रतिबंधक -यंत्र,-साधन.

Si'lent, *a.* (सा'इ-लेन्ट्)—marked by silence; soundless, mute; habitually speaking little, tacit, taciturn; saying nothing on some subject. स्तब्ध; अनुच्चारित, मुका; शांत, निवांत; (एखाद्या विषयावर) मत न देणारा, गुपचुप, स्वस्थ. *S.-letter,* अनुच्चारित वर्ण,-अक्षर (जसें, *doubt,* मधील b हें अक्षर). *S. partner,* धंद्याच्या व्यवस्थेसंबंधीं मत नसलेला भागीदार. *The s. system,* (तुरुंगांतील) कैद्यांसाठीं ' आळीमिळी गुपचुळी 'चा नियम. *Silently, adv.*

Silhouette', *n.* (सिलुएट्)—a portrait of head or figure cut from black paper or done in solid black on white; an outline of object seen against the light. (काळ्या कागदावरून कापलेलें) शिरोभागाचें (डोक्याचें) किंवा शरीराचें चित्र,-आकृति; (प्रकाशाच्या पार्श्वभूमीवरील) आकृति,-चित्र. *v. t.* to represent by, or exhibit in s. बाह्यरेषांनीं दाखविणें, काळ्या रंगांत उठावदार करून दाखविणें. *In s.,* रूपरेषा दिसेल असें ठेवलेलें.

Sil'ica, *n.* (सि'लिका)—a mineral forming quartz and the chief part of flint, sand, etc. वाळू, शैल, गार, गारगोटी. *Sili'ceous,* (सिलि'शस्) *a.* गारेचा, रेताड. *Sili'cic, silici'ferous, sili'cious, aa.* [L. *silex, silicis,* flint]

Sil'icon, *n.* (सि'लिकन्)—a non-metallic element found only in combination. ' सिक ' नांवाचें अधातु मूलद्रव्य.

Sil'iqua, Sil'ique, *n.* (सि'लिक्वा,-लीक्)—pod of plants of mustard family. (मोहरी, तीळ इ०) स्फुटनशील फळाचें बोंड.

Silk, *n.* (सिल्क्)—fibre composing silkworms, cocoons; a thread prepared from it; cloth woven of this; (*pl.*) silk garments; (attrib.) made of sillk; (U. S.) silk-like filiform styles of female flower of maize; peculiar lustre seen in some sapphires and rubies. रेशीम; रेशमाचा धागा; रेशमी कापड, दुकूल; (अने०) रेशमाचीं वस्त्रें; रेशमी कपडे; (रेशमाच्या धाग्यांसारखा) मक्याचा फुलाचा गोंडा; तेज, तकाकी. *Artificial s.,* कृत्रिम रेशीम, बनावट रेशीम. *Spun s.,* कांकरी. *To make a s. purse out of a sow's ear,* एखाद्याकडून त्याच्या योग्यतेपेक्षां-गुणांपेक्षां-अधीक चांगलें काम करवून घेणें. *S. worm,* रेशमी-रेशमाचा-किडा. *Sil'ky, a.* like silk in softness or lustre. रेशमाचा, रेशमी, मृदु, मऊ. *Sil'kiness, n.*

Sil'ken, *a.* (सि'ल्कन्)—made of silk; clad in silk; soft, sauve. रेशमी, रेशमाचा; रेशमी पोषाख केलेला; मृदु, मऊ.

Sill, *n.* (सिल्)—a slab of wood or stone at the foot of window or doorway. (खिडकीच्या-दरवाजाच्या-,) चौकटीची खालची बाजू, उंबरठा.

Sill'abub, *n.* (सि'लॅबब्)—a dish of cream or milk curdled with wine. मलई, किंवा दूध व दारू यांच्या मिश्रणाचा एक खाद्य पदार्थ.

Sill'y, *a.* (सि'लि)—foolish, imprudent, thoughtless; weak of intellect; unwise; (arch.) harmless, innocent. मूर्ख, अविचारी; बुद्धीचा मंद, अजागळ, वेडा; वेडेपणाचा; निरुपद्रवी, साधा. *n.* a silly person. आचरट,-बावळट,-वेडसर मनुष्य. *The s. season,* (इंग्लंडमध्यें वर्तमानपत्रांना) विशेष बातमी देतां येत नाहीं असे ऑगस्ट व सेप्टेंबर हे महिने. *S. point, S. short-leg,* placed close up to batsman. (क्रिकेटमध्यें) खेळाडूच्या अगदीं नजीक ठेवलेला क्षेत्ररक्षक.

Si'lo, *n.* (सा'इलो)—(*pl.-os*), a pit or air-tight chamber for storing green crops for fodder. ओलेपणीं चारा सांठवून ठेवण्याचा हवाबंद खड्डा.

Silt, *n.* (सिल्ट्)—a deposit of mud or fine earth from running water. गाळ, चिखल, रेंदा. *v. t. & i. S.* (*up*), choke or be choked up with silt. गाळ सांचून बंद करणें,-होणें, गाळ तुंबून अडथळा होणें.

Silur'ian, *a. & n.* (सिल्यू'अरिअन्)—(of) a series of rocks forming the lowest sub-division of the Palaeozoic. प्रस्तरविशेष, प्राचीन खडकांचा थर (-त्याचा).

Sil'van, Syl'van, *a.* (सि'ल्व्हन्)—of the woods; rural. वनाचा, अरण्याचा; खेड्यापाड्यांतील, ग्राम्य. [L. *silva,* wood]

Sil'ver, *n.* (सि'ल्व्हर्)—a white lustrous precious metal; coins made of it; vessels or implements made of it; any of the salts of silver used in sensitizing photographic paper. चांदी, रुपें; रुप्याचीं नाणीं, रुपये; चांदीचीं भांडीं, चांदीचे डाग; (छायाचित्राचा कागद सचेतन करण्याकरितां) रौप्यक्षार. *a.* made of silver; second best; white like s.; resembling s. in ringing tone. रुप्याचा, चांदीचा; दुसऱ्या प्रतीचा; रुपेरी, पांढरा; खणखणीत (आवाज). *v. t. & i.* to coat or plate with s., make or become silvery; (of hair) turn grey or white. रुप्याचा मुलामा देणें; (कांचेला) पारा लावणें; रुपेरी-पांढरा-करणें; (केस) पांढरा, रुपेरी, किंवा करडा होणें,-पिकणें. *German s., nickel s.,* हिणकस शुभ्र धातु (चांदीसारखी दिसणारी). *Fulminating s.,* नाराची दारू. *Speech is silver or silvern, but silence is golden,* मौन पहिल्या प्रतीचें, बोलणें दुसऱ्या प्रतीचें होय, बोलण्यापेक्षां न बोलणेंच चांगलें. *S. hair,* white and lustrous. शुभ्र रुपेरी केंस. *Has a s. tongue,* is eloquent. वक्तृत्वपूर्ण, अस्खलित वक्ता. *S.-tongued, a. Every cloud has a s. lining,* misfortune has its consolations. दुःखांत कांहींतरी सुखाचा अंश असतोच.

S. bath, (छायाचित्राचा कागद सचेतन करण्यासाठीं) रौप्यक्षार, रौप्यक्षाराचें पात्र, कांटीखारचा द्रव, तो द्रव ठेवण्याचें पात्र. *S. fir*, ज्याच्या पानाच्या मागच्या बाजूवर दोन रुपेरी रेषा असतात असा फर नांवाचा वृक्ष. *S. fish*, एक जातीचा चिनरंगी मासा; (पुस्तकांना लागणारी) पांढरी कसर, चाळवी. *S. fox*, करड्या टोकाची काळी लोंकर व शेंपटीचें टोंक पांढरें असलेला कोल्हा. *S. gilt*, of silver gilded over. चांदीचा मुलामा दिलेलें. *S. leaf*, रुप्याचा वर्ख. *S. paper*, पानळ (रुपेरी) कागद; कथिलाचा वर्ख. *S. plate*, चांदीचीं (चांदीच्या मुलाम्याचीं) भांडीं. *S. point*, विशिष्ट कागदावर रुपेरी लेखणीनें चित्र कोरण्याची कला,-असें कोरलेलें चित्र. *S. standard*, रुप्याचें (रुप्याच्या नाण्याचें) चलन. *S. top*, गव्हावर होणारा एक रोग. *S. weed*, (रस्त्याच्या कडेला वाढणारें पिवळ्या फुलांचें व रुपेरी पानांचें झाड. *Silvern*, *a.* (rare).

Sil'ver-smith, *n.* (सिल्व्हर्-स्मिथ्)—one whose occupation is to work in silver. रौप्यकार, सोनार.

Sil'very, *a.* (सिल्व्हरि)—like silver in whiteness and lustre; having the clear soft resonance of a silver bell. रुप्यासारखा शुभ्र व तेजस्वी, रुपेरी, पांढरा; खणखणीत (आवाजाचा). *Sil'veriness*, *n.* पांढरेपणा, शुभ्रपणा.

Sim'ian, *a.* & *n.* (सिमिअन्)—(of) one of the anthropoid apes, (gen.) ape (like), monkey (like). (मानवसदृश) माकड, वानर, (माकडाचा), (माकड-वानरा-सारखा). *Sim'ioid*, *a.* [L. *Simia*, ape]

Sim'ilar, *a.* (सिमिलर्)—having resemblance to, of the same kind; (Geom.) identical in shape. सारखा, समान, सदृश; सरूप, आकारानें बरोबर,-सदृश. *n.* a thing resembling another. (pl.) similar things. तत्सदृश वस्तु; सारख्या आकाराच्या-समान-वस्तु.-*ly*, *adv.* तसाच, त्याप्रमाणें, तद्वत्.

Simila'rity, *n.* (सिमिलॅरिटि)—state of being similar, likeness, resemblance. सारखेपणा, सादृश्य, साम्य.

Sim'ile, *n.* (सिमिलि)—a comparison of two things for the purpose of illustration or ornament, a poetic or imaginative comparison. उपमा, उपमालंकार. *Sim'ilize*, *v. i.* & *t.* उपमा योजणें; उपमा देऊन स्पष्ट करणें,-होणें. [L. *similis*, like]

Simil'itude, *n.* (सिमिलिट्यूड)—guise or outward appearance; simile; copy. सारखेपणा, समता, सादृश्य; बाह्यरूप; उपमा; प्रतिमा.

Simm'er, *v. i.* & *t.* (सिमर्)—to be or keep just bubbling or singing below boiling-point; be in a state of suppressed anger or laughter. चरचरणें, चुरचुरणें, सणसण वाजणें, उकळणें; आंतल्या आंत उकळणें, उकळी येणें-फुटणें (रागाची, हंसण्याची). *n.* simmering state. चरचरण्याची, उकळण्याची,-स्थिति.

Simo'niac, *n.* (सिमोनिॲक्)—a person guilty of simony. धार्मिक अधिकारांचा, अधिकाराच्या जागांचा-व्यापार-सौदा-करणारा. *Simoni'acal*, *a.*

Si'mony, *n.* (सा'इमनि)—trafficking in Church preferment. धार्मिक अधिकारांचा सौदा करणें.

Si'mon Pure, *n.* (सा'इमन् प्युअर्)—the real or genuine person or article. खरा मनुष्य, खरी व्यक्ति, सत्य गोष्ट,-वस्तु. [character in Centlivre's 'Bold Stroke for a Wife']

Simoom', *n.* (सिमूम्)—hot desert sand-wind, chiefly in Arabian desert. वाळवंटावरून वाहणारा उष्ण ग़ुदमरून टाकणारा वारा. [f. Arab. *samm*, to poison]

Simp, *n.* (सिम्प्)—(sl.) a fool, simpleton. मूर्ख, बेढगळ, बेढप.

Sim'per, *v. i.* & *t.* (सिम्पर्)—to smile in a silly or affected manner; express by or with simpering. वेड्याप्रमाणें किंवा वरकरणी गालांत हंसणें, गालांतल्या गालांत हंसून सांगणें,-व्यक्त करणें. *n.* Such smile. अशा प्रकारचें हास्य. *Sim'peringly*, *adv.* *Sim'perer*, *n.*

Sim'ple, *a.* (सिम्पल्)—of one element or kind; not complicated or elaborate or adorned or involved or highly developed; unsophisticated, artless, natural; inexperienced, humble; trifling, of low rank; easily solved or understood or done; absolute, mere, just, एकाकी, सलग, अविभक्त (Chem. & Bot.); साधा, बिनगुंतागुंतीचा, अनलंकृत, अल्पविकासित; येताचा; निर्मळ, शुद्ध, साधा; मूर्ख, बेढगळ, अननुभवी; सालस, भोळा, क्षुद्र, खालच्या दर्जाचा, हीन; सोपा, सुलभ, सुकर, शुद्ध, केवळ, संतोतंत. *n.* a herb used in medicine; the medicine. एक औषधी वनस्पति; त्या वनस्पतीचें औषध. *S. sentence*, without subordinate clauses. साधें,-केवल,-वाक्य. *S. Interest*, सरळव्याज. *S. equation*, एकवर्णसमीकरण. *S. leaf*, of one blade. अविभक्त पर्ण. *S.-pistil*, अविभक्त,-एकाकी,-स्त्रीकेसर. *S. fracture*, साधा अस्थिभंग. *The s. life*, practice of doing without servants and luxuries, attempt to return to more primitive conditions. साधी राहणी. *S. forms of life*, creatures low in scale of evolution. अल्पविकसित प्राणिजात. *S. contract*, साधा कर्जरोखा, बिनमोबदल्याचा (लेखी, तोंडी, गर्भित) करार. *Sim'ply*, *adv.* साधेपणानें, निखालस, सहजगत्या.

Sim'ple-hearted, Sim'ple-minded, *aa.* (सिम्पल्-हार्टेड्, सिम्पल्माइन्डेड्)—of simple heart, ingenuous. साधा, भोळा, निष्कपटी. *Sim'ple-mindedness*, *n.*

Sim'pleton, *n.* (सिम्पल्-टन्)—of foolish or half-witted person, one easily deceived. मूर्ख, भोळा, अर्धवट मनुष्य.

Simpli'city, *n.* (सिम्प्लिसिटि)—artlessness, weakness of intellect; foolishness. भावार्थीपणा, साधेपणा; बुद्धीची दुर्बलता; मूर्खपणा, भोळसटपणा.

Sim'plify, *v. t.* (सिम्प्लिफाइ)—to make simple or easy to understand, to make plain. सोपा करणें, सुलभ करणें, सरळ रूप देणें.-*fication*, *n.*

Sim'plism, *n.* (सिं'प्लिझम्)—affected simplicity. कृत्रिम साधेपणा.

Simūlā'crūm, *n.* (सिम्यूले'क्रम्)—(*pl.-cra*) shadowy likeness or mere pretence of. वरच्या सारखेपणा.

Sim'ū'lant, *a.* (सि'म्यूलंट्)—having the appearance of. (त्या) सारखा दिसणारा.

Sim'ūlāte, *v. t.* (सि'म्युलेट्)—to feign; to pretend to have or feel, to counterfeit. चें ढोंग करणें; आव आणणें, ढोंग धरणें,-घालणें, वेष,-रूप,-घेणें. *Simula'tion*, *-tor*, *nn.*

Simultā'neous, *a.* (सिमल्टे'निअस्)—occurring or operating at the same time (*with*). समकालीन, एककालीन, एककालिक, एकदम होणारा,-चालणारा.*-ly*, *adv.* एकदम, एकसमयावच्छेदेंकरून.*-ness*, *Simultane'ity*, *nn.*

Sin, *n.* (सिन्)—transgression against divine law; an offence against any code. पातक, पाप; दुष्कृत्य, अपराध, अन्याय, दोष, उल्लंघन. *v. i.* to commit sin; to offend *against*. पाप करणें; गुन्हा करणें, चें उल्लंघन करणें, अपराध-अन्याय-करणें. *Original s.*, मूळ पातक, उपजत पापबुद्धि. *Deadly* or *mortal s.*, such as kills soul or is fatal to salvation. (मनुष्याची आध्यात्मिक अधोगति करणारें) महापातक. *The seven deadly ss.*, pride, covetousness, lust, anger, gluttony, envy, sloth. गर्व किंवा दर्प, लोभ, हांव, क्रोध, खावाडपणा, द्वेष किंवा असूया, आणि आळस हीं सात महापातकें, (रोमन कॅथॉलिक धर्मपंथाप्रमाणें). One's *besetting s.*, एखाद्याचें विशेष-विशिष्ट-व्यसन,-पातक. *Like s.*, *adv.* (sl.) vehemently. आवेशानें, जोराजोरानें. *S.-offering*, पापानिष्कृतीसाठीं प्रायश्चित्त. *More sinned against than sinning*, (King Lear III ii 54,) often of victim of seduction. माझ्या पापांपेक्षां इतरांनींच माझे फार अन्याय-अपराध केले आहेत. *S. one's mercies*, चांगलें दैव उघडलें तरी दुर्दैवाला कृतघ्न होणें. *Sin'ful*, *sin'less*, *aa.*; *Sin'fully,-lessly*, *adv.*; *Sinfulness,-lessness*, *nn.* *Sin'ner*, *n.*

Sin'apism, *n.* (सि'नॅपिझम्)—mustard plaster. मोहरीचा लेप. [Gk *sinapi*, mustard]

Since, *prep.* (सिन्स्)—in the period between some specified time and the present. अमक्या काळापासून आजपर्यंत, पासून. *conj.* since the time when, seeing that; inasmuch as. पासून, नंतर, म्हणून, साठीं, जेव्हां, ज्याअर्थी. *adv.* since then or that, subsequently, from then till now. तेव्हांपासून, नंतर, अलीकडे, मागें, पूर्वी, झाला, गेला. (*Have eaten nothing*) *s. yesterday*, (I have heard-), तुला भेटल्यापासून. (*What have you done*) *s. we met*? आम्हीं भेटल्यानंतर. *Has been healthy ever s.*, त्यावेळेपासून त्याची प्रकृति चांगली आहे.

Sincere', *a.* (सिन्सि'अर्)—guileless, frank; not assumed, being in reality what it appears, genuine. निष्कपट, अकृत्रिम, मांजळ, मनाचा मोकळा; मनापासूनचा, खरा, शुद्ध, निर्भेळ.*-ly*, *adv.*

Sincĕ'rity, *n.* (सिन्से'रिटि)—honesty.खरेपणा, मांजळपणा.

Sin'ciput, *n.* (सि'न्सिपट्)—head from forehead to crown. डोक्याची कवटी, टाळू, मस्तकाग्र (भाग). [L. *semi*, half; *caput*, head]

Sine, *n.* (साइन्)—(trigon.) (*S. of* arc) line drawn from one extremity of arc perpendicularly to radius at other extremity; (*S. of angle*) ratio of above line to radius (abbr. Sin, Sin A etc.). ज्या. *Versed s.*, abbr. *vers.*, unity minus the cosine. इषु.

Si'ne, *prep.* (सा'इनि)—(L) without. शिवाय. *S. die*, (साइनि डा'ईई) indefinitely (of adjourning). बेमुदत (तहकूब). *S. qua non*, (साइनि क्वे नॉन्), indispensable condition or qualification. अगदीं आवश्यक अट,-गुण, अत्यावश्यक गोष्ट.

Si'nécure, *n.* (सा'इ-निक्युअर्, सि'-)—an office of honour or profit with no duties attached to it. काम वगैरे नसलेली मानाची किंवा फायद्याची जागा, बैठी नोकरी; (ख्रिस्ती उपाध्याला कांहीं काम न करतां दिलेलें) बैठें वेतन.*-curist*, *n.* बैठा पगार खाणारा.*-curism*, *n.*

Sin'ew *n.* (सि'न्यू)—tough fibrous animal tissue, a tendon; (*pl.*) muscles, bodily strength; motive power *of*. स्नायु, अस्थिबंधन; शारीरिक बळ, सामर्थ्य, ताकद; मुख्य साधन, आधार. *v. t.* (poet.) to serve as ss. of, sustain, hold together. चे स्नायु-बळकटी-असणें; स्नायूंनीं घट्ट बांधणें,-आवळणें, मजबूत करणें. *The ss. of war*, money. द्रव्यबळ, संपत्ति. *Sin'ewless*, *a.*; *sin'ewy*, *a.* स्नायूंचा, बळकट, स्नायूयुक्त. *Sinewiness*, *n.*

Sin'ful, *a.* (सि'न्-फुल)—of the nature of sin; guilty of sin, contrary to the laws of God. पापयुक्त, पापाचा; पापी, पातकी.

Sing, *v. i & t.* (सिंग्)—(*sang*, or arch. *sung*; *sung*), to utter words with musical modulations; to make humming or whistling sound; to produce vocal melody, utter (song, tune); (of ears) be affected as with buzzing sound; compose poetry, to celebrate in verse; usher (esp. old or new year) *out*, or *in*, with singing; put to sleep etc. with singing. गाणें स्वरावर म्हणणें, गान करणें; गुणगुणणें, घोंघावणें, चूं चूं करणें, सणसणणें; गाणें, गाऊन म्हणणें, चालीवर म्हणणें; (कानांत) आवाज होणें; गाणें गाऊन झोंपवणें; काव्य रचणें, कविता करणें, (वर) कविता रचणें, चें काव्यांत वर्णन करणें. *n.* (U. S.) a large social gathering for singing. गाण्याची मजलस,-बैठक. *To s. one's praises*, एखाद्याचें स्तुतिस्तोत्र गाणें, त्याची नेहमीं स्तुति करीत असणें. *S. another song* or *tune*, नम्रता धारण करणें, कमीपणा घेणें. *S. small*, नांगी टाकणें, चूप बसणें, हार खाणें. *S. out*, *v. t. & i.* मोठ्यानें हांका मारणें, ओरडून सोडणें, ओरडणें. *Singing-man*, धंदेवाईक-पगारी-गवई. *Singing-master*, गायनशिक्षक. *Singing-voice*, गाण्याचा आवाज. *Sing-song*, *a. & n.*

S. bath, (छायाचित्राचा कागद सचेतन करण्यासाठीं) रौप्यक्षार, रौप्यक्षाराचें पात्र, कांडीखारच्या द्रव, तो द्रव ठेवण्याचें पात्र. *S. fir*, ज्याच्या पानाच्या मागच्या बाजूवर दोन रुपेरी रेषा असतात असा फर नांवाचा वृक्ष. *S. fish*, एक जातीचा बिनरंगी मासा; (पुस्तकांना लागणारी) पांढरी कसर, वाळवी. *S. fox*, करड्या टोंकाची काळी लोंकर व शेंपटीचें टोंक पांढरें असलेला कोल्हा. *S. gilt*, of silver gilded over. चांदीचा मुलामा देलेलें. *S. leaf*, रुप्याचा वर्ख. *S. paper*, पातळ (रुपेरी) कागद; कथिलाचा वर्ख. *S. plate*, चांदीचीं (चांदीच्या मुलाम्याचीं) भांडीं. *S. point*, विशिष्ट कागदावर रुपेरी लेखणीनें चित्र कोरण्याची कला,-असें कोरलेलें चित्र. *S. standard*, रुप्याचें (रुप्याच्या नाण्याचें) चलन. *S. top*, गवतावर होणारा एक रोग. *S. weed*, (रस्त्याच्या कडेला वाढणारें पिवळ्या फुलांचें व रुपेरी पानांचें झाड. *Silvern*, *a.* (rare).

Sil'ver-smith, *n.* (सि'ल्वर्-स्मिथ्)—one whose occupation is to work in silver. रौप्यकार, सोनार.

Sil'verў, *a.* (सि'ल्व्हरि)—like silver in whiteness and lustre; having the clear soft resonance of a silver bell. रुप्यासारखा शुभ्र व तेजस्वी, रुपेरी, पांढरा; खणखणीत (आवाजाचा). *Sil'veriness*, *n.* पांढरेपणा, शुभ्रपणा.

Sĭm'ĭan, *a.* & *n.* (सि'मिअन्)—(of) one of the anthropoid apes, (gen.) ape (like), monkey (like). (मानवसदृश) माकड, वानर, (माकडाचा), (माकडा-वानरा-सारखा). *Sim'ioid*, *a.* [L. *Simia*, ape]

Sĭm'ĭlar, *a.* (सि'मिलर्)—having resemblance to, of the same kind; (Geom.) identical in shape. सारखा, समान, सदृश; सरूप, आकारानें बरोबर,-सदृश. *n.* a thing resembling another; (pl.) similar things. तत्सदृश वस्तु; सारख्या आकाराच्या-समान-वस्तु.-*ly*, *adv.* तसाच, त्याचप्रमाणें, तद्वत्.

Sĭmĭlă'rĭtў, *n.* (सिमिलॅ'रिटि)—state of being similar, likeness, resemblance. सारखेपणा, सादृश्य, साम्य.

Sĭm'ĭlė, *n.* (सि'मिलि)—a comparison of two things for the purpose of illustration or ornament, a poetic or imaginative comparison. उपमा, उपमालंकार. *Sim'ilize*, *v. i.* & *t.* उपमा योजणें; उपमा देऊन स्पष्ट करणें,-होणें. [L. *similis*, like]

Sĭmĭl'ĭtūde, *n.* (सिमि'लिट्यूड्)—guise or outward appearance; simile; copy. सारखेपणा, समता, सादृश्य; बाह्यरूप; उपमा; प्रतिमा.

Sĭmm'er, *v. i.* & *t.* (सि'मर्)—to be or keep just bubbling or singing below boiling-point; be in a state of suppressed anger or laughter. चरचरणें, चुरचुरणें, सणसण वाजणें, उकळणें; आंतल्या आंत उकळणें, उकळी येणें-फुटणें (रागाची, हंसण्याची). *n.* simmering state. चरचरण्याची, उकळण्याची,-स्थिति.

Sĭmō'nĭăc, *n.* (सिमो'निॲक्)—a person guilty of simony. धार्मिक अधिकारांचा, अधिकाराच्या जागांचा-व्यापार-सौदा-करणारा. *Simoni'acal*, *a.*

Sī'monў, *n.* (सा'इमनि)—trafficking in Church preferment. धार्मिक अधिकारांचा सौदा करणें.

Sī'mon Pure, *n.* (सा'इमन् प्युअर्)—the real or genuine person or article. खरा मनुष्य, खरी व्यक्ति, सत्य गोष्ट,-वस्तु. [character in Centlivre's 'Bold Stroke for a Wife']

Sĭmōōm', *n.* (सिमू'म्)—hot desert sand-wind, chiefly in Arabian desert. वाळवंटावरून वाहणारा उष्ण गुदमरून टाकणारा वारा. [f. Arab. *samm*, to poison]

Sĭmp, *n.* (सिम्प्)—(sl.) a fool, simpleton. मूर्ख, वेडगळ, वेडपट.

Sĭm'per, *v. i.* & *t.* (सि'म्पर्)—to smile in a silly or affected manner; express by or with simpering. वेड्याप्रमाणें किंवा वरकरणी गालांत हंसणें, गालांतल्या गालांत हंसून सांगणें,-व्यक्त करणें. *n.* Such smile. अशा प्रकारचें हास्य. *Sim'peringly*, *adv.* *Sim'perer*, *n.*

Sĭm'ple, *a.* (सि'म्पल्)—of one element or kind; not complicated or elaborate or adorned or involved or highly developed; unsophisticated, artless, natural; inexperienced; humble; trifling, of low rank; easily solved or understood or done; absolute, mere; just, एकाकी, सलग, अविभक्त (Chem. & Bot.); साधा, बिनगुंतागुंतीचा, अनलंकृत, अल्पविकासित; येताचा; निर्मळ, शुद्ध, साधा; मूर्ख, वेडगळ, अननुभवी; सालस, भोळा, क्षुद्र, खालच्या दर्जाचा, हीन; सोपा, सुज्ञेय, सुकर; शुद्ध, केवळ, तंतोतंत. *n.* a herb used in medicine; the medicine. एक औषधी वनस्पति; त्या वनस्पतीचें औषध. *S. sentence*, without subordinate clauses. साधें,-केवळ,-वाक्य. *S. Interest*, सरळव्याज. *S. equation*, एकवर्णसमीकरण. *S. leaf*, of one blade. अविभक्त पर्ण. *S. pistil*, अविभक्त,-एकाकी,-स्त्रीकेसर. *S. fracture*, साधा अस्थिभंग. *The s. life*, practice of doing without servants and luxuries, attempt to return to more primitive conditions. साधी राहणी. *S. forms of life*, creatures low in scale of evolution. अल्पविकसित प्राणिजात. *S. contract*, साधा कर्जरोखा, बिनमोबदल्याचा (लेखी, तोंडी, गर्भित) करार. *Sim'ply*, *adv.* साधेपणानें, निखालस, सहजगत्या.

Sĭm'ple-hearted, Sĭm'ple-minded, *aa.* (सि'म्पल्-हार्टेड्, सिम्प'ल्माइन्डेड्)—of simple heart, ingenuous. साधा, भोळा, निष्कपटी. *Sim'ple-mindedness*, *n.*

Sĭm'pleton, *n.* (सि'म्पल्-टन्)—of foolish or half-witted person, one easily deceived. मूर्ख, भोळा, अर्धवट मनुष्य.

Sĭmplĭ'cĭtў, *n.* (सि'म्प्लि'सिटि)—artlessness, weakness of intellect; foolishness. भावार्थीपणा, साधेपणा; बुद्धीची दुर्बलता; मूर्खपणा, भोळसटपणा.

Sĭm'plĭfў, *v. t.* (सि'म्प्लिफाइ)—to make simple or easy to understand, to make plain. सोपा करणें, सुलभ करणें, सरळ रूप देणें.-*fication*, *n.*

Sĭm'plism, *n.* (सि'म्प्लिझम्)—affected simplicity. कृत्रिम साधेपणा.

Sĭmūlā'crŭm, *n.* (सिम्यूले'क्रम्)—(*pl.-cra*) shadowy likeness or mere pretence of. वरचा सारखेपणा.

Sĭm'ūlant, *a.* (सि'म्यूलंट्)—having the appearance of. (त्या) सारखा दिसणारा.

Sĭm'ūlāte, *v. t.* (सि'म्युलेट्)—to feign; to pretend to have or feel, to counterfeit. चें ढोंग करणें; आव आणणें, ढोल धरणें,-घालणें, वेप,-रूप,-घेणें. *Simula'tion, -tor, nn.*

Sĭmultā'nėous, *a.* (सिमल्टे'निअस्)—occurring or operating at the same time (*with*). समकालीन, एककालीन, एककालिक, एकदम होणारा,-चालणारा.-*ly, adv.* एकदम, एकसमयावच्छेदेंकरून.-*ness, Simultane'ity, nn.*

Sĭn, *n.* (सिन्)—transgression against divine law; an offence against any code. पातक, पाप; दुष्कृत्य, अपराध, अन्याय, दोप, उल्लंघन. *v. i.* to commit sin; to offend *against.* पाप करणें; गुन्हा करणें, चें उल्लंघन करणें, अपराध-अन्याय-करणें. *Original s.*, मूळ पातक, उपजत पापबुद्धि. *Deadly* or *mortal s.*, such as kills soul or is fatal to salvation. (मनुष्याची आध्यात्मिक अधोगति करणारें) महापातक. *The seven deadly ss.*, pride, covetousness, lust, anger, gluttony, envy, sloth. गर्व किंवा दर्प, लोभ, हाव, क्रोध, खादाडपणा, द्वेप किंवा असूया, आणि आळस हीं सात महापातकें, (रोमन कॅथॉलिक धर्मपंथाप्रमाणें). One's *besetting s*, एखाद्याचें विशेष-विशिष्ट-व्यसन,-पातक. *Like s., adv.* (sl.) vehemently. आवेशानें, जोराजोरानें. *S.-offering*, पापानिष्कृतीसाठीं प्रायश्चित्त. *More sinned against than sinning*, (King Lear III ii 54,) often of victim of seduction. माझ्या पापापेक्षां इतरांनींच माझे फार अन्याय-अपराध केले आहेत. S. one's *mercies*, चांगलें दैव उघडलें तरी दुर्दैवाला कृतघ्न होणें. *Sin'ful, sin'less, aa.*; *Sin'fully,-lessly, adv.*; *Sinfulness,-lessness, nn. Sin'ner, n.*

Sĭn'apism, *n.* (सि'नॅपिझम्)—mustard plaster. मोहरीचा लेप. [Gk *sinapi*, mustard]

Since, *prep.* (सिन्स)—in the period between some specified time and the present. अमक्या काळापासून आजपर्यंत, पासून. *conj.* since the time when, seeing that; inasmuch as. पासून, नंतर, म्हणून, साठीं, जेव्हां, ज्याअर्थी. *adv.* since then or that, subsequently, from then till now. तेव्हांपासून, नंतर, अलीकडे, मागें, पूर्वी, झाला, गेला. (*Have eaten nothing*) *s. yesterday*, (I have heard-), तुला भेटल्यापासून. (*What have you done*) *s. we met?* आम्हीं भेटल्यानंतर. *Has been healthy ever s.*, त्यावेळेपासून त्याची प्रकृति चांगली आहे.

Sincere', *a.* (सिन्सि'अर्)—guileless, frank; not assumed, being in reality what it appears, genuine. निष्कपट, अकृत्रिम, मांजळ, मनाचा मोकळा; मनापासूनचा, खरा, शुद्ध, निर्मळ.-*ly, adv.*

Sĭncĕ'rĭtў, *n.* (सिन्से'रिटि)—honesty. खरेपणा, मांजळपणा.

Sĭn'ciput, *n.* (सि'न्सिपट्)—head from forehead to crown. डोक्याची कवटी, टाळू, मस्तकाग्र (भाग). [L. *semi*, half; *caput*, head]

Sīne, *n.* (साइन्)—(trigon.) (*S. of* arc) line drawn from one extremity of arc perpendicularly to radius at other extremity; (*S. of angle*) ratio of above line to radius (abbr. Sin, Sin A etc.). ज्या. *Versed s.*, abbr. *vers.*, unity minus the cosine. इषु.

Sī'nē, *prep.* (सा'इनि)—(L) without. शिवाय. *S. die*, (साइनि डा'यई) indefinitely (of adjourning). बेमुदत (तहकूब). *S. qua non*, (साइनि क्वे नॉन्), indispensable condition or qualification. अगदीं आवश्यक अट,-गुण, अत्यावश्यक गोष्ट.

Sī'nėcure, *n.* (सा'इ-निक्युअर्, सि'-)—an office of honour or profit with no duties attached to it. काम वगैरे नसलेली मानाची किंवा फायद्याची जागा, बैठी नोकरी; (ख्रिस्ती उपाध्याला कांहीं काम न करतां दिलेलें) बैठें वेतन.-*curist, n.* बैठा पगार खाणारा.-*curism, n.*

Sĭn'ew *n.* (सि'न्यू)—tough fibrous animal tissue, a tendon; (*pl.*) muscles, bodily strength; motive power *of.* स्नायु, अस्थिबंधन; शारीरिक बळ, सामर्थ्य, ताकद; मुख्य साधन, आधार. *v. t.* (poet.) to serve as ss. of, sustain, hold together. चे स्नायु-पळकटी -असणें; स्नायूंनीं घट्ट बांधणें,-आवळणें, मजबूत करणें. *The ss. of war*, money. द्रव्यबळ, संपत्ति. *Sin'ewless, a.*; *sin'ewy, a.* स्नायूचा, बळकट, स्नायूयुक्त. *Sinewiness, n.*

Sĭn'ful, *a.* (सि'न्-फुल्)—of the nature of sin; guilty of sin, contrary to the laws of God. पापयुक्त, पापाचा; पापी, पातकी.

Sĭng, *v. i & t.* (सिंग्)—(*sang*, or arch. *sung*; *sung*), to utter words with musical modulations; to make humming or whistling sound; to produce vocal melody, utter (song, tune); (of ears) be affected as with buzzing sound; compose poetry, to celebrate in verse; usher (esp. old or new year) *out*, or *in*, with singing; put to sleep etc. with singing. गाणें स्वरावर म्हणणें, गान करणें; गुणगुणणें, घोंघावणें, चूं चूं करणें, सणसणणें; गाणें, गाऊन म्हणणें, चालीवर म्हणणें; (कानांत) आवाज होणें; गाणें गाऊन झोंपवणें; काव्य रचणें, कविता करणें, (वर) कविता रचणें, चें काव्यांत वर्णन करणें. *n.* (U. S.) a large social gathering for singing. गाण्याची मजलस,-बैठक. *To s.* one's *praises*, एकाद्याचें स्तुतिस्तोत्र गाणें, त्याची नेहमीं स्तुति करीत असणें. *S. another song* or *tune*, नम्रता धारण करणें, कमीपणा घेणें. *S. small*, नांगी टाकणें, चूप बसणें, हार खाणें. *S. out, v. t. & i.* मोठ्यानें हांका मारणें, ओरडून सोडणें, ओरडणें. *Singing-man*, धंदेवाईक-पगारी-गवई. *Singing-master*, गायनशिक्षक. *Singing-voice*, गाण्याचा आवाज. *Sing-song, a. & n.*

monotonous rhythm or cadence in reading etc.; (colloq.) impromptu vocal concert. एक आवाजी,-कंटाळवाणें-गीत; एकच (गाण्याच्या) आवाजांत-हेल काढीत-बोलणें किंवा वाचणें; तात्कालिक गाण्यांची मजलस,-गाण्यांचा जलसा, नवशिक्या गवयांचा जलसा. *v. t. & i.* to recite, speak, in s. manner. हेल काढून, गाइल्यासारखें, किंवा सुरावर म्हणणें,-बोलणें.

Sĭnge, *v. t. & i.* (सिंज्)—to burn slightly, to apply fire to the surface or edge of; rid thus of hair or feathers or nap; suffer singeing. होरपळणें, वरवर जळणें,-जाळणें; हरतरी करणें,-होणें. *n.* superficial burn (rare). वरवरची झळ; आंच. To *s.* one's *feathers* or *wings*, take some harm. (साहसाचा प्रयत्न करतांना) थोडीशी दुखापत-इजा-होणें, -झळ लागणें.

Sĭng'le, *a.* (सिंग्गल्)—one only, not double or multiple, individual; unmarried; of, for, or with one person or thing; solitary, lonely, unaided; sincere, consistent, ingenuous; (in negative contexts) not to speak of more. एकेरा, एकेरी, एकच, एक; एकेकटा, व्यक्तिशः; एकटा; अविवाहित; एकव्यक्तिक,-वस्तुक; एकाकी, एकलकोंडा, असहाय; मनःपूर्वक, एकसूत्रीपणाचा, निष्कपट, साधा, सरळ; एकही (न). *v. t.* to choose *out* for attention or treatment of some kind. निवडून काढणें, निवडणें, पसंत करणें. *n.* a s. game; hit for one in cricket; (pl.) twisted s. threads of silk. एक डाव, एकेरी,-एकेकट्या भिडूचा,-डाव; (क्रिकेटमध्यें) एकेरी धांव, एक एक धांव; (अने०) रेशमाच्या धाग्यांचा पेळू. *A s. combat,* द्वंद्वयुद्ध. *S. flower,* एका देंटावर येणारें एकच फूल, एकेरी पाकळ्यांचें फूल. *S. game,* एकेरी भिडूचा खेळ. *S. court,* (एकेकच भिडू खेळू शकेल एवढें) एकेरी लॉन टेनिस,-अंगण. *S. bed,-room,* एकाच माणसाच्या उपयोगी बिछाना,-खोली. *S. eye-glass,* एकाच डोळ्याचा चष्मा. *S. blessedness,* unmarried state. अविवाहित स्थिति. *A s. eye,* devotion to one purpose. एकहेतुकता, एकनिष्ठा, एकाग्रता,; *S.-eyed, a.* एकनिष्ठ, एकलक्षी; एकाक्ष, एकडोळ्या. *S. heart* or *mind,* simplicity of character. साधा-सरळ-स्वभाव, एकाकारता; *S. hearted, a.* free from duplicity or mixed motives. दुटप्पीपणा नसलेला, एकनिष्ठ; *S.-minded,* true to one object, एकनिष्ट, एकचित्त; *S.-mindedness, n. S. file,* advance in which every member of the party is straight behind its leader. (एका पाठीं एक अशी) एकेरी रांग, *S.-foot*, (U. S.) horse's racking gait. घोड्याची मध्यम दौड. *S. fire,* (of cartridge) एकवारी; एकदांच उडवितां येण्याजोगें, (काडतूस). *S.- acting,* (of engine etc.) with steam admitted only to one side of piston. पिस्टनच्या एकाच बाजूच्या वाफेनें चालणारें, एकाच बाजूनें कार्य करणारें. *S.-breasted,* (of coat etc.) एकाच बाजूला बटणें असलेला (अंगरखा). *S.-stick,* (fencing with) basket-hilted stick of about sword's length. (टोपलीच्या आकाराच्या मुठीच्या यष्टीनें केलेलें) यष्टीयुद्ध. दांडपट्टा, दांडपट्टयाचा खेळ. *Sing'ly, adv.* एकेरा, साह्यावांचून, एकट्यानें, एकामागून एक. *Sin'gleness, n.*

Sĭng'le-hănded, *a. & adv.* (सिंग्गल्-हँडेड्)—without assistance from others, by one's own efforts; with or for one hand. एकटा, असहाय; एकहाती, एक हातानें वापरण्याची; (*adv.*) एकट्याच्या हिंमतीनें; एका हातानें.

Sĭng'let, *n.* (सिंग्लेट्)—a garment worn below shirt, vest. आंतला अंगरखा, कुडतें.

Sĭng'leton, *n.* (सिंग्गल्टन्)—player's only card of a suit; lone person. हुकमाचें एकटेंच पान; एकटा-एकलकोंडा-मनुष्य.

Sĭng'ūlar, *a.* (सिंग्युलर्)—extraordinary, uncommon, surprising; eccentric; single; unexampled, unique (rare); (*Gram.*) of a single thing or person. अद्वितीय, असामान्य, विलक्षण; तऱ्हेवाईक, विक्षिप्त; एक, एकटा, व्यक्तिशः; अद्वितीय, अनुपम, अपूर्व; एकवचनी, एकवचनाचा. *n.* (Gram.) the singular number; a singular word. एकवचन; एकवचनी शब्द. *All and s.*, सर्व मिळून व व्यक्तिशः, एकेक. *Singularly, adv.* विशेषपणें, विलक्षण रीतीनें, विक्षिप्तपणानें; एकवचनी.

Sĭngūlă'rĭtў, *n.* (सिंग्युलॅरिटि)—peculiarity; eccentricity, strangeness. अद्वितीयता, विलक्षणपणा; तऱ्हेवाईकपणा.

Sĭn'ister, *a.* (सिनिस्टर्)—of evil omen; ill-looking; wicked, flagitious; (Herald.) on left side of shield, etc.; left. अमंगळ, अनिष्ट, अशुभ; (दिसण्यास) भेसुर, दुष्ट, अतिनिंद्य;; कपटाचा; डाव्या बाजूचा, डावीकडचा, डावा. *A s. design,* दुष्ट डाव,-बेत. *Sinisterly, adv.*

Sĭnk, *v. i. & t.* (सिंक्)—to fall slowly downwards; decline; disappear below horizon or surface of liquid; droop, subside; gradually expire; lower or let droop; send (ship, &c.) to the bottom; bore or construct below ground, engrave; invest (money); decrease the value of; penetrate, make way; keep in obscurity or background, conceal. बुडणें, खालीं जाणें; खालावणें; बुडणें; गळणें, गळठणें, कमी होणें; हळूहळू नाहींसें होणें; उतरवणें, बुडवणें; तळाशीं नेणें; जमीनीखालीं खोदणें; खणणें; (पैसा) धंद्यांत गुंतविणें; किंमत कमी होणें,-करणें, उतरविणें; आंत शिरणें, वाट काढणें, भिजणें, मुरणें, लपवणें, मागें ठेवणें, दृष्टिआड ठेवणें; चोरणें. *n.* a place in which foul liquid collects (usu. fig.); receptacle with out-flow pipe into which dirty water etc. is thrown; pool or marsh in which river's water disappears; opening in stage through which scenery is raised and lowered. (अनीतीचा) अड्डा, गटार; मोरी, घाण पाणी सांडण्याचें भांडें; नदीकांठची दलदल; रंगभूमीतील आरपार फट. *Ship sinks,* goes to the bottom. गलबत बुडून तळाला जातें. *Eyes sank,* दृष्टि अधोमुख झाली. *Voice sinks,* आवाज पडतो,-कमी होतो. *Sick man, life, is sinking,* खालावत, मरणोन्मुख

स्थितींत आहे. *Ground sinks,* जमीन उतरती आहे,-खचत आहे. *S. in one's estimation,* एखाद्याच्या मर्जीतून उतरणें. *Sunken cheeks, eyes,* चिंबलेलीं;-बसलेलीं,-गालफडें, खोल गेलेले डोळे. *Here goes, s. or swim,* (said in running risks and taking chances). तरायला होवो का बुडायला होवो, पुढें पाऊल टाकलें खरें! *Lesson sinks into the mind,* धडा, बोध, गळीं उतरतो,-मनावर ठसतो. *Dye sinks in,* रंग पूर्णपणें भिनतो,-एकजीव होतो. *S. shaft, well,* dig or bore it. विहीर, विवर,-खणणें किंवा पोखरणें. *S. the fact,* एखादी गोष्ट गुप्त ठेवणें. *S. money,* (एखाद्या नव्या धंद्यांत) पैसा बुडीत म्हणून घालणें,-गुंतविणें,-बुडवून घेणें. *Sink'able, a. Sank,* or (arch.) *Sunk,* pa. t.; *Sunk,* or in adj. use usu. *Sunken,* pa. p.

Sink'er, *n.* (सिं'कर्)—In vbl. senses; (esp.) weight used to sink fishing or sounding line. बुडणारा, बुडवणारा; बुडीद (वजन).

Sink'ing, *n.* (सिं'किंग्)—In vbl. senses; (esp.) internal sensation caused by hunger or apprehension. बुडणें, बुडवणें, खचणें, उतरणें; (भूक किंवा भीति यांमुळें) गळणें, गळाठणें, ग्लानि (येणें). *S.-fund,* moneys set aside for the gradual extinction of a debt. (क्रमशः कर्जफेडीसाठीं) बुडीत रक्कम. *The s.-f.*, राष्ट्रीय कर्ज फेडण्याकडे उपयोगांत आणण्याची (राष्ट्रीय) शिल्लक रक्कम. *To raid the s. f.*, अशा शिल्की रकमेचा एखादे वर्षी इतर गोष्टींत खर्च करणें.

Sin Fein, *n.* (शिन् फेन्)—Irish movement aiming at national revival in language, etc. as well as independence. आयर्लंडमधील राजकीय चळवळ,-संस्था. [Ir.,=we ourselves]

Sinn'er, *n.* (सि'नर्)—a sinful person. पापी मनुष्य, नष्टात्मा.

Sinol'ogy, *n.* (सिनॉ'लजि)—knowledge of the Chinese language, history, customs, etc. चिनी भाषा, संस्कृति, इ. चें ज्ञान. *Sinol'ogist, n. Sinol'ogue, n.* चिनी भाषा,-संस्कृति-तज्ज्ञ. [Gk *Sinai, the* Chinese]

Sin'ter, *n.* (सिन्टर्)—a mineral; incrustration. झऱ्यांमुळें खनिजद्रव्यांचा पाणुद्रा घसरलेला खडक.

Sin'ūate, *a.* (सि'न्युअट्)—(esp. bot.) wavy-edged. वीचितरंगवत्, नागमोडी कडेचें (पान).—*ly, adv.*; *Sinua'tion, n.* [L. *sinus,* bend]

Sin'ūous, *n.* (सि'न्युअस्)—with many curves, crooked; meandering, of a winding form. वक्र; नागमोडी, वांकाचा, वांकणांचा.-*ly, adv.*; *Sinuosi'ty, n.* (esp.) being senuous; a bend (esp.) in a stream or road. नागमोडी-वक्र-असणें; (प्रवाहांतील-रस्त्यांतील-) वांकण.

Si'nus, *n.* (सा'इनस्)—(*pl.-uses,-us*) (Anat., Zool.) cavity of bone or tissue; (path.) fistula; (Bot.) curve between lobes of leaf. हाडांतील पोकळी, अस्थिविवर; नाडीव्रण; नासूर; पर्णपालिकांतील पोकळी.

Sip, *v. t. & i.* (सिप्)—to drink by successive spoonfuls or small mouthfuls. चाखत चाखत पिणें, आचमन घेणें. *n.* one such mouthful. घुटका, आचमन. *A sip of brandy,* दारूचा घुटका, घोंट.

Si'phon, *n.* (सा'इफन्)—a curved tube for conveying liquids over edge of vessel; (also *s. bottle*) a bottle with tap from which aerated water is forced out by pressure of gas; (zool.; also *siphuncle*) canal or conduit in some shells, sucking tube of insects. (भांड्यांच्या कडेवरून पाणी काढण्याची) वक्रनलिका; वांकड्या नळीची सोडा-वॉटरची बाटली; सकवच प्राण्यांची अन्ननलिका, कीटकांची शोषनलिका. *S. barometer,* वक्रनलिका, भारमापक यंत्र. *S., v. t. & i.* to conduct or flow (as) through s. वक्रनलिकेतून येणें,-वाहणें,-झिरपणें. *Si'phonal,-nic, aa.* [Gk *siphon,* a hollow tube]

Si'ppet, *n.* (सि'पिट्)—one of the pieces of toast or fried bread served with soup, mince, etc. पावाचा लहान तुकडा.

Sir, *n.* (सर्)—used as vocative to master or superior or male stranger, or to a boy or inferior who is being rebuked; title preceding Christian name of knight or baronet. महाराज, साहेब; एक बहुमानाचा सर हा नांवापूर्वी लावण्याचा किताब. *v. t.* to address as *sir.* 'महाराज' म्हणून संबोधणें.

Sire, *n.* (सायर्)—father, the male progenitor of an animal esp. stallion kept for breeding. पिता, बाप, जनक, वाडवडील, पूर्वज; पोळ, वळू, सांड. *voc.* Your Majesty (in addressing king or sovereign prince. (राजा किंवा राजपुत्र याची पदवी) महाराज. *v. t.* to beget (esp. of stallion). उत्पन्न करणें (चांगली घोड्यांची अवलाद).

Sir'en, *n.* (सा'इरिन्)—(Gk. myth.; pl.) winged women living on a rock and with sweet songs luring mariners to destruction; a sweet singer; a dangerously fascinating woman or pursuit; hooting instrument used for sound-signals. (ग्रीक पुराणांतील पंख असलेल्या व गोड आवाजानें खलाशांना मोहून त्यांचा नाश करणाऱ्या) जलदेवता; गोड मोहक गाणारा; मोहिनी, मोहणारी-भुलविणारी स्त्री,-भुलावणुकीची वस्तु; (पदार्थ.) स्वरमापक; शिटी. *S.,* (attrib.) irresistibly tempting. मोहून-भुलवून-टाकणारा.

Sire'nian, *a. & n.* (सायरी'निअन्)—(member) of of the Sirenia. तिमिसदृश सस्तन प्राणि-जाती.

Siri'asis, *n.* (सिरा'यसिस्)—sun-stroke; sun-bath as medical treatment. उन्हाची तिरीप, उन्हाचा तडाखा; आतपस्नान (उपचार).

Si'rius, *n.* (सि'रिअस्)—the dog-star. व्याध, लुब्धक (तारा).

Sirl'oin, *n.* (स'र्लॉइन्)—best part of loin of beef. पुट्ठा, पुठ्याचें मांस.

Sirocco', Sci- *n.* (सिरॉको')—(pl.-os.) hot moist oppressive (south or south-east) African wind. उष्ण दमट त्रासदायक द. आफ्रिकेंतील वारा.

Si'rrah, *n.* (सि'रा)—voc. of sir, used in anger, etc. (रागांत इ.) महाराज! बेट्या! पठ्ठ्याजी!

Siree', *n.* (सिरी')—(U. S.) voc. of sir. महाराज!

Sis'al, *n.* (सि'सल्)—*S.-grass,-hemp,* fibre of American Aloe. वांकाचा दोर. [*Sisal,* port of Yukatan]

Sis'kin, *a.* (सि'स्किन्)—a small song-bird. एक गाणारा लहान पक्षी.

Siss'y̆, *n.* (सि'सि)—(U. S.) an effiminate boy or person. दुर्बळ मुलगा,-पुरुष. *Voc.* sister, young girl. बहीण; तरुण मुलगी.

Sis'ter, *n.* (सि'स्टर्)—the daughter of same parents as another person; a famale fellow-member of class or sect or human race; a nun or member of sisterhood; hospital nurse in authority over others; an institution, etc. on same lines or of same origin (usu. attrib.). बहीण, भगिनी; वर्गभगिनी, जाति-भगिनी; धर्मभगिनी, जोगीण, मठवासिनी; वरिष्ठ सुईण; जोड (संस्था). तत्सम (संस्था, इ०). *S. german,* सख्खी बहीण. *Half s.,* सावत्र बहीण. *The Fatal Ss. or Ss. three or three Ss.,* the Fates. (ग्रीक पुराणांतील) तीन दैव-देवता,-भाग्यदेवता. *Prose, younger sister of verse,* पद्याची धाकटी बहीण 'गद्य' होय. *S. ships,* एकाच-सारख्याच-बांधणीचीं गलबतें,-जहाजें. *Sis'terhood, n.* बहीणपणा, भगिनीत्व; भगिनी समाज। भगिनी-संप्रदाय. *S.-less, Sis'terly, aa. Si'sterliness, n.* [OE *swuster,* Du. *zuster,* Skr. *Swasa.*]

Sis'ter-in-law, *n.* (सि'स्टर्-इन्लॉ)—one's husband's or wife's sister, brother's wife. नणंद, मेहुणी, भावजय.

Sisy̆phē'an, *a.* (सिसिफी'अन्)—(of toil) endless and fruitless; vainly toilsome (as of Sisyphus, Greek condemned to push a stone up hill and begin again when it rolled down). न संपणारें व निष्फळ (काम); व्यर्थ खटाटोपीचें (काम).

Sit, *v. t. & i.* (सिट्)—(sat) to rest upon the buttocks; to be in session (of parliament, etc.); (of bird) rest on perch, hatch eggs by sitting on them in nest; keep one's seat on (horse, etc.); (of things) lie or rest or be situated; (with *for*) represent constituency in Parliament; let artist take one's portrait. बसणें, बैठक मारणें, -घेणें, बूड टेकणें; बैठक भरणें,-चालू असणें; बसणें, अंडीं उबवणें, पाखर घालणें; (घोड्यावर) बैठक मारणें, बसणें; असणें, राहणें; (पार्लमेंटांत) च्या वतीनें बसणें; (चित्र-छबी-काढण्यासाठीं) चित्रकारासमोर बसणें. *To s. tight,* (colloq.) आपलें आसन स्थिर ठेवणें, न डगमगणें, चिकाटीनें राहणें. *S. in judgement,* चौकशी करण्याकरितां बसणें, शहानिशा करणें. *S. for one's portrait,* चित्रकारासमोर स्वतःचें चित्र काढण्यासाठीं बसणें. *S. at home,* आळशीपणानें राहणें, धंदाउद्योग न करणें. *Sits the wind there?,* Is it in that quarter? Is that the state of affairs? वारा त्या दिशेनें वाहात आहे काय? एकंदर वस्तुस्थिती अशी आहे का? *Food sits heavy on the stomach,.* अन्न पोटांत गप्पदिशीं बसतें,-लौकर पचत नाहीं. *Sitting tenant,* चालू-हल्लींचा-भाडेकरी. *S. down,* खालीं बस. *Sat him down,* तो खालीं बसला. *Pray s. you down,* खालीं बसा. *S. down,* (*Mil.*) encamp *before* place to besiege it. एकाद्या जागेपुढें तिला वेढा देण्यासाठीं तळ देऊन राहणें. *S. down under,* submit tamely to (insult etc.). निमूटपणें गिळणें,-सहन करणें. *S. on* or *upon,* (of jury etc.), च्या विचारार्थ बसणें,-बैठक भरवणें. *S. out,* एकाद्या गोष्टींत भाग न घेणें; शेवटपर्यंत राहणें; घराबाहेर बसणें,-राहणें. *S. under,* धर्मोपदेशकाचें शिष्यत्व पत्करणें,-चें व्याख्यान ऐकणें. *S. up,* उ बसणें; जागणें, जागरण करणें. *Make* one *s. up,* एकाद्याला कष्ट-कठीण काम-करावयाला लावणें, पीडा देणें. इ० *Sit fast,* घोड्याच्या पाठीचें हाड सुजणें.

Site, *n.* (साइट् —ground for town or building, local position. शहराकरितां किंवा घराकरितां आसपासची जागा, स्थान, विशिष्ट स्थान.

Sitt'er, *n.* (सि'टर्)—(esp.) a person sitting for portrait; (sl. with ref. to shooting bird sitting) easy job, easy shot at goal, etc. चित्र काढण्याकरितां बसलेला मनुष्य; सोपें काम, सोपा नेम.

Sitt'ing, *n.* (सि'टिंग)—(esp.) time for which person or assembly sits continuously; a person's seat in church. बैठक, अधिवेशन; चर्च-मधील बसण्याची प्रत्येकाची जागा. *S. room,* parlour. बैठकीची जागा, दिवाणखाना.

Sit'ūated, *n.* (सि'च्युएटेड्)—having a site, in specified situation. वसवलेला, ठिकाणीं असलेला. *Sit'uate, a.* (arch.).

Situā'tion, *n.* (सिच्युए'शन्)—the site and surroundings of a place, &c.; posture of affairs; the way one is pleased; post as a servant or a wage-earner. ठिकाण, जागा; स्थिति, वस्तुस्थिति; दशा, हालहवाल, अवस्था; नोकरी, जागा, असामी.

Six *a. & n.* (सिक्स्)—one more than five, 6, VI. सहा, सहाचा आंकडा, षट्,-ड्; (on a dice etc.) छक्का, सख. *S. to one,* long odds, मोठाच फरक, महदंतर. *two and s.,* half-a-crown. अर्धक्राउन. *S. & s.,* 6/6, सहा शिलिंग सहा पेन्स. *It is six of one and half-a-dozen of the other,* केवळ नांवाचाच फरक आहे. *Six'pence,* सहा पेन्सांचें चांदीचें नाणें, ६ पे. *Sixpenny bit,-piece,* silver 6 d. चांदीचें सहा पेन्सांचें नाणें. *S.-shooter,* सहाबारी पिस्तुल. *At ss. and sevens,* in confusion. गोंधळ असणें, घोटाळा-अस्ता-व्यस्त-असणें. *Six'fold, a. & adv.* सहापट.

Six'ain, *n.* (सि'क्सेन्)—a six-line stanza. सहा ओळींची कविता.

Six'er, *n.* (सि'क्सर्)—a hit for six in cricket. षट्कार, सहा धांवांचा फटका.

Six'footer, *n.* (सि'क्सफुटर्)—a person 6 ft in height, thing 6 ft long. सहा फूट उंचीचा मनुष्य, सहा फूट लांब वस्तु.

Sixth, *a.* & *n.* (सिक्स्थ्)—next after fifth. सहावा. *S. form*, highest form in public school. कांहीं शाळेंतील वरचा शेवटचा वर्ग. *Sixth'ly*, *adv.* in the sixth place. सहाव्यांदा, सहाव्यांनीं.

Sixteen', *a.* & *n.* (सिक्स्-टीन्)—six and ten, one more than fifteen, 16, XVI. सोळा, षोडश.-*th*, *a.* सोळावा. *Six'teenmo*, *16mo*, 16 leaves or 32 pages to sheet of printed book. पुस्तकाचा षोडशपत्री फर्मा.

Six'ty̆, *a.* & *n.* (सि'क्स्-टि)—six times ten, 60, LX. साठ, षष्टि.—*fold*, *a.* & *adv.* साठपट,-पटीनें. *Six'tieth*, *a.* & *n.* साठावा. *The ss.*, वयाचा किंवा शतकाचा ५९ ते ७० वर्षांचा काळ.

Si'zable, *a.* (सा'इझबल्)—of large size. मोठ्या आकाराचा, मोठा.

Si'zar, *n.* (सा'इझर्)—an undergraduate at Cambridge, etc. receiving college assistance on the ground of poverty. कॉलेजची मदत मिळणारा गरीब कॉलेज-विद्यार्थी.-*ship n.*

Size, *n.* (साइझ्)—relative bigness or dimensions; glutinous substance used to give surface to paper, stiffen calico, &c; (Hist.) standard of weight or measure for some articles; (Camb. univ.; *Siz'ing*, *n.*) ration of food or drink. आकार, विस्तार, परिमाण, लांबीरुंदी, महत्त्वमापन, क्षेत्र; सरस, खळ; (ऐति.) सरकारी शिक्क्याचें,-प्रमाणभूत, वजन, माप; खाद्यपेयाचा रतीब,-प्रमाण. *v. t.* & *i.* to sort in sizes or make conform to a size; glaze or stiffen with size; (with *up*) estimate size of, (colloq.) form judgement of (person). आकारप्रमाणें वर्गवारी करणें,-लावणें; आकारप्रमाणें कापणें; खळ लावणें, सरस लावणें; चा आकार-मोठेपणा -अजमावणें, (ची) पारख करणें, (वर) मत देणें. *Are both of a s.*, दोन्ही एकाच आकाराचीं आहेत. *Is the s. of a mango*, आंब्याच्या आकाराचें,-आंब्याएवढें-आहे. *S. stick*, shoe-maker's measure for taking length of foot. पायाचें माप घेण्याची चांभाराची मोजपट्टी.-*sized*, *a.* (च्या) आकाराचा, आकृतीचा. *Si'zer*, *n.* आकारप्रमाणें वर्गवारी करणारा,-आकारप्रमाणें कापणारा,-वसविणारा. *Siz'y*, *a.* खळीसारखा, चिकट.

Sjăm'bŏk, *n.* (शॅ'म्बॉक्)—rhenoceros hide whip used in S. Africa. गेंड्याच्या चामड्याचा चाबूक.

Skald, *n.* (स्कॉल्ड्)—ancient Scandinavian poet. स्कॅन्डिनेव्हिआंतील प्राचीन कवि.

Skāte, *n.* (स्केट्)—kinds of ray-fish; (U. S.) poor-spirited or worthless person. एक जातीचे (समुद्रांतील) मासे; नेभळट, गचाळ,-मनुष्य.

Skāte, *n.* (स्केट्)—one of a pair of implements attachable to the boots and enabling wearer to glide over ice. बर्फावरून घसरत जाण्याकरितां (तळीं) पोलादी पट्टी किंवा चाकें मारलेला) जोडा,-बूट. *v. i.* & *t.* to go on skates, to slide or move on skates. बर्फावरून पोलादी तळपट्टीचे जोडे घालून घसरत जाणें, बर्फावर अशा जोड्यांनीं निरनिराळ्या आकृती रेखाटणें. *Roller-s.*, साध्या जमिनीवरून घसरण्याचे तळीं चाकें जोडलेले जोडे. *To s. over thin ice*, नाजूक विषयावर बोलणें. *Skating-rink*, घसरत जाण्याचा खेळ खेळण्याची कृत्रिम बर्फ-भूमि किंवा रंगण. *Skā'ter*, *n.*

Skĕdăd'dle, *v. i.* (स्किडॅ'डल)—(sl.) to make off. पळ काढणें, पळून जाणें. *n.* hurried flight or dispersal. पळ, दाणादाण. [U. S.]

Skeen, *n.* (स्कीन्)—the Himalayan ibex. हिमालयांतील रान-बकरा.

Skein, *n.* (स्केन्)—a bundle of yarn or thread or silk; flock of wild geese in flight; (*fig.*) tangle, confusion. सुताची,-रेशमाची, लडी (१२० वार लांब); हंसांचा धावता थवा; गुंतागुंत, घोंटाळा, गोंधळ.

Skĕl'eton, *n.* (स्के'लिटन्)—the hard framework of an animal or plant; the dried bones of a person; an epitome or abstract; nucleus; thin person. सांगाडा, सांपळा, हाडांचा पिंजरा; अस्थिपंजर; टांचण, ठळक मुद्दे, आराखडा; मुख्य आधार; हाडकुळा मनुष्य, सुदामजी. *S. at the feast*, एकंदर सुखांत विरस करणारी गोष्ट, चिंता, हृद्रोग. *S. in the cupboard*, *family s.*, मानहानिकारक किंवा अकल्पित (अशी इतरांपासून लपवून ठेवलेली) गुप्त गोष्ट, गुप्त लांछन,-कालिमा. *S. key*, अनेक कुलुपांना लागणारी किल्ली. *Skel'etal*, *a.* *Skel'etonize*, *v. t.* अस्थिपंजर करणें, (पानांच्या) नुसत्या शिरा ठेवणें; अनवश्यक-पाल्हाळिक-भाग गाळणें.

Skĕp, *n.* (स्केप्)—kinds of wooden or wicker basket; straw or wicker bee-hive. लांकडी किंवा विणीची टोपली; गवती किंवा विणीची (मधमाशांच्या पोळ्यांच्या आकाराची) परडी.

Skĕtch, *n.* (स्केच्)—a rough drawing or painting; a rough draft or general account of something; a short light entertainment; short article. रेखाचित्र, चित्राची रूपरेषा, आराखडा; संक्षिप्त माहिती, मसुदा; नाटिका; संक्षिप्त लेख. *v. t.* & *i.* to make sketches; draw or design or describe in sketchy way. रूपरेषा काढणें, मसुदा तयार करणें; स्थूल वर्णन करणें. *Sketch'y*, *a.* केवळ रूपरेखात्मक, ओबडधोबड चित्रासारखा, त्रोटक. *Sketch'ily*, *adv.*, *-iness*, *n.* *Sketch'er*, *n.* रेखाचित्रें काढणारा, चा आराखडा काढणारा. *Sketch-map*, नकाशाचा आराखडा. *Sketch block* or *book*, आराखडे काढण्याची वही.

Skew, *a.* (स्क्यू)—set askew; not in straight lines or at right angles, oblique; (Math.) having symmetry distorted by reversal of some element on opposite sides. तिरपा; सरळ रेषेंत किंवा काटकोनांत नसलेला; दोन्ही बाजू समप्रमाण नसलेला. *n.* sloping top of buttress; coping of gable; stone built into bottom of gable to support coping. नेढाळ्याचा (तिरकस असा) शेंडा, -वरचा भाग, धिराशाचें तिरपें टोंक; चांदईची वरंडी, घराच्या आढ्याखालचा तिरपा (त्रिकोणी) भाग; चांदईच्या तळचा नेढाळ्याचा दगड. *S. bald*, (esp. of horse) with irregular patches of white and some colour. (पांढऱ्या व दुसऱ्या कोणत्याहि रंगाचे) अनियमित ठिपके असलेला. *S. eyed*, squinting. तिरवा, तिरप्या नजरेचा,-दृष्टीचा.

Skew'er, *n.* (स्क्यूंअर्)—a wooden or metal pin with which meat is held together while cooking ; (joc.) sword etc. सळई, शलाका ; तलवार, (इ. हत्यार). *v. t.* to run s. through. सळई खुपसणें, सळईत धरणें.

Ski, *n. & v. i.* (शी,स्की) (pl. *ski, skis*) one of pair of wooden runners 8 ft long and 4 in. broad fastened under feet for travelling over snow. बर्फावरून चालतांना वापरण्याचा जोडा. *v. i.* (*ski'd, skiing,*) to go on ski. असला जोडा घालून जाणें.

Skid, *n.* (स्किड्)—piece of wood etc. serving as support or roller or check ; iron-shoe or other device to check vehicle's pace ; slide of wheel on muddy ground ; (U. S.) timber track on which logs are slid. टेंकूचा,-घसरविणारा,-अटकावणीचा दांडा ; चाकाची गति कमी करणारी घसरी,-चाकाचें घसरणें,-चीं घसरण ; लांकडी ओंडे घसरविण्याचा रस्ता. *v. t. & i.* to suport or move or check with *s.*, (of wheel) slide. टेकू देणें, घसरायला लावणें, घसरत जाणें, घसरणें.

Ski'er, *n.* (शी'अर्)—a person using ski. बर्फावरून घसरजोडे घालून घसरणारा.

Skiff, *n.* (स्किफ्)—kinds of small light boat. लहान होडी.

Skil'ful, *a.* (स्कि'ल्-फुल्)—expert, adroit. कुशल, कसबी, चतुर ; प्रवीण, तरबेज.-*fully, adv.* युक्तीनें, चातुर्यानें.

Skill, *a.* (स्किल्)—practised ability ; expertness ; dexterity, aptitude. कौशल्य ; चातुर्य, हिकमत ; कसब, युक्ति. *Skilled, a.* (-ल्ड्) कसबी, सराईत, वाकबगार.

Ski'llet, *n.* (स्कि'लेट्)—a small metal pot with long handle used in cooking. थाबर, पळा, पळी.

Skill'y, *n.* (स्कि'लि)—thin gruel or soup. कांजी, पेज.

Skim, *v. t. & i.* (स्किम्)—to take or remove the scum or cream off ; to read superficially ; to glide over, to pass lightly. छाटणें, झाडणें, झाऱ्यानें काढणें, मलई काढणें ; वरवर वाचणें, पानें चाळणें, नजर टाकणें ; सरपटत जाणें, हवेंत तरंगणें, समांतर उडणें. *To s. the cream off,* (often *fig.*) take best part of. ची मलई-सार-काढून घेणें. *Skimming dish,* (*sl.*) सपाट शर्यत-नौका. *S. milk,* from which cream has been skimmed. चरबीरहित दूध.

Skimm'er, *n.* (स्कि'मर्)—In vbl. senses ; esp. a ladle etc. for skimming liquid ; kinds of water-bird, (esp. Black S.). झारा, शिंपें ; एक जातीचा (पाण्यावरून उडणारा) पक्षी.

Skimp, *v. t. & i.* (स्किम्प्)—to supply (person with or *in*) scantily with necessaries ; be parsimonius with ; live parsimoniously. (आवश्यक वस्तू) बामतरतेनें-अत्यल्प-पुरविणें ; काटकसर करणें ; कंजूषपणानें राहणें. *Skimp'y, a.* insufficient ; lean. अपुरा ; तुटपुंजा. *Skimp'ingly, adv.*

Skin, *n.* (स्किन्)—the natural covering of the body ; (Anat.) one layer of this ; peel or rind ; complexion ; hide of flayed animal ; material prepared from skins esp. of smaller animals ; a vessel for wine or water made of animal's whole skin ; planking or plating of ship or boat. चामडी, त्वचा, कातडी ; त्वचेचा थर ; साल, सालपट, टरफल, कोशेटा, छिलटा, कवच ; वर्ण, रंग, चेहरापट्टी ; चामडें, चर्म ; चामड्याची वस्तु ; पखाल, चर्मपात्र ; गलबताला,-होडीला,-(सांगाड्याच्या आंतून किंवा बाहेरून) फळ्या किंवा पत्रा मारणें. *v. t.* to strip the skin from ; flay, peel ; heal over with new skin ; (colloq.) strip (oneself or another) of tight garment. कातडें काढणें, त्वचा काढणें ; सोलणें, साल काढणें ; नवीन चामडी येऊन बरें करणें, कातडी धरणें ; तंग कपडा (आंगावरून) काढणें. *With a whole s.,* unwounded. जखम,-इजा,-न होतां. *To save* one's *s.,* get off safe. सुरक्षितपणें बचावणें,-निसटणें, आंग वाटावणें. *Change* one's *s.,* स्वभावांत (वगैरे सहसा न होणारा) बदल होणें. *Would not be in his s.,* should not like to be he. त्याच्यासारखें व्हावेंसें वाटणार नाहीं. *Is only s. & bone,* हाडकोळा सुदामदेव. *Escape with the s. of* one's *teeth,* संकटांतून थोडक्यांत निभावणें. *Thick s.,* निगरगट्टपणा, चिवटपणा. *Thin s.,* मनाचा हळवेपणा, हळुवारपणा. *Fair, dark, s.,* गोरेपणा, गोरी कातडी, गोरा चेहरा ; काळी कातडी, काळा चेहरा. *True or inner s.,* अंतस्त्वचा, सत्यत्वचा. *Outer s.,* बाह्यत्वचा,-चामडी. *S. deep,* (of wound, emotion, etc.) merely superficial. वरवरचा, फार खोल नसलेला. *S.-grafting,* surgical substitution of skin. व्रण लवकर भरावा म्हणून त्यावर चांगल्या ठिकाणच्या कातडीचा तुकडा बसविणें, कोथितांगसंधान. *S.-game,* (U. S.) swindle. फसव्या ; पैसेखाऊ. *Keep your eyes skinned,* (sl.) be watchful or cautious. डोळे उघडे ठेव, डोळ्यांत तेल घालून-सावध-रहा. *Skinned, Skinless, aa.*

Skin'flint, *a.* (स्कि'न्-फ्लिन्ट्)—a great miser. कवडीचुंबक.

Skin'ny, *a.* (स्कि'नि)—lacking flesh ; rather thin. हाडकोळा ; पळ काढणें, किरकोळ. *Skin'niness, n.*

Skip, *v. t. & i.* (स्किप्)—to caper, frisk, jump lightly from ground ; use skipping rope ; to omit parts in reading ; be desultory ; (sl.) make off. नाचणें ; धागडणें ; दोरीवरून उड्या मारणें ; वाचतांना कांहीं भाग गाळणें,-वगळणें ; चटकन विषयांतर करणें ; पळ काढणें, अदृश्य होणें. *n.* skipping motion (esp. slight jump), a light leap. उडी, उडी मारणें, कुदणें, थयथय नाच. *Skip.jack,* jumping toy ; kinds of jumping insect etc. उडतें खेळणें ; उडणारे कीटक, मासे, पतंग इ० *Skipping rope,* length of rope used in girls' game of skipping. मुलींच्या खेळांतील (दोरीवरून) उड्या मारण्याची दोरी. *Skip'pingly, adv.*

Skip, *n.* (स्किप्)—college servant, scout, esp. at Dublin ; captain of side at bowls or curling.

कॉलेजमधील नोकर, मदतनीस, लांकडी चेंडूनीं मैदानावर किंवा सपाट दगडांनीं फर्शावर खेळण्याच्या खेळांतील प्रत्येक बाजूचा म्होरक्या, पुढारी, कर्णधार.

Skĭp, *n.* (स्किप्)—a cage, basket, etc. in which men or materials are lowered or raised in mines or quarries. खाणींतून माणसें किंवा सामान खालीं वर सोडण्या-घेण्याचें (टोपली, पिंजरा इ०) साधन.

Skĭpp'er, *n.* (स्कि'पर्)—(zool.) skip-jack; captain of ship, esp. of small trading ship; (transf.) captain of side in games; (U. S. sl.) first sergeant of a company. उडते माशी, फौदक; (लहान व्यापारी) जहाजाचा कप्तान, तांडेल; (खेळांतील भिडूंचा) कर्णधार; लष्करी मुख्य सार्जंट,-अंमलदार.

Skirl, *v. i.* & *n.* (स्कर्ल्)—(make) sound of bagpipes. सनई-मुरली-सारखा आवाज (करणें). [Sc.]

Skirm'ish, *n.* (स्क'र्मिश्)—an irregular or unpremeditated fight; a brief contest, contention. गोळागोळी, चकमक, झटापट; बोलाचाली, वाग्युद्ध. *v. i.* to engage in desultory fighting. चकमक होणें,-झडणें.—*er, n.*

Skĭ'rret, *n.* (स्कि'रेट्)—kind of water parsnip. पिवळें मूळ असलेल्या पाण-वनस्पतीची जात.

Skirt, *n.* (स्कर्ट्)—women's outer garment hanging from the waist, or this part of a complete dress; part of coat etc. that hangs below wrist; border or outlying part, margin, extreme part (*oft. pl.*); (*sl.*) girl. घागरा, स्कर्ट; कमरेखालच्या अंगरख्याचा भाग; किनारा, कांठ, सीमा, वेश, शींव, पालव; मुलगी. *v. t.* & *i.* to go or be situated along the edge of; coast along side of. सीमेजवळून जाणें, सीमा,-बाजू,-शींव धरणें,-असणें; (च्या) किनाऱ्याकिनाऱ्यानें जाणें, कांठानें जाणें. *Divided skirts,* (घागऱ्यासारखी) सैल तुमान, लेंगा. *On the ss. of Bombay,* मुंबईच्या सीमेच्या (शिवेच्या) आसपास, मुंबईच्या आंतबाहेर,-आसपास. *S. dance (r),-cing,* घागरानाच, (नाचतांना पायघोळ घागरा) घेरदार (पसरून केलेला) नाच. *Skirting-board,* खोलीच्या भिंतीच्या तळाशीं असलेली-मारलेली-फळी. *Skirt'ing, n.* कोटाच्या झोलाचा,-घागऱ्याचा,-कपडा,-कापड. *Skirted, Skirt'less, aa.*

'Skĭt, *n.* (स्किट्)—light piece of satire or burlesque (*upon*). ओपरोधिक लेख, विडंबनात्मक काव्य,-लेख.

Skitt'ish, *a.* (स्कि'टिश्)—(of horse etc.) easily frightened, timorous, (of persons) sportive, given to indiscretions, flirting, lively. बुजट, बुजरा, भितरा, (घोटा, इ.); नाचरा, नखरेबाज, चंचल, नाचरी (स्त्री).-*ly, adv.*;-*ness, n.*

Skit'tle, *n.* (स्कि'टल्)—*ss.,* a game played with nine pins, (ss. or s.-pins) set up at end of *s.-alley,* or *s.-ground* to be bowled down with s.-ball. नऊ खुंट्या-दांड्या-उभ्या करून त्या चेंडूनें पाडविण्याचा खेळ, नऊ खुंट्यांचा-दांड्यांचा-खेळ. *Life is not all beer and ss.,* आयुष्य हें नेहमीं चैनीचें नसतें. *int. ss.,* rubblish, nonsense. मूर्खपणा! हलकटपणा!

Skŏff, *n.* (स्कॉफ्)—(S.-Afr.) Food. अन्न, खाद्य.

Skū'a, *n.* (स्क्यू'आ)—a large gull. एक मोठा दर्यावरील पक्षी.

Skŭlk, *v. i.* (स्कल्क्)—to move stealthily or lurk; to shirk danger or duty. लपून छपून चालणें,-बसणें, दडी मारणें; टाळणें, अंग चोरणें. *Skulker, n.* अंगचोर, दडी मारून बसणारा. *Skulkingly, adv.*

Skull, *n.* (स्कल्)—bony case of the brain; the bones of the head. डोक्याची कवटी,-करटी, मस्तिष्कावरण; डोक्याचीं हाडें. *S.-cap,* (डोक्याला घट्ट आवळून बसणारी) माकडटोपी, कानटोपी; शिरस्त्राणाकृति फुलांची वनस्पति,-झाड.-*skulled, a.*

Skŭnk, *n.* (स्कंक्)—N.-Amer. animal of weasel king; its fur; (sl.) mean rascal. (मांजराएवढें, काळ्या रंगाचें पांढऱ्या पट्ट्यांचें) मांसभक्षक जनावर; त्याची लोंकर; पाजी, हलकट मनुष्य. *v. i.* (sl.) to defeat (opponent) without his scoring. प्रतिपक्षाचा पुरा पाडाव (डावांत) करणें.

Skȳ, *n.* (स्काय्)—the apparent arch or vault of heaven, the firmament; a region, climate, atmosphere. आकाश, आभाळ, अस्मान, अंतरिक्ष; प्रदेश, हवा, वातावरण. *v. t.* (-*ied*), to hit (ball) high into the air, hang (picture) high on wall. (चेंडु) उंच उडविणें; (चित्र) उंच टांगणें. *If the s. fall we shall catch larks,* अशक्य आपत्तींना तोंड देण्याची सिद्धता करणें नलगे. *Under the open s.,* घराबाहेर, उघड्यावर. *Was raised to the skies,* taken up to heaven. आकाशाला नेऊन भिडवला गेला. *S.-born,* (*poet.*) of divine birth. स्वर्गीय, अमानुष. *S.-line,* क्षितिज. *S.-scape,* आकाशाचें चित्र,-देखावा. *Skyly, skyless, aa. skyward, a.,-s, adv.*

Skȳ'blue, *a.* & *n.* (स्का'य-ब्लू)—azure. अस्मानी, नीलवर्ण.

Skȳ'clad, *a.* (स्का'यक्लॅड)—naked. दिगंबर, नागवा, नग्न.

Skȳe, *n.* (स्काय्)—*terrier,* a breed of Scotch terrier dog. एक जातीचा कुलंगी कुत्रा.

Skȳ'er, *n.* (स्का'यर्)—a high hit at cricket. उंच टोलावलेला चेंडू.

Skȳ'lārk, *n.* (स्का'यलार्क्)—the common lark that mounts and sings as it flies. चंडोलपक्षी, भारद्वाज. *v. i.* to play about; play tricks. खिदळणें; थट्टामस्करी करणें.

Skȳ'-light, *a.* (स्का'यलाइट्)—glazed opening in roof, or ceiling or sloping wall. गवाक्ष, धारें, झरें, सार्णे. *Is on the s.-l.,* seen outlined on s. आकाशावर रेखाटलेलें.

Skȳ'-rocket, *n.* (स्का'यरॉकिट्)—a kind of firework. हवाई, बाण.

Sky̆-scrāper, *n.* (स्का'यस्क्रेपर्)—a sky-sail; very tall building; tall chimney. वरचें शीड; गगनचुंबी इमारत; उंच धुराडें.

Sky̆-writing, *n.* (स्का'यराइटिंग)—legible smoke-trails made as advertising method by aeroplane. (विमानांतून मसिद्धी करण्यासाठीं-जाहिरातीसाठीं-धुराच्या साह्यानें केलेलें) आकाशलेखन.

Slăb, *n.* (स्लॅब्)—a flat thin piece of stone or some rigid material; (of timber) outer cut sawn from log. शिला, लादी; चीप, लाफा. *v. t.* to remove ss. from (log, tree) to prepare it for sawing into planks. वाशूचे लाफे काढणें. *a.* thick and slimy. गिळगिळीत, चिकट. *S.-stone*, लाद्यांचा दगड. *Slabbing-gang*, लांकडाचे लाफे काढण्याची करवत.

Slăck, *a.* (स्लॅक्)—sluggish; not busy; remiss; relaxed, loose. सुस्त, मेंदी; मंद, मंदीचा; कामचुकारू; ढिला, खिळखिळीत. *n.* slack part of a rope; small coal; slack time in trade etc.; (pl.) trousers. दोरीचा ढिला (न ताणलेला) भाग; कोळशाचा भुगा,-चुरा; मंदी, मंदीचा काळ; तुमान, विजार. *v. t. & i.* to idle or be remiss; slake (lime, thirst); fall off in vigour, speed, etc. आळसांत दवडणें, कामचुकारू असणें; चुन्यावर पाणी घालणें, तहान भागवणें; जोम,-वेग,-कमी होणें,-करणें. *S. water*, (ओहोटी लागण्यापूर्वीचें) संथ पाणी. *S. in stays*, (naut.) slow in going about. हळू चालीचा. *To keep a s. hand* or *rein*, निष्काळजीपणानें घोड्यावर बसणें,-कारभार चालवणें. *S. trade, business, market*, व्यापाराची मंदी. *S. weather*, सुस्ती आणणारी हवा. *S. lime*, पाणी मारलेला-भिजवलेला-विरघळविलेला-चुना. *To s.-bake bread* (*s., adv.*) अर्धवट-अर्धीकच्ची-भाकरी भाजणें. *S. dried*, हळूहळू वाळवलेला. *S.* (*off, away*), (दोर) सैल सोडणें. *S. off*, जोम,-आवेश,-कमी होणें. *S. up*, (थांबवण्यापूर्वी गाडीचा वगैरे) वेग कमी करणें. *Slack'ness*, *n.* ढिलेपणा, शैथिल्य, आळस, सुस्ती, मंदाई. *Slack'ly*, *adv.* ढिला-सैल-होईसा; ढिलेपणानें, सुस्ताईनें, हलगर्जीपणानें.

Slăck'en, *v. t. & i.* (स्लॅ'कन्)—to loosen, to relax, to make less tight; to be remiss. शिथिल करणें, सैल करणें; आळसावणें, कर्तव्यभ्रष्ट होणें.

Slăck'er, *n.* (स्लॅ'कर्)—(esp., sl.) an idler; person who scamps his work. आळशी, सुस्त,-मनुष्य; निष्काळजीपणानें काम करणारा, कामचुकारू,-मनुष्य.

Slăg, *n.* (स्लॅग)—vitreous smelting refuse, clinkers; volcanic scoria. दुर्गंधी येणारा कचरा, (अशुद्ध धातू गाळतांना निघालेली) मळी; ज्वालामुखीचा खंगर. *v. i.* to form slag; cohere into s.-like mass. मळी बनणें; खंगर जमणें. *Slagg'y*, *a.*

Slain, *pa. p.* of Slay.

Slāke, *v. t.* (स्लेक्)—to assuage or satisfy (thirst, & rhet. revenge etc.), to decrease; (also slack) to disintegrate (lime) by combination with water. (तहान वगैरे) भागविणें, शमविणें; (चुना) विरघळविणें,-उमलविणें.

Slăm, *v. t. & i.* (स्लॅम्)—to shut (door etc.) with a bang; to throw or put down (object) with a bang; hit, beat, gain easy victory over. धाडकन लावणें,-बंद करणें; धाडकन खालीं ठेवणें; फेंकणें, झापटणें; सहज मारणें, जिंकणें. *n.* violent shutting. धाडकन बंद करणें.

Slă'nder, *n.* (स्ला'न्डर्)—a false report maliciously uttered to a person's injury; calumny; (Law) false oral defamation. निंदा, अपवाद, कलंक, कुटाळकी; तोंडी निंदा,-नालस्ती,-बेअब्रू. *v. t.* to utter slander about. ची निंदा-नालस्ती-करणें.-*ous*, *a.* निंदामचुर, बेअब्रू करणारा.-*ously*, *adv.*;-*ousness*, *n.* *Sla'nderer*, *n.* निंदक, कुटाळखोर, कालिमा लावणारा.

Slăng, *n.* (स्लॅंग)—expressions in common colloquial use but regarded as vulgar and not standard English; words or uses of form peculiar to a class. अशुद्ध किंवा अडाणी बोली, अश्लील भाषा, शिष्टसंमत नसलेली बोली, भाषा; (विशिष्ट) धंद्याची-वर्गाची-भाषा, किंवा शब्दप्रचार. *v. t.* (sl.) to use abusive language to. ला शिवीगाळ करणें, असभ्य शब्दांत बोलणें. *Racing, thieves, artistic, schoolboy*, etc. *s.*, (घोड्यांच्या) शर्यतीसंबंधीं विशिष्ट शब्दप्रयोग,-भाषा, इ. *Slang'y*, *a.* of the nature of slang. अडाणी-विशिष्ट-बोलीसारखी. *Slang'ily*, *adv.*, *Slang'iness.*

Slănt, *v. t. & i.* (स्लान्ट)—to be or put in an oblique position; to slope. तिरकस करणें; उतरता असणें, ढाळ देणें, घसरता करणें. *n.* position between horizontal and vertical, slope; (arch.) indirect censure; (Naut.) favourable breeze (a s. wind). उतरतेपणा, तिर्यक्त्व, उतार, घसरड; अप्रत्यक्ष निंदा, अपमानकारक शब्द; अनुकूल,-मागचा,-वारा. *a.* (poet.) sloping, oblique. उतरता, कलता, तिरपा, तिर्यक्. *Slantingdi'cular, Slantendi'cular*, *aa.* *Slant'ingly*, *adv.* *On the* or *a s.*, aslant. तिरपा, कलता. *Slant'wise*, *adv.*

Slăp, *v. t.* (स्लॅप्)—to strike with the palm of the hand, to smack. चापट मारणें, थप्पड मारणें, थोबाडांत लगावणें. *n.* a stroke with the palm of the hand. चापट, चपराक, थाप, थप्पड. *adv.* suddenly, just, quite, full. रपकन, रपारप; धाडकन, सपाट्यानें, फटकन, साफ. *part.* (*Slapping*) as *adj.* & *adv.* very fast, big, good etc. अतिजलद, मोठा, सुंदर. *To s. in the face*, थोबाडांत भडकावणें; (*fig.*) चांगली थप्पड लगावणें, सपाटा लगावणें, नक्षा उतरणें. *A slapping great girl*, खूप (मोठी) उफाड्याची मुलगी. *S.-up*, *a.* (vulg.) quite uptodate. अगदीं आजतागायतचें, अगदीं आधुनिक.

Slăp'bang, *adv.* (स्लॅ'प्बॅंग)—violently, noisily,

headlong. आकस्मिक जोरानें, धावकन, ताडकन, धसदिशीं.

Slap'-dash, *adv.* (स्लॅप्'डॅश्)—vehemently, recklessly. झपाट्यानें, मार मारे, फटकन्, कसेंतरी, अनियमित. *a.* impetuous, random, happy-go-lucky. वेगवान, तडख, निष्काळजी, बेफिकीर. *n.* such action or work. तडख,-निष्काळजीपणाची,-कृति,-काम.

Slăsh, *v. i. & t.* (स्लॅश्)—to make sweeping cut with sword, knife etc., to make long gashes in. धपकावणें, खापावणें, सपासप तोडणें, कोरडे ओढणें; खोल जखम किंवा वार करणें. *n.* slashing stroke or gash. वार, चीर, जखम. *Slashing criticism,* स्पष्टोक्तीची मर्मभेदक, कडक,-टीका. *Slash'ing, n.* (U. S.) place in forest where trees have been felled or blown. जेथें झाडें तोडून किंवा मोडून पडलीं आहेत अशी अरण्यांतील जागा.

Slăt, *n.* (स्लॅट्)—thin narrow piece of metal or wood esp. used in sets in Venetian blinds. लोखंडी किंवा लांकडी रीप,-पट्टी. *v. i. & t.* to flap against mast etc. with reports (of sails, cordage, etc.); strike noisily with or on a surface. फडफडणें, आवाज करणें; आवाज करीत आपटणें.

Slāte, *n.* (स्लेट्)—kinds of rock easily split into thin smooth plates; trimmed plate of this used esp. in roofing or for writing on. (एक जातीचा) मऊ पाटीचा दगड; (छपराकरितां दगडी) चीप, दगडी पाटी. *v. t.* to roof with slates; reprimand or criticize severely, (esp. author in reviews), scold; (pol.) suggest as candidate (U. S.). दगडी चिपांनीं शाकारणें; कडक टीका करणें, कानउघाडणी करणें; उमेदवार म्हणून सुचविणें. *S. pencil,* दगडी लेखनी (पेन्सिल). *Clean the s.,* rid oneself of or renounce obligations. जबाबदारी-कर्तव्य-आंगावाहेर टाकणें. *S. club,* (साप्ताहिक अल्पवर्गणी असलेलें) परस्पर साह्यकारी मंडळ. *S.-colour(ed),* गर्द निळसर किंवा करड्या रंगाचा, पाटीच्या दगडासारखा. *Sla'ter,* दगडी चिपांनीं (घर) शाकारणारा, दगडी चिपा बसविणारा. *Sla'ling, n.* कडक टीका, कठोर टीकास्त्र. *Sla'ty, a.*

Slătt'ern, *n.* (स्लॅटर्न्)—untidy or slovenly woman, one negligent of her clothes and house. गैदी गबाळ स्त्री, आळश्या सुस्त्याची बायको, गबाळ स्त्री. *-ly, a.* untidy. गबाळ, गबाळी.*-liness, n.*

Slaught'er, *n.* (स्लॉटर्)—slaying, esp. of many persons or animals at once, carnage, massacre; killing of animals for food. कत्तल, संहार, कापाकापी, कापाकापी; (खाद्य मांसासाठीं गुरें) कापणें, (गुरांची) कत्तल. *v. t.* to kill thus. (लोकांची) कत्तल करणें, (गुरें) कापणें. *S.-house,* shambles. कत्तलखाना, कसाईखाना. *Slaught'erous, a.*;*-erously, adv.* *Slaught'erer, n.* कत्तल-संहार-करणारा, कसाई, खाटीक.

Slăv, *a. & n.* (स्लाव्ह्)—(a member) of any of the E.-Eur. peoples allied in race to the Russians. (पूर्व युरोपांतील रशियन, बल्गेरिअन, पोल, वगैरे) स्लाव्हजातीचा (मनुष्य).

Slāve, *n.* (स्लेव्ह्)—one who is another's property; helpless victim of some dominating influence, bondman, bondservant; a drudge, a person of no leisure; mean, contemptible person. गुलाम, दास, बंदा; कट्टा आहारीं गेलेला, बंदा गुलाम; (दुसऱ्याकरितां) काबाडकष्ट करणारा, मरीं मरणारा, हाडाचीं काडें करणारा. *v. i.* to work like a slave, drudge. गुलामाप्रमाणें राबणें, हाडाचीं काडें करणें. *Is a slave to drink,* दारूचा कट्टा दास बनला आहे. *S. bangle,* स्त्रियांचें कोंपराच्यावरून घालण्याचें दंड-कडें. *S. born,* गुलामगिरींत जन्मलेला; गुलाम आईबापांच्या पोटचा. *S.-driver,* an overseer of slaves at work; (*fig.*) exacting employer. गुलामांवर देखरेख करणारा; सक्तीनें (नोकरांकडून) काम करून घेणारा मालक. *S.-grown,* (of commodities) produced by s.-labour. (गुलामांकडून तयार करविलेला (माल). *S.-holder,* गुलामांचा धनी. *S.-hunter,* (नीग्रो) रानटी लोकांना पकडून गुलाम म्हणून विकणारा मनुष्य. *S.-ship,* गुलामांचा व्यापार करण्यासाठी (उपयोगांत आणिलेलें) जहाज. *S. states,* उत्तरअमेरिकेंतील दक्षिणेकडील संस्थानें (यांत पूर्वी गुलामांचा व्यापार चाले.). *S.-trade(r),* गुलामांचा व्यापार,-(री). [L. *selavus, slav,* captive]

Slā'ver, *n.* (स्ले'व्हर्)—a ship or person engaged in slave-trade. गुलामांची ने-आण करणारें जहाज; गुलामांचा व्यापारी.

Slăv'er, *n.* (स्लॅव्हर्)—saliva running from the mouth; (*fig.*) gross flattery. लाळ, थुंकी; तोंडपुजेपणा, अतिशय खुशमस्करी. *v. i. & t.* to let slaver flow; beslaver in kissing, etc.,; (*fig.*) fawn upon or flatter. लाळ सांडणें; थुंकी-लाळ-गाळणें,-उडवणें; हांजी, हांजी,-खुशामत,-लाळघोटेपणा करणें. *Slav'ery, a.* लाळेचा, लाळयुक्त.

Slā'very̆, *n.* (स्ले'व्हरि)—slave's condition; slave-holding as an institution; drudgery. दास्य, गुलामगिरी; गुलाम बाळगणें; काबाडकष्ट.

Slā'vey, *n.* (स्ले'व्हि)—(sl.; pl.-eys), maid of-all work. दासी, मोलकरीण.

Slā'vĭc, *a. & n.* (स्ला'व्हिक्)—(language) of the slavs, Slavonic. स्लाव्ह लोकांची (भाषा).

Slā'vĭsh, *a.* (स्ले'व्हिश्)—abject, mean, servile; oppressively laborious. नीच, क्षुद्र, गुलामगिरीचा, स्वत्वशून्य; काबाडकष्टाचा. *S. imitation,* जसेंच्या तसें (त्यांत मूलभूत सुधारणा वगैरे न करतां केलेलें-अंध-) अनुकरण. *Sla'vishly, adv. Sla'vishness, n.*

Slavō'nĭan, Slavŏn'ĭc, *aa.* (स्लॅव्हो'निअन्, स्लॅव्हॉ'निक्)—of the Slavs. स्लाव्ह लोकांचा,-लोकांसंबंधीं. *nn.* Slavonic language or person. स्लाव्ह लोकांची भाषा,-मनुष्य.

Slaw, *n.* (स्लॉ)—(U. S.) salad of sliced cabbage. चिरलेल्या कोबीची कोशिंबीर,-चटणी.

Slay, *v. t.* (स्ले)—(*slew* ; *slain*), to kill by violence. ठार मारणें, वध करणें, नाश करणें. *Slay'er*, *n.* जीव घेणारा.

Slea'zy, *a.* (स्ली'झि)—(of textiles) flimsy. पातळ, झिरझिरीत.

Slĕdge, Slĕd, Sleigh, *nn.* (स्लेज, स्लेड, स्ले)—a vehicle on runners instead of wheels (for use *esp.* on snow). (बर्फावरून घसरत जाण्याची) बिनचाकाची गाडी. *v. i.* & *t.* to travel, go, convey, in's. घसरगाडींतून प्रवास करणें,-जाणें,-नेणें.

Slĕdge, Slĕd'ge-hămmer, *nn.* (स्लेज, स्लेज्-हॅमर्) —a blacksmith's heavy hammer. लोहाराचा मोठा हातोडा, घण.

Sleek, *a.* (स्लीक्)—soft and smooth ; sleek *haired* or skinned ; of well-fed comfortable appearance. मऊ, तुळतुळीत, तुकतुकीत ; तुळतुळीत केसाचा,-कातडीचा ; गोंडस, गुबगुबीत. *v. t.* to make sleek by stroking or pressing down. तुळतुळीत,-सफाईदार,-करणें. *Sleek'ly*, *adv.* ; *Sleek'ness*, *n.* तुळतुळीतपणा, गुळगुळीतपणा.

Sleep, *n.* (स्लीप्)—condition in which the eyes are closed and the nervous system inactive ; a spell of this ; (*fig.*) rest, quiet, negligence, death, etc. झोंप, निद्रा, नीज ; झोपेचा चुटका, सुस्ती, गुंगी ; विश्रांति, मरण. *v. t.* & *i.* (slept), to be or fall asleep ; to be dormant or inactive ; to lie in the grave, to be dead ; sojourn for the night *at* or *in* ; provide sleeping accommodation for. झोंपीं जाणें, झोंप लागणें, निजणें, नीज घेणें ; गुंगींत,-सुस्तींत,-स्वस्थ राहणें ; थडग्यांत असणें, मृत्युमुखीं पडणें ; रात्री-करितां मुक्काम करणें ; झोपण्याची सोय करणें,-असणें. *In one's s.*, झोंपी गेलें असतां. *The s. of the just*, गाढ-सुखाची-निद्रा. *S. that knows not breaking*, शेवटची झोंप, मरण. *Broken s.*, चुटक्या चुटक्यानें लागणारी झोंप ; निद्राभंग. *To go to s.*, निजणें, झोंपी जाणें. *Fall on s.*, (*fig.*) माणसांतून उठणें, मृतवत् (आहे नाहीं सारखा) होणें ; मरणें. *Let sleeping dogs lie*, avoid stirring up trouble. भानगड-कटकट-उपस्थित करूं नये. *S. like a log* or *top*, सुस्त घोरत निजणें, गाढ झोंपणें. *S. on, upon, over, a question*, (चर्चेचा प्रश्न,-विषय-) उद्यांवर ढकलणें. *Sleeping partner*, केवळ भांडवलवाला धंद्यातील भागीदार (धंद्याच्या व्यवस्थेत हात नसलेला, पण भांडवल गुंतविलेला.). *Sleeping draught*, झोंपेचें-गुंगीचें-औषध. *Sleeping sickness*, (आफ्रिकेंत सेहासि माशीमुळें होणारा) झोंपेचा रोग. *Sleeping suit*, रात्रीं घालायचे पायजमे.

Sleep'er, *n.* (स्ली'पर्)—a person that sleeps, sleeping person ; one of the logs on which rails rest ; *a sleeping-car*. झोंपीं गेलेला, झोंपणारा ; आगगाडीच्या रुळाखालील लांकडाचा ओंढा, स्लिपाट ; आगगाडींतील (बिछाने असलेला) झोंपण्याचा डबा.

Sleep'lĕss, *a.* (स्लीप्-लिस्)—failing to get sleep निद्रारहित, झोंप न आलेला, अस्वस्थ.—*ly*, *adv.*, —*ness*, *n.* जागरण, अस्वस्थता.

Sleep'walker, *n.* (स्ली'प् वॉकर्)—a somnambulist. झोंपेंतच चालणारा. *Sleep'-walking*, झोंपेंत चालणें.

Sleep'ÿ, *a.* (स्ली'पि)—inclined to sleep, drowsy, feeling the need of sleep ; habitually indolent ; without stir or bustle (a town etc.); (of fruit, esp. pears) over-ripe. निद्रावश, झोंपेची गुंगी आलेला ; झोपाळू, अत्यंत आळशी ; कांहीं हालचाल नसलेलें, झोंपीं गेलेलें, स्तब्ध, सामसूम असलेलें ; अति पक्व, शुष्क व बेचव (फळ इ.). *Sleep'y-head* (esp. in voc.) डुलक्या घेणारा, आळशी, लक्ष नसणारा,-मनुष्य. *Sleepy-sickness*, सुस्तीचा-गुंगी आणणारा-रोग (जागतिक, व हल्लींच नवीन शोध लागलेला) *Sleep'ily*, *adv.* ; *Sleep'iness*, *n.*

Sleet, *n.* (स्लीट्)—snow or hail falling mixed with rain. गारांचा पाऊस, बर्फयुक्त पाऊस, तुषार-हिममय-वृष्टि. *v. i.* (impers.) *it sleets*, sleet falls. गारांचा पाऊस पडतो. *Sleety*, *a.*, *Sleet'iness*, *n.*

Sleeve, *n.* (स्लीव्ह्)—that part of garment that is fitted to cover the arm ; tube including rod or smaller tube. हाताची बाही, अस्तनी, हातोपा ; शेंबी, साम, चरवी, आंवचण. *Mandarin s.*, कोपराखालीं सैल व उघडी अस्तनी. *To laugh in* one's *s.*, laugh secretly,-slyly. गालांतल्या गालांत हसणें, ओठांत,-पदर लावून,-हसणें. *Have card, plan,* etc. *up* one's *s.*, हातचा (पत्ता), तयार पण गुप्त राखून ठेवलेला (बेत इ०). *Turn, roll up*, one's *ss.*, अस्तन्या वर सारून (मारामारीला, कामाला) सिद्ध होणें. *S. coupling*, दांडे किंवा नळ्या जोडणारा सांधा,—जोडणारी शेंबी,-चरवी. *S. link*, (हातोप्याचें) दुहेरी -जोड-बटण.-*sleeved* ; *Sleevĕ'less*, बिनबाह्यांचा *aa.*

Sleigh, see Sledge.

Sleight, *n.* (स्लाइट)—dexterity ; artifice. कौशल्य ; युक्ती, चलाखी, वस्तादगिरी. *S.-of-hand*, juggling. हातचलाखी, हातचलाखीचा-जादुगिरीचा-खेळ, हस्त-लाघव, सफाईचा हात.

Slĕn'der, *n.* (स्लें'न्डर्)—of small girth or breath ; slim ; scanty, meagre, inadequate. बारीक, किरकोळ, सडपातळ ; निर्बळ, नाजूक, थोडा, अल्प, थोडासा, बेताचाच, काटकसरीचा.-*ly*, *adv.* ;-*ness*, *n.* कृशता, सूक्ष्मता, हलकेपणा.

Slept, *pa. t.* & *pa. p.* of Sleep.

Sleuth'-hound, *n.* (स्लूथ् हाउन्ड्)—a blood-hound (*lit.* &*fig.*) ; (*Sleuth*, U. S.) a detective. शिकारी कुत्रा, माग काढणारा ; गुप्त पुलीस.

Slew, Slue, *v. t.* & *i.* & *n.* (स्लू)—turn or swing from one direction to another (often *round*, *to the left*, etc.). मध्यबिंदूवर, डाव्या बाजूकडे, वगैरे फिरविणें,-फिरणें,-दिशा बदलणें ; असा स्थितिपालट.

Slew, *pa. t.* of Slay.

Slice, *n.* (स्लाइस)—a thin broad piece cut off or out as with a carving knife; a share of; a slicing motion; cook's flat scoop. फांक, काप, कातळा, कापलेला तुकडा; चा भाग, हिस्सा, तुकडा; फांक काढणें, कल्पा काढणें; कालथा, झारा. *v. t.* & *i.* to cut into slices; take (piece) off with carving motion; strike (ball, water) incorrectly in golf and rowing; go through (air etc.) with cutting motion. फांका,-तुकडे,-करणें; (तुकडा) कापून काढणें; (चेंडू, पल्हें) वांकडा तिकडा मारणें; (हवा) कांपीत जाणें. *A s. of territory,* प्रांताचा तुकडा.

Slick, *a.* & *adv.* (स्लिक्)—(colloq.) dextrous, carried smoothly through; simple, absolute, mere; (*adv.*) directly, exactly, completely. कुशल, तरबेज, सीधा, सरळ; साधा, केवळ; सरळ-पणानें, अचूक, नेमका, पूर्णतेनें. *Bowled his middle stump s. out of the ground,* त्याची मधली दांडी अचूक उडविली (क्रिकेटमध्यें).

Slick'er, *n.* (स्लि'कर)—(U. S.) a waterproof coat. पर्जन्यनिवारक (आंत पाणी न घेणारा) कोट, जलनिवारक डगला.

Slide, *v. i.* & *t.* (स्लाइड)—(*slid*), progress smoothly over a surfaces; to glide or cause to glide or go smoothly; to pass or put imperceptibly; glide on the feet on ice; go without interference. सरकणें, घसरणें, घसरत येणें; निसटणें, घरंगळणें; घसराविणें; दृष्टीस न पडतां हळूच निघून जाणें,-निसटणें, हळूच घुसडणें,-घालून देणें; बर्फावरून पायांवर (पायांनीं) घसरत जाणें; केव्हांच आपोआप निघून जाणें. *n.* an act of sliding; track on ice made by person's sliding; track to slide on; slip of glass with object or picture sliding into microscope or magic lantern; (also *slide way*) part(s) of machine on or between which sliding part works. घसरणें, घरंगळणें; बर्फावरील घसरड, घसरणीचा मार्ग,-माग; (दगड, ओंडके, वगैरेसाठीं) घसरडीचा रस्ता, घसरण, पळण; कांचेची पट्टी, काचपट (सूक्ष्मदर्शक यंत्र किंवा मॅजिक लँटर्नमध्यें); सरकपडदा, सरकणी. *S. over delicate subject,* barely touch upon it. एखाद्या नाजूक विषयाचा ओझरता उल्लेख करणें. *Let things s.,* be negligent. काय होईल तसें होऊं दे, लक्ष देऊं नको. *Slides into sin,* नकळत पापाचरणाला प्रवृत्त होतो. *Sliding door,* सरकता दरवाजा. *Sliding friction,* घसरतें घर्षण. *Sliding, slide, rule,* (बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करण्याचें) सरकपट्टीचें (गणित-) यंत्र, (गणिताची) सरकपट्टी. *Sliding scale,* schedule for automatically varying a thing (esp. tax, wages, prices) in direct or inverse proportion to fluctuations of another. आपोआप कमजास्त होणाऱ्या (दर, मजुरी, बाजारभाव) वस्तूंचें प्रमाण, बाजारभावांतील चढउताराचें प्रमाण,-मान. *Slid'er, n.*; *slid'able, a.*

Slight, *a.* (स्लाइट)—slender, frail-looking; *a* or *some s.,* inconsiderable; scanty; inadequate. बारीक, किरकोळ, कमजोर, कृश, दुबळा, क्षुल्लक, कळे न कळेसा; थोडासा; अपुरा. *v. t.* to treat or speak of as not worth attention; fail in courtesy or respect to, markedly neglect. तुच्छ मानणें, मान न देणें, उपेक्षा, हयगय किंवा (जाणून बुजून) अनादर करणें. *n.* marked failure of respect, intentional disregard. अनादर, अव्हेर, उपेक्षा. *Slightish, a.* अल्पसा. *Slight'ly, adv., Slight'ness, n. Slight'ingly, adv.* उपेक्षापूर्वक, तुच्छता दर्शवून, अवमान करून.

Slim, *a.* (स्लिम्)—of slender make; not stout or thick-set; (sl.) crafty. बारीक, सडपातळ, एक-शिवडा, किरकोळ; लेचापेचा, डळमळीत; लुच्चा, धूर्त. *Slimish, a.*; *Slim'ness, n.*; *Slim'ly, adv.*

Slime, *n.* (स्लाइम)—a soft substance, fine oozy mud or glutinous substance. रबड, गाळ, चिखल; चीक; वार, बोळ, चिकटा. *v. t.* & *i.* to cover with s. (esp. of snake preparing prey for gorging); (sl.) get *through, away, etc.* by physical or moral slipperiness. चिखल-बोळ,-फांसणें; निसटणें, पळवाट काढणें. *S.-gland,* बोळ-ग्रंथि. *S.-pit,* शिलाजि-तखानि, गाळाची जागा.

Sli'my, *a.* (स्ला'इमि)—of or like or covered with slime; slippery; servile, cringingly dishonest. बोळाचा, चिखलाचा, बोळासारखा, रेवड असलेला; गिलगिलीत, विळविळीत; तोंडपुज्या, लाळघोट्या.

Sling, *n.* (स्लिंग)—a strap used in hurling stones; kinds of appliance for supporting a hanging weight, *e. g.* injured arm, rifle, ship's boat, goods being transferred. गोफण; कावड, ओळकंबें, गळेगती., (for injured arm); शिंकें, दांतळी; झोळी, नौपण; शिकारणी. *v. t.* & *i.* (*slung*), to hurl with a sling; to throw; to suspend, hoist or transfer with sling. गोफणीनें मारणें, फेकणें; भिरकावणें; टांगणें, शिकारणीनें खालीं वर चढविणें,-सोडणें,-नेणें. *S.-dog,* one of pair of hooks used to grapple goods for hoisting. (वर उचलतांना) वस्तु घट्ट पकडण्याची (जोडकडीपैकीं) एक कडी. *To s. ink,* (sl.) लेखक, वर्तमानपत्रकार, -होणें; लेखन करणें. *S.-cart,* चाकांच्या आंसाला (कण्याला) ओझें लोंबकळत ठेवलें आहे अशी गाडी, आंसाखालची वजनाची गाडी. *Slung shot,* metal ball attached by thong etc. to wrist and used esp. by criminals as weapon. चाहीनें मनगटावर बांधलेली धातूची गोळी.

Sling, *n.* (स्लिंग)—(U. S.) kind of toddy. एक जातीची ताडी, मादक पेय.

Slink, *v. i.* (स्लिंङ्क)—(*slunk*) to creep away meanly, to go stealthily or with sneaking air (usu. *off, away, by, etc.,*). गुपचुप निघून जाणें, निसटणें, सरकणें, नजर चुकवून जाणें. *n.* (sl.) a

Slaw, *n.* (स्लॉ)—(U. S.) salad of sliced cabbage. चिरलेल्या कोबीची कोशिंबीर,-चटणी.

Slay, *v. t.* (स्ले)—(*slew* ; *slain*), to kill by violence. ठार मारणें, वध करणें, नाश करणें. *Slay'er*, *n.* जीव घेणारा.

Slea'zy, *a.* (स्ली'झि)—(of textiles) flimsy. पातळ, झिरझिरीत.

Slĕdge, Slĕd, Sleigh, *nn.* (स्लेज, स्लेड, स्ले)—a vehicle on runners instead of wheels (for use *esp.* on snow). (बर्फावरून घसरत जाण्याची) बिनचाकाची गाडी. *v. i. & t.* to travel, go, convey, in s. घसरगाडींतून प्रवास करणें,-जाणें,-नेणें.

Slĕdge, Slĕd'ge-hămmer, *nn.* (स्लेज, स्लेज्-हॅमर्) —a blacksmith's heavy hammer. लोहाराचा मोठा हातोडा, घण.

Sleek, *a.* (स्लीक्)—soft and smooth ; sleek *haired* or skinned ; of well-fed comfortable appearance. मऊ, तुळतुळीत, तुकतुकीत ; तुळतुळीत केसाचा,-कातडीचा ; गोंडस, गुबगुबीत. *v. t.* to make sleek by stroking or pressing down. तुळतुळीत,-सफाईदार,-करणें. *Sleek'ly*, *adv.* ; *Sleek'ness*, *n.* तुळतुळीतपणा, गुळगुळीतपणा.

Sleep, *n.* (स्लीप्)—condition in which the eyes are closed and the nervous system inactive ; a spell of this ; (*fig.*) rest, quiet, negligence, death, etc. झोंप, निद्रा, नीज ; झोपेचा चुटका, सुस्ती, गुंगी ; विश्रांति, मरण. *v. t. & i.* (slept), to be or fall asleep ; to be dormant or inactive ; to lie in the grave, to be dead ; sojourn for the night *at* or *in* ; provide sleeping accommodation for. झोंपीं जाणें, झोंप लागणें, निजणें, नीज घेणें ; गुंगींत,-सुस्तींत,-स्वस्थ राहणें ; थडग्यांत असणें, मृत्युमुखीं पडणें ; रात्रीकरितां मुक्काम करणें ; झोपण्याची सोय करणें,-असणें. *In one's s.*, झोंपी गेलें असतां. *The s. of the just*, गाढ-सुखाची-निद्रा. *S. that knows not breaking*, शेवटची झोंप, मरण. *Broken s.*, चुटक्या चुटक्यानें लागणारी झोंप ; निद्राभंग. *To go to s.*, निजणें, झोंपी जाणें. *Fall on s.*, (*fig.*) माणसांतून उठणें, मृतवत् (आहे नाहीं सारखा) होणें ; मरणें. *Let sleeping dogs lie*, avoid stirring up trouble. भानगड-कटकट-उपस्थित करूं नये. *S. like a log* or *top*, सुस्त घोरत निजणें, गाढ झोंपणें. *S. on, upon, over, a question*, (चर्चेचा प्रश्न,-विषय-) उद्यांवर ढकलणें. *Sleeping partner*, केवळ भांडवलवाला धंद्या भागीदार (धंद्याच्या व्यवस्थेंत हात नसलेला, पण भांडवल गुंतविलेला.). *Sleeping draught*, झोंपेचें-गुंगीचें-औषध. *Sleeping sickness*, (आफ्रिकेंत सेहासि माशीमुळें होणारा) झोंपेचा रोग. *Sleeping suit*, रात्रीं घालायचे पायजमे.

Sleep'er, *n.* (स्ली'पर्)—a person that sleeps, sleeping person ; one of the logs on which rails rest ; *a sleeping-car*. झोंपीं गेलेला, झोंपणारा ; आगगाडीच्या रुळाखालील लांकडाचा ओंडा, सिलिपाट ; आगगाडींतील (बिछाने असलेला) झोंपण्याचा डबा.

Sleep'lĕss, *a.* (स्लीप्-लिस्)—failing to get sleep निद्रारहित, झोंप न आलेला, अस्वस्थ.—*ly*, *adv.*, —*ness*, *n.* जागरण, अस्वस्थता.

Sleep'walker, *n.* (स्लीप् वॉकर)—a somnambulist. झोंपेंतच चालणारा. *Sleep'-walking*, झोंपेंत चालणें.

Sleep'y̆, *a.* (स्ली'पि)—inclined to sleep, drowsy, feeling the need of sleep ; habitually indolent ; without stir or bustle (a town etc.); (of fruit, esp. pears) over-ripe. निद्रावश, झोंपेची गुंगी आलेला ; झोपाळू, अत्यंत आळशी ; कांहीं हालचाल नसलेलें, झोपीं गेलेलें, स्तब्ध, सामसूम असलेलें ; अति पक्व, शुष्क व बेचव (फळ इ.). *Sleep'y-head* (esp. *in* voc.) डुलक्या घेणारा, आळशी, लक्ष नसणारा,-मनुष्य. *Sleepy-sickness*, सुस्तीचा-गुंगी आणणारा-रोग (जागतिक व हल्लींच नवीन शोध लागलेला) *Sleep'ily*, *adv.* ; *Sleep'iness*, *n.*

Sleet, *n.* (स्लीट्)—snow or hail falling mixed with rain. गारांचा पाऊस, बर्फयुक्त पाऊस, तुषार-हिममय-वृष्टि. *v. i.* (impers.) *it sleets*, sleet falls. गारांचा पाऊस पडतो. *Sleety*, *a.*, *Sleet'iness*, *n.*

Sleeve, *n.* (स्लीव्ह्)—that part of garment that is fitted to cover the arm ; tube including rod or smaller tube. हाताची बाही, अस्तनी, हातोपा ; शेंबी, साम, वस्वी, आंवळण. *Mandarin s.*, कोपराखालीं सैल व उघडी अस्तनी. *To laugh in* one's *s.*, laugh secretly,-slyly. गालांतल्या गालांत हसणें, ओठांत,-पदर लावून,-हसणें. *Have card, plan*, etc. *up* one's *s.*, हातचा (पत्ता), तयार पण गुप्त राखून ठेवलेला (बेत इ०). *Turn, roll up*, one's *ss.*, अस्तन्या वर सारून (मारामारीला, कामाला) सिद्ध होणें. *S. coupling*, दांडे किंवा नळ्या जोडणारा सांधा,-जोडणारी शेंबी,-वस्बी. *S. link*, (हातोप्याचें) दुहेरी -जोड-बटण.-*sleeved* ; *Sleeve'less*, बिनबाह्यांचा *aa.*

Sleigh, see Sledge.

Sleight, *n.* (स्लाइट्)—dexterity ; artifice. कौशल्य ; युक्ती, चलाखी, वस्तादगिरी. *S.-of-hand*, juggling. हातचलाखी, हातचलाखीचा-जादुगिरीचा-खेळ, हस्तलाघव, सफाईचा हात.

Slĕn'der, *n.* (स्ले'न्डर्)—of small girth or breath ; slim ; scanty, meagre, inadequate. बारीक, किरकोळ, सडपातळ ; निर्बळ, नाजूक, थोडा, अल्प, थोडासा, बेताचाच, काटकसरीचा.-*ly*, *adv.* ;-*ness*, *n.* कृशता, सूक्ष्मता, हलकेपणा.

Slept, *pa. t. & pa. p.* of Sleep.

Sleuth'-hound, *n.* (स्लूथ् हाउन्ड्)—a blood-hound (*lit.* &*fig.*) ; (*Sleuth*, U. S.) a detective. शिकारी कुत्रा, माग काढणारा ; गुप्त पुलीस.

Slew, Slue, *v. t. & i. & n.* (स्लू)—turn or swing from one direction to another (often *round, to the left*, etc.). मध्यबिंदूवर, डाव्या बाजूकडे, वगैरे फिरविणें,-फिरणें,-दिशा बदलणें ; असा स्थितिपालट.

Slew, *pa. t.* of Slay.

Slice, *n.* (स्लाइस)—a thin broad piece cut off or out as with a carving knife; a share of; a slicing motion; cook's flat scoop. फांक, काप, कातळा, कापलेला तुकडा; चा भाग, हिस्सा, तुकडा; फांक काढणें, कळपा काढणें; कालथा, झारा. *v. t. & i.* to cut into slices; take (piece) off with carving motion; strike (ball, water) incorrectly in golf and rowing; go through (air etc.) with cutting motion. फांका,-तुकडे,-करणें; (तुकडा) कापून काढणें; (चेंडू, वल्हें) वांकडा तिकडा मारणें; (हवा) कांपीत जाणें. *A s. of territory,* प्रांताचा तुकडा.

Slick, *a. & adv.* (स्लिक्)—(colloq.) dextrous, carried smoothly through; simple, absolute, mere; (*adv.*) directly, exactly, completely. कुशल, तरबेज, सीधा, सरळ; साधा, केवळ; सरळपणानें, अचूक, नेमका, पूर्णतेनें. *Bowled his middle stump s. out of the ground,* त्याची मधली दांडी अचूक उडविली (क्रिकेटमध्यें).

Slick'er, *n.* (स्लि'कर)—(U. S.) a waterproof coat. पर्जन्यनिवारक (आंत पाणी न घेणारा) कोट, जलनिवारक डगला.

Slide, *v. i. & t.* (स्लाइड)—(*slid*), progress smoothly over a surfaces; to glide or cause to glide or go smoothly; to pass or put imperceptibly; glide on the feet on ice; go without interference. सरकणें, घसरणें, घसरत येणें; निसरणें, घसंगळणें; घसरविणें; दृष्टीस न पडतां हळूच निघून जाणें,-निसटणें, हळूच घुसडणें,-घालून देणें; बर्फावरून पायांवर (पायांनीं) घसरत जाणें; केल्यांच आपोआप निवून जाणें. *n.* an act of sliding; track on ice made by person's sliding; track to slide on; slip of glass with object or picture sliding into microscope or magic lantern; (also *slide way*) part(s) of machine on or between which sliding part works. घसरणें, घसंगळणें; बर्फावरील घसरड, घसरणीचा मार्ग,-माग; (दगड, ओंडके, वगैरेसाठीं) घसरडीचा रस्ता, घसरण, घळण; कांचेची पट्टी, काचपट (सूक्ष्मदर्शक यंत्र किंवा मॅजिक लॅंटर्नमध्यें); सरकपडदा, सरकणी. *S. over delicate subject,* barely touch upon it. एखाद्या नाजूक विषयाचा ओझरता उल्लेख करणें. *Let things s.,* be negligent. काय होईल तसें होऊं दे, लक्ष देऊं नको. *Slides into sin,* नकळत पापाचरणाला प्रवृत्त होतो. *Sliding door,* सरकता दरवाजा. *Sliding friction,* घसरतें घर्षण. *Sliding, slide, rule,* (बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करण्याचें) सरकपट्टीचें (गणित-) यंत्र, (गणिताची) सरकपट्टी. *Sli'ding scale,* schedule for automatically varying a thing (esp. tax, wages, prices) in direct or inverse proportion to fluctuations of another. आपोआप कमजास्त होणाऱ्या (दर, मजुरी, बाजारभाव) वस्तूंचें प्रमाण, बाजारभावांतील चढउतारांचें प्रमाण,-मान. *Slid'er, n.*; *slid'able, a.*

Slight, *a.* (स्लाइट)—slender, frail-looking; *a* or *some s.,* inconsiderable; scanty; inadequate. बारीक, किरकोळ, कमजोर, कृश, दुबळा, क्षुल्लक, कळे न कळेसा; थोडासा; अपुरा. *v. t.* to treat or speak of as not worth attention; fail in courtesy or respect to, markedly neglect. तुच्छ मानणें. मान न देणें, उपेक्षा, हयगय किंवा (जाणून बुजून) अनादर करणें. *n.* marked failure of respect, intentional disregard. अनादर, अव्हेर, उपेक्षा. *Slightish, a.* अल्पसा. *Slight'ly, adv., Slight'ness, n. Slight'ingly, adv.* उपेक्षापूर्वक, तुच्छता दर्शवून, अवमान करून.

Slim, *a.* (स्लिम्)—of slender make; not stout or thick-set; (sl.) crafty. बारीक, सडपातळ, एकशिवडा, किरकोळ; लेचापेचा, डळमळीत; लुच्चा, धूर्त. *Slimish, a.*; *Slim'ness, n.*; *Slim'ly, adv.*

Slime, *n.* (स्लाइम)—a soft substance, fine oozy mud or glutinous substance. रबड, गाळ, चिखल; चीक; बार, बोळ, चिकटा. *v. t. & i.* to cover with s. (esp. of snake preparing prey for gorging); (sl.) get *through, away, etc.* by physical or moral slipperiness. चिखल-बोळ,-फांसणें; निसटणें, पळवाट काढणें. *S.-gland,* बोळ-ग्रंथि. *S.-pit,* शिलाजितखानि, गाळाची जागा.

Sli'my, *a.* (स्ला'इमि)—of or like or covered with slime; slippery; servile, cringingly dishonest. बोळाचा, चिखलाचा, बोळासारखा, रेवड असलेला; गिलगिलीत, बिळबिळीत; तोंडपुज्या, लाळघोट्या.

Sling, *n.* (स्लिंग)—a strap used in hurling stones; kinds of appliance for supporting a hanging weight, *e. g.* injured arm, rifle, ship's boat, goods being transferred. गोफण; कावड, ओळकंबें, गळंगती., (for injured arm); शिंकें, दांतळी; झोळी, नौघण; शिकारणी. *v. t. & i.* (*slung*), to hurl with a sling; to throw; to suspend, hoist or transfer with sling. गोफणीनें मारणें, फेकणें; भिरकावणें; टांगणें, शिकारणीनें खालीं वर चढविणें,-सोडणें,-नेणें. *S.-dog,* one of pair of hooks used to grapple goods for hoisting. (वर उचलतांना) वस्तु घट्ट पकडण्याची (जोडकडींपैकीं) एक कडी. *To s. ink,* (sl.) लेखक, वर्तमानपत्रकार, -होणें; लेखन करणें. *S.-cart,* चाकांच्या आंसाला (कण्याला) ओझें लोंबकळत ठेवलें आहे अशी गाडी, आंसावलेंबी वजनाची गाडी. *Slung shot,* metal ball attached by thong etc. to wrist and used esp. by criminals as weapon. वादीनें मनगटावर बांधलेली धातूची गोळी.

Sling, *n.* (स्लिंग)—(U. S.) kind of toddy. एक जातीची ताडी, मादक पेय.

Slink, *v. i.* (स्लिंक्)—(*slunk*) to creep away meanly, to go stealthily or with sneaking air (usu. *off, away, by, etc.,*). गुपचुप निघून जाणें, निसटणें, सरकणें, नजर चुकवून जाणें. *n.* (sl.) a

slinking fellow. लपूनछपून,-नजर चुकवून,-जाणारा मनुष्य.

Slink, *v. t & i.* (स्लिंक्)—(of animals) miscarry, produce (young) prematurely. गाभडणें, गाभ (गर्भ) सांडणें,-टाकणें. *n.* animal esp. calf, so born; its flesh. गाभसांडलेलें वासरूं; त्याचें मांस. *S.-butcher*, गाभसांड जनावराचें मांस विकणारा,-खाटिक.

Slip, *n.* (स्लिप्)—a narrow piece of material or paper; a slim girl or boy; kinds of loose covering or garment (e. g. pillow-case, under bodice, etc.); leash for slipping dogs, device for suddenly loosing clip or attachment; artificial slope of stone or landing stage; inclined plane on which ships are built or repaired; cutting from a plant; one of the fielders stationed for balls glancing off bat to off side behind batsman, this part of ground; (without pl. or article) semifluid clay for coating etc.; (Theatr.;. pl.) part from which scenes are slipped on, or where actors stand before entering; act of slipping, casual mistake, blunder. चिरफळी, पट्टी, फडकें, चिंधोटी, कांब, कांबीट, पिंजोळी, (धातूची) कांब, (जमिनीची) पट्टी, फाळकी, (कागदाचा) लहान तुकडा, चिठोरा; बारीक-किरकोळ-एकशिवडी मुलगी किंवा मुलगा; सैल आच्छादन किंवा कपडा (उशीचा अभ्रा, आंगचोळी, इ.); कुत्र्याच्या गळपट्टीची वादी -गळ्यांतील पट्टा, (शिकाऱ्यांना घसवायचें) कुत्रें; दगडी कृत्रिम उतरण, धक्क्यावर उतरण्याची उतरण (-जागा), (जहाजें बांधण्याची किंवा दुरुस्त करण्याची) उतरती जागा,-उतरण; (झाडाचें) कलम, रोपा; (क्रिकेटच्या खेळांत) खेळणाऱ्याच्या मागच्या (चेंडू झेलणारा) क्षेत्ररक्षक, क्रीडांगणाची ही बाजू; मऊ चिकण माती; रंगभूमीवर देखावे जिथून सरकवितात ती जागा, रंगभूमीची डावी-उजवी (पडद्याआडची) बाजू; निसरणें, घसरणें, सरकणें, नजरचूक, दोष, चुकी. *A s. of a boy*, चारकोळा मुलगा. *Was caught in the ss.* or *at s.*, पट्टीच्या (किंवा खेळणाऱ्याच्या) मागें (खेळाडूचा) झेल पकडला गेला. *There's many a slip 'twixt the cup and the lip*, nothing is certain till it has happened. हातांतलें तोंडांत पडेपर्यंत मध्यें कितीतरी विघ्नें (अडथळे) येतात. हातातोंडाला गांठ पडेल, तेव्हां खरी. S. *of the tongue, pen*, जिव्हादोष, तोंडानें चुकून शब्द जाणें, हस्तदोष. *To give* one *the s.*, escape from him. ला झुकविणें, झुकांडी देऊन जाणें.

Snow, *n.* (स्नो)—the light white flakes in which frozen vapour falls to the earth; (*pl.*) falls or accumulations of snow; white substance or colour. आकाशांतून पडणारे बर्फाचे बारीक तुकडे, बर्फ, हिम; बर्फाचे ढीग; पांढरी वस्तु, पांढरा रंग, गोरा रंग. *v. i.* to fall in snow; fall or sprinkle like snow; turn (hair) white. बर्फ पडणें (*It snows, impers.*); बर्फ पाडणें, बर्फाच्छादित करणें, हिमाच्छादित करणें; (केंस) पांढरे होणें. *Ss. of seventy years,* white hair. (सत्तर वर्षांच्या माणसाचे) पांढरे केंस. *Her breast of s.,* तिचा गोरापान स्तन,-गोरी पान छाती. *S. berry,* पांढऱ्या फळांचें झुडूप. *S.-blind (ness),* (बर्फमय प्रदेशावरून चालतांना) बर्फाच्या चकाकीमुळें आलेली अन्धता, हिमान्धता. *S. blink,* (आकाशांवर पडलेलें बर्फमय प्रदेशाचें) प्रतिबिंब, हिमप्रतिबिंब. *S. boots,* over-boots of rubber and cloth. बर्फावरून चालतांना घालण्याचे बूट. *S.-bound* बर्फामुळें अडकून पडलेला. S.-*cap,* white-crowned humming bird. पांढऱ्या डोक्याचा गाणारा पक्षी. *S. capped,* बर्फाच्छादित (शिखराचा पर्वत). S.-*drop* early spring white-flowered plant. (वसंतऋतूंत आगस फुलणारें) पांढरें फुलझाड. *S.-fall,* (एकेवेळीं किंवा वर्षभर झालेली) हिमवृष्टि. *S.-field,* esp. permanent wide expanse of snow in mountainous or polar regions. (सतत) बर्फाचा प्रदेश, हिमक्षेत्र. *S. flake,* (हिमपतनांतील) बर्फाचा तुकडा. *S.-line,* level above which snow lies permanently in a region. हिमरेषा, हिममर्यादा. *S.-man,* (मुलांनीं बर्फाच्या गोळ्यांचा केलेला) हिम मनुष्य. *S.-on-the-mountain,* पांढऱ्या फुलांचीं बागाइती फुलझाडें. *S.-plough,* machine pushing snow aside to clear track. हिमनिःसारणयंत्र. S.-*shoes,* आंत पाय न रुततां, बर्फावरून चालतां येण्यासाठीं, जोडे. *S.-slip* पर्वतावरून घसरत येणारा बर्फाचा कडा. *S.-storm,* बर्फाचें वादळ. *S.-under,* (U. S.) बर्फाच्छादित करणें; प्रचंड बहुमतानें दाबून टाकणें. (esp. in pass. of election candidate defeated by huge majority). *S.-white,* बर्फाप्रमाणें शुभ्र, हिमधवल. *Snow'less, a.* बर्फरहित; *Snow'y, a.* हिममय, बर्फासारखा पांढरा. *Snow'ily, adv.; Snow'iness, n.*

Snow'-ball, *n.* (स्नो'बॉल्)—snow pressed or rolled into hard ball, *esp. for use as a missile; the guelder* -rose; kind of pudding. बर्फाचा गोळा,-चेंडू; पांढऱ्या झुपकेदार फुलांचें फुलझाड; एक प्रकारचें खाद्य,-पक्वान्न. *v. i. & t.* to throw snow-balls at; have game of this. बर्फाचे गोळे-चेंडू,-मारणें; बर्फाच्या चेंडूफेंकीचा खेळ खेळणें.

Snow'drift, *n.* (स्नो'ड्रिफ्ट)—bank of snow heaped by wind. वाऱ्यानें जमलेली बर्फाची रास किंवा बांध.

Snŭb, *v. t.* (स्नब्)—to rebuff with words or coldness; to treat with contempt, check way of (ship) esp. by rope. धमकावणें, दाबणें, दटावणें, दरडावणें, तुच्छ लेखणें; ओढून धरणें (जहाज वगैरे), दोरानें बांधून ठेवणें. *n.* a snubbing. धमकावणी, दबावणी, दरडावणी. *a.* (of nose) stumpy or turned up. बसकें, नकटें, फेंदरें (नाक). *S.-nosed, a. Snub'bingly, adv,* धमकावणी देऊन, दटावून.

Snŭbb'er, *n.* (स्न'बर्)—(U. S.) a device for checking recoil of motor-car springs. (मोटरगाडीची स्प्रिंग) कमान सैल न होण्याचें यंत्र, कमानीवर ताण ठेवणारें यंत्र.

Snŭff, *n.* (स्नफ्)—black excrescence on the wick of a lighted candle; powdered tobacco for sniffing up, medicinal powder similarly used. (दिव्यावरील, मेणबत्तीवरील) काजळी, काजळी, दीपदाण; तपकीर, नस्य; नाकांत ओढण्याचें, औषध. *v. t. & i.* to rid (candle) of s.; put out or trim with snuffers or fingers; 2. to sniff (rare); take snuff. काजळी कातरणें,-झाडणें,-काढणें; कातरून हातानें, मालवणें, विझवणें; सूं सूं करणें, श्वास घेणें; तपकीर ओढणें. *To s. out* (*v. t.*) कातरून मालवणें. *I was nearly snuffed out,* मी निस्तेज झालों,-गार पडलों. (*fig.*); (*v. i.*) (*sl.*) die. मरणें. *take thing in s.,* (arch.) take offence at. ची चीड, चा राग,-येणें. *up to. s.,* (*sl.*) not childishly ignorant or innocent. पोरकट नसलेला, प्रौढ, समजायला लागलेला. *S.-box,* तपकिरीची डबी. *S.-colour (ed),* तपकिरी रंग,-रंगाचा. *S.-mill,* तपकीर दळण्याचें जातें,-घोटण्याचें भांडें, तपकिरीची डबी. *S.-taker,* तपकीर ओढणारा.

Snŭff'ers *n. pl.* (स्न'फर्झ्)—wick-trimming instrument or scissors. वात सारखी करण्याची कातर, दिव्याची कातर.

Snŭf'fle, *v. i. & t.* (स्न'फल्)—to sniff, make sniffing sounds; speak nasally, or like one with a cold (esp. as form of religions affectation ascribed to puritans and dissenters). सुंसूं करणें; नाकांत बोलणें, गेंगणें बोलणें, (सुद्दाम) नाकांत बोलणें. *n.* sniff; sniffling sound, tone, or talk. सुंसूं करणें, गेंगणें, (सुद्दाम) नाकांत बोलणें,-उच्चार. *S. out,* नाकांत बोलणें,-उच्चार करणें. *Snuf'fler, n.* गेंगणा. *Snuf'flingly adv.*

Snŭff'y̆, *a.* (स्न'फि)—discoloured with snuff-taking. तपकिरीनें भरलेला,-बरबटलेला. *Snuffiness, n.*

Snŭg, *a.* (स्नग)—sheltered, well-enclosed; comfortable; sufficing for comfort, affording comfort. सुखसोईचा, चिकटलेला, गुरफटलेला; सुखदायक; आरामशीर, सुखसोयींना पुरण्याइतका. *Snug'ly, adv.* चिकटून, अटोपशीरपणें, सुरक्षितपणें. *Snug'ness, n.*

Snŭgg'ery, *n.* (स्न'गरि)—a person's private room arranged for comfort; bar-parlour of inn. खाजगी आरामशीर खोली; उपाहारगृहांतील, स्वतंत्र बसण्याची जागा,-खोली.

Snŭg'gle, *v. i. & t.* (स्न'गल्)—to shift one's position or lie close up to for warmth; draw close to one, cuddle. कुशींत-चिकटून-निजणें; कुशींत घेणें, सरसा घेणें.

Sō, *adv.* (सो)—in that ay, in the same way; to the same extent as; to a surpassing degree; accordingly, as it seems; also. तसा, त्याप्रमाणें, असा, ह्या प्रमाणें; इतका; अत्यंत, फार, पुष्कळ, कितीतरी; म्हणून, त्यामुळें, यामुळें, वास्तव; सुद्धां. *Conj.* (arch.) provided that. जर, (असें, असेल,-असलें) तर, मग, म्हणून, या करितां. *int.* (of approval). हो!, होहो!, ठीक! ;*pron.* (after *say,* etc.) that, it, those things; (after *or*) that-sort. असें, तें, असें असें; इतकी (रक्कम, संख्या). *So far,* इतका, एथपर्यंत. *And so forth and so on,* इत्यादि इत्यादि. *So be it,* तथास्तु, ठीक आहे. *So much for,* इतकेंच (पुरे). *Is only so much rubbish,* सगळेंच टाकाऊ-कचरा-आहे. *I suppose so,* मलाही असेंच वाटतें. *I told you so,* मी तुला हें अगोदरच सांगितलें होतें,-बजावलें होतें. (पण व्यर्थ). *So to say, so to speak,* तसें म्हटलें तर. *You don't say so?* म्हणतोस तरी काय! खरें का हें? *Or so* (*1 lb. or so will do*), अदमासें, सुमारें. *So many men so many minds,* (जितक्या) व्यक्ति तितक्या प्रकृति. *Never mind, what so and so says,* अमका तमका काय म्हणतो याच्याकडे लक्ष देऊं नको. **Sō-ănd-sō,** (सो अॅन्ड सो)—substitute for the name of a person or thing. अमुक, अमुक, अमकातमका. **Sō-called,** *a.* (सो-कॉल्ड) called by but doubtfully deserving that name. या नांवाचा, (चुकीनें) म्हटलेला, नामधारी. **Sō făr ăs,** (सो फार् अॅज्) to the extent to which. तितका, तेथपर्यंत, अमुक एक मर्यादेपर्यंत. **Sō lŏng,** (सो लॉंग) farewell till our next meeting. पुन्हां भेटेपर्यंत (राम राम). **Sō lŏng ăs,** (सो लॉंग अॅज्) provided that. अमुक एक गोष्ट होईपर्यंत, जोंपर्यंत. **Sō so,** (सो सो) (colloq.) not very well or good; fair. सामान्य प्रतीचा, सर्वसाधारण, सुमाराचा, चालीचा.

Soak, *v. t. & i.* (सोक्)—(of rain) to drench; to take up (liquid) by absorption; place or leave or lie in a liquid for saturation; (of moisture) make way in (*to*) or *through* by saturation; booze, drink persistently. चिंब भिजवणें, चिंब करणें, शोषून घेणें, शोषणें; भिजत ठेवणें,-राहणें,-पडणें; ओलावा येणें, ओल मारणें,-झिरपणें,-मुरणें,-जिरणें; एकसारखें,-अतिशय,-दारू पिणें. *n.* a soaking; drinking bout; hard drinker. शोषणें, भिजणें, भिजविणें; दारू पिणें, दारूची निशा; अट्टल दारूबाज. *Soak'ing, n.* चिंब भिजणें. *Soak'age, n.* शोषण, ओलावा.

Soak'er, *n.* (सो'कर्)—In vbl. senses; (esp.) a hard drinker; a drenching shower. भिजविणारा; अट्टल दारुड्या; चिंब भिजविणारी पावसाची सर.

Soap, *n.* (सोप्)—a substance used in washing (consisting of fat or oil combined with alkali). साबण, साबू. *v. t. & i.* to apply soap to; wash with soap. साबण लावणें,-चोळणें; साबणानें धुणें. *Soft s.,* made with potash and remaining liquid; (*fig.*) flattery. नरम साबण; खुशामत, तोंडदेखली स्तुती. *S.-berry,-nut,-plant-pod,-root,-wort,* साबणाचे गुणधर्म असलेलीं फळझाडें, रिंग्यांचें झाड, रिंगीण. *S.-boiler,-boiling,* साबण तयार करणारा,-करणें. *S.-bubble,* iridescent globe made by blowing through pipe after dipping it in soap-suds. साबणाच्या पाण्याचा (नळींतून हवा ओतून घेऊन काढलेला) बुडबुडा,-फुगा. *S.-earth,-stone,* steatite. शैलखिरें. *S.-pod,* शिकेकाई. *S.-suds,* froth of soapy water. साबणाच्या पाण्याचा फेंस. *S.-works,* साबणाचा कारखाना. *Soap'less, a.*

Soap'y̆, *a.* (सो'पि)—like, smeared or impregnated with soap; (*fig.*) unctuous or flattering. साबणासारखा मऊ, बुळबुळीत, साबणानें माखलेला-भरलेला; खुशामतीचें, आर्जवी (मनुष्य, भाषण इ०). *Soap'ily. adv.*; *Soap'iness, n.*

Soar, *v. i.* (सोअर्)—to fly high; to mount to a great height (also *fig.*). उंच उडणें, उंच जाणें, हवेंत तरंगणें; भराऱ्या मारणें. *Soaring eagle, thoughts,* उंच उडणारा गरुड, कल्पनेच्या उंच भराऱ्या. *Soaringly, adv.*

Sŏb, *n.* (सॉब्)—convulsive drawing of breath, esp. in weeping. स्फुंदन, हुंदका. *v. i. & t.* to weep or breathe or speak with sobs. स्फुंदणें, हुंदके देणें, हुंदके देत बोलणें. *S.-stuff,* (U. S.) pathos, sentimental writing. करुणरस; भावनामय,-भावनावश,-लिखाण. *Sob'bingly, adv.* हुंदके देऊन,-देत

Sō'ber, *a.* (सो'बर्)—not drunk; not given to drink; moderate, sane, tranquil; (of colours) quiet. अंमल न चढलेला, सावध; दारू न पिणारा;

नेमस्त, विचारी, शांतचित्त; सौम्य (रंग). *v. t. & i.* to make or become sober. निवळविणें, शुद्धीवर आणणें, सावध-विचारशील-करणें, निवळणें, शुद्धीवर येणें. *A s. man,* मितपान करणारा. *S.-sides,* sedate person. शांत,-स्थिरबुद्धि,-मनुष्य. *S.-suited,* (poet.) सौम्य रंगांत रंगविलेला. *So'berly,* adv.

Sobri'etў, *n.* (सोब्रा'इटि)—temperance, moderation, saneness, soberness. मितपान, सावधपणा, शुद्ध विवेक.

Sō'briquet, Sou,- *n.* (सो'ब्रिके, सु-)—a nickname. टोपणनांव.

Sŏcc'er, *n.* (सॉ'कर्)—(*sl.*) Association foot-ball. असोशिएशन् फुटबॉल (खेळ,-यांत चेंडूला हातानें स्पर्श करितां येत नाहीं).

Sō'ciable, *a.* (सो'शबल्)—fitted for or disposed to companionship or conversation; (of meeting) marked by friendliness, not stiff or formal. संगतिप्रिय, मनमिळाऊ, मंडळींतला; आपसांतली, स्नेही-मंडळींची (सभा). *n.* an open carriage with facing side seats; tricycle for two riders; S.-shaped couch; (U. S.) informal reception. समोरासमोर दोन माणसें बसण्याची उघडी गाडी; दोघांना बसण्या-जोगी तिचाकी (सायकल) गाडी; S या आकाराची बैठक,-बिछायत; अनौपचारिक आदरसत्कार. *So'ciably, adv.*; *Sociabil'ity, n.* मनमिळाऊपणा.

Sō'cial, *a.* (सो'शल्)—unfitted for solitary life; concerned with the mutual relations of men or classes; relating to society; living in communities, gregarious; of or with allies. एकलकोंडा न राहणारा, समाजप्रिय; मंडळींतला; सामाजिक, समाजाचा; समाज,-कळप,-करून राहणारा, दाट रुजणारा, वाढणारा; आपसांतील. *n.* a social gathering, esp. one organised by a club. (स्नेह) संमेलन. *Man is a s. animal,* मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. *S. bees,* एकाच पोळ्यांत राहणाऱ्या माशा. *S. birds,* घरटीं बांधून घोळक्यांनीं राहणारे पक्षी. *S. plants,* दाट रुजणारीं व सभोंवतालची जागा, स्वतः-साठींच व्यापणारीं झाडें. *S. problems,* सामाजिक प्रश्न. *S. science,* समाजशास्त्र. *The social contract* or *compact,* आद्यसमाजकरार, समाजरचनेचा आद्य किंवा मूळ करार (या करारानें प्रत्येक मनुष्य आपलें नैसर्गिक व्यक्तिगत स्वातंत्र्य समाजाच्या स्वाधीन करतो, व कायमचें समाजधारणेचें बंधन स्वीकारतो). *S. democrat,* politician aiming at improving condition of lower classes by gradual advance towards socialism. लोकसत्तावादी राजकारणी मनुष्य. *The s. evil,* prostitution. वेश्याव्यवसाय. *Socia'lity n.* (सोशिॲ'लिटि) समाजप्रियता, मनमिळाऊपणा, सामाजिकता, समाजसत्तावादप्रवृत्ति. *Socially, adv.* समाजदृष्ट्या, समाजांत. [L. *Socius, a* fellow]

Sō'cialism, *n.* (सो'शलिझम्)—principle that individual liberty should be completely subordinated to the interests of the community, e. g. substitution of co-operative for competitive production, national ownership of land and property, abolition of inheritance etc.; social equality. समाजसत्तावाद, समाजसत्तामत. *Christian s.,* सामान्य व्यवहारांत ख्रिस्ताच्या तत्त्वांचा उपयोग करून समाजसमता निर्माण करणें. *So'cialist n.* (सो'शलिस्ट) समाजसत्तावादी. *Socialistic, a.* समाजसत्तावादाचा, -वादी; *-tically, adv.*

Sō'cialize, *v. t.* (सो'शलाइझ्)—to make social; arrange socialistically. समाजप्रिय,-समाजयोग्य,-करणें; समाजसत्ता-वादाप्रमाणें पुनर्घटना करणें. *Socializa'tion, n.*

Sŏci'etў, *n.* (सोसा'इटि)—a social mode of life; any social community; company, fellowship, companionship; an association of persons united by a common aim or interest, or principle; the upper classes, people of fashion; (U. S.) voting members of church congregation. सामाजिक पद्धति, समाजपद्धति; समाज; संगत, संगति, सोबत, समागम; मंडळ, मंडळी; उच्च दर्जाचे लोक, वरच्या वर्गांचे लोक; धार्मिक संस्थेचे मतदार लोक. *Pests of s.,* समाजकंटक लोक. *Leaders of s.,* समाजाचे नेते,-पुढारी,-धुरीण. *S.-journal,* बड्या लोकांचें वर्तमानपत्र. *S.-lady,* उच्च वर्गांतील प्रमुख स्त्री. *S. verse,* of light topical witty kind. प्रचलित विषयावरील विनोदी कविता. *To avoid the s. of,* ची संगत टाळणें. *S. of Friends,* 'क्वेकर' पंथीय मंडळी. *Cooperative s.,* सहकारी संस्था.

Sŏciŏl'ogў, *n.* (सोशिऑ'लजि)—study of the history and nature of human society. समाजशास्त्र. *Sociolo'gical, a.* समाजशास्त्रविषयक.-*gically, adv.* *Sociolo'gist, n.* समाजशास्त्रज्ञ.

Sŏck, *n.* (सॉक्)—(shop pl. *sox*), short stocking not reaching the knee; inside sole for use in shoe for warmth, etc.; light shoe of ancient comic actors, a comedy. (आंखुड) पायमोजा; जोड्याचा आंतील तळवा; (पूर्वीच्या विनोदी पात्रांचा पायांतील) हलका जोडा; हास्यरसप्रधान खेळ.

Sŏck, *v. t.* (सॉक्)—(sl.) to fling at; hit (person) with hand-flung missile. (कडे) फेंकणें; फेंकून मारणें. *n.* a blow of fist or missile. ठोसा, फेंकून मारणें. *adv.* squarely. तडक, सरळ, अचूक (मारणें).

Sŏck, *n., v. t. & i.* (सॉक्)—(school-sl.) sweets eaten at odd times; to treat to sock. अवेळीं मेवामिठाई वगैरे खाणें,-देणें.

Sŏck'et, *n.* (सॉ'किट्)—a natural or artificial hollow for something to fit into or revolve in. भोंक, घर, उखळी, उखळें.

Sŏ'cle, *n.* (सॉ'कल्)—(archit.) a plinth esp. as pedestal of statue or column. लहान बैठक, पाया.

Socră'tic, *n.* (साक्रॅ'टिक्)—of, like, following, worthy of Socrates. सॉक्रेटिसचा, त्याच्या मताप्रमाणें चालणारा-अनुयायी. *n.* follower of Socrates. सॉक्रेटिसचा अनुयायी. *S. method,* dialectic. (साक्रे-

दिसाची) प्रश्नोत्तररूप शिक्षणपद्धति. *S. irony,* दुसऱ्याचें ज्ञान समजावें म्हणून स्वतः मुद्दाम अज्ञान पांघरणें. *Socratically, adv.*

Sŏd, *n.* (सॉद्) a piece of turf pared off; (poet.) surface of the ground. गवताळ जमीन; गवताळ जमिनीचा पृष्ठभाग. *v. t.* cover with sods; pelt with ss. जमीन गवताळ करणें; कापलेलें गवत फेकून मारणें. *Under the s.,* थडग्यांत. *Sod'dy, a.*

Sō'da, *n.* (सो'डा)—one of the compounds of sodium in common use, esp. sodium carbonate or bicorbonate; soda water. सोडीअमचा (सिंधचा) प्राणिल; कार्बिकाम्लयुक्त पेय, सोडावाटर. *S.-water,* अतिशय दाबानें कार्बनडायाक्साइड घातलेलें पाणी, कार्बिकाम्लयुक्त पेय. *S.-fountain,* सोडावाटर तयार करण्याचें यंत्र.

Sŏdd'en, *a.* (सॉ'डन्)—saturated with liquid; (of bread) heavy and doughy; stupid with drink. शिजविलेलें; जड आणि दमट (भाकरी); दारू पिऊन झिंगलेला. *v. t. & i.* to make, become, sodden. थिजविणें; झिंगणें. *S.-ness, n.*

Sō'dium, *n.* (सो'डिअम्)—a silver white alkaline metal burning with bright yellow flame. सिंध, सासुद्र (धातु). *Sodic, a.* [soda+ium]

Sŏ'domy, *n.* (सो'डामि)—an unnatural sexual intercourse, esp. between males. (पुरुषा-पुरुषांचें) गुदमैथुन. *Sodomite, n.* गुदमैथुन करणारा.

Sō'fa, *n.* (सो'फा)—a long stuffed seat with raised end and back. कोच. *S.-bed (stead),* रात्रीं झोपतां येण्यासारखा कोच. [arab. *soffah,* a bench]

Sŏ'ffit, *n.* (सॉ'फिट्)—lower surface of arch, balcony, etc. कमान वगैरेंची खालची दिसणारी बाजू, पायऱ्यांच्या खालची बाजू.

Sŏft, *a.* (सॉफ्ट्)—not hard; yielding to pressure, plastic, easily cut; gentle, quiet, conciliatory; easily touched, compassionate; of smooth surface or texture; moist or rainy or thawing; not sour or bitter; not sharply defined; low-toned; (of air etc.) balmy; flabby, feeble, luxurious, half-witted, silly; (phonet.) sibilant, unaspirated. मऊ, मृदु, नरम; फुसफुशीत, ठिसूळ, सौम्य, शांत; अंतःकरणाचा कोमल, दयाळू, गुळगुळीत, तुळतुळीत, तलम; सर्द, पावसाळी, घरसातीचा, वितळविणारा; मिळमिळीत, मेणचट; अंधुक, अस्पष्ट; मंजुळ, हलका, गोड (आवाज, गाणें); सौम्य, सुखकर (हवा, धारा इ.); मऊ, वायल्या, कमजोर, लेचापेचा, मिळमिळीत, अर्धवट; मृदु (स्वर, उच्चार). *n.* a silly weak person. भोळा, मूर्ख, मेणचट मनुष्य. *adv.* softly. हळू, सावकाश, मंदपणानें. *int.* (arch.) hold, stop, not so fast. सावकाश! धीरे! धीरे! *S. tissues* (of body), not bony. शरीरांतील मृदु धातु. *S. palate,* टाळूचा मागचा भाग. *S. wicket* at cricket, खेळण्याची ओलसर (न घाळलेली) जागा. *S. goods,* मुलायम कपडे, विणलेलें कापड. *S. money,* notes and bills. नोटा व हुंड्या. *S. drink,* (U. S. sl.) non-alcoholic liquor. मद्यार्करहित साधी दारू. *S. job,* (बेतावाताचें काम परंतु पगार रगड अशी) चैनीची नोकरी. *A s. thing,* चैनीची जागा (नोकरी). *S. nothing,* amorous talk. प्रेमसंलाप, शृंगारिक भाषण. *S. sawder,* flattery. तोंडपुजेपणा, खुशमस्करी. *S. soap,* मऊ, -पातळ,-साबण, (*fig.*) खुशमस्करी. *S. headed, -witted,* मूर्ख, वेडसर.

Soft'en, *v. t. & i.* (सॉ'फन्)—to make or grow soft. मऊ,-मृदु,-सौम्य करणें किंवा होणें, द्रवविणें, पाझरविणें, नरम होणें, पाझरणें. *Softening of the brain,* मेंदूचें मार्दव,-मृदु होणें. *Soft'ener, n.*

So'ftў, *n.* (सॉ'फ्टि)—a half-witted person. अर्धवट, वेडसर, भोळसट (मनुष्य).

Sŏgg'ў, *a.* (सॉ'गि)—sodden, water-logged. पाणथळ, दलदलीचें.

Soi-disant, *a.* (स्वा-डी'झाँ)—self-styled, pretended. नामधारी, स्वतःशिष्ट, तोतया. [F]

Sŏil, *v. t. & i.* (सॉइल्)—to smear or stain with dirt, tarnish, defile, make dirty. मळविणें; मळकट करणें, खराब करणें; कलंक लावणें, डाग दिसणें,-पडणें. *n.* a dirty mark, dirt; the ground; the upper layer of earth; mould. मळ, डाग, कलंक; भूमि, देश, जमीन; मातीचा वरचा थर; खताची माती, खत. *S. pipe,* a sewage or waste-water pipe. संडासाचा घाण पाण्याचा नळ. *S.-less, a.* स्वच्छ, डाग नसलेला. *Black s.,* काळी माती. *Red s.,* तांबडी माती,-जमीन. *Alluvial s.,* नदीच्या कांठची, गाळ सांचून तयार झालेली, सुपीक जमीन. *Clayey s.,* चिकणमातीची जमीन. *Rich s.,* सुपीक जमीन. *N. soil,* सोनखत. One's *native s.,* स्वदेशभूमि.-*soiled a.*

Soire'e, *n.* (स्वा'रे)—an evening party, esp. for talk or discussion. सायंसभा, संध्याकाळची बैठक. [F]

Soj'ourn, *n.* (स'जर्न्)—temporary stay at a place. तात्पुरता मुक्काम. *v. i.* to make a sojourn. मुक्काम करणें, चार दिवस राहणें.-*er, n.*

Sōla, *n.* (सोला)—tall pithy-stemmed swamp-plant of India; the pith of this employed in making light-hats. लव्हाळा. *S. topi,* गवती टोपी. [Hind. *shola*]

Sŏl'ace, *n. & v. t.* (सॉ'लेस्)—to comfort in distress or disappointment, alleviation. समाधानी, समाधान, सान्त्वन (करणें). *To s. oneself with,* find compensation or relief in. समाधान मानणें,-मानून घेणें.

Sō'lan (-goose), *n.* (सो'लन् गूस्)—the gannet. समुद्र-हंस (पक्षी).

Solā'num, *n.* (सोले'नम्)—a large genus of plants including potato, nightshade, and many kinds cultivated as ornamental creepers or for flowers or foliage. कांदारिंगणीच्या जातीची वनस्पति.

Sō'lar, *a.* (सो'लर्)—of or reckoned by the sun, proceeding from the sun. सूर्याचा, सौर, सूर्यासंबंधीं. *S. das,* सौर दिवस. *S. eclipse,* सूर्यग्रहण. *S. spectrum,* सौरविच्छिन्नकिरण. *S. month,* सौरमास (सूर्याचा

पारावा भाग). *S. year,* सौरवर्ष. *S. flowers,* दिनपुष्प (दिवसा कांहीं तास फुलणारीं). *S. system,* (सूर्यमध्य-) ग्रहमाला. *S. plexus,* the complex of nerves at the pit of stomach. मज्जातंतूंचा भाग. *S. myth,* सौर दंतकथा.

Solār'ium, *n.* (सोले'अरिअम्)—place often enclosed in glass for enjoyment or medical use of sun's rays. सूर्यकिरण आंत येणारें कांचगृह.

Sō'larize, *v. i. & t.* (सो'लराइझ्)—(photog.) to spoil by long exposure. (छायाचित्र) जास्त प्रकाश मिळाल्यानें खराब करणें,–होणें. *Solariza'tion, n.*

Sōlā'tiŭm, *n.* (सोले'शिअम्)—(pl.-tia) a sum received as compensation. नुकसानभरपाई म्हणून मिळालेली रक्कम.

Sold, *pa. t. & pa. p.* of Sell.

Sŏ'lder, *n.* (सॉल्डर्)—*fusible alloy used in joining* the edges of less fusible metal; (*fig.*) cementing agency. डांक, सांधा; दुवा. *v. t.* to join with solder, to unite, to patch up. डांक लावणें, सांधणें. *Sol'dering-iron,* tool used hot for applying solder. खडिया, कवीजा.

Sō'ldier, *n.* (सो'ल्जर्)—member of army, private or N. C. O. in army; a military commander of specified ability; (sl.) a red herring; a man esp. sailor, who shirks work, one of fighting section of ant. सैनिक, शिपाई; सोजीर, लष्करी शिपाई; लष्करी सेनापति, योद्धा; तांबडा हेरिंग मासा; कामचुकारू खलाशी; लढाऊ जातीची मुंगी. *v. i.* to serve as soldier; (Naut. sl.) shirk work. शिपाईगिरी करणें, सैन्यांत नोकरी करणें; काम चुकवणें. *To go, enlist, for a s.,* सैन्यांत नोकरी धरणें,–भरती होणें. *To play at ss.,* मुलांचा खेळ, स्वयंसैनिकांचा खेळ. *S. of Christ,* (इतरांना) वाटाविणारा ख्रिस्ती. *Every inch a s.,* पुरा पुरा, दाढाचा-शिपाई, तरबेज शिपाई. *Old s.,* (अनुभविक) म्हातारा शिपाई; जाणता अनुभविक मनुष्य; रिकामी बाटली; सिगारेटचें-बिडीचें –थोटूक. *To come the old s. over,* अनुभविक म्हणून आपलाच हुकूम चालूं पाहणें. *S. of fortune,* केवळ पैशासाठीं वाटेल त्याची नोकरी करणारा भाडोत्री शिपाई, –मनुष्य. *Red, s.,* डुकरांना होणारा एक रोग. *S.'s wind,* (naut.) जलप्रवासांत गलबताला जाण्यायेण्याला अनुकूल असा वारा. *A great s.,* महान योद्धा,–सेनापति. *S. like, –ly, a.; S.-ship, n.* शिपाईगिरी, शौर्य.

Sō'ldiery, *n.* (सो'ल्जरि)—the soldiers (of a state, etc.); a set of troops of specified character (a *wild, licentious, etc.*). सैन्य, सैनिक; (रानटी, बेताल, इ०) सैनिक,–शिपाई.

Sōle, *n.* (सोल्)—under surface of the foot; part of shoe or stocking below this; lower surface or base of certain things (*e. g.* plough, golf –club). पायाचा तळवा, तळपाय; (पादत्राणाचा) तळ; (कांहीं वस्तूंचा) तळभाग, तळ, बुड, नांगराचा डावा तळ. *v. t.* to provide (boot) with sole. (बुटाला वगैरे) तळ घालणें,–लावणें.*-soled, a.*

Sōle, *a.* (सोल्)—one and only; exclusive or restricted to single person; (arch.) alone, unique. एकच, एकमेव, अद्वितीय, एकटा, अविवाहित; केवळ, अनन्य. *Solely, adv.* केवळ.

Sole, *n.* (सोल्)—kind of flat-fish much esteemed as food. लेप, लेप (मासा).

Sŏl'ecism, *n.* (सॉ'लिसिझम्)—a flagrant offence against grammar, idiom or etiquette. अपप्रयोग, अशुद्ध प्रयोग; गैर-असभ्य-वर्तन. *Sol'ecist, n. Solecistics, a.*

Sŏl'emn, *a.* (सॉ'लेम्)—accompanied with ceremony; mysteriously impressive; full of importance, weighty; grave or deliberate, having the appearance of gravity; pompous. यथाविधि,–यथाशास्त्र,–केलेला, धार्मिक, विधियुक्त समारंभाचा, गंभीर; महत्त्वपूर्ण, वजनदार; हृदयंगम; डामडौलाचा. *S. silence,* गंभीर शांतता. *A s. occasion,* महत्त्वाचा-गंभीर-प्रसंग. *To put on a s. face,* गंभीर चेहरा करणें.*-ly, adv.;-ness, n.* (rare).

Sŏlĕm'nĭtў, *n.* (सॅलें'म्निटि)—a solemn rite; solemnness, impressiveness. धर्म, विधि, संस्कार, समारंभ; भव्यपणा, महत्त्व, गांभीर्य.

Sŏl'emnize, *v. t.* (सॉ'लेम्नाइझ्)—to celebrate (a festival); to perform a rite (*esp.* wedding) duly or religiously; make solemn. (उत्सव वगैरे) यथाविधि करणें, मोठ्या थाटानें करणें; समारंभानें करणें; (विवाहविधि) यथाशास्त्र करणें; गंभीरपणा आणणें, गंभीर करणें.*-zation, n.*

Sō'len, *n.* (सो'लन्)—a bi-valve, the Razor shell. (द्वि-पुट) कालवासारखा प्राणी. [Gk *solen tube,* shell-fish]

Solĕn'oid, *n.* (सॉली'नाइड)—(phys.) a magnet made of wire coiled into cylinder and traversed by electric current. तार-सर्पिल-नलिका, तार-सर्पिल.

Sŏlfa', *n. & v. t. & i.* (सॉल्फा')—(to sing with) note-names, not words. सा-रे-गम करणें,–गाणें, (गातांना पदाचे शब्द न गातां) सुरावट गाणें.

Soli'cit, *v. t.* (सलि'सिट्)—to ask repeatedly or urgently (*for*); to importune; to request, to invite, to make a petition to, to seek by a petition; (of prostitute) entice (man) in public place. आग्रहानें सांगणें; आग्रह करणें; विनवणें, ची विनंति,–याचना,–करणें; लक्ष वेधणें, विनंति-अर्ज-करणें; (वेश्येचें) उघड भुलवणें,–मोह घालणें. *Solicita'tion, n.* मागणी, याचना, विनवणी, प्रार्थना.

Soli'citor, *n.* (सलि'सिटर्)—one who solicits (rare); member of branch of legal profession chiefly concerned with advising clients and preparing their cases. विनंति करणारा; (कोणत्यादि विशिष्ट कायद्याबाबत) सल्ला देणारा वकील, सॉलिसिटर. *S.-General,* कायद्याचा सल्ला देणारा सरकारी अधिकारी.

Soli'citous, *a.* (सालि'सिटस्)—anxious, concerned; eager to do, desirous *of.* चिंताक्रांत, सचिंत; उत्सुक, उत्कण्ठित, आतुर, सोत्सुक, सोत्कंठ.*-ly, adv.*

Soli'citūde, *n.* (सालि'सिटयूड्)—being solicitous, uneasiness of mind. घोर, काळजी, अस्वास्थ्य, उत्कंठा, कळकळ, तळमळ.

Sŏl'id, *a.* (सॉ'लिड्)—of stable shape, not liquid; of the same material throughout; not hollow, whole; sound or reliable, real, genuine, valid; of three dimensions. स्थिर आकाराचा, घन, घट्ट; एकाच प्रकारचा; भरींव, सगर्भ, पोकळ नसलेला, खंबीर, विश्वसनीय, कणखर; घन. *n.* a body or substance of stable shape; (*Geom.*) a body or magnitude of three dimensions. घन वस्तु, घन पदार्थ; घन, घनाकृति. *S. food*, भरभक्कम खाद्य (पदार्थ), अन्न. *Water becomes solid at 32° F.*, 32° फॅ. ला पाण्याचें घनीभवन होतें. *S. tire*, अखंड रबरी नळी. *S. square*, (mil.) भरींव चौरसाकार, घनचौरस-सैन्यरचना. *S.-horned*, भरींव शिंगाचा. *S. printing*, (बिनलेडेची) भरींव छपाई. *A man of s. build*, मजबूत (शरीर-) बांध्याचा मनुष्य. *Of s. silver*, ऐनजिनसी -संपूर्ण-चांदीचा. *A s. vote*, unanimous, undivided. सर्वांच्या सर्व मतें. *To go or be s. for*, एक मतानें (कया) घाजूला असणें. A *s. man*, अक्कलवान मनुष्य, समंजस मनुष्य; गब्बर, पैसेवाला. *S. consideration*, विचारांत घेण्यासारखी महत्त्वशीर बाब,-गोष्ट. *S. foot*, Cubic foot. घनफूट. *S. number*, तीन मूलावयव असलेली संख्या. *S. geometry*, घनभूमिति. *S. figure*, घन आकृति, घनक्षेत्र. *Solid'ity, n.* घनता, भरींवपणा. *Solid'ly, adv.*

Sŏlidā'rity̆, *n.* (सॉलिडॅ'रिटि)—community of interests, feelings and action, mutual dependence. दृढ ऐक्य, हिताचा दृढ संबंध, परस्परहितैक्य, जूट, एकोपा. *Sol'idary, a.*

Solid'ify̆, *v. t. & i.* (सालि'डिफाय्)—to make or become solid. घट्ट करणें, घनत्व आणणें, घन होणें. *-fication, n.*

Solil'ŏquy̆, *n.* (सालि'लॉकि)—talking to oneself; a piece of such talk. स्वतःशींच बोलणें; आत्मगत भाषण. *A s.*, (नाटकांतील) स्वगत भाषण.*-oquist, n.* [L. *solus*, alone; *loqui, speak*]

Solil'ŏquize, *v. i.* (सालि'लॉक्वाइझ्)—to talk or discourse to oneself, to indulge in soliloquy. स्वगत भाषण करणें.

Sŏ'lipĕd, *a. & n.* (सॉ'लिपेड्)—solid-hoofed (animal). भरींव खुराचा-अखंड खुराचा, (प्राणी, घोडा).

Sŏl'itaire, *n.* (सॉ'लिटेअर्)—a gem set by itself or an ear-ring, stud, etc. adorned with it; kinds of card-game for single player; kinds of thrush; (rare) a recluse. खडा, खडा बसविलेला दागिना, बटण इ.; एकट्यानें खेळण्याचा पत्त्यांचा डाव; कोकिळ, सारिका (अमेरिकन); संन्यासी, यति.

Sŏl'itary̆, *a.* (सॉ'लिटरि)—living alone; without companion, shared by no companions; unfrequented; single; lonely; sole. एकटा राहणारा, एकला, एकलकोंडा; निर्जन, भयाण, एकांतसावाचा, उदास; एकच, एकटा; संसर्गरहित; एकमेव. *n.* a recluse. यति, संन्यासी; जोगी. *S. confinement*, isolation in separate cell. अंधारकोठडी (ची शिक्षा). *S. ants*, एकेकट्या राहणाऱ्या मुंग्यांची जात. *A s. life*, एकलकोंडें जीवन. *Sol'itarily, adv.* एकट्यानें, एकांतात. *Sol'itariness, n.*

Sŏl'itūde, *n.* (सॉ'लिटयूड्)—being solitary; a solitary place, a lonely life. एकान्तवृत्ति, एकान्तवास; एकान्त अशी जागा, निर्जनस्थान.

Sŏl'misātion, *n.* (सॉ'ल्मिझेशन्)—repetition of the notes of the gamut. सा-रि-ग-म, सुरावट. *Sol'mizate, v. t.*

Sō'lō, *n.* (सो'लो)—(*pl.-os*), a song or instrumental piece for single performer; (cards) kind of whist in which one player opposes three. एकानेंच गाण्याची चीज,-वाजविण्याची गत; एक प्रकारचा (एक विरुद्ध तीन खेळाडूंचा) पत्त्यांचा डाव. *So'loist, n.* a performer of solo. एकानेंच गाण्याची चीज म्हणणारा, गत वाजविणारा.

Sŏ'lomon, *n.* (सॉ'लोमन्)—kind of Israel reputed wisest of men. शहाणपणांत श्रेष्ठ असा ज्यू लोकांचा राजा.*-ic, a.* सॉलोमनचें, शहाणपणाचें. *S.'s seal*, एक जातीचें फूलझाड.

Sō'lon, *n.* (सो'लन्)—a sage, wise legislator. शहाणा, शहाणा कायदेकानू करणारा, स्मृतिकार. [name of Athenian law-giver]

Sŏl'stice, *n.* (सॉ'ल्स्टिस्)—time at which the sun is farthest from the equator and appears to pause before returning; (also *solstitial point*) point in ecliptic reached by the sun at solstice. अयन, अयनान्त, अयनकाल; (ज्योतिषांत) सूर्याच्या उत्तर किंवा दक्षिण गतीचा शेवट. *Solsti'tial, a.* (-शल्) अयनांतसंबंधीं, अयनकालिक. *The summer solstice*, about 21st June, उत्तरायण, *the winter solstice*, 22nd Dec., दक्षिणायन.

Sŏl'ūble, *a.* (सॉ'ल्यूबल्)—dissolvable in liquor; (of problem) soluable. विद्राव्य, द्रवणशील, द्रव करण्याजोगा; सोडवण्यासारखा.*-bility, n.* द्रवणशीलता, विद्राव्यता.

Sō'lus, *pred. a.* (सो'लस्)—(*fem.-la*), alone, unaccompanied (esp. in stage directions). एकटाच.

Sōlu'tion, *n.* (सोल्यु'शन्)—dissolving, or being dissolved; conversion of solid or gas into liquid state; mixing with the solvent; solving of a problem, explanation, answer to a problem, (surg.) separation, dissolution. द्रव करणें, द्रव होणें, द्रवीकरण, विद्राव; घन किंवा गॅसचें द्रवांत रूपांतर करणें; उलगडा, समाधान, निरसन, उत्तर, निकाल, रीत; सोडवणें, मोकळें करणें. *Chemical s.*, रासायनिक द्रवण, -विद्राव. *Mechanical s.*, रासायनिक (साधा) विद्राव.

His ideas are in s., unsettled. त्याच्या कल्पना विरघळणाऱ्या,-अपरिपक्व,-आहेत.

Sŏlve, *v. t.* (सॉल्व्ह्)—to find or supply the answer to or way out of (difficulty, etc.), to give an explanation of; untie, loosen, dissolve (knot, tangle, etc.). समाधान करणें, सोडविणें, चें उत्तर काढणें; मार्ग-वाट-काढणें; सोडवणें, उलगडणें, गुंतागुंत काढणें. *Solvable, a.*; *solvabil'ity, n.* [L. *se*, apart; *lucre*, loosen]

Sŏl'vĕncy̆, *n.* (सॉल्व्हन्सि)—being pecuniarily solvent, ability to pay all debts. कर्ज फेडण्याची ताकद किंवा लायकी, ऐपतदारपणा.

Sŏl'vent, *a.* (सॉल्व्हन्ट्)—capable of acting as dissolver; (*fig.*) having the power of weakening the hold of traditions or beliefs; having money enough to meet one's liabilities. विद्रावक, द्रावक, स्रावक; पुराणमतसामर्थ्यविद्रावक-जोर कमी करणारा; कर्ज फेडण्याच्या लायकीचा. *n.* a solvent liquid or substance; an agency that saps belief etc. द्रावक, द्रवविणारा, विद्रावक रस,-पदार्थ; द्रावक, शिथिल करणारा,-रें साधन. *Water is the commonest s.,* पाणी हें अगदीं सामान्य-सोपें-द्रावक आहे, (पाण्यांत पुष्कळ पदार्थ वितळतात). *Science as s. of religious beliefs,* शास्त्रीय ज्ञान हें पुष्कळ धार्मिक समजुती शिथिल करणारें आहे.

Somăt'ic, *a.* (सोमॅटिक्)—of the body, physical देहसंबंधीं, शारीरिक, दैहिक. [Gk. *somatikos*, body]

Sŏm'bre, *a.* (सॉम्बर्)—dark, gloomy, melancholy, dismal; dark-coloured. खिन्न, उदास; काळासांवळा, काळसर.-*ly, adv.*;-*ness, n.*; *som'brous, a.* (poet.)

Sŏmbrer'ō, *n.* (साम्ब्रेअरो)—(pl.-*os,*) broad-brimmed felt hat (common in America). रुंद कडेची साहेबी टोपी.

Some, *a.* (सम्)—an unspecified amount or number of; an appreciable or considerable amount of; particular but un-known; such to or certain extent; (U. S.) of surpassing magnitude or quality. कांहीं, कांहींसा, थोडा, थोडका; बराच, बराचसा, अल्पस्वल्प, लक्षांत घेण्यासारखा, अनेक, कित्येक; कोणी, कोणतरी, कोणीतरी, एखादा, कोणतासा; कांहींसा, अल्पसा; बराचसा, बराच मोठा,-पुष्कळ. *pron.* some people; some specimens of the class in question; some number or amount of. कांहीं लोक; कांहीं वस्तु; (पैकीं) कांहीं, कोणी; (पैकीं) थोडेंसें, कांहींसें. *adv.* (*sl.* & *U. S.*) somewhat; rather; a good deal. कांहींसा,-सें; अंमळ; बराचसा. *Ask s. experienced person,* कोणातरी अनुभविक माणसाला विचारा. *S. say yes and s. say no,* कांहीं (लोक) 'होय', म्हणतात आणि बाकीचे 'नाहीं' म्हणतात. *S. years ago,* कांहीं वर्षांपूर्वी. *That is s. proof,* तो कांहींसा पुरावा आहे. *Do have s. mercy,* थोडीशी तरी दया दाखवा. *Waited s.* 20 *minutes,* सुमारें वीस मिनिटें थांबलों. *He seemed annoyed s.,* तो कांहींसा (त्रासलेला असा) त्रस्त दिसला.

Some'body̆, *n.* (सम्-बडि)—(pl.-*dies*), some person; a person of importance. कोणीतरी मनुष्य; विशिष्ट व्यक्ति, वजनदार-महत्त्वशील-व्यक्ति.

Some'how, *adv.* (सम्-हाउ)—in some way or for some reason or other not yet known; no matter how. कसातरी, जेमतेम, कसेंहीकरून.

Some'one, *n.* (सम्-वन्)—somebody. कोणीतरी एक, क्ष. *Some one,* any particular one. कोणतातरी एक.

So'mersault,-set, *n.* & *v. t.* (सम्मर्सॉल्ट्,-सेट)—spring, bound, with the acrobatic feat of turning heels over head and alighting on feet. कोलांटी उडी, घोलांटी, उलटी उडी (मारणें). *To turn a s.,* कोलांटी उडी मारणें. [L. *supra,* above; *saltus,* leap]

Some'thĭng, *n.* (सम्थिंग)—something, esp. as substitute for more precise term; a little. कांहींतरी, थोडासा; कांहींसा.

Some'tīme, *a.* & *adv.* (सम्-टाइम)—former(ly), quondam. माजी. *Sometime, adv.* कांहीं वेळ; केव्हांतरी

Some'tīmes, *adv.* (सम्-टाइम्स)—now and then; at one time or other, at intervals. कधींकधीं; केव्हांतरी.

Some'what, *adv.* (सम्-व्हाट्)—in some degree; a certain indefinite quantity or amount. कांहींसा, थोडासा, जरासा, किंचित्, थोडाबहुत.

Some'where, *adv.* (सम्-व्हेअर)—in or at some place, in one place or another. कोठेंतरी, कोठेंसा.

Sŏmnăm'būlism, *n.* (सॉम्नॅम्ब्युलिझम्)—walking about during sleep; condition of brain inducing this. झोपेंत फिरणें,-चालणें, निद्राभ्रमण; निद्राभ्रमणकारक मेंदूची स्थिती. *Artificial s.,* hypnotism. मनोवशीकरणार्थ मूर्च्छना.—*bulist, n.* झोपेंत चालणारा,-हिंडणारा.—*bulistic, a.* [L. *somnus,* sleep; *ambulare,* walk]

Sŏmnĭ-,in comb. (सॉम्नि-)—sleep-निद्रा-: *Somniferous,* झोपेचा, निद्राकारक. *Somnil'oquence,-loquism,-l'oquy, nn.* झोपेंत बडबडणें, (-ण्याची संवय). *Somnil'oquous,—l'oquist, nn.* झोपेंत बडबडणारा (मनुष्य). *Somnip'athist, n.* hypnotic subject. मनोवशीकरणार्थ मूर्च्छना आणलेली व्यक्ति. *-pathy,* मनोवशीकरणार्थ मूर्च्छना.

Sŏm'nolent, *a.* (सॉम्नोलन्ट)—half asleep; sleepy, drowsy, inducing sleep. अर्धनिद्रित; झोप आणणारा, झोपाळू, झोंप आणणारा. *Som'nolence,-cy, nn.* झोपाळूपणा, पेंगणें. *Som'nolently, adv.*

Son, *n.* (सन्)—one's male child; a descendant; native of a country; a devotee or slave of. मुलगा पुत्र, चिरंजीव, सुत; वंशज, वंशीय; (देशाचा) पुत्र, संतान; (चा) भक्त, दास. *S. and heir,* (ज्येष्ठ) पुत्र. *He is his father's son,* like, worthy, of his father. बापासारखा,-बापाच्या तोडीचा,-मुलगा. *The S. of Man,* ख्रिस्त (नवीन करार); आदमचा वंशज (जुना क०). *The ss. of men,* मनुष्यजाति,-जात. *S. of a*

gun, हलकट, क्षुद्र. *S. of the soil*, रहिवासी; शेतकरी, मजूर. *S. of Mars*, a soldier. सैनिक. *Son'less, a.* निपुत्रिक, निपुत्र. *Son'ship, n.* पुत्रत्व; वारसदारी.

Son'-in-law, *n.* (स'न्-इन्-लॉ)—daughter's husband. जांवई.

So'nant, *a. & n.* (सो'नंट्)—(phonet.) (a sound or letter) involving voice. नादयुक्त, सतत नाद्कारी, स्वनयुक्त (उच्चार, अक्षर, *f.* d, g, etc.).

Sona'ta, *n.* (सेना'टा)—an instrumental piece, esp. for piano, in several movements. (निरनिराळ्या गतींत वाजवितां येण्यासारखें) पद्याचें-पदाचें-स्वरलेखन.

Sŏng, *n.* (सॉंग)—singing: vocal music; musical cry of some birds; set of words for singing; poetry; a poem. गाणें, गायन; गाणें; पक्ष्यांचें कूजन,-मंजूळ गाणें; गीत; काव्य; कविता. *S.-birds*, गाणारे पक्षी. *Bought, sold, it for a s.* or *an old s.*, कवडीमोलानें विकत घेतलें,-विकलें. *S.-less, a.*

Sŏng'ster, *n.* (सॉं'ग-स्टर्)—singer; poet; song-bird. गाणारा, गायक; कवि; गाणारा पक्षी.

Song'stress, *n.* (सॉं'ग-स्ट्रेस्)—a female singer. गाणारीण, गायिका.

Sonif'erous, *a.* (सोनि'फरस्)—conveying or producing sound. नादवाहक,-कारक. [L. *sonus*, Sk. *Swana*, a sound]

Sŏnn'ĕt, *n.* (सॉ'निट्)—piece of rhymed verse of fourteen ten-syllable lines; (rare) any short poem. चवदा ओळींची एक कविता, चतुर्दशक, सुनीत, स्वनीतक; लहानशी-छोटी-कविता. *Sonneteer, n.* सुनीत लिहिणारा कवि; *v. i.* (usu. contempt.) (सुनीतें,-छोटीं काव्यें रचून) कवि बनणें.

So'nnȳ, *n.* (स'नि)—a small boy (familiar form of address). बाळ, मूल, लहान मुलगा.

Sonŏm'eter, *n.* (सोनॉ'मिटर्)—kinds of instruments for measuring sounds, testing deaf person's hearing etc. ध्वनिमापकयंत्र.

Sonorif'ic, *a.* (सोनॉअरि'फिक्)—producing (esp. other than vocal) sound. ध्वनि करणारा, आवाज करणारा.

Sonor'ous, *a.* (सोनॉ'अरस्)—having a resonant or rich or powerful sound; (of speech, style) high-sounding. खणखणीत चांगला आवाज असलेला, नाद असणारा; खणखणीत, ठसठशीत, दणदणीत, भरींव, (भाषण, लेखनशैली). *S. figures*, नादलहरींनीं वाळवेवर वगैरे उमटलेल्या आकृति. *S. body*, नादजनक पदार्थ. *Sonor'ously, adv.*;—*ousness, n.*; *Sonor'ity, n.* सनादता, सशब्दता, खणखणीतपणा.

Sōōn, *adv.* (सून्)—in a short time, after no long interval, relatively early; readily, willingly. इतक्यांत, लवकर, चटकन; आधीं, अगोदर; आनंदानें, खुशीनें, संतोषानें. *He was s. convinced of his error*, लवकरच त्याला आपली चूक उमगली. *So s. as*, जितका लौकर. *As s. as*, जों, लगेच, क्षणींच. *Sooner or later*, आगें मागें, केव्हां तरी, आज नाहीं उद्यां. *No sooner said than done*, तोंडावाटे (शब्द) निघण्याचा अवकाश कीं झालेंच. *The sooner the better*, वेळेवर वेळ. *What makes you come so s.*, इतक्या लवकर कां आलास?

Sŏŏt, *n.* (सुट्)—black powdery substance rising in the smoke. काजळ, मस, मशेरी, धुरकट, घरोसा. *v. t.* to mark with s.; apply s. धुरकटवणें, काजळी धरवणें, काळा करणें. *S.-less, soot'y, aa. Soot'ily, adv.*, *-tiness, n.*

Sōōth, *n.* (सूथ्)—(*arch.*) verily, the truth. सत्य, खरें. *In (good) s.*, खरोखर. *Sooth'sayer, n.* (सूथ्-सेअर्) one who foretells or predicts, diviner, prognosticator. भविष्य सांगणारा, भविष्यवादी, ज्योतिषी. *Sooth'say, v. i.*

Sōōthe, *v. t.* (सूद्)—to make less angry, to calm (person, nerves); to soften, alleviate (pain), to pacify; flatter, humour (person). शांत करणें, सान्त्वन करणें; दुःख कमी करणें,-हलकें करणें; आवळणें, गोंजारणें, च्या कलानें घेणें, खुलविणें. *Sooth'er, n.* (esp.) लहान मुलांचें रबरी चोखणें, चोखायचें चुन्न. *Sooth'ingly, adv.* समजूत घालून, शांत करून, गोंजारून.

Sŏp, *n.* (सॉप्)—a piece of bread, etc. soaked in gravy, milk, etc.; bribe offered to pacify. (रशांत) भिजविलेला भाकरीचा तुकडा; तोंडावर टाकलेला तुकडा, लांच. *v. t. & i.* to soak; take up by absorption; drench; be wet through. बुडविणें, भिजविणें; शोषून घेणें; भिजणें, भिजून चिंब होणें. *Sop in the pan*, घावन, आंबोळी वगैरे तळलेली भाकरी. *Sop'py, a.*

Sŏph'ism, *n.* (सॉ'फिझम्)—a false argument or fallacy meant to deceive. खोटा युक्तिवाद, वितंडवाद, हेत्वाभास.

Sŏph'ist, *n.* (सॉ'फिस्ट्)—Ancient-Greek paid teacher of philosophy and rhetoric; a reasoner willing to avail himself of fallacies that will help his case, a fallacious reasoner. (प्राचीन) ग्रीक तत्त्वज्ञानाचा व साहित्याचा पगारी गुरु; खोटा युक्तिवाद करणारा, वितंडवादी, हेत्वाभासपटु. *Sophis'tic,-'tical, aa.* आभासरूप, हेत्वाभासाचा, वितंडवादी.-*tically, adv.*

Sophis'ticate, *v. t. & i.* (साफि'स्टिकेट्) to involve (a subject) in sophistry; mislead (a person) thus; make artificial; tamper with (text etc.) for argument; adulterate (wine, etc.); use sophistry. (च्या विषयीं) हेत्वाभास योजणें; वितंडवाद करून फसविणें; कृत्रिमता आणणें; शब्दच्छलानें अर्थाची ओढाताण करणें; भेसळ करणें; शब्दच्छल-वितंडवाद-करणें.-*'tion, n.* लपंडाव, शब्दच्छल, भेसळ.-*tor, n.*

Sŏph'istrȳ, *n.* (सॉ'फिस्ट्रि)—use of sophisms, reasoning sound in appearance only. वितंडवाद, वाक्छल, हेत्वाभासाची तर्कपद्धति.

Sŏph'omōre, *n.* (सॉ'फमोअर्)—(U. S.) a second year student at college or university. (महाविद्यालयांतील किंवा विश्वविद्यालयांतील) दुसऱ्या वर्षाचा विद्यार्थी. *Sophomor'ic, a.* immature, bombastic. अपक्व, शब्दाडंबराचा.

Sŏporif'ic, *a.* & *n.* (सोपरि'फिक्)—(drug or agency) tending to produce sleep. झोंप आणणारा, निद्राकारक (औषधि, साधन). *Soporif'erous, So'porous, So'porose, aa.* [L. *Sopor*, sleep]

Sŏpp'y̆ *a.* (सॉ'पि)—soaked in liquid; swampy. भिजविलेला; दलदलीचा, पाणथळीचा.

Sopra'no, *n.* (सप्रा'नो)—(pl.-*nos*,-*ni*,) highest female or boy's voice, treble; a s. singer. तारस्थान, उच्चस्वर; तारस्वरांत गाणारा.

Sŏr'cerer, *n.* (सॉ'अर्सर्)—a man practising sorcery, an enchanter, a magician. जादुगार, चेटक्या. *Sor'ceress, n, f.* जादुगारीण, चेटकी स्त्री.

Sŏr'cery̆, *n.* (सॉ'अर्-सरि)—witchcraft. जादूगिरी, चेटक, चेट्टक.

Sŏrd'id, *a.* (सॉ'अर्डिड्)—squalid, mean; humiliating; inspired by low or mercenary or selfish ends, niggardly; (Bot., Zool. of colours) impure, muddy. नीच, हलकट; अपमानकारक; स्वार्थानें प्रेरित, भाडोत्री, कृपण, कद्रू; अशुद्ध, मळकट (रंग).-*ness, n.* नीचपणा, क्षुद्रपणा, कृपणपणा.

Sore, *a.* (सोअर्)—(*arch.*, poet.) grievous, distressing; suffering bodily or mental pain; morbidly tender; irritating. भयंकर स्वरूपाचा, तीव्र; घायाळ, दुखावलेला; दुखरा, दुखणारा, दुखापत झालेला; लागणारा, झोंबणारा. *n.* a sore place on body; a sore subject, painful memory. व्रण, दुखापत, जखम; मर्मस्थान; मर्म, वर्म, दुःख, अडचण, दुःखाचा प्रसंग. *adv.* grievously. फारच, अतिशय. *A s. arm*, दुखरा दंड,-हात. *S. throat*, घसा बसलेला. *A sight for s. eyes*, आवडता, मनाजोगता, देखावा. *Very s. about his defeat*, पराभवानें अतिशय चिडलेला,-त्रासलेला. *A s. struggle*, तीव्र धडपड. *To have s. eyes*, डोळे येणें. *To reopen old ss.*, मागील दुःखप्रसंगांची पुन्हां आठवण होणें. *Sore'ly, adv.; Sore'ness, n.* दुखरेपणा; दुःख.

Sŏrg'hum, *n.* (सॉ'अर्गम्)—kinds of grass including millet and Chinese sugar-cane. (बाजरीसारखें) गवती धान्य, चिनी ऊंस.

Sorī'tēs, *n.* (सोरा'इटीझ्)—chain-syllogism; form of sophism leading from truth to absurdity. अनुमानशृंखला; हेत्वाभासमालिका. *Sori'tical, a.*

Sorō'sis, *n.* (सोरो'सिस्)—(bot.) a fleshy-compound fruit. (तुती, फणस, अननस वगैरे) पुष्कळ फुलें एकत्र होऊन झालेलें फळ. [Gk *soros*, heap]

Sŏ'rrel, *n.* (सॉ'रल)—kinds of sour-leaved herb. चुका, चुक्याची भाजी, शतवेधी.

Sŏ'rrel, *a.* & *n.* (सॉ'रल)—(of) reddish-brown colour; a s. animal (esp. horse); (also *sorel*) buck of third year. तांबूस रंगाचा; तांबूस रंगाचें जनावर (घोडा); तिसऱ्या वर्षांतील काळवीट,-हरिण.

So'rrow, *n.* (सॉ'रो)—mental pain, grief, sadness; misfortune, trouble; lamentation. दुःख, खेद, शोक; संकट, प्रसंग, आपत्ति; शोक. *v. i.* to feel sorrow; to mourn. दुःख वाटणें; शोक करणें, श्रम वाटणें, रडणें. *The Man of ss.*, येशू ख्रिस्त. *S.-stricken*, आपत्तींत सांपडलेला. *So'rrower, n. So'rrowing, a.*

Sŏ'rrowful, *a.* (सॉ'रोफुल्)—feeling or causing sorrow, full of sorrow, sad, mournful. दुःखी, रडवा, दुःखप्रद, दुःखाचा.-*fully, adv.* दुःखानें, कष्टी होऊन, दिलगिरीनें.-*fulness, n.*

Sŏ'rry̆, *a.* (सॉ'रि)—pained at or regretful over something; feeling pity for some one; ridiculously bad. दुःखीकष्टी, दुःखी, खिन्न; दया वाटत असलेला; भिकार, अत्यंत वाईट, हलका. *S.* (in formal apology) चूक झाली! चुकलों!. *Felt s. for him*, त्याच्याबद्दल वाईट वाटलें. *S. for* oneself, (colloq.) खिन्न, उदास. *So'rrily, adv., So'rriness, n.*

Sŏrt, *n.* (सॉअर्ट्)—a kind or variety, class, kind, species; manner, way; (Print.) any letter or piece in fount of type. जात, जाति, तऱ्हा प्रकार; एकाद्या जातीचा टंक (टाइप). *v. t.* & *i.* to arrange in sets according to size or quality or other standard; (arch.) correspond or agree with. मतवार लावणें, वर्गीकरण करणें; निवडणें, वेंचणें; पत्रांची विल्हे करणें; योग्य होणें, शीं जुळणें, मिळता असणें. *Of ss.*, mixed. सरमिसळ असलेलें. *A s. of war, a war of a s.*, or *of ss.*, not fully deserving the name of war. नांवाची लढाई, खरीखुरी नव्हे अशी. *That's your s.*, ती तुमची पद्धत (तऱ्हा) आहे. *In some s.*, to a certain extent. कांहींसा. *Copy is hard* (or *runs*) *on ss.*, कांहीं जातींचा पुष्कळ टाइप लागणारा हा मजकूर आहे. *To be out of ss.*, out of health, or spirits, (print.) short of *ss.* चैन न पडणें, अस्वस्थ होणें; कांहीं जातींचीं अक्षरें खुंटणें.

Sŏrt'ie, *a.* (सॉ'अर्टी)—a sally of besieged party. वेढा घातलेल्या सैन्यावर केलेला हल्ला,-घातलेला छापा.

Sŏrt'ilege, *n.* (सॉ'र्टिलिज्)—divination by lots. चिठ्या टाकून पाहणें.

Sŏrti'tion, *n.* (सॉअर्टि'शन्)—lot-casting; distribution by lot. चिठ्या टाकणें; गठ्ठागठ्ठांनीं वांटणें, चिठ्या टाकून वांटणें.

Sōr'us, *n.* (सो'रस्)—(pl.-ri) (bot.) a heap, cluster, esp. of spore-cases on back of fern-frond. (फर्न वनस्पतीच्या पानावरील बीजरेणुकोशांचा) समुदाय.

S. O. S., (एसो एस्)—wireless code-signal of extreme distress. भयंकर प्रसंगाच्या वेळीं दिलेला बिनतारी संदेश.

Sō'-sō, *pred. a.* & *adv.* (सो'सो)—not very good. सुमाराचा, जेमतेम.

Sŏt, *n.* (सॉट्)—man constantly stupid with drink, a habitual drunkard. दारूनें बेहोष झालेला मनुष्य, दारुड्या, झिंगट, छाकटा. *v. i.* to

tipple. झिंगणें, दारूबाजी करणें. *Sot'tish, a.,-ishly, adv.,-ness, n.*

Sŏtt'ō Vō'cĕ, *adv.* (सॉ'टो व्हो'सि)—in an undertone, aside. हलक्या आवाजांत, बाजूला. [It.]

Sou, *n.* (सु)—the French ½d. अर्धापेन्स किंमतीचें फ्रेंच नाणें.

Sou'chong, *n.* (सु'शाग)—a choice black tea made from youngest leaves. उत्कृष्ट जातीचा चहा.

Sou'ffle, *n.* (सु'फ्ल)—(med.) low murmur. कुंथण्यासारखा आवाज.

Sou'ffle, *a.* & *n.* (सु'फ्ले)—made light and frothy; dish made of beaten white of egg. हलकीं व तळलेलीं; अंड्यांतील पांढरा बलक घालून केलेला खाद्य पदार्थ.

Sough, *n.* & *v. i.* (सव्, साउ, सफ़्)—(to make) sighing or moaning of wind in trees etc. वाऱ्याचा सूं सूं आवाज (होणें).

Sought, (साट्)—*pa. t.* & *pa. p.* of Seek.

Soul, *n.* (सोल्)—the immaterial part of man regarded as immortal; moral and emotional part of man; intellectual part of man; vital principle; animating or essential part; a person viewed as embodying moral or intellectual quality; the organ of emotion, thought, and will; human being; spirit, essence; departed spirit. आत्मा; हृदय, अंतःकरण; बुद्धि, मन, जीव, प्राण, चैतन्य, जीवनकला; आत्मा, जीव, जिव्हाळा; महात्मा, थोर पुरुष; जीव, चैतन्य, आत्मिक तेज; मनुष्य, मनुष्यप्राणी; सत्त्व, सार; मृताचा आत्मा. *Immortality of the s.* आत्म्याचा अविनाशीपणा,-अमरत्व. *'pon my s.,* गळ्याची शपथ! *He cannot call his s. his own,* तो दुसऱ्याच्या पूर्ण आहारीं गेला आहे, स्वत्व नष्ट झालें आहे. *The greatest ss. of antiquity,* पुरातन काळांतील थोर पुरुष. *His pictures lack s.,* त्याच्या चित्रांत आत्मिकता-प्राण-नाहीं, तीं चित्रें निर्जीव भासतात. *S.-stirring,* भावनोद्दीपक, अंतःकरण खळबळून सोडणारे.*-souled, a.* (उच्च) मनोभाव असलेला. *High-souled,* महाशय, थोर अंतःकरणाचा.

Soul'ful, *n.* (सो'ल्फुल्)—filled with, or appealing to, fine thoughts or emotions. सद्भावनायुक्त, सद्भावनोद्दीपक.*-fully, adv.;-fulness, n.*

Soul'less, *a.* (सो'ल्-लेस्)—(*esp.*) destitute of the humane emotions, spiritless. अंतःकरणरहित, क्षुद्र.*-ly, adv.;-ness, n.*

Sound, *n.* (साउन्ड्)—audible air-vibration; mere noise as opposed to meaning; what is or may be heard; (*fig.*) mental impression. ठोका; आवाज, नाद, ध्वनि, शब्दावडंबर, पोकळ आवाज; ध्वनि, शब्द, नांव; भावना, भास. *v. i.* & *t.* to give forth sound; convey specified impression; (part. *sounding*) of imposing sound or import; produce sound (from bugle, etc.); give signal thus; celebrate; pronounce, utter; test condition of (heart, railway-carriage wheel etc.) with stethoscope, etc. वाजणें, आवाज-ध्वनि-होणें; ध्वनि येणें, (आवाजावरून) दिसणें,-वाटणें; चा भास होणें; मोठमोठा, भपकेबाज, शब्दावडंबराचा; (शिंग) वाजवणें, फुंकणें; (शिंग वगैरे वाजवून) सूचना देणें, खूण करणें; गाजवणें, ची गर्जना-प्रसिद्धि-करणें, चा घोष करणें; उच्चार करणें; (ठोकून) तपासणें. *Musical s.,* नादलहरी,-ध्वनि. *Vowel ss.,* स्वरोच्चार. *Consonantal ss.,* व्यंजनोच्चार. *S.-board, sounding board,* ध्वनिवर्धक फलक. *S. bow,* thick edge of bell against which tongue strikes. घंटेची कडा. *S.-box,* ध्वनिमंजूषा. *S.-film,* बोलपट. *S. proof,* ध्वनिनिवारक, ध्वनिप्रतिबंधक. *S. record,* ध्वनिलेख. *S.-recorder,* ध्वनिलेखक कांटा. *S. wave,* नादलहरी, ध्वनिलहरी. *To s. a retreat,* माघार घेण्याची (वाद्य वाजवून) सूचना देणें. *Sound'-less, a.*

Sound, *a.* (साउन्ड्)—free from disease or defects or corruption or heresy; of good quality throughout; reliable; not fallacious; (of sleep) unbroken; (Commerc.) solvent; thorough. निरोगी, निर्दोष, अव्यंग; शाबूद, धड, न कुजलेला; विश्वसनीय; समर्पक, सयुक्तिक; गाढ, स्वस्थ; शहाजोग, सुस्थितींतील, संपन्न (उद्योगधंदा, पेढी इ.); खूप, जोराचा, मजबूत, बळकट, *adv.* fast, soundly. गाढ, स्वस्थ. *S. asleep,* गाढ निद्रिस्त. *Sound'ly, adv.; Sound'ness, n.*

Sound, *n.* (साउन्ड)—a strait; swimming-bladder of cod and some other fishes; cuttle-fish; a kind of surgical probe. सामुद्रधुनी; माशाच्या अंगांतील हवेची पिशवी; म्हाकूळ, समुद्रफेन (एक जातीचा मासा); अश्मरी-परीक्षा-शलाका, मुतखडा आहे कीं नाहीं हें तपासण्याचा भरींव दांडा. *v. t.* & *i.* to measure depth of sea, etc. and the quality of its bottom with the *sounding-line*; examine surgically; try to elicit the views of; (of fish) dive to the bottom. गळ टाकून (ची) खोली पाहणें, चा तळ तपासणें; सळई घालून तपासणें-पाहणें; युक्तीनें (मनांतलें) काढून घेणें, मन पाहणें; (देवमासा) तळापर्यंत बुडणें,-बुडी मारणें. *Sounding line,-apparatus,* पाण्याचा थांग पाहण्याची दोरी, गळ. *Sounding rod,* गलबताच्या तळाशीं आलेलें पाणी मोजण्याची काठी.

Sound'er, *n.* (सा'उन्डर्)—(*arch.*) herd of wild swine; a young wild boar; telegraph receiving instrument. रानडुकरांचा कळप; लहान रानडुकर; तार घेण्याचें यंत्र, ध्वनिजनक.

Sound'ings, *n. pl.* (सा'उन्डिंग्ज्)—depth of sea &c. taken with the lead, place near enough to shore to admit of sounding. समुद्राची वगैरे गळ टाकून काढलेली खोली, समुद्रकिनाऱ्यालगतची गळ टाकण्याजोगी समुद्राची खोली.

Soup, *n.* (सूप)—liquid food made by stewing bones, meat, vegetables &c. सागुतीचा रसा,

सूप. *In the s.,* (sl.) अडचणींत, संकटांत. *S. and fish,* (sl.) evening dress. संध्याकाळीं घालण्याचे कपडे. *S. gourd, n.* घोसाळें.

Sou'p con *n.* (सू'सॉं)—a dash or trace or tinge of (flavouring, quality, etc.). चुणूक, छटा, मागमूस. [F]

Sour, *a.* (सॉवर्)—tasting like unripe fruit or vinegar; (of bread) spoilt by fermentation, &c., harsh of temper, peevish or morose; (of soil) damp. आंबट, आंबटा, नासलेला; आंबलेला, आंबूस; तुसडा, खट्याळ, आंबट चेहऱ्याचा, चिडखोर; ओलसर, ओलाव्याची, पाणथळ. *v. t. & i.* to turn, make, sour (oft. *fig.*). आंबट करणें,-होणें; आंबणें; तुसडा-चिडखोर बनणें. *S.-dock,* common sorrel. आंबटचुका (भाजी). *Sourish, a.; Sour'ly, adv.; Sour'ness, n.* आंबटपणा, आंबटेपणा; तुसडेपणा.

Source, *n.* (सोअर्स्)—the place from which a stream issues; fountain-head; first cause, origin; place of origin. नदीचें उगमस्थान, उगम; मुख्य झरा; आदिकारण, मूळ; मूळस्थान, ठिकाण

Sourdine', *n.* (सुअर्डी'न्)—harmonium stop producing soft effect. वाजाच्या पेटीची कोमल सुरांची खुंटी.

Sour'-sop, *n.* (सॉवर्सॉप्)—a W.-Ind. fruit and tree. एक जातीचें फळ,-फळझाड.

Souse, *v. t. & i.* (साउस्)—to put in pickle; send or plunge into liquid, throw liquid over a thing. लोणच्यांत घालणें, मुरवणें; डुबकन बुडवणें, वर पातळ पदार्थ ओतणें. *n.* a plunge into liquid; sound of this; pickle made with salt. डुबकन् बुडणें; त्याचा आवाज; (डुकराचे कान, पाय, वगैरेंचें) लोणचें. *adv.* with swift descent, head-long. डुबकन, धाडकन्.

Soutane', *n.* (सूटा'न्)—long buttoned gown worn by R.-C. priests. रोमन कॅथोलिक उपाध्यायांचा लांब झगा.

South, *n.* (साउथ्)—the point of horizon directly opposite the north; point of compass opposite north. दक्षिण दिशा, दक्षिण; होकायंत्राचा दक्षिणाभिमुख कांटा. *a.* being in the south; facing south; coming from south. दाक्षिणात्य, दक्षिणेकडील; दक्षिणेकडचा, दक्षिणाभिमुख; दक्षिणेकडून येणारा. *adv.* towards or in the south. दक्षिणेस, दक्षिण-दिशेकडे. *v. i.* to move towards south, (of moon etc.) cross the meridian of a place. दक्षिणेकडे जाणें, दक्षिणेस फिरणें,-वळणें,-वळणें. *S. of,* च्या दक्षिणेस. *S. wind,* दक्षिणेकडील वारा. *South'down, a. & n.* साउथ् डाउन्स् (इंग्लंड) मधील उत्कृष्ट मेंढी. *S. sea,* (hist.) the Pacific. पॅसिफिक् महासागर. *S. Sea Bubble,* स्पॅनिश अमेरिकेशीं व्यापार करण्यासाठीं उभारलेली फसवी मंडळी; हिचा ऑफिस् १७२० त झाला. *S. pole,* दक्षिणध्रुव. *S.-ward, a., adv. & n.;-wards, adv. South'ron* (Sc., सद्रन्) a southerner or Englishman. दाक्षिणात्य, इंग्रज मनुष्य.

South'east, *n.* (सा'उथ्-ईस्ट्)—(abbr. S. E.) the region half way between and equally distant from the south and the east. आग्नेयी दिशा, आग्नेय. *a. & adv.* आग्नेयीचा.

South'-easter, *n.* (सा'उथ्-ईस्टर्)—(Also) souther (सा'उथर्), wind from SE. (south east). आग्नेय (दिशेचा) वारा. *S.-easterly,* towards or coming from the SE. आग्नेयीकडे, आग्नेयीकडील. *S.-eastern,* आग्नेयीचा, आग्नेय दिशेकडे. *S.-eastward,* towards the SE. आग्नेयीकडे. *S.-eastwardly,* in a south eastern direction. आग्नेयदिशेकडे,-दिशेनें. *S.-eastwards,* आग्नेयीकडे, आग्नेयीकडून.

Sou'therly, *a. & adv.* (स'दर्लि)—towards the south, coming from the south. दक्षिणेकडील, दक्षिणचा, दक्षिणाभिमुख, दाक्षिणात्य.

Sou'thern, *a. & n.* (स'दर्न्)—situated in the south. दक्षिणेचा. *S. cross,* a constellation. दक्षिणीय चातुष्पथ. *Southerner, n.* दाक्षिणात्य रहिवासी. *Southern wood, n.* दवणा, दमनक (सुवासिक वनस्पति). *Sou'thern-most, a.*

South'ing, n. (सा'उथिंग)—In vbl, senses; (esp. Naut.) difference of latitude made in sailing south. दक्षिणायन; (जहाजांतून) दक्षिणेकडे जात असतां अक्षांशांत होणारा फरक.

South'-west, *n.* (सा'उथ्-वेस्ट्)—(abbr. S. W.) the region half-way between and equally distant from the south and the west. नैर्ऋत्य. *S.-wester, n.* wind from S W; (usu. sou-wester) water proof hat. नैर्ऋत्येचा वारा; पर्जन्यनिवारक (साहेबी) टोपी.

Sou'venir, *n.* (सू'व्हेनिअर्)—a thing given or kept in memory of a person or place or event. आठवण म्हणून दिलेली किंवा ठेवलेली गोष्ट, आठवण, खूण.

Sŏv'ereign, *a.* (सॉ'व्ह्-रिन्)—supreme and exempt from external control; having supreme power; very good. श्रेष्ठ आणि स्वतंत्र, वरिष्ठाधिकारी, सार्वभौम; अचुक गुणकारी, रामबाण; श्रेष्ठ. *n.* a sovereign ruler; (abbr. *sov.*) British gold coin of £1. सार्वभौम राजा किंवा राणी; तक्ताधिपति राजा किंवा राणी; सोन्याचें १ पौंडाचें नाणें, सॉव्हरिन. *A s. remedy, a.* रामबाण उपाय. *Half s.,* १० शिलिंग किंमतीचें सोन्याचें नाणें.

Sŏv'ereignty, *n.* (सॉ'व्ह्-रिन्टि)—supreme power in a State; supreme excellence. अधिराज्य, सार्वभौमत्व, आधिपत्य; उत्कृष्टता, श्रेष्ठता.

Sŏviĕt', *n.* (सोव्हिए'ट्)—any of the councils elected by the workers and soldiers of a district in revolutionary Russia, or of a smaller number elected by these, or the all-Russian congress of delegates from the elected smaller number. रशियन राज्यक्रांतीनंतर कामकरी आणि सैनिक यांनीं निवडलेलें प्रांतिक मंडळ, प्रजा-लोक-सत्तावादी रशियांतील प्रतिनिधि-सभा. *Union of Soviet Socialist Republics,* (abbr. U. S. S. R.) रशियांतील लोकसत्तावादी राज्यसत्ता (लोकसत्तात्मक राज्य).

Sow, *v. t. & i.* (सो)—(*sowed, sown or sowed*), to scatter or plant seed for reproduction;

to propagate; (fig.) cover thickly *with*. धीं पेरणें; रुजत घालणें, पेरणी करणें; पसरणें, पेरणें, फैलाव करणें; वर जाड थर पसरणें. *You must reap what you have sown*, करावें तसें भरावें. *Sow'er, n.*; *Sow'ing, n.*

Sow, *n.* (सौ)—the female of the swine or hog, adult female pig; (*also s.-bug*) a wood-louse; main trough through which molten iron runs into side channels to form pigs, large block of iron that solidifies in this. डुकरी. डुकरीण; वाळवी, कीड; लोखंड वितळविण्याची मुख्य कढई,-पात्र. वितळलेल्या लोखंडापासून बनणारा मोठा ओतीव ठोकळा. *To get the wrong s. by the ear*, to fix on wrong person or thing, reach wrong conclusion. चोराला सोडून संन्याशाला सुळी देणें, भलतेंच-चुकीचें-अनुमान काढणें. *As drunk as a s.*, completely. यथेच्छ दारू प्यालेला, पूर्ण झिंगलेला. *S.-'back*, low ridge of sand etc. वाळवेचा सखल बांध,-कडा. *S.-'bread*, एक जातीचें फुलझाड.

Soy, *n.* (सॉय)—kind of sauce prepared chiefly in India, China, and Japan from *Soy bean* or-*pea*; the soy bean. वाटाण्याचें कालवण,-तोंडीं लावणें; एक प्रकारचा वाटाणा,-कडधान्य.

Spa, *n.* (स्पा)—a place resorted to for medicinal water. औषधी पाण्याचा झरा,-चें ठिकाण. [a place in Belgium]

Spāce, *n.* (स्पेस्)—extension, an interval between things; regions beyond ken; room available or required; a period or interval of time; (print.) blank between words etc., type securing this. विस्तार, क्षेत्र; जागा, अंतर, अवधि; आकाश, दिक्, शून्य; जागा, स्थळ; अवधि, मुदत; (शब्दांमधील) कोरी जागा, पूरक (टंक). *v. t.* to set at intervals, put spaces between; make a space between words on a typewriter etc. अंतरावर ठेवणें, अंतर ठेवणें; मधलें अंतर सारखें करणें, पूरक टाकणें; (शब्दांमध्यें) अंतर ठेवणें. *Space-time*, (philos.) a fusion of the concept of space and time. दिक्कालज्ञानैक्य, दिक्कालज्ञान. *Space-writer,-writing*, मजकुराच्या मोजणीवर मोबदला मिळविणारा लेखक,-लिखाण. *S.-bar*, bar in typewriter for making space. पूरक पट्टी. *To s. out*, (print.) (शब्दांमध्यें) अधिक जागा सोडणें, अधिक सुटे सुटे टंक जुळविणें, मध्यें पूरक टाकणें. *S.-less, a.*; *spa'cer, n.*

Spā'cious, *a.* (स्पे'शस्)—extended, having ample space; roomy. अघळपघळ; ऐसपैस; प्रशस्त, विस्तीर्ण; मोठ्या विस्ताराचा.-*ly, adv.*

Spāde, *n.* (स्पेड्)—a broad-bladed digging tool with long handle, an instrument of digging; tool of similar shape; playing card with black figure, (pl.) suit of these cards. कुदळ, खनित्र; कुदळीच्या आकाराचें हत्यार; (पत्त्यांतील) इस्पिकचें काळ्या ठिपक्यांचें पान,-चीं पानें. *v. t.* to dig over (ground), cut blubber from whale. कुदळीनें खणणें; देवमाशाची चरबी कापून काढणें. *To call a s. a s.*, स्पष्टपणें बोलणें, वाईटाला वाईटच म्हणणें, आडपडदा न ठेवतां खरें तें सांगणें. *S. husbandry*, (कुदळीप्रमाणें) जमीन खोल नांगरून केलेली मशागत. *S.-'ful, n.*

Spāde'-work, *n.* (स्पे'ड्-वर्क्)—preparatory work of an arduous kind. (कोणत्याहि धंद्यांतील) आरंभाचें कठीण काम.

Spădg'er,-g'ick, *nn.* (स्पॅ'जर,-जिक्)—(*sl.*) a sparrow. चिमणी.

Spā'dix, *n.* (स्पे'डिक्स्)—(*pl.-di'ces*) (Bot.) spike of flowers closely arranged round fleshy axis and usu. enclosed in a spathe. पोयमंजिरी, नारळाची किंवा पोफळीची पोय, केळफूल. *Spadi'ceous, Spad'icose, aa.* [L. f. Gk,=palm-branch]

Spā'do, *n.* (स्पे'डो)—(low) a person incapable of procreation. नपुंसक मनुष्य.

Spake, *pa. t.* of Speak.

Späll, *v. t. & i. & n.* (स्पाल्)—splinter, chip; (Mining) prepare (ore) for sorting by breaking it up. फोडणें, तुकडे-सळपे-करणें, (अशुद्ध धातु) फोडून टाकून वितळविण्यासाठीं तयार करणें. *Spal'der, n.*

Spălpeen', *n.* (स्पॅल्पी'न्)—(Ir.) a mean fellow; a youngster. क्षुद्र, हलकट मनुष्य, बच्चा, तरणा.

Spăn, *n.* (स्पॅन्)—full extent from end to end; the utmost distance between tips of thumb and little finger, nine inches; short distance or time; distance from support to support of an arch or roof; a yoke of oxen, an arch of a bridge; a pair of horses or mules. विस्तार, मर्यादा; वीत, नऊ इंच; थोडें अंतर; अल्पावधि; कमानीची किंवा छपराची गर्भा, (दोन टोकांमधील) पुलाची कमान; घोड्यांची किंवा बैलांची जोडी. *v. t.* to measure by hand-spans; (of bridge, roof, etc.) cross or cover, esp. with a single span; bridge (river etc.). वितीनें मोजणें, वितींत धरणें; वर कमान करणें; वर पूल बांधणें. *Our brief s. of life*, आपल्या आयुष्याची अल्प मर्यादा. *S. dogs*, a pair of iron bars with claws for grappling timber. इमारती लाकूड पकडण्याची लोखंडी कैची. *S. roof*, दुपाखी छप्पर. *S. worm*, एक जातीचा कीटक,-किडा.

Span, *pa. t.* of Spin.

Spăn'drel, *n.* (स्पॅ'न्ड्रल्)—space between either shoulder of arch and surrounding rectangular frame-work. कमान व तिजवरील चौकोनी चौकटींतील तिरपा भाग, तिरपा.

Spăng'le, *n.* (स्पॅं'गल्)—a small piece of glittering metal, a small sparkling object, (fig. of stars). टिकली, चमकी, भिंग-कांच-टिकली, चांदणी. *Oak-s*, ओक वृक्षाच्या अंगचा डिंक. *Spang'led, a.* चमक्यांचा, टिकल्यांचा, टिचक्या बसविलेला. *Spang'ly, a.* टिचक्यां-टिकल्यां-सारखा, चकचकीत.

Spăn'iard, *n.* (स्पॅ'न्यर्ड्)—a native of Spain. स्पेन देशाचा रहिवासी.

Spăn'iel, *n.* (स्पॅन्येल्)—kinds of large-eared long-haired dog; (fig.) fawning or cringing person. मोठ्या कानाचा केसाळ कुत्रा; लाळघोट्या, पुढें पुढें करणारा.

Spăn'ish, *a. & n.* (स्पॅनिश)—of Spain or the Spaniards or their language. स्पेन देशांतील, स्पेन देशांतील लोकांचा, त्यांच्या भाषेचा. *n.* स्पॅनिश भाषा. *S. Armada*, (hist.) स्पेनचें (अजिंक्य) आरमार. *S. fly*, पलित्तराचा किडा, स्फोटमक्षिका (हे किडे मद्यार्कामध्यें बुडवून वाळवतात व मग पलित्तराचे कामीं उपयोजितात). *S. wind-lass*, दोर किंवा पट्टी घट्ट आवळण्याकरितां योजिलेली लांकडी तरफ,-खुंटी. S. main, (hist.) N. E. coast of S. America, with the adjoining sea. दक्षिण अमेरिकेचा ईशान्य किनारा. व लगतचा समुद्र.

Spănk, *v. t. & i.* (स्पंक्)—to slap with the hand; go at a great pace. (ढुंगणावर) थापट मारणें; दामटणें, पिटाळणें, दौडणें. *n.* a slap. थापट, चापट. *Span'ker*, *n.* (esp.) a fast horse, or fine specimen of something; fore-and-aft suit on mizzen mast. जलद पळणारा घोडा; उत्कृष्ट नमुना; मागच्या डोलकाठीवरील शीड. *Spank'ing*, *a* excellent. उत्कृष्ट, सर्वोत्तम, फार.

Spăn'less, *a.* (स्पॅन् लिस्)—beyond measure (poet.). अगणित, विशाल.

Spăn'ner, *n.* (स्पॅनर्)—a gripping-tool for working nuts &c., a wrench. स्क्रू घट्ट पिळण्याची गावी, पकड, पाना.

Spär, *n.* (स्पार्)—a stout pole; kinds of crystalline mineral. वांसा, सोटा, डोलकाठी; खनिज द्रव्याचा पैलूदार खडा.

Spär, *v. i.* (स्पार्)—to box; strike out with the spurs; (fig.) engage in banter or repartee. मुष्टियुद्ध खेळणें, हातापिटी चालविणें; (कोंबड्यांचें) चोंचा मारून झुंजणें; भांडणें, तोंड सोडणें. *n.* a sparring motion, boxing match; cock-fight. हातपिटी, मुष्टियुद्ध; कोंबड्यांची झुंज.

Spāre, *v. t. & i.* (स्पेअर्)—to abstain from hurting or destroying, be frugal or grudging of; to let off, to dispense with; to find (time, &c.); to let a person have (a thing, &c.) out of one's superfluity; be frugal; abstain from inflicting. दया दाखवणें, वांचवणें, काटकसर करणें, कमताई करणें; गरज करणें; सुखानें देणें, गैरसोय न होतां देणें; (वेळ) सांपडणें; वांट्याला येणें; दुसऱ्याला (शिलकींतून) देतां येणें,-देणें,-देऊं शकणें; काटकसर करणें, शिलक ठेवणें; माफ करणें, क्षमा करणें. *a.* superfluous; kept in reserve; frugal; lean. फालतू, अधिक; शिलकी; अपुरा; थोडा, बेताचा; कृश, रोड. *n.* a spare part for substitution in machine. (शिलकी) सुटा भाग. *S. the rod and spoil the child*, 'छडी लागे छम छम, विद्या येई घम घम.' *S. me*, माझा जीव घेऊं नको, मला मारूं नको. *S. diet*, अल्प आहार. *S. time*, फुरसतीचा वेळ. *A s. cap*, जादा टोपी. *A s. room*, bed-room for visitor. पाहुण्यांची निजावयाची (वेगळी-जादा-) खोली. *S. rib*, कमी मांस चिकटलेलीं डुकराचीं बरगडीचीं हाडें. *Spare'ly*, *adv.* काटकसरीनें, कमताईनें. *Spare'ness*, *n.* रोडपणा, कृशता. *Sparingly*, *adv.* हात राखून. *Sparingness*, *n.*

Spärk, *n.* (स्पार्क्)—fiery particle of burning substance; a small bright object or point; (e. g. in gem); (*fig.*) brilliant emanation of wit etc.; (Electr.) flash of light between two neighbouring electric conductors; a gay young fellow. विस्तवाची ठिणगी, तेजोकण; तेज, चमक, पाणी; चातुर्याची-बुद्धीची-चमक; विद्युत्-स्फुलिंग, विजेची ठिणगी; नखरेबाज मनुष्य, रंगेल प्राणी, प्रणयी. *v. i. & t.* to emit sparks; apply electric spark to, ignite or affect thus; play the gallant. ठिणग्या निघणें,-पाडणें; विद्युत्स्फुलिंग लावणें, विजेच्या ठिणगीनें पेटणें; विद्युत्स्फुलिंग निघणें; रंगेल बनणें, प्रणयचेष्टा करणें. *As the ss. fly upward*, with the certainty of a law of nature. निसर्गनियमाप्रमाणें (खात्रीलायक), निश्चित निसर्गनियमानुसार. *A s. of generosity*, औदार्याचा कण, -लवलेश. *Sparks*, (nickname for) a wireless operator. बिनतारी संदेश पाठविणारा. *Fairy ss.*, कुजलेल्या वनस्पतींपासून निघणारे फॉस्फरस-स्फुलिंग, -ठिणग्या, प्रकाश. *Spark'ing-plug*, a device for firing explosive mixture in motor-engine. (स्वयंप्रेरितयंत्रांतील) विद्युत्स्फुलिंगोत्पादक खुंटी,-दट्ट्या, -साधन. *Spark'less*, *a.*; *Spark'let*, *n.*; *Spark'ish* *a.* रंगेल, प्रणयी.

Spär'kle, *v. t.* (स्पा'र्कल्)—to seem to emit sparks; to be bright with shifting points of light, (of gem, *fig.* of wits) glitter, glisten. ठिणग्या निघणें; ठिणग्या टाकणें,-ओकणें; लुकलुकणें, लिकलिकणें; चमकणें, तकतकणें, चमक असणें. *n.* spark, sparkling, gleam. लहान ठिणगी, तेजःकण, चकाकी, तेज, चमक, लकलकाट. *Sparkling wines*, फसफसणारी-बुडबुडे येणारी,-दारू. *Spark'ler*, *n.*; *Spark'lingly*, *adv.*; *Spark'let*, *n.* a small spark; least possible amount *of* a quality. लहान ठिणगी,-स्फुलिंग; चा अत्यल्पांश.

Spă'rrow, *n.* (स्पॅ'रो)—a small bird haunting houses. चिमणी; चिमणा. *Cock s.*, चिमणा. *Hen s.*, चिमणी. *S.-hawk*, लहान बहिरी ससाणा.

Spärse, *a.* (स्पार्स्)—(of population etc.) thinly scattered; (Bot., Zool.) placed, occurring, at irregular intervals. पातळ, तुरळक; विरलस्थ, तुरळक होणारा, अंतरावर होणारा. *Sparse'ly*, *adv.* तुरळकपणें, दूर दूर. *Sparse'ness*, *n.* तुरळकपणा, विरळपणा.

Spärt'an, *a. & n.* (स्पा'र्टन्)—(a native) of Sparta. ग्रीसमधील स्पार्टाचा (रहिवासी), स्पार्टन लोकांप्रमाणें निर्भय, शूर, साधा इ०

Spa̋'sm, *n.* (स्पॅझम्)—convulsive muscular contraction; violent excess of emotion. स्नायूचें आकुंचन, पेटका, वेग; झटका, लहर.

Spa̋smŏd'ic, *a.* (स्पॅझमॉडिक्)—sudden and violent; intermittent. झटक्यांनीं येणारा; पेटक्यांचा, मधून मधून येणारा,-उसळी मारणारा.-*ally, adv.*

Spa̋'stic, *a.* (स्पॅस्टिक्)—*S. paralysis,* (med.) (पायांवरून वारा गेल्यामुळें किंवा पायांच्या स्नायूंवर ताबा न राहिल्यामुळें) झोंका इकडे तिकडे जाणें.

Spa̋t, *n.* (स्पॅट्)—spawn of shell fish. कालवाच्या जातीच्या माशांचीं अंडीं,-वीण. *v. i. & t.* (माशाचीं) अंडीं घालणें,-टाकणें. 2. (abbr. of *spatterdash*) लहान पायचंद.

Spa̋t, *pa. t.* of Spit.

Spa̋tch'cŏck, *n.* (स्पॅच्कॉक्)—a fowl killed and cooked in a hurry. ठार मारून घाईघाईनें शिजविलेलें कोंबडें. *v. t.* to cook thus; insert (item of news etc.) in middle of something. घाईघाईनें (शिजविणें); (बातमी वगैरे) मध्येंच घुसडविणें.

Spāte, *n.* (स्पेट्)—a sudden river flood (esp. *river is in s.*), नदीला आलेला आकस्मिक

Spāte, *n.* (स्पेट्)—(bot.) नारळाची किंवा सुपारीची पोय.

Spā'tial, *a.* (स्पेशल्)—of or in or relating to space. स्थलाचा, दैशिक, मर्यादेचा. *S. relation,* दैशिक संबंध. *Spatial'ity, n.* दैशिकता. *Spa'tially, adv.*

Spa̋tt'er, *v. t. & i.* (स्पॅटर्)—to fly or send (mud, &c.) flying in drops or splashes. splash (person) thus, besprinkle. शिंतोडे उडविणें, शिंपडून डाग पाडणें, शिंतोडे,-ठिपके,-पडणें. *n.* splattering, splash, pattering. शिंतोडे टाकणें, -उडवणें, शिंतोडा, टप् टप् आवाज. *S.-dash,* (now usu. *spat*) a gaiter. पदबंध. *S.-dock,* (U. S.) the yellow water-lily. पिंवळें कमळ.

Spa̋t'ūla, *n.* (स्पॅट्युला)—an instrument with edgeless blade for working pigments, etc.; surgeon's instrument for pressing tongue down or to one side. (रंग, मलमाचीं औषधें वगैरे मिसळण्याच्या कामाची) बोथट सुरी; जीभ खालीं किंवा बाजूला दाबून धरण्याचें हत्यार.

Spa̋t'ule, *n.* (स्पॅट्युल्)—(Zool.) broad racket-shaped formation or part, esp. end of bird's tail-feather. पक्ष्याच्या शेंपटीच्या पिसाऱ्याचें रुंदट टोंक,-भाग. *Spat'ular,-tulate,-tuliform, aa.*

Spa̋v'in, *n.* (स्पॅव्हिन्)—kind of tumour on horse's leg causing lameness. घोड्याच्या पायावरचें वारूळ.-*ed, a.*

Spawn, *n.* (स्पॉन्)—eggs of fish, frogs, molluscs, &c. when ejected; (contempt.) progeny; white fibrous matter from which fungi are produced. मासे, बेडूक वगैरे प्राण्यांचीं अंडीं; पोरें, संतति; (अळंबी जातींतील) नग्न बीज. *v. t. & i.* अंडीं घालणें, जन्म देणें, उत्पन्न होणें.

Spāy, *v. t.* (स्पे)—to castrate, remove ovaries of (female animal). (जनावरांतील मादीचा) अंडाशय काढून टाकणें.

Speak, *v. i. & t.* (स्पीक्)—(*Spoke,* arch. *Spake; Spoken*), to utter words in the ordinary way; say something; hold conversation (*with, to,* person, *of, about,* thing); deliver speech; utter (words); make known thus; use (a language) in speaking; hail and hold communication with (a ship); show (person) to be (so-and-so); be evidence of; (of fact) be significant; (of dog) bark when ordered; (*fig.*) sound; (*p. p.;* as stage direction) to be said, not sung. बोलणें; बोलून दाखविणें; बोलणें, संभाषण करणें, चर्चा वाद-विवाद-करणें; (जाहीर-प्रकट) भाषण करणें; (शब्द) उच्चारणें,-काढणें; बोलून वर्णन-उल्लेख,-करणें; (भाषा) बोलतां येणें, (भाषेंत) बोलणें, समजणें; जहाजाच्या कप्तानाशीं खुणांनीं बोलणें; दर्शविणें, सुचविणें; चा पुरावा असणें; सूचक,-दर्शक,-असणें; (हुकमाप्रमाणें) भुंकणें; वाजणें, फुंकणें; बोलून दाखविण्याचा (नाटकांतील भाग). *The portrait speaks,* is life-like. तसबीर अगदीं हुबेहूब (उतरली) आहे. *S one's mind,* मनांतले विचार स्पष्टपणें बोलून दाखविणें. *He cannot s. French,* त्याला फ्रेंच भाषा बोलतां येत (समजत) नाहीं. *Strictly speaking,* खरें बोलायचें म्हणजे, तसेंच म्हटलें तर. *So to s,* if I may use such an expression. असें म्हणतां आलें तर. *To s. volumes, (for),* चा भक्कम पुरावा देणें,-साक्ष देणें. *To s. (person) fair,* सौम्य -सभ्य-शब्द वापरणें. *S. for,* च्या वतीनें बोलणें; च्या भावना दर्शविणें. *S. of,* (चें) नांव घेणें, (चा) उल्लेख करणें. *Nothing to s. of,* सांगण्याजोगें कांहीं नाहीं, तथ्यांश-वस्तुतः-कांहीं नाहीं. *S. out, S. up.,* स्पष्ट बोलून दाखविणें, मोठ्यानें बोलणें. *S. to,* (शीं) बोलणें; ची साक्ष देणें, (च्या संबंधीं) विवेचन करणें. *S. up, (out),* मोठ्यानें बोलणें. *S. without book,* give facts from memory. (स्मरणशक्तीच्या बळावर) तोंडी कथन करणें. *Speak'easy, n.* (U. S.) an illicit bar. चोरटें दारू -दुकान.

Speak'er, *n.* (स्पीकर्)—one who speaks, (esp.) person of specified skill in speech-making; official president of House of Commons. वक्ता; लोकसभेचा अध्यक्ष, इंग्लंडमधील कॉमन्ससभेचा अध्यक्ष. *-ship, n.*

Speak'ies, *n. pl.* (स्पीकीज्)—(sl.) acted plays as opp. *Movies.* नाटकें (रंगभूमीवर नटांनीं केलेलीं).

Speak'ing, *n.* (स्पीकिंग्)—In vbl. senses; *S. acquaintance,* बोलणें चालणें, तोंडओळख. *Not on s. terms,* अबोला आहे, बोलणें चालणें नाहीं. *S. trumpet,* दूरध्वनिक्षेपक कर्णा. *S. tube,* एका खोलींतून दुसऱ्या खोलींत बोलण्याची नळी, संभाषणनलिका.

Spear, *n.* (स्पिअर्)—hunter's or foot-soldier's thrusting or hurling long pointed weapon; (poet.) a spear-man; sharp-pointed instrument for stabbing fish etc. भाला, बरची; भालेकरी,

भालाईत; तीक्ष्ण धारेचें शस्त्र. *v. t. & i.* to pierce or wound with spear; shoot into a long stem. भाल्यानें भोंसकणें,-टोंचणें,-जखमी करणें; लांब देठ, -दांडा-येणें. *S.-man,* भालेकरी, भालाईत, बरचीवाला (सैनिक). *S.-mint,* common garden mint. पुदिना (वनस्पति). *S.* side, पुरुषाकडचा वंश.

Spec, *n.* (स्पेक्)—(colloq.) speculation. सट्टा, अंदाजी धाडशी व्यवहार.

Spe'cial, *a.* (स्पे'शल)—of a peculiar or restricted kind; of or for a particular person, purpose, occasion or thing; (also *especial*) exceptional amount, degree, etc. विशेष; विशिष्ट, खास, विवक्षित, मुद्दाम केलेला,-नेमलेला; विशिष्ट, मनस्वी. *n.* a special edition, train, constable, etc. खास अंक,-आवृत्ति, वधारो, खास गाडी, मुद्दाम नेमलेला मनुष्य. *S. anatomy,* विशिष्ट (अवयवांचें) शारीर (शास्त्र). S. *hospital,* विशिष्ट रोगांचें रुग्णालय. *S. agents,* खास प्रतिनिधि -मुनीम,-कारभारी. *S. case,* written statement of facts submitted by litigants to court; exceptional case. कोर्टापुढील लेखी कैफियत; अपवादात्मक गोष्ट. *S. constable,* a private person sworn in to assist in maintaining public peace in case of riot etc. जादा अधिकारी. *S. edition,* वर्तमानपत्राची जादा आवृत्ति, खास अंक. *S. pleading,* (Law) (प्रतिपक्षाचे मुद्दे खोडून न काढतां) विशिष्ट-जादा-मुद्दे पुढें आणणें, नवीन मुद्दे पुढें मांडणें; (pop.) अघळपघळ परंतु अप्रशस्त मुद्दा, सत्यान्वेषणापेक्षां बोलणाऱ्याच्या म्हणण्याला दुजोरा देणें. *S. train,* खास आगगाडी (विशिष्ट कारणाकरितां). *Spe'cially, adv.* विशेषेंकरून, मुख्यतः, मुद्दाम, बुद्ध्या.

Spe'cialist, *n.* (स्पे'शलिस्ट)—person devoting himself to a single branch of his profession or subject. विद्येच्या एखाद्या विशिष्ट शाखेंत प्रवीण, विशेष व्यासंगी, तज्ज्ञ, पंडित. *Spe'cialism, n.* विशिष्ट व्यासंग, तज्ज्ञता, तरबेजपणा. *Specialis'tic, a.*

Speciăl'ity, *n.* (स्पेशिॲ'लिटि)—special characteristic, specialness; distinctive quality. वैशिष्ट्य, विशेष काम, विशेष गुण.

Spe'cialize, *v. t. & i.* (स्पे'शलाइझ्)—to make special; to be a specialist; adopt for a particular purpose. विशिष्ट करणें, विशिष्टरूप देणें; तज्ज्ञ होणें, चा विशेष व्यासंग करणें; विशिष्टीकरण करणें, विशिष्ट कार्याकडे लावणें. *Specializa'tion, n.* विशिष्टीकरण; विशिष्टीभवन; विशेष व्यासंग.

Spe'cialty, *n.* (स्पे'शल्टि)—(Law) sealed contract, instrument under seal; a speciality. कायदेशीर करार; आवडता धंदा, आवडीचा विषय, विशेष माल.

Spe'cie, *n.* (स्पी'शिई, स्पी'शी)—money in the shape of coin, metallic money. रोकड पैसा, नाणें, नगदी ऐवज, सोनेंनाणें.

Spe'cies, *n.* (स्पी'शिईझ्,-शीझ्)—(Logic) a class of things having some common characteristics; a subdivision of a genus; a sort, kind, variety; form, shape. उपजाति, जाति, जात; पोटजाति, वर्ग; प्रकार, जाति; आकार.

Specif'ic, *a.* (स्पिसि'फिक्)—definite, distinctly formulated; possessing, concerned with, the properties that characterize a species; peculiar; relating to a particular subject. ठाम, निश्चित, विशिष्ट प्रकारचा, ठराविक उपजातिवाचक; विशिष्ट; विशिष्ट-विषयाचा,-बाबींचा. *n.* a specific or infallible remedy. रामबाण औषध,-इलाज. *S. gravity,* विशिष्ट गुरुत्व. *S. heat,* विशिष्ट उष्णता. *S. weight,* विशिष्ट भार. *S. cause,* producing a particular form of disease. विशिष्टरोगकारण. *S. medicine,* रामबाण औषध, हटकून गुणकारी इलाज,-औषध. *Specif'ically, adv.* विशेषतः, हटकून. *Specifi'city, Specif'icness, nn.*

Specifica'tion, *n.* (स्पेसिफिके'शन्)—specifying; any or all of the details specified in a contract or patent; (Law) working up of materials into a new product not held to be the property of the owner of the materials. तपशीलवार लिहिणें, -बोलणें,-सांगणें; खुलासेवार टांचण, (खास हक्क घेणारानें दिलेलें) नवीन पेटंटचें वर्णन; अविवादिक अशा नवीन वस्तूची निपज,-वस्तु बनविणें.

Spe'cify, *v. t.* (स्पे'सिफाय्)—to make specific or definite, to state precisely; to mention expressly; to give the name of. तपशीलवार सांगणें; विशेष वर्णन करणें; विशेष नामनिर्देश करणें. *Spe'cified, pa. t. & pa. p.: a.* विशिष्ट, खास, खुलासेवार सांगितलेला. *Spe'cifiable, a.*

Spe'cimen, *n.* (स्पे'सिमिन्)—an individual animal, or plant or piece of a mineral etc. used for scientific examination; a sample; (colloq. contempt.) (*what a s.*) a person. नमुना, मासला; बानगी; मनुष्य, प्राणी. *Specimens of copper ore,* अशुद्ध ताम्र-धातूचे नमुने. *S. page,* नमुन्याचें पान.

Speciol'ogy, *n.* (स्पीशिऑ'लजि)—science of species. उपजात्युद्गमशास्त्र.*-logical, a.*

Spe'cious, *a.* (स्पी'शस्)—fair-seeming; plausible, colourable. दिसण्यांत चांगला; दिखाऊ, वरवडीचा, वरपांगी, सत्याभासाचा. *S. argument, tale, appearance,* (दिसण्यांत खरें)-लाघवी भाषण, खरी भासणारी गोष्ट, वरपांगी देखावा.*-ly, adv.* दिखाऊपणानें, सत्याभासपूर्वक.*-ness, n., Speciosity, n.*

Speck, *n.* (स्पेक्)—a small spot or stain or particle, a blemish, a flaw. ठिपका, डाग, चिन्ह, लासें, (डोळ्यांतील) फूल, डाग, व्यंग. *v. t.* to mark with specks. वर डाग पाडणें. *Specked, pa. p.* डाग पडलेला; ठिपक्यांचा. *Speckless, a.*

Spe'ck, *n.* (स्पे'क्)—(U. S. & S. Afr.) fat meat, bacon, pork; fat of seals, etc. मांस; (माशांची) चरबी.

Spec'kle, *n.* (स्पे'कल्)—a small spot esp. as natural marking on skin, &c. (कातडीवरील) ठिपका, डाग, ठिकें. *v. t.* to mark thus. ठिपके पाडणें, चित्रविचित्र,-ठिपकेदार,-करणें. *Speckled, pa. p.* ठिपकेदार, चित्रविचित्र.

Spĕcs, *n. pl.* (स्पेक्स्)—(colloq.) pair of spectacles. चष्मा, उपनेत्र.

Spĕc'tacle, *n.* (स्पे'क्टकल्)—a public show or noteworthy scene; (*pl.*) pair of lenses to correct or assist defective eyesight (set in a frame). अपूर्व देखावा, अपूर्व गोष्ट, तमाशा, खेळ, प्रदर्शन, देखावा; (अने०) चष्मा, उपनेत्र, आरशी, चाळशी. *Sure to make a s. of himself*, स्वतःचें प्रदर्शन -स्वतःची शोभा-खात्रीनें करून घेईल. *A pair of ss.*, चष्मा. *To see everything through rose-coloured ss.*, take a cheerful view. आशाजनक अनुमान काढणें,-बांधणें. (Crick.) *pair of ss.*, दोन पूज्यें, -भोपळे-(धांवा). *Spec'tacled, a.* चष्मा लावलेला, -लावणारा; चष्म्यासारखे ठिपके असलेला. *S. bear*, द. अमेरिकेंतील अस्वल.

Spĕctăc'ūlar, *a.* (स्पेक्टॅ'क्युलर्)—of the nature of a show. मौजेचा, पाहण्यालायक, थाटामाटाचा.*-ly, adv.*

Spĕctā'tor, *n.* (स्पेक्टे'टर्)—a looker-on; a person present at a performance, an eye-witness. (मौज) पाहणारा, प्रेक्षक, तमासगीर, बघ्या, साक्षी. *The s.*, वर्तमानपत्राचें नांव. *Spectatress, n. f.* स्त्री प्रेक्षक.

Spĕc'tral, *a.* (स्पे'क्ट्रल्)—ghost-like; unreal; of the spectrum. भुतासारखा, भुताचा, समंधाचा; असत्य; विच्छिन्नकिरणासंबंधीं, वर्णपटदर्शकासंबंधीं. *-trally, adv.*

Spĕc'tre, *n.* (स्पे'क्टर्)—a ghost; fear of an expected calamity. भूत, समंध, पिशाच, छाया; पुढें येणाऱ्या संकटाबद्दल भीति,-धास्ती. *S. bat, lemur*, किडकिडीत वाघूळ, माकड, इ. *S. of the Brocken*, पर्वतशिखरावरील धुक्यावर पडलेली प्रेक्षकाची भव्य छाया.

Spectro-, (स्पेक्ट्रो-)—in comb., Spectrum, *Spectrograph*, वर्णपटलेख, विच्छिन्नकिरणलेख. *Spectrology*, किरणद्वारा पृथक्करण प्रकरण. *Spectrom'eter*, वर्णपटमापक, विच्छिन्नकिरणमापक,-यंत्र. *Spec'troscope, n.* विच्छिन्नकिरणदर्शक; रक्ताची परीक्षा करण्याचें यंत्र; *-co'pic, a.* विच्छिन्नकिरणदर्शकाचा,-दर्शकानें दाखविलेला.

Spĕc'trum, *n.* (स्पे'क्ट्रम्)—(pl.*-ra*) the image of something seen continuing when the eyes are closed or turned away; the coloured bond into which a beam of light is decomposed. डोळे मिटले किंवा बाजूला वळविले असतां चालू राहिलेली दृष्टीपुढील छाया, प्रतिकृति; विच्छिन्न किरण, वर्णपट. *S.* (or *spectral*) *analysis*, वर्णपटात्मक पृथक्करण, विच्छिन्नकिरणद्वारा पृथक्करण.

Spĕc'ūlar, *a.* (स्पे'क्युलर्)—of the nature of a speculum, reflecting. आरशासारखा बिंबग्राही, परावर्तक. *S. surface*, आरशाप्रमाणें प्रतिबिंब पडणारा पृष्ठभाग.

Spĕc'ūlāte, *v. i.* & *t.* (स्पे'क्युलेट्)—to indulge in thought of a conjectural theoretical kind; to buy and sell stocks or goods in the hope of profiting by changes in market value, to deal in transactions of a risky kind. एखाद्या गोष्टीचा विचार किंवा तर्क करीत बसणें, कल्पना चालवणें, तर्क बांधणें, उपपत्ति लावणें; सट्टा करणें, साटें ठरविणें, सट्टेबाजी करणें, जुगार खेळणें.*-tion, n.* अनुमान करणें, उपपत्ति लावणें; अनुमान, तर्क, कल्पना, अंदाज; सट्टा, जुगार; साटें.*-tor, n.* उपपत्ति बसविणारा, अनुमानें काढणारा; जुगाऱ्या, सट्टेबाज.*-tive, a.* कल्पना करीत बसणारा; केवळ सिद्धांतात्मक, तात्त्विक; अव्यवहार्य; सट्ट्याचा, सट्टेबाजीचा;*-tively, adv.*;*-tiveness, n.*

Spĕc'ūlum, *n.* (स्पे'क्युलम्)—(*pl.*-la) (surg.) an instrument for dilating orifices to facilitate examination; a mirror used for some scientific purposes. शरीराचे भाग तपासण्याचें एक प्रकारचें यंत्र, ईक्षणयंत्र; शास्त्रीय उपकरणाचा आरसा. *S. metal*, (तांबें आणि कथिल) यांच्या मिश्रणापासून केलेली) आरसा करण्याची धातु.

Sped, *pa. t.* & *pa. p.* of Speed.

Speech, *n.* (स्पीच्)—faculty of speaking; a spoken remark, thing said; particular language (of a nation); public address; sounding quality of organ-pipe *etc.* वाणी, वाचा, वाचाशक्ति; बोलणें, भाषण, विचार, शब्द; (देश-) भाषा, बोली; जाहीर भाषण; नादकारकता, नाद. *A set s.*, आगाऊ तयारी करून केलेलें भाषण. *To make a s.*, भाषण करणें. *King's* or *Queen's s.*, *s. from the throne*, आपण स्वतः किंवा प्रतिनिधीमार्फत, पार्लमेंटच्या (लोकसभेच्या) पहिल्या बैठकीच्या वेळीं राजाचें किंवा राणीचें भाषण. *Figure of s.*, अलंकार. *Parts of s.*, व्याकरण दृष्ट्या शब्दांच्या जाति (नाम, सर्वनाम, इ.). *S. reading*, ओठांच्या हालचालीवरून बहिऱ्यामुक्यांना होणारा अर्थबोध. *S. day*, annual day for delivering prizes in schools usu. marked by recitations *etc.* शाळेचा वार्षिक बक्षिससमारंभ.

Speech'ifȳ, *v. t.* (स्पी'चिफाय्)—(contempt.) to make speeches; hold forth oratorically in conversation. लांबलचक भाषण करणें; वक्तृत्व दाखविणें.*-fica'tion, n.* लांबलचक,-जाहीर,-भाषण करणारा, वक्ता.

Speech'lĕss, *a.* (स्पी'च्लिस्)—dumb; temporarily deprived of speech by emotion etc.; (*sl.*) dead drunk. मुका, मोना; स्तब्ध, कुंठितवाक्, बोलवेनासा झालेला; खूप दारू प्यालेला, झिंगलेला.

Speed, *n.* (स्पीड्)—dispatch, rapidity of movement; relative pace of motion or action; (arch.) success, prosperity. त्वरा, जलदी; वेग, गति; यश, भरभराट, सुदैव. *v. i.* & *t.* (*sped*), to go fast; smooth the way of; give prosperity or success to; send fast; (*pa. t.* & *pa. p. speeded*) to regulate speed of (engine etc.); cause to go at fixed speed. जोरानें जाणें,-चालणें; सुलभ करणें; ला यश किंवा हात देणें; वेगानें सोडणें; ची गति कमीजास्त करणें; ठराविक गतीनें चालविणें. *At full s.*, भरधांव, अतिवेगानें. *To s. up*, cause to work at greater

s. अधिक वेगानें चालविणें. *Speed'er*, *n.* (यंत्राची) गति कमी जास्त करण्याची कळ, गतीची चावी.

Speedŏm'eter, *n.* (स्पीडॉमिटर्)—speed-indicator in a motor-car etc. (मोटरगाडींतील) गतिमापक घड्याळ.

Speed'-trap, *n.* (स्पी'ड्ट्रॅप्)—a trap to catch speeding motorists. भरधांव मोटारहांकयांना पकडण्याचें साधन.

Speed'way, *n.* (स्पी'ड्वे)—course for fast driving of horses, or motorcars. (घोडे किंवा मोटारी) भरधांव चालविण्याचा रस्ता.

Speed'well, *n.* (स्पी'ड्वेल्)—a blue-flowered plant. निळ्या फुलांचें फुलझाड.

Speed'y̆, *a.* (स्पी'डि)—prompt, expeditious, quick in performance; quick. त्वरित; चपळ, वेगवान; तात्कालिक, तत्पर.*-ily, adv.*;*-iness, n.*

Spēlae'an, *a.* (स्पीलि'अन्)—of, dwelling in, caves गुहांचा, गुहांमध्यें राहणारा, विवरस्थ.

Spĕll, *n.* (स्पेल्)—words used as charm; fascination exercised by person or thing; turn of work; time devoted to or taken by something; (Austral.) a period of rest from work etc. मंत्र; जादू, मोहनी, आकर्षक शक्ति; पाळी, खेप; अवधि, क्षण, वेळ; विश्रांतीचा काळ, सुटी. *v. t. & i.* to write or name the letters of (a word), to read with difficulty, spell words correctly; (of letters) make up or form (word); (*fig.*) have as necessary result, involve. (शब्दाचें) वर्ण लिहिणें,-उच्चारणें, अडखळत वाचणें; वर्ण बरोबर सांगणें; शब्द होणें,-बनणें; (अंत) शेवट होणें, परिणाम होणें, भोगावें लागणें. *Under a s.*, mastered by or as by a s. मंत्र-मुग्ध. *Spell'binder*, (U. S.) a political speaker who can hold audiences spell-bound. (श्रोत्यांना वाक्प्रभावानें) भारून टाकणारा वक्ता. *To s. out* or *over*, एक एक अक्षर टाकून अडखळत वाचणें. *To s. backward*, उलटें लिहिणें,-वाचणें; (*fig.*) अर्थविपर्यास करणें, भलताच अर्थ करणें. *These changes s. ruin to the farmer*, ह्या फरकांमुळें शेतकरी ठार बुडणार (पुरा नाश पावणार) सें दिसतें. *Spelt, Spelled, pa. t. & pa. p.*

Spĕll'bound, *a.* (स्पे'ल्-बाउन्ड्)—held with attention as by a spell. जादूनें भारल्याप्रमाणें असलेला, भारलेला; स्तब्ध, तटस्थ.

Spĕll'ing, *n.* (स्पे'लिंग्)—In vbl. senses. वर्णरचना. *S. bee*, शब्दाच्या वर्णरचनेनें,-ची चढाओढ. *S.-book*, वर्णरचना-शिक्षिका.

Spelt, (स्पेल्ट्)—*pa. t. & pa. p.* of Spell. 2. German wheat. जर्मन गहूं.

Spĕl'ter, *n.* (स्पे'ल्टर्)—zinc. जस्त.

Spĕn'cer, *n.* (स्पे'न्सर्)—short over-coat. बंडी.

Spen'cerism, *n.* (स्पे'न्सरिझम्)—doctrine of Herbert Spencer referring the ordererd universe to the necessary laws of mechanics, synthetic philosophy. (हर्बर्ट स्पेन्सरचा) यांत्रिकपरिणामवाद (जगाची सुव्यवस्थित रचना यांत्रिक नियमानुसारी आहे हा सिद्धांत.)

Spent, *pa. t. & pa. p.* of Spend.

Spĕnd, *v. t. & i.* (स्पेन्ड्)—(*spent*), to pay out (money), to expend or use up; exhaust, wear out; (Naut.) lose (mast); emit spawn; be consumed; to pass in some place or occupation. खर्चणें, वेंचणें, दवडणें, घालवणें; शांत करणें,-होणें, निरवणें, निवणें; (डोलकाठी) मोडणें; अंडीं टाकणें,-घालणें; पडून जाणें, खपणें, सरणें. *Spent, pa. p.* exhausted. खर्चलेला, खपलेला; शिणलेला, भागलेला. *Spend'able a.*; *Spend'er, n.*

Spĕnd'thrift, *n.* (स्पे'न्ड्-थ्रिफ्ट्)—a person who wastes his money. उधळ्या, उधळपट्टी करणारा, दिवाळखोर.

Sperm, *n.* (स्पर्म्)—semen, seminal fluid. वीर्य, बीज, शुक्र, रेत. *S.-'cell*, शुक्रगोलक,-कण,-बिन्दु *S. whale*, a whale yielding spermaceti. डोक्यांत पांढऱ्या चरबीसारखा पदार्थ असणारा व्हेल,-देवमासा.

Spermacē'ti, *n.* (स्पर्मसी'टि)—white brittle fatty substance got from head of sperm-whale. (एक जातीच्या) व्हेल (देव) माशाच्या डोक्यांतील चरबीसारखा पांढरा ठिसूळ पदार्थ.

Spermăt'ic, *a.* (स्पर्मॅ'टिक्)—of sperm. वीर्याचा, बीजाचा, रेताचा, शुक्रकर, बीजासंबंधाचा.

Spermat'o-, (स्पर्मॅटो-)—in comb. & sperm. शुक्र-, वीर्य-. *Spermatogen'esis*, *n.* शुक्रजन्तूत्पत्ति. *Spermatorrhoe'a*, (-रि'आ), involuntary spermatic emission. नकळत वीर्यस्खलन,-वीर्यस्राव. *Spermatozo'on*, (pl.-zoa), fertilizing filament in semen. शुक्रजन्तु, रेतांतील जन्तु.

Spew, Spue, *v. t. & i.* (स्प्यू—(vulg.) to vomit; (of gun) droop at muzzle from too quick firing. ओकणें, वांति करणें,-होणें; (बंदूक) तोंडाजवळ वांकणें.

Sphăg'num, *n.* (स्फॅ'ग्नम्)—(pl.-*na.*) (Bot. kinds of moss growing in bogs and peat, used as packing, etc. (दलदलीच्या भागांत वाढणारें) एक प्रकारचें शेवाळी गवत,-रान.

Sphē'noid, *a. & n.* (स्फी'नाइड्)—(anat.) wedge-shaped (*bone*), compound bone at base of skull. शीर्षतलास्थि.*-al, a.* [Gk *sphen*, wedge]

Sphere, *n.* (स्फिअर्)—a solid figure having all points of its surface equidistant from a point within it; ball, globe; a globular body; field of action or province or scope; (poet.) the heavens, the sky. गोल, मंडळ, वर्तुळ, चेंडू, चेंडूच्या आकाराची वस्तु, गोल, ग्रह; प्रांत, कामाचा टप्पा, आटोका, अधिकार; आकाश. *v. t.* to enclose as in sphere, make s.-shaped; (poet.) exalt to the celestial s. वेढणें, वेष्टणें; गोलाकार करणें; स्वर्गीय स्थान देणें. *Music of the ss.*

ग्रहसंगीत. *Celestial s.,* surface on which heavenly bodies appear to lie. खगोल. *Sphe'rule, n.* small sphere (poet.). लहान गोल. *Spher'y, a.*

Sphĕ'rical, *a.* (स्फे'रिकल्)—sphere-shaped; of spheres. गोलाकार; गोलघनक्षेत्राचा, गोल.

Sphĕr'oid, *n.* (स्फि'अराइड्)—body of approximately spherical shape. चपटा गोल, गोलप्राय वस्तु. *Oblate s.,* प्रथमाण्ड-चापट-गोल. *Oblong-prolate -s.,* द्वितीयाण्ड-चसकट-गोल. *Spheroid'al, a.* अंडाकार.

Sphinc'ter, *n.* (स्फिं'क्टर्)—ring-muscle of orifice. स्नायूचा वाटोळा बंद.

Sphinx, *n.* (स्फिंक्स)—figure of couching lion with woman's head; (Gk-myth.) a winged monster; enigmatic person. स्त्रीचें डोकें असलेल्या सिंहाची आकृति; अशा आकृतीचा (ग्रीक पुराणांतील) राक्षस,; कोडें (मनुष्य).

Spice, *n.* (स्पाइस)—aromatic or pungent vegetable substance used as flavouring; spices collectively; (*fig.*) smack, flavour (*of*). मसाला; मसाले; चुणूक, वास. *v. t.* to flavour s. or wit, etc. मसाला घालणें, खमंग चुरचुरीत करणें.

Spi'cerў, *n.* (स्पा'इसरि)—spices; aromatic scents. निरनिराळे मसाले,-मसाल्याचे जिन्नस; सुगंधी पदार्थ.

Spick and spăn, *a.* (स्पिक्'अँन्ड् स्पॅन्)—trim, smart, brand new. तरतरीत, कोरा, अगदीं नवा.

Spi'cule, *n,* (स्पि'क्यूल्)—a small sharp-pointed body; (Zool.) small hard body, esp. in famework of sponge; (Bot.) small or secondary spike. लहान अणकुचीदार वस्तु; लहान कठीण अवयव; उप-मंजिरी. *Spi'cular,-culate, aa.*

Spi'cў, *n.* (स्पा'इसि)—having much spice, aromatic; (*fig.*) piquant, improper (*s. story*), pungent, showy. मसालेदार, मसाले घातलेला; खमंग, झणझणीत, तिखटमीठ लावून सांगितलेली (गोष्ट), भपकेबाज. *Spi'ciness, n.; Spi'cily, adv.*

Spiel, *n.* (स्पिएल्)—(U. S.) a talk, speech. बोलणें, भाषण. *v. t.* to make speeches. व्याख्यान देणें.

Spi'der, *n.* (स्पा'इ-डर्)—kinds of eight-legged web-spinning animal. कोळी, कोष्टी, अष्टपाद, ऊर्णनाभि. *S. and fly,* (*fig.*) ensnarer and ensnared. जाळ्यांत पकडणारा (अडकवणारा) व अडकलेला. *S. catcher,* एक जातीचा पक्षी. *S.-crab,* लांब व बारीक पायांचा खेंकडा,-कुरली. *S. line,* (अति सूक्ष्म तन्हेनें वजन करतां यावें म्हणून तारेऐवजीं वापरलेला) कोळीष्टकाचा धागा. *S. monkey,* लांब अवयवांचा व लांब शेंपटीचा वानर. *S. wasp,* a wasp that stores its nest with ss. for its young. (मारलेले) कोळी खाद्य म्हणून सांठविणारी गांधीलमाशी. *Spi'derlike, a. Spi'dery, aa.* very thin. अतिशय बारीक,-कृश.

Spif'licāte, *v. t.* (स्पि'फ्लिकेट्)—(sl.) to castigate, trounce. कानउघाडणी,-शिक्षा,-करणें—*tion, n.*

Spig'ot, *n.* (स्पि'गट्)—a vent-peg or part of tap by which flow in controlled. बुंच, गुडदी, तोटीची मधली चावी.

Spike, *n.* (स्पाइक्)—a sharp projecting point; a long nail as used for railways; pointed piece of metal; (Bot.) an inflorescence of many sessile flowers set closely on long common axis; a separate sprig in which flowers from s.-like cluster; kind of lovender. पुढें आलेलें तीक्ष्ण टोंक, अणकुची, अरी, मोठा खिळा, शंकु, सळई, नाल, खिळा, शंकु; कणीस; मंजिरी (उ० गुलछब्बू वेलचोंडी इ.); सुवासिक वनस्पती. *v. t.* to furnish with ss.; transfix; plug vent of gun with a spike. सूळ,-शंकु,-मारणें,-लावणें; घट्ट बसवणें, पक्के करणें; तोफेच्या कान्यांत खिळा ठोकणें,-ठोकून रद्द करणें. *S. oil,* लव्हेंडर वनस्पतीचें तेल. *Spike'let, n.* लहान कणीस,-मंजिरी. *Spike'wise, adv.; Spik'y, a.* सूळ पुरलेला, लावलेला, अणकुचीदार. [L. *spica,* ear of corn.]

Spike'nard, *n.* (स्पा'इक्नार्ड)—(an aromatic substance got from) an Eastern plant. जटामांसी, जटामावशी (वनस्पति); सुवासिक तेलें.

Spile, *n.* (स्पाइल्)—a wooden peg; a pile. लाकडी खुंटा; (जमिनींत पुरण्याचा) लांकडी खांब,-वासा. *v. t.* to make s.-hole in (cask). भोंक पाडणें.

Spi'ling, *n.* (स्पा'इलिंग)—a set of piles; (Naut.) an edge-curve of plank in vessel's hull. लांकडी खुंट्यांचा संच; (जहाजाच्या सांगाड्यांतील) फळीचें वांकण.

Spill, *v. t. & i.* (स्पिल्)—(spilt or spilled). to let (liquid, powder) run out from receptacle, to flow over, to shed; (of horse or vehicle) throw or upset or let fall; (Naut.) empty (belly of sail) of wind. (लवंडून, उचंबळून) सांडणें, लवंडणें; सांडणें; फेंकून देणें, उलटणें, खालीं पाडणें; (शिडांतून) वारा काढून टाकणें. *n.* (colloq.) a fall from a horse or vehicle. (घोड्यावरून किंवा गाडींतून खालीं पडणें,-येणें. *Spilt the salt,* मीठ सांडलें,-उपडें केलें. *It's no use crying over spilt milk,* गतं न शोचयम्, गेल्याचा वृथा शोक न करावा. *To s. blood,* रक्त सांडणें, रक्तपात करणें. *To. s. the blood of,* ला ठार मारणें. *S. money,* (*sl.*) जुगारांत-पैजेंत-पैसा घालवणें,-हरणें. *Spill way,* a passage for surplus water from dam. धरणांतील जादा पाण्याला वाहून जाण्यासाठीं मार्ग, पाट.

Spill, *n.* (स्पिल्)—a strip of wood or folded piece of paper for lighting candles etc. सळपट, कागदाची सुरनळी.

Spill'ikĭn, Spĕl'ican, *n.* (स्पि'लिकन, स्पे'लिकन्)—one of the wooden or ivory slips thrown in a heap in the game of spillikins. स्पिलिकन्स् खेळांत फेकायची लांकडी किंवा हस्तिदंती पट्टी.

Spilt, *pa. t. & pa. p. of* Spill.

Spĭn, *v. t. & i.* (स्पिन्)—(*span* or *spun, spun*) to make thread by drawing out and twisting together the fibres of wool, &c; to twirl round; of

spider, etc. make (web etc.) by extrusion of fine viscous thread; compose (story, etc.); turn or cause to turn like a top or wheel: (sl.) reject (candidate) after examination. सूत कातणें, काढणें, कातणें; गरगर फिरविणें, गरगरावणें; (कोळी) जाळें विणणें,-करणें; (कथा, गोष्ट) रचणें; फिरणें, भोवणें. चकावर फिरविणें, भोवरणें; परीक्षा घेऊन नापास करणें. *n.* a revolving motion, whirl; secondary revolving motion; brisk or short run, or spell of driving, rowing, etc. चाटोळी गति, गरगर फिरणें; गिरकी; जलद धांव, सरकन् जाणें, सुरकन् निसटणें. *To s. a yarn,* tell a story. (लांबलचक किंवा कल्पित) गोष्ट सांगणें. *S. out* (वेळ) घालवणें, दवडणें; लांबलचक लेख लिहिणें; चऱ्हाट लावणें, गुऱ्हाळ लावणें. *Spun, pa. p.* (sl.) tired out, done. थकून गेलेला, भागलेला. *Spun glass,* दोराप्रमाणें वळवलेली-चांकलेली-कांच. *Spun gold, silver,* सोन्याची किंवा चांदीची काढलेली तार. *Spun yarn,* (naut.) वळलेलें दोरखंड; वळलेली दोरी (पाण्याची खोली मोजण्याची). *Spinning-jenny,* an early form of spinning machine. (पुष्कळ सूत) कातण्याच्या चारया एकदम फिरविणारें चाक. *Spin'ning-wheel, n.* (स्पिं'निंग-व्हील) a house-hold spinning-apparatus with fly-wheel and treadle. चरखा.

Spin'ach,-age, *n.* (स्पि'नच्, स्पि'निज)—a vegetable eaten boiled. शिजविलेली एक प्रकारची पालेभाजी.

Spi'nal, *a.* (स्पा'इनल्)—of the spine. पाठीच्या कण्याचा, पृष्ठवंशीय *S.-column,* पाठीचा कणा. *S. chord,* पृष्टमज्जारज्जु.

Spĭn'dle, *n.* (स्पिं'न्डल्)—slender rod serving to twist and wind thread in spinning; axis; a varying quantity of yarn or thread, a slender thing or person. चाती. चात, सुई; आंस, अक्ष; सुताचें माप; बारीक वस्तु, किडकिडीत मनुष्य. *v. i.* to have, grow, into long slender form. सडपातळ असणें,-होत जाणें. *Live s.,* फिरता आंस. *Dead s.,* न फिरता आंस. *S. shanked, a.* लांबटांगा. *Spindly, a.*

Spĭn'drift, *n.* (स्पिं'न्ड्रिफ्ट्)—spray blown along surface of the sea. (समुद्रपृष्ठभागावर उडणारा) जलतुषार. *S. clouds,* हलके कापसासारखे ढग.

Spine, *n.* (स्पाइन्)—the backbone or vertebral column; thorn or prickle. कणा, पाठीचा कणा; (Bot.) शूक, कंटकपर्ण, कांटा. *S.-less a.* पाठीचा कणा नसलेला; अशक्त, निर्जीव. *Spined, Spinose, Spinous, aa.* कांटेकांटे असलेला, सशूक. *Spinosity, n.* कंटकता, कांटेरीपणा.

Spĭn'el, *n.* (स्पि'नल्)—a scarlet ruby-like precious stone. शेंदरी रंगाचें रत्न.

Spĭn'ĕt, *n.* (स्पि'निट्)—(hist.) a musical instrument. एक (संगीत) वाद्य.

Spinn'aker, *n.* (स्पि'नॅकर्)—a large extra sail of racing yacht. शर्यतीच्या नौकचें मोठें जादा शीड.

Spĭn'ney *n.* (स्पि'नि)—(pl.-eys) copse. रान.

Spĭn'ster, *n.* (स्पि'न्स्टर्)—an unmarried woman. अविवाहित स्त्री, प्रौढ कुमारी. *S.-hood n.* प्रौढ कौमार्य. [orig. woman who spins]

Spi'nule, *n.* (स्पा'इन्यूल्)—(Bot.; Zool.) small spine. लहान शूळ, कांटा; लहान कणा.

Spĭr'acle, *n.* (स्पा'यॅकल्)—(zool.) kind of breathing holes in animals. श्वासच्छिद्र, [illegible] र.

Spir'al, *a.* (स्पा'इरल्)—coiled in a plane or as round a cylinder or cone. शंकुस[illegible], नागमोडी, मळसूत्राकार. *n.* curve or course winding like a screw. नागमोड, नागमोडी रस्ता; मार्पल, सर्पचक्र. *v. t.* to make *s.* नागमोडी-मळसूत्रासारखें-करणें. *Spirally, adv. Spirality, n.*

Spire, *n.* (स्पायर्)—tapering structure in form of tall cone or pyramid rising from tower-top; tapering portion of a steeple; spiral, coil; single twist of this. सुळका, दांडा शंकु; सुळका, सुळक्याचें शिखर, मनोरा; (वृक्ष) वृन्त; नागमोडी मळसूत्र; मळसूत्राचा फरा. *Spire, v. t. & i.* शंक्वाकार होत जाणें; मनोरा बांधणें. *Spiry, a.*

Spi'rĭt *n.* (स्पि'रिट्)—the element in man regarded as separable from and animating the body; an apparition; a person's disposition or mental attitude; a person from the mental or moral point of view; disembodied soul, elf, fairy; real meaning opp. to verbal expression; exhibition of courage or energy or vivacity; (*pl.*) state of cheerfulness or despondency; (sing. or pl.) distilled alcoholic liquor. चैतन्य, आत्मा; भूत; पिशाच्च, प्रेत, छाया; बुद्धि; मन, वृत्ति. भाव, भावना; स्वभाव, प्रकृति, प्रवृत्ति; आत्मा, अदृश्य व्यक्ति, अशरीरी व्यक्ति; भावार्थ, आशय, खरा अंतस्थ हेतु; तेज, जीव, हिम्मत, उत्साह, धमक, पाणी, धैर्य, हिंमत, अवसान; (अने०) आनंदवृत्ति, निराशामय स्थिति; गाळलेली दारू, मद्य. *v. t.* to convey mysteriously *away, off, etc.* (as if by agency of a spirit); cheer person (*up.*). गुप्तपणें घेऊन जाणें, पळवून नेणें; उत्साहित,-उल्लसित,-उत्तेजित करणें. *In (the) s.,* inwardly. मनांतल्या मनांत, मनानें. *A master -s.,* a person of commanding intellect etc. विलक्षण बुद्धिमान पुरुष. *The Holy S.,* third person of the Trinity. पवित्र आत्मा. *Poor in s.,* meek. नम्र, विनम्र. *Infused s. into his men,* आपल्या लोकांत चेतना निर्माण केली,-(उत्साह निर्माण केला). *The s. of the age or times,* तद्युगीन-तत्कालीन-प्रवृत्ति,-वारें. *High and great ss.,* cheerfulness and buoyancy उत्साह आणि प्रसन्नता. *Poor* or *low ss.,* depression. खिन्नता, विषण्णता. *S. lamp,* burning alcohol instead of oil. मद्यार्क दीप. *S.-level,* glass tube partly filled with s. for testing horizontally. मद्यसाराची पाणसळ. *S.-rapper,* मृतात्म्यांशीं चोलीभाषण करणारा, (टेबलावर पिशाच्चांच्या बोटांच्या होणाऱ्या खटखट आवाजादिकावरून). *S.-room,* (naut.) गलबतावरील कोठी. *Spi'ritism, n.* पिशाच्चास्तित्ववाद, मृतात्मसंचारता *Spi'ritist, n.* मृतात्म्यांशीं संबंध ठेवणारा.

Spi'rited, *a.* (स्पि'रिटिड्)—showing courage or enterprise, full of spirit or fire; having specified spirit. दमदार, हिंमतवान, पाणीदार, उत्साही, आवेशाचा, जोरदार; स्वभावाचा, प्रकृतीचा.—*ly, adv.* जोरानें, हिंमतीनें, उत्साहानें.—*ness, n.* उत्साह, पाणी, तेज, जोम.

Spi'ritless, *a.* (स्पि'रिट्लिस्)—despondent; lacking energy; abject. हताश; निरुत्साही; क्षुद्र, फिका, निःसत्त्व.—*ly, adv.* नाउमेदीनें, निरुत्साहानें.

Spi'ritual, *a.* (स्पि'रिच्युअल्)—concerned with the spirit or soul or with religion; unworldly; mental, intellectual. आध्यात्मिक, पारमार्थिक, आत्मिक, धार्मिक; प्रासादिक, स्फूर्तिजन्य, पवित्र, दिव्य, अलौकिक, निराकार, अमूर्त, मानसिक, बौद्धिक. *The s. man,* अध्यात्मवादी मनुष्य, पारमार्थिक वृत्तीचा मनुष्य; मनुष्याचा अंतरात्मा,-मन. *Lords s.,* लॉर्ड्स सभेंतील बिशप आणि आर्चबिशप सभासद. *S. court,* धर्मप्रकरणांचा निवाडा देणारें कोर्ट. *S. science,* अध्यात्मशास्त्र. *Spi'ritualness, n.;—ritually, adv.*

Spi'ritualism, *n.* (स्पि'रिच्युअॅलिझम्)—the belief that departed spirits communicate with and show themselves to men; (Philos.) doctrine that nothing is real except soul or spirit. (पिशाच्चें-मृतात्मे-मध्यस्थाच्या द्वारें आपलें अस्तित्व व्यक्त करूं शकतात, हा) पिशाच्चवाद, संचारवाद; आत्मसत्यवाद. *—list, n. & a.* पिशाच्च-वादी; आत्मसत्यवादी.—*listic, a.* पिशाच्चवादाचा; आत्मसत्यवादाचा.

Spiritual'ity, *n.* (स्पिरिच्युॲ'लिटि)—spiritual quality; (usu. *pl.*) what belongs or is due to the Church. पारमार्थिकता, धार्मिकता; धर्मखात्याचें उत्पन्न, धर्मादाय उत्पन्न.

Spi'ritualize, *v. t.* (स्पि'रिच्युअलाइझ्)—to make spiritual, elevate; (rare) animate; attach spiritual meaning to. परमार्थाकडे वळविणें, दिव्य करणें,-बनविणें; उत्साहित करणें, चेतना देणें; पारमार्थिक (दृष्ट्या) अर्थ लावणें.—*za'tion, n.* परमार्थीकरण; दिव्य स्वरूप देणें; परमार्थाकडे वळविणें.

Spi'rituous, *a.* (स्पि'रिच्युअस्)—of the nature of or containing distilled spirit. फार अंमली, जालीम, तीव्र; मद्यसारीय.—*ness, n.*

Spirom'eter,-scope, *n.* (स्पा'इरॉमिटर्,-स्कोप्)—an instrument for measuring lung capacity. श्वासमापक यंत्र. [L.*spiro,* breathe]

Spirt, Spurt, *n.* (स्पर्ट्)—sudden gushing out, jet. अकस्मात् वाहणें, आकस्मिक प्रवाह. *v. i. & t.* to gush out in a jet or stream; cause to do this. कारंज्याप्रमाणें-प्रवाहाप्रमाणें-जोरानें वाहणें,-वाहावणें.

Spit, *n.* (स्पिट्)—pointed rod on which a joint of meat, &c. is struck for roasting; point of land running out into the sea, &c. (मांस भाजण्याची) सळई, शूळ, सूळ; भूशिर, *v. t.* to thrust a spit through (meat); (*fig.*) to run (person etc.) through with sword, etc. सळईंत गोंवणें,-भोंसकणें.

Spit, *v. i. & t.* (स्पिट्)—(*Spat*; arch *Spit*), to eject saliva (from the mouth); (*fig.*) utter vehemently (curses etc.); (of cat or person) make noise as of spitting as in anger or sign of hostility; (of rain) fall lightly; (of fire, candle) send out sparks, (of ink) stray ink. थुंकणें; लाळ गळणें; आवेशानें तोंडावाटे काढणें,-बोलणें; फुसफुसणें, फिसकारणें; शितडणें, थुईथुई येणें; तडतडणें, ठिणग्या उडवणें; शाई उडवणें. *n.* spittle (rare); spitting (of cat); spawn of some insects. लाळ, थुंकी; (मांजराचें) फिसकारणें; कांहीं किड्यांचीं अंडीं. *S. it out,* (*sl.*) मोठ्यानें बोल,-गा,-की. *S. at* or *upon,* थूत्कारणें, तुच्छ मानणें, हिडीस-फिडीस करणें. *Spit-fire,* चिडखोर मांजर, चावरा कुत्रा, रागीट मनुष्य. *S.-fire,-S.-devil,* a toy-cone of wet gun-powder spitting when ignited. (दारूकामांतील) नळा. *The (very) s. of,* ची प्रतिमा,च्या सदृश.

Spit, *n.* (स्पिट्)—spade-depth. कुदळीचा टवका.

Spite, *n.* (स्पाइट्)—ill-will; malice. दुष्टपणा, दावा, द्वेष; मत्सर. *v. t.* to mortify, annoy, thwart. मानहानि करणें, त्रास देणें, अडवणें. *Spiteful, a.* दुष्ट, आकसखोर, कपटी.—*fully, adv.-fulness, n.*

Spit'tle, *n.* (स्पि'टल्)—saliva. लाळ, थुंकी.

Spittoon, *n.* (स्पि'टून्)—a pan to spit into. पिकदाणी.

Splash, *v. t. &i.* (स्प्लॅश्)—to agitate liquid so that drops of it fly about; be thus agitated or flung about; wet or stain or spatter by splashing; fall into or go through water or mud with splashing; decorate with scattered ornamentation. उसळणें, हिसळणें, शिंतोडे उडवणें; घुसळत जाणें; शिंतोडे उडवून भिजवणें,-डाग पाडणें,-माखणें; पाणी उसळीत,-चिखल तुडवीत,-जाणें; अधून मधून चित्रें किंवा नकशी काढून सुशोभित करणें. *n.* splashing or its sound or mark made by it; a patch or colour. पाण्याच्या लाटा, धप्प आवाज; डाग, ठिपका. *S.-board,* (चिखल उडूं नये म्हणून लावलेला) गाडीच्या चाकांवरील पत्रा. *To make a s,* (*fig.*) पुष्कळ लक्ष वेधून घेणें; खळबळ उडविणें. *Splash'er, n.* (*esp.*) चाकांवरील, आच्छादक पत्रा,-पंखा; (भिंतीवर पाणी उडूं नये म्हणून) पाणपडदा. *Splash'y, a.*

Spleen, *n.* (स्प्लीन्)—abdominal organ acting on the blood; moroseness; irritability; spite. प्लीहा, कौल, पाणथरी; औदासीन्य, विषण्णवृत्ति; चिडखोरपणा; दुष्टपणा, दावा. *Spleen-wort,* कौलु-पाणथरी-वरील औषधी वनस्पती. *Spleen'ish, Spleen'y, aa.*

Splen'did, *a.* (स्प्लें'डिड्)—brilliant, magnificent, admirable, glorious, excellent. तेजस्वी, पाणीदार, शोभिवंत, भव्य, प्रशंसनीय, वैभवशाली; नामी, उत्तम, छान.—*ly, adv.*

Splendif'erous, *a.* (स्प्लेन्डि'फरस)—(sl.) extremely good. अति उत्तम, फारच नामी.

Splen'dour, *n.* (स्प्लें'न्डर्)—splendidness. कांति, प्रखर तेज, शोभा, सौंदर्य, ऐश्वर्य.

Splenet'ic, *a.* (स्प्लिने'टिक्)—morose; ill-tempered; of the spleen. खिन्न, कटी, चिडखोर, रागीट; प्लीहेचा. *n.* a medicine for, a sufferer from, spleen. प्लीहेवरील औषध; प्लीहा झालेला रोगी. *-ically, adv.*

Splĕ'nic, *a.* (स्प्ले'निक्)—(Anat., Med.) of the spleen. प्लीहेसंबंधीं. *Splen'oid, a.*

Splice, *v. t.* (स्प्लाइस्)—to join (pieces of rope or wood) into one length; (sl.) join in marriage. सांधणें, एकांत एक वळून एक करणें, सांध्यांत सांधा मिळविणें; विवाहबद्ध होणें, लग्न करणें. *n.* junction by splicing. (गांठ दिल्यावांचून) जोडणी, सांधा, पलास.

Spline, *n.* (स्प्लाइन्)—rectangular key fitting into grooves in hub and shaft of wheel; flexible wood or rubber strip used in drawing large curves. चिंशीवाली चावी, लवचीक पट्टी.

Splint, *n.* (स्प्लिन्ट्)—a slip of wood, &c. bound on to keep broken bone in position while it sets; a thin and flexible piece of wood. ढलपा, कपची; भाळी, सांपळी, फळी. *v. t.* to confine (broken limb etc.) with ss. भाळी बांधणें,-बांधून ठेवणें.

Splin'ter, *n.* (स्प्लि'न्टर्)—a pointed, sharp-edged, or narrow fragment. ढलपी, कपची, अणकुचीदार तुकडा, पट्टी. *v. i. & t.* to break into ss.; come off as a s. ढलप्या काढणें, बारीक तुकडे करणें; ढलपा निघणें. *S.-proof,* (स्फोटक गोळ्याच्या तुकड्यांपासून) इजा-नुकसान-न होण्याजोगा,-सुरक्षित.

Split, *v. i. & t.* (स्प्लिट्)—(split up), to divide into parts; to deprive of or lose unity; burst by explosion or pressure from within; break forcibly. वाटणें, विभागून देणें, फाडणें, उभा चिरणें; फोडणें; ऐक्य नाहींसें करणें, दोन तट पाडणें, पक्ष करणें, स्फोट होणें, तडावणें, भेताळणें; जोरानें फोडणें,-फुटणें. *n.* splitting; fissure, rent; schism; split osier etc. for parts of basket-work; each of the strips of steel, cane, of reed in loom; half bottle of aerated water, half glass of liquor; (pl.) acrobat's trick of sitting on ground with legs spread out laterally; turning of two cards of equal value so that stakes are divided. फाडणें, फुटणें; चीर, भेग, तडा; पंथ, धर्मभेद; (टोपल्या विणण्याकरितां) चिर्ले; पट्टी, कांब, मागाच्या फणीचा दांता,-पिचका; सोडावाटरची अर्धी बाटली, अर्धा पेला दारू; एका रेषेंत (बाजूला) दोन्हीं पाय ताठ सोडून बसण्याची कसरत; पैज,-बक्षीस,-विभागणारे दोन सारखे पत्ते उलगडून-उचलून-दाखविणें. *To s. one's vote,* मतें विभागून-वांटून-देणें. *To s. the difference,* निम्यावर तोड करणें. *To s. hairs,* (शब्दांचा) कीस काढणें, शुष्क (शाब्दिक) वाद करणें. *Hair-splitting,* शाब्दिक वाद,-कीस, शुष्क वाद. *S.* or *s. one's side,* be convulsed with laughter. पोट धरधरून-दुखेसर-हसणें. *Side splitting, a. & n.* पोट दुखेसर हंसविणारा,-हंसणें. *Side -splitter,* पोट दुखेसर हंसविणारा मनुष्य,-चुटका,-गोष्ट. *A splitting head-ache,* भयंकर-असह्य-डोकें-दुखी, तीव्र कपाळशूळ. *To s. on,* (sl.) (साथीदाराच्या) गुप्त गोष्टी फोडणें *S. cloth,* (surg.) कापडाच्या पट्ट्या (डोक्याची किंवा चेहऱ्याची जखम बांधण्याच्या). *Splitter, n.*

Splŏtch, Splŏdge, *nn.* (स्प्लॉच्,-ज्)—a daub, a smear. बरबटणें, लिडबिडणें. *Splotch'y, a.*

Splŭrge, *n. & v. i.* (स्प्लर्ज्)—(U. S.) (make) a noisy display or effort. गवगवा, गडबड-धांदल (करणें).

Splŭtt'er, *v. i. & t. & n.* (स्प्ल'टर्)—sputter. गडबड, घाई (नें बोलणें).

Spoff'ish, *a.* (स्पॉ'फिश्)—(sl.) bustling, fussy. गडबड्या, धांदरट.

Spŏil, *n.* (स्पॉइल्)—(collect. sing. or pl.) plunder taken from enemy; things found or acquired; emoluments of office, etc. लुटणें, लूट; सांपडलेल्या किंवा मिळविलेल्या वस्तू, अधिकारामुळें होणारे फायदे. *v. t. & i.* to plunder; to deprive of; to impair; to injure character of (person etc.) by petting or over-indulgence; make useless or inefficient; decay, go bad; (sl.) maim, kill. लुटणें, नागविणें; बिघडविणें, खराब करणें, निरुपयोगी करणें; लाड करून बिघडविणें; लाडकावणें; निकामी,-खराब करणें; नासणें, सडणें, उबणें; इजा करणें, (ठार) मारणें. *Ss. system,* (U. S.) अधिकारारूढ पक्षानें आपल्या अनुयायांना मोठमोठ्या सरकारी नोकऱ्या वगैरे देण्याची पद्धति; *Spoil'sman,,* (वरील) तत्त्वाचा पुरस्कर्ता, तत्त्वाप्रमाणें अधिकार-नोकरी मिळवूं इच्छिणारा. *Spare the rod, and s. the child,* छडीचा उपयोग न करणें म्हणजे मुलाला बिघडविणें; 'छडी लागे छमछम, विद्या येई घमघम'. *Is the spoilt child of fortune,* श्रीमंतीनें बिघडलेला. *S.-sport,* a meddler. मध्येंच लुडबुड करणारा, लुडबुड्या. *Spoil'ing, pa. p. & a.* (dog), माजलेला (कुत्रा.) *Spoil'er, n. Spoilt* or *Spoiled, pa. t. & pa. p.*

Spoil'age, *n.* (स्पॉ'इलिज्)—paper spoilt in printing. छपाईत खराब झालेले कागद, खराबी.

Spōke, *n.* (स्पोक्)—any of the radiating bars connecting wheel's hub and felloe, or of the projecting handles of a steering-wheel; a bar preventing a wheel from turning esp. down-hill, a rung of a ladder, a round of a ladder. (चाकाचा) रवा, आरा, आर; जहाजाच्या सुकाणूची त्रिज्यात्मक आर; खिटी, खीळ; शिडीची पायरी, पावडा. *v. t.* to furnish with *ss.,* check wheel with *ss.* आर मारणें, रवे ठोकणें; (चाकाला) खिटी लावणें, खीळ घालणें. *To put a s. in person's wheel, (fig.)* to thwart his purposes. नसताच व्यत्यय आणणें, (एखाद्याच्या) चालत्या गाड्याला खीळ घालणें. *Spoking-machine,* चाकाच्या आरांना सारखी उतरण देण्याचें यंत्र.

Spoke,-*n, pa. t. & pa. p* of Speak.

Spōkes'man, *n.* (स्पो'क्स्मन्)—(pl.-men), a person deputed to voice the opinions of others. दुसऱ्याच्या वतीनें बोलणारा,-प्रतिनिधि, पुढारी.

Spōlia'tion, *n.* (स्पोलिए'शन्)—pillaging, despoiling, robbery; (Eccle.) taking of the fruits of benefice, under a pretended title; (law) destruction, mutilation, of document to prevent its being used as evidence. लूट, दरवडा, धडधडीत चोरी; (खोट्या अधिकारानें) (धार्मिक उत्पन्न बळकावणें,-खाणें; (पुराव्यांत दाखल होऊं नये म्हणून एखादा) दस्तऐवज खोडून टाकणे, बदलणें किंवा नष्ट करणें. *Spo'liatory, a.*; *Spo'liator, n.*

Spŏn'dee, *n.* (स्पॉन्डि)—a metrical dot of two long syllables. दोन गुरु अक्षरांचा (– –) गण. *-da'ic, a.*

Spon'dȳl (e), *n.* (स्पॉन्डिल्)—the joint of back bone, vertebra. कटिमणि, पृष्ठवंश.

Sponge, *n.* (स्पज)—an aquatic animal of low order with pores in the body-wall; the skeleton of a sponge or colony of sponges used as absorbent in bathing, etc.; a thing of sponge-like absorbency; (fig.) a parasite; a mop for cleaning cannon-bore; hard-drinker. स्पंजमाणी; स्पंजमाण्याचा सच्छिद्र सांगाडा, (शाई पुसण्याचा, पाणी लावण्याचा) स्पंज; स्पंजासारखा भुसभुशीत पदार्थ (कणकेचा गोळा, इ०); परपुष्ट, परान्नपुष्ट; तोफेची पोकळ नळी पुसण्याचा फडका,-झाडू; अट्टल दारुड्या. *v. t. & i.* to wipe, cleanse, wet, with s.; absorb, take up, with s.; gather sponges; live as a parasite *on.* स्पंजानें पुसून काढणें,-साफ करणें,-धुऊन काढणें,-ओला करणें,-पाणी लावणें; स्पंजानें पुसून-टिपून-काढणें-घेणें; (*fig.*) ची आठवण बुजविणें; स्पंज गोळा करणें; वर अवलंबून राहणें, परान्नपुष्ट होणें. *To throw up the s.,* (of boxer) throw into the air as token of defeat the sponge used between rounds; (fig.) abandon contest, own one's defeat. शरण जाणें; हार कबूल करणें. *To pass the s. over,* agree to forget offence etc. झालें गेलें विसरून जाण्याला तयार होणें. *S. bath,* स्पंज-स्नान. *S.-cake,* स्पंजासारखी अतिशय हलकी भाकरी (केक). *S. tent,* compressed s. for keeping wound etc. open. स्पंजतंतू (हा जखमेंत वगैरे घातल्यावर फुगतो व जखमेचें दार मोठें होतें). *Spongol'ogist,-gy, nn.* स्पंजकीटक,-शास्त्रज्ञ,-ज्ञान. *Spo'nger, n.* (esp.) a person who habitually sponges on others. परान्नपुष्ट, आगंतुक. *Spo'ngy, a.* स्पंजाप्रमाणें सच्छिद्र, भुसभुशीत, स्पंजसदृश; विरल-परमाणुक (धातु). *Sponginess, n.* स्पंजधर्मता; सच्छिद्रता.

Spŏn'son, *n.* (स्पॉन्सन्)—a platform projecting from ship's side. गलबताच्या बाजूबाहेरील (त्रिकोणी) बैठक,-फलाट.

Spŏn'sor, *n.* (स्पॉन्सर्)—godfather or godmother; a person who answers or gives security for another, surety. धर्मपिता, धर्ममाता; जामीन, हमी घेणारा.*-ial, a.;-ship, n.* धर्मपितृ-मातृ-संबंध; जामिनकी, हमी. [L. *spons,* promise]

Spŏntā'nĕous, *a.* (स्पॉन्टेनिअस)—resulting from natural impulse; not deliberate or laboured, voluntary; (of sudden movements) involuntary; growing naturally without cultivation; (Biol.) instinctive, automatic; (of bodily movements, literary style) gracefully natural. आपोआप होणारा,-झालेला, स्वाभाविक, स्वतःसिद्ध; आपखुषीचा, अन्तःस्फूर्तीचा, स्वयंस्फूर्त; स्वाभाविक; (लागवड केल्याशिवाय) आपोआप रुजणारा,-होणारा,-वाढणारा; स्वयंप्रेरित, सहज, अनैच्छिक; सहजमनोहर, सहजस्फूर्तीचा. *S. combustion,* आपोआप जळूं लागणें,-लागलेली आग. *S. generation,* आपोआप उत्पन्न होणें,-जन्माला येणें. *S. suggestion,* सहजस्फूर्ति. *Spontane'ity, n., -'neousness, n.* स्वयंस्फूर्ति. स्वाभाविकता. *Sponta'neously, adv.* अंतःस्फूर्तीनें, स्वाभाविकपणें, आपण होऊन.

Spōōf, *n. & v. t.* (स्पूफ्)—(sl.) hoax, jocular deception. फसवेगिरी, थट्टेनें फसविणे,-चनविणें.*-er, n.*

Spōōk, *n.* (स्पूक्)—a ghost. पिशाच्च, भूत.*-ish,-y, aa.*

Spōōl, *n.* (स्पूल्)—bobbin, reel. रीळ, कांडी, चक्र, धोटा. *v. t.* to wind on s. रिळावर-कांडीवर-गुंडाळणें.

Spōōn, *n.* (स्पून्)—shallow oval bowl with long handle; a golf-club; a s.-shaped thing e. g. an oar with broad curved blade, simpleton, silly lover. चमचा, पळी; गोल्फचा दांडू; चमच्याच्या आकाराची वस्तु (वल्हें इ०); अर्धवट, भोळसर मनुष्य; प्रेमवेडा. *v. t. & i.* to lift with spoon; (Crick., etc.) strike feebly upwards; (sl.) make love. चमच्यानें घेणें,-खाणें; झेल उडवणें, सहज (चेंडू) वर उडवणें; प्रेमाचे वेडेचार करणें, लघिवाळपणा करणें. *Tea s.,* चहाचा (लहान) चमचा. *Table s.,* मोठा चमचा. *Marrow, s.,* हाडांतील मगज काढण्याचा चमचा. *Salt s.,* मिठाचा चमचा. *Born with silver s. in mouth,* गर्भश्रीमंत. *S.-beak,-bill,* kinds of bird. एक जातीचे पक्षी. *S.-fed,* (fig., of industries etc.) artificially encouraged. संरक्षण किंवा आयात मालावर जकात लादून) कृत्रिम रीतीनें-पुरस्कृत-प्रोत्साहित-(धंदे). *S.-meat,* पातळ-पेय-पदार्थ, लहान वालकांचें अन्न. *To be ss. on,* शीं प्रेमवेडेपणा करणें. *S.-ful, n.* (*pl.* *-fuls*) चमचाभर, अत्यल्प.

Spōōn'er(ism), *n.* (स्पूनरिझम)—accidental transposition of initial letters or sounds in successive words. (e. g. has just received a *blushing crow* for *a crushing blow*). (बोलतांना) सहजगत्या झालेला वर्णविपर्यय,-उच्चारविपर्यय.

Spōōn'ȳ, *n.* (स्पूनि)—(sl.) in love, amorous; soft, silly. प्रेमातुर, आपक; वेडसर, वेडगळ. *n.* a mild simpleton. अर्धवट, वेडसर.*-ily, adv.;-iness, n.*

Spoor, *n.* (स्पुअर्)—track of animal. जनावराच्या-पशूच्या-माग,-मार्ग. *v. t. & i.* to follow by s. माग काढणें, मागानें-वासावर-जाणें.

Sporăd'ic, *a.* (स्पॅरॅडिक्)—scattered, occurring only here and there. अधून मधून होणारा, तुरळक.*-ical, a.;-ically, adv.;-icalness, n.* तुरळकपणा.

Spōre, *n.* (स्पोअर्)—(Bot., Biol.) one of the germs by which flowerless plants are reproduced; minute organic body that develops into new individual, (fig.) seed, germ, of

anything. (अपुष्प वनस्पतींतील) बीजकण ; बीज, जंतु, जननपेशी ; बीज. *Sporan'gium, n.* (-जि-), (Bot.) बीजकणकोश, जननपेशीकोश. *Sporogen'esis,* बीजकणोत्पत्ति. *Sporogenous, a.* बीजकणोत्पादक. [Gk *spora,* sowing, seed]

Spōrt, *n.* (स्पोर्ट)—fun or diversion ; a pastime of an outdoor or athletic kind, such pastimes collectively, a meeting for athletic competitions ; an animal or plant deviating strikingly from normal type, (sl.) a good fellow, a sportsman. मौज, मजा, थट्टा, लीला, करमणूक ; क्रीडा, खेळ ; उघड्या मैदानांत शिकार, शर्यत इ० खेळ ; विलक्षण-अकल्पित-प्राणी,-वनस्पति ; खिलाडू वृत्तीचा मनुष्य, चांगला,-भला,-माणूस,-गडी, खेळाडू. *v. i. & t.* to gambol, to play, to toy or play or trifle *with.* (colloq.) exhibit, (Bot., Zool.) become or produce a sport. खेळणें ; रमणें, वागडणें, मौज,-चैन,-थट्टामस्करी करणें ; वाळून मिरवणें, चा देखावा करणें ; विलक्षण,-अकल्पित,-(प्राणी, वनस्पति,-) बनण,-होणें. *In s.,* थट्टेनें. *To make s. of,* make fun of. ची थट्टा करणें. *Be the s. of Fortune,* दैवाधीन असणें, दैवाचे हातांतील बाहुलें होऊन राहणें. *Athletic ss.,* मर्दुमकीचे खेळ (धांवण, वजन उचलणें, इ०). *School ss.,* शाळेचे खेळ,-खेळांचे सामने. *Sporting, a.* interested in sport, sportsmanlike. खेळ आवडणारा ; खिलाडू-वृत्तीचा. *A sporting man,-conduct,-offer,* खेळाडू मनुष्य, खिलाडूपणाची वागणूक,-देवाण. *Sport'ingly, adv.*

Spōrt'ive, *a.* (स्पो'र्टिव्ह)—playful. खेळाडू, गमत्या, विनोदी, शोकी.*-ly, adv.* ;*-ness, n*

Spōrts'man, *n.* (स्पो'र्ट्स्मन्)—a person fond of hunting and such sports ; person ready to risk failure or to act fairly. पारधी, मर्दुमकीचे खेळ खेळणारा ; खिलाडू वृत्तीचा मनुष्य.*-like, a.* ;*-ship, n.* Sportswoman, *n. f.*

Spōr'ule, *n.* (स्पॉ'र्यूल्)—a (small) spore. (लहान) बीज, जंतु.

Spŏt, *n.* (स्पॉट्)—a small mark or stain, a pimple on skin ; a blemish in character, a particular area or place or locality, a position marked on a billiard table. डाग, कलंक ; लासें, ठिपे, शिबें ; दोषस्थान, लांछन, कलंक ; स्थान, ठिकाण, जागा, वर ; (बिल्यर्ड्स) टेबलावरील काळें टिंगळ. *v. t. & i.* to mark with a spot, (of material) show spots readily, (colloq.) pick out, detect, identify, single out beforehand (winner of race etc., horse as winner of event). ठिपका देणें,-पाडणें ; डाग पाडणें, कलंक लावणें, काळें फासणें ; डाग सहज दिसणें,-दिसून येणें ; ओळखणें, ओळखून काढणें, आधींच ठरविणें, अगाऊ निवडून काढणें. *On the s.,* जागच्या जागीं, हां हां म्हणतां ; जागृत, तत्पर, सावध (मनुष्य). चांगला खेळाडू. (Commerc.) *S. cash, cotton, etc.* रोख मोजण्याची रक्कम, रोखीनें कापूस-खरेदी. *Ss.,* जागच्या जागीं रोख किंमत मोजून विकलेला माल,-जिन्नस. *Spotted fever,* cerebro-spinal meningitis. मेंदुज्वर. *Spotty, a.* ठिपक्यांचा, ठिपके असलेला. *Spot'tiness, n. Spottedness, n.*

Spŏt'less, *a.* (स्पॉ'ट्-लिस्)—absolutely clean ; (*fig.*) without a blemish. निर्मळ ; निष्कलंक, निर्दोष, शुद्ध.*-ly, adv.* ;*-ness, n.*

Spouse, *n.* (स्पाउझ्)—husband or wife ; (*pl.*) a married pair. नवरा किंवा बायको ; (नवराबायकोचें) जोडपें.

Spout, *n.* (स्पाउट्)—the projecting tube or lip for liquid to issue from ; a jet of liquid ; sloping trough, (also *S.-hole*), spiracle of a whale तोटी, नळी ; फवारा, चिळकांडी, धार ; उतरता पन्हळ, कलता डबा ; देवमाशाची नाकपुडी,-श्वास-रंध्र *v. t. & i.* to discharge or issue in a jet ; discharge liquid, (colloq.) declaim or recite, (*sl.*) pawn. फवारा-चिटकांडी-उडणें,-निघणें ; फवारा टाकणें,-सोडणें ; वक्तृत्वाच्या थाटानें बोलणें,-म्हणणें ; गहाण टाकणें. *Spouter, n. Spout'less, a.*

Sprăg, *n.* (स्प्रॅग)—a billet of wood or similar device for checking wheel of car etc. चाकाची अडणी.

Sprain, *v. t.* (स्प्रेन्)—to wrench (a joint) so as to cause pain and swelling. लचक भरवणें, पिळवटणें, मुरगळणें. *n.* such injury. लचक, मुरगळा, उसण.

Sprăng, *pa. t.* of Spring.

Sprăt, *n.* (स्प्रॅट्)—a small (European herring-like) sea-fish ; (joc.) a small child, thin person. समुद्रांतला लहान मासा ; लहान मूल, बारीक-किडकिडीत -मनुष्य. *v. i.* to fish for ss. लहान खारे मासे पकडणें. *To throw a s. to catch a herring* or *mackerel* or *whale,* to risk a little to gain much. मोठ्या फायद्यासाठीं अल्पाचा त्याग करणें. *S.-day,* नोव्हेंबर ९ (या दिवसापासून इंग्लंडांत स्प्रॅट मासे पकडण्यास आरंभ करतात). *Sprat'ter, Sprat'ting, n.n.*

Sprawl, *v. t. & i.* (स्प्रॉल्)—to fall or lie with limbs flung out ; to throw limbs about, to stretch the body and limbs carelessly ; (of writing, plant, etc.) be of irregular form ; open out (troops) irregularly. हातपाय ताणून पडणें ; अस्ताव्यस्त पडणें ; कुठल्याकुठें-अस्ताव्यस्त-फांटे जाणें, -पसरणें ; (सैन्य) अस्ताव्यस्त पेरणें,-पसरणें. *n.* a sprawling movement or attitude. अस्ताव्यस्त हालचाल,-पसरणें,-वृत्ति.

Spray, *n.* (स्प्रे)—a branched shoot or twig with its flowers or leaves ; liquid flying in fine drops ; medical or other liquid preparation to be applied in this form. नवीन कोंब, फांदी, डहाळी ; गुच्छ, फांदी (दागिना), पाण्याचे तुषार ; झारी, तुषारयंत्र ; (घसा धुण्याच्या पिचकारीची) वाफ. *v. t.* to sprikle with spray. (वर) तुषार उडवणें, शिंपडणें, (तुषारयंत्रानें) घशांत वाफ सोडणें. *Spray'ey, a.* ; *Spray'er, n.* तुषारयंत्र, पिचकारी.

Spread, *v. t. & i.* (स्प्रेड्)—(spread) to extend the surface of, (*fig.*) display thus to eye or mind ; to cause to cover largest surface, to diffuse

or be diffused; lay out on a surface; cover surface of. पसरणें, पसरवणें; दिमाखानें पसरून दाखवणें; विस्तार पावणें, रुंदावणें; पसरणें. पेरणें, उत्पन्न करणें; ठेवणें, मांडणें; लावणें, चोपडणें, माखणें. *n.* extent or compass of a thing; expanse; diffusion, (of education, etc.); (sl.) feast, meal provided; (U. S., commerc.) the difference between cost of manufacture and selling price. विस्तार; फैलाव; प्रसार; जेवण, मेजवानी; उत्पादनाचा खर्च व विक्रीची किंमत या दोहोंमधील अंतर. *Peacock spreads its tail*, मोर आपला पिसारा (दिमाखानें-डौलानें) उभारतो. *S. oneself, (pl.)* आत्मप्रौढीनें बोलणें. *Rumour s. from mouth to mouth*, ती बातमी कर्णोपकर्णी (गेली-) पसरली. *S.-eagle*, figure of eagle with wings and legs spread; skating movement; fowl split open and broiled; (Naut.) person lashed as punishment. (नाण्यावरील वगैरे) पंख आणि पाय पसरलेली गरुडाची आकृति; बर्फावर घसरण्याच्या खेळांतील एक तऱ्हा; उभें चिरून विस्तवावर भाजलेलें कोंबडें वगैरे; शिक्षा म्हणून हातपाय ताणून फटके मारला गेलेला खलाशी इ. *Spread-eagle'ism*, noisy nationalism with reference to the spread eagle as U. S. emblem. देशाभिमानाचा गाजावाजा. *S.-eagle, a.* गाजावाजा करणारा (देशभक्त). *S.-over system*, (विशेष गरजेकरितां) कामाच्या ठराविक तासांमध्यें लवचीकपणा (शिथिलता) आणण्याची पद्धत. *Spread'er, n.* अंथरणारा, पसरणारा, फैलावणारा.

Spree, *n. & v. i.* (स्प्री)—bit of fun; carouse, drunken frolic, bout of drinking. मौज; चैन, नाचरंग; दारू पिण्याची चढाओढ, झिंगून दंगामस्ती करणें. *To be on the s.*, नाचरंग-धिंगामस्ती-करणें.

Sprew, *n.* (स्प्रू)—a S. Afr. bird having iridescent plumage; a glossy starling. सप्तरंगी पिसारा असलेला एक (आफ्रिकेंतील) पक्षी; एक लहान पक्षी.

Sprig, *n.* (स्प्रिग)—twig or shoot of some plant; (*fig.*) (usu. contempt.) youth, scion; a small headless nail. डहाळी, उपशाखा, अंकुर; अपत्य, (तरुण) पोर; शंकूसारखा (बिनडोक्याचा) लहान खिळा. *v. t.* to ornament with ss. (वर) वेलबुट्टी काढणें, वेलीचें नक्षीकाम करणें. *A s. of the nobility*, थोरामोठ्याचें पोर. *S.-tail, n.* अणकुचीदार शेपटीचें बदक इ. *Sprig'gy, a.; Sprig'ged, pa. t. & pa. p.*

Sprigh'tly, *a.* (स्प्राइट्-लि)—vivacious, lively, brisk; in high spirits. आनंदी, उल्हासी; रंगलेला, स्फुर्तीत आलेला, रंगेल. *-liness, n.*

Spring, *v. t. & i.* (स्प्रिंग)—(*Sprang, Sprung*) to burst forth; leap, jump; be descended from; well up from below the ground; jump from the ground; bring suddenly into action or view; rise from a base; (of wood) warp, split, crack; rouse game; cause (mine) to burst. फुटणें, उगवणें; उडी मारणें, उडणें; (पासून) उगम पावणें, उत्पन्न होणें; जमिनींतून उजणें,-फुटणें; उडी मारणें; जोरानें बाहेर येणें, एकदम उपस्थित करणें, -होणें,-घडविणें, च्या पायावर उभारणें; वांकणें, बांक येणें; भेग पडणें, भेताळणें; शिकार उठाविणें; स्फोट करविणें,-उडविणें, सुरुंग लावणें. *n.* a leap, springing motion; a place where water or oil wells up; (*fig.*) a motive or source of action; the season of early vegetation (March 21 to June 22); a piece of metal, &c. used to exert elastic force; recoil; upward curve (of beam etc.); springing of leak. उडी, उसळी, झेंप; झरा, निर्झर, उगम, खाण, मूळ, प्रेरणा, प्रेरकशक्ति; वसंत ऋतु; दाबखीळ, स्प्रिंग, कमान; मागील ओढ; उठावदार वळण -बांकण; फूट, झरा, भोंक पडणें, रंध्र. *A branch sprang back*, फांदीनें मागें ओढ घेतली. *To s.* (*seed sown*), वाफा येणें. *S. forwards*, झेंप घालणें, झांप घालणें, झेंपावणें. *Where do you s. from?* तूं अकस्मात कोठून आलास! *The buds are springing*, कळया येत आहेत. *He loves to s. surprises on us*, त्याला आम्हांपुढें नवीन नवीन आश्चर्य (कारक गोष्टी) निर्माण करण्याची हौस वाटते, कांहींतरी नवीनच तो आम्हांपुढें आणतो. *S. a leak*, develop leak from starting of timbers. (लांकडांना) फट पडून भोंक पडणें,-आंत पाणी येऊं लागणें. *S. the or her luff*, yield to helm and sail nearer to wind. गलबताची नाळ वाऱ्याकडे होणें,-वळणें. *S. a butt*, (गलबताच्या) फळीचें टोंक सैलावणें. *Hot s.* उन्हाळें, ऊन पाण्याचा झरा. *Mineral ss.*, औषधी पाण्याचे झरे. *S. balance*, ताणकाटा. *S. bok*, S.-Afr. gazelle; (pl.) nickname. (द. आफ्रिकेंतील एक जातीचा) काळवीट, हरीण; द. आफ्रिकन लोक. *S. gun*, (आगंतुक मनुष्याचा किंवा पशूचा धक्का लागतांच) उडणारी बंदूक. *S.-halt*, (मागचा पाय उचलतांना इजा करणारा) घोड्याचा रोग. *S. tide*, high tide occurring after full and new moon. उधान, उधानाची भरती. *Spring'tide,-time*, season of spring. वसंत (ऋतु). *Spring-like,-less, aa. Spring-let, n.*

Springe, *n.* (स्प्रिंज)—noose or snare for small game. (लहान शिकार-जनावर-पकडण्याचा) चाप, फांस, जाळें.

Spring'er, *n.* (स्प्रिंगर्)—In vbl. senses; (esp.) support from which an arch springs; a breed of spaniel; a springbok. (कमानीची) बैठक, आधार; एक जातीचा कुत्रा; (द. आफ्रि.) काळवीट.

Spring'y, *a.* (स्प्रिंगि)—elastic. स्थितिस्थापक; लवचीक. *Spring'iness, n.* स्थितिस्थापकता.

Sprin'kle, *v. t.* (स्प्रिंकल्)—to scatter in small drops or particles, to besprinkle, to bedew; fall in drops on. शिंतडणें, शिंपडणे, सडा घालणें, पाणी शिंपडणें; शिंतोडे टाकणें,-पडणें. *n.* a light shower of rain etc. (पावसाचें) शिंतडणें, रिमझिम सर. *Sprink'ler, n.* शिंपडणारा; झारी; झारीसारखी तोटी.

Sprink'ling, *n.* (स्प्रिंक्लिंग्)—(*esp.*) a few here and there, a small quantity sprinkled. थोडेसें, तुरळक, अल्प प्रमाण, थोडासा भाग.

Sprint, *n.* & *v. i.* (स्प्रिंट)—run for short distance at utmost speed. (अल्प अंतर) भरधांव धांवणें, अति वेगाची दौड.-*er, n.*

Sprit, *n.* (स्प्रिट)—a small spar reaching diagonally from mast to upper outer corner of sail. (डोलकाठीपासून शिडाच्या वरच्या टोंकाला जाणारा) आडवा लहान दांडा.

Sprock'et, *n.* (स्प्रॉकिट)—each of several teeth on wheel. चांकाचा दांत. *S. wheel,* (दुचाकीचें -बायसिकलचें) दांतेवालें (सांखळी अडकण्याचें) चांक.

Sprite, *n.* (स्प्राइट)—elf or fairy. लहान खोडकर भूत; वनदेवता.

Sprout, *v. i.* & *t.* (स्प्राउट)—to put forth shoots, hair etc.; to have a sprout; spring up; produce by sprouting. अंकुर किंवा कोंब येणें, पालवणें; रुजवणें; वाढणें, उंच होणें; फुटणें, फुटून येणें,-वाढणें. *n.* shoot of plant, young growth of a branch, etc.; (pl.) Brussels ss. अंकुर, कोंब, दिरा, टिकशी, पालवी; खुंटभाजी, निपालवीची भाजी.

Spruce, *a.* (स्प्रूस)—neat in dress and appearance, of trim smart appearance. झकपक, लकलकीत, नखरेबाज. *v. t.* to smarten (oneself *up*). झकपक पोषाख करणें, नोकझोंक करणें.-*ly, adv.*; -*ness, n.*

Spruce, *n.* (स्प्रूस)—(*S.* fur) kinds of fur. फर जातीचें झाड. *S.-beer,* medicinal infusion from spruce. फरच्या पानांचा औषधी अर्क.

Sprue, *n.* (स्प्रू)—1. passage through which metal is poured into mould; metal filling sprue. धातु मुशींत (सांच्यांत) ओतण्याचें साधन, -प्रवाह; प्रवाहिकेंतून वाहणारी धातु. 2. a tropical disease with ulcerated mouth, etc. संग्रहणी, तोंडाचा रोग.

Spru'it, *n.* (स्प्रूइट)—(S.-Afr.) a small stream of water-course. (उन्हाळ्यांत आटणारा) ओढा, प्रवाह.

Sprung, *pa. t.* & *pa. p.* of Spring.

Spŭd, *n.* (स्पड)—a kind of weeding implement; (*sl.*) a potato: a short thick thing. रान उपटून टाकण्याचें यंत्र, लहान खोरें,-कुदळ; बटाटा; आंखूड व जाड वस्तु. *Spuddy, a.* आंखूड व जाड.

Spūme, *n.* & *v. i.* (स्प्यूम)—froth, to foam. फेंस, फेंस येणें. *Spumy, a.* तवंगाचा, फेसाळ.

Spun, *pa. t.* & *pa. p.* of Spin.

Spŭnk, *n.* (स्पंक्)—mettle, grit; anger. दम, धमक, जोम, जोर; आवेश.-*y, a.*

Spŭr, *n.* (स्पर्)—a pricking instrument worn on horseman's heel; a thing that acts as an incitement, stimulus, incentive; a projection or back of cock's leg or at base of a flower; a ridge running out from mountain -mass. कांटा, आर, टांच, खिळा; उत्तेजक वस्तु, प्रोत्साहन, उत्तेजन; नांगी, नखी; (फुलाची) आर; (पर्वताचें) शिंग, शृंग. *v. t.* & *i.* to put spurs to, to incite to action, to press forward. घोड्याला टांच मारणें; उत्तेजन, देणें, जोरानें प्रयत्न करविणें; दौडणें, भरधांव फेंकणें. *To put* or *set ss. to,* to spur. घोड्याला टांच मारणें.-झोडणें. *To win* one's *ss.* (hist.), सरदारकी मिळविणें; नांव,-मान्यता,-मिळविणें. *To need the s.,* रेंगाळत चालणें, आळसावणें. *On the s. of the moment,* impromptu. तात्कालिक स्फूर्तीनें, तत्काल. *To s. a willing horse,* (*fig.*) be needlessly importunate. विनाकारण लोंचटपणा करणें,-लाळघोटे-पणा करणें. *S.-wheel,* मिथ्या त्रिज्यात्मक-दात्यांचें चक्र, -चांक. *S. wort,* एक वनस्पती. *S.-less, a.*

Spūr'ious, *a.* (स्प्यूरिअस)—not genuine: counterfeit, false, fictitious; pretended. नकली, खोटा; बनावट; ढोंगी, (Zool.) भ्रामक, दिखाऊ.-*ly, adv.*; -*ness, n.*

Spŭrn, *v. t.* (स्पर्न्)—to push away with the foot in contempt, to treat with contempt. तिरस्कारानें लाथाडणें, झिडकारणें, धिक्कारणें. *n.* spurning, contemptuous rejection. झिडकारणें, झिडकार, तिरस्कार.

Spŭ'rrier, *n.* (स्परिअर्)—a spur-maker. टांच -खिळे बनविणारा.

Spŭrt, Spirt, *v. i.* & *t.* (स्पर्ट)—to burst forth in a jet; to increase the pace. चिळकांडी उडणें, -उडणें,-टाकणें; गति वाढवणें, उसळी मारणें. *n.* a jet or burst; a sprint, a sudden act. चिळकांडी; उकळी, उमाळा, झटका.

Spŭtt'er *v. t.* & *i.* & *n.* (स्पटर्)—to move the lips with repeated spitting action; to speak with incoherent haste. थुंकी उडेल असें भराभर बोलणें; तोंडांतल्या तोंडांत बोलणें; थुंका, थुंकी. -*er, n.*;-*ingly, adv.* थू थू करून, थुंकी उडत, -उडवीत.

Spū'tŭm, *n* (स्प्यूटम्)—(*pl.-ta*). ejected saliva; any expectorated matter, esp. as characteristic of disease. थुंकी, थुंका; खाकरा.

Spȳ, *n.* (स्पाय)—a person secretly collecting and reporting informtion; a person who keeps (secret) watch on movements of others. हेर, चार; गुप्त नजर ठेवणारा मनुष्य. *v. i.* & *t.* to act as a spy (*upon*); to discern by scrutiny. हेराचें काम करणें, हेरणें; टेहळणें. *To s. out,* explore secretly. गुप्त रीतीनें शोधून काढणें *S.-glass,* a small telescope. लहान दुर्बीण. *S.-hole,* a peep-hole. चोरखिडकी.

Squab, *n.* (स्क्वॉब्)—an unfledged bird; a short fat person; a cushion, couch. पंख न फुटलेला पक्षी; टेंगू लठ्ठ मनुष्य; मऊ गिरदी. *a.* short and plump. स्थूल, ढुल्ला, टेंगू आणि लठ्ठ. *adv.* with a heavy fall. धपदिशीं, धाडकन्. *Squab'by, a.*

Squa'bble, *n.* & *v. t.* (स्क्वॉबल्)—a quarrel about trifles, wrangle, to brawl, to scuffle; (Print.) disarrange composed type. क्षुल्लक गोष्टीबद्दल भांडणें,

झगडणें, झगडा करणें, खटका उडणें; झुळवलेला टाइप (टंक)—ढांसळणें, सरकणें.-r, n. भांडखोर.

Squad, n. (स्क्वॉ'द)—a party of men, being drilled or employed together. कामकऱ्यांची टोळी, तुकडी; कवाइतीकरितां जमलेले लोक, नवशिकी तुकडी. S. drill, प्राथमिक कवाईत. Awkward s., कवाईत शिकणारी तुकडी; नवशिके विद्यार्थी.

Squa'dron, n. (स्क्वॉ'ड्रन्)—a division of cavalry regiment, consisting of two troops and containing 120 to 200 men; any orderly body of persons; a number of warships grouped into a temporary unit; a division of R. A. F. घोडेस्वारांच्या दोन तुकड्यांचा विभाग,-गट; संघ; आरमाराची तुकडी,-चा काफिला; लष्करी विमानांचा काफिला. v. t. to form into ss., तुकडी बनविणें S.-leader, लष्करी विमानांच्या तुकडीचा प्रमुख अधिकारी.

Squail, n. pl. (स्क्वेल्)—a game with small wooden discs on round table or board. एक बैठा खेळ.

Squa'lid, a. (स्क्वॉ'लिड्)—dirty or wretched with neglect or want, foul, extremely dirty. ओंगळ, हिडिस, दरिद्री, कंगाल, भिकारी.-ily,-ness, nn.-qual'or n. घाणेरडेपणा, ओंगळपणा. Squal'idly, adv.

Squall, n. (स्क्वॉल्)—a discordant cry or scream; a sudden violent storm of wind esp. at sea and with rain. किंकाळी, टाहो; वावटळ, झंझावात. v. i. & t. to cry out, scream; (usu. of babies) utter in discordant voice. केंकावणें, केंकाटणें, केंकटून रडणें; कर्कशपणें बोलणें. Arched s., विषुववृत्तावरील, कमानीसारखे काळे ढग जमून होणारा, झंझावात,-वादळ. Black-s., काळा ढग येऊन सुटणारा सोसाट्याचा वारा. White s., विनढगाची वावटळ. To look out for ss., (fig.) (भावी अनर्थाविषयीं) सावध असणें,-राहणें. Squa'ller, n. केंकाटणारा, किंकाळणारा.

Squa'lly, a. (स्क्वा'लि)—(of weather) boisterous. वावटळीची, आकस्मिक वादळी (हवा).

Squā'loid, a. (स्क्वे'लॉइड्)—like a shark. शार्क माशासारखा.

Squa'lor, n. (स्क्वॉ'लर्)—squalidness. ओंगळपणा.

Squā'ma, n. (स्क्वे'मा)—(pl-ae), (Bot., Zool.) a scale, scalelike feather or part of bone. (त्वचेवरील) खवला, पापुद्रा. Squā'mous, a. खवले असलेला.

Squa'nder, v. t. (स्क्वॉ'न्डर्)—to spend wastefully; to scatter lavishly, to fling away. उधळणें; विल्हेवाट करणें, वाट लावणें, उधळून टाकणें.-er, n. उधळ्या मनुष्य, दिवाळखोर, उडण्या.-ingly, adv. Squanderma'nia, n. युद्धानंतरची आणि इतर खर्चाची उधळपट्टी,-दिवाळखोरी.

Squāre, a. (स्क्वेअर्)—of the shape of an equilateral rectangle; rectangular; of equal breadth and length; angular, not round; properly arranged; thorough, uncompromising; even, quits; (of number) that is a square; honest or fair. समचतुष्कोणी, चौकोनी; चौरस, समचौरस; आडवा, आडव्या आंगाचा,-बांध्याचा; चौकोनी; ठाकठीक, व्यवस्थित लावलेला; रोखठोक, सरळ, स्पष्ट; फिटंफाट, सारखा, सरळ, समचित्त; सरळ, न्याय्य, रास्त; वर्गाचा, वर्ग-; सरळ, नीट, थेट, अचूक, ठीक. n. an equilateral rectangle; an object of approximately this shape; a space in town enclosed by houses; a body of troops presenting four fronts; L-shaped or T-shaped instrument; standard or pattern (fig.); set of words arranged in squares; (U. S. sl.) a square meal; product of a number multiplied by iteslf. चौकोन, समचतुष्कोण, (सम-) चौकोनी वस्तु; चौक, चौरस क्षेत्र; (सैन्याचा) कोट; गुण्या, काटकोन,-कोन्या; योग्य प्रमाण,-माप, नमुना; कोष्टक, घर; यथास्थित भोजन; वर्ग, द्विघात. v. t. & i. to make a square; make rectangular; multiply a number by itself; to be square or tally with, reconcile; (colloq.) pay (bribe); (sl.) secure silence or acquiescence of by persuasion or bribery; assume attitude of a boxer. चौकोन,-नी करणें; चौपाटणें, चौपट करणें; वर्ग करणें; द्विघात करणे; बरोबर किंवा चुकता करणें, मिळता करणें,-होणें, मूठ दाबणें, लांच देणें; लांच देऊन गप बसविणें,-अनुकूल करून घेणें; हातघाईवर येणें, अस्तन्या वर सारणें. S. inch,-foot, चौरस इंच (एक इंच लांब, एक इंच रुंद), चौरस फूट (क्षेत्रफळ). S. measure, क्षेत्रफळ (चौरस इंच वगैरेंनीं मोजण्याचें). A table 4 ft s., चार फूट लांब व चार फूट रुंद असें मेज. S. root, वर्गमूळ (जसें, ९ चें वर्गमूळ ३ आहे). A s. deal, fair bargain. चोख व्यवहार, योग्य व्यवहार. To get s. with, (creditors), (सावकारांचें) देणें भागविणें. S.-built, चौकोनी आकाराचा, रुंदट. S. sail, चौकोनी शीड. S.-shouldered, रुंद खांद्याचा (छातीचा). S. toed, having boots with s. toes; (fig.) formal. चौकोनी टोकांचे बूट घातलेला; ऐटबाज, छानछोकीचा. S.-toes, नीटनेटका मनुष्य. He plays s., प्रामाणिकपणानें खेळतो, योग्य तऱ्हेनें खेळतो. Lives in the next s., पुढल्या चौकांत (रस्त्यांच्या) राहतो. Out of s., not at right angles. काटकोनांत नसलेला. On the s., fairly, honestly. प्रमाणिकपणानें, सरळपणानें. By the s., exactly. नेमका, अचूक, बरोबर. Word-s., शब्दांचें कोष्टक,-घर, कोडें. The s. of 9 is 81, ९ चा वर्ग ८१ आहे. 3 squared is 9, ३ चा वर्ग ९ आहे. To s. account with, s. up., settle, pay (bill), (fig.) have revenge on. खातें चुकतें करणें, बाकी पूज्य करणे; चा सूड घेणें, चें उट्टें घेणें. To s. the circle, दिलेल्या वर्तुळाइतकें क्षेत्रफळ असणारा सम चतुष्कोन-चौरस-काढणें; दिसण्यांत अशक्य अशी गोष्ट करून दाखविणें. Squarely, adv.; Squāre'ness, n., Squarish, a.

Square'leg, n. (स्क्वे'अलेग)—(crick.) a fielder on batsman's left nearly level with wicket. (क्रिकेट) खेळणाऱ्याच्या डावीकडचा क्षेत्ररक्षक, त्याची जागा.

Squāre'rōōt, *n.* (स्क्वे'अरूट्)—a factor that multiplied by itself gives the given number or quantity. वर्गमूळ.

Squa'rrose,-ous, *aa.* (स्क्वॉ'रस)—(Bot., Zool.) rough with scale-like processes. खवले असलेला, ओबडधोबड अंगाचा.

Squar'son, *n.* (स्क्वॉ'र्सन्)—a squire and parson in one. जमीनजुमलेवाला खिस्ती पाद्री.

Squash, *v. t. & i.* (स्क्वॉश)—to squeeze; to snub or suppress (person); to squeeze one's way (into), pack tight. पिळणें, चेंदा करणें, चेंदामेंदा करणें, दावणें; (टोमणा मारून) गप्प करणें, नाहींसा करणें, चीत करणें; रेटारेटी करून मार्ग काढणें; गच्च -घट्ट-पाधणें. *n.* crowded state; a crowd; a sudden fall of a heavy soft body, squashed thing or mass. कोंबणें; गर्दी, चेंदामेंदी; धप असें वाजणें; चेंदामेंदा, थिरथिरी. *S. rackets,* a game played with rackets and soft ball. एक प्रकारचा चेंडूचा खेळ. *S. hat,* मऊ लोंकरीची टोपी. *Squas'hy, a.* गिलगिलीत; दलदलीचा. *Squash'iness, n.*

Squash, *n.* (स्क्वॉ'श्)—*S.-gourd,* kind of gourd. डांगर, भोपळा.

Squat, *v. i.* (स्क्वॉ'ट्)—to sit on one's hams or heels, or on ground with knees drawn up, (of animals) crouch close to ground; sit (*down, on*). उकिडवा बसणें, जमिनीला चिकटून (भुईसरपट) बसणें; (खालीं, वर) बसणें. *a.* sitting on the hams; (of person etc.) short and thick. उकिडवा, चपटा, बसकट; फेंदरा, बसकें (नाक इ.). *n.* a squatting position, a squat person. उकिडवा बसणें,-बी बैठक; ठेंगू आणि जाड मनुष्य. *Squatter, n.* In vbl. senses: (esp.) an Australian sheepfarmer; (U. S.) a person who settles on new land without title. उकिडवा बसणारा; (ऑस्ट्रेलियांतील) मेंढपाळ; बिगरहक्क वसाहत-वाला.

Squaw, *n.* (स्क्वा)—an Amer.-Ind. woman or wife. रेड इंडिअन स्त्री,-पत्नी. *S.-man,* अशा स्त्रीशीं लग्न केलेला श्वेतवर्णीय मनुष्य.

Squawk, *v. t. & n.* (स्क्वाक्)—(to utter) harsh cry of pain or fear (chiefly of birds). (पक्ष्याचें) कर्कश ओरडणें. [imit.]

Squeak, *n.* (स्क्वीक्)—a short shrill cry or sound; (*sl.*) a close affair. किंकाळी, चीं चीं, करकर; गुप्त गोष्ट. *v. i.* to give out shrill sound as of mouse or unoiled hinge; utter shrilly; (*sl.*) turn informer. चीं चीं करणें, करकरणें; किंचाळणें, किंचाळून बोलणें; माफीचा साक्षीदार होणें, गुप्त गोष्ट फोडणें. *Narrow. s.,* थोडक्यावर निभावणें, जेमतेम यश मिळणें.*-y, a.;-ily, adv.*

Squeal, *n.* (स्क्वील)—a shrill sustained cry. किंचाळणें, (दुःखाची) किंकाळी. *v. i.* to utter or emit a *s.*, (U. S., sl.) betray by confession, confess. (दुःखानें) किंचाळणें, ओरडणें; द्रोह करून (गुप्त गोष्ट) कबूल करणें.*-er, n.* लहान पारवा,-कबुतर.

Squeam'ish, *a.* (स्क्वी'मिश)—fastidious; of delicate stomach or conscience. चोखंदळ, खोडकर, खंतखोर, खोडयाळ; नाजूक कोठ्याचा, बेतबात्या.*-ly adv.; -ness, n.*

Squeegee', *n.* (स्क्वीजी')—(Also, *squilgee'*) a rubber-edged implement, used to push moisture off a smooth surface; a small roller used in photography. दांड्याचा रबरी रूळ, पीडन-यंत्र. *v. t.* to treat with a *s.* पीडनयंत्रानें ओलावा किंवा पाणी पुसून टाकणें.

Squeeze, *v. t. & i.* (स्क्वीझ्)—to exert pressure upon, compress with hand or between two bodies, thrust (*oneself,* person, thing, *into, out of,* vehicle, room etc.) forcibly; make one's way by squeezing; oppress, crush; wring (water, juice, money etc.) from something; extract information by pressure; produce with effort (a tear etc.); take impression of. चेपणें, चापटणें, आवळणें, पिळणें; जोरानें ढकलणें, घुसडणें, कोंबणें; चेंगरून वाट काढणें; पिळून काढणें, चिरडणें; (पाणी,-पैसा,-) पिळून काढणें, -उकळणें; दडपण घालून,-आणून-माहिती काढून घेणें; प्रयत्नानें (अश्रु) काढणें; चा ठसा घेणें. *n.* an act of squeezing; a crowded state, a forced exaction or impost; a levy; an impression (of coin etc.). चेपणें, दाबणें, पिळणें; रेटारेटी, गर्दी; जबरदस्तीची वसुली,-कर; कर; ठसा. *To s a person's hand,* (प्रेमानें, सहानुभूतीनें) हस्तांदोलन करणें. *Squeezed orange, (fig.)* a person or thing from whom or which nothing more is to be had. अगदीं पिळून निघालेला मनुष्य,-वस्तु. *Squeez'able, a.,-ability, n.* (*esp.*) lack of moral firmness. नैतिक बळाचा अभाव. *Squeez'er, n.*

Squelch, *v. i. & t.* (स्क्वेल्च्)—(*colloq.*) to suppress, stamp on, make sucking sound as of hoof drawn out of stiff mud. दाबून टाकणें, दडपणें; 'सप' असा आवाज करणें. *n.* an act or a sound of squelching. दडपण, दाब; 'सप' असा आवाज [imit.]

Squib, *n* (स्क्विब्)—small firework thrown by hand, a tube of gunpowder, lampoon. फटाका, फटाकडी, हातनळा, दारूची नळी; औपरोधिक लेख किंवा भाषण, फटका. *v. t. & i.* to write, attack, with lampoons. औपरोधिक लेख लिहणें, वर फटका रचणें.

Squiffy, *a.* (स्क्विफि)—(*sl.*) slightly drunk. थोडासा झिंगलेला.

Squint, *v. i.* (स्क्विन्ट्)—to have the eyes turned in different direction; look sidelong. तिरवा पाहणें, तिरवेपणा असणें; आडपडद्यानें पाहणें. *n.* squinting set of the eyeballs, an oblique look तिरवी दृष्टि, तिरवेपणा. *S.-eyed, a. (fig.)* malignant. तिरव्या दृष्टीचा; दुष्टपणाचा, द्वेषमूलक. *Squin'ter, n.*

Squire, *n.* (स्क्वायर्)—a country or landed gentleman; (*hist.*) knight's attendant; woman's escort or gallant. जमीनदार, उमराव; हुजऱ्या; स्त्रीचा सोबती,-स्त्रीसहवासप्रिय. *A. s. of dames*, स्त्रियांच्या सहवासांत राहणारा, बायक्या मनुष्य. *v. t.* (of man) स्त्रियांना सोबत करणें,-चें हुजरेपण करणें. *S. hood,-let,-ling,-ship, nn.*

Squir'archy, *n.* (स्क्वाय'रार्कि)—the landed class. जमीनदारवर्ग.

Squireen', *n.* (स्क्वायरी'न्)—a small land-owner in Ireland. आयर्लंडमधील लहान जमीनदार.

Squirm, *v. i. & n.* (स्क्वर्म्)—to writhe like a worm; wriggle; (*fig.*) to show, feel, embarassment. वळवळणें, (अंगाला) पिळे देणें; अस्वस्थ होणें-वाटणें.

Squi'rrel, *n.* (स्क्वि'रल)—a bushy-tailed arboreal rodent quadruped with pointed ears. खार, च्यानी, खडी. *A barking s.*, a prairie-dog. (उत्तर अमेरिकेंतील) तीक्ष्णदंती (कुत्र्यासारखी ओरडणारी) खार. *S. tail*, एक प्रकारचें गवत.

Squirt, *v. t. & i.* (स्क्वर्ट्)—to shoot out in a jet, esp. from a syringe. वर चिळकांडी उडवणें, पिचकारी मारणें. *n.* a syringe. पिचकारी, चिळकांडी.

Stăb, *n.* (स्टॅब्)—a thrust or wound with a sharp weapon; sudden acute pain or attack (on person's feelings). भोंसकणें; तीव्र वेदना, (च्या अब्रूवर-भावनेवर-) तीव्र घाव,-हल्ला. *v. t. & i.* to give a stab, to pierce or wound with something pointed, aim blow at (reputation, person, etc.). भोंसकून जखमी करणें, भोंसकणें; खुपसणें; (ला) धक्का लावणें,-पोंचवणें. *S. in the back*, slander. (अपरोक्ष) निंदा,-बदनामी,-करणें. *Stab'ber, n.*

Stă'bility, *n.* (स्टॅबिलिटि)—steadiness, firmness. मजबुती, स्थैर्य, स्थिरता, कायमपणा. *S. of value*, किंमती कायम-स्थिर-राहणें.

Stā'ble, *a.* (स्टे'बल)—abiding; likely to endure, firm, steady, constant. स्थिर; स्थायी; टिकाऊ; मजबूत; खंबीर, करारी, निश्चयी, दृढ, अचल. *Stabilize, v. t.* to make stable. स्थिरता आणणें, घळकट करणें; कायमपणा-स्थिरता-आणणें. *Stabilizer, n.* (esp.) air-craft's fixed horizontal tail-plane. विमानांची (कायम बसविलेली) न हालती मागील टोंकाची आडवी पातळी. *Stabiliza'tion, Sta'bleness, nn.* [L. *stabilis, stare*, Skr. *stha, stand*]

Stā'ble, *n.* (स्टे'बल)—a building in which horses are kept. तबेला, घोडशाळा; विशिष्ट तबेल्यांतील शर्यतीचे घोडे. *v. t. & i.* to put, keep, or accommodate in a stable. तबेल्यांत घालणें,-ठेवणें,-राहणें. *Stable-boy, stable man*, मोतद्दार. *S.-call*, घोड्यांना पाणी दाखविण्याची व चंदी देण्याची सूचना. *S. companion*, a horse of same stable; (colloq.) a member of same school or club. (एकाच तबेल्यांतील) जोडीदार घोडा; त्याच संस्थेतील किंवा मंडळांतील जोडीदार-सभासद.

Stā'bling, *n.* (स्टे'ब्लिंग)—In vbl. senses; stable-accommodation. तबेल्यांत ठेवणें,-बांधणें; तबेल्याची सोय. *S.-charges*, तबेल्याचें भाडें.

Stăb'lish, *v. t.* (स्टॅ'ब्लिश्)—to make stable. स्थिर करणें, दृढ बसविणें.

Stacca'to, *a.* (स्टका'टो)—(Mus.) with sharp separation of notes. द्रुतगति व सूर पाडून (वाजवणें, गाणें.) [It.]

Stăck, *n.* (स्टॅक्)—a pile of hay or sheaves; a pile, heap, number of chimneys standing together. (colloq.) large quantity. गवताची गंज, अडवी; ढीग, रास; जवळजवळ असणारीं धुराडीं; विपुलता, अगणितपणा, बाहुल्य. *v. t.* to form into stacks. गंज करणें,-रचणें, उडवें डाळणें. *Have ss. of work*, कामाचे ढिगारे पडले आहेत. *Smoke-s.*, इंजिनाचें,-आगबोटीचें,-धुराडें,-फनेल. *S. arms*, पुष्कळशा बंदुका एकत्र उभ्या ठेवणें.

Stactŏ'meter, *n.* (स्टक्टॉ'मिटर्)—a tube for measuring liquid in drops. बिन्दुमापननलिका. [Gk *stazo*, drip]

Stā'dium, *n.* (स्टे'डिअम्)—(pl.-*ia*), a foot-race course about 202 yds, in anc.-Gk athletic contests; a modern athletic ground; (Med.) a stage or period of disease. दौड मारण्याचें रंगण,-जागा; आखाडा, क्रीडांगण,-रंगण; रोगाची अवस्था,-मुदत. [Gk *stadion, sta*, stand]

Stăff, *n.* (स्टाफ्)—a stick or pole as weapon or support or as symbol of office; a stick used in surveying etc.; surgeon's steel instrument; body of assistants by whom an institution or business is carried on; (Mil.) a body of officers attached to a commander; (Mus.) (pl. *staves*) a set of parallel lines on which notes are written. सोटा, दंड, दांडा, आधार, अधिकारदंड; जमीन,-उंची,-वगैरे मोजण्याची काठी,-नाप; अशरीहर शलाका, सळई; मदतनीस कामगार मंडळी, नोकरमंडळी, (सेनापतीच्या हाताखालील) अंमलदारमंडळ; (आरोहावरोह-) स्वरलेखनपंक्ति. *v. t.* to provide (institution etc.) with staff. संस्थेंत नोकर-कामगार-मंडळी नेमणें. *You are the s. of his old age*, त्याच्या म्हातारपणाची तूं काठी (आधार) आहेस. *S.-college*, लष्करी अंमलदार तयार करण्याचें विद्यालय. *Editorial s. of newspaper*, वर्तमानपत्राचें संपादकमंडळ.-*staffed, a.*

Stăff, *n.* (स्टाफ्)—mixture of cement, plaster-of-Paris etc. as building material. (रेती, चुना वगैरेचें) बांधकामाचें मिश्रण.

Stăg, *n.* (स्टॅग्)—male of red or other large deer; a bull castrated when nearly full-grown: (Stock Exch.) a person who applies for allotments in new concerns with a view to selling at once at a profit; (sl.) an irregular dealer in stocks. काळवीट, एक जातीचा हरीण; खच्ची केलेला-बडवलेला-बैल; (पुढें भाव वाढून फायदा मिळेल म्हणून) नवीन धंद्यांतील विभाग (शेअर्स) आगाऊ

घेणारा मनुष्य; ठेवींचा अनियमित व्यवहार करणारा मनुष्य *S.-evil*, घोड्यांचा जबड्याचा रोग. *S.-horn*, मवाद कीटकांची एक जात. *S.-hound*, काळविटांची शिकार करणारा मोठा शिकारी कुत्रा.

Stāge, *n.* (स्टेज)—a platform. of boards. the part of a theatre on which the actors perform the drama, acting profession. (fig.) the scene of action, part or period of development interval between stopping-places; a stopping place. परांची, माच, उच्चासन, व्यासपीठ; रंगभूमि; नाट्य, नाटकगृहें, नाटकमंच, नाट्यकला, नाट्यधंदा; कर्तव्यक्षेत्र,-भूमि; अवस्था,-स्थिति-काल; मजल, टप्पा, टप्प्यामधील अंतर; मुक्काम. *v. t.* to put (a play) on the theatrical stage. (*fig.*) to arrange with a view to effect. रंगभूमीवर आणणें; प्रयोग करणें, प्रयोगांत वठणें, उठाव होणें. *Landing s.*, बंदर-धक्का. *To go on the s.*, नाटकांत जाणें. नट होणें. A *critical s.*, आणीबाणीची वेळ,-परिस्थिति. *The s. of politics*, राजकारणाचें क्षेत्र *S.-coach*, डाकेची गाडी, टपालाचा टांगा; टप्प्या-टप्प्यांनीं थांबून जाणारी गाडी. *S. craft*, नाट्यलेखन-कौशल्य, प्रयोगविज्ञान. *S.-direction*, पात्रांना (अभिनयविषयक वगैरे) सूचना. *S.-door*, (पात्रांना रंगभूमीवर जाण्यायेण्यासाठीं) रंगभूमीच्या मागचा दरवाजा. *S.-effect*, खेळाचा उठाव (दारपणा). *S.-fever*, नाटकांत काम करण्याची अनावर हौस. *S.-fright*, (प्रथमच रंगभूमीवर आल्यानें) पात्राला-नटाला-वाटणारी भीति,-होणारा सभाकंप. *S.-manager*, रंगभूमि-व्यवस्थापक. *S.-right*, (नाटकाच्या) प्रयोगाचा हक्क. *S.-whisper*, नेपथ्ये, बाजुला (कुजबुजून इतरांना ऐकूं जाईलसें बोलणें).

Stā'ger, *n.* (स्टेजर्)—*Old s.*, a person of experience. जुना, अनुभविक,-मनुष्य.

Stă'ggard,-t, *n.* (स्टॅगर्ड,-र्ट)—a stag four years old. चार वर्षांचें मोठें काळवीट.

Stăgg'er, *v. i. & t.* (स्टॅगर्)—to go unsteadily as if about to fall, to totter, to sway helplessly, shake conviction etc. of; arrange in zigzag order. झोंके खाणें, लटपटणें, झोकांडे खाणें; डळमळणें गडबडणें; डळमळविणें, साशंक करणें; वांकडीतिकडी-नागमोडी-रचना करणें. *n.* act of staggering; (Mech) zigzag or slantwise arrangements, (pl.) (*blind ss.*) giddiness, kinds of disease in horses and cattle. झोंक जाणें,-देणें; वांकडी-तिकडी,-तिरपी-रचना; (जनावरांचा) भिरगी (रोग), भोंवळ, चक्कर. *Stagg'eringly, adv.*

Stăgg'erer, *n.* (स्टॅगरर्)—In vbl. senses; an event, argument, etc. that staggers one. चकित,-स्तब्ध,-करणारी गोष्ट, इ.

Stā'ging, *n.* (स्टेजिंग)—putting a play on the stage; driving stage-coaches, a scaffolding. खेळ रंगभूमीवर आणणें, प्रयोग करणें; टपालाचे टांगे हांकणें,-चालविणें; पराची, माचण.

Stăg'nant, *a.* (स्टॅग्नन्ट)—not flowing in a current, without current or tide; motionless; inert, sluggish; unchanging. सांठलेला, कोंडलेला, अस्वच्छ, घाणेरडा; गतिरहित; मंद, थंड; स्थिर, आळशी, न बदलणारा.-*ly, adv.*

Stăg'nāte, *v. i.* (स्टॅग्नेट)—(of liquid) to become motionless, cease to flow; (of life, mind, business) be (come) dull or sluggish. जागच्याजागीं सांठणें, कोंडणें, न वाहणें; मंद-सुस्त-होणें, आळसावणें. *Stagna'tion,-nancy, nn.* सांठणें, कोंडणें, स्थिरता, स्थैर्य, अप्रवाहिता, मंदी, सुस्ती.

Stăgni'colous, *a.* (स्टॅग्निकलस्)—living in stagnant water or swamps. कोंडलेल्या पाण्यांत किंवा दलदलींत राहणारा. [L. *stagnum*, pool: *colere*, inhabit]

Stā'gy, *a.* (स्टेजि)—theatrical in manner, appearance, etc. नाटकी पद्धतीचा,-थाटाचा. -*giness, n.*

Staid, *a.* (स्टेड)—of sober demeanour. धीर, गंभीर, धिमा, शांत.-*ly, adv.;-ness, n.* स्थिरता, धिमेपणा. [*Stayed*]

Stain, *n.* (स्टेन्)—colouring liquid for staining; a coloured spot; fact that sullies a person's reputation, cause of reproach. रंग; ठिपका, डाग; कलंक, बट्टा, ठपका, कालिमा. *v. t. & i.* to discolour, soil; make coloured mark on; (*fig.*) sully, blemish; impregnate (substance) for microscopic examination with (colours); print colours on wall paper. डाग पाडणें, खराब करणें; रंगाची निशाणी करणें; कलंक लावणें बट्टा लावणें, काळोखी फांसणें; रंग भरणें; छापणें. *Without a s. on his character*, निष्कलंक चारित्र्य. *Stain'er, n.* रंग भरणारा. *Stain'able, a. Stain'less, a.* बिनडागाचा; निर्दोष, निष्कलंक.

Stair, *n.* (स्टेअर्)—(*pl.*) set of fixed steps connecting different floors; one such step. (अने०) शिडी, जिना, दादर; पायरी, पावठणी. *Flight, pair, of ss*, (एका रेषेंतील) जिना, दादर, पायऱ्या. *A winding s.*, नागमोडी जिना, वांकणाचा जिना. *Below ss.*, खालीं, तळमजल्यावर; नोकरांत, नोकरांकडून. *Down ss.*, *up ss.*, खालीं, खालच्या मजल्यावर; वरतीं, वरच्या मजल्यावर. S. *rod*, दोन पावठण्यांमधील गालिचा वगैरे घट्ट बसविणारा दांडा.

Stair'cāse, *n.* (स्टेअर्-केस)—the part of a building which contains flights of stairs. जिना, दादर. *Cork-screw s. c.*, मधील खांबाभोंवतीं असलेला नागमोडी-वक्र-जिना.

Stāke, *n.* (स्टेक्)—a stout stick or post pointed for driving into ground; a post to which a person was tied to be burnt alive, (*fig.*) death by burning; a tinsmith's small anvil; amount risked in a wager or match! (*pl.*) money to be contended for (*esp.* in race-horse), such race. मेख, खुंटा, मेढ, शंकु, मेढका; सूळ, शूल, जाळून ठार मारणें,-मरण; उभाळा (लहान ऐरण); पण, पैज, पैजेची रक्कम; (घोड्यांच्या शर्यतींची) पैजेची रक्कम, अशी घोड्यांची शर्यत.

v. t. to fix with stakes; to risk (money, credit, &c.) on an issue, to wager, to pledge. मेढे पुरणें, मोखे घालणें, मोख्याचें कुंपण घालणें; पैज मारणें, पणास लावणें, -ची शर्यत लावणें. *Have a s. in the country,* be materially concerned in its welfare. -च्या हिताविषयीं विशिष्ट हितसंबंध असणें. *To be at s.,* पणास लावलेला असणें, धोक्यांत असणें. *S.-net,* खुंटांवर पसरलेलें मच्छेमारी जाळें. *S.-holder,* सट्टेवाल्यांची पैजेची रक्कम अनामत ठेवणारा.

Stăl'actite, *n.* (स्टॅलक्टाइट)—a deposit of carbonate of lime hanging from roof of cave etc., and formed by trickling of water. (पाणी झिरपून गुहेच्या छपरापासून लोंबणारा) खडूचा,-चुनखडीचा थर. *Stal'agmite, n.* (गुहेच्या जमिनींतून वर येणारा वरीलसारखा) चुनखडीचा उकीर,-थर. [Gk *stalasso,* drip]

Stāle, *a.* (स्टेल्)—lacking freshness, (of athlete) overstrained. शिळा, वासा, जुना, जुनाट; दमलेला, भागलेला. *v. t. & i.* to make stale by overuse; (of horse etc.) make water. अति वापरण्यानें जुना-शिळा-करणें; (घोड्याचें, गुरांचें) मुतणें. *n.* urine of horses and cattle; decoy bird; dupe. (घोड्याचें, गुरांचें) मूत; (इतरांना) भुलवणारा पक्षी; हंसण्याचा विषय. *S. bread.* शिळी भाकर,-पाव. *S. news,* शिळी-जुनीपुराणी-बातमी. *Stale'ly, adv.; Stale'ness, n.*

Stă'lemāte', *n.* (स्टेल्मेट्)—(chess) a state of chess-game counting as draw; (*fig.*) a deadlock in proceedings. राजाला शह न बसल्यामुळें डाव थांबणें,-कुजणें; कुजलेला डाव, काम बंद पडणें,-एकदम थांबणें. *v. t.* to reduce player to standstill; (*fig.*) bring to a standstill. विरुद्ध पक्षाचा पराभव न करतां खेळ थांबणें; (काम) बंद पडणें.

Stalk, *n.* (स्टॉक्)—(Bot.) slender stem of plant or flower; stalk-like support of organ in animals, (Archit.) ornament-like s of plant. देंठ, देंख, वृन्त, दण्ड, नळी; नळीसारखा आधार; देठाप्रमाणें नक्शी.

Stalk, *v. t. & i.* (स्टॉक्)—to steal up to game; walk in stately manner; walk slowly. लपतछपत जाणें; ऐटीनें चालणें, तोऱ्यानें मिरविणें; हळूहळू चालणें. *n.* a stalking gate; an attempt to stalk game. ठुमकणें, ठुमकत चालणें, तोरा, लपत छपत शिकार साधण्याचा प्रयत्न. *Stalking-horse,* a horse behind which a hunter conceals himself. (*fig.*) a pretext. (शिकार करतांना) आड लपण्याचा घोडा; ढोंग, मिष.

Stall, *n.* (स्टॉल्)—compartment for one animal in stable or cow-house; space appropriated to one dealer in market or bazaar; a numbered seat in a theatre; (*pl.*) row of seats lining wall of choir etc., (*sing.*) one such seat; pickpocket's confederate. गोठ्यांत किंवा तबेल्यांत एका जनावराकरितां जागा; एका दुकानाची जागा, दुकान, बैठक; नाटकगृहांतील नंबर घातलेली जागा; (ख्रिस्ती प्रार्थनामंदिरांतील) भिंतीबरोबरच्या बैठकी; अशी एक बैठक,-जागा, खिसेकापूचा साथीदार. *v. t. & i.* to put or keep (a beast) in stall; (motor-engine) stop working; (of aeroplane) become unstable by loss of speed. गोठ्यांत-ठाण्यावर-बांधणें; (मोटरयंत्र) थांबणें; (विमान,-वैमानिक) वेग कमी झाल्यामुळें डळमळूं लागणें. *Book-s.,* पुस्तकांचें दुकान.

Stall'age, *n.* (स्टॉलिज)— a space for, rent for, right to erect stall in a market. दुकानाची जागा, भाडें, दुकान-उघडण्याचा हक्क.

Stall'fed, *a.* (स्टॉल्फेड)—ठाणबंद जनावर.

Stăll'ion, *n.* (स्टॅल्यन्)—a male horse. वळू घोडा.

Sta'lwart, *a.* (स्टॉल्वर्ट)—tall and strong, stout-hearted; courageous. मजबूत, बळकट, धिप्पाड; शूर, धीराचा, धैर्यशाली. *n.* a resolute member of party in politics etc. खंबीर सभासद.*-ly, adv.;-ness, n.*

Stā'mĕn, *n* (स्टेमेन्)—the male organ of fructification in plant, pollen-bearing organ in flower. (फुलांतील) पुंकेसर, नर-केसर. *Stam'inate, a.* (Bot.) having stamens. केवल पुंकेसरयुक्त (पुष्प). *-stamened, Stam'neal,-neous,-niferous, aa.*

Stăm'ină, *n.* (स्टॅमिना)—staying power, power of endurance. जोम, त्राण, धमक, कुवत, वकूब, ताकद.

Stă'minal, *a.* (स्टॅमिनल्)—of stamens or stamina. पुंकेसरांचा; जोमाचा, ताकदीचा.

Stămm'er, *v. t. & i. & n.* (स्टॅमर्)—to speak haltingly, to utter (an excuse etc.) with hesitation. अडखळत बोलणें, तोतरें बोलणें; घाबरत घाबरत बोलणें, लागत बोलणें. *n.* such speech. चोचरेपणा, तोतरेपणा.*-ingly, adv.,-er, n.* तोतरा, चोचरा, बोलतांना लागणारा.

Stămp, *v. t. & i.* (स्टॅम्प्)—to bring food down with force on something; mark (paper, &c.) with a stamped impress; to affix postage or other stamp to; (of action, &c.) serve to distinguish; impress on the memory; crush (ore etc). (वर) पाय आदळणें, हापटणें, पादाघात करणें; पाय आपटणें; छापणें; शिक्का मारणें,-पाडणें, नाणें पाडणें; (ला) तिकिट लावणें,-टकणें; (ला) शिक्का-छाप-मारणें, स्वरूप देणें; स्मृतींत ठसविणें, बिंबविणें, -चा ठसा मारणें; कुटणें, कुट्टन बारीक करणें. *n.* stamping of foot; a stamped impress; piece of printed paper affixed as an indication of an amount of postage paid on a letter or to ensure validity of a document; mark or lable affixed to commodity; (*fig.*) characteristic mark; a block that crushes ore. पाय आपटणें,-वाजवणें,-आदळणें; छाप, शिक्का, ठसा; पोष्टाचें तिकिट, पावतीचें तिकिट; (व्यापारी मालाची) निशाणी, (चांगुलपणाची) खूण;

प्रकार, खूण, विशिष्ट रूप,-प्रत; (अशोधित) धातु कुटण्याचें मुसळ. *To s. out,* put an end to, crush (rebellion etc.). मोडून टाकणें, चीनीट करणें, दडपून टाकणें. *S.-collector,* (निरनिराळ्या देशांचीं) तिकिटें (हौशीखातर) गोळा करणारा. *S.-duty,* (कांहीं खतांवर-दस्तैवजांवर-स्टाम्पच्या-तिकिटांच्या रूपानें भरावयाची) स्टाम्प फी. *S. machine,* (चिंध्या वगैरे कुटून कागद तयार करण्यासाठीं) रांधा कुटण्याचें यंत्र. *S.-office,* (सरकारी स्टाम्प विकण्याची व स्टाम्प फी घेण्याची) स्टाम्प-कचेरी. *Stam'per,* छाप मारणारा, छापवाला; धातु कुटण्याचें यंत्र.

Stămpēde', *n.* (स्टॅम्पी'ड्)—a rush of horses or cattle or people under sudden common impulse, esp. panic, (U. S. polit.) unconcerted movement of many persons. (भीतीमुळें शिपायांची वगैरे) पळापळ, धांवाधांव, धांवपळ, दाणादाण. *v. t. & i.* to make or cause to make such rush. धांवपळ,-दाणादाण उडणें,-उडविणें.

Stănce, *n.* (स्टॅन्स)—position taken for stroke in golf or cricket. टोला मारण्याच्या वेळचा पवित्रा.

Stanch, *See* Staunch.

Sta'nchion, *n.* (स्टा'न्शन्)—a pillar, post; upright bar for confining cattle in stall. मेढका, खांब; दावण, मेढा.

Stipūlā'tion, *n.* (स्टिप्युले'शन्)—a demand stated as condition of consent to an agreement. करार, संकेत, वायदा.

Stip'ūle, *n.* (स्टि'प्यूल्)—(Bot.) a small leaf-like appendage to a leaf (at base of leaf-stem). उपपर्ण, वृन्तपर्ण.-*uliform, a.* उपपर्णाकार, उपपर्णाकृति.

Stir, *v. t. & i.* (स्टर्)—to set or keep moving, cause motion in; excite, rouse; touch the feelings of. हालणें, हालवणें; चाळवणें, चेतविणें, उत्तेजन देणें, चेतना जागृत करणें, जागृति आणणें. *n.* a slight motion seen or heard after stillness; liveliness or display of interest on the part of many people; act of stirring. हालचाल; धामधूम, गडबड; चळवळ; चाळवणें, चालना. *Is not stirring yet,* is still in bed. अजून हालचाल दिसत नाहीं, झोंपला आहे. *S. your stumps,* (colloq.) आटप, पाई कर, पाय उचल. *To lead a stirring life,* be busy. उद्योगांत, गडबडींत असणें. *S. up,* mix well by stirring. कालवून,-ढवळून एकजीव करणें. *Person wants stirring up,* आळशी,-सुस्त,-आहे, त्याला चाळवला पाहिजे. *Stirring times,* धामधुमीचा-चळवळीचा-काळ. *S.-about, n.* शिजवलेलें खाद्य; *a.* धांदल्या, गडबड्या. *Stir'ringly, adv.*; *stir'rer, n.* हालविणारा, ढवळणारा. *Stir'less, a.* शांत.

Stirps, *n.* (स्टर्प्स्)—(Law) progenitor of family; (Zool.) classificatory group. मूळपुरुष; वर्गीकरण-योग्य प्राणी (-समुदाय). [L.=stock]

Sti'rrŭp, *n.* (स्टि'रप्)—rider's foot-rest; (Naut.) a rope with eye. रिकिब, रिकाब; शिडाला ओढणारी फांसाची दोरी. *S. leather,* रिकिबीची वादी,-चा पट्टा. *S.-piece,* लोंबता आधार.

Stitch, *n.* (स्टिच्)—acute pain in side induced by running after meal; single pass of needle. कचक, पार्श्वशूल; उसण, टांका, टांचा, शिवण, शिवणकाम, शिवणकामांतील टांका. *v. t. & i.* to sew. शिवणें, टांका घालणें. *A. s. in time saves nine,* वेळेवर एक टांका घातला तर तो (पुढल्या) अनेक टाक्यांचें काम करतो; वेळेंच जपावें. *Has not a dry s. on him,* अगदीं चिंब भिजला आहे. *Put a s.* or *ss. in,* (in Surgery) शस्त्रक्रियेनंतर टांके घालून (जखम वगैरे) शिवणें. *S.-wort,* (उसण-लचक-यावर औषधी) वनस्पति. *To s. up,* टांके घालून दुरुस्त करणें.

Stith'y̆, *n.* (स्टि'दि)—anvil, forge. ऐरण, लोहाराची भट्टी, लोहारशाळा.

Sti'ver, *n.* (स्टा'इव्हर्)—even the smallest coin. कापदी सुद्धां, पैसुद्धां. *Don't care a s.,* कवडीची सुद्धां किंमत देत नाहीं.

Stoat, *n.* (स्टोट्)—the ermine, any beast of weasel kind. पांढऱ्या लोंकरीचा प्राणी, वीझलप्राणी. *v. t.* to sew up (a tear etc.) with invisible stitches. (न दिसणाऱ्या) टांक्यांनीं शिवून टाकणें, रफू करणें.

Stŏck, *n.* (स्टॉक्)—stump or butt or trunk; a family or breed of definite qualities; the goods or equipment for carrying on a business; money contributed by way of loan to form the capital of a company, money lent to a government; timber frame in which offender's ankles were held, (pl.) timbers on which a ship rests while building; the animals belonging to a farm, kinds of fragrant-flowered garden plant; stiff wide band worn round neck. खोड, सोट, सोटा, खुंट, ठुंठण, दांडा, दस्ता; घराणें, वंश, ताणा, बिजवट; बेगमी, सांठा, साहित्य, सामानसुमान; ठेव, भांडवल, सरकारी कर्ज-रोखे; खोडा (बेडी); (गलबत बांधलें जात असतां) गलबताच्या बांधकामाचा सांगाडा, ढिरा, शिपाई; पशुधन, गुरेंढोरें; सुवासिक फुलझाड; ताठ गळपट्टी. *v. t.* to equip with what is needful, keep (goods) in stock; fit gun with a stock; (hist.) confine in the ss.; cover land with permanent growth. बेगमी करणें, सांठा करणें, (विक्रीसाठीं) सांठा करून ठेवणें; (बंदुकीला) दस्ता बसविणें; खोड्यांत घालणें,-अडकविणें; कुरणाची (गवताची) वाढ कायम राखणें. *Ss. and stones,* निर्जीव वस्तु; आळशी,-सुस्त,-माणसें. *Laughing s.,* butt for ridicule. हसण्याचा,-थट्टेचा,-विषय. *S. of plough,* नांगराचा फाळ बसविण्याचें लांकूड. *Lock, s. and barrel,* (*fig.*) root and branch. समूळ, पाळांमुळांसह, पूर्णपणें. *Comes of a good s.,* प्रतिष्ठित कुळांत जन्मलेला आहे. *Paper s.,* कागद तयार करण्याचा चिंध्या वगैरे कच्चा माल. *Rolling s.,* आगगाडीचे डबे, यंत्रें वगैरे सामायन. *Live s.,* गुरेंढोरें.*Dead s.,* शेतकीचीं आउतें वगैरे हत्यारें. *S.-in trade,* all requisites for a trade; also (*fig.*). धंद्याला लागणाऱ्या आवश्यक वस्तु; वस्त्याचे ठराविक शब्द,-शब्दसमूह, इ० *To have in s.,* (चा) भरपूर पुरवठा असणें. *Take s.,* (चा) आढावा घेणें, मालाची मोजदाद, यादी करणें. *S.-taking, n. Take s. of,* (*fig.*) (स्वभाव वगैरे ताडण्या-करितां) लक्ष देऊन पाहणें. *S. argument, joke,* नेहमींचा, ठराविक, मुद्दा,-विनोद, इ. *Buy, hold, s.,*

(कंपनीच्या भांडवलाचे) भाग, ठेवी विकत घेणें,-धारण करणें. *The ss.*, state's funded debts as a whole. एकंदर राष्ट्रीय कर्ज. *Take s. in, (fig.)* च्यांत लक्ष घालणें. *S.-breeder, farmer*, , गुराढोरांची निपज करणारा. *S.-broker*, (रोख्यांची खरेदी-विक्री करणारा) रोख्यांचा दलाल. *S. car*, गुराढोरांचा (रेल्वेचा) डबा. *S. exchange*, (सरकारी रोखे विकण्याचा) सराफकट्टा; रोख्यांचा व्यवहार करणाऱ्या दलालांची संस्था. *S.-fish*, मीठ न घालतां फाडून उन्हांत वाळवलेली (कॉड वगैरे) मासळी. *S.-jobber,-jobbing,-jobbery*, (person) buying and selling ss., with a view of profiting by fluctuations in price. रोख्यांचे सट्टे करणारा, सट्टेबाज, दलाल. *S. man*, गुराखी, राखणा; (आस्ट्रे०) गाई वगैरे सशृंग जनावरें व घोडे यांचा राखणा. *S.-market* सराफकट्टा; तेथील व्यवहार; गुरांचा बाजार. *A well-stocked library*, पुस्तकांचा वगैरे भरपूर संग्रह असलेलें वाचनालय.

Stŏckāde', *n. & v. t.* (स्टॉके'ड्)—a line of upright stakes or posts (as defence, &c.). मेढेकोट, लकडकोट (रचणें).

Stock'inĕt,-nĕtte, *n.* (स्टॉ'किनेट्)—elastic knitted material for underclothing. (चड्डी वगैरेसाठीं) विणलेलें कापड.

Stŏc'king, *n.* (स्टॉ'किंग्)—a close-fitting, knitted or woven covering for foot and leg. पायमोजा. *A pair of ss.*, पायमोजाची जोडी.

Stŏck-still', *a.* (स्टॉक्स्टि'ल्)—as still as a stock, motionless. खांबासारखा, निश्चल, स्तब्ध.

Stŏck'whĭp, *n.* (स्टॉ'क्व्हिप्)—a thick tapering thong of 12 to 14 ft, affixed to a handle of 1½ ft, for herding cattle. (गुरें राखण्याचा) लांब वादीचा चाबूक.

Stŏck'y̆, *a.* (स्टॉ'कि)—thickset, short and strongly built. मेढेकोट केलेला, जवळ जवळ असलेला; ठेंगू व मजबुत (बांध्याचा). Also, *Stug'gy*, (colloq.),-*ily*, *adv.*;-*iness*, *n.*

Stŏdge, *n.* (स्टॉज्)—(*sl.*) food of heavy kind; full meal; a greedy eater. सहज न पचणारें, जडान्न; पोटभर भरपूर जेवण; अधाशी मनुष्य. *v. t. & i.* to eat greedily. अधाशासारखें खाणें.

Stŏdg'y̆, *a.* (स्टॉ'जि)—(of food) indigestible, heavy; (of receptacle) packed; (of style) overfull of facts or details. जड, न पचणारें (अन्न); गच्च भरलेला, फुगीर; भरगच्च मजकुराचा, बारीक सारीक सर्व गोष्टींनीं भरलेलें.-*iness*, *n.*

Stoep, *n.* (स्टूप्)—(S.-Afr.) a terraced verandah. ओसरी, ओटी.

Stō'gie, *n.* (स्टो'गि)—(U. S.) kind of heavy boot; a long slender cigar. जड बूट; बारीक व लांबट सिगार (विडी).

Stō'ic, *n.* (स्टो'इक्)—a philosopher of the school of Zeno, the Greek philosopher (342-270 B. C.); a person of great fortitude or austerity. झेनोचा अनुयायी; सुखदुःखाविषयीं अनुद्विग्न, फार धैर्याचा किंवा मोठ्या तपश्चर्येचा मनुष्य. *Sto'ic,-ical, a.* स्टोइक पंथाचा; (सुखदुःखाविषयीं उदासीन राहून) निर्विकार. *-ically, adv., Sto'icism, n.* उदासीनतावाद; विकाराराहित्य.

Stōke, *v. t. & i.* (स्टोक्)—to keep (fire, furnace) going; stoke fire of (engine); (*fig.*) take food in a hurried way. निखारे हालवणें,-सारखे करणें, भट्टी चालू ठेवणें; (एंजिनांत) कोळसा टाकणें,-मारणें; पोटांत अन्न (गपागप) भरणें. *Sto'ker, n.* कोळसे मारणारा.

Stōle, *n.* (स्टोल्)—outer dress (of ancient Roman matron); ecclesiastical vestment. सैल पोकळ झगा; (विशपचें)उपवस्त्र.

Stole, Stolen, *pa. t., pa. p.* of Steal.

Stŏl'ĭd, *a.* (स्टॉ'लिड्)—slow to feel or betray feeling; not easily moved, dull, foolish. जड; मंदमति, मूर्ख.-*ity, n.*;-*ly, adv.*

Sto'mach, *n.* (स्ट'मक्)—the cavity into which food passes for digestion; the belly, abdomen; appetite or inclination or courage *for*. कोठा, पोट; जठर, अन्नाशय; भूक, अन्नावर वासना; प्रवृत्ति, कल, धैर्य, जोम. *v. t.* to eat with relish; find sufficiently palatable to swallow or keep down, (*fig.*) put up with (an insult etc.). रुचीनें,-चवीनें,-खाणें; रुचकर वाटणें,-असणें; खपणें, सहन करणें, पोटांत घालणें. *Ruminant's ss.*, प्रथम,-द्वितीय, -तृतीय,-चतुर्थ जठर. *Pit of the s.*, depression below bottom of breast-bone. मणिपूर. *Proud* or *high s.*, haughtiness. उद्धटपणा, ताठा. *S.-ache*, पोटदुखी, पोटशूळ. *S. pump*, पोटांतून विषारी पदार्थ काढण्याचा पंप. *S.-tube*, कोठा धुण्याकरितां घशांतून घालण्याची नळी. *Cannot s. the insult*, तो अपमान सहन करतां येत नाहीं. *Sto'machal,-machless, aa., S.-ful n.*

Sto'macher, *n.* (स्ट'मचर्)—(hist.) breast piece of woman's dress, often set with gems or richly embroidered. (भरजरीचा) पोलका.

Stomăc'hĭc, *n.* (स्टमॅ'किक्)—of the stomach; promoting digestion or appetite. कोठ्याचा, जठराचा; पाचक, भूक वाढविणारा. *n.* a stomachic drug or draught. पचनक्रिया वाढविणारें औषध.

Stōne, *n.* (स्टोन्)—piece of rock of any shape and of no great size; stones or rock as a substance or material; (usu. a *precious stone*) a gem; thing resembling stone in hardness or pebble in shape; weight of 14 lb. दगड, धोंडा, खडा; मोठा धोंडा, पाषाण, शिला, दगड; रत्न, मणि; आंठोळ, बाठा, बाठी, कोय; अश्मरी, (मुत-) खडा (इ. दगडासमाणें) कठीण पदार्थ; १४ पौंडांचें वजन. *v. t.* to pelt with stones; rid (fruit) of stones; face pave, with stone. दगड मारणें, दगडमार करणें; आठळा,-कोया,-(फळांतून) काढणें; फरसबंदी करणें. *Ss. will cry out*, पाषाणालाहि पाझर फुटेल. *Give a s. for bread*, offer a mockery of help. मदत दिल्याचें सोंग करणें,-ची थट्टा करणें, खरी मदत न देणें. *Mark*

with a white s., आनंदाचा दिवस म्हणून लिहून ठेवणें. *Leave no s. unturned*, प्रयत्नांची शिकस्त (चोहोंबाजूनें प्रयत्न) करणें. *Break ss.*, खडी फोडणें, अत्यन्त दुर्दशा येणें. *Cast, throw, ss.,* or *a s. at.*, (ला) दगड मारणें, (वर) दगडफेक करणें; (चीं) निंदा करणें, (वर) दोषारोप करणें. *Those who live in glass houses should not throw ss.*, आपण लागून (उणें) बोललों कीं दुसरा टोमणा मारतोच (उणें बोलतोच). *Kill two birds with one s.*, एका दगडानें दोन पक्षी मारणें, एकांत दोन कामें करणें. *S.'s cast* or *throw*, distance stone can be thrown. हांकभर, हांकेचें अंतर. *S. buildings*, दगडी, चिरेबंदी, इमारती. *Has a heart of s.*, पाषाणहृदयी,-कठोर अंतःकरणाचा,-आहे. *Philosopher's s.*, परीस. *S. axe*, पिकिंदर, पिकाव. *S.-blind*, quite blind. निखालस (पूर्णपणें) आंधळा. *S. chat*, एक लहान पक्षी. *S. crop*, एक जातीची (भिंतीवर व खडकावर वाढणारी) वनस्पति, वेल. *S. horse*, वळू, आंडील घोडा. *S. mason*, पाथरवट, गवंडी. *S. pine*, S. Ital. kind with spreading top. छत्रीच्या आकाराच्या पसरट फांद्या शेंड्यावर असलेला पाइन वृक्ष. *S.-pit*, दगडाची -चिऱ्यांची,-खाण. *S.-race*, वाटेंतील दगड धांवतांना उचलण्याची शर्यत. *S.-work*, masonry. दगडी बांधकाम. *S.-wort*, kinds of plant. एक जातीचें झाड, -वनस्पति. *S. to death*, दगडांनीं ठेंचून (ठार) मारणें. *-stoned, Ston'eless, aa.*

Stone'age, *n.* (स्टोनएज्)—age or period in which weapons and tools were made of stone. पाषाणयुग, दगडाचीं हत्यारें व भांडींकुंडीं असलेल्या स्थितीचा काळ.

Stōne'-fruit, *n.* (स्टोन्फ्रूट्)—fruit with seed enclosed in hard shell. आठळी, किंवा कोय, किंवा बीं असलेलें फळ.

Stonewall,' *v. t. & i.* (स्टोन्वॉल)—to obstruct by stone-walling. दगडी तट उभा करणें, अभेद्य युद्धानें प्रतिकार करणें, भरभक्कम प्रतिकार करणें. *Stonewall'ing*, (pol., esp. Austral.) parliamentary obstruction; (crick.) excessively cautious batting. लोकसभेंत विरोध,-अडथळा: अति सावधगिरीचा (धिम्मा) खेळ (बाद न होण्यासाठीं).

Stone'ware, *n.* (स्टोन्वेअर्)—pottery made from flinty clay. हलक्या जातीचीं (खणखणीत) चिनी भांडीं.

Stō'nȳ, *n.* (स्टोनि)—abounding in stones, hard or unfeeling. दगडांनीं भरलेलें, खडकाळ, रेताड, कठीण, निर्दय. *A s. stare*, ओळख न देणारी दृष्टि,-नजर, निष्ठुर नजर. *Ston'ily adv.*, *-iness, n.*

Stoŏd, *pa. t.* of Stand.

Stoŏk, *n. & v. t.* (स्टुक्)—(Sc.) group of corn-sheaves. धान्याच्या पेंढ्या, कवळ्या (रचणें).

Stoōl, *n.* (स्टूल)—movable seat without a back, a window sill; root of plant from which shoots spring; evacuation of bowels. लांकडी तिवई, तिपाई स्टूल; खिडकीचा उंबरठा; बुळका, खुंट; दस्त, शौच. *v. t.* to throw up shoots from root; evacuate bowels. धुमारे फुटणें; शौचास जाणें,-बसणें. *To fall between two ss.*, दोन दगडींवर हात ठेवणें (व फसणें). *To go to s.*, शौचाला जाणें. *S. ball*, old game of cricket or rounders. क्रिकेटच्या खेळासारखा एक जुना (मुलींनीं खेळण्याचा) खेळ. *S. pigeon*, pigeon used, person acting, as decoy. भुलवून आणणारें कबुतर, भुलवणूक करणारा मनुष्य.

Stoōp, *v. t. & i.* (स्टूप्)—to bend down: to abase oneself or condescend to do; to swoop, pounce, tilt (cask). वांकणें, ओणवणें; हलकेपणा धरणें, मोठेपणा -अभिमान-सोडणें; झडप घालणें, झेंपावणें, (पिंप पुढच्या तोलावर) कलंडवणें. *n.* stooping carriage of body; swoop of hawk etc. ओणवणें, वांकत चालणें; झडप, झेंप. *To s. to conquer*, gain one's end or power by preliminary self-abasement. प्रथम नमतें घेऊन हेतु-कार्य-साधणें,-सत्ता मिळविणें. *Stoop'ingly, adv.*

Stoōp, *n.* (स्टूप्)—(U. S., Can.) unroofed platform or porch. घरापुढील उघडी ओटी,-गच्ची,-देवडी.

Stŏp, *v. t. & i.* (स्टॉप्)—to stuff up; prevent passage of, stifle, prevent motion or action of; cease to supply, cease from action or speech: halt or pause; sojourn somewhere; change pitch of by pressing string, etc.; (naut.) make fast, punctuate. बुजवणें, बुजणें, बंद करणें; थांबवणें, चा मार्ग बंद करणें, तोंड बंद करणें, चोंदणें; (च्या गतीला विरोध) रोध करणें, अडथळा करणें, बंद पाडणें; कापणें, तहकूब करणें; थांबणें; उभें राहणें, स्तब्ध राहणें; वस्ती करणें, उतरणें, राहणें; स्वर-सूर-बदलणें; घट्ट बांधणें, धोपटून धरणें; विरामचिन्हें देणें,-लिहिणें. *n.* a pause or cessation, check, a punctuation mark; (Mus.) device in instrument to assist change of pitch; set of pipes having special tone in organ, (*fig.*) manner of speech; batten, peg; (Opt., Photog.) diaphragm, (Phonet.) mute consonant sound. थांबणें, खेळ, विराम, अडथळा; विरामचिन्ह (स्वल्पविराम, अर्धविराम, पूर्णविराम); वाद्यावरचें बोट ठेवण्याचें भोंक, खुंटी; विशिष्ट सुरांची सुरावट; भाषणाची ढब; खुंटी; आवरण, आवरक (फोटो०); (क, ट, प) व्यंजनोच्चार. *To s. one's ears*, कानांत बोटें घालणें; (*fig.*) न ऐकणें, ऐकण्याचें नाकारणें. *S. a tooth*, दांतांतील खळगी वगैरे (सोनें, सीमेंट वगैरेनें) भरणें, बांधणें. *S. a wound*, जखमेंतून रक्त वाहण्याचें बंद करणें. *S. one's mouth*, (*fig.*) induce him by bribery etc. to keep silent. (लांच देऊन चें) तोंड बंद करणें,-गप्प करणें. *S. a gap*, (तात्कालिक) गरज भागविणें, काम भागवून घेणें. *S. the way*, (ला) अडथळा करणें, (चा) मार्ग बंद करणें, प्रगति थांबविणें. *S. thief!* चोर! चोर! पकडा. *S. blow with one's head*, ठोसा खाणें. *S. a bullet*, be shot. गोळी लागणें. *S. one's breath*, गळा दाबून जीव घेणें, -मारणें. *S. a factory*, कारखाना बंद करणें. *S. payment of a cheque*, direct one's banker not to cash it. चेक वटावूं न देणें (धंकेला तसें कळवून). *S. payment*, break financially. दिवाळें काढणें. *S. dead,-short*, एकदम बंद पडणें. *S. up*, not go to

bed. आगत घमणे. (Etching) *S.* out, (कांचेच्या ज्या भागावर अम्लाचें कार्य नको असेल त्यावर) अम्लाचें कार्य न होणाऱ्या रोगाचा हात देणें. *S. down*, वस्तूचा (Lens चा) नको असेल तो भाग पडद्यानें झांकणें (फोटो॰). *S. off*, (Founding) साच्यांतील रिकामी जागा वाळूनें भरणें. *To put a s. to*, बंद करणें, (ची) बंदी करणें. *To be at a s.*, बंद पडणें, ची प्रगति खुंटणें. *Full s.*, पूर्णविराम. *Come to full s.*, निखालस बंद होणें, -पडणें. *S.-cock*, a tap. (पाणी बंद करण्याची) चावी. *S.-gap*, तात्पुरता, बदली. *S.-press*, छापतां छापतां, अगदीं ताजा आलेला, मजकूर,-बातमी. *S.-watch*, (शर्यतीच्या वेळीं उपयोगी पडणारें) वाटेल तेव्हां चालू, -बंद-होणारें घड्याळ.

Stŏpp'age, *n.* (स्टॉपिज्)—blocked state; a cessation, arrest of progress. गतिरोध, बंदी; थांबणें, विराम.

Stŏpp'er, *n.* (स्टॉपर्)—a plug for closing a bottle (In vbl. senses). बुच; गतिरोधक. *v. t.* बुचानें बंद करणें.

Stŏpp'le, *n.* (स्टॉपल्)—a stopper. (बाटलीचें वगैरे) बुच, झांकण. *v. t.* to close with a *s.* बुचानें बंद करणें, ला बुच लावणें.

Stōre, *n.* (स्टोअर्)—abundance; (*sing.* or *pl.*) a fund or good supply of; shop dealing in many different kinds of commodity on a large scale; warehouse or storing-place; (U. S.) an animal kept for fattening. रेलचेल, रास, विपुलता, समृद्धि; साठा, संचय, बरेंच मोठें दुकान; वखार; गुबगुबीत, धष्टपुष्ट होण्यासाठीं राखलेलें जनावर. *v. t.* to equip or furnish plentifully with; to lay up for future use; to deposit or keep in ware-house. गोळा करणें, सांठवणें; वेगमी करणें; वखारीत ठेवणें. *a.* (of cattle etc.) kept for fattening. धष्टपुष्ट होण्यासाठीं राखीव (जनावरें). *In s.*, राखीव, संचित, भावी. *The ss.*, वखार, मोठें दुकान. *S.-house*, वखार, चें भांडार. *S.-room*, कोठी, सामानाची खोली. *Stor'able, a.*; *Stor'age, n.* कोठींत ठेवणें, ठेवणावळ, कोठीचें भाडें.

Storey, *n.* (स्टोअरि)—*See* Storey.

Stŏrk, *n.* (स्टॉर्क)—a tall stately (*usu.* white) wading bird that feeds on fishes, etc. करकोंचा पक्षी. *S.'s bill*, एक जातीची वनस्पति,-झाड. *King S.* जुलमी राजा.

Storm, *n.* (स्टॉर्म्)—violent disturbance of the atmosphere, a tempest; commotion in human relations; agitation etc.; vehement shower *of* missiles, applause etc.; assault by troops on fortified place. वादळ, झंझावात, वादळ, तुफान; खळबळ, गर्दी, धामधूम, चळवळ; खणखणाट, गजर, दणदणाट, वर्षाव (अस्त्रांचा,-शस्त्रांचा); किल्ल्यावर छापा किंवा हल्ला. *v. t. & i.* to take by storm; force into; talk violently, rage. हल्ला करणें, हल्ला करून-छापा घालून-घेणें; जोरानें शिरकाव करून घेणें; चवताळून बोलणें. *S. in a tea-cup*, चहाच्या कपांतील (अल्प गोष्टीविषयीं) वादळ, वादविवाद, हमरीतुमरी. *S. and stress*, (व्यक्तीच्या किंवा राष्ट्राच्या आयुष्यांतील) खळबळीचा,-धामधुमीचा -काळ. *Take by storm*, अचानक छापा घालून काबीज करणें; (श्रोत्यांवर, व्यक्तीवर) धों धों म्हणतां छाप पाडणें. *S.-beaten*, वादळांत सांपडून फुटलेला; वादळांचे तडाखे बसलेला. *S.-bell, S. zone*, the tract in which *ss.* are frequent. नेहमीं वादळें होणारा प्रदेश,-परिसर. *S.-bound*, वादळामुळें (बंदरांत) अडकून राहिलेला. *S.-card*, chart assisting navigator of ship in storm. वादळाचा नकाशा, ज्याच्या मुळें नावाड्याला (कप्तानाला) वादळाचा मुख्य बिंदु काढतां येऊन त्याप्रमाणें जहाज वाचवतां येतें. *S.-cloud*, वादळी ढग, अस्वस्थता, चळवळ. *S.-cock*, एक जातीचा पक्षी. *S.-signal*, वादळाचा बावटा, ची निशाणी, -चिन्ह. *S.-proof*, वादळांत टिकणारा, वादळाला न जुमानणारा. *Storming party*, हल्ला चढविणारी तुकडी.

Stŏrm'centre, *n.* (स्टॉर्मसेंटर्)—point to which wind blows spirally inward in a cyclonic storm. (*fig.*) subject of agitation. वादळाचा मुख्य बिंदु,-स्थान; वादळाचें मूळ,-चा मुख्य मुद्दा, वादग्रस्त मुद्दा.

Stŏrm'y̆, *a.* (स्टॉर्मि)—boisterous, subject to storms; violent or quarrelsome, associated with or threatening storms. खवळलेला; वादळी, तुफानी, जोराचा; भांडखोर, वादळाचा (सूचक). *S.-petrel*, वादळाची सूचना देणारा समुद्रावरील पक्षी. *Storm'ily, adv.*; *-iness, n.*

Stōry̆, **Stor'ey**, *n.* (स्टोअरि)—(*pl.*-ies,-eys) any of the parts one above the other into which a house is divided. मजला. *Of four ss*, चारमजली. *The upper s.*, (fig.) मेंदू.-*storied, a.*

Stor'y̆, *n.* (स्टोअरि)—legends or tradition; an account given of an incident; a short piece of narrative or tale about a matter; past course of life. इतिहास; कथा; वृत्तान्त; कथानक, गोष्ट, हकीकत, वर्णन, कहाणी; (भूतकालीन) आयुष्यक्रम, आयुष्यांतील गोष्टी. *According to his own s.*, त्याच्या सांगण्याप्रमाणें (खरें किंवा खोटें असेलहि.) *To make a long s. short*, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे. *It is quite another s. now*, आतां कांहीं निराळेंच ऐकूं येतें; वस्तुस्थिति बदललेली दिसते. *To s. goes*, it is said. असें सांगतात (कीं). *Short s.*, story usu. relating a single incident. लघुकथा. *But that is another s.*, परंतु तें असूंदे, असो. *S.-book*, गोष्टींचें पुस्तक, कादंबरी. *S.-teller*, (धंदेवाईक) गोष्टी सांगणारा; गोष्टी लिहिणारा; गप्पीदास, बाताड्या; खोटें बोलणारा.

Stoup, *n.* (स्टूप)—flagon, beaker; drinking vessel. (उभट) पात्र, भांडें; पान-पात्र.

Stout, *a.* (स्टाउट्)—undaunted, resolute; of considerable thickness or strength, vigorous, robust; corpulent. खंबीर, निश्चयी; धट्टाकट्टा, स्थूल, जाडा. *n.* strongest kind of porter. अति कडक दारू. *S. heart*, courage. धैर्य, शौर्य. *S.-hearted, a.* धीराचा, धैर्याचा, हिंमतीचा;-*ly.*;

adv.;–*ness, n. Stoutish, a.* जाडा, लठ्ठंभारती. *Stoutly, adv.* खंबीरपणानें, धैर्यानें. *Stoutness, n.*

Stove, *pa. t. & pa. p. of* Stave.

Stōve, *n.* (स्टोव्ह्)—kinds of closed apparatus in which heat is produced; (Gardening) hot house. एक प्रकारची शेगडी, चूल, चुला, स्टोव्ह; कृत्रिम ऊष्णतागृह.

Stō'ver, *n.* (स्टो'व्हर्)—(U. S.) fodder of corn -straw etc. (कडवा वगैरे) वैरण, गवत.

Stow, *v. t.* (स्टो)—to put in a suitable place or position, to pack closely or compactly; cease to indulge in (noise). बंदोबस्तानें भरणें; जेथलें तेथें भरणें,-ठेवणें, सामान गच्च भरणें,-लावणें; बंद करणें, (तोंड) मिटणें. *Stow'age,* accommodation for stowing things; money paid for stowing. माल भरण्याची जागा, वाव; भरणावळ.

Stow'away, *n.* (स्टो'अवे)—a person going on board ship and hiding till she is at sea. (गलबतांतून) फुकट प्रवास करणारा, फुकट्या व चोरटा प्रवासी,-उतारू. *v. i.* फुकटांत व चोरून प्रवास करणें.

Străd'dle, *v. t. & i. & n.* (स्ट्रॅड्ल्)—to take or be in attitude with legs apart; stand or sit across thus; (Nav.) drop shots to find range; (*fig.*) sit on the fence. टांगा फांकणें, पाय फांकून राहणें, पाय फांकून-पंद करून-उभें राहणें, -बसणें; (लढाऊ जहाजावरून) पल्ला किती पोचतो हें पाहण्यासाठीं (तोफांचे) गोळे टाकणें; दोन डगरींवर हात ठेवणें, मनाची चलबिचल असणें.

Străg'gle, *v. i.* (स्ट्रॅ'गल्)—to lack compactness, to be in loose irregular order; to stray or lag behind; occur here and there. पांगणें, पांगापांग होणें, रस्ता सोडून जाणें, पाठीमागें राहणें; तुरळक असणें,-होणें; वेडावांकडा जाणें (झाड, रोप इ.). *Straggling village, houses,* इतस्ततः विखुरलेलें खेडेगांव,-लीं घरें.-*er, n.*;-*gglingly, adv.*;-*ggly, a.*

Straight, *a.* (स्ट्रेट)—not curved or crooked; (of object) in a straight line; correctly placed or in proper order; symmetrical; honest or candid; (of aim) going correctly to the mark; direct from source. नीट, उजू; सरळ; सुव्यवस्थित, नीटनेटका, बरोबर; प्रामाणिक, सचोटीचा; थेट, सरळ, नेमका, तडक; मुळांतला, अधिकृत, अगदीं विश्वसनीय. *adv.* in a straight line; correctly, direct, with good aim. सरळ; थेट, तसाच, नेमका, अचूक. *n.* straight condition; concluding stretch of race-course; sequence of cards in poker. सरळ दिशा,-स्थिति; घोडदौडीचा शेवटचा टप्पा; (अमेरिकन) खेळांतील पत्त्यांचा अनुक्रम. *A s. line,* (in Geom.) सरळ रेषा. *S. hair,* not curly. सरळ (कुरळे नव्हेत असे) केंस. *S. dealings,* उघड,-सरळ,-व्यवहार. *S. thinking,* तर्कशुद्ध,-भावनाविरहित विचारसरणी. *Put things s.,* सुव्यवस्था लावणें, गोंधळ मोडून टाकणें. *Accounts are s.,* हिशेब-जमाखर्च-व्यवस्थित ठेवलेला आहे. *A s. fight,* चुरशीचा लढा. *S. ticket,* (U. S.) party programme without modification. न बदलणारा कार्यक्रम. *S. off,* without hesitation, deliberation, etc. कां कूं न करतां, एकदम, तडक.

Straight'arm, *n.* (स्ट्रेट्आर्म्)—a straightforward thrust. सरळ हल्ला,-धुसंडी,-घुसणें.

Straight'fŏrward, *a.* (स्ट्रेट्-फॉर्वर्ड्)—devoid of guile or complexity, candid. निष्कपटी, मनाचा मोकळा.

Straight'en, *v. t. & i.* (स्ट्रे'टन्)—to make straight; reduce to order. सरळ,-नीट,-उजू करणें; व्यवस्था लावणें.

Straight'way, *adv.* (स्ट्रे'ट्-वे)—immediately. तात्काळच.

Strain, *v. t. & i.* (स्ट्रेन्)—to stretch tightly; exert one's self; injure by over-exertion; wrest or distort from true meaning; pass liquid through strainer, filter; hold tight in embrace; tug at, strive intensely after. ताण देणें, तणावा देणें, ओढणें, आवळणें; ताणणें; फाजील श्रमानें शिणणें, शिणविणें,-दुखविणें; अर्थाची ओढाताण करणें; अर्थविपर्यास,-हेतुविपर्यास,-करणें; गाळणें, छानणें, पाखरणें, गळणें; कवटाळणें, पोटाशीं धरणें; नेट करणें, नेटानें ओढणें, धडपड करणें. *n.* pull, tension; severe demand upon a person or thing; injury caused by such; (*pl.*) music or verse of specified tendency; (*sing.*) moral tendency; breed of animals, human family, tone or tendency in speech or writing. ताण, ओढ, तणाव; ओढाताण, नेट, जोर; ताण, शीण, लचक, चमक; (अने०) चुटका, कडवें, गीत, गाणें; (स्वाभाविक) वळण, रोख; अवलाद (पशूंची), (मनुष्य-) कुळ, वंश, जात; बोलण्याची किंवा लिहिण्याची पद्धत, झोंक, रोख, वळण. *S. every nerve,* (प्रयत्नांची) शिकस्त करणें. *S.* one's *eyes, ears,* लक्षपूर्वक पाहणें,-ऐकणें. *S.* one's *authority,* अधिकाराचा अतिरेक करणें, मर्यादातिक्रमण करणें. *S. a point,* (एखादी गोष्ट) फारच ताणून धरणें. *A strained sense,* ओढून ताणून लावलेला अर्थ. *S. at,* be over-scrupulous about. ची अति काळजी घेणें. *Is suffering from over-s.,* अति श्रमामुळें त्याला थकवा आला आहे. *All his senses were on the s.,* exerted to the utmost. त्याच्या सर्व अवयवांना-इंद्रियांना-भयंकर ताण बसला. *Martial, pathetic, ss.,* वीररसात्मक, करुणरसात्मक कविता,-काव्य,-गाणें,-संगीत. *Comes of a good s.,* चांगल्या कुळांतला आहे. *Strain'able, a.*

Strain'ed, *pa. p. & a.* (स्ट्रे'न्ड्)—constrained, forced, fictitious. ताणलेला, ताण दिलेला, ओढून ताणून आणलेला, औपचारिक, काल्पनिक, कृत्रिम. *S. relations,* बेबनाव.

Strain'er, *n.* (स्ट्रे'नर्)—(*esp.*) an appliance through which liquid is poured to be cleared of matter suspended in it. चाळण, चाळणी, गाळणी, गाळणें, रोवळी.

Strait, *a.* (स्ट्रेट)—narrow, limited; strict. अरुंद, साकड, अप्रशस्त, तंग; कडक. *n.* a narrow water-passage connecting two seas or large bodies of

water; (*pl.*) ill-supplied state, need, difficulty. खाडी, सामुद्रधुनी; विपत्ति, संकट, अडचण. *S. laced*, (*fig.*) severely virtuous, puritanic. कडकडीत, सोंवळा,-नियमबद्ध. *In straits*, अडचणींत, पेंचांत, संकटांत. *Strait'ly, adv.,-ness, n.*

Strait'en, *v. t.* (स्ट्रे'टन्)—to restrict, confine, *reduce to straits.* संकुचित,-मर्यादित,-करणें; अडचणींत टाकणें, संकटांत घालणें. *Straitened circumstances*, दारिद्य, कंगाल स्थिति. *To be straitened for*, be ill supplied with. ची वाण-गरज-असणें.

Stramōn'ium, *n.* (स्ट्रमो'निअम्)—(Bot.) drug from seeds or leaves or datura. धोतरा, धत्तुरा (वनस्पति).

Strănd, *n.* (स्ट्रॅन्ड)—land along sea or other water, margin. तीर, कांठ. *v. t. & i.* to run (of ship) aground. कांठाला लागणें, किनाऱ्यावर आदळणें, आपटणें.

Strănd, *n.* (स्ट्रॅन्ड्)—one of the strings or wires by twisting which a rope is made; (*fig.*) element or strain in composite whole. पदर, पेड, पेढ; (संबंध गोष्टीचा) धागादोरा. *v. t.* to break a *s.* in (a rope). (दोराचा) पदर-पेढ-काढणें.

Strănd'ĕd, *a.* (स्ट्रॅन्डेड्)—(*fig.*) in difficulties. संकटांत पडलेला, (पैशाच्या अडचणीमुळें) मागें पडलेला, असहाय.

Strānge, *a.* (स्ट्रेंज्)—foreign, alien; unfamiliar or not known (*to*); surprising; eccentric, bewildered. परकीय, परदेशचा, परका, विदेशी; अपरिचित, नवा, अनोळखी; आश्चर्यकारक; गोंधळलेला, घाबरलेला. *Is very s. in his manners*, seems mad. वेडेचाळे करतो, वेडा दिसतो. *Feel s.*, कसेंसें-चक्कर आल्यासारखें-वाटणें. *It feels s.*, अवघड वाटतें, नवलसें वाटतें. *Strange'ly, adv.*; *Strange'ness, n.*

Strā'nger, *n* (स्ट्रे'न्जर्)—a person strange to some one or to something; a person in a company or town or country that he does not belong to; (U. S. voc.) sir. अनोळखी माणूस, तिऱ्हाईत, नवशिका; परकी, परदेशस्थ, विदेशी; (संबो.) महाराज! पाहुणे! *To spy* or *see ss.*, (कॉमन्ससभेंतून) सभासदांखेरीज इतरांना बाहेर घालवून देणें. *Make a s. of*, treat distantly. परका म्हणून-परकेपणानें-वागविणें. *Make no s. of*, treat cordially. प्रेमानें-आपुलकीनें-वागविणें. *The little s.*, new-born child. नूतन जन्मलेलें बालक.

Străng'le, *v. t.* (स्ट्रॅं'गल्)—to kill by squeezing the windpipe; to suppress; (of collar) squeeze neck. नरडी दाबून मारणें, गळा दाबून ठार मारणें; दाबून टाकणें, दडपून टाकणें; (गळपट्टीनें) मान आवळणें.-*hold*, deadly grip, (usu. fig.). भयंकर पकड, गळचेपी (राजकारणांतील, व्यापारी). *Strang'les. n. pl.* (or as sing.) infectious catarrh in horse etc. (घोड्याला वगैरे होणारा) सांसर्गिक पडसें,-शैत्य (रोग).

Străng'ūlāte, *v. t.* (स्ट्रॅं'ग्युलेट्)—to prevent circulation through (vein, intestine) and vital action in by compression; strangle (rare). दाबून रुधिराभिसरण थांबविणें,-बंद करणें; गळा दाबणें.-*tion, n.* करकचून आवळणें; रुधिराभिसरण -स्तंभन; श्वासरोध.

Strang'ūry, *n.* (स्ट्रॅं'ग्यूअरि)—disease in which urine is passed painfully and in drops; *disease produced in plants by bandaging.* अश्मरी, मूत्रकृच्छ्र; वनस्पतींचा रोग.-*gur'ious, a.* [Gk *stragx*, drop, *ouron*, urine]

Străp, *n.* (स्ट्रॅप्)—a strip of leather or other material, esp. one fitted with a buckle to serve as a band, (Bot.) tongue-shaped part in ligulate floret. चामड्याचा पट्टा, वादी, पट्टी, (कोणत्याहि धातूचा) पट्टा, आंकडा, (वस्तऱ्याचें) धापटणें; लघुपुष्पांतील वादीसारखी पाकळी. *v. t.* to secure with a strap; strop, whet (razor etc.; (Surg.) close (wound), bind part up with adhesive plaster; flog with a strap. वादीनें,-पट्ट्यानें,-घट्ट आंवळणें; पलाटण्यावर (वस्तऱ्याला वगैरे) धार लावणें; पट्टी बांधून जखम बरी करणें, पट्टी बांधणें; वादीनें मारणें,-झोडणें. *The s.*, चामड्याच्या वादीचा मार. *S.-hanger*, bus or train passenger who has to stand or hold on by s. for want of sitting space. (वरील चामडी पट्ट्याला धरून) उभें राहून जाणारा. S. *oil*, वादीनें दिलेला मार. *S.-wort*, पांढऱ्या फुलांची गवती वनस्पति.

Străpp'ing *a.* (स्ट्रॅ'पिंग)—stalwart; tall and strong. दांडगा; उंच, भव्य. *n.* (esp.) adhesive plaster for surgical use, a flogging. चिकट औषधी पट्टी (जखम बांधण्यासाठीं); वादीचा मार, -फटके. *A strapping girl*, उंच, उफाड्याची, मुलगी. *Strap'per, n.* उंच, उफाड्यानें वाढलेला.

Strappā'dō, *n. & v. t.* (स्ट्रपे'डो)—(pl.-*os*), torture in which the victim was let fall from a beam to the distance allowed by the rope securing his hands etc. (दोराला हातपाय बांधून) मनुष्याला खालीं फेंकून लोंबकळत ठेवण्याची शिक्षा (करणें).

Strata, *See* Stratum.

Străt'agĕm, *n.* (स्ट्रॅ'टजिम्)—a device for deceiving the enemy, a clever plan, a trick to obtain advantage. शत्रूला फसवण्याचा डाव, व्यूह, कल्पति, युक्ति, उपाय.

Străt'ĕgy̆, *n.* (स्ट्रॅ'टिजि)—the art of war. लष्करी डावपेंच.

Stratē'gic, *a.* (स्ट्रटी'जिक)—of or serving the ends of strategy. लष्करी डावपेंचाचा, मान्याचा, सोईचा; युक्तीनें सिद्धीस नेलेला.-*gical, a.*;-*gically, adv.* व्यूहरचनाशास्त्रदृष्ट्या.

Străt'ĕgist, *n.* (स्ट्रॅ'टिजिस्ट)—an expert in strategy. व्यूहरचनानिपुण, लष्करी डावपेंच लावण्यांत वाकबगार.

Străth, *n.* (स्ट्रॅथ)—(Sc.) a broad mountain-valley. रुंद खोरें.-*spey'*, (-स्पे') स्कॉच लोकांचा नाच.

Străt'iculate, *a.* (स्ट्रॅ'टिक्युलट्)—(Geol.) arranged in thin layers. पातळ थरांच्या रचनेचा, प्रस्तरित.

Străt'ifȳ, *v. t. & i.* (स्ट्रॅ'टिफाइ)—to form into strata. थरांथरांनीं असणें,-पसविणें.-*fication, n.* प्रस्तरीकरण,-भवन.

Stratŏ'cracȳ, *n.* (स्ट्रटॉ'क्रसि)—military government. सैन्यसत्ताक राज्यपद्धति. लष्करी सत्ता. [Gk *strates*, army]

Stră'tŭm, *n.* (स्ट्रे'टम्)—(pl.-ta,) a layer of deposited matter forming part of earth's crust, (also *fig.*) social grade. थर, पडदा; (समाजांतील) दर्जा. *Stra'tal, Stra'tiform, aa.*

Stră'tus, *n.* (स्ट्रे'टस्)—(pl -ti) low horizontal sheet of cloud. मेघपटल, मेघाच्छादन.

Straw, *n.* (स्ट्रॉ)—dry cut stalks of grain, a straw hat; single stalk of straw, insignificant trifle. काड, गवत, पेंढा; गवती टोपी; (गवताची) काडी, काड; काडी, कसपट, तुच्छ-कवडी किंमतीची-वस्तु. *A man of s.,* stuffed effigy, person without substantial means. (गवती पेंढ्या भरलेलें) मनुष्याकृति,-बुजगावणें; करंटा, यःकश्चित् मनुष्य. *Draw ss.,* draw lots. गवताच्या काड्या टाकून अजमावणें. *To make bricks without s.,* भरपूर तयारी (साधनसामुग्री) नसतांना कामाला सुरुवात करणें. *To catch at a s.,* काडीचा आश्रय करणें (बुडत्या मनुष्याप्रमाणें). *The last s.,* (उंटाच्या पाठीवरील ओझ्यांत टाकलेली व असह्य होणारी) शेवटची काडी, थोडीशी भर. *A s. shows which way the wind blows,* a slight hint may suggest much. of. शितावरून भाताची परीक्षा. *Don't care a s.,* काडीची किंमत देऊं नको. *S.-berry,* (माथेरान, महाबळेश्वर वगैरे थंड ठिकाणीं होणारी) तांबूस फुलांची वनस्पति, तिचें फळ. *The s.-berry leaves,* ड्यूकची पदवी. *Straw-board,* जाड गवती पुठ्ठा. *S.-coloured,* फिकट पिवळ्या रंगाचा.

Straw'ȳ, *a.* (स्ट्रा'इ)—of flavour of inferior tea. (कमी प्रतीचा चहासारख्या) कमी चवीचा.

Stray, *v. t.* (स्ट्रे)—to go astray *from*; to wander aimlessly. रस्ता सोडून जाणें, चुकणें, भ्रमणें, भकणें; भटकणें. *a.* strayed, sporadic, isolated. चुकार, चुकलेला; क्वचित, अधूनमधून, फिरकोळ, प्रकीर्ण. *n.* a strayed beast or child; (pl. Wireless) atmospherics; property of deceased person escheating to crown in default of heirs. चुकार,-चुकलेलें,-गुरूं,-मूल; (बिनतारी संदेशावर परिणाम करणारा) हवेंतील वैजिक विघटना-फेरबदल,-अस्थिरता; (सरकारजमा होणारी) बिनवारशी,-मालमत्ता. *A few s. instances,* कांहीं तुरळक उदाहरणें,-दाखले. *A s. customer,* चुकून माकून येणारें गिऱ्हाईक.

Streak, *n.* (स्ट्रीक्)—irregular line or band, esp. one distinguished by colour; (*fig.*) strain or element in character. पट्टा, रेषा, रेघोटी, रेघ, लकेर; (स्वभावांतील) छटा, अंश. *v. t.* (usu. in *pa. p. Streaked*) make with streaks. रेषांनीं,-पट्ट्यांनीं,-चित्रिविचित्र करणें, रेषा काढणें. *A s. of lightning,* a flash. विजेची चमक, विद्युल्लेखा. *Like a s (of lightning),* swiftly. विद्युद्वेगानें, अतिजलद. *The silver s.,* इंग्लिश खाडी (चानेल). *Streak'y, a.* रेषांकित, रेषांनीं सुशोभित.-*ily, adv.*;-*iness, n.*

Stream, *n.* (स्ट्रीम्)—a body of running water; a moving mass or crowd; large quantity of something that moves along; current. पाण्याचा प्रवाह, ओघ, झरा, ओढा; चालता दीग किंवा समुदाय; प्रवाह. *v. t. & i.* to flow out or along; run with liquid, end forth in a stream, (of banner etc.) float or wave in the wind. वाहणें, पाट चालणें; धार लागणें, पाट सुटणें,-वाहणें, वाहविणें; (निशाण) फडकणें, फडफडणें. *Up, down, s.,* प्रवाहाच्या उलट दिशेनें, प्रवाहाबरोबर. *To go with the s.,* do as others do. लोक वागतील तसें आपण वागणें, प्रवाहाबरोबर जाणें. *S.-line,* natural course of water or air currents. पाण्याचा,-हवेचा-स्वाभाविक प्रवाह,-दिशा. *S-line shape,* (in aircraft) हवेला विशेष विरोध न करील अशी विमानाची बांधणी,-असा विमानाचा आकार,-ची रचना. *Streaming eyes,* अश्रुधारा वाहात आहेत असे-रडवे-डोळे. *Stream'y, a.* (rare); *Stream'-less, a.* जलप्रवाहरहित.

Stream'er, *n* (स्ट्री'मर्)—a pennon; a ribbon attached at one end to float in wind; a column of light shooting up in aurora. निशाण, बावटा; (वाऱ्यावर) फडफडणारी फीत; क्षितिजापासून निघणारी किरणच्छटा.

Stream'lĕt, *n.* (स्ट्री'म्लेट्)—a small stream. ओहोळ, वहाळी, लहान ओढा.

Street, *n.* (स्ट्रीट्)—a town or village road lined with houses, the roadway. (दुतर्फा घरें असलेला) रस्ता, आळी, पेठ. *To live in the s.,* नेहमीं घराबाहेर असणें. *Not in the same s. with,* (colloq.) utterly inferior to. (च्या पेक्षां) अगदीं कमी प्रतीचा. *On the ss.,* living by prostitution. वेश्याव्यवसायी. *S. cries,* (फेरीवाल्यांची) आरोळी, आरडाओरड वगैरे. *S. orderly,* झाडूवाला, रस्ते साफ करणारा. *S.-door,* रस्त्याकडच्या दरवाजा. *S.-sweeper,* रस्ते झाडण्याचें यंत्र. *S.-walker,* common prostitute. बाजारबसवी, सामान्य वेश्या. *S.-ward, a. & adv.*;-*streeted, a.*

Strĕngth, *n.* (स्ट्रेंग्थ्)—being strong; degree of strongness; number of persons present or available; what makes strong. जोरदार असणें, शक्ति, सामर्थ्य; हजर असलेल्या किंवा मिळणाऱ्या लोकांची संख्या; मनुष्यबळ; आधार, भरंवसा. *Has*

the s. of a horse, एका घोड्याचें बळ त्याच्या अंगीं आहे. *I did it on the s. of your promise,* तुझ्या शब्दावर विश्वास ठेवून मी तसें केलें. *God is our s.,* ईश्वर आमचा आधार-भरंवसा-आहे. *On the s.* (Mil.) हजेरीपटावर. *S.-less, a.*

'Streng'then, *v. t. & i.* (स्ट्रे'ंथन्)—to add to the strength or number of; grow stronger, cause to increase in power. बळकटी आणणें; जोरावणें, अधिक बलवान्-सबळ-होणें; जास्त बळकट होणें.

Stren'uous, *a.* (स्ट्रे'न्युअस्)—making or requiring great exertions, energetic, ardent. फार जोराचा, जोरदार, दांडगा, उत्साही, चिकाटीचा, *-ly, adv.* उत्साहानें, परिश्रमानें.*-ness, n.*

'Streptoco'ccus, *n.* (स्ट्रेप्टोकॉ'कस्)—(*pl.-ci*) a bacterial organism of chaplet-form. शृंखलाकार रोग-जन्तु.

Stress, *n.* (स्ट्रेस्)—stretch or pressure or tension or compulsion; emphasis, accent. ओढ, ताण, दाब, जोर, महत्त्व; शब्दावर दिलेला जोर, स्वराघात. *v. t.* to lay stress on, emphasize; (Mech.) subject to mechanical stress. शब्दांवर जोर देणें, महत्त्व देणें; दाबणें, दाब देणें. *To lay s. on,* वर जोर देणें. *S.-less' a.* [short for *distress*]

Stretch, *v. t. & i.* (स्ट्रेच्)—to make tight increase the length or size of by tension; exert to the utmost; exaggerate, misrepresent by exaggeration; reach out (one's hand etc.); be of specified extent; run, be spread out, in specific direction; be continuous between points or to or from a point; (sl.) hang a person. ताठ करणें, ताणणें,-लांब करणें, सैल करणें (ओढून); शिकस्त करणें, आटोकाट प्रयत्न करणें; ओढून ताणून अर्थ करणें, अतिशयोक्ति करणें; पसरणें; (हात वगैरे), पोचविणें; विस्तारणें, पसरणें, ताणणें; वाहणें, वाहणी-वळण-असणें; लांब असणें; (एखाद्याला) फांशीं देणें. *n.* act of stretching; an expanse or tract; spell; (Naut.) distance covered on one tack. ओढ, ताण, वळण, प्रयत्न, बळ, नेट, विस्तार, विस्तृत प्रदेश; आवांका; एका खेपेला तोडलेलें अंतर. *To s. (oneself),* हातपाय लांब करणें,-ताणणें. *S. out,* हात लांब करणें,-पोंचविणें; लांब पावलें टाकणें. *S. (the truth),* exaggerate, lie. अतिशयोक्ति करणें, खोटें बोलणें. *Works ten hours at a s.,* एका झपाट्यांत,-ओढीनें,-एका वेळीं, दहा दहा तास काम करतो. *Stretch'y, a.; -iness, n. Stretch'ed, pa. t. & pa. p.* पसरलेला, ताणलेला, विस्तृत, ओढून ताणून आणलेला.

Stretch'er, *n.* (स्ट्रे'चर्)—In vbl. senses; (*esp.*) a hand-barrow on which disabled person is carried; board in boat for rower to steady his feet against; brick laid with side in face of wall; (*sl.*) lie. ताणणारा, पसरणारा; (आजारी, अशक्त मनुष्याला) वाहून नेण्याचा. हात-बिछाना,-हातपलंग; (वल्हवणाराचीं) पांवडी; भिंतींत बसलेली दर्शनी उभी वीट (दगड); असत्य, खोटी गोष्ट.

Strew, *v. t.* (स्ट्रू)—(*pa. p.*-n,-ed), to scatter (sand etc.) over a surface. पसरणें, विखरणें; वर पसरून झांकणें.

Stri'a, *n.* (स्ट्रा'इआ)—(*pl.-ae*) slight ridge or a surface. (पृष्ठभागावरील) रेषा, लहान उंचवटा. *Stria'ted, a.* रेषांकित, रेखांकित. *Stria'tion, n.* रेषांकित करणें,-असणें,-होणें.

Stricken, See Strike.

Stric'kle, *n.* (स्ट्रि'कल्)—a rod used in strike-measure. (मापाची) शीग मारण्याची पट्टी.

Strict, *a.* (स्ट्रिक्ट्)—precisely defined or limited; requiring implicit obedience, without deviation, not lay. अगदीं बरोबर, रेखीव, रेखलेला, बांधीव; कडक, शिस्तीचा; इकडे तिकडे न होणारा, ढिला नसलेला. *S. discipline,* कडक शिस्त. *Strict'ly, adv.; Strict'ness, n.* रेखीवपणा, कडकपणा, सरळपणा.

Stric'ture, *n.* (स्ट्रि'क्चर्)—(usu in pl.) comment of a critical or censorious kind; (Med.) morbid contraction of a duct in the body. दोषाविष्करणार्थ किंवा प्रतिकूल टीका; संकोच, आकुंचन. *Stric'tured, a.*

Stride, *v. t. & i.* (स्ट्राइड)—(*strode*), to walk with long steps; bestride or stand astride of; pass over (a ditch etc.) with one step. ढेंगा टाकीत चालणें; ढेंगा पसरून उभा राहणें; एका ढेंगांत ओलांडणें. *n.* a single walking or running step; gait in regard to the length of stride, a measured tread or gait. ढेंग, टांग; ढेंगभर अंतर, चालण्याची ढब. *Take obstacle in one's s.,* वाटेंतील अडथळा सहज पाऊल टाकून ओलांडणें; (*fig.*) अडचणीला न जुमानणें.

Stri'dent, *a.* (स्ट्रा'इडन्ट्)—of loud harsh sound. कर्कश, किंचाळल्यासारखा कठोर.

Strife, *n.* (स्ट्राइफ्)—quarrels, hostilities. झगडा, भांडण.

Strike, *v. i. &t.* (स्ट्राइक्)—(*Struck; Stricken*), to hit; to deliver blows (*lit.* or *fig.*); to dash against or on something; to make (a coin, medal) by stamping; to agree on (a bargain); to enter the mind, impress as; to ignite (match) by rubbing; (of clock) to sound the time; (of hour) be sounded; (of workmen) to go on strike, cease work; to take root; lower, take down, (flag, sail etc.), surrender; cause to penetrate, diverge to; level in strike measure. (टोला, तडाखा, ठोका) मारणें; ठोकणें, पिटणें, गुद्दे मारणें; आपटणें, आदळणें; (नाणें) पाडणें; ठरवणें, पटविणें, कायम करणें; मनांत येणें, सुचणें; काडी पेटविणें; वेळ सांगणें, ठोके पडणें, वाजणें; संप करणें, काम बंद करणें,-थांबविणें; मूळ धरणें; (निशाण, शीड) खालीं पाडणें, उतरणें, शरण

जाणें;-भोसकणें, पार जाणें, (च्या दिशेनें) वळणें, शीग मारणें. *n.* concerted refusal of workmen to work till higher wages are paid or some grievance is remedied; (U. S.) levelling all the pins with one bowl; sudden success at finding petroleum, etc. in financial operation. संप, हरताळ; (नाइन् पिन्स् च्या खेळांत) एका तडाख्यांत नऊ खुंट्या पाडविणें; (धंदा-उद्योगाच्या दृष्टीनें) अकस्मात् (रॉकेल, पेट्रोल वगैरेचा) शोध लागणें. *S.* one *in the mouth with fist,* तोंडावर गुद्दा मारणें. *S. while iron is hot,* cf. तवा तापला आहे तों भाकरी भाजून घ्यावी. *Striking force,* एकदम हल्ला करण्यास सुसज्ज सैन्य (सैन्याची तुकडी). *S. hands,* (एखादी गोष्ट ठरली म्हणून) हातावर टाळी देणें. *A stricken field,* रणांगणावरची (हातघाईची) लढाई. *S. at,* aim blow at. (वर) नेम धरणें. *S. at the root of,* (च्या) मुळावर घाव घालणें. *S. back,* परत ठोसा-टोला-मारणें,-लगावणें. *S. home,* भरपूर,-वर्मी,-टोला मारणें. *S. the track,* come upon it. माग लावणें, मार्गावर येणें. *S. coin,* नाणें पाडणें. *S. bargain,* सौदा ठरविणें,-पटविणें. *The hour has struck,* घड्याळांत ठोका पडला; (*fig.*) आणीबाणीची वेळ आली,-टळली. *S. me dead!,* शपथ! खरोखर! *S. down,* fell with a blow, (also *fig.*). एका तडाख्यांत खालीं पाडणें,-चीत करणें. *S.* one's *head off,* (एखाद्याचें) शिर तोडणें, डोकें छाटणें,-उडवणें. *S. out* (*a plan*), तोड काढणें, युक्ति सुचणें. *S. up an acquaintance,* तोंडकर ओळख पाडणें. *S. off* (*copies*), (प्रति) छापून काढणें. *How does it s. you?* how do you think about it? त्याविषयीं तुझें मत काय आहे? *Struck with terror,* आकस्मिक भीतीनें गाळण उडालेला. *S. into a gallop,* begin galloping. दौडूं लागणें. *A match will not s.,* काडी पेटणार नाहीं. *S.-a-light,* चकमकीपासून प्रकाश पाडण्याचें साधन. *To be on s.,* संप करणें, संपावर असणें. *General s,* सार्वत्रिक संप, सर्व कामगारांचा हरताळ. *Sympathetic s.,* (इतर मजुरांचा खरीं गाऱ्हाणीं असलेल्या मजुरांसाठीं-कामकऱ्यांसाठीं) सहानुभूतिदर्शक संप. *S.-breakers,* outsiders got in to replace strikers. (संपवाल्या मजुरांऐवजीं काम करणारे) संपफोडे. *S.-pay,* subsistence allowance paid to strikers by trade-union. कामकरी-संघाकडून संपवाल्यांना होणारी मदत,-मिळणारें वेतन. *S.-measure,* measuring grain etc. by passing rod across top of heaped vessel. मापाची शीग (मारणें).

Stric'ken, *pa. p.* & *a.* (स्ट्रिक्न्)—smitten with disease, famine, or grief; advanced in years. रोगपीडित, दुष्काळग्रस्त, दुःखी; वृद्ध, वयातीत.

Stri'ker, *n.* (स्ट्राइकर्)—one who strikes; (*esp.*) workman on strike. ठोकणारा, घाव मारणारा; टोला मारण्याचें साधन; संप केलेला कामगार, संपवाला.

Strik'ing, *a.* (स्ट्राइकिंग्)—sure to be noticed, impressive, arresting. लक्षांत येण्यासारखा, ठसठशीत, ढळढळीत, परिणामकारक, चकित करणारा, चमत्कारिक, विलक्षण.—*ly adv.*;-*ness, n.*

String, *n.* (स्ट्रिंग्)—twine or fine cord; length of this material; one of the stretched pieces of cord producing the notes of musical instruments; set of things threaded on a string; set of things etc. coming successively; (Bot.) tough piece connecting two halves of pod. दोरी, सुतळी, सडा, सूत्र; (बांधण्यासाठीं) दोरीचा-तारेचा-तुकडा; तंतु, तार; सर, हार, माळ; (बिल्यर्ड खेळांतील) हात मांडण्याची माळ; (वस्तूंचा इ०) अनुक्रम, रांग. *v. t.* & *i.* (*Strung*) to thread on a string; to provide with strings; to put (facts etc.) together; bring (person) to state of tension; put a stringed instrument in tune; strip strings from beans. गोंवणें, ओंवणें, गुंफणें, (धनुष्याला) दोरी लावणें; तारा लावणें, तंतुयुक्त (तंतुवाद्य) करणें; एकत्र जुळविणें, सूत्र-बद्ध करणें; पेंचांत,-कैचींत धरणें,-सांपडणें, (तंतुवाद्य) लावणें, सूर लावणें; (शेंगांच्या) शिरा काढणें. *To pull the ss.,* (एखाद्या कामाचीं) सूत्रें हालविणें. *Touch the ss,* play. तंतुवाद्य वाजविणें. *Harp on one s.,* एकाच विषय घेऊन बसणें, एकाच विषयाचें तुणतुणें वाजविणें. *Touch a s.,* (*fig.*) (एखाद्याची) विशिष्ट भावना जागृत करणें. *The ss.,* तंतुवाद्यें. *A s. of porters, carriages,* हमालांची, गाड्यांची-रांगच रांग. *S. alphabet,* दोरीवरील (विशिष्ट गांठीवरून) अंधळ्यांसाठीं रचलेली वर्णमाला. *S.-course,* (archit.) कार्निसची लांबलचक रांग, गलथा.

Stringed, *a.* (स्ट्रिंग्ड्)—provided with strings. तारा असलेलें, तारा लावलेलें (तंतुवाद्य).

Strin'gent, *a.* (स्ट्रिन्जन्ट्)—strict, binding, precise, rigorous, making severe restrictions; (of money market) tight. सक्त, पळवाट नसलेला; चग-चणलेला, कडक.—*gency, n.*;—*gently, adv.*

String'y, *a.* (स्ट्रिंगि)—fibrous; (of liquid) ropy. तंतुमय, सूत्रमय; दोराळ, दोरा,-तार,-सुटलेला. *S-substance,* लुकण. *To be s.,* दोरावणें.—*iness, n.*

Strip, *v. t.* & *i.* (स्ट्रिप्)—to remove clothes or covering from; to deprive of covering or belongings, to despoil; (of screw) lose thread; issue from rifled gun without spin. उघडा करणें, नागवा करणें; हिरावून घेणें, बुचाडणें, नागवणें; आंटा नाहींसा होणें; (गोळी) सुटणें, निसटणें. *n.* a long narrow piece of something, a stripling. पट्टी, चिरोटी, चिंधी, फाळा. *To s.* one *to the skin,* पूर्ण नागवा, दिगंबर, -करणें. *Stripped,* naked. नागडा, उघडा. *S. a house,* घरांतील सामानसुमान काढून टाकणें. *S. a tree,* झाडाच्या साली, फांद्या वगैरे काढून,-छाटून,-टाकणें. *S. a cow,* milk to the last drop. थेंबान् थेंब दूध काढणें. *S. tobacco,* तंबाकूच्या पानांचीं देठें काढून टाकणें. *Strip'per, n.*

Stripe, *n.* (स्ट्राइप्)—long narrow band differing in colour or texture from the surface on either side; (Mil.) N. C. O.'s chevron; stroke of a whip; (pl.) flogging. चित्रविचित्र पट्टी, पट्टा; फीत; फटका, फटकारा, वळ. *To get, lose,* one's *ss.,* (नवीन) फीत चढणें, बढती मिळणें;

फीत कमी होणें. *Zebra's ss.,* झेब्रा-जनावराच्या अंगावरील पट्टे.-*strip'ed, a.* (-प्ड्) पट्टेरा. *Strip'y, a.; Strip'iness, n.*

Strip'ling, *n.* (स्ट्रि'प्लिंग)—a youth whose figure has not yet filled out. पूर्ण वाढ न झालेला, पोऱ्या.

Strive, *v. i.* (स्ट्राइव्ह्)—(strove, striven) to endeavour, to try earnestly, to try hard, to struggle; to engage in strife *with;* to contend *against.* झटणें, झटून उद्योग करणें, जोराचा प्रयत्न करणें; लढणें, भांडणें; झगडणें, स्पर्धा करणें. *S. together* or *with each other,* (मोठेपणाकरितां) झगडणें, स्पर्धा करणें.

Strō'bile, *n.* (स्ट्रो'बिल्)—(Bot.) cone of pine etc. (पुष्कळ फुलें एकत्र होऊन झालेलें) लांबोडे व खवलेदार फळ. [Gk *Strepho,* twist]

Strode, *pa. t.* of Strive.

Strōke, *n.* (स्ट्रोक्)—a blow; shock given by a blow; sudden favourable turn of luck; the sound of a clock's bell; sweep of the brush,, pencil or pen; a single effort put forth movement of a regulated or recurrent kind; method of striking in games, a skilful effort; the oarsman rowing nearest stern. टोला, ठोका, फटकारा, फटका, धसका; दैवाची रेषा; ठोका, टोला; (लेखणीचा) फटकारा, फांटा, रेषा; दणका, झपाटा; दम, फेरी; (खेळांत) टोला मारण्याची पद्धत, कुशलतेनें मारलेला फटकारा,-टोला; सुकाणूंजवळचा वल्हेवाला. *v. t.* to pass the hand gently along; act as stroke to crew. कुरवाळणें, प्रेमानें हात फिरवणें, गोंजारणें; सुकाणूच्चें वल्हें धरणें. *Killed by a s. of lightning,* विजेच्या तडाख्यानें (वीज पडून) मारला गेला. *Finishing s.,* final and fatal blow. शेवटचा प्राणघातक टोला,-सपाटा. *S. of paralysis,* पक्षाघाताचा झटका. *Sun-s.,* उन्हाची तिरीप. *S. of genius,* original idea. (प्रचंड) बुद्धीचें काम, मूळची-नवीन-कल्पना. *S. of business,* धंद्यांत मिळालेला मोठा फायदा. *S. of luck,* unforeseen opportune occurrence. सुदैवानें प्राप्त झालेली सुसंधि,-घडलेली अनुकूल गोष्ट. *Dash off picture with a few ss.,* कुंचल्याच्या थोड्याशा फटकाऱ्यांनीं चित्र काढणें,-रेखाटणें. *Could do it with a s. of the pen,* by writing signature. तें एका सहीच्या (लेखणीच्या) फटकाऱ्यानें झालेंच समजा; दुसऱ्या सहीनें तें काम तो करील. *Finishing ss.,* (of a picture), शेवटचा हात. *Was there on the s.,* अगदीं वेळेवर, वक्तशीर. *To s.* one or one's *hair the wrong way,* (एकाद्याला) त्रासवणें, चिडवणें. *Strok'ingly, adv.*

Strōll, *v. i.* (स्ट्रोल्)—to walk leisurely along; to rove from place to place. रमत रमत जाणें; उनाडणें, भटकणें, गांवोगांव हिंडून खेळ वगैरे करणें. *n.* a short leisurely walk. सहल, रपेट, फेरफटका. *To take, go, for a s.,* फेरफटका करणें, चक्कर मारून येणें. *Stroll'er, n.* (esp.) गांवोगांव फिरून खेळांत काम करणारा नट.

Strō'ma, *n.* (स्ट्रो'मा)—(pl.-*ata*). (Biol.) connective tissue of organ or cell. संधीपेशी, जोडणारा पडदा.-*tic, a.*

Strŏng, *a.* (स्ट्रॉंग्)—having power of resistance: tough, firm, healthy; powerful by size or numbers or resources or quality; having any quality in a great degree; energetic, vigorous, decided. (Gram. of verbs.), forming inflections by vowel change within stem rather than by adding suffx (e. g. *Swim, Swam,* etc.). बळकट, जोमदार; काटक, खंबीर, निरोगी; मजबूत, बळकट, कणखर, प्रबळ; भारी; उग्र, उग्रट; जोराचा, निश्चयाचा, उत्साही, निश्चयी; अविकारी (क्रियापदें,-धातु). *A s. constitution,* निरोगी, मजबूत,-प्रकृति. *S. nerves,* proof against fright, etc. न डगमगणारा, न भिणारा, निधड्या छातीचा, बळकट स्नायूंचा. *The s.,* सशक्त माणसें. *S. box,-room,* (दरोडेखोरांना फोडतां न येणारी) भक्कम तिजोरी, खोली. *A s. market,* हळू हळू चढलेले,-चढणारे,-बाजारभाव. *S. meat,* bibl. मजबूत,-भरपूर,-पोट भरेल असें,-अन्न; (*fig.*) उत्साही किंवा समंजस माणसांना पटतील अशीं तत्त्वें, -असे मार्ग. *S. in health,* शरीरप्रकृतीनें मजबूत. *By the s. arm* or *hand,* by force. शक्तीच्या बळावर, दांडगाईनें, बळजबरीनें. *A company 200 s.,* दोनशें लोकांची तुकडी. *S. tea,* कडक चहा. *S. drink,-waters,* alcoholic liquors. मादक पेयें. *S. situation,* conjuncture in play or story calculated to move audience deeply. (नाटक किंवा कथा यांतील) श्रोत्यांना हालवून सोडणारा प्रसंग. *S. onion,* तिखट कांदा. *S. butter,* खवट लोणी. *S. language,* कडक-लागट,-शब्द,-भाषा. *S. measures,* drastic actions. कडक उपाय, -इलाज. *Going s.,* जोरांत-जोमांत-असणें, सरशी असणें. *Come* or *go it s.,* (sl.) अतिरेक करणें. *Strong'ish, a.; Strong'ly, adv.*

Strŏng'hōld, *n.* (स्ट्रॉं'ग्-होल्ड्)—a fortress or citadel; place where some cause or sentiment still prevails. किल्ला; पालेकिल्ला.

Strong'-minded, *a.* (स्ट्रॉं'गमाइन्डिड्)—having a strong mind; (esp. of woman) claiming mental and legal equality with men. करारी, निग्रही; (पुरुषाच्या बरोबरीनें आपणाला) समानहक्क मागणारी (स्त्री.)

Strŏp, *n.* (स्ट्रॉप्)—appliance for sharpening razors; (Naut.) band of leather, rope, or iron round pulley. वस्तऱ्याकरितां पलाटणें; कप्पीला गुंडाळलेला (चामड्याचा वगैरे) तुकडा. *v. t.* to sharpen on a strop. पलाटण्यावर वस्तऱ्याला धार लावणें.

Strōve, *pa. t.* of Strive.

Struck, *pa. t. & pa. p.* of Strike.

Strŭc'ture, *n.* (स्ट्र'क्चर्)—manner in which a building or organism holds together; the

supporting framework of essential parts; a building or any complex whole. (यंत्राची) रचना, बांधा, बनावट, (खडकाची) मांडणी, (दागिन्याची) घडण, घाट; (शरीराची, घराची) रचना, बांधणी; इमारत, इमला, बांधकाम. *Nervous s.*, ज्ञानतंतुरचना. *A fine marble s.*, सुंदर संगमरवरी बांधकाम *Struc'tural, a.* (आवश्यक) बांधणीचा, रचनेचा, घडणीचा.*-turally, adv.*, *Struc'tureless,-tured, aa.*

Strŭg'gle, *v. i.* (स्ट्रगल्)—to make one's way with difficulty; to make great efforts under difficulties; throw one's limbs about in violent effort to get free. धडपड करणें, झगडणें; जीव तोडून कष्ट करणें; हातपाय झाडणें,-आदळणें, -आपटणें. *n.* effort under difficulties, hard contest; spell of struggling. धडपड, आटोकाट प्रयास, आटाआटी, झगडा, कलह, धडपडणें, झगडणें. *Strug'gling, pr. p.* (artist etc.), पोटासाठीं,-मान्यता मिळण्यासाठीं,-धडपडणारा कारागीर, चित्रकार. *Struggler, n.* धडपडणारा, झगडणारा. *The struggle for existence,* the competition between organisms. जीवनार्थ कलह,-झगडा.

Strŭm, *v. i. & t. & n.* (स्ट्रम्)—twang strings of piano etc. (*esp.* unskilfully); such a sound. तंतुवाद्याच्या तारा छेडणें (नवशिक्याप्रमाणें).

Strū'ma, *n.* (स्ट्रुमा)—scrofula; (Bot.) cushion -like dilatation of an organ. गंडमाळा, गलगंड (विकार); (उशीसारखी) मऊ वाढ, मृदु वृद्धी, प्रसरण. *Stru'mose,-mous, aa.*

Strŭm'pĕt, *n.* (स्ट्रंपिट्)—a prostitute. वेश्या, कसबीण.

Strŭng, *pa. t. & pa. p.* of String.

Strŭt, *v. i.* (स्ट्रट्)—to walk in stiff pompous way, to walk with affected dignity. ऐटींत डौलानें चालणें, ठुमकत,-मिरवत,-चालणें, छाती पुढें काढून पावलें टाकणें. *n.* a bar forming part of a framework; strutting gait. धिरा, तीर; ठुमकणें, ठमका, नखरा.

Stru'thĭous, *a.* (स्ट्रूथिअस)—of or like an ostrich. शहामृगाचा,-सारखा, शहामृगाच्या जातीचा.

Strȳ'chnia,-chnine, *nn.* (स्ट्रिक्निआ,-क्निन्)—vegetable alkaloid got from plants and used as nerve-stimulant. कुचल्याचें सत्त्व,-विष.*-chnic, a.*

Stŭb, *n.* (स्टब्)—a stump of tree, tooth, etc. left projecting; remnant of pencil, cigar, etc. खुंट, बुंधा; ठोटण. खुंटण. *v. t.* to rid (ground) of stubs; dig up (root etc.). खुरपणें, खरडणें. (खुंट, मुळें वगैरे) उपटून टाकणें. *To s.* one's *toe,* ठेंच लागून (पायाचा) आंगठा दुखावणें. *Stub'by, a.*

Stŭb'ble, *n.* (स्टबल्)—stumps of grain left sticking up after harvest; cropped hair or beard. (धान्य कापल्यावर राहिलेला) खुंट; (केसाचा, दाढीचा) खुंट.

Stŭbb'lȳ, *a.* (स्टब्लि)—short and stiff. खुंटासारखा. आंखुड व ताठ.

Stŭbb'ŏrn, *a.* (स्टबॉर्न्)—unyielding; not docile or amenable to control, persisting. ताठ, दुराग्रही; हट्टी, अडेल. *Facts are s. things,* विचारसरणीप्रमाणें वस्तुस्थिति (सत्य गोष्ट) बदलूं शकत नाहीं. *S.-ly, adv.*; *-ness, n.* हट्ट, आग्रह.

Stŭcc'o, *n.* (स्टको)—(*pl.-oes*), kinds of plaster or cement for walls. (चुन्याचा वगैरे भिंतीचा) गिलावा, सन्दला, गिलाव्याचें काम. *v. t.* to face with stucco. (चुन्याचा) गिलावा काढणें.

Stŭck, *pa. t. & pa. p.* of Stick.

Stŭd, *n.* (स्टड्)—projecting knob on a surface; large-headed nail; post to which laths are nailed. चमकी; गुंडी; गुलमेख. *v. t.* to set thickly with or as with studs. चमक्या बसवणें, जडवणें, गुलमेखा मारणें. *Stud'ded, pa. p.* गुलमेखा जडवलेला, जडित, खचित.

Stŭd, *n.* (स्टड्)—number of horses kept for breeding, hunting, etc. (पैदाशीचे, शर्यतीचे) राखीव घोडे. *S.-book,* घोड्यांच्या वंशावळीचें पुस्तक. *S.-bull,* वियाण्याचा बैल, पोळ, वळू बैल.

Stŭd'ding, *n.* (स्टडिंग)—wood, lath, etc. of partition. पडद्याचें लांकूड, पट्टचा, गिलावा, वगैरे.

Stū'dent, *n.* (स्ट्यूडन्ट्)—a person undergoing instruction, a man devoted to books. विद्यार्थी. अभ्यासू, शिकणारा, शिष्य.*-ship, n.* छात्रवृत्ति, शिष्यवृत्ति.

Stŭd'ied, *a.* (स्टडिड्)—deliberate or intentional, deliberately planned. जाणून बुजून, हेतुपुरःसर, मुद्दाम धारण केलेलें.*-ly, adv.*

Stū'dĭō, *n.* (स्ट्यूडिओ)—(*pl.-os*) artist's work -room, work-place of a painter. (मूर्तिकाराचें किंवा चित्रकाराचें) कार्यालय, चित्रगृह, चित्रपटगृह.

Stū'dĭous, *n.* (स्ट्यूडिअस्)—given to study or reading; attentive to, careful. विद्याव्यासंगी, अभ्यासी, तत्पर, दक्ष.*-ly, adv.*; *-ness, n.*

Stŭd'ȳ, *n.* (स्टडि)—acquiring of information (esp.from books); pursuit of some branch of knowledge; meditation; room used for literary work or owner's private business; (Paint. etc.) sketch made for practice; (Theatr.) learner of parts. विद्यार्जन, अभ्यास; अध्ययन, व्यासंग; चिंतन, मनन; अभ्यासाची खोली, (खाजगी) खोली; (हात बसण्याकरितां, नमुन्याकरितां काढलेलें) रेखाचित्र; भाषण पाठ करणारा नट. *v. t. & i.* to devote time and thought to understanding (subject, &c.); scrutinize; make an object of study; be on the watch; apply oneself to (esp. reading); (arch.) meditate. अभ्यास करणें, अध्ययन करणें, शिकणें; विवेचन,-चिंतन,-मनन करणें, चिकित्सा करणें; (वर) विचार करणें; गढून जाणें; ध्यान,-चिंतन,-करणें. *To make a s. of,* try to secure; investigate carefully. मिळविण्याचा प्रयत्न करणें; कसून संशोधन करणें. *Brown s.,* fit of musing. विचारभ्रमण, विचारांत गढून जाणें. *Continue your ss.,* आपले पाठ (धडे, अभ्यास) चालू ठेव. *To s. up,* (परीक्षेकरितां एखाद्या विषयाची) तयारी करणें. *S. out,* परिश्रमानें-पुष्कळ

विचारांतीं-शोधून काढणें. *S. for the bar,* read law. कायद्याचा अभ्यास करणें (बॅरिस्टर होण्याकरितां). [L. *studium,* zeal]

Stŭff, *n.* (स्टफ्)—material; substance or things of inferior quality; woollen fabric; trash, nonsense. वस्तु, द्रव्य, सामान, तत्त्व, दम; सटरफटर सामान, हलकी चीजवस्त; लोंकरीचा कपडा; हलकी वस्तु, क्षुद्र-क्षुल्लक-बडबड. *v. t. & i.* to pack tightly or cram into, to feed gluttonously; eat greedily; (colloq.) hoax. खचून भरणें, चोंदणें, कोंबणें; ठासणें; दपटणें, ओ येई तों-अधाशासारखें-भरविणें, -खावविणें,-खाणें,-(पोट) भरणें; फसविणें, ठकविणें. *Has good s. in him,* has sterling qualities. अप्रतिम गुण आहेत. *This book is good, sorry, s.* हें पुस्तक-बऱ्या,-वाईट,-प्रतीचें आहे. *Food ss.,* धान्यें, दाणा गोटा. *Green, garden, s.,* भाजीपाला. *Doctor's s.* औषध. *Inch s.,* एक इंच जाडीच्या फळ्या. *What s. he writes!* किती गचाळ लिहितो तो! *Stuffed birds, beasts,* skin with interior removed and replaced by enough material to restore original shape. पेंढा भरलेले पक्षी,-पशू. *Stuffed fowl,* (शिजविण्याकरितां) पुरण-मसाला-भरलेलें बदक, -कोंबडें इ० *To stuff a child,* मुलाला खचून भरविणें. *He stuffed his fingers into his ears,* कानांत बोटें घातलीं (कोंबलीं). *Stuff'er n.* (जनावरांच्या) चामड्यांत पेंढा भरणारा.

Stŭff'ing, *n.* (स्ट'फिंग)—(esp.) seasoning; padding of furniture etc. पुरण, मसाला; भरण, भराव. *S.-box,* chamber in machinery through which rod can work, all vacant space being filled with stuffing. यंत्रांतील दांडा फिरण्याची हवाबंद पेटी,-विभाग.

Stŭff'ȳ, *a.* (स्ट'फि)—lacking ventilation; close, oppressive; (sl.) angry, sulky. कुजलेला, कोंदट; बंदिस्त, गुदमरविणारा; रागीट, चिडखोर.—*iness, n.*

Stŭ'ltifȳ, *v. t.* (स्ट'ल्टिफाय)—to exhibit in ridiculous light, to make a fool of; undo the work or effect of. मूर्खपणाचें प्रदर्शन करणें, मूर्खपणाचें ठरविणें, हसूं करून घेणें; परिणाम नाहींसा करणें.—*fication, n.*

Stŭm, *n.* (स्टम्)—unfermented grape-juice. (मादकपणा-आम्लपणा-न आलेला) द्राक्षारस. *v. t.* to prevent from (further) fermentation. (अधिक) मादकपणा न येईल असें करणें.

Stŭm'ble, *v. i.* (स्ट'म्बल्)—to have partial fall; to be checked in speech; (with *at*) to feel scruples or doubts about; (with *upon*) to come across unexpectedly. ठेंचळणें; ठोकर लागणें, अडखळणें; घोटाळा करणें, गुचकळ्यांत पडणें, अकस्मात गांठ पडणें, अवचित सांपडणें. *n.* act of stumbling. अडखळणें, ठेंचळणें; ठेंच, ठोकर. *Stum'blingly, adv.*

Stŭm'bling-blŏck, *n.* (स्ट'म्बलिंग्-ब्लॉक्)—circumstance causing difficulty or hesitation. अडचण, अडथळा, धोंड.

Stŭmp, *n.* (स्टम्प्)—part of a felled or fallen tree that remains projecting from the ground; remnant of something; any of the three uprights of a cricket wicket; wooden leg; (pl. colloq.) legs; cylinder of rolled paper etc. for uses in drawing. खुंटा, खोड, बुंधारा; शिल्लक राहिलेला भाग, (विडीचें) थोटूक, खुंटण, अवशिष्ट भाग; क्रिकेटच्या खेळांतील खुंट, त्रिफळा; दांडी, लांकडी पाय; तंगड्या, पाय; (कागदी किंवा इतर) सुरनळी. *v. i. & t.* to walk on, or as on, wooden legs; (of question etc.) be too hard for; embarass; (Cricket) put out batsman while he is out of his ground by (wicketkeeper) disturbing wicket; use stump on. दणदणत,-पाय हापटीत, -चालणें; कठीण जाणें; गोंधळणें, गोंधळविणें, गुचकळ्यांत पाडणें; (यष्टिरक्षकानें, हातांत चेंडू असतां मर्यादेबाहेर पाय असलेल्या,-गेलेल्या) खेळाडूला चीत करणें,-बाद करणें; वर सुरनळी फिरविणें. *On the s.,* (colloq.) राजकीय (चळवळींत) भाषण करणें, -चळवळ करणें. *S. oratory,* राजकीय व्याख्यानांतील-भाषणांतील,-वक्तृत्व, खळबळ उडविणारें वक्तृत्व. *Stir one's ss.,* पाय उचलणें,-चालवणें. *Stum'per, n.* (sl.) wicket-keeper, यष्टिरक्षक.

Stŭmp'ȳ, *a.* (स्ट'म्पि)—thickset. गिड्डा, थोटा, आंखूड व जाड.

Stŭn, *v. t.* (स्टन्)—to knock senseless; to overwhelm or stupefy by a shock, to surprise completely. आघातानें मूर्च्छित करणें; कानठळ्या बसवणें, गोंधळवणें, थक्क करणें, अक्कल गुंग करणें. *Stun'ning, a.* ravishingly good in some respect. splendid. (कांहीं बाबतींत) अत्युत्कृष्ट, अप्रतिम, सुंदर; *-ly, adv. Stun'ner, n.* अप्रतिम,-सुंदर,-नमुना.

Stŭng, *pa. t. & pa. p.* of Sting.

Stŭnk, *pa. t. & pa. p.* of Stink.

Stŭnt, *v. t.* (स्टन्ट्)—to check the growth of. वाढ खुंटवणें, खुरटणें, वाढ मोडणें. *n* a special effort or display. विशेष प्रयत्न, विलक्षण कृत्य, धाडस, खळबळ. *Stunt'ed, pa. p.* खुरटलेला, खुजा, वाढ खुंटलेला, कुणगूस.

Stūpe, *n.* (स्ट्यूप्)—flannel wrung out of hot water and applied as fomentation; (Surg.) fomentation flannel. (ऊब आणण्याकरितां,-शेकण्याकरितां, भिजवलेला) गरम कपडा; गरम कपड्याची पट्टी. *v. t.* to apply stupe to. (गरम पाण्यांत भिजविलेला) गरम कपडा लावणें,-कपड्यानें शेकणें.

Stū'pefȳ, *v. t.* (स्ट्यू'पिफाय्)—to dull the wits or senses of, to confound or confuse utterly. मति गुंग करणें, धुंद करणें, धुंदी आणणें. *Stupefied with drink,* दारु पिऊन बेहोष,-धुंद,-झालेला. *Stupefa'ction n.;-tive, a. Stu'pefier, n.,-pefa'cent, a.* गुंगी आणणारें (औषध).

Stūpĕn'dous, *a.* (स्ट्युपे'न्डस)—amazing; of vast size or importance, prodigious. आश्चर्यकारक; भव्य; विशाल, भयंकर. *S. folly,* विलक्षण,-भयंकर, मूर्खपणा.*-ly. adv.;-ness, n.* [L. *stupere,* be amazed at]

Stū'peous, *a.* (स्टयूंपिअस्)—with long loose scales. लांब सुटे सुटे खवले असलेला.

Stū'pid, *a.* (स्टयूपिड्)—unintelligent, foolish; uninteresting. बुद्धीचा जड, मूर्ख, अजागळ, सुस्त; नीरस, कंटाळवाणा.-*ly, adv.*; *Stupid'ity, n.* मंदबुद्धि, मूढता, मोह, धुंदी, सुस्ती.

Stū'por, *n.* (स्टयूपर्)—dazed or torpid state, insensibility, utter amazement. गुंगी, धुंदी, बेशुद्धि, मोह, व्यामोह.-*ous, a* (med.) गुंगी, धुंदी आणणारा.

Stūpo'se, *a.* (स्टयूपो'स)—(Bot., Zool.) with tufts of long hair. लांब केसाळ झुपक्याचा.

Stŭrd'ў, *a.* (स्टर्'डि)—not easily knocked down or pushed aside; strong, hardy, robust; of independent character, firm. कणखर, धट्टाकट्टा; धाडशी, दांडगा; दुराग्रही, हट्टी. *S. beggar,* धडधाकट (परंतु निरुद्योगी-फुकटखाऊ-) भिकारी. *Sturd'ily, adv.*; *Sturd'iness, n.* कणखरपणा, राकटपणा.

Stŭrd'ў, *n.* (स्टर्'डि)—vertigo in sheep caused by tape-worm in brain. (मेंढरांना होणारी) मिरगी, घीट (रोग).-*died, a.*

Stŭr'geon, *n.* (स्टर्'जन्)—kinds of large edible fish with mailed body and head. एक जातीचा मोठा मासा (खाण्याच्या उपयोगी).

Stŭtt'er, *v. i. & t.* (स्टट्'टर्)—to stammer. तोतरें, -चोचरें,-बोलणें.-*ingly, adv.*;-*er, n.*

Stў, *n.* (स्टाय्)—(pl.-ies) an enclosure in which pigs are kept; (*fig.*) filthy room or dwelling; place of debauchery, inflamed swelling on the edge of the eyelid. डुकरवाडा; घाणेरडी जागा; कुंटणखाना; रांजणवाडी. *v. t. & i.* to lodge in a sty. डुकरवाड्यांत ठेवणें. *Pig-sty,* डुकरवाडा.

Stў'gian, *a.* (स्टि'जिअन्)—of, as of, Hades; gloomy. नरकलोकासंबंधीं; काळोखी, दुःखी.

Stўle, *n.* (स्टाइल्)—ancient writing implement; a pen or pencil; a manner of writing, speaking, &c.; shape or make or appearance of a garment or vehicle or the like, an implement of style-like shape; full title, designation; distinction; (Bot.) narrowed extension of ovary. सळई; लेखणी, शलाका, टांक; लेखनशैली; ढब, धर्ती, भाषाशैली; ठेवण, घाटणी, पद्धति; (सूर्य-तबकडीचा) शंकु, शंकूचा कांटा; किताब, पदवी; श्रीमंतीचा डौल, -थाट,-रुबाब; स्त्रीकेसरनलिका, परागवाहिनी, स्त्रीकेसराचा दांडा. *v. t.* to describe by specified term or designation. म्हणणें, नांव देणें, पदवी,-किताब, -देणें. *Lapidary* or *monumental s.*, शिलालेखयोग्य-पद्धति. *There is no s. about her,* ती अगदींच सामान्य (भटीची) दिसते. *In all sizes and ss.,* सर्व तऱ्हेच्या मापांचे व नमुन्यांचे. *Sty'let, n.* अणकुचीदार शस्त्र; मूत्राशयांत घालण्याची सळई.

Stў'lish, *a.* (स्टा'इ-लिश)—in the prevailing fashion; well-appointed. चालू पद्धतीचा; डामडौलदार, फक्कड. *Sty'list, n.* writer or artist more intent on style than matter. ढबदार (लेखन) शैलीवर भर देणारा (लेखक, चित्रकार). *Stylis'tic, a.* लेखनशैलीचा. -*tically, adv.*

Stў'lograph, Stў'lō, (स्टा'इलग्राफ्,-इलो)—(*pl.-os*) reservoir pen. आंगच्या शाईचा टांक.-*graphic, a.*

Stў'ptic, *a. & n.* (स्टि'प्टिक्)—(substance) checking blood. रक्त बंद करणारा, रक्तस्तंभक (वस्तु, औषध).

Suā'sion, *n.* (स्वे'झन्)—reasoning or advice as incentive. प्रेरक उपदेश, मन वळविणें.

Suāve, *a.* (स्वेव्)—bland, polite. गोड, मधुर, सौम्य. -*ly, adv.*; *Suav'ity, n.* गोडपणा, माधुर्य, सभ्यपणा.

Sŭb, *n.* (सब्)—(colloq.) subaltern, subscription, substitute. कप्तानाच्या खालचा लष्करी अंमलदार; वर्गणी; बदली (मनुष्य इ.).

Sŭb, L. *prep.* (सब्)—under. खालीं, खालचा. *Sub-ju'dice,* (सब्जू'डिसि) न्यायालयीन, न्यायकोर्टांतून निकाल न झालेला (कज्जा). *Sub-ro'sa,* (-रो'झ़ा) गुप्त, निगूढ, गुप्तपणाची शपथ घेतलेला. *Sub-silen'tio,* गुप्त रीतीनें.

Sŭb, *pref* (सब्)—कमीपणा,-उणेपणा दाखविणारा (उपसर्ग). *Sub-committee,* पोटमंडळ (कमिटि). *Subcontrary, a. & n.* (*pl.*) (Logic) contrary in some respect. अनुविपरीत. *Sub-editor, n.* (वर्तमानपत्राचा वगैरे) उपसंपादक, दुय्यम संपादक, -*ship, n.*;-*ed'it, v. t.* चा दुय्यम संपादक असणें. *Sub-office, n.* (मुख्य ऑफिसा) खालचें ऑफिस, -ची कचेरी,-खातें. *Sub-ordinacy, n.* ताबेदारी, अधीनता. *Sub-quadruple, a.* उपचतुर्गुण (गुणोत्तर). *S.-quin'tuple, a.* उपपंचगुण (गुणोत्तर). *S.-race,* अवांतर जाति. *S.-registrar,* (दस्तैवज नोंदणारा) दुय्यम अधिकारी (सब्रजिस्ट्रार). *S.-satur'ation, n.* उपसंपृक्तता. *S.-section,* पोटकलम.

Sŭbă'cid, *a.* (सबॅ'सिड)—slightly acid. आंबटगोड.

Sŭbăg'ueous, *a.* (सबॅ'क्विअस्)—below water. पाण्यांतील, जलाशयीन, जलचर; जलोपयोगी.

Sŭbclăss', *n.* (सब्क्ला'स)—a subdivision of a class. वर्गातील एक पोटभाग, उपवर्ग, उपभेद.

Sŭbcŏn'scious, *a.* (सब्कॉ'न्शस्)—partially or imperfectly conscious. अर्धवट शुद्धींत, अप्रबुद्ध, अर्धजागृत.

Subcon'tract, *n.* (सब्कॉ'न्ट्रॅक्ट्)—a contract under a previous contract or contractor. पोटकंत्राट. -*tract, v. i.*;-*tract'or, n.* पोटकंत्राटदार.

Subcūta'neous, *a.* (सब्क्यूटे'निअस्)—below the skin. त्वचेच्या खालील, त्वग्निम्नस्थ.

Sŭbdivide', *v. t. & i.* (सब् डिव्हा'इड्)—to divide further, to part into smaller divisions. —आणखी भाग करणें, पोटभाग पडणें,-पाडणें.

Sŭbdivi'sion, *n.* (सब्डिव्हि'झन्)—one of the parts resulting, the part of a large part. पोटविभाग, अंशांश; प्रांत, विभाग, मविभाग.-*al, a.* प्रांताचा, विभागाचा.

Sŭbdūe', *v. t.* (सब्ड्यू)—to get the upper hand of; to tame; to soften, to tone down. जिंकणें; वश करणें; ची नांगी मोडणें, नरम पाडणें.

Subdu'al, *n.* जिंकणें, वठणीस आणणें, दमन. *Subdued'*, *a.* जिंकलेला, वठणीस आणलेला, वशीकृत.

Sŭbjā'cent, *a.* (सब्जे'सन्ट्)—situated below. खालचा, अधःस्थित.

Sŭb'jĕct, *a.* (स'ब्जेक्ट्)—under government; politically dependent; obedient, submissive, owing obedience to; liable or exposed or prone to; subjacent. ताब्यांत असलेला; हुकमाखालील, ताबेदार, परतंत्र; आज्ञांकित; योग्य, जोगा, पात्र, वश, अधीन; अधःस्थित, खालील. *adv.* (with *to*) conditionally upon; on the assumption of. अटीवर, गृहीत,-धरून. *n.* a person subject to political rule, member of a State; (Gram., Logic) a thing about which something is predicated; (Metaphys.) thinking and feeling entity; substance of anything; a theme of discussion, description, &c. रयत, प्रजा; कर्ता, उद्देश्य; द्रष्टा, विषयी, मन, बुद्धि, अहंकार; अधिष्ठान, अधिकरण, स्थान, आधार, आश्रय; विषय, प्रतिपाद्य गोष्ट, प्रकरण. *Is held s.*, in subjection. अंमलाखालीं, परतंत्रतेत, -आहे. *S. to your consent, I propose to try again.* तुम्हीं मान्यता दिलीत तर मी पुन्हां प्रयत्न करूं इच्छितों. *S. to correction*, चुकीची दुरुस्ती करण्याच्या अटीवर. *The ss. of the king*, त्या राजाची प्रजा,-रयत लोक. *The liberty of the s.*, प्रजेला मिळालेलें कायदेशीर स्वातंत्र्य, प्रजास्वातंत्र्य. *A dull s.*, कंटाळवाणा विषय. *S. for dissection*, or *s.*, dead body. (छेदनार्थ) शव, प्रेत. *To change the s.*, talk of something else, esp. as way out of embarassment. (गोंधळलेल्या मनःस्थितींतून निसटण्यासाठीं) विषयांतर करणें. *S.-matter*, matter treated of in a book etc. प्रतिपाद्य विषय. *S. index*, विषयवार सूची. *S.-less*, *a.*

Sŭbjĕct', *v. t.* (सब्-जे'क्ट्)—to subdue; to expose, to render liable; to submit *to*. जिंकणें, अमलांत आणणें; पात्र करणें, जोगा करणें, (मूर्च्छेनेचा) प्रयोग करणें; अधीन करणें, भाग पाडणें. *Subjec'tion*, *n.* जिंकणें, वश करणें; ताबेदारी, आधीनता; वशीकरण, मूर्च्छन.

Sŭbjĕc'tive, *a.* (सब्जे'क्टिव्ह्)—relating to the subject as opposed to the object; (pop.) imaginary; (of art and artists) expressing the artist's point of view rather than transcribing external realities; (Gram.) of the subject. अधिष्ठाननिष्ठ, आत्मगत, अधिष्ठानासंबंधीं; विचारसृष्टीच्या, काल्पनिक; व्यक्तिनिष्ठ, स्वत्वप्रधान, भावनात्मक, स्वात्माविर्भावी (काव्य, चित्र इ.); कर्तृवाच्य.-*ly*, *adv.* आंतरदृष्टीनें.-*ness*, *n.* *Subjectiv'ity*, *n.* अधिष्ठाननिष्ठता; स्वानुभववाद, नैजवाद.

Subjĕc'tivism, *n.* (सब्जे'क्टिव्हिझम्)—the doctrine that all knowledge is subjective only and incapable of objective test of truth. विषयिविज्ञानवाद; विषयी हा सर्व ज्ञानाचें अधिष्ठान आहे असा वाद.

Sŭbjoin', *v. t.* (सब्जॉइ'न्)—to add at the end शेवटीं जोडणें.

Sŭb'jŭgāte, *v. t.* (स'ब्जुगेट्)—to bring into subjection, to conquer and force to submit. जिंकणें, ताब्यांत आणणें.-*tion*, *n.*; *Sub'jugable*, *a.*

Sŭbjŭn'ctive (mood), *a.* & *n.* (सब्जं'क्-टिव्ह् मूड्)—a mood named as being common in subjoined or dependent clauses expressing condition. संशयार्थ.-*ly*, *adv.* [L. *sub*, under; *jungere*, join]

Sub-kĭng'dom, *n.* (सब्-किं'ग्डम)—main division of animal or vegetable kingdom. (प्राणिवर्ग, वनस्पतिवर्ग, यांची) उपकोटि.

Sub-lease, *n.* & *v. t.* (सब्ली'स्)—letting to another person of what the lessor himself holds on lease. (कुळानें) पोटकुळास पट्टयानें देणें, पोटपट्टा, पोटकौल.

Sŭblĕt', *v. t.* (सब्ले'ट्)—to underlet, to let to another person. पोटभाड्यानें देणें.

Sub'lĭmate, *a.* & *n.* (स'ब्लिमट्)—product of sublimation. ऊर्ध्वपातित, (घनाचा बाष्प करून) बाष्पाचा घन केलेला, फूल केलेला (पदार्थ), रस-कापूर. *Sub'limate*, *v. t.* (स'ब्लिमेट्), convert from solid state to vapour by heat and allow it to solidify again; (*fig.*) refine, idealize. घनाचा बाष्प व बाष्पाचा पुन्हां घन होऊं देणें; ऊर्ध्वपातन करणें; (अलं०) उदात्त करणें, शुद्ध करणें, सोज्ज्वल करणें. *Sublima'tion*, *n.* ऊर्ध्वपातन, संप्लवन. [L. *sublimare*, lift up]

Sŭblīme', *a.* (सब्ला'इम्)—elevated aloft, exalted; surpassing; so impressive as to inspire awe or wonder, lying near the surface. उन्नत, थोर, उंच; अत्युत्कृष्ट; प्रगल्भ, प्रशस्त, मोठा, भव्य, उदात्त, विस्तीर्ण; (शारीर०) पृष्टगत. *v. t.* & *i.* make sublime; undergo sublimation. शुद्ध,-उदात्त,-करणें; ऊर्ध्वपातन करणें, ऊर्ध्वपातनानें शुद्ध करणें. *S. mountain*, *virtue*, *love*, *genius*, उत्तुंग,-अत्युच्च,-विशाल पर्वत, उदात्तगुण,-प्रेम, थोर बुद्धि. *S. indifference*, उदात्त बेफिकिरी. *The s.*, उदात्त संपद्, उदात्तता. *Sublime'ly*, *adv.*

Sublĭm'ity, *n.* (सब्लि'मिटि)—being sublime. थोरपणा, उदात्तता, श्रेष्ठपणा.

Sublĭm'inal, *a.* (सब्लि'मिनल्)—(Psychol. of sensations) so faint that subject is not conscious of them. अर्धजागृत,-सुप्त.

Sublu'narȳ, *a.* (सब्लू'नरि)—of this world, earthly. चंद्राखालचा, इहलोकींचा, ऐहिक. *Sublu'nar*, *a.* (poet.)

Sŭb'marine, *a.* (स'ब्-मरीन्)—situated at some depth in the sea. समुद्रांतला, समुद्रतळाचा. *n.* submersible boat. पाणबुडी बोट, जलान्तःसंचारिणी सुद्रनौका.

Sŭbmerge', *v. t.* & *i.* (सब्मर्'ज्)—to contain below the surface, to sink. जलमय होणें; (पाण्यांत) बुडणें, बुडविणें; (पाणबुडी) पाण्याखालीं जाणें, अदृश्य होणें. *Submerged*, *pa. p.* (*fig.*) कर्जांत बुडालेला, खालावलेला. *Submerg'ence*, *n.* बुडणें, मज्जन, निमज्जन.

Submersed', *a.* (सब्मर्स्ड्) -put or growing under water. जलमग्न, पाण्याखालीं वाढणारा. *Submers'ible, a.*

Sŭbmĭ'ssion, *n.* (सब्मिशन्)—submitting, humble or suppliant behaviour; (in legal use) theory submitted. मान वांकविणें, अधीनता; (वकिलानें) पुढें मांडलेलें तत्त्व,-मुद्दा.

Sŭbmĭ'ssive, *a.* (सब्-मि'सिव्ह्)—unresisting; meek, tractable, compliant. प्रतिकार न करणारा; नम्र, दीन *-ly, adv.*; *-ness, n.*

Sŭbmĭt', *v. t. & i.* (सब्-मि'ट्)—to accept without resistance. to give way, to yield. to present for consideration or decision. मान वाकविणें, अंकित असणें; शरण जाणें, हार घेणें; विचारार्थ पुढें मांडणें, (न्यायाधिशापुढें) ठेवणें, (-कडे) सोंपविणें. *That, I s., is a false inference.* मी नम्रतापूर्वक आपल्या नजरेस आणून देतों कीं, आपलें अनुमान चुकीचें आहे.

Sŭbmŭl'tiple, *a. & n.* (सब्म'ल्टिपल)—(Math.) अवान्तर अपवर्त्य.

Sŭbŏrd'ĭnate, *a.* (सबॉ'र्डिनट्)—of inferior importance or rank. खालच्या दर्जाचा, गौण. *n.* a person working under another. हाताखालीं काम करणारा मनुष्य, हाताखालचा, दुय्यम. *v. t.* (-नेट्) गौण स्थान देणें, कमी प्रतीचा लेखणें. *S. clause,* गौणवाक्य-*tive, a.*

Sŭbŏrdinā'tion, *n.* (सबॉर्डिने'शन्)—subordinate state, inferiority of rank. खालचा दर्जा, गौणता गौणस्थान, ताबेदारी.

Suborn', *v. t.* (सबॉ'र्न्)—to induce to commit perjury or other crime. लांच देऊन खोटे साक्षी तयार करणें,-खोटें वदविणें.*-er, n.-ation, n.*

Subpoe'na, *n. & v. t.* (सब्पी'ना)—(Law) writ commanding person's attendance in the court of justice. कोर्टाचें साक्षीस आव्हान,-समन्स (बजविणें). [L. = under penalty]

Sŭbscrībe', *v. t. & i.* (सब्-स्क्रा'इब्)—to sign (one's name or a document etc.); to express adhesion *to,* to give consent to; to contribute to a fund or an object. वर सही करणें, नांव घालणें,-लिहिणें, (ब्रीदवाक्य) खालीं लिहिणें; मान्यता दर्शविणें; वर्गणीदार होणें, संमत असणें, संमति देणें. *I cannot s. to that opinion,* तें मत मला मान्य करवत नाहीं. *To s. for a book,* (पुस्तक छापून होण्यापूर्वीच) आगाऊ ग्राहक होणें. *S. to a newspaper,* वर्तमानपत्राचा वर्गणीदार असणें,-होणें. *Subscribed capital,* संकल्पित (देण्याचें मान्य केलेलें) भांडवल. [L. *sub*, under; *scribere,* write]

Sŭbscrī'ber, *n.* (सब्स्क्रा'इ-बर्)—one who signs, one who enters his name for a paper. सही करणारा; वर्गणीदार.

Sŭbscrĭp'tion, *n.* (सब्स्क्रि'प्शन्)—subscribing; share or sum subscribed. सही करणें, दस्तत; वर्गणी.

Sŭb'sequĕnt, *a.* (स'ब्सिक्वेन्ट्)—coming after, succeeding, next; posterior *to.* मागून येणारा; पाठीमागचा, नंतरचा.*-ly, adv.* मागून, मग, नंतर. *Sub'sequence, n.* अनुगमन, मागून येणें.

Sŭbserve', *v. t.* (सब्स'र्व्)—to serve as means towards, to assist or promote (purpose, end, etc.). उपयोगीं पडणें, साहाय्य करणें, त्या कामास येणें,-उपयोगी होणें.

Sŭbser'vĭent, *a.* (सब्स'र्व्हिअन्ट्)—conducive as means *to,* serving to promote some end; cringing. सहायक, उपकारी, उपकारक, पोषक; दुसऱ्याच्या तंत्रानें चालणारा, हांजीखोर.*-ly, adv.*; *Subser'vience,-cy, nn.* उपयुक्तता; छंदानुवर्तन, तंत्र

Sŭbsīde' *v. i* (सब्-सा'इड्)—to abate; (of ground) sink; to die away; to fall silent, to be calmed, to fall into a state of quiet. (पूर, पाणी) ओसरणें, कमी होणें; (जमीन) दबणें, खचणें; नाहींसा होणें; शांत होणें; (आरामखुर्चीत) पडून राहणें. *Sub'sidence, n.* (जमीन) खालीं बसणें. थिरावणें, पडणें, उतार, उपशमन.

Sŭbsĭd'ĭarў, *a.* (सबिस'डिअरि)—serving to help or supplement; supplementary *to.* मदतीचा, अंगभूत, साहाय्यकारी, उपकारक. *S. troops,* कुमकेची फौज.*-ily, adv.*

Sŭb'sĭdize, *v. t.* (स'ब्सिडाइझ्)—to pay subsidy to, support. द्रव्यसाहाय्य करणें, पैशाचा आश्रय देणें.

Sŭb'sĭdў, *n.* (स'ब्सिडि)—money grant to meet urgent necessities; money grant to sovereign, or to another state in return for support; money grant from state to private concerns of public utility. अडचणींत केलेलें द्रव्यसाहाय्य, मदत; (एका राजानें दुसऱ्याला दिलेली) मदतीबदलची खंडणी,-पैसा.

Sŭbsĭst', *v. i. & t.* (सब्सि'स्ट्)—to exist; to support life; to find sustenance for, to be maintained with food and clothing. अस्तित्वांत असणें, असणें; जीव धरून असणें, (वर) जगणें; निर्वाह करणें, पोसणें, पाळणें, योगक्षेम चालविणें.

Sŭbsĭst'ence, *n.* (सब्सि'स्टन्स)—subsisting; what one lives on or by. अस्तित्व; उपजीविकेचें साधन, निर्वाह.

Sŭb'soil, *n.* (स'ब्साइल्)—stratum of earth just below surface. भूपृष्ठाखालची जमीन, अधोभूमि.

Sŭb'stance, *n.* (स'ब्स्टन्स)—the essence or most important part of anything; gist, purport; matter, reality; solidity, firmness, substantiality; particular kind of matter; actual possessions. महत्त्वाचा भाग, सत्त्व, तत्त्व, तात्पर्य, सार, सारांश; पदार्थ; वस्तु; सार; जड द्रव्य, जड पदार्थ,-वस्तु; संपत्ति, धनदौलत. *I agree with him in s.,* generally. तत्त्वतः,-सामान्यपणें,-त्याचें व माझें मत जुळतें. *A man of s.,* जमीनजुमलेवाला मनुष्य. *To waste* one's *s.,* be spendthrift. उधळपट्टी करणें. *A porous s.,* सच्छिद्र वस्तु,-द्रव्य.

Sŭbstăn'tial, *a.* (सब्स्टॅन्शल्)—having substance, actually existing, not illusory, not inconsiderable, moderately wealthy. ठळक, दणदणीत, कसदार, भक्कम; खरा, खराखुरा, वास्तविक; भरीव, बराचसा, पैसेवाला, ऐपतदार.-*tially, adv.*;-*tial'ity, n. Substan'tialism, n.* (philos.) doctrine that behind phenomena there are substantial realities. द्रव्यास्तित्ववाद, द्रव्यवाद.-*list, n.*

Sŭbstăn'tiāte, *v. t.* (सब्स्टॅन्शिएट्)—to give good grounds for (charge, statement). प्रमाणानें सिद्ध करणें, पुरवणी करणें, मजबुती आणणें, खरा करून देणें.-*tiation, n.* भक्कमपणा आणणें, पुरावा. -*tiator, n.*

Sŭb'stăntive, *n.* (सब्स्टॅन्टिव्)—a noun. नाम, विशेष्य. *a.* expressing existence: a separate and independent existence; not subservient. अस्तित्वदर्शक; वस्तुविशिष्ट, वास्तविक; मूळ, खरा, मूळ सूचनेच्या रूपाचा. *S. motion,* मूळ सूचनेच्या रूपाचा ठराव, मुख्य ठराव (म्हणून, समजून).-*ly, adv. Substanti'val, a.,-tivally, adv.*

Sŭb'stĭtūte, *n.* (सब्स्टिट्यूट्)—a person or thing performing some function instead of another. बदली, प्रतिनिधि. *v. t.* to put in exchange (*for*). च्या बदली ठेवणें, च्या जागीं योजणें.-*tion, n.,-tional, a.,-tionary, a.*

Sŭbstrā'tŭm, *n.* (सब्स्ट्रेटम्)—lower layer, stratum lying under another; basis. खालचा थर; आधार, पाया, अधिष्ठान.

Substrŭc'tion, *n.* (सब्स्ट्रक्शन्)—vaults or other masonry, etc. serving as foundation. पायाच्या कमानी किंवा इतर बांधकाम. *Sub'structure, n.* तळघर; पाया; पायाची बांधणी.

Sŭbtĕn'ant, *n.* (सब्टेनन्ट्)—tenant holding of a tenant, one who rents land from a tenant. पोटभाडेकरी.-*ancy, n.*

Sŭbtĕnd', *v. t.* (सब्टेन्ड्)—(geom.) to stretch or extend under, (of line) to be opposite (angle, arc.). विरुद्ध बाजूला असणें, अन्तरित करणें.

Sub'terfūge, *n.* (सब्टर्फ्यूज्)—evasion (*esp.* in argument or excuse), a dishonest shift. पळवाट, फट; सोडवण, छिद्र, वांव. [L. *subter,* under; *fugere,* flee]

Sŭbtĕrrā'nean, *a.* (सब्टेरेनिअन्)—lying under the surface of the earth, underground. जमिनीखालचा, जमिनींतला, भूमिगत, भौम.-*'neously, adv.*

Sŭbtī'tle, *n.* (सब्टाइटल्)—secondary title (of a book etc.). दुसरें,-उप,-नांव, पोट-नांव, प्रकरण.

Sŭb'til(e), *n.* (सटिल्)—(arch. for) subtle, (See below).

Sŭ'btle, *a.* (सटल्)—tenuous, rarefied, hard to analyse or apprehend; ingeniously minute, capable of nice distinctions; crafty, cunning; elaborate, clever. सूक्ष्म, विरल, पातळ; समजण्याला अत्यंत कठीण, मार्मिक, गूढ; अत्यंत सूक्ष्म, कावेबाज, धूर्त; बारीकसारीक,-खांचाखोचा,-जाणणारा, हुशार. *The s. air,* सूक्ष्म,-विरल,-हवा,-वायु. *A s. distinction,* सूक्ष्म फरक. *S. fingers,* बारीक,-लवचीक, -झटपट उठणारी बोटें. *Subt'ilize, v. t.* विरल,-सूक्ष्म, -करणें; कीस काढणें.-*lization, n. Sub'tly, adv.*

Sŭbt'lety, *n.* (सटल्टि)—subtleness, acuteness of intellect. a fine distinction. गूढता, सूक्ष्मता, कावेबाजपणा, शब्दच्छल, सूक्ष्म भेद.

Sŭbtrăct', *v. t.* (सब्ट्रॅक्ट्)—to deduct *from, esp.* with a view to finding out the remainder. वजा करणें, अंतर काढणें, व्यवकलन करणें. [L. *sub,* under, *trahere,* draw]

Sŭbtră'ction, *n.* (सब्ट्रॅक्शन्)—(*esp.*)subtracting process, act or operation of subtracting. वजाबाकी, व्यवकलन.—*ctive, a.*

Sŭb'trahend, *n.* (सब्ट्रहेन्ड्)—what is to be subtracted in a subtraction sum. वजा करावयाची संख्या,-रकम, घातांक.

Sū'bŭlate, Su'buliform, *aa.* (स्यूब्युलट्,-लिफॉर्म)—(Bot., Zool.) awl-shaped. आरीच्या आकाराचा, टोपणासारखा.

Sŭb'ŭrb, *n.* (सबर्ब्)—outlying district of a city. उपनगर, नगरोपान्त. *The ss.,* (*a house in the ss.*). (उपनगरांतील घर) आसपासचा भाग,-प्रांत,-प्रदेश. *Suburb'an, a.* (शहराच्या) आसपासचा, नगरोपान्तीय.

Sŭbvĕn'tion, *n.* (सब्व्हेन्शन्)—grant of money in aid of an institution, &c. एखाद्या संस्थेकरितां द्रव्यसाहाय्य.

Sŭbvert', *v. t.* (सब्-व्हर्ट्)—to effect destruction or overthrow of (religion, &c.). विध्वंस करणें, लयास नेणें, मोडून टाकणें, नष्ट करणें. *Subver'sion, n.* subverting. उलथापालथ, नाश, विध्वंस. *Subver'sive, a.* पालथें पाडणारा, मोडणारा, विध्वंसक.

Sŭb'-way, *n.* (सब्वे)—underground passage (for foot-passengers), or under-ground railway (U. S.). जमिनीखालील (पद-) मार्ग, पायवाट; जमिनीखालील आगगाडीचा रस्ता.

Sŭcca'des, *n. pl.* (सकेड्झ्)—candied fruits in syrup. (फळांचा) मुरांबा.

Sŭccedā'neum, *n.* (सक्सिडे'निअम्)—(*pl.-ea*) substitute. अनुकल्प, बदला, गौण.—*neous, a.* गौणभूत, अनुकल्पित, पर्यायभूत.

Sŭcceed', *v. t. & i.* (सक्सीड्)—to come next after and take the place of, follow: to inherit: to attain one's purpose, be successful. मागून पदावर येणें, पुढें येणें, नंतर येणें; वारस होणें; यश मिळविणें, पार पडणें, यश येणें, (बेत) सिद्धीस जाणें.

Sŭccĕss', *n.* (सक्सेस)—favourable issue; attainment of one's object; prosperity; a person or thing that turns out well. यश, जय; सिद्धि; भरभराट, बरकत; यशस्वी गोष्ट, लायक मनुष्य. *Nothing succeeds like s.,* एकामागून एक यश मिळत जातें, एकदां यश मिळालें कीं सारखें यश मिळत जातें. *S.-ful, a.* यशस्वी, विजयी (मनुष्य); सफळ, गुणावह. *S.-fully, adv.* यशस्वितेनें, चांगल्या रीतीनें.

Succe'ssion, *n.* (सक्से'शन्)—a following in order; series of things in succession; right of succeeding to, esp. throne, or inheritance; (Bio.) order of descent in development of species. क्रम; अनुक्रम; परंपरा, रांग, माळ; वारशाचा हक्क; उपजातीच्या वाढीचा वंशानुक्रम. *In s.*, एकामागून एक. *In s. to*, चा वारस (दार) म्हणून, च्या पाठीमागून. (*Was left to him and his*) *s.* (heirs). वारसदार. *Natural s.*, समन्वय *-al, a.* पारंपरिक, परंपरेचा, ओळीनें लागलेला.

Succe'ssive, *a.* (सक्से'सिव्ह्)—following in order, consecutive; running. अनुक्रमानें येणारा, यथाक्रम; लागोपाठचा, परंपरागत.*-ly, adv.* अनुक्रमानें, परंपरेनें.

Succe'ssor, *n.* (सक्से'सर्)—one who follows, a person or thing succeeding to another. मागून येणारा, वारस.

Succi'nct, *a.* (सक्सि'क्ट्)—(arch. of clothes) girded up; terse, brief. संक्षिप्त, संकलित; घट्ट, तंग. *-ly, adv.*; *-ness.*

Succ'our, *n.* (स'कर्)—aid given at the time of need, help, assistance; (*pl.* arch.) troops coming to the rescue. साहाय्य, मदत; कुमक. *v. t.* come to the assistance of. मदत करणें, साहाय्य करणें.*-less, a.*

Succ'ulent, *a.* (स'क्युलन्ट्)—full of sap or juice, juicy; (Bot.) thick and fleshy. रसाळ, कसदार, जाड व रसमधुर (पानें, फुलें असलेला).*-ly, adv.*: *-ulence, n.*

Succumb', *v. i.* (सकम्'ब्)—to yield, to submit, to be vanquished, to give way *to*, to die. वश होणें, दबणें, दबकणें; बळी पडणें; मरणें. *S. to grief*, दुःखाधीन होणें.

Such, *a.* (सच्)—of the kind or degree indicated. असा, असला, अशा प्रकारचा; तसला, तसा, इतका, मोठा, अमूक, फलाणा. *pron.* that; the action etc. referred to; other such things. तो; तसला; तसल्या,-तशा प्रकारच्या, गोष्टी. *S. a fright*, इतकी मोठी धडकी. *S. grapes*, असल्या प्रकारचीं द्राक्षें. *S. master, s. servant*, जसा धनी तसा चाकर. *S. a fine sight!*, फारच सुंदर देखावा! *S. and s. a person*, अमूक एक,-फलाणा,-मनुष्य, कोणी एक. *S. as*, those who. जे. *As s*, (अमका,-असा,-) म्हणून. *S. like*, (things) of such kind. अशा तऱ्हेच्या (गोष्टी).

Suck, *v. t. & i.* (सक्)—to draw (millk, liquid) into mouth; (*fig.*) to imbibe or gain (knowledge); draw liquid or sustenance or advantage from; squeeze in the mouth. अंगावर पिणें, स्तनपान करणें, तोंडानें ओढणें, चुपणें, चाखणें; आंत ओढून घेणें, ज्ञान मिळविणें,-प्राप्त करून घेणें; तोंडांत जीभ फिरविणें, चघळणें. *n.* an act or shell or process of sucking; sucking the breast; (*sl. pl.*) sweets; (schoolboy sl.) fiasco. अंगावर पिणें, लुचणें, स्तनपान; खाऊ, मेवामिठाई; फजिती, खोड मोडणें, जिरणें. *To s. dry*, चुपून कोरडा करणें. *Sucked orange*, the thing in which no goodness is left. निःसत्त्व झालेली वस्तु. *S. one's brains*, (आपल्या फायद्याकरितां) दुसऱ्याच्या कल्पना काढून घेणें. *S. in* or *up*, शोषून घेणें; (पाण्याच्या भोवऱ्याचें) आंत ओढून घेणें, वेढणें. *Sucking child*, (अंगावर पिणारें) तान्हें मूल. *Sucking barrister*, unpractised, budding. नवशिका कायदेपंडीत. *Sucking pump*, (आवाज करून) पाणी वर खेंचणारा नळ. *To give s.*, अंगावर पाजणें, लुचायला देणें. *What a s.!, ss.!* काय घमेंड मारीत होता! भली जिरली!

Suck'er, *n.* (स'कर्)—a person or thing that sucks; (Bot.) shoot springing from plant's root beside and not from the stem; organ or pipe through which liquid is drawn by suction, pump-piston; (U. S., *pl.*) a simpleton. चुंफणारा, चोखणारा, तान्हें; चोषक खोड,-दंड; चोषकनलिका, तेल काढण्याची नळी; (कांहीं) पंपांतील दांडी; दूधखुळा मनुष्य. *v. t. & i.* to remove or produce sucks. चोषक दंड खुडून टाकणें,-वाढणें.

Suck'le, *v. t.* (स'कल्)—to feed (young) from the breast or udder, to nurse at the breast. स्तनपान देणें.

Suck'ling, *n.* (स'क्-लिंग)—unweaned child or other mammal. अंगावरचें मूल, लुचणारें वासरूं. *Babes and ss.*, आगदीं नवशिके लोक.

Su'crose, *n.* (स्यू'क्रोस)—cane-sugar or any other sugar of the same composition. (उंसाची किंवा तत्सदृश) साखर.

Suc'tion, *n.* (स'क्शन्)—sucking; production of partial vacuum by removal of air etc. चुंफणें, चोखणें; हवा खेंचून घेणें, हवा काढून घेणें, रिक्तावकाशीकरण. *S.-pump*, चोषणनलिका.

Suctor'ial, *a.* (सक्टॉ'अरिअल्)—(Zool.) adapted for sucking. चोखण्याजोगा, शोषणयोग्य.

Sudd, *n.* (सड्)—floating plants, trees, etc, obstructing the White Nile. (श्वेत नाईल नदीच्या प्रवाहाला अडथळा करणारी) वनस्पति, झाडें वगैरे.

Sudd'en, *a.* (स'डन्)—occurring unexpectedly, abrupt; hurried. अकल्पित, आकस्मिक; शीघ्र, सत्वर, जलद. *All of a sudden*, एकाएकीं. *Sudd'enly, adv.*; *-ness, n. Of* or *on a s., on the s.*, suddenly. एकाएकीं, अकस्मात, अवचित.

Sudorif'ic, *a. & n.* (स्यूडरि'फिक्)—(a drug) causing sweat. घाम आणणारें, स्वेदोत्पादक (औषध, औषधी). [L. *sudor*, sweat]

Suds, *n. pl.* (सड्झ्)—(*Soap-s.*) soap froth साबणाचें (फेसाळ) पाणी.

Sue, *v. t. & i.* (स्यू)—to prosecute in court; to make petition to, to entreat (*esp.* woman's hands in marriage). फिर्याद करणें, विनंतिअर्ज करणें; प्रार्थना करणें, (लग्नाकरितां स्त्रीची) मनधरणी करणें, विनवणी करणें, याचना करणें. *S. out*, (कोर्टाला) विनंतिअर्ज करून दाद मागणें.

Suede, *n.* (स्वेद्)—undressed kid-skin as used for gloves, etc. (न कमावलेलें) कोकराचें कातडें.

Sū'ėt, *n.* (स्यू'इट्)—fat enclosing kidneys and loins of ox, sheep, etc. (गुरांच्या कमरेसभोंवतालची, -गुर्दावरील,-) चरबी.

Sŭff'er, *v. t. & i.* (स'फर्)—to undergo pain or damage or punishment, to bear what is inconvenient; be exceuted; to allow to go on. भोगायला लागणें, सोसणें; दुःख भोगणें; फाशी जाणें; दुखवणें, दुखणें, चालूं देणें, नको न म्हणणें.-*er, n.*

Sŭff'erence, *n.* (स'फरन्स)—tacit consent; abstention from objection; (arch.) submissiveness. मूक संमति; अडथळा न करणें, कानाडोळा, अनिषेध, शरणागति, नम्रता.

Sŭff'ering, *n.* (स'फरिंग)—what one has to endure, bodily affliction, distress. दुःख, व्यथा, भोग, ताप.

Sŭffice', *v. t. & i.* (सफा'इस्)—to be enough or sufficient; to meet the needs of. पुरा होणें, गरज भागविणें. *S. it to say that*, एवढेंच म्हणतों (एवढेंच म्हटलें म्हणजे पुरे) कीं. *Suffic'ingly, adv.*

Sŭffi'ciency, *n.* (सफि'शन्सि)—(arch.) ability; adequate resources. पुरें पडणें, सामर्थ्य, ताकत, पुरवठा, पर्याप्ति, पुरेपणा.

Sŭffi'cient, *a.* (सफि'शन्ट्)—sufficing, adequate, to the need, fit, able, enough of; (arch.) competent. पुरेसा, भरपूर, पुरा; समर्थ, पुरा पडणारा, पुरून उरणारा. *n.* a sufficient quantity. पुरेंसें.-*ly, adv.* पुरे, बस, पाहिजे तितकें.

Sŭff'ix, *n.* (स'फिक्स्)—letter or syllable appended in word-formation. पुढें जोडण्याचा प्रत्यय किंवा अक्षर, उत्तरगामी प्रत्यय. *v. t.* (सफि'क्स्) उत्तरगामी प्रत्यय लावणें,-जोडणें.

Sŭff'ocāte, *v. t. & i.* (स'फोकेट्)—to kill by stopping respiration; feel suffocated, grasp for breath. श्वास कोंडून मारणें; दम कोंडणें, गुदमरणें. *Suffocated with* or *by grief*, दुःखानें गुदमरलेला, तोंडांतून शब्द न येणारा. *Suff'ocatingly, adv.*; *Suffoca'tion, n.* दम कोंडणें, गुदमरणें, कोंदमारा.

Sŭff'ragan, *n. & a.* (स'फ्रगन्)—an assistant bishop; subordinate. मदतनीस बिशप; मदतनीस, दुय्यम.

Sŭff'rage, *n.* (स'फ्रिज्)—vote; right of voting at political elections; (*usu. pl.*) intercessory petition (s). मत; (निवडणुकीच्या वेळीं) मताचा अधिकार, मताधिकार; (ख्रिश्चन प्रार्थनेंतील) अनुवचन. *Manhood s.*, extended to all adult males. (वयांत आलेल्या सर्व) पुरुषांना मत देण्याचा अधिकार. *Woman s.*, (वयांत आलेल्या सर्व) स्त्रियांना मताधिकार. *Universal s.*, (वयांत आलेल्या सर्व स्त्रीपुरुषांना) सार्वत्रिक मताधिकार. *It has my s.*, मला तें अधिक पसंत वाटतें.

Sŭffragĕtte' *n.* (सफ्रजे'ट्)—a woman who agitated for woman suffrage. स्त्रीमताधिकाराची कैवारी स्त्री.

Sŭff'ragist, *n.* (स'फ्रजिस्ट्)—an advocate of extending the franchise (to women). स्त्रीमताधिकारवादी.

Suffūse', *v. t.* (सफ्यू'झ्)—(of liquid, hue, etc.) spread as from within, moisten. (आंतून पर येऊन) व्यापणें, भरणें, आर्द्र करणें.-*ed, pa. p.* व्याप्त, भरलेला; *S.-ed with blood, tears*, रक्तबंबाळ झालेला, अश्रुपूर्ण. *Suffu'sion, n.* व्यापणें, भरणें.

Su'gar, *n.* (शु'गर्)—kinds of sweet crystalline substance; sweet words; (chem.) kinds of soluble sweet-tasting carbohydrate. साखर; गोड भाषण, आर्जव, खुशामत; रासायनिक शर्करा,-साखर. *v. t. & i.* to sweeten or coat with sugar (*lit. & fig.*); (U. S.) make maple-sugar; work lazily, not put forth full effort. साखर घालणें, शर्करावगुंठित करणें; मेपलझाडापासून साखर तयार करणें; आळसानें काम करणें, कामाची टाळाटाळ करणें. *S.-beet*, (गाजरासारखें, ज्यापासून साखर तयार करतात, असें) बीट (कंद). *S.-bird*, फुलांचें शोषण करणारा पक्षी. *S.-loaf*, conical mass of refined sugar. साखरेचे निमुळते गोळे. *S.-maple*, (ज्याच्या चिकापासून साखर करतात तो) मेपल वृक्ष. *S.-house,-mill*, गुऱ्हाळ, साखरेचा कारखाना. *S.-refiner(y)*, साखर स्वच्छ करणारा, (त्याचा कारखाना). *Cane s.*, उंसाची साखर. *Milk s.*, दुग्धशर्करा. *S.-less. a.*

Su'gar-căndy̆, *n.* (शु'गर्-कँडि)—clarified and crystallised sugar. खडीसाखर, मिस्री.

Su'gar-cāne, *n.* (शु'गर्-केन्)—grass yielding sugar. ऊंस.

Su'gary̆, *n.* (शु'गरि)—full of sugar; fond of sugar. शर्करायुक्त, गोड, मिट, साखरेचा; गोडखाऊ, -खाणारा. *Su'gariness, a.*

Sŭggĕst', *v. t.* (सजे'स्ट्)—to give a hint or inkling of; propose for acceptance; call up the idea of by mention. ध्वनित करणें; सूचना करणें; ची कल्पना सुचवणें,-येणें. *A thing suggests itself*, (एखादी) गोष्ट (आपोआप) सुचणें. *Sugges'tive, a.* सूचना करणारा, विषयवासनासूचक.

Suggĕst'ible, *a.* (सजे'स्टिबल्)—that may be suggested; (*esp.*) open to hypnotic suggestion. सूचना करण्याजोगा, सूचनार्ह; मनोवशीकरणाधीन, मूर्च्छनापात्र.-*ibil'ity, n.*

Sŭggĕs'tion, *n.* (सजे'स्चन्)—suggesting; theory or plan suggested, insinuation. सुचविणें, सूचना करणें; सुचविलेली गोष्ट; सूचना.

Sū'icide, *n.* (स्यु'इसाइड्)—self-murder; one guilty of self-murder; action destructive to one's own interests. आत्महत्या; आत्महत्या करणारा; आत्मघातकी कृत्य. *To commit s.*, kill oneself. जीव देणें. *Commit political s.*, राजकारणांतून नामशेष होणें. *Race-s.*, वंशनाश, वंशांतील लोकांची संख्या घटत घटत जाणें. *Suici'dal, a.* आत्मघातक,-घाती;-*dally, adv.* [L. *sui*, of himself; *caedere*, *kill*]

Suit, *n.* (स्यूट्)—suing, petition; seeking of woman's hand. prosecution of a claim in law-court. set of clothes; any of the four sets into which a pack of cards is divided; woman's costume, set of armour or sails. विनंति, अर्ज; विवाहाकरितां एखाद्या स्त्रीची मनधरणी करणें, मागणी, प्रार्थना; फिर्याद, मुकदमा, वाद; संच, जोड; (बदाम, इस्पीक, किलावर, चौकट यां-पैकीं) पत्त्यांच्या जोटांतील एकरंगी पानें; स्त्रियांचे कपडे; (चिलखतांचा, शिडांचा) जोड. *v. t. & i.* to adapt or make appropriate *to;* to meet the requirements or interests of. to agree with. to be convenient or suitable to. मेळ घमवणें, योग्य करणें; जम बसवणें; जुळणें, शोभणें, साजणें; सोइस्वार असणें, (अन्न, हवा) मानवणें, मानणें; *Suit'ed, pa. p.* well fitted, appropriate *to.* साजेसा, मानवणारा, हितावह, योग्य. *To make s.,* नम्र विनंती करणें. *Criminal s.,* फौजदारी खटला. *Civil s.,* दिवाणी दावा. *Law-s., s.* at law, खटला, दावा. *Follow s.,* play from s that was led. (*fig.*) conform to another's movements. त्याच रंगाचें (हुकमाचें) पान खेळणें; अनुसरणें, मागून जाणें. *Suit'ing,* (सूटचें) एकरंगी कापड (कोट, जाकीट, तुमान यांचें). *Democracy is not suited to* or *for the uncivilized people,* न सुधारलेल्या लोकांना लोकशाही मानवणार (युक्त,-योग्य,-) नाहीं. *Cold does not s. me,* थंड हवा मला मानवत नाहीं. *Mercy suits a king,* राजाला दयाशीलपणा शोभून दिसतो.

Suit'case, *n.* (स्यूट्-केस्)—a travelling bag. प्रवासाची बॅग,-पेटी.

Suit'able, *a.* (स्यूटेब्ल्)—suited *to* or *for,* fitted for the purpose, appropriate. योग्य, शोभणारा, यथोचित, अनुरूप.*-bility, n.-bleness, n. .-bly, adv.*

Suite, *n.* (स्वीट्)—a retinue, company of followers; set of rooms, furniture, &c., a series of dance tunes. परिवार, टवाजमा; संच, जोड; नाचाची सुरावट. *S. of rooms,* खोल्यांची रांग,-चाळ.

Suit'or, *n.* (स्यूटर्)—a wooer, plaintiff or petitioner (in law-suit). विवाहार्थ मागणी घालणारा; पक्षकार, अर्जदार.

Sŭl'cate, *a.* (सल्केट्)—(Bot.) grooved, furrowed. खांचदार.

Sŭlk, *v. i.* (सल्क्)—to be sulky. मनांत कुढणें, दुर्मुखणें. *n. pl.* a sulky state मनांत कुढणें, खिन्नता, दुर्मुखता.

Sŭl'kȳ, *a.* (सल्कि)—silent from resentment or ill temper, sullen, morose. घुम्या, दुर्मुखलेला. *n.* a light one-horse carriage. एक घोड्याची दुचाकी गाडी.*-kily, adv.;-kiness, n.*

Sull'age, *n.* (सलेज)—filth, refuse. घाण, कचरा.

Sŭll'en, *a.* (सलन्)—passively resentful; ill-humoured, morose, gloomy, dismal. खिन्न, उदास; दुर्मुखलेला, कंटाळवाणा, मलिन. (*n. pl.*) *the ss.,* ill temper. दुर्मुखलेपणा, खिन्नता.*-ly, adv.; -ness, n.*

Sŭll'ȳ, *v. t.* (सलि)—to soil, to tarnish (poet.): to be a stain on; to discredit. मळवणें; कलंक लागणें; बट्टा लावणें.

Sŭl'phāte, *n.* (सल्फेट्)—salt of sulphuric acid. गंधकाम्लाचा क्षार, गंधकित. *S. of copper,* मोरचूद, ताम्रगंधकित. *S. of iron,* हिराकस, लोहगंधकित. *S. of magnesium,* मारक (एप्सम) क्षार,-मीठ.

Sŭl'phide, *n.* (सल्फाइड्)—compound of sulphur with element or radical. गंधक आणि दुसरें मूलद्रव्य यांचा संयुक्त पदार्थ, गंधकिल. *S. of arsenic,* (med.) मनःशील.

Sŭl'phite, *n.* (सल्फाइट्)—a salt of sulphurous acid. गंधकित.

Sŭl'phonal, *n.* (सल्फनाल्)—a hypnotic drug. गुंगी आणणारें औषध.

Sŭl'phur, *a.* (सल्फर्)—pale-yellow non-metallic element, simple mineral of yellow colour. kinds of butterfly. गंधकाच्या रंगाचीं फुलपांखरें. *v. t.* to treat with sulphur. गंधकाची धुमी देणें. *a.* of pale yellow फिकट पिंवळा. *S.-spring,* गंधकयुक्त पाण्याचा झरा. उन्हाळें. *Sul'phurate, v. t.* गंधकसंयुक्त करणें, गंधकाचा धूर देणें. *Sulphur'eous, a.* of or like sulphur. गंधकाचा, गंधकमय. (Bot.) गंधकाच्या रंगाचा. *Sulphure'tted a.* सगंधक, गंधकसंयुक्त.*-hydrogen,* गंधकसंयुक्त उज्ज, उज्जगंधकीय.*Sul'phury, a.*

Sŭlphŭr'ic, *a.* (सल्फ्युअरिक्)—combining sulphur in its higher combining proportion. गंधकक. *S. acid,* तेजाब, गंधकाम्ल.

Sŭl'phŭrous, *a.* (सल्फरस)—containing sulphur in its lower combining proportion. गंधक. *S. acid,* गंधकाम्ल.

Sul'trȳ, *a.* (सल्ट्रि)—hot and close. उकाड्याचा, कोंदट, गुदमरण्याचा.*-trily, adv.;-triness, n.*

Sŭm, *n.* (सम्)—total resulting from addition of items, summary; particular amount of money; an arithmetical problem. संकलन, समाहार, बेरीज; सारांश, तात्पर्य, इत्यर्थ; रकम; उदाहरण. *v. t. & i.* to collect into one total; (with *up*) set out arguments on both sides. बेरीज करणें; चा उपसंहार करणें, गोळाबेरीज सांगणें, समारोप करणें. *S. total,* एकूण,-गोळा,-बेरीज. *The s.* or *s. and substance,* (of his speech). (त्याच्या भाषणाचा) इत्यर्थ भाग, सारांश, गोळाबेरीज. *In s.,* briefly and comprehensively put. थोडक्यांत सगळें सांगायचें म्हणजे. *Good at ss.,* (अंक) गणितांत चांगला,-हुशार. *Summing-up, n.* (of the judge) पुराव्याचा सारांश सांगणें, खटल्याचा थोडक्यांत सारांश,-समारोप (न्यायाधिशानें केलेला).

Sŭm'marize, *v. t.* (समराइझ्)—to make or be a summary of. संक्षिप्त करणें, सारांश काढणें, सारांश देणें.

Sŭmm'arȳ, *a.* (समरि)—done with dispatch, effected by a short way. संक्षिप्त, तात्विक, त्वरित. *n.* brief account; resume, epitome. थोडकी हकिगत; सारांश, संक्षेप.*-arily, adv.* संक्षेपानें, त्वरित.

Sŭmmā'tion, *n.* (समे'शन्)—finding of total. समाहार, बेरीज करणें. *S. of series*, श्रेढीचें सर्वधन.

Sŭmm'er, *n.* (स'मर्)—second or hot season. उन्हाळा, ग्रीष्मकाल. *v. t. & i.* to pass the summer (*at* or *in* a place): pasture (cattle) for the summer. उन्हाळा घालविणें; उन्हाळ्यासाठीं गुरें चरविणे. *A child of nine ss.*, नऊ वर्षांचें मूल. *S. house*, उन्हाळी राहण्याचें घर. *S.-time*; उन्हाळा: ऊष्मकाल; उन्हाळ्यांत एक तास घड्याळ पुढें लावून दर्शविलेली वेळ.

Sŭmm'er, *n.* (स'मर्)—*S.-tree*, horizontal bearing beam. तळचें आडवें वार, आडवी तुळई.

Sŭmm'ersault, *n.* (स'मर् सॉल्ट्)—somersault. गोलांटी, कोलांटी उडी.

Sŭmm'it, *n.* (स'मिट्)—highest point, top. कळस, शिखर, सीमा, परमावधि.*-less, a.*

Sŭmm'on, *v. t.* (स'मन्)—to send for; to demand the presence of, to bid (esp. witness or defendant) appear; to muster *up* courage etc. to do; call upon (town etc.) to surrender. बोलावणें; आव्हान करणें, हजर राहण्यास फर्मावणें; धैर्य धरणें,-एकवटणें; शरण येण्याला सांगणें.

Sŭmm ons, *n.* (स'मन्झ्)—(pl.-ses) authoritative call to attend or do something; citation to appear in court. हुकमानें-अधिकारानें,-बोलावणें, कोर्टाचें बोलावणें, कोर्टात हजर राहण्यास फर्माविणें, आव्हान, समन्स. *v. t.* to serve with summons. समन्स,-कोर्टाचा (हजर राहण्याचा) हुकूम,-बजावणें.

Sŭmmum bō'nŭm, *n.* (स'मम् बो'नम्)—the chief good, esp. as the ultimate determining principle in the ethical system. निःश्रेयस, परमार्थ. [L.]

Sŭmp, *n.* (सम्प्)—pit or well for receiving superfluous water etc., cesspool. (केरकचरा, घाणपाणी यांसाठीं) खड्डा, डबरा, डबकें.

Sŭmp'ter, *n.* (स'म्प्टर्)—*S.-horse,-mule*, a pack. ओझ्याचा घोडा.

Sŭmp'tion, *n.* (स'म्शन्)—major premiss in syllogism. अनुमानांतील साध्यप्रमाण.

Sŭmp'tūarў, *a.* (स'म्प्च्युअरि)—regulating expenditure. खर्चाच्या नियमाचा, व्ययनियमनविषयक. *S.-law,-edict*, राष्ट्रहितार्थ व्यक्तिगत खर्चावर निर्बंध घालणारा कायदा.

Sŭmp'tūous, *a.* (स'म्प्चुअस्)—very expensive, magnificent, of costly richness. मोठ्या खर्चाचा, बहुमोली, चमचमीत.*-ly, adv.* मोठा खर्च करून, थाटामाटानें.*-ness, n.*

Sŭn, *n.* (सन्)—the heavenly body that the earth travels round and receives light and warmth from; sun's light or warmth; any fixed star with satellite (s); (poet.) -day or year; (also *S.-burner*) a set of lights massed as one great light in ceiling. सूर्य; सूर्याची उष्णता, ऊन; मुख्य ग्रह; दिवस, वर्ष; छतांत बसविलेला दिव्यांच्या उजेडाचा स्रोत. *v. t. & i.* to expose to the sun; sun oneself. उन्हांत ठेवणें; उन्हांत बसणें. *His, its, s. is set*, time of prosperity or existence is over. त्याचा भाग्यकाळ संपला. *To rise with the s.*, अगदीं सकाळीं (पहांटेस) उठणें. *Order of the Rising S.*, जपानी बहुमानदर्शक पदवी. *Adore or hail the rising s.*, curry favour with new or rising power. नूतन अधिकाऱ्याची,-सत्तेची, -हांजीहांजी करणें, उगवत्या सूर्याची पूजा करणें. *The midnight s.*, s. as seen in arctic and antarctic regions. (उत्तर दक्षिण, ध्रुव,-प्रदेशाजवळील) मध्यरात्रीचा सूर्य (प्रकाश). *Nothing new under the s.*, in this world. इहलोकीं या जगांत-कांहींच नवीन (आश्चर्यकारक) नाहीं. *S. of righteousness*, Christ. येशू ख्रिस्त. *See the s.*, जिवंत असणें. *Make hay while the s. shines*, वेळेवर वेळ साधून घेणें, ऊन आहे तों गवत सुकवून घ्यावें. *Hold a candle to the s.*, prov. of superfluous action. सूर्यापुढें काजवा धरणें. *Take* or *shoot the s*, (naut.) अक्षांश-विषुववृत्ता-पासूनचें अंतर,-ठरविण्यासाठीं सूर्याची उंची अजमावणें. *In the s.*, सूर्यप्रकाशांत. *A place in the s.* (*fig.*), favourable situation. अनुकूल परिस्थिति. *Take the s.* आंगावर ऊन घेणें *S.-bath*, exposure of naked body to the sun. आतपस्नान, उन्हात उघडें बसणें. *S.-beam*, सूर्यकिरण. *S.-blind*, external to window-shade. खिडकीवरची छाणी. *S.-burn*, उन्हानें तोंड काळवंडणें. *S.-dog*, सूर्याभासांतील ठिपका. *S.-dial*, शंकुयंत्र, छायायंत्र. *S.-down*, sun-set. सूर्यास्त. *S.-downer*, Australian tramp who times his arrival for the evening (S.-Afr.) chink of s.-down· सूर्यास्ताबरोबर घरीं येणारा भटक्या; सूर्यास्ताच्यावेळीं घेण्याचें पेय. *S.-dried*, उन्हांत वाळवलेला. *S.-flower*, सूर्यफूल,-कमळ. *S.-god*, सूर्य-देव. *S.-light*, सूर्यप्रकाश. *S.-lit*, *a.* सूर्यप्रकाशित. *S.-parlour*, (U. S.) a room with windows on three sides, so arranged as to get sun at all hours. सूर्यप्रकाशित खोली. *S.-picture*, प्रकाशलेख, फोटो. *S.-shade* लहान छत्री, दुकानाच्या खिडकीवरील छप्पर,-आच्छादन. *S.-spots*, सूर्यावरचे डाग. *S.-stone*, सूर्यकांतमणि. *S.-stroke*, उन्हाचा चटका, झळ, तिरमिरी. *S.-worship*, सूर्योपासना. *S.-proof, a.* आतपनिवारक. *S.-burned* or *burnt, a. S.-less, a.*

Sŭn'dae, *n.* (स'न्डि)—(U. S.) portion of ice-cream mixed with crushed fruit etc. फळांचें थंड खाद्य (आइस्क्रीम).

Sŭn'day, *n.* (स'न्-डे)—first day of the week. रविवार. *S.-school*, धर्मशिक्षणाची रविवारची शाळा, -चा वर्ग.

Sŭn'der, *v. t. & i.* (स'न्डर्)—to sever. वेगळा करणें, दुभागणें, दुभंगणें.

Sŭn'drў *a.* (स'न्ड्रि)—divers, several, various. अनेक, विविध. *n.* (*in pl. only*) oddments; items that need not be specified. किरकोळ वस्तु; सटरफटर. *All & sundry*, each and all. व्यक्तिशः व सर्वांनीं मिळून.

Sŭng, *pa. t. & pa. p.* of Sing.

Sŭnk, *pa. t. & pa. p* of Sink.

Sŭnn, *n.* (सन्)—*S.-hemp, E.-Ind.* hemp-like fibre सण, ताग.

Sŭnn'y̆, *a.* (स'नि)—bright with or as sunlight; diffusing cheerfulness. सूर्यप्रकाशित, चकचकीत; आनंद पसरविणारा. *-ily, adv.*; *-iness, n.*

Sŭn'rise, *n* (सं'न्-राइज़)—rise of the sun. सूर्योदय.

Sŭn'sĕt, *n.* (सं'न्-सेट्)—(moment of) sun's setting; (*fig.*) declining period of life. सूर्यास्त; (अलं.) उत्तरार्ध, उतार, उतरती कळा.

Sŭn'-shine, *n.* (स'न्शाइन्)—sun-light, area illuminated by it, fair weather; (*fig.*) cheerfulness or bright influence. सूर्यप्रकाश, ऊन, सूर्यप्रकाशित जागा,-स्थळ, स्वच्छ हवा; उल्हास, आनंद, सुचिन्ह. *Sun'-shiny, a.* उन्हाचा, प्रकाशाचा, आनंदकारक.

Sŭp, *v. i.* (सप्)—*to take* supper. रात्रीचें जेवण,-चा फराळ करणें. *v. t.* to drink by sips or spoon fuls. ओठांनीं पिणें, लहान घोट घेणें. *n.* घोट, सुरका.

Sū'per, *n.* (स्यू'पर्)—a super-numerary actor, extra or un-wanted person, (commerc.) superfine cloth etc. उपऱ्या नट, ज्यादा-राखीव-नट. अनावश्यक,-जादा.-मनुष्य; फार तलम,-अति बारीक, -कापड वगैरे. *a.* superfine; (of feet) in square measure. अत्युत्कृष्ट, तलम, नामी; (क्षेत्रफळानें), चौरसमानें जास्त, अधिक.

Sūper-, *pref* (स्यूपर्-)—L. over, beyond. (पूर्वगामी प्रत्यय) अधिक, अतिशय.

Sūperănn'ūate, *v. t.* (स्यूपर्-ॲ'न्युएट्)—to dismiss or discard as too old, to send into retirement with a pension. वृद्धावस्थेमुळें काढून टाकणें; पेन्शन देऊन कमी करणें.*-uation, n.* साठी, अतिवयस्कता.

Sūperb', *a.* (स्-,स्यूप'र्ब्)—of the most impressive or exalted kind, magnificent, august. उत्कृष्ट, नामी, शानदार, उमदा, भव्य.*-ly, adv.* उमदेपणानें, शानदार रीतीनें, उत्कृष्टपणें.

Sūper-cal'endered, *a.* (स्युपर्-कॅ'लन्डर्ड्)—refined, beyond usual degree. चकाक व सफाईदार केलेला (कागद).

Sū'percărgō, *n* (स्यू'पर्कार्गो)—(pl.*-oes*) a person in merchant-ship managing sales of cargo. मालाच्या गलबताची देखरेख करणारा.

Sūpercil'iary̆, *a.* (स्युपर्सि'ल्यरि)—of the eye-brows, over the eye भुंवयांसंबंधी, भुंवयांचा, डोळ्यावरील. [L. *super*, above, *cilium*, eye-brow]

Sūpercil'ious, *a.* (स्यूपर्-सि'ल्यस)—exhibiting contemptuous indifference, insolently nonchalant, manifesting haughtiness. अहंमन्य, मिजासखोर, पिळाचा, उन्मत्त.*-ly, adv.*; *-ness, n.*

Sūper-dread'nought, *n.* (स्युपर्ड्रे'ड्नॉट्)—अतिनेटर (लढाऊ जहाज).

Sūperĕrogā'tion, *n.* (स्यूपरेरोगे'शन्)—performance of more than duty requires. कर्तव्यापेक्षां जास्त करणें, अपेक्षेबाहेर (कर्तव्य) करणें. *Works of s.,* (खिश्चन धर्माप्रमाणें) अपेक्षेबाहेर जास्त पुण्यसंचय करणें,-असणें.*-tory, a.*

Superfĕcundā'tion, *n.* (स्युपरफिकन्डे'शन्)—*Superfeta'tion,* second conception occurring during gestation. एक गर्भ पोटांत असतांना दुसरा गर्भ राहणें, अधिगर्भ.

Sūperfi'cial *a.* (स्यूपर्-फि'शल्)—of or on the surface only, without depth, shallow. पृष्ठभागाचा, पृष्ठस्थित, बाह्य; पृष्ठसंलग्न; वरकरणी, वरवरचा, उथळ. *S. area,* पृष्ठफळ. *S. view,* वरवर (चें) अवलोकन. *S. knowledge,* तुटपुंजें ज्ञान. *A s person,* वरवर दाखवतो त्यापेक्षां अधिक नसलेला, तुटपुंजें,-उथळ,-ज्ञान असलेला मनुष्य. *Superficial'ity n.* (-फिशिआलिटि), उत्तानता, उथळपणा. *Superfi'cially, adv.* वरून, बाहेरून; वरकरणी, आपाततः

Sūperfi'cies, *n.* (स्युपर्फि'शिईज़्)—(pl.-the same) a surface (area). वरचें अंग, तल; पृष्ठभाग.

Sū'perfine, *a.* (स्यू'पर् फाइन्)—very fine, affecting great refinement, of extra quality. अतिसूक्ष्म, अति तलम. सर्वोत्कृष्टपणाचा डिमाख मारणारा, अत्युत्तम; अत्युत्कृष्ट.*-ness, n.*

Sūperflu'ity̆, *n.* (स्युपर्फ्लू'इटि)—superfluous amount, what is over. अनावश्यक वस्तु; गरजेपेक्षां जास्त, अतिरेक, अतिरिक्तता. *To give of one's s.,* आपल्याजवळील (गरजेहून जास्त असलेल्या) शिलकींतून देणें.

Superf'luous, *a.* (सुप'र्-फ्लुअस)—not needed; more than enough. अनावश्यक; पाहिजे त्यापेक्षां जास्त, प्रयोजनातिरिक्त.*-ly, adv.*; *-ness, n.* आधिक्य, प्रयोजनातिरिक्तता. [L. *super*, more; *fluere*, flow]

Sūper-heat', *v. t.* (स्युपर्ही'ट्)—(esp.) to heat (steam) to temperature higher than that of boiling water. (उकळत्या पाण्यापेक्षां) उष्णतेचें मान अधिक वाढविणें.*-er, n.* (वाफेच्या) उष्णतेचें मान वाढविण्याची नळ्यांची योजना.

Sūperhū'man *a.* (स्यूपर्-ह्यू'मन्)—more than human, above what is human, divine. अतिमानुष, अमानुष; ईश्वरी.*-ly, adv.*

Sūperimpōse', *v. t.* (स्युपरिम्पो'झ्)—to lay (*on*) something else. (च्या) वर ठेवणें, (ला) लावणें.

Sū'perincŭm"bent, *a.* (स्यू'पर्-इन्क''म्बन्ट्)—lying or resting on the top of something. वर असणारा, उपरिस्थित.

Sūperindūce', *v. t.* (स्यूपरिन्ड्यूस्)—to bring on or induce (sleep etc.) by external influence. (वर) ओढून आणणें, चढेंच आणणें.

Sūperintĕnd', *v. t. & i.* (स्यूपरिंटें'न्ड्)—to arrange and oversee the working of. देखरेख करणें, नजर ठेवणें.*-ence,* देखरेख, व्यवस्था, पाहणी.

Sūperintĕnd'ent, *n.* (स्यूपरिन्टे'न्डन्ट्)—an official manager with power of directing. देखरेख करणारा, व्यवस्थापक.

Supĕr'ior, *a. & n.* (सुपी'अरिअर्)—higher or more elevated in place; better in some respect; much more than average: inaccessible to temptation etc.; (Bot.) lying above, upper. वरचा, वरिष्ठ, श्रेष्ठ, वरच्या अधिकाराचा; श्रेष्ठ, सरस, अधिक; अनधीन, अवश, आहारीं न जाणारा; ऊर्ध्वस्थित. *n.* a person superior to one in rank, etc.; head of a monastery. वरिष्ठ मनुष्य, वडील, ज्येष्ठ; ख्रिस्ती महंत. *S. genus*, वरिष्ठ श्रेणी, -जाति, पर जाति. *S. wings*, folding over others. (इतर पंखांना आवरण घालणारे) वरचे पंख. *S. numbers*, more men or their presence. संख्याधिक्य, अधिक मनुष्यबळ. *S. persons*, अधिक विद्वान मनुष्य; घमेंडखोर. *A s. air*, श्रेष्ठपणाचा डौल, -दिमाख. *Rise s. to*, be unaffected by. चा परिणाम होऊं न देणें. *Super'iorly, adv.* (Bot., Anat., etc.) वर असल्यानें, ऊर्ध्वस्थित.

Supĕriŏ'rity̆, *n.* (सुपीअरिऑ'रिटि)—being higher in place; pre-eminence. वरची पदवी; प्राधान्य, श्रेष्ठत्व.

Superl'atĭve, *a.* (सुप'र्-लेटिव्ह्)—expressing the highest degree; surpassing all others. पराकाष्ठेचा, सर्वश्रेष्ठ, सर्वोत्कृष्ट, परम, पर. *n.* the superlative degree or form; a word in the superlative. अतिशयार्थवाचक रूप,-शब्द. *S. degree*, (Gram.) अतिशयार्थवाचक, 'तम'-वाचक (विशेषण व क्रियाविशेषण यांचीं रूपें). *S. wisdom*. श्रेष्ठ शहाणपण, -ज्ञान *S. beauty*, परमोच्च,-सर्वोत्कृष्ट,-सौंदर्य. *Superlatively, adv.* सर्वतोपरी, अतोनात -*tiveness*, *n.* पराकाष्ठा, परमावधि.

Sū'perman, *n.* (स्यू'पर्मॅन्)—(pl.-*e*:), the ideal man of Nietzsche. श्रेष्ठ पुरुष, उत्तम पुरुष.

Sūpermŭn'dāne, *a.* (स्यूपर्मं'न्डेन्)—superior to earthly things. पारलौकिक, पारमार्थिक, दिव्य.

Sūpernăc'ūlum, *adv.* (स्यूपर्नॅ'क्यूलम्)—to the best drop. शेवटच्या थेंबसुद्धां. *Drink s.*, एक थेंबहि शिल्लक न ठेवतां (पिणें). *n.* choice wine. उंची मद्य. [L, *naculum*, finger-nail]

Sūpern'al, *a.* (स्यूप'र्नल्) (poet.)—heavenly, divine, lofty. स्वर्गीय, दिव्य.

Sūpernā'tural, *a.* (स्यूपर्-नॅ'चरल्)—manifesting some agency above the forces of nature. निसर्गातीत, अलौकिक, अद्भुत.-*ism*, *n.* जगांतील कांहीं गोष्टी निसर्गातीत असतात हा (निसर्गातीतता-) वाद.-*ist*, *n.* निसर्गातीततावादी.-*ness*, *n.*

Sūpernū'merary̆, *a.* (स्यूपर्न्यू'मररि)—in excess of the normal number. (ठराविक,-आवश्यक,-संख्येपेक्षां) जास्त अधिक. *n.* an extra person. अधिक,-जादा, -इसम.

Sūperpōs'e, *v. t.* (स्यूपर्पो'झ्)—to lay (thing) on or upon another. वर ठेवणें, उपरिस्थापन करणें. *Superposi'tion*, *n.* उपरिस्थान.

Sūpersăt'urate, *v. t.* (स्यूपर्सॅ'च्युरेट्)—to soak to a degree beyond natural. अतिशय मुरवणें.-*cd*, *a.* अतिपरिप्लुत, अतिसंपृक्त.-*tion*, *n.*

Sū'perscribe, *v. t.* (स्यू'पर्स्काइब्)—to write at top of or outside something. वर,-बाहेर,-लिहिणें; पत्ता लिहिणें. *Su'perscript*, *a.* (ओळी) वरच्या.

Sūperscrĭp'tion, *n.* (स्यूपर्-स्क्रि'प्शन्)—inscription over something; the address on a letter. कशावर तरी खोदलेला लेख; पत्रावर लिहिलेला पत्ता.

Sūpersēde', *v. t.* (स्यूपर्-सी'ड्)—to appoint or adopt another person or thing in the place of, to oust or take the place of. दुसऱ्याच्या जागीं ठेवणें; दुसऱ्याची जागा बळकावणें, (पाठीं) मागें टाकणें, च्या जोरावर बसणें.-*se'ssion*, *n.* मागें टाकणें, रद्द करणें. -*se'ded*, *pa. p.* मागें टाकलेला, रद्द. [L. *super*, above; *cedere*, sit.]

Sūpersti'tion, *n.* (स्यूपर्स्टि'शन्)—credulity or popular belief regarding the supernatural; misdirected reverence. शकुनविश्वास, धर्मभोळेपणा; अन्यथाभक्ति, वेडगळ समजूत, खोटी धर्म-समजूत.

Sūpersti'tious, *a.* (स्यूपर्-स्टि'शस्)—marked by superstition, full of idle religious notions. धर्मभोळा, वेडगळ धर्मसमजुतीचा, अशास्त्रीय, भोळा, मूढविश्वासाचा.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.*

Sū'perstrŭcture, *n.* (स्यू'पर्स्ट्रक्चर्)—a building in relation to, or what rests on, a foundation. पायावरील बांधकाम,-इमारत, वरचें बांधकाम.-*ral*, *a.*; -*ction*, *n.*

Sū'pertăx, *n.* (स्यू'पर्टॅक्स्)—a tax on incomes above a certain amount levied in addition to ordinary tax. (नेहमींच्या प्राप्तीवरील कराखेरीज) मोठ्या उत्पन्नाच्या रकमांवरील जादा कर.

Sūpervene', *v. i.* (स्यूपर्व्ही'न्)—to occur as an interruption in some state. आणखी येणें,-घडणें, उद्भवणें, नवा,-चालून,-येणें. *Superven'tion*, *n.* नवोद्भव, आणखी येणें.

Sūpervise', *v. t.* (स्यूपर्-वा'इझ्)—to oversee; to watch or direct the carrying on of work of. पाहणें; देखरेख करणें.

Sūpervi'sion, *n.* (स्यूपर्-व्हि'झन्)—superintendence. देखरेख, पर्यवेक्षण.

Sū'pervisor, *n.* (स्यू'पर्व्हाइझर्)—one who supervises; (U. S.) an officer of elected board administering a township. देखरेख करणारा, काम पाहणारा, पर्यवेक्षक; नगरशासनसंस्थेच्या लोकनियुक्त मंडळाचा अधिकारी.

Supine', *a.* (स्यूपा'इन्)—lying facing upwards; quiescent, indolent, negligent. उताणा; सुस्त, आळशी.-*ly*, *adv.* सुस्तीनें, ढिलेपणानें.-*ness*, *n.* उताणेपणा; सुस्ती.

Sū'pīne', *n.* (स्यू'पाइन्)—(Lat. gram.) verbal noun. कारक, क्रियावाचक नाम.

Sŭpp'er, *n.* (स'पर्)—a meal taken late in the day, the last meal of the day. रात्रीचें जेवण.-*less*, *a.*

Sŭpplănt', *v. t.* (सप्लां'न्ट्)—to oust in favour of one's self. लबाडीनें एखाद्याला हुसकून लावून त्याची जागा घेणें, हुसकून देणें, पाडाव करणें.-*er*, *n.* युक्तीनें,-कारवाईनें,-जागा हिसकून घेणारा.

Sŭp'ple, *a.* (स'पल्)—easily bent, flexible; adroit; flattering. लवचीक, नरम; कुशल; खुशामत्या, आर्जवी, छंदानुरोधी *v. t.* & *i.* to make or grow supple. लवचीक करणे,-होणें; नरम करणें,-होणें. *S.-jack*, हातात धरण्याची लवचीक छडी,-काठी. *To s. horse*, train him to obey slightest touch of rein. घोड्याला शिकवून नरम आणणे. *Sup'pleness, n.*; *Sup'ply, adv.*

Sŭp'plĕment, *n.* (स'प्लिमन्ट)—a thing added to supply deficiencies, an appendix, an addition to the regular number of a periodical, (Math.) the angle that added to another will make the sum two right angles. भरतीचा पदार्थ, परिशिष्ट; पुरवणी; (गणितांत) पूरक कोन.

Sŭpplĕmĕnt', *v. t.* (सप्लिमे'न्ट्)—to make additions to, to increase by a supplement. पुरवणी जोडणे, पुस्ती जोडणें. *Supplemen'tal, a.*;*-'tary, a.* पुरवणीचा, भरतीचा, न्यूनतापूरक; पूरक.*-ation, n.* पुरवणी करणें.

Sŭpp'liant, *a.* (स'प्लिअन्ट्)—supplicating, expressive of supplication. नम्र विनंति करणारा; दीन, नम्र, *n.* humble petitioner. भिक्षुक, याचकजन. नम्र विनंति करणारा.

Sŭpp'licāte, *v. i.* & *t.* (स'प्लिकेट्)—to make humble petition to (a person) or for (a thing), to beseech. नम्र विनंति किंवा अर्ज करणें, याचना करणें, मिनतवारीनें मागणें.*-ca'tion, n.* प्रार्थना, विनवणी, मिनतवारी.*-catory, a.* विनंतीचा; विनंतिपूर्वक.;*-catingly, adv.*

Sŭpplĭcā'tion, *n.* (सप्लिके'शन्)—humble petition, an earnest request, solicitation. नम्र विनंति, अर्ज.

Sŭpply', *v. t.* (सप्ला'य्)—to furnish, to provide, to afford a sufficiency for, fill (place) as substitute. पुरवणें, पुरवठा करणें, बेगमी करणे, धान्य सामग्री पोंचविणें,-पुरवणें; (जागा) भरणें, भरती करणें, काम करणें, स्थान राखणें. *n.* providing of what is needed, stock, store, (*pl.*) necessaries for army, etc.; (*pl.*) grant of money by Parliament, money allowance to person. पुरविणें, पुरवठा करणें; पुरवठा, सांठा; (अने०) आवश्यक वस्तु (सैन्याला लागणाऱ्या इ०); लोकसभेनें केलेली (सरकारी खर्चाची) तरतूद, (एखाद्याला दिलेली) रोकड पैशाची नक्त,-नेमणूक, वर्षासन. *S. and demand, (Pol. Econ.)* chief factors regulating price of commodities. मागणी आणि पुरवठा (या तत्त्वावर वस्तूंच्या किंमतींत होणारा चढउतार). *Water s.*, पाणीपुरवठा. *S. department*, (सैन्याला) सामायन पुरविण्याचें खातें, पुरवठाखातें.

Sŭppōrt', *v. t.* (सपॉ'र्ट्)—to carry weight of, prop up, give strength to, encourage; supply with necessaries, lend assistance to, keep up adequately. धारण करणें, पडूं न देणें, आधार देणें; उत्तेजन देणें; पोसणें; पुष्टि देणें, पाठबळ देणें, आधार,-आश्रय,-देणें, मदत करणें; चालवणें, सांभाळणें. *n.* supporting or being supported; a person or thing that supports. आधार, निर्वाह; आश्रय देणारा मनुष्य,-वस्तु. *Foundation supports a house*, घराला पाया आधार देतो, पाया घराचा आधार आहे. *Had to be supported home*, त्याला धरून,-सांवरून,-घरीं आणावें लागलें. *To s. a family*, कुटुंबाचा चरितार्थ चालविणें. *To s. actor*, नटाचा मदतनीस म्हणून काम करणें. *S. resolution*, ठरावाला पुष्टि देणें. *S. institution*, subscribe to its funds. संस्थेला वर्गणी देणें. *To give s. to*, ला पुष्टि,-पाठिंबा,-आधार देणें. *Troops stationed in s.*, as reserve. राखीव ठेवलेलें सैन्य. *S. trench*, (तीन खंदकांच्या रांगांतील) मधला खंदक. *Speak in s. of*, advocate. ची बाजू घेणें, च्या वतीनें बोलणें. *S.-less, a.* निराधार, निराश्रित. *Support'able, a.*; *-bly, adv.*

Sŭppōrt'er, *n.* (सपॉ'र्टर्)—one who supports; (*esp.*) (*Herald.*) representation of living creature holding up. आधार देणारा, पोसणारा; उचलून धरणारी-आधारभूत-(प्राण्याची) प्रतिमा.

Sŭppōse', *v. t.* (सपो'झ्)—to take for granted, assume in default of knowledge, to think to be the case, to imagine; to be inclined to think. समजणें, कल्पना करणें, गृहीत धरणें, कल्पिणें, वाटणें, अस्तित्व कल्पिणें. *Supposed', pa. p.* believed to exist, reputed. कल्पिलेला, मानलेला, कल्पित, मानींव. *I s. so*, मला असें वाटतें (कुरकुरत कबुली देणें). *S. your father saw you what would he say?* समज, तुझ्या बापानें तुला पाहिलें तर तो काय म्हणेल? *Well, s. it was so*, बरें तर, तें असेच होतें असें मानूं. *Supposed'ly, adv.*; *Suppos'able, a.*

Sŭpposĭ'tion, *n.* (सपोझि'शन्)—a thing supposed; supposing. गृहीत धरलेली गोष्ट; कल्पना, भावना, तर्क, इष्टपक्ष, उपन्यास.*-al, a.* कल्पनेचा, अटकळीचा, काल्पनिक.*-ally, adv.*

Sŭppŏsiti'tious, *n.* (सपॉझिटि'शस्)—spurious. कपटाचा; कृत्रिम, बनाऊ, खोटा.*-ly, adv.*;*-ness, n.*

Suppŏ'sitorў, *n.* (सपॉ'झिटरि)—(med.) a cone or substance of medicinal substance placed in orifice to dissolve. (गुह्य भागांत विरघळण्यासाठीं ठेवण्याची) औषधी सोंगटी, गुदवर्ती. [L. *sub*, under; *ponere*, place]

Sŭpprĕss', *v. t.* (सप्रे'स्)—to put down, quell (rebellion, sedition etc.), put an end to the existence or activity of, overpower and crush; avoid giving vent to; withhold from publication; keep secret. मोडून टाकणें, दडपून टाकणें, मोड करणें; दाबून ठेवणें, दाबणें, गिळणें; प्रसिद्ध न करणें; गुप्त ठेवणें.*-ible, a.*;*-ion, n.* दाबणें, दडपणें; झांकणें; (दुःख) गिळणें; रेटून टाकणें, अवरोध.*-or, n.* दडपणारा, दाबून टाकणारा.

Suppres'sio vēr'i, *n.* (सप्रे'शिओव्हि'अराय्)—hiding of truth. सत्यापलाप, खरी गोष्ट मुद्दाम लपवून ठेवणें. [L]

Su'ppūrāte, *v. i.* (स'प्यूरेट्)—to form pus. पू होणें, पिकणें, पुवळणास येणें. *Suppura'tion, n.*; *Suppurative, a.* पूयजनक पिकवण.

Sūpra-, *pref.* (स्यूप्रा-)—above. (पूर्वगामी प्रत्यय=) वरचा, उपरिस्थ. *Supra-calvi'cular*, गळ्याच्या हाडावरचा, अक्षकोपरिस्थ.*-con'scious, a.* अधिक

जागृत.-*maxil'lary*, *a.* & *n.* (of) the upper jaw. ऊर्ध्व दंतास्थिगत, वरच्या जाभाड्याचा.-*mu'ndane*, पारलौकिक, परलोकचा.-*or'bital*, डोळ्याच्या खांचेवरील, नेत्रपुटोपरिस्थ.-*re'nal*, *a.* मूत्रपिंडावरील.

Suprĕm'acy̆, *n.* (सुप्रे'मसि)—being supreme, highest authority or power. प्राधान्य, श्रेष्ठत्व, वर्चस्व.

Suprē'me, *a.* (सुप्री'म्)—highest in authority or rank; of the uttermost importance or merit, utmost, greatest possible. सर्वांत मोठा, मुख्य, श्रेष्ठ, वरिष्ठ, परम; अत्यंत महत्वाचा, पराकाष्ठेचा, परमावधीचा. *The S. Being, the S., n.* God. परमात्मा, ब्रह्म. *S. court*, वरिष्ठ कोर्ट,-न्यायालय. *S. pontiff*, the pope. पोप (धर्मगुरु). *S. courage*, पराकाष्ठेचें शौर्य. *Supremely*, *adv.* पराकाष्ठेनें, अतिशय.

Sūr'al, *a* (स्यू'अरल्)—of the calf of the leg. पायाच्या पोटरीचा. [L. *sura*, calf]

Sŭr'chārge, *n.* (स'र्-चार्ज्)—extra load or charge; supply of force etc. in excess of what is required; additional charge for false returns of taxable property; a mark printed on postage-stamp changing its value; amount not passed by auditor. अधिक ओझें,-भरताड, अधिक आकार; अतिसंपृक्तता, (मालमत्तेसंबंधीं खोटी माहिती दिल्याबद्दल शिक्षा म्हणून घेतलेला) अधिक आकार,-आकारलेला कर; पोस्टाच्या तिकिटावरील (बदललेली किंमत दाखविणारी) छापील खूण; (हिशेबतपासनिसानें मंजूर न केलेली) अधिक,-जादा,-रक्कम.

Sŭrcharge', *v. t.* (सर्चा'र्ज्)—to overload; exact surcharge from; fine (person sum) as surcharge, show omission of credit in (account). अधिक भरताड करणें,-भरणें; अधिक आकार-रक्कम -वसूल करणें; अधिक रकमेचा दंड करणें; (हिशेबांतील) जमा न केलेल्या रकमेची चूक दाखविणें.

Sŭr'cĭngle, *n.* (स'र्-सिंगल)—band or belt round a horse's body. तंग, घोड्याच्या शरीराभोंवतीं घालण्याचा पट्टा. *v. t.* घोड्याला तंग बांधणें, पट्टा बांधणें, तंग बांधून घट्ट करणें.

Sŭr'culose,-lous, *aa.* (स'र्क्युलस्)—(Bot.) producing suckers. चोपकदंडोत्पादक, चोपक खोड उत्पन्न करणारा.

Sŭrd, *a.* & *n.* (सर्ड्)—(math.) *S.-number,-root*, irrational; (phonet.) un-voiced letter or sound. करण्यात्मक, करणी; मूक (उच्चार, अक्षर). [L. *surdus*, deaf]

Sure, *a.* (शुअर्)—having adequate reason for belief, convinced of, safe, reliable, unfailing; faithful खचित, खात्रीचा, खात्री झालेला; अचूक; विश्वासू, कधींहि न चुकणारा. *adv.* certainly. खात्रीनें निःसंशय, खरोखर. *Are you s.?* तुझी खात्री आहे का? *A s. shot*, a marksman who never misses. अचूक नेम मारणारा, अचुकसंधानी. *S. card*, खात्रीनें यशस्वी होणारी (योजना इ.). *A s. way*, खात्रीचा इलाज,-उपाय. *S.-footed*, never making false step (*lit.* & *fig.*). योग्य मार्गावर पाऊल टाकणारा न चुकणारा, अचूक. *To be s. she is pretty*, अगदीं खरें बोलायचें तर ती देखणी आहे. *To make s.*, खात्री करून घेणें. *Make s. of*, ची सत्यता पडताळून घेणें, ची खात्री करून घेणें. *As s. as a gun*, अगदीं निखालस खरें, खात्रीपूर्वक, निश्चित. *S. enough*, निःसंशय, खात्रीनें.

Sure'ly̆, *adv.* (शु'अर्लि)—with certainty. खात्रीनें, खचीत.

Sure'ty̆, *n.* (शु'अर्टि)—security, certainty; thing pledged as surety; person who goes bail for another's appearance in court or payment of sum. खात्री, खचीतपणा, तारण, हमी; जामीन, हमीदार. *of a s.*, certainly. खात्रीनें. *Stand s.*, (*for* another.) (दुसऱ्याकरितां) जामीन राहणें. *Find s.* or *ss.*, जामीन,-हमीदार,-देणें. *Sure'tyship*, *n.* जामिनकी.

Sŭrf, *a.* (सर्फ्)—foam and commotion of the sea breaking on shore or reefs. किनाऱ्यावर आपटणाऱ्या लाटांचा फेंस, (लाटांची) खळाळी, खळखळाट. *Surf'y*, *a.*

Sŭrf'ace, *n.* (स'र्फिस)—the outside of a body; outward aspect, external appearance; (Geom.) that which has length and breadth but no thinckness. वरचा भाग, वरचें अंग, पृष्ठ, पृष्ठभाग; बाह्य स्वरूप, बहिरंग, दिखाऊपणा; पृष्ठभाग, पातळी. *v. i.* to put special surface on (paper etc.). गुळगुळीत करणें. *A smooth s*, सपाटी. *Uneven s.*, जमिनीचा उंचसखलपणा. *His politeness is only of* or *on the s.*, त्याचा नम्रपणा हा केवळ वरवर दाखवण्याचा (दिखाऊच) आहे. *Plane s*, समान पातळी. *Curved s.*, वक्र पातळी. *S.-car*, (U. S.) electric street car. (रस्त्यातील) विजेची गाडी. *S.-man*, workman keeping permanent way of railway in order. आगगाडीच्या रस्त्यावर देखरेख करणारा कामगार.

Sŭrf'eit, *n.* (स'र्-फिट्)—excess, esp. in food; satiety, disgust caused by excess. फाजील खाणेपिणें, अतिआहार; वीट, पोटास लागलेले तडस. *v. t.* & *i.* to overfeed; cloy, satiate with or be satiated. अतिशय खाऊं घालणें, ओ येस्तों जेऊं घालणें; अतिशय खाणें, ओकारी,-वीट,-येईतों खाणें.

Surge, *v. i.* (सर्ज्)—to move in or as in waves (of sea, crowd, emotion etc.); (Naut., of rope) slip back with a jerk; (of wheel) revolve without advancing. (लाटेप्रमाणें) उसळणें, उठणें; (दोरी, सांखळी) हिसका देऊन मागें घसरणें; (चाक पुढें न सरकतां) फिरत राहणें. *n.* surging motion; waves. उसळणें, उसळी; लाट, मोठी लाट, कल्लोळ.

Sur'geon, *n.* (स'र्जन्)—a person skilled in surgery; a medical practitioner having a diploma qualifying him to practise surgery; a medical officer in navy or army or military hospital. शस्त्रवैद्य, शल्यतंत्रज्ञ; (परीक्षा पास होऊन डिप्लोमा मिळविलेला) शस्त्रक्रिया करणारा, शस्त्रवैद्य; (आरमारी, लष्करी) वैद्यकीय खात्याचा

प्रमुख. *Dental s., S. dentist,* दंतवैद्य, (शस्त्रक्रियेनें) दांत काढून टाकणारा. *S. fish,* एक जातीचा मासा. [Gk. *kheir,* hand; *ergo,* work]

Sur'gerў, *n.* (स'र्जरि)—manual treatment of injuries or disorders of the body; surgeon's consulting room and dispensary. शस्त्रवैद्यकी, शस्त्रविद्या; शस्त्रवैद्याची खोली,-चा दवाखाना, शल्यगृह.

Sur'gical, *a.* (स'र्जिकल्)—of surgeons; of or by surgery. शस्त्रवैद्याचा, शस्त्रविद्येचा; शस्त्रक्रियाविषयक, शल्य. *S. hall,* शस्त्रक्रियाशाला,-दवाखाना. *S. skill,* शस्त्रक्रियेंतील नैपुण्य.*-lly, adv.* शस्त्रक्रियेनें.

Sūr'icate, *n.* (स्यु'अरिकट्)—A small S.-Afr. animal. (आफ्रिकेंतील) एक मांसाहारी लहान जनावर.

Surl'ў, *a.* (स'र्लि)—sour in manner, gloomily sour or morose; rudely unsociable. तुसडा; खाष्ट, खत्याळ. *Surl'ily, adv.*; *-iness, n.*

Surmise', *n.* (सर्मा'इझ्)—suspicion of the existence or nature of something, a guess. कल्पना; तर्क, अटकळ. *v. t.* & *i.* to suspect the existence of; make a guess. (च्या विषयीं) कल्पना करणें, अनुमान करणें, तर्क करणें, अटकळ बांधणें.

Surmount' *v. t* (सर्मा'उन्ट्)—to be on the top of (usu. in pass.); to overcome, to get over by effort, to get the better. वर असणें, च्या शिखरावर असणें; निवारण करणें, पार पडणें. *Peaks surmounted with snow,* शिखरें घर्माच्छादित होतीं. *Surmount'able, a.* निवारण्याजोगा, साध्य, निवार्य.

Surmŭll'et, *n.* (सर्म'लिट्)—the red mullet. एक जातीचा समुद्रांतील तांबडा मासा.

Surn'āme, *n.* (स'र्-नेम्)—the name common to all members of a family, family name. आडनांव, उपनांव. *v. t.* to give surname to. आडनांव देणें; टोपणनांव देणें. *Sur'named, pa. p.* आडनांवाचा, उपनांवाचा, नांव दिलेला.

Surpāss', *v. t.* (सर्-पा'स)—to go beyond in anything, to exceed, to outdo, to excel. मागें टाकणें, चढ करणें.*-ing.* (part.) super-eminent. मागें टाकणारा, सर्वश्रेष्ठ, अतिशयित.*-ingly, adv.*

Surp'lice, *n.* (स'र्प्लिस्)—loose white-linen garment worn by clergy. पाद्र्याचा पांढरा झगा. *S.-fee,* (लग्न, मृत्यु या वेळीं) पाद्र्याला दिलेली दक्षिणा.*-d, a.*

Surp'lus, *n.* (स'र्-प्लस्)—amount left over when requirements have been met, (opp. deficit). शिल्लक राहिलेला, फाजील, ज्यादा, बचत. *S. population,* अधिक,-वाढीव,-लोकसंख्या. *Sur'plusage, n.* (of grain etc.) वरताळा.

Surprise', *n.* (सर्-प्रा'इझ्)—catching of a person unprepared; emotion excited by the unexpected; event etc. exciting this. अकस्मात गांठणें, अचानक पकडणें; आश्चर्य, विस्मय, नवल; आश्चर्यकारक गोष्ट. *v. t.* to attack or come upon at unawares; astonish; hurry (person) by surprise into act. अचानक गांठणें, -घेरणें; चकित करणें, दंग करणें, विस्मय पाडविणें, अकस्मात भाग पाडणें. *The fort was taken by s.,* अचानक हल्ला करून किल्ला काबीज केला. *A s. visit,* आकस्मिक भेट (देणें), अचानक येणें. *To my great s.,* much against my expectations. मी आश्चर्यचकित झालों. *A s. packet,* अनपेक्षित वस्तू हातीं पडणें, अनपेक्षित गोष्ट. *Surprised him in the act,* त्याला ती गोष्ट करीत असतां अचानक पाहिलें,-पकडलें. *To be surprised,* नवल वाटणें. *Surpris'edly, adv.*

Surpris'ing *a.* (सर्-प्रा'इझिंग)—unlooked-for. आश्चर्यकारक; चमत्कारिक, नवलाचें.*-ly, adv.* नवलवाटण्याजोगें, नवलपूर्ण.

Surren'der, *v. t.* & *i.* (सरे'न्डर्)—to relinquish possession of; to give oneself up; submit; give oneself over *to* (habit, emotion, etc.). हवालीं करणें; स्वाधीन होणें,-करणें, मान वाकवणें; च्या आहारीं जाणें, अधीन होणें. *n.* surrendering or being surrendered. सोडणें, त्याग, परित्याग, शरणागति. *S. insurance policy,* सोडरक्कम घेऊन विम्याचा हक्क सोडणें. *S. value,* amount payable to surrenderer of insurance policy. (विम्याची) सोडरक्कम.

Surrĕpti'tious, *a.* (सरेप्टि'शस)—done by stealth; clandestine, underhand. चोरून केलेला, चोरटा, खोटा, कपटाचा, खोटानाटा.*-ly, adv.* कपटानें, खोडसाळपणानें.

Sŭ'rrey, *n.* (स'रि)—(U. S.) a kind of two-seated pleasure-carriage. दुमाणसी गाडी.

Sŭ'rrogate, *n.* (स'रगेट्)—a deputy of bishop; (U. S.) a judge. (बिशपचा) प्रतिनिधि; न्यायाधीश.

Surround', *v. t.* (सरा'उन्ड)—to come or be all round; to encompass, to environ. सभोंवतीं असणें; घेरणें, गराडा घालणें, वेढणें. वेटणें. *n.* a floor-covering between walls and carpet. भिंतींच्या बाजूचें आस्तरण. *The surrounding country,* आसपासचा प्रदेश. *Surrounded with* or *by,* (नें) वेढलेला, वेष्टिलेला.

Surround'ings, *n. pl.* (सरा'उन्डिंग्ज्)—all that environs one, environments. सभोंवतालचा प्रदेश, परिस्थिति, वातावरण (अलं॰). *Cultured s.,* सुसंस्कृत वातावरण.

Sŭr'tăx, *n.* & *v. t.* (स'र्टॅक्स)—(to impose) additional tax (on). ज्यादा कर (बसविणें).

Surt'out, *n.* (स'र्टूट्)—an overcoat. वरचा झगा,-अंगरखा.

Surveill'ance, *n.* (सर्वे'लन्स)—watch kept on a suspected person, superintendence. पाहणी, नजर, पहारा, देखरेख. *Under s.,* not trusted unwatched. नजर ठेवलेला, देखरेखीखालील.

Survey', *v. t.* (सर्-व्हे')—to take general view of, to scrutinize, to examine, to inspect. पाहणें, पाहणी करणें, अवलोकन करणें, (जमीन वगैरेची) मोजणी करणें, पैमाइशी करणें.—*ing, n.*

Surv'ey, *n.* (सर्‌-व्हे)—casting of eyes over something; department carrying on or piece of land-surveying. निरीक्षण; मोजणी-खातें, जमीनमोजणी, पैमाशी, भूमापन, मोजणीखात्याचा नकाशा. *Trigonometrical s.*, त्रिकोणमित पैमाश,-भूमापन.

Surveyor, *n.* (सर्व्हे'अर्)—official inspector *of*; a person who surveys land professionally, one who surveys, an overseer. पाहणी करणारा; मोजणीदार.-*ship*, *n.*

Survi'val, *n.* (सर्व्हाइ-व्हल)—a living beyond another's life; relic of the past. जगणें, मागें राहणें; टिकाव, अवशेष. *S. of the fittest*, process or result of natural selection. योग्यतमातिजीवन, 'बळी तो कान पिळी, या न्यायानें बलिष्ठ जो असतो तोच टिकाव धरतो, मागें राहतो, ती पद्धत.

Survive', *v. t. & i.* (सर्व्हाइव्ह)—to outlive; to be still alive or existent. मागें जिवंत राहणें; अद्याप अस्तित्वांत असणें. *To s. one's contemporaries*, आपल्याबरोबरचे लोक मरून गेले असतां मागें जिवंत राहणें. *S. all perils*, सर्व संकटांतून निभावणें.

Sur'vivor, *n.* (सर्व्हाइ-व्हर्)—one who outlives another, one who lives after some event. मागें जिवंत राहिलेला, अन्योत्तरजीवी.-*ship*, *n.* (*esp.*) right of joint tenant to whole estate on other's death. अनुजीवन; भागीदार मेल्यावर मागें जिवंत राहणाऱ्याची सर्व मालमत्तेवरील मालकी, अनुजीविताधिकार.

Suscep'tible, *n.* (ससेप्टिबल्)—impressionable: touchy; admitting-*of*; accessible or sensitive *to*. मनावर परिणाम करणारा; कोमल मनाचा, नाजूक, करुणार्द्र; जोगा, जोगता, क्षम; विकारी, ग्रहणक्षम. *Facts not s. of proof*, पुराव्याची गरज नसलेल्या सत्य गोष्टी. *The passage is s. of another interpretation*, त्या उताऱ्याचा दुसरा अर्थ लागण्याजोगा आहे. *Suscep'tibility*, *n.* क्षमता, ग्रहणक्षमता. *Susceptibilities*, *n. pl.*, sensitive points of person's nature. कोमल-मनोवृत्ति, नाजूक मनोभावना,-मनोविकार. *Suscep'tibly*, *adv.*

Suscep'tive, *a.* (ससे'प्टिव्ह)—concerned with the receiving of emotional expressions. हळव्या मनाचा, भावनाप्रधान, भावनामय.

Suspect', *v. t.* (सस्पे'क्ट)—to be inclined to think that; to doubt the innocence or genuineness or truth of, distrust, mistrust; have an impression of the existence or presence of. संशय येणें, वहीम येणें; संशय वाटणें, अविश्वास वाटणें, शंका घेणें,-असणें; चा वास येणें. *pred. a.* subject to suspicion. संशयास्पद, विश्वास न ठेवण्याजोगा. *n.* a suspected person. वहीम,-संशय,-आलेला, वहिमी. *A suspected criminal*, गुन्हेगारीचा संशय आलेला,-संशयित गुन्हेगार,-इसम. *Suspect'able*, *a.* (rare).

Suspend', *v. t.* (सस्पे'न्ड)—to hang up; delay, put off; adjourn; deprive of office for a time. टांगणें, लोंबत,-तरंगत,-ठेवणें; (औषधि वगैरे पाण्यांत) लटकत ठेवणें, तहकूब करणें, मोघम ठेवणें; कांहीं दिवस कामावरून काढून टाकणें, घरीं पसविणें, दूर करणें, अंदेशा घेऊन बडतर्फ करणें. *To s. judgement*, निकाल मोघमांत ठेवणें,-तहकूब करणें. *To s. payment*, admit insolvency. देण्याघेण्याचा व्यवहार तहकूब करणें, नादारी कबूल,-जाहीर,-करणें. *Suspended animation*, state of insensibility without death. निरुद्ध प्राण. *Suspens'ible*, *a.* तरंगत राहण्याजोगा, लोंबकळण्याजोगा; -*bil'ity*, *n.* *Suspend'ed*, *pa. p.* तरंगत, टांगलेला; तहकूब केलेला; (Bot.) लटकत राहणारा, प्रलंबित.

Suspen'der, *n.* (सस्पे'न्डर्)—In vbl. senses; (esp. pl.) (U. S.) trouser-braces; attachments holding up socks, etc. तरंगत ठेवणारा, टांगणारा, तहकूब करणारा; पाटलोणीचे खांद्यावरील बंद,-पट्टया; (पायमोज्याचे) बंद.

Suspense', *n.* (सस्पे'न्स)—undetermined state, indetermination, indecision; (Law) suspension. अनिश्चित स्थिति, अनिश्चय, संशय, विकल्प, अनिश्चितता; हक्कांची तहकुबी. *To keep* one *in s.*, delay acquainting him with what he is eager to know. संशयांत ठेवणें, उत्सुकतेंत पाडणें, मोघमांत ठेवणें. *S. account* (in book-keeping), अनामत रकमांचें खातें.

Suspen'sion, *n.* (सस्पे'न्शन्)—In vbl. senses of Suspend. टांगणें, लटकावणें; तहकुबी; अधिकार कांहीं काळपर्यंत काढून घेणें. *S.-bridge*, झुलता पूल. *S. veto*, कांहीं मुदतीपर्यंतचा निषेध,-जादा मताधिकार. *Suspen'sive*, *a.*,-*ly*, *adv.* *Suspen'sory*, *a.* अधांतरीं राहणारें, टांगतें.

Suspi'cion, *n.* (सस्पि'शन्)—partial or unconfirmed belief, esp. that something is wrong. संशय, शंका, वहीम, अंदेशा, तर्क, अंदाज, कल्पना. *v. t.* (U. S., sl.) to have suspicion *that*. (असा) संशय,-शंका,-वहीम घेणें. *Above s.*, too obviously good to be suspected. शंका घेण्यास जागा नसलेला, संशयातीत. *S.-less*, *a.*

Suspi'cious, *a.* (सस्पि'शस्)—feeling or justifying suspicion; distrustful. साशंक, शंकेखोर; संशयास्पद. -*ly*, *adv.*;-*ness*, *n.*

Sustain', *v. t.* (सस्टे'न्)—to keep from falling; to enable to last out; to undergo, to suffer (loss, &c.); to keep up; uphold, bear weight of. धरणें, पडूं न देणें; टिकवणें; सहन करणें, सोसणें; चालू ठेवणें; उचलून धरणें, चा भार सहन करणें. *Sustaining food*, पौष्टिक अन्न, शक्ति कायम ठेवणारें अन्न. *S. a defeat, loss*, पराभव, नुकसान, सहन करणें,-सोसणें,-होणें,-येणें. *S. the applicant in his claim*, अर्जदाराची बाजू उचलून धरणें. *A sustained effort*, सतत चालू राहणारा प्रयत्न, *Sustain'able*, *a.*,-*ment*, *n.*

Sus'tenance, *n.* (सस्टेनन्स)—nourishing quality, nutriment, food (*lit.* or *fig.*). पौष्टिकपणा, पोषण, संभाळ, उपजीविका, अन्न, आहार, उपजीवन.

Sustenta'tion, *n.* (सस्टेन्टे'शन्)—supporting of life. जीविताधार, जीवनाधार.

Sŭt'ler, *n.* (सट्लर्)—a camp-follower selling provisions. लष्कराबरोबरचा दुकानदार, वाणी.

Sū'ture, *n.* (स्यूचर्)—seamlike articulation of two bones (at their edges); (*surg.*) stitching of wound, a thread or wire used for this. शिवण, संधि, जोडण, (मस्तक-) संधि; टांके मारून जोडणें, शिवणें; जखम शिवण्याची तार, दोरा. *v. t.* (जखम वगैरे) शिवून सांधणें. *Su'tural, a.* सांध्याचा, शिवणीसंबंधीं ;-*ly, adv. Sutura'tion, n.* सांधणें, शिवणें. *Su'tured, a.* सांधलेला. शिवलेला.

Sū'zerain, *n.* (स्यूझरेन)—feudal lord. संस्थानाधिपति, अधिराज. *Su'zerainty, n.* अधिराज्य.

Swab, *n.* (स्वॉब्)—a mop for cleaning absorbent pad used in surgery; (Naut.) a clumsy fellow. बोळा; (लांब काठीला बांधलेला) कापसाचा, कापडाचा, किंवा स्पंजाचा बोळा; शोषक मऊ उशी,-गिरदी; अडाणी मनुष्य *v. t.* to clean with a swab. काठीवाल्या बोळ्यानें साफ करणें, पुसून काढणें.-*ber, n.*

Swa'ddle, *v. t.* (स्वॉडल्)—to wrap up tight and warm, to bind tight with clothes. लपेटणें, गुंडाळणें, वेढणें. *Swaddling-bands,-clothes,* बाळंतिणीचीं तान्हें मूल गुंडाळण्याचीं वस्त्रें, बाळवतें; (*fig.*) influences restraining freedom of action or thought. आळा, आळाबंधा, लोढणें.

Swăg, *n* (स्वॅग)—(sl.) burglar's booty; gains made by jobbery; (Austral.) tramp's or bush-traveller's bundle. दरोडेखोराची लूट; लूटमार. (भटक्या मनुष्याचें) बोचकें, गाठोडें.

Swăgg'er, *v. i.* (स्वॅगर्)—to walk like a superior, to behave arrogantly; to talk boastfully (about), bluff. डौलानें चालणें, आखडणें; उद्धटपणानें वागणें; फुशारक्या मारणें, तोरा मिरवणें; घढाई मारणें, बाता झोंकणें. *n.* swaggering gait, or manner or talk; smartness; (Austral.) a tramp. डौलाची चाल, अकड, डौल, तोरा. मिजास; चुणचुणीतपणा, धडाडी; भटक्या मनुष्य. *a.* smart, fashionable. चुणचुणीत, भपकेबाज, नोकझोकाचें. -*er, n.*;-*ingly, adv.*

Swain, *n.* (स्वेन्)—a young rustic, hind; a lover, a suitor. गांवढळ तरुण; प्रेमवेडा; विवाहार्थ प्रेमयाचक, प्रिय, नायक.

Swāle, *n.* (स्वेल्)—(dial.) a low place or hollow; (U. S.) a marshy depression. सखल जमीन, खळगा, पोकळी; दलदलीचें डबकें.

Swa'llow, *v t. & i.* (स्वॉलो)—to make or let pass down one's throat; engulf; draw in; accept credulously; pocket (an affront); recant (one's words). गिळून टाकणें, गिळणें; गडप करणें; सुरवणें; खाऊन टाकणें; भोळेपणानें स्वीकारणें; खरें मानणें; (अपमान) गिळणें, पोटांत घालणें, निमूटपणें सहन करणें; (आपले शब्द) परत घेणें, खाणें. *n.* gullet; act of swallowing; amount swallowed at once; (*s.-hole*) funnel-shaped cavity in limestone. गळा, अन्नमार्ग; गिळणें; घांस; चुनखडींतील कर्ण्याच्या आकाराची पोकळी. *To s. up,* खाऊन टाकणें, गडप करणें. *To s. a camel.* अवघित, -कठीण,-भयंकर गोष्टीची पर्वा न करणें.

Swa'llow, *n.* (स्वॉलो)—kinds of migratory fork-tailed swift insect-eating bird- associated with summer. पाकोळी. *One s. does not make a summer,* (a warning against hasty inference). प्रमाणावरून सामान्य सिद्धान्त बसवूं नये, घाईघाईनें अनुमान काढूं नये. *S. dive,* दोन्ही हात लांब करून (पोहणाऱ्यानें) पाण्यांत बुडी मारणें. *S.-tail,* खोलगट चिमट्यासारखी शेपटी; एक जातीचें फुलपांखरूं,-पक्षी. *S.-tailed coat.* लांबट शेपट्यावाला अंगरखा. *S.-wort,* milk-weed. अर्क, मंदार (वृक्ष). *Gigantic s.-wort,* रुई, रुइटी.

Swam, *pa. t.* of Swim.

Swamp, *n.* (स्वॉम्प्)—a piece of wet spongy ground, low ground filled with water, bog, marsh. पाणथळ, दलदल. *v. t.* to overwhelm, flood, soak (with water etc.); overwhelm by superior numbers or quantity. दलदलींत रुतवणें, अडकवणें, जलमय करणें, बुडविणें; दडपून टाकणें, गिळून टाकणें, टिकूं न देणें. (*attrib.*) found in swamps. दलदलींतला, पाणथळ जमिनींतला,-जमिनींत होणारा. *To be swamped with work,* कामकाजामुळें बेजार होणें,-दडपलें जाणें. *Swa'mpy, a.* दलदलीचा, पाणथळ.

Swan, *n.* (स्वॉन्)—a large long-necked web-footed (*usu.* white) water-bird; the constellation Cygnus. हंसपक्षी, राजहंस; राजहंस (नक्षत्र). *S.-song,* song of dying swan; a person's last production. राजहंसाचें शेवटचें गाणें: (एखाद्याची) शेवटची कृति,-कलाकृति,-लेख,जय. *S. neck,* (पाणी वाहून नेणाऱ्या) नळाची वांकडी तोटी. *S.-like, a.*; *Swa'nnery, n.*

Swănk, *n. & v. i.* (स्वँक)—(*sl.*) showing off, swagger. भपका, बढाई (मारणें).

Swap, See Swop.

Sward, *n.* (स्वॉअर्ड)—lawn-like ground. (आखूड-कापलेल्या-) गवताची जमीन; हिरवळ.-*ed, a.*

Sware, *pa, t.* of Swear

Swarm, *n.* (स्वॉअर्म्)—a large number (of insects, birds, small animals, horse-men &c.) moving about, a cluster of honey bees. थवा, घोळका, झुंड; मधमाशांचा घोळका, मोहळ. *v. i.* to move in or form a swarm, to be thronged with a multitude; (of places) be crowded *with;* (of bees) cluster for emigration. गर्दी करणें, घोळक्यानें निघणें; गजबजणें, गर्दी,-दाटी,-होणें; (स्थलांतर करण्यासाठीं मधमाशांचें) थवा करणें. *Ss. of children, stars,* मुलांचा घोळका; ताऱ्यांचे पुंज,-पुंजके

Swarm, *v. t. & i.* (स्वॉअर्म्)—to climb (rope, tree, pole) *up,* by clipping with knees and hands. (सरपटत) वर चढणें.

Swar'thy̆, *a.* (स्वॉर्दि)—being of a dusky complexion, dark-hued; sunburnt. कृष्णवर्ण,

काळसर; उन्हानें काळा झालेला.-*ily*, *adv.*;-*iness*, *n.* कृष्णवर्णता, काळसरपणा. Also, *Swart*, *a.* (स्वॉअर्ट्) (arch.).

Swash, *v. t.* & *i.* (स्वॉश्)—to strike violently (arch.); make the sound (of water etc.) of washing or rising or falling. जोरानें धपाटा देणें; (पाण्याची) खळबळ करणें, खळबळाट होणें. *n.* खळखळाट, खळबळाट. *A swashing blow*, भयंकर तडाखा. *A s. buckler*, bully. आडदांड, मवाली, धाडशी (मनुष्य).

Swat, *v. t.* (स्वॉट्)—(U. S.) to slap, crush (a fly etc.). चापटी मारणें, (माशी) मारणें, चिरडणें.

Swath, *n.* (स्वॉथ्)—a ridge of mowed grass, space left clear after one passage of mower. पात, पाथरा; (गवत, शेत कापून झालेली) पट्टी.

Swāthe, *v. t.* (स्वेद्)—to enclose (limb, person) in bandages or wraps, to bind, to swaddle. पट्टा बांधणें, लपेटणें, वेष्टणें. *n.* a wrapping. पट्टी, वेष्टण, लपेटा.

Sway, *v. i.* & *t.* (स्वे)—to waver; have influence over; rule over; lean unsteadily to one side, oscillate irregularly. मागें पुढें कलणें; (वर) वजन असणें; (वर) अंमल चालवणें, चा ताबा,-स्वामित्व,-असणें; (एकीकडे) कलणें, झुकणें, डळमळणें, हालवणें, डोलविणें, फिरविणें. *n.* swaying motion; rule, preponderance, government. हेलकावे खाणारी गति, कल, अंमल, अधिकार. *Sway-backed*, *Swayed*, (of horse) पाठीला भयंकर पोंक आलेला,-पाठ खालीं घसलेला (घोडा).

Swear, *v. t.* & *i.* (स्वेअर्)—to take oath; to make promise on oath; use profane oaths to express anger (*at*); cause to take oath, administer oath to. शपथ घेणें; शपथ घेऊन सांगणें; घाणेरड्या शपथा (रागानें) घेणें; शपथ घेवविणें; शपथ (घेण्याचा प्रकार,-विधि) सांगणें. *n.* spell of profane swearing; (*s.-word*) a profane oath. शपथ घेणें, शपथा, आणभाक; घाणेरडी,-गलिच्छ,-शपथ. *Sworn*, *pa. p.* (of (evidence) शपथेवर दिलेली (साक्ष, पुरावा). *S. by*, (colloq.) वर विशेष श्रद्धा,-विश्वास,-असणें. *To s. off drink etc.*, take oath to abstain. (दारू वगैरे) न पिण्याची शपथ घेणें, प्रतिज्ञा करणें. *Sworn friends,-enemies*, जिवश्च कंठश्च मित्र,-दोस्त; उघड उघड कट्टे वैरी. *To s. in*, शपथ घेववून कामावर,-अधिकारावर नेमणें. *Swear'er*, *n.* शपथ घेणारा,-वाहणारा. *Swore*, *Sware* (arch.), *pa. t.*; *Sworn*, *pa. p.*

Sweat, *n.* (स्वेद्)—perspiration; labour, toil, drudgery; (colloq.) state of anxiety; sweating state; drops exuding from any surface. घाम; श्रम, मेहनत; काळजी वाटण्याजोगी स्थिति, चिंता; घामाघूम होणें; निचरा, पाझर, शेदव. *v. i.* & *t.* to exude sweat; emit like sweat; to toil, to drudge; (of wall etc.) exhibit surface moisture; employ (labour, workers) at starvation wages for long hours, work on such terms; remove sweat from (horse) by scraping; be in a state of terror. घाम येणें; अंगाचें पाणी करणें; कष्ट करणें; (भिंत) पाझरणें, झिरपणें, शेदव करणें; अल्प मजुरीवर भरपूर काम करून घेणें, घामट्या काढणें, अल्प मजुरीवर भरपूर काम करणें; पट्टीनें (घोड्याचा) घाम खरवडून काढणें; भयानें घामाघूम होणें. *In* or *by the s. of* one's *brow*, by dint of toil. निढळाच्या घामानें कष्ट करून. *A cold s.*, (भय, मूर्च्छा, मरण या वेळचा) दरदरून आलेला-थंडगार पाडणारा-घाम. *In a s.*, सचिंत, चिंताकुल. *S. band*, (टोपीच्या आंतील कातड्याची) घामाची पट्टी. *S.-cloth*, (घोड्याच्या खोगिराखालील किंवा मानेभोंवतालचा) गरम कापडाचा तुकडा. *S.-duct*, घर्मनालिका. *S.-gland*, secreting sweat below skin. स्वेदपिंड. *S. shop*, घामाघूम होईपर्यंत काम करणारे नोकर असलेलें दुकान. *He shall s. for it*, पश्चात्ताप करावा लागेल. *Sweating bath*, घर्मोत्पादक स्नान;-*iron*, घोड्याचा घाम खरडून काढण्याची पट्टी;-*sickness*, epidemic fever prevalent in 15th and 16th cc.. अतिस्वेदक तापाचा रोग. *Sweat'y*, *a.* *Sweat'ily*, *adv.*,-*iness*, *n.*; *Sweat'less*, *a.*

Swea'ter, *n.* (स्वे'टर्)—(*esp.*) thick woollen jersey. एक प्रकारचा जाड गरम अंगरखा, स्वेटर.

Swēde, *n.* (स्वीड्)—a native of Sweden. स्वीडनचा रहिवाशी. *a s.*, a Swedish turnip. स्वीडनमध्यें होणारें सलगम (फळ). *Swe'dish*, *a.* of Sweden. स्वीडनचा; *n.* स्वीडनची भाषा.

Sween'y̆, *n.* (स्वी'नि)—(U. S.) atrophy of muscle, esp. of shoulder in horse. (स्नायूचा) एकांगक्षय.

Sweep, *v. i.* & *t.* (स्वीप्)—(swept) to glide swiftly, clear everything from; clear of dust; go majestically; extend in continuous curve or line or slope; impart sweeping motion to; (of artillery) cover; clear everything from; gather *up* or push *away* as with broom; propel (barge) with sweeps. झपाट्यानें जाणें; साफ करणें; धूळ वगैरे झाडणें; डौलानें जाणें; सारखा-पसरत-जाणें, उतरत जाणें; झाडीत जाणें; टप्प्यांत,-मान्यांत-असणें,-आणणें; झाडणें, झाडून साफ करणें, केरकचरा काढणें; झाडून टाकणें, झटकणें, हाकून देणें; पतिंग्यांनीं (पडाव) वल्हवणें. *n.* a sweeping motion; curve in road; range of something; a long oar; a chimney sweep; a long pole mounted as lever for raising bucket from well. झटकारा, झोंक; वळण, वांकण, वांकणाचा रस्ता; आटोका, आवांका, पोंच; पतिंगा; चिमण्या झाडणारा; उत्कींची काठी. *She swept out of the room*, ती खोलींतून झपाट्यानें निघून गेली. *Wind sweeps along*, वारा घोंघावतो. *S. away slavery*, abolish it swiftly. गुलामगिरी सत्वर नष्ट करणें. *Dress sweeps the ground*, (पायघोळ) कपडे रस्ता झाडीत आहेत.

S. the seas, समुद्रांतून सर्व शत्रू हांकून,-घालवून,-देणें; चारी दिशांनीं जलपर्यटन करणें. *Swept and garnished*, सामान्यपणें ताजातवाना झालेला. *S. the board*, सोंगटीत सगळे पैसे मिळविणें; सर्व बक्षिसें मिळविणें. *Make a clean s*, have a complete riddance of old furniture, officials, etc. जुनें सामानसुमान, अधिकारी वगैरेंची साफ हकालपट्टी करणें. *Sweep'stake(s)*, gamble on horse-race. घोड्यांच्या शर्यतीचा प्रकार.

Sweep'er, *n.* (स्वीप्‌र्)—one who sweeps. झाडणारा; (*esp.*) झाडूवाला, भंगी.

Sweep'ing, *pr. p.* (स्वी'पिंग्)—of wide range. सरसहा, सरसकट.-*ly, adv.*,-*ness, n. Sweepings, n. pl.* केरकचरा, गाळ, गदळ.

Sweet, *a.* (स्वीट्)—tasting like sugar or honey; smelling like perfumes, fragrant; melodious; fresh and sound; gratifying; dear, beloved; pretty, amiable, gentle. गोड, गुळचट, मिष्ट, स्वादु; मधुर, सुवासिक, सुगंधी; गोड आवाजाचा, मंजुळ; ताजा, लाडका, मनोहर; सुंदर, प्रिय, मोहक. *n.* the sweet part; a sweetmeat; (*pl.*) delights; (*usu. pl.*) sweet dishes; (chiefly voc.) darling. सुखाचा भाग,-अंश, सुख; खाऊ, मिठाई, गोड पदार्थ; सुख, चैन, आनंद; पक्वान्न, मिष्टान्न; प्रिय, प्रिया. *A s. tooth*, liking for sweet things. गोड पदार्थांविषयीं आवड. *Tastes s.*, (ला) गोडी आहे, गोड चव आहे. *S. song*, गोड,-कर्णमधुर,-गाणें. *S. toil*, that one loves. आवडतें काम,-कामाचे श्रम. *S. temper*, मनमिळाऊ,-गोड,-स्वभाव;-*ed, a.* गोड स्वभावाचा. *A s. girl*, गोड,-प्रेमळ,-मुलगी. *S. one!* (voc.) darling. प्रिये! लाडके! *A s. one*, (*sl.*) (मुठीचा) भयंकर तडाखा. *S. going*, वाहनांतून केलेला सुखकर प्रवास. *At one's own s. will*, just as one pleases, at random. यदृच्छेनें, मन मानेल तसें. *S. bread*, pancreas or thymus-gland, *esp.* of calf as food. स्वादुपिंड. *S.-brier*, रानगुलाब. *S.-flag, n.* वेखंड. *S.-heart*, either of pair of lovers. प्रिय, नायक, प्रिया, नायिका. *Go sweet-hearting*, प्रेमाराधन,-प्रेमयाचना,-करणें. *S.-oil*, गोडें तेल. *S. potato*, रताळी (वेल); रताळें (फळ). *S.-water*, उष्ण गृहांतील पाढरें द्राक्ष. *S.-William*, एक बहुरंगी फुलझाड. *S. willow*, S. gale. सुगंधि (त) वारा,-वाऱ्याची झुळुक. *S.-scented, a.* सुवासिक, सुगंधाचा. *Sweet'en, v. t. & i.* गोड करणें; गोडी आणणें; गोड,-मिष्ट,-होणें. *Sweet'ening, n.*; *Sweet'ish, a.* गुळमट, गोडसर. *Sweet'ly, adv.*; *Sweet'ness, n.* गोडपणा, गोडी, माधुरी.

Sweet'heart, *n.* (स्वीट्‌-हार्ट्)—either of the pair of lovers, a lover (male or female). प्रियकर, प्रिया.

Sweet'ing, *n.* (स्वी'टिंग्)—kind of sweet apple; (arch.) darling. सफरचंद, गोड फळ; प्रिय, लाडके.

Sweet'meat, *n.* (स्वी'ट्-मीट्)—sugar-plum or bon-bon, confection made mostly of sugar. मिठाई, खाऊ.

Swell, *v. i. & t.* (स्वेल्)—to (cause to) grow bigger or louder; dilate, expand, enlarge rise or raise *up*; bulge out, increase in volume or force or intensity. वाढणें, वाढवणें, मोठा होणें, फुगवणें, फुगारा आणणें, सुजणें, फुगणें, पसरणें; चढणें, चढवणें; बाहेरून फुगवटी मारणें, वाढणें, ताठणें, माजणें. *n.* an act or condition of swelling; heaving of the sea with waves after a storm; (colloq.) a person of distinction or of good society; a man of fashionable appearance; (mechanism in organ for) swelling or subduing tones at will. सूज, फुगारा, फुगवटी; (समुद्राच्या लाटांची) फुग, फुगवटी, फुगवणी (पाण्याची); प्रतिष्ठित,-मोठा,-मनुष्य; नोकझोकाचा मनुष्य; वाद्यांतील सुरांचे आरोह-अवरोह करण्याची रचना, आरोह-अवरोह. *a.* (colloq.) of distinction; smart, finely dressed. प्रतिष्ठित; तरतरीत, नीटनेटका पोषाख केलेला. *To s. up, s.*, सुजणें. *The swelling sails*, वारा भरून फुगणारीं शिडें. *Swelling oratory*, दर्पोक्तिपूर्ण वक्तृत्व. *Heart swells*, भावनेनें हृदय उचंबळून येतें. *S. with pride*, अभिमानानें ताठ होणें,-फुगून जाणें. *Swollen estimates*, प्रमाणाबाहेर फुगवून-वाढवून-सांगितलेला अंदाज (अंदाजी हिशेब,-खर्च). *S. note*, (in music) आवाजाच्या चढ-उतारानें म्हणावयाचें गाणें,-वाजवावयाची गत. *Swelled head*, (*sl.*) conceit. घमेंड, ताठा. *S.-fish*, स्वतःला (लंबवर्तुळाकार) फुगवूं शकणारा मासा. *S. mobsmen*, संभावित खिसेकातरू. *Swell'dom, n.* भपकेबाजपणा, नोकझोक. *Swell'ish, a.*

Swell'ing, *n.* (स्वे'लिंग्)—(*esp.*) temporary protuberance due to bruise, prominence. सुजणें, सूज.

Swel'ter, *v. i.* (स्वे'ल्टर्)—to be faint or oppressive or oppressed with heat, to perspire. उन्हानें अति त्रास होणें, उबवणें, उकडणें, गदमदणें, शिजून जाणें. *n.* sweltering atmosphere or condition. उबवणारी हवा, उकाडा.

Swept, *pa. t. & pa. p. of* Sweep.

Swerve, *v. i. & t.* (स्वर्व्)—to diverge from regular line of motion (*lit. & fig.*); cause (ball) to swerve in the air. बाजूला जाणें, ढळणें; (चेंडू) हवेंत वळविणें, वळणें. *n.* swerving motion. रस्ता सोडणें, ढळणें, चळणें. *Never swerves an inch from his duty*, आपल्या कर्तव्यापासून तिळमात्र ढळत नाहीं. *S.-less, a.*

Swift, *a.* (स्विफ्ट्)—fleet; speedy, quick, prompt, quick to do. जलद, चपळ, वेगवान्; तावडतोबीचा, शीघ्र. *adv.* swiftly. जलदीनें, त्वरेनें, सत्वर. *n.* kinds of birds; kinds of small lizard; revolving frame for winding yarn etc. from. (पाकोळी-सारखा लांब शेपटीचा जलद धांवणारा) पक्षी; एक जातीची चोपई, सरडा; सुतानें कांड्या भरण्याचा रहाट. *S. feet*, जलद गति,-पाय. *S.-footed*, पायाचा जलद. *Be s. to hear, slow to speak*, जलद-तावडतोब ऐकावें, पण विचार करून सावकाश बोलावें. *Swift-ness, n.* जलदी, त्वरा, शीघ्रगति.

Swig, *v. t. & i.* (स्विग्)—(*sl.*) to take draughts (of). झोंकणें, ढोसणें. *n.* मोठा घोंट,-घुटका.

Swill, *v. t. & i.* (स्विल्)—to rinse, flush (*out*); drink greedily. धुणें, विसळणें; ढोसणें, रगडून पिणें. *n.* rinsing; inferior liquor; slops; bout of drinking. धुणें, विसळणें; हलकी दारू; (स्वयंपाकाच्या भांड्यांचें) विसळवणी, धूण; दारूची धुंदी, निशापाणी.

Swim, *v. i. & t.* (स्विम्)—(swam; swum) to float on or at surface of liquid, to be supported on water; progress in water by swimming; cover distance or compete in (race) thus, cause to progress thus; (*fig.*) go with gliding motion; have dizzy effect or sensation, appear to undulate, overflow *with* or *in* moisture. पोहणें, तरंगणें, तरणें; पोहून जाणें, पोहण्याच्या शर्यतींत भाग घेणें, पोहायला लावणें; सरकन जाणें, सरदिशीं निघून जाणें; भोंवणें, फिरणें, चक्कर येणें; वर पाणी येणें, पाण्यानें भरणें, वर तरंगणें. *n.* spell of swimming; a deep pool frequented by fish in river; (*fig.*) main current of affairs. पोहणें, पोहणी; नदींतील खोलगट भाग,-डबकें; चालू परिस्थिति. *To s. with the tide* or *stream*, act with the majority. पुष्कळ लोक वागतील तसें वागणें. *The moon swims in sky*, आकाशांत चंद्र सरकन चालतो. *My head swims*, माझें डोकें गरगरतें, मला चक्कर यते. *Swimming eyes*, पाण्यानें भरलेले डोळे. *At a swim*, एका पोहणीनें.

Swim'mer, *n.* (स्वि'मर्)—one who swims. पोहणारा, पोहता.

Swim'ming, *pr. p. & n.* (स्वि'मिंग)—पोहणें, तरंगणें. *-bath*, पोहण्याचें स्नानगृह, पोहणें शिकण्याची शाळा. *-bell*, घंटेच्या आकाराचें (माशाचें) पोहण्याचें इंद्रिय. *-belt*, पोहण्याचें कडें. *-bladder*, माशाची श्वासनलिका. *-stone*, एक जातीचा स्फटिक.

Swim'mingly, *adv.* (स्वि'मिंग्लि)—with easy unobstructed progress. सहजगत्या, सटकन, सरकन.

Swin'dle, *v. t. & i.* (स्वि'न्डल)—to cheat; to defraud. फसवणें, लुबाडणें. *n.* fraudulent scheme. फसवेगिरी, उपटेपणा. *Swindler*, *n.* फसव्या, उपट्या. *Swindlingly*, *adv.* फसवेगिरीनें, लबाडीनें.

Swine, *n.* (स्वाइन्)—(*sing & plu.*) a pig, a hog; a person of greedy or bestial habits. डुकर, डुवर, सूकर; हावरा,-पशुवृत्तीचा,-मनुष्य. *S.-herd*, डुकर-पाळ. *S.-pox*, गोंवराचा प्रकार. *Swinish*, *a.* सूकरवृत्तीचा;-घाणेरडा; *-ly*, *adv.*; *-ness*, *n.* *Swin'ery*, *n.* डुकरवाडा,-खाना.

Swing, *v. i. & t.* (स्विंग)—(*swung*) to move with to and fro motion; sway like a pendulum or door; oscillate, revolve, rock; go with a swinging gate. झोंके देणें, हिंदुळणें, झोंपा काढणें, डुलवणें; (लंबकाप्रमाणें) हेलकावे खाणें; आंदोलणें, वर्तुळाकार फिरणें, डुलणें; डुलत डुलत चालणें. *n.* act of swinging, oscillation, swinging gait or rhythm; seat slung by ropes or chains for swinging in; compass to which a thing swings. डुलणें, झेंप, आंदोलन, हेलकावा; डुलती चाल, तालबद्धता; झोंपाळा, हिंदोळा, चौफळा, झुला, झोंका, हेलकावा; आंदोलनसीमा, झोंका. *He shall s. for it*, त्याला फांसावर लटकावलें जाईल. *Door swung to*, दरवाजा लागला,-बंद झाला. *To s. child*, मुलाला झोंके काढणें. *To be in full s.*, active. ऐन भरांत,-जोमांत,-असणें. *The s. of the pendulum*, (*fig.*) tendency to alternation (tendency of electorate). (मतदारांचें एकदां या पक्षाला व एकदां त्या पक्षाला) मतें देण्याचें आंदोलन. *It has a s. of 3ft*, त्याचा झोंका तीन फूट जातो. *S.-bridge*, झुला, झुलता पूल.

Swing'ing, *pr. p. & a.* (स्विं'गिंग)—vigorously rhythmical (of gait, melody) तालबद्ध, तालसुरांत असलेला.

Swing'le, *n.* (स्विं'ङ्गल्)—a flax-beating instrument, swinging bar of flail. झोडण्याचें दांडकें; मोगऱ्याचा फिरता दांडा (धान्य झोडण्याचा). *v. t.* to beat (flax). (ताग, अंबाडी) झोडणें. *S.-tree*, cross-bar pivoted in middle. (गाडीचा, नांगराचा) मधला आडवा दांडा. *Swingling-tow*, तागाचा,-अंबाडीचा,-काथ्या, काठेरा.

Swipe, *v. i. & t. & n.* (स्वाइप्)—(Crick.) to hit hard and recklessly, slog. (चेंडू) जोरानें वाटेल तसा टोलावणें, लगावणें, फटकावणें. *n.* फटकावणें, टोला. *Swip'er*, *n.* [var. of sweep]

Swipes, *n. pl.* (स्वाइप्स्)—washy or inferior beer. हलकी दारू.

Swirl, *v. i. & t. & n.* (स्वर्ल्)—whirling motion of water, air, etc.; eddy. (पाण्याची, हवेची) फिरती गति, भोंवऱ्यासारखें फिरणें; भोंवरा.

Swinge, *v. t.* (स्विंज्)—to strike hard. खूप मार देणें, जोरानें मारणें. *Swingeing*, (part.) huge. मोठा, प्रचंड, अतिशय.

Swish, *v. t. & i.* (स्विश्)—to flog with birch; audibly cut (air, flower) with a cane. छम छम छड्या मारणें; चमकावणें, छमकावणें; छडीनें (आवाज करून) हवा कापणें, फूल तोडणें. *n.* (छडीचा, चाबकाचा) छम् छम् आवाज, छमकन् लगावलेला तडाखा. [imit.]

Swiss, *a. & n.* (स्विस्)—(a native) of Switzerland. स्वीत्झर्लंडचा (रहिवासी). *S.-roll*, एक प्रकारचें पूरणयुक्त खाद्य पक्वान्न.

Switch, *n.* (स्विच्)—flexible shoot cut from a tree; kinds of mechanism for making and breaking connexion of electric circuit, &c. काठी, छडी; विजेचा प्रवाह (चालू किंवा बंद करण्याकरितां) फिरवणारी कळ, विजेचा खुंटा,-दांडा, (आग-) गाडीचा सांधा बदलणारी लोखंडी जीभ. *v. t. & i.* to whip with a switch; swing round quickly, transfer (train, current) with switch; (*fig.*) direct (thoughts) to another subject; turn (light, current) *off* or *on*; put (user of telephone) *on* to or cut him *off* from another. चमकावणें, शिरपुटणें; झटकणें, चटकन् हालवणें,-फिरवणें; विजेच्या कळीनें गाडी दुसऱ्या रुळावर घालणें,-विद्युत्प्रवाह बदलणें; (अलं०) विचारांचें विषयांतर करणें; विद्युत्प्रवाह,-विजेचा दिवा-बंद करणें, सुरू करणें, मालवणें, लावणें; टेलिफोनचा

संबंध जोडणें,-तोडणें. *S.-back*, zigzag railway for steep slopes (used for amusement at fairs). (जत्रेच्या वेळचा खेळांतील उभ्या चढणीवरील) आगगाडीचा नागमोडी रस्ता.

Swiv'el, *n.* (स्वि'व्हल)—ring and pivot connecting two parts of something and enabling one of them to revolve without the other. भोवरकडी, फिरकी, कोयंडा. *S.-gun*, फिरती तोफ. *S. bookrest*, पुस्तकाची उघडझापीची अडणी. *S. eye*, तिरवा डोळा, तिरपी नजर. *v. t. & i.* to turn on swivel. फिरकीवर फिरवणें,-फिरणें. *Swiv'elled, a.*

Swollen, Swolen, *pa. p.* of Swell.

Swoon, *v. i. & n.* (स्वून)—to faint, to sink into a fainting fit; (of music) die languidly away, a fainting fit. मूर्च्छा येणें; सुस्तपणें एकूं येईनासें होणें; मूर्च्छा, मूर्च्छना, झीट. *Swoon'ingly, adv.*

Swoop, *v. i.* (स्वूप्)—to come down with the rush of a bird of prey; to make a sudden attack, snatch up. झडप घालणें; एकदम हल्ला करणें; एकदम उचलून घेणें, एका झेंपेस उचलणें. *n.* pouncing of a rapacious bird of prey; sudden raid. झडप, आकस्मिक हल्ला. *At one fell s.*, एका भयंकर झेंपेसरशी, एकदम आवेशानें,-तडाख्यांत.

Swop, Swap, *v. t. & i.* (स्वॉप, स्वॅप्)—to exchange, barter. मोबदला करणें, साटेंलोटें करणें. *Never s. horses while crossing the stream*, आणीबाणीच्या प्रसंग निघून जाईपर्यंत फिरवाफिरव,-उलटापालट,-करूं नये.

Sword, *n.* (सोअर्ड्)—a warlike offensive weapon with long blade for cutting or thrusting; (Mil. sl.) bayonet. तलवार, समशेर; संगीन. *Court, dress, s.*, राजदरबारी पोषाखाबरोबर लावण्याची तलवार. *The s. of the spirit*, ईश्वरी,-दैवी,-शब्द. *To cross* or *measure ss.*, have fight or open rivalry *with*, शीं दोन हात करणें, भांडणतंटा करणें. *Draw the s.*, तलवार उपसणें, युद्ध सुरू करणें. *Sheathe the s.*, तलवार म्यानांत घालणें,-म्यान करणें, युद्ध-लढा-बंद करणें. *Throw* one's *s. into the scale*, back claim etc. with arms. तलवारीच्या जोरावर मागणी करणें. *Put to the s.*, (शत्रूला, जिंकलेल्यांना) कापून काढणें, ठार मारणें. *Fire and s.*, rapine. (चढाई करणाऱ्या सैन्यानें केलेली) जाळपोळ, नाश. *The s. of justice*, न्यायाची तलवार, न्यायाधिकार. *The s*, युद्ध; लष्कर; लष्करी सामर्थ्य. *S-arm*, उजवा हात. *S.-bearer*, असिधर राजपुरुष. *S. bill*, long-billed humming bird. लांब चोंचीचा पक्षी. *S. cane*, गुप्ती (ची काठी). *S.-cut*, तलवारीचा घाव,-जखम. *S.-fish*, large Atlantic fish with upper jaw elongated to sharp weapon. खड्गमत्स्य. *S.-law*, military domination. लष्करी वर्चस्व. *S.-play*, fencing; (*fig.*) cut and thrust argument. सखड्ग द्वंद्वयुद्ध; वाक्प्रहार. *Swordlike, -less, aa.*; *-proof, a.*

Swords'man, *n.* (सॉर्ड्झ्मन्)—a person of some skill in use of a sword. धारकरी. तलवारबहाद्दर. *-ship, n.*

Swore, *pa. t.* **Sworn**, *pa. p.* of Swear.

Swot, *v. i. & t.* (स्वॉट)—(school *sl.*) to work hard (at books); *S. up*, study hurriedly; (U. S.) hit hard. (पुस्तकांची) घोकंपट्टी करणें, जोराचा अभ्यास करणें; घाईघाईनें वाचणें; जोरानें लगावणें,-तडाखा देणें. *n.* मेहनतीनें केलेला अभ्यास, कसून प्रयत्न, कसून अभ्यास करणारा.

Swum, *pa. p.* of Swim.

Swung, *pa. t. & pa. p.* of Swing.

Syb'arite, *n.* (सि'बराइट्)—an inhabitant of ancient Greek colony or Sybaris in Italy (noted for luxury); a luxurious effiminate person. ऐषआरामाविषयीं प्रसिद्ध अशा सिबरिसचा रहिवासी; ऐषआरामी स्त्रैण मनुष्य. *Sybarit'ic, a., -ally, adv.*

Syc'amore, *n.* (सि'कमोअर्)—a large timber tree. एक (इमारती लांकडांच्या उपयोगाचा) वृक्ष.

Syce, *See* Sice.

Sychnocar'pous, *a.* (सिक्नोका'र्पस्)—(Bot.) bearing fruit several times before dying. पुष्कळ वेळां फळें देणारा (वृक्ष, उ० आंबा).

Syco'nium, *n.* (सायकों'निअम्)—(Bot. *pl.-ia*) fleshy receptacle developing into multiple fruit. संयुक्त फळ (अंजिर इ.).

Syc'ophant, *n.* (सि'कोफन्ट्)—a flatterer. आर्जवी, खुशामती, हांजीहांजी करणारा. *Sycophancy, n. -phantic, a.*

Syco'sis, *n.* (सायको'सिस्)—barber's itch. वस्तरा लागून आलेल्या पुटकुळ्या.

Sy'enite, *n.* (सा'यइनाइट्)—kind of grey crystalline rock. एक प्रकारचा करड्या रंगाचा स्फटिकमय खडक, फत्तर.

Syll'able, *n.* (सि'लेबल)—word or part of word containing one vowel-sound. शब्दावयव, अक्षर. *v. t.* अवयव पाडून उच्चार; स्पष्ट उच्चारणें. *Not a s.!* अवाक्षर बोलूं नकोस! *Syllab'ic, a.* अवयवी, अवयवांचा, अवयवदर्शक, अवयव तोडून उच्चारलेला.

Syll'abus, *n.* (सि'लॅबस)—(*pl. -bi, -buses*), abstract of subjects of a lecture or course; programme of hours. अभ्यासक्रम, यादी, माहितीपत्रक, कार्यक्रम.

Syll'ogism, *n.* (सि'लाजिझम्)—form of reasoning consisting of two propositions; called major and minor premise, from which a third—the conclusion is deduced. वाक्यसमन्वय, अनुमान. *Syllogis'tic, a.* अनुमानाचा. *Syllogise, v. i. & t.* अनुमान मांडणें, अनुमानाच्या आकारांत बसविणें.

Sylph, *n.* (सिल्फ्)—elemental spirit of the air; a girl or woman of slender frame. वायुदेवता, परी; सडपातळ मुलगी, तन्वंगी. *S.-like, a.*

Sylvan, *See* Silvan. वन्य, वनाचा.

Sym'bol, *n.* (सि'म्बल्)—an emblem or representation of something; mark or character. चिन्ह, संज्ञा; खुण, निशाणी, संकेताक्षर.

Symbol'ic, -al, *aa.* (सिम्बॉ'लिक्,-कल)—pertaining to or of the nature of a symbol; emblematic;

figurative. खुणेचा, चिन्हाचा; सांकेतिक; संज्ञिक; द्योतक, सूचक, दर्शक; गर्भित, लाक्षणिक. *Symbol'ically, adv.* संकेतानें, खुणेनें, संज्ञेनें.

Sym'bolize, *v. t.* (सि'म्बलाइझ्)—to be a symbol of; represent by symbols; treat as symbolic. चें चिन्ह, ची खूण-असणें; संज्ञांनीं दर्शविणें, संकेतांनीं व्यक्त करणें; द्योतक,-सूचक,-म्हणून समजणें. *Sym'bolism, n.* संकेतपद्धति, चिन्हयोजना.

Symm'etry, *n.* (सि'मिट्रि)—right proportion of parts; proportion; harmony; (Bot.) possession by flower of sepals, petals, stamens and pistils, in multiples of the same number. सममाण, प्रमाणबद्धता; एकवाक्यता, (Math.) सारखेपणा, समप्रमाण; (Bot.) (फुलांतील पाकळ्या वगैरेंच्या) सम्मितकार, सममाण. *Symmet'ric,-al, aa.* (मध्यरेषेपासून दोन्ही बाजूंना) समप्रमाण असलेला, समप्रमाणांतला, बांधेसूद, वळणदार; (Bot.) सम्मिताकार;-*rically, adv. Symmet'rian,-tri'cian, -trist, nn.* प्रमाणबद्धतेवर जोर देणारा मनुष्य. *Symm'etrize. v. t.* प्रमाणशीर करणें;-*zation, n.*

Sympathet'ic, *a.* (सिम्पथे'टिक्)—expressing or feeling sympathy; compassionate, capable of evoking sympathy, appealing to reader. सहानुभूतीचा, सहानुभूतिदर्शक, सहानुभूतिपूर्ण, कनवाळू, दयाळू; (med.) आनुकंपिक; मनोग्राही, मनावर पकड बसविणारा, परिणामकारक. *n.* sympathetic nerve or system; person peculiarly sensitive to (hypnotic.) influence. आनुकंपिक मज्जातंतु, वशीकरणानुकूल, वश्य मनुष्य. *S. ink*, writing done with which is invisible till brought out by some agency. (ज्या शाईनें कागदावर लिहिलें असतां प्रथम दिसत नाहीं, पण कागदाला उष्णता वगैरे दिली असतां अक्षरें दिसूं लागतात अशी) चोर शाई, गुप्त शाई. *Sympathet'ically, adv.* सहानुभूतिपूर्वक.

Sym'pathize, *v. i.* (सि'म्पथाइझ्)—to feel or express sympathy (*with*). सहानुभूति वाटणें, कळवळा येणें, कळवळणें.-*r, n.* सहानुभूति वाटणारा, कळवळा दाखविणारा.

Sym'pathy, *n.* (सि'म्पथि)—fellow-feeling (*with*), participation in feeling (*with*); compassion *for*; agreement in opinion or desire. सहानुभूति; कळवळा; प्रकृतिसाम्य, स्वभाव. [L. *syn*, with; pathos feeling]

Sym'phony, *n.* (सि'म्फनि)—harmonious sounds, a consonance of sounds agreeable to the ear; instrumental prelude; interlude, or close to a song accompaniment. स्वरमेळ, स्वरैक्य; पद्याला-गाण्याला,-असलेली सुरावनाची (सुरावटीची) साथ. *Symphon'ic, a.; Sympho'nious, a.* स्वरैक्याचा, स्वरमेळाचा.

Sympo'dium, *n.* (सिम्पो'डिअम्)—(Bot.) a stem whose successive sections are strictly branches each springing from the preceding. एकमार्गी नियमित शोंडा अग्रस्कंध (उ० द्राक्षाची वेल.)

Sympos'ium, *n.* (सिम्पो'झिअम्)—(*pl.-sia*) philosophical or other friendly discussion; ancient Greek drinking-party; any drinking party; a set of articles on one subject by various authors. तत्त्वज्ञानविषयक किंवा अन्य वादविवाद; प्राचीन ग्रीक नाचगाण्याची मजलस; मद्यपानमंडळ; (एकाच विषयावरील निरनिराळ्या लेखकांचे) चर्चालेख. *Sympo'sial, a.* [Gk *sym*, together; *posis*, a drinking]

Symp'tom, *n.* (सि'म्टम्)—manifestation in the body that indicates disease; sign of the existence of something. रोगाचें लक्षण,-ची खूण, चिन्ह; निशाणी, खूण, लक्षण, चिन्ह. *Subjective ss.*, फक्त रोग्यालाच कळून येणारीं रोगाचीं चिन्हें. *Objective ss.*, इतरांना दिसून येणारीं रोगाचीं लक्षणें. *Symptomatic, a.* सूचक, दर्शक, बोधक.

Syn'agogue, *n.* (सि'नॅगॉग)—Jewish congregation, its place of meeting. ज्यू लोकांची भजन-सभा; ज्यू लोकांचें देऊळ.-*gogical, a.*

Synarthro'sis, *n.* (सिनॅर्थ्रो'सिस्)—(pl.-oses), immovable articulation. अचलसंधि, स्थिरसंधि.-*throus, a.* स्थिर, अचल. [Gk *syn*, together; *arthron*, joint]

Syn'carp, *n.* (सि'न्कार्प्)—a multiple fruit (e. g. black-berry, *fig.*) संयुक्त फळ (अंजीर, सिताफळ, रामफळ, इ.).-*ous, a.* संयुक्त स्त्रीकेसरदली, संयुक्त कार्पेली (उ. काकडी, भेंडी). [Gk *karpos*, fruit]

Synchondro'sis, *n.* (सिंकॉन्ड्रो'सिस्)—nearly immovable articulation of bones by layer of cartilage. कूर्चास्थींच्या साहाय्यानें झालेला संधि, कूर्चास्थिसंश्लिष्ट संधि.

Synch'ronous, *a.* (सिं'क्रॉनस्)—happening at the same time, simultaneous (with). एककालिक, समकालीन, समकालिक.-*ly, adv.*

Sync'hronize, *v. t. & i.* (सिं'क्रनाइझ्)—to agree in time; occur at the same time; ascertain the correspondence in date of (events); regulate a clock by some standard. समकालिक असणें; एकाच वेळीं घडणें,-होणें; समकालिकता ठरविणें, युगपद्भाव दाखवून देणें; प्रमाणभूत वेळा बरोबर (घड्याळाबरोबर) दुसरें घड्याळ लावणें.-*zation, n.* एककालिक करणें,-असणें,-होणें; एककालिकता. [Gk *syn*, with; *khronos*, time]

Synclas'tic, *a.* (सिंक्लॅ'स्टिक्)—concave or convex all over (opp. *anticlastic*). सर्व बाजूंनीं अंतर्गोल किंवा बाह्यगोल, सर्वान्तर्गोल, सर्व बाह्यगोल. [Gk *syn* & *klao*, break]

Sync'opate, *v. t.* (सिं'कपेट्)—to shorten by omission of interior letter (s) (e. g. *Symbology* for *Symbololoy*); (Mus.) invert rhythm of note or tone. मध्याक्षरलोप करून (शब्द) आखूड करणें; (पदाच्या सुरावटीचा) क्रम बदलणें.-*pa'tion, n.*

Sync'ope, *n.* (सिं'कोपि)—syncopation; (*Med.*) fainting. मध्याक्षरलोप; सुरावटीचा क्रमपालट; मूर्च्छा, झीट येणें.

Sўn'dic, *n.* (सिन्-डिक्)—one of certain members of the Senate. एकाद्या कार्यकारी मंडळाचा,-सभेचा, -सभासद.

Sўn'dicalism, *n.* (सिंन्डिकलिझम्)—a movement among industrial workers having as its object the transfer of the means of production and distribution from the hands of present owners to unions of workers. (कामगार संघाच्या हातीं उद्योगधंदे,-त्यांतील मालाचें उत्पादन व विक्रीकरण हीं यावीं या हेतूनें चाललेली) (धंदे-) कामगार चळवळ.

Sўn'dicate, *n.* (सिंन्डिकट्)—committee of delegates or syndics, the office of syndics; combination of commercial firms. कार्यकारी मंडळ, व्यापारी, -मंडळ,-संस्था.-*tion*, *n.* व्यापारी मंडळाची स्थापना.

Sўne, (साइने)--*Sc.* for *Since*,. पासून, पूर्वी.

Sўnĕc'dochė, *n.* (सिनेक्डॉकि)—(*Gram.*) extended acceptation by which a part may be named for the whole (e. g. 50 *sail*, i. e. ships). उपलक्षण, लक्षणा (अलंकार).

Sўn'gĕnesis, *n.* (सिंन्जेनिसिस्)—(Bot.) formation of embryo partly from the male and partly from the female element. परागकोशगर्भसंयोग, परागकोशगुच्छ (उ० माका, पांढर सोटी).

Sўn'ŏd, *n.* (सिनॉद्)—assembly of a Church for deliberation, a convention; (Astron.) conjunction of planets or stars. धर्मोपाध्यायसभा, चर्चेचें कोर्ट; ग्रहांची किंवा ताऱ्यांची युति.-*ic*,-*ical*,-*al*, *aa.*; -*ically*, *adv.* [Gk *syn*, & *hodos*, way, *sunodos*, meeting]

Sўn'ŏnўm, *n.* (सिनॉनिम्)—a word identical in sense and usage with another. प्रतिशब्द, पर्याय, पर्यायशब्द, समानार्थक शब्द. *Synon'ymous*, *a.* (*with*), पर्यायवाचक; समानार्थदर्शक;-*ly*, *adv.*

Sўnŏn'ўmў, *n.* (सिनॉनिमि)—redundant collocation of synonyms for emphasis (e.g. *in any shape or form*); treatise on synonyms. पर्यायशब्दांची निरर्थक योजना; प्रतिशब्दसंग्रह.

Sўnŏp'sĭs, *n.* (सिनॉप्सिस्)—(pl.-*pses*) summary; conspectus, a brief statement of topics. सारांश; सार, गोषवारा. *Synop'tic*, *a.* सारांशाचा, सारांशभूत, सारभूत;-*al*, *a.* ,-*ally*, *adv.*

Sўnō'via, *n.* (सिनोव्हिआ)—(*med.*) albuminous fluid secreted by membranes in interior of joints. सांध्यांतील त्वचेच्या आशयांत असणारा अंड्यांतील बलकासारखा पदार्थ, श्लेषक, वंगण.-*vial*, *a.* श्लेषकाचा, श्लेषकोत्सर्जक.

Sўnovi'tis, *n.* (सायनव्हाइटिस्)—inflammation of the membrane secreting the lubricating fluid in a joint. संधिगतत्वग्दाह, संश्लेषिकदाह.

Sўn'tăx, *n.* (सिंन्टॅक्स्)—the sentence construction or its rules (in grammar). वाक्यरचना व त्याचे नियम. *Syntac'tic*, *a.* वाक्यरचनेचा, वाक्यरचनेसंबंधीं;-*ally*, *adv.* *Syntac'tics*, *n. pl.* (Math.) branch of mathematics relapsing to the number of ways of putting things together under conditions. वस्तुसमीकरण.

Sўn'thĕsĭs, *n.* (सिंन्थिसिस्)—(pl.-*theses*), combining of elements or parts into a system or whole; (Chem.) artificial production of compounds from their constituents; (Surg.) joining of divided parts. संयोग, संकलन, एकीकरण; संयोगीकरण. *Syn'thesize*,-*tize*, *v. t.* संयोगीकरण करणें.

Sўnthĕt'ic,-**al**, *aa.* (सिन्थेटिक्,-कल्)—proceeding by or resulting from synthesis; artificial. संयोगीकरणाचा,-करणात्मक, कृत्रिम. *S. rubber*, (मूळ द्रव्यांच्या संयोगीकरणानें तयार केलेला) कृत्रिम रबर. -*tically*, *adv.* संयोगीकरणद्वारा.

Sўn'tony, *n.* (सिंन्टनि)—the tuning to each other of wireless telegraphy apparatuses. बिनतारी संदेश यंत्रांचा संदेश देण्याघेण्याचा मेळ घालणें,-एकाच लहरींच्या लांबींत जुळविणें.-*tonic*, *a.*;-*tonize*, *v. t.* ;-*tonizator*, *n.* बिनतारीचा ग्राहक (यंत्र).

Sў'pher, *v. t.* (सायफर्)—to join (planks) with overlapping edges into flush surface. (फळ्यांचा) जोडसांधा करणें. *S.-joint*, असा केलेला जोडसांधा.

Sўph'ĭlĭs, *n.* (सिफिलिस्)—an infectious venereal disease. गर्मी, उपदंश, फिरंगोपदंश (सांसर्गिक रोग). *Primary s.*, प्रथमावस्थेंतील उपदंश. *Secondary s.*, द्वितीयावस्थेंतील उपदंश. *Tertiary s*, अस्थि, स्नायु व मेंदू यांवर परिणाम करणारा, तृतीयावस्थेंतील उपदंश. *Syphilit'ic*, *a.* गर्मीच्या रोगासंबंधीं, उपदंशाचा.

Syphon, **Syren**, *See* Si-.

Sўr'iăc, *n.* & *a.* (सिरिॲक्)—(in) the language of ancient Syria. प्राचीन सिरिअन् भाषा (-यंतील). *Sy'rian*, *a.* & *n.* सिरिआचा (रहिवासी).

Sўring'a, *n.* (सिरिंगा)—a shrub with white scented flowers. पांढऱ्या झुपकेदार फुलांचें फुलझाड.

Sў'rĭnge, *n.* (सिरिंज्)—a tube with nozzle and piston into which liquid is drawn to be ejected in stream. पिचकारी, (नाकपाची) पिचकारी. *v. t.* to wash by a syringe. पिचकारीनें धुणें,-औषध घालणें. *Hypodermic s.*, a needle pointed one for hypodermic injections. अंगांत औषध टोंचण्याची सूच्यग्र पिचकारी. -*ful*, *n.* [Gk *syringx*, a reed]

Sў'rĭnx, *n.* (सिरिंक्स्)—(pl.-*es*,-*nges*) a pan--pipe; (Archaeol.) narrow rock-cut gallery. पोरूचे पिपेरें, नलिका; खडकांत खोदलेली अरुंद गच्ची.

Sў'rŭp, *n.* (सिरप्)—water thickened with sugar. सरबत; साखरेचा पाक.-*y*, *a.*

Sўstăl'tic, *a.* (सिस्टॅल्टिक्)—contracting and dilating by turns, pulsatory. आळीपाळीनें,-एकसारखें,-उघडझांप होणारें, धडधडणारें.

Sўs'tem, *n.* (सिस्टिम)—organization; method; (principle of) classification; complex whole;

set of connected things. रचना; पद्धत; व्यवस्था, क्रम; व्यूह, रचना, माला; (Bot.) वर्गीकरण. *Mountain s.*, पर्वतांची रांग,-रांगा. *River s.*, नदी व तिचे फांटे; देशांतील नद्यांची रचना. *Solar s.*, सूर्यमाला. *The s.*, the body as a functional whole. सर्वशरीर (भर). *S.-less, a.*

Sўstĕmăt'ic, *a.* (सिस्टिमॅ'टिक्)—methodical; according to a plan or regular method. पद्धतशीर; व्यवस्थित, वर्गीकरणात्मक, व्यूहात्मक.*-ally, adv.*

Sў's'tĕmatize, *v. t.* (सि'स्टिमटाइझ्)—to arrange methodically, to reduce to a system. व्यवस्थित किंवा पद्धतशीर लावणें, पद्धति बसविणें, व्यवस्था लावणें, वर्गीकरण करणें.*-za'tion, n.*

Sўstĕm'ic, *a.* (सिस्टे'मिक्)—of the bodily system of a whole. सर्व शरीररचनेसंबंधीं.*-ally,adv.*

Sў's'tolē, *n.* (सि'स्टलि)—contraction of heart etc. alternating with diastole. (हृदयाची वगैरे) आकुंचनक्रिया, संकोच. *Sys'tolic, a.* हृत्संकोचाचा. *S. murmur*, हृत्संकोचमर्मर.

Sў's'tyle, *a.* (सि'स्टिल्)—with columns set comparatively close together. जवळजवळ बसविलेल्या खांबांचा,-स्तंभांचा. *Sys'tylous, a.* (Bot.) संयुक्तस्त्रीकेसरदंड.

Sўz'ўgў, *n.* (सि'झिजि)—(astron.) conjunction or opposition. युति, षड्भांतर, पर्वस्थान. [Gk *suzugia*, union]

T

T, t, (टी)—twentieth letter of the English alphabet. इंग्रजी वर्णमालेंतील विसावा वर्ण. (attrib.) T-shaped (thing). T या आकाराची वस्तु. *To a T.*, exactly. अगदीं तंतोतंत, बरोबर, एकदम, थेट. *To cross the T's, (fig.)* be minutely accurate, emphasize a point. बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष देणें; एखाद्या मुद्यावर विशेष जोर देणें. *pl. Ts, T's.*

Taal, *n.* (टाल्)—*The t.*, Cape Dutch language. दक्षिण आफ्रिकेच्या डच लोकांची भाषा.

Tăb, *n.* (टॅब्)—a small flap, strip or tongue attached to a material; (Mil.) mark on collar. (बुटाच्या डोळ्याखालची चामड्याची) जिभली; बुटाची फीत, बुटाच्या बंदाचें टोपण; शोभेची फीत, शोभेचें फूल; (लष्करी) गळपट्टीवरील (विशिष्टाधिकारदर्शक) खूण,-चिन्ह. *Ear-t.*, टोपीचा कान. *Keep t.* or *tt. on*, (colloq.) चा हिशेब ठेवणें, वर नजर ठेवणें.

Tăb'arĕt, *n.* (टॅबरिट्)—fabric of alternate satin and watered-silk stripes. एक प्रकारचें पटेरी कापड.

Tăbasheer',-shir', *n.* (टॅबशि'अर्)—kind of opal found in joints of bamboo and used in *E.* Ind. medicine. तवकील, तवकीर, त्वक्षीर. [Hindi & Arab.]

Tăbb'ў, *n.* (टॅबि)—kind of watered silk (attrib.); a streaked cat; a female cat; a gossiping woman; old maid; kinds of moth; kind of concrete. लाटांच्या रंगाचें रेशमी (कापड); वांड्या रंगाचें पट्टेरी मांजर; मांजरी; गोष्टीवेल्हाळ बाई, बुढ्ढी; पतंग; कांक्रीटचा प्रकार. *v. t.* (कापडा) झगझगीत करणें.

Tăb'ernăcle, *n.* (टॅबर्नॅकल्)—a temporary habitation; a nonconformist meeting-house, a place of worship; canopied niche; receptacle for pyx; (U.S.) large church; (*fig.*) human body. तंबू, राहटी, तात्पुरतें वसतिस्थान; पूजास्थान, ज्यू लोकांचें भजन,-प्रार्थना,-मंदीर; साधुसंतांच्या मूर्ति ठेवण्याचा कोनाडा, देव्हारा; पवित्र (भाकरीचें पात्र ठेवण्याची) पेटी; मोठें प्रार्थनामंदीर; (अलं०) मनुष्यदेह. *v. i. & t.* dwell temporarily, provide with shelter. कांहीं दिवस राहणें,-आश्रय देणें.*-d, a.*

Tā'bēs, *n.* (टे'बीझ्)—(med.) emaciation. किरी, क्षयरोग. *Tabet'ic, a. & n.* किरी लागलेला, क्षयरोगी (मनुष्य).

Tăb'inĕt, *n.* (टॅबिनिट्)—watered fabric of silk and wool. झगझगीत रेशमी व लोंकरी कापड.

Tă'blāture, *n.* (टॅब्लेचर्)—mental picture; graphic description. काल्पनिक चित्र; हुबेहुब वर्णन.

Tā'ble, *n.* (टे'बल्)—a piece of furniture with flat top on which things may be placed; slab of wood or stone, matter written on this; a horizontal slab; set of facts or figures arranged in columns; each half of folding table; level area; (palmistry) palm; company seated at (dinner etc.) table; food provided at table; each of two bony layers of skull. मेज, टेबल; फळीचा तुकडा, शिला,-लेख; पत्रक, तक्ता, कोष्टक; घडीच्या मेजाचा प्रत्येक भाग; सडा, डोंगरसपाटी; तळवा हात; जेवणारी मंडळी; जेवणाचे पदार्थ; डोक्याच्या कवचीच्या दोन अस्थिमय थरांपैकीं एक थर. *v. t.* to lay (measure etc.) on the table; tabulate; set timbers together; strengthen (sail). मागें टाकणें, तहकूब ठेवणें; कोष्टकें पाडणें, तक्ता तयार करणें; इमारती लांकडें एकत्र जुळवून ठेवणें; (शिडाला) मजबुती आणणें. *At t.*, while taking meal. जेवणावर, जेवतांना. *Under the t.* भोजनोत्तर दारू पिऊन झिंगलेला. *Round-t.*, गोलमेज. *Tt. of weights and measures*, वजनमापाचीं कोष्टकें. *T. of contents*, अनुक्रमणिका, सूची. *Turn the tt.* (*on* person), reverse relations. स्थिति बदलणें, उलटापालट करणें, (वर) बाजू उलटवणें. *Lay, lie, on the t.*, postpone, be postponed, indefinitely. बिनामुदत तहकूब करणें,-ठेवणें. *T. cloth*, मेजाची (शोभिवंत) चादर, मेजावरील कपडा. *T.-cut*, (of gem) cut with flat top. सपाट छेंट्याचें रत्न. *T. lifting,-moving*, दैवी सामर्थ्यद्योतक म्हणून मेज उचलणें,-हालणें (वगैरे प्रयोग करणें). *T. money*, लष्करी व आरमारी वरिष्ठ अधिकाऱ्यांना भोजनखर्चासाठीं मिळणारा पैसा, मंडळाच्या सभासदाचा भोजनखर्च. *T. talk*, भोजनाच्या वेळच्या गप्पा-गोष्टी. *T. water*,

जेवतांना पिण्याचें पाणी. *T.-ful, a.* [L. *tabula*, a board]

Tă'blelănd, *a.* (टे'बल्-लॅन्ड)—level tract at higher level than surrounding country. डोंगरसपाटी, पठार.

Tăb'leau, *n.* (टॅब्लो)—(*pl.-caux*-लोज्), a dramatic or effective situation suddenly brought about. नाटकांतील परिणामकारक सीन, आकस्मिक घटना, -देखावा. *T. vivant,* (टॅब्लोव्हीव्हां) मूक व स्तब्ध नटांचा वगैरे मिळून होणारा देखावा. *T. curtains,* (theatr.) pair of curtains to draw across and meet in the middle of the stage. (नेहमींच्या वरून खालीं येणाऱ्या दर्शनी पडद्याऐवजीं) दोन बाजूंनीं सरकत येऊन (मधोमध) मिटणारा दर्शनी पडदा. [F=picture]

Table d'hōte, *n.* (टाब्बल् हो'ट्)—common table for guests at hotel. खानावळींतील पाहुण्यांची जेवण-खाणाची सोय. [F=table]

Tăb'lĕt, *n.* (टॅब्लिट्)—a small slab ; a dose of some drug in the form of a small slab. पत्रिका, पट, पाटोळी पाटी, लेखशिला ; वडी.

Tăb'loid, *n.* (टॅब्लाइड्)—compressed dose of a drug. औषधी वडी.

Tăbōō', *n.* (टबू')—setting apart of a person or thing as accursed or sacred ; a ban or prohibition by general consent. वाळींत टाकणें, बाजूला काढणें; मनाई, भोगनिषेध, निषेध. *a.* inviolable or prohibited. न मोडतां येणारा, मनाई असलेला. *v. t.* to put under taboo, interdict approach to. मनाई करणें, निषिद्ध ठरविणें. *Tabooed', pa. t. & pa. p.*

Tā'bor, *n.* (टे'बर्)—a small drum. ढोलकें, पखवाज.

Tăb'ouret, *n.* (टॅबरिट्)—a low stool ; an embroidery frame. तिवई, घडवंची ; भरतकामाची चौकट.

Tăb'ūla, *n.* (टॅब्यूला)—(*pl.-ae*) (Anat.) hard flat surface (of bone etc.). (हाडाचा वगैरे) कठीण व सपाट पृष्ठभाग. *T. rasa,* पुसलेला फलक; (अलं०) जन्मकाळचें (मनुष्यमाण्याचें) निर्विकार,-कोरें करकरीत, -मन. [L=board]

Tăb'ūlar, *a.* (टॅब्यूलर्)—shaped like a table-top or board ; flat like a table ; displayed systematically in columns or in the form of a table ; (formed) in thin plates. सपाट, सपाटीचा ; तक्त्याच्या रूपाचा, तक्ता काढलेला, कोष्टकांत दाखविलेला ; पातळ थरांचा.*-ly, adv.*

Tăb'ūlate, *v. t.* (टॅब्युलेट्)—to arrange (figures etc.) in tabular form ; give flat surface to. (आंकडे इ.) कोष्टकवार लिहिणें, तक्ता तयार करणें ; सपाट (पृष्ठभाग) करणें. *a.* सपाट (पृष्ठभागाचा), पातळ थराचा. *Tabula'tion, n,-tor, n.*

Tăch (e), *n.* (टॅच्)—(Bibl.) a clasp, link. अडसर, दुवा, सांधा.

Tachŏm'eter, *n.* (टकॉ'मिटर्)—an instrument for measuring velocity. वेगमापकयंत्र.*-try, n.* [Gk *takhos*, speed]

Tachўcard'ia, *n.* (टॅकिका'र्डिआ)—(path.) abnormally rapid heart-action as a disease. शीघ्र-हृत्क्रिया, हृदयाची क्रिया जलद चालणें (रोग-लक्षण).

Tachўg'raphy, *n.* (टकि'ग्रफि)—stenography, esp. that of ancient Greeks and Romans. (प्राचीन ग्रीक व रोमन लोकांची) शीघ्रलेखनकला, लघुलिपि. [Gk *takhus*, swift]

Tachў'meter, *n.* (टाकि'मिटर्)—surveyor's instrument for rapid location of points. जमीन-मोजणीचें यंत्र.

Tă'cit *a.* (टॅसिट्)—unspoken, not worded ; implied but not expressed. मूक, मुका ; ध्वनित, गर्भित.*-ly, adv.* पर्यायानें, न बोलतां, गर्भितार्थानें.

Tă'citŭrn, *a.* (टॅसिटर्न्)—given to silence, talking little, not inclined to converse. अबोलका, अल्प-भाषी, थोडें,-मोजकें-बोलणारा.

Tăcitŭrn'itў, *n,* (टॅसिटॅ'र्निटि)—habitual silence or reserve in speaking ; reservedness. मौन ; अबोलकेपणा.

Tăck, *n.* (टॅक्)—a small broad-headed nail (*pl.*) long stitches as temporary fastening (in needle-work) ; rope etc. for securing sail -corner ; direction in which vessel moves as determined by position of sails ; (*fig.*) course of action or policy ; (Naut.) food ; sticky condition. चूक, गुलमेख, टेकस ; लांब टाके ; शिडाचें टोंक घट्ट बांधण्याचा दोर, वासरूं ; जहाजाची दिशा ; युक्ति, डावपेंच, डाव ; खाणेंपिणें, अन्न ; चिकटपणा, ओलेपणा. *v. t. & i.* to nail with tacks ; stitch lightly together ; annex or append to ; (Naut.) make tack ; (*fig.*) change one's policy. टांके-टांचे, -मारणें ; धांवते (लांब) टांके मारणें ; ला जोडणें ; (वाऱ्याप्रमाणें) वासरें व शिडें बदलणें, जहाजाची दिशा बदलणें, डावपेंच बदलणें. *We must change,* or *try another, t.,* आम्हांला दुसरा डाव (पेंच) टाकला पाहिजे. *Soft t.,* bread, good fare. भाकरी, चांगलें अन्न. *T. hammer,* खिळे काढण्याची-ठोकण्याची-हातोडी.*-er, n. Tac'kiness, n.* चिकटपणा. *Tacky, a.*

Tă'ckle, *n.* (टॅ'कल्)—ropes and pulleys used in working sails, &c. ; windlass with its ropes and hooks ; requisites for a tack or sport ; (Football) grasping or holding of opponent. गलबताचें (दोरखंडें, कप्या वगैरे) सामायन ; जहाजावरील नांगर उचलण्याचा रहाट व त्याचें सामायन ; धंद्याची किंवा खेळाची साधनसामुग्री, साहित्य ; फूटबॉलच्या खेळांत प्रतिस्पर्ध्याला धरून ठेवणें. *v. t.* to grapple with ; try to defeat (opponent), or solve (problem), or accomplish (task) ; (Football) seize and stop (player running with ball) ; secure by means of tackle. धरणें, पकडणें ; (शीं) झुंजणें, झटापट करणें, झगडणें ; धरून ठेवणें, पकडणें, थांबविणें ; दोरखंडांनीं घट्ट पकडणें. *Fishing t.,* मच्छीमारीचें सामायन, साहित्य. *T. block,* दोरखंड सरकविण्याची कप्पी. *T. fall,* rope connecting blocks of a tackle. कप्प्यांना जोडणारी दोरी. *To t. to,* (colloq.) कामाला जोरानें सुरवात करणें. *Tack'ling, n.* दोरखंडें, दोऱ्या, सामान, ठेवण ; जनावराचा साज. *v. t.* to grapple with ;

Tăct, *n.* (टॅक्ट)—delicate perception of the right thing to do or say; adroitness in dealing with others; (*Mus.*) stroke in beating time. (स्वाभाविक) हातोटी, कसब; युक्ति, हिकमत, डावपेंच, कला; तालाची टाळी.-*ful*, *a.* युक्तिबाज, हुशार, वस्ताद. -*less*, युक्ति नसलेला, बिनहिकमती.-*fully*, *adv.* युक्तीनें, हिकमतीनें, कौशल्यानें.-*lessness*, *n.*

Tăc'tical, *a.* (टॅक्टिकल्)—of tactics; adroitly planning or planned. (चालू) लढाईतल्या डावपेंचांचा, युक्तिप्रयुक्तीचा, कसबाचा.-*tically*, *adv.*

Tăcti'cian, *n.* (टॅक्टि'शन्)—one clever in tactics. (चालू) लढाईतील डावपेंच जाणणारा, युद्धयुक्तिकुशल, डावपेचांत कुशल.

Tăc'tics, *n.* (टॅक्टिक्स)—(sing or pl.) art of disposing military or naval forces in actual contact with enemy; (*pl.*) procedure adopted for carrying out a policy. (लढाई सुरू असतांचे) लष्करी व नाविक डावपेंच; पेंच, डावपेंच. [Gk *tasso*, arrange]

Tăc'tile, *a.* (टॅक्टाइल,-टिल्)—of, perceived by, having the sense of touch; (Paint.) having to do or producing the effect of solidity. स्पर्शाचा, स्पर्शमूलक, स्पर्शज्ञेय, स्पर्शेंद्रियाचा; घन (वस्तु) संबंधीं, घन (वस्तु) त्व दर्शक,-बोधक. Also, *tactual*, *a.* -*tually*, *adv.* *Tactil'ity*, *n.* *Tactile organ*,-*sense*, स्पर्शेंद्रिय, स्पर्शज्ञान.

Tăd'pōle, *n.* (टॅड्पोल्)—larva of frog, toad, etc., *esp.* while it presents only a round head and a tail. प्रथमावस्थेंतील बेडूक (फक्त डोकें व शेंपूट असलेला); बेडकीचें पोर, बेडकुली. *T.-fish*, मोठ्या सपाट डोक्याचा युरोपांतील मासा.

Tael, *n.* (टेल्)—Chinese weight ($1\frac{1}{3}$ oz), and money of account (about 3s.). चिनी लोकांचें (दीड औंसाचें) वजन, किंवा (तीन शिलिंगांच्या किंमतीचें) नाणें.

Tae'nia, *n.* (टी'निआ)—(*pl.*-*ae*) (Anat.) ribbon-like part, esp. of brain; roller bandage, tape-worm; head-band. (मेंदूचा) फितीसारखा भाग; बांधपट्टी; अंत्रपट्टकृमि; डोक्याला बांधण्याची फीत.-*nioid*, *a.* [Gk *tainia*, a ribbon or tape-worm]

Tăff'eta, *n.* (टॅफिटा)—kinds of thin, glossy silk or linen fabric. एक प्रकारचें तलम रेशमी किंवा तागी कापड, ताफता. [Pers. *taftah*, woven]

Tăff'rail, **Tăff'erel**, *n.* (टॅफ्रेल,-फ्रिल)—rail round stern of vessel; upper part of stern. गलबताच्या सुकाणूंभोंवतालचा कठडा; वरामाचा कठडा; वरामाचा वरचा भाग.

Tăff'y̆, *n.* (टॅफि)—(colloq.) a Welshman. वेल्श मनुष्य. 2 Toffee. एक साखरेचें गोड खाद्य.

Tăg, *n.* (टॅग)—a metal point of shoe-lace, &c.; a loose or ragged end; a stock phrase; addressed label; appendage; (Theatr.) closing speech; refrain of song; (tip of) animal's tail; ragged lock of wool on sheep; children's game in which one chases the rest. (दोरीच्या टोंकाला लावलेलें) धातूचें टोपण; झोल, झालर; टराविक शब्द, तेंच तेंच-नेहमीचें-वाक्य; माहितीचें,-पत्त्याचें,-पत्रक,-चिठ्ठी; (कपड्याला लावलेलें) फूल, शेंपूट, फीत; (नाटकांतील पात्राचा) सूचक शब्द, प्रेक्षकांना उद्देशून केलेलें भाषण; (गाण्याचें) ध्रुपद, पालुपद; गाण्याची शेंपटी,-तिचें टोंक; मेंढरावरील लोंकरीचें झुलूप; लपंडावीचा खेळ, शिवाशिवीचा (मुलांचा) खेळ. *v. t.* to furnish with tags; tack or fasten on (verses, rhymes, things, etc.); shear away tags from (sheep). (colloq.) follow closely; touch (person) in game of tag. कपड्याला शोभेचें फूल लावणें, माहितीची चिठ्ठी लावणें, फितीला टोपण लावणें; जोडणें, जुळवणें; मेंढरांचीं लोंकरीचीं झुलपें कातरणें,-भादरणें; पाठीमागून जाणें, पाठ न सोडणें; शिवाशिवीच्या डावांत (भिडूला) शिवणें. *T.-tail*, a kind of worm, sycophant. एक जातीचा किडा; तोंडपुजा, हांजीखोर मनुष्य. *T.-day*, (*U. S.*) सार्वत्रिक वर्गणी गोळा करण्याचा दिवस. *T. rag* and *bob-tail*, *n.* बाजारबुणगें, ग्वारपोर. *Tag'ger*, *n.* (*esp.*) शिवाशिवीच्या खेळांतील पाठलाग करणारा; (*pl.*) लोखंडी पत्रे.

Tail, *n.* (टेल्)—a member prolonging animal's body backwards; slender prolongation or appendage; lower or inferior or later part of something. शेंपूट, शेंपटी, पुच्छ, लांगूल; शेंडी, टोंक, (मिरवणुकीची, गाडीची) पिछाडी, (पतंगाचें) शेंपूट; (छपरांतील कौलांचा) उघडा भाग, पिछाडी, मागचा भाग. *v. t. & i.* to furnish with tail; (colloq.) remove the ends of (fruit); join *on to* another; dwindle away, fall off in size or number. (पतंगाला वगैरे) शेंपटी लावणें; (फळांचीं) टोकें छाटणें; जोडणें; कमी होणें, उतरणी लागणें; आकारानें,-संख्येनें,-कमी कमी होणें. *Dog has his t. between his legs*, (भीतीनें) कुत्र्यानें तंगडींत शेंपूट घातलें आहे; (*fig.* of person) (एखाद्यानें) भीतीनें-निराशेनें-शेंपूट घालणें. *Turn t.*, पाठ दाखवणें, पळ काढणें. *Cow's t.*, frayed end of rope etc. दोरीचे सुटलेले धागे. *T. gate*, lower gate of canal lock. कालव्याचा खालचा दरवाजा. *T.-light*, (आगगाडीचा, दुचाकीचा, मोटरगाडीचा) मागचा,-पिछाडीचा,-दिवा. *T. margin*, पुस्तकाच्या पानाच्या शेवटीं ठेवलेली कोरी जागा. *T. piece*, decoration in blank space at end of chapter, etc.; triangular piece of wood to which lower strings are ti[illegible] in a musical instrument. प्रकरणाच्या शेवटीं म[illegible] या जागेंत छापलेला शोभिवंत देखावा,-चित्र; तांतदाणी, [illegible]दाणी. *T. pipe*, पंपाचें पाणी वर खेंचून नेण्याची नळी, खेंचनळी *T. race*, part of mill race below wheel. पाणचक्कींतील पाणी पुढें जाण्याचा सखल पन्हळ, सखल पाट. *Tailed*, *tailless*, *aa.*

Tail, *n.* (टेल्)—(law) limited ownership. मर्यादित मालकी; व्यक्तिगत मालकीची मालमत्ता. *a.* (*estate t.*) limited by a tail. मर्यादित मालकीची.

Tail'ing, *n.* (टे'लिंग)—(esp.) unexposed end of brick or beam in wall; (*pl.*) refuse of grain, ore, etc.; blur in calico-printing. भिंतींतील बाहेर न आलेलें विटेचें किंवा तुळईचें टोंक; (अने०) कचरा, गाळसाळ; चिटावरील पुसट छाप.

Tail'or, *n.* (टे'लर्)—one whose occupation is to make outer garments, esp. for men. शिंपी, दरजी. *v. i. & t.* to be or work as a tailor; make clothes for. शिंप्याचा धंदा करणें; कपडे शिवणें. *The t. makes the man,* cf. एक नूर अदमीं, दस नूर कपडा. *Ride like a t.*, badly. गवाळ्यासारखें घोड्यावर बसणें. *T. bird,* सुगरण, सुतारपक्षी (पानें शिवून घरटें करणारा). *T. made,* (स्त्रियांचा, शिंप्यानें शिवलेला) तंग व साधा कपडा. *Tailor's cramp,* शिंप्याच्या बोटाला होणारा रोग. *Tail'oress, n.* शिंपीण. *Tail'oring,* शिवण-काम,-कामाचा.

Tain, *n.* (टेन्)—thin tinplate; tinfoil. पातळ पत्रा (जस्ताचा).

Taint, *n.* (टेन्ट्)—sullying spot, blemish, corruption. दोष, दूषण, कलंक, रोग, घाण, वास लागणें. *v. t. & i.* to introduce corruption or disease into. खराब करणें, कलंक लावणें, नासणें, बिघडणें. *Tainted goods,* (in trade-unionism). कामगारसंघाबाहेरच्या कामकऱ्यांनीं तयार केलेला दूषित माल.

Take, *v. t. & i.* (टेक्)—to lay hold of, seize, grasp, capture, win, gain; appropriate, steal; convey or conduct; assume possession of, procure; use, use up; require; remove, dispossess (person etc.) of; catch, be infected with, (cold etc.); conceive, experience, indulge; ascertain by measurement, inquiry, etc.; infer, conclude, interpret; accept, submit to; perform, execute, deal with; photograph. घेणें, धरणें, पकडणें; मिळवणें, संपादन करणें, जिंकणें; चोरणें; बरोबर नेणें,-घेऊन जाणें; बरोबर जाणें; मालक बनणें, घेणें; पिणें, खाऊनपिऊन टाकणें; (ची) आवश्यकता असणें; काढणें, नाहींसें करणें, हिरावून घेणें; (थंडी, ताप) होणें, जडणें, येणें; बाळगणें, वाटणें, अनुभवणें; मोज (माप) घेणें,-घेऊन पाहणें,-ठरवणें; अनुमान करणें, समजणें, उमजणें, (चा) विशिष्ट अर्थ लावणें; स्वीकारणें, ग्रहण करणें, सहन करणें; वृत्तींत आणणें, (काम) पुरें करणें, (प्रमाणें) वागणें; (छायाचित्र) घेणें, काढणें, उतरणें, निघणें. *Take one by the throat,* च्या गळ्याला हात घालणें. *Took first prize,* पहिलें बक्षीस मिळविलें. *Novel did not t.*, become popular. ती कादंबरी लोकप्रिय झाली नाहीं, खपली नाहीं. *Do you take the magazine?* तूं ह्या मासिकाचा वर्गणीदार आहेस का? *T. the French Revolution,* फ्रेंचराज्यक्रांतीचें (च) उदाहरण घ्या. *Do not t. advantage of his youth,* त्याच्या तरुणपणाचा गैरफायदा घेऊं नको. *T. your time,* do not hurry. घाई करूं नको. *It takes a lot of doing*, is hard to do. तें करायला कठीण (दुष्कर) आहे. *T. in hand,* करायला घेणें, सुरवात करणें, ची काळजी घेणें, हातीं घेणें. *How would you t. this passage?* ह्या उताऱ्याचा कसा अर्थ लावाल? *T. it for granted,* आहे असें गृहीत धरून चाला. *T. sides,* पक्षपात करणें. [Special uses with *nn.*] *To t. account of,* not overlook. हिशेबांत घेणें, जमेस धरणें. *T. aim,* नेम घेणें,-धरणें. *T. care,* काळजी घेणें, जपणें, संभाळणें. *T. care of,* ची काळजी घेणें, चा संभाळ करणें. *T.* one's *chance,* accept risk (of). डाव टाकून पाहणें, नशिबाची परीक्षा पाहणें. *T. earth,* बिळांत पळून जाणें, (*fig.*) (मनुष्य) दडून बसणें. *T. effect,* लागू पडणें. *T. exception,* हरकत घेणें. *T. heart,* धैर्य धरणें, धीर धरणें. *T. hold of,* धरणें, पकडणें. *T. leave of,* (चा) निरोप घेणें, (ची) रजा घेणें. *Take* one's *life in* one's *hand,* risk it. तळहातावर शीर घेणें, जीव धोक्यांत घालणें. *T. place,* happen. घडून येणें, होणें. *T. stock of,* (*fig.*) स्वभावाची पारख करणें. *T. wind,* चारचौघांत पसरणें. [Special uses with *prepp., advv.*, and *adv. phrr.*] *T. after,* resemble (esp. parent or relation) in character, feature, etc. (च्या) वळणावर जाणें, चालीनें चालणें, च्या सारखें दिसणें. *T. back,* (colloq.) आपले शब्द परत घेणें. *T. down,* (1) लिहून ठेवणें,-घेणें, टांचून ठेवणें; (2) *t. person down a peg or two,* humble. (चीं) रग जिरविणें, नक्षा उतरविणें; (3) झुलमानें,-नाखुषीनें,-(अन्न) गिळणें,-खाणें; (4) (घर, बांधकाम) मोडून दुसरीकडे नेणें, उलगडणें, उसकटणें. *T. from,* diminish. कमी करणें, उणेपणा आणणें. *T. in,* (1) घेणें, समावेश करणें; (2) *t.* (lady) *in,* बरोबर घेऊन जाऊन जेवायला बसणें; (3) receive (work) to be done at home. घरीं करण्याकरितां काम घेणें; (4) include. सामावणें, समावेश करणें; (5) reduce (garment) to smaller scale, furl (sail). (चिरगूट) आवरून घेणें, (शीड) गुंडाळणें; (6) understand, digest mentally. समजणें, मनानें ग्रहण करणें; (7) believe (false statement). खोट्या गोष्टीवर,-विधानावर -विश्वास ठेवणें; (8) deceive, cheat. फसवणें, ठकवणें; (9) वर्गणी भरून (वर्तमानपत्र) घेणें. *T.-in, n.* (colloq.) a fraud, piece of humbug. लबाडी, फसवणूक, फसवेगिरी. *T. into* one's *confidence,* विश्वासांत घेणें. *T. into* one's *head,* डोक्यांत येणें,-घेणें,-शिरणें; कल्पना करणें. *T. off,* (कपडे) काढणें, उतरणें; नेणें, घेऊन जाणें; (किंमत) कमी करणें; नक्कल करणें, टिंगल करणें, उडी मारणें; पिऊन टाकणें. *T.-off, n.* नक्कल, सोंग, व्यंग्यचित्र; उडी मारण्याची जागा; (खोखोच्या खेळांत, आपला चेंडू दुसऱ्याच्या चेंडूला न हालवतां) चाटून जाण्याइतका दिलेला टोला. *T. on,* (काम, जबाबदारी) अंगावर घेणें, शिरावर घेणें; (भावनेचा) उमाळा येणें, (भावनेचें) प्रदर्शन करणें. *T. out,* बाहेर नेणें,-आणणें,-घेऊन जाणें; (डाग) काढणें, नाहींसा करणें; घेणें, मिळविणें. *T. the nonsense out of* (person), cure him of it. एखाद्याच्या अंगचा मूर्खपणा काढून टाकणें.-घालविणें. *T. it out in,* (नें) कर्जाची फेड,-भरपाई,-करून घेणें. *T. it out of,* चा सूड घेणें, वर सूड उगवणें, ची रग जिरवणें. *T. over,* succeed to management or ownership of (business). (ची व्यवस्था,-मालकी) आपल्याकडे घेणें, आपल्या

ताब्यांत घेणें. *T. to*, आरंभ करणें, सुरवात करणें; संवय लागणें, लाचावणें, चट लागणें; conceive a liking for (person, etc.). (वर) प्रीति बसणें, मन लागणें,-जडणें. *T. up*, उचलणें, उचलून घेणें; शोषून घेणें; घेणें, खाणें, गुंतवणें, ग्रासणें; ताब्यांत घेणें; (धंद्याला) सुरवात करणें, चालू करणें; स्वीकारणें; पुढें चालू करणें,-ठेवणें, (वक्त्याला) मध्येंच थांबवणें, अडथळा करणें; ची रक्कम देणें. *T. up with*, शीं साहचर्य करणें, संबंध जोडणें. *T. up the cudgels*, कलहांत,-वादविवादांत,-गुंतणें, गुंतवणें. *T. up the gauntlet* or *glove*, (युद्धाचें, द्वंद्वाचें) आव्हान स्वीकारणें, (द्वंद्व-) युद्धास तयार होणें. *T.-up*, *n.* (*mech.*) (शिवण्याच्या यंत्रांतील दोरा) वर उचलून घेण्याचा आंकडा; (पट्टा ताठ करण्याकरितां) सरकवून घेण्याचें यंत्र-साधन. *T. it upon* (or *on*) *to*, venture, presume to. स्वतःवर घेणें, स्वतःच्या शिरावर घेणें. *Took*, *pa. t.*; *taken*, *pa. p.*

Tāke, *n.* (टेक्)—amount of fish caught, moneys received at theatre, etc.; (Print.) amount of copy set up at one time. पकडलेले मासे (त्यांची एकूण संख्या), तिकिटांची रोख विक्री; एकाच खेपेंत छपाईसाठीं टंकांत उभा केलेला मजकूर.

Tā'ker, *n.* (टे'कर्)—In vbl. senses, esp. one who takes a bet. घेणारा; सोडत घेणारा,-खेळणारा.

Tā'king, *n.* (टे'किंग्)—In vbl. senses; esp. state of agitation; (*pl.*) money received in business, receipts. घेणें; गोंधळलेली स्थिति, गडबड, धांदल; (धंद्यांतील) आवक, जमा, जमलेला पैसा. *a.* attractive, captivating; catching. मोहक, आकर्षक; सांसर्गिक, पसरणारा.-*ly*, *adv.*;-*ness*, *n.* मोहकता; सांसर्गिकता.

Tălc, *n.* (टॅल्क्)—kinds of magnesian mineral, often in thin glasslike plates; (pop.) mica. मेघजाल, अभ्रक. *Calx of t.*, अभ्रकभस्म.-*ite*, गोळेदार अभ्रक.

Tāle, *n.* (टेल्)—narrative or story; report of alleged facts; full number. गोष्ट, कहाणी, कथा; हकीगत, चहाडी, चुगली; पूर्ण संख्या *T. of a tub*, idle fiction. भाकड कथा, काल्पनिक गोष्ट. *Thing tells its own t.*, त्या गोष्टीला अधिक पुरावणीची आवश्यकता नाहीं, ती सुस्पष्ट आहे. *To tell tt.*, चहाड्या सांगणें. *T. bearer*, चुगलखोर, चहाडखोर मनुष्य. *T.-bearing*, *a. T.-teller*, गोष्टी सांगणारा, गोष्टीवेल्हाळ, चहाडखोर. *Nursery tt.*, लहान मुलांच्या गोष्टी; कहाण्या.

Tăl'ent, *n.* (टॅ'लेन्ट्)—faculty or aptitude for something; high mental ability; persons of talent; ancient weight and money of account. गुण, अक्कल; बुद्धि, डोकें, डोक्याचीं माणसें, बुद्धिमान पुरुष; (प्राचीन ग्रीक, रोमन लोकांचें) ११० पौंडांचें वजन, चारशें पौंड किंमतीचें नाणें.

Tal'ented, *n.* (टॅ'लेंटिड्)—having high ability. बुद्धिमान. *Tal'entless*, *a.* निर्बुद्ध, बुद्धिहीन.

Tăl'ipĕd, *a.* (टॅ'लिपेड्)—club-footed; (zool.) having unusually twisted feet. वक्रपाद. *n.* वक्रपाद प्राणी किंवा मनुष्य.

Tă'lipēs, *n.* (टॅ'लिपीझ्)—club-footedness; taliped formation. पाऊल,-पाय,-वांकडा झालेला किंवा आंत वळलेला असणें, वक्रपाद.

Tăl'isman, *n.* (टॅ'लिझ्मन्)—an object endowed with magical powers, an amulet. ताईत, तोडगा, दोरा, कवच, यंत्र.-*man'ic*, *a.* ताइताचा, कवचाचा, यंत्राचा.

Talk, *v. i. & t.* (टॉक्)—to say words; hold conversation; have the power of speech; express in words; use (language); gossip or spread reports; discuss; use as a medium of communication. बोलणें; संभाषण करणें; बोलतां येणें, वाचा असणें; शब्दांनीं बोलून दाखविणें,-व्यक्त करणें; (भाषा-भाषेंत) बोलणें; कंड्या उठवणें; वादविवाद करणें; दळणवळणाचें साधन म्हणून योजणें. *n.* familiar conversation; rumour; mere words; theme of gossip. संभाषण, अफवा; भाषण; भाषणाचा विषय. *To talk big,-tall*, बढाई मारणें, बढाइच्या गोष्टी सांगणें. *Now you're talking*, (*sl.*) आतां वळणावर आलास, आतां तुझें बोलणें पटेल. *Talk nothing but English*, त्याला इंग्रजीशिवाय दुसरी भाषा बोलतां येत नाहीं. *T. person round*, persuade him. एकाद्याचें मन (बोलून) वळविणें. *Would t. a horse's hind leg off*, is talkative. फार बडबड करतो, बडबड्या, बटबट्या,-आहे. [*With prepp. & advv.*] *T. about*, discuss. वादविवाद करणें, वाटाघाट करणें. *T. at*, (एकाला ऐकूं जाईलसें उद्देशून) दुसऱ्याशीं बोलणें. *T. away*, consume (time) in talking. (वेळ) बोलण्यांत घालविणें. *T. back*, reply defiantly. उलट उत्तरें बोलणें, उद्धटपणानें उत्तरें देणें. *T. down*, मोठ्यानें बोलून (एखाद्याला) चूप बसविणें. *T. of*, (विषयीं) बोलणें, उल्लेख करणें. *T. out* (bill, motion, in Parl.) get rid of it by prolonging discussion till time of adjournment. बैठक उठेपर्यंत (सूचनेवर) बोलत राहून (ती) पुढें ढकलविणें. *T. over*, (एखाद्या विषयासंबंधीं) बराच वेळ चर्चा करणें,-बोलणें; (एखाद्याचें) बोलून मन वळवणें. *T. round*, (एखाद्या विषयाचा) काथ्याकूट करणें. *T. through one's hat*, (*sl.*) exaggerate, bluff, make wild statements. अतिशयोक्ति करणें, थातावणी करणें, भरमसाट विधानें करणें. *T. to*, शीं बोलणें, ची कानउघाडणी करणें. *T. up*, (एखाद्या विषयाची आवड उत्पन्न करण्याकरितां त्यावर) वादविवाद करणें,-चर्चा करणें. *It will end in t.*, प्रत्यक्ष कृति कांहींच घडणार नाहीं. *Their quarrels are the t. of the town*, त्यांचीं भांडणें हा एक गांवांत सर्वांच्या तोंडीं विषय होऊन राहिला आहे. *Talk'er*, *n.*

Ta'lkătive, *a.* (टॉ'केटिव्ह्)—fond of talking. बोलका, वाचाट, वाचाळ.-*ness*, *n.*

Talkee-Talkee, *n.* (टॉ'की-टॉ'की)—incessant chatter; broken English of Negroes. सारखी वटवट,-बडबड; मोडकेंतोडकें इंग्रजी.

Ta'lkies, *n. pl.* (टॉ'कीझ्)—cinematographic film in which the characters speak. बोलका चित्रपट, बोलपट.

Ta'lking, *a.* (टॉ'किंग्)—In vbl. senses; *esp.* having the power of speech; expressive.

बोलणारा, वाचा असलेला, बोलूं शकणारा; भावदर्शक. *T. parrot*, बोलका पोपट. *T. eyes*, भावदर्शक नेत्र.

Tall, *a.* (टॉल्)—(of person) of more than average height; (of tree, etc.) higher than surroundings; of specified height. (*sl.*) extravagant, excessive, boastful. उंच, उन्नत; च्या उंचीचा; उधळ्या, प्रमाणाबाहेर, घमेंडखोर. *adv.* (talk *t.*, boast) घमेंडखोरपणानें. *T.-boy*, bed-room chest of drawers, खणाचें उंच कपाट. *T.-ness*, *n.* उंचपणा, उंची.

Tăll'ow, *n.* (टॅलो)—harder kinds of fat. मेणबत्त्या, साबण करण्यासाठीं प्राणिज चरबी. *v. t.* to grease with tallow, fatten (sheep). चरबीयुक्त करणें; (मेंढ्यांना) पुष्ट करणें. *Vegetable t.*, वनस्पतींपासून काढलेली चरबी. *T.-chandler*, *n.* मेणबत्त्या करणारा; मेणबत्त्यांचा व्यापारी. *T.-face*, pale person. फिकट चेहऱ्याचा मनुष्य. *T. drop*, style of cutting stones with dome on one or both sides. हिरा कापण्याची पद्धत. *Tallowish*, *a.* थोडासा चरबीचा. *Tallowy*, *a.* चरबीचा, चरबीसारखा.

Tăll'y̆, *a.* (टॅलि)—a notched stick to number with; counterpart or duplicate of a thing, account of goods entered in seller's and in purchaser's book, ticket or label attached to thing for identification. (हिशेब मांडण्याची) खुणांची काठी; जोड, तोड, जोडभाग, ताळा; रुजवातीचा हिशेब; ओळखण्याची खूण. *v. t. & i.* to record or reckon by tally; agree, correspond, *with*; (Naut.) haul taut. (खुणांच्या) काठीनें हिशेब करणें,-मांडणें; जुळवणें, जमणें, मेळ बसणें; खालच्या दोरीनें (शीड) घट्ट करणें. *Horticultural tt.*, plant labels. रोपांच्या नांवाच्या चिठ्या. *T.-man*, (आठ दिवसांच्या) उधारीवर माल विकणारा. *T. sheet*, हिशेबाच्या रुजवातीचा कागद,-तक्ता. *T. shop*, उधारीनें मालविक्रीचें दुकान. *T. system*,-*trade*, of trades on short credit with account kept by tally. अल्प मुदतीच्या पतीची (उधारीची) व्यापारी पद्धत, व्यापार. *T. clerk*, यादीवरून मालाची रुजवात घेणारा कारकून. *Tall'ier*, *n.*

Tăll'y̆-hō', *int. & n.* (टॅलिहो')—huntsman's cry to hounds; (U. S.) large coach. पारध्याची शिकारी कुत्र्यांना हाक; मोठी घोडागाडी. *v. i. & t.* to cry tallyho; urge (hounds) thus. (पारध्याची कुत्र्यांना आरोळी मारणें; आरोळीनें चेतावणें,-पिटाळणें.

Tăl'on, *n.* (टॅलन्)—claw of a bird of prey; cards left after deal; heel of sword-blade. नखें, नखी; वांटून उरलेले पत्ते; तलवारीच्या पात्याची पाठ.

Tāl'ŭs, *n.* (टेलस्)—(*pl.-li*) (Anat.) anklebone; form of club-foot; (Geol.) sloping mass of fragments at foot of cliff. घोटा, घोट्याचें हाड, गुल्फास्थि; वांकड्या पायाचा प्रकार; कड्याच्या तळचा उतरता खडकांचा थर. [*L*]

Tăm'arind, *n.* (टॅमरिन्ड्)—tropical tree or its fruit which is acid and agreeable. चिंचेचें झाड, चिंच, आंबली.

Tăm'arisk, *n.* (टॅमरिस्क्)—feathery-leaved ever-green common at seaside. एक पिसासारखीं पानें असलेलें, समुद्राकांठीं वाढणारें झाड,-वनस्पति.

Tăm'bour, *n.* (टॅम्बुअर्)—a drum (arch.); circular frame for stretching embroidery work on, stuff so embroidered; (Archit.) cylindrical stone in shaft of column, circular part; kinds of fish. डफ, खंजिरी; कलाबतूची,-भरतकामाची,-(कापड ताणून धरण्याची) वाटोळी ताण, वाटोळें कडें, वाटोळ्या ताणीवरील भरतकाम; (खांबांतील) नलिकाकार दगड, वर्तुलाकार भाग; डफासारखा आवाज करणारे, डफाच्या आकाराचे,-मासे. *v. t.* to decorate, embroider, on *t.* भरतकाम करणें, कलाबतूचें शोभिवंत काम करणें.

Tămbourine', *n* (टॅम्बरीन्)—a musical instrument or small drum with jingling metal disks; dance accompanied by the *t.*; kind of African pigeon. खंजिरी, डफरी; डफरीचा नाच,-नाचाचें गाणें; एक जातीचें आफ्रिकन कबूतर.

Tāme, *a.* (टेम्)—(of animals) domesticated, tractable; lacking spirit, uninteresting, insipid; (colloq) cultivated. माणसाळलेला; पाळींव; दीन, गरीब, नेभळा, लेचापेचा; नीरस, पचपचीत, पुळपुळीत; लागवडीस आणलेला, लावून केलेला. *v. t.* to make tame, to domesticate; to break in, to humble. माणसाळवणें; वठणीस आणणें, मऊ,-नरम,-करणें. *A t. cat*, (*fig.* of person) हांजीखोर व उपयोगी म्हणून राखलेला मनुष्य. *T.-less*, *a.* untamable. न माणसाळण्या जोगा, हिंस्र, व्रात्य. *Tamability*,-*bleness*, *nn.* *Tamer*, *n.* (Lion-) माणसाळवणारा, (सिंहांना) शिकविणारा. *Tamable*, *a.* *Tamely*, *adv.* नेभळे-पणानें, हूं का चूं न करतां. *Tame'ness*, *n.*

Tăm'per, *v. i.* (टॅम्पर्)—(*T. with*) to meddle, to make unauthorized changes; to exercise underhand influence. लुडबुडणें, लुडबुड करणें, नसती उठाठेव करणें, ढवळाढवळ करणें. फितविणें, बिघडविणें, लांच देऊन वळविणें; अनधिकृत फेरफार,-फिरवाफिरव करणें,-दुरुस्ती करणें.-*er*, *n.*

Tămp'ion, *n.* (टॅम्पिअन्)—wooden stopper for muzzle of gun; a plug (for top of organ pipe). बंदुकीच्या तोंडाची लांकडी बुद्दी,-लांकडी बूच; (सूरसनईची) पिपाणी, जिव्हाळी.

Tăm'pon, *n.* (टॅम्पन्)—plug used to stop haemorrhage. रक्त थांबविण्याकरितां वापरलेला (कापसाचा, कपड्याचा) बोळा, बुद्दी. *v. t.* बोळा घालून (जखमेंतील) रक्त थांबविणें. *Tamponade'*, *n.* रक्त थांबविण्याकरितां बोळा वापरणें,-बोळ्याचा उपयोग.

Tăn, *n.* (टॅन्)—bark of oak tree crushed in use for tanning hide; the yellowish brown of tanned leather; the bronze of sun-burnt skin. (युरोपांतील ओकवृक्षाची, किंवा आपल्याकडील बाभळ, तरवड वगैरे झाडांची) कातडीं कमावण्याची साल, बाभळीची साल; पिंवळट-पिंगट रंग; उन्हानें करपलेला (कातडीचा) पिंगट रंग, काळवट रंग. *a.* yellowish brown. पिंगट. *v. t* & *i.*

to convert (hide) into leather by steeping in infusion of tan; make or become brown by exposure to sun; treat (imitation (marble) with hardening process; (*sl.*) beat, thrash. (कच्चीं कातडीं) कमावणें, रापवणें; (उन्हानें) काळा करणें, काळवंडणें; (कृत्रिम संगमरवरी दगड) कठीण करणें; मारणें, ठोकणें, ठोके देणें. *Tann'er, n.*; *Tann'ery, n.* कातडीं कमावण्याचा कारखाना. *Tann'ing, n.* कातडीं कमावणें. *The tan,* (*sl.*) सर्कस. *T. yard,* tannery. कातडीं कमावण्याचा कारखाना. *Tann'able, a.*

Tăn'dem, *adv.* (टॅन्डम्)—(of horses in harness) one behind another. एकामागून एक, एकापाठीं एक (जोडलेले घोडे). *n.* a vehicle driven tandem; a bicycle etc. with two or more seats behind each other. एका पाठीं एक घोडे जोडलेली गाडी; एका पाठीं एक बैठका असलेली दुचाकी. *a.* (of bicycle) so arranged. एका पाठीं एक बैठक असलेली (दुचाकी).

Tăng, *n.* (टॅंग)—part of tool that fits into handle; strong taste or flavour, characteristic property; resonant sound of bell etc.; kinds of seaweed. (विळा, चाकू, कानस वगैरेचा) मुठींत गेलेला भाग; उग्र वास,-चव, विशेष धर्म; (घंटेचा वगैरे) खणखण आवाज, घणघणाट; एक जातीची समुद्रवेल. *v. t. & i.* घणघण आवाज करणें; मूठ बसवणें (हत्याराला). *Tang'y, a.* (टॅंगि) उग्रट वासाचा,-चवीचा.

Tăn'gent, *n.* (टॅन्जन्ट्)—a straight line that meets a curve at a point but if produced does not intersect it at that point. वर्तुळाला स्पर्श करणारी रेषा, स्पर्शरेषा, स्पर्शज्या, स्पर्शिका. (Trig., abr. *tan*) *t. of an angle,* ratio of the perpendicular subtending it in a right angled triangle to the base, कोनस्पर्श ज्या. *To fly, go off, at a tangent,* ओझरतें,-चाटून -जाणें; विचाराची,-आचाराची,-दिशा एकदम पालटणें. *Tangen'tial, a.* (टॅन्जे'न्शल्) स्पर्शज्यासंबंधीं, स्पर्शरेषेचा; *-tially, adv.* *Tan'gency, n.* स्पर्शज्यास्थिति, -संबंध.

Tăn'gible, *n.* (टॅन्जिबल्)—perceptible by touch; real, actual, evident, palpable; (Law) corporeal. स्पर्शनीय; खरा, स्पष्ट, प्रत्यक्ष; शारीरिक.*-bility,-ness, nn.* स्पर्शनीयता, स्पर्शक्षियता, ठळकपणा.*-bly, adv.*

Tăn'gle, *n.* (टॅंगल्)—confused mass or state. गुंडाळा, गुंतळा, गुंतागुंत, घोटाळा. *v. t. & i.* to bring or come into a tangle, complicate; entrap, ensnare. गुंतवणें गुरफटवणें, गुरफटणें, गुंतागुंत होणें, जाळ्यांत धरणें,-पकडणें. *T.'-foot,* (U. S., sl.) whisky etc. दारू, मादक पेयें. *Tan'glesome,-gly, aa.* *Tan'gled, pa. p* गुंतवलेला, गुंतागुंतीचा, भानगडीचा.

Tank, *n.* (टॅंक्)—a large receptacle for storing liquid; a reservoir, pond; (Mil.) steel-box travelling by motor power, containing crew and guns and serving as moving forts in battle; (U. S.) natural pool. टाकी; तलाव, तळें; (लढाईच्या उपयोगाचे) टॅंक,-फिरता लढाऊ बुरूज, रणगाडा; नैसर्गिक तळें; डबकें. *T. drama,* (जलाशयाचा देखावा ज्यांत दाखविला आहे असें) अद्भुत देखाव्याचें नाटक. *T. engine,* टांकीवालें (आगगाडीचें) यंत्र. *Tank'age, n.* (टॅंकिज्) टांकींतील सांठवण (त्याचें भाडें); टाकीचें घनफळ.

Tănk'ard, *n.* (टॅंकर्ड्)—large drinking vessel (usu. of silver or pewter); contents of this. (दारू वगैरे पिण्याचें) उभट पात्र; भांडेंभर पेय. *T. turnip,* उभट मुळ्याचें गाजरासारखें फळ; सालगम.

Tănk'er, *n.* (टॅंकर्)—a ship with tank for carrying mineral oil. (टाक्यांतून खनिज तेल वगैरे वाहून नेणारी) तेलाची बोट.

Tănn'er *n.* (टॅनर्)—one who tans. कातडें कमावणारा. 2. (*sl.*) a sixpence. सहा पेन्स.

Tănn'ic, *a.* (टॅनिक्)—of tan. ओक, बाभळ ह्या झाडांच्या सालीपासून काढलेलें. *T. acid, tann'in, nn.* बाभळीच्या सालीपासून काढलेलें (कातडीं कमावणें, शाई व औषध यांच्या उपयोगी) अम्ल. *Tann'ate, n.* (chem); *Tannif'erous, a.*

Tăn'sy, *n.* (टॅन्झि)—an aromatic herb used in medicine and cookery. एक सुगंधी वनस्पति.

Tăn'talize, *v. t.* (टॅंटलाइझ्)—to torment with disappointment; raise and then dash the hopes of. निराशा करून दुःख देणें, झुलवणें; आशा दाखवून निराश करणें.*-zation, n.-zingly, adv.*

Tăn'talum, *n.* (टॅन्टलम्)—a rare metal used for electric lamp filaments. एक दुर्मिळ धातु (ह्याच्यापासून विजेच्या दिव्यांतील धागे करतात).

Tăn'talus, *n.* (टॅन्टलस)—(Gk. Myth.) son of Zeus condemned to stand up to chin in water which he could never drink and so died of starvation, spirit stand. (ग्रीक पुराणांतील गळाभर पाण्यांत उभा असूनहि अन्न-पाण्यावांचून तडफडून मरण्याची शिक्षा झालेला) झिअस्चा मुलगा,-टॅन्टलस् राक्षस; दारूच्या बाटल्या, बंदिस्त करून ठेवल्या आहेत असें कपाट. *T. cup,* toy cup containing figure of man illustrating principle of siphon, वसुदेव प्याला.

Tăn'tamount, *pred. a.* (टॅंटमाउन्ट्)—equivalent in value or effect, equal. समान, सारखा, बरोबर. [L. *tantus,* so great]

Tăn'trum, *n.* (टॅन्ट्रम्)—display of temper. रागाचा झटका, चिडखोरपणा.

Tăp, *n.* (टॅप्)—a cock through which liquid is drawn; a plug of a cask; liquor of a particular brewing etc.; a tap-room; an instrument of cutting threads of internal screws. तोटी, आंटेवालें तोंड, (आंटेवाली तोंडाची) नळी, गुडदी, बूच; विशिष्ट प्रकारची दारू; दारूचा गुत्ता; टाप, नर, ?चर. *v. t.* to furnish caks

with tap; pierce (a cask) to let out liquid; (surg.) draw off fluid by incession; draw sap from tree by cutting into it; apply to, solicit, (person *for*); broach (subject); divert part of current (from telegraph wires etc.) to intercept message. (पिंपाला) टाप लावणें,-बसवणें; भोंक पाडणें, तोंड पाडणें, भोंक पाडून (दारू वगैरे) काढणें; (शस्त्रक्रियेनें अन्तर्गळांतील) पाणी काढणें; (खाप पाडून झाडांतील) चीक,-रस,-काढणें; अर्ज.-विनंति, -करणें, संधान लावणें; (विषयासंबंधीं) घोळणें काढणें; (वीज दुसऱ्या तारेवर घेऊन) बातमी मध्येंच काढून घेणें. *T. room,-house*, दारूचें दुकान, दारूचा गुत्ता. *T. root,* chief descending root of plant. (गाजर, मुळा यांचें-द्विदल वनस्पतीचें,-खालीं जमिनींत जाणारें) मुख्य मूळ, किंकरी मूळ, पाळ. *Tapped, pa. t. & pa. p.*

Tăp, *v. t. & i.* (टॅप्)—to strike a light blow; rap (*at*); cause to strike lightly against; apply leather to (heel). थाप मारणें, हळू ठोठावणें; (दरवाजावर) टक् टक् (आवाज) करणें; (नें ठोठावणें); ठोकणें; जोड्याच्या टांचेला चामडें मारणें,-लावणें. *n.* light blow or sound; (*pl.*) men's dinner-call in barracks; (U. S.) signal for putting out lights in soldier's quarters. थाप, थापटी, टिचकी; टक् टक् आवाज; (लष्करी) जेवणाची घंटा; (लष्करी शिपायांना) दिवे मालवण्याची-झोंपीं जाण्याची-खूण.

Tes'ticle, *n.* (टे'स्टिकल्)—either of the semen-secreting glands. अंड, आंड, कोष, वृषण, कोष. *Testicular, a.* अंडाचा, अंडकोशाचा.

Testic'ulate, *a.* (टेस्टि'क्यूलट्)—having or shaped like testicles; (Bot.) having a pair of organs so shaped. अंड असलेला, अंडाकार; अंडाकार दोन इंद्रियें किंवा अवयव असलेला.

Tes'tify, *v. i. & t.* (टे'स्टिफाय्)—to bear witness *to*; (Law) give evidence. प्रतिज्ञेवर सांगणें, साक्ष देणें, सांगणें, जाहीर करणें; शपथेवर साक्ष देणें.

Testimo'nial, *n.* (टेस्टिमो'निअल्)—certificate of character or qualifications; gift, money, presented to a person (in public) as mark of esteem, etc. प्रशंसापत्र, दाखला, सर्टिफिकेट; बहुमानाची (पैशाची) थैली, बक्षीस.

Tes'timony, *n.* (टे'स्टिमनि)—witness borne; a thing that testifies *to* something; declarations, statements; (*pl.*) the Scriptures, the teachings of God. जबानी, साक्ष; पुरावा, आधार; ग्वाही, साक्ष, परवाक्यप्रमाण; शब्द; आप्तवाक्य-प्रमाण; (अने०) ईश्वरी तत्त्वें, देववचनें, धर्मग्रंथ.

Tes'ty, *a.* (टे'स्टि)—irascible; short-tempered, peevish, petulant, fretful. रागीट, तुसडा, चिडका, चिडखोर, खिसखिशा.-*tily, adv.*;-*tiness, n.* तुसडेपणा, चिडकेपणा.

Tet'anus, *n.* (टे'टनस्)—a disease marked by painful contraction of voluntary muscles. धनुर्वात, धनुष्कंपवात. *Tet'anic, a.* धनुर्वातासारखा, धनुर्वाताचा.

Tetch'y, *n.* (टे'चि)—easily put out; touchy. चिडखोर, रागावण्यास कठीण.

Tete-a-tete, *adv.* (टे'टाटे'ट्)—together in private. एकांतीं, गुप्तरीतीनें, दोघांत. *a.* private, confidential. एकांताचा, खाजगी, सल्लोख्याचा, गुप्त. *n.* private interview or conversation between two persons; a sofa for two. (दोघांमधील) गुप्त संभाषण, एकांतांतील भाषण; दोघांना बसण्याजोगा पलंग. [F.,head to head]

Teth'er, *n* (टे'दर्)—a rope by which a grazing animal is restricted to a radius; scope of one's knowledge. चरणारीं गुरें वगैरे बांधण्याची दोरी, चारणीची दोरी, चारणीचें चऱ्हाट; ज्ञानक्षेत्र, ज्ञानमर्यादा,- मांत. *v. t.* to fasten or confine with a tether. चरतें जनावर दोरानें बांधणें,-बांधून ठेवणें.

Tĕt'ra, (टे'ट्रा)—(in comb.) four. चतुः ; चौ,-चार. *Tetraba'sic, a.* चतुर्भस्मिक. *T.-chord,* चतुःसुरात्मक सुरावट ;*-al, a. T.-dyn'amous a.* (Bot.) सहा नरकेसरांपैकीं चार अधिक उंच असणारें, चतुर्दुंगनर-केसर (पुष्प). *T.-gon, n.* a plane rectilineal figure of four sides and four angles. चतुष्कोणाकृति, चतुष्कोण.*-gonal, a.* चतुष्कोणी, चौकोनी *T.-hedral, a.* चतुष्फलकाचा. *T.-hedron, n.* four-sided solid, esp. triangular pyramid. चतुष्फलक, चतुष्कोण, घनाकृति. *T.-logy, n.* group of four dramatic works. चार नाटकांचा समुदाय, नाट्यचतुष्टय. *T.-meral,-merous, a.* चतुर्विभागयुक्त ; चतुःसाधियुक्त. *Tetran'drous, a.* चतुःपुंकेसरी पुष्पवर्गाचा. *T. -petalous, a.* चार पाकळ्यांचा, चौपाकळी. *Te'trarch, n.* रोमन प्रांताच्या चतुर्थांश भागावरील अधिकारी;*-y, n.*

Tĕt'răd, *n.* (टे'ट्रॅड्)—the number four; a set of four; atom with combining power of four atoms of hydrogen. चार, चौकडा, चारांचा समुदाय, चतुष्टय ; चतुर्मूल्य परमाणु, चतुःशक्तिक परमाणु.

Tĕtt'er, *n.* (टे'टर्)—kinds of skin-disease. चकदळ, दाद.

Teu'ton, *n.* (ट्यूटन्)—a member of any of the Teutonic nations. ट्यूटन जातीचा (जर्मनीतील) प्राचीन रहिवासी.*-tonic, a.* of the Germans, or of the races and languages closely allied to the German. ट्यूटन-जर्मन-लोकांचा, जर्मनसारख्या देशाचा,-भाषांचा ; *n.* प्राचीन ट्यूटानिक भाषा.

Tĕxt, *n.* (टे'क्स्ट्)—the wording of a composition, author's own work; authentic form of a document or passage or book; any selected passage of Scripture. प्रबंधरचना ; मूळ, मूळग्रंथ, मूळ, संहिता ; धर्मग्रंथांतील वचन. *To stick to* one's *t.,* विषयांतर न करणें, मुद्याला धरून बोलणें. [L *texere,* weave]

Tĕxt'bŏok, *n.* (टे'क्स्ट्-बुक्)—a manual; a book set for study. क्रमिक पुस्तक ; अभ्यासाकरितां नेमलेलें पुस्तक, पाठ्यपुस्तक.

Tĕx'tile, a. (टे'क्सटाइल्)—of weaving; woven. विणण्यासंबंधीं, विणकामाचा ; विणलेला. *n.* (*usu.* in *pl.*) textile fabrics, fabrics made by weaving. विणलेला माल, कापड.

Tĕx'tūal, *n.* (टे'क्स्च्यूअल्)—of or in the text. मूळग्रंथाचा, मूळग्रंथविषयक, मूळचा, मुळांतला. *T. criticism,* (मूळग्रंथांतील) पाठभेदचर्चा. *T. errors,* मूळग्रंथांतील अपपाठ, चुकीचे पाठ, चुका.*-ally, adv. Tex'tualist, n.* one who adheres to the letter of the text; a ready quoter of scriptural texts. (मूळग्रंथाच्या) शब्दप्रमाणी ; धार्मिक ग्रंथांतील वचनें घडाघड म्हणणारा,-मुखोद्गत असणारा.

Tĕx'ture, *n.* (टे'क्स्चर्)—arrangement of threads in textile fabric; structure (*of* skin, rock etc.); representation of surface of objects in works of art; (Biol.) tissue. पोत, बनावट, वीण, विणाई ; घटना, रचना, पृष्ठभागदर्शन ; पेशी, शरीरघटक धातु. *-ral, a.-less,* पेढौल बनावटीचा.

Thăl'mus, *n.* (थॅ'ल्मस्)—(Gk) inner room, women's apartment; (Anat.) place where nerve emerges from brain; (Bot.) receptacle of flowers. अंतःपुर, स्त्रियांची खोली ; मेंदूंतून मज्जातंतु निघतात तें स्थान ; पुष्पाधार.

Thali'a, *n.* (थला'या)—Greek muse of comedy and pastoral poetry. हास्यरसाची व ग्रामीणगीताची देवता.

Thăll'ium, *n.* (थॅ'लिअम्)—rare soft white metallic element used in alloys and glass-making. (रसायन शास्त्रांतील 'थाल्ल' नांवाचें) एक दुर्मिळ धातुरूप मूलद्रव्य.

Thă'llus, *n.* (थॅलस्)—plant-body without root, stem or leaves. (झाडाचें) खोड.

Thăn, *conj. & prep.* (दॅन्)—(introducing a second member of comparison) पेक्षां, हून, °च्या अपेक्षेनें. *You are taller t. he (is).* तूं त्याच्याहून उंच आहेस.

Thāne, *n.* (थेन्)—a gentleman below rank of earl. सरदार, सरदाराची एक पदवी.

Thănk, *v. t.* (थँक्)—to express gratitude to. आभार मानणें, उपकार मानणें ; आभारीपणा दर्शविणें. *n. pl.* expressions of gratitude. आभार, उपकार. *T. you,* ठीक, छान, आभारी आहें. *Thanks,* thank you. आभारी आहें. *Thank-offering,* (*bibl.*) ईश्वराची उपकार-प्रार्थना. *Thanksgiving,* देवाच्या दयेबद्दल जाहीर प्रार्थना, उपकारस्तुतीची प्रार्थना.

Thănk'ful, *a.* (थँ'क्-फुल्)—grateful (*for*); greatly pleased *that.* उपकारी, आभारी ; कृतज्ञ.*-fully, adv.* आभारी होऊन, कृतज्ञतापूर्वक.*-fulness, n.* आभारीपणा, कृतज्ञता, उपकारज्ञता.

Thănk'less, *a.* (थँ'क्-लेस)—ungrateful; earning no thanks. कृतघ्न, अनुपकारी, आभारी न होणारा ; बिनफायद्याचा. *A t. task,* निरर्थक काम.*-ly adv., -ness, n.*

Thăt, *a. & demonst. pron.* (दॅट्)—(*pl.* those दोज्) the person or thing pointed to or drawn attention to. तो, ती, तें ; जो, जी, जें, *conj.* (introducing subordinate clauses). कीं, कारण. *adv.* (*t. far, -much*) to such a degree, so, as. इतका, एवढा, असा, अशा प्रकारें, कीं. *Upon t., after t.,* तदनंतर. *Went to this doctor and t.,* or *to this and t. doctor,* to various doctors. तो निरनिराळ्या डॉक्टरांकडे गेला. *This, t. and the other,* various things. निरनिराळ्या गोष्टी,-वस्तु. *Put this and t. together,* वेगवेगळ्या गोष्टी एकत्र करा,-निरनिराळ्या गोष्टींचा एकत्र विचार करा. *In t.,* since, in so far as. ज्याअर्थी, जेवढें. *Now t.,* since now. आतां, ज्याअर्थी.

Thătch, *n.* (थॅच्)—roofing of straw or rushes. शाकार, छप्पर., कॅमळा, कोलवा. *v. t.* roof with a thatch. शाकारणें, शाकार घालणें.

Thaum'aturgȳ, *n.* (थॉ'मटर्जि)—working of wonders, the miraculous. जादू करणें, अद्भुत, आश्चर्य.*-gic, a.*

Thaw, *v. i. & t.* (थॉ)—(of ice, snow) to release or escape from frozen state; (of weather, *It-*) to warm into liquid state or animation; (*fig.*) become less cold or stiff; cause to thaw. विरघळणें, पाझरणें, वितळणें; (हवा) बर्फ वितळण्याइतकी उष्ण होणें; उदासीनपणा सोडणें, प्रेमानें वागणें, वितळविणें, थंडपणा सोडणें, प्रेमानें वागण्यास लावणें. *n.* melting of ice or snow, cessation of frost. बर्फ वितळणें, विद्रावक हवा, (बर्फ वितळण्यास पुरेशी) हवेची उष्णता. *T. less,-y, aa.*

The, *a.* (दि bef. vowel, द bef. consonant, दी emphat.) to denote a particular person or thing. तो, ती, तें. *adv.* preceding comparatives (e. g. *the more—the better*). (तर-तम भावदर्शक, पूर्वी) जितकें जितकें—तितकें तितकें. *Let us drop t. matter*, आपण ती बाब,-गोष्ट,-सोडून देऊं. *T. lion, t. man in the street*, (*t. before sing. noun* showing species or class). सिंह (जात), सामान्य मनुष्य (वर्ग). *t. drink*, habit of drink. दारूचें व्यसन. 4 *as. t.* (or *a* or *per*) *yard*, (दर) वाराला चार आणे. *t. fair, t. beautiful*, ,beauty. सौंदर्य. *t more he gets t. more he wants*, जितकें त्याला अधिक मिळतें, तितकी त्याची हांव वाढते. *t. stage, t. platform*, नाटकाचा धंदा, वक्तृत्वकला.

The'atre, *n.* (थिंएटर्)—a building for dramatic performances; room or building for lectures, surgery etc.; dramatic literature or art; scene or locale *of.* नाटकगृह; (व्याख्यान,-शस्त्रक्रिया) गृह, शाला; नाट्यवाङ्मय, नाट्यकला, रंगभूमि; आखाडा, रंगभूमि, क्षेत्र.*T. of war*, युद्धाचें क्षेत्र,-ची रंगभूमि. *T.-goer,-going*, frequenter, frequenting, of *tt.* नाटकांचा शोकी,-शोक.

Theat'rical, *a.* (थिॲ'ट्रिक्ल्)—of, for, the theatre or acting; sensational, showy, affected. नाटकाचा, नाट्याचा, नाट्यकलेसंबंधीं, अभिनयाचा; नाटकी, नाटकी ढोंगाचा, बरपांगी. *n. pl.* dramatic performances. (हौशी लोकांनीं केलेलें) नाटक; नाटकांतील प्रवेश.*-cally, adv.*

Thee, See Thou.

Theft, *n.* (थेफ्ट्)—stealing, arceny. चोरी, चौरकर्म, चौर्य.

The'ine, *n.* (थी'इन्)—the bitter principle found in tea. चहांतील कडू द्रव्य. *The'ic, a.* अतिशय चहा पिणारा.

Their, *a.* (देअर्)—of or belonging to them. त्यांचा, ह्यांचा. *Theirs*, pron. & pred. a. (देअर्झ्) त्यांचा. (या Theirs पुढें नाम येत नाहीं.)

The'ism, *n.* (थी'इझ्म)—belief in a divine creation and conduct of the universe. आस्तिक्यवाद, ईश्वरवाद.

The'ist, *n.* (थी'इस्ट्)—one who believes in the existence of God. ईश्वरवादी, आस्तिक, ईश्वर आहे असें मानणारा.*-ic, a.* आस्तिक्यवादाचा,-मताचा.

Them, see They.

Theme, *n.* (थीम्)—a subject or topic; a school exercise on a set theme; (Mus.) melodic subject. विषय, प्रकरण, वादविषय; निबंध, प्रबंध; काव्यविषय, गाण्याचें कडवें,-पालुपद. *Thematic, a.* (Mus.) (गान-) विषयसंबंधीं, पदासंबंधीं.

The'mis, *n.* (थी'मिस्)—(Gk Myth.) goddess of law and justice. ग्रीक न्यायदेवता.

Themselves', *pron.* (देम्से'ल्व्झ्)—emphatic form of they. ते स्वतः

Then, *adv.* (देन्)—at that time, after that, next; under those circumstances; accordingly. नंतर; तेव्हां; त्या स्थितींत; तदनुसार. *n.* that time. ती वेळ, तो समय. *a.* then-existing. त्यावेळी असलेला, तत्कालीन. *Now and then*, at one time and another, from time to time. कधींमधीं, मधून मधून, वारंवार. *Every now and t.*, वरचेवर.

The'nar, (थी'नार्)—(anat.) palm of hand, sole of foot. हाताचा,-पायाचा,-तळवा.

Thence, *adv.* (देन्स)—from there; for that reason; from that. तेथून, त्या ठिकाणाहून; म्हणून; त्यापासून, तेव्हांपासून, त्यावेळेपासून.

Thence'forth, **Thence'-forward**, *adv.* (देन्स-फोर्थ्, देन्स-फॉर्वर्ड)—from that time forward. तेव्हांपासून पुढें.

Theo,-, (थिओ-)—(in comb.=Gk *theos*) God. ईश्वर-, देव-.

Theoc'racy, *n.* (थिऑ'क्रसि)—government or a State in which God is the sovereign and religion the law. ईश्वरकर्तृकराज्य, ईश्वरसत्ताक राज्यपद्धति.*-cratic, a.* ईश्वरसत्ताक राज्याचा, राज्यपद्धतीचा.

Theod'olite, *n.* (थिऑ'डलाइट्)—surveying instrument for measuring angles. (जमीन) मोजणी करतांना दुर्बिणीच्या साह्यानें कोन मोजण्याचें एक यंत्र.

Theog'ony, *n.* (थिऑ'गनि)—an account or theory of the genesis of gods. देवोत्पत्तीचा इतिहास, देववंशावळ.

Theolo'gian, *n.* (थिऑलो'जिअन्)—a person learned in theology, a divine. वेदान्ती, ब्रह्मज्ञानी.

Theol'ogy, *n.* (थिऑ'लजि)—the science treating of God and His relation to man. ब्रह्मज्ञान, वेदान्त. *Natural t.*, सृष्टिसिद्ध धर्मशास्त्र. *Positive* or *revealed t.*, based on revelation. ईश्वरप्रणीत धर्मशास्त्र. *Dogmatic t.*, सिद्धान्तरूप धर्मशास्त्र. *Speculative t.*, पौरुषेय धर्मशास्त्र. *Systematic t.*, सूत्रबद्ध धर्मशास्त्र.*-gical, a.* of, in, or for the study of theology. धर्मशास्त्रीय, वेदान्तपर, ब्रह्मज्ञानविषयक. *-gically, adv.,-'gize, v. t.* धर्मशास्त्रदृष्ट्या विचार करणें, धर्मशास्त्राचें स्वरूप देणें.

Theoph'any, *n.* (थिऑ'फनि)—a visible manifestation of a god to man. (देव) साक्षात्कार.

The'orem, *n.* (थी'अरेम्)—(*Geom.*) a proposition to be proved; speculative truth; algebraical

or other rule, esp. one expressed by symbols or formulae. सिद्धान्त, प्रमेय; नियम, सारणी, सिद्धांत.

Thĕorĕt'ic, (al), *a.* (थिॲरे'टिक्,-कल)—of the nature of theory; speculative, unpractical. काल्पनिक, तात्त्विक; प्रयोगहीन, उपपत्त्यात्मक, पुस्तकी. *-cally, adv. Theoret'ics, n. pl.* speculative parts of a science etc. तात्त्विक ज्ञान.

Thē'orist, *n.* (थी'अरिस्ट्)—a person given to theoretics; holder of a theory. कल्पनाकुशल, तात्त्विक ज्ञानी; शास्त्रीय कल्पना काढणारा, उपपत्ति लावणारा.

Thē'orize, *v. t.* (थी'अराइझ्)—to form or state a theory. उपपत्ति बसवणें,-लावणें; तात्त्विक कल्पना करणें, -रचणें,-बांधणें.*-zation, n.*

Thē'orў, *n.* (थि'अरि)—a view held; supposition explaining something, exposition of general principles; the sphere of speculation as distinguished from that of practice. कल्पना, वाद, मत; कल्पना, तर्क, शास्त्र, उपपत्ति, तत्त्व, युक्ति; (Math.) उपपत्ति, नियम.

Thĕŏs'ophў *n.* (थिऑ'सफि)—any speculative system basing knowledge of nature on intuitional or traditional knowledge of God. ब्रह्मविद्या, तत्त्वज्ञान.*-ic,-ical, aa.* ब्रह्मविद्येचा, -विद्याविषयक.*-'ophist n.* ब्रह्मविद्यामंडळाचा सभासद, ब्रह्मवादी.*-sophize, v. i.*

Thĕrapeut'ics, *n. pl.* (थेरप्यू'टिक्स)—curative branch of medicine. रोगशमनविद्या, औषधोपचारप्रकरण, भेषजप्रकरण.*-ic, a.* रोगनिवारक,-प्रतिकारक, औषधी-योजनेसंबंधीं.*-ical, a.,-ically, adv.*

There, *adv.* (देअर्)—in or at that place, at that point, thither; yonder. तेथें, तिकडे, त्या ठिकाणीं; पलीकडे. *n.* (after *prep.* only) that place or point. तें स्थळ, ती जागा. *int.* (drawing attention to anything. केवलप्रयोगी,-आश्चर्य, आनंद-दर्शक अव्यय). *He lived t. some years,* तो तेथें कांहीं वर्षे राहिला. *Go t. everyday,* दररोज त्या ठिकाणीं जात जा. *Lives somewhere near t.,* near that place. तो कोठेंतरी त्या जागीं राहतो *T.! what did I tell you?* पहा! मी तुला काय सांगितलें होतें? (पाहिलेंस!). *T.-after,* thenceforward. त्यानंतर, त्याप्रमाणें. *T.-at,* त्या ठिकाणीं, तेथें, त्यावेळीं; त्यामुळें. *T. in,* in it or them, in that respect. त्यांत; त्यासंबंधीं. *T. of,* of that, of this. त्याचा, तेथील, ह्याचा, येथील. *T. to,* त्या ठिकाणीं, तेथें. *T. with,* त्यावर, लागलाच.

There'abouts, *adv.* (दे'अर्-अबाउट्स्)—near the place or amount or time. आगेमागें, जवळजवळ, अरतापरता, त्या सुमारास.

There'bў, *adv.* (दे'अर्-बाय)—by that means or agency, in consequence of that. त्यामुळें, त्यायोगानें.

There'fore, *adv.* (दे'अर्-फोर्)—for that reason; accordingly, consequently. म्हणून; तदनुसार.

There'ŭpŏn, *adv.* (दे'अर्-अपॉन्)—upon that or this, as an immediate consequence of; directly after that, immediately. त्यावर, त्यामुळें; लागलाच.

There'wĭthal, *adv.* (दे'अर्-विदॉल्)—besides. शिवाय, खेरीज.

Therm, *n.* (थर्म्)—amount of heat required to raise one gram of water at maximum density one degree centigrade; unit of coal-gas supplied. एक ग्राम पाणी एक अंश उष्ण करण्याकरितां लागणारी उष्णता, उष्णतेचा एकम्.

Therm'al, *a.* (थर्मल्)—of heat; of hot springs. उष्णतेचा; उन्हाळ्यांचा, ऊन पाण्याच्या झऱ्यांचा. *Thermal springs,* उन्हाळीं; *T.-units,* उष्णतेचा एकम्. *T. equator,* line along which greatest heat occurs on earth's surface. (भूगोलावरील) महत्तम उष्णतेची रेषा.

Therm'ic, *a.* (थर्मिक्)—of heat. उष्णतेचा.

Thermăn'tĭdŏte, *n.* (थर्मॅ'न्टिडोट्)—apparatus for cooling the air, used in India. हवा (मान) थंड राखण्याचें यंत्र

Thermi'ŏn, *n.* (थर्मा'यॉन्)—an ion emitted by an incandescent substance. (ज्वलत्पदार्थापासून निघणारें) उष्णतामूलक.*-ic valve, n.* बिनतारी लहरींचें (मध्यें) टेलिफोन वगैरे ध्वनिकंपोत्पादक यंत्र.

Thermodўnăm'ics, *n.* (थर्मोडायनॅ'मिक्स)—science of the relation between heat and mechanical energy. उष्णतागति-संबंध-शास्त्र.

Thermŏm'eter, n. (थर्मॉ'मिटर्)—an instrument for measuring temperature. उष्णतामापक यंत्र, तपमापक. *Centigrade t.,* शतभाग तपमापक (यांत पाण्याचा थिजण्याचा व कढण्याचा अंश-बिंदु-अनुक्रमें ० व १०० असतो.); *Fahrenheit t.,* फॅरनहाइट उष्णमापक (अंश अनुक्रमें ३२ व २१२); *Reaumur t.,* रोमरचा उष्णमापक (अंश अनुक्रमें ० व ८०). *Clinical t.,* for taking temperature of the body. तापाची नळी, कष्णोष्णमानमापकनळी. *Maximum t.,* महत्तम उष्णतामापक. *Minimum t.,* लघुतम उ० *Thermometric,-al, a.;-metry, n.* उष्णमापन-विद्या, तपमापनविज्ञान.

Ther'mŏs, *n.* (थ'र्-मॉस्)—*T. flask,* vacuum flask. (आंत ठेवलेल्या पदार्थाची) उष्णता कायम ठेवणारी बाटली, थर्मोस.

Thēr'oid, *a.* (थी'अराइड)—(of idiot) having beastlike propensities. पशुवृत्ति. [Gk *ther,* wild beast]

Thĕsaur'ŭs, *n.* (थीसॉ'रस)—(*pl.-ri*), a storehouse of information; a dictionary or encyclopaedia. ज्ञानभांडार, ज्ञानसंग्रह; शब्दसंग्रह, ज्ञानकोश.

These, *See* This.

Thē'sis, *n.* (थी'सिस)—(*pl.-ses*), a proposition that one essays to prove; composition supporting thesis. साधक-बाधक प्रमाणांसह एखाद्या विषयाचें प्रतिपादन; निबंध, प्रबंध.

Thĕs'pian, *a.* (थे'स्पिअन्)—of Thespis, Greek dramatic poet of 6 th c. B. C.; of tragedy or

the drama. प्राचीन ग्रीक नाटककार थेस्पिस-संबंधीं; (शोकपर्यवसायी) नाटकाचा, नाट्यविषयक, नाटका-संबंधीं. *n.* an actor or actress. नट, नटी.

Thews, *n. pl.* (थ्यूझ्)—a person's muscular strength, sinews, muscles; (*fig.*) mental or moral vigour. शारीरिक सामर्थ्य, शक्ति; स्नायु; मानसिक,-नैतिक सामर्थ्य. *Thewed, thewless,-y, aa.*

They, *pron.* (दे)—*pl.* of he, she, it. ते, त्या, तीं. people in general. लोक, जन. *T. say,* असें म्हणतात, लोक म्हणतात, बोलतात (कीं). *Them, obj.* त्यांना. *Their, poss.* त्यांचा इ॰.

Thick, *a.* (थिक्)—of great depth between opposits surfaces; closely set; numerous, dense; hard to penetrate; turbid, muddy; stupid, dull; (of voice) muffled, indistinct; intimate. जाड, जाडगा, स्थूल; दाट, घट्ट, गच्च, निबिड, किर्र; आंत शिरण्याला कठीण; गढूळ, गदळ, राड; मंद, मंदबुद्धी; कुंद, दाटलेला; जानी, सलगीचा. *n.* the thick part of anything; a stupid person. जाड भाग, भर, ऐन जोर; मूर्ख,-वेडगळ-मनुष्य. *adv.* thickly; with thick voice. दाट, गच्च, लागोपाठ, भसट्या,-जाड्या,-आवाजांत. *A board two inches t.,* दोन इंच जाडीचा फळा,-फळी. *T. hair, forest,* दाट केस, निबिड अरण्य. *T. puddles,* गढूळ डबकीं. *Lay it on t.,* (colloq.) be profuse (in compliments). भरमसाट स्तुति करणें. *In the t. of it,* (युद्धाच्या) ऐनगर्दींत. *Through t. and thin,* under all conditions. कोठल्याहि परिस्थितींत, निश्चयानें. *Heart beats t.,* छाती लगलग धडधडते. *Thick'ish, a. Thick'ly, adv*

Thicke'n, *v. t. & i.* (थिक्न्)—to make or become thick. दाट करणें, घट्ट करणें, आवळणें, गोठवणें, दाट -घट्ट,-होणें; जमणें, दाटणें; (आवाज, कंठ) दाटणें घाईवर येणें, गुंतागुंतीचा होणें.*-ing, a.* मिळण.

Thick'et, *n.* (थिकिट्)—a tangle of shrubs of trees closely set together. गर्द झाडी, रान.

Thick'head, *n.* (थिक्हेड्)—a block-head. मंदबुद्धि मनुष्य.*-ed, a.* stupid. मंद, मंदबुद्धि. Also, *Thick-skulled,-witted, aa.*

Thick'ness, *n.* (थिक्निस्)—being thick; dimension other than length or breadth; a layer of material. जाडी, स्थूलता; जाडी; भर, पापुद्रा.

Thick'set, *a.* (थिक्-सेट्)—set closely together, having a short thick body. जवळ जवळ लावलेलें, मजबूत.

Thick'-skinned, *a.* (थिक्-स्किन्ड्)—not sensitive to criticism or rebuff. टीकेला न जुमानणारा, निगरगट्ट.

Thief, *n.* (थीफ्)—(*pl.-ves*) one who takes away by stealth what belongs to another; projection in wick of candle causing it to melt away. चोर, स्तेन, चोरटा, भामट्या; मेणबत्तीच्या वातीचें टोंक.

Thieve, *v. i.* (थीव्)-to steal things. चोरी करणें, चोरणें, भामटेगिरी करणें.*-v'ery, n.* stealing. चोरणें, चोरी, चोरचाळे.*-vish, a.* चोरटा, भामटा.*-vishness, n.-vishly, adv.*

Thigh, *n.* (थाइ)—the leg above the knee. मांडी, जांघ, जांघड. *T. bone,* जंघास्थि, मांडीचें हाड. *-thighed, a.*

Thill, *n.* (थिल्)—shaft of cart or carriage. गाडीचा दांडा,-धूर. *Thiller, thill horse,* धुरेचा घोडा.

Thim'ble, *n.* (थिंबल्)—a metal finger-cap or cover for thumb used to push needle with; metal ring; (Mech.) short metal tube. अंगुस्तान, टोपण; धातूचें कडें,-अडकवणें; धातूचें टोपण. *T.-rig,* sharper's game at fairs, etc. with three thimbles, and a pea. (जत्रेच्या ठिकाणचा) हातचलाखीचा खेळ.*-rigger,* हातचलाखीचा खेळ करणारा.*-ful, n.* small quantity (of brandy) to drink. दारूचा घोट, घुटका.*-pie,* (शिक्षा म्हणून) अंगुस्तानानें डोक्यावर टिचक्या मारणें.

Thin, *a.* (थिन्)—of little thickness, slender, meagre; weak; easily seen through; not full, crowded or numerous; of watery consistence; (*fig.*) shallow, flimsy; (of line) narrow, fine; (*sl.*) uncomfortable. पातळ, बारीक; अल्प, अशक्त; झिरझिरीत; विरळ, तुरळक, थोडका; पातळ, पिळ-पिळीत, पाणचट; किरकोळ, हलक; बारीक (रेघ इ.); अस्वस्थतेचा. *v. t. & i.* to make or become thin; remove some young fruit to allow the rest to grow well. पातळ, बारीक, सूक्ष्म-करणें,-होणें, तुरळक करणें; (झाडावरचीं बारीक फळें तोडून) पातळ करणें, तोडणें, खुडून टाकणें. *T. wire* or *sheet,* बारीक तार, पातळ पत्रा. *T. air,* विरळ हवा. *T. house,* तुरळक प्रेक्षक असलेलें नाटकगृह. *T. gruel,* पातळ कांजी. *T. excuse,* पोकळ सबब. *T. skinned, a.* sensitive. अति नाजूक (स्वभावाचा), अति भावनाशील. *T. captain,* एक प्रकारचें बिस्किट. *T.-ness, n. thin'ly adv., thin'-nish, a.* पातळसर, बारीकसर.

Thine, *pron.* (possessive of thou). तुझा.

Thing, *n.* (थिंग्)—any possible object of thought; a material object; a person or animal regarded in pity, or contempt, or affection; (*pl.*) the course of events, one's belongings. गोष्ट, विषय; वस्तु, पदार्थ; तिरस्करणीय,-प्रेमार्ह,-वस्तु, मनुष्य; (अने॰) व्यवहार, वस्तुस्थिति, परिस्थिति; मालमत्ता, चीजवस्त, कपडेलत्ते, सामानसुमान. *Not the t.,* ग्राह्य गोष्ट नव्हे, अमान्य. (*Am not feeling at all*) *the t.,* well. मला मुळींच बरें वाटत नाहीं. (Law) *tt. personal,* जंगम मिळकत. *tt. real,* स्थावर मिळकत. *Make a good t. of,* चांगला नफा मिळविणें. *Know a t. or two,* be shrewd. अनुभविक होणें, व्यवहारी असणें,-बनणें. *Do the handsome t. by,* चांगल्या रीतीनें वागविणें. *T. amy,-umajig,-umbob,-ummy, nn.* a person or thing whose name one forgets. ज्याचें नांव आपल्याला विसरायला होतें असा मनुष्य किंवा अशी वस्तु.

Think, *v. t. & i.* (थिंक्)—to have one's mind at work; hold the opinion; intend, expect; form the conception of. विचार करणें; वाटणें, मनांत आणणें, समजूत असणें; विचार असणें, घेत असणें,

चिंतणें; कल्पना करणें, तर्क होणें, हेरणें, मनांत धरणें. *T. twice before doing,* avoid hasty action. कोणतीहि गोष्ट सहसा करूं नये. *T. about,* consider. (विषयीं) विचार करणें, शक्याशक्यता पाहणें. *T. aloud,* ज्या क्रमानें विचार मनांत आले तसे मोठ्यानें बोलून दाखविणें. *T. of,* (विषयीं) विचार करणें; तर्क करणें, कल्पना चालविणें; चेत करणें, विचार आणणें; आठवणें, स्मरण करणें. *T. little* or *nothing of,* consider insignificant,. क्षुल्लक मानणें, कस्पटासमान लेखणें. *T. out,* (plan etc.). पूर्ण विचार करून काढणें (युक्ति इ.), डोकें चालवून ठरविणें. *T. fit,* or *good,* choose to do (arbitrary or foolish thing). (विशेषतः एककल्ली किंवा मूर्खपणाची गोष्ट करण्याचें) ठरविणें, पसंत करणें. *Think'able, a.* विचारणीय, चिंतनीय.

Think'er, *n.* (थिं'कर्)—one who thinks; (esp.) a person of philosophic mind. विचार करणारा, शोधक, कल्पक; तत्त्वज्ञानी.

Think'ing, *a.* (थिं'किंग)—reflective; given to independent thought. मनन,-चिंतन,-करणारा, विचारशील,-क्षम.

Third, *a.* (थर्ड्)—next after second. तिसरा, तृतीय. *n.* तृतीयांश, तिसरा भाग, तिर्धेल.*-degree,* (U. S.) severe treatment of prisoner by the police to extort confession. कैद्याला गुन्हा कबूल करविण्याकरितां दिलेली कडक वागणूक,-छळ.*-man,* (क्रिकेट) एक क्षेत्ररक्षक.*-ly, adv.* तिसऱ्यानें, तिसऱ्यांदा.

Thirst, *n.* (थर्स्ट्)—sensation or state of requiring drink; vehement desire *for* or *of* glory &c. तहान, तृष्णा; हांव, हव्यास, सोस. *v. i.* to crave *for* or *after*; be physically thirsty. हव्यास लागणें; तहान लागणें.

Thirs'ty, *a.* (थ'र्स्टि)—feeling thirst; craving for some satisfaction; (of soil) parched, suffering from lack of moisture; causing thirst. तहानेलेला, हव्यासी; रुक्ष, रखरखीत; तहान लागणारें, शोष लागणारें (काम).*-tily, adv.*

Thirteen', *a.* & *n.* (थर्टी'न्)—three and ten, 13, XIII. तेरा, तेराचा अंक, आंकडा, तेरा ही संख्या. *The t. superstition, t.* brings ill-luck. तेरा ही संख्या, हा क्रमांक, अशुभ आहे अशी भोळी कल्पना.*-th, a. & n.* तेरावा.

Thir'ty, *a.* & *n.* (थ'र्टि)—three times ten, 30, XXX. तीस. *n* तिसाचा अंक, आंकडा; तीस (संख्या). *T. one,-two,-nine,* एकतीस, बत्तीस, एकूणचाळीस. *t.-two-mo, 32mo,* book with 32 leaves to the sheet. बत्तीसपत्री-सांच्याचें पुस्तक. *thirt'ieth, a. & n.* तिसावा. *t.-fold, a. & n.* तीसपट.

This, *a. & pron.* (दिस)—*pl. these* (दीझ्), the person or thing close at hand or drawn attention to. हा, ही, हें. *T. is not fair,* हें तुझें करणें चांगलें नाहीं, ही गोष्ट चांगली नाहीं. *t. day,* today. आज. *All t. week,* ह्या समंध आठवडाभर. *Having been asking for it these three weeks,* गेले तीन आठवडे ह्याबद्दल मी विचारीत आहें. *This'ness, n.* हा-पणा, असें-असें असणें.

Thi'stle, *n.* (थि'सल्)—kinds of prickly plant common as weeds; Scottish national emblem. एक प्रकारची कांटेरी वनस्पति; कांटेसुबक, उंटकटारा; स्कॉच लोकांचें राष्ट्रीय प्रतीक,-चिन्ह.*-down, t. seed.* थिसलचें-कांटे धोतऱ्याचें-बीं. *Thi'stly, a.* (थि'स्लि) overgrown with thistles. कांटेरी झुडुपें वाढलेलें.

Thith'er, *adv.* (दि'दर्)—to that place. तेथें, तिकडे.*-wards, adv.*

Tho', See Though.

Thōle, *n.* (थोल)—*T.-pin,* a pin in the gun-wale of a boat serving as fulcrum for the oar. वल्हें अडकवण्याचा खुंटा, आटेला. *v. t.* (arch.) undergo, suffer (pain etc.); admit of. भोगणें, सहन करणें; मान्यता देणें.

Thŏng, *n.* (थॉंग)—a narrow strip of hide or leather, used as halter, reins, etc. चर्मपट्टी, वादी. *v. t.* to provide with, strike with, a thong. वादी लावणें, वादीनें मारणें.

Thŏr'ăx, *n.* (थॉ'रॅक्स)—the part of the trunk between the neck and the abdomen or tail; breast-plate (Gk.). छाती, वक्षःस्थल, वक्षःकोटर, उरःपंजर; छातीचें चिलखत, उरस्त्राण. *Thora'cic, a.* छातीचा, उराचा, वक्षःकोटरासंबंधीं.

Tho'rium, *n.* (थॉ'अरिअम्)—radio-active metallic element, used in making gas mantle. (धुराच्या दिव्यांच्या टोप्या करण्याकरितां उपयोगी असें) थूर नांवाचें धातुरूप मूलद्रव्य.

Thŏrn, *n.* (थॉर्न्)—prickle on a plant; kinds of thorny shrub, hawthorn. कांटा, कंटक; कांटेरी झाड,-झुडुप, कांटेझाड. *A t. in* one's *flesh* or *side,* a constant source of annoyance. टोंचणी, शल्य. *Be, sit, on tt.,* be continuously uneasy. रुखरुख लागणें, साशंक असणें. *A bed of tt.,* कंटकशय्या (*lit. & fig.*). *T.-bill,-tail,* एक प्रकारचा गाणारा पक्षी *T.-less, a.* कंटकरहित, निष्कंटक.

Thŏrn'y, *a.* (थॉ'र्नि)—abounding in thorns; difficult to tackle, troublesome. कांटेरी; कंटकमय, गुंतागुंतीचा, त्रासाचा; जाचाचा, जाचणीचा.

Tho'rough, *a.* (थ'रो)—complete; radical; in all respects; out-and-out. पूर्ण, पक्का, निःशेष; सर्वस्वीं; पूर्णपणें; पारंगत. *adv. & prep.* (poet.) through. मधून. *n.* (hist.) uncompromising policy of Strafford and Laud. (पहिल्या चार्ल्स राजाचे प्रधान स्टॅफर्ड व लॉड्ड यांची) अरेरावी वागणूक. *T. bass',* science of harmony. स्वरमेलन (शास्त्र). *T.-going,* uncompromising, out and out. पुरा, पक्का, विलंदर, अट्टल. *T.-paced, a.* practised (*fig.*). सर्व चाली शिकलेला (घोडा), अट्टल, पुरेपूर, पक्का. *Tho'roughly,* (थ'रलि) *adv.; Tho'roughness, a.* पूर्णपणा, पुरतेपणा.

Tho'rough-bred, *a. & n.* (थरोब्रेड)—(of animal) of pure breed; (*fig.*) high-spirited. खऱ्या अवलादीचा, अस्सल रक्ताचा ; पाणीदार.

Tho'roughfare, *n.* (थरोफेअर्)—right of way; road not closed at either end. रस्त्याचा हक्क ; रहदारीचा रस्ता. *No t.,* हा रहदारीचा रस्ता नाहीं (अशी पाटी).

Thorp(e), *n.* (थॉर्प्)—a village. खेडें.

Those, *pl.* of That.

Thou, *pron.* (दाउ)—of 2nd pers. now replaced by *you,* except in addresses to God or in Quaker or dialect speech. (द्वितीयपुरुषीं एकवचनी) तूं. *v. t. & i.* to address (person) as thou, use *t.* instead of you. एकेरीवर येणें, अरेतुरे करणें.

Though, *conj.* (दो)—tho', *although,* and yet. जरी, यद्यपि. *What t. the way is* (or *be*) *long,* what does it matter etc. मार्ग दूरचा असला तरी कांहीं क्षिति-पर्वा-नाहीं. *As t.,* as if. जणूं काय.

Thought, *n.* (थॉट्)—thinking as a process or a faculty; a conception or mental image; (usu. pl.) what one thinks, one's opinion; subject of one's thought. विचार, मन, चिंतन, विचारशक्ति; कल्पना; विचार, मत; विचाराचा विषय काळजी, चिंता. *pa. t. & pa. p.* of Think. *In t.,* meditating. विचारमग्न, ध्यानस्थ. *You are much in my tt.,* I often think of you. तूं माझ्या ध्यानींमनीं असतोस. *A t., adv.* a little, somewhat. थोडासा, किंचित्. *Quick as t.,* अति त्वरेनें, वायुवेगानें. *Second tt.,* पुनः केलेला विचार, फेरविचार. *T. reader,* दुसऱ्याचें मन जाणणें,-ओळखणें, मनकवडा. *T. transference,* युगपद्भावनानुभूति. *T. wave,* विचारलहरी.

Thought'ful, *a.* (थॉट्-फुल्)—contemplative; engaged in meditation; giving signs of original thought; considerble. मननशील; कल्पक; विचारी.-*fully, adv.* विचारपूर्वक, मननपूर्वक.-*fulness, n.* विचारीपणा, विचारशीलता.

Thought'less, *a.* (थॉट्लेस्)—careless of consequences; due to want of thought. अविचारी, मद्द, मूर्ख, निष्काळजी; अविचारानें केलेलें. -*ly, adv.* ;-*ness, n.* अविचारीपणा, मूर्खपणा.

Thous'and, *a. & n.* (थाउजन्ड्)—denoting the number ten hundred, 1000, M.; (loosely) many. एक हजार, सहस्र, दहाशें, दशशत; पुष्कळ, लाखों. *A. t. times easier,* लाखोपटीनें सोपें. *One in a t.,* rare or excellent one. लाखांत एखादा, लाख मनुष्य. *Made a t. and one excuses.* त्यानें असंख्य सबबी सांगितल्या.-*fold, a. & adv.* हजारपट, सहस्रपट,-पटीनें.-*th, a. & n.* हजारावा.

Thrall, *n.* (थ्रॉल्)—(*rhet., poet.*) a bondsman, a slave (*of, to*), a serf; bondage, slavery. दास, गुलाम; गुलामगिरी, दास्य. *a.* (arch.) enslaved (*to*). (चा) दास झालेला,-बंदा. *v. t.* to enslave. गुलाम-दास-करणें.

Thral'dom, *n.* (थ्रॉल्डम्)—bondage. दास्य, गुलामगिरी.

Thrăsh, Thrĕsh, *v. t. & i.* (थ्रॅश्, थ्रेश्)—(*usu. -ash*) beat with a stick or whip, conquer, surpass; (usu.-*esh*) beat out grain from corn; (of paddle, wheel, branch) deliver repeated blows; (of ship) keep striking the waves. काठीनें,-चाबकानें,-मारणें, झोडपणें, कुचलणें, चीत पाडणें, मात करणें; (धान्याची मळणी करणें, झोडपणें, झोडणे; धोपटणें, सतत तडाखे मारणें; (प्रवाहाच्या, वाऱ्याच्या) उलट दिशेनें, लाटा कांपीत, जाणें. *T. out,* (*fig.*) arrive at (the truth, rhyme, etc.) by repeated trial. कीस काढणें, संशोधन करणें. *Threshing floor,-machine,* धान्य-मळणीचें खळें,-यंत्र.

Thrăsh'er,-ĕsh'er, *nn.* (थ्रॅशर्, थ्रेशर्)—a kind of shark; (U. S.) thrush; one who thrashes; a person, or machine, that threshes. एक जातीचा शार्क मासा; कोकिळ, सारिका (अमे०), मारणारा, झोडणारा; (धान्य) झोडणारा, मळणारा, झोडण्याचें यंत्र.

Thrăsh'ing, *n.* (थ्रॅशिंग्)—a whipping, a sound drubbing; a defeat. चाबकाचा मार; पराभव.

Thrasŏn'ical, *a.* (थ्रसॉनिकल्)—bragging. बढाई मारणारा, बढाईखोर.-*ically, adv.*

Thread, *n.* (थ्रेड्)—a length of spun yarn flax, cotton, etc.; thin cord of twisted yarns; theme of argument, &c.; spiral part of screw; thin vein of ore. सूत, दोरा, धागा, सूत्र, तंतु; धागादोरा, अनुसंधान, कथासूत्र,-संदर्भ; (स्क्रूचा) आंटा, पेंच, गाळा; दोरा. *v. t.* to pass thread through (needle, beads); to make way through. दोरा ओंवणें; मधून मार्ग काढणें, धागा लावणें; रस्ता काढणें. *Has not a dry t. on him,* is wet through. चिंब भिजला आहे. *Gold t., silver t.,* कलाबतू, जरतार. *To hang by a t.,* (of person's life, etc.) be in a precarious condition; (of momentous issue) be determinable either way. (जीवित) धोक्यांत असणें; पेंचांत असणें; अनिश्चित असणें. *Resume* or *take up the t. of,* (चें) कथासूत्र पुन्हां जुळविणें, अनुसंधान करणें. *Gather up the tt.,* (विषयाचे) धागेदोरे एकत्र आणणें,-जुळविणें, विषयाची जुळवाजुळव करणें. *T.-lace,* तागाच्या सुताची फीत. *T.-needle,* children's game. 'सुई-धागा', मुलांचा खेळ. *T. worm,* सूत्रकृमि, सुतासारखा जंत (लहान मुलांच्या पोटांत होणारा). *Thread'y, a.;* -*d'iness, n.*

Thread'bāre, *a.* (थ्रेड्-बेअर्)—with nap worn off and threads showing; hackneyed. विरविरीत, फूल झडलेला, जीर्ण, झिरझिरीत; प्रचारांतील, शिळा, जुना.-*ness, n.*

Threat, *n.* (थ्रेट्)—declaration of intention to punish or hurt; indication of coming evil. धाक, भय, भीति, (law) धमकी; भयसूचना.

Threa'ten, *v. t. & i.* (थ्रे'टन्)—to use a threat *to*; intimidate *with*; portend; (of evil) seem to impend. धमकी देणें, धाक घालणें; भविष्य सुचविणें, सूचना देणें, सूचक होणें; जवळ येऊन भिडणें, भेडसावणें, भय दाखविणें. *Threatened me with death*, मला ठार मारण्याची धमकी दिली. *Threa'teningly, adv.*

Three, *a. & n.* (थ्री)—one more than two, 3, III. तीन, ति-. *The t. R's*, reading, writing, arithmetic. वाचन, लेखन, हिशेबठिशेब (गणित). *Rule of t.*, त्रैराशिक. *T.-bottle man*, जुन्या पद्धतीचा पक्का दारुड्या. *T. colour process*, (तांबडा, निळा आणि पिंवळा या रंगांत) तीनरंगी चित्र बनविणें. *T. handed*, तीन हातांनीं; तिहाती; तिघांनीं खेळण्याचा. *T.-fold*, *a. & adv.* तिप्पट, तिहींचा, तिहेरी, तिघड. *T.-pence*, (थ्रे'पन्स्) तीन पेन्स (रक्कम). *T.-penny bit*, (थ्रे'-पनिबिट) तीन पेन्साचें नाणें. *T.-ply*, *n.* तिपदरी लांकूड, फळी, पुठ्ठा. *T. quarter*, *a.* (of protrait) कमरेपर्यंतच्या वरच्या भागाचें (चित्र), पाऊणपट चेहरा-चेहऱ्याच्या तीन बाजू-दाखविणारें (चित्र).

Three'score, *a.* (थ्री'स्कोअर्)—thrice twenty, sixty. साठ. *T. and ten*, age of 70, normal limit of life. अयुष्याची सर्वसाधारण सत्तर वर्षांची मर्यादा.

Thremmatŏl'ogy̆, *n.* (थ्रेमटॉ'लजि)—the science of breeding animals and plants. प्राणिसंवर्धन, -वनस्पतिसंवर्धन,-विद्या.

Thrĕ'nody̆, *n.* (थ्री'नडि)—*node*, song of lamentation. शोकगीत, मरशा. *Threnet'ic,-ical, threnodial, -dic, aa.*

Thrĕsh, *v. t. & i.* (थ्रेश्)—to separate the grain or seeds from corn by beating. झोडणें, मळणी काढणें.

Thrĕsh'ing, *n.* (थ्रे'शिंग)—act of beating out grain, process of threshing corn. झोडपणी, मळणी.

Thrĕsh'ōld, *n.* (थ्रे'शोल्ड्)—the plank or stone forming the bottom of a doorway; (colloq.) entrance. उंबरा, उंबरठा; प्रवेशद्वार, मूळारंभ, उपक्रम. *At the t. of a new century*, नवीन शतकाच्या मूळारंभीं. *Stumble at the t.*, (*fig.*) प्रथमग्रासे मक्षिकापातः.

Threw, *pa. t.* of Throw.

Thrice, *adv.* (थ्राइस्)—three times, (in comb.) highly. तीनदां, त्रिवार; पुष्कळ, अतिशय. *t. favoured*, पुष्कळ कृपेंतला,-मर्जीतला.

Thrift, *n.* (थ्रिफ्ट्)—saving ways, sparing expenditure, frugality, economical management; kinds of plant. काटकसर, मितव्यय, बेतबात व्यवस्था; एक वनस्पति, झाड.*-less*, उधळ्या.*-lessly*, *adv.*, *-lessness, n.*

Thrif'ty̆, *a.* (थ्रि'फ्टि)—economical; thriving. काटकसरी, मितव्ययी; भरभराटीचा, चलतीचा.*-tily*, *adv.*

Thrill, *n.* (थ्रिल्)—a nervous tremor due to intense emotion; a wave of sensation; a tremulous sound. शिरशिरी; स्फुरण, शिसारी, कंप. *v. i. & t.* to feel thrills or vibrate (*with*); quiver, throb, with emotion. शिरशिरी येणें किंवा आणणें; अंतःकरण हालवून सोडणें, खळबळवणें, थरारून सोडणें, हालून जाणें, कंप पावणें. *-ingly, adv.,-ingness, n.*

Thrill'er, *n.* (थ्रि'लर्)—(esp.) a sensational play or tale. मनोविकार उद्बंचळविणारें,-संक्षोभजनक नाटक, कथानक.

Thrive, *v. i.* (थ्राइव्ह्)—(throve, thriven), to prosper or be successful; (of animal or plant) to grow vigorously. भरभराट होणें, उत्कर्ष होणें; जोरानें वाढणें, जोमानें वाढणें. *Thriv'ingly, adv. -ingness, n.*

Thro', **thro**, see Through.

Throat, *n.* (थ्रोट)—front part of the neck; gullet, wind-pipe; passage or entrance. गळा, कंठ; अन्ननलिका, घसा, श्वासनलिका, अरुंद मार्ग,-वाट. *v. t.* to channel, groove. खांचणी पाडणें, खोदणें. *To cut* one's *t.*, कंठस्नान घालणें, गळा कापणें. *Take by the t.*, try to throttle. गळा आवळणें, मान आवळणें. *Words stuck in my t.*, तोंडावाटे,-ओंठावाटे,-शब्द निघेनात. *Sore t.*, घसा धरणें,-सुजणें. *Cut* one's *own t.*, आत्मघातकी वर्तन करणें. *Cut one another's tt.*, adopt mutually destructive policy. परस्पर-विघातक वर्तन करणें. *Lie in* one's *t.*, lie grossly. धडधडीत खोटें बोलणें. *Give person the lie in his t.*, एखाद्यावर धडधडीत खोटें बोलल्याचा आरोप करणें.

Throat'y̆, *a.* (थ्रो'टि)—(of voice) guttural, hoarsely resonant. कंठस्थ, घोगरा (आवाज). *-iness, n.*

Thrŏb, *v. i.* (थ्रॉब्)—(of heart, bosom etc.) to pulsate with abnormal force; (fig.) quiver, vibrate. उडणें, फुरफुरणें, धडधडणें; लवणें, स्फुरण पावणें. *n.* palpitation; a single beat of strong pulsation. धडधडणें; ठोका; स्पंद, स्पंदन. *Heart-tt.*, छातीचें धडधडणें,-ठोके. *Throb'bingly, adv.*

Throe, *n.* (थ्रो)—(*usu. in pl.*) a violent spasm, esp. those of childbirth, anguish. वेदना, तिडीक, प्रसववेदना, चिंता. *v. i.* to be in agony. तिडीक,-वेदना, -लागणें.

Thrōne, *n.* (थ्रोन्)—the chair of State for sovereign, &c.; the sovereign power. सिंहासन, तक्त, गादी; राजाधिकार, राजसत्ता *v. t.* to enthrone. सिंहासनावर,-गादीवर,-बसविणें; तक्तनशीन करणें. *came to the t.* गादीवर बसला, *lost his t.*, त्याचें राज्य (अधिकार, राज्यसत्ता) गेलें, तो राज्यभ्रष्ट झाला. *T. less, a.*

Thrŏng, *n.* (थ्रॉंग)—press of people, crowding (*of* people or things), a crowd. लोकांची गर्दी, गर्दी, समुदाय, जमाव. *v. i. & t.* to come in great numbers; to flock into. गर्दी करणें; एकत्र जमणें, दाटी होणें, गर्दी होणें.

Thrŏs'tle, *n.* (थ्रॉस्‌ल्)—the song-thrush; (*-frame*) machine for spinning wool, etc. एक गाणारा पक्षी, मदनसारिका; सूत कातण्याचा सांचा.

Thrŏt'tle, *v. t.* (थ्रॉट्‌ल्)—to compress the throat of; strangle, choke; control (steam, etc.) with throttle-valve. गळा दाबणें; नरडी आवळणें; (वाफ दाबणाऱ्या पडद्यानें) वाफेचें नियमन करणें. *n.* a throat, gullet; (*-valve*), a valve regulating supply of steam etc. in engine. गळा, अन्ननलिका; यंत्रांतील वाफ्पनियामक पडदा.

Through, *prep.* (थ्रू)—from end to end or side to side of; between the sides of; by agency, means or fault of; by reason of. आरपार; मधून; काढून, मार्फत, द्वारा, मुळें. *adv.* through something; from end to end; (U. S.) finished. मधून; पार, आरपार; शेवटास, कडेस, कडेपर्यंत. संपूर्ण. *a.* going; (of travelling) going all the way without change of line etc. आरपार (जाणारा); ठेपी, न बदलतां जाणारी (गाडी इ.). (*fig.*) *went t. many trials*, पुष्कळ कसोटींतून तो यशस्वी होऊन पार पडला. *See t. a telescope*, दुर्बिणींतून पहा.. *Concealed it t. shame*, लाजेमुळें त्यानें तें (ती गोष्ट) झाकलें. *Would not let us t.*, आम्हांला (दरवाज्यांतून) आंत जाऊं देईना. *Read* (a book) *t. and t.*, पुन्हां पुन्हां (साद्यंत) वाचणें, पारायण करणें. *Look* one *t. and t.*, (एखाद्याला) न्याहाळून पाहणें. *A t. train,-ticket*, शेवटपर्यंत-थेट,-ठेपी जाणारी (आग-) गाडी,-ठेपीचें तिकिट.

Through'out, *prep.* (थ्रु'अउट्)—from end to end of; in every part of. साद्यंत; शेवटपर्यंत, सर्व यावतींत. *adv.* right through, in all respects. सारखा, सर्वत्र, सर्व यावतींत. *Timber was rotten t.*, तें लांकूड जिकडे-तिकडे,-सर्वभर,-कुजलेलें होतें.

Throw, *v. t. & i.* (थ्रो)—(*threw*, थ्रू pa. t, *thrown* थ्रोन् pa. p.) to launch (an object) into the air with some force; to fling off (rider), hurl, cast; use as missile; (Crick.) throw ball with sudden jerking motion of elbow; (of wrestler etc.) bring to the ground; put (clothes) carelessly *on, off, over*; (of snake) cast skin; (of rabbits etc.) bring forth; make specified cast with dice; twist (silk etc.) into threads; shape on potter's wheel. फेंकणें, झुगारणें, जोरानें उडवणें; (खालीं,-दूर) फेंकणें; (दगड) हत्यार म्हणून मारणें; (क्रिकेट) खांदा उचलून चेंडू फेंकणें; जमिनीवर लोळवणें, खालीं पाडणें, जमीनदोस्त करणें; (कपडा) निष्काळजी-पणानें घालणें; टाकणें, फेंकणें; (सापाचें) कात टाकणें, मेंग टाकणें; (सशाचें, कबुतराचें) विणें, अंडीं घालणें; (फांशांनीं) नेमका डाव येणें; (रेशमाचा) पीळ घालून धागा करणें, दोरा करणें; (कुंभाराच्या चाकावर भांड्याला) वाटोळा आकार देणें. *n.* throwing, being thrown; cast of dice; cast of fishing-line; distance a missile is thrown; (Crick.) bowler's illegitimately thrown ball; (Geol.) fault in strata; machine giving rapid rotary motion. फेंकणें, टाकणें, प्रक्षेपण; डाव; गळ टाकणें; फेंक, फेंकीचें अंतर; चेंडूफेंक्यानें नियमबाह्य टाकलेला चेंडू; भ्रंशविस्तार, भगविस्तार; जलद व वर्तुळाकार गति देणारें यंत्र. *To t. about*, चोहोंकडे उधळणें,-फेकणें. *T. away*, (*fig.*) घालवणें, गमावणें. *The advice was thrown away upon him*, was wasted. त्याला सांगितलेला सगळा उपदेश फुकट गेला, उपड्या घागरीवर पाणी असें झालें. *T. oneself down*, lie down. पडणें, आडवें होणें. *T. back*, मूळ वंशावर जाणें. *T. in* one's *lot with*, शीं (नफानुकसानींत) सहभागी होणें. *T. off*, (कपडे) काढून टाकणें; (मैत्री, ओळख) झिटकारणें, अव्हेर करणें; (आळस, आजार) झाडून टाकणें, दूर करणें; (कविता वगैरे) शीघ्र तयार करणें, हातावेगळें करणें; सुरवात करणें. *T. open*, open suddenly or wide; make accessible to all. सताड उघडणें; मुक्तद्वार ठेवणें, सर्वांना शक्य करणें. *T. out*, reject (bill etc.) by votes; put (batsman) out by throwing at wicket; embarass by interruption. (बहुमतानें) फेटाळणें; खेळाडूला बाद करणें (चेंडू यष्टीवर फेकून), अडथळा करून (वक्त्याला) गोंधळविणें. *T. over*, desert, abandon. (स्व-पक्ष) सोडून देणें; (पक्षांतून) फुटणें. *T. up*, (खिडकीचें झांकण) वर सारणें; (नोकरीचा) राजीनामा देणें; वांति करणें, होणें. उलटी होणें. *T.* one's *eyes up*, (भीतीनें इ.) डोळे टवकारणें. *T. stones*, (lit. & fig.) दगड मारणें; आरोप करणें, चिखल फेंकणें. *T. light on the matter*, चा उलगडा करणें. *T. me a rope*, माझ्याकडे दोरी फेंक. *A stone's t.*, (loosely). थोडकें अंतर. *Throw'er*, *n.*

Throw'ster *n.* (थ्रो'स्टर्)—one who throws silk. रेशमाचा धागा काढणारा.

Thrŭm, *n.* (थ्रम्)—unwoven end of a warp thread left when the finished web is cut away; any loose thread or tuft. आंचळ्या, दशा; दशी, सुटा धागा. *v. t.* दशा लावणें, झालर लावणें. *Thrum'my*, *a.*

Thrŭm, *v. t. & i. & n.* (थ्रम्)—to play monotonously (*on* a stringed instrument); drum, tap, idly. तारा नवशिक्याप्रमाणें वाजविणें,-तोडणें, -छेडणें; उगाच वाजवीत राहणें, ठकठक आवाज करणें.

Thrŭsh, *n.* (थ्रश्)—kinds of song-bird. युरोपांतील सारिका पक्षी, कोकिळ, मदनसारिका.

Thrŭsh, *n.* (थ्रश्)—throat disease, esp. of children; foot-disease in horses. (लहान मुलांचें) तोंड येणें (रोग), तोंडांतील नाव्हा, जिभेवरील बुरशी (चा रोग); घोड्याच्या खुरांचा रोग.

Thrŭst, *v. t. & i.* (थ्रस्ट्)—to push, drive with force; make a lunge or stab with a weapon; intrude oneself, force (a person) *upon*; force one's way through. ढकलणें, रेटणें, खुपसणें, खोचणें, शिरकावणें, घुसडणें, भोसकणें; आगंतुकीनें घुसणें, घुसून मार्ग काढणें. *n.* a stab, sudden push; (Mil.) strong attempt to penetrate enemy's line or territory; remark aimed at a person; stress between two bodies. खुपसणें, ढकलणें; शत्रूची फळी फोडण्यासाठीं वेगाचा हल्ला,-चाल; मर्मवचन, शब्दबाण; धक्का, ताण, हुसकणी. *To t. oneself* or *one's nose*

in, obtrude, interfere. लुडबुड करणें, तोंड घालणें. *Home t.*, वर्मी लागणारा (शाब्दिक) घांव;-हल्ला.

Thŭd *n.* & *v. i.* (थड्)—sound made by impact of nonresonant things. जोराचा न घुमणारा आवाज, धप्प, धब्ब,-आवाज (करणें, होणें).

Thŭmb, *n.* (थम्)—one of the five fingers opposable to the other four. (हाताचा, मनुष्याचा किंवा जनावराचा) आंगठा. *v. t.* to soil or wear (book etc.) with thumb, handle or play awkwardly. (पुस्तकाचीं पानें आंगठ्यानें) मळविणें; (पिआनोवर) वांकडें तिकडें वाजविणें. *Under person's t.*, (च्या) मुठींत, ताब्यांत, *T. mark*, आंगठ्याचा छाप,-खूण. *T. nail sketch*, portrait of *t.* nail size; hasty word-picture. आंगठ्याच्या नखाएवढें चित्र; घाईघाईनें-काढलेलें-ओझरतें-शब्दचित्र. *T. screw*, instrument of torture for squeezing *tt.* आंगठ्यांना लावण्याचा चांप (शिक्षा म्हणून). *T. stall*, अंगुष्ठरक्षण,-रक्षक,-वेष्टण. *T. less, a.*

Thŭmb'-print, *n.* (थंम्-प्रिंट्)—impression of thumb taken as means of identifying a person. आंगठ्याचा ठसा.

Thŭmp, *v. t.* & *i.* (थम्प्)—to hit with a fist, pummel. बुक्के मारणें, धडक मारणें, बुदकणें, कुचकणें. *n.* sound of thumping; a blow with the fist. धडक, धडका, धपाटा; बुक्का, ठोसा. *Thum'ping, a.* फार मोठा, अजस्र. *Thum'per n.* big specimen; outrageous lie. मोठा, अजस्र मनुष्य; धडधडीत असत्य,-खोटें.

Thŭn'der, *n.* (थंन्डर्)—the sound made by lightning; thunderbolt; any loud rumbling; (*pl.*) authoritative censure or threats. मेघनाद, गडगडाट; वज्र, वीज, गर्जना; टीका, टीकास्त्र, गर्जना. *v. i.* & *t.* to emit thunder or thunders; utter or say out loudly. गरजणें, गाजणें, मेघगर्जना होणें; दणकावून बोलणें किंवा उच्चारणें, धडकावून उच्चारणें,-सांगणें. *Blood-and-t.*, (novel), sensational. खळमळ उडविणारी, भावनोत्पादक, चेतनोत्पादक. *It thunders*, मेघगर्जना होते. *T.-clap*, (*fig.*) crash *of t.*, वज्राघात. *T.-cloud*, गडगडाट करणारा मेघ, विजेचा मेघ. *T. storm*, storm with *t.* गाजता पाऊस, गाजती सर. *T.-less.*

Thŭn'derbōlt, *n.* (थंडर्-बोल्ट्)—lightning-flash regarded as a missile or destroying agency; punitive decree. वीज, वज्र; लष्करशाहीचा हुकूम.

Thŭn'derer, *n.* (थंन्डरर)—*the T.*, ग्रीक लोकांची ज्युपिटर देवता.

Thŭn'dering, *n.* (थंन्डरिंग)—In vbl. senses; (colloq.) unusual, remarkable. गर्जना करणारा; फार मोठा, अतिशय, कडाक्याचा, कडकडाटाचा. *adv.* गर्जना करून, कडकडाटानें, कडाक्यानें.-*ly, adv.*

Thŭn'derstrŭck, *a.* (थंडर्-स्ट्रक्)—utterly taken aback by an event or discovery. थक्क, चकित, थक्क झालेला.

Thŭn'derous, *a.* (थंडरस्)—producing thunder, thundery, as loud as thunder. मेघगर्जनेइतका मोठा, कडकडाचा, गडगडाटाचा.-*ly, adv.*

Thŭn'dery, *a.* (थंन्डरि)—oppressive. कडाक्याचा, तीव्र, दडपणारा.

Thūri'ble, *n.* (थ्यूअरिबल्)—a censer. धुपाटणें, धुपारती.

Thūrs'day, *n.* (थंर्झ्-डि)—the fifth day of the week, गुरुवार, बृहस्पतिवार.

Thŭs, *adv.* (दस)—in this way; accordingly; to this extent. अशा तऱ्हेनें, असा; इतका, एवढा. *T. far, t. much*, एथवर, एथपर्यंत, इतका, एवढा.

Thwart, *v. t.* (थ्वॉर्ट्)—to frustrate or foil. निष्फळ करणें, मोडा घालणें, विरुद्ध जाणें. *n.* a rower's seat. वल्हवणाराची बसण्याची जागा,-बैठक. *adv.* & *prep.* across., आडवा, तिरवा. *a.* transverse. आडवा.-*ingly, adv.*

Thȳ, *attrib. a.* (दाय्)—of or belonging to thee. तुझा. *Thine, pron.* & *a.* तुझा, त्वदीय. *It was thy fault, lift thine eyes.* तुझा अपराध होता, (तूं) आपली दृष्टि वर कर. *Thyself, pron.* (refl. & emph. form of *thee, thou*). तूंच, आपणच.

Thȳl'acine, *n.* (थिलॅसिन्)—a zebra-wolf; a Tasmanian carnivorous marsupial. (झेब्रासारखा) पट्टेरी लांडगा; तास्मानियांतील एक हिंस्र प्राणी.

Thȳ'mol, *n.* (थाय्मॉल्)—a powerful disinfectant. प्रखर जंतुनाशक.

Thȳr'oid, *a.* (थाय्राइड्)—(anat., zool.) shield-shaped; having shield-shaped markings. ढालीच्या आकाराचा; ढालीसारखे ठिपके असलेला. *T. cartilage*, large cartilage in larynx enclosing vocal chords. कंठस्थळींचा मृदु अस्थि, कंठकूर्चा. *T. gland*, or *body*, कंठग्रंथि, वाटाणूग.

Ti, *n.* (टी)—(Austral.) kinds of tree with edible roots. एक जातीचें झाड.

Tiar'a, *n.* (टाय्अरा)—ancient Persian conical cap; pope's diadem; jewelled band worn in the front of the hair by ladies. उभट टोपी; मुकुट; स्त्रियांचें केशभूषण.

Tiār'a, *n.* (टिआरा)—kind of turban, a conical cap; pope's diadem. निमुळती टोपी; पोपचा मुकुट.

Tib'ia, *n.* (टिबिआ)—(*pl.-ae*) the shin-bone; joint of leg. पायाचा नळा, नळी, नळकुटी.-*ial, a.*

Tick, *n.* (टिक्)—the beat or sound of a watch or clock; a slight sound; a small mark; kinds of insect parasite infesting animals; cover of bedding; stout striped cloth used for this; (colloq.) credit. घड्याळाचा टिकटिक असा आवाज; लहान आवाज; बारीक खूण, टीक; गोचीड, कोळऊ; (उशीची, गादीची) पिशवी, खोळ, खोळींचें पटेरें कापड; उधार, खातें. *v. i.* & *t.* (of clock) to make tick; (*T. off*) set tick against; give tick, buy or sell on tick. टिक्

टिक्‌ वाजणें,-आवाज करणें ; (वर) खूण करणें, फुली करणें ; उधारी (वर) देणें ; उधारीनें विकत देणें,-विकत घेणें. *To,* or *on, the t.,* घड्याळ्याच्या ठोक्यावर, बिनचूक वेळेवर. *T. t.,* घड्याळ (लहान मुलांचा शब्द). *Buy goods on t.,* उधारीनें (पतीवर) माल विकत घेणें, खात्यावर घेणें.

Tick'et, *n.* (टिकिट्)—a card or paper securing admission, &c. to its holder ; (U. S.) list of candidates put forward by a party, (*fig.*) principle of a party ; (Mil., sl.) discharge. (नाटकाचें, बोटीचें, आगगाडीचें) तिकिट, प्रवेशपत्र, परवाना ; चिठी, खूण, अंकपट्टी, चीजक ; (एखाद्या पक्षाच्या) उमेदवारांची यादी, पक्षाचें तत्त्व, -मत ; कायम रजा, मोकळीक. *v. t.* to put ticket on. (किंमतीची) चिठी लावणें,-चिकटविणें. *Not quite the t.,* proper t. योग्य गोष्ट नव्हे. *T. porter,* परवानेवाला हमाल. *T. punch,* तिकिटें कापण्याचें यंत्र. *Return t.,* जाण्यायेण्याचें,-परतीचें,-तिकिट. *Season t.,* (ठराविक) मुदतीचें तिकिट.

Tick'ing, *n.* (टिकिंग)—strong material for bed ticks. सतरंजीचें मजबूत कापड.

Tic'kle, *v. i.* & *t.* (टिकल्)—to stir sense of humour in ; poke or knead in the ribs, &c., produce convulsive laughter. आनंदित करणें, खुष करणें ; खुलवणें, गुदगुल्या करणें,-होणें. *n.* act or sensation of tickling. गुदगुल्या, आनंद, खुलावणूक.

Tick'ler, *n.* (टिक्लर्)—In vbl. senses ; a feather used to tickle faces ; puzzling or delicate question. गुदगुल्या करणारा ; गुदगुल्या करण्याचें पीस ; नाजुक प्रश्न, भानगडीची गोष्ट.

Tick'lish, *a.* (टिक्लिश)—sensitive to tickling ; (of problem, affairs) difficult to handle. गुदगुल्या होणारा ; नाजूक भानगडीचा.*-ly, adv.* ;*-ness, n.*

Ti'dal, *a.* (टाइडल्)—of, due to, or affected by the tide. भरती ओहोटीचा ; ठराविक वेळानें होणारा. *T. air,* श्वासाबरोबर फुफ्फुसांतून आंत जाणारी व बाहेर पडणारी हवा. *T. harbour,* भरतीचें बंदर. *T. river,* मुखापासून कांहीं अंतरावर भरतीचें पाणी जातें ती नदी, खाडी. *T. wave,* समुद्राची मोठी लाट ; (*fig.*) जंगी प्रदर्शन (लोकमताचें वगैरे). *Ti'dally, adv.*

Tide, *n.* (टाइड)—the rise and fall of the sea occurring twice in a lunar day ; time, season ; period of time ; a trend of opinion or feeling. समुद्राच्या पाण्यांतील चढउतार, भरतीओहोटी ; काळ, वेळ ; समय, दिवस ; मतप्रवाह, प्रवाह, दैव. *v. i.* & *t.* to be carried by the tide ; get *over* (difficulty etc.). भरतीओहोटीबरोबर वाहणें,-जाणें ; पार पडणें. *High t.,* भरती, भरती. *Low t.,* निगार. *Flood t.,* भरती. *Ebb t.,* ओहोटी, ओहोट. *Spring t.,* उधाण ; उधाणाची मोठी भरती (अमावास्येला वेते). *Neap t.,* भांग (भरती, अष्टमीला वेते). *T. guage,* भरती मोजण्याची आंखलेली काठी. *T. lock,* lock between tidal harbour and basin behind it. भरतीचें दार. *T.-waiter,* जकात अधिकारी (गलबतांची पाहणी-तपासणी करणारा). *T. way,* भरतीनें होणारा रस्ता, भरतीचा मार्ग. *T.-less, a.*

Ti'dings, *n. pl.* (टाइडिंग्ज्)—news received, information, intelligence. बातमी, समाचार, वार्ता, खबर.

Ti'dy, *a.* (टाइडि)—neat, orderly, dressed with neatness ; methodically arranged ; (colloq.) pretty large ; fairly well in health. सुबक, ठीक ; व्यवस्थित, नीटनेटका ; बराच, पुष्कळ, मोठा ; (प्रकृतीनें) बरा, ठीक. *n.* a detachable cover for chair-back, receptacle for odds and ends. खुर्चीच्या पाठीचा अभ्रा ; सटरफटर वस्तूंचें पात्र. *v. t.* make (*up*) neat, put in good order. नीटनेटका करणें, व्यवस्थित करणें, -ठेवणें,-लावणें. *A t. sum,* मोठी रकम, पुष्कळ पैसा. *Street t.,* रस्त्यावरील कचऱ्याची पेटी. *Ti'dily, adv.* ; *Ti'diness, n.*

Tie, *v. t.* & *i.* (टाइ)—to attach, fasten with a cord ; form into a knot or bow ; restrict, bind (person to, *down* to) ; bind rafters by a cross -bar ; make an equal score or run dead heat or draw game. दोरीनें बांधणें ; गांठ मारणें ; बंधन घालणें, आडव्या काठीनें बांधणें ; सारख्या धावा काढणें, सारखें धांवणें, खेळांत समसमान होणें, सारखा डाव करणें. *n.* a necktie ; cord for unifying or connecting element ; (*fig.*) thing that unites persons ; rod, beam, holding parts of a structure together ; (U. S.) rail-sleeper ; (Mus.) curve set above notes to be played continuously ; thing that hampers ; draw or dead heat or equal score. गळपट्टी, नेक्टाय ; बंद, बंधन, गांठ ; लागाबांधा, धागा-दोरा ; आडवा दांडा,-अटसर, आडवी तुळई ; (रेल्वेच्या रुळांना जोडणारा) सिलिपाट, आडवा ओंडका ; (एकदम वाजविण्याच्या सुरांवरील) वक्र खूण ; अडचण, अडथळा ; समसमान,-सारखा,-टाय. *To t. a person's tongue,* secure or compel his silence. (एखाद्याला) गप बसवणें, न फाटण्याची-बोलण्याची-मनाई करणें. *T. up,* बांधून टाकणें, गोवून घेणें. *T. down,* restrain. गुंतवून घेणें, हातपाय बांधून टाकणें, नियंत्रण घालणें. *Tt. of friendship,* मैत्रीचें बंधन. *Play, shoot off, a t.,* सारखा डाव झाल्यानंतर (सामनेवाल्यांची सरशी ठरविण्याकरितां) पुढें डाव खेळणें. *T. up,* (U. S.) a strike, lock-out, संप, काम बंद पाडणें. *T. beam,* पोचीची तुळई. *Ty'ing, pr. p.*

Tier, *n.* (टिअर्)—(*pl.*) two or more rows of things etc. ; (sing.) one of such row. रांगा, रांग, ओळ, मजला. *v. t.* to pile in *tt.* ओळी लावणें, रांगा रचणें. *Tt. of cable,* दोरखंडाचें वेटाळें. *of two, three, four, tt.,* दुमजला,-ली, तिमजली, चार मजली.

Tierce, *n.* (टिअर्स)—old wine-measure ; medium sized cask for wine ; sequence of three cards ; (Fencing) position for guard or thrust. जुनें दारूचें माप ; मध्यम आकाराचें दारूचें पिंप ; एकामागचे एक असे तीन पत्ते ; (मुष्टियुद्धांतील) एक पवित्रा.

Tiff, *n.* (टिफ्)—a slight quarrel between lovers or friends ; a draught of liquor. लहानसें भांडण, मित्र-

कलह; दारूचा घोट: *v. i. & t.* प्रेमकलह होणें; दारूचा घोट घेणें, आचमन घेणें, पिणें; फराळ करणें.

Tiff'any, *n.* (टि'फनि)—kind of gauzy silk. विरविरीत रेशमी कापड.

Tiff'in, *n. & v. t.* (टि'फिन्)—light meal, lunch. फराळ, उपाहार (करणें).

Tige, *n.* (टीझ्)—shaft of column; stem, stalk. खांबाच्या वाटोळा दांडा,-भाग; देंठ. [F]

Ti'ger, *n.* (टा'इ्-गर्)—a large striped feline beast of prey; a bully; smart small boy as groom; final burst of applause. वाघ, व्याघ्र, शार्दूल; आडदांड मनुष्य, घमेंड्यानंदन; चपराशी; अभिनंदनार्थ शेवटची आरोळी, गलका. *Work like a t.,* वाघासारखें (क्रूरपणानें व झपाट्यानें) काम करणें. *T.-cat,* kinds of smaller animal looking like tiger. वाघरूं, वाघट, वाघासारखें लहान जनावर. *T. eye, T.'s eye.,* a gem of brilliant lustre. अत्यंत पाणीदार रत्न,-मणि. *T. lily,* काळ्या ठिपक्यांचें गुलाबी फूल. *T. moth,* वाघाच्या कातड्या-सारखें केसाळ पंख असलेलें पांखरूं,-पतंग. *Ti'gerish, a.* वाघासारखा क्रूर, हिंस्र. *Ti'gress, n. f.* वाघीण, व्याघ्री.

Tight, *a.* (टाइट्)—close packed or firmly fixed; compact, well-knit; grappling; (sl.) drunk. तंग, ताठ, घट्ट; आंवळ, गच्च; ओढघस्तीचा, चणचणीचा; झिंगलेला, तर्र, लास. *n. pl.* tight garments as of an acrobat. तंग कपडा. *adv.* tightly. घट्ट, गच्च, जोरानें. *Air t.,* हवाबंद. *Water t.,* पाणी आंत येणार नाहीं असें. *T. lass.* नीटनेटकी,-नीटस,-टुणटुणीत,-सुलगी. *T. rope.,* rope stretchad tight for the performer to walk on. नाडा, ताठ दोरखंड. *Become t. for money,* पैशाची चणचण भासणें. *Be in a t. place,* (*fig.*) बिकट परिस्थितींत सांपडणें,-असणें. *T. wad,* (U. S.) a stingy person. चिक्कू मनुष्य, कवडीचुंबक.

Tight'en, *v. t. & i.* (टा'इ्-टन्)—to make or become tight, to make more close, to straiten. आवळणें, घट्ट करणें किंवा होणें, ताठ करणें, ताणणें.

Tile, *n.* (टाइल्)—a thin piece of burnt clay for roofing; (colloq.) silk-hat. कौल, जमिनींत पसविण्याची शोभिवंत फरशी; रेशमी (साहेबी) टोपी. *v. t.* to cover with tiles. कौलें घालणें,-पसविणें. *Have a t. loose,* (*sl.*) be rather mad. वेडसर असणें. *Ti'ler, n.* कौलें करणारा,-पसविणारा, कुंभार. *Ti'lery, n.* कौलांचा कारखाना.

Till, *prep & conj.* (टिल)—up to, as late as. पर्यंत, पावेतों, तागाईत. *T. now,* आतांपर्यंत, हाकाळपावतों. *T. then,* तेव्हांपर्यंत, त्याकाळापर्यंत. *Walk on t. you come to the gate,* वेशीशीं पोंचेपर्यंत चालत रहा.

Till, *n.* (टिल्)—money-drawer in a shop-counter. (दुकानांतील) पैशांची पेटी, पैशाचा खण.

Till, *v. t.* (टिल)—to cultivate (land), to labour on. लागवड करणें, नांगरणें, जमिनीची मशागत करणें; परिश्रम करणें. *Tillable, a.;-age, n.* शेती, नांगरणी, लागवड.

Till, *n.* (टिल्)—stiff-clay with boulders, sand etc. रेताड माती, दगडाळ माती. *Till'y, a.*

Till'er, *n.* (टि'लर्)—one who tills, lever by which rudder is turned; shoot of plant springing from bottom of original stalk. नांगरणारा; सुकाणाची दांडी; मुळापासून फुटणारा अंकुर,-कोंब.

Tilt, *n.* (टिल्ट्)—unlevel, sloping position; act of tilting with lance; (also *t. hammer*) heavy pivoted hammer used in forging. कलंडणी, कलतेपणा; भालाभाली, भालाइती, भालेकरोली; ढेकी-सारखा जड घण. *v. i. & t.* to charge with lance at each other or *at* a mark (*fig.*); direct argument or satire *at* or *against;* assume or cause to assume sloping position, heel over; hammer with tilt; (Geol.) turn up at steep angle. भालाइती करणें, भाला खुपसणें; मुद्दा उलटवणें, विरुद्ध बाजूनें मुद्दा मांडणें, वर कठोर टीका (निंदाव्यंजक टीका) करणें; कलंडणें, कलंडवणें, कलतें होणें; घणानें ठोकणें; (भू-स्तर,-थर) एकदम वर उचलणें,-येणें. *Full t.,* at full speed, with full force. भरधांव, भर वेगानें. *Tilt'er, n.* भालाईत. *T. yard,* भालाइतीचें मैदान. *At full tilt.* भरधांव.

Tilt, *n.* (टिल्ट्)—covering of canvas etc. for cart. (गाडीचें) छप्पर, छत, चांदवा. *v. t.* छप्पर घालणें.

Tilth, *n.* (टिल्थ्)—cultivation, tillage; depth of of soil caused by this. नांगरटी, नांगरणी; नांगरटीची खोली.

Tim'ber, *n.* (टि'म्बर्)—wood as material suitable for building purposes or carpentry; trees suitable for this; piece of beam; (Naut.) any of the curved pieces forming ribs of vessel; (Hunting) fences and gates. इमारती लांकूड, लांकडी काम, इमारती लांकडाचीं झाडें; तुळईचा,-फळीचा,-तुकडा; गलबताच्या सांगाड्याची वांकडी फळी, वांकडी तुळई; कुंपणें व फाटकें. *T. toes,* (*sl.*) a person with wooden leg; heavy-treading person. लांकडी पाय लावलेला मनुष्य; जड पायाचा मनुष्य. *Tim'bered, a.* लांकडी, लांकडांचा; जंगलांचा, अरण्यमय (देश). *Tim'bering, n.*

Tim'brel, *n.* (टि'म्ब्रल्)—a tambourine. ढोलकें.

Time, *n.* (टाइम्)—duration, continued existence, a period with its events or characteristics; a season or distinguishable part of the year or day; a period with its events etc.; amount of time allowed, taken or available; an appointed interval, a breathing space; (*pl.*) so many reckonings of multiplicand; time of day as shown by clock; the present life; hour of delivery; musical duration. काळ, काल, वेळ; कालावधि; वेळ, दिवस, हंगाम; (विशिष्ट) कालखंड, विभाग; वेळ, फुरसत; मुदत, अवधि; (अने०) पट, वेळां,-दां; तास, वेळ, इहलोक, इहजन्म, आयुष्य, आयुर्मर्यादा; बाळंतपणाचा काळ; ताल. *v. t.* to choose right time for; appoint time for; ascertain the time taken by. काळ,-वेळ,-पाहणें; ची वेळ ठरवणें; काल,-वेळ,-मोजणें. *Assaults of T.* (personified), कालाचे (कालपुरुषाचे) आघात,

-तडाखे. *In the course of t.*, कालेंकरून, कालगतीनें. *The good old tt.*, पूर्वीचे सोन्याचे दिवस. *It will last our t.*, तें आमच्या जन्मभर (आयुष्यभर) पुरेल. *For the t. being*, तेवढ्यापुरतें, तात्पुरतें. *Now is your t.*, (opportunity). ही तुला चांगली संधि आहे. *Is near her time*, तिचे दिवस भरले, ती लवकरच बाळंत होईल. *Had a good time*, enjoyed myself. अगदीं चैन मारली.-झाली. *Spirit of the t.*, काळाचें वारें. *In the nick of time*, ऐन वेळीं, प्रसंगास. *At the same t*, त्याच वेळीं, तसेंच. *At tt*, now and then. अधूनमधून. *At one t.*, एकेकाळीं, पूर्वी. *From t. to t.*, occasionally. मधूनमधून, प्रसंगवशात्. *In t.*, वेळेवर. *In no t.*, क्षणांत, निमिषार्धांत. *Keep t.*, walk, dance, sing in *t.* तालबद्ध, तालसुरावर, चालणें, नाचणें, गाणें. (of clock) *keep good t.* बरोबर वेळ दाखविणें. *Out of t.*, अकालीं, बेताल (गाणें). *T. immemorial* or *out of mind*, प्राचीन काळ, स्मरणातीत काळ. *The t. of day*, hour of clock. (घड्याळांतील) वेळ. *Pass the t. of day*, भेटीगांठी घेणें, रामराम करणें. *What t.*, (poet.) while, when. जोंपर्यंत, जेव्हां. *T. ball*, (वेधशाळेत काठीच्या टोंकावरून ठराविक तास-वेळ-दाखविण्यासाठीं खालीं पडणारा) कालदर्शक गोळा. *T. bargain*, वायदा. *T. book, -card,-sheet*, (for recording workmen's hours of work). कामगारलोकांचे कामाचे तास मांडण्याचें पुस्तक,-तक्ता. *T. keeper*, one who records time; a clock or watch. वेळेची नोंद ठेवणारा; घड्याळ. *T. work*, (ज्या कामाचा तासावर हिशेब व मजुरी असते) असें तासावरचें काम. *Tim'er*, *n.* योग्य वेळीं (काम) करणारा; वेळ अवेळ पाहणारा. *Tim'ing*, *n.* वेळ, वेळा, योजलेली वेळ.

Time'honoured, *a.* (टा'इम्-ऑनर्ड)—venerable by antiquity. प्राचीन असल्याकारणानें आदरणीय, पुराणपूज्य.

Time'piece, *n.* (टा'इम्-पीस)-a clock or watch. घड्याळ.

Time'server, *n.* (टा'इम्-सर्व्हर)—a supple person; a selfish opportunist. रंग पाहून चालणारा, वागणारा; स्वार्थी, संधिसाधू मनुष्य. *T.—serving, a. & n.* काळवेळ पधून,-रंग पाहून,-चालणें.

Time'-täble, *n.* (टा'इम्-टेबल)—synopsis of hours of work, starting and arrival times of trains, &c. वेळापत्रक.

Time'lў, *n.* (टा'इम्लि)—opportune, occurring at the right time, being in good time. समयोचित, योग्य, वक्तशीर.*-liness, n.*

Tim'id, *a.* (टि'मिड्)—faint-hearted, easily frightened; apprehensive. घाबरणारा, भ्याड, भितरा; बुजट, लाजरा.*-id'ity, n.;-idness, n.;-ly, adv.* भिऊन, घाबरून, लज्जेनें, लाजून, बुजून.

Tim'orous, *a.* (टि'मरस्)—timid, fearful of danger; shrinking or shy with timidity. भितरा, भ्याड; लज्जायुक्त.*-ly, adv;-ness, n.* भित्रेपणा, लाजाळूपणा.

Tin'cal,-kal, *n.* (टि'ंकल)—unrefined borax. टांकणखार. सोहागा. [Malay. f. Skr. *tankana*]

Tincto'rial, *a.* (टिंक्टॉ'अरिल्)—of or for dyeing, producing colour. रंगाचा, रंगविषयक, रंगोत्पादक.

Tin, *n.* (टिन्)—a white metal; a vessel of tin or tin-plate; (sl.) money. कथील, वंग; कल्हई; कथलाचें भांडें, चाडगा, जस्ताचा डबा. (attrib.) made of tin or of iron covered with tin. कथली, कथलाचा, जस्ताचा. *v. t.* to cover, coat, with tin; seal up (fruit etc.) in tins for preservation. कल्हई लावणें,-करणें,-काढणें; (खराब न व्हावें म्हणून) डब्यांत भरणें. *T. fish*, (Naut.) a torpedo. टॉर्पेडो, पाणसुरंग, पाणसुसर. *T. foil*, *n.* कथलाचा वर्ख; *v. t.* कथलाच्या वर्खांत (साबण, तंबाखू) गुंडाळणें. *T. god*, object of mistaken veneration. खोटा देव, अंधभक्तीचा विषय. *T. hat*, (sl.) helmet. शिरस्त्राण. *T. Lizzie*, nickname for Ford motorcar. फोर्ड मोटरगाडीचें टोपणनांव. *T. plate*, sheet iron coated with tin. जस्ताचा मुलामा केलेला लोखंडी पत्रा. *T. man,-smith*, (जस्ती) पत्र्याचें काम करणारा, *Tin'ner*, कल्हईवाला. *Tin'ny, a.*

Tinc'ture, *n.* (टिं'क्चर्)—a tinge of colour; a smack (*of* some quality or accomplishment; medicinal solution of a drug. रंगाची छटा; स्वाद, चुणूक, अर्क, मद्यार्कनिर्मित अर्क. *v. t.* to tinge colour slightly; affect slightly *with* quality. रंगाची छटा देणें, किंचित् रंगविणें; (*fig.*) छटा देणें, रंग देणें.

Tin'der, *n.* (टि'न्डर्)—dry substance readily taking fire from spark. गूल गंधकाची काडी, पेटवण. *T. box*, चकमकीची पेटी, चकमक.*-y, a.*

Tine, *n.* (टाइन्)—a prong, tooth or point of a fork, comb, etc. (कांटा, फणी इ. चें) टोंक, दांत, अणकुचीदार भाग.

Tinge, *v. t.* (टिंज्)—to colour slightly (*with*); (*fig.*) modify by mixture (*with*). रंगाची छटा देणें; चुणूक असणें, भेसळ असणें. *n.* tendency to or trace of some colour; slight admixture of a feeling or quality. (रंगाची) छटा; चुणूक.

Tin'gle, *v. i.* (टिं'गल्)—to feel pricking or thrilling sensation, feel sharp pain. झणझणणें, मुंग्या येणें, भिरभिरणें, चुरचुरणें, विरविरणें.

Tink'er, *n.* (टिं'कर्)—itinerant mender of kettles, pans and the like; rough and ready worker; patching; kinds of fish, bird. जुनीं भांडीं नीट करणारा; झटपट दुरुस्ती करणारा, मोडीचा तांबट; सांधा लावणें, गावड मारणें; एक जातीचे मासे व पक्षी. *v. i.* to work indifferently. ओबडधोबड काम करणें, कसें तरी सांधडणें,-नीट करणें.*-ly, adv.*

Tin'kle, *n.* (टिं'कल्)—sound of or as of a small bell, quick sharp ringing noise. घण्टानाद, रुणझुण. *v. i. & i.* किणकिणणें, रुणझुणणें, रुणझुण आवाज करणें *Tink'ler*, a small bell. लहान घंटा.

Tinni'tus, *n.* (टिना'इटस्)—(Med.) ringing in the ears. कानांत गुणगुणणें (आवाज).

Tin'sĕl, *n.* (टि'न्-सेल)—decorations of bright metal threads; tawdry brilliance; flashiness. खोट्या जरीचें कापड; खोटा कलाबतू, भपका; चकाकी,

चमक. (attrib.) flashy, cheaply splendid. भपकेबाज, खोटा, दिखाऊ, बेगडी. *v. t.* to adorn with tinsel. खोटा कलाबतू लावणें, खोटी झकाकी आणणें. *Tin'selled, pa. p. & a.*

Tint, *n.* (टिन्ट्)—a faint colour spread over a surface; a variety of a colour; set of parallel lines to give uniform shading. मजीक रंग, रंगाची झांक; समान छायादर्शक समांतर रेषा. *v. t.* to colour slightly or conventionally, tinge, wash with colour. दुसऱ्या रंगाची छटा देणें; रंगाचा हात देणें. *Red with* or *of a blue t.*, निळ्या रंगाची छटा असलेला तांबडा रंग. *Autumn tt.* of dying leaves. गळणाऱ्या पानांच्या पावसाळीं (रंगाच्या) छटा. *T.-less, a.*

Tintinnā'bŭlum, *n.* (टिन्टिनॅब्यूलम)—(pl.*-la*) small tinkling bell; rattle of small bells. किणकिणी घंटा; त्यांचा किणकिणाट (आवाज).*-bula'tion, n.* घंटांचा किणकिणाट.

Ti'nȳ, *a.* (टा'इ-नि)—very small. अति लहान, चिमुकला.

Tip, *n.* (टिप्)—the finer end of a thing, a small tapering point; a kind of brush used in gilding; small piece at end of thing, a piece of information as to probable winner of a race; a gift given to waiter, driver, etc.; a good dodge or recipe; *slight glancing stroke (with cricket* bat etc.); slight push; place where refuse is tipped. अणी, टोंक, अग्र; सोन्याचा (वर्ख उचलण्याचा) कुंचला; टोपण; (शर्यतीच्या घोड्यांची, व्यापारी दराची) गुप्त बातमी; बक्षीस, चिरिमिरी; निसरता टोला; लहानसा,-अल्पसा,-धक्का, ढकलणें; कचरा टाकण्याची जागा. *v. t. & i.* to put tip on; give tip to; strike ball (with side of bat etc.); tilt, incline; upset by inclining; give secret information about horse etc. ला टोंपण लावणें; बक्षिसी-चिरिमिरी, देणें; निसरता टोला मारणें; कलतें करणें; वांकडें करणें, कलंडवणें; ढकलणें; कलतें करून ओतणें, -उपडें करणें; (शर्यती घोड्यांसंबंधीं) गुप्त माहिती देणें. *On the t. of the tongue,* जिभेवर (असणें, येणें), म्हणणार (असणें). *Miss* one's *t.*, fail in one's object. हेतु,-बेत,-फसणें. *T. up seat,* (नाटक, सिनेमा--गृहांतल्यासारखी) वरखालीं सरकत्या बैठकांची खुर्ची, सरकती बैठक. *T. and run,* (क्रिकेट) फलकाला (फळीला) चेंडू लागला तर धांवलें पाहिजे असा खेळ. *T. cat,* विटीदांडूचा खेळ. *T.-staff,* शेरिफचा अधिकारी, दंडधारी अधिकारी. *T. tilted,* (of nose) turned up at tip. उभट टोंकीचें (नाक), घोंडीवर चढलेलें नाक.

Ti'pp'ĕt, *n.* (टि'पिट्)—covering of fur, etc. for the shoulders worn by women and by judge etc. लोकरीचें (खांद्यावर टाकण्याचें) उपवस्त्र.

Tip'ple, *v. i. & t.* (टि'पल्)—be given to drink, दारूची संवय असणें, सडकून दारू पिणें, झिंगणें. *n.* कडक दारू. *Tip'pler, n.*

Tip'ster, *n.* (टि'प्स्टर्)—one who gives tips about races etc. (घोडे-शर्यतींची वगैरे) खाजगी-गुप्त-माहिती पुरविणारा.

Tip'sȳ, *a.* (टि'प्सि)—unsteady in gait or speech with drink, drunk, intoxicated. दारूचा परिणाम झालेला, झिंगलेला, प्यालेला, छाकटा.*-sily, adv.*; झिंगून;*-siness, n.* छाकटेपणा.

Tip'toe, *n.* (टि'प्-टो)—the point of the toe, the tip or end of the toe. पायाच्या बोटाचा शेंडा. *v. i.* to walk *t.* पाय खोंचे करून चालणें. *adv.* (*on t.*), पाय खोंचे करून, पायाच्या टोंकावर. *To stand on the t. of expectation,* (मनांत) मोठी आशा धरणें.

Tip'top, *n.* (टि'प्टॉप्)—highest point of excellence. कळस, सीमा, पराकाष्ठा. *a. & adv.* first-rate. अप्रतिम, पहिल्या प्रतीचा. *T. of a tree,* झाडाची-टिकाळी,-शेंडा.

Tirāde', *n.* (टिरे'ड्)—a strain of censure, long passage of declamation; (Mus.) diatomic run filling interval between notes. शिव्यांची लाखोली, गालिप्रदान, भरपूर निंदा; तान. [F, = long speech.]

Tire, *n.* (टायर्)—a metel rim enclosing felloe; rim-cover of rubber etc, (*arch.*) head-dress, attire. चाकाची धाव. रबरी चाकाचें कडें, टायर; पागोटें, पोषाख, कपडे. *v. t.* to put tire on (wheel); dress (hair), attire. (चाकाला) धांव, धांवेला रबरी वेष्टण, घालणें; (केंस) सारखे करणें, कपडे घालणें, सुशोभित करणें.

Tire, *v. t. & i.* (टायर्)—to become unequal to or indisposed for further exertion, grow sick of; make sick of. दमणें, थकणें, कंटाळा येणें; छळणें, त्रास देणें, दमवणें, कांटा ढिला करणें, शिणवणें. *Tired, pa. t. & pa. p. & a.* दमलेला, थकलेला, शिणलेला, बेजार. *Tired'ness, n.*

Tire'lĕss, *a.* (टा'यर्-लेस्)—of inexhaustible energy, never getting fatigued. कधींहि न थकणारा, न दमणारा.*-ly, adv.*;*-ness, n.*

Tire'some, *a.* (टा'यर्-सम्)—trying to the temper; annoying; tedious. दमवणारा; त्रासदायक; कष्टप्रद, कंटाळवाणा, जिकिरीचा.*-ly, adv.*;*-ness, n.*

Tir'ō, *n.* (टा'इरो)—a beginner. नवशिका.

'tis, (टिझ्)—it is. (असें) आहे.

Tiss'ue, *n.* (टि'श्यू)—a textile stuff, a woven fabric; (Biol.) substance of an organ, fabric formed of cells and cell-products; (*fig.*) a network. विणीव कापड, जरीकापड; कला, शरीरघटक धातु, ऊति; जाळें, जाल. *A t. of lies,* असत्यजाल. *T. paper,* पातळ झिरझिरीत कागद. *Adipose t.*, मेदोमय धातु, ऊति. *Connective t.*, संधायक ऊति. *Muscular t.*, स्नायुमय धातु. *Nervous t.*, मज्जामय धातु *Retiform t.*, सरंध्र धातु. *Tiss'ued, a.*

Tit, *n.* (टिट्)—kinds of small bird; small horse, girl, child. लहान पक्षी; (हरदासी) तट्टू; लहान मूल,-मुलगी. 2. *T. for tat,* जशास तसें, ठोशास ठोसा, प्रतिकार.

Ti'tan, *n.* (टा'इटन)—(Gk Myth.) each of the giants, the children of Uranus and Ge;

the sun (*poet.*); a person far beyond others in genius of power; a huge person or animal. (ग्रीक पुराणांतील) दैत्य, राक्षस; सूर्य; अलौकिक बुद्धीचा किंवा सामर्थ्याचा मनुष्य; प्रचंड मनुष्य किंवा अन्य प्राणी. *The weary T.*, ब्रिटिश किंवा इतर मोठें साम्राज्य. *Titan'ic, a.* प्रचंड.

Tit'bit, *n.* (टिट्-बिट्)—a dainty morsel, piquant item of news etc. गोड घांस, सुग्रास, मनोरंजक वेंचा,-चुटका.

Tithe, *n.* (टाइद्)—a tenth part. दहावा हिस्सा, दशमांश, दहावा भाग; (खिस्ती उपाध्याला दिलेला) उत्पन्नाचा दहावा हिस्सा. *v. t.* दहावा हिस्सा घेणें, *Not a t. of*, दहावा हिस्सा सुद्धां नाहीं.

Tit'illāte, *v. t.* (टिटिलेट्)—to tickle. गुदगुल्या करणें.-*tion, n.* गुदगुल्या;-*tor, n.*

Tit'ivāte, *v. t. & i.* (टिटिव्हेट्)—(colloq.) to adorn, smarten (oneself). नीटनेटकें करणें, तरतरी आणणें.

Ti'tle, *n.* (टाइटल्)—the name of a book or other work of art; heading of a chapter, &c.; word or phrase indicative of person's status; (law) right to ownership of property; just or recognized claim (*to*). (पुस्तकाचें वगैरे) नांव; सदर, प्रकरण, मथळा, पदवी, किताब, मालकी हक्क; हक्क, अधिकार. *Ti'tled, a.* having title of nobility. सरदारीची पदवी असलेला, किताबवाला.

Tit'le-deed, *n.* (टाइटल्-डीड्)—a legal document establishing right to property. मालकी हक्काचें कागदपत्र, कपाला, कबाला.

Ti'tle-pāge, *a.* (टाइटल्-पेज्)—the page of a book exhibiting its name, authorship &c. मुखपृष्ठ.

Ti'tle-role, *n.* (टाइटल्रोल्)—part in a play that gives it its name (e. g. Hamlet). (नाटकाला ज्या पात्रावरून नांव दिलें असतें तें) प्रमुख पात्र, मुख्य नटाचें काम.

Ti'tling, *n.* (टाइटलिंग)—impressing of title in gold-leaf on back of book. (सोनेरी वर्खानें पुस्तकाच्या पाठीवर उठविलेलें) पुस्तकाचें नांव.

Tit'mouse, *n.* (टिट्माउस्)—(pl.-mice) kinds of small active bird. एक जातीचे लहान पक्षी.

Titt'er, *v. i. & n.* (टिटर्)—to laugh covertly; such a laugh. गालांतल्यागालांत हंसणें, फारीक हसणें.-'*crer, n.*

Tit'tle, *n.* (टिटल्)—a small particle, minute part, small mark, an iota. लहान खूण, लेश, बिंदु, अणु. *Not one jot* or *t.*, लेशमात्र सुद्धां नाहीं.

Tit'tle-tattle, *n. & v. i.* (टिटल्-टॅटल्)—gossip. फकफक, बडबड, गप्पा; बडबडणें.

Titt'up, *v. i.* (टिटप्)—to go mincingly; bob up and down, मचमच करीत जाणें, उड्या मारीत चालणें. *n.* prance. बागडणें, उडी.

Tit'ūlar, *a.* (टिट्युलर्)—such in name irrespective of the reality, nominal; giving or serving as a title. नामधारी, नांवाचा; पदवीसंबंधीचा. *n.* nominal holder of a benefice or office. नामधारी अधिकारी.-*ly, adv.*

To, *prep.* (टु)—[व्यंजनाच्या पूर्वी To चा उच्चार टोटु, स्वरापूर्वी टु, एरवीं टू असा होतो]. in the direction of; as far as; not short of. स, ला, जवळ, पाशीं, कडे, पर्यंत; पेक्षां; हून. *House looks to the south,* घराचें तोंड दक्षिणेस आहे. *Told him to his face,* त्याच्या तोंडावर सांगितलें. *Fell to work,* कामाला लागला. *All to no purpose,* सर्व व्यर्थ गेलें. *Fought to the last gasp,* मरेपर्यंत लढला. *To the end of the chapter,* प्रकरणाच्या शेवटपर्यंत. *Not up to the mark,* जसा पाहिजे तसा नाहीं. *Made to order,* सांगितल्याप्रमाणें,-बरहुकूम,-केलेला. *Not to the point,* मुद्याला न धरून (सोडून). *Write to me, explain it to me,* मला लिही, तें मला समजावून सांग. *What's that to you?*, तुला काय त्याचें? [As sign of infinitive] *He began to sing* or *singing,* तो गाऊं लागला. *Declines to go,* जाण्याचें नाकारतो.

To, *adv.* (टू)—to or in the required position, to a stand-still; in closed state. उद्दिष्ट स्थळीं, पुढें; स्तब्ध, निश्चल; स्वस्थानीं, एकत्र. *The door is to,* दरवाजा बहुतेक बंद आहे,-किंचित् उघडा आहे.

To and frō, *phr.* (टु अँड् फ्रो)—backwards and forwards; from place to place. इकडून तिकडे, मागेंपुढें, इकडे तिकडे; एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं.

Toad, *n.* (टोड्)—a frog-like reptile breeding in water but living chiefly on land; a detestable person. मोठा बेडूक; हलकट, तुच्छ, क्षुद्र मनुष्य. *T.-flax, n.* a yellow-flowered plant. पिवळ्या फुलांचें झाड,-वनस्पति. *T.-ish, a.*

Toad'eater, Toad'y, *n.* (टोड्-ईटर्, टोडि)—a sycophant, an obsequious parasite. आर्जवी, खुशामत्या, थुंकी झेलणारा, हांजीहांजी करणारा, तोंडपुजा. *T.-eating, a. & n. Toad'yism, n.* तोंडपुजेपणा, हांजीखोरपणा.

Toad'stool *n.* (टोड्-स्टूल्)—kinds of umbrella-shaped fungus. कुत्र्याचें मूत, कुत्र्याचें छत्र, आळंबें, घोड्याचें मूत.

Toast, *n.* (टोस्ट्)—bread sliced and browned; the drinking of health; person esp. woman, thing etc. whose health is drunk. विस्तवावर भाजलेली रोटी; भाजून कुरकुरीत केलेला पाव,-पावाचे तुकडे; आरोग्यचिंतनार्थ केलेलें मद्यपान; आरोग्यपानाचा विषय. *v. t. & i.* to brown (bread) before the fire; warm oneself before the fire; drink to the health of in honour or respect. विस्तवावर भाकरी,-पाव,-भाजणें; विस्तवावर पाव वगैरे शेकविणें, शेक घेणें; आरोग्यचिंतनार्थ पिणें. *T.-master,* (सार्वजनिक भोजनप्रसंगीं) आरोग्यपानाचा अध्यक्ष.

Toast'er, पाव भाजणारा; विस्तवावर पाव गरम करण्याचें भांडें.

Tōbăcc'o, *n.* (टोबॅ'को)—(pl.–*os*) narcotic leaves from which cigars and snuff are made. तंबाखू, तंबाखूचें पान. *T. plant,* तंबाखूचें झाड. *T. heart,* disorder of heart due to excessive use of tobacco. तंबाखूच्या अतिसेवनानें छातीवर होणारा दुष्परिणाम,–छातीचा विकार. *T. pipe,* चुट्टा, चिलीम.

Tobăcc'ōnĭst, *n.* (टबॅ'कोनिस्ट्)—a dealer in tobacco. तंबाखूचा व्यापारी, विड्या वगैरे तयार करणारा.

Tobŏgg'an, *n.* (टोबॉ'गन्)—hand-sledge for sliding down snow-covered place. विनचाकाची (बर्फावरून चालणारी) हातगाडी. *v. i.* to go in *t.* बर्फावरून चालणाऱ्या गाडींतून जाणें.–*er, n.*;–*ing, n.*

Tō'bÿ, *n.* (टो'बि)—a jug or mug in the shape of old man with three-cornered hat. वृद्धमनुष्याकृति (दारूचें) भांडें.

Tŏc H, *n.* (टॉक् एच्)—a society carrying on comradeship from the last great war. (मागील महायुद्धानंतर स्थापिलेली) विश्वबंधुत्वप्रसारक संस्था. [F *Talbot House* started at Ypres in memory of Gilbert Talbot]

To'cō, *n.* (टो'को)–(*sl.*) blows, punishment. घाव, तडाखे, शिक्षा, निर्भर्त्सना.

Toc'sĭn, *n.* (टॉ'क्सिन्)—alarm-signal on a bell, a bell rung as signal. भयसूचक घंटा, धोक्याची सूचना.

Tŏd, *n.* (टॉड्)—bush; mass of foliage; weight for wool; a fox. झुडूप; पान-पातेरा; लोकरीचें माप; कोल्हा.

To-day', *n. & adv* (टुडे')— this day, on or during this day. आज.

Tŏd'dle, *v. i.* (टॉ'ड्ल)—to walk with short unsteady steps, as child learning to walk; take leisurely walk. (नवशिक्या बालकाप्रमाणें) धडपडत चालणें, पडतझडत चालणें; मजेंत फिरायला जाणें. *n.* a toddling child; a stroll. धडपडत चालणारें लहान मूल; सहल.–*r, n.*

Tŏdd'ÿ, *n.* (टॉ'डि)—drink of whisky or other spirit; palm-tree sap or fermented liquor made from it. दारू, ताडी.

Toe, *n.* (टो)—any of the five members in which the front of a human foot ends; front of animal's foot; piece of iron under front of horse-shoe; end of head of golf-club; (Mech.) arm of valve-lifting rod of steam-engine. पायाचें बोट, पदांगुलि; (जनावराच्या) खुराचा पुढला भाग, मेचक; (घोड्याच्या) नालापुढचा लोखंडी तुकडा; गोल्फ-दांडूचें टोंक; बाष्पयंत्राच्या पडदा उचलणाऱ्या दांड्याचा हात. *v. t.* (sl.) to kick; touch with the toes; (Golf) touch faultily with the tip of club; furnish with toe, mend toe of (stocking or shoe). लाथ मारणें; (पायाच्या) पोटांनीं स्पर्श करणें; (गोल्फच्या खेळांत) दांडूच्या टोकानें चुकीनें स्पर्श करणें; आंगठा लावणें,–दुरुस्त करणें. *To tread on* person's *tt.,* offend his feelings. त्या मनोभावना दुखविणें. *The light fantastic t.,* dancing, नाचणें. *Turn up* one's *tt.,* (sl.) die. मरणें. *From top to t.,* पायापासून डोक्यापर्यंत, नखशिखांत, पूर्णपणें. *T. the line,* (*fig.*) conform to the requirements of one's party. आपल्या पक्षाप्रमाणें (नाइलाजानें) वागावें लागणें. *Toed,* पायाला बोटें असलेला. *Toeless, aa.*

To'-fall, *n.* (टु' फॉल्)—(poet.) close, decline (*of*). शेवट, अस्त.

Tŏff, *n.* (टॉफ्)—(sl.) a distinguished person, a swell. प्रसिद्ध पुरुष, सद्गृहस्थ; घमेंड्या.

Tŏff'ee, *n.* (टॉ'फि)—sweet-stuff of boiled butter and sugar. लोणी-साखरेचा एक गोड पदार्थ,–गोड वड्या,–खाऊ.

Tō'ga, *n.* (टो'गा)—the mantle of a Roman citizen; a plain piece of woollen stuff. रोमन रहिवाशाचा सैल झगा, लोकरी उपरणें. *d,*–*ed, a.*

Togeth'er, *adv.* (टुगे'दर्)—in company; simultaneously, at the same place. बरोबर, एकत्र; एकाच वेळीं, एकदम, एकवट. *T. with,* च्या सह.

Tŏil, *v. i.* (टॉइल्)—to work laboriously or incessantly *at, on, through*; to make slow painful progress. खपणें, मेहनत करणें, काबाडकष्ट करणें; जेरीस येणें; मेटाकुटीस येणें. *n.* labour with fatigue, severe labour; drudgery. कष्ट, मेहनत, परिश्रम; काबाडकष्ट, दगदग, यातायात.

Tŏil'some, *a.* (टॉ'–इल्–सम्)—involving toil, laborious, wearisome, fatiguing. त्रासदायक, कष्टदायक.–*ly, adv.*;–*ness, n.*

Tŏil'ĕt, *n.* (टॉइ'लिट्), **Toilette',** *n.* (ट्वाले'ट्)—process of arranging the hair, style or fashion of dress; a (style of) costume, attire, dress; (Med.) washing of a part after operation. वेणीफणी; पोषाखाची पद्धति, पोषाख; शस्त्रक्रियेनंतर भाग धुवून स्वच्छ करणें. *T. table,* पोषाखाच्या खोलींतलि आरसा वगैरे बसवलेलें मेज. *T.-paper,* शौचाच्या वेळीं वापरण्याचा कागद. *To make* one's *t.,* केंस विंचरून पोषाख करणें,–कपडे चढविणें.

Tŏils, *n. pl.* (टॉइल्झ्)—net, snare. जाळें, फांस. *Taken in the tt.,* जाळ्यांत–फासांत–पकडलेला.

Tō'ken, *n.* (टो'कन्)—indication, symptom; distinctive mark, or guarantee. चिन्ह; लक्षण; विशेष खूण, ओळख, यादगिरी, बिल्ला. *In t. of,* चें चिन्ह म्हणून, च्या स्मरणार्थ. *T. money,* coins of higher nominal than intrinsic value. (मौलिकपेक्षां) अधिक दर्शनी किंमतीचें नाणें. *T. cut,* (लोकसभेंत सरकारी पैशाच्या मागणीला केलेली) सूचक-दर्शक,–कपात.

Told, *pa. t. & pa. p.* of Tell.

Tŏl'erable, *n.* (टॉ'लरेब्ल)—not beyond endurance; fairly good. सहन करण्याजोगा; साधारण चांगला, मध्यम, माफक, कामचलाऊ.–*ably, adv.*,–*ableness, n.*

Tŏl'erance, *n.* (टॉ'लरन्स)—tolerant temper or ways, sufferance, endurance. सहनशक्ति, सहिष्णुता.

Tŏl'erant, *a.* (टॉ'लरन्ट्)—disposed to tolerate others or their opinions, favouring toleration; broadminded. सहन करणारा, सहिष्णु; मोठ्या मनाचा.

Tŏl'erāte, *v. t.* (टॉ'लेरेट्)—to put up with, endure, permit; (Med.) sustain use of (drug etc.) without harm. सहन करणें, सोसणें, परवानगी देणें; क्षेपणें; मानवणें, दुरुपयोग न होणें.

Tŏlerā'tion, *n.* (टॉले'रेशन्)—tolerating, esp. the recognition of free thought and practice in religious matters. सहन करणें, सहिष्णुता; सोशिकपणा, सर्वधर्मसहिष्णुता. *Act of T.*, (इंग्लंडांतील इ. स. १६८९ चा) धर्मसहिष्णुतेचा कायदा.-*ist, n.*

Tōll, *n.* (टोल्)—charge payable for permission to pass a barrier; grain retained by miller as compensation for grinding. जकात, दस्तुरी, कर; (धान्य दळणाऱ्या) गिरणीवाल्यानें दळण्याचें भाडें म्हणून घेतलेला धान्याचा भाग. *v. i.* take or pay toll. दस्तुरी घेणें,-देणें *T. thorough,* taken by town for use of highway, bridge etc. रस्त्याची, पुलाची (वापरणावळीची) दस्तुरी. *T. bar,-gate,* दस्तुरी (चा) नाका. *T. booth,* (Sc.) town-gate. (दस्तुरी चुकविणाऱ्यांसाठीं) तुरुंग, कोठडी. *T. house,* house of a toll-collector. नाकेदाराचें घर. *To take t.,* (*fig.*) abstract a portion of. च्या हिस्सा ठेवून घेणें,-काढून घेणें.

Tōll, *v. t. & i.* (टोल्)—to sound (a bell) with slow succession of strokes; strike (hour) or announce or mark (death) thus. राहून राहून वाजणें, हळू हळू घंटा वाजवणें; (तासाचा) टोला पडणें,-ठोका वाजणें; घंटा वाजवून (एखाद्याच्या मरणाची) सूचना देणें. *n.* tolling sound (of bell). घंटेचा नाद, नाद.

Tolū', *n.* (टॉल्यू')—a S.-Amer. tree and balsam. (द. अमेरिकेंतील) एक वृक्ष, त्याचा सुवासिक धूप,-चीक; -वृक्षनिर्यास. *Toluene, toluol, n.* liquid with smell-like benzene and burning taste, yielding many compounds. एक रासायनिक द्रव पदार्थ.

Tŏm, *n.* (टॉम्)—(T) abbr. of Thomas; a male animal, esp. a male domestic bird or cat. टॉमसचा संक्षेप टॉम्; नर-पक्षी, बोका, मोठें (नर) मांजर. (*t.-cat*). *T., Dick and Harry,* ordinary common place people. सटरफटर,-सामान्य,-लोक. *T.-boy,* a wild romping girl. घोडी, घोडदेवता, उडाणटप्पू मुलगी. *T.-noddy,* a blockhead, fool. मद्द, ठोंब्या, बेडसर. *T.-tit,* kinds of small bird. लहान पक्षी.

Tŏm'ahawk, *n.* (टॉ'मेहाक्)—war-axe of N.-Amer. Indians. (उ. अमेरिकेंतील रेड-इंडिअन लोकांची) लढाऊ कुऱ्हाड *v. t.* to kill or or strike with *t.*, criticize savagely. कुऱ्हाडीनें ठार मारणें,-हाणणें; निष्ठुर टीका करणें, वाभाडे काढणें.

Tomā'tō, *n.* (टमा'टो)—(pl.-*oes*) (a plant with) pulpy red or yellow fruit. टामाटो झाड, फळ [f Sp.]

Tomb, *n.* (टूम्)—a grave, burial-vault; sepulchral monument. मेताचा खड्डा, मेत पुरण्याची जागा; थडगें, कबर छत्री. *v. t.* थडग्यांत ठेवणें, पुरून टाकणें. *The t.,* (*fig.*) death. मरण, मृत्यु. *T. stone,* memorial stone placed on grave. मृताच्या स्मरणार्थ थडग्यावरची शिळा,-स्मृतिलेख. *T.-less, a.*

Tōme, *n.* (टोम्)—a large book or volume. मोठें पुस्तक.

Tŏm'fool, *n.* (टॉ'मफूल्)—a great fool; a silly fellow. महामूर्ख; मूर्ख मनुष्य; यःकश्चित् क्षुद्र मनुष्य. *v. i.* to play the fool; act in trifling manners. वेडाचार करणें, मूर्खासारखें वागणें.-*fool'ery, n.* महामूर्खपणा; विदूषकी चेष्टा, नकला.

Tŏmm'y̆, *n.* (टॉ'मि)—(*sl.*) food; (Mech.) a wrench or turn-screw. अन्न; टाप पिळण्याचें यंत्र. *T. Atkins,* ब्रिटिश सोजीर,-शिपाई. *T. rot,* (*sl.*) nonsense. मूर्खपणा, वेडेपणा (ची बडबड). *T. shop,* पाव-रोटीवाल्याचें दुकान. *Soft t.,* (naut.) मऊ किंवा ताजी भाकरी.

To-mŏ'rrow, *n.* (टु-मॉ'रो)—the day after to-day. उद्यां.

Tŏm'tŏm, *n.* (टॉ'म्-टॉम्)—a native Indian drum; gong. डमडम वाद्य; तास. *v. i.* to beat tomtom. तास वाजवणें. [f. Hind. *tamtam,* imit.]

Ton, *n.* (टन्)—a measure of weight, 20 cwt.; unit of measurement for ship's tonnage, 100 cub. ft, or carrying capacity, 40 cub. ft.; (colloq.) large number or amount. वीस हंड्रेडवेटचें एक वजन, २२४० पौंडाचें वजन, टन; १०० घनफुटाचें (जहाजाच्या मापाचें) परिमाण, किंवा ४० घ. फू. भरताडीचें परिमाण; पुष्कळ,-मोठी,-संख्या, मोठें माप. *Metric t.,* १००० किलोग्राम. *Tt. of people,* असंख्य लोक. *Tt. of times,* अनेक वेळां, असंख्य वेळां.

Ton, *n.* (टन्)—fashion. शिष्टसंप्रदाय. [F]

Tō'nal, *a.* (टो'नल्)—of tone or tones; of tonality. सुराचा, स्वराचा, स्वरांचा, ध्वनिसंबंधीं; परस्पर स्वरसंबंधाचा; (चित्राच्या) रंगछटांचा. *Tonal'ity, n.*

Tōne, *n.* (टोन्)—quality, strength or character of a sound; musical sound; modulation of voice to express emotion, &c.; stress on one syllable of word; proper condition of the bodily organs; tint or shade of colour; prevailing character of morals, sentiments, etc.; (photog.) colour of finished positive picture. स्वर, आवाज, नाद, ध्वनि; मूर्च्छना; भावनादर्शक स्वरभेद, स्वर, हेल, शरीराची सुस्थिति, नेहमींची स्थिति, प्रकृतिस्वास्थ्य; उठाव, मेळ, चालू स्थिति,-भावना,-रंग; प्रकाशलेखाचा रंग. *v. t. & i.* to give desired tone to; modify the tone of; (Mus.) tone (instrument); be in harmony with; (photog.) give or receive altered colour in finishing by means of chemical solution. हेल काढून बोलणें; स्वर जमवणें; सूर लावणें; जुळणें, मिळणें; प्रकाशलेखाचा रंग (रासायनिक द्रवांत) खुलवणें. *Heart tt.,* छातीचे ठोके. *Half* or *quarter t.,* स्वरांश, श्रुति. *T. down,* to soften colouring of (picture); render less confident; become softer. (रंग) फिका करणें; नरम करणें, कमजोर करणें; मृदु होणें. *T. up,* to give

receive, higher tone, character or vigour. (रंग) खुलविणें; मकृति सुधारणें; नीति सुधारणें, पळ पाढविणें. *Tone'lessness, n.*

Tŏngs, *n. pl.* (टॉंग्झ्)—kinds of two-limbed gripping implement. (निखारे उचलण्याचा) चिमटा, गावी, सांडशी. Also, *a pair of tt. Would not touch* (repulsive person or thing) *with a pair of tongs,* लांबून सुद्धां शिवणार नाहीं,-स्पर्श करणार नाहीं.

Tongue, *n.* (टंग)—muscular organ in the mouth; faculty or manner of speech or speaking; language of a nation; tongue-like piece, in shape or function (clapper of bell, index of balance, vibrating slip in reed of some musical instruments, jet of flame, a promontory, etc.). जीभ, जिव्हा, रसना; बोलण्याची शक्ति, भाषण, बोली, भाषणपद्धति; (देश-) भाषा, बोली; जिभेसारखा तुकडा, -खी वस्तु, जिभली; (घंटेचा) लोळा, लोळी; (सुर-वाद्याची) जिव्हाळी; कांटा; अग्निशिखा,-जिव्हा; भूशलाका, भूशिर. *v. t. & i.* to use tongue in playing the flute etc. (मुखवाद्यें) जिव्हाळीनें वाजविणें. *To put out one's t.,* जीभ बाहेर काढून दाखविणें (वेडावण्यासाठीं, वैद्यकीय परिक्षेसाठीं). *Put, speak with, one's t. in one's cheek,* speak ironically, humour one's hearer. व्याजोक्तीनें बोलणें, ऐकणाऱ्याला खुलावणें, शब्दांनीं खूप,-गार,-करून सोडणें. *Keep a civil t. in one's head,* avoid rudeness. उद्धटपणा टाकणें, नम्रपणानें बोलणें. *Have lost one's t.,* be too bashful. अति लाजाळूपणानें तोंडांतून शब्द न निघणें. *Find one's t.,* recover power of speech. बोलूं लागणें, (गेलेली) वाचाशक्ति पुन्हां येणें. *Give or throw t.,* (of hounds) (सावजाचा वास लागतांच) भुंकूं लागणें. *Hold one's t.,* be silent. गप्प बसणें, तोंडाला खीळ घालणें. *Wag one's t.,* वाटेल तसें बरळणें. *On the tt. of men,* much talked of. पुष्कळांच्या तोंडचा विषय असलेला. *Fur or dirt of the t.,* जिभेवरील बुरशी (रोगचिन्ह). *A long t.,* फार बडबडणारी,-लवलव करणारी-जीभ. *Mother t.,* मातृभाषा, मायबोली. *Slip of the t.,* जिव्हादोष, जीभ चळणें. *T. bone,* जिव्हास्थि.

Tongue'-tie, *n.* (टंगटाय्)—an impediment in speech due to shortness of fraenum of tongue. (जीभ आंखूड असल्यामुळें) बोलतांना होणारा अडथळा, बोलतांना अडखळणें.-*tied,* incapable or slow of speech, (*fig.*) debarred from speaking out. आंखुड जिभेचा, बोलतांना अडखळणारा; मुस्कुटदाबी केलेला.

Tŏn'ic, *n.* (टॉनिक्)—(med.) tending to restore bodily tone, bracing; of the key-note. बलवर्धक, पुष्टिकारक; (मुख्य) सुराचा. *n.* a tonic medicine or agency; (Mus.) key-note. पुष्टिकारक औषध, शक्तिवर्धक-बलवर्धक-औषध, मुख्य सूर. *T. accent,* स्वराघात. *T. sol-fa,* musical notation. सारेगम. *Tonic'ity, n.* (शरीर-) स्वास्थ्य.

To-night', *n. & adv.* (टु-नाइट्)—the coming or present night. आज रात्रीं, आज रात्रौ, या रात्रीं.

Tō'nite, *n.* (टोनाइट्)—a powerful gun-cotton explosive. भयंकर स्फोटक द्रव्य,-पदार्थ.

Tŏnk, *v. t.* (टॉंक्)—(*sl.*) to hit hard, defeat easily. जोरानें मारणें,-फेंकणें; सहज पाडाव करणें.

To'nnage, *n.* (टनेज)—ship's cubic content or carrying capacity; total freightage of a country's merchant-marine; charge per ton on freight. जहाजाची माल नेण्याची शक्ति, टनी वजन, टनी दास्तान; एकंदर जहाजांचें टनी वजन,-दास्तान; दर टनामागें द्यावा लागणारा खर्च, दर टनीं भाडें. *T. deck,* जहाजाचा,-बोटीचा,-दुसरा मजला.

Tonn'eau, *n.* (टॉनो)—rounded rear body (containing seats) of some motor-cars. कांहीं मोटरगाड्यांचा मागचा वर्तुळाकार भाग. [F. lit. cask]

Tonŏm'eter, *n.* (टनॉमिटर्)—an instrument for measuring pitch of tones. (वाद्यांचें) स्वरमापक यंत्र.

Tŏn'sil, *n.* (टॉन्सिल्)—one of the two oblong glands at either side of the back of the mouth. घशाच्या दोहोंबाजूला असलेली गांठ, गलग्रंथि, अमृतकळा. *Tonsilli'tis, n. inflammation of tonsils.* गलग्रंथींची सूज,-दाह. *Ton'sillar, a.*

Tŏn'sure, *n.* (टॉन्शर्)—shaving of the head or of a patch on the crown; (*pl.*) admission to holy order. क्षौर, मुंडन, चूडाविधि; उपाध्यायदीक्षा देणें. *v. t.* to subject to tonsure. मुंडन करणें, क्षौर करणें.

Tŏntine', *n.* (टॉन्टीन्)—loan or fund the surviving subscribers of which receive annuities increasing as they become fewer. वर्गणीदारांनीं उभारलेला फंडाचा एक मकार.

Tōō, *adv.* (टू)—in addition; as well; moreover; in an excessive degree. ही, पण, देखील, आणखी; सुद्धां; शिवाय; अतिशय, फारच, अत्यंत. *T. much, T. much of a good thing,* असह्य. ['*Too*' is not used to qualify vb.]

Took, *pa. t. of* Take.

Tōōl, *n.* (टूल्)—a mechanical instrument; a person used to forward another's purposes. साधन, शस्त्र, हत्यार; बाहुलें. *v. t. & i.* to dress (stone) with chisel; impress design on (leather book-cover); (*sl.*) drive or convey or go (in carriage). (दगड) तासणें; (पुस्तकाच्या चामडी-पुठ्यावर) दाबून वेलबुट्टी वगैरे काढणें; हांकलणें, चालवणें; (गाडींत) बसून मजेंत (फिरावयाला) नेणें,-जाणें. *Carpenter's, gardener's, tt.,* सुताराचीं,-माळ्याचीं,-हत्यारें. *Machine t.,* यंत्रानें चालणारें-यांत्रिक-हत्यार. *The tt. of one's t., (fig.)* धंद्याचीं साधनें. *Tool'er, n.* stone-mason's broad chisel. पाथरवटाची पटाशी,-छिन्नी. *Tool'ing, n.* दगड तासणें; पुस्तकाच्या चामटीवेष्टणाची कडांची वेलबुट्टी,-नक्षी.

Tōōth, *n.* (टूथ्)—(*pl. teeth*) any of the set of bone-like bodies, rooted in the jaws and used esp. in biting; tooth-shaped projection or thing. दांत; दांता, दांत, फणा, खांच. *v. t. & i.* to furnish with teeth; (of cog-wheels) inter-lock. दांते पाडणें, खांचा पाडणें, दांते आणणें; दाते एकमेकांत

अडकणें. *Wisdom t.*, अक्कलदाढ. *False, artificial, t.*, t. made by dentist. कृत्रिम दांत, बसवलेला दांत. *To cast thing in person's tt.*, reproach him with it. एखाद्या गोष्टीमुळें (एखाद्याची) निर्भर्त्सना,-कान-उघाडणी,-करणें. *In the tt. of*, (opposition etc.), च्या विरुद्ध (दिशेनें); (ला) न जुमानतां. *Armed to the tt.*, completely armed. (शस्त्रास्त्रांची,-साधनांची) अत्यंत तयारी असलेला, सुसज्ज. *Cut one's eye-tt.*, व्यवहारज्ञान शिकणें,-मिळविणें, शहाणपण मिळविणें. *By the skin of one's tt.*, narrowlly (escape). कसेंबसें निभावणें, मरतां मरतां वांचणें. (*Fight, struggle,*) *t. and nail*, with utmost effort. शिकस्त करून, यत्नांची पराकाष्ठा करून. *From the tt. outwards*, insincerely. वरवर, तोंडदेखणें. *Show one's tt.*, दांतओंठ चावणें. *T. brush*, दांत घांसण्याचा कुंचला. *T. comb*, जवळ जवळ व बारीक दांत्यांची फणी. *T. pick*, दांत कोरणें. *T. powder*, दांतवण. *Toothed, Tooth'less, aa., tooth'let, n.*

Tōōth'āche, *n.* (टूथ्-एक्)—ache in the tooth. दंतशूळ, दांतदुखी.

Tōōth'some, *a.* (टूथ्-सम्)—(of food) delicious. रुचकर, चवदार, चमचमीत.-*ly, adv.*;-*ness, n.*

Tōōth'ful, *n.* (टूथ्फुल्)—small drop of brandy etc. मद्याचा घोंट.

Tŏp, *n.* (टॉप्)—the summit or the upper part or the surface of something; the highest place or rank; cover, lid; the upper part, leaves etc., of a plant grown for the root; (Naut.) the platform round head of lower mast serving to extend topmost shrouds; (*pl.*) metal buttons plated etc. only on face; bunch of hair, fibres, etc. esp. as measure = 1½ lb. शिखर, शेंडा, वरचा भाग, माथा, मस्तक; अगदीं वरची जागा, श्रेष्ठ पदवी,-दर्जा; झांकण, टोपण, सरपोस; शेंडा, वरचीं पानें, पाला; लहान डोलकाठीच्या शेंड्याजवळील फळी; (वरतीं) मुलामा दिलेलीं धातूचीं बटणें; (दीड रत्तल वजनाचा) केसांचा,-तंतूंचा,- समुदाय. *a.* of or at or on the top. वरचा, टोंकाचा, सर्वश्रेष्ठ, उच्च. *v. t. & i.* to cover top of or crown *with*; cut off top of (tree); surpass; be at the top of; reach the top of (hill etc.) शिखरावर असणें,-राहणें,-बसणें; शेंडा छाटणें; (वर) ताण करणें, सरशी करणें, मागें टाकणें; सर्वांत पुढें,-श्रेष्ठ,-असणें; शिखर, माथा चढून जाणें,-गांठणें. *At the t. of the tree*, झाडाच्या टिकाळशीला,-शेंड्यावर; (*fig.*) (धंद्यांत वगैरे) सर्वश्रेष्ठ, पहिल्या जागेचा,-मानाचा. *On the t. of*, in addition to. शिवाय, आणखी. *Gilt t.* (of book), सोनेरी रंगाची (पुस्तकाच्या पानांची) कडा. *At the t. of his voice*. शक्य तेवढ्या मोठ्यानें ओरडून. *From t. to toe*, नखशिखांत, वरपासून खालपर्यंत. *At t. speed*, भरधांव. *T. boots*, boots with tops. (पायाच्या पोटरीसभोंवार भिन्नरंगी पट्ट्यांचे) उंच शिकारी बूट. *T. coat*, overcoat. वरचा सैल अंगरखा, वरचा कोट. *T. dress*, जमिनीच्या पृष्ठभागावर खत घालणें. *T.-gall'ant*, (टॉपगॅलन्ट, टगॅलन्ट) (दुसऱ्या) उंच डोलकाठीवरचें व शिडावरचें शीड, डोलकाठी, दोरखंडें. *T. hat*, उंच रेशमी टोपी. *T. heavy*, apt to topple from being over-weighted above; (*fig.* of scheme, machinery, etc.). शेंड्याकडे भारी,-वजनदार,-न पेलण्याजोगा. *T. knot*, डोक्या-वरील फितीची गांठ, केसांचा झुबका, तुरा, शेंडी. *T. mast*, mast next above the lower mast. (दुसरी) उंच डोलकाठी. *T.-sail*, (-सल्) square sail next above lowest. (खालच्या शिडाच्या) वरचें चौकोनी शीड. *Topp'er, n.* उंच टोपी; (व्यापारी) दर्शनी उत्तम उत्तम वस्तु (फळें इ.). *Topp'ing, a.* excellent. अप्रतिम, सुंदर, सर्वोत्कृष्ट; -*ly, adv.*

Tŏp, *v. t. & i.* (टाप्)— to be at the top of; to surpass. शिखरावर चढणें; मागें टाकणें.

Tŏp, *n.* (टॉप्)—a toy of wood or metal. भोंवरा, भौरा, गिरीभोंवरा. *T-shell*, भोंवऱ्यासारख्या कवचाचे-शिंपल्याचे-मासे.

Tō'pāz, *n.* (टोपॅझ्)—a precious stone of various colours, esp. yellow; kinds of humming bird. पुष्पराग, पीतस्फटिक; एक जातीचे पक्षी.

Tōpe, *v. i.* (टोप्)—to drink to excess. खूप दारू पिणें, ढिंगणें. *To'per, n.* दारुड्या, दारूबाज.

Tōpe, *n.* (टोप्)—kind of small shark. लहान मगर-मासा.

Tŏph, Tō'phus, *n.* (टॉफ्, टोफस्)—gouty deposit of calcareous matter. वातरक्त रोगामध्यें (संधिवातांत) होणारा चुन्याच्या खड्यासारखा क्षारसंचय.

Tō'piarў, *a.* (टोपिअरि)—of the clipping of trees etc. into fantastic shapes. नानाप्रकारच्या चित्रविचित्र आकृतींत झाडेंझुडपें काढण्यासंबंधीं (कला). [L. *topiarius*, landscape gardener.]

Tŏp'ic, *a.* (टॉपिक्)—subject of conversation or theme of discourse. बोलण्याचा किंवा वादाचा विषय, प्रकरण.

Tŏp'ical, *a.* (टॉपिकल्)—having reference to current events; (med.) affecting a part of the body. प्रचलित विषयांविषयीं, चालू विषयासंबंधीं, विशेष स्थानिक, शरीरांतील विशिष्ट भागासंबंधीं.

Tŏp'mōst, *a.* (टॉप्-मोस्ट्)—uppermost. अगदीं वरचा, शेंड्याचा, शिखरावरचा.

Topŏg'raphў, *n.* (टापॉग्रफि)—local geography; features of a district or description of them; such features; (Anat.) mapping surface of body with reference to parts beneath. विशेष स्थलवर्णन; कोणत्याहि प्रांताचें अगदीं बारीकसारीक वर्णन; स्थलवर्णनविद्या; (अंतर्गत शरीररचनादर्शक) शरीराचा नकाशा काढणें. *Topog'rapher*, विशिष्ट स्थलवर्णनवेत्ता,-कार. *Topograph'ic, aa.* स्थलवर्णन-विषयक.-*ically, adv.* स्थलवर्णनविद्येच्या दृष्टीनें. [Gk *topos*, place; *graphein*, describe.]

Topŏ'nўmў, *n.* (टॉपॉ'निमि)—study of the place-names of a region. स्थलनामांचें संशोधन, स्थलनाम-विद्या.

Tŏp'ple, *v. i. & t.* (टॉ'पल्)—to be unsteady or hang as if about to fall; to fall or cause to fall. पडण्याच्या बेतावर असणें; पडणें, कोसळणें, तोंडावर पडणें.

Tŏpsўtürv'ў, *adv. & a.* (टॉप्सिट'व्हि)—upside down, in inverted position or way; in confusion. उलटापालटी, उलटसुलट. *n.* घोंटाळा, गोंधळ.-*dom, n.*

Tor, *n.* (टॉम्र्)—a hill, rocky peak. टेंकडी, खडकाळ शिखर.

Tŏrch, *n.* (टॉर्च्)—an inflammable stick or rope that can be carried as a light. धूर, मशाल, दिवटी, पोत, दिवा. *T. of Hymen,* passion of love. प्रेमविकार, अनुराग, मदनबाधा. *Electric t.,* विजेचा (लांबट फिरविण्याजोगा) दिवा. *T. fishing,* चूड पेटवून त्याच्या उजेडांत मासे पकडणें. *T. race,* ancient Greek festival performance of runners handing lighted *tt.* to others in relay. (प्राचीन ग्रीक लोकांची) मशाली घेऊन धावण्याची शर्यत. *Hand on the t.,* प्रज्वलित ठेवणें, (विद्या, ज्ञान वगैरेची) मशाल पेटती ठेवणें.

Tor'chon, *n.* (टॉ'र्श्रॉन्)—coarse loose kind of lace. जाडीभरडी उचीळ फीत. *T. paper;* जाडाभरडा कागद. [F = dishcloth]

Tore, *pa. t.* of Tear.

Tŏ'reador, *n.* (टॉ'रिअडॉ'अर्)—Spanish (mounted) bull-fighter. बैलांची झुंज लावण्यारा स्पॅनिश घोडेस्वार.

Tŏr'ment, *n.* (टॉ'अर्मन्ट्)—severe bodily or mental suffering. पराकाष्ठेचें दुःख, यातना, पीडा. *v. t.* (टॉअर्मे'न्ट्) to subject to torment, importune, tease. गांजणें, सतावणें, फार त्रास देणें, छळणें, पिडणें.-*or, n.* सतावणारा, छळणारा; (कठीण जमीन सारखी करण्याचें) चाकवालें गुठें. -*ress, n. f.*

Tŏr'mina, *n.* (टॉ'र्मिना)—griping pain in bowels, colic. (पोटांतील) मुरडा, तिडीक.

Torn, *pa. p.* of Tear.

Tŏrnā'dō, *n.* (टॉअर्ने'डो)—(*pl.-oes*), a very violent storm (*esp.* in W. Africa & in U. S.) over a limited area, a hurricane; (*fig.*) outburst or volley (*of* cheers, etc.). (प. आफ्रिका आणि अमेरिकेंतील सं संस्थानें यांत होणारें) प्रचंड वादळ, झंझावात, तुफान; प्रचंड कडकडाट, -गडगडाट. *Tornad'ic, a.*

Tor'ous, Toro'se, *aa.* (टॉ'अरस, टोरो'झ्)—(Bot.) cylindrical with bulges at intervals; (Zool.) knobby. मधून मधून फुगीर व नलिकाकार,-नळकांड्यासारखा; गांठाळ, गांठी असलेला.

Tŏrpē'dō, *n.* (टॉअर्पी'डो)—a fish inflicting electric shocks when touched; kinds of explosive mine; submarine missile that can be aimed at a ship, &c. and explodes on touching it. स्पर्श होतांच विजेच्यासारखा धक्का बसविणारा एक प्रकारचा मासा; स्फोटक सुरुंग; पाणतीर, जलतीर, मत्स्यास्त्र, पाणसुरुंग, पाणसुसर. *v. t. & i.* to hit or damage with torpedoes; (*fig.*) paralyse, make ineffective. पाणसुरुंग मारणें, पाणसुरुंगानें नाश करणें, पाणसुसर लागणें; निकामी करणें, बंद पाडणें (काम, संस्था इ०). *T. boat,* पाणतीर फेंकणारी बोट,-लहानसर अतिवेगवान लढाऊ जहाज. (*T. boat*) *destroyer,* टार्पेडो नेणारी बोट; टॉर्पेडो बोटीला धरणारी विनाशिका. *T. tube,* टार्पेडो सोडण्याची नळी. *Aerial t., t.* discharged from aircraft. विमानांतून फेंकण्याचे सुरुंग. [L. *torpere,* benumb]

Tŏrp'id, *a.* (टॉ'अर्पिड्)—benumbed, stupefied; sluggish; dull, inactive. बधिरा, सुन्ना; जाड, स्वस्थ, निपचित. *Torpidity, n. Torpidly, adv.*

Tŏrp'or, *n.* (टॉ'अर्पर्)—suspended animation; apathy, sluggishness. बधिरता, गुंगी; सुस्तपणा, मांद्य, जडता.

Torps, *n.* (टॉअर्प्स)—(Naut. sl.) ship's torpedo officer. आरमारी गलबतावरील सुरुंगाधिकारी.

Tor'quāte (d), *aa.* (टॉ'अर्क्वेट,-टेड्)—(Zool.) with ring about the neck. मानेभोंवतीं विशिष्ट वलय असलेला (प्राणी).

Tŏrr'ĕfў, *v. t.* (टॉ'रेफाय्)—to parch with heat, dry. उष्णता देणें, आंच देणें.-*faction, n.*

Tŏ'rrent, *n.* (टॉ'रन्ट्)—a violent rushing stream of water; (*pl.*) great downpour of rain; (*fig.*) a volley of abuse, etc. पाण्याचा स्रोत, लोंढा; पावसाची मुसळधार, वृष्टि; (शिव्यांचा) वर्षाव.-*ial, a.* (टॉरे'न्शल्);-*ially, adv. Rain falls in tt.,* मुसळधार पाऊस पडत आहे,-पडतो.

Tŏ'rrid, *a.* (टॉ'रिड्)—intensely hot. (अत्यंत) उष्ण, अति कडक उन्हाचा. *T. zone,* part of earth's surface between tropics. उष्ण कटिबंध. *Torrid'ity, n.,-ness, n.*

Tor'sel, *n.* (टॉ'र्सल्)—a twisted ornament; block of wood in brick wall. वेटोळें (नक्षी); विटांच्या भींतींतील लांकडी आधार.

Tor'sion, *n.* (टॉ'र्शन्)—twisting. पिळवटणें, पिळणें, निष्पीडण; तारेचा पीळ; (med.) रक्तवाहिनीचें टोंक पिळवटणें. *T. balance,* तारेच्या पिळावरून सूक्ष्म प्रेरणा मोजण्याचा तराजू.-*al, a.*

Tors'ō, *n.* (टॉ'र्सो)—(*pl.-os*) trunk of statue; unfinished work. पुतळ्याचें धड; अपुरें काम.

Tŏrt, *n.* (टॉर्ट्)—breach of duty imposed by law. अपकृत्य, नुकसान, नुकसानी. *Tortious, a.* (law) अपकृत्याचा;-*ly, adv.* [F]

Torticoll'is, *n.* (टॉअर्टिक'लिस्)—stiff neck. (संधिवात रोगानें होणारी) वांकडी मान, वक्रग्रीवा.

Tort'il, *a.* (टॉ'र्टिल्)—twisted; (Bot.) coiled. पिळलेला, पीळ पडलेला; वेटोळेंदार.

Tŏrt'oise, *n.* (टॉ'अर्टस, टॉ'र्-टॉइझ्)—a four-legged reptile enclosed in a horny shell. कासव,

कूर्म, कच्छप. *Hare and t.,* (fable). शक्तीपेक्षां चिकाटी अंतीं यशस्वी होते. *T. shell,* (टॉर्टशल्) कचकडा, कांसवाचा खवला, कांसवाच्या पाठीचें हाड, -हाडासारखा, कचकड्याचा.

Tŏrt'ūous, *a.* (टॉ'अट्युअस)—winding; (*fig.* of policy) roundabout, indirect, involved. पांकडा; नागमोडीचा, वक्र, कुटिल, गुंतागुंतीचा. *Tortuose, a.* (Bot.) पीळ घातलेला, पीळदार. *Tortuos'ity, n.*

Tŏr'ture, *n.* (टॉ'अर्च्र्)—infliction of pain, esp. to extort something from victim; agony. छळ,-हाल, यातना; तीव्र वेदना. *v. t.* to subject to torture; (*fig.*) force out of natural position, pervert the meaning of (words etc.). छळ करणें, हाल करणें; हालवणें, बदलणें, (शब्दांचा) अर्थ फिरविणें, शब्दच्छल करणें.*-turer, n., -turingly, adv.*

Tor'y, *n.* (टॉ'अरि)—a Conservative in English politics. टोरीपक्षीय, पुराणमतवादी.*-ism, n.* टोरीपक्षाचीं मतें,-तत्त्वें.

Tor'ŭs, *n.* (टॉ'अरस)—(*pl.*-ri), lowest member of base of column; (Bot.) receptacle of flower. (खांबाच्या) उथळयाची जाड गोलची; पुष्पाधार, श्रीकेसराधार, श्रीकेसरासन.

Tŏss, *v. t. & i.* (टॉस)—to move with fitful to-and-fro-motion; to fling or roll about; to throw upwards, (of ball, bull with horns etc.); throw (coin) into air to decide choice by way it falls; drain (liquor) at a draught; throw back one's head; roll about restlessly. खालीं वर होणें,-हालणें, -हालवणें; फेंकणें, टाकणें, भिरकावणें; वर उडवणें, -फेंकणें; (नाणें वर फेंकून) ओली सुकी करणें; घोटासरशी (दारू) पिऊन टाकणें; (तिरस्कार, -उतावीळ,-दाखविण्यासाठीं) मान उडवणें; अस्वस्थपणें लोळणें, गडबडां लोळणें, क्षुब्ध होणें. *n.* tossing of coin, head, etc.; tossing motion; upward throw of ball. उडवणें, फेंकणें, ओलीसुकी; तळमळ, चडफडाट; उंच फेंक (चेंडूची). *T. off,* drink off; dispatch (work) rapidly. घोटासरशीं पिऊन टाकणें; (काम) सहज उरकून टाकणें,-संपवणें. *Win the t.,* (खेळाची) ओलीसुकी (उन्हाळी पावसाळी) जिंकणें. *full t.,* (क्रिकेट०) उंचावरून टाकलेला चेंडू. *T.-up,* doubtful question. संशयग्रस्त प्रश्न,-मुद्दा. *Tossed,* (poet.) *Tost, pa t. & pa. p.*

Tŏt, *n.* (टॉट)—(colloq.) *a tiny t.,* small child; dram of liquor; addition sum or its result. पोरटें, लहान मूल; दारूचा घोट; मिळवावयाची रक्कम, बेरीज. *v. t. & i.* to add *up*; (of expenses) mount *up.* मिळवणें; (खर्चाचा) आकडा वाढणें,-फुगत जाणें.

Tō'tal, *a.* (टो'टल)—complete; comprising the whole. पूर्ण; एकूण, सर्व, पुरा. *n.* sum of all items; total amount. एकूण; बेरीज; जमा, राशि, रास. *v. t. & i.* to find the total of; amount in number to. ची बेरीज करणें, मिळवणें; अमुक संख्या होणें, गोळा-बेरीज होणें. *T. eclipse,* खग्रास ग्रहण. *Grand t.,* एकूण (सर्व रकमांची) गोळाबेरीज. *The visitors totalled 200,* एकंदर पाहुणे दोनशें होते. *Total'ity, n.* एकंदर जमा, गोळा बेरीज, खग्रास ग्रहणकाल. *To'tally, adv.* पूर्णपणें, एकंदर, सर्व बाजूंनीं.

Tō'talise, *v. t. & i.* (टो'टलाइझ्)—to collect into a total; use totalizer in betting. एकत्र,-बेरीज, -करणें; शर्यतींतील लावलेल्या रकमा दाखविणाऱ्या यंत्राचा उपयोग करणें.

Tō'talizer,-zātor, Tōte, *nn.* (टो'टलाइझ्,-झेटर्, टोट)—the device registering number and amount of bets staked on race. शर्यतींतील (क्रमांक व त्यावर लावलेल्या रकमा यांची) नोंदणी करणारी यांत्रिक योजना.

Tōte, *v. t.* (टोट्)—(U. S.) to carry, bear (burden etc.). नेणें, वाहणें.

Tō'tĕm, *n.* (टो'टेम्)—hereditary emblem (a natural object, esp. animal) of a tribe or clan of primitive people giving its name to the tribe. (परंपरागत) गोत्रचिन्ह, वंशचिन्ह.*-ism, n.* रानटी लोकांची वंशचिन्ह धारण करण्याइतकी सुधारणेची स्थिति.

Trop'ical, *a.* (ट्रॉ'पिकल्)—of or as of or incident to the tropics; (*fig.*) fervid, passionate; figurative. क्रांतिवृत्ताचा, अयनवृत्तांमधील, उष्णप्रदेशांत होणारा; (अलं०) सोत्सुक, उत्कट मनोविकाराचा; अलंकारिक. *T. diseases,*

उष्णप्रदेशांतील रोग. *T. year,* between two successive passages of sun through the same equinox. सायन वर्ष, सांपातिक सौरवर्ष. *Trŏ'pically, adv.*

Trŏpĭcopŏl'itan, *a. & n.* (ट्रॉपिकापॉ'लिटन्)—(an animal or plant) confided and common to the tropics. फेवळ उष्णकटिबंधांतील (प्राणी, झाड).

Tropŏl'ogy̆, *n.* (ट्रपॉ'लजि)—figurative use or interpretation of words. (शब्दांची) लाक्षणिक योजना, रूपकयोजना; लाक्षणिक अर्थ लावणें.

Trŏt, *n.* (ट्रॉ'ट्)—a quadruped's medium pace; human being's gentle run; a toddling child. दुडकी चाल; (मनुष्याचें) साधारण धावणें, -धाप. *v. t. & i.* (of horse etc.) to go at the trot; (*joc.*) go on foot; make (horse etc.) trot. दुडक्या चालीनें चालणें, तुरतुर चालणें; पायीं चालणें; (घोडा) दुडदुड चालवणें,-हांकवणें. *T. out,* cause (horse) to trot to show his paces, (*fig.*) produce, introduce (person, thing etc.) to excite admiration. (घोड्याचीं) पावलें दिसतील अशा दुडक्या चालीनें चालवणें; कौतुकास्पद रीतीनें दाखविणें, भासविणें. *Proceeded at a t.,* दुडक्या चालीनें जाऊं लागला. (*Kept him*) *on the t.,* busy. उद्योग लावून दिलेला. *Trott'ers, n. pl.* animal's feet as food; (*sl.*) human foot. (खाण्यासाठीं) जनावराचे पाय; माणसाचीं पावलें.

Trōth, *n.* (ट्रोथ्)—truth; faith, fidelity. सत्य, विश्वास, खरें; भरंवसा. *Plight one's t.,* (लग्नांत) वचन देणें, शपथ घेणें.

Trō'tȳl, *n.* (ट्रो'टिल)—trinitrotoluol. एक भयंकर स्फोटक (अस्त्र).

Trou'badour, *n.* (ट्र'बॅडूर्)—a medieval romantic or amatory poet. (फ्रान्समधील) मध्ययुगीन पोवाडे-लावण्या-रचणारे कवि; (आपल्याकडल्या सारखे) कोंकेवाले बैरागी. [F]

Trou'ble, *n.* (ट्र'बल्)—disquiet; disturbed state; pains bestowed; disease; molestation; (Mining) small fault. अशांतता; त्रास, कष्ट, सायास; खळबळ; श्रम, तसदी, खटपट; विकार, पिडा, रोग; दुःख, उपद्रव, छळणूक; भूमिगत थरांतील लहान खंड,-मध्यें तुटलेला भाग. *v. t. & i.* to ruffle (water, peace, &c.); inflict trouble on or be a trouble to; trouble oneself. क्षुब्ध करणें; त्रास देणें किंवा घेणें, श्रम देणे, पिडणें, ताप देणें, छळणें; त्रास करून घेणें, संतापणें, काळजी करणें, -वाटणें. *Digestive tt.,* पचनक्रियेचे विकार, -चा त्रास. *Ask* or *look for t.,* (sl.) meddle, be rash. लुडबुड करणें, अविचार करणें, संकट,-त्रास,-ओढवून घेणें. *Be in t., get into t.,* पेंचांत,-अडचणींत, -सांपडणें; शिक्षेस पात्र होणें. *Take the t.,* तसदी घेणें. *No t.,* (as a polite formula) कांहीं अडचण,-त्रास,-नाहीं. *Don't t. about it,* त्याविषयीं कांहीं काळजी-चिंता-करू नको. *A troubled countenance,* सचिंत,-दुःखी,-मुद्रा. *Trou'blous, a.* (arch.) full of troubles, agitated. दुःखाचा, संकटाचा, गडबडीचा; क्षुब्ध, खळबळीचा, नष्ट (काळ इ०).

Trou'blesome, *a.* (ट्र'बल्-सम्)—causing difficulty or annoyance or discomfort. त्रासदायक, कंटाळवाणा, खडतर.

Trough, *n.* (ट्रॉफ्)—a long narrow shallow receptacle for liquid, &c. to stand in; channel or hollow like this. द्रोण, कोठिंबा, कुंड, टांकी, हौद; पाट, पन्हळ. *T. of the sea,* hollow between two waves. समुद्राच्या दोन लाटांमधील खोलगट भाग, -खोली.

Trounce, *v. t.* (ट्राउन्स्)—to inflict severe punishment or defeat *on* by word or deed. जबर शिक्षा देणें; खरपूस मार देणें,-चोप देणें. *Trouncing, n.* खरपूस मार,-चोप.

Troupe, *n.* (ट्रूप्)—a set of actors, acrobats, performing animals, etc. खेळ करणारी मंडळी, नाटकमंडळी, डोंबारी-मंडळी, खेळ करणाऱ्या जनावरांचा संच, इ.

Trous'ers, *n.* (ट्रा'उ-झर्झ्)—(also *pair of t.*) loose two-legged outer garment from waist to ankles. इजार, पायजमा, पायघोळ चोळणा. *T.* or *tt. pocket,* (पैसे ठेवण्याचा,-हात मजेंत घालण्याचा) विजारीचा खिसा.

Trouss'eau, *n.* (ट्रूसो)—(*pl.-s* or *x,-झ्*), bride's outfit of clothes etc. वधूचीं वस्त्रें, कपडे.

Trout, *n.* (ट्राउट्)—a fresh-water fish. गोड्या पाण्यांतील एक मासा. *v. i.* to fish for trout. 'ट्राउट' मासे पकडणें. *T. coloured,* (of white horse) काळे करडे ठिपके असलेला, रंगीबेरंगी (पांढरा घोडा).*-y, a., -let, n.*

Trō'ver, *n.* (ट्रो'व्हर्)—acquisition of personal property; law-action to recover value of goods wrongfully taken or detained. स्वतःची खाजगी मालमत्ता करणें, स्वकष्टार्जित मालमत्ता करणें; गैरकायदा दुसऱ्यानें घेतलेल्या स्वतःच्या मालकी मालमत्तेबद्दल नुकसानभरपाईची फिर्याद.

Trow, *v. t.* (ट्रो)—(arch.) to think. वाटणें, मत असणें. *What ails him,* (I) *t.?* त्याला काय होत आहे? कळत नाहीं.

Trow'el, *n.* (ट्रा'वेल्)—(mason's) flat-bladed tool for spreading mortar etc.; gardener's scoop for lifting small plants. थापी, कर्णी; खुरपें. *v. t.* थापीनें (भिंतीला) गिलावा काढणें. *To lay it on with a t.,* (*fig.*) flatter grossly. भरमसाट स्तुति करणें,-खुशामत करणें. *Trowelled, pa. t. & pa. p.* [L. *trua, a* ladle]

Troy,-weight, *nn.* (ट्राय, ट्रायवेट्)—weight used for gold, silver and gems. (बारा औंसी पौंडाचें) ट्राय वजन.

Tru'ant, *n.* (ट्रु'अन्ट्)—a child who absents himself from school without leave; a person neglecting duty, &c. उनाड मुलगा, भटक्या; कामचुकार मनुष्य. *a.* idle, shirking, wandering.

आळशी, कामचुकार, भटक्या. *v. i.* भटकणें, चुकारपणा करणें. *To play t.,* stay away from school. उनाडणें, उनाडकी करणें. *T, school,* उनाड पोरांकरितां (औद्योगिक) शाळा. *Tru'ancy, n.* उनाडपणा, भटकेपणा.*-antly, adv.*

Truce, *n.* (ट्रूस)—cessation of hostilities by agreement for a time; armistice; short quiet. मुदतीचा तह, तात्पुरता तह; विश्रांति, विसांवा. *Flag of t.,* तहाचा बावटा. *T. of God,* (hist.) धार्मिक उत्सवांत खाजगी भांडणें विसरून जाणें. *T.-less, a.*

Trŭck, *v. t. & i., n.* (ट्रक)—to barter, exchange; hawk (wares) about. मालाचा सौदा करणें, अदलाबदल करणें; (किरकोळ माल) फेरी करून विकणें. *n.* an exchange, barter; small wares; rubbish; (*fig.*) non-sense; (also *t.* system) practice of paying workmen in goods instead of money. अदलाबदल, सौदा, व्यापार; चिल्लर माल, किरकोळ जिन्नसपानस; गाळ, कचरा; भलतेंच, भलतीच गोष्ट; रोकड मजुरीऐवजीं कामगारांना जिन्नस-माल-मजुरी म्हणून देण्याची पद्धत. *Have no t. with,* avoid dealing with. शीं संबंध टाळणें. *Shall stand no t.,* भलतेंसलतें खपणार नाहीं,-ऐकून घेणार नाहीं. [F]

Trŭck, *n.* (ट्रक)—kinds of strong vehicle for moving goods or cattle; an open railway wagon; porter's wheeled barrow for luggage; set of wheels in frame-work; (Naut.) wooden disk at top of a mast. गाडा; (आगगाडीचा) उघडा डबा, उघडी वागीन; (स्टेशनवरील) हमालाची हातगाडी; सांगाड्यांत जोडलेल्या (रेल्वेच्या वगैरे) चाकांचा संच; डोलकाठीच्या टोंकावरचें लांकडी कडें. *v. t.* to convey on truck. (रेल्वेच्या) उघड्या डब्यांतून नेणें; गाडा, डबा-भरून नेणें.*-age,* उघड्या वागिणींतून नेणें, नेण्याचें भाडें.

Trŭc'kle, *n.* (ट्रंकल्)—a small wheel, or castor; truckle-bed. लहान चाक, लाटिसाचें बिछान्याचें चाक; चाकें लावलेला सरकत बिछाना. *v. i.* to cringe *to*; act in a servile manner. ची लाळ घोटणें, हांजीहांजी करणें. *T.-bed,* चाकांवरचा (लोटतां येणारा) सरकत बिछाना. *Truc'kler, n.* हांजीहांजी करणारा.

Trŭc'ulent, *n.* (ट्रंक्युलन्ट्)—of or showing bellicose merciless temper, fierce. रानटी, क्रूर, निर्दय, विनाशक, घातक.*-ly, adv.*;*-ence, n.* रानटीपणा, क्रूरपणा.

Trŭdge, *v. i. & n.* (ट्रज्)—to go on foot, walk with effort; toil along. पायीं जाणें; यातायात करणें; वणवण, पायपिटी.

Trŭdg'ĕn, *n.* (ट्रंजिन्)—swimming with alternate right and left over-arm strokes and ordinary leg action. डावा उजवा हात मारून पोहण्याचा एक प्रकार.

True, *a.* (ट्रू)—in accordance with fact or reality, not false; genuine, not hybrid or counterfeit; loyal or faithful or constant (*to*), in correct position; upright; (of voice) in perfect tune; honest, truthful. सत्य, खरा; अस्सल; प्रामाणिक, इमानी; योग्य, स्थितींत, उभा, सरळ; उत्तम सुरावटीचा, योग्य (आवाज); प्रामाणिक, इमानी, सत्य, सच्चा. *adv.* truly. खरोखर, इमानानें. *v. t.* (of tool, wheel, frame) to bring into exact position or form required. नीट बसविणें, योग्य आकार देणें. *His words have come t.,* have been realized in fact. त्याचे शब्द खरे ठरले,-अनुभवाला आले. *T. as steel,* पोलादाप्रमाणें सत्यशील. *T. bill,* grand jury's verdict, sustained by evidence, sending case for trial. वरिष्ठ (मतीच्या) पंचमंडळानें पुरावा पाहून खटला भरण्याविषयीं दिलेला निकाल. *T.-blue, a. & n.* (a person) of uncompromising principles or loyalty. पूर्ण तत्त्वनिष्ठ,-प्रामाणिक (मनुष्य). *T.-born,* शुद्ध रक्ताचा, अस्सल. *T.-bred,* of genuine or good breed. चांगल्या रीतिभातींचा, सुविनीत, कुलीन. *T.-hearted,* शुद्ध अंतःकरणाचा. *T.-love,* प्रेमाचें मनुष्य, प्रेमपात्र; एकांत एक गुरफटलेल्या चार पानांची वनस्पति. *T. penny,* (arch.) an honest fellow. प्रामाणिक मनुष्य. *Tell me t.,* खरेंखुरेपणानें,-खरें खरें,-सांग. *T.-ness, n.* खरेपणा, सच्चेपणा.

Tru'ism, *n.* (ट्रूइझम्)—statement too obviously true or too hackneyed to be worth making, self-evident truth. स्वतःसिद्ध किंवा अगदीं प्रचारांतील विधान, शिळा,-उष्टा,-सिद्धांत, स्वयंसिद्ध गोष्ट.

Trull, *n.* (ट्रल)—a harlot. वेश्या.

Tru'lў, *adv.* (ट्रूलि)—according to truth, with truth; sincerely; loyally, honestly; accurately. वस्तुतः, खरोखर; मनापासूनचा, खरोखर, प्रामाणिकपणानें; इमानानें; अगदीं तंतोतंत, अस्सल बरहुकूम.

Trŭmp, *n.* (ट्रम्प्)—a card of the suit that ranks above other suits for one game; (colloq.) a good fellow. हुकूम, हुकुमाचें पान; भैयांचा, भरंवशाचा,-चांगला माणूस. *v. t. & i.* to defeat with a trump; play a *t.* हुकमानें घेणें,-मारणें; हुकमाचें पान खेळणें. *T. card,* हुकमाचें पान, हुकूम; (*fig.*) महत्त्वाचें साधन, प्रमुख इलाज. *Put person to his tt.,* (*fig.*) reduce to his last resources. निर्वाणावर बेतवणें,-आणणें. *Turn up tt.,* (colloq.) अनपेक्षित बरें ठरणें; दैव उघडणें. *T. up,* fabricate (story etc). बनवणें, रचवणें, बनवाबनवी करणें.

Trŭmp, *n.* (ट्रम्प्)—(poet.) a trumpet, its sound. तुतारी, तुतारीचा आवाज.

Trŭmp'erў, *n.* (ट्रंपरि)—worthless finery; things of no real value, useless matter; unsound reasoning. दिखाऊ पण टाकाऊ वस्तु, उगीच भपका; सटरफटर वस्तु; न पटणारा युक्तिवाद, शुष्कवाद,-गप्पा. *a.* showy but worthless, shallow. खोटा, कवडीमोलाचा, पोकळ.

Trŭmp'ĕt, *n.* (ट्रंपिट्)—a wind-instrument of loud clear tone; a sound of *t.*; a reed-stop in organ; an ear-trumpet. तुतारी, कर्णा. तुतारीचा आवाज; वाजाच्या पेटींतील तुतारीसारखा आवाज काढण्याची खुंटी; (अर्धवट बहिऱ्या माणसाचें नीट ऐकूं यावें म्हणून)

कानाला लावण्याचें यंत्र,-चा कर्णा. *v. i. & t.* to blow the trumpet; proclaim loudly, celelerate, advertise; (of elephant) make loud sound as of a *t.* तुतारी वाजवणें, जाहीर करणें, थोरवी सांगणें; (हत्तीनें) तुतारीसारखा चीत्कार करणें. *Speaking t.*, (आवाज मोठा व्हावा म्हणून) बोलण्याचा कर्णा. *Blow* one's *own t.*, आपणच आपली स्तुति करणें,-स्वतःचें तुणतुणें वाजवणें. *T.-call*, call by sound of *t.*; (*fig.*) urgent summons to action. तुतारी वाजवून बोलावणें,-आव्हान करणें; कार्य करण्यास त्वरेचें आव्हान, कार्याला त्वरित सिद्ध होण्याचा इशारा. *T. flower*, सागरगोटी, गजरी. *T.-major*, chief trumpeter of cavalry regiment. घोडदळाचा मुख्य कर्णेकरी, तुताऱ्या.

Trŭmp'ēter, *n.* (ट्रंम्पिटर्)—*one who sounds a* trumpet; a cavalry man giving signals on trumpet; birds making trumpet-like sounds. तुतारी,-कर्णा,-वाजविणारा; तुतारीनें लष्करी सूचना देणारा, तुताऱ्या, घोडेस्वार; तुतारीसारखा आवाज करणारे पक्षी. *To be* one's *own t.*, blow one's own *t.* आपणच आपलें ढोलकें वाजविणें,-आपली स्तुति करणें.

Trŭnc'al, *a.* (ट्रंकल्)—of the trunk of a body or tree. धडाचा,-सोंडा.

Trŭncāte', *v. t.* (ट्रंकेट्)—to cut off the tip of. (*lit & fig.*); replace edge by plane. चें अग्र तोडणें, शेंडा कापून-छाटून-टाकणें; कडा काढून सपाट करणें. *a.* cut off at the tip. (अग्रहीन) छाटलेला, सोंडितासारखा. *-ly, adv.*; *-cation, n.*; -cature, *n.* (Zool.) अग्रच्छेदन.

Trŭn'cheon, *n.* (ट्रंचन्)—a short staff or baton as symbol of authority; the policeman's short club; a club, a cudgel. अधिकारदंड; पोलिसांचा दंडुका; सोटा, सोडगा.

Trŭn'dle, *v. t. & i.* (ट्रंडल्)—to roll or bowl along, roll as on little wheels; push or draw (wheel barrow); (sl.) bowl at cricket. ढकलणें, ढकलीत नेणें; चाकांवर फिरवणें,-चळवणें; ढकलणें; (क्रिकेट) चेंडु फेकणें,-टाकणें. *n.* a small broad wheel; kind of low wheeled cart; a rolling motion; a trundle bed. लहान रुंदट चाक; सखल चाकांचा गाडा; घरंगळी गति; चाकांवर फिरणारा बिछाना. *Trun'dler, n.* (sl.) bowler. चेंडू टाकणारा.

Trŭnk, *n.* (ट्रंक्)—woody stem of a tree; a person's or animal's body without head and limbs and tail; the main body of anything; elephant's prehensile nose; a travelling box or portmanteau; (also *t.-line*) main line of railway or canal, telephone main line (from town to town); kinds of shaft etc. for ventilation etc.; open cylinder used instead of piston-rod in some engines. झाडाचें खोड, कांद, पेड; शरीराचें कांड, धड; मुख्य भाग, पोट; (हत्तीची) सोंड, (किड्याची) सोंड, तोंड; प्रवासी पेटी, ट्रंक; मुख्य फांटा,-रस्ता,-प्रवाह; (टेलिफोनचा) मुख्य फांटा,-मार्ग; (हवा जाण्याकरितां) यंत्र,-पन्हळ,-चाळण; (दट्ट्याच्या दांड्याऐवजीं कांहीं यंत्रांतील) उघडा नलिकाकार यंत्र-भाग. *T. call*, टेलिफोनच्या मुख्य मार्गावरून विशेष -जादा-दर देऊन केलेलें संभाषण. *T. line*, रेल्वेचा मुख्य मार्ग,-रस्ता; शहराशहरांमधला टेलिफोनचा मुख्य मार्ग,-फांटा, *T. road*, main road. मुख्य रस्ता, राजमार्ग.

Trŭnn'ion, *n.* (ट्रंन्यन्)—supporting cylindrical projection on either side of cannon or mortar; hollow grudgeon supporting cylinder in steam engine. (तोफेचा) कानपा; खुंटी.*-ed, a.* कानपा असलेला, बसविलेला. [F]

Trŭss, *n.* (ट्रस्)—timber-tie helping to support roof or bridge, a bundle of hay or straw; compact terminal flower-cluster; surgical appliance used in rupture; large corbel supporting monument etc.; (Naut.) heavy iron fitting securing lower yards to mast. कैची; (गवताचा) गठ्ठा, भारा, लाटा; गुच्छ; दाव, पट्टा, चाप; (आधारभूत) मोठा दगडी किंवा लांकडी घोडा (भिंतींत पसविलेला•); लोखंडी कैची. *v. t.* to support with truss (es); make into *tt.*; tie up (fowl) compactly for cooking; tie arms (of person) to his sides. कैचीवर सांवरून धरणें, कैचीचा आधार देणें; भारे बांधणें; आंवळून बांधणें; हात बाजूला आंवळून बांधणें. *T. up*, वस्त्र वर घेणें, वर आंवळून गच्च बांधणें; (गुन्हेगाराला) फांशी देणें. *T. bridge*, कैचीचा आधार दिलेला पुल.

Trŭst, *n.* (ट्रस्ट)—firm belief; confidence, charge committed to one; trusteeship; property committed to trustee(s); (commerc.) combination of producing firms designed to prevent outside competition; commercial credit. दृढ विश्वास, श्रद्धा, निष्ठा, भरंवसा, ठेव, निक्षेप; जिम्मा, हवाला; व्यवस्थेकारितां ताब्यांत दिलेली मालमत्ता; व्यापारी संघ; पत, उधार. *v. t. & i.* to put trust in, place confidence in; treat as reliable; commit to the care of, hope earnestly; allow credit to (person *for* funds). विश्वास ठेवणें, खरा मानणें; विश्वास असणें; हवालीं करणें, हवालणें, विश्वासानें देणें, वर पातणें; आशा करणें, उमेद पाळगणें, (माल) उधार देणें, उधारीनें देणें,-विकणें. *Put no t. in him*, त्याच्यावर विश्वास ठेवूं नको, त्याचा भरंवसा धरूं नको. *Takes everything on t.*, प्रत्येक गोष्ट अंधश्रद्धेनें स्वीकारतो. *On t.*, उधार, आंगावर, पतविर. *Breach of t.*, विश्वासघात. *Do not t. him with your camera.* तूं आपला कॅमेरा त्याला वापरूं देऊं नको. *Cat cannot be trusted with milk*, दुधाविषयीं मांजराचा विश्वास नाहीं, तें दूध चोरून खाईल. *T. deed*, document creating a legal trust. (मालमत्ता) पंचांच्या ताब्यांत दिल्याचा कायदेशीर लेख,-दस्तैवज. *Trustingly, adv.* विश्वासपूर्वक, विश्वासानें.

Trŭstee', *n.* (ट्रस्टी)—a person or member of a board entrusted with the administration of trust property; each of a body of men managing affairs of college etc. जिम्मेदार,

(दुसऱ्याच्या वतीनें व्यवस्था पाहणारा) पंच; व्यवस्थापक मंडळाचा सभासद.

Trust'ful,-'ing, *aa.* (ट्रस्ट्फुल्;-स्टिंग्)—full of trust, not given to suspicion; confiding. विश्वास ठेवणारा, विश्वसनीय, विश्वासू, श्रद्धावान, निष्ठ.*-fully, adv.* *-fulness, n.*

Trŭst'worthy̆, *a.* (ट्रस्ट्-वर्दि)—deserving of trust or confidence, faithful. खातरीचा, विश्वासू. *-thiness, n.*

Trus'ty̆, *a.* (ट्रस्टि)—loyal, faithful. विश्वासू, खात्रीचा. *n.* a well-behaved and privileged convict. सद्वर्तनी कैदी.

Truth, *n.* (ट्रुथ)—being true or truthful; what is true, a true statement. सत्य, सत्यता, खरेपणा, वास्तवपणा; खरी गोष्ट; वास्तविक प्रकार, सत्यकथा,-वृत्तांत; खरें विधान, तत्त्व, सिद्धांत. *The wheel is out of t.,* चाक योग्य ठिकाणांतून घसरलें आहे,-बाहेर गेलें आहे. *God's t., Gospel t.,* वेदवाक्य, सर्वस्वी खरें विधान. *In t., of a t.,* (arch.) truly, really. खरें पाहतां, खरोखर, वास्तविक. *Home tt.,* unpalatable facts about oneself. स्वतःसंबंधीं न रुचणाऱ्या-अप्रिय-गोष्टी, अप्रिय सत्य.

Tru'thful, *a.* (ट्रूथ्फुल्)—wont to tell the truth; (of tale etc.) true, conformable with truth. सत्यशील. खरें बोलणारा; खरा, प्रामाणिक; विश्वसनीय, वास्तविक.*-lly, adv.;-ness, n.*

Truth'less, *a.* (ट्रूथ्लिस्)—(of statement) false; (of person) faithless. खोटा, असत्य; अविश्वासू, आपलें वचन न पाळणारा (मनुष्य).*-ness, n.*

Trȳ, *v. t. & i.* (ट्राय्)—to test, prove by experiment; make an attempt at, examine and pronounce upon (case); apply and become candidate for; (also *t. up*) dress with *trying—plane* to give fine surface, (also *t. out*) purify (fat, metal. etc.) by boiling or melting. परीक्षा किंवा कसोटी पाहणें, प्रयत्न करणें, यत्न करणें, उद्योग करणें; चौकशी करून निर्णय देणें, (खटला) चालवणें, चौकशी करणें; अर्ज करून पाहणें; (खडबडीत पृष्ठभाग) रांधून गुळगुळीत करणें; उकळवून गाळून शुद्ध करणें. *n.* an attempt; (Rugby-footb.) the right to carry ball in front of goal and to kick goal. प्रयत्न; (फुटबॉलच्या खेळांत) सीमेसमोर चेंडू नेऊन तो (पायानें) मारण्याचा विशिष्ट हक्क. *T. our soap,* buy-. आमचा साबण विकत घेऊन पहा. *T. your hand at it,* आपलें कौशल्य,-कसब,-चालवून पहा,-दाखव. *Let us t. whether it will break,* तें मोडतें का पाहूं या. *The light tries one's eyes,* या उजेडानें डोळ्यांना त्रास होतो. *T. for,* aim at; apply or compete for. (चा) यत्न करून पाहणें; (त्या जागेसाठीं) अर्ज करणें, चढाओढ करणें. *T. on,* (a garment). घालून पाहणें; प्रयोग करून पाहणें. *T. out,* test (thoroughly), पुरेपूर कसोटीला लावणें,-कसोटी पाहणें. *T.'sail,* (-सल) लहान शीड. *Try (ing) square,* carpenter's square, usu. with one wooden and one metal limb. सुताराचा गुण्या. *Have a t. at it,* तें करून पहा, त्या विषयीं यत्न करून पहा.

Trȳ'ing, *a.* (ट्रायिंग्)—exhausting; exasperating; difficult to bear. दमविणारा; आणीबाणीचा, अडचणीचा, असह्य.

Trȳp'anosōme, *n.* (ट्रिपॅनासोम्)—kinds of blood-parasite causing diseases. रक्तशोषक (रोग) जंतु, कीड.

Trȳp'sin, *n.* (ट्रिप्सिन्)—chief digestive ferment of the pancreatic juice. स्वादुपिंडाच्या रसांतील पाचकतत्त्व, स्वादुपिंडरसतत्त्व.

Trȳst, *n. & v. t.* (ट्रिस्ट्)—(arch.) time and place for meeting; appointment. भेटण्याची वेळ व जागा, संकेतस्थान, संकेत (ठरविणें).

Tsar, *n.* (त्झार्)—an emperor or king. (रशियाचा माजी) राजा, बादशहा, झार.

Tsĕt'sé, *n.* (त्सेट्सि)—S.-Afr. fly whose bite is fatal to horses, cattle, etc. (घोडे, गुरेंढोरें वगैरेंना घातक) दंश करणारी एक जातीची (द. आफ्रि.) माशी.

Tŭb, *n.* (टब्)—an open wooden vessel used for washing and other purposes; varying measure of capacity for butter, corn, etc.; sponge-bath, or use of it; kinds of bucket or box for conveying ore, coal, etc.: broad short clumsy boat; boat for practice-rowing. (लाकडाचें) पिंप, टीप, (लोणी, धान्य वगैरे) मोजण्याचें मापाचें टीप; स्पंजस्नान, (स्नानाच्या) पिंपांतील-टिपांतील-स्नान; (अशुद्ध धातु वगैरे भरून नेण्याची) बादली, पिंप; लहान बेढब होडी,-पगार; (वल्हवण्याचा सराव करण्याची) वल्हेंवाली होडी, बोट. *v. t. & i.* to bathe in tub; plant in tub; row in tub. पिंपांत बसून स्नान करणें; पिंपांत भरणें, लावणें; होडींत बसून वल्हवणें, वल्हवण्याला शिकविणें. *Let every t. stand on its own bottom,* every one look to himself. ज्यानें त्यानें आपापलें पहावें. *A cold t.,* थंड पाण्याचें स्नान. *T.-pair,-four,* दोन,-चार,-वल्ह्यांची बोट. *T-thumper,* ranting preacher. आवेशयुक्त,-तावातावानें-भाषण करणारा प्रचारक. *T.-ful,* पिंपभर.

Tū'ba, *n.* (ट्यूबा)—a large low-toned trumpet; kind of organ-stop. मृदु आवाजाची मोठी तुतारी; वाजाच्या पेटीची खुंटी. [L=trumpet]

Tŭbb'y̆, *a.* (टबि)—Also *tubb'ish,* tub-shaped, fat and round; (of musical instrument) sounding dull. पिंपाच्या आकाराचा, वाटोळा, लठ्ठ; भद्या,-फुटक्या,-आवाजाचा, ढबढब वाजणारें.

Tūbe, *n.* (ट्यूब्)—a long hollow cylinder; a structure serving for passage of fluid, or for holding it; main body of musical instrument; a tubular electric railway; (Anat.) a hollow tube-shaped organ. नलिका, नळी; तोटी, नळकांडें, पन्हळ, पन्हळी; रंग ठेवण्याची नळी; सुरवाद्याचा नळीसारखा मुख्य भाग; जमिनीखालून

नलिकाकार भागांतून जाणारी विजेची आगगाडी; नाडी, धमनी, शीर, (श्वास) नलिका. *v. t.* to furnish with or enclose in tube(s). नळी घालणें,-लावणें; नळींत घालणें,-ठेवणें. *T. colours,* नळींत ठेवलेले रंग. *T. well,* an iron pipe with sharp point and perforations at bottom for getting water from under-ground. नलिकाकूप,-विहीर, कूपनलिका. *Tub'al, tub'er, aa.* नलिकेसंबंधीं, नलिकांतर्गत.

Tū'ber, *n.* (ट्यू'बर्)—short thick swelling of an underground stem of some plants and putting forth buds, e. g. potato etc.: kinds of underground fungus; (Anat.) a swelling part. (जमिनींतील) गोळ्यासारखें खोड, ग्रंथिकोड (याच्या वरच्या बाजूला डोळे येतात, उ० बटाटा); एक जातीचें जमिनीखालीं होणारें अळंबें,-भूछत्र; सुजलेला भाग, गांठ.

Tū'bercle, *n.* (ट्यू'बर्कल्)—a small rounded projection (of bone); one of the small granular tumours formed in consumption: (Bot.) a small tuber. (हाडावरील) लहान गांठ, फोड, सूक्ष्म ग्रंथि; क्षयरोगग्रंथि; मुळाची गांठ, गांठाळ मूळ, पानावर आलेला फोड. *Tuber'cular, a.* क्षयी, क्षयाचा, क्षयरोगग्रंथि झालेला; (Bot.) ग्रंथिल, गांठाळ; सूक्ष्म ग्रंथि असलेला.-*'culous, a.* क्षयरोगाचा, क्षयग्रंथिविकृत; क्षयग्रंथिजन्य.

Tūberculō'sis, *n.* (ट्यूबर्क्यूलॉ'सिस)—consumption of the lungs, consumptive state. फुफ्फुसांचा क्षय, कफक्षयरोग, क्षयावस्था.

Tū'berōse,-ous, *aa.* (ट्यू'बरोझ्,-रस)—having tubers; of the nature of a tuber; knobby. गांठ येणारा,-असलेला; गांठीसारखा; ग्रंथिल, गांठाळ. *Tu'berose, n.* (ट्यू'ब्रोझ्) a garden plant with creamy-white fragrant flowers. निशिगंध, गुलछडी (फुलझाड व फूल). *Tuberos'ity, n.* गांठाळपणा; गोंडेरेपणा; (anat.) अर्बुद, पिंड.

Tū'bing, *n.* (ट्यू'बिंग्)—an indefinite length of tube or quantity of tubes. नळाची लांबी, नळ्या, नळया करण्याचें साधन.

Tū'būlar, *a.* (ट्यू'ब्यूलर्)—tube-shaped; having tubes. नळीच्या आकाराचा; नळीसारखा; नळ्यांचा, नळ्या असलेला. *T. boiler,* नळ्यावाला वाफजनक. *T. bridge,* rectangular tube through which railway etc. passes. मधून रेल्वे जाणारा चौकोनी बोगद्यासारखा नळ्यांचा पूल. *T. breathing,* नळींत फुंकल्यासारखा आवाज, अपस्तंभ-श्वासध्वनि.

Tū'būle, *n.* (ट्यू'ब्यूल्)—a small tube. लघुनलिका, लहान नळी.

Tŭck, *n.* (टक्)—a flat fold sewn in a garment; (sl.) eatables; (Naut.) part of vessel's hull. चुमड, चूण, सुरख, खोंचण, ओंचा, कांचा; (गोड) खाद्य पदार्थ; गलबताच्या सांगाड्याचा मागचा भाग. *v. t. & i.* to make *it.* in garment; roll or gather *up* (sleeve., skirt); draw together; dispose or tow compactly. चुणी पाडणें, सुरख घालणें; दुमडणें, खोंवणें, घर खोंचणें, (अस्तन्या) वर करणें; ओढून (अंगाशीं) घेणें, दुमडणें; गच्च,-खेटून,-टाकणें,-ठेवणें. *To t. in,* (sl.) खच्चून जेवणें. *Make a t. in sleeves,* चूण मारून हात आंखूड करणें. *T.-in,-out,* (sl.) मेजवानी. *T. shop,* (विद्यार्थ्यांचें) खाद्यपेयाचें दुकान. *Tuck'-er, n.* स्त्रिया आणि मुलें वापरतात असें जाळीदार किंवा तागी कापड; (sl.) खाद्य पदार्थ; *v. t.* to tire or weary. थकविणें, दमविणें.

Tūes'day, *n.* (ट्यूझ्‌-डे)—third day of the week. मंगळवार.

Tū'fa, Tuff, *nn.* (ट्यूफा, टफ्)—kinds of coarse volcanic rock. खडबडीत ज्वालामुखी खडक.

Tŭft, *n.* (टफ्ट्)—a cluster or knot. झुबका, गुच्छ, तुरा, गेंद गोंडा, शिखा, अवतंस. *v. t. & i.* to furnish with a tuft or tufts; grow in tufts; make depressions at regular intervals. तुरे लावणें; झुबके-गोंडे-येणें; टांके मारून (चटईला) उंचसखलपण आणणें. *T.-hunter,* थोरमोठ्या पदव्यावाल्यांचा गोंडा घोळणारा. *Tu'fty, a.* गोंडदार.

Tŭg, *v. t. & i.* (टग)—to pull hard, pull violently at: tow; (*fig.*) drag (subject etc *in*) forcibly. शक्य तेवढ्या जोरानें ओढणें; नेटानें ओढणें; दोरी लावून ओढणें; एखादा विषय बळेंच घुसडणें. *n.* a hard pull, pulling with force; small powerful steam boat for towing ships. शिकस्तीची ओढ, खेंचाखेंच, ओढाताण; गलबतें ओढण्याची लहान आगबोट.

Tŭg'-ŏf-war, *n.* (टग-ऑफ्-वॉर्)—trial of strength between two sides pulling opposite ways on a rope. दोरीची दोहोंबाजूला शिकस्तीची ओढाताण, रस्सीखेंच, रस्सीखेंचीचा खेळ.

Tūi'tion, *n.* (ट्यूइ'शन्)—tutorship, teaching, giving of lessons; instruction, fee for this. शिकवणी; उपदेश, शिक्षण,-शिकवणीचें वेतन.-*al, a.*

Tū'lip, *n.* (ट्यू'लिप्)—kinds of plants with bell-shaped flowers; bell-shaped outward swell of muzzle of gun. घण्टाकार फुलांचें फूलझाड; बंदुकीचा कानपा.

Tŭm'ble, *v. i. & t.* (टंम्बल्)—to have a fall: toss the body about, suffer downfall; toss to and fro; disarrange. पडणें, कोसळणें; गडबडत लोळणें; कोसळणें, ढासळणें; निष्काळजीपणानें टाकणें; नाडेभोरप्याचा खेळ करणें, कोलांट्या उड्या मारणें; ओढणें, अस्ताव्यस्त टाकणें. *n.* a bodily fall; untidy state. पडणें, पतन, कोलांटी उडी; अस्ताव्यस्त स्थिति, गबाळेपणा.

Tŭm'ble-down, *a.* (टंम्बलडाउन्)—dilapidated, in ruinous state. मोडकळीस आलेला, पडीतझडीत.

Tŭmb'ler, *n.* (टं'म्लर्)—one who tumbles; (*esp.*) an acrobat; kinds of pigeon with peculiar flight; a stemless drinking-glass; a toy-figure contrived to rock when touched; part of the mechanism of a lock etc. पडणारा; डोंबारी; एका जातीचें गिरेबाज, लोट्या,-कबूतर; पिण्याचें भांडें, टंबरेल; (हात लावला असतां) झोकांडे घेणारी,-डुलणारी,-बाहुली,

ठकायमावहरी; (कुलपांतील वगैरे) एक यांत्रिक भाग. *Tumb'lerful*, n. भांडेंभर. टंबरेलभर.

Tŭm'brel,-il, *n.* (टंब्रल्,-ब्रिल्)—a dung-cart; (*Mil.*) *a two-wheeled covered cart for carrying* ammunition, etc.; (Hist.) an instrument of punishment. शेणखताची गाडी; लष्करी सामान नेण्याची छपरी गाडी,-खटारा; शिक्षा करण्याचें साधन.

Tū'mĕfȳ, *v. t. & i.* (ट्यूमिफाय्)—to (cause to) swell, be inflated (*lit. & fig.*). सुजवणें, सुजणें; फुगणें. *Tumefa'cient*, *a.* सुजणारा, सुजलेला.-*fa'ction*, *n.* सूज, गांठ (येणें).

Tūmĕs'cence, *n.* (ट्यूमेसन्स)—swelling. सूज.-*cent*, *a.* सुजलेला, सुजणारा.

Tū'mid *a.* (ट्युमिड्)—(of parts of body etc.) swollen, swelling. (*fig.* of style) inflated, pompous. फुगलेला; ढोलाचा, भपक्याचा, टपट्टार, शब्दाडंबराची (लेखनपद्धति).-'*ity*,-*ness*, *nn.* सूज, फुगवटी; दप, आव, शब्दाडंबर. *Tu'midly*, *adv.* सुजून; पोकळ भपक्यानें.

Tū'mour, *n.* (ट्यूमर्)—a local permanent swelling, esp. from morbid growth. ग्रंथी, अपची, गांठ, घातूक, आवाळूं, अर्बुद. *Malignant t.*, tending to recur after removal and cause death. घातुक आवाळूं. *Benign t.*, निरुपद्रवी आवाळूं.

Tŭm'-tŭm, *n.* (टम्-टम्)—a W.-Ind. dish of boiled plantains beaten soft in a mortar. (*Anglo-Ind.*) *a dog-cart, a light vehicle.* (शिकरणीसारखें) केळ्यांचें पक्वान्न; कुत्रागाडी, हलकी गाडी.

Tū'mŭlt, *n.* (ट्युमल्ट्)—a riot, angry demonstration of a mob; uproar or din; a confused state of mind. धामधूम, दंगा, दंगल, गर्दी, हुल्लड; गडबड; गलबला; गोंधळ, क्षोभ, खळबळ, मानसिक अस्वस्थता. -'*uary*, *a.* undisciplined. अनिर्बंध, बेबंदशाहीचा, दंगेखोर.-'*uous*, *a.* vehement, uproarious. आवेशाचा, आरडाओरडीचा, तुंबळ, क्षुब्ध.-'*uously*, *adv.*,-*uousness*, *n.* दंगल, गडबड, गर्दी.

Tū'mūlous, *n.* (ट्यूम्यूलस्)—(*pl.*-*li*) a sepulchral mound. (थडग्यावरील) छत्रीचा चबुतरा. *Tu'mular*, -*y*, *aa.*

Tŭn, *n.* (टन्)—a large cask for wine; a brewer's fermenting vat. दारूचें मोठें पींप, दारू आंबवण्याचें लाकडी पात्र,-पींप. *v. t.* to store (liquor) in a tun. पिंपांत सांठवून ठेवणें. *Tun'dish*, a kind of funnel (in brewing). एक प्रकारचें गाळणें, नरसाळें.

Tu'ndra, *n.* (टुंड्रा)—a mossy and often marshy plain in N. Russia. (उत्तर रशियांतील) शेवाळी व दलदलीचा प्रदेश.

Tūne, *n.* (ट्यून्)—the succession of musical notes; a melody or air; correct intonation in singing or playing; agreement, concord; suitable mood (*for*). स्वर, स्वरमेळ, राग; सूर; ताल, तान; मेळ, मिलाफ, जम; वृत्ति, तार, लहर. *v. t. & i.* to adjust the notes of; (*fig.*) be in harmony *with*; (poet.) produce (music); express in music. सूर लावणें; मिलाफानें असणें, मिळतें घेणें; गाऊं लागणें, गाणें; गाऊन दाखविणें, गाऊन साजरा करणें. *Sings out of t.*, तो बदसूर गातो. *It is out of t.*, त्याचा सूर जमला नाहीं, तें बदसूर आहे. *Sing in t.*, स्वरबद्ध-सुरांत-गाणें. *Change one's t.*, *sing another t.*, assume a different style of language or manner. भाषणाचा रंग,-भर्दिचा रंग-सूर,-बदलणें, वृत्ति पालटणें, दुसरीच तऱ्हा पत्करणें. *To the t. of Rs. 100*, (*serious or exorbitant amount*). शंभर रुपयांच्या (फार मोठ्या, भरमसाट) रकमेला. *To t. in*, set wireless instrument to right wave-length. बिनतारी यंत्र योग्य वायु-लहरीस्थान लावणें. *To t. up*, (of orchestra), सर्व वाद्यें एक सुरांत लावणें, गाऊं-वाजवूं,-लागणें; (of child) रडण्याला सुरवात करणें, रडूं लागणें, भोंगाड पसरणें. *Tun'er*, *n.* (पेटी वगैरे) सुरांत लावणारा. *Tun'able*, *a.* सुरांत लावण्याजोगा, मेळ घालण्याजोगा;-*ness*, *n. Tun'ably*, *adv.*

Tūne'ful, *a.* (ट्यून्-फुल्)—melodious, musical. सुरेल. *Tune'fully*, *adv.* सुरात, सुस्वरानें.-*fulness*, *n.*

Tūne'less, *a.* (ट्यून्लस्)—not in time or tune; silent, not played. बदसूर, बेसूर, सुरांत नसलेला; न वाजवलेला, बंद.

Tŭng'sten, *n.* (टंग्स्टन्)—a steel-grey heavy metallic element. (रसायनशास्त्रांतील) 'तुंगस्त' नांवाचें धातुमूलद्रव्य. [Sw. *tung*, heavy; *sten*, stone]

Tū'nic, *n.* (ट्यूनिक्)—kinds of sleeved garment *extending below waist, a short military coat;* (Zool.) leathery envelope; (Anat.) membrane enclosing an organ; (Bot.) any of the layers of a bulb. अंगावरचा कमरेखालीं येणारी कुडती, शिपायांचा सैल अंगरखा, ब्लाउज; शिपायाचा आखूड डगला; त्वचावेष्टन; शरीरावयवावरील पातळ त्वचा; (कंदाचें) पदर वेष्टन, मालीचा थर. *Tu'nicate*, *a.* त्वचावेष्टित (कंद-विशेष).

Tū'nicle, *n.* (ट्यूनिकल्)—(*Bot., Zool.*) fine or delicate tunic. अगदीं पातळ त्वचा.

Tūn'ing,-fork, *n.* (ट्युनिंग्-फोर्क्)—(*Phys.*) a two -pronged implement giving a particular note when struck. स्वरशूल.

Tŭnn'el, *n.* (टनेल्)—a tubular opening; artificial subterranean passage through hill or under river, etc.; level open at one end; main flue of chimney. बीळ, बोगदा; खाणींतील रस्ता; सुरुंग भुयाराची वाट. *v. i. & t.* to make a tunnel; make one's way by tunnelling. बोगदा पाडणें; बीळ,-बोगदा,-पाडून वाट पाडणें,-करणें. *T. borer*, बोगदा पाडण्याचें यंत्र. *T. net*, a fishing-net wide at mouth and narrow at other end. तोंडाजवळ रुंद व टोंकाकडे निमुळतें असें मासेमारी जाळें.

Tŭnn'ȳ, *n.* (टनि)—a large sea-fish used as food. एक मोठा खारा मासा.

Tŭp, *n.* (टप्)—a male sheep, ram; striking face of steam-hammer. मेंढा, टपूर; (वाफेनें चालणाऱ्या) हातोड्याचें तोंड. *v. t.* to copulate with (ewe). (मेंढीला) लागणें.

Tŭrb'an, *n.* (टर्बन्)—man's oriental head-dress of coiled linen or silk; kind of woman's hat; spire of shell. पागोटें, पगडी, मुंडासें; एक प्रकारची स्त्रियांची टोपी; शिंपल्याचें निमुळतें टोंक. *T.-binder,* पगडबंद. *T.-top,* एक प्रकारचें भूछत्र. *Tur'banced, a.* [f. Turk. *tulbant,* f. Pers. *dulband*]

Tŭrb'id, *a.* (टर्‌-बिड्)—(of liquid or colour) muddy, thick; not clear or lucid; (*fig.*) confused. गढूळ, दाट; अशुद्ध; गोंधळलेला, गोंधळाचा. *-'ity, n.-ness, n.* गढूळपणा; कलुषता.*-ly, adv.* गढूळपणानें, गढूळ होऊन.

Tŭr'binate, *a.* (टर्बिनिट्)—shaped like a top or inverted cone; (Anat.) of scroll-like formation; whirling like a top. भोंवऱ्याच्या आकारासारखा, व्यस्तशंकाकार; शुक्तिकाकार (अस्थि); भोंवऱ्यासारखा गरगर फिरणारा. *Tur'binal, a., Turbina'tion, n.*

Tŭrb'ine, *n.* (टर्बिन्,-'बाइन्)—kinds of rotary motor driven by water or air or steam. (पाण) चक्की. *Air t.,* पवनचक्की. *Steam t.,* वाफ-चक्की. *T. boat,* चक्कीनें चालणारी नाव, बोट.

Tŭr'bit, *n.* (टर्बिट्)—a kind of domestic pigeon. एक जातीचें कबूतर, पारवा.

Tŭr'bot, *n.* (टर्बट्)—a large, flat fish esteemed as food. मोठा सपाट मासा.

Turb'ūlent, *a.* (टर्‌-ब्युलन्ट्)—given to making disturbances; riotous, disorderly, refractory, insubordinate. भंडखोर, दंगेखोर; शिरजोर, उर्मट, उद्दाम. *Turb'ulence, n.* दंगेली, दांडगाई, उर्मटपणा. *-lently, adv.*

Tŭr'dine, *a.* (टर्डिन्)—thrush-like. सारिकेसारखा. [L. *turdus,* thrush]

Tūreen', *n.* (टयूअरीन्)—a deep covered dish for soup. खोलगट थाळी,-बशी.

Tŭrf, *n.* (टर्फ्)—short grass with the surface earth bound together by its roots; sod; (*Ir.*) peat. गवताळ जमिनीचा पृष्ठभाग, गवताची जमीन; कापलेलें गवत; कापलेलें जळाऊ गवत. *v. t.* to cover (ground) with turf. (जमीन) गवताळ करणें, गवताची करणें. *The turf,* horse-racing, race-course. घोड्यांच्या शर्यतीचा धंदा, घोड्यांच्या शर्यतीचें पटांगण. *on the t.,* शर्यतींत गुंतलेला. *T.'man,* घोड्यांच्या शर्यतीचा नाद असलेला मनुष्य. *T.-bound,* तृणाच्छादित, गवताळ. *Tur'fy, a.* गवताळ, गवतासारखा.

Tŭr'gid, *a.* (टर्जिड्)—swelling, swollen, bloated; (of language) bombastic, rhetorical. सुजलेला, फुगलेला; डवदार, अलंकारिक, अवडंबराचा, भपकेबाज. *Turges'cence, tur'gidity, nn.* तांबडा होऊन फुगणें, सूज. *Turges'cent, a., Tur'gidly, adv.*

Tūr'ion, *n.* (ट्युअरिअन्)—(Bot.) young scaly shoot rising from the ground. खवलेदार लहान कोंब. *-iferous, a.*

Tŭrk, *n.* (टर्क्)—a member of the Ottoman race; a Mohammedan; Turkish horse; an unmanageable person or child. तुर्क जातीचा मनुष्य; मुसलमान; तुर्की घोडा; आडदांड मनुष्य,-मूल. *T.'s cap,* सुर्ईकमळ (वनस्पति). *T.'s-head,* पगडीसारखी शोभेची गांठ; वंटेिळा झाडू; एक प्रकारचा खोलगट तवा. *Turc'ophil, a. & n.* friendly to, a friend of, the Turks. तुर्की लोकांच्या बाजूचा (मित्र). *Turc'ophobe, a. & n.* तुर्की लोकांना विरोध करणारा (शत्रु, प्रतिपक्षी).

Tŭrk'ey, *n.* (टर्कि)—(pl.-eys.) a large domesticated bird bred as food; (T-)country of the Turks. कोंबड्याच्या वर्गांतील एक मोठा पक्षी, टर्की कोंबडा, विलायती कोंबडा; तुर्कस्थान देश. *T. buzzard, vulture,* an American vulture. अमेरिकेंतील गिधाड. *T. carpet,* संपूर्ण लोकरीचा तुर्की गालिचा. *T. cock,* male Turkey noted for its trut. डौलदार चालीचा तुर्की कोंबडा (नर); (fig.) a pompous person. घमेंडखोर,-अकडबाज,-मनुष्य; *Red as a t. cock,* (रागानें) लालबुंद झालेला (मनुष्य). *T. corn,* maize. मका. *T. red,* एक प्रकारचा टिकाऊ तांबडा रंग. *T. stone,* सुरी वगैरेंना धार लावण्याचा दगड.

Tŭrk'ish, *a. & n.* (टर्किश्)—(the language) of Turkey or the Turks. तुर्कस्थानची, तुर्क लोकांची, तुर्की (भाषा). *T. bath,* hot-air bath followed by massage. (बाष्पस्नान व मालीश मिळून होणारें) तुर्की स्नान. *T. delight,* शर्करायुक्त मेवामिठाई.

Tŭrm'eric, *n.* (टर्मरिक्)—powdered root used as dye-stuff, stimulant and condiment. हळद, हरिद्रा. *T.-paper,* (used as test for alkalis). हळदीचा कागद.

Tŭrm'ōil, *n.* (टर्‌-मॉइल्)—din, commotion. गडबड, दंगल, धांदल, अस्वस्थता.

Tŭrn, *v.t. & i.* (टर्न्)—to move round; move on or as on axis; face or make face in another direction; place with another side up; diverge; have recourse *to,* subject to or undergo a change; shape in lathe; turn sour; (*fig.*) revolve mentally. वळणें; फिरणें, फिरविणें, फिरता करणें; बाजूला जाणें, दूर जाणें; तोंड फिरविणें; आश्रय घेणें; पालटणें, बदल होणें; आकार किंवा रूप देणें, कातणें, कातून तयार करणें; आंबटावणें, आंबट होणें; डोक्यांत घोळवणें, मनन करणें. *n.* act of turning, bend; a rotary motion; changed direction; road, &c. diverging from another; act of kindness or malice; character, tendency; short walk, ride, drive etc.; opportunity, privilege, etc. coming successively to each of several persons; (pl.) menses; each round in a coil of rope; (mus.) kinds of grace consisting of principal tone with those above and below it; (Print.) inverted type as temporary substitute for missing letter etc.; (colloq.) nervous shock. फिरणें, वळणें; वळण; बांकण; फेरा, घेर, फेर, पालट, स्थित्यंतर; फेरा, चक्कर, प्रासंगिक वागणूक; मनाचा कल, झोंक, धोरण, वळण; फेरी, फेरफटका, रपेट; पाळी, आळीपाळी, खेप; (पाळीनें येणारा) विटाळ, पाळी; आटा, विळखा, वळसा; सुरावटींतील फेर, मोड वळण; (सुणेकरितां घातलेला) उलटा टाइप,-

टंक; धसका, धपका. *Eevcrything turns on his answer*, सर्व कांहीं त्याच्या उत्तरावर अवलंबून आहे. *Umbrella turns inside out*, छत्री साफ उलटी झाली. *T. one's coat*, दुसऱ्या बाजूला जाऊन मिळणें. *T. an honest penny*, प्रामाणिकपणें व्यापार करून थोडासा नफा मिळविणें. *T. tail*, शेंपूट घालणें, पळून जाणें. *T. the tables on*, वर बाजू उलटणें, पारडें फिरविणें. *Can t. his hand to anything*, learn, do, anything. कोणतेंहि काम शिकूं शकेल. *T. the scale*, पारडें खालीं घालवणें; वादग्रस्त प्रश्न निकालांत काढणें. *T. person's flank*, outwit him, defeat him in argument. एखाद्यावर मात करणें, वादविवादांत माघार घ्यायला लावणें. *Will t. a bullet*, बंदुकीच्या गोळीला मागें वळवील,-प्रतिकार करील. *T. the passage into French*, त्या उताऱ्याचें फ्रेंच भाषेंत भाषांतर करा. *Stomach turns at the sight*, तें दृश्य पाहून (पोटांत) कळवळून येतें. *Head turns* (with. giddiness), घेरी येते चक्कर करते,-येते. (With advv. & prepp.), *T. about*, दुसरीकडे तोंड फिरविणें, दुसऱ्या बाजूला वळणें. *T. against*, become hostile to. (च्या) विरुद्ध उठणें,-जाणें. *T. down*, to fold down; place (playing card) face downwards; reduce flame of (lamp etc.); reject (proposal etc.). दुमटणें; (पत्त्याचें पान) उपडें-उलटें-ठेवणें; ज्योत कमी करणें; अमान्य करणें, झिडकारणें. *T. in*, fold inwards; incline inwards; go into a house etc.; go to bed. आंत दुमटणें; आंत वळणें; (जातां जातां सहज) घरांत जाणें; झोपीं जाणें. *T. off*, चावीनें (पाणी, गॅस वगैरे) बंद करणें; (काम) करणें, उरकणें; नोकरीवरून काढून टाकणें; (sl.) फांशीं देणें, लग्न लावून देणें. *T. on* (*adv.*), पाणी चालू करणें, नळाची चावी सोडणें; (colloq.) *t. on the water-works*, begin to cry. रडूं लागणें. *T. on* (prep.), depend upon; become hostile to. वर अवलंबून असणें; च्या विरुद्ध उठणें,-असणें,-जाणें. *T. out*, घालवून देणें, हाकून देणें; बाहेर काढणें; (माल) तयार करणें, काढणें; खोलून-उघडून-दाखविणें; जमणें, निपणें, तयार होणें; ठरणें, उतरणें, सिद्ध होणें. *T. over*, उलथून पाडणें, उलटणें; transfer the conduct of (thing *to* person), दुसऱ्यावर सोंपवणें, दुसऱ्याच्या नांवें करणें. do business to the amount of, (अमुक रकमेपर्यंत) धंदा,-उलाढाल,-व्यवहार करणें. *T. round*, तोंड फिरवणें, नवीन धोरण स्वीकारणें. *T. to* (prep.), (कामास) लागणें; t. *to* (*adv.*), begin work. कामाला प्रारंभ करणें. *T. up*, उकरून वर काढणें; येणें, हजर राहणें घडणें, देणें; (colloq.) वांति करणें, भडभडून आणणें; (Cards) हुकमाचें पान दाखविणें. *T. upon*, t. on (पहा). *T. cock*, (मुख्य नळापासून पाणी सोडणारा, खजिन्यावरचा नळवाला. *T. key*, (तुरुंगांतील) चावीवाला (अधिकारी). *T.-over*, धंद्यांतील उलाढालीची रक्कम; दुसऱ्या पानावर गेलेला (वर्तमानपत्रांतील) लेख; (गाडी) उलटणें. *T.-pike*, जकातीचा नाक्यावरील दरवाजा. -अडवण. *T. screw*, screw-driver. ढिसपीस, पेंचकस. *T.-sole*, सूर्यकमळ, सूर्याचें फूल. *T. stile*, चाकाचा फिरता दरवाजा, चिंड. *T.-table*, circular revolving platform for reversing locomotives etc. आगगाडीच्या इंजिनांची दिशा बदलण्यासाठीं वाटोळें फिरतें मेज. *T.-up*, (colloq.) गडबड, धांदल, गोंधळ.

Turn'-bench, *n.* (टर्न्‌बेंच्)—a watchmaker's portable lathe. घड्याळवाल्याचा लहानसा चरक.

Tŭrn'-cap, *n.* (टर्न्‌कॅप्)—revolving chimney-top. धुराड्यावरील फिरती टोपी.

Tŭrn'coat, *n.* (टर्न्‌कोट)—a person who changes sides. आपला पक्ष सोडून देणारा, पगडी फिरविणारा, टोपी बदलणारा.

Tŭrn'er, *n.* (टर्नर्)—(esp.) a lathe-worker. कातकाम करणारा, कातारी. *Turn'ery*, *n.* लाकडी कातीव वस्तु.

Tŭrn'ing, *n.* (टर्निंग्)—road diverging from larger one. वळण (रस्त्याचें).

Tŭrn'ing-point, *n.* (टर्निंग् पॉइंट्)—the point on which a thing turns; that which decides a matter. विवर्तनस्थान; निर्णायक प्रसंग, क्रांतीची वेळ.

Tŭrn'ip, *n.* (टर्निप्)—a plant with root used as vegetable and folded. सलगम गांवाचें लहान झाड, -फळ. *T.-top*, टरनिप-सालगम-ची पालेभाजी.-*y*, *a.*

Tŭrn'-out, *n.* (टर्न्-अउट्)—*turning-out*, equipage, quantity of goods manufactured in given time. कामाकरतां बाहेर निघणें; मजुरांचा संप, लोकसमुदाय; सरंजाम, परिवार; (मालाची) निपज.

Tŭrn tŭrtle, *v. i.* (टर्न् टर्टल्)—to capsize. उपडी होणें, उलटणें.

Tŭrp'entine, *n.* (टर्पेन्टाइन्)—kinds of resin got from terebinth and other trees, (also *turps*) oil or spirit of terpentine. देवदारादि कांहीं झाडांचा चीक, टर्पेन्टाइन वृक्षाचा चीक, देवदाराचें तेल, टरपेनतेल. *v. t.* to apply *t.* to. (ला) टरपेनतेल लावणें. *Turpenti'nic*, *a.*

Tŭrp'eth, *n.* (टर्पिथ्)—cathartic root of an E. Ind. plant. एक रेचक मुळी.

Tŭrp'itūde, *n.* (टर्पि-ट्यूड्)—baseness, depravity. नीचपणा, दुराचार, क्षुद्रपणा.

Turq'uoise, *n.* (टर्कॉइझ्)—an opaque azure gem. फिरोसा, पेरोज, वैडूर्य (रत्न). *T. green*, फिकट हिरवट-निळा रंग.

Tŭ'rrĕt, *n.* (टरिट्)—a small tower forming part of a larger building; (Mil.) low, flat, usually revolving tower for gun or gunners in a ship or fort; (Hist.) square many-storied building on wheels used in attacking a fortified place. मनोरा, शिरोगृह, प्रासादशृंग; फिरता मनोरा; चाकावरील चौकोनी बुरूज. *T. ship*, तोफांच्या मनोऱ्यांचें जहाज. *Tu'rreted*, *a.* मनोरे असलेला; मनोऱ्याच्या आकाराचा.

Tŭr'tle, *n* (टर्टल्)—(also *t.-dove*) kind of dove noted for cooing and amativeness; marine reptile encased in horny shell; turtle-soup. कबूतराच्या जातीचा एक पक्षी; कांसव, समुद्रकूर्म, समुद्रकच्छ; समुद्रकूर्माच्या मांसाचें पक्वान्न. *v. i.* to hunt for *tt.* कांसवें पकडणें. *To turn*

t., (naut. sl.) capsize. उलटणें, उपडें होणें, उलेडणें. *Turtler*, *n.* कांसवांची शिकार करणारा. -*ling*, *n.* [f. tortoise]

Tŭs'can, *a.* & *n.* (टस्कन्)—pertaining to Tuscany in Italy; designating an order of architecture. टस्कनी प्रांताचा (रहिवासी); (साच्या) शिल्पशास्त्राच्या एका प्रकारचा.

Tŭsh, *interj.* (टश्)—(arch.) pshaw. छी छी!, छत्! *n.* a long pointed tooth. लांब अणीदार दांत. *Tush'ery*, *n.* 'Tush!' वगैरे अप्रसिद्ध उद्गारवाचकांचा वाङ्मयांत केलेला उपयोग.

Tŭsk, *n.* (टस्क्)—a long pointed tooth esp. one projecting from mouth as in elephant or boar; tusk-like part in harrow, lock, etc. सुळा, सुळका; सुळ्यासारखा भाग. *v. t.* to thrust, tear up, with tusks. सुळ्यांनीं भोसकणें,-फाडणें,-चिरणें. *Tusked*, *a.* *Tusky*, *a.* सुळ्यांचा, दंती. *Tusk'er*, *n.* an elephant with developed tusks. वाढलेल्या सुळ्यांचा हत्ती.

Tuss'er,-ur,-ōre. *n*, (टस्सर, टसर, टसोअर्)—kinds of Indian silkworm; their silk; fabri made from it. एक रेशमी किडा; या किड्यापासून केलेलें रेशीम; तसर नांवाचें रेशमी कापड. Also. *t.-slik*, [Sk. *tasara*, shutte]

Tŭs'sive, *a.* (टसिव्ह्)—(med.) of a cough. खोकल्याचा. [L. *tussis*, cough]

Tŭs'sle, *n.*, *v. i.* (टसल)—to struggle, wrestle, (*with* a person, *for* a thing); conflict, a scuffle. झोंपाझोंपी, झगडा, झटापट करणें.

Tŭss'ock, *n.* (टसक्)—a clump of grass etc.; tuft of hair etc. गवताचा समुदाय; केसांचा झुबका. -*y*, *a.* गवताळ; केसाळ.

Tŭt, *int.*, *n.* & *v. i.* (टट्)—showing impatience. छट्, छीछी, हुडूत् (करणें). *n.* (mining) job. काम. *T. work*, piece-work. तोडून दिलेलें काम.

Tū'télage, *n.* (ट्यूटिलज्)—guardianship; period of being under *t.* राखणदारी; पालकत्व; अज्ञानदशा.

Tū'telarÿ, *a.* (ट्यूटिलरि)—giving protection. संरक्षक, राखण करणारा, पालकाचा.

Tū'tenăg, *n.* (ट्यूटिनॅग)—zinc imported from China and E. Indies; white alloy like German silver. चिनी जस्त; सफेत मिश्र धातु. [f. Marathi *tuttinag*]

Tū'tor, *n.* (ट्यूटर्)—a private teacher; College official, a fellow; guardian of a minor. खाजगी शिक्षक; (महाविद्यालयांतील) खालच्या वर्गांत शिकविणारा शिक्षक; (Law) अज्ञानपालक. *v. t.* & *i.* to make one's living as a *t.*, instruct; exercise restraint over. शिक्षकाचा धंदा करणें; शिकविणें, पढविणें, पढवून तयार करणें; (वर) ताबा ठेवणें.-*ess*, *n.* शिक्षकीण; पालकीण. -*ship*, *n.* शिक्षकाची जागा,-चें काम; पालकत्व, शिक्षक. *v. t.* & *i.* to exercise restraint over, discipline, instruct. पढवणें, ताब्यांत ठेवणें.

Tūtor'ial, *a.* (ट्यूटॉरिअल्)—*belonging to*, exercised by, a tutor. शिक्षकाचा, शिक्षणाच्या, शिक्षणविषयक.-'*ially*, *adv.*

Tu-whit', *tu-whoo'*, *n.* & *v. i.* (टुव्हिट, टुव्हू)—(to make) cry of owl. घुबडाचें ओरडणें. [imit.]

Twa'ddell, *n.* (ट्वॉडल्)—hydrometer for liquids heavier than water. (पाण्यापेक्षां जड द्रवांकरितां) जल-गुरुत्वमापक. [inventor's name]

Twa'ddle, *n.* & *v. i.* (ट्वॉडल्)—talk not worth hearing. वटवट, बडबड (करणें).-*r*, *n.*,-*ly*, *a.*

Twain, *n.* (ट्वेन)—two persons or things. दोन, जोडी.

Twăng, *n.* (ट्वँग)—sound made by a bow: a nasal sound. टणत्कार; गेंगणें, नाकांत बोलणें. *v. i.* & *t.* to emit or make twang. टणत्कार करणें,-करविणें; नाकांत बोलणें,-उच्चारणें, गेंगणें.

'twas, (ट्वॉझ्)—contraction of It was.

Tweak, *v. t.* (ट्वीक्)—to grip with finger or beak and twist or jerk. चिमटीनें ओढणें, हिसकणें, चिमटून ओढणें. *n.* a sharp pull, pinch; (*sl.*) dodge, device. जोराचा हिसका, चिमटा; डाव, युक्ति. *Tweak'er*, *n.* (*sl.*) boy's catapult. पेचकी, (दगड मारण्याची) गोफण.

Tweed, *n.* (ट्वीड्)—rough-surfaced cloth. खडबडीत कापड.

Tweedle, *n.* (ट्वीडल्)—sound as of fiddle. फिडल्-सारंगीसारखा 'ढिंग् ढिंग्' आवाज. *T. dum'* & *T. dee'*, केवळ नांवाचाच फरक असलेल्या (सारख्या) वस्तु.

'tween, *adv.* & *prep.* (ट्वीन्)—between. मधील, मध्यें.

Tween'ÿ, *n.* (ट्वीनि)—(*colloq.*) *between-maid*; small cigar. दोन नोकरांची मदतनीस, अधलण मधलण मोलकरीण; स्वस्त विडी.

Twee'ers, *n. pl.* (ट्वीझर्झ्)—a minute pincers for pulling out hairs or picking up small objects. लहान चिमटा.

Twĕlfth, *a.* & *n.* (ट्वेल्फ्थ्)—next in order of eleventh. बारावा, द्वादश; बारावा भाग.-*ly*, *adv.*

Twĕlve, *a.* & *n.* (ट्वेल्व्ह्)—one more than eleven, 12, XII. बारा.-*fold*, *a.* & *adv.* बारांदा, बारापट.-*month*, *n.* वर्ष, बारा महिने.-*mo*, 12 mo. द्वादशपत्री (पुस्तक).

Twĕn'tieth, *a* & *n.* (ट्वेन्टिइथ्)—विसावा.

Twĕn'tÿ, *a.* (ट्वेन्टि)-twice ten, 20, xx. वीस, विंशति. *T. times*, several times. पुष्कळ वेळां, अनेक वेळां. *T.-fold*, *a.* & *adv.* वीसपट; वीसदां. *T.-one*,-*two*, or *one* & *t.*, एकवीस, बावीस इ॰ *T.-four-mo*, or 24 *mo*, चव्वीसपत्री.

'twere, (ट्वअर्)—contr. of It were.

Twice, *adv.* (ट्वाइस्)—two times, on two occasions; doubly. दुणें, दोनदां; दुप्पट वेळां, द्विगुणित. *T. 3 is 6*, तीन दुणें सहा. *T. as strong*, दुप्पट बळवान्,-बळकट. *Did it in t.*, (colloq.) in two attempts or instalments. दोनदां प्रयत्न करून, दोन हप्त्यांनीं.

Twid'dle, *v. i.* & *n.* (ट्वि'डल्)—to twist idly about, trifle *with* (an object). आळे पिळे घालणें; उगाच चाळे करणें; आळापिळा, गिरकी.

Twig, *n.* (ट्विग्)—minor shoot of a tree or shrub; (Anat.) small branch of artery; (Electric) small conductor; a divining rod. डहाळी, चारकी फांदी; धमनीची लघु शाखा; लघु वीज-प्रसारक; पानाड्याची यष्टि. *To hop the t.,* (colloq.) die. मरण पावणें. *Twiggy, a.*

Twig, *v. t.* & *i.* (ट्विग)—(colloq.) to observe, notice, catch the meaning of. पाहणें; समजणें.

Twi'light, *n.* (ट्वा'इ्-लाइट)—the half light following sunset and preceding sunrise; faint light; (*fig.*) state of imperfect knowledge. संधिप्रकाश, संध्या; अंधूक प्रकाश; अर्धवट अवस्था,-ज्ञान इ०. *v. t.* to illuminate faintly. अंधुक प्रकाश पाडणें. *T. of the gods,* (Norse myth.) देवदानवांचें परस्परसंहारक युद्ध. *T. sleep,* name of a modern method of making child-birth painless. आधुनिक वेदनारहित प्रसूतितंत्र.

Twill, *n.* (ट्विल्)—a fabric with small raised ribs. एक जातीचें (उठावदार सळ्यांचें) सळीदार कापड. *v. t.* सळीदार कापड विणणें.

'twill, (ट्विल्)—contr. of It will.

Twin, *n.* (ट्विन्)—(*pl.*) two persons born at a birth, a pair, couple; (*sing.*) one of twins; exact counterpart of person or thing. एकाच वेळीं जन्मलेलीं जुळीं मुलें, जोडी; जुळें मूल, जुळें; हुबेहुब प्रतिमा,-नक्कल. *a.* being one of two children born at a birth; (Bot.) growing in pairs consisting of two closely connected and similar parts. जुळा, जावळा; यमल; दोन सारख्या जुळया भागांचा. *v. t.* & *i.* to join immediately together, pair. एकत्र जोडणें, सांधणें, जुळणें. *The Twins,* मिथुन राशि.

Twine, *n.* (ट्वाइन्)—cord twisted to the thickness used for tying small parcels; a coil, twist; interlacing. सुतळी, सडा; वेढोळें, वेढा; पिळा, पीळ. *v. t.* & *i.* to coil or wind round or about something; make (string etc.) by twisting strands; interweave; coil itself. गुंडाळणें, वेंटाळणें; (दोरी इ०) वळणें; विणणें; वेटाळें करणें, -घालणें.-*er, n.* दोरी विणणारा,-वळणारा.-*ningly, adv., Snaky tt.,* सर्पाकृति वेटाळीं.

Twinge, *n.* (ट्विंज)—a transitory sharp local pain, a pinch, a tweak. लचक, चरका, हिसका; (मनाची) टोंचणी, चुरचूर, बोंचणी.

Twin'kle, *v. i.* (ट्विं'क्ल्)—to shine with rapidly pulsating or dancing light; sparkle; (of eyelids and eyes) close and open. लुकलुकणें; चमकणें; (डोळे) मिचकावणें, लवणें, स्फुरणें. *n.* twinkling; slight flash or light, gleam or sparkle. डोळ्यांची उघडझांप, लवणें, स्फुरणें; चमक, लिकलिक. *Twin'kling, n. In a twinkling, in the t., of an eye,* निमिषार्धात, क्षणार्धात.

Twirl, *v. t.* (ट्वर्ल्)—to spin or swing or twist quickly and lightly round. गरगरां फिरवणें, गिरकी देणें, आळेपिळे देणें,-घेणें. *n.* rapid circular movement; pen-flourish. गिरकी, गिरकांडी, चिरटी; फटकारा, फांटा, वळसा.

Twist, *v. t.* & *i.* (ट्विस्ट)—to wind (strands) about each other; distort; wrench out of shape; (of river, ball) take curved course, have a winding course; twine (*into* garland), make (garland) thus; make one's way (*through, along*) in a winding manner. (दोरी) वळणें; गुंडाळणें, वेटणें; विपर्यास करणें; वांकडा करणें, पिळवटणें; वांकडा मार्ग स्वीकारणें, वांकडें तिकडें जाणें; वळणें, (फुलें) वळून माळ करणें; वळणावळणानें मार्ग काढणें. *n.* twisting; twisted state, thread or rope made by winding two or more strands; a roll of bread, tobacco, etc.; a moral obliquity or mental peculiarity; kinds of mixed drink; (sl.) appetite. पिळणें, वळणें, मुरडणें; पीळ, मुरड, पिळा, पेंच; सडा, वेंठ, वळींव दोरी, वेंटाळी; सुरड, वळण, पीळ; मिश्र पेय; चव, गोडी, भूक, रुचि. *Wants to twist my words into an admission of error,* (*fig.*) माझ्या बोलण्याचा ओढून ताणून अर्थ लावून मी चुकीची कबुली दिली असें त्याला दाखवायला पाहिजे. *T. off,* break off by twisting. पिळवटून तोडणें,-तुकडा पाडणें. *T. up,* (कागदाची) गुंडाळी,-सुरनळी,-करणें. *T. of the wrist,* (*fig.*) dexterity. कसब, कौशल्य, चलाखी. *Twister, n.* वांकडातिकडा येऊन गरगर फिरणारा चेंडू; तुळई.

Twit, *v. t.* (ट्विट्)—to reproach, taunt (person *with* fault etc.). निंदा करणें, टोमणा मारणें-देणें, नांवें ठेवणें, *Twittingly, adv.*

Twitch, *v. t.* & *i.* (ट्विच्)—to give a momentary sharp pull at; quiver or jerk spontaneously, *at* (to call attention); (of features, limbs etc.) move or contract spasmodically. हिसडून घेणें; (लक्ष वेधण्यासाठीं) हिसकणें, हिसका देणें; (वाताच्या झटक्यानें) एकदम आंखडणें. *n.* a sharp light pull; slight muscular strain. हिसका; लचक, हिसडा, आंचका.

Twitt'er, *v. i.* (ट्वि'टर्)—(of birds) to utter a succession of tremulous sounds; express thus. किलबिलणें, चिंवचिंव करणें; (पक्ष्यांच्या) चिंवचिंवासारखें उच्चारणें,-बोलणें. *n.* such sounds; (also *twittera'tion*) state of tremor. चिंवचिंव, किलबिल, किलबिलाट; अस्वस्थता.

'twixt, *prep.* (ट्विक्स्ट)—abbr. of Betwixt. (दोहों) मध्यें.

Two, *a.* & *n.* (टू)—one more than one, 2, II, दोन, बे, द्वि, दोघे-घी-वें; दोन, दोहोंचा आंकडा, जोडी, दुक्कल. *One or t.,* a few. थोडके, एकदोन. *Cut, divide, in t.,* दोन भाग करणें. *Put t. & t. together,* make inference from data. गृहीत गोष्टीवरून अनुमान काढणें, पुढील पुराव्यावरून अनुमान करणें. *In t.*

Victōr'ious, *n.* (व्हिक्टो'रिअस)—vanquishing, conquering, triumphant. विजयी, विजय संपादन करणारा.-*ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Vic'torў, *n.* (व्हि'क्टरि)—the winning of a battle or contest, conquest; (*V*–) (the statue of) goddess of victory. विजय, विजयश्री, फत्ते, जय; विजयदेवता,-तेचा पुतळा.

Vi'ctual, *n.* (व्हि'टल्)—(usu. *plu.*) food and drink; provisions. अन्नपाणी; खाण्यापिण्याचा पुरवठा. *v. t.* खाद्यपेयाचा पुरवठा करणें,-मिळविणें, अन्नपाणी घेणें.-*aller*, *n*, (व्हि'टलर्) खाद्यपेय पदार्थांचा विक्रेता, खानावळ-हॉटेल-वाला; इतर जहाजांना खाद्यपेय देऊन पुरविणारें जहाज.

Vi'de, *v. imperat.* (व्हा'यडि)—see. पहा. *V. supra*, (पुस्तकांतील पानावर) वर पहा. *V. infra*, खालीं -पुढें-पहा.

Vidē'licĕt, *adv.* (व्हायडी'लिसेट्)—(abbr. *viz.* नेंमलि) namely, in other words. म्हणजे.

Vie, *v. i.* (व्हाय्)—to enter into rivalry *with* (another *in* quality). स्पर्धा करणें, बरोबरी करणें. सर लावणें. *Vying*, *pr. p.*

View, *n.* (व्ह्यू)—inspection by eye; survey, spectacle, scene, prospect; range of vision; intention, design; opinion. अवलोकन; तपासणी, पाहणें, दृश्य, देखावा; दृष्टीचा टप्पा; दृष्टिपथ; हेतु, उद्देश; मत, समज. *v. t.* to examine, survey with eyes or mind; hold specified view of. अवलोकन करणें, विचार करणें; मत बनविणें. *Side*, *v.*, बाजूचा देखावा. *Front*, *v.*, दर्शनी देखावा. *On v.*, पाहण्याकरितां (मांडलेला,-ठेवलेला). *With a v. to*, *with the v. of*, (vulg.) *with a v. of*, for the purpose of. च्या हेतूनें; च्या आशेनें, ची आशा धरून. *To the v.*, openly, in public. उघड उघड, उघड रीतीनें. *To have in v.*, उद्देश मनांत धरणें, लक्षांत-ध्यानांत-घेणें. *V.-able*, *a.* *V.-less*. *a.* invisible. अदृश्य. *View'y*, *a.* (colloq.) विलक्षण मतांचा, चोखंदळ.

Vi'gil, *n.* (व्हि'जिल)—eve of a festival watching, keeping awake. उत्सवाचा आदला दिवस; जागरण, पहारा; (*pl.*) सायंप्रार्थना.

Vig'ilance, *n.* (व्हि'जिलन्स)—caution, watchfulness; insomnia. सावधपणा, हुशारी, जागरूकता, जागरण; निद्रानाश (रोग).

Vi'gilant, *a.* (व्हि'जिलन्ट्)—watchful; on the watch, on the outlook, alert. जागरूक; सावध. -*ly*, *adv.*

Vigilăn'tĕ, *n.* (व्हिजिलॅ'न्टि)—(U. S.) a member of a *Vigilance Committee*. समाजहितवर्धिनी सभेचा सभासद.

Vigne'tte, *n.* (व्हीन्ये'ट्)—(Archit.) an ornament of leaves and tendrils; flourishes round capital letters; engraved illustration; a portrait showing only head and shoulders with back-ground shaded off; (*fig.*) character -sketch. पानांचें आणि तुऱ्यांचें खोदकाम; मूळ-मोठ्या अक्षराचे अलंकारिक फाटे; खोदीव चित्र; (डोकें आणि खांदे दाखविणारें) चेहऱ्याचें चित्र; स्वभावचित्र.-*ttor*,-*ttist*, *nn.*

Vig'our, *n.* (व्हि'गर्)—activity and strength of body or mind, physical force बळ, जोम, उत्साह, कुवत, शक्ति. *V.-less*, *a.*

Vig'orous, *a.* (व्हि'गरस)—full of physical strength, active, forcible. जोमदार, धमक असलेला, ताकदवान, बळकट, जोराचा.-*ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Vi'kĭng, *n.* (व्हा'यकिंग)—Northern sea-robber of 8th & 10th centuries. उत्तर युरोपांतील समुद्रावरील लुटारू, चांचा.

Vile, *a.* (व्हाइल्)—depraved, base; worthless; despicable. अधम, नीच; निरुपयोगी, तिरस्करणीय. -*ly*, *adv.*,-*ness*, *n.* अधमपणा, नीचपणा, दुष्टपणा.

Vil'ify, *v. t.* (व्हि'लिफाय्)—to speak ill of, defame, traduce. बदनामी करणें, कलंक लावणें. -*fication*,-*fier*, *nn.*

Vill'ă, *n.* (व्हि'ला)—a country residence, a rural or suburban house. गांवट्यावरचा बंगला, बागेंतील घर, उद्यानगृह.-*dom*, *n.*

Vill'age, *n.* (व्हि'लिज्)—assemblage of dwellings in the country. खेडेगांव. *a.* rustic. खेडेगांवांतील, ग्रामीण.

Vill'ager, *n.* (व्हि'लिजर्)—a dweller in or inhabitant of a village; rustic. खेडेगांवांत राहणारा; गांवढळ.

Vill'ain, *n.* (व्हि'लन्)—a wicked schemer; (colloq.) playful; (arch.) rustic. दुष्ट मनुष्य, खल (नायक); खेळकर, खोडकर; गांवढळ.-*ous*, *a.* vile, wicked. दुष्ट, नीच, दुष्टपणाचें.-*y*, *n.* पाजीपणा, सोदेगिरी.

Vi'llus, *n.* (व्हि'लस)—(*pl.*-*li*), (anat.) each of the short hair-like processes on some membranes, (Bot. *pl.*) long soft hair covering fruit, flower etc. त्वचेवरील लव; फळां-फुलांवरील लव. -*llosity*, *n.*-*llous*, *a.* लवदार, मृदुकेशावृत.

Vim, *n.* (व्हिम्)—(colloq.) vigour. जोर, जोम, उत्साह.

Vim'inal, *a.* (व्हि'मिनल्)—(Bot.) of, producing, twigs or shoots. डहाळ्यांचा, तुऱ्यांचा, धुमारे येणारें.-*neous*, *a.*

Vinā'ceous, *a.* (व्हिने'शस्)—of wine or grapes; wine-red. दारूचा, द्राक्षांचा; दारूप्रमाणें लाल.

Vinaigrette', *n.* (व्हिनिग्रेट्)—a smelling-bottle. हुंगायची पाटली.

Vin'cible, *a.* (व्हिंन्सिबल्)—that may be conquered. जेय, जिंकण्यासारखें, भेद्य.

Vin'culum, *n.* (व्हिंन्क्युलम्)—(*pl.-la.*) (Alg.) a line drawn over several terms to serve as a bracket; a band. कंसदर्शक रेघ, शृंखला; सांखळी.

Vin'dicate, *v. t.* (व्हिंन्डिकेट्)—to defend, justify; establish the truth of; prove to be right; avenge. समर्थन करणें; निर्दोषी ठरवून घेणें, सत्यत्व स्थापन करणें; सूड उगवणें.*-tion, n.* सत्यापित-शाबीत करणें; दोषनिरसन.*-tive, a.* शाबीत करणारा, दोषनिवारक.

Vin'dicatory, *a.* (व्हिंन्डिकेटरि)—tending to vindicate; punitive. सत्यापित-शाबीत-करणारा; शिक्षेचा, शिक्षाविधायक.

Vindic'tive, *a.* (व्हिन्डि'क्टिव्ह)—bent on revenge, given to revenge, revengeful. सूड घेणारा, खुनशी. *-ly, adv.,-ness, n.*

Vine, *n.* (व्हाइन्)—the plant that bears grapes; a climbing plant. द्राक्षलता, द्राक्षांची वेल; वेल, ताणा.*-ny, a.*

Vin'egar, *n.* (व्हिं'निगर्)—acid liquid got from various alcoholic liquors, anything that is sour. शिरका. *A v. countenance,* (*fig.*) आंबट (निराशेचा) चेहरा.*-ish,-y, aa.*

Vin'ery, *n.* (व्हा'इनरि)—a vine greenhouse. द्राक्षवेलींचा (कृत्रिम कांचगृहांतील) मंडप.

Vine'yard, *n.* (व्हिं'न्यार्ड)—vine-plantation. द्राक्षांचा मळा.

Vi'nous, *a.* (व्हा'इनस्)—of, like, due to, wine. द्राक्षांच्या दारूचा,-सारखा, द्राक्षामद्याचा.*-nosity, n.*

Vint, *v. t.* (व्हिन्ट्)—to make (wine). दारू-मद्य-तयार करणें. 2. a Russian card-game. पत्त्यांचा (रशियन) डाव.

Vin'tage, *n.* (व्हिं'न्टिज्)—the grapes-gathering season or its yield; wine. द्राक्षांचा हंगाम, द्राक्षांचें पीक; दारू.*-r, n.* द्राक्षें तोडणारा.

Vin'tner, *n.* (व्हिन्टनर्)—a wine-merchant. द्राक्षारस-मद्य-विकणारा, मद्याचा व्यापारी.*-y, n.*

Vi'ol, *n.* (व्हा'यल्)—a medieval stringed instrument. मध्ययुगीन सारंगी, तंतुवाद्य.*-a, n.* मोठें सारंगीवाद्य.

Viola'ceous, *a.* (व्हायोले'शस्)—of violet colour or family. जांभळ्या रंगाचें,-रंगापैकीं.

Vi'olate, *v. t.* (व्हा'यलेट्)—to transgress, infringe, sin against, break in upon; ravish. उल्लंघन करणें, मोडणें, अतिक्रमण करणें; भ्रष्ट करणें, बलात्कार करणें. *-lable, a.,-lation, n.* उल्लंघन, अतिक्रम, भंग; बलात्कार.*-lator, n.*

Vi'olence, *n.* (व्हा'यलन्स्)—force; violent conduct or treatment, outrage, injury; impetuousness; (Law) illegal use of force. जोर, वेग, नेट; दांडगाई; आवेश, साहस; जुलूम, जबरी, बलात्कार.

Vi'olent, *a.* (व्हा'योलेन्ट्)—of great and impetuous force; intense; outrageous. जोराचा; जबर; जबरदस्त, दांडगा. *V. death,* not natural. अपघाती-आकस्मिक-मरण.*-ly, adv.*

Vi'olet, *n.* (व्हा'यलेट्)—kinds of plant with blue, purple, white or other colours; kinds of *v.* butterfly. निळ्या, इ. रंगांच्या फुलांचें फूलझाड; जांभळ्या रंगाचें फुलपाखरूं. *a.* जांभळा-नीललोहित-रंगाचें, जांभळें, पाटल.

Violin', *n.* (व्हायलिं'न्)—a four-stringed musical instrument played with a bow. सारंगीसारखें वाद्य. *-ist, n.* व्हायलिन् वाजविणारा.

Vi'olin,-ine, *n.* (व्हा'यलिन्)—an emetic substance contained in sweet violet व्हायलेट फुलांतील वांतिकारक पदार्थ.

Vi'olist, *n.* (व्हा'यलिस्ट्)—a performer on viola. मोठें व्हायलिन वाजविणारा. *Violoncell'o, n.* मोठें व्हायलिन वाद्य.*-llist, n.*

Vi'per, *n.* (व्हा'इपर्)—kinds of venomous snake, the adder; a malignant treacherous man. विषारी साप; नीच मनुष्य, अधम, विश्वासघातकी. *-ous, a.* नीच, दुष्ट.

Vira'go, *n.* (व्हिरे'गो)—a man-like woman, a fierce or abusive woman. पुरुषी स्त्री, कर्कशा, वाघिणी.

Vire'scence, *n.* (व्हिरे'सन्स्)—greenness; (Bot.) abnormal greenness in petals. हिरवेपणा (पाकळ्यांचा) भडक हिरवा रंग.*-cent, a.*

Vir'gate, *a.* (व्ह'र्गेट्)—(nat. hist.) slim, straight and erect. बारीक, सरळ व उंच.

Virgil'ian, *a.* (व्हर्जि'लिअन्)—of, in the style of, Virgil, the Roman poet. रोमन कवि व्हर्जिलचें,-च्या शैलीचें.

Vir'gin, *n.* (व्ह'र्जिन्)—a girl or woman who has not known sexual intercourse; a female insect producing eggs without impregnation; (Astr. V-) virgo. कुमारी, कुमारिका; गर्भाधानाशिवाय अंडीं घालणारा स्त्रीकीटक; कन्या (रास). *a.* chaste, unsullied, maidenly. शुद्ध, पवित्र, असुक्त, कन्येचा, कुमारिकेचा. The (Blessed) Virgin, Mary, mother of Christ. ख्रिस्तमाता कुमारी मेरी. *V. modesty,* कुमारीला शोभेसा विनय. *V. soil,-clay,* लागवड न केलेली जमीन. *V. Queen.* एलिझाबेथ राणी. *-al, a. & n.* (arch),*-ally, adv. V. hood,-ness, nn.*

Virgi'nia, *a.* (व्हर्जि'निआ)—tobacco from *V.* सं. संस्थानांतील व्हर्जिनिआ संस्थानांत होणारा तंबाखू. *-n, a. & n.*

Vir'go, *n.* (व्ह'र्गो)—sixth zodiacal. कन्या (रास).

Vi'rile, *a.* (व्हि'राइल्)—having masculine vigour or strength, manly, strong. पुरुषत्व असलेला, पौरुषाचा.*-lity, n.* [L. *vir,* Skr. *veera,* man]

Virtu', *n.* (व्हर्टू')—love of fine-arts. ललितकलांची-वस्तूंची-आवड.*-o'so,* ललितकलापारखी, पटु, तज्ज्ञ.

Virt'ual, *a.* (व्ह'र्चुअल्)—such in practice though not in name, not actual or real. तात्त्विक, वास्तविक, कार्यकारी. *V. velocity,* वास्तविक वेग. *V. images,* भासक प्रतिमा.*-ily, n.,-lly, adv.*

Vir'tue, *n.* (व्ह'र्च्यू)—moral goodness; chastity (of women); good quality; inherent power, efficacy. सद्गुण, नीति, धर्माचरण, धर्म, साधुत्व; पातिव्रत्य, शुद्धता; गुण; सत्त्व, वीर्य, जोम, प्रताप. *Make a v. of necessity*, नाइलाजानें कर्तव्य-धर्म -परता दाखविणें. *By v. of*, मुळें, परत्वें. *V. less, a.*

Virt'üous, *a.* (व्ह'र्च्युअस)—practising virtue; morally good; chaste. सदाचरणी, सद्गुणी; पवित्र, पतिव्रता.*-ly, adv.*;*-ness, n.*

Vi'rulent, *a.* (व्हि'रुलेन्ट्)—powerful; venomous, malignant, poisonous. जालीम, कडक; विषारी. *-lence, n.*

Vir'us, *n.* (व्हा'यरस)—poison of contagious disease; (*fig.*) moral poison; malignity. रोगविष, जन्तु; नैतिक ऱ्हास; दुष्टपणा.

Vis'age, *n.* (व्हि'झिज्)—the internal face (esp. as revealing temperament, &c.), countenance. चेहरा, मुद्रा.*-d, a.*

Vis-a-vis, *adv. & n.* (व्हीझाव्ही)—in a position opposite *to*. समोरासमोर, सामोरा. *n.* समोरासमोर असलेला मनुष्य.

Vis'cera, *n. pl.* (व्हि'सेरा)—the internal organs of the body, the entrails, the bowels. आंतडीं.*-l, a., -te, v. t.* to disembowel. आंतडीं काढणें.

Vis'cid, *a.* (व्हि'सिद्)—sticky, semifluid. चिकट, गिळगिळीत.*-ity, n.* viscosity. चिकटपणा.

Vis'count, *n.* (व्हा'य-काउन्ट्)—a peer ranking between earl and baron, a nobleman of rank fourth below a prince. अर्ल आणि बॅरन यांच्या मधील दर्जाचा सरदार.*-cy, n.*

Vis'cous, Vis'cid, *aa.* (व्हि'स्कस, व्हि'सिड)—of a semifluid clinging consistence. चिकट, चिकचिकीत.

Vise', Visa, *n. & v. t.* (व्ही'झे, व्ही'झा)—indorsement on passport etc. परवाना तपासल्याचा शेरा, -दाखला (मारणें,-देणें).

Vis'ible, *a.* (व्हि'झिबल्)—perceived by the eye, to be seen; apparent, open; prepared to receive callers; conspicuous. दृष्टिगोचर, दिसणारा, दृश्य, उघड; दृश्यमान; आगतस्वागत करणारा; स्पष्ट.*-bility, n.* दृग्गोचरता, दृश्यमानता.*-ness, n. -bly, adv.* प्रत्यक्ष, उघड.

Vi'sion, *n.* (व्हि'झन्)—act or faculty of seeing, sight; thing seen in a dream; imaginative insight, political sagacity, foresight. पाहणें, नजर, दृष्टि; दृष्टांत, स्वप्न, भास, छाया, मनोराज्य, कल्पना; बुद्धि, दूरदृष्टि. *v. t.* to see, present, (as) in *a v.* स्वप्नवत् पाहणें, भास होणें,-दाखविणें. *-ist, n.,-al, a.,-ally, adv.*

Vi'sionary, *a.* (व्हि'झनरि)—unpractical. असत्य, काल्पनिक. *n.* a person of unpractical ideals. मनोराज्यांत रमणारा.*-riness, n.*

Vis'it, *v. t. & i.* (व्हि'झिट)—to go, come, see; punish or afflict; comfort, bless. भेटणें, भेट देणें, तपासण्यास जाणें,-येणें; (विपत्ति किंवा रोग) येणें, शिक्षा किंवा बक्षीस देणें; सांत्वन करणें, आशीर्वाद देणें. *n.* भेट, दर्शन, फेरी, तपासणी.*-able, a., -ing, a.* भेटीस नेहमीं जाणें, जाणें येणें, परिचय, *-ing book*,भेटणारांची नोंद-वही.

Vi'sitant, *a.* (व्हि'झिटन्ट्)—(poet.) visiting. भेटणारा. *n.* a migratory bird; (poet., rhet.) a visitor; (*V-*)a member of an order of nuns concerned with education of young girls. स्थलांतर करणारा-भटक्या-पक्षी; भेटणारा, पाहुणा; मुलींच्या शिक्षणाला वाहिलेली जोगीण.

Visitā'tion, *n.* (व्हिझिटे'शन्)—official visit; boarding of vessel belonging to another State; divine dispensation; (zool.) unusual and large migration of animals. सरकारी तपासणी, पाहणी, भेट; परराष्ट्राच्या जहाजाची तपासणी; दैवी आपत्ति, कृपा, बक्षीस; पशुपक्ष्यांचें मोठ्या प्रमाणांत स्थलांतर.

Vis'itor, *n.* (व्हि'झिटर्)—one who visits; an inspecting official. भेटीस येणारा, पाहुणा; तपासनीस. *Visit (at)orial, a. Visitor's book n.* तपासणीदाराचें किंवा हॉटेलांतील उतारूंचें शेरे -पुस्तक.

Vi'sor, Vis'ard, *nn.* (व्हा'इझर, व्हि'झर्ड)—(*Hist.*) movable part of helmet covering the face; mask to conceal identity; projecting front part of a cap. वर करतां येणारा शिरस्त्राणाचा भाग, मुखवटा, मुखटोप; तोंडावरील बुरखा; टोपीचा पुढचा भाग.*-ed,-less, aa.*

Vis'ta, *n.* (व्हि'स्टा)—a long narrow view as between rows of trees; mental prospect or retrospect. दुतर्फा झाडें असलेल्या मार्गाचा देखावा; भूत किंवा भावी गोष्टींचा दृष्टीपुढें येणारा देखावा, -रें चित्र.*-'d, a.*

Vi'sual, *a.* (व्हि'झुअल्)—of, concerned, used in, seeing. दृष्टीचा, नजरेचा, चाक्षुष, दर्शनोपयोगी, देखाव्याचा. *V. angle*, दृष्टिकोन. *V. focus*, दर्शन किरणेंद्र. *V. point*, दृश्यबिंदु.*-ize, v. t.* दिसेल असें करणें, दृश्य करणें; डोळ्यापुढें (कल्पनेनें) उभा करणें, कल्पना करणें.*-ity, n.,-lly, adv.,-ization, n.*

Vit'a glass, *n.* (व्हा'इटा ग्लास)—kind of glass that does not exclude the ultra-violet vitalizing rays. किरणांचें परावर्तन न करणारी एक प्रकारची-किरणापरावर्तनी कांच. [L *vita, life*]

Vi'tal, *a.* (व्हा'इटल)—essential to organic life; essential to success, &c. जीवनाला आवश्यक; अति महत्त्वाचा, आवश्यक. *n. pl.* the vital organs of the body. मर्मस्थानें. *V. question*, महत्त्वाचा मुद्दा,-प्रश्न. *A v. wound*, घातक-मर्मस्थानीं-जखम. *A v. error*, घोडचूक. *V. statistics*, of birth, marriage, death etc. जन्म-विवाह-मृत्यु इ० ची नोंद, गणन.*-ally, adv.* जीवनाच्या दृष्टीनें, फार, अतिशय.

Vital'ity, *n.* (व्हाइटॅ'लिटि)—vital power; hold on life; persistent energy. जीव; जीवनशक्ति; चेतना, जोम, जिवंतपणा.

Vi'talize, *v. t.* (व्हा'इटलाइझ्)—to endow with life. जिवनशक्ति घालणें,-उत्पन्न करणें, चेतना-चैतन्य -आणणें.

Vi'tămin, *n.* (व्हि'टॅमिन्)—a factor regarded as necessary to health. प्रकृतिस्वास्थ्याला आवश्यक असा भाग, जिवनसत्त्व.

Vitĕllus, *n.* (*pl.*) (व्हिटे'लस्)—yolk of egg. अंड्यांतील पिंवळा बलक.-*llary*,-*lline*, *aa.*

Vi'tiāte, *v. t.* (व्हि'शिएट्)—to render defective, invalidate, deprive of efficacy; spoil. भ्रष्ट करणें, दूषित करणें, रद्बातल करणें, बिघडविणें. -*tor*,-*tion*, *nn.*

Vit'rĕous, *a.* (व्हि'ट्रिअस्)—of, like, of the nature of, glass. कांचेचा,-सारखा, काचसदृश, काचर. *V. body* or *humour*, (डोळ्यांतील) काचरूपी रस. *V. electricity*, काचजन्य विद्युत्. *Vit'rify*, *v. t.* कांच करणें,-होणें, कांचेसारखें बनणें,-*trifaction*,-*fication*, *nn.*

Vit'riol, *n.* (व्हि'ट्रिआल्)—sulphuric acid or any of its salts; (*fig.*) savage speech or criticism. मोरचूद, ताम्रगर्भ, हिराकस, धातुशेखर; कटक भाषण, विदारक टीका. *Oil of v.*, तीव्र तेजाब.-*ic*,-*ine*,*aa.*,-*ize*, *v. t.*

Vitt'a, *n.* (व्हि'टा)—(pl.-ae) a garland; (Bot.) *oil-tube in fruit*; (Zool.) strips of colour. माला, माळ; तैलनलिका; रंगाचे पट्टे.

Vitū'perāte, *v. t.* (व्हाइट्यु'परेट्)—to revile, abuse, blame or censure offensively, scold, speak angrily about. निर्भर्त्सना करणें, निंदा करणें.-*tion*, *n.* निंदा, निर्भर्त्सना.-*tive*, *a.* निंदात्मक.-*tor*, *n.* निंदक.

Vi'va, *int.* & *n.* (व्ही'वा)—(the cry) long live, long life to. जीते रहो, चिरायू होवो (असा आवाज). 2. *adv.*, *a.* & *n.* viva voce. तोंडी (परीक्षा).

Vivā'cious, *a.* (व्हाइव्हे'शस्)—sprightly, animated, having strong vital powers; (Bot.) tenacious of life, perennial. आनंदी, उल्हासी, उत्साही; सदाजीवी, सदापर्णी.-*ly*, *adv.*, *Viva'city*, *n.* उत्साह, जोम, आनंदवृत्ति.

Vivār'ium, *n.* (व्हाइव्हे'अरिअम्)—place in which live wild creatures are kept, a zoological garden. पशुसंग्रहालय.

Vi'va vō'cē, *adv.*, *a.* & *n.* (व्हा'इव्हा व्हो'सि)—orally, the *v. v.* part in an examination. तोंडी (परीक्षा).

Viv'ers, *n. pl.* (व्ही'व्हर्झ्)—(Sc.) food, victuals. अन्न, खाद्य पदार्थ.

Viv'id, *a.* (व्हि'व्हिड्)—forming brilliant images, bright, intense; graphic; clear, vigorous. भडक, ठळक; हुबेहुब, स्पष्ट; जोमदार, प्रतिभासंपन्न. -*ly*, *adv.*,-*ness*, *n.* ठळकपणा, स्पष्टपणा.

Viv'ify, *v. t.* (व्हि'व्हिफाइ)—to put life into; make lively or animated. सजीव करणें; चेतना आणणें.

Vivi'parous, *a.* (व्हाइव्हि'परस्)—bringing forth young alive. जीवंत पोरांना जन्म देणारी, सचेतनप्रसू.-*ness*, *n.*,-*ly*, *adv.*, *Vivipa'rity*, *n.*

Viv'isect, *v. t.* (व्हि'व्हिसेक्ट्)—to dissect (animal) while living. (अभ्यासाकरितां) जिवंत प्राणी कापणें, प्राणीव्यवच्छेदन करणें.-*section*, *n.* (शास्त्रीय संशोधनासाठीं) जीवंत प्राण्यावर केलेले प्रयोग.-*or*, *n.*

Vix'en, *n.* (व्हि'क्सन्)—a she-fox; a spiteful woman. कोल्ही, भालू; अवदसा; कृत्या, कैदाशीण (स्त्री).

Viz, *adv.* (व्हिझ्)—videlicet. म्हणजे.

Vizard-See Visor.

Vŏc'able *n.* (व्हो'कबल्)—(philol.) a word. (तोंडी उच्चारलेला) शब्द.

Vocăb'ūlarў, *n.* (व्हाकॅ'ब्युलरि)—a list of words *in a language, arranged alphabetically* with definitions. शब्दांचा संग्रह, शब्दकोश, कोश, शब्दांचा भरणा,-सांठा.

Vō'cal, *a.* (व्हो'कल्)—uttered by the voice. तोंडचा, वाणीचा.-*ist*, *n.*,-*ize*, *v. t.* & *i.*

Vocā'tion, *n.* (व्होके'शन्)—occupation or calling, employment, trade, profession. धंदा, उद्योग, पेशा. *Mistake one's v.*, take up unsuitable work. चुकीचा-पेशा-धंदा-पत्करणें.-*al*, *a.* व्यावसायिक, धंदाउद्योगासंबंधीं.

Vŏc'ative, *a.* & *n.* (व्हॉ'कटिव्ह्)—a case or word used in calling or addressing by name. संबोधन (विभक्ति).

Vŏcif'erāte, *v. t.* & *i.* (व्हॉसि'फरेट्)—to speak loudly and insistently, cry noisily, exclaim. जोरानें ओरडणें, गोंगाट करणें, उद्गारणें.-*tion*,-*tor*, *nn.*

Vocif'erous, *a.* (व्होसि'फरस्)—noisy, clamorous. आवाजाचा, गलबला करणारा, आरडाओरड करणारा. -*ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Vŏd'ka, *n.* (व्हॉ'ड्का)—kind of fiery brandy distilled from rye etc. in Russia. (रशियांतील) कडक दारू, मद्य.

Voe, *n.* (व्हो)—a small bay, creek. लहान आखात, खाडी.

Vŏgue, *n.* (व्होग)—the fashion. चाल, प्रचार, प्रघात. *v. i. v.* la galère, (व्होग ल गलेअर्) here goes. चालू आहे, जात आहे. *In v.*, प्रचारांतील, रूढ.

Vŏice, *n.* (व्हॉइस्)—a sound uttered by the mouth; the expressed opinion; the verbal forms proper to a certain relation of the subject to the action. आवाज, शब्द, स्वर, कंठ, ध्वनि; मत, मताधिकार, अभिप्राय; (कर्मणि, कर्तरि किंवा भावे) प्रयोग. *v. t.* to give *v.* to; make sonant. व्यक्त करणें, वाचा फोडणें; उच्चार करणें. *Has lost his v.*, cannot speak aloud. मोठ्यानें बोलवत नाहीं, घसा बसला-बसला-आहे. *To find one's v.*, बोलण्याचें धैर्य असणें,-धारण करणें. *With one v.*, unanimously. एकमतानें. *The people's v. is the v. of God*, पांचांमुखीं परमेश्वर.-*voiced*, (-स्ड्) *a.*

Vŏid, *a.* (व्हॉइड्)—empty, vacant, unoccupied, not valid; ineffectual, useless रिता, रिकामा. निरर्थक; गैरलागू, निरुपयोगी. *n.* empty space;

sense of loss. शून्य, पोकळी; नुकसानीची जाणीव. *v. t.* to render invalid; emit; quit. रद्द करणें, निरुपयोगी करणें; उत्सर्जन करणें, बाहेर टाकणें; सोडून जाणें, खाली करणें. *Null & v.*, बंधनकारक नसलेलें, रद्दबातल. *Nothing can fill the v.*, उणीव कशानेंही भरून येणार नाहीं.*-able, a.,-ance, n.*

Voile, *n.* (व्हाइल्)—thin dress-material. उंची झिरझिरीत कापड.

Vō'lant, *a.* (व्हो'लन्ट्)—flying, able to fly; represented as flying; (poet.) nimble, rapid. उडता, उड्डयनशील; उडता दाखविलेला; चपळ, जलद.

Vŏl'apuk, *n.* (व्हॉ'लपुक्)—an artificial international language. आंतरराष्ट्रीय कृत्रिम भाषा,-बोली.

Vō'lar, *a.* (व्हो'लर्)—(anat.) of the palm or sole. तळहाताचा, तळव्याचा.

Vŏl'atile, *a.* (व्हॉ'लटाइल्)—evaporating rapidly; of gay or lively temperament. उडून जाणारा; वायुपरिणामी, जिता.*-ness,-latil'ity, nn.* आनंदी, चंचलप्रकृति, अस्थिर.

Volă'tilize, *v. t. & i.* (व्हॉलॅ'टिलाइझ्)—(to cause) to evaporate. वायुपरिणामी करणें, वायुरूपानें नाहींसा करणें, उडणें, उडून जाणें, वायुरूपानें नाहींसा होणें. *-zation, n.*

Vŏlcă'nic, *a.* (व्हॉल्कॅ'निक्)—of, like, produced by, a volcano. ज्वालामुखीचा,-सारखा, ज्वालामुखीपासून झालेला.*-ally, adv.,-nicity, n.*

Vŏlcā'nō, *n.* (व्हॉल्के'नो)—(*pl.*-oes) a mountain or hill with openings through which lava, cinders, gases, &c. are expelled, a burning mountain. ज्वालामुखी पर्वत. *Active v.*, जागृत ज्वालामुखी. *Dormant v.*, सुप्त, निद्रित. *Extinct v.*, मृत. *Submarine v.*, समुद्रांतून वर येणारा. *V. ship*, ज्वालाग्राही वस्तूंनीं भरलेलें व दुसऱ्या जहाजाच्या संपर्कानें स्फोट होणारें जहाज.*-logy, n.,-logical, a.*

Vōle, *n.* (व्होल्)—(cards) winning of all the tricks in a deal. (पत्त्यांच्या खेळांत) सगळे हात जिंकणें. *v. t.* सगळे हात जिंकणें.

Vōle, *n.* (व्होल्)—kinds of mouse-like rodent. उंदरासारख्या प्राण्यांची जात.

Voli'tion, *n.* (व्हालि'शन्)—act or faculty of willing, power of willing, will. संकल्प, इच्छा. *-al, a.,-ally, adv.*

Vŏl'l'cy, *n.* (व्हॉ'लि)—simultaneous discharge of a number of rifles, missiles, &c.; (Tennis) return of ball in play before it touches ground; (Crick.) sending of ball so that after touching ground it flies towards head of wicket. वर्षाव, सरबत्ती, लाखोली, वृष्टि; (टेनिस) भिडूचा चेंडू जमिनीला लागण्यापूर्वीच परत टोलवणें, -फारणें; (क्रिकेट) टप घेऊन यष्टींवर उडणारा असा चेंडू फेंकणें,-अशी चेंडूफेंक. *v. t. & i.* वर्षाव,-सरबत्ती -करणें, (टेनिस) चेंडू जमिनीला न लागतां परत करणें; टप घेऊन उडेल असा चेंडू (क्रिकेटमध्यें) टाकणें.

Vŏl'plāne, *v. i. & n.* (व्हॉ'ल्प्लेन्)—(of aeroplane or its pilot) to descend by gliding without using its engine. (विमान, वैमानिक) इंजिन् न चालवितां घसरत खालीं येणें.

Vōlt, *n.* (व्होल्ट्)—the unit of electromotive force. विद्युच्चलशक्तीचा एकं. *-age, n.* अशा एकंचें परिमाण. *-aic, a.* (of electricity) galvanic. रासायनिक प्रक्रियेनें उत्पन्न केलेली विद्युत्. [*Volta*, person]

Volte-face', *n.* (व्हॉल्ट्-फा'स्)—turning round, complete change of front. वळणें, बाजू बदलणें, कोलांटी उडी घेणें, मतांतर.

Vŏl'ūble, *a.* (व्हॉ'ल्युबल्)—with incessant flow of words, overfluent; (arch.) revolving; (Bot.) twining. फुचफुच बोलणारा, तोंडाचा फटाकडा; गोल गोल फिरणारा, सभोंवतीं फिरणारा; वेढोळें घेणारा, वेढणारा.*-bly, adv.*

Vŏl'ūme, *n.* (व्हॉ'ल्यूम्)—a book; moving mass of water or smoke, something coiled, coil; bulk, mass; fullness of tone. ग्रंथ, पुस्तक; पाण्याचा लोंढा, धुराचा लोट; परिमाण, विस्तार, आकारमान; दांसदार-भरींव-स्वर, आवाज.*-menometer, n.* घनफलमापक यंत्र. *Volu'meter, n.* वायुघनफल-मापक यंत्र.

Vŏlu'minous, *a.* (व्हॉल्यु'मिनस्)—running to great length; bulky, copious. फार मोठा; विस्ताराचा, प्रचंड.*-ly, adv.,-ness, n.*

Vŏl'ūntarў, *a.* (व्हॉ'लन्टरि)—willing, having free will, not subject to compulsion. आपखुशीचा, ऐच्छिक, आवडीचा. *n.* (ख्रिस्ती मंदिरांत) एकानें वाजविलेलें-गायिलेलें-गीत; स्पर्धेतील खेळाडूनें दाखविलेला ऐच्छिक प्रयोग. *-rily, adv.,-riness, n.*

Vŏlŭnteer', *n.* (व्हॉलन्टि'अर्)—a person who comes forward with offer of service at need. स्वयंसेवक. *v. t. & i.* to come forward or serve as a volunteer. आपणहून काम करण्यास तयार होणें; मदत करणें, स्वयंसेवक होणें.

Vŏlŭp'tūarў, *a. & n.* (व्हॉल'प्चुअरि)—a person given up to luxury and sensual gratification. विषयी, विषयासक्त, भोगी, चैनी (मनुष्य).

Volŭp'tuous, *a.* (व्हाल'प्चुअस्)—sensual. विषयी, विलासी.*-ly, adv.,-ness, n.*

Volūte', *n.* (व्हाल्यू'ट्)—(archit.) spiral scroll in stone-work. सुरळीच्या आकाराचें दगडी नक्षीकाम. *-tion, n.*

Vŏm'it, *v. t. & i.* (व्हॉ'मिट्)—to eject food, &c. from the stomach through the mouth, eject. ओकणें, वांती होणें; (अलं०) (ज्वालामुखीचा) स्फोट-उद्रेक-होणें. *n.* वांति, ओकारी.*-ory, a.* वांतिकारक, वांतीचें.

Voo'dōo, *n. & v. t.* (व्हू'डू)—use of, belief in witchcraft and the like. जंतरमंतर, तंत्रमंत्र, जादूटोणा करणें, जादूटोणा वगैरेंवर विश्वास.*-ism,-ist, nn.*

Voră'cious, *a.* (व्होरे'शस्)—greedy, ravenous, eager to devour or swallow. खादाड, अधाशी, हपापलेला. *-ly, adv.,-ness, n.*

Vora'city, *n.* (व्हॅ'सिटि)—greed, eagerness to devour. अधाशीपणा, खादाडपणा.

Vor'tex, *n.* (व्हॉ'र्टेक्स्)—a whirl in water, eddy, whirlpool, whirlwind. आवर्त, चक्र, भोवरा; वावटळ, चक्रवात.-*tical*, *a.* भोवऱ्यासारखा, गरगर फिरणारा.-*ticular*, *a.*, -*tically*, *adv.*

Vo'tary, *n.* (व्हो'टरि)—a person vowed to the service of a god, one devoted to a pursuit. उपासक, सेवक, भक्त.-*taress*, *n. f.* भक्तीण, सेविका, दासी.

Vote, *n.* (व्होट्)—expression of will or opinion by means of ballot or show of hands; the right to take part in such vote, decision by a majority. मत; मत देण्याचा अधिकार, मताधिकार; बहुमताचा निकाल. *v. t. & i. to give one's vote*; enact, resolve (that), grant by majority of votes; declare by general consent; (colloq.) propose. मत देणें; बहुमतानें ठरविणें, मंजूर करणें; बहुमतानें जाहीर करणें; सुचविणें.-*table*, *a.*, *Voter*, *n.* मतदार. *Voting*, *n.* मतदान करणें, मत देणें.-*paper*, मतपत्रिका.

Vo'tive, *a.* (व्हो'टिव्ह्)—offered, consecrated, in fulfilment of a vow. नवसाचा, नवस फेडण्यासाठीं दिलेलें.

Vouch, *v. t. & i.* (व्हाउच्)—(with *for*) to guarantee, confirm, bear witness to. साक्षी करणें; साक्षी देणें, साक्ष देणें..

Vouch'er, *n.* (व्हा'उचर्)—a document or written evidence establishing the payment of money or the truth of accounts. पैसे दिल्याचा दाखला, प्रमाणलेख,-पत्र, दाखला.

Vouchsafe', *v. t.* (व्हाउच्-से'फ्)—to condescend to grant or *to* do something. कृपा करून देणें, मेहेरबानी करणें.

Vou'ssoir, *n.* (व्हू'स्वार्)—each of the wedge-shaped stones forming an arch. पाचरीसारखा घसविलेला कमानीचा दगड.

Vow, *n.* (व्हाउ)—a solemn promise or engagement. शपथ, प्रतिज्ञा, व्रत, नवस. *v. t.* to promise solemnly or threaten by vow; declare solemnly (*that*); (arch.) declare. प्रतिज्ञा करणें, शपथपूर्वक धाक घालणें; शपथेवर सांगणें; स्पष्ट सांगणें, जाहीर करणें.

Vow'el, *n.* (व्हॉ'वेल्)—sound capable of forming a syllable, letter representing this sound, e. g. *a, e, i, o, u.* स्वर, स्वराचें अक्षर, स्वरवर्ण.-*vowelled*, *a.*

Vox, *n.* (व्हॉक्स)—*V. bar'bara*, hybrid word. अशुद्ध साधित शब्द. *V. et praete'rea*, an empty word. पोकळ (फक्तिरूप) शब्द, पोकळ बडबड. *V. populi*, the people's voice. लोकवार्ता, सार्वत्रिक मत, लोकापवाद. [Voice]

Voy'age, *n. & v. i.* (व्हॉ'इज्)—journey (esp. to some distance by water. जलपर्यटन, सफर करणें. -*able*, *a.*,-*r*, *n.* समुद्रावरील सफर करणारा.

Vul'can, *n.* (व्ह'ल्कन्)—(Rom. Myth.) god of fire. (रोमन) अग्निदेवता. *V. powder*, स्फोटक दारू,-पदार्थ. -*ite*, रबर व गंधक एकत्र मिळवून व कढवून तयार केलेला पदार्थ.-*ize*, *v. t.* मजबूत रबर बनविण्यासाठीं व्हल्कनाइटचा उपयोग करणें.-*zable*, *a.*,-*zation*, *n.*

Vul'gar, *a.* (व्ह'ल्गर्)—coarse; mean, low; common; offending against good taste. हलका; गांवढळ, ग्राम्य; प्राकृत; असभ्य. *The vulgar*, अशिक्षित लोक, सामान्य-खालील-जनता. *V. fraction*, व्यवहारी अपूर्णांक.-*ism*, *n.* अडाणी-गांवढळ-शब्दप्रयोग, ग्राम्यता.-*ly*, *adv.* *Vulga'rity*, *n.* अशिष्टता, अडाणीपणा, ग्राम्यता.

Vulgar'ian, *n.* (व्हल्गे'अरिअन्)—a vulgar (rich) person. असभ्य, गांवढळ (श्रीमंत) मनुष्य.

Vul'garize, *v. t.* (व्ह'ल्गराइझ्)—to make vulgar; spoil by making too common. असभ्यता आणणें, ग्राम्यता आणणें; अतिप्रसिद्धपानें ग्राम्य करणें, -बिघडविणें.-*zation*, *n.*

Vul'gate, *n.* (व्ह'ल्गट्)—Latin version of the Bible. ४ थ्या शतकांत केलेलें बायबलचें लॅटिन भाषांतर.

Vul'nerable, *a.* (व्ह'ल्नरब्ल्)—not proof against wounds, offering an opening (to criticism, &c.). भेद्य, भेदनीय.-*bility*, *n.* भेद्यता, भेदनीयता. -*ness*, *n.*

Vul'nerary, *a. & n.* (व्ह'ल्नररि)—(a drug etc.) useful or used for healing wounds. जखम भरून येण्याच्या उपयोगी (औषधी इ.)

Vul'pine, *a.* (व्ह'ल्पिन्,-पाइन्)—of (the nature of) a fox; crafty, cunning. कोल्ह्याचा,-च्या स्वभावाचा; लुच्चा, कावेबाज.

Vul'ture, *n.* (व्ह'ल्चर्)—kinds of a large bird of prey; (*fig.*) a rapacious person. गिधाड, गृध्र; अधाशी, खादाड मनुष्य.-*ine*,-*ish* *aa.* गिधाडासारखा, खादाड, अधाशी.-*ous*, *a.*

Vul'va, *n.* (व्ह'ल्वा)—(anat.) opening, orifice. स्त्रियांचीं बाह्य जननेंद्रियें, योनि, विवर.-*r*, *a.* *Vulvi'tis*, *n.*

Vy'ing, (व्हा'यिंग्)—*pre. pa.* of Vie. स्पर्धा करीत, -करणारा.

W

W, w, (डब्ल्यू)—twenty-third syllable of the English alphabet. इंग्रजी वर्णमालेंतील तेविसावा वर्ण.

Waac, *n.* (वॅक्)—(colloq.) a member of women's Army Auxiliary Force (1917). लष्करी स्त्री-सैनिक.

Waaf, *n.* (वॅफ्)—(colloq.) a member of Women's Auxiliary Air Force (1939). विमानदलांतील स्त्री-सैनिक.

Wad, *n.* (वॉड्)—a small lump of soft material to keep things apart, etc.; a disk of felt keeping powder or shot compact in gun; (U. S.) roll of notes, money. नरम बोळा, चोंदा, दिंडी; जामीन; नोटांचें पुडकें, पैसा. *v. t.* बोळा करणें,-मारणें; गादी करणें, कापूस घालून भरणें.

Wad'ding, *n.* (वॉ'डिंग्)—soft material for padding garments; material from which gun-wads

are made. स्क्रू, कापूस, लोंकर; बंदुकीच्या जामिनाचें साधन,-सामान.

Waddle, *v. i.* (वॉड्ल)—to walk with slow rocking gait, rock from one side to the other. डुलत डुलत चालणें. *n.* बदकाची-डुलती-चाल. -*lingly*, *adv.*

Wāde, *v. i.* & *t.* & *n.* (वेद)—to walk through water or other impeding medium. पाण्यांतून चालणें, कष्टानें जाणें.-*dable*, *a.* *Wading bird*, पाण्यांतून चालणारा लांबटांग्या पक्षी.

Wā'der, *n.* (वे'डर्)—in vbl. senses; a wading bird; (*pl.*) big waterproof boots. पाय ओढीत चालणारा, पाण्यांतून पायीं जाणारा; लांबटांग्या पक्षी; पाणी आंत न घेणारे बूट.

Wadi, *n.* (वॉ'डि)—a rocky water-course dry except in rainy season. पावसाळी वाहणारा ओढा, ओहोळ, पर्या.

Wā'fer, *n.* (वेफर्)—kind of very thin biscuit; *thin disk of unleavened bread used in Eucharist*; a small disk of dried paste; a disk of red paper stuck on law papers instead of seal. अति पातळ कुरकुरीत बिस्किट; पातळ भाकरी,-पाव (मधुभोजनाच्या वेळचा); लाखेची वडी; शिक्क्याच्या ऐवजीं कायद्याच्या कागदपत्रांवर लावण्याची तांबड्या कागदाची चकती. *v. t.* वेफरनें चिकटविणें,-शिक्का करणें.

Wāft, *v. t.* (वाफ्ट)—to convey smoothly through the air or along the water. हवेंतून किंवा पाण्यांतून तरंगत नेणें, वाहवत नेणें. *n.* a single sweep of bird's wing; whiff of odour; fugitive sensation; (Naut.) *weft*, distress signal. पक्ष्याच्या पंखाचा एक झपाटा,-झडप; वासाचा भपकारा; पळता-क्षणिक-आनंद, सुख, ऊर्मि; (जहाजानें) दिलेली-केलेली -धोक्याची सूचना.

Wăg, *v. t.* & *i.* (वॅग्)—to move backwards and forwards, shake or wave to and fro. हालणें, हालवणें, *Tail wags dog*, least important member has control. यःकश्चित् मनुष्याच्या हातीं सूत्रें आहेत. *To wag one's finger at*, धमकावणी देणें, बोट हालवून दटावणें. *n.* हेलकावा, हालवणें.

Wăg, *n.* (वॅग्)—one given to jesting; (sl.) truant. थट्टेबाज, मस्कऱ्या मनुष्य; चुकारतट्टु, पळपुट्या. -*ggery*, *n.*,-*ggishly*, *a.*,-*ggish*, *adv.*

Wāge, *n.* (वेज्)—workman's or servant's periodical pay (*usu. pl.*); a requital. मजुरी, पगार; मोबदला, भरपाई. *v. i.* to carry on. चालवणें, चालू ठेवणें.

Wā'ger, *n.* & *v. t.* & *i.* (वे'जर्)—a bet, to bet. पण करणें, पैज मारणें.

Wăg'gle, *v. i.* & *t.* & *n.* (वॅ'गल्)—wag. हालणें, हालवणें, इ.

Wăg'on,-*ggon*, *n.* (वॅ'गन्)—a four-wheeled vehicle for heavy loads; an open railway truck. चार चाकांची सामानाची गाडी; आगगाडीचा उघडा डबा.-*er*, *n.* गाडीवान; मालवाहक.

Wăgonette',-*ggonate*, *n.* (वॅगने'ट्)—a four-wheeled open carriage with facing side-seats. चार चाकांची उघडी गाडी.

Waif, *n.* (वेफ्)—ownerless object or animal; homeless or helpless person or child. बेवारशी माल,-सांड, जनावर; निराधार, अनाथ इसम,-मूल. *Waifs & strays*, बेवारशी सटरफटर वस्तु, अनाथ पोरकीं मुलें.

Wail, *n.* (वेल्)—a prolonged plaintive cry; wail-like sound. आक्रोश, विलाप; (वाऱ्याचा) आवाज. *v. i.* & *t.* to utter wail, express sorrow, lament for. आक्रोश करणें, शोक करणें.-*ful*, *a.*, -*ingly*, *adv.*

Wain, *n.* (वेन्)—a wagon. गाडी, छकडा, गाडा, शकट. *Charles's Wain*, *Arthur's W.*, *the W.*, the Great Bear. सप्तर्षि. *The Lesser W.*, लघु सप्तर्षि. [L *vehere*, carry, Skr. *vahana*]

Wain'scŏt, *n.* (वे'नस्कॉट्)—a boarding or wooden panelling on room-wall. भिंतीला तक्त्यांची मढवणी. *v. t.* भिंतीला तक्तेबंदी करणें.-*ing*, *n.*

Waist, *n.* (वेस्ट्)—part of the human body below ribs and above hips, the middle part (of a ship); (U. S.) bodice. कटिप्रदेश, कंबर, मध्य; (जहाजाचा) पोपट, कमरगा; (स्त्रियांचें) घट्ट अंगरखें, चोळी इ. *W. band*,-*belt*, कमरपट्टा. *W. deep* or *high*, *aa.* & *advv.* कमरभर. -*waisted*, *a.*

Waist'coat, *n.* (वे'स्कोट्, वे'स्कट्)—a garment worn below a coat. बंडी, जाकीट.

Wait, *v. t.* & *i.* (वेट्)—*to defer an action*; wait for, await or abide; attend *upon*. खोळंबणें, थांबणें, खोळंबून राहणें; मार्गप्रतीक्षा करणें, वाट पाहणें; भेटीस जाणें; भेट घेणें; सेवाचाकरी करणें, जेवणाचे पदार्थ वाढणें. *n.* (*pl.*) band,-s of persons singing carols etc. from house to house at Christmas; (*sing.*) the act or time of waiting; ambush (*lie in w. for*). नाताळांत घरोघर गाणीं म्हणत फिरणारे खेळे; थांबणें, खोटी; लपून बसणें, दडून बसणें.

Wait'er, *n.* (वे'टर्)—an attendant (at the table); a tray. चाकर, हुजऱ्या, वाढपी, परिवेषक; ताट, थाळा. *Waitress*, *n. f.* स्त्री नोकर.

Waive, *v. t.* (वेव्)—to forgo, relinquish. सोडून देणें, सोडणें.-*r*, *n.* (*Law*) process of waiving a right or claim. (कायदेशीर) हक्क सोडणें, -सोडून देणें.

Wāke, *n.* (वेक्)—track left by a ship on water (*also fig.*). गलबत गेल्यानंतर मागें पाण्यांत दिसणारा त्याचा रस्ता. *In the w. of*, behind, following. पाठीमागें, मागून.

Wāke, *v. i.* & *t.* (वेक्)—to cease to sleep; rouse from sleep; be awake, not to sleep; cease or rouse from sloth etc.; rise or raise from the dead; hold wake over; disturb with noise, make re-echo. जागणें,

जागें करणें, झोंपेंतून उठवणें; जागें होणें,-असणें; आळस झाटणें; मेलेला जिवंत होणें,-उठणें,-उठवणें; पहारा करणें; आवाजानें शांततेचा भंग करणें, प्रतिध्वनि करविणें. *n.* anniversary of dedication of church kept by watching all night, fair in connection with this; (*Ir.*) watch by corpse, lamentations etc. चर्चचा वार्षिक जागरणोत्सव, जत्रा; (पुरण्यापूर्वी) प्रेतावर पहारा, विलाप इ.

Wāke'ful, *a.* (वे'क्-फुल्)—unable to sleep; watchful, vigilant, sleepless. निद्राविमुख; दक्ष, जागा, सावध.-*fully, adv.*

Wā'ken, *v. t. & i.* (वे'कन्)—to cease to sleep, wake up; make or become awake. उठणें; जागें होणें किंवा करणें.

Wale, Weal, *n.* (वेल्)—ridge raised on flesh by stroke of a rod or whip. काठीचा-चाबकाचा -वळ. *Wale-knot, wall-knot,* दोरी उचॅाळ होऊं नये म्हणून शेवटीं मारलेली गांठ. *v. t.* वळ उठविणें.

Wā'ler, *n.* (वे'लर्)—horse imported for Indian army from New South Wales. (न्यू साउथ् वेल्समधून हिंदी सैन्यांत आणलेला) घोडा.

Wāles, *n.* (वेल्स्)—the province in England. वेल्स प्रांत. *Prince of W.,* इंग्लंडच्या युवराजाचा किताब, युवराज.

Walk, *n.* (वॉक्)—gait or step; excursion on foot, stroll; track for foot-passengers. गति, चाल, चालणें; रपेट, फेरफटका, सहल; फिरण्याची जागा. *v. i. & t.* to travel or go on foot, pass over or through on foot; tread the floor or surface of; cause to walk with one. चालणें, चालत जाणें, पायीं जाणें; (वर) फिरणें, चालणें, जाणें, येणें; हलक्या चालीनें चालवणें, -हांकणें. *To go for, take a w.,* फिरायला जाणें, पायीं रपेट-सहल-करणें. *To w. off* or *away with,* carry off, steal. चोरणें, पळविणें, लांबवणें. *To w. the streets,* रस्त्यांतून भटकणें; वेश्येचा धंदा करणें. *To w. the hospitals,* be a medical student. वैद्यकीचा अभ्यास करणें. *To w. the boards,* be an actor. नाटकांत-नटाचें-काम करणें, नट होणें. *To w. the chalk,* रस्त्यांतून आंखलेल्या मार्गानें सरळ जाणें.

Walk'er, *n.* (वॉ'कर्)—In vbl. senses; a bird that neither flies nor swims. चालणारा, पादचारी; न उडणारा, न पोहणारा कोंबड्यासारखा पक्षी. 2. *int.* (*sl.*) अविश्वास-संशयदर्शक-उद्गारवाचक अव्यय.

Walk'ing, *pr. pa. & v. n.* (वॉ'किंग)—चालणें, पायीं जाणें. *W. dress,* for outdoor wear. बाहेर जाण्याचा पोषाख. *W. gentleman,-lady,* देखणा पण विशेष काम नसलेला नट,-ली नटी. *W. tour,* मजेखातर पायीं सहल.

Walk'-over, *n.* (वॉ'क्ओव्हर्)—easy victory. सहजीं मिळालेला डाव,-जय.

Wall, *n.* (वॉल्)—upright structure serving as defence of a town, side of a building etc. गांवकूस, तट, प्राकार, पोवळी, कूट, भिंत. *v. t.* to provide with a wall; block *up* with a wall, defend by walls. भिंत घालणें, बांधणें; घालून बंद करणें. *Party* or *partition w.,* दोन खोल्या, घरें, शेतें यांमधील पडदी; भिंत, मेरी. *W. of partition,* (*fig.*) line of division, gulf. मतभेदाची भिंत, पडदा. *Blank w.,* (दरवाजा किंवा) खिडकी नसलेली सुनी भिंत. *To run one's head against a w.,* attempt impossibilities. भिंतीवर डोकें हापटून घेणें, अशक्य गोष्टी साध्य करण्याचा प्रयत्न करणें. *To see through brick w.,* भिंतींतून आरपार पाहणें (अदृश्य-सूक्ष्म दृष्टीनें). *Ww. have ears,* भिंतीला कान असतात. *With* one's *back to the wall,* एकट्यानेंच लढणें, निरुपायानें. *The weakest goes to the w.,* चढाओढींत दुबळाच हरतो. *W.-creeper,* एक जातीचा पक्षी. *W. painting,* भित्तिचित्र, भिंतीवर रंगविलेलें चित्र. *W. paper,* भिंतीला चिकटविण्याचा शोभेचा कागद. *W. pepper,* kind of stone-crop. इंद्रकंद, इंद्रवट, इंद्राठी. *W. plate,* भिंतींत घसविलेलें घहालाच्या खालचें आडवें लांकूड. *W. washer,* डळमळत्या भिंतीचा टेकावा,-नेट. *W. less, a. Walled up,* वेष्टित.

Wa'llaby, *n.* (वॉ'लबि)—kinds of smaller kangaroo. लहान जातीचा कांगारू. *On the w.* (*track*), भटक्या, निरुद्योगी, बेकार.

Wallaroo', *n.* (वॉलरू')—kinds of larger kangaroo. मोठ्या जातीचा कांगारू. [Austral.]

Wa'llĕt, *n.* (वॉ'लेट्)—a bag for articles (such as food, &c.) to be carried on a journey, a small leather case, fishing-kit; flat case for holding paper money unfolded. पडशी, पिशवी, थैंग; चामड्याची लहान पिशवी; कागदी चलन ठेवण्याचें पैशाचें पाकीट.

Wall-eye, *n.* (वॉ'लाय)—diseased eye. पांढऱ्या बुबुळाचा (दृष्टिहीन) डोळा; कैरा-खैरा-डोळा.-*d, a.* कैऱ्या डोळ्याचा.

Wa'llow, *v. i.* (वॉ'लो)—to roll about (in mud, sand, &c.); (*fig.*) take gross delight *in.* लोळणें; व्यसनांत गर्क असणें. *n.* place to which buffaloes etc. resort to *w.* म्हशी, रेडे इ० यांची लोळण्याची जागा, खाजण. *To w. in money,* be very rich. संपत्तींत लोळणें

Wall Street, *n.* (वॉल् स्ट्रीट्)—the American money-market. अमे. (सं. संस्थानांतील) सराफकट्टा.

Wa'lnŭt, *n.* (वॉ'लनट्)—a handsome and valuable tree, an edible nut in pair of boat-shaped shells. अक्रोड (झाड, फळ), अक्रोट. *Over the ww. & the wine,* at dessert. सुखशुद्धीसाठीं दारू आणि अक्रोड.

Wal'rus, *n.* (वॉ'लरस)—kinds of large amphibious arctic long-tusked mammal, sea-horse. पाणघोडा, समुद्रघोडा (नासा).

Waltz, *n. & v. i.* (वॉल्ट्स्)—a dance in which partners progress gyrating round each other

in embrace; piece of *w.* music. 'वाल्स' नांवाचा वाटोळा नाच (नाचणें); अशा नाचाचें गाणें.

Wan, *a.* (वॉन्)—having a pale hue, pale as with illness; languid (of look); (arch.. of night, water) dark, black. फिकट; निस्तेज, म्लान; काळोखी, काळें.-*ly*, *adv.*,-*ness*, *n.*

Wand, *n.* (वॉन्ड्)—a long slender rod. काठी, छडी, कांडी (जादूगाराची).

Wa'nder, *v. i.* (वॉ'न्डर्)—to go from place to place without a settled plan; stray. भटकणें; वाट सोडून जाणें, वाहावणें, भ्रमणें, भकणें. *Wandering Jew*, ख्रिस्तानें भटकण्याचा शाप दिलेला भटक्या ज्यू; अस्थिर, भटक्या मनुष्य; वेलींची जात. *Wa'nderer*, *n.* भटक्या, प्रवासी. *Wander-lust*, *n.* (वॉ'न्डर्लुस्ट्), eager desire for travelling or wandering. प्रवासाची-भटकण्याची-हौस. *Wan'dering*, *n.* (*pl.*) प्रवास, भ्रमण;-*ly*, *adv.*

Wāne, *v. i.* & *n.* (वेन्)—(of moon) to decrease in size after the full; decline or fall off. लहान होत जाणें; क्षीण होणें, क्षय होणें, क्षय, ऱ्हास. *Is on the w*, declining. ऱ्हास होत आहे.

Wā'ngle, *v. t.* (वें'गल्)—to secure by dubious means; fake. आडमार्गानें मिळविणें; बनावट-खोटा-नाटा-करणें.

Want, *n.* (वॉन्ट्)—lack or need *of*, deficiency; poverty, indigence; desire. उणीव, न्यूनता; दारिद्र्य; गरज, जरूरी, इच्छा. *v. t.* & *i.* to be without, be insufficiently provided with; wish, long for; fall short of. उणीव किंवा कमतरता असणें; इच्छा असणें; तोटा असणें. *A man of few ww.*, त्याच्या गरजा फारच थोड्या आहेत, तो असेल त्यांत संतुष्ट आहे. *Is in w. of money*, पैशाची गरज आहे.

Want'ing, *prep.* (वॉ'न्टिंग)—without, minus, less. शिवाय, खेरीज, उणा, कमी. *Made a century w. one run*, त्यानें शंभराला एक धांव कमी, (९९) धांवा केल्या. *a.* गैरहजर, अनुपस्थित, कमी (पडणारा).

Wa'nton, *a.* (वॉ'न्टन्)—sportive, capricious; luxuriant, wild; unchaste; purposeless. खेळकर, धागडणारा, विलासी, स्वच्छंदी; आनंदी, रंगेल; व्यसनी, कामी; निर्हेतुक. *n.* a lascivious or unchaste person. कामासक्त किंवा व्यसनी मनुष्य, (स्त्री, पुरुष). *v. i.* खेळणें, धागडणें, दुरंगळणें, मौज करणें; व्यभिचार-स्वैरवर्तन-करणें.-*ly*, *adv.*, -*ness*, *n.* मजा, गंमत, फाजा; स्वच्छंदीपणा; स्वैराचार.

Wa'pity, *n.* (वॉ'पिटि)—N. Amer. stag. उत्तर-अमेरिकेंतील काळवीट.

War, *n.* (वॉर्)—a quarrel usually between nations conducted by armed force; (*fig.*) hostile relations between persons. युद्ध, संग्राम, लढाई; वैर, शत्रुत्व. *v. i.* & *t.* to make *w.*; bring or beat down by *w.* युद्ध करणें; युद्ध करून-लढून-जेर करणें, जेरीस आणणें; पादाक्रांत करणें. *Civil w.*, यादवी, आपापसांतील युद्ध. *Private w.*, खाजगी भांडण, द्वेष. *Holy w.*, धर्मयुद्ध. *To make* or *wage war*, युद्ध सुरू करणें. *To be at w.*, शत्रुत्वानें वागणें. *W. to the knife*, विकोपास गेलेलें भांडण. *Trade of w.*, शिपाईगिरीचा पेशा. *The dogs of war*, (poet.) havoc attending war. युद्धांतील-नंतर-होणारी-हानि. *W. of the elements*, पंचमहाभूतांचा क्षोभ. *W. cry*, युद्धाचा संकेत शब्द. *W. god*, मंगळ, युद्धदेवता. *Warring*, *part.* rival प्रतिस्पर्धी.

War'ble, *v. i.* & *t.* (वॉ'र्बल्)—to sing in gentle continuous trilling manner, sing musically. लकेरी मारणें; छेडणें, आळवणें, गाणें. *n.* गाणें, लकेर.-*r*, *n.* गाणारा, लकेर मारणारा; सुंदर गाणारा पक्षी.

War'ble, *n.* (वॉ'र्बल्)—a hard lump on horse's back from galling of saddle; tumour. खोगिर घसटून घोड्याच्या पाठीला आलेलें टेंगूळ; टेंगूळ, उठाणूं.

Ward, *n.* (वॉर्ड्)—custodianship, custody: minor under care of guardian; division in a prison, hospital or work-house; administrative division of a city; (*pl.*) notches and projections in key and lock to prevent opening by wrong key. रक्षण, रखवाली; अज्ञान, पाल्य, पालकाच्या ताब्यांतला; तुरुंग, हॉस्पिटल किंवा कारखान्यांतील खण, खोली, दालन; पुरा, मोहला, पेठ, विभाग; किल्ली आणि कुलूप यांतलि (दुसऱ्या किल्ल्या लागूं नये म्हणून) विशेष खांचाखोचांची रचना. *v. t.* to protect (chiefly of God); parry (a blow); keep *off* danger, etc. सांभाळ-रक्षण-करणें; टाळणें, चुकवणें; निवारण करणें. *To keep watch & ward*, पाहरा करणें. *Court of ww.*, अज्ञानपालकखातें. *W. room*, लढाऊ जहाजावरील अधिकाऱ्यांची जेवणाची खोली,-मेसखाना. *W. ship*, tutelage, guardian's care. पालकत्व, पालकाचें काम.

War'den, *n.* (वॉ'र्डन्)—a president or governor; (*arch.*) a watchman, a sentinel. अध्यक्ष, मुख्य अधिकारी, रखवालदार. 2. kind of cooking pear. शिजविण्याजोगे पेअर जातीचें फळ.-*ship*, *n.* पालकत्व अध्यक्षपद. (*Air*) *warden*, वैमानिक हल्ल्याच्या वेळीं लोकांना मदत करणारा निमलष्करी अधिकारी.

War'der, *n.* (वॉ'र्डर्)—a jailor; a sentinel (arch.); (*Hist.*) staff of authority. तुरुंगावरचा अधिकारी; पाहारेकरी, पालक; अधिकारदंड,-काठी.

Ward'rōbe, *n.* (वॉ'र्ड्-रोब्)—a place where clothes are kept; a person's stock of clothes. कपडे ठेवण्याची जागा, जामदारखाना; कपड्याचा संग्रह. *Wardrobe dealer*, dealer in secondhand clothes. जुन्या कपड्यांचा व्यापारी.

Wāre, *n.* (वेअर्)—(*pl.*) what one has for sale, articles of merchandise. विक्रीचा माल, विकाऊ माल, चिनीमातीचीं भांडीं. *China w.*, चिनी मातीचीं भांडीं. *Hard w.*, लोखंडी सामान,-माल.

Wāre'house, *n.* (वे'अर्हाउस्)—a building in which goods are stored or shown for sale. वखार, कोठी. *v. t.* (-हाउझ्) to store goods. वखारींत माल साठविणें. -*man*, *n.* वखारवाला.

War'fare, *n.* (वॉ'र्‌फेअर्)—military service, state of war, campaigning. युद्धावस्था, युद्ध, स्वारी, संग्राम,

War'like, *a.* (वॉ'र्‌लाइक्)—martial, military; threatening war. रणशूर, लष्करी, युद्धविषयक; लढाईची भीति दाखविणारा.

War'lŏck, *n.* (वॉ'र्‌लॉक्)—a sorcerer. जादूगार, चेटक्या.

Warm, *a.* (वॉर्म्)—moderately hot; fit to keep the wearer warm; hearty, excited, affectionate. ऊन; गरम; उत्साहाचा, प्रेमळ. *v. t.* to make warm. ऊन करणें, तापवणें, शेकणें, चेतवणें. *W. blood*, (जिवंत माण्यांचें) उष्ण-सळसळणारें-रक्त; कामुकता, रंगेल स्वभाव;*-ed*, *a. A w. heart*, प्रेमळ, सहानुभूतिपर, -मन. *To w. person* or *his jacket*, thrash him. एखाद्याला झोडपून काढणें, मार देणें.*-ing*, *n. Warming -pan*, शेकण्याची दंगडी; (*fig.*) (वयांत न आलेल्या दुसऱ्याकरितां राखून ठेवलेल्या जागेवर नेमलेला) तात्पुरता मनुष्य,-अधिकारी.

Warm'-hearted, *a.* (वॉ'र्म्‌-हार्टेड्)—of affectionate or sympathetic disposition. मायाळू, जिव्हाळ्याचा, प्रेमळ.*-ly, adv,-ness, n.*

Warmth, *n.* (वॉर्म्थ्)—warmness; zeal. उष्णता, ऊनपणा, ऊब; उत्सुकता, उत्साह, कळकळ, आवेश.

Warn, *v. t.* (वॉर्न्)—to make aware *of*; put on guard *against*; admonish by way of caution or threat. सूचना देणें; पूर्वी सुचविणें, आगाऊ सावध करणें; ताकीद देणें, धजावणें, सांगून ठेवणें.

War'ning, *n.* (वॉ'र्निंग्)—what is said or done to warn a person; an event that serves to warn. ताकीद, सांगी, बजावणें; सूचना, इशारा; पूर्वबोधन, पूर्वसूचना,-सूचक गोष्ट. *To give* (master, servant) *w.*, नोकरी सोडण्याबद्दलची आगाऊ सूचना.

Warp, *n.* (वॉर्प्)—threads stretched in loom to be crossed by woof; crooked state produced in timber etc.; mental bias; sediment or alluvial deposit. उभी वीण, उभें सूत, ताणा, उभवण; बांक, बांक; मनाचा कल किंवा ओढा, तेढ, वांकडेपणा; (गढूळ पाण्यांतील) बसलेला गाळसाळ. *v. t.* to make or become crooked or perverted, bias; (Naut.) haul ship by a rope attached to fixed point; fertilize by inundating with *w.* वांकविणें, वांकडा करणें; बहकविणें; (गलबत) दोरीनें ओढणें; गाळानें जमीन सुपीक करणें.

Wa'rrant, *n.* (वॉ'रन्ट्)—a thing that bears one out in doing something; an authorization, esp. in writing, to receive money, carry out arrest or distress, represent principal in law-suit. हमी, खात्री, प्रमाण; लेखी अधिकारपत्र, पकडण्याचा लेखी हुकूम, आरोपीचें वकीलपत्र दाखल करणें, इ. *v. t.* to serve as a warrant for; bear out, guarantee (goods). हुकूम देणें; हमी घेणें; (आपल्या मालाविषयीं) खात्री देणें.*-ed*, *a.* हमी दिलेला, खात्रीचा.*-er, n.,-or,-n.* हमी-खात्री देणारा.*-ee, n.* हमी दिलेला मनुष्य.

Wa'rrantable, *a.* (वॉ'रन्टेबल्)—that can be warranted; legitimate, justifiable. समर्थनीय; न्याय्य. *W. stag*, of an age to be hunted. शिकार करण्याला योग्य वयाचें-वाढलेलें-काळवीट.

Wa'rranty, *n.* (वॉ'रन्टि)—authority or jusification (*for*); (Law) guarantee. सनद पुरावा, आधार, खातरीपत्र, हमी.

Wa'rren, *n.* (वॉ'रन्)—piece of ground where rabbits are kept or abound. ससे पाळण्याचें रान. *Like rabbits in a w.*, of thick population. अतिवस्तीची-गर्दीची-जागा.

Wa'rrior, *n.* (वॉ'रिअर्)—a distinguished or veteran soldier; a fighting man; (of savages) a fighting man. कसलेला शिपाई; योद्धा; लढाऊ क्रूर रानटी मनुष्य. (attrib.) martial. लढवय्या. *W. ant*, ant of kinds that make slaves of other species. लढाऊ जातीची मुंगी. *The Unknown W. or Soldier*, देशाच्या स्वार्थत्यागाचा द्योतक असा युद्धांत मरून पडलेला अज्ञात योद्धा, -सैनिक.

Wart, *n.* (वॉर्ट्)—small excrescence on the skin; *protuberance on the tree-trunk.* चामखीळ; गुंज. *To paint* one *with his warts*, without concealment of blemishes. दोष-व्यंगें -न लपवितां एखाद्याला खऱ्या स्वरूपांत दर्शविणें. *-y, a.* चामखीळ असलेला.

Wār'y̆, *a.* (वे'अरि)—cautious, circumspect; on the lookout for danger. सावध, दक्ष; मागें पुढें पाहून वागणारा.*-rily, adv.* सावधपणानें.*-riness, n.* सावधपणा, हुशारी, धोरण.

Wash, *v. t. & i.* (वॉश्)—to cleanse with liquid; (*fig.*) purify; take (stain etc.) *out* or *off* or *away* by washing; bear washing without loss of colour; moisten; touch with waters; sift (ore) by action of water; brush thin coating of watery colour over, coat thinly with gold etc. धुणें, धुऊन टाकणें, पाण्यानें साफ करणें; शुद्ध-पवित्र-करणें; धुऊन (डाग इ०) काढणें; रंग न जातां धुतला जाणें; भिजविणें; (किनारा) धुऊन काढणें, (किनाऱ्याला) पाणी लागणें; (पाण्यानें) धातू साफ करणें; पातळ पाण्याच्या रंगाचा हात देणें,-मुलामा काढणें. *n.* washing; lotion or liquid cosmetic; thin coat of liquid colour applied to paper or wall; thin or weak or inferior liquid food; (*fig.*) twaddle. धुणें; धुण्याचें औषध; रंगाचा पातळ हात; पेजवणी, ढेपवणी; वटवट, बहकणें. *To w.* one's *hands* (*of*), (*fig.*) decline responsibility. जबाबदारी टाळणें, अंगावाहेर टाकणें. *To w. up*, खरकटीं भांडीं घासून धुऊन स्वच्छ करणें. *Must w. before dinner*, जेवणापूर्वी हात, पाय, तोंड,-धुतलें पाहिजे, स्नान केलें पाहिजे. *Washes for a living*, धोब्याचा-धुणीं धुण्याचा-धंदा करतो. *Won't w.*, (fig. of argument) stand examination. मुद्दा टिकणार नाहीं, कसोटीस उतरणार नाहीं.

Washed out, (*fig.*) enfeebled, demoralized. दुर्बल-निःसत्त्व-बनलेला. *The w.,* परीट-धुणें. *W.-boiler,* कपडे शिजविण्याची कढई. *W. bottle,* apparatus for purifying gases etc. by passing through liquid. वायु स्वच्छ करण्याचें उपकरण,-बाटली. *W. day,* भट्टीचा दिवस. *W. out,* (army sl.) complete failure, esp. to hit target, fiasco. बंदुकीचा नेम चुकणें, फजिती *W. stand, W. hand stand,* हात-तोंड धुण्याचें साहित्य ठेवण्याची जागा,-स्टँड. *W. tub,* कपडे धुण्याचें पिंप, लांकडी घमेल.

Wash'er, *n.* (वॉ'शर्)—In vbl. senses; a flat ring or perforated piece used to give tightness. धुणारा; वायसर, घट्ट बसविण्याचें चपटें कडें.

Wash'erman, *n.* (वॉ'शर्मन्)—a man who washes clothes. धोबी, परीट. (Also, Washer).

Washer-woman, *n.* (वॉशर्-वुमन्)—a laundress. परटीण.

Wash'y, *a.* (वॉ'शि)—(of liquid food etc.) too watery, insipid, weak; (of colour) faded-looking; (of style etc.) diffuse, feeble. पाणचट, पचपचीत, मिळमिळीत; फिकट, फिका; पिळपिळीत, पुचाट, ओजोहीन.-*shily, adv.,-shiness, n.*

Wasp, *n.* (वॉस्प्)—a winged insect with venomous sting; spiteful person. गांधीलमाशी, कुंभारीण; दीर्घद्वेषी. *Has a waist like a wasp's,* (गांधीलमाशीच्या सारखी) पातळ कमर आहे; तनुमध्यमा.-*ish, a.* irritable, ill-tempered. चिडखोर, चिरडखोर;-*ly, adv.,-ness, n.*

Wass'ail, *n.* (वॉ'सल्, वॅ'-)—(arch.) a festive occasion, drinking bout; a spiced ale. उत्सव, आनंदाचा सण, मद्यपानाचा धिंगाणा; मसालेदार दारू. *v. i.* to make merry, hold festivities. उत्सव-मजा-चैन करणें.

Wast, *v.* (वॉस्ट्)—*pa. t.* 2nd sing of Be. होतास-तीस-तेंस.

Wās'tage, *n.* (वे'स्टिज्)—loss by waste. घस, घट, घटती, तूट.

Wāste, *a.* (वेस्ट्)—not inhabited or cultivated; superfluous; left over; (*fig.*) monotonous. ओस, पडीत; अधिक, जास्त, टाकाऊ, रद्दी, गाळसाळ; निरर्थक, विशेष गोष्टी न घडलेला (काळ). *v. t. & i.* to lay waste; squander; dwindle or pine. ओसाड करणें; उधळणें; खंगणें; रोडावणें. *n.* barren expanse of ground; extravagance; wanton destruction. जंगल, रान; उधळपट्टी; नासधुस, नाश, ऱ्हास. *To lay w.,* ravage. उजाड करणें. *To lie w.,* be uncultivated. (जमीन) ओस, पडीत-पडणें,-राहणें. *W. land,* ओस-पडीत-जमीन. *W. products,* useless by-products. गाळ-साळ-टाकाऊ-माल. *W. paper,* निरुपयोगी कागदपत्र,-पुस्तकें इ० *W. breath* or *words,* talk uselessly. वायफळ बडबड करणें, शब्द फुकट घालविणें. *A w. of waters,* unbroken expanse of sea. विशाल पसरलेला समुद्र, पाणीच पाणी. *Wilful w. makes woeful want,* उधळपट्टी केली कीं भयंकर चणचण भासते. *To run to w.,* be wasted. (पाणी इ०) वाहून फुकट जाणें. *W. basket,* केराची टोपली. *W. paper basket,* केराची कागदाच्या कपट्यांची टोपली. *W. book,* in book-keeping, कच्ची नोंद. *W. pipe,* (सांडपाण्याचा) नळ. *W.-ful, a.* extravagant, given to waste. उधळ्या, उधळपट्टीचा, हानिकारक;-*fully, adv.,-fulness, n.,-less, a.*

Wā'ster, *n.* (वे'स्टर्)—In vbl. senses; an article spoilt in making; (*sl.*) a person whose existence is regrettable. क्षीण करणारा, उधळ्या; नासलेला बिघडलेला (कारखान्यांतील) माल; असून नसून सारखा मनुष्य.

Wā'strel, *n.* (वे'स्ट्रल्)—a thing spoilt in making; a stray child; good-for-nothing fellow; a wasteful person. बिघडलेला माल; चुकार-भटकें पोर; निरुपयोगी मनुष्य; उधळ्या मनुष्य.

Watch, *n.* (वॉच्)—wakefulness at night; state of being on the look-out for something; attention, vigilance; (*hist.*) watchman; one of the divisions of the night; a timepiece for carrying on the person; four-hour spell of duty on board ship. रात्रीचा जागर; पहारा; लक्ष; पहारेकरी; रात्रीचा एक भाग; खिशांतील-मनगटावरील-घड्याळ; (जहाजावरील) ४ तासांची पाळी, पहारा. *v. t. & i.* to be vigilant; keep a watch. सावध असणें; पहारा करणें. *On the w.,* जागरूक, जागृत. *Dog-w.,* (गलबतावरील) २ तासांचा पहारा, पाळी. *W. dog,* पहाऱ्याचा कुत्रा. *W. man,* पाहरेकरी. *W. tower,* पहाऱ्याचा-टेहेळणीचा-बुरूज. *W. word,* पहाऱ्याचा-परवलीचा शब्द, परवल; ब्रीदवाक्य, ध्येयवाक्य, एखाद्या गोष्टीची आतुरतेनें वाट पाहात असतां वेळ कशी जावेसें वाटणें.

Wa'tchful, *a.* (वॉ'च्-फुल्)—vigilant; on the watch, heedful, observant, cautious. जागरूक; सावध.-*fully, adv.,-ness, n.*

Wa'ter, *n.* (वॉ'टर्)—liquid compound of oxygen and hydrogen; the degree of brilliance and transparence. पाणी, तेज. *v. t. & i.* to sprinkle or adulterate or dilute with water; provide or fill (horse, engine, &c.) with water; give drink of *w.* to, go to pool etc. to drink; take in supply of *w.*; secrete or run with *w.*; increase (capital) by issue of new shares. पाणी घालणें; पाणी पुरवणें; (जनावराला) पाणी पाजणें, दारविणें, (तळ्यावर इ.) पाणी प्यायला जाणें; पाणीपुरवठा घेणें; (डोळे) पाण्यानें डबडबणें,-भरणें, पाणी येणें, (तोंडाला) पाणी सुटणें; नवीन हिस्सा (शेअर) काढून कंपनीचें भांडवल वाढविणें. *Red w.,* bloody urine. (रक्तासारखी) लाल लघवी,-मूत्र. *In smooth w.,* going easily. सुखानें, सुखांत, विन अडचणीनें. *On the w.,* in boat or ship. गलबतांतून. *By w.,* जलमार्गानें. *In deep w.* or *ws.,* in great difficulties. मोठ्या अडचणींत, संकटांत, दुःखांत. *Still ws. run deep,* खोल पाणी गंभीर असतें, बाहेरून शांतता पोटांत भावनेची,-ज्ञानाची,-बुद्धिमत्तेची खोली

(लपवूं शकते), cf. उथळ पाण्याला खळाळी फार. *To get into, be in, hot w.*, अविचारानें संकट इ. ओढवून घेणें. *To keep* one's *head above w.*, (*fig.*) avoid financial ruin. दिवाळें वाजूं न देणें, बुड येऊं न देणें. *The ww.*, the sea. सागर, समुद्र. *To pour oil on the ww.*, भांडणतंटा मिटविणें, शांत करणें. *To spend money like w.*, पाण्यासारखा पैसा खर्च करणें (उधळणें). *To make, pass, w.*, लघ्वी करणें. *W. of life*, आध्यात्मिक ज्ञान. *Ww. of forgetfulness*, oblivion, death. पाताळांतलि लीथ नदी, विस्मरण, मृत्यु. *High w.*, भरती, समा. *Low w.*, निखार, ओहोट. *In low w.*, (*fig.*) in depressed condition. (पैशानें) खालावलेला. *Of the first w.*, of finest quality. उत्कृष्ट, पाणीदार. *W. borne*, (of goods) जलवाहतुकीनें नेलेला (माल). *W. colour.*, पाण्यांत मिसळणारा रंग. *W. finder*, dowser. पानाड्या, पाणी शोधून काढणारा. *W. fowl*, पाणकोंबडें, जलकुक्कुट. *W. line*, जहाजाला पाण्याचा पृष्ठभाग स्पर्श करतो ती जलरेषा, कागदावरील पाणरेषा. *W. main*, पाण्याचा मुख्य मोठा नळ. *W. man*, होडीवाला, वल्हेकरी. *W. mark*, (कागद उजेडाकडे धरला असतां दिसणारी) कागदांतील रेषा, खूण इ., *v. t.* (अशी) खूण करणें. *W. mill*, पाणचक्की. *W. monkey*, पाण्याचा खुजा. *W.-motor*, रहाट, पाण्यावर चालणारें यंत्र. *W. nymph*, जलाप्सरा. *W. parting*, जलविभाजक क्षेत्र. *W. pillar*, इंजिनाला पाणी घेण्याचा नळ. *W. power*, जलशक्ति. *W. side*, समुद्रकिनारा, नदीतीर. *W. snake*, पाणसाप. *W. works*, पाणी-पुरवठाखातें, नक्षीदार कारंजें; *to turn on the water works*, (*sl.*) shed tears. अश्रु गाळणें. *W. less*, *a.*, *W. y*, *a.* जलमय; पाण्यानें भरलेला, पाणी गळणारा (डोळा); पाणचट; पचपचीत, नेभळट (लेखन शैली); फिक्का-फिकट-(रंग); पर्जन्यसूचक; *Wa'teriness*, *n.*

Wa'ter-bŭffalo, *n.* (वॉ'टर्-ब'फलो)—the common domestic Indian buffalo. रेडा, म्हैस.

Wa'terfall, *n.* (वॉ'टर्फॉल्)—steam falling over precipice, cascade. धबधबा, धोत, जलप्रपात.

Wa'ter-mĕlon, *n.* (वॉ'टर्मेलन्)—elliptical smooth kind of melon with watery juice. कलिंगड.

Wa'ter-proŏf, *a.* (वॉ'टर्-प्रूफ्)—so firm and compact as not to admit water. आंत पाणी न येईल असा (करणें).

Wa'tertight, *a.* (वॉ'टर्-टाइट)—so tightly closed as to prevent ingress or egress of water. पाणी आंतून बाहेर व बाहेरून आंत न येईल इतका घट्ट, पाणीबंद. *W. compartment*, (*fig.*) keeping of subjects entirely separate. निरनिराळे विषय पृथक् पृथक् ठेवणें.

Watt, *n.* (वॉट)—unit of electric power. एक आम्पीअर (ampere) तीव्रता असणाऱ्या विजेच्या चालकशक्तीच्या एका व्होल्टनें केलेलें काम, वाट. *W. meter*, *n.* [J. Watt, engineer, d. 1819]

Watt'le, *n.* (वॉ'टल्)—rods or twigs interlaced as material for fences, walls etc.; a wicker hurdle. काठ्याची-डहाळ्यांची गंधण; ताटी, गांठण, गंधण. *Wall of w. & dab*, कूड. *v. t.* गांठणें, विणणें; कूड घालणें. 2 *n.* fleshy appendage on head or throat of birds. तुरा, कल्ला; *-d*, *a.*

Waul, *v. i.* (वॉल्)—to cry like a cat. मांजरासारखें ओरडणें, केंकाटणे.

Wāve, *v. t.* & *i.* (वेव्ह्)—to show motions like those of a flag in the wind; impart waving motion to. हालणें, हालवणें; फडफडणें, परजणें. *n.* a ridge of water raised above the level of the surface; a wavy line or surface; a signal made by waving the hand. लाट, लहरी, ऊर्मि, मौज; लाटेची रेषा; हात हालवणें. *W. less*, *a.*, *W. let*, *n.*

Wā'ver, *v. i.* (वे'व्हर्)—to be undecided; oscillate unsteadily; to hesitate. हेलकावे खाणें; घोंटाळणें; कांकूं करणें.*-er*, *n.*,*-ingly*, *adv.*

Wā'vy̆, *a.* (वे'व्हि)—undulating; showing alternate contrary curves. लाटांनीं हालणारा, नागमोडीचा, लाटेसारखा, लहरीरूप. 2. snow goose. आर्क्टिक हंसी (पक्षी).

Wăx, *v. i.* (वॅक्स्)—to grow or become larger. मोठा होणें, कलाकलांनीं वाढणें, वृद्धि होणें,-पावणें. *n.* the plastic substance secreted by bees. मेण. *v. t.* मेण लावणें, मेणानें सारवणें.

Wăx, *n.* (वॅक्स्)—fit of anger. रागाचा झटका.

Wăx'en, *n.* (वॅ'क्सन्)—made of, resembling, wax. मेणाचा, मेणासारखा, मऊ, लवचीक.

Wăx'y *a.* (वॅ'क्सि)—resembling wax; (*sl.*) angry, quick-tempered. मेणासारखा, लवचीक, मऊ, बिळबिळीत; रागीट, तापट स्वभावाचा.

Way, *n.* (वे)—a road or track for passing along; course, route; method or plan for attaining an object; travelling distance; unimpeded opportunity of advance; specified direction; custom, manner of behaving; scope, sphere, range, branch of business; progress; condition, assumption, state, degree. रस्ता, वाट; गति, मार्ग; तऱ्हा, प्रकार, शैली; मजल, पल्ला, टप्पा, मार्ग, मोकळीक, जागा; बाजू, दिशा; वहिवाट, रीत, सरणी, सोय; वाव, धंदा; प्रगति; स्थिति. *Milky w.*, आकाशगंगा. *To go the w. of all the earth, of all flesh, of nature*, die. मरणें. *To pave the w. for*, मार्ग मोकळा करणें, मनें तयार करून ठेवणें. *To find one's or the way*, इच्छित स्थळ गांठणें. *Parting of the ww.*, time for momentous decision. महत्त्वाच्या निर्णयाची वेळ,-चा प्रसंग. *Out of the w.*, आडवळणी, आडबाजूस. *To give w.*, हार जाणें, वाकणें; मोडणें; शोकवश होणें; भाव उतरणें. *To make one's way*, स्वतःच्या हिंमतीवर मार्ग काढणें. *On the w.*, वाटेंत, मार्गांत. *By the w.*, प्रवासांत, (*fig.*) incidentally. सहज, जातां जातां. *Every w.*, चारा वाटा, चहूंकडे. *Ways*, चालचलणूक, रीतभात. *To be under w.*, (गलबत) चालू होणें,-असणें. *To make w.*, प्रगति करणें. *By w. of*, ऐवजीं, बद्दल. [Sk *vaha*, carry]

Way'fārer, *n.* (वे'फेअरर्)—one who travels, a traveller (esp. on footway), a foot-passenger.

वाटसरू, पांथस्थ. *Way-faring, pr. pa. a.* वाट चालणारा, प्रवाशी.

Way'lay, *v. t.* (वे'ले)—to lie in wait for (esp. to rob or interview). रस्त्यांत पाळत ठेवणें, वाट मारणें.*-laid, pa. t. & pa. p.*

Wayside', *n.* (वेसा'इड्)—side of road (esp. attrib.). रस्त्याची बाजू,-च्या बाजूची,-वरील.

Way'ward, *a.* (वे'वर्ड्)—full of troublesome whims, childishly self-willed, capricious. स्वच्छंदी, लहरी, हट्टी, छांदिष्ट.*-ly, adv.,-ness, n.* स्वच्छंदीपणा.

Wayworn, *a.* (वेवोर्न्)—tired with travel. प्रवासानें थकलेला.

We, *pron.* (वी, वुई)—*pl.* of I. आम्ही, आपण (राजेलोक, वर्तमानपत्राचे संपादक व एखाद्या समाजाचा प्रतिनिधि म्हणून बोलणारा वक्ता I मी ऐवजीं We आम्ही चा उपयोग करतात, आदरार्थी अनेकवचन).

Weak, *a.* (वीक्)—wanting in physical strength or power or number. अशक्त, दुर्बळ, निर्जीव; संख्येनें कमी. *W. vessel,* (*fig.*) an unreliable person. अविश्वासू मनुष्य. *The weaker sex,* woman. स्त्रीजात, अबला. *W. knees,* (*fig.*) inability to stand firm, want of resoluion. मनाचा डळमळीतपणा, अनिश्चयी-चंचल-स्वभाव. *W. kneed, a. W. sight, eyes,* अधू दृष्टि, नजर, डोळे. *The market was w.,* slack. बाजारांत मालाला मागणी नसणें, उठाव नसणें, मंदी. *W. evidence,* पोकळ-फुसका-पुरावा. *W. tea,* पचपचीत चहा. *W. -ish, a. W. ly, adv. & a.*

Weak'en, *v. t. & i.* (वी'कन्)—to make or become weak; enervate, enfeeble. अशक्त, होणें; दुर्बळ करणें.

Weak'ling, *n.* (वी'क्लिंग)—a feeble person etc. अशक्त-कमजोर-दुबळा मनुष्य, मूल इ.

Weak'ness, *n.* (वी'क्नेस्)—infirmity; weak point; inability to resist temptation; foolish liking *for.* अशक्तता; दोष, न्यून; कमकुवतपणा; मूर्खपणाची आवड.

Weal, *n.* (वील्)—welfare; happiness. कल्याण; सुख. *W. & woe,* सुख आणि दुःख. *W. or woe,* सुख किंवा दुःख.

Weal, *n.* (वील्)—a mark on the skin by the stroke of a cane. छडीचा वळ.

Wealth, *n.* (वेल्थ्)—material possessions, affluence, riches; abundance. धन, संपत्ति, द्रव्य; समृद्धि, विपुलता.

Wea'lthy, *a.* (वे'लिथ)—rich; opulent. श्रीमंत; मातबर.*-thily, adv.,-thiness, n.* श्रीमंती, सधनता, समृद्धि.

Wean, *v. t.* (वीन्)—to induce (suckling) to feed otherwise than from the breast; to cure *of* or rescue *from* habit. अंगावर प्यायचा सोडणें; संवय टाकविणें. *W.-ling,* अंगावर पिण्याचें सुटलेले मूल, थानतुटें मूल, -वासरू.

Wean, *n.* (वीन्)—(Sc.) a child मूल.

Wea'pon, *n.* (वे'पन्)—an instrument or implement for inflicting bodily harm; means employed in any conflict. हत्यार, शस्त्र; साधन.

Wear, *v. t. & i.* (वेअर्)—to carry or exhibit on one's person; injure appearance or efficiency of by wearing or using; sap the energy of; have lasting quality. घालणें, अंगावर घेणें, धारण करणें, अंगांत घालणें, नेसणें; वापरून टाकणें, झिजवणें; शक्तिभंग करणें; टिकणें. *n.* wearing, use as clothes; fashionable apparel; damage sustained as result of ordinary use; capacity for resisting wear and tear. कपडे घालणें,-वापरणें; योग्य वस्त्र, शिष्टसंमत वस्त्र; झीज, वापर; टिकण्याची शक्ति, टिकाऊपणा.

Wear, *v. t. & i.* (वेअर्)—(*pa. t. & pa. p. Wore*) (*naut.*) to bring (ship), come, about by putting up of helm. सुकाणूनें गलबत वळविणें,-वळणें.

Wear, *n.* (वीअर)—a weir. नदीचें धरण.

Wear'iness, *n.* (वि'अरिनेस)—fatigue, langour, tedium, impatience. थकवा, शीण, कंटाळा, त्रास.

Wear'isome, *a.* (वि'अरिसम्)—causing weariness, tedious; monotonous. त्रासदायक; कंटाळवाणा. *-ness, n.*

Wear'y, *a.* (वि'अरि)—tired or tiring; sick or impatient *of*; tiring, tedious, irksome. दमलेला, कंटाळलेला, श्रमाचा; वीट आलेला, त्रस्त; कंटाळवाणा. *v. t. & i.* to tire. दमवणें, कंटाळा आणणें.*-rily, adv.*

Weas'el, *n.* (वी'झल्)—a small nimble carnivorous beast akin to the pole-cat. एक चपळ मांसभक्षक पशु. *To catch a w. asleep,* deceive wide-awake person. सावध-जागृत-माणसाला फसविणें. *W. faced,* वीझलसारख्या बारीक चुणचुणीत चेहऱ्याचा.

Wea'ther, *n.* (वे'दर)—state prevailing of such natural conditions as temperature, sunshine, wind and rain. हवा, वायुमान, हवामान. *v. t.* to expose to air; be discoloured or worn; get to windward of; come safely through. हवेवर टाकणें; हवेनें रंग जाणें,-बिघडणें; वाऱ्याच्या बाजूला (जहाज) हाकारणें; निभावणें, पार पडणें. *April w.,* ऊन पाऊस अशी हवा; (*fig.*) हास्य आणि अश्रु. *King's* or *Queen's w.,* दरबारी वेळीं असलेली चांगली हवा. *Under stress of w.,* owing to storms etc. वादळी हवेच्या तडाख्यांत. *To make good* or *bad w.,* (naut.) meet with. बिघडलेली-वादळी-हवा किंवा चांगली हवा (गलबताला) मिळणें. *To make heavy w. of,* (*fig.*) find trying. कसोटी लागणें, कष्टदायक वाटणें. *Under the w.,* (*sl.*) in adversity. आपत्काळांत, पडत्या काळांत, संकटांत. *W. bound,* वाऱ्या-वादळामुळें अडकून राहिलेलें (जहाज.) *W. box,* w.-indicator with figures of man and woman the former issuing to foreshow rain, the latter fine weather.

(पावसाळी हवा असल्यास पुरुषाचें व चांगली हवा असल्यास स्त्रीचें चित्र पुढें येतें अशी) हवादर्शक पेटी. *W. bureau,* हवामानखातें. *W. chart,* वाऱ्याचा -हवामानाचा-नकाशा. *W. forecast,* हवामानाचा अंदाज. *W. glass,* barometer. वायुभारमापक यंत्र. *W. station,* हवामानदेहळणीचें ठिकाण. *W. worn,* हवेनें-वादळानें-झिजलेला.

Wea'ther, *a.* (वे'दर्)—(naut.) windward. वाऱ्याकडचा, घोसाकडचा. *To keep* one's *w. eye open,* (*fig.*) be on the lookout. टेहळणी-पहारा-करणें. *W.-ly, a.*

Wea'ther-beaten, *n.* (वे'दर्-बीटन्)—seasoned or injured by exposure to storms. वादळी हवेनें झोडपलेला, वादळी हवेंत निढावलेला, ऊनपाऊस खाल्लेला.

Wea'thercŏck, *n.* (वे'दर्-कॉक्)—revolving metal bird or other pointer showing whence the wind blows; (*fig.*) changeable person, a fickle inconstant person. पवन-वात-कुक्कुट, वाऱ्याचा रोंख दाखविणारें यंत्र; अस्थिर बुद्धीचा मनुष्य.

Weave, *v. t. & i.* (वी'व्)—to form fabric by interlacing threads; work up. विणणें, सजवणें, बनवणें. *n.* style of weaving. वीण (प्रकार).

Weav'er, *n.* (वी'व्हर्)—a loom-worker; *a w. bird.* कोष्टी, विणकरी; सुंदर घरटें विणणारा सुगा पक्षी.

Wĕb, *n.* (वेब्)—woven fabric; cobweb, threads spun by a spider; membrane joining toes of water-birds or bats; connective tissue; large roll of paper; thin flat part connecting more solid parts in machinery; vane of feather. विणलेली वस्तु, सणंग; कोळ्याचें जाळें; (बदकांच्या) पायाचीं नखें जोडणारें कातडें; संधायक धातु; (वर्तमानपत्रें छापण्याच्या) कागदाची मोठी गुंडाळी; यंत्रांतील मोठ्या भागांना जोडणारा पातळ सपाट भाग; पिसाचा भाग. *Webbed, a.*

Wĕb'bing, *n.* (वे'बिंग्)—a stray narrow fabric; stronger edging of more delicate fabric. जाड कापडाचा पट्टा; तलम कापडाची किनार,-कांठ.

Wĕb-foot'ĕd, *a.* (वेब्-फुटेड्)—having space between the toes, filled with web, palmate, palmiped. ज्याच्या पायांचीं बोटें कातडीनें जोडलेलीं आहेत असा.

Wĕd, *v. t. & i.* (वेड्)—to marry; (*fig.*) unite (a quality) to another. लग्न करणें, (परस्परविरोधी गुण) एकत्र करणें.

Wĕd'dĕd, *a.* (वे'डेड्)—married; firmly attached *to* a pursuit; joined. वैवाहिक, विवाहित; एकजीव झालेला; जोडलेला.

Wĕdd'ing, *n.* (वे'डिंग्)—a marriage ceremony. लग्नसमारंभ. *W. ring.* लग्नांत वरानें वधूला दिलेली आंगठी.

Wĕdge, *n.* (वेज्)—a piece of wood or metal sharp at one end and gradually growing thicker. पाचर, पाचेरू. *v. t.* to split with *w.*; fasten by use of *w.*; thrust or pack (*in*) tightly between other things or persons; push off or away. पाचर मारून फोडणें; पाचर मारून घट्ट करणें,-सांधणें; मध्यें खेंचून भरणें; पाचेरूप्रमाणें दूर सारणें. *Thin end of the w.,* change, measure etc. that will lead to further changes or developments and is of more importance than it seems. cf. चंचुप्रवेशे मुसलप्रवेशः, एकदां घोडशिरकाव झाला कीं पाचरीप्रमाणें अधिक वाव मिळविणारी वस्तु. *W. shaped,* पाचरीच्या आकाराची.

Wĕd'lŏck, *n.* (वे'ड्-लॉक्)—the married state. विवाहसंबंध, वैवाहिक स्थिति. *Born in lawful w.,* legitimately, of married parents. कायदेशीर लग्न झालेल्या आईबापांपासून जन्मलेला, औरस.

Wĕdnes'day, *n.* (वे'न्झ्डे)—fourth day of the week. बुधवार.

Wee, *a.* (वी)—(chiefly in nursery or Sc. use) little, very small. अतिशय लहान, छकुला.

Weed, *n.* (वीड्)—a wild herb growing where it is not wanted, a useless plant; *the w.,* tobacco; a lanky & weakly horse or person. निरुपयोगी झाड, रान; तंबाखू; किडकिडीत घोडा,-मनुष्य. *v. t.* to clear (ground) of *ww.*; sort *out,* rid of inferior members. भांगलणें, वेचणें, रान-गवत-काढणें; निवडणें, चाळणें. *W. grown,* weedy. रान माजलेला, गवताळ. *W. less, a., W. er, n.*

Weeds, *n. pl.* (वीड्झ्)—the mourning apparel or dress worn by a widow. विधवेचीं सुतकी वस्त्रें.

Weed'y̆, *a.* (वी'डि)—abounding with weeds, full of weeds; lanky and weak. रानानें भरलेला; अशक्त.-*diness, n.*

Week, *n.* (वीक्)—any period of seven days; the six days between Sundays. आठवडा, सप्ताह, कामाचे सहा दिवस,-चा आठवडा. *Today w.,* 7 days hence. आजपासून सात दिवशीं. *W. day,* रविवार सोडून कोणताहि (कामाचा) दिवस. *W. end,* शनिवार दुपारनंतरपासून रविवार व सोमवार सकाळ हा आठवड्याच्या शेवटचे सुट्टीचा दिवस, सप्ताहशेष; *v. i.* अशा सुटींत बाहेर जाणें;-*er, n.*

Week'ly̆, *a., adv. & n.* (वी'क्-लि)—issued only once a week; of a week. आठवड्यांतून एकदां, आठवड्याचा; साप्ताहिक (वर्तमान) पत्र.

Ween, *v. t.* (वीन्)—to be of opinion, expect to (get etc.). ला वाटणें, कल्पना असणें, उमेद असणें.

Weep, *v. t. & i.* (वीप्)—(*wept*) to shed tears *for* from either sorrow or joy; lament for; send forth in drops, sweat, drip. अश्रु ढाळणें; शोक करणें; थेंब थेंब गळणें, झिरपणें, पाझरणें. *To w. out,* रडत रडत सांगणें. *To w. oneself out,* पोटभर रडणें. *To w. away,* रडून वेळ काढणें,-घालवणें. *W.-er, n.* रडणारा, शोक करणारा; भाडोत्री रडणारा.

Weev'er, *n.* (वी'व्हर्)—kinds of fish with sharp dorsal spines. तीक्ष्ण टोकांच्या पृष्ठरज्जूचे मासे.

Weev'il, *n.* (वी'व्हिल्)—destructive granary-beetle. टोंका.-*billed,-billy, aa.*

Weft, *n.* (वेफ्ट्)—cross-threads of a web, the woof of cloth; web. जाळयाचा ताणा, कापडाची वीण; विणीव वस्तु.

Weigh, *v. t. & i.* (वे)—to find the weight of; compare merits of; be of specified weight or importance; have influence. वजन करणें; तुलना करणें; महत्त्वाचा वाटणें; वजन असणें. *n.* process or occasion of weighing. तोलणें, वजन. *To weigh anchor,* to raise or lift up anchor to start voyage. नांगर उचलणें. *To w. out,* तोलून घेणें,-देणें. *To w. in with,* ऐटींत पुढें मांडणें,-करणें. *To w. upon,* ओझें-भार-असणें, (ओझ्याखालीं) दडपून जाणें. *W. age,* तोलणावळ. *W. beam,* वजन-करण्याची दांडी. *W. bridge,* गाडीघोडा वजन करण्याचा कांटा. *W. er,* तोलणारा. *W. ing,* तोलणे, तोल. *W. ing machine,* वजन करण्याचा कांटा. *W. ment,* तोल, वजन.

Weight, *n.* (वेट्)—gravity as a property of bodies; a body of known weight for use in weighing; a load or burden; influence; importance. भार, गुरुत्व, दडपण; माप; ओझें; वजन; महत्त्व. *v. t.* to attach a *w.* to; impede or burden with load (lit. & fig.); treat (fabric) with mineral etc. वजन लावणें; वजन ठेवणें, घालणें, दडपणें; (खळ लावून कापड) जड करणें. *W.y, a.* वजनदार, जड, भारी; महत्त्वाचें; पोक्त, विचारणीय, भारदस्त, अधिकृत. *W.-ily. adv., W. yness, n., W. less, a.* हलका.

Weir, Wear, *n.* (विअर्)—a river-dam; an enclosure of stakes etc. set in stream as a trap for fish. नदीचा बंधारा, बांध, धरण; (मासे पागण्यासाठीं प्रवाहांत खुंटे रोवून केलेला) पायगीर, चोकशी.

Weird, *a.* (विअर्ड्)—fate, one's destiny. दैव. *a.* connected with fate; unearthly, supernatural; (colloq.) queer, odd. दैवासंबंधीचा, चेटकी, पारलौकिक, अगाद्युप; विलक्षण, चमत्कारिक.-*ly, adv., -ness, n.*

Weis'mannism, *n.* (व्हि'इमनिझम्)—a theory of heredity, which denies transmission of acquired characters. कमावलेले स्वभावगुण पुढील पिढींत उतरत नाहीं असा आनुवंशिकतेचा सिद्धांत. [*Weismann,* German biologist]

Wel'come, *n.* (वे'ल्कम्)—kind or glad reception. स्वागत, आदरातिथ्य. *v. t.* to receive (guest, news, &c.) with apparent pleasure. स्वागत करणें, आनंदानें स्वीकारणें. *a.* received with pleasure; free to use or accept. आनंदानें स्वीकारलेला; अनिर्बन्ध, मोकळा, मुभा असलेला, मुखत्यार. *int.* hail! सुस्वागतम्! या! बसा! *W. ness, n.*

Weld, *v. t. & i.* (वेल्ड्)—to hammer or press (iron, &c.) into unity, unite very closely. सांधणें, जोडणें, एकजीव करणें. *n.* a welded joint. तापवून एकजीव केलेला सांधा.

Weld, *n.* (वेल्ड्)—dyer's-weed. पिंवळा रंग देण्याच्या उपयोगी एक वनस्पति.

Wel'fare, *n.* (वे'ल्फेअर्)—happiness; prosperous or satisfactory condition. कल्याण; सुस्थिति. *W. work,* (कामगारांच्या) हितासाठीं-सुखसोईसाठीं -प्रयत्न, कामगार-हितवर्धक कार्य.

Welk, *v. i.* (वेल्क्)—(arch.) to fade, wither. कोमेजणें, सुकणें.

Wel'kin, *n.* (वे'ल्किन्)—(*poet.*) the sky. आकाश, नभोमंडळ, द्यु, अभ्र.

Well, *n.* (वेल्)—a water-spring; source of knowledge or happiness; space in middle of house from floor to roof containing stairs or lift; railed space for counsel in court; receptacle for ink in inkstand. विहीर, झरा; ज्ञानाचा किंवा सुखाचा उगम, उगमस्थान; जिन्याचा किंवा पाळण्याचा (लिफ्टचा) विहिरीसारखा रस्ता, -मार्ग; वकील बसण्याची कठड्याची जागा; शाईचें घर,-दौत. *v. i.* to gush out. जोरानें बाहेर येणें, झरा लागणें, पाणी लागणें,-वाहणें. *adv.* in a satisfactory or praiseworthy manner; probably or reasonably. चांगल्या रीतीनें; यथायोग्य. *a.* in good health; in satisfactory state. बरा, निरोगी; सुस्थितींत. *n.* good things; what is satisfactory. बरें, भलें; कल्याण, हित. *int.* बरें! *To come off w.,* have good luck. यशस्वी होणें. *W. done!* शाबास! बहार केली. *W. played,* शाबास, चांगलें खेळलां. *As w.,* तितक्याच सुकरतेनें, सुद्धां. *He is well off,* (*pred. use*) तो सुस्थितींत आहे. *Well-off people,* (*attrib. use*) ते सुखवस्तु-खाऊन पिऊन सुखी-लोक आहेत.

Welladay',-away', *int.* (वेलअडे',-अवे')—(of grief). अरेरे! हाय हाय!

Well'-being, *n.* (वे'ल्-बीइंग्)—welfare. कल्याण, सुस्थिति.

Well'-bred, *a.* (वे'ल्-ब्रेड्)—refined, of good manners; (of horse, &c.) of pure stock. सुसंस्कृत, सभ्य; सुवंशज.

Well'nigh, *adv.* (वे'ल्-नाइ्)—almost. जवळजवळ.

Well'-to-do, *a.* (वे'ल्-टुडु)—prosperous. सम्पन्न, सुस्थितींत.

Welsh, *a. & n.* (वेल्श्)—(language, the people) of Wales. वेल्स देशाचा,-परगण्यांतला (रहिवासी, लोक, भाषा).-*man,-woman,* वेल्सचा रहिवासी (पुरुष, स्त्री)

Welsh, Welch, *v. t. & i.* (वेल्श्)—to decamp without paying. पैजेची रक्कम न देतां पळून जाणें. *-er, n.*

Welt, *n.* (वेल्ट्)—a strip of leather between the upper and the sole. (बुटाच्या) तळव्याच्या पट्टेचा कांठ, घडी. *v.t.* कांठ पाडणें; फटके मारणें, चाबकानें मारणें.

Welt, *n.* (व्हेल्ट्)—world. जग, विश्व, [German]

Wel'ter, *v. t.* (वे'ल्टर्)—to wallow; roll in water or mire; be in a confused state. लोळणें; पाण्यांत, रक्तांत, किंवा चिखलांत मारवणें,-लोळणें; गोंधळलेल्या स्थितींत असणें, गोंधळणें. *n.* confusion (*of*). गोंधळ, घोंटाळा, गडबड. *2. n.* a heavy rider. वजनशीर -जड अंगाचा-घोडेस्वार; (colloq.) a heavy blow; a big person or thing. जोरदार तडाखा; मोठा वजनशीर इसम,-वस्तु.

Wen, *n.* (वेन्)—a tumour; (*fig.*) abnormally large or congested city. तीळ, वाळूक, आवाळूं; अतिशय मोठें लोकवस्तीचें शहर.

Wench, *n.* (वेन्च्)—a girl or young woman (usu. depreciatory); a lass. चोंडी, घोडनवरी, तरुण स्त्री; कुमारिका, मुलगी. *v. t.* to whore. रंडीबाजी करणें.

Wend, *v. t. & i.* (वेन्ड्)—to direct (one's way); (*arch.*) go. मार्गाला लागणें; जाणें, (रस्ता) सुधारणें, धरणें, चालूं लागणें.

Went, *n.* (वेन्ट)—*pa. t. of* Go. गेला,-ली-लें इ.

Wen'tletrap, *n.* (वे'न्टल्ट्रॅप्)—a shell-fish. एक जातीचा कालव-मासा.

Wept, *v.* (वेप्ट्)—*pa. t.* of Weep. रडला.

Were, *v.* (वेअर्)—*pa. t.* of Be (*pl.*). होते-त्या-तीं.

Were'wolf, Wer'wolf, *n.* (वे'अर्वुल्फ्)—a human being turned into wolf. माणसाचा लांडगा झालेला.

Wert, *v.* (वर्ट्)—*pa. t.* 2nd sing. of Be. (तूं) होतास.

West, *n.* (वेस्ट्)—the point of horizon where the sun goes down. पश्चिम दिशा. *adv.* to the west. पश्चिमेकडे. *a.* पश्चिम, पश्चिमेकडला. *Wes'tering*, *a. & part.* tending towards the west (of sun). पश्चिमेकडे कललेला. *Wes'terly*, *a. & adv.* पश्चिम, पश्चिमेकडचा. *Wes'tward*, *adv*, *n. & a.*,-*s*, *adv. & n.*

Wes'tern, *a.* (वे'स्टर्न्)—of or in the west. पश्चिमेकडील.-*er*, *n.* पाश्चिमात्य (मनुष्य), पाश्चात्य देशीय. *W. most*, *a.* अगदीं पश्चिमेकडचा.

Wes'ting, *n.* (वे'स्टिंग्)—westward progress or deviation (in sailing). पश्चिमेकडे जाणें, झुकणें, कलणें.

Wes'tminster, *n.* (वे'स्ट्मिन्स्टर्)—city forming part of London; (the Houses of) Parliament, the political arena. लंडनचा एक विभाग; पार्लमेंट (सभागृहें), राजकारणी आखाडा.

Wet, *a.* (वेट्)—soaked, covered or supplied with water or other liquid; rainy; (U. S.) not prohibiting use of alcohol. ओला, भिजलेला, आर्द्र, दलदलीचा; पावसाळी; दारूबंदी नसलेला,-न करणारा. *v. t.* to make wet; moisten. भिजविणें, ओला करणें. *n.* moisture, rainy weather; (*sl.*) a drink; (U. S.) opponent of prohibition. ओलावा, ओल, पावसाळी हवा; पेय, मद्य, मद्यपानबंदीचा विरोधक. *To be w. to the skin*, with clothes soaked through. कपडे पूर्ण भिजणें, ओलाचिंब होणें. *W. bargain*, (दारू पिऊन पुरा केलेला) ओला सौदा. *W. dock*, पाणी असलेली गोदी. *W. ness*, *n.* ओलेपणा, ओलावा, आर्द्रता. *Wet'tish*, *a.*, *Wetting*, *n.*

Weth'er, *n.* (वे'दर्)—a castrated ram. खच्ची केलेला मेंढा.

Wet'-nurse, *n.* (वे'ट्-नर्स्)—a woman who suckles another's child. (दुसऱ्यांच्या मुलांना अंगावर पाजणारी) दाई.

Whack, *v. t.* (वॅक्)—to strike heavily, thwack; (*sl.*) distribute. जोरानें मारणें, बडवणें, ठोक देणें; आपापसांत वाटणें,-वाटून घेणें. *n.* रपाटा, रट्टा; विभाग, वाटणी, वांटा.-*ing*, *n.* मार.

Wha'cker, *n.* (वॅ'कर्)—a thing or person big of its kind. त्यांतल्या त्यांत मोठा इसम, मोठी वस्तु. *Wha'cking*, *a.* (*sl.*) त्यांतल्या त्यांत मोठें.

Whale, *n.* (व्हेल्)—a large fish-like marine mammal. देवमासा, तिमि. *v. i.* देवमासे पकडणें.-*r*, *n.* देवमासे पकडणारी बोट,- मनुष्य, कोळी.

Whang, *v. t. & i.* (वॅंग्)—to strike heavily and loudly. जोरानें वाजवणें,-वाजणें. *n.* जोराचा आवाज, -तडाखा.

Wharf, *n.* (वॉर्फ्)—platform to which ships or barges may be moored to load and unload. बोटींचा धक्का, बंदर धक्का. *v. t.* धक्क्याजवळ जहाज खुंटवणें, धक्क्यावर माल उतरून घेणें.-*inger*, *n.* wharf-owner धक्क्याचा मालक.

Wharf'age, *n.* (वॉर्फिज्)—wharf accommodation; wharf dues or charge. धक्क्यावरील जागा; धक्काभाडें.

What, *a.* (वॉट्)—asking for selection from indefinite number; how great or strange? कोणता, कसला, काय, किती; केवढा? किती मोठा? *pron.* (*interrog.*) what thing or person? (*exclam.*) what an amount! how much! (*rel.*) that or those which. कोणता? किती, केवढा, मोठा! जो-तो, जो काय, जी-जें-काय. *W. is he? w.* is his occupation? त्याचा धंदा-उद्योग काय? तो काय करतो? *W. for*? कशाकरतां? *W. though we are poor? w.* does it matter... आम्हीं गरीब असलों म्हणून काय झालें? *W. not*, आणि अशाच इतर गोष्टी, इत्यादि, कांहींहि; *n.* सटरफटर सामान ठेवण्याचें कपाट,-ची मांडणी. *I know w.*, I have a new idea. मला नवीन कल्पना सुचते. *I'll tell you w.*,-the truth or right course is. खरें किंवा काय करायचें तें मी सांगतों. *To know w.'s w.*, बरें कोणतें व वाईट कोणतें हें समजणें. *Come w. will, come w. may*, in spite of any result. होईल तें होवो! कांहींहि होवो. *W. so*, whatsoever. जें जें कांहीं.

What'ever, Whate'er, *pron.* (वॉटेव्हर्, वॉटेअर्)—(poet.) all that. जो, जें कांहीं, जो काय, काय जो.

Whaup, *n.* (वॉप्)—curlew. (Sc.) लांब निमुळत्या वक्र चोंचीचा पक्षी.

Wheat, *n.* (व्हीट्)—the grain of kinds of corn. गहूं, गोधूम.-*en*, *a.* गव्हाचा, कणकेचा.

Wheat'ear, *n.* (व्हीट्इअर्)—a small bird. एक लहान पक्षी.

Whee'dle, *v. t.* (व्ही'टल्)—to fool by flattery; get (a thing) *out of* by wheedling. फुसलावणें; फुसलावून मिळवणें, गोड बोलून काम साधणें.-*r*, *n.*,-*ling*,-*a.*,-*lingly*, *adv.*

Wheel, *n.* (व्हील)—a circular spoked frame revolving on an axis. चाक, चक्र, चक्कर. *v. t.* & *i.* to push or pull along, change direction, face another way (*round*); go in circles, ride on bicycle. ढकलणें, ओढणें; दिशा बदलणें, (तोंड) फिरविणें; गिरकी मारणें, फेराने नाचणें,-जाणें, वाटोळें फिरणें; दुचाकीवर बसणें. *Balance w.*, घड्याळाचा वाल, घड्याळांतील कॅस. *Cog w.*, दांते असलेलें चक्कर. *Driving w.*, चालक चक्कर. *Fly w.*, इंजिनचें चक्र. *Helical w.*, वांकड्या दांत्यांचें चक्र. *Paddle w.*, आगबोटीचा पंखा. *Potter's w.*, कुंभाराचें चाक. *Ratchet w.*, कुत्रेवालें चक्कर. *Spinning w.*, कांतण्याचा रहाट, चरखा. *Steering w.*, सुकाणू (चें चाक). *Toothed w.*, दंतुर चक्र. *Wheels within wheels*, intricate machinery, indirect or secret agencies. गुंतागुंतीची यंत्ररचना; आंतल्या आंत घोटाळे, गुप्त भानगडी. *The ww. of life*, जीवनोपयोगी क्रिया. *Fortune's w.*, दैवाचें रहाटगाडगें. *W. and axle*, चांक आणि आंस. *W. of life*, अनेक निरनिराळीं चित्रें एकजिनसी-सलग-दाखविणारें शास्त्रीय खेळणें. *W. chair*, (अजाऱ्यांकरितां) चाकांची खुर्ची. *W. horse*, चाकाजवळचा घोडा. *W. house*, steerman's shelter. सुकाणूवाल्याची खोली. *W. man*, cyclist. सायकलस्वार. *W. wright*, चक्रें-चाकें-करणारा.-*wheeled*, *w. less*, *aa. Wheeler*, *n.* फिरविणारा, फिरणारा; चांकाजवळचा घोडा; चाक बनविणारा (घिसाडी).

Wheel'bărrow, *n.* (व्हील्-बॅरो)—a box on two legs and a wheel with handles for pushing. लहान ओझीं नेण्याकरितां एकचाकी हातगाडी.

Wheeze, *v. i.* (व्हीझ्)—to breathe with audible friction, breathe hard. घसा वाजणें, घरघरणें. *n.* घरघर, सूंर्दू; नटाचा आगंतुक विनोद, चुटका इ० *W. out*, घसा घरघरवून बोलणें.-*zy*, *a.*,-*zily*, *adv.*, -*ziness*, *n.*

Whĕlk, *n.* (व्हेल्क)—kind of mollusc. (गोगलगाईसारखा) सामुद्रिक प्राणी, काल्व. 2. a pimple. उटंगळ, पुटकुळी.-*ed*, *a.* 3. चाबकाचा वळ.

Whĕlm, *v. t.* (व्हेल्म्)—to engulf, overwhelm, swallow up, ruin. निमग्न करणें, ग्रासणें, नाश करणें.

Whĕlp, *n.* (व्हेल्प्)—a pup or cub; an ill-bred child or youth. पिलूं, बच्चा; रीतभात नसलेलें मूल,-मनुष्य. *v. i.* & *t.* पिलें घालणें, विणें, पोरें काढणें; (दुष्ट कल्पना) डोक्यांतून काढणें.

Whĕn, *adv.* (व्हेन्)—(*interrog.*) at what time? केव्हां? *conj.* at the time that; upon which. जेव्हां, ज्यावेळीं. *pron.* (*interrog.*) what time? (*rel.*) which time. कोणत्या वेळीं? ज्यावेळीं, ज्या समयीं, जेव्हां, जो वेळ. *n.* time, date, occasion. वेळ, काळ, तारीख, दिनांक, प्रसंग, समय.

Whĕnce, *adv.* (वेन्स्)—from what place or source? from what things? wherefore. कोठून, कोणीकडून; कोणापासून; म्हणून करतां. *interrog. pron.* what place. कोणतें स्थळ,-ठिकाण. *rel. pron.* which place. जें स्थळ,-ठिकाण. *n.* source. मूळ (ठिकाण), उगम.

Whĕn'ĕver, *adv.* (व्हेनेव्ह्र) **Whene'er**, (*poet.*) (व्हेनेअर्) **Whensoev'er**, (व्हेन्सोएव्ह्र)—at whatever time; every time that. कोणत्याहि वेळीं, केव्हांहि; जेव्हां जेव्हां, प्रत्येक वेळीं.

Where, *adv.* (वेअर्)—in or to what place; in what direction, at what part, in what respect, in which. कोठे. कोणत्या स्थळीं,-जागीं, कोणत्या दिशेला, कोणत्या स्थळाकडे, कोणत्या बाबतींत, जेथें, ज्या दिशेला, जिकडे. *conj.* and there. आणि तेथें. *n.* place of something. ठिकाण, स्थान, स्थळ. *pron.* (*interrog.*) कोणतें स्थळ, -ठिकाण; (*relat.*) जें ठिकाण,-स्थळ. *W. about*, -*s*, *adv.* (जवळपास) कोठें, कोठेंसा. *W. from adv.* कोठून,

Where'abouts, *n.* (वे'अर्-अबाउट्स)—person's or thing's locality roughly defined. साधारण-अंदाजी -ठिकाण.

Whereăs', *conj.* (वेअर्-ॲज़)—taking into consideration the fact that. ज्या अर्थी, असें आहे तर.

Whereat', *adv.* (वेअरॲट्)—at which (*relat.*)? at what (*interrog.*). ज्यावर, त्यावर, ज्यानंतर, कशामुळें?

Wherebȳ', *adv.* (वेअर्-बा'इ)—by which. जेणेंकरून.

Where'ver, *adv.* (वे'अरेव्ह्र)—at whatever place, *Wheresoev'er.* जेथें जेथें, ज्या स्थळीं,-ठिकाणीं.

Where'fore, *adv.* & *conj.* (वे'अर्-फोर्)—for what reason? on account of which; consequently. कां, कारण, कोणत्या कारणाकरितां? ज्या कारणास्तव; या कारणास्तव.

Where'in, *adv.* (वे'अर्-इन्)—in which. ज्याठिकाणीं.

Where'ŭpŏn, *adv.* (वे'अर्-अपॉन्)—after which; and thereupon. ज्याच्यानंतर; आणि त्यावर.

Wherewith', *adv.* (वेअर्विथ्)—with which. ज्यानें; कशानें, कोणत्या साधनानें.-*al*, *n.* साधन (पैसा इ.)

Whĕ'rrȳ, *n.* (व्हे'रि)—a light boat. तर, होडी.

Whĕt, *v. t.* (व्हेट्)—to sharpen; stimulate. पाजळणें, धार लावणें, प्रदीप्त करणें; उत्तेजित करणें. *n.* पाजळणें, प्रदीपन

Whĕth'er, *pron.* (व्हे'दर्)—(*interrog.*) which of the two. दोहोंपैकीं कोणता? (used with *or*).

Whĕt'stōne, *n.* (व्हे'ट्-स्टोन्)—a stone for tool-sharpening; thing that sharpens the wits. धार लावण्याची सहाण, दगड, निसणा; बुद्धि तरतरीत-उत्तेजित-करणारी गोष्ट.

Whey, *n.* (वे)—the liquid left when milk forms curds. दह्यातलें पाणी, दह्याची निवळी. *W. faced*, (*arch.*) pale (with fear). (भयानें) फिक्कट चेहऱ्याचा, घाबरलेला.

Which, *a.* (विच्)—(*interrog.*) asking for selection from limited or known alternatives ; (*rel.*) and or but or though this or these. कोणता ? जो, जी, जें. *pron.* (*interrog.*) कोणता, कोण ; (*relat.*) जो, जी, जें.

Whichev'er, Which-soev'er, *n.* (व्हिच्-एव्हर्, व्हिच्-सोएव्हर्)—the one or the ones out of limited or known number. जो कोणता ; कोणताहि, जो जो.

Whi'dah-bird, *n.* (वि'डाबर्ड)—a small W.-African bird. प० आफ्रिकेंतील एक लहान पक्षी.

Whiff, *n.* (विफ्)—puff of air etc. ; a small cigar ; a sculling boat. झुळूक, भपकारा, झुरका, दम ; विडी ; लहान होडी,-पडाव. *v. i. & t.* दम सोडणें, झुरका मारणें. 2 a kind of flat-fish. एक चपटा मासा. 3 *v. i.* पाण्याच्या पृष्ठभागाजवळच गरीनें मासे पकडणें.

Whiffle, *v. i. & t.* (विफल्)—(of wind) to blow lightly, shift about (ship) ; flicker, flutter ; make a sound of a light wind in breathing. वारा झुळुझुळु वाहणें, (गलबत) इकडे तिकडे वळविणें (वाऱ्यानें) ; (ज्वाळा इ०) हालणें, हेलकावे खाणें, डुलणें. *n.* वाऱ्याची झुळूक.

Whig, *n. & a.* (विग्)—(a member) of a political party (opp. to Tory). उदारमतवादी.

While, *n.* (वाइल्)—space of (short) time. (थोडा) वेळ, काळ. *v. t.* (with *away*) to cause to pass. कसातरी घालविणें, कालक्रमण (णा) करणें, चैनींत वेळ घालविणें. *adv.* during which. जोंपर्यंत. *conj. whiles* (*arch.*), during the time that, for as long as, at the same time as. तोंपर्यंत. *Worth while,* वेळ खर्चण्याजोगा. *A. w., for a w.,* थोडावेळ, अंमळ. *In a little w.,* soon. लवकर, थोड्या वेळांत. *Once in a w.,* occasionally. अधूनमधून. *Meanwhile,* दरम्यान.

Whil'om, *adv.* (वा'इलम्)—once, formerly (arch.). पूर्वी ; एके काळीं. *a.* quondam. माजी, पूर्वीचा.

Whilst, *conj. & n.* (वाइल्स्ट)—See While.

Whim, *n.* (व्हिम्)—a sudden fancy or caprice. लहर, हुक्की, तरंग, वेड.

Whim'brel, *n.* (वि'म्ब्रल्)—kind of curlew. बदकासारखा पक्षी.

Whim'per, *v. i. & n.* (व्हि'म्पर्)—(to make) feeble sound. (मुलाचें, कुत्र्याचें) किरकिरणें, कैंकाटणें. *-er, n.,-ingly, adv.*

Whim'sical, *a.* (व्हि'म्-झिकल्)—full of whims or whimsies ; capricious ; fantastic. लहरी ; तऱ्हेवाईक.*-cal'ity, n.* छांदिष्ट-तऱ्हेवाईक-पणा.*-cally, adv.*

Whim'sy, *n.* (व्हि'म्झि)—a whim, fad. लहर, हुक्की, नाद.

Whin, *n.* (व्हिन्)—gorse, furge, पिंवळ्या फुलांचें कांटेरी झुडूप. *W. chat, n.* एक लहान पक्षी.

Whin, *n.* (व्हिन्)—*W. sill,-stone,* hard sandstone. कठीण खडक, रेवाळ दगड.

Whine, *n. & v. i. & t.* (व्हाइन्)—long-drawn wail ; querulous tone or talk, plaintive noise. (कुत्र्यासारखें) कैंकाटणें, किरकिर, पिरपिर (लावणें), रडगाणें (लावणें, गाणें).*-r, n.,-ningly, adv.*

Whing'er, *n.* (व्हिं'गर्)—a short sword, dirk or long knife. लहान तलवार, मोठा चाकू.

Whinn'y, *n. & v.* (व्हिं'नि)—(to emit) gentle or joyful neigh. सौम्य-आनंदी-खिंकाळणें.

Whip, *n.* (व्हिप्)—a stick with lash attached ; a member of a party who secures the attendance of other members ; a coach-man ; rope-and-pulley hoisting apparatus. चाबूक ; प्रतोद, एखाद्या पक्षाचा मुख्य सभासद ; गाडीवान ; कपीवालें वर उचलण्याचें यंत्र. *v. t. & i.* to apply a whip to, urge on by whipping ; act as a whip to ; fish with fly, beat (eggs) to froth ; outdo. चाबूक मारणें ; (पक्षाचा) प्रतोद होणें ; गळाला माशी लावून मासे पकडणें ; (अंडीं) चेंचणें ; वर ताण करणें. *W. cord,* बारीक पिळाची दोरी. *Whipper-snapper,* लहान मूल; क्षुद्र घमेंडखोर. *To have the w.-hand of,* वर वर्चस्व-ताबा-असणें. सत्ता गाजविणें. *Whip'per, n. Whip'ping, n.*

Whip'pet, *n.* (व्हि'पिट्)—cross-bred dog used for racing ; (Mil.) fast light tank. शर्यतीच्या संकर-मिश्र-बीजाचा कुत्रा ; वेगवान हलका रणगाडा.

Whip'ster, *n.* (व्हि'प्स्टर्)—a small child ; a trifling frivolous person. लहान मुल ; पोरकट माणूस.

Whir, Whirr, *v. i. & t.* (वर्)—(to make) continuous buzzing sound. भरारणें, भर्र आवाज करणें.

Whirl, *v. t. & i.* (व्हर्ल्)—to swing round and round ; convey or go rapidly. गरगर फिरवणें ; जलदीनें नेणें किंवा जाणें. *n.* whirling movement. गिरकांडी, गिरकी ; *W.igig,* *n.* भोंवरा, भिंगरी (खेळणें) ; फेरा, गिरकी ; *W.-igig of time,* change of fortune. दैवाचा-काळाचा-फेरा.

Whirl'pool, *n.* (व्हर्ल्-पूल्)—a circular eddy in the sea, river and the like ; a vortex. पाण्याचा भोवरा.

Whirl'wind, *n.* (व्हर्ल्-विन्ड)—a circular eddy of the wind, a violent whirling wind. वावटळ, चक्रवात.

Whirr, *n. & v. i.* (व्हर्)—continuous buzzing or clicking sound. सुंर्सुं असा आवाज करीत जाणें, सणसणाट.

Whisk, *n.* (व्हिस्क्)—sweeping motion of tail ; beating-up instrument. झटका, झटकारा ; ठोकणें, माथ्या, रवि. *v. t. & i.* to flap *away* or *off.* झटकावणें.

Whis'ker, *n.* (व्हि'स्कर्)—hair of (man's) cheek. कल्ला, मिशा.*-ed, a.* कल्लेदार.

Whisk'y, *n.* (व्हि'स्कि)—a spirit distilled from barley. (जव धान्याची) दारू. 2. kind of light gig or chaise. हलकी जलद चालणारी गाडी.

Whis'per, *v. i. & t.* (व्हि'स्पर्)—to talk in secret or confidential way ; rustle or murmur. कुजबुजणें, कानगोष्ट करणें ; सळसळणें, हळू आवाज करणें. *n.* whispering speech or sound ; rumour of unknown origin ; rustling sound. कुजबूज ; कुणकुण ; सळसळ आवाज. *Whispering gallery,*

एका टोंकाचा हळू आवाज दुसऱ्या टोंकाला ऐकूं येईल अशा रचनेची इमारत, गहा, बोलघुमट. *Whisperer, n.,-pering, n.,- peringly, adv.*

Whist, *n.* (व्हिस्ट्)—a card-game. एक पत्त्यांचा खेळ.

Whist, *a.* (विस्ट्)—silent. गप्प, चूप. *int. whisht.* गप्प! चूप!

Whi'stle, *n.* (व्हि'सल्)—shrill sound made by forcing the breath between nearly closed lips; an instrument made to produce whistle; throat. सुं सूं, भणभण, शीळ; शिटी; घसा. *v. t. & i.* to emit whistle; call by *w.* शीळ घालणें, शिटी वाजवणें; शीळ घालून बोलावणें.*-r, n.*

Whit, *n.* (व्हिट्)—a particle, jot. लेश, अणु, कण. *No, not a, never a w.*, not at all मुळींच नाहीं.

Whit, Whit'sun, *aa.* (विट्, वि'ट् सन्)—*Whit Sunday*, Sunday after Easter. ईस्टरनंतरचा रविवार.

White, *a. & n.* (व्हाइट्)—of the colour of fresh snow or table salt, pale; transparent, colourless; innocent, unstained. पांढरा, सफेत, पांढरा-सफेत. रंग; फिका, पांढरट; शंखासारखा, रंगहीन; निरपराधी, निष्कलंक. *v. t.* पांढरा सफेत करणें,-सफेता देणें. *Whiting, n.* खडूची पूड. *W. as snow,-crystal,* पांढरा, फटफटीत, स्फटिकाप्रमाणें निर्मळ,-पांढरा. *Yellowish w.*, पांडुर. *To set down in black and w.*, पांढऱ्यावर काळें करणें (लिहिणें). *W. ant,* वाळवी, उधई. *W. arsenic,* श्वेत ताल, पांढरा हरताळ. *W. corpuscle,* श्वेत रक्तकण. *W. crow,* दुर्मिळ वस्तु. *W. elephant,* पांढरा हत्ती, खावयाला काळ. *W. ensign,* ब्रिटिश आरमाराचें पांढरें निशाण. *W. flag,* शांततेचें पांढरें निशाण. *W. gum,* पांढरा पुरळ. *W. hall,* लंडनमधील रस्ता, ब्रिटिश सरकारी खात्यांची कचेरी. *W. heat,* श्वेत उष्णता. *W. house,* अमेरिकेंतील सं. संस्थानच्या अध्यक्षांचें सरकारी निवासस्थान. *W. lead,* सफेता. *W. lie,* निरुपद्रवी असत्य भाषण. *W. lipped,* (esp.) with fear. (भीतीनें) ओंठ पांढरे झालेला. *W. magic,* पिशाच्चाच्या साह्यावाचून केलेली जादू, शुक्लतंत्रविद्या. *W. man,* श्वेत (युरोपिअन) मनुष्य, उच्च कुलीन मनुष्य. *The w. man's burden,* the task of leading the world forward. जगाची प्रगति करण्याचें (गोऱ्या लोकांचें) काम, जोखीमदारी. *W. metal,* पांढरी मिश्र धातु. *W. paper,* श्वेतपत्रिका, सरकारी माहितीपत्रक. *W. smith,* कथिलाचें काम करणारा. *-tish,-ly, aa.*

Whi'ten, *v. t. & i.* (व्हा'इ-टन्)—to make or become white; bleach, blanch. पांढरा होणें, सफेत करणें; सफेती देणें.

White'livered, *a.* (व्हा'इट्-लिव्हर्ड)—cowardly. भ्याड, नामर्द.

White'wash, *n.* (व्हा'इट्-वॉश्)—solution of lime or whiting for whitening walls and ceilings. पांढरा रंग, चुना. *v. t.* to apply whitewash to; (*fig.*) to attempt to clear (discredited person) of imputations. पांढरा रंग लावणें; कलंक धुवून टाकण्याचा प्रयत्न करणें.

Whith'er, *adv.* (वि'द्र्)—(*interrog.*) to what place? in what direction? (*rel.*) to which; to the place to which. कोठें? कोणत्या दिशेला? जिकडे; ज्या ठिकाणीं. *n.* destination. जाण्याचें ठिकाण. *W. ward, adv.*

Whith'ersoever, *adv.* (वि'द्रसो-एव्हर्)—to whatever destination. जिकडे पाहिजे तिकडे, ज्या-ज्या ठिकाणीं.

Whit'low, *n.* (व्हि'ट्-लो)—inflamed tumour on a finger, a swelling about the joints of fingers. नखुडें, नखुरडें.

Whit'tle, *n.* (व्हि'टल्)—(*arch.*) butcher's knife. खाटकाचा सुरा. *v. t.* to cut with a knife: (*down, away*) reduce by repeated subtraction. चाकूनें कापणें; (तासून) कमी करणें, उणें-कमी कमी-करणें, (चा परिणाम) कमी करणें.

Whiz', Whizz, *n. & v. i.* (विझ्)—sound made by body cutting the air at great speed. गोंगावणें, सूं करणें, सणसणणें, सरकन् जाणें.

Who, *pron.* (हू)—what person? that. कोण? जो. *W. so,* जो कोणी. *Whosoever,* जो जो.

Whoe'ver, *pron.* (हू-ए'-व्हर्)—any one or every one that; though any one. जो कोणी; कोणीहि. *Whom (so) ever, whoever,* ज्या कोणाला.

Whole, *a.* (होल्)—in uninjured or intact or undiminished state; all that there is of. चांगला, निरोगी, चांगल्या स्थितींत, धड, शाबूत; पुरा, सर्व, सगळा, समग्र. *n.* साकल्य, संपूर्ण वस्तु. *On the w.*, एकंदरीनें पाहतां, मिळून, एकूण.

Whole'hearted, *a.* (हो'ल्-हार्टेड्)—heartily felt or done. मनःपूर्वक, पूर्ण मनापासूनचा, अंतःकरणपूर्वक. *-ly, adv.,-ness, n.*

Whole'sale, *n.* (हो'ल्-सेल्)—(*attrib.*) selling of things in large quantities to be retailed by others. घाऊक विक्री, ठोकबंद.

Whole'some, *a.* (हो'ल्-सम्)—promoting physical or moral health; producing a good effect. शरीराला हितकारक, पथ्यकर; परिणामीं हितकर.*-ly, adv.,-ness. n.*

Who'lly, *adv.* (हो'ल्लि)—entirely or without abatement; exclusively. पूर्णपणें; सर्वस्वी, निखालस.

Whom, *pron.* (हूम्)—obj. case of Who. ज्याला.

Whoop, *int., v. & n.* (हूप्)—hoop. हुप्! हुपें हुप (करणें, करून चिडविणें).

Whop, *v. i.* (व्हॉप्)—to thrash, defeat. झोडपून काढणें, पाडाव करणें.*-pper, n.* (sl.) मोठा नमुना, धडधडीत खोटें. *-pping, a.* अति मोठें.

Whore, *n.* (होअर्)—a prostitute. कुलटा, वेश्या. *v. i.* शिंदळकी करणें; अनैतिक वासना धरणें.*-dom, n., -master,-monger,* रंडीबाज, बाहेरख्याली.

Whorl, *n.* (व्हॉर्ल्)—a ring of leaves round stem; a raised ridge; one turn of spiral. देंठाभोंवतींचें पानांचें कडें; उंच कंगोरा, कडें; आटा.*-ed, a.*

Whose, *pron.* (हूझ्)—poss. case of Who or Which. ज्याचें, ज्यांचें. *Whoso, Whosoever,*

कोणी, जो जो. *Whose-ever, Whose-so-ever,* ज्या कोणाचा.

Why, *adv.* (व्हाइ)—(*interrog.*) for what reason or purpose? (*rel.* after *reason* &c.) for which reason. कां? कोणत्या कारणास्तव? ज्या कारणाकरितां. *int.* ओहो! *n.* reason. कारण, हेतु, उद्देश, प्रयोजन. *Whys, pl. The whys and wherefores,* सर्व कारणें, कारण-परंपरा.

Wick, *n.* (विक्)—a strip or thread feeding the flame of lamp or candle with oil or grease. दिव्याची वात. 2. town, hamlet, district. नगर, खेडें; विभाग.

Wick'ĕd, *a.* (वि'केड्)—sinful, immoral; spiteful, malicious. पापी, अधर्मी, दुष्ट, दुष्ट बुद्धीचा.*-ly, adv., -ness, n.* दुष्टपणा, दुष्कर्म, पाप.

Wick'er, *n.* (वि'कर्)—plaited osiers etc. वेत, गवत. *a.* वेताचें, गवती विणीचें. *W. work,* टाहाळ्यांचें-शेरणीचें -काम (टोपल्या, खुर्च्या, चटया इ.). *-ed, a.*

Wick'ĕt, *n.* (वि'केट्)—a small door or gate; turnstile entrance; (*Crick.*) three upright rods *i. e.* three stumps with bails on position. लहान दरवाजा किंवा फाटक; फिरकीचें द्वार; क्रिकेटमधील स्टम्प्स.-दांडी, यष्टि. *W. keeper, n.* यष्टिरक्षक. *Be w. keeper, to keep w.,* यष्टिरक्षण करणें. *To keep* one's *w. up,* succeed in not being put out. (क्रिकेट खेळांत) बाद न होणें. *Five ww. down,* पांच गडी बाद. *Match won by two ww.,* दोन गडी खेळायचे राहून डाव जिंकला. *A good, perfect, w.,* क्रिकेटचें सुस्थितींतलें क्षेत्र. *W. door,-gate,* दिंडी (दरवाजा).

Wide, *a.* (वाइड्)—having sides far apart, broad; open to full extent. रुंद, पसरट; विस्तृत. *adv.* with wide interval or opening. प्रशस्तपणानें, विस्तारानें. *n.* a wide ball, its run. दुरून-अंतरावरून-जाणारा चेंडू, त्याची एक धांव. *W. awake,* पूर्ण जागृत. *W.-awake, a.* कावेबाज, धूर्त; *n.* रुंद कडांची मऊ हॅट. *W., W. ball,* फलंदाजच्या आटोक्याबाहेर-मर्यादेबाहेर फेंकलेला चेंडू. *The w. world,* अफाट विस्तीर्ण जग. विशाल विश्व. *To give w. berth to,* keep clear of, avoid. दूर टाकणें, टाळणें. *W. ly, adv., Widen, v. Widish, a.*

Wid'geon, *n.* (वि'जन्)—kinds of wild duck. रानटी बदक.

Wid'ow, *n.* (वि'डो)—a woman whose husband is dead. गतभर्तृका, विधवा. *v. t.* to make into a widow or widower; (poet.) bereave. विधवा किंवा विधूर करणें, वैधव्य आणणें, दुःख-शोक-करणें. *-ed, pa. p.* विधवा, विधुर. *-hood, n.* वैधव्यदशा.

Wid'ower, *n.* (वि'डोअर)—a man whose wife is dead. ज्याची बायको मेलेली आहे असा, विधुर.

Width, *n.* (विड्थ्)—distance or measurement from side to side, wideness, breadth. पन्हा, रुंदी, आडी, प्रशस्तपणा.

Wield, *v. t.* (वील्ड्)—to hold and use (power, sword, pen, &c.), sway, exercise. चालवणें, पेलणें, झेंपणें, फिरवणें.

Wife, *n.* (वाइफ्)—(*pl.* wives), a married woman, esp. in relation to her husband. लग्नाची बायको; भार्या, पत्नी.*-hood,-fie,-*(-फि) *nn.,-less, a., -like, -ly, aa.*

Wig, *n.* (विग्)—artificial head of hair. केसांचा टोप. *v. t.* to rebuke sharply. खरडपट्टी काढणें. *Wigging, n.* हजामत, घोडेती.

Wight, *n.* (वाइट्)—a person. इसम, व्यक्ति.

Wig'wam, *n.* (वि'ग्वॅम,-वॉम्)—N. Amer. Indian's tent or hut. (उत्तर अमे.) तंबू, झोंपडी.

Wild, *n.* (वाइल्ड्)—in the original natural state; not domesticated, uncivilized; tempestuous; out of control; intensely excited; rash, ill-aimed, random. मूळ स्थितींतला, रानटी; न माणसाळलेला; न सुधारलेला, ओसाड; वादळी; बेताल; बेफाम; अति रागावलेला. *adv.* निष्काळजीपणानें, वाटेल तसें. *n.* a wild tract. *ओसाड-निर्जन-प्रदेश. W. ing, n. आपोआप* वाढणारें झाड,-त्याचें फळ. *To run w.,* grow unchecked. सैरावैरा धांवणें,-वाढणें, उधळणें, चेवणें. *To drive w.,* madden. वेड लावणें. *Report spreads like w. fire,* बातमी हां हां म्हणतां पसरली. *W. cat,* रानमांजर, (*fig.*) reckless, unsound. अविचाराचें, अस्थिर, चंचल. *W.-ish, a., W. ly,-ness, n.*

Wild'er, *v. t.* (वि'ल्डर्)—to bewilder. गोंधळांत पाडणें.

Wild'erness, *n.* (वि'ल्डर्नेस्)—a desert, a waste; state of being wild or disorderly. ओसाड प्रदेश, जंगल, जंगलीपणा. *Void in the w.,* unregarded advocate of some reform etc. एखादी सुधारणा सुचविणाऱ्याचे शब्द वाऱ्यावर जाणें (कोणींहि न ऐकणें).

Wil'ding, *n.* (वा'इल्डिंग)—a plant sown by natural agency. निसर्गानें बीज पसरून वाढणारें झाड इ.

Wile *n.* (वाइल्)—a stratagem or trick (*usu.* in *pl.*), a sly insidious artifice. कपट, कावा, युक्ती, डाव. *v. t.* फसविणें, फुसलावणें.

Wil'ful, *a.* (वि'ल्-फुल्)—committed intentionally; obstinate, wayward. जाणून-बुजून केलेला; हट्टी, दुराग्रही, अटेल.*-fully, adv.,-fulness.*

Will, *v. aux.* (विल्)—forming compound tenses or moods. भविष्यकाळाचा प्रत्यय. *v. t.* to desire (a thing); intend unconditionally; compel by will; bequeath by a will. इच्छिणें; संकल्प करणें; भाग पाडणें; मृत्युपत्रानें देणें. *n.* fixed intention; control exercised over impulse; person's directions written in legal form for disposition of his property after death. मनोदय, संकल्प; मनोनिग्रह; मृत्युपत्र. *Where there's a w. there's a way.* इच्छा असली कीं मार्ग सांपडतो. *With a w.,* energetically. उत्साहानें, जोमानें. *Thy w. be done,* तुझ्या इच्छेप्रमाणें होवो. *At w.,* मनसोक्त, मर्जीनुरूप. *Tenant at w.,* नोटिशी-सूचने-शिवाय वाटेल तेव्हां काढून टाकतां येणारा भाडेकरी,-भाडेकरी. *Good w.,* मर्जी, कृपा; त्याच नांवादाखीं धंदा करण्याचा हक्क. *-willed, a. Will'less, a. Will-power,* इच्छाशक्ति.

Will'et, *n.* (वि'लेट्)—N.-Amer. snipe. उ. अमे. पाणलावा (पक्षी).

Will'ing, *a.* (वि'लिंग)—not reluctant; cheerfully ready or given. खुशी, राजी; खुशीचा, खुशीनें केलेला. *-ly, adv.,-ness, n.*

Will-o'-the-wisp', *n.* (विल्-ऑ-द्-वि'स्प्)—phosphorescent light seen on marshy ground, an elusive person or thing. रात्रीं दलदलीच्या प्रदेशांत दिसणारें भुताचें कोलीत, आभास, फसवणूक करणारा इतर पदार्थ किंवा वस्तु.

Will'ow, *n.* (वि'लो)—a pliant wooded waterside tree. वाळुंज, वाळुंजीचें झाड. *To handle the w.*, to use a bat. हातांत बॅट धरणें, बॅटनें खेळणें. 2 *v. t. & n., Will'y, n.* clean, machine for willowing. स्वच्छ-साफ-करणें, (करण्याचें यंत्र).

Will'owy, *a.* (वि'लोइ)—lithe and slender, slender and graceful; fringed with willows. लवचिक आणि बारीक; कांठावर वाळुंजीचीं झाडें असलेला (प्रवाह).

Willy-nill'y *adv.* (विलि-नि'लि)—whether one likes it or not. मनांत असो वा नसो, अळेंबळें.

Wilt, *v.* (विल्ट्)—2*nd per. sing. of* Will.

Wilt, *v. t. & i.* (विल्ट्)—to wither, droop. कोमेजणें, मलूल करणें,-होणें.

Wi'ly, *a.* (वा'इलि)—crafty, cunning. कपटी, कावेबाज. *-lily, adv.,-liness, n.*

Win, *v. t. & i.* (विन्)—to gain by victory; persuade, induce to do. जिंकणें, मिळविणें, मिळणें; मन वळवणें. *n.* डावांत जीत, विजय. *To w.* one's *spurs*, सरदारकी मिळविणें; तज्ज्ञ म्हणून मान्यता मिळविणें. *To w.* one's *way*, progress by struggle. नेटानें पुढें सरणें, अडचणींतून मार्ग काढणें. *To w.* one's *bread*, पोटाला मिळविणें. *Bread-winner*, स्वतःचें (व कुटुंबाचें) पोट भरणारा, पोषण करणारा. *To w. over*, आपल्या मताचा करणें,-बाजूचा करणें.

Win'ner, *n.* (वि'नर्)—one who wins, a victor. विजयी.

Win'ning, *a.* (वि'निंग)—adapted to win or gain favour, attractive; charming. आकर्षक, चित्तवेधक; मनोहर.

Wince, *v. i. & n.* (विन्स्)—to show pain by starting, flinch. दचकणें; कचरणें, अंग चोरणें, माघार (घेणें).

Winch, *n.* (विन्च्)—a crank of wheel or axle: a windlass. चाकाची कळ; पवनचक्की.

Wind, *n.* (विन्ड्)—air moving along, esp. with considerable speed; flatulence. वारा, वायु; वात. *v. t.* to sound (bugle, horn) by blowing. फुंकून वाजवणें. *v. i. & t.* (वाइन्ड्) to go in a spiral or curved course; coil, wrap with overlapping; turn or twist in various ways. वांकणें, वळणें; गुंडाळणें; मनाला वाटेल तसें वांकवणें. *To wind* (वाइन्ड्) *up a company*, कंपनीचा कारभार-व्यवहार-आटोपणें, गुंडाळणें. *Trade winds*, व्यापारी वारे. *To find out how the w. blows or lies*, what developments are likely or what is the state of public opinion. (लोकमताचा) वारा कसा वाहतो हें पाहणें. *To get the w. up*, (*sl.*) be frightened. घाबरून जाणें. *To go like the w.*, swiftly. वाऱ्याप्रमाणें जलद जाणें. *There is something in the w.*, कांहीं तरी कुणकुण-गुप्त हालचाल चालू-आहे. *To raise the w.*, (*fig.*) जरूर तेवढा पैसा उभारणें,-काढणें. *To take the w. out of* one's *sail*, वर कुरघोडी करणें, आघाडी साधून (चा) जोर कमी करणें. *To get w. of*, चा वास-सुगावा-लागणें. *W. bag*, पोकळ शब्दावडंबरी वक्ता. *W. bound*, उलट वाऱ्यानें (गति) खुंटलेलें जहाज. *W. cutter*, पिपेऱ्याची जिभाळी. *W. gauge*, वायुवेगमापक यंत्र. *W. swept*, exposed. वाऱ्यावर : उघडा पडलेला. *W. less*, *a.* निर्वात. *W. mill*, *n.* पवनचक्की. *Winding-sheet*, प्रेताला गुंडाळलेलें वस्त्र. *Wind'y, a.*

